श्रीमत् ग्रंथराज दासबोध

ग्रंथप्रवेश

॥ श्रीराम समर्थ ॥

अध्यात्मशास्त्राच्या ग्रंथरचनेच्या आरंभी मंगलाचरण करण्याची सांप्रदायिक रीत आहे. त्यानुसार येथे रामदासस्वामींनी 'नमस्क्रियारूप मंगल' केले आहे. श्रीगणेश, सरस्वती, श्रीगुरू व प्रभू रामचंद्रांना वंदन करून ग्रंथ निर्विघ्नपणे सिद्धीला जावा म्हणून रीतीनुसार आशीर्वाद मागितले आहेत. ग्रंथांच्या शेवटी ज्या जगदीश्वराचे त्यांनी स्मरण केले आहे त्याचेच ग्रंथारंभीही स्मरण करून आपला भाव व्यक्त केला आहे. पुढील समासात तपशीलवार स्तवन करून त्या त्या देवतांविषयीचा वाचकाचा भाव जागा केला आहे. यामध्ये श्रोते व पारमार्थिक सभेतील सभासदांचाही समावेश केला आहे हे विशेष!

'यशः कीर्तिः समज्ञा च स्तवः स्तोत्रं नुतिः स्तुतिः ।'

(अमर १-६-११) या श्लोकात स्तवन या शब्दाची पूर्ण व्याप्ती सांगितली आहे.

यश– दैवताची व्याप्ती, मोठेपणा, पराक्रम इ सांगणे.

कीर्ती– दैवताची कृपाशक्ती व यश भाविकांना सांगणे.

समज्ञा– वाचक किंवा श्रोत्यांना दैवताचे सारखेच ज्ञान करून देणे. सारखेपणाने वर्णन करणे याप्रमाणे श्रीगणेश व सरस्वती ही बुद्धीची दैवते. सर्व दैवतांचे दैवत श्रीगुरू व आराध्य दैवत श्रीराम यांची स्तवने केली आहेत.

स्तवनामुळे साधकाला स्वतःचा अहंकार दूर ठेवण्यास मदत होते. स्वतःचे गुणगान करण्याऐवजी दैवतांचे गुणानुवाद केल्याने 'अहं' विसरण्यास मदत होते. कृतज्ञता हा विकसित बुद्धीच्या मानवाचा खास गुण आहे ज्या दैवतांच्या कृपेने परमार्थ सिद्ध होतो त्यांचेविषयी त्यांच्या स्तवनाने व नमनाने कृतज्ञताही व्यक्त होते.

स्वतः श्रीगुरू असलेल्या समर्थांनी शिष्याची भूमिका स्वीकारून किंवा श्रोत्यांच्या भूमिकेतून प्रश्नोत्तर रूप ग्रंथाला सुरुवात केली आहे. अनेक किंत, संशय, आशंका, आक्षेप, संदेह इत्यादींचे अनेक पदर उलगडून ते दूर केले आहेत. व्यवहारात निश्चयाची जेवढी आवश्यकता आहे त्याहून त्याची अधिक आवश्यकता परमार्थात आहे. पहिल्या समासात पंधरा निश्चय सांगितले आहेत. त्यामुळे श्रीमत् दासबोधात आध्यात्मिक तत्त्वज्ञानाची स्पष्टता व त्यामुळे त्यासंबंधी होणारी निर्णयात्मक भूमिका प्रत्ययाला येते. कोणताही पारमार्थिक ग्रंथ हे मोक्षाचे साधन असते. ग्रंथ साध्य नसतो. ग्रंथातून मोक्षाच्या साधनाची वर्मे वाचकाच्या बुद्धीला स्पष्टपणे उमगली पाहिजेत ती अशी–

१) 'मी' जीव नसून ब्रह्म आहे.

२) कर्म व उपासना ही 'जीव ब्रह्म आहे' असा अनुभव येण्यासाठी अत्यंत उपयुक्त साधने आहेत. ती साध्ये नाहीत.

३) ज्ञानाशिवाय मोक्ष नाही.

४) श्रीगुरुकृपेशिवाय ज्ञान नाही. 'मी ब्रह्म आहे' ह्या अनुभवालाच ज्ञान म्हणतात.

५) दिसणारे जग, प्रपंच व देह मायिक आहेत. त्याविषयी अनासक्त असावे.

६) मायिक जगात मायिक जीवाने ईश्वराच्या आज्ञेनुसार वागून, प्रयत्नांची पराकाष्ठा करून वैभवसंपन्न जीवन जगण्याचा प्रयत्न करावा. जीवन आनंदमय असावे.

७) जीवनाच्या विशिष्ट वळणावर आल्यानंतर त्या वळणाशी सुसंगत जीवन असावे. वानप्रस्थ व संन्यास ह्या

दोन आश्रमांची वळणे जीवनात येतात व ती आली पाहिजेत ह्याचे भान असावे.

८) मोक्ष हाच खरा पुरुषार्थ आहे. धर्म, अर्थ व काम हे त्याला साह्य करतात. न्याय, नीती, कायदा इत्यादिकांचा धर्मातच समावेश असून, केवळ धर्मजीवन हे साध्य नाही. दया, दान, सेवा ह्यांचाही धर्मातच समावेश होतो. तीही साधने आहेत, साध्ये नाहीत. 'मी धार्मिक आहे, मी परोपकारी आहे, मी कर्तव्यदक्ष आहे, मी निःस्पृह आहे, मी पवित्र आहे' : इत्यादी प्रकारे धुमसणारा साधक 'मी ब्रह्म आहे' अशी निष्ठा सांभाळू शकत नाही! परमार्थाच्या सहजावस्थेत ही निष्ठासुद्धा एक अडचणच ठरते!

९) व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र ह्यांचे स्वातंत्र्य, प्रगती व वैभव ह्या सर्वांचा उपयोग मानवाच्या अंतिम कल्याणासाठी म्हणजे मोक्षासाठी असतो ह्याचे भान असावे.

१०) दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणीतून सुटून संपन्न व यशस्वी जीवनासाठी परमार्थाचा उपयोग करावासा वाटणे हा त्या साधकाने केलेला परमार्थाचा पराभव होय.

दशक पहिला : स्तवनाचा

समास पहिला : ग्रंथारंभलक्षण

॥ श्रीरामसमर्थ ॥

श्रोत्याची भूमिका स्वीकारून समर्थ स्वत:च स्वत:च्या ग्रंथाविषयी प्रश्न विचारतात की या ग्रंथाचे स्वरूप काय आहे? त्याचा विषय काय? त्याच्या अभ्यासाचे फळ काय?

श्रोते पुसती कोण ग्रंथ । काय बोलिलें जी येथ । श्रवण केलियानें प्राप्त । काय आहे ।।१।।

'काय बोलिले' या शब्दांनी विषय व 'प्राप्त काय आहे' या शब्दांनी अनुबंधातील प्रयोजन (फळ) यांचा उल्लेख केला आहे. शास्त्राची भाषा न वापरता साधी भाषा वापरण्यास येथूनच सुरुवात झाली आहे. (प्रस्तावना पाहावी) ॥१॥

ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद । येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ।।२।।

स्वत:च्या प्रश्नाला स्वत:च उत्तर देताना समर्थ म्हणतात की, माझा हा दासबोध नावाचा ग्रंथ गुरू व शिष्य यांच्यातील कल्पित संवादरूपाने लिहिला असून त्यात भक्तिमार्गाचे सुस्पष्ट विवेचन आहे. ॥२॥

नवविधा भक्ति आणि ज्ञान । बोलिले वैराग्याचे लक्षण । बहुधा अध्यात्मनिरुपण । निरोपिले ।।३।।

भक्तीचे नऊ प्रकार, प्रपंच, ज्ञान व वैराग्य यांचा बराच विचार केला असला तरी प्रामुख्याने अध्यात्माचाच विचार व स्पष्टीकरण केले आहे. ॥३॥

भक्तिचेनि योगें देव । निश्चयें पावती मानव । ऐसा आहे अभिप्राव । इये ग्रंथीं ।।४।।

अधिकारसंपन्न होऊन भक्ती या साधनाने माणसाला 'आत्मरूप देव मी आहे' असा निश्चितपणे अनुभव येईल हे या ग्रंथाचे तात्पर्य आहे. ॥४॥

मुख्य भक्तीचा निश्चयो । शुद्ध ज्ञानाचा निश्चयो । आत्मस्थितीचा निश्चयो । बोलिला असे ।।५।।

आत्मनिवेदन या मुख्य भक्तीचे खरे स्वरूप, निर्विशेष व निर्विषय ज्ञान कसे असते व ज्याला हे ज्ञान झाले आहे त्याची अवस्था किंवा स्थिती कशी असते यांचे निश्चयात्मक वर्णन या ग्रंथात केले आहे. ॥५॥

शुद्ध उपदेशाचा निश्चयो । सायोज्यमुक्तीचा निश्चयो । मोक्षप्राप्तीचा निश्चयो । बोलिला असे ।।६।।

'जीव ब्रह्म आहे' हाच शुद्ध उपदेश, जीवन्मुक्ती हीच खरी मुक्ती व मोक्ष म्हणजे नेमके काय यासंबंधी स्पष्टीकरण केले आहे. ॥६॥

शुद्ध स्वरूपाचा निश्चयो । विदेहस्थितीचा निश्चयो । अलिप्तपणाचा निश्चयो । बोलिला असे ।।७।।

ब्रह्म या विमल तत्त्वाचे स्वरूप, ब्रह्मज्ञान झाल्याने 'मी देह आहे' ही भूमिका जाऊन 'मी देहाचा प्रकाशक आहे' असा बोध झालेली अवस्था व आत्मरूप 'मी'चा देह व दृश्य जगताशी असलेला कल्पित संबंध कमलपत्र व त्यावरील पाण्याप्रमाणे कसा असतो, याचे स्पष्ट विवेचन आहे. ॥७॥

मुख्य देवाचा निश्चयो । मुख्य भक्ताचा निश्चयो । जीवशिवाचा निश्चयो । बोलिला असे ।।८।।

ब्रह्मरूप देव, त्याच्याशी विभक्त नसलेला भक्त, ईश्वर व जीव यांचेसंबंधी निश्चयात्मक वर्णन केले आहे. ॥८॥

मुख्य ब्रह्माचा निश्चयो । नाना मतांचा निश्चयो । आपण कोण हा निश्चयो । बोलिला असे ।।९।।

चौदा ब्रह्मांपैकी खरे ब्रह्म कोणते, जीव, ईश्वर, जगत् व ब्रह्म यांच्या स्वरूपासंबंधी असलेला अनेक मतांचा

ऊहापोह व 'मी'चे खरे स्वरूप काय आहे याचे निर्णयात्मक वर्णन या ग्रंथात केलेले सापडेल. ॥९॥

मुख्य उपासनालक्षण । नाना कवित्वलक्षण । नाना चातुर्यलक्षण । बोलिलें असे ।।१०।।

उपासनेची मुख्य लक्षणे कोणती, काव्य किती प्रकारांनी केले जाते व चातुर्याची विविध लक्षणे कशी असतात त्यांचे वर्णन केले आहे. ॥१०॥

मायोद्भवाचें लक्षण । पंचभूतांचें लक्षण । कर्ता कोण हें लक्षण । बोलिलें असे ।।११।।

'माया' या तत्त्वापासून निर्माण झालेल्या दृष्य जगताचे लक्षण, पंचमहाभूतांचे स्वरूप व खरा कर्ता कोण आहे यासंबंधी स्पष्टीकरण केले आहे. ॥११॥

नाना किंत निवारिले । नाना संशयो छेदिले । नाना आशंका फेडिले । नाना प्रश्न ।।१२।।

किंतु, संशय व आशंका या तीन शब्दांचा शंका हा एकच अर्थ आहे. व्यवहार, धर्म व परमार्थ यासंबंधी निर्माण होणारे प्रश्न व त्यासंबंधी निर्माण होणाऱ्या शंकांची उत्तरे दिली आहेत. ॥१२॥

ऐसें बहुधा निरोपिलें । ग्रंथगर्भी जें बोलिलें । तें अवघें चि अनुवादलें । न वचे किं कदा ।।१३।।

ग्रंथाचे संपूर्ण अंतरंग प्रस्तावनेच्या मर्यादेत तपशीलाने सांगणे शक्य नाही. पण जे प्रामुख्याने सांगितले आहे त्याचा उल्लेख केला आहे. ॥१३॥

तथापि अवघा दासबोध । दशक फोडून केला विशद । जे जे दशकींचा अनुवाद । ते ते दशकीं बोलिला ।।१४।।

परंतु एवढे नक्की की दासबोधाची वीस दशकांत वाटणी केली असून, त्या त्या दशकात त्या त्या विषयांची मांडणी केली आहे. ती विस्तृत होईल अशी काळजी घेतली आहे. ॥१४॥

नाना ग्रंथांच्या समती । उपनिषदे वेदांत श्रुती । आणि मुख्य आत्मप्रचीती । शास्त्रेंसहित ।।१५।।

दासबोधाची रचना करताना अनेक संबंधित ग्रंथांचा आधार घेतला असून, त्यात प्रत्येक वेदाच्या शेवटी येणाऱ्या उपनिषदांचा किंवा श्रुतिवाक्यांचा मुख्यत्वाने समावेश आहे. शिवाय अन्य प्रकरण ग्रंथ व प्रक्रिया ग्रंथांचाही उपयोग केला आहे. (उदा. विवेकचूडामणि, पंचदशी). श्रुती व शास्त्र याहून अधिक महत्त्वाचा म्हणजे स्वत:ला आलेला पडताळा! त्याचाही दासबोधाच्या रचनेत महत्त्वाचा वाटा आहे. ॥१५॥

नाना समतीअन्वये । म्हणौनि मिथ्या म्हणतां न ये । तथापि हें अनुभवासि ये । प्रत्यक्ष आतां ।।१६।।

या ग्रंथाला अशा प्रकारे अनेक प्रमाण ग्रंथांचा आधार असल्याने त्याच्याही प्रामाण्याविषयी शंका घेण्याचे कारण नाही. ग्रंथाचा यापुढे अभ्यास करणाऱ्याला तसा अनुभव येईलच. ॥१६॥

मत्सरें यासी मिथ्या म्हणती । तरी अवघेचि ग्रंथ उछेदती । नाना ग्रंथांच्या समती । भगवद्वाक्यें ।।१७।।

अध्यात्मशास्त्राचा नवा ग्रंथ पुढे येत आहे म्हणून केवळ मत्सराने त्याला दोष द्यावयाचे असतील, तर त्यामुळे गीता, उपनिषदादी सर्वच ग्रंथांना दोष द्यावा लागेल व त्या सर्वांचेच प्रामाण्य नाकारावे लागेल.

(भगवद्वाक्य = गीता, उच्छेद = प्रामाण्य नाकारणे) ॥१७॥

शिवगीता रामगीता । गुरुगीता गर्भगीता । उत्तरगीता अवधूतगीता । वेद आणि वेदांत ।।१८।।

भगवद्गीता ब्रह्मगीता । हंसगीता पांडवगीता । गणेशगीता येमगीता । उपनिषदें भागवत ।।१९।।

इत्यादिक नाना ग्रंथ । समतीस बोलिले येथ । भगवद्वाक्यें येथार्थ । निश्चयेंसीं ।।२०।।

उत्तरगीता, अवधूतगीता, वेद, उपनिषदे, भगवत्गीता, ब्रह्मगीता, हंसगीता, पांडवगीता, गणेशगीता, यमगीता श्रीमत् भागवत इत्यादी अनेक ग्रंथांचा आधार घेतला आहे. या सर्वांची अतिसंक्षिप्त माहिती अशी–

१) उत्तरगीता– श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितली. तीन अध्याय, दृढयोगाने कर्मत्यागपूर्वक आत्मानुभवाची साधना पद्धती.

२) अवधूतगीता– श्री दत्तात्रेयांनी कार्तिकस्वामींना आठ अध्यायांत सांगितलेला गोरक्षप्रणीत ज्ञानयोग.

३) वेद– जगाचे आद्य अक्षर वाङ्मय. ऋक्, यजु, साम व अथर्व असे चार वेद. ऋक् ज्ञानप्रधान, यजु कर्मप्रधान, साम भक्तिप्रधान तर अथर्व तंत्रमंत्रप्रधान आहे. कर्म, उपासना व ज्ञान अशी प्रत्येक वेदाची तीन कांडे. व्यक्ती, कुटुंब, समाज, राजा व देव अशा जीवनाच्या पाचही घटकांचा विचार. प्रत्येक वेदाचे संहिता, ब्राह्मण व आरण्यक असे तीन पोट भाग. वेद मंत्र म्हणजे ऋचा. पवित्र व शांत ऋषींना हे मंत्र जणू श्रुत झाले (ऐकू आले) म्हणून त्यांना श्रुती म्हणतात. म्हणूनच वेदवाङ्मयाला अपौरुषेय म्हणतात. मानवी बुद्धीचे भ्रम, प्रमाद, विप्रलिप्सा व करणापाटव हे दोष त्यांत नसल्याने वेदांना प्रमाण मानले जाते. गीता असे सांगते की वेद ईश्वराच्या श्वासातून निर्माण झाले. म्हणजे त्यांची कोणी विचार करून रचना केली नाही, तर त्या ऋचा म्हणजे उत्स्फूर्त ज्ञानाची शब्दबद्ध कारंजी होत. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष ही वेदांगे होत. आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद इ. उपवेद होत. वेदमंत्रांच्या उच्चाराचे काटेकोर नियम आहेत. पूर्वी आपापले वेद मुखोद्गत असलेले ब्राह्मण असत. आजही क्वचित आहेत. काही जणांचे दोन वेदांचे, काहींचे तीन वेदांचे तर काहींचे चार वेदांचे अध्ययन असे. त्यावरून द्विवेदी, त्रिवेदी, चतुर्वेदी अशी आडनावे असतात. 'विद्' या धातूपासून ज्ञानवाचक वेद हा शब्द तयार झाला.

४) उपनिषद– वेदातील ज्ञानकाण्ड. प्रत्येक वेदाची उपनिषदे आहेत. उदा. सामवेदाचे केनोपनिषद, यजुर्वेदाचे तैत्तिरीय. उपनिषदांचे सार म्हणजे गीता. 'ज्याच्या अनुभवाने अविद्येची पकड सैल होते व जे मोक्षाकडे गती देते ते उपनिषद' अशी उपनिषदाची सुटसुटीत व्याख्या आहे. उपनिषदे सुमारे १०८ असून त्यात ईश, केन, कठ इ. सुमारे पंधरा उपनिषदे मुख्य आहेत. भ. शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रभाष्यात या उपनिषदांतील मंत्र विचारासाठी घेतले आहेत.

५) भगवत्गीता– जगप्रसिद्ध अध्यात्मग्रंथ. धर्म व अधर्म, न्याय व अन्याय, नीती व अनीती, कर्तव्य व अकर्तव्य यांविषयी मोहित झालेल्या अर्जुनाला भगवान श्रीकृष्णाने उपदेश करून प्राप्त कर्तव्याला कर्तृत्वाचा भ्रम सोडून सामोरे जाण्यास सांगितले. अनासक्त कर्म, समर्पित भक्ती व मोक्षाचे तत्त्वज्ञान त्यासंबंधी निःसंदिग्ध बोध करून जगाला मोक्षाचे तत्त्वज्ञान सांगितले.

६) ब्रह्मगीता– ब्रह्मदेवाने देवांना सांगितली. स्कंद पुराणातील सूतसंहितेचे १ ते १२ अध्याय, किंवा योगवासिष्ठातील उत्तरार्धातील सर्ग १७३ ते १८१.

७) हंसगीता– महाभारतातील शांतिपर्वापैकी ४५ श्लोक विष्णूने हंसरूपाने ब्रह्मदेवाला सांगितले. भीष्मांनी युधिष्ठिराला सांगितली. किंवा भागवतात स्कंध ११– अध्याय १३. कृष्णाने सांगितली.

८) पांडवगीता– पाच पांडव व ब्रह्मदेव, इंद्रादिकांनी भ. श्रीकृष्णाची ८० श्लोकांत केलेली स्तुती.

९) गणेशगीता– गणेशपुराणाच्या अखेरच्या खंडात अ. १३८ ते १४८. भगवतगीतेशी मिळतीजुळती.

१०) यमगीता– १९ श्लोकांचे भक्तिपर स्तोत्र. हिचे श्रेय बऱ्याच जणांकडे जाते.

अ) पराशर– मैत्रेय, ब) भीष्म– नकुल, क) यम– नचिकेता.

ग्रंथ– महाभारत, विष्णुपुराण, नृसिंहपुराण, अग्निपुराण.

११) शिवगीता- ही गीता श्री शंकरांनी श्री रामचंद्रांना सांगितली. हिचे सोळा अध्याय असून ७८३ श्लोक आहेत. ही वेदांताचे उत्तम विवरण करणाऱ्या पद्मपुराणात आलेली आहे.

१२) रामगीता- ब्रह्मांडपुराणात उमा-महेश्वर संवादात्मक अध्यात्मरामायणाच्या उत्तरकांडात (सर्ग ५) ही गीता असून यात ६२ श्लोक आहेत. ही गीता श्रीरामांनी लक्ष्मणास सांगितली असून यात मुख्यत्वे कर्माकर्म विवेक व सद्गुरु आश्रमाचा महिमा वर्णिला आहे.

१३) गुरुगीता- ही गीता म्हणजे अनन्य गुरुभक्ती, साधन या विषयावरील उमा-महेश्वर संवाद आहे. स्कंद पुराणात उत्तरखंडात अद्वैत तत्त्वज्ञानाचा उपदेश २७४ श्लोकांतून या गीतेद्वारे केला आहे.

१४) गर्भगीता- श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेल्या या गीतेत २५ श्लोक असून त्यात गर्भधारा, जन्मप्राप्ती,

भोग वगैरे चुकवण्याचा उपाय उपदेशिला आहे.

१५) भागवत– महापुराण. व्यासांनी केलेली १२ स्कंधांची प्रचंड रचना, १८ हजार श्लोक. अत्यंत रसाळ असे कृष्णचरित्र व जोडीला आख्याने, उपाख्याने संस्कृत श्लोक समजण्यास कठीण. १० व्या स्कंधावर कृष्णदयार्णव (हरिवरदा) व बहिराजातवेद (भैरवी) यांची टीका असून अकराव्या स्कंधावर एकनाथ महाराजांची सविस्तर ओवीबद्ध टीका आहे. यातील अन्य गीतावाङ्मय आता प्रचलित नाही. फक्त भगवतगीता सर्वत्र अभ्यासिली जाते. ॥१८॥१९॥२०॥

भगवद्वचनी अविश्वासे । ऐसा कवण पतित असे । भगवद्वाक्याविरहित नसे । बोलणें येथीचें ।।२१।।

प्रत्यक्ष भगवंताच्या उपदेशावर विश्वास न ठेवण्याइतका पापी कोणी असेल काय? या ग्रंथातील प्रत्येक सिद्धान्ताला भगवत्वचनाचा प्रत्यक्ष आधार आहे. त्यावाचून एक शब्दही लिहिलेला नाही. ॥२१॥

पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण । तो दुरात्मा दुराभिमान । मत्सरें करी ।।२२।।

संपूर्ण ग्रंथाचा व्यवस्थित अभ्यास केल्याशिवाय जर कोणी त्या ग्रंथाला नावे ठेवीत असेल, तर तो दुष्ट व दुरभिमानी केवळ मत्सरामुळेच तसे करील. ॥२२॥

अभिमानें उठे मत्सर । मत्सरें ये तिरस्कार । पुढें क्रोधाचा विकार । प्रबळे बळें ।।२३।।

दुरभिमानामुळे मत्सर उफाळून येतो. मत्सराचे रूपांतर तिरस्कारात होते व तिरस्कारातून क्रोधाचा अग्नी पेटतो. ॥२३॥

ऐसा अंतरीं नासला । कामक्रोधें खवळला । अहंभावें पालटला । प्रत्यक्ष दिसे ।।२४।।

असा जो कोणी कामक्रोधादिकांनी खवळून नासक्या अन्त:करणाचा होतो त्याच्या अहं वृत्तीमध्ये झालेला भयंकर बदल सर्वांनाच स्पष्टपणे दिसतो. ॥२४॥

कामक्रोधें लिथाडिला । तो कैसा म्हणावा भला । अमृत सेवितांच पावला । मृत्य राहो ।।२५।।

जो कामक्रोधादिकांनी बरबटलेला आहे त्याला सज्जन कसे म्हणता येईल? त्याची अवस्था अमृत पिऊ बघणाऱ्या राहूसारखी होईल. श्रीविष्णू मोहिनीच्या रूपाने देवांना अमृत वाटत असताना, राहू कपटाने देवांच्या रांगेत बसला. तो अमृताचा घोट घेणार तोच चंद्र व सूर्याने राहूचे कपट विष्णूच्या लक्षात आणून दिल्याने श्री विष्णूंनी क्षणार्धात त्याचे मस्तक सुदर्शन चक्राने उडवले. अमृत मुखातच राहिले. जठरात गेले नाही. ही गोष्ट समुद्रमंथनाच्या वेळेची आहे. त्याप्रमाणे हा ग्रंथ वर वर पाहून त्याला नावे ठेवणाऱ्यांना या अमृततुल्य ग्रंथाच्या लाभाला मुकावे लागेल. ॥२५॥

आतां असो हें बोलणें । अधिकारासारिखें घेणें । परंतु अभिमान त्यागणें । हें उत्तमोत्तम ।।२६।।

खरे तर एवढे बोलू नये. पण ज्याचा जसा अधिकार असेल तसा त्याला लाभ होईल. तरीही दुरभिमान सोडण्यातच जीवाचे खरे कल्याण आहे. ॥२६॥

मागां श्रोतीं आक्षेपिलें । जी ये ग्रंथी काय बोलिलें । तें सकळही निरोपिलें । संकळीत मार्गें ।।२७।।

सुरुवातीला या ग्रंथासंबंधी जो प्रश्न श्रोत्यांनी विचारला होता त्याचे पूर्ण उत्तर थोडक्यात दिले आहे. ॥२७॥

आतां श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ । तुटे संशयाचें मूळ । येकसरां ।।२८।।

या ग्रंथाचे व्यवस्थित श्रवण केले असता श्रवण करणाऱ्याच्या प्रवृत्तीत ताबडतोब बदल होईल. त्याचे वागणे, बोलणे बदलून जाईल. त्याच्या मनात असलेल्या अनेक शंकांची उत्तरे मिळत जातील. अज्ञान हे शंकेचे मूळ आहे. ग्रंथाच्या यथार्थ मननाने व चिंतनाने अज्ञान नष्ट होत जाईल. ॥२८॥

मार्ग सांपडे सुगम । न लगे साधन दुर्गम । सायोज्यमुक्तीचें वर्म । ठांइ पडें ।।२९।।

जीवन्मुक्तीचा सोपा मार्ग त्याला दिसू लागेल. अवघड साधने करण्याची गरज नाही हे लक्षात येईल व सायुज्य मुक्ती किंवा जीवन्मुक्ती म्हणजे नक्की काय हे कळेल. ॥२९॥

नासे अज्ञान दु:ख भ्रांती । शीघ्रचि येथें ज्ञानप्राप्ती । ऐसी आहे फळश्रुती । ईये ग्रंथीं ।।३०।।

'मी', दृश्यजगत्, जगताचे कारण ब्रह्म, जगताचा नियंता ईश्वर यासंबंधीचे अज्ञान दूर होईल. दु:खाचे स्वरूप कळून दु:खांची कारणे प्रारब्धामुळे तशीच राहिली, तरी त्यामुळे दु:ख होणार नाही. पाच प्रकारचे भ्रम नष्ट होऊन लवकरच 'मी ब्रह्म आहे' असे ज्ञान होईल. पाच प्रकारचे भ्रम पुढीलप्रमाणे–

१) जगत्सत्यत्वभ्रान्ती– सोन्याऐवजी विशिष्ट नाम व रूप असलेली बांगडी दिसू लागली की, सोन्याकडे दुर्लक्ष होते. त्याप्रमाणे नामरूपांनी भरलेले जग सत्य वाटू लागले की ब्रह्माकडे दुर्लक्ष होते. जग खरे आहे असा भ्रम होतो.

२) कर्तृत्वभोक्तृत्वभ्रान्ती– जास्वंदीच्या पाकळीवर पारदर्शक पेपरवेट ठेवला तर त्या पाकळीने पेपरवेट रंगीत केल्यासारखे वाटते. त्याप्रमाणे निष्क्रीय आत्म्याच्या सत्तेवर बुद्धीचे व्यवहार चालत असले, तरी आत्माच कर्ता आहे असा भ्रम होतो.

३) भेदभ्रान्ती– सूर्यबिंबाचे पाण्यामुळे पाण्यात प्रतिबिंब दिसून सूर्याचे बिंब व प्रतिबिंब असे दोन भेद भासतात. त्याप्रमाणे आत्मबिंबाचे स्वच्छ बुद्धीत आभासरूप प्रतिबिंब पडल्याने आत्मा व जीव असा भेदाचा भ्रम होतो.

४) संगभ्रान्ती– घटातील आकाशाचा घटाशी कधीच संग किंवा संबंध होत नाही. घट फुटला तरी आकाश जसेच्या तसे राहते. त्याप्रमाणे आत्मा व शरीर यांचा कधीच संग होत नाही. देह मरण पावताच आत्मा मेला असा अज्ञानामुळे भ्रम होतो.

५) विकारभ्रान्ती– असतो, जन्मतो, वाढतो, बदलतो, क्षीण होतो व नष्ट होतो हे सहा विकार देहाला असतात. अज, अजर, अमर व निरवयव आत्म्याला विकार नसतात. देहाचे विकार आत्म्याचे आहेत, असा भ्रम होतो. असे भ्रमज्ञान नष्ट झाल्यावर आत्मज्ञान होते. ।।३०।।

योगियांचे परम भाग्य । आंगीं बाणें तें वैराग्य । चातुर्य कळे यथायोग्य । विवेकेंसहित ।।३१।।

ज्याला जीव व ब्रह्म यांचा योग साधावयाचा आहे त्याला वैराग्य प्राप्त झालेच पाहिजे. असे वैराग्य हे महत् भाग्याचे लक्षण आहे. हे वैराग्य या ग्रंथाच्या अभ्यासाने मिळेल. व्यवहारचातुर्य व ब्रह्मसत्य असून व्यवहाराचा आधार असलेले जग मिथ्या आहे हा विवेक होईल. ।।३१।।

भ्रांत अवगुणी अवलक्षण । तेचि होती सुलक्षण । धूर्त तार्किक विचक्षण । समयो जाणती ।।३२।।

कर्म-अकर्म, नीती-अनीती इत्यादीसंबंधी असलेले भ्रम जातील. दुर्गुण व कुलक्षणे हळूहळू कमी होतील व त्यांची जागा सद्‌गुण व सुलक्षणे घेतील. प्रसंग, व्यवहार व व्यक्ती यांचे आकलन होईल. तर्कशक्ती काम करू लागेल. बुद्धीला निवाडा करण्याचे सामर्थ्य येईल. कालमानाच्या प्रभावाचे भान राहील. पुढे कोणती वेळ येऊन ठेपणार आहे त्याचे आधीच आकलन होईल. समोर ठाकलेल्या प्रसंगाचे स्वरूप लक्षात येईल. ।।३२।।

आळसी तेचि साक्षपी होती । पापी तेचि प्रस्तावती । निंदक तेचि वंदूं लागती । भक्तिमार्गासी ।।३३।।

जे आळशी आहेत त्यांना उद्योग करावासा वाटेल. पापी लोकांना आपल्या पापी जीवनाचा पश्चात्ताप होईल. 'भक्ती ही निरुद्योगी, निराश व भावनाप्रधान मंडळींची अनुत्पादक जीवनपद्धती आहे' या व अशा प्रकारची भक्तीची निंदा करणारे भक्तिमार्गाचे महत्त्व ओळखतील. ।।३३।।

बद्धचि होती मुमुक्ष । मूर्ख होती अति दक्ष । अभक्तचि पावती मोक्ष । भक्तिमार्गें ।।३४।।

जे बद्ध आहेत (द. ५ स. ७) ते मुमुक्षु होतील (द. ५ स. ८) मूर्ख आपला मूर्खपणा सोडून तो न करण्याविषयी जागरूक राहतील, (द. २ स. १) जे भगवत्‌भजन करीत नाहीत ते, भगवंताचे भजन करूनच मुक्त होतील. (द. ५ स. १०) ।।३४।।

नाना दोष ते नासती । पतित तेचि पावन होती । प्राणी पावे उत्तम गती । श्रवणमात्रें ।।३५।।

स्वभाव, आचार, विचार व उच्चार यांतील अनेक प्रकारचे दोष नाहीसे होत जातील. या दोषांमुळे पतित झालेले पावन होत जातील. व्यावहारिक पतन थांबेल. 'मी' ब्रह्म असताना 'मी देहादी आहे' अशा अज्ञानाने पतन पावलेले, 'मी ब्रह्म आहे' असा अनुभव घेऊन ब्रह्माप्रमाणे पावन (विमल) होतील. या ग्रंथाच्या श्रवणाने माणसाला अशी उत्तम

गती मिळेल. जीवभावाची अधोगती थांबून ब्रह्मभावाची उत्तम गती प्राप्त होईल. ॥३५॥

नाना धोकें देहबुद्धीचे । नाना किंत संदेहाचे । नाना उद्वेग संसाराचे । नासती श्रवणें ।।३६।।

'मी देह आहे' या देहबुद्धीमुळे जीवाला अनेक दु:खे, यातना, संकटे व छळ सोसावे लागतात. ते श्रवणामुळे जाणवणार नाहीत. व्यवहार व परमार्थ याविषयी असलेल्या अनेक शंका व चुकीच्या संकल्पना नाहीशा होतील. या जगात व प्रपंचात राहून जीवन जगत असताना होणारे उद्वेग नष्ट होतील. ॥३६॥

ऐसी याची फलश्रुती । श्रवणें चुके अधोगती । मनास होय विश्रांती । समाधान ।।३७।।

असे या ग्रंथाच्या श्रवणाचे फळ आहे. त्यामुळे अधोगती टळून अन्त:करण शांत व तृप्त होते. ॥३७॥

जयाचा भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा । मत्सर धरी जो पुंसा । तयास तेंचि प्राप्त ।।३८।।

परंतु त्यासाठी ग्रंथ व ग्रंथातील विषयावर श्रद्धा हवी. जेवढी श्रद्धा जास्त तेवढे फळ अधिक. ग्रंथकर्त्या व्यक्तीकडे लक्ष देऊन व्यक्तिमत्सरामुळे ग्रंथमत्सर केला, तर त्या मत्सरी व्यक्तीला तसेच फळ मिळेल. ॥३८॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'ग्रंथारंभलक्षणनाम' समास पहिला

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'ग्रंथारंभलक्षण' नावाचा पहिला समास समाप्त

दशक पहिला : स्तवनाचा

समास दुसरा : गणेशस्तवन

॥ श्रीराम समर्थ ॥

ॐ नमोजिगणनायेका । सर्वसिद्धिफळदायेका । अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ।।१।।

प्रणवाच्या अक्षराकृतीत ज्याच्या रूपाची कल्पना करता येते अशा श्री गणनायका, तुला वंदन असो. तुझ्या उपासनेने सर्व प्रकारच्या सिद्धींचे फळ मिळते. मुख्यत्वाने जीव व ब्रह्म ह्यांचे ऐक्य सिद्ध होते. अज्ञान व भ्रम नाहीसे होतात. बोध म्हणजे ज्ञान हेच तुझे खरे स्वरूप आहे. ॥१॥

माझिये अंतरीं भरावें । सर्वकाळ वास्तव्य करावें । मज वाग्सूंन्यास वदवावें । कृपाकटाक्षेंकरूनीं ।।२।।

माझ्या अन्त:करणात सतत व्यापून राहून तू माझ्याकडे कृपादृष्टीने पहा. आत्मरूपाने तू माझ्या 'वाणीची वाणी' (पहा केन उप.) असल्याने माझी वाणी स्वतंत्रपणे काहीच बोलू शकत नाही. तुझ्या सत्तेवर तिला बोलण्याचे सामर्थ्य दे. ॥२॥

तुझिये कृपेचेनि बळें । वितुळती भ्रांतीचीं पडळें । आणि विश्वभक्षक काळें । दास्यत्व कीजे ।।३।।

तुझी कृपा झाल्यानंतर माझ्या अन्त:करणावरील भ्रमाचे पापुद्रे निघून जातील. सर्व विश्वाला ग्रासणारा प्रत्यक्ष काळ सुद्धा माझी सेवा करील. ईश्वर काळाचा काळ आहे. गणपतीरूप ईशाची कृपा झाली की इतर सर्वांचे सामर्थ्य तुच्छ आहे. ग्रंथ पूर्ण होईपर्यंत काळाचीही माझ्यावर सत्ता चालणार नाही. ॥३॥

येतां कृपेची निज उडी । विघ्नें कांपती बापुडीं । होऊनि जाती देशधडी । नाममात्रें ।।४।।

तुझ्या कृपेने उडी घातली की बिचारी विघ्ने थरथर कापू लागतात. माझ्या ग्रंथरचनेच्या कार्यात ती आडवी येणार नाहीत. केवळ तुझे नाव घेतले तरी ती दूरवर पळून जातात. ॥४॥

म्हणौन नामें विघ्नहर । आम्हा अनाथांचें माहेर । आदि करूनी हरीहर । अमर वंदिती ।।५।।

म्हणूनच तुला विघ्नहर म्हणतात. आम्ही तुझ्यावाचून अनाथ असून तूच आमचा आधार आहेस. तू प्रत्यक्ष परमेश्वर असल्याने श्रीविष्णू, श्रीशंकर व अन्य देव तुलाच वंदन करतात.॥५॥

वंदूनियां मंगळनिधी । कार्य करितां सर्वसिद्धी । आघात अडथाळें उपाधी । बाधूं सकेना ।।६।।

सर्व मांगल्याचा तू संचयच आहेस. तुला वंदन करून कोणत्याही कार्याला आरंभ केला असता ते सिद्धीला जाते. त्या कार्यात घातपात, अडचणी व नसत्या कटकटी निर्माण होत नाहीत. तुझ्या स्मरणांत आरंभलेले कर्म जसे होते तसे ते पूर्णच असते. कारण तू पूर्ण आहेस.॥६॥

जयाचें आठवितां ध्यान । वाटे परम समाधान । नेत्रीं रिघोनियां मन । पांगुळे सर्वांगीं ।।७।।

ज्याच्या सगुण मूर्तीचे ध्यान (रूप) नुसते आठवले तरी अन्त:करण वृत्तीचे सम्यक् आधान म्हणजे समाधान होते. ती त्या ध्यानाने शांत होते. अन्त:करण वृत्ती डोळ्यातून बाहेर पडून त्याच्या रूपाला खिळून रहाते. तिचे मनोवृत्ती, बुद्धिवृत्ती व अहंवृत्तीचे व्यापार थांबतात. एक चित्तवृत्तीच ध्यानाला धरून बसते. ध्यानाकार होऊन राहते. (पहा– तनुचतुष्टय निरसन.) ॥७॥

सगुण रूपाची टेव । माहा लावण्य लाघव । नृत्य करितां सकळ देव । तटस्त होती ।।८।।

श्री गजाननाचे रूप अत्यंत देखणे असून त्याच्या हालचाली सहज व चपळतेने होतात. विशिष्ट शैलीने तो नृत्य

करू लागताच सर्व देव त्या आविष्काराने स्तब्ध होतात. ॥८॥

सर्वकाळ मदोन्मत । सदा आनंदें डुल्लत । हरुषें निर्भर उद्दित । सुप्रसन्नवदनु ।।९।।

तो आपल्याच स्वरूपस्थितीत सदा धुंद असून स्वानंदाने डोलत असतो. आनंदघन असलेला तो सतत उत्साही व प्रसन्नवदनाचा असतो. सतत प्रसन्न राहतो. ॥९॥

भव्यरूप वितंड । भीममूर्ति माहा प्रचंड । विस्तीर्ण मस्तकीं उदंड । सिंधूर चर्चिला ।।१०।।

श्री गजाननाचे एकूण दर्शन भव्य आहे. त्याचे हत्तीचे मुख वेगळेच दिसते. (वितंड-वितुंड-विपरीत तुंड-वेगळे मुख) मूर्ती फार प्रचंड व बलदंड दिसते. हत्तीसारख्या मोठ्या मस्तकावर सतत शेंदूराचा लेप लावलेला असतो. ॥१०॥

नाना सुगंध परिमळें । थबथबां गळती गंडस्थळें । तेथें आलीं षट्पदकुळें । झुंकारशब्दें ।।११।।

त्याच्या गंडस्थळातून अनेक सुगंध येणारा मदस्राव सारखा पाझरतो. तो सुगंध फुलांचाच आहे असे वाटून अनेक भ्रमर त्याभोवती गुंजारव करीत फिरतात. ॥११॥

मुर्डीव शुंडादंड सरळे । शोभे अभिनव आवाळें । लंबित अधर तिक्षण गळे । क्षणक्ष्णा मंदसत्वी ।।१२।।

त्यांची सोंड वाकडी असून दात सरळ आहेत. मस्तकावर गंडस्थळाचा उंचवटा शोभून दिसत आहे. खालचा ओठ लोंबता असून त्याच्या अणकुचीदार टोकातून हळूहळू मदस्राव गळत राहतो. ॥१२॥

चौदा विद्यांचा गोसावी । हरस्व लोचन ते हिलावी । लवलवित फडकावी । फडै फडै कर्णथापा ।।१३।।

त्याचे चौदा विद्यांवर स्वामित्व आहे. त्यांत तो अत्यंत कुशल आहे. त्याचे बारीक डोळे चौफेर पाहतात. बारीक डोळे बुद्धिमत्तेचे प्रतीक समजले जाते. चौदा विद्या पुढीलप्रमाणे–

१) चार वेदांच्या चार विद्या = ४
२) सहा वेदांगांच्या विद्या = ६
३) न्याय, मीमांसा, पुराणे, धर्मशास्त्र = ४
} एकूण १४.

(वेदांगे– पहा १-१-१८)

त्याच्या मोठ्या कानांच्या पाळ्या फड् फड् असा आवाज करीत हळूहळू मागे-पुढे होत असतात. ॥१३॥

रत्नखचित मुगुटीं झळाळ । नाना सुरंग फांकती कीळ । कुंडलें तळपती नीळ । वरि जडिले झमकती ।।१४।।

त्याचा मुगुट रत्नांनी मढविलेला असून अत्यंत तेजस्वी आहे. त्या रत्नांचे अनेक रंगांचे तेज फाकलेले असून कानातील कुंडलाला लावलेल्या 'नील' नावाच्या रत्नांचे तेज झळकत आहे. ॥१४॥

दंत शुभ्र सद्दट । रत्नखचित हेमकट्ट । तया तळवटीं पत्रें नीट । तळपती लघु लघु ।।१५।।

त्याचे दात पांढरे स्वच्छ असून मजबूत आहेत. कपाळावरील दोन्ही उंचवट्यांवर सोन्याचे अलङ्कार असून त्यांच्या काठांना बारीक घंटिका बसविल्या आहेत. त्यांचा किणकिण असा आवाज होत आहे. (कट्ट = कट = कपाळावरील उंचवटे. हेम = सोने = अलंकार. हेमकट्ट = उंचवट्यावरील अलंकार) ॥१५॥

लवथवित मलपे दोंद । वेष्टित कट्ट नागबंद । क्षुद्र घंटिका मंद मंद । वाजती झणत्कारें ।।१६।।

त्याचे पोट थुलथुलीत असून शरीराच्या हालचालीबरोबर ते सारखे हालते. त्याच्या कमरेला नागबंध नावाचा अलङ्कार बांधला असून त्याच्या खालील काठाला लावलेल्या बारीक घंटा मंजुळ नाद करीत आहेत. ॥१६॥

चतुर्भुज लंबोदर । कासे कासिला पीतांबर । फडके दोंदिचा फणीवर । धुधूकार टाकी ।।१७।।

हे गजानना, तुला चार हात असून पोट फार मोठे व लंबवर्तुळाकार आहे. तू पिवळ्या रंगाचे रेशमी वस्त्र नेसले आहेस. तुझ्या पोटावरील सर्प फूत्कार करीत आहे. ॥१७॥

डोलवी मस्तक जिव्हा लाळी । घालून बैसला वेंटाळी । उभारोनि नाभिकमळीं । टकमकां पाहे ।।१८।।

तो सर्प आपली फणी डोलवीत असून जीभ मुखाबाहेर नाचवीत आहे. तो तुझ्या नाभीभोवती वेटोळे घालून फणी वर काढून टकमक पहात आहे. सर्प हा पंचविषयाचा प्रतिनिधी मानण्याचा संकेत आहे. श्रीशंकर किंवा गजानन अंगाखांद्यावर सर्प खेळवतात असे चित्र नेहमी दिसते. म्हणजे विषयरूप सर्प त्यांना दंश न करता खेळत रहातो. कारण त्यांच्या ठिकाणी पुढील भ्रम नसतात. १) मी सुखरूप नाही. २) विषयात सुख आहे. ३) मी विषयांचा संपादक व भोक्ता आहे. जीवाला हे भ्रम असतात. त्यामुळे त्यांना पंचविषय बाधतात. ॥१८॥

नाना याति कुशममाळा । व्याळपरियंत रुळती गळा । रत्नजडित हृदयकमळा । वरी पदक शोभे ।।१९।।

तुझ्या गळ्यात अनेक प्रकारच्या फुलांच्या, बेंबीपर्यंत पोहचणाऱ्या माळा घातल्या आहेत. बेंबीवर सर्पाचे वेटोळे असल्याने त्या माळा त्याला स्पर्श करीत आहेत. तुझ्या हृदयकमळावर रत्नखचित सुवर्णपदक शोभत आहे. ॥१९॥

शोभे फरश आणी कमळ । अंकुश तिक्षण तेजाळ । येके करीं मोदकगोळ । तयावरी अति प्रीति ।।२०।।

एका हातात परशु, दुसऱ्यात कमळ, तिसऱ्यामध्ये तेजस्वी व धारदार अंकुश शोभत असून चौथ्या हातात असलेला मोदक तुला फार आवडतो. ज्ञानदेवांनी मोदकावर वेदान्तविद्येचे रूपक केले आहे. ॥२०॥

नट नाट्य कळा कुसरी । नाना छंदें नृत्य करी । टाळ मृदांग भरोवरी । उपांग हुंकारे ।।२१।।

नटांजवळ जी नाट्यविद्या असते ते कौशल्य तुझ्यापाशी आहे. तू अभिनयात कुशल आहेस. ह्या अभिनयासह तू अनेक प्रकारच्या तालांवर नृत्य करतोस. टाळ व मृदुंगासारखी नृत्याची वाद्येसुद्धा तुझ्याभोवती वाजतात. तूही त्यात तुझा हुंकार भरतोस. (नृत्याचे उपांग.) ॥२१॥

स्थिरता नाहीं येक क्षण । चपळविशईं अग्रगण । साजिरी मूर्ति सुलक्षण । लावण्यखाणी ।।२२।।

तुला स्वस्थता ती कशी ठाऊक नाही. तू चपळांमध्ये सर्वांत चपळ आहेस. लावण्याची खाण असलेली तुझी मूर्ती मोठी लोभसवाणी दिसते. ॥२२॥

रुणझुणां वाजती नेपुरें । वांकी बोभाटती गजरें । घागरियांसहित मनोहरें । पाउलें दोनि ।।२३।।

तुझ्या पाऊलातील नूपुरांचा रुणझुण नाद होतो. वाक्यांचा मोठा आवाज येतो. घागऱ्या घालून नृत्य करणारी तुझी दोन पाऊले मनाला मोहून टाकतात. ॥२३॥

ईश्वरसभेसी आली शोभा । दिव्यांबरांची फांकली प्रभा । साहित्यविशईं सुल्लभा । अष्ट नायका होती ।।२४।।

तुझ्यामुळे देवसभेला मोठी शोभा येते. तुझ्या दिव्य पीतांबराचे तेज सर्व सभेत पसरते. घृताची, तिलोत्तमा, उर्वशी, रंभा, मेनका, सुकेशी, मंजुघोषा व पूर्वचिती ह्या देवलोकींच्या अष्टनायिका (शिवलीलामृत अ. ३) नृत्याच्या सर्व उपांगांसह (साहित्य) तुला साथ करण्यात तत्पर (सुलभा) असतात. ॥२४॥

ऐसा सर्वांगें सुंदरु । सकळ विद्यांचा आगरू । त्यासी माझा नमस्कारू । साष्टांग भावें ।।२५।।

असा तू सर्वांगसुंदर, सर्व विद्यांचे माहेरघर असून तुला मी शरीराच्या आठही अंगांनी भावपूर्ण नमस्कार करीत आहे. अष्ट अंगे– गुडघे, पाउले, हात, छाती, बुद्धी, मस्तक, वाणी, डोळे; **किंवा** दोन गुडघे, दोन हात, दोन पाय, वाचा व मन. ॥२५॥

ध्यान गणेशांचें वर्णितां । मतिप्रकाश होये भ्रांता । गुणानुवाद श्रवण करितां । वोळे सरस्वती ।।२६।।

श्रीगणेशाच्या मूर्तीचे असे भावपूर्ण वर्णन करणाऱ्या मूर्खाच्या सुद्धा बुद्धीत ज्ञानाचा उदय होईल. त्याच्या गुणानुवादांचे श्रवण केले तर सरस्वती प्रसन्न होते. ॥२६॥

जयासी ब्रह्मादिक वंदिती । तेथें मानव बापुडे किती । असो प्राणी मंदमती । तेहीं गणेश चिंतावा ।।२७।।

ब्रह्मदेव सुद्धा ज्याला वंदन करतो त्याला क्षुल्लक मानवाने वंदन केले तर त्यांत नवल ते काय! तात्पर्य असे की ज्याची बुद्धी मंद आहे त्याने श्रीगणेशाच्या रूपाचे चिंतन करावे. ते रूप पहावे, सांगावे, ऐकावे व गावे. ॥२७॥

जे मूर्ख अवलक्षण । जे कां हीणाहूनि हीण । ते चि होती दक्ष प्रविण । सर्वविशईं ।।२८।।

जे कुलक्षणी, मूर्ख, बुद्धीने अती हलक्या दर्जाचे असतात तेही श्रीगणेशरूपाच्या चिंतनाने जीवनावश्यक सर्व विद्यांत पारंगत व चतुर होतात. ॥२८॥

ऐसा जो परम समर्थ । पूर्ण करी मनोरथ । सप्रचीत भजनस्वार्थ । कल्लौ चंडी विनायेका ।।२९।।

असा श्रीगणेश सर्वशक्तिमान असून भक्तांचे सर्व मनोरथ पूर्ण करण्यास समर्थ आहे. त्याची उपासना करणाऱ्यांना तसा प्रत्यक्ष अनुभव येतो. कलियुगात चंडी व गणपती ह्या देवता लवकर प्रसन्न होतात. ॥२९॥

ऐसा गणेश मंगळमूर्ती । तो म्यां स्तविला येथामती । वांछ्या धरूनि चित्तीं । परमार्थाची ।।३०।।

अशा ह्या मंगलमूर्ती श्रीगणेशाचे मी मोक्षाच्या अपेक्षेने माझ्या बुद्धीच्या कुवतीप्रमाणे वर्णन केले आहे. ह्या समासात श्रीगजाननाच्या सगुणरूपाचे वर्णन समर्थांना अभिप्रेत दिसते. श्री ज्ञानदेवांप्रमाणे त्यांनी त्याच्या अवयवांवर तत्त्वज्ञानाची रूपके बसवलेली नाहीत. मतमतांतरांच्या कल्पना केलेल्या नाहीत. स्तवनांच्या दशकांत सगुणाचे प्राबल्य असणे स्वाभाविक आहे. कारण निर्गुणाचे स्तवन करता येत नाही. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'गणेशस्तवननाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध ह्या ग्रंथातील 'गणेशस्तवन' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक पहिला : स्तवनाचा

समास तिसरा : शारदास्तवन

॥ श्रीराम समर्थ ॥

या समासात समर्थांनी अतिसूक्ष्म मायारूप शारदेची विविधरूपे किंवा स्तर मोठ्या खुबीने मांडले आहेत. मायेसह अद्वैत ह्या शांकरमताचे समर्थ हे कट्टर समर्थक आहेत. त्यामुळे भ्रम, अध्यास, विवर्त इत्यादी परिभाषा ते स्वीकारतात. प्रामाणिक व तळमळीच्या साधकाला 'मी ब्रह्म आहे' अशा प्रत्यक्ष, टिकावू व कायमच्या अनुभवाची तीव्र इच्छा असते. (दृढ, अपरिवर्तनीय अपरोक्षानुभूती). त्या आधीचे किंवा तो सोडून सर्व अनुभव मायारूप शारदेचे असतात. ते अत्यंत सूक्ष्म असल्याने त्याच अनुभवांना ब्रह्मानुभव समजून साधक चकण्याची शक्यता असते. ह्या संदर्भात काही मुद्दे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

१) ब्रह्मानुभवाचे अतिसूक्ष्म तत्त्वज्ञान चांगले समजणे म्हणजे ब्रह्मानुभव नव्हे.

२) जे जे मला जाणवते, कळते, लक्षात येते (वृत्तिज्ञान) ते ते मायिक शारदेचे स्वरूप आहे.

३) कोणत्याही प्रकारची साधना कितीही उंचीवर गेली तरी ती साधकाने केलेली असल्याने कृत्रिम असते. ब्रह्म अकृत्रिम (अनादि, नित्य, आद्य, स्वयंभू) आहे. कृत्रिम साधनेने अकृत्रिम साध्य कधीच सिद्ध होत नाही.

('नहि अध्रुवैः प्राप्यते हि धृवं तत्'– कठोनिषद १-२-१०)

४) साधक जीव कृत्रिम साधनेने अकृत्रिम आत्मरूप साध्यामध्ये विसर्जित झाला की जीवात्मैक्यरूप सिद्धी सिद्ध होते. ज्ञानमार्गात 'जीवब्रह्मैक्य', भक्तिमार्गात 'पराभक्ती' व योगमार्गात 'स्वरूपावस्थान' अशी ह्या सिद्धीला नावे आहेत.

५) वरील सिद्धी सिद्ध झाल्यानंतर त्यांना सातत्यपूर्ण अभ्यासामुळे सहजावस्था येते. ह्या अवस्थेत मायारूप शारदा बाधित दिसत असून सत्य नाहीं असा निश्चय होऊन तो 'सिद्ध', बाध झालेल्या देह, अन्तःकरण यासह बाधित जीवन शेष प्रारब्धामुळे जगामध्ये जगतो.

आतां वंदीन वेदमाता । श्रीशारदा ब्रह्मसुता । शब्दमूळ वाग्देवता । माहं माया ।।१।।

श्रीगणेशांना नमस्कार असो. जिच्यापासून वेद प्रगट झाले, जी ब्रह्मावर अध्यस्त आहे व जी शब्दांना जन्माला घालणारी वाग्देवता आहे तिला मी वंदन करीन. ब्रह्म, मूळमाया, गुणमाया, ईश्वर, जडमाया असा दृश्य सृष्टीचा उत्पत्तिक्रम शास्त्र सांगते. त्यामुळे ब्रह्मदेव, विष्णू व महेश हे अनुक्रमे रज, सत्त्व व तमोगुणात्मक ईश्वर गुणमायेचे ठरतात. ब्रह्मदेव मूळमायेतून प्रगट होतो. मूळमाया हे शारदेचे रूप आहे. त्यामुळे 'मूळमाया ब्रह्मदेवाची मुलगी आहे' असे म्हणता येत नाही. म्हणून शारदारूप माया ब्रह्मावर भासते म्हणजे ती ब्रह्मस्वरूपावर अध्यस्तरूपाने असते. तिला अर्धांगिनी म्हणण्याऐवजी श्री समर्थांनी येथे सुता म्हणजे कन्या असे कौतुकाने म्हटले आहे. वेद ईश्वराचे 'निश्वसित' मानले जातात. ईश्वराचे वेद प्रगट करण्याचे सामर्थ्य शारदारूप असल्याने वेदांची शारदा ही माता आहे. शारदा = ब्रह्मभासासह शक्ती असे समीकरण लक्षात घेतले पाहिजे. त्या शारदेलाच महामाया किंवा मूळमाया म्हणतात. ॥१॥

जे उठती शब्दांकुर । वदे वैखरी अपार । जें शब्दांचें अभ्यांतर । उकलून दावी ।।२।।

शारदारूप प्राणशक्ती ध्वनिरूपाने स्वरयन्त्रातून बाहेर पडून ऊर, कंठ, शिर, जिव्हामूळ, दात, नाक, ओठ व

ताळू अशा आठ ठिकाणी आदळून स्वर व्यञ्जनादि अक्षररूप होते. अशा अनेक अक्षरांचे शब्द, शब्दांची वाक्ये इ. प्रकारे वाणी अनेक प्रकारे अनेक विषय बोलत रहाते. पण त्याच वाणीमध्ये शब्दाने अनुभवाला न येणारे ब्रह्म तत्त्वदृष्ट्या समजावून सांगण्याचे सामर्थ्य आहे. ('यद्वाचानभ्युदितं येन वागभ्युद्यते'– केन १-४) बाप उपेगी वस्तु शब्दू। स्मरणदानी प्रसिद्धु। अमूर्ताचा विशदु। आरिसा नव्हें।। अमृतानुभव (६-१) ।।२।।

जे योगियांची समाधी । जे धारिष्टांची कृतबुद्धी । जे विद्या अविद्या उपाधी । तोडून टाकी ।।३।।

ध्याता ध्यानाच्या सहाय्याने ध्येयाकार करण्याच्या समाधीसाठी जी चित्तवृत्तिनिरोधाची कृती करावी लागते त्या कृतीला आवश्यक ती शक्ती शारदेची असते. धैर्यवान पुरुष जे बुद्धीचा अविचल निश्चय करतात ते करणे शारदेचे असते. बंधनसापेक्ष अविद्या व मोक्षसापेक्ष अध्यात्मविद्या व ह्या दोन्ही उपाधी निवृत्त करणारे ज्ञान त्याला परिपक्वता व सहजता येईपर्यंत शारदारूपच असते. ।।३।।

जे माहापुरुषाची भार्या । अति सलग्न अवस्था तुर्या । जयेकरितां महत्कार्या । प्रवर्तले साधु ।।४।।

शारदा ही ब्रह्माची स्वीय शक्ती आहे. जागृती, स्वप्न व सुषुप्ती ह्या जीवाच्या तिन्ही अवस्थांचे साक्षित्व करणारी तुर्या ही ज्ञानवृत्तिरूप चौथी अवस्था आहे. ती ब्रह्मस्वरूपाच्या अत्यंत जवळ असली तरी वृत्तिलेश शिल्लक असल्याने शारदारूपच आहे. ती अनुभवाला यावी म्हणून साधकांनी फार मोठी व खडतर साधने आरंभिली. (साधू = साधण्याची इच्छा करणारा). ।।४।।

जे महंतांची शांती । जे ईश्वराची निज शक्ती । जे ज्ञानियांची विरक्ती । नैराशशोभा ।।५।।

संतांना जो शान्तीचा अनुभव येतो तो वृत्तिरूप असतो. ईश्वर सर्वशक्तिमान आहे. ती त्याची शक्ती शारदेचीच. आत्मज्ञानी महात्म्यांच्या निरपेक्षतेमुळे त्यांच्या वैराग्याला जी शोभा येते ती शारदेचीच. कारण वैराग्य ही वृत्तीच आहे. ।।५।।

जे अनंत ब्रह्मांडें घडी । लीळा विनोदेचि मोडी । आपण आदिपुरुषीं दडी । मारून राहे ।।६।।

ही मूळमायारूप शारदा अनंत ब्रह्मांडे निर्माण करते, केवळ खेळ म्हणून कौतुकाने ती नष्ट करते व स्वत: ब्रह्म स्वरूपात जणू दडी मारून बसते. (अव्याकृत) अनंत ब्रह्मांडे घडवणे व ती परत मोडणे हा तिचा लीलारूपी विनोद आहे. ।।६।।

जे प्रत्यक्ष पाहातां आडळे । विचार घेतां तरी नाडळे । जयेचा पार न कळे । ब्रह्मादिकांसी ।।७।।

तिला नामें व रूपें असल्याने ती डोळा इ. प्रमाणांनी म्हणजे ज्ञानेंद्रियांनी दिसते. परंतु अस्ति, भाति व प्रियरूपाने तिचा विचार करू लागले तर तिचा बाध होतो. कारण हे तीन अनुक्रमे सत्, चित् व आनंदाच्या पोटात सामावलेले आहेत. म्हणजे ब्रह्मरूप आहेत. केवळ नामे व रूपे ह्यांच्या आधाराने ती जिवंत राहते. अस्ति, भाति, प्रियत्वाचे निकष त्या नामरूपांना लावताच ती सत् चित् आनंदरूप ब्रह्मात गडप होते! उदा. दगडाला दगड हे नाव आहे व त्याला त्याचे रूप आहे. पण दगड अस्ति म्हणजे 'आहे' असे म्हणताच दगडाशिवाय पान, लाकूड, पाणी इ. अनेक नामे व रूपे असतात. म्हणून त्यांच्यात 'अस्तित्व' हे तत्त्व सारखे आहे. अस्तित्व हे तत्व जगत् सापेक्ष असल्याने जगत् नष्ट झाले की ते नष्ट होते. हे सापेक्ष अस्तित्व निरपेक्ष सत्वर निर्भर आहे व ते अनादि अनंत आहे. दगड पाहताच सत् रूप ब्रह्माचे स्मरण होणे ह्यालाच त्या दगडाचा व पर्यायाने जगताचा बाध असे म्हणतात. अशा ब्रह्माचे स्वरूप ब्रह्मदेवादिकांनाही कळत नाही. कारण ब्रह्मदेवही मायेच्या आवरणातच असतो. ।।७।।

जे सर्व नाटकअंतर्कळा । जाणीव स्फूर्ति निर्मळा । जयेचेनि स्वानंदसोहळा । ज्ञानशक्ती ।।८।।

ह्या जगद्रूप नाटकाची सूत्रधार व चालक शारदा आहे. शुद्ध जाणीव हे तिचेच स्वरूप आहे. ज्ञानाच्या शक्तीमुळे जे 'मी आनंदरूप आहे' असे वृत्तिज्ञान होते तो आनंदोत्सव तिचाच असतो. सहजावस्थेत आनंदानुभवालाही सहजता असते. त्याचा वेगळेपणाने अनुभव येत नाही. ।।८।।

जे लावण्यस्वरूपाची शोभा । जे परब्रह्मसूर्याची प्रभा । जे शब्दीं वदोनि उभा । संसार नासी ।।९।।

श्रीकृष्णादी सगुणरूपांचे अलौकिक सौंदर्य शारदेचे असते. परब्रह्माची जी जगतूरूपाने वस्तुप्रभा दिसते ती तिचीच असते. (जया एका सत्तेचे बैसणें । दोघा एका प्रकाशाचे लेणें । जे अनादि एकपणें । नांदती दोघे ॥ अमृ. १-८) ही शारदाच वेदान्तशास्त्ररूप शब्दसामर्थ्याने किंवा श्रीगुरुमुखातून येणाऱ्या महावाक्यरूप शब्दाने दृष्य संसाराचा बाध करते. ॥९॥

जे मोक्षश्रिया माहामंगळा । जे सत्रावी जीवनकळा । जे सत्वलीळा सुसीतळा । लावण्यखाणी ।।१०।।

अत्यंत मंगलमय असलेली 'मोक्षरूप संपत्ती' ही संकल्पना शारदेची आहे. कारण मोक्ष बंधनसापेक्ष आहे. नित्यमुक्ताला मोक्ष कुठला? जीवन हे सोळा कलांचे असते. पांच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, पाच प्राण व अन्त:करण, ह्या सर्वांना चेतना देणारी शारदा ही जणू सतरावी कला आहे. ईश्वर शुद्ध सत्त्वगुणाचा असतो. ईश्वरी लीला ह्या तिच्याच असतात. मूळमायारूप शारदा जगताचा गोंधळ नसल्याने शांत असते. शांतपणामुळे तिचे सौंदर्य खुलून दिसते. अथवा जल ह्या भूतात ब्रह्म महेशरूपाने रहाते तेव्हा त्रिपरसुन्दरीरूप शारदा शांती ह्या शक्तीच्या रूपाने रहाते.

(त्रिपुर सुंदरी स्तोत्र क्र. १४) ॥१०॥

जे अवेक्त पुरुषाची वेक्ती । विस्तारें वाढली इच्छाशक्ती । जे कळीकाळाची नियंती । सद्‌गुरुकृपा ।।११।।

अव्यक्त ब्रह्म शारदेच्या (शक्ती) रूपाने व्यक्त होते. तिच्या इच्छाशक्तीने अनंतकोटी ब्रह्मांडाचा पसारा निर्माण झाला. सद्‌गुरूंजवळ जी कृपाशक्ती असते, जी लाभली असता जन्ममरणातून सुटका होते, ती शक्ती शारदाच होय. ॥११॥

जे परमार्थमार्गींचा विचार । निवडून दावी सारासार । भवसिंधूचा पैलपार । पाववी शब्दबळें ।।१२।।

शारदेच्या शब्दशक्तीमुळे परमार्थशास्त्र तयार झाले असून त्यांत सार काय व असार काय ह्याचा स्पष्ट निवाडा केला आहे. त्याचे आधाराने भवसागर तरता येतो. ॥१२॥

ऐसी बहुवेषें नटली । माया शारदा येकली । सिद्धचि अंतरीं संचली । चतुर्विधा प्रकारें ।।१३।।

अशी अनेक रूपांनी नटलेली शारदा अन्त:करणांत चार प्रकाराने कायमची उपलब्ध (सिद्धचि) असते. ॥१३॥

तींहीं वाचा अंतरीं आलें । तें वैखरिया प्रगट केलें । म्हणौन कर्तुत्व जितुकें जालें । तें शारदागुणें ।।१४।।

ते चार प्रकार असे. परा, पश्यन्ती व मध्यमेतून अनुक्रमे येणारे शब्द वैखरी वाणी प्रगट करते. म्हणून शब्दसामर्थ्याने जे जे घडते (कर्तृत्व) ते ते शारदेमुळे होय. ॥१४॥

जे ब्रह्मादिकांची जननी । हरीहर जयेपासुनी । सृष्टिरचना लोक तिनी । विस्तार जयेचा ।।१५।।

ती ब्रह्मदेवाची माता असून श्रीविष्णू व शंकर तिचेच पुत्र होत. स्वर्ग, मृत्यू व पाताळ ह्या तिन्ही लोकांचा जो विस्तार तो तिचेच रूप होय. (जडमाया) ॥१५॥

जे परमार्थाचें मूळ । नांतरी सद्विद्याचि केवळ । निवांत निर्मळ निश्चळ । स्वरूपस्थिती ।।१६।।

मोक्षकारक अध्यात्मशास्त्र हे शारदेचेच रूप असून त्या शास्त्रामुळे साधकाला शांत, पावन व अढळ अशी आत्मस्थिती प्राप्त होते. ॥१६॥

जे योगियांचे ध्यानीं । जे साधकांचे चिंतनीं । जे सिद्धांचे अंत:कर्णीं । समाधिरूपें ।।१७।।

योगी लावीत असलेले ध्यान, ज्ञानमार्गी करीत असलेले चिंतन व सिद्धांच्या अनुभवात असलेली सविकल्प समाधी ही शारदेची रूपे होत. ॥१७॥

जे निर्गुणाची वोळखण । जे अनुभवाची खूण । जे व्यापकपणें संपूर्ण । सर्वां घटीं ।।१८।।

निर्गुण ब्रह्माची शब्दाने ओळख करून देण्याचे काम शारदा करते. 'मला ब्रह्माचा अनुभव आला' हे वृत्तिज्ञान शारदारूप आहे. ते ब्रह्म व्यापक असून सर्व जड-जीवांना ते व्यापून असते. ॥१८॥

शास्त्रें पुराणें वेद श्रुति । अखंड जयेचें स्तवन करिती । नाना रूपीं जयेसी स्तविती । प्राणिमात्र ।।१९।।

सहा शास्त्रे, अठरा पुराणे, चार वेद व श्रुतिवचने जे जे काही सांगतात ते सांगणे किंवा ज्ञान शारदामय असते. ती सर्व शारदेशिवाय काही बोलत नाहीत. अखंड तिची स्तुती करतात. सर्व प्राण्यांना जे जे हवे असते ते ते तिचेच रूप असते. सर्व प्राणी अशा रीतीने सतत तिचे भजन करतात. आहारासाठी अन्न, निद्रेसाठी भूमी, परस्परांचे भय व संभोगासाठी जोडीदार ही सर्व शारदेची रूपे आहेत. सर्व प्राण्यांना ती हवी असतात.

सहा शास्त्रे– पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा, न्याय, सांख्य, वैशेषिक व योग. अठरा पुराणे– मत्स्य, मार्कंडेय, भविष्य, भागवत, ब्रह्मांड, गरूड, लिङग, पद्म, वामन, अग्नि, सूर्य, नारद, वाराह, ब्रह्म वैवर्त, विष्णु, ब्रह्म व शिव. चार वेद– ऋग्वेद, यजु, साम्य, अथर्व.

श्रुतिवाक्ये– 'तत्त्वमसि', 'नेह नानास्ति किंचन', 'सर्वं खल्विदं ब्रह्म', 'द्वितीयाद्वैभयं भवति' इ. शिवाय उपपुराणे व उपवेद आहेत. ॥१९॥

जे वेदशास्त्रांची महिमा । जे निरोपमाची उपमा । जयेकरितां परमात्मा । ऐसें बोलिजे ।।२०।।

वेदशास्त्रांचे माहात्म्य शारदेमुळेच आहे. ब्रह्म एकमेव अद्वितीय असल्यामुळे त्याला कोणाची उपमा देता येत नाही. पण 'ते उपमारहित आहे' असे त्याचे माहात्म्य शारदेमुळेच सांगता येते. शारदेचे विश्व नानाभेदांनी भरलेले असल्याने त्यांत उपमा व उपमेय असा भेद शक्य आहे. त्यावरून तत् निरपेक्ष ब्रह्माची कल्पना करता येते. शारदारूप माया कल्पित आहे. कल्पिताला अधिष्ठान असतेच. (उदा. कल्पित चांदीला चकाकणाऱ्या शिंपीचे) म्हणून कल्पित मायेवरून परमात्मरूप ब्रह्माची कल्पना करता येते. ॥२०॥

नाना विद्या कळा सिद्धी । नाना निश्चयाची बुद्धी । जे सूक्ष्म वस्तूची शुद्धी । ज्ञेप्तीमात्र ।।२१।।

अनेक विद्या, कला, सिद्धी, 'हेच बरोबर आहे' इत्यादी प्रकारे निश्चय करणारी बुद्धी, ज्ञानरूप असलेल्या (ज्ञप्तिमात्र) सूक्ष्म ब्रह्माचा शोध घेण्याचे सामर्थ्य तिचेच आहे. ॥२१॥

जे हरिभक्तांची निजभक्ती । अंतर्निष्ठांची अंतरस्थिती । जे जीवन्मुक्तांची मुक्ती । सायोज्यता ते ।।२२।।

विष्णू इत्यादिकांचे भजन करणाऱ्यांची भक्ती, आत्मनिष्ठा सांभाळणाऱ्यांची आत्मस्थिती व जीवनमुक्त भोगतात ती सायुज्यमुक्ती ही तिचीच रूपे आहेत. ॥२२॥

जे अनंत माया वैष्णवी । न कळे नाटक लाघवी । जे थोराथोरासी गोवी । जाणपणें ।।२३।।

विष्णूच्या मायेला वैष्णवी म्हणतात. ती अज्ञानी जीवांसाठी अन्तपार नसणारी आहे. भासमय वस्तू सत्य आहेत, त्या माझ्या आहेत व अनुकूल-प्रतिकूल आहेत असा भ्रम निर्माण करणारी ती शक्ती जादूगाराप्रमाणे जणू हातचलाखी करते. भल्याभल्यांना 'मी ब्रह्म जाणतो' असा भ्रम निर्माण करून ती फसवते. ॥२३॥

जें जें दृष्टीनें देखिलें । जें जें शब्दें वोळखिलें । जें जें मनास भासलें । तितुकें रूप जयेंचे ।।२४।।

जे डोळ्याने दिसले, शब्दाने ज्याचे ज्ञान झाले व मनाला जे जाणवले ते शारदेचे रूप असते. ॥२४॥

स्तवन भजन भक्ति भाव । मायेवांचून नाहीं ठाव । या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ।।२५।।

स्तुती करणे, भजन म्हणणे, भावपूर्ण भक्ती इत्यादी सर्वांत शारदारूप माया असते. जे अध्यात्म शास्त्र जाणतात त्यांच्याच हे लक्षात येते. स्तवनाचे शब्द, ज्याचे स्तवन करावयाचे ते सगुण दैवत व स्तवन करणारा जीव ही सर्व मायिक आहेत! भजनाचे अभंग, ज्याचे भजन करावयाचे तो देव व अभंग म्हणणारी वाणी ही सर्व मायिक आहेत. भाव हा अन्त:करणाचा विकार आहे. ब्रह्म निर्विकार आहे. म्हणून ह्या सर्वांचा द्वैतात व त्रिपुटीत समावेश होतो. पंचदशीकार ह्या सर्वाला शास्त्रीय द्वैत म्हणतात. सामान्य उपासकांना अशी बोलणी आवडत नाहीत. पण ज्यांना 'मी

देव आहे’ अशी निश्चल आत्मनिवेदन भक्ती साध्य झाली आहे (दा. बो. १२-५) ते ह्या बोलण्यातील रहस्य जाणतात. ।।२५।।

म्हणौनि थोराहूनि थोर । जे ईश्वराचा ईश्वर । तयेसी माझा नमस्कार । तदांशेंचि आतां ।।२६।।

अशी ही माया सर्वांत श्रेष्ठ असून ती ईश्वराची ईश्वर आहे. ‘मी’ तिचाच अंश असून ती अंशी आहे. तिला मी नमस्कार करतो. (ज्याचे अंश पडतात तो अंशी) ।।२६।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ‘शारदास्तवननाम’ समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध ह्या ग्रंथांतील ‘शारदास्तवन’ नावाचा तिसरा समास समाप्त

दशक पहिला : स्तवनाचा

समास चौथा : गुरुस्तवन

॥ श्रीराम समर्थ ॥

'म्हणून जाणतेनि गुरु भजिजे । तेणें कृतकार्य होइजे । की मूळसिंचने सहजे । शाखा पल्लव संतोषती ॥' अशा शब्दात श्री ज्ञानदेवांनी श्री गुरुमाहात्म्य सांगितले आहे. ज्ञा. (१-२५) जो चाणाक्ष साधक आहे त्याने श्रीगुरूंना शरण जावे. त्यामुळे मनुष्यशरीरात आल्यावर जे केले पाहिजे (कार्य) ते तडीला जाते (कृत). वृक्षाच्या मुळात पाणी, खते इ. घातले असता फांद्या व पाने ह्यांना आपोआपच टवटवी येते. त्याप्रमाणे सद्‌गुरूंच्या संतोषाने मोक्षाच्या पालवीला बहर येतो. 'ब्रह्मानंदं परमसुखदं—-' इत्यादी प्रकारे केले जाणारे सद्‌गुरुस्तवन सर्वांच्या परिचयाचे आहे. भारतीय अध्यात्मशास्त्रात श्रीगुरू ह्या संस्थेला जी प्रतिष्ठा आहे तशी व तेवढी अभारतीय तत्त्वज्ञानांत नाही. मुळात भारतासारखे मोक्षवादी तत्त्वज्ञान भारताबाहेर सुव्यवस्थितपणे मांडलेच गेले नाही. नीतिशास्त्र, राज्यशास्त्र व धर्मशास्त्र ह्यांचेभोवतीच पाश्चात्त्य तत्त्वज्ञाने घुटमळत राहिली. 'मोक्ष' ही भारतीय संकल्पना व Salvation ही पाश्चात्त्य कल्पना वरवरच मिळतीजुळती आहे. मोक्षाचे सर्व पदर भारतातील वेदान्तशास्त्राप्रमाणे कोठेच मांडले गेले नाहीत. ह्यातून श्रीगुरुमाहात्म्याचे वैभव वाढले. तीन मोठ्या पाश्चात्त्य तत्त्वज्ञांचे व्यक्तिगत जीवन व स्वभाव पाहिले असता ते व भारतीय तत्त्वज्ञ ह्यांतील प्रचंड दरी लक्षात येते. स्पिनोझाचे लॅटिन भाषा शिकविणाऱ्या शिक्षकाच्या मुलीवर प्रेम जडले. पण तिने एक श्रीमंत तरुण भेटताच त्याचेबरोबर विवाह केला! ह्या धक्क्याने स्पिनोझा तत्त्वज्ञानाचा अभ्यासक बनला. श्रीगुरूंकडून विवेकाचे धडे घेऊन नव्हे! व्होल्टेर हा जगप्रसिद्ध तत्त्वज्ञ स्तुतिप्रिय, चंचल, संभाषणात घाणेरडी भाषा वापरणारा, कारस्थानी व अप्रामाणिक होता. शॉपेनॉर निराश, संशयी, तिरसट व अत्यंत भित्रा होता. भरलेली पिस्तुले उशागती ठेवून तो झोपत असे. ह्या तुलनेत आमचे ज्ञानदेव, तुकाराम, रामदास ह्यांचा विचार केला असता ती दरी फारच जाणवते. तत्त्वज्ञानाने व्यक्तिगत जीवन उंच व दर्जेदार होत नसेल तर ते सांगणाऱ्याचे मूल्य किती? मोक्षाची भारतीय कल्पना सिद्धीला जाण्यासाठी एकाही पाश्चात्त्य तत्त्वज्ञाचे तत्त्वज्ञान उपयोगी पडणार नाही. त्यांचे पांगुळगाडे वापरण्याची आम्हाला गरजच नाही. विज्ञानाच्या क्षेत्रात जसे आम्ही त्यांना अनुसरतो त्याप्रमाणे मोक्षाच्या क्षेत्रात त्यांनीच आमच्या मागे आले पाहिजे. स्वामी विवेकानंद, चिन्मयानंद, शिवानंद, अरविंद, रमणमहर्षी, जे. कृष्णमूर्ती इत्यादिकांनी ते सिद्ध केले आहे. विश्वविद्यालयांच्या वातावरणात पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे व मोक्षाच्या उद्देशाने तो करणे ह्यात फार फरक आहे. दोन्हीत गल्लत करणारी मंडळी प्रामाणिक साधकाची दिशाभूल करण्याची शक्यता आहे.

आतां सद्‌गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों सकेना । तें स्वरुप मज अज्ञाना । काये कळें ।।१।।

शारदेपाठोपाठ श्रीगुरूंचे वर्णन करू म्हटले तर ते फारच कठीण वाटते. ज्या साधनांनी त्यांचे वर्णन करावे ती सर्व मायिक असतात व मायेचा श्रीगुरूरूप ब्रह्माला स्पर्शही होत नाही! मी अज्ञानी त्यांचे कसे वर्णन करणार? ॥१॥

न कळे न कळे नेति नेति । ऐसें बोलतसे श्रुती । तेथें मज मूर्खाची मती । पवाडेल कोठें ।।२।।

श्रीगुरूरूप ब्रह्म पाच ज्ञानेंद्रियांनी कळत नाही. नऊ प्रमाणांनी कळत नाही (स्वसंवेद्य). श्रुतीने त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता 'हे ब्रह्म नाही, हे ब्रह्म नाही' अशा रीतीने त्याचा धांडोळा घेता घेता ती दमून गेली. मी तर मूर्खच असल्याने मला त्याचे ज्ञान कसे होणार? ॥२॥

मज न कळे हा विचारु । दुरूनि माझा नमस्कारु । गुरुदेवा पैलपारू । पाववीं मज ।।३।।

ह्या संबंधात मला काहीच कळत नाही. म्हणून श्रीगुरूंना त्यांचे वर्णन न करताच म्हणजे त्यांचे स्वरूप न

जाणताच मी त्यांना वंदन करतो. हे श्रीगुरो, आपणच मला ह्या दुस्तर भवसागराच्या पलीकडे न्या. ॥३॥

होती स्तवनाची दुराशा । तुटला मायेचा भर्वसा । आतां असाल तैसे असा । सद्गुरु स्वामी ।।४।।

हे श्रीगुरो, आपले स्तवन करण्याची मी जिद्द बाळगली खरी, पण ज्या मायिक सामुग्रीने स्तवन करावयाचे ती त्यासाठी निरुपयोगी आहे असे लक्षात आल्यावर मायेच्या मदतीची आशा सोडून दिली! हे श्रीगुरो, आता आपले स्वरूप जसे असेल तसे असूदे. 'ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति' (मुंडक ३-२-९) ब्रह्मवेत्ता ब्रह्मच होतो. ब्रह्मासारखा होत नाही. श्रीगुरू ब्रह्मवेत्ते असल्याने ब्रह्मच असतात. ब्रह्मरूप असतात. ॥४॥

मायेच्या बळे करीन स्तवन । ऐसें वांछित होतें मन । माया जाली लज्यायमान । काय करूं ।।५।।

मायेच्या मदतीने आपले स्तवन करण्याची इच्छा धरली होती खरी, पण मायाच लाजून चूर झाल्याने अबोल झाली. तिच्या शक्तीने बोलणारी माझी वाणी आता काय बोलणार? आता कोणताच उपाय उरला नाही. ॥५॥

नातुडे मुख्य परमात्मा । म्हणौनि करावी लागे प्रतिमा । तैसा मायायोगें महिमा । वर्णीन सद्गुरुचा ।।६।।

निर्गुण निराकार ब्रह्म (मुख्य परमात्मा) स्वसंवेद्य असते. म्हणूनच त्याची एखाद्या मूर्तीमध्ये कल्पना करावी लागते. तडजोड स्वीकारावी लागते. त्याचप्रमाणे आता त्या ब्रह्मरूप श्रीगुरूंची शरीरात कल्पना करून त्यांचे माहात्म्य सांगेन. मात्र मायेची मला नक्कीच मदत मिळेल. ॥६॥

आपल्या भावासारिखा मनीं । देव आठवावा ध्यानीं । तैसा सद्गुरु हा स्तवनीं । स्तऊं आतां ।।७।।

आपल्या भावानुसार श्रीरामासारख्या देवाचे जसे ध्यान करावे त्याप्रमाणे आता श्रीगुरूंची देहात कल्पना करून आता स्तुती करीन. ॥७॥

जय जया-जि सद्गुरुराजा । विश्वंभरा विश्वबीजा । परमपुरुषा मोक्षध्वजा । दीनबंधु ।।८।।

हे श्रीगुरो, आपला जयजयकार असो. विभु असा तू विश्वाला व्यापून आहेस. हे जग तुझ्यापासूनच उत्पन्न होते. (जन्माद्यस्य यतः – ब्र. सू. १-१-२) तू उत्तम पुरुष आहेस. (गीता अ. १५) तुझी ऐक्यभावाने प्रत्यक्ष अनुभूती हीच सायुज्य मुक्ती. तू दीनांचा सखा आहेस. करुणामय आहेस. ॥८॥

तुझीयेन अभयंकरें । अनावर माया हे वोसरे । जैसें सूर्यप्रकाशे अंधारें । पळोन जाये ।।९।।

तू शिष्यांना अभयदान दिलेस की अनावर असलेली माया (मम माया दुरत्यया– गीता) ओसरते. बाधित होते. सूर्य उगवल्यावर अंधार नष्ट होतो त्याप्रमाणे. ॥९॥

आदित्यें अंधकार निवारे । परंतु मागुतें ब्रह्मांड भरे । नीसी जालियां नंतरें । पुन्हा काळोखें ।।१०।।

पण ह्या उदाहरणांत मोठीच उणीव आहे. सूर्य उगवताच अंधार नष्ट होतो हे खरे. पण रात्र होताच पुन्हा तो ब्रह्मांडात भरून राहतो. ॥१०॥

तैसा नव्हे स्वामीराव । करी जन्ममृत्य वाव । समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी ।।११।।

श्रीगुरूंचे तसे नाही. अविद्येचे मूळच छाटून टाकून ते जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमचे सोडवितात. ॥११॥

सुवर्णाचे लोहो कांहीं । सर्वथा होणार नाहीं । तैसा गुरूदास संदेहीं । पडोंचिं नेणे सर्वथा ।।१२।।

परिसाने लोखंडाला एकदा स्पर्श करून त्याचे सोने झाल्यावर तो परीस दूर झाला तरी पुन्हा त्या सोन्याचे लोखंड होत नाही. त्याप्रमाणे एकदा गुरुकृपा झाली की तुटलेल्या अज्ञानाच्या मुळाला पुन्हा अंकुर फुटत नाही. अज्ञानरूप भ्रम कायमचा दूर होतो. ॥१२॥

कां सरिता गंगेसी मिळाली । मिळणी होतां गंगा जाली । मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा ।।१३।।

लहान ओढे, झरे एकदा गंगेला मिळाले की त्यांनाही गंगाच म्हणतात. नंतर पुन्हा त्यांना गंगेपासून वेगळे करता

येणे कधीच शक्य नाही. ॥१३॥

परी ते सरिता मिळणीमागें । वाहाळ मानिजेत जगें । तैसा नव्हे शिष्य वेगें । स्वामीच होये ।।१४।।

पण वरील उदाहरणही गुरू-शिष्यांचे बाबतीत उणे ठरते! कारण तो ओढा किंवा झरा गंगेला मिळेपर्यंतच्या त्याच्या प्रवाहाला ओढा किंवा झरा ह्याच नावाने ओळखले जाते. शिष्याचे तसे नाही. शिष्य श्रीगुरुस्वरूपात जाऊन मिळाल्यानंतर त्या शिष्यालाही श्रीगुरू असेच म्हणतात! तोही श्रीगुरूंच्या योग्यतेला प्राप्त होतो. ॥१४॥

परीस आपणाऐसें करीना । सुवर्णे लोहो पालटेना । उपदेश करी बहुत जना । अंकित सद्‌गुरूचा ।।१५।।

परीस लोखंडाचे सोने करतो पण त्या सोन्याला परिसाची योग्यता कधीच मिळत नाही! त्या सोन्याचा लोखंडाला स्पर्श झाला तर त्याचे सोने होत नाही. पण श्रीगुरूंचा दास असलेला शिष्य मात्र श्रीगुरुपदावर बसून त्याच्या शिष्यांना श्रीगुरुपद देऊ शकतो! ॥१५॥

शिष्यास गुरूत्व प्राप्त होये । सुवर्णे सुवर्ण करितां न ये । म्हणौनि उपमा न साहे । सद्‌गुरूसी परिसाची ।।१६।।

शिष्यालाच गुरुत्व मिळत असल्याने व सोन्याने सोने होत नसल्याने श्रीगुरूंना परिसाची उपमा कमी पडते. तो दृष्टान्त देता येत नाही. ॥१६॥

उपमे द्यावा सागर । तरी तो अत्यंतचि क्षार । अथवा म्हणों क्षीरसागर । तरी तो नासेल कल्पांतीं ।।१७।।

श्रीगुरूंना व्यापकत्वामुळे समुद्राची उपमा द्यावी तर समुद्र खारट असतो. ही उणीव दूर करण्यासाठी त्यांना दुधाचा समुद्र म्हणावे तर तोही कल्पाच्या शेवटी जगाबरोबर नष्ट होतो. श्रीगुरू अमर असतात. त्यामुळे हाही दृष्टान्त देता येत नाही. ॥१७॥

उपमे द्यावा जरी मेरु । तरी तो जड पाषाण कठोरु । तैसा नव्हे कीं सद्‌गुरू । कोमळ दिनाचा ।।१८।।

मेरू पर्वत सुवर्णमय व प्रचंड असल्याने त्याची श्रीगुरूंना उपमा द्यावी तर तो अचेतन, दगड व कठोर (टणक) असतो. श्रीगुरू दीनांविषयी अत्यंत कोमल म्हणजे हळवे असतात. दयाळू असतात. ॥१८॥

उपमे म्हणों गगन । तरी गगनापरीस तें निर्गुण । या कारणें दृष्टांत हीण । सद्‌गुरूस गगनाचा ।।१९।।

गंभीर व व्यापक असल्याने आकाशाची त्यांना उपमा द्यावी तर गगनाला शब्द हा गुण असल्याचे शास्त्र सांगते. त्यामुळे ते सगुण ठरते. श्रीगुरू निर्गुण आहेत. म्हणून त्यांना आकाशाची उपमा देता येत नाही. ॥१९॥

धीरपणें उपमूं जगती । तरी हेहि खचेल कल्पांतीं । म्हणौन धीरत्वास दृष्टांतीं । हीण वसुंधरा ।।२०।।

क्षमा हा पृथ्वीचा गुण असल्याने श्रीगुरूंना पृथ्वीची उपमा द्यावी तर तीही कल्पाच्या शेवटी जल तत्त्वात विरून जाते. म्हणून अशा हीन पृथ्वीची उपमा श्रीगुरूंना देण्याचा धीर होत नाही. ॥२०॥

आता उपमावा गभस्ती । तरी गभस्तीचा प्रकाश किती । शास्त्रें मर्यादा बोलती । सद्‌गुरू अमर्याद ।।२१।।

सूर्य तेजस्वी व प्रकाशमान असल्याने त्याची श्रीगुरूंना उपमा द्यावी तर त्याचा प्रकाश तो किती? एका मर्यादेपलीकडे तो पोचू शकत नाही असे शास्त्र सांगते. श्रीगुरू अमर्याद प्रकाशमान आहेत. ते सूर्यासह सर्वप्रकाशक आहेत. नित्य प्रकाशमान आहेत. ॥२१॥

म्हणौनि उपमें उणा दिनकर । सद्‌गुरु ज्ञानप्रकाश थोर । आतां उपमावा फणीवर । तरी तोही भारवाही ।।२२।।

म्हणून श्रीगुरूंची सूर्याशी जराही तुलना होऊ शकत नाही. व्यापक, अनादि, नित्य, सत्य, आद्य (थोर) ज्ञानप्रकाश हे श्रीगुरूंचे स्वरूप आहे. शेषाची व त्यांची तुलना करावी तर शेष पृथ्वीचा भार डोक्यावर वाहणारा सामान्य सेवक आहे. त्याला शंभर फण्या आहेत एवढेच! ॥२२॥

आतां उपमा द्यावें जळ । तरी तें काळांतरीं आटेल सकळ । सद्‌गुरूरूप तें निश्चळ । जाणार नाहीं ।।२३।।

पाणी सर्वांची तहान भागवून त्यांना स्वच्छ करते म्हणून श्रीगुरूंना पाण्याची उपमा द्यावी तर काही कालांतराने कल्पान्ती ते अग्नितत्त्वात विलीन होते. श्रीगुरू अढळ, नित्य, अविकारी आहेत. त्यांना जाणे-येणे नाही. ॥२३॥

सद्‌गुरूसी उपमावें अमृत । तरी अमर धरिती मृत्यपंथ । सद्‌गुरूकृपा यथार्थ । अमर करी ।।२४।।

अमृत अमरत्व देते म्हणून श्रीगुरूंची त्याच्याशी तुलना करावी तर रोज अमृत पिणारे देवसुद्धा मृत्युपंथाने जातात असे शास्त्र सांगते. यथार्थ श्रीगुरुकृपा झाली तर जीव ब्रह्मच होऊन त्यासारखा अज, अजर व अमर होतो. ॥२४॥

सद्‌गुरूसी म्हणावें कल्पतरु । तरी हा कल्पनेतीत विचारु । कल्पवृक्षाचा अंगिकारु । कोण करी ।।२५।।

इच्छा करावी ते देतो म्हणून कल्पतरूची श्रीगुरूंना उपमा द्यावी तर श्रीगुरुकृपेने शिष्य नित्यतृप्त झाल्याने इच्छारहित होतो. मग कल्पतरूला कोण विचारतो? ॥२५॥

चिंता मात्र नाहीं मनीं । कोण पुसे चिंतामणी । कामधेनूचीं दुभणीं । निःकामासी न लगती ।।२६।।

चिंतावे ते देतो तो देणारा चिंतामणी व कामधेनू यांची तुलना त्यांच्याशी करावी तर श्रीगुरूकृपा झालेला निष्काम झाल्याने त्यांला चिंतामणीची किंमतच वाटत नाही. कामधेनूचे दुभते त्याला नीरस वाटते. ॥२६॥

सद्‌गुरू म्हणों लक्ष्मीवंत । तरी ते लक्ष्मी नाशिवंत । ज्याचे द्वारीं असे तिष्ठत । मोक्षलक्ष्मी ।।२७।।

श्रीविष्णूपाशी लक्ष्मी असल्याने त्यांची श्रीगुरूंना उपमा द्यावी तर लक्ष्मी विनाशी आहे. लक्ष्मीधर विष्णूसुद्धा मूळमायेत लीन होतात. मोक्षरूप लक्ष्मी श्रीगुरूंची सतत सेवा करते. 'मी मुक्त आहे.' असाही अभिमान श्रीगुरूंना नसल्याने ती जणू त्यांच्या दारातच राहते. ॥२७॥

स्वर्गलोक इंद्र संपती । हे काळांतरी विटंबती । सद्‌गुरूकृपेची प्राप्ती । काळांतरी चळेना ।।२८।।

स्वर्गलोक, इंद्राचे वैभव हे तर श्रीगुरूंच्या पासंगालाही पुरत नाहीत. कारण ते काळाच्या ओघात नष्ट होतात. श्रीगुरुकृपेने त्रिकालाबाधित ब्रह्म प्राप्त होते. ते नष्ट होणारे नाही. ॥२८॥

हरीहर ब्रह्मादिक । नाश पावती सकळिक । सर्वदा अविनाश येक । सद्‌गुरूपद ।।२९।।

विष्णू, शंकर व ब्रह्मदेव हे मूळमायेतून व्यक्त होतात. जे व्यक्त होते ते सर्व नष्ट होते. सद्‌गुरुपद मात्र अविनाशी, अविकारी आहे. ॥२९॥

तयासी उपमा काय द्यावी । नाशिवंत सृष्टी आघवी । पंचभूतिक उठाठेवी । न चलें तेथें ।।३०।।

म्हणून श्रीगुरूंना कोणाचीच उपमा देता येत नाही. सृष्टीतील प्रत्येक पदार्थ नाशिवंत आहे. जे जे पांचभौतिक असते ते ते विनाशी असल्याने त्याचा श्रीगुरूंशी संबंध जोडण्याचा व्यर्थ खटाटोप करू नये. ॥३०॥

म्हणौनि सद्‌गुरू वर्णवेना । हे गे हेचि माझी वर्णना । अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती ।।३१।।

एकूण श्रीगुरूंचे शब्दाने वर्णन करणे शक्य नाही. अहो, हेच त्यांचे वर्णन मी केले आहे! या माझ्या वर्णनाचे रहस्य जे ब्रह्मज्ञानी आहेत त्यांनाच कळेल!! कारण एक ब्रह्मज्ञ दुसऱ्या ब्रह्मज्ञाच्या भाषेचे वर्म जाणू शकतो. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरूशिष्यसंवादे 'सद्‌गुरूस्वतननाम' समास चौथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध ह्या ग्रंथांतील 'सद्‌गुरूस्तवन' नावाचा चवथा समास समाप्त

दशक पहिला : स्तवनाचा

समास पाचवा : संतस्तवन

॥ श्रीराम समर्थ ॥

संत हे भारतीय समाजाचे भूषण व वैभव आहे. भोगवादापासून समाजाला दूर ठेवून त्याला ईश्वरनिष्ठ करून मोक्षाची सोपी वाट दाखविण्याचे महत्कार्य ते करतात. श्रीगुरूंची बांधिलकी शिष्याशी असेल तर संतांची सर्व समाजाशी असते. ज्ञानदेवांचे पसायदान व समर्थांचे आनंदवनभुवन त्यांच्या समाजनिष्ठेचे साक्षीदार आहेत. त्यांच्या ग्रंथरचना समाजाला रुचतील व पचतील अशा आहेत. राजकारणातील अपयशामुळे भारतीय समाज कितीही विस्कळीत झाला तरी धर्म व अध्यात्माच्या आधाराने संतांनी तो एक ठेवण्याचा प्रयत्न केला.

आतां वंदीन सज्जन । जे परमार्थाचें अधिष्ठान । जयांचेनि गुह्यज्ञान । प्रगटे जनीं ।।१।।

श्रीगणेशाला वंदन असो. ज्यांचा मोक्षमार्गाला मोठा आधार आहे व ज्यांच्यामुळे त्या मार्गाची रहस्ये सामान्य लोकांना समजू लागतात त्या संतांना आता मी वंदन करतो. ॥१॥

जे वस्तु परम दुल्लभ । जयेचा अलभ्य लाभ । तेंचि होये सुल्लभ । संतसंगें करूनी ।।२।।

अत्यंत कठीण असलेला जीव व ब्रह्म यांच्या ऐक्याचा अनुभव तो संतांच्या सहवासात सोपा होतो. ॥२॥

वस्तु प्रगटचि असे । पाहातां कोणासीच न दिसे । नाना साधनीं सायासें । न पडे ठाईं ।।३।।

तसे पाहिले तर ब्रह्मानुभव सर्वांना सतत आहे. पण ते ज्ञान नेहमीच्या ज्ञान होण्याच्या पद्धतीने होत नसल्याने ते नाही असे वाटते. भलत्याच दिशेने प्रयत्न करून ते कधीच होत नाही. ॥३॥

जेथें परीक्षवंत ठकले । नांतरी डोळस-चि अंध जाले । पाहात असतांचि चुकले । निजवस्तूसी ।।४।।

जे स्वत:ला मोठे परीक्षावंत समजतात तेही त्या बाबतीत फसतात. चर्मचक्षूंना ब्रह्म दिसत नसल्याने ते असून नसल्यासारखे असतात. कित्येक साधकांना जीव ब्रह्म आहे असा अनुभव येऊनही त्याला व्यावहारिक अनुभवाचे स्वरूप नसल्याने तो अनुभव आल्याचे त्यांनाच कळत नाही. ॥४॥

जें दीपाचेनि दिसेना । नाना प्रकाशें गवसेना । नेत्रांजनेंहि वसेना । दृष्टीपुढें ।।५।।

ब्रह्म दिव्याच्या उजेडात दिसत नाही. हिऱ्याच्या प्रकाशात कळत नाही, गुप्त ठेवा दाखविणारे नेत्रांजन डोळ्यांत घालूनही अरूप निराकार ब्रह्म दृष्टीस पडत नाही. ॥५॥

सोळां कळी पूर्ण शशी । दाखऊं शकेना वस्तूसी । तीव्र आदित्य कळारासी । तोहि दाखवीना ।।६।।

पौर्णिमेच्या चंद्राच्या किंवा प्रखर सूर्याच्या प्रकाशातही ब्रह्मदर्शन करून देण्याचे सामर्थ्य नाही. ॥६॥

जया सूर्याचेनि प्रकाशें । ऊर्णतंत तोहि दिसे । नाना सूक्ष्म पदार्थ भासे । अणुरेणादिक ।।७।।

ज्या तेजस्वी सूर्याच्या प्रकाशात कोळ्याच्या धाग्यासारखी सूक्ष्म वस्तू व अतिबारीक धूलीकण दिसू शकतात. ॥७॥

चिरलें वाळाग्र तेंहि प्रकासी । परी तो दाखवीना वस्तूसी । तें जयाचेनि साधकांसी । प्राप्त होये ।।८।।

केसाचे कापलेले टोकही दिसते पण साधकाला अनुभव येईल अशा प्रकारे तो प्रकाश ब्रह्म दाखवू शकत नाही. ॥८॥

जेथें आक्षेप आटले । जेथें प्रेत्न प्रस्तावले । जेथें तर्क मंदावले । तर्किंतां निजवस्तूसी ।।९।।

जेथे संशयी बुद्धी कुंठित होते, भलत्याच दिशेने केलेले प्रयत्न फुकट जातात व तार्किकांच्या तर्कबुद्धीचे शहाणपण चालत नाही अशी ती ब्रह्मवस्तू आहे. ब्रह्मज्ञान नित्य असल्याने त्यासाठी प्रयत्न करायचे नसतात. अज्ञान घालविण्यासाठी ते करावे लागतात. 'नैषा तर्केण मतिरापनेय' (कठ १-२-९) त्याच्या अनुभवासाठी आवश्यक ती बुद्धी तर्काने मिळत नाही. तर्क बाह्यपदार्थांसंबंधी करता येतो. स्वरूपासंबंधी नव्हे. ॥९॥

बळे विवेकाची वेंगडी । पडे शब्दाची बोबडी । जेथें मनाची तांतडी । कामा नये ।।१०।।

'ब्रह्म सत्य असून जगत् मिथ्या आहे' अशा शाब्दिक विवेकाची तेथे गठडी वळते. शब्द माघारी फिरल्याशिवाय त्याचा अनुभव येत नाही. मनाने कितीही तत्परता दाखविली तरी त्याला आत्मदर्शन होत नाही. ('यतो वाचा निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह' तै. २-९-१) ॥१०॥

जो बोलकेपणें विशेष । सहस्र मुखांचा जो शेष । तोहि सिणला निःशेष । वस्तु न संगवे ।।११।।

हजार तोंडे असल्याने जो अखंड बोलू शकतो त्या शेषालाही ब्रह्म सांगताना थकवा येतो. पण ते सांगता येत नाही. ॥११॥

वेदें प्रकाशिलें सर्वहि । वेदविरहित कांहीं नाहीं । तो वेद कोणासहि । दाखऊं सकेना ।।१२।।

वेदांमध्ये अनेक विषयांसंबंधी विस्तृत लिहिले आहे. जे वेदात नाही ते कोठेच नाही. असा वेदही कोणा साधकाला ब्रह्मानुभव देऊ शकत नाही. ॥१२॥

तेचि वस्तु संतसंगे । स्वानुभवें कळों लागे । त्याचा महिमा वचनीं सांगें । ऐसा कवणु ।।१३।।

पण हेच ब्रह्म संतांच्या सहवासात अनुभवाला येते. या अनुभवाचे माहात्म्य वाणीने सांगता येईल असा कोणी नाही. म्हणून संतांचेही माहात्म्य सांगणे कठीण आहे. ॥१३॥

विचित्र कळा ये मायेची । परी वोळखी न संगवे वस्तूची । मायातीता अनंताची । संत सोये सांगती ।।१४।।

या मायेचे सामर्थ्य व जादू अशी आहे की तिच्या प्रभावाखाली ब्रह्मानुभव सांगताच येत नाही. संत मात्र मायेचे अधिष्ठान असलेल्या ब्रह्माची ओळख करून देतात. ॥१४॥

वस्तूसी वर्णिलें नवचे । तेंचि स्वरूप संताचें । या कारणें वचनांचें । कार्य नाहीं ।।१५।।

ज्या ब्रह्माचे कोणत्याही प्रकारे वर्णन करता येत नाही त्या ब्रह्माची संत ही जणू मूर्त रूपे असतात. संत ब्रह्मरूप असल्याने त्यांचेही वर्णन शब्दांनी करणे कठीणच आहे. ॥१५॥

संत आनंदाचें स्थळ । संत सुखचि केवळ । नाना संतोषाचें मूळ । ते हे संत ।।१६।।

संतांचे जीवन आनंदमय असते. सुखच जणू त्यांच्या रूपाने आकाराला येते. त्रिविध ताप नष्ट करून सर्व प्रकारे संतुष्ट जीवन जगण्याची विद्या त्यांच्याकडून घ्यावी. ॥१६॥

संत विश्रांतीची विश्रांती । संत तृप्तीची निजतृप्ती । नातरी भक्तीची फळश्रुती । ते हे संत ।।१७।।

मोक्ष संतांचे ठिकाणी विश्रांतीला येतो. त्याची सर्व खटपट त्यांचे ठिकाणी थांबते. तृप्ती संतांच्या जवळ तृप्त होते. सामान्य जीवांना कितीही तृप्त केले तरी ते तृप्तच होत नाहीत. तृप्ती अतृप्तच राहते! अनेक प्रकारच्या उपासनांना येणारे फळ म्हणजे संतदर्शन होय. ॥१७॥

संत धर्माचें धर्मक्षेत्र । संत स्वरूपाचें सत्पात्र । नातरी पुण्याची पवित्र । पुण्यभूमी ।।१८।।

धर्म संतांच्या आश्रयाने राहतो. त्यांच्या देहांत स्वरूपाचे दर्शन घेण्याची योग्यता आहे. संत ही पवित्र पुण्यक्षेत्रेच होत. ॥१८॥

संत समाधीचें मंदिर । संत विवेकाचें भांडार । नातरी बोलिजे माहेर । सायोज्यमुक्तीचें ।।१९।।

संतांच्या देहरूप मंदिरात चालतीबोलती समाधी राहते. क्षराक्षर, प्रकृतिपुरुष, क्षेत्रक्षेत्रज्ञ इ. विवेकांची संत ही भांडारे

असतात. ते सायुज्य मुक्तीचे माहेरघर असतात. ती त्यांच्याजवळ मोकळेपणाने सुखात राहते! ॥१९॥

संत सत्याचा निश्चयो । संत सार्थकाचा जयो । संत प्राप्तीचा समयो । सिद्धरूप ।।२०।।

सत्याचे (ब्रह्म) निश्चयात्मक स्वरूप संतांना उमगलेले असते. सार्थकाला (मोक्ष) संतांमुळे विजय मिळतो. मनुष्य जन्माचे सार्थक होऊ शकते हे संतांमुळे जगाला कळते. जीव-ब्रह्म त्यांचे ऐक्य सिद्धीला जाण्याची वेळ संतांच्या ठिकाणी येते. ॥२०॥

मोक्षश्रिया आळंकृत । ऐसे हे संत श्रीमंत । जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले ।।२१।।

मोक्षरूप संपत्तीच्या शांती, निर्भयता, तृप्ती इ. अलंकारांनी संत शोभून दिसतात. तीच त्यांची श्रीमंती होय. ही संपत्ती नसलेल्या अनेक दरिद्री जीवांना ते त्या श्रीमंतीचे स्वामी करतात. जीवभाव हेच दारिद्र्य असून मोक्ष हेच सम्राटपद आहे. संतरूप सम्राट अनेक दरिद्र्यांना सम्राटपदावर बसवतात. ॥२१॥

जे समर्थपणें उदार । जे कां अत्यंत दानशूर । तयांचेनि हा ज्ञानविचार । दिधला न वचे ।।२२।।

संत श्रीमंत व उदार असतात व म्हणून अतिशय दानशूर असतात. त्यांनी कितीही दिली तरी त्यांची ज्ञानरूप संपत्ती कधीच संपत नाही. ॥२२॥

माहाराजे चक्रवर्ती । जाले आहेत पुढें होती । परंतु कोणी सायोज्यमुक्ती । देणार नाहीं ।।२३।।

लहान-मोठे राजे व चक्रवर्ती सम्राट आजपर्यंत कित्येक झाले व पुढेही होतील. तेही दानशूर असले तरी सायुज्य मुक्ती त्यांना कोणालाच देता येत नाही. ॥२३॥

जें त्रैलोकीं नाहीं दान । तें करिती संतसज्जन । तयां संतांचे महिमान । काय म्हणौनि वर्णावें ।।२४।।

तिन्ही लोकातील कोणालाही जे दान करता येत नाही ते संत करतात. त्या संतांचे माहात्म्य कोणत्या शब्दात कोणी सांगावे? ॥२४॥

जें त्रैलोक्याहून वेगळें । जें वेदश्रुतीसी नाकळें । तेंचि जयांचेनि वोळें । परब्रह्म अंतरीं ।।२५।।

परब्रह्म तिन्ही लोकांपासून असंग आहे. ('प्रपंचोपशमम्'– मांडूक्य. ७) वेद व श्रुतिवाक्ये त्याला जाणू शकत नाहीत. त्याच परब्रह्माचे ज्यांच्या सहवासाने अनुभवात्मक ज्ञान होते. ॥२५॥

ऐसी संतांची महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा । जयांचेनि मुख्य परमात्मा । प्रगट होये ।।२६।।

असे संतांचे माहात्म्य आहे. त्यांच्याविषयी जेवढे बोलावे तेवढे थोडेच आहे. त्यांच्यामुळेच ब्रह्म जणू प्रत्यक्ष होते. ॥२६॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'संतस्तवननाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध ह्या ग्रंथांतील 'संतस्तवन' नावाचा पाचवा समास समाप्त.

दशक पहिला : स्तवनाचा

समास सहावा : श्रोतेजनस्तवन

॥ श्रीराम समर्थ ॥

समर्थांच्या आध्यात्मिक सभेतील श्रोता सत्त्वगुणी, बुद्धिमान, शब्दप्रभू, प्रसंगी वक्त्याहून श्रेष्ठ, पवित्र, वक्त्याला स्फूर्ती देणारा, भाविक व जाणकार आहे. सभेत समर्थ स्वत:कडे गौणत्व घेऊन आपल्या सहज विनयाची अभिव्यक्ती करतात. 'वक्ता तो वक्ता नव्हे । श्रोतेवीण ।' या ज्ञानदेवांच्या वचनाशी ते पूर्ण सहमत आहेत.

आतां वंदूं श्रोते जन । भक्त ज्ञानी संत सज्जन । विरक्त योगी गुणसंपन्न । सत्यवादी ।।१।।

आता भक्त, ज्ञानी, संततुल्य, सज्जन, विरक्त, योगाभ्यास करणाऱ्या, सद्‌गुणी व सत्यवादी श्रोतृवर्गाला वंदन करू. ॥१॥

येक सत्वाचे सागर । येक बुद्धीचे आगर । येक श्रोते वैरागर । नाना शब्दरत्नाचे ।।२।।

श्रोत्यातील काही जण सत्त्वगुणसंपन्न, काही महाबुद्धिमान तर काही शब्दरूप रत्नांच्या खाणीप्रमाणे असतात. ॥२॥

जे नाना अर्थांबृताचे भोक्ते । जे प्रसंगी वक्तयाचे वक्ते । नाना संशयातें छेदिते । निश्चई पुरुष ।।३।।

काही जणांजवळ शब्दार्थाच्या अनेक छटा जाणण्याचे कौशल्य असते. काही वेळी, प्रसंगी वक्त्यालासुद्धा मार्मिक मार्गदर्शन करू शकतात. सभेत फार शंका उपस्थित केल्या गेल्या तर त्यांचे शास्त्रशुद्ध व परिणामकारक निराकरण करण्याचे सामर्थ्य काहींपाशी असते. ॥३॥

ज्यांची धारणा अपार । जे ईश्वराचे अवतार । नातरी प्रत्यक्ष सुरवर । बैसले जैसे ।।४।।

काही श्रोत्यांची ग्रहणशक्ती एवढी तीक्ष्ण असते की त्यांना ईश्वराचे अवतार किंवा प्रत्यक्ष देवच म्हणावे. ॥४॥

किं हे ऋषेश्वरांची मंडळी । शांतस्वरूप सत्वागळी । जयांचेनि सभामंडळीं । परम शोभा ।।५।।

काही श्रोत्यांकडे पाहिले की ते ऋषिमंडळातील असावेत असे वाटते. ते शांत व सात्त्विक दिसतात. त्यांच्या उपस्थितीमुळे सभेची शोभा वाढते. ॥५॥

हृदईं वेदगर्भ विलसे । मुखीं सरस्वती विळासे । साहित्य बोलतां जैसे । भासती देवगुरु ।।६।।

काहींच्या ठिकाणी वेदांच्या तात्पर्याचा अखंड निश्चय असतो. वाणीवर सरस्वतीच बसली आहे अशी विद्वत्ता असते. ते साहित्यासंबंधी बोलू लागले तर बृहस्पतीच त्यांच्या रूपाने बोलतात असे वाटते. ॥६॥

जे पवित्रपणें वैश्वानर । जे स्फूर्तिकिरणाचे दिनकर । ज्ञातेपणें दृष्टीसमोर । ब्रह्मांड नयें ।।७।।

काही अग्नीसारखे पवित्र, सूर्यापासून किरण येतात तशी त्यांच्यापासून वक्त्याला स्फूर्ती मिळते असे, तर काहींना आत्मज्ञानामुळे समोर दिसणारे ब्रह्मांड बाधीत झालेले असते. ॥७॥

जे अखंड सावधान । जयांस त्रिकाळाचें ज्ञान । सर्वकाळ निरभिमान । आत्मज्ञानी ।।८।।

काही श्रोते श्रवणकाळी अत्यंत सावध असतात, त्यांना तिन्ही काळांचे ज्ञान असते. व आत्मज्ञानामुळे निरहंकार स्थितीमध्ये ते असतात. ॥८॥

ज्यांचें दृष्टीखालून गेलें । ऐसें कांहींच नाहीं उरलें । पदार्थमात्रासी लक्षिलें । मनें जयांच्या ।।९।।

काही असे सर्वज्ञ असतात की त्यांनी जाणले नाही असे काहीच शिल्लक नसते. ज्ञानाच्या अनेक क्षेत्रांत त्यांना गती असते. ॥९॥

जें जें कांहीं आठवावें । तें तें तयांस पूर्वीच ठावें । तेथें काये अनुवादावें । ज्ञातेपणेंकरूनी ।।१०।।

वक्त्याने जे जे आठवून आठवून सांगावे ते ते त्यांना आधीपासूनच ठाऊक असते! मग वक्त्याने 'मी ज्ञाता' अशा भूमिकेतून काय बरे सांगावे? ॥१०॥

परंतु हे गुणग्राहिक । म्हणौन बोलतों निःशंक । भाग्यपुरुष काये येक । सेवीत नाहीं ।।११।।

तरीही ते वक्त्याच्या गुणांचे भोक्ते असतात. त्यामुळेच मी सभेमध्ये न बावरता बोलू शकतो. खरोखर जे भाग्यवन्त असतात ते सर्वच गुणांचे भोक्ते असतात. ॥११॥

सदा सेविती दिव्यान्नें । पालटाकरणें आवेट अन्नें । तैसींच माझीं वचनें । पराकृतें ।।१२।।

जे सदाच पक्वान्ने जेवतात ते केव्हा तरी माझ्यासारख्याचे साधे वक्तव्यरूप अन्न रुचिपालट म्हणून घेतात! माझे बोलणेच तसे सुमार आहे. ॥१२॥

आपुले शक्तिनुसार । भावें पुजावा परमेश्वर । परंतु पुजूं नये हा विचार । कोठेंचि नाहीं ।।१३।।

जशी आपली शक्ती असेल त्याप्रमाणे परमेश्वराची पूजा करावी. पूजा करूच नये असे कोठेच म्हटलेले नाही. त्याप्रमाणे– ॥१३॥

तैसा मी येक वाग्दुर्बळ । श्रोते परमेश्वरचि केवळ । यांची पूजा वाचाबरळ । करूं पाहे ।।१४।।

मी वाणीने दुर्बळ आहे तर श्रोते परमेश्वरासारखे आहेत. त्यांची मी माझ्या बोबड्या बोलाने पूजा करू पाहतो. ॥१४॥

वित्पत्ती नाहीं कळा नाहीं । चातुर्य नाहीं प्रबंद नाहीं । भक्ति ज्ञान वैराग्य नाहीं । गौल्यता नाहीं वचनाची ।।१५।।

व्युत्पत्तिशास्त्र मला ठाऊक नाही, वक्तृत्वाची कला माझ्याजवळ नाही. बोलण्यातील खुब्या मी आत्मसात केलेल्या नाहीत. चातुर्य किंवा विद्वत्ताही नाही. भक्ती, ज्ञान व वैराग्याचा अभाव असून बोलण्याला गोडी नाही. ॥१५॥

ऐसा माझा वाग्विळास । म्हणौन बोलतों सावकाश । भावाचा भोक्ता जगदीश । म्हणौनियां ।।१६।।

माझे वक्तृत्व अशा प्रकारचे असल्यामुळे मी अडखळत कसेतरी बोलतो आहे. जगदीशाला भाव आवडतो ह्याच आधारावर माझे बोलणे निर्भर आहे. ॥१६॥

तुम्ही श्रोते जगदीशमूर्ति । तेथें माझी वित्पत्ती किती । बुद्धिहीण अल्पमती । सलगी करितों ।।१७।।

तुम्ही श्रोते जगदीशाच्या मूर्ती आहात. ('प्रभू तुम्ही महेशाच्या मूर्ती'- ज्ञाने.) तुमच्यापुढे माझे ज्ञान ते किती? असा बुद्धी नसलेला मी केवळ लडिवाळपणे तुमच्यापुढे उभा आहे. ॥१७॥

समर्थाचा पुत्र मूर्ख जगीं । परी सामर्थ्य असे त्यांचे आंगी । तुम्हां संतांचा सलगी । म्हणौनि करितों ।।१८।।

व्यवहारामध्यें कोणा सत्ताधीशाचा मुलगा मूर्ख असला तरी त्यालाही लोक सत्ताधीश समजतात. अशाच प्रकारे मी तुमचा आहे असे मानून तुम्ही मला अभय द्यावे. ॥१८॥

व्याघ्र सिंह भयानक । देखोनि भयचकित लोक । परि त्यांचीं पिलीं निःशंक । तयांपुढें खेळती ।।१९।।

वाघ व सिंह अत्यंत क्रूर असतात. त्यांना नुसते पाहूनही इतर सर्व प्राणी भयभीत होतात. परंतु त्यांचे छावे त्यांच्या जवळपास निर्भयपणे बागडतात. ॥१९॥

तैसा मी संतांचा अंकित । तुम्हां संतांपासीं बोलत । तरी माझी चिंता तुमचें चित्त । वाहेलच कीं ।।२०।।

त्याप्रमाणे मी संतांचा दास आहे. आपण सर्व संत आहात. त्यामुळे मी तुमच्यासमोर बोलू लागलो की तुमचे चित्त मला सहजच अनुकूल राहील. ॥२०॥

आपलेंचि बोले वाउगें । त्याची संपादणी करणें लागे । परंतु कांहीं सांगणे नलगे । न्यून तें पूर्ण करावें ।।२१।।

ज्याला आपले म्हटले आहे त्याचे बोलण्यात काही कमीजास्त झाले तरी ते सहजच दुरुस्त करून घेतले जाते. खरे तर हे सांगण्याची गरजच नाही. सर्व उणिवा तुम्ही दुरुस्त करून घ्यालच. ॥२१॥

हें तों प्रीतीचें लक्षण । स्वभावेंचि करी मन । तैसे तुम्ही संतसज्जन । मायेबाप विश्वाचे ।।२२।।

असे करणें हे प्रेमाचे लक्षणच आहे. तुमचे अन्तःकरण सहजच ते करील. तसे पाहिले तर तुम्ही सर्व जण संत व सज्जन असून सर्व जगाचेच मातापिता आहात. ॥२२॥

माझा आशय जाणोनि जीवें । आतां उचित तें करावें । पुढें कथेसि अवधान द्यावें । म्हणे दासानुदास ।।२३।।

मला काय म्हणावयाचे आहे ते आपण सहजच जाणता. आता आपणाला योग्य वाटेल त्याप्रमाणे माझ्याबाबत विचार करावा. मी आपल्या दासांचाही दास असून मी आता पुढे बोलेन तिकडे लक्ष पुरवावे. ॥२३॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'श्रोतेजनस्तवननाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध ह्या ग्रंथांतील 'श्रोतेस्तवन' नावाचा सहावा समास समाप्त

दशक पहिला : स्तवनाचा

समास सातवा : कवीश्वरस्तवन

॥ श्रीराम समर्थ ॥

ज्या लेखकांनी व कवींनी मानवाचे कल्याण होण्यासाठी अनेक प्रकारच्या साहित्याची रचना करून, ती कायमची उपलब्ध होण्याची व्यवस्था केली त्यांचे समर्थ आता स्तवन करीत आहेत. हे साहित्य नसते तर मानव आज पशुवत् राहिला असता. समर्थांचा भर अर्थातच धर्म व अध्यात्माच्या साहित्यावर आहे. वैज्ञानिक, आर्थिक, ललित इत्यादी साहित्याचे प्रकार मानवी विकासाला आवश्यक असले तरी मानवी जीवनाचे मोक्ष हेच अन्तिम साध्य असल्याने त्याविषयीचे साहित्य सर्वांत मौल्यवान आहे. दशक १४ समास ३ मध्ये काव्याविषयी समर्थांचे विचार स्पष्टपणे मांडले गेले आहेत.

आतां वंदूं कवेश्वर । शब्दसृष्टीचे ईश्वर । नातरी हे परमेश्वर । वेदावतारी ।।१।।

आता श्रेष्ठ कवींना वंदन करू. शब्दसृष्टीवर ह्यांचे प्रभुत्व असते. वेदांमधील अफाट शब्दसृष्टी पाहिली तर असे वाटते की हे कवी वेदांचे अवतारच असतात. वेद ईश्वराचे असल्याने कवींना ईश्वराचे अवतार म्हणण्यासही काहीच हरकत नाही. ॥१॥

कीं हे सरस्वतीचें निजस्थान । कीं हे नाना कळांचें जीवन । नाना शब्दांचें भुवन । येथार्थ होये ।।२।।

विद्येची देवता असलेल्या सरस्वतीचे कवी हे माहेरघर आहे. साहित्य रचनेच्या अनेक प्रकारांना (कळा) त्यांचाच आश्रय असतो. त्यांच्यामुळेच ते प्रकार टिकून राहतात. त्यांच्या ठिकाणी शब्दांचा प्रचंड संग्रह (भुवन) असतो. गायन, चित्र, नृत्य इत्यादी कलांचेही शास्त्र असते. ते ह्या लेखकांमुळेच टिकून रहाते. ॥२॥

कीं हे पुरुषार्थाचें वैभव । कीं हे जगदेश्वराचें महत्त्व । नाना लाघवें सत्कीर्तीस्तव । निर्माण कवी ।।३।।

कवींच्या रूपाने चारी पुरुषार्थ वैभवसंपन्न झाले. खुद्द ईश्वरालाही ह्यांच्यामुळेच नावलौकिक प्राप्त झाला! नाना प्रकारची रचनाकौशल्ये दाखवून सत्कीर्तीसाठी कवींचा जन्म असतो. ॥३॥

कीं हे शब्दरत्नाचे सागर । कीं हे मुक्तांचें मुक्त सरोवर । नाना बुद्धीचे वैरागर । निर्माण जाले ।।४।।

शब्दरूप रत्ने साठविण्याचे कवी हे सागर आहेत. काव्यरूप सरोवरात मुक्तपुरुष मुक्तपणे विहार करतात. मुक्तपुरुष काव्यरूपाने आपली स्थिती वर्णन करतात. बुद्धीच्या विलासाच्या अनेक प्रकारांची कवी ही खाण असते. ॥४॥

अध्यात्मग्रंथांची खाणी । कीं हे बोलके चिंतामणी । नाना कामधेनूचीं दुभणीं । वोळलीं श्रोतयांसी ।।५।।

अध्यात्मशास्त्राचे सिद्धान्त हे कवी ग्रंथात आकर्षक रीतीने मांडतात. चिंतामणी हा दगड असल्याने बोलत नाही. पण कवी बोलून चिंतामणी व कामधेनूचे काम करतात. मुमुक्षूंची तत्त्वज्ञानाच्या सुबोध मांडणीची अपेक्षा पूर्ण करतात. ॥५॥

कीं हे कल्पनेचे कल्पतरु । कीं हे मोक्षाचे मुख्य पडीभरु । नाना सायोज्यतेचे विस्तारु । विस्तारले ।।६।।

श्रोत्याची कल्पनाविलासाची इच्छा कवी कल्पतरूप्रमाणे पूर्ण करतात. ह्यांच्या रचनांमुळे साधकांना मार्गदर्शन होत असल्याने ते मोक्षाची शोभा (पडीभरू) आहेत. त्यांच्यामुळे मोक्ष मिळतो. जीवन्मुक्तीच्या सर्व पैलूंचा (नाना) विस्तार ते करतात. ॥६॥

कीं हा परलोकींचा निजस्वार्थु । कीं हा योगियांचा गुप्त पंथु । नाना ज्ञानियांचा परमार्थु । रूपासि आला ।।७।।

परलोकप्राप्तीची साधने, अष्टांग योग्यांचे गुप्त पंथ व ज्ञान मार्गांचे वेदान्तशास्त्र ह्यांच्या रूपाने जणू प्रगट झाले. कवींनीच त्यांची रचना करून त्यांच्या परंपरा सांभाळल्या. ॥७॥

कीं हे निरंजनाची खूण । कीं हे निर्गुणाची वोळखण । मायाविलक्षणाचें लक्षण । ते हे कवी ।।८।।

रूपरहित ब्रह्म कवींमुळे शब्दरूपाने जणू रूपाला येते. निर्गुण ब्रह्माचा त्यांच्या रचनांमुळे परिचय होतो. ब्रह्माला मायेचा स्पर्शही होत नाही. पण कविरूप मायेचा जणू त्याला स्पर्श होतो! ते काव्यरूप मायेने त्याचे वर्णन करतात. ॥८॥

कीं हा श्रुतीचा भावगर्भ । कीं हा परमेश्वराचा अलभ्य लाभ । नातरी होये सुल्लभ । निजबोध कविरूपें ।।९।।

श्रृतीचे तात्पर्य कवीच काढून दाखवतात. (वेदांचा तो अर्थ आम्हासचि ठावा-तुका.) कवींच्या काव्यरचनेमुळे परमेश्वराचे एऱ्हवी न कळणारे स्वरूप कळते. त्यांच्यामुळेच आत्मज्ञान सोपे होते. ॥९॥

कवि मुमुक्षाचें अंजन । कवि साधकांचें साधन । कवि सिद्धांचें समाधान । निश्चयात्मक ।।१०।।

गुप्त असलेला आत्मा मुमुक्षूंना दिसावा म्हणून कवी त्यांच्या डोळ्यांत स्वरचनांचे अंजन घालतात. साधकांना साधनेसाठी मार्गदर्शन करतात. जीवन्मुक्तांनाही पुन:प्रत्ययाचा आनंद देतात. किंवा पडताळा घेण्यासाठी मदत करतात. ॥१०॥

कवि स्वधर्माचा आश्रयो । कवि मनाचा मनोजयो । कवि धार्मिकाचा विनयो । विनयकर्ते ।।११।।

स्वधर्म कवींच्या आश्रयाने राहतो. तेच स्वधर्मपालनाचे तत्त्वज्ञान सर्वांना सांगत राहतात. मनोजय व धर्मपरायणांची विनम्रता अशीच त्यांच्या आश्रयाने राहते. ॥११॥

कवि वैराग्याचें संरक्षण । कवि भक्तांचें भूषण । नाना स्वधर्मरक्षण । ते हे कवी ।।१२।।

वैराग्याचे महत्त्व गाऊन कवी त्याचे रक्षण करतात. भक्तांना अनेक प्रकारे भगवन्ताची आळवणी करण्यासाठी कविभक्तांनी केलेल्या रचना फार गोड वाटतात. सर्व प्रकारचे स्वधर्म (पुत्र, पितृ, भ्रातृ, शिष्य इ.) कसे पाळावेत त्याचे कवींकडून मार्गदर्शन मिळते. ॥१२॥

कवि प्रेमळांची प्रेमळ स्थिती । कवि ध्यानस्थांची ध्यानमूर्ती । कवि उपासकांची वाढ कीर्ती । विस्तारली ।।१३।।

प्रेमीजनांच्या प्रेमाच्या अभिव्यक्तीचे कवी हे माध्यम आहे. ध्यानस्थ होणाऱ्यांना ध्यान सिद्ध करण्यासाठी कवींकडून मार्गदर्शन होत असल्याने जणू कवीच त्यांच्या ध्यानरूपाने साकार झालेले असतात. उपासकांची निष्ठा, प्रेम, शरणभाव इ. कवींकडूनच सर्वत्र प्रसिद्ध होतात. ॥१३॥

नाना साधनाचें मूळ । कवि नाना प्रेत्नाचें फळ । नाना कार्यसिद्धी केवळ । कविचेनि प्रसादें ।।१४।।

कवींच्या कृपेने अनेक साधनामार्गांमागील वर्म किंवा तत्त्व लक्षात येते. हरतऱ्हेच्या प्रयत्नांना यश मिळते. अनेक कार्ये सिद्धीला जातात. ॥१४॥

आधीं कवीचा वाग्विळास । तरी मग श्रवणीं तुंबळे रस । कवीचेनि मतिप्रकाश । कवित्वास होये ।।१५।।

कवींच्या वाणीने शब्दविहार केला तरच रसिकाच्या कानांत त्या रसांना प्रवेश मिळतो. काव्यातील बारकावे व शब्दांचे खेळ कवींमुळेच रसिकांना कळतात. ॥१५॥

कवि वित्पन्नाची योग्यता । कवि सामर्थ्यवंतांची सत्ता । कवि विचक्षणाची कुशळता । नाना प्रकारें ।।१६।।

अनेक व्युत्पत्तींचे कौतुक कवींमुळेच कळते. कवींना त्यांच्या काव्यसामर्थ्यामुळे एक प्रकारे सत्ताही प्राप्त होते. शहाण्यांचे शहाणपणाचे कौशल्य कवींच्या माध्यमातून प्रगट होते. कवी ते लक्षात आणून देतात. ॥१६॥

कवि कवित्वाचा प्रबंद । कवि नाना धाटी मुद्रा छंद । कवि गद्यपद्यें भेदाभेद । पदत्रासकर्ते ।।१७।।

काव्यरचनेचे कसब कवींमुळे कळते. वाङमयाचे संप्रदाय (धाटी) रसादिकांची लक्षणे (मुद्रा) व अनुष्टुपादी छंद कवींमुळे प्रगट होतात. वाङमयाचे गद्य व पद्यादी भेद व अनुप्रासादी साधण्याचे कौशल्य तेच स्पष्ट करतात. ।।१७।।

कवि सृष्टीचा आळंकार । कवि लक्ष्मीचा शृंगार । सकळ सिद्धीचा निर्धार । ते हे कवी ।।१८।।

सृष्टी कवीनीं अलंकृत झाल्याने तिच्यावरील मानवी जीवनाला शोभा आली आहे. लक्ष्मीचे वैभव (शृंगार) वर्णन करताना कवी रंगून जातात. सर्व प्रकारच्या सिद्धी कशा प्राप्त करून घ्याव्यात ह्याचे निश्चयात्मक वर्णन कवीच करतात. ।।१८।।

कवि सभेचें मंडण । कवि भाग्याचें भूषण । नाना सुखाचें संरक्षण । ते हे कवी ।।१९।।

सभेला कवींमुळे शोभा येते. भाग्याला सुद्धा कवींचे भूषण असते. कविसहवास हा भाग्याचा महत्त्वाचा घटक आहे. सुखाची जेवढी साधने आहेत, ती शब्दरूपाने जपून ठेवण्याचे काम कवी करतात. ।।१९।।

कवि देवांचे रूपकर्ते । कवि ऋषीचे महत्ववर्णिते । नाना शास्त्रांचें सामर्थ्य ते । कवि वाखाणिती ।।२०।।

अनेक देवांच्या रूपांचे कवी वर्णन करतात. ऋषींचे महत्त्व व अनेक शास्त्रांचा जीवनाला असलेला उपयोग ते सांगतात. ।।२०।।

नस्ता कवीचा व्यापार । तरी कैंचा अस्ता जगोद्धार । म्हणौनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ।।२१।।

जर कवींनी रचना केल्या नसत्या तर ह्या जगाच्या उद्धाराची व्यवस्थाच झाली नसती म्हणून सृष्टीवरील माणसाला त्यांचा मोठा आधार आहे. ।।२१।।

नाना विद्या ज्ञातृत्व कांहीं । कवेश्वरेंविण तों नाहीं । कविपासून सर्वहि । सर्वज्ञता ।।२२।।

कवींशिवाय अनेक विद्या जाणण्याचा कोणताच मार्ग नाही. सर्व ज्ञानाचा उगम कवींपासूनच होतो. ।।२२।।

मागां वाल्मीक व्यासादिक । जाले कवेश्वर अनेक । तयांपासून विवेक । सकळ जनासी ।।२३।।

फार पूर्वी वाल्मिकी व व्यासांसारखे महाकवी होऊन गेले. त्यानंतरच्या सर्व कवींसमोर त्यांचाच आदर्श आहे.।।२३।।

पूर्वीं काव्यें होतीं केलीं । तरीच वित्पत्ति प्राप्त जाली । तेणें पंडिताआंगीं बाणली । परम योग्यता ।।२४।।

पूर्वी केलेल्या काव्यरचनांच्या आधारानेच पुढे अनेक पंडितांनी काव्ये केली. त्या बळावरच ते मोठ्या योग्यतेस चढले. ।।२४।।

ऐसें पूर्वीं थोर थोर । जाले कवेश्वर अपार । आतां आहेत पुढें होणार । नमन त्यांसी ।।२५।।

पूर्वी फार मोठ्या योग्यतेचे कित्येक कवी होऊन गेले. आजही आहेत व ह्यापुढेही जन्माला येतील. त्या सर्वांनाच वंदन असो. ।।२५।।

नाना चातुर्याच्या मूर्ती । कीं हे साक्षात् बृहस्पती । वेद श्रुती बोलों म्हणती । ज्यांच्या मुखें ।।२६।।

चातुर्य त्यांच्या रूपाने साकार होते. त्यांना प्रत्यक्ष बृहस्पती म्हणता येईल. वेद व श्रुतींनाही त्यांच्या मुखातून बोलावे असे वाटले. ।।२६।।

परोपकाराकारणें । नाना निश्चय अनुवादणें । सेखीं बोलिले पूर्णपणें ।संशयातीत ।।२७।।

अनेक अनुभवाच्या गोष्टी कवी केवळ परोपकारासाठी लिहून ठेवतात. त्यांचे सर्व लेखन परिपूर्ण व संशयविपर्यासरहित असते. ।।२७।।

कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसाचे वोघ लोटले । नाना सुखाचें उचंबळलें । सरोवर हे ।।२८।।

कवी हे जणू तहानलेल्या श्रोत्याच्या दिशेने वळलेले अमृताचे मेघ, किंवा नवरसरूप पाण्याचे लोंढे आहेत.

त्यांच्या रूपाने अनेक सुखांनी भरलेले सरोवरच उचंबळत असते.

रस व त्यांचे स्थायीभाव– श्रुंगार-रती, हास्य-आनंद, करुण-शोक, रौद्र-क्रोध. वीर-उत्साह, भयानक-भय. बीभत्स-घृणा, अद्भुत-विस्मय, शांत-शम. ह्या नऊ रसांशिवाय कोठे कोठे क्रांतिरस, वत्सल रस, सेवारस इत्यादींचा उल्लेख आहे. ॥२८॥

कीं हे विवेकनिधीचीं भांडारें । प्रगट जालीं मनुष्याकारें । नाना वस्तूचेनि विचारें । कोंदाटले हे ।।२९।।

कवींपाशी अनेक प्रकारची विवेकरूप संपत्ती भरपूर असते. ती जणू त्यांच्या रूपाने साकार होते. जगातील अनेक विषयांसंबंधी ह्यांना भरपूर माहिती असते. (उदा. नद्या, ऋषी, पर्वत, राजे, इतिहास, पुराण, साहित्य, वाद्य इ.इ.) ॥२९॥

कीं हे आदिशक्तीचें ठेवणें । नाना पदार्थास आणी उणें । लाधलें पूर्व संचिताच्या गुणें । विश्वजनासी ।।३०।।

कवी ही मायेच्या खास ठेवणीतील निर्मिती आहे. इतर अनेक निर्मिती त्यांच्यापुढे फिक्या आहेत. विश्वातील लोकांच्या पूर्वपुण्याईमुळेच केवळ त्यांना ही ठेव मिळते. ॥३०॥

कीं हे सुखाचीं तारुवें लोटलीं । आक्षै आनंदें उतटलीं । विश्वजनास उपेगा आलीं । नाना प्रयोगाकारणें ।।३१।।

कवी ह्या अनेक सुख सामुग्रीने भरलेल्या सुखाच्या नौकाच होत. जगातील रसिक त्यांच्या साहित्याचा उपयोग अनेक प्रकारे करतात. (उदा. नवनिर्मिती, चर्चा, अध्यापन, साधना इ.) ॥३१॥

कीं हे निरंजनाची संपत्ती । कीं हे विराटाची योगस्थिती । नातरी भक्तीची फळश्रुती । फळास आली ।।३२।।

कवी ही जणू ब्रह्माची संपत्ती आहे. निराकार ब्रह्माचा त्यांच्या रचनांमुळे अंदाज येतो. ईश्वराच्या जगत्‌रूप शरीराला विराट म्हणतात. कवी जेव्हा समाधीचा अनुभव घेतात तेव्हा जणू विराटालाच समाधी लागते! एवढे ते विराटाला पोटात घेऊन आत्मसुखात रंगतात. भक्तीनेच जर उपासना केली तर त्या उपासनेला येणारे फळ म्हणजे कवी होत! ॥३२॥

कीं हा ईश्वराचा पवाड । पाहातां गगनाहून वाड । ब्रह्मांडरचनेहून जाड । कविप्रबंदरचना ।।३३।।

कवी ही ईश्वराने कौतुकाने केलेली रचना असून ते ईश्वराची कीर्ती सतत गातात. त्यांच्या बुद्धीची सूक्ष्मता आकाशाच्या सूक्ष्मतेहून अधिक आहे. कवींच्या रचनांचे मूल्य ब्रह्मांडाहून जास्त आहे. ॥३३॥

आतां असो हा विचार । जगास आधार कवेश्वर । तयांसी माझा नमस्कार । साष्टांग भावें ।।३४।।

कवींचे माहात्म्य कितीही गायिले तरी ते कमीच ठरेल! सर्व जगाला त्यांचा मोठा आधार आहे हे खरे. त्यांना मी साष्टांग नमस्कार करतो.

(पूर्वी बहुतेक लेखन काव्यरूपाने होत असे. म्हणून सतत 'कवी' असा उल्लेख समर्थ करतात.) ॥३४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'कवेश्वरस्तवननाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध ह्या ग्रंथांतील 'कवेश्वरस्तवन' नावाचा सातवा समास समाप्त

दशक पहिला : स्तवनाचा

समास आठवा : सभास्तवननिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

आतां वंदूं सकळ सभा । जये सभेसी मुक्ती सुल्लभा । जेथें स्वयें जगदीश उभा । तिष्ठतु भरें ।।१।।

आता सभा व सभासद ह्यांना वंदन करू. ह्या सभेत चालणाऱ्या विचारामुळे मोक्ष सोपा होतो. स्वत: जगदीश अशा सभांत सतत उपस्थित असतो. जगदीशाशिवाय त्यांत कोणताही विचार नसतो. आध्यात्मिक श्रोतृवर्गाला समर्थ 'सभा' असे म्हणतात. श्रोत्यांचे स्तवन करून झाल्यावर त्यांचा समुदाय व त्या समुदायाचे घटक ह्या नात्याने आता समर्थ त्यांचे स्तवन करीत आहेत. ॥१॥

श्लोक

नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ । मद्‌भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ।।

नाहीं वैकुंठीचा ठाईं । नाहीं योगियांचा हृदईं । माझे भक्त गाती ठाईं ठाईं । तेथें मी तिष्ठतु नारदा ।।२।।

हे नारदा, मी कदाचित् वैकुंठलोकात, योग्यांच्या अन्त:करणांत (वा सूर्यबिंबामध्ये) सापडणार नाही. पण जेथे माझे भक्त माझे भजन करतात तेथे मी सतत राहतो. ॥२॥

याकारणें सभा श्रेष्ठ । भक्त गाती तें वैकुंठ । नामघोषें घडघडाट । जयजयकारें गर्जती ।।३।।

म्हणून सभेचे अपार महत्त्व आहे. भक्त जेथे भजन करतात, नामघोषाचा घडघडाट करून जयजयकाराची गर्जना करतात तोच वैकुंठ. ॥३॥

प्रेमळ भक्तांची गायनें । भगवत्‌कथा हरिकीर्तनें । वेदव्याख्यान पुराणश्रवणें । जेथें निरंतर ।।४।।

भक्त अत्यंत प्रेमाने श्रीहरीचे गुण गातात. भगवंताच्या वाक्यांच्या (उदा. गीता) आधाराने हरिकीर्तने करतात. वेदशास्त्रांवर प्रवचने, पाठ घेतात. पुराणे सांगतात. ह्या गोष्टी सभांतून सतत चालतात. ॥४॥

परमेश्वराचे गुणानुवाद । नाना निरूपणाचे संवाद । अध्यात्मविद्या भेदाभेद । मथन जेथें ।।५।।

ह्या सभांतून परमेश्वराचे यश, कीर्ती, वत्सलता इ. गुण गायिले जातात, अध्यात्मविषयांवर चर्चा होतात व अध्यात्म किंवा वेदान्तशास्त्रातील भेदवाद, अभेदवाद, भेदाभेदवाद इत्यादी वादांचा ऊहापोह होतो. किंवा सर्व दर्शनांचे वैचारिक मंथन करून त्यातून सार घेतले जाते. ॥५॥

नाना समाधानें तृप्ती । नाना आशंकानिवृत्ती । चित्तीं बैसे ध्यानमूर्ति । वाग्विळासें ।।६।।

सर्व प्रकारच्या शंकांचे सभेमध्ये समाधान होऊन सर्वजण तृप्त होतात. सभेत होणाऱ्या शास्त्रशुद्ध श्रवणामुळे सभासदांची चित्तवृत्ती ध्येयाकार होते, आत्माकार होते. ॥६॥

भक्त प्रेमळ भाविक । सभ्य सखोल सात्विक । रम्य रसाळ गायक । निष्ठावंत ।।७।।

सभेमध्यें प्रेमळ व भाविक भक्त, सज्जन, सत्त्वगुणी, सखोल अभ्यास करणारे लोक असतात. त्याचबरोबर नवरसांनी भरलेली कवने म्हणून ईश्वराशी निष्ठा ठेवणारे गायक श्रोत्यांना रमवितात. ॥७॥

कर्मसीळ आचारसीळ । दानसीळ धर्मसीळ । सुचिस्मंत पुण्यसीळ । अंतरशुद्ध कृपाळु ।।८।।

सत्कर्म, सदाचरण, दान, धर्मनिष्ठता सर्व प्रकारची शुचिता, पुण्य, इत्यादी गुणांनी युक्त असून हे सभासद शुद्ध अंत:करणाचे व कृपाळूही असतात. ॥८॥

योगी वीतरागी उदास । नेमक निग्रह तापस । विरक्त निस्पृह बहुवस । आरण्यवासी ।।९।।

काही योगी, तर काही वैराग्यसंपन्न, काही आशापाश तोडलेले, तर काही कडक तपे करणारे असतात. बरेचसे नि:स्पृह असतात, तर काही अरण्यात झोपडी बांधून राहणारे असतात. ॥९॥

दंडधारी जटाधारी । नाथपंथी मुद्राधारी । येक बाळब्रह्मच्यारी । योगेश्वर ।।१०।।

त्रिदंडी संन्यासी, जटाधारी बैरागी, नाथपंथाची भूषणे (कंथा, कमंडलू इ.) मिरवणारे, बाळवयाचे ब्रह्मचारी तर काही श्रेष्ठ योगीही सभेमध्ये असतात. ॥१०॥

पुरश्चरणी आणि तपस्वी । तीर्थवासी आणि मनस्वी । महायोगी आणि जनस्वी । जनासारखे ।।११।।

कोणी पुरश्चरणाची तपे करणारे, काही क्षेत्रनिवासी तर कोणी मनाला येईल तशी भ्रमंती करणारे असतात. काही महान योगी तर काही लोकसंग्रहार्थ समाजात समाजासारखे राहणारे असतात. ॥११॥

सिद्ध साधु आणी साधक । मंत्रयंत्रशोधक । येकनिष्ठ उपासक । गुणग्राही ।।१२।।

सिद्ध, साधू, साधक, मांत्रिक, यंत्रपूजक (उदा. श्रीयंत्र) निष्ठावन्त उपासक व नाना गुणांचे चाहते असतात. ॥१२॥

संत सज्जन विद्वज्जन । वेदज्ञ शास्त्रज्ञ माहाजन । प्रबुद्ध सर्वज्ञ समाधान । विमळकर्ते ।।१३।।

संत, विद्वान, वेदपाठक, वेदान्ती, शास्त्रवेत्ते, श्रेष्ठ नागरिक, पूर्णज्ञानी, सर्वज्ञ, तृप्त व मंगल कार्ये करणारे काही सभासद असतात. ॥१३॥

योगी वित्पन्न ऋषेश्वर । धूर्त तार्किक कवेश्वर । मनोजयाचे मुनेश्वर । आणी दिग्वल्की ।।१४।।

योगी, व्युत्पत्तिशास्त्र जाणणारे, श्रेष्ठ ऋषी, चाणाक्ष, तर्ककुशल, महान कवी, मनोजय साधलेले श्रेष्ठ मुनी व दिगंबरही सभेला आलेले असतात. ॥१४॥

ब्रह्मज्ञानी आत्मज्ञानी । तत्त्वज्ञानी पिंडज्ञानी । योगाभ्यासी योगज्ञानी । उदासीन ।।१५।।

ब्रह्माचे स्वरूप जाणणारे, 'मी आत्मा आहे' असा अनुभव घेतलेले, आस्तिक व नास्तिक दर्शने जाणणारे, क्षेत्राचे ज्ञान असणारे (गीता अ. १३) योगसाधक, योगसिद्ध व आशारहित सभासद सभेत असतात. ॥१५॥

पंडित आणी पुराणिक । विद्वांस आणी वैदिक । भट आणी पाठक । येजुर्वेदी ।।१६।।

गाढे पंडित, पुराणे सांगणारे, याज्ञिक, वैदिकी करणारे (विवाह, मौजीबंधनादी करणारे) 'भट्ट' ही विद्वत्तेची उपाधी धारण करणारे व यजुर्वेद मुखोद्‌गत असणारे असतात. ॥१६॥

माहाभले माहाश्रोत्री । याज्ञिक आणी आग्नहोत्री । वैद्य आणी पंचाक्षरी । परोपकारकर्ते ।।१७।।

अत्यंत सज्जन, महान वेदवेत्ते, यज्ञ करणारे, अग्निहोत्री, वैद्य व मांत्रिकांसारखे पीडितांवर उपकार करणारेही असतात. ॥१७॥

भूत भविष्य वर्तमान । जयांस त्रिकाळाचें ज्ञान । बहुश्रुत निरभिमान । निरापेक्षी ।।१८।।

तिन्ही काळांचे ज्ञान असणारे ज्योतिषी किंवा सिद्धपुरुष, भरपूर श्रवण झालेले, नाना विषयांचा अभ्यास केलेले, अभिमानरहित व नि:स्पृह. ॥१८॥

शांती क्षमा दयासीळ । पवित्र आणी सत्वसीळ । अंतरशुद्ध ज्ञानसीळ । ईश्वरी पुरुष ।।१९।।

दया, क्षमा, शांती हे ज्यांचे सहजस्वभाव आहेत, अंतर्बाह्य पवित्र, सात्त्विक, शुद्धज्ञानाने (अध्यात्म) अंत:करण

पवित्र झालेले असे ईश्वरप्रसाद मिळालेले पुरुष. ॥१९॥

ऐसे जे कां सभानायेक । जेथे नित्यानित्यविवेक । त्यांचा महिमा अलोलिक । काय म्हणोनि वर्णावा ।।२०।।

असे जे सभेतील मुख्य मुख्य महात्मे असतात त्यांचेजवळ नित्य व अनित्याचा विवेक सतत जागा असतो. त्यांच्या मोठेपणाचे वर्णन करावे तेवढे थोडेच आहे. ॥२०॥

जेथें श्रवणाचा उपाये । आणी परमार्थसमुदाये । तेथें जनासी तरणोपाये । सहजचि होये ।।२१।।

जेथे श्रवणाची संधी असते व अध्यात्मक्षेत्रातील जाणती मंडळी असतात तेथे श्रोत्यांच्या मोक्षाची सहजच व्यवस्था असते. ॥२१॥

उत्तम गुणांची मंडळी । सत्त्वधीर सत्त्वागळी । नित्य सुखाची नव्हाळी । जेथें वसे ।।२२।।

ही सर्व मंडळी उत्तम गुणसंपन्न, सत्त्वगुणी असल्याने धैर्यशील व जणू नित्यनूतन आत्मानुभवाने सुखी असतात. ॥२२॥

विद्यापात्रें कळापात्रें । विशेष गुणांची सत्पात्रें । भगवंताचीं प्रीतिपात्रें । मिळालीं जेथें ।।२३।।

विद्या, कला, काही गुणविशेष त्यांचे ठिकाणी एकवटलेले असतात. भगवंताचे त्यांच्यावर खास प्रेम असते. ॥२३॥

प्रवृत्ती आणी निवृत्ती । प्रपंची आणी परमार्थी । गृहस्थाश्रमी वानप्रहस्ती । संन्यासादिक ।।२४।।

काही प्रवृत्तिमार्गी तर काही निवृत्तिमार्गी, कोणी प्रापंचिक तर कोणी साधक किंवा वानप्रस्थी वा संन्यासी असतात. ॥२४॥

वृद्ध तरुण आणी बाळ । पुरुष स्त्रियादिक सकळ । अखंड ध्याती तमाळनीळ । अंतर्यामीं ।।२५।।

बालके, तरुण, वृद्ध, पुरुष, स्त्रिया हे सर्व आपल्या अंत:करणात मेघ:श्याम श्रीरामाचे ध्यान करतात. ॥२५॥

ऐसे परमेश्वराचे जन । त्यांसी माझे अभिवंदन । जयांचेनि समाधान । अकस्मात बाणे ।।२६।।

अशा या देवाघरच्या माणसांना माझे अभिवादन. त्यांच्या सहवासात अकस्मितपणे समाधानाचा ठेवा मिळतो. ॥२६॥

ऐसिये सभेचा गजर । तेथें माझा नमस्कार । जेथें नित्य निरंतर । कीर्तन भगवंताचें ।।२७।।

ज्या सभेत असे महात्मे, चर्चा व भगवंताची अखंड उपासना असते त्या सभेला माझे वंदन असो. ॥२७॥

जेथे भगवंताच्या मूर्ती । तेथें पाविजे उत्तम गती । ऐसा निश्चय बहुतां ग्रंथीं । महंत बोलिले ।।२८।।

जेथे जणू ईश्वराने पाठविलेले महात्मे असतात तेथे उत्तम गती प्राप्त होते असे अनेक संतांनी त्यांच्या ग्रंथात सांगितले आहे. ॥२८॥

कल्लौ कीर्तन वरिष्ठ । जेथें होय ते सभा श्रेष्ठ । कथाश्रवणें नाना नष्ट । संदेह मावळती ।।२९।।

कलियुगात भगवत् संकीर्तन हे मोक्षाचे सर्वात श्रेष्ठ साधन आहे असे म्हटले आहे. आणि ते अशा सभेत चालू असेल तर त्यातील तत्त्वज्ञान ऐकून श्रोत्यांच्या अनेक शंका दूर होतात. ॥२९॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सभास्तवननाम' समास आठवा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध ह्या ग्रंथांतील 'सभास्तवन' नावाचा आठवा समास समाप्त

दशक पहिला : स्तवनाचा

समास नववा : परमार्थस्तवननिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

परमार्थ म्हणजे चार पुरुषार्थांतील परम पुरुषार्थ किंवा मोक्ष. मानवी जीवनाचे अंतिम साध्य. कृतार्थता. कर्म, उपासना, ग्रंथाध्ययन, व्रते, चार आश्रम, श्रीगुरुसेवा, तीर्थयात्रा, धारणा, ध्यान, समाधी, नामस्मरण या सर्वांनी मोक्षलाभ झाला तरच त्यांचे साफल्य. अन्यथा सर्व भाकड प्रयत्न. भारतीय विचारपरंपरातून मोक्षाचा जेवढा विचार झाला आहे तेवढा अन्यत्र कोठेही झालेला नाही. 'मोक्षसुखा हाणू लाथा' असे जेव्हा संत तुकोबाराय म्हणतात तेव्हा त्यांना मोक्षाची निंदा करायची नसून भक्तिसुखाचे माहात्म्य सांगायचे आहे. जीवन्मुक्त स्थिती प्राप्त झाल्यानंतर ते 'न लगे मुक्ति' असे म्हणतात! सामान्य साधकाने तसे म्हणण्यात काय अर्थ?

आतां स्तऊं हा परमार्थ । जो साधकांचा निजस्वार्थ । नांतरी समर्थामध्यें समर्थ । योग हा ।।१।।

ज्यांना साधक म्हणतात (दशक ५ समास ९) त्यांचे अंतिम कल्याण ज्या परमार्थात आहे त्या परमार्थाचे आता स्तवन करू. मानवी जीवनात सर्वांत मोठा योग तो हाच! ॥१॥

आहे तरी परम सुगम । परी जनासी जाला दुर्गम । कां जयाचें चुकलें वर्म । सत्समागमाकडे ।।२।।

तसे पाहिले तर परमार्थ सोपा आहे. पण सामान्य लोकांना तो फार फार कठीण झाला. कारण 'संतसंगतीशिवाय मोक्ष नाही' हे वर्म त्यांच्या लक्षात येत नाही. श्रीगुरुकृपा मोक्षासाठी अनिवार्य आहे हे त्यांना कळत नाही. केवळ संतांच्या संगतीत मोक्षमार्ग हळूहळू उलगडत जातो. ॥२॥

नाना साधनांचे उधार । हा रोकडा ब्रह्मसाक्षात्कार । वेदशास्त्रीं जें सार । तें अनुभवास ये ।।३।।

संतसंगतीशिवाय केलेली सर्व साधने फलद्रूप होण्याची काहीच निश्चिती नाही. वहीत लिहून ठेवलेल्या उधारीप्रमाणे त्यांची अवस्था असते! संतांच्या संगतीत मात्र वेदान्त शास्त्रांत जे महावाक्यरूप सार आहे त्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो. 'मी ब्रह्म आहे' असा अनुभव येतो. 'जीव व ब्रह्म एक आहेत' असे सांगणाऱ्या श्रुतिवाक्यांना महावाक्ये म्हणतात. जी श्रुतिवाक्ये ब्रह्माचे केवळ वर्णन करतात त्यांना अवांतर वाक्ये म्हणतात. चार वेदांची चार महावाक्ये आहेत.

वेद	उपनिषद्	महावाक्य	अर्थ
ऋग्वेद	ऐतरेय	प्रज्ञानम् ब्रह्म	ज्ञानच ब्रह्मरूप आहे.
यजुर्वेद	बृहदारण्यक	अहं ब्रह्मासि	मी ब्रह्म आहे.
सामवेद	छांदोग्य	तत्वमसि	तू ते (ब्रह्म) आहेस.
अथर्ववेद	मांडुक्य	अयमात्मा ब्रह्म	हा आत्मा ब्रह्मरूप आहे.

आहे तरी चहूंकडे । परी अणुमात्र दृष्टी न पडे । उदास परी येकीकडे । पाहातां दिसेना ।।४।।

ब्रह्म सर्वत्र भरून उरले आहे असे शास्त्र सांगते व तसा मुक्तांचा निश्चय असतो. पण अज्ञानी जीवांना त्याचा मागमूसही लागत नाही. ब्रह्म सर्वव्यापी असूनही ते तथाकथित सर्वांहून अलिप्त आहे. ते व्यापक असल्याने एखाद्या विशिष्ट ठिकाणीच असते असे नाही. ॥४॥

आकाशमार्गीं गुप्त पंथ । जाणती योगिये समर्थ । इतरांस हा गुह्यार्थ । सहसा न कळे ।।५।।

आकाशात पक्षी उडतो तेव्हा त्याच्या उडण्याचा मार्ग दाखविता येत नाही, आखता येत नाही, त्याप्रमाणे

बंधनाकडून मोक्षाकडे नेणारा मार्गसुद्धा गुप्त असतो. कारण असा मार्गच नसतो! जीव कायमचा व स्वरूपाने मुक्तच आहे. केवळ अज्ञानामुळे 'मी बद्ध आहे' असा त्याला भ्रम होतो. सर्व साधने अज्ञान घालविण्यासाठी असतात. हे गुप्त वर्म सहसा कोणास कळत नाही. ॥५॥

साराचेंहि निजसार । अखंड अक्षै अपार । नेऊं न सकती तश्कर । कांहीं केल्या ।।६।।

ब्रह्म हे साराचेही सार आहे. उदा. रस हे जर वृक्षाचे सार असेल तर ब्रह्म त्या रसाचे सार आहे. म्हणजे ते रसाहून सूक्ष्म आहे. ते खंडरहित, अंतपार नसणारे व न झिजणारे आहे. कोणत्याही चोराजवळ कितीही कौशल्य असले तरी त्याला ते चोरता येत नाही. ईशकृपा, गुरुकृपा व शास्त्रकृपा झाल्याशिवाय परस्पर यांना चुकवून ब्रह्मानुभव येणार नाही. ॥६॥

तयास नाहीं राजभये । अथवा नाहीं अग्निभये । अथवा स्वापदभये । बोलोंच नये ।।७।।

ते राजाच्या सत्तेखाली येत नाही. कारण तेच सर्वसत्ताधीश आहे. अग्नी त्याला जाळू शकत नाही. रूप असल्याशिवाय पदार्थ पेटत नाही. ब्रह्म अरूप आहे. त्याच कारणाने त्याला पशूचीही भीती नाही. ॥७॥

परब्रह्म तें हालवेना । अथवा ठावहि चुकेना । काळांतरीं चळेना । जेथीचा तेथें ।।८।।

परब्रह्म व्यापक असल्याने इकडून तिकडे ठेवता येत नाही. अमुक ठिकाणी ते नाही असे नाही. त्रिकालाबाधित असल्याने त्यावर काळाची सत्ता चालत नाही. उलट काळावर त्याची सत्ता चालते.

(मृत्युर्धावति पंचम: - तै. ८) किंवा काल ही कल्पना जगत्सापेक्ष आहे. ब्रह्म जगत्निरपेक्ष व म्हणून कालनिरपेक्ष आहे. ॥८॥

ऐसें ते निज ठेवणें । कदापि पालटों नेणें । अथवा नव्हे आदिक उणें । बहुतां काळें ।।९।।

असे ते ब्रह्म जीवाचे स्वरूपच असून निर्विकार आहे. काळाने ते कमी किंवा जास्त होत नाही. उदा. अंकुराचा काळाने वृक्ष होतो. द्राक्ष काळाने सुकून लहान होते.॥९॥

अथवा तें घसटवेना । अथवा अदृश्य होयेना । नातरी पाहाता दिसेना । गुरुअंजनेंविण ।।१०।।

सोन्याप्रमाणे ते झिजत नाही. ते अदृश्य होत नाही. सूर्य रात्री एका गोलार्धापुरता अदृश्य होतो. असे असले तरी सद्गुरूंनी केलेल्या उपदेशाशिवाय त्याचे ज्ञान होत नाही. कारण ते प्राण्याच्या हृदयात दडून असते! ॥१०॥

मागां योगिये समर्थ । त्यांचाहि निजस्वार्थ । यासी बोलिजे परमार्थ । परमगुह्य म्हणौनि ।।११।।

यापूर्वी जे जे सामर्थ्यसंपन्न योगी होऊन गेले त्यांनीही या परमार्थासच आपले अंतिम कल्याण मानले. कारण अत्यंत गूढ असलेल्या तत्त्वाच्या अनुभवातच सामर्थ्याचा कस लागतो. ॥११॥

जेंहीं शोधून पाहिला । त्यासी अर्थ सांपडला । येरां असोनि अलभ्य जाला । जन्मोजन्मीं ।।१२।।

ज्यांनी या गूढ तत्त्वाचा गंभीरतापूर्वक शोध घेतला त्यांनाच त्याचा लाभ झाला. इतरांना ते तत्त्व त्यांच्या हृदयातच असूनही अनेक जन्म त्याचा लाभ होऊ शकला नाही. ॥१२॥

अपूर्वता या परमार्थाची । वार्ता नाहीं जन्ममृत्याची । आणि पदवी सायोज्यतेची । सन्निधचि लाभे ।।१३।।

या परमार्थाचे वैशिष्ट्य असे की त्याचा लाभ झाल्यावर जन्ममरणाच्या चक्रातून सुटका तर होतेच, पण त्याबरोबरच या शरीरातच (संनिध) जीवन्मुक्तीचा अनुभव येतो. ॥१३॥

माया विवेकें मावळे । सारासार विचार कळें । परब्रह्म तेंहि निवळे । अंतर्यामीं ।।१४।।

विवेकाच्या बळाने नामरूपात्मक माया बाधित होते. सार व असाराचा निवाडा होऊन हृदयामध्ये निश्चळ ब्रह्मानुभव राहतो. ॥१४॥

ब्रह्म भासलें उदंड । ब्रह्मीं बुडालें ब्रह्मांड । पंचभूतांचें थोतांड । तुछ्य वाटे ।।१५।।

व्यापक ब्रह्माचा अनुभव आल्यावर सर्व ब्रह्मांड त्यातच समाविष्ट असल्याचा निश्चय होतो. पांचभौतिक सृष्टी फोलकटाप्रमाणे तुच्छ वाटते. ॥१५॥

प्रपंच वाटे लटिका । माया वाटे लापणिका । शुद्ध आत्मा विवेका । अंतरीं आला ॥१६॥

प्रपंच मायिक असल्याचे जाणवते. मायेची फसवेगिरी लक्षात येते. विवेकामुळे शुद्ध आत्मा हृदयात भरून राहतो. ॥१६॥

ब्रह्मस्थित बाणतां अंतरीं । संदेह गेला ब्रह्मांडाबाहेरी । दृश्याची जुनी जर्जरी । कुहिट जाली ॥१७॥

ब्रह्मस्थितीला अशी सहजता आल्यावर ब्रह्माविषयीचे असंभावना व विपरीत भावना हे दोष नष्ट होतात. दृश्य प्रपंचाची जुनाट गोधडी जणू नष्ट झाली, 'जग सत्य आहे,' हा अनंत जन्मांचा निश्चय नष्ट झाला. 'मी ब्रह्म असणे शक्य नाही.' हीच असंभावना. प्राणादी ब्रह्म आहेत असे वाटणे ही विपरीत भावना. ॥१७॥

ऐसा हा परमार्थ । जो करी त्याचा निजस्वार्थ । आतां या समर्थास समर्थ । किती म्हणौनि म्हणावें ॥१८॥

असा परमार्थ जो तडीला नेईल त्याच्या जीवनाचे सार्थक होईल. ह्याचे श्रेष्ठत्व व महत्त्व किती व कसे सांगावे? ॥१८॥

या परमार्थाकरितां । ब्रह्मादिकांसि विश्रामता । योगी पावती तन्मयता । परब्रह्मीं ॥१९॥

प्रत्यक्ष ब्रह्मदेवाला सुद्धा मोक्षाशिवाय खरी विश्रांती नाही. योगीसुद्धा विश्रांतीसाठी ब्रह्मानुभवात बुडून जातात. ॥१९॥

परमार्थ सकळांस विसांवा । सिद्ध साधु माहानुभवां । सेखीं सात्त्विक जड जीवां । सत्संगेंकरूनी ॥२०॥

सिद्ध, साधू व ब्रह्मानुभवी (महानुभवी) ह्यांना मोक्षातच पराशांतीचा लाभ होतो. हाच मोक्ष अज्ञानी जीवांना सत्त्वगुणाच्या मदतीने संतसंगतीत मिळतो. समर्थ जेव्हा महानुभाव हा शब्द वापरतात तेव्हा त्या पंथाचा काहीच संबंध नसतो. महान अनुभव म्हणजे 'ब्रह्म मी आहे' असा अनुभव आलेले ते महानुभवी. ओवीतील 'जड' ह्या शब्दाचा अचेतन असा अर्थ नसून अज्ञानी असा अर्थ आहे. कारण अचेतन किंवा निर्जीव पदार्थाचा बंधमोक्षाशी काहीच संबंध नसतो. ॥२०॥

परमार्थ जन्माचें सार्थक । परमार्थ संसारीं तारक । परमार्थ दाखवी परलोक । धार्मिकासी ॥२१॥

मनुष्यजन्माचे मोक्षातच सार्थक आहे. संसार तरून जाण्याचे तेच एक साधन आहे. धर्मानुसारी जीवन जगणाऱ्यांना परमार्थ, ब्रह्मलोकाची प्राप्ती करून देतो. ॥२१॥

परमार्थ तापसांसी थार । परमार्थ साधकांसी आधार । परमार्थ दाखवी पार । भवसागराचा ॥२२॥

मोक्ष मिळण्याच्या अपेक्षेनेच तपस्वी तपश्चर्या करतात. साधकांनाही त्याचाच आधार असतो. भवसागर तरून जाण्याचे परमार्थ हे एकमेव साधन आहे. ॥२२॥

परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी । या परमार्थाची सरी । कोणास द्यावी ॥२३॥

जीवन्मुक्त ब्रह्मरूप असल्याने खरा सत्ताधीश असतो! ज्याला ब्रह्मानुभव नाही तो भिकारीच समजावा. ह्या परमार्थाहून श्रेष्ठ असे ह्या जगात काय आहे बरे? ॥२३॥

अनंत जन्मींचें पुण्य जोडे । तरीच परमार्थ घडे । मुख्य परमात्मा आतुडे । अनुभवासी ॥२४॥

अनंतजन्म पुण्यसंचय केला असेल तरच परमार्थ प्राप्त होतो. 'मी ब्रह्म आहे' असा प्रत्यक्ष अनुभव येतो. (बहुत सुकृताची जोडी म्हणून विठ्ठली आवडी-तुका.) ॥२४॥

जेणें परमार्थ वोळखिला । तेणें जन्म सार्थक केला । येर तो पापी जन्मला । कुलक्षयाकारणें ॥२५॥

मनुष्यशरीर मिळाल्यावर ज्याने परमार्थ साधला त्यानेच जन्माचे सार्थक केले. ज्या कुळात ब्रह्मज्ञ जन्माला येतो तो सर्व कुळ उद्धरून नेतो असे शास्त्र सांगते. जो आपल्या कुळात जन्माला येऊन ब्रह्मज्ञ होत नाही त्याने त्याच्या कुळाला

जन्ममरणाच्या चक्रात लोटून दिले असे समजावे. (ज्ञानदेवीमंत्र हरिनामाचे शस्त्र । येथें कुळगोत्र वर्जियेले- ज्ञानदेव हरिपाठ-१९) ॥२५॥

असो भगवत्प्राप्तीविण । करी संसाराचा सीण । त्या मूर्खांचें मुखावलोकन । करूंच नयें ।।२६।।

असे हे परमार्थाचे माहात्म्य आहे. जो जन्माला येऊन फक्त संसार करण्याचे कष्ट घेतो तो इतका मूर्ख असतो की त्याचे तोंडही पाहू नये! ॥२६॥

भल्यानें परमार्थीं भरावें । शरीर सार्थक करावें । पूर्वजांस उद्धरावें । हरिभक्ती करूनी ।।२७।।

म्हणून शहाण्याने परमार्थमार्गावर जोमाने वाटचाल करावी व आपल्या जन्माचे सार्थक करून पूर्वजांचाही हरिभक्तीने उद्धार करावा. ॥२७॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'परमार्थस्तवननाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'परमार्थस्तवन' नावाचा नववा समास समाप्त

दशक पहिला : स्तवनाचा

समास दहावा : नरदेहस्तवननिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

समर्थांनी त्यांच्या खास शैलीने हा समास रंगविला आहे. पहिल्या सुमारे तेवीस ओव्यांत नरदेह लाभल्यावर कोणी कोणत्या क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी केली त्याचे वर्णन केले आहे. पुढील चार ओव्यांत नरदेहमाहात्म्य सांगून नंतरच्या पाच ओव्यांत नरदेह असून त्यात विकृती असेल तर तो कसा निरुपयोगी ठरतो त्याचे वर्णन आहे. नंतरच्या तेरा ओव्यांत (४७ पर्यन्त) माणसाच्या शरीरावर कोण कोण हक्क सांगतात त्याची यादी देऊन त्याला 'माझा' म्हणण्यात काही अर्थ नाही असे सुचविले आहे. पुढे ओवी ५९ अखेर नरदेहाला होणारे रोग, घातपात इत्यादींचे भीषण वर्णन करून शेवटी पुन्हा परमार्थाचे माहात्म्य सांगितले.

पाठीचा कणा जमिनीशी काटकोनात ठेवून दोन पायांवर उभा राहणारा, इतर प्राण्यांच्या मानाने शरीराच्या वजनाच्या तुलनेत मेंदूचे वजन अधिक असणारा, विलक्षण व अफाट बुद्धिमत्तेचा, अनेक कौशल्ये (Skills) संपादन करणारा व पृथ्वीवर अधिराज्य गाजवणारा असे मानवाचे वैज्ञानिक वर्णन आहे. ईश्वरालासुद्धा मानवी शरीर निर्माण केल्यावरच धन्यता वाटली! 'पुरुषो वाव सुकृतम्' (ऐत. १-२-३) असा हा हसणारा, रडणारा, भावभावनांनी भरलेला, विकारांनी बरबटलेला व अफाट जिज्ञासा असणारा प्राणी आहे. त्याने ब्रह्मजिज्ञासा करावी असे भारतीय संस्कृती सांगते.

ह्या समासात तत्त्वाचा तपशील फार मोठा आहे. उदा. घरावर हक्क सांगणाऱ्या प्राण्यांची नावे. त्या ओव्या व अर्थाचा एकत्रित गट केला आहे. प्राण्यांच्या नावांचे भाषांतर अचूक आहे अशी खात्री नाही. पुनरुक्ती सतत असल्याने त्रोटक अर्थ दिले आहेत. उदा. 'एक फिरती, एक करिती.' ह्यांतील 'एक' शब्द नंतर गाळला आहे. पुढील सर्व दशकांचे अर्थ लिहिताना हीच पद्धत स्वीकारली आहे.

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो । जो जो कीजे परमार्थलाहो । तो तो पावे सिद्धीतें ।।१।।

हा नरदेह खरोखर धन्य आहे. ह्याचे वैशिष्ट्य असे की ह्यात जशी परमार्थाची इच्छा करावी तशी ती सिद्धीला जाते. पारमार्थिक साधने करून कोणी काय मिळविले ते पाहा. ॥१॥

या नरदेहाचेनि लागवेगें । येक लागले भक्तिसंगें । येकीं परम वीतरागें । गिरिकंदरें सेविलीं ।।२।।

हा नरदेह मिळताच कोणी कोणी मोठ्या त्वरेने भक्तिमार्गाला लागले. वैराग्यामुळें डोंगरकपारीत, गुहेत राहिले. ॥२॥

येक फिरती तीर्थाटणें । येक करिती पुरश्चरणें । येक अखंड नामस्मरणें । निष्ठांवत राहिले ।।३।।

तीर्थयात्रा, पुरश्चरणे करीत नामनिष्ठा सांभाळून राहिले. उदा. गायत्रीपुरश्चरण. ह्यात त्या मंत्राचे फळ मिळण्यासाठी ठराविक दिनक्रम सांभाळून त्या मंत्राची जपसंख्या उच्चारादिविधींसह शास्त्रशुद्ध पद्धतीने पूर्ण करावी लागते. ॥३॥

येक तपें करू लागले । येक योगाभ्यासी माहाभले । येक अभ्यासयोगें जाले । वेदशास्त्रीं वित्पन्न ।।४।।

तपे, अवघड योगाभ्यास व व्युत्पत्तीसह वेदान्त शास्त्राचा अभ्यास करू लागले. एका विशिष्ट ध्येयाच्या पूर्तीसाठी सर्व ताप सोसून स्वीकारलेल्या जीवनपद्धतीला तप म्हणतात. ॥४॥

येकीं हटनिग्रह केला । देह अत्यंत पीडिला । येकीं देव ठाईं पाडिला । भावार्थबळें ।।५।।

अत्यंत देहकष्टाचा हठयोग केला, व भावाच्या मोठ्या बळाने सगुण दर्शन साध्य केले. 'अनर्गला सुषुम्नाच हठसिद्धिश्च जायते' (हठ. प्र. २-७६) कुंभकामुळे कुंडलिनी जागी होऊन सुषुम्ना शुद्ध झाल्यावर हठयोग सिद्ध होतो.

'भावबळे आकळे येऱ्हवी नाकळे.' (ह.पा.) ॥५॥

येक माहानुभाव विख्यात । येक भक्त जाले ख्यात । येक सिद्ध अकस्मात । गगन वोळगती ।।६।।

ब्रह्मानुभवी, विख्यात भक्त व कोणी एकाएकी आकाशातून प्रवास करणारे सिद्ध झाले. ॥६॥

येक तेजीं तेजचि जालें । येक जळीं मिळोन गेले । येक ते दिसतचि अदृश्य जाले । वायोस्वरूपीं ।।७।।

मुक्ताबाई तेजोरूप झाली, एकनाथमहाराज जळात समाविष्ट झाले, तुकारामहाराज पहाता पहाता जणू हवेत विरून गेले. ॥७॥

येक येकचि बहुधा होती । येक देखतचि निघोनि जाती । येक बैसलें असताची भ्रमती । नाना स्थानीं समुद्रीं ।।८।।

एकाच वेळी अनेक रूप धारण करणारे, बघता बघता गुप्त होणारे, एका ठिकाणी बसूनच समुद्रादी अनेक ठिकाणीं दिसतात. ॥८॥

येक भयानकावरी बैसती । येक अचेतनें चालविती । येक प्रेतें उठविती । तपोबळेंकरूनी ।।९।।

वाघावर बसतात (चांगदेव), अचेतन पदार्थ (भिंत) चालवितात (ज्ञानदेव), तप:सामर्थ्याने मेलेले जिवंत करतात. ॥९॥

येक तेजें मंद करिती । येक जळें आटविती । येक वायो निरोधिती । विश्वजनाचा ।।१०।।

सूर्यादिकांचे तेज कमी करतात, पाणी आटवून टाकतात, जगातील सर्व प्राण्यांचे श्वासोच्छ्वास कोंडून धरतात. ॥१०॥

ऐसे हटनिग्रही कृतबुद्धी । जयांस वोळल्या नाना सिद्धि । ऐसे सिद्ध लक्षावधी । होऊन गेले ।।११।।

ज्यांना अनेक सिद्धी मिळालेल्या आहेत असे दुर्दम्य दृढनिश्चय असलेले लक्षावधी सिद्ध होऊन गेले. ॥११॥

येक मनोसिद्ध येक वाचासिद्ध । येक अल्पसिद्ध येक सर्वसिद्ध । ऐसे नाना प्रकारीचे सिद्ध । विख्यात जाले ।।१२।।

मनात येईल ते घडवू शकणारे, जे बोलतील ते खरे होणारे, क्षुद्र सिद्धी मिळालेले व सर्व प्रकारच्या सिद्धी मिळालेले प्रसिद्ध झाले. ॥१२॥

येक नवविधाभक्तिराजपंथें । गेले तरले परलोकींच्या निजस्वार्थें । येक योगी गुप्तपंथे । ब्रम्हभुवना पावले ।।१३।।

नवविधाभक्तीच्या राजमार्गाने काहींनी परलोकरूप मोक्ष हे परम कल्याण साधले. काहींना योगमार्गाने ब्रह्मलोक मिळाला. ॥१३॥

येक वैकुंठास गेले । येक सत्यलोकीं राहिले । येक कैळासीं बैसले । शिवरूप होउनी ।।१४।।

कोणी वैकुंठलोक, कोणी सत्यलोक तर कोणी कैलासलोकावर शिवस्वरूप मिळवले. ॥१४॥

येक इंद्रलोकीं इंद्र जाले । येक पितृलोकीं मिळाले । येक ते उडगणीं बैसले । येक ते क्षीरसागरीं ।।१५।।

कोणी इंद्रलोकी इंद्रपदावर बसले, कोणी पितृलोक, नक्षत्रलोक मिळवले. तर कोणी दुधाच्या समुद्रात विसावले. ॥१५॥

सलोकता समीपता । स्वरूपता सायोज्यता । या चत्वार मुक्ती तत्वतां । इच्छा सेऊन राहिले ।।१६।।

ईश्वरलोकात वास्तव्य, ईश्वराशी जवळीक, ईश्वराशी रूपाचे ऐक्य व ईश्वराशी तात्त्विक ऐक्य ह्याप्रमाणे जी आवड असेल ती पूर्ण केली. ।।१६।।

ऐसे सिद्ध साधु संत । स्वहिता प्रवर्तले अनंत । ऐसा हा नरदेह विख्यात । काय म्हणौनि वर्णावा ।।१७।।

अशा रीतीने ज्या नरदेहात आल्यावर अनेक साधुसंतांनी स्वत:चे हित साधले त्या सुप्रसिद्ध नरदेहाचे माहात्म्य किती म्हणून सांगावे? ।।१७।।

या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनांचेनि द्वारें । मुख्य सारासारविचारें । बहुत सुटले ।।१८।।

ह्या नरदेहाची प्राप्ती झाल्यावर नानाप्रकारच्या साधनांनी व मुख्यत्वे सारासारविचाराने अनेकांनी मोक्ष मिळविला. ।।१८।।

या नरदेहाचेनि संमंधें । बहुत पावले उत्तम पदें । अहंता सांडून स्वानंदें । सुखी जाले ।।१९।।

मनुष्य जन्माला आल्यावर अहंकाराचा त्याग करून अनेक साधक आत्मानंदाच्या अनुभवाने सुखरूप झाले. ।।१९।।

नरदेहीं येऊन सकळ । उधरागती पावले केवळ । येथें संशयाचें मूळ । खंडोन गेलें ।।२०।।

फक्त मानवी शरीरातच उत्तमगती मिळू शकते व तशी अनेकांना मिळाली ह्याविषयी शंका बाळगण्याचे आता कारण नाही. ।।२०।।

पशुदेहीं नाहीं गती । ऐसे सर्वत्र बोलती । म्हणौन नरदेहींच प्राप्ती । परलोकाची ।।२१।।

पशुपक्ष्यांच्या शरीरातील जीवात्म्याला उत्तम गती मिळत नाही ह्याबद्दल एकमत आहे. म्हणून केवळ नरदेहातच परलोक किंवा मोक्षलाभ होऊ शकतो. ।।२१।।

संत महंत ऋषी मुनी । सिद्ध साधु समाधानी । भक्त मुक्त ब्रह्मज्ञानी । विरक्त योगी तपस्वी ।।२२।।

तत्त्वज्ञानी योगाभ्यासी । ब्रह्मचारी दिगंबर संन्यासी । शड्दर्शनी तापसी । नरदेहींच जाले ।।२३।।

संत, महंत, ऋषी, मुनी, सिद्ध, साधू, नित्यतृप्त, भक्त, मुक्त, ब्रह्मज्ञानी, विरक्त, योगी, तपस्वी, तत्त्ववेत्ते, योगसाधक, ब्रह्मचर्यव्रती, दिगंबरव्रती, संन्यासी, साही शास्त्रे किंवा दर्शने जाणणारे व तपाचरणी मानवी देहातच झाले. ।।२२, २३।।

म्हणौनि नरदेह श्रेष्ठ । नाना देहांमधें वरिष्ठ । जयाचेनि चुके आरिष्ट । येमयातनेचें ।।२४।।

ह्याच कारणाने नरदेह श्रेष्ठ असून इतर लक्षावधी योनींच्या मानाने फारच वरच्या दर्जाचा आहे. यमयातनांचे संकट चुकविण्याची क्षमता त्यात आहे. ।।२४।।

नरदेह हा स्वाधेन । सहसा नव्हे पराधेन । परंतु हा परोपकारीं झिजऊन । कीर्तिरूपें उरवावा ।।२५।।

त्यातल्यात्यात पुरुषाचे (Male किंवा नर) शरीर हे स्वतंत्र असून सहसा परतंत्र नसते. म्हणून त्याचा उपयोग सतत परोपकारासाठी करून कीर्तिरूपाने अमर व्हावे. ।।२५।।

अश्व वृषभ गाई म्हैसी । नाना पशु स्त्रिया दासी । कृपाळूपणें सोडितां त्यांसी । कोणी तरी धरील ।।२६।।

घोडा, बैल, गाय, म्हैस, इतर पशू, दासदासी व स्त्री ह्यांना जर त्यांच्या बंधनाविषयी कळवळा येऊन मोकळे सोडले तर त्यांचे कोणीतरी हरण करतात. ह्या यादीत स्त्रीचा समावेश पाहून बरे वाटत नाही. पण स्त्रियांना काही बंधने स्वीकारावीच लागतात हे खरे आहे. ते त्रैकालिक सत्य आहे. ती स्वीकारण्यातच कौटुंबिक व सामाजिक स्वास्थ्य टिकण्याची व्यवस्था आहे. पुरुष जातीची आक्रमकता गृहीत धरून व त्यात बदल होईल अशी भाबडी समजूत न करता हे कटू वास्तव स्वीकारण्याची समर्थांची तयारी आहे. ।।२६।।

तैसा नव्हे नरदेहो । इच्छा जाव अथवा राहो । परी यास कोणी पाहो । बंधन करूं सकेना ।।२७।।

पुरुषाच्या देहाला असे बंधन नाही. तो कोणाच्या बंधनात चरितार्थासाठी राहील अगर न राहील पण सहसा कोणी त्याला बंधनात ठेवण्याचे मनात आणीत नाही. ॥२७॥

नरदेह पांगुळ असता । तरी तो कार्यास न येता । अथवा थोंटा जरी असता । तरी परोपकारास न ये ।।२८।।

नरदेह मिळूनही तो पांगळा असेल तर कार्याला मोठ्याच मर्यादा येतात. थोटा असेल तर दुसऱ्यासाठी प्रत्यक्ष हाताने काही करता येत नाही. ॥२८॥

नरदेह अंध असिला । तरी तो निपटचि वाया गेला । अथवा बधिर जरी असिला । तरी निरूपण नाहीं ।।२९।।

आंधळेपणा असेल तर ते शरीर व जन्म फुकट गेल्यातच जमा आहे. बहिरा असेल तर श्रवण घडणार नाही. ॥२९॥

नरदेह असिला मुका । तरी घेतां न ये आशंका । अशक्त रोगी नासका । तरी तो निःकारण ।।३०।।

बोलता येत नसेल तर प्रश्न विचारता येत नाहीत. दुर्बळ, रोगट व कुढणारा असेल तर त्याच्यात काहीच अर्थ नाही. ॥३०॥

नरदेह असिला मूर्ख । अथवा फेंपऱ्या समंधाचें दुःख । तरी तो जाणावा निरार्थक । निश्चयेंसी ।।३१।।

मूर्ख असेल किंवा झटक्यांचा आजार असेल तर तो अकारण जन्माला आला असे नक्की समजावे. (मूर्ख व आळशी माणूस पाहिला की समर्थांच्या मस्तकाची तिडीक उठत असावी!) ॥३१॥

इतुकें हें नस्तां वेंग । नरदेह आणी सकळ सांग । तेणें धरावा परमार्थमार्ग । लागेवेगें ।।३२।।

ह्यांतील एकही व्यंग नसेल व शरीर आणि मेंदू धडधाकट असेल तर मोठ्या तत्परतेने परमार्थपंथ धरावा. ॥३२॥

सांग नरदेह जोडले । आणि परमार्थबुद्धि विसरलें । तें मूर्ख कैसें भ्रमलें । मायाजाळीं ।।३३।।

उत्तम शरीराचा लाभ होऊनही जर परमार्थाकडे दुर्लक्ष झाले तर तो मूर्ख मायाजाळात फसलाच म्हणून समजा. ॥३३॥

मृत्तिका खाणोन घर केलें । तें माझें ऐसें दृढ कल्पिलें । परी तें बहुतांचें हें कळलें । नाहींच तयासी ।।३४।।

ह्या मायेचा एक परिणाम असा की जमीन खणून काढलेल्या मातीने घर बांधल्यावर हा मूर्ख ते ‘माझे’ म्हणतो. व ते ममत्व घट्ट धरून बसतो. पण त्यावर हक्क सांगणारे कितीतरी प्राणी असतात हे त्याला कळतच नाही. ते सर्व प्राणी असे– ॥३४॥

मूषक म्हणती घर आमुचें । पाली म्हणती घर आमुचें । मक्षिका म्हणती घर आमुचें । निश्चयेंसीं ।।३५।।

कांतण्या म्हणती घर आमुचें । मुंगळे म्हणती घर आमुचें ।मुंग्या म्हणती घर आमुचें । निश्चयेंसीं ।।३६।।

विंचू म्हणती आमुचें घर । सर्प म्हणती आमुचें घर ।झुरळें म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।।३७।।

भ्रमर म्हणती आमुचें घर । भिंगोऱ्या म्हणती आमुचें घर । आळिका म्हणती आमुचे घर । काष्ठामध्यें ।।३८।।

मार्जरे म्हणती आमुचें घर । श्वाने म्हणती आमुचें घर । मुंगसे म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।।३९।।

पुंगळ म्हणती आमुचें घर । वाळव्या म्हणती आमुचें घर । पिसुवा म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।।४०।।

ढेंकुण म्हणती आमुचें घर । चांचण्या म्हणती आमुचें घर । घुंगर्डी म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।।४१।।

पिसोळे म्हणती आमुचें घर । गांधेले म्हणती आमुचें घर । सोट म्हणती आमुचें घर । आणी गोंबी ।।४२।।

बहुत किड्यांचा जोजार । किती सांगावा विस्तार । समस्त म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।।४३।।

पशु म्हणती आमुचें घर । दासी म्हणती आमुचें घर । घरीचीं म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।।४४।।

पाहुणे म्हणती आमुचें घर । मित्र म्हणती आमुचें घर । ग्रामस्थ म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।।४५।।

उंदीर, पाली, डोंगळे, मुंग्या, विंचू, साप, झुरळे, भुंगे, भ्रमरी, आळ्या, मांजरे, कुत्री, मुंगूस, ढेकूण, चांचड, घुंगरटी, बागुरडे, वाळवी, पिसवा, पावसाळी किडे, लाल माशा, चतुर, गोमाशी, पाहुणे, मित्र, ग्रामस्थ, पशू, मोलकरणी, कुटुंबीय. ।।३५ ते ४५।।

तश्कर म्हणती आमुचें घर । राजकी म्हणती आमुचें घर । आग्न म्हणे आमुचें घर । भस्म करूं ।।४६।।

चोर, सरकारी अधिकारी व अग्नी हेही घरावर हक्क सांगतात. चोर चोरीसाठी, अधिकारी रहाण्यासाठीं व अग्नी भस्म करण्यासाठी. ।।४६।।

समस्त म्हणती घर माझें । हें मूर्खही म्हणे माझें माझें । सेवट जड जालें वोझें । टाकिला देश ।।४७।।

असे हे सर्वच घरावर हक्क सांगत असताना हा मूर्खही ते घर माझे आहे असे म्हणतो. शेवटी ते सांभाळता सांभाळता नाकी नऊ आले की घर व तो भागही सोडून जावे लागते. ।।४७।।

अवघीं घरें भंगली । गांवांची पांढरी पडिली । मग ते गृहीं राहिली । अरण्यश्वापदें ।।४८।।

शेवटी गावातील सर्वच घरे पडून गाव ओस पडते व नंतर त्या घरात कोल्हे-लांडगे राहू लागतात. ।।४८।।

किडा मुंगी वाळवी मूषक । त्यांचेंच घर हें निश्चयात्मक । हें प्राणी बापुडें मूर्ख । निघोन गेलें ।।४९।।

मग त्या घरातून किडे, मुंगी, वाळवी व उंदीर ह्यांचीच कायमची वसती होऊन हा तथाकथित मूर्ख घरमालक त्यातून निघून जातो. ।।४९।।

ऐसी गृहांची स्थिती । मिथ्या आली आत्मप्रचिती । जन्म दों दिसांची वस्ती । कोठे तरी करावी ।।५०।।

अशी ही घराच्या मालकीची स्थिती आहे. 'ते माझे आहे' असा उगीचच भ्रम झाला होता. तसे पाहिले तर आयुष्याचे चार दिवस जमेल तसे जमतील तेथे घालवावेत. ।।५०।।

देह म्हणावें आपुलें । तरी हें बहुतांकारणें निर्मिलें । प्राणीयांच्या माथां घर केलें । वा मस्तकीं भक्षिती ।।५१।।

'देह माझा आहे' असे म्हणावे तर त्याचाही स्वत:शिवाय अनेकांना उपयोग होतो. उवा डोक्यावर घर करून त्वचेच्या पेशी कुरतडून खातात. ।।५१।।

रोमेमुळे किडे भक्षिती । खांडुक जाल्यां किडे पडती । पोटामध्यें जंत होती । प्रत्यक्ष प्राणियांच्या ।।५२।।

केसांच्या मुळांशी जंतू शिरून पू होतो. (Folliculitis.) गळू झाल्यावर त्यांत किडे पडतात. पोटात जंत होतात हे तर प्रत्यक्षच दिसते. ।।५२।।

कीड लागे दांतासी । कीड लागे डोळ्यांसी । कीड लागे कर्णासी । आणी गोमाशा भरती ।।५३।।

दातांना कीड लागते, डोळे सुजतात, कानांत किडे होतात व गोमाशीही आत जाते. ।।५३।।

गोचिड अशुद्ध सेविती । चामवा मांसांत घुसती । पिसोळे चाऊन पळती । अकस्मात ।।५४।।

गोचिड लागून रक्त शोषते, पिसवा त्वचेत शिरतात, अचानक डास चावून पळून जातात. ।।५४।।

भोंगें गांधेलें चाविती । गोंबी जळवा अशुद्ध घेती । विंचू सर्प दंश करिती । कानटें फुर्सीं ।।५५।।

भुंगे, गांधीलमाशा, गोम, जळू, विंचू, घुंगुरटी व फुरसे चावतात. ॥५५॥

जन्मून देह पाळिलें । तें अकस्मात व्याघ्रें नेलें । कां तें लांडगींच भक्षिलें । बळात्कारें ॥५६॥

जन्मापासून सांभाळलेला देह अचानक वाघ किंवा लांडगा खातो तेव्हा त्याला काहीच करता येत नाही. ॥५६॥

मूषकें मार्जरें दंश करिती । स्वानें अश्वें लोले तोडिती । रीसें मर्कटें मारिती । कासावीस करूनी ॥५७॥

उंदीर, मांजरे चावतात. कुत्री व घोडे लचके तोडतात. व अस्वले व माकडे छळून हाल करून मारून टाकतात. ॥५७॥

उष्टरें डसोन उचलिती । हस्थी चिर्डून टाकती । वृषभ टोचून मारिती । अकस्मात ॥५८॥

उंट चावा घेऊन माणसाला वर उचलतात, हत्ती पायाखाली चिरडतो, बैल अचानक शिंगाने मारतो. ॥५८॥

तस्कर तडतडां तोडिती । भूतें झडपोन मारिती । असो या देहाची स्थिती । ऐसी असे ॥५९॥

चोर-दरोडेखोर कुऱ्हाडीचे घाव घालतात. भुते लागून प्राण जातात. एकूण देहाचा हा असा प्रकार आहे. ॥५९॥

ऐसें शरीर बहुतांचें । मूर्ख म्हणे आमुचें । परंतु खाजें जिवांचे । तापत्रैं बोलिलें ॥६०॥

असे हे शरीर अनेकांचे भक्ष्य असताना मूर्ख त्याला स्वत:चे समजतो. (द. ३ स ५,६ व ७)

पुढे तीन तापांचे वर्णन करताना देह हे अनेकांचे खाद्य कसे आहे ते सांगितले आहे. ॥६०॥

देह परमार्थी लाविलें । तरीच याचें सार्थक जालें । नाहीं तरी हें वेर्थचि गेलें । नाना आघातें मृत्यपंथे ॥६१॥

असे हे शरीर परमार्थासाठी उपयोगात आणले तरच ह्याचे खरे सार्थक होते. नाहीतर ते अनेक आघात व मृत्यू ह्यांच्या स्वाधीन होणार हे ठरलेलेच आहे. ॥६१॥

असो जे प्रापंचिक मूर्ख । ते काये जाणती परमार्थसुख । त्या मूर्खांचें लक्षण काही येक । पुढें बोलिलें असे ॥६२॥

आता हे वर्णन पुरे. देह व घर माझे म्हणणाऱ्या प्रापंचिक मूर्खांना पारमार्थिक सुखाची कशी बरे कल्पना येणार? अशा ह्या मूर्खांची लक्षणे पुढच्या दशकात सांगितली आहेत. ॥६२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'नरदेहस्तवननिरूपणनाम' समास दहावा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'नरदेहस्तवन' नावाचा दहावा समास समाप्त

—दशक पहिला समाप्त—

दशक दुसरा : मूर्खलक्षणांचा

समास पहिला : मूर्खलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

देहासक्ती, व्यवहारासक्ती, प्रपंचासक्ती, इ. आसक्ती आत्मस्वरूपाच्या अज्ञानामुळे निर्माण होतात. कायदा, नीती, लोकरीती, प्रतिष्ठा, इत्यादींमुळे या आसक्तीची विपरीत आचरणात परिणती होणे काही प्रमाणात कमी होते हे खरे, परंतु आत्मज्ञानामुळे या आसक्तीच नष्ट होतात. अज्ञ, मूढ, यथाजात, मूर्ख, वैधेय व बालिश (अमरकोश) या सर्व प्रतिशब्दांना न्याय देणारी लक्षणे समर्थांनी सांगितली आहेत! वरील विपरीत आचरण करणाऱ्यालाच मूर्ख असे म्हणतात. माणसाने मूर्खत्वाकडून उत्तमत्वाकडे, कुविद्येकडून सद्विद्येकडे, अभक्तीतून भक्तीकडे, त्रिगुणाकडून गुणातीतत्वाकडे व आसक्तीकडून विरक्तीकडे जावे अशी अपेक्षा समर्थ या दशकात व्यक्त करतात. शेवटच्या समासात कुणीच पढतमूर्ख असू नये अशी सूचना देतात.

ॐ नमोजि गजानना । येकदंता त्रिनयना । कृपादृष्टी भक्तजना । अवलोकावे ।।१।।

ॐ या लेखनाकृतीशी साम्य असलेल्या श्रीगजानना, तू एकदंत व तीन डोळे असलेला आहेस. तू भक्तांकडे कृपादृष्टीने पहा. ॥१॥

तुज नमू वेदमाते । श्रीशारदे ब्रह्मसुते । अंतरी वसे कृपावंते । स्फूर्तिरूपे ।।२।।

वेद निर्माण करणाऱ्या हे शारदे, तू ब्रह्मदेवाची कन्या आहेस. माझ्यावर कृपा करून माझ्या बुद्धीत स्फूर्तिरूपाने रहा. ॥२॥

वंदूनी सद्‌गुरुचरण । करून रघुनाथस्मरण । त्यागार्थ मूर्खलक्षण । बोलिजेल ।।३।।

आता श्रीगुरूंच्या चरणांना वंदन करून, श्री रघुनाथाचे स्मरण करून मूर्ख लक्षणे मी सांगेन. ती वाचून त्यांचा त्याग करावा. ॥३॥

येकमूर्ख येक पढतमूर्ख । उभय लक्षणी कौतुक । श्रोती सादर विवेक । केला पाहिजे ।।४।।

मूर्ख व पढतमूर्ख असे मूर्खांचे दोन प्रकार असून त्या दोघांच्या लक्षणातील फरक श्रोत्यांनी नीट समजावून घ्यावा. ॥४॥

पढतमूर्खांचें लक्षण । पुढिले समासीं निरूपण । सावध होऊनि विचक्षण । परिसोत पुढें ।।५।।

पढतमूर्खाची लक्षणे याच दशकाच्या शेवटी शेवटच्या समासात सांगितली आहेत. चतुर श्रोत्यांनी ती लक्षपूर्वक तेथे पहावीत. ॥५॥

आतां प्रस्तुत विचार । लक्षणें सांगता अपार । परि कांहीं येक तत्पर । होऊन ऐका ।।६।।

आता सामान्य मूर्खाची लक्षणे सांगू म्हटले तर ती असंख्य आहेत. पण त्यांतील थोडी लक्षणे लक्षपूर्वक ऐका. ॥६॥

जे प्रापंचिक जन । जयांस नाहीं आत्मज्ञान । जे केवळ अज्ञान । त्यांचीं लक्षणें ।।७।।

केवळ अज्ञानाने भरून गेल्यामुळे आत्मज्ञानाचा वारासुद्धा न लागलेल्या प्रपंचासक्तांची ही लक्षणे आहेत (आत्मविद्येमध्ये सुख, जग, जीव, ईश्वर व ब्रह्म यांची मीमांसा केलेली असते. त्यांच्या परस्परसंबंधाचा विचार केलेला असतो. तो अभ्यास साधनापूर्वक केल्यास मूर्खपणा कमी होतो. पुढील मूर्ख लक्षणे वाचताना तो कसा कमी होतो ते पाहू.) ॥७॥

जन्मला जयांचे उदरीं । तयांसी जो विरोध करी । सखी मानिली अंतुरी । तो येक मूर्ख ।।८।।

पत्नीलाच सर्वस्व मानून जन्माला घालणाऱ्या आईवडिलांशी जो फटकून राहतो तो मूर्ख. (भोगासक्तीमुळे फक्त पत्नीच हवीशी वाटते. भोग सुखांसाठी हवा असतो. सुखमीमांसा असे सांगते की केवळ आत्माच सुखरूप आहे. आत्मविद्येचा गंधही नसल्याने हे कळत नाही व त्यामुळे आईवडिलांची घरात अडचण वाटून पत्नीच्या अर्ध्या वचनात राहतो.) ॥८॥

सांडून सर्वहि गोत । स्त्रीआधेन जीवित । सांगे अंतरींची मात । तो येक मूर्ख ।।९।।

सर्व नातलगांचे संबंध तोडून पत्नीच्या अर्ध्या वचनात राहून तिच्याशीच गुजगोष्टी करीत राहणारा मूर्ख असतो. ॥९॥

परस्त्रीसी प्रेमा धरी । श्वशुरगहीं वास करी । कुळेंविण कन्या वरी । तो येक मूर्ख ।।१०।।

परस्त्रीची अभिलाषा धरणारा, सासुरवाडीत मुक्काम ठोकणारा व कुळपरंपरा चांगली नसतानाही त्यातील मुलीशी विवाह करणारा मूर्ख ठरतो. ॥१०॥

समर्थावरी अहंता । अंतरी मानी समता । सामर्थ्येंविण करी सत्ता । तो येक मूर्ख ।।११।। ।

सर्व दृष्टीने सामर्थ्यसंपन्न व्यक्तीला अहंकारामुळे मनोमनी स्वत:च्या बरोबरीची मानणारा व स्वत:चे ठिकाणी कोणतेच सामर्थ्य नसताना इतरांवर हुकमत गाजवू पाहणारा मूर्ख असतो. ॥११॥

आपली आपण करी स्तुती । स्वदेशीं भोगी विपत्ती । सांगे वडिलांची कीर्ती । तो येक मूर्ख ।।१२।।

स्वत:च्या तोंडाने स्वत:चीच स्तुती करणारा, आपल्याच गावात कर्तृत्वशून्यतेमुळे गांजलेल्या अवस्थेत राहणारा व अशाही स्थितीत पूर्वजांचे माहात्म्य सर्वांना सांगणारा मूर्ख असतो. ॥१२॥

अकारण हास्य करी । विवेक सांगतां न धरी । जो बहुतांचा वैरी । तो येक मूर्ख ।।१३।।

काहीच कारण नसताना हसणारा, कोणी हिताच्या चार गोष्टी सांगूनही त्या न ऐकणारा व अनेकांशी वैर धरणारा मूर्ख असतो. ॥१३॥

आपुली धरूनियां दुरी । पराव्यासीं करी मीत्री । परन्यून बोले रात्रीं । तो येक मूर्ख ।।१४।।

स्वकीयांना दूर लोटून परकीयांशी जवळीक साधणारा व शांत एकांतात दुसऱ्याची उणीदुणी काढणारा, ॥१४॥

बहुत जागते जन । तयांमध्यें करी शयन । परस्थळीं बहुभोजन । करी, तो येक मूर्ख ।।१५।।

सर्वजण जागे असताना आपण एकटाच त्यांच्यासमोर झोपणारा व दुसऱ्याचे घरी भोजनास गेला असता चापून खाणारा, ॥१५॥

मान अथवा अपमान । स्वयें करी परिच्छिन्न । सप्त वेसनीं जयाचें मन । तो येक मूर्ख ।।१६।।

स्वत:चे झालेले सन्मान व अपमान स्वत:च सर्वांना सांगत सुटणारा आणि सात प्रकारच्या व्यसनात चित्त लागलेला, (जुगार, वेश्या, चोरी, चहाडी, परस्त्री, पशुपक्ष्यांची झुंज व तमाशा.) ॥१६॥

धरून परावी आस । प्रेत्न सांडी सावकास । निसुगाईचा संतोष । मानी, तो येक मूर्ख ।।१७।।

दुसऱ्यांच्या मदतीवर विसंबून स्वत: प्रयत्न न करणारा व आळसाने सुखात दिवस काढणारा, ॥१७॥

घरीं विवेक उमजे । आणि सभेमध्यें लाजे । शब्द बोलतां निर्बुजे । तो येक मूर्ख ।।१८।।

घरात असताना चांगले चांगले विचार सुचतात. पण समुदायापुढे बोलायची वेळ आली की सभाधीटपणा नसल्याने गप्प बसणारा व शब्द बोलण्याचा प्रसंग येताच लाजणारा, ॥१८॥

आपणाहून जो श्रेष्ठ । तयासीं अत्यंत निकट । सिकवणेचा मानी वीट । तो येक मूर्ख ।।१९।।

स्वत:हून सर्व दृष्टीने मोठ्या व्यक्तीशी फार जवळीक असल्याप्रमाणे वागणारा व हिताच्या चार गोष्टी ऐकण्यासही कंटाळणारा, ॥१९॥

नायेके त्यांसी सिकवी । वडिलांसीं जाणीव दावी । जो आरजास गोवी । तो येक मूर्ख ।।२०।।

जो काही ऐकण्याची शक्यताच नाही त्याला शिकविणारा, वडीलधाऱ्यांसमोर उन्मत्तपणे वागणारा व सभ्य व्यक्तींना लफड्यात अडकविणारा, ॥२०॥

येकायेकीं येकसरा । जाला विषईं निलाजिरा । मर्यादा सांडून सैरा । वर्ते, तो येक मूर्ख ।।२१।।

चित्ताला भुरळ पाडणारा विषय समोर आला असता एकाएकी सर्व मर्यादा सोडून निर्लज्ज सैरटाप्रमाणे वागणारा, ॥२१॥

औषध ने घे असोन वेथा । पथ्य न करी सर्वथा । न मिळे आलिया पदार्था । तो येक मूर्ख ।।२२।।

रोग असून उपाय न करणारा, मुळीच पथ्य न सांभाळणारा व जेवताना ताटात पडलेला पदार्थ तक्रार न करता न स्वीकारणारा, ॥२२॥

संगेविण विदेश करी । वोळखीविण संग धरी । उडी घाली माहापुरीं । तो येक मूर्ख ।।२३।।

कोणी बरोबर न घेता दूरवरच्या अनोळखी प्रदेशात जाणारा, पुरेशी ओळख नसताना मैत्री जोडणारा व नदीला महापूर आला असता आपले शौर्य दाखविण्यासाठी त्यात उडी घेणारा, ॥२३॥

आपणास जेथें मान । तेथें अखंड करी गमन । रक्षूं नेणें मानाभिमान । तो येक मूर्ख ।।२४।।

जेथे आपली प्रतिष्ठा आहे तेथे सतत गेल्याने स्वत:चा मान व अस्मिता गमावून बसणारा, ॥२४॥

सेवक जाला लक्ष्मीवंत । तयाचा होय अंकित । सर्वकाळ जो दुश्चित । तो येक मूर्ख ।।२५।।

स्वत:कडे पूर्वी नोकरीला असलेला नंतर त्याच्या नशिबाने श्रीमंत झाल्यावर त्याच्या आश्रयाला जाणारा व कधीही कोठेच नीट लक्ष न देणारा, ॥२५॥

विचार न करितां कारण । दंड करी अपराधेंविण । स्वल्पासाठीं जो कृपण । तो येक मूर्ख ।।२६।।

मागचापुढचा विचार न करता व अपराध केलेला नसताना दुसऱ्याला दोष देणारा किंवा शिक्षा करणारा व थोडक्यासाठी मन छोटे करणारा, ॥२६॥

देवलंड, पितृलंड । शक्तिवीण करी तोंड । ज्याचे मुखीं भंडउभंड । तो येक मूर्ख ।।२७।।

देव व पितृकुळाशी निष्ठा नसणारा, अंगात सामर्थ्य नसताना मोठमोठ्या गप्पा मारणारा व शिवराळ आणि भांडखोर असणारा, ॥२७॥

घरीच्यावरी खाय दाढा । बाहेरी दीन बापुडा । ऐसा जो कां वेडमूढा । तो येक मूर्ख ।।२८।।

पत्नी, मुले, वृद्ध आईबाप यांना सतत धाकात ठेवणारा व घराबाहेर मात्र दीनवाणा, मोहित व वेड्याप्रमाणे वागणारा, ॥२८॥

नीच यातीसीं सांगात । परांगनेसीं येकांत । मार्गे जाय खात खात । तो येक मूर्ख ।।२९।।

वृत्तीने नीच असलेल्यांबरोबर फिरणारा, परस्त्रीला एकटी गाठू पाहणारा, रस्त्याने चालताना खाणारा, ॥२९॥

स्वयें नेणें परोपकार । उपकाराचा अनोपकार । करी थोडें बोले फार । तो येक मूर्ख ।।३०।।

स्वत: दुसऱ्यावर उपकार करण्याचे नावही न काढणारा, दुसऱ्याने केलेल्या उपकाराचे स्मरण न ठेवणारा व प्रत्यक्ष कृती थोडी करून बडबड मात्र भरपूर करणारा, ॥३०॥

तपीळ खादाड आळसी । कुश्चीळ कुटीळ मानसीं । धारिष्ट नाहीं जयापासीं । तो येक मूर्ख ।।३१।।

तापट, खादाड, आळशी, अस्वच्छ, कपटी, अधीर किंवा भित्रा, ॥३१॥

विद्या वैभव ना धन । पुरुषार्थ सामर्थ्य ना मान । कोरडाच वाहे अभिमान । तो येक मूर्ख ।।३२।।

विद्येचे किंवा धनाचे वैभव नाही, धर्मादी पुरुषार्थाचा पत्ता नाही, कोणतेही सामर्थ्य नाही व कुत्रेसुद्धा विचारीत नाही असे असूनही उगीचच ताठ्याने वागणारा मूर्ख समजावा. ॥३२॥

लंडी लटिका लाबाड । कुकर्मी कुटीळ निचाड । निद्रा जयाची वाड । तो येक मूर्ख ।।३३।।

कोठेच निष्ठा नसणारा, खोटारडा, लबाड, निंद्य कर्मे करणारा, कपटी, कशाचीही चाड नसणारा व अति झोपाळू, ॥३३॥

उंचीं जाऊन वस्त्र नेसे । चौबारां बाहेरी बैसे । सर्व काळ नग्न दिसे । तो येक मूर्ख ।।३४।।

उंच ठिकाणी कपडे बदलणारा, सकाळपासून रात्री उशिरापर्यंत रस्त्यावर किंवा चौकात सतत वावरणारा, बहुतेक वेळा केवळ पंचा गुंडाळून फिरणारा, ॥३४॥

दंत चक्षु आणि घ्राण । पाणी वसन आणि चरण । सर्वकाळ जयाचे मळिण । तो येक मूर्ख ।।३५।।

दात, डोळे, नाक, हात, पाय व कपडे सतत अस्वच्छ असणारा, ॥३५॥

वैधृति आणि वितिपात । नाना कुमुहूर्तें जात । अपशकुनें करी घात । तो येक मूर्ख ।।३६।।

धैर्याचा नाश करणारा, योग व मोठे संकट आणणारा, योग म्हणजे वैधृति व व्यतिपात. यांचा पंचांगाच्या चवथ्या अंगात समावेश होतो. सूर्य व चंद्राच्या मासिक गतीच्या बेरजेचे सत्तावीस भाग मानले आहेत. त्यांतील सतरावा भाग म्हणजे व्यतिपात मुहूर्त व विसावा भाग म्हणजे वैधृतिमुहूर्त. या कुमुहूर्तावर कार्यारंभ करून स्वत:लाच अपशकुन करून कार्यनाश ओढवून घेणारा मूर्ख असतो. ॥३६॥

क्रोधें अपमानें कुबुद्धि । आपणास आपण वधी । जयास नाही दृढ बुद्धि । तो येक मूर्ख ।।३७।।

संताप व अपमान झाला असता मेंदू ठिकाणावर न राहून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणारा व कशाविषयीच निश्चयी बुद्धी नसणारा, ॥३७॥

जिवलगांस परम खेदी । सुखाचा शब्द तोहि नेदी । नीच जनास वंदी । तो येक मूर्ख ।।३८।।

नातलगांना किंवा कुटुंबियांना नाना प्रकारे छळणारा, त्यांना केवळ गोड शब्दांचेही सुख न देणारा व दुष्ट दुर्जनांपुढे लाचार होणारा, ॥३८॥

आपणास राखे परोपरी । शरणागतांस अव्हेरी । लक्ष्मीचा भर्वसा धरी । तो येक मूर्ख ।।३९।।

वाटेल ते करून स्वत:ला सांभाळणारा, कुटुंबियांकडे दुर्लक्ष करणारा व पैशाने सर्व काही मिळविता येते किंवा पैसा कायम टिकून राहील असे मानणारा, ॥३९॥

पुत्र कळत्र आणी दारा । इतुकाची मानुनिया थारा । विसरोन गेला ईश्वरा । तो येक मूर्ख ।।४०।।

मुलगे, गणगोत व पत्नी यांच्या आश्रयाने जगून जगन्नियंत्या ईश्वरास विसरणारा, ॥४०॥

जैसें जैसें करावें । तैसें तैसें पावावें । हें जयास नेणवें । तो येक मूर्ख ।।४१।।

आपण जसे करू तसे फळ मिळेल हे ज्याला पटत नाही व पटले तर लक्षात राहत नाही, ॥४१॥

पुरुषाचेनि अष्टगुणें । स्त्रियांस ईश्वरी देणें । ऐशा केल्या बहुत जेणें । तो येक मूर्ख ।।४२।।

पुरुषांपेक्षा स्त्रियांना अनेक वस्तू जमविण्याची, नटण्यामुरडण्याची, मत्सर– द्वेषाची प्रवृत्ती कितीतरी अधिक असते. अशा अनेक स्त्रियांशी विवाह करून स्वत:वर संकटे ओढवून घेणारा, ॥४२॥

दुर्जनाचेनि बोलें । मर्यादा सांडून चाले । दिवसा झांकिले डोळे । तो येक मूर्ख ।।४३।।

दुर्जनाच्या नादी लागून बेफामपणे वागणारा व दिवसा भरपूर झोपा काढणारा, ॥४३॥

देवद्रोही गुरुद्रोही । मातृद्रोही पितृद्रोही । ब्रह्मद्रोही स्वामीद्रोही । तो येक मूर्ख ।।४४।।

देव, गुरू, माता, पिता, ईश्वर (ब्रह्मा) व स्वामी ह्यांच्या उपकारांचे स्मरण न ठेवता त्यांच्या आज्ञा न जुमानणारा व प्रसंगी त्यांनाही फसविणारा, ॥४४॥

परपीडेचें मानी सुख । परसंतोषाचें मानी दुःख । गेले वस्तूचा करी शोक । तो येक मूर्ख ।।४५।।

दुसऱ्याला त्रास झाला किंवा दिला तर संतुष्ट होणारा, दुसऱ्याला सुख मिळाले तर त्याने संत्रस्त होणारा व हरवलेल्या वस्तूची खंत करीत बसणारा, ॥४५॥

आदरेंविण बोलणें । न पुसतां साक्ष देणें । निंद्य वस्तु आंगिकारणें । तो येक मूर्ख ।।४६।।

आदर न ठेवता उद्धटपणे बोलणारा, विचारले नसताना साक्ष देणारा व परस्त्री-परधनासारख्या निंदनीय वस्तू स्वीकारणारा, ॥४६॥

तुक तोडून बोले । मार्ग सांडून चाले । कुकर्मी मित्र केले । तो येक मूर्ख ।।४७।।

मर्यादा सोडून बोलणारा, भलत्या मार्गाने जाणारा, पापकर्माच्या मदतीसाठी मित्र जोडणारा, ॥४७॥

पत्य राखों नेणे कदा । विनोद करी सर्वदा । हासतां खिजे पेटे द्वंद्वा । तो येक मूर्ख ।।४८।।

स्वतःची पत कधीच न सांभाळणारा, किंवा आजारपणात पथ्य न करणारा, सतत उथळपणाने विनोद करणारा, कोणी थट्टा केली तर हमरीतुमरीवर येणारा, ॥४८॥

होड घाली अवघड । काजेंविण करी बडबड । बोलोंचि नेणे मुखजड । तो येक मूर्ख ।।४९।।

अवघड पैजा लावणारा, कारण नसताना बडबड करणारा व बोलणे आवश्यक असताना तोंड न उघडणारा, ॥४९॥

वस्त्र शास्त्र दोनी नसे । उंचे स्थळीं जाऊन बैसे । जो गोत्रजांस विस्वासे । तो येक मूर्ख ।।५०।।

अधिकार (उदा. प्रधानकीचे वस्त्र) किंवा धर्मादिशास्त्रांचे ज्ञान ह्यांतील काहीच नसताना उच्चस्थानावर जाऊन बसणारा (महत्त्वाच्या व्यक्तींसाठी राखून ठेविलेल्या खुर्चीवर बसणारा) व नातलगांवर अवलंबून राहणारा, ॥५०॥

तश्करासी वोळखी सांगे । देखिली वस्तु तेचि मागे । आपलें आन्हीत करी रागें । तो येक मूर्ख ।।५१।।

अनोळखी व्यक्तीला स्वतःची सर्व माहिती सांगणारा किंवा दुसऱ्यांची माहिती पुरविणारा किंवा 'हा चोर आहे' असे लक्षात आल्यानंतरही बेसावधपणे अघळपघळ बोलणारा, कोणाकडे काही आकर्षक वस्तू दिसली की ती मागणारा व क्रोधाने स्वतःचेच नुकसान करणारा, ॥५१॥

हीन जनासीं बरोबरी । बोल बोले सरोत्तरीं । वामहस्तें प्राशन करी । तो येक मूर्ख ।।५२।।

हलक्या लोकांत सलगीने मिसळणारा, ताठ्याने लंब्याचवड्या गप्पा मारणारा व डाव्या हाताच्या ओंजळीने पाणी पिणारा (डावा हात अस्वच्छ असणे शक्य असते), ॥५२॥

समर्थासीं मत्सर धरी । अलभ्य वस्तूचा हेवा करी । घरीच्या घरीं करी चोरी । तो येक मूर्ख ।।५३।।

सत्ता संपत्ती इ. असणाऱ्यांविषयी मनात तेढ बाळगणारा, मिळणें शक्य नसणारी वस्तू मिळत नाही म्हणून हात चोळीत बसणारा व एकत्र कुटुंबात आपल्याच घरात चोरी करणारा, ॥५३॥

सांडूनियां जगदीशा । मनुष्याचा मानी भर्वसा । सार्थकेंविण वेंची वयसा । तो येक मूर्ख ।।५४।।

जगन्नियन्त्या ईश्वराला शरण न जाता सामान्य माणसावर विसंबून रहाणारा व चार पुरुषार्थ साधून आयुष्याचे सार्थक न करणारा, ॥५४॥

संसारदुःखाचेनि गुणें । देवास गाळी देणें । मैत्राचें बोले उणें । तो येक मूर्ख ।।५५।।

संसारात पूर्वकर्मानुसार भोगाव्या लागणाऱ्या दु:खांसाठी ईश्वराला शिव्या देणारा व मित्रांची चारचौघात उणीदुणी काढणारा, ॥५५॥

अल्प अन्याय क्ष्मा न करी । सर्व काळ धारकीं धरी । जो विस्वासघात करी । तो येक मूर्ख ।।५६।।

क्षुल्लक अपराधांकडे दुर्लक्ष न करणारा, इतरांना सतत धारेवर धरणारा व विश्वासघात करण्याची सवय असणारा, ॥५६॥

समर्थाचे मनींचे तुटे । जयाचेनि सभा विटे । क्षणा बरा क्षणा पालटे । तो येक मूर्ख ।।५७।।

सत्ता संपत्ती इत्यादिकांनी सामर्थ्यवान लोकांच्या मनातून उतरणारा किंवा त्यांची नाराजी ओढवून घेणारा, ज्याचा सभेला कंटाळा येतो व जो एक क्षण ठीक असतो व दुसऱ्या क्षणीच बदलतो, असा लहरी असणारा, ॥५७॥

बहुतां दिवसांचे सेवक । त्यागून ठेवी आणिक । ज्याची सभा निर्नायेक । तो येक मूर्ख ।।५८।।

वर्षानुवर्षे काम करणारे नोकर काढून टाकून दुसऱ्यांना ठेवून घेणारा व सभेमध्ये कोणालाच प्रमुख न मानणारा, कोणाच्या नियंत्रणाखाली न राहणारा, ॥५८॥

अनीतीनें द्रव्य जोडी । धर्म नीति न्याय सोडी । संगतीचें मनुष्य तोडी । तो येक मूर्ख ।।५९।।

लुबाडून पैसे मिळविणारा किंवा फसवून लाच खाऊन द्रव्य जोडणारा, न्यायनीती व धर्माला न जुमानणारा व सहकाऱ्याचे संबंध सोडून टाकणारा, ॥५९॥

घरीं असोन सुंदरी । जो सदांचा परद्वारी । बहुतांचें उचिष्ट अंगीकारी । तो येक मूर्ख ।।६०।।

घरी धर्मपत्नी असूनही सतत परस्त्रीला भोगणारा, व अनेकांच्या घरी सतत भोजन करणारा, ॥६०॥

आपुलें अर्थ दुसऱ्यापासीं । आणी दुसऱ्याचें अभिळासी । पर्वत करी हीनासी । तो येक मूर्ख ।।६१।।

आपले पैसे दुसऱ्याकडे ठेवावयास देणारा, दुसऱ्यांच्या संपत्तीवर डोळा ठेवणारा व नीचाशी व्यवहार करणारा, ॥६१॥ (पर्वत– प्र + वृत्त (वर्त १ आ.) व्यवहार करणे-आचरण घेणे.)

अतिताचा अंत पाहे । कुग्रामामधें राहे । सर्वकाळ चिंता वाहे । तो येक मूर्ख ।।६२।।

अतिथी घरात आला असता त्याला सळो की पळो करून सोडणारा, बदमाशांच्या गावात राहणारा व सतत चिंताग्रस्त असणारा, ॥६२॥

दोघे बोलत असती जेथें । तिसरा जाऊन बैसे तेथें । डोई खाजवी दोहीं हातें । तो येक मूर्ख ।।६३।।

दोघे आपापसांत बोलत असता तेथे जाऊन मधे तोंड घालणारा व दोन्ही हातांनी डोके खाजविणारा, ॥६३॥

उदकामधें सांडी गुरळी । पायें पायें कांडोळी । सेवा करी हीन कुळीं । तो येक मूर्ख ।।६४।।

पाण्याने चूळ भरून पाण्यातच टाकणारा, पायाने पाय खाजविणारा व कुलीन नसणाऱ्याकडे नोकरी करणारा, ॥६४॥

स्त्री बाळका सलगी देणें । पिशाच्या सान्निध बैसणें । मर्यादेविण पाळी सुणें । तो येक मूर्ख ।।६५।।

पत्नी व मुलांजवळ फाजील सलगीने वागणारा, पिशाच्चवत् व्यक्तीच्या जवळ राहणारा व कुत्र्याला अंगाखांद्यावर व घरभर वावरू देणारा, ॥६५॥

परस्त्रीसीं कळह करी । मुकी वस्तु निघातें मारी । मूर्खाची संगती धरी । तो येक मूर्ख ।।६६।।

परस्त्रीशी भांडण करणारा, मुक्या प्राण्यांना निर्दयपणें मारणारा व मूर्खांच्या संगतीत रहाणारा, ॥६६॥

कळह पाहात उभा राहे । तोडविना कौतुक पाहे । खरें अस्ता खोटें साहे । तो येक मूर्ख ।।६७।।

भांडण लागले असता ते न सोडविता मजा बघत उभा रहाणारा व आपली बाजू खरी असताना खोटेपणाचा आरोप सहन करणारा, ॥६७॥

लक्ष्मी आलियावरी । जो मागील वोळखी न धरी । देवींब्राह्मणीं सत्ता करी । तो येक मूर्ख ।।६८।।

श्रीमंत झाल्याने चांगले दिवस आल्यानंतर आधीच्या परिचितांना ओळख न देणारा व देवाब्राह्मणांचेही आपणच स्वामी असल्याच्या थाटात रहाणारा, ।।६८।।

आपलें काज होये तंवरी । बहुसाल नम्रता धरी । पुढिलांचें कार्य न करी । तो येक मूर्ख ।।६९।।

आपले काम होईपर्यन्त अत्यन्त नम्रता धरणारा पण ज्यांनी काम केले त्यांचे काम न करणारा, ।।६९।।

अक्षरें गाळून वाची । कां तें घालीं पदरिचीं । नीघा न करी पुस्तकाची । तो येक मूर्ख ।।७०।।

वाचताना काही मजकूर गाळून किंवा काही नसलेले शब्द त्यांत घालून वाचणारा व पुस्तक नीट न सांभाळणारा, ।।७०।।

आपण वाचीना कधीं । कोणास वाचाया नेदी । बांधोन ठेवी बंदीं । तो येक मूर्ख ।।७१।।

स्वत: कधीच पुस्तक वाचावयाचे नाही व दुसऱ्याला ते द्यावयाचेही नाही. ती पुस्तके कपाटात ठेवणारा, ।।७१।।

ऐसीं हें मूर्ख लक्षणें । श्रवणें चातुर्य बाणे । चित्त देउनियां शहाणे । ऐकती सदा ।।७२।।

अशी ही मूर्खांची लक्षणें ऐकली असता ती सोडून देणारा चतुर होतो. म्हणून जे शहाणे आहेत ते ही लक्षणे सतत ऐकत रहातात. ।।७२।।

लक्षणें अपार असती । परी कांहीं येक येथामती । त्यागार्थ बोलिलें श्रोतीं । क्ष्मा केलें पाहिजे ।।७३।।

तसे पाहिले तर मूर्खांची लक्षणे अजूनही कितीतरी सांगता येतील. पण येथे आठवली तेवढी सांगितली. ती ऐकून त्यांचा त्याग करावा. ती ऐकत असताना त्यातील काही आपलीच लक्षणे आहेत असे लक्षात आल्याने राग आला असेल तर क्षमा करावी. ।।७३।।

उत्तम लक्षणें घ्यावीं । मूर्ख लक्षणें त्यागावीं । पुढिले समासीं आघवीं । निरोपिलीं ।।७४।।

पुढील समासात विस्ताराने सांगितलेली उत्तम लक्षणे अंगी बाणवावीत व मूर्ख लक्षणें सोडून द्यावीत. ।।७४।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ‘मूर्खलक्षणनाम’ समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील ‘मूर्खलक्षण’ नावाचा पहिला समास समाप्त

दशक दुसरा : मूर्खलक्षणांचा

समास दुसरा : उत्तमलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

श्रोतां व्हावें सावधान । आतां सांगतों उत्तम गुण । जेणें करिता बाणें खूण । सर्वज्ञपणाची ।।१।।

आता श्रोत्यांनी लक्ष देऊन ऐकावे. आतां मी उत्तम गुणांचे वर्णन करीन, ते अंगी बाणले तर शहाणपणा येतो. ॥१॥

वाट पुसल्याविण जाऊं नये । फळ वोळखिल्याविण खाऊं नये । पडिली वस्तु घेऊं नये । येकायेकीं ।।२।।

परगावी किंवा परप्रांती रस्त्याची चौकशी केल्याशिवाय प्रवास करू नये. ओळखीचे फळ नसेल तर ते खाऊ नये. वाटेवर पडलेली वस्तू विचार न करता उचलू नये. ह्यातील प्रत्येकाने अडचणी व संकटे येण्याची शक्यता आहे. ती टाळण्यासारखी आहेत. ॥२॥

अति वाद करूं नये । पोटीं कपट धरूं नये । शोधिल्याविण करूं नये । कुळहीन कांता ।।३।।

प्रसंगी वाद करण्याची वेळ आली तरी तो मर्यादित असावा. अटीतटीचे वाद नसावेत. कपट वा डावपेचाची प्रवृत्ती टाळावी. सर्व बाजूने चौकशी करूनच उत्तम कुळातील चारित्र्यसंपन्न मुलीशी विवाह करावा. ॥३॥

विचारेंविण बोलों नये । विवंचनेविण चालों नये । मर्यादेविण हालों नये । कांही येक ।।४।।

चौफेर विचार केल्याशिवाय बोलू नये. सर्वांगीण विचार केल्याशिवाय कृती करू नये. प्रत्येक गोष्टीला असणाऱ्या मर्यादांचा विचार केल्याशिवाय एक पाऊलही पुढे टाकू नये. न्याय, नीती, धर्माची चौकट ओलांडू नये. ॥४॥

प्रीतीविण रुसों नये । चोरास वोळखी पुसों नये । रात्रीं पंथ क्रमूं नये । येकायेकीं ।।५।।

प्रेम व आपुलकी असल्याशिवाय कोणावरही रागावू नये. त्या रागाला किंमत नसते. उपऱ्या व अनोळखी व्यक्तीकडे दुसऱ्यासंबंधी चौकशी करू नये. रात्री बेधडक प्रवासाला निघू नये. (त्या काळचा प्रवास विचारात घ्यावा. हल्ली बरेच प्रवास रात्रीच असतात!) ॥५॥

जनी आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये । पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ।।६।।

समाजात वागताना मनाचा सरळपणा सोडू नये. वाम मार्गाने पैसा मिळवू नये. सदाचरण कधीच सोडू नये. ॥६॥

निंदा द्वेष करूं नये । असत्संग धरूं नये । द्रव्यदारा हरूं नये । बळात्कारें ।।७।।

परनिंदा व दुसऱ्याचा द्वेष करू नये. कुसंगती टाळावी. सामर्थ्याच्या मस्तीत दुसऱ्याची संपत्ती व पत्नी ह्यांचे हरण करू नये. ॥७॥

व्यक्तयास खोदूं नये । ऐक्यतेसी फोडूं नये । विद्याभ्यास सोडूं नये । कांहीं केल्या ।।८।।

सभेतील वक्त्याला आडवेतिडवे प्रश्न विचारू नयेत. सुरळीत चाललेली सभा मोडेल असे करू नये. किंवा संघटना मोडू नये. काही झाले तरी विद्यांचा अभ्यास सोडू नये. ॥८॥

तोंडाळासीं भांडों नयें । वाचाळासीं तंडों नये । संतसंग खंडूं नये । अंतर्यामीं ।।९।।

भांडखोराशी आपण भांडू नये. बडबड करणाऱ्याशी वाद घालू नये. अन्त:करणातील संतसंगतीची ओढ कमी होऊ देऊ नये. ॥९॥

अतिक्रोध करूं नये । जिवलगांस खेदूं नये । मनीं वीट मानूं नये । सिकवणेचा ।।१०।।

संतापाचा प्रसंग आला तरी त्याला आवर घालावा. स्नेही, सोबती, सुहृद, कुटुंबीय, सहकारी ह्यांना यातना देऊ नये. हिताचे चार शब्द कोणी सांगत असेल तर ते ऐकण्याचा कंटाळा करू नये. ॥१०॥

क्षणक्षणां रुसों नये । लटिका पुरुषार्थ बोलों नये । केल्याविण सांगों नये । आपला पराक्रमु ।।११।।

सारखे रुसू, फुगू नये. संबंधित हळूहळू दुर्लक्ष करतात. न केलेला व नसलेला पराक्रम सांगू नये. केलेला पराक्रम क्वचित् सांगितला तर हरकत नाही. ॥११॥

बोलिला बोल विसरों नये । प्रसंगी सामर्थ्य चुकों नये । केल्याविण निखंदूं नये । पुढिलांसि कदा ।।१२।।

आपण एकदा मांडलेले मत व दिलेले वचन विसरू नये. त्याने बोलण्यात विसंगती दिसते व विश्वासार्हता नाहीशी होते. एऱ्हवी नम्र असले तरी प्रसंगविशेषी आपल्या सामर्थ्याची चुणूक अवश्य दाखवावी. स्वतः कृतिशिल असल्याशिवाय इतरांच्या निष्क्रियतेविषयी बोलू नये. किंवा पूर्वजांनी कांहीच केले नाही असे म्हणू नये. ॥१२॥

आळसें सुख मानूं नये । चाहाडी मनास आणूं नये । शोधल्याविण करूं नये । कार्य कांहीं ।।१३।।

आळसाच्या निष्क्रियतेत शरीर व मन सुस्त राहिल्याने सुखाचा भास होतो. असे सुख झुगारून द्यावे. ''तुझ्याविषयी तो असे म्हणत होता.'' अशा तऱ्हेच्या कोणी केलेल्या चहाडीकडे दुर्लक्ष करावे. सर्वांगीण विचार केल्याशिवाय कोणतेच काम हाती घेऊ नये. ॥१३॥

सुखा आंग देऊं नये । प्रेत्न पुरुषें सांडूं नये । कष्ट करितां त्रासों नये । निरंतर ।।१४।।

सुखासीन होऊ नये. माणसाने प्रयत्न सोडू नये व सतत कष्ट करण्याचा त्रास मानू नये. ॥१४॥

सभेमध्ये लाजों नये । बाष्कळपणें बोलों नये । पैज होड घालूं नये । कांहीं केल्यां ।।१५।।

एखाद्या समुदायामध्यें मोकळेपणे आपले विचार मांडण्यास लाजू नये. संकोच करू नये. त्याचबरोबर वायफळ बडबड करू नये. आणि कोणी कितीही भरीला घातले तरी प्रतिज्ञा व पैजा टाळाव्यात. ॥१५॥

बहुत चिंता करूं नये । निसुगपणें राहों नये । परस्त्रीतें पाहों नये । पापबुद्धी ।।१६।।

चिंता निर्माण झाली तरी विचाराने ती थांबवावी. आळसात आयुष्य घालवू नये. परस्त्रीचा अभिलाष धरू नये. ॥१६॥

कोणाचा उपकार घेऊं नये । घेतलातरी राखों नये । परपीडा करूं नये । विश्वासघात ।।१७।।

शक्य तोवर कोणाची मदत मागू नये किंवा कोणी करीत असेल तर ती स्वीकारू नये. तशी घेण्याची वेळ आलीच तर तिची योग्य रीतीने योग्यवेळी परतफेड करावी. दुसऱ्याला त्रास देऊ नये किंवा छळू नये. कोणालाही विश्वास देऊन त्याचा घात करू नये. ॥१७॥

शोच्येंविण असों नये । मळिण वस्त्र नेसों नये । जाणारास पुसों नये । कोठें जातोस म्हणौनी ।।१८।।

शरीर व वस्त्रे स्वच्छ असावीत. अंगावरचे वस्त्र मळकट असू नये. कोठेही जाणाऱ्या व्यक्तीस 'तू कोठे निघाला आहेस' अशा अर्थाचा प्रश्न विचारू नये. त्याला त्या प्रश्नाचे उत्तर न द्यावेसे वाटण्याची शक्यता आहे. ॥१८॥

व्यापकपण सांडूं नये । पराधेन होऊं नये । आपलें वोझें घालूं नये । कोणीयेकासी ।।१९।।

मन मोठे असावे. आपले जीवन दुसऱ्याच्या कृपेवर अवलंबून ठेवू नये. आपल्या व्यक्तिगत अडचणी सोडविण्यासाठी किंवा स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याला गळ घालू नये. ॥१९॥

पत्रेंविण पर्वत करूं नये । हीनाचें रुण घेऊं नये । गोहीविण जाऊं नये । राजद्वारा ।।२०।।

व्यावहारिक देवघेवीचा करार सरकारमान्य कागदावरच करावा. असंस्कृत माणूस श्रीमन्त असला तरी त्याचेकडून कर्ज किंवा उसनवारी करू नये. बरोबर सुपरिचित किंवा वजनदार माणूस घेतल्याशिवाय शासकीय कार्यालयात स्वतःच्या कामासाठी जाऊ नये. ॥२०॥

लटिकी जाजू घेऊं नये । सभेस लटिकें करूं नये । आदर नस्तां बोलों नये । स्वभाविक ।।२१।।

अन्यायाच्या बाजूने उभे राहू नये. समुदायाच्या कलाविरुद्ध तात्काळ काही बोलू नये. समूहाची मानसिकता विवेक जाणीलच असे नाही. कदाचित आपलाही विचार चुकीचा असू शकतो. आपल्या मताची कदर होण्याची शक्यता नसल्यास मौन धरावे. ॥२१॥

आदखणेपण करूं नये । अन्यायेंविण गांजूं नये । अवनीतीनें वर्तो नये । आंगबळे ।।२२।।

जेथे बोललेच पाहिजे किंवा कृती केली पाहिजे तेथे दुर्लक्ष करू नये. कोणी अन्याय केल्याशिवाय त्याला उगीचच त्रास देऊ नये. स्वत:च्या सत्ता, संपत्ती, शरीरसामर्थ्य इत्यादिकांच्या बळावर समाजात अनीतीने वागून ती वागणूक दडपण्याचा प्रयत्न करू नये. ॥२२॥

बहुत अन्न खाऊं नये । बहुत निद्रा करूं नये । बहुत दिवस राहों नये । पिसुणाचेथें ।।२३।।

झोप पूर्ण झाल्यावर उगीचच लोळत पडू नये, पोट जड होण्याइतके अन्न खाऊ नये, दुष्टाचे घरी किंवा अपरिचिताचे घरी आवश्यक तेवढेच मुक्कामाला थांबावे. ॥२३॥

आपल्याची गोही देऊं नये । आपली कीर्ती वर्णूं नये । आपलें आपण हासों नये । गोष्टी सांगोनी ।।२४।।

केवळ आपला आहे म्हणून त्याचे बोलणे, वागणे, कृती इ. योग्यच आहे असा निर्वाळा देऊ नये. स्वत:च्या तोंडाने स्वत:ची कीर्ती सांगू नये. आपल्या बोलण्यातील विनोदाने आपणच हसू नये. त्याने विनोदाचा परिणाम कमी होतो. स्वयंतुष्टता व्यक्त होते. ॥२४॥

धूम्रपान घेऊं नये । उन्मत्त द्रव्य सेऊं नये । बहुचकांसीं करूं नये । मैत्री कदा ।।२५।।

धूम्रपान, मदिरा, जर्दा इत्यादी व्यसने नसावीत. बडबड्या व उथळ व्यक्तीशी व्यक्तिगत संबंध नसावेत. ॥२५॥

कामेंविण राहों नये । नीच उत्तर साहों नये । आसुदें अन्न सेऊं नये । वडिलांचेंहि ।।२६।।

सतत कार्यमग्न असावे. कोणाच्याही उद्धट किंवा अपमानकारक बोलण्या-वागण्याला रोखठोक उत्तर द्यावे. कमाविण्याचे वय झाल्यावर वडिलांचेही आयते अन्न खाऊ नये. वाटेल ते कष्ट करूनच अन्न खावे. ॥२६॥

तोंडी सीवी असों नये । दुसऱ्यास देखोन हांसों नये । उणें अंगीं संचरों नये । कुळवंताचे ।।२७।।

अपशब्द वापरू नये. शिवीगाळ करू नये. कोणाचा अपमान करण्याच्या हेतूने त्याचेकडे पाहून छद्मीपणाने हसू नये. सुप्रसिद्ध कुळातील व्यक्तीत काही दोष असतील तर ते मात्र आपल्यात उतरू नयेत ह्याची काळजी घ्यावी. ॥२७॥

देखिली वस्तु चोरूं नये । बहुत कृपण होऊं नये । जिवलगांसी करूं नये । कळह कदा ।।२८।।

कोठेही दिसलेली कोणाची विसरलेली वस्तू योग्य ठिकाणी जमा करावी. ठेवून घेऊ नये. घरात व चारचौघात कद्रूपणा करू नये. अत्यंत स्नेहसंबंध असणाऱ्यांशी दीर्घकाळ भांडण होण्यासारखे बोलू, वागू नये. ॥२८॥

येकाचा घात करूं नये । लटिकी गोही देऊं नये । अप्रमाण वर्तो नये । कदाकाळीं ।।२९।।

कोणाचाही दगाफटक्याने प्राण घेऊ नये. खोटी साक्ष देऊ नये. दिलेली जबानी फिरवू नये. विश्वासार्हतेला तडा जाईल असे वागू नये. न्यायनीती-धर्माचे आचरण कधीच सोडू नये. ॥२९॥

चाहाडी चोरी धरूं नये । परद्वार करूं नये । मागें उणें बोलों नये । कोणीयेकाचें ।।३०।।

एकाकडे दुसऱ्याविषयी खरे-खोटे सांगू नये. कोणी तसे करीत असल्यास तेही कोणाला सांगू नये! लहानसहान वस्तू संधी मिळताच चोरू नये. (चोर बनू नये असे येथे सांगावयाचे असावे) परस्त्रीच्या नादी लागू नये. दुसऱ्याच्या गैरहजेरीत त्याच्या दोषांची चर्चा करू नये. ॥३०॥

समईं यावा चुकों नये । सत्वगुण सांडूं नये । वैरियांस दंडूं नये । शरण आलियां ।।३१।।

कोणत्याही प्रसंगात आपले धैर्य गळू देऊ नये. आपली सात्त्विकता सांभाळावी. व्यक्तिगत वैरी पश्चात्ताप होऊन सामोपचारासाठी आला असता त्याला वैरीच समजून शिक्षा करू नये. (पृथ्वीराज चौहान व महंमद घोरी ह्यांचे वैर व्यक्तिगत नव्हते. राजा या नात्याने पृथ्वीराज चौहान याने महंमद घोरी याला सोडले हे चूक आहे) ॥३१॥

अल्पधनें माजों नये । हरिभक्तीस लाजों नये । मर्यादेविण चालों नये । पवित्र जनीं ।।३२।।

प्रसंगी चार पैसे जास्त मिळाले म्हणून तेवढ्याने मस्तीला येऊ नये. 'मी हरिभक्त आहे.' असे समाजाला कळू नये म्हणून गुपचुप उपासना करण्याची गरज नाही. भक्ती अभिमानाने करावी. संत-सज्जनांची संगत लाभली असता शिष्टपणा, अमर्यादा किंवा उथळपणे वागू नये. त्यांच्याकडून होईल तेवढा 'श्रवणस्वार्थ' पदरात पाडून घ्यावा. ॥३२॥

मूर्खासीं संमंध पडो नये । अंधारीं हात घालू नये । दुश्चितपणें विसरों नये । वस्तु आपुली ।।३३।।

शक्यतोवर मूर्खाशी संबंधच येऊ देऊ नये. त्याचे संगतीतील सर्व वेळ वाया जातो. वस्तू शोधण्यासाठी अंधाऱ्या जागेत हात घालू नये. विसरभोळेपणाने आपल्या वस्तू जागोजागी विसरू नयेत. ॥३३॥

स्नानसंध्या सांडूं नये । कुळाचार खंडूं नये । अनाचार मांडूं नये । चुकुरपणें ।।३४।।

स्नानसंध्येसारखी नित्यकर्मे सोडू नयेत. कुळधर्मकुळाचारांची परंपरा मोडू नये. आळसाने आचारभ्रष्ट होऊ नये. ॥३४॥

हरिकथा सांडूं नये । निरूपण तोडूं नये । परमार्थास मोडूं नये । प्रपंचबळें ।।३५।।

हरिकथा ऐकण्याची संधी सोडू नये. एखादा ग्रंथ सांगितला जात असेल तर तो सलग ऐकावा. प्रपंचाच्या व्यापाचे निमित्त करून परमार्थाकडे दुर्लक्ष करू नये. किंवा प्रापंचिक वैभवामुळे परमार्थ विसरू नये. ॥३५॥

देवाचा नवस बुडऊं नये । आपला धर्म उडऊं नये । भलतें भरीं भरों नये । विचारेंविण ।।३६।।

देवाला नवस बोललाच असेल तर तो अवश्य फेडावा. जो देवाला दिलेले वचन पाळीत नाही तो माणसाशी कसा वागेल? येथे नवस बोलावेत असे समर्थांना सुचवावयाचे नाही. आपल्या धर्माचे विधी अवश्य सांभाळावेत. 'ह्याने काय होणार', 'त्यात काय अर्थ आहे' असे प्रश्न आढ्यतेने विचारू नयेत. संघभावना, संघटना, समाजधारणा, कौटुंबिक वातावरणनिर्मिती, सत्त्वगुण इत्यादी गोष्टी धार्मिक विधींनी साधल्या जातात. पूर्ण विचार केल्याशिवाय एखादा संप्रदाय, पक्ष, मत, संघटना इत्यादींच्यात सामील होऊ नये. भावनेच्या भरात निर्णय घेऊ नये. ॥३६॥

निष्ठुरपण धरूं नये । जीवहत्या करूं नये । पाऊस देखोन जाऊं नये । अथवा अवकाळीं ।।३७।।

अन्त:करणात कठोरपणाला (पारूष्य) थारा देऊ नये. अकारण किंवा छंद म्हणून दुसऱ्या जीवाला मारू नये. फार पाऊस पडत असलेल्या किंवा दुष्काळ असलेल्या प्रदेशात त्या त्या वेळी जाऊ नये. ॥३७॥

सभा देखोन गळों नये । समईं उत्तर टळों नये । धि:कारितां चळों नये । धारिष्ट आपुलें ।।३८।।

मोठा समुदाय किंवा सभा पाहून अवसान गळू देऊ नये. एखादा मुद्दा खोडून काढणें आवश्यक असेल किंवा रोखठोक उत्तर देणे गरजेचे असेल तेथे मूग गिळून बसू नये. कोणी आक्रमकपणे किंवा तुच्छतेने बोलले तर धीर खचू देऊ नये. शांतपणे प्रत्युत्तर द्यावे. ॥३८॥

गुरुविरहित असों नये । नीच यातीचा गुरु करूं नये । जिणें शाश्वत मानूं नये । वैभवेंसी ।।३९।।

देहधारी सद्‌गुरूंचा अनुग्रह अवश्य घ्यावा. ते आपल्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणारे नसावेत. चारचौघांत त्यांचे नाव सांगण्याची लाज वाटू नये असे ते असावेत. गुरुशिष्याच्या नात्यांत सुरुवातीला लौकिक व्यवहाराचा बराच विचार करावा लागतो. ते नाते नीट विकसित झाल्यानंतर ह्या समस्या उद्भवत नाहीत. आयुष्य व ऐश्वर्य कायम टिकणारी आहेत असे मानूं नये. ॥३९॥

सत्य मार्ग सांडूं नये । असत्य पंथें जाऊं नये । कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ।।४०।।

सतत न्यायाच्या मार्गाने जावे. अन्यायाचा मार्ग तात्कालिक फायद्याचा वाटत असला तरी त्या मार्गाने जाऊ नये. असत्याचा मार्गच योग्य असल्याचे समर्थन कधीच करू नये. सत्यासारखे शस्त्र नाही. ।।४०।।

अपकीर्ति ते सांडावी । सद्कीर्ति वाढवावी । विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ।।४१।।

आपल्या बोलण्यातून व वागण्यातून अपकीर्ती होणार नाही ह्याची काळजी घ्यावी. उलट सत्कीर्ती वाढेल असेच प्रयत्न करावेत. सर्वांगीण विचाराने सदाचरणाला पर्याय नाही हे लक्षात घेऊन तसेच वागावे. ।।४१।।

नेघतां हे उत्तम गुण । तें मनुष्य अवलक्षण । ऐक तयांचें लक्षण । पुढिलीये समासीं ।।४२।।

वरील उत्तम गुण प्रयत्नपूर्वक कमाविले नाहीत तर माणूस अवलक्षणी बनून त्याची फजिती होते. त्याची लक्षणे पुढील समासात सविस्तर सांगितली आहेत. ।।४२।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'उत्तमलक्षणनाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'उत्तमलक्षण' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक दुसरा : मूर्खलक्षणांचा

समास तिसरा : कुविद्यालक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

ऐका कुविद्येचीं लक्षणें । अति हीनें कुलक्षणें । त्यागार्थ बोलिलीं ते श्रवणें । त्याग घडे ।।१।।

आता कुविद्येची लक्षणे ऐका. ती जीवनाचा सर्वांगीण घात करणारी आहेत. ती ऐकली असता त्यांचा त्याग करावा आणि तसा त्याग करता येतो. ॥१॥

ऐका कुविद्येचा प्राणी । जन्मां येऊन केली हानी । सांगिजेल येहीं लक्षणीं । वोळखावा ।।२।।

कुविद्यासंपन्न प्राणी जन्माला येऊन स्वत:चे व इतरांचे सर्व प्रकारे नुकसान करतो. त्याची लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत. त्यावरून तो ओळखावा. ॥२॥

कुविद्येचा प्राणी असे । तो कठिण निरूपणें त्रासे । अवगुणाची समृद्धि असे । म्हणौनियां ।।३।।

कुलक्षणे सांगितली असता कुलक्षणी माणसाला ती लागू पडत असल्याने त्याला ते अपमानकारक वाटते. त्याच्याजवळ कुलक्षणांचा फार मोठा साठा असतो. ॥३॥

श्लोक

दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।

अज्ञानं चाभिजातस्य पार्थसंपदमासुरीम् ।।(गीता १६-४)

दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, निष्ठुरपणा व अज्ञान ही जन्मजात आसुरी संपत्तीची लक्षणे आहेत.

काम क्रोध मद मत्सर । लोभ दंभ तिरस्कार । गर्व ताठा अहंकार । द्वेष विषाद विकल्पी ।।४।।

अनावर संभोगेच्छा, संताप, उन्मत्तपणा, मत्सर, लोभ, नसलेले गुण दाखविणे व असलेले दोष झाकणे, तुच्छता, गर्व, ताठरपणा, अहंमन्यता, द्वेष, सतत अप्रसन्नता व कोणत्याही विचाराला सतत फाटे फोडणे, ॥४॥

आशा ममता तृष्णा कल्पना । चिंता अहंता कामना भावना । असूया अविद्या ईषणा वासना । अतृप्ती लोलंगता ।।५।।

अनिवार व अशक्यप्राय अपेक्षा, ममत्व (possessive) हाव, कल्पनासाम्राज्यात रमणे, काळजी, मीपणा, इच्छा, भावनांचे उद्रेक, मत्सर, अध्यात्मशास्त्राचा गंध नसणे, लोकेषणा, दारेषणा, वित्तेषणा, इच्छापूर्तीचा हव्यास, अतृप्ती व अनिवार विषयासक्ती, ॥५॥

इछा वांछ्या चिकित्सा निंदा । आनित्य ग्रामणी मस्ती सदा । जाणीव अवज्ञा विपत्ती आपदा । दुर्वृत्ती दुर्वासना ।।६।।

विषय हवेहवेसे वाटणे, त्यांची ओढ लागणे, कशाचाही कीस काढीत बसणे, निंदा, अनीती, हलकटपणा, सतत उन्मत्त, स्वत:विषयी फाजील कल्पना, थोरामोठ्यांचे न ऐकणे (दुर्योधन), सतत अडचणीत असणे, संकटांची परंपरा, वाईट विचार व वासना, ॥६॥

स्पर्धा खटपट आणी चटपट । तऱ्हे झटपट आणी वटवट । सदा खटखट आणी लटपट । परम वेथा कुविद्या ।।७।।

कोणाशी तरी सतत स्पर्धा, नाना खटपटी व हालचाली, लहरीपणा, घाई व बडबड, काहीतरी करीत राहिल्यावाचून चैन न पडणे, डावपेच, मनोवेदना इत्यादी कुविद्या होत. ॥७॥

कुरुप आणी कुलक्षण । अशक्त आणी दुर्जन । दरिद्री आणी कृपण । आतिशयेंसीं ।।८।।

आधी दिसावयाला कुरूप व त्यांत भर म्हणून कुलक्षणी, शरीराने दुर्बळ व शिवाय प्रवृत्तीने दुष्ट, अति दरिद्री व अतिशय कोत्या मनाचा, ॥८॥

आळसी आणि खादाड । दुर्बळ आणी लाताड । तुटक आणी लाबाड । आतिशयेंसीं ।।९।।

कष्ट करायला नकोत व खादाडी मात्र भरपूर. स्वत: दुर्बल पाप्याचे पितर व कोणी मदतीला यावे तर तिरसट! फटकून राहणारा व प्रत्येक व्यवहारात लबाडी करणारा, ॥९॥

मूर्ख आणी तपीळ । वेडें आणी वाचाळ । लटिकें आणी तोंडाळ । आतिशयेंसी ।।१०।।

मूर्ख असून तापट, निर्बुद्ध पण बडबड्या, खोटारडा व बोलभांड. असे दुर्गुण मोठ्या प्रमाणात असणारा, ॥१०॥

नेणे आणी नायके । न ये आणी न सीके । न करी आणी न देखे । अभ्यासदृष्टी ।।११।।

स्वत:ला अक्कल नाही व दुसऱ्या शहाण्याचे ऐकत नाही, ज्ञान तर काही नाही व शिकण्याची इच्छा नाही. स्वत: चिकित्सक बुद्धीने पहावयाचे नाही व दुसऱ्याने पाहिले तर सहन होत नाही. ॥११॥

अज्ञान आणी अविस्वासी । छळवादी आणी दोषी । अभक्त आणी भक्तांसी । देखों सकेना ।।१२।।

स्वत:ला कळत नाही व दुसऱ्यावर मुळीच विश्वास नाही. आपणच दुसऱ्याचा छळ करून वर कांगावखोरपणाने त्यालाच दोष देणारा. स्वत:चे ठिकाणी भक्तीचा लेश नाही व दुसऱ्या भक्ताचा अति मत्सर करणारा, ॥१२॥

पापी आणी निंदक । कष्टी आणी घातक । दुःखी आणी हिंसक । आतिशयेंसीं ।।१३।।

स्वत: पाप करून दुसऱ्याची निंदा करणारा, दु:खीकष्टी राहून दुसऱ्याचा घात करणारा, स्वत: यातना भोगत असून दुसऱ्याची हिंसा करणारा, ॥१३॥

हीन आणी कृत्रिमी । रोगी आणी कुकर्मी । आचंगुल आणी अधर्मी । वासना रमे ।।१४।।

सर्व दृष्टीने नालायक असून योग्यतेचा कृत्रिम आव आणणारा, रोगी असून पथ्य न पाळणारा, संकटात असूनही धर्माचे पालन न करणारा व अधर्मातच वासना असणारा, ॥१४॥

हीन देह आणी ताठा । अप्रमाण आणी फांटा । बाष्कळ आणी करंटा । विवेक सांगे ।।१५।।

रूपगुणांचा पत्ता नसताना अहंमन्यतेने राहणारा, मुळीच विश्वास न ठेवता येण्यासारखा असून प्रत्येक गोष्टीला अकारण फाटे फोडणारा, उथळ व दुर्दैवी असून इतरांना शहाणपणा शिकविणारा, ॥१५॥

लंडी आणी उन्मत्त । निकामी आणी डुल्लत । भ्याड आणी बोलत । पराक्रमु ।।१६।।

भित्रा असून मस्तवाल, बेकार असून ताठ्यात राहणारा, भेकड असून स्वत:चे नसलेले पराक्रम सांगणारा, ॥१६॥

कनिष्ठ आणी गर्विष्ठ । नुपरतें आणी नष्ट । द्वेषी आणी भ्रष्ट । आतिशयेंसी ।।१७।।

जीवनाच्या सर्वांगांनी कुचकामी असून गर्वाने राहणारा, विषयासक्त असून दुसऱ्याचे नुकसान करणारा, दीर्घद्वेष्टा व अतिशय आचारभ्रष्ट असणारा, ॥१७॥

अभिमानी आणी निसंगळ । वोडगस्त आणी खळ । दंभिक आणी अनर्गळ । आतिशयेंसीं ।।१८।।

दुरभिमानी व बेशरम, प्रपंचात सतत ओढाताण असूनही दुष्टबुद्धीचा, ढोंगी व बेफाम, ॥१८॥

वोखटे आणी विकारी । खोटें आणी अनोपकारी । अवलक्षण आणी धि:कारी । प्राणिमात्रांसी ।।१९।।

खोट्या बुद्धीचा व कामादिविकारांनी भरलेला, खोटेपणाने वागून परोपकाराचे नावही न काढणारा, ।।१९।।

अल्पमती आणी वादक । दीनरूप आणी भेदक । सूक्ष्म आणी त्रासक । कुशब्देंकरूनि ।।२०।।

स्वत:पाशी बुद्धीचा खडखडाट असूनही वादाला उभा राहणारा, दैन्यवाणा असून दुसऱ्याचे दोष काढणारा, इतरांचे बारीकसारीक दोष हेरून त्यांना अपशब्दाने छळणारा, ।।२०।।

कठिणवचनी कर्कशवचनी । कापट्यवचनी संदेहवचनी । दु:खवचनी तीव्रवचनी । क्रूर निष्ठुर दुरात्मा ।।२१।।

कठोर, अपमानकारक, कपटी, संशय निर्माण करणारा, दु:खदायक, खोचक, क्रूर, निर्दय बोलणारा, नीच, ।।२१।।

न्यूनवचनी पैशून्यवचनी । अशुभवचनी अनित्यवचनी । द्वेषवचनी अनृत्यवचनी । बाष्कळवचनी धि:कारु ।।२२।।

उणीदुणी काढणारा, घाणेरडे बोलणारा, मृत्यू, दिवाळे इत्यादिविषयी उत्साहाने बोलणारा, एकदा एक तर एकदा दुसरेच, द्वेषाने भरलेले, खोटे, निरर्थक व दुसऱ्याचा अधिक्षेप करणारे शब्द बोलणारा, ।।२२।।

कपटी कुटिळ गाठ्याळ । कुर्टे कुचर नट्याळ । कोपी कुधन टवाळ । आतिशयेंसीं ।।२३।।

कपटी, कुटाळखोर, आतल्या गाठीचा, कुढणारा, चुकार, नटणे-मुरडणें आवडणारा, रागीट, वाटेल त्या मार्गाने संपत्ती जोडणारा, टवाळखोर. ह्या सर्वांचा अतिरेक असणारा, ।।२३।।

तपीळ तामस अविचार । पापी अनर्थी अपस्मार । भूत समंधी संचार । आंगीं वसे ।।२४।।

रागीट, तामसी, अविचारी, पापप्रवृत्तीचा, सर्व संबंधितांना संकटात लोटणारा, लहरी व पिशाच्चाने झपाटलेला, ।।२४।।

आत्महत्यारा स्त्रीहत्यारा । गोहत्यारा ब्रह्महत्यारा । मातृहत्यारा पितृहत्यारा । महापापी पतित ।।२५।।

स्वत:, पत्नी, गाय, ब्राह्मण, माता, पिता इत्यादिकांची बिनदिक्कत हत्या करणारा महापापी, ।।२५।।

उणें कुपात्र कुतर्की । मित्रद्रोही विस्वासघातकी । कृतघ्न तल्पकी नारकी । आतित्याई जल्पक ।।२६।।

जीवनाच्या प्रत्येक अंगात उणेपणा, कांहीही करण्यास किंवा समजावून घेण्याची पात्रता नसलेला, कुतर्क करण्यांत पटाईत, मित्राला फसविणारा, सरसकट विश्वासघातकी, दुसऱ्याने केलेले उपकार न स्मरणारा, मातृगमनी, नरकात जाण्यास योग्य, आततायी व बढाईखोर, ।।२६।।

किंत भांडण झगडा कळ्हो । अधर्म अनराहाटी शोकसंग्रहो । चाहाड वेसनी विग्रहो । निग्रहकर्ता ।।२७।।

संशय, वाद, हातघाई, घरगुती कलह, धर्मभ्रष्ट, लोकाचारविरोधी वर्तन, अनेक कारणांनी सतत शोकग्रस्त, चहाडखोर, व्यसनी, कलागती लावून देणारा, दुसऱ्यांना प्रत्येक बाबतीत विरोध करणारा, ।।२७।।

द्वाड आपेसी वोंगळ । चाळक चुंबक लच्याळ । स्वार्थी अभिळासी वोढाळ । आदत्त झोड आदखणा ।।२८।।

दुष्ट, अपयशी, ओंगळ, इतरांना भरीला घालणारा, कवडीचुंबक, लोचट, मतलबी, लोभी, दिसेल ते स्वत:कडे ओढून घेण्याचा प्रयत्न करणारा, दान न करणारा, दांडगेश्वर व मतलबासाठी किंवा सोयीनुसार तोंड फिरविणारा, ।।२८।।

शठ शुंभ कातरु । लंड तर्मुंड सिंतरु । बंड पाषांड तश्करु । अपहारकर्ता ।।२९।।

ठकसेन, बिनडोक, भित्रा, द्रोही, गुडघ्यात डोके खुपसून बसणारा, फसवा, धसमुसळा, धर्मविरोधक, चोर व स्त्रियादिकांचे अपहरण करणारा, ।।२९।।

धीट सैराट मोकाट । चाट चावट वाजट । थोट उद्धट लंपट । बटवाल कुबुद्धी ।।३०।।

नको तेथे धाडसी, स्वैर, बेलगाम, चावट, आरडाओरडा करणारा, कुभांड रचणारा, कोणाशीही कसेही वागणारा, विषयासक्त, जातीने बहिष्कार घातलेला, दुर्बुद्धी, ॥३०॥

मारेकरी वरपेकरी । दरवडेकरी खाणोरी । मैंद भोंदु परद्वारी । भुररेकरी चेटकी ।।३१।।

सुपारी घेऊन हत्या करणारा, वाटमारी करणारा, दरोडे घालणारा, खादाड, फसवा, भोंदू, परस्त्रीमध्ये आसक्त, भुरळ पाडणारा, चेडा-चेटुक करणारा, ॥३१॥

निशंक निलाजिरा कळभंट । टोणपा लौंद धट उद्धट । ठस ठोंबस खट नट । जगभांड विकारी ।।३२।।

अविवेकी, निर्लज्ज, भांडखोर, लठ्ठंभारती, आडदांड, उद्धट, दडपून बोलणारा, बुद्धिहीन, तिरके विचार करणारा, नाटकी, वाऱ्याशी भांडणारा, रुग्णाईत, विकाराधीन, ॥३२॥

अधीर आळिका अनाचारी । अंध पंगु खोंकलेकरी । थोटा बधिर दमेकरी । तऱ्ही ताठा न संडी ।।३३।।

उतावीळ, आळ घेणारा, दुराचारी, अधू दृष्टीचा, पांगळा, सतत खोकणारा, थोटा, बहिरा, दमेकरी असूनही व त्यामुळे परावलंबी असूनही त्यांच्यावरच गुरगुरणारा. दुर्बळ असूनही ताठा न सोडणारा, ॥३३॥

विद्याहीन वैभवहीन । कुळहीन लक्ष्मीहीन । शक्तिहीन सामर्थ्यहीन । अदृष्टहीन भिकारी ।।३४।।

शिक्षण, वैभव, चांगली कुळपरंपरा, संपत्ती, शरीरबळ, सत्तेचे सामर्थ्य, पूर्वसुकृत ह्यांतील काहीच नसणारा दरिद्री, ॥३४॥

बळहीन कळाहीन । मुद्राहीन दीक्षाहीन । लक्षणहीन लावण्यहीन । आंगहीन विपारा ।।३५।।

तेज, एक तरी कला, अभिव्यक्ती, संप्रदाय, अंगलक्षण होराशास्त्राप्रमाणें सुलक्षणे, सौंदर्य, ह्यांतील काहीच नाही. उलट जन्मत:च एखादा अवयव कमी असणारा, ॥३५॥

युक्तिहीन बुद्धिहीन । आचारहीन विचारहीन । क्रियाहीन सत्वहीन । विवेकहीन संशई ।।३६।।

युक्ती किंवा तर्क, बुद्धी, शिष्टाचार, सुविचार किंवा विचार करण्याची क्षमता, क्रियाशीलता, सत्त्वगुण, विवेक ह्यांतील काहीच नसून सर्वांबद्दल सतत संशय घेणारा, ॥३६॥

भक्तिहीन भावहीन । ज्ञानहीन वैराग्यहीन । शांतिहीन क्ष्माहीन । सर्वहीन क्षुल्लकु ।।३७।।

भक्ती, भाव, ज्ञान, वैराग्य, शांती, क्षमा इत्यादी काहीच नसणारा फडतुस, ॥३७॥

समयो नेणे प्रसंग नेणे । प्रेत्न नेणे अभ्यास नेणे । आर्जव नेणे मैत्री नेणे । कांहींच नेणे अभागी ।।३८।।

कालमान व परिस्थितीचे भान नाही, कष्ट व अभ्यास नाही, मनाचा सरळपणा नाही, कोणाशी स्नेह नाही असा दुर्दैवी, ॥३८॥

असो ऐसे नाना विकार । कुलक्षणाचें कोठार । ऐसा कुविद्येचा नर । श्रोतीं वोळखावा ।।३९।।

आता हे वर्णन पुरे. अशा अनेक विकृतीची माणसे दिसतात. ती जणू कुलक्षणांनी भरलेली कोठारेच असतात. अशी व्यक्ती दिसल्यास ती कुविद्येने भरलेली आहे असे वाचकाने ओळखावे. त्यांचेपासून जपून असावे. ॥३९॥

ऐसीं कुविद्येचीं लक्षणें । ऐकोनी त्यागचि करणें । अभिमानें तऱ्हें भरणें । हें विहित नव्हे ।।४०।।

अशी कुविद्येची लक्षणे पारखून स्वत:मध्ये त्यांतील जी असतील ती आत्मपरीक्षण करून सोडून द्यावीत. ती लक्षणे असून नाकारणे किंवा त्याच लक्षणांचा अभिमान बाळगून विचित्रपणे वागणे हिताचे नाही. ॥४०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'कुविद्यालक्षणनाम' समास तिसरा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'कुविद्यालक्षण' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक दुसरा : मूर्खलक्षणाचा

समास चवथा : भक्तिनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

नाना सुकृताचें फळ । तो हा नरदेह केवळ । त्याहि मधें भाग्य सफळ । तरीच सन्मार्ग लागे ।।१।।

अनन्त जन्मांच्या पुण्याईने जीवाला मनुष्यशरीराचा लाभ होतो. त्यातही भाग्याला खरेखुरे फळ लागण्याचा योग असेल तरच त्याला परमार्थ मार्ग सापडतो. ॥१॥

नरदेहीं विशेष ब्राह्मण । त्याहि वरी संध्यास्नान । सद्वासना भगवद्भजन । घडे पूर्वपुण्यें ।।२।।

पुरुषाचे शरीर, त्यांतही ब्राह्मण्याचे गुण व स्नानसंध्यादी धर्मकर्मांची आवड असावी. सत्प्रवृत्ती व ईश्वराच्या भजनाची आवड पूर्वपुण्याईनेच लाभते. ॥२॥

भगवद्‌भक्ति हे उत्तम । त्याहि वरी सत्समागम । काळ सार्थक हाचि परम । लाभ जाणावा ।।३।।

भगवंताचे भजन हे सत्प्रवृत्तीचे उत्तम लक्षण असून त्याला संतसहवासाची जोड मिळाली तर जीवनाचे खरे सार्थक होते. हाच सर्वश्रेष्ठ लाभ आहे. ॥३॥

प्रेमप्रीतीचा सद्भाव । आणि भक्तांचा समुदाव । हरिकथा मोहोत्साव । तेणें प्रेमा दुणावे ।।४।।

आधीच भावयुक्त प्रेम, त्यांत तशाच भक्तांचा समुदाय व एखाद्या (रामनवमीसारख्या) महोत्सवाची पर्वणी असेल तर त्यामुळे सर्वांचेच भगवंत प्रेम पटीपटीने वाढते. ॥४॥

नरदेहीं आलियां येक । कांही करावें सार्थक । जेणें पाविजे परलोक । परम दुल्लभ जो ।।५।।

मनुष्यजन्माची प्राप्ती झाली असता अत्यंत दुर्लभ असलेला मोक्ष मिळविण्यातच त्याचे सार्थक आहे. ॥५॥

विधियुक्त ब्रह्मकर्म । अथवा दया दान धर्म । अथवा करणें सुगम । भजन भगवंताचें ।।६।।

विधीनुसार वैदिक कर्म, भूतदया, सत्पात्री दानधर्म किंवा ह्या सर्वांहून सोपे असलेले भगवत् भजन करावे. ॥६॥

अनुतापें करावा त्याग । अथवा करणें भक्तियोग । नाहीं तरी धरणें संग । साधुजनाचा ।।७।।

आतापर्यन्त विषयासक्त जीवन जगल्याचा पश्चात्ताप होऊन आसक्तीचा त्याग करावा. किंवा शास्त्रशुद्ध भक्तियोगाचा साधना म्हणून स्वीकार करावा. अथवा संतांची सेवा करीत त्यांच्या संगतीत राहावे. ॥७॥

नाना शास्त्रें धांडोळावीं । अथवा तीर्थें तरी करावी । अथवा पुरश्चरणें बरवीं । पापक्षयाकारणें ।।८।।

उत्तरमीमांसादी आस्तिक दर्शनांचा संप्रदायकपूर्वक अभ्यास करावा. किंवा किमान, तीर्थयात्रा तरी करीत रहाव्यात. अथवा पूर्व पापांचा क्षय होण्यासाठी गायत्रीसारखी पुरश्चरणे करावीत. ॥८॥

अथवा कीजे परोपकार । अथवा ज्ञानाचा विचार । निरूपणीं सारासार । विवेक करणें ।।९।।

परोपकार हेच पुण्याचे खरे स्वरूप असल्याने पुण्याच्या राशी उभ्या कराव्यात, नित्य-अनित्य इत्यादी ब्रह्मज्ञानाचे श्रीगुरुमुखातून श्रवण करावे. त्याने सार असार विचार स्थिर होतो. ॥९॥

पाळावी वेदांची आज्ञा । कर्मकांड उपासना । जेणें होईजे ज्ञाना । अधिकारपात्र ।।१०।।

वेदांना मान्य असलेली कर्मे व उपासना निष्काम बुद्धीने केली असता ब्रह्मज्ञानाचा अधिकार प्राप्त होतो. ॥१०॥

काया वाचा आणि मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें । कांही तरी येका भजनें । सार्थक करावें ।।११।।

शरीर, वाणी व मनाने तप करावे (गीता. अ. १४) अर्चन भक्तीत भगवंताला पान, फूल, फळ, पाणी इ. अर्पण करावीत. अशी ह्या ना त्या प्रकारे उपासना करून जीवनाचे सार्थक करावे. ॥११॥

जन्मा आलियाचें फळ । कांहीं करावें सफळ । ऐसें न करितां निर्फळ । भूमिभार होये ।।१२।।

मनुष्यजन्माला आल्यानंतर त्यात ह्या रीतीने सफलता प्राप्त करून घ्यावी. असे केले नाही, तर केवळ भूमीला भार होऊन राहण्याचा प्रसंग येतो. ॥१२॥

नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित । यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावें ।।१३।।

आत्मज्ञानाची प्राप्तीच मनुष्यशरीराला उचित आहे. त्यासाठी आपल्या सामर्थ्यानुसार आपले चित्त व धन परमेश्वराच्या सेवेसाठी वापरावे. ॥१३॥

हें कांहींच न धरी जो मनीं । तो मृत्यप्राय वर्ते जनीं । जन्मा येऊन तेणें जननी । वायांच कष्टविली ।।१४।।

ह्यातील एकही गोष्ट करण्याचे ज्याच्या मनात सुद्धा येत नाही तो जिवंत असून जणू मेल्याप्रमाणे समाजात जगतो. त्याने त्याच्या मातेला प्रसूतीच्या वेदना मात्र अकारण दिलेल्या असतात. तिचे ते कष्ट व्यर्थ जातात. ॥१४॥

नाहीं संध्या नाहीं स्नान । नाहीं भजन देवतार्चन । नाहीं मंत्र जप ध्यान । मानसपूजा ।।१५।।

स्नान, संध्या, भजन, पूजा, मंत्र, जप, ध्यान किंवा मानसपूजा ह्यांतील काहीच न करणारा. ॥१५॥

नाहीं भक्ति नाहीं प्रेम । नाहीं निष्ठा नाहीं नेम । नाहीं देव नाहीं धर्म । अतीत अभ्यागत ।।१६।।

विधियुक्त उपासना, प्रेमलक्षणा भक्ती, ईश्वरनिष्ठा, नित्यनेम कुळाचार, अतिथीचा सत्कार हे काहीच नाही. ॥१६॥

नाही सद्बुद्धि नाहीं गुण । नाहीं कथा नाहीं श्रवण । नाहीं अध्यात्मनिरूपण । ऐकिलें कदां ।।१७।।

सात्त्विक बुद्धी, सद्‌गुण, हरिकथा किंवा वेदान्त श्रवण हे ज्याचेपाशी नाही. ॥१७॥

नाहीं भल्यांची संगती । नाहीं शुद्ध चित्तवृत्ती । नाहीं कैवल्याची प्राप्ती । मिथ्यामदें ।।१८।।

सत्संगती, चित्तशुद्धी ही नसतील तर केवळ मस्तीमधे मिथ्या जगतात राहून मोक्ष मिळत नसतो. ॥१८॥

नाहीं नीति नाहीं न्याये । नाहीं पुण्याचा उपाये । नाहीं परत्रीची सोये । युक्तायुक्त क्रिया ।।१९।।

न्याय, नीती, पुण्यकृत्ये व योग्य व अयोग्य ह्यांचा यथार्थ निवाडा नसेल तर मोक्षाचा मार्ग सापडत नाही. ॥१९॥

नाहीं विद्या नाहीं वैभव । नाहीं चातुर्याचा भाव । नाहीं कळा नाहीं लाघव । रम्यसरस्वतीचें ।।२०।।

लौकिक किंवा अलौकिक विद्या, वैभव, चाणाक्षपणा, कलाकौशल्य किंवा नितांत रमणीय सरस्वतीचे वरदान ह्यांतील काहीच नाही. ॥२०॥

शांती नाहीं क्ष्मा नाहीं । दीक्षा नाहीं मीत्री नाहीं । शुभाशुभ कांहींच नाहीं । साधनादिक ।।२१।।

मनाला शांती नाही, स्वभावजन्य बारीकसारीक बोलण्यावागण्याला क्षमा नाही, कोणाकडून अनुग्रह नाही, कोणाशी स्नेह नाही, शुभ किंवा अशुभाचा विचारच नाही व मोक्षाचे कोणतेच साधन नाही. ॥२१॥

सुचि नाहीं स्वधर्म नाहीं । आचार नाही विचार नाही । आरत्र नाहीं परत्र नाहीं । मुक्त क्रिया मनाची ।।२२।।

स्त्रीधनादि शुचिता, स्वधर्माचरण, सदाचार, संतुलित विचार, ऐहिकासंबंधी कर्तबगारी, मोक्षाची साधने ह्यांतील कांहीच नाही. मोकाट मनाकडून जे घडेल ते घडेल! ॥२२॥

कर्म नाहीं उपासना नाहीं । ज्ञान नाहीं वैराग्य नाहीं । योग नाहीं धारिष्ट नाहीं । कांहींच नाहीं पाहातां ।।२३।।

नित्यनिमित्तिकादी कर्म, यथासांग उपासना, अध्यात्म शास्त्र, वैराग्य, योगाभ्यास व या सर्वांसाठी आवश्यक ते धैर्य ह्यांतील काहीच नाही. ॥२३॥

उपरती नाहीं त्याग नाहीं । समता नाहीं लक्षण नाहीं । आदर नाहीं प्रीति नाहीं । परमेश्वराची ।।२४।।

गतजीवनातील अपराधांचा पश्चात्ताप, वैराग्य, समदृष्टी, सुलक्षणे, दुसऱ्याविषयी आदर, व परमेश्वराचे प्रेम ह्यांचा पत्ता नाही. ॥२४॥

परगुणाचा संतोष नाहीं । परोपकारें सुख नाहीं । हरिभक्तीचा लेश नाहीं । अंतर्यामीं ।।२५।।

दुसऱ्यांचे सद्‌गुण पाहून बरे वाटत नाही. दुसऱ्यावरील उपकाराचे सुख कळत नाही व अन्त:करणांत हरिभक्तीचा मागमूसही नाही. ॥२५॥

ऐसे प्रकारीचे पाहातां जन । ते जीतचि प्रेतासमान । त्यांसीं न करावें भाषण । पवित्र जनीं ।।२६।।

अशा प्रकारच्या व्यक्ती जिवंत असून मेल्यासारख्याच असतात. पवित्र व्यक्तींनी त्यांचेशी कोणताच संबंध ठेवू नये. ॥२६॥

पुण्यसामग्री पुरती । तयासीच घडे भगवद्भक्ती । जे जे जैसें करिती । ते पावती तैसेंचि ।।२७।।

ज्यांचेपाशी परिपूर्ण पुण्याची जोड असते त्यांनाच भगवंताच्या भक्तीची ओढ निर्माण होते. ‘जसे करावे तसे मिळवावे’ अशी ईश्वराची योजनाच आहे. ॥२७॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ‘भक्तिनिरूपणनाम’ समास चवथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील ‘भक्तिनिरूपण’ नावाचा चवथा समास समाप्त

दशक दुसरा : मूर्खलक्षणांचा

समास पाचवा : रजोगुणलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

मुळीं देह त्रिगुणाचा । सत्त्वरजतमाचा । त्यामध्यें सत्त्वाचा । उत्तम गुण ।।१।।

प्रत्येक शरीर सत्त्व, रज व तम ह्या तीन गुणांचे मिळून तयार झालेले असते. त्यांत सत्त्व गुण श्रेष्ठ आहे. ॥१॥

सत्त्वगुणें भगवद्भक्ती । रजोगुणें पुनरावृत्ती । तमोगुणें अधोगती । पावति प्राणी ।।२।।

सत्त्वगुणाच्या प्रभावाने भगवत्भक्तीकडे प्रवृत्ती निर्माण होते. रजोगुणांच्या आधिक्याने जन्ममरणांच्या फेऱ्यात अडकावे लागते. तमोगुणाचे अमलाखाली जीवाला तिर्यकादी योनींची अधोगती मिळते. (तिर्यक– मृतशरीरावर संस्कार नसणे.) ॥२॥

ह्या अर्थाचा गीतेतील श्लोक–

श्लोक– ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्यें तिष्ठन्ति राजसाः । जघन्यगुणवृत्तिस्था अधोगच्छन्ति तामसाः ।।१४-१८।।

श्लोकार्थ

आजन्म सत्त्वगुणांत स्थिर असलेले स्वर्गब्रह्मादी लोकांना जातात. रजोगुणांत स्थिर राहिलेले मृत्युलोकीच राहतात. निकृष्ट गुणस्वभावात स्थिर राहिलेले तमोगुणी नरकाला जातात.

त्यांतहि शुद्ध आणी सबळ । तेहि बोलिजेति सकळ । शुद्ध तेंचि जें निर्मळ । सबळ बाधक जाणावें ।।३।।

त्रिगुणांमध्ये सुद्धा शुद्ध व शबल असे दोन प्रकार आहेत. त्यांचेही आता वर्णन करीन. शुद्ध त्रिगुण हितकारक असून शबल घातक असतात. ॥३॥

शुद्धसबळाचें लक्षण । सावध परिसा विचक्षण । शुद्ध तो परमार्थी जाण । सबळ तो संसारिक ।।४।।

आता शुद्ध व शबलाचे तपशीलवार वर्णन बुद्धिमन्तांनी सावधपणाने ऐकावे. शुद्ध त्रिगुण मोक्षदायक असून शबल त्रिगुण प्रपंचात गुंतवून ठेवतात. ॥४॥

तया संसारिकाची स्थिती । देहीं त्रिगुण वर्तती । येक येतां दोनी जाती । निघोनियां ।।५।।

प्रपंचासक्त व्यक्तीमधील त्रिगुणांपैकी प्रसंगानुसार एक बलवान झाला की दुसरे दोन फार मंद होतात. ॥५॥

रज तम आणी सत्त्व । येणेंचि चालें जीवित्व । रजोगुणाचें कर्तृत्व । दाखऊं आतां ।।६।।

रजोगुण, तमोगुण व सत्त्वगुण ह्या तिन्हींवर देहाचे जीवन अवलंबून असते. रजोगुण बलवान झाला असता ते जीवन कसे असते ते आता सांगू. ॥६॥

रजोगुण येतां शरीरीं । वर्तणुक कैसी करी । सावध होऊनी चतुरीं । परिसावें ।।७।।

रजोगुणाचा बुद्धीत जबर प्रादुर्भाव झाल्याने त्या जीवाचे आचार विचार कसे असतात ते चतुरांनी ऐकावेत. ॥७॥

माझें घर माझा संसार । देव कैंचा आणिला थोर । ऐसा करी जो निर्धार । तो रजोगुण ।।८।।

मी माझ्या घराचा स्वामी असून माझा प्रपंच मी चालवितो. ह्यात त्या देवाच्या महात्म्याचा संबंधच काय? असा तो कोण लागून गेला आहे? रजोगुणी बुद्धी असा निश्चय करते. ॥८॥

माता पिता आणि कांता । पुत्र सुना आणि दुहिता । इतुकियांची वाहे चिंता । तो रजोगुण ।।९।।

आई, वडील, पत्नी, मुलगे, सुना व मुली एवढ्या सर्व कुटुंबियांच्या जबाबदारीचे ओझे व काळजी रजोगुणाने वाटते. येथे मी कर्ता, माझ्यामुळे होते, मी नसेन तर कसे होईल इत्यादी भाव लक्षात घ्यावेत. ॥९॥

बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरे नेसावें । दुसऱ्याचें अभिळाषावें । तो रजोगुण ।।१०।।

खाण्यासाठीं चमचमीत पदार्थ असावेत, जेवणात अनेक पदार्थ बदलून बदलून खावेत, दागदागिन्यांनी नटावे, ऐटबाज वस्त्रे नेसावीत व जे दुसऱ्याकडे आकर्षक दिसेल ते आपल्याकडेही असावे. रजोगुण असा असतो. ॥१०॥

कैंचा धर्म कैचें दान । कैंचा जप कैंचें ध्यान । विचारीना पापपुण्य । तो रजोगुण ।।११।।

धर्म ही निरर्थक बाब असून कोणालाही दान करण्याचे काही कारण नाही. जप व ध्यान ही वेळ फुकट घालविण्याची साधने आहेत. पाप व पुण्य या नुसत्या कल्पना आहेत. ॥११॥

नेणे तीर्थ नेणे व्रत । नेणे अतीत अभ्यागत । अनाचारी मनोगत । तो रजोगुण ।।१२।।

तीर्थयात्रांची गरज नाही, व्रताने कोणताही लाभ होत नाही, साधू-संन्यासी दारात आला तर खपत नाही. अनीतीच्या वर्तनाकडे सतत प्रवृत्ती राहते. ॥१२॥

धनधान्यांचे संचित । मन होये द्रव्यासक्त । अत्यंत कृपण जीवित्व । तो रजोगुण ।।१३।।

धनधान्याचा साठा करावा, द्रव्याच्या राशी जोडाव्यात व अत्यंत कंजुषपणे जगावे. ॥१३॥

मी तरुण मी सुंदर । मी बळाढ्य मी चतुर । मी सकळांमध्ये थोर । म्हणे तो रजोगुण ।।१४।।

माझ्यासारखा तरुण व रूपसंपन्न कोणी नाही, मी देहाने बलवान व बुद्धीने चतुर असल्याने माझ्यासारखा मोठा कोठेच कोणी नाही. ॥१४॥

माझा देश माझा गांव । माझा वाडा माझा ठाव । ऐसी मनीं धरी हांव । तो रजोगुण ।।१५।।

ज्याचे सर्व विचार आपला तालुका किंवा जिल्हा, गांव, घर, जमीन यांचेभोवती सतत घुटमळतात. ॥१५॥

दुसऱ्याचे सर्व जावें । माझेंचि बरें असावें । ऐसें आठवे स्वभावें । तो रजोगुण ।।१६।।

दुसऱ्याचे दिवाळे निघावे, स्वत:चे ऐश्वर्य टिकून राहावे व आपले सर्वदा चांगले व्हावे. ॥१६॥

कपट आणी मत्सर । उठे देहीं तिरस्कार । अथवा कामाचा विकार । तो रजोगुण ।।१७।।

डावपेच किंवा दुसऱ्याच्या नाशाच्या योजना, इतरांच्या यशादिकांचा मत्सर व पुढे तिरस्कार, अनावर काम. ॥१७॥

बाळकावरी ममता । प्रीतीनें आवडे कांता । लोभ वाटे समस्तां । तो रजोगुण ।।१८।।

स्वत:च्या अपत्यावर अत्यंत प्रेम, पत्नीविषयी आसक्ती व प्रत्येक अनुकूल गोष्टीविषयी लोभ. ॥१८॥

जिवलगांची खंती । जेणें काळें वाटे चित्तीं । तेणें काळें सीघ्रगती । रजोगुण आला ।।१९।।

ज्या वेळी अनुकूल गणगोतांविषयी मनात फार मोठी काळजी निर्माण होते त्या वेळी रजोगुणाने अंत:करणाचा ताबा घेतला आहे असे समजावे. ॥१९॥

संसाराचे बहुत कष्ट । कैसा होईल सेवट । मनास आठवे संकट । तो रजोगुण ।।२०।।

संसारासाठी जिवापाड झटावे व तो कसा तडीला जाईल याची सतत खंत व भीती वाटत राहावी. ॥२०॥

कां मागें जें जें भोगिलें । तें तें मनी आठवलें । दु:ख अत्यंत वाटलें । तो रजोगुण ।।२१।।

पूर्वायुष्यामध्ये जे जे प्रतिकूल घडत गेले ते ते आठवून आठवून दुःखाचे उमाळे यावेत. किंवा जे जे सुखाचे दिवस होते ते आता गेल्याचा शोक वाटावा. ॥२१॥

वैभव देखोनि दृष्टी । आवडी उपजली पोटीं । आशागुणें हिंपुटी- । करी, तो रजोगुण ।।२२।।

दुसऱ्याचे प्रासादतुल्य घर, मोठी शेती, कारखाना, व्यापार इ. पाहून आपल्यालाही तसेच असावे अशी तीव्र इच्छा निर्माण व्हावी. त्यामुळे नाराजी येते. ॥२२॥

जें जें दृष्टी पडिलें । तें तें मने मागितलें । लभ्य नस्तां दुःख जालें । तो रजोगुण ।।२३।।

जे आकर्षक दिसते ते लगेच हवेसे वाटते. ते मिळाले नाही तर मन हिरमुसलेले राहते. ॥२३॥

विनोदार्थीं भरें मन । श्रृंघारिक करी गायेन । राग रंग तान मान । तो रजोगुण ।।२४।।

सतत उथळ विनोदात मन रमते, श्रृंगार रसप्रधान गाणी गुणगुणावीशी वाटतात. रागरागिणी, भडक रंग, आलापी, हावभाव इत्यादीत चित्त रमते. ॥२४॥

टवाळी ढवाळी निंदा । सांगणे घडे वेवादा । हास्य विनोद करी सर्वदा । तो रजोगुण ।।२५।।

टिंगल, टवाळी व निंदेमध्ये रस वाटणे, दुसऱ्याशी झालेल्या वादात स्वतःची सरशी कशी झाली ते सांगावेसे वाटणे व सतत हास्यविनोदात रमणे. ॥२५॥

आळस उठे प्रबळ । कर्मणुकेचा नाना खेळ । कां उपभोगाचे गोंधळ । तो रजोगुण ।।२६।।

अतिशय आळसाने सर्वांग जड होते, करमणुकीचे सर्व प्रकार हवे असतात, उपभोगाची सर्व साधने कमावण्यात बराच वेळ, उत्साह व द्रव्य खर्च होते. ॥२६॥

कळावंत बहुरूपी । नटावलोकी साक्षेपी । नाना खेळी दान अर्पी । तो रजोगुण ।।२७।।

नाटक-सिनेमातील नटनट्या व बहुरूपी यांना कौतुकाने डोळे भरून पहावेसे वाटते. तमाशासारखे प्रकार चालू असता नट्यांचे अंगावर पैसे फेकावेसे वाटतात. ॥२७॥

उन्मत्त द्रव्यावरी अति प्रीती । ग्रामज्य आठवे चित्तीं । आवडे नीचाची संगती । तो रजोगुण ।।२८।।

दारू, जर्दा इत्यादिकांचे मोठे कौतुक वाटणे, संभोगाच्या विचारात गर्क असणे, नीचांची संगत आवडणे, ॥२८॥

तश्करविद्या जीवीं उठें । परन्यून बोलावें वाटें । नित्यनेमास मन विटें । तो रजोगुण ।।२९।।

चोरी, लबाडी, फसवणूक करण्याची इच्छा, दुसऱ्यांची उणीदुणी काढावी, जो थोडा पूजेसारखा धार्मिक नित्यनेम, त्याचाही कंटाळा, ॥२९॥

देवकारणीं लाजाळु । उदरालागीं कष्टाळु । प्रपंची जो स्नेहाळु । तो रजोगुण ।।३०।।

देवदर्शनाला सुद्धा जाण्याची लाज, पोटासाठी अपार कष्ट व थाटलेल्या प्रपंचाविषयी जबर आसक्ती, ॥३०॥

गोडग्रासी आळकेपण । अत्यादरें पिंडपोषण । रजोगुणें उपोषण । केलें न वचे ।।३१।।

सतत गोडधोड खावे व मोठ्या कौतुकाने देहाला पुष्ट करावे. आषाढी एकादशी किंवा गोकुळाष्टमी सारखा एखादा उपास करणे सुद्धा जिवावर येते. ॥३१॥

श्रृंगारिक तें आवडे । भक्ती वैराग्य नावडे । कळालाघवीं पवाडे । तो रजोगुण ।।३२।।

श्रृंगार रसाला पोषक सर्वकाही आवडते, भक्ती व वैराग्य हे शब्दही नकोसे वाटतात. कला-कौशल्यात मन रमते. ॥३२॥

नेणोनियां परमात्मा । सकळ पदार्थीं प्रेमा । बळात्कारें घाली जन्मा । तो रजोगुण ।।३३।।

व्यापक, अखंड व अद्वैतरूप ब्रह्मतत्त्वाची ओळखही न करून घेता दृश्य जगतातील सर्व नामरूपात्मक

पदार्थाविषयी आसक्ती वाटून अविद्येमध्ये मरण आल्याने पुन्हा पुन्हा जन्ममरणाच्या चक्रात सापडतो. (ईशावास्य उप. मंत्र तिसरा) ।।३३।।

असो ऐसा रजोगुण । लोभें दावी जन्ममरण । प्रपंची तो सबळ जाण । दारुण दुःख भोगवी ।।३४।।

असा हा रजोगुण आहे. मायिक प्रपंचाचा लोभ निर्माण करून तो जन्ममरणात अडकवितो. हा शबल रजोगुण प्रपंचामध्ये अति कष्टदायक दुःखे भोगावयास लावतो. ।।३४।।

आतां रजोगुण हा सुटेना । संसारिक हें तुटेना । प्रपंची गुंतली वासना । यास उपाय कोण ।।३५।।

कोणी जर विचारले की हा रजोगुण तर सुटता सुटत नाही, वासना गुंतल्याने प्रपंचासक्तीतून सुटका होत नाही, मग याला उपाय कोणता? तर त्याचे उत्तर– ।।३५।।

उपाये येक भगवद्भक्ती । जरी ठाकेना विरक्ती । तरी येथानुशक्ती । भजन करावें ।।३६।।

भगवंताची नवविधा भक्ती हाच खरा उपाय आहे. जरी परमार्थाला आवश्यक ते वैराग्य आले नाही, तरी स्वतःच्या व्यापांच्या मर्यादेत शक्य होईल तेवढे भगवद्भजन करावे. ।।३६।।

काया वाचा आणि मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें । ईश्वरीं अर्पूनिया मनें । सार्थक करावें ।।३७।।

शरीर, वाणी व चित्त यांनी अनुक्रमे तीर्थयात्रा, नामसाधना व अनुसंधान अशा प्रकारे भजन करावे. त्याचबरोबर तुळशीपत्रादी पाने, फुले, फळे व पाणी या सामुग्रीने देवाची पूजा करावी. असे भजन मनापासून केल्यास जीवनाचे सार्थक होते. ।।३७।।

येथानुशक्ती दानपुण्य । परी भगवंती अनन्य । सुखदुःखें परी चिंतन । देवाचेंचि करावें ।।३८।।

आपल्या सामर्थ्यानुसार सत्पात्री धनदान, भुकेल्याला अन्नदान इ. प्रकारे दाने देऊन पुण्य संपादन करावे. हे करीत असताना 'मी दाता' असा भाव न ठेवता भगवंताशी अनन्यभाव सांभाळावा. प्रपंचातील अनिवार्य सुखदुःखांच्या खेळात देवाचेच स्मरण करावे. ।।३८।।

आदिअंती येक देव । मध्येंचि लाविली माव । म्हणोनियां पूर्ण भाव । भगवंतीं असावा ।।३९।।

जगाच्या निर्मितीपासून त्याच्या नाशापर्यंत सर्वकाही परमेश्वराचाच खेळ आहे. या दोन्हींच्या मध्यंतरी हा मायेचा पसारा अनुभवाला येतो. म्हणून त्या परमेश्वराविषयीचा भाव स्थिर ठेवावा. अस्थिर मायेविषयी नव्हे. ।।३९।।

ऐसा सबळ रजोगुण । संक्षेपें केलें कथन । आतां शुद्ध तो तूं जाण । परमार्थिक ।।४०।।

अशा या शबल रजोगुणाचे थोडक्यात वर्णन केले. शुद्ध रजोगुण मात्र मोक्षाच्या दिशेने नेतो. ।।४०।।

त्याचे वोळखीचें चिन्ह । सत्त्वगुणीं असे जाण । तो रजोगुण परिपूर्ण । भजनमूळ ।।४१।।

'प्रवृत्ती निर्माण करणे' हे रजोगुणाचे कार्य सत्त्वगुणामागे उभे राहिले तर तोच रजोगुण ईश्वरभजनाकडे वळवतो. म्हणून शुद्ध रजोगुणाची लक्षणे सत्त्वगुणाशीच मिळतीजुळती आहेत. ।।४१।।

ऐसा रजोगुण बोलिला । श्रोतीं मनें अनुमानिला । आतां पुढें परिसला । पाहिजे तमोगुण ।। ४२।।

असे रजोगुणाचे वर्णन सांगून झाले. वाचकांनी ते नीट समजावून घेतले असेलच. आता तमोगुणाचे वर्णन समजावून घ्यावे. ।।४२।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'रजोगुणलक्षणनाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'रजोगुणलक्षण' नावाचा पाचवा समास समाप्त.

दशक दुसरा : मूर्ख लक्षणांचा

समास सहावा : तमोगुणलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

मागां बोलिला रजोगुण । क्रियेसहित लक्षण । आतां ऐका तमोगुण । तोहि सांगिजेल ।।१।।

मागील समासात जीवामधील रजोगुण व्यक्त झाल्यावर दिसणारी लक्षणे त्याच्या कृतीसह सांगून झाली. आता तमोगुणासंबंधी सांगतो ते ऐका. ॥१॥

संसारी दुःखसंमंध । प्राप्त होतां उठे खेद । कां अद्भुत आला क्रोध । तो तमोगुण ।।२।।

प्रपंचामध्ये प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाल्याने विषाद किंवा शोक वाटणे व भयंकर संताप येणे हे तमोगुणाचे लक्षण आहे. ॥२॥

शेरीरीं क्रोध भरतां । नोळखे माता पिता । बंधु बहिण कांता । ताडी, तो तमोगुण ।।३।।

अनावर संतापाच्या भरात आई, वडील इ. आदराची स्थाने व भाऊ, बहीण व पत्नी यांचे प्रेम इ.भान न राहता त्यांना मारहाणही करतो तो तमोगुण. ॥३॥

दुसऱ्याचा प्राण घ्यावा । आपला आपण स्वयें द्यावा । विसरवी जीवभावा । तो तमोगुण ।।४।।

प्रसंगी दुसऱ्याला ठार मारावे किंवा स्वतःच आत्महत्या करावी असे वाटते. आपण माणूस आहोत याचाही विसर पडतो. ॥४॥

भरलें क्रोधाचें काविरें । पिश्याच्यापरी वावरे । नाना उपायें नावरे । तो तमोगुण ।।५।।

संतापाचा पारा चढू लागल्यावर भूतबाधा झाल्यासारखा बेभान होतो. कोणी कितीही आवरण्याचा किंवा समजावून सांगण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा उपयोग होत नाही. ॥५॥

आपला आपण शस्त्रपात । पराचा करी घात । ऐसा समय वर्तत । तो तमोगुण ।।६।।

एखाद्या वेळी स्वतःलाच हाती लागेल त्या शस्त्राने मारून घेतो किंवा दुसऱ्यालाही मारतो. ॥६॥

डोळां युध्यचि पाहावें । रण पडिलें तेथें जावें । ऐसें घेतलें जीवें । तो तमोगुण ।।७।।

युद्ध किंवा हाणामाऱ्या आवडीने पाहाव्यात, जेथे त्या चालू असतील तेथे धावत जावे अशी आवड असते. (हल्ली चित्रपट वा दूरदर्शनवर हाणामाऱ्या पाहणाऱ्यांची वाढती संख्या लक्षात घ्यावी.) ॥७॥

अखंड भ्रांती पडे । केला निश्चय विघडे । अत्यंत निद्रा आवडे । तो तमोगुण ।।८।।

सतत संभ्रमात असणे, निश्चय करीत राहणे व ते मोडत राहणे व सतत झोपून राहावेसे वाटणे. ॥८॥

क्षुधा जयाची वाड । नेणे कडु अथवा गोड । अत्यंत जो कां मूढ । तो तमोगुण ।।९।।

भूक नाही असे कधीच होत नाही व ती भरपूर असते. त्यामुळे समोर आलेले अन्न गोड की कडू, ताजे की शिळे, पथ्य की अपथ्य हे जाणत नाही. असा जो महामूर्खासारखा असतो. ॥९॥

प्रीतिपात्र गेलें मरणें । तया लागी जीव देणें । स्वयें आत्महत्या करणें । तो तमोगुण ।।१०।।

अत्यंत प्रेम असलेली व्यक्ती मरण पावल्यावर शोकाने स्वतः जीव देणारा तमोगुणी. (नट किंवा नटी मरण पावल्यावर त्यांच्या चहात्यांनी आत्महत्या केल्याची उदाहरणे आहेत.) ॥१०॥

किडा मुंगी आणी स्वापद । यांचा करूं आवडे वध । अत्यंत जो कृपामंद । तो तमोगुण ।।११।।

किडे, मुंग्या मारणे किंवा ससा, हरीण इत्यादींची शिकार करण्याची आवड असणे व दुसऱ्याला जराही उपयोगी पडण्याची इच्छा नसणे. ॥११॥

स्त्रीहत्या बाळहत्या । द्रव्यालागीं ब्रह्महत्या । करूं आवडे गोहत्या । तो तमोगुण ।।१२।।

पत्नी व अर्भक किंवा स्वत:चे मूल ठार मारणे, द्रव्यलोभाने ब्राह्मणाला मारणे व गायीसारख्या पवित्र मानल्या गेलेल्या प्राण्याला मुद्दाम ठार मारणें. ॥१२॥

विसाळाचेनि नेटें । वीष घ्यावेंसें वाटे । परवध मनीं उठे । तो तमोगुण ।।१३।।

ईर्षा किंवा चीड निर्माण झाल्यावर विष प्यावेसे वाटणे, दुसऱ्याचा नाश करावासा वाटणे. ॥१३॥

अंतरीं धरूनि कपट । पराचें करी तळपट । सदा मस्त सदा उद्धट । तो तमोगुण ।।१४।।

मनात कपटी डावपेच आखून दुसऱ्याचा नाश करणे, सतत मस्तवाल व उद्धटपणानें वागणें. ॥१४॥

कळहो व्हावा ऐसें वाटे । झोंबी घ्यावी ऐसें उठे । अंतरीं द्वेष प्रगटे । तो तमोगुण ।।१५।।

आपण भांडावे व दुसऱ्यात भांडण लावून द्यावेसे वाटणे, कोणाशी तरी सतत संघर्ष असावा, द्वन्द्वयुद्धाची खुमखुमी व मन द्वेषाने भरलेले असणे. ॥१५॥

युद्ध देखावें ऐकावें । स्वयें युध्यचि करावें । मारावें कीं मरावें । तो तमोगुण ।।१६।।

युद्ध पहावे, युद्धाच्या कथा ऐकाव्यात, युद्धाचे चित्रपट पहावेत, स्वत: युद्धासाठी पेटून उठावे व त्यांत शत्रूला मारावे किंवा स्वत: धारातीर्थी पडावे. (क्षत्रियाला हा गुण देशरक्षणासाठी आवश्यक आहे. श्रीरामानेही प्रसंगी युद्धासाठी हा गुण स्वीकारला होता.) ॥१६॥

मत्सरें भक्ति मोडावी । देवाळयें विघडावीं । फळतीं झाडें तोडावीं । तो तमोगुण ।।१७।।

स्वत: नास्तिक असल्यामुळे किंवा दुसऱ्यांच्या उपासनापद्धतीचा द्वेष असल्यामुळे त्यांच्या उपासनांची टिंगलटवाळी करावी किंवा मंदिरे फोडावीत, फळे व फुले देणारी झाडे तोडावीत. ॥१७॥

सत्कर्मे ते नावडती । नाना दोष ते आवडती । पापभय नाहीं चित्तीं । तो तमोगुण ।।१८।।

सदाचाराचा द्वेष, दुराचाराची आवड व त्याचे समर्थन व पाप ही संकल्पनाच नाकारून त्याचे भय न वाटणे. ॥१८॥

ब्रह्मवृत्तीचा उछेद । जीवमात्रास देणें खेद । करूं आवडे अप्रमाद । तो तमोगुण ।।१९।।

ब्राह्मणांची वैदिक कर्मे बंद पाडणे, प्राण्यांना नाना प्रकारे छळणे, अनेक प्रकारचे गुन्हे, अपराध करावेसे वाटणे. (अप्रमाद = अतिप्रमाद.) ॥१९॥

आग्नप्रळये शस्त्रप्रळये । भूतप्रळये वीषप्रळये । मत्सरें करीं जीवक्षये । तो तमोगुण ।।२०।।

घरे, उभी पिके, वाहने इत्यादिकांना आगी लावणे, बेछूटपणे सुरे, तलवारी, बंदुका चालवणे, भानामतीसारखे दुसऱ्यावर प्रयोग करणे, विषप्रयोगादिकांनी मत्सराच्या भरात जीव घेणे. ॥२०॥

परपीडेचा संतोष । निष्ठुरपणाचा हव्यास । संसाराचा नये त्रास । तो तमोगुण ।।२१।।

दुसऱ्याला त्रास देण्यात सुख वाटणे, आपल्या कठोरपणाने आपणच आपल्यावर खूष होणे, संसारात कितीही कष्ट उपसण्याची वेळ आली तरी वैराग्य न येणे. ॥२१॥

भांडण लाऊन द्यावें । स्वयें कौतुक पाहावें । कुबुद्धि घेतली जीवें । तो तमोगुण ।।२२।।

दुसऱ्यांच्यात भांडणे लावून देऊन आपण गंमत पहावी, अशा तऱ्हेची दुर्बुद्धी तमोगुणाची असते. ॥२२॥

प्राप्त जालियां संपत्ती । जीवांस करी यातायाती । कळवळा नये चित्तीं । तो तमोगुण ।।२३।।

स्वत:ला धनधान्याची समृद्धी असता त्या मस्तीमध्ये इतरांना तुच्छ मानून त्रास द्यावा असे वाटते. वास्तविक

दीनदुबळ्यांचा कळवळा यावा. त्याचे नावही नसते. ॥२३॥

नावडे भक्ति नावडे भाव । नावडे तीर्थ नावडे देव । वेदशास्त्र नलगे सर्व । तो तमोगुण ।।२४।।

निरनिराळ्या उपासना, सत्त्वभावाच्या अभिव्यक्ती, तीर्थे, देवधर्म, वेद ह्यांची कशाचीच गरज वाटत नाही. ॥२४॥

स्नानसंध्या नेम नसे । स्वधर्मी भ्रष्टला दिसे । अकर्तव्य करीतसे । तो तमोगुण ।।२५।।

स्नानसंध्यादी धर्मकर्म करीत नाही, कर्तव्ये पाळीत नाही व करू नये ते हमखास करतो. ॥२५॥

जेष्ठ बंधु बाप माये । त्यांचीं वचनें न साहे । सीघ्रकोपी निघोन जाये । तो तमोगुण ।।२६।।

मोठा भाऊ, पिता, माता ह्यांचे साधे बोलणेसुद्धा नकोसे वाटते. उपदेश तर दूरच. किंचित संभाषण सुरू होताच अनावर संतापाने ताबडतोब चालता होतो. ॥२६॥

उगेंचि खावें उगेंचि असावें । स्तब्ध होऊन बैसावें । कांहींच स्मरेना स्वभावें । तो तमोगुण ।।२७।।

उद्योगधंदा न करता खावेप्यावे, आळसात वेळ काढावा व कर्तव्य, व्यवसाय, जबाबदाऱ्या ह्यांचे भान नसते. ॥२७॥

चेटकविद्येचा अभ्यास । शस्त्रविद्येचा हव्यास । मल्लविद्या व्हावी ज्यास । तो तमोगुण ।।२८।।

चेडाचेटुक करण्याची विद्या, शस्त्र वापरण्याचा सराव, निरनिराळीं द्वन्द्वयुद्धें करण्याची जबर आवड. ॥२८॥

केले गळाचे नवस । राडिबेडीचे सायास । काष्ठयंत्र छेदी जिव्हेस । तो तमोगुण ।।२९।।

मासे पकडण्याचा लोखंडी गळ मानेमध्ये खोवून त्याला दोरीने वजन बांधून देवळापर्यन्त चालत जाणें, निखारे पसरून त्यावरून चालणें, खरेखोटे ठरविण्यासाठी बेडी घालणें (विशाळगड), जिभेच्या मुळाशी हळूहळू चिरून जिव्हेची हालचाल वाढविणे. ॥२९॥

मस्तकीं भदें जाळावें । पोतें आंग हुरपळावें । स्वयें शस्त्र टोंचून घ्यावें । तो तमोगुण ।।३०।।

डोक्यावर मातीचे उथळ भांडे ठेवून त्यात निखारे किंवा गुग्गुळ जाळावे, अंगाला टाचण्या, खिळे टोचून घ्यावेत, मशालीने स्वत:चे अंग भाजून घ्यावे. ॥३०॥

देवास सिर वाहावें । कां तें आंग समर्पावें । पडणीवरून घालून घ्यावें । तो तमोगुण ।।३१।।

स्वत:चे मस्तक कापून देवाच्या चरणी वहाण्याचा प्रयोग करणे, किंवा सर्व शरीरच वहाणे, स्वत:चा कडेलोट करून घ्यावा. ॥३१॥

निग्रह करून धरणें । कां तें टांगून घेणें । देवद्वारी जीव देणें । तो तमोगुण ।।३२।।

हट्टाला पेटून देवाच्या दारात धरणे धरून राहणे, जीव देणे किंवा स्वत:ला फाशी देणे. ॥३२॥

निराहार उपोषण । पंचाग्नी धूम्रपान । आपणास घ्यावें पुरून । तो तमोगुण ।।३३।।

वायुभक्षण करून रहाणे, चहूकडून अग्नी पेटवून मधे बसणे, धुरामध्ये नाक घालून बसणे किंवा स्वत:ला गाडणे. ॥३३॥

सकाम जें का अनुष्ठान । कां तें वायोनिरोधन । अथवा राहावें पडोन । तो तमोगुण ।।३४।।

प्रापंचिक संकट दूर होण्यासाठी किंवा एखादी जबर इच्छा पूर्ण होण्यासाठी अनुष्ठान करणे, प्राणवायू कोंडून ठेवणे किंवा आळसाने नुसते पडून रहाणे. ॥३४॥

नखें केश वाढवावे । हस्तचि वर्ते करावे । अथवा वाग्सुंन्य व्हावें । तो तमोगुण ।।३५।।

नखे व केस वाढवीत रहावे, उगीचच आळोखेपिळोखे द्यावेत किंवा मुखस्तंभासारखे बसावे. ॥३५॥

नाना निग्रहें पिडावें । देहदु:खें चर्फडावें । क्रोधें देवास फोडावें । तो तमोगुण ।।३६।।

अनेक प्रकारचे हट्ट धरून स्वत:ला व दुसऱ्यांना छळावे, शरीराला थोडा त्रास झाला तरी चरफडावे, संतापाच्या भरात पूजेतील देवालाही फोडून टाकावे. ।।३६।।

देवाची जो निंदा करी । तो आशाबद्धि अघोरी । जो संतसंग न धरी । तो तमोगुण ।।३७।।

राम-कृष्णांच्या चरित्रातील प्रसंग समजावून न घेता त्यांची निंदा करणे किंवा देवावर पक्षपाताचे वगैरे आरोप करणे. आकांक्षा पूर्ण न झाल्याने असा प्रकार होतो. संताच्या संगतीत तमोगुणी बेचैन होतो व त्यामुळे तो संतसंगत टाळतो. ।।३७।।

ऐसा हा तमोगुण । सांगतां तो असाधारण । परी त्यागार्थ निरूपण । कांहीं येक ।।३८।।

अशा ह्या तमोगुणाची सर्व लक्षणें सांगू म्हटले तर ते अशक्य आहे. पण त्याचा त्याग करता यावा म्हणून त्यांतील काही सांगितली. ।।३८।।

ऐसें वर्ते तो तमोगुण । परी हा पतनास कारण । मोक्षप्राप्तीचें लक्षण । नव्हे येणें ।।३९।।

असे हे तमोगुणाचे वर्तन अध:पाताकडे नेते. त्यात मोक्षप्राप्तीची शक्यताच नाही. ।।३९।।

केल्या कर्माचें फळ । प्राप्त होईल सकळ । जन्म दु:खाचें मूळ । तुटेना कीं ।।४०।।

अशा वर्तनाची ती ती फळे मिळतच राहतात. जीव बद्ध राहिल्याने जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका होणार नाही. ।।४०।।

व्हावया जन्माचें खंडण । पाहिजे तो सत्त्वगुण । तेंचि असे निरूपण । पुढिलिये समासीं ।।४१।।

जन्ममरणांच्या चक्रातून सुटकेसाठी सत्त्वगुणच हवा. पुढील समासात त्याचे वर्णन आहे. ।।४१।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'तमोगुणलक्षण' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'तमोगुण लक्षण' नावाचा सहावा समास समाप्त.

दशक दुसरा : मूर्खलक्षणांचा

समास सातवा : सत्त्वगुणलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

मागां बोलिला तमोगुण । जो दुःखदायक दारुण । आतां ऐका सत्त्वगुण । परम दुल्लभ ।।१।।

गेल्या समासात अत्यंत दु:ख देणाऱ्या तमोगुणाचे वर्णन केले. आता महाभाग्याने मिळणाऱ्या सत्त्वगुणाविषयी ऐका. असे भाग्यवान विरळे असतात कारण तो दुर्लभ आहे. ॥१॥

जो भजनाचा आधार । जो योगियांची थार । जो निरसी संसार । दुःखमूळ जो ।।२।।

भगवद्भक्तीला आधारभूत, योगी ज्याचे आश्रयाने योगसाधना करतात व ज्याच्या साह्याने सर्व दु:खांना कारण असलेल्या संसाराचा निरास होतो. ॥२॥

जेणें होये उत्तम गती । मार्ग फुटे भगवंती । जेणें पाविजे मुक्ती । सायोज्यता ते ।।३।।

ज्याने भगवत्प्राप्तीचा मार्ग सापडल्याने मोक्षाकडील प्रवास सुरू होऊन सायुज्यमुक्तीचा म्हणजे जीवन्मुक्तीचा लाभ होतो. ॥३॥

जो भक्तांचा कोंवसा । जो भवार्णवींचा भर्वसा । मोक्षलक्ष्मीची दशा । तो सत्त्वगुण ।।४।।

भक्तांना आधार, भवसागर तरून जाण्याची निश्चिती देणारा व मोक्षलक्ष्मीच्या अलीकडील एक अवस्था म्हणजे दशा होय. (मोक्ष त्रिगुणातीत असतो.) ॥४॥

जो परमार्थाचें मंडण । जो महंतांचें भूषण । रजतमाचें निर्शन । जयाचेनि ।।५।।

जो परमार्थाची शोभा व महंतांचे भूषण असून तो प्रभावी झाला असता रज व तम हे गुण दुर्बल होतात. ॥५॥

जो परम सुखकारी । जो आनंदाची लहरी । देऊनियां, निवारी- । जन्ममृत्यु ।।६।।

जो अत्यंत सुखदायक, आनंदाची जणू झुळूक देऊन जन्ममरणातून सोडवितो. ॥६॥

जो अज्ञानाचा सेवट । जो पुण्याचें मूळपीठ । जयाचेनि सांपडे वाट । परलोकाची ।।७।।

सत्त्वगुणापाशी अज्ञान टिकत नाही. पुण्याची सुरुवातच सत्त्वगुणात आहे. तो लाभला असता मुक्तीचा मार्ग सापडतो. किंवा सत्त्वगुणात मृत्यू आल्यास विष्णुलोकाची प्राप्ती होते. ॥७॥

ऐसा हा सत्त्वगुण । देहीं उमटतां आपण । तये क्रियेचें लक्षण । ऐसें असे ।।८।।

अशा सत्त्वगुणाच्या प्रभावाखालील व्यक्तीचे आचार, विचार व उच्चार कसे असतात ते आता ऐका. ॥८॥

ईश्वरीं प्रेमा अधिक । प्रपंच संपादणें लोकिक । सदा सन्निध विवेक । तो सत्त्वगुण ।।९।।

ईश्वरावर वाढते प्रेम असते, प्रपंचामध्ये ‘एक भला गृहस्थ’ असा नावलौकिक होतो किंवा अनासक्त वृत्तीने प्रपंच होतो. अन्त:करणात व्यावहारिक व पारमार्थिक विवेक सतत जागा असतो. व्यवहार धर्मानुसार व परमार्थ वेदानुसार असतो. ॥९॥

संसार दुःख विसरवी । भक्तिमार्ग विमळ दावी । भजनक्रिया उपजवी । तो सत्त्वगुण ।।१०।।

प्रतिकूल परिस्थितीमुळे निर्माण होणारे दु:ख सत्त्वगुणी व्यक्तीला टोचत रहात नाही. शुद्ध भक्तिमार्गाकडे प्रवृत्ती राहते. भजनात सुख वाटते व म्हणून सत्त्वगुणी व्यक्ती सतत भजनशील राहते. ॥१०॥

परमार्थाची आवडी । उठे भावार्थाची गोडी । परोपकारीं तांतडी । तो सत्त्वगुण ।।११।।

परमार्थाची मोठी आवड निर्माण होते. आध्यात्मिक ग्रंथांचे तात्पर्य समजावून घेण्यात रस निर्माण होतो. व्यवहारात इतरांना मदत करावी व परमार्थात आपणांस समजलेले तात्पर्य भक्तांना समजावून सांगावेसे वाटते. ॥११॥

स्नानसंध्या पुण्यसीळ । अभ्यांतरींचा निर्मळ । शरीर वस्त्रें सोज्वळ । तो सत्त्वगुण ।।१२।।

तो स्नानसंध्यादी धर्मकृत्ये, पुण्यदायक कर्मांचे आचरण करतो, निर्मळ अन्त:करण असते व स्वच्छ व साधी वस्त्रे अंगावर असतात. ॥१२॥

येजन आणी याजन । अध्ययन आणी अध्यापन । स्वयें करी दानपुण्य । तो सत्त्वगुण ।।१३।।

यज्ञ करावे, यज्ञ करवून घ्यावेत, स्वत: शास्त्राभ्यास करून तो शिकवावा व दान करावे. ॥१३॥

निरूपणाची आवडी । जया हरिकथेची गोडी । क्रिया पालटे रोकडी । तो सत्त्वगुण ।।१४।।

भगवन्ताचे ऐश्वर्य व अध्यात्मशास्त्र आवडीने सांगावे, हरिकथा रंगवून सांगाव्यात व त्याचे प्रत्यक्ष बदललेले आचरण सर्वांच्या प्रत्ययाला येण्यासारखे असते. ॥१४॥

अश्वदानें गजदानें । गोदानें भूमिदानें । नाना रत्नांचीं दानें । करी, तो सत्त्वगुण ।।१५।।

घोडा, हत्ती, गाय, जमीन, रत्ने इ. दाने द्यावीत अशी इच्छा सत्त्वगुणामुळे होते. शक्तीनुसार दान द्यावेसे वाटते. ॥१५॥

धनदान वस्त्रदान । अन्नदान उदकदान । करी ब्राह्मणसंतर्पण । तो सत्त्वगुण ।।१६।।

पैसे, वस्त्रे, अन्न, पाणी वाटावे, ब्राह्मणभोजने घालावीत. ॥१६॥

कार्तिकस्नानें माघस्नानें । व्रतें उद्यापनें दानें । नि:काम तीर्थे उपोषणें । तो सत्त्वगुण ।।१७।।

कार्तिक स्नान, माघस्नान, अनेक व्रते व त्यांची दानपूर्वक उद्यापने, निष्काम बुद्धीने तीर्थयात्रा व एकादशीसारखी उपोषणे करावीत असे वाटते व करतो. ॥१७॥

सहस्त्रभोजनें लक्षभोजनें । विविध प्रकारींचीं दानें । नि:काम करी सत्त्वगुणें । कामना रजोगुण ।।१८।।

सहस्त्रभोजन, लक्षभोजन, अनेक प्रकारची दाने सत्त्वगुणांत निष्काम, तर रजोगुणांत सकाम होतात. ॥१८॥

तीर्थीं अर्पी जो अग्रारें । बांधो वापी सरोवरें । बांधे देवाळयें सिखरें । तो सत्त्वगुण ।।१९।।

तीर्थक्षेत्रातील देवाच्या विविध उत्सवांसाठी जमीन किंवा ठराविक उत्पन्न देणे, जागोजागी विहिरी व तलाव बांधणे, देवळे उभारावीत, शिखरे बांधावीत असे वाटणे. ॥१९॥

देवद्वारीं पडशाळा । पाईरीया दीपमाळा । वृंदावनें पार पिंपळा । बांधे, तो सत्त्वगुण ।।२०।।

देवाच्या परिसरात धर्मशाळा, पायऱ्या दीपमाळा, वृंदावने, पिंपळाला पार बांधणें. ॥२०॥

लावी वनें उपवनें । पुष्पवाटिका जीवनें । निववी तापस्यांची मनें । तो सत्त्वगुण ।।२१।।

देवळाच्या परिसरात लहानमोठी झाडे लावावीत, फुलबाग तयार करावी, पाण्याची सोय करावी व तपस्व्यांना अनुकूल वातावरण तयार करून द्यावे. ॥२१॥

संध्यामठ आणि भुयेरीं । पाईरीया नदीतीरीं । भांडारगृहें देवद्वारीं । बांधे, तो सत्त्वगुण ।।२२।।

नदीच्या परिसरात संध्या करण्यासाठी मठ बांधणे, तपश्चर्येसाठी भुयारे, स्नानासाठी घाट बांधणे. देवाच्या उत्सवासाठी किंवा यात्रेकरूसाठी देवळाच्या आवारात स्वयंपाकघरे बांधणे. ॥२२॥

नाना देवांची जी स्थानें । तेथें नंदादीप घालणें । वाहे अळंकार भूषणें । तो सत्त्वगुण ।।२३।।

अनेक तीर्थस्थानी देवाच्या नंदादीपाची व्यवस्था करणे, देवाला सोन्या-माणकांचे अलंकार अर्पण करणे. ॥२३॥

जेंगट मृदांग टाळ । दमामे नगारे काहळ । नाना वाद्यांचे कल्लोळ । सुस्वरादिक ।।२४।।

नाना सामग्री सुंदर । देवाळईं घाली नर । हरिभजनीं जो तत्पर । तो सत्त्वगुण ।।२५।।

ताशा, मृदुंग, टाळ, दमामे (मोठे नगारे). नगारे, कर्णे, तुतारी इत्यादी मोठा आवाज करणारी वाद्ये व वीणा, सनईसारखी मंजुळ ध्वनीची अनेक प्रकारची वाद्ये, गादी, उशी इ. देवासाठी सुंदर सामुग्री देऊन स्वत: हरिभजनात तत्पर असणे. (देऊन मोकळा होणारा नव्हें) ॥२४, २५॥

छेत्रें आणि सुखासनें । दिंड्या पताका निशाणें । वाहे चामरें सूर्यापानें । तो सत्त्वगुण ।।२६।।

देवाला छत्र, सिंहासन, दिंड्या, पताका, निशाणें, चवरी, अबदागिरी अर्पण करणें. ॥२६॥

वृंदावनें तुळसीवने । रंगमाळा समार्जनें । ऐसी प्रीती घेतली मनें । तो सत्त्वगुण ।।२७।।

देवळाच्या आवारात तुळशीवृंदावन तयार करून तुळशीची बने लावावीत, रांगोळ्या घालाव्यात, सडासंमार्जन, झाडलोट करावी अशी ज्याला मनापासून आवड असते. ॥२७॥

सुंदरें नाना उपकर्णे । मंडप चांदवे आसनें । देवाळईं समर्पणें । तो सत्त्वगुण ।।२८।।

पळी, ताम्हनासारखी भांडी, मांडव, कनाती, (आसने) खुर्च्या देवालयाला अर्पण करणे. ॥२८॥

देवाकारणें खाद्य । नाना प्रकारीं नैवेद्य । अपूर्व फळें अर्पी सद्य । तो सत्त्वगुण ।।२९।।

मूर्तिरूप सगुण उपासनेत देवालाही उत्तम स्वयंपाक करून जेवण द्यावे लागते. असा नैवेद्याचा स्वयंपाक आवडीने करणे व दुर्मिळ फळफळावळ अर्पण करणे. ॥२९॥

ऐसी भक्तीची आवडी । नीच दास्यत्वाची गोडी । स्वयें देवद्वार झाडी । तो सत्त्वगुण ।।३०।।

अशा भक्तीच्या आवडीतून सतत देवाचे दास्य करावेसे वाटणें व देवळाच्या आवारात झाडलोट करण्यासारखी कामे करणे. ॥३०॥

तिथी पर्व मोहोत्साव । तेथें ज्याचा अंतर्भाव । काया वाचा मनें सर्व । अर्पी, तो सत्त्वगुण ।।३१।।

संतांच्या पुण्यतिथी, कुंभमेळ्यासारखा पर्वकाळ, रामजन्मासारखे महोत्सव ह्यांतील उपक्रमांत शरीर, वाणी व मनाने हमखास सहभागी होणे. धनही त्यासाठी देणे. ॥३१॥

हरिकथेसी तत्पर । गंधें माळा आणी धुशर । घेऊन उभीं निरंतर । तो सत्त्वगुण ।।३२।।

हरिकथेच्या पूर्वतयारीला कार्यकर्ता म्हणून व प्रत्यक्ष कथेत श्रोता म्हणून तत्परतेने सामील होणे, त्यासाठी जरूर ते गंध, फुलांचे हार, बुक्का इ. सामुग्री वेळच्यावेळी तयार ठेवणे हे सत्त्वगुणाचे लक्षण आहे. ॥३२॥

नर अथवा नारी । येथानुशक्ति सामग्री । घेऊन उभीं देवद्वारीं । तो सत्त्वगुण ।।३३।।

स्त्रिया किंवा पुरुषांनी आपल्या परिस्थितीनुसार आवश्यक ती सामुग्री देवकार्यासाठी तयार ठेवणे. ॥३३॥

महत्कृत्य सांडून मागें । देवास ये लागवेगें । भक्ति निकट अंतरंगें । तो सत्त्वगुण ।।३४।।

अत्यंत महत्त्वाची व्यावहारिक कामे मागेपुढे जुळवून घेऊन देवकार्याला हयगय न करता जाण्यासारखी भक्ती अन्त:करणात सहजच असणे. ॥३४॥

थोरपणा सांडून दुरी । नीच कृत्य अंगीकारी । तिष्ठत उभीं देवद्वारीं । तो सत्त्वगुण ।।३५।।

स्वत:चे व्यावहारिक किंवा लौकिक मोठेपण बाजूला ठेवून देवाच्या सेवेचे कोणतेही हलकेसलके काम करण्यासाठी देवाच्या दारात तिष्ठत रहाणे. ॥३५॥

देवालागीं उपोषण । वर्जी तांबोल भोजन । नित्य नेम जप ध्यान । करी, तो सत्त्वगुण ।।३६।।

देवाच्या प्राप्तीसाठी उपवासाचे व्रत, विड्यासारखा एखादा भोग सोडणे, एकवेळचे जेवण सोडणे इ. व्रते व नित्यनेमाने जप व ध्यान करणे. ॥३६॥

शब्द कठीण न बोले । अतिनेमेंसी चाले । योगी जेणें तोषविले । तो सत्त्वगुण ।।३७।।

सत्त्वगुणी कोणालाही कठोरपणे बोलत नाही, नियमितपणा कधीच सोडीत नाही व ते पाहून योगीसुद्धा संतुष्ट होऊन त्याचे कौतुक करतात. ॥३७॥

सांडूनिया अभिमान । नि:काम करी कीर्तन । श्वेद रोमांच स्फुरण । तो सत्त्वगुण ।।३८।।

अहंकार पूर्णपणे बाजूला सारून निरपेक्षपणे हरिनाम संकीर्तन करतो व त्या वेळी अष्टसात्त्विकभाव जागे होतात. (घाम, रोमांच, कंप, अश्रू, गद्गद्, स्तब्धता, मूर्च्छा, हास्य). ॥३८॥

अंतरीं देवाचें ध्यान । तेणें निडारले नयन । पडे देहाचें विस्मरण । तो सत्त्वगुण ।।३९।।

अन्त:करणात प्रेमातिरेकाने भगवन्ताचे ध्यान करीत असता डोळे पाण्याने भरून येऊन देहाची आठवणही उरत नाही. ॥३९॥

हरिकथेची अति प्रीती । सर्वथा नये विकृती । आदिक प्रेमा आदिअंती । तो सत्त्वगुण ।।४०।।

हरिकथेचे एवढे प्रेम असते की हरीवाचून दुसरा विषयच मनात येत नाही. कथेच्या सुरुवातीपासून अखेरपर्यन्त व नंतरही ते प्रेम टिकून राहते. ॥४०॥

मुखीं नाम हातीं टाळीं । नाचत बोले ब्रीदावळी । घेऊन लावी पायधुळी । तो सत्त्वगुण ।।४१।।

वाणीने नामाचा उच्चार, हाताने टाळी वाजवीत नाचत नाचत, भगवन्त भक्तवत्सल आहे, तो दुष्टांचा संहारक आहे, इत्यादी त्याची ब्रीदे मधून मधून गात रहातो. भगवद्भक्त ज्यावर नाचतात ती धूळ कपाळाला लावून घेतो. ॥४१॥

देहाभिमान गळे । विषईं वैराग्य प्रबळे । मिथ्या माया ऐसें कळे । तो सत्त्वगुण ।।४२।।

'मी देह', 'माझा देह सुंदर' इ. प्रकारचा देहाभिमान गळून पडतो. पंचविषयांचे वैराग्य वाढत जाते. विषय, विषयी व भोग हे तिन्ही मिथ्या व मायिक असल्याचे लक्षात येते. ॥४२॥

कांहीं करावा उपाये । संसारीं गुंतोन काये । उकलवी ऐसें ह्रदये । तो सत्त्वगुण ।।४३।।

ह्या संसाराविषयी आसक्ती धरून कोणता लाभ होणार? आत्मलाभाची साधना करीत जावी हे बरे असे विचार मनात रुजत जातात. ॥४३॥

संसारासी त्रासे मन । कांहीं करावें भजन । ऐसें मनीं उठे ज्ञान । तो सत्त्वगुण ।।४४।।

'मी व माझे' ह्या नादात केलेला संसार चटके देऊ लागला की भगवद्भजनाशिवाय ते चटके थांबणार नाहीत असा विवेक जागा होतो. ॥४४॥

असतां आपुले आश्रमीं । अत्यादरें नित्यनेमीं । सदा प्रीती लागे रामीं । तो सत्त्वगुण ।।४५।।

आपल्या गृहस्थादी आश्रमात राहूनच अतिशय श्रद्धेने नित्यनेम चालू ठेवून रामाविषयी अखंड प्रेम जडून राहते. (घर सोडून जाणे आवश्यक नाही.) ॥४५॥

सकळांचा आला वीट । परमार्थी जो निकट । आघातीं उपजे धारिष्ट । तो सत्त्वगुण ।।४६।।

सर्व संबंधित माणसे 'सुखाचे सांगाती' आहेत हे लक्षात आल्यावर त्यांच्यावर सुखासाठी अवलंबून रहाणे थांबते. मोक्षमार्गाविषयी अत्यंत आपुलकी वाटू लागते. त्यामुळें प्रापंचिक जीवनात आलेल्या संकटांनी डगमगून जात नाही. ॥४६॥

सर्वकाळ उदासीन । नाना भोगीं विटे मन । आठवे भगवद्भजन । तो सत्त्वगुण ।।४७।।

अनासक्ती व अलिप्तता अखंड टिकून राहते. विषयभोगातील सुख अनित्य असल्याचे लक्षात येऊन त्यांची अभिलाषा थांबते व भगवद्भजनात गोडी वाटते. ॥४७॥

पदार्थीं न बैसे चित्त । मनीं आठवे भगवंत । ऐसा दृढ भावार्थ । तो सत्त्वगुण ॥४८॥

शरीर, संपत्ती, घरदार, मानसन्मान इत्यादी विचार मनात रेंगाळत रहात नाहीत. भगवंताचे अनुसंधान लागते. अशी अन्त:करणाची निश्चयात्मक रचना तयार होते. ॥४८॥

लोक बोलती विकारी । तरी आदिक प्रेमा धरी । निश्चय बाणे अंतरी । तो सत्त्वगुण ॥४९॥

लोकप्रवाहातून अलग झाल्याने लोक त्याच्याबद्दल उलटसुलट बोलू लागतात. पण त्यामुळे त्यांचा राग न येता उलट त्यांची उपाधी सुटल्याने भगवन्ताविषयीचे प्रेम दृढ होऊ लागते. मोक्षाविषयीचा निश्चय वाढतो. ॥४९॥

अंतरी स्फूर्ती स्फुरे । सस्वरूपीं तर्कभरे । नष्ट संदेह निवारे । तो सत्त्वगुण ॥५०॥

प्रज्ञाचक्षू उघडू लागतात व ज्ञान स्फुरू लागते. श्रुती व श्रीगुरूंच्या उपदेशाला अनुकूल अशी विचारांची साखळी तयार होऊन घातक असलेला संशय नष्ट होतो. स्वरूपाविषयी निश्चय होतो. ॥५०॥

शरीर लावावें कारणीं । साक्षेप उठे अंत:कर्णीं । सत्त्वगुणाची करणी । ऐसी असे ॥५१॥

मनुष्यशरीरासारखे अद्भुत साधन प्राप्त झाले असता त्याचा मोक्षासाठी पुरेपूर उपयोग करून घ्यावा असा अन्त:करण ध्यास धरते. हा सत्त्वगुणाचा प्रभाव होय. ॥५१॥

शांति क्ष्मा आणि दया । निश्चय उपजे जया । सत्त्वगुण जाणावा तया । अंतरीं आला ॥५२॥

शांती, क्षमा व दया हा ज्याच्या अन्त:करणाचा स्थायीभाव झाला आहे त्यांत सत्त्वगुण आहे असे समजावे. ॥५२॥

आले अतीत अभ्यागत । जाऊं नेदी जो भुकिस्त । येथानशक्ती दान देत । तो सत्त्वगुण ॥५३॥

कोणी घरी आले, अचानक आले तरी आपल्या शक्तीनुसार त्यांना चहा-फराळ दिल्याशिवाय पाठवीत नाही. कोणी सत्पात्र याचक आला तर मोकळ्या हाताने जाऊ देत नाही. ॥५३॥

तडितापडी दैन्यवाणें । आलें आश्रमाचेनि गुणें । तयालागीं स्थळ देणें । तो सत्त्वगुण ॥५४॥

गृहस्थाश्रमात असल्याने कोणी साधुसन्त किंवा दीन व्यक्ती आल्यास तिला तात्पुरता निवारा देतो. ॥५४॥

आश्रमीं अन्नाची आपदा । परी विमुख नव्हे कदा । शक्तिनुसार दे सर्वदा । तो सत्त्वगुण ॥५५॥

घरात अन्न पुरेसे नसतानाही पाहुण्यांना आपल्या शक्तीच्या मर्यादेत अन्न देतो. उपाशीपोटी कधीच जाऊ देत नाही. ॥५५॥

जेणे जिंकिली रसना । तृप्त जयाची वासना । जयास नाहीं कामना । तो सत्त्वगुण ॥५६॥

ज्याचे जिभेवर नियंत्रण आहे, ज्याच्या वासनांना पूर्णविराम मिळाला आहे व इच्छा-आकांक्षा थांबल्या आहेत तो सात्त्विक समजावा. ॥५६॥

होणार तैसें होत जात । प्रपंचीं जाला आघात । डळमळिना ज्याचें चित्त । तो सत्त्वगुण ॥५७॥

प्रारब्धाप्रमाणें जे व्हावयाचे ते होत जाते. आपले कर्तव्य चोख करीत असताना प्रपंचात संकटे आली तरी तो शान्त असतो. ॥५७॥

येका भगवंताकारणें । सर्व सुख सोडिलें जेणें । केलें देहाचें सांडणे । तो सत्त्वगुण ॥५८॥

भगवत्सुखासाठी ज्याने विषयसुखांचा त्याग करून देहावरील आसक्ती सोडून दिली आहे तो सात्त्विक. ॥५८॥

विषईं धांवे वासना । परी तो कदा डळमळिना । ज्याचे धारिष्ट चळेना । तो सत्त्वगुण ॥५९॥

वासनेने विषयाकडे धावणे स्वाभाविक आहे. पण तो धैर्यवान असल्याने त्या धावेने तो बेचैन न होता शान्तपणे

चित्ताला आवरतो. धीर सोडीत नाही. ॥५९॥

देह आपदेनें पीडला । क्षुधे तृषेनें वोसावला । तरी निश्चयो राहिला । तो सत्त्वगुण ॥६०॥

देहाला नाना व्याधींनी पोखरले, तहानभूक न भागल्याने तो क्षीण झाला तरी त्याचे धैर्य व भगवंतप्राप्तीचा निश्चय ढळत नाही. ॥६०॥

श्रवण आणी मनन । निजध्यासें समाधान । शुद्ध जालें आत्मज्ञान । तो सत्त्वगुण ॥६१॥

संप्रदायशुद्ध श्रवण, श्रुतीला अनुकूल तर्काने मनन व गुरुवाक्याच्या निदिध्यासनाने अन्तःकरणवृत्ती आत्माकार झाल्याने होणारे श्रुतिसंमत आत्मज्ञान सत्त्वगुणाशिवाय होत नाही. ॥६१॥

जयास अहंकार नसे । नैराशता विलसे । जयापासीं कृपा वसे । तो सत्त्वगुण ॥६२॥

अहंकाराचा वाराही नसतो, वैराग्य शोभून दिसते व जो सतत कृपाळू असतो तो सत्त्वगुणी असतो. ॥६२॥

सकळांसी नम्र बोले । मर्यादा धरुन चाले । सर्व जन तोषविले । तो सत्त्वगुण ॥६३॥

सर्वांशी सरसकट नम्रतेने बोलतो, न्यायनीती धर्माच्या मर्यादेत वागतो व सर्वांना संतुष्ट ठेवतो. ॥६३॥

सकळ जनासीं आर्जव । नाहीं विरोधास ठाव । परोपराकारीं वेची जीव । तो सत्त्वगुण ॥६४॥

सर्वांबरोबर सरळपणाने वागतो, वैर निर्माण होण्याचे कारणच ठेवीत नाही व परोपकारात आयुष्य खर्ची घालतो. ॥६४॥

आपकार्याहून जीवीं । परकार्यसिद्धी करावी । मरोन कीर्ती उरवावी । तो सत्त्वगुण ॥६५॥

स्वतःचे काम प्रसंगी बाजूला ठेवून दुसऱ्याचे काम करावे व मरणानंतरही स्वतःची सत्कीर्ती मागे राहील असे वागावे. ॥६५॥

पराव्याचे दोषगुण । दृष्टीस देखे आपण । समुद्राऐसी साठवण । तो सत्त्वगुण ॥६६॥

दुसऱ्यांच्या गुणदोषांची अचूक पारख असते व ते सर्व लक्षात येऊनही ते समुद्राप्रमाणे पोटात घालतो. त्यांच्याशी असलेल्या संबंधावर त्यांचा परिणाम होऊ देत नाही व ते गुणदोष दुसऱ्यांना सांगतही नाही. ॥६६॥

नीच उत्तर साहाणें । प्रत्योत्तर न देणें । आला क्रोध सावरणें । तो सत्त्वगुण ॥६७॥

कोणी अपमानकारक बोलले तरी त्याला त्याच भाषेत उत्तर देत नाही. संताप आला तरी शांत राहतो. ॥६७॥

अन्यायेंवीण गांजिती । नानापरी पीडा करिती । तितुकेंहि साठवी चित्तीं । तो सत्त्वगुण ॥६८॥

कोणताच अपराध नसताना उगीच आरोप करणारे, अनेक प्रकारांनी छळणारे ह्यांचे सर्व सहन करतो. ॥६८॥

शरीरें घीस साहाणें । दुर्जनासीं मिळोन जाणें । निंदकास उपकार करणें । हा सत्त्वगुण ॥६९॥

शरीर दुसऱ्यांसाठी झिजवतो, दुष्टांशी जमवून घेतो व निंदकावर उलट उपकारच करतो. ॥६९॥

मन भलतीकडे धावें । तें विवेकें आवरावें । इंद्रियें दमन करावें । तो सत्त्वगुण ॥७०॥

विषयांकडे धावणे, भूतभविष्याच्या विचारांत रमणे, हा मनाचा सहज स्वभाव आहे. ते विवेकाने आवरणें व इंद्रियांना त्या विषयांपर्यन्त न जाऊ देणें हे सत्त्वगुणाने शक्य होते. ॥७०॥

सत्क्रिया आचरावी । असत्क्रिया त्यागावी । वाट भक्तीची धरावी । तो सत्त्वगुण ॥७१॥

सत्कर्मेच करीत असावे, निषिद्ध कर्मांचा त्याग करावा व भक्तीच्या मार्गाने मोक्ष मिळवावा. ॥७१॥

जया आवडे प्रातःस्नान । आवडे पुराणश्रवण । नाना मंत्री देवतार्चन । करी, तो सत्त्वगुण ॥७२॥

पहाटे उठून स्नान करणे आवडते, पुराणे ऐकावीशी वाटतात, व देवाची मंत्रपूर्वक उपासना आवडते. ॥७२॥

पर्वकाळीं अतिसादर । वसंतपूजेस तत्पर । जयंत्याची प्रीती थोर । तो सत्त्वगुण ।।७३।।

ग्रहणासारख्या पर्वकाळी सर्व सांगितलेले दानादी विधी करणारा, वसंतपंचमीचा उत्सव उत्साहाने करणारा व जन्माष्टमीसारखे उत्सव भक्तिभावाने साजरे करणारा. ॥७३॥

विदेशीं मेलें मरणें । तयास संस्कार देणें । अथवा सादर होणें । तो सत्त्वगुण ।।७४।।

दूर प्रदेशातील कोणी पांथस्थ मरण पावला तर त्याच्या प्रेताला अग्नी देणे किंवा अन्त्ययात्रेला आवर्जून हजर राहणे. ॥७४॥

कोणी येकास मारी । तयास जाऊन वारी । जीव बंधनमुक्त करी । तो सत्त्वगुण ।।७५।।

एक दुसऱ्यास मारू लागला तर मारणाऱ्याची समजूत घालतो. कोणास अटक झाल्यास त्याला सोडविण्याचा प्रयत्न करतो. न्याय मिळवून देतो. ॥७५॥

लिंगें लाखोलीं अभिशेष । नामस्मरणीं विस्वास । देवदर्शनीं अवकाश । तो सत्त्वगुण ।।७६।।

शिवलिंगावर बेलाची लक्ष पाने वाहणे किंवा विधियुक्त अभिषेक करणे, नामसाधनेवर परिपूर्ण श्रद्धा व देवदर्शनासाठी वेळात वेळ काढणे. ॥७६॥

संत देखोनि धावें । परमसुखें हेलावे । नमस्कारी सर्वभावें । तो सत्त्वगुण ।।७७।।

संत-साधू कोठे आले आहेत असे कळताच त्यांच्या दर्शनासाठी धावत जातो, दर्शनाने अत्यंत सुखी होऊन सर्वभावाने त्यांना साष्टांग नमस्कार घालतो. ॥७७॥

संतकृपा होय जयास । तेणें उद्धरिला वंश । तो ईश्वराचा अंश । सत्त्वगुणें ।।७८।।

संत ज्याचेवर कृपा करतात त्याचा वंशच धन्य होतो. अशी सन्तकृपा लाभलेला ईश्वराचा अंश समजावा. हे सर्व सत्त्वगुणाने घडून येते. ॥७८॥

सन्मार्ग दाखवी जनां । जो लावी हरिभजना । ज्ञान सिकवी अज्ञाना । तो सत्त्वगुण ।।७९।।

सामान्य लोकांना कल्याणाचा मार्ग दाखवितो, अज्ञानी जनांना व्यवहार व परमार्थ ज्ञान शिकवितो व भाविकांना हरिभजनात गोडी उत्पन्न करतो. ॥७९॥

आवडे पुण्य संस्कार । प्रदक्षणा नमस्कार । जया राहे पाठांतर । तो सत्त्वगुण ।।८०।।

पुण्य निर्माण करणारे संस्कार, देवाला प्रदक्षिणा व नमस्कार व शास्त्र-संत-स्तोत्र वाङमयाचे पाठांतर सहज होते. ॥८०॥

भक्तीचा हव्यास भारी । ग्रंथसामग्री जो करी । धातुमूर्ति नानापरी । पूजी तो सत्त्वगुण ।।८१।।

भक्तीची आसक्ती, अध्यात्मग्रंथांचा संग्रह व मूर्तींची सर्व उपचारपूर्वक पूजा करावी असे वाटते. ॥८१॥

झळफळित उपकर्णे । माळा गवाळी आसनें । पवित्रें सोज्वळें वसनें । तो सत्त्वगुण ।।८२।।

स्वच्छ केल्याने झळकणारी पूजापात्रे पूजेसाठी वापरणे, सुंदर माळा, सतरंजा, रोज धुतलेली व अन्य कामासाठी न वापरलेली वस्त्रे इत्यादी सामुग्रीची आवड असते. ॥८२॥

परपीडेचें वाहे दुःख । परसंतोषाचें सुख । वैराग्य देखोन हरिख । मानी, तो सत्त्वगुण ।।८३।।

दुसऱ्याच्या दुःखाने व्यथित होणे, दुसऱ्यांच्या सुखाने संतुष्ट होणे, वैराग्यपूर्ण व्यक्ती पाहून समाधान होणे ही सत्त्वगुणाची लक्षणे आहेत. ॥८३॥

परभूषणें भूषण । परदूषणें दूषण । परदुःखे सिणे जाण । तो सत्त्वगुण ।।८४।।

इतरांना मानसन्मान, स्तुती, श्रेय इत्यादी मिळाले की जो आतून सुखावतो व दुसऱ्याचे अपमान, निंदा इत्यादींनी

खिन्न होतो व दुसऱ्याच्या दु:खाने स्वत: कष्टी होतो. ॥८४॥

आतां असो हें बहुत । देवीं धर्मी ज्यांचें चित्त । भजे कामनारहित । तो सत्त्वगुण ।।८५।।

अशी सत्त्वगुणाची लक्षणे किती म्हणून सांगावीत? जो धर्माचे अनुष्ठान व देवाची उपासना निष्काम बुद्धीने करतो तो सात्त्विक. ॥८५॥

ऐसा हा सत्त्वगुण सात्त्विक । संसारसागरीं तारक । येणें उपजे विवेक । ज्ञानमार्गाचा ।।८६।।

असा हा निर्मळ सत्त्वगुण संसार समुद्रातून तरून जाण्याचा एकमेव उपाय असून त्यातून ज्ञानमार्गाचा 'ब्रह्म सत्य असून जगत् मिथ्या आहे' हा विवेक उदयाला येतो. ॥८६॥

सत्त्वगुणें भगवद्भक्ती । सत्त्वगुणें ज्ञानप्राप्ती । सत्त्वगुणें सायोज्यमुक्ती । पाविजेते ।।८७।।

सत्त्वगुणामुळे भगवंताच्या सगुणरूपाचे अत्यंत प्रेम उत्पन्न होऊन त्याच्याच कृपेने 'मी ब्रह्म आहे' अशा ज्ञानाचा उदय होतो. असा अनुभव दृढ व अपरिवर्तनीय झाला की त्यालाच सायुज्य मुक्ती असे म्हणतात. ॥८७॥

ऐसी सत्त्वगुणाची स्थिती । स्वल्प बोलिलें येथामती । सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ।।८८।।

असा हा एकूण सत्त्वगुण आहे. माझ्या बुद्धीनुसार त्याचे थोडक्यात वर्णन केले. आता श्रोत्यांनी सावध चित्ताने पुढील विषयाकडे लक्ष द्यावे. ॥८८॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सत्त्वगुणलक्षणनाम' समास सातवा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सत्त्वगुणलक्षण' नावाचा सातवा समास समाप्त

दशक दुसरा : मूर्खलक्षणांचा

समास आठवा : सद्विद्यानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ऐका सद्विद्येचीं लक्षणें । परम शुद्ध सुलक्षणें । विचार घेतां बळेंचि बाणें । सद्विद्या आंगी ।।१।।

अत्यंत पवित्रतेने शोभून दिसणारी सद्विद्येची लक्षणे आता ऐका. त्याप्रमाणे वागण्याचा अथक प्रयत्न केला असता ती सद्विद्या जणू त्या वागणाऱ्याच्या रूपाने प्रगट होते. तिचे सामर्थ्यच तसे आहे. ॥१॥

सद्विद्येचा जो पुरुष । तो उत्तमलक्षणीं विशेष । त्याचे गुण ऐकतां संतोष । परम वाटे ।।२।।

अशी सद्विद्येची व्यक्ती ह्या शोभून दिसणाऱ्या लक्षणांनी उठून दिसते. ते गुण ऐकले तरी फार मोठे समाधान मिळते. ॥२॥

भाविक सात्त्विक प्रेमळ । शांती क्ष्मा दयासीळ । लीन तत्पर केवळ । अमृतवचनी ।।३।।

अशी व्यक्ती, किंवा पुरुष भाविक, सत्त्वगुणसंपन्न व प्रेमळ असतो. शांती, क्षमा व दया हे त्याच्या स्वभावाचे स्थायीभाव असतात. सदा नम्र व वाणी मधुर असते. ॥३॥

परम सुंदर आणि चतुर । परम सबळ आणि धीर । परम संपन्न आणि उदार । अतिशयेंसी ।।४।।

व्यक्तिमत्त्व देखणे व आकर्षक, बुद्धीला चातुर्याची जोड असते. सामर्थ्यसंपन्न व धैर्यवान असून धन-विद्यादिकांनी संपन्न असून फार उदारही असतो. ॥४॥

परम ज्ञाता आणी भक्त । महापंडित आणी विरक्त । महातपस्वी आणी शांत । अतिशयेंसी ।।५।।

जीवनाच्या अनेक क्षेत्रांतील ज्ञानाचा आवाका मोठा असून भगवद्भक्त असतो. न्याय-वेदान्तदर्शनांचे उत्कृष्ट अध्ययन झालेले असून वैराग्यसंपन्न असतो. मोठी तपश्चर्या करणारा असून शांत. (वरील व पुढील सर्व जोड्या प्रत्यक्षात कमी बघावयास मिळतात. उदा. तपस्वी माणूस तापट असण्याचाच संभव जास्त.) ॥५॥

वक्ता आणी नैराशता । सर्वज्ञ आणी सादरता । श्रेष्ठ आणी नम्रता । सर्वत्रांसी ।।६।।

उत्कृष्ट वक्तृत्व असूनही मानधनाच्या अटी न घालणारा, स्वत:पाशी अफाट ज्ञान असूनही दुसऱ्याकडून विनयपूर्वक ज्ञानग्रहण करण्यास तयार, अनेक बाबतीत श्रेष्ठ असून सर्वांशी नम्रतेने वागणारा. ॥६॥

राजा आणी धार्मिक । शूर आणी विवेक । तारुण्य आणी नेमक । अतिशयेंसी ।।७।।

सत्ताधीश असून धर्मपालन करणारा, अंगी शौर्य असून त्याचा विचाराने वापर करणारा, तारुण्यसंपन्न असून मर्यादशील. ॥७॥

वृद्धाचारी कुळाचारी । युक्ताहारी निर्विकारी । धन्वंतरी परोपकारी । पद्महस्ती ।।८।।

अनुभवी वाडवडिलांच्या परंपरेप्रमाणे आचरण असणारा, कुळाचार-कुळधर्म सांभाळणारा, आरोग्याला अनुकूल आहार घेणारा, कामादी विकारांवर नियंत्रण असणारा, हाताला यश असणारा व परोपकारी वृत्तीचा उत्तम वैद्य. ॥८॥

कार्यकर्ता निराभिमानी । गायक आणी वैष्णव जनी । वैभव आणी भगवद्भजनी । अत्यादरें ।।९।।

सर्व कार्यात प्रत्यक्ष सहभाग असूनही कार्याचा अभिमान नाही, उत्तम गायक असून भगवद्भक्त (कलासक्त व्यसनी नव्हे!) धनादी वैभव असून श्रद्धापूर्वक भगवद्भजन. ॥९॥

तत्त्वज्ञ आणी उदासीन । बहुश्रुत आणी सज्जन । मंत्री आणी सगुण । नीतिवंत ।।१०।।

वेदान्तवेत्ता असून विद्येचा दर्प नाही, बहुश्रुतपणाच्या जोडीला नीतिमत्ता, अधिकारपदावर असूनही नीतिमान व सद्‌गुणी. ।।१०।।

साधु पवित्र पुण्यसीळ । अंतरशुद्ध धर्मात्मा कृपाळ । कर्मनिष्ठ स्वधर्में निर्मळ । निर्लोभ अनुतापी ।।११।।

साधूप्रमाणें पवित्र व पुण्यवान, मनाने निर्मळ, धर्माचे आदरपूर्वक अनुष्ठान, कृपाळू, स्वकर्माशी निष्ठा, व स्वधर्मपालनाने चित्तशुद्ध झालेला निर्लोभी व गतायुष्यातील काही दोषांमुळे आयुष्य सार्थकी लागले नाही अशी खंत बाळगणारा. ।।११।।

गोडी आवडी परमार्थप्रीती । सन्मार्ग सत्क्रिया धारणा धृती । श्रुति स्मृती लीळा युक्ति । स्तुती मती परीक्षा ।।१२।।

पूर्वसुकृताने परमार्थाची गोडी, श्रवणाने त्याविषयी निर्माण झालेली आवड व त्यात रमल्याने निर्माण झालेले प्रेम, संतांनी घालून दिलेल्या मार्गाने वाटचाल, सदाचार, स्मरणशक्ती, धैर्य, श्रुतिस्मृतींचे अर्थ सहज आकलन होण्यासारखी तीक्ष्ण तर्कबुद्धी, जे चांगले दिसेल त्याची स्तुती व स्वत:च्या बुद्धीची सतत निरनिराळ्या कसोट्यांवर परीक्षा पहाणे. (इतरांचीही परीक्षा) ।।१२।।

दक्ष धूर्त योग्य तार्किक । सत्य साहित्य नेमक भेदक । कुशळ चपळ चमत्कारिक । नाना प्रकारें ।।१३।।

कर्तव्याविषयी तत्पर, चाणाक्ष, योग्य निष्कर्षाकडे नेणारा तर्क करणारा, सत्याचरणी, वाङ्मयाचा चहाता, नित्यनेम सांभाळणारा, वर्मज्ञ, अनेक बाबतीत कुशल, चलाख व सामान्यांना चकित करणारे व्यक्तिमत्त्व. ।।१३।।

आदर सन्मान तार्तम्य जाणे । प्रयोग समयो प्रसंग जाणे । कार्याकारण चिन्हें जाणें । विचक्षण बोलिका ।।१४।।

कोणाचा आदर सत्कार कसा करावा ह्याची जाण, कोणत्या प्रसंगी, कोणत्या वेळी नेमके काय करावे ह्याचे ज्ञान, काय करावे व काय करू नये हे समजणे, व मार्मिक वक्तृत्व ही सद्‌विद्येची लक्षणे होत. ।।१४।।

सावध साक्षेपी साधक । आगमनिगमशोधक । ज्ञानविज्ञान बोधक । निश्चयात्मक ।।१५।।

साधनेविषयी जागरूक राहून सतत साधना, वेदवेदान्ताचा मूलगामी अभ्यास व ज्ञान व विज्ञान ह्यांचे स्वरूप निश्चयपूर्वक समजावून सांगणे. ।।१५।।

पुरश्चरणी तीर्थवासी । दृढव्रती कायाक्लेसी । उपासक निग्रहासी । करूं जाणे ।।१६।।

पुरश्चरणांची आवड, तीर्थक्षेत्रांचे श्रद्धापूर्वक दर्शन, प्रसंगी शरीराला क्लेश झाले तरी निश्चयाने व्रते चालविणें, विधिपूर्वक उपासना व शमदमांचा अभ्यास करणे. ।।१६।।

सत्यवचनी शुभवचनी । कोमळवचनी येकवचनी । निश्चयवचनी सौख्यवचनी । सर्वकाळ ।।१७।।

सत्य व शुभ असेल ते बोलणे, गोड शब्दांनी हळुवार बोलणे, एकदा बोलल्याचा निश्चयपूर्वक पाठपुरावा करणे (शब्द न फिरवणे), सतत सर्वांना सुखकारक वाटेल असे बोलणे (सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात्–तैत्ति). ।।१७।।

वासनातृप्त सखोल योगी । भव्य सुप्रसन्न वीतरागी । सौम्य सात्विक शुद्धमार्गी । नि:कपट निर्वेसनी ।।१८।।

वासना निवृत्ती, समाधीपर्यंत योगाभ्यास, भव्य देहयष्टी, प्रसन्नचित्त, विरक्त, वाणी, दृष्टी, हावभाव इ. सौम्य, सत्त्वगुण, सदाचरण, निष्कपट व व्यसनराहित्य. ।।१८।।

सुगड संगीत गुणग्राही । अनापेक्षी लोकसंग्रही । आर्जव सख्य सर्वहि । प्राणीमात्रांसी ।।१९।।

चतुर, संगीत शास्त्राचा जाणकार, इतरांचे गुण ओळखून त्यांचे कवतुक करणारा, निरपेक्ष बुद्धीने लोक-संग्रह करणारा, सर्व जीवांशी सरळपणे व सख्यत्वाने वागणारा सद्विद्यासंपन्न असतो. ॥१९॥

द्रव्यसुची दारासुची । न्यायसुची अंतरसुची । प्रवृत्तिसुची निवृत्तिसुची । सर्वसुची निःसंगपणें ।।२०।।

सन्मार्गाने द्रव्य मिळविणे, पत्निनिष्ठ/पतिनिष्ठ, न्यायाने वागणे, शुद्ध अन्त:करण, व्यवहार व परमार्थ शुद्धतेने करणे. संगरहित असल्याने सदा पवित्र. ॥२०॥

मित्रपणें परहितकारी । वाग्माधुर्य परशोकहारी । सामर्थ्यपणें वेत्रधारी । पुरुषार्थें जगमित्र ।।२१।।

दुसऱ्या कोणाचेही मित्राप्रमाणें हित पाहणारा, वाणीने गोड बोलून दुसऱ्यांना शोकातून बाहेर काढणारा, सामर्थ्याची सर्व साधने असून स्वत:च्या पुरुषार्थाने जगाचे कल्याण करणारा. ॥२१॥

संशयछेदक विशाळ वक्ता । सकळ क्लृप्त असोनि श्रोता । कथानिरुपणीं शब्दार्था । जाऊंच नेदी ।।२२।।

सर्वव्यापक किंवा सर्वंकष वक्तृत्वाने अनेकांच्या अनेक शंका फेडणारा, सर्वज्ञ असूनही दुसऱ्याचे शांतपणे ऐकून घेणारा, व कीर्तन-प्रवचन करू लागला असता विषय सोडून न भरकटणारा. ॥२२॥

वेवादरहित संवादी । संगरहित निरोपाधी । दुराशारहित अक्रोधी । निर्दोष निर्मत्सरी ।।२३।।

संवाद करीत असता वर्दळीवर न येणे, कोठेही आसक्त नसल्याने उपाधी न चिकटलेला, फार मोठ्या आशा बाळगलेल्या नसल्याने त्या पूर्ण न झाल्यास इतर संतापतात तसे न संतापणे, दोषरहित व कोणाचाही मत्सर न करणे. ॥२३॥

विमळज्ञानी निश्चयात्मक । समाधानी आणि भजक । सिद्ध असोनी साधक । साधन रक्षी ।।२४।।

शुद्ध ब्रह्माचे संशय व विपर्ययरहित ज्ञान, नित्य समाधान, ईश्वरोपासना, स्वत: सिद्ध असूनही इतर साधकांना आदर्श घालण्यासाठी व त्या साधनामार्गाचे रक्षण करण्यासाठी स्वत: साधना करणे. ॥२४॥

सुखरूप संतोषरूप । आनंदरूप हास्यरूप । ऐक्यरूप आत्मरूप । सर्वत्रांसी ।।२५।।

'सुखरूप आत्मा मी आहे' असे ज्ञान व त्यामुळे सतत संतुष्टता, मंद स्मिताच्या रूपाने प्रगट होणारा आत्मानंद व ह्या दोन्हीमुळे जीवमात्रांचा जणू आत्माच असल्याप्रमाणें सर्वांच्यात मिसळून राहणे व त्यांना सुखी करणे. ॥२५॥

भाग्यवंत जयवंत । रुपवंत गुणवंत । आचारवंत क्रियावंत । विचारवंत स्थिती ।।२६।।

ज्याचे जीवन भाग्य व विजयाने समृद्ध आहे, व्यक्तिमत्त्व भव्यरूप, सद्गुण, सदाचार, सत्क्रिया व सद्विचाराने शोभून दिसते. ॥२६॥

येशवंत कीर्तिवंत । शक्तिवंत सामर्थ्यवंत । वीर्यवंत वरदवंत ।सत्यवंत सुकृती ।।२७।।

यश, कीर्ती, देहसामर्थ्य, सत्तासामर्थ्य, संघर्षाचे सामर्थ्य, कृपा करणे, सत्याचरण, सदाचार. ॥२७॥

विद्यावंत कळावंत । लक्ष्मीवंत लक्ष्णवंत । कुळवंत सुचिष्मंत । बळवंत दयाळु ।।२८।।

विद्या, कला, संपत्ती, सुलक्षणे, उत्तम कुळपरंपरा, पावित्र्य, बलवान देह व दयाळूपणा. ॥२८॥

युक्तिवंत गुणवंत वरिष्ठ । बुद्धिवंत बहुधारिष्ट । दीक्षावंत सदा संतुष्ट । निस्पृह वीतरागी ।।२९।।

प्रत्येक कामात युक्तीचा वापर, सद्गुणसंपन्न, श्रेष्ठ दर्जाचे व्यक्तिमत्व, तैलबुद्धी, धाडस, आध्यात्मिक दीक्षा घेतलेला, सतत संतुष्ट, नि:स्पृह, विरक्त. ॥२९॥

असो ऐसे उत्तम गुण । हें सद्विद्येचें लक्षण । अभ्यासाया निरूपण । अल्पमात्र बोलिलें ।।३०।।

अशी ही उत्तमगुणांनी समृद्ध असलेली सद्विद्या आहे. ती संपादन करण्यासाठी थोडक्यात सांगितली. ॥३०॥

रूप लावण्य अभ्यासितां न ये । सहज गुणास न चले उपाये । कांहीं तरी धरावी सोये । अगांतुक गुणाची ।।३१।।

देहाची आकृती, वर्ण, सौंदर्य ह्यांसारख्या गोष्टी मिळविता येत नाहीत. बुटकेपणा, कुरूपता इत्यादिकांवर उपाय करणे शक्य नाही. पण सद्‌गुणांची संपत्ती मात्र कमाविता येते. म्हणून त्यासाठी थोडा तरी प्रयत्न करावा. हळूहळू त्या दिशेने वाटचाल करावी. ॥३१॥

ऐसी हे सद्विद्या बरवी । सर्वत्रांपासी असावी । परी विरक्तपुरुषें अभ्यासावी । अगत्यरुप ।।३२।।

अशी ही अतिकल्याणकारक सद्विद्या सर्वांनी कमवावी. पण विरक्त महंतापाशी तर ती असलीच पाहिजे. कारण तो समाजासमोर आदर्श असतो. ॥३२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सद्विद्यानिरुपणनाम' समास आठवा.

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सद्विद्यानिरूपण' नावाचा आठवा समास समाप्त.

दशक दुसरा : मूर्खलक्षणांचा

समास नववा : विरक्तलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

ऐका विरक्तांची लक्षणें । विरक्तें असावें कोण्या गुणें । जेणें आंगी सामर्थ्य बाणें । योगियाचें ।।१।।

आता विरक्ताजवळ वैराग्याचे कोणते गुण असावेत ते ऐका. योगसाधनेसाठी आवश्यक ते सामर्थ्य वैराग्यामुळे मिळते. ॥१॥

जेणें सद्कीर्ति वाढे । जेणें सार्थकता घडे । जेणेंकरिता महिमा चढे । विरक्तांसी ।।२।।

वैराग्यामुळे उत्तम कीर्ती, जीवनाचे सार्थक व वैराग्याचे सतत सांगितले गेलेले माहात्म्य विरक्ताला प्राप्त होते. ॥२॥

जेणें परमार्थ फावे । जेणें आनंद हेलावे । जेणें विरक्ति दुणावे । विवेकेंसहित ।।३।।

वैराग्यामुळे परमार्थ सिद्धीला जातो, अन्त:करणात आनंदाच्या लाटा येत राहतात व विवेकासह असलेले वैराग्य सहजच वाढीला लागते. वैराग्याचे महत्त्व पटले की ते वाढते. ॥३॥

जेणें सुख उचंबळे । जेणें सद्विद्या वोळे । जेणें भाग्यश्री प्रबळे । मोक्षेंसहित ।।४।।

विरक्तीमुळे सुखाच्या लहरी येतात, सद्विद्या हस्तगत होते व मोक्षासह भाग्यलक्ष्मी बळकट होते. दृढ होते. ॥४॥

मनोरथ पूर्ण होती । सकळ कामना पुरती । मुखीं राहे सरस्वती । मधुर बोलावया ।।५।।

मनोराज्यांना पूर्णविराम मिळतो, सर्व इच्छा 'पुरे पुरे' झाल्याने मावळतात व मंगलकारक शब्द बोलण्यासाठी वाणीवर सरस्वती स्थिर होते. ॥५॥

हें लक्षणें श्रवण कीजे । आणि सदृढ जीवीं धरिजे । तरी मग विख्यात होईजे । भूमंडळीं ।।६।।

अशी ही लक्षणें नीट ऐकून बुद्धीवर ठसली तर ह्या जगात असा विरक्त कीर्तिसंपन्न होतो. ॥६॥

विरक्तें विवेकें असावें । विरक्तें अध्यात्म वाढवावें । विरक्तें धारिष्ट धरावें । दमनविषईं ।।७।।

विरक्ताने विवेकाची कास कधीच सोडू नये. विवेकावाचून वैराग्य केवळ हट्टीपणात मोडते. विरक्ताने समाजात अध्यात्म वाढविण्याची जबाबदारी उचलावी. इंद्रियांच्या विषयाकडील ओढी आवरण्यासाठी धैर्याने रहावे. ॥७॥

विरक्तें राखावें साधन । विरक्तें लावावें भजन । विरक्तें विशेष ब्रह्मज्ञान । प्रगटवावें ।।८।।

विरक्ताने आपली नियोजित साधना कटाक्षाने करावी, इतरांना उपासनेला प्रवृत्त करावे व विशेष करून वेदान्त-शास्त्राचा प्रसार करावा. ॥८॥

विरक्तें भक्ति वाढवावी । विरक्ते शांती दाखवावी । विरक्तें येत्नें करावी । विरक्ती आपुली ।।९।।

विरक्ताने भक्तिमार्ग प्रशस्त करावा व अधिकाधिक लोकांना बरोबर घेऊन जावे. त्याचेपाशी पराशांती असावी व त्याने स्वत:च्या वैराग्यवृत्तीला सांभाळून असावे. ॥९॥

विरक्तें सद्क्रिया प्रतिष्ठावी । विरक्तें निवृत्ति विस्तारावी । विरक्तें नैराशता धरावी । सदृढ जिवेंसी ।।१०।।

विरक्ताने सत्कर्माचे माहात्म्य वाढवावे, निवृत्तीचा प्रसार करावा व स्वत:ची अनासक्ती जीवापाड जपावी. ॥१०॥

विरक्तें धर्मस्थापना करावी । विरक्तें नीति अवलंबावी । विरक्तें क्ष्मा सांभाळावी । अत्यादरेंसी ।।११।।

विरक्ताने समाजाला धर्माचे पालन करण्यास प्रवृत्त करावे, स्वत:चे वर्तन नीतीनुसारी असावे व क्षमा हा स्वत:चा धर्म आहे असे लक्षात घेऊन क्षमाशील रहावे. ॥११॥

विरक्तें परमार्थ उजळावा । विरक्तें विचार शोधावा । विरक्तें सन्निध ठेवावा । सन्मार्ग सत्वगुण ।।१२।।

परमार्थाला लागलेली जळमटे विरक्ताने झटकावीत, मिळेल तेथून अध्यात्मविचार संकलित करावेत व सन्मार्ग व सत्त्वगुणांच्या आधाराने जीवन जगावे. ॥१२॥

विरक्तें भाविकें सांभाळावी । विरक्तें प्रेमळें निववावीं । विरक्तें साबडीं नुपेक्षावीं । शरणागतें ।।१३।।

भाविकांचे भाव विरक्ताने जपावेत, प्रेमळांना गोंजारावे व साध्याभोळ्यांकडे दुर्लक्ष न करता त्यांना हवा असलेला आधार द्यावा. ॥१३॥

विरक्तें असावें परम दक्ष । विरक्तें असावें अंतरसाक्ष । विरक्तें वोढावा कैपक्ष । परमार्थाचा ।।१४।।

विरक्ताने कार्याविषयी जागरूक व तत्पर असावे, सर्वांचे मनोगत जाणून घ्यावे व परमार्थाच्या बाजूने ठामपणे उभे राहावे. ॥१४॥

विरक्तें अभ्यास करावा । विरक्तें साक्षेप धरावा । विरक्तें वगत्रृत्वें उभारावा । मोडला परमार्थ ।।१५।।

विरक्ताने अध्यात्मशास्त्राचा व्यासंग करावा, प्रयत्नांचे सातत्य सोडू नये व आपल्या वक्तृत्वाच्या कौशल्याने मोडकळीस आलेला परमार्थ पुन्हा उभा करावा. ॥१५॥

विरक्तें विमळज्ञान बोलावें । विरक्तें वैराग्य स्तवीत जावें । विरक्ते निश्चयाचें करावें । समाधान ।।१६।।

शुद्ध परमार्थ सांगावा, वैराग्याचे माहात्म्य सांगावे व ह्या मार्गातील व्यक्तींना परमार्थ शास्त्राची स्पष्ट शिकवण देऊन त्यांच्या बुद्धीतील शंकाकुशंका नष्ट कराव्यात. ॥१६॥

पर्वें करावी अचाटें । चालवावीं भक्तांची थाटे । नाना वैभवें कचाटे । उपासनामार्ग ।।१७।।

पर्वकाळात मोठमोठे उत्सव करून घ्यावेत, पारायणासारखे भक्तीचे सोहोळे थाटामाटात करून समाजाला भक्तीकडे प्रवृत्त करावे व निरनिराळ्या उपासना प्रकारांचा झगमगाट समाजापुढे ठेवावा. ॥१७॥

हरिकिर्तनें करावीं । निरूपणें माजवावीं । भक्तिमार्गें लाजवावीं । निंदक दुर्जनें ।।१८।।

कीर्तन, प्रवचन, भजनांचे कार्यक्रम करावेत, भव्य अभ्यास वर्गांचे आयोजन करावे व असा भक्तिमार्गाचा हा थाटमाट दाखवून भक्तीची निंदा करणारे दुर्जन खजील करावेत. ॥१८॥

बहुतांस करावें परोपकार । भलेपणाचा जीर्णोद्धार । पुण्यमार्गाचा विस्तार । बळेंचि करावा ।।१९।।

अनेकांना अनेक प्रकारे मदत करावी, जे जे चांगले आहे ते ते पुढे आणावे व किंचित सक्तीने सुद्धा पुण्यमार्ग वाढवावा. ॥१९॥

स्नानसंध्या जप ध्यान । तीर्थयात्रा भगवद्भजन । नित्यनेम पवित्रपण । अंतरशुद्ध असावें ।।२०।।

स्नान, संध्या, जप, ध्यान, तीर्थयात्रा व भजन करीत असावे. सर्व पावित्र्य सांभाळून नित्यनेम करून अंत:करण शुद्ध ठेवावे. ॥२०॥

दृढनिश्चयो धरावा । संसार सुखाचा करावा । विश्व जन उद्धरावा । संसर्गमात्रें ।।२१।।

'आपल्याला मुक्त व्हावयाचे आहे,' हा निश्चय सतत सांभाळून संसार व्यवस्थितपणे व तो सुखाचा होईल असा करावा. आपल्याशी संबंध येणाऱ्यांना मार्गदर्शन करावे. ॥२१॥

विरक्तें असावें धीर । विरक्तें असावें उदार । विरक्तें असावें तत्पर । निरूपणविषईं ।।२२।।

विरक्ताने धैर्य सोडू नये किंवा उतावीळ होऊ नये. मन मोठे करावे व भक्ती, ज्ञान व वैराग्याविषयी कीर्तन,

प्रवचनांच्या माध्यमातून सतत प्रसार करावा. ॥२२॥

विरक्तें सावध असावें । विरक्तें शुद्ध मार्गें जावे । विरक्तें झिजोन उरवावें । सद्कीर्तीसी ।।२३।।

विरक्ताने सर्व प्रकारे सावधगिरी बाळगून धर्ममार्गाने चालावे व स्वत:ची पर्वा न करता सतत काम करून आपली सत्कीर्ती मागे ठेवावी. ॥२३॥

विरक्तें विरक्त धुंडावें । विरक्तें साधु वोळखावें । विरक्तें मित्र करावें । संत योगी सज्जन ।।२४।।

दुसऱ्या विरक्तांची पारख करून त्यांच्याशी संघटन करावे, संत योगी व सज्जनांना ओळखून त्यांचेबरोबर घनिष्ट संबंध प्रस्थापित करावेत. ॥२४॥

विरक्तें करावीं पुरश्चरणें । विरक्तें फिरावीं तीर्थाटणें । विरक्तें करावीं नानास्थानें । परम रमणीय ।।२५।।

गायत्री पुरश्चरणासारखी पुरश्चरणें करावीत, तीर्थयात्रा करीत असावे व मोडकळीला आलेली कळाहीन क्षेत्रे रमणीय करण्यासाठी त्यांचा जीर्णोद्धार करावा. ॥२५॥

विरक्तें उपाधी करावीं । आणी उदासवृत्ति न सांडावी । दुराशा जडों नेदावी । कोणयेकविषईं ।।२६।।

विरक्ताने स्वत:ची अनासक्ती सांभाळीत समाजामध्ये संघटन करावे व कोणाकडून किंवा कशाविषयी फार मोठ्या अपेक्षा ठेवू नयेत. ॥२६॥

विरक्तें असावें अंतरनिष्ठ । विरक्तें नसावे क्रियाभ्रष्ट । विरक्तें न व्हावें कनिष्ठ । पराधेनपणें ।।२७।।

त्याने आपली आत्मनिष्ठा सांभाळीत कर्मकांड करावे किंवा कार्यप्रवण रहावे. स्वत:चा चरितार्थ कोणाही एका व्यक्तीवर किंवा संस्थेवर अवलंबून ठेवून मिंधेपणा स्वीकारू नये. ॥२७॥

विरक्तें समय जाणावा । विरक्तें प्रसंग वोळखावा । विरक्त चतुर असावा । सर्वप्रकारें ।।२८।।

विरक्ताने वेळ व प्रसंगाचे भान ठेवावे व स्वत:च्या सर्वस्पर्शी बुद्धीने चातुर्याने काम करावे. ॥२८॥

विरक्तें येकदेसी नसावें । विरक्तें सर्व अभ्यासावें । विरक्तें अवघें जाणावें । ज्याचें त्यापरी ।।२९।।

एकच विचार किंवा साधनापद्धतीला चिकटून न राहता नाना विचार व साधनापद्धतींचा अभ्यास करून त्यांचे त्यांचे मूल्य व मर्यादा ओळखून असावे. ॥२९॥

हरिकथा निरूपण । सगुण भजन ब्रह्मज्ञान । पिंडज्ञान तत्त्वज्ञान । सर्व जाणावें ।।३०।।

कीर्तन, सगुणाचे भजन, वेदान्तशास्त्र, पंचीकरणाचे तत्त्वज्ञान इ. सर्वांचा अभ्यास करावा. ॥३०॥

कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग । प्रवृत्तिमार्ग निवृत्तिमार्ग । सकळ जाणावें ।।३१।।

कर्म, उपासना, ज्ञान, गुरू, प्रवृत्ती, निवृत्ती इत्यादी मार्गांचे किंवा साधना पद्धतींचे सम्यक ज्ञान असावे. ॥३१॥

प्रेमळ स्थिती उदास स्थिती । योगस्थिती ध्यानस्थिती । विदेह स्थिती सहज स्थिती । सकळ जाणावें ।।३२।।

प्रेमलक्षणाभक्ती, कडकडीत वैराग्य, अष्टांग योग, ध्यानयोग, विदेही अवस्था यांची पूर्ण कल्पना असावी. ॥३२॥

ध्वनी लक्ष मुद्रा आसनें । मंत्र यंत्र विधी विधानें । नाना मतांचें देखणें । पाहोन सांडावें ।।३३।।

ध्वनीवर बसवलेली साधना, त्राटक, व्याघ्रादी योग मुद्रा, योगासने, सिद्धमंत्र, श्रीयंत्रासारखी यंत्रे, दीक्षाविधीसारखे विधी व त्यांचे नियम यांची जाण असावी किंवा ते समजावून घेऊन सोडून द्यावेत. ॥३३॥

विरक्तें असावें जगमित्र । विरक्तें असावें स्वतंत्र । विरक्तें असावें विचित्र । बहुगुणी ।।३४।।

विरक्ताने समाजामध्ये मिळून मिसळून राहावे व तरीही आपले स्वातंत्र्य गमावून बसू नये. नाना विद्या व कला

संपादन कराव्या. ज्यायोगे सर्वांना त्याचे नवल वाटत राहावे. ॥३४॥

विरक्तें असावें विरक्त । विरक्तें असावें हरिभक्त । विरक्तें असावे नित्यमुक्त । अलिप्तपणें ।।३५।।

जाणीवपूर्वक त्याने आपले वैराग्य सांभाळावे व ईश्वरोपासना करीत राहावे. कोठेही अडकून न पडता देवकार्यासाठी स्वत:ला मोकळे ठेवावे. ॥३५॥

विरक्तें शास्त्रें धांडोळावीं । विरक्तें मतें विभांडावीं । विरक्तें मुमुक्षें लावावीं । शुद्धमार्गें ।३६।।

विरक्ताने आस्तिक व नास्तिक अशा सर्व दर्शनांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून नास्तिक व द्वैती मतांचे आवेशपूर्ण खंडन करावे. मुमुक्षूंना केवलाद्वैतावर आरूढ करावे. त्यांना त्याच मताचे महत्त्व पटवून द्यावे. (समर्थांनी भगवान शंकराचार्यांच्या मायावादाचा हिरिरीने पुरस्कार केला आहे.) ॥३६॥

विरक्तें शुद्धमार्ग सांगावा । विरक्तें संशय छेदावा । विरक्तें आपला म्हणावा । विश्वजन ।।३७।।

हाच शुद्धमार्ग सतत सर्वांचे समोर मांडावा व त्यासंबंधी निर्माण होणाऱ्या सर्व शंकांचे निराकरण करावे. समाजाच्या सर्व घटकांविषयी आपलेपणा सांभाळावा. ॥३७॥

विरक्तें निंदक वंदावें । विरक्तें साधक बोधावें । विरक्तें बद्ध चेववावे । मुमुक्षनिरूपणें ।।३८।।

विरक्ताने त्याच्या व परमार्थ मार्गाच्या निंदकांनाही आदराने वागवावे. परमार्थमार्गावरील साधकांना मार्गदर्शन करावे व बद्धांना मुमुक्षूंची लक्षणे व मोक्षसुख यासंबंधी काहीशा आक्रमकपणे उपदेश करावा. ॥३८॥

विरक्तें उत्तम गुण घ्यावे । विरक्तें अवगुण त्यागावे । नाना अपाय भंगावे । विवेकबळें ।।३९।।

सद्गुण आत्मसात करावेत, अवगुणांचा त्याग करावा व विवेकाच्या आधाराने सर्व प्रकारचे नुकसान टाळावे. ॥३९॥

ऐसीं हें उत्तम लक्षणें । ऐकावीं येकाग्र मनें । याचा अव्हेर न करणें । विरक्तपुरुषें ।।४०।।

अशी ही सर्व उत्तम लक्षणे विरक्ताने मनापासून ऐकून दुर्लक्ष न करता अंगी बाणवण्याचा प्रयत्न करावा. ॥४०॥

इतुकें बोलिलें स्वभावें । त्यात मानेल तितुकें घ्यावें । श्रोतीं उदास न करावें । बहु बोलिलें म्हणौनी ।।४१।।

‘अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी’ यानुसार सर्व लक्षणे सहजपणे सांगितली. ही सर्व लक्षणे अवलंबिणे कठीण आहे असे वाटून श्रोत्याने निराश न होता त्यातील पटतील व मानवतील तेवढी स्वीकारावीत. ॥४१॥

परंतु लक्षणें न घेतां । अवलक्षणें बाष्कळता । तेणें त्यास पढतमूर्खता । येवों पाहे ।।४२।।

परंतु त्या सर्वांचा स्वीकार केला नाही, तर वाईट लक्षणे तशीच राहून माणूस उथळ, संकुचित, टाकाऊ व फजीतखोर होतो व ‘ऐकण्यात सुलक्षणे व आचरणात कुलक्षणे’ असा पढतमूर्ख बनतो. ॥४२॥

त्या पढतमूर्खाचें लक्षण । पुढिलिये समासीं निरूपण । बोलिलें असे सावधान– । होऊन, ऐका ।।४३।।

अशा पढतमूर्खाची लक्षणे पुढील समासात सांगितली आहेत. ती सावधपणाने ऐका. ॥४३॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ‘विरक्तलक्षणनाम’ समास नववा.
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील ‘विरक्तलक्षण’ नावाचा नववा समास समाप्त.

दशक दुसरा : मूर्खलक्षणांचा

समास दहावा : पढतमूर्खलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

मागां सांगितलीं लक्षणें । मूर्खाआंगीं चातुर्य बाणे । आतां ऐका शाहाणे । असोनि मूर्ख ।।१।।

आतापर्यंत जी मूर्ख, सद्विद्या इ. लक्षणे सांगितली ती ऐकून ती लक्षणे ठाऊक नसलेला सामान्य मूर्ख स्वत:ला शहाणा करू शकेल. पण आता सर्व चांगली लक्षणे चांगली माहीत असूनही तसे न वागणाऱ्याची लक्षणे ऐका. ॥१॥

तया नाव पढतमूर्ख । श्रोतीं न मनावें दुःख । अवगुण त्यागितां सुख । प्राप्त होये ।।२।।

त्याला पढतमूर्ख असे म्हणतात. त्यांची लक्षणे ऐकून श्रोत्यांनी त्रासून न जाता तशी लक्षणे असतील तर ती सोडून देऊन सुखी व्हावे. ॥२॥

बहुश्रुत आणी वित्पन्न । प्रांजळ बोले ब्रह्मज्ञान । दुराशा आणी अभिमान । धरी तो येक पढतमूर्ख ।।३।।

ज्ञानाच्या अनेक शाखांचे ज्ञान, व्युत्पत्तिशास्त्रावर प्रभुत्व, ब्रह्मविद्येचा उत्तम वक्ता असूनही लोभ व अहंकार असणारा पढतमूर्ख असतो. (लोभ व अहंकार हे मोक्षाचे वैरी आहेत.) ॥३॥

मुक्त क्रिया प्रतिपादी । सगुण भक्ति उछेदी । स्वधर्म आणी साधन निंदी । तो येक पढतमूर्ख ।।४।।

न्यायनीती व धर्माच्या मर्यादा न बाळगण्याचे समर्थन, सगुण उपासनांची टिंगलटवाळी व स्वधर्मपालन व प्रत्यक्ष साधन यांची निंदा करतो. ॥४॥

आपलेन ज्ञातेपणें । सकळांस शब्द ठेवणें । प्राणीमात्रांचें पाहे उणें । तो येक पढतमूर्ख ।।५।।

आपणच काय ते ज्ञानी असल्याच्या अभिमानामुळे सर्वांनाच नावे ठेवणारा व प्रत्येकात काहीतरी दोष काढीत बसणारा तो पढतमूर्ख. ॥५॥

शिष्यास अवज्ञा घडे । कां तो संकटी पडे । जयाचेनि शब्दें मन मोडे । तो येक पढतमूर्ख ।।६।।

ज्या आज्ञा पाळता येणार नाहीत व पाळतांना अनेक प्रकारे त्रास होईल अशा आज्ञा शिष्याला देणारा व बोलून इतरांची मने दुखविणारा. ॥६॥

रजोगुणी तमोगुणी । कपटी कुटिल अंतःकर्णी । वैभव देखोन वाखाणी । तो येक पढतमूर्ख ।।७।।

बुद्धीवर रजोगुण व तमोगुणाचा पगडा, पोटात एक ओठावर दुसरेच, कुटाळक्या करणारा व अशाचेही वैभव पाहून त्याचेकडून काही लाभ होण्यासाठी तोंडभरून स्तुती करणारा. ॥७॥

समूळ ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवि जो दूषण । गुण सांगतां अवगुण । पाहे तो येक पढतमूर्ख ।।८।।

संपूर्ण ग्रंथाचे यथाशास्त्र अध्ययन केल्याशिवाय ग्रंथाला नावे ठेवणारा व त्यातील चांगल्या गोष्टी कोणी सांगू लागला तर त्यांनाही वाईट म्हणणारा. ॥८॥

लक्षणें ऐकोन मानी वीट । मत्सरें करी खटपट । नीतिन्याय उद्धट । तो येक पढतमूर्ख ।।९।।

कोणाच्या सद्‌गुणांचे वर्णन ऐकून त्रासून जाणारा व त्याचा मत्सर वाटून आपलेच श्रेष्ठत्व सिद्ध करण्याची खटपट करणारा. कोणी न्यायनीतीचा उपदेश करू लागला, तर उर्मटपणाने तो ऐकूनही न घेणारा. ॥९॥

जाणपणें भरीं भरे । आला क्रोध नावरे । क्रिया शब्दास अंतरे । तो येक पढतमूर्ख ।।१०।।

स्वत: सर्वज्ञ असल्याच्या कल्पनेने धुमसत राहून सर्वांना आव्हाने देणारा, कोणी प्रतिकार केल्यास अनावर

रागावणारा व वागणे व बोलणे यांत विसंगती असणारा. ॥१०॥

वक्ता अधिकारेंवीण । वगत्रृत्वाचा करी सीण । वचन जयाचें कठीण । तो येक पढतमूर्ख ।।११।।

व्यासंग व अनुभव नसताना 'वक्ता' म्हणून मान्यतेची अपेक्षा, अधिकारी वक्त्याचे वक्तृत्व ऐकून त्रासून जाणारा व कठोर शब्दाने ताडन करणारा. ॥११॥

श्रोता बहुश्रुतपणें । वक्तयास आणी उणें । वाचाळपणाचेनि गुणें । तो येक पढतमूर्ख ।।१२।।

एखाद्या श्रोत्याने अनेक शास्त्रांचा अभ्यास केलेला असतो. तो श्रवणाला बसल्यावर आपल्या तोंडाळ स्वभावामुळे वक्त्याच्या विषयमांडणीतील दोष दाखवून त्याचा उपमर्द करतो. तो श्रोता पढतमूर्ख होय. ॥१२॥

दोष ठेवीं पुढिलांसी । तेंचि स्वयें आपणापासीं । ऐसें कळेना जयासी । तो येक पढतमूर्ख ।।१३।।

पूर्वज किंवा आपल्याहून श्रेष्ठांच्या ठिकाणी असलेले दोष दाखविताना तेच दोष स्वत:जवळ आहेत हे विसरणारा. ॥१३॥

अभ्यासाचेनि गुणें । सकळ विद्या जाणे । जनास निवऊं नेणें । तो येक पढतमूर्ख ।।१४।।

मोठा व्यासंग असल्याने अनेक विद्या जाणतो. पण त्या विद्या दुसऱ्यांना शिकवून त्यांचे समाधान करता न येणारा. ॥१४॥

हस्त बांधीजे ऊर्णतंते । लोभें मृत्य भ्रमरातें । ऐसा जो प्रपंची गुंते । तो येक पढतमूर्ख ।।१५।।

वास्तविक हत्तीला कोळ्याच्या धाग्याने जखडून ठेवणे अशक्य आहे. लाकडे फोडणाऱ्या भुंग्याला कमळात अडकविणे कधीच शक्य नाही. त्याप्रमाणे खरे तर मायिक प्रपंचामध्ये जीवाला अडकण्याचे काहीच कारण नाही. हे शास्त्र ठाऊक असूनही प्रपंचासक्त असणारा माणूस पढतमूर्ख ठरतो. 'ब्रह्म सत्य जगत् मिथ्या' अशी घोकंपट्टी उपयोगी पडत नाही. हत्तीनेच जर आपण कोळ्याच्या धाग्याने बांधलो गेलो, असे अज्ञानाने ठरविले तर त्याला कोण सोडवणार? भुंगा मधाच्या लोभानेच कमळात गुंतून पडतो. त्याप्रमाणे पढतमूर्ख पंडित ब्रह्मविद्या माहीत असूनही अज्ञान व विषयलोभाने प्रपंचात अडकून पडतो. ॥१५॥

स्त्रियांचा संग धरी । स्त्रियांसी निरूपण करी । निंद्य वस्तु आंगिकारी । तो येक पढतमूर्ख ।।१६।।

सतत स्त्रीच्या अनुसंधानात राहून त्यांच्याच घोळक्यात रमणारा, स्त्रियांमध्येच प्रवचन-कीर्तन करण्यात रंगणारा व गुटखा, भांग, चोरीचा माल इत्यादी बाळगणारा. ॥१६॥

जेणें उणीव ये आंगासी । तेंचि दृढ धरी मानसी । देहबुद्धि जयापासीं । तो येक पढतमूर्ख ।।१७।।

ज्याने आपली प्रतिष्ठा व लौकिकाला तडा जाईल त्याचाच ध्यास धरणारा व 'मी देह' असा ज्याचा दृढ निश्चय आहे. ॥१७॥

सांडूनियां श्रीपती । जो करी नरस्तुती । कां दृष्टीं पडिल्यांची कीर्ती । वर्णी तो येक पढतमूर्ख ।।१८।।

श्रीविष्णू हेच एक स्तुती करण्यास योग्य आहेत. त्यांची स्तुती न करता समोर येईल त्या सामान्य माणसाची तोंड भरून स्तुती करतो. (स्वार्थासाठी) ॥१८॥

वर्णी स्त्रियांचे आवेव । नाना नाटकें हावभाव । देवा विसरे जो मानव । तो येक पढतमूर्ख ।।१९।।

काहीतरी निमित्त करून स्त्रियांच्या अवयवांचे खुलवून वर्णन करतो, निरूपणात व दैनंदिन व्यवहारात नाटकीपणाने बोलतो व हावभाव करतो व ईश्वराचा ज्याला विसर पडतो तो पढतमूर्ख. ॥१९॥

भरोन वैभवाचे भरीं । जीवमात्रास तुच्छ करी । पाषांडमत थावरी । तो येक पढतमूर्ख ।।२०।।

स्वत:च्या वैभवाच्या धुंदीत इतर सर्वांना तुच्छ समजतो व निरीश्वरवादाच्या प्रचाराचा धडाका लावतो. ॥२०॥

वित्पन्न आणी वीतरागी । ब्रह्मज्ञानी माहायोगी । भविष्य सांगों लागे जगीं । तो येक पढतमूर्ख ।।२१।।

स्वत: व्युत्पत्तिशास्त्रात प्रवीण, विरक्त, वेदान्तविद्येचा जाणकार व योगाभ्यास करणारा असूनही कुंडली किंवा हात पाहून लोकांना भविष्य सांगणारा. ('भविष्यकथन' या कल्पनेतच जगत् सत्यत्व व देहतादात्म्य यांचा सहज समावेश आहे.) ॥२१॥

श्रवण होतां अभ्यांतरी । गुणदोषाची चाळणा करी । परभूषणें मत्सरी । तो येक पढतमूर्ख ।।२२।।

दुसऱ्या वक्त्याचे निरूपण ऐकता ऐकताच मनामध्ये त्याच्या गुणदोषांचा विचार करून त्यातील गुण लक्षात येताच मत्सर जागा होतो. ॥२२॥

नाहीं भक्तीचें साधन । नाहीं वैराग्य ना भजन । क्रियेविण ब्रह्मज्ञान । बोले तो येक पढतमूर्ख ।।२३।।

स्वत: कोणतीच उपासना व व्रतवैकल्ये न करणे, वैराग्याचा पत्ता नसणे, भजन न आवडणे व ब्रह्मज्ञानाची साधनाशून्य बडबड करीत राहणे ही पढतमूर्खाची लक्षणे आहेत. ॥२३॥

न मनी तीर्थ न मनी क्षेत्र । न मनी वेद न मनी शास्त्र । पवित्र कुळीं जो अपवित्र । तो येक पढतमूर्ख ।।२४।।

तीर्थ, क्षेत्र, वेद, धर्मशास्त्र यांतील कशालाच किंमत न देणारा व पवित्र कुळात जन्माला येऊन अपवित्रपणे वागणारा. ॥२४॥

आदर देखोनि मन धरी । कीर्तीविण स्तुती करी । सर्वेचि निंदी अनादरीं । तो येक पढतमूर्ख ।।२५।।

जो स्वत:ला आदराने वागवतो त्यावर खूष होतो, काहीच योग्यता नसताना एखाद्याची उथळपणे स्तुती करतो व पाठोपाठ त्याची निंदाही करून अपमान करतो तो पढतमूर्ख. ॥२५॥

मागें येक पुढें येक । ऐसा जयाचा दंडक । बोले येक करी येक । तो येक पढतमूर्ख ।।२६।।

दिसायला एक व असायला दुसरेच, बोलणे एक व करणे भलतेच असा जणू त्याचा नियमच! ॥२६॥

प्रपंचविशीं सादर । परमार्थी ज्याचा अनादर । जाणपणें घे अधार । तो येक पढतमूर्ख ।।२७।।

प्रपंचाविषयी अत्यंत उत्साही व तत्पर, परमार्थाकडे पूर्ण दुर्लक्ष व जीवनाची इतिकर्तव्यता कशात आहे हे ऐकून ठाऊक असूनही अविद्येच्या अंधारात राहणारा. ('अधार' या पाठाऐवजी 'आधार' असा पाठ आहे. 'आपल्या या वागण्याचे ग्रंथांचा आधार सोयिस्करपणे घेऊन समर्थन करतो' असा अर्थ करावा.) ॥२७॥

येथार्थ सांडून वचन । जो रक्षून बोले मन । ज्याचें जिणें पराधेन । तो येक पढतमूर्ख ।।२८।।

जे जसे आहे तसे न बोलता त्यातील गैरसोयीचा भाग टाळून बोलणे व दुसऱ्याच्या तंत्राने जगत राहणे. ॥२८॥

सोंग संपाधी वरीवरी । करूं नये तेंचि करी । मार्ग चुकोन भरे भरीं । तो येक पढतमूर्ख ।।२९।।

आपण कोणी संतमहंत आहोत असा देखावा निर्माण करून प्रत्यक्षात मात्र विपरीत वागतो व गैरमार्गाने जाऊनही त्याचेच हट्टाने समर्थन करीत राहतो, तो पढतमूर्ख. ॥२९॥

रात्रंदिवस करी श्रवण । न संडी आपले अवगुण । स्वहित आपलें आपण । नेणे तो येक पढतमूर्ख ।।३०।।

सत्शास्त्रांचे सतत श्रवण करूनही आपले दुर्गुण न सोडणारा व आपले शाश्वत हित कशात आहे ते न ओळखणारा. ॥३०॥

निरूपणीं भले भले । श्रोते येऊन बैसले । क्षुद्रें लक्षुनी बोले । तो येक पढतमूर्ख ।।३१।।

स्वत: प्रवचन-कीर्तन करीत असताना श्रोत्यांमध्ये तोलामोलाचे विद्वान सज्जन बसलेले असूनही त्यांना क्षुल्लक समजून तोऱ्याने बोलणारा. त्यांचेविषयी योग्य शब्दांत किंवा नमस्कारासारख्या कृतीने आदर न दाखविणारा. ॥३१॥

शिष्य जाला अनाधिकारी । आपली अवज्ञा करी । पुन्हा त्याची आशा धरी । तो येक पढतमूर्ख ।।३२।।

अधिकार नसलेल्या व्यक्तीला शिष्य म्हणून स्वीकारतो. नंतर तो शिष्य केलेली आज्ञा धुडकावतो. तरीही आपल्या शिष्यांची संख्या कमी होईल किंवा त्यांच्याकडून होणारे लाभ बंद होतील म्हणून पुन्हा त्यांच्या मागे लागणारा. ॥३२॥

होत असतां श्रवण । देहांस आले उणेपण । क्रोधें करी चिणचिण । तो येक पढतमूर्ख ।।३३।।

कोणी अधिकारी वक्ता निरूपण करीत असता मानवी शरीराबरोबर येणारी दु:खे, त्यातील घाण, त्याची नश्वरता इत्यादींचे वैराग्य निर्माण होण्यासाठी वर्णन करतो. देहावरील प्रेमामुळे हे वर्णन सहन न होऊन जो संतापून चुळबुळ करू लागतो तो श्रोता पढतमूर्ख. ॥३३॥

भरोन वैभवाचे भरीं । सद्गुरुची उपेक्षा करी । गुरुपरंपरा चोरी । तो येक पढतमूर्ख ।।३४।।

स्वत:च्या अनेक प्रकारच्या वैभवाने (सत्ता, संपत्ती, पुत्र इ.) अहंकार निर्माण झालेला असल्याने असे वैभव नसलेल्या सद्गुरूंना तुच्छ समजणारा व त्यामुळे 'आपण त्यांचे शिष्य आहोत' असे सांगण्यास टाळणारा, लाजणारा. ॥३४॥

ज्ञान बोलोन करी स्वार्थ । कृपणा ऐसा सांची अर्थ । अर्थासाठी लावी परमार्थ । तो येक पढतमूर्ख ।।३५।।

वेदान्त, भक्ती, योग इत्यादींचे ज्ञान सांगून त्यातून आपला स्वार्थ साधणारा, कृपणाप्रमाणे संपत्ती साठविणारा व परमार्थाच्या माध्यमातून संपत्ती कमाविणारा. ॥३५॥

वर्तल्यावीण सिकवी । ब्रह्मज्ञान लावणी लावी । पराधेन गोसावी । तो येक पढतमूर्ख ।।३६।।

स्वत: तसे न वागता नुसते सांगतो, ब्रह्मज्ञानाची जणू अर्थार्जनासाठी गुंतवणूक करतो व वैराग्य स्वीकारले असूनही चरितार्थासाठी कोणावर तरी अवलंबून राहातो. ॥३६॥

भक्तिमार्ग अवघा मोडे । आपणामध्यें उपंढर पडे । ऐसिये कर्मी पवाडे । तो येक पढतमूर्ख ।।३७।।

आपल्या वागण्याबोलण्याने भक्तिमार्ग मोडून टाकतो व ज्या कृतीने स्वत:चे पितळ उघडे पडेल अशा कृती बेलाशकपणे करतो. ॥३७॥

प्रपंच गेला हातीचा । लेश नाहीं परमार्थाचा । द्वेषी देवां ब्राह्मणांचा । तो येक पढतमूर्ख ।।३८।।

हाती आलेला प्रपंच तर निघून जातो. परमार्थाला साधी सुरुवातही न करता देव व ब्राह्मणांच्या द्वेषात आयुष्य घालविणारा. ॥३८॥

त्यागावया अवगुण । बोलिलें पढतमूर्खाचें लक्षण । विचक्षणें नीउन पूर्ण । क्ष्मा केलें पाहिजे ।।३९।।

आपले अवगुण लक्षात येऊन ते सोडण्यासाठी ही पढतमूर्खाची लक्षणे सांगितली. त्यात काही कमी-अधिक बोललो असेन तर श्रोत्यांनी क्षमा करावी. ॥३९॥

परममूर्खामाजी मूर्ख । जो संसारीं मानी सुख । या संसारदु:खा ऐसें दु:ख । आणीक नाहीं ।।४०।।

जो या संसारामध्ये सुख शोधण्याचा प्रयत्न करतो तो मूर्खशिरोमणी समजावा. कारण या संसारासारखे दु:खदायक दुसरे काही नाही. ॥४०॥

तेंचि पुढें निरूपण । जन्मदु:खाचें लक्षण । गर्भवास हा दारुण । पुढें निरोपिला ।।४१।।

आता पुढील दशकात जन्माला आल्यानंतर जीवाला होणाऱ्या दु:खाचे व अत्यंत क्लेशकारक गर्भवासाचे भयानक दु:ख सांगितले जाईल. ॥४१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'पढतमूर्खनाम' समास दहावा.

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'पढतमूर्खलक्षण' नावाचा दहावा समास समाप्त.

–दशक दुसरा समाप्त–

दशक तिसरा : स्वगुणपरीक्षा

समास पहिला : जन्मदु:खनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

जन्म दु:खाचा अंकुर । जन्म शोकाचा सागर । जन्म भयाचा डोंगर । चळेना ऐसा ।।१।।

दु:ख भोगण्याची वेळ येऊन ठेपली की जीव जन्माला येतो. जन्म हा शोकाने भरलेला समुद्र व मुळीच न हलणारा भीतीचा डोंगर आहे. ॥१॥

जन्म कर्माची आटणी । जन्म पातकाची खाणी । जन्म काळाची जाचणी । निच नवी ।।२।।

जन्मल्यानंतर अखंड कर्म करून पाप-पुण्याचे भोग संपवावे लागतात. जन्मामुळेच जीव अनेक पापकर्मे करतो. काळाच्या उदरात नवे नवे छळ लपलेले असतात. ॥२॥

जन्म कुविद्येचें फळ । जन्म लोभाचें कमळ । जन्म भ्रांतीचें पडळ । ज्ञानहीन ।।३।।

मागल्या जन्मी देहतादात्म्याची कुविद्या राहून गेल्याने चालू जन्म घेण्याची पाळी आली. लोभाच्या चिखलात जन्माचे कमळ फुलते. अज्ञानरूप भ्रमाचा पडदा ज्ञानदृष्टीला सत्य पाहू देत नाही. ॥३॥

जन्म जिवासी बंधन । जन्म मृत्यासी कारण । जन्म हेंचि अकारण । गथागोवी ।।४।।

जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहणे हेच जीवदशा असेपर्यंत बंधनकारक असते. जन्मामुळेच मरावे लागते. वास्तविक जीव मूळचा ब्रह्मरूप असताना भ्रामक अविद्येमुळे (अकारण) त्याला जन्ममरणांच्या गुंतागुंतीत पडावे लागते. (गथागोवी) ॥४॥

जन्म सुखाचा विसर । जन्म चिंतेचा आगर । जन्म वासनाविस्तार । विस्तारला ।।५।।

सुखरूप आत्मा जीवात्मा म्हणून जन्माला आला की त्याला स्वत:च्या सुखरूपत्वाचा विसर पडतो. मी व माझे यांच्या विचाराने जीव चिंतेने ग्रासलेला राहतो. वासनाबीज न जळाल्याने जन्ममरण व वासना यांचे अनिवार चक्र फिरत राहते. ॥५॥

जन्म जीवाची आवदसा । जन्म कल्पनेचा ठसा । जन्म लांवेचा वळसा । ममतारूप ।।६।।

जीवाला जन्मल्यानंतर देहतादात्म्य, जगत्सत्यत्व, कर्तृत्व– भोक्तृत्व इ. अवदसा आठवत राहतात. या कल्पनांमुळेच पुन्हा जन्म मिळून ममत्वाची डाकीण त्याला झपाटते. ॥६॥

जन्म मायेचें मैंदावें । जन्म क्रोधाचें विरावें । जन्म मोक्षास आडवें । विघ्न आहे ।।७।।

मायेने भ्रम निर्माण केल्याने 'मी' जन्माला आल्यासारखे वाटते. जन्मामुळे क्रोधाला सामर्थ्य मिळून नरकाच्या दारात जावे लागते व मोक्षाला विघ्न होते ('त्रिविधं नरकस्येदं द्वारं'– गीता). ॥७॥

जन्म जिवाचे मीपण । जन्म अहंतेचा गुण । जन्म हेंचि विस्मरण । ईश्वराचें ।।८।।

जन्माला आल्याबरोबर जीव 'मी मी' असे म्हणू लागतो. त्यालाच अहंवृत्ती किंवा अहंकार असे म्हणतात. त्यामुळे जीवाचा नियामक असलेल्या ईश्वराची आठवण रहात नाही. त्याच्या नियमानुसार वागले पाहिजे हे भान रहात नाही. ॥८॥

जन्म विषयांची आवडी । जन्म दुराशेची बेडी । जन्म काळाची कांकडी । भक्षिताहे ।।९।।

जन्मल्याबरोबर शब्दादी पाच विषयांचे आकर्षण निर्माण होते. त्यांची तृष्णा जणू जीवाला जखडून टाकते. पण काळ त्या जीवाला कोवळ्या काकडीप्रमाणे क्षणार्धात फस्त करतो. ॥९॥

जन्म हाचि विषमकाळ । जन्म हेंचि वोखटी वेळ । जन्म हा अति कुश्चीळ । नर्कपतन ।।१०।।

जन्माबरोबरच प्रतिकूल काळाला सुरुवात होते. जन्माची वेळ हीच अशुभ वेळ होय. तो इतका वाईट असू शकतो की त्यामुळें नरकयातना भोगाव्या लागतात. ॥१०॥

पाहातां शरीराचें मूळ । या ऐसें नाहीं अमंगळ । रजस्वलेचा जो विटाळ । त्यामध्यें जन्म यासी ।।११।।

शरीर कोठून जन्माला आले ह्याचा शोध घेतला तर स्त्रीच्या मासिकपाळीच्या रक्तामध्ये तो होतो. ॥११॥

अत्यंत दोष ज्या विटाळा । त्या विटाळाचाचि पुतळा । तेथें निर्मळपणाचा सोहळा । केवी घडे ।।१२।।

ज्या मासिक पाळीच्या रक्तस्त्रावाला अत्यंत अशुद्ध समजले जाते त्याच रक्ताचा देह हा पुतळा तयार होतो. अशा शरीराला पावित्र्याचे मांगल्य कोठून येईल? ॥१२॥

रजस्वलेचा जो विटाळ । त्याचा आळोन जाला गाळ । त्या गाळाचेंच केवळ । शरीर हें ।।१३।।

मासिक पाळीच्या मुदतीतील वहाणारे रक्त थिजून त्याचे शरीर बनते. (हे सर्व वर्णन वैद्यकशास्त्राचे दृष्टीने पहावयाचे नसून पुन्हा पुन्हा जन्माला येण्याचा तिटकारा निर्माण व्हावा म्हणून केले आहे. पहिल्या दशकातील नरदेहस्तवनही वाचकाने लक्षात घ्यावे. वैद्यक शास्त्राची समर्थांच्या काळी झालेली व सामान्य माणसापर्यन्त (Layman) पोहोचलेली प्रगती विचारात घ्यावी लागेल. कारण ह्या दोन्हीत बरीच तफावत असते. वैद्यक शास्त्राच्या दृष्टीने समर्थांसारखे सर्व संतही सामान्यच असतात. 'संत सर्वज्ञ असतात' हे विधान व्यावहारिक नसून पारमार्थिक आहे. 'एक ब्रह्म जाणले की सर्व जाणलेलेच असते' ह्या दृष्टीने ब्रह्मज्ञ संत सर्वज्ञ असतात.) ॥१३॥

वरि वरि दिसे वैभवाचें । अंतरी पोतडें नर्काचें । जैसें झांकणें चर्मकुंडाचे । उघडितांच नये ।।१४।।

शरीर बाहेरून पाहिले तर घाटदार, बांधेसूद, गोरे, कमनीय इ. वैभवाने नटलेले दिसते. पण आत मलाशय, मूत्राशय इ. घाणच असते. चामडे कमाविण्याच्या कुंडावरील झाकण काढले की जशी घाण असते तशीच ती असते. ॥१४॥

कुंड धुतां शुद्ध होतें । यास प्रत्यईं धुईजेतें । तरी दुर्गंधी देहातें । शुद्धता न ये ।।१५।।

चांभाराचे कुंड एकदा धुतले की शुद्ध होते. पण देहाच्या आतील घाण रोज काढली तरी भरलेलीच असते. घामासारखी दुर्गंधी सतत असल्याने शरीर शुद्ध होतच नाही. ॥१५॥

अस्तीपंजर उभविला । सीरानाडीं गुंडाळिला । मेदमांसें सरसाविला । सांदोसांदी भरूनी ।।१६।।

हाडांचा पिंजरा उभा करून त्याला शिरा व नाड्यांनी बांधले. त्यावर स्नायू व चरबीचा जणू लेप दिला किंवा वेष्टण घातले. बारीक सारीक फटी व्यवस्थित भरून त्याला आकार दिला. ॥१६॥

अशुद्ध शब्दें शुद्ध नाहीं । तेंहि भरलें असे देहीं । नाना व्याधी दुःखें तेंहि । अभ्यांतरी वसतीं ।।१७।।

रक्ताला 'अशुद्ध' हा प्रतिशब्द आहे. तेच सर्व शरीरात भरलेले असते. ह्या शरीरातच अनेक विकृती व दुःख देणारे रोगजंतू इ. असतात. ॥१७॥

नर्काचें कोठार भरलें । आंत बाहेरी लिडीबिडिलें । मूत्रपोतडें जमलें । दुर्गंधीचें ।।१८।।

शरीर हे जणू नरकाचे कोठार (गोडाऊन) आहे! ते आतबाहेर खराबच असून आतील मूत्राशयात दुर्गंधी येणारे मूत्र असते. ॥१८॥

जंत किडे आणी आंतडी । नाना दुर्गंधीची पोतडी । अमुप लवथविती कातडी । कांटाळवाणी ।।१९।।

आतील आतडी ही जणू जंत, किडे व विष्ठेने भरलेली पोतडीच असतात. अनेक अवयव आपापल्या जागी स्थिर राहण्यासाठी ते निरनिराळ्या प्रकारच्या वेष्टणांनी बांधलेले असतात. ॥१९॥

सर्वांगास सिर प्रमाण । तेथें बळसें वाहे घ्राण । उठे घाणी फुटतां श्रवण । ते दुर्गंधी ने घवे ।।२०।।

मस्तक हे शरीराचे भूषण किंवा सर्वांत महत्त्वाचा अवयव आहे. पण त्या मस्तकावर सूंसूं करणारे नाक व फुटले तर घाण सहन न होण्यासारखे कान असतात. ॥२०॥

डोळां निघती चिपडें । नाकीं दाटतीं मेकडें । प्रात:काळीं घाणी पडे । मुखीं मळासारिखी ।।२१।।

डोळ्यांतून घाण बाहेर येते, नाकात मेकडे चिकटून बसतात व सकाळी तोंड धुताना घाण बाहेर पडतें. ॥२१॥

लाळ थुंका आणी मळ । पीत श्लेष्मा प्रबळ । तयास म्हणता मुखकमळ । चंद्रासारिखें ।।२२।।

लाळ, कफाचा बेडका, हिरड्यांतील घाण, आम्ल, पिवळा बेडका, इत्यादी ज्या मुखातून बाहेर येतात त्याला कवी लोक चंद्राची किंवा प्रफुल्ल कमळाची खुशाल उपमा देतात! ॥२२॥

मुख ऐसें कुश्चीळ दिसे । पोटीं विष्ठा भरली असे । प्रत्यक्षास प्रमाण नसे । भूमंडळी ।।२३।।

असे घाणेरडे तोंड, विष्ठेने भरलेली आतडी ह्यांचा सर्वांना प्रत्यक्षच अनुभव असतो. एखादे उदाहरण देऊन ते सांगण्याची गरज नाही. ॥२३॥

पोटीं घालितां दिव्यान्न । कांही विष्ठा कांही वमन । भागीरथीचें घेतां जीवन । त्याची होये लघुशंका ।।२४।।

जेवणात उत्कृष्ट अन्नपदार्थ असले तरी त्याच्या काही भागाची विष्ठा होते व काही आजार असेल तर उलटी सुद्धा होते. पवित्र गंगेचे पाणी प्यायले तरी त्याचे पुढे अपवित्र मूत्रच तयार होते. (शिवांबू पिणाऱ्यांची क्षमा मागून!) ॥२४॥

एवं मळ मूत्र आणी वमन । हेंचि देहाचें जीवन । येणेंचि देह वाढे जाण । यदर्थी संशय नाहीं ।।२५।।

एकूण मळमूत्रविसर्जन व उलटी ह्यांवरच देहाचे आरोग्य सुरळित चालते व देहाची वाढ होते ह्यात शंका नाही. ॥२५॥

पोटीं नस्तां मळ मूत्र वोक । मरोन जाती सकळ लोक । जाला राव अथवा रंक । पोटीं विष्ठा चुकेना ।।२६।।

मळ, मूत्र व उलटी ह्यांच्या विसर्जनाची व्यवस्थाच नसती तर सर्व लोक ताबडतोब मेले असते. ह्याला श्रीमंत किंवा गरीब ह्यांचा अपवाद नाही. ॥२६॥

निर्मळपणें काढूं जातां । तरी देह पडेल तत्त्वतां । एवं देहाची वेवस्ता । ऐसी असे ।।२७।।

देहातील ही घाण काढून स्वच्छ करण्याचा प्रयत्न करू म्हटले तर देहच राहणार नाही. अशी एकंदर या देहाची व्यवस्था आहे. ॥२७॥

ऐसा हा धड असतां । येथाभूत पाहों जातां । मग ते दुर्दशा सांगतां । शंका बाधी ।।२८।।

शरीर धडधाकट असताना त्याचे हे स्वरूप वाचल्यावर किंवा समजून घेतल्यावर ‘ते असे कसे असेल’ अशी शंका येतच रहाते. ॥२८॥

ऐसिये कारागृही वस्ती । नवमास बहु विपत्ती । नवहि द्वारें निरोधती । वायो कैंचा तेथें ।।२९।।

अशा प्रकारे नऊ महिनेपर्यन्त गर्भाशयाच्या तुरुंगवासात नाना कष्ट सोसावे लागतात. मुख- नासिकादि नऊ दारे बंद असतात. श्वास घेण्यासाठी हवाही नसते. ॥२९॥

वोका नरकाचे रस झिरपती । ते जठराग्नीस्तव तापती । तेणें सर्वहि उकडती । अस्थिमांस ।।३०।।

घाण वास येणारी उलटी मातेच्या जठराग्नीने तापून गर्भाचे मांस व अस्थीही तापतात. ॥३०॥

त्वचेविण गर्भ खोळे । तंव मातेसी होती डोहाळे । कटवतिक्षणें सर्वांग पोळे । तया बाळकाचें ।।३१।।

देहावरील त्वचा पुरेशी तयार न झालेल्या अवस्थेत गर्भाचे शरीर खोळीत कोंडलेले असताना गर्भवतीला डोहाळे

लागून जे तिखटकडू पदार्थ ती खाते त्याने गर्भाच्या शरीराचा दाह होतो. ॥३१॥

बांधलें चर्माचें मोटाळें । तेथें विष्ठेचें पेटाळें । रसउपाय वंकनाळें । होत असे ।।३२।।

त्वचेने बांधलेल्या गाठोड्यामध्ये विष्ठा साठलेली असून गर्भाला नाळ ह्या वाकड्या नळीने रसरूपाने पोषण होते. ॥३२॥

विष्ठा मूत्र वांती पीत । नाकीं तोंडी निघती जंत । तेणे निर्बुजलें चित्त । आतिशयेंसी ।।३३।।

विष्ठा, मूत्र, उलटी पित्ताबरोबरच नाकातोंडातून जंत निघून गर्भ अतिशय कष्टी होतो. ॥३३॥

ऐसिये कारागृहीं प्राणी । पडिला अत्यंत दाटणीं । कळवळोन म्हणे चक्रपाणी । सोडवीं येथून आतां ।।३४।।

अशा कैदेत पडलेला जीव गुदमरून त्रस्त होऊन 'मला आता ह्यातून सोडव' अशी देवाची कळवळून प्रार्थना करतो. ॥३४॥

देवा सोडविसी येथून । तरी मी स्वहित करीन । गर्भवास हा चुकवीन । पुन्हां न ये येथें ।।३५।।

'देवा, मला जर ह्यातून सोडविलेस तर माझ्या शाश्वत हिताकडे लक्ष देऊन जन्ममरणांच्या फेऱ्यातून सुटून पुन्हा गर्भाशयात येणार नाही' अशी प्रतिज्ञा करतो. ॥३५॥

ऐसी दुखवोन प्रतिज्ञा केली । तंव जन्मवेळ पुढें आली । माता आक्रंदों लागली । प्रसूतकाळी ।।३६।।

मोठ्या आक्रोशाने अशी प्रतिज्ञा केल्यानंतर योग्य वेळी प्रसूतीची वेळ आली. वेदनांनी माता तळमळू लागली. ॥३६॥

नाकीं तोंडी बैसलें मांस । मस्तकद्वारें सांडी स्वास । तेंहि बुजलें निशेष । जन्मकाळीं ।।३७।।

प्रसूतिमार्गातील मांस नाकातोंडावर दाबले जाते. श्वास जणू कोंडल्यामुळे मस्तक फोडून बाहेर पडतील असे वाटते. तेही नंतर दाबले जाते. ॥३७॥

मस्तकद्वार तें बुजलें । तेंणें चित्त निर्बुजलें । प्राणी तळमळूं लागलें । चहूंकडे ।।३८।।

टाळू दाबली गेली व त्याने गर्भाला अती त्रास होऊन तो तळमळू लागतो. ॥३८॥

स्वास उस्वास कोंडला । तेणें प्राणी जाजावला । मार्ग दिसेनासा जाला । कासावीस ।।३९।।

श्वास, उच्छवास कोंडून गर्भ गुदमरून पुढील वाट न सापडल्याने कासावीस होतो. ॥३९॥

चित्त बहु निर्बुजलें । तेणें आडभरी भरलें । लोक म्हणती आडवें आलें । खांडून काढा ।।४०।।

चित्त गोंधळून गेल्याने त्याचा मार्ग चुकतो तेव्हा सुईणी असे म्हणतात की मूल आडवे आले आहे. त्याला कापून काढा. ॥४०॥

मग ते खांडून काढिती । हस्तपाद छेदून घेती । हातां पडिलें तेंचि कापिती । मुख नासिक उदर ।।४१।।

मग ते कापण्यास सुरुवात करतात. हात, पाय, पोट, नाक इ. जे समोर दिसेल ते कापतात. (समर्थांचा काळ लक्षात घ्यावा). ॥४१॥

ऐसे टवके तोडिले । बाळकें प्राण सोडिले । मातेनेंहि सांडिलें । कळिवर ।।४२।।

अशी कापाकापी केल्यावर गर्भाचे प्राण जातात व त्या सर्व प्रकारात आईलाही मरण येते. ॥४२॥

मृत्य पावला आपण । मातेचा घेतला प्राण । दु:ख भोगिले दारुण । गर्भवासीं ।।४३।।

स्वत: मेला, आईला मारले. असे गर्भाशयात भयानक दु:ख असते. ॥४३॥

तथापी सुकृतेंकरुनी । मार्ग सांपडला योनी । तऱ्हीं आडकला जाउनी । कंठ स्कंदी मागुता ।।४४।।

परंतु एखादा गर्भ पूर्वपुण्याई असल्याने बराचसा बाहेर पडतो परंतु कंठ किंवा खांद्यापाशी अडकून राहतो. ॥४४॥

तये संकोचित पंथीं । बळेंचि वोढून काढिती । तेणें गुणें प्राण जाती । बाळकाचे ।।४५।।

तेव्हा त्या अरुंद मार्गातून त्याला जोराने ओढून बाहेर काढताना गर्भाचे प्राण जातात. ॥४५॥

बाळकाचें जातां प्राण । अंती होये विस्मरण । तेणें पूर्वील स्मरण । विसरोन गेला ।।४६।।

प्राण गेल्यावर पूर्वी केलेली प्रतिज्ञा (ओवी ३५) विसरते. ॥४६॥

गर्भी म्हणें सोहं सोहं । बाहेरी पडतां म्हणे कोहं । ऐसा कष्टी जाला बहु । गर्भवासीं ।।४७।।

गर्भाशयात 'मी ब्रह्म आहे' असे म्हणतो, पण जन्माला आल्यावर 'मी कोण?' अशा भ्रमात सापडतो. (पहा-गर्भोपनिषद) त्यामुळे जन्ममरणांच्या चक्रात अडकून अनंत दु:खे भोगत राहतो. ॥४७॥

दु:खा वरपडा होता जाला । थोरा कष्टीं बाहेरी आला । सर्वेंच कष्ट विसरला । गर्भवासाचे ।।४८।।

कोणी एखादा गर्भ गर्भाशयातील दु:खातून सुटून मोठ्या कष्टाने, प्रसूतीमार्गातून जिवंत बाहेर पडताच ते सर्व कष्ट विसरतो. ॥४८॥

सुंन्याकार जाली वृत्ती । कांहीं आठवेना चित्तीं । अज्ञानें पडिली भ्रांती । तेणें सुखचि मानिलें ।।४९।।

वृत्तीला काही समजेनासे होते. स्मरण नष्ट होते. अज्ञानामुळे भ्रम निर्माण होऊन तीच अवस्था सुखाची वाटू लागते. ॥४९॥

देह विकार पावलें । सुखदु:खे झळंबलें । असो ऐसें गुंडाळलें । मायाजाळीं ।।५०।।

देह विकारांच्या तडाख्यात सापडतो. सुखदु:खे होत राहतात. असा तो मायेच्या जाळ्यात अधिकाधिक गुरफटत जातो. ॥५०॥

ऐसें दु:ख गर्भवासीं । होतें प्राणीमात्रांसीं । म्हणोनियां भगवंतासी । शरण जावें ।।५१।।

जन्ममरणातील ही दु:खे लक्षात घेऊन माणसाने भगवन्ताला शरण जावे. ॥५१॥

जो भगवंताचा भक्त । तो जन्मापासून मुक्त । ज्ञानबळें विरक्त । सर्वकाळ ।।५२।।

जो भगवन्ताचा भक्त असतो तो जन्ममरणातून सुटतो. कारण तो त्याच्या कृपेने आत्मज्ञानपूर्वक वैराग्यसंपन्न होतो. ॥५२॥

ऐशा गर्भवासीं विपत्ती । निरोपिल्या येथामती । सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ।।५३।।

गर्भवासातील ही दु:खे मला सांगता आली तशी सांगितली. ह्यापुढील विषय लक्षपूर्वक ऐका. ॥५३॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'जन्मदु:खनिरूपणनाम' समास पहिला.
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'जन्मदु:खनिरूपण' नावाचा पहिला समास समाप्त.

दशक तिसरा : स्वगुणपरीक्षा

समास दुसरा : स्वगुणपरीक्षा (अ)

॥ श्रीराम समर्थ ॥

संसार हाचि दु:खमूळ । लागती दु:खाचे इंगळ । मागां बोलिली तळमळ । गर्भवासाची ।।१।।

शरीर व दृष्यजगत्‌रूपी हा सर्व संसार दु:खाचे कारण असून त्या दु:खरूपी निखाऱ्यांचे चटके बसतात. मागील समासात गर्भाशयात रहाण्याचे दु:ख सांगितले. ॥१॥

गर्भवासीं दु:ख जालें । तें बाळक विसरलें । पुढें वाढों लागलें । दिवसेंदिवस ।।२।।

जन्माला आल्यावर बाळ गर्भाशयातील दु:खे विसरून दिवसानुदिवस वाढू लागते. ॥२॥

बाळपणीं त्वचा कोंवळी । दु:ख होतांचि तळमळी । वाचा नाहीं तये काळीं । सुखदु:ख सांगावया ।।३।।

अर्भकावस्थेत शरीर अतिशय नाजूक असते. थोडा त्रास झाला तरी दु:ख फार होते. पण सांगता येत नसल्याने तळमळ मात्र होत राहते. ॥३॥

देहास कांही दु:ख जालें । अथवा क्षुधेनें पीडलें । तरी तें परम आक्रंदलें । परी अंतर नेणवे ।।४।।

देहाला त्रास होऊन किंवा फार भूक लागून ते रडून आकांत करीत असले तरी ते का रडते हे कोणालाच कळत नाही. ॥४॥

माता कुरवाळी वरी । परी जे पीडा जाली अंतरी । ते मायेसी न कळे अभ्यांतरीं । दु:ख होये बाळकासीं ।।५।।

आई वात्सल्याने कुरवाळते खरी, पण त्या यातना दूर होत नाहीत. कारण तिला त्याचे मन जाणता येत नाही. ॥५॥

मागुतें मागुतें फुंजे रडे । माता बुझावी घेऊन कडे । वेथा नेणती बापुडें । तळमळी जीवीं ।।६।।

ते पुन्हा पुन्हा हुंदके देऊन रडू लागल्यावर आई त्याला कडेवर घेऊन समजूत घालते. पण त्याचे दु:ख, आईला न समजल्याने त्याची तळमळ तशीच राहते. ॥६॥

नाना व्याधीचे उमाळे । तेणें दु:खें आंदोळे । रडे पडे कां पोळे । अग्निसंगें ।।७।।

त्याला अनेक रोग होतात किंवा दिव्याला हात-पाय लागून चटके बसतात व ते दु:खाने आक्रोश करून तडफडते. ॥७॥

शरीर रक्षितां नये । घडती नाना अपाये । खोडी अधांतरी होये । आवेवहीन बाळक ।।८।।

त्याला स्वत:ला सांभाळता न आल्याने अनेक प्रकारे त्रास होतो. त्याला काहीच न कळता एखादा अपघात होऊन (खोडी) अवयव निकामी होण्याचा प्रसंग येतो. ॥८॥

अथवा अपाय चुकले । पूर्व पुण्य पुढें ठाकलें । मातेस वोळखों लागलें । दिवसेंदिवस ।।९।।

ह्या सगळ्यातून पूर्वपुण्याईने ते वाचते व हळूहळू आईला ओळखू लागते. ॥९॥

क्षणभरी मातेस न देखे । तरी आक्रंदे रुदन करी दु:खें । ते समईं मातेसारिखें । आणीक कांहींच नाहीं ।।१०।।

क्षणभर जरी आई नजरेआड झाली तरी ते रडून आकांत मांडते. त्या वेळी माता हेच त्याचे सर्वस्व असते. ।।१०।।

आस करून वास पाहे । मातेविण कदा न राहे । वियोग पळमात्र न साहे । स्मरण जालियां नंतरें ।।११।।

ते आई दिसण्याची सतत वाट पहाते. आईवाचून ते क्षणभरही दूर राहू शकत नाही. आईचे स्मरण झाले की ती न दिसून मुळीच चालत नाही. ।।११।।

जरी ब्रह्मादिक देव आले । अथवा लक्ष्मीनें अवलोकिलें । तरी नवचे बुझाविलें । आपले मातेवांचूनी ।।१२।।

प्रत्यक्ष ब्रह्मदेवादी देव समोर आले किंवा लक्ष्मीने दर्शन दिले तरी आईशिवाय त्याचे कोणीही समाधान करू शकत नाही. ।।१२।।

कुरूप अथवा कुलक्षण । सकळांहूनि करंटेपण । तरी नाहीं तीसमान । भूमंडळीं कोणी ।।१३।।

आई कुरूप, कुलक्षणी व सर्वांत करंटी असली तरी तिच्याशिवाय त्याच्या दृष्टीने ह्या जगात कोणालाच किंमत नसते. ।।१३।।

ऐसें तें केविलवाणें । मातेविण दिसे उणें । रागें परतें केलें तिनें । तरी आक्रंदोनि मिठी घाली ।।१४।।

असे ते बिचारे आईवाचून पूर्ण निराधार असते. आईने रागाने त्याला दूर केले तरी ते तिलाच मिठी मारते. ।।१४।।

सुख पावे मातेजवळी । दुरी करितांचि तळमळी । अति प्रीति तयेकाळीं । मातेवरी लागली ।।१५।।

सर्व सुख एका आईत सामावलेले असते. ती जरा दूर झाली तरी त्याची तळमळ सुरू होते. त्याचे सर्व प्रेम त्या आईसाठीच असते. ।।१५।।

तंव ते मातेस मरण आलें । प्राणी पोरटें जालें । दुःखें झुर्णीं लागलें । आई आई म्हणोनी ।।१६।।

अशा स्थितीत आई अचानक मरण पावते. मूल पोरके होऊन आईच्या वियोगाच्या दु:खाने झुरणीला लागते. ।।१६।।

आई पाहातां दिसेना । दीनरूप पाहे जना । आस लागलिसे मना । आई येईल म्हणोनी ।।१७।।

आई दिसेल म्हणून सर्वत्र पाहूनही ती दिसली नाही की ते अगदी दीन झाल्याचे सर्वांनाच जाणवते. आई येईल अशी आशा बाळगूनच ते जगते. ।।१७।।

माता म्हणौन मुख पाहे । तंव ते आपुली माता नव्हे । मग हिंवासलें राहे । दैन्यवाणें ।।१८।।

आई बघण्याच्या नादात एखाद्या स्त्रीकडे पाहिले की ही आपली आई नाही हे कळताच ते हिरमुसले होते. ।।१८।।

मातावियोगें कष्टलें । तेणें मानसीं दुःख जालें । देहहि क्षीणत्व पावलें । आतिशयेंसीं ।।१९।।

मातेच्या वियोगामुळे देहाला कष्ट तर होतातच (पुरेशी काळजी घेतली जात नाही.) पण त्याहून मनाला यातना अधिक होतात. शरीर झुरून अती क्षीण होते. ।।१९।।

अथवा माताहि वांचली । मायलेंकुरा भेटी जाली । बाळदशा ते राहिली । दिवसेंदिवस ।।२०।।

जेव्हा आई जगते तेव्हा आई व मूल ह्यांचा सहवास टिकून राहतो व मुलाची बाल्यावस्था सरून पौगंडदशा येते. ।।२०।।

बाळपण जालें उणें । दिवसेंदिवस होये शाहाणें । मग ते मायेचें अत्यंत पेरुणें । होतें तें राहिलें ।।२१।।

बालदशा सरून दिवसानुदिवस त्याची बुद्धी वाढू लागल्यावर आईवर संपूर्ण अवलंबून रहाणे कमी होऊ लागले. ।।२१।।

पुढें लो लागला खेळाचा । कळप मेळविला पोरांचा । आल्यागेल्या डावाचा । आनंद शोक वाहे ।।२२।।

पुढे खेळांचा नाद लागून समवयस्क मुलांचा गट तयार झाला. खेळात डाव जिंकला तर आनंद व हारला तर दु:ख होऊ लागले. ।।२२।।

मायबापें सिकविती पोटें । तयाचें परम दुःख वाटे । चट लागली न सुटे । संगती लेंकुरांची ।।२३।।

आई-वडील पोटतिडिकेने त्याला शिक्षण देतात, त्याचा त्याला फार त्रास वाटू लागला. खेळ व सवंगडी ह्यांचा नाद सुटत नाही. ॥२३॥

लेंकुरांमध्ये खेळतां । नाठवे माता आणि पिता । तंव तेथेंहि अवचिता । दुःख पावला ।।२४।।

मुलांबरोबर खेळताना आईवडिलांची आठवणही होत नाही. पण त्या खेळातच अचानक अपघात होतो. ॥२४॥

पडिते दांत फुटला डोळा । मोडले पाय जाला खुळा । गेला माज अवकळा । ठाकून आली ।।२५।।

दात पडतात, डोळा फुटतो, पाय मोडतो. शक्तीचा मद ओसरून दैन्य येऊन वेड्यासारखी स्थिती होते. ॥२५॥

निघाल्या देवी आणी गोवर । उठलें कपाळ लागला ज्वर । पोटसुळीं निरंतर । वायगोळा ।।२६।।

देवी व गोवर येतात. डोकेदुखी, थंडीताप, पोटदुखी, वाट सरकणे (Cramps) इ. आजार होतात. ॥२६॥

लागलीं भूतें जाली झडपणी । जळीच्या मेसको मायेराणी । मुंज्या झोटिंग करणी । म्हैसोबाची ।।२७।।

भूत धरते, पाण्यातील मेसको मायराणी पछाडते, मुंजा किंवा झोटिंग कबजा घेतो. म्हसोबाचा मांत्रिक करणी करतो. ॥२७॥

वेताळ खंकाळ लागला । ब्रह्मगिऱ्हो संचरला । नेणों चेडा वोलांडिला । कांही कळेना ।।२८।।

वेताळ, खंकाळ बाधतो, ब्रह्मसमंधाचा शरीरात संचार होतो, मंतरलेले लिंबू व टांचण्या ओलांडल्याने त्रास होतो. ॥२८॥

येक म्हणती बीरेदेव । येक म्हणती खंडेराव । येक म्हणती सकळ वाव । हा ब्राह्मणसमंध ।।२९।।

हा सर्व त्रास बिरदेव किंवा खंडेरावाचा आहे असे कोणी म्हणतात. ब्राह्मणाच्या भुताखेरीज हे घडणार नाही असे कोणी ठासून सांगतात. ॥२९॥

येक म्हणती कोणें केलें । आंगी दैवत घातलें । येक म्हणती चुकलें । सटवाईचें ।।३०।।

मंत्राचा वापर करून कोणी अंगात एखादी देवता सोडली असे कोणी म्हणतात तर कोणी सटवाईचे देणे राहिले आहे असेही म्हणतात. ॥३०॥

येक म्हणती कर्मभोग । आंगीं जडले नाना रोग । वैद्य पंचाक्षरी चांग । बोलाऊन आणिले ।।३१।।

जन्मोजन्मी केलेल्या कर्मांमुळे हे अनेक आजारांचे भोग भोगावे लागतात असे तत्त्वज्ञान कोणी सांगतो. दुसरे कोणी नावाजलेल्या वैद्याला किंवा मांत्रिकाला बोलावून आणतात. ॥३१॥

येक म्हणती हा वांचेना । येक म्हणती हा मरेना । भोग भोगितो यातना । पापास्तव ।।३२।।

कोणी म्हणतात हा जगणे शक्य नाही. दुसरे म्हणतात हा नक्कीच मरत नाही! पापांच्या यातनेचे भोग कोण भोगणार? ॥३२॥

गर्भदुःख विसरला । तो त्रिविधतापें पोळला । प्राणी बहुत कष्टी जाला । संसारदुःखें ।।३३।।

गर्भवासाचे दुःख विसरून आध्यात्मिकादी तापांचे दुःख वाट्याला येते. संसारातील यातनांचे फार कष्ट होतात. ॥३३॥

इतुकेंहि चुकोन वांचला । तरी मारमारूं शहाणा केला । लोकिकीं नेटका जाला । नांव राखे ऐसा ।।३४।।

इतक्या सगळ्यातून कोणी वाचला तर त्याला छडीच्या माराने शिक्षण देतात. लौकिक दृष्ट्या 'कुळाचे नाव राखणारा व्यवस्थित पुरुष' असे त्याला म्हणू लागतात. ॥३४॥

पुढें मायेबापीं लोभास्तव । संभ्रमें मांडिला विव्हाव । दाऊनियां सकळ वैभव । नोवरी पाहिली ।।३५।।

पुढे आई-वडील वंशविस्ताराच्या हव्यासाने त्याच्या लग्नाचा घाट घालतात. आपल्या सर्व वैभवाचे प्रदर्शन मांडून

मुलगी पसंत करून लग्नसोहळा पार पाडतात. ॥३५॥

व्हाडींवैभव दाटलें । देखोन परमसुख वाटलें । मन हें रंगोन गेलें । सासुरवाडीकडे ।।३६।।

नटलेथटलेले व्हाडी पाहून त्या तरुणाला फार बरे वाटते व सासुरवाडीचा ओढा वाटू लागतो. ॥३६॥

मायबापीं भलतैसें असावें । परी सासुरवाडीस नेटकें जावें । द्रव्य नसेल तरी घ्यावें । रुण कळांतरे ।।३७।।

आईवडील कसेही राहिले तरी चालतील, पण सासुरवाडीला दिमाखाने जावे व पैसे नसतील तर कर्ज काढावे. ॥३७॥

आंतर्भाव ते सासुरवाडीं । मायेबापें राहिलीं बापुडीं । होताती सर्वस्वें कुडकुडीं । तितुकेंच कार्य त्यांचें ।।३८।।

मनात सासुरवाडी घर करते. आईवडिलांकडे संपूर्ण दुर्लक्ष होऊन त्यांचे हाल होतात. कारण त्यांचे काम संपलेले असते. ॥३८॥

नोवरी आलियां घरा । अती हव्यास वाटे वरा । म्हणे मजसारिखा दुसरा । कोणीच नाहीं ।।३९।।

नवरी मुलगी घरात आल्यावर नवरा उत्तेजित होऊन 'आता माझ्यासारखा जगात कोणी नाही' असे समजू लागतो. ॥३९॥

मायबाप बंधु बहिणी । नोवरी न दिसतां वाटे काणी । अत्यंत लोधला पापिणीं । अविद्येनें भुलविला ।।४०।।

पत्नी दिसली नाही, तर आई, वडील, भाऊ, बहीण ही सर्व तुच्छ वाटू लागतात. पापमय अविद्या त्याला भूल घालून अत्यंत आसक्त करते. ॥४०॥

संभोग नस्तां इतुका प्रेमा । योग्य जालिया उलंघी सीमा । प्रीती वाढविती कामा । करिता प्राणी गुंतला ।।४१।।

बायको वयात आलेली नसल्याने संभोग न होताच तिच्यावर एवढा जीव! ती वयात आल्यावर ताळतंत्रच रहात नाही. कामपूर्तीसाठी आसक्ती वाढून तो तिच्या चिंतनात राहतो. ॥४१॥

जरी न देखे क्षण येक डोळां । तरी जीव होय उताविळा । प्रीतीपात्र अंतर्कळा । घेऊन गेली ।।४२।।

क्षणभर ती नजरेआड झाली तरी जीव उतावळा होतो. त्या प्रेममूर्तीने त्याचे मन जणू चोरून नेलेले असते. ॥४२॥

कोवळे कोवळे शब्द मंजुळ । मर्यादा लज्या मुखकमळ । वक्त्रलोकनें केवळ ।ग्रामज्याचे मैंदावें ।।४३।।

तारुण्यातील कोवळे व गोड शब्द, लोकमर्यादेमुळे लाजेने लाल झाल्याने कमळासारखा दिसणारा चेहरा, एवढ्यानेच संभोगाचे मनोरथ सुरू होतात. ॥४३॥

कळवळा येतां सांवरेना । शरीर विकळ आवरेना । अनेत्र वेवसाई क्रमेना । हुरहुर वाटे ।।४४।।

तिच्या भेटीची इच्छा अनावर होते, संभोगाच्यासांठीं झुरणारे शरीर सावरेना, झोप उडून व्यवसायातही लक्ष लागेना. अखंड अस्वस्थ वाटते. ॥४४॥

वेवसाय करितां बाहेरी । मन लागलेंसे घरीं । क्षणाक्षणां अभ्यांतरी । स्मरण होये कामिनीचें ।।४५।।

उद्योगासाठी घराबाहेर पडल्यावर चित्त घराचीच ओढ घेते. क्षणाक्षणाला मनात पत्नीची आठवण येत राहते. ॥४५॥

तुम्हीं माझिया जिवांतील जीव । म्हणौनि अत्यंत लाघव । दाऊनियां चित्त सर्व । हिरोन घेतलें ।।४६।।

'तुम्ही माझ्या जीवाचे जीवन आहात' असे तिने म्हटले की त्या संभाषणचातुर्याने त्याचे चित्त हारवून जाते. ॥४६॥

मैंद सोइरीक काढिती । फांसे घालून प्राण घेती । तैसें आयुष्य गेलियां अंतीं । प्राणीयांस होये ।।४७।।

लबाड चोर काही नातेसंबंध सांगून जवळीक साधून कपटाने प्राणही घेतात. आयुष्य संपत आलेल्या माणसाचे तसेच होते. (पत्नी लडिवाळपणाने शाश्वत हित साधू देत नाही.) ॥४७॥

प्रीति कामिनीसीं लागली । जरी तयेसी कोणी रागेजलीं । तरी परम क्षिती वाटली । मानसीं गुप्तरुपें ।।४८।।

पत्नीवर एवढे प्रेम जडते की तिला कोणी थोडे जरी टाकून बोलले तरी त्याला सहन न होऊन मनात धुसफुसतो. ॥४८॥

तये भार्येचेनि कैवारें । मायेबापासीं नीच उत्तरें । बोलोनियां तिरस्कारें । वेगळा निघे ।।४९।।

पत्नीची बाजू घेऊन आईवडिलांना शिवीगाळ करून तिरस्काराने वेगळी चूल मांडतो. ॥४९॥

स्त्रीकारणें लाज सांडिली । स्त्रीकारणें सखीं सोडिलीं । स्त्रीकारणें विघडिलीं । सकळहि जिवलगें ।।५०।।

स्त्रीकारणें देह विकिला । स्त्रीकारणें सेवक जाला । स्त्रीकारणें सांडवला । विवेकासी ।।५१।।

स्त्रीकारणें लोलंगता । स्त्रीकारणें अतिनम्रता । स्त्रीकारणें पराधेनता । अंगिकारिली ।।५२।।

स्त्रीकारणें लोभी जाला । स्त्रीकारणें धर्म सांडिला । स्त्रीकारणें अंतरला । तीर्थयात्रा स्वधर्म ।।५३।।

स्त्रीकारणें सर्वथा कांही । शुभाशुभ विचारिलें नाहीं । तनु मनु धनु सर्वहि । अनन्यभावें अर्पिलें ।।५४।।

स्त्रीकारणें परमार्थ बुडविला । प्राणी स्वहितास नाडला । ईश्वरीं कानकोंडा जाला । स्त्रीकारणें कामबुद्धी ।।५५।।

स्त्रीकारणें सोडिली भक्ती । स्त्रीकारणें सोडिली विरक्ती । स्त्रीकारणें सायोज्यमुक्ती । तेहि तुछ्य मानिली ।।५६।।

येके स्त्रियेचेनि गुणें । ब्रह्मांड मानिलें ठेंगणें । जिवलगें ती पिसुणें । ऐसें वाटलीं ।।५७।।

स्त्रीच्या नादी लागून लाज सोडून नातलग व मित्रांचाही त्याग करतो. स्वत:चे शरीर राबवून दास होऊन विवेक सोडतो. आसक्तीने दीन होऊन पराधीन बनतो. पैशाचा लोभ धरून धर्मकृत्ये तीर्थयात्रा सोडून देतो. शुभअशुभाचा विचार न करता शरीर, मन व संपत्ती तिला निष्ठापूर्वक अर्पण करतो. कामबुद्धीमुळें ईश्वरी आज्ञा न पाळता स्वत:च्या हिताचा परमार्थ सोडून देतो. भक्ती, विरक्ती व मुक्ती कसपटासमान मानतो. स्त्रीपुढे सर्व जग टाकाऊ वाटून आपलीच परकी होतात. ॥५०-५७॥

ऐसी अंतरप्रीति जडली । सर्वस्वाची सांडी केली । तंव ते मरोन गेली । अकस्मात भार्या ।।५८।।

जिच्यावर एवढे प्रेम केले व सर्वस्वाची कुरोंडी केली ती पत्नी एक दिवस अचानक मरण पावली. ॥५८॥

तेणें मनीं शोक वाढला । म्हणे थोर घात जाला । आतां कैंचा बुडाला । संसार माझा ।।५९।।

त्यामुळे तो शोकाने संतप्त होऊन ‘माझा मोठा घात होऊन संसार बुडाला’ असे म्हणू लागला. ॥५९॥

जिवलगांचा सोडिला संग । अवचिता जाला घरभंग । आतां करू मायात्याग । म्हणे दु:खें ।।६०।।

पत्नीसाठी सगळ्या गणगोताचा त्याग केला. आता माझे घरच अचानक मोडले. अशा दु:खात ‘आता आपण मायिक संसाराचा त्याग करावा’ असा विचार करू लागला. ॥६०॥

स्त्री घेऊन आडवी । उर बडवी पोट बडवी । लाज सांडून गौरवी । लोकां देखतां ।।६१।।

मृत पत्नीचे शरीर मांडीवर घेऊन स्वत:चे पोट व छाती बडवीत सर्व जनलज्जा सोडून तिचे गुणगान करू लागला. ॥६१॥

म्हणे माझें बुडालें घर । आतां न करी हा संसार । दु:खें आक्रंदला थोर । घोर घोषें ।।६२।।

मोठमोठ्याने ओरडत तो म्हणू लागला की माझे घर आता बुडाले. आता मी संसाराच्या फंदात पडणार नाही. ।।६२।।

तेणें जीव वारयावेघला । सर्वस्वाचा उबग आला । तेणें दु:खें जाला । जोगी कां माहात्मा ।।६३।।

दु:खाने मन सैरभैर झाले. जीवनाचा उबग आला व त्या दु:खाने जणू तो विरक्त महात्मा बनला! ।।६३।।

कां तें निघोन जाणें चुकलें । पुन्हां मागुतें लग्न केलें । तेणें अत्यंतचि मग्न जालें । मन द्वितीय संमंधीं ।।६४।।

पण प्रत्यक्षात त्याने घराचा त्याग न करिता दुसरे लग्न केले व पुन्हा तो संसारात पूर्वीप्रमाणेच रमला. ।।६४।।

जाला द्वितीय संमंध । सर्वेचि मांडिला आनंद । श्रोतीं व्हावें सावध । पुढिले समासीं ।।६५।।

नव्या प्रपंचात पुन्हा आनंद भरला. आता श्रोत्यांनी पुढील समास सावधपणें ऐकावा. ।।६५।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'स्वगुणपरीक्षा (अ) नाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'स्वगुणपरीक्षा' (अ)' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक तिसरा : स्वगुणपरीक्षा

समास तिसरा : स्वगुणपरीक्षा (ब)

॥ श्रीराम समर्थ ॥

द्वितीय संमंध जाला । दुःख मागील विसरला । सुख मानून राहिला । संसाराचें ।। १ ।।

दुसरे लग्न केल्यावर मागील सर्व दुःख विसरून संसारात सुखाने रमला. ॥१॥

जाला अत्यंत कृपण । पोटें न खाय अन्न । रुक्याकारणें सांडी प्राण । येकसरा ।। २ ।।

अत्यंत कंजूस होऊन पोटभर अन्नही खाणे सोडले. एका पैशासाठी प्राण सोडण्याची तयारी होती. ॥२॥

कदा कल्पांतीं न वेची । सांचिलेंचि पुन्हा सांची । अंतरी असेल कैंची । सद्वासना ।। ३ ।।

वाटेल ते झाले तरी खर्च न करता पैशाला पैसा जोडून साठविला. अशा व्यक्तीला चांगली बुद्धी होईलच कशी? ॥३॥

स्वयें धर्म न करी । धर्मकर्त्यासहि वारी । सर्वकाळ निंदा करी । साधुजनाची ।।४।।

स्वत: धर्मकृत्ये न करता ती करणाऱ्यासही परावृत्त करतो व साधुसंतांची यथेच्छ निंदा करतो. ॥४॥

नेणे तीर्थ नेणे व्रत । नेणे अतित अभ्यागत । मुंगीमुखीचें जें सीत । तेंहि वेंचून सांची ।।५।।

तीर्थयात्रा व व्रतांचे नाव नाही. आल्यागेल्याचे स्वागत नाही. मुंगीच्या तोंडातील अन्नकणही बाहेर काढून साठवून ठेवतो. ॥५॥

स्वयें पुण्य करवेना । केलें तरी देखवेना । उपहास्य करी मना । नये म्हणौनी ।।६।।

स्वत: पुण्य करीत नाही. दुसऱ्याने केलेले आवडत नाही. म्हणून त्याची टिंगल करतो. ॥६॥

देवां भक्तांस उछेदी । आंगबळें सकळांस खेदी । निष्ठुर शब्दें अंतर भेदी । प्राणीमात्राचें ।।७।।

देव व भक्त ह्यांना मोजीत नाही. स्वत:च्या सामर्थ्याने दुसऱ्यांना त्रास देतो व दुसऱ्याला जिव्हारी लागतील असे कठोर शब्द बोलतो. ॥७॥

नीति सांडून मागें । अनीतीनें वर्तों लागे । गर्व धरुन फुगे । सर्वकाळ ।।८।।

नीतीचा त्याग करून अनीतीचे जीवन जगून सतत गर्वाने फुगलेला रहातो. ॥८॥

पूर्वजांस सिंतरिलें । पक्षश्राद्धहि नाहीं केलें । कुळदैवत ठकिलें । कोणेपरी ।।९।।

पितरांना झुगारून श्राद्धकर्मे बंद केली. कुळदैवताकडे ढुंकूनही कधी पाहिले नाही. ॥९॥

आक्षत भरिली भाणा । दुजा ब्राह्मण मेहुणा । आला होता पाहुणा । स्त्रियेस मूळ ।।१०।।

कोणत्याही कार्यासाठीं फक्त बहिणीला आमंत्रण द्यावयाचे. पत्नीला माहेरी नेण्यासाठी आलेला मेहुणा हाच दुसरा पाहुणा! (ब्राह्मण समजून त्यालाच जेवण देणे). ॥१०॥

कदा नावडे हरिकथा । देव नलगे सर्वथा । स्नानसंध्या म्हणे वृथा । कासया करावी ।।११।।

हरिकथा नको, देवाची गरज नाही, स्नानसंध्या टाकाऊ आहे. ॥११॥

अभिळाषें सांची वित्त । स्वयें करी विस्वासघात । मदें मातला उन्मत्त । तारुण्यपणें ।।१२।।

दुसऱ्यांचा लोभाने विश्वासघात करूनही धनसंचय केला. तारुण्याच्या मदाने उन्मत्तासारखा वागू लागला. ॥१२॥

तारुण्य आंगी भरलें । धारिष्ट नवचे धरिलें । करुं नये तेंचि केलें । माहा पाप ।।१३।।

तारुण्याने मुसमुसत असल्याने अधीर होऊन जे करू नये ते महापापही त्याने केले. ॥१३॥

स्त्री केली परी धाकुटी । धीर न धरवेचि पोटीं । विषयलोभें सेवटीं । वोळखी सांडिली ।।१४।।

दुसरे लग्न केले खरे, पण ती पत्नी वयात आलेली नसल्याने धीर धरवेना. संभोगासक्तीने त्याने सर्व मर्यादा सोडल्या. ॥१४॥

माये बहिण न विचारी । जाला पापी परद्वारी । दंड पावला राजद्वारीं । तऱ्ही पालटेना ।।१५।।

कोणाची आई, कोणाची बहीण, कोणाची पत्नी असा विचार न करता तो व्यभिचारी बनला. राजाने त्यासाठी शिक्षा केली तरी तो बदलला नाही. ॥१५॥

परस्त्री देखोनि दृष्टीं । अभिळाष उठे पोटीं । अकर्तव्यें हिंपुटी । पुन्हा होये ।।१६।।

कोणाची पत्नी पाहून तिच्यावर मन बसले तरी ती मिळणे शक्य नसल्याने खिन्नता येऊ लागली. ॥१६॥

ऐसें पाप उदंड केलें । शुभाशुभ नाहीं उरलें । तेणें दोषें दुःख भरलें । अकस्मात आंगी ।।१७।।

अशी भरपूर पापे केल्याने व योग्य अयोग्याचा विचार सोडल्याने अनेक आजार जडले. ॥१७॥

व्याधी भरली सर्वांगीं । प्राणी जाला क्षयरोगी । केले दोष आपुले भोगी । सीघ्र काळें ।।१८।।

व्याधीने सर्वांग भरले. क्षयरोग झाला. त्याच्याच पापाचे त्याला लवकरच प्रायश्चित्त मिळाले. ॥१८॥

दुःखें सर्वांग फुटलें । नासिक अवघेंचि बैसलें । लक्षण जाऊन जालें । कुलक्षण ।।१९।।

सर्वांगाला डाग पडले, नाक चपटे झाले, देखणेपणा नष्ट होऊन विद्रूप झाला. ॥१९॥

देहास क्षीणता आली । नाना वेथा उद्भवली । तारुण्यशक्ती राहिली । खंगला प्राणी ।।२०।।

देह क्षीण झाला. रोगप्रतिकारशक्ती संपली. तारुण्य नष्ट होऊन हाडकुळा झाला. ॥२०॥

सर्वांगी लागल्या कळा । देहास आली अवकळा । प्राणी कांपे चळचळां । शक्ति नाहीं ।।२१।।

सर्वांग दुखू लागले, देह विद्रूप होऊन, दुर्बळपणामुळें हातापायांना कंप सुटला. ॥२१॥

हस्तपादादिक झडले । सर्वांगीं किडे पडिलें । देखोन थुंकों लागले । लाहानथोर ।।२२।।

हाताची, पायाची बोटे झडली, अंगात किडे पडले, लहान-मोठे लोक त्याला पाहून त्याची छीथू करू लागले. ॥२२॥

जाली विष्टेची सारणी । भोवती उठली वर्ढाणी । अत्यंत खंगला प्राणी । जीव न वचे ।।२३।।

विष्ठेवर नियंत्रण राहिले नाही. भोवती घाण सुटली. तो इतका क्षीण झाला की 'तो आता जगत नाही.' असे लोक म्हणू लागले. ॥२३॥

आतां मरण देगा देवा । बहुत कष्ट जाले जीवा । जाला नाहीं नेणों ठेवा । पातकाचा ।।२४।।

'देवा, आतां मला तू मरण दे. कष्ट सहन होत नाहीत. अजून माझी पापे संपली नाहीत असे दिसते.' अशी तो करुणा भाकू लागला. ॥२४॥

दुःखें घळघळां रडे । जों जों पाहे आंगाकडे । तों तों दैन्यवाणें बापुडें । तळमळी जीवीं ।।२५।।

दुःखाने डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहू लागले. स्वतःच्या शरीराकडे पाहून राहून राहून खंत वाटू लागली. दीन होऊन तळमळू लागला. ॥२५॥

ऐसे कष्ट जाले बहुत । सकळ जालें वाताहात । दरवडा घालून वित्त । चोरटीं नेलें ।।२६।।

अशा यातना होऊन सर्वाची वाताहत झाली. त्यात भर म्हणून चोरांनी दरोडा घालून संपत्ती लुटली. ॥२६॥

जालें आरत्र ना परत्र । प्रारब्ध ठाकलें विचित्र । आपला आपण मळमूत्र । सेविला दुःखें ।। २७।।

धड ना संसार, धड ना परमार्थ अशी स्थिती झाली. प्रारब्धाचे खेळ अनुभवाला आले. जणू आपल्यालाच आपली विष्ठा व मूत्र घेण्याचे दुःख प्राप्त झाले. ॥२७॥

पापसामग्री सरली । दिवसेंदिवस वेथा हरली । वैद्यें औषधें दिधलीं । उपचार जाला ।। २८।।

दुःखे भोगून पापे संपली. हळूहळू रोग बरा होत गेला. वैद्याने औषधे देऊन उपचार केले. ॥२८॥

मरत मरत वांचला । यास पुन्हां जन्म जाला । लोक म्हणती पडिला । माणसांमधे ।। २९।।

'हा मरता मरता वाचून त्याचा जणू पुनर्जन्म होऊन हा आता माणसात आला' असे लोक म्हणू लागले. ॥२९॥

येरें स्त्री आणिली । बरवी घरवात मांडिली । अति स्वार्थबुद्धी धरिली । पुन्हां मागुती ।। ३०।।

पत्नीला घरी आणली, प्रपंचाची सामुग्री गोळा करून पुन्हा अत्यंत स्वार्थी जीवनाला सुरुवात केली. ॥३०॥

कांही वैभव मेळविलें । पुन्हा सर्वहि संचिलें । परंतु गृह बुडालें । संतान नाहीं ।। ३१।।

काही संपत्ती मिळविली व साठविली. परंतु मूलबाळ नसल्याने घर बुडाल्यासारखे वाटू लागले. ॥३१॥

पुत्रसंतान नस्तां दुःखी । वांज नांव पडिलें लोकिकीं । तें न फिटे म्हणौनी लेंकी । तरी हो आतां ।। ३२।।

मुलगा नसल्याने दुःख तर होतेच. पण लोक त्यांना वांझोटे म्हणू लागले ते दुःख जास्त वाटू लागले. ते तरी नसावे म्हणून मुलगी तरी व्हावी असे वाटू लागले! ॥३२॥

म्हणोन नाना सायास । बहुत देवास केले नवस । तीर्थें व्रतें उपवास । धरणें पारणें मांडिलें ।। ३३।।

त्यासाठी अनेक प्रयत्न केले. देवाला नवस केले. तीर्थयात्रा व्रत, उपास, धरणे धरली, पारणी केली. ॥३३॥

विषयसुख तें राहिलें । वांजपणें दुःखी केलें । तंव तें कुळदैवत पावलें । जाली वृद्धी ।।३४।।

संभोगासक्ती संपून पितृत्वाची इच्छा बळकट झाली. वंध्यत्वाचे दुःख फारच क्लेश देऊ लागले. अचानक कुलदैवत प्रसन्न होऊन मुलगा झाला. ॥३४॥

त्या लेंकुरावरी अति प्रीति । दोघेहि क्षण येक न विशंभती । कांही जाल्या आक्रंदती । दीर्घस्वरें ।। ३५।।

त्यावर दोघांचे जीवापलीकडे प्रेम जडले. त्याला ती दोघे डोळ्यापुढून हालू देत नव्हती. साधी शिंक आली तरी दोघे गळे काढून रडू लागली. ॥३५॥

ऐसी ते दुःखिस्ते । पूजीत होती नाना दैवतें । तंव तेंहि मेलें अवचितें । पूर्वपापेंकरुनी ।।३६।।

त्या मुलाच्या काळजीने त्यांनी अनेक दैवतांच्या उपासना केल्या. परंतु त्या दोघांच्या व त्याच्या स्वतःच्या पूर्वपापांमुळे तो मुलगाही अकस्मात मेला. ॥३६॥

तेणें बहुत दुःख जालें । घरीं आरंधें पडिलें । म्हणती आम्हांस कां ठेविलें । देवें वांज करुनी ।। ३७।।

त्यामुळे त्यांना अत्यंत दुःख झाले. घर जणू ओस पडले. 'देवाने आम्हाला असे निपुत्रिक का ठेविले' असा शोक ते करू लागले. ॥३७॥

आम्हांस द्रव्य काये करावें । तें जावें परी अपत्य व्हावें । अपत्यालागी त्यजावें । लागेल सर्व ।। ३८।।

'आता आम्हाला संपत्तीचा काय उपयोग? ती सर्व जाऊ दे, पण मूल होऊ दे. त्यासाठी सर्वस्वाचा त्याग करावा लागला तरी चालेल.' ॥३८॥

वांजपण संदिसें गेलें । तों मरतवांज नांव पडिले । तें न फिटे कांही केलें । तेणें दुःखें आक्रंदती ।। ३९।।

थोड्या दिवसांपुरते वंध्यत्वाचे किटाळ गेले खरे. पण आतां मरेपर्यन्त ते छळीत राहणार, असे दिसते. ते आता अटळ आहे असे समजून दोघे मोठमोठ्याने रडू लागले. ॥३९॥

आमुची वेली कां खुंटिली । हा हा देवा वृत्ती बुडाली । कुळस्वामीण कां क्षोभली । विझाला कुळदीप ।।४०।।

'आमची वंशवेली का खंडित झाली? माझा व्यवसाय आता कोण चालविणार? कुलस्वामिनी का रागावली? आमच्या वंशाचा दिवाच विझून गेला.' ॥४०॥

आतां लेंकुराचें मुख देखेन । तरी आनंदे राडी चालेन । आणी गळहि टोंचीन । कुळस्वामिणीपासीं ।।४१।।

'आतां पुन्हा जर मुलगा झाला तर मोठ्या आनंदाने निखाऱ्यावरून वाटेल तेवढा चालेन. कुळदेवीपाशी जाऊन मानेला गळ टोचून घेईन.' (एक नवस.) ॥४१॥

आई भुता करीन तुझा । नांव ठेवीन केरपुंजा । वेसणी घालीन माझा । मनोरथ पुरवी ।।४२।।

माझ्या मुलाला तुझ्यापाशी मशाल घेऊन उभा करीन. हे माते, त्याचे 'केरपुंजा' असे अपमानकारक नाव ठेवीन. तुझ्या सेवेची त्याला वेसण घालीन. मात्र तू माझी इच्छा पूर्ण कर. (केरपुंजा-कचराकुंडी.) ॥४२॥

बहुत देवांस नवस केलें । बहुत गोसावी धुंडिले । गटगटां गिळिलें । सगळे विंचू ।।४३।।

असे अनेक देवांना नवस केले. बऱ्याच सिद्धपुरुषांचे आशीर्वाद घेतले. कोणी विंचू न चावता गिळावयास सांगितले तेही गिळले! किंवा विंचवाच्या दंशाप्रमाणें वेदना सहन करून सर्व अघोरी नवस केले. ॥४३॥

केले संमंधाचे सायास । राहाणें घातलें बहुवस । केळें नारिकेळें ब्राह्मणास । अंब्रदानें दिधलीं ।।४४।।

कोणा समंधाचे शाप असतील म्हणून त्यांना शांत केले. गोंधळ्याकडून गोंधळ घातले. ब्राह्मणांना नारळ, केळी व आंब्यांची दाने दिली. ॥४४॥

केलीं नाना कवटालें । पुत्रलोभें केलीं ढालें । तरी अदृष्ट फिरलें । पुत्र नाहीं ।।४५।।

पिशाच्च विद्येची साधने व काही विपरीत कृत्ये पुत्रप्राप्तीसाठी केली. पण प्रारब्धच प्रतिकूल झाल्याने मुलगा झाला नाही. ॥४५॥

वृक्षाखालें जाऊन नाहाती । फळतीं झाडें करपती । ऐसे नाना दोष करिती । पुत्रलोभाकारणें ।।४६।।

पुत्राच्या जबर अपेक्षेने करू नये ते केले. पत्नीने मासिक पाळीच्या मुदतीत झाडाखाली स्नान केले. फळे देणारी झाडे वाळवून टाकण्याचे उपाय केले. ॥४६॥

सोडून सकळ वैभव । त्यांचा वारयावेघला जीव । तंव तो पावला खंडेराव । आणी कुळस्वामिणी ।।४७।।

सर्व वैभव तुच्छ वाटू लागून चित्त सैरभैर झाले. तेव्हा अकस्मात खंडेराव व कुळस्वामिनी प्रसन्न झाली. ॥४७॥

आता मनोरथ पुरती । स्त्रीपुरुषें आनंदती । सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ।।४८।।

ह्यापुढे त्याच्या मनाप्रमाणे त्याला मिळेल. दोघेजण आनंदाने बेहोष होतील, ती कथा आता सावध होऊन श्रोत्यांनी ऐकावी. ॥४८॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'स्वगुण परीक्षा' (ब) नाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'स्वगुण परीक्षा' (ब) नावाचा तिसरा समास समाप्त

दशक तिसरा : स्वगुणपरीक्षा

समास चवथा : स्वगुणपरीक्षा (क)

॥ श्रीराम समर्थ ॥

लेंकुरें उदंड जालीं । तों ते लक्ष्मी निघोन गेली । बापडीं भिकेसीं लागलीं । कांही खाया मिळेना ।।१।।

पुढे त्याला एकामागून एक अशी कित्येक मुले झाली. त्यांना पोसता पोसता असलेली संपत्ती संपली. खायला मिळेनासे झाल्याने भीक मागण्याची त्यांच्यावर वेळ आली. ॥१॥

लेंकुरें खेळती धाकुटीं । येकें रांगती येकें पोटीं । ऐसी घरभरी जाली दाटी । कन्या आणी पुत्रांची ।।२।।

काही लहान मुले खेळत होती, काही रांगत होती. एक पोटात होते. असे मुलांनी घर भरून गेले. ॥२॥

दिवसेंदिवस खर्च वाढला । यावा होता तो खुंटोन गेला । कन्या उपवरी जाल्या त्यांला । उजवावया द्रव्य नाहीं ।।३।।

दिवसानुदिवस खर्च वाढत चालला. मिळकत कमी झाली. वयात आलेल्या मुलींच्या लग्नासाठी हाताशी पैसाही राहिला नाही. ॥३॥

मायेबापें होतीं संपन्न । त्यांचें उदंड होतें धन । तेणेंकरितां प्रतिष्ठा मान । जनीं जाला होता ।।४।।

आईवडील धनाढ्य होते व त्यांच्यामुळे लोकात प्रतिष्ठा मिळत होती. दबदबा होता. ॥४॥

भरम आहे लोकाचारीं । पहिली नांदणूक नाहीं घरीं । दिवसेंदिवस अभ्यांतरीं । दरिद्र आलें ।।५।।

'कुटुंब संपन्न आहे' असा लोकांना भ्रम होता. पण वस्तुस्थिती अगदी वेगळी होती. दिवसानुदिवस घरात दारिद्र्य शिरले. ॥५॥

ऐसी घरवात वाढली । खातीं तोंडें मिळालीं । तेणें प्राणीयांस लागली । काळजी उद्वेगाची ।।६।।

अशा रीतीने घरातील व्याप वाढला. खाणारी तोंडे, एकामागून एक वाढत गेली. त्यामुळें पतिपत्नीला प्रपंचाविषयी उद्‌वेग निर्माण झाला. उबग आला. ॥६॥

कन्या उपवरी जाल्या । पुत्रांस नोवऱ्या आल्या । आतां उजवणा केल्या । पाहिजेत कीं ।।७।।

मुलींचे लग्नाचे वय झाले. मुलांना मुली सांगून येऊ लागल्या. आता त्यांची लग्ने केलीच पाहिजेत अशी परिस्थिती निर्माण झाली. ॥७॥

जरी मुलें तैसींच राहिलीं । तरी पुन्हां लोकलाज जाली । म्हणती कासया व्यालीं । जन्मदारिद्र्ये ।।८।।

मुले-मुली अविवाहित राहिली तर लोकांकडून घालूनपाडून बोलणी ऐकून घेण्याची वेळ येते. ह्या जन्मदरिद्र्यांनी मुले जन्माला घालावीच कशाला? ॥८॥

ऐसी लोकलाज होईल । वडिलांचें नांव जाईल । आतां रुण कोण देईल । लग्नापुरतें ।।९।।

अशी समाजात छीथू होईल, वाडवडिलांची कीर्ती धुळीला मिळेल. आता लग्नांपुरते कोणी कर्ज देईल का अशी चिंता निर्माण झाली. ॥९॥

मागें रुण ज्याचें घेतलें । त्याचें परतोन नाहीं दिल्हें । ऐसें आभाळ कोसळलें । उद्वेगाचें ।।१०।।

आतापर्यन्त घेतलेली कर्जेसुद्धा फेडलेली नाहीत. ह्या सर्व विचाराने उद्‌वेगाचे जणू आभाळच कोसळले. ॥१०॥

आपण खातों अन्नासी । अन्न खातें आपणासीं । सर्वकाळ मानसीं । चिंतातुर ।।११।।

आपण अन्न खातो. अन्नासाठी पैसा मिळविण्याची चिंता आपल्यालाच खाते! म्हणून मन सतत चिंतेनेच ग्रासलेले राहते. ।।११।।

पती अवघीच मोडली । वस्तभाव गाहाण पडिली । अहा देवा वेळ आली । आंता डिवाळ्याची ।।१२।।

बाजारात होती ती पत संपली. घरातील लहानमोठ्या वस्तू गहाण पडल्या. देवा! आता दिवाळे निघण्याची वेळ आली आहे. काय ही अवस्था! ।।१२।।

कांहीं केला ताडामोडा । विकिला घरींचा पाडारेडा । कांहीं पैका रोकडा । कळांतरें काढिला ।।१३।।

शेवटी राखून ठेविलेल्या वस्तू व जनावरे विकून पैसा थोड्या दिवसांत उभा केला. ।।१३।।

ऐसें रुण घेतलें । लोकिकीं दंभ केलें । सकळ म्हणती नांव राखिलें । वडिलांचें ।।१४।।

अशा रीतीने कर्ज काढून जाणारी अब्रू कशीतरी सांभाळली. ह्याने घराण्याचा लौकिक राखला असे लोकही म्हणू लागले. ।।१४।।

ऐसें रुण उदंड जालें । रिणाइतीं वेढून घेतलें । मग प्रयाण आरंभिलें । विदेशाप्रती ।।१५।।

कर्ज वाढतच चालले. सावकारांनी तगादा लावला. म्हणून गुपचूप दूरदेशी निघून जाण्याचे ठरविले. ।।१५।।

दोनी वरुषें बुडी मारिली । नीच सेवा अंगिकारिली । शरीरें आपदा भोगिली । अतिशयेंसीं ।।१६।।

कोणालाही न सांगता दोन वर्षे दूर देशात जाऊन राहिला. हलकीसलकी कामे केली. हालअपेष्टा सोसल्या. अतोनात त्रास झाला. ।।१६।।

कांही मेळविलें विदेशीं । जीव लागला मनुष्यांपासीं । मग पुसोनियां स्वामीसी । मुरडता जाला ।।१७।।

दूरदेशात थोडे पैसे साठविले, पण चित्त मात्र घरातील माणसांकडे लागले होते. त्यामुळे धन्याची परवानगी घेऊन गावाकडे परत आला. ।।१७।।

तंव तें अत्यंत पीडावलीं । वाट पाहात बैसलीं । म्हणती दिवसगती कां लागली । काये करणें देवा ।।१८।।

तो परत येईपर्यन्त कुटुंबीयांची परिस्थिती अत्यंत हालाखीची झाली होती. सर्वजण त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसले होते. हे असे दिवस का आले म्हणून देवाकडे दाद मागत होते. ।।१८।।

आतां आम्ही काये खावें । किती उपवासीं मरावें । ऐसियाचे संगतीस देवें । कां पां घातलें आम्हांसी ।।१९।।

ह्या स्थितीत आम्ही काय खावे ? उपाशीपोटी किती दिवस काढावे? हे देवा, आम्ही अशा माणसाच्या घरात काय म्हणून आलो? ।।१९।।

ऐसें आपुलें सुख पाहाती । परी त्याचें दुःख नेणती । आणी शक्ति गेलियां अंतीं । कोणीच कामा न येती ।।२०।।

असे सर्वजण स्वतःच्या सुखाचा विचार करीत होते. पण तो कशा स्थितीत असेल असा विचारही कोणाच्या मनात आला नाही. शेवटी विकलांग स्थितीत तर कोणीच विचारीत नाही. ।।२०।।

असो ऐसी वाट पाहतां । दृष्टी देखिला अवचिता । मुलें धावती ताता । भागलास म्हणौनी ।।२१।।

अशा मनःस्थितीत सर्वजण त्याची वाट पहात असता अचानक तो घरी आला. 'प्रवासाने तुम्ही दमला असाल' असे म्हणून सर्व मुले भोवती जमली. ।।२१।।

स्त्री देखोन आनंदली । म्हणे आमुची दैन्य फिटली । तंव येरें दिधली । गांठोडी हातीं ।।२२।।

नवऱ्याला बघून पत्नीलाही आनंद झाला. 'आतां आमचे दीनवाणे जीवन संपले' असे ती मनातल्या मनात म्हणाली. बरोबर आणलेली गाठोडी त्यानें त्या सर्वांच्या हातात दिली. ।।२२।।

सकळांस आनंद जाला । म्हणती आमुचा वडील आला । तेणें तरी आम्हांला । आंग्या टोप्या आणिल्या ।।२३।।

असा आनंदीआनंद झाला. 'आमचे वडील आले व त्यांनी आमच्यासाठीं कपडे आणले' असे मुले म्हणू लागली. ।।२३।।

ऐसा आनंद च्यारी दिवस । सवेंच मांडिली कुसमुस । म्हणती हें गेलियां आम्हांस । पुन्हा आपदा लागती ।।२४।।

चार दिवस हा आनंद टिकला. नंतर हळूहळू तक्रारींना सुरुवात झाली. 'आणलेली सामुग्री व पैसे संपले तर पुन्हा आमचे हाल सुरू होतील,' असे सर्वांना वाटू लागले. ।।२४।।

म्हणौनी आणिलें तें असावें । येणें मागुतें विदेशास जावें । आम्ही हें खाऊं न तों यावें । द्रव्य मेळऊन ।।२५।।

म्हणून आणलेले सर्व येथेच ठेवावे. त्याने पुन्हा दूरदेशी जाऊन आणलेले संपण्याच्या आत आणखी द्रव्य कमावून आणावे. ।।२५।।

ऐसी वासना सकळांची । अवघीं सोइरीं सुखाचीं । स्त्री अत्यंत प्रीतीची । तेहि सुखाच लागली ।।२६।।

असे सर्वांनाच वाटू लागले, कारण ते सर्व सुखाचे सोबती होते. जिचे नवऱ्यावर अत्यंत प्रेम असावे ती पत्नी सुद्धा मुलांप्रमाणेच म्हणू लागली. ।।२६।।

विदेसीं बहु दगदला । विश्रांती घ्यावया आला । स्वासहि नाहीं टाकिला । तों जाणें वोढवलें ।।२७।।

परप्रांतात फार दगदग झाल्याने विश्रांतीसाठीं घरी येतो न येतो तोच पुन्हा परतण्याची वेळ आली. ।।२७।।

पुढें अपेक्षा जोसियांची । केली विवंचना मुहूर्ताची । वृत्ति गुंतली तयाची । जातां प्रशस्त न वाटे ।।२८।।

ज्योतिषाला जाण्याचा मुहूर्त विचारला खरा, पण त्याला जावेसे वाटेना. घरातच रहावे असे वाटू लागले. ।।२८।।

माया मात्रा सिद्ध केली । कांही सामग्री बांधली । लेंकुरें दृष्टीस पाहिलीं । मार्गस्त जाला ।।२९।।

जाण्यासाठी बांधाबांध केली. मायेचे पाश कसेतरी तोडले. मुलांकडे डोळे भरून पाहिले व दाराबाहेर पडला. ।।२९।।

स्त्रियेस अवलोकिलें । वियोगें दुःख बहुत वाटलें । प्रारब्धसूत्र तुकलें । रुणानबंधाचे ।।३०।।

पत्नीकडे दृष्टी टाकली. तिच्या वियोगाचे फारच दुःख वाटले. वास्तविक हे नाते कायमचे असते. पण प्रारब्धाच्या प्रवाहाने तेही तुटले. ।।३०।।

कंठ सद्गदित जाला । न संवरेच गहिवरला । लेंकुरा आणि पित्याला । तडातोडी जाली ।।३१।।

कंठ दाटून आला. अनावरपणे हुंदके येतच राहिले. पण वडील व मुले ह्यांची ताटातूट चुकली नाही. ।।३१।।

जरी रुणानबंध असेल । तरी मागुती भेटी होईल । नाहीं तरी संगती पुरेल । येचि भेटीनें तुमची ।।३२।।

तो सर्वांना म्हणाला, 'काही ऋणानुबंध असेल तरच पुन्हा आपली भेट होईल. नाहीतर हीच आता अखेरची भेट.' ।।३२।।

ऐसें बोलोन स्वार होये । मागुता फीरफिरों पाहे । वियोगदुःख न साहे । परंतु कांही न चले ।।३३।।

असे म्हणून जाण्यासाठी निघाला, पण पुन्हा मागे वळून वळून पहात होता. वियोगाचे दुःख असह्य झाले. पण

परिस्थितीपुढे काही इलाज नव्हता. ॥३३॥

आपुला गांव राहिला मागें । चित्त भ्रमलें संसारउद्वेगें । दुःखवला प्रपंचसंगें । अभिमानास्तव ।।३४।।

स्वत:चे गाव मागे पडले, संसाराच्या त्रासाने चित्त अस्वस्थ व उद्विग्न झाले. ‘मी कर्ता’, ‘मी पोशिंदा’ अशा अभिमानामुळे प्रपंचाच्या संगतीत अत्यंत दु:ख झाले. ॥३४॥

ते समईं माता आठवली । म्हणे धन्य धन्य ते माऊली । मजकारणें बहुत कष्टली । परी मी नेणेंचि मूर्ख ।।३५।।

अशा ह्या मन:स्थितीत अचानक आईची आठवण झाली व त्याला असे वाटले की जिने माझ्यासाठी अपार कष्ट घेतले ती खरोखर किती प्रेमळ असली पाहिजे. पण मला मूर्खाला त्याची जाणीव राहिली नाही. ॥३५॥

आजी जरी ते असती । तरी मजला कदा न विशंभती । वियोग होतां आक्रंदती । ते पोटागि वेगळीच ।।३६।।

आज तर ती हयात असती तर तिने मला असे वाऱ्यावर सोडले नसते. त्यातून वियोगाची वेळ आलीच असती तर तिने किती आक्रोश केला असता. तो कळवळाच वेगळा! ॥३६॥

पुत्र वैभवहीन भिकारी । माता तैसाचि अंगिकारी । दगदला देखोनि अंतरीं । त्याच्या दुःखें दुःखावे ।।३७।।

मुलगा वैभवशून्य व दरिद्री असला तरी आई त्याला आपला मानते. त्याला त्रास झाला की ती दु:खी होते. ॥३७॥

प्रपंच विचारें पाहातां । हें सकळ जोडे न जोडे माता । हें शरीर जयेकरितां । निर्माण जालें ।।३८।।

प्रपंचाचे स्वरूप पाहता, ह्या शरीराला जिने जन्म दिला ती माता ह्या प्रपंचात इतर वाटेल ते मिळाले तरी परत मिळत नाही. ॥३८॥

लांव तरी ते माया । काय कराविया सहश्र जाया । परी भुलोन गेलों वायां । मकरध्वजाचेनि ।।३९।।

पत्नीचे प्रेम डाकिणीसारखे असते. अशा हजार स्त्रिया असून काय उपयोग? पण संभोगसुखासाठी मला भूल पडली व माझे जीवन फुकट गेले. ॥३९॥

या येका कामाकारणें । जिवलगांसिं द्वंद्व घेणें । सखीं तींच पिसुणें । ऐसीं वाटतीं ।।४०।।

ह्या संभोगसुखासाठी जिवलगांचे संबंध तुटले. जी आपली होती तीच परकी झाली. ॥४०॥

म्हणौन धन्य धन्य ते प्रपंची जन । जे मायबापाचें भजन । करिती न करिती मन । निष्ठुर जिवलगांसी ।।४१।।

म्हणून जे प्रापंचिक लोक आईवडिलांना सांभाळतात व मित्रनातलगांशी चांगले संबंध ठेवतात ते खरोखर धन्य होत. ॥४१॥

संगती स्त्रीबाळकाची । आहे साठी जन्माची । परी मायेबापें कैंचीं । मिळतील पुढें ।।४२।।

पत्नी व मुले ह्यांचे संबंध आयुष्यभर पुरतात. पण आई व वडील शेवटपर्यन्त कसे रहातील? ॥४२॥

ऐसें पूर्वीं होतें ऐकिलें । परी ते समईं नाहीं कळलें । मन हें बुडोन गेलें । रतिसुखाचा डोहीं ।।४३।।

हा विचार तरुणपणात मी ऐकलेला होता. पण रतिसुखाच्या संभ्रमामध्ये मन बुडून गेल्याने तो विचार त्या वेळी टिकला नाही. ॥४३॥

हे सखीं वाटती परी पिसुणें । मिळाली वैभवाकारणे । रितें जातां लाजिरवाणें । अत्यंत वाटे ।।४४।।

पत्नी व मुले ही जिवलग वाटतात खरी, पण तीच परकी असतात. कारण त्यांना फक्त वैभव हवे असते. त्यांच्या

गरजा पुरवल्या नाहीत तर त्यांची बोलणी ऐकून आपली आपल्यालाच लाज वाटू लागते. ॥४४॥

आतां भलतैसें करावें । परि द्रव्य मेळऊन न्यावें । रितें जातां स्वभावें । दु:ख आहे ।।४५।।

वाटेल तो उद्योग करावा पण त्यांना पैसे पुरवावेत. मोकळ्या हाताने गेले की त्यांच्याकडून घालून पाडून बोलणी ऐकण्याचे दु:ख सोसावे लागते. ॥४५॥

ऐसी वेवर्धना करी । दु:ख वाटलें अंतरी । चिंतेचिये माहापुरीं । बुडोन गेला ।।४६।।

अशा प्रकारच्या विचारचक्रात बुडून तो फार कष्टी झाला व अत्यन्त चिन्ताग्रस्त झाला. ॥४६॥

ऐसा हा देह आपुला ।असतांच पराधेन केला । ईश्वरीं कानकोंडा जाला । कुटुंबकाबाडी ।।४७।।

वस्तुत: आपल्या देहावर आपली मालकी असताना तो जणू कुटुंबीयांचा गुलाम बनवला. त्यांच्यासाठी काबाड कष्ट करताना ईश्वराचे साधे स्मरणही झाले नाही. ॥४७॥

या येका कामासाठी । जन्म गेला आटाटी । वय वेचल्या सेवटीं । येकलेंचि जावें ।।४८।।

'कुटुंबीयांचे पोषण करणे' ह्या एकाच कामासाठी जन्मभर कष्ट उपसले. पण आयुष्य संपले की एकट्यानेच मरावे लागते. साथीला कोणी नसते. ॥४८॥

ऐसा मनीं प्रस्तावला । क्षण येक उदास जाला । सर्वेचि प्राणी झळंबला । मायाजाळें ।।४९।।

अशा पश्चात्तापात काही वेळ गेला. तेवढा वेळ अत्यंत उदास झाला. परंतु मायेच्या प्रभावामुळे पुन्हा खडबडून जागा झाला. ॥४९॥

कन्यापुत्रें आठवलीं । मनीहूनि क्षिती वाटली । म्हणे लेंकुरें अंतरलीं । माझीं मज ।।५०।।

मुलगे व मुली ह्यांची आठवण होऊन स्वत:ची मन:स्थिती बाजूला ठेवून त्यांची काळजी वाटू लागली. 'माझीच मुले मला दुरावली.' असे तो म्हणू लागला. ॥५०॥

मागील दु:ख आठवलें । जें जें होतें प्राप्त जालें । मग रुदन आरंभिलें । दीर्घ स्वरें ।।५१।।

भोगलेले सर्व दु:ख आठवले. जे प्रारब्धात होते ते मिळाले असे म्हणून मोठ्याने गळे काढून रडू लागला. ॥५१॥

आरण्यरुदन करितां । कोणी नाहीं बुझाविता । मग होये विचारिता । आपुले मनीं ।।५२।।

पण हे रडणे अरण्यातील एकांतात रडण्यासारखे होते. समजूत घालावयाला कोणीच नव्हते. हे लक्षात आल्यावर तो स्वत:शी विचार करू लागला. ॥५२॥

आतां कासया रडावें । प्राप्त होतें तें भोगावें । ऐसें बोलोनिया जीवें । धारिष्ट केलें ।।५३।।

आता रडून काय उपयोग? जे समोर येईल ते भोगलेच पाहिजे. असा मनातल्या मनात विचार करून स्वत:ला धीर दिला. ॥५३॥

ऐसा दु:खे दगदला । मग विदेशाप्रती गेला । पुढें प्रसंग वर्तला । तो सावध ऐका ।।५४।।

असा दु:खाने होरपळून तो दूर देशी गेला. पुढे जे जे घडले ते सावधानतेने ऐका. ॥५४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'स्वगुणपरीक्षा (क) नाम' समास चवथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'स्वगुणपरीक्षा (क)' नावाचा चवथा समास समाप्त

दशक तिसरा : स्वगुणपरीक्षा

समास पाचवा : स्वगुणपरीक्षा (ड)

॥ श्रीराम समर्थ ॥

पुढें गेला विदेशासी । प्राणी लागला व्यासंगासी । आपल्या जिवेसीं सोसी । नाना श्रम ।।१।।

पुढे दूरदेशी पोहोचल्यावर तो झटून काम करू लागला. त्यासाठी होणारे सर्व प्रकारचे श्रम त्याने सोसले. ॥१॥

ऐसा दुस्तर संसार । करितां कष्टला थोर । पुढें दोनी च्यारी संवत्सर । द्रव्य मेळविलें ।।२।।

अशा या पार पाडण्यास कठीण असलेल्या संसारासाठी त्याने अपार कष्ट सोसले व दोन-चार वर्षे पैसे जमवले. ॥२॥

सवेंचि आला देशासी । तों आवर्षण पडिलें देसीं । तेणें गुणें मनुष्यांसी । बहुत कष्ट जाले ।।३।।

नंतर तो आपल्या घरी परतल्यावर पहातो तो देशात दुष्काळ पडला होता. माणसांचे जीवन खडतर बनले. ॥३॥

येकांच्या बैसल्या अमृतकळा । येकांस चंद्री लागली डोळां । येकें कांपती चळचळां । दैन्यवाणीं ।।४।।

कोणाच्या डोळ्यांतील तेज निघून गेले, उपासामुळे कोणी बेशुद्ध होण्याच्या मार्गावर होते. कोणी उपासमारीमुळे दीन होऊन थरथर कापत होते. ॥४॥

येकें दीनरूप बैसलीं । येकें सुजलीं येकें मेलीं । ऐसीं कन्यापुत्रें देखिलीं । अकस्मात डोळां ।।५।।

कोणी दीनवाणेपणाने नुसते बसून होते, कोणाच्या सर्वांगाला सूज आली. कोणी मेली. अशी मुलामुलींची अवस्था त्याने पाहिली. ॥५॥

तेणें बहुत दुःखी जाला । देखोनियां उभड आला । प्राणी आक्रंदों लागला । दैन्यवाणा ।।६।।

त्यामुळे त्याला अतीव दु:ख झाले. दु:खाच्या उमाळ्याने दीन होऊन तो मोठ्याने रडू लागला. ॥६॥

तंव तीं अवघीं सावध जालीं । म्हणती बाबा बाबा जेऊं घाली । अन्नालागीं मिडकलीं । झडा घालिती ।।७।।

बापाला पाहून त्यांना थोडी उभारी आली व 'बाबा आम्हाला जेवू घाला' असे म्हणत अन्नासाठी तळमळणारी ती मुले त्याला येऊन चिकटली. ॥७॥

गांठोडें सोडून पाहाती । हातां पडिलें तेंचि खाती । कांहीं तोंडी कांहीं हातीं । प्राण जाती निघोनी ।।८।।

त्यांनी गाठोडी सोडून हाताला येईल ते खाण्यास सुरुवात केली. एक घास हातात व एक घास तोंडात असतानाच कोणाचा प्राण गेला. ॥८॥

तांतडी तांतडी जेऊं घाली । तों तें जेवितां जेवितां कांही मेली । कांही होतीं धादावलीं । तेंहि मेलीं अजीर्णे ।।९।।

बाप मुलांना घाईघाईने भरवू लागला. जेवताजेवताच कोणी मेली. अतिभुकेमुळे अतिजेवलेली अजीर्ण होऊन मेली. ॥९॥

ऐसीं बहुतेकें मेलीं । येक दोनी मुलें उरलीं । तेंहि दैन्यवाणी जालीं । आपले मातेचांचुनी ।।१०।।

अशी बहुतेक मुले मेली. एकदोन वाचली, पण आईवाचून ती दीनवाणीच राहिली. ॥१०॥

ऐसें आवर्षण आलें । तेणें घरचि बुडालें । पुढें देसीं सुभिक्ष जालें । आतिशयेंसी ।।११।।

अशा प्रकारे दुष्काळामुळे कुटुंबाची वाताहत झाली. नंतर देशात अन्नधान्य भरपूर पिकले. ॥११॥

लेकुरां नाही वाढविते । अन्न करावें लागे आपुलेन हातें । बहु त्रास घेतला चित्तें । स्वयंपाकाचा ।।१२।।

पण मुलांचे संगोपन करण्यास कोणीच नव्हते. स्वयंपाक स्वत:लाच करावा लागत होता. त्यामुळे तो फार त्रस्त झाला. ॥१२॥

लोकीं भरीस घातलें । पुन्हां मागुतें लग्न केलें । द्रव्य होतें तें वेचलें । लग्नाकारणें ।।१३।।

लोकांनी फार आग्रह केल्याने त्याने आणखी एकदा लग्न करून त्यात सर्व संपत्ती खर्च केली. ॥१३॥

पुन्हा विदेशासी गेला । द्रव्य मेळऊन आला । तव घरीं कळहो लागला । सावत्र पुत्रांसी ।।१४।।

नंतर पुन्हा दूरदेशी जाऊन पैसे मिळवून आणले. घरी येऊन पाहतो तो सावत्र मुलांत भांडणे लागलेली! ॥१४॥

स्त्री जाली न्हातीधुती । पुत्र देखो न सकती । भ्रताराची गेली शक्ति । वृद्ध जाला ।।१५।।

नवी पत्नी नुकतीच वयात आलेली. पहिल्या दोघींचे तरुण मुलगेही वयात आलेले. त्यांचे संबंध बिघडून गेले होते. नवरा वृद्धत्वाने क्षीण झाला होता. ॥१५॥

सदा भांडण पुत्रांचें । कोणी नायकती कोणाचें । वनिता अति प्रीतीचें । प्रीतिपात्र ।।१६।।

मुलगे सतत आपापसात भांडत होते. कोणीच कोणाचे ऐकत नव्हते. तरुण पत्नीविषयी अत्यंत आसक्ती निर्माण झाली होती. ॥१६॥

किंत बैसला मना । येके ठाईं पडेना । म्हणोनियां पांचा जणा । मेळविलें ।।१७।।

सतत चिंता लागून राहिली. काय करावे ते कळेना. एकत्र राहणे अशक्य झाले. म्हणून त्याने गावातील पाच त्रयस्थ सज्जनांना निवाड्यासाठी बोलाविले. ॥१७॥

पांच जण वांटे करिती । तों ते पुत्र नायेकती । निवाडा नव्हेचि अंती । भांडण लागलें ।।१८।।

त्या पंचांनी वाटण्या करून दिल्या. पण मुलांना त्या मान्य झाल्या नाहीत. शेवटी निवाडा न झाल्याने भांडणे सुरू झाली. ॥१८॥

बापलेंका भांडण जालें । लेकीं बापास मारिलें । तव ते मातेनें घेतलें । शंखतीर्थ ।।१९।।

बाप व मुलगे यांच्यातही भांडण लागले. मुलांनी बापाला बडविल्याने सावत्र आई शंख करू लागली. ॥१९॥

ऐकोनि मिळाले लोक । उभे पाहती कौतुक । म्हणती बापास लेक । कामा आले ।।२०।।

तो आरडाओरडा ऐकून बरेच लोक गोळा झाले व कुचेष्टा करून गंमत पाहू लागले. 'मुलगे बापाच्या चांगलेच उपयोगी पडले!' असे ते कुत्सितपणे म्हणू लागले. ॥२०॥

ज्या कारणें केले नवस । ज्या कारणें केले सायास । ते पुत्र पितीयास । मारिती पहा ।।२१।।

'ज्या मुलांसाठी नवस केले, अमाप कष्ट उपसले ते मुलगे बापास मारीत आहेत. ते नवल पहा!' ॥२१॥

ऐसी आली पापकळी । आश्चिर्य मानिलें सकळी । उभे तोडिती कळी । नगरलोक ।।२२।।

पापामुळे असा हा कलह निर्माण झाला. सर्वांना त्याचे फार नवल वाटले. नंतर काही सज्जनांनी तो तंटा सोडवला. ॥२२॥

पुढें बैसोन पांच जण । वाटे केले तत्समान । बापलेकांचें भांडण । तोडिलें तेंहीं ।।२३।।

पुन्हा पंचांनी सर्वांना सारखे वाटे करून दिले व बापलेकांचे भांडण सोडविले. ॥२३॥

बापास वेगळें घातलें । कोंपट बांधोन दिधलें । मन कांतेचें लागलें । स्वार्थबुद्धी ।।२४।।

बापाला वेगळे करून एक झोपडी बांधून दिली. पत्नीही आता दोघांपुरतेच पाहू लागली. ॥२४॥

कांता तरुण पुरुष वृद्ध । दोघांस पडिला संमंध । खेद सांडून आनंद । मानिला तेहीं ।। २५ ।।

पत्नी तरुण व पती म्हातारा अशा त्या प्रपंचात दोघांनी दु:ख विसरून आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ॥२५॥

स्त्री सापडली सुंदर । गुणवंत आणी चतुर । म्हणे माझें भाग्य थोर ।वृद्धपणीं ।। २६ ।।

सुंदर, सद्गुणी व चतुर पत्नी योगायोगाने म्हातारपणी मिळाल्याने तो स्वत:ला फार भाग्यवान समजू लागला. ॥२६॥

ऐसा आनंद मानिला । दु:ख सर्वहि विसरला । तंव तो गल्बला जाला । परचक्र आलें ।। २७ ।।

अशी कोठे सुखी जीवनाला सुरुवात होऊन मागील दु:ख विसरते न विसरते तोच त्या भागावर शत्रूने हल्ला केल्याने गोंधळ उडाला. ॥२७॥

अकस्मात धाडी आली । कांता बंदी धरून नेली । वस्तभावहि गेली । प्राणीयाची ।। २८ ।।

शत्रूची अचानक धाड आली. त्याच्या पत्नीला त्यांनी पळवून नेले व घरही लुटून नेले. ॥२८॥

तेणें दु:ख जालें भारीं । दीर्घ स्वरें रुदन करी । मनीं आठवे सुंदरी । गुणवंत ।। २९ ।।

त्यामुळे तो अतिशय कष्टी झाला. गुणवान व सुंदर पत्नीच्या आठवणीने मोठमोठ्याने रडू लागला. ॥२९॥

तंव तिची वार्ता आली । तुमची कांता भ्रष्टली । ऐकोनिया आंग घाली । पृथ्वीवरी ।। ३० ।।

तोच त्याच्या पत्नीला बाटवल्याची (किंवा ती शीलभ्रष्ट झाल्याची) बातमी आली. ती ऐकून तो जमिनीवर गडबडा लोळू लागला. ॥३०॥

सव्य अपसव्य लोळे । जळें पाझरती डोळे । आठवितां चित्त पोळें । दु:खानळें ।। ३१ ।।

जमिनीवर डाव्या उजव्या अंगाने लोळू लागला. डोळ्यांना अश्रुधारा लागल्या. पत्नीच्या आठवणींच्या दु:खाग्नीने त्याचे मन होरपळून निघाले. ॥३१॥

द्रव्य होतें मेळविलें । तेंहि लग्नास वेचलें । कांतेसिहि धरून नेलें । दुराचारीं ।। ३२ ।।

जेवढे द्रव्य मिळवले होते ते लग्नासाठी खर्च केले व बायकोला दुष्टांनी पळवून नेले. ॥३२॥

मजहि वृद्धाप्य आलें । लेकीं वेगळें घातलें । अहा देवा वोढवलें । अदृष्ट माझें ।। ३३ ।।

मीही आता वृद्ध झालो. त्यात मुलांनी मला वेगळे केले. हे देवा, माझे प्रारब्ध कसे मला छळीत आहे! ॥३३॥

द्रव्य नाहीं कांता नाहीं । ठाव नाहीं शक्ति नाहीं । देवा मज कोणीच नाहीं । तुजवेगळें ।। ३४ ।।

पैसा नाही, बायको नाही, घर नाही, सामर्थ्य नाही. हे देवा, आता तुझ्यावाचून मला कोणीच नाही. ॥३४॥

पूर्वी देव नाहीं पुजिला । वैभव देखोन भुलला । सेखीं प्राणी प्रस्तावला । वृद्धपणीं ।। ३५ ।।

आतापर्यंत देवाची साधी पूजासुद्धा केली नाही. स्वत:च्या वैभवात रमून राहिला व शेवटी म्हातारपणी पश्चात्तापाची पाळी आली. ॥३५॥

देह अत्यंत खंगलें । सर्वांग वाळोन गेलें । वातपीत उसळलें । कंठ दाटला कफें ।। ३६ ।।

देहाचा पिंजरा राहिला, शरीर वाळून गेले, वातपित्ताचा प्रकोप होऊन कंठात कफ भरून राहिला. ॥३६॥

वळे जिव्हेचि बोबडी । कफें कंठ घडघडी । दुर्गंधी सुटली तोंडीं । नाकीं स्लेष्मा वाहे ।। ३७ ।।

जिभेने बोलणे कठीण झाले, कंठात कफ घरघरू लागला, तोंडाला वाईट वास येऊ लागून नाकातून शेंबूड वाहू लागला. ॥३७॥

मान कांपे चळचळां । डोळे गळतीं भळभळां । वृद्धपणीं अवकळा । ठाकून आली ।। ३८ ।।

मानेला कंप सुटला, डोळ्यांतून पाणी वाहू लागले. चेहरा निस्तेज होऊन दैन्यवाणा दिसू लागला. ॥३८॥

दंतपाटी उखळली । तेणें बोचरखिंडी पडिली । मुखीं लाळ गळों लागली । दुर्गंधीची ।।३९।।

सर्व दात पडले. त्यामुळे तोंडाचे बोळके होऊन लाळेचा प्रतिबंध गेल्याने ती वाहू लागली. शिवाय कफादिकांमुळे तिला दुर्गंध येऊ लागला. ॥३९॥

डोळां पाहतां दिसेना । कानीं शब्द ऐकेना । दीर्घ स्वरें बोलवेना । दमा दाटे ।।४०।।

डोळ्यांना धड दिसेना, कानांनी नीट ऐकू येईना व धाप लागल्याने मोठ्या आवाजात बोलता येईना. ॥४०॥

शक्ती पायांची राहिली । बैसवेना मुरुकुंडी घाली । बृहती वाजों लागली । तोंडाच ऐसी ।।४१।।

पायांत चालण्याची शक्ती उरली नाही. बसण्याचीही शक्ती न उरल्याने पाय पोटावर घेऊन झोपण्याची पाळी आली. घशात घरघर व खाली सरकणारा वारा यांचे सतत आवाज होऊ लागले. ॥४१॥

क्षुधा लागतां आवरेना । अन्न समईं मिळेना । मिळालें तरी चावेना । दांत गेले ।।४२।।

कधी भूक अनावर झाली तरी वेळेवर अन्न मिळेना. दात नसल्याने मिळालेले अन्न चाववेना. ॥४२॥

पित्तें जिरेना अन्न । भक्षीतांच होये वमन । तैसेंचि जाये निघोन । अपानद्वारें ।।४३।।

पचनशक्ती कमी झाल्याने अन्न पचेना. काही अन्न उलटीतून तर काही न पचलेल्या स्थितीतच गुदद्वारातून बाहेर पडू लागले. ॥४३॥

विष्टा मूत्र आणी बळस । भोवता वमनें केला नास । दुरून जातां कोंडे स्वास । विश्वजनाचा ।।४४।।

मल, मूत्र, बेडका व उलट्या या सर्वांनी अंथरुणाच्याभोवती दुर्गंधी निर्माण केली. जवळून जाणाऱ्या प्रत्येकाला नाक धरून जावे लागले. ॥४४॥

नाना दु:खें नाना व्याधी । वृद्धपणीं चळे बुद्धी । तऱ्हीं पुरेना आवधी । आयुष्याची ।।४५।।

अनेक मनस्ताप, रोग यांच्याबरोबरच म्हातारपणी बुद्धीवरचे नियंत्रण सुटते. पण आयुष्य मात्र संपत नाही. ॥४५॥

पापण्या भवयाचे केश । पिकोन झडले नि:शेष । सर्वांगीं लोंबलें मांस । चिरकुटासारिखें ।।४६।।

पापण्या व भुवयांचे केस पांढरे झाले किंवा पूर्ण गळून पडले व सर्वांगावर चिंध्या वाळत घातल्याप्रमाणे त्वचा लोंबू लागली. ॥४६॥

देह सर्व पारिखें जालें । सवंगडे नि:शेष राहिले । सकळ प्राणीमात्र बोले । मरेना कां ।।४७।।

सर्व संबंधित दुरावले. बरोबरीची माणसे मरण पावली. ‘हा अजून का मरत नाही’ असे सर्वजण म्हणू लागले. ॥४७॥

जें जन्मून पोसलीं । तेचि फिरोन पडिलीं । अंतीं विषम वेळ आली । प्राणीयासी ।।४८।।

ज्यांना जन्माला घालून वाढविली ती मुलेच पाठ करून बसली. त्याच्यावर शेवटी फार मोठ्या अडचणीची वेळ आली. ॥४८॥

गेलें तारुण्य गेलें बळ । गेलें संसारीचें सळ । वाताहात जालें सकळ । शरीर आणि संपत्ती ।।४९।।

तारुण्य व शक्ती संपली. संसाराची उमेद नष्ट झाली. शरीराची व पैशाची वाताहत झाली. ॥४९॥

जन्मवरी स्वार्थ केला । तितुकाहि वेर्थ गेला । कैसा विषम काळ आला । अंतकाळीं ।।५०।।

सर्व आयुष्यभर केवळ स्वार्थाचा विचार केला. पण त्यातून जे साधले ते फुकट गेले. आणि आता मरणाच्या वेळी परिस्थिती अत्यंत कठीण झाली. ॥५०॥

सुखाकारणें झुरला । सेंखीं दु:खें कष्टी जाला । पुढें मागुता धोका आला । येमयातनेचा ।।५१।।

सुखासाठी आयुष्यभर तळमळ केली. शेवटी दु:खच वाट्याला आले व पुढे आता यमयातनांचे ताट वाढून ठेविले आहे. ॥५१॥

जन्म अवघा दु:खमूळ । लागती दु:खाचें इंगळ । म्हणोनियां तत्काळ । स्वहित करावें ।।५२।।

सर्व दु:खांचा उगम जन्मातच आहे. जन्मभर त्या दु:खांच्या डागण्या सोसाव्या लागतात. म्हणून माणसाने मोक्षासाठी झटून स्वत:चे हित साधावे. ॥५२॥

असो ऐसें वृद्धपण । सकळांस आहे दारुण । म्हणोनियां शरण । भगवंतास जावें ।।५३।।

असे हे भयानक म्हातारपण कमी-जास्त प्रमाणात प्रत्येकालाच येते. म्हणून देवाला शरणागत रहावे. ॥५३॥

पुढें वृद्धीस तत्त्वतां । गर्भी प्रस्तावा होता । तोचि आला मागुता । अंतकाळीं ।।५४।।

गर्भावस्थेपासूनच होणारी पिंडाची वाढ ही वृद्धत्वाची नांदीच असते. तेच मरणकाळी येऊन ठेपते. ॥५४॥

म्हणौनि मागुते जन्मांतर । प्राप्त मातेचे उदर । संसार हा अति दुस्तर । तोचि ठाकून आला ।।५५।।

व नंतर पुढील जन्मात पुन्हा मातेच्या गर्भाशयात रहावे लागते. असा हा दुर्लंघ्य संसार पुढे दिसत आहे. ॥५५॥

भगवद्भजनावांचुनी । चुकेना हे जन्मयोनी । तापत्रयांची जाचणी । सांगिजेल पुढें ।।५६।।

भगवंताच्या भक्तीशिवाय संसाराचे ताप चुकत नाहीत. पुनर्जन्म टळत नाही. ते त्रिविध ताप आतां सांगू. ॥५६॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'स्वगुण परीक्षा (ड) नाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'स्वगुण परीक्षा (ड)' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक तिसरा : स्वगुणपरीक्षा

समास सहावा : आध्यात्मिकताप

॥ श्रीराम समर्थ ॥

तापत्रयाचें लक्षण । आतां सांगिजेल निरूपण । श्रोतीं करावें श्रवण । येकाग्र होऊनी ।। १ ।।

आता तीन प्रकारच्या तापांचे वर्णन करू. श्रोत्यांनी एकाग्र होऊन ते ऐकावे. ॥१॥

जो तापत्रैं पोळला । तो संतसंगे निवाला । आर्तभूत तोषला । पदार्थ जेवी ।। २ ।।

तीन तापांनी पोळलेला संतसंगतीत निवून जातो. एखाद्या वस्तूसाठी तळमळणारा ती वस्तू मिळाल्यावर जसा शांत होतो त्याप्रमाणे. उदा.– ॥२॥

क्षुधाक्रांतास मिळे अन्न । तृषाक्रांतास जीवन । बंदी पडिल्याचें बंधन । तोडितां सुख ।। ३ ।।

भुकेलेल्यास अन्न, तहानलेल्यास पाणी व तुरुंगात पडलेल्यास सुटका होताच सुख वाटते. ॥३॥

माहापुरें जाजावला । तो पैलतीरास नेला । कां तो स्वप्नींचा चेइला । स्वप्नदुःखी ।। ४ ।।

महापुरात सापडलेला सुरक्षितपणे काठावर पोहोचला, स्वप्नात दुःख भोगणाऱ्याला जाग आली. ॥४॥

कोणी येकासी मरण । येतां दिलें जीवदान । संकटास निवारण । तोडितां सुख ।। ५ ।।

मरणाला टेकलेल्याला जीवदान मिळाले, कोणावर कोसळलेले संकट दूर केले तर सुख मिळते. ॥५॥

रोगीयास औषध । सप्रचित आणि शुद्ध । तयासी होये आनंद । आरोग्य होता ।। ६ ।।

रोगी माणसाला अनुभवाच्या कसाला उतरलेले व खात्रीचे औषध दिल्यावर रोग गेल्याने त्याला समाधान वाटते. ॥६॥

तैसा संसारें दुःखवला । त्रिविधतापें पोळला । तोचि येक अधिकारी जाला । परमार्थासी ।। ७ ।।

जो संसार दुःखानी दुखावला आहे व तीन प्रकारच्या तापानी देह दुःखात पोळून निघाला आहे तोच खराखुरा परमार्थाला योग्य (अधिकारी) असतो. ॥७॥

ते त्रिविध ताप ते कैसे । आतां बोलिजेत तैसे । येविषईं येक असे । वाक्याधार ।। ८ ।।

आता त्रिविध तापांचे स्वरूप सांगू. त्याविषयी एक श्लोक आधारासाठी घेऊ. तो असा– ॥८॥

श्लोक

देहेंद्रियप्राणेन सुखं दुःखं च प्राप्यते । इममाध्यात्मिकं तापं जायते दुःखं देहिनाम् ।। १ ।।
सर्वभूतेन संयोगात् सुखं दुःखं च जायते । द्वितीयतापसंतापः सत्यं चैवाधिभौतिकः ।। २ ।।
शुभाशुभेन कर्मणा देहांते यमयातना । स्वर्गनरकादि भोक्तव्यमिदं चैवाधिदैविकम् ।। ३ ।।

श्लोकार्थ

देह, इंद्रिये व प्राण ह्यांना सुखदुःखांचा अनुभव येतो. त्यातील दुःखांना आध्यात्मिक ताप म्हणतात. जगातील जडचेतन पदार्थांच्या संबंधामुळे सुखदुःखे होतात. त्यातील दुःखांना आधिभौतिक ताप म्हणतात. शुभ व अशुभ कर्मे करणाऱ्याला मरणानंतर स्वर्गनरकादि भोग मिळतात. त्यातील नरकयातनांना आधिदैविक ताप म्हणतात. (१-३)

येक ताप आध्यात्मिक । दुजा तो आदिभूतिक । तिसरा आदिदैविक । ताप जाणावा ।।९।।

आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक असे तीन प्रकारचे ताप आहेत. ॥९॥

आध्यात्मिक तो कोण । कैसी त्याची वोळखण । आदिभूतिकांचें लक्षण । जाणिजे कैसें ।।१०।।

आध्यात्मिक ताप कसा असतो व त्याचे स्वरूप काय? आधिभौतिक ताप कसा ओळखावा? ॥१०॥

आदिदैविक तो कैसा । कवण तयाची दशा । हेंहि विशद कळे ऐसा । विस्तार कीजे ।।११।।

आधिदैविक ताप कसा असतो व त्याच्या अनुभवाचे स्वरूप काय ते स्पष्टपणे कळेल असे विस्तारपूर्वक सांगा. ॥११॥

हां जी म्हणोनि वक्ता । जाला कथा विस्तारिता । आध्यात्मिक ताप आतां । सावध ऐका ।।१२।।

श्रोत्याने असे म्हटल्यावर वक्त्याने 'ठीक आहे' असे म्हणून विस्तारपूर्वक सांगण्यास सुरुवात केली. आता आध्यात्मिक तापाविषयी लक्षपूर्वक ऐका. ॥१२॥

देह इंद्रिय आणी प्राण । यांचेनि योगें आपण । सुखदुःखें सिणे जाण । या नांव आध्यात्मिक ।।१३।।

जीव हा देह, इंद्रिये व प्राण यांच्या संबंधामुळे कधी सुखी तर कधी दुःखी होतो. त्यातील दुःखाच्या अनुभवाला ताप म्हणतात. हाच आध्यात्मिक ताप होय. (अध्यात्म म्हणजे शरीर.) ॥१३॥

देहामधून जें आलें । इंद्रियें प्राणें दुःख जालें । तें आध्यात्मिक बोलिलें । तापत्रईं ।।१४।।

दुःखांची निर्मिती शरीरात होते. इंद्रिये व प्राण यांना झालेले दुःख मनामार्फत जीवाला कळते. तापत्रयातील आध्यात्मिक ताप तो हाच. ॥१४॥

देहामधून काये आलें । प्राणें कोण दुःख जालें । आतां हें विशद केलें । पाहिजे कीं ।।१५।।

देहात कोणकोणत्या दुःखांची निर्मिती होते, प्राणांना कोणते दुःख होते ते आता विस्तारपूर्वक सांगू. ॥१५॥

खरुज खवडे पुळिया नारु । नखरुडें मांजऱ्या देवि गोवरु । देहामधील विकारु । या नांव आध्यात्मिक ।।१६।।

खरूज, त्वचेच्या भेगा, पुळ्या, नारू, नखाखाली पू होणे, फोड, देवी, गोवर इ. देहविकार म्हणजे आध्यात्मिक ताप. ॥१६॥

काखमांजरी केशतोड । वोखटें वर्ण काळफोड । व्याधी मूळव्याधी माहाजड । या नांव आध्यात्मिक ।।१७।।

काखेतील फोड, केसाच्या मुळांत पू होणे, कॅन्सरसारख्या आजाराने त्यावरील त्वचेचा रंग बदलणे व अत्यंत तापदायक अशी मूळव्याध. ॥१७॥

अंगुळवेडे गालफुगी । कंड लागे जे वाउगी । हिरडी सुजे भरे बलंगी । या नांव आध्यात्मिक ।।१८।।

बोट मुरगळणे, गालगुंड, अतोनात खाज सुटणे, हिरडी सुजणे, दातात काही अडकणे. ॥१८॥

वाउगे फोड उठती । कां ते सुजे आंगकांती । वात आणि तिडका लागती । या नांव आध्यात्मिक ।।१९।।

अंगभर फोड उठणें, सर्वांगाला सूज, पोटात गुबारा धरून तडस लागणे. ॥१९॥

नाइटे अंदु गजकर्ण । पेहाचें पोट विस्तीर्ण । बैसलें टाळें फुटती कर्ण । या नांव आध्यात्मिक ।।२०।।

नायटे, हाडापर्यंत पोहोचलेली जखम, जलोदराने मोठे झालेले पोट, कान गच्च होणे व फुटणे. ॥२०॥

कुष्ट आणी वोला कुष्ट । पंड्यारोग अतिश्रेष्ठ । क्षयरोगाचे कष्ट । या नांव आध्यात्मिक ।।२१।।

पांढरे कोड, महारोग, लवकर बरा न होणारा रक्तक्षय (Anaemia) व क्षयरोग. ॥२१॥

वाटी वटक वायेगोळा । हातीं पाईं लागती कळा । भोवंडी लागे वेळोवेळां । या नांव आध्यात्मिक ।।२२।।

वरचेवर गुडघ्याची वाटी दुखणे, उलट्या, पोटात वरचेवर उठणारी कळ, हातपाय दुखणे, वरचेवर चक्कर येणे. ॥२२॥

वोलांडा आणि वळ । पोटसुळाची तळमळ । आर्धशिसी उठे कपाळ । या नांव आध्यात्मिक ।।२३।।

गरमी (Gonorrhoiea) व त्यामुळे जांघ्यात उठणाऱ्या गाठी, पोटशूलाचा त्रास, अर्धशिशी, ॥२३॥

दुःखे माज आणि मान । पुष्ठी ग्रीवा आणि वदन । अस्तिसांदे दुःखती जाण । या नांव आध्यात्मिक ।।२४।।

कंबर व मान दुखणे, मानेवर चरबीचा गोळा येणे (Lipoma) गाल फुगलेले दिसणे, हाडे व सांधे दुखणे, ॥२४॥

कुळिक तरळ कामिणी । मुरमा सुंठरे माळिणी । विदेसीं लागलें पाणी । या नांव आध्यात्मिक ।।२५।।

आमांश, अतिसार, कावीळ, तारुण्यपीटिका, गळवे, गंडमाळा, प्रवासात पाणी बाधणे, ॥२५॥

जळसोस आणि हिवारें । गिरीविरी आणि अंधारे । ज्वर पाचाव आणि शारें । या नांव आध्यात्मिक ।।२६।।

तहानेने तोंड कोरडे पडणे, थंडी भरणे, गरगरणे, डोळ्यांपुढे अंधारी येणे, थंडी वाजून येणारा पांच दिवसांचा ताप, ॥२६॥

शैत्य उष्ण आणि तृष्णा । क्षुधा निद्रा आणी दिशा । विषयतृष्णेची दुर्दशा । या नांव आध्यात्मिक ।।२७।।

दमट व उष्ण हवेचा त्रास, तहान, भूक, झोप व संडास यासंबंधीच्या अडचणी व अनिवार संभोगेच्छा, ॥२७॥

आळसी मूर्ख आणी अपेसी । भय उद्भवें मानसीं । विसराळु दुश्चित्त आहिर्निशी । या नांव आध्यात्मिक ।।२८।।

आळस, अज्ञान व अपयशाने खचून भीती वाटणे, विसरभोळेपणा व कायमच्या अनवधानामुळे सतत होणारे नुकसान व मनस्ताप, ॥२८॥

मूत्रकोड आणी परमें । रक्तपिती रक्तपरमें । खडाचढाचेनि श्रमे । या नांव आध्यात्मिक ।।२९।।

लघवी अडणे, परमा (syphilis) रक्ताच्या उलट्या, लघवीतून रक्त जाणे, खडा चढ चढल्याने दमणे, ॥२९॥

मुरडा हागवण उन्हाळे । दिशा कोंडतां आंदोळे । येक वेथा असोन न कळे । या नांव आध्यात्मिक ।।३०।।

पोटात मुरडून आव पडणे, लघवीला जळजळणे, आकाश ढगांनी भरून गेल्यावर गुदमरणे व आजाराचे निदान न होणे, ॥३०॥

गांठी ढळली जाले जंत । पडे आंव आणि रक्त । अन्न तैसेंचि पडत । या नांव आध्यात्मिक ।।३१।।

पोटाच्या स्नायूवर ताण पडणे, जंत, रक्ती आव व अन्न न पचता तसेच बाहेर पडणे, ॥३१॥

पोटफुगी आणि तडस । भरला हिर लागला घांस । फोडी लागतां कासावीस । या नांव आध्यात्मिक ।।३२।।

पोट फुगून तडस लागणे, जेवताना अन्नकण श्वासनलिकेत जाऊन ठसका लागणे, एखादी फोड घशात अडकून जीव कासावीस होणे, ॥३२॥

उचकी लागली उसित गेला । पीत उसळलें उलाट जाला । खरे पडसा आणि खोंकला । या नांव आध्यात्मिक ।।३३।।

उचकी लागून उच्छ्वास कोंडणे, जठरातील आम्ल वाढून उलटी होणे, पडसे व खोकल्याने घसा खरखरणे, ॥३३॥

उसळला दमा आणी धाप । पडजिभ ढासि आणी कफ । मोवाज्वार आणि संताप । या नांव आध्यात्मिक ।।३४।।

धाप लागून अनावर झालेला दमा, पडजिभेमध्ये खवखव सुटून खोकला, तापामध्ये अति ताप येऊन अंग भाजून निघणे, ॥३४॥

कोणी सेंदुर घातला । तेणें प्राणी निर्बुजला । घशामध्यें फोड जाला । या नांव आध्यात्मिक ।।३५।।

गायकाचा आवाज चांगला असल्यास प्रतिस्पर्धी त्याला अन्नातून शेंदूर घालतात. त्यामुळे आवाज बसून तो माणूस खचून जातो. घशात फोड येणे, ॥३५॥

गळसोट्या आणी जीभ झडे । सदा मुखीं दुर्गंधी पडे । दंतहीन लागती किडे । या नांव आध्यात्मिक ।।३६।।

गळ्याच्या दोन्ही बाजूंना गाठी येणे (mumps) एका बाजूने जीभ झडू लागणे (cancer) तोंडाला सतत घाण वास येणें व दात पडून हिरड्या किडून जाणे, ॥३६॥

जरंडी घोलाणा गंडमाळा । अवचिता स्वयें फुटे डोळा । आपणचि कापी अंगुळा । या नांव आध्यात्मिक ।।३७।।

पांथरी सुजणे, नाकातून रक्त वाहणे, मानेतील गाठी वाढणे, डोळ्यांतील मोतिबिंदू अचानक फुटणे, चुकून आपले बोट आपणच कापणे, ॥३७॥

कळा तिडका लागती । कां तें दंत उन्मळती । अधर जिव्हा रगडती । या नांव आध्यात्मिक ।।३८।।

कंबर, मान इ. अचानक दुखू लागून ठणका लागणे, दात पडणे, जीभ व ओठ चावले जाणे, ॥३८॥

कर्णदुःख नेत्रदुःख । नाना दुःखें घडे शोक । गर्भांध आणि नपुश्यक । या नांव आध्यात्मिक ।।३९।।

कान दुखणे, डोळे येणे, अनेक दु:खांचे शोकात होणारे रूपांतर, जन्मांधळेपणा व नपुंसकत्व, ॥३९॥

फुलें वडस आणी पडळें । कीड गर्ता रातांधळें । दुश्चित भ्रमिष्ट आणी खुळें । या नांव आध्यात्मिक ।।४०।।

काचबिंदू, मोतिबिंदू व पडदा येणे, कानांत इ. कीडी होणे, शेण इ. गर्तेत पडणे, रात्री न दिसणे, लक्ष नसणे, विचित्रपणा व वेडेपणा, ॥४०॥

मुकें बधीर राखोंडें । थोटें चळलें आणी वेडें । पांगुळ कुन्हें आणी पावडें । या नांव आध्यात्मिक ।।४१।।

मुकेपणा, बहिरेपणा, दुभंगलेला ओठ, हात नसणे, चळ लागणे, वेडेपणा, पांगळा, कुबडा व आखुड पायांचा असणे, ॥४१॥

तारसें घुलें काणें कैरें । गारोळें जामुन टाफरें । शडांगुळें गेंगाणें विदरें । या नांव आध्यात्मिक ।।४२।।

विचित्र डोळे, वाकडी मान, तिरळा, तिरक्या डोळ्यांचा, घारे डोळे, बुटका, ठेच लागणे, सहा बोटे (हाताला किंवा पायाला), गेंगाणा स्वर व कुरूप, ॥४२॥

दांतिरें बोचिरें घानाळ । घ्राणहीन श्रोत्रहीन बरळ । अतिकृश अतिस्थूळ । या नांव आध्यात्मिक ।।४३।।

मोठे व पुढे आलेले दात, लांबच लांब नाक, बैठे नाक, एक कानच नसणे, वाचाळपणा, लुकडा वा लठ्ठ, ॥४३॥

तोंतरें बोंबडें निर्बळ । रोगी कुरूप कुटीळ । मत्सरी खादाड तपीळ । या नांव आध्यात्मिक ।।४४।।

चांचरत बोलणे, अस्पष्ट उच्चार, जीव नसल्याप्रमाणे बोलणे, रोगग्रस्त, कुरूप, कुटाळखोर, मत्सरी, खादाड, तापट, ॥४४॥

संतापी अनुतापी मत्सरी । कामिक हेवा तिरस्कारी । पापी अवगुणी विकारी । या नांव आध्यात्मिक ।।४५।।

तापट, पश्चात्तापी, मत्सरी, कामुक, हेवा व तिरस्कार करणारा, पापी, दुर्गुणी व क्रोधादिकांना बळी पडणे, ।।४५।।

उठवणें ताठा करक । आवटळे आणी लचक । सुजी आणी चालक । या नांव आध्यात्मिक ।।४६।।

कोणीतरी उठवावे लागणे, पाठ इ. ताठणे, अंग अवघडणे, लचकणे, सुजणे, संधिवात, ।।४६।।

मूल आडवें गर्भपात । स्तनगुंते सनपात । संसारकोंडे आपमृत्यु । या नांव आध्यात्मिक ।।४७।।

गर्भवतीचे पोट दुखणे, गर्भ आडवा येणे, गर्भपात होणे, बाळंत झाल्यावर स्तनातून दूध बाहेर न येता साठून राहणे, योनीमार्गात (संसार) गर्भ कोंडून तो मरण पावणे. ।।४७।।

नखविख आणी हिंगुर्डे । बाष्ट आणि वावडें । उगीच दांतखिळ पडे । या नांव आध्यात्मिक ।।४८।।

घाणेरड्या नखाची जखम, नखाच्या तळाशी सूज, शिळे व न सोसणारे अन्न खावे लागणे, अचानक दातखीळ बसणे, ।।४८।।

झडती पातीं सुजती भवया । नेत्रीं होती राझणवडीया । चाळसी लागे प्राणियां । या नांव आध्यात्मिक ।।४९।।

पापण्या झडणे, भुवयांची सूज, रांजणवाड्या व दृष्टीसाठी चष्मा वापरावा लागणे. ।।४९।।

वांग तिळ सुरमें लांसे । चामखिळ गलंडें मसें । चुकुर होईजे मानसें । या नांव आध्यात्मिक ।।५०।।

त्वचेवर काळ्या पुळ्या, तीळ, खवले पडणे, त्वचेवरील केसांचा पुंजका तयार होणे, चामखीळ, गालगुंड, त्वचेचा काही भाग जाड होणे, मन सैरभैर होणे. ।।५०।।

नाना फुग आणी आवाळें । आंगी दुर्गंधी प्रबळे । चाईचाटी लाळ गळे । या नांव आध्यात्मिक ।।५१।।

अंगावर येणारे फुगवटे, मासाचे गोळे व शरीराला दुर्गंधी येणे. डोक्यावरचे केसाचे पुंजके गळून पडणे व तोंडावाटे लाळ गळणे. ।।५१।।

नाना चिंतेची काजळी । नाना दु:खें चित्त पोळी । व्याधीवांचून तळमळी । या नांव आध्यात्मिक ।।५२।।

अंत:करणावर जणू चिंतेची काजळी धरणे, दु:खांनी मन जणू भाजणे, मनाची अकारण तळमळ होणे. ।।५२।।

वृद्धपणीच्या आपदा । नाना रोग होती सदा । देह क्षीण सर्वदा । या नांव आध्यात्मिक ।।५३।।

म्हातारपणात येणाऱ्या अडचणी, सतत काहींना काही रोग असणे, सततचा अशक्तपणा, ।।५३।।

नाना व्याधी नाना दु:खें । नाना भोग नाना खांडकें । प्राणी तळमळी शोकें । या नांव आध्यात्मिक ।।५४।।

अनेक आजार व त्यांची त्यांची दु:खे, दु:खाचे निरनिराळे भोग, चरत जाणारे व्रण, व शोकाने होणारी तळमळ, ।।५४।।

ऐसा आध्यात्मिक ताप । पूर्वपापाचा संताप । सांगता सरेना अमूप । दु:खसागर ।।५५।।

असे हे आध्यात्मिक ताप अनेक जन्मींच्या पापांमुळे भोगावे लागतात, हा दु:खसागर सांगून संपणार नाही. ।।५५।।

बहुत काय बोलावें । श्रोतीं संकेतें जाणावें । पुढें बोलिजे स्वभावें । आदिभूतिक ।।५६।।

अधिक सांगून किती सांगणार? सांगितले त्यावरून श्रोत्यांनी तापांचा अंदाज करावा. यानंतर आधिभौतिक ताप सांगू. ।।५६।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आध्यात्मिकतापनाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आध्यात्मिकताप' नावाचा सहावा समास समाप्त

दशक तिसरा : स्वगुणपरीक्षा

समास सातवा : आधिभौतिकताप

॥ श्रीराम समर्थ ॥

मागां जालें निरूपण । आध्यात्मिकाचें लक्षण । आतां आदिभूतिक तो कोण । सांगिजेल ।। १ ।।

याआधीच्या समासात आध्यात्मिक तापांच्या लक्षणांचा तपशील सांगितला, आता आधिभौतिक ताप सांगू. ॥१॥

श्लोक

सर्वभूतेन संयोगात् सुखं दुःखं च जायते ।। द्वितीयतापसंतापः सत्यं चैवाधिभौतिकः ।। १ ।।

सर्व भूतांचेनि संयोगें । सुख दुःख उपजों लागे । ताप होतां मन भंगे । या नांव आदिभूतिक ।। २ ।।

पंचमहाभूतांनी घडलेल्या बाह्य सृष्टीशी संबंध आल्यावर कधी सुख तर कधी दुःख यांचा अनुभव येतो. दुःखाचा अनुभव आल्यामुळे जीव त्रस्त होऊन मनाला वेदना होतात. हाच तो आधिभौतिक ताप होय. ॥२॥

तरी या आदिभूतिकाचें लक्षण । प्रांजळ करूं निरूपण । जेणें अनुभवास ये पूर्ण । वोळखी तापत्रयाची ।। ३ ।।

आता या आधिभौतिक तापांच्या लक्षणांचे तपशीलवार निरूपण करू. त्यामुळे तापत्रय कसे असतात, याची पूर्ण ओळख पटेल. ॥३॥

ठेंचा लागती मोडती कांटे । विझती शस्त्रांचे घायटे । सल सिलका आणी सरांटे । या नांव आदिभूतिक ।। ४ ।।

पावलांना ठेचा लागणे, हातापायात काटे शिरणे, शस्त्रांचे घाव बसणे, लाकडाचे टोकदार, बारीक तुकडे हातापायात शिरणे, टोकदार गवत व सराटे लागणे. ॥४॥

अंग्या आणि काचकुहिरी । आवचटा लागे शरीरीं । गांधील येऊन दंश करी । या नांव आदिभूतिक ।। ५ ।।

खाजकुहिरी व आग निर्माण करणारी वनस्पती अचानक अंगाला लागते. कल्पना नसताना गांधील माशी चावते. हेच ते आधिभौतिक ताप होत. ॥५॥

मासी गोमासी मोहळमासी । मुंगी तेलमुंगी डांस दसी । सोट जळु लागे यासी । आदिभूतिक बोलिजे ।। ६ ।।

मधमाशी, गोमाशी, मोहोळ उठल्यावर चावणारी माशी, मुंगी, लालमुंगी व डास चावणे, रक्त शोषणारा किडा व जळू अंगाला लागणे. ॥६॥

पिसा पिसोळे चांचण । कुसळें मुंगळे ढेंकुण । विसीफ भोवर गोंचिड जाण । या नांव आदिभूतिक ।। ७ ।।

पिसवा, पिसोळे, डोंगळे, कुसळे, मुंगळे, ढेकूण, गजकर्ण, भुंगे, गोचिडे चावणे. ॥७॥

गोंबी विंचु आणी विखार । व्याघ्र लांडिगे आणी शूकर । गौसायळ सामर । या नांव आदिभूतिक ।। ८ ।।

गोम, विंचू, सर्प, वाघ, लांडगे, डुक्कर, साळू व सांबर यांचे चावे, जखमा किंवा फाडणे. ॥८॥

रानगाई रानम्हैसे । रानशकट्ट आणी रींसें । रानहाती लावपिसें । या नांव आदिभूतिक ।।९।।

रानगाई, रानरेडे, रानबैल, अस्वले, रानहत्ती ह्यांच्या धडका व पक्ष्यांची पिसे टोचणे. ॥९॥

सुसरीनें वोढून नेलें । कां तें आवचितें बुडालें । अथवा खळाळीं पडिलें । या नाव आदिभूतिक ।।१०।।

पाण्यात सुसरीने ओढून नेणे, पाण्यात अचानक बुडणे, वेगवान पाण्याच्या प्रवाहात सापडणे. ॥१०॥

नाना विखारें आजगर । नाना मगरें जळचर । नाना वनचरें अपार । या नांव आदिभूतिक ।।११।।

विषारी साप, अजगर, मगरी, इतर जळचर व अनेक जंगली जनावरे यांचा त्रास. ॥११॥

अश्व वृषभ आणी खर । स्वान शूकर जंबुक मार्जर । ऐसीं बहुविध क्रूर । या नांव आदिभूतिक ।।१२।।

घोडे, बैल, गाढवे, कुत्री, डुकरे, कोल्हे, मांजर अशा क्रूर प्राण्यांपासून होणारा त्रास. ॥१२॥

ऐसीं कर्कशें भयानकें । बहुविध दुःखदायकें । दुःखें दारुणें अनेकें । या नांव आदिभूतिक ।।१३।।

अशी ही सहन करण्यास कठीण व भयंकर अशी अनेक दारुण दुःखे म्हणजे आधिभौतिक ताप. ॥१३॥

भिंती माळवदें पडती । कडे भुयेरीं कोंसळती । वृक्ष आंगावरी मोडती । या नांव आदिभूतिक ।।१४।।

अंगावर भिंती व गच्च्या पडतात, कडे कोसळतात, भुयारे जमीनदोस्त होतात, झाडे अंगावर पडतात. ॥१४॥

कोणी येकाचा श्राप जडे । कोणी येकें केले चेडे । आधांतरी होती वेडे । या नांव आदिभूतिक ।।१५।।

कोणाचा शाप लागतो, कोणी चेडा-चेटुक करते, सर्व आधार सुटल्याने वेड लागणे. ॥१५॥

कोणी येकें चाळविलें । कोणी येकें भ्रष्टविलें । कोणी येकें धरून नेलें । या नांव आदिभूतिक ।।१६।।

कोणी बुद्धीत संभ्रम निर्माण करते, कोणी धर्मांतर सक्तीने करावयास लावते, पळवून नेते. ॥१६॥

कोणी येकें दिलें वीष । कोणी येंके लाविले दोष । कोणी येकें घातले पाश । या नांव आदिभूतिक ।।१७।।

कोणी विष घालते, कोणी दूषणे देते, कोणी खोड्यात अडकवून ठेवते. ॥१७॥

अवचिता सेर लागला । नेणो बिबवा चिडला । प्राणी धुरें जाजावला । या नांव आदिभूतिक ।।१८।।

शेतातून चालताना न कळत शेराचा चीक लागतो, बिब्बा उततो, धुराने श्वास कोंडतो. ॥१८॥

इंगळावरी पाय पडे । शिळेखालें हात सांपडे । धावतां आडखुळे पडे । या नांव आदिभूतिक ।।१९।।

निखाऱ्यावर पाय पडतो, हातावर दगड पडतो, पळताना अडखळून पडतो. ॥१९॥

वापी कूप सरोवर । गर्ता कडा नदीतीर । आवचितें पडे शरीर । या नांव आदिभूतिक ।।२०।।

बारव, खोलविहीर, तलाव, शेणाची गर्ता, डोंगराचा कडा, नदीकाठ इत्यादीमध्ये किंवा वरून पडणे. ॥२०॥

दुर्गाखालें कोंसळती । झाडावरून पडती । तेणें दुःखें आक्रंदती । या नांव आदिभूतिक ।।२१।।

बुरूज व झाडावरून खाली पडल्यावर सर्वांगावर मार बसून किंवा हाडे मोडून मोठमोठ्याने रडतात. ॥२१॥

सीतें वोठ तरकती । हात पाव टांका फुटती । चिखल्या जिव्हाळ्या लागती । या नांव आदिभूतिक ।।२२।।

थंडीने ओठ फुटणे, हात, पाय व टाचांना भेगा पडणे, पायाची बोटे हुळहुळी होणे व कुजणे. ॥२२॥

अशनपानाचिये वेळे । उष्ण रसें जिव्हा पोळे । दांत कस्करे आणि हरळे । या नांव आदिभूतिक ।।२३।।

खाताना किंवा पिताना पदार्थ फार कढत असले तर तोंड पोळते. थंडी भरली असता दात वाजू लागतात. काही

वेळा दातांना थंड किंवा उष्ण पदार्थ सोसत नाहीत. ॥२३॥

पराधेन बाळपणीं । कुशब्दमारजाचणी । अन्नवस्त्रेंवीण आळणी । या नांव आदिभूतिक ।।२४।।

आईवडील मरण पावल्यामुळे बालपण परक्याच्या घरात गेले तर, टाकून बोलणे, मार देणे, निरनिराळ्या प्रकारे छळणे, पुरेसे जेवण न देणे, कपडे जेमतेम देणे, इत्यादी सोसावे लागते. ॥२४॥

सासुरवास गालोरे । ठुणके लासणें चिमोरे । आलें रूदन न धरे । या नांव आदिभूतिक ।।२५।।

सासुरवासात सुनेचा गाल पिरगळणे, ठोसे देणे, डाग, चिमटे, इत्यादींमुळे रडू येत असले तरी रडणेही अशक्य होणे. ॥२५॥

चुकतां कान पिळिती । कां तो डोळा हिंग घालिती । सर्वकाळ धारकीं धरिती । या नांव आदिभूतिक ।।२६।।

थोडे चुकले तरी कान पिळणे, डोळ्यांत हिंगाची पूड घालणे व सतत धारेवर धरणे. ॥२६॥

नाना प्रकारीचे मार । दुर्जन मारिती अपार । दुरी अंतरे माहेर । या नांव आदिभूतिक ।।२७।।

हाताने, पायाने इ. अनेक प्रकारे मारणे, दुष्टांकडून भयंकर मार खाणे, मुलींचे माहेर कायमचे तुटणे. ॥२७॥

कर्ण नासिक विंधिले । बळेंचि धरून गोंधिले । खोडी जालिया पोळविलें । या नांव आदिभूतिक ।।२८।।

नाक व कान कापणे किंवा विद्रूप करणे, सक्तीने गोंदविणे (Tatoo), व्रात्यपणा केल्यास चटके देणे. ॥२८॥

परचक्रीं धरून नेलें । नीच यातीस दिधलें । दुर्दशा होऊन मेलें । या नांव आदिभूतिक ।।२९।।

शत्रूच्या आक्रमणात पळवून नेणे, हलक्या जातीतील व्यक्तीशी लग्न झाल्याने हाल होऊन मरणे. ॥२९॥

नाना रोग उद्भवले । जे आध्यात्मिकीं बोलिले । वैद्य पंचाक्षरी आणिले । या नांव आदिभूतिक ।।३०।।

वरचेवर निरनिराळ्या रोगांनी आजारी पडणे, त्यांची यादी आध्यात्मिक तापात दिली आहे. त्यासाठी वैद्य व पंचाक्षरी ह्यांनी उपचार करताना हाल करणे! ॥३०॥

नाना वेथेचें निर्शन । व्हावया औषध दारुण । बळात्कारें देती जाण । या नांव आदिभूतिक ।।३१।।

अनेक आजार बरे होण्यासाठी बळजबरीने जहाल औषधे देणे. ॥३१॥

नाना वल्लीचे रस । काडे गर्गोड कर्कश । घेतां होये कासाविस । या नांव आदिभूतिक ।।३२।।

अनेक वनस्पतींचे रस काढून तयार केलेले जहाल काढे व आसवे घेताना जीव कासावीस होणे. ॥३२॥

ढाळ आणी उखाळ देती । पथ्य कठीण सांगती । अनुपान चुकतां विपत्ती । या नांव आदिभूतिक ।।३३।।

ढाळ व उलटी होण्यासाठी औषधे, भयंकर पथ्य व अनुपाने सांगतात. ह्यात चूक झाली तर भयंकर परिणामांची भीती घालतात. ॥३३॥

फाड रक्त फांसणी । गुल्लडागांची जाचणी । तेणें दुःखें दुखवे प्राणी । या नांव आदिभूतिक ।।३४।।

शस्त्रक्रियेसाठी शरीर फाडणे (समर्थांचे काळी संमोहनाची सोय नव्हती.), गळवातून रक्त काढणे, आवाळू बरे करण्यासाठी त्यावर तापलेल्या सळीने डाग देणे अशा वेदनांमुळे दुःखी होणे. ॥३४॥

रुचिक बिबवें घालिती । नाना दुःखें दडपे देती । सिरा तोडिती जळवा लाविती । या नांव आदिभूतिक ।।३५।।

रुईचा चीक व बिब्ब्याचे थेंब रोगावर घालणे, शिरा तोडणे, जळवा लावणे इत्यादी अनेक दुःखांनी जीव दडपून

जातो. ॥३५॥

बहु रोग बहु औषधें । सांगतां अपारें अगाधें । प्राणी दुखवे तेणें खेदें । या नांव आदिभूतिक ।।३६।।

रोग कित्येक असून त्यांची औषधेही अनेक आहेत, ती सर्व सांगू म्हटले तर अमोज आहेत. त्या सर्वांनी माणसाला अत्यंत त्रास होतो. ॥३६॥

बोलाविला पंचाक्षरी । धूरमार पीडा करी । नाना यातना चतुरीं । आदिभूतिक जाणिजे ।।३७।।

भूतबाधा काढण्यासाठी पंचाक्षरी आणला तर तो धुरी देणे, छडीने मारणे, अंगावर पाण्याचा मारा करणे इ. छळ करतो. शहाण्याने ह्या सर्वांना 'आधिभौतिक' ताप म्हणावे. ॥३७॥

दरवडे घालूनियां जना । तश्कर करिती यातना । तेणें दुःख होये मना । या नांव आदिभूतिक ।।३८।।

चोर व दरोडेखोर वस्त्यांमध्यें दरोडे घालून लोकांना लुबाडतात व त्या यातनांचे त्यांना दुःख होते. ॥३८॥

अग्नीचेनि ज्वाळें पोळे । तेणे दुःखें प्राणी हरंबळे । हानी जालियां विवळे । या नांव आदिभूतिक ।।३९।।

अग्नीच्या ज्वालांनी अंग भाजल्यावर माणसाला अतोनात यातना होतात. घर व घरातील वस्तूंना आग लागून नुकसान झाले की माणूस तळमळतो. ॥३९॥

नाना मंदिरें सुंदरें । नाना रत्नांचीं भांडारें । दिव्यांबरें मनोहरें । दग्ध होती ।।४०।।

अशा आगीत सुंदर इमारती, रत्नांच्या पेट्या, उंची वस्त्रे भस्मसात होतात. ॥४०॥

नाना धान्यें नाना पदार्थ । नाना पशु नाना स्वार्थ । नाना पात्रें नाना अर्थ । मनुष्यें भस्म होती ।।४१।।

धान्यांची कोठारे, जनावरांचे गोठे व दैनंदिन गरजेची (स्वार्थ) भांडी, कपाटे व माणसेही जळून जातात. ॥४१॥

आग्न लागला सेती । धान्यें बणव्या आणि खडकुती । युक्षदंड जळोन जाती । अकस्मात ।।४२।।

उभ्या पिकांना शेतात आग लागते, धान्याची पोती, गवताच्या गंजी, धान्याचे भुसकट, ऊस इत्यादींना अचानक आग लागते. ॥४२॥

ऐसा आग्न लागला । अथवा कोणीं लाविला । हानी जाली कां पोळला । या नांव आदिभूतिक ।।४३।।

अशी आग अपघाताने लागते किंवा मुद्दाम कोणी लावण्याने नुकसान होऊन माणूस दुःखात पोळतो. ॥४३॥

ऐसे सांगतां बहुत । होती वन्हीचे आघात । तेणें दुःखें दुःखवें चित्त । या नांव आदिभूतिक ।।४४।।

असे आग लागण्याचे कित्येक प्रकार सांगता येतील. त्यामुळे अन्तःकरणाला फार यातना होतात. ॥४४॥

हारपे विसरे आणि सांडे । नासे गाहाळे फुटे पडे । असाध्य होये कोणीकडे । या नांव आदिभूतिक ।।४५।।

हरवणे, विसरणे, वाटेत पडणे, नष्ट होणे, न सापडणे, फुटणे, उंचावरून आदळणे व झालेले नुकसान भरून न येणे असे कित्येक वस्तूंबाबत घडते. ॥४५॥

प्राणी स्थानभ्रष्ट जालें । नाना पशूतें चुकलें । कन्यापुत्र गाहाळले । या नांव आदिभूतिक ।।४६।।

गाव किंवा सत्तेचे पद सोडावे लागणे, गाई-म्हशी-शेळ्या हरवणे, मुले वा मुली बेपत्ता होणे. ॥४६॥

तश्कर अथवा दावेदार । आवचिता करिती संव्हार । लुटिती घरें नेती खिल्लार । या नांव आदिभूतिक ।।४७।।

चोर किंवा वैरी अचानक हल्ला करून घर लुटतात किंवा जनावरे पळवून नेतात. ॥४७॥

नाना धान्यें केळी कापिती । पानमळां मीठ घालिती । ऐसे नाना आघात करिती । या नांव आदिभूतिक ।।४८।।

उभी पिके व केळीचे लोंगर कापून नेतात, पानमळ्यातील वेलीच्या आळ्यात मीठ घालून हरप्रकारे नुकसान करतात. ।।४८।।

मैंद उचले खाणोरी । सुर्वणपंथी भुररेकरी । ठकु सिंतरु वरपेकरी । वरपा घालिती ।।४९।।

लुटारू, भुरटे चोर, पुरलेले द्रव्य खणून काढणारे, किमयागार, भुरळ घालणारे, ठक, लबाड व दरोडेखोर इ. नाना प्रकारे लुबाडणे. ।।४९।।

गठीछोडे द्रव्य सोडिती । नाना आळंकार काढिती । नाना वस्तू मूषक नेती । या नांव आदिभूतिक ।।५०।।

लक्ष ठेवून गाठोडी सोडून आतील दागिन्यासारख्या वस्तू पळवणे, उंदरांनी वस्तू नेणे. ।।५०।।

वीज पडे हिंव पडे । प्राणी प्रजंनी सांपडे । कां तो माहापुरीं बुडे । या नांव आदिभूतिक ।।५१।।

अंगावर वीज पडणे, हिमवर्षावात सापडणे, तुफान पावसात भिजणे किंवा महापुरात बुडणे. ।।५१।।

भोंवरे वळणें आणी धार । वोसाणें लाटा अपार । वृश्चिक गोंबी आजगर । वाहोन जाती ।।५२।।

पाण्याच्या प्रवाहात भोवरे असणे, वळणे, वेगवान धार, वहाणारे ओंडके, उंच लाटा, ह्यांचे तडाखे. विंचू, गोमाशा व अजगर इत्यादीं ज्यांत वाहून जातात. ।।५२।।

तयांमधें प्राणी सांपडला । खडकीं बेटीं आडकला । बुडत बुडत वांचला । या नांव आदिभूतिक ।।५३।।

त्या प्रवाहात माणूस वाहात जातो, खडकावर आपटतो, बेटावर अडकतो, बुडता बुडता वाचतो. ।।५३।।

मनासारिखा नसे संसार । कुरूप कर्कश स्त्री क्रूर । विधवा कन्या मूर्ख पुत्र । या नांव आदिभूतिक ।।५४।।

संसार मनासारखा न होणे, बायको कुरूप, कर्कशा व कठोर असणे, घरात विधवा झालेली कन्या व मुलगे मूर्ख असणे. ।।५४।।

भूत पिशाच्च लागलें । आंगावरून वारें गेलें । अबद्ध मंत्रें प्राणी चळलें । या नांव आदिभूतिक ।।५५।।

भूत व पिशाच्चाने झपाटणे, अर्धांगवात, मंत्र चुकीचा जपल्याने बुद्धी भ्रमिष्ट होणे. ।।५५।।

ब्राह्मणसमंध शरीरीं । बहुसाल पीडा करी । शनेश्वराचा धोका धरी । या नांव आदिभूतिक ।।५६।।

ब्रह्मसमंधाने शरीरात प्रवेश करून नाना प्रकारे छळणे, शनीची साडेसाती. ।।५६।।

नाना ग्रहे काळवार । काळतिथी घातचंद्र । काळवेळ घातनक्षत्र । या नांव आदिभूतिक ।।५७।।

वक्री ग्रह झाल्याचे कळणे, घातवार, घाततिथी, चंद्राचे बळ नसणे, अशुभ वेळ, घातनक्षत्र, हेच आधिभौतिक दुःख. ।।५७।।

सिंक पिंगळा आणी पाली । वोखटें होला काक कलाली । चिंता काजळी लागली । या नांव आदिभूतिक ।।५८।।

भलत्या दिशेला तोंड करून किंवा शुभवेळेला शिंक येणे, पिंगळ्याचा शब्द, पालीची चुकचुक, कावळा व होला ह्या पक्ष्यांचे अपशकून सूचक ओरडणे व त्यामुळे अन्तःकरणाला चिंतेची काजळी लागते. ।।५८।।

दिवटा सरवदा भाकून गेला । अंतरीं धोका लागला । दुःस्वप्नें जाजावला । या नांव आदिभूतिक ।।५९।।

मशाल घेऊन फिरणाऱ्या दिवट्याने व ज्योतिष्याने काही प्रतिकूल भविष्य सांगितल्याने मन खिन्न झाले. वाईट स्वप्न पडल्याने भयभीत झाला. ॥५९॥

भालु भुंके स्वान रडे । पाली आंगावरी पडे । नाना चिन्हें चिंता पवाडे । या नांव आदिभूतिक ।।६०।।

कोल्ही ओरडू लागली, कुत्री विव्हळू लागली, अंगावर पाल पडली की अशुभ होण्याच्या चिंतेने तळमळणारा. ॥६०॥

बाहेरी निघतां अपशकुन । नाना प्रकारें विच्छिन्न । तेणें गुणें भंगे मन । या नांव आदिभूतिक ।।६१।।

घराबाहेर पडताच अपशकुन होणे व त्यामुळे उत्साह नष्ट होऊन मन उदास व द्विधा होणे. ॥६१॥

प्राणीं बंदीं सांपडला । यातने वरपडा जाला । नाना दु:खें दु:खवला । या नांव आदिभूतिक ।।६२।।

कैदेत पडून हालअपेष्टा भोगणे व त्या केव्हा संपतील ह्या अपेक्षेने तळमळणे. ॥६२॥

प्राणी राजदंड पावत । जेरबंद चाबुक वेत । दरेमार तळवेमार होत । या नांव आदिभूतिक ।।६३।।

अपराधाची शिक्षा म्हणून दोऱ्यांनी बांधून टाकून चाबूक मारणे, वेताच्या छडीने झोडपणे, कडेलोट करणे, तळहातावर काठीने मारणे. ॥६३॥

कोरडे पारंब्या फोक । बहु प्रकारें अनेक । बहु ताडिती आदिभूतिक । या नांव बोलिजे ।।६४।।

चामड्याचा चाबूक, झाडाच्या पारंब्या, झाडाची सालपटे अशी अनेक प्रकारची साधने वापरून मार देणे. ॥६४॥

मोघरीमार बुधलेमार । चौखुरून डंगारणेमार । बुक्या गचांड्या गुडघेमार । या नांव आदिभूतिक ।।६५।।

सोट्याने सडकून काढणे, पिंपात बसवून दगडाळ रस्त्यावरून ढकलत नेणे, हातापायाला दोरखंडांनी ताणून, ठोकून काढणे, बुक्क्या मारणे, गचांडी धरणे, गुडघ्याने मारणे. ॥६५॥

लाता चपराखा सेणमार । कानखडे दगडमार । नाना प्रकारींचे मार । या नांव आदिभूतिक ।।६६।।

लाथा व चपराका मारणे, शेणाच्या गोळ्यांनी मारणे, कानांत खडे ठोकणे, दगडांनी किंवा इतर वस्तूंनी मारणे. ॥६६॥

टांगणें टिपऱ्या पिछोडे । बेडी बुंधनाल कोलदंडे । रक्षणनिग्रह चहूंकडे । या नांव आदिभूतिक ।।६७।।

उलटे टांगणे, काढण्या घालणे, हात पाठीमागे बांधणे, बेड्या घालणे, पायाला नाल ठोकणे, खोड्यांत अडकवून सर्व हालचाली बंद करणे. ॥६७॥

नाकवणी चुनवणी । मीठवणी रायवणी । गुळवण्याची जाचणी । या नांव आदिभूतिक ।।६८।।

चुना, मीठ, मोहोरी ह्यांचे पाणी व कढत काकवी नाकातोंडात बळजबरीने ओतणे. ॥६८॥

जळामध्यें बुचकुळिती । हस्तीपुढें बांधोन टाकिती । हाकिती छळिती यातायाती । या नांव आदिभूतिक ।।६९।।

पाण्यात वरचेवर नाक व तोंड बुडविणे, हत्तीच्या पायी देणे, कोळप्याला जुंपून बैलाप्रमाणे चाबकाने मारणे व नाना प्रकारांनी छळणे. ॥६९॥

कर्णछेद घ्राणछेद । हस्तछेद पादछेद । जिव्हाछेद अधरछेद । या नांव आदिभूतिक ।।७०।।

कान, नाक, हात, पाय, जीभ व ओठ छाटणे. ॥७०॥

तीरमार सुळीं देती । नेत्र वृषण काढिती । नखोनखीं सुया मारिती । या नांव आदिभूतिक ।।७१।।

बाणांनी मारणे, सुळी देणे, डोळे काढणे, वृषण (Scrotum) कापणे, सर्व नखांत खिळे ठोकणे. ॥७१॥

पारड्यामध्यें घालणें । कां कडेलोट करणें । कां भांड्यामुखें उडवणें । या नांव आदिभूतिक ।।७२।।

वजनाच्या काट्यात घालून वरखाली करणे, कडेलोट, तोफेच्या तोंडी देणे. ॥७२॥

कानीं खुंट्या आदळिती । अपानीं मेखा मारिती । खाल काढून टाकिती । या नांव आदिभूतिक ।।७३।।

कानांत खुंट्या ठोकणे, गुदद्वारात पाचर मारणे, अंगाची सालटी काढणे. ॥७३॥

भोत आणी बोटबोटी । अथवा गळ घालणें कंठीं । सांडस लावून आटाटी । या नांव आदिभूतिक ।।७४।।

पोत्यात भरून घुसमटून मारणे, बोटे ठेचणे, गळ्यात गळ खुपसणें, तापलेल्या चिमट्याने अवयव धरणे. ॥७४॥

सिसें पाजणें वीष देणें । अथवा सिरछेद करणें । कां पायातळीं घालणें । या नांव आदिभूतिक ।।७५।।

शिसे वितळवून ते उकळत असतानाच तोंडात घालणे, विषप्रयोग, मान तलवारीने उडविणे, पायाखाली तुडविणे. ॥७५॥

सरडें मांजरें भरिती । अथवा फांसीं नेऊन देती । नानापरी पीडा करिती । या नांव आदिभूतिक ।।७६।।

खेळताना मुलांनी कपड्यात सरडे टाकणे किंवा मांजर टाकणे, दावेदारांनी फासावर लटकविणे इ. त्रासांना आधिभौतिक ताप म्हणतात. ॥७६॥

स्वानप्रळये व्याघ्रप्रळये । भूतप्रळये सुसरीप्रळये । शस्त्रप्रळये विझप्रळये । या नांव आदिभूतिक ।।७७।।

पिसाळलेले कुत्रे चावणे व त्यामुळे हालहाल होऊन मरणे, वाघाने फाडून खाणे, पिशाच्चाने झपाटून आयुष्य बरबाद होणे, सुसरीने गिळणे, शस्त्राने व अंगावर वीज पडून मरणे. ॥७७॥

सीरा वोढून घेती । टेंभें लाऊन भाजिती । ऐशा नाना विपत्ती । या नांव आदिभूतिक ।।७८।।

शरीरातील शिरा सोलून काढणे, मशालीने चटके देणे अशा प्रकारच्या यातना. ॥७८॥

मनुष्यहानी वित्तहानी । वैभवहानी महत्त्वहानी । पशुहानी पदार्थहानी । या नांव आदिभूतिक ।।७९।।

माणसे मरणे, संपत्तीचा नाश, वैभव नष्ट होणे, मोठेपणा गमावणे, जनावरे साथीत मरणे व भूकंपादिकात घरातील चीजवस्तूचे नुकसान होणे. ॥७९॥

बाळपणीं मरे माता । तारुण्यपणीं मरे कांता । वृद्धपणीं मृत्यु सुता । या नांव आदिभूतिक ।।८०।।

लहानपणी आई, तारुण्यात पत्नी व म्हातारपणी कर्ता मुलगा मरण पावणे. ॥८०॥

दुःख दारिद्र आणी रुण । विदेशपळणी नागवण । आपदा अनुपति कदान्न । या नांव आदिभूतिक ।।८१।।

दारिद्र्य व कर्जाचे दुःख, ह्यातून सुटकेसाठी दूरदेशी गेले असता फसवणूक होणे, अचानक आपत्ती येणे व शिळे, कुजलेले, जाडेभरडे अन्न खावे लागणे. ॥८१॥

आकांत वाखाप्रळयें । युध्य होतां पराजये । जिवलगांचा होये क्षये । या नांव आदिभूतिक ।।८२।।

साथीमध्ये हजारो बळी पडून आकांत होणे, लढाईत पराभव, प्रियजनांचा अधःपात किंवा मृत्यू. ॥८२॥

कठीण काळ आणी दुष्काळ । साशंक आणि वोखटी वेळ । उद्वेग चिंतेचे हळाळ । या नांव आदिभूतिक ।।८३।।

राजकीय दृष्ट्या कठीण काळ येणे, दुष्काळ, संशयग्रस्तता, वाईट वेळ, उद्वेगाने व काळजीने जणू हलाहल विष घेतल्याप्रमाणे हाल होणे. ॥८३॥

घाणा चरखीं सिरकला । चाकाखालें सांपडला । नाना वन्हींत पडिला । या नांव आदिभूतिक ।।८४।।

घाण्यात किंवा चरकात हात सापडणे, वाहनाच्या चाकाखाली चिरडणे, विटांची भट्टी, लोहाराची भट्टी, गुळाचे चुळवण ह्यांत पडणे. ॥८४॥

नाना शस्त्रें भेदिला । नाना स्वापदीं भक्षिला । नाना बंदीं पडिला । या नांव आदिभूतिक ।।८५।।

अनेक शस्त्रांच्या जखमा, निरनिराळ्या जंगली जनावरांनी फाडणे, वेळोवेळी कैदेत पडणे. ।।८५।।

नाना कुवासें निर्बुजे । नाना अपमानें लाजे । नाना शोकें प्राणी झिजे । या नांव आदिभूतिक ।।८६।।

गलिच्छ व नको असलेल्या ठिकाणी वरचेवर राहावे लागल्याने त्रस्त होणे, वेळोवेळी होणाऱ्या अपमानांमुळे लाजिरवाणे जीवन जगणे, शोकामुळे झुरणीला लागणें. ।।८६।।

ऐसें सांगता अपार । आहेत दुःखाचे डोंगर । श्रोतीं जाणावा विचार । आदिभूतिकाचा ।।८७।।

असे आधिभौतिक सांगू गेले तर अगणित आहेत. त्यांची दु:खे डोंगराएवढी आहेत. श्रोत्यांनी त्यांचा स्वत:शी विचार करावा. ।।८७।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आधिभौतिकतापनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आधिभौतिकताप' नावाचा सातवा समास समाप्त

दशक तिसरा : स्वगुणपरीक्षा

समास आठवा : आधिदैविकताप

॥श्रीरामसमर्थ॥

मागां बोलिला आध्यात्मिक । त्याउपरी आदिभूतिक । आतां बोलिजेल आदिदैविक । तो सावध ऐका ।।१।।

मागील दोन समासांत आध्यात्मिक व आधिभौतिक ताप सांगितले. आता आधिदैविक तापाविषयी लक्ष देऊन ऐका. ॥१॥

श्लोक

शुभाशुभेन कर्मणा देहांते यमयातना । स्वर्गनरकादि भोक्तव्यमिदं चैवाधिदैविकम् ।।१।।

श्लोकार्थ

शुभ व अशुभ कर्मानुसार मरणानंतर भोगाव्या लागणाऱ्या अनुक्रमे स्वर्गातील सुख व नरकातील यमयातनांना आधिदैविक ताप म्हणतात. ॥१॥

शुभाशुभ कर्मनें जना । देहांतीं येमयातना । स्वर्ग नर्क भोग नाना । या नांव आदिदैविक ।।२।।

लोकांनी शुभ व अशुभ कर्मे केल्यावर मृत्यूनंतर शुभाचे फळ स्वर्गसुख व नरकाचे यमयातना हे फळ मिळते. शुभकर्माचे फळ स्वर्ग सुख व अशुभ कर्माचे फळ यमयातना हे मिळते. ह्या यातनांना आधिदैविक ताप म्हणावे. ॥२॥

नाना दोष नाना पातकें । मदांधपणें अविवेकें । केलीं परी तें दुःखदायकें । येमयातना भोगविती ।।३।।

अविवेकाने माणूस उन्मत्त होतो. त्या धुंदीत (अंध) तो निषिद्ध कर्मे व पापे करतो. त्यामुळे दुसऱ्यांना त्याचा त्रास झाल्याने ती कर्मे करणाराला यमयातना भोगाव्या लागतात. (पाप ह्या संकल्पनेत अन्य जीवाला त्रास होणे मुख्य आहे. संध्यादी उपासना न करणे गौण आहे.) ॥३॥

आंगबळें द्रव्यबळें । मनुष्यबळें राजबळें । नाना सामर्थ्याचेनि बळें । अकृत्य करिती ।।४।।

शरीर, संपत्ती, अनुयायी, सत्ता इत्यादी बळांचे जोरावर करू नये ते केले जाते. ॥४॥

नीती सांडूनियां तत्त्वतां । करूं नये तेंचि करितां । येमयातना भोगितां । जीव जाये ।।५।।

नीतीतत्त्वे झुगारून देऊन जे अनीतीचे वर्तन घडते, त्यामुळे भोगाव्या लागणाऱ्या यमयातना अत्यंत कष्टदायक असतात. ॥५॥

डोळे झांकून स्वार्थबुद्धी । नाना अभिळाश कुबुद्धी । वृत्ति भूमिसिमा सांधी । द्रव्य दारा पदार्थ ।।६।।

स्वार्थपरायण बुद्धीमुळे, आंधळा होऊन त्याची कुबुद्धी लोभाने भरून गेल्यावर दुसऱ्यांचा व्यवसाय हाडप करणे, जमिनीवर अतिक्रमण करणे, दुसऱ्याची संपत्ती, पत्नी व इतर वस्तू पळवून नेण्यासारखी पापे घडतात. ॥६॥

मातलेपणें उन्मत्त । जीवघात कुटुंबघात । अप्रमाण क्रिया करीत । म्हणौन येमयातना ।।७।।

माज चढलेला उन्मत्त, इतरांचा प्राण घेणे, सर्व कुटुंब ठार मारणे व बेकायदेशीर कृत्ये करीत असल्याने जी पापे घडतात त्यामुळे यमयातना भोगाव्या लागतात. ॥७॥

मर्यादा सांडूनि चालती । ग्रामा दंडी ग्रामाधिपती । देशा दंडी देशाधिपती । नीतिन्याय सांडितां ।।८।।

कोणी न्यायनीतीच्या मर्यादा सोडून वागू लागले तर गावात गावाचा प्रमुख शिक्षा करतो. देशात त्याला देशाचा राज्यपाल शिक्षा करतो. ॥८॥

देशाधिपतीस दंडिता रावो । रायास दंडिता देवो । राजा न करितां नीतिन्यावो । म्हणौन येमयातना ।।९।।

राज्यपालाला साम्राज्याचा सम्राट शिक्षा करतो. सम्राट न्यायनीतीने वागत नसेल तर त्याला ईश्वर दंड करतो. सम्राटालाही यमयातना भोगाव्या लागतात. ॥९॥

अनीतीनें स्वार्थ पाहे । राजा पापी होऊन राहे । राज्याअंतीं नर्क आहे । म्हणौनियां ।।१०।।

राजाने नीती सोडून तो स्वार्थीपणे वागू लागला तर त्यालाही पाप लागते. असे पाप साठत गेल्याने मरण आल्यावर त्याला नरकात जावेच लागते. ॥१०॥

राजा सांडितां राजनीति । तयास येम गांजिती । येम नीति सांडितां धावती । देवगण ।।११।।

राजाने राजधर्म सोडला तर त्याला यम दंड करतो. यमाने आपली मर्यादा सोडली तर त्याला दंड करण्यासाठी देव पुढे सरसावतात. ॥११॥

ऐसी मर्यादा लाविली देवें । म्हणौनि नीतीने वर्तावें । नीति न्याय सांडितां भोगावें । येमयातनेसी ।।१२।।

ईश्वराने अशी दंडपरंपरा योजून ठेवली आहे. म्हणून प्रत्येकाने न्यायनीतीच्या मर्यादा सांभाळाव्यात. त्या न सांभाळल्यास यमयातना भोगाव्या लागतात. ॥१२॥

देवें प्रेरिले येम । म्हणौनि आदिदैविक नाम । तृतीय ताप दुर्गम । येमयातनेचा ।।१३।।

शिक्षा करण्यासाठी ईश्वराने यमदेवाची योजना केली असल्याने व ईश्वर हा महादेव असल्याने अत्यंत घोर यमयातनांना ‘आधिदैविक’ म्हणतात. ॥१३॥

येमदंड येमयातना । शास्त्रीं बोलिले प्रकार नाना । तो भोग कदापि चुकेना । या नांव आदिदैविक ।।१४।।

यमदंड व त्याच्या यातना ह्यांचे अनेक प्रकार पुराणांत सांगितले आहेत. पाप्यांसाठी ते यातनांचे भोग अटळ असतात. हाच आधिदैविक ताप. ॥१४॥

येमयातनेचे खेद । शास्त्री बोलिले विशद । शेरीरीं घालून अप्रमाद । नाना प्रकारें ।।१५।।

त्या यमयातनांचा तपशीलही पुराणात सांगितला आहे. मरणाऱ्याचे सूक्ष्मशरीर न चुकता यातना देण्याच्या यंत्रादिकांत घालून यमयातनांचे कष्ट भोगावयास भाग पाडतात. ॥१५॥

पापपुण्याचीं शरीरें । स्वर्गीं असती कळीवरें । त्यांत घालून नाना प्रकारें । पापपुण्य भोगविती ।।१६।।

मरण पावणाऱ्याचा सूक्ष्मदेह पाप व पुण्य ह्या दोन्हींच्या संचयाने भरलेला असतो. (त्यातील जे कमी असते त्याचे फळ आधी मिळते.) पुण्यशरीरे स्वर्गात जातात. त्यांना सुख भोगण्याच्या साधनांत घालतात.(ती त्यांना देतात.) ॥१६॥

नाना पुण्यें नाना विळास । नाना दोषें यातना कर्कश । शास्त्रीं बोलिलें अविश्वास । मानूंच नये ।।१७।।

अनेक प्रकारच्या पुण्यकर्मांनी अनेक प्रकारची सुखे व अनेक प्रकारच्या पापकृत्यांनी अनेक प्रकारच्या भयंकर यातना भोगाव्या लागतात असे शास्त्र सांगते. त्याविषयी जराही अविश्वास धरू नये. ॥१७॥

वेदाज्ञेनें न चालती । हरिभक्ती न करिती । त्यास येमयातना करिती । या नांव आदिदैविक ।।१८।।

जे वेदांनी सांगितलेली कर्मे व श्रीहरीचे भजन करीत नाहीत त्यांना यमयातना भोगाव्या लागतील. ॥१८॥

अक्षोभ नर्कीं उदंड जीव । जुनाट किडें करिती रवरव । बांधोन टाकिती हातपाव । या नांव आदिदैविक ।।१९।।

अक्षोभ ह्या नावाच्या नरकात अनंत काळपर्यन्त राहिलेले जीव किड्यांच्या शरीरात राहून त्यांचे त्यांचे आवाज काढीत असतात. पापी जीवाचे हातपाय बांधून यमदूत त्यांना त्या किड्यांत टाकून देतात. ।।१९।।

उदंड पैस लाहान मुख । कुंभाकार कुंड येक । दुर्गंधी उकाडा कुंभपाक । या नांव आदिदैविक ।।२०।।

कुंभपाक नावाचा नरक अरुंद तोंडाच्या प्रचंड मडक्याप्रमाणे असतो. त्यात अत्यंत उष्णता असून फार घाण सुटलेली असते. त्यात टाकून देण्याची शिक्षा देतात. (रौरव नरकाचा ह्यातच समावेश आहे.) ।।२०।।

तप्त भूमिका ताविती । जळत स्तंभ पोटाळविती । नाना सांडस लाविती । या नाव आदिदैविक ।।२१।।

तापलेल्या तव्यावर उभे करतात, पेटत्या खांबाला आलिंगन द्यावयास लावतात, निरनिराळ्या अवयवांना चिमटे लावतात. ।।२१।।

येमदंडाचे उदंड मार । यातनेची सामग्री अपार । भोग भोगिती पापी नर । या नांव आदिदैविक ।।२२।।

यमाजवळ एक दंड असतो. त्याचे सतत तडाखे देतात. जीवाला शिक्षा करण्याची कित्येक साधने त्याचेजवळ असतात. पापी जीवांना त्या भोगाव्या लागतात. ।।२२।।

पृथ्वीमध्यें मार नाना । त्याहून कठीण येमयातना । मारितां उसंतचि असेना । या नांव आदिदैविक ।।२३।।

मृत्युलोकावर बसणाऱ्या तडाख्यांपेक्षा यमयातनांचे तडाखे फारच जबर असून ते सतत बसत राहतात. ।।२३।।

चौघे चौंकडे वोढिती । येक तें झोंकून पाडिती । ताणिती मारिती वोढूनि नेती । या नांव आदिदैविक ।।२४।।

पापी जीवाला चार यमदूत चार बाजूंनी ओढतात, कोणी झोके देऊन आदळतात. हातापायांना ताण देऊन मारत मारत फरपटत नेतात. ।।२४।।

उठवेना बैसवेना । रडवेना पडवेना । यातनेवरी यातना । या नांव आदिदैविक ।।२५।।

उठावे तर उठवत नाही, बसावे तर बसू देत नाहीत, रडायला किंवा जरा शांत पडून रहायलाही अवसर मिळू नये इतक्या यातनांवर यातना देतात. ।।२५।।

आक्रंदे रडे आणी फुंजे । धकाधकीनें निर्बुजे । झुर्झुरों पंजर होऊन झिजे । या नांव आदिदैविक ।।२६।।

आक्रोश, रडणे, धुसफूस, काकुळतीला येणे, हाल हाल झाल्याने येणारे नैराश्य, झुरणीला लागून झीज होऊन हाडांचा पिंजरा करणे हे आधिदैवक तापाचे स्वरूप आहे. ।।२६।।

कर्कश वचनें कर्कश मार । यातनेचे नाना प्रकार । त्रास पावती दोषी नर । या नांव आदिदैविक ।।२७।।

कठोर बोलून भयंकर मारतात, व इतर अनेक प्रकारे पापी जीवाला छळ छळ छळतात. ।।२७।।

मागां बोलिला राजदंड । त्याहून येमदंड उदंड । तेथील यातना प्रचंड । भीमरूप दारुण ।।२८।।

आधिभौतिक तापांचे वर्णन करताना राजा देत असलेल्या शिक्षांचे वर्णन केले. त्याहून यमाच्या शिक्षा अखंड, भयंकर, काटा आणणाऱ्या व हाल करणाऱ्या आहेत. ।।२८।।

आध्यात्मिक आदिभूतिक । त्याहूनि विशेष आदिदैविक । अल्पसंकेतें कांहींयेक । कळावया बोलिलें ।।२९।।

आध्यात्मिक, आधिभौतिक व विशेष असलेल्या आधिदैविक तापाचे थोडक्यात वर्णन ते सर्व कळावेत म्हणून केले. ।।२९।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आधिदैविकतापनाम' समास आठवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आधिदैविकताप' नावाचा आठवा समास समाप्त

दसक तिसरा : स्वगुणपरीक्षा

समास नववा : मृत्युनिरूपण

॥श्रीरामसमर्थ॥

संसार म्हणजे सवेंच स्वार । नाहीं मरणास उधार । मापीं लागलें शरीर । घडीनें घडी ।।१।।

संसार ही अखंड चाललेली घोडदौड आहे. जन्माला येऊन, जगून मरणाची वेळ आली तरी तिला सामोरे जावेच लागते. शरीर प्रतिक्षणी मरणाकडे नेले जाते. ॥१॥

नित्य काळाची संगती । न कळे होणाराची गती । कर्मासारिखे प्राणी पडती । नाना देसीं विदेसीं ।।२।।

गर्भाशयात जीव असल्यापासूनच मृत्यू त्याच्या सोबतीला असतो! तो केव्हा झडप घालील हे सांगता येत नाही. कर्मानुसार जीवाला स्वदेशात किंवा परदेशात मरण येते. ॥२॥

सरतां संचिताचें शेष । नाहीं क्षणाचा अवकाश । भरतां न भरतां निमिष्य । जाणें लागे ।।३।।

प्रारब्ध संपताक्षणीच पुढील एक क्षणसुद्धा सवलत मिळत नाही. उलटी गणती संपते न संपते तोच मरण येते. (Count down). ॥३॥

अवचितें काळाचे म्हणियारे । मारित सुटती येकसरें । नेऊन घालिती पुढारे । मृत्यपंथें ।।४।।

काळाचे दूत अकस्मात येऊन बळजबरीने मृत्युपंथावर पुढे घालून नेतात. ॥४॥

होतां मृत्याची आटाटी । कोणी घालूं न सकती पाठीं । सर्वत्रांस कुटाकुटी । मागें पुढें होतसे ।।५।।

मृत्यूचा धडाका आला की त्यापासून कोणीच कोणाला वाचवू शकत नाही. आधी किंवा नंतर तो धडाका सर्व जीवांना बसतोच. ॥५॥

मृत्यकाळ काठी निकी । बैसे बळियाचे मस्तकीं । माहाराजे बळिये लोकीं । राहों न सकती ।।६।।

मृत्यूची वेळ ही अनिवार दंडासारखी आहे. मोठमोठ्या बलवन्तांच्याही डोक्यावर तो दंड आदळतो. बलाढ्य सम्राटसुद्धा त्यातून सुटत नाहीत. ॥६॥

मृत्य न म्हणे किं हा क्रूर । मृत्य न म्हणे हा जुंझार । मृत्य न म्हणे संग्रामशूर । समरांगणीं ।।७।।
मृत्य न म्हणे किं हा कोपी । मृत्य न म्हणे हा प्रतापी । मृत्य न म्हणे उग्ररूपीं । महाखळ ।।८।।
मृत्य न म्हणे बळाढ्य । मृत्य न म्हणे धनाढ्य । मृत्य न म्हणे आढ्य । सर्वगुणें ।।९।।
मृत्य न म्हणे हा विख्यात । मृत्य न म्हणे हा श्रीमंत । मृत्य न म्हणे हा अद्भुत । पराक्रमी ।।१०।।
मृत्य न म्हणे हा भूपती । मृत्य न म्हणे हा चक्रवर्ती । मृत्य न म्हणे हा करामती । कैवाड जाणे ।।११।।
मृत्य न म्हणे हयपती । मृत्य न म्हणे गजपती । मृत्य न म्हणे नरपती । विख्यात राजा ।।१२।।
मृत्य न म्हणे वरिष्ठ जनीं । मृत्य न म्हणे राजकारणी । मृत्य न म्हणे वेतनी । वेतनधर्ता ।।१३।।
मृत्य न म्हणे देसाई । मृत्य न म्हणे वेवसाई । मृत्य न म्हणे ठांईं ठांईं । पुंड राजे ।।१४।।
मृत्य न म्हणे मुद्राधारी । मृत्य न म्हणे व्यापारी । मृत्य न म्हणे परनारी । राजकन्या ।।१५।।
मृत्य न म्हणे कार्याकारण । मृत्य न म्हणे वर्णावर्ण । मृत्य न म्हणे हा ब्राह्मण । कर्मनिष्ठ ।।१६।।

मृत्य न म्हणे वित्पन्न । मृत्य न म्हणे संपन्न । मृत्य न म्हणे विद्वज्जन । समुदाई ।।१७।।
मृत्य न म्हणे हा धूर्त । मृत्य न म्हणे बहुश्रुत । मृत्य न म्हणे हा पंडित । माहाभला ।।१८।।
मृत्य न म्हणे पुराणिक । मृत्य न म्हणे हा वैदिक । मृत्य न म्हणे हा याज्ञिक । अथवा जोसी ।।१९।।
मृत्य न म्हणे अग्नहोत्री । मृत्य न म्हणे हा श्रोत्री । मृत्य न म्हणे मंत्रयंत्री । पूर्णागमी ।।२०।।
मृत्य न म्हणे शास्त्रज्ञ । मृत्य न म्हणे वेदज्ञ । मृत्य न म्हणे सर्वज्ञ । सर्व जाणे ।।२१।।
मृत्य न म्हणे ब्रह्महत्या । मृत्य न म्हणे गोहत्या । मृत्य न म्हणे नाना हत्या । स्त्रीबाळाकादिक ।।२२।।
मृत्य न म्हणे रागज्ञानी । मृत्य न म्हणे ताळज्ञानी । मृत्य न म्हणे तत्त्वज्ञानी । तत्त्ववेत्ता ।।२३।।
मृत्य न म्हणे योगाभ्यासी । मृत्य न म्हणे संन्यासी । मृत्य न म्हणे काळासी । वंचूं जाणे ।।२४।।
मृत्य न म्हणे हा सावध । मृत्य न म्हणे हा सिद्ध । मृत्य न म्हणे वैद्य प्रसिद्ध । पंचाक्षरी ।।२५।।
मृत्य न म्हणे हा गोसावी । मृत्य न म्हणे हा तपस्वी । मृत्य न म्हणे हा मनस्वी । उदासीन ।।२६।।
मृत्य न म्हणे ॠषेश्वर । मृत्य न म्हणे कवेश्वर । मृत्य न म्हणे दिगंबर । समाधिस्थ ।।२७।।
मृत्य न म्हणे हटयोगी । मृत्य न म्हणे राजयोगी । मृत्य न म्हणे वीतरागी । निरंतर ।।२८।।
मृत्य न म्हणे ब्रह्मच्यारी । मृत्य न म्हणे जटाधारी । मृत्य न म्हणे निराहारी । योगेश्वर ।।२९।।
मृत्य न म्हणे हा संत । मृत्य न म्हणे हा महंत । मृत्य न म्हणे हा गुप्त । होत असे ।।३०।।
मृत्य न म्हणे स्वाधेन । मृत्य न म्हणे पराधेन । सकळ जीवांस प्राशन । मृत्यचि करी ।।३१।।
येक मृत्यमार्गीं लागले । येकीं आर्ध पंथ क्रमिले । येक ते सेवटास गेले । वृद्धपणीं ।।३२।।
मृत्य न म्हणे बाळ तारुण्य । मृत्य न म्हणे सुलक्षण । मृत्य न म्हणे विचक्षण । बहु बोलिका ।।३३।।
मृत्य न म्हणे हा आधारु । मृत्य न म्हणे उदार । मृत्य न म्हणे हा सुंदर । चतुरांग जाणे ।।३४।।
मृत्य न म्हणे पुण्यपुरुष । मृत्य न म्हणे हरिदास । मृत्य न म्हणे विशेष । सुकृती नर ।।३५।।

मृत्यू कोणाकोणाला सोडीत नाही त्याचे तपशीलवार वर्णन पुढे आहे. सात ते पस्तीस ओव्यांअखेर हा तपशील आहे. ती यादी पुढे दिली आहे.–

क्रूर, लढवय्या, रणशूर, संतापी, पराक्रमी, उग्र, दुष्ट, बलवान, धनवान, सर्वगुणसंपन्न, कीर्तिवन्त, श्रीमंत, अचाट पराक्रम करणारा, राजा, सम्राट, करामती करणारा जादूगार, घोडदळांचा प्रमुख, गजदळाचा मुख्य, लोकपती व प्रसिद्ध राजा, लोकमान्य, लोकनेता, कोषाध्यक्ष, देसाई वृत्ती असलेला, व्यवसाय करणारा, गावगुंड, सरकारी शिक्का मारणारा अधिकारी, व्यापारी, परस्त्री, राजकन्या, करावे ते करणारा, न करावे ते करणारा, त्रैवर्णिक, वर्णबाह्य, कर्मनिष्ठ ब्राह्मण, व्युत्पत्तिशास्त्र जाणणारा, संपन्न, सभेतील विद्वान, धूर्त, गाय मारणारा, स्त्री-बालकांचे खून करणारा, संगीतातील राग जाणणारा, नृत्याचे ताल जाणणारा, तत्त्व जाणणारा तत्त्ववेत्ता, योगी, संन्यासी, चांगदेवासारखा मृत्यूला झुकांडी देणारा, सतत सावध असणारा, सिद्ध, ख्यातनाम वैद्य, पंचाक्षरी, गोसावी, तपस्वी, लहरी, विरक्त श्रेष्ठ ॠषी, उत्तम कवी, दिगंबर, समाधी साधलेला, राजयोगी, सतत वैराग्य सांभाळलेला, ब्रह्मचारी, जटाधारी साधू, वायुभक्षण करून राहणारा श्रेष्ठ योगी, संत, महंत, गुप्त होण्याची सिद्धी प्राप्त झालेला, स्वतंत्रपणे जीवन जगणारा, गुलाम, हठयोगी, नुकतेच जन्मलेले बालक, तरुण, वृद्ध, बालक, पौगंड, सुलक्षणी, चाणाक्ष, वाचाळ, अनेकांना आधार देणारा, उदार, देखणा, चतुरस्त्र, पुण्यवन्त, हरिभक्त, अतिपुण्यवान. ॥७ ते ३५॥

आतां असो हें बोलणें । मृत्यापासून सुटिजे कोणें । मागें पुढें विश्वास जाणें । मृत्यपंथे ।।३६।।

आता ही यादी पुरे झाली. मृत्यूपासून कोणाचीही सुटका नाही. लवकर किंवा उशिरा मरण नक्कीच येते. ॥३६॥

च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यांशी लक्ष जीवयोनी । जन्मां आले तितुके प्राणी । मृत्य पावती ।।३७।।

चार वाणी घेऊन जन्माला आलेले चारी प्रकारचे (जार, स्वेद, भूमी व अंडे ह्यांतून निर्माण झालेले) चौऱ्यांशी लक्ष जीव जन्मून मरतात. ।।३७।।

मृत्याभेणें पळों जातां । तरी मृत्य सोडिना सर्वथा । मृत्यास न ये चुकवितां । कांहीं केल्या ।।३८।।

मृत्यूला भिऊन कितीही पळाले तरी तो कधीच सोडीत नाही. त्याला चुकविण्याचा एकही उपाय नाही. ।।३८।।

मृत्य न म्हणे हा स्वदेसी । मृत्य न म्हणे हा विदेसी । मृत्य न म्हणे हा उपवासी । निरंतर ।।३९।।

हा ह्या देशाचा रहिवासी आहे, हा परदेशी आहे, हा सतत उपवासाचे व्रत करणारा आहे ह्यांचा मृत्यू विचार करीत नाही. ।।३९।।

मृत्य न म्हणे थोर थोर । मृत्य न म्हणे हरिहर । मृत्य न म्हणे अवतार । भगवंताचे ।।४०।।

अत्यंत मोठ्या व्यक्ती, प्रत्यक्ष विष्णू, शंकर किंवा भगवंताचे अवतार तो सोडीत नाही. ।।४०।।

श्रोतीं कोप न करावा । हा मृत्यलोक सकळांस ठावा । उपजला प्राणी जाईल बरवा । मृत्यपंथें ।।४१।।

श्रीविष्णू, शंकर व अवतारांच्या मृत्यूची भाषा ऐकून श्रोत्यांनी रागावू नये. पृथ्वीला 'मरलोक' म्हणतात हे प्रसिद्धच आहे. ज्याला जन्म किंवा अवतरण आहे त्याला मृत्यू किंवा तिरोधान आहेच. ।।४१।।

येथें न मानावा किंत । हा मृत्यलोक विख्यात । प्रगट जाणती समस्त । लाहान थोर ।।४२।।

ह्याविषयी जराही शंका नको. सर्व लहान-मोठ्यांना हा प्रसिद्ध मृत्युलोक चांगलाच ठाऊक असतो. ।।४२।।

तथापि किंत मानिजेल । तरी हा मृत्यलोक नव्हेल । याकारणें नासेल । उपजला प्राणी ।।४३।।

कोणाला शंका असेल तर ह्याला मृत्युलोक म्हणणेच निरर्थक होईल. म्हणून जन्माला येणारा मरणारच. ।।४३।।

ऐसे जाणोनियां जीवें । याचें सार्थकचि करावें । जनीं मरोन उरवावें । कीर्तिरूपें ।।४४।।

हे लक्षात घेऊन माणसाने शरीराने मेले तरी कीर्तिरूपाने जिवंत राहून जन्माचे सार्थक करावे. ।।४४।।

येरवीं प्राणी लाहान थोर । मृत्य पावती हा निर्धार । बोलिलें हें अन्यथा उत्तर । मानूंचि नये ।।४५।।

व्यवस्थित विचार केला तर लहान-मोठे जीव मरणारच. हे बोलणे खोटे असेल असा विचारही करू नये. ।।४५।।

ओवी सेहेचाळीस ते अठ्ठावन्नअखेरपर्यन्त कोण कसे असून मृत्युपंथाने गेले त्याची यादी दिली आहे.

गेले बहुत वैभवाचे । गेले बहुत आयुष्याचे । गेले अगाध महिमेचे । मृत्यपंथें ।।४६।।
गेले बहुत पराक्रमी । गेले बहुत कपटकर्मी । गेले बहुत संग्रामी । संग्रामसौरे ।।४७।।
गेले बहुतां बळांचे । गेले बहुतां काळांचे । गेले बहुतां कुळांचे । कुळवंत राजे ।।४८।।
गेले बहुतांचे पाळक । गेले बुद्धीचे चाळक । गेले युक्तीचे तार्किक । तर्कवादी ।।४९।।
गेले विद्येचे सागर । गेले बळाचे डोंगर । गेले धनाचे कुबेर । मृत्यपंथें ।।५०।।
गेले बहुत पुरुषार्थाचे । गेले बहुत विक्रमाचे । गेले बहुत आटोपाचे । कार्यकर्ते ।।५१।।
गेले बहुत शस्त्रधारी । गेले बहुत परोपकारी । गेले बहुत नानापरी । धर्मरक्षक ।।५२।।
गेले बहुत प्रतापाचे । गेले बहुत सत्कीर्तीचे । गेले बहुत नीतीचे । नीतिवंत राजे ।।५३।।
गेले बहुत मतवादी । गेले बहुत कार्यवादी । गेले बहुत वेवादी । बहुतांपरीचे ।।५४।।
गेली पंडितांचीं थाटें । गेली शब्दांचीं कचाटें । गेलीं वादकें अचाटें । नाना मतें ।।५५।।
गेले तापषांचे भार । गेले संन्यासी अपार । गेले विचारकर्ते सार । मृत्यपंथें ।।५६।।
गेले बहुत संसारी । गेले बहुत वेषधारी । गेले बहुत नानापरी । नाना छंद करूनी ।।५७।।

गेले ब्राह्मणसमुदाये । गेले बहुत आच्यार्य । गेले बहुत सांगों काये । किती म्हणौनि ।।५८।।

मोठे वैभवसंपन्न, दीर्घायुषी, मोठे महात्मे, महापराक्रमी, महाकपटी, संग्रामात सूर्याप्रमाणे तळपणारे, युगानुयुगे जगणारे, श्रेष्ठ कुळात जन्मलेले राजे, अनेकांचा सांभाळ करणारे, बुद्धीला चालना देणारे, तर्कवादी, तर्कपटू, अफाट विद्या असलेले, सामर्थ्यसंपन्न, कुबेराप्रमाणे संपन्न, पुरुषार्थसंपन्न विक्रमवीर, कार्यक्षम कार्यकर्ते, शस्त्रविद्याप्रवीण, परोपकारीं, सर्व बाजूंनी धर्मांचे रक्षण करणारे, महाप्रतापी, उत्तम कीर्ती असणारे, नीतिवान राजे, नाना मतांचे प्रवर्तक, अनेक कार्ये करणारे, वादपटु, पंडितांचे समुदाय, शब्दप्रभू, अनेक मतांचे वाद घालून प्रचार करणारे, तपस्व्यांचे समूह, अनेक संन्यासी, सारासार विचार करणारे, संसारासक्त, नट, छंदी, ब्राह्मणांचे समुदाय, आचार्य. ही यादी किती म्हणून सांगावी? ।।४६ ते ५८।।

असो ऐसे सकळहि गेले । परंतु येकचि राहिले । जे स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी ।।५९।।

हे असो. हे सर्व गेले खरे, पण आत्मज्ञान झाल्यावर स्वरूपाकार होऊन राहिलेले तेवढे मृत्यूला जिंकून राहिले! ।।५९।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मृत्युनिरूपणनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'मृत्युनिरूपण' नावाचा नववा समास समाप्त

दशक तिसरा : स्वगुणपरीक्षा

समास दहावा : वैराग्यनिरूपण

॥ श्रीरामसमर्थ ॥

संसार म्हणिजे माहापूर । माजीं जळचरें अपार । डंखूं धावती विखार । काळसर्प ।।१।।

विषारी महासर्प व असंख्य जलचर संसाररूप महापुरात असतात. ते काळसर्प संसारिकांना चावण्यासाठी त्यांच्या मागे लागतात. (पहा मायानदी अ. ७. भ. गी.) ॥१॥

आशा ममता देहीं बेडी । सुसरी करिताती तडातोडी । नेऊन दुःखाचे सांकडी । माजीं घालिती ।।२।।

अवास्तव आशा व 'माझे माझे' हा हव्यास जीवाला बंधनात टाकतो. ह्या बंधनरूप सुसरी त्याचे लचके तोडून अनेक प्रकारे दुःख देतात. ॥२॥

अहंकारनक्रें उडविलें । नेऊनि पाताळीं बुडविलें । तेथुनियां सोडविलें । न वचे प्राणी ।।३।।

अहंकाररूप मगर जीवाला अविद्येच्या तळापर्यन्त नेऊन बुडविते. तेथून त्याची कोणीच सुटका करू शकत नाही. ॥३॥

काममगरमिठी सुटेना । तिरस्कार लागला तुटेना । मद मत्सर वोहटेना । भूलि पडिली ।।४।।

कामाने घातलेला विळखा सुटत नाही. दुसऱ्यांचा तिरस्कार करण्याची सवय जात नाही. मस्तवालपणा व मत्सर जराही कमी होत नाही. अशी अविद्येने जीवावर मोठी मोहिनी घातली आहे. ॥४॥

वासनाधामिणी पडिली गळां । घालून वेंटाळें वमी गरळा । जिव्हा लाळी वेळोवेळां । भयानक ।।५।।

वासनारूप धामीण गळ्यात पडून भक्कम वेटोळे घालते व संकल्पांचे गरळ ओकत राहते. त्या वासना पूर्ण होण्यासाठी तिची लवलवणारी भयंकर जीभ बाहेर काढीत राहते. ॥५॥

माथां प्रपंचाचें वोझें । घेऊन म्हणे माझें माझें । बुडताहि न सोडी, फुंजे । कुळाभिमानें ।।६।।

'मी प्रपंच तडीला नेणारा' अशा अविचाराचे ओझे डोक्यावर घेऊन माणूस 'माझे माझे' ह्या भ्रमात राहतो. प्रपंच बुडण्याची वेळ आली तरी कुळाच्या अभिमानामुळे तो सोडीत नाही. ॥६॥

पडिलें भ्रांतीचें अंधारें । नागविलें अभिमानचोरें । आलें अहंतेचें काविरें । भूतबाधा ।।७।।

संगभ्रांती, विकारभ्रांती, कर्तृत्व– भोक्तृत्वभ्रांती, जगत्सत्यत्वभ्रांती व भेदभ्रांतीमुळे मनात अंधार पसरला. देह, कुळ, बुद्धी, संपत्ती इत्यादींच्या अभिमानरूप चोराने मोक्षसंपत्ती लुटून नेली. 'मी' च्या अभिमानामुळे भुताने झपाटल्याप्रमाणे वागू लागतो. ॥७॥

बहुतेक आवर्ती पडिले । प्राणी वाहातचि गेले । जेंहिं भगवंतासी बोभाइलें । भावार्थबळें ।।८।।

देव आपण घालूनि उडी । तयांसी नेलें पैलथडी । येर तें अभाविकें बापुडीं । वाहातचि गेलीं ।।९।।

बहुतेक सर्वजण मायानदीच्या जबर प्रवाहाच्या धारेत वाहून गेले. परंतु ज्यांनी अत्यंत श्रद्धेने भगवंताचा आर्ततेने धावा केला त्यांना देवाने स्वतः उडी घालून प्रवाहाच्या पलीकडे नेले. इतर सर्व अश्रद्ध त्या प्रवाहाबरोबर अनिवारपणे वाहात गेले. ॥८,९॥

भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भुलला । संकटीं पावे भाविकाला । रक्षितसे ।।१०।।

देवाच्या अस्तित्वावर प्रेमाने श्रद्धा ठेवणारे देवाला फार आवडतात. त्या श्रद्धेनेच प्रसन्न होऊन तो भाविकांचे संकटकाळी रक्षण करतो. ॥१०॥

जयास भगवंत आवडे । तयाचें देवासीं सांकडें । संसारदु:ख सकळ उडे । निज दासाचें ।।११।।

ज्याचे देवावर अत्यंत प्रेम असते त्याचा देवाला विचार करणे भाग पडते. देवाचे दास्य करणाराला संसाराचे दु:ख अनुभवाला येत नाही. संसारातील प्रतिकूल घटनांसंबंधी त्याची प्रतिक्रिया दु:खरूप नसते. ॥११॥

जे अंकित ईश्वराचे । तयांस सोहळे निजसुखाचे । धन्य तेचि दैवांचे । भाविक जन ।।१२।।

जे ईश्वराचे दास बनून रहातात त्यांना आत्मसुखाचे वैभव अनुभवाला येते. असे सुदैवी भाविक धन्य होत. ॥१२॥

जैसा भाव जयापासीं । तैसा देव तयासी । जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणीमात्रांचा ।।१३।।

देवासंबंधी जसा भाव धरावा तसा देव प्रतिसाद देतो. तो सर्वांचे सर्व अंतरंग सहजतेने सर्वदा जाणतो. ॥१३॥

जरी भाव असिला माईक । तरी देव होये माहा ठक । नवल तयाचें कौतुक । जैशास तैसा ।।१४।।

भाव जर फसवा असेल तर देवाकडून 'ठकाला महाठक' असा प्रतिसाद मिळतो. जशास तसे वागण्याचे त्याचे कौशल्य खरोखर आश्चर्यकारक आहे. ॥१४॥

जैसें जयाचें भजन । तैसेंचि दे समाधान । भाव होता किंचित न्यून । आपणहि दुरावे ।।१५।।

ज्या प्रमाणात भक्तीला पूर्णत्व येते, त्या प्रमाणात तो भक्ताला समाधान देतो. तिच्यात किंचित उणेपणा येताच समाधानरूप देवही दुरावतो. ॥१५॥

दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जैस्यास तैसें भासे । तयाचें सूत्र असे । आपणाच पासीं ।।१६।।

आरशात जे आपले प्रतिबिंब दिसते ते कसे दिसावे ते आपल्यावरूनच ठरते! जसे आपण तसे ते!! ॥१६॥

जैसें आपण करावें । तैसेंचि तेणें व्हावें । जरी डोळे पसरूनि पाहावें । तरी तेंहि टवकारें ।।१७।।

जी कृती आपण करतो तीच ते करते, आपण डोळे मोठे केले तर तेही डोळे वटारून पहाते. ॥१७॥

भृकुटीस घालून मिठी । पाहाता क्रोधें तेंहि उठी । आपण हास्य करितां पोटीं । तेंहि आनंदे ।।१८।।

भुवया वाकड्या करून पाहिले तर प्रतिबिंबही आपल्याकडे क्रोधाने पहाते. आपण मनापासून हसलो तर तेही सुखावते. ॥१८॥

जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचाचि देव जाला । जो जैसें भजे त्याला । तैसाचि वोळे ।।१९।।

अन्त:करणात जो भाव प्रतिबिंबित होतो त्याचाच जणू देव बनतो. जो ज्या भावाने त्याला भजतो तो त्याला तसाच प्रतिसाद देतो. (ये यथा माम् प्रपद्यन्ते.... गीता) ॥१९॥

भावें परमार्थाचिया वाटा । वाहाती भक्तीचिया पेंठा । भरला मोक्षाचा चोहाटा । सज्जनसंगें ।।२०।।

परमार्थमार्गाच्या वाटचालीत भक्तीच्या बाजारपेठा लागतात. संतसंगतीत जणू भक्तीच्या केंद्रांवर सर्वत्र गर्दी झालेली असते. ॥२०॥

भावें भजनीं जे लागले । ते ईश्वरीं पावन जालें । भावार्थबळें उद्धरिले । पूर्वज तेहि ।।२१।।

जे भावबळाने भगवंताची भक्ती करतात ते त्यांच्या ईश्वररूपात पावन होतात. एवढेच नव्हे, तर ते त्यांच्या भावबळाने पूर्वजांनाही तारून नेतात. ॥२१॥

आपण स्वयें तरलें । जनासहि उपेगा आले । कीर्तिश्रवणें जाले । अभक्त भावार्थी ।।२२।।

ते स्वत:तर तरतातच, पण इतरांनाही त्यांच्याकडून मार्गदर्शन मिळते. त्यांची अशी कीर्ती ऐकून जे अभक्त असतात तेही भक्तिमार्गाला लागतात. ॥२२॥

धन्य तयांची जननी । जे लागले हरिभजनीं । तेहिंच येक जन्म जनीं । सार्थक केला ।।२३।।

जे हरीचे भक्त झाले त्यांची आई खरोखर धन्य होय. त्यांनीच खरोखर मनुष्यजन्म सार्थकी लावलेला असतो. ॥२३॥

तयांची वर्णू काय थोरी । जयांचा भगवंत कैवारी । कासे लाऊन उतरी । पार दु:खाचा ।।२४।।

ज्यांच्या बाजूने प्रत्यक्ष भगवन्त उभा राहतो व स्वत: हात धरून त्यांना दु:खरूप संसारापलीकडे नेऊन सोडतो त्यांचे माहात्म्य काय वर्णावे! ॥२४॥

बहुतां जन्मांचे सेवटीं । जेणें चुके अटाटी । तो हा नरदेह भेटी । करी भगवंतीं ।।२५।।

लक्षावधी जन्म घेतल्यानंतर मनुष्यजन्माची प्राप्ती झाल्यावर भगवन्ताचे यथार्थ दर्शन होऊन जन्ममरणांच्या चक्रांचे छळ थांबतात. ॥२५॥

म्हणौन धन्य ते भाविक जन । जेंहिं जोडिलें हरिनिधान । अनंत जन्मांतरीचें पुण्य । फळासि आलें ।।२६।।

म्हणून अनंत जन्मांचे शुद्ध पुण्य फळाला येऊन ज्यांनी हरिरूप धन जोडले ते भक्त धन्य होत. ॥२६॥

आयुष्य हेचि रत्नपेटी । माजीं भजनरत्नें गोमटीं । ईश्वरीं अर्पूनिया, लुटी । आनंदाची करावी ।।२७।।

माणसाचे आयुष्य हे भजनरूप रत्नांनी भरलेल्या पेटीप्रमाणे आहे. ती सर्व भगवन्ताला अर्पण करून 'मी ब्रह्म आहे' असा अनुभव घेऊन त्याचा आनंद भोगावा. ॥२७॥

हरिभक्त वैभवें कनिष्ठ । परी तो ब्रह्मादिकां वरिष्ठ । सदा सर्वदा संतुष्ट । नैराशबोधे ।।२८।।

हरिभक्त लौकिक वैभवाने कमी असू शकेल. तरी तो वैराग्यसंपन्न असल्याने तृप्त व संतुष्ट असल्यामुळे ब्रह्मदेवादी देवांहून श्रेष्ठ असतो. (पहा तैत्ति. उप.) ॥२८॥

धरून ईश्वराची कास । केली संसाराची नैराश । तयां भाविकां जगदीश । सबाह्य सांभाळी ।।२९।।

ज्यांनी भगवन्ताला सर्व भावाने शरण जाऊन संसारासंबंधी अनासक्ती साधलेली असते त्यांचा प्रपंच व परमार्थ भगवन्त सांभाळतो. ॥२९॥

जया संसाराचें दु:ख । विवेकें वाटें परम सुख । संसारसुखाचेनि पढतमूर्ख । लोधोन पडती ।।३०।।

संसार दु:खमय असला तरी ज्याला आत्मानात्मविवेक साधला आहे त्याला तो सुखरूपच वाटतो. ('अवघाचि संसार सुखाचा करीन'–तुका) केवळ शाब्दिक विवेक असेल तर संसारात जे थोडे सुख मिळते त्यानेच तो अडकून पडतो. ॥३०॥

जयांचा ईश्वरीं जिव्हाळा । ते भोगिती स्वानंदसोहळा । जयांचा जनावेगळा । ठेवा आक्षै ।।३१।।

जे ईश्वरप्रेमात रंगून जातात ते अवीट व अखंड आत्मानंदात रममाण होतात. सामान्यांना मिळणाऱ्या विषयानंदापेक्षा आत्मानंद फारच वेगळा असतो. ॥३१॥

ते आक्षै सुखें सुखावले । संसारदु:खें विसरले । विषयेरंगीं वोरंगले । श्रीरंगरंगीं ।।३२।।

त्यांनी विषयसुखाकडे पाठ फिरवून श्रीरंगाच्या प्रेमरंगात स्वत:ला भिजविलेले असते, त्यामुळे संसारदु:खांना विसरून ते न संपणारे आत्मसुख भोगतात. ॥३२॥

तयांस फावली नरदेह पेटी । केली ईश्वरेंसिं साटी । येरें अभाविकें करंटी । नरदेह गेला ।।३३।।

त्यांना मिळालेला मनुष्यजन्म सार्थकी लागला. कारण त्यांनी जन्मभर जीवनात ईश्वर साठवला. इतर भक्तिशून्य असलेले करंटे तो जन्म फुकट घालवतात. ॥३३॥

आवचटें निधान जोडलें । तें कवडिच्या बदल नेलें । तैसें आयुष्य निघोनि गेलें । अभाविकाचें ।।३४।।

दैवबळाने अचानक अतिमौल्यवान रत्न सापडावे व अभागीपणामुळें नंतर ते कवडीच्या मोबदल्यात देऊन टाकावे

तसे अभक्ताचे आयुष्य फुकट जाते. ।।३४।।

बहुत तपाचा सांठा । तेणें लाधला परीस गोटा । परी तो ठाईचा करंटा । भोगूंच नेणें ।।३५।।

फार मोठ्या तपश्चर्येनंतर परीस लाभावा; पण त्याचा उपयोग माहीत नसलेला जन्मजात करंटा दरिद्रीच राहतो! ।।३५।।

तैसा संसारास आला । मायाजाळीं गुंडाळला । अंती येकलाचि गेला । हात झाडुनी ।।३६।।

त्याप्रमाणे माणसाचा देह घेऊन जन्माला आला खरा; पण मायेच्या जाळ्यात फसल्याने जे जे कमाविलेले असते ते सर्व मरताना येथेच सोडून एकटाच आला तसा परत जातो. ।।३६।।

या नरदेहाचेनि संगती । बहुत पावले उत्तम गती । येकें बापुडीं यातायाती । वरपडीं जालीं ।।३७।।

ह्या नरदेहाच्या प्राप्तीनंतर बरेच लोक मुक्त झाले. पण इतर बिचाऱ्यांवर जन्ममरणाच्या चक्राने मात केली. ।।३७।।

या नरदेहाचेनि लागवेगें । सार्थक करावें संतसंगें । नीच योनीं दुःख मागें । बहुत भोगिलें ।।३८।।

होऊन गेलेल्या लक्षावधी जन्मांत कुत्री-मांजरांच्या शरीरात मिळणारी अपार दुःखे भोगली. आता नरदेह मिळाल्यावर मात्र संतसंगतीत त्याचे त्वरेने सार्थक करावे. ।।३८।।

कोण समयो येईल कैसा । याचा न कळे किं भर्वसा । जैसे पक्षी दाही दिशा । उडोन जाती ।।३९।।

एक ठिकाणी बसलेल्या पक्ष्यांच्या थव्यातील पक्षी अचानक दाही दिशांना उडून जातात. त्याप्रमाणे केव्हा कशी वेळ येईल ते सांगता येत नाही. कशाचाच भरवसा धरू नये. ।।३९।।

तैसें वैभव हें सकळ । कोण जाणें कैसी वेळ । पुत्रकळत्रादि सकळ । विघडोन जाती ।।४०।।

त्याप्रमाणें कितीही वैभव असले तरी प्रतिकूल वेळ सांगून येत नाही. पुत्र, पती/पत्नी ह्यांचा अचानक वियोग होतो. ।।४०।।

पाहिली घडी नव्हे आपुली । वयसा तरी निघोन गेली । देह पडतांच ठेविली । आहे नीच योनी ।।४१।।

वर्तमानातील प्रत्येक क्षण-क्षणात भूतकाळात जातो. म्हणून तो 'आपला' म्हणू नये. असेच आयुष्य संपल्यावर मरण येते. नंतर नीच योनीत जन्म अटळच असतो. ।।४१।।

स्वान शुकरादिक नीच याती । भोगणें घडे विपत्ती । तेथें कांहीं उत्तम गती । पाविजेत नाहीं ।।४२।।

कुत्रा व डुकरासारखी शरीरे मिळून त्या नीच योनींतील सर्व दुःखे भोगावीच लागतात. त्या योनीत मोक्ष मिळावा अशी ईश्वरी योजनाच नाही. ।।४२।।

मागां गर्भवासीं आटाटी । भोगितां जालासि रे हिंपुटी । तेथुनियां थोरा कष्टीं । सुटलासि दैवें ।।४३।।

ह्यापूर्वी अनंत जन्मात गर्भवासाची अपार दुःखे भोगून तू थकला आहेस. अचानक पाप-पुण्य समान झाल्याने त्यातून तुझी सुटका होण्याची वेळ आता आली आहे. ।।४३।।

दुःख भोगिलें आपुल्या जीवें । तेथें कैंचिं होतीं सर्वे । तैसेंचि पुढें येकलें जावें । लागेल बापा ।।४४।।

त्या सर्व जन्मात तू जे दुःख भोगलेस तेव्हा आता ज्यांना तू आपली मानतोस, ते सर्व कोठे होते? ते तुला तेव्हा उपयोगी पडले काय? ह्याही जन्मातून त्यांच्यावाचून तसेच पुढील जन्मांत जावे लागेल. ।।४४।।

कैंची माता कैंचा पिता । कैंची बहिण कैंचा भ्राता । कैंचीं सुहृदें कैंची वनिता । पुत्रकळत्रादिक ।।४५।।

आई, वडील, बहीण, नवरा, मित्र, पत्नी, मुलगे, नातलग इत्यादी तथाकथित नाती निरर्थक असतात. ।।४५।।

हे तूं जाण मावेचीं । आवघीं सोइरीं सुखाचीं । हे तुझ्या सुखदुःखाची । सांगाती नव्हेती ।।४६।।

मायेच्या मोहिनीमुळें त्यांच्यावर आपलेपणा निर्माण होतो. त्यांना तुझ्याकडून फक्त सुख हवे असते. तुझ्या सुखदुःखाच्या प्रवासात त्यांची साथ मिळणार नाही. ।।४६।।

कैंचा प्रपंच कैंचें कुळ । कासया होतोसी व्याकुळ । धन कण लक्ष्मी सकळ । जाइजणें ।।४७।।

प्रपंच, कुळ इत्यादिकांत रमण्यात अर्थ नाही. त्यांचेसाठी व्याकूळ होऊ नको. गोधनादी धन, धान्य व संपत्ती इ. सर्व सोडून जाणें तुला भाग पडेल. ।।४७।।

कैंचें घर कैंचा संसार । कासया करिसी जोजार । जन्मवरी वाहोन भार । सेखीं सांडून जासी ।।४८।।

माझे घर, माझा प्रपंच ह्या भ्रमात राहून स्वत:चा छळ करून घेऊ नकोस. आयुष्यभर ही ओझी वाहून शेवटी एकटाच मृत्युपंथाने निघून जाशील. ।।४८।।

कैंचें तारुण्य कैंचें वैभव । कैंचे सोहळे हावभाव । हें सकळहि जाण माव । माईक माया ।।४९।।

तारुण्य, वैभव, उत्सवसमारंभ, ऐट ह्या सर्वांनी काय होणार? कारण हे सर्व अशाश्वत, क्षणभर सुख देणारे व म्हणून मिथ्या किंवा मायिक आहेत. ह्यांतच आयुष्य घालवून शाश्वत सुखरूप मोक्ष मिळत नाही. ।।४९।।

येच क्षणीं मरोन जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी । माझें माझें म्हणतोसी । म्हणौनियां ।।५०।।

आता ह्या क्षणीच जर मरण आले तर 'माझे माझे' ह्या छंदात आयुष्य गेल्याने सुखरूप श्रीरामाची भेट होण्याचा योग हुकून जाईल. ।।५०।।

तुवां भोगिल्या पुनरावृत्ती । ऐसीं मायबापें किती । स्त्री कन्या पुत्र होती । लक्षानलक्ष ।।५१।।

तू आतापर्यन्त लक्षावधी वेळा जन्माला येऊन मरण पावलास. त्या प्रत्येक जन्मात आई, वडील, कन्या, मुलगे, पत्नी तेवढीच झाली! ।।५१।।

कर्मयोगें सकळ मिळालीं । येके स्थळीं जन्मास आलीं । ते तुवां आपुलीं मानिली । कैसीं रे पढतमूर्खा ।।५२।।

तुझ्या पूर्वकर्मानुसार ती सर्व तुझ्या वाट्याला आली. कन्यापुत्र तुझ्या घरात जन्मली. अरे पढतमूर्खा, तू त्यांना कोणत्या आधाराने 'आपली' मानलेस? ।।५२।।

तुझें तुज नव्हे शरीर । तेथें इतरांचा कोण विचार । आतां येक भगवंत साचार । धरीं भावार्थबळें ।।५३।।

तुझ्या शरीरावरच तुझी सत्ता नसताना इतरांची शरीरे तुझी कशी? आता भक्तीच्या बळावर देवालाच 'माझे' म्हण. ।।५३।।

येका दुर्भरा कारणें । नाना नीचांची सेवा करणें । नाना स्तुती आणी स्तवनें । मर्यादा धरावी ।।५४।।

किती भरले तरी रिकामे होणारे पोट नीच लोकांची सेवा करणें भाग पाडते. त्यांची अनेक प्रकारे अकारण भलावण करावयास लावते. त्यांचा मान राखावयास लावते. ।।५४।।

जो अन्न देतो उदरासी । शेरीर विकावें लागे त्यासी । मां जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ।।५५।।

जो चाकरी करून घेऊन पोटापाण्याची व्यवस्था करतो, त्याच्या स्वाधीन देह करावा लागतो. मग ज्या ईश्वराने जन्म दिला त्याला विसरून कसे चालेल? ।।५५।।

अहिर्निशीं ज्या भगवंता । सकळ जीवांची लागली चिंता । मेघ वरुषे जयाची सत्ता । सिंधु मर्यादा धरी ।।५६।।

भगवंत सर्व जीवसृष्टीचे रात्रंदिवस नियमन करतो. त्याच्या आज्ञेने पाऊस पडतो व समुद्र मर्यादेत राहतो. ।।५६।।

भूमि धरिली धराधरें । प्रगट होईजे दिनकरें । ऐसी सृष्टी सत्तामात्रें । चालवी जो कां ।।५७।।

शेष पृथ्वीला मस्तकावर धरतो, सूर्य वेळेवर उगवतो इ. प्रकारे भगवंताचे सर्व सृष्टीवर नियंत्रण असते. ।।५७।।

ऐसा कृपाळू देवाधिदेव । नेणवे जयाचें लाघव । जो सांभाळी सकळ जीव । कृपाळुपणें ।।५८।।

देवाने अत्यंत कृपाळूपणे सृष्टी सांभाळण्याची योजना केली असून त्याचे ते कौशल्य अनाकलनीय आहे. त्याच्या कृपेमुळेच सर्व जीवांचे नियोजन होते. ।।५८।।

ऐसा सर्वात्मा श्रीराम । सांडून धरिती विषयकाम । ते प्राणी दुरात्मे अद्धम । केलें पावती ।।५९।।

असा सर्वांच्या हृदयात राहणारा सुखरूप श्रीराम सोडून जे विषयसुखाची इच्छा करतात ते पापी पामर त्यांच्या कर्मांची फळे भोगण्यासाठी जन्ममरणांत सापडतात. ।।५९।।

रामेविण जे जे आस । तितुकी जाणीव नैराश । माझें माझें सावकाश । सीणचि उरे ।।६०।।

एका रामावाचून ज्याची ज्याची इच्छा करावी ते सर्व नाशिवन्त, क्षणिक व अशाश्वत असते. त्यावर आसक्ती निर्माण झाली असता संयोग-वियोग व अनुकूल-प्रतिकूल ह्यांमुळें होणारे छळ तेवढे सतत वाट्याला येतात. ।।६०।।

जयास वाटे सीण व्हावा । तेणे विषयो चिंतीत जावा । विषयो न मिळतां जीवा । तगबग सुटे ।।६१।।

ज्याला असे छळ करून घ्यावयाचे असतील त्याने विषयांच्या चिंतनात अवश्य रहावे! अपेक्षित विषय मिळाला नाही, तर जीवाची तगमग होते. ।।६१।।

सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन । त्यासी कैंचे समाधान । लोलंगतासी ।।६२।।

आनंदरूप राम सोडून जो अस्थिर विषयांच्या चिंतनात राहतो त्या विषयासक्ताला समाधान मिळणे शक्य नाही. ।।६२।।

जयास वाटे सुखचि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें । स्वजन सकळहि त्यागावे । दुःखमूळ जे ।।६३।।

ज्याला अखंड सुखाची इच्छा आहे त्याने सुखरूप रामाची भक्ती करावी. नाना प्रकारची दुःखे देणाऱ्या गणगोत व कुटुंबियांवरील आसक्ती सोडावी. ।।६३।।

जेथें वासना झोंबोन पडें । तेणेंचि अपायें दुःख जडे । म्हणौनि विषयवासना मोडे । तो येक सुखी ।।६४।।

जेव्हा वस्तूला किंवा व्यक्तीला वासना घट्ट धरून ठेवते तेव्हाच वस्तू किंवा व्यक्ती दुःखाला कारण होते. म्हणून त्या विषयांची वासना मोडून काढणाराच सुखी होतो. ।।६४।।

विषयजनित जें जें सुख । तेथेंचि होतें परम दुःख । पूर्वी गोड अंतीं शोक । नेमस्त आहे ।।६५।।

विषयांमुळे मिळणारे तथाकथित सुख परिणामी दुःखात रूपांतरित होते. विषय मिळविण्यासाठी कष्ट, भोगकाली क्षणिक सुख व नंतर ते मिळविण्याचे पुन्हा कष्ट! हे चक्र अखंड चालू राहते. विषय क्षणिक सुख निर्माण करतात. निद्रा सुख देते. आत्मा सुखरूप आहे. ।।६५।।

गळ गिळितां सुख वाटो । वोढून घेतां घसा फाटे । कां तें बापुडें मृग आपटे । चारा घेऊन पळतां ।।६६।।

गळाच्या दोरीला लावलेले आमिष खाताना सुख होते पण तेथेच असलेले गळाचे टोक तोंडात जाऊन त्या दोरीला झटका बसताच मासा गळा फाटून मरतो. अत्यंत आवडणारे हिरवे गवत तोंडात धरून पळताना हरीण पारध्याच्या जाळ्यात धडपडून पडते. ।।६६।।

तैसी विषयेसुखाची गोडी । गोड वाटे परी ते कुडी । म्हणौनियां आवडी । रघुनाथीं धरावी ।।६७।।

त्याप्रमाणें विषयसुख गोड वाटते पण परिणामी ते खोटे किंवा दुःखदायक आहे. म्हणून श्रीरामाच्या भक्तीची आवड धरावी. ।।६७।।

ऐकोनि बोले भाविक । कैसेनि घडे जी सार्थक । सांगा स्वामी येमलोक । चुके जेणें ।।६८।।

हे बोलणें मनापासून पटलेला श्रोता विचारतो- 'जीवनाचे सार्थक कसे करावे? हे श्रीगुरो, यमलोक चुकविणारे ते तत्त्व कृपया समजावून सांगा.' ॥६८॥

देवासी वास्तव्य कोठें । तो मज कैसेंनि भेटे । दुःखमूळ संसार तुटे । कोणेपरी स्वामी ।।६९।।

सुखरूप श्रीराम कोठे असतो? त्याचे दर्शन मला कसे होईल? सर्व दुःखांना कारण असलेल्या ह्या संसारबंधनातून मी कसे सुटावे? ॥६९॥

धडपुडी भगवत्प्राप्ती । होऊन चुके अधोगती । ऐसा उपाये कृपामूर्ती । मज दीनास करावा ।।७०।।

अधोगती चुकवण्यासाठी अनिवार्य असलेले यथार्थ भगवतदर्शन कसे होईल? हे कृपारूप असलेल्या श्रीगुरो, दीन झालेल्या मला त्याचा उपाय लवकर समजावून सांगा. ॥७०॥

वक्ता म्हणे हो येकभावें । भगवद्भजन करावें । तेणें होईल स्वभावें । समाधान ।।७१।।

तेव्हा श्रीगुरू म्हणाले की अनन्यगती होऊन देवाचे भजन करावे. त्याने सहजच समाधान होईल. ॥७१॥

कैसें करावें भगवद्भजन । कोठे ठेवावें हें मन । भगवद्भजनाचें लक्षण । मज निरोपावें ।।७२।।

ह्यावर श्रोता पुन्हा विचारतो– हे भजन करण्याची संपूर्ण रीत समजावून सांगाल का? अन्तःकरण वृत्ती कोठे स्थिर करावी? त्या भगवत्भजनाचे संपूर्ण शास्त्र मला स्पष्ट करून सांगा. ॥७२॥

ऐसा म्लानवदनें बोले । धरिले सदृढ पाऊलें । कंठ सद्गदित गळाले । अश्रुपात दुःखें ।।७३।।

अनुतापाने खिन्न झालेल्या चेहऱ्याने त्या श्रोत्याने श्रीगुरूंचे पाय घट्ट धरले. त्याचा कंठ दाटून येऊन आयुष्य व्यर्थ गेल्याच्या दुःखाने त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा येऊ लागल्या. ॥७३॥

देखोन शिष्याची अनन्यता । भावें वोळला सद्गुरु दाता । स्वानंद तुंबळेल आतां । पुढिले समासीं ।।७४।।

असा अनन्यभावाने शरण आलेला शिष्य पाहून दातृत्व हा स्वभावच असलेले श्रीगुरू त्याच्या भावामुळे प्रसन्न झाले. आता पुढील समासात भक्तिसुखाला अपार भरती येईल. ॥७४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'वैराग्यनिरुपणनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'वैराग्यनिरूपण' नावाचा दहावा समास समाप्त
–दशक तिसरा समाप्त–

दशक चवथा : नवविधाभक्ती

समास पहिला : श्रवणभक्ती

॥ श्रीरामसमर्थ ॥

जयजय जी गणनाथा । तू विद्यांवैभवें समर्था । अध्यात्मविद्येच्या परमार्था । मज बोलवावें ।।१।।

हे गणपते, तुझा जयजयकार असो. तू विद्येच्या वैभवाने सामर्थ्यवान आहेस. अध्यात्मविद्या ज्या मोक्षात परिणत होते ती विद्या सांगण्यासाठी मला सामर्थ्य द्यावे. ॥१॥

नमूं शारदा वेदजननी । सकळ सिध्दि जयेचेनी । मानस प्रवर्तलें मननीं । स्फूर्तिरूपे ।।२।।

वेद प्रगट करणाऱ्या शारदेला नमस्कार असो. तिच्या कृपेने सर्व सिद्धी मिळतात. माझ्याही मनात पुढील विषय सांगण्यासाठी स्फूर्ती निर्माण झाली आहे. ॥२॥

आतां आठऊं सद्‌गुरु । जो पराचाहि परु । जयाचेनि ज्ञानविचारु । कळों लागे ।।३।।

आता श्रीगुरूंचे स्मरण करू. तो ईश्वराहून (परात्) सूक्ष्म व श्रेष्ठ (पर) ब्रह्मरूप आहे. त्याच्या कृपेने आत्मज्ञानविषयक शब्दज्ञान समजू लागते. ॥३॥

श्रोतेन पुसिलें बरवें । भगवद्भजन कैसें करावें । म्हणौनि बोलिलें स्वभावें । ग्रन्थान्तरी ।।४।।

श्रोत्याने भगवत्भक्ती कशी करावी असा मोठा मौलिक प्रश्न विचारला आहे. त्याविषयी निरनिराळ्या भक्तिग्रंथांत जे सांगितले आहे ते मी माझ्या शब्दात सांगेन. ॥४॥

सावध होऊन श्रोतेजन । ऐका नवविधा भजन । सत्शास्त्रीं बोलिलें पावन । होईजे येणें ।।५।।

भागवतादी भक्तिशास्त्राच्या उत्तम ग्रंथात जी नवविधा भक्ती सांगितली आहे ती श्रोत्यांनी सावधपणाने ऐकावी. त्यामुळे श्रोता पवित्र होतो. ॥५॥

श्लोक

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।।छ।।

श्रवण, कीर्तन, नामस्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन, अशी नऊ प्रकारची भक्ती भक्तिशास्त्राच्या ग्रंथात सांगितली आहे.

नवविधा भजन बोलिलें । तेंचि पुढे प्रांजळ केलें । श्रोतीं अवधान दिधले । पाहिजे आतां ।।६।।

अशा या नऊ प्रकारच्या भक्तीचे तपशीलवार वर्णन पुढे केले आहे. श्रोत्यांनी सावधानतेने ते ऐकावे. ॥६॥

प्रथम भजन ऐसें जाण । हरिकथापुराणश्रवण । नाना अध्यात्मनिरूपण । ऐकत जावे ।।७।।

आता भक्तीचा पहिला प्रकार ऐका. हरिकथा, पुराणे व अध्यात्मशास्त्र ऐकावे. उदा. हरिकथा हरिविजय या ग्रंथात आहे. कूर्मादी अठरा पुराणे ते गीता, उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, त्यांवरील शांकरादी भाष्ये, आनंदगिरीसारखी भाष्यावरील भाष्ये, पंचदशी, विवेकसिंधू, विचारसागर इ. ग्रंथ, नारदादी भक्तिसूत्रे. ॥७॥

कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग । योगमार्ग वैराग्यमार्ग । ऐकत जावे ।।८।।

पूर्वमीमांसेतील कर्ममार्ग, रामोपासनेसारखे उपासनामार्ग, उपनिषदांचा ज्ञानमार्ग, गुरू हेच सर्वस्व मानणारा सिद्धांतमार्ग, पतंजलीचा योगमार्ग, नाथसंप्रदायाचा वैराग्य मार्ग इ. समजावून घ्यावेत. ॥८॥

नाना व्रतांचे महिमे । नाना तीर्थांचे महिमे । नाना दानांचे महिमे । ऐकत जावे ।।९।।

कार्तिकस्नानासारखी व्रते, काशीसारखी तीर्थक्षेत्रे, गोदानासारख्या दानांचे महत्त्व समजावून घ्यावे. ॥९॥

नाना माहात्म्यें नाना स्थानें । नाना मंत्र नाना साधनें । नाना तपें पुरश्चरणें । ऐकत जावीं ।।१०।।

पंढरीमाहात्म्य, आळंदीचे सिद्धबेट, त्रयोदक्षाशरी मंत्र, नामसाधना, पंचाग्निसाधन, गायत्री पुरश्चरण इ. विषयी ऐकावे. ॥१०॥

दुग्धाहारी निराहारी । फळाहारी पर्णाहारी । तृणाहारी नानाहारी । कैसे ते ऐकावे ।।११।।

दूध, फळे, पाने, गवत इ. खाऊन राहणारे तपस्वी. असे अनेक प्रकारचे आहार घेणारे व काही न खाता राहणारे असतात. त्यांच्याविषयी ऐकत जावे. ॥११॥

उष्णवास जळवास । सीतवास आरण्यवास । भूगर्भ आणी आकाशवास । कैसे ते ऐकावे ।।१२।।

अग्नी, पाणी, बर्फ, जंगल, भुयार, आकाश इत्यादिकांजवळ किंवा त्यांच्यात राहणारे तपस्वी असतात. ॥१२॥

जपी तपी तामस योगी । नाना निग्रह हटयोगी । शाक्तआगम आघोरयोगी । कैसे ते ऐकावे ।।१३।।

नामजपासारखा जप करणारे, विश्वामित्रासारखे तपस्वी, दुर्वासासारखे तापट, चांगदेवासारखे योगी, एका पायावर उभे राहून तप करणारे शक्तीचे उपासक, शैवागम, प्रेतादिकांची उपासना करणारे कसे असतात ते ऐकावे. ॥१३॥

नाना मुद्रा नाना आसनें । नाना देखणीं लक्षस्थानें । पिंडज्ञानें तत्त्वज्ञानें । कैसीं तें ऐकावीं ।।१४।।

खेचरीसारख्या योगमुद्रा, पद्मासनासारखी आसने, भ्रूमध्यासारखी पाहवीत अशी लक्ष्यस्थाने (देखणी हे लक्ष्यस्थानाचे विशेषण.) 'पद पिंडाची गोठी' (सि. सि. प. = सिद्धसिद्धान्त पद्धती) व उत्तरमीमांसादी तत्त्वज्ञाने ऐकावीत. ॥१४॥

नाना पिंडाची रचना । नाना भूगोळरचना । नाना सृष्टीची रचना । कैसी ती ऐकावी ।।१५।।

मानवादी शरीरांची रचना, सूर्यमालेतील ग्रहांची वैशिष्ट्ये, जळचरादी सृष्टीची माहिती घ्यावी. ॥१५॥

चंद्र, सूर्य तारामंडळें । ग्रहमंडळे मेघमंडळे । येकवीस स्वर्गें सप्तपाताळें । कैसीं ते ऐकावी ।।१६।।

चंद्र, सूर्य, तारे, ग्रह, ढगांचे प्रकार (पाहा– Encyclopedic dictionary –Oxford) एकवीस स्वर्ग, अतलवितलादी सात पाताळ समजून घ्यावेत. ॥१६॥

ब्रह्माविष्णु महेशस्थानें । इन्द्रदेवऋषीस्थानें । वायोवरुणकुबेरस्थाने । कैसी ते ऐकावीं ।।१७।।

ब्रह्मदेव, विष्णू, शंकर, इंद्र, यमादी देव यांच्या लोकांची माहिती, मार्कंडेयादी ऋषींची स्थाने, वायू, वरुण व कुबेराची स्थाने समजावून घ्यावीत. ॥१७॥

नव खंडे चौदा भुवनें । अष्ट दिग्पाळांचीं स्थाने । नाना वनें उपवनें गहनें । कैसीं ते ऐकावीं ।।१८।।

इलावृत्त, भद्राश्व इ. नवखंड, सात (अतलादि) अधोलोक व सात (स्वर्गादि) ऊर्ध्वलोक अशी चौदा भुवने. इंद्र अग्न्यादी पूर्व व अग्नेय दिशांचे स्वामी, खांडव वनासारखी वने व ऋषींच्या आश्रमांची उपवने, ॥१८॥

गण गंधर्व विद्याधर । येक्ष किन्नर नारद तुंबर । अष्ट नायका संगीतविचार । कैसा तो ऐकावा ।।१९।।

शिवगण, गंधर्व, विद्याधर, यक्ष, किन्नर, नारद, तुंबर, रंभादी अप्सरा व संगीताचा अभ्यास. ॥१९॥

रागज्ञान ताळज्ञान । नृत्यज्ञान वाद्यज्ञान । अमृतवेळ प्रसंगज्ञान । कैसें तें ऐकावें ।।२०।।

मालकंस इ. संगीतातील राग, त्रितालादी ताल, कथ्थकादी नृत्यांचे प्रकार, रुद्रवीणेसारखी वाद्ये, घबाडादी मुहूर्त व कोणत्या प्रसंगी काय करावे इ. ऐकत जावे. ॥२०॥

चौदा विद्या चौसष्टी कळा । सामुद्रिक लक्षणें सकळ कळा । बत्तीस लक्षणें नाना कळा । कैशा त्या ऐकाव्या ।।२१।।

चौदा विद्या, (चार वेद, सहा वेदांगे, न्याय, मीमांसा, पुराण व धर्मशास्त्र), चौसष्ट कला (इतिहास, कला, वाङ्मय, भाषा, व्यवहार, स्वयंपाक, रत्नपरीक्षा इ.) ज्योतिषविषयक देहलक्षणांचे ज्ञान, महापुरुषाची बत्तीस लक्षणे (पूर्वसुकृत, सुखरूपता, शील, पराक्रम अभ्यास, शास्त्रज्ञान, सत्संग, नि:संगता, दातृत्व इ.) ॥२१॥

मंत्र मोहरे तोटके सिद्धी । नाना वल्ली नाना औषधी । धातु रसायण बुद्धी । नाडिज्ञानें ऐकावी ।।२२।।

गायत्रीसारखे मंत्र, अरिष्टनिवारक मणी, संकटनाशक तोडगे, लहान-मोठ्या सिद्धी, वेली, वनौषधी, पारा, इ. धातू, तारुण्यदायक रसायने, मंडूकादी नाडीची गती समजून घ्यावी. ॥२२॥

कोण्या दोषें कोण रोग । कोणा रोगास कोण प्रयोग । कोण्या प्रयोगास कोण योग । साधे तो ऐकावा ।।२३।।

वातादी त्रिदोषांपैकी कशाच्या वृद्धीने कोणता रोग होतो, कोणत्या रोगावर काय औषध वापरावे, कोणता प्रयोग केला असता पुत्रादी प्राप्तीचा योग संभवतो ते जाणून घ्यावे. ॥२३॥

रवरवादि कुंभपाक । नाना यातना येमलोक । सुखदुःखादि स्वर्गनर्क । कैसा तो ऐकावा ।।२४।।

रौरव व कुंभीपाकादी नरक, यमलोकातील अनेक प्रकारचे छळ, स्वर्गातील सुखे, नरकातील दु:खे जाणून घ्यावीत. ॥२४॥

कैशा नवविधा भक्ती । कैशा चतुर्विधा मुक्ती । कैसी पाविजे उत्तम गती । ऐसे हें ऐकावें ।।२५।।

नऊ भक्ती, चार मुक्ती, उत्तम गती म्हणजे काय इ. ऐकावे. ॥२५॥

पिंडब्रम्हांडाची रचना । नाना तत्वविवंचना । सारासारविचारणा । कैसी ते ऐकावी ।।२६।।

पिंड म्हणजे जीवाचे शरीर, ब्रह्मांड म्हणजे ईश्वराचे शरीर, छत्तीस किंवा ब्याऐंशी दृष्यसृष्टीची घटकरूप तत्त्वे व सार काय व असार काय ते समजून घ्यावे. ॥२६॥

सायोज्यता मुक्ती कैसी होते । कैसें पाविजे मोक्षातें । याकारणें नाना मतें । शोधित जावी ।।२७।।

सायुज्य मुक्ती व मोक्ष यांचा लाभ कसा होतो यासंबंधीची मते समजावून घ्यावीत. ॥२७॥

वेदशास्त्रें आणि पुराणें । माहावाक्याचीं विवरणें । तनुचतुष्टयनिर्शनें । कैसीं ते ऐकावीं ।।२८।।

वेदांचा अर्थ समजावून सांगणारी शास्त्रे किंवा वेदरूपशास्त्रे, अठरा पुराणे, तत्त्वमस्यादी महावाक्ये, स्थूलादी चार देहांचा निरास समजून घ्यावा. ॥२८॥

ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें । असार तें जाणोनि त्यागावें । या नाव श्रवणभक्ती ।।२९।।

अशा प्रकारे व्यापक व बहुरंगी श्रवण करावे. त्यातील असार सोडून सार घ्यावे. हीच खरी श्रवणभक्ती होय. (वेदांताच्या तात्पर्यनिश्चयाला श्रवण म्हणतात.) ॥२९॥

सगुणांची चरित्रें ऐकावीं । कां तें निर्गुण अध्यात्में शोधावीं । श्रवणभक्तींची जाणावीं । लक्षणें ऐसीं ।।३०।।

रामकृष्णादिकांची दिव्य चरित्रे वाचावीत, ऐकावीत, सांगावीत. वेदान्तशास्त्रातील निर्गुण ब्रह्माचा ठाव घ्यावा. हीच खरी श्रवणभक्ती! ॥३०॥

सगुण देवांचीं चरित्रें । निर्गुणाचीं तत्त्वें यंत्रें । हे दोनी परम पवित्रें । ऐकत जावीं ।।३१।।

विठ्ठल, नृसिंहासारख्या देवांच्या कथा, निर्गुणांतर्गत तत्त्वचिंतन व श्रीयंत्रासारख्या यंत्रांचे रहस्य कळावे. ॥३१॥

जयंत्या उपोषणें नाना साधनें। मंत्र यंत्र जप ध्यानें। कीर्ति स्तुती स्तवनें भजनें। नानाविधें ऐकावीं।। ३२।।

कृष्णजन्म, एकादशीसारखी उपोषणे, शोडषोपचारयुक्त पूजा, विविधमंत्र, यंत्र, जप, ध्यान, भगवत्कीर्ती, स्तुती, स्तोत्रे, भजने ऐकावी. ।।३२।।

ऐसें श्रवण सगुणाचें। अध्यात्मनिरूपण निर्गुणाचें। विभक्ती सांडून भक्तीचें। मूळ शोधावें।। ३३।।

सगुणाचे श्रवण, निर्गुणाचे अध्यात्मशास्त्र यांचा अभ्यास करून द्वैताचे निर्मूलन करून भगवंताशी असलेल्या मूळच्या ऐक्याचा अनुभव घ्यावा. ।।३३।।

श्रवणभक्तीचें निरूपण। निरोपिलें असे जाण। पुढें कीर्तनभजनांचें लक्षण। बोलिलें असे ।।३४।।

येथपर्यंत श्रवणभक्तीचे स्वरूप सांगितले. पुढील समासात कीर्तन भक्ती सांगितली आहे. ।।३४।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'श्रवणभक्तिनाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'श्रवणभक्ती' नावाचा पहिला समास समाप्त

दशक चवथा : नवविधाभक्ती

समास दुसरा : कीर्तनभक्ती

॥ श्रीरामसमर्थ ॥

श्रोतीं भगवद्भजन पुसिलें । तें नवविधा प्रकारें बोलिलें । त्यांत प्रथम श्रवण निरोपिलें । दुसरें कीर्तन ऐका ।।१।।

श्रोत्यांनी भगवन्ताच्या भजनासंबंधी प्रश्न विचारला होता. ते नऊ प्रकारचे आहे असे सांगितले. त्यांतील पहिले श्रवण सांगून झाले. आता कीर्तन ऐका. ॥१॥

सगुण हरिकथा करावी । भगवत्कीर्ती वाढवावी । अखंड वैखरी वदवावी । येथायोग्य ।।२।।

सगुण हरीची कथा कीर्तनाच्या माध्यमातून सांगावी.भक्तिशास्त्राला धरून केलेल्या कीर्तनाने सतत वाणीचे तप करून भगवंताची कीर्ती सर्वत्र गावी व ती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावी. ॥२॥

बहुत करावें पाठांतर । कंठी धरावें ग्रन्थांतर । भगवत्कथा निरंतर । करीत जावी ।।३।।

भगवत्‌चरित्रे, संतचरित्रे, संतवचने, शास्त्रवचने इत्यादी पाठ करावीत. त्यांचे शब्दार्थ व लक्ष्यार्थ तयार असावेत. अशी भगवत्कथा अथक करीत राहावी. ॥३॥

आपुलिया सुखस्वार्था । केलीच करावी हरिकथा । हरिकथेविण सर्वथा । राहोंचि नये ।।४।।

हरिकथा स्वतःच्या सुखासाठी करावी. तीच ती कथा करीत राहावी. त्यावाचून दिवसही जाऊ नये. ॥४॥

नित्य नवा हव्यास धरावा । साक्षेप अत्यंतचि करावा । हरिकीर्तनें भरावा । ब्रह्मगोळ अवघा ।।५।।

हरिकथा करण्याची संधी शोधीत राहावे. मिळालेली एकही संधी सोडू नये. सतत हरिकीर्तनाने जग दुमदुमून टाकावे. ॥५॥

मनापासून आवडी । जीवापासून अत्यंत गोडी । सदा सर्वदा तांतडी । हरिकीर्तनाची ।।६।।

हरिकथेची मनापासून आवड असावी व ती स्वतःच्या जीवाहून अधिक प्रिय वाटावी. अत्यंत उत्साहाने हरिकीर्तन करावे. ॥६॥

भगवंतास कीर्तन प्रिये । कीर्तनें समाधान होये । बहुत जनासी उपाये । हरिकीर्तनें कलयुगीं ।।७।।

स्वतः भगवंताला हरिकीर्तन फार आवडते. त्याने फार मोठ्या समाजाला अध्यात्म व भक्तिसंबंधी मार्गदर्शन मिळते. कलियुगात कीर्तनाचे अपार महत्त्व आहे. ॥७॥

विविध विचित्रें ध्यानें । वर्णावीं आळंकार भूषणें । ध्यानमूर्ति अंतःकरणें । लक्षून कथा करावी ।।८।।

विठ्ठलाचे समदृष्टीध्यान, श्रीकृष्णाचे त्रिभंगाकृती ध्यान इ. देवाची विविध ध्याने समरसतेने सांगावीत. त्याचे अलंकार, आभूषणे इत्यादींचे श्रद्धापूर्वक वर्णन करावे. जणू ती समोर असल्याप्रमाणे वर्णन असावे. ॥८॥

येश कीर्ति प्रताप महिमा । आवडीं वर्णावा परमात्मा । जेणें भगवद्भक्तांचा आत्मा । संतुष्ट होये ।।९।।

भगवंताचे कलंकशून्य यश व कीर्ती, अगाध पराक्रम व माहात्म्य अत्यन्त आवडीने सांगावे. त्यामुळे तो अत्यन्त प्रसन्न होतो. ॥९॥

कथा अन्वय लापणिका । नामघोष करताळिका । प्रसंगे बोलाव्या अनेका । धात माता नेमस्त ।।१०।।

कथेचा क्रम लक्षात ठेवून विस्तार करावा. टाळ्या वाजवून नामघोष करीत योग्य प्रसंगी वाद्यांचा ताल जुळवून तानाही घ्याव्यात. मात्र त्यांचे प्रमाण मर्यादित असावे. ॥१०॥

ताळ मृदांग हरिकीर्तन । संगीत नृत्य तान मान । नाना कथानुसंधान । तुटोंचि नेदावें ।।११।।

हरिकीर्तनात टाळ व मृदुंगाची साथ असावी. काव्यरचना, नृत्य, बोलतानांसारख्या चित्तवेधक ताना यांच्या मदतीने कथांचा अनुक्रम सांभाळीत श्रोत्यांना गुंग करावे. ॥११॥

करुणाकीर्तनाच्या लोटें । कथा करावी घडघडाटें । श्रोतयांचीं श्रवणपुटें । आनंदें भरावीं ।।१२।।

करुणाकराचे कीर्तनात करुणरस भरभरून वाहावा. वक्त्याने खणखणीत आवाजात हरिकथेने वातावरण दणाणून टाकून श्रोत्यांचे कान तृप्त करावेत. ॥१२॥

कंप रोमांच स्फुराणें । प्रेमाश्रुसहित गाणें । देवद्वारीं लोटांगणें । नमस्कार घालावे ।।१३।।

सत्त्वगुण प्रबळ झाल्याने श्रोत्याला कंप, रोमांच व स्फुरणादिकांचा अनुभव यावा. प्रेमाने अश्रू येऊन डोळे भरावेत. कथेच्या भरात देवासमोर लोटांगणे घालावीत. ॥१३॥

पदें दोहडे श्लोक प्रबंद । धाटी मुद्रा अनेक छंद । बीरभाटिंव विनोद । प्रसंगें करावे ।।१४।।

भावभक्तीने भरलेली पदे, दोहे (कबीर), श्लोक (वामन पंडित) सुबद्ध काव्यरचना (वृत्तबद्ध) छंदबद्ध असाव्यात. चेहऱ्यावर प्रसंगानुरूप भाव, वीर व हास्यादि रस असावे. ॥१४॥

नाना नवरसिक श्रृंघारिक । गद्यपद्याचें कौतुक । नाना वचनें प्रस्ताविक । शास्त्राधारें बोलावीं ।।१५।।

कथेमध्ये नवरस शृंगारासह असावा. उत्तम गद्य व पद्यात बोलत असतांना कथेच्या अनुषंगाने शास्त्राधार असलेली अनेक वचने सांगावीत. ॥१५॥

भक्तिज्ञान वैराग्यलक्षण । नीतिन्यायस्वधर्मरक्षण । साधनमार्ग अध्यात्मनिरूपण । प्रांजळ बोलावें ।।१६।।

भक्ती, ज्ञान, वैराग्य यांची लक्षणे, न्यायनीतीपूर्वक स्वधर्मरक्षण, अध्यात्मशास्त्रपूर्वक साधनापद्धती स्पष्टपणे समाजावून सांगावी. ॥१६॥

प्रसंगे हरिकथा करावी । सगुणीं सगुणकीर्ती धरावी । निर्गुणप्रसंगें वाढवावी । अध्यात्मविद्या ।।१७।।

जयंत्या, पुण्यतिथी, इ. प्रसंगी हरिकथा करावी. कीर्तनात सगुणमाहात्म्य सांगावे. प्रवचनात वेदान्तशास्त्र विस्तारपूर्वक मांडावे. ॥१७॥

पूर्वपक्ष त्यागून सिद्धांत । निरूपण करावें नेमस्त । बहुधा बोलणें अव्यावेस्त । बोलोंचि नये ।।१८।।

बुद्धिभेद करणारा पूर्वपक्ष बाजूला सारून नेमकेपणाने सिद्धान्तपक्ष (अद्वैत) सांगावा. चालू विषयाला सोडून सहसा बोलूच नये. ॥१८॥

करावें वेदपारायेण । सांगावें जनासी पुराण । मायाब्रह्मीचें विवरण । साकल्य वदावें ।।१९।।

स्वत: वेदवेदान्ताचा सखोल अभ्यास करून सामान्य जनांना सगुणप्रधान पुराण सांगावे. प्रसंगी ब्रह्म व माया या अमूर्त तत्त्वांचे स्पष्टीकरण करावे. ॥१९॥

ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेचीं भजनद्वारें । गुरुपरंपरा निर्धारें । चळोंच नेदावी ।।२०।।

ब्राह्मण्याच्या गुणसंपदेची आवश्यकता, उपासनेच्या हेतूने केलेले भजन व गुरुपरंपरेचे माहात्म्य यांना जराही धक्का न लावता कथा करावी. ॥२०॥

करावें वैराग्यरक्षण । रक्षावें ज्ञानाचें लक्षण । परम दक्ष विचक्षण । सर्वहि सांभाळी ।।२१।।

वैराग्याचे महत्त्व वारंवार सांगावे. 'आत्मज्ञान' या संकल्पनेची खोली वरचेवर लक्षात आणून द्यावी. सावध व बुद्धिमान कथाकार हे सर्व सांभाळतो. ॥२१॥

कीर्तन ऐकता संदेह पडे । सत्य समाधान तें उडे । नीतिन्यायसाधन मोडे । ऐसें न बोलावें ।।२२।।

श्रोता घोटाळ्यात पडावा, तर्कसंगत मांडणीने सहज होणारे समाधान मोडावे, न्याय, नीती व प्रत्यक्ष साधना सुटावी असे कीर्तन नसावे. ॥२२॥

सगुणकथा या नाव कीर्तन । अद्वैत म्हणिजे निरूपण । सगुण रक्षून निर्गुण । बोलत जावे ।।२३।।

ज्यात सगुणाची कथा मुख्य असते ते कीर्तन. ज्यात शांकर अद्वैत वैदान्ताचे बारकावे असतात ते प्रवचन. मात्र सगुणाचे प्रेम व महत्त्व कमी होणार नाही याची प्रवचनात काळजी घ्यावी. ॥२३॥

असो वग्त्रृत्वाचा अधिकार । अल्पास न घडे सत्योत्तर । वक्ता पाहिजे साचार । अनुभवाचा ।।२४।।

वक्त्याचा वेदान्तशास्त्राचा सखोल व व्यापक अभ्यास असलाच पाहिजे. नाहीतर त्याला श्रोत्यांच्या शंकांचे समाधान करता येत नाही. म्हणून तो शास्त्रसंपन्न व अनुभवसंपन्न असावा. ॥२४॥

सकळ रक्षून ज्ञान सांगे । जेणे वेदज्ञा न भंगे । उत्तम सन्मार्ग लागे । प्राणीमात्रांसी ।।२५।।

न्याय, नीती, धर्म, सगुण साधना यांना दूर न सारता वेदान्त सांगितल्याने वेदांचे मनोगत सांभाळले जाते. लोक लौकिक व आध्यात्मिक सन्मार्गाला लागतात. ॥२५॥

असो हें सकळ सांडून । करावें गुणानुवादकीर्तन । या नाव भगवद्भजन । दुसरी भक्ती ।।२६।।

म्हणून कोणतीच चूक न करता कीर्तनात देवाचे यशादी गुणगान करावे. हीच दुसरी भजन भक्ती. ॥२६॥

कीर्तनें माहा दोष जाती । कीर्तनें होये उत्तम गती । कीर्तनें भगवत्प्राप्ती । येदर्थीं संदेह नाही ।।२७।।

कीर्तनामुळे पापाची प्रवृत्ती नष्ट होते. मोक्षाकडे प्रवृत्ती होते व विभक्ताचा भक्त होतो हे नक्की. ॥२७॥

कीर्तनें वाचा पवित्र । कीर्तनें होय सत्पात्र । हरिकीर्तनें प्राणीमात्र । सुसिळ होती ।।२८।।

कीर्तनाने वाणी शुद्ध होते, मोक्षाचा अधिकार मिळतो. समाजात चारित्र्य व शील वाढीला लागते. ॥२८॥

कीर्तनें अवेग्रता घडे । कीर्तनें निश्चये सापडे । कीर्तनें संदेह बुडे । श्रोतयांवक्तयांचा ।।२९।।

कीर्तनाने प्रपंच चिंतनात व्यग्र असलेले मन शांत होते. जीवनाच्या ध्येयाचा निश्चय होतो. श्रोता व वक्ता संशय विपर्यय रहित होतात. ॥२९॥

सदा सर्वदा हरिकीर्तन । ब्रह्मसुत करी आपण । तेणें नारद तोचि नारायेण । बोलिजेत आहे ।।३०।।

नारदमुनी स्वत: सतत कीर्तन करतात. म्हणून 'नारद हेच नारायण' असा निश्चय रूढ झाला. ॥३०॥

म्हणोनि कीर्तनाचा अगाध महिमा । कीर्तनें संतोषे परमात्मा । सकळ तीर्थे आणी जगदात्मा । हरिकीर्तनीं वसे ।।३१।।

कीर्तनाचे माहात्म्य अपार आहे. कीर्तनाने राम, कृष्ण, विठ्ठलादी प्रसन्न होतात. (ईश्वरकृपा होते.) व्यापक ईश्वर व सर्व तीर्थे कीर्तनातील कथेच्या माध्यमातून कीर्तनात उपस्थित असतात. (तीर्थ = तीर्थातील दैवते.) ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'कीर्तनभक्तिनाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'कीर्तनभक्ती' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक चवथा : नवविधाभक्ती

समास तिसरा : नामस्मरणभक्ती

॥श्रीरामसमर्थ॥

मागां निरोपिलें कीर्तन । जें सकळांस करी पावन । आतां ऐका विष्णोः स्मरण । तिसरी भक्ती ।।१।।

मागील समासात कीर्तनभक्ती सांगितली. त्यामुळे सर्वांचे अंत:करण शुद्ध व शांत होते. आता विष्णूचे नामस्मरण ही तिसरी भक्ती होय. ॥१॥

स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें । नामस्मरणें पावावें । समाधान ।।२।।

व्यापक (विष्णू) देवाचे अखंड स्मरण करावे. त्याचे नामवाणीने जपून समाधान प्राप्त करून घ्यावे. (अंत:करण वृत्तीचे सम्यक् आधान म्हणजे समाधान. एकाग्रतेची तृप्ती) ॥२॥

नित्य नेम प्रात:काळीं । माध्यानकाळीं सायंकाळीं । नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें ।।३।।

ब्राह्ममुहूर्त, सकाळ, दुपार व संध्याकाळी नामजपाचा नित्यनेम करावा. नामाचा संस्कार करावा. ॥३॥

सुख दुःख उद्वेग चिंता । अथवा आनंदरूप असतां । नामस्मरणेंविण सर्वथा । राहोंच नये ।।४।।

सुख, दु:ख, उद्वेग, चिंता किंवा आनंद अशा अंत:करणाच्या कोणत्याही स्थितीत नाम मुळीच सोडू नये. सुखे व दु:खे नामाचे ठिकाणी एकरूप करावीत. ॥४॥

हरुषकाळीं विषमकाळीं । पर्वकाळीं प्रस्तावकाळीं । विश्रांतिकाळीं निद्राकाळीं । नामस्मरण करावें ।।५।।

अत्यानंद, अडचणींचे दिवस, ग्रहणासारखा पर्वकाळ, पश्चात्तापाच्या मन:स्थितीत, विश्रांतीची वेळ व झोपताना नामस्मरण करावे. ॥५॥

कोडें साकडें संकट । नाना संसारखटपट । आवस्ता लागतां चटपट । नामस्मरण करावें ।।६।।

समस्या उभी राहिली असताना, जबाबदारीमध्ये, संकटकाळी, संसारातील अनेक उलाढाली करताना व अस्वस्थ मन:स्थितीत नामस्मरण करावे. ॥६॥

चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां । नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये ।।७।।

प्रवास, गप्पा, व्यवसाय, भोजन, न्याहारी, सुखानुभव, विषयभोग या सर्वांत नामाचा विसर पडू नये. (राम म्हणे भोगी त्यागी/कर्म न लिंपे त्या अंगी ॥ तु.॥) ॥७॥

संपत्ती अथवा विपत्ती । जैसी पडेल काळगती । नामस्मरणाची स्थिती । सांडूच नये ।।८।।

वैभव व दारिद्र्य यातील काहीही प्रारब्धानुसार मिळेल. नामाचे स्मरण हे स्वाधीन असल्याने कधीच सोडू नये. ॥८॥

वैभव सामर्थ्य आणी सत्ता । नाना पदार्थ चालता । उत्कट भाग्यश्री भोगितां । नामस्मरण सांडूं नये ।।९।।

वैभव, सामर्थ्य व सत्ता मिळून प्रचंड उलाढालीने भरलेले निर्भेळ वैभव भोगताना नाम विसरू नये. ॥९॥

आधीं आवदसा मग दसा । अथवा दसेउपरी आवदसा । प्रसंग असो भलतैसा । परंतु नाम सोडूं नये ।।१०।।

आधी दारिद्र्य व नंतर वैभव किंवा आधी वैभव व नंतर दारिद्र्य यातील काहीही झाले तरी नाम सोडू नये. ।।१०।।

नामें संकटें नासतीं । नामें विघ्नें निवारती । नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें ।।११।।

नामामुळे संकटांचा संकटपणा संपतो. नामामुळे विघ्नांचे विघ्नत्व नष्ट होते. मोक्षपद लाभते. ।।११।।

भूत पिशाच्य नाना छंद । ब्रह्मगिऱ्हो ब्राह्मणसमंध । मंत्रचळ नाना खेद । नामनिष्ठें नासतीं ।।१२।।

भूत व पिशाच्यांच्या कल्पनेने मनाचा कबजा घेतल्याने (छंद) वाटणारे भय जाते. ब्रह्मसमंध, ग्रहपीडा, चुकीच्या पद्धतीने मंत्र म्हटल्याने होणारे दुष्परिणाम ही सर्व नामाने नष्ट होतात. ।।१२।।

नामें विषबाधा हरती । नामें चेडे चेटकें नासती । नामें होये उत्तम गती । अंतकाळीं ।।१३।।

नामाने विषबाधा होत नाही. (मीरा) कोणी केलेले चेडाचेटूक परिणामशून्य होते. अखंड नामधारकाला मृत्यूनंतर सद्गती मिळते. ।।१३।।

बाळपणीं तारुण्यकाळीं । कठिणकाळीं वृधाप्यकाळीं । सर्वकाळीं अंतकाळीं । नामस्मरण असावें ।।१४।।

बालवय, तारुण्य, आजार किंवा अडचणींचा कठीण काळ, वृद्धत्व, अंतकाळ इ. सर्वकाळी नाम घ्यावे. ।।१४।।

नामाचा महिमा जाणे शंकर । जना उपदेसी विश्वेश्वर । वाराणसी मुक्तिक्षेत्र । रामनामेंकरूनी ।।१५।।

भ. शंकर रामनामाचे माहात्म्य जाणतात. (त्यामुळेच हलाहल कंठात थोपवून धरण्याचे सामर्थ्य त्यांना मिळाले.) ते माहात्म्य ते सर्वांना सांगतात. काशीला मोक्षदायक क्षेत्राचा दर्जा रामनामानेच प्राप्त झाला. ।।१५।।

उफराट्या नामासाठीं । वाल्मिक तरला उठाउठी । भविष्य वदला शतकोटी । चरित्र रघुनाथाचें ।।१६।।

'मरा मरा' असे उलटे रामनाम घेऊन वाल्मीकी तरला. श्रीरामाचे शतकोटी श्लोकांचे चरित्र त्याने अवतारापूर्वीच लिहून ठेवले. ।।१६।।

हरिनामें प्रल्हाद तरला । नाना आघातापासून सुटला । नारायणनामें पावन जाला । अजामेळ ।।१७।।

कड्यावरून ढकलण्यासारख्या शिक्षेतून प्रल्हाद नामामुळेच बचावला. अजामीळाने मृत्यूच्या वेळी 'नारायण' या नामाचा अभावितपणे उच्चार केला तरी तो उद्धरून गेला. ।।१७।।

नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले । माहा पापी तेचि जाले । परम पवित्र ।।१८।।

सेतू बांधताना 'राम' हे नाम लिहिलेले दगड पाण्यावर तरंगले. असंख्य भक्तांचा उद्धार नामाने झाला. महापापी असलेले पावन झाले. (वाल्या) ।।१८।।

परमेश्वराची अनंत नामें । स्मरतां तरिजे नित्यनेमें । नामस्मरण करितां येमें । बाधिजेना ।।१९।।

परमेश्वराची हजार नामे आहेत. (विष्णुसहस्रनाम) नित्यनेमाने त्यांचे स्मरण केले असता जन्म-मरणातून सुटका होते. ।।१९।।

सहस्रा नामामध्यें कोणी येक । म्हणतां होतसे सार्थक । नाम स्मरतां पुण्यश्लोक । होईजे स्वयें ।।२०।।

हजार नामांपैकी एकाचे स्मरण केले तरी मोक्ष मिळून नामधारक स्वत: पुण्यरूप होतो. (पवित्र तो देह, वाणी पुण्यवन्त । जो वदे अच्युत सर्वकाळ ।।तुका.) ।।२०।।

कांहींच न करूनि प्राणी । रामनाम जपे वाणी । तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तांलागीं सांभाळी ।।२१।।

इतर कोणतीच साधना न करता केवळ नामसाधनेने भगवंत संतुष्ट होऊन भक्ताला सांभाळतात. ॥२१॥

नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्यशरीर । माहा दोषांचे गिरिवर । रामनामें नासती ।। २२।।

अखंड नामसाधना करणाऱ्या जीवाचे शरीरसुद्धा पुण्यरूप होते. नामनिष्ठेने पापांचे डोंगर नष्ट होतात. ॥२२॥

अगाध महिमा न वचे वदला । नामें बहुत जन उद्धरला । हळहळापासून सुटला । प्रत्यक्ष चंद्रमौळी ।। २३।।

नामाचा महिमा अपार असून तो सांगण्याचा प्रयत्न केला. नामाने असंख्य भक्त तरून गेले. प्रत्यक्ष भ. शंकरांची हलाहलाच्या विषापासून नामाने सुटका झाली. ॥२३॥

चहुं वर्णां नामाधिकार । नामीं नाहीं लहानथोर । जड मूढ पैलपार । पावती नामें ।।२४।।

चारी वर्णांना नामसाधनेचा अधिकार आहे. (कुळ गोत्र वर्ण । हे अवघेचि अकारण ॥ज्ञाने. ॥) नामसाधनेला लौकिकातील लहानमोठेपणाचा अडसर नाही. अशिक्षित व अडाणी नामाने भवसागर तरून जातात. ॥२४॥

म्हणौन नाम अखंड स्मरावे । रूप मनीं आठवावें । तिसरी भक्ती स्वभावें । निरोपिली ।।२५।।

म्हणून चित्तात रूपाचे स्मरण ठेवून नामसाधना करावी. (तुझे रूप चित्ती राहो । मुखी तुझे नाम ॥तुका. ॥) अशी ही तिसरी भक्ती आहे. ॥२५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'नामस्मरणभक्तिनाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'नामस्मरणभक्ती' नावाचा तिसरा समास समाप्त.

दशक चवथा : नवविधाभक्ती

समास चवथा : पादसेवनभक्ती

॥श्रीरामसमर्थ॥

मागां जालें निरूपण । नामस्मरणाचें लक्षण । आतां ऐका पादसेवन । चौथी भक्ती ।।१।।

मागील समासात नामस्मरण भक्ती सांगितली. आता चौथ्या पादसेवन भक्तीची लक्षणे ऐका. ॥१॥

पादसेवन तेंचि जाणावें । कायावाचामनोभावें । सद्‌गुरुचे पाय सेवावे । सद्‌गतिकारणें ।।२।।

श्रीगुरूंची शरीर, मन व वाणीने निष्ठापूर्वक व चरणसेवापूर्वक सेवा करून मोक्ष मिळवावा. हेच पादसेवन भक्तीचे स्वरूप आहे. 'चरण सेवा' हे अहंकारविरहित सेवेचे प्रतीक आहे. (तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया'–गीता) ॥२॥

या नाव पादसेवन । सद्‌गुरुपदीं अनन्यपण । निरसावया जन्ममरण । यातायाती ।।३।।

श्रीगुरूंच्या ठिकाणी अनन्यशरणता असावी. जीवनात आपली कर्तव्ये चोख करीत असताना जे घडेल ते श्रीगुरूंच्या इच्छेने घडते, असा निश्चय असावा. जन्ममरणाच्या येरझारातून कायमपणे सुटण्याचा हा एकमेव मार्ग आहे. ॥३॥

सद्‌गुरुकृपेविण कांहीं । भवतरणोपाव तों नाहीं । याकारणें लवलाहीं । सद्‌गुरुपाय सेवावे ।।४।।

श्रीगुरुकृपा झाल्याशिवाय संसार तरून जाण्याचा दुसरा मार्ग नाही. म्हणून त्यांची तत्परतेने सेवा करावी. ॥४॥

सद्वस्तु दाखवी सद्‌गुरु । सकळ सारासारविचारु । परब्रह्माचा निर्धारु । अंतरीं बाणे ।।५।।

सद्‌गुरू जणू परब्रह्माचे तळहातावरील आवळ्याप्रमाणे दर्शन घडवितात. असार माया व सार ब्रह्म यांचा स्पष्ट निवाडा करून ब्रह्माविषयी कोणतीही शंका न राहून त्याच्या स्वरूपाचा निश्चय करून देतात. ॥५॥

जे वस्तु दृष्टीस दिसेना । आणी मनास तेहि भासेना । संगत्यागेंविण ये ना । अनुभवासी ।।६।।

पाच ज्ञानेंद्रिये व अंत:करणाने ब्रह्म अनुभवाला येत नाही. देह व जगताचा 'मी व माझे' असा संग सोडल्याशिवाय ब्रह्मानुभव येत नाही. ॥६॥

अनुभव घेतां संगत्याग नसे । संगत्यागें अनुभव न दिसे । हे अनुभवीयासीच भासे । येरां गथागोवी ।।७।।

ब्रह्मानुभव आल्यावर त्याग करण्यासाठी संगाचे पदार्थ उरत नाहीत! पण त्या पदार्थांचा (देह व जग) संग सोडल्याशिवाय ब्रह्मानुभव येत नाही!! हे विचित्र बोलणे अनुभव घेतलेल्यालाच कळते. इतरांना ते गौडबंगालच वाटते. देहाचा 'मी देह' असा तादात्म्यसंबंध सोडल्याशिवाय 'मी ब्रह्म' असा अनुभव येत नाही. 'मी ब्रह्म' असा अनुभव आल्यावर संबंध सोडण्यासाठी देहच सत्यत्वाने शिल्लक राहत नाही. बाधित होतो. ॥७॥

संगत्याग आणी निवेदन । विदेहस्थिती अलिप्तपण । सहजस्थिती उन्मनी विज्ञान । हे सप्तहि येकरूप ।।८।।

संगत्याग, आत्मनिवेदन, विदेहमुक्ती, अलिप्तता, सहजावस्था, उन्मनी व विज्ञान या साती शब्दांचे तात्पर्य एकच आहे. उदा. ज्या मायिक जीवाचा त्याग करायचा त्याचेच आत्मस्वरूपात विलीनीकरण करायचे. ते झाल्यावर जी मुक्ती मिळते तीच जीवभाव व देहतादात्म्यरहित मुक्ती. ॥८॥

याहिवेगळीं नामाभिधानें । समाधानाचीं संकेतवचनें । सकळ कांहीं पादसेवनें । उमजों लागें ।।९।।

कैवल्यासारखे इतर शब्दही त्याचेच अधिक स्पष्टीकरण देऊन समाधान देतात. हे सर्व गूढ पादसेवन भक्तीने उकलू लागते. ॥९॥

वेद वेदगर्भ वेदांत । सिद्ध सिद्धभावगर्भ सिद्धांत । अनुभव अनुर्वाच्य धादांत । सत्य वस्तु ।।१०।।

त्रिकांडात्मक वेदांचा वेदान्त हा गर्भ म्हणजे अत्यंत आतील भाग आहे. सिद्धांचा सिद्धभाव हा जीव ब्रह्मैक्याच्या सिद्धान्ताचा खरा आशय आहे. जीवब्रह्मैक्य हा वेदान्ताचा मुख्य सिद्धान्त आहे. हा ऐक्यानुभव हेच सत्य वस्तूचे म्हणजे ब्रह्माचे स्वरूप असून तो अनुभव शब्दाने न सांगण्यासारखा (अनिर्वाच्य) व प्रत्यक्ष (धादांत) असतो. ॥१०॥

बहुधा अनुभवाचीं आंगें । सकळ कळती संतसंगें । चौथे भक्तीचे प्रसंगें । गौप्य तें प्रगटे ।।११।।

असे अनुभवाचे पैलू संतांच्या सहवासाने कळतात. पादसेवन भक्तीने गहन गूढ तत्त्व उलगडत जाते. ॥११॥

प्रगट वसोनि नसे । गोप्य असोनि भासे । भासाअभासाहून अनारिसे । गुरुगम्य मार्ग ।।१२।।

सर्वत्र भरून राहिलेले असून ज्ञानेंद्रियांना कळत नाही. गुप्त असून अनुभवाला येते. कळणे व न कळणे अशा दोन्हीत न सापडणारे तत्त्व श्रीगुरूंच्या उपदेशाने लक्षात येते. (जाणीव नेणीव भगवन्ती नाही–हरिपाठ) ॥१२॥

मार्ग होये परी अंतरिक्ष । जेथें सर्वहि पूर्वपक्ष । पाहों जातां अलक्ष । लक्षवेना ।।१३।।

ब्रह्मानुभव ही अंतर्यात्रा आहे. ब्रह्म सोडून बाकी सर्व अनात्म वस्तूंचा निरासच करावा लागतो. ब्रह्म 'लक्ष्य' नाही. नित्यप्राप्त आहे. म्हणून त्याला ध्येयाचा दर्जा नाही. ते अलक्ष्य आहे. ॥१३॥

लक्षें जयासी लक्षावें । ध्यानें जयासी ध्यावें । तें गे तेंचि आपण व्हावें । त्रिविधा प्रचिती ।।१४।।

त्याला लक्ष्य किंवा ध्येय करण्याचा प्रयत्न करण्यासाठी त्राटकासारखे किंवा सोऽहं सारखे साधन करणारा साधक तोच होतो! वेदान्त, श्रीगुरूंचा उपदेश व स्वानुभव या तिन्हींचे सांगणे तेच असून अनुभव सारखाच येतो. ॥१४॥

असो हीं अनुभवाची द्वारें । कळतीं सारासारविचारे । सत्संगें करून सत्योत्तरें । प्रत्ययासि येती ।।१५।।

एकूण हा सगळा अनुभव घेण्याचा प्रांत आहे. सार ब्रह्म व असार मायेच्या चिंतनाने अनुभवाचा मार्ग सापडतो. श्रीगुरूंकडून मिळणाऱ्या यथार्थ उपदेशाने अनुभव येतो. ॥१५॥

सत्य पाहातां नाहीं असत्य । असत्य पाहातां नाहीं सत्य । सत्याअसत्याचें कृत्य । पाहाणारापासीं ।।१६।।

ब्रह्मरूप सत्याचा अनुभव येताच मायिक जगत् मावळते. मायिक जगतात सत्यत्व बुद्धीने रमल्यास सत्य ब्रह्माचा अनुभव येत नाही. म्हणून सत्य व असत्याचा निवाडा पाहणाऱ्यानेच करायचा असतो. ॥१६॥

पाहाणार पाहाणें जया लागलें । तें तद्रूपत्वें प्राप्त जालें । तरी मग जाणावें बाणलें । समाधान ।।१७।।

पाहणारा व पाहणे आत्मस्वरूपात हरवून गेल्यानंतरच्या अनुभवातच खरे समाधान आहे. ॥१७॥

नाना समाधानें पाहतां । बाणतीं सद्गुरु करितां । सद्गुरुविण सर्वथा । सन्मार्ग नसे ।।१८।।

सर्व साधनांचे सार्थक गुरुकृपेनेच होते. त्यामुळेच ती साधकाला आत्मसात होतात. सद्गुरुवाचून मोक्ष मार्गाची वाटचाल शक्य नाही. ॥१८॥

प्रयोग साधनें सायास । नाना साक्षेपें विद्याभ्यास । अभ्यासें कांहीं गुरुगम्यास । पाविजेत नाहीं ।।१९।।

प्राणायामादी प्रयोग, नाना प्रकारची व्रतादी साधने, प्रयत्नपूर्वक केलेला वेदान्ताचा अभ्यास इत्यादिकांनी श्रीगुरूंच्या कृपेनेच प्राप्त होणाऱ्या मुक्तीचा लाभ कधीच होत नाही. ॥१९॥

जें अभ्यासें अभ्यासितां न ये । जें साधनें असाध्य होये । तें हें सद्गुरुविण काये । उमजों जाणे ।।२०।।

ज्याचा अध्ययनाने थांगपत्ता लागत नाही व जे कोणत्याही साधनाचे साध्य नाही, त्याचे वर्म श्रीगुरूंवाचून

कोणाकडूनच समजत नाही. ॥२०॥

याकारणें ज्ञानमार्ग । कळाया धरावा सत्संग । सत्संगेंविण प्रसंग । बोलोंचि नये ।। २१ ।।

यासाठी ज्ञानमार्गी साधकाने मार्गाचे स्वरूप कळण्यासाठी सद्गुरुसंग करावा. त्याशिवाय आत्मज्ञानाची गोष्टसुद्धा काढू नये. ॥२१॥

सेवावे सद्गुरुचे चरण । या नांव पादसेवन । चौथे भक्तीचें लक्षण । ते हें निरोपिलें ।। २२ ।।

श्रीगुरूंच्या चरणांची सेवा हेच चौथ्या भक्तीचे लक्षण आता सांगितले. ॥२२॥

देव ब्राह्मण माहानुभाव । सत्पात्र भजनाचें ठाव । ऐसिये ठाईं सद्भाव । दृढ धरावा ।। २३ ।।

त्यांचेबरोबरच भूदेव ब्राह्मण, श्रीगुरूंच्या योग्यतेचे संत, अशा सत्पात्रांची दृढ भाव धरून सेवा करावी. ॥२३॥

हें प्रवृत्तीचें बोलणें । बोलिलें रक्षाया कारणें । परंतु सद्गुरुपाय सेवणें । या नाव पादसेवन ।। २४ ।।

हे सांगणे परंपरेचे रक्षण करण्यासाठी सांगितले. (पहा. तैत्तिरीय) परंतु आपल्या श्रीगुरूंची सर्वभावे सेवा करणे हीच चौथी भक्ती होय. ॥२४॥

पादसेवन चौथी भक्ती । पावन करितसे त्रिजगती । जयेकरितां सायोज्यमुक्ती । साधकास होये ।। २५ ।।

या चौथ्या पादसेवन भक्तीने भक्त तिन्ही लोकांत पावन ठरतो व त्याला जीवन्मुक्ती लाभते. ॥२५॥

म्हणौनि थोराहूनि थोर । चौथे भक्तीचा निर्धार । जयेकरितां पैलपार । बहुत प्राणी पावती ।। २६ ।।

म्हणून ही चौथी भक्ती सर्व भक्तीत श्रेष्ठ असून साधक तिच्यामुळे मायासमुद्र पार करतात. ॥२६॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'पादसेवनभक्तिनाम' समास चवथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'पादसेवनभक्ती' नावाचा चवथा समास समाप्त.

दशक चवथा : नवविधाभक्ती

समास पाचवा : अर्चनभक्ती

॥ श्रीरामसमर्थ ॥

मागां जालें निरूपण । चौथे भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । पांचवी भक्ती ।।१।।

मागील समासात चौथी भक्ती सांगितली. आता लक्ष देऊन पाचवी भक्ती ऐका. ॥१॥

पाचवी भक्ती तें आर्चन । आर्चन म्हणिजे देवतार्चन । शास्त्रोक्त पूजाविधान । केलें पाहिजे ।।२।।

अर्चन या पाचव्या भक्तीत देवाची शोडषोपचारयुक्त पूजा केली पाहिजे. ॥२॥

नाना आसनें उपकर्णे । वस्त्रें आळंकार भूषणें । मानसपूजा मूर्तिध्यानें । या नांव पांचवी भक्ती ।।३।।

देवाला सुंदर आसने, पूजेची भांडी, वस्त्रे, दागिने, आभूषणे अर्पण करावीत. देवाची मानसपूजा करून मूर्तीच्या रूपाचे ध्यान करावे. हीच पाचवी भक्ती. ॥३॥

देवब्राह्मण अग्नीपूजन । साधूसंत अतीतपूजन । इतिमहानुभावगाइत्रीपूजन । या नाव पांचवी भक्ती ।।४।।

देव, अग्नी, ब्राह्मण, साधू, संत, अतिथी, संन्यासी, पूजनीय व्यक्ती व गाय यांची विधिवत् पूजा करावी. ॥४॥

धातुपाषाणमृत्तिकापूजन । चित्रलेपसत्पात्रपूजन । आपले गृहीचें देवतार्चन । या नांव पांचवी भक्ती ।।५।।

तांब्यासारखे धातू, काळा पत्थर व माती यांच्या मूर्तींची पूजा करावी. सत्पात्रांच्या चरणांवर शंखचक्रादी रंगवून त्यांची पूजा करावी. घरातील देवांची नियमाने पूजा करणे म्हणजे अर्चन भक्ती. ॥५॥

सीळा सप्तांकित नवांकित । शालिग्राम शकलें चक्रांकित । लिंगें सूर्यकांत सोमकांत । बाण तांदळे नर्बदे ।।६।।

सात किंवा नऊ आडव्या रेषा असलेले गुळगुळीत दगड, चक्रे असलेले पूर्ण वा अपूर्ण शाळिग्राम, सूर्यकान्त व चंद्रकान्त मणी, बाण, शेंदूर लावलेल्या ओळखू न येणाऱ्या मूर्ती, नर्मदेचे गोटे इ. पूजावेत. ॥६॥

भैरव भगवती मल्लारी । मुंज्या नृसिंह बनशंकरी । नाग नाणी नानापरी । पंचायेत्नपूजा ।।७।।

बटुक भैरव, देवी भगवती, खंडोबा, मुंजोबा, नृसिंह, बनशंकरी (बदामी), नाग, शिक्के व रामादी पंचायतनांची पूजा करावी. ॥७॥

गणेशशारदाविठलमूर्ती । रंगनाथजगन्नाथतांडवमूर्ती । श्रीरंगहनुमंतगरुडमूर्ती । देवतार्चनी पूजाव्या ।।८।।

गणपती, शारदा, श्रीविठ्ठल, रंगनाथ, जगन्नाथ, तांडवनृत्य करणारे श्रीशंकर, श्रीरंग, हनुमान, गरुड इत्यादींची पूजा करावी. ॥८॥

मत्छकूर्मवऱ्हावमूर्ती । नृसिंहवामनभार्गवमूर्ती । रामकृष्णहयग्रीवमूर्ती । देवतार्चनी पूजाव्या ।।९।।

मत्स्य, वराह, कूर्म, नृसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण व हयग्रीव या अवतारमूर्तींची पूजा करावी. (हयग्रीव = घोड्याची मान.) ॥९॥

केशवनारायणमाधवमूर्ती । गोविंदविष्णुमदसूदनमूर्ती । त्रिविक्रमवामनश्रीधरमूर्ती । रुषीकेश पद्मनाभि ।।१०।।

केशव, नारायण, माधव, गोविंद, विष्णू, मधुसूदन, त्रिविक्रम, वामन, श्रीधर, हृषिकेश, पद्मनाभ इ. विष्णूमूर्तींची पूजा करावी. ॥१०॥

दामोदरसंकर्षणवासुदेवमूर्ती । प्रद्युम्नअनुरधपुरुषोत्तम मूर्ती । अधोक्षजनारसिंहअच्युतमूर्ती । जनार्दन आणि उपेंद्र ।।११।।

दामोदरापासून उपेंद्रापर्यंत सर्व विष्णूमूर्तींची पूजा करावी. ॥११॥

हरिहरांच्या अनंत मूर्ती । भगवंतजगदात्माजगदीशमूर्ती । शिवशक्तीच्या बहुधा मूर्ती । देवतार्चनी पूजाव्या ।।१२।।

श्रीविष्णू व शंकराच्या अवतारांच्या मूर्ती, जगाचा आत्मा असलेल्या जगदीशाची मूर्ती, शिवपार्वतीच्या मूर्तींची पूजा करावी. ॥१२॥

अश्वत्थनारायेण सूर्यनारायेण । लक्ष्मीनारायेण त्रिमल्लनारायेण । श्रीहरीनारायण आदिनारायण । शेषशाई परमात्मा ।।१३।।

अश्वत्थ, लक्ष्मी, श्रीमल्ल, हरी यांच्याशी निगडित आदिनारायणाची व सूर्यनारायण व शेषावर पहुडलेल्या श्रीविष्णूची (मूर्ती) पूजा करावी. ॥१३॥

ऐश्या परमेश्वराच्या मूर्ती । पाहों जातां उदंड असती । त्यांचे आर्चन करावें भक्ती । पांचवी ऐसी ।।१४।।

अशा कित्येक मूर्तींची परमेश्वरभावाने पूजा करणे हीच पाचवी भक्ती. ॥१४॥

याहि वेगळे कुळधर्म । सोडूं नये अनुक्रम । उत्तम अथवा मध्यम । करीत जावें ।।१५।।

याशिवाय कुळधर्माची चालत आलेली परंपरा उत्तम रीतीने किंवा मध्यम रीतीने सांभाळावी. ॥१५॥

जाखमाता मायराणी । बाळा बगुळा मानविणी । पूजा मांगिणी जोगिणी । कुळधर्में करावीं ।।१६।।

जाखादेवी, मायराणी, बाळा, बगुळा, मानविणी, मांगिणी, जोगिणी इ. हलके कुळधर्महीकरावेत. ॥१६॥

नाना तीर्थां क्षेत्रांस जावें । तेथें त्या देवांचें पूजन करावें । नाना उपचारी आर्चावें । परमेश्वरासी ।।१७।।

अनेक तीर्थक्षेत्रांच्या यात्रा करून तेथील त्या त्या दैवतांची रूढीनुसार पूजा करावी. परमेश्वर एकच आहे, असा भाव धरून पूजा करावी. ॥१७॥

पंचामृतें गंधाक्षतें । पुष्पें परिमळद्रव्यें बहुतें । धूपदीप असंख्यातें । नीरांजनें कर्पुराचीं ।।१८।।

पंचामृत, गंधाक्षता, फुले, चंदनादी सुगंधी द्रव्ये, धूप, दिवे, कापराची निरांजने अर्पण करावीत. ॥१८॥

नाना खाद्य नैवेद्य सुंदर । नाना फळें तांबोलप्रकार । दक्षणा नाना आळंकार । दिव्यांबरें वनमाळा ।।१९।।

अनेक खाद्यपदार्थांचे रुचकर नैवेद्य, फळे, विडे, दक्षिणा, दागिने, वस्त्रे, व वनमाळा अर्पाव्यात. ॥१९॥

सिबिका छत्रें सुखासनें । माहि मेघडंब्रें सूर्यापानें । दिंड्या पताका निशाणें । टाळ घोळ मृदांग ।।२०।।

पालखी, छत्र, आसन, उंच छत्री, अबदागिरी, वाद्ये, पताका, निशाणे, ढोल, मृदुंग. ॥२०॥

नाना वाद्यें नाना उत्साव । नाना भक्तसमुदाव । गाती हरिदास सद्भाव । लागला भगवंती ।।२१।।

हरिदास भक्तांचे अनेक गट अनेक प्रकारची वाद्ये वाजवून नाना प्रकारच्या उत्सवांत सद्भावाने भगवंताचे भजन करतात. ॥२१॥

वापी कूप सरोवरें । नाना देवाळयें सिखरें । राजांगणें मनोहरें । वृंदावनें भुयरीं ।।२२।।

मंदिरासाठी विहीर, आड, तलाव करावेत. नवीन देवळे, शिखरे, सुंदर पटांगणे, वृंदावने व भुयारे करावीत. ॥२२॥

मठ मंड्या धर्मशाळा । देवद्वारीं पडशाळा । नाना उपकर्णें नक्षत्रमाळा । नाना वस्त्र सामग्री ।।२३।।

नवे मठ, देवळासमोर सभामंडप, जवळ धर्मशाळा, ओवऱ्या, भांडी, ताटे, आराशीचे साहित्य व झालरी इ. द्यावेत. ॥२३॥

नाना पडदे मंडप चांदोवे । नाना रत्नघोष लोंबती बरवे । नाना देवाळई समर्पावे । हस्थी घोडे शक्कटें ।।२४।।

पडदे, मंडपाची सामुग्री, रत्नांच्या सुंदर माळा, अनेक देवळांना हत्ती, घोडे, गाड्या द्याव्यात. ॥२४॥

आळंकार आणी आळंकारपात्रें । द्रव्य आणी द्रव्यपात्रे । अन्नोदक आणी अन्नोदकपात्रे । नाना प्रकारीची ।।२५।।

दागिने व दागिन्यांच्या पेट्या, पैसे व तिजोरी, धान्य, पाणी व त्यासाठी भांडी द्यावीत. ॥२५॥

वनें उपवनें पुष्पवाटिका । तापस्यांच्या पर्णकुटिका । ऐसी पूजा जगन्नायका । येथासांग समर्पावीं ।।२६।।

जागोजागी वृक्ष लावावेत, उपवने व फळांच्या बागा कराव्यात. तपस्व्यांना पर्णकुटी बांधून द्याव्यात. अशी जगन्नाथाची व्यवस्थित पूजा करावी. ॥२६॥

शुक शारिका मयोरें । बदकें चक्रवाकें चकोरें । कोकिळा चितळें सामरें । देवाळईं समर्पावीं ।।२७।।

पोपट, साळुंक्या, मोर, बदक, चक्रवाक, चकोर, कोकिळा, हरिण, सांबर इ. देवळांच्या बागेत व तलावात सोडावेत. ॥२७॥

सुगंधमृगें आणि मार्जरें । गाई म्हैसी वृषभ वानरें । नाना पदार्थ आणि लेकुरें । देवाळईं समर्पावीं ।।२८।।

कस्तुरीमृग, मांजरे, गाई, म्हशी, बैल, माकडे किंवा त्यांची पिले देवाला अर्पण करावीत. ॥२८॥

काया वाचा आणि मनें । चित्तें वित्तें जीवें प्राणें । सद्भावें भगवंत आर्चनें । या नाव आर्चनभक्ती ।।२९।।

शरीर, वाणी, मन, चित्त, संपत्ती, स्वतःचा जीव व प्राण भगवंताला समर्पित ठेवणे हीच अर्चन भक्ती होय. ॥२९॥

ऐसेचि सद्‌गुरुचें भजन । करून असावें अनन्य । या नाव भगवद्भजन । पांचवी भक्ती ।।३०।।

सद्‌गुरूंची वरील प्रकारे भक्ती करावी व त्यांना अनन्यशरण असावे. हीच पाचवी भक्ती. ॥३०॥

ऐसी पूजा न घडे बरवी । तरी मानसपूजा करावी । मानसपूजा अगत्य व्हावी । परमेश्वरासी ।।३१।।

अशी व इतकी पूजा प्रतिकूल परिस्थितीमुळे शक्य नसेल तर परमेश्वराची मानसपूजा अवश्य करावी. ती तरी सोडू नये. ॥३१॥

मनें भगवंतास पूजावें । कल्पून सर्वहि समर्पावें । मानसपूजेचें जाणावें । लक्षण ऐसें ।।३२।।

केवळ मनाने अनेक पदार्थांची कल्पना करून ते सर्व पदार्थ अर्पण करून भगवंताची पूजा करणे हीच मानस पूजा. ॥३२॥

जें जें आपणांस पाहिजें । तें तें कल्पून वाहिजे । येणें प्रकारें कीजे । मानसपूजा ।।३३।।

आपल्या कल्पनेला जेवढा वाव देता येईल तेवढा देऊन त्या कल्पनेच्या भरारीतील भव्यदिव्य पदार्थांनी मानसपूजा करावी. ।।३३।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अर्चनभक्तीनाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'अर्चनभक्ती' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक चवथा : नवविधाभक्ती

समास सहावा : वंदनभक्ती

।। श्रीराम समर्थ ।।

मागां जालें निरूपण । पाचवे भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । साहावी भक्ती ।।१।।

मागील समासात पाचवी भक्ती सांगितली. आता सहाव्या भक्तीचे लक्षण लक्ष देऊन ऐका. ।।१।।

साहावी भक्ती तें वंदन । करावें देवासी नमन । संत साधु आणी सज्जन । नमस्कारीत जावे ।।२।।

'वंदन' ही सहावी भक्ती. संत, साधू, सज्जन व देव यांना नमस्कार करीत जावे. ।।२।।

सूर्यासि करावे नमस्कार । देवासि करावे नमस्कार । सद्गुरुस करावे नमस्कार । साष्टांग भावें ।।३।।

सूर्य, देव व सद्गुरू यांना गुडघे, खांदे, छाती इ. शरीराची आठ अंगे जमिनीला टेकून नमस्कार करावा. ।।३।।

साष्टांग नमस्कारास अधिकारु । नाना प्रतिमा देवगुरु । अन्यत्र नमनाचा विचारु । अधिकारें करावा ।।४।।

देवांच्या मूर्ती व सद्गुरू यांनाच साष्टांग नमस्कार करावा. इतरांना रीतीरिवाजाप्रमाणे वंदन करावे. ।।४।।

छपन्न कोटी वसुमती । मधें विष्णूमूर्ती असती । तयांस नमस्कार प्रीती । साष्टांग घालावे. ।।५।।

पृथ्वीचा परीघ छपन्न कोटी कोस आहे. त्यात श्रीविष्णूच्या अनंत मूर्ती आहेत. त्यांना नमस्कार करावे. (योजन = ४ कोस. कोस = साधारण १५ कि.मी.) ।।५।।

पशुपति श्रीपति आणी गभस्ती । यांच्या दर्शनें दोष जाती । तैसाचि नमावा मारुती । नित्य नेमें विशेष ।।६।।

भ. शंकर, श्रीविष्णू व सूर्यनारायण यांच्या दर्शनाने अनंत पापे नष्ट होतात. श्रीहनुमंताचे विशेष करून नियमाने दर्शन घ्यावे. ।।६।।

श्लोक ।।शंकरः शेषशायी च मार्तंडो मारुतिस्तथा । एतेषां दर्शनं पुण्यं नित्यनेमे विशेषतः ।।१।।

शंकर, शेषावर पहुडलेले श्रीविष्णू, सूर्य, हनुमन्त ह्यांचे नित्यनेमाने दर्शन घेतले असतां विशेष पुण्य मिळते.

भक्त ज्ञानी आणी वीतरागी । माहानुभाव तापसी योगी । सत्पात्रें देखोनि वेगी । नमस्कार घालावे ।।७।।

देवाचे भक्त, आत्मवेत्ते, संन्यस्त, महात्मे, तपस्वी, योगी, इ. अधिकारी पाहून त्यांना संकोच न करता नमस्कार करावा. ।।७।।

वेदज्ञ शास्त्रज्ञ आणी सर्वज्ञ । पंडित पुराणिक आणी विद्वज्जन । याज्ञिक वैदिक पवित्रजन । नमस्कारीत जावे ।।८।।

वेदवेत्ते, धर्मादी शास्त्रवेत्ते, अनेक विषयांत पारंगत पंडित, पुराणिक, विद्वान, याज्ञिक, वैदिक व चारित्र्यवान या सर्वांना नमस्कार करावा. ।।८।।

जेथे दिसती विशेष गुण । तें सद्गुरुचें अधिष्ठान । याकारणें तयासी नमन । अत्यादरें करावें ।।९।।

जेथे काही भव्यदिव्य दिसेल तेथे श्रीगुरूंचे अधिष्ठान असते. (पहा-विभूति योग. गीता.) म्हणून अशा व्यक्तींना

आदराने नमस्कार करावा. ॥९॥

गणेश शारदा नाना शक्ती । हरिहरांच्या अवतारमूर्ती । नाना देव सांगों किती । पृथकाकारें ।।१०।।

गणेश, शारदा, अनेक प्रकारच्या शक्तिदेवता, हरिहरांच्या अवतारमूर्ती अशा अनेक देवदेवतांबद्दल कितीही सांगितले तरी अपुरेच पडेल. ॥१०॥

सर्व देवांस नमस्कारिलें । तें येका भगवंतास पावलें । येदर्थी येक वचन बोलिलें । आहे, तें ऐका ।।११।।

कोणत्याही देवाला केलेला नमस्कार एका भगवंतालाच पोहोचतो. त्याचे प्रमाण ऐका. ॥११॥

श्लोक

आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् । सर्वदेवनमस्कारः केशवं प्रतिगच्छति ।।१।। (अर्थ सरळ आहे.)

याकारणें सर्व देवांसीं । नमस्कारावें अत्यादरेंसीं । अधिष्ठान मानितां, देवांसी । परम सौख्य वाटे ।।१२।।

म्हणून सर्व देवांना तेवढ्याच श्रद्धेने नमस्कार करावा. त्यांना असलेले भगवंताचे अधिष्ठान लक्षात घेतले की अतिशय समाधान वाटते. ॥१२॥

देव देवाचीं अधिष्ठानें । सप्तात्रें सद्गुरुंचीं स्थानें । याकारणें नमस्कार करणें । उभय मार्गीं ।।१३।।

देवांना भगवंताचे व सज्जनांना श्रीगुरूंचे अधिष्ठान असल्यामुळे देव व सज्जन यांना न चुकता नमस्कार करावा. ॥१३॥

नमस्कारें लीनता घडे । नमस्कारें विकल्प मोडे । नमस्कारें सख्य घडे । नाना सत्पात्रासीं ।।१४।।

नमस्कारामुळे नम्रता व्यक्त होते, दुरावा दूर होतो व अनेक क्षेत्रांतील अधिकारी सज्जनांशी सख्य होते. ॥१४॥

नमस्कारें दोष जाती । नमस्कारें अन्याय क्ष्मतीं । नमस्कारें मोडलीं जडतीं । समाधानें ।।१५।।

नमस्कारामुळे अहंकारासारखे दोष जातात, कळत नकळत केलेल्या अपराधांची क्षमा होते. कोणाशी संबंध बिघडले असले तर ते सुरळीत होतात. ॥१५॥

सिसापरता नाहीं दंड । ऐसें बोलती उदंड । याकारणें अखंड । देव भक्त वंदावे ।।१६।।

मस्तकासारखा शरीराचा सर्वश्रेष्ठ अवयव झुकवला की तीच अपराधासाठी पुरेशी शिक्षा असते असे सर्वत्र मानतात. म्हणून देव व त्याचे भक्त यांना सतत मस्तक झुकवून वंदन करावे. ॥१६॥

नमस्कारें कृपा उचंबळे । नमस्कारें प्रसन्नता प्रबळे । नमस्कारें गुरुदेव वोळे । साधकांवरी ।।१७।।

नमस्कारामुळे ज्यांना तो केला त्यांच्या मनात कृपा निर्माण होते, ते अतिशय प्रसन्न होतात. सद्गुरू शिष्यावर कृपा करतात. (तद्विद्धि प्रणिपातेन....) ॥१७॥

निशेष करितां नमस्कार । नासती दोषांचे गिरिवर । आणी मुख्य परमेश्वर । कृपा करी ।।१८।।

नमस्काराचा विशेष असा की त्यामुळे अहंकार, द्वेष, मत्सर इ. दोषांचे डोंगर हळूहळू नाहीसे होतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ईशकृपा होते. ॥१८॥

नमस्कारें पतित पावन । नमस्कारें संतांसी शरण । नमस्कारें जन्ममरण । दुरी दुऱ्हावे ।।१९।।

नमस्काराने पापी पुण्यवान होतात, संतांना शरण जाण्याचा उपाय सापडतो व जन्ममरणातून सुटका होते ॥१९॥

परम अन्याय करूनि आला । आणी साष्टांग नमस्कार घातला । तरी तो अन्याये क्ष्मा केला । पाहिजे श्रेष्ठीं ।।२०।।

कोणी महापाप करून आला असेल व त्याने संतांना पश्चात्तापपूर्वक साष्टांग नमस्कार घातला तर त्याला क्षमा करण्याशिवाय संत दुसरे काही करूच शकत नाहीत. (संतांच्या दरबारात त्याला क्षमा होते.) ॥२०॥

याकारणें नमस्कारापरतें । आणीक नाहीं अनुसरतें ।नमस्कारें प्राणीयातें । सद्बुद्धि लागे ।। २१ ।।

म्हणून सज्जनांकडून काही शिकावयाचे असेल तर नमस्कार करणे शिकावे. त्यामुळे माणसाला सुबुद्धी मिळते. ॥२१॥

नमस्कारास वेचावें नलगे । नमस्कारास कष्टावें नलगे । नमस्कारास कांहींच नलगे । उपकर्ण सामग्री ।। २२ ।।

नमस्कारासाठी काही द्यावे लागत नाही, शरीराला कष्ट नाहीत व कोणतेच साहित्य लागत नाही. ॥२२॥

नमस्कारा ऐसें नाहीं सोपें । नमस्कार करावा अनन्यरूपें । नाना साधनीं साक्षपें । कासया सिणावें ।। २३ ।।

अनन्यभावाने नमस्कार घालण्यासारखे दुसरे सोपे साधन नाही. अवघड साधनांचे कष्ट सतत का घ्यावे? ॥२३॥

साधक भावें नमस्कार घाली । त्याची चिंता साधूस लागली । सुगम पंथे नेऊन घाली । जेथील तेथें ।। २४ ।।

अनन्यभावाने नमस्कार घालणाऱ्या साधकाची श्रीगुरूंवर जबाबदारी येते. साधकाच्या अधिकारानुसार योग्य ती साधना सांगून ते त्याला त्याच्या मूळच्या स्वरूपाची जणू फेर प्राप्ती करून देतात. ती साधना सोपी होईल अशी समजावून सांगतात. ॥२४॥

याकारणे नमस्कार श्रेष्ठ । नमस्कारें वोळती वरिष्ठ । येथे सांगितली पष्ट । साहावी भक्ती ।। २५ ।।

म्हणून नमस्कार हे सुरुवातीचे मोठे साधन आहे! कारण त्यामुळे अधिकारसंपन्न श्रेष्ठ प्रसन्न होतात. अशी सहावी भक्ती स्पष्ट केली. ॥२५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'वंदनभक्तीनाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'वंदनभक्ती' नावाचा सहावा समास समाप्त

दशक चवथा : नवविधाभक्ती

समास सातवा : दास्यभक्ती

॥ श्रीरामसमर्थ ॥

मागां जालें निरुपण । साहावे भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । सातवी भक्ती ।।१।।

मागील समासात सहाव्या वंदनभक्तीचे स्पष्टीकरण केले. आता सातवी भक्ती लक्षपूर्वक ऐका. ॥१॥

सातवें भजन तें दास्य जाणावें । पडिलें कार्य तितुकें करावें । सदा सन्निधचि असावें । देवद्वारीं ।।२।।

दास्य ही सातवी भक्ती होय. देव, देऊळ, उत्सव, अभ्यासवर्ग इत्यादीसंबंधी जे काम असेल ते करण्यासाठी सतत देवळामध्ये हजर राहावे. ॥२॥

देवांचे वैभव सांभाळावें । न्यूनपूर्ण पडोंचि नेदावें । चढतें वाढतें वाढवावें । भजन देवाचें ।।३।।

देवाचे वैभव सांभाळून त्यात काही कमी पडू न देता उत्तरोत्तर ते वाढवण्याचा प्रयत्न करावा. ॥३॥

भंगलीं देवाळयें करावीं । मोडलीं सरोवरें बांधावीं । सोफे धर्मशाळा चालवावीं । नूतन चि कार्यें ।।४।।

पडलेली देवळे, मोडलेली तळी दुरुस्त करावीत. ओवऱ्या, धर्मशाळा इ. नसतील तर त्या बांधाव्यात. ॥४॥

नाना रचना जीर्ण जर्जर । त्यांचे करावें जीर्णोद्धार । पडिलें कार्य तें सत्वर । चालवित जावें ।।५।।

देवळे वगैरे फार जुनी असतील तर डागडुजी करावी. त्यासाठी पडेल ते काम तत्परतेने करावे. ॥५॥

(ओवी ६ पासून २४ पर्यंत अर्चनभक्तीचीच पुनरावृत्ती आहे.)

गज रथ तुरंग सिंहासनें । चौकिया सिबिका सुखासनें । मंचक डोल्हारे विमानें । नूतन चि करावीं ।।६।।
मेघडंब्रे छत्रें चामरें । सूर्यापानें निशाणें अपारें । नित्य नूतन अत्यादरें । सांभाळित जावीं ।।७।।
नाना प्रकारीचीं यानें । बैसावयाची उत्तम स्थानें । बहुविध सुवर्णासनें । येत्नें करीत जावी ।।८।।
भुवनें कोठड्या पेट्या मांदुसा । रांझण कोहळीं घागरी बहुवसा । संपूर्ण द्रव्यांश ऐसा । अति येत्नें करावा ।।९।।
भुयेरीं तळघरें आणि विवरें । नाना स्थळें गुप्त द्वारें । अनर्घ्यें वस्तूंचीं भांडारें । येत्नें करीत जावीं ।।१०।।
आळंकार भूषणें दिव्यांबरें । नाना रत्नें मनोहरें । नाना धातु सुवर्णपात्रें । येत्नें करीत जावीं ।।११।।
पुष्पवाटिका नाना वनें । नाना तरुवरांची बनें । पावतीं करावीं जीवनें । तया वृक्षांसी ।।१२।।
नाना पशूंचिया शाळा । नाना पक्षी चित्रशाळा । नाना वाद्यें नाट्यशाळा । गुणी गायेक बहुसाल ।।१३।।
स्वयंपाकगृहें भोजनशाळा । सामग्रीगृहें धर्मशाळा । निद्रिस्तांकारणें पडशाळा । विशाळ स्थळें ।।१४।।
नाना परिमळद्रव्यांची स्थळें । नाना खाद्यफळांचीं स्थळें । नाना रसांची नाना स्थळें । येत्नें करीत जावीं ।।१५।।
नाना वस्तांची नाना स्थानें । भंगलीं करावीं नूतनें । देवांचें वैभव वचनें । किती म्हणौनि बोलावें ।।१६।।
सर्वां ठाईं अति सादर । आणी दास्यत्वास हि तत्पर । कार्यभागाचा विसर । पडणार नाहीं ।।१७।।
जयंत्या पर्वें मोहोत्साव । असंभाव्य चालवी वैभव । जें देखतां स्वर्गींचे देव । तटस्त होती ।।१८।।

ऐसें वैभव चालवावें । आणी नीच दास्यत्वहि करावें । पडिले प्रसंगीं सावध असावें । सर्वकाळ ।।१९।।

जें जें कांहीं पाहिजे । तें तें तत्काळचि देजे । अत्यंत आवडीं कीजे । सकळ सेवा ।।२०।।

चरण क्षाळणें स्नानें आच्मनें । गंधाक्षतें वसनें भूषणें । आसनें जीवनें नाना सुमनें । धूप दीप नैवेद्य ।।२१।।

शयेनाकारणें उत्तम स्थळें । जळें ठेवावीं सुसीतळें । तांबोल गायनें रसाळें । रागरंगें करावीं ।।२२।।

परिमळद्रव्यें आणी फुलेलें । नाना सुगंधेल तेलें । खाद्य फळें बहुसालें । सन्निधचि असावीं ।।२३।।

सडे संमार्जनें करावीं । उदकपात्रें उदकें भरावीं । वसनें प्रक्षाळून आणावीं । उत्तमोत्तमें ।।२४।।

हत्ती, रथ, घोडे, सिंहासने, चौरंग, पालख्या, मेणे, पलंग, झोपाळे, विमाने, मेघडंबऱ्या, छत्र्या, चामरे, अबदागिरी, निशाणे इ. जुनी सांभाळून नवी तयार करावीत. वाहने, बैठका, अनेक नमुन्याची सिंहासने, पडशाळा, पेट्या, तिजोऱ्या, गार पाण्यासाठी रांजण, कोहळे, घागरी, इ. साठवणाची भांडी मोठ्या प्रयत्नाने जमवावीत. परचक्रापासून संरक्षणासाठी भुयारे, तळघरे, विवरे इ. गुप्त वाटा तयार कराव्यात. अलंकार, भूषणे, भरजरी वस्त्रे, सुंदर रत्ने, सोने, चांदी इत्यादीची भांडी करावीत व करवावीत. देवळाभोवती रमणीय फुलबागा, वने, उपवने उभारून त्यांच्या पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी. पशुपक्ष्यांसाठी गोठे, पिंजरे व चित्रांची दालने बांधावीत. वाद्यांचा संग्रह करून रंगमंच उभारून गुणी गायकांच्या सेवा नेमून द्याव्यात. स्वयंपाक, भोजन, सामानासाठी साठवण, यात्रेकरू इत्यादींसाठी खोल्या बांधाव्यात. मोठ्या पडव्या व पटांगणे तयार करावीत. तेले, अत्तरे, केशरादी सुगंधी द्रव्ये, धान्य, फळे, अन्न, दही-दूध इत्यादी ठेवण्यासाठी तशी तशी व्यवस्था करावी. कपाटे, कोनाडे इ. मोडली असल्यास दुरुस्त करावीत. नसल्यास नवी करावीत. असे देवाचे वैभव वाढते ठेवावे. असे किती म्हणून सांगावे? एकूण कोणतेही कार्य तत्परतेने करण्यासाठी सिद्ध असावे. कोणतेच काम विसरू नये. जयंत्या, पर्वकाळ, इ. महोत्सव मोठ्या थाटाने साजरे करावेत. स्वर्गस्थ देवांनासुद्धा त्याचे नवल वाटावे. असे देवाचे वैभव चालवावे व स्वत: दास होऊन कोणत्याही प्रसंगाला सावध राहून सतत सामोरे जावे. ज्याची ज्याची गरज पडेल ते ते तेथल्या तेथे आणून द्यावे व अतिशय आवडीने सेवा करावी. पाय धुणे, स्नान घालणे, आचमनासाठी पळी, पंचपात्र, गंधाक्षता, वस्त्रे, भूषणे, आसने, पाणी, विविध फुले, धूप, दिवा, नैवेद्य, झोपण्यासाठी उत्तम व्यवस्था, थंड पाणी व विडा द्यावा. विविध राग व आलापीचे रंग भरून देवापुढे गाणे करावे. चंदनादी सुगंधी द्रव्ये, फुले, सुगंधी तेले, खाद्य पदार्थ, फळे तयार ठेवावीत. अंगणात सडा घालावा. पाण्याची भांडी भरून ठेवावीत. चांगली वस्त्रे स्वच्छ धुऊन आणावीत. ॥६ ते २४॥

सकळांचें करावें पारपत्य । आलयाचें करावें आतित्य । ऐसी हे जाणावी सत्य । सातवी भक्ती ।।२५।।

उत्सवाला येणाऱ्याचे स्वागत करून त्याचे क्षेमकुशल विचारावे, हवे-नको पाहावे. अशी ही खरोखर सातवी भक्ती आहे. ॥२५॥

वचनें बोलावीं करुणेंचीं । नाना प्रकारें स्तुतीचीं । अंतरें निवती सकळांचीं । ऐसें वदावें ।।२६।।

आस्थेवाईकपणे चौकशी करून येणारा-जाणाऱ्याची स्तुती करून त्यांना संतुष्ट करावे. ॥२६॥

ऐसी हे सातवी भक्ती । निरोपिली येथामती । प्रत्यक्ष न घडे तरी चित्तीं । मानसपूजा करावी ।।२७।।

अशी ही सातवी भक्ती मला जमली तशी सांगितली. असे सर्व प्रत्यक्षात शक्य झाले नाही, तर मनाने या सर्वांची कल्पना करावी. ॥२७॥

ऐसें दास्य करावें देवाचें । येणेंचि प्रकारें सद्‌गुरूचें । प्रत्यक्ष न घडे तरी मानसपूजेचें । करित जावें ।।२८।।

असे देवाचे व श्रीगुरूंचे दास्य करावे. प्रत्यक्ष घडले नाही, तर मनाने करावे. ॥२८॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'दास्यभक्तीनाम' समास सातवा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'दास्यभक्ती' नावाचा सातवा समास समाप्त

दशक चवथा : नवविधाभक्ती

समास आठवा : सख्यभक्ती

॥श्रीरामसमर्थ॥

मागां जालें निरूपण । सातवें भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । आठवी भक्ती ।।१।।

मागील समासात सातवी दास्यभक्ती सांगितली. आता आठवी भक्ती लक्ष देऊन ऐका. ॥१॥

देवासी परम सख्य करावें । प्रेम प्रीतीनें बांधावें । आठवें भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ।।२।।

देवाशी अत्यंत सख्य जोडावे. आपल्या निरपेक्ष व अखंड प्रेमाने त्याला जणू बांधून टाकावे. आठव्या भक्तीचे हे मुख्य लक्षण आहे. ॥२॥

देवास जयाची अत्यंत प्रीती । आपण वर्तावें तेणें रीतीं । येणें करितां भगवंती । सख्य घडे नेमस्त ।।३।।

देवाला अत्यंत आवडेल असे आपले सर्व जीवन असावे. त्याच्याशी सख्य जोडण्याचा हा मुख्य उपाय आहे. (त्याला काय आवडते ते ऐका–) ॥३॥

भक्ति भाव आणी भजन । निरूपण आणी कथाकीर्तन । प्रेमळ भक्तांचें गायन । आवडे देवा ।।४।।

अत्यंत प्रेम, त्याच्या अस्तित्वाचा सहज सतत निश्चय, आराधना, कीर्तन व प्रवचन करणे व ऐकणे आणि प्रेमळ भक्तांचे भजन वा शास्त्रीय गायन देवाला आवडते. ॥४॥

आपण तैसेंचि वर्तावें । आपणासि तेंच आवडावें । मनासारिखें होतां स्वभावें । सख्य घडे नेमस्त ।।५।।

त्याला जे आवडते तेच आपण आवडते करून घ्यावे व तसेच प्रत्यक्षात करावे. दोघांची आवड जुळून येताच सहज व शाश्वत सख्य जमून येते. ॥५॥

देवाच्या सख्यत्वाकारणें । आपलें सौख्य सोडून देणें । अनन्यभावें जीवें प्राणें । शरीर तेंहि वेंचावें ।।६।।

देवाच्या सख्यासाठी स्वत:ची आवड बाजूला ठेवून अनन्यत्वासाठी प्राण, जीव व शरीराची पर्वा करू नये. ॥६॥

सांडून आपली संसारवेथा । करित जावी देवाची चिंता । निरूपण कीर्तन कथा वार्ता । देवाच्याचि सांगाव्या ।।७।।

व्यथा हा संसाराचा एक स्थायीभाव आहे. केवळ काळजी करून त्या संपत नाहीत. म्हणून सतत ईशचिंतन करीत सर्व बोलणे कथांच्या रूपाने देवासंबंधीच असावे. ॥७॥

देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगांसी तुटी । सर्व अर्पावें सेवटी । प्राण तोहि वेचावा ।।८।।

'जग हे सुखाचे । दिल्या घेतल्याचे' (तुकाराम महाराज) अशा जगातील जिवलगांशी असलेले संबंध कमी करून शेवटी प्राणासकट सर्व देवाला अर्पण करावे. ॥८॥

आपुलें आवघेंचि जावें । परी देवासीं सख्य रहावें । ऐसी प्रीती जिवें भावें । भगवंती लागावी ।।९।।

आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्याची वेळ आली तरी फिकीर न करता देवाशी सख्य जोडावे. एवढे जिवाभावाचे प्रेम भगवंताविषयी विकसित व्हावे. ॥९॥

देव म्हणिजे आपुला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण । परम प्रीतीचें लक्षण । तें हें ऐसें असें ।।१०।।

देव हाच आपला प्राण समजून त्याला पडेल ती किंमत देऊन जपावे. खऱ्या प्रेमाचे हेच लक्षण आहे. ॥१०॥

ऐसें परम सख्य धरितां । देवास लागे भक्ताची चिंता । पांडव लाखाजोहरीं जळतां । विवरद्वारें काढिले ।।११।।

असा आत्यंतिक सख्यभाव सांभाळला तर देवाला भक्ताच्या हिताची काळजी पडते. कौरवांचा पांडवांना लाक्षागृहात जाळण्याचा कट पांडवांना भुयारी मार्गाने बाहेर काढून भ. श्रीकृष्णाने उधळून लावला. ॥११॥

देव सख्यत्वें राहे आपणासी । तें तों वर्म आपणाचि पासीं । आपण वचनें बोलावीं जैसीं । तैसीं येती पडसादें ।।१२।।

देवाशी सख्य जोडणे सर्वस्वी आपल्या हातात आहे. आपण त्याला साद घालावी. त्याप्रमाणे प्रतिसाद येतो. ॥१२॥

आपण असतां अनन्यभावें । देव तत्काळचि पावे । आपण त्रास घेतां जीवें । देवहि त्रासे ।।१३।।

श्लोक

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यमहम् ।। (गीता)

ह्या नियमानुसार देवाशी अनन्यभावाने राहिले तर तो लवकर प्रसन्न होतो. अनन्यभावाचा त्रास वाटू लागला तर तोही आपल्याला त्रासतो. ॥१३॥

जैसें जयाचें भजन । तैसाचि देवहि आपण । म्हणौन हें आवघें जाण । आपणाचि पासीं ।।१४।।

ज्याची जशी भक्ती तशीच त्याची प्रसन्नता असते. म्हणून हे सख्याचे वर्म आपल्याचपाशी आहे. ॥१४॥

आपुल्या मनासारिखें न घडें । तेणें गुणें निष्ठा मोडे । तरी गोष्टी आपणांकडे । सहजचि आली ।।१५।।

आपल्या व्यावहारिक अपेक्षा पूर्ण न झाल्यामुळे देवावरील प्रेम कमी झाले तर त्याच्या परिणामांची जबाबदारी आपल्यावरच येते. ॥१५॥

मेघ चातकावरी वोळेना । तरी चातक पालटेना । चंद्र वेळेसि उगवेना । तऱ्ही चकोर अनन्य ।।१६।।

चातक पक्ष्याची तहान भागवण्यासाठी ढगांनी पाऊस पाडला नाही, तरी ढगाकडेच डोळे लावून बसतो. तिथीप्रमाणे चंद्राचा उदय सतत बदलत असला तरी चकोर त्यावरच प्रेम करतो. ॥१६॥

ऐसें असावें सख्यत्व । विवेकें धरावें सत्व । भगवंतावरील ममत्व । सांडूचि नये ।।१७।।

देवाशी असे सख्य असावे. व्यवस्थित विचार करून आपला निश्चय सांभाळून देवावरील निरपेक्ष प्रेमाला जराही धक्का लागू देऊ नये. ॥१७॥

सखा मानावा भगवंत । माता पिता गण गोत । विद्या लक्ष्मी धन वित्त । सकळ परमात्मा ।।१८।।

भगवंतालाच खरा सखा मानावे. आई, वडील, नातलग, पदवी, संपत्ती, धन, वैभव ही सर्व परमात्म्याचे ठिकाणी पहावीत. तोच सर्वस्व होय. ॥१८॥

देवावेगळें कोणी नाहीं । ऐसें बोलती सर्वहि । परंतु त्यांची निष्ठा कांहीं । तैसीच नसे ।।१९।।

'या जगात सर्वत्र देव भरला आहे' असे सैद्धान्तिक वाक्य सर्वच उपासक सांगतात. पण त्यांचा तसा खरा निश्चय मुळीच झालेला नसतो. ॥१९॥

म्हणौनि ऐसें न करावें । सख्य तरी खरेंचि करावें । अंतरीं सुदृढ धरावें । परमेश्वरासी ।।२०।।

म्हणून असे निरर्थक न बोलता देवाशी खरेखुरे सख्य जोडावे. अंत:करण वृत्ती सतत परमेश्वराच्या चिंतनात असावी. ॥२०॥

आपुलिया मनोगताकारणें । देवावरी क्रोधास येणें । ऐसीं नव्हेत किं लक्षणें । सख्यभक्तीची ।।२१।।

आपल्या आशाआकांक्षा पूर्ण होत नाहीत म्हणून त्याचा देवावर राग काढणे हे खऱ्या सख्यभक्तीचे लक्षण नाही. ॥२१॥

देवाचें जें मनोगत । तेंचि आपुलें उचित । इच्छेसाठीं भगवंत । अंतरूं नये कीं ।। २२।।

उलट जी देवाची योजना तीच आपल्या खऱ्या हिताची आहे असे समजावे. स्वत:च्या काही आशा-आकांक्षांसाठी देवाला मुकू नये. ॥२२॥

देवाचे इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें । मग सहजचि स्वभावें । कृपाळु देव ।। २३।।

देवाच्या आज्ञांप्रमाणे जीवन बंदिस्त करावे. मग देवाने जसे ठेवले असेल तसे आनंदाने स्वीकारावे. अशा भक्तावर देव सहजच कृपा करतो. ॥२३॥

पाहतां देवाचे कृपेसी । मातेची कृपा कायेसी । माता वधी बाळकासी । विपत्तिकाळीं ।। २४।।

देवाची कृपा अतुलनीय आहे. त्यापुढे आईचे अपत्यावरील प्रेमसुद्धा अगदीच फिके पडते. कारण ती संकटकाळी अपत्याला ठारही मारण्यास मागेपुढे पहात नाही. ॥२४॥

देवें भक्त कोण वधिला । कधीं देखिला ना ऐकिला । शरणागतांस देव जाला । वज्रपंजरु ।। २५।।

देवाने भक्ताला ठार मारल्याचे आजपर्यंत एकही उदाहरण नाही. शरण गेलेल्या भक्ताला जणू वज्राचे कवच घालून देव त्याचे रक्षण करतो. ॥२५॥

देव भक्तांचा कैवारी । देव पतितांसी तारी । देव होये साहाकारी । अनाथांचा ।। २६।।

देव नेहमी भक्तांच्या बाजूने उभा राहतो. पतितांना उद्धरून नेतो व अनाथांना तो मदत करतो. ॥२६॥

देव अनाथांचा कैपक्षी । नाना संकटांपासून रक्षी । धांविन्नला अंतरसाक्षी । गजेंद्राकारणें ।। २७।।

देवाला अनाथांचा खास ओढा वाटतो व त्यांना तो अनेक संकटांतून सोडवतो. गजेंद्राचे मनोगत जाणून तो त्याच्या मदतीला धावून गेला. त्याला नक्राच्या जबड्यातून सोडविले. ॥२७॥

देव कृपेचा सागरु । देव करुणेचा जळधरु । देवासि भक्तांचा विसरु । पडणार नाहीं ।। २८।।

देव कृपेचा जणू विशाल क्षीरसमुद्र आहे. करुणेचा मोठा ढग आहे. तो भक्ताला तृप्त केल्याशिवाय रहात नाही. भक्तांना विसरत नाही. ॥२८॥

देव प्रीती राखों जाणे । देवासी करावें साजणें । जिवलगें आवघीं पिसुणें । कामा न येती ।। २९।।

प्रेम कसे सांभाळावे हे देवाला फार चांगले कळते. म्हणून त्याच्याशीच सख्य जोडावे. इतर नातलग, मित्र इ. परके समजावेत. वेळेला त्यांचा उपयोग नसतो. ॥२९॥

सख्य देवाचें तुटेना । प्रीती देवाची विटेना । देव कदा पालटेना । शरणागतांसी ।। ३०।।

देवाशी जुळलेले सख्य कधीच तुटत नाही. त्याचे प्रेम अवीट असून शरण आलेल्याच्या बाबतीत तो कधीच धरसोड करीत नाही. ॥३०॥

म्हणौनि सख्य देवासी करावें । हितगुज तयासी सांगावें । आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ।। ३१।।

म्हणून देवाशी सख्य जोडून त्याच्याशीच सुखदु:खाचा संवाद करावा. सर्व मनोगत त्याचेपाशी व्यक्त करावे. हीच आठवी भक्ती. ॥३१॥

जैसा देव तैसा गुरु । शास्त्री बोलिला हा विचारु । म्हणौन सख्यत्वाचा प्रकारु । सद्‌गुरुसीं असावा ।। ३२।।

जे सर्व देवाशी तेच सर्व श्रीगुरूंशी जुळवून घ्यावे असे शास्त्र सांगते. म्हणून श्रीगुरूंशी देवाप्रमाणेच सख्य असावे. ॥३२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सख्यभक्ती' नाम समास आठवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सख्यभक्ती' नावाचा आठवा समास समाप्त

दशक चवथा : नवविधाभक्ती

समास नववा : आत्मनिवेदनभक्ती

॥ श्रीराम समर्थ ॥

मागां जालें निरुपण । आठवे भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । भक्ति नवमी ।।१।।

मागील समासात आठवी भक्ती सांगितली. आता नववी भक्ती लक्ष देऊन ऐका. ॥१॥

नवमी निवेदन जाणावें । आत्मनिवेदन करावें । तेहि सांगिजेल स्वभावें । प्रांजळ करूनि ।।२।।

नवव्या भक्तीत जीवाचे आत्मस्वरूपाशी ऐक्य करावे. त्याचे आता स्पष्टीकरण करून सांगतो. ॥२॥

ऐका निवेदनाचें लक्षण । देवासि वाहावें आपण । करावें तत्त्वविवरण । म्हणिजे कळे ।।३।।

आता निवेदनाचे लक्षण ऐका. देवामधील ब्रह्मतत्त्व स्पष्टपणे जाणून त्यात स्वत:चा जीवभाव अर्पावा. ॥३॥

मी भक्त ऐसें म्हणावें । आणी विभक्तपणेंचि भजावें । हें आवघेंचि जाणावें । विलक्षण ।।४।।

स्वत:ला भक्त समजावयाचे व प्रत्यक्षात विभक्त म्हणजे वेगळा राहून उपासना करावयाची हा प्रकार अत्यंत विपरीत आहे, असे समजून घ्यावे. ॥४॥

लक्षण असोन विलक्षण । ज्ञान असोन अज्ञान । भक्त असोन विभक्तपण । तें हें ऐसें ।।५।।

प्रत्येक जीव स्वभावत: आत्मदेवाच्या लक्षणांचा असतो. पण अविद्येमुळे तो जणू वेगळ्या लक्षणांचा बनतो. वास्तविक ज्ञान हेच जीवाचे स्वरूप आहे. पण मायेच्या प्रभावामुळे जणू अज्ञानी होतो. वस्तुत: जीव सतत आत्मरूपच (भक्त) आहे. पण अज्ञानामुळे जणू आत्मदेवापासून वेगळा (विभक्त) राहतो. असा हा प्रकार आहे. ॥५॥

भक्त म्हणिजे विभक्त नव्हे । आणि विभक्त म्हणिजे भक्त नव्हे । विचारेंविण कांहींच नव्हे । समाधान ।।६।।

भक्त विभक्त असणे किंवा विभक्त भक्त असणे शक्य नाही. वेदान्तविचार केल्याशिवाय हा गुंता सुटून समाधान मिळणे शक्य नाही. ॥६॥

तस्मात् विचार करावा । देव कोण तो वोळखावा । आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं ।।७।।

म्हणून वेदान्त शास्त्राचा अभ्यास करून देवाचे खरे स्वरूप (ब्रह्म) ओळखून अंत:करण वृत्तीने ‘सोऽहं’सारख्या चिंतनात्मक साधनेने त्याला शोधावे. ॥७॥

मी कोण ऐसा निवाडा । पाहों जातां तत्वझाडा । विचार करितां उघडा । आपण नाहीं ।।८।।

सतत स्फुरणाऱ्या ‘मी’चे पृथक्करण करून खऱ्या मी चे स्वरूप निश्चित करण्यासाठी ‘मी’ म्हणून मिरविणाऱ्या ब्याऐंशी तत्त्वांचा विचाराने निरास केला असता (द. १७. स. ८, ९), ‘तो भ्रामक मी खरा नाही’, असे कळून येते. ॥८॥

तत्वें तत्व जेव्हां सरे । तेव्हां आपण कैंचा उरे । आत्मनिवेदन येणें प्रकारें । सहजचि जालें ।।९।।

आत्मतत्त्वाच्या ज्ञानाने एक एक अनात्मतत्त्व जेव्हा विचाराने मागे टाकले जाते तेव्हा अनात्मरूप ‘अहं’ शिल्लक

न राहून ‘आत्मरूप’ तेवढे उरते. सहजच जीवरूप ‘अहं’चे आत्मस्वरूपाशी नित्य असलेले ऐक्य जणू पुन्हा होते. ॥९॥

तत्त्वरूप सकळ भासे । विवेक पाहातां निरसे । प्रकृतिनिरासें आत्मा असे । आपण कैंचा ।।१०।।

सर्व दृष्य जगत् ब्याऐंशी तत्त्वांनी भरल्यासारखे वाटते. परंतु आत्मानात्मविचार, सारासारविचार, जडचेतन विचार, क्षराक्षरविचार, प्रकृतीपुरुषविचार इ. विचाराने त्या सर्वांचा निरास झाल्यावर दृश्य प्रकृतीचा निरास होऊन एक आत्मा तेवढा उरतो. तेथे जीवरूप मी असेलच कसा? ॥१०॥

येक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति जगदाकारु । तिसरा आपण कैंचा चोरु । आणिला मधें ।।११।।

एक परमेश्वररूप परब्रह्म व दुसरी जगत् रूपाने असणारी प्रकृती यांचेशिवाय ‘मी’ म्हणून तिसरा घुसखोर मधेच कोठून आणला? तथाकथित ‘मी’ हा प्रकृतीचाच भाग असून आत्मरूप ‘मी’ ब्रह्मच आहे. ॥११॥

ऐसें हें सिद्धचि असतां । नाथिली लागे देहअहंता । परंतु विचारें पाहों जातां । कांहींच नसे ।।१२।।

असे हे वेदसिद्ध व अनुभवसिद्ध वास्तव असताना ‘मी देह’ ही नसती ब्याद मागे लागलेली आहे. पण वेदान्त विचारापुढे ती मुळीच टिकत नाही. ॥१२॥

पाहाता तत्त्वविवंचना । पिंडब्रह्मांडतत्वरचना । विश्वाकारें वेक्ती नाना । तत्त्वें विस्तारलीं ।।१३।।

पिंड (शरीर) व ब्रह्मांड (अनंत विश्व) यांच्या रचनेतील घटकांचा (तत्त्वे) अभ्यास करू लागलो तर ते घटकच निरनिराळी रूपे घेऊन या जगाच्या आकाराने विस्तारले आहेत असे कळते. ॥१३॥

तत्वें साक्षत्वें वोसरतीं । साक्षत्व नुरे आत्मप्रचिती । आत्मा असे आदिअंतीं । आपण कैंचा ।।१४।।

‘ती तत्त्वे मी जाणतो’ अशा रीतीने त्यांचे साक्षित्व केले असता अनात्म तत्त्वे बाजूला सरतात. ती तशी सारल्यावर त्यांना बाजूला सारणारा जीवात्माच ब्रह्म आहे असा अनुभव येताच तत्त्वांचे साक्षित्वही संपते! तत्त्वे सारण्यापूर्वी व नंतरही तेच ब्रह्म अखंड असताना मधेच त्याला मीपणाचा छेद कसा जाईल? ॥१४॥

आत्मा एक स्वानंदघन । आणी अहमात्मा हे वचन । तरी मग आपण कैंचा भिन्न । उरला तेथें ।।१५।।

आत्मा एकमेव, भेदशून्य व आनंदरूप म्हणजे आनंदपूर्ण आहे व ‘मी आत्मा आहे’ असे श्रुती सांगते. मग मी वेगळेपणाने उरेनच कसा? ॥१५॥

सोहं हंसा हें उत्तर । याचें पहावें अर्थांतर । पाहतां आत्मयाचा विचार । आपण कैंचा तेथें ।।१६।।

‘ते मी आहे’ व ‘मी ते आहे’ या वाक्यांचे लक्षणेने अर्थांतर करावे. मी हा वाच्यार्थाने जीव असून लक्ष्यार्थाने कूटस्थ चैतन्य (आत्मा) आहे. ‘ते’ वाच्यार्थाने ईश्वर असून लक्ष्यार्थाने ब्रह्म आहे. दोन्हीतील वाच्यार्थाचा त्याग करून लक्ष्यार्थांच्या ऐक्याचे चिंतन करावे. हीच भागत्याग लक्षणा. फक्त ब्रह्मच असताना जीवरूप अहं तेथे असेल कसा? ॥१६॥

आत्मा निर्गुण निरंजन । तयासी असावें अनन्य । अनन्य म्हणिजे नाहीं अन्य । आपण कैंचा तेथें ।।१७।।

आत्मा त्रिगुणातीत व शुद्ध (पापपुण्यरहित) असून त्याच्याशी ऐक्य साधल्यावर तेथे दुसरा म्हणजे ‘मी’ कसा असेन? ॥१७॥

आत्मा म्हणिजे तो अद्वैत । जेथें नाहीं द्वैताद्वैत । तेथें मीपणाचा हेत । उरेल कैंचा ।।१८।।

आत्मा म्हणजेच अद्वैत. तेथे द्वैतच नसल्याने खरे तर द्वैतसापेक्ष अद्वैतही नाही. तेथे ‘मी’ येणार कोठून? ॥१८॥

आत्मा पूर्णत्वें परिपूर्ण । जेथें नाहीं गुणागुण । निखळ निर्गुणीं आपण । कोण कैंचा ।।१९।।

आत्मा कारण-कार्यरूपाने पूर्ण, गुण किंवा अगुण रहित, निर्मळ व निर्गुण असताना यात ‘मी’ कोण? अगुण हे

पद गुणसापेक्ष आहे. गुणच नसताना अगुण तरी का म्हणावे? ॥१९॥

त्वंपद तत्पद असिपद । निरसुनि सकळ भेदाभेद । वस्तु ठाईंची अभेद । आपण कैंचा ।।२०।।

'तू', 'ते' व 'आहेस' या तिन्ही पदांचा निरास केल्यावर भेद व तत् सापेक्ष अभेद उरत नाही. ब्रह्म स्वभावानेच भेदशून्य असताना त्यात 'मी'चा भेद कसा असेल? ॥२०॥

निरसितां जीवशिवउपाधी । जीवशिवचि कैंचे आधीं । स्वरूपीं होतां दृढबुद्धी । आपण कैंचा ।।२१।।

जीव व ईश्वर या दोन उपाधींचा निरास केल्यावर जीवत्व व शिवत्वच शिल्लक राहत नाही. 'ब्रह्म मी' असा दृढ, अपरिवर्तनीय, अपरोक्ष अनुभव आल्यावर 'मी'ला स्वतंत्रपणे अस्तित्व उरत नाही. (जीव व ईश्वर किंवा शिव यांच्या असण्या-नसण्यावर ब्रह्माचे अस्तित्व अवलंबून नाही. म्हणून जीव व ईश्वर या ब्रह्मस्वरूपाच्या कल्पित उपाधी आहेत.) ॥२१॥

आपण मिथ्या साच देव । देव भक्त अनन्यभाव । या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ।।२२।।

जीवरूप 'मी' सत् असत् विलक्षण असून ब्रह्मरूप देव त्रिकालाबाधित सत्य आहे. भक्त असलेला मी व ब्रह्म असलेला देव परस्परांहून वेगळे नाहीत. या बोलण्याचे रहस्य आत्मानुभवी जाणतात. (जीव रूप मी मध्ये बुद्धी असत् किंवा अचेतन आहे व त्यातील चिदाभास सत् किंवा चेतन आहे.) ॥२२॥

या नांव आत्मनिवेदन । ज्ञानियांचे समाधान । नवमे भक्तीचें लक्षण । निरोपिलें ।।२३।।

ज्याने जीव आत्म्याशी ऐक्य पावतो ते आत्मनिवेदन. त्यामुळेच ज्ञाता ज्ञेयात मिसळून ज्ञानरूप झाल्याचे समाधान मिळवितो. हीच ती नववी भक्ती! ॥२३॥

पंचभूतांमध्यें आकाश । सकळ देवांमध्यें जगदीश । नवविधा भक्तिमध्यें विशेष । भक्ति नवमी ।।२४।।

पंचमहाभूतांतील आकाश हे महाभूत सर्वांत सूक्ष्म आहे. सर्व देवांमध्ये ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे. त्याप्रमाणे भक्तीच्या सर्व प्रकारांत नववी भक्ती सर्वश्रेष्ठ आहे. ॥२४॥

नवमी भक्ति आत्मनिवेदन । न होतां न चुके जन्ममरण । हें वचन सत्य प्रमाण । अन्यथा नव्हे ।।२५।।

नववी आत्मनिवेदनभक्ती सिद्ध झाल्याशिवाय जन्ममरणाच्या चक्रातून कदापि सुटका होणार नाही हे वचन अगदी सत्य आहे. त्यात बदल होणार नाही. ॥२५॥

ऐसी हे नवविधा भक्ती । केल्यां पाविजे सायोज्यमुक्ती । सायोज्यमुक्तीस कल्पांती । चळण नाहीं ।।२६।।

असा हा नवविधाभक्तींचा क्रमविकास साधल्यावर जीवन्मुक्त स्थिती लाभते. कल्पान्तानंतर जीवसृष्टी पुन्हा निर्माण होईल. पण हा त्यातून सुटतो. ॥२६॥

तिहीं मुक्तींस आहे चळण । सायोज्यमुक्ती अचळ जाण । त्रैलोक्यास होतां निर्वाण । सायोज्यमुक्ती चळेना ।।२७।।

सलोकता, समीपता व सरूपता ह्या मुक्ती मिळाल्यातरी पुन्हा जन्म घ्यावा लागतो. पण सायुज्य मुक्ती कायमची मुक्त करते. त्रैलोक्य पुन्हा पुन्हा निर्माण होऊन नष्ट होईल. पण सायुज्य मुक्ती ज्याने साधली आहे असा त्यांतून सुटतो. ॥२७॥

आवघीया चत्वार मुक्ती । वेदशास्त्रें बोलती । तयांमध्ये तीन नासती । चौथी ते अविनाश ।।२८।।

वेदात चारच मुक्ती सांगितल्या आहेत. त्यांतील तीन अशाश्वत असून एकच शाश्वत आहे. तीच चौथी. ॥२८॥

पहिली मुक्ती ते स्वलोकता । दुसरी ते समीपता । तिसरी ते स्वरूपता । चौथी सायोज्यमुक्ती ।। २९ ।।

सलोकता-देवलोकात देवाबरोबर राहणे, समीपता-देवाजवळ राहणे. सरूपता-केवळ रूप देवाप्रमाणे होणे. सायुज्य-देवाशी एकरूप होऊन, देवच होऊन राहणे. ॥२९॥

ऐसिया चत्वार मुक्ती । भगवद्भजनें प्राणी पावती । हेंचि निरुपण प्रांजळ श्रोतीं । सावध पुढें परिसावें ।। ३० ।।

भगवंताच्या भक्तीने साधक त्याच्या अधिकारानुसार चार मुक्ती प्राप्त करतो. हाच विषय श्रोत्यांनी पुढे सावध होऊन ऐकावा. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आत्मनिवेदनभक्ती' नाम समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आत्मनिवेदनभक्ती' नावाचा नववा समास समाप्त

दशक चवथा : नवविधाभक्ती

समास दहावा : मुक्तिचतुष्टय

॥ श्रीरामसमर्थ ॥

(यातील सर्व वर्णन पुराणात सांगितल्याप्रमाणे आहे. मुमुक्षूने त्याचा छडा लावण्याचा, शक्याशक्यतेचा विचार करू नये. नव्या विज्ञानाशी ओढून ताणून जुळवून घेण्याचा प्रयत्न करण्यातही अर्थ नाही.)

मुळी ब्रह्म निराकार । तेथें स्फूर्तिरूप अहंकार । तो पंचभूतांचा विचार । ज्ञानदशकीं बोलिला ।।१।।

मूळ म्हणजे अधिष्ठानरूप ब्रह्म निराकार (व अंत:करणरहित) आहे. अध्यारोपाची भाषा असे सांगते की त्याला 'अहं' असे स्फुरण अकस्मात झाले. या संदर्भातील पंचमहाभूतांचा विचार पुढील आठव्या ज्ञानदशकात सांगितला आहे. ॥१॥

तो अहंकार वायोरूप । तयावरी तेजाचें स्वरूप । तया तेजाच्या आधारें आप । आवर्णोदक दाटलें ।।२।।

हा 'अहं' वायुरूप असून त्यापासून तेज व नंतर पाणी सर्वत्र भरून राहिले. त्याचे जणू आवरण झाले. ॥२॥

तया आवर्णोदकाच्या आधारें । धरा धरिली फणिवरें । वरती छपन्न कोटी विस्तारें । वसुंधरा हे ।।३।।

त्या पाण्याच्या आधाराने शेषाने पृथ्वी तोलून धरली. तिचा परिघ छपन्न कोटी क्रोस आहे. ॥३॥

इयेवरी परिघ सप्त सागर । मध्य मेरु माहां थोर । अष्ट दिग्पाळ तो परिवार । अंतरें वेष्टित राहिला ।।४।।

पृथ्वी सात समुद्रांनी वेढलेली असून मध्यभागी कण्यासारखा सोन्याचा मेरू पर्वत आहे. आठ दिशांनी हा सर्व परिवार आठ देवतांनी वेढून टाकला आहे. ॥४॥

तो सुवर्णाचा माहां मेरु । पृथ्वीस तयाचा आधारु । चौऱ्यांसी सहस्र विस्तारु । रुंदी तयाची ।।५।।

तो प्रचंड मेरु पर्वत सोन्याचा असून त्याची रुंदी चौऱ्याऐंशी हजार क्रोस असल्याने त्याचा पृथ्वीला आधार आहे. ॥५॥

उंच तरी मर्यादेवेगळा । भूमीमधें सहस्र सोळा । तया भोवता वेष्टित पाळा । लोकालोक पर्वताचा ।।६।।

त्याची उंची मोजणे शक्य नसून तो सोळा हजार क्रोस खोल आहे. लोक व अलोक या दोन पर्वतांच्या त्याला तटबंद्या असून त्या त्याला ढळू देत नाहीत. ॥६॥

तया ऐलिकडे हिमाचळ । जेथें पांडव गळाले सकळ । धर्म आणि तमाळनीळ । पुढें गेले ।।७।।

ज्यावरून चालताना पांडवांचे देह पडले तो हिमालय, त्याच्या अलीकडे आहे. धर्मराज व श्रीकृष्ण मात्र पुढे गेले. ॥७॥

जेथें जावया मार्ग नाहीं । मार्गी पसरले माहा अही । सितसुखें सुखावले तें हि । पर्वतरूप भासती ।।८।।

पुढे सामान्यांना जाता येत नाही. कारण त्या मार्गावर थंड जागा पाहून पर्वताएवढे सर्प सुखाने पडलेले असतात. ॥८॥

तया ऐलिकडे सेवटीं जाण । बद्रिकाश्रम बद्रिनारायण । तेथें माहां तापसी निर्वाण । देहत्यागार्थ जाती ।।९।।

हिमालयाच्या अगदी कुशीत बद्रीनारायणाचा बद्रिकाश्रम असून तेथे महान तपस्वी देह सोडण्यासाठी जातात. देह पडेपर्यंत तेथेच राहतात. ॥९॥

तया ऐलिकडे बद्रिकेदार । पाहोन येती लाहानथोर । ऐसा हा अवघा विस्तार । मेरुपर्वताचा ।।१०।।

त्याचे अलीकडे केदारनाथ क्षेत्र असून लहानमोठे लोक त्याचे दर्शन घेऊन येतात. असा हा मेरु पर्वताचाच सर्व विस्तार आहे. ॥१०॥

तया मेरुपर्वतापाठारीं । तीन श्रृंगें विषमहारी । परिवारें राहिले तयावरी । ब्रह्मा विष्णु महेश ।।११।।

मेरु पर्वताच्या पठारावर कमी-जास्त उंचीची तीन शिखरे असून त्यावर ब्रह्मदेव, विष्णू व महेश आपल्या परिवारासह वास्तव्य करितात. ॥११॥

ब्रह्मश्रृंग तो पर्वताचा । विष्णुश्रृंग तो मर्गजाचा । शिवश्रृंग तो स्फटिकाचा । कैळास नाम त्यांचें ।।१२।।

ब्रह्मदेवाचे शिखर सोन्याचे, विष्णूचे पाचूंचे व शंकराचे स्फटिकाचे आहे. तोच कैलास. ॥१२॥

वैकुंठ नाम विष्णुश्रृंगाचें । सत्यलोक नाम ब्रह्मश्रृंगाचें । अमरावती इंद्राचें । स्थळ खालतें ।।१३।।

विष्णुशिखर म्हणजे वैकुंठ. ब्रह्मदेवाचे शिखर हाच सत्यलोक व त्याखाली इंद्राची अमरावती आहे. ॥१३॥

तेथें गण गंधर्व लोकपाळ । तेतिसकोटी देव सकळ । चौदा लोक सुवर्णाचळ । वेष्टित राहिले ।।१४।।

तेथे गण, गंधर्व, लोकपाल, तेहेतीस देवांच्या कोटी, चौदा भुवने त्या मेरूच्या अवतीभवती आहेत. ॥१४॥

तेथें कामधेनूचीं खिलारें । कल्पतरूची बनें अपारें । अमृताचीं सरोवरें । ठांई ठांई उचंबळतीं ।।१५।।

स्वर्गामध्ये कामधेनूंचे कळप, कल्पतरूंची घनदाट जंगले व लाटावर लाटा उसळणारी अमृताची सरोवरे आहेत. ॥१५॥

तेथें उदंड चिंतामणी । हिरे परिसांचियां खाणी । तेथें सुवर्णमये धरणी । लखलखायमान ।।१६।।

तेथे जागोजागी चिंतामणीच्या राशी, हिरेमाणकांच्या खाणी व जमीन सोन्याप्रमाणे झळकणारी आहे. ॥१६॥

परम रमणीये फांकती किळा । नवरत्नाचिया पाषाणसिळा । तेथे अखंड हरुषवेळा । आनंदमये ।।१७।।

नवरत्नांचे सर्वत्र पाषाण असून त्यांचे मनोहारी तेज सर्वत्र फाकते, वातावरण सतत हर्षोत्फुल्ल असते. ॥१७॥

तेथें अमृताचीं भोजनें । दिव्य गंधें दिव्य सुमनें । अष्ट नायका गंधर्वगायनें । निरंतर ।।१८।।

तेथे जेवणात अमृत, दिव्य गंध, सुंदर सुगंधी फुले, रंभादी आठ अप्सरांचा नाच आणि गंधर्वगायन इत्यादी थाट सतत असतो. ॥१८॥

तेथें तारुण्य वोसरेना । रोगव्याधीहि असेना । वृधाप्य आणी मरण येना । कदाकाळीं ।।१९।।

सर्व स्वर्गवासीयांचे तारुण्य चिरकाल टिकते, रोग-व्याधी नसतात व वृद्धत्व व मरण कधीच येत नाही. ॥१९॥

तेथें येकाहूनि येक सुंदर । तेथें येकाहूनि येक चतुर । धीर उदार आणी शूर । मर्यादेवेगळे ।।२०।।

सर्व व्यक्ती एकापेक्षा एक सुंदर, चतुर, धैर्यशील, उदार व अत्यंत शूर असतात. ॥२०॥

तेथें दिव्यदेह ज्योतिरुपें । विद्युल्यतेसारिखीं स्वरुपें । तेथें येश कीर्ति प्रतापें । सिमा सांडिली ।।२१।।

त्या सर्वांची शरीरे दिव्य, तेजस्वी, विजेप्रमाणे झळकणारी असून त्यांचे यश, कीर्ती व प्रताप अमर्याद असतात. ॥२१॥

ऐसें तें स्वर्गभुवन । सकळ देवांचें वस्तें स्थान । तया स्थळांचें महिमान । बोलिजे तितुकें थोडें ।।२२।।

असा हा स्वर्ग सर्व देवांचे निवासस्थान असून त्याचे माहात्म्य सांगावे तेवढे थोडे आहे. ॥२२॥

येथें ज्या देवाचें भजन करावें । तेथें ते देवलोकीं राहावें । स्वलोकता मुक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ।।२३।।

पृथ्वीवर ज्या देवाचे भजन करावे त्यानुसार मृत्यूनंतर त्या देवाच्या लोकी जावे हीच सलोकता मुक्ती. ॥२३॥

लोकीं राहावें ते स्वलोकता । समीप असावें ते समीपता । स्वरुपचि व्हावें ते स्वरुपता । तिसरी मुक्ती ।।२४।।

त्या लोकात राहणे ही सलोकता, जवळ असणे म्हणजे समीपता व तेच रूप मिळणे ही सरूपता. ॥२४॥

देवस्वरूप जाला देही । श्रीवत्स कौस्तुभ लक्ष्मी नाहीं । स्वरुपतेचें लक्षण पाहीं । ऐसें असे ।।२५।।

देवाचे तसेच रूप मिळते खरे, पण श्रीवत्स, कौस्तुभ व लक्ष्मी यांचा लाभ होत नाही. हीच ती सरूपता मुक्ती होय. ॥२५॥

सुकृत आहे तों भोगिती । सुकृत सरतांच ढकलून देती । आपण देव ते असती । जैसे तैसे ।।२६।।

पुण्य असेपर्यंत देवलोकांत ठेवून घेतात. ते संपताच देव त्याला ढकलून देऊन स्वत: मात्र तेथेच राहतात. ॥२६॥

म्हणोनि तिनी मुक्ति नासिवंत । सायोज्यमुक्ति ते शाश्वत । तेंहि निरोपिजेल सावचित्त । ऐक आतां ।।२७।।

म्हणून तीन मुक्ती अनित्य असून सायुज्यता तेवढी नित्य आहे. तिचे वर्णन लक्षपूर्वक ऐक. ॥२७॥

ब्रह्मांड नासेल कल्पांतीं । पर्वतासहित जळेल क्षिती । तेव्हां अवघेच देव जाती । मां मुक्ति कैंच्या तेथें ।।२८।।

कल्प संपला की ब्रह्मांड नष्ट होते. मेरूसारख्या पर्वतांसह पृथ्वी जळून खाक होईल. सर्व देव नष्ट होतात. त्यांचे लोकही नष्ट झाल्यावर त्यांच्या लोकांत मुक्तीला काय अर्थ आहे? ॥२८॥

तेव्हां निर्गुण परमात्मा निश्चळ । निर्गुण भक्ति तेहि अचळ । सायोज्यमुक्ती ते केवळ । जाणिजे ऐसी ।।२९।।

परंतु ब्रह्म मात्र निर्गुण, नित्य असून तेच झालेला सायुज्यमुक्तीला पावतो म्हणून निर्गुण ब्रह्मानुभव आल्यावरची सायुज्यमुक्तीच नित्य आहे हे लक्षात घ्यावे. ॥२९॥

निर्गुणीं अनन्य असतां । तेणें होये सायोज्यता । सायोज्यता म्हणिजें स्वरूपता । निर्गुण भक्ती ।।३०।।

निर्गुण ब्रह्माच्या ठिकाणी अनन्य असणे म्हणजेच सायोज्यता. स्वरूपात विलीन होणे म्हणजे सायोज्यता. हीच निर्गुण भक्ती होय. ॥३०॥

सगुण भक्ति ते चळें । निर्गुंण भक्ति ते न चळें । हें आवघें प्रांजळ कळे । सद्गुरु केलियां ।।३१।।

सगुणाची उपासना अनित्य असते. 'निर्गुण ब्रह्म मी आहे' हा अनुभव आला की त्याने होणारा मोक्ष नित्य असतो. श्रीगुरूंचा अनुग्रह घेतलेल्यांनाच याचे रहस्य कळते. ॥३१॥

(कर्म व उपासना यांचे महत्त्व अपार असले तरी जीवन्मुक्ती मात्र 'निर्गुण ब्रह्म मी आहे'असा प्रत्यक्ष अनुभव आल्याशिवाय मिळत नाही हा उपनिषदांचा ठाम सिद्धान्त येथे समर्थांनी सांगितला आहे. जीवन्मुक्तीनंतरही आवडीनुसार कोणी महात्मे उपासना करीत राहतील. ती ज्ञानोत्तर भक्ती होय)

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मुक्तिचतुष्टयनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'मुक्तिचतुष्टय' नावाचा दहावा समास समाप्त.
–दशक चवथा समाप्त–

दशक पाचवा : मंत्रांचा

समास पहिला : गुरुनिश्चय

॥ श्रीराम समर्थ ॥

'मननात् त्रायते इति मन्त्रः'– 'विचार केला असता तरून जाण्याची सामग्री पुरवितो तो मंत्र' अशी व्याख्या लक्षात घेऊन या दशकाचा अभ्यास करणे इष्ट आहे. उदा. पहिला समास गुरुनिश्चयाचा आहे. श्रीगुरू हे तत्त्व, व्यक्ती, कृपेची अनिवार्यता, तिचे स्वरूप इ. विचार येथे अभिप्रेत आहे.

जय जय जी सद्‌गुरु पूर्णकामा । परमपुरुषा आत्मयारामा । अनुर्वाच्य तुमचा महिमा । वर्णिला नवचे ।।१।।

हे वासनाक्षय झालेल्या श्रीगुरो, आपला जयजयकार असो. उत्तम पुरुष, (गीता.अ. १५), व आत्माराम (कूटस्थ चैतन्य) याही नावाने आपण ओळखले जाता. आपले माहात्म्य अगाध असून त्याचे वर्णन करणे शक्य नाही. ॥१॥

जें वेदांस सांकडें । जें शब्दांसि कानडें । तें सत्शिष्यास रोकडें । अलभ्य लाभे ।।२।।

ज्या ब्रह्माविषयी प्रत्यक्ष बोलण्याची वेळ आली तर वेदांनाही अडचण पडते, शब्द एका मर्यादेपलीकडे ज्याविषयी काही सांगू शकत नाहीत ते शिष्यांना आपल्यामुळे किंवा आपल्या रूपाने प्रत्यक्ष अनुभवाला येते. ॥२॥

जें योगियांचें निजवर्म । जें शंकराचें निजधाम । जें विश्रांतीचें निजविश्राम । परम गुह्य अगाध ।।३।।

जे योग्यांचे स्वरूप, भ.शंकराचे अधिष्ठान व विश्रांतीलाही विश्रांती मिळण्याचे अत्यंत गूढ व गुप्त ठिकाण आहे. (राजगुह्य–गीता. गूढमनुप्रविष्टं–कठ उप.) शांतीची शांती, विश्रांतीची विश्रांती इ. शब्दयोजनांत काव्यात्मकतेबरोबरच तत्त्वज्ञानही आहे. गाढ झोपेत खरी विश्रांती मिळते. पण ही विश्रांती जीव आत्मरूप झाल्यामुळे (संप्रसाद-मांडूक्य) मिळते. म्हणून आत्मा विश्रांतीची विश्रान्ती होय. ॥३॥

तें ब्रह्म तुमचेनि योगें । स्वयें आपणचि होईजे आंगें । दुर्घट संसाराचेनि पांगें । पांगिजेना सर्वथा ।।४।।

आपल्या अनुग्रहाने 'ते ब्रह्म मी आहे' असा अनुभव येतो. दुस्तर संसाराच्या बंधनात तो शिष्य अडकून पडत नाही. ॥४॥

आतां स्वामिचेनी लडिवाळपणें । गुरुशिष्यांचीं लक्षणें । सांगिजेती तेणें प्रमाणें । मुमुक्षें शरण जावें ।।५।।

मी माझ्या श्रीगुरूंचा लाडका शिष्य असण्याच्या बळावर आता श्रीगुरू व शिष्य यांची लक्षणे सांगेन. ती लक्षात घेऊन मोक्षाची इच्छा असणाऱ्याने श्रीगुरूंना शरण जावे. ॥५॥

गुरु तों सकळांसी ब्राह्मण । जऱ्हीं तो जाला क्रियाहीन । तरी तयासीच शरण । अनन्यभावें असावें ।।६।।

श्रीगुरुत्व हे तर (गीता.अ.१८ प्रमाणे असणाऱ्या) ब्राह्मण वर्णासाठीच नियुक्त आहे. जीवन्मुक्तस्थितीत त्यांनी कर्मकांडाचा त्याग केलेला असला तरी त्यांनाच अनन्यभावाने शरण जावे. ॥६॥

अहो या ब्राह्मणाकारणें । आवतार घेतला नारायेणें । विष्णूनें श्रीवत्स मिरवणें । तेथें इतर ते किती ।।७।।

ऋषींच्या यज्ञांचा नाश करणाऱ्या राक्षसांचा नाश करण्यासाठी विष्णूने रामाचा अवतार घेतला. तीन देवांत श्रेष्ठ

कोण याची परीक्षा पाहण्यासाठी भृगूने छातीवर मारलेली लाथसुद्धा श्रीविष्णूने भूषण म्हणून त्याची खूण जपून ठेवली. मग इतर देव त्यांना मानतील यात काय आश्चर्य! ॥७॥

ब्राह्मणवचनें प्रमाण । होती शूद्रांचे ब्राह्मण । धातुपाषाणीं देवपण । ब्राह्मणाचेनि मंत्रें ।।८।।

जन्माने प्रत्येक माणूस शूद्र असतो. ब्राह्मणाने उपनयन संस्कार केल्यानंतर त्याचा विप्र होतो. पुरोहितांनी प्राणप्रतिष्ठा केल्यावर पाषाणाच्या मूर्तीला देव म्हणतात. ॥८॥

मुंजीबंधनेंविरहित । तो शूद्रचि निभ्रांत । द्विजन्मी म्हणोनि सतंत । द्विज ऐसें नाम त्याचें ।।९।।

ज्याची मुंज झालेली नाही तो शास्त्रदृष्ट्या शूद्रच असतो. मौंजीबंधनानंतर जणू त्याचा दुसरा जन्म होतो. म्हणून त्याला द्विज म्हणतात. ॥९॥

सकळांसि पूज्य ब्राह्मण । हे मुख्य वेदाज्ञा प्रमाण । वेदविरहित तें अप्रमाण । अप्रिये भगवंता ।।१०।।

विवाहादी वैदिक कर्मे करणारे पवित्र ब्राह्मण सर्वांनाच पूजनीय असतात, असे वेद म्हणतात. वेदबाह्य गोष्टी त्याज्य असून भगवंतालाही त्या रुचत नाहीत. ॥१०॥

ब्राह्मणीं योग याग व्रतें दानें । ब्राह्मणी सकळ तीर्थाटणें । कर्ममार्ग ब्राह्मणाविणें । होणार नाहीं ।।११।।

योग, यज्ञ, व्रते, दाने, तीर्थयात्रा इत्यादी कर्मकांड वैदिकांनी सांगितलेल्या विधीप्रमाणेच होते. ॥११॥

ब्राह्मण वेद मूर्तिमंत । ब्राह्मण तोचि भगवंत । पूर्ण होती मनोरथ । विप्रवाक्येंकरूनी ।।१२।।

वेद मुखोद्गत करून सांभाळणारे वैदिक जणू वेदमूर्तीच होत. ईश्वरप्रणीत वेद जतन करणारे वैदिक जणू ईश्वरच असतात. विप्रांनी म्हटलेल्या मंत्रामुळे यजमानाच्या कामना पूर्ण होतात. ॥१२॥

ब्राह्मणपूजनें शुद्ध वृत्ती । होऊन, जडे भगवंतीं । ब्राह्मणतीर्थें उत्तम गती । पावती प्राणी ।।१३।।

पवित्र ब्राह्मणांच्या पूजनाने मन शुद्ध होते. ते मन उपासनेकडे वळते. त्यांच्या उपदेशरूप तीर्थाने माणसाला मोक्ष मिळतो. ॥१३॥

लक्षभोजनीं पूज्य ब्राह्मण । आन यातिसी पुसे कोण । तरी भगवंतासि भाव प्रमाण । येरा चाड नाहीं ।।१४।।

कोणी लक्षभोजन घातले तर त्याच्या उद्यापनासाठीं ब्राह्मण लागतात. इतर जातींना त्यासाठी कोणी बोलवीत नाहीत. पण भगवंत मात्र भावाचा भुकेला असतो. त्याला जातीशी काहीच कर्तव्य नसते. तो समदृष्टी आहे. ॥१४॥

असो ब्राह्मण सुरवर वंदिती । तेथें मानव बापुडें किती । जरी ब्राह्मण मूढमती । तरी तो जगद्वंद्य ।।१५।।

एकूण देवसुद्धा ब्राह्मणांना नमस्कार करतात. मग माणूस त्यांना मान देईल यात नवल कोणते? वैदिकी करणाऱ्या पुरोहिताला इतर काही अक्कल नसली तरी वैदिकीपुरता तो सर्वांनाच वंदनीय असतो. ॥१५॥

अंत्येज शब्दज्ञाता बरवा । परी तो नेऊन काये करावा । ब्राह्मणासन्निध पुजावा । हें तों न घडे कीं ।।१६।।

कोणा शूद्राला वेदान्ताचे परोक्षज्ञान असले तरी यज्ञादी कर्मकांडासाठी त्याचा काहीच उपयोग नाही. तो याज्ञिकांच्या पंगतीला पूजनीय होत नाही. ॥१६॥

जें जनावेगळें केलें । ते वेदें अव्हेरिले । म्हणोनि तयासी नाम ठेविलें । पाषांडमत ।।१७।।

कोणी बंडखोरी करून तसे केले तरी ते वेदांना मान्य नसते. म्हणून त्यांना पाखंडी म्हणतात. ॥१७॥

असो जे हरिहरदास । तयास ब्राह्मणीं विस्वास । ब्राह्मणभजनें बहुतांस । पावन केलें ।।१८।।

श्रीविष्णू किंवा भ.शंकरांच्या भक्तांची उपासनेच्या विधीसाठी पुरोहितांवर श्रद्धा असते. त्यांनी सांगितलेल्या विधीनुसार उपासना केलेले अनेक जण पावन झाले. ॥१८॥

ब्राह्मणें पाविजे देवाधिदेवा । तरी किमर्थ सद्‌गुरु करावा । ऐसें म्हणाल तरी निजठेवा । सद्‌गुरुविण नाहीं ।।१९।।

ब्राह्मणांवरील श्रद्धेने देव प्रसन्न होत असेल तर सद्‌गुरूंची गरजच काय असे कोणी म्हणेल. पण एक नक्की की 'मी ब्रह्म आहे' असा अनुभव येणार नाही. आपलेच गमावलेले स्वरूप पुन्हा मिळणार नाही. ।।१९।।

स्वधर्मकर्मीं पूज्य ब्राह्मण । परी ज्ञान नव्हे सद्‌गुरुविण । ब्रह्मज्ञान नस्तां सीण । जन्ममृत्य चुकेना ।।२०।।

कर्मकांडातील कर्मे करण्यापुरते पुरोहित वंदनीय आहेत. पण जीवब्रह्मैक्याचे प्रत्यक्ष ज्ञान मात्र सद्‌गुरूंच्या अनुग्रहाशिवाय होणार नाही. या ज्ञानावाचून कर्मकांड हा नुसता शीण आहे. त्याने जन्ममरणातून सुटका होणार नाही. ।।२०।।

सद्‌गुरुविण ज्ञान कांहीं । सर्वथा होणार नाहीं । अज्ञान प्राणी प्रवाहीं । वाहातचि गेले ।।२१।।

'मी ब्रह्म आहे' असा स्वरूपानुभव श्रीगुरूंच्या कृपेशिवाय येणे अगदी अशक्य आहे. तो न आलेले जीव जन्ममरणाच्या प्रवाहात वाहत राहतात. ।।२१।।

ज्ञानविरहित जें जें केलें । तें तें जन्मासि मूळ जालें । म्हणौनि सद्‌गुरुचीं पाऊलें । सुदृढ धरावीं ।।२२।।

ब्रह्मज्ञान न होता जे जे कर्म उपासनादी करावे त्याने जन्ममरण चुकत नाहीत. म्हणून श्रीगुरूंना अत्यंत निष्ठापूर्वक शरण जावे. ।।२२।।

जयास वाटे देव पाहावा । तेणें सत्संग धरावा । सत्संगेंविण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ।।२३।।

ज्याला आत्मदेवाचा साक्षात्कार (तोच स्वत: होणे) हवा आहे त्याने श्रीगुरूंची सेवापूर्वक संगत करावी. त्याशिवाय देवांचा देव असलेले ब्रह्म अनुभवाला येत नाही. ।।२३।।

नाना साधनें बापुडीं । सद्‌गुरुविण करिती वेडीं । गुरुकृपेविण कुडकुडीं । वेर्थचि होती ।।२४।।

नाम, योग, ध्यानादी अनेक बिचारी साधने श्रीगुरूंच्या मुखातून आल्याशिवाय केवळ कष्टच देतात. गुरुकृपेवाचून त्या साधनांची केलेली खुडबुड वाया जाते. ।।२४।।

(पुढील नऊ ओव्यांत साधनांची यादी दिली आहे)

कार्तिकस्नानें माघस्नानें । व्रतें उद्यापनें दानें । गोरांजनें धूम्रपानें । साधिती पंचाग्नी ।।२५।।
हरिकथा पुराणश्रवण । आदरें करिती निरूपण । सर्व तीर्थें परम कठिण । फिरती प्राणी ।।२६।।
झळफळित देवतार्चनें । स्नानें संध्या दर्भासनें । टिळे माळा गोपीचंदने । ठसे श्रीमुद्रांचे ।।२७।।
अर्घ्यपात्रें संपुष्ट गोकर्णें । मंत्रयंत्रांची तांब्रपर्णें । नाना प्रकारींचीं उपकर्णें । साहित्यशोभा ।।२८।।
घंटा घणघणा वाजती । स्तोत्रें स्तवनें आणि स्तुती । आसनें मुद्रा ध्यानें करिती । प्रदक्षणा नमस्कार ।।२९।।
पंचायेत्न पूजा केली । मृत्तिकेची लिंगे लाखोली । बेले नारिकेळें भरिली । संपूर्ण सांग पूजा ।।३०।।
उपोषणें निष्ठा नेम । परम सायासी केलें कर्म । फळचि पावती, वर्म । चुकले प्राणी ।।३१।।
येज्ञादिकें कर्मे केलीं । ह्रदई फळाशा कल्पिली । आपले इच्छेनें घेतली । सूति जन्माची ।।३२।।
करूनि नाना सायास । केला चौदा विद्यांचा अभ्यास । रिद्धिसिद्धि सावकास । वोळल्या जरी ।।३३।।

कार्तिक व माघस्नान, व्रते, उद्यापने, दाने, अंगदाह, धूर खाणे, चारी बाजूंनी अग्नी पेटवून उन्हात बसणे, हरिकथा व पुराण ऐकणे व सांगणे, अवघड तीर्थयात्रा करणे, थाटाने पूजा करणे, स्नान, संध्या, दर्भासनावर बसणे, टिळे, माळा गोपीचंदन, मुद्रा उठविणे, ओंजळीसारखी किंवा गोकर्णासारखी अर्घ्यपात्रे, मंत्रजप, तांब्याच्या पत्र्यावरील यंत्रे, शोभिवन्त पूजासाहित्य, घंटा, स्तोत्रे, स्तवने, आरत्या, आसने, मुद्रा, ध्यान, प्रदक्षिणा, नमस्कार, शाळिग्राम,

गणपती, देवी, शंकर, सूर्य अशी पंचायतन पूजा, मातीची लक्ष शिवलिङ्गे करणे, बेल व नारळाने पूजा, यथासांग पूजा, उपास, नित्यनेम, यज्ञादी कष्टकारक कर्मांने स्वर्गादी फळ मिळते पण आत्मज्ञानाचे वर्म चुकते. जो यज्ञादी कर्मे फळाच्या अपेक्षेने करतो तो स्वत: आपल्या जन्ममरणांची व्यवस्था करून ठेवतो. कोणी अनेक कष्ट करून चौदा विद्या आत्मसात केल्या, योगसाधनेने सिद्धी मिळाल्या तरी— ॥२५-३३॥

तरी सद्‌गुरुकृपे विरहित । सर्वथा न घडे स्वहित । येमपुरीचा अनर्थ । चुकेना येणें ।।३४।।

श्रीगुरुकृपेशिवाय आत्मज्ञानरूप स्वहित होत नाही व यमयातना चुकत नाहीत. ॥३४॥

जंव नाहीं ज्ञानप्राप्ती । तव चुकेना यातायाती । गुरुकृपेविण अधोगती । गर्भवास चुकेना ।।३५।।

जोपर्यन्त जीव आत्मा आहे व आत्मा ब्रह्म आहे असे संदेहरहित ज्ञान होत नाही तोपर्यंत पुनर्जन्मांचे फेरे चुकत नाहीत. गुरुकृपेशिवाय गर्भवासांची अधोगती चुकत नाही. ॥३५॥

ध्यान धारणा मुद्रा आसन । भक्ती भाव आणी भजन । सकळहि फोल, ब्रह्मज्ञान । जव तें प्राप्त नाहीं ।।३६।।

ध्यान, धारणा, मुद्रा, आसन, भावपूर्ण भक्ती व भजन हे सर्व ब्रह्मज्ञानावाचून व्यर्थ होय. ॥३६॥

सद्‌गुरुकृपा न जोडे । आणी भलतीच कडे वावडे । जैसें आंधळें चाचरोन पडे । गारीं आणि गडधरां ।।३७।।

आंधळा जसा एकटा चालू लागला की शेणाच्या गारीत किंवा खड्ड्यात पडतो त्याप्रमाणे एकटा प्रामाणिक साधकसुद्धा श्रीगुरूंच्या कृपेच्या अभावी भलत्याच दिशेला जातो. ॥३७॥

जैसें नेत्रीं घालितां अंजन । पडे दृष्टीस निधान । तैसें सद्‌गुरुवचनें ज्ञान– । प्रकाश होये ।।३८।।

असे म्हणतात की डोळ्यांत विशिष्ट अंजन घातले तर भूमिगत धन दिसते त्याप्रमाणे श्रीगुरूंच्या मुखातून ऐकलेल्या महावाक्याने शिष्याला ज्ञानाचा प्रकाश दिसतो. ॥३८॥

सद्‌गुरुविण जन्म निर्फळ । सद्‌गुरुविण दु:ख सकळ । सद्‌गुरुविण तळमळ । जाणार नाहीं ।।३९।।

श्रीगुरूंच्या अनुग्रहावाचून जन्म फुकट जातो. नाना दु:खे भोगावी लागतात. तळमळ जात नाही. ॥३९॥

सद्‌गुरुचेनि अभयंकरें । प्रगट होईजे ईश्वरें । संसारदु:खें अपारें । नासोन जाती ।।४०।।

श्रीगुरूंच्या अभयवचनाने ईश्वरसुद्धा प्रगट होऊन संसारातील दु:खांना दु:खांचे स्वरूपच राहत नाही. ॥४०॥

मागें जाले थोर थोर । संत महंत मुनेश्वर । तयांस हि ज्ञानविज्ञानविचार । सद्‌गुरुचेनी ।।४१।।

आतापर्यन्त अनेक मोठे मोठे संत, महंत व मुनी होऊन गेले. त्यांनासुद्धा त्यांच्या श्रीगुरूंकडूनच ज्ञान व विज्ञानाचा उपदेश लाभला. ॥४१॥

श्रीरामकृष्ण आदिकरूनी । अति तत्पर गुरुभजनीं । सिद्ध साधु आणी संतजनीं । गुरुदास्य केलें ।।४२।।

श्रीराम व श्रीकृष्णानेही वसिष्ठ व सांदीपनींचे शिष्यत्व व दास्यत्व केले. अनेक सिद्ध, साधू व संतांनी श्रीगुरूंची सेवा केली. ॥४२॥

सकळ सृष्टीचे चाळक । हरिहरब्रह्मादिक । तेहि सद्‌गुरुपदीं रंक । महत्त्वा न चढेती ।।४३।।

पृथ्वीची उत्पत्ती, स्थिती व लय करणाऱ्या ब्रह्मा, विष्णू व शंकरांनाही श्रीगुरूंच्या मानाने कनिष्ठत्व असून त्यांना ते (गुरुपदाचे) महत्त्व नाही. ॥४३॥

असो जयासि मोक्ष व्हावा । तेणें सद्‌गुरु करावा । सद्‌गुरुविण मोक्ष पावावा । हें कल्पांती न घडे ।।४४।।

आता हे सांगणे पुरे. ज्याला मोक्ष हवा आहे त्याने श्रीगुरूंचा अनुग्रह घ्यावा. गुरुकृपेवाचून मोक्ष ही गोष्ट

कल्पांतीसुद्धा घडणार नाही. ।।४४।।

आतां सद्‌गुरु ते कैसे । नव्हेति इतरां गुरु ऐसे । जयांचे कृपेनें प्रकाशे । शुद्ध ज्ञान ।।४५।।

आता ते श्रीगुरू कसे असतात? तर इतर लौकिक गुरूंसारखे नसतात. परात्पर गुरूंच्या कृपेने शुद्ध ज्ञानाचा प्रकाश पडतो. ।।४५।।

त्या सद्‌गुरुची वोळखण । पुढिले समासीं निरूपण । बोलिलें असे श्रोतीं श्रवण । अनुक्रमें करावें ।।४६।।

अशा सद्‌गुरूंची पुढील समासात ओळख करून घेऊ. श्रोत्यांनी यथाक्रम ती ऐकावी. ।।४६।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'गुरुनिश्चयनाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'गुरुनिश्चय' नावाचा पहिला समास समाप्त

दशक पाचवा : मंत्रांचा

समास दुसरा : गुरुलक्षण

॥ श्रीरामसमर्थ ॥

जे करामती दाखविती । ते हि गुरु म्हणिजेती । परंतु सद्गुरु नव्हेती । मोक्षदाते ।।१।।

चमत्कार करून दाखविणाऱ्यांना गुरू म्हणून फार मोठी मान्यता मिळते. परंतु ते शिष्याला मुक्त करू शकत नाहीत. (हातचलाखीला चमत्कार समजणाऱ्या भोळ्यांची संख्या प्रचंड आहे) ॥१॥

सभामोहन भुररीं चेटकें । साबरमंत्र कौटालें अनेकें । नाना चमत्कार कौतुकें । असंभाव्य सांगती ।।२।।

समुदायाला शब्द, नाट्य, नजर, व्यक्तिमत्त्व इत्यादिकांनी भारून टाकणारे, भुरळ पाडणारे, चेटुक करणारे, शाबरी मंत्रांच्या गूढतेने स्तंभित करणारे इ. कुटिल गुरूंसंबंधी लोक अनेक चमत्कार सांगतात. ॥२॥

सांगती औषधीप्रयोग । कां सुर्वणधातूचा मार्ग । दृष्टीबंधनें लागवेग । अभिळाषाचा ।।३।।

गावठी औषधे सांगणे, लोखंडाचे सोने करण्याचे तंत्र, नजरबंदी इत्यादी प्रकारे लोकांना स्वार्थ साधण्याचे उपाय सांगतात. ॥३॥

साहित संगीत रागज्ञान । गीत नृत्य तान मान । नाना वाद्यें सिकविती जन । ते हि येक गुरु ।।४।।

साहित्य, संगीत, मालकंसादी राग, गीत, नृत्य, ताल, सूर वाद्ये शिकण्यासाठीही गुरू लागतात. ॥४॥

विद्या सिकविती पंचाक्षरी । ताडेतोडे नानापरी । कां पोट भरे जयावरी । ते विद्या सिकविती ।।५।।

पिशाच्चे काढण्याची विद्या, तोडगे इ. सांगून पोट भरण्याची विद्या शिकविणारे गुरू असतात. ॥५॥

जे यातीचा जो व्यापार । सिकविती भरावया उदर । ते हि गुरु परी साचार । सद्गुरु नव्हेती ।।६।।

ज्याला त्याला ज्याचा त्याचा उद्योग शिकवून पोट भरावयास शिकविणारेसुद्धा गुरूच. पण ते सद्गुरू नाहीत. ॥६॥

आपली माता आणी पिता । ते हि गुरुचि तत्वतां । परी पैलपार पावविता । तो सद्गुरु वेगळा ।।७।।

आई व वडिलांनाही गुरू म्हणतात. परंतु त्यांना मुलांना जन्ममरणाचे पलीकडे नेता येत नाही. जन्ममरणाचे पलीकडे नेणारे सद्गुरू वेगळेच असतात. ॥७॥

गाईत्रीमंत्राचा उचारु । सांगे तो साचार कुळगुरु । परी ज्ञानेंविण पैलपारु । पाविजेत नाहीं ।।८।।

कुळगुरू गायत्री मंत्राची संथा देतात. परंतु ब्रह्मज्ञानाशिवाय भवसमुद्र पार करता येत नाही. ॥८॥

जो ब्रह्मज्ञान उपदेसी । अज्ञानअंधारे निरसी । जीवात्मयां परमात्मयांसी । ऐक्यता करी ।।९।।

जो ब्रह्मज्ञानाचा अवांतर वाक्य व महावाक्य यांचे साह्याने उपदेश करून अविद्येचा अंधार नष्ट करतो व 'जीव व आत्मा एक आहेत' असा अनुभव आणून देतो तोच सद्गुरू. ॥९॥

विघडले देव आणी भक्त । जीवशिवपणें द्वैत । तया देवभक्तां येकांत । करी तो सद्गुरु ।।१०।।

मूळत: एक असलेले भक्तरूप जीव व देवरूप आत्मा यांचे अज्ञानामुळे विघटन झाल्यासारखे वाटते व द्वैत निर्माण होते. त्यांचे पुन्हा ऐक्य साधून देणारा तो सद्गुरू. ॥१०॥

भव्यव्याघ्रें घालूनि उडी । गोवत्सास तडातोडी । केली देखोनि सीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ।।११।।

गायरूप ब्रह्म व वत्सरूप जीव यांचेवर ‘प्रपंच सत्य आहे’ हा भ्रमरूप वाघ हल्ला करून त्यांची ताटातूट करतो. त्यांचे त्वरेने ऐक्य करून देणारा सद्‌गुरू होय. ॥११॥

प्राणी मायाजाळीं पडिलें । संसारदु:खें दु:खवलें । ऐसें जेणें मुक्त केलें । तो सद्‌गुरु जाणावा ।।१२।।

जीव मायेच्या जाळ्यात अडकून संसारातील विविध तापांनी दु:खी होतात. त्यांना त्यांतून सोडवितो तो सद्‌गुरू. ॥१२॥

वासनानदीमाहांपुरीं । प्राणी बुडतां ग्लांती करी । तेथें उडीं घालूनि तारी । तो सद्‌गुरु जाणावा ।।१३।।

ज्या वासनेमुळे जन्म घ्यावा लागतो त्या वासनारूप नदीच्या महापुरात बुडून दीन होऊन गटांगळ्या खाणाऱ्याला पुरात उडी घेऊन तारतो तोच सद्‌गुरू जाणावा. ॥१३॥

गर्भवास अति सांकडी । इछाबंधनाची बेडी । ज्ञान देऊन सीघ्र सोडी । तो सद्‌गुरु स्वामी ।।१४।।

गर्भाशयात राहणे अतिशय त्रासदायक असते. जन्मानंतर अनेक कामनांच्या बंधनात जीव अडकतो. त्यांना आत्मज्ञानाने मुक्त करतो तो सद्‌गुरू. ॥१४॥

फोडूनि शब्दाचें अंतर । वस्तु दाखवि निजसार । तोचि गुरु माहेर । अनाथांचें ।।१५।।

‘तत्वमसि’ सारख्या महावाक्यांचा वाच्यार्थ व लक्ष्यार्थ सांगून प्रत्येकाच्या ‘अहं’ मागे अधिष्ठान रूपाने असलेला आत्मा अनुभवाला आणून देणाराच सद्‌गुरू होय. आत्मनाथाला विसरल्याने अनाथ झालेल्यांना तो सनाथ करतो. ॥१५॥

जीव येकदेसी बापुडें । तयास ब्रह्म चि करी रोकडें । फेडी संसारसांकडें । वचनमात्रें ।।१६।।

जीव संकुचित किंवा एकदेशी म्हणजे केवळ देहभर व्यापून राहतो. म्हणून तो दैन्यवाणा होतो. श्रीगुरू त्याला अनंत, अपार, व्यापक ब्रह्मच करतात. महावाक्याच्या उपदेशाने त्याला संसार सागराच्या संकटातून सोडवितात. ॥१६॥

जें वेदांचे अभ्यांतरीं । तें काढून अपत्यापरी । शिष्य श्रवणीं कवळ भरी । उद्‌गारवचनें ।।१७।।

मोक्षाचे तत्त्वज्ञान हा वेदांचा गाभा आहे. तो एखाद्या लहान मुलाला घास भरवावा त्याप्रमाणे शिष्याच्या कानांत शब्दरूपाने घालतात. ॥१७॥

वेद शास्त्र माहानुभाव । पाहातां येकचि अनुभव । तोचि येक गुरुराव । ऐक्यरुपें ।।१८।।

वेदान्तशास्त्राच्या मोक्षसाधक तत्त्वज्ञानाचा जीवन्मुक्तांना मुक्तरूपाने प्रत्यक्ष अनुभव असतो. या दोन्हीतील अंतर सद्‌गुरू शिष्याला अद्वैताचा अनुभव देऊन तोडून टाकतात. शिष्य तोच अनुभव घेतात. तत्त्वज्ञान व प्रत्यक्ष मोक्ष यांत अंतर राहत नाही. ॥१८॥

संदेह नि:शेष जाळी । स्वधर्म आदरें प्रतिपाळी । वेदविरहित टवाळी । करूच नेणे ।।१९।।

श्रीगुरू शिष्याला वेळोवेळी येणारी प्रत्येक शंका पूर्णपणे दूर करतात. व्यवहार, धर्म, तत्त्वज्ञान व साधना या सर्व बाबतीत शंका येऊ शकतात. आपल्या वर्णाश्रमानुसार विहित कर्मे ते करतात. वेदबाह्य वर्तन बेजबाबदारपणाने करीत नाहीत. ॥१९॥

जें जें मन आंगिकारी । तें तें स्वयें मुक्त करी । तो गुरु नव्हे भिकारी । झडे आला ।।२०।।

आपल्या मनात जे जसे येईल तसे मोकाटपणे ते कधीच करीत नाहीत. असे नसतील तर त्यांना श्रीगुरू म्हणूच नये. त्यांच्यामुळे पारमार्थिक दारिद्र्य निर्माण होऊन शिष्यांचे शाश्वत हित झडून जाते. ॥२०॥

शिष्यास न लविती साधन । न करविती इंद्रियेंदमन । ऐसे गुरु आडक्याचे तीन । मिळाले तरी त्यजावें ।।२१।।

ते जर शिष्याने साधन करावे असा आग्रह धरीत नसतील व त्यांना इंद्रियजयाचे धडे देत नसतील तर असे गुरू फुकट मिळाले तरी खुशाल सोडून द्यावेत. ॥२१॥

जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी । इंद्रियेंदमन प्रतिपादी । तो सद्‌गुरु जाणावा ।।२२।।

जो श्रोत्रिय असल्यामुळे आत्मविद्या शिकवितो व अविद्या बाधित करून शमदमादिकांचा अभ्यास करून घेतो तोच खरा सद्‌गुरू. ॥२२॥

येक द्रव्याचे विकिले । येक शिष्याचे आखिले । अति दुराशेनें केले । दीनरूप ।।२३।।

काही तथाकथित गुरूंना सतत पैसे हवे असतात. त्यांचे प्रकल्प कधी संपतच नाहीत. काही शिष्यांच्या ते अधीन राहतात. हे हवे, ते हवेच्या हव्यासाने ते दैन्यवाणे होतात. ॥२३॥

जें जें रुचे शिष्यामनीं । तैसीच करी मनधरणी । ऐसी कामना पापिणी । पडली गळां ।।२४।।

असा गुरु शिष्याला ज्याची गोडी वाटते तसे अनुकूल बोलून त्याची मर्जी सांभाळतो! शिष्याकडून पूर्ण होणाऱ्या अपेक्षांवर नजर ठेवणारी कामनारूप पापिणी त्याच्या गळ्यात पडलेली असते. ॥२४॥

जो गुरु भीडसारु । तो अद्धमाहून अद्धम थोरु । चोरटा भैंद पामरु । द्रव्यभोंदु ।।२५।।

जो गुरू शिष्यांच्या भिडेने त्यांची साधनेतील कुचराई सहन करतो तो अत्यंत अधम होय. शिष्यांकडून होणाऱ्या लाभामुळेच अशी भीड पडत असल्याने तो गुरू चोर, नीच, पामर व भोंदू समजावा. ॥२५॥

जैसा वैद्य दुराचारी । केली सर्वस्वें बोहरी । आणी सेखी भीड करी । घातघेणा ।।२६।।

वैद्याचे जर फक्त पैशावर लक्ष असेल व तो रुग्णाला भरपूर लुबाडून त्याला पथ्य सांगण्याची भीड धरीत असेल तर तो घातकीच समजावा. ॥२६॥

तैसा गुरु नसावा । जेणें अंतर पडे देवा । भीड करूनियां गोवा । घाली बंधनाचा ।।२७।।

गुरू असा नसावा. शिष्याची नाराजी होऊ नये म्हणून त्याची भीड धरून बद्धता दृढ करून ब्रह्मज्ञान न होऊ देणारा नसावा. ॥२७॥

जेथें शुद्ध ब्रह्मज्ञान । आणी स्थूळ क्रियेचें साधन । तोचि सद्‌गुरु निधान । दाखवी डोळां ।।२८।।

ज्या श्रीगुरूंजवळ परिपूर्ण ब्रह्मविद्या, ब्रह्मानुभव व तो घेण्याचे प्रत्यक्ष साधन एवढी सामग्री असते तेच आत्मानुभव देऊ शकतात. ॥२८॥

देखणें दाखविती आदरें । मंत्र फुंकती कर्णद्वारें । इतुकेंच ज्ञान तें पामरें । अंतरलीं भगवंता ।।२९।।

भपकेबाज आश्रम, ऐटबाज पोशाख, थाटाचे आसन, कानांत मंत्र फुंकणे एवढीच सामुग्री असणारे श्रीगुरू पामर शिष्याची व देवाची फारकत करतात. ॥२९॥

बाणे तिहींची खूण । तोचि गुरु सुलक्षण । तेंथेंचि रिघावें शरण । अत्यादरें मुमुक्षें ।।३०।।

शब्दज्ञान, ब्रह्मानुभव व दया या तीन गोष्टी जिथे पुरेपूर असतील त्यांनाच मोक्षाची इच्छा असणाऱ्याने अत्यंत आदराने शरण जावे. ॥३०॥

अद्वैत निरूपणें अगाध वक्ता । परी विषई लोलंगता । ऐसिया गुरुचेनि सार्थकता । होणार नाहीं ।।३१।।

अद्वैतवेदान्ताचे निरूपण करण्यात पटाईत पण पंचविषयात आसक्त असेल तर असा गुरू शिष्याला मुक्त करू शकणार नाही. ॥३१॥

जैसा निरूपणसमयो । तैसेंचि मनहि करी वायो । कृतबुद्धीचा जयो । जालाच नाहीं ।।३२।।

आत्मानुभवाचे अभावी स्वत:चा असा कोणताच ठाम निर्णय नसल्याने प्रसंग व श्रोते पाहून पगडी फिरविणारा गुरू

नसावा. बुद्धमत, परमाणुवाद इ. आधुनिकांना बरे वाटणारे विचार सांगून अद्वैताची परंपरा मोडणारा नसावा. ॥३२॥

निरूपणीं सामर्थ्य सिद्धी । श्रवण होतां दुराशा बाधी । नाना चमत्कारें बुद्धी । दंडळूं लागे ।।३३।।

आपल्या निरूपणात अलौकिक सामर्थ्य, अवाक् करणाऱ्या सिद्धींचे वर्णन करतो व त्यामुळे श्रोत्यांना भलत्याच आशा-आकांक्षांच्या मागे लावतो. चमत्कारांच्या रसभरीत वर्णनामुळे श्रोत्याचे मायानिवृत्तीपूर्वक मोक्षावरील लक्ष उडून जाते. ॥३३॥

पूर्वीं ज्ञाते विरक्त भक्त । तयांसि सादृश्य भगवंत । आणि सामर्थ्यहि अद्भुत । सिद्धीचेनि योगें ।।३४।।

तो श्रोत्यांच्या मनात असे भरवून देतो की पूर्वीच्या काळी फार मोठे विद्वान, विरक्त व भक्त झाले. ते सामर्थ्याने ईश्वरासमान होते. सिद्धींमुळे त्यांचेजवळ अद्भुत सामर्थ्य होते. ॥३४॥

ऐसें तयांचें सामर्थ्य । आमुचें ज्ञानचि नुसदें वेर्थ । ऐसा सामर्थ्याचा स्वार्थ । अंतरीं वसे ।।३५।।

त्यांच्या त्या सामर्थ्याच्या तुलनेने आपण ऐकत असलेले शब्दज्ञान अगदीच टाकावू आहे. त्यांच्यासारखे अद्भुत सामर्थ्य मिळविण्यातच पुरुषार्थ आहे. असे विचार मनात सुरू होतात. ॥३५॥

निशेष दुराशा तुटे । तरीच भगवंत भेटे । दुराशा धरिती ते वोखटे । शब्दज्ञाते कामिक ।।३६।।

वासनाजन्य सर्व कामना संपूर्ण नष्ट झाल्या तरच आत्मज्ञान होते. कामना सांभाळून केवळ शब्दज्ञान सांगणारे खोटे श्रीगुरू निरुपयोगी होत. ॥३६॥

बहुत ज्ञातीं नागवलीं । कामनेनें वेडीं केलीं । कामना इच्छितांच मेलीं । बापुडी मूर्खें ।।३७।।

आजपर्यंत कामना कवटाळून बसणारे कित्येक पंडित फसले आहेत. ते पढतमूर्ख कामनावेडे होऊन त्यातच मेले. ॥३७॥

निशेष कामनारहित । ऐसा तो विरुळा संत । अवघ्यां वेगळें मत । अक्षै ज्याचें ।।३८।।

वासनेचा क्षय झालेला एखादाच कोणी खरा संत असतो. जेथे जग जागे असते तेथे तो झोपलेला असतो! ('यस्यां जाग्रति भूतानि'– गीता) ॥३८॥

अक्षै ठेवा सकळांचा । परी पांगडा फिटेना शरीराचा । तेणें मार्ग ईश्वराचा । चुकोनि जाती ।।३९।।

आत्मा हे सर्वच प्राण्यांचे अविनाशी स्वरूप आहे. परंतु देहतादात्म्यामुळे जीव व ब्रह्म ह्यांच्या ऐक्याचा मार्ग सापडत नाही. देहाचा पिंजरा सोडता येत नाही. ॥३९॥

सिद्धी आणि सामर्थ्य जालें । सामर्थ्यें देहास महत्त्व आलें । तेणें बेंचाड बळकावलें । देहबुद्धीचें ।।४०।।

साधनेमुळे सिद्धींचे सामर्थ्य मिळालेच तर त्यामुळे देहाला अधिकच महत्त्व येऊन आधीच असलेले देहतादात्म्य आणखी बळकट होते. ॥४०॥

सांडूनि अक्षै सुख । सामर्थ्य इछिती ते मूर्ख । कामनेसारिखें दुःख । आणीक कांहींच नाहीं ।।४१।।

अवीट आत्मसुख सोडून सामर्थ्याचे सुख हवे वाटणारे मूर्खच असतात. कारण त्या सामर्थ्याची कामना अनावर असते व ती दुःखरूप असते. त्यासारखे दुसरे दुःख नाही. ॥४१॥

ईश्वरेंविण जे कामना । तेणेंचि गुणें नाना यातना । पावती होती पतना । वरपडे प्राणी ।।४२।।

आत्मानुभवाशिवाय ज्या ज्या इच्छा कराव्यात त्या अनेक प्रकारे यातना देतात. उथळ विचार करणाऱ्यांचे ह्याच कारणाने पतन होते आणि ते जन्ममरणाच्या फेऱ्यात अडकतात. ॥४२॥

होतां शरीरासी अंत । सामर्थ्य हि निघोन जात । सेखीं अंतरला भगवंत । कामनागुणें ।।४३।।

कितीही सामर्थ्य मिळाले तरी ते शरीराबरोबर नष्ट होते. खोट्या सामर्थ्याच्या जबर महत्त्वाकांक्षेमुळे आत्मदेव मात्र अंतरतो. ॥४३॥

म्हणोनि नि:कामताविचारु । दृढबुद्धीचा निर्धारु । तोचि सद्‌गुरु पैलपारु । पाववी भवाचा ।।४४।।

म्हणून निष्कामता हा ज्याच्या बुद्धीचा स्थायीभाव झाला आहे असाच सद्‌गुरू कामनेने निर्माण झालेल्या ('बहुस्याम') कामनामय जगातून सोडवितो. ।।४४।।

मुख्य सद्‌गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमळ ज्ञान । निश्चयाचें समाधान । स्वरूपस्थिती ।।४५।।

शुद्ध ब्रह्माचे अनुभवात्मक ज्ञान, ज्ञानामुळे झालेले अखंड समाधान व सहजस्वरूपानुसंधान ही श्रीगुरूंची मुख्य लक्षणे आहेत. ।।४५।।

याहिवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदास केवळ । विशेष आचारें निर्मळ । स्वधर्मविषईं ।।४६।।

ह्या शिवाय गुणगंध वैराग्य, संकल्पशून्य अंत:करण व स्वधर्मपूर्वक सदाचरण असावे. (गुणकार्य = जग, गुणमय = अंत:करण. गुणगंध = वैराग्याचे वैराग्य. वैराग्याला आलेली सहजता.) ।।४६।।

याहिवरी अध्यात्मश्रवण । हरिकथा निरूपण । जेथे परमार्थविवरण । निरंतर ।।४७।।

शिवाय अध्यात्मशास्त्राचे पाठ, प्रवचन, सगुण हरिकीर्तन व सतत परमार्थचर्चा असावी. ।।४७।।

जेथें सारासारविचार । तेथें होये जगोद्धार । नवविधा भक्तीचा आधार । बहुत जनासी ।।४८।।

सार ब्रह्म व असार दृश्य जगत् हा विचार जेथे सतत जागा असतो तेथे जगाच्या उद्धाराची व्यवस्था असते. नवविधा भक्ती हा फार मोठ्या जनसमुदायाचा आधार आहे. ।।४८।।

म्हणोनि नवविधा भजन । जेथें प्रतिष्ठलें साधन । हें सद्‌गुरूचें लक्षण । श्रोतीं वोळखावें ।।४९।।

म्हणून नवविधा भक्ती व भक्कम साधना ह्यांचा आग्रह असणे हे श्रीगुरुंचे लक्षण साधकांनी ओळखावे. ।।४९।।

अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन । तेथें बहु भक्त जन । विश्रांति पावती ।।५०।।

अंत:करणवृत्ती जीव-ब्रह्मैक्य चिंतनात गढलेली व बाहेर ब्रह्माचे प्रतीक असलेल्या सगुणाचे भजन अशी उभयस्थिती असेल तर तेथें बहुतांश भक्तांना समाधान वाटते. (उदा. नामसाधना.) ।।५०।।

नाहीं उपासनेचा आधार । तो परमार्थ निराधार । कर्मेविण अनाचार । भ्रष्ट होती ।।५१।।

सगुण उपासनेवाचून परमार्थ सैरभैर होतो. विहित कर्मावाचून परमार्थात अनाचार माजतो. साधक साधनाभ्रष्ट होतो. ।।५१।।

म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्मकर्म आणि साधन । कथा निरूपण श्रवण मनन । नीति न्याये मर्यादा ।।५२।।

म्हणून ब्रह्मविद्या, वैराग्य, उपासना, स्वधर्माचरण, सोऽहं सारखी ध्यानसाधना, भगवत् कथा श्रवण, आत्मानात्मविचार व न्यायनीतीची बंधने– ।।५२।।

यामधें येक उणें असे । तेणें तें विलक्षण दिसे । म्हणौन सर्व हि विलसे । सद्‌गुरुपासीं ।।५३।।

ह्या सामुग्रीत एकाचीही उणीव असेल तर ती श्रीगुरूंमध्ये उणीव निर्माण करते. म्हणून सद्‌गुरूंपाशी ह्या सर्वांचा अपूर्व मिलाफ असतो. ।।५३।।

तो बहुतांचें पाळणकर्ता । त्यास बहुतांची असे चिंता । नाना साधनें समर्था । सद्‌गुरुपासीं ।।५४।।

श्रीगुरूंना अनेकांच्या मोक्षमार्गाचा सांभाळ करावयाचा असतो. त्यामुळे त्यांना त्या सर्वांचा विचार करावा लागतो. म्हणून समर्थ श्रीगुरूंपाशी अनेक साधने सिद्ध झालेली असतात. ।।५४।।

साधनेंविण परमार्थ प्रतिष्ठे । तो मागुतां सवेंच भ्रष्टे । याकारणें दुरीद्रष्टे । माहानुभाव ।।५५।।

प्रत्यक्ष साधना केल्याशिवाय परमार्थाला स्थिर बैठक प्राप्त होत नाही. केवळ शब्दज्ञान असेल तर परमार्थ फार

काळ टिकत नाही. म्हणून अनुभवी संत दूरदृष्टीने साधनेचा आग्रह धरतात. ।।५५।।

आचार उपासना सोडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती । जळो तयांची महंती । कोण पुसे ।।५६।।

सदाचार व उपासनेचा त्याग करणारे भ्रष्ट लोक भक्त आहेत असे कोणालाच पटत नाही. अशांची महंती कधीच यशस्वी होत नाही. त्यांना विचारतो कोण? ।।५६।।

कर्म उपासनेचा अभाव । तेथें भकाथेसि जाला ठाव । तो कानकोंडा समुदाव । प्रपंची हांसती ।।५७।।

कर्म व उपासना नसेल तर शिष्यसमुदाय स्वैराचारी बनतो. त्यामुळे परमार्थाला काळिमा लागून प्रापंचिक लोक त्यांची थट्टा करतात. ।।५७।।

(पुढील ओव्या वाचताना चारशे वर्षांपूर्वीची समाजरचना लक्षात घ्यावी. आजही जातींच्या उतरंडी पुसट होत असल्या तरी प्रतिष्ठा, जात, संपत्ती, सत्ता, कीर्ती इ. उतरंडी आहेतच.)

नीच यातीचा गुरु । तोहि कानकोंडा विचारु । ब्रह्मसभेस जैसा चोरु । तैसा दडे ।।५८।।

हलक्या जातीच्या व्यक्तीला गुरू म्हणून स्वीकारले तर शिष्याची वेळोवेळी पंचाईत होते. कारण ब्राह्मणांच्या सभेत त्याला प्रतिष्ठा नसते. ।।५८।।

ब्रह्मसभे देखतां । त्याचे तीर्थ नये घेतां । अथवा प्रसाद सेवितां । प्राश्चित पडे ।।५९।।

ब्रह्मसभेत त्या गुरूकडून तीर्थप्रसाद घेता येत नाही. घेतलेच तर धर्मरूढीनुसार प्रायश्चित्त घ्यावे लागते. ।।५९।।

तीर्थप्रसादाची सांडी केली । तेथें नीचता दिसोन आली । गुरुभक्ति ते सटवली । येकायेकी ।।६०।।

तीर्थप्रसाद न घ्यावा तर गुरूंचा अपमान होऊन गुरुभक्तीच डागळते. गुरुशिष्य नात्यात बिघाड होतो. ।।६०।।

गुरूची मर्यादा राखतां । ब्राह्मण क्षोभती तत्वतां । तेथें ब्राह्मण्य रक्षूं जाता । गुरुक्षोभ घडे ।।६१।।

श्रीगुरूंचा मान राखावा तर ब्राह्मणांच्या दृष्टीने धर्ममर्यादा मोडते व स्वत:चे ब्राह्मण्य सांभाळू म्हटले तर श्रीगुरूंचा अपमान होतो. गुरुद्रोह घडतो. ।।६१।।

ऐसीं सांकडीं दोहींकडे । तेथें प्रस्तावा घडे । नीच यातीस गुरुत्व न घडे । याकारणें ।।६२।।

अशी दोन्ही बाजूने कोंडी होऊन पश्चात्तापाची पाळी येते. म्हणून हलक्या जातीसाठी गुरुत्व नाही. ।।६२।।

तथापि आवडी घेतली जीवें । तरी आपणचि भ्रष्टावें । बहुत जनांसी भ्रष्टवावें । हें तों दूषणचि कीं ।।६३।।

पण नीच यातीच्या गुरूविषयी श्रद्धा वाटलीच तर; आपण एकट्यानेच रूढी मोडावी. इतरांनाही भरीला घालून परंपरा मोडणे दूषणास्पद आहे. ।।६३।।

आतां असो हा विचारू । स्वयातीचा पाहिजे गुरु । नाहीं तरी भ्रष्टाकारु । नेमस्त घडे ।।६४।।

आतां हा विचार पुरे. एकूण गुरू कमीत कमी स्वत:च्या जातीचा असावा. अन्यथा परंपरा मोडतात. ।।६४।।

जे जे कांहीं उत्तम गुण । तें तें सद्‌गुरुचें लक्षण । तथापि सांगों वोळखण । होये जेणें ।।६५।।

सद्‌गुरू जीवनाच्या अनेक क्षेत्रांत असतात. ते त्या त्या क्षेत्रात सर्वश्रेष्ठ गुणांचे असतात. त्यांचा आता थोडा परिचय करून देतो. ।।६५।।

येक गुरु येक मंत्रगुरु । येक यंत्रगुरु येक तांत्रगुरु । येक वस्तादगुरु येक राजगुरु । म्हणती जनीं ।।६६।।

येक कुळगुरु येक मानिला गुरु । येक विद्यागुरु येक कुविद्यागुरु । येक असद्‌गुरु येक यातिगुरु । दंडकर्ते ।।६७।।

येक मातागुरु येक पितागुरु । येक राजागुरु येक देवगुरु । येक बोलिजे जगद्‌गुरु । सकळकळा ।।६८।।

ऐसे हे सत्रा गुरु । याहिवेगळे आणीक गुरु । ऐक तयांचा विचारु । सांगिजेल ।।६९।।

येक स्वप्नगुरु येक दीक्षागुरु । येक म्हणती प्रतिमागुरु । येक म्हणती स्वयें गुरु । आपला आपण ।।७०।।

जे जे यातीचा जो व्यापारु । ते ते त्याचे तितुके गुरु । याचा पाहातां विचारु । उदंड आहे ।।७१।।

अक्षर ओळख, मंत्र देणे, यंत्रोपासना, तंत्र, कुस्ती गुरू, राजगुरू, कुळगुरू, मानलेला गुरू, विद्यागुरू, अघोरी विद्या, निंद्यगुरू, जातीचा नियामक गुरू, देवगुरू, जगद्‌गुरू. ह्या सतरा गुरूंशिवाय स्वप्नात मंत्र देणारे, दीक्षा देणारे, प्रतिमारूप गुरू, आपलाच आपण गुरू, त्या त्या जातीचा व्यवसाय शिकवणारे गुरू इत्यादी सर्वांना सद्‌गुरू असेच व्यवहारात म्हणतात. ।।६६-७१।।

असो ऐसे उदंड गुरु । नाना मतांचा विचारु । परी जो मोक्षदाता सद्‌गुरु । तो वेगळाचि असे ।।७२।।

आता ही यादी पुरे. सर्वांची मते सांगून झाली. पण मोक्ष देणारा परात्पर गुरू ह्या सगळ्यांहून वेगळाच असतो. ।।७२।।

नाना सद्विद्येचे गुण । याहिवरी कृपाळूपण । हें सद्‌गुरूंचे लक्षण । जाणिजे श्रोतीं ।।७३।।

न्याय, नीती, धर्म, अध्यात्मविद्या इ. अनेक गुणांबरोबर दया हे श्रीगुरूंचे मुख्य लक्षण श्रोत्यांनी लक्षात घ्यावे. ।।७३।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'गुरूलक्षणनाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'गुरूलक्षण' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक पाचवा : मंत्रांचा

समास तिसरा : शिष्यलक्षण

॥श्रीरामसमर्थ॥

मागां सद्‌गुरूचें लक्षण । विशद केलें निरूपण । आतां सच्छिष्याची वोळखण । सावध ऐका ।।१।।

मागील समासांत गुरुलक्षणे विस्ताराने सांगितली. आता अधिकारी शिष्याची लक्षणे सावधपणे ऐका. ॥१॥

सद्‌गुरुविण सच्छिष्य । तो वायां जाय निशेष । कां सच्छिष्येंविण विशेष । सद्‌गुरु सिणे ।।२।।

अधिकारी शिष्याला परात्पर श्रीगुरूंचा लाभ झाला नाही तर त्याचे जीवन व तळमळ व्यर्थ जाते. उलट श्रीगुरूंना अधिकारी शिष्य मिळाला नाही तर अनधिकाऱ्यांशी प्रसंग येऊन नुसता त्रासच होतो. ॥२॥

उत्तम भूमि शोधिली शुद्ध । तेथें बीज पेरिलें किडखाद । कां तें उत्तम बीज परि संमंध । खडकेंसि पडिला ।।३।।

मशागत केलेली सुपीक जमीन असून जर पेरलेले बी किडके असेल किंवा बी उत्तम असून जमीन खडकाळ असेल– ॥३॥

तैसा सच्छिष्य तें सत्पात्र । परंतु गुरु सांगें मंत्र तंत्र । तेथें अरत्र ना परत्र । कांहींच नाहीं ।।४।।

तर पीक येत नाही. त्याप्रमाणे अधिकारी शिष्याला गुरूने भाकड मंत्र तंत्र सांगितले तर त्याचा ऐहिक व पारलौकिक दोन्ही घात होतो. ॥४॥

अथवा गुरु पूर्ण कृपा करी । परी शिष्य अनाधिकारी । भाग्यपुरुषाचा भिकारी । पुत्र जैसा ।।५।।

किंवा अधिकारी श्रीगुरूने अनुग्रह देऊनही शिष्य अनधिकारी असेल तर भाग्यवंताचा पुत्र करंटा असावा त्याप्रमाणे होते. ॥५॥

तैंसें येकाविण येक । होत असे निरार्थक । परलोकींचे सार्थक । तें दुऱ्हावे ।।६।।

म्हणून दोघेही एकमेकावाचून निरर्थक ठरून मोक्ष दूरच रहातो. ॥६॥

म्हणौनि सद्‌गुरु आणी सच्छिष्य । तेथें न लगती सायास । त्यां उभयतांचा हव्यास । पुरे येकसरा ।।७।।

परंतु सद्‌गुरू व सत्‌शिष्य दोघांचा संयोग घडला की मोक्षातील कठीणपणा नाहीसा होऊन दोघांना उत्साह निर्माण होऊन त्यांचे सार्थक होते. ॥७॥

सुभूमि आणी उत्तम कण । उगवेना प्रजन्येंविण । तैसें अध्यात्मनिरूपण । नस्तां होये ।।८।।

भूमी सुपीक आहे व बीजही उत्कृष्ट आहे पण पाणी नसेल तर जसे पीक येत नाही तसे सत्‌शिष्य व श्रीगुरू असून अध्यात्मशास्त्राचे चिंतन नसेल तर मोक्ष सिद्ध होत नाही. ॥८॥

सेत पेरिलें आणी उगवलें । परंतु निगेविण गेलें । साधनेंविण तैसें जालें । साधकांसी ।।९।।

तसेच शेत पेरले, उत्तम पीक आले, पण पिकाची निगा राखली नाही, तर पीक नष्ट होते. त्याप्रमाणे शिष्याने प्रत्यक्ष साधना केली नाही, तर मोक्ष लाभत नाही. ॥९॥

जंवरी पीक आपणास भोगे । तंवरी अवघेंचि करणें लागे । पीक आलियां हि उगें । राहोंचि नयें ।।१०।।

धान्य घरात येईपर्यंत सर्वच बाजू सांभाळाव्या लागतात व पीक उगवल्यावरही स्वस्थ बसून चालत नाही– ॥१०॥

तैसें आत्मज्ञान जालें । परी साधन पाहिजे केलें । येक वेळ उदंड जेविलें । तऱ्हीं सामग्री पाहिजे ।।११।।

त्याप्रमाणे ब्रह्मविद्येने जीव ब्रह्मैक्याचे ज्ञान झाले तरी साधन करावेच लागते. एकदा पोटभर जेवले तरी पुढच्या जेवणासाठी सामग्री तयार लागते. तसे ज्ञान दृढ, अपरोक्ष होईपर्यंत साधना करावीच. ॥११॥

म्हणौन साधन अभ्यास आणी सद्‌गुरु । सच्छिष्य आणी सच्छास्त्रविचारु । सत्कर्म सद्वासना पारु । पाववी भवाचा ।।१२।।

म्हणून ब्रह्मविद्येचा अभ्यास, सद्‌गुरू, प्रत्यक्ष साधना, सतशिष्य, सारासारविचार, सत्कर्म व सद्बुद्धी एवढी सामग्री मोक्षाला जरूर हवी. ॥१२॥

सदुपासना सत्कर्म । सत्क्रिया आणि स्वधर्म । सत्संग आणी नित्य नेम । निरंतर ।।१३।।

शास्त्रशुद्ध उपासना, विहितकर्म, न्यायनीती, स्वधर्म, सत्संग व नियमित अखंड साधना– ॥१३॥

ऐसें हें अवघें चि मिळे । तरी च विमळ ज्ञान निवळे । नाहीं तरी पाषांड संचरें बळें । समुदाईं ।।१४।।

हे असे सर्वच एकत्र आले तरच शुद्ध ब्रह्मज्ञान स्थिर होते. अन्यथा समाजात पाखंडमत बलवान बनून त्याचा झपाट्याने प्रसार होतो. ॥१४॥

येथे शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्‌गुरुपासीं । सद्‌गुरु पालटी अवगुणासी । नाना येत्नें करूनी ।।१५।।

ह्या सर्व प्रकारात शिष्याची जबाबदारी फार कमी आहे. श्रीगुरूंवरच सर्व अवलंबून आहे. कारण अनेक यत्न करून ते शिष्यात परिवर्तन घडवून आणतात. ॥१५॥

सद्‌गुरुचेनि असच्छिष्य पालटे । परंतु सच्छिष्यें असद्‌गुरु न पालटे । कां जें थोरपण तुटे । म्हणौनिया ।।१६।।

शिष्य अनधिकारी असेल तर श्रीगुरूंना त्याला अधिकारसंपन्न होण्यासाठी मदत करता येते. परंतु अधिकारी शिष्य अनधिकारी गुरूला अधिकारी करू शकत नाही. ह्या नात्यातील श्रीगुरूंच्या मोठेपणाला त्यामुळे धक्का लागतो. शिष्याने अधिकारीच गुरू करावा. ॥१६॥

याकारणें सद्‌गुरु पाहिजे । तरीच सन्मार्ग लाहिजे । नाहीं तरी होईजे । पाषांडा वरपडे ।।१७।।

म्हणून सद्‌गुरू अनिवार्य असून तेच सर्व दृष्टीने साधकाला योग्य मार्गावर ठेवतात. त्यांच्या अभावी पाखंडीपणाच वाढीला लागतो. ॥१७॥

येथें सद्‌गुरुचि कारण । येर सर्व निःकारण । तथापि सांगों वोळखण । सच्छिष्याची ।।१८।।

परमार्थ प्रांतात सद्‌गुरूंनाच प्राधान्य आहे. इतर सर्व गौण आहे. तरी सत्‌शिष्याची लक्षणे सांगतो. ॥१८॥

मुख्य सच्छिष्याचे लक्षण । सद्‌गुरुवचनीं विश्वास पूर्ण । अनन्यभावें शरण । त्या नांव सच्छिष्य ।।१९।।

सत् शिष्याचे मुख्य लक्षण म्हणजे त्याची श्री गुरूंच्या उपदेशावर पूर्ण श्रद्धा. त्यांच्याशिवाय अन्य कोणाकडूनच आपले कल्याण होणार नाही असा विश्वास असावा. ‘मला वाटते’ ह्याची जागा श्रीगुरूंच्या आज्ञेने घ्यावी. (पारमार्थिक संदर्भात.) ॥१९॥

शिष्य पाहिजे निर्मळ । शिष्य पाहिजे आचारसीळ । शिष्य पाहिजे केवळ । विरक्त अनुतापी ।।२०।।

शिष्य मनाने पवित्र, सदाचारसंपन्न, अनासक्त व ‘परमार्थावाचून आजपर्यंतचे जीवन वाया गेले’ असा निश्चय झालेला असावा. ॥२०॥

शिष्य पाहिजे निष्ठावंत । शिष्य पाहिजे सुचिष्मंत । शिष्य पाहिजे नेमस्त । सर्वप्रकारीं ।।२१।।

श्रीगुरू, शास्त्र व साधना ह्यांचेविषयी गाढ निष्ठा असलेला, शुद्ध बुद्धी, शिस्तबद्ध व मर्यादशील शिष्य असावा. ॥२१॥

शिष्य पाहिजे साक्षपी विशेष । शिष्य पाहिजे परम दक्ष । शिष्य पाहिजे अलक्ष । लक्षी ऐसा ।।२२।।

सतत प्रयत्नशील, जराही ढिलेपणा नसणारा व वृत्तिज्ञानाचा विषय नसणाऱ्या ब्रह्माचा जणू वेध घेण्याइतका सूक्ष्मबुद्धीचा असावा. ॥२२॥

शिष्य पाहिजे अति धीर । शिष्य पाहिजे अति उदार । शिष्य पाहिजे अति तत्पर । परमार्थविषईं ।।२३।।

मुळीच उतावीळ नसणारा, मनाने फार मोठा व परमार्थमार्गात अत्यंत तत्पर असावा. ॥२३॥

शिष्य पाहिजे परोपकारी । शिष्य पाहिजे निर्मत्सरी । शिष्य पाहिजे अर्थांतरी । प्रवेशकर्ता ।।२४।।

परोपकार हा सहजस्वभाव झालेला, कोणाचाच मत्सर न करणारा व शब्दाचा वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, गर्भितार्थ, ध्वन्यार्थ इ. सहज लक्षात येणारा हवा. ॥२४॥

शिष्य पाहिजे परम शुद्ध । शिष्य पाहिजे परम सावध । शिष्य पाहिजे अगाध । उत्तम गुणाचा ।।२५।।

अत्यंत शुद्ध आचारविचाराचा, कर्तव्ये व साधना ह्या बाबतीत सावध व अनेक सद्‌गुणांनी संपन्न हवा. ॥२५॥

शिष्य पाहिजे प्रज्ञावंत । शिष्य पाहिजे प्रेमळ भक्त । शिष्य पाहिजे नीतिवंत । मर्यादेचा ।।२६।।

सूक्ष्माचा ठाव घेणारी बुद्धी, प्रेमलक्षणा भक्ती व न्यायनीती व मर्यादांचा संगम त्याचेपाशी असावा. ॥२६॥

शिष्य पाहिजे युक्तिवंत । शिष्य पाहिजे बुद्धिवंत । शिष्य पाहिजे संतासंत । विचार घेता ।।२७।।

तर्ककुशल, तैलबुद्धी व सत्य-असत्याचा तत्काळ निवाडा करणारा असावा. ॥२७॥

शिष्य पाहिजे धारिष्टाचा । शिष्य पाहिजे दृढ व्रताचा । शिष्य पाहिजे उत्तम कुळीचा । पुण्यसीळ ।।२८।।

न डगमगणारा, अत्यंत निश्चयी, सदाचारसंपन्न कुटुंबातील व पुण्यवान असावा. ॥२८॥

शिष्य असावा सात्विक । शिष्य असावा भजक । शिष्य असावा साधक । साधनकर्ता ।।२९।।

सत्वगुणसंपन्न, प्रेमाने भगवत् भजन करणारा, व प्रत्यक्ष साधना करणारा असावा. ॥२९॥

शिष्य असावा विश्वासी । शिष्य असावा कायाक्लेशी । शिष्य असावा परमार्थासी । वाढऊं जाणे ।।३०।।

सद्‌गुरूवर विश्वास ठेवणारा, गुरुसेवा व साधनेसाठी कष्ट करणारा परमार्थाचा प्रसारक असावा. ॥३०॥

शिष्य असावा स्वतंत्र । शिष्य असावा जगमित्र । शिष्य असावा सत्पात्र । सर्व गुणें ।।३१।।

पराधीन नसणारा, अजातशत्रू व सर्व सद्‌गुणांचा ठेवा असलेला असावा. ॥३१॥

शिष्य असावा सद्विद्येचा । शिष्य असावा सद्भावाचा । शिष्य असावा अंतरींचा । परम शुद्ध ।।३२।।

सर्व सद्विद्या लक्षणे असणारा (दा. बो. २-८) शुद्ध भावाचा व अंत:करणाने अतिशुद्ध असावा. ॥३२॥

शिष्य नसावा अविवेकी । शिष्य नसावा गर्भसुखी । शिष्य असावा संसारदु:खी । संतप्त देही ।।३३।।

व्यवहार व परमार्थ ह्या दोन्हींसंबंधी विवेकात उणीव नसावी, गर्भश्रीमंत नसावा व संसाराचे चटके बसून तापत्रयाने पोळलेला असावा. ॥३३॥

जो संसारदु:खे दु:खावला । जो त्रिविधतापें पोळला । तोचि अधिकारी जाला । परमार्थाविषीं ।।३४।।

कारण जो संसारातील अनेक दु:खांनी गांजून गेल्याने विरक्त होतो (वैतागलेला नव्हे.) त्यालाच पारमार्थिक सुखाची निकड निर्माण होते. ॥३४॥

बहु दु:ख भोगिलें जेणें । तयासीच परमार्थ बाणे । संसारदु:खाचेनि गुणें । वैराग्य उपजे ।।३५।।

ज्याने अनेक दु:खे सोसली आहेत त्याला खरे वैराग्य निर्माण होते. ती दु:खेच त्याला विरक्त करतात. ह्यातून विवेकासह वैराग्य बाणते. ॥३५॥

जया संसाराचा त्रास । तयासीच उपजे विश्वास । विस्वासबळें दृढ कास । धरिली सद्गुरुची ।।३६।।

जो जीवनातील कायिक, कौटुंबिक, व्यावसायिक, सामाजिक व राजकीय समस्यांनी त्रस्त होतो त्याची जीवनाची आसक्ती नष्ट होऊन सद्गुरूंची ओढ लागून त्यांच्या उपदेशावर श्रद्धा जडते. ती पुढे अधिकाधिक दृढ होत जाते. ॥३६॥

अविस्वासें कास सोडिली । ऐंसी बहुतेक भवीं बुडाली । नाना जळाचरीं तोडिलीं । मध्येंचि सुखदु:खें ।।३७।।

श्रद्धा डळमळीत झाल्याने ज्यांनी सद्गुरूंचा त्याग केला असे बहुतेक साधक भवसागरात गटांगळ्या खातात. सुखदु:खांचे द्वंद्वरूप जलचर त्यांचे लचके तोडू लागतात. ॥३७॥

याकारणें दृढ विस्वास । तोचि जाणावा सच्छिष्य । मोक्षाधिकारी विशेष । आग्रगण्यु ।।३८।।

म्हणून निरपेक्ष दृढश्रद्धा असलेलाच सत्‌शिष्य असतो. तो मोक्षाभिमुख असल्याने श्रेष्ठ असतो. ॥३८॥

जो सद्गुरुवचनें निवाला । तो सायोज्यतेचा आंखिला । संसारपांगें पांगिला । न वचे कदा ।।३९।।

श्रीगुरूंच्या यथार्थ उपदेशाने पूर्ण समाधान होऊन जो सायुज्यमुक्तीच्या साधनेवर आरूढ होतो तोच श्रेष्ठ शिष्य होय. संसाराच्या आसक्तीच्या बंधनात अडकलेला कधीच सत्शिष्य होत नाही. ॥३९॥

सद्गुरुहून देव मोठा । जयास वाटे तो करंटा । सुटला वैभवाचा फांटा । सामर्थ्यपिसें ।।४०।।

सद्गुरूपेक्षा ईश्वर श्रेष्ठ आहे असे जो मानतो तो परमार्थदृष्ट्या करंटा समजावा. ‘ईश्वर सर्व शक्तिमान आहे.’ व तो प्रसन्न झाला तर प्रापंचिक वैभव मिळेल ह्या कल्पनेच्या आडमार्गाला (फाटा) तो वळतो. ॥४०॥

सद्गुरुस्वरूप तें संत । आणी देवांस मांडेल कल्पान्त । तेथे कैंचे उरेल सामर्थ्य । हरिहरांचें ।।४१।।

सद्गुरू ब्रह्मरूप असल्याने नित्य, सत्य व अनंत असतात. कल्पाच्या शेवटी ईश्वरही नष्ट होतो! त्या वेळी हरी व शंकर ह्यांचे सर्वशक्तिमान हे बिरूद कसे टिकेल? ॥४१॥

म्हणौन सद्गुरुसामर्थ्य आधीक । जेथें आटती ब्रह्मादिक । अल्पबुद्धी मानवी रंक । तयांसि हें कळेना ।।४२।।

म्हणून हरिहरांच्याही शक्तीचे अधिष्ठान असलेले ब्रह्मरूप सद्गुरू श्रेष्ठ असतात. त्या ब्रह्मरूपातच हरिहरांचाही लय होतो. मानवी बुद्धी सकामतेने दरिद्री झालेली असल्याने तिला हे कळत नाही व पटतही नाही. ॥४२॥

गुरुदेवास बराबरी । करी तो शिष्य दुराचारी । भ्रांति बैसली अभ्यांतरी । सिद्धांत नेणवे ।।४३।।

श्रीगुरू व ईश्वर हे सारखेच आहेत असे मानणाऱ्या शिष्याचे श्रीगुरूंशी योग्य आचरण होणार नाही. ‘ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति’ (मुं. ३-२-९) असा सिद्धांत आहे. त्यामुळे ब्रह्म जाणणारे श्रीगुरू ब्रह्म असतात. ब्रह्माच्या मायेतील आभासाला ईश्वर म्हणतात, किंवा प्रतिबिंब म्हणतात. ब्रह्माला बिंब म्हणतात. भ्रमामुळे हे कळत नाही. (शास्त्रकृपेशिवाय भ्रम जात नाही.) ॥४३॥

देव मनुषीं भाविला । मंत्रीं देवपणासी आला । सद्गुरु न वचे कल्पिला । ईश्वराचेनि ।।४४।।

देव ही माणसाची कल्पना आहे. मंत्र म्हणून मूर्तीला देवत्व दिले जाते. माणूस तर राहोच, पण ईश्वरही श्रीगुरूरूप ब्रह्माची कल्पना करू शकत नाही. ॥४४॥

म्हणोनि सद्गुरु पूर्णपणें । देवाहून आधीक कोटिगुणें । जयासि वर्णितां भांडणें । वेदशास्त्री लागलीं ।।४५।।

म्हणून ब्रह्मरूप गुरू ईश्वररूप देवाहून अत्यंत श्रेष्ठ आहेत. ब्रह्मस्वरूपाचा निर्णय करताना केवलाद्वैत, शुद्धाद्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैताद्वैत असे अनेक वाद निर्माण झाले. श्रीगुरूही असेच अनाकलनीय होत. ॥४५॥

असो सद्‌गुरुपदापुढें । दुजें कांहींच न चढे । देवसामर्थ्य तें केवढें । मायाजनित ।।४६।।

श्रीगुरूंच्यासमोर दुसऱ्या कोणाचाच टिकाव लागत नाही. ईश्वराला किंवा देवतांना मिळालेले सामर्थ्य परब्रह्माच्या मायिक शक्तीपासून उसने मिळते म्हणजेच ते त्यांना श्रीगुरूंकडून मिळालेले असते. ॥४६॥

अहो सद्‌गुरुकृपा जयासी । सामर्थ्य न चले तयापासीं । ज्ञानबळें वैभवासी । तृणतुछ केलें ।।४७।।

ज्याला श्रीगुरुकृपा लाभली त्याला सामर्थ्याची काहीच किंमत वाटत नाही. ब्रह्मज्ञानाच्या वैभवापुढे त्याला शक्तीचे वैभव अत्यंत क्षुल्लक वाटते. ॥४७॥

सद्‌गुरुकृपेचेनि बळें । अपरोक्षज्ञानाचेनि उसाळें । मायेसहित ब्रह्मांड सगळें । दृष्टीस न ये ।।४८।।

श्रीगुरुकृपेच्या सामर्थ्याने ब्रह्मानुभव प्रत्यक्ष आल्यावर माया व मायाकार्य सृष्टी बाधित होते. ॥४८॥

ऐसें सच्छिष्याचें वैभव । सद्‌गुरुवचनीं दृढ भाव । तेणें गुणें देवराव । स्वयेंचि होती ।।४९।।

श्रीगुरूंच्या उपदेशावर दृढ विश्वास असल्याने शिष्य स्वत:च श्रीगुरूंच्या स्थितीला पोहोचतो. ब्रह्म होतो. ॥४९॥

अंतरीं अनुतापें तापले । तेणें अंतर शुद्ध जालें । पुढें सद्‌गुरुवचनें निवाले । सच्छिष्य ऐसे ।।५०।।

दु:खरूप प्रपंचाचे मिथ्यात्व अंत:करणात ठसल्याने ज्यांचे अंत:करण शुद्ध होते व नंतर श्रीगुरूंच्या उपदेशाने तृप्त होते तेच खरे सत् शिष्य. ॥५०॥

लागतां सद्‌गुरुवचनपंथें । जालें ब्रह्मांड पालथें । तरी जयाच्या शुद्ध भावार्थें । पालट न धरिजे ।।५१।।

श्रीगुरूंच्या उपदेशानुसार साधनामार्गावरून वाटचाल करताना जीवनात वाटेल ती उलथापालथ झाली तरी ज्यांच्या श्रीगुरूंवरील निष्ठेत जराही फरक पडत नाही– ॥५१॥

शरण सद्‌गुरुस गेले । सच्छिष्य ऐसे निवडले । क्रियापालटें जाले । पावन ईश्वरीं ।।५२।।

असे गुरुशरणागत शिष्य अविद्याजन्य आचारविचार संपूर्ण बदलल्यामुळे श्रीगुरूंच्या कसोटीला उतरून ईश्वराहून शुद्ध ब्रह्म होतात. ॥५२॥

ऐसा सद्भाव अंतरीं । तेचि मुक्तीचे वाटेकरी । येर माईक वेषधारी । असच्छिष्य ।।५३।।

एवढी निष्ठा असलेलेच मोक्षाचे अधिकारी होतात. इतर वरवर शिष्यत्व मिरविणारे असत् शिष्य होत. ॥५३॥

वाटे विषयांचें सुख । परमार्थ संपादणें लौकिक । देखोवेखीं पढतमूर्ख । शरण गेले ।।५४।।

सुख विषयातूनच मिळते असा निश्चय कायम ठेवून ‘प्रतिष्ठेचा एक विषय’ म्हणून परमार्थ करणारे पढतमूर्ख वेषधारी साधू पाहून किंवा दुसरे शरण गेलेले पाहून स्वत:ही शरण जातात. ॥५४॥

जाली विषईं वृत्ति अनावर । दृढ धरिला संसार । परमार्थचर्चेचा विचार । मळिण जाला ।।५५।।

सुखासाठी अनावरपणे विषयचिंतनात राहून संसाराची आसक्ती वाढल्याने आत्मानात्मविचार गढूळ होतो. ॥५५॥

मोड घेतला परमार्थाचा । हव्यास धरिला प्रपंचाचा । भार वाहिला कुटुंबाचा । काबाडी जाला ।।५६।।

परमार्थाचे वळण सोडून प्रपंचाचा धोपट मार्ग घट्ट धरून कुटुंबपोषणाचा तो भार वाहणारा हमाल होतो. ॥५६॥

मानिला प्रपंचीं आनंद । केला परमार्थें विनोद । भ्रांत मूढ मतिमंद । लोधला कामीं ।।५७।।

खरे सुख प्रपंचात आहे असा निश्चय तसाच राहून परमार्थ प्रांतात बागडणारा भ्रमिष्ट, मोहित व बुद्धिहीन माणूस कामाकडे ओढला जातो. ॥५७॥

सूकर पूजिलें विलेपनें । म्हैसा मर्दिला चंदनें । तैसा विषई ब्रह्मज्ञानें । विवेके बोधिला ।।५८।।

डुकराच्या सर्वांगाला उटणें लावावे, रेड्याला अंगभर चंदनाचा लेप लावावा, त्याप्रमाणे विषयासक्ताला ब्रह्मज्ञान सांगणे आहे. ।।५८।।

रासभ उकरडां लोळे । तयासि परिमळसोहळे । उलूक अंधारीं पळे । तया केवी हंसपंगती ।।५९।।

गाढवाला उकिरड्यावरच लोळणे आवडते. त्याला सुगंधी द्रव्याची काय किंमत! घुबड अंधारातच फिरते. त्याने हंसाबरोबर कसा विहार करावा? ।।५९।।

तैसा विषयदारींचा बराडी । घाली अध:पतनीं उडी । तयास भगवंत आवडी । सत्संग कैंचा ।।६०।।

त्याप्रमाणे पंचविषयांच्या दारात पडून राहिलेला लंपट वेगाने अध:पतनाकडे जातो. त्याला देवाचे प्रेम व सत्संग याविषयीची आवड कोठून निर्माण होणार? ।।६०।।

वर्ती करून दांताळी । स्वानपुत्र हाडें चगळी । तैसा विषई तळमळी । विषयसुखाकारणें ।।६१।।

हाड चघळताना जिभेला जखम होऊन येणाऱ्या रक्ताची चव हाडाची आहे असे कुत्र्याला वाटते. म्हणून ते हाडे चघळीतच राहते. त्याप्रमाणे आत्मसुख विषयाच्या निमित्ताने अनुभवाला येते हे ठाऊक नसणारा विषयासक्त विषयांसाठी तळमळतो. ।।६१।।

तया स्वानमुखीं परमान्न । कीं मर्कटास सिंहासन । तैसें विषयशक्तां ज्ञान । जिरेल कैचें ।।६२।।

त्या कुत्र्याच्या मुखात पक्वान्न घालावे तर पचत नाही, माकडाला राजसिंहासनावर बसवावे, तर सोसत नाही त्याप्रमाणे विषयासक्ताला ब्रह्मज्ञान आवडत नाही व उपयोगी नाही ।।६२।।

रासभें राखतां जन्म गेला । तो पंडितांमध्ये प्रतिष्ठिला । न वचे तैसा आशक्ताला । परमार्थ नाहीं ।।६३।।

गाढवे राखण्यात जन्म गेलेल्याला पंडितांच्या सभेत जराही रस वाटत नाही. त्याप्रमाणे विषयासक्ताला परमार्थात रस नसतो. ।।६३।।

मिळाला राजहंसाचा मेळा । तेथें आला डोंबकावळा । लक्षून विष्ठेचा गोळा । हंस म्हणवी ।।६४।।

मोत्याचा चारा खाणाऱ्या राजहंसांमध्ये विष्ठेवर लक्ष ठेवून कोणी डोंबकावळा शिरून स्वत:ला हंस समजू लागेल! ।।६४।।

तैसें सज्जनांचे संगती । विषई सज्जन म्हणविती । विषय आमेद्य चित्तीं । गोळा लक्षिला ।।६५।।

त्याप्रमाणे संतांचे संगतीत कोणी विषयासक्त येऊन बसला तरी त्याचे चित्त विषयानेच दाट भरलेले असते (मेद्य = दाट. आमेद्य = इथून तिथून दाट) तिकडेच त्याचे लक्ष असते. ।।६५।।

काखे घेऊनियां दारा । म्हणे मज संन्यासी करा । तैसा विषई सैरावैरा । ज्ञान बडबडी ।।६६।।

पत्नीच्या कमरेभोवती हाताने विळखा घालून कोणी संन्यासदीक्षा घेण्यासाठी यावा त्याप्रमाणे विषयासक्त ब्रह्मज्ञानाची स्वैर बडबड करतो. ।।६६।।

असो ऐसे पढतमूर्ख । ते काय जाणती अद्वैतसुख । नारकी प्राणी नर्क । भोगती स्वइच्छा ।।६७।।

एकूण हे पढतमूर्ख अद्वैतानुभवापासून नेहमी दूरच असतात. नरकातील प्राणी स्वत:च्याच इच्छेने नरकाचे दु:ख भोगत बसतात. ।।६७।।

वैषेची करील सेवा । तो कैसा मंत्री म्हणावा । तैसा विषयदास मानावा । भक्तराज केवी ।।६८।।

वेश्येच्या तालावर नाचणाऱ्याला मंत्रिपद कसे द्यावे? किंवा जो वेश्येलाच वश होऊन रहातो त्याने वशीकरणाचा मंत्र सिद्ध केला असे कसे म्हणावे? विषयांना वश झालेला तो निर्विषय ब्रह्माचा अनुभव घेणे शक्य नाही. ।।६८।।

तैसें विषई बापुडे । त्यांस ज्ञान कोणीकडे । वाचाळ शाब्दिक बडबडे । वरपडे जाले ।।६९।।

तसे विषयेच्छेने दीन झालेल्यांना ब्रह्मज्ञान कसे होईल? त्यांचा प्रभाव फक्त शब्दज्ञानाच्या रटाळ बडबडीपुरताच असतो. ।।६९।।

ऐसे शिष्य परमनष्ट । कनिष्ठांमध्यें कनिष्ठ । हीन अविवेकी आणी दृष्ट । खळ खोटे दुर्जन ।।७०।।

असे अत्यंत खोटे, नालायक, हीन, अविवेकी, दुष्ट, खळ, खोटे व दुर्जन भक्त असत् होत. ।।७०।।

ऐसे जे पापरूप । दीर्घदोषी वज्रलेप । तयांस प्राश्चीत अनुताप । उद्धवतां आहे ।।७१।।

पापमय व दोष वज्रलेप झालेले महादोषी त्यांनाही अनुताप हेच प्रायश्चित्त आहे. ।।७१।।

तेंहिं पुन्हां शरण जावें । सद्गुरूस संतोषवावें । कृपादृष्टी जालियां व्हावें । पुन्हां शुद्ध ।।७२।।

त्यांनी पुन्हा श्रीगुरूंना शरण जावे, त्यांना संतुष्ट करून त्यांच्या कृपादृष्टीने पुन्हा शुद्ध व्हावे. ।।७२।।

स्वामीद्रोह जया घडे । तो यावश्चंद्र नरकीं पडे । तयास उपावचि न घडे । स्वामी तुष्टल्यावांचुनी ।।७३।।

जे श्रीगुरूंचा द्रोह करतात म्हणजे आज्ञा मानीत नाहीत ते कल्पान्तापर्यंत नरकात पडतात. श्रीगुरूंच्या संतोषावाचून त्यांना सुटकेचा एकही मार्ग उपलब्ध नाही. ।।७३।।

स्मशानवैराग्य आलें । म्हणोन लोटांगण घातलें । तेणें गुणें उपतिष्ठलें । नाहीं ज्ञान ।।७४।।

कोणाचा मृत्यू पाहून तात्पुरते वैराग्य येऊन श्रीगुरूंच्या पायावर डोके ठेवण्याने कोणाला व कधीच ब्रह्मज्ञान होत नाही. ।।७४।।

भाव आणिला जायाचा । मंत्र घेतला गुरूचा । शिष्य जाला दो दिसांचा । मंत्राकारणें ।।७५।।

ओढूनताणून आणल्यामुळे जो भाव टिकणारा नाहीच त्या भावाने श्रीगुरूंचा मंत्र घेणारा दोन दिवसांचा शिष्य केवळ मंत्रार्थी असतो. ।।७५।।

ऐसे केले गुरु उदंड । शब्द सिकला पाषांड । जाला तोंडाळ तर्मुंड । माहापाषांडी ।।७६।।

असे अनेक गुरूंचे मंत्र घेऊन हा वेदांच्या मनोगताविरुद्ध वागणारा (पाषांड) शब्दज्ञान शिकून वाचाळ, लुडबुड्या व अत्यंत स्वैर बनतो. (पाषांड म्हणजे नास्तिक. तो गुरूचा मंत्रच घेणार नाही. म्हणून पाषांड म्हणजे स्वैर असा अर्थ केला.) ।।७६।।

घडी येक रडे आणी पडे । घडी येक वैराग्य चढे । घडी येक अहंभाव जडे । ज्ञातेपणाचा ।।७७।।

घटकेत भाव जागृतीचा आव आणून रडतो व पायावर दंडवत घालतो, घटकेत अत्यंत वैराग्याची भूमिका घेतो व दुसऱ्या क्षणी शब्दज्ञानाने फुगून जातो. ।।७७।।

घडी येक विस्वास धरी । सवेंच घडी येक गुर्गुरी । ऐसे नाना छंद करी । पिसाट जैसा ।।७८।।

एक दिवस अत्यंत श्रद्धेचा उजाडतो तर दुसऱ्याच दिवशी श्रीगुरूंवर गुरगुरू लागतो असा वेड्यासारखे अनेक चाळे करतो. ।।७८।।

काम क्रोध मद मत्सर । लोभ मोह नाना विकार । अभिमान कापट्य तिरस्कार । हृदई नांदती ।।७९।।

काम, संताप, मस्ती, मत्सर, लोभ, मोहादी विकार, अहंकार, कपटीपणा व तिरस्कार अंत:करणात ठाण मांडून बसलेले असतात. ।।७९।।

अहंकार आणी देहपांग । अनाचार आणी विषयसंग । संसार प्रपंच उद्वेग । अंतरीं वसे ।।८०।।

अहंता, देहतादात्म्य, निषिद्ध कर्म व विषयासक्ती, संसार व प्रपंचाचा अत्यंत त्रास हे सर्व अंत:करणात नांदत असतात. ।।८०।।

दीर्घसूत्री कृतघ्न पापी । कुकर्मी कुतर्की विकल्पी । अभक्त अभाव सीघ्रकोपी । निष्ठुर परघातक ।।८१।।

प्रत्येक गोष्ट लांबणीवर टाकणारा, केलेले उपकार न जाणणारा, पापी, कुकर्मी, कुतर्क लढवणारा, संशयांनी भरलेला, प्रेम व भाव नसणारा, क्षणात संतप्त होणारा, कठोर व दुसऱ्याचा घात करणारा असत् शिष्य असतो. ।।८१।।

हृदयेंसुन्य आणी आळसी । अविवेकी आणी अविस्वासी । अधीर अविचार संदेहासी । दृढ धर्ता ।।८२।।

सहानुभूतीशून्य, आळशी, विवेकहीन, श्रद्धाहीन, उतावळा, अविचारी व शंका कधीच न संपणारा ।।८२।।

आशा ममता तृष्णा कल्पना । कुबुद्धी दुर्वृत्ति दुर्वासना । अल्पबुद्धि विषय कामना । हृदईं वसे ।।८३।।

आशा, ममत्व, हव्यास, मनोराज्य, दुर्बुद्धी, वाईट प्रवृत्ती, कुवासना, बुद्धिमांद्य व संभोगासक्तीने भरलेले मन ।।८३।।

ईषणा असूया तिरस्कारें । निदेस प्रवर्ते आदरें । देहाभिमानें हुंबरे । जाणपणें ।।८४।।

पुत्रेषणा, दारेषणा, लोकेषणा, वित्तेषणा, असूया व तिरस्कार ह्यांमुळे दुसऱ्याची निंदा करण्यास टपलेला, स्वत:च्या सामर्थ्याच्या अभिमानाने गुर्मीत राहून ज्ञानाच्या अहंकारात राहणारा– ।।८४।।

क्षुधा तृष्णा आवरेना । निद्रा सहसा धरेना । कुटुंबचिंता वोसरेना । भ्रांति पडिली ।।८५।।

तहान, भूक व झोप अनावर असलेला, न संपणाऱ्या कौटुंबिक समस्यांनी गोंधळून गेलेला– ।।८५।।

शाब्दिक बोले उदंड वाचा । लेश नाहीं वैराग्याचा । अनुताप धारिष्ट साधनाचा । मार्ग न धरी ।।८६।।

तोंडाने भक्ती, ज्ञान व वैराग्याच्या अफाट गोष्टी बोलतो, पण खरे वैराग्य जराही नसते. अनुताप होऊन धैर्याने साधना कधीच करीत नाही. ।।८६।।

भक्ति विरक्ति ना शांती । सद्‌वृत्ति लीनता ना दांती । कृपा दया ना तृप्ती । सुबुद्धि असेच ना ।।८७।।

भक्ती, विरक्ती, शांती, सत्प्रवृत्ती, नम्रता, इंद्रियदमन, कृपा, दया, तृप्ती व सद्‌बुद्धी नसते. ।।८७।।

कायाक्लेसीं शेरीरहीन । धर्मविषईं परम कृपण । क्रिया पालटेना कठिण । हृदय जयाचें ।।८८।।

शरीराला कष्ट देण्याची वेळ आली की ह्याला जणू शरीरच नसते! धर्मपालनातील दान हा शब्दही त्याला नको असतो. स्वत:मध्ये कोणतेच परिवर्तन न करणारा कठोर मनाचा– ।।८८।।

आर्जव नाहीं जनासी । जो अप्रिये सज्जनासी । जयाचे जिवीं आहिर्णेसीं । परन्यून वसे ।।८९।।

लोकांशी सरळ न बोलणारा, सज्जनांना अप्रिय होणारा व रात्रंदिवस इतरांची उणीदुणी काढणारा, ।।८९।।

सदा सर्वकाळ लटिका । बोले माईक लापणिका । क्रिया विचार पाहातां येका । वचनीं सत्य नाहीं ।।९०।।

सतत खोटे, फसवे व हातचे राखून बोलणारा व प्रत्यक्ष कृती व बोलणे ह्यांत कधीच मेळ नसणारा– ।।९०।।

परपीडेविषईं तत्पर । जैसें विंचु आणि विखार । तैसा कुशब्दें जिव्हार । भेदी सकळांचे ।।९१।।

दुसऱ्याला यातना देण्यासाठी आतुर, विंचू वा सर्पाप्रमाणे शब्दाने डंख मारून दुसऱ्याच्या अंत:करणाला घरे पाडणारा. ।।९१।।

आपले झांकी अवगुण । पुढिलांस बोले कठिण । मिथ्या गुणदोषेंविण । गुणदोष लावी ।।९२।।

स्वत:च्या दुर्गुणांचे समर्थन करून किंवा त्यांचा उच्चारही न करता दुसऱ्यांना किंवा वडील मंडळींना त्यांच्या ठायी नसलेल्या गुणदोषांबद्दल कठोर शब्दात निर्भत्सना करतो. गुणांमध्येही दोष पाहतो. ॥९२॥

स्वयें पापात्मा अंतरीं । पुढिलांचि कणव न करी । जैसा हिंसक दुराचारी । परदु:खे शिणेना ।।९३।।

स्वत: पापाने अंतर्बाह्य भरलेला असून दुसऱ्याविषयी जराही दयाबुद्धी नसते. हिंसक प्रवृत्तीच्या दुराचाऱ्याला इतरांच्या दु:खाबद्दल जराही वाईट वाटत नाही. उलट– ॥९३॥

दु:ख पराव्यांचे नेणती । दुर्जन गांजिले चि गांजिती । श्रम पावतां आनंदती । आपुले मनीं ।।९४।।

दुसऱ्यांच्या दु:खाची पर्वा न करणारे असे दुष्ट, दुर्जन दु:खी असलेल्यांना अधिक दु:ख देऊन त्यांना झालेल्या यातनांनी स्वत: संतुष्ट होतात! ॥९४॥

स्वदु:खें झुरे अंतरीं । आणी परदु:खें हास्य करी । तयास प्राप्त येमपुरी । राजदूत ताडिती ।।९५।।

स्वत:ला दु:ख झाले की तळमळतो, पण तेच दुसऱ्याला झाले तर त्याला आसुरी आनंद होतो. अशा दुष्टाला यमपुरीत यमदूत भरपूर झोडपतात. ॥९५॥

असो ऐसे मदांध बापुडे । तयांसि भगवंत कैंचा जोडे । जयांस सुबुद्धि नावडे । पूर्वपातकेंकरूनी ।।९६।।

आता असत् शिष्याचे वर्णन पुरे झाले. अशा धुंदी चढलेल्या पण पारमार्थिक दृष्ट्या दीनवाण्यांना देवदर्शन कसे होईल? अनंत जन्मे केलेल्या पापांमुळे त्यांना हितकर उपदेश मुळीच रुचत नाही. ॥९६॥

तयास देहाचा अंतीं । गात्रें क्षीणता पावती । जिवलगें वोसंडिती । जाणवेल तेव्हां ।।९७।।

मरणाच्या वेळी जेव्हा सर्व इंद्रिये क्षीण होतील व ज्यांना आपले म्हटले ते सोडून जातील तेव्हाच त्याचे डोळे उघडतील. ॥९७॥

असो ऐसे गुणावेगळे । ते सच्छिष्य आगळे । दृढ भावार्थे सोहळे । भोगिती स्वानंदाचे ।।९८।।

वरील सर्व दुर्गुण नसलेले सत्शिष्य भाग्यवान असून त्यांच्या सद्गुरूंवरील दृढ भाव व निष्ठेमुळे ते स्वानंद सुखाचे सोहळे भोगतात. ॥९८॥

जये स्थळीं विकल्प जागे । कुळाभिमान पाठीं लागे । ते प्राणी प्रपंचसंगें । हिंपुटी होती ।।९९।।

ज्यांना संशय उत्पन्न होतात, प्रतिष्ठेच्या कल्पना आडव्या येतात ते प्रपंचासक्तीमुळे कष्टी होतात. ॥९९॥

जेणेंकरितां दु:ख जालें । तेंचि मनीं दृढ धरिलें । तेणें गुणें प्राप्त जालें । पुन्हां दु:ख ।।१००।।

एखादी गोष्ट दु:खदायक आहे असा अनुभव येऊनही तिलाच कवटाळून बसले तर पुन्हा पुन्हा दु:खच वाट्याला येते. ॥१००॥

संसारसंगें सुख जालें । ऐसें देखिलें ना ऐकिलें । ऐसें जाणोन अनहित केलें । ते दु:खी होती स्वयें ।।१०१।।

प्रपंचामध्ये निर्भेळ सुख मिळते असे आजपर्यंत ऐकले नाही व पाहिलेही नाही. हे ठाऊक असूनही प्रपंचात आसक्त असणारे स्वत:चे शाश्वत हित डावलून स्वत:च दु:खे भोगतात. ॥१०१॥

संसारी सुख मानिती । ते प्राणी मूढमती । जाणोन डोळे झांकिती । पढतमूर्ख ।।१०२।।

संसारात सुख मानणारे मोहित बुद्धीचे असून त्यांतील दु:ख पाहूनही परमार्थाबाबत डोळेझाक करतात. हे सर्व

पढतमूर्खच म्हटले पाहिजेत! ॥१०२॥

प्रपंच सुखे करावा । परी कांहीं परमार्थ वाढवावा । परमार्थ अवघाचि बुडवावा । हें विहित नव्हे ।।१०३।।

गृहस्थाश्रम अवश्य करावा व तो सुखाने करावा पण त्यातच परमार्थाची पूर्वतयारी करून तोही वाढता ठेवावा. परमार्थाकडे पूर्ण दुर्लक्ष करणे योग्यही नाही व धर्माला मान्यही नाही. ॥१०३॥

मागां जालें निरूपण । गुरुशिष्यांची वोळखण । आतां उपदेशाचें लक्षण । सांगिजेल ।।१०४।।

आतापर्यंत श्रीगुरू व शिष्य ह्यांची सत् व असत् लक्षणे तपशीलवार सांगून झाली. आता गुरू शिष्यांना उपदेश कोणता व कसा करतात ते सांगू. ॥१०४॥

इति श्रीदासबोधे गुरूशिष्यसंवादे 'शिष्यलक्षणनाम' समास तिसरा
गुरूशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'शिष्यलक्षण' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक पाचवा : मंत्रांचा

समास चवथा : उपदेशलक्षण

॥श्रीरामसमर्थ॥

ऐका उपदेशाचीं लक्षणें । बहुविधें कोण कोणें । सांगतां तें असाधारणें । परी कांही येक सांगों ।।१।।

आतां श्रीगुरू त्यांच्या शिष्यांना करीत असलेल्या अनंत प्रकारच्या उपदेशासंबंधी थोडेफार सांगतो. ॥१॥

बहुत मंत्र उपदेशिती । कोणी नाम मात्र सांगती । येक ते जप करविती । वोंकाराचा ।।२।।

त्यांतील बहुतेक जण कोणत्या ना कोणत्या मंत्राचा उपदेश करतात. उदा. नाममंत्र किंवा प्रणवाचा जप. ॥२॥

(ओवी ३ ते २९ मंत्र, देवता, विविध हेतू, तंत्र इत्यादिकांची यादी आहे. ह्यांची तपशीलवार माहिती सांगणे हा समर्थांचा हेतू नाही, तर त्यांची उपयुक्तता अत्यंत मर्यादित असून 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' हा ठाम सिद्धांत त्यांना सांगावयाचा आहे.)

शिवमंत्र भवानीमंत्र । विष्णुमंत्र माहालक्ष्मीमंत्र । अवधूतमंत्र गणेशमंत्र । मार्तंडमंत्र सांगती ।।३।।

मछकूर्मवऱ्हावमंत्र । नृसिंहमंत्र वामनमंत्र । भार्गवमंत्र रघुनाथमंत्र । कृष्णमंत्र सांगती ।।४।।

भैरवमंत्र मल्लारिमंत्र । हनुमंतमंत्र येक्षिणीमंत्र । नारायेणमंत्र पांडुरंगमंत्र । अघोरमंत्र सांगती ।।५।।

शेषमंत्र गरुडमंत्र । वायोमंत्र वेताळमंत्र । झोटिंगमंत्र बहुधा मंत्र । किती म्हणौनि सांगावे ।।६।।

बाळामंत्र बगुळामंत्र । काळिमंत्र कंकाळिमंत्र । बटुकमंत्र नाना मंत्र । नाना शक्तींचे ।।७।।

पृथकाकारें स्वतंत्र । जितुके देव तितुके मंत्र । सोपे अवघड विचित्र । खेचर दारुण बीजाचे ।।८।।

पाहों जातां पृथ्वीवरी । देवांची गणना कोण करी । तितुके मंत्र वैखरी । किती म्हणौन वदवावी ।।९।।

असंख्यात मंत्रमाळा । येकाहूनि येक आगळा । विचित्र मायेची कळा । कोण जाणे ।।१०।।

कित्येक मंत्रीं भूतें जाती । कित्येक मंत्रीं वेथा नासती । कित्येक मंत्रीं उतरती । सितें विंचू विखार ।।११।।

ऐसे नाना परीचे मंत्री । उपदेशिती कर्णपात्रीं । जप ध्यान पूजा यंत्री । विधानयुक्त सांगती ।।१२।।

येक शिव शिव सांगती । येक हरि हरि म्हणविती । येक उपदेशिती । विठल विठल म्हणोनि ।।१३।।

येक सांगती कृष्ण कृष्ण । येक सांगती विष्ण विष्ण । येक नारायण नारायण । म्हणौनि उपदेशिती ।।१४।।

येक म्हणती अच्युत अच्युत । येक म्हणती अनंत अनंत । येक सांगती दत्त दत्त । म्हणत जावें ।।१५।।

येक सांगती राम राम । येक सांगती ॐ ॐ म । येक म्हणती मेघशाम । बहुतां नामीं स्मरावा ।।१६।।

येक सांगती गुरु गुरु । येक म्हणती परमेश्वरु । येक म्हणती विघ्नहरु । चिंतीत जावा ।।१७।।

येक सांगती शामराज । येक सांगती गरुडध्वज । येक सांगती अधोक्षज । म्हणत जावें ।।१८।।

येक सांगती देव देव । येक म्हणती केशव केशव । येक म्हणती भार्गव भार्गव । म्हणत जावें ।।१९।।

येक विश्वनाथ म्हणविती । येक मल्लारि सांगती । येक ते जप करविती । तुकाई तुकाई म्हणौनी ।।२०।।

हें किती म्हणौनि सांगावें । शिवशक्तीचीं अनंत नांवें । इछेसारिखीं स्वभावें । उपदेशिती ।।२१।।

येक सांगती मुद्रा च्यारी । खेचरी भूचरी चाचरी अगोचरी । येक आसनें परोपरी । उपदेशिती ।।२२।।

येक दाखविती देखणी । येक अनुहातध्वनी । येक गुरु पिंडज्ञानी । पिंडज्ञान सांगती ।।२३।।

येक सांगती कर्ममार्ग । येक उपासना मार्ग । येक सांगती अष्टांग योग ।। नानाचक्रें ।।२४।।

येक तपें सांगती । येक अजपा निरोपिती । येक तत्वें विस्तारिती । तत्वज्ञानी ।।२५।।

येक सांगती सगुण । येक निरोपिती निर्गुण । येक उपदेशिती तीर्थाटण । फिरावें म्हणूनी ।।२६।।

येक माहावाक्यें सांगती । त्यांचा जप करावा म्हणती । येक उपदेश करिती । सर्व ब्रह्म म्हणोनी ।।२७।।

येक शाक्तमार्ग सांगती । येक मुक्तमार्ग प्रतिष्ठिती । येक इंद्रियें पूजन करविती । येका भावें ।।२८।।

येक सांगती वशीकर्ण । स्तंबन मोहन उच्चाटण । नाना चेटकें आपण । स्वयें निरोपिती ।।२९।।

भ. शंकर, माता भवानी, श्रीविष्णू, महालक्ष्मी, श्रीदत्तावधूत, गणेश, मार्तंड, मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह, वामन, भार्गव, श्रीराम, श्रीकृष्ण, भैरव, मल्हारी मार्तंड, हनुमंत, यक्षिणी, नारायण, पांडुरंग, अघोरमंत्र, शेष, गरुड, वायू, वेताळ, झोटिंग, बाळा, बगळा, कालिका, कंकाळी, बटुकभैरव. इ. प्रकारे जेवढे देव तेवढे मंत्र. काही सोपे, काही सिद्ध करण्यास कठीण, काही गुप्त पण परिणामी भयंकर असतात. ह्या पृथ्वीवर अगणित देव असून वाणीने कोणाकोणाचे मंत्र जपावे! मायेची विविधता एवढी आहे की ह्या मंत्रांचीही संख्या अफाट व चित्रविचित्र आहे. भूते निघून जाणे, आजार बरे होणे, विंचू व सर्पाचे विष उतरणे इ. हेतूने अनेक मांत्रिक अनेक मंत्र कानांत सांगून जोडीला त्यांचा जप, ध्यान, दैवतोपासना, यंत्र इत्यादी विधाने सांगतात. शिव, हरी, विठ्ठल, कृष्ण, विष्णू, नारायण, अच्युत, अनंत, दत्त, राम, प्रणव, मेघ:श्याम, श्रीगुरू, परमेश्वर, गणपती, घनश्याम, गरूडध्वज, अधोक्षज, देव, केशव, भार्गव, विश्वनाथ, मल्हारी, तुकाई इ. नामे 'दत्त दत्त' अशा प्रकारे दोनदा दोनदा जपावयास सांगतात. देव व देवीची अनंत नामे असून त्यांच्या त्यांच्या इच्छेप्रमाणे जप करावयास सांगतात. जमीन, भ्रूमध्य, आकाश व अंत:करणांत नजर स्थिर करण्याच्या अनुक्रमे भूचरी, चाचरी, खेचरी व अगोचरी अशा चार मुद्रा सांगणारे आहेत. कोणी अद्भुत दर्शने सांगतात, अनाहत नादाचे माहात्म्य गातात. कोणी उपासना तर दुसरे अष्टांग योग व चक्रभेदनाच्या अद्भुत गोष्टी वर्णन करतात. अजपाजप, नाना तपे सांगतात. पिंड-ब्रह्मांडाची तत्त्वे, सगुण, निर्गुण, तीर्थयात्रा, महावाक्यविवरण करून त्याचा जप, 'हे सर्व ब्रह्म आहे.' असे तत्त्वज्ञान सांगतात. शाक्तपंथ, मुक्तमार्ग, जननेंद्रियांचे पूजन, वशीकरण, स्तंभन, संमोहन, उच्चाटण, चेटुक इ. वाममार्गाच्याही उपासना सांगतात. ॥३-२९॥

ऐसी उपदेशांची स्थिती । पुरे आतां सांगों किती । ऐसे हे उपदेश असती । असंख्यात ।।३०।।

असे हे अनेक प्रकारचे उपदेश गुरू शिष्यांना करतात. त्यांची संख्या अगणित आहे. ॥३०॥

ऐसे उपदेश अनेक । परी ज्ञानेंविण निरार्थक । येविषईं असे येक । भगवद्वचन ।।३१।।

असे उपदेश वाटेल तेवढे असले तरी 'जीव ब्रह्म आहे' असे निसंदिग्ध प्रत्यक्ष ज्ञान झाल्यावाचून कशालाच किंमत नाही. भगवान श्रीकृष्ण म्हणतात– ॥३१॥

श्लोक **नानाशास्त्रं पठेल्लोको नानादैवतपूजनम् ।**
आत्मज्ञानं विना पार्थ सर्वकर्म निरर्थकम् ।
शैवशाक्तागमाद्या ये अन्ये च बहवो मताः ।

अपभ्रंशसमास्तेऽपि जीवानां भ्रांतचेतसाम् ।।
न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिदमुत्तमम् ।।

श्लोकार्थ

हे अर्जुना, कोणी सर्व शास्त्रे आत्मसात केली किंवा अनेक दैवतांच्या यथाविधी उपासना केल्या तरी आत्मज्ञानावाचून ती सर्व निरर्थक असतात. शैव, शाक्तादी आगमातील नाना मते आधीच भ्रमलेल्या जीवांना अधोगतीला नेतात. आत्मज्ञानासारखे पावन करणारे दुसरे काही श्रेष्ठ नाही.

याकारणें ज्ञाना समान । पवित्र उत्तम न दिसे अन्य । म्हणौन आधीं आत्मज्ञान । साधिलें पाहिजे ।।३२।।

म्हणून आत्मज्ञानासारखे पावन करणारे व सर्वश्रेष्ठ दुसरे काहीच नसल्याने आत्मज्ञानालाच अग्रक्रम दिला पाहिजे. ।।३२।।

सकळ उपदेशीं विशेष । आत्मज्ञानाचा उपदेश । येविषईं जगदीश । बहुतां ठाईं बोलिला ।।३३।।

अन्य कोणत्याही उपदेशाहून आत्मज्ञानाचा उपदेश श्रेष्ठ असल्याचे भगवंताने जागोजागी सांगितले आहे. ।।३३।।

श्लोक यस्य कस्य च वर्णस्य ज्ञानं देहे प्रतिष्ठितम् ।
तस्य दासस्य दासोहं भवे जन्मनि जन्मनि ।।

श्लोकार्थ

कोणत्याही वर्णाच्या पुरुषामध्ये आत्मज्ञान सुप्रतिष्ठित झाले असेल तर त्याच्या दासाचा मी जन्मोजन्मी दास होऊन राहतो.

आत्मज्ञानाचा महिमा । नेणे चतुर्मुख ब्रह्मा । प्राणी बापुडा जीवात्मा । काय जाणे ।।३४।।

आत्मज्ञानाचे माहात्म्य प्रत्यक्ष ब्रह्मदेवाला सुद्धा आकलन होत नाही. सामान्य बिचाऱ्या जीवाला ते कसे कळेल? ।।३४।।

सकळ तीर्थांची संगती । स्नानदानाची फळश्रुती । त्याहूनि ज्ञानाची स्थिती । विशेष कोटिगुणें ।।३५।।

पृथ्वीवरील सर्व तीर्थांच्या यथाशास्त्र यात्रा केल्या किंवा स्नाने व दाने केली तरी आत्मज्ञान त्यांचेपेक्षा कोटीपटीने श्रेष्ठ आहे. ।।३५।।

श्लोक– पृथिव्यां यानि तीर्थानि स्नानदानेषु यत्फलम् ।
तत्फलं कोटिगुणितं ब्रह्मज्ञानसमोपमम् ।।

पृथ्वीवर जेवढी तीर्थे आहेत तेथे स्नाने व दाने करून जे फळ मिळते त्याच्या कोटीपट ब्रह्मज्ञानाचे फळ आहे.

म्हणौनि जें आत्मज्ञान । तें गहनाहूनि गहन । ऐक तयाचें लक्षण । सांगिजेल ।।३६।।

म्हणून आत्मज्ञान अत्यंत सूक्ष्म व सर्वश्रेष्ठ आहे. आता त्याची लक्षणे सांगतो ती ऐका. ।।३६।।

इति श्रीदासबोधे गुरूशिष्यसंवादे 'उपदेशलक्षणनाम' समास चवथा
गुरूशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'उपदेशलक्षण' नावाचा चवथा समास समाप्त

दशक पाचवा : मंत्रांचा

समास पाचवा : बहुधाज्ञान

॥श्रीरामसमर्थ॥

जंव तें ज्ञान नाहीं प्रांजळ । तव सर्व कांहीं निर्फळ । ज्ञानरहित तळमळ । जाणार नाहीं ।।१।।

त्या शब्दाने व अनुभवाने सुस्पष्टपणे कळलेल्या ब्रह्मज्ञानाशिवाय इतर सर्व साधने निरुपयोगी असतात. द्वन्द्वातील तळमळ निर्द्वंद्व ब्रह्मज्ञान झाल्याशिवाय संपत नाही. ॥१॥

ज्ञान म्हणतां वाटे भरम । काये रे बा असेल वर्म । म्हणोनि हा अनुक्रम । सांगिजेल आतां ।।२।।

'ब्रह्मज्ञान' हा शब्द उच्चारताच सामान्य माणूस 'हा सर्व ब्रह्मघोटाळा आहे' असे म्हणतो! त्याचे वर्म काय आहे ते त्याला उमजत नाही. म्हणून आता क्रमाक्रमाने ते स्पष्ट करू. ॥२॥

(पारमार्थिक दृष्ट्या ज्ञान कशाला म्हणू नये ते तपशीलवार सांगतात–)

भूत भविष्य वर्तमान । ठाउकें आहे परिछिन्न । यासी हि म्हणिजेत ज्ञान । परी तें ज्ञान नव्हे ।।३।।

भूत, भविष्य व वर्तमानातील घटना बरोबर सांगता येणाऱ्यालाही लोक चकित होऊन ज्ञानी म्हणतात. पण ते खरे ज्ञान नाही. ॥३॥

बहुत केलें विद्यापठण । संगीतशास्त्र रागज्ञान । वैदिक शास्त्र वेदाधेन । हें हि ज्ञान नव्हे ।।४।।

न्यायमीमांसादी विद्यांचा अभ्यास केला, संगीत, राग, वैदिकी, वेदान्तशास्त्र, वेदाध्ययन केले हेही ज्ञान नव्हे. ॥४॥

नाना वेवसायाचें ज्ञान । नाना दीक्षेचें ज्ञान । नाना परीक्षेचें ज्ञान । हें ज्ञान नव्हे ।।५।।

वैद्यकी इ. व्यवसाय, दीक्षा देता येणे, अश्वादी परीक्षा इ. ज्ञान नव्हे. ॥५॥

नाना वनितांची परीक्षा । नाना मनुष्यांची परीक्षा । नाना नरांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।६।।

स्त्री, नद्या व माणसांची पारख हे ज्ञान नाही. ॥६॥

नाना अश्वांची परीक्षा । नाना गजांची परीक्षा । नाना स्वापदांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।७।।
नाना पशूंची परीक्षा । नाना पक्ष्यांची परीक्षा । नाना भूतांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।८।।
नाना यानांची परीक्षा । नाना वस्त्रांची परीक्षा । नाना शस्त्रांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।९।।
नाना धातूंची परीक्षा । नाना नाण्यांची परीक्षा । नाना रत्नांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।१०।।
नाना पाषाण परीक्षा । नाना काष्ठांची परीक्षा । नाना वाद्यांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।११।।
नाना भूमींची परीक्षा । नाना जळांची परीक्षा । नाना सतेज परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।१२।।
नाना रसांची परीक्षा । नाना बीजांची परीक्षा । नाना अंकुरपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।१३।।
नाना पुष्पांची परीक्षा । नाना फळांची परीक्षा । नाना वल्लींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।१४।।
नाना दुःखांची परीक्षा । नाना रोगांची परीक्षा । नाना चिन्हांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।१५।।
नाना मंत्रांची परीक्षा । नाना यंत्रांची परीक्षा । नाना मूर्तींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।१६।।
नाना क्षत्रांची परीक्षा । नाना गृहांची परीक्षा । नाना पात्रांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।१७।।

नाना होणार परीक्षा । नाना समयांची परीक्षा । नाना तर्कांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।१८।।
नाना अनुमान परीक्षा । नाना नेमस्त परीक्षा । नाना प्रकार परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।१९।।
नाना विद्येची परीक्षा । नाना कळेची परीक्षा । नाना चातुर्यपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।२०।।
नाना शब्दांची परीक्षा । नाना अर्थांची परीक्षा । नाना भाषांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।२१।।
नाना स्वरांची परीक्षा । नाना वर्णांची परीक्षा । नाना लेखनपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।२२।।
नाना मतांची परीक्षा । नाना ज्ञानांची परीक्षा । नाना वृत्तींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।२३।।
नाना रुपांची परीक्षा । नाना रसनेची परीक्षा । नाना सुगंधपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।२४।।
नाना सृष्टींची परीक्षा । नाना विस्तारपरीक्षा । नाना पदार्थपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ।।२५।।
नेमकचि बोलणें । तत्काळचि प्रतिवचन देणें । सीघ्रचि कवित्व करणें । हें ज्ञान नव्हे ।।२६।।
नेत्रपालवी नादकळा । करपालवी भेदकळा । स्वरपालवी संकेतकळा । हें ज्ञान नव्हे ।।२७।।
काव्यकुशळ संगीतकळा । गीतप्रबंद नृत्यकळा । सभाच्यातुर्य शब्दकळा । हें ज्ञान नव्हे ।।२८।।
वाग्विळास मोहनकळा । रम्य रसाळ गायनकळा । हास्य विनोद कामकळा । हें ज्ञान नव्हे ।।२९।।
नाना लाघवें चित्रकळा । नाना वाद्यें संगीतकळा । नाना प्रकारें विचित्र कळा । हे ज्ञान नव्हे ।।३०।।
आदिकरुनि चौसष्टि कळा । याहि वेगळ्या नाना कळा । चौदा विद्या सिध्दि सकळा । हें ज्ञान नव्हे ।।३१।।

घोडे, हत्ती, श्वापदे, पशू, पक्षी, भूते, विमाने, वस्त्रे, शस्त्रे, धातू, नाणी, रत्ने, पाषाण, वनौषधी, वाद्ये, जमीन, पाणी, माणके, रस, बीजे, अंकुर, फुले, फळे, वेली, दु:खे, रोग, चिन्हे, मंत्र, यंत्र, मुहूर्त, क्षेत्र, घरे, भांडी, भविष्य, शुभाशुभ वेळ, तर्क, अनुमान, नियम, सर्व प्रकार, विद्या, कला, चातुर्य, शब्द, अर्थ, भाषा, स्वर, वर्ण, लेखन, मते, ज्ञान, वृत्ती, रूप, चव, गंध, सृष्टी, विस्तार, पदार्थ, नेटके बोलणे, लगेच उत्तर देणें, शीघ्रकवित्व, नेत्रसंकेत, हस्तसंकेत, स्वरसंकेत, काव्य, संगीत, गीता, प्रबंध, नृत्य, सभेचे आयोजन, शब्द, वाणीचे चातुर्य, संमोहन, रम्य व रसाळ गायन, हास्य, विनोद, रतिक्रीडा, हस्तलाघव, चित्रे काढणे, वाद्ये वाजवणे व इतर अनेक कला अवगत असणे ह्याला ज्ञान म्हणत नाहीत. चौसष्ट कला चौदा विद्या, सिद्धी इत्यादी सुद्धा ज्ञान नव्हे. ॥७-३१॥

असो सकळ कळाप्रवीण । विद्यामात्र परिपूर्ण । तरी ते कौशल्यता, परी ज्ञान । म्हणों चि नये ।।३२।।

एकूण सर्व कलांत निपुण असणे, सर्व विद्यासंपन्न होणे यांना कौशल्य म्हणावे. ते ज्ञान नाही. ॥३२॥

हें ज्ञान होयेसें भासे । परंतु मुख्य ज्ञान तें अनारिसें । जेथें प्रकृतीचें पिसें । समूळ वाव ।।३३।।

हे सर्व ज्ञान आहे असा भास होतो. परंतु जेथे दृश्य जगताचा लागलेला ध्यासच मुळात भ्रम ठरतो ते ब्रह्मज्ञान हेच फक्त ज्ञान असून त्याचे स्वरूप फार फार वेगळे आहे. ॥३३॥

जाणावें दुसऱ्याचें जीवीचें । हें ज्ञान वाटे साचें । परंतु हें आत्मज्ञानाचें । लक्षण नव्हे ।।३४।।

एखाद्याच्या मनातील विचार कोणी सहजतेने जाणले तर तो मोठा ज्ञानी आहे असे वाटते. परंतु आत्मज्ञानाचे हे लक्षणच नाही. ॥३४॥

माहानुभाव माहाभाला । मानसपूजा करितां चुकला । कोणी येकें पाचारिला । ऐसें नव्हे म्हणोनी ।।३५।।

एक महात्मा मानसपूजा करीत असता त्याने त्यांत चूक केली. दुसऱ्याने ती चूक त्याच्या लक्षात आणून दिली. ॥३५॥

ऐसी जाणे अंतरस्थिती । तयासि परम ज्ञाता म्हणती । परंतु जेणें मोक्षप्राप्ती । तें हें ज्ञान नव्हे ।।३६।।

असे अंतर्ज्ञान असणाऱ्याला, सामान्य लोक मोठा ज्ञानी समजतात. पण हे मोक्षदायक ज्ञान नव्हे. ॥३६॥

बहुत प्रकारींचीं ज्ञानें । सांगों जातां असाधारणें । सायोज्यप्राप्ती होये जेणें । तें ज्ञान वेगळें ।।३७।।

सर्व प्रकारचे ज्ञान सांगू म्हटले तर ते अगणित आहे. ज्याने जीव व ब्रह्म यांचे ऐक्य साधते ते ज्ञान वेगळेच आहे. ॥३७॥

तरी तें कैसें आहे ज्ञान । समाधानाचें लक्षण । ऐसें हें विशद करून । मज निरोपावें ।।३८।।

श्रोता म्हणतो– ते ज्ञान कसे आहे ते मला माझे समाधान होईल असे स्पष्ट करून सांगावे. ॥३८॥

ऐसें शुद्ध ज्ञान पुसिलें । तें पुढिलें समासीं निरोपिलें । श्रोतां अवधान दिधलें । पाहिजे पुढें ।।३९।।

असा शुद्धज्ञानासंबंधीचा प्रश्न विचारल्यानंतर ते पुढील समासात सांगत आहे. श्रोत्याने पूर्ण लक्ष द्यावे. (चालू समासात 'माहिती' या सदरात मोडणारे अशुद्ध ज्ञान सांगून झाले.) ॥३९॥

इति श्रीदासबोधे गुरूशिष्यसंवादे 'बहुधाज्ञाननाम' समास पाचवा
गुरूशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'बहुधाज्ञान' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक पाचवा : मंत्रांचा

समास सहावा : शुद्धज्ञान

॥श्रीरामसमर्थ॥

ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान । पाहावें आपणासि आपण । या नांव ज्ञान ।।१।।

शुद्ध ज्ञानाचे लक्षण ऐका. आत्मज्ञान हेच शुद्ध ज्ञान होय. यामध्ये जीवाने (आपण) आत्म्याचे (आपणासी) 'तो मी आहे' असे दर्शन घ्यावयाचे असते. (पहावयाचे असते) हेच शुद्ध ज्ञान होय. ॥१॥

मुख्य देवास जाणावें । सत्य स्वरूप वोळखावें । नित्यानित्य विचारावें । या नांव ज्ञान ।।२।।

ब्रह्म हेच देवाचे मुख्य स्वरूप आहे. ते त्रिकालाबाधित म्हणजे सत्य असून तेच ओळखावे. ते नित्य असून त्या व्यतिरिक्त जे भासते ते सर्व अनित्य असते असा निश्चय करणे हेच ज्ञान. ॥२॥

जेथें दृश्य प्रकृति सरे । पंचभूतिक वोसरे । समूळ द्वैत निवारे । या नांव ज्ञान ।।३।।

ज्या तत्त्वामध्ये पांचभौतिक दृश्य सृष्टीचा बाध होऊन द्वैताचा मागमूसही राहत नाही त्या तत्त्वाच्या अनुभवाला ज्ञान असे म्हणतात. ॥३॥

मनबुद्धि अगोचर । न चले तर्काचा विचार । उल्लेख परेहूनि पर । या नांव ज्ञान ।।४।।

हा अनुभव व ते तत्त्व मन-बुद्धीच्या आवाक्यात येत नाही. तर्काचा सूक्ष्मपणा उपयोगी पडत नाही. परावाणीलाही जे अधिष्ठान आहे ते 'ज्ञान' होय. ॥४॥

जेथें नाही दृश्यभान । जेथें जाणीव हें अज्ञान । विमळ शुद्ध स्वरूपज्ञान । यासि बोलिजे ।।५।।

त्या स्वरूपात, दृश्य जगत् व त्याचे भान होणारा जीव नाही, 'कळणे' हे जेथे अज्ञानात मोडते, तेच विमळ व शुद्ध ब्रह्मरूप ज्ञान होय. ॥५॥

सर्वसाक्षी अवस्ता तुर्या । ज्ञान ऐसें म्हणती तया । परी तें जाणिजे वायां । पदार्थज्ञान ।।६।।

जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तीनही अवस्थांच्या साक्षीला तुर्या म्हणतात व तेच ज्ञान असा काहींचा समज आहे. परंतु ही अवस्था तीन अवस्थांच्या अपेक्षेने असल्याने अशुद्धच मानली पाहिजे किंवा ब्रह्म व माया यांच्या मधील जणू उंबरठ्यावर असणाऱ्या वृत्तीला तुर्या म्हणतात. पण ती 'कळणारी' असल्याने अशुद्ध ज्ञानरूप आहे. म्हणून टाकावू आहे. ॥६॥

दृश्य पदार्थ जाणिजे । त्यास पदार्थज्ञान बोलिजे । शुद्ध स्वरूप जाणिजे । या नांव स्वरूपज्ञान ।।७।।

दृश्य पदार्थ 'कळणे' म्हणजे पदार्थज्ञान (माहिती) 'आत्मा मी' असा अनुभव घेणे हे स्वरूप ज्ञान. ॥७॥

जेथें सर्वचि नाहीं ठाईंचें । तेथें सर्वसाक्षत्व कैंचें । म्हणौनि शुद्ध ज्ञान तुर्येचें । मानूंचि नये ।।८।।

ज्याला 'सर्व' म्हणतात ते मुळातच अस्तित्वात नसताना (अजातवाद) त्याचे साक्षित्व सिद्धच होत नाही. म्हणून तुर्या ही अवस्था शुद्धज्ञान आहे असे म्हणूच नये. ॥८॥

ज्ञान म्हणिजे अद्वैत । तुर्या प्रत्यक्ष द्वैत । म्हणौनि शुद्ध ज्ञान ते सतत । वेगळेंचि असे ।।९।।

ज्ञान हे अद्वैताचे दुसरे नाव आहे. तुर्येत द्वैत तर स्पष्ट दिसते. म्हणून शुद्ध ज्ञान केव्हाही वृत्तिज्ञानाहून फार वेगळे असते. ॥९॥

ऐक शुद्ध ज्ञानाचें लक्षण । शुद्ध स्वरुपचि आपण । या नांव शुद्ध स्वरूपज्ञान । जाणिजे श्रोतीं ।।१०।।

'मी शुद्ध स्वरूप आहे' हेच ज्ञान शुद्धस्वरूप ज्ञान असून तेच त्याचे लक्षण आहे. श्रोत्यांनी हे सतत लक्षात ठेवावे. ॥१०॥

माहांवाक्य उपदेश भला । परी त्याचा जप नाहीं बोलिला । तेथीचा तो विचारचि केला । पाहिजे साधकें ।।११।।

'तत्त्वमसि' सारख्या महावाक्याचा उपदेश फार चांगला आहे. पण त्याचा नामजपाप्रमाणे जप करावयाचा नाही. तर तत्, त्वम् व असि या तीन पदांच्या वाच्य व लक्ष्य अशा अर्थाचा विचार करावयाचा असतो. त्वमपद वाच्य जीव व लक्ष्य कूटस्थ चैतन्य. तत् पद वाच्य ईश्वर व लक्ष्य ब्रह्म. दोन्हीतील वाच्यार्थाचा त्याग (भागत्याग लक्षणेने) केला असता कूटस्थ चैतन्य (आत्मा) व ब्रह्म एकरूप आहेत. ॥११॥

माहांवाक्य उपदेश सार । परी घेतला पाहिजे विचार । त्याच्या जपें अंधकार । न फिटे भ्रांतीचा ।।१२।।

महावाक्य हे वेदान्ताच्या सर्व तत्त्वज्ञानाचे सार आहे. परंतु त्याचा शास्त्रशुद्ध विचारच केला पाहिजे. त्याचा जप करून अज्ञान व भ्रम जाणार नाहीत. अज्ञानजन्य भ्रम फिटणार नाही. ॥१२॥

माहावाक्याचा अर्थ घेतां । आपण वस्तुचि तत्वतां । त्याचा जप करितां वृथा । सीणचि होये ।।१३।।

महावाक्याचा लक्ष्यार्थ स्वीकारला की 'मीच ब्रह्म आहे' असा निश्चय होतो. त्याचा जप केल्याने फुकटचे श्रम होतात. ॥१३॥

माहावाक्याचें विवरण । हें मुख्य ज्ञानाचें लक्षण । शुद्ध लक्ष्यांशें आपण । वस्तुच आहे ।।१४।।

महावाक्याचे स्पष्टीकरण करणें हे ज्ञानाचे मुख्य साधन आहे. (महावाक्य आत्मज्ञानाचे साधक आहे. जनक नाही) दोन्हीकडील शुद्ध लक्ष्यांश घेतले की (ओवी ११) मी ब्रह्मच आहे असा निश्चय होतो. ॥१४॥

आपला आपणासि लाभ । हें ज्ञान परम दुल्लभ । जें आदिअंती स्वयंभ । स्वरुपचि स्वयें ।।१५।।

'मी' मूळचा ब्रह्मरूप असताना मी स्वत:ला देहादी समजू लागल्याने जणू मीच मला हरवून बसलो! महावाक्याने मला माझे मूळचे स्वरूप कळल्याने जणू माझाच मला पुन्हा लाभ झाला. हे ज्ञान अतिदुर्लभ असून प्रथमपासून शेवटपर्यन्त आदि अन्ती ब्रह्म हे माझे स्वरूपच आहे. (जन्मापासून मृत्यूपर्यंत किंवा अज्ञानापासून ज्ञानापर्यंत) ॥१५॥

जेथून हें सर्वही प्रगटे । आणी सकळही जेथें आटे । तें ज्ञान जालियां फिटे । भ्रांति बंधनाची ।।१६।।

हे सर्व दृश्य जग ज्यापासून प्रगट होते व शेवटी त्यातच लय पावते. (जन्माद्यस्य यत: ॥ ब्र.सू.) त्या ब्रह्माचे 'मी ब्रह्म' असे ज्ञान झाल्यावर 'मी देह', 'मी कर्ता' इ. भ्रमात्मक बंधने गळून पडतात. (भिद्यन्ते हृदयग्रन्थि:) –मुंडक) ॥१६॥

मतें आणी मतांतरें । जेथें होतीं निर्विकारें । अतिसूक्ष्म विचारें । पाहातां ऐक्य ।।१७।।

सांख्य वैशेषिकादि मते, निरीश्वर व सेश्वर इ. सांख्यातील पोटभेद हे सर्व त्या ब्रह्मस्वरूपात विरून जातात. ब्रह्मदृष्टीने त्यांचेकडे पाहिले असता त्यांचे अस्तित्वच उरत नाही. (जेथ नाना मता बुझावणी जाहाली । एकमेकां शास्त्रांची अनोळखी फिटली ॥ (ज्ञाने. ९-२७४) ती मते ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी ऐक्याला येतात. ॥१७॥

जें या चराचराचें मूळ । शुद्ध स्वरूप निर्मळ । या नांव ज्ञान केवळ । वेदांतमतें ।।१८।।

या चर व अचर सृष्टीचे अधिष्ठान असलेले शुद्ध व निर्मळ स्वरूप हेच वेदान्तमताने ज्ञान होय. ॥१८॥

शोधितां आपलें मूळ स्थान । सहजचि उडे अज्ञान । या नांव म्हणिजे ब्रह्मज्ञान । मोक्षदायेक ।।१९।।

स्वत:चे अधिष्ठान शोधले की त्याचे अज्ञान सहजच जाते. हेच ते मोक्षसाधक ब्रह्मज्ञान होय. ॥१९॥

आपणासि वोळखों जातां । आंगी बाणे सर्वज्ञता । तेणें येकदेसी वार्ता । निशेष उडे ।।२०।।

स्वत:चे स्वरूप जाणू जाता 'सर्वप्रकाशक ब्रह्म मी आहे' असा अनुभव येऊन स्वत:चे अल्पज्ञत्व संपून जाते. (सर्वज्ञ म्हणजे जगातील सर्व वस्तूंचे, शास्त्रांचे, कलांचे ज्ञान नव्हे. दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणे किंवा घडलेल्या व आगामी घटनांचे ज्ञान नव्हे. झाकलेल्या किंवा गुप्त वस्तू ओळखून त्यांचा तपशील सांगणे नव्हे! हे सर्व जग ज्यापासून झाले ते ब्रह्म जाणणाऱ्याला सर्वज्ञ म्हणतात). ॥२०॥

मी कोण ऐसा हेत । धरून पाहातां देहातीत । आवलोकितां नेमस्त । स्वरूपचि होये ।। २१ ।।

'मी कोण' याचा शोध घेऊन पाहिले तर 'मी देहाहून भिन्न आहे' असा अभ्यास करून ब्रह्मानुभव येतो. ॥२१॥

असो पूर्वीं थोर थोर । जेणें ज्ञानें पैलपार । पावले ते साचार । ऐक आतां ।। २२ ।।

असे ब्रह्मज्ञान झाल्यावर पूर्वी कोण कोण महात्मे मुक्त झाले ते आता ऐक. ॥२२॥

व्यास वसिष्ठ माहामुनी । शुक नारद समाधानी । जनकादिक माहांज्ञानी । येणेंचि ज्ञानें ।। २३ ।।

मननशील व्यास व वसिष्ठ, नित्यतृप्त नारद व शुक, महाज्ञानी राजा जनक, ॥२३॥

वामदेवादिक योगेश्वर । वाल्मीक अत्रि ऋषेश्वर । शोनिकादि अध्यात्मसार । वेदांतमतें ।। २४ ।।

वामदेवादी, योगेश्वर, अत्री व वाल्मीकीसारखे श्रेष्ठ ऋषी, अध्यात्माचे वर्म जाणणारे शौनकादी, ॥२४॥

सनकादिक मुख्यकरूनी । आदिनाथ मीन गोरक्षमुनी । आणीक बोलतां वचनी । अगाध असती ।। २५ ।।

सनक सनातनादी, आदिनाथ, मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ व त्यांच्यासारखे कितीतरी महात्मे, ॥२५॥

सिव्ध मुनी माहानुभाव । सकळांचा जो अंतर्भाव । जेणें सुखें माहादेव । डुल्लत सदा ।। २६ ।।

सिद्ध, मुनी, महात्मे इत्यादिकांमध्ये समान असणाऱ्या ब्रह्मसुखाने भ.शंकरही डोलतात. ॥२६॥

जें वेदशास्त्रांचे सार । सिद्धांत धादांत विचार । ज्याची प्राप्ती भाग्यानुसार । भाविकांस होये ।। २७ ।।

वेदान्तशास्त्राचे मंथन केल्यावर ब्रह्म हे त्याचे सार निघते. हाच सिद्धान्त भाविकाला त्याच्या शुद्ध पुण्याचे बळावर प्रत्यक्ष अनुभवाला येतो. ॥२७॥

साधु संत आणी सज्जन । भूत भविष्य वर्तमान । सर्वत्रांचें गुह्य ज्ञान । तें सांगिजेल आतां ।। २८ ।।

पूर्वीचे, हल्लीचे व पुढचे साधू, संत व सज्जन यांच्या ब्रह्मज्ञानाचे वर्म आता सांगतो. ॥२८॥

तीर्थें व्रतें तपें दानें । जें न जोडे धूम्रपानें । पंचाग्नी गोरांजनें । जें प्राप्त नव्हे ।। २९ ।।

तीर्थयात्रा, व्रते, दाने, धूम्रपानादी देहकष्ट, पंचाग्निसाधन, स्वत:ला डागणे इत्यादीने ब्रह्मज्ञान होत नाही. ॥२९॥

सकळ साधनाचें फळ । ज्ञानाची सिगचि केवळ । जेणें संशयाचें मूळ । निशेष तुटे ।। ३० ।।

'मी ब्रह्म आहे व जगत् ब्रह्मरूप आहे' असा अनुभव हे सर्वश्रेष्ठ ज्ञान आहे. सर्व साधनांचे हे फळ आहे. त्यामुळे मी व जगत् यांच्यासंबंधी कोणताच संशय राहत नाही. तो समूळ तुटतो. ॥३०॥

छपन्न भाषा तितुके ग्रन्थ । आदिकरून वेदांत । या इतुकियांचा गहनार्थ । येकचि आहे ।। ३१ ।।

वेदान्त शास्त्र छप्पन भाषांतील छप्पन ग्रंथांत लिहिले तरी त्याचा गूढार्थ वा रहस्य एकच आहे. ॥३१॥

जें नेणवे पुराणीं । जेथे सिणल्या वेदवाणी । तेंचि आतां येचि क्षणीं । बोधीन गुरुकृपें ।। ३२ ।।

पुराणांना ज्याचा अंदाजही लागत नाही, वेद त्याचेसंबंधी बोलून दमले ते आता मी श्रीगुरुकृपेने सांगेन. ॥३२॥

पाहिलें नस्तां संस्कृतीं । रीग नाहीं मऱ्हाष्ट ग्रन्थी । हृदईं वसल्या कृपामूर्ती । सद्गुरुस्वामी ।। ३३ ।।

मी संस्कृत भाषेतील वेदान्तग्रंथांचे अध्ययन केलेले नाही. मराठीतील अध्यात्मग्रंथसुद्धा धड वाचलेले नाहीत. पण कृपारूप श्रीगुरू माझ्या हृदयात राहिलेले आहेत. (हा समर्थांचा विनय आहे व त्यांच्या गुरुनिष्ठेचे प्रतीक आहे.) ॥३३॥

आतां नलगे संस्कृत । अथवा ग्रंथ प्राकृत । माझा स्वामी कृपेसहित । हृदईं वसे ।।३४।।

आता संस्कृत अथवा प्राकृत ग्रंथांची आवश्यकता नाही. माझा सद्‌गुरुस्वामी त्याच्या कृपाकटाक्षासह माझ्या हृदयात बसलेला आहे. ।।३४।।

न करितां वेदाभ्यास । अथवा श्रवणसायास । प्रेत्नेंविण सौरस । सद्‌गुरुकृपा ।।३५।।

वेदान्तग्रंथांचा अभ्यास न करता किंवा यथार्थ पारंपरिक श्रवण न करता सद्‌गुरुकृपेने सहजासहजी ज्ञानाचा गोड प्रसाद लाभतो. ।।३५।।

ग्रन्थ मात्र मऱ्हाष्ट । त्याहून संस्कृत श्रेष्ठ । त्या संस्कृतामधें पष्ट । थोर तो वेदांत ।।३६।।

मराठी भाषेवरील आध्यात्मिक ग्रंथापेक्षा संस्कृतमधील ग्रंथ श्रेष्ठ. त्यातही वेदान्तग्रन्थ सर्वांत श्रेष्ठ आहेत. ।।३६।।

त्या वेदांपरतें कांहीं । सर्वथा श्रेष्ठ नाहीं । जेथें वेदगर्भ सर्व ही । प्रगट जाला ।।३७।।

त्या वेदान्ताहून काहीच श्रेष्ठ नाही कारण त्यांत वेदांचे साररूप वर्म प्रगट झाले आहे. ।।३७।।

असो ऐसा जो वेदांत । त्या वेदांचाहि मथितार्थ । अतिगहन जो परमार्थ । तो तूं ऐक आतां ।।३८।।

असा जो वेदान्त त्या वेदान्ताचेही सार असलेला सूक्ष्म व गहन परमार्थ तू आता ऐक. ।।३८।।

अरे गहनाचें ही गहन । तें तूं जाण सद्‌गुरुवचन । सद्‌गुरुवचनें समाधान । नेमस्त आहे ।।३९।।

त्या गहन परमार्थाची सर्व खोली सद्‌गुरूंच्या उपदेशात सामावलेली असते. त्या उपदेशाने मुमुक्षूला निश्चित समाधान लाभते. ।।३९।।

सद्‌गुरुवचन तोचि वेदांत । सद्‌गुरुवचन तोचि सिद्धांत । सद्‌गुरुवचन तोचि धादांत । सप्रचीत आतां ।।४०।।

श्रीगुरूंचा उपदेश हाच वेदान्त. तोच सिद्धान्त. तोच सत्य आहे. तो आता प्रचीती येईल अशा पद्धतीने समजावून घे. ।।४०।।

जें अत्यंत गहन । माझ्या स्वामीचें वचन । जेणें माझें समाधान । अत्यंत जालें ।।४१।।

त्याच अतिगूढ अशा सद्‌गुरुवचनाने माझे स्वत:चे परिपूर्ण समाधान झाले. ।।४१।।

तें हें माझें जीवीचें गुज । मी सांगैन म्हणतों तुज । जरी अवधान देसी मज । तरी आतां येच क्षणीं ।।४२।।

माझ्या जीवाहून अधिक जपून ठेवलेले ते रहस्य मी तुला आता सांगतो. तू मनापासून ऐकलेस तर आताच तुला त्याचा बोध होईल. ।।४२।।

शिष्य म्लानवदनें बोले । धरिले सदृढ पाउलें । मग बोलों आरंभिलें । गुरुदेवें ।।४३।।

असे सद्‌गुरुवचन ऐकताच शिष्याचा चेहरा कृतज्ञतेने व कृतार्थतेच्या अपेक्षेने अहंकारशून्य झाला. (शरणागतीची सर्व लक्षणे दिसू लागली) त्याने त्यांचे चरण घट्ट धरले. मग श्रीगुरूंनी उपदेश करण्यास सुरुवात केली. ।।४३।।

अहं ब्रह्मास्मि माहांवाक्य । येथीचा अर्थ अतर्क्ये । तो ही सांगतो ऐक्य । गुरुशिष्य जेथें ।।४४।।

श्रीगुरू व शरणागत शिष्य असे नाते तयार झाल्यानंतर श्रीगुरू म्हणतात– 'मी ब्रह्म आहे' या वाक्याचा अर्थ अत्यंत गूढ आहे. तोही मी तुला सांगतो. ।।४४।।

ऐक शिष्या येथीचें वर्म । स्वयें तूंचि आहेसि ब्रह्म । ये विषई संदेह भ्रम । धरूंचि नको ।।४५।।

त्यातील मुख्य वर्म असे की तू स्वत:च ब्रह्म आहेस. याविषयी संशयाचा भ्रम जराही राहू देऊ नकोस. ।।४५।।

नवविधा प्रकारें भजन । त्यात मुख्य तें आत्मनिवेदन । तें समग्र प्रकारें कथन । कीजेल आतां ।।४६।।

नऊ प्रकारची भक्ती तुला सांगितली. त्यातील आत्मनिवेदन सर्वश्रेष्ठ आहे. ती भक्ती व महावाक्य यांचा अतूट संबंध आहे. तो आता मी विस्तारपूर्वक स्पष्ट करीन. ॥४६॥

निर्माण पंचभूतें यीयें । कल्पांतीं नासतीं येथान्वयें । प्रकृति पुरुष जीयें । तेही ब्रह्म होती ।।४७।।

आकाशापासून पृथ्वीपर्यन्त महाभूते क्रमाने आत्मरूप ब्रह्मापासून निर्माण झाली. कल्पाच्या शेवटी पृथ्वीपासून आकाशापर्यन्त सर्व महाभूते त्या ब्रह्मस्वरूपातच लीन होतात. ॥४७॥

दृश्य पदार्थ आटतां । आपणहि नुरे तत्वतां । ऐक्यरुपें ऐक्यता । मुळींच आहे ।।४८।।

पांचभौतिक दृश्य पदार्थ लीन झाल्यावर 'ती लीन होतात' असे म्हणणारा 'मी' सुद्धा शिल्लक राहत नाही. ब्रह्म व 'मी' सह दृश्य पदार्थ यांचे मूळचेच ऐक्य असल्याने त्यांच्यात सहजच अद्वैत आहे. (ब्रह्म हे जगाचे अभिन्ननिमित्त व उपादान कारण आहे.) ॥४८॥

सृष्टीची नाहीं वार्ता । तेथें मुळींच ऐक्यता । पिंड ब्रह्मांड पाहों जातां । दिसेल कोठें ।।४९।।

जेव्हा सृष्टीच शिल्लक राहत नाही तेव्हा त्यांच्यात मूळचे असलेले अद्वैतच उरते. अद्वैतामध्ये पिंड व ब्रह्मांड त्यांतील अनंत भेदात्मक द्वैतासह द्वैत कोणाला व कसे दिसेल? (तत्र केन किम् विजानीयात?– बृह.) ॥४९॥

ज्ञानवन्ही प्रगटे । तेणें दृश्य केर आटे । तदाकारें मूळ तुटे । भिन्नत्वाचें ।।५०।।

ज्ञानाग्नि प्रगट झाल्यावर दृष्य जगताचे मिथ्यत्व स्पष्टपणे अनुभवाला येते. त्या जगताच्या अधिष्ठानाशी अद्वैत साधल्यावर द्वैताचे समूळ उच्चाटण होते. ॥५०॥

मिथ्यत्वें वृत्ति फिरे । तो दृश्य असतांच वोसरे । सहजचि येणें प्रकारें । जालें आत्मनिवेदन ।।५१।।

'दृश्य सृष्टी मिथ्या आहे' अशा सहज निश्चयाने अन्त:करण वृत्ती दिसणाऱ्या सृष्टीकडून मागे वळते व वृत्तीतील चिदाभासाचे आत्मस्वरूपात निवेदन म्हणजे ऐक्य होते. त्यामुळे सृष्टीच्या अधिष्ठानाशी अद्वैताची भूमिका तयार होते. (या प्रक्रियेला बाधनिश्चय असे म्हणतात. हा निश्चय झालेला जीवन्मुक्त बाधाच्या अनुवृत्तीने जीवन जगतो.) ॥५१॥

असो गुरूचे ठाईं अनन्यता । तरी तुज कायेसी रे चिंता । वेगळेपणें अभक्ता । उरोंचि नको ।।५२।।

(वरील विचार शब्दाने सुद्धा समजावून घेणे महाकठीण आहे. तो आकलन होऊन मुरण्यासाठी समर्थ आता उपाय सुचवितात–) हे सर्व तू ऐकलेस खरे! पण आता श्रीगुरूंचे ठिकाणी अनन्यशरण रहा. मग तुला हे आकलनाची व अनुभवाची काळजी करण्याचे कारणच काय? त्यांच्याशी तू आता जो विभक्त आहेस तो भक्त हो म्हणजे समरसतेने रहा. ॥५२॥

आता हेंचि दृढीकर्ण । व्हावया करीं सद्‌गुरुभजन । सद्‌गुरुभजनें समाधान । नेमस्त आहे ।।५३।।

ही प्रक्रिया प्रत्यक्षात उतरण्यासाठी आता तू काया, वाचा, मनाने व धनाने श्रीगुरूंची सेवा कर. त्याने सिद्धान्ताचे रूपान्तर अनुभवात होऊन समाधान नांदते. ॥५३॥

या नांव शिष्या आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान । भवभयाचें बंधन । समूळ मिथ्या ।।५४।।

हेच ते आत्मज्ञान! त्यामुळे सततचे समाधान प्राप्त होऊन या भवसागराच्या द्वन्द्वरूप व जन्ममरणरूप भयाचे बंधन समूळ नष्ट होते. कारण ते मिथ्याच आहे. ॥५४॥

देह मी वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा । देहाभिमानें येरझारा । भोगिल्याच भोगी ।।५५।।

'मी देह' ही भूमिका ज्याने घट्ट धरून ठेविली आहे तो आत्महत्या करीतच राहतो! कारण त्यामुळेच वासना शिल्लक राहून जन्ममरणांच्या फेऱ्यात पुन्हा पुन्हा फिरत राहतो. ॥५५॥

असो चहूं देहावेगळा । जन्मकर्मासी निराळा । सकळ आबाळगोबळा । सबाह्य तूं ।।५६।।

अरे तू स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या चार देहांहून वेगळा आहेस, देहाचा जन्म व त्याने केलेले कर्म

याहून भिन्न आहेस. या चित्रविचित्र भ्रमरूप सृष्टीत तू ओतप्रोत भरून राहिला आहेस. (स्थूल देह– अस्थिमांसाचे शरीर. सूक्ष्म देह– पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, पाच प्राण व अन्त:करण. कारण देह– जागृती व स्वप्नाला कारण असलेली निद्रा. महाकारणदेह– 'मी ब्रह्म' या साधनकाळातील मनोरचना). ॥५६॥

कोणासीच नाहीं बंधन । भ्रांतिस्तव भुलले जन । दृढ घेतला देहाभिमान । म्हणौनियां ।।५७।।

वास्तविक कोणत्याच जीवावर मायेची 'मी देह आहे' असे समजण्याची सक्ती नाही! पण तसा भ्रम होऊन सर्वच जीव भुलतात व त्याचा परिणाम म्हणून 'मी देह' असे देहाला घट्ट धरतात. ॥५७॥

शिष्या येकांतीं बैसावे । स्वरूपीं विश्रांतीस जावें । तेणें गुणें दृढावें । परमार्थ हा ।।५८।।

हे शिष्या, तू शांत वेळी विजन ठिकाणी आसनस्थ हो. श्रीगुरूंनी दिलेल्या साधनप्रक्रियेच्या साह्याने जीवाला आत्मस्वरूपात विश्रांती देण्याचा (खरा एकान्त) अभ्यास कर. मोक्षमार्गावरील हा प्रवास त्यामुळे निश्चितपणे होत राहील. ॥५८॥

अखंड घडे श्रवण मनन । तरीच पाविजे समाधान । पूर्ण जालियां ब्रह्मज्ञान । वैराग्य भरे आंगीं ।।५९।।

वेदान्ताचे अखंड श्रवण व मनन करावे. तरच खरे समाधान म्हणजे अन्त:करण वृत्तीचे सम्यक् आधान होते. ती आत्म्याला पकडून ठेवून ब्रह्मस्वरूपात स्वत:ला हरवते. ब्रह्मज्ञान होते. त्याला परिपक्वता आल्यावर मिथ्या जगताविषयी सहजच वैराग्य निर्माण होऊन स्थिर होते. ॥५९॥

शिष्या मुक्तपणें अनर्गळ । करिसी इंद्रियें बाष्कळ । तेणें तुझी तळमळ । जाणार नाहीं ।।६०।।

विवेक, वैराग्य, शमादिकांत तू स्वत:ला बांधून न ठेवता मोकळे सोडलेस तर इंद्रिये स्वैर वागतील. याने तुला समाधान मिळणार नाही. तळमळ संपणार नाही. ॥६०॥

विषईं वैराग्य उपजलें । तयासीच पूर्ण ज्ञान जालें । मणी टाकितांचि लाधले । राज्य जेवीं ।।६१।।

पंचविषयांची अनासक्ती निर्माण झाली तरच ब्रह्मज्ञान दृढ व अपरिवर्तनीय होते. मण्याची अभिलाषा सोडताच राज्य परत मिळावे त्याप्रमाणे (कथा पुढील ओवीत). ॥६१॥

मणी होता सीगटाचा । लोभ धरूनिया तयाचा । मूर्खपणें राज्याचा । अव्हेर केला ।।६२।।

एका धूर्ताने बैलाच्या शिंगावर लावलेल्या चकचकीत मण्यासंबंधी एका मूर्ख राजाला त्या मण्याची अपरंपार खोटी महती सांगून, राजाला भुलवून त्याच्या राज्याच्या मोबदल्यात तो मणी राजाला दिला! ॥६२॥

ऐक शिष्या सावधान । आतां भविष्य मी सांगेन । जया पुरुषास जें ध्यान । तयासि तेंचि प्राप्त ।।६३।।

हे शिष्या, तुला आता एक निश्चितपणे होणारी गोष्ट सांगतो. 'जो ज्याचे चिंतन करतो तो तेच होतो' तेच त्याला लाभते. ॥६३॥

म्हणोनी जे अविद्या । सांडून धरावी सुविद्या । तेणें गुणें जगद्वंद्या । पाविजे सीघ्र ।।६४।।

म्हणून अविद्येचा त्याग करून सद्‌विद्येचा अभ्यास करावा. त्यामुळे जगताला जे हवेसे वाटते ते ब्रह्मसुख तुला त्वरित मिळेल (जगाला सुख हवे असते. सुख ब्रह्माशिवाय नाही.) ॥६४॥

सन्यपाताचेनि दु:खें । भयानक दृष्टीस देखे । औषध घेताचि सुखें । आनंद पावे ।।६५।।

रोगामुळे शरीराचे तापमान फार वाढले तर रोग्याला भयानक दृश्यांचा भास होतो व तो घाबरतो. पण औषधाने रोग बरा होताच ती भीती संपून तो पूर्वीप्रमाणे आनंदी होतो. ॥६५॥

तैसें अज्ञानसन्यपातें । मिथ्या दृष्टीस दिसतें । ज्ञानऔषध घेतां तें । मुळींच नाहीं ।।६६।।

त्याप्रमाणे अज्ञान या बलवान रोगाने अनिर्वचनीय जग दिसू लागते. ब्रह्मज्ञानाचे औषध घेताच ते मावळते. ॥६६॥

मिथ्या स्वप्ने वोसणाला । तो जागृतीस आणिला । तेणें पूर्वदशा पावला । निर्भय जे ।।६७।।

मिथ्या स्वप्नातील दृश्य बघून जो घाबरतो त्याला जागे करताच तो पूर्वीसारखा निर्भय होतो. जाग आल्यावर ते काल्पनिक दृश्य नष्ट होते. ॥६७॥

मिथ्याच परी सत्य वाटलें । तेणें गुणें दु:ख जालें । मिथ्या आणी निरसलें । हें तों घडेना ।।६८।।

वास्तविक स्वप्नातील दृश्य अनिर्वचनीय असताना सत्य वाटले व त्यामुळे भयाचे दु:ख झाले. दृश्य मिथ्या असले तरी स्वप्न पाहत असताना ते पाहणाऱ्याला ते नष्ट करता येत नाही. ॥६८॥

मिथ्या आहे जागृतासी । परी वेढा लाविलें निद्रिस्तांसी । जागा जालिया तयासी । भयेचि नाहीं ।।६९।।

जाग आल्यावर त्याचे मिथ्यात्व कळते. पण गाढ झोपलेल्याला पडलेले स्वप्न अगदी खरे असल्यासारखे वाटून सुखदु:खाचा अनुभव देते. जाग आल्यावर भयाचे नावही नसते. (मिथ्या = सत् असत् विलक्षण = अनिर्वचनीय. सत् म्हणजे त्रिकालात अबाधित राहणारे. असत् म्हणजे कधीच नसणारे. स्वप्न जाग आल्यावर नसल्याने भविष्यात बाधित होते. म्हणून सत्च्या लक्षणांशी जुळत नाही. स्वप्नकाळी सत्य वाटते म्हणून अस्तच्या लक्षणांशी जुळत नाही.) ॥६९॥

परी अविद्याझोंप येते भरें । भरे सर्वांगी काविरें । पूर्ण जागृती श्रवणद्वारें । मननें करावी ।।७०।।

त्याप्रमाणे अविद्येच्या गाढ झोपेत जगत् रूप स्वप्न फुलते व झोपणाऱ्याला मोहित करून ते स्वप्न खरे आहे असा भ्रम निर्माण करते. वेदान्तश्रवण व मननाने त्या झोपलेल्याला जाग आणावी. ॥७०॥

जागृतीची वोळखण । ऐक तयाचें लक्षण । जो विषईं विरक्त पूर्ण । अंतरापासुनी ।।७१।।

जो पंचविषयांचे वैराग्य मनापासून सांभाळतो तो जागा आहे असे समजावे. किंवा जो पूर्ण विरक्त झाला आहे तो जागा आहे. ॥७१॥

जेणें विरक्तीस न यावें । तो साधक ऐसें जाणावें । तेणें साधन करावें । थोरीव सांडुनी ।।७२।।

ज्याला वैराग्य प्राप्त झालेले नाही त्याने आपण साधक आहोत हे लक्षात घेऊन 'मी मुक्त आहे' असा समज करून घेतला असेल तर तो सोडून द्यावा. ॥७२॥

साधन न मने जयाला । तो सिद्धपणें बद्ध जाला । त्याहूनि मुमुक्षु भला । ज्ञानाधिकारी ।।७३।।

ज्याला साधन करावेसे वाटत नाही तो 'मी मुक्त' या कल्पनेनेच बद्ध होतो! त्यापेक्षा मुमुक्षू कितीतरी चांगला. कारण तो ज्ञानाचा अधिकारी असतो. ॥७३॥

तव शिष्ये केला प्रश्न । कैसे बद्धमुमुक्षाचें लक्षण । साधक सिद्ध वोळखण । कैसी जाणावी ।।७४।।

हे ऐकून शिष्याने 'बद्ध, मुमुक्षू, साधक व सिद्ध यांच्या कोणत्या लक्षणांनी त्यांना ओळखावे?' असे विचारले. ॥७४॥

याचें उत्तर श्रोतयांसी । दिधलें पुढिलीये समासी । सावध श्रोतीं कथेसी । अवधान द्यावें ।।७५।।

या प्रश्नाचे उत्तर पुढील समासात दिले आहे. श्रोत्यांनी ते लक्ष देऊन ऐकावे. ॥७५॥

इति श्रीदासबोधे गुरूशिष्यसंवादे 'शुद्धज्ञाननाम' समास सहावा
गुरूशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'शुद्धज्ञान' नावाचा सहावा समास समाप्त

दशक पाचवा : मंत्रांचा

समास सातवा : बद्धलक्षण

॥ श्रीरामसमर्थ ॥

सृष्टी जे कां चराचर । जीव दाटले अपार । परी ते अवघे चत्वार । बोलिजेती ।।१।।

चर व अचर (चेतन व जड) सृष्टीमध्ये अब्जावधी जीव (माणसे) आहेत. त्यांचे प्रकार मात्र चारच आहेत असे सांगतात. ॥१॥

ऐक तयांचें लक्षण । चत्वार ते कोण कोण । बद्ध मुमुक्षू साधक जाण । चौथा सिद्ध ।।२।।

ते चार प्रकार कोणते ते ऐक. बद्ध, मुमुक्षू, साधक व चौथा सिद्ध. ॥२॥

या चौघांविरहित कांहीं । सचराचरीं पांचवा नाहीं । आतां असो हें सर्वही । विशद करूं ।।३।।

या चार प्रकारांपेक्षा या चराचर सृष्टीत पाचवा प्रकार नाही. आता त्यांचे स्पष्टीकरण करू. ॥३॥

बद्ध म्हणिजे तो कोण । कैसें मुमुक्षाचें लक्षण । साधक सिद्ध वोळखण । कैसी जाणावी ।।४।।

बद्ध कोणाला म्हणावे, मुमुक्षूचे लक्षण, साधकाची अवस्था व सिद्धाची ओळख कशी करून घ्यावी. ॥४॥

श्रोतीं व्हावें सावध । प्रस्तुत ऐका बद्ध । मुमुक्ष साधक आणि सिद्ध । पुढें निरोपिलें ।।५।।

श्रोत्यांनी सावधपणे आता बद्ध कोणाला म्हणावे ते समजावून घ्यावे. मुमुक्षू, साधक व सिद्धांची लक्षणे पुढील समासात सांगितली आहेत. ॥५॥

आतां बद्ध तो जाणिजे ऐसा । अंधारींचा अंध जैसा । चक्षुवीण दाही दिशा । सुन्याकार ।।६।।

आंधळ्याने डोळे नसल्यामुळे दाही दिशांना अंधार भरलेला पहावा तसा हा बद्ध सगळीकडे अविद्यारूपी अंधारच भरलेला पहातो. ॥६॥

भक्त ज्ञाते तापसी । योगी वीतरागी संन्यासी । पुढें देखतां दृष्टीसी । येणार नाही ।।७।।

कोणी भक्त, ज्ञानी, तपस्वी, योगी, विरक्त, संन्यासी इ. समोर आले तरी हा बघणार नाही. ॥७॥

न दिसे नेणे कर्माकर्म । न दिसे नेणे धर्माधर्म । न दिसे नेणे सुगम । परमार्थपंथ ।।८।।

विहित कर्म व निषिद्ध कर्म, धर्म व अधर्म इकडे तो ढुंकूनही पाहत नाही व ते जाणीतही नाही. परमार्थ मार्ग सोपा असूनही तो त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करतो. ॥८॥

तयास न दिसे सच्छास्त्र । सत्संगति सत्पात्र । सन्मार्ग जो कां पवित्र । तो ही न दिसे ।।९।।

वेद, संतसंगत, दान देण्यास योग्य व्यक्ती व पवित्र असलेला मोक्षमार्ग त्याला दिसत नाही. ॥९॥

न कळे सारासार विचार । न कळे स्वधर्म आचार । न कळे कैसा परोपकार । दान पुण्य ।।१०।।

सार व असार यांचा विचार, स्वधर्माचे आचरण, परोपकार, दान, पुण्य इत्यादींची त्याला दादही नसते. ॥१०॥

नाहीं पोटीं भूतदया । नाहीं सुचिष्मंत काया । नाहीं जनासि निववावया । वचन मृद ।।११।।

भूतमात्राविषयी दया, शरीराचे पावित्र्य, इतरांना दिलासा देणारी वाणी यांचा मागमूस नसतो. ॥११॥

न कळे भक्ति न कळे ज्ञान । न कळे वैराग्य न कळे ध्यान । न कळे मोक्ष न कळे साधन । या नांव बद्ध ।।१२।।

भक्ती, ज्ञान, वैराग्य, ध्यान, मोक्ष, साधन इत्यादी शब्दसुद्धा त्याला वर्ज्य असतात! ॥१२॥

न कळे देव निश्चयात्मक । न कळे संतांचा विवेक । न कळे मायेचें कौतुक । या नाव बद्ध ।।१३।।

'देव' ही संकल्पना, संतांचा विवेकयुक्त उपदेश, व मायेचा भुलवणारा प्रभाव यांची कल्पनाही नसते. ॥१३॥

न कळे परमार्थाची खूण । न कळे अध्यात्मनिरूपण । न कळे आपणासि आपण । या नाव बद्ध ।।१४।।

मोक्षाचे वर्म, अध्यात्म चर्चा, व 'मी कोण आहे' याचा त्याला अंदाजही लागत नाही. ॥१४॥

न कळे जीवाचें जन्ममूळ । न कळे साधनांचें फळ । न कळे तत्त्वता केवळ । या नाव बद्ध ।।१५।।

जीवाचे जन्ममूळ, साधनेचे फळ आणि केवळ शुद्ध ब्रह्म हे कळत नाही. ॥१५॥

न कळे कैसें तें बंधन । न कळे मुक्तीचें लक्षण । न कळे वस्तु विलक्षण । या नाव बद्ध ।।१६।।

मायेचे बंधन, मोक्षाचे लक्षण, व नामरूपा पलीकडील ब्रह्म याविषयी पूर्ण अज्ञानी असतो. ॥१६॥

न कळे शास्त्रार्थ बोलिला । न कळे निजस्वार्थ आपुला । न कळे संकल्पें बांधला । या नाव बद्ध ।।१७।।

कोणी समजावून सांगितलेला शास्त्रार्थ, आपले शाश्वत हित, स्वत:वरील संकल्पाचे बंधन हे त्याला जराही उमजत नाही. ॥१७॥

जयासि नाहीं आत्मज्ञान । हें मुख्य बद्धाचें लक्षण । तीर्थ व्रत दान पुण्य । कांहींच नाहीं ।।१८।।

तीर्थ, व्रत, दान, पुण्य इत्यादिकांचा विचारही करीत नाही व आत्मज्ञान कशाशी खातात हेही ठाऊक नसणे ही बद्धाची मुख्य लक्षणे! ॥१८॥

दया नाहीं करुणा नाहीं । आर्जव नाहीं मित्रि नाहीं । शांति नाहीं क्षमा नाहीं । या नाव बद्ध ।।१९।।

दया, करुणा, नम्रता, मित्रता, शांती आणि क्षमा या गुणांचा अभाव असतो तो बद्ध होय. ॥१९॥

जे ज्ञानविशिं उणें । तेथें कैचीं ज्ञानाचीं लक्षणें । बहुसाल कुलक्षणें । या नाव बद्ध ।।२०।।

जेथे ज्ञानाचा पत्ताच नसतो तिथे ज्ञानाची लक्षणे कशी सापडणार? उलट कुलक्षणांनी भरलेला तो बद्ध. ॥२०॥

नाना प्रकारीचे दोष । करितां वाटे परम संतोष । बाष्कळपणाचा हव्यास । या नाव बद्ध ।।२१।।

नाना प्रकारे निषिद्ध वर्तन करण्यात भूषण वाटणे व बेताल वागण्याचा सोस असणे हीच बद्ध लक्षणे. ॥२१॥

(बावीस ते पस्तीस ओवीअखेर सर्व कुलक्षणांची यादी आहे. ती 'बहु' असण्यात फार दोष आहे. कमी असतील तर सुधारणे शक्य आहे.)

बहु काम बहु क्रोध । बहु गर्व बहु मद । बहु द्वंद्व बहु खेद । या नाव बद्ध ।।२२।।
बहु दर्प बहु दंभ । बहु विषये बहु लोभ । बहु कर्कश बहु अशुभ । या नाव बद्ध ।।२३।।
बहु ग्रामणी बहु मत्सर । बहु असूया तिरस्कार । बहु पापी बहु विकार । या नाव बद्ध ।।२४।।
बहु अभिमान बहु ताठा । बहु अहंकार बहु फांटा । बहु कुकर्माचा सांठा । या नाव बद्ध ।।२५।।
बहु कापट्य वादवेवाद । बहु कुतर्क भेदाभेद । बहु क्रूर कृपामंद । या नाव बद्ध ।।२६।।
बहु निंदा बहु द्वेष । बहु अधर्म बहु अभिळाष । बहु प्रकारीचे दोष । या नाव बद्ध ।।२७।।
बहु भ्रष्ट अनाचार । बहु नष्ट येकंकार । बहु आनित्य अविचार । या नाव बद्ध ।।२८।।
बहु निष्ठुर बहु घातकी । बहु हत्यारा बहु पातकी । तपीळ कुविद्या अनेकी । या नाव बद्ध ।।२९।।

बहु दुराशा बहु स्वार्थी । बहु कळह बहु अनर्थी । बहु डाईक दुर्मती । या नाव बद्ध ।।३०।।
बहु कल्पना बहु कामना । बहु तृष्णा बहु वासना । बहु ममता बहु भावना । या नाव बद्ध ।।३१।।
बहु विकल्पी बहु विषादी । बहु मूर्ख बहु समंधी । बहु प्रपंची बहु उपाधी । या नाव बद्ध ।।३२।।
बहु वाचाळ बहु पाषांडी । बहु दुर्जन बहु थोतांडी । बहु पैशून्य बहु खोडी । या नाव बद्ध ।।३३।।
बहु अभाव बहु भ्रम । बहु भ्रांति बहु तम । बहु विक्षेप बहु विराम । या नाव बद्ध ।।३४।।
बहु कृपण बहु खंदस्ती । बहु आदखणा बहु मस्ती । बहु असत्क्रिया व्यस्ती । या नाव बद्ध ।।३५।।

काम, संताप, गर्व, उन्मत्तपणा, मनातील द्वंद्वे, दु:ख, दर्प, दंभ, विषयासक्ती, लोभ, कर्कशपणा, अशुभ विचार, गावगुंडी, मत्सर, असूया, तिरस्कार, पाप, विकार, अभिमान, गर्व, अहंकार, विस्कळीत विचार, पापे, कपट, वादविवाद, कुतर्क, पक्षपात, क्रौर्य, कृपेचा अभाव, निंदा, द्वेष, अधर्म, अभिलाषा, अनेक दोष, भ्रष्टता, अनाचार, घातकी, सबगोलंकार, चंचल, अविचारी, निष्ठुर, घातकी, खुनी, पापी, तापट, जारणादि कुविद्या, अती आशा, स्वार्थ, भांडखोर, अनर्थकारी, डूक धरणारा, कुबुद्धी, शेखमहंमदी इच्छा, अनिवार हव्यास, भोगवासना, ममत्व, अनियंत्रित भावना, विकल्प, विषाद, मूर्ख, अखंड घोळक्यात राहणे, प्रपंचासक्त, उपद्व्यापी, बडबड्या, पाखंडी मताचा, दुर्जन, थोतांड करणारा, दोषदृष्टी, खोडकर, दरिद्री, भ्रमिष्ट, संशयी, तमोगुणी, चंचल, झोपाळू, कृपण, खादाड, दुर्लक्ष करणे, उन्मत्तपणा, वाईट वागणूक व जनरीतीला सोडून वागणे. ॥२२ ते ३५॥

परमार्थविषई अज्ञान । प्रपंचाचें उदंड ज्ञान । नेणें स्वयें समाधान । या नाव बद्ध ।।३६।।

परमार्थ शास्त्राचा गंध नसणे, जगातील उलाढालींची बित्तंबातमी असणे व समाधानाचा वाराही न लागणे ही बद्धाची लक्षणे आहेत. ॥३६॥

परमार्थाचा अनादर । प्रपंचाचा अत्यादर । संसारभार जोजार । या नाव बद्ध ।।३७।।

अध्यात्मशास्त्राविषयी तुच्छता, कुटुंब, व्यवसाय, राजकारण, अफवा इत्यादिकांची अती गोडी व संसाराच्या ओझ्याखाली दडपलेला तो बद्ध. ॥३७॥

सत्संगाची नाहीं गोडी । संतनिंदेची आवडी । देहेबुद्धीची घातली बेडी । या नाव बद्ध ।।३८।।

संतांपासून दूर राहून प्रसंगी त्यांची निंदा किंवा टवाळी करण्याची आवड व 'मी देह' या सहज निश्चयाने बांधला गेलेला तो बद्ध. ॥३८॥

हाती द्रव्याची जपमाळ । कांताध्यान सर्वकाळ । सत्संगाचा दुष्काळ । या नाव बद्ध ।।३९।।

पैसे मिळवण्याचा हव्यास, स्त्रियांच्या संगतीस हपापलेला व सत्संगाचे नाव न काढणारा तो बद्ध. ॥३९॥

नेत्रीं द्रव्य दारा पहावी । श्रवणीं द्रव्य दारा ऐकावी । चिंतनीं द्रव्य दारा चिंतावी । या नाव बद्ध ।।४०।।

डोळ्यांनी स्त्री व धन पहावे, कानांनी त्यांच्याविषयीच ऐकावे व मनात त्यांनीच ठाण मांडून असावे. ॥४०॥

काया वाचा आणि मन । चित्त वित्त जीव प्राण । द्रव्यदारेचें करी भजन । या नाव बद्ध ।।४१।।

शरीर, वाणी, मन, चित्त, वित्त, जीव व प्राण या सर्वांचे स्त्री (किंवा पुरुष) व संपत्तीसाठी समर्पण करणारा तो बद्ध. ॥४१॥

इन्द्रियें करून निश्चळ । चंचळ होऊं नेदी पळ । द्रव्यदारेसि लावी सकळ । या नाव बद्ध ।।४२।।

सर्व इंद्रियांना एक करून दुसरीकडे ढुंकूनही न पाहता स्त्री व धनामध्येच आसक्त राहणारा. ॥४२॥

द्रव्य दारा तेंचि तीर्थ । द्रव्य दारा तोचि परमार्थ । द्रव्य दारा सकळ स्वार्थ । म्हणे तो बद्ध ।।४३।।

त्याची तीर्थस्थाने, परमार्थ, स्वार्थ इ. सर्व द्रव्य व स्त्रीमध्ये एकवटलेले असतात! ॥४३॥

वेर्थ जाऊं नेदी काळ । संसारचिंता सर्वकाळ । कथा वार्ता ते चि सकळ । या नाव बद्ध ।।४४।।

एक क्षणही फुकट न जाऊ देता, संसाराविषयीच ऐकतो, त्याविषयीच बोलून त्याचीच अखंड चिंता वाहणारा. ।।४४।।

नाना चिंता नाना उद्वेग । नाना दुःखाचे संसर्ग । करी परमार्थाचा त्याग । या नाव बद्ध ।।४५।।

अनेक काळज्यांनी त्रासून सतत प्रपंचातील अडचणीत मन गुंतून पडल्याने परमार्थाकडे पूर्ण दुर्लक्ष करणारा तो बद्ध. ।।४५।।

घटिका पळ निमिष्यभरी । दुश्चीत नव्हतां अंतरीं । सर्वकाळ ध्यान करी । द्रव्यदारा प्रपंचाचें ।।४६।।

तास, तासाची मिनिटे व मिनिटांचे सेकंद यांत सतत प्रपंच, द्रव्य व स्त्रीचे अनुसंधान करणारा तो बद्ध. ।।४६।।

तीर्थ यात्रा दान पुण्य । भक्ति कथा निरूपण । मंत्र पूजा जप ध्यान । सर्वही द्रव्य दारा ।।४७।।

द्रव्य व स्त्रीमध्येच त्याची तीर्थे, यात्रा, दान, पुण्य, भक्ती, हरिकथा, प्रवचन, मंत्र, पूजा, जप, ध्यान सामावलेली असतात! ।।४७।।

जागृति स्वप्न रात्रि दिवस । ऐसा लागला विषयेध्यास । नाहीं क्षणाचा अवकाश । या नाव बद्ध ।।४८।।

जागेपणी, स्वप्नात, दिवसा व रात्री पंचविषयांचा ध्यास लागून क्षणभरही उसंत न मिळणारा तो बद्ध. ।।४८।।

ऐसें बद्धाचें लक्षण । मुमुक्षपणीं पालटे जाण । एक तेही वोळखण । पुढिलीये समासीं ।।४९।।

अशी ही 'बहु' असलेली बद्धाची लक्षणे मुमुक्षुत्व प्राप्त झाले असता हळूहळू बदलतात. त्यासंबंधी पुढील समासात ऐकावे. ।।४९।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'बद्धलक्षणनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'बद्धलक्षण' नावाचा सातवा समास समाप्त

दशक पाचवा : मंत्रांचा

समास आठवा : मुमुक्षुलक्षण

॥श्रीरामसमर्थ॥

संसारमदाचेनि गुणें । नाना हीनें कुलक्षणें । जयाचेनि मुखावलोकनें । दोषचि लागे ।।१।।

संसारात धुंद झाल्याने व अत्यंत घाणेरडी लक्षणे असल्याने ज्याचे तोंड पाहणेही पाप आहे. ॥१॥

ऐसा प्राणी जो कां बद्ध । संसारीं वर्ततां अबद्ध । तयास प्राप्त जाला खेद । काळांतरीं ।।२।।

अशा एखाद्याला संसारात अस्ताव्यस्त जीवन जगत असताना काही काळानंतर पश्चात्ताप वाटू लागतो. ॥२॥

संसारदु:खें दुखवला । त्रिविधतापें पोळला । निरूपणें प्रस्तावला । अंतर्यामीं ।।३।।

संसाराच्या थपडा बसल्या, तीन तापांनी चटके दिले व चुकून केव्हातरी कीर्तन, प्रवचन कानावर पडले व त्यामुळे अचानक पश्चात्ताप झाला. ॥३॥

जाला प्रपंचीं उदास । मनें घेतला विषयत्रास । म्हणे आतां पुरे सोस । संसारींचा ।।४।।

प्रपंचाचा कंटाळा येऊन पंच विषयांचा उबग आला. 'आता हा संसाराचा हव्यास पुरे झाला' असे वाटू लागले. ॥४॥

प्रपंच जाईल सकळ । येथील श्रम तो निर्फळ । आतां कांहीं आपुला काळ । सार्थक करूं ।।५।।

प्रपंच केव्हातरी मोडणारच आहे. त्यात केलेला अनावश्यक शीण निरर्थक असतो व तसा तो झाला आहे. आता यापुढे तरी आपल्या शाश्वत हिताचा विचार करून आयुष्य सार्थकी लावावे. ॥५॥

ऐसी बुद्धि प्रस्तावली । पोटीं आवस्ता लागली । म्हणे माझी वयेसा गेली । वेर्थचि आवघी ।।६।।

अशी ही पश्चात्तापाची अवस्था अंत:करणात घर करून बसली. 'माझे आतापर्यंतचे आयुष्य फुकट गेले' अशी धारणा तयार झाली. ॥६॥

पूर्वीं नाना दोष केले । ते अवघेचि आठवले । पुढें येऊनि उभे ठेले । अंतर्यामीं ।।७।।

आतापर्यंत जे अनंत अपराध केले ते सगळे अंत:करणात स्पष्टपणे आठवू लागले. ॥७॥

आठवे येमाची यातना । तेणें भयेचि वाटे मना । नाहीं पापासि गणना । म्हणौनियां ।।८।।

कीर्तनात ऐकलेल्या यमयातनांची आठवण झाली व त्यामुळे मन भयग्रस्त झाले. कारण पापेच तशी अगणित केली होती. ॥८॥

नाहीं पुण्याचा विचार । जाले पापाचे डोंगर । आतां दुस्तर हा संसार । कैसा तरों ।।९।।

पुण्यकर्मांचा थोडाही विचार न करता पापांचे डोंगर उभे केले. आता हा तरून जाण्यास महाकठीण असलेला संसार कसा पार पाडावा? जन्ममरणातून कसे सुटावे? ॥९॥

आपले दोष आछ्यादिलें । भल्यास गुणदोष लाविले । देवा म्यां वेर्थचि निंदिले । संत साधु सज्जन ।।१०।।

स्वत:चे दोष झाकले, सज्जनांवर दोषांचे आरोप करून गुणांकडे दुर्लक्ष केले. संत, साधू, सज्जन व देव यांची काही कारण नसताना किंवा त्यांची योग्यता न जाणता निंदा केली. ॥१०॥

निंदे ऐसे नाहीं दोष । ते मज घडले कीं विशेष । माझे अवगुणीं आकाश । बुडों पाहे ।।११।।

परनिंदा हे महापाप आहे. ते मी भरपूर केले असून माझ्या इतर अवगुणांमध्ये आकाशही बुडून जाईल एवढे ते अपार आहेत. ॥११॥

नाहीं वोळखिले संत । नाहीं अर्चिला भगवंत । नाहीं अतित अभ्यागत । संतुष्ट केले ।।१२।।

संतांचे माहात्म्य जाणले नाही, देवाची पूजा केली नाही, पाहुणेराउळे, माधुकरी यांना तृप्त केले नाही. ॥१२॥

पूर्व पाप वोढवलें । मज कांहींच नाहीं घडलें । मन अव्हाटीं पडिलें । सर्वकाळ ।।१३।।

पूर्वजन्माच्या पापामुळे माझ्या हातून एकही सत्कृत्य घडले नाही. मन नेहमी आडमार्गानेच भटकत गेले. ॥१३॥

नाहीं कष्टविलें शेरीर । नाहीं केला परोपकार । नाहीं रक्षिला आचार । काममदें ।।१४।।

ईशसेवा व लोकसेवेसाठी शरीराला कष्ट दिले नाहीत. परोपकाराचे नावही काढले नाही. भोगासक्तीमुळे विधिनिषेधांचा विचारही केला नाही. कामपूर्तीच्या धुंदीत त्यांचेकडे दुर्लक्ष केले. ॥१४॥

भक्तिमाता हे बुडविली । शांति विश्रांति मोडिली । मूर्खपणें म्यां विघडिली । सद्बुद्धी सद्वासना ।।१५।।

भक्तिरूप आईला बुडवून टाकली. शांती व विश्रांती कशी असते ते कधीच अनुभवले नाही. क्वचित सद्‌वासना व सद्बुद्धी झालीच तर ती दडपून टाकली. ॥१५॥

आतां कैसें घडे सार्थक । दोष केले निरार्थक । पाहों जातां विवेक । उरला नाहीं ।।१६।।

ज्या पापकर्माने मला काहीच लाभ झाला नाही, ती मी विवेक न उरल्याने केली. आता जीवनाचे सार्थक घडावे कसे? ॥१६॥

कोण उपाये करावा । कैसा परलोक पावावा । कोण्या गुणें देवाधिदेवा । पाविजेल ।।१७।।

आता काय साधन करावे? परलोकाची प्राप्ती कशी साधावी? ब्रह्मानुभव कसा येईल? ॥१७॥

नाहीं सद्भाव उपजला । अवघा लोकिक संपादिला । दंभ वरपंगें केला । खटाटोप कर्माचा ।।१८।।

सद्भावना कधी निर्माणच झाली नाही. जे जे प्रपंचाला उपयोगी तेच केले. लोकात बरे दिसण्यापुरते उथळ कर्मकांड केले. ॥१८॥

कीर्तन केलें पोटासाठीं । देव मांडिले हाटवटीं । आहा देवा बुद्धि खोटी । माझी मीच जाणें ।।१९।।

चरितार्थासाठी कीर्तनाचेही सोंग केले. देवांचा बाजार मांडून कथा केल्या. हे देवा, माझी बुद्धी किती भ्रष्ट आहे, ती माझी मलाच ठाऊक! ॥१९॥

पोटीं धरूनि अभिमान । शब्दीं बोलें निराभिमान । अंतरीं वांछूनियां धन । ध्यानस्त जालों ।।२०।।

शरीराने वाकून व वाणीने नम्र बोलून आपण अहंकाररहित असल्याचा आव आणताना मनात मात्र तो ठासून भरला होता. कोणी पैसे देतील या अपेक्षेने बकध्यान लावून बसलो. ॥२०॥

वित्पत्तीनें लोक भोंदिले । पोटासाठीं संत निंदिले । माझे पोटीं दोष भरले । नाना प्रकारीचे ।।२१।।

व्युत्पत्तीचे शाब्दिक खेळ करून लोकांना भुलविले. आपल्याला श्रेष्ठ समजून लोकांनी देणग्या द्याव्यात म्हणून श्रेष्ठ संतांचे दोष दाखवले. असे नाना दोष माझ्यात आहेत. ॥२१॥

सत्य तेंचि उछिदेलें । मिथ्य तेंचि प्रतिपादिलें । ऐसें नाना कर्म केलें । उदरंभराकारणें ।।२२।।

सत्याचे आपणच रक्षक असल्याचे भासविण्यासाठी सत्याचा उच्छेद केला! खोट्याला प्रतिष्ठा दिली. पोट भरण्यासाठी असे अनेक अपप्रकार केले. ॥२२॥

ऐसा पोटीं प्रस्तावला । निरूपणें पालटला । तोचि मुमुक्षु बोलिला । ग्रंथांतरीं ।।२३।।

सगुण-निर्गुणाचे निरूपण कानांवर पडल्यानंतर मनापासून अनुताप होऊन अंतर्बाह्य बदलतो तोच मुमुक्ष म्हणावा, असे ग्रंथ सांगतात. ॥२३॥

(ओवी २४ पासून ४३ पर्यंत हा अनुतापदग्ध जणू आपल्या पूर्वायुष्यातील कुकर्मांचा पाढा वाचून स्वतःची निर्भर्त्सना करीत आहे. यालाच समर्थ मुमुक्षू म्हणतात.)

पुण्यमार्ग पोटीं धरी । सत्संगाची वांछा करी । विरक्त जाला संसारीं । या नाव मुमुक्ष ।।२४।।
गेले राजे चक्रवर्ती । माझें वैभव तें किती । म्हणे धरूं सत्संगती । या नाव मुमुक्ष ।।२५।।
आपुले अवगुण देखे । विरक्तिबळें वोळखे । आपणासि निंदी दुःखें । या नाव मुमुक्ष ।।२६।।
म्हणे मी काये अनोपकारी । म्हणे मी काय दंभधारी । म्हणे मी काये अनाचारी । या नाव मुमुक्ष ।।२७।।
म्हणे मी पतित चांडाळ । म्हणे मी दुराचारी खळ । म्हणे मी पापी केवळ । या नाव मुमुक्ष ।।२८।।
म्हणे मी अभक्त दुर्जन । म्हणे मी हीनाहूनि हीन । म्हणे मी जन्मलों पाषाण । या नाव मुमुक्ष ।।२९।।
म्हणे मी दुराभिमानी । म्हणे मी तपीळ जनीं । म्हणे मी नाना वेसनी । या नाव मुमुक्ष ।।३०।।
म्हणे मी आळसी आंगचोर । म्हणे मी कपटी कातर । म्हणे मी मूर्ख अविचार । या नाव मुमुक्ष ।।३१।।
म्हणे मी निकामी वाचाळ । म्हणे मी पाषांडी तोंडाळ । म्हणे मी कुबुद्धि कुटिळ । या नाव मुमुक्ष ।।३२।।
म्हणे मी कांहींच नेणे । म्हणे मी सकळाहूनि उणें । आपलीं वर्णी कुलक्षणें । या नाव मुमुक्ष ।।३३।।
म्हणे मी अनाधिकारी । म्हणे मी कुश्चिळ अघोरी । म्हणे मी नीच नानापरी । या नाव मुमुक्ष ।।३४।।
म्हणे मी काये आपस्वार्थी । म्हणे मी काये अनर्थी । म्हणे मी नव्हे परमार्थी । या नाव मुमुक्ष ।।३५।।
म्हणे मी अवगुणाची रासी । म्हणे मी वेर्थ आलों जन्मासी । म्हणे मी भार जालों भूमीसी । या नाव मुमुक्ष ।।३६।।
आपणास निंदी सावकास । पोटीं संसाराचा त्रास । धरी सत्संगाचा हव्यास । या नाव मुमुक्ष ।।३७।।
नाना तीर्थे धुंडाळिलीं । शमदमादि साधनें केली । नाना ग्रंथांतरें पाहिली । शोधूनियां ।।३८।।
तेणें नव्हे समाधान । वाटे अवघाच अनुमान । म्हणे रिघों संतांस शरण । या नाव मुमुक्ष ।।३९।।
देहाभिमान कुळाभिमान । द्रव्याभिमान नानाभिमान । सांडूनि संतचरणीं अनन्य । या नाव मुमुक्ष ।।४०।।
अहंता सांडूनि दूरी । आपणास निंदी नानापरी । मोक्षाची अपेक्षा करी । या नाव मुमुक्ष ।।४१।।
ज्याचें थोरपण लाजे । जो परमार्थकारणें झिजे । संतापाईं विश्वास उपजे । या नाव मुमुक्ष ।।४२।।
स्वार्थ सांडून प्रपंचाचा । हव्यास धरिला परमार्थाचा । अंकित होईन सज्जनाचा । म्हणे तो मुमुक्ष ।।४३।।

मोठमोठे सम्राट वैभवसंपन्न असून मरण पावले. त्यांच्या तुलनेने मी कोण? आता संतसंगतीच धरावी. वैराग्यामुळे आपले दुर्गुण आपल्याला मान्य होऊ लागून त्यांची निर्भर्त्सना करून कष्टी होतो. मी कोणी केलेले उपकार जाणले नाहीत, दंभ व अनाचारात बुडालो. मी पतित, चांडाळ, दुराचारी, खळ व महापापी आहे. मी अभक्त, दुर्जन, अती हीन व जन्मापासून दगडाप्रमाणे संस्कारशून्य राहिलो. दुरभिमानी, तापट व अनेक व्यसनांत गुरफटलो. मी आळशी, कामचुकार, कपटी, कंजूस, मूर्ख व अविचारी आहे. निष्क्रिय, बडबड्या, पाखंडी, भांडखोर, कुबुद्धी व कुटिल आहे. मी अज्ञानी, सर्वांहून हीन अशी माझी कुलक्षणे आहेत. अध्यात्माचा अधिकार नसलेला, गलिच्छ, अघोरी व सर्व दृष्टीने नालायक आहे. मी मतलबी, घातकी, व परमार्थापासून दूर असून अवगुणांची रास आहे. माझा जन्म फुकट असून या पृथ्वीला भार होऊन राहिलो आहे. अशी स्वत:ची यथेच्छ निंदा करून संसाराचा उबग आल्याने संतसंगतीची जबर ओढ लागलेला; अनेक तीर्थयात्रा केल्या, शमदमादी साधने केली, अनेक ग्रंथांचा अभ्यास करूनही खरे समाधान

न मिळता असा तो सगळाच अनुमानधपका दिसल्याने संतांना शरण जाण्याचा निश्चय करतो. देह, कुळ, द्रव्यादी अनेक अभिमान सोडून संतचरणी शरण जातो. अहंकार सोडून स्वत:ची निर्भर्त्सना करून मोक्षाची इच्छा करणाऱ्या, त्याला स्वत:च्या तथाकथित मोठेपणाची लाज वाटते व परमार्थासाठी शरीर झिजवतो. संतांविषयी श्रद्धा निर्माण होते. प्रपंचातील केवळ स्वार्थ सोडून परमार्थाचा ध्यास घेऊन संतांची दास्यभक्ती करतो तो मुमुक्ष. ।।२४ ते ४३।।

ऐसा मुमुक्ष जाणिजे । संकेतचिन्हें वोळखिजे । पुढें श्रोतीं अवधान दीजे । साधकलक्षणीं ।।४४।।

या सर्व लक्षणांवरून मुमुक्षू ओळखावा. आता साधक लक्षणे लक्ष देऊन ऐका. ।।४४।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मुमुक्षुलक्षणनाम' समास आठवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'मुमुक्षुलक्षण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक पाचवा : मंत्रांचा

समास नववा : साधकलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

मागां मुमुक्षाचें लक्षण । संकेतें केलें कथन । आतां परिसा सावधान । साधक तो कैसा ।।१।।

मागील समासात मुमूक्षूच्या खुणा सांगितल्या. आता सावधानतेने साधकाची लक्षणे ऐका. ॥१॥

अवगुणाचा करूनि त्याग । जेणें धरिला संतसंग । तयासि बोलिजे मग । साधक ऐसा ।।२।।

सर्व दुर्गुण सोडून ज्याने संतांची सेवा पत्करली आहे त्याला साधक म्हणावे. ॥२॥

जो संतांसी शरण गेला । संतजनीं आश्वासिला । मग तो साधक बोलिला । ग्रंथांतरीं ।।३।।

जो संतांना शरण गेला व संतांनी त्याला आपले म्हटले की तो साधक असे ग्रंथ म्हणतात. ॥३॥

उपदेशिलें आत्मज्ञान । तुटलें संसारबंधन । दृढतेकारणें करी साधन । या नाव साधक ।।४।।

श्रीगुरूंनी आत्मज्ञानाचा उपदेश केल्यावर प्रपंचासक्ती सुटून ज्ञान दृढ होण्यासाठी तीव्र साधना करतो. ॥४॥

धरी श्रवणाची आवडी । अद्वैतनिरूपणाची गोडी । मननें अर्थांतर काढी । या नाव साधक ।।५।।

वेदान्त शास्त्रातील अद्वैत तत्त्वाच्या श्रवणाची आवड निर्माण होऊन त्यावर स्वत: मनन करून वाच्य-लक्ष्याचा यथार्थ विवेक करतो. ॥५॥

होता सारासारविचार । ऐके होऊनि तत्पर । संदेह छेदूनि दृढोत्तर । आत्मज्ञान पाहे ।।६।।

कीर्तन-प्रवचनात सार व असाराचा विचार सुरू झाला की अगदी लक्षपूर्वक ऐकून सर्व शंकांचे निरसन करून आत्मानुभूतीच्या अधिकाधिक जवळ जातो. ॥६॥

नाना संदेहनिवृत्ती । व्हावया धरी सत्संगती । आत्मशास्त्रगुरुप्रचीती । ऐक्यतेसि आणी ।।७।।

मनात उठणारे अनेक संशय दूर करण्यासाठी संतसहवास धरतो. वेदांतशास्त्र, श्रीगुरूंचा उपदेश व स्वत:चा अनुभव यांतील एकरूपतेचा अनुभव घेतो. ॥७॥

देहबुद्धि विवेकें वारी । आत्मबुद्धि सदृढ धरी । श्रवण मनन केलेंचि करी । या नाव साधक ।।८।।

'मी देह' हा निश्चय विचाराने दूर करून 'मी आत्मा' असा निश्चय दृढ करीत तेच श्रवण व मनन वारंवार करतो. ॥८॥

विसंचूनि दृश्यभान । दृढ धरी आत्मज्ञान । विचारें राखें समाधान । या नाव साधक ।।९।।

दृश्य जगताचे विचाराने पृथक्करण करीत त्याच्या अधिष्ठानाशी चित्तवृत्ती दृढ ठेवतो व विचाराने स्वत:चे समाधान सांभाळतो. ॥९॥

तोडूनि द्वैताची उपाधी । अद्वैत वस्तु साधनें साधी । लावी ऐक्यतेची समाधी । या नाव साधक ।।१०।।

उपाधीमुळे भासणारे द्वैत बाजूला सारून अद्वैत आत्मस्वरूपाच्या अनुसंधानाची साधना करतो. जीव आत्मा आहे या अनुभवाने समाधी साधतो. (घटातील आकाशाची घट ही उपाधी आहे. घट असला किंवा नसला तरी आकाश असते. देह ही आत्म्याची उपाधी आहे.) ॥१०॥

आत्मज्ञान जीर्ण जर्जर । त्याचा करी जीर्णोद्धार । विवेकें पावे पैलपार । या नाव साधक ।।११।।

आत्मा हे प्रत्येकाचे स्वरूप असूनही अविद्येमुळे त्याचे ज्ञान होत नाही. असे अज्ञान लाखो जन्म टिकून राहिल्याने ज्ञान जणू फार जीर्ण झालेले असते. त्या आत्मज्ञानाचा जणू उद्धार करून विवेकाच्या आधाराने मायासमुद्राच्या पैलतीरावर जातो. ॥११॥

उत्तमें साधूचीं लक्षणें । अंगिकारी निरूपणें । बळेचि स्वरूपाकार होणें । या नाव साधक ।।१२।।

निरूपणात जी साधूची उत्तम लक्षणे कानावर पडतील ती अभ्यासपूर्वक स्वत:मध्ये बाणवून घेण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे आत्मानुभवाचा अधिकार निर्माण होतो. ॥१२॥

असत्क्रिया ते सोडिली । आणी सत्क्रिया ते वाढविली । स्वरूपस्थिती बळावली । या नाव साधक ।।१३।।

निषिद्ध कर्मांचा त्याग करून विहित कर्मे वाढती केली व आत्मस्थिती प्राप्त होण्यास बळ आले. ॥१३॥

अवगुण त्यागी दिवसेंदिवस । करी उत्तम गुणाचा अभ्यास । स्वरूपीं लावी निजध्यास । या नाव साधक ।।१४।।

दिवसानुदिवस सर्व अवगुण सोडून, उत्तम गुण बाणवण्याचा प्रयत्न करून आत्मस्वरूपाच्या चिंतनात राहतो. ॥१४॥

दृढ निश्चयाचेनि बळें । दृश्य असतांच नाडळे । सदा स्वरूपीं मिसळे । या नाव साधक ।।१५।।

आत्मानात्मविचार घट्ट धरून ठेवल्याने अनात्म जगत् दिसत असूनही नाहीसे होते व आत्मस्वरूपाच्या अनुसंधानात राहतो. (अनात्मपदार्थ मिथ्या असतात असा निश्चय असतो.) ॥१५॥

प्रत्यक्ष माया अलक्ष करी । अलक्ष वस्तु लक्षी अंतरीं । आत्मस्थितीची धारणा धरी । या नाव साधक ।।१६।।

नामरूपात्मक माया प्रत्यक्षात दिसत असूनही तिचे मिथ्यात्व लक्षात ठेवतो. अरूप ब्रह्म दिसत नसूनही त्याचे सत्यत्व जाणून त्याच्या अनुसंधानात राहतो. अंत:करणवृत्ती आत्माकार करण्याचा अभ्यास करतो. ॥१६॥

जें या जनासि चोरलें । मनास न वचे अनुमानलें । तेंचि जेणें दृढ केलें । या नाव साधक ।।१७।।

सामान्य लोकांना ज्याचा अंदाजही लागत नाही, जे मन, बुद्धी, चित्ताच्या आवाक्यात सापडत नाही, तेच आपले स्वरूप असल्याचा दृढ निश्चय करतो. ॥१७॥

जें बोलतांचि वाचा धरी । जें पाहतांचि अंध करी । तें साधी नाना परी । या नाव साधक ।।१८।।

ज्यासंबंधी बोलू लागले तर वाणी थांबते, जे पाहू लागले तर कधीच दिसत नाही, ते हरप्रयत्नाने अनुभवण्याची शिकस्त करतो. ॥१८॥

जें साधूं जातां साधवेना । जें लक्षूं जातां लक्षवेना । तेंचि अनुभवे आणी मना । या नाव साधक ।।१९।।

ब्रह्म नित्यप्राप्त असल्याने साध्य नाही. ते अरूप असल्याने पंचज्ञानेंद्रिये व अंत:करण वृत्तीला कळत नाही, त्याचाच अनुभव घेतो. ॥१९॥

जेथें मनचि मावळे । जेथें तर्कचि पांगुळे । तेंचि अनुभवा आणी बळें । या नाव साधक ।।२०।।

ब्रह्म अनुभवात मन शिल्लक राहत नाही. त्याचे संबंधी तर्काचे शहाणपण चालत नाही. तेच ब्रह्म महाप्रयासाने अनुभवात आणतो. ॥२०॥

स्वानुभवाचेनि योगें । वस्तु साधी लागवेगें । तेंचि वस्तु होये आंगें । या नाव साधक ।।२१।।

आत्मानुसंधानाचा अनुभव घेत घेत जो त्वरेने स्वत:च आत्मा होऊन राहतो. ॥२१॥

अनुभवाचीं आंगें जाणें । योगियांचे खुणे बाणे । कांहींच नहोन असणें । या नाव साधक ।।२२।।

आत्मानुभवाची सर्व वर्मे जाणतो. त्याची लक्षणे जाणतो. महान योग्यांच्या अनुभवाचा मागोवा घेत तो स्वत:मध्ये

बाणवतो. देहतादात्म्य, कर्तृत्वभोक्तृत्व व जगत्सत्यत्व यातील एकही भ्रांती न राहता जो केवळ प्रारब्धामुळे जीवन जगतो. ॥२२॥

परती सारून उपाधी । असाध्य वस्तु साधनें साधी । स्वरूपीं करी दृढ बुद्धी । या नाव साधक ।।२३।।

देहाच्या उपाधीचा निरास करण्याच्या साधनेने, जो आत्मा नित्यप्राप्त असल्याने 'साध्य' नाही त्याच्याशी अंत:करणवृत्ती दृढत्वाने तदाकार करतो. आत्म्यालाच स्वरूप म्हणतात– 'आत्मा मी नाही' अशा समजुतीपोटी 'तो मी आहे' असा अनुभव घेण्यासाठी अनुभव घेणारा साधक, आत्मा साध्य व साधकाला साध्याशी जोडणारे साधन असा अकारण पसारा मांडला जातो. ॥२३॥

देवाभक्ताचें मूळ । शोधून पाहे सकळ । साध्यचि होये तत्काळ । या नाव साधक ।।२४।।

ब्रह्मरूप देव व जीवरूप भक्त यांचे मूळचे नाते शोधून काढून ते अविद्येमुळे बिघडलेले आहे हे लक्षात घेऊन पुन्हा जोडतो. जीव वास्तविक ब्रह्मच आहे. ॥२४॥

विवेकबळें गुप्त जाला । आपेंआप मावळला । दिसतो परी देखिला । नाहींच कोणी ।।२५।।

'जीव मूळचा ब्रह्म आहे' या विवेकज्ञानाच्या बळाने तो सतत निराकार आत्म्याच्या अनुसंधानात राहतो. (गुप्त) देहरूपाने तो सर्वांना दिसत असला तरी आत्मरूप त्याला कोणीच पाहत नाही. स्वत:चा देह, मिथ्यत्व निश्चयामुळे त्याच्या दृष्टीने मावळलेला असतो. ॥२५॥

मीपण मागें सांडिलें । स्वयें आपणास धुंडिलें । तुर्येसहि वोलांडिलें । या नाव साधक ।।२६।।

मी देह, मी मन, मी प्राण इ. सर्व मीपणा विचाराने मागे सारून आत्मरूप 'मी' चा शोध घेतो. 'मी तुर्य, हा अतिसूक्ष्म मीपणाही सोडून देतो. ॥२६॥

पुढें उन्मनीचा सेवटीं । आपली आपण अखंड भेटी । अखंड अनुभवीं ज्याची दृष्टी । या नाव साधक ।।२७।।

उन्मनीच्या पलीकडील सहजावस्थेमध्ये कोणतीही साधना न करता जीव व आत्मा यांचे मूळचे ऐक्य अनुभवत राहतो. तो अनुभव कशानेही भंग पावत नाही. ॥२७॥

द्वैताचा तटका तोडिला । भासाचा भास मोडिला । देहीं असोनि विदेह जाला । या नाव साधक ।।२८।।

द्वैताचे म्हणजे भेददृष्टीचे आवळलेले पाश तोडून टाकले. भेद व्यवहारात असून नसल्यासारखा झाला. सविशेष जाणिवांचे विशेषत्व बाधित करून निर्विशेष जाणीव स्थिर केली. देहात राहूनही 'मी देह नाही' अशा निश्चयात राहू लागला. (सविशेष = विशेषासह; विशेष = रूप, रंग, आकार, गुण इ. निर्विशेष = हे सर्व विशेष जाणिवेतून काढून टाकणे = शुद्ध जाणीव) ॥२८॥

जयास अखंड स्वरूपस्थिती । नाहीं देहाची अहंकृती । सकळ संदेहनिवृत्ती । या नाव साधक ।।२९।।

जो सतत स्वरूपानुसंधानात राहतो, त्याचा 'मी देह' हा भ्रम गळून पडलेला असतो. मी कोण, जगाचे स्वरूप काय इ. सर्व शंका पूर्णपणे फिटलेल्या असतात. (अनु = मागे मागे जाणे, संधान = संपर्क साधणे, अनुसंधान = सतत संपर्क साधून असणे.) ॥२९॥

पंचभूतांचा विस्तार । जयासि वाटे स्वप्नाकार । निर्गुणीं जयाचा निर्धार । या नाव साधक ।।३०।।

पंचमहाभूतांच्या पंचीकरणाने झालेला हा विश्वाचा अफाट पसारा ज्याला स्वप्नाप्रमाणे वाटतो. 'निर्गुण ब्रह्म मी आहे' असा निश्चय झालेला असतो. ॥३०॥

स्वप्नीं भये जें वाटलें । तें जागृतीस नाहीं आलें । सकळ मिथ्या निर्धारिलें । या नाव साधक ।।३१।।

स्वप्नात वाटलेली कोणाची तरी भीती ते कोणी जागृतीत नसल्याने निघून जाते. त्यामुळे हे दोन्ही अनुभव मिथ्या

असल्याचा निश्चय होतो. (भीती व तिचे निवारण मिथ्या) ॥३१॥

मायेचें जें प्रत्यक्षपण । जनास वाटे हें प्रमाण । स्वानुभवें अप्रमाण । साधकें केलें ।।३२।।

सामान्य माणसांना डोळ्यांनी धडधडीत दिसणारे हे जग सत्य वाटते. पण साधकाने मात्र ते मिथ्या आहे असे अनुभवाने निश्चित केलेले असते. ॥३२॥

निद्रा सांडूनि चेइरा जाला । तो स्वप्नभयापासून सुटला । माया सांडून तैसा गेला । साधक स्वरूपीं ।।३३।।

झोंपेतून जागा झालेला स्वप्नांत वाटलेल्या भीतीपासून मुक्त होतो त्याप्रमाणे अज्ञानाच्या झोंपेतून जागा झालेला (साधक) स्वप्नवत् संसारभयातून सुटतो. (अज्ञान = माया) ॥३३॥

ऐसी अंतरस्थिती बाणली । बाह्य निस्पृहता अवलंबिली । संसारउपाधी त्यागिली । या नाव साधक ।।३४।।

अंतरंग वरीलप्रमाणे स्थिर झाले. बाह्य जीवनात सहजच नि:स्पृहता तयार होऊन संसारातील कर्तृत्व, सत्यत्व, ममत्व संपून गेले. ॥३४॥

कामापासून सुटला । क्रोधापासून पळाला । मद मत्सर सांडिला । येकीकडे ।।३५।।

कामबंधनातून मुक्त झाला, क्रोधापासून दूर निघून गेला, मद व मत्सर दूर कोठेतरी टाकून दिले. ॥३५॥

कुळाभिमानासी सांडिलें । लोकलाजेस लाजविलें । परमार्थास माजविलें । विरक्तिबळें ।।३६।।

मी कुळवन्त, खानदानी इ. अभिमान सोडले. लोकलाजेला लज्जित केले (सोडून दिली) व वैराग्याच्या बळावर परमार्थास सामर्थ्य प्राप्त करून दिले. ॥३६॥

अविद्येपासून फडकला । प्रपंचापासून निष्टला । लोभाचे हातींचा गेला । अकस्मात ।।३७।।

अविद्येपासून फारकत घेतली, प्रपंचाच्या तावडीतून निसटला, लोभाला अचानक झुकांडी दिली. ॥३७॥

थोरपणासि पाडिलें । वैभवासि लिथाडिलें । महत्त्वासि झिंजाडिलें । विरक्तिबळें ।।३८।।

वैराग्याच्या सामर्थ्याने 'मी मोठा' ही कल्पना खाली आदळली, वैभवाच्या ममत्वाला लाथाडले व स्वत:चा खासपणा (मोठेपणा) (V.I.P) झिडकारला. ॥३८॥

भेदाचा मडघा मोडिला । अहंकार सोडून पाडिला । पाईं धरून आपटिला । संदेहशत्रु ।।३९।।

द्वैतरूप भेदाचे मडके फोडले, मानेवर बसलेला अहंकार सोडवून खाली पाडला व संशय या जन्मजात शत्रूला त्याचे पाय पकडून आपटले. ॥३९॥

विकल्पाचा केला वधु । थापें मारिला भवसिंधू । सकळ भूतांचा विरोधु । तोडून टाकिला ।।४०।।

संकल्पाबरोबर उठणाऱ्या विकल्पाला ठार मारले, भवसमुद्राला थपडा लगावल्या व सर्व भूतांशी धरलेले वैर तोडले.('लोकान्नोद्विजते च य:'-गीता१२-१५) ॥४०॥

भवभयासी भडकाविलें । काळाचें टांगें मोडिलें । मस्तक हाणोनि फोडिलें । जन्ममृत्याचें ।।४१।।

प्रपंचाविषयी वाटणाऱ्या भयाला भडाग्नी दिला, यमदेवाची तंगडी तोडली व जन्ममरणाचे डोके आपटून फोडले. ॥४१॥

देहसमंधावरी लोटला । संकल्पावरी उठवला । कल्पनेचा घात केला । अकस्मात ।।४२।।

'देह मी' या अज्ञानाच्या समंधावर 'मी ब्रह्म' हा मंत्र सोडला, संकल्पाच्या जीवावर उठला, कल्पना पक्ष्यांचे थवे खाली पाडून मारले. ॥४२॥

अपधाकासि ताडिलें । लिंगदेहासि विभांडिलें । पाषांडास पछ्याडिलें । विवेकबळें ।।४३।।

स्वत:लाच धाक दाखविणाऱ्या असुरक्षिततेच्या भावनेला यथेच्छ बडविले. सूक्ष्म शरीराने 'मी' वर मिळविलेला कब्जा मोडून काढला. 'मी आत्मा' या विवेकाची कुमक तेथे उपयोगी पडली. ।।४३।।

गर्वावरी गर्व केला । स्वार्थ अनर्थीं घातला । अनर्थ तोहि निर्दाळिला । नीतिन्यायें ।।४४।।

नम्रता धरून गर्वाला मान खाली घालणे भाग पाडले. स्वार्थाला अनर्थात नेऊन सोडले. न्यायनीतीच्या वर्तनाने जीवनात अनर्थाला थारा दिला नाही. ।।४४।।

मोहासी मधेंचि तोडिलें । दुःखासि दुःधडचि केलें । शोकास खंडून सांडिलें । येकिकडे ।।४५।।

मोह ऐन भरात आला असता तोडून टाकला. दु:खाचे दोन तुकडे केले व शोकाचे तुकडे करून चारी दिशांना फेकून दिले. (दु:ख व शोक हे अविद्येचे परिणाम आहेत. ती गेली की हेही जातात.) ।।४५।।

द्वेष केला देशधडी । अभावाची घेतली नरडी । धाकें उदर तडाडी । कुतर्काचें ।।४६।।

द्वेषाला हद्दपार केले, शून्यवादाच्या नरडीचा घोट घेतला, कुतर्काला धाक घालून त्याचे पोट फाडले.(ब्रह्म सत्य आहे. त्याचा अभाव केव्हाही कुठेही नसतो. प्राक्, प्रध्वंस व अत्यंत हे अभाव नामरूपात्मक जगताला असतात. ब्रह्माला नसतात.) ।।४६।।

ज्ञानें विवेक माजला । तेणें निश्चयो बळावला । अवगुणाचा संव्हार केला । वैराग्यबळें ।।४७।।

विवेकाच्या ज्ञानाने मोठे सामर्थ्य मिळून 'ब्रह्म सत्य' हा निश्चय बळकट झाला. वैराग्यामुळे अवगुणांचा संहार झाला. (मत्सर हा अवगुण आहे. दुसऱ्याचे वैभव पाहून उठणारा मत्सर विरक्तापाशी नसतो.) ।।४७।।

अधर्मास स्वधर्में लुटिलें । कुकर्मासि सत्कर्में झुगटिलें । लांटून वाटा लाविलें । विचारें अविचारासी ।।४८।।

स्वधर्मपालनाने अधर्माचे दिवाळे काढले. सत्कर्मे करून कुकर्मांना झुगारून दिले. विचाराने अविचाराला ढकलून वाटेला लावले. ।।४८।।

तिरस्कार तो चिरडिला । द्वेष खिरडूनि सांडिला । विषाद अविषादें घातला । पायांतळीं ।।४९।।

दुसऱ्याविषयी वाटणाऱ्या तिरस्काराला चिरडून टाकले (पहा. ईश.६) द्वेषाला समूळ उपटले. मोह नष्ट झाल्याने विषादरहित होऊन विषाद पायाखाली चिरडला. ।।४९।।

कोपावरी घालणें घातलें । कापट्य अंतरी कुटिलें । सख्य आपुलें मानिलें । विश्वजनीं ।।५०।।

क्रोधावर अचानक हल्ला चढवला. कपटीपणाला तो जेथे निर्माण होतो तेथेच ठेचले. विश्वातील सर्व माणसांना आपले सखे मानले. ।।५०।।

प्रवृत्तीचा केला त्याग । सुहृदाचा सोडिला संग । निवृत्तिपथें ज्ञानयोग । साधिता जाला ।।५१।।

कर्मकांडाचा त्याग केला, गणगोत व मित्रांवरील माझेपणाचा भाव सोडला व निवृत्तिमार्गाने ज्ञानयोग साधला. ।।५१।।

विषयेमैंदास सिंतरिलें । कुविद्येसि वेढा लाविलें । आपणास सोडविलें । आप्ततश्करापासुनी ।।५२।।

पंचविषयरूप चोरांना फसविले (ते सुख देत नाहीत असे निश्चित झाले. ते सुख देण्याचा आव आणतात हे ओळखले) अन्यथा ज्ञानाला लुबाडले. (एक असताना दुसरे दिसणे. ब्रह्म असताना जग दिसणें) जे स्वकीय मोहात पाडत होते व आत्मसुखाचे हरण करीत होते त्यांच्यापासून स्वत:ला सोडवले. ।।५२।।

पराधेनतेवरी कोपला । ममतेवरी संतापला । दुराशेचा त्याग केला । येकायेकी ।।५३।।

देह, विषय, नातलग, संपत्ती इत्यादिकांवर आत्मरूप मी अवलंबून नाही हे जाणले, 'माझे' म्हणण्यासाठी दुसरे

कोणी व काही नाही हे ओळखले (नेह नानास्ति किञ्चन– उपनि) ईश्वरी योजनेनुसार जीवासाठी जे नियोजित असते ते मिळते हे जाणल्यामुळे व आत्मा नित्यतृप्त असल्याने आशेचा एकदम त्याग केला. ॥५३॥

स्वरूपीं घातलें मना । यातनेसि केली यातना । साक्षेप आणि प्रेत्ना । प्रतिष्ठिलें ।।५४।।

संकल्प व विकल्पाने चांचल्य निर्माण करणाऱ्या मनाला शांत स्वरूपात नेऊन सोडले. आनंदरूप आत्म्याला यातनारूप दु:ख स्पर्शही करणे शक्य नाही या विचाराने यातनांनाच यातना दिल्या. प्रयत्नांच्या सातत्याला प्रतिष्ठा दिली. ॥५४॥

अभ्यासाचा संग धरिला । साक्षपासरिसा निघाला । प्रेत्न सांगाती भला । साधनपंथें ।।५५।।

अन्यसंग सोडून साधनाभ्यासाचा संग धरला व त्याचे सातत्य सांभाळले. साधनामार्गावर योग्य प्रयत्नासारखा जोडीदार नाही असे जो जाणतो तो साधक म्हणावा. ॥५५॥

सावध दक्ष तो साधक । पाहे नित्यानित्यविवेक । संग त्यागूनि येक । सत्संग धरी ।।५६।।

जो साधक जागरूक व दक्ष असतो तो सतत नित्य व अनित्याच्या विचारावर आरूढ असतो. इतर सर्व संग सोडून फक्त संतसंगती धरतो. ॥५६॥

बळेंचि सारिला संसार । विवेकें टाकिला जोजार । शुद्धाचारें अनाचार । भ्रष्टविला ।।५७।।

वैराग्यबळाने संसाराची आसक्ती सोडतो. विवेकाने त्यांतील व्यथांना दूर सारतो. सदाचरणाने अनाचाराचे बंड मोडून काढतो. ॥५७॥

विसरास विसरला । आळसाचा आळस केला । सावध नाहीं दुश्चित्त जाला । दुश्चित्तपणासी ।।५८।।

साधनारूढ राहण्याचे विसरणें विसरला! त्याच्या आळसाचा आळस केला. लक्ष नसण्याकडे लक्ष न देता लक्ष नसण्याविषयी बेसावध राहिला. (शाब्दिक कोट्या) ॥५८॥

आतां असो हें बोलणें । अवगुण सांडी निरूपणें । तो साधक ऐसा येणें प्रमाणें । बुझावा ।।५९।।

आतापर्यन्त बरेच सांगून झाले. निरूपणें मन:पूर्वक ऐकून स्वत:चे अवगुण सोडणारा साधक जाणावा. ॥५९॥

बळेंचि अवघा त्याग कीजे । म्हणौनि साधक बोलिजे । आतां सिद्ध तो जाणिजे । पुढिले समासीं ।।६०।।

हे सर्व सोडणे निश्चयाच्या बळावर त्याला साध्य करावे लागते म्हणून तो साधक. पुढील समासांत सिद्ध लक्षणे ऐका. ॥६०॥

येथें संशय उठिला । निस्पृह तोचि साधक जाला । त्याग न घडे संसारिकाला । तरी तो साधक नव्हें कीं ।।६१।।

या सर्व विवेचनावरून एक शंका येते की जो विरक्त तोच साधक होऊ शकतो. संसारी माणूस विरक्त होत नाही. मग तो साधक होणारच नाही का? ॥६१॥

ऐसें श्रोतयांचें उत्तर । याचें कैसें प्रत्योत्तर । पुढिले समासीं तत्पर । होऊन ऐका ।।६२।।

या श्रोत्यांच्या प्रश्नाचे उत्तर काय आहे ते पुढील समासात सावधपणाने ऐका. ॥६२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'साधकलक्षणनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'साधकलक्षण' नावाचा नववा समास समाप्त

दशक पाचवा : मंत्रांचा

समास दहावा : सिद्धलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

मागें बोलिला संसारिक । त्यागेंविण नव्हे कीं साधक । ऐका हो याचा विवेक । ऐसा असे ।।१।।

सातव्या बद्धलक्षण समासात प्रापंचिकाचे वर्णन केले. त्या प्रपंचावरील आसक्ती सोडल्याशिवाय साधकावस्था येत नाही. त्याचे स्पष्टीकरण आता ऐका. ते असे– ॥१॥

सन्मार्ग तो जीवीं धरणें । अनमार्गाचा त्याग करणें । संसारिकां त्याग येणें । प्रकारें ऐसा ।।२।।

संसारात राहून सन्मार्गावर चालत राहणे, अर्थात कुमार्गाचा त्याग करणे हाच संसाराचा त्याग अपेक्षित आहे. ॥२॥

कुबुद्धित्यागेंविण कांहीं । सुबुद्धि लागणार नाहीं । संसारिका त्याग पाहीं । ऐसा असे ।।३।।

दुर्बुद्धी सोडल्याशिवाय सद्बुद्धी लाभत नाही. संसारिकांनी दुर्बुद्धिचा त्याग करणे हाच संसाराचा त्याग करणें आहे. ॥३॥

प्रपंची वीट मानिला । मनें विषयेत्याग केला । तरीच पुढें आवलंबिला । परमार्थमार्ग ।।४।।

प्रपंचाचे प्राबल्य कमी होऊन विषयांचे चिंतन थांबवले तरच क्रमाने परमार्थमार्ग चालतां येतो. ॥४॥

त्याग घडे अभावाचा । त्याग घडे संशयाचा । त्याग घडे अज्ञानाचा । शनै शनै ।।५।।

देव नाहीच, देव असेल की नसेल व देवाच्या सत्य स्वरूपाचे अज्ञान असे अभाव, संशय व अज्ञान हळूहळू नाहीसे होतात. ॥५॥

ऐसा सूक्ष्म अंतर्त्याग । उभयांस घडे सांग । निस्पृहास बाह्यत्याग । विशेष आहे ।।६।।

असा हा अन्त:करणात होणारा सूक्ष्म त्याग गृहस्थाश्रम व संन्यासाश्रम या दोन्हींत सारखाच आहे. पण संन्यासाश्रमात बाह्य त्याग करावाच लागतो. ॥६॥

संसारिकां ठाईं ठाईं । बाह्यत्याग घडे कांहीं । नित्यनेम श्रवण नाहीं । त्यागेंविण ।।७।।

नित्यनेम, व्रते, वैकल्ये, तीर्थयात्रा, श्रवण इत्यादिकांच्या निमित्ताने प्रापंचिकांना सुद्धा बाह्य त्याग आपोआप घडतो. त्यागावाचून यातील काहीच करता येत नाही. (अनासक्ती = आतील त्याग. विधिवत् संन्यासाश्रम स्वीकारून घरदार प्रत्यक्ष सोडणें = बाह्यत्याग). ॥७॥

फिटली आशंका स्वभावें । त्यागेंविण साधक नव्हें । पुढे कथेचा अन्वय । सावध ऐका ।।८।।

श्रोत्याने उपस्थित केलेली शंका या स्पष्टीकरणाने फिटली. त्यागावाचून साधकावस्था नाही हे मात्र नक्की. आता पुढील विषय लक्ष देऊन ऐका. ॥८॥

मागां जाले निरूपण । साधकाची वोळखण । आतां सांगिजेल खूण । सिद्धलक्षणाची ।।९।।

नवव्या समासात साधक लक्षणे स्पष्ट केली. आता सिद्ध ओळखण्याच्या खुणा सांगतो. ॥९॥

साधु वस्तु होऊन ठेला । संशय ब्रह्मांडाबाहेरि गेला । निश्चये चळेना ऐसा जाला । या नांव सिद्ध ।।१०।।

जो स्वत: अखंड ब्रह्मरूप होऊन राहिला तो साधू सिद्ध असतो. संशय, अन्यथाज्ञान इ. सर्व कायमचे संपून 'मी ब्रह्म' या सहज अनुभवापासून तो ढळत नाही. ॥१०॥

बद्धपणाचें अवगुण । मुमुक्षपणीं नाहीं जाण । मुमुक्षपणाचें लक्षण । साधकपणीं नाहीं ।। ११ ।।

बद्धावस्थेतील दुर्गुण मुमुक्षु अवस्थेत नसतात व मुमुक्षावस्थेतील पश्चात्ताप साधकावस्थेत नसतो. ॥११॥

साधकासि संदेहवृत्ती । पुढें होतसे निवृत्ती । याकारणें निःसंदेह श्रोतीं । साधु वोळखावा ।। १२ ।।

साधकावस्थेत अनुभवाची सहजता नसल्यामुळे कृत्रिमतेमधील संदिग्धता शिल्लक असते. तीही गेल्यावर सिद्धावस्था येते. जेथे अनुमानाचे ज्ञान नसून नि:संदिग्ध ज्ञान असते तो साधू. ॥१२॥

संशयरहित ज्ञान । तें चि साधूचें लक्षण । सिद्धाआंगीं संशय हीन । लागेल कैसा ।। १३ ।।

जेथे ज्ञानामध्ये जराही अस्पष्टता नसते तोच साधू. हीन संशय, संदिग्धता, अस्पष्टता, अपूर्णता सिद्धामध्ये असेलच कशी? ॥१३॥

कर्ममार्ग संशये भरला । साधनीं संशये कालवला । सर्वांमधें संशये भरला । साधु तो निःसंदेह ।। १४ ।।

कर्मकांड विकल्पाने भरलेले असून साधनामार्गातही अनेक प्रकारचे संशय डोकावतात. सर्व जीवन संशयमय आहे. साधू संशयातीत असतो. (कर्मकांडात 'असे करावे की तसे' असे विकल्प असतात. साधनेत कर्म, भक्ती, योग इत्यादिकांच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेचे, दैवते, श्रीगुरू इत्यादीसंबंधी अनेक संशय असतात. अनुभवानेच हे सर्व संपते). ॥१४॥

संशयाचें ज्ञान खोटें । संशयाचें वैराग्य पोरटें । संशयाचें भजन वोखटें । निर्फळ होये ।।१५।।

ज्यांत संदिग्धता आहे असे ज्ञान निरर्थक असते. अपूर्ण वैराग्य बालिश असून देव न जाणता देवाची केलेली उपासना फळरहित होते. ॥१५॥

वेर्थ संशयाचा देव । वेर्थ संशयाचा भाव । वेर्थ संशयाचा स्वभाव । सर्व कांहीं ।।१६।।

देवावर पूर्ण श्रद्धा नसल्यास तो व्यर्थ असतो तर संशयाने देवावरील भाव सुद्धा व्यर्थ जातो. संशयाने ग्रासलेल्यामुळे सर्व काही व्यर्थ जाते. ॥१६॥

वेर्थ संशयाचे व्रत । वेर्थ संशयाचें तीर्थ । वेर्थ संशयाचा परमार्थ । निश्चयेंविण ।।१७।।

'व्रताने काय मिळणार आहे?' असा संशय ठेवून व्रत करणें, तीर्थयात्रेचा काय उपयोग? अशी शंका ठेवून यात्रा करणें व परमार्थ म्हणजे काय? हे न जाणता केलेला तथाकथित परमार्थ व्यर्थ होय. ॥१७॥

वेर्थ संशयाची भक्ती । वेर्थ संशयाची प्रीती । वेर्थ संशयाची संगती । संशयो वाढवी ।। १८ ।।

श्रद्धाहीन भक्ती, हातचे राखून केलेले प्रेम व असुरक्षितपणाच्या भावनेतून केलेली संगत नुसती व्यर्थच नव्हे, तर संशय वाढविणारी असते. ॥१८॥

वेर्थ संशयाचें जिणें । वेर्थ संशयाचें धरणें । वेर्थ संशयाचें करणें । सर्व कांहीं ।। १९ ।।

संशयाने भरलेले जीवन, अनिश्चितपणा ठेवून हाती घेतलेले काम व कार्य-अकार्य ठाऊक नसताना केलेली कृती व्यर्थ जाते. ॥१९॥

वेर्थ संशयाची पोथी । वेर्थ संशयाची वित्पत्ती । वेर्थ संशयाची गती । निश्चयेंविण ।।२०।।

ग्रंथाविषयी श्रद्धा नसताना ग्रंथ वाचणें किंवा ऐकणे, संशयाने भरलेली विद्वता, संशय ठेवून केलेली वाटचाल व्यर्थ होते. ॥२०॥

वेर्थ संशयाचा दक्ष । वेर्थ संशयाचा पक्ष । वेर्थ संशयाचा मोक्ष । होणार नाहीं ।।२१।।

सावध असून संशयी, संशय असलेल्याची बाजू उचलून धरणे व मोक्ष ही संकल्पना समजावून न घेणारे तथाकथित मोक्षार्थी व्यर्थ होत. ॥२१॥

वेर्थ संशयाचा संत । वेर्थ संशयाचा पंडित । वेर्थ संशयाचा बहुश्रुत । निश्चयेंविण ।। २२ ।।

ज्याचेविषयी शंका वाटते (सकारण किंवा अकारण) त्या संतांना शरण जाणे, ज्याचे पांडित्य भावत नाही त्याचेकडून श्रवण करणे व बहुश्रुत आहे पण संशयग्रस्त आहे अशाशी केलेला संवाद व्यर्थ होय. ॥२२॥

वेर्थ संशयाची श्रेष्ठता । वेर्थ संशयाची वित्पन्नता । वेर्थ संशयाचा ज्ञाता । निश्चयेंविण ।। २३ ।।

ज्याचेविषयी संशय आहे त्याला श्रेष्ठ मानणे, संशयात पाडणारे पांडित्य व संदिग्ध ज्ञानी निरुपयोगी होत. कारण त्यांचेविषयी निश्चयीपणा नसतो. ॥२३॥

निश्चयेंविण सर्व काहीं । अणुमात्र तें प्रमाण नाहीं । वेर्थचि पडिलें प्रवाहीं । संदेहाचे ।। २४ ।।

जेथे निश्चयात्मक ज्ञान नाही ते प्रमाण म्हणून कधीच स्वीकारता येत नाही. सर्व संबंधित संशयाच्या प्रवाहातच गटांगळ्या खातात. ॥२४॥

निश्चयेंविण जें बोलणें । तें अवघेंचि कंटाळवाणें । बाष्कळ बोलिजे वाचाळपणें । निरार्थक ।। २५ ।।

ज्या बोलण्यात अनुभवाचा ठामपणा नसतो ते बोलणे ऐकणाऱ्याला कंटाळवाणे वाटते. केवळ वाचाळाने केलेली अस्ताव्यस्त बडबड निरर्थक असते. ॥२५॥

असो निश्चयेंविण जे वल्गना । ते अवघीच विटंबना । संशयें कांहीं समाधाना । उरी नाहीं ।। २६ ।।

एकूण निश्चयावाचून बोलणे हे वल्गनेचे असून त्यात सर्व संबंधितांची विटंबनाच होते. संशयांच्या साखळीने समाधान पूर्ण बिघडून जाते. ॥२६॥

म्हणोनि संदेहरहित ज्ञान । निश्चयाचें समाधान । तेंचि सिद्धाचें लक्षण । निश्चयेंसीं ।। २७ ।।

म्हणून नि:संदिग्ध ज्ञानाने निश्चयात्मक बोलून श्रोत्याचे समाधान करणाऱ्यालाच सिद्ध म्हणावे हे नक्की समजावे. ॥२७॥

तव श्रोता करी प्रश्न । निश्चय करावा कवण । मुख्य निश्चयाचें लक्षण । मज निरोपावें ।। २८ ।।

तेव्हा श्रोता विचारतो, निश्चय काय करावा? निश्चयाचे मुख्य लक्षण मला समजावून सांगावे. ॥२८॥

ऐक निश्चय तो ऐसा । मुख्य देव आहे कैसा । नाना देवाचा वळसा । करूंचि नये ।। २९ ।।

मुख्य देवाचे स्वरूप जाणणें हाच निश्चय. अनेक देवांच्या फंदात कधीच पडू नये. ॥२९॥

जेणें निर्मिलें सचराचर । त्याचा करावा विचार । शुद्ध विवेकें परमेश्वर । वोळखावा ।। ३० ।।

ज्याने ही चर-अचर सृष्टी निर्माण केली त्याचा विचार वेदान्तशास्त्रातील विवेकाने करून त्या सर्वश्रेष्ठ परमेश्वराला (ब्रह्म) जाणावे. ॥३०॥

मुख्य देव तो कवण । भक्ताचें कैसें लक्षण । असत्य सांडून वोळखण । सत्याची धरावी ।। ३१ ।।

मुख्य देव ओळखून त्याच्या भक्तांची चिन्हे लक्षात घेऊन इतर कल्पित व अर्थवादात्मक भाग सोडावा. सत्य देवाच्या अनुसंधानात राहावे. ॥३१॥

आपल्या देवास वोळखावें । मग मी कोण हें पाहावें । संग त्यागून राहावें । वस्तुरूप ।। ३२ ।।

ज्याला आपण देव म्हणतो त्याचे तटस्थ लक्षण, स्वरूप लक्षण इ. समजावून घेऊन 'मी' चा शोध घेत त्या देवाचा व 'मी' चा संबंध निश्चित करावा. ज्याला आपण 'माझे' म्हणतो त्याचा संग सोडून राहिले तर मी व देव एक आहोत या अनुभवात राहता येते. ॥३२॥

तोडावा बंधनाचा संशयो । करावा मोक्षाचा निश्चयो । पाहावा भूतांचा अन्वयो । वितिरेकेंसीं ।। ३३ ।।

'मी' बंधनात आहे हा गैरसमज दूर करावा. 'मी' मुक्त आहे असा सतत निश्चय सांभाळावा. या दृश्य जगताचा 'मी' शी काही संबंध नाही (व्यतिरेक) अशी साधना करीत करीत त्या दृश्य जगतात 'मी' ओतप्रोत भरून आहे

(अन्वय) असा अनुभव घ्यावा. (पहा– ऐश्वर्ययोग.अ.९-गीता) ॥३३॥

पूर्वपक्षेंसिं सिद्धांत । पाहावा प्रकृतीचा अंत । मग पावावा निवांत । निश्चय देवाचा ।।३४।।

पृथ्वी मी नाही, आप मी नाही, इ. साधक अवस्थेतील व्यतिरेकाचा पूर्वपक्ष व 'सर्व खल्विदं ब्रह्म' हा सिद्धांचा अन्वयी सिद्धान्तपक्ष या दोन्हींचा विचार करावा. दृश्य प्रकृतीचा बाध करून तिचे अधिष्ठान असलेल्या ब्रह्माचा 'सत्य' म्हणून व 'मी' म्हणून निश्चय करावा. (जीवन्मुक्ताला प्रारब्ध संपल्याने त्याचा देह पडल्यावर विदेहमुक्ती मिळते. या अवस्थेत परमात्मा अखंड सच्चिदानन्द रूपाने राहतो. हाच ब्रह्माचा अन्वय होय. मायेचे मुक्तावस्थेत भान होत नाही. हाच मायेचा व्यतिरेक होय). ॥३४॥

देहाचेनि योगें संशयो । करी समाधानाचा क्षयो । चळों नेदावा निश्चयो । आत्मत्वाचा ।।३५।।

देहाचे 'मी देह' किंवा 'माझा देह' असे भान होत असल्याने 'आत्मरूप मी' विषयी संदिग्धता राहते. देहाचा विचार हा नेहमीच समाधान बिघडविणारा असतो. म्हणून 'मी आत्मा' हा निश्चय सतत जागा ठेवावा. ॥३५॥

सिद्ध असतां आत्मज्ञान । संदेह वाढवी देहाभिमान । याकारणें समाधान । आत्मनिश्चयें राखावें ।।३६।।

वास्तविक आत्मा नित्यसिद्ध म्हणून नित्यप्राप्त आहे. 'देह मी' या भूमिकेमुळें याविषयी संदेह वाढत राहतो. म्हणजे तसा निश्चय न होता 'मी देह' हाच निश्चय वाढत जातो. म्हणून 'मी आत्मा' असा निश्चय वाढता ठेवून समाधान सांभाळावे. ॥३६॥

आठवतां देहबुद्धी । उडे विवेकाची शुद्धी । याकारणें आत्मबुद्धि । सदृढ करावी ।।३७।।

देहाची 'देह मी' या भूमिकेतून आठवण झाली की अभ्यासाने कमावलेला विवेक संपलेला असतो! (देहबुद्धी व आत्मबुद्धी यांची अशी झटापट साधकावस्थेत चालूच राहते.) म्हणून 'मी आत्मा' या निश्चयाचे बळ अखंड वाढते ठेवावे. ॥३७॥

आत्मबुद्धि निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची । अहमात्मा हें कधींचि । विसरों नये ।।३८।।

'मी आत्मा' असा एकदा सहज निश्चय झाला की परमभाग्यरूप मोक्ष तेथेच असतो. असे होईपर्यंत 'मी आत्मा' हे सतत भान ठेवावे. ॥३८॥

निरोपिलें निश्चयाचें लक्षण । परी हें न कळे सत्संगेंविण । संतांसि गेलियां शरण । संशये तुटती ।।३९।।

संशयसापेक्ष निश्चयाचे लक्षण शब्दाने सांगून झाले. पण त्या निश्चयाचे खरे स्वरूप सिद्धांना शरण गेल्याशिवाय व त्यांच्या संगतीशिवाय कळत नाही. सर्व संशय नष्ट होण्याचा हाच मार्ग आहे. ॥३९॥

आतां असो हें बोलणें । ऐका सिद्धांचीं लक्षणें । मुख्य निःसंदेहपणें । सिद्ध बोलिजे ।।४०।।

आतापर्यंत साधकांसंबंधी सांगून झाले. आता सिद्धांची लक्षणे ऐका. जेथे 'मी ब्रह्म' या निश्चयाला सहजता येऊन त्याविषयी जराही अपूर्णता किंवा संदिग्धता नसते तेथे सिद्धावस्था असते. हे त्याचे मुख्य लक्षण होय. ॥४०॥

सिद्धस्वरूपीं नाहीं देहो । तेथें कैंचा हो संदेहो । याकारणें सिद्ध पाहो । निःसंदेही ।।४१।।

सिद्धावस्थेमध्ये सिद्धाच्या देहाचा बाध झालेला असतो. त्यामुळे त्या अवस्थेत संशयाचे कारणच शिल्लक नसते. म्हणून 'संशयरहित तो सिद्ध' असे त्याचे लक्षण ठरते. ॥४१॥

देहसमंधाचेनि गुणें । लक्ष्णासि काये उणें । देहातीताची लक्षणें । काये म्हणोनि सांगावी ।।४२।।

अज्ञ जीवाचा देहाशी संबंध असल्याने त्याला देहाचे कितीतरी गुण चिकटतात. पण देहाशी संबंध सुटलेल्याची लक्षणे कशी सांगता येतील? ॥४२॥

जें लक्षवेना चक्षूसी । त्याचीं लक्षणें सांगावी कैसीं । निर्मळ वस्तु सिद्ध त्यासी । लक्षणें कैसीं ।।४३।।

पण जे आत्मतत्त्व डोळ्यांना दिसत नाही ती आत्मवस्तू अरूप, निर्गुण इ. असल्याने (निर्मळ) तिची लक्षणें कशी

सांगता येतील? ॥४३॥

लक्षणें म्हणिजे केवळ गुण । वस्तु ठाईची निर्गुण । तेचि सिद्धांचे लक्षण । वस्तुरूप ।।४४।।

लक्षणे सांगणे म्हणजे गुणांचेच वर्णन करणें! आत्मवस्तू स्वरूपाने निर्गुण असते व वस्तुरूप झालेले सिद्धही तसेच असतात. ॥४४॥

तथापि ज्ञानदशकीं बोलिलें । म्हणौनि वग्तृत्व आटोपिलें । न्यून पूर्ण क्ष्मा केलें । पाहिजे श्रोतीं ।।४५।।

ही सिद्ध लक्षणे पुढील ज्ञानदशकात (द. ८ स. ९) सांगितलेली असल्याने येथे त्यांचा फक्त उल्लेख केला आहे. श्रोत्यांनी ते जुळवून घ्यावे व तसे करावे लागत आहे याची क्षमा असावी. ॥४५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सिद्धलक्षणनाम' समास दहावा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सिद्धलक्षण' नावाचा दहावा समास समाप्त

–दशक पाचवा समाप्त–

दशक सहावा : देवशोधन

समास पहिला : देवशोधन

॥ श्रीराम समर्थ ॥

चित्त सुचित करावें । बोलिलें तें जीवीं धरावें । सावध होऊन बैसावें । निमिष्य येक ।।१।।

चित्तवृत्तीला सावध करून आता जे सांगेन ते जीवाचे कान करून लक्ष देऊन ऐकावे. सावधपणाचा एक क्षण दुसऱ्या क्षणाला जोडीत जावे. सतत सावध असावे. ॥१॥

कोणी येके ग्रामीं अथवा देसीं । राहाणें आहे आपणासी । न भेटतां तेथिल्या प्रभूसी । सौख्य कैचें ।।२।।

जर एखाद्या गावात किंवा राज्यात राहावयाचे असेल तर तेथील मुख्य अधिकाऱ्याला किंवा नेत्याला भेटून त्याच्याशी सख्य केल्याशिवाय सुखाने कसे रहाता येईल? ॥२॥

म्हणौंन ज्यास जेथें राहाणें । तेणें त्या प्रभूची भेटीं घेणें । म्हणिजे होये श्लाघ्यवाणें । सर्व काहीं ।।३।।

म्हणून ज्याला असे रहावयाचे असेल त्याने त्या नेत्याला स्वत: होऊन भेटले तर ते हिताचे ठरते. ॥३॥

प्रभूची भेटी न घेतां । तेथें कैंची मान्यता । आपुलें महत्त्व जातां । वेळ नाहीं ।।४।।

नेत्याशी सख्य जोडले नाही, तर त्या गावात किंवा राज्यात उपरेपणा किंवा परकेपणा राहून क्षुल्लक कारणाने मानहानी होऊ शकते. ॥४॥

म्हणौंनि रायापासूनि रंक । कोणी तरी येक नायेक । त्यास भेटणें हा विवेक । विवेकी जाणती ।।५।।

म्हणून राजा असो की भिकारी असो, त्याने दुसऱ्या राज्यात प्रवेश केल्यावर तेथील राजाला किंवा मुख्य अधिकाऱ्याला रिवाजानुसार भेटण्यात शहाणपणा आहे हे विवेकी लोक जाणतात. ॥५॥

त्यास न भेटतां त्याचे नगरीं । राहतां धरितील बेगारी । तेथें न करितां चोरी । आंगीं लागे ।।६।।

त्यांच्याच राज्यात जाऊन त्यालाच न भेटल्यास वेठबिगारीसाठी नेले जाईल. किंवा चोरी न करताच चोर म्हणून पकडले जाईल. ॥६॥

या कारणें जो शाहाणा । तेणें प्रभूसी भेटावें जाणा । ऐसें न करितां दैन्यवाणा । संसार त्याचा ।।७।।

म्हणून विचारी प्रापंचिकाने ईश्वराला शरण जावे. त्याच्या आज्ञेप्रमाणे वागून कर्तव्य करीत असता तो ठेवील तसे रहावे. नाहीतर सर्व प्रपंचात दैन्याचे जीवन वाट्याला येईल. ॥७॥

ग्रामीं थोर ग्रामाधिपती । त्याहूनि थोर देशाधिपती । देशाधिपतीहूनि नृपती । थोर जाणावा ।।८।।
राष्ट्राचा प्रभु तो राजा । बहुराष्ट्र तो माहाराजा । माहाराजाचाहि राजा । तो चक्रवती ।।९।।
येक नरपति येक गजपती । येक हयपति येक भूपती । सकळांमध्ये चक्रवती । थोर राजा ।।१०।।

खेड्यात गावाचा प्रमुख, प्रांतात प्रांताचा प्रमुख, विभागाचा जहागीरदार प्रमुख, राष्ट्राचा प्रमुख राजा, अनेक राष्ट्रांचा महाराजा मुख्य व अनेक महाराजांचा सम्राट चक्रवर्ती हा स्वामी असतो. सैनिकांची तुकडी (नरपती) हत्तीदळ, घोडदळ ह्यांचे प्रमुख असतात. कोणी मांडलीक राजे असतात. ह्या सर्वांत चक्रवर्ती श्रेष्ठ असतो. ॥८-९-१०॥

असो ऐसियां समस्तां । येक ब्रह्मा निर्माणकर्ता । त्या ब्रह्मयासहि निर्मिता । कोण आहे ।।११।।

या सर्वांचा ब्रह्मदेव हा जनक असून त्या ब्रह्मदेवालाही निर्माण करणारा कोणी एक आहे. ॥११॥

ब्रह्मा विष्णु आणि हर । त्यांसी निर्मिता तोचि थोर । तो वोळखावा परमेश्वर । नाना येत्नें ।।१२।।

त्या ब्रह्मदेव, विष्णु व शंकर यांनाही उत्पन्न करणाऱ्या महान परमेश्वराला हर प्रयत्नाने ओळखावे. ॥१२॥

तो देव ठाईं पडेना । तरी येमयातना चुकेना । ब्रह्मांडनायेक चोजवेना । हें बरें नव्हे ।।१३।।

त्या परमेश्वराचे जर दर्शन झाले नाही, तर यमयातना चुकत नाहीत. ब्रह्मांडनायकाला जर प्रसन्न करता येत नसेल तर त्यासारखे दुर्भाग्य नाही. ॥१३॥

जेणें संसारीं घातलें । आवघें ब्रह्मांड निर्माण केलें । त्यासी नाहीं वोळखिलें । तोचि पतित ।।१४।।

ज्याने ही सृष्टी निर्माण करून त्यात जन्माला घातले त्याला न ओळखणारा पतित आहे, असे समजावे. कारण त्याला ओळखून त्याच्या आज्ञेत राहणारा व हळूहळू त्याच्याशी एकरूप होऊन जगणारा सुखरूप होतो. असे न करणारा दु:खी होतो. दु:ख हेच पतन होय. ॥१४॥

म्हणोनि देव वोळखावा । जन्म सार्थकचि करावा । न कळे तरी सत्संग धरावा । म्हणिजे कळे ।।१५।।

म्हणून देवाचे खरे स्वरूप ओळखून मनुष्यजन्म ज्या मोक्षासाठी आहे तो प्राप्त करावा. ते स्वरूप ओळखता येणे ज्याचे त्याला शक्य नसते म्हणून श्रीगुरूंची संगत धरावी. ॥१५॥

जो जाणेल भगवंत । तया नाव बोलिजे संत । जो शाश्वत आणी अशाश्वत । निवाडा करी ।।१६।।

जो भगवंताला ओळखून 'तो मी आहे' असा अनुभव घेतो तोच श्रीगुरू होय. त्यांचेपाशी सत्य व मिथ्या यांचा निवाडा झालेला असतो. ॥१६॥

चळेना ढळेना देव । ऐसा ज्याचा अंतर्भाव । तोचि जाणिजे माहानुभाव । संत साधु ।।१७।।

देव हा नित्य व सत्य आहे असा ज्याचा सहज निश्चय झालेला असतो तो महान अनुभव घेतलेलाच संत किंवा साधू असतो. ॥१७॥

जो जनामधें वागे । परि जनावेगळी गोष्ट सांगे । ज्याचे अंतरीं ज्ञान जागे । तोचि साधु ।।१८।।

जो समाजात मिसळून राहतो, पण त्यातील सामान्य लोकांप्रमाणे सुखदु:ख, रागद्वेष, कामक्रोध इत्यादिकांनी भरलेले जीवन जगत नाही, उलट त्यांना आनंदमय, तृप्त, शांत व निर्भय जीवन जगण्यास शिकवतो, 'मी ब्रह्म आहे' हे ज्ञान ज्याचे ठिकाणी सहजतेने बाणलेले असते तोच खरा साधू होय. ॥१८॥

जाणिजे परमात्मा निर्गुण । त्यासीच म्हणावें ज्ञान । त्यावेगळें तें अज्ञान । सर्व कांहीं ।।१९।।

'निर्गुण ब्रह्म मी आहे' या अनुभवालाच ज्ञान म्हणतात. याहून जे जे वेगळे असते ते सर्व अज्ञान होय. ॥१९॥

पोट भराव्याकारणें । नाना विद्या अभ्यास करणें । त्यासीं ज्ञान म्हणती परी तेणें । सार्थक नव्हे ।।२०।।

चरितार्थासाठी अनेक विद्यांचा अभ्यास करावा लागतो. त्यालाही 'ज्ञान' असे म्हणतात. पण त्या तथाकथित ज्ञानाने जीवनाचे मोक्षरूप सार्थक होत नाही. ॥२०॥

देव वोळखावा येक । तेंचि ज्ञान तें सार्थक । येर आवघेंचि निरार्थक । पोटविद्या ।।२१।।

एकमेव अद्वितीय ब्रह्म जाणणे हे एकच ज्ञान सार्थक करणारे असून इतर ज्ञाने केवळ चरितार्थासाठी उपयोगी पडतात. ती मोक्षाचे दृष्टीने निरर्थक ठरतात. ॥२१॥

जन्मवरी पोट भरिलें । देहाचें संरक्षण केलें । पुढें आवघेंचि वेर्थ गेलें । अंतकाळीं ।।२२।।

जन्मभर पोट भरून देह सांभाळला तरी मरणाचे वेळी ती पोटाची विद्या फुकट जाते. ॥२२॥

येवं पोट भराव्याची विद्या । तयेसी म्हणों नये सद्विद्या । सर्वव्यापक वस्तु सद्या । पाविजे तें ज्ञान ।।२३।।

म्हणून जी विद्या केवळ पोट भरण्यासाठी उपयोगी पडते तिला हिताची समजू नये. 'सर्वव्यापक ब्रह्म मी आहे' हा अनुभव ज्यामुळे येतो तीच ब्रह्मविद्या शाश्वत कल्याण करणारी आहे. ॥२३॥

ऐसें जयापासीं ज्ञान । तोचि जाणावा सज्जन । तयापासीं समाधान । पुसिलें पाहिजे ।।२४।।

ही विद्या ज्याचेपाशी आहे, तोच संत किंवा सद्‌गुरू असतो. स्वत:च्या समाधानासाठी त्याला शरण जावे व आपल्या शाश्वत हिताचा प्रश्न विचारावा. ॥२४॥

अज्ञानास भेटतां अज्ञान । तेथें कैंचे सांपडेल ज्ञान । करंट्यास करंट्याचें दर्शन । होतां भाग्य कैंचे ।।२५।।

एका अडाण्याला दुसरा अडाणी भेटला तर त्यात कोणाचे समाधान होणार? त्यातून ज्ञान कसे प्रकट होणार? करंट्याला करंटा भेटून भाग्योदय होईल काय? ॥२५॥

रोग्यापासीं रोगी गेला । तेथें कैंचें आरोग्य त्याला । निर्बळापासीं निर्बळाला । पाठी कैंची ।।२६।।

पिशाच्यापासीं पिशाच्य गेलें । तेथें कोण सार्थक जालें । उन्मत्तास उन्मत्त भेटलें । त्यास उमजवी कवणु ।।२७।।

भिकाऱ्यापासीं मागतां भिक्षा । दीक्षाहीनापासीं दीक्षा । उजेड पाहतां कृष्णपक्षा । पाविजे कैंचा ।।२८।।

अबद्धापासीं गेला अबद्ध । तो कैसेनि होईल सुबद्ध । बद्धास भेटता बद्ध । सिद्ध नव्हे ।।२९।।

देहापासीं गेला देही । तो कैसेनि होईल विदेही । म्हणौनि ज्ञात्यावांचून नाहीं । ज्ञानमार्ग ।।३०।।

रोगी रोग्याकडे उपचारासाठी जावा, दुर्बळ दुर्बळाकडे आधारासाठी जावा, एका पिशाच्चाने मुक्तीसाठी दुसऱ्या पिशाच्चाकडे जावे, वेड्याला वेडा भेटावा, भिकाऱ्याने भिकाऱ्याकडे भीक मागावी, दीक्षा न घेतलेल्याकडे दीक्षा मागावी, पौर्णिमेने अमावास्येकडे उजेडासाठी पहावे, अजागळाची अजागळाशी गाठ पडावी, बद्धाने मोक्षासाठी बद्धाकडे जावे, देहतादात्म्य असलेल्याने दुसऱ्या बद्धाकडे जावे, या सर्व बाबी हास्यास्पद होत. म्हणून ज्ञात्याशिवाय ज्ञान मिळत नाही. ॥२६-३०॥

याकारणें ज्ञाता पाहावा । त्याचा अनुग्रह घ्यावा । सारासारविचारें जीवा । मोक्ष प्राप्त ।।३१।।

म्हणून ज्ञानी श्रीगुरूंचा शोध घेऊन त्यांचा अनुग्रह घ्यावा. त्यांच्या सहवासात सार व असार यांचा विचार करून मुक्त व्हावे. देह व जगत् असार असून ब्रह्म सार आहे असा निश्चय करावा. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देवशोधननाम' समास पहिला

गुरुशिष्यसंवादात्माक श्रीदासबोध या ग्रंथातील 'देवशोधन' नावाचा पहिला समास समाप्त

दशक सहावा : देवशोधन

समास दुसरा : ब्रह्मपावननिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ऐका उपदेशाचीं लक्षणें । सायोज्यप्राप्ती होय जेणें । नाना मतांचे पेखणें । कामा नये सर्वथा ।।१।।

आता श्रीगुरूंकडून प्राप्त होणाऱ्या अस्सल उपदेशाची लक्षणे ऐका. त्या उपदेशाने जीवन्मुक्ती मिळाली पाहिजे. बुद्धिभेद करणाऱ्या मतांचा उपदेश मुळीच उपयोगी पडत नाही. ॥१॥

ब्रह्मज्ञानेंविण उपदेश । तो म्हणों नये विशेष । धान्येंविण जैसें भूंस । खातां नये ।।२।।

ज्यामध्ये ब्रह्मज्ञान सांगितले जात नाही त्या उपदेशाला काहीच किंमत नाही. धान्य न खाता जसा कोंडा खावा तसा तो उपदेश असतो. ॥२॥

नाना कबाड बडविलें । नातरी तक्रचि गुसळिलें । अथवा धुणचि सेविलें । सावकास ।।३।।

कणसे नसलेल्या कडब्याची (पिंजर, ताट) मळणी केली, लोणी काढल्यावर ताक घुसळत राहिले किंवा तांदूळ धुतलेले पाणी प्यायले. ॥३॥

नाना साली भक्षिल्या । अथवा चोइट्या चोखिल्या । खोबरें सांडून खादल्या । नरोट्या जैशा ।।४।।

फळांच्या साली खाल्ल्या, उसाच्या चोयट्या चघळीत बसले, नारळातील खोबरे न खाता करवंट्या चावल्या. ॥४॥

तैसें ब्रह्मज्ञानेंविण । नाना उपदेशाचा सिण । सार सांडून असार कोण । शाहाणा सेवी ।।५।।

त्याप्रमाणे ज्यात ब्रह्मज्ञान नाही त्या उपदेशात केवळ कष्ट आहेत. कोणता शहाणा सार सोडून असार स्वीकारील? ॥५॥

आतां ब्रह्म जें कां निर्गुण । तेंचि केलें निरूपण । सुचित करावें अंत:कर्ण । श्रोतेजनीं ।।६।।

आता निर्गुण निराकार ब्रह्माचे वर्णन करू. श्रोत्यांनी सावध अंत:करणाने ते ऐकावे. ॥६॥

सकळ सृष्टीची रचना । ते हे पंचभूतिक जाणा । परंतु हे तगेना । सर्वकाळ ।।७।।

अवाढव्य दृश्य सृष्टी विविधतेने भरलेली आहे. ती पाच महाभूतांची घडली असून निश्चितपणे नाश पावणारी आहे. त्रिकालाबाधित नाही. ॥७॥

आदिअंतीं ब्रह्म निर्गुण । तेचि शाश्वताची खूण । येर पंचभूतिक जाण । नासिवंत ।।८।।

प्रथमपासून शेवटपर्यंत निर्गुण ब्रह्म व्यापून राहिले आहे. तेच शाश्वत असून त्याहून वेगळे पांच महाभूतांचे घडलेले सगुण नष्ट होते. 'प्रथम व शेवट' ही शब्दयोजना मानवी बुद्धीची आहे. ती गृहीत धरून वर्णन करावे लागते. ॥८॥

येऱ्हवीं हें पाहातां भूतें । देव कैसें म्हणावें त्यातें । भूत म्हणतां मनुष्यातें । विषाद वाटे ।।९।।

निराकार ब्रह्माऐवजी दिसणारे साकार जग पाच महाभूतांचे झाले आहे. त्याला देव म्हणता येत नाही. मानवी शरीर पाच महाभूतांचे आहे असे सांगितले तर माणसाला बरे वाटत नाही. कारण त्याचे देहावर फार प्रेम असते. ॥९॥

मां तो जगज्जनक परमात्मा । त्यास आणि भूतउपमा । ज्याची कळेना महिमां । ब्रह्मादिकांसी ।।१०।।

जगाला उत्पन्न करणारा परमेश्वर माणसासारखा पांचभौतिक शरीरधारी नाही. त्याचे स्वरूप ब्रह्मदेवालाही कळत नाही, इतका तो सूक्ष्म व व्यापक आहे. ॥१०॥

भूतां ऐसा जगदीश । म्हणतां उत्पन्न होतो दोष । याकारणें माहापुरुष । सर्व जाणती ।।११।।

विनाशी पंचमहाभूतांप्रमाणेच अविनाशी परमेश्वर असतो असे म्हटले तर मूर्खपणा पदरी येतो. सद्गुरू व संतांना याचे नि:संदिग्ध ज्ञान असते. ते ब्रह्म व जगत् यातील भेद जाणतात. ॥११॥

पृथ्वी आप तेज वायो आकाश । यां सबाह्य जगदीश । पंचभूतांसी आहे नाश । आत्मा अविनाशरूपी ।।१२।।

पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश या क्रमाने सूक्ष्म असणाऱ्या पंचमहाभूतांच्या आत व बाहेर सूक्ष्मतम आत्मा भरून आहे. महाभूतांना नाश असून आत्मा अविनाशी आहे. ॥१२॥

जें जें रूप आणी नाम । तो तो आवघाचि भ्रम । नामरूपातीत वर्म । अनुभवें जाणावें ।।१३।।

ज्याला ज्याला रूप व नाम असते ते सर्व दृश्य भ्रमरूप आहे. नामे व रूपे यांच्यामागे अस्तित्व, भातित्व, व प्रियत्व असते. म्हणजे कोणतेही रूप असते, कळते व हवेसे वाटते. रूपे हजारो असली तरी त्यांचे असणे, कळणे व हवेसे वाटणे एकच असते. हे वर्म अनुभवानेच लक्षात येते. ॥१३॥

पंचभूतें आणि त्रिगुण । ऐसी अष्टधा प्रकृति जाण । अष्टधाप्रकृतीस नामाभिधान । दृश्य ऐसें ।।१४।।

पांच महाभूते व सत्त्वादी तीन गुण अशी आठ घटकांची प्रकृती तयार होते. त्या प्रकृतीला किंवा सृष्टीला 'दृश्य' असे म्हणतात. जे जे वेगळेपणाने जाणवते ते सर्व 'दृश्य' या एकाच वर्गात मोडते. ॥१४॥

तें हें दृश्य नासिवंत । ऐसें वेद श्रुति बोलत । निर्गुण ब्रह्म शाश्वत । जाणती ज्ञानी ।।१५।।

हे दृश्य नाश पावणारे आहे असे वेद व उपनिषदे सांगतात. (यत् दृष्टं तं नष्टं.) पण अरूप व स्वसंवेद्य ब्रह्म अविनाशी आहे असे ब्रह्मवेत्ते जाणतात. ॥१५॥

जें शस्त्रे तोडितां तुटेना । जें पावकें जाळितां जळेना । कालवितां कालवेना । आपेंकरूनी ।।१६।।

जे शस्त्राने तोडू म्हटले तर तुटत नाही, अग्नीने जाळता येत नाही व मातीप्रमाणे पाण्यात कालविता येत नाही. (नैनं छिन्दंति शस्त्राणि —गीता) ॥१६॥

जें वायोचेनि उडेना । जें पडेना ना झडेना । जें घडेना ना दडेना । परब्रह्म तें ।।१७।।

जे वाऱ्याने उडत नाही, वरून खाली पडत नाही, झिजत नाही किंवा त्याचे अवयव वाळून जात नाहीत व जे कधीच लपत नाही ते परब्रह्म. शुद्ध जाणिवेच्या रूपाने सर्वांच्या ते सतत अनुभवात असते. ॥१७॥

ज्यासी वर्णचि नसे । जें सर्वांहूनि अनारिसें । परंतु असतचि असे । सर्वकाळ ।।१८।।

ब्रह्माला रंग नाही, ते कशात किंवा कोणांत एकरूप होऊन राहत नाही ('अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम्' गीता १३-१६) व तथाकथित तिन्ही काळात अबाधित असते. ॥१८॥

दिसेना तरी काय जालें । परंतु तें सर्वत्र संचलें । सूक्ष्मचि कोंदाटलें । जेथें तेथें ।।१९।।

ते पांच ज्ञानेंद्रिये व मनाला कळत नसले तरी ते हरवते काय? कल्पना केल्या जाणाऱ्या कोणत्याही सूक्ष्म पदार्थाहून ते सूक्ष्म आहे. जे सूक्ष्म असते ते व्यापक असल्याने सर्वत्र घनदाट भरून राहिले आहे. (अणुकणाहून ते सूक्ष्म आहे.) ॥१९॥

दृष्टीस लागली सवे । जें दिसेल तेंचि पाहावें । परंतु गुज तें जाणावें । गोप्य आहे ।।२०।।

माणसाला सहजच अशी सवय लागली आहे की जे दिसू शकते ते पहावे. म्हणजे जे बुद्धीला कळू शकते तेच अस्तित्वात असते. परंतु बुद्धी व ज्ञानेंद्रियांना जे कळत नाही ते गुप्त ब्रह्म अनुभवण्यातच पुरुषार्थ आहे. (रविदीप हिरा दाविती देखणे । अदृष्य दर्शने संतांचिया - तुका.) ॥२०॥

प्रगट तें जाणावें असार । आणी गुप्त तें जाणावें सार । गुरुमुखें हा विचार । उमजों लागे ।।२१।।

जो वृत्तिज्ञानाचा विषय असतो तो असार असतो म्हणजे जे ज्ञानेंद्रिये व बुद्धीच्या साहाय्याने समजते ते असार असते. जे स्वसंवेद्य असते ते सार असते. म्हणजे जे अनुभवरूप असते ते सार असते. श्रीगुरूंकडूनच हे रहस्य स्पष्टपणे समजावून घ्यावे लागते. ॥२१॥

जें उमजेना तें उमजावें । जें दिसेना तें पहावें । जें कळेना तें जाणावें । विवेकबळें ।।२२।।

श्रीगुरूंनी समजावून सांगितलेल्या विवेकाच्या बळावर जे बुद्धीला कळत नाही त्याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा. जे चर्मचक्षूंना दिसत नाही ते ज्ञानचक्षूंनी जणू पाहावे. ॥२२॥

गुप्त तेंचि प्रगटवावें । असाध्य तेंचि साधावें । कानडेंचि अभ्यासावें । सावकास ।।२३।।

धैर्याने आणि धीराने गुप्त आत्म्याचा साक्षात्कार करून घ्यावा. (राजगुह्य– गीता) अशक्य वाटणारा हा साक्षात्कार अवश्य साधावा. जे घोटाळ्यात टाकणारे आहे त्याचे यथाशास्त्र मनन करून त्याचा बुद्धीत निश्चय करावा. (आत्मा अरे वा श्रोतव्यो मन्तव्यो– बृह. उप.) ॥२३॥

वेद विरंची आणि शेष । जेथें सिणले निशेष । तेंचि साधावें विशेष । परब्रह्म तें ।।२४।।

चार वेद, चार मुखांचा ब्रह्मदेव व हजार जिभांचा शेष हे ज्याचे संबंधी बोलून बोलून थकले त्या अनिर्वाच्य ब्रह्माचाच अनुभव घ्यावा. ॥२४॥

तरीं तें कोणेपरी साधावें । तेंचि बोलिलें स्वभावें । अध्यात्मश्रवणें पावावें । परब्रह्म तें ।।२५।।

हा अनुभव कसा घ्यावा ते आता शास्त्राच्या सरणीनुसार पाहू. अध्यात्मशास्त्राच्या यथार्थ अभ्यासानेच ते परब्रह्म जाणता येते. ॥२५॥

पृथ्वी नव्हे आप नव्हे । तेज नव्हे वायु नव्हे । वर्णवेक्त ऐसें नव्हे । अव्यक्त तें ।।२६।।

परब्रह्म हे पृथ्वी, आप, तेज, वायू व वर्णमालेने तयार केलेले शब्द ह्याहून वेगळे आहे. (न तत्र वाक् गच्छति -केन उप.) कारण ते ह्या सर्वांप्रमाणे ज्ञानेंद्रियांनी कळणारे नाही. (अव्यक्त) ॥२६॥

तयास म्हणावें देव । वरकड लोकांचा स्वभाव । जितुके गाव तितुके देव । जनाकारणें ।।२७।।

हे परब्रह्मच खऱ्या अर्थाने देव आहे. परंतु उथळ विचारांच्या सामान्य श्रद्धावन्तांचा स्वभावच असा असतो की त्यांना आपापल्या गावांत देवाच्या मूर्ती असल्याशिवाय भागत नाही. जनरीत अशीच आहे. ॥२७॥

ऐसा देवाचा निश्चयो जाला । देव निर्गुण प्रत्यया आला । आतां आपणचि आपला । शोध घ्यावा ।।२८।।

देव म्हणजे परब्रह्म असून तो निर्गुण, निराकारादी आहे असा परिपूर्ण निश्चय झाल्यावर त्याचा स्वतःच विवेकाच्या बळाने अनुभव घेण्याचा प्रयत्न करावा. ॥२८॥

माझें शरीर ऐसें म्हणतो । तरी तो जाण देहावेगळाचि तो । मन माझें ऐसें जाणतो । तरी तो मनहि नव्हे ।।२९।।

जो जीवात्मा 'शरीर माझे आहे' असे म्हणतो तो त्या शरीराहून वेगळा असलाच पाहिजे. 'माझे मन' म्हणणारा मनाहून भिन्न असलाच पाहिजे. ('घटद्रष्टा घटात् भिन्नः') ॥२९॥

पाहातां देहाचा विचार । अवघा तत्वांचा विस्तार । तत्वें तत्व झाडितां सार । आत्माच उरें ।।३०।।

शरीराचे पृथक्करण केले असता पंचभूतादी तत्त्वांचा पसाराच त्यात आहे हे लक्षात येते. स्थूल तत्त्व त्यामागील सूक्ष्म तत्त्वात विचाराने लीन केले असता साररूप आत्माच शिल्लक राहतो. ॥३०॥

आपणासी ठावचि नाहीं । येथें पाहाणें नलगे काहीं । तत्वें ठाईंचा ठाईं । विभागून गेलीं ।।३१।।

जीवात्मा हे ज्याचे स्वरूप आहे अशा 'मी' ने वरीलप्रमाणें पृथक्करण केल्यावर तो स्वत:च शिल्लक राहत नाही! जीवात्म्याचा बुद्धी हा घटक लीन झाल्यावर पाहणाराच उरत नाही. तत्त्वे जागच्या जागी लीन झाल्यावर पृथक्करण करण्यासारखे व ते करणारा दोन्ही लीन होतात. हा विभाग पूर्ण झाल्यावर नष्ट होतो. ॥३१॥

बांधली आहे तों गांठोडी । जो कोणी विचारें सोडी । विचार पाहातां ही गांठोडी । आडळेना ।।३२।।

जोपर्यंत हे तत्त्वांचे बांधलेले गाठोडे अविद्येमुळे एकरूप किंवा एकजिनसी वाटते तोपर्यन्तच त्याला अस्तित्व असते. पण जो विचार करून तत्त्वांचा निरास करतो त्याला ते तसे वाटत नाही. ते मिथ्या असल्याचा निश्चय होतो. ॥३२॥

तत्वांचें गांठोडें शरीर । याचा पाहातां विचार । येक आत्मा निरंतर । आपण नाहीं ।।३३।।

शरीर हे ब्याऐंशी तत्त्वांचे गाठोडे आहे. ती तत्त्वे विचाराने सुटी केल्यावर ती सुटी करणारा 'आपण' म्हणजे मी किंवा जीवात्मा लीन होऊन एकमेव भेदशून्य नित्य आत्मा उरतो. ॥३३॥

आपणासी ठावचि नाहीं । जन्ममृत्यु कैंचें काई । पाहातां वस्तुचा ठाईं । पापपुण्य नसे ।।३४।।

जीवरूप मी ला जर अस्तित्वच नसेल तर जन्म व मरण तर कोठून आणणार? ('न कश्चित जायते जीवो' - मांडूक्य कारिका.) आत्मरूप मी निर्गुण असल्याने त्याला पापपुण्याचा स्पर्शही होत नाही. ॥३४॥

पापपुण्य येमयातना । हे निर्गुणीं तों असेना । आपण तोचि तरी जन्ममरणा । ठाव कैंचा ।।३५।।

पाप व पुण्याने मिळणारे नर्कस्वर्गादी ह्यांचा निर्गुणाशी संबंधच नाही. आत्मरूप 'मी' निर्गुण असल्याने त्याला जन्ममरण व मरणोत्तर गती कशा मिळतील? ॥३५॥

देहेबुद्धीनें बांधला । तो विवेकें मोकळा केला । देहातीत होतां पावला । मोक्षपद ।।३६।।

'मी देह' ह्या भ्रमाने बद्ध झालेला विवेकाने मुक्त होतो. जिवंत असताना देह बाधित झाल्यावर जीवन्मुक्ती व देहाला मरण आल्यावर विदेहमुक्ती लाभते. ॥३६॥

जालें जन्माचें सार्थक । निर्गुण आत्मा आपण येक । परंतु हा विवेक । पाहिलाच पाहावा ।।३७।।

निर्गुण, अजर व अमर असा अद्वितीय आत्मा 'मी' आहे हा अनुभव घेण्यात जन्माचे सार्थक आहे. हा विवेक साधकाने सतत सांभाळावा. त्याचे सतत श्रवण व मनन करून निश्चय करीत जावे. ॥३७॥

जागें होतां स्वप्न सरे । विवेक पाहातां दृश्य वोसरे । स्वरूपानुसंधानें तरे । प्राणीमात्र ।।३८।।

जाग येताच स्वप्नातील अनुभव नाहीसे होतात. त्याप्रमाणे अविद्येमुळे भासणारे जगत्‌रूप स्वप्न विवेकाची जाग येताच नाहीसे होते. 'मी ब्रह्म आहे' ह्या अनुसंधानाने जीव मुक्त होतो. ॥३८॥

आपणास निवेदावें । आपण विवेकें नुरावें । आत्मनिवेदन जाणावें । याचें नाव ।।३९।।

जीवरूप मी चे आत्मरूप मी मध्यें विसर्जन करून जीवरूप मीचा बाध करून घ्यावा. आत्मानात्मविवेक हे त्याचे साधन आहे. ह्यालाच 'आत्मनिवेदन' असे म्हणतात. (द. १२-५) ॥३९॥

आधीं अध्यात्मश्रवण । मग सद्‌गुरुपादसेवन । पुढें आत्मनिवेदन । सद्‌गुरुप्रसादें ।।४०।।

प्रथम अध्यात्मशास्त्राचे अधिकाऱ्याच्या मुखातून श्रवण करावे. नंतर श्रीगुरुचरणांची सेवा केली असता त्यांच्या प्रसादाने आत्मनिवेदन साध्य होते. ('तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया- गीता ४-३४) ॥४०॥

आत्मनिवेदना उपरी । निखळ वस्तु निरंतरी । आपण आत्मा अंतरीं । बोध जाला ।।४१।।

आत्मनिवेदन साधल्यानंतर 'मी आत्मा' हा अनुभव आला असता विमल व नित्य आत्मवस्तूशिवाय काहीही उरत नाही. ॥४१॥

त्या ब्रह्मबोधें ब्रह्मचि जाला । संसारखेद तो उडाला । देहो प्रारब्धीं टाकिला । सावकास ।।४२।।

'मी ब्रह्म' असा अनुभव घेणारा ब्रह्मच होतो. दृश्य प्रपंचाचा बाध झाल्याने सुखदु:खादी द्वंद्वांचे आघात थांबतात. ज्या प्रारब्धाची तीन देहावर (स्थूल, सूक्ष्म, कारण) सत्ता चालते त्याकडे देह शांतपणे सोपवला जातो. ।।४२।।

यासी म्हणिजे आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान । परब्रह्मीं अभिन्न । भक्तचि जाला ।।४३।।

आत्मज्ञान म्हणतात ते हेच. परब्रह्माशी भ्रमाने आलेला वेगळेपणा जाऊन भक्त (विभक्त नसलेला) होताच अखंड समाधान लाभते. ।।४३।।

आतां होणार तें होयेना कां । आणि जाणार तें जायेना कां । तुटली मनांतील आशंका । जन्ममृत्याची ।।४४।।

त्यानंतर 'जे व्हावयाचे ते खुशाल होऊ द्या व जे जायचे ते खुशाल जाऊ द्या' अशी भूमिका तयार होते. 'माझा जन्म झाला असून मी मरणार आहे' हा भ्रम संपूर्णपणे मावळून जातो. ।।४४।।

संसारी पुंडावें चुकलें । देवा भक्तां ऐक्य जालें । मुख्य देवास वोळखिलें । सत्संगें करूनी ।।४५।।

जन्ममरणांच्या चक्रातून सुटका होते कारण मुख्य ब्रह्मरूप देवास सद्गुरूंच्या सहवासात ओळखून त्याच्याशी भक्तरूपाने ऐक्य साधले जाते. ।।४५।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'ब्रह्मपावननिरूपण' नाम समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'ब्रह्मपावन' निरुपण नावाचा दुसरा समास समाप्त.

दशक सहावा : देवशोधन

समास तिसरा : मायोद्भवनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

निर्गुण आत्मा तो निर्मळ । जैसें आकाश अंतराळ । घनदाट निर्मळ निश्चळ । सदोदित ।।१।।

निर्गुण आत्म्याला देह, गुण, अवस्था इत्यादिकांचा मळ नसतो. आत्म्याला अखंड, निष्कलंक व सतत स्थिर आकाशाचे उदाहरण देतात. ॥१॥

जें खंडलेंचि नाहीं अखंड । जें उदंडाहूनि उदंड । जें गगनाहूनि वाड । आणि सूक्ष्म ।।२।।

पण तो आकाशाहून व्यापक व सूक्ष्म आहे. तो निरपेक्ष व्यापक असून देश, काल व वस्तूने परिच्छिन्न होत नाही. (तो सर्वत्र, सर्वकाल व अखंड असतो.) ॥२॥

जें दिसेना ना भासेना । जें उपजेना ना नासेना । जें येयना ना जायना । परब्रह्म तें ।।३।।

ब्रह्म डोळ्यांना दिसत नाही, मनाला जाणवत नाही, निर्माण होत नाही, नष्ट होत नाही, जात नाही व येत नाही. ॥३॥

जें चळेना ना ढळेना । जें तुटेना ना फुटेना । जें रचेना ना खचेना । परब्रह्म तें ।।४।।

परब्रह्म हालत नाही, सरकत नाही, तुटत नाही, फुटत नाही, घडत नाही व मोडत नाही. ॥४॥

जें सन्मुखचि सर्वकाळ । जें निःकळंक आणि निखळ । सर्वांतर आकाशपाताळ । व्यापूनि असे ।।५।।

कलंकरहित विमल ब्रह्म आकाश व पाताळात व्यापून असून प्रत्येकाच्या जणू सतत समोर आहे. जिकडे पहावे तिकडे आहे. ॥५॥

अविनाश तें ब्रह्म निर्गुण । नासे ते माया सगुण । सगुण आणि निर्गुण । कालवलें ।।६।।

निर्गुण ब्रह्म अविनाशी असून सगुण माया विनाशशील आहे. त्या दोघांचा दृश्य जगतात जणू संगम झाला आहे. ॥६॥

या कर्दमाचा विचार । करूं जाणती योगेश्वर । जैसें क्षीर आणि नीर । राजहंस निवडिती ।।७।।

अशक्य असलेला हा संगम झाला म्हणजे काय झाले हे जीवन्मुक्त ज्ञानीच जाणतात. (पहा-'सत्यानृते मिथुनीकृत्य' इ. ब्र. सू. शांकरभाष्याचा उपोद्घात) पाण्यापासून दूध वेगळे करण्याची कला राजहंसच जाणतात. ॥७॥

जड सबळ पंचभूतिक । त्यामध्यें आत्मा व्यापक । तो नित्यानित्यविवेक । पाहातां कळे ।।८।।

अचेतन जगत् पंचभूतांचे असल्याने अशुद्ध असून त्यात चेतन आत्मा व्यापून राहतो, अचेतन अनित्य व चेतन नित्य असा विवेक, समजावून घेतल्यानंतर लक्षात येतो. ॥८॥

सबळ = शबल = अशुद्ध

उसांमध्यें घेईजे रस । येर तें सांडिजे बाकस । तैसा जगामध्यें जगदीश । विवेकें वोळखावा ।।९।।

उसाची साल सोलून त्यातील रस घ्यावा त्याप्रमाणे दृश्य जगतात ब्रह्म आहे हे जाणावे. ॥९॥

रस नासिवंत पातळ । आत्मा शाश्वत निश्चळ । रस अपूर्ण आत्मा केवळ । परिपूर्ण जाणावा ।।१०।।

रसाचा दृष्टांत एकदेशी (मर्यादित अर्थाने घ्यावयाचा) आहे. कारण तो पातळ असून नंतर कुजतो. आत्मा रूपरहित

असून निर्विकार आहे. रसाचे अस्तित्व उसावर अवलंबून आहे (अपूर्ण). आत्म्याचे असणे दृश्य जगतावर अवलंबून नाही. (पूर्णमद: पूर्णमिदं). ॥१०॥

आत्म्यासारिखें येक असावें । मां तें दृष्टांतासि द्यावें । दृष्टांतमिसें समजावें । कैसें तरी ।।११।।

खरे तर आत्म्यासारखी दुसरी वस्तू नसल्याने दृष्टान्त नाहीच. पण त्याचे साह्याने थोडी तरी समजूत पटते. ॥११॥

ऐसी आत्मस्थिती संचली । तेथें माया कैसी जाली । जैसी आकाशीं वाहिली । झुळुक वायोची ।।१२।।

आत्मा घनदाट भरला असता त्यात मायेला प्रवेश कसा मिळाला? आकाशात अचानक वायू वाहू लागावा त्याप्रमाणे. ॥१२॥

वायोपासूनि तेज जालें । तेजापासूनि आप निपजलें । आपापासूनि आकारलें । भूमंडळ ।।१३।।

(आकाशापासून वायू), वायूपासून तेज, तेजापासून पाणी व पाण्यापासून पृथ्वी तयार झाली. ॥१३॥

भूमंडळापासूनि उत्पत्ती । जीव नेणों जाले किती । परंतु ब्रह्म आदिअंतीं । व्यापूनि आहे ।।१४।।

पृथ्वीवर असंख्य जीव निर्माण झाले. परंतु ब्रह्म मात्र आकाशाच्या आधी व पृथ्वीच्या अंतीसुद्धा व्यापून राहिलेले असते. ॥१४॥

जें जें काहीं निर्माण जालें । तें तें अवघेंचि नासलें । परी मुळीं ब्रह्म तें संचलें । जैसें तैसें ।।१५।।

जे जे काही उत्पन्न होते त्याला त्याला नाश असतो. परंतु परब्रह्म मात्र अनादि, आद्य, नित्य व सत्य असून, त्यात जराही बदल न होता सर्वत्र व्यापून राहिलेले असते. ॥१५॥

घटापूर्वीं आकाश असे । घटामधें आकाश भासे । घट फुटतां न नासे । आकाश जैसें ।।१६।।

मडके घडविण्यापूर्वी आकाश असते. ते घडविल्यानंतर मडक्यात आकाश व्यापून राहिल्याप्रमाणे वाटते. पण मडके फुटल्यावर आकाश मात्र आहे तसेच असते. ॥१६॥

तैसें परब्रह्म केवळ । अचळ आणि अढळ । मधें होत जात सकळ । सचराचर ।।१७।।

त्या आकाशाप्रमाणे परब्रह्म न हालणारे व न ढळणारे असून मडक्याप्रमाणे चर अचर सृष्टी निर्माण होऊन नष्ट होते. ब्रह्म तसेच राहते. ॥१७॥

जें जें कांहीं निर्माण जालें । तें तें आधीच ब्रह्में व्यापिलें । सर्व नाशतां उरलें । अविनाश ब्रह्म ।।१८।।

या सृष्टिरूपाने जे जे उत्पन्न होते ते त्या उत्पत्तीपूर्वीपासूनच ब्रह्माने व्यापले आहे! सृष्टी नष्ट झाली तरी अविनाशी ब्रह्म तसेच उरते. ॥१८॥

ऐसें ब्रह्म अविनाश । तेंचि सेविती ज्ञाते पुरुष । तत्वनिर्शनें आपणास । आपण लाभे ।।१९।।

आत्मवेत्ते पुरुष या अविनाशी ब्रह्माच्याच अनुसंधानात राहतात. मागील समासात सांगितल्याप्रमाणे तत्त्वांचा निरास केला असता 'जीवरूप मी आत्मरूप मी आहे' असा अनुभव येतो. ॥१९॥

तत्त्वें तत्व मेळविलें । त्यासी देह हें नाम ठेविलें । तें जाणते पुरुषीं शोधिलें । तत्वें तत्व ।।२०।।

एका तत्त्वात दुसरे तत्त्व मिळवीत मिळवीत जो संघात तयार होतो त्याला देह असे म्हणतात. जाणत्या पुरुषांनी तत्त्व झाडा करून आत्मतत्त्वाचा शोध घेतलेला असतो. ॥२०॥

तत्वझाडा निशेष होतां । तेथें निमाली देहअहंता । निर्गुण ब्रह्मीं ऐक्यता । विवेकें जाली ।।२१।।

तत्त्वे झाडली जाताच 'मी देह' हा भ्रमरूप अहंकार नष्ट होतो व विवेकाने 'मी निर्गुण ब्रह्म' असा अनुभव येतो. ॥२१॥

विवेकें देहाकडे पाहिलें । तों तत्वें तत्व वोसरलें । आपण कांहीं नाहीं आलें । प्रत्ययासी ।।२२।।

विवेक दृष्टीने शरीराचे पृथक्करण करताच तत्त्वामागून तत्त्व निरसून 'मी' म्हणून काही अनुभवाला येत नाही. ॥२२॥

आपला आपण शोध घेतां । आपली तों माईक वार्ता । तत्वांतीं उरलें तत्वता । निर्गुण ब्रह्म ।।२३।।

जीव जेव्हा आत्म्याचा शोध घेऊ पाहतो तेव्हा तो (जीव) अनिर्वचनीय असल्याचे समजते व सर्व तत्त्वे सारली असता आत्मरूप निर्गुण ब्रह्म उरते. ॥२३॥

आपणाविण निर्गुण ब्रह्म । हेंचि निवेदनाचें वर्म । तत्वासरिसा गेला भ्रम । मीतूंपणाचा ।।२४।।

जीवभाव आत्मस्वरूपात विसर्जित होऊन निर्गुण ब्रह्म उरणे हेच आत्मनिवेदनाचे वर्म आहे. मायिक तत्त्वे झाडली जाताच 'मी' व 'तू' हा भ्रम निवृत्त होतो. (पहा. ब्र.सू. शांकरभाष्य उपोद्घात) ॥२४॥

मी पाहातां आडळेना । निर्गुण ब्रह्म तें चळेना । आपण तेंचि परी कळेना । सद्गुरुविण ।।२५।।

अहं रूप जीव शोधता शोधता तत्त्वांच्या निरासात तोच हरवतो! निर्गुण ब्रह्म मात्र जसेच्या तसे राहते. तेच मी चे खरे स्वरूप आहे हे ज्ञान श्रीगुरुकृपेवाचून होत नाही. ॥२५॥

सारासार अवघें शोधिलें । तों असार तें निघोन गेलें । पुढें सार तें उरलें । निर्गुण ब्रह्म ।।२६।।

सार व असार यांचा कसून शोध घेतल्यावर असाराचा निरास झाला. निर्गुण ब्रह्मरूप सार तेवढे शिल्लक राहिले. (सर्पाचा निरास झाल्यावर रज्जू शिल्लक राहिली.) ॥२६॥

आधीं ब्रह्म निरोपिलें । तेंचि सकळांमध्यें व्यापलें । सकळ आवघेंचि नासलें । उरलें तें केवळ ब्रह्म ।।२७।।

ब्रह्म अनादि आद्य असून तेच दृश्य जगतात व्यापून राहिले आहे. दृश्य जगत् नष्ट झाल्यावर ब्रह्म शिल्लक राहते. ॥२७॥

होतां विवेकें संव्हार । तेथें निवडे सारासार । आपला आपणासि विचार । ठाईं पडे ।।२८।।

विवेकाच्या शस्त्राने दृश्य जगताचा संहार केला असता सार व असाराचा निवाडा होऊन जातो. 'मी' (आत्मा) सार असून देहादि प्रपंच असार असल्याचे चांगले लक्षात येते. ॥२८॥

आपण कल्पिलें मीपण । मीपण शोधितां नुरे जाण । मीपण गेलियां निर्गुण । आत्मा स्वयें ।।२९।।

जीवानेच 'मी' अशी कल्पना घट्ट धरून ठेवलेली असते. त्या 'मी'कडे भेदक दृष्टीने पाहिले असता तो मी नष्ट होतो. तो जाताच निर्गुण आत्मा हे मूळ स्वरूप असलेला जीव उरतो. ॥२९॥

जालियां तत्वाचें निर्शन । निर्गुण आत्मा तोचि आपण । कां दाखवावें मीपण । तत्वनिर्शनाउपरी ।।३०।।

तत्त्वांचा निरास झाल्यावर निर्गुण आत्मा हेच 'मी'चे खरे स्वरूप राहते, मग तत्त्वांचा निरास झाल्यानंतरही भ्रामक 'मी'पणा का मिरवावा? ॥३०॥

तत्वांमध्यें मीपण गेलें । तरी निर्गुण सहजचि उरलें । सोहंभावें प्रत्यया आलें । आत्मनिवेदन ।।३१।।

तत्त्वांच्या निरासाबरोबरच मीपणाचाही निरास होतो. कारण अहंकाररूप मी त्या तत्त्वांचाच घडलेला असतो. नंतर फक्त आत्मरूप निर्गुण ब्रह्म उरते. 'ते मी आहे' या निश्चयाने आत्मनिवेदनाचा अनुभव येतो. ॥३१॥

आत्मनिवेदन होतां । देवाभक्तांसी ऐक्यता । साचार भक्त विभक्तता । सांडूनि जाला ।।३२।।

आत्मनिवेदन होताच आत्मरूप देव व जीवरूप भक्त यांचे जणू पुन्हा ऐक्य होते. उपासक विभक्तपणा सोडून खराखुरा भक्त बनतो. ॥३२॥

निर्गुणासी नाहीं जन्ममरण । निर्गुणासी नाहीं पापपुण्य । निर्गुणीं अनन्य होतां आपण । मुक्त जाला ।।३३।।

निर्गुण हे जगत् रूपाने व्यक्त होत नाही व नष्टही होत नाही. ते जीवरूपाने जन्माला येऊन मरतही नाही. त्याला

पापपुण्याचा स्पर्शही होत नाही. जीव त्याच्याशी एकरूप झाला की मुक्त होतो. ॥३३॥

तत्वीं वेटाळून घेतला । प्राणी संशयें गुंडाळला । आपणासी आपण भुलला । कोहं म्हणे ।।३४।।

ब्याऐंशी तत्त्वांशी तादात्म्य संबंधाने राहिल्यामुळे जीवात्मा स्वतःच्या खऱ्या स्वरूपाविषयी आयुष्यभर भ्रमात राहतो. स्वतःचे स्वरूप विसरून 'मी कोण?' असा प्रश्न विचारतो. ॥३४॥

तत्वीं गुंतला म्हणे कोहं । विवेक पाहतां म्हणे सोहं । अनन्य होतां अहं सोहं । मावळलीं ।।३५।।

'तत्त्वे म्हणजे मी' असे म्हणणारा केव्हा तरी पूर्व सुकृत उदयाला आल्यावर 'खरा मी कोण' असा प्रश्न विचारू लागतो. नंतर त्याला विवेकाची प्राप्ती झाल्यावर 'मी ब्रह्म' असा निश्चय करतो. तो ब्रह्मरूप होताच 'मी' व 'मी ब्रह्म' या दोन्ही भावांचे कारण न राहिल्याने तेही मावळतात. ॥३५॥

याउपरी उर्वरित । तेंचि स्वरूप संत । देहीं असोनि देहातीत । जाणिजे ऐसा ।।३६।।

जीव व ब्रह्म यांचे दृढ व अपरिवर्तनीय ऐक्य झाल्यावर जे काही देहरूपाने उरते तेही ब्रह्मच असते. (ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति–मुंडक), देह असून तो मुक्त जीव देहापासून अलिप्त राहतो असे लक्षात घ्यावे. ॥३६॥

संदेहवृत्ति ते न भंगे । म्हणोनि बोलिलेंचि बोलावें लागे । आम्हासी हें घडलें प्रसंगें । श्रोतीं क्ष्मां करावे ।।३७।।

श्रोत्याचा जन्मोजन्मीचा भ्रम लवकर जात नसल्याने मला असे पुन्हा पुन्हा सांगावे लागते. क्षमस्व!॥३७॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मायोद्भवनाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'मायोद्भव' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक सहावा : देवशोधन

समास चवथा : ब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

कृतायुग सत्रा लक्ष अठाविस सहस्त्र । त्रेतायुग बारा लक्ष शाहाणौ सहस्त्र । द्वापार आठ लक्ष चौसष्टी सहस्त्र । आतां कलयुग ऐका ।।१।।

पुराणांमध्ये चार युगांचे कालमान पुढीलप्रमाणे सांगितले आहे. कृत–सतरा लक्ष अठ्ठावीस हजार वर्षे. त्रेता–बारा लक्ष शहाण्णव हजार वर्षे, द्वापार–आठ लक्ष चौसष्ट हजार वर्षे. ॥१॥

कलयुग च्यारि लक्ष बतीस सहस्त्र । च्यतुर्युगें त्रेताळिस लक्ष वीस सहस्त्र । ऐसीं च्यतुर्युगें सहस्त्र । तो ब्रह्मयाचा येक दिवस ।।२।।

कलि–चार लक्ष बत्तीस हजार वर्षे. अशी ही चारी युगे एक हजार वेळा पुन्हा पुन्हा झाली की तो सर्वकाळ मिळून ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो. ॥२॥

ऐसे ब्रह्मे सहस्त्र देखा । तेव्हां विष्णुची येक घटिका । विष्णु सहस्त्र होतां ऐका । पळ येक ईश्वराचें ।।३।।

ब्रह्मदेवाचे असे हजार दिवस मिळून विष्णूची एक घटका होते. विष्णूच्या हजार घटका मिळून ईश्वराचा एक पळ होतो. ॥३॥

ईश्वर जाये सहस्त्र वेळ । तें शक्तीचें अर्ध पळ । ऐसी संख्या बोलिली सकळ । शास्त्रांतरी ।।४।।

ईश्वराचे हजार पळ मिळून आदिशक्तीचा अर्धा पळ होतो. शास्त्रात ही कालगणना सांगितली आहे. या अर्थाचा श्लोक–

श्लोक

चतुर्युग सहस्त्राणि दिनमेकं पितामहम् ।
पितामहसहस्त्राणि विष्णोर्घटिकमेवच ।।१।।
विष्णोरेकसहस्त्राणि पलमेकं महेश्वरम् ।
महेश्वरसहस्त्राणि शक्तेरर्धं पलं भवेत् ।।२।।

ऐशा अनंत शक्ती होती । अनंत रचना होति जाती । तरी अखंड खंडेना स्थिती । परब्रह्माची ।।५।।

आदि शक्तीचे असंख्य अर्धपळ होऊन त्यात सृष्टी अनंत वेळा निर्माण होऊन नष्ट होते. तरी ब्रह्म मात्र त्या कशानेच लिप्त न होता जसेच्या तसे पूर्णत्वाने राहते. ॥५॥

परब्रह्मासी कैंची स्थिती । परी हे बोलावयाची रीती । वेदश्रुती नेति नेति । परब्रह्मीं ।।६।।

परब्रह्माच्या बाबतीत खरे तर स्थिती किंवा अवस्थेच्या भाषेत बोलता येतच नाही. पण समजुतीसाठी तसे बोलावे लागते. प्रत्यक्ष वेदोपनिषदेसुद्धा परब्रह्मासंबंधी काही सांगावयाची वेळ येते तेव्हा मौन पत्करतात. ॥६॥

च्यारि सहस्त्र सातसें साठीं । इतुकी कलयुगाची राहाटी । उरल्या कलयुगाची गोष्टी । ऐसी असे ।।७।।

आतापर्यंत कलियुगाची चार हजार सातशे साठ वर्षे झाली आहेत. आता पुढील कलियुगासंबंधी सांगतो ते ऐका. ॥७॥

च्यारि लक्ष सत्ताविस सहस्र । दोनिसें चाळीस संवछर । पुढें अन्योविण्य वर्णसंकर । होणार आहे ।।८।।

आता उरलेल्या कलियुगाची चार लक्ष सत्तावीस हजार दोनशे चाळीस वर्षे शिल्लक आहेत. त्यात पुढे पुढे चार वर्णांचा संकर होईल. ॥८॥

ऐसें रचलें सचराचर । येथें येकाहूनि येक थोर । पाहतां येथीचा विचार । अंत न लगे ।।९।।

अशा या चराचर सृष्टीच्या रचनेत मोठेपणाच्या चढत्या श्रेणी सांगितल्या जातात. ज्याला त्याला आपापले दैवत मोठे वाटते. या बडबडीला अंत नाही. ॥९॥

येक म्हणती विष्णू थोर । येक म्हणती रुद्र थोर । येक म्हणती शक्ति थोर । सकळांमध्यें ।।१०।।

कोणी विष्णूला, कोणी रुद्राला तर कोणी शक्तीला थोर समजतात. ॥१०॥

ऐसें आपुलालेपरी बोलती । परंतु अवघेंचि नासेल कल्पांतीं । यदृष्टं तं नष्टं हे श्रुती । बोलतसे ।।११।।

असे आपापल्या समजुतीनुसार बोलतात. परंतु 'जे दिसते ते नष्ट होते' या न्यायाने ही सर्व सृष्टी कल्पाच्या शेवटी त्यांच्यासह नष्ट होणार आहे! ॥११॥

आपुलाली उपासना । अभिमान लागला जना । याचा निश्चयो निवडेना । साधुविण ।।१२।।

सामान्य माणसांना आपापल्या उपास्य दैवतांच्या उपासनांचा अभिमान वाटतो. पण यासंबंधीचे सत्य केवळ साधूलाच कळते. इतरांना नाही. ॥१२॥

साधु निश्चय करिती येक । आत्मा सर्वत्र व्यापक । येर हें अवघेंचि माईक । सचराचर ।।१३।।

त्या साधूंचा असा दृढनिश्चय असतो की आत्मा सर्वत्र व्यापून असून त्याव्यतिरिक्त भासणारा सर्व पसारा मायिक आहे. सतासत विलक्षण आहे. ॥१३॥

चित्रीं लिहिली सेना । त्यांत कोण थोर कोण साना । हें तुम्ही विचाराना । आपुले ठाईं ।।१४।।

चित्रामध्ये सेनापतीपासून सामान्य सैनिकापर्यंत व्यक्ती रंगवलेल्या दिसतात. त्या सर्व केवळ रंगमय असल्याने त्यात श्रेष्ठ कोण व लहान कोण याचा तुम्हीच स्वत:शी विचार करा. ॥१४॥

स्वप्नीं उदंड देखिलें । लहानथोरहि कल्पिलें । परंतु जागें जालियां जालें । कैसें पहा ।।१५।।

स्वप्नामध्ये अमर्याद दृश्ये दिसतात. त्यात कोणी श्रेष्ठ व कोणी कनिष्ठ असेही दिसते. परंतु जाग आल्यावर त्यातील काय शिल्लक राहते याचा विचार करा. ॥१५॥

पाहातां जागृतीचा विचार । कोण लहान कोण थोर । जाला अवघाचि विस्तार । स्वप्नरचनेचा ।।१६।।

त्याचप्रमाणे जागृती हेही एक अविद्येमुळे पडलेले स्वप्नच असून त्यातही कोणी श्रेष्ठ, कनिष्ठ, लहानमोठे नाही. रंगाच्या विस्ताराप्रमाणे तो स्वप्नाचा विस्तार असतो. (पहा-मांडुक्य कारिका) ॥१६॥

अवघाचि माईक विचार । कैंचे लाहान कैंचें थोर । लाहानथोराचा निर्धार । जाणती ज्ञानी ।।१७।।

सर्व सृष्टीच मायामय असल्याने त्यातील लहानमोठ्याचा विचारही मायिकच आहे. अशा या विचाराचे रहस्य आत्मवेत्ते जाणतात. ॥१७॥

जो जन्मासी येऊन गेला । तो मी थोर म्हणतांच मेला । परी याचा विचार पाहिला । पाहिजे श्रेष्ठीं ।।१८।।

जो जन्माला येऊन मरतो तो 'मी मोठा' असे म्हणत म्हणत मरून जातो! पण शहाण्याने यासंबंधी नीट विचार करावा. किंवा श्रेष्ठ संतांनी यासंबंधी करून ठेवलेला निवाडा पहावा. ॥१८॥

जयांसि जालें आत्मज्ञान । तेचि थोर माहाजन । वेद शास्त्रें पुराण । साधु संत बोलिले ।।१९।।

ज्यांना आत्मज्ञान झाले आहे असे महान संत, वेद, शास्त्रे, पुराणे व साधू यांनी असा निवाडा करून ठेवला आहे

तो पहावा किंवा वेद, शास्त्रे, पुराणे व साधू आत्मवेत्त्यालाच श्रेष्ठ म्हणतात. ॥१९॥

एवं सकळांमध्यें थोर । तो येकचि परमेश्वर । तयांमधें हरिहर । होति जाती ।।२०।।

एकूण परब्रह्मच सर्वश्रेष्ठ असून विष्णू व ब्रह्मदेव अगणित वेळा येतात व जातात. परमेश्वरी सृष्टीचे ते घटक असतात. ॥२०॥

तो निर्गुण निराकार । तेथें नाहीं उत्पत्ती विस्तार । स्थानमानाचा विचार । ऐलिकडे ।।२१।।

परब्रह्मरूप परमेश्वर निर्गुण व निराकार असून त्याला उत्पत्ती, स्थिती व नाश नाहीत. तो कोठे आहे व केवढा आहे हा विचार फारच अलीकडचा आहे. (अज्ञानातील आहे.) ॥२१॥

नावरूप स्थानमान । हा तों आवघाचि अनुमान । तथापी होईल निदान । ब्रह्मप्रळईं ।।२२।।

नाव, रूप, ठिकाण, आकार इ. सर्व काल्पनिक होत या विधानाची वास्तवता ब्रह्मदेवाच्या प्रलयकाळी लक्षात येते. नामादि नष्ट होतात. ॥२२॥

ब्रह्म प्रळयावेगळें । ब्रह्म नावरूपानिराळें । ब्रह्म कोणी येकाकाळें । जैसें तैसें ।।२३।।

ब्रह्म मात्र या प्रळयापासून अलिप्त असते. कारण त्याला नाम नाही व रूपही नाही. (ब्रह्म हा शब्द नाम नसून संकल्पनात्मक आहे.) ते तिन्ही काळात अबाधित (सत्य) असते. ॥२३॥

करिती ब्रह्मनिरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण । तेचि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद ।।२४।।

जे ब्रह्मविद्या समजावून सांगतात व स्वतः ते ब्रह्म पूर्णपणे अनुभवतात त्या ब्रह्मवेत्त्यांनाच ब्राह्मण म्हणावे. ॥२४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'ब्रह्मनिरूपणनाम' समास चवथा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'ब्रह्मनिरूपण' नावाचा चवथा समास समाप्त.

दशक सहावा : देवशोधन

समास पाचवा : मायाब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

श्रोते पुसती ऐसें । माया ब्रह्म तें कैसें । श्रोत्यां वक्तयांच्या मिसें । निरूपण ऐका ।।१।।

'माया व ब्रह्म यांचे स्वरूप कसे असते?' असा प्रश्न श्रोत्याने विचारल्यामुळे त्या निमित्ताने त्याचे निरूपण सांगतो ते ऐका. ॥१॥

ब्रह्म निर्गुण निराकार । माया सगुण साकार । ब्रह्मासि नाहीं पारावार । मायेसि आहे ।।२।।

ब्रह्म निर्गुण निराकार तर माया सगुण साकार आहे. ब्रह्म निरपेक्ष व्यापक, तर माया सृष्टीमध्ये व्यापून राहते. ब्रह्म अमर्याद. माया मर्यादित. ॥२॥

ब्रह्म निर्मळ निश्चळ । माया चंचळ चपळ । ब्रह्म निरोपाधी केवळ । माया उपाधिरूपी ।।३।।

ब्रह्म विमल व स्थिर. माया अस्थिर व चंचल. ब्रह्म निरूपाधिक. मायेचे उपाधी हेच स्वरूप आहे. ॥३॥

माया दिसे ब्रह्म दिसेना । माया भासे ब्रह्म भासेना । माया नासे ब्रह्म नासेना । कल्पांतकाळीं ।।४।।

मायिक जगत् पाच ज्ञानेंद्रियांना कळते व मनाला जाणवते. ब्रह्म कळत व भासत नाही. कल्पान्त झाल्यावर माया निवृत्त होते. ब्रह्म तसेच राहते. ॥४॥

माया रचे ब्रह्म रचेना । माया खचे ब्रह्म खचेना । माया रुचे ब्रह्म रुचेना । अज्ञानासी ।।५।।

मायिक पदार्थ घडतात. ब्रह्मात बदल नाही. मायिक पदार्थांना झीज आहे. ब्रह्म निर्विकार आहे. अविद्येमध्ये जगणाऱ्या जीवांना मायिक पदार्थांचे ममत्व वाटते. ब्रह्माचे नाही. ॥५॥

माया उपजे ब्रह्म उपजेना । माया मरे ब्रह्म मरेना । माया धरे ब्रह्म धरेना । धारणेसी ।।६।।

क्षर व अक्षर या मायिक वस्तूंची उत्पत्ती किंवा जन्म होतो. ब्रह्माचा नाही. मायेच्या अभिव्यक्तीचा नाश होतो. ब्रह्म अविनाशी आहे. मायिक पदार्थांना चित्तवृत्ती पकडते. ब्रह्माला नाही. ॥६॥

माया फुटे ब्रह्म फुटेना । माया तुटे ब्रह्म तुटेना । माया विटे ब्रह्म विटेना । अविनाश तें ।।७।।

मायेचे भाग पडतात. (पंचभूत, त्रिगुण इ.) ब्रह्माचे नाही. मायिक वस्तूचे तुकडे पडतात. ब्रह्म अफूट आहे. अविनाशी ब्रह्म विटत नाही. मायिक पदार्थ विटतात. ॥७॥

माया विकारी ब्रह्म निर्विकारी । माया सर्व करी ब्रह्म कांहींच न करी । माया नाना रूपें धरी । ब्रह्म तें अरूप ।।८।।

मायेला अस्ति, जायते इ. सहा विकार असतात. ब्रह्माला नसतात. ब्रह्माण्डाचे सर्व कर्तृत्व मायेचे असून ब्रह्म अक्रिय आहे. माया अनेक रूपांनी प्रगट होते. ब्रह्म अरूप आहे. ॥८॥

माया पंचभूतिक अनेक । ब्रह्म तें शाश्वत येक । मायाब्रह्मांचा विवेक । विवेकी जाणती ।।९।।

पंचभूतांच्या विविध मिश्रणाने माया बहुविध भासते. अविनाशी ब्रह्म एकमेव आहे. असा हा माया व ब्रह्म यांतील फरक विवेक्यांना कळतो. ॥९॥

माया लाहान ब्रह्म थोर । माया असार ब्रह्म सार । माया अर्ति पार । ब्रह्मासी नाहीं ।।१०।।

माया एकदेशी ब्रह्म व्यापक. माया नाशवान असल्याने फोलकटाप्रमाणे असार तर अविनाशी ब्रह्म हे जडजीवात्मक जगताचे सार आहे. मायेला आरंभ व अंत आहे. ब्रह्माला नाही. ॥१०॥

सकळ माया विस्तारली । ब्रह्मस्थिति अछ्यादिली । परी ते निवडूनि घेतली । साधुजनीं ।।११।।

सर्वत्र मायेचा म्हणजे नामरूपांचा विस्तार दिसत असल्याने त्यामागील ब्रह्म झाकले गेले आहे. साधू मात्र नेमके झाकलेले ब्रह्म स्वीकारतात. (अस्ति, भाति व प्रिय यामागील सत्, चित् व आनंद पाहतात.) ॥११॥

गोंडाळ सांडून नीर घेईजे । नीर सांडूनि क्षीर सेविजे । माया सांडूनि अनुभविजे । ब्रह्म तैसें ।।१२।।

शेवाळ दूर सारून पाणी घ्यावे, पाणी बाजूला करून दूध प्यावे त्याप्रमाणे नामे व रूपे दूर करून ब्रह्म बघावे. ॥१२॥

ब्रह्म आकाशा ऐसे निवळ । माया वसुंधरा डहुळ । ब्रह्म सूक्ष्म केवळ । माया स्थूळरूपी ।।१३।।

ब्रह्म आकाशाप्रमाणे स्वच्छ आहे. मायेला पृथ्वीसारख्या पदार्थांचे डाग आहेत. ब्रह्म सूक्ष्म असून माया स्थूल आहे. कारण तिला रूपे आहेत. ॥१३॥

ब्रह्म तें अप्रत्यक्ष असे । माया ते प्रत्यक्ष दिसे । ब्रह्म तें समचि असे । माया ते विषमरूपी ।।१४।।

ब्रह्म ज्ञानेंद्रियांनी कळत नाही. मायिक पदार्थ कळतात. ब्रह्म समत्वाने सर्वत्र भरून आहे. मायिक पृथ्व्यादि पदार्थ कमी अधिक स्थूल सूक्ष्म आहेत. ॥१४॥

माया लक्ष ब्रह्म अलक्ष । माया साक्ष ब्रह्म असाक्ष । मायेमध्यें दोनि पक्ष । ब्रह्मीं पक्षचि नाहीं ।।१५।।

माया वृत्तिज्ञानाचा विषय आहे. ब्रह्म नाही. (मायेचे अन्तःकरणवृत्तीला ज्ञान होते. ब्रह्माचे होत नाही.) मायिक जीव द्रष्टा, श्रोता इ. असतो. ब्रह्म केवळ ज्ञानरूप असते. मायिक तुर्यावस्था ब्रह्म व माया दोन्ही जाणते. ब्रह्म ज्ञानरूप आहे. ॥१५॥

माया पूर्वपक्ष ब्रह्म सिद्धांत । माया असंत ब्रह्म संत । ब्रह्मासि नाहीं करणें हेत । मायेसि आहे ।।१६।।

अध्यारोप मायेचा असून अपवाद ब्रह्माशी निगडित आहे. 'जग आहे' हा अध्यारोप पूर्व पक्षाचा आहे. 'ब्रह्म आहे' हा अपवाद वेदान्ताचा म्हणजे सिद्धान्तपक्षाचा आहे. माया असत् असून ब्रह्म सत् आहे. ब्रह्माला कर्तव्य नाही. मायेला सृष्टीची घडामोड करावयाची असते. ॥१६॥

ब्रह्म अखंड घनदाट । माया पंचभूतिक पोचट । ब्रह्म तें निरंतर निघोट । माया ते जुनी जर्जरी ।।१७।।

ब्रह्म भेदशून्य एकसंध आहे. माया पांचभौतिक व केवळ कल्पित आहे. ब्रह्म नित्य व व्यापक असून माया भूतकाळाने ग्रस्त आहे. जीर्ण आहे. ॥१७॥

माया घडे ब्रह्म घडेना । माया पडे ब्रह्म पडेना । माया विघडे ब्रह्म विघडेना । जैसें तैसें ।।१८।।

मायिक सृष्टी तयार होते. ब्रह्म नित्यसिद्ध आहे. ती सृष्टी नष्ट होते. ब्रह्म तसेच राहते. मायेला विकार आहेत. ब्रह्माला विकार नाहीत. ॥१८॥

ब्रह्म असतचि असे । माया निरसितांच निरसे । ब्रह्मास कल्पांत नसे । मायेसि आहे ।।१९।।

ब्रह्म अनादि नित्यसिद्ध आहे. मायेचा निरास करता येतो. (सान्त.) कल्पान्त झाल्यावर माया निवृत्त होते. ब्रह्म असते तसेच राहते. ॥१९॥

माया कठिण ब्रह्म कोमळ । माया अल्प ब्रह्म विशाळ । माया नासे सर्वकाळ । ब्रह्मचि असे ।।२०।।

माया स्थूल, ब्रह्म सूक्ष्म आहे. माया परिच्छिन्न तर ब्रह्म परिच्छेदरहित व्यापक आहे. मायेला तीन काळांचे बंधन आहे. ब्रह्म कालातीत आहे. (माया नष्ट होते. भूतकाळात जाते.) ॥२०॥

वस्तु नव्हे बोलिजे ऐसी । माया जैसी बोलिजे तैसी । काळ पावेना वस्तुसी । मायेसी झडपी ।।२१।।

ब्रह्मासंबंधी ‘ते असे आहे’ म्हणून बोलता येत नाही. माया सतासतविलक्षण अनिर्वचनीय आहे. अज्ञानाने तिला ‘आहे’ म्हणता येते. ज्ञानाने ती ‘नाही’ असे म्हटले जाते. ब्रह्मावर काळाची सत्ता नाही. माया काळाच्या उदरात गडप होते. ॥२१॥

नाना रूप नाना रंग । तितुका मायेचा प्रसंग । माया भंगे ब्रह्म अभंग । जैसें तैसैं ।।२२।।

रूपांची व रंगांची विविधता जेथे दिसते तेथे माया असते. मायेची ही रूपे नष्ट होतात किंवा बदलतात. ब्रह्म जसेच्या तसे असते. ॥२२॥

आतां असो हा विस्तार । चालत जातें सचराचार । तितुकी माया परमेश्वर । सबाह्यअभ्यंतरीं ।।२३।।

आता हा तपशील पुरे झाला. चर व अचर सृष्टीत जे जे क्रियाशील व गतिमान आहे ते ते मायेचे आहे. ब्रह्म सृष्टीच्या आत व बाहेर स्थिर आहे. ॥२३॥

सकळ उपाधीवेगळा । तो परमात्मा निराळा । जळीं असोनि नातळे जळा । आकाश जैसें ।।२४।।

जलाशयामध्येही आकाश व्यापून असते. (त्यामुळेच त्यात सूर मारण्यासाठी अवकाश मिळतो.) पण त्यामुळे आकाश भिजत नाही. त्याप्रमाणे ब्रह्म उपाधीत, असूनही त्याने लिप्त होत नाही. (पहा–ऐश्वर्ययोग. गीता.) ॥२४॥

मायाब्रह्माचें विवरण । करितां चुके जन्ममरण । संतांस गेलियां शरण । मोक्ष लाभे ।।२५।।

माया व ब्रह्म यांचे तपशीलवार विवेचन करून, मायिकापासून अलिप्त राहून ब्रह्मानुसंधानात राहिले असता जन्ममरणातून सुटका होते. परंतु या मोक्षासाठी श्रीगुरूंना शरण जावे लागते. ॥२५॥

अरे या संतांचा महिमा । बोलावया नाहीं सीमा । जयांचेनि जगदात्मा । अंतरचि होये ।।२६।।

संत व श्रीगुरूंचे माहात्म्य खरोखर अपार आहे. त्यांच्या कृपेने अनंत ब्रह्मांडात व्यापून राहिलेले ब्रह्म आपल्या हृदयात असल्याचा अनुभव येतो. ॥२६॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ‘मायाब्रह्मनिरूपणनाम’ समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील ‘मायाब्रह्मनिरूपण’ नावाचा पाचवा समास समाप्त

दशक सहावा : देवशोधन

समास सहावा : सृष्टिकथन

॥ श्रीरामसमर्थ ॥

सृष्टीपूर्वीं ब्रह्म असे । तेथें सृष्टि मुळींच नसे । आतां सृष्टि दिसत असे । तें सत्य किं मिथ्या ।।१।।

''सृष्टी निर्माण होण्याआधी ब्रह्म असते. तेव्हा त्या ब्रह्मस्वरूपात सृष्टी नसते. नंतर जी सृष्टी असते ती सत्य की काल्पनिक?'' ॥१॥

तुम्ही सर्वज्ञ गोसांवी । माझी आशंका फेडावी । ऐसा श्रोता विनवी । वक्तयासी ।।२।।

अशी शंका विचारताना श्रोता म्हणतो-''तुम्ही सर्वज्ञ व सद्गुरू आहात. माझ्या या शंकेचे निरसन करावे अशी प्रार्थना आहे.'' ॥२॥

आतां ऐका प्रत्योत्तर । कथेसि व्हावें तत्पर । वक्ता सर्वज्ञ उदार । बोलता जाला ।।३।।

त्यावर शास्त्रवेत्ते व दयाळू असलेले ब्रह्मज्ञ सद्गुरू म्हणतात, ''आता पूर्ण लक्ष देऊन या प्रश्नाचे उत्तर ऐका.'' ॥३॥

जीवभूतः सनातन । ऐसें गीतेचें वचन । येणे वाक्यें सत्यपण । सृष्टीस आलें ।।४।।

यद्दृष्टंतन्नष्टंयेणें । वाक्यसृष्टी मिथ्यापणें । सत्य मिथ्या ऐसें कोणें । निवडावें ।।५।।

'ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन:' (गीता १५-७) 'या सृष्टीतील जीवात्मा माझा सनातन अंश आहे' या भगवद् वचनामुळे सृष्टी सत्य आहे असे म्हणावे लागते. त्याचबरोबर 'जे दिसते ते नष्ट होते' असा न्याय असल्यामुळे सृष्टी त्रिकालाबाधित सत्य नाही असेही म्हणावे लागते. अशा परिस्थितीत सृष्टीच्या सत्यासत्यतेचा निर्णय कसा करावा? ॥४,५॥

सत्य म्हणों तरी नासे । मिथ्या म्हणों तरी दिसे । आतां जैसें आहे तैसें । बोलिजेल ।।६।।

सत्य म्हणावी तर सृष्टी कालांतराने नष्ट होते. असत्य म्हणावी तर सध्या स्पष्ट दिसते. आता यासंबंधी शास्त्र व संत जो निर्णय करतात तो पाहू. ॥६॥

सृष्टीमध्यें बहुजन । अज्ञान आणी सज्ञान । म्हणौनियां समाधान । होत नाहीं ।।७।।

सृष्टीमध्ये तीन गुण व बुद्धी यांची अत्यंत विविधता वाट्याला आलेली माणसे असतात. त्यातील काही ज्ञानी असतात, तर काही अज्ञानी असतात. त्यामुळे अशा प्रश्नांचे समाधानकारक उत्तर देणे फार कठीण असते. (यापुढे ज्ञानी व अज्ञानी याचा झडलेला संवाद रंगवला आहे. ॥७॥

ऐका अज्ञानाचें मत । सृष्टि आहे ते शाश्वत । देव धर्म तीर्थ व्रत । सत्यचि आहे ।।८।।

अज्ञानी म्हणतो-सृष्टी शाश्वत आहे. त्या सृष्टीतील मूर्तिरूप देव, दानादी धर्म, तीर्थयात्रा व व्रतवैकल्ये इत्यादिकांची फळेही शाश्वत आहेत. ॥८॥

बोले सर्वज्ञाचा राजा । मूर्खस्य प्रतिमापूजा । ब्रह्मबळयाच्या पैजा । घालूं पाहे ।।९।।

सर्वश्रेष्ठ सर्वज्ञ म्हणतो-'देवादिकांच्या मूर्तीची पूजा करणे' मूर्खाला शोभते. ज्यांची पूजा करावयाची ते सर्व देव ब्रह्मदेवाच्या प्रलयकाळी नष्ट होतात असे मी पैजेवर सांगतो.' ॥९॥

तंव बोले तो अज्ञान । तरी कां करिसी संध्यास्नान । गुरुभजन तीर्थाटण । कासया फिरावें ।।१०।।

तेव्हा अज्ञानी विचारतो-"मग तू स्नानसंध्या कशासाठी करतोस? तीर्थाटणे करीत का फिरतोस व सद्गुरूंची सेवा कशासाठी करतोस? ॥१०॥

श्लोक **।। तीर्थे तीर्थे निर्मलं ब्रह्मवृंदं । वृंदे वृंदे तत्त्वचिंतानुवादः ।।**
वादे वादे जायते तत्त्वबोधः । बोधे बोधे भासते चंद्रचूडः ।।

चंद्रचूडाचें वचन । सद्गुरूचें उपासन । गुरुगीता निरूपण । बोलिलें हरें ।।११।।

श्लोकार्थ– ज्ञानी समजावून सांगतो–(श्लोकार्थ–) सर्व तीर्थक्षेत्रांमध्ये पवित्र ब्राह्मण वास्तव्याला असतात. त्यांच्या सभेमध्ये अध्यात्मशास्त्राचे विवरण चालू असते. त्या संवादात्मक विवरणातून आत्मतत्त्वाचा निश्चय होत जातो. या निश्चयातून आत्मरूप शिवाचा अनुभव येतो. (ओवीचा अर्थ–) गुरुगीता सांगताना भगवान शंकर श्रीगुरूंची उपासना करावयास सांगतात. ॥११॥

गुरूसि कैसें भजावें । आधी तयासि वोळखावें । त्याचें समाधान घ्यावें । विवेकें स्वयें ।।१२।।

श्रीगुरूंची ओळख पटवून घेऊन नंतर त्यांना प्रणिपातपूर्वक शरण जाऊन सेवेसह स्वत:च्या शाश्वत हिताचा प्रश्न विचारावा. त्यांनी दिलेल्या विवेकाच्या अनुष्ठानाने शाश्वत समाधान प्राप्त करून घ्यावे. ॥१२॥

श्लोक **।। ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं ।**
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यं ।।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरूं तं नमामि ।।१।।

श्लोकार्थ– परमसुखरूप असलेला ब्रह्मानंद प्राप्त करून देणारे, ज्ञानाची जणू ओतीव मूर्ती असलेले, सुखदु:खादी द्वन्द्वरहित, आकाशाप्रमाणे गंभीर व शान्त, 'तत्त्वमसि' ह्या महावाक्यासारखी वाक्ये ज्यांचा निर्देश करतात असे, जे एकमेव, नित्य, विमल, अचल, सर्वांच्या बुद्धीत साक्षित्वाने रहाणारे, भाव व अभाव ह्यांचे अतीत व त्रिगुणातीत असलेल्या ब्रह्मरूप श्रीगुरूंना मी वंदन करतो.

गुरुगीतेचें वचन । ऐसें सद्गुरुचें ध्यान । तेथें सृष्टिमिथ्याभान । उरेल कैंचें ।।१३।।

गुरू गीता असे सांगते की अशा सद्गुरूंची सेवा केल्यावर सृष्टीचे मिथ्यत्वाने होणारे भान कसे बरे उरेल? ॥१३॥

ऐसा सज्ञान बोलिला । सद्गुरु तो वोळखिला । सृष्टि मिथ्या ऐसा केला । निश्चितार्थ ।।१४।।

अशा प्रकारे सद्गुरूंची ओळख पटल्यावर 'सृष्टी मिथ्या आहे' असा निर्णय झालेला ज्ञानी वरीलप्रमाणे म्हणाला. ॥१४॥

श्रोता ऐसें न मनी कदा । आधीक उठिला वेवादा । म्हणे कैसा रे गोविंदा । अज्ञान म्हणतोसि ।।१५।।

पण श्रोत्याला हे मुळीच न पटल्याने तो पुन्हा वादाला उभा राहिला. तो म्हणतो– प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णाला तुम्ही अज्ञानी कसे ठरविता? ॥१५॥

जीवभूतः सनातनः । ऐसें गीतेचें वचन । तयासि तूं अज्ञान । म्हणतोसि कैसा ।।१६।।

'जीव माझा सनातन अंश आहे' असे गीतेमध्ये स्वमुखाने सांगणारा श्रीकृष्ण अज्ञानी आहे असे कसे म्हणतोस? ॥१६॥

ऐसा श्रोता आक्षेप करी । विषाद मानिला अंतरीं । याचें प्रत्योत्तर चतुरीं । सावध परिसावें ।।१७।।

भगवन्तावर अज्ञानाचा आरोप केलेला मुळीच न आवडून श्रोत्याने वरील प्रश्न विचारला. मर्मज्ञ साधकांनी त्याचे यथाशास्त्र उत्तर ऐकावे. ॥१७॥

गीतेस बोलिला गोविंद । त्याचा न कळे तुज भेद । म्हणौनियां वेर्थ खेद । वाहातोसी ।।१८।।

गीतेतील कृष्णवचनाचे रहस्य न उमगल्याने तू उगीचच खिन्न झाला आहेस. ॥१८॥

श्लोक ।। अश्वत्थ: सर्ववृक्षाणां ।। छ.।।

श्लोकार्थ (श्रोत्याने घेतलेल्या आक्षेपावर वरताण आक्षेप स्वत:च घेऊन वक्ता त्याची समजूत घालण्यास सुरुवात करतो. विभूतियोगात श्रीकृष्ण म्हणतात की—)

माझी विभूति पिंपळ । म्हणौनि बोलिला गोपाळ । वृक्ष तोडितां तत्काळ । तुटत आहे ।।१९।।

'पिंपळाचा वृक्ष ही माझी विभूती आहे.' पण पिंपळ तर घाव घालताच तुटतो. (मग श्रीकृष्णही तसाच तुटतो असे समजावे काय? पण दुसऱ्या अध्यायात भगवन्त म्हणतात—) ॥१९॥

श्लोक ।। नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावक: । न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुत: ।।(२-२३)।।

श्लोकार्थ– आत्मा शस्त्राने तुटत नाही, अग्नी त्याला जाळीत नाही, पाणी त्याला भिजवू शकत नाही, वाऱ्याने तो वाळत नाही.

शस्त्रांचेनि तुटेना । अग्निचेनि जळेना । उदकामध्यें कालवेना । स्वरूप माझें ।।२०।।

आत्मरूप मी शस्त्राने तुटत नाही, अग्नीने जळत नाही, पाण्यात कालवला जात नाही. वाऱ्याने वाळत नाही. ॥२०॥

पिंपळ तुटे शस्त्रानें । पिंपळ जळे पावकानें । पिंपळ कालवे उदकानें । नाशिवंत ।।२१।।

पिंपळ शस्त्राने तुटतो. अग्नीने जळतो, त्याचा लगदा होतो. असा तो विनाशशील आहे. ॥२१॥

तुटे जळे बुडे उडे । आतां ऐक्य कैसें घडे । म्हणोनि हें उजेडे । सद्गुरुमुखें ।।२२।।

जो तुटतो, जळतो, ज्याचा लगदा होतो व जो झंजावाताने उडूनही जातो असा पिंपळ व आत्मा एकच असे कसे म्हणता येईल? ह्याचे खरे उत्तर श्रीगुरूंच्या उपदेश प्रकाशातच सापडते. ॥२२॥

'इंद्रियाणां मनश्चास्मि । कृष्ण म्हणे मन तो मी । तरी कां आवरावी उर्मी । चंचळ मनाची ।।२३।।

ह्याही पुढे जाऊन भगवन्त म्हणतात की 'सर्व इंद्रियात मन ते मी' श्रीकृष्णच मन असेल तर साधकाने शमदमाचा अभ्यास करण्याचे कारणच काय? (श्रीकृष्ण सहजच त्या रूपाने उपलब्ध आहे.) ॥२३॥

ऐसें कृष्ण कां बोलिला । साधनमार्ग दाखविला । खडे मांडूनि सिकविला । वोनामा जेवी ।।२४।।

बालकांना शिक्षण देण्यास सुरुवात करताना ज्याप्रमाणे एकेक खडा मांडल्यासारखी वर्णाक्षरे शिकवितात, त्याप्रमाणे साधनमार्गाची सुरुवात सांगताना भ. श्रीकृष्णाने ही पद्धत वापरली आहे. ॥२४॥

ऐसा आहे वाक्यभेद । सर्व जाणे तो गोविंद । देहबुद्धीचा वेवाद । कामा नये ।।२५।।

दोन वाक्यांत तत्त्वासंबंधी विसंवाद वाटतो हे खरे, पण त्यातील वर्म किंवा रहस्य एक श्रीकृष्णच जाणतो. 'मी देह' ह्या ठाम निश्चयातून निर्माण होणाऱ्या शंकांचा निरास करणे कठीण असते. ॥२५॥

वेद शास्त्र श्रुति स्मृती । तेथे वाक्यभेद पडती । ते सर्व हि निवडती । सद्गुरूचेनि वचनें ।।२६।।

जेव्हा वेदवाक्य, उपनिषदवाक्य व स्मृतिवाक्य ह्या सर्व शास्त्रवाक्यांत विसंवाद वाटतो तेव्हा त्यांतील सुसंवाद श्रीगुरुवाक्यानेच लक्षात येतो. ॥२६॥

वेदशास्त्रांचें भांडण । शस्त्रें तोडी ऐसा कोण । हें निवडेना साधुविण । कदा कल्पांतीं ।।२७।।

वेदाच्या अर्थासंबंधी असलेल्या अनेक मतांतील विसंवाद नाहीसा करणे हे सामान्याचे काम नव्हे. तो कोणत्याही वादविवादाच्या शस्त्राने कधीच तुटत नाही. केवळ आत्मानुभवी महात्मेच ते करू शकतात. ॥२७॥

पूर्वपक्ष आणि सिद्धांत । शास्त्रीं बोलिला संकेत । याचा होये निश्चितार्थ । साधुमुखें ।।२८।।

वादविवादाच्या रीतीमध्ये पूर्वपक्ष, मध्यस्थ, सिद्धान्त पक्ष ह्या गोष्टी शास्त्राने मान्य केलेल्या आहेत. पण वादाचा निर्णायक निकाल श्रीगुरूच देऊ शकतात. ॥२८॥

येरवीं वादाचीं उत्तरें । येकाहूनि येक थोरें । बोलों जातां अपारें । वेदशास्त्रीं ।।२९।।

नाहीतर वादविवादाच्या झपाट्यात एकमेकावर कुरघोडी करीत वेदवाक्यांच्या निर्णयाचे काम अखंडपणे चालूच रहाते. तर्कावर तर्क लढविले जातात!॥२९॥

म्हणोनि वादवेवाद । सांडून कीजे संवाद । तेणे होये ब्रह्मानंद । स्वानुभवें ।।३०।।

म्हणोनि असे वादविवाद टाळून श्रीगुरूंशी संवाद करावा. त्यामुळे ब्रह्मानंदाचा प्रत्यक्ष अनुभव येतो. ॥३०॥

येके कल्पनेचे पोटीं । होति जाती अनंत सृष्टी । तया सृष्टींची गोष्टी । साच केवी ।।३१।।

(अध्यारोपाची भाषा असे सांगते की ब्रह्मवस्तूला 'एकोऽहं बहुस्याम्' अशी स्फुरणात्मक कल्पना झाली) त्या एका कल्पनेतून अनंत सृष्टींच्या उत्पत्ती व लयाचे चक्र सुरू झाले. कल्पनेपासून झालेली सृष्टी सत्य कशी असेल? ॥३१॥

कल्पनेचा केला देव । तेथें जाला दृढ भाव । देवालागीं येतां खेव । भक्त दुःखें दुःखवला ।।३२।।

आपल्या कल्पनेने एका देवाची मूर्ती तयार करून 'हा देव' अशी दृढ भावना धरली. ती मूर्ती चुकून आडवी पडली तरी भक्ताला दुःख होते. ॥३२॥

पाषाणाचा देव केला । येके दिवसीं भंगोन गेला । तेणें भक्त दुखवला । रडे पडे आक्रंदे ।।३३।।

दगडाची देवमूर्ती फुटली की भक्ताला फार दुःख होऊन तो रडून, धरणीवर लोळून आकांत मांडतो. ॥३३॥

देव हारपला घरीं । येक देव नेला चोरी । येक देव दुराचारीं । फोडिला बळें ।।३४।।

एक देवमूर्ती घरातल्या घरात हारवते. दुसरी चोरीला जाते. एखादी देवळातील मूर्ती क्रूर, हिंसक व असहिष्णू धर्माचे लोक फोडून टाकतात. ॥३४॥

येक देव जापाणिला । एक देव उदकीं टाकिला । येक देव नेऊन घातला । पायतळीं ।।३५।।

एखाद्या देवाची सोंड तोडून त्याचा अपमान करतात, दुसऱ्याला पाण्यात फेकून देतात, तर एक देव दुसरे धर्मीय त्यांच्या प्रार्थना स्थळाच्या पायात पुरतात. ॥३५॥

काय सांगों तीर्थमहिमा । मोडूनि गेला दुरात्मा । थोर सत्व होतें तें मा । काय जालें कळेना ।।३६।।

तीर्थांच्या महात्म्यासंबंधी काय बोलावे? एक नीच व दुष्ट सोमनाथ क्षेत्र भ्रष्ट करतो. क्षेत्रातील 'जागृत' देवाची जागृती कोठे गेली समजत नाही! ॥३६॥

देव घडिला सोनारीं । देव वोतिला वोतारीं । येक देव घडिला पाथरीं । पाषाणाचा ।।३७।।

सोनाराने सोन्याची मूर्ती केली, ओताऱ्याने पितळेची मूर्ती ओतली व पाथरवटाने दगडाची मूर्ती घडविली. ॥३७॥

नर्बदागंडिकातीरीं । देव पडिले लक्षवरी । त्यांची संख्या कोण करी । असंख्यात गोटे ।।३८।।

नर्मदा व गंडकी नद्यांच्या काठी असंख्य गोटे असून त्यांचे लक्षावधी देव पडलेले असतात! ते मोजताही येत नाहीत (शालिग्राम). ॥३८॥

चक्रतीर्थी चक्रांकित । देव असती असंख्यात । नाहीं मनीं निश्चितार्थ । येक देव ।।३९।।

चक्रतीर्थामध्ये पृष्ठभागावर चक्रे असलेले असंख्य देवरूप गोटे आहेत. कोणत्याच एका देवावर धड श्रद्धा नाही. ॥३९॥

बाण तांदळे तांब्रनाणें । स्फटिक देव्हारां पूजणें । ऐसे देव कोण जाणे । खरे किं खोटे ।।४०।।

देव्हाऱ्यामध्ये बाण, तांदळे, तांब्याच्या नाण्यांवर कोरलेले देव स्फटिक इत्यादिकांची पूजा करतात. हे देव खरे की खोटे हे जाणून घेण्याचा कोण प्रयत्न करतो? ॥४०॥

देव रेसिमाचा केला । तो हि तुटोनियां गेला । आतां नवा नेम धरिला । मृत्तिकेचा ।।४१।।

रेशमाचा धागा कपड्यावर भरून देव विणल्यावर तो थोड्या दिवसांतच तुटतो. त्यामुळे मातीचा देवच चांगला म्हणून त्याची उपासना सुरू केली! ।।४१।।

आमचा देव बहु सत्य । आम्हां आकांतीं पावत ।पूर्ण करी मनोरथ । सर्वकाळ ।।४२।।

आमचा देव सर्वशक्तिमान असल्याने तोच 'अतिशय सत्य' आहे. कारण तो संकटाचे वेळी धावून येऊन आमच्या इच्छा पूर्ण करतो! ।।४२।।

आतां याचें सत्व गेलें । प्राप्त होतें तें जालें । प्राप्त न वचे पालटिलें । ईश्वराचेनी ।।४३।।

एक भक्त (?) म्हणतो की 'आमचा देव' इतके दिवस सामर्थ्यवान होता, पण ते सामर्थ्य आता संपले. जे व्हावयाचे ते झाले. कारण ते प्रत्यक्ष ईश्वर सुद्धा टाळू शकत नाही. ।।४३।।

धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ठ देखा । तेथें देव कैंचा मूर्खा । भ्रांति पडिली ।।४४।।

धातू, दगड, माती, चित्र, लाकूड इत्यादिकात देव असतो ही कल्पना भ्रमरूप आहे. अरे मूर्खा, त्यांत देव कसा असेल? (केला मातीचा पशुपती । परी मातीस काय महती । तुका.) ।।४४।।

हे आपुली कल्पना । प्राप्तऐसीं फळें जाणा । परी त्या देवाचिया खुणा । वेगळयाचि ।।४५।।

देवाचे सामर्थ्य वाढते वा कमी होते हा आपल्या कल्पनेचा खेळ आहे. आपल्या प्रारब्धानुसार जे व्हावयाचे ते होत रहाते. खरा देव ह्या सर्व भ्रामक समजुतीहून वेगळाच आहे. ।।४५।।

म्हणौनि हें मायाभ्रमणें । सृष्टि मिथ्या कोटिगुणें । वेद शास्त्रें पुराणें । ऐसींच बोलती ।।४६।।

मायेने भ्रम निर्माण झाल्यामुळे पांचभौतिक सृष्टी सत्य वाटते. वेदान्तशास्त्र व पुराणे ह्यांचा असा ठाम निर्णय आहे की कोट्यवधी प्रकारांनी विचार करूनही दृश्य सृष्टी मिथ्या आहे. ।।४६।।

साधुसंत मानुभाव । त्यांचा ऐसाचि अनुभव । पंचभूतातीत देव । सृष्टि मिथ्या ।।४७।।

देवाचा अनुभव घेऊन देवरूप झालेल्या साधुसंतांचा अनुभव असे सांगतो की देव पंचमहाभूतांहून अत्यंत वेगळा आहे. पांचभौतिक सृष्टी मिथ्या असून तिचे अधिष्ठान देवरूप ब्रह्म सत्य आहे. ।।४७।।

सृष्टीपूर्वीं सृष्टि चालतां । सृष्टि अवघी संव्हारतां । शाश्वत देव तत्वता । आदिअंतीं ।।४८।।

हल्लीच्या सृष्टीपूर्वीचे सृष्टिचक्र चालू असताना व पुढे सृष्टीचा संहार झाल्यानंतर देव मात्र शाश्वत आहे (पहा-दशक ६. स. ४) ।।४८।।

ऐसा सर्वांचा निश्चयो । येदर्थी नाही संशयो । वीतरेक आणि अन्वयो । कल्पनारूप ।।४९।।

सर्व जाणत्यांचा असाच निर्णय असून त्याबाबत शंकेला जागाच नाही. 'अधिष्ठान आहे म्हणून अध्यस्त जग आहे.' 'अधिष्ठान नसेल तर जग नाही' ही अन्वय व्यतिरेकाची मांडणी केवळ काल्पनिक आहे. कारण अधिष्ठान सतत आहे व अध्यस्त वास्तविक नाहीच. ।।४९।।

येके कल्पनेचे पोटीं । बोलजेती अष्ट सृष्टि । तया सृष्टीची गोष्टी । सावध ऐका ।।५०।।

'अष्टसृष्टी' ही संकल्पना केवळ काल्पनिक असून सृष्टी मिथ्या आहे हे ठसविण्यासाठी ती मांडली आहे. ती संकल्पना आता सावधपणे ऐका. ।।५०।।

येकी कल्पनेची सृष्टी । दुजी शाब्दिक सृष्टी । तिजी प्रत्यक्ष सृष्टी । जाणती सर्व ।।५१।।
चौथी चित्रलेपसृष्टी । पांचवी स्वप्नसृष्टी । साहावी गंधर्व सृष्टी । ज्वरसृष्टी सातवी ।।५२।।
आठवी दृष्टिबंधन । ऐशा अष्ट सृष्टि जाण । यामधें श्रेष्ठ कोण । सत्य मानावी ।।५३।।

१) कल्पनासृष्टी– मनोराज्यांचे जग.
२) वाङ्मयीन सृष्टी.
३) प्रत्यक्षसृष्टी– ज्ञानेंद्रियांनी कळणारी सृष्टी.
४) चित्रलेपसृष्टी– (पहा– पंचदशी-चित्रदीप) खळीने घट्ट केलेल्या सुती कापडावर निरनिराळ्या रंगाने आकाश, जमीन, सूर्य, पक्षी, झाडे इ. रंगवितात, त्या सर्वांना कापडाचे अधिष्ठान असते. कापड झाकले जाऊन फक्त चित्रे दिसतात.
५) स्वप्नसृष्टी– स्वप्नात दिसणारी सृष्टी.
६) गंधर्वसृष्टी– ढगांना येणारे काल्पनिक आकार.
७) ज्वरसृष्टी– रोगाने ताप वाढून मेंदूवरील होणाऱ्या परिणामामुळे होणारे भास.
८) दृष्टिबंधन– दृष्टिबंधनामुळे तयार होणारी सृष्टी. (Hypnosis)

ह्यांतील श्रेष्ठ कोणती व सत्य कोणती हे कसे ठरवावे? त्या सगळ्याच काल्पनिक आहेत.'' ॥५१-५३॥

म्हणोनि सृष्टी नासिवंत । जाणती संत महंत । सगुणीं भजावें निश्चित । निश्चयालागीं ।।५४।।

म्हणून संत व महंतांचा असा अनुभव असतो की दृश्य सृष्टी नाशिवन्त आहे. देवाची सगुण रूपे तशीच असली तरी निर्गुणाचा निश्चय होईपर्यन्त सगुण भजन सोडू नये. ॥५४॥

सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें । सारासारविचारें । संतसंगें ।।५५।।

संत व श्रीगुरूंच्या सहवासात सार निर्गुण व असार सगुण समजावून घेऊन साधनचतुष्टय संपन्न होऊन सगुणाच्या आधाराने 'निर्गुण ब्रह्म मी आहे' असा अनुभव घ्यावा. सगुण द्वैतात मोडत असले तरी ते शास्त्रीय किंवा संवादी द्वैत आहे. (पहा– द्वैतविवेक पंचदशी) ॥५५॥

आतां असो हें बहुत । संतसंगें कळे नेमस्त । येऱ्हवीं चित्त दुश्चित । संशई पडे ।।५६।।

हे असे किती सांगावे? तरी असे लक्षात घ्यावे की संतांच्या सहवासातच यथार्थ निर्णय होतात. एरव्ही रजोगुणाचे चंचल मन सतत संशयाने भरलेले रहाते. ॥५६॥

तव शिष्यें आक्षेपिलें । सृष्टी मिथ्या ऐसें कळलें । परी हें अवघें नाथिलें । तरी दिसतें कां ।।५७।।

हे सगळे ऐकल्यावर शिष्याने असा प्रश्न विचारला की सर्व दृश्य सृष्टी मिथ्या असून प्रत्यक्षात का दिसते? ती खरे तर दिसू नये. ॥५७॥

दृश्य प्रत्यक्ष दिसतें । म्हणोन सत्यचि वाटतें । यासि काय करावें तें । सांगा स्वामी ।।५८।।

जे दृश्य जगत् पांच ज्ञानेंद्रियांनी प्रत्यक्ष कळते ते सत्य वाटते. आपले सांगणे व आमचा अनुभव ह्यातील विसंगतीला काय करावे? हे आपण समजावून सांगा. ॥५८॥

याचें प्रत्योत्तर भलें । पुढिलें समासीं बोलिलें । श्रोतां श्रवण केलें । पाहिजे पुढें ।।५९।।

ह्या प्रश्नाचे शास्त्रशुद्ध उत्तर पुढील समासात देऊ. ते त्याच वेळी ऐका. ॥५९॥

एवं सृष्टी मिथ्या जाण । जाणोनि रक्षावें सगुण । ऐसी हे अनुभवाची खूण । अनुभवी जाणती ।।६०।।

एकूण असे लक्षात घ्यावे की सृष्टी मिथ्या आहे. हे मनोमनी लक्षात ठेवून उपासनेसाठी सगुणाला सांभाळून ठेवावे. हे अनुभवी संतांनी जाणलेले वर्म आहे. ॥६०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सृष्टिकथननाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध ग्रंथातील 'सृष्टिकथन' नावाचा सहावा समास समाप्त.

दशक सहावा : देवशोधन

समास सातवा : सगुणभजन

॥ श्रीराम समर्थ ॥

पहिल्या आठ ओव्यांमध्ये शिष्याचा प्रश्न समर्थांनी सविस्तर मांडला आहे.

ज्ञानें दृश्य मिथ्या जालें । तरी कां पाहिजे भजन केलें । तेणें काये प्राप्त जालें । हें मज निरोपावें ।।१।।
ज्ञानाहूनि श्रेष्ठ असेना । तरी कां पाहिजे उपासना । उपासनेनें जना । काये प्राप्त ।।२।।
मुख्य सार तें निर्गुण । तेथें दिसेचिना सगुण । भजन केलियाचा गुण । मज निरोपावा ।।३।।
जें समस्त नासिवंत । त्यासि भजावें किंनिमित्य । सत्य सांडून असत्य । कोणें भजावें ।।४।।
असत्याचा प्रत्यये आला । तरी मग नेम कां लागला । सत्य सांडून गल्बला । कासया करावा ।।५।।
निर्गुणानें मोक्ष होतो । प्रत्यक्ष प्रत्यया येतो । सगुण काये देऊं पाहातो । सांगा स्वामी ।।६।।
सगुण नासिवंत ऐसें सांगतां । पुन्हा भजन करावें म्हणतां । तरी काशासाठीं आतां । भजन करूं ।।७।।
स्वामीचे भिडेनें बोलवेना । येऱ्हवीं हें कांहींच मानेना । साध्यचि जालियां साधना । कां प्रवर्तावें ।।८।।

वेदान्त शास्त्राच्या अभ्यासाने असे कळते की, दृश्य सृष्टी मिथ्या आहे. मग सगुणाचे भजन का करावे? त्याने काय लाभ होतो? ज्ञान हे सर्वश्रेष्ठ साधन आहे (ज्ञानात् एव तु कैवल्यं) अशी वस्तुस्थिती असताना उपासनेसारखे निकृष्ट साधन का करावे? त्यामुळे लोकांना काय मिळते? निर्गुण हे साररूप असून त्यात सगुणाचा मागमूसही नाही. मग त्या सगुणभजनाचे महत्त्व मला समजावून सांगावे. 'जे सगुण साकार ते विनाशी' असा सिद्धान्त असताना अविनाशी निर्गुण सोडून सगुणाचे भजन काय म्हणून करावे? सत्य सोडून असत्याच्या का मागे लागावे? सगुण साकार असत्य आहे असे नक्की झाल्यावर नित्यनेमाचे सगुणभजन का करावे? सत्य बाजूला सारून उपासनेचा गोंधळ कशासाठी? 'निर्गुण ब्रह्म मी आहे' असा अनुभव हेच मोक्षाचे स्वरूप आहे. अशा सर्व जाणत्यांचा प्रत्यक्ष अनुभव असाताना सगुण उपासना असे काय विशेष देणार आहे? सगुण विनाशी आहे असे आपणच सांगता. त्याचे भजन करावे असा आपलाच उपदेश आहे. असे भजन मी कशासाठी करावे? आपल्याविषयी अत्यंत आदर असल्याने असे उलटे प्रश्न विचारण्याचे धाडस होत नाही. पण आपले उलटसुलट सांगणे मुळीच पटत नाही. निर्गुणरूप साध्य ज्ञानाने लाभल्यावर पुन्हा सगुणाच्या साधनेची खटपट का करावी? ॥१ ते ८॥

ऐसें श्रोतयाचें बोलणें । शब्द बोले निर्बुजलेपणें । याचें उत्तर ऐकणें । म्हणे वक्ता ।।९।।

काहीसा संकोच व काहीसा गोंधळ अशा मन:स्थितीत श्रोत्याने असे प्रश्न विचारले. वक्ता म्हणतो की आता त्यांची उत्तरे ऐका. ॥९॥

गुरुचें वचन प्रतिपाळणें । हें मुख्य परमार्थाचें लक्षण । वचनभंग करितां विलक्षण । सहजेंचि जालें ।।१०।।

सद्गुरूंच्या सांगण्यावर विश्वास ठेवून त्यानुसार मनोरचना तयार करून घेऊन व ती सांभाळून वागणे हे मोक्षार्थीचे मुख्य लक्षण आहे. असे केले नाही तर साहजिकच विपरीत प्रश्न निर्माण होतात. ॥१०॥

म्हणोनि आज्ञेसी वंदावे । सगुणभजन मानावें । श्रोता म्हणे हे देवें । कां प्रयोजिलें ।।११।।

म्हणून त्यांची आज्ञा प्रमाण मानून सगुणोपासना करावी. त्यावर शिष्य किंवा श्रोता विचारतो– 'सगुण उपासनेचे

प्रयोजन काय?' ॥११॥

काय मानिला उपकार । कोण जाला साक्षात्कार । किंवा प्रारब्धाचें अक्षर । पुसिले देवें ।।१२।।

मोक्ष मार्गात सगुणाची नेमकी मदत काय होते? त्याचा साक्षात्कार कसा होतो? सगुणोपासनेमुळे प्रारब्धात बदल होतो का?

किंवा

असा सगुण देवाने काय उपकार केला आहे की ज्यासाठी त्याची उपासना करावी? असा त्याचा काय साक्षात्कार होतो की त्याची उपासना अनिवार्य असावी? अटळ प्रारब्धरेषा देवाला पुसता येते काय? ॥१२॥

होणार हें तों पालटेना । भजनें काय करावें जना । हें तों पहातां अनुमाना । कांहींच न ये ।।१३।।

जे प्रारब्धाने व्हावयाचे ते होऊन जाते. मग लोकांनी ईश्वरोपासना का करावी? त्यामुळे सगुणभजन तर्काला पटत नाही. ॥१३॥

स्वामीची आज्ञा प्रमाण । कोण करील अप्रमाण । परंतु याचा काय गुण । मज निरोपावा ।।१४।।

श्रीगुरूंची आज्ञा प्रमाण मानली पाहिजे हे खरे. कोणीही प्रामाणिक मोक्षार्थी त्याविषयी शंका घेणार नाही. पण सगुणोपासनेचे मोक्ष साधनेत काय स्थान आहे त्याविषयी मला सांगावे. ॥१४॥

वक्ता म्हणे सावधपणें । सांग ज्ञानाचीं लक्षणें । तुज कांहीं लागे करणें । किंवा नाहीं ।।१५।।

ह्यावर वक्ता वर्म उलगडण्यासाठी प्रतिप्रश्न विचारतो– तू ज्ञान ज्ञान म्हणतोस ते आहे तरी काय? ते ज्ञान झाल्यावर तुझ्या शरीर व मनाच्या क्रिया थांबतात का? की चालूच राहतात? ॥१५॥

करणें लागे भोजन । करणें लागे उदकप्राशन । मळमूत्रत्यागलक्षण । तेंहि सुटेना ।।१६।।

अन्न खावे लागते, पाणी प्यावे लागते, मळमूत्राचे विसर्जन करावे लागते. हे काहीच सुटत नाही. ॥ १६ ॥

जनाचें समाधान राहावें । आपुलें पारिखें वोळखावें । आणि भजनचि मोडावें । हें कोण ज्ञान ।।१७।।

सर्व संबंधितांना हवे नको विचारावे लागते, आपले व परके ओळखावे लागते व भजन तेवढे सोडावे असा ज्ञानाचा परिणाम का असावा? ॥१७॥

ज्ञानविवेकें मिथ्या जाले । परंतु अवघें नाहीं टाकिलें । तरी मग भजनेंचि काय केलें । सांग बापा ।।१८।।

'ब्रह्मसत्य जगत् मिथ्या' ह्या विवेकाने जग मिथ्या ठरले तरी देह व जगतासंबंधी कर्तव्य कर्मे चालूच राहिल्याने जग तर सोडलेले नसते, मग भजन तेवढे सोडावे हे कसले ज्ञान? ॥१८॥

साहेबास लोटांगणीं जावें । नीचासारिखें व्हावें । आणी देवास न मनावें । हें कोण ज्ञान ।।१९।।

साहेबाला लोटांगण घालायचे, त्याच्यापुढे लाचारी पत्करायची आणि देवाला मात्र मानायचे नाही हे कसले ज्ञान? ॥१९॥

हरीहर ब्रह्मादिक । हे जयाचे आज्ञाधारक । तूं येक मानवी रंक । भजेसिना तरी काय गेलें ।।२०।।

प्रत्यक्ष ब्रह्मदेव, विष्णू व शंकर हेही परमेश्वराची उपासना करतात व त्याच्या आज्ञेप्रमाणे आपले कार्य करतात. तू तर अल्पज्ञ, अल्पसाक्षी, अल्पशक्ती असा जीवरूप मानव आहेस. तू त्याची उपासना न केल्याने त्याला काय कमी पडणार आहे? ॥२०॥

आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ । जो समर्थाचाहि समर्थ । देवां सोडविता ।।२१।।

माझ्या कुळात रघुनाथाच्या उपासनेची परंपरा आहे. त्यामुळेच माझा परमार्थ सिद्ध झाला. तो सर्व सामर्थ्यसंपन्न असून त्याने देवांना रावणाच्या बंधनातून मुक्त केले. ॥२१॥

त्याचे आम्ही सेवकजन । सेवेकरितां जालें ज्ञान । तेथें अभाव धरितां पतन । पाविजेल कीं ।। २२।।

त्या श्रीरामाचे आम्ही सर्वजण दासानुदास आहोत. त्या दास्यामुळेच सख्य व आत्मनिवेदनरूप ज्ञान झाले. (केवळ शब्दज्ञान नव्हे) ही दास्यरूप उपासना केली नाही तर साधकाचे पतन ठरलेले आहे. ॥२२॥

गुरु सांगती सारासार । त्यास कैसें म्हणावें असार । तुज काय सांगणें विचार । शाहाणे जाणती ।। २३।।

सद्गुरू सार व असाराची जी लक्षणे सांगतात ती बरोबर नाहीत असे कोण म्हणेल? तुला त्यातील वर्म खरे तर सांगावयास लागू नये कारण सात्त्विक बुद्धीला ती वर्मे उमगतात. ॥२३॥

समर्थाचे मनीचें तुटे । तेंचि जाणावें अदृष्ट खोटें । राज्यपदापासून करंटे । चेवलें जैसें ।। २४।।

षड्गुणैश्वर्यसंपन्न परमेश्वराची कृपा नसेल तर प्रारब्ध प्रतिकूल आहे असे समजावे. राजपुत्राने जर राजाची मर्जी सांभाळली नाही, तर त्या करंट्या राजपुत्राला राज्यपद मिळत नाही. ॥२४॥

मी थोर वाटे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी । विचार पाहातां देहाभिमानी । प्रत्यक्ष दिसे ।। २५।।

'मी मोठा ब्रह्मज्ञानी आहे' असा ज्याला अहंकार असतो तो ब्रह्मज्ञानी नसतोच! सूक्ष्म विचार केला तर त्याचा हा अहंकार देहबुद्धीतूनच निर्माण झालेला असतो हे सहजच लक्षात येते. (पहा– नाहं मन्ये सुवेदेति– केन.उप.) ॥२५॥

वस्तुभजन करीना । न करीं ऐसेंहि म्हणेना । तरी हे जाणावी कल्पना । दडोन राहिली ।। २६।।

प्रत्यक्ष ब्रह्म स्वत: उपासना करीत नाही. 'मी उपासना करीत नाही' असा अहंभावही तेथे नसतो. तू मात्र मी उपासना का करावी असा प्रश्न विचारतोस. त्या अर्थी अहंभाव तुझ्यामध्ये गुप्तरूपाने दृढ आहे. (ब्रह्म वृत्तिरहित असल्याने ते उपासना करणे शक्य नाही. 'मी उपासना करीत नाही' अशी वृत्ती सुद्धा त्यावर उमटत नाही. खरा ब्रह्मज्ञ ब्रह्मच होत असल्याने तोही उपासना करणे शक्य नाही. पण श्रोता किंवा शिष्य खरा ब्रह्मज्ञ झालेला नसल्याने 'मी उपासना का करावी' असा अहंवृत्ती भक्कम असलेला प्रश्न विचारतो) ॥२६॥

ना तें ज्ञान ना भजन । उगाचि आला देहाभिमान । येथें नाहीं किं अनुमान । प्रत्यय तुझा ।। २७।।

धड ना ब्रह्मज्ञान वा धड ना उपासना अशी अवस्था होते. 'मी' रूपाने नुसताच देहभावाचा गोंधळ चालतो! हे माझे बोलणे केवळ अंदाजाचे नाही. हे शिष्या, हा तुझा स्वत:चाच अनुभव आहे. ॥२७॥

तरी आतां ऐसें न करावें । रघुनाथभजनीं लागावें । तेणेंचि ज्ञान बोलावें । चळेना ऐसें ।। २८।।

म्हणून उपासनेसंबंधी सर्व संशय सोडून दे. श्रीरामाची उपासना कर. त्यामुळेच निश्चळ ब्रह्मज्ञानाची प्राप्ती होते. त्यालाच खरे ज्ञान म्हणावे. ॥२८॥

करी दुर्जनाचा संव्हार । भक्तजनासी आधार । ऐसा हा तों चमत्कार । रोकडा चाले ।। २९।।

प्रभू श्रीरामचंद्र दुष्टांचा नाश करून साधू व भक्तांचा सांभाळ करतात. ही त्याची अद्भुत लीला सर्वांनाच ठाऊक आहे कारण ती प्रत्यक्ष घडलेली आहे. ॥२९॥

मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोन जातें । कृपा केलियां रघुनाथें । प्रचित येते ।। ३०।।

श्री रघुनाथाची कृपा झाली तर मनोकामना पूर्ण होतात व विघ्ने नाहीशी होतात असा अनुभव येतो. ॥३०॥

रघुनाथभजनें ज्ञान जालें । रघुनाथभजनें महत्त्व वाढलें । म्हणौनियां तुवां केलें । पाहिजे आधीं ।। ३१।।

मला स्वत:ला श्रीरामाच्या उपासनेने ब्रह्मज्ञान होऊन माझे जगात महात्म्य वाढले. म्हणून प्रथम तूही तेच कर. ॥३१॥

हें तों आहे सप्रचित । आणी तुज वाटेना प्रचित । साक्षात्कारें नेमस्त । प्रत्ययो करावा ।। ३२।।

हा माझा प्रत्यक्ष अनुभव आहे. तुला जर तो खरा वाटत नसेल तर तूही मी केले तसे करून स्वत: अनुभव घेऊन खरे खोटे ठरव! ॥३२॥

रघुनाथ स्मरोनि कार्य करावें । तें तत्काळचि सिद्धी पावे । कर्ता राम हें असावें । अभ्यांतरीं ।।३३।।

श्री रघुनाथाचे स्मरण करून काम हाती घेतले तर ते यशस्वी झालेच म्हणून समजावे. मात्र श्रीराम कर्ता आहे हे कार्यकर्त्याने लक्षात ठेवावे. ॥३३॥

कर्ता राम मी नव्हे आपण । ऐसें सगुणनिवेदन । निर्गुणीं तें अनन्य । निर्गुणचि होईजे ।।३४।।

'श्रीराम कर्ता आहे', मी नाही अशा प्रकारे केलेले कर्म त्याला म्हणजे सगुणाला सहजच अर्पण होते व त्यामुळे सगुणाशी अनन्यता साधते. 'सोऽहं' भावामुळे निर्गुणाशी अनन्यता सिद्ध होते व निर्गुणत्व प्राप्त होते. ॥३४॥

मी कर्ता ऐसें म्हणतां । कांहींच घडेना सर्वथा । प्रचित पाहासी तरी आतां । सीघ्रचि पाहें ।।३५।।

'मी कर्ता' ह्या अहंकारामुळें वरीलपैकी काहीच होत नाही. तुला तसा अनुभव हवा असेल तर तो तू लगेचच घेऊ शकतोस. ॥३५॥

मी कर्ता ऐसें म्हणसी । तेणें तूं कष्टी होसी । राम कर्ता म्हणतां पावसी । येश कीर्ती प्रताप ।।३६।।

'मी कर्ता' ह्या कर्तृत्वाच्या अहंकारामुळे तुझ्या वाट्याला दु:खे येतात. 'राम कर्ता आहे' अशा समर्पण भावामुळे तुला यश, कीर्ती व पराक्रमाचा लाभ होईल. ॥३६॥

येके भावनेसाठीं । देवासीं पडे तुटी । कां ते होये कृपादृष्टी । देव कर्ता भावितां ।।३७।।

केवळ भाव हाच जीवाला परमेश्वराशी तोडणारा किंवा जोडणारा आहे. 'राम कर्ता आहे.' असा भाव धरला तर त्याची कृपा प्राप्त होते. ॥३७॥

आपण आहे दों दिसांचा । आणी देव बहुतां काळांचा । आपण थोडे वोळखिचा । देवासि त्रैलोक्य जाणे ।।३८।।

माणसाचे आयुष्य अत्यल्प आहे. देव आद्य, अनादि आहे. माणसाला ओळखणारे फारच थोडे असतात. देवाची त्रैलोक्याला ओळख असते. ॥३८॥

याकारणें रघुनाथभजन । त्यासि मानिती बहुत जन । ब्रह्मादिक आदिकरून । रामभजनीं तत्पर ।।३९।।

म्हणून श्री रघुनाथाची उपासना करावी. प्रचंड जनसमुदायाला त्याचेविषयी प्रेम व आदर असतो. प्रत्यक्ष ब्रह्मदेवादी देव सुद्धा त्याची मोठ्या तत्परतेने उपासना करून त्याच्या आज्ञेत रहातात. ॥३९॥

ज्ञानबळें उपासना । आम्ही भक्त जरी मानूं ना । तरी या दोषाच्या पतना । पावों अभक्तपणें ।।४०।।

शाब्दिक ब्रह्मज्ञानाच्या घमेंडीत राहून आम्ही भक्त म्हणविणारे जर उपासना न करता राहू तर आमचे सर्व प्रकारे पतन होईल. त्या दोषामुळे सतत देवापासून वेगळेच राहू (पंडित वाचक जरी झाला पुरता । तेणें कृष्ण कथा सांडू नये– तुका.) ॥४०॥

देव उपेक्षी थोरपणें । तरी मग त्याचें तो जाणे । अप्रमाण तें श्लाघ्यवाणें । नव्हे किं श्रेष्ठा ।।४१।।

'मी ब्रह्मज्ञानी' ह्या स्वत:विषयीच्या मोठेपणाच्या भ्रमात राहिले तर त्याच्या पतनाला तोच जबाबदार राहील. परंतु जाणत्याला मात्र हे शोभणारे नाही. कारण ते शास्त्रविरुद्ध आहे. ॥४१॥

देहास लागली उपासना । आपण विवेकें उरेना । ऐसी स्थिति सज्जना । अंतरींची ।।४२।।

विवेकाच्या बळामुळें 'मी' म्हणून काही शिल्लक रहात नसले तरी देह जिवंत आहे तोपर्यन्त उपासना करीत असावे. सर्व सज्जनांची अन्तरस्थिती ह्या प्रकारची असते. ॥४२॥

सकळ मिथ्या होऊन जातें । हे रामभजनें कळों येतें । दृश्य ज्ञानियांचेनि मतें । स्वप्न जैसें ।।४३।।

रामाच्या भजनामुळेच हे सर्व दृष्य जगत सतासतविलक्षण, अनिर्वचनीय असल्याचा सहज निश्चय होतो. ब्रह्मज्ञांच्या

दृष्टीने दृष्य जगत् स्वप्नाप्रमाणे असते. ॥४३॥

मिथ्या स्वप्न विवंचना । तैसी सृष्टीची रचना । दृश्य मिथ्या साधुजना । कळों आलें ।।४४।।

स्वप्नातील सर्व दृश्ये मिथ्या असतात. ती स्वप्नकाळी सत्य वाटतात. त्याप्रमाणे ह्या दृष्य सृष्टीची रचना आहे असा साधूंचा सहज निश्चय असतो. ॥४४॥

आक्षेप जाला श्रोतयांसी । मिथ्या तरी कां दिसतें आम्हांसी । याचे उत्तर पुढिले समासीं । बोलिलें असे ।।४५।।

'दृश्य जगत् मिथ्या असून प्रत्यक्ष का दिसते' ह्या श्रोत्याच्या प्रश्नाचे उत्तर द्यावयाचे राहिले आहे. ते पुढील समासात देऊ. ॥४५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सगुणभजननाम' समास सातवा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सगुणभजन' नावाचा सातवा समास समाप्त

दशक सहावा : देवशोधन

समास आठवा : दृश्यनिर्शन

॥ श्रीराम समर्थ ॥

मागां श्रोतीं पुसिलें होतें । दृश्य मिथ्या तरी कां दिसतें । याचें उत्तर बोलिजेल तें । सावध ऐका ।।१।।

'दृश्य मिथ्या असून प्रत्यक्षात का दिसते' असा प्रश्न श्रोत्याने विचारला होता त्याचे उत्तर आता लक्ष देऊन ऐकावे. ॥१॥

देखिलें तें सत्यचि मानावें । हें ज्ञात्याचें देखणें नव्हे । जड मूढ अज्ञान जीवें । हें सत्य मानिजे ।।२।।

'जे प्रत्यक्षात दिसते ते खरे असते' हे खऱ्या ज्ञात्याचे लक्षण नव्हे! बुद्धीने मंद, मोहित व अज्ञानी जीवाचे ते लक्षण आहे. ॥२॥

येक्या देखिल्यासाठीं । लटिक्या कराव्या ग्रंथकोटी । संतांमहंतांच्या गोष्टी । त्याहि मिथ्या मानाव्या ।।३।।

केवळ 'प्रत्यक्षात दिसते' एवढ्या एका लक्षणावरून कोट्यवधी ग्रंथांतून 'जगत् मिथ्या आहे' असे जे सांगितले आहे ते खोटे ठरवावे काय? संत-महंतांचे सांगणे वृथा मानावे काय? (सत्य म्हणजे जे तिन्ही काळांत अबाधित असते ते.) ॥३॥

माझें दिसतें हेंचि खरें । येथें चालेना दुसरें । ऐशिया संशयाच्या भरें । भरोंचि नये ।।४।।

'मी जे सत्य मानतो ते सत्य. दुसऱ्या कोणाचे मी ऐकून घेणार नाही' असा हट्ट चालवू नये. ॥४॥

मृगें देखिलें मृगजळ । तेथें धावतें बरळ । जळ नव्हे मिथ्या सकळ । त्या पशूस कोणें म्हणावें ।।५।।

हरिणाने पाणी प्रत्यक्ष पाहिलेले असते. त्यामागे ते धावत सुटते. 'अरे हे पाणी खरे नसून रोहिणीचे जळ आहे' असे त्याला कोण समजावून सांगणार? (रौहिण मुहूर्तावर दिसते ते. मृगाला खरे वाटते ते.) ॥५॥

रात्रौ स्वप्न देखिलें । बहुत द्रव्य सांपडलें । बहुत जनांसी वेव्हारिलें । तें खरें कैसेनि मानावें ।।६।।

रात्री पडलेल्या स्वप्नांत भरपूर संपत्ती सापडली. ती वापरून अनेकांशी अनेक व्यवहार किंवा देवघेव केली. ते खरे म्हणता येतात काय? ॥६॥

कुशळ चितारी विचित्र । तेणें निर्माण केलें चित्र । देखतां उठे प्रीति मात्र । परंतु तेथे मृतिका ।।७।।

कोणा चित्रकाराने उत्कृष्ट रीतीने रंगविलेला पुतळा पाहून तो पहाणाऱ्याला आवडतो, पण त्यात मातीशिवाय काहीच नसते. ॥७॥

नाना वनिता हस्ति घोडे । रात्रौ देखतां मन बुडे । दिवसा पाहातां कातडें । कंटाळवाणें ।।८।।

रात्रीच्या अंधुक प्रकाशात पेंढा व भुसा भरून तयार केलेल्या स्त्रिया, हत्ती, घोडे इ. पाहिले तर मन रमून जाते. पण दिवसाच्या स्वच्छ उजेडात नीरस कातडे तेवढे दिसते. ते निर्जीव असल्याचे कळते. ॥८॥

काष्ठी पाषाणी पुतळ्या । नाना ठकारें निर्मिल्या । परम सुंदर वाटल्या । परंतु तेथें पाषाण ।।९।।

सुतार, पाथरवट इत्यादींनी तयार केलेल्या लाकडी व पाषाणाच्या बाहुल्या पाहून कौतुक वाटते. पण त्यांत लाकूड व पाषाणाशिवाय काहीच नसते. ॥९॥

नाना गोपुरीं पुतळ्या असती । वक्रांगें वक्रदृष्टीं पाहाती । लाघव देखतां भरे वृत्ती । परंतु तेथें त्रिभाग ।।१०।।

देवळांच्या गोपुरांवर देवस्त्रियांचे पुतळे असतात. त्यांचा कमनीय बांधा व तिरकस नजरा पाहून कौतुकाने मन भरून जाते किंवा मनाला भुरळ पडते. परंतु त्यांत चुना, वाळू व रंग ह्याशिवाय काहीच नसते. ॥१०॥

खेळतां नेटके दशावतारी । तेथें येती सुंदर नारी । नेत्र मोडिती कळाकुंसरी । परंतु अवघे धटिंगण ।।११।।

दशावतारी नाटकांत नेटकेपणाने ते सादर करताना आकर्षक हावभाव करीत व डोळे मोडीत स्त्रिया मंचावर येतात. पण ते सगळे प्रत्यक्षात पुरुष असतात! (स्त्रीभूमिका करणारे पुरुष) ॥११॥

सृष्टी बहुरंगी असत्य । बहुरूपाचें हें कृत्य । तुज वाटे दृश्य सत्य । परी हे जाण अविद्या ।।१२।।

भेदाने भरलेली सृष्टी सत्य नसून 'बहुस्याम्' ह्या संकल्पातून तयार झालेली आहे. तुला ती सत्य वाटते खरी, पण ती अविद्येची बनलेली आहे. मायिक आहे. ॥१२॥

मिथ्या साचासारिखें देखिलें । परि तें पाहिजे विचारिलें । दृष्टी तरळतां भासलें । तें साच कैसें मानावें ।।१३।।

मिथ्या जगताला सत्यत्व येते ते ज्ञानदृष्टी नसल्यामुळे येते. डोळ्याला बोटाने दाबून पाहिले तर एकाच्या जागी दोन पदार्थ दिसतात. म्हणून जे दिसते ते विचाराच्या कसोटीवर घासून पहावे. एकाएकी ते सत्य कसे मानावे? ॥१३॥

वरी पाहातां पालथें आकाश । उदकीं पाहातां उताणें आकाश । मध्यें चांदिण्याहि प्रकाश । परी तें अवघें मिथ्या ।।१४।।

वर पाहिले तर आकाश बहिर्वक्र घुमटाकृती भासते. पाण्यात आंतर्वक्र भासते. त्यात चांदण्यांचे प्रतिबिंबही दिसते. प्रकाशसुद्धा दिसतो. पण ते सर्व मिथ्या असते. ॥१४॥

नृपतीनें चितारी आणिले । ज्याचे त्या ऐसे पुतळे केले । पाहातां तेचि ऐसे गमले । परी अवघे माईक ।।१५।।

राजाने मूर्तिकाराकडून हुबेहूब स्वत:सारखे पुतळे करविले तरी ते सर्व मायिक असतात. ॥१५॥

नेत्रीं काहीं बाहोलि नसे । जेव्हां जें पाहावें तेव्हां तें भासे । डोळां प्रतिबिंब दिसे । तें साच कैसेनी ।।१६।।

आपल्या डोळ्यातील बाहुली आपल्याला दिसत नाही पण जेव्हां जे पहावे ते मात्र दिसते.त्या दिसणाऱ्या बाहुलीतील प्रतिबिंब खरे कां मानावे? ॥१६॥

जितुके बुडबुडे उठती । तितुक्यांमध्यें रूपें दिसती । क्ष्णामध्यें फुटोन जाती । रूपें मिथ्या ।।१७।।

पाण्यावर उठणाऱ्या अनंत बुडबुड्यात चंद्राची अनंत रूपे दिसतात. बुडबुडा फुटला की रूपे दिसेनाशी होतात. ती रूपे मिथ्या असतात. ॥१७॥

लघुदर्पणें दोनि च्यारी हातीं । तितुकीं मुखें प्रतिबिंबती । परी तें मिथ्या आदिअंतीं । येकचि मुख ।।१८।।

चार दोन छोटे आरसे हातात घेऊन पाहिले तर त्यात तेवढे चेहरे दिसतात. पण ते चेहरे आरशात पहाण्यापूर्वी व नंतर नसतात. मुख एकच. ॥१८॥

नदीतीरें भार जातां । दुसरा भार दिसे पालथा । कां पडसादाचा अवचिता । गजर उठे ।।१९।।

नदीच्या काठावरून कोणी गवताचा भारा घेऊन चालू लागला तर नदीत त्याचे उलटे प्रतिबिंब दिसते. डोंगराच्या कड्यासमोर कोणी बोलले तर त्याचा अकस्मात प्रतिध्वनी उमटतो. ॥१९॥

वापीसरोवराचें तीर । तेथें पशु पक्षी नर वानर । नाना पात्रें वृक्षविस्तार । दिसे दोहि सवा ।।२०।।

विहीर किंवा सरोवर ह्यांच्या एकाच काठावर असलेल्या पशू, पक्षी, माणूस, माकड, झाडे व भांडी इत्यादींचे प्रतिबिंब दोन्ही काठांवर दिसते. ॥२०॥

येक शस्त्र झाडूं जातां । दोनि दिसती तत्वता । नाना तंतु टणत्कारिंता । द्विधा भासती ।।२१।।

तलवार वेगाने फिरविली तर दोन तलवारी भासतात. तंबोऱ्याच्या तारेवर बोट फिरविले तर दोन तारा भासतात. ॥२१॥

कां ते दर्पणाचे मंदिरीं । बैसली सभा दिसे दुसरी । बहुत दीपांचिये हारीं । बहुत छ्याया दिसती ।।२२।।

आरसे महालात सभा भरली असेल, तर दुसरी सभाही दिसू लागते. छताला टांगलेल्या झुंबराच्या प्रकाशात अनेक पडछाया दिसतात. ॥२२॥

ऐसें हें बहुविध असे । साचासारिखेंचि दिसे । परि हें सत्य म्हणौनि कैसें । विश्वासावें ।।२३।।

अशा प्रकारे एकच असलेल्या अनेक गोष्टी, त्या प्रत्येकी अनेक आहेत असे भासले म्हणून खऱ्या मानाव्यात काय? ॥२३॥

माया मिथ्या बाजीगरी । दिसे साचाचिये परी । परी हे जाणत्यानें खरी । मानूंचि नये कीं ।।२४।।

मायेच्या प्रभावाने दृश्य जगत् सत्य असल्याप्रमाणे वाटते, पण ज्ञात्याने ते खरे मानू नये. ॥२४॥

लटिकें साचाऐसें भावावें । तरी पारखी कासया असावें । येवं ये अविद्येचे यावे । ऐसेचि असती ।।२५।।

भास हेच ज्याचे स्वरूप आहे ते जर खरे मानावयाचे असेल तर पारखी किंवा परीक्षा करणाऱ्याचे कामच काय? एकूण ही अविद्येची फसवणूक अशीच असते. (पितळ सोन्यासारखे भासते. जर पितळच सोन्याच्या भावाने खरेदी करावयाचे असेल तर कस लावणाऱ्या सोनाराची जरूरच काय?) ॥२५॥

मनुष्यांची बाजीगरी । बहुत जनास वाटे खरी । सेवट पाहातां निर्धारीं । मिथ्या होये ।।२६।।

कसबी जादूगाराने जादूचे प्रयोग करताना दाखविलेली दृश्ये बहुतेक सर्वांना खरी वाटतात. पण प्रत्यक्षात ती सर्व फसवी असतात. ॥२६॥

तैसीच माव राक्षेसांची । देवांसहि वाटे साची । पंचवटिकेसि मृगाची । पाठी घेतली रामें ।।२७।।

त्याचप्रमाणे मायावी राक्षसांनी तयार केलेल्या मायिक व्यक्ती किंवा दृश्ये देवांनाही खरी वाटतात (असे पुराण सांगते) मारीचाने मायावी हरिणाचे घेतलेले रूप न ओळखून रामानेही पंचवटीत त्याचा पाठलाग केला. ॥२७॥

पूर्वकाया पालटिती । येकाचेचि बहुत होती । रक्तबिंदींच जन्मती । रजनीचर ।।२८।।

काही राक्षस पहिले शरीर सोडून दुसरे धारण करतात. काही अनेक रूपाने प्रगट होतात. काही रक्ताच्या एका थेंबातून पुन्हा प्रगट होतात. ॥२८॥

नाना पदार्थ फळेंचि जाले । द्वारकेमधें प्रवेशले । कृष्णें दैत्य किती वधिले । कपटरूपी ।।२९।।

राक्षसांनी अनेक पदार्थ व फळांची रूपे घेऊन द्वारकेत प्रवेश केला. त्या सर्वांना श्रीकृष्णाने ठार मारले. (पहा– वत्सलाहरण. जैमिनी भारत) ॥२९॥

कैसें कपट रावणाचें । सिर केलें मावेचे । काळनेमीच्या आश्रमाचें । अपूर्व कैसें ।।३०।।

कपटी रावणाने रामलक्ष्मणांची मायावी शिरे तयार करून सीतेला भय उत्पन्न केले. कालनेमीचा आश्रम असाच मायावी होता. ॥३०॥

नाना दैत्य कपटमती । जे देवांसहि नाटोपती । मग निर्माण होऊन शक्ती । संव्हार केला ।।३१।।

असे अनेक कपटी दैत्य जेव्हा देवांचाही पराभव करू लागले तेव्हा शक्तीने अवतार घेऊन त्यांचा नाश केला. ॥३१॥

ऐसी राक्षेसांची माव । जाणों न सकती देव । कपटविद्येचें लाघव । अघटित ज्यांचें ।।३२।।

अशी ही राक्षसांची चलाखी देवांनाही कळत नाही. त्यांची कपट विद्याच तशी फसवी असते. ॥३२॥

मनुष्यांची बाजीगरी । राक्षसांची वोडंबरी । भगवंताची नाना परी । विचित्र माया ।।३३।।

माणसाने केलेली जादू, राक्षसांची वोडंबरी (इंद्रजाल) व भगवंताची माया ह्यांचे स्वरूप सारखेच आहे. ॥३३॥

हे साचासारिखीच दिसे । विचारितांच नसे । मिथ्याचि आभासे । निरंतर पाहातां ।।३४।।

ही सर्व सत्याप्रमाणे वाटतात. त्यांचा शोध घेतला तर ती सत्य नाहीत हे लक्षात येते. पण पाहू गेले तर ती मिथ्या असून सतत भासत राहतात. ॥३४॥

साच म्हणावी तरी हे नासे । मिथ्या म्हणावी तरी हे दिसे । दोहीं पदार्थीं अविश्वासे । सांगतां मन ।।३५।।

त्यांना सत्य मानावे तर प्रत्यक्षात नसतात. असत्य मानावे तर प्रत्यक्ष असल्याप्रमाणे दिसतात. त्यामुळे मनाचा गोंधळ होतो. (सत् विलक्षण– असत् विलक्षण– सतासतविलक्षण– मिथ्या– मायिक) ॥३५॥

परंतु हें नव्हे साचार । मायेचा मिथ्या विचार । दिसतें हें स्वप्नाकार । जाण बापा ।।३६।।

म्हणून हे प्रिय शिष्या, हे दृश्य जगत् सत्य नाही. मायेचाच तो आभासिक विस्तार आहे. जे दिसते ते सर्व स्वप्नवत आहे असा निश्चय कर. ॥३६॥

तथापि असो तुजला । भासचि सत्य वाटला । तरी येथें चुका पडिला । ऐक बापा ।।३७।।

हे सर्व खरे असले तरी तुला भास सत्य वाटतो हेही खरे! ह्या ठिकाणी मोठाच घोटाळा झाला आहे हे लक्षात घे. ॥३७॥

दृश्यभास अविद्यात्मक । तुझाहि देहो तदात्मक । म्हणौनि हा अविवेक । तेथें संचारला ।।३८।।

दृश्य जगत् जसे अविद्येचे घडले आहे त्याचप्रमाणे तुझा देहही जीवभावासह अविद्यामय आहे. 'मी देह व माझे जगत्' ह्या भ्रमामुळे दृश्य जगाला सत्यत्व दिले जाते. अविवेकाला वाव मिळतो. ॥३८॥

दृष्टीनें दृश्य देखिलें । मन भासावरी बैसलें । तरी तें लिंगदेह जालें । अविद्यात्मक ।।३९।।

जीव दृष्टीच्या माध्यमातून दृश्य पहातो. अन्त:करण वृत्तीला दृश्य जगताचे ज्ञान होते. हे अन्त:करणही अविद्येचे रूप आहे. अन्त:करण हा लिंगदेहाचा भाग आहे. ॥३९॥

अविद्येनें अविद्या देखिली । म्हणोनि गोष्टि विश्वासली । तुझी काया अवघी संचली । अविद्येची ।।४०।।

जीवरूप अविद्येने जगत् रूप अविद्या पाहिल्यामुळे एकीला दुसरी सत्य वाटली! (हे पहाणे सुद्धा अविद्यात्मकच आहे.) तुझे सर्व शरीर अविद्यामय आहे हे लक्षात ठेव. ॥४०॥

तेचि काया मी आपण । हें देहबुद्धीचें लक्षण । येणें करितां जालें प्रमाण । दृश्य आवघें ।।४१।।

ते शरीर 'मी' आहे ह्या भ्रमाला देह बुद्धी म्हणतात. त्या देहबुद्धीमुळेच जगताला सत्यत्व दिले गेले. ॥४१॥

इकडे सत्य मानिला देहो । तिकडे दृश्य सत्य हा निर्वाहो । दोहींमधें माहां संदेहो । पैसावला बळें ।।४२।।

'मी' कडून देहाला सत्यत्व आले. 'माझे' कडून दृश्य जगताला सत्यत्व दिले गेले. मायेच्या बळाने दोन्हीकडे भ्रम ऐसपैस पसरून दृढ झाला. ॥४२॥

देहबुद्धी केली बळकट । आणि ब्रह्म पाहों गेला धीट । तों दृश्यानें रुधिली वाट । परब्रह्माची ।।४३।।

अशी देहबुद्धी घट्ट पकडून जेव्हा ब्रह्मवस्तूचा वेध घेण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा हे दृश्य जग प्रचंड पर्वताप्रमाणे मधे आडवे येते. ब्रह्मज्ञानाच्या वाटचालीत प्रचंड अडथळा निर्माण करते. ॥४३॥

तेथें साच मानी दृश्याला । निश्चयचि बाणोनि गेला । पाहा हो केवढा चुका पडिला । अकस्मात ।।४४।।

अज्ञानामुळे दृश्य जगताला सत्यत्व येऊन त्या सत्यत्वाला अज्ञानमय जीवनामुळे दृढता येते. अरेरे! केवढा हा घोटाळा झाला!! साधना करणाऱ्याला अकस्मात तो लक्षात येतो. ॥४४॥

आतां असो हें बोलणें । ब्रह्म न पविजे मीपणें । देहबुद्धीचीं लक्षणें । दृश्य भाविती ।।४५।।

आता हा विस्तार पुरे. अहंकार आहे तोपर्यंत ब्रह्मज्ञान होणार नाही. तुझ्यातील देहबुद्धीमुळे जगत् भावरूप (सत्य) आहे असे वाटते. ॥४५॥

अस्तिचा देहीं मांषाचा डोळा । पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा । तो ज्ञाता नव्हे आंधळा । केवळ मूर्ख ।।४६।।

हाडांच्या सांगाड्यावर रचलेल्या शरीरात काही पेशी एकत्र येऊन डोळा हे ज्ञानेंद्रिय तयार झाले आहे. त्या अचेतन पेशीपासून तयार झालेल्या डोळ्याने चेतन ब्रह्म पाहू बघणारा तथाकथित ज्ञाता मूर्ख व आंधळा असतो. (अचेतनाने चेतनाचे ज्ञान होत नाही.) ॥४६॥

दृष्टीसि दिसे मनासि भासे । तितुकें काळांतरीं नासे । म्हणोनि दृश्यातीत असे । परब्रह्म तें ।।४७।।

जे जे डोळ्याला दिसून जीवाला कळते ते ते सर्व काळाच्या उदरात गडप होते. ब्रह्म असे नसल्याने ते दिसत व कळत नाही. (अन्वय व व्यतिरेकी मांडणी) ॥४७॥

परब्रह्म तें शाश्वत । माया तेचि अशाश्वत । ऐसा बोलिला निश्चितार्थ । नाना शास्त्रीं ।।४८।।

परब्रह्म अविनाशी नित्य असून माया विनाशी व अनित्य आहे असे वेदान्त शास्त्रांचे तात्पर्य आहे. ॥४८॥

आतां पुढें निरुपण । देहबुधीचें लक्षण । चुका पडिला तो मी कोण । बोलिलें असे ।।४९।।

पुढील समासात देहबुद्धीची लक्षणे सांगू. मोठा घोटाळा करणारा 'मी' कोण ते स्पष्ट करू. ॥४९॥

मी कोण हें जाणावें । मीपण त्यागूनि अनन्य व्हावें । मग समाधान तें स्वभावें । आंगीं बाणें ।। ।५०।।

खरा 'मी' ओळखावा. भ्रामक 'मी' रूप अहंकार सोडून सगुण निर्गुणापाशी अनन्यत्व साधावे. त्यामुळे आत्मसुखाने होणारे समाधान सुस्थिर होते. ॥५०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'दृष्यनिर्शननाम' समास आठवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'दृष्यनिर्शन' नावाचा आठवा समास समाप्त

दशक सहावा : देवशोधन

समास नववा : सारशोधन

॥ श्रीराम समर्थ ॥

गुप्त आहे उदंड धन । काये जाणती सेवक जन । तयांस आहे तें ज्ञान । बाह्याकाराचें ।।१।।

श्रीमंताच्या चौसोपी वाड्यातील तळघरात अगणित संपत्ती असते. नोकराचाकरांना ती कधीच दिसत नाही. त्यांना वाड्यात बाहेर मांडून ठेवलेल्या वस्तू तेवढ्या दिसतात. ॥१॥

गुप्त ठेविलें उदंड अर्थ । आणी प्रगट दिसती पदार्थ । शाहाणे शोधिती स्वार्थ । अंतरीं असे ।।२।।

मौल्यवान संपत्ती गुप्त ठेवतात. सामान्य पदार्थ बाहेर मांडून ठेवतात. शहाण्यांना ठाऊक असते की खरी मतलबाची गोष्ट आत दडवलेली आहे. ॥२॥

तैसें दृश्य हें माईक । पाहात असती सकळ लोक । परी जयांस ठाउका विवेक । ते तदंतर जाणती ।।३।।

त्याप्रमाणे हे दृश्य मायिक जगत् सगळ्यांनाच दिसते. पण विवेक असणारे त्या जगताचे अधिष्ठान किंवा सार पहातात. (दोरीच्या अधिष्ठानावर मायिक सर्प दिसतो. त्या सर्पाचे दोरी हे अधिष्ठान असून ती दोरीच सर्पाचे सार आहे!) ॥३॥

द्रव्य ठेऊन जळ सोडिलें । लोक म्हणती सरोवर भरलें । तयाचें अभ्यांतर कळलें । समर्थ जनासी ।।४।।

तळाशी सोन्याच्या लगडी ठेवून वर पाणी सोडून तलाव तयार केला तर सामान्य लोक पाण्याने भरलेला तलाव पहातात. पण जाणत्यांना त्या तलावाचे रहस्य कळते. ॥४॥

तैसे ज्ञाते ते समर्थ । तेहिं वोळखिला परमार्थ । इतर ते करिती स्वार्थ । दृश्य पदार्थाचा ।।५।।

त्याप्रमाणे विवेकी ब्रह्मवेत्ते ह्या दृश्य जगताचे रहस्य जाणतात. सामान्य माणसे दृश्य जगातील वस्तूंचा संग्रह करून त्यावर ममत्व धरून बसतात. ॥५॥

काबाडी वाहाती काबाड । श्रेष्ठ भोगिती रत्नें जाड । हें जयाचें तयास गोड । कर्मयोगें ।।६।।

व्यवहारामध्ये सुद्धा काबाडकष्ट करणारे कष्टच करीत राहतात. भाग्यवन्त मौल्यवान रत्ने धारण करण्यासारखी सुखे भोगतात. पूर्वकर्मानुसार त्याचे भोग त्याला मिळतात व ते गोड मानून घ्यावे लागतात. ॥६॥

येक काष्ठस्वार्थ करिती । येक शुभा येकवाटिती । तैसे नव्हेत कीं नृपति । सारभोक्ते ।।७।।

कोणी लाकडाच्या मोळ्या बांधतात. कोणी गोवऱ्या थापतात. राजे लोक ह्यातील काहीच न करता सर्व तऱ्हेची सुखे भोगतात. ॥७॥

जयांस आहे विचार । ते सुकासनीं जाले स्वार । इतर जवळीलभार । वाहातचि मेले ।।८।।

जे विचारवन्त असतात ते सर्व प्रकारच्या सुखांचे धनी होतात. विचारशून्य व अविचारी जीवनाचे ओझे वाहून मरून जातात. ॥८॥

येक दिव्यान्ने भक्षिती । येक विष्ठा सावडिती । आपण वर्तल्याचा घेती । साभिमान ।।९।।

कोणी पंचपक्वान्ने खातात, तर कोणी उकिरड्यावर पडलेले अन्न खाऊन दिवस काढतात व त्यातही आपणास

भरपूर मिळाल्याच्या अभिमानात राहतात. ॥९॥

सार सेविजे श्रेष्ठीं । असार घेयिजे वृथापृष्टीं । साराअसाराची गोष्टी । सज्ञान जाणती ।।१०।।

बुद्धीने श्रेष्ठ असलेले सार तेवढे वेचून घेतात. उरलेले असार आळशांच्या वाट्याला येते. सार काय व असार काय ह्याचा निवाडा ज्ञानीच करतात. ॥१०॥

गुप्त परीस चिंतामणी । प्रगट खडे कांचमणी । गुप्त हेमरत्नखाणी । प्रगट पाषाण मृत्तिका ।११।।

परीस व चिंतामणी सहसा कोणाला मिळत नाहीत. खडे व कांचेचे मणी वाटेल तेथे मिळतात. सोने व हिरे ह्यांच्या खाणी जमिनीत शोधाव्या लागतात. दगड व माती वाटेवर पडलेले असतात. ॥११॥

अव्हाशंख अव्हावेल । गुप्त वनस्पति अमोल । येरंड धोत्रे बहुसाल । प्रगट सिंपी ।।१२।।

उजवा शंख व वेल, प्राण वाचविणाऱ्या अमूल्यवान वनस्पती दुर्मिळ असतात. एरंड, धोतरा व शिंपल्या वाटेल तेवढे मिळतात. ॥१२॥

कोठे दिसेना कल्पतरु । उदंड सेरांचा विस्तारु । पाहातां नाहीं मळियागरु । बोरि बाभळा उदंडी ।।१३।।

कल्पतरू कोठेच दिसत नाही, तर शेर भरपूर असतात. चंदन क्वचित असतो, तर बोरी- बाभळी जागोजागी आढळतात. ॥१३॥

कामधेनु जाणिजे इंद्रे । सृष्टींत उदंड खिल्लारें । महद्भाग्य भोगिजे नृपवरें । इतर कर्मानुसार ।।१४।।

कामधेनू फक्त इंद्राजवळ असते. जगात गाई-म्हशी मोठ्या संख्येने असतात. सम्राट दुर्मिळ भोग भोगतो. इतरांना पूर्वकर्मानुसार किरकोळ भोग मिळतात. ॥१४॥

नाना व्यापार करिती जन । आवघेचि म्हणती सकांचन । परंतु कुबेराचें महिमान । कोणासीचि न ये ।।१५।।

मोठे मोठे सगळेच व्यापारी धनाढ्य असतात. पण कुबेराच्या श्रीमंतीची कोणाशीच तुलना होत नाही. ॥ १५ ॥

तैसा ज्ञानी योगेश्वर । गुप्तार्थलाभाचा ईश्वर । इतर ते पोटाचे किंकर । नाना मतें धुंडिती ।।१६।।

त्याप्रमाणे ब्रह्मज्ञानी असलेला श्रेष्ठ योगी ब्रह्मसुखाच्या गुप्त लाभाचा स्वामी असतो. सामान्य पोटार्थी माणसे भोगवाद, साम्यवाद, समाजवाद, भांडवलवाद इ. मतांच्या आधारे सुख मिळवू पहातात. ॥१६॥

तस्मात सार तें दिसेना । आणी असार तें दिसे जना । सारासारविवंचना । साधु जाणती ।।१७।।

म्हणून ह्या सर्वांचा निष्कर्ष असा की सामान्य जनांना सार न दिसता असाराचा पसारा दिसतो. साधुसंतांनाच सार व असार हा विवेक कळतो. ॥१७॥

इतरांस हें काये सांगणें । खरें खोटें कोण जाणे । साधुसंतांचिये खुणे । साधुसंत जाणती ।।१८।।

इतर सामान्यांना हे सांगून तरी काय उपयोग! खरे व खोटे त्यांना कळत नाही. एक साधूच दुसऱ्या साधूचा विवेक स्वतःच्या अनुभवाच्या खुणेने जाणू शकतो. ॥१८॥

दिसेना जें गुप्त धन । तयासि करणें लागे अंजन । गुप्त परमात्मा सज्जन- । संगतीं शोधावा ।।१९।।

न दिसणारे जमिनीत पुरलेले धन दिसण्यासाठी डोळ्यात अंजन घालतात. तसा गुप्त परमात्मा अनुभवण्यासांठी श्रीगुरूंची संगत धरावी. ॥१९॥

रायाचे सन्निध होतां । सहजचि लाभे श्रीमंतता । तैसा हा सत्संग धरितां । सद्वस्तु लाभे ।।२०।।

राजाच्या परिवाराला सहजच राजाच्या श्रीमंतीचा लाभ होतो. त्याप्रमाणे संतसंगतीत त्यांच्या ब्रह्मानुभवाचा लाभ होतो. ॥२०॥

सद्वस्तूस लाभे सद्वस्तु । अव्यावेस्तास अव्यावेस्तु । पाहातां प्रशस्तास प्रशस्तु । विचार लाभे ।।२१।।

सोऽहं सारख्या श्रेष्ठ साधनाने ब्रह्मरूप सद्वस्तू लाभते. अस्ताव्यस्ताला अव्यवस्थाच मिळते. मनाने व्यापक असणाऱ्याला तसाच प्रतिसाद मिळतो. ॥२१॥

म्हणौनि हें दृश्यजात । आवघेंचि आहे अशाश्वत । परमात्मा अच्युत अनंत । तो या दृश्यावेगळा ।।२२।।

म्हणून अनंतकोटी ब्रह्मांडे विनाशशील असून अढळ अन्तपाररहित ब्रह्म त्यांत असूनही त्यापासून अलिप्त आहे. ॥२२॥

दृश्यावेगळा दृश्याअंतरी । सर्वात्मा तो सचराचरीं । विचार पाहातां अंतरीं । निश्चये बाणे ।।२३।।

ब्रह्म ब्रह्मांडात असून त्याहून अलिप्त आहे. ते सर्व चर व अचर सृष्टीचा आत्मा आहे. (विराट व ईश्वर) असा अंतर्मुख होऊन विचार केला असता त्या ब्रह्मस्वरूपाचे असे आकलन होते व नंतर तसा सहज निश्चय होतो. ॥२३॥

संसारत्याग न करितां । प्रपंचउपाधी न सांडितां । जनामध्यें सार्थकता । विचारेंचि होये ।।२४।।

म्हणून ह्या जगत् रूप संसारात राहून कुटुंबव्यवस्थादी प्रपंचाचा त्याग न करता विवेकाने ह्याच जन्मात जन्माचे मोक्षरूप सार्थक होते. ॥२४॥

हें प्रचितीचें बोलणें । विवेकें प्रचित पाहाणें । प्रचित पाहे तें शाहाणे । अन्यथा नव्हे ।।२५।।

हा अनुभव अनेकांनी घेतला आहे. विवेकाने अनुभव घ्यावा. अनुभवावर नजर ठेवणारे शहाणे असतात. इतर नसतात. ॥२५॥

सप्रचित आणि अनुमान । उधार आणी रोकडें धन । मानसपूजा प्रत्यक्ष दर्शन । यांस महदांतर ।।२६।।

अनुभव व ऐकीव ज्ञान, रोख रक्कम व उधारीचा वायदा, प्रत्यक्ष दर्शन व देवाची मानसपूजा ह्यांत फार फार अंतर पडते. ॥२६॥

पुढें जन्मांतरी होणार । हा तों अवघाच उधार । तैसा नव्हे सारासार । तत्काळ लाभे ।।२७।।

'काही जन्म घेतल्यानंतर मोक्ष मिळतो' हा उधारीचा वायदा आहे. सार व असार विचार असा नाही. सारासार विचारामुळे चालू जन्मातच जीवन्मुक्ती मिळते. ॥२७॥

तत्काळचि लाभ होतो । प्राणी संसारी सुटतो । संशय अवघाचि तुटतो । जन्ममरणाचा ।।२८।।

चालू जन्मातच मोक्ष लाभून साधक जन्ममरणांच्या चक्रातून सुटतो. 'मला पुन्हा जन्ममरणांच्या फेऱ्यात सापडावे लागेल की काय' अशी शंकाही उरत नाही. ॥२८॥

याचि जन्में येणेंचि काळें । संसारी होईजे निराळें । मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ।।२९।।

ह्या जन्माच्या ह्याच जीवनात जन्ममरणाच्या रहाटगाडग्यातून सुटून स्वरूपानुभवाने निश्चळ मोक्ष मिळवावा. (दृढ, अपरिवर्तनीय अपरोक्ष) ॥२९॥

ये गोष्टीस करी अनुमान । तो सिद्धचि पावेल पतन । मिथ्या वदे त्यास आण । उपासनेची ।।३०।।

ह्या माझ्या सांगण्याविषयी जो तर्ककुतर्क करील तो मोक्षाच्या उंबरठ्यातून मागे फिरेल. माझे म्हणणे खोटे नाही हे मी, मी केलेल्या उपासनेची शपथ घेऊन सांगतो आहे. (वाचकानों सावधान!) ॥३०॥

हें येथार्थचि आहे बोलणें । विवेकें सीघ्रचि मुक्त होणें । असोनी कांहींच नसणें । जनामधें ।।३१।।

हे माझे सांगणे अगदी खरे आहे. विवेक ह्या साधनाने लवकरात लवकर मुक्त व्हावे. देहाने जगात वावरत असले तरी ते बाधितानुवृत्तीने असावे. (अन्त:करण, जग व त्यांचा आपापसातील संबंध कल्पित आहेत असा सतत सहज निश्चय). ॥३१॥

देवपद आहे निर्गुण । देवपदीं अनन्यपण । हाचि अर्थ पाहातां पूर्ण । समाधान बाणे ।। ३ २।।

देव ह्या पदाचा लक्ष्यार्थ निर्गुण असून त्याच्याशी जीवाने एकरूप होऊन रहावे. (वाच्यार्थ सगुण) हा निश्चय केला तरच मोक्षसुखाचे समाधान लाभते. ।।३२।।

देहीच विदेह होणें । करून कांहींच न करणें । जीवनमुक्तांचीं लक्षणें । जीवन्मुक्त जाणे ।। ३ ३।।

प्रारब्धामुळे देह असला तरी त्यापासून असंगत्वाने रहाणें, सर्व करून काही न करणें (कर्तृत्वभ्रांती नसणे) इ. जीवन्मुक्ताची लक्षणे फक्त जीवन्मुक्तच जाणतात. ।।३३।।

येरवीं हें खरें न वटे । अनुमानेंचि संदेह वाटे । संदेहाचें मूळ तुटे । सद्‌गुरुवचनें ।।३४।।

ही अवस्था अनेकांनी प्रत्यक्षात अनुभवली आहे म्हणून बरे; नाहीतर ती अवस्था असू शकते हे खरेच वाटणार नाही! शंकाकुशंका थैमान घालतात कारण अनुभव नसतो. केवळ ऐकीव माहिती असते. पण या शंका सद्‌गुरूंच्या उपदेशाने समूळ नष्ट होतात. ।।३४।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सारशोधननाम' समास नववा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सारशोधन' नावाचा नववा समास समाप्त

दशक सहावा : देवशोधन

समास दहावा : अनिर्वाच्य

॥ श्रीराम समर्थ ॥

समाधान पुसतां कांहीं । म्हणती बोलिजे ऐसें नाही । तरी तें कैसें आहे सर्वहि । निरोपावें ।।१।।

मोक्षसुखाने मिळणारे निरपेक्ष समाधान कसे असते असे कोणी विचारले तर 'ते सांगता येण्यासारखे नाही' असे उत्तर मिळते. तरी त्याचे स्वरूप कसे असते ते सांगावे असे शिष्य श्रीगुरूंना विचारतो. ॥१॥

मुक्यानें गूळ खादला । गोडी न ये सांगाव्याला । याचा अभिप्राव मजला । निरोपण कीजे ।।२।।

पुढे असे उदाहरण देतात की मुक्याने गूळ खाल्ला तर त्याला तो गोड असून तसे सांगता येत नाही. हे सर्व मला स्पष्ट करून सांगा. ॥२॥

अनुभवहि पुसों जातां । म्हणती न ये किं सांगतां । कोणापासीं पुसों आतां । समाधान ।।३।।

'ब्रह्म मी आहे' असा अनुभव आला तरी 'तो वाणीने बोलता येत नाही' असेच जाणते सांगतात. यांचे स्पष्टीकरण आपणांशिवाय कोणाकडे मागावे? ॥३॥

जे ते अगम्य सांगती । न ये माझिये प्रचिती । विचार बैसे माझे चित्तीं । ऐसें करावें ।।४।।

प्रत्येक जाणता 'ब्रह्मानुभव अगम्य आहे' असे सांगतो. पण या सांगण्याचे वर्म माझ्या काही केल्या लक्षात येत नाही. ते मला स्पष्टपणे समजेल असे सांगावे. ॥४॥

ऐसें श्रोत्यांचें उत्तर । याचें कैसें प्रत्योत्तर । निरोपिजेल तत्पर । होऊन ऐका ।।५।।

या श्रोत्याच्या प्रश्नाला वक्ता काय उत्तर देतो ते सावधपणे ऐका. ॥५॥

जें समाधानाचें स्थळ । किं तो अनुभवचि केवळ । तें स्वरूप प्रांजळ । बोलोन दाऊं ।।६।।

ब्रह्मानुभव 'मला समाधान झाले' अशा स्वरूपाचा आहे की केवळ अनुभवरूप आहे ते आता अगदी स्पष्ट करून सांगू. ॥६॥

जें बोलास आकळेना । बोलिल्याविणहि कळेना । जयासी कल्पितां कल्पना । हिंपुटी होये ।।७।।

ब्रह्मानुभव आला असता वाणीचे व्यापार थांबल्याने तो शब्दबद्ध करता येत नाही (यतो वाचो निवर्तन्ते - केन उप.) पण शब्दाने सांगितल्याशिवाय त्याचेसंबंधी अंदाज येत नाही. ब्रह्मासंबंधी विचार करू लागले तर विचार बंद पडतात. (यन्मनसा न मनुते - केन.) ॥७॥

तें जाणावें परब्रह्म । जें वेदांचें गुह्य परम । धरितां संतसमागम । सर्वहि कळे ।।८।।

वेदवाङ्मयातील सर्वात गूढ विषय ब्रह्म हा आहे. ते जाणण्यात पुरुषार्थ असून संत सद्‌गुरूंच्या सहवासात त्याच्या स्वरूपाचे यथार्थ आकलन होते. ॥८॥

तेंचि आतां सांगिजेल । जें समाधान सखोल । ऐक अनुभवाचे बोल । अनुर्वाच्य वस्तु ।।९।।

तुझे पूर्ण समाधान होईल अशा रीतीने अनिर्वाच्य ब्रह्मासंबंधी मी घेतलेला अनुभव सांगेन. ('बोलीं अरूपाचे रूप दावीन' –ज्ञानेश्वरी) ॥९॥

सांगतां न ये तें सांगणें । गोडी कळाया गूळ देणें । ऐसें हें सद्‌गुरुविणें । होणार नाहीं ।।१०।।

जे शब्दाने बोलता येत नाही ते सांगणे व सद्‌वस्तूचा प्रत्यक्ष अनुभव देणे हे केवळ श्री. सद्‌गुरूंनाच शक्य आहे. ॥१०॥

सद्‌गुरुकृपा कळे त्यासीं । जो शोधील आपणासी । पुढें कळे अनुभवासी । आपेंआप वस्तु ।।११।।

ज्याला सद्‌गुरूंचा कृपाप्रसाद लाभला आहे तो 'मी'चा अंतरंगात शोध घेऊ लागतो व त्याला त्या शोधातूनच सहजपणें ब्रह्मानुभव येतो. ॥११॥

दृढ करुनियां बुद्धी । आधीं घ्यावी आपशुद्धी । तेणें लागे समाधी । अकस्मात ।।१२।।

सोऽहं बुद्धी जशी जशी दृढ होत जाईल तशी अचानक समाधी लागून अहं स: मध्ये बुडून जातो. स्व चा शोध (शुद्धी) तेथेच संपतो. ॥१२॥

आपलें मूळ बरें शोधिता । आपली तों माईक वार्ता । पुढें वस्तुच तत्वता । समाधान ।।१३।।

अहं रूप मीचे मूळ शोधता शोधता, ते जर शास्त्रशुद्ध पद्धतीने व श्रीगुरूंच्या मार्गदर्शनाखाली (बरे) शोधले असेल, तर पुढे असे लक्षात येते की हा शोधणारा 'मी' मायिक असून त्याचा उगम आत्मरूप 'मी' मध्ये आहे. त्या अनुभवात समाधान दडलेले असते. ॥१३॥

आत्मा आहे सर्वसाक्षी । हें बोलिजे पूर्वपक्षीं । जो कोणी सिद्धांत लक्षी । तोचि सिद्ध ।।१४।।

'आत्मा सर्वसाक्षी आहे' हे बोलणे अध्यारोपाचे (पूर्वपक्ष) असून परमात्म्यामध्ये 'स्व' ला हरवणारा (सिद्धान्तपक्षाचा) अपवादाचा अनुभव घेतो. तोच जीवब्रह्मैक्य सिद्धीला गेलेला सिद्ध असतो. ॥१४॥

सिद्धांतवस्तु लक्षूं जातां । सर्वसाक्षी ते अवस्ता । आत्मा तीहून पर्ता । अवस्तातीत ।।१५।।

ब्रह्मानुभव (सिद्धान्तवस्तू) घेण्याच्या संदर्भात 'सर्वसाक्षित्व' ही एक अवस्था आहे. अवस्थेच्या अतीत असलेला आत्मा तिच्याहून पलीकडचा किंवा भिन्न आहे. (जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तीन अवस्था सापेक्ष तुर्य ही आत्म्याची अवस्था आहे. तोच साक्षी.) ॥१५॥

पदार्थज्ञान जेव्हां सरे । द्रष्टा द्रष्टेपणें नुरे । ते समईं उतरे । फुंज मीपणाचा ।।१६।।

पदार्थमय सृष्टीचा जेव्हा बाध होतो तेव्हा ती सृष्टी पहाणारा द्रष्टा द्रष्टा राहत नाही. त्याचे द्रष्टेपण संपते. तो द्रष्टाच स्वत:ला 'मी' म्हणून मिरवीत असल्याने द्रष्टेपणा संपताच 'मी'पणाही संपतो. ॥१६॥

जेथे मुरालें मीपण । तेंचि अनुभवाची खूण । अनुर्वाच्य समाधान । याकारणें बोलिजे ।।१७।।

जेथें 'मी'पणा मुरून जातो तोच ब्रह्मानुभव असतो. तो कसा आहे हे जाणणारा व नंतर सांगणारा 'मी' न उरल्याने तो अनुभव अनिर्वाच्य असतो. अनिर्वाच्याविषयीच्या शंकेचे हे समाधान आहे व त्या अवस्थेतच निरपेक्ष समाधान असते. ॥१७॥

अत्यंत विचाराचे बोल । तरी ते माईक फोल । शब्द सबाह्य सखोल । अर्थचि अवघा ।।१८।।

ब्रह्म ही संकल्पना कितीही सूक्ष्म पदर उलगडून सांगितली तरी ते सांगणे शब्दमय असल्याने मायिक वा टाकाऊ असते. कारण अक्षरांचा बनलेला शब्द सांकेतिक अर्थाने भरलेला असतो. ॥१८॥

शब्दाकरितां कळे अर्थ । अर्थ पाहातां शब्द वेर्थ । शब्द सांगे तें येथार्थ । परी आपण मिथ्या ।।१९।।

शब्दाच्या माध्यमातून अर्थ कळतो. अर्थ कळताच शब्द निरुपयोगी होतो. शब्दाने जे सांगितले जाते ते खरे असले तरी शब्द मिथ्या ठरतो. ॥१९॥

शब्दाकरितां वस्तु भासे । वस्तु पाहातां शब्द नासे । शब्द फोल अर्थ असे । घनवटपणें ।।२०।।

शब्दामुळे पदार्थाचे ज्ञान होते. ज्ञान होताच शब्द निवृत्त होतो. शब्द टरफलाप्रमाणे असला तरी अर्थ आतील दाण्याप्रमाणे असतो. ॥२०॥

भुंसाकरितां धान्य निपजे । धान्ये घेऊन भूंस टाकिजे । तैसें शब्द भूंस जाणिजे । अर्थ धान्य ।।२१।।

मळणी केल्यावर कोंड्यातून धान्य काढले जाते. ते घेऊन कोंडा टाकतात. शब्द कोंडा असून अर्थ धान्याप्रमाणे आहे. ॥२१॥

पोचटामधें घनवट । घनवटीं उडे पोचट । तैसा शब्द हा फलगट । परब्रह्मीं ।।२२।।

कोंड्यात धान्य असते. वारा येऊन कोंडा उडतो व धान्य राहते. ब्रह्मस्वरूपात शब्द कोंड्यासारखा आहे. ॥२२॥

शब्द बोलोनि राहे । अर्थ शब्दापूर्वींच आहे । या कारणें न साहे । उपमा तया अर्थासी ।।२३।।

शब्द बोलल्यावर निवृत्त होतो. त्या शब्दाने सुचविलेला पदार्थ किंवा संकल्पना (उदा. सूर्य व सुख) शब्दाच्या उच्चारापूर्वी असतातच, म्हणून शब्द व अर्थ एकच आहे असे म्हणता येत नाही. ॥२३॥

भूंस सांडून कण घ्यावा । तैसा वाच्यांश त्यजावा । कण लक्ष्यांश लक्षावा । शुद्ध स्वानुभवें ।।२४।।

भुसा टाकून धान्य घ्यावे, त्याप्रमाणें शब्द हा वाच्यार्थ टाकून अर्थ हा लक्ष्यांश घ्यावा. ब्रह्म या अर्थाचा म्हणजे वस्तूचा अनुभव घ्यावा. ॥२४॥

दृश्यावेगळें बोलिजे । त्यासी वाच्यांश म्हणिजे । त्याचा अर्थ तो जाणिजे । शुद्ध लक्ष्यांश ।।२५।।

'दृश्य जगतापासून ब्रह्म अलिप्त आहे' हे वाक्य वाच्य असून ब्रह्माची अलिप्तता लक्षात घेणे हे लक्ष्य आहे. हाच शुद्ध लक्ष्यांश. ॥२५॥

ऐसा जो शुद्ध लक्ष्यांश । तोचि जाणावा पूर्वपक्ष । स्वानुभव तो अलक्ष । लक्षिला नवचे ।।२६।।

या शुद्ध लक्ष्यांशालाही अध्यारोप किंवा पूर्वपक्ष म्हणावे कारण अपवाद जे ब्रह्म त्याचे ठिकाणी पूर्व व सिद्धान्त असे कोणतेच पक्ष नाहीत, ते कशाचे लक्ष्य नाही व तत् सापेक्ष अलक्ष्यही नाही. ॥२६॥

जेथें गाळून सांडिलें नभा । जो अनुभवाचा गाभा । ऐसा तोहि उभा । कल्पित केला ।।२७।।

भौतिक पदार्थांमध्ये आकाश हे महाभूत सर्वांत सूक्ष्म आहे. पण ब्रह्म त्याहून सूक्ष्म असल्याने जणू ते आकाशाच्या वस्त्रातूनही गाळले जाते. 'ब्रह्माचा अनुभव आला' ही भाषा केवळ कल्पनेनेच बोलली जाते. ॥२७॥

मिथ्या कल्पनेपासूनि जाला । खरेंपण कैंचें असेल त्याला । म्हणौनि तेथें अनुभवाला । ठावचि नाहीं ।।२८।।

'अनुभव आला' हे बोलणे मिथ्या कल्पनेनेच शक्य आहे. ते खरे कसे असेल? म्हणून 'ब्रह्मानुभव' ही संकल्पनाच अज्ञानाची आहे. (येथ जाणपण तेचि नेणे । आथिलेपण मिरवी तेचि उणे– ज्ञानेश्वरी) ब्रह्मानुभव घेऊन तो घेतला असे म्हणणे केवळ अशक्य आहे. ॥२८॥

दुजेविण अनुभव । हें बोलणेंचि तों वाव । याकारणें नाहीं ठाव । अनुभवासी ।।२९।।

अनुभव घेणारा अनुभव घेण्याच्या वस्तूपासून वेगळा राहिल्याशिवाय 'अनुभव आला' असे म्हणूच शकणार नाही. म्हणून असे कधीच म्हणता येणार नाही. ॥२९॥

अनुभवें त्रिपुटी उपजे । अद्वैतीं द्वैतचि लाजे । म्हणौनि बोलणें साजे । अनुर्वाच्य ।।३०।।

'अनुभव आला' असे म्हणताक्षणी त्रिपुटीचा स्वीकार करावाच लागतो. अद्वैताच्या अनुभवात द्वैताला जागाच नसते. त्रिपुटी तीन प्रकारच्या भेदाने तयार होते. (ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान) म्हणून अद्वैतरूप ब्रह्मानुभव अनिर्वाच्य असतो असे म्हणणे शास्त्रशुद्ध व अनुभवसिद्ध आहे. ॥३०॥

दिवसरजनीचें परमित्य । करावया मूळ आदित्य । तो आदित्य गेलियां उर्वरित । त्यासी काये म्हणावें ।।३१।।

दिवस व रात्र या दोन्हींना सूर्यामुळे अस्तित्व आहे. तो सूर्यच नष्ट झाला तर दिवस व रात्र या संकल्पनाच संपून जातील. ते शब्दही उरणार नाहीत. मग त्यांचेसंबंधी कसे बोलावे? ॥३१॥

शब्दमौन्याचा विचार । व्हावया मूळ वोंकार । तो वोंकार गेलिया उच्चार । कैसा करावा ।।३२।।

बोलणे व न बोलणे हे प्रणवामध्ये समाविष्ट असलेल्या अ, उ आणि म या स्वर व व्यंजनांनी तयार होणाऱ्या शब्दांवर अवलंबून आहे. तो प्रणवच (ओम्) नसेल तर स्वर व व्यंजने नष्ट होतील. मग शब्दाचा उच्चार कसा होईल? ॥३२॥

अनुभव आणि अनुभविता । सकळ ये मायेचि करितां । ते माया मुळीं नस्तां । त्यासीं काये म्हणावें ।।३३।।

त्याप्रमाणे अनुभव व अनुभव घेणारा हे दोन्ही मायामय आहेत. मायाच जर मिथ्या व कल्पित असेल तर त्या दोन्हींनाही मिथ्यात्व येते. ॥३३॥

वस्तु येक आपण येक । ऐसी अस्ती वेगळिक । तरि अनुभवाचा विवेक । बोलों येता सुखें ।।३४।।

'मी' वेगळा व ब्रह्म वेगळे असे असते तर 'मी'ला ब्रह्माचा अनुभव येतो असे अवश्य म्हणता येईल. (पण जीवरूप मी तत्त्वत: आत्मरूप ब्रह्मच आहे.) ॥३४॥

वेगळेपणाची माता । ते लटिके वंधेची सुता । म्हणोनियां अभिन्नता । मुळींच आहे ।।३५।।

भेदरूप वेगळेपणाला जन्म देणारी आई-माया-ही मुळात जणू वांझ असलेल्या आईची मुलगी आहे! म्हणून भेदरूप द्वैत व माया ही दोन्ही एकरूप आहेत. ॥३५॥

अजन्मा होता निजेला । तेणें स्वप्नीं स्वप्न देखिला । सद्‌गुरूस शरण गेला । संसारदु:खें ।।३६।।

तत्त्वत: कधीच जन्माला न येणाऱ्या जीवाला जणू अविद्येची झोप लागली. या अविद्यारूप स्वप्नात त्याने स्वप्न पाहिले! व त्यात तो संसारातील त्रिविध तापांनी त्रस्त होऊन सद्‌गुरूंना शरण गेला. (दृश्य सृष्टी हे एक प्रदीर्घ स्वप्न आहे.) ॥३६॥

सद्‌गुरुकृपेस्तव । जाला संसार वाव । ज्ञान जालियां ठाव । पुसे अज्ञानाचा ।।३७।।

स्वप्नात त्याला श्रीगुरूंची कृपा होऊन संसार बाधित झाला. 'मी ब्रह्म आहे' असे ज्ञान झाल्यावर तो पूर्वीच्या अज्ञानाचा शोध घेऊ लागला! ॥३७॥

आहे तितुकें नाहीं जालें । नाहीं नाहींपणें निमालें । आहे नाहीं जाऊन उरलें । नसोन कांहीं ।।३८।।

जे पूर्वी सत्य आहे असे वाटत होते ते मायिक आहे असा निश्चय झाला. मायिक मायामय असल्याने नाहीसे झाले. माया ही संकल्पनाच संपली. आहेपणा व नाहीपणा दोन्ही नाहीसे होऊन नित्य ब्रह्म तेवढे उरले. ब्रह्म अस्तित्व व नास्तित्व याहून वेगळे आहे. ते दोन्ही नाही. ॥३८॥

सुन्यत्वातीत शुद्धज्ञान । तेणें जालें समाधान । ऐक्यरूपें अभिन्न । सहजस्थिती ।।३९।।

काही नाही म्हणजे शून्य. ब्रह्म 'काही नाही' असे नाही. ते निर्विशेषपणे आहे. ते शून्याचे प्रकाशक आहे. 'ते मी आहे' अशा अनुभवाला शुद्धज्ञान म्हणतात. त्या अद्वैतानुभवरूप सहज स्थितीमध्ये निरपेक्ष समाधान झाले. (सहज स्थिती-मूळचे स्वरूप) ॥३९॥

अद्वैतनिरूपण होतां । निमाली द्वैताची वार्ता । ज्ञानचर्चा बोलो जातां । जागृती आली ।।४०।।

श्रीगुरूंनी अद्वैताचा बोध करून दिल्यावर द्वैत समूळ पुसले गेले. या वेदान्ताच्या उपदेशानंतर त्याला अविद्यानिद्रेतून जाग आली. ॥४०॥

श्रोता व्हावें सावधान । अर्थीं घालावें मन । खुणे पावतां समाधान । अंतरीं कळे ।।४१।।

या प्रासंगिक कथेतून श्रोत्याने बोध घ्यावा व तिच्या हेतूकडे लक्ष द्यावे. खूण किंवा वर्म समजणे हा तो हेतू असून ते कळताच झालेले समाधान ज्याचे त्याला मिळते. ॥४१॥

तेणें जितुकें ज्ञान कथिलें । तितुकें स्वप्नावारीं गेलें । अनुर्वाच्य सुख उरलें । शब्दातीत ।।४२।।

श्रीगुरूंनी जेवढे ज्ञान शब्दाने सांगितले ते स्वप्नाबरोबर नाहीसे झाले. उरले ते फक्त शब्दापलीकडील अनिर्वाच्य सुख! ॥४२॥

तेथें शब्देंविण ऐक्यता । अनुभव ना अनुभविता । ऐसा निवांत तो मागुता । जागृती आला ।।४३।।

शब्दांच्या मदतीवाचून असलेला अद्वैताचा बोध राहिला. त्यांत अनुभव घेणारा व अनुभव मावळून गेल्यावर अगदी अलगदपणे त्याला ज्ञानरूप जाग आली. ॥४३॥

तेणें स्वप्नीं स्वप्न देखिला । जागा होऊनि जागृती आला । तेथें शब्द कुंठित जाला । अंत नलगे ।।४४।।

असे स्वप्नात स्वप्न पाहिल्यावर तो जागा झाला. शब्दाचे काम संपून अन्तपार नसलेल्या ब्रह्मसुखात तो बुडून गेला. ॥४४॥

या निरूपणाचें मूळ । केलेंचि करूं प्रांजळ । तेणें अंतरीं निवळ । समाधान कळे ।।४५।।

या प्रासंगिक कथेचा हेतू उघड असला तरी तो अधिक स्पष्ट होईल असा पुन्हा सांगतो. त्यामुळे श्रोत्याच्या पदरात पूर्ण समाधानाचे माप पूर्णपणे पडेल. ॥४५॥

तव शिष्यें विनविलें । जी हें आतां निरोपिलें । तें पाहिजे बोलिलें । मागुतें स्वामी ।।४६।।

त्यावर शिष्यही म्हणाला की आतापर्यन्त जे कथारूपाने सांगितले ते अधिक स्पष्ट करून सांगावे. पुन्हा सांगावे. ॥४६॥

मज कळाया कारण । केलेंचि करावें निरूपण । येथील जे कां निजखूण । ते मज अनुभवावी ।।४७।।

मला स्पष्टपणे आकलन होण्यासाठी जे सांगितले तेच पुन्हा सांगावे. त्यातील गूढ वर्म उकलून दाखवावे. ॥४७॥

अजन्मा तो सांग कवण । तेणें देखिला कैसा स्वप्न । तेथें कैसें निरूपण । बोलिलें आहे ।।४८।।

हा तत्त्वत: जन्माला न येणारा कोण? (ओवी ३६) त्याला पडलेल्या स्वप्नाचे स्वरूप काय? त्या स्वप्नांत उपदेश कसा व काय झाला? ॥४८॥

जाणोनी शिष्याचा आदर । स्वामी देती प्रत्योत्तर । तेंचि आतां अति तत्पर । श्रोतीं येथें परिसावें ।।४९।।

शिष्याची प्रामाणिक उत्कंठा पाहून स्वामींनी उत्तर देण्यास सुरुवात केली. श्रोत्यांनी ते आता अत्यंत सावध होऊन ऐकावे. ॥४९॥

ऐक शिष्या सावधान । अजन्मा तो तूंच जाण । तुवां देखिला स्वप्नीं स्वप्न । तोहि आतां सांगतों ।।५०।।

हे शिष्या, तूच तो आत्मा आहेस! तू स्वप्नात स्वप्न कसे पाहिलेस ते आता सांगतो. ॥५०॥

स्वप्नीं स्वप्नाचा विचार । तो तूं जाण हा संसार । येथें तुवां सारासार । विचार केला ।।५१।।

दृश्य जडचेतनात्मक जगत् हे ईश्वराचे स्वप्न आहे. त्यात असलेला तू एक चेतन जीव आहेस. त्या स्वप्नात तू या संसाराचे स्वप्न पाहिलेस व सारासार विचार केलास. ॥५१॥

रिघोनी सद्‌गुरूस शरण । काढून शुद्ध निरूपण । याची करिसी ऊणखूण । प्रत्यक्ष आतां ।।५२।।

श्रीगुरूंना शरण जाऊन त्यांचेकडून शुद्ध वेदांताचा बारीकसारीक तपशील समजावून घेतलास. आता माझ्यासमोर बसून त्याविषयीच अधिक स्पष्टीकरण मागत आहेस. ॥५२॥

याचाचि घेतां अनुभव । बोलणें तितुकें होतें वाव । निवांत विश्रांतीचा ठाव । ते तूं जाण जागृती ।।५३।।

या बोलण्याचे रहस्य जाणून घेतलेस की सर्व शब्दज्ञान निरर्थक होते. अविद्या निवृत्त होऊन विद्येने ज्ञानरूप जागृती आल्यावर ती जागृतीच शान्त समाधानाची आहे. ॥५३॥

ज्ञानगोष्टीचा गल्बला । सरोन अर्थ प्रगटला । याचा विचार घेतां आला । अंतरीं अनुभव ।।५४।।

शब्दज्ञानाचा बडेजाव संपून त्याचा अर्थ कळला. त्याचे अनुसंधान ठेवल्यावर तुला पुन्हा जाग आली. ॥५४॥

तुज वाटे हे जागृती । मज जाली अनुभवप्राप्ती । या नांव केवळ भ्रांती । फिटलीच नाहीं ।।५५।।

तुला असे वाटले की तू जागा झालास व ब्रह्मानुभव घेतलास. पण हे वाटणे भ्रम दूर न झाल्याचे लक्षण आहे! ॥५५॥

अनुभव अनुभवीं विराला । अनुभवेंविण अनुभव आला । हाहि स्वप्नीचा चेईला । नाहींस बापा ।।५६।।

तथाकथित अनुभव अनुभवरूप झाला. ('ठायीच मुराला अनुभव'– ज्ञाने. हरिपाठ.) 'अनुभव आला' या अन्त:करणवृत्तीचा मागमूस नसलेला अनुभव आला! असे म्हणणे सुद्धा स्वप्नातून जाग न आल्याचेच लक्षण आहे!! ॥५६॥

जागा जालियां स्वप्नउर्मीं । स्वप्नीं म्हणसी अजन्मा तो मी । जागेपणें स्वप्नउर्मीं । गेलीच नाहीं ।।५७।।

स्वप्नातून जाग आल्यावर जर 'तो न जन्मणारा जीव मी आहे' अशी वृत्ती शिल्लक असेल तर स्वप्नातून जाग आलेलीच नाही असे समज. ॥५७॥

स्वप्नीं वाटे जागेपण । तैसी अनुभवाची खूण । आली परी तें सत्य स्वप्न । भ्रमरूप ।।५८।।

स्वप्न पहाणाराला आपण जागे आहोत असे वाटते, त्याप्रमाणे 'मला अनुभव आला' असे अज्ञानातच वाटते! पण ते भ्रमरूप स्वप्नच असते हे पक्के समजावे. ॥५८॥

जागृती या पैलिकडे । तें सांगणें केवि घडे । जेथें धारणाचि मोडे । विवेकाची ।।५९।।

ज्ञानरूप जागृती या वृत्तिज्ञानाच्या पलीकडे असून ती अनिर्वाच्य आहे. कारण त्या अवस्थेत 'मी जीव नसून ब्रह्म आहे' असे विवेकाचे अनुसंधान पुसून जाते. ॥५९॥

म्हणोनि तें समाधान । बोलतांचि न ये ऐसें जाण । निशब्दाची ऐसी खूण । वोळखावी ।।६०।।

म्हणून त्या समाधानाविषयी काही बोलता न येणे हेच त्याविषयीचे बोलणे आहे. शब्दरहित वा शब्दापलीकडील अनुभवाचे वर्म असे जाणून घ्यावे. ॥६०॥

ऐसें आहे समाधान । बोलतांच न ये जाण । इतुकेन बाणली खूण । निशब्दाची ।।६१।।

असे हे समाधान शब्दाने न सांगण्यासारखे आहे. यावरून शब्दातीत ब्रह्मानुभवाचे वर्म हाती येईल. ॥६१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अनिर्वाच्यनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'अनिर्वाच्य' नावाचा दहावा समास समाप्त

दशक सातवा : चौदाब्रह्मांचा (चतुर्दश ब्रह्म)

समास पहिला : मंगलाचरण

॥ श्रीराम समर्थ ॥

(नव्या ग्रंथाला सुरुवात केल्यासारखे या दशकारंभी मंगलाचरण केले आहे. त्यामुळे समर्थांना सांगावयाचे तत्त्वज्ञान सहा दशकांत सांगून झाले, असे काही जाणकारांचे मत आहे. तत्त्वज्ञानाच्या व्याप्तीचे दृष्टीने ते खरेही आहे. कारण पुढील सर्व दशकांत वेगळ्या शब्दात जवळजवळ तोच विषय मांडला आहे. अर्थात समर्थांचे राजकारण मात्र यापुढे साक्षेपाने सांगितले गेले आहे. शिवाय वेळोवेळी सांगितलेले समास पुढे श्री दासबोध या नावाने एकत्र करून त्यात गरजेनुसार बरीच भर घालून शिवथर घळीत लिहिले गेले असे मानले तर काही संपादनाच्या त्रुटी राहून जाणे शक्य आहे.)

विद्यावंताचां पूर्वजु । मत्ताननु येकद्विजु । त्रिनयेन चतुर्भुजु । फरशपाणी ।।१।।

श्री गजानन हा ज्ञानीजनांत पहिला असून त्याला गजानन, त्रिनेत्र, चतुर्भुज व परशुपाणि अशी विशेषणे आहेत. ॥१॥

कुबेरापासूनि अर्थ । वेदापासून परमार्थ । लक्ष्मीपासून समर्थ । भाग्यासि आले ।।२।।

कुबेर संपत्तीचे, वेद परमार्थाचे व लक्ष्मी हे भाग्य व सामर्थ्याचे मूळ आहे. ॥२॥

तैसी मंगळमूर्ती अद्या । पासूनि जाल्या सकळ विद्या । तेणें कवी लाघव गद्या । सत्पात्रें जाले ।।३।।

त्याप्रमाणे सर्व विद्यांचे श्री गजानन हे मूळ आहे. त्याचे कृपेने लेखक काव्य व गद्यरचनेसाठी योग्य झाले. ॥३॥

जैसी समर्थाचीं लेकुरें । नाना आळंकारीं सुंदरें । मूळ पुरुषाचेनि द्वारें । तैसे कवी ।।४।।

समर्थ श्रीमंतांची मुले अनेक दागिन्यांनी व सुंदर वस्त्रांनी शोभतात. ती त्यांना मुख्य कर्त्या पुरुषाने दिलेली असतात. कवींनाही त्यांच्या रचनांसाठी आवश्यक ते सर्वज्ञान गजाननाकडून लाभते. ॥४॥

नमूं ऐसिया गणेंद्रा । विद्याप्रकाशें पूर्णचंद्रा । जयाचेनि बोधसमुद्रा । भरितें दाटे बळें ।।५।।

पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशाप्रमाणे गजाननाचा ज्ञानप्रकाश पूर्ण आहे. चंद्रामुळे जशी समुद्राला भरती येते त्याप्रमाणे गजाननामुळे सर्वांच्या ज्ञानाला जणू भरती येते. अशा गजाननाला वंदन करू. ॥५॥

जो कर्तुत्वास आरंभ । मूळपुरुष मुळारंभ । जो परात्पर स्वयंभ । आदिअंतीं ।।६।।

श्री गजानन ईश्वररूपाने जगदुत्पत्तीच्या कार्याला सुरुवात करतो. मूळ माया त्याच्या रूपाने गुणमाया होते. तो शुद्ध सत्त्वगुणी ईश्वर या सृष्टीचा मूळ पुरुष होय. तोच ब्रह्मरूपाने सूक्ष्माहून सूक्ष्म असून जगताच्या पूर्वी व नंतर तो सत्यरूपाने असतो. ॥६॥

तयापासून प्रमदा । इछा कुमारी शारदा । आदित्यापासून गोदा । मृगजळ वाहे ।।७।।

इच्छा किंवा स्फुरण हे जिचे स्वरूप आहे अशी शारदा गजाननापासून उत्पन्न झाली. गो म्हणजे आकाश. त्या आकाशाने जणू दिलेल्या सूर्यामुळे मृगजळाचा भास होतो. तशी शारदा भासमय किंवा कल्पित आहे. ॥७॥

जे मिथ्या म्हणतांच गोवी । माईकपणें लाघवी । वक्तयास वेढा लावी । वेगळेपणें ।।८।।

शारदेला मिथ्या किंवा मायिक म्हटले तरी ती आपल्या सामर्थ्याने वक्त्याला ब्रह्मवस्तूपासून भिन्न केल्याशिवाय बोलू देत नाही. त्याला द्वैतात अडकवून टाकते. ॥८॥

जे द्वैताची जननी । किं ते अद्वैताची खाणी । मूळमाया गवसणी । अनंत ब्रह्मांडांची ।।९।।

शारदेमुळे द्वैताचा अनुभव येतो. पण वेदान्तशास्त्र हे तिचेच स्वरूप असल्याने त्या शास्त्राने अद्वैताचाही अनुभव येतो. ती मूळमाया शारदा अनंत ब्रह्मांडात व्यापून आहे. ॥९॥

किं ते अवदंबरी वल्ली । अनंत ब्रह्मांडीं लगडली । मूळपुरुषाची माउली । दुहितारूपें ।।१०।।

शारदा ही जणू औदुंबराची फांदी आहे व तिला अनंत ब्रह्मांडांची फळे लगडली आहेत. ती ईश्वराला जन्माला घालते म्हणून त्याची आई असून परब्रह्माच्या स्फुरणातून प्रगटते म्हणून त्याची कन्याही आहे. ॥१०॥

वंदूं ऐसी वेदमाता । आदिपुरुषाची जे सत्ता । आतां आठवीन समर्था । सद्‌गुरूसी ।।११।।

अशा या वेदांच्या जननीला वंदन करू. आदिपुरुषाची क्रियाशक्ती ती आहे. आता समर्थ श्रीगुरूंचे स्मरण करू. ॥११॥

जयाचेनि कृपादृष्टी । होये आनंदाची वृष्टी । तेणें सुखें सर्व सृष्टी । आनंदमये ।।१२।।

त्यांची कृपा झाली असता आनंदाचा वर्षाव होऊन सर्व सृष्टी आत्मसुखमय म्हणजे आनंदमय असल्याचा अनुभव येतो. ॥१२॥

किं तो आनंदाचा जनक । सायोज्यमुक्तीचा नायेक । कैवल्यपददायक । अनाथबंधु ।।१३।।

मूळचे स्वरूप विसरल्याने अनाथ झालेल्यांचे श्रीगुरू हे हितकर्ते असतात. ते आनंदाचा जणू उगम असून सायुज्यमुक्तीचे पती व शिष्यांना कैवल्यपदाचे दाते असतात. ॥१३॥

मुमुक्ष चातकीं सुस्वर । करुणा पाहिजे अंबर । वोळे कृपेचा जळधर । साधकांवरी ।।१४।।

मुमुक्षुरूप चातकांनी करुणायुक्त स्वरांनी आळवणी करीत आकाशाकडे डोळे लावून बसले तर श्रीगुरुकृपारूप ढग त्या साधकावर वर्षाव करतो. ॥१४॥

किं तें भवार्णवींचें तारूं । बोधें पाववी पैलपारु । माहां आवर्ती आधारु । भाविकांसी ।।१५।।

संसाररूप समुद्र तरून जाण्यासाठी श्रीगुरू हे नौका असून त्यांत बसलेल्यांना आत्मस्वरूपाच्या प्राप्तीसाठी आवश्यक तो बोध करून पैलतीरावर नेतात. संसार सागरावरील कितीही प्रचंड वादळात ते भाविकांना आधार होत. ॥१५॥

किं तो काळाचा नियंता । नांतरी संकटीं सोडविता । किं ते भाविकांची माता । परम स्नेहाळु ।।१६।।

अत्यंत स्नेहाळू असलेले श्रीगुरू काळाचे स्वामी असून भाविकांची आई होऊन त्यांना नाना संकाटातून सोडवितात. जन्ममरणाचे चक्र व द्वंद्वमय जीवन हीच खरी संकटे. ॥१६॥

किं जो परत्रींचा आधार । किं ते विश्रांतीची थार । नांतरी सुखाचें माहेर । सुखस्वरूप ।।१७।।

आत्मलोकाच्या प्राप्तीसाठी त्यांची मदत अनिवार्य असून तापत्रयाने पोळलेल्यांच्या विश्रांतीचे ते ठिकाण आहेत. सुखरूप असलेले ते सुखाचे माहेरघर आहेत. ॥१७॥

ऐसा सद्‌गुरू पूर्णपणी । तुटे भेदाची कडसणी । देहविण लोटांगणी । तया प्रभूसी ।।१८।।

अशा सद्‌गुरूंची पूर्ण कृपा झाल्यावर भेददृष्टी मावळते. तिन्ही देहांचा निरास करून त्या स्वामींना मी आता लोटांगण घालतो. त्यांच्याशी ऐक्य अनुभवतो. ॥१८॥

साधु संत आणी सज्जन । वंदूनियां श्रोतेजन । आतां कथानुसंधान । सावध ऐका ।।१९।।

साधू, संत, सज्जन व श्रोते यांना वंदन करून आता जी कथा मी सांगेन तिकडे अनुसंधान ठेवा. सावध व्हा. ॥१९॥

संसार हाचि दीर्घ स्वप्न । लोभें वोसणाती जन । माझी कांता माझें धन । कन्या पुत्र माझे ।।२०।।

संसार हे एक जीव पाहत असलेले प्रदीर्घ स्वप्न आहे. (येथे द. ६ स. १० चे पूर्वसूत्र धरलेले दिसते.) ते पाहत

असता 'माझी पत्नी, माझी संपत्ती, माझी मुले' इत्यादी प्रकारे ते बरळू लागतात. ॥२०॥

ज्ञानसूर्य मावळला । तेणें प्रकाश लोपला । अंधकारें पूर्ण जाला । ब्रह्मगोळ आवघा ।।२१।।

ज्ञानसूर्याचा अस्त झाल्याने ज्ञानप्रकाश नाहीसा होऊन अज्ञानाच्या अंधाराने सर्व ब्रह्मांडे जणू भरून गेली. ॥२१॥

नाहीं सत्वाचें चांदिणें । कांही मार्ग दिसे जेणें । सर्व भ्रांतीचेनि गुणें । आपेंआप न दिसे ।।२२।।

सत्त्वगुणाचा चंद्रप्रकाश असला तर थोडा तरी मार्ग दिसतो. पण रजतमाच्या भ्रमामध्ये सहजच काही दिसत नाही. ॥२२॥

देहबुद्धिअंहकारें । निजेले घोरती घोरें । दु:खें आक्रंदती थोरें । विषयसुखाकारणें ।।२३।।

देहबुद्धी व अहंकाराची झोप लागल्याने घोरू लागतात. विषयसुख न मिळून दु:ख मिळाल्याने मोठ्याने ओरडू लागतात. ॥२३॥

निजेले असतां च मेले । पुन्हा उपजतां च निजेले । ऐसे आले आणी गेले । बहुत लोक ।।२४।।

या मोहनिद्रेत असतानाच कित्येक जीव मरून पुन्हा जन्माला येऊन पुन्हा झोपले! असे कोट्यवधी जीव कोट्यवधी वेळा आले व गेले. ॥ २४ ॥

निदसुरेपणें चि सैरा । बहुतीं केल्या येरझारा । नेणोनियां परमेश्वरा । भोगिले कष्ट ।।२५।।

अशा झोपाळूपणातच कित्येकांनी सैरटाप्रमाणे अगणित घिरट्या घातल्या. केवळ परमेश्वराला न ओळखल्याने त्यांना एवढे कष्ट करावे लागले. ॥२५॥

तया कष्टाचें निर्शन । व्हावया पाहिजे आत्मज्ञान । म्हणोनि हें निरुपण । अध्यात्मग्रंथ ।।२६।।

असे कष्ट नको असतील तर जीवाने परमेश्वर जाणला पाहिजे. म्हणजे आत्मज्ञान झाले पाहिजे. म्हणून या अध्यात्मशास्त्राच्या ग्रंथात ते ज्ञान सांगितले जात आहे. ॥२६॥

सकळ विद्येमध्यें सार । अध्यात्मविद्येचा विचार । दशमोध्याईं सारंगधर । भगवद्गीतेसि बोलिला ।।२७।।

जगातील सर्व विद्यांमध्ये अध्यात्मविद्या सर्वश्रेष्ठ आहे असे भगवद्गीतेच्या दहाव्या अध्यायात प्रत्यक्ष श्रीकृष्णाने सांगितले आहे. ॥२७॥

श्लोक

।। अध्यात्मविद्या विद्यानां वाद: प्रवदतामहम् ।।छ।।

याकारणें अद्वैतग्रंथ । अध्यात्मविद्येचा परमार्थ । पाहावया तोचि समर्थ । जो सर्वांगें श्रोता ।।२८।।

म्हणून जो सर्व ज्ञानेंद्रियांचे कान करून श्रवण करतो तोच अद्वैत सांगणाऱ्या ग्रंथातील मोक्षदायक अध्यात्मविद्या उत्तम रीतीने समजावून घेऊ शकतो. ॥२८॥

जयाचें चंचल हृदये । तेणें ग्रंथ सोडूं चि नये । सोडितां अलभ्य होये । अर्थ येथीचा ।।२९।।

ज्याचे मन चंचल आहे त्याने तर ग्रंथाचे अनुसंधान कधीच सोडू नये. कारण अनुसंधान सुटले तर त्यातील वर्मे कधीच कळणार नाहीत. ॥२९॥

जयास जोडला परमार्थ । तेणें पाहावा हा ग्रंथ । अर्थ शोधितां परमार्थ । निश्चयें बाणे ।।३०।।

ज्याला मोक्ष (परमार्थ) हवा आहे त्याने ग्रंथाचे अध्ययन करावे. त्यातील तात्पर्याची वर्मे लक्षात येताच हळूहळू मोक्षस्थिती बाणत जाते. ॥३०॥

जयासि नाहीं परमार्थ । तयासि न कळे येथीचा अर्थ । नेत्रेंविण निधानस्वार्थ । अंधास कळेना ।।३१।।

ज्याला मुमुक्षुत्व नाही त्याला या ग्रंथातील ज्ञान भांडार कळणार नाही. त्यातील शास्त्राची सूक्ष्मता लक्षात येणार

नाही. जमिनीत पुरलेले धन आंधळ्याला दिसत नाही. ॥३१॥

येक म्हणती मऱ्हाटें काये । हें तों भल्यांसि ऐकों नये । तीं मूर्खें नेणती सोये । अर्थान्वयाची ।।३२।।

कोणी असे म्हणतात की मराठी भाषेत केलेल्या ग्रंथरचनेने मोक्ष कसा मिळणार? शहाण्याने असले बोलणे ऐकताच कानात बोटे घालावीत. सामान्य माणसाला वेदान्तशास्त्र जाणण्याची त्याने किती सोय होते ते त्या मूर्खांना कळत नाही. ॥३२॥

लोहाची मांदुस केली । नाना रत्नें साठविलीं । ते अभाग्यानें त्यागिली । लोखंड म्हणौनी ।।३३।।

लोखंडाच्या पेटीत जर मौल्यवान रत्ने ठेविली असतील तर लोखंडाची पेटी म्हणून तिचा त्याग करणारा रत्ने गमावल्यामुळे अभागी ठरतो. ॥३३॥

तैसी भाषा प्राकृत । अर्थ वेदांत आणि सिद्धांत । नेणोनि त्यागी भ्रांत । मंदबुद्धिस्तव ।।३४।।

याप्रमाणे भाषा मराठी असली तरी तिने सांगितलेले वेदान्त शास्त्राचे सिद्धांत मौल्यवान आहेत. हे लक्षात न घेता मंदबुद्धीचा माणूस त्यांचा त्याग करतो. ॥३४॥

आहाच सांपडतां धन । त्याग करणें मूर्खपण । द्रव्य घ्यावें सांठवण । पाहोंचि नये ।।३५।।

कष्ट न करता सहजासहजी मिळालेली संपत्ती न घेणे हा मूर्खपणा आहे. द्रव्याच्या भांड्याचा विचार न करता द्रव्य घ्यावे. ॥३५॥

परिस देखिला आंगणीं । मार्गीं पडिला चिंतामणी । आव्हावेल माहां गुणी । कूपांमधें ।।३६।।

अंगणात सापडलेला परीस, वाटेवर दिसलेला चिंतामणी व कोरड्या विहिरीत पडलेला उजव्या मुखाचा प्रभावी वेल अवश्य उचलून घ्यावा. ॥३६॥

तैसें प्राकृतीं अद्वैत । सुगम आणी सप्रचित । अध्यात्म लाभे अकस्मात । तरी अवश्य घ्यावें ।।३७।।

त्याप्रमाणे मराठी भाषेत लिहिलेले अद्वैत तत्त्वज्ञान कोणालाही सहज कळते. शिवाय ते अनुभव घेऊन लिहिले असेल तर अध्यात्मशास्त्र सुलभतेने हाती लागते. त्याचा अभ्यास करावा. ॥३७॥

न करितां वित्पत्तीचा श्रम । सकळ शास्त्रार्थ होये सुगम । सत्समागमाचें वर्म । तें हें ऐसें असे ।।३८।।

न्याय, व्याकरण व संस्कृत शिकण्याचे श्रम न करता सर्व वेदान्त शास्त्राचा सखोल अर्थ हातात आणून देण्याचे काम संतांच्या सहवासात सुलभतेने होते. वर्म सापडते. ॥३८॥

जें वित्पत्तीनें न कळे । तें सत्समागमें कळे । सकळ शास्त्रार्थ आकळे । स्वानुभवासी ।।३९।।

जे न्यायादी अभ्यासाने समजत नाही ते संत सहवासात कळते. सर्व शास्त्रार्थाचा प्रत्यक्ष अनुभव येतो. ॥३९॥

म्हणौनि कारण सत्समागम । तेथें नलगे वित्पत्तीश्रम । जन्मसार्थकाचें वर्म । वेगळेंचि आहे ।।४०।।

म्हणून न्यायादी अभ्यासाचे कष्ट न घेता संतांच्या सहवासात जन्माचे सार्थक होण्यासाठी आवश्यक ते वर्म हाती लागते. हे वर्म हा सहवास यांचे महत्त्व काही वेगळेच आहे. ॥४०॥

श्लोक– भाषाभेदाश्च वर्तन्ते ह्यर्थ एको न संशयः । पात्रद्वये यथा खाद्यं स्वादभेदो न विद्यते ।।१।।

श्लोकार्थ– भाषेत फरक असला तरी जे सांगावयाचे ते एकच असते. एक खाद्य पदार्थ दोन भांड्यांत वाटून ठेवला तरी त्याची चव बदलत नाही.

भाषापालटें कांहीं । अर्थ वायां जात नाहीं । कार्यसिद्धि ते सर्वहि । अर्थाचपासीं ।।४१।।

भाषा बदलली म्हणून असलेला अर्थ फुकट जात नाही! जो उपयोग व्हावयाचा तो अर्थामुळेच होतो. ॥४१॥

तथापी प्राकृताकरितां । संस्कृताची सार्थकता । येऱ्हवीं त्या गुप्तार्था । कोण जाणे ।।४२।।

उलट मराठी भाषेत वेदान्तशास्त्र आल्याने संस्कृत भाषेतील शास्त्राचे सार्थक झाले! नाहीतर संस्कृत न समजल्याने ते शास्त्र कोणाला कळले असते? ॥४२॥

आतां असो हें बोलणें । भाषा त्यागूनि अर्थ घेणें । उत्तम घेऊन त्याग करणें । सालीटरफलांचा ।।४३।।

आता जे सांगावयाचे ते पुरेसे सांगून झाले. भाषेला भलते महत्त्व न देता त्यातील अर्थ घ्यावा. गाभा काढून घेऊन साली व टरफले टाकून द्यावीत. ॥४३॥

अर्थ सार भाषा पोचट । अभिमानें करावी खटपट । नाना अहंतेनें वाट । रुधिली मोक्षाची ।।४४।।

भाषा फोलकटाप्रमाणे असून अर्थ आतील सार आहे. केवळ भाषेच्या अभिमानामुळे अनावश्यक कष्ट पडतात व मोक्षाची वाट आडवली जाते. ॥४४॥

शोध घेतां लक्ष्यांशाचा । तेथें आधीं वाच्यांश कैंचा । अगाध महिमा भगवंताचा । कळला पाहिजे ।।४५।।

लक्ष्यांशाच्या (ब्रह्म) अनुसंधानात रहाणाऱ्याचा वाच्याशांशी (शब्द) संबंधच काय? भगवंताचे व्यापकत्व व महात्म्य लक्षात घेतले पाहिजे. (लक्ष्यात वाच्य हारवते.) ॥४५॥

मुकेपणाचें बोलणें । हें जयाचें तोचि जाणे । स्वानुभवाचिये खुणे । स्वानुभवी पाहिजे ।।४६।।

ब्रह्मज्ञान हा विषयच जणू मौनाने बोलण्याचा आहे! हे वर्म ब्रह्मज्ञच जाणतो. स्वानुभवाचे बोलणे दुसरा स्वानुभवी जाणतो. ('जे शब्देविण संवादिजे'- ज्ञाने.) ॥४६॥

अर्थ जाणे अध्यात्माचा । ऐसा श्रोता मिळेल कैंचा । जयासि बोलतां वाचेचा । हव्यासचि पुरे ।।४७।।

अध्यात्मशास्त्राची सर्व वर्मे जाणणारा श्रोता असा असावा की ते सांगता सांगता वक्त्याला पूर्ण समाधान लाभावे. पण असा श्रोता फार दुर्मिळ असतो. ॥४७॥

परीक्षवंतांपुढें रत्न । ठेवितां होये समाधान । तैसें ज्ञानियांपुढें ज्ञान । बोलावें वाटे ।।४८।।

रत्नपारख्यासमोर रत्न ठेवले तरच त्याचे योग्य मूल्यमापन होते. त्याप्रमाणे ज्ञानी श्रोत्यासमोर बोलण्यात फार मोठे समाधान असते. ॥४८॥

मायाजाळें दुश्चीत होये । तें निरूपणीं कामा न ये । संसारिकां कळे काये । अर्थ येथीचा ।।४९।।

मायेच्या प्रभावामुळे श्रोता दुश्चित असेल तर ते चित्त वक्त्याचे सांगणे स्वीकारीत नाही. मी व माझे या भ्रमाने मोहित झालेल्या प्रपंचासक्ताला त्यांतील वर्मे कशी कळणार? ॥४९॥

श्लोक– व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन । बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ।।१।।

श्लोकार्थ– हे अर्जुना, या मोक्षमार्गात निश्चयात्मक बुद्धी एकविध असते. निश्चय न झालेल्यांची बुद्धी वृक्षाच्या अनेक शाखांप्रमाणे अनेकविध असते. (गीता २-४१)

वेवसांई जो मळिण । त्यासि न कळे निरूपण । येथें पाहिजे सावधपण । अतिशयेंसीं ।।५०।।

ज्याच्या बुद्धीचा निश्चय कामादिकांनी डागाळलेला आहे त्याला सूक्ष्म निरूपण समजत नाही. या विषयात श्रोता अत्यंत सावध व एकचित्त असावा लागतो. ॥५०॥

नाना रत्नें नाना नाणीं । दुश्चीतपणें घेतां हानी । परीक्षा नेणतां प्राणी । ठकला तेथें ।।५१।।

रत्ने व नाणी ह्यांची परीक्षा न करता जर ती घेतली तर घेणारा फसतो व त्याचे नुकसान होते. त्यांची लक्ष देऊन परीक्षा केलीच पाहिजे. ॥५१॥

तैसें निरूपणीं जाणा । आहाच पाहातां कळेना । मऱ्हाटेंचि उमजेना । कांहीं केल्यां ।।५२।।

त्याप्रमाणे आध्यात्मिक प्रवचनात केवळ बसायचे म्हणून बसले तर मराठी भाषा असली तरी काही कळणार नाही. ।।५२।।

जेथें निरूपणाचे बोल । आणि अनुभवाची वोल । तें संस्कृतापरीस खोल । अध्यात्मश्रवण ।।५३।।

जेथे शास्त्रशुद्ध वेदान्ताला अनुभवाची बैठक असते ते निरूपण केवळ संस्कृतातील निरूपणापेक्षा अधिक परिणामकारक असते. तेच खरे अध्यात्मश्रवण होय. ।।५३।।

मायाब्रह्म वोळखावें । तयास अध्यात्म म्हणावें । तरी तें मायेचें जाणावें । स्वरूप आधीं ।।५४।।

ज्यांत माया व ब्रह्म यांच्या स्वरूपाचे सुस्पष्ट विवेचन केले जाते तेच खरे अध्यात्मश्रवण असते. त्यांतही मायेचा विचार प्रथम करावा. ।।५४।।

माया सगुण साकार । माया सर्वस्व विकार । माया जाणिजे विस्तार । पंचभूतांचा ।।५५।।

मायेमध्ये सत्त्वादी तीन गुणांची अभिव्यक्ती असून ती नाना नामांनी व रूपांनी साकार असते. अस्ति, जायते इ. पाचही विकारांचा खेळ मायेत चालतो. पृथ्व्यादी पाच महाभूतांच्या पंचीकरणाचा मायेमध्ये विस्तार झालेला दिसतो. ।।५५।।

माया दृश्य दृष्टी दिसे । माया भास मनासि भासे । माया क्षणभंगुर नासे । विवेक पाहातां ।।५६।।

डोळ्यांनी मायेचे दृश्य दिसते, मनाला तिची जाणीव होते, पण विवेकदृष्टीने पाहिले तर ती क्षणभंगुर व विनाशी असते. ।।५६।।

माया अनेक विश्वरूप । माया विष्णूचें स्वरूप । मायेची सीमा अमूप । बोलिजे तितुकी ।।५७।।

अनंत विश्वांच्या व प्रत्यक्ष विष्णूच्या रूपाने मायाच असते. मायेचा विस्तार अफाट असून तो सांगावा तेवढा थोडाच! ।।५७।।

माया बहुरूपी बहुरंग । माया ईश्वराचा संग । माया पाहातां अभंग । अखिळ वाटे ।।५८।।

मायेला नाना रूपे व रंग असून तिच्या संगाने ब्रह्माला ईश्वरत्व येते. अज्ञानी जनांना ती दुस्तर व अनिवार आहे. ।।५८।।

माया सृष्टीची रचना । माया आपुली कल्पना । माया तोडितां तुटेना । ज्ञानेंविण ।।५९।।

सृष्टीची रचना मायामय असून जीवाने केलेली प्रत्येक कल्पना हे तिचेच रूप होय. ब्रह्मज्ञानाशिवाय तिचा बाध होत नाही. ।।५९।।

ऐसी माया निरोपिली । स्वल्प संकेतें बोलिली । पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ।।६०।।

असे हे मायेचे स्वरूप अगदी थोडक्यात सांगितले. पुढील निरूपणासाठी आता श्रोत्यांनी सावध असावे. ।।६०।।

पुढें ब्रह्मनिरोपण । निरोपिलें ब्रह्मज्ञान । जेणें तुटे मायाभान । येकसरें ।।६१।।

पुढील समासात ब्रह्मज्ञान सांगण्यासाठी ब्रह्मनिरूपण केले असून त्याच्या यथार्थ श्रवणाने मायेची एकाएकी निवृत्ती होईल. मायेचा बाध होईल. ।।६१।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मंगलाचरणनाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'मंगलाचरण' नावाचा पहिला समास समाप्त

दशक सातवा : चौदा ब्रह्मांचा (चतुर्दशब्रह्म)

समास दुसरा : ब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ब्रह्म निर्गुण निराकार । ब्रह्म निःसंग निर्विकार । ब्रह्मासि नाहीं पारावार । बोलती साधु ।।१।।

साधूसंत असे सांगतात की ब्रह्मस्वरूपात सत्त्वादी गुण, आकार व विकारही नसून ते मायेच्या कल्पित रूपादिकांपासून असंग असते. ते निरपेक्ष व्यापक (विभु) असते. ॥१॥

ब्रह्म सर्वांस व्यापक । ब्रह्म अनेकीं येक । ब्रह्म शाश्वत हा विवेक । बोलिला शास्त्रीं ।।२।।

मायेने दाखविलेल्या विविधतेत ते एकच व्यापून राहते, असे ब्रह्म अविनाशी असल्याचे शास्त्रे सांगतात. ॥२॥

ब्रह्म अच्युत अनंत । ब्रह्म सदोदित संत । ब्रह्म कल्पनेरहित । निर्विकल्प ।।३।।

ब्रह्म अढळ, अन्तपार नसलेले, नित्य व सत् असून त्यांत कल्पनेला अवसरच नाही. असे ते निर्विकल्प आहे. ॥३॥

ब्रह्म या दृश्यावेगळें । ब्रह्म सुन्यत्वास निराळें । ब्रह्म इंद्रियांच्या मेळें । चोजवेना ।।४।।

दृश्य जगताचा ब्रह्माला स्पर्शही होत नाही. ते शून्याचेही प्रकाशक असून ज्ञानेंद्रिये व अन्त:करण यांनी अनुभवाला येत नाही. (ते स्वसंवेद्य आहे.) ॥४॥

ब्रह्म दृष्टीस दिसेना । ब्रह्म मूर्खासी असेना । ब्रह्म साधुविण येना । अनुभवासी ।।५।।

ब्रह्म डोळ्यांनी दिसत नसल्याने आध्यात्मिक दृष्ट्या जे मूर्ख असतात त्यांचे दृष्टीने ते नसतेच. संत, श्रीगुरूंच्या उपदेशावाचून त्याचा अनुभव येत नाही. ॥५॥

ब्रह्म सकळांहूनि थोर । ब्रह्मा ऐसें नाहीं सार । ब्रह्म सूक्ष्म अगोचर । ब्रह्मादिकांसी ।।६।।

ब्रह्म सर्वाहून मोठे (महतोमहीयान्) असून सर्व दृश्य प्रपंचाचे ते अधिष्ठान (सार) आहे. ब्रह्म अतिसूक्ष्म असल्याने प्रत्यक्ष ब्रह्मदेवादिकांनाही ते दिसत नाही. ॥६॥

ब्रह्म शब्दीं ऐसें तैसें । बोलिजे त्याहूनि अनारिसें । परी तें श्रवणअभ्यासें । पाविजे ब्रह्म ।।७।।

ब्रह्म असे आहे, तसे आहे असे शब्दांनी कितीही सांगितले, तरी त्याचा अनुभव त्या वर्णनापासून वेगळाच असतो. पण श्रवण, मनन व निदिध्यासनाने त्याचा अनुभव येतो. ॥७॥

ब्रह्मास नामें अनंत । परी तें ब्रह्म नामातीत । ब्रह्मास हेतदृष्टांत । देतां न शोभती ।।८।।

ब्रह्मवस्तूला कैवल्य, साक्षी इ. विशेषणे व सगुण ब्रह्माला रामकृष्णादी अनेक नावे असली तरी ते निर्विशेष व नामातीत आहे. ब्रह्म समजण्यासाठी एखादा दृष्टान्त देता येत नाही. कारण त्यासारखी दुसरी वस्तू नाही. ॥८॥

ब्रह्मासारिखें दुसरें । पाहातां काय आहे खरें । ब्रह्म दृष्टांतउत्तरें । कदा न साहे ।।९।।

विवेक दृष्टीने पाहिले तर ब्रह्मासारखी दुसरी सत्य वस्तू नाही. म्हणून त्याला एकही दृष्टान्त सापडत नाही. ॥९॥

श्लोक ।। यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसा सह ।।छ।।

श्लोकार्थ– जेव्हा आत्मानुभवाची वेळ येते तेव्हा वाणी व मन त्याचा अनुभव न घेताच निवृत्त होतात.

जेथें वाचा निवर्तती । मनासी नाहीं ब्रह्मप्राप्ती । ऐसी बोलिली श्रुती । सिद्धांतवचन ।।१०।।

'जेथे वाणी निवृत्त होते किंवा थांबते व मनाने ब्रह्मानुभव येत नाही' असा श्रुतीचा सिद्धान्त आहे. ।।१०।।

कल्पनारूप मन पाहीं । ब्रह्मी कल्पनाचि नाहीं । म्हणौनि वाक्य कांहीं । अन्यथा नव्हे ।।११।।

कल्पना हेच मनाचे स्वरूप आहे. ब्रह्म 'अमन' (मुंडक) असल्याने तेथे कल्पना नाही हे श्रुतिवाक्य यथार्थ आहे. ।।११।।

आतां मनासि जें अप्राप्त । तें कैसें होईल प्राप्त । ऐसें म्हणाल तरी कृत्य । सद्‌गुरुविण नाहीं ।।१२।।

जे मनाने जाणता येत नाही ते कसे जाणावे असे जर तुम्हाला वाटेल तर त्याचे उत्तर श्रीगुरुकृपेने सापडते. ।।१२।।

भांडारगृहें भरलीं । परी असती आडकिलीं । हातास न येतां किली । सर्व हि अप्राप्त ।।१३।।

कोठीच्या खोल्यांत भरपूर सामान आहे, पण त्यांना जर कुलुपे लाविली असतील तर किल्ल्या मिळेपर्यन्त ते सामान असूनही मिळत नाही. ।।१३।।

तरी ते किली ते कवण । मज करावी निरूपण । ऐसा श्रोता पुसे खूण । वक्तयासी ।।१४।।

तेव्हा श्रोता म्हणतो की ती किल्ली कशी व कोणाकडे असते ते मला तुम्ही समजावून सांगा. ।।१४।।

सद्‌गुरुकृपा तेचि किली । जेणें बुद्धि प्रकाशली । द्वैतकपाटें उघडलीं । येकसरीं ।।१५।।

सद्‌गुरूंची कृपा हीच ती किल्ली असून त्यामुळे बुद्धीत 'मी ब्रह्म आहे' या अनुभवाचा प्रकाश पडतो व द्वैताच्या भ्रमाने भरलेली कपाटे ओस पडतात. ।।१५।।

तेथें सुख असे वाड । नाहीं मनास पवाड । मनेंविण कैवाड । साधनाचा ।।१६।।

त्या अनुभवात अपूर्व व अपार सुख आहे. त्या सुखासाठी विषयसुखाप्रमाणे मनाची गरज नसते. सर्व साधनांचे अन्त:करणनिवृत्ती हे वर्म आहे. ।।१६।।

त्याची मनेंविण प्राप्ती । किं वासनेविण तृप्ती । तेथें न चले वित्पत्ती । कल्पनेची ।।१७।।

साधनकाळी मन निवृत्त होताच आत्मानुभव येतो. सामान्य जीवाची तृप्ती वासनापूर्तीवर अवलंबून आहे. आत्मतृप्ती अशी नाही. सर्व अध्यात्मशास्त्र कृत्रिम असून आत्मानुभवकाळी तेही उरत नाही. (विज्ञातेऽपि परे तत्त्वे शास्त्राधीतिस्तु निष्फला ।।विवे. चूडा) ।।१७।।

तें परेहूनि पर । मनबुद्धीअगोचर । संग सोडितां सत्वर । पाविजेतें ।।१८।।

ब्रह्म परावाणीचे प्रकाशक असून मन व बुद्धीला त्याचा अनुभव येत नाही. वाणी व अन्त:करण यांचा संग सोडताच ते ताबडतोब अनुभवाला येते. ।।१८।।

संग सोडावा आपुला । मग पाहावें तयाला । अनुभवी तो या बोला । सुखावेल गा ।।१९।।

आपुला म्हणजे जीवभावाचा संग सोडून आत्मानुभव घ्यावा. अनुभव घेतलेल्याला या बोलण्याचे रहस्य समजून तो मान डोलावेल. ।।१९।।

आपण म्हणिजे मीपण । मीपण म्हणिजे जीवपण । जीवपण म्हणिजे अज्ञान । संग जडला ।।२०।।

आपण = मीपणा. मीपणा = जीवभाव. जीवभाव = अज्ञान. या अज्ञानाचे आत्म्यावरील आवरण हाच त्याचा संग. ।।२०।।

सोडितां तया संगासी । ऐक्य होये नि:संगासी । कल्पनेविणप्राप्तीसी । अधिकार ऐसा ।।२१।।

हे आवरण निघताच जीव व नि:संग आत्मा यांचे मूळचे असलेले ऐक्य जणू पुन्हा होते. अज्ञानरूप कल्पना सोडताच जीव मोक्षाला पात्र होतो. ।।२१।।

मी कोण ऐसें नेणिजे । तया नाव अज्ञान बोलिजे । अज्ञान गेलियां पाविजे । परब्रह्म तें ।।२२।।

'मी कोण आहे' याचे खरे उत्तर माहीत नसणें हेच अज्ञान. ते उत्तर मिळून अज्ञान गेले की ब्रह्मानुभव येतो. ।।२२।।

देहबुद्धीचें थोरपण । परब्रह्मीं न चले जाण । तेथें होतसे निर्वाण । अहंभावासी ।। २३ ।।

'मी देह आहे' हा अनन्त जन्मात दृढ झालेला निश्चय तसाच आहे तोपर्यन्त 'परब्रह्म मी आहे' हा अनुभव येणे शक्य नाही. कारण त्या अनुभवात अहंवृत्ती शिल्लक राहत नाही. ।।२३।।

उंचनीच नाहीं परी । राया रंका येकिच सरी । जाला पुरुष अथवा नारी । येकचि पद ।। २४ ।।

त्या अनुभवामध्ये लौकिकातील लहान-मोठेपणाला वावच नाही. राजा, भिकारी, पुरुष व स्त्री यांचा अनुभव एकच. ।।२४।।

ब्राह्मणाचें ब्रह्म तें सोंवळें । शूद्राचें ब्रह्म तें वोवळें । ऐसें वेगळें आगळें । तेथें असेचिना ।२५।।

ब्राह्मणासाठी ब्रह्म सोवळे व शूद्रासाठी ते ओवळे असते असे नाही. हा भेदभाव तेथे नाही. ।।२५।।

उंच ब्रह्म तें रायासी । नीच ब्रह्म तें परिवारासी । ऐसा भेद तयापासीं । मुळिंच नाहीं ।। २६ ।।

राजाला उच्चप्रतीच्या व सेवकांना हलक्या प्रतीच्या ब्रह्माचा अनुभव येतो असे नाही. अशी प्रतवारी ब्रह्माला नाही. ।।२६।।

सकळांसि मिळोन ब्रह्म येक । तेथें नाहीं हे अनेक । रंक अथवा ब्रह्मादिक । तेथेंचि जाती ।। २७ ।।

सर्व जडजीव सृष्टीसाठी ब्रह्म एकच आहे. ब्रह्मवस्तूत विविधता नाही. रंक किंवा ब्रह्मदेव हे दोन्ही प्रलयकाली ब्रह्माच्या अव्यक्त मायेत लीन होतात किंवा मोक्षकाळी ब्रह्मरूप होतात. ।।२७।।

स्वर्ग मृत्य आणि पाताळ । तिहीं लोकींचे ज्ञाते सकळ । सकळांसि मिळोन येकचि स्थळ । विश्रांतीचें ।। २८ ।।

स्वर्गादी तिन्ही लोकांमध्ये असलेल्या विवेकी जनांना मोक्षप्राप्तीने मिळणाऱ्या विश्रांतीचे ब्रह्म हेच ठिकाण आहे. ।।२८।।

गुरुशिष्या येकचि पद । तेथें नाहीं भेदाभेद । परी या देहाचा समंध । तोडिला पाहिजे ।। २९ ।।

श्रीगुरू व सत्शिष्य यांनाही एकच ब्रह्मानुभव येतो. पण शिष्याने देहतादात्म्याला झुगारले पाहिजे. गुरू श्रेष्ठ व शिष्य कनिष्ठ म्हणून अनुभवात भेद नाही. ।।२९।।

देहबुद्धीचा अंतीं । सकळांसि येकचि प्राप्ती । येक ब्रह्म द्वितीयं नास्ति । हें श्रुतिवचन ।। ३० ।।

'मी देह' ही बुद्धी संपताच सर्वांना एकच ब्रह्मानुभव येतो. 'ब्रह्म एकमेव अद्वितीय आहे' असे श्रुती सांगते. ।।३०।।

साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले । अवघे मिळोन येकचि जाले । देहातीत वस्तु ।। ३१ ।।

साधूंची शरीरे, स्वभाव, कार्यपद्धती, लौकिक परिस्थिती, कपडे, सामाजिक दर्जा, संप्रदाय इ. भिन्न असले तरी ते सर्व ब्रह्मरूप म्हणजे ब्रह्मच असतात. ते सर्वजण देहातीत वस्तूशी ऐक्य पावलेले असतात. ।।३१।।

ब्रह्म नाहीं नवें जुनें । ब्रह्म नाहीं अदिक उणें । उणें भाविल तें सुणें । देहबुद्धीचें ।। ३२ ।।

ब्रह्म ताजे किंवा शिळे नाही. कमी किंवा अधिक नाही. ज्याला त्यात अशा उणिवा दिसतात तो देहबुद्धी जबर असलेला कुत्राच समजावा! ।।३२।।

देहबुद्धीचा संशयो । करी समाधानाचा क्षयो । चुके समाधानसमयो । देहबुद्धीयोगें ।। ३३ ।।

'मी देह' या निश्चयामुळे अध्यात्मशास्त्राविषयी शंका येतच राहून समाधान होत नाही. मानवी जन्मातच असे समाधान होण्याची संधी असते. ती देहबुद्धीमुळे हुकते. ।।३३।।

देहाचें जें थोरपण । तेंचि देहबुद्धीचें लक्षण । मिथ्या जाणोनि विचक्षण । निंदिती देहो ।। ३४ ।।

देहबुद्धीमुळे देहाला अवास्तव महत्त्व दिले जाते. त्यावर अतिप्रेम जडते. विवेकी लोक देहाचे मिथ्यात्व जाणून तो

तुच्छ समजतात. ॥३४॥

देह पावे जंवरी मरण । तंवरी धरी देहाभिमान । पुन्हा दाखवी पुनरागमन । देहबुद्धि मागुती ।।३५।।

'मी देह' ही बुद्धी देह जिवन्त असेपर्यन्त टिकून मरणानंतर तीच देहबुद्धी पुन्हा पुन्हा जन्ममरणांच्या चक्रात अडकवते. ॥३५॥

देहाचेनि थोरपणें । समाधानासी आलें उणें । देहो पडेल कोण्या गुणें । हें हि कळेना ।।३६।।

देहासक्तीमुळे समाधान बिघडून जाते. आत्मसुखाचे सहज समाधान लाभत नाही. शिवाय देह कोठे, कसा व केव्हा मरण पावेल हेही कळत नाही. अस्वस्थता राहते. ॥३६॥

हित आहे देहातीत । म्हणौनि निरोपिती संत । देहबुद्धीने अन्हित । होंचि लागे ।।३७।।

देहाशी असंगत्वाने असणाऱ्या आत्मलाभातच शाश्वत हित आहे. म्हणूनच देहबुद्धीत सर्व प्रकारे अनहित आहे असे संत सांगतात. ॥३७॥

सामर्थ्यबळें देहबुद्धी । योगियांसि तेहि बाधी । देहबुद्धीची उपाधी । पैसावों लागे ।।३८।।

कुंडलिनी योगामुळे लाभणाऱ्या सिद्धीमुळे योग्यांची देहबुद्धी सामान्य माणसाहून अधिक बळकट होते. 'मी सिद्ध' ही भर पडते. ॥३८॥

म्हणौनि देहबुद्धि हे झडे । तरीच परमार्थ घडे । देहबुद्धीनें विघडे । ऐक्यता ब्रह्मीची ।।३९।।

म्हणून देहबुद्धीचा बाध झाला तरच परमार्थ (मोक्ष) साधतो. देहबुद्धीने जीवाचे ब्रह्माशी असलेले मूळचे ऐक्य बिघडते. ॥३९॥

विवेक वस्तूकडे वोढी । देहबुद्धि तेथूनि पाडी । अहंता लाऊन निवडी । वेगळेपणें ।।४०।।

विवेकामुळे अन्त:करणवृत्तीची धाव आत्मस्वरूपाकडे होते. देहबुद्धीमुळे ती मागे येते व नंतर अहंकाराचे साम्राज्य पसरून आत्म्यापासून वेगळेपणा दृढ होतो. ॥४०॥

विचक्षणें याकारणें । देहबुद्धि त्यजावी श्रवणें । सत्यब्रह्मीं साचारपणें । मिळोन जावें ।।४१।।

म्हणून शाश्वत हितासाठी शहाण्याने अध्यात्मशास्त्राच्या परंपरायुक्त श्रवणाने देहबुद्धी सोडून सत् स्वरूप ब्रह्माशी दृढ ऐक्य साधावे. ॥४१॥

सत्यब्रह्म तें कवण । ऐसा श्रोता करी प्रश्न । प्रत्योत्तर दे आपण । वक्ता श्रोतयासी ।।४२।।

यावर श्रोता विचारतो की सत् ब्रह्म कसे असते? तेव्हा वक्ता श्रोत्याला उत्तर देतो– ॥४२॥

म्हणे ब्रह्म येकचि असे । परी तें बहुविध भासे । अनुभव देहीं अनारिसें । नाना मतीं ।।४३।।

ब्रह्म वस्तुत: एकच आहे. परंतु निरनिराळ्या संप्रदायात अभ्यासपद्धती वेगळ्या असल्याने त्याचे बाबतीत अनेक प्रकारे सांगितले जाते व तसे निश्चय होतात. ॥४३॥

जें जें जया अनुभवलें । तेंचि तयासि मानलें । तेथेंचि त्याचें विस्वासलें । अंत:कर्ण ।।४४।।

ज्यांचे जसे निश्चय करून दिले जातात त्यांना तेच योग्य वाटते व त्यांची त्याप्रकारे श्रद्धा तयार होते. ॥४४॥

ब्रह्म नामरूपातीत । असोनि नामें बहुत । निर्मळ निश्चळ निवांत । निजानंद ।।४५।।

वास्तविक ब्रह्माला नामे व रूपे नाहीत. तरी सगुण ब्रह्म अनेक नावांनी ओळखले जाते. त्याचबरोबर निर्गुण ब्रह्मालाही निर्मळ, अढळ, शांत, स्वानंद अशी विशेषणे देतात. ॥४५॥

अरूप अलक्ष अगोचर । अच्युत अनंत अपरांपर । अदृश्य अतर्क्ये अपार । ऐसीं नामें ।।४६।।
नादरूप ज्योतिरूप । चैतन्यरूप सत्तारूप । साक्षरूप सस्वरूप । ऐसीं नामें ।।४७।।

सुन्य आणी सनातन । सर्वेश्वर आणी सर्वज्ञ । सर्वात्मा जगजीवन । ऐसीं नामें ।।४८।।
सहज आणी सदोदित । शुद्ध बुद्ध सर्वातीत । शाश्वत आणी शब्दातीत । ऐसीं नामें ।।४९।।
विशाळ विस्तीर्ण विश्वंभर । विमळ वस्तु व्योमाकार । आत्मा परमात्मा परमेश्वर । ऐसीं नामें ।।५०।।
परमात्मा ज्ञानघन । येकरूप पुरातन । चिद्रूप चिन्मात्र जाण । नामें अनाम्याचीं ।।५१।।

रूपरहित, अन्त:करणवृत्तीचा विषय न होणारे, ज्ञानेंद्रियांना न कळणारे, अढळ, अन्तरहित, निरपेक्ष व्यापक, रूपरहित, तर्काने न कळणारे, पलीकडचा काठ नसणारे, नाद, ज्योती, चैतन्य, सत्ता, साक्ष, सस्वरूप इ. प्रकारचे, शून्य, सनातन, सर्वेश्वर, सर्वज्ञ, सर्वात्मा, जगज्जीवन, सहज, नित्य, शुद्ध, बुद्ध, सर्वातीत, शाश्वत, शब्दातीत, विशाल, विस्तीर्ण, विश्वाच्या आतबाहेर भरलेले, विमल, वस्तू, गगनोपम, आत्मा, परमात्मा, परमेश्वर, ज्ञानघन, एकरूप, सनातन, चिद्रूप, चिन्मात्र इ. प्रकारे निर्विशेष ब्रह्माची विशेषणे सांगतात. (यात ब्रह्माची स्वरूपलक्षणे व तटस्थ लक्षणे सांगितली आहेत. विशेषण व लक्षणांना समर्थ नामे म्हणतात) ॥४६ ते ५१॥

ऐसीं नामें असंख्यात । परी तो परेश नामातीत । त्याचा करावा निश्चितार्थ । ठेविलीं नामें ।।५२।।

अशी असंख्य लक्षणे व विशेषणे आहेत. पण ब्रह्म लक्षणातीत व निर्विशेष म्हणून नामातीत आहे. ब्रह्माचे स्वरूप निश्चित करण्यासाठी ती सांगितली. ॥५२॥

तो विश्रांतीचा विश्राम । आदिपुरुष आत्माराम । तें येकचि परब्रह्म । दुसरें नाहीं ।।५३।।

जीवाला विश्रान्तीसाठी शान्तब्रह्माशी एक व्हावे लागते. तेच आद्यपुरुष व आत्माराम असून दुसरे काहीच तसे नाही. ॥५३॥

तेंचि कळायाकारणें । चौदा ब्रह्मांचीं लक्षणें । सांगिजेती तेणें श्रवणें । निश्चयो बाणे ।।५४।।

त्या ब्रह्माविषयी परिपूर्ण व नि:संदिग्ध कल्पना यावी म्हणून लक्षणांनुसारे ब्रह्माचे चौदा कल्पित प्रकार सांगू. ती ऐकली असता त्याच्या स्वरूपाचे पूर्ण परोक्ष ज्ञान होते.॥५४॥

खोटें निवडितां येकसरें । उरलें तें जाणिजे खरें । चौदा ब्रह्में शास्त्राधारें । बोलिजेती ।।५५।।

मायिक तत्त्वे बाजूला काढताच उरते ते सत्य असते. त्यासाठी शास्त्रांचा आधार घेऊन चौदा ब्रह्मे सांगू. ॥५५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'ब्रह्मनिरूपणनाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'ब्रह्मनिरूपण' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक सातवा : चौदा ब्रह्मांचा (चतुर्दशब्रह्म)

समास तिसरा : चतुर्दशब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

श्रोतां व्हावें सावधान । आतां सांगतो ब्रह्मज्ञान । जेणें होये समाधान । साधकाचें ।। १ ।।

श्रोत्यांनी सतर्कपणे आता सांगितले जाणारे ब्रह्मज्ञान ऐकावे. ते ऐकून साधकाचे समाधान होईल. ॥१॥

रत्नें साधायाकारणें । मृत्तिका लागे येकवटणें । चौदा ब्रह्मांची लक्षणें । जाणिजे तैसीं ।। २ ।।

खाणीतून रत्न मिळवावयाचे असेल तर मातीचे ढीग उपसावे लागतात. त्याप्रमाणे ब्रह्माची चौदा लक्षणे सांगून त्यातून शुद्ध ब्रह्माचा निवाडा करू. ॥२॥

पदार्थेंविण संकेत । द्वैतावेगळा दृष्टांत । पूर्वपक्षेंविण सिद्धांत । बोलतांचि न ये ।। ३ ।।

अतिसूक्ष्म वस्तू दाखवावयाची असेल तर खुणेसाठी दुसरी स्थूल वस्तू दाखवावी लागते. दृष्टान्ताने समजूत पटविण्यासाठी द्वैत पत्करावेच लागते. सिद्धान्त पक्षाच्या सिद्धीसाठी पूर्वपक्ष मांडावा लागतो. ॥३॥

आधीं मिथ्या उभारावें । मग तें वोळखोन सांडावें । पुढें सत्य तें स्वभावें । अंतरीं बाणे ।। ४ ।।

प्रथम मिथ्या वस्तूसह सत्य समोर ठेवून नंतर मिथ्या वस्तू वगळताच सत्याचा बुद्धीत सहजच निश्चय होतो. (सारखे दिसणारे पितळ व सोने कस लावताच वेगळेपणाने दिसते.) ॥४॥

म्हणौन चौदा ब्रह्मांचा संकेत । बोलिला कळाया सिद्धांत । येथें श्रोतीं सावचित । क्षण येक असावें ।। ५ ।।

या उद्देशाने ब्रह्म त्याच्या चौदा मायिक लक्षणांसह समोर ठेवले. श्रोत्याने सावधपणाने थोडा वेळ त्यांचे चिंतन करून सिद्धान्त जाणावा. ॥५॥

पहिलें तें शब्दब्रह्म । दुजें मीतिकाक्षरब्रह्म । तिसरें खंब्रह्म । बोलिली श्रुती ।। ६ ।।

चौथें जाण सर्वब्रह्म । पांचवे चैतन्यब्रह्म । साहावें सत्ताब्रह्म । साक्षब्रह्म सातवें ।। ७ ।।

आठवें सगुणब्रह्म । नवें निर्गुणब्रह्म । दाहावें वाच्यब्रह्म । जाणावें पैं ।। ८ ।।

अनुभव तें अक्रावें । आनंदब्रह्म तें बारावें । तदाकार तेरावें । चौदावें अनुर्वाच्य ।। ९ ।।

ऐसीं हें चौदा ब्रह्में । यांची निरोपिली नामें । आतां स्वरूपाचीं वर्मे । संकेत दाऊं ।। १० ।।

१) शब्द, २) मीतिकाक्षर, ३) खंब्रह्म, ४) सर्व, ५) चैतन्य, ६) सत्ता, ७) साक्ष, ८) सगुण, ९) निर्गुण, १०) वाच्य, ११) अनुभव, १२) आनंद, १३) तदाकार, १४) अनिर्वाच्य– अशी ही चौदा ब्रह्मांची नावे आहेत. आता त्या प्रत्येकाचे स्पष्टीकरण करू. ॥६ ते १०॥

अनुभवेंविण भ्रम । या नांव शब्दब्रह्म । आतां मीतिकाक्षरब्रह्म । तें येकाक्षर ।। ११ ।।

अनुभव न येता जे केवळ शब्दमय असल्याने भ्रमरूप असते ते शब्दब्रह्म. 'ओम्' हे एकाक्षर ब्रह्म. (मीति = एका लहान अक्षरात समाविष्ट असलेले) ॥११॥

खंशब्दें आकाशब्रह्म । महदाकाश व्यापकधर्म । आतां बोलिलें सूक्ष्म । सर्वब्रह्म ।। १२ ।।

खं ब्रह्म म्हणजे आकाश ब्रह्म. ते महादाकाशाला व्यापून राहते. आता सूक्ष्म असलेले सर्व ब्रह्म सांगू. ॥१२॥

पंचभूतांचें कुवाडें । जें जें तत्व दृष्टी पडे । तें तें ब्रह्मचि चोखडें । बोलिजेत आहे ।। १३ ।।

पंचमहाभूतांच्या पंचीकरणाने जी जी विविधरूपे दिसतात ती ती ब्रह्मच आहेत असे सांगतात. ॥१३॥

या नाव सर्वब्रह्म । श्रुतिआश्रयाचें वर्म । आतां चैतन्य ब्रह्म । बोलिजेल ।।१४।।

हेच ते सर्वब्रह्म. आता चैतन्य ब्रह्म सांगू. ह्या सर्व सांगण्याला श्रुतिवाक्यांचा आधार आहे. ॥१४॥

पंचभूतादि मायेतें । चैतन्य चि चेतवितें । म्हणौनि त्या चैतन्यातें । चैतन्यब्रह्म बोलिजे ।।१५।।

पंचमहाभूतात्मक मायेला चैतन्य प्रकाशित करते किंवा प्राणांच्या माध्यमातून सक्रिय करते म्हणून ब्रह्माला चैतन्यब्रह्म म्हणतात. ॥१५॥

चैतन्यास ज्याची सत्ता । ते सत्ताब्रह्म तत्वता । तये सत्तेस जाणता । या नाव साक्षब्रह्म ।।१६।।

चित् = चैतन्य सत्च्या आधाराने राहते म्हणून सत् सत्ताब्रह्म असून त्या सत्ला जाणणारे ते साक्षब्रह्म. ॥१६॥

साक्षत्व जयापासुनी । तें हि आकळिलें गुणीं । सगुणब्रह्म हे वाणी । तयासि वदे ।।१७।।

जेथे जाणणे असते तेथे जाणणारा असतो व तो सगुण असतो. तोच सगुण ब्रह्म. ॥१७॥

जेथें नाहीं गुणवार्ता । तें निर्गुणब्रह्म तत्वता । वाच्यब्रह्म तें हि आतां । बोलिजेल ।।१८।।

गुणांचा जेथे मागमूस नसतो ते निर्गुणब्रह्म. आता वाच्यब्रह्म सांगू. ॥१८॥

जें वाचें बोलतां आलें । तें वाच्यब्रह्म बोलिलें । अनुभवासि कथिलें । न वचे सर्वथा ।।१९।।

‘ब्रह्म’ असे वाणीने बोलता येते ते वाच्यब्रह्म. जे अनुभव आला तरी मुळीच सांगता येत नाही– ॥१९॥

या नांव अनुभव ब्रह्म । आनंदवृत्तीचा धर्म । परंतु याचेंहि वर्म । बोलिजेल ।।२०।।

ते अनुभव ब्रह्म, वास्तविक आनंद वृत्तीला होतो. पण त्याचाही उलगडा पुढे करू. ॥२०॥

ऐसें हें ब्रह्म आनंद । तदाकार तें अभेद । अनुर्वाचीं संवाद । तुटोन गेला ।।२१।।

असे हे आनंदब्रह्म. जीव ब्रह्मरूप झाला की तदाकार ब्रह्म असे त्याला नाव मिळते. अनिर्वचनीयतेत बोलणे खुंटते. ॥२१॥

ऐसीं हे चौदा ब्रह्में । निरोपिलीं अनुक्रमें । साधकें पाहातां भ्रमें । बाधिजेना ।।२२।।

अशी ही चौदा ब्रह्मे अनुक्रमाने सांगितली. साधकांनी त्यांचा अभ्यास केला तर भ्रमाची बाधा होणार नाही. ॥२२॥

ब्रह्म जाणावें शाश्वत । माया तेचि अशाश्वत । चौदा ब्रह्मांचा सिद्धांत । होईल आतां ।।२३।।

ब्रह्म शाश्वत असून माया अशाश्वत आहे. आता चौदा ब्रह्मांचे अधिक स्पष्टीकरण करू. ॥२३॥

शब्दब्रह्म तें शाब्दिक । अनुभवेंविण माईक । शाश्वताचा विवेक । तेथें नाहीं ।।२४।।

शब्दाने ब्रह्म कळले की ते शब्दब्रह्म. त्याचा अनुभव येईपर्यंतचा सर्व खटाटोप मायिक असतो. केवळ शाब्दिक विचाराने शाश्वत ब्रह्माचा दृढ अपरिवर्तनीय अनुभव येत नाही. (मुंडक उपनिषदात प्रत्यक्ष वेदांचा समावेश अपरा विद्येत केला आहे. (१-१-५) शिवाय तीच श्रुती, आत्मा शब्दमय प्रवचनाने किंवा शब्दमय श्रवणाने अनुभवाला येत नाही असे सांगते. (३-२-३) म्हणून शब्द ब्रह्म मायिक आहे.) ॥२४॥

जें क्षर ना अक्षर । तेथें कैंचें मीतिकाक्षर । शाश्वताचा विचार । तेथेंहि न दिसे ।।२५।।

जे क्षर नाही व अक्षरही नाही तेथे एकाक्षर प्रणव कोठून आणावा? येथेही शाश्वत अनुभवाची सोय नाही. (‘तस्य वाचक प्रणव:’ (बृह. उप.) ओंकार ही ब्रह्माची खूण आहे. खूण किंवा संकेत रेखामय अक्षरांचा असल्याने मायिक आहे. ओम् हे अक्षर ब्रह्माचे कल्पित शरीर आहे. (म्हणून एकाक्षर ब्रह्म मायिक आहे.) ॥२५॥

खंब्रह्म ऐसें वचन । तरी सुन्यातें नासी ज्ञान । शाश्वताचें अधिष्ठान । तेथेहि न दिसे ।।२६।।

'खंब्रह्म' ह्या संकल्पनेत पोकळ किंवा शून्यरूप आकाशाचा संबंध आहे. शून्याचे किंवा आकाशाचे प्रकाशन ब्रह्म करते. ह्या ब्रह्मातही शाश्वताची उणीवच आहे. ('आत्मन: आकाश: संभूत:' ह्या तैत्तिरीय श्रुतीत आत्म्यापासून आकाश हे सर्वांत सूक्ष्म व्यक्त तत्त्व उत्पन्न होते असे म्हटले आहे. आकाशाला 'शब्द' हा गुण आहे. जे गुणवान असते ते मायिक असते. म्हणून खंब्रह्म ही संकल्पना मायिक आहे.) ॥२६॥

सर्वत्रास आहे अंत । सर्वब्रह्म नासिवंत । प्रळये बोलिला निश्चित । वेदांतशास्त्रीं ।।२७।।

सर्व ह्या शब्दाने ओळखले जाणारे दृश्य जगत् विनाशी आहे. त्याचा प्रलय होतो असे वेदांतशास्त्र सांगते. म्हणून सर्व ह्या शब्दासह ओळखले जाणारे ब्रह्म नाशिवंत आहे. ('सर्वं खल्विदं ब्रह्म' ह्या श्रुतीवर सर्व– ब्रह्म ही कल्पना आधारलेली आहे. 'नेह नानास्ति किञ्चन' ही दुसरी श्रुती भेदाने भरलेले दृश्य जगत् नाकारते. शिवाय ते जगत् व्यवहारत: विनाशी असून परमार्थत: अध्यस्त आहे. म्हणून सर्व ब्रह्म मिथ्या.) ॥२७॥

ब्रह्मप्रळये मांडेल जेथें । भूतान्वय कैचा तेथें । म्हणौनियां सर्वब्रह्मातें । नाश आहे ।।२८।।
अचळासि आणी चळण । निर्गुणास लावितां गुण । आकारास विचक्षण । मानीतना ।।२९।।
जें निर्माण पंचभूत । तें प्रत्यक्ष नासिवंत । सर्वब्रह्म हे मात । घडे केवी ।।३०।।
असो आतां हें बहुत । सर्वब्रह्म नासिवंत । वेगळेपणास अंत । पाहाणें कैचें ।।३१।।

जेव्हा ब्रह्मदेवाचा प्रळय होतो तेव्हा त्यात असणारी जीवसृष्टी कशी टिकेल? म्हणून सर्व ब्रह्माला नाश आहे. ब्रह्म अचल असताना वस्तूरूपाने ते हलते, ते निर्गुण असताना जगाचे संबंधाने सगुण होते व निराकार असताना रूपवान होते हे शहाण्याला पटणारे नाही. जे पंचभूतात्मक जग व्यावहारिकतेत प्रत्यक्ष निर्माण होऊन नाश पावते तेथे सर्वब्रह्माची भाषा कशी टिकेल? आता हे स्पष्टीकरण पुरे. सर्वब्रह्म हे विनाशी असून ब्रह्मापासून भिन्न असलेल्या 'सर्वाला' शेवट आहे. सर्वासह ब्रह्म त्रिपुटीयुक्त आहे. (पाहणे-पाहणारा-पहायची वस्तू) ॥२८-३१॥

आतां जयास चेतवावें । तेंचि माईक स्वभावें । तेथें चैतन्याच्या नावें । नास आला ।।३२।।

आता 'चैतन्यब्रह्म' ह्या कल्पनेत ज्याला ब्रह्म प्रकाशित करते किंवा गतिमान करते ते जडजीवात्मक जग मायिक आहे. ते विनाशी असल्यामुळे 'चैतन्यब्रह्म' मायिक होय. 'सत् पद ते ब्रह्म, चित् पद ते माया' असे एकनाथी हरिपाठात म्हटले आहे. सत् ब्रह्म जड-जीवात व्यापून सामान्यत्वाने रहाते. चित् म्हणजे ज्ञान. होणारे ज्ञान बुद्धिसापेक्ष असल्याने बुद्धी निवृत्त होताच तेही निवृत्त होते. म्हणून ते मिथ्या. ॥३२॥

परिवारेंविण सत्ता । ते सत्ता नव्हे तत्वता । पदार्थेंविण साक्षता । तेहि मिथ्या ।।३३।।

हाताखाली काम करणारे कोणी असल्याशिवाय सत्ता हा शब्दच सिद्ध होत नाही. दुसरा पदार्थ प्रत्यक्षात असल्याशिवाय त्याचे साक्षित्व करता येत नाही. म्हणून सत्ताब्रह्म व साक्षीब्रह्म मायिक. (प्राण हा ब्रह्माच्या परिवारातील मुख्य घटक आहे. वायुतत्त्वात्मक प्राण हा वायूप्रमाणेच विनाशी असल्याने त्याची सांगड अविनाशी ब्रह्माशी घालता येत नाही. साक्षित्व मनाने करावयाचे असून साक्षित्व करण्यासाठी दुसरा पदार्थ असावा लागतो. 'अप्राणो ह्यमन: शुभ्रो ह्यक्षरात्परत: पर: ।' ही मुंडक श्रुती (२-१-२) असे सांगते की ब्रह्माला प्राण व मन दोन्ही नाहीत. त्यामुळे सत्ता व साक्ष ही ब्रह्मे मिथ्या होत.) ॥३३॥

सगुणास नाश आहे । प्रत्यक्षास प्रमाण काये । सगुणब्रह्म निश्चयें । नासिवंत ।।३४।।

सगुण पदार्थ नाश पावतो हे प्रत्यक्षच दिसते. ते सिद्ध करण्यासाठी प्रमाणाची गरज नाही. म्हणून सगुण व ब्रह्म हे जोडब्रह्म विनाशी आहे. (अनादित्वान्निर्गुर्णत्वात्परमात्मा:ऽयमव्य: ॥ गीता. १३-३१॥ परमात्मा सगुण नाही. मूळ माया-गुणमाया-जडमाया असा हा मायेचा विस्तार गुण मायिक असल्याचे सांगतो. म्हणून सगुणब्रह्म मायिक.) ॥३४॥

निर्गुण ऐसें जें नाव । त्या नावास कैचा ठाव । गुणेंविण गौरव । येईल कैचें ।।३५।।

ब्रह्माला निर्गुण असे जे म्हटले जाते ते सगुणाच्या सापेक्षतेने आहे. सगुणत्वच जर मायिक आहे तर तत् सापेक्ष

निर्गुण ही उपाधी निरर्थक नव्हे काय? (ब्रह्म कधीही हा, ही, हे, ह्या प्रकारे (इदंता) दर्शविले जात नाही. म्हणून त्याचे कोणतेच वर्णन करता येत नाही. श्री. ज्ञानदेवांनी ब्रह्माच्या निर्गुणत्वाचाही निरास करण्यासाठी 'सगुण निर्गुण गुणांचे अगुण' (ह. पा.) अशी शब्दयोजना केली.) ॥३५॥

माया जैसें मृगजळ । ऐसें बोलती सकळ । कां तें कल्पनेचें आभाळ । नाथिलेंचि ।।३६।।

माया ही मृगजळाप्रमाणे आहे असे सांगतात. आकाशाचा निळेपणासुद्धा काल्पनिक आहे. ते वस्तुत: निळे नाही. ॥३६॥

ग्रामो नास्ति कुतः सीमा । जन्मेंविण जीवात्मा । अद्वैतासी उपमा । द्वैताची ।।३७।।

गावच अस्तित्वात नसेल तर त्याच्या चार सीमा कशा दाखवाव्यात? अजात ब्रह्म जीवरूपाने कसे जन्माला येईल? अद्वैत ब्रह्माला द्वैताची उपमा कशी द्यावी? (सगुणसापेक्ष निर्गुण कसे म्हणावे?) ॥३७॥

मायेविरहित सत्ता । पदार्थेविण जाणता । अविद्येंविण चैतन्यता । कोणास आली ।।३८।।

सत्ता चैतन्यता साक्षी । सर्व हि गुणाचपासीं । ठाईचें निर्गुण त्यासी । गुण कैंचे ।।३९।।

मायेवाचून सत्ता गाजविण्यासाठी व सत्ता वापरण्यासाठी काय व कोण मिळणार? बाह्य पदार्थ असल्याशिवाय 'जाणता' कसा होणार? सत्ता, चैतन्यत्व व साक्षित्व हे सर्व धर्म सगुणाला असतात. जे मूळचे निर्गुण त्याला गुण कसे असतील? (सत्ता गाजविण्यासाठी वायू, अग्नी, जीव इत्यादींची गरज आहे. सत्ता वापरण्यासाठी इंद्र, वरुण, यमादिकांची गरज आहे. हे सर्व मायिक आहेत.) ॥३८-३९॥

ऐसें जें गुणरहित । तेथें नामाचा संकेत । तोचि जाणावा अशाश्वत । निश्चयेंसी ।।४०।।

निर्गुण ब्रह्मासि संकेतें । नामें ठेविलीं बहुतें । तें वाच्यब्रह्म त्यातें । नाश आहे ।।४१।।

असे जे अगुण आहे, त्याला दिलेले केवळ सांकेतिक नावही मायिक आहे हे नक्की. अगुण ब्रह्माला ओळखीसाठी बरीच नावे दिली, तेच वाचेने बोलले जाणारे वाच्य ब्रह्म होय. तेही विनाशी आहे. ('यद्वाचानभ्युदितं येन वागभ्युद्यते' ॥ केन. १-१-४॥ जे वाणीने सांगता येत नाही पण वाणी ज्याचेमुळे बोलते ते ब्रह्म असे श्रुती सांगते. त्यामुळे वाच्य ब्रह्म मिथ्या आहे. ॥४०-४१॥

आनंदाचा अनुभव । हाहि वृत्तीचाचि भाव । तदाकारीं ठाव । वृत्तीस नाहीं ।।४२।।

'मला आनंद झाला' हा अनुभव अंत:करण वृत्तीला येतो. (मूळच्या स्वस्थ अंत:करणात जेव्हा कोणतेही ज्ञान करून देणारा बदल होतो तेव्हा त्या बदलाला वृत्ती असे म्हणतात.) ब्रह्मस्वरूपात वृत्तीला शिरकाव नाही. (आनंदावस्था ही आभासाची सातवी अवस्था आहे. ब्रह्म अवस्थानिरपेक्ष आहे. पहा-विचार सागर-तरंग ४.) म्हणून तदाकार ब्रह्महो मिथ्या ठरते. ॥४२॥

अनुर्वाच्य याकारणें । संकेत वृत्तीच्या गुणें । तया संकेतास उणें । निवृत्तीनें आणिलें ।।४३।।

अनुर्वाच्य ते निवृत्ती । तेचि उन्मनीची स्थिती । निरोपाधी विश्रांती । योगियांची ।।४४।।

'अनिर्वाच्य ब्रह्म' ही कल्पनासुद्धा सांकेतिक असल्याने तो संकेत निवृत्त होताच कल्पनाही निवृत्त होते. अंत:करण निवृत्त झाल्याने सर्व बोलणे थांबल्याने ब्रह्माविषयी बोलणेही थांबते! (म्हणून ते अनिर्वाच्य होते) हीच उन्मनी असून ती निरुपाधिक आहे. (तेथे अंत:करणाची उपाधी नाही.) योगी तेथे विश्रांती घेतात. ॥४३-४४॥

वस्तु जे कां निरोपाधी । तेचि सहज समाधी । जेणें तुटे आदिव्याधी । भवदुखाची ।।४५।।

निरुपाधिक ब्रह्मस्वरूपात लीन असणे हेच समाधीचे सहज स्वरूप आहे. ('लावलेली' समाधी नव्हे.) त्या ठिकाणी संसाराची बाहेरील दु:खे व कामादी आतील व्यथा नसतात. ॥४५॥

जो उपाधीचा अंत । तोचि जाणावा सिद्धांत । सिद्धांत आणी वेदांत । धादांत आत्मा ।।४६।।

निरुपाधिकता हाच अंतिम सिद्धांत आहे. हा सिद्धांत व वेदांतशास्त्र यांच्या अभ्यासाने आत्म्याचा अपरोक्ष अनुभव येतो. उपाधींचा निरास हेच सर्व साधनांचे सार आहे. सर्व वेदांत यासाठी मांडला गेला आहे. धादांत म्हणजे पूर्ण किंवा प्रत्यक्ष म्हणजे अपरोक्ष. ।।४६।।

असो ऐसे जे शाश्वत ब्रह्म । जेथें नाहीं मायाभ्रम । अनुभवी जाणे वर्म । स्वानुभवें ।।४७।।

आता हे वर्णन पुरे. शाश्वत ब्रह्माला मायिक पदार्थांची जोड देणे संभवतच नाही. स्वानुभव घेतलेला अनुभवी या बोलण्याचे रहस्य जाणतो. ।।४७।।

आपुलेन अनुभवें । कल्पनेसि मोडावें । मग सुकाळी पडावें । अनुभवाचे ।।४८।।

स्वत:च्या चिंतनाने सर्व कल्पना हळू हळू मागे टाकीत आत्मानुभव घेऊन नंतर तो यथेच्छ लुटावा. ।।४८।।

निर्विकल्पास कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें । मग नसोनि असावें । कल्पकोटी ।।४९।।

'ब्रह्म निर्विकल्प आहे' अशी कल्पना करता करता कल्पना आपोआप गळून पडते. नंतर ब्रह्म ज्याप्रमाणे कोट्यवधी कल्पपर्यंत या दृश्य जगाला व्यापूनही अलिप्त असते तसे खुशाल आयुष्यभर रहावे. ।।४९।।

कल्पनेचें येक बरें । मोहरितांच मोहरे । स्वरूपीं घालिता भरे । निर्विकल्पीं ।।५०।।

कल्पनेचा एक फार चांगला गुण आहे की ती जेवढी खुलवावी, फुलवावी तेवढी खुलते व फुलते. त्याचबरोबर निर्विकल्प आत्मस्वरूपात हरवूनही जाते! (ती वापरावी तशी वापरली जाते.) ।।५०।।

निर्विकल्पासि कल्पितां । कल्पनेचि नुरे वार्ता । नि:संगास भेटों जातां । नि:संग होइजे ।।५१।।

निर्विकल्पाची कल्पना करता करता कल्पना लयाला जाते. ती असंग आत्म्याला भेटताच तीही नि:संग होते. स्वत:चे अस्तित्व स्वत:च्या प्रचंड पसाऱ्यासह विसरते. ।।५१।।

पदार्थऐसें ब्रह्म नव्हे । मा तें हातीं धरून द्यावें । असो हें अनुभवावें । सद्‌गुरुमुखें ।।५२।।

हातात पकडून कोठे न्यावे असे इतर दृश्य पदार्थांसारखे ब्रह्म नाही. हे म्हणणे अनुभवण्यासाठी श्रीगुरूंच्याकडून यथार्थ अध्यात्म श्रवण करावे. ।।५२।।

पुढें कथेचा अन्वये । केलाचि करूं निश्चये । जेणें अनुभवासि ये । केवळब्रह्म ।।५३।।

यापुढील समासात आतापर्यंत सांगितलेला विषय अधिक स्पष्ट करू. त्यामुळे केवळ ब्रह्माचा साक्षात्कार होईल. 'ते मी आहे' असा अनुभव येईल. ।।५३।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'चतुर्दशब्रह्मनिरूपणनाम' समास तिसरा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'चतुर्दशब्रह्मनिरूपण' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक सातवा : चौदा ब्रह्मांचा (चतुर्दशब्रह्म)

समास चवथा : विमलब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ब्रह्म नभाहून निर्मळ । पाहातां तैसेंचि पोकळ । अरूप आणी विशाळ । मर्यादेवेगळें ।।१।।

आकाशाला शब्द या गुणाचा मळ आहे. ब्रह्म त्याहून निर्मळ आहे. त्याला तोही नाही. तसे पाहिले तर आकाशाप्रमाणेच ब्रह्मात अवकाशच अवकाश (पोकळी) असून त्यात अनंत कोटी ब्रह्मांडे सामावतात. ब्रह्म रूपरहित व अमर्याद व्यापक आहे. ॥१॥

येकविस स्वर्गे सप्त पाताळ । मिळोन एक ब्रह्मगोळ । ऐसीं अनंत तें निर्मळ । व्यापून असे ।।२।।

एकवीस स्वर्ग व सात पाताळ याला ब्रह्मगोळ म्हणतात. निर्मळ ब्रह्म त्या सर्वांना व्यापून राहते. ॥२॥

अनंत ब्रह्मांडांखालतें । अनंत ब्रह्मांडांवरुतें । तेणेंविण स्थळ रितें । अणुमात्र नाहीं ।।३।।

अनंत ब्रह्मांडांच्या तथाकथित खाली व वर ब्रह्मावाचून अणुभरही जागा रिकामी नाही. ॥३॥

जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं । ऐसी वदे लोकवाणी । तेणेंविण रिता प्राणी । येकहि नाहीं ।।४।।

ब्रह्म जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी व्यापून आहे असे लोकांच्या सामान्य भाषेत सांगितले जाते. सर्व जीवसृष्टी त्यानेच व्यापली आहे. त्यावाचून कोणी नाही. ॥४॥

जळचरांस जैसें जळ । बाह्याभ्यांतरीं निखळ । तैसें ब्रह्म हें केवळ । जीवमात्रांसी ।।५।।

जलचर प्राण्यांना जसे आंतबाहेर पाणीच असते त्याप्रमाणे सर्व जीवसृष्टीला ब्रह्म आतबाहेर व्यापून आहे. (दृष्टांतात जलचर खोल पाण्यात आहे असे गृहीत धरले आहे.) ॥५॥

जळावेगळा ठाव आहे । ब्रह्माबाहेरी जातां नये । म्हणौनि उपमा न साहे । जळाची तया ।।६।।

पण पाण्याच्या उदाहरणात उणीव आहे. कारण पाणी नसलेले बरेच मोठे जग शिल्लक उरते. जीवांना मात्र ब्रह्मावाचून इकडेतिकडे करण्यास जागाच नाही. ॥६॥

आकाशाबाहेरी पळों जातां । पुढें आकाशचि तत्वता । तैसें तया अनंता । अंतचि नाहीं ।।७।।

आकाशाच्या पोकळीपलीकडे जाऊ म्हटले तर पुढे पुढे आकाशच असते. त्याप्रमाणे अनंत ब्रह्माला अंत नाही. ॥७॥

परी जे अखंड भेटलें । सर्वांगास लिगटलें । अति निकट परी चोरलें । सकळांसि जें ।।८।।

सर्व जीवांना ब्रह्माची आत्मरूपाने सतत भेट आहे. (जीव तत्त्वतः ब्रह्मच आहे.) ते त्यांच्या अंगप्रत्यंगांमध्ये व्यापून आहे. ते जीवांच्या एवढे जवळ असून (जीव ब्रह्म असून) त्यांना ते अनुभवाला येत नाही. (पहा-ईश उप.) ॥८॥

तयामधेंचि असिजे । परी तयास नेणिजे । उमजे भास नुमजे । परब्रह्म तें ।।९।।

सर्व जीवसृष्टी ब्रह्मातच असून त्याला जाणीत नाही. (अध्यस्त अधिष्ठानमय असून कल्पित असते. अध्यस्ताला अधिष्ठान 'जाणणे' संभवत नाही.) होणाऱ्या सविशेषज्ञानाच्या रूपाने त्याचे अस्तित्व जाणवते. पण अनुभव येत नाही. (प्रतिबोधविदितम्...केन २-४) ॥९॥

आकाशामधें आभाळ । तेणें आकाश वाटे डहुळ । परी तें मिथ्या निवळ । आकाशचि असे ।।१०।।

आकाशात ढग जमून आले की आकाश मळले असे वाटते. पण आकाश प्रत्यक्षात कधीच मळत नाही. ते केवळ निर्मळ आकाशच असते. ॥१०॥

नेहार देतां आकाशीं । चक्रें दिसती डोळ्यांसी । तैसें दृश्य ज्ञानियांसी । मिथ्यारूप ।।११।।

आकाशाकडे दिवसा टक लावून पाहिले तर डोळ्यापुढे रंगीबेरंगी चक्रे भासतात. त्याप्रमाणे ब्रह्मज्ञान्यांचे दृष्टीने दृश्य जगत् हा भास आहे. मिथ्या आहे. ॥११॥

मिथ्याचि परी आभासे । निद्रिस्तांस स्वप्न जैसें । जागा जालियां अपैसें । बुझों लागे ।।१२।।

गाढ झोपेत अचानक स्वप्न पडले तर त्यातील दृश्ये भ्रामक असून त्या वेळी सत्य वाटतात. पण जाग येताच त्याचे मिथ्यात्व लक्षात येते. ॥१२॥

तैसें आपुलेन अनुभवें । ज्ञानें जागृतीसि यावें । मग माईक स्वभावें । कळों लागे ।।१३।।

त्याप्रमाणे स्वत: ब्रह्मानुभव घेतल्यावर म्हणजे ब्रह्मज्ञानाने अविद्येच्या निद्रेतून जाग आल्यावर दृश्य जगत् मायिक असल्याचे लक्षात येते. ॥१३॥

आतां असो हें कुवाडें । जे ब्रह्मांडापैलिकडे । तेंचि आता निवाडें । उमजोन दाऊं ।।१४।।

आता हा प्रासंगिक विषय पुरे. जे अनंत ब्रह्मांडांना व्यापून अपरंपार उरले आहे त्याचे स्वरूप स्पष्ट करू. ॥१४॥

ब्रह्म ब्रह्मांडीं कालवलें । पदार्थासी व्यापून ठेलें । सर्वांमधें विस्तारलें । अंशमात्रें ।।१५।।

अतिसूक्ष्म अरूप ब्रह्म ब्रह्मांडामध्ये व्यापून आहे. सर्व पदार्थांना सत्‌रूपाने व्यापून पदार्थांच्या विस्ताराएवढे ते विस्तृत आहे. ॥१५॥

ब्रह्मामधें सृष्टी भासे । सृष्टीमध्यें ब्रह्म असे । अनुभव घेतां आभासे । अंशमात्रें ।।१६।।

व्यापक ब्रह्मामध्ये कमी व्याप असलेली सृष्टी भासते. सृष्टीत ब्रह्म व्यापून आहे. ते सत् रूपाने सामान्यत्वाने सर्व सृष्टीत व विशेषत्वाने बुद्धीत भासते असे सूक्ष्म विचाराने कळते. (त्यामुळे सत् ब्रह्म अस्तिरूपाने सर्वांना कळते. चित् ब्रह्म चिदाभासरूपाने विचारवंतांना कळते. आनंदब्रह्म ब्रह्मज्ञान्यांच्या अनुभवात असते.) ॥१६॥

अंशमात्रें सृष्टीभीतरीं । बाहेरी मर्यादा कोण करी । सगळें ब्रह्म ब्रह्मांडोदरीं । माईल कैसें ।।१७।।

ब्रह्मवस्तूच्या एका अंशावर सृष्टी भासते. (ब्रह्मवस्तूत अंश अंशी भाव नसल्याने 'ब्रह्म सृष्टीत अंशमात्र असते' असे म्हणणे वेदांत शास्त्रात बसत नाही.) ब्रह्माची सृष्टीबाहेर अपार व्याप्ती आहे. ब्रह्मांडाच्या अल्प व्याप्तीत अपरंपार ब्रह्म कसे मावेल? ॥१७॥

अमृतीमधें आकाश । सगळें सांठवतां प्रयास । म्हणौन तयाचा अंश । बोलिजेतो ।।१८।।

एखाद्या लहान भांड्यात सर्व आकाश साठवणे अशक्य आहे. म्हणून त्या भांड्यात आकाशाचा अंश आहे असे केवळ म्हणण्यापुरतेच असते. आकाशाचे भाग पडत नाहीत. ॥१८॥

ब्रह्म तैसें कालवलें । परी तें नाहीं हालवलें । सर्वांमधें परी संचलें । संचलेपणें ।।१९।।

त्याप्रमाणे ब्रह्म पांचभौतिक सृष्टीत व्यापून असले तरी प्रत्यक्षात ते त्यात शिरते असे नाही. ते मूळचेच व्यापक असून त्यावर जगत्भास भासू लागल्यावर ते त्या भासात अधिष्ठान रूपाने असते. येत-जात नाही. ॥१९॥

पंचभूतीं असे मिश्रित । परंतु तें पंचभूतातीत । पंकीं आकाश अलिप्त । असोनि जैसें ।।२०।।

चिखलातील आकाशाप्रमाणे ब्रह्म पांचभौतिक सृष्टीत व्यापून असूनही असंगत्वाने असते. ॥२०॥

ब्रह्मास दृष्टांत न घडे । बुझावया देणें घडे । परी दृष्टांती साहित्य पडे । विचारितां आकाश ।।२१।।

एकमेव चित्घन ब्रह्माला दृष्टांत देण्यासाठी दुसरे व तसे काही नाही. पण समजूत पटण्यासाठी तो द्यावा लागतो. कल्पित व अचेतन आकाश हेच एक दृष्टांत देण्यासारखे तत्त्व आहे असे विचारान्ती ठरले. ॥२१॥

खंब्रह्म ऐसी श्रुती । गगनसदृशं हे स्मृती । म्हणौनि ब्रह्मास दृष्टांती । आकाश घडे ।।२२।।

श्रुती ‘खंब्रह्म’ म्हणते व स्मृती ‘गगनोपम’ म्हणते म्हणून ब्रह्माला उपमा देण्याची सोय झाली आहे. ॥२२॥

काळिमा नस्तां पितळ । मग तें सोनेंचि केवळ । सुन्यत्व नस्तां निवळ । आकाश ब्रह्म ।।२३।।

जर पितळ कळकले नाही, तर ते सोनेच! आकाश जर असत् जड नसेल तर ते ब्रह्मच म्हणणे शक्य आहे. ॥२३॥

म्हणौनि ब्रह्म जैसें गगन । आणि माया जैसा पवन । आडळे परी दर्शन । नव्हे त्याचें ।।२४।।

म्हणून ब्रह्माला आकाशाचा व मायेला वायूचा दृष्टांत देऊन निराभास ब्रह्मावर साभास माया कशी भासू लागते त्याच्या स्पष्टीकरणाची सोय झाली. (वायू त्वचेला कळतो. पण डोळ्याने दिसत नाही. पोकळी कोणत्याच ज्ञानेंद्रियांना कळत नाही.) ॥२४॥

शब्दसृष्टीची रचना । होत जात क्षणक्षणा । परंतु ते स्थिरावेना । वायुच ऐसी ।।२५।।

शब्द हा आकाशाचा गुण आहे. शब्द सतत बोलले जातात. परंतु ते वायूप्रमाणे स्थिर नसतात. (ही ओवी बरीच संदिग्ध आहे. शिवाय मागील पुढील ओव्यांचा संदर्भही स्पष्टपणे लागत नाही. शब्दसृष्टी व वायू यांची तुलना केलेली दिसते. किंवा शब्दसृष्टीला वायूचा दृष्टांत दिल्यासारखा दिसतो.) शब्द हा गुण असलेल्या आकाशात शब्द व स्पर्श हे दोन गुण असलेला वायू अचानक निर्माण होतो. त्याप्रमाणे निर्गुण ब्रह्मात सगुण माया अकस्मात भासू लागते. ॥२५॥

असो ऐसी माया माईक । शाश्वत तें ब्रह्म येक । पाहों जातां अनेक । व्यापून आहे ।।२६।।

एकमेव अद्वितीय असलेले शाश्वत ब्रह्म बहुविध व विनाशी मायेला व्यापून राहते असे लक्षात येते. ॥२६॥

पृथ्वीसी भेदून आहे । परी तें ब्रह्म कठीण नव्हे । दुजी उपमा न साहे । तया मृदत्वासी ।।२७।।

ब्रह्म पृथ्वीत व्यापून आहे म्हणून ते पृथ्वीला फोडण्याइतके कठीण आहे असे नाही. उलट ते इतके मृदु (सूक्ष्म) आहे की त्या सूक्ष्मत्वासाठी उदाहरणही नाही. ॥२७॥

पृथ्वीहूनि मृद जळ । जळाहूनि तो अनळ । अनळाहूनि कोमळ । वायो जाणावा ।।२८।।

पृथ्वीपेक्षा पाणी, पाण्याहून अग्नी व अग्नीहून वायू कोमल म्हणजे अधिकाधिक सूक्ष्म आहे. ॥२८॥

वायोहून तें गगन । अत्यंतचि मृद जाण । गगनाहून मृद पूर्ण । ब्रह्म जाणावें ।।२९।।

वायूहून आकाश अत्यंत सूक्ष्म असून, आकाशाहून ब्रह्मामध्ये सूक्ष्मत्वाची परिसीमा आहे. ॥२९॥

वज्रास असे भेदिलें । परी मृदत्व नाहीं गेलें । उपमेरहित संचलें । कठिण ना मृद ।।३०।।

इंद्राच्या वज्रातही ते व्यापून असले तरी त्याच्या मृदुत्वाला जराही उणेपणा येत नाही. त्याला कठीण वा मृदू असे काहीच म्हणता येत नाही. ते निरूपम आहे. ॥३०॥

पृथ्वीमधें व्यापून असें । पृथ्वी नासे तें न नासे । जळ शोषे तें न शोषे । जळीं असोनी ।।३१।।

ब्रह्म पृथ्वी व जळात असून पृथ्वी नष्ट झाली तरी व जळ आटले तरी ते नष्ट होत नाही. ॥३१॥

तेजीं असे परी जळेना । पवनीं असे परी चळेना । गगनीं असे परी कळेना । परब्रह्म तें ।।३२।।

परब्रह्म अग्नीत असून जळत नाही, वायूत असून हलत नाही व आकाशात असून अनुभवाला येत नाही. ॥३२॥

शेरीर अवघें व्यापलें । परी तें नाहीं आडळलें । जवळिच दुरावलें । नवल कैसें ।।३३।।

ब्रह्म सर्व शरीरभर व्यापून असून ते कोठेच सापडत नाही. इतके जवळ असून त्याची ताटातूट होते हे नवलच! ॥३३॥

सन्मुखचि चहुंकडे । तयामधें पाहाणें घडे । बाह्याभ्यांतरी रोकडें । सिद्धचि आहे ।।३४।।

जिकडे डोळे फिरवावेत तिकडे ते आहे. आपण पाहतो ते त्याच्यातूनच! आत व बाहेर ते प्रत्यक्ष व नित्यसिद्ध आहे. ॥३४॥

तयामधेंचि आपण । आपणा सबाह्य तें जाण । दृश्यावेगळी खूण । गगनासारिखी ।।३५।।

आपल्या सर्वांचा ब्रह्मात समावेश आहे. आपल्या आतबाहेर ते व्यापून असून अदृश्य आहे. आकाश जसे दिसत नाही तसे ते दिसत नाही. अदृश्य आहे. (तेदन्तस्य सर्वस्यांईश–) ॥३५॥

कांहीं नाहींसें वाटलें । तेथेंचि तें कोंदाटलें । जैसें न दिसे आपलें । आपणासि धन ।।३६।।

जेथे सर्व रिकामेच रिकामे वाटते तेथे ते घनदाट भरलेले असते. आपलेच पुरलेले धन आपणास दिसू नये त्याप्रमाणे. ॥३६॥

जो जो पदार्थ दृष्टी पडे । तें त्या पदार्था ऐलिकडे । अनुभवें हें कुवाडें । उकलावें ।।३७।।

जो जो पदार्थ दिसतो तो दिसण्याच्या आधी त्या पदार्थाचे अलीकडे ब्रह्म असते. (पहा-ईश उप. ४.) हे कोड्यासारखे वाटणारे बोलणे अनुभवानेच समजावून घ्यावे. ॥३७॥

मागें पुढें आकाश । पदार्थेविण जो पैस । पृथ्वीविण भकास । येकरूप ।।३८।।

प्रत्येक पदार्थाच्या मागे, पुढे (व आत) आकाश असते. पदार्थ नसताना जो सृष्टीच्या प्रलयकाळातील अत्यंत विस्तीर्ण मोकळा प्रदेश तो ब्रह्माने भरलेला म्हणजे ब्रह्मरूप असतो. ॥३८॥

जें जें रूप आणी नाम । तो तो नाथिलाच भ्रम । नामरूपातीत वर्म । अनुभवी जाणे ।।३९।।

जेथे जेथे रूप असते व नाम असते तेथे मिथ्यात्व असते. नामरूपापलीकडील आध्यात्मिक तत्त्व फक्त अनुभवी संतांना कळते. (नाम व रूप हे दोन्ही मायिक. अस्तिभातिप्रिय ईश्वरी सत्तेतील. सत् चित् आनंद पारमार्थिक सत्तेतील. रुप असते = व्यावहारिक सत्ता + ईश्वरी सत्ता. अस्तित्व हे सत्वर अवलंबून. सत् ब्रह्मरूप.) ॥३९॥

नभीं धूम्राचे डोंगर । उचलती थोर थोर । तैसें दावी वोडंबर । मायादेवी ।।४०।।

आकाशात ढगांची गंधर्वनगरे भासतात. त्यात डोंगरांचेही आकार भासतात. त्याप्रमाणे माया देवी नामरूपांचे भ्रम दाखविते. ॥४०॥

ऐसी माया अशाश्वत । ब्रह्म जाणावें शाश्वत । सर्वां ठाईं सदोदित । भरलें असे ।।४१।।

अशी ही माया विनाशशील असून ब्रह्म शाश्वत आहे. ते सर्वत्र, सदा व समत्वाने व्यापून आहे. ॥४१॥

पोथी वाचू जातां पाहे । मातृकांमधेंचि आहे । नेत्रीं निघोनि राहे । मृदपणें ।।४२।।

पोथी वाचताना पहाणारे तेच, पोथीच्या प्रत्येक अक्षरात तेच व डोळ्यांमध्ये न खुपता राहणारे तेच! ॥४२॥

श्रवणें शब्द ऐकतां । मनें विचार पाहतां । मना सबाह्य तत्वता । परब्रह्म तें ।।४३।।

कानाने शब्द ऐकणारे, मनाने मनन करणारे ब्रह्मच मनाला आत-बाहेर व्यापून असते. (द्रष्टा, श्रोता व मन्ता जीव असला तरी चेतन आत्म्याच्या सत्तेवरच या क्रिया घडतात.) ॥४३॥

चरणें चालतां मार्गीं । जें आडळे सर्वांगीं । करें घेतां वस्तुलागीं । आडवें ब्रह्म ।।४४।।

पाय चालू लागले म्हणजे ते पायातही असते व पायाबाहेरूनही जणू पायाला स्पर्श करते. हाताने वस्तू उचलताना वस्तूच्या आधी ब्रह्म जणू आडवे येते. ॥४४॥

असो इंद्रियेंसमुदाव । तयामधें वर्ते सर्व । जाणो जातां मोडे हांव । इंद्रियांची ।।४५।।

हा तपशील आता पुरे. ब्रह्म सर्व इंद्रियांना व्यापून आहे. त्याच्या अनुसंधानात राहिले तर इंद्रियांची त्यांच्या त्यांच्या विषयाकडील ओढ थांबते. ॥४५॥

तें जवळिच असे । पाहों जातां न दिसे । न दिसोन वसे । कांहीं येक ।।४६।।

ब्रह्म जीवाच्या अत्यंत जवळ असून ज्ञानेंद्रियांना मात्र कळत नाही. पण कळले नाही तरी ते आहे हे नक्की. ॥४६॥

जें अनुभवेंचि जाणावें । सृष्टीचेनि अभावें । आपुलेन स्वानुभवें । पाविजे ब्रह्म ।।४७।।

देह, इंद्रिये व अहंकारादी सृष्टीचा विचाराने अभाव करून (विवेक प्रलय) 'ब्रह्म मी आहे' असा साक्षात्कार करून घ्यावा. (इंद्रिये व अहंकार हे सृष्टीचे देहातील घटक आहेत. पिंड-ब्रह्मांडाचे ऐक्य साधकाने विसरू नये.) ।।४७।।

ज्ञानदृष्टीचें देखणें । चर्मदृष्टी पाहों नेणे । अंतरवृत्तीचिये खुणे । अंतरवृत्ति साक्ष ।।४८।।

ज्याने विवेकरूप ज्ञानाची दृष्टी बाणली आहे तो सामान्य नजरेने पाहू शकत नाही. ज्या कोणाला ज्ञानदृष्टी लाभली असेल ती त्याची त्यालाच असते. (सामान्यांना तिची फार तर कल्पना करता येईल.) ।।४८।।

जाणे ब्रह्म जाणे माया । जाणे अनुभवाच्या ठाया । ते येक जाणावी तुर्या । सर्वसाक्षिणी ।।४९।।

जीवांच्या जाग्रतादी तीन अवस्थांसापेक्ष तुर्या ही चौथी अवस्था आहे. (तुरीय = चौथी) त्या अवस्थेत अन्त:करण वृत्ती आतून आत्माकार राहते (जाणे ब्रह्म) व बाहेर व्यवहार जाणते (जाणे माया). पण त्या व्यवहारांचे आत अनुकूल-प्रतिकूल परिणाम होत नाहीत. हा अनुभव तो घेणाऱ्यालाच कळतो. अशा या अवस्थेला सर्व जगत् व्यवहाराची (देहासह) साक्षिणी म्हणतात. (पुढील समासात पुन्हा हा विषय आहे.) ।।४९।।

साक्षत्व वृत्तीचें कारण । उन्मनी ते निवृत्ति जाण । जेथें विरे जाणपण । विज्ञान तें ।।५०।।

वृत्ती जागी असेपर्यन्त साक्षित्व होते. वृत्ती निवृत्त होताच उन्मनी अवस्था येते. तेथे ज्ञानाचे विज्ञान होऊन जाणीव नाहीशी होते. ।।५०।।

जेथें अज्ञान सरे । ज्ञान तेंहि नुरे । विज्ञानवृत्ति मुरे । परब्रह्मीं ।।५१।।

त्या अवस्थेत अज्ञान नष्ट होते, ज्या ज्ञानाने ते गेले ते ज्ञानही लुप्त होऊन विज्ञानावस्था म्हणजे ब्रह्मरूपता प्राप्त होते. ।।५१।।

ऐसें ब्रह्म शाश्वत । जेथें कल्पनेसी अंत । योगी जना येकांत । अनुभवें जाणावा ।।५२।।

जेथे सर्व कल्पना म्हणजे संकल्पविकल्प नाहीसे होतात ज्याच्याशी ऐक्य झाल्यामुळे योग्यांना एकान्ताची शान्ती मिळते अशा ह्या परब्रह्माचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा व एकांत भोगावा. (भोगरहित भोग) ।।५२।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'विमलब्रह्मनिरूपणनाम' समास चवथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'विमलब्रह्मनिरूपण' नावाचा चवथा समास समाप्त

दशक सातवा : चौदा ब्रह्मांचा (चतुर्दशब्रह्म)

समास पाचवा : द्वैतकल्पनानिरसन

॥ श्रीराम समर्थ ॥

केवळ ब्रह्म जें बोलिलें । तें अनुभवास आलें । आणी मायेचेंहि लागलें । अनुसंधान ।। १ ।।

आतापर्यंत सांगितल्याप्रमाणे शुद्ध ब्रह्मानुभव आला व मायिक सृष्टीही सतत जाणवत राहिली तर — ॥१॥

ब्रह्म अंतरीं प्रकाशे । आणी मायाहि प्रत्यक्ष दिसे । आतां हें द्वैत निरसे । कवणेपरी हो ।। २ ।।

आत ब्रह्मज्ञान प्रकाशले व देहादी जगतरूप मायाही प्रत्यक्ष दिसत असताना या द्वैताचा निरास कसा करावा? ॥२॥

तरी आतां सावधान । येकाग्र करूनियां मन । माया ब्रह्म हें कवण । जाणताहे ।। ३ ।।

श्रीगुरू सांगतात की आता सावधानतेने मन एकाग्र करून माया व ब्रह्म कोण जाणतो त्याचा निवाडा ऐका. ॥३॥

सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प । ऐसिया द्वैताचा जल्प । मनचि करी ।। ४ ।।

'ब्रह्म सत्य आहे' असा विचार व 'माया मिथ्या आहे' हा दुसरा विचार अशा ब्रह्ममायेच्या द्वैताची बडबड मनच करते किंवा ब्रह्म हे एकमेव आहे असा संकल्प करता करताच मन मायेचा विकल्प करते. या द्वैताला मनच जबाबदार आहे. ॥४॥

जाणे ब्रह्म जाणे माया । ते येक जाणावी तुर्या । सर्व जाणे म्हणोनिया । सर्वसाक्षिणी ।। ५ ।।

तुर्य नावाची अशी एक अवस्था आहे की ती ब्रह्मही जाणते व मायाही जाणते (पहा– मागील समास. ओवी ४९) ती ब्रह्ममायेचा सर्व पसारा जाणते म्हणून तिलाच सर्वसाक्षिणी असे म्हणतात. ॥५॥

ऐक तुर्येचें लक्षण । जेथें सर्व जाणपण । सर्वचि नाही कवण । जाणेल गा ।। ६ ।।

तुर्येचे एक लक्षण असे आहे की ती सर्वकाही जाणते. पण 'सर्व' असे काही अस्तित्वातच नसताना ते कोण जाणेल? (जो मी तुरीय सच्चिद्घन । त्या माझ्या ठायी अवस्था गुण । नभी नीळिमा मिथ्या भान । तैसे नसता जाण भासती ॥ एक भाग. २८-२७२) ॥६॥

संकल्पविकल्पाची सृष्टी । जाली मनाचिये पोटीं । तें मनचि मिथ्या सेवटीं । साक्षी कवणु ।। ७ ।।

केवळ मनामुळे संकल्पविकल्प होऊन सृष्टी भासते. ते मनच मायिक असल्याने त्या मनाची घडलेली सृष्टी साक्षीरूपाने कोण कशी पाहील? ॥७॥

साक्षत्व चैतन्यत्व सत्ता । हे गुण ब्रह्माचिया माथां । आरोपलें जाण वृथा । मायागुणें ।। ८ ।।

साक्षीपण, चैतन्यत्व व सत्ता हे तीन धर्म केवळ मायेमुळे ब्रह्मस्वरूपावर अकारण लादले जातात. ॥८॥

घटमठाचेनि गुणें । त्रिविधा आकाश बोलणें । मायेचेनि खरेंपणें । गुण ब्रह्मीं ।। ९ ।।

मडके व घर यांच्या अस्तित्वामुळे मडक्यातील आकाश, घरातील आकाश व त्या बाहेरील महाकाश असे आकाशाचे कल्पित भेद पडतात. त्याप्रमाणे माया सत्य मानली तर ब्रह्मावर धर्मांचा आरोप करता येतो. ॥९॥

जव खरेंपण मायेसी । तवचि साक्षत्व ब्रह्मासी । मायेअविद्येचे निरासीं । द्वैत कैचें ।। १० ।।

जोपर्यन्त माया सत्य मानली जाते तोपर्यन्त ब्रह्मरूप तुर्याला साक्षी म्हणता येते. माया व अविद्येचा निरास झाल्यावर ब्रह्म व माया असे द्वैतच राहत नाही. ॥१०॥

म्हणोनि सर्वसाक्षी मन । तेंचि जालिया उन्मन । मग तुर्यारूप ज्ञान । तें मावळोन गेलें ।।११।।

म्हणून मनाचे उन्मन झाल्यावर सर्वसाक्षी असलेली तुर्या ही अवस्थाही शिल्लक राहत नाही. ॥११॥

जयास द्वैत भासलें । ते मन उन्मन जालें । द्वैताअद्वैताचें तुटलें । अनुसंधान ।।१२।।

ज्या अन्त:करण वृत्तीला द्वैतरूप दृश्य जगताचा अनुभव येतो तीच मावळून गेल्यावर ते द्वैत व द्वैतसापेक्ष अद्वैत या संबंधीची विचारमालिका तुटते. ॥१२॥

येवं द्वैत आणी अद्वैत । होये वृत्तीचा संकेत । वृत्ति जालिया निवृत्त । द्वैत कैंचें ।।१३।।

एकूण द्वैत व अद्वैत दोन्ही वृत्तिसापेक्ष असून वृत्ती निवृत्त होताच द्वैताचा अनुभव कोण घेणार? तो कसा येणार? ॥१३॥

वृत्तिरहित जें ज्ञान । तेंचि पूर्ण समाधान । जेथें तुटे अनुसंधान । मायाब्रह्मीचें ।।१४।।

वृत्तीला चिदाभासाच्या साहाय्याने होणारे ज्ञान सविशेष असून वृत्ती मावळल्यावर चिदाभास आत्माकार होतो तेव्हा शुद्ध किंवा निर्विशेष ज्ञान राहिल्याने पूर्ण समाधानाची स्थिती प्राप्त होते. माया व ब्रह्माचे विचार नाहीसे होतात. ॥१४॥

मायाब्रह्म ऐसा हेत । मनें कल्पिला संकेत । ब्रह्म कल्पनेरहित । जाणती ज्ञानी ।।१५।।

साधकावस्थेमध्ये विवेकासाठी माया व ब्रह्म अशा दोन कल्पना केलेल्या असतात. ज्यांना ब्रह्मवस्तूचा अपरोक्ष अनुभव येतो त्यांना ब्रह्माची कल्पना होत नाही हे कळते. ॥१५॥

जें मनबुद्धिअगोचर । जें कल्पनेहून पर । तें अनुभवितां साचार । द्वैत कैंचें ।।१६।।

जे मन, बुद्धी व कल्पना यांच्या साहाय्याने अनुभवाला येत नाही त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यावर (ब्रह्म) द्वैताचा भास कसा टिकेल? ॥१६॥

द्वैत पाहातां ब्रह्म नसे । ब्रह्म पाहातां द्वैत नासे । द्वैताद्वैत भासे । कल्पनेसी ।।१७।।

अन्त:करण वृत्ती द्वैताच्या दृश्य पसाऱ्यात अडकली की ब्रह्माचे अनुसंधान सुटते. ती ब्रह्मस्वरूपात (आत्मा) लीन झाली की द्वैताचे अनुसंधान सुटते. द्वैत व अद्वैत हे दोन्ही कल्पनेचे खेळ आहेत. ॥१७॥

कल्पना माया निवारी । कल्पना ब्रह्म थावरी । संशय धरी आणी वारी । तेहि कल्पना ।।१८।।

'मी मायेला दूर सारीन' व 'मी आत्मस्वरूपात लीन होईन' हे कल्पनेचेच खेळ आहेत. कल्पनाच संशय निर्माण करते व तीच संशय मोडते. ॥१८॥

कल्पना करी बंधन । कल्पना दे समाधान । ब्रह्मीं लावी अनुसंधान । तेहि कल्पना ।।१९।।

'मी बद्ध आहे' व 'मी बंधनमुक्त झाल्याने समाधानात आहे' हे कल्पनेचेच खेळ!' मी आता माझी अन्त:करण वृत्ती आत्माकार करीन' ही सुद्धा एक कल्पनाच आहे! ॥१९॥

कल्पना द्वैताची माता । कल्पना ज्ञेप्ती तत्वता । बद्धता आणी मुक्तता । कल्पनागुणें ।।२०।।

कल्पनेमुळे द्वैत भासते, 'शुद्ध ज्ञान' ही संकल्पना तयार होते, व बद्ध-मुक्तादी अवस्था मानल्या जातात. ॥२०॥

कल्पना अंतरीं सबळ । नस्ते दावी ब्रह्मगोळ । क्षणा येकातें निर्मळ । स्वरूप कल्पी ।।२१।।

बलवान कल्पनाच मायिक जगताचा प्रचंड पसारा दाखविते व ती त्याच बळाने 'मी ब्रह्म आहे' अशा निर्मळ स्वरूपानुभवात क्षणात जीवाला नेऊन सोडते. ॥२१॥

क्षणा येका धोका वाहे । क्षणा येका स्थिर राहे । क्षणा येका पाहे । विस्मित होउनी ।।२२।।

कल्पना एका क्षणात भयभीत होते, दुसऱ्या क्षणी शांतता भोगते, तर तिसऱ्या क्षणी आश्चर्यचकित होते. ॥२२॥

क्षणा येकातें उमजे । क्षणा येकातें निर्बुजे । नाना विकार करिजे । ते कल्पना जाणावी ।।२३।।

क्षणभर तिला काही कळते, दुसऱ्या क्षणी कळेनासे होते व कामक्रोधादी विकारात सापडणारी कल्पनाच असते. ॥२३॥

कल्पना जन्माचें मूळ । कल्पना भक्तीचें फळ । कल्पना तेचि केवळ । मोक्षदाती ।।२४।।

कल्पनेमुळें पुन्हा पुन्हा जन्म होतात, 'मी भक्ती करून तिचे फळ मिळवीन' ही कल्पनाच असून मोक्षाला तीच साहाय्य करते. ॥२४॥

असो ऐसी हे कल्पना । साधनें दे समाधाना । येरवी हे पतना । मूळच कीं ।।२५।।

हे असे कल्पनेचे स्वरूप आहे! कल्पना साधनेला जोडली तर मोक्ष व स्वैर सोडली तर पतन अशी फळे देते. ॥२५॥

म्हणौन सर्वांचें मूळ । ते हे कल्पनाच केवळ । इचें केलियां निर्मूळ । ब्रह्मप्राप्ती ।।२६।।

म्हणून या दृश्य सृष्टीचे व जीवाच्या बंधन मोक्षाचे मूळ ही कल्पना आहे. ती समूळ काढली तर ब्रह्मानुभव सहजच असतो. ॥२६॥

श्रवण आणी मनन । निजध्यासें समाधान । मिथ्या कल्पनेचें भान । उडोन जाये ।।२७।।

यथार्थ संप्रदाययुक्त श्रवण, शास्त्रानुसारी मनन व गुरुवाक्याचे निदिध्यासन यांचे साहाय्याने कल्पना समूळ जाऊन मोक्षरूप समाधान प्राप्त होते. ॥२७॥

शुद्ध ब्रह्माचा निश्चयो । करी कल्पनेचा जयो । निश्चितार्थें संशयो । तुटोन गेला ।।२८।।

कल्पनेने शुद्ध ब्रह्माच्या स्वरूपाचे यथार्थ आकलन झाल्यावर ती कल्पनाच निवृत्त होते! 'मी कोण आहे' जगताचे स्वरूप काय आहे, सुख कशात आहे इ. सर्व संशय निघून जातात. ॥२८॥

मिथ्या कल्पनेचें कोडें । कैसें राहे साचापुढें । जैसें सूर्याचेनि उजेडें । नासे तम ।।२९।।

सूर्य उगवताच जसा अंधार टिकत नाही त्याप्रमाणे सत्य ब्रह्माच्या प्रकाशात मिथ्या कल्पनेचे कौतुक टिकत नाही. ॥२९॥

तैसें ज्ञानाचेनि प्रकाशें । मिथ्या कल्पना हे नासे । मग हें तुटे अपैसें । द्वैतानुसंधान ।।३०।।

त्याप्रमाणे ब्रह्मज्ञानाच्या प्रकाशात मिथ्या कल्पना नाहीशी होऊन द्वैताचे अनुसंधान आपोआप सुटते. ॥३०॥

कल्पनेनें कल्पना उडे । जैसा मृगें मृग सांपडे । कां शरें शर आतुडे । आकाशमार्गीं ।।३१।।

ज्याप्रमाणे एका पशूच्या शिकारीसाठी दुसरा पशू वापरावा किंवा बाणानेच आकाशातून येणारा दुसरा बाण तोडावा त्याप्रमाणे कल्पनेने कल्पना नष्ट होते. ॥३१॥

शुद्ध कल्पनेचें बळ । जालियां नासे सबळ । हेंचि वचन प्रांजळ । सावध ऐका ।।३२।।

शुद्ध किंवा संवादी कल्पनेच्या बळाने अशुद्ध वा विसंवादी कल्पना छाटावी. हे विधान सावधपणाने ऐका. ॥३२॥

शुद्ध कल्पनेची खूण । स्वयें कल्पिजे निर्गुण । सस्वरुपीं विस्मरण । पडोंचि नेदी ।।३३।।

'मी निर्गुण ब्रह्म आहे' ही शुद्ध किंवा संवादी कल्पना असून ती स्वरूपाचे विस्मरण पडू देत नाही. ॥३३॥

सदा स्वरूपानुसंधान । करी द्वैताचें निर्शन । अद्वयनिश्चयाचें ज्ञान । तेचि शुद्ध कल्पना ।।३४।।

आत्मस्वरूपाचे अनुसंधान टिकून, द्वैताचा निरास करून 'मी व ब्रह्म एक आहे' असा निश्चय करून देते ती शुद्ध कल्पना होय. ॥३४॥

अद्वैत कल्पी ते शुद्ध । द्वैत कल्पी ते अशुद्ध । अशुद्ध तेचि प्रसिद्ध । सबळ जाणावी ।।३५।।

अद्वैताच्या अनुसंधानात ठेवणारी कल्पना शुद्ध असून द्वैतामध्ये रमणारी अशुद्ध किंवा शबल होय. ॥३५॥

शुद्ध कल्पनेचा अर्थ । अद्वैताचा निश्चितार्थ । आणी सबळ वेर्थ । द्वैत कल्पी ।।३६।।

शुद्ध कल्पनेने अद्वैतानुभवाचे तर शबल कल्पनेने टाकावू द्वैताच्या अनुभवाचे फळ (अर्थ) मिळते. ॥३६॥

अद्वैतकल्पना प्रकाशे । तेचि क्षणीं द्वैत नासे । द्वैतासरिसी निरसे । सबळ कल्पना ।।३७।।

अद्वैत कल्पनेचा प्रकाश पडताच द्वैताचा अंधार नष्ट होतो. द्वैत मावळताच शबल कल्पना नष्ट होते. ॥३७॥

कल्पनेनें कल्पना सरे । ऐसी जाणावी चतुरें । सबळ गेलियां नंतरें । शुद्ध उरली ।।३८।।

विचारवन्ताने कल्पनेने कल्पना कशी सरते ते असे जाणून घ्यावे. शबल कल्पना जाताच शुद्ध कल्पना उरते. ॥३८॥

शुद्ध कल्पनेचें रूप । तेंचि जें कल्पी स्वरूप । स्वरूप कल्पितां तद्रूप । होये आपण ।।३९।।

शुद्ध स्वरूपाचे अनुसंधान हेच शुद्ध कल्पनेचे रूप असून तिच्या माध्यमातून कल्पना करणारा स्वरूपाकार होतो. ॥३९॥

कल्पनेसी मिथ्यत्व आलें । सहजचि तद्रूप जालें । आत्मनिश्चयें नासिलें । कल्पनेसी ।।४०।।

शुद्ध कल्पनाही मिथ्या आहे असा निश्चय झाल्यावर आत्म्याशी तद्रूपता येते व 'मी आत्मा' या निश्चयाने कल्पना नष्ट होते. ॥४०॥

जेचि क्षणीं निश्चये चळे । तेचि क्षणीं द्वैत उफाळे । जैसा अस्तमानीं प्रबळे । अंधकार ।।४१।।

वरील निश्चय ज्या क्षणी मोडतो त्या क्षणीच द्वैत उफाळून येते. सूर्य मावळताच अंधार पसरावा त्याप्रमाणे. ॥४१॥

तैसें ज्ञान होतां मळिण । अज्ञान प्रबळे जाण । याकारणें श्रवण । अखंड असावें ।।४२।।

त्याप्रमाणे आत्मानुसंधान कमी होताच अज्ञानरूप द्वैत जोराने वर येते. म्हणून सतत श्रवण असावे. ('स्वाध्यायान्माप्रमदः' तैत्ति.११) ॥४२॥

आतां असो हें बोलणें जालें । आशंका फेडू येका बोलें । जयास द्वैत भासलें । तें तूं नव्हेसी सर्वथा ।।४३।।

आता आतापर्यन्तच्या सांगण्याचे तात्पर्य एका वाक्यात सांगतो. ते असे की, ज्याला द्वैताचा भास झाला तो तू नव्हेस! (द्वैतभान जीवाला होते. तू ब्रह्म आहेस.) ॥४३॥

मागील आशंका फिटली । इतुकेन हे कथा संपली । पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ।।४४।।

विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिल्याने हा विषय आता संपला. पुढील अभ्यासासाठी श्रोत्याने सावध व्हावे. ॥४४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'द्वैतकल्पनानिरसननाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'द्वैतकल्पनानिरसन' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक सातवा : चौदा ब्रह्मांचा (चतुर्दशब्रह्म)

समास सहावा : बद्धमुक्तनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

अद्वैत ब्रह्म निरोपिलें । जें कल्पनेरहित संचलें । क्षणयेक तदाकार केलें । मज या निरुपणें ।।१।।

शिष्य किंवा श्रोता म्हणतो की आताच केलेल्या अद्वैत ब्रह्माच्या निरूपणामुळे सर्व कल्पना मावळलेली अद्वैतस्थिती मला क्षणभर अनुभवाला आली. ॥१॥

परी म्यां तदाकार व्हावें । ब्रह्मचि होऊन असावें । पुन्हा संसारास न यावें । चंचळपणें सर्वथा ।।२।।

पण मला असे वाटते की मी ब्रह्माशी सतत तद्रूपच होऊन राहावे. ती स्वरूप स्थिती मोडून (चंचळपणे) द्वैतरूप प्रपंचाचा मला पुन्हा अनुभव येऊ नये. ॥२॥

कल्पनारहित जें सुख । तेथें नाहीं संसारदुःख । म्हणोनि तेंचि येक । होऊन असावें ।।३।।

कल्पनारहित अद्वैत बोधात असलेल्या सुखाला संसारदुःखाचा स्पर्शही नाही असे मी अनुभवले. म्हणून यापुढे त्याच अवस्थेत राहावे. ॥३॥

ब्रह्मचि होईजे श्रवणें । पुन्हा वृत्तीवरी लागे येणें । ऐसें सदा येणें जाणें । चुकेना कीं ।।४।।

श्रवणाने 'मी ब्रह्म आहे' असा अनुभव येतो हे खरे. पण पुन्हा अन्तःकरण वृत्ती जागी होऊन स्वरूप स्थिती ढळते. असे हे ज्ञान-अज्ञानाचे येणे-जाणे चुकत नाही असे दिसते. ॥४॥

मनें अंतरिक्ष जावें । क्षणयेक ब्रह्मचि व्हावें । पुन्हा तेथून कोंसळावें । वृत्तीवरी मागुतें ।।५।।

अन्तःकरण वृत्तीने चिदाकाशात क्षणभर ब्रह्मामध्ये लीन व्हावे व पुन्हा जागे होऊन वेगाने मागे यावे.... ॥५॥

प्रत्यावृत्ती सैरावैरा । किती करूं येरझारा । पाईं लाउनियां दोरा । कीटक जैसा ।।६।।

एखाद्या कीटकाच्या पायाला दोरा बांधून त्याला उडू द्यावे व नंतर पुन्हा खाली ओढावे त्याप्रमाणे अन्तःकरण वृत्ती आत्माकार व्हावी व पुन्हा स्वैरपणे मागे परतावी अशी ये-जा किती करीत राहावे? ॥६॥

उपदेशकाळीं तदाकार । होतां पडे हें शरीर । अथवा नेणे आपपर । ऐसें जालें पाहिजे ।।७।।

उपदेश कानी पडून जीव ब्रह्मरूप होताच शरीराला मरण तरी यावे किंवा व्युत्थान झाल्यावर 'माझे व दुसऱ्याचे' हा अज्ञान काळातील भाव तरी नष्ट झाला पाहिजे असे मला वाटते. ॥७॥

ऐसें नस्तां जें बोलणें । तेंचि वाटे लाजिरवाणें । ब्रह्म होऊन संसार करणें । हेंहि विपरीत दिसे ।।८।।

असे प्रत्यक्षात काही न घडता ऐकलेला उपदेश लाजिरवाणा आहे. निरर्थक आहे. 'मी ब्रह्म आहे' असा अनुभव घ्यावयाचा व पुन्हा संसार करावयाचा हे फारच विपरीत वाटते. ॥८॥

जो स्वयें ब्रह्मचि जाला । तो मागुता कैसा आला । ऐसें ज्ञान माझें मजला । प्रशस्त न वटे ।।९।।

जो एकदा 'मी ब्रह्म' या अवस्थेला पोहोचला तो पुन्हा 'मी देह' या अवस्थेकडे मागे येतो असे जर असेल तर त्या ब्रह्मज्ञानाला काही अर्थ नाही. ॥९॥

ब्रह्मचि होऊन जावें । कां तें संसारींच असावें । दोहींकडे भरंगळावें । किती म्हणूनी ।।१०।।

एक तर ब्रह्म होऊन राहावे किंवा संसारात तरी असावे. एकदा ब्रह्म, एकदा संसार असा चढउतार किती करावा? ॥१०॥

निरूपणीं ज्ञान प्रबळे । उठोन जातां तें मावळे । मागुता कामक्रोध खवळे । ब्रह्मरूपासी ।।११।।

श्रवण होताना ब्रह्मानुभव येतो व श्रवण थांबताच तो अनुभव जातो व कामक्रोधांचा गोंधळ सुरू होतो. ह्याचा अर्थ असा होतो की ब्रह्मालाच काम व क्रोध होतात! ॥११॥

ऐसा कैसा ब्रह्म जाला । दोहींकडे अंतरला । वोडगस्तपणेंचि गेला । संसार त्याचा ।।१२।।

असा कसा हा ब्रह्मज्ञ? एकूण असे दिसते की धड ना ब्रह्म व धड ना संसार अशा ओढाताणीतच त्याचे सांसारिक जीवन संपून जाते. ॥१२॥

घेतां ब्रह्मसुखाची गोडी । संसारिक मागें वोडी । संसार करितां आवडी । ब्रह्मीं उपजे मागुती ।।१३।।

ब्रह्मसुख भोगल्याने त्याची ओढ लागते व जन्मोजन्मीच्या संस्कारामुळे प्रपंचही मागे ओढतो. आवडीने संसार करू म्हटले तर ब्रह्मसुखाची पुन्हा आवड निर्माण होते. ॥१३॥

ब्रह्मसुख नेले संसारें । संसार गेला ज्ञानद्वारें । दोनी अपुरीं पुरें । येकहि नाहीं ।।१४।।

विषयसुखाच्या संसाराने ब्रह्मसुखाचा विसर पडतो व ब्रह्मज्ञानामुळे संसार नकोसा वाटतो. धड ना ब्रह्म, धड ना संसार असे दोन्ही अर्धवट राहतात. ॥१४॥

याकारणें माझें चित्त । चंचळ जालें दुश्चीत । काये करणें निश्चीत । येकहि नाहीं ।।१५।।

यामुळे माझे चित्त संभ्रमित होऊन कोठेच ते धडपणे लागत नाही. एकाचाही निर्णय होत नसल्याने काय करावे ते समजत नाही. ॥१५॥

ऐसा श्रोता करी विनती । आतां राहावें कोणे रीतीं । म्हणे अखंड माझी मती । ब्रह्माकार नाहीं ।।१६।।

असे प्रांजळ निवेदन श्रोत्याने केले. तो म्हणाला की माझी चित्तवृत्ती अखंड ब्रह्माकार राहत नाही. मी आता काय करावे? ॥१६॥

आतां याचें प्रत्योत्तर । वक्ता देईल सुंदर । श्रोतीं व्हावें निरोत्तर । क्षण येक आतां ।।१७।।

आता मी (वक्ता) या समस्येचे शास्त्रशुद्ध उत्तर देईन. त्यासाठी श्रोत्यांनी आता थोडा वेळ शांतचित्त व्हावे. ॥१७॥

ब्रह्मचि होऊन जे पडिले । तेचि मुक्तपदास गेले । येर ते काय बुडाले । व्यासादिक ।।१८।।

ब्रह्मरूप झाल्यावर ज्यांचे शरीर मरण पावले तेच मुक्त झाले असे म्हणता येईल काय? किंवा शरीर पाषाणासारखे होऊन पडावे काय? (पहा– याच समासातील सातवी ओवी) भगवान व्यासांसारखे महर्षी मुक्त न होताच बुडाले काय? ॥१८॥

श्रोता विनती करी पुढती । शुको मुक्तो वामदेवो वा हे श्रुती । दोघेचि मुक्त आदिअंतीं । बोलतसे ।।१९।।

यावर श्रोता नम्रपणे म्हणतो– या जगाच्या इतिहासात फक्त शुक व वामदेवच मुक्त झाले असे श्रुती सांगते ॥१९॥

वेदें बद्ध केले सर्व । मुक्त शुक वामदेव । वेदवचनीं अभाव । कैसा धरावा ।।२०।।

शुक व वामदेव तेवढे मुक्त व बाकी सर्व जग बद्ध असे वेदांचे सांगणे खोटे कसे म्हणावे? (त्यामुळें दुसरे व्यासादिक मुक्त असणें शक्य नाही.) ॥२०॥

ऐसा श्रोता वेदाधारें । देता झाला प्रत्योत्तरें । दोघेचि मुक्त अत्यादरें । प्रतिपाद्य केले ।।२१।।

केवळ दोघांनाच वेदांनी मुक्त म्हटले आहे असे श्रोता वेदांच्या आधारे म्हणाला. ॥२१॥

वक्ता बोले याउपरी । दोघेचि मुक्त सृष्टीवरी । ऐसें बोलतां उरी । कोणास आहे ।।२२।।

यावर वक्ता म्हणतो– सृष्टीच्या इतिहासात जर दोघेच मुक्त झाले असतील तर कित्येक महान ज्ञानी, सिद्ध व योग्यांची वाट काय? ॥२२॥

बहु ऋषि बहु मुनी । सिद्ध योगी आत्मज्ञानी । जाले पुरुष समाधानी । असंख्यात ।।२३।।

आजपर्यन्त अनेक ऋषी, मुनी, सिद्ध, योगी व आत्मज्ञानी स्त्रीपुरुष झाले आहेत. ॥२३॥

श्लोक

प्रल्हादनारदपराशरपुंडरीकव्यासांबरीष शुकशौनकभीष्मदाल्भ्यान् ।

रुक्मांगदार्जुनवसिष्ठबिभीषणादीन् पुण्यानिमान्परमभागवतान्स्मरामि ।।१।।

कविर्हरिरंतरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः । आविर्होत्रोऽथद्रुमिलश्चमसः करभाजनः ।।२।।

श्लोकार्थ– प्रल्हाद, नारद, पराशर, पुंडरीक, व्यास, अंबरीष, शुक, शौनक, भीष्म, दाल्भ्य, रुक्मांगद, अर्जुन, वसिष्ठ, बिभीषण इ. शिवाय भागवतात सांगितलेले (११-२) कवी, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस व करभाजन.

याहि वेगळे थोर थोर । ब्रह्माविष्णुमहेश्वर । आदिकरून दिगंबर । विदेहादिक ।।२४।।

शिवाय ब्रह्मदेव, विष्णू, शंकर, दत्तात्रेय, विदेही जनक इत्यादी महान व्यक्ती मुक्त आहेत. ॥२४॥

शुक वामदेव मुक्त जाले । येर हे अवघेचि बुडाले । या वचना विश्वासले । ते पढतमूर्ख ।।२५।।

शुकवामदेव मुक्त झाले व इतर सर्व बद्धावस्थेतच मरण पावले या वेदनवचनावर जो जसाच्या तसा विश्वास ठेवील तो पढतमूर्ख म्हणावा लागेल. ॥२५॥

तरी वेद कैसें बोलिला । तो काये तुम्हीं मिथ्या केला । ऐकोन वक्ता देता जाला । प्रत्योत्तर ।।२६।।

श्रोता म्हणतो– मग वेदांनी असे कसे सांगितले? ते आपण कसे चुकीचे ठरविता? यावर वक्ता म्हणाला– ॥२६॥

वेद बोलिला पूर्वपक्ष । मूर्ख तेथेंचि लावी लक्ष । साधु आणी वित्पन्न दक्ष । त्यांस हें न मने ।।२७।।

वेदांनी पूर्वपक्ष मांडला असून हे न जाणणारा मूर्ख पूर्वपक्षच खरा मानतो. आत्मानुभवी, वेदान्त-शास्त्रपारंगत व जागरूक असणारे पूर्वपक्ष खरा मानीत नाहीत. ॥२७॥

तथापी हें जरी मानलें । तरी वेदसामर्थ्य बुडालें । वेदांचेनि उद्धरिलें । न वचे कोणा ।।२८।।

तरीही शुकवामदेवासंबंधीचे वचन जसे आहे तसे मानले तर त्याचा अर्थ असा होतो की वेदांचे सामर्थ्य नष्ट झाले असून त्यांच्या अभ्यासाने कोणीच मुक्त होणार नाही! ॥२८॥

वेदा आंगी सामर्थ्य नसे । तरी या वेदास कोण पुसे । म्हणौनि वेदीं सामर्थ्य असे । जन उधरावया ।।२९।।

वेदांना जर ते सामर्थ्य नसेल तर त्यांना कोण विचारील? पण असे नाही. त्यांचे ठिकाणी लोकांना मुक्त करण्याचे सामर्थ्य आहे. ॥२९॥

वेदाक्षर घडे ज्यासी । तो बोलिजे पुण्यरासी । म्हणौन वेदीं सामर्थ्यासी । काय उणें ।।३०।।

वेदांच्या संहिता पठण करणारा महापुण्य जोडतो. अशा वेदांपाशी सामर्थ्याची कोणतीच उणीव नाही. (किंवा वेदांचे एक अक्षर कानी पडले तरी मोठे पुण्य मिळते.) ॥३०॥

वेदशास्त्रपुराण । भाग्यें जालियां श्रवण । तेणें होईजे पावन । हें बोलती साधु ।।३१।।

वेद, धर्मशास्त्र व पुराणें यांचे पूर्वपुण्याईमुळे श्रवण घडले तर श्रोत्याचे चित्त शुद्ध होते असे साधुसंत सांगतात. ॥३१॥

श्लोक अथवा श्लोकार्ध । नाहीं तरी श्लोकपाद । श्रवण होतां येक शब्द । नाना दोष जाती ।।३२।।

एक श्लोक, अर्धा श्लोक, श्लोकाचा चरण किंवा शब्द कानी पडला तरी अनेक पापे नष्ट होतात. (अर्थवादात्मक वाक्य) ।।३२।।

वेदशास्त्रीं पुराणीं । ऐशा वाक्याच्या आईणी । अगाध महिमा व्यासवाणी । वदोन गेली ।।३३।।

वेद, शास्त्रे व पुराणे यांत अशा अर्थाची कित्येक वाक्ये आहेत. खुद्द व्यासांनी वेदांचे माहात्म्य त्यांच्या दैवी वाणीने सांगून ठेविले आहे. ।।३३।।

येकाक्षर होतां श्रवण । तत्काळचि होईजे पावन । ऐसें ग्रंथाचें महिमान । ठाईं ठाईं बोलिलें ।।३४।।

वेदांचे एक अक्षर चुकून जरी कानी पडले तरी श्रोता पावन होतो असे वेदांचे माहात्म्य जागोजागी सांगितले आहे. ।।३४।।

दोहीवेगळा तिजा नुधरे । तरी महिमा कैंचा उरे । असो हें जाणिजे चतुरें । येरां गथागोवी ।।३५।।

शुक व वामदेव या दोघांशिवाय तिसरा कोणीच उद्धरून गेला नाही असे मानले तर या वेदमाहात्म्याला काय अर्थ उरतो? मर्म जाणणाऱ्यांनाच, माझे बोलणे कळेल. इतर सर्व गोंधळात पडतील. (सिद्धान्त पक्षाच्या सिद्धीसाठी पूर्वपक्ष मांडावा लागतो. 'हा पूर्वपक्ष' असे शीर्षक देऊनच तो मांडला जातो असे नाही. वाचकाने तो लक्षात घ्यावा लागतो.) ।।३५।।

वेदशास्त्रें पुराणें । कैसीं होतीं अप्रमाणें । दोघांवांचून तिसरा कोणें । उद्धरावा ।।३६।।

वेद, शास्त्रे व पुराणे यांतील वाक्यांचे प्रामाण्य कसे नष्ट होईल? ते प्रामाण्य नाकारले तर त्या दोघांवाचून तिसऱ्याचा उद्धार करण्यासाठी कोण उरले? ।।३६।।

म्हणसी काष्ठीं लागोन पडला । तोचि येक मुक्त जाला । शुक तोहि अनुवादला । नाना निरुपणें ।।३७।।

कित्येकांचा मोक्षासंबंधी असा समज आहे की जो लाकडाप्रमाणे क्रियाशून्य होऊन राहतो तोच खरा मुक्त! खुद्द शुकाने भागवत ग्रंथात अनेक आध्यात्मिक विषयाचे स्पष्टीकरण केले आहे. तो क्रियाशून्य नव्हता. ।।३७।।

शुक मुक्त ऐसें वचन । वेद बोलिला हें प्रमाण । परी तो नव्हता अचेतन । ब्रह्माकार ।।३८।।

शुक मुक्त झाला हे वेदवचन सत्यच आहे. पण तो ब्रह्मरूप झाल्यामुळे ब्रह्माप्रमाणे निष्क्रिय झाला नाही. अचेतनाप्रमाणे पडून राहिला नाही. ।।३८।।

अचेतन ब्रह्माकार । असता शुक योगेश्वर । तरी सारासारविचार । बोलणें न घडे ।।३९।।

योगेश्वर शुक जर ब्रह्मरूप झाल्याने अचेतन लाकडाप्रमाणे झाला असता तर त्याला सार व असार यांचा शास्त्रशुद्ध विवेक सांगता आला नसता. ।।३९।।

जो ब्रह्माकार जाला । तो काष्ठ होऊन पडिला । शुक भागवत बोलिला । परीक्षितीपुढें ।।४०।।

'ब्रह्मरूप झालेला काष्ठाप्रमाणे होतो' असे जर असते तर शुकाला भागवत ग्रंथात परीक्षित राजाला तत्त्वज्ञान सांगता आले नसते. कारण– ।।४०।।

निरूपण हें सारासार । बोलिला पाहिजे विचार । धांडोळावें सचराचर । दृष्टांताकारणें ।।४१।।

आध्यात्मिक निरूपणात सार व असार यांचे स्पष्टीकरण करण्यासाठी अनेक उदाहरणे व युक्त्या वापराव्या लागतात. ती उदाहरणे (रज्जुसर्प, शुक्तीरजत इ.) सर्व सृष्टीतून वेचून आणावी लागतात. (त्यासाठी सृष्टीचे आणि युक्तीसाठी शास्त्र ग्रंथांचे भान असावे लागते. काष्ठाप्रमाणे पडून असणाऱ्याला हे कसे जमेल?) ।।४१।।

क्षण येक ब्रह्मचि व्हावें । क्षण येक दृश्य धांडोळावें । नाना दृष्टांतीं संपादावें । वगतृत्वासी ।।४२।।

शुकासारखे वक्ते एका क्षणी ब्रह्माकार होऊन दुसऱ्या क्षणी वृत्तीवर येऊन सृष्टीत फेरफटका मारतात व अनेक दृष्टान्त वेचून आणून स्वत:चे निरूपण अधिक परिणामकारक करतात, प्रभावी करतात. ।।४२।।

असो भागवतनिरूपण । शुक बोलिला आपण । तया आंगीं बद्धपण । लाऊं नये कीं ।।४३।।

भागवतासारख्या महान ग्रंथामध्यें शुकाचार्यांच्या निरूपणाचा मोठा वाटा आहे. यासाठी त्यांचा मोक्ष नाकारून त्यांना बद्ध म्हणता येणार नाही. ।।४३।।

म्हणोनी बोलतां चालतां । निचेष्टित पडिलें नस्तां । मुक्ति लाभे सायोज्यता । सद्‌गुरुबोधें ।।४४।।

म्हणून श्रीगुरुमुखाने महावाक्य श्रवण झाल्यावर ज्याला सायुज्यमुक्ती लाभली आहे तो लाकडाप्रमाणे पडून न राहता बोलतो व चालतो. सर्व व्यवहार करतो. ।।४४।।

येक मुक्त येक नित्यमुक्त । येक जाणावे जीवन्मुक्त । येक योगी विदेहमुक्त । समाधानी ।।४५।।

मुक्तांचे नित्यमुक्त, जीवन्मुक्त व योगाने प्राप्त होणाऱ्या विदेहमुक्तीत समाधानाने राहणारे असे तीन प्रकार आहेत. (ज्ञानदेव, तुकाराम, रामदासादी नित्यमुक्त किंवा अवतारी. सामान्य जीवन्मुक्त अनेक झाले व आहेत. निर्विकल्प समाधी भोगणारे विदेहमुक्त किंवा देह असेपर्यन्त जीवन्मुक्त व तो मरण पावल्यावर विदेह मुक्त. जीवन्मुक्ताचे शेषप्रारब्ध संपल्यावर त्याचा देह पंचत्वात लीन होऊन विदेहमुक्ती मिळते.) ।।४५।।

सचेतन ते जीवन्मुक्त । अचेतन ते विदेहमुक्त । दोहिवेगळे नित्यमुक्त । योगेश्वर जाणावे ।।४६।।

मोक्षप्राप्तीनंतर कार्यक्षम असणारे जीवन्मुक्त किंवा जिवन्त असणारे ते जीवन्मुक्त. वर्षानुवर्षे समाधीत राहणारे किंवा शरीर टाकणारे ते विदेहमुक्त. अत्यंत श्रेष्ठ योगी असलेले नित्यमुक्त या दोन्हीहून वेगळेच असतात. (ईश्वरी योजनेनुसार ते वेळोवेळी अवतार घेऊन धर्म व अध्यात्माला नवचैतन्य देण्याचे महत्‌कार्य करतात.) ।।४६।।

स्वरूपबोधें स्तब्धता । ते जाणावी ताटस्तता । ताटस्तता आणि स्तब्धता । हा देहसमंधु ।।४७।।

'मी ब्रह्म' असा अनुभव आल्यावर त्या अनुभवात बुडलेल्या स्थितीत जी स्तब्धता येते तिलाच तटस्थता असे म्हणतात. पण या दोन्ही गोष्टी देहसापेक्ष आहेत. ।।४७।।

येथें अनुभवासी कारण । येर सर्व नि:कारण । तृप्ती पावावी आपण । आपुल्या स्वानुभवें ।।४८।।

अनुभव मुख्य असून त्याचे शरीरावर दिसणारे परिणाम गौण आहेत. ते विचारात घेण्याचे कारण नाही. स्वत: अनुभव घेऊन तृप्त होण्यातच सार्थक आहे. ।।४८।।

कंठमर्याद जेविला । त्यास म्हणती भुकेला । तेणें शब्दें जाजावला । हें तों घडेना ।।४९।।

पोटभर जेवलेल्याला जर कोणी 'हा उपाशी आहे' असे म्हटले तर त्याला त्या म्हणण्याचा मुळीच त्रास होत नाही! त्याप्रमाणे विपरीत कल्पनांमुळे कोणी मुक्ताला बद्ध म्हटले तरी त्याची मुक्ती बिघडत नाही. ।।४९।।

स्वरूपीं नाहीं देहो । तेथें काईसा संदेहो । बद्ध मुक्त ऐसा भावो । देहाचकडे ।।५०।।

ब्रह्मानुभवात देहबुद्धीचा स्पर्शही नसतो. किंवा ब्रह्मस्वरूपात देहाला अस्तित्वच नाही. त्यामुळे मोक्षाच्या देहसापेक्ष लक्षणांविषयी शंकासुद्धा घेऊ नये. बंधन व बंधनसापेक्ष मोक्ष या दोन्ही संकल्पना स्थूलादी देहांशी निगडित आहेत. ।।५०।।

देहबुद्धि धरून चिंती । मुक्त ब्रह्मादिक नव्हेती । तेथें शुकाची कोण गती । मुक्तपणाची ।।५१।।

प्रत्यक्ष ब्रह्मदेवाची सुद्धा जर देहबुद्धी शिल्लक असेल तर त्याला मुक्त म्हणता येत नाही. मग शुकादिकांची गोष्टच कशाला! ।।५१।।

मुक्तपण हेंचि बद्ध । मुक्त बद्ध हें अबद्ध । सस्वरूप स्वतसिद्ध । बद्ध ना मुक्त ।।५२।।

'मी मुक्त आहे' असे वाटणे हे सुद्धा बंधनच आहे. बद्धता व मोक्ष यासंबंधी बोलणेही वायफळ आहे! नित्यसिद्ध ब्रह्म कशानेच बद्ध होत नसल्याने कधीच मुक्त होत नाही. ॥५२॥

मुक्तपणाची पोटीं शिळा । बांधतां जाईजे पाताळा । देहबुद्धीचा आगळा । स्वरुपीं न संटे ।।५३।।

'मी मुक्त' ही कल्पना घट्ट धरून बसणारा बंधनाच्या तळाशी जाऊन बसतो! त्या कल्पनेतील 'मी'च्या रूपाने शिल्लक असलेल्या देहबुद्धीचा कलंक विमल ब्रह्माला शोभत नाही. ॥५३॥

मीपणापासून सुटला । तोचि येक मुक्त जाला । मुका अथवा बोलिला । तरी तो मुक्त ।।५४।।

ज्याचा 'अहं' बाधित होतो त्यालाच मुक्त म्हणता येते. तो तसे म्हणो किंवा न म्हणो तो मुक्तच असतो. ॥५४॥

जयास बाधावें तें वाव । तेथें कैंचा मुक्तभाव । पाहों जातां सकळ वाव । गुणवार्ता ।।५५।।

मोक्षासाठी ज्याचा ज्याचा बाध करण्याची कल्पना करावी ते ते तत्त्व मायिक असते.(८२ तत्त्वे मायिक) मग बाध केल्यावर होणारा मोक्षभाव सुद्धा काल्पनिकच ठरतो. जिकडे पहावे तिकडे त्रिगुणात्मक मायिक पसारा दिसतो. ॥५५॥

श्लोक– बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुतः ।
गुणस्य मायामूलत्वान्न मे मोक्षो न बंधनम् ।।छ।।

श्लोकार्थ– बंधन व मोक्ष ही भाषा सत्त्वादी गुणसापेक्ष असून आत्मरूप मी ला वास्तविक ते दोन्ही नसतात. गुण मायेपासून उत्पन्न होत असल्याने मायाविरहित आत्मरूप 'मी' ला बंध व मोक्ष दोन्ही नाहीत.

तत्वज्ञाता परमशुद्ध । तयासी नाहीं मुक्त बद्ध । मुक्तबद्ध हा विनोद । मायागुणें ।।५६।।

ब्रह्मानुभवी ब्रह्मच होत असल्याने अत्यंत शुद्ध असतो. बंध व मोक्ष हे दोन्ही डाग त्याला नसतात. केवळ मायेच्या साम्राज्यात बंधमोक्षाचे खेळ चालतात. त्या कल्पनांना माया जबाबदार आहे. ॥५६॥

जेथें नामरूप हें सरे । तेथें मुक्तपण कैचें उरे । मुक्त बद्ध हें विसरे । विसरलेपणेंसीं ।।५७।।

ज्या स्थितीत नाम व रूपांचा पसारा ओसरतो त्यात बंध व मोक्ष कसे उरतील?मी बद्ध किंवा मी मुक्त या कल्पनांचा विसर पडून 'मला त्यांचा विसर पडला आहे' या जाणिवेचाही विसर पडतो. हीच पारमार्थिक सहजावस्था होय. ॥५७॥

बद्ध मुक्त जाला कोण । तो तरी नव्हे कीं आपण । बधक जाणावें मीपण । धर्त्यास बाधी ।।५८।।

बंधन कोणाला व मुक्त कोण झाला याचा विचार केला तर आत्मरूप 'मी'शी त्यांचा काहीच संबंध नाही. जो जीवरूप 'मी' ला घट्ट पकडून ठेवतो त्यालाच त्या 'मी'पणा चे बंधन पडते. ॥५८॥

एवं हा अवघा भ्रम । अहंतेचा जाला श्रम । मायातीत जों विश्राम । सेविला नाहीं ।।५९।।

एकूण हा सर्व भ्रमरूप अहंकाराचा पसारा आहे व त्यामुळेच बंधमोक्षाचा शीण होतो. जोपर्यन्त 'मायेचे अधिष्ठान ब्रह्म मी आहे' असा अनुभव घेऊन पराशान्ती लाभत नाही तोपर्यन्त शीण होत राहतो. ॥५९॥

असो बद्धता आणी मुक्तता । आली कल्पनेच्या माथां । ते कल्पना तरी तत्वता । साच आहे ।।६०।।

तेव्हा असे ठरले की बंधन व मोक्ष या दोन्ही केवळ कल्पना आहेत. कल्पना ही कधी तरी सत्य असते का? कल्पना कल्पनाच असते. ॥६०॥

म्हणौनि हें मृगजळ । माया नाथिलें आभाळ । स्वप्न मिथ्या तत्काळ । जागृती होये ।।६१।।

म्हणून बंधमोक्ष हे माळजमिनीवरील मृगजळाप्रमाणे, गगनाच्या नीलतेप्रमाणे भ्रामक आहेत. जाग येताच जसे स्वप्न भ्रामक ठरते त्याप्रमाणे प्रत्यक्ष ब्रह्मानुभव येताच बंधमोक्ष काल्पनिक ठरतात. ॥६१॥

स्वप्नीं बद्ध मुक्त जाला । तो जागृतीस नाहीं आला । कैंचा कोण काये जाला । कांहीं कळेना ।।६२।।

एक कोणी बद्ध स्वप्नात मुक्त झाला असे त्याला वाटले पण तो झोपेतून जागा झालाच नाही, तर त्या बंध मोक्षाला काय अर्थ उरतो? सर्व स्वप्नच! ॥६२॥

म्हणोनि मुक्त विश्वजन । जयास जालें आत्मज्ञान । शुद्धज्ञानें मुक्तपण । समूळ वाव ।।६३।।

म्हणून जो मुक्त असतो त्याला सर्व जीवसृष्टी मुक्तच दिसते. त्याच्या शुद्धज्ञानामुळे 'मोक्ष' ही संकल्पनाच उरत नाही. ॥६३॥

बद्ध मुक्त हा संदेहो । धरी कल्पनेचा देहो । साधु सदा निःसंदेहो । देहातीत वस्तु ।।६४।।

बंध व मोक्ष या विषयीचे बोलणे कल्पनेला घट्ट धरून ठेवल्यानेच शक्य होते. देहातीत ब्रह्मानुभव घेतलेला साधू नि:शंक असून स्वत:च्या बंधमोक्षाविषयी काहीच बोलत नाही. ॥६४॥

आतां असो हें पुढती । पुढें राहावें कोणे रितीं । तेंचि निरूपण श्रोतीं । सावध परिसावें ।।६५।।

आता हा विषय आवरता घेऊ. या अनुभवासाठी सैद्धान्तिक विचाराची दिशा कशी असावी ते श्रोत्यांनी सावधपणे ऐकावे. साधना ऐकावी. ॥६५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'बद्धमुक्तनिरूपण' नाम समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'बद्धमुक्तनिरूपण' नावाचा सहावा समास समाप्त

दशक सातवा : चौदा ब्रह्मांचा (चतुर्दशब्रह्म)

समास सातवा : साधनप्रतिष्ठानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

वस्तूसि जरी कल्पावें । तरी ते निर्विकल्प स्वभावें । तेथें कल्पनेच्या नावें । सुन्याकार ।।१।।

ब्रह्मानुभवासाठी ब्रह्माविषयी कल्पना करून त्यात अन्त:करणवृत्ती अडकवून ठेवावी असा जर कोणी साधक विचार करील तर ते शक्य नाही. कारण ते स्वरूपानेच स्वसंवेद्य आहे. कोणत्याच ज्ञानेंद्रियाने किंवा तर्काने त्याचे ज्ञान होत नसल्याने त्याचे विषयी कोणतीच कल्पना करता येणे कोणाला कधीही शक्य नाही. (व्यवहारात 'मला परिस्थितीची पूर्ण कल्पना आली' असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा त्या परिस्थितीचा पूर्ण तपशील लक्षात आलेला असतो. असे ब्रह्माविषयी होऊ शकत नाही) ॥१॥

तथापि कल्पू जातां । न ये कल्पनेच्या हातां । वोळखी ठाई न पडे चित्ता । भ्रंश पडे ।।२।।

असे असूनही ब्रह्माची कल्पना करण्याचा प्रयत्न केलाच तर ते कल्पनेच्या आवाक्यात येत नाही. 'हे ब्रह्म' अशी त्याची ओळख न झाल्याने मन घोटाळ्यात पडते. ओळखीच्या इतर नामरूपात्मक पदार्थाप्रमाणे त्याची ओळख न पटल्याने संभ्रम होतो. ॥२॥

कांही दृष्टीसचि न दिसे । मनास तेंहि न भासे । न भासे न दिसे कैसें । वोळखावें ।।३।।

डोळ्यासमोर काही केल्या त्याचे रूप आणता येत नाही. मनाने त्याची कल्पना करू म्हटले तर तेही जमत नाही. जे दिसत नाही व भासत नाही ते कसे ओळखावे? ॥३॥

पाहों जातां निराकार । मनासि पडे सुन्याकार । कल्पूं जातां अंधकार । भरला वाटे ।।४।।

ब्रह्म अरूप म्हणून निराकार आहे. डोळ्याचा रूप हा विषय आहे. म्हणजे डोळ्याला केवळ रूपाचे ज्ञान होते. म्हणून ब्रह्म डोळ्याने दिसत व कळत नाही. जे केव्हांतरी पाच ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने कळलेले असते, त्याविषयीच मन संकल्प करू शकते. ब्रह्म असे कधीच कळलेले नसल्याने ब्रह्माचा विचार करू गेले तर ते शून्य होऊन जाते! सर्वत्र अंधार पसरल्यासारखे वाटते! ॥४॥

कल्पूं जातां वाटे काळें । ब्रह्म काळें ना पिवळें । आरक्त निळें ना धवळें । वर्णरहित ।।५।।

ब्रह्माची कल्पना करू गेले तर ते काळे वाटते. वस्तुत: अरूप ब्रह्म काळे, पिवळे, लाल, निळे, पांढरे, इ. वर्णांचे नाही. (डोळे मिटल्यावर काळेपणा भरून जातो) ॥५॥

जया वर्णवेक्ती नसे । भासाहून अनारिसें । रूपचि नाहीं कैसें । वोळखावें ।।६।।

ज्याला कोणताही रंग नाही, जे मनाला भासत नाही व ज्याला रूप नाही ते ओळखावे कसे? ॥६॥

न दिसतां वोळखण । किती धरावी आपण । हें तों श्रमासीच कारण । होतसे ।।७।।

जे कधीच पाहून कळलेले नाही ते चित्ताने पकडून ठेवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी कष्टाशिवाय काहीच वाट्याला येत नाही. ॥७॥

जो निर्गुण गुणातीत । जो अदृश्य अवेक्त । जो अचिंत्य चिंतनातीत । परम पुरुष ।।८।।

ज्या ब्रह्माला परमपुरुष म्हटले जाते ते अगुण असल्याने निर्गुण, अव्यक्त असल्याने अदृश्य व अचिंत्य असल्याने

चिंतनात न येणारे आहे. ॥८॥

श्लोक– अचिंत्याव्यक्तरूपाय निर्गुणाय गुणात्मने ।
समस्तजगदाधार मूर्तये ब्रह्मणे नमः ।।

श्लोकार्थ– अचिंत्य, अव्यक्त, निर्गुण (स्वरूप लक्षणे) गुणात्मक, जगदाधार व मूर्त (तटस्थ लक्षणे) अशा ब्रह्माला नमस्कार असो.

अचिंत्य तेंचि चिंतावें । अव्यक्तास आठवावें । निर्गुणास वोळखावें । कोणेपरी ।।९।।

जे चिंतनातीत त्याचे चिंतन, अव्यक्ताचे स्मरण व निर्गुणाचा परिचय कसा करून घ्यावा? ॥९॥

जें दृष्टीसचि न पडे । जें मनासहि नातुडे । तया कैसें पाहाणें घडे । निर्गुणासी ।।१०।।

अगुण ब्रह्म डोळ्यांना दिसत नाही, मनाला कळत नाही. त्याला कसे पहावे? ॥१०॥

असंगाचा संग धरणें । निरावलंबी वास करणें । निशब्दासी अनुवादणें । कोणेपरीं ।।११।।

एकमेव असंग ब्रह्माची संगत, पाया व छप्पर नसलेल्या ब्रह्मात अनिकेत राहणे व शब्दातीताचे वर्णन करणे कसे शक्य आहे? ॥११॥

अचिंत्यासी चिंतूं जातां । निर्विकल्पासी कल्पितां । अद्वैताचें ध्यान करितां । द्वैतचि उठे ।।१२।।

'मी अचिंत्याचे चिंतन करतो', 'मी निर्विकल्पाची कल्पना करतो' व 'मी अद्वैतब्रह्माचे ध्यान करतो' इ. प्रकारे द्वैतच फोफावते! ॥१२॥

आतां ध्यानचि सोडावें । अनुसंधान तें मोडावें । तरी मागुतें पडावें । माहां संशईं ।।१३।।

असे होते म्हणून ध्यानच करू नये व अनुसंधान सोडावे तर स्वरूपाविषयीचे गहन संशय अधिकच वाढत जातात. निश्चय होत नाही. ॥१३॥

द्वैताच्या भेणें अंतरी । वस्तु न पाहिजे तरी । तेणें समाधाना उरी । कदा असेचिना ।।१४।।

द्वैत फोफावण्याच्या भीतीने आत्मानुभव घेतलाच नाही, तर आत्मानुभवाचे समाधान कधीच होत नाही. ॥१४॥

सवे लावितां सवे पडे । सवे पडतां वस्तु आतुडे । नित्यानित्यविचारें घडे । समाधान ।।१५।।

ते समाधान हवे असेल तर आत्मानात्म, क्षराक्षर, सत्यमिथ्या इ. प्रकारे विवेकाची सवय लावून घ्यावी. लावून घेतली की सवय लागते व आत्मानुभव येतो. ॥१५॥

वस्तु चिंतितां द्वैत उपजे । सोडी करितां कांहींच नुमजे । सुन्यत्वसंदेहीं पडिजे । विवेकेंविण ।।१६।।

आत्मविचार करावा तर द्वैत व तो सोडून द्यावा तर शून्यरूप अंधार होतो. नित्यनित्यादी विवेक नसेल तर संशय सरत नाही. ॥१६॥

म्हणोनि विवेक धरावा । ज्ञानें प्रपंच सारावा । अहंभाव वोसरावा । परी तो वोसरेना ।।१७।।

म्हणून सतत विवेकाच्या अनुसंधानाने अनात्म, अनित्य व असार प्रपंचातून अन्तःकरण काढून घेऊन अहंकाराचा त्याग करावा. पण अहंकार असा सहजासहजी जाणारा नव्हे! ॥१७॥

परब्रह्म तें अद्वैत । कल्पितांच उठे द्वैत । तेथें हेत आणी दृष्टांत । कांहीच न चले ।।१८।।

परब्रह्म अखंड व भेदशून्य आहे. त्याची कल्पना करू लागताच ब्रह्म व कल्पना करणारा असे त्याचे दोन खंड किंवा भाग पडतात व अद्वैत मोडते. न्यायशास्त्राने तर्काचे पाच अवयव सांगितले आहेत. प्रतिज्ञा, हेतू, उदाहरण, उपनय व निगमन. पण असा तर्क मांडूनही ब्रह्मानुभव येत नाही. ब्रह्म हा तर्काचा विषयच नाही. ॥१८॥

तें आठविंता विसरिजे । कां तें विसरोनि आठविजे । जाणोनियां नेणिजे । परब्रह्म तें ।।१९।।

ब्रह्माची आठवण करू गेले तर ते हरवते! ते हरवले असता जणू अनुभवाला येते. ‘मी ब्रह्म जाणत नाही’ असे जो जाणतो त्याने ते जाणलेले असते!! (ह्या गूढ ओवीच्या स्पष्टीकरणासाठी केन.उप. २/२ व ३ या मंत्रावरील आचार्यभाष्य समजावून घ्यावे) ॥१९॥

त्यास न भेटतां होये भेटी । भेटों जातां पडे तुटी । ऐसी हे नवल गोष्टी । मुकेपणाची ।२०।।

द्वैत मोडून अद्वैत साधले तर तीच ब्रह्माची खरी भेट! व्यावहारिक भेटीत द्वैत असते. अशा भेटीने ब्रह्म भेटत नाही. (ज्ञानदेव ह्या सहजभेटीला ‘सिद्धभेट’ म्हणतात– चांग. पासष्टी) अशी ही नवलाईची शब्दरहित भेट आहे. ॥२०॥

तें साधूं जातां साधवेना । नातरी सोडितां सुटेना । लागला समंध तुटेना । निरंतर ।।२१।।

‘मी आत्म्याची भेट घेईन’ असे म्हणून ती घेता येत नाही. व ‘मी आत्म्याला भेटणार नाही’ असे म्हणून असलेली भेट सुटणार नाही. अनादि नित्यसंबंध कधीच सुटत नाही. (जीव मूलत: ब्रह्मच आहे.) ॥२१॥

तें असतचि सदां असे । नातरी पाहातां दुरासे । न पाहातां प्रकाशे । जेथें तेथें ।।२२।।

ब्रह्म स्वरूपाने अनादि, नित्य, सत्य आहे. जीवभाव पत्करून त्याकडे पाहू लागले तर त्याचे अद्वैत मोडल्याने ते जणू दुरावते. हे द्वैतातील पहाणे सोडून दिले तर ते स्वयंप्रकाशत्वाने सर्वत्र व्यापून आहे. ॥२२॥

जेथें उपाये तोचि अपाये । आणी अपाये तोचि उपाये । हें अनुभवेंविण काये । उमजो जाणें ।।२३।।

शुद्ध परमार्थामध्ये ब्रह्मप्राप्तीचा प्रत्येक उपाय ते नित्यप्राप्त असल्याने अपयश देतो. पण पहाणारा, पहाण्याची वस्तू व पाहणे या त्रिपुटीला अपाय केला तर तोच ब्रह्मानुभवाचा उपाय उरतो. अनुभवानेच या म्हणण्याचे वर्म लक्षात येईल. ॥२३॥

तें नुमजतांच उमजे । उमजोन कांहींच नुमजे । तें वृत्तीविण पाविजे । निवृत्तिपद ।।२४।।

जे ब्रह्म वृत्तीला कळले असे वाटते ते ब्रह्म नसते. वृत्तिज्ञानाशिवाय जो ब्रह्मानुभव येतो तेच खरे ब्रह्मज्ञान. नित्य ब्रह्माचा अनुभव अनित्य वृत्ती निवृत्त झाल्यावर येतो. निवृत्ती हेच ब्रह्म जाणावे. ॥२४॥

तें ध्यानी धरितां नये । चिंतनीं चिंतावें तें काये । मनामधें न समाये । परब्रह्म तें ।।२५।।

अरूप व अलक्ष्य ब्रह्माचे ध्यान करता येत नाही. चित्तवृत्तीला ते धरता येत नाही. ब्रह्मच अन्त:करण वृत्तीचे प्रकाशक असल्याने ते तिच्या आवाक्यात येत नाही. ॥२५॥

त्यास उपमे द्यावें जळ । तरी तें निर्मळ निश्चळ । विश्व बुडालें सकळ । तरी तें कोरडेंचि असे ।।२६।।

ब्रह्माला पाण्याची उपमा द्यावी तर ब्रह्म मलरहित व अचल आहे. पाण्यात कचरा असतो व त्यावर तरंग उठतात. सर्व विश्व जणू ब्रह्मामध्ये बुडालेले असूनही ब्रह्म कोरडे म्हणजे अलिप्त आहे. ॥२६॥

नव्हे प्रकाशासारिखें । अथवा नव्हे काळोखें । आतां तें कासयासारिखें । सांगावें हो ।।२७।।

त्याला प्रकाशाची किंवा अंधाराची उपमा देता येत नाही. प्रकाश प्रकाशकणयुक्त (Photones) असतो. ब्रह्म निरवयव आहे. त्यामुळे ते कोणासारखे आहे ते कसे सांगावे? प्रकाश व अंधाराचे ब्रह्म प्रकाशक आहे. ॥२७॥

ऐसे ब्रह्म निरंजन । कदा नव्हे दृश्यमान । लावावें तें अनुसंधान । कोणेपरी ।।२८।।

असे हे रूपरहित ब्रह्म कोणालाही कधीच डोळ्याने दिसत नाही. त्यामुळे ते चित्ताने कसे पकडून ठेवावे? ॥२८॥

अनुसंधान लाऊं जातां । कांहीं नाहीं वाटे आतां । तेणें मनाचिया माथां । संदेह वाजे ।।२९।।

असे असतानाही चित्ताने त्याचे अवधारण करण्याचा यत्न केलाच तर अवधारण करण्यासारखे काहीच नाही असा अनुभव येतो. त्यामुळे मनाचे त्यासंबंधीचे विकल्प वाढतात. ॥२९॥

लटिकेंचि काये पाहावें । कोठें जाऊन राहावें । अभाव घेतला जीवे । सत्य स्वरूपाचा ।।३०।।

पाहण्याचा व्यर्थ प्रयत्न काय उपयोग? कोणत्या तीर्थक्षेत्रात वा मठात राहून ते दिसेल? अशा विचारामुळे त्रिकालाबाधित ब्रह्म नाहीच असे वाटू लागते! ॥३०॥

अभावचि म्हणों सत्य । तरी वेदशास्त्र कैसें मिथ्य । आणी व्यासादिकांचें कृत्य । वाउगें नव्हे ।।३१।।

'नाहीपणा' हेच ब्रह्माचे स्वरूप मानले तर ब्रह्म 'सत्' आहे हे वेदान्ताचे सांगणे खोटे मानावे लागेल. शिवाय व्यासादी महर्षींनी गीतेसारखे ग्रंथ सांगण्याचे कष्ट उगीचच केले असे म्हणावे लागेल. ॥३१॥

म्हणोनि मिथ्या म्हणतां नये । बहुत ज्ञानाचे उपाये । बहुतीं निर्मिलें तें काये । मिथ्या म्हणावें ।।३२।।

म्हणून गीतादी शास्त्रात सांगितलेले सत्य ब्रह्म नाकारणे शक्य नाही. ब्रह्मानुभवाची अनेक शास्त्रे अनेकांनी सांगितली ती व्यर्थ नाहीत. ती अशी– ॥३२॥

अद्वैतज्ञानाचा उपदेश । गुरुगीता तो महेश । सांगता होये पार्वतीश । पार्वतीप्रती ।।३३।।
अवधूतगीता केली । गोरक्षीस निरोपिली । ते अवधूतगीता बोलिली । ज्ञानमार्ग ।।३४।।
विष्णु होऊन राजहंस । विधीस केला उपदेश । ते हंसगीता जगदीश । बोलिला स्वमुखें ।।३५।।
ब्रह्मा नारदा उपदेशित । चतुश्लोकी भागवत । पुढें व्यासमुखें बहुत । विस्तारलें ।।३६।।
वसिष्ठसार वसिष्ठऋषी । सांगता जाला रघुनाथासी । कृष्ण सांगे अर्जुनासी । सप्तश्लोकी गीता ।।३७।।

पार्वतीपती महेशाने गुरुगीतेत पार्वतीस अद्वैताचा उपदेश केला. त्यानेच अवधूत गीतेमध्ये गोरक्षनाथाला ज्ञानमार्ग सांगितला. श्री विष्णूने हंसरूपाने ब्रह्मदेवाला स्वमुखाने जो उपदेश केला तीच हंस गीता. ब्रह्मदेवाने नारदाला चतुश्लोकी भागवतात तेच तत्त्व सांगितले. पुढे व्यासांकडून त्याचा मोठा विस्तार झाला. वसिष्ठ मुनींनी योग वासिष्ठात श्रीरामाला साररूप सिद्धान्त सांगितला. श्रीकृष्णाने अर्जुनाला सप्तश्लोकी गीता सांगितली. ॥३३-३७॥

ऐसें सांगावें तें किती । बहुत ऋषी बोलिले बहुतीं । अद्वैत ज्ञान आदिअंतीं । सत्यचि असे ।।३८।।

आतापर्यन्त अनेक ऋषींनी अनेकांना ब्रह्मज्ञान सांगितले आहे. त्यांची संख्या किती सांगावी? अनादि कालापासून आतापर्यन्त ते अद्वैत तत्त्वज्ञान सत्य व उपयुक्त आहे. व्यर्थ नाही. ॥३८॥

म्हणोनि मिथ्या आत्मज्ञान । म्हणतां पाविजे पतन । प्रज्ञेरहित जे जन । तयांसी हें कळेना ।।३९।।

म्हणून आत्मज्ञान हा केवळ कल्पनाविलास आहे असे मानले तर आत्मोद्धार होणार नाही. पूर्वसुकृताने मिळालेली सत्त्वप्रधान बुद्धी नसेल तर आत्मज्ञानावर श्रद्धा बसत नाही. ॥३९॥

जेंथे शेषाची प्रज्ञा मंदली । श्रुतीस मौन्यमुद्रा पडिली । जाणपणें न वचे वदली । स्वरूपस्थिती ।।४०।।

हजार जिभा असलेल्या शेषाला आत्मस्वरूप सांगू म्हटले तर बोबडी वळते! प्रत्यक्ष उपनिषदे सुद्धा आत्मानुभवाचे वर्णन करताना स्तब्ध होतात. 'मी ब्रह्म जाणले' अशा प्रकारे ते कोणालाही कधीही जाणता येत नाही. (पहा ओवी १९.) ॥४०॥

आपणास नुमजे बरवें । म्हणोनि मिथ्या कैसें करावें । नातरी सदृढ धरावें । सद्गुरुमुखे ।।४१।।

स्वत:ला समजत नाही म्हणून ब्रह्मतत्त्व नाहीच असे म्हणणे योग्य आहे काय? म्हणून श्री गुरूंच्या आश्रयाने ते जाणून घ्यावे व त्याविषयी यथार्थ निश्चय करून घ्यावा. ॥४१॥

मिथ्य तेंचि सत्य जालें । सत्य असोन मिथ्य केलें । संदेहसागरी बुडालें । अकस्मात मन ।।४२।।

दृश्य जगत् मिथ्या असून सत्य वाटते. ब्रह्म सत्य असून मिथ्या वाटते. रजतम प्रधान असलेले मन मधूनमधून अकस्मात अशा संशयसमुद्रात बुडत राहते. ॥४२॥

मनास कल्पायाची सवे । मनें कल्पिले तें नव्हे । तेणे गुणें संदेह धावे । मीपणाचेनि पंथे ।।४३।।

संकल्पविकल्पात्मक विचार करणें हा मनाचा स्वभावच आहे. पण त्याने केलेल्या कोणत्याही विचाराने विचारकाळी ब्रह्मानुभव येत नाही. त्यामुळे ब्रह्मस्वरूपाविषयी वाटणाऱ्या संशयामुळे सहज असलेली अहंता जागी होऊन तिचा नित्याचा मी सुखी, मी दु:खी, मी असा, मी तसा इत्यादी प्रकारे प्रवाह सुरू होतो. ॥४३॥

तरी तो पथचि मोडावा । मग परमात्मा जोडावा । समूळ संदेह तोडावा । साधुचेनि संगतीं ।।४४।।

म्हणून हा प्रवाहच आटवून टाकावा व ब्रह्मानुभव घ्यावा. संतांच्या आश्रयाने संशयाचे मूळ असलेला संकल्प-विकल्पात्मक विचार थांबवावा. ॥४४॥

मीपण शस्त्रें तुटेना । मीपण फोडितां फुटेना । मीपण सोडितां सुटेना । कांहीं केल्यां ।।४५।।

अहंता शस्त्राने तुटत नाही, घण घालून फुटत नाही व कोणत्याही स्वबुद्धीने केलेल्या विचाराने ती सोडता येत नाही. ॥४५॥

मीपणें वस्तु नाकळे । मीपणें भक्ति मावळे । मीपणें शक्ति गळे । वैराग्याची ।।४६।।

अहंकाराचे अधिष्ठान असलेले ब्रह्म अहं जागा असेपर्यंत अनुभवाला येत नाही. अहंकार शरणागतीला विरोधी असल्याने उपासनाही सार्थकी लागत नाही. अहंकार तमोगुणाचा असल्याने सत्त्वगुणाचे वैराग्य लाभत नाही. ॥४६॥

मीपणें प्रपंच न घडे । मीपणें परमार्थ बुडे । मीपणें सकळहि उडे । येशकीर्तिप्रताप ।।४७।।

अहंकारी प्रापंचिक प्रपंच बिघडवतो व दु:खरूप करतो. प्रबळ अहंता जीव व ब्रह्म ह्यांचे ऐक्य साधू देत नाही. मिळालेले यश, कीर्ती व पराक्रम अहंकाराने फुकट जातात. ॥४७॥

मीपणें मीत्री तुटे । मीपणें प्रीति आटे । मीपणें लिगटे । अभिमान आंगी ।।४८।।

जोडलेले मित्र अहंकारामुळे तुटतात. असलेले प्रेम नष्ट होते व दर्पामुळें इतर तुच्छ वाटू लागतात. ॥४८॥

मीपणें विकल्प उठे । मीपणें कळह सुटे । मीपणें संमोह फुटे । ऐक्यतेचा ।।४९।।

'मला पटत नाही' ह्या प्रकारे अहंकारामुळे विकल्प निर्माण होतात व भांडणाची व्याप्ती वाढत जाते. मूळचे असलेले जीव आणि ब्रह्म ह्यांचे ऐक्य 'अहं' जागा झाल्याने मोडते. ॥४९॥

मीपण कोणासिच न साहे । तें भगवंती कैसेनि साहे । म्हणौनि मीपण सांडून राहे । तोचि समाधानी ।।५०।।

अहंकारी माणूस कोणालाही नकोसा वाटतो. मग तो देवाला कसा आवडेल? म्हणून 'अहं' सोडणारा सर्व प्रकारे समाधानात राहतो. ॥५०॥

मीपण कैसें त्यागावें । ब्रह्म कैसें अनुभवावें । समाधान कैंसे पावावें । कोणा प्रकारें ।।५१।।

असा प्रश्न निर्माण होतो की हा 'मी' पणा कसा सोडावा? ब्रह्मानुभव घेऊन ते समाधान मिळण्याचे साधन कोणते? उत्तर —– ॥५१॥

मीपण जाणोनि त्यागावें । ब्रह्म होऊन अनुभवावें । समाधान तें पावावें । नि:संगपणे ।।५२।।

अहंकाराचे स्वरूप श्रीगुरूंकडून समजावून घेऊन त्याप्रमाणें तो ओळखून त्यांच्याच उपदेशानुसार सोडावा. जीवरूप मी ब्रह्मरूप करून ब्रह्मानुभव घ्यावा. नि:संगपणे जगण्याची सवय लावून घेऊन प्राप्त परिस्थितीत स्वस्थ राहावे. ॥५२॥

आणीक येक समाधान । मीपणेंविण साधन । करूं जाणे तोचि धन्य । समाधानी ।।५३।।

शमादी सहा साधनांतील समाधानापेक्षा आणखी श्रेष्ठ समाधानांसाठी साधकाने साधनकाळी 'मी साधक असून साधना करीत आहे' हा भाव सोडून साधना करावी! असे साधन करणारा धन्य होय. साधनेला बसताच 'अहं'चे विसर्जन करावे. ॥५३॥

मी तों ब्रह्मचि जालों स्वता । साधन कोण करील आतां । ऐसें मनीं कल्पूं जातां । कल्पनाचि उठे ।।५४।।

तसे विसर्जन केले नाही तर 'मी आता ब्रह्मरूप झाल्याने साधना करण्यासाठी कोणी उरले नाही' हाच एक नवा संकल्प उत्पन्न होतो! एक कल्पना उठली की त्यांची रांग लागते. ॥५४॥

ब्रह्मीं कल्पना न साहे । तेचि तेथें उभी राहे । तयेसि शोधून पाहे । तोचि साधु ।।५५।।

सूक्ष्मातिसूक्ष्म अन्त:करणवृत्ती हाही ब्रह्मानुभवाला प्रतिबंध होतो. साधन करताना ती हजर असते! ती लक्षात घेऊन तिचेही निराकारण करणारा साधक सिद्ध होतो. साधू होतो. ॥५५॥

निर्विकल्पासी कल्पावें । परी कल्पिते आपण न व्हावें । मीपणासि त्यागावें । येणें रितीं ।।५६।।

'मी ब्रह्म आहे' इत्यादी प्रकारे निर्विकल्पाविषयी कल्पना करता करता कल्पना करणाऱ्याने ('मी'ने) ज्याची 'मी' अशी कल्पना करावयाची (ब्रह्म) त्यापासून वेगळे उरू नये. 'मी'पणाचा त्याग करण्याची ही रीत आहे. ॥५६॥

या ब्रह्मविद्येच्या लपणी । कांहींच नसावें असोनी । दक्ष आणी समाधानी । तोचि हें जाणे ।।५७।।

या ब्रह्मविद्येचे रहस्य असे आहे की तीन देहांचे व दृश्य जगताचे व्यावहारिक अस्तित्व असूनही ते जणू मावळून जावेत. साधनकाळी सावधपणाने समाधानात राहणारा (ओवी ५३) या बोलण्यातील गूढ उकलू शकतो. (पहा– ५-३-३२) ॥५७॥

जयासी आपण कल्पावें । तेंचि आपण स्वभावें । येथें कल्पनेच्या नावें । सुन्य आलें ।।५८।।

ज्याची 'मी' म्हणून कल्पना दृढ करावयाची ते ब्रह्म स्वरूपाने पहिल्यापासून मीच असल्याने कल्पनेला पूर्णविराम मिळतो. ॥५८॥

पदीहून चळों नये । करावें साधन उपाये । तरीच सांपडे सोये । अलिप्तपणाची ।।५९।।

एकदा अद्वैतबोधावर आरूढ झाल्यावर पुन्हा द्वैतात न येण्याचा आटोकाट यत्न करावा. साधन असे असावे. त्यानेच असंगत्वाने सहजपणे राहणे साधते. ॥५९॥

राजा राजपदीं असतां । उगीच चाले सर्व सत्ता । साध्यचि होऊन तत्वतां । साधन करावें ।।६०।।

राजा राज्यपदावर असला की काही न करता त्याची सत्ता चालते. त्याप्रमाणे ब्रह्मरूप होऊन त्याच्याच अधिष्ठानावर जणू साधना करावी! अध्यस्त साधना अधिष्ठान ब्रह्मामुळे चालते! ॥६०॥

साधन आलें देहाच्या माथां । आपण देह नव्हे सर्वथा । ऐसा करूनि अकर्ता । सहजचि जाला ।।६१।।

आत्मरूप मी चा देहाशी जराही संबंध नाही. (आत्मा असंग). साधनांचे सर्व प्रकार स्थूल सूक्ष्म शरीराने करावयाचे असतात. त्यामुळे 'मी' सहजच असंग व अकर्ता ठरतो. ॥६१॥

देह आपण ऐसें कल्पावें । तरीच साधन त्यागावें । देहातीत अस्तां स्वभावें । देह कैचां ।।६२।।

'मी साधनेचा त्याग करीन' अशी कल्पना 'मी देह आहे' या अविद्यामय भ्रमात उतरल्याशिवाय करताच येत नाही. 'मी' जर देहातीत आहे तर देहसापेक्ष साधनेचा त्याग कसा करणार? देह उरतोच कोठे? ॥६२॥

ना तें साधन ना तें देह । आपला आपण नि:संदेह । देहीच असोन विदेह । स्थिति ऐसी ।।६३।।

मी देह नसल्यामुळे साधनही शक्य नाही. 'मी' संदेहरहित स्वरूपस्थितीत आहे. देहात असून विदेही आहे. (५८ ते ६३ पर्यन्तचा विषय केवळ सैद्धान्तिक दृष्ट्या बरोबर असला तरी शब्दपातळीवरील साधकासाठी घातक आहे असे यापुढे समर्थ सांगतात) ॥६३॥

साधनेंविण ब्रह्म होतां । लागों पाहे देहममता । आळस प्रबळे तत्वता । ब्रह्मज्ञानमिसें ।।६४।।

प्रत्यक्ष साधना न करता केवळ ब्रह्मविद्या प्राप्त झाल्याने देहावरील प्रेम अत्यंत वाढते. आपण ब्रह्मज्ञ आहोत या कल्पनेमुळे साधना करण्याचा मोठाच आळस येतो. ॥६४॥

परमार्थमिसें अर्थ जागे । ध्यानमिसें निद्रा लागे । मुक्तिमिसें दोष भोगे । अनर्गळता ।।६५।।

परमार्थाच्या माध्यमातून जमीन, पैसा, मठ इ. मिळण्याची इच्छा होते. निद्रा हीच ध्यान बनते! आपण मुक्त आहोत या भावेनेने अशोभनीय वर्तन घडते. ॥६५॥

निरूपणमिसें निंदा घडे । संवादमिसें वेवाद पडे । उपाधीमिसें येऊन जडे । अभिमान आंगीं ।।६६।।

प्रवचन-कीर्तनातून दुसऱ्यांच्या निंदेची हौस भागविली जाते. कोणी संवादासाठी आले तर अभिमानामुळे त्याच्याशी भांडण होते. महाराज, गुरू, वेदान्ती इ. उपाधी चिकटून अभिमान वाढत राहतो. ॥६६॥

तैसा ब्रह्मज्ञानमिसें । आळस अंतरीं प्रवेशे । म्हणे साधनाचें पिसें । काये करावें ।।६७।।

प्रस्थानत्रयीसारख्या ग्रंथांच्या अभ्यासामुळें ब्रह्मज्ञान झाल्याचा भास होऊन साधनेचा उत्साह संपूर्णपणे मावळतो. 'आपण आता साधनेचा वेडेपणा का करावा' असे वाटू लागते. ॥६७॥

श्लोक– किं करोमि क्व गच्छामि किं गृण्हामि त्यजामि किम् ।
आत्मना पूरितं सर्वं महाकल्पांबुना यथा ।।

श्लोकार्थ– 'मी आता काय करावे? कोठे जावे? काय घ्यावे? काय टाकावे? कारण जळप्रलयकाळी जसे सर्वत्र पाणीच पाणी भरलेले असते त्याप्रमाणे आत्माच सर्वत्र व्यापून आहे.

वचन आधारीं लाविलें । जैसें शस्त्र फिराविलें । स्वता हाणोन घेतलें । जयापरी ।।६८।।

यासारखी वचने सांगून हा तथाकथित जीवन्मुक्त जणू आपण आपल्यावरच शस्त्र चालवून स्वत:चा घात करतो. ॥६८॥

तैसा उपायाचा अपाये । विपरीतपणें स्वहित जाये । साधन सोडितां होये । मुक्तपणें बद्ध ।।६९।।

अशा प्रकारे वेदान्तशास्त्र हे मुक्तीचा उपाय असूनही तेच अपायकारक ठरते. विपरीत विचाराने स्वहिताला मुकतो. 'मी मुक्त' या कल्पनेने साधना सोडल्यामुळे बांधला जातो. ॥६९॥

साधन करितां च सिद्धपण । हातींचें जाईल निघोन । तेणें गुणें साधन । करूंच नावडे ।।७०।।

आपण साधन केले तर आपल्या भ्रामक जीवनमुक्तीच्या लौकिकाला धक्का लागेल या भयाने त्याला साधन करावेसे वाटत नाही. ॥७०॥

लोक म्हणती हा साधक । हेचि लज्या वाटे येक । साधन करिती ब्रह्मादिक । हें ठाउकें नाहीं ।।७१।।

'मी साधन करू लागलो तर लोक मला साधक समजतील व त्यामुळें माझी जीवन्मुक्ती ते मान्य करणार नाहीत!' म्हणून तो साधना करण्यास लाजतो. प्रत्यक्ष ब्रह्मदेवादी सुद्धा सतत साधना करतात हे त्याला ठाऊकच नसते. ॥७१॥

आतां असो हे अविद्या । अभ्याससारणी विद्या । अभ्यासें पाविजे अद्या । पूर्ण ब्रह्म ।।७२।।

आता हा विचार पुरे. वेदान्त चिन्तनपूर्वक साधना केल्याने लाभणारी विद्या हळूहळू अविद्येचा निरास करते. या अभ्यासाने आद्य, अनादि, नित्य ब्रह्म 'मी' आहे असा अनुभव येतो. ॥७२॥

अभ्यास करावा कवण । ऐसा श्रोता करी प्रश्न । परमार्थाचें साधन । बोलिलें पाहिजे ।।७३।।

यावर श्रोता विचारतो– अभ्यास कोणता व कसा करावा? मोक्षासाठी आवश्यक ती साधना सांगावी अशी विनंती आहे. ॥७३॥

याचें उत्तर श्रोतयांसी । दिधले पुढिले समासीं । निरोपिलें साधनासी । परमार्थाच्या ।।७४।।

पुढील समासात श्रोत्याच्या या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी मोक्षसाधना सांगू. ॥७४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'साधनाप्रतिष्ठानाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'साधनप्रतिष्ठा' नावाचा सातवा समास समाप्त

दशक सातवा : चौदा ब्रह्मांचा (चतुर्दशब्रह्म)

समास आठवा : श्रवणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ऐका परमार्थाचें साधन । जेणें होये समाधान । तें तूं जाण गा श्रवण । निश्चयेंसी ।।१।।

आता जीवब्रह्मैक्यरूप परमार्थ साधण्याचे व त्यामुळे अखंड निरपेक्ष समाधान प्राप्त होण्याचे सुनिश्चित साधन ऐका. श्रवण हे ते साधन होय. किंवा श्रोत्यांचे समाधान होईल अशा प्रकारे मोक्षसाधन सांगू. (पूर्वोत्तरपक्ष विचारपूर्वक वेदान्ताच्या तात्पर्याचा निश्चय करणे म्हणजे श्रवण. यात मननाचाही समावेश होतो. धर्मशास्त्र, पुराणे, षड्दर्शने, प्रस्थानत्रयी इ. ऐकणे, वाचणे व सांगणे यांनाही सामान्यत्वाने श्रवण म्हटले जाते.) ॥१॥

श्रवणें आतुडे भक्ती । श्रवणें उद्भवे विरक्ती । श्रवणें तुटे आसक्ती । विषयांची ।।२।।

त्या त्या विषयातील अधिकाऱ्याच्या मुखातून यथार्थ श्रवण घडले तर उपासनेची वर्मे समजून भक्तीचे स्वरूप कळते. वैराग्याचे लक्षण व महत्त्व कळून त्याचा लाभ होतो. त्यामुळे शब्दादी विषयांची आसक्ती कमी होत जाते. ॥२॥

श्रवणें घडे चित्तशुद्धी । श्रवणें होये दृढबुद्धी । श्रवणें तुटे उपाधी । अभिमानाची ।।३।।

वेदविहित निष्काम कर्मामुळे चित्त शुद्ध होते. परमार्थाच्या सर्व संकल्पना स्पष्ट होऊन तत्त्वज्ञान व साधनेविषयी दृढ बुद्धी होते. अहंकारलयाचे महत्त्व कळून तो हळूहळू गळून पडतो. हे सर्व श्रवणाने घडते. ॥३॥

श्रवणें निश्चयो घडे । श्रवणें ममता मोडे । श्रवणें अंतरीं जडे । समाधान ।।४।।

मोक्ष हेच मानवी जीवनाचे साध्य आहे असा निश्चय होतो. ज्याला 'माझे' म्हटले जाते ते जगातील असून जग मायिक असल्याने तेही मायिक ठरल्याने 'माझे' विरळ होते व समाधान टिकते. ॥४॥

श्रवणें आशंका फिटे । श्रवणें संशय तुटे । श्रवण होतां पालटे । पूर्वगुण आपुला ।।५।।

सर्व संशय व शंका फिटून आपले कामादी सहज गुण आवरले जातात. ॥५॥

श्रवणें आवरे मन । श्रवणें घडे समाधान । श्रवणें तुटे बंधन । देहबुद्धीचें ।।६।।

स्वभावत: चंचल असलेले मन आवरले पाहिजे हे कळून ते आवरता येते व समाधान बिघडत नाही. 'मी देह आहे' या अनंत जन्मांच्या भ्रामक संस्काराचे बंधन तुटते. ॥६॥

श्रवणें मीपण जाये । श्रवणें धोका न ये । श्रवणें नाना अपाये । भस्म होती ।।७।।

मी कर्ता, मी भोक्ता इ. भ्रम श्रवणाने दूर होतात. सावधपणा येऊन संभाव्य धोके टाळता येतात साधनेतील येणाऱ्या अडचणींचे निवारण होते. ॥७॥

श्रवणें होये कार्यसिद्धी । श्रवणें लागे समाधी । श्रवणें घडे सर्व सिद्धी । समाधानासी ।।८।।

कोणतेही कार्य सिद्धीला नेण्यासाठी आवश्यक ती माहिती असल्याने ते यशस्वी होते. यथार्थ श्रवण होतानाच श्रोता तल्लीन होतो. सर्व प्रकारे समाधान प्राप्त होते. ॥८॥

सत्संगावरी श्रवण । तेणें कळे निरूपण । श्रवणें होईजे आपण । तदाकार ।।९।।

सत्संगाच्या जोडीला शास्त्रशुद्ध श्रवणाचा लाभ झाला तर श्रवणाचा विषय अधिकाधिक कळू लागतो. नंतर आपला अभ्यास व श्रवण यांचे मीलन होताच वृत्ती श्रवणात रंगते किंवा ती आत्मस्वरूपात हरवून जाते. ॥९॥

श्रवणें प्रबोध वाढे । श्रवणें प्रज्ञा चढे । श्रवणें विषयांचे वोढे । तुटोन जाती ।।१०।।

आकलन शक्तीत भर पडून बुद्धीला धार येते. विषयांकडील ओढ कमी होते. ॥१०॥

श्रवणें विचार कळे । श्रवणें ज्ञान हें प्रबळे । श्रवणें वस्तु निवळे । साधकासी ।।११।।

कोणत्याही विचाराचे सार कळून ज्ञानात भर पडते. साधकाला ब्रह्म ही संकल्पना स्पष्टपणे कळते. ॥११॥

श्रवणें सद्बुद्धि लागे । श्रवणें विवेक जागे । श्रवणें मन हे मागे । भगवंतासी ।।१२।।

सद्बुद्धीला चालना मिळून विवेक सतत जागा राहतो. एका भगवद्दर्शनाचीच अधिकाधिक ओढ लागते. ॥१२॥

श्रवणें कुसंग तुटे । श्रवणें काम वोहटे । श्रवणें धोका आटे । येकसरां ।।१३।।

दुष्ट किंवा हलक्या लोकांची संगत आपोआप सुटते. कामविकार क्षीण होऊन होणारी अधोगती टळते. ॥१३॥

श्रवणें मोह नासे । श्रवणें स्फूर्ति प्रकाशे । श्रवणें सद्वस्तु भासे । निश्चयात्मक ।।१४।।

मोहाचे स्वरूप व कारणें कळून तो नाहीसा होतो. काव्यरचनादी स्फुरू लागतात. ब्रह्मस्वरूपाचा बौद्धिक निश्चय होतो. ॥१४॥

श्रवणें होय उत्तम गती । श्रवणें आतुडे शांती । श्रवणें पाविजे निवृत्ती । अचळ पद ।।१५।।

मोक्षरूप सद्गतीचा लाभ होऊन पराशांती मिळते. नित्य निवृत्त अढळ पदाची प्राप्ती होते. ॥१५॥

श्रवणा ऐसें सार नाहीं । श्रवणें घडे सर्व कांहीं । भवनदीचा प्रवाहीं । तरणोपाव श्रवणें ।।१६।।

अनेक शास्त्रांचे सार अनायासे मिळते. व्यवहार, धर्म, कला, चातुर्य, परमार्थ इत्यादी जीवनांगांसाठी मार्गदर्शन लाभून संसार नदीतून पलीकडे जाणे शक्य होते किंवा मुक्तीसाठी जरूर ते सर्व मार्गदर्शन होते. ॥१६॥

श्रवण भजनाचा आरंभ । श्रवण सर्वीं सर्वारंभ । श्रवणें होये स्वयंभ । सर्व कांहीं ।।१७।।

नवविधा भक्तीतील श्रवण ही पहिली भक्ती आहे. जीवनाच्या प्रत्येक अंगाची सुरुवात श्रवणाने होते. प्रत्येक गोष्ट ज्याची त्याला उमजू लागते. ॥१७॥

प्रवृत्ती अथवा निवृत्ती । श्रवणेंविण न घडे प्राप्ती । हे तों सकळांस प्रचिती । प्रत्यक्ष आहे ।।१८।।

व्यावहारिक जीवन व आध्यात्मिक जीवन या दोन्हींचे श्रवणाशिवाय भागत नाही असा सर्वांनाच अनुभव आहे. ॥१८॥

ऐकिल्याविण कळेना । हें ठाउकें आहे जना । याकारणें मूळ प्रेत्ना । श्रवण आधीं ।।१९।।

कोणत्याही विषयाचे श्रवणाशिवाय ज्ञान होत नाही हे सर्व लोकांना ठाऊक आहे. म्हणून कोणत्याही प्रयत्नापूर्वी त्यासंबंधीचे श्रवण करावेच लागते. ॥१९॥

जें जन्मीं ऐकिलें चि नाहीं । तेथें पडिजे संदेहीं । म्हणोनियां दुजें कांहीं । साम्यता न घडे ।।२०।।

आयुष्यात ज्याविषयी काही ऐकलेच नाही त्याचे ज्ञान होण्यासाठी श्रवणासारखा दुसरा उपाय नाही. ॥२०॥

बहुत साधनें पाहातां । श्रवणास न घडे साम्यता । श्रवणेंविण तत्वता । कार्य न चले ।।२१।।

ज्ञानाच्या अनेक साधनांचा विचार करता श्रवणासारखे अन्य साधन नाही. त्याशिवाय कोणतेच कार्य होत नाही. ॥२१॥

न देखतां दिनकर । पडे अवघा अंधकार । श्रवणेंविण प्रकार । तैसा होये ।।२२।।

सूर्य मावळलेला असताना जसा सर्वत्र अंधार असतो त्याप्रमाणे श्रवण नसेल तर अज्ञानाचे साम्राज्य असते. ॥२२॥

कैसी नवविधा भक्ती । कैसी चतुर्विधा मुक्ती । कैसी आहे सहजस्थिती । हें श्रवणेंविण न कळे ।।२३।।

भक्तीचे नऊ टप्पे, चार प्रकारच्या मुक्ती, सहजावस्था इत्यादी श्रवणावाचून कळत नाहीत. ॥२३॥

न कळे शडकर्माचरण । न कळे कैसें पुरश्चरण । न कळे कैसें उपासन । विधियुक्त ।।२४।।

यजन-याजनादी ब्राह्मणवर्णाची सहा कर्मे, पुरश्चरणे, अनेक प्रकारच्या उपासनांचे विधी श्रवणाशिवाय कळत नाहीत. ॥२४॥

नाना व्रतें नाना दानें । नाना तपें नाना साधनें । नाना योग तीर्थाटणें । श्रवणेंविण न कळती ।।२५।।

अनंतादी व्रते, गोदानासारखी दाने, कायिकादी तपे, नामादी साधने, अष्टांग योग व तीर्थक्षेत्रांचे माहात्म्य श्रवणावाचून कळत नाही. ॥२५॥

नाना विद्या पिंडज्ञान । नाना तत्त्वांचे शोधन । नाना कळा ब्रह्मज्ञान । श्रवणेंविण न कळे ।।२६।।

चौदा विद्या, शरीरशास्त्र, ब्रह्मांडातील ब्याऐंशी तत्त्वे, चौसष्ट कला, ब्रह्मज्ञान इ. श्रवणाशिवाय कळत नाहीत. ॥२६॥

आठराभार वनस्पती । येका जळें प्रबळती । येका रसें उत्पत्ती । सकळ जीवांची ।।२७।।

गहू, साळ, तूर इ. अठरा धान्ये पेरली असता पाण्यामुळेच वाढीला लागतात. 'रसो वै स:' ही श्रुती ब्रह्माला रस म्हणते. त्यापासूनच सर्व जीवसृष्टी उत्पन्न झाली. ॥२७॥

सकळ जीवां येक पृथ्वी । सकळ जीवां येक रवी । सकळ जीवां वर्तवी । येक वायो ।।२८।।

पृथ्वी, सूर्य व प्राण यांच्या आधाराने सर्व जीवसृष्टी जगते. ॥२८॥

सकळ जीवां येक पैस । जयास बोलिजे आकाश । सकळ जीवांचा वास । येका परब्रह्मीं ।।२९।।

आकाशरूप पोकळीत जीवांचे सर्व व्यवहार चालतात. सर्व जीव तत्त्वत: ब्रह्मरूपच आहेत. ॥२९॥

तैसें सकळ जीवांस मिळोन । सार येकचि साधन । तें हें जाण श्रवण । प्राणीमात्रांसी ।।३०।।

त्याप्रमाणें सर्व जीवांच्या कल्याणासाठी श्रवण हे एकमेव साधन आहे. सर्व साधनांचे ते सार आहे. ॥३०॥

नाना देश भाषा मतें । भूमंडळी असंख्यातें । सर्वांस श्रवणापरतें । साधन चि नाहीं ।।३१।।

जगातील देश, प्रदेश, भाषा, मतमतांतरे यांची विविधता मोठी आहे. त्यांच्या ज्ञानासाठी श्रवणासारखे साधन नाही. ॥३१॥

श्रवणें घडे उपरती । बद्धाचे मुमुक्ष होती । मुमुक्षाचे साधक अती । नेमेंसिं चालती ।।३२।।

श्रवणामुळे गतजीवनातील विफलतेचा अनुताप होतो. बद्धाचे मुमुक्षू व मुमुक्षूचे साधक होऊन ते नियमित साधना करतात. ॥३२॥

साधकाचे होती सिद्ध । आंगीं बाणतां प्रबोध । हें तों आहे प्रसिद्ध । सकळांस ठाउकें ।।३३।।

'मी ब्रह्म आहे' असा अनुभव येताच साधकांचे सिद्ध होतात असे सर्व शास्त्रे सांगतात व ते सर्वांनाच ठाऊक आहे. ॥३३॥

ठाईंचे खळ चांडाळ । तेचि होती पुण्यसिळ । ऐसा गुण तत्काळ । श्रवणाचा ।।३४।।

जे जन्मत:च दुष्ट व पापी प्रवृत्तीचे असतात ते यथार्थ श्रवणाने पुण्यकृत्ये करू लागतात. हे श्रवणाचे माहात्म्य आहे. ॥३४॥

जो दुर्बुद्धि दुरात्मा । तोचि होये पुण्यात्मा । अगाध श्रवणाचा महिमा । बोलिला न वचे ।।३५।।

श्रवणाचे अपार माहात्म्य शब्दाने सांगणे कठीण आहे. दुष्ट बुद्धी व गलिच्छ मनाची व्यक्ती श्रवणाने पुण्यशील होते. ॥३५॥

तीर्थी व्रतांची फळश्रुती । पुढें होणार सांगती । तैसें नव्हे हातीचा हातीं । सप्रचित श्रवण ।।३६।।

तीर्थयात्रा व व्रतवैकल्ये केली असता मिळणारी फळे नंतर केव्हा तरी मिळतात असे म्हणतात. पण श्रवणाने मात्र तेथल्या तेथे फळ मिळते असा अनुभव येतो. ।।३६।।

नाना रोग नाना व्याधी । तत्काळ तोडिजे औषधी । तैसी आहे श्रवणसिद्धी । अनुभवी जाणती ।।३७।।

एखादी सिद्ध औषधी अनेक रोग व व्याधींना तात्काळ नष्ट करते. त्याप्रमाणे श्रवण ही एक सिद्धीच आहे असे अनुभवी जाणतात. ।।३७।।

श्रवणाचा विचार कळे । तरीच भाग्यश्री प्रगटे बळें । मुख्य परमात्माच आकळे । स्वानुभवासी ।।३८।।

श्रवणाच्या विषयांची वर्मे कळत गेली तर भाग्य अनावरपणे उदयाला येते व ब्रह्मानुभव हे मुख्य फळ मिळते. ।।३८।।

या नाव जाणावें मनन । अर्थालागीं सावधान । निजध्यासें समाधान । होत असे ।।३९।।

वर्मे जाणण्यासाठी मनन करीत असता वाच्यार्थ, लक्ष्यार्थ इ. अर्थाविषयी सावध असावे. वर्म कळल्यानंतर त्याच्या निदिध्यासाने समाधान होते.(श्रवण, मनन व निदिध्यासन असा साधनाक्रम आहे.) ।।३९।।

बोलिल्याचा अर्थ कळे । तरीच समाधान निवळे । अकस्मात अंतरीं वोळे । निःसंदेहता ।।४०।।

श्रवणकाळी जे सांगितले जाते त्याचे पूर्ण आकलन झाले तरच सर्व शंका व गुंता अचानक संपून समाधान मिळते. ।।४०।।

संदेह जन्माचें मूळ । तें श्रवणें होये निर्मूळ । पुढें सहजचि प्रांजळ । समाधान ।४१।।

'मी कोण आहे' याविषयी संशय राहून गेला तर पुन्हा जन्माला यावे लागते. श्रवणाने 'मी ब्रह्म आहे' असा निश्चय झाल्याने मूळ संशयच नष्ट होतो. त्यामुळे सुखरूपत्वाचे समाधान मिळाल्याचे उघड उघड कळते. ।।४१।।

जेथें नाहीं श्रवण मनन । तेथें कैचें समाधान । मुक्तपणाचें बंधन । जडलें पाईं ।।४२।।

जेव्हा शास्त्रशुद्ध श्रवण व मनन होत नाही तेव्हा 'मी मुक्त' हे नवे बंधन येऊन पडते! (पहा– ७-७-५६) ।।४२।।

मुमुक्ष साधक अथवा सिद्ध । श्रवणेंविण तो अबद्ध । श्रवणमननें शुद्ध । चित्तवृत्ति होये ।।४३।।

मुमुक्षू, साधक किंवा सिद्ध यांपैकी कोणीही असो त्याची बुद्धी श्रवणावाचून विस्कळीत किंवा संभ्रमित राहते. श्रवण व मननाने चित्तवृत्ती शुद्ध होते. सर्व पारमार्थिक संकल्पना स्पष्ट होतात. (५-१०-९ व १२,१३,. या ओव्यांचा विचार करता चालू ओवीतील सिद्धाची बुद्धी सुद्धा अबद्ध असू शकते हा विचार खटकणारा आहे. याचे स्पष्टीकरण असे असू शकते– सिद्धावस्थेत व्यावहारिक बंधने गळून पडतात. पण त्यानेही 'मार्गाधारे वर्तावे । विश्व हे मोहोरे लावावे' हे ज्ञानदेवांच्या आदेशाचे श्रवण केले नसेल तर त्याचे वर्तन अबद्ध किंवा अमर्याद होऊ शकेल.) ।।४३।।

जेथें नाहीं नित्य श्रवण । तें जाणावें विलक्षण । तेथें साधकें येक क्षण । क्रमूं नये सर्वथा ।।४४।।

ज्या आश्रमात, मठात किंवा व्यक्तीपाशी सतत शास्त्रशुद्ध श्रवणाची व्यवस्था नसते तेव्हा ते साधकाच्या दृष्टीने घातक असते. साधकाने काही झाले तरी क्षणभर सुद्धा तेथे थांबू नये. (अंगारे, गंडेदोरे, आरत्या, अनुभव कथन, उठसूट पायावर डोके ठेवणे इ. 'दरबारी' प्रकार समर्थांना किती मान्य होते याचा विचार करावा.) ।।४४।।

जेथें नाहीं श्रवणस्वार्थ । तेथें कैचा हो परमार्थ । मागें केलें तितुकें वेर्थ । श्रवणेंविण होये ।।४५।।

परमार्थासाठी आवश्यक तो श्रवणस्वार्थ जेथे साधत नाही तेथे साधकाचा सिद्ध कसा होणार? केलेली सर्व साधना श्रवणावाचून फुकट जाते. ।।४५।।

तस्मात् श्रवण करावें । साधन मनी धरावें । नित्यनेमें तरावें । संसारसागरीं ।।४६।।

म्हणून श्रवण करीत करीत साधनेवर आरूढ राहावे व त्याला नित्यनेमांची (एकादशी इ.) जोड देत संसारसागर तरून जावें. ।।४६।।

सेविलेंच सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन । तैसें श्रवणमनन । केलेंचि करावें ।।४७।।

शरीरपोषणासाठी जसे तेच अन्न व पाणी रोज नियमाने घ्यावे लागते त्याप्रमाणे त्याच त्याच विषयांचे श्रवण मनन करीत तेच साधन चालवावे. ।।४७।।

श्रवणाचा अनादर । आळसें करी जो नर । त्याचा होय अपहार । स्वहितविषईं ।।४८।।

जो साधक श्रवणाचा कंटाळा करतो, त्याचे मोक्षरूप हित त्याचेपासून हिरावून घेतले जाते. ।।४८।।

आळसाचें संरक्षण । परमार्थाची बुडवण । याकारणें श्रवण । केलेंचि पाहिजे ।।४९।।

जेथे आळसाला प्रतिष्ठा असते तेथे परमार्थ बुडतो म्हणून कंटाळा व टाळाटाळ न करता श्रवण केलेच पाहिजे. ।।४९।।

आतां श्रवण कैसें करावें । कोण्या पंथास पाहावें । पुढिलें समासीं आघवें । सांगिजेल ।।५०।।

आता यापुढील समासात श्रवण कसे करावे, कोणत्या ग्रंथांचे करावे ते सर्व सांगू. ।।५०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'श्रवणनिरूपणनाम' समास आठवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'श्रवणनिरूपण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक सातवा : चौदा ब्रह्मांचा (चतुर्दशब्रह्म)

समास नववा : श्रवणनिरूपण (पुढे चालू)

॥ श्रीराम समर्थ ॥

आतां श्रवण कैसें करावें । तेंहि सांगिजेल अघवें । श्रोतां अवधान द्यावें । येकचित्तें ।।१।।

आता श्रवण कसे करावे त्याचे सविस्तर वर्णन करू. श्रोत्यांनी एकचित्त होऊन लक्षपूर्वक ऐकावे. ॥१॥

येक वगतृत्व श्रवणीं पडे । तेणें जालें समाधान मोडे । केला निश्चय विघडे । अकस्मात ।।२।।

(श्रवणासाठी वक्ता कसा निवडावा ते सांगतात–) कोणी वक्ता असे बोलतो की त्यामुळे आधी केलेल्या यथार्थ श्रवणाने मिळालेले समाधान व बुद्धीचे झालेले निश्चय एकाएकी बिघडतात. ॥२॥

तें वगतृत्व त्यागावें । जें माईक स्वभावें । जेथें निश्चयाचा नावें । सुन्याकार ।।३।।

अशी दिशाभूल करणाऱ्या, उथळ व शब्दांची उधळण करून दिपवून टाकणाऱ्या वक्त्याचा लगेच त्याग करावा. ॥३॥

येक्या ग्रंथें निश्चय केला । तो दुजयानें उडविला । तेणें संशयोचि वाढला । जन्मवरी ।।४।।

एका ग्रंथाच्या श्रवणाने स्वरूप व साधनेसंबंधी झालेले निश्चय जर दुसऱ्या ग्रंथाचे श्रवण उधळून लावीत असेल तर आयुष्य संशयातच निघून जाईल. (संप्रदायांचे उदंड पीक असणाऱ्या चालू काळात तर हा विचार फारच महत्त्वाचा आहे.) ॥४॥

जेथें संशय तुटती । होये आशंकानिवृत्ती । अद्वैत ग्रंथ परमार्थी । श्रवण करावे ।।५।।

म्हणून ज्यांच्या श्रवणाने सर्व शंकांचा निरास होऊन बुद्धी संशयरहित होते त्या अद्वैत प्रतिपादन करणाऱ्या ग्रंथांचे मोक्षासाठी श्रवण करावे. (अद्वैत– शांकर अद्वैत वेदान्त) ॥५॥

जो मोक्षाचा अधिकारी । तो परमार्थपंथ धरी । प्रीति लागली अंतरीं । अद्वैतग्रंथाची ।।६।।

जो मोक्षाचा खरा अधिकारी असतो तो परमार्थशास्त्राचा अभ्यास करताना अद्वैत वेदान्त सांगणाऱ्या ग्रंथांचा प्रेमादराने स्वीकार करतो, त्यांची त्याला ओढ लागते. ॥६॥

जेणें सांडिला इहलोक । जो परलोकींचा साधक । तेणें पाहावा विवेक । अद्वैतशास्त्रीं ।।७।।

ज्याने दृश्यजगताची आसक्ती सोडली आहे त्याने मोक्षासाठी आवश्यक त्या विवेकासाठी अद्वैत वेदान्त ग्रंथांचे श्रवण करावे. ॥७॥

जयास पाहिजे अद्वैत । तयापुढें ठेवितां द्वैत । तेणें क्षोभलें उठे चित्त । तया श्रोतयाचें ।।८।।

ज्याला अद्वैताची अत्यंत गोडी लागली आहे त्याचे पुढे द्वैती ग्रंथ ठेवताच त्याचे चित्त क्षुब्ध होते. ॥८॥

आवडीसारिखें मिळे । तेणें सुखचि उचंबळे । नाहीं तरी कंटाळे । मानस ऐकतां ।।९।।

आपल्या आवडीनुसार श्रवण घडले तरच सुखाच्या लाटा मनात उठतात. अन्यथा कंटाळा येतो. ॥९॥

ज्याची उपासना जैसी । त्यासी प्रीति वाटे तैसी । तेथें वर्णितां दुजयासी । प्रशस्त न वटे ।।१०।।

ज्याची जशी उपासना असेल त्याला त्या श्रवणाची गोडी वाटते. दुसरे श्रवण योग्य वाटत नाही. ॥१०॥

प्रीतीचें लक्षण ऐसें । अंतरीं उठे अनायासें । पाणी पाणवाटें जैसें । आपण चि धांवे ।।११।।

पाणी जसे उताराकडे सहजच वहाते (पाणवाट) त्याप्रमाणे त्या त्या विषयाकडील ओढ तिकडे नेते. प्रेमाचे हे सहज लक्षण आहे. ।।११।।

तैसा जो आत्मज्ञानी नर । तयास नावडे इतर । तेथें पाहिजे सारासार । विचारणा ते ।।१२।।

त्याप्रमाणे आत्मज्ञानाची ओढ लागलेल्या साधकाला सार व असार विवेक सांगणारे अद्वैतशास्त्र हवे असते. इतर काही नको असते. ।।१२।।

जेथें कुळदेव्या भगवती । तेथें पाहिजे सप्तशती । इतर देवांची स्तुती । कामा नये सर्वथा ।।१३।।
घेतां अनंताच्या व्रता । तेथें नलगे भगवद्गीता । साधुजनासी वार्ता । फळाशेची नाहीं ।।१४।।
वीरकंकण घालितां नाकीं । परीं तें शोभा पावेना कीं । जेथील तेथें आणिकीं । कामा न ये सर्वथा ।।१५।।
नाना महात्में बोलिलीं । जेथील तेथें वंद्य जालीं । विपरीत करून वाचिलीं । तरी तें विलक्षण ।।१६।।
मलारमाहात्म द्वारकेसी । द्वारकामाहात्म नेलें कासीं । कासीमाहात्म वेंकटसीं । शोभा न पवे ।।१७।।
ऐसें सांगतां असे वाड । परी जेथील तेथेंचि गोड । तैसी ज्ञानीयांस चाड । अद्वैत ग्रंथाची ।।१८।।
योगियांपुढें राहाण । परीक्षवंतांपुढें पाषाण ।पंडितांपुढें डफगाण । शोभा न पवे ।।१९।।
वेदज्ञापुढें जती । निस्पृहापुढें फळश्रुती । ज्ञानीयांपुढें पोथी । कोकशास्त्राची ।।२०।।
ब्रह्मचर्यापुढे नाचणी । रासक्रीडा निरूपणीं । राजहंसापुढें पाणी । ठेविलें जैसें ।।२१।।
तैसें अंतर्निष्ठांपुढें । ठेविलें श्रृंघारिक टिपडें । तेणें त्याचें कैसें घडे । समाधान ।।२२।।
रायास रंकाची आशा । तक्र सांगणें पीयुषा । संन्याशासी वोवसा । उचिष्ट चांडाळी ।।२३।।
कर्मनिष्ठां वशीकर्ण । पंचाक्षरी निरूपण । तेथें भंगे अंत:कर्ण । सहजचि त्याचें ।।२४।।
तैसे परमार्थिक जन । तयांस नस्तां आत्मज्ञान । ग्रंथ वाचितां समाधान । होणार नाहीं ।।२५।।
आतां असो हें बोलणें । जयासि स्वहित करणें । तेणें सदा विचरणें । अद्वैतग्रंथीं ।।२६।।

कुळदेवीची उपासना करताना सप्तशतीचा पाठ करावा लागतो. इतर देवतांची स्तोत्रे मुळीच उपयोगी नसतात. ।।१३।। अनंताचे व्रत करीत असता भगवत्गीतेचे वाचन करू नये. ते व्रत सकाम आहे. गीतेत निष्काम उपासना सांगितली आहे. साधूंना फळाची आशा नसल्याने ते गीता वाचतात. ।।१४।। मनगटात घालावयाचे वीरकंकण नाकात घातले तर त्याचे महत्त्व उरत नाही. जी ती गोष्ट जेथील तेथेच हवी. ।।१५।। सर्व तीर्थांची माहात्म्ये वर्णिली आहेत. एका तीर्थाचे माहात्म्य दुसऱ्या तीर्थात सांगणे विपरीत वाटते. ।।१६।। मल्हारी मार्तंडाचे माहात्म्य द्वारकेत, द्वारकामाहात्म्य काशीत व काशीमाहात्म्य तिरुपतीला वाचले तर शोभत नाही. ।।१७।। असे बरेच सांगता येईल. जेथे जे योग्य तेथेच ते असावे. त्याप्रमाणे आत्मज्ञानासाठी अद्वैत ग्रंथच हवा. ।।१८।। योग्यापुढे चेटुकविद्या, रत्नपारख्यापुढे गारगोटी, पंडितापुढे रात्रभर चालणारी भेदिक गाणी ठेवणे शोभत नाही. ।।१९।। कर्मठापुढे संन्यासी, विरक्तापुढे एखाद्या विधीची फलश्रुती किंवा अध्यात्मविद्येच्या अभ्यासकापुढे कामशास्त्र ठेवू नये. ।।२०।। ब्रह्मचाऱ्यांसमोर नाचगाणे, वेदान्ताचा पाठ चालू असता रासक्रीडेचे वर्णन, राजहंसासमोर नुसतेच पाणी असू नये. ।।२१।। अंतर्निष्ठ साधकाला शृंगारप्रधान तमाशा ऐकवल्याने त्याचे काय समाधान होणार? ।।२२।। राजाला दारिद्र्याचे मनोरथ नसतात. अमृतापुढे ताकाची महती सांगू नये. संन्याशाला चांडाळीच्या उष्ट्याची भिक्षा मागण्याचे व्रत सांगू नये. ।।२३।। कर्मठाला वशीकरणाचा मंत्र व भूत-पिशाच्चे काढणाऱ्या मांत्रिकाला वेदान्त सांगितला तर तो अत्यंत नाराज होतो. ।।२४।।

म्हणून पारमार्थिक साधकांना अध्यात्मविद्येतील अद्वैत तत्त्वज्ञान नसलेले ग्रंथ समाधान देणे शक्य नाही. ।।२५।।

आता सांगावयाचे ते सांगून झाले. ज्याला मोक्षरूप आत्महित साधावयाचे आहे त्याने अद्वैत सांगणाऱ्या ग्रंथांचा अभ्यास करावा. ।।२६।।

आत्मज्ञानी येकचित्त । तेणें पाहाणें अद्वैत । येकांत स्थळीं निवांत । समाधान ।।२७।।

'मी ब्रह्म आहे' ह्या अद्वैत बोधासाठी साधकाने गर्दी-गडबड नसलेल्या ठिकाणी एकाग्र चित्ताने अद्वैत वेदान्तशास्त्राचा अभ्यास करून समाधान मिळवावे. ॥२७॥

बहुत प्रकारें पाहातां । ग्रंथ नाहीं अद्वैतापरता । परमार्थास तत्त्वता । तारूंच कीं ।।२८।।

अध्यात्माशी संबंधित सर्व दर्शनांचा अभ्यास केला असता असा निर्णय होतो की मोक्षरूप समुद्र तरून जाण्यासाठी अद्वैत वेदान्त दर्शनरूप नौकेसारखे दुसरे दर्शन किंवा साधन नाहीं. ॥२८॥

इतर जे प्रपंचिक । हास्य विनोद नवरसिक । हित नव्हे तें पुस्तक । परमार्थासी ।।२९।।

हास्यादी नवरसांनी भरलेले प्रापंचिकांना आवडणारे साहित्याचे पुस्तक पारमार्थिक साधकांच्या हिताचे नाही. ॥२९॥

जेणें परमार्थ वाढे । आंगीं अनुताप चढे । भक्तीसाधन आवडे । त्या नाव ग्रंथ ।।३०।।

ज्या ग्रंथाच्या (पुस्तकाच्या नव्हे!) अभ्यासाने वैराग्य स्थिर होऊन भक्तिसाधनेची आवड निर्माण होते व पारमार्थिक अधिकार वाढीला लागतो त्यालाच ग्रंथ म्हणावे. ॥३०॥

जो ऐकतांच गर्व गळे । कां ते भ्रांतीच मावळे । नातरी येकसरें वोळे । मन भगवंती ।।३१।।

त्या ग्रंथाच्या श्रवणाने अहंकार गळून पडतो. जगत् सत्यत्वादी भ्रम नष्ट होतात व अंत:करणवृत्ती भगवंतामध्ये रमते. ॥३१॥

जेणें होये उपरती । अवगुण पालटती । जेणें चुके अधोगती । त्या नाव ग्रंथ ।।३२।।

ज्या ग्रंथाच्या अभ्यासाने गतजीवनातील चुकांचा पश्चात्ताप होतो, (पहा-मुमुक्षुलक्षण) त्यांना जबाबदार असलेले दुर्गुण सुटून त्यांची जागा सद्‌गुण घेतात व त्यामुळे संभाव्य अधोगती टळते, (अधोगती = बद्धावस्था तशीच राहून जन्ममरण न चुकणे) त्यालाच ग्रंथ म्हणावे. ॥३२॥

जेणें धारिष्ट चढे । जेणें परोपकार घडे । जेणें विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ।।३३।।

ज्या ग्रंथांच्या अभ्यासाने साधकाचे वैराग्यासाठी व साधनेसाठी आवश्यक ते धैर्य वाढते, परोपकाराची इच्छा वाढते व विषय सुखभोगाची इच्छा नष्ट होते, तोच खरा ग्रंथ. ॥३३॥

जेणें परत्रसाधन । जेणें ग्रंथें होये ज्ञान । जेणें होईजे पावन । या नाव ग्रंथ ।।३४।।

मोक्षासाठी आवश्यक त्या साधनामार्गाचे ज्ञान होऊन चित्तशुद्धी वाढीला लागण्याचे सामर्थ्य असणारा तोच खरा ग्रंथ. ॥३४॥

ग्रंथ बहुत असती । नाना विधानें फळश्रुती । जेथें नुपजे विरक्ती भक्ती । तो ग्रंथचि नव्हे ।।३५।।

तसे पाहिले तर ग्रंथांना काही तोटा नाही. त्यांत अनेक अनुष्ठाने व त्यांची फळे सांगितलेली असतात. पण त्यामुळे वैराग्य किंवा भक्ती मुळीच वाढत नाही. ते खरे ग्रंथच नव्हेत. ॥३५॥

मोक्षेंविण फळश्रुती । ते दुराशेची पोथी । ऐकतां ऐकतां पुढती । दुराशाचि वाढे ।।३६।।

मोक्ष हे एकच शाश्वत फळ आहे. त्यावाचून जे ग्रंथ लोभाचीच अनिवार वाढ करणारी फळे सांगतात त्यांच्या श्रवणाने आशाच अधिकाधिक वाढते. ॥३६॥

श्रवणीं लोभ उपजेल जेथें । विवेक कैंचा असेल तेथें । बैसलीं दुराशेचीं भूतें । तया अधोगती ।।३७।।

ज्या ग्रंथाच्या श्रवणाने लोभ निर्माण होतो त्यात नित्यानित्यविवेक कसा असेल? त्यात बलवान आशेच्या हडळी बसलेल्या असतात. त्यामुळे अधोगतीच होते. ॥३७॥

ऐकोनिच फळश्रुती । पुढें तरी पावोन म्हणती । तयां जन्म अधोगती । सहजचि जाली ।।३८।।

ग्रंथांच्या शेवटी सांगितलेली फलश्रुती वाचून ह्या जन्मी नाही, तर पुढील जन्मी तरी ते फळ मिळण्याची आशा धरणारा वाचक सहजच पुढील जन्मप्राप्तीच्या अधोगतीला जातो! ॥३८॥

नाना फळें पक्षी खाती । तेणेंचि तयां होये तृप्ति । परी त्या चकोराचे चित्तीं । अमृत वसे ।।३९।।

बहुतेक सर्व पक्षी वृक्षाला लागलेली फळे खाऊन तृप्त होतात पण चकोराला मात्र अमृतच हवे असते. ॥३९॥

तैसें संसारी मनुष्य । पाहे संसाराची वास । परी ते भगवंताचे अंश । भगवंतचि इछिती ।।४०।।

त्याप्रमाणे प्रपंचासक्तांना संसारसुख देणारी फळे हवी असतात. पण पूर्वसुकृतामुळे भगवंताविषयी प्रेम असणाऱ्यांना भगवंतच हवा असतो. ॥४०॥

ज्ञानियास पाहिजे ज्ञान । भजकास पाहिजे भजन । साधकास पाहिजे साधन । इच्छेसारिखें ।।४१।।

ब्रह्मविद्येचा अधिकारी वेदान्ताची अपेक्षा करतो, सगुण भजन आवडणारा भजनात रमतो, साधकाला आवडीचे साधन हवे असते. ॥४१॥

परमार्थ्यास परमार्थ । स्वार्थ्यास पाहिजे स्वार्थ । कृपणास पाहिजे अर्थ । मनापासुनी ।।४२।।
योगियांस पाहिजे योग । भोगियांस पाहिजे भोग । रोगियांस पाहिजे रोग- । हर्ति मात्रा ।।४३।।
कवीस पाहिजे प्रबंद । तार्किकास तर्कवाद । भाविकांस संवाद । गोड वाटे ।।४४।।
पंडितास पाहिजे वित्पत्ती । विद्वांसास अधेनप्रीती । कळावंता आवडती । नाना कळा ।।४५।।
हरिदासा आवडे कीर्तन । सुचिस्मंतां संध्यास्नान । कर्मनिष्ठां विधिविधान । पाहिजे तें ।।४६।।
प्रेमळास पाहिजे करुणा । दक्षता पाहिजे विचक्षणा । चातुर्य पाहे शाहाणा । आदरेंसीं ।।४७।।
भक्त पाहे मूर्तिध्यान । संगीत पाहे ताळज्ञान । रागज्ञानी तानमान । मूर्छना पाहे ।।४८।।
योगाभ्यासी पिंडज्ञान । तत्वज्ञासि तत्वज्ञान । नाडिज्ञानी मात्राज्ञान । पाहातुसे ।।४९।।
कामिक पाहे कोकशास्त्र । चेटकी पाहे चेटकमंत्र । यंत्री पाहे नाना यंत्र । आदरेंसीं ।।५०।।
टवाळां आवडे विनोद । उन्मत्तास नाना छंद । तामसास अप्रमाद । गोड वाटे ।।५१।।
मूर्ख होये नादलुब्धी । निंदक पाहे उणी संधी । पापी पाहे पापबुद्धि । लाऊन आंगीं ।।५२।।
येकां पाहिजे रसाळ । येकां पाहिजे पाल्हाळ । येकां पाहिजे केवळ । साबडी भक्ती ।।५३।।
आगमी पाहे आगम । शूर पाहे संग्राम । येक पाहाती नाना धर्म । इछेसारिखे ।।५४।।
मुक्त पाहे मुक्तलीळा । सर्व पाहे सर्व कळा । जोतिषी भविष्य पिंगळा । वर्णूं पाहे ।।५५।।

मोक्षाची इच्छा करणाऱ्याला परमार्थ, स्वार्थी व्यक्तीला स्वार्थाचा विषय, कंजूषाला पैसे, योग्यांना पातंजल दर्शन, भोगासक्ताला विषय, रोग्याला औषध, कवीला महाकाव्य, तार्किकाला तर्कप्रधान वाद, भाविकाला भक्तांमध्ये चालणारे भगवंताच्या माहात्म्याचे संवाद, पंडिताला व्युत्पत्तीशास्त्र, याज्ञिकाला यज्ञसामग्री, कलाकाराला अनेक कला, हरिदासाला हरिकीर्तन, शुचिर्भूताला स्नानसंध्या, कर्मठाला पूर्वमीमांसेतील धर्मविधी, प्रेमळाला करुणरस, चतुराला सावधपणा, शहाण्याला चातुर्य, भक्ताला मूर्तीचे सुंदर ध्यान, जाणकार संगीतप्रेमीला ताल, मालकंसादी रागांच्या जाणत्याला तान, आलापी, योगाभ्यासीला पिंडातील तत्त्वांचे ज्ञान, वेदान्त्याला तत्त्वज्ञान, नाडीपरीक्षा असणाऱ्याला औषधीच्या मात्रा, कामुकाला कोकशास्त्र, पंचाक्षऱ्याला बटूक मंत्र, श्रीयंत्रासारख्या यंत्रोपासकांना निरनिराळी यंत्रे, टवाळखोरांना पांचट विनोद, मस्तवालाला जुगारासारखे छंद, तमोगुण्याला निषिद्ध वर्तन, मूर्खाला काहीतरी चाळा, निंदकाला दुसऱ्याच्या उणिवा काढण्याची संधी, पाप्याला पापकर्माचे विचार, कोणा भक्ताला नवविध रसांनी भरलेली उपासना, दुसऱ्याला पुराणांचे पाल्हाळ तर तिसऱ्याला भोळा भाव, वैदिकाला वेदातील आगमभाग, शूराला लढाई, कोणाला मनाला येईल त्या धर्मांचा अभ्यास, मुक्ताला स्थितप्रज्ञ लक्षणे, सर्व जीवनात रस असणाऱ्याला संगीतादी

सर्व कला, तर ज्योतिष्याला 'पिंगळा म्हणतो' असे सांगून भविष्य सांगणे आवडते. ॥४२-५५॥

ऐसें सांगावें तें किती । आवडीसारिखें ऐकती । नाना पुस्तकें वाचिती । सर्वकाळ ।।५६।।

असे किती म्हणून सांगावे? जो तो आपल्या आवडीनुसार वाचतो व ऐकतो. त्यातच वेळ घालवितो. ॥५६॥

परी परत्र साधनेंविण । म्हणों नये तें श्रवण । जेथें नाहीं आत्मज्ञान । तया नाव कर्मणा ।।५७।।

परंतु ज्यात मोक्षासंबंधी मार्गदर्शन नाही त्याला 'श्रवण' हा शब्दही वापरू नये. ज्यात अध्यात्मविद्या नाही तेथे केवळ श्रवणाचे कर्म केल्यासारखे होते. वेळ व्यर्थ जातो. ॥५७॥

गोडीविण गोडपण । नाकेंविण सुलक्षण । ज्ञानेंविण निरूपण । बोलोंचि नये ।।५८।।

गोडी नसलेल्या पदार्थाला गोड म्हणणे, बसक्या नाकाचा चेहरा सुंदर म्हणणे जसे निरर्थक असते त्याप्रमाणे अद्वैत वेदान्त नसलेले श्रवण 'श्रवण' म्हणण्यास लायक नाही. ॥५८॥

आतां असो हें बहुत । ऐकावा परमार्थग्रंथ । परमार्थग्रंथेविण वेर्थ । गथागोवी ।।५९।।

आतापर्यंत खूपच विस्तार झाला. तात्पर्य असे की परमार्थशास्त्राचा ग्रंथ वाचावा. त्यावाचून फक्त गोंधळच गोंधळ उडतो. ॥५९॥

म्हणोनि नित्यानित्यविचार । जेथें बोलिला सारासार । तोचि ग्रंथ पैलपार । पाववी विवेकें ।।६०।।

नित्य व अनित्य, सार व असार इ. प्रकारे विवेक सांगणारे ग्रंथच साधकाला भवनदीच्या पलीकडे नेऊन सोडतात. ॥६०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'श्रवणनिरूपणनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'श्रवणनिरूपण' नावाचा नववा समास समाप्त

दशक सातवा : चौदा ब्रह्मांचा (चतुर्दशब्रह्म)

समास दहावा : देहान्तनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

मिथ्या तेंचि जालें सत्य । सत्य तेचि जालें असत्य । मायाविभ्रमाचें कृत्य । ऐसें असे पाहातां ।।१।।

सत् असत् विलक्षण मायिक जगत् सत्य वाटते. प्राक्, प्रध्वंस, अन्योन्य व अत्यंत असे चार अभाव नसलेले, त्रिकालाबाधित सत्य ब्रह्म असत्य वाटते. असे का होते? तर 'मायेच्या परिणामस्वरूप भ्रमाने' असे त्याचे उत्तर आहे. ॥१॥

सत्य कळाया कारणें । बोलिलीं नाना निरूपणें । तरी उठेना धरणें । असत्याचें ।।२।।

सत्यस्वरूप समजावे म्हणून प्रस्थानत्रयीसारखी शास्त्रे सांगितली जातात. पण मनात बसलेले असत्याचे ठाणे उठत नाही. त्याच्या प्रभावाखालीच जीव रहातो. ॥२॥

असत्य अंतरीं बिंबलें । न सांगतां तें दृढ जालें । सत्य असोन हारपलें । जेथील तेथें ।।३।।

असत्याचा कोणीच उपदेश करीत नाही. तरी अंत:करणात त्याचाच निश्चय होऊन तेच ठसून रहाते. सत्यरूप आत्मा किंवा ब्रह्म नित्य असून जणू जागच्या जागी विरून जाते! ॥३॥

वेदशास्त्रें पुराणें सांगती । सत्याचा निश्चय करिती । तरी नये आत्मप्रचिती । सत्यस्वरूप ।।४।।

वेद, वेदान्तशास्त्रे व पुराणे सत्यब्रह्माचा निश्चय करून देतात. तरीही 'सत्यस्वरूप ब्रह्म मी आहे' असा अनुभव मात्र येत नाही. ॥४॥

सत्य असोन आछयादलें । मिथ्या नसोन सत्य जालें । ऐसें विपरीत वर्तलें । देखत देखतां ।।५।।

ब्रह्म सत्य असून त्यावर मायेचे आवरण पडले. जगत् मिथ्या असून त्याला सत्यत्व मिळाले. हा विपरीत अनुभव सर्वांच्या परिचयाचा आहे. जणू तो देखत देखत फसवतो. ॥५॥

ऐसी मायेची करणी । कळों आली तत्क्षणीं । संतसंगें निरूपणीं । विचार घेतां ।।६।।

संतांच्या संगतीत त्यांच्या मुखातून, श्रवण घडल्यावरही, फसवणूक मायेमुळे होते असे कळते. भ्रमाला ती जबाबदार आहे. ॥६॥

मागां जालें निरूपण । देखिलें आपणासि आपण । तेणें बाणली खूण । परमार्थाची ।।७।।

मागे (५-६-१) 'पहावे आपणासी आपण' या पद्धतीने 'ज्ञान' समजावून घेतल्याने परमार्थाचे वर्म लक्षात आलेलेच आहे. ॥७॥

तेणें समाधान जालें । चित्त चैतंनीं मिळालें । निजस्वरूपें वोळखिलें । निजवस्तुसी ।।८।।

ती प्रक्रिया पूर्ण होताच चित्तातील चिदाभास आत्म्याला मिळतो व तो चिदाभास 'आत्मा हेच माझे मूळचे स्वरूप आहे' असे जाणतो. (पहा– ज्ञानेश्वरी अ. ६, ओ. ३६६) किंवा 'पाहावे आपणासी आपण' ॥८॥

प्रारब्धीं टाकिला देहो । बोधें फिटला संदेहो । आतांचि पडो अथवा राहो । मिथ्या कळीवर ।।९।।

आत्मज्ञान झालेला जीवन्मुक्त त्याचे शरीर अनिवार प्रारब्धावर सोडतो. मी व देह, देह व जग, जग व ईश्वर, ईश्वर व माया, माया व ब्रह्म यांच्या संबंधाविषयी सर्व संशय फिटलेले असतात. त्यामुळे अचेतन पांचभौतिक शरीर,

लगेच मरण पावले किंवा दीर्घायुषी झाले तरी त्याला त्याचे काहीच वाटत नाही. ।।९।।

ज्ञानियांचें जें शेरीर । तें मिथ्यत्वें निर्विकार । जेथें पडे तेचि सार । पुण्य भूमी ।।१०।।

जीवन्मुक्ताचे शरीर मिथ्या म्हणजे मायिक किंवा कल्पित असते. त्यामुळे अस्ति, जायते इ. शरीराचे विकारही कल्पितच ठरतात. उदा. मृगजळ स्वच्छ, अस्वच्छ, हलके, जड, यमुनेसारखे काळसर, थंड, उष्ण इ. काहीच नसते! असे त्याचे शरीर जेथे पडते त्या ठिकाणाला तीर्थक्षेत्राचे स्वरूप येते. (देहू, आळंदी, सज्जनगड) ।।१०।।

साधुदर्शनें पावन तीर्थ । पुरती त्यांचे मनोरथ । साधु न येतां जिणें वेर्थ । तयां पुण्यक्षेत्रांचे ।।११।।

अशा तीर्थांना संतांचे चरण लागत राहिले तरच त्यांचे पावित्र्य टिकून त्या तीर्थांची 'आपले पावित्र्य टिकून रहावे' ही इच्छा पूर्ण होते. साधुसंतांनी तीर्थयात्रा केल्या नाहीत (ज्ञानदेव-नामदेवांची काशीयात्रा) तर ती क्षेत्रे प्रभावशून्य बनतात. ।।११।।

पुण्यनदीचें जें तीर । तेथें पडावें शरीर । हा इतर जनाचा विचार । साधु नित्यमुक्त ।।१२।।

गंगेसारख्या पवित्र नदीकाठी मरण यावे हा सामान्यांचा सामान्य विचार होय. मोक्षासांठी साधूंना अशी इच्छा धरावी लागत नाही. कारण ते जिवन्तपणीच मुक्त असतात. ।।१२।।

उत्तरायेण तें उत्तम । दक्षणायेण तें अधम । हा संदेहीं वसे भ्रम । साधु तो निःसंदेह ।।१३।।

शुक्लपक्ष उत्तरायेण । गृहीं दीप दिवा मरण । अंतीं राहावें स्मरण । गतीकारणें ।।१४।।

उत्तरायण, शुक्लपक्ष व दिवस असताना आलेले मरण चांगले. दक्षिणायन, कृष्णपक्ष व रात्री आलेले मरण वाईट. मरणाचे क्षणीं सद्‌गतीसाठी देवाचे स्मरण व्हावें इ. विकल्पांचे भ्रम, भ्रमरहित जीवन्मुक्ताला नसतात. ।।१३-१४।।

इतुकें नलगे योगियांसी । तो जीत चि मुक्त पुण्यरासी । तिळांजुळी पापपुण्यासी । दिधली तेणें ।।१५।।

जीवन्मुक्ताला यातील कशाचीच गरज नसते. तो शुद्धपुण्यवान जिवन्तपणीच मुक्त असतो. इतर पुण्यपापे त्याने केव्हाच धुऊन टाकलेली असतात. ('स विद्वान पुण्यपापे विधूय'– मुंडक) ।।१५।।

देहाचा अंत बरा आला । देह सुखरूप गेला । त्यासी म्हणती धन्य जाला । अज्ञान जन ।।१६।।

(१३-१४ मध्ये म्हटल्याप्रमाणें–) देहाला चांगले मरण आले व सर्व गणगोतांनी निरोप दिला की मरणारा धन्य झाला असे सामान्य लोकांना वाटते. ते अज्ञानीच असतात. ।।१६।।

जनाचें विपरीत मत । अंतीं भेटतो भगवंत । ऐसें कल्पून घात । करिती आपुला स्वयें ।।१७।।

मरणकाळी भगवंत भेटेल असा अत्यंत विपरीत विचार करून सामान्य अज्ञानी जन आपला आपण घात करून घेतात. ।।१७।।

जितां सार्थक नाहीं केलें । वेर्थ आयुष्य निघोन गेलें । मुळीं धान्येचि नाहीं पेरिलें । तें उगवेल कैचें ।।१८।।

जिवन्त असताना 'मी ब्रह्म आहे' असा अनुभव न घेता त्यांनी जीवन फुकट घालविलेले असते. न पेरलेल्या धान्याला अंकुर कसा फुटेल? साधनेवाचून साध्य कसे सिद्ध होईल? ।।१८।।

जरी केलें ईश्वरभजन । तरीच होईजे पावन । जैसें वेव्हारितां धन । रासि माथां लाभे ।।१९।।

संपत्तीची उत्तम गुंतवणूक केली तर धनाच्या राशी मिळतात. त्याप्रमाणें जिवन्तपणी ईश्वराचे भजन अखंड केले तरच सद्‌गती मिळते. ।।१९।।

दिधल्याविण पाविजेना । पेरल्याविण उगवेना । ऐसें हें वाक्य जना । ठाउकेंचि आहे ।।२०।।

दिल्याशिवाय मिळत नाही, पेरल्यावाचून उगवत नाही इ. म्हणी सर्वांनाच तोंडपाठ असतात. ।।२०।।

न करितां सेवेच्या व्यापारा । स्वामीस म्हणे कोठें मुशारा । तैसें अंतीं अभक्त नरां । स्वहित न घडे ।।२१।।

मालकाचे काम न करता नोकराला जसा पगार मागता येत नाही त्याप्रमाणे भगवन्ताची भक्ती न करताच सद्‌गतीचे

फळ मिळत नाही. मोक्षरूप हित साधत नाही. ॥२१॥

जितां नाहीं भगवद्भक्ती । मेल्यां कैंची होईल मुक्ती । असो जे जे जैसें करिती । ते ते पावती तैसें ।।२२।।

जिवन्त असताना भगवद्भजन न करता मेल्यावर मुक्ती मिळत नाही. चुकीच्या कल्पना उराशी बाळगणाऱ्याला तसेच फळ मिळते. जसे कर्म तसे फळ हा ईशसृष्टीचा नियमच आहे. ॥२२॥

एवं न करितां भगवद्भजन । अंतीं नव्हीजे पावन । जरी आलें बरें मरण । तरी भक्तीविण अधोगति ।।२३।।

एकूण आयुष्यभर भगवद्भजन केले नाही, तर मरणोत्तर मुक्ती मिळत नाही. सामान्यांच्या कल्पनेप्रमाणें 'चांगले मरण' आले तरी भक्ती सिद्ध झाली नसेल तर जन्ममरणांचा फेरा चुकत नाही ॥२३॥

म्हणौन साधूनें आपलें । जीत अस्ताच सार्थक केलें । शरीर कारणीं लागलें । धन्य त्याचें ।।२४।।

परंतु साधू मात्र जिवन्तपणीच मुक्त होतो. त्याने त्याच्या शरीराचा यथायोग्य उपयोग करून त्याचे सार्थक केलेले असते. ॥२४॥

जे कां जीवन्मुक्त ज्ञानी । त्यांचें शरीर पडो रानीं । अथवा पडो स्मशानीं । तरी धन्य जालें ।।२५।।

ब्रह्मज्ञानी जीवन्मुक्ताचा देह जंगलात पडून कुजला किंवा स्मशानातच मरण आले तरी त्याचे सार्थक झालेले असते. ॥२५॥

साधूचा देह खितपला । अथवा श्वानादिकीं भक्षिला । हें प्रशस्त न वटे जनाला । मंदबुद्धीस्तव ।।२६।।

कोणी साधू आजाराने खितपत पडला किंवा त्याचे मृत शरीर कुत्र्याकोल्ह्यांनी फाडून खाल्ले तर सामान्य माणूस ते अशुभ समजतो. कारण त्यांच्या बुद्धीला सत्याचे आकलन होत नाही. ॥२६॥

अंत बरा नव्हेचि म्हणोन । कष्टी होती इतर जन । परी बापुडे अज्ञान । नेणती वर्म ।।२७।।

त्याला चांगले मरण आले नाही या खंतीने सामान्य लोक हळहळतात. पण त्या बिचाऱ्या अज्ञान्यांना वर्म कळत नाही. ॥२७॥

जो जन्मलाच नाहीं ठाईचा । त्यास मृत्य येईल कैंचा । विवेकबळें जन्ममृत्याचा । घोट भरिला जेणें ।।२८।।

मूळचा ब्रह्मरूप असलेला तो मुक्त, ब्रह्म 'अज' असल्याने, जन्माला येणे शक्यच नाही. मग तो मरणार कसा? त्याने जिवन्त असतानाच विवेकाने जन्ममरणाचा निरास केलेला असतो. ॥२८॥

स्वरूपानुसंधानबळें । सगळी मायाच नाडळे । तयाचा पार न कळे । ब्रह्मादिकासी ।।२९।।

अन्त:करणवृत्ती अखंड स्वरूपानुसंधानात राहिल्याने मायेचा मागमूसही रहात नाही. प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही त्याच्या या स्थितीचे आकलन होत नाही. ॥२९॥

तो जीतचि असतां मेला । मरणास मारून ज्याला । जन्ममृत्य न स्मरे त्याला । विवेकबळें ।।३०।।

त्याने आपल्या शरीराचा जिवंतपणीच बाध केलेला असतो. त्याने जणू मरणाला मारलेले असते व स्वत: मात्र जिवंत रहातो! मी ब्रह्म आहे व देह मिथ्या आहे या विवेकामुळें तो जन्ममरण विसरून राहतो. ॥३०॥

जो जनीं दिसतो परी वेगळा । वर्ततां भासे निराळा । दृश्य पदार्थ त्या निर्मळा । स्पर्शलाचि नाहीं ।।३१।।

तो चार लोकांत वावरत असला तरी अलिप्त असतो, त्याच्या सहवासात त्याच्या वागण्याचे वेगळेपण कळून येते. त्या विमल ब्रह्मरूप झालेल्याला नामरूपात्मक जगताचा स्पर्शही होत नाही. ॥३१॥

असो ऐसे साधुजन । त्यांचें घडलियां भजन । तेणें भजनें पावन । इतर जन होती ।।३२।।

असो. अशा साधूची जर सेवा घडली किंवा त्याचे सतत स्मरण घडले तर त्यामुळे ते सेवा व स्मरण करणारे पावन होतात. ॥३२॥

सद्गुरूचा जो अंकित साधक । तेणें केलाचि करावा विवेक । विवेक केलियां तर्क । फुटे निरूपणीं ।।३३।।

जो साधक असून सद्गुरूचा सेवक होतो, त्याने सतत विवेक सांभाळावा. तोच तोच विवेक पुन्हा पुन्हा करावा. त्यामुळे तो निरूपण करू लागला की श्रुतीला अनुकूल तर्कांच्या मांडणीला बहर येतो. ॥३३॥

हेंचि साधकासी निरवणें । अद्वैत प्रांजळ निरूपणें । तुमचेंहि समाधान बाणे । साधूच ऐसें ।।३४।।

साधकांना हीच प्रेमाग्रहाची सूचना आहे की त्यांनी अद्वैत वेदान्ताचे शास्त्रशुद्ध अस्खलित निरूपण करावे. त्यामुळे जीवन्मुक्ताला जे समाधान मिळते ते त्यांनाही मिळेल. ॥३४॥

जो संतांस शरण गेला । तो संतचि होऊन ठेला । इतर जनास उपेगा आला । कृपाळूपणें ।।३५।।

जो संतांना शरण राहून विवेक सांभाळून अद्वैत सांगतो तो स्वत:च सन्त होतो. त्याच्या सहज कृपाळू स्वभावामुळें तो इतरांनाही मार्गदर्शन करतो. ॥३५॥

ऐसें संतांचे महिमान । संतसंगें होतें ज्ञान । सत्संगापरतें साधन । आणीक नाहीं ।।३६।।

असे हे संतांचे माहात्म्य आहे. त्यांच्या संगतीत आत्मज्ञान होते. आत्मज्ञानासाठी सत्संगासारखे दुसरे साधन नाही. ॥३६॥

गुरुभजनाचेंनि आधारें । निरूपणाचेनि विचारें । क्रियाशुद्ध निर्धारें । पाविजे पद ।।३७।।

वेदाने सांगितल्याप्रमाणे निष्काम कर्माचे निर्धारपूर्वक आचरण, प्रणिपात व सेवापूर्वक श्रीगुरूंचा सहवास व त्यांनी केलेल्या महावाक्यादी उपदेशाचे मनन आणि चिंतन ही आत्मपदाच्या प्राप्तीची साधने आहेत. ॥ ।३७॥

परमार्थाचें जन्मस्थान । तेंचि सद्गुरूचें भजन । सद्गुरुभजनें समाधान । अकस्मात बाणे ।।३८।।

सद्गुरूंना सेवापूर्वक केलेले परिप्रश्न व त्या प्रश्नांची त्यांच्याकडून मिळालेली उत्तरे हेच परम अर्थाचे म्हणजे मोक्षाचे साधन आहे. त्यामुळे अचानक ब्रह्मानुभवाचे समाधान प्राप्त होते. ॥३८॥

देह मिथ्या जाणोनि जीवें । याचें सार्थकचि करावें । भजनभावें तोषवावें । चित्त सद्गुरूचें ।।३९।।

स्वत:चे शरीर मायिक आहे असा साधकरूप जीवाने सतत निश्चय करीत असावे. त्या जीवाने 'मी ब्रह्म आहे' या अनुभवाने देह सार्थकी लावावा, व त्यासाठी तन, मन व धनाने श्रीगुरुसेवा करून त्यांचे चित्त प्रसन्न करावे. ॥३९॥

शरणांगतांची वाहे चिंता । तो येक सद्गुरू दाता । जैसें बाळक वाढवी माता । नाना येत्नें करूनी ।।४०।।

जे श्रीगुरूंना, याप्रमाणे अनन्यशरण राहतात, त्यांना श्रीगुरू जीव-ब्रह्म ऐक्याचे दान देतात. ते होईपर्यंत त्यांच्यामागे उभे राहतात. आई तिच्या बाळाला सर्व प्रयत्नाने वाढविते त्याप्रमाणे. ॥४०॥

म्हणौन सद्गुरूचें भजन । जयासि घडे तोचि धन्य । सद्गुरुविण समाधान । आणीक नाहीं ।।४१।।

अशी सद्गुरूसेवा ज्यांना घडते ते महाभाग्यवान असतात. कारण त्याशिवाय समाधानाचा दुसरा मार्ग नाही. ॥४१॥

सरली शब्दाची खटपट । आला ग्रंथाचा सेवट । येथें सांगितलें पष्ट । सद्गुरुभजन ।।४२।।

शब्दांनी जेवढे सांगावयाचे ते सांगून झाल्याने ती खटपट आता थांबवण्याची वेळ आली आहे. ग्रंथाचा प्रतिपाद्य विषयही सांगून झाला आहे. या नेमक्या प्रसंगी श्रीगुरुसेवेचे महत्त्व स्पष्टपणें सांगितले आहे. ॥४२॥

सद्गुरुभजनापरतें कांहीं । मोक्षदायेक दुसरें नाही । जयास न मने तेंहीं । अवलोकावी गुरुगीता ।।४३।।

श्रीगुरूंच्या सेवेसारखे दुसरे कोणतेच मोक्षदायक साधन नाही. ज्याला हे पटत नाही त्याने गुरुगीतेचा अभ्यास करावा. ॥४३॥

तेथें निरोपिलें बरवें । पार्वतीप्रति सदाशिवें । याकारणें सद्भावें । सद्‌गुरुचरण सेवावे ।।४४।।

गुरुगीतेमध्ये भगवान सदाशिवांनी मातापार्वतीला श्रीगुरुसेवेचे माहात्म्य फार चांगल्या पद्धतीने सांगितले आहे. म्हणून सद्‌गुरूंची त्यांचे ठिकाणी ब्रह्मभाव ठेवून सेवा करावी. ॥४४॥

जो ये ग्रंथींचा विवेक । विवंचूनि पाहे साधक । तयास सांपडे येक । निश्चय ज्ञानाचा ।।४५।।

जो साधकावस्थेतून या ग्रंथात सांगितलेल्या नित्य अनित्यादी विवेकाचा पिंजून पिंजून अभ्यास करील त्याला श्री-दासबोधामध्यें ब्रह्मज्ञानाचा प्रामुख्याने विचार केला असल्याचे लक्षात येईल. ॥४५॥

जें ग्रंथीं बोलिलें अद्वैत । तो म्हणों नये प्राकृत । सत्य जाणावा वेदांत । अर्थविषईं ।।४६।।

हा ग्रंथ मराठी भाषेत असला तरी त्यांत अद्वैत वेदान्ताची भक्कम मांडणी केली आहे. शुद्ध वेदान्त ज्यात सांगितला आहे तोच खरा ग्रंथ समजावा. ॥४६॥

प्राकृतें वेदांत कळे । सकळ शास्त्रीं पाहातां मिळे । आणी समाधान निवळे । अंतर्यामीं ।।४७।।

सामान्य माणसाला मराठीत सांगितलेला वेदान्त अधिक चांगला कळतो. तोच वेदान्त सर्व संस्कृत शास्त्रग्रंथात सांगितलेला असतो. (त्यांत अधिक काही नसते) त्यामुळे वाचक समाधानाने संतुष्ट होतो. ॥४७॥

तें प्राकृत म्हणों नये । जेथें ज्ञानाचे उपाये । मूर्खासि हें कळे काये । मर्कटा नारिकेळ जैसें ।।४८।।

करवंटी पहाणाऱ्या माकडाला नारळातील मलई व गोड पाणी दिसत नाही, त्याप्रमाणे केवळ भाषेचा विचार करणाऱ्याला मराठीतील अध्यात्मविद्या मनास येत नाही. भावत नाही. या अध्यात्मविद्येला भाषेमुळे कमी समजू नये. ॥४८॥

आतां असो हें बोलणें । अधिकारपरत्वें घेणें । शिंपीमधील मुक्त उणें । म्हणों नये ।।४९।।

असो. बुद्धी जशी कमी-जास्त असेल त्याप्रमाणे तशी समजूत होणे स्वाभाविक आहे, पण शिंपलीतील मोत्याची किंमत शिंपलीमुळे कमी होत नाही! ॥४९॥

जेथे नेति नेति श्रुती । तेथें न चले भाषावित्पत्ती । परब्रह्म आदिअंतीं । अनुर्वाच्य ।।५०।।

प्रत्यक्ष ईश्वरी वेदसुद्धा ब्रह्मवस्तूविषयी बोलताना 'हे ब्रह्म नाहीं,' 'हे ब्रह्म नाही' असे म्हणता म्हणता थकले!असे जे परब्रह्म अभ्यासाच्या सुरुवातीपासून अनुभवाच्या शेवटापर्यंत अनिर्वाच्य किंवा स्वसंवेद्य आहे, त्याच्या वर्णनासाठी कोणतीही भाषा कितीशी कामाला येईल? संस्कृत व मराठी दोन्ही भाषा सारख्याच! ॥५०॥

या समासाच्या शेवटी शेवटी ग्रंथाचा विषय संपल्याचा संकेत समर्थांनी दिला आहे. त्यांच्या 'जीवींची आवडी' पूर्ण झाली. 'अधिकारासारिखे घेणे' 'तयास लाभ तैसा' इ. पहिल्या समासातील भाषा येथेही आहे. मराठी अध्यात्मग्रंथाचा द्वेष करणाऱ्यांचा समाचार पहिल्या दशकातील पहिल्या समासाप्रमाणे येथेही माकडाचा दृष्टान्त देऊन घेतला आहे. येथेही ग्रंथसमाप्तीचा संकेत मिळतो. त्यांच्या काळातील राष्ट्र, महाराष्ट्र व समाजाची आणि धर्म व अध्यात्माची अत्यंत अवनत परिस्थिती लक्षात घेऊन स्वत:ची आवड दूर ठेवून समर्थांनी पुढील दासबोधात समाज व राजकारणाचा बराच विचार केला आहे.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देहान्तनिरूपणनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'देहान्तनिरूपण' नावाचा दहावा समास समाप्त
—दशक सातवा समाप्त—

दशक आठवा : मायोद्भव अथवा ज्ञानदशक

समास पहिला : देवदर्शन

॥ श्रीराम समर्थ ॥

श्रोतीं व्हावें सावध । विमळ ज्ञान बाळबोध । गुरुशिष्यांचा संवाद । अति सुगम परियेसा ।। १ ।।

आतां श्रोत्यांनी सावध होऊन गुरुशिष्य संवादाच्या माध्यमातून सांगितले जाणारे, अति सोप्या भाषेतील शुद्ध ज्ञान ऐकावे. ॥१॥

नाना शास्त्रें धांडोळितां । आयुष्य पुरेना सर्वथा । अंतरीं संशयाची वेथा । वाढोंचि लागे ।। २ ।।

शास्त्रग्रंथ एवढे आहेत की आयुष्यभर त्यांचा अभ्यास करूनही ते संपणार नाहीत. दिवसानुदिवस संशय वाढतच जातात. ॥२॥

नाना तीर्थे थोरथोरें । सृष्टीमध्यें अपारें । सुगमें दुर्गमें दुष्करें । पुण्यदायकें ।। ३ ।।

या जगात अपार माहात्म्य सांगितली जाणारी कित्येक तीर्थक्षेत्रे आहेत. त्यांतील काही सहज जाण्यासारखी (पंढरपूर), काही जाण्यास अतिकठीण (मान सरोवर), काहींचे ठिकाणी सांगितले जाणारे शास्त्रविधी करणे अति जिकिरीचे (गया) तर काही निर्भेळ पुण्यदायक (शिवथर घळ) असतात. ॥३॥

ऐसी तीर्थे सर्वहि करी । ऐसा कोण रे संसारी । फिरों जातां जन्मवरी । आयुष्य पुरेना ।।४।।

अशा या सर्व तीर्थक्षेत्रांच्या यात्रा करण्यासाठी या जगात कोण बरे समर्थ आहे? सर्व आयुष्य त्यासाठी पुरणार नाही. ॥४॥

नाना तपें नाना दानें । नाना योग नाना साधनें । हें सर्वहि देवाकारणें । करिजेत आहे ।।५।।

सर्व कायिकादी तपे, अन्नदानादी दाने, अष्टांगादी योग, नामादी साधने ही सर्व देवाच्या प्राप्तींसाठी केली जातात.

पावावया देवाधिदेवा । बहुविध श्रम करावा । तेणें देव ठाईं पाडावा । हें सर्वमत ।।६।।

देवांच्याही देवाच्या (ब्रह्म) अनुभवासांठी नाना प्रकारे सायास केल्यावर तो अनुभव येतो हे सर्व साधकांना मान्य असते. ॥६॥

पावावया भगवंतातें । नाना पंथ नाना मतें । तया देवांचे स्वरूप तें । कैसें पाहे ।।७।।

ज्या देवाच्या अनुभवासाठी अनेक मते व दर्शने आपापले तत्त्वज्ञान मांडतात, त्या देवाचे स्वरूप काय आहे? ॥७॥

बहुत देव सृष्टीवरी । त्याची गणणा कोण करी । येक देव कोणेपरी । ठाईं पडेना ।।८।।

शिवाय या सृष्टीत असंख्य देव आहेत. 'देव असा आहे' अशा रीतीने एकही देव सर्वमान्य होत नाही. ॥८॥

बहुविध उपासना । ज्याची जेथें पुरे कामना । तो तेथेंचि राहिला मना । सदृढ करूनि ।।९।।

उपासनांचे कित्येक प्रकार आहेत. ज्या उपासनेमुळे आपल्या मनासारखे होते, ती उपासना तो घट्ट धरून बसतो. ॥९॥

बहु देव बहु भक्त । इछ्या जाले आसक्त । बहु ऋषी बहु मत । वेगळालें ।।१०।।

अनेक दैवतांचे सकाम भक्त आपल्या कामनापूर्तीसाठी त्यांच्या दैवतांना अनन्यशरण रहातात. शिवाय अनेक ऋषींनी त्यांची त्यांची वेगळी मते मांडलेली आहेतच. (पतंजली– योगदर्शन. व्यास– अद्वैतदर्शन इ.) ॥१०॥

बहु निवडितां निवडेना । येक निश्चय घडेना । शास्त्रें भांडती पडेना । निश्चय ठाईं ।।११।।

एवढ्या सगळ्यातून खऱ्या देवाची निवड करणें व 'हाच देव' असा निश्चय करणे महाकठीण आहे. कारण द्वैती, शुद्ध अद्वैती, विशिष्ट अद्वैती, क्षणिक विज्ञानवादी इ. शास्त्रांत तीव्र मतभेद आहेत. ॥११॥

बहुत शास्त्रीं बहुत भेद । मतांमतांस विरोध । ऐसा करितां वेवाद । बहुत गेले ।।१२।।

अशा अनेक शास्त्रांचे 'देव' या तत्त्वाविषयीचे वाद व विरोध चालत आलेले आहेत. असे कित्येक शास्त्रकार व दर्शनकार होऊन गेले. ॥१२॥

सहस्रामधें कोणी येक । पाहे देवाचा विवेक । परी त्या देवाचें कौतुक । ठाईं न पडे ।।१३।।

आधीच 'मनुष्याणां सहस्रेषु' या गीतावचनानुसार देव शोधण्याचा प्रयत्न हजारांत एखादा करतो. पण त्याला स्वबुद्धीने देवाचे स्वरूप समजत नाही. ॥१३॥

ठाईं न पडे कैसें म्हणतां । तेथें लागली अहंता । देव राहिला परता । अहंतागुणें ।।१४।।

'मला देवाचे खरे स्वरूप समजत नाही असे म्हणणारे तुम्ही कोण?' असा प्रश्न विचारणाऱ्याला अहंकाराने पछाडले आहे असे समजावें! त्या अहंकारामुळेच त्याला खरा देव समजत नाही. तो खरा देव ओळखत नाही. ॥१४॥

आतां असों हे बोलणें । नाना योग ज्याकारणें । तो देव कोण्या गुणें । ठाईं पडे ।।१५।।

असो. कर्मादी योग ज्याच्या प्राप्तीची साधने म्हणून सांगितली जातात, त्या देवाचे स्वरूप काय आहे वा ते कसे कळेल याचा विचार करू. ॥१५॥

देव कोणासी म्हणावें । कैसें तयासी जाणावें । तेंचि बोलणे स्वभावें । बोलिजेल ।।१६।।

देव म्हणजे नेमके काय, त्याचा अनुभव कसा घ्यावा हे जे सांगणे आवश्यक आहे ते आता सांगू. ॥१६॥

जेणे केलें चराचर । केले सृष्ट्यादि व्यापार । सर्वकर्ता निरंतर । नाम ज्याचें ।।१७।।

(देवाचे तटस्थ लक्षण—) ज्याने ही चर अचर सृष्टी निर्माण केली, सृष्टीच्या सृजनाचे कर्म केले व जो सतत या सृष्टीतील चेतन व अचेतनांचा नियामक असतो तोच देव. (तटस्थ लक्षण– क्रियेसह, स्वरूप लक्षण– अक्रीय) ॥१७॥

तेणें केल्या मेघमाळा । चंद्रबिंबीं अमृतकळा । तेज दिधलें रविमंडळा । जया देवें ।।१८।।

ढग निर्माण व्हावेत, चंद्राच्या चांदण्यात अमृत असावे, सूर्य तेजस्वी असावा ही सर्व देवाचीच योजना आहे. ॥१८॥

ज्याची मर्यादा सागरा । जेणें स्थापिलें फणिवरा । जयाचेनि गुणें तारा । अंतरिक्ष ।।१९।।

त्याच्या नियमनामुळे समुद्र मर्यादा ओलांडत नाही, पृथ्वी शेषाच्या आधाराने स्थिर रहाते व चांदण्या आकाशात भ्रमण करतात. ॥१९॥

च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यासि लक्ष जीवयोनी । जेणें निर्मिले लोक तिनी । तया नाव देव ।।२०।।

परादी चार वाणी, जारजादी चार प्राणी, मानवादी चौऱ्यांशी लक्ष योनी व स्वर्गादी तीन लोक देवानेच उत्पन्न केले. ॥२०॥

ब्रह्मा विष्णु आणी हर । हे जयाचे अवतार । तोचि देव हा निर्धार । निश्चयेंसीं ।।२१।।

ज्या ईश्वराचे ब्रह्मदेव, विष्णू व शंकर हे अवतार असतात, तोच हा देव असे निश्चित समजावे. ॥२१॥

देव्हाराचा उठोनि देव । करूं नेणे सर्व जीव । तयाचेनि ब्रह्मकटाव । निर्मिला न वचे ।।२२।।

पूजेतील देवाची मूर्ती बाहेर येऊन सर्व जीवसृष्टी व पांचभौतिक जग निर्माण करणे शक्य नाही. ॥२२॥

ठाईं ठाईं देव असती । तेहिं केली नाहीं क्षिती । चंद्र सूर्य तारा जीमूती । तयांचेनि नव्हे ।।२३।।

देवांच्या लहानमोठ्या मूर्ती जागोजागी असतात. त्या जग निर्माण करू शकत नाहीत. (मूर्तीच जगाच्या आधाराने

राहतात!) सूर्य, चंद्र, तारे व ढग निर्माण करण्याचे सामर्थ्य त्यांना मुळीच नाही. ॥२३॥

सर्वकर्ता तोचि देव । पाहों जातां निरावेव । ज्याची कळा लीळा लाघव । नेणती ब्रह्मादिक ।।२४।।

ईश्वर सगुण, निराकार व निरवयव असून तोच सर्व निर्माण करतो. त्याचे सूक्ष्मत्व ब्रह्मदेवादिकांनाही कळत नाही. त्याचे कर्तुम अकर्तुमादि सामर्थ्य व केवळ संकल्पाने सृष्टी उत्पन्न करण्याचे कौशल्य लक्षात येत नाही. ॥२४॥

येथें आशंका उठिली । ते पुढीलीये समासीं फिटली । आतां वृत्ती सावध केली । पाहिजे श्रोतीं ।।२५।।

'निराकारापासून साकार जग कसे निर्माण होईल?' अशी शंका येथे येते. त्याचे उत्तर पुढील समासात देऊ. जगत् निर्मितीचा तपशील आता ऐका. ॥२५॥

पैस अवकाश आकाश । कांहींच नाहीं जें भकास । तये निर्मळीं वायोस । जन्म जाला ।।२६।।

प्रथम अतिशय व्यापक, पोकळीचेच तयार झालेले व त्यात दुसरे काही नसलेले (भकास) असे निर्मळ आकाश होते. त्यात अचानक वायू तयार झाला. ॥२६॥

वायोपासून जाला वन्ही । वन्हीपासुनी जालें पाणी । ऐसी जयाची करणी । अघटित घडली ।।२७।।

वायूपासून अग्नी व अग्नीपासून पाणी तयार होण्याची अशक्य असलेली घटना घडली. असा तो सर्वसामर्थ्यसंपन्न आहे. ॥२७॥

उदकापासून सृष्टि जाली । स्तंभेंविण उभारली । ऐसी विचित्र कळा केली । त्या नाव देव ।।२८।।

पाण्यापासून पृथ्वी तयार होऊन ती कोणत्याही आधारावाचून अंतरिक्षात फिरू लागली. असे अतर्क्य सामर्थ्य असते, तोच देव. ॥२८॥

देवें निर्मिली हे क्षिती । तिचे पोटीं पाषाण होती । तयासचि देव म्हणती । विवेकहीन ।।२९।।

देवाने निर्माण केलेल्या पृथ्वीवर अगणित दगड असतात. त्यातीलच एकाला आकार देऊन अविवेकी लोक त्यालाच देव म्हणतात! ॥२९॥

जो सृष्टिनिर्माणकर्ता । तो ये सृष्टीपूर्वीं होता । मग हे तयाची सत्ता । निर्माण जाली ।।३०।।

ज्याने ही अनंत सृष्टी निर्माण केली तो ती निर्माण करण्याच्या आधीपासून होता. नंतर तो तिचा नियामक झाला. नियमनरूप सत्ता अस्तित्वात आली. ॥३०॥

कुल्लाळ पात्रापूर्वीं आहे । पात्रें कांहीं कुल्लाळ नव्हे । तैसा देव पूर्वींच आहे । पाषाण नव्हे सर्वथा ।।३१।।

मडके तयार करण्याआधी कुंभार असतो, पण मडक्यांचा कुंभार तयार होत नाही! (दगडाचा देव करतात त्याप्रमाणे) तसा देव सृष्टीपूर्वीचाच आहे. पाषाण सृष्टीपूर्वी नसतो. ॥३१॥

मृत्तिकेचें शैन्य केलें । कर्ते वेगळे राहिले । कार्यकारण येक केलें । तरी होणार नाहीं ।।३२।।

मातीचे सैनिक तयार केले तर ते करणारा मूर्तिकार (चेतन) मातीपासून व सैनिकांपासून (अचेतन) वेगळाच असतो. म्हणून मातीचे सैनिक (कार्य) व ते करणारा चेतन मूर्तिकार (कारण) कधीच एक असू शकत नाहीत. (त्याप्रमाणे अचेतन दगडाचा चेतन देव होऊ शकत नाही. येथे समर्थ कर्त्याला निमित्त कारण व कृतीला कार्य म्हणतात.) ॥३२॥

तथापि होईल पंचभूतिक । निर्गुण नव्हे कांहीं येक । कार्याकारणाचा विवेक । भूतांपरता नाहीं ।।३३।।

ब्रह्म– मूळमाया– गुणमाया– जडमाया या सृष्टीच्या विकासक्रमात जडमाया, म्हणजेच पंचमहाभूते होत. त्या पंचमहाभूतांमध्ये आकाश हे कारण तर वायू हे कार्य, वायू हे कारण तर अग्नी हे कार्य इ. प्रकारे कार्यकारण भाव असू शकतो. पण ब्रह्म या निर्गुण स्वरूपात तो असणे शक्य नाही. कारण ब्रह्म अवयवशून्य, अखंड व भेदशून्य आहे. त्यांत एक कारण व त्याचे दुसरे कार्य असा भेद संभवत नाही. म्हणून कार्य व कारणांची भाषा केवळ पांचभैतिक

सृष्टीत संभवते. ।।३३।।

अवघी सृष्टि जो कर्ता । तो ते सृष्टीहूनि पर्ता । तेथें संशयाची वार्ता । काढूंचि नये ।।३४।।

जो सर्व सृष्टी निर्माण करतो तो त्या सृष्टीहून वेगळा असतो. या सरळ सरळ कळणाऱ्या गोष्टीबद्दल शंकासुद्धा घेऊ नये. ।।३४।।

खांबसूत्रींची बाहुली । जेणें पुरुषें नाचविली । तोचि बाहुली हे बोली । घडे केवी ।।३५।।

जो कळसूत्री बाहुल्या दोऱ्यांनी नाचवतो तोच त्या बाहुल्याही असतो असे घडणे कधीतरी शक्य आहे काय? ।।३५।।

छायामंडपीची सेना । सृष्टीसारिखीच रचना । सूत्रें चाळी परी तो नाना । वेक्ति नव्हे ।।३६।।

झिरझिरीत पडद्यामागे मोठा दिवा ठेवून त्या दिव्याच्या पार्श्वभूमीवर कागदी आकृतींच्या सावल्या नाचविण्याचा खेळ करतात. हाच छाया मंडप. त्या कागदी आकृत्या सृष्टीतील विविध आकृत्यांप्रमाणे समजाव्यात. जरी त्या नाचविणाऱ्याने कागदी सैनिकांच्या आकृती तयार करून त्यांच्या सावल्या नाचवल्या तरी, व सैनिक अनेक असले तरी, तो मात्र एकटाच असतो. ।।३६।।

तैसा सृष्टिकर्ता देव । परी तो नव्हे सृष्टिभाव । जेणें केले नाना जीव । तो जीव कैसेनी ।।३७।।

त्याप्रमाणें सृष्टी व सृष्टीतील अब्जावधी जीव यांचा ईश्वर निर्माता असल्याने तोच सृष्टी किंवा जीव असणे कसे शक्य आहे? ।।३७।।

जें जें जया करणें पडे । तें तें तो हें कैसें घडे । म्हणोनि वायांचि बापुडे । संदेहीं पडती ।।३८।।

ज्याला जे निर्माण करावयाचे तोच ते असतो हे अशक्य आहे. हे लक्षात न घेणारे अज्ञानी लोक अकारण संशयात सापडतात. ।।३८।।

सृष्टि ऐसेंचि स्वभावें । गोपुर निर्मिलें बरवें । परी तो गोपुर कर्ता नव्हे । निश्चयेंसीं ।।३९।।

ही सृष्टी जणू देवळावरील सुंदर गोपुरासारखी आहे. पण गोपुर बांधणारा स्वत: गोपुर असू शकत नाही. ।।३९।।

तैसें जग निर्मिलें जेणें । तो वेगळा पूर्णपणें । येक म्हणती मूर्खपणें । जग तोचि जगदीश ।।४०।।

जो जग निर्माण करतो तो जगाहून सर्वस्वी वेगळा असतो. निव्वळ मूर्ख असणारे जग व ईश्वर एकरूप समजतात. (हे म्हणणे मायावादाचे आहे.) ।।४०।।

एवं जगदीश तो वेगळा । जग निर्माण त्याची कळा । तो सर्वांमधें परी निराळा । असोन सर्वीं ।।४१।।

असा ईश्वर जग निर्माण करून, सर्वव्यापी असून, सर्वाहून अलिप्त असतो. हे त्याचे अद्भुत कौशल्य किंवा लीला आहे. (पहा गीता अ.९. ऐश्वर्ययोग.) ।।४१।।

म्हणोनि भूतांचा कर्दमु । यासी अलिप्त आत्मारामु । अविद्यागुणें मायाभ्रमु । सत्यचि वाटे ।।४२।।

पंचभूतांचे एकत्रीकरण होऊन तयार झालेला मायिक प्रपंच अविद्येच्या प्रभावामुळे सत्य वाटतो. ईश्वर त्यांत असून अलिप्त असतो. ।।४२।।

मायोपाधी जगडंबर । आहे सर्वहि साचार । ऐसा हा विपरीत विचार । कोठेंचि नाहीं ।।४३।।

दृश्य जगत् ही ब्रह्माची मायिक उपाधी आहे. ती उपाधीसुद्धा ब्रह्माप्रमाणें सत्य आहे. असा विपरीत विचार अद्वैतशास्त्रात कोठेच नाही. ।।४३।।

म्हणोनि जग मिथ्या साच आत्मा । सर्वांपर जो परमात्मा । अंतर्बाह्य अंतरात्मा । व्यापूनि असे ।।४४।।

म्हणून – १) देह व जगत् मिथ्या. २) आत्मा सत्य. ३) जीव व ईश्वराहून सूक्ष्म ब्रह्म. ४) ईश्वर अंतर्बाह्य व्यापून नियामक (सर्वांपर = ब्रह्म; अंतरात्मा = ईश्वर). ।।४४।।

तयास म्हणावें देव । येर हें अवघेंचि वाव । ऐसा आहे अंतर्भाव । वेदांतीचा ।।४५।।

त्या ब्रह्मवस्तूलाच देव म्हणावे. इतर सर्व अध्यस्त, मायिक, कल्पित व मिथ्या समजावे. वेदान्तशास्त्राचे हे वर्म आहे. (अविद्या उपाधी = जीव, माया उपाधी = ईश्वर, निरुपाधिक = ब्रह्म. अविद्या उपाधी देहात. माया उपाधी जगात. ब्रह्मात दोन्ही उपाधी नाहीत.) ।।४५।।

पदार्थवस्तु नासिवंत । हें तों अनुभवास येत । याकारणें भगवंत । पदार्थावेगळा ।।४६।।

पांचभौतिक पदार्थ किंवा वस्तू नाश पावतात हे तर सर्वांच्याच अनुभवाला येते. ब्रह्म अविनाशी असल्याने ते ह्या पदार्थांपासून वेगळे असते. ।।४६।।

देव विमळ आणी अचळ । शास्त्रें बोलती सकळ । तया निश्चळास चंचळ । म्हणों नये सर्वथा ।।४७।।

ब्रह्म विमल व निश्चळ आहे असे वेदान्तशास्त्र सांगते : त्या निश्चळाला चंचल म्हणजे उत्पत्ती व नाश असलेले कधीच मानू नये ।।४७।।

देव आला देव गेला । देव उपजला देव मेला । ऐसें बोलतां दुरिताला । काये उणें ।।४८।।

व्यापक ब्रह्म आले किंवा गेले, अज व अमर असलेले ब्रह्म जन्माला आले व मेले असे म्हणणाऱ्याला पापाचा साठा कमी पडेल काय? (पाप = अज्ञान.) ।।४८।।

जन्ममरणाची वार्ता । देवास लागेना सर्वथा । देव अमर ज्याची सत्ता । त्यासी मृत्य कैसेनी ।।४९।।

इंद्रादी देवांना अमर म्हणतात. त्यांचे सापेक्ष अमरत्व ब्रह्माच्या निरपेक्ष अमरत्वावर निर्भर आहे. अशा त्या ब्रह्माला जन्ममरण स्पर्शही करीत नाहीत. त्याला मरण कसे येईल? ।।४९।।

उपजणें आणी मरणें । येणें जाणें दुःख भोगणें । हें त्या देवाचें करणें । तो कारण वेगळा ।।५०।।

जन्माला येणे, मरून जाणे, सुखदुःखादी द्वंद्व भोगणे इ. ईश्वराच्या नियमनानुसार होतात. नियामक ईश्वर त्याहून वेगळा असतो. (ब्रह्म अलिप्त असते.) ।।५०।।

अंतःकरण पंचप्राण । बहुतत्वीं पेंडज्ञान । यां सर्वांस आहे चळण । म्हणोनि देव नव्हेती ।।५१।।

मनादी अन्तःकरण, प्राणापानादी पंचप्राण, पिंडाची ब्याऐंशी तत्त्वे घ्या सर्वांना उत्पत्ती, स्थिती व लय असल्याने ते देव नव्हेत. ।।५१।।

येवं कल्पनेरहित । तया नाव भगवंत । देवपणाची मात । तेथें नाहीं ।।५२।।

म्हणून ब्रह्म स्वसंवेद्य असून इंद्रादी देव किंवा ईश्वर यांना खरे देवपण नाही. ।।५२।।

तव शिष्यें आक्षेपिलें । तरी कैसें ब्रह्मांड केलें । कर्तेपणें कारण पडिलें । कार्यामधें ।।५३।।

यावर शिष्य विचारतो– निराकार ब्रह्माने, साकार ब्रह्मांड कसे तयार केले? जगात असे दिसते की कारण जेव्हा कर्ता होते तेव्हा ते सहजच कार्यरूप होते. उदा.– ।।५३।।

द्रष्टेपणें द्रष्टा दृश्यीं । जैसा पडे अनायांसीं । कर्तेपणें निर्गुणासी । गुण तैसे ।।५४।।

पाहणारा जेव्हा पाहू लागतो, तेव्हा ,सहजच तो जे पहातो त्याच्या आकाराचा होतो. (चिदाभास घटाकार होतो– पहा विचारसागर.) त्याप्रमाणे निर्गुणाने ब्रह्मांडाचे कर्तृत्व स्वीकारले तर ते सगुणरूप होते. ।।५४।।

ब्रह्मांडकर्ता कवण । कैसी त्याची वोळखण । देव सगुण किं निर्गुण । मज निरोपावा ।।५५।।

म्हणून ब्रह्मांड निर्माण करणारा देव कोणता? त्याचे स्वरूप काय? तो सगुण की निर्गुण ते मला स्पष्ट करून सांगावे. ।।५५।।

येक म्हणती त्या ब्रह्मातें । इछ्यामात्रें सृष्टिकर्तें । सृष्टिकर्तें त्यापर्तें । कोण आहे ।।५६।।

कोणी असे म्हणतात की ब्रह्म स्वरूपाला केवळ संकल्प झाल्याने सृष्टी निर्माण झाली, म्हणून दुसरा सृष्टिकर्ता कोठून आणावा? ।।५६।।

आतां असो हे बहु बोली । सकळ माया कोठून जाली । ते हे आतां निरोपिली । पाहिजे स्वामी ।।५७।।

आता माझे बोलणे नको. ही माया व मायिक सृष्टी कोठून आली? कशी आली? ते आता मला समजावून सांगा. ।।५७।।

ऐसें ऐकोनि वचन । वक्ता म्हणे सावधान । पुढिले समासीं निरूपण । सांगिजेल ।।५८।।

या प्रश्नाचे उत्तर देताना वक्ता म्हणतो– आता सावधपणे ऐका. याचे उत्तर पुढील समासात सांगू. ।।५८।।

ब्रह्मीं माया कैसी जाली । पुढें असे निरोपिली । श्रोतीं वृत्ति सावध केली । पाहिजे आतां ।।५९।।

ब्रह्मरूप अधिष्ठानावर अध्यस्त, माया कोठून आली? ती पुढील समासात सांगू. श्रोत्यांनी सावध होऊन ऐकावे ।।५९।।

पुढें हेंचि निरूपण । विशद केलें श्रवण । जेणें होये समाधान । साधकांचें ।।६०।।

पुढील समासात हाच विषय स्पष्ट करून सांगितला आहे. त्याने साधकांचे समाधान होईल. ।।६०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देवदर्शननाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'देवदर्शन' नावाचा पहिला समास समाप्त

दशक आठवा : मायोद्भव अथवा ज्ञानदशक

समास दुसरा : सूक्ष्मआशंका

॥ श्रीराम समर्थ ॥

मागां श्रोतीं आक्षेपिलें । तें पाहिजे निरोपिलें । निरावेवीं कैसें जालें । चराचर ।।१।।

श्रोत्याने असा प्रश्न विचारला होता की अवयवरहित व म्हणून निराकार ब्रह्मापासून साकार सृष्टी कशी निर्माण झाली? त्या मागील प्रश्नाचे आता उत्तर देऊ. ॥१॥

याचें ऐसें प्रतिवचन । ब्रह्म जें कां सनातन । तेथें माया मिथ्याभान । विवर्तरूप भासे ।।२।।

त्याचे उत्तर असे– अनादि नित्य ब्रह्मावर विवर्त झाल्याने मायेचे सत् असत् विलक्षण असलेले भान होते. (विवर्त– अधिष्ठानापेक्षा विपरीत व अन्यथारूप असणे. उदा. झाडाच्या खोडावर राक्षसाचा विवर्त होतो. झाडाचे खोड व्यावहारिक तर राक्षस त्याहून विपरीत म्हणजे काल्पनिक असतो. व्यावहारिक खोड अचेतन तर काल्पनिक राक्षस चेतन म्हणजे अन्यथारूप किंवा वेगळा असतो.) ॥२॥

आदि येक परब्रह्म । नित्यमुक्त अक्रिय परम । तेथें अव्याकृत सूक्ष्म । जाली मूळमाया ।।३।।

मुळात परब्रह्म सतत मुक्त, क्रियाशून्य व व्यापक असून त्यात प्रगटीकरणाला सुरुवात न झालेली, अति सूक्ष्म असलेली मूळमाया उत्पन्न झाली. (अव्याकृत– केवळ स्फुरण रूप.) ॥३॥

श्लोक

आद्यमेकं परब्रह्म नित्यमुक्तमविक्रियम् । तस्य माया समावेशो जीवमव्याकृतात्मकम् ।।छ।।

श्लोकार्थ– प्रथम एकमेव, सततमुक्त व विकाररहित ब्रह्मच होते. त्याच्या, प्रगटीकरणाला सुरुवात न झालेल्या मूळमायेत, जीवभावाचा समावेश झाला. (तिसऱ्या व चौथ्या ओवीला प्रमाण म्हणून हा श्लोक दिला आहे.)

आशंका ।। येक ब्रह्म निराकार । मुक्त अक्रिये निर्विकार । तेथें माया वोडंबर । कोठून जाली ।।४।।

शंका– ब्रह्म नित्यमुक्त, क्रियाशून्य, निर्विकार, एकमेव व निराकार असताना तेथे मायेचा भूलभुलय्या कोठून आला? ॥४॥

ब्रह्म अखंड निर्गुण । तेथें इच्छा धरी कोण । निर्गुणीं सगुणेविण । इछा नाहीं ।।५।।

ब्रह्माला 'मी एक आहे, बहु व्हावे' असा संकल्प झाला असे श्रुती सांगते. ब्रह्म तर अखंड व निर्गुण आहे. सगुणाला इच्छा होणे शक्य आहे. निर्गुणाला नाही. मग 'अमन' (मुंडक उप.) ब्रह्माला इच्छा करणारा, इच्छेचा विषय व इच्छा असे खंड असणारी इच्छा कशी होणार? ब्रह्म अखंड आहे. ॥५॥

मुळीं असेचिना सगुण । ह्मणोनि नामें निर्गुण । तेथें जालें सगुण । कोणेपरी ।।६।।

'ब्रह्म निर्गुण आहे' याचा अर्थच असा की त्यात सगुणाला मुळात वावच नाही. ते सगुण असणेच शक्य नाही. मग ते आले कोठून? ॥६॥

निर्गुणचि गुणा आलें । ऐसें जरी अनुवादलें । लागों पाहे येणें बोलें । मूर्खपण ।।७।।

निर्गुणाचेच सगुणांत रूपांतर झाले असे जर कोणी स्पष्टीकरण करील तर त्याला मूर्खच म्हणावे लागेल! ॥७॥

येक म्हणती निरावेव । करून अकर्ता तो देव । त्याची लीळा बापुडे जीव । काये जाणती ।।८।।

कोणी म्हणतात की निरवयव देव सृष्टी निर्माण करूनही अकर्ताच राहतो. त्याची ही लीला बिचाऱ्या अज्ञानी जीवाला कशी कळणार! हे कसे शक्य आहे ते त्याचा तोच (देव) जाणे. ॥८॥

येक म्हणती तो परमात्मा । कोण जाणे त्याचा महिमा । प्राणी बापुडा जीवात्मा । काये जाणे ।।९।।

कोणी म्हणतात की परमात्म्याचा महिमा अगाध आहे. बिचाऱ्या जीवात्म्याला तो कसा कळणार? ॥९॥

उगाच महिमा सांगती । शास्त्रार्थ अवघा लोपिती । बळेंचि निर्गुणास म्हणती । करूनि अकर्ता ।।१०।।

असे हे देवाचे नसलेले, काल्पनिक माहात्म्य सांगून ते वेदान्तशास्त्राला हरताळ फासतात. निर्गुणाला बळजबरी करून अकर्ता म्हणतात. ॥१०॥

मुळीं नाहीं कर्तव्यता । कोण करून अकर्ता । कर्ता अकर्ता हे वार्ता । समूळ मिथ्या ।।११।।

ज्याला मुळात कोणतीच क्रिया नसते तो करणार काय व ते करून अकर्ता होणार कसा? कर्ता व अकर्ता या शब्दांनाच मुळात तेथे काही अर्थ नाही. तशी भाषाच बोलू नये. ॥११॥

जे ठाईंचे निर्गुण । तेथें कैचें कर्तेपण । तरी ते इछा धरी कोण । सृष्टिरचाव्याची ।।१२।।

जे स्वरूपानेच सत्त्वादी गुणरहित आहे, त्याला कर्तेपणा येईलच कसा? मग 'आपण सृष्टी निर्माण करावी' ही इच्छा कोणाला होते? ॥१२॥

इछा परमेश्वराची । ऐसी युक्ती बहुतेकांची । परी त्या निर्गुणास इछा कैंची । हें कळेना ।।१३।।

ती इच्छा परमेश्वराला (ब्रह्म) होते, असे स्पष्टीकरण बऱ्याच ठिकाणी दिले आहे. पण निर्गुणाला इच्छा कशी होते हा प्रश्न अनुत्तरित राहतो. ॥१३॥

तरी हें इतुकें कोणें केलें । किंवा आपणचि जालें । देवेंविण उभारलें । कोणेपरी ।।१४।।

मग हे स्पष्ट दिसणारे जग कोणी केले? ते आपले आपणच तयार झाले का? देवावाचून त्याची उभारणी कशी झाली? ॥१४॥

देवेंविण जालें सर्व । मग देवास कैंचा ठाव । येथें देवाचा अभाव । दिसोन आला ।।१५।।

देवावाचूनच सृष्टी उत्पन्न होते असे मानले तर देव या तत्त्वाची गरजच काय? त्याचे अस्तित्व का मानावे? देव नाहीच असे ठरते. ॥१५॥

देव म्हणों सृष्टिकर्ता । तरीं येवं पाहे सगुणता । निर्गुणपणाची वार्ता । देवाची बुडाली ।।१६।।

देव सृष्टी निर्माण करतो तर तो सगुण मानला पाहिजे. असे आतांपर्यंत (एवं) ठरले आहे. मग 'ब्रह्म निर्गुण आहे' हे शास्त्र खोटे ठरते. ॥१६॥

देव ठाईंचा निर्गुण । तरी सृष्टिकर्ता कोण । कर्तेपणाचें सगुण । नासिवंत ।।१७।।

ब्रह्म स्वरूपाने निर्गुण असल्याने सृष्टीचा कर्ता कोणाला म्हणावे? ज्याला कर्तेपणा असतो ते सगुण सहजच विनाशी असते! ॥१७॥

येथें पडिले विचार । कैसें जालें सचराचर । माया म्हणों स्वतंतर । तरी हेंहि विपरीत दिसे ।।१८।।

येथे हे दृष्य जग कसे झाले या विचाराचा गुंता सुटत नाही. माया स्वतंत्रपणे हे जग निर्माण करते असे म्हणावे तर तेही शास्त्राला विरोधी आहे. ॥१८॥

माया कोणीं नाहीं केली । हे आपणचि विस्तारली । ऐसें बोलतां बुडाली । देवाची वार्ता ।।१९।।

माया कोणी निर्माण केली नसून तिची ती निर्माण होऊन सर्वत्र व्यापून रहाते, असे म्हणावे तर देवाचे अस्तित्व नाकारावे लागते किंवा ते निरर्थक ठरते. ॥१९॥

देव निर्गुण स्वतसिद्ध । त्यासी मायेसि काये समंध । ऐसें बोलतां विरुद्ध । दिसोन आलें ।।२०।।

ब्रह्म निर्गुण व स्वयंसिद्ध असून त्याचा मायेशी काहीच संबंध नाही असे म्हणावे तर 'ब्रह्म अधिष्ठान व माया अध्यस्त' ह्या वेदान्तशास्त्राला विरोध येतो. ॥२०॥

सकळ कांहीं कर्तव्यता । आली मायेच्याचि माथां । तरी भक्तांस उद्धरिता । देव नाहीं कीं ।।२१।।

सर्व कर्तृत्व मायेचे आहे असे म्हणून तिचे माहात्म्य सांगावे तर मग भक्तांचा उद्धार करणारा देव नाहीच असे म्हणावे लागते. ॥२१॥

देवेंविण नुस्ती माया । कोण नेईल विलया । आम्हां भक्तां सांभाळाया । कोणीच नाहीं ।।२२।।

मायेवर देवाचे नियंत्रण नसेल तर तिचे हे दृश्य जग कोण नष्ट करील? आम्हां भक्तांचा कृपाळूपणें सांभाळ करण्यासाठी कोणीच असणार नाही. ॥२२॥

म्हणोनि माया स्वतंतर । ऐसा न घडे कीं विचार । मायेस निर्मिता सर्वेश्वर । तो येकचि आहे ।।२३।।

म्हणून माया स्वतंत्र आहे असे म्हणणे कधीच शक्य नाही. ब्रह्म हेच माया निर्माण करते असे म्हणावे लागते. ॥२३॥

तरी तो कैसा आहे ईश्वर । मायेचा कैसा विचार । तरी हें आतां सविस्तर । बोलिलें पाहिजे ।।२४।।

श्रोतां व्हावें सावधान । येकाग्र करूनियां मन । आतां कथानुसंधान । सावध ऐका ।।२५।।

आता ईश्वर व माया ह्यांचे स्वरूप सविस्तर सांगितले पाहिजे. श्रोत्यांनी एकाग्र चित्ताने सावध होऊन ते ऐकावे. ॥२४-२५॥

येके आशंकेचा भाव । जनीं वेगळाले अनुभव । तेहि बोलिजेती सर्व । येथानुक्रमें ।।२६।।

वेगवेगळ्या लोकांचा भाव, अनुभव व मते वेगळी असतात. त्या सर्वांचा आता परामर्श घेऊ. ॥२६॥

येक म्हणती देवें केली । म्हणोनि हे विस्तारली । देवास इछ्या नस्ती जाली । तरी हे माया कैंची ।।२७।।

एक मत असे आहे की माया ही देवाची निर्मिती असून त्याच्या इच्छेनुसार तिचा विस्तार झाला. देवाला संकल्प झालाच नसता तर माया कशी निर्माण झाली असती? ॥२७॥

येक म्हणती देव निर्गुण । तेथें इछा करी कोण । माया मिथ्या हे आपण । जालीच नाहीं ।।२८।।

पण ब्रह्म निर्गुण असताना त्याला इच्छा कशी झाली? माया स्वरूपाने कल्पित असल्याने तिला अस्तित्वच नाही. ॥२८॥

येक म्हणती प्रत्यक्ष दिसे । तयेसी नाहीं म्हणतां कैसें । माया हे अनादि असे । शक्ती ईश्वराची ।।२९।।

पण जगताच्या रूपाने माया प्रत्यक्ष दिसत असताना तिचे अस्तित्व नाकारणार कसे? माया ही ईश्वराची अनादि शक्ती आहे असे शास्त्र सांगते. ॥२९॥

येक म्हणती साच असे । तरी हे ज्ञानें कैसी निरसे । साचासारिखीच दिसे । परी हे मिथ्या ।।३०।।

कोणी म्हणतात की माया त्रिकालाबाधित सत्य आहे. पण संत सांगतात की ज्ञानाने तिचा निरास होतो. मग ती सत्य कशी? ती सत्य वाटते पण अनिर्वचनीय असते. ॥३०॥

येक म्हणती मिथ्या स्वभावें । तरी साधन कासया करावें । भक्तिसाधन बोलिलें देवें । मायात्यागाकारणें ।।३१।।

कोणी म्हणतात की माया स्वरूपाने मिथ्या असेल तर तिचेच रूप असलेल्या अज्ञान व अविद्येच्या निवृत्तीसाठी

साधना का करावी? देव तर सांगतात की भक्ती ह्या साधनाने त्यांचा निरास होतो. (पहा गीता– ७-१४. 'दैवी ह्येषा गुणमयी'–) ॥३१॥

येक म्हणती मिथ्या दिसतें । भयें अज्ञानसन्येपातें । साधन औषधही घेईजेतें । परी तें दृश्य मिथ्या ॥३२॥

मंद प्रकाशात ज्याप्रमाणें भयामुळें दोरीऐवजी साप सत्यत्वाने दिसतो त्याप्रमाणें अज्ञानाचा ज्वर चढल्यामुळें ब्रह्माऐवजी जगत् सत्यत्वाने दिसते. त्या ज्वरासाठी साधना हे औषध घ्यावे लागते. तरीही दृश्य जगत् मात्र अनिर्वचनीय आहे. (सत् विलक्षण असून भासते म्हणून साधना करावी.) ॥३२॥

अनंत साधनें बोलिलीं । नाना मतें भांबावलीं । तरी माया नवचे त्यागिलीं । मिथ्या कैसी म्हणावी ॥३३॥

अध्यात्म शास्त्रातील अनेक मतमतांतरानुसार वेगळ्या वेगळ्या साधना करूनही ती मते व साधना गोंधळलेलीच असतात. त्या सर्वांनीही माया निवृत्त होत नाही! अशी माया भ्रमरूप आहे असे कसे म्हणावे? ॥३३॥

मिथ्या बोले योगवाणी । मिथ्या वेदशास्त्रीं पुराणीं । मिथ्या नाना निरूपणीं । बोलिली माया ॥३४॥

योगशास्त्र, वेदान्तशास्त्र व पुराणें माया भ्रमरूप आहे असे सांगतात. अनेक भाष्यग्रन्थातही तसेच सांगितले आहे. ॥३४॥

माया मिथ्या म्हणतां गेली । हे वार्ता नाहीं ऐकिली । मिथ्या म्हणतांच लागली । समागमें ॥३५॥

'माया भ्रमरूप आहे' असे नुसते म्हणून माया निवृत्त झाल्याचे ऐकिवात नाही! 'ती मिथ्या आहे' ह्या वाक्यातच तिचे अस्तित्व सिद्ध होते. ॥३५॥

जयाचे अंतरीं अज्ञान । नाहीं वोळखिले सज्जन । तयास मायामिथ्याभान । सत्यचि वाटे ॥३६॥

ज्याला 'मी आत्मा' असे ज्ञान नाही व संत ओळखून त्यांची सेवा केली नाही, त्यांना मायेने दिसणारा जगत् भ्रम सत्य वाटतो. ॥३६॥

जेणें जैसा निश्चये केला । तयासी तैसाचि फळला । पाहे तोचि दिसे बिंबला । तैसी माया ॥३७॥

ज्याने जसा निश्चय करावा तसा तो होतो. त्याला तसा अनुभव येतो. जे बघावे तेच दिसते. 'माया' आहे म्हणणाऱ्याला ती आहे. ॥३७॥

येक म्हणती माया कैंची । आहे तें सर्व ब्रह्मचि । थिजल्या विघुरल्या घृताची । ऐक्यता न मोडे ॥३८॥

कोणी म्हणतात की माया आहेच कोठे? सर्व ब्रह्मच ब्रह्म आहे. शुद्ध ब्रह्म हे पातळ तुपाप्रमाणें असून दृश्य जगत् थिजलेल्या तुपाप्रमाणें आहे. ॥३८॥

थिजलें आणी विघुरलें । हें स्वरूपीं नाहीं बोलिलें । साहित्य भंगलें येणें बोलें । म्हणती येक ॥३९॥

निर्विकार ब्रह्म स्वरूपाचे बाबतीत पातळपणा व थिजलेपणा हे दृष्टान्तापुरतेसुद्धा संभवत नाहीत. अशा बोलण्यानेसुद्धा वेदान्तशास्त्र (साहित्य) जणूं मोडते. त्याची मोडतोड होते. ॥३९॥

येक म्हणती सर्व ब्रह्म । हें न कळे जयास वर्म । तयाचे अंतरींचा भ्रम । गेलाच नाहीं ॥४०॥

'सर्वं खल्विदं ब्रह्म' ह्या श्रुतीचे वर्म ज्याला कळले नाही त्याच्या अन्तःकरणातील अज्ञानाचा भ्रम वा गोंधळ गेलेला नसतो. ॥४०॥

येक म्हणती येकचि देव । तेथें कैंचें आणिलें सर्व । सर्व ब्रह्म हें अपूर्व । आश्चिर्य वाटे ॥४१॥

ह्यावर कोणी आक्षेप घेतात की केवळ ब्रह्मच असताना 'सर्व' ह्या नावाने जे 'इदं'चा विषय होणारे जगत् ते तुम्ही

आणलेच कोठून? 'सर्व ब्रह्म' हा शब्दप्रयोग असंभव असून तो तुम्ही करता ह्याचे आश्चर्य वाटते. ॥४१॥

येक म्हणती येकचि खरें । आनुहि नाहीं दुसरें । सर्व ब्रह्म येणें प्रकारें । सहजचि जालें ।।४२।।

त्यावर उत्तर देतात की एका ब्रह्माशिवाय दुसरे काही अणुमात्रही सत्य नाही. त्यामुळें दुसरे काहीं भासत असेल तर त्याला ब्रह्मच म्हणावे लागते. म्हणून 'सर्व ब्रह्म' ही शब्दयोजना संभवते. ॥४२॥

सर्व मिथ्या येकसरें । उरलें तेंचि ब्रह्म खरें । ऐसीं वाक्यें शास्त्राधारें । बोलती येक ।।४३।।

कोणी शास्त्राचा आधार घेऊन असे म्हणतात की जे जे बुद्धीला कळते ते ते सर्व मिथ्या असून ते बाजूला सारल्यावर जे उरते ते ब्रह्मच फक्त सत्य आहे. (सर्व = बुद्धीला कळणारे. जगातील सर्व पदार्थ, स्वत:चे सुख, दु:ख, क्रोधादि व 'अहं' हेही बुद्धीला कळतात.) ॥४३॥

आळंकार आणी सुवर्ण । तेथें नाहीं भिन्नपण । आटाआटी वेर्थ सीण । म्हणती येक ।।४४।।

कोणी म्हणतात की सोने व त्याचे अलङ्कार यांत जराही भेद नाही. उगीच वैचारिक कोलांट्या मारून फुकट शीण का करावा? (पण सोन्याचा दागिना कोणी केला? कसा झाला? की 'प्रथमपासून' सोने व दागिना दोन्ही आहेत?) ॥४४॥

हीन उपमा येकदेसी । कैसी साहेल वस्तूसी । वर्णवेक्ती अव्यक्तासी । साम्यता न घडे ।।४५।।

कोणी म्हणतात की सोने व दागिन्याची ब्रह्म व जगताला दिलेली उपमा एकांगी आहे. ती ब्रह्माला जुळत नाही. ब्रह्म अमूर्त आहे व सोने मूर्त आहे. दोन्हीत उपमा देण्यापुरतेही साम्य नाही. ॥४५॥

सुवर्णीं दृष्टी घालितां । मुळींच आहे वेक्तता । आळंकार सोने पाहातां । सोनेंचि असे ।।४६।।

सोन्यावर दृष्टी स्थिर केली तरी ते मुळातच रूपवान, मूर्त किंवा व्यक्त आहे. सोन्यावरील दृष्टी काढून अलङ्काराच्या वेगळ्या रूपावर स्थिर केली तरी ते सोनेच असते. ॥४६॥

मुळीं सोनेंचि हें वेक्त । जड येकदेसी पीत । पूर्णास अपूर्णाचा दृष्टांत । केवीं घडे ।।४७।।

मुळात सोनेच व्यक्त, अचेतन व पिवळ्या रंगाचे असते. (ब्रह्म अव्यक्त, चेतन व अवर्ण आहे.) पूर्ण ब्रह्माला अपूर्ण सोन्याचा दृष्टान्त कसा देता येईल? (ज्याला रूप- वर्णादी विशेष असतात ते अपूर्ण असते. निर्विशेष ब्रह्म पूर्ण आहे.) ॥४७॥

दृष्टांत तितुका येकदेसी । देणें घडे कळायासी । सिंधु आणी लहरीसी । भिन्नत्व कैंचें ।।४८।।

ह्याचे उत्तर असे देतात– दृष्टान्त नेहमीच एकदेशी असतो असे शास्त्रच सांगते. समजूत पटली की दृष्टान्ताचे काम संपते. समुद्राचे पाणी व त्यावरील तरङ्ग किंवा लाटा ह्यांत वेगळेपणा असतो का? ॥४८॥

उत्तम मधेम कनिष्ठ । येका दृष्टांतें कळे पष्ट । येका दृष्टांतें नष्ट । संदेह वाढे ।।४९।।

दृष्टान्ताचे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन प्रकार असतात. उत्तम व मध्यम दृष्टान्ताने सिद्धान्त कळतो. कनिष्ठ दृष्टान्ताने उलट गोंधळच वाढतो. ॥४९॥

कैंचा सिंधु कैंची लहरी । अचळास चळाची सरी । साचाऐसी वोडंबरी । मानूंच नये ।।५०।।

समुद्र व लाटांचा तरी दृष्टान्त ब्रह्म व दृश्य जगताला कसा जुळेल? ब्रह्म निश्चळ असते तर समुद्र चंचळ! जादू कधी खरी मानू नये. ॥५०॥

वोडंबरी हे कल्पना । नाना भास दाखवी जना । येरवी हे जाणा । ब्रह्मचि असे ।।५१।।

कोणी म्हणतात– जादू ही एक प्रकारे फसवणूकच असून त्यात अनेक विचित्र दृश्ये दाखवतात. तशी माया जगदाभासाची दृश्ये दाखवते. तत्त्वदृष्टीने पाहिले तर हे सर्व ब्रह्मच आहे. ॥५१॥

ऐसा वाद येकमेकां । लागतां राहिली आशंका । तेचि आतां पुढें ऐका । सावध होउनि ।।५२।।

असे एकमेकांवर कडी करू पहाणारे वाद फार पूर्वीपासून चालत आलेले आहेत. पण यथार्थ उत्तर मात्र मिळालेले नाही. ते आता पुढील समासात सावध होऊन ऐका. ॥५२॥

माया मिथ्या कळों आली । परी ते ब्रह्मीं कैंसी जाली । म्हणावी ते निर्गुणें केली । तरी ते मुळींच मिथ्या ।।५३।।

माया भ्रमरूप आहे हे खरे, पण ती ब्रह्मस्वरूपावर कशी भासू लागली? ती निर्गुण ब्रह्माने उत्पन्न केली असे म्हणावे, तर 'भ्रमरूप उत्पन्न झाले' असे म्हणावे लागेल! ॥५३॥

मिथ्या शब्दीं काहींच नाहीं । तेथें केलें कोणें काई । करणें निर्गुणाचा ठाईं । हेंहि अघटित ।।५४।।

मिथ्या म्हणजे 'काहीच नाही' असा अर्थ आहे असे वाटते. तेथे कोण, काय, कसे व केव्हा करणार? निर्गुणाने काही केले म्हणावे तर ते केवळ अशक्य आहे. ॥५४॥

कर्ता ठाईंचा अरूप । केलें तेंहि मिथ्यारूप । तथापी फेडूं आक्षेप । श्रोतयांचा ।।५५।।

ब्रह्म स्वरूपानेच अरूप व निराकार आहे. जे जगत् त्याने केले असे म्हणतात तेही अनिर्वचनीय मिथ्या आहे. पण श्रोत्यांना ह्या शंकेचे स्पष्ट उत्तर देऊ. ॥५५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सूक्ष्मआशंकानिरूपण' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सूक्ष्मआशंका' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक आठवा : मायोद्भव अथवा ज्ञानदशक

समास तिसरा : सूक्ष्मआशंकानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

अरे जे जालेंचि नाहीं । त्याची वार्ता पुससी काई । तथापि सांगों जेणें कांहीं । संशय नुरे ।।१।।

जगत्, सृष्टी, ब्रह्मांड इ. नावाने ओळखले जाणारे वस्तुत: उत्पन्न झालेलेच नाही! त्यासंबंधी विचार करण्याचे कारणच काय? पण तुला विचार करावासा वाटतो म्हणून काही विचार सांगतो. त्यामुळें तुझ्या मनातील शंका निघून जाईल. (अजातवाद ही समर्थांची मुख्य भूमिका आहे. (पहा– १२-६-२०) ॥१॥

दोरीकरितां भुजंग । जळाकरितां तरंग । मार्तंडाकरितां चांग । मृगजळ वाहे ।।२।।

मंद प्रकाशात दोरी पडलेली असते म्हणून तिच्यावर भयामुळें सर्प भासतो. पाण्याचा साठा असतो म्हणून त्यावर वाऱ्यामुळे तरंग निर्माण होतो. आकाशात भर दुपारी सूर्य तळपतो म्हणून माळ जमिनीवर भ्रमामुळें पाणी स्पष्टपणे भासते. ॥२॥

कल्पनेकरितां स्वप्न दिसे । सिंपीकरितां रूपें भासे । जळाकरितां गार वसे । निमिष्य येक ।।३।।

अर्धवट झोपेत कल्पना सुरू झाल्याने स्वप्न दिसते. भर उन्हात समुद्रकाठी शिंपी चकाकून चांदीचा भास होतो. मूळ पाणी असते म्हणून अति थंडीमुळे पाण्याची गार तयार होऊन ती थोडा वेळ गार ह्या स्वरूपात रहाते. ॥३॥

मातीकरितां भिंती जाली । सिंधुकरितां लहरी आली । तिळाकरितां पुतळी । दिसों लागे ।।४।।

माती आहे म्हणून तिची भिंत (विटांची) होते. समुद्र आहे म्हणून लाट दिसते. शरीरावरील मोठ्या चामखिळीला (वांग) बाहुलीसारखा आकार भासतो. ॥४॥

सोन्याकरितां आळंकार । तंतुकरितां जालें चीर । कासवाकरितां विस्तार । हातापायांचा ।।५।।

सोने आहे म्हणून अलंकार दिसतात. उभे-आडवे धागे असतात म्हणून वस्त्र दिसते. कासवाचे अवयव हा त्याच्या शरीराचाच विस्तार असतो. ॥५॥

तूप होतें तरी थिजलें । तरीकरितां मीठ जालें । बिंबाकरितां बिंबलें । प्रतिबिंब ।।६।।

तूप असते म्हणून ते थिजते. समुद्राची खाडी असते म्हणून खारट मीठ तयार होते. बिंब असते म्हणून बिंबसापेक्ष प्रतिबिंब दिसते. ॥६॥

पृथ्वीकरितां जालें झाड । झाडाकरितां छ्याया वाड । धातुकरितां पवाड । उंच नीच वर्णाचा ।।७।।

जमीन असल्यामुळें तिच्यातून वृक्ष जन्माला येतो. वृक्षामुळे त्याची मोठी सावली दिसते. मूळ धातू (Metal) असतो म्हणून सुवर्ण रंगाचे मौल्यवान सोने व काळ्या रंगाचे कमी किमतीचे लोखंड असा भेद पडतो. ॥७॥

आतां असो हा दृष्टांत । अद्वैतास कैंचे द्वैत । द्वैतेंविण अद्वैत । बोलतांच न ये ।।८।।

आता ही दृष्टान्तांची उधळण पुरे झाली. अद्वैत हे पारमार्थिक वास्तव आहे. त्यात खरे तर द्वैत कोठून आणावे? पण द्वैत पत्करल्याशिवाय अद्वैत पटवून सांगताच येत नाही. (द्वैत पत्करणे = अध्यारोप. अद्वैत = अपवाद, 'अध्यारोप अपवादाभ्यां निष्प्रपंचं प्रपंच्यते'– भ. शंकराचार्य. समर्थांनी ह्या सर्व दृष्टान्तात मायावाद, परिणामवाद, आरंभवाद, सर्वब्रह्म वाद इत्यादी सर्व वादांचे दृष्टान्त सांगितले आहेत. समर्थांचा अजातवाद आहे. त्याचा दृष्टान्त संभवत नाही.) ॥८॥

भासाकरितां भास भासे । दृश्याकरितां अदृश्य दिसे । अदृश्यास उपमा नसे । म्हणोनि निरोपम ।।९।।

भासण्यासारखे काही तरी असते म्हणून भास होतो. दिसण्यासारखे काही असते म्हणून ते दिसते. जे अरूप, निराकार, अव्यक्त असते त्याला उपमा देता येत नाही. (ब्रह्माला आकाश ह्या शब्दगुण असलेल्या महाभूताचा दृष्टान्त देण्याची पद्धत आहे. तोच ब्रह्माला दृष्टान्तासाठी सर्वांत जवळचा पदार्थ आहे.) ॥९॥

कल्पनेविरहित हेत । दृश्यावेगळा दृष्टांत । द्वैतावेगळें द्वैत । कैंसें जालें ।।१०।।

पर्वतावर अग्नी आहे = प्रतिज्ञा. धूर दिसतो त्यावरून = हेतू. ह्या तर्काच्या मांडणीत हेतू मांडताना कल्पना करावी लागते. स्वयंपाकघरात 'धूर तेथे अग्नी' अशी व्याप्ती दिसते म्हणून अशी कल्पना करणे शक्य आहे. पण ब्रह्माविषयी अशी कल्पना करता येत नाही. कोणताही दृष्टान्त दृश्य पदार्थातीलच घ्यावा लागतो. त्याहून वेगळा दृष्टान्त आणणार कोठून? अद्वैत द्वैताहून भिन्न आहे. अद्वैत अमूर्त, द्वैत मूर्त आहे. मूर्ताचा दृष्टान्त अमूर्ताला कसा वापरणार? ॥१०॥

विचित्र भगवंताची करणी । वर्णवेना सहस्त्रफणी ।तेणें केली उभवणी । अनंत ब्रह्मांडाची ।।११।।

(सामान्य भाविकाच्या समजुतीसाठी दिलेले उत्तर–) मायावी ईश्वराची करणी अनाकलनीय असते. त्याच्या सामर्थ्याविषयी कल्पनाही करता येत नाही. प्रत्यक्ष हजार जिभा असलेल्या शेषालाही त्याचे वर्णन करता येत नाही. अनंत ब्रह्मांडांची रचना त्या ईश्वराची आहे. ॥११॥

परमात्मा परमेश्वरु । सर्वकर्ता जो ईश्वरु । तयापासूनि विस्तारु । सकळ जाला ।।१२।।

परब्रह्मरूप परमात्मा किंवा परमेश्वराने माया ही उपाधी धारण केली की त्याला सर्वकर्ता ईश्वर म्हणतात. त्यापासून हा जगाचा अफाट विस्तार झाला. ॥१२॥

ऐसीं अनंत नामें धरी । अनंत शक्ती निर्माण करी । तोचि जाणावा चतुरीं । मूळपुरुष ।।१३।।

त्या ईश्वराला ब्रह्मदेवादी नावे असून तोच अनेक प्रकारच्या शक्ती उत्पन्न करतो. (पहा– श्री यंत्र.) म्हणून ईश्वरच ह्या सर्व दृश्य सृष्टीचा मूळ पुरुष आहे असा शहाण्याने निर्णय करावा. ॥१३॥

त्या मूळपुरुषाची वोळखण । ते मूळमायाचि आपण । सकळ कांहीं कर्तेपण । तेथेंचि आलें ।।१४।।

मूळस्फुरणरूप मूळमाया हेच ईश्वराचे सैद्धान्तिक स्वरूप आहे. सर्व कर्तृत्व त्याचे असते. (सकळ करणे जगदीशाचे) ॥१४॥

श्लोक

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ।।छ।।

श्लोकार्थ– कार्य, कारण व कर्तृत्व ह्यांचे प्रकृती (मूळमाया) हे मूळ आहे.

हे उघड बोलतां न ये । मोडों पाहातो उपाये । येरवीं हें पाहातां काय । साच आहे ।।१५।।

हे उघडपणे बोलणेही कठीण आहे. कारण सर्व साधने जीव, अन्तःकरण, देव व जग गृहीत धरून बसविलेली असतात. सर्वाला कारण प्रकृती आहे, असे म्हटले तर साधने मोडून जातील. (देवरूप ईश्वर, अन्तःकरण, जीव व जग हे सर्व प्रकृतिमय आहेत. मिथ्या आहेत.) तसे पाहिले तर ह्यांतील एक तरी सत्य आहे काय? ॥१५॥

देवापासून सकळ जालें । हें सर्वांस मानलें । परी त्या देवास वोळखिलें । पाहिजे कीं ।।१६।।

हे सर्व जग ईश्वराने उत्पन्न केले हे सर्वच भाविकांना मान्य असते. पण त्याचे खरे स्वरूप जाणलेच पाहिजे. ॥१६॥

सिद्धांचे जें निरूपण । तें साधकांस न मने जाण । पक्व नाहीं अंतःकर्ण । म्हणोनियां ।।१७।।

'मी ब्रह्म आहे' ह्या अनुभवाने ज्यांचे जीवब्रह्मैक्य सिद्धीला गेले आहे त्यांचे अनुभवातून आलेले बोलणे सत्य

असले तरी सामान्य भाविकांना ते पटत नाही. समजत नाही. आवडत नाही. कारण त्यांची बुद्धी ते ग्रहण करण्याइतकी परिपक्व झालेली नसते. (ती कर्माने शुद्ध, उपासनेने शान्त, वैराग्याने अनासक्त व गुरुवाक्य-श्रवणाने साधनोन्मुख झालेली नसते.) ॥१७॥

अविद्यागुणें बोलिजे जीव । मायागुणें बोलिजे शिव । मूळमायागुणें देव । बोलिजेतो ।।१८।।

ब्रह्माला अविद्येच्या उपाधीमुळे जीव म्हणतात, माया उपाधीमुळे शिव म्हणतात, मूळ माया उपाधीमुळे देव म्हणतात. ॥१८॥

म्हणौनि कारण मूळमाया । अनंत शक्ती धरावया । तेथीचा अर्थ जाणावया । अनुभवी पाहिजे ।।१९।।

म्हणून नाना प्रकारच्या शक्ती धारण करणारी मूळमाया असते, ह्या सर्वाचे रहस्य जाणणारा ब्रह्मानुभवीच हवा. (मायेला शक्ती हे दुसरे नाव आहे. मायिक जग सत्य वाटते तोपर्यन्त ते जग व्यवस्थित चालण्यासाठी अनेक प्रकारच्या शक्तींची गरज असते हे मान्य करावे लागते व तशा शक्ती असल्याचा अनुभवही येतो. पण जगाचे मिथ्यत्व अनुभवाला येताच शक्ती आपोआपच मिथ्या ठरते.) ॥१९॥

मूळमाया तोचि मूळपुरुष । तोचि सर्वांचा ईश । अनंतनामी जगदीश । तयासीचि बोलिजे ।।२०।।

मूळ मायेलाच मूळ पुरुष म्हणतात. तोच सर्वनियामक ईश्वर असून त्यालाच जगदीशादी अनेक नावे आहेत. ॥२०॥

अवघी माया विस्तारली । परी हे विशेष नाथिली । ऐसिया वचनाची खोली । विरुळा जाणे ।।२१।।

दृश्य प्रपंचाचा सर्व पसारा हा मूळमायेचा विस्तार असून ती माया समूळ भ्रमरूप आहे. तिला सत्यत्वाने अस्तित्वच नाही. हे गूढ सिद्धान्त जाणणारी क्वचित कोणी व्यक्ती असते. ॥२१॥

ऐसें अनुर्वाच्य बोलिजे । परी हें स्वानुभवें जाणिजे । संतसंगेंविण नुमजे । कांहीं केल्यां ।।२२।।

हे बोलणे खरे तर बोलण्यासारखे नाही. त्याचे रहस्य अनुभवले पाहिजे. हा अनुभव कसा घ्यावा ते श्रीगुरूंच्या संगतीत होणाऱ्या मार्गदर्शनाने कळते. ॥२२॥

माया तोचि मूळपुरुष । साधकां न मने हें निशेष । परी अनंतनामी जगदीश । कोणास म्हणावें ।।२३।।

मूळ मायेला मूळपुरुष किंवा ईश्वर म्हणावे हे शास्त्रसंस्कार नसलेल्या भाविकाला मुळीच मान्य होत नाही. पण अनेक नावे असलेला जगदीश हे कोणत्या तत्त्वाचे रूप समजावे? कोणाला जगदीश म्हणावे? ॥२३॥

नामरूप माये लागलें । तरी हें बोलणें नीटचि जालें । येथें श्रोतीं अनुमानिलें । कासयासी ।।२४।।

'ज्याला नाम व रूप असते ते सर्व मायिक असते,' हे एकदा स्वीकारले की अनेक रूपांनी व नामांनी ओळखला जाणारा ईश्वर मायिक असतो हे सरळ सरळ कळते. ह्या ठिकाणी सामान्य भाविकाने तर्क चालविण्याची गरजच काय? ॥२४॥

आता असो हे सकळ बोली । मागील आशंका राहिली । निराकारीं कैसी जाली । मूळमाया ।।२५।।

आता हा विषय पुरे. निराकार ब्रह्मापासून साकार माया कशी उत्पन्न झाली हा प्रश्न अजून तसाच राहिला आहे. (८-२-४) ॥२५॥

दृष्टीबंधन मिथ्या सकळ । परी तो कैसा जाला खेळ । हेंचि आतां अवघें निवळ । करून दाऊं ।।२६।।

जादूगाराने टाकलेले मोहजाल पूर्णपणें भ्रामक असते त्याप्रमाणे हे जग मिथ्या आहे. पण हा सृष्टिभ्रम दाखविण्याचा खेळ कसा होतो ते आता स्पष्ट करून सांगू. ॥२६॥

आकाश असतां निश्चळ । मधें वायो जाला चंचळ । तैसी जाणावी केवळ । मूळमाया ।।२७।।

मूळ आकाश किंवा अवकाश अत्यंत शांत असते. त्यात कोणतीच हालचाल नसते. त्यात अचानकपणे वहाणारा वायू निर्माण होतो. त्याप्रमाणें शांत ब्रह्मामध्ये स्फुरणरूप मूळमाया निर्माण झाली. ॥२७॥

रूप वायोचें जालें । तेणें आकाश भंगलें । ऐसें हें सत्य मानलें । नवचे किं कदा ।।२८।।

वायूला रूप असले तरी त्यामुळे आकाश खंडित झाले असे कोणी म्हटले तर ते कोणी खरे मानणे कधीच शक्य नाही. (कारण वायूमध्येही आकाश असते. वहाणारा वायू गेला तरी तो आतील आकाश बरोबर नेत नाही! तो आकाशातूनच वाहतो.) ॥२८॥

तैसी मूळमाया जाली । आणी निर्गुणता संचली । येणें दृष्टांतें तुटली । मागील आशंका ।।२९।।

त्याप्रमाणें मूळमाया अचानक उत्पन्न झाली तरी ब्रह्माचे निर्गुणत्व अबाधित राहिले. ह्या दृष्टान्ताने मागे घेतलेल्या शंकेचे निरसन झाले.(८-२-५३) ॥२९॥

वायु नव्हता पुरातन । तैसी मूळमाया जाण । साच म्हणता पुन्हा लीन । होतसे ।।३०।।

आकाशात अचानक वायू निर्माण झाला. तो आधीपासून नव्हता. मूळ मायेच्या बाबतीत हेच समजावे. ती सत्य मानावी तर ज्ञानी महात्म्यांच्या दृष्टीने ती नसते. किंवा कल्पान्ती लीन होते. ॥३०॥

वायो रूपें कैसा आहे । तैसी मूळमाया पाहें । भासे परी तें न लाहे । रूप तयेचें ।।३१।।

वायू केवळ स्पर्शाने अस्पष्टपणे कळतो. त्याप्रमाणे मूळमाया तर्काने मानावी लागते. गुण व जड मायेच्या रूपाने ती दिसते. पण तिचे मूळ स्वरूप प्रत्यक्ष दाखविता येत नाही. ॥३१॥

वायो सत्य म्हणों जातां । परी तो न ये दाखवितां । तयाकडे पाहों जातां । धुळीच दिसे ।।३२।।

'वायू सत्य आहे' असे म्हटले तर तो डोळ्यांनी दिसत नाही. तो पहाण्याचा प्रयत्न केला तर त्याचेबरोबर उडणारी धूळच दिसते! ॥३२॥

तैसी मूळमाया भासे । भासे परी ते न दिसे । पुढें विस्तारली असे । माया अविद्या ।।३३।।

त्याप्रमाणें मूळ माया तर्काने किंवा श्रुतिप्रमाणाने कळते, पण ती दिसत नाही. तिचा अविद्यारूपाने झालेला विस्तार (धूळ) दिसतो. ॥३३॥

जैसें वायोचेनि योगें । दृश्य उडे गगनमार्गे । मूळमायेच्या संयोगें । तैसें जग ।।३४।।

ज्याप्रमाणें वाऱ्याबरोबर (वायू) धूळ, ढग, गवत, धूर इ. दृश्य पदार्थ आकाशात उडतात त्याप्रमाणे मूळमायेचे विविधतापूर्ण जग ब्रह्मस्वरूपात दिसू लागते. ॥३४॥

गगनीं अभाळ नाथिलें । अकस्मात उद्भवलें । मायेचेनि गुणें जालें । तैसें जग ।।३५।।

आकाशात मूळचे नसताना अचानकपणे अनिर्वचनीय ढग जमतात त्याप्रमाणे मायेच्या प्रभावामुळे ब्रह्म स्वरूपात अचानक जग भासू लागते. (नाथिले = अनिर्वचनीय. ढग पूर्वी नव्हते. नंतर नसतात, मधेच दिसतात.) ॥३५॥

नाथिलेंचि गगन नव्हतें । अकस्मात आलें तेथें । तैसें दृश्य जालें येथें । तैसियापरी ।।३६।।

अनिर्वचनीय ढग प्रथम नव्हते. अकस्मात जमा झाले. त्याप्रमाणें दृश्य जगत् पूर्वी नव्हते. एकाएकी उत्पन्न झाले. ॥३६॥

परी त्या आभाळाकरितां । गगनाची गेली निश्चळता । वाटे परी ते तत्वता । तैसीच आहे ।।३७।।

पण त्या ढगांमुळें शांत आकाशात हालचाल सुरू झाली. त्याचा शांतपणा जणू मोडला. पण सूक्ष्म निरीक्षण केले तर ते शांतच असते. ॥३७॥

तैसें मायेकरितां निर्गुण । वाटे जालें सगुण । परी तें पाहतां संपूर्ण । जैसें तैसें ।।३८।।

त्याप्रमाणें मायेमुळें निर्गुणाला सगुणता आल्याचा भास होतो. पण ज्ञान दृष्टीने पाहिले असता त्याच्या निर्गुणत्वाला जराही धक्का लागत नाही. ॥३८॥

आभाळ आलें आणि गेलें । तरी गगन तें संचलें । तैसें गुणा नाहीं आलें । निर्गुण ब्रह्म ।।३९।।

ढग जमा झाले व विरून गेले तरी आकाश शांतच असते. तसे निर्गुण ब्रह्म प्रत्यक्षात सगुण कधीच होत नाही. ।।३९।।

नभ माथां लागलें दिसे । परी तें जैसें तैसें असे । तैसें जाणावें विश्वासें । निर्गुण ब्रह्म ।।४०।।

आकाश घुमटाप्रमाणे वरती आहे असे वाटले तरी ते निराकार असल्याने वर, खाली, बाजूला इ. प्रकारे नसते. असायचे तसेच असते. निर्गुण ब्रह्म तसेच सर्वव्यापक आहे. ।।४०।।

ऊर्ध पाहातां आकाश । निळिमा दिसे सावकास । परी तो जाणिजे मिथ्या भास । भासलासे ।।४१।।

वर आकाशाकडे पाहिले तर ते निळेच निळे दिसते. परंतु त्याची ही निळाई केवळ भास आहे. ते खरे निळे नाही. ।।४१।।

आकाश पालथें घातलें । चहूंकडे आटोपलें । वाटे विश्वास कोंडिलें । परी तें मोकळेंचि असे ।।४२।।

आकाश जर कल्पनेने उलटे केले व जणू विश्वाला झाकण्यासाठी चहूकडून झाकणाप्रमाणे घट्ट बसविले तरी प्रत्यक्षात ते निराकार व अवकाशरूप किंवा पोकळच असते. ।।४२।।

पर्वतीं निळा रंग दिसे । परी तो तया लागला नसे । अलिप्त जाणावें तैसें । निर्गुण ब्रह्म ।।४३।।

दुरून पाहिले तर डोंगर निळे दिसतात. पण तो निळेपणा त्या डोंगरांना चिकटलेला नसतो. तो त्यांचा नसतो. निर्गुण ब्रह्म त्या निळाईप्रमाणे अलिप्त जाणावे. ।।४३।।

रथ धावतां पृथ्वी चंचळ । वाटे परी ते असे निश्चळ । तैसें परब्रह्म केवळ । निर्गुण जाणावें ।।४४।।

वाहन वेगाने धावू लागले की जमिनीला उलटा वेग आल्याचा भास होतो. जमीन जराही हालत नाही. तसे निर्गुण ब्रह्म समजावे. ।।४४।।

अभाळाकरितां मयंक । वाटे धावतो निशंक । परी तें अवघें माईक । अभाळ चळे ।।४५।।

स्थिर असलेला चंद्र ढगांमुळे पळतो असे वाटते. पण ते पळणे हा भ्रम आहे. ढग पळतात. ।।४५।।

झळे अथवा अग्निज्वाळ । तेणें कंपित दिसे अंत्राळ । वाटे परी तें निश्चळ । जैसें तैसें ।।४६।।

धडाडलेल्या अग्नीच्या ज्वाळा थरारू लागल्या की आकाश थरथरल्यासारखे वाटते, पण आकाश शांतच असते. ।।४६।।

तैसें स्वरुप हें संचलें । असतां वाटे गुणा आलें । ऐसें कल्पनेसि गमलें । परी तें मिथ्या ।।४७।।

त्या आकाशाप्रमाणें निर्गुण ब्रह्म सर्वत्र व्यापून असता सगुण झाल्यासारखे (जगत् रूपाने) वाटते. पण हा भ्रम होय. ।।४७।।

दृष्टिबंधनाचा खेळ । तैसी माया हे चंचळ । वस्तु शाश्वत निश्चळ । जैसी तैसी ।।४८।।

नजरबंदीचा प्रयोग जसा भ्रामक असतो त्याप्रमाणें माया भ्रमरूप असून ब्रह्म नित्य, सत्य, अनादी असते. ।।४८।।

ऐसी वस्तु निरावेव । माया दाखवी अवेव । ईचा ऐसाच स्वभाव । नाथिलीच हे ।।४९।।

ब्रह्म अवयवरहित अखंड असून मायेमुळें ते अवयवांचे व खंडित वाटते. मुळात मिथ्या असलेल्या मायेचा हा खास स्वभाव आहे. ।।४९।।

माया पाहाता मुळींच नसे । परी हे साचाऐसी भासे । उद्भवे आणि निरसे । अभाळ जैसें ।।५०।।

जसे ढग जमा होतात व विरून जातात त्याप्रमाणें अनिर्वचनीय माया जगत्‌रूपाने सत्य असल्याप्रमाणें भासते. ।।५०।।

ऐसी माया उद्भवली । वस्तु निर्गुण संचली । अहं ऐसी स्फूर्ति जाली । तेचि माया ।।५१।।

मूळ निर्गुण ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी 'एकोऽहं' असे स्फुरण अचानक झाले. हे स्फुरण म्हणजेच माया. माया अशा प्रकारे निर्माण झाली. ॥५१॥

गुणमायेचे पवाडे । निर्गुणीं हें काहींच न घडे । परी हें घडे आणी मोडे । सस्वरुपीं ।।५२।।

हा सर्व खेळ गुणमायेचा आहे. निर्गुण 'अक्रीड' असते. पण अध्यस्ताचा खेळ अधिष्ठान ब्रह्मावर भासतो. ॥५२॥

जैसी दृष्टी तरळली । तेणें सेनाच भासली । पाहातां आकाशींच जाली । परी ते मिथ्या ।।५३।।

दृष्टीला भ्रम झाल्यानंतर तिला सैन्य समोर असल्यासारखे भास होतात. हा सैन्याचा भास आकाशाच्या पोकळीतच होतो, पण तो भ्रामक असतो. ॥५३॥

मिथ्या मायेचा खेळ । उद्भव बोलिला सकळ । नाना तत्त्वांचा पाल्हाळ । सांडूनियां ।।५४।।

ब्याऐंशी तत्त्वांच्या तपशिलाचा पसारा सोडून देऊन मिथ्या मायेच्या खेळातील जगताची निर्मिती मूळमायेत असल्याचे शास्त्रकार सांगतात. ॥५४॥

तत्त्वें मुळींच आहेती । वोंकार वायोची गती । तेथीचा अर्थ जाणती । दक्ष ज्ञानी ।।५५।।

ब्याऐंशी तत्त्वे मूळ मायेतच बीजरूपाने असतात. अ, उ, म इत्यादींनी तयार झालेला प्रणव उत्पत्ती, स्थिती, लय इत्यादींच्या प्रतीक रूपाने वायुरूप ईश्वराशी निगडित आहे. (प्रथमस्फुरण = मूळमाया = ईश्वर = वायू. अशी समर्थांची मांडणी आहे.) ह्याचे रहस्य वेदान्तशास्त्रात पारंगत असलेले ब्रह्मवेत्ते जाणतात. ॥५५॥

मूळमायेचें चळण । तेंचि वायोचें लक्षण । सूक्ष्म तत्त्वें तेंचि जाण । जडत्वा पावलीं ।।५६।।

मूळमाया कार्योन्मुख झाली की तिलाच वायू म्हणतात. मूळच्या सुप्त व सूक्ष्म तत्त्वांनाच स्थूलता मिळाली. ती व्यक्तदशेला आली. ॥५६॥

ऐसीं पंचमाहांभूतें । पूर्वी होतीं अवेक्तें । पुढें जालीं वेक्तें । सृष्टिरचनेसी ।।५७।।

पुढे स्पष्ट व स्थूल झालेली पंचमहाभूते आधी सुप्त व सूक्ष्म होती. नंतर सृष्टीची रचना होताना ती व्यक्त झाली. ॥५७॥

मूळमायेचें लक्षण । तेंचि पंचभूतिक जाण । त्याचे पाहें वोळखण । सूक्ष्मदृष्टीं ।।५८।।

सूक्ष्म, सुप्त व पंचीकरण न झालेली पंचमहाभूते ह्यांचीच मूळमाया घडलेली असते. आता त्यांचा सूक्ष्म तपशिलासह विचार करू. ॥५८॥

आकाश वायोविण । इछ्याशब्द करी कोण । इच्छाशक्ति तेचि जाण । तेजस्वरुप ।।५९।।

शब्द हा आकाशाचा गुण आहे. वायूशिवाय हा शब्द कसा उमटणार? 'एकोऽहं' हा संकल्परूप शब्द ब्रह्माचे ठिकाणी उमटला. ह्या संकल्पशक्तीलाच तेज म्हणतात. ॥५९॥

मृदपण तेंचि जळ । जडत्व पृथ्वी केवळ । ऐसी मूळमाया सकळ । पंचभूतिक जाणावी ।।६०।।

कोठेही असलेला मऊपणा पाणी या महाभूताचा असतो. कोणत्याही कठीणपणामध्ये पृथ्वी असते. अशी ही पांचभौतिक मूळमाया जाणून घ्यावी. ॥६०॥

येक येक भूतांपोटीं । पंचभूतांची राहाटी । सर्व कळे सूक्ष्मदृष्टी । घालून पाहातां ।।६१।।

प्रत्येक महाभूतामध्ये इतर चार महाभूतांचा विशिष्ट प्रमाणात समावेश असतो. सूक्ष्मदृष्टीने पाहिले तर हे कळते. ॥६१॥

पुढें जडत्वास आलीं । तरी असतीं कालवलीं । ऐसी माया विस्तारली । पंचभूतिक ।।६२।।

सूक्ष्म महाभूते जगतनिर्मितीचे वेळी अधिकाधिक स्पष्ट होत गेली तेव्हा त्यांचे पंचीकरण झालेले होते. असा हा पंचमहाभूतांचा विस्तार झाला. ॥६२॥

मूळमाया पाहातां मुळी । अथवा अविद्या भूमंडळीं । स्वर्ग मृत्य पाताळीं । पांचचि भूतें ।।६३।।

पहिल्या मूळमायेमध्ये किंवा अविद्यामय सृष्टीमध्ये व स्वर्ग, मृत्यू व पाताळात केवळ पंचमहाभूतेच असतात. ॥६३॥

श्लोक

स्वर्गे मृत्यौ पाताले वा यत्किंचित्सचराचरं ।
सर्वं पंचभूतकं राम षष्ठं किंचिन्न दृश्यते ।।छ।।

श्लोकार्थ– हे रामा, स्वर्ग, मृत्यू व पाताळ किंवा सर्व चर व अचर सृष्टीत जे काही आहे ते सर्व पाच महाभूतांचे आहे. सहावे काहीच नाही.

सत्य स्वरूप आदिअंती । मध्यें पंचभूतें वर्तती । पंचभूतिक जाणिजे श्रोतीं । मूळमाया ।।६४।।

सृष्टीपूर्वी व सृष्टीनंतर सच्चिदानंद ब्रह्मच फक्त असते. ह्या दरम्यान पांच महाभूतांची सृष्टी असते. ती महाभूते मूळमायेत असतात. ॥६४॥

येथें उठिली आशंका । सावध होऊन ऐका । पंचभूतें जालीं येका । तमोगुणापासुनी ।।६५।।

येथे एक शंका उद्भवते. ती शंका आता सावधपणे ऐका. सृष्टीची उत्पत्ती हा तमोगुणाचा परिणाम आहे असे शास्त्र सांगते व त्यापासून पंचमहाभूते उत्पन्न झाली. ॥६५॥

मूळमाया गुणापरती । तेथें भूतें कैंचीं होती । ऐसी आशंका हे श्रोतीं । घेतली मागां ।।६६।।

मूळ माया सत्त्वादी गुणरहित असते. मग त्यापासून महाभूते कशी निर्माण होतात? अशी शंका आताच घेतली आहे. ॥६६॥

ऐसें श्रोतीं आक्षेपिलें । संशयास उभें केलें । याचें उत्तर दिधलें । पुढिले समासीं ।।६७।।

ही जी शंका श्रोत्यांनी घेतली त्याचे उत्तर पुढील समासात दिले आहे. ॥६७॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सूक्ष्मआशंकानाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सूक्ष्मआशंका' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक आठवा : मायोद्भव अथवा ज्ञानदशक

समास चवथा : सूक्ष्मपंचभूते

॥ श्रीराम समर्थ ॥

मागील आशंकेचें मूळ । आतां होईल प्रांजळ । वृत्ति करावी निवळ । निमिष्य येक ।।१।।

मागे विचारलेल्या प्रश्नाचे अधिक स्पष्ट उत्तर आता देऊ. काही वेळ अंत:करणवृत्ती एकाग्र करावी. ॥१॥

ब्रह्मीं मूळमाया जाली । तिच्या पोटा माया आली । मग ते गुणा प्रसवली । म्हणौनि गुणक्षोभिणी ।।२।।

ब्रह्माचे ठिकाणी मूळमाया निर्माण झाली. तिच्यापासून माया जन्माला येऊन तिने त्रिगुणांना जन्म दिला. म्हणून ह्या मायेला गुणक्षोभिणी म्हणतात. (गुणांना जन्म देण्यासाठी तिचा क्षोभ झाला.) ॥२॥

पुढें तिजपासाव कोण । सत्वरजतमोगुण । तमोगुणापासून निर्माण । जालीं पंचभूतें ।।३।।

पुढे ह्या गुणक्षोभिणीपासून सत्त्व, रज व तम हे गुण उत्पन्न होऊन ह्यातील तमोगुणापासून पंचभूते झाली. ॥३॥

ऐसीं भूतें उद्भवलीं । पुढें तत्वें विस्तारलीं । एवं तमोगुणापासून जालीं । पंचमाहांभूतें ।।४।।

भूतांची अशी निर्मिती झाल्यानंतर त्यांचा पुढे विस्तार झाला. (सूक्ष्मभूते-पंचीकरण-स्थूल भूते) ॥४॥

मूळमाया गुणापरती । तेथें भूतें कैंचीं होतीं । ऐसी आशंका हे श्रोतीं । घेतली मागां ।।५।।

मूळ मायेत त्रिगुण नसताना त्यातील तमापासून भूते उत्पन्न कशी होतील अशी शंका मागे घेतली होती. (८-२-६) ॥५॥

आणीक येक येके भूतीं । पंचभूतें असतीं । तेहि आतां कैसी स्थिती । प्रांजळ करू ।।६।।

शिवाय प्रत्येक महाभूतात उरलेली चार महाभूते ठराविक प्रमाणात असतात. त्याविषयीही आता तपशील सांगू. ॥६॥

सूक्ष्मदृष्टीचें कौतुक । मूळमाया पंचभूतिक । श्रोतीं विमळ विवेक । केला पाहिजे ।।७।।

मूळमायेमध्ये सूक्ष्म महाभूते समाविष्ट असतात ही नवलाई कळण्यासाठी दृष्टी सूक्ष्म करणे आवश्यक आहे. त्यासाठी सूक्ष्म विचार करावा लागतो. स्वच्छ मनाने विवेक करावा लागतो. ॥७॥

आधीं भूतें तीं जाणावीं । रुपें कैसीं वोळखावीं । मग ते शोधून पाहावीं । सूक्ष्मदृष्टीं ।।८।।

आधी त्या महाभूतांचे गुण जाणून घ्यावेत. त्यानंतर सूक्ष्म विचाराने त्यांचा मूळमायेत शोध घ्यावा. ॥८॥

वोळखी नाहीं अंतरीं । ते वोळखावी कोणेपरी । म्हणोनि भूतांची वोळखी चतुरीं । नावेक परिसावी ।।९।।

महाभूतांच्या गुणांचे ज्ञान नसल्याने त्यांची ओळख पटण्यासाठी चतुर साधकाने ते ज्ञान पुरेसा वेळ देऊन मिळवावे. ॥९॥

जें जें जड आणी कठिण । तें तें पृथ्वीचें लक्षण । मृद आणी वोलेपण । तितुकें आप ।।१०।।
जें जें उष्ण आणी सतेज । तें तें जाणावें पैं तेज । आतां वायोहि सहज । निरोपिजेल ।।११।।
चैतन्य आणी चंचळ । तो हा वायोचि केवळ । सुन्य आकाश निश्चळ । आकाश जाणावें ।।१२।।

महाभूत		**लक्षण**
१) पृथ्वी	–	वजन व टणकपणा
२) आप	–	मऊपणा व ओलेपणा
३) तेज	–	उष्णता व चमकदारपणा
४) वायू	–	हालचाल व अस्थिरता
५) आकाश	–	पोकळ व शांत

(१०-११-१२)

ऐसीं पंचमाहांभूतें । वोळखी धरावी संकेतें । आतां येकीं पांच भूतें । सावध ऐका ।।१३।।

ह्याप्रमाणे पंचमहाभूतांची मुख्य लक्षणे लक्षात घेऊन त्यांचे परस्परांतील मिश्रण कसे असते ते एकाग्रतेने ऐका. ॥१३॥

जें त्रिगुणाहूनि पर । त्याचा सूक्ष्म विचार । यालागीं अति तत्पर । होऊन ऐका ।।१४।।

पंचीकरण त्रिगुणांच्या निर्मितीपूर्वी झाले असल्याने त्याचा विचार फार सूक्ष्मतेने करावा लागतो. तो अतितत्परतेने ऐका. ॥१४॥

सूक्ष्म आकाशीं कैसी पृथ्वी । तेचि आधीं निरोपावी । येथें धारणा धरावी । श्रोतेजनीं ।।१५।।

श्रोता– सूक्ष्म आकाशात पृथ्वी कशा प्रकारे असते ते प्रथम सांगा.

वक्ता– श्रोत्यांनी त्यासंबंधी मनापासून ऐकावे. ॥१५॥

आकाशातील उरलेली चार भूते–

आकाश म्हणजे अवकाश सुन्य । सुन्य म्हणिजे तें अज्ञान । अज्ञान म्हणिजे जडत्व जाण । तेचि पृथ्वी ।।१६।।

आकाश स्वयें आहे मृद । तेंचि आप स्वतसिद्ध । आतां तेज तेंहि विशद । करून दाऊं ।।१७।।

अज्ञानें भासला भास । तोचि तेजाचा प्रकाश । आतां वायो सावकाश । साकल्य सांगों ।।१८।।

वायु आकाशा नाहीं भेद । आकाशाइतुका असे स्तब्ध । तथापी आकाशीं जो निरोध । तोचि वायो ।।१९।।

आकाशीं आकाश मिसळलें । हें तों नलगे किं बोलिलें । येणें प्रकारें निरोपिलें । आकाश पंचभूत ।।२०।।

आकाशाचे गुण	महाभूतांचे गुण	महाभूत.
↓	↓	↓
पोकळी, शून्य→	अज्ञान, जडत्व→	पृथ्वीचे.
↓	↓	↓
मऊपणा→	मृदुता→	आपाची.
↓	↓	↓
निळाई→	भासणे→	अग्नीचे.
↓	↓	↓
वायूशी अभेद→	निरोध→	वायूचा
↓		↓
आकाश→	आकाशात असतेच→	आकाश

(निरोध– आकाशात उडवलेल्या पदार्थाची गती ठराविक उंचीवर निरुद्ध होते. हे वायूच्या सामर्थ्यामुळे घडते अशी त्या काळची समजूत.) ॥१६ ते २०॥

वायूतील उरलेली चारभूते–

वायोमध्यें पंचभूतें । तेहिं ऐका येकचित्तें । बोलिजेती ते समस्तें । येथान्वयें ।।२१।।
हळु फूल तरी जड । हळु वारा तरी निबिड । वायो लागतां कडाड । मोडती झाडें ।।२२।।
तोलेंविण झाड मोडे । ऐसें हें कहींच न घडे । तोल तोचि तये जडे । पृथ्वीचा अंश ।।२३।।
येथें श्रोते आशंका घेती । तेथें कैंचीं झाडें होतीं । झाडें नव्हतीं तरी शक्ती । कठिणरूप आहे ।।२४।।
वन्हीस्फुलिंग लाहान । कांहीं तऱ्ही असे उष्ण । तैसें सूक्ष्मीं जडपण । सूक्ष्मरूपें ।।२५।।
मृदपण तेंचि आप । भास तेजाचें स्वरूप । वायो तेथें चंचळरूप । सहजचि आहे ।।२६।।
सकळांस मिळोन आकाश । सहजचि आहे अवकाश । पंचभूतांचे अंश । वायोमधें निरोपिले ।।२७।।

वायूचे गुण	महाभूतांचे गुण	महाभूत.
↓	↓	↓
वजन (सूक्ष्म)	कठीणता (शक्ती)	पृथ्वीची
↓	↓	↓
हळुवारपणा➔	मृदुता➔	आपाची
↓	↓	↓
अस्तित्व कळणे➔	भास➔	तेजाचा
↓	↓	↓
वायूत वायू सहजच असतो➔		वायू
↓		↓
वायूला सर्वव्यापक आकाश व्यापून राहते➔		आकाश. ॥२१ ते २७॥

अग्नीतील उरलेली चार भूते–

आतां तेजाचें लक्षण । भासलेंपण तें कठिण । तेजीं ऐसी वोळखण । पृथ्वीयेची ।।२८।।
भासला भास वाटे मृद । तेजीं आप तेचि प्रसिद्ध । तेजीं तेज स्वतसिद्ध । सांगणेंचि नलगे ।।२९।।
तेजीं वायो ते चंचळ । तेजीं आकाश निश्चळ । तेजी पंचभूतें सकळ । निरोपिलीं ।।३०।।

तेजाचे गुण.	महाभूतांचे गुण.	महाभूत
↓	↓	↓
भास➔	भासामागील अस्तित्व➔	पृथ्वीचे.
↓	↓	↓
भासाचा हळुवारपणा➔	मृदुता➔	आपाची.
↓		↓
तेजात तेज सहजच असते➔		तेज
↓	↓	↓
ज्वालांचे चांचल्य	चंचलता➔	वायूची
↓	↓	↓
आकाश इतर सर्वांना सहजच व्यापून राहते➔		आकाश. ॥२८ ते ३०॥

जळातील उरलेली चार भूते –

आतां आपाचें लक्षण । आप तेंचि जें मृदपण । मृदपण तें कठिण । तेचि पृथ्वी ।।३१।।
आपीं आप सहजचि असे । तेज मृदपणें भासे । वायो स्तब्धपणें दिसे । मृदत्वाआंगी ।।३२।।
आकाश नलगे सांगावें । तें व्यापकचि स्वभावें । आपीं पंचभूतांची नांवें । सूक्ष्म निरोपिलीं ।।३३।।

आपाचे गुण	महाभूतांचे गुण	महाभूत.
↓	↓	↓
मृदुतेमागील अस्तित्व➔	कठीणता➔	पृथ्वीची
↓		
आपतत्त्वात आप (जळ) सहजच असते➔		आप.
↓		↓
मृदुता कळते➔	भास➔	तेजाचा
↓		↓
मृदुत्व स्तब्ध असते➔ (स्तब्ध = स्थिर)	कधीतरी स्तब्धता➔	वायूची.
आकाश चारी भूतांना सहजच व्यापून असते➔		आकाश ॥३१ ते ३३॥

पृथ्वीतील उरलेली चार भूते–

आतां पृथ्वीचें लक्षण । कठिण पृथ्वीचे आपण । कठिणत्वीं मृदपण । तेंचि आप ।।३४।।
कठिणत्वाचा जो भास । तोचि तेजाचा प्रकाश । कठिणत्वीं निरोधांश । तोचि वायो ।।३५।।
आकाश सकळांस व्यापक । हा तो प्रगटचि विवेक । आकाशींच कांहीं येक । भास भासे ।।३६।।

पृथ्वीचे गुण	भूतांचे गुण	महाभूत.
↓	↓	↓
पृथ्वीत तिच्या कठीणतेसह पृथ्वी सहजच असते➔		पृथ्वी.
↓		
मऊस्पर्श	मृदुता➔	आपाची
↓		
कठीणत्व कळते➔	भास➔	तेजाचा
↓		
कठीणतेत कोठेतरी उणीव➔	निरोध➔	वायूचा
↓		
आकाश उरलेल्या चारी महाभूतांना व्यापते➔		आकाश ॥३४ ते ३६॥

आकाश तोडितां तुटेना । आकाश फोडितां फुटेना । आकाश परतें होयेना । तिळमात्र ।।३७।।

कितीही प्रयत्न केला तरी आकाश तोडता किंवा फोडता येत नाही. त्याला जराही इकडे तिकडे ढकलता येत नाही. ॥३७॥

असो आतां पृथ्वीअंत । दाविला भूतांचा संकेत । येक भूतीं पंचभूत । तेंहि निरोपिलें ।।३८।।

आतापर्यंत आकाशापासून पृथ्वीपर्यंत पंचभूतांचे पंचीकरण सांगून प्रत्येक स्थूल महाभूतात उरलेली सूक्ष्म महाभूते असतात तेही सांगितलें. (आकाशात १/२ आकाश. उरलेले प्रत्येकी १/८) ॥३८॥

परी हें आहाच पाहातां नातुडे । बळेंचि पोटीं संदेह पडे । भ्रांतिरूपें अहंता चढे । अकस्मात ।।३९।।

हे पंचीकरण वरवर उथळ दृष्टीने पाहिले तर लक्षात येत नाही. न कळताच पहाण्याचा प्रयत्न केला तर कित्येक शंका येतात व भ्रम झाल्याने 'हे सर्व खोटे आहे' असा अहंकारी निर्णय होऊन जातो! ॥३९॥

सूक्ष्मदृष्टीनें पाहातां । वायोचि वाटे तत्वतां । सूक्ष्म वायो शोधूं जातां । पंचभूतें दिसती ।।४०।।

सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर पृथ्वीपासून वायूपर्यंत स्थूल महाभूते नीट कळून वायूची सूक्ष्मता बुद्धीत ठसते. ती सूक्ष्मता कळल्यावर अन्य महाभूतांची सूक्ष्मता कळू लागते. ॥४०॥

एवं पंचभूतिक पवन । तेचि मूळमाया जाण । माया आणी सूक्ष्म त्रिगुण । तेहि पंचभूतिक ।।४१।।

अशा रीतीने सूक्ष्म महाभूतांचे पंचीकरण झालेला वायू म्हणजेच मूळमाया. व्यक्त माया व तीन सूक्ष्म गुण हेही मूलत: पंचभौतिकच आहेत. (पहा ८-४-२) ॥४१॥

भूतें गुण मेळविजे । त्यासी अष्टधा बोलिजे । पंचभूतिक जाणिजे । अष्टधा प्रकृती ।।४२।।

पाच महाभूते व तीन गुण मिळून आठ घटकांची प्रकृती (निसर्ग) तयार होते. ही प्रकृती मूलत: पंचभौतिक आहे. ॥४२॥

शोधून पाहिल्यावीण । संदेह धरणें मूर्खपण । याची पाहावी वोळखण । सूक्ष्मदृष्टीं ।।४३।।

स्वत:च्या दृष्टीला सूक्ष्मत्व देऊन हा विषय समजावून न घेता संशय घेत राहणे हा मूर्खपणा आहे. सूक्ष्म दृष्टीनेच पंचीकरण समजावून घ्यावे लागते. ॥४३॥

गुणापासुनी भूतें । पावलीं पष्ट दशेतें । जडत्वा येऊन समस्तें । तत्त्वें जालीं ।।४४।।

तमोगुणापासून पंचमहाभूते व्यक्त होऊन स्पष्ट झाली. (पहा ८-४-३) ही सर्व व्यक्त आहेत, अनात्म व अनित्य आहेत. ॥४४॥

पुढें तत्वविवंचना । पिंडब्रह्मांड तत्वरचना । बोलिली असे ते जना । प्रगटचि आहे ।।४५।।

ह्यापुढे ह्या आठ तत्त्वांचे विवेचन केले असून त्यांच्यापासून तयार झालेली पिंडाची व ब्रह्मांडाची रचना सर्वांनाच दिसते. ॥४५॥

हा भूतकर्दम बोलिला । सूक्ष्म संकेतें दाविला । ब्रह्मगोळा उभारला । तत्पूर्वीं ।।४६।।

पंचभूतांचे झालेले मिश्रण सूक्ष्मदृष्टीने कसे पहावे ते सांगून झाले. स्थूल ब्रह्मांड तयार होण्यापूर्वी सूक्ष्म मिश्रण झाले. ॥४६॥

या ब्रह्मांडापैलिकडिल गोष्टी । जैं जाली नव्हती सृष्टी । मूळमाया सूक्ष्मदृष्टीं । वोळखावी ।।४७।।

हे अवाढव्य ब्रह्मांड निर्माण होण्यापूर्वी जेव्हा सृष्टिरचना झाली नव्हती तेव्हा असलेली मूळमाया सूक्ष्मविचाराने जाणावी. ॥४७॥

सप्तकंचुक प्रचंड । जालें नव्हतें ब्रह्मांड । मायेअविद्येचें बंड । ऐलिकडे ।।४८।।
ब्रह्मा विष्णु महेश्वर । हा ऐलिकडिल विचार । पृथ्वी मेरु सप्त सागर । ऐलिकडे ।।४९।।
नाना लोक नाना स्थानें । चंद्र सूर्य तारांगणें । सप्त द्वीपें चौदा भुवनें । ऐलिकडे ।।५०।।
शेष कूर्म सप्त पाताळ । येकविस स्वर्गे अष्ट दिग्पाळ । तेतिस कोटी देव सकळ । ऐलिकडे ।।५१।।
बारा आदित्य अक्रा रुद्र । नव नाग सप्त ऋषेश्वर । नाना देवांचे अवतार । ऐलिकडे ।।५२।।

(पुढील व्यक्त महाभूतांचा तपशील मूळमाया व्यक्त झाल्यानंतरचा आहे. पलीकडे मूळमाया. अलीकडे व्यक्त माया.) सात कंचुकांनी तयार झालेले प्रचंड ब्रह्मांड, माया व अविद्येचा खेळ, ब्रह्मदेव, विष्णू, शंकर, अनेक लोक व स्थाने, चंद्र, सूर्य, तारकासमूह, सात बेटे, चौदा भुवने, शेष, कूर्म, सातपाताळ, एकवीस स्वर्ग, आठ दिशापती, तेहेतीस कोटी देव, बारा आदित्य, अकरा रुद्र, नऊ नाग, सात ऋषी, अनेक देवांचे अवतार. ॥४८–५२॥

१. सप्तकंचुक– पंचमहाभूते, अहंकार व महत्तत्व अशा सातांचा मिळून झालेला ब्रह्मांडासारखा मोठा गोल.

२. सप्तद्वीपे : जंबु, प्लक्ष, शाल्मली, कुश, क्रौंच, शाक व पुष्कर ही सात बेटे.

३. चौदा भुवने : भूः, भूवः, स्वः, महः जनः, तपः व सत्य हे सात स्वर्ग व अतल, वितल, सुतल, रसातल, महातल, तलातल व पाताल ही सात पाताळे.

४. एकवीस स्वर्ग : ज्योति, सित, विमल, अभिआगत, प्रकाश, रम्य, सहज, सिद्ध, नाद, दिव्य, एकांत, स्थिर, तृप्ती, निर्मळ, प्रेमळ, निज, लय, अनंत, नित्य, अतीत व सच्चिदानंद मिळून एकवीस स्वर्ग.

५. अष्ट दिक्पाळ : इंद्र (पूर्व), अग्नी (आग्नेय), यम (दक्षिण), निर्ऋती (नैर्ऋत्य), वरुण (पश्चिम), वायू (वायव्य), सोम (उत्तर), ईश्वर (इशान्य) असे आठ दिशांचे अधिपती.

६. तेहतीस कोटी देव, आठ वसू, बारा आदित्य, अकरा रुद्र, प्रजापती व वषट्कार मिळून देवांचे तेहतीस प्रकार. (ऐतरेय ब्राह्मण १–१०)

७. बारा आदित्य : धातु, मित्र, अर्यमा, रुद्र, वरुण, सूर्य, भग, विवस्वत्, पूषन्, सवितृ, त्वष्टा व विष्णु ही सूर्याची बारा महिन्यांतील बारा रूपे.

८. अकरा रुद्र : रैवत, अज, भीम, भव, वाम, वृषाकपि, अजैकपाद, उग्र, अहिर्बुध्न्य, बहुरूप, महान ही रुद्राची अकरा नावे.

९. नवनाग : अनंत, वासुकी, शेष, पद्मनाभ, कंबल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक व कालिया अशा नागांच्या नऊ जाती.

१०. सप्तऋषी : कश्यप, अत्रि, भरद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि व वसिष्ठ.

मेघ मनु चक्रवर्ती । नाना जीवांची उत्पत्ती । आतां असो सांगों किती । विस्तार हा ।।५३।।

ढग, सूर्य, मनु, चक्रवर्ती राजे, लक्षावधी जीव इ. सर्व विस्तार मूळ मायेनंतरचा आहे. तो किती सांगावा? ।।५३।।

सकळ विस्ताराचें मूळ । ते मूळमायाच केवळ । मागां निरोपिली सकळ । पंचभूतिक ।।५४।।

सर्व दृष्य जगाचा प्रचंड पसारा मूळमायेपासून निर्माण झाला. ती पांचभौतिक असल्याचे आधी सांगितले आहे. ।।५४।।

सूक्ष्मभूतें जे बोलिलीं । तेचि पुढें जडत्वा आलीं । ते सकळहि बोलिलीं । पुढिले समासी ।।५५।।

मूळची सूक्ष्म असलेली पंचमहाभूते पुढे व्यक्त झाली. त्यांचा तपशील पुढील समासात आहे. ।।५५।।

पंचभूतें पृथकाकारें । पुढें निरोपिली विस्तारें । वोळखीकारणें अत्यादरें । श्रोतीं श्रवण करावीं ।।५६।।

वेगळ्या वेगळ्या प्रकारे व्यक्त झालेली महाभूते पुढील समासात सविस्तर सांगितली आहेत. त्यांचे ज्ञान होण्यासाठी श्रोत्यांनी ती अगत्यपूर्वक ऐकावीत. ।।५६।।

पंचभूतिक ब्रह्मगोळ । जेणें कळे हा प्रांजळ । दृश्य सांडून केवळ । वस्तुच पाविजे ।।५७।।

ज्या ब्रह्माच्या अधिष्ठानावर हा ब्रह्मांडाचा विस्तार स्पष्ट दिसतो (कळतो) तो विस्तार विवेकयुक्त विचाराने दूर सारून ‘ते ब्रह्म मी आहे’ असा अनुभव घ्यावा. ।।५७।।

माहाद्वार वोलांडावें । मग देवदर्शन घ्यावें । तैसें दृश्य हें सांडावें । जाणोनियां ।।५८।।

देवळात प्रवेश करण्यापूर्वी महाद्वार असते. ते ओलांडून देवाचे दर्शन घ्यावे लागते. त्याप्रमाणे दृश्य जगत् मागे सारून स्वसंवेद्य ब्रह्माचा अनुभव घ्यावा. त्या दृश्य जगताचे पांचभौतिक मिथ्यात्व लक्षात घेऊन सत्यब्रह्म पहावे. ।।५८।।

म्हणोनि दृश्याचा पोटीं । आहें पंचभूतांची दाटी । येकपणें पडिली मिठी । दृश्य पंचभूतां ।।५९।।

हे सर्व दृश्य जगत् पंचमहाभूतांनीच व्यापले आहे. स्थूल पंचमहाभूते बेमालूमपणे एकत्र येऊन ब्रह्मांडाला मिठी घालून बसली आहेत. ॥५९॥

एवं पंचभूतांचेंचि दृश्य । सृष्टी रचली सावकास । श्रोती करून अवकाश । श्रवण करावें ।।६०।।

अशा रीतीने व्यक्त झालेल्या पंचमहाभूतांनी ह्या दृश्य सृष्टीची क्रमाने रचना झाली आहे. श्रोत्यांनी ती ऐकण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा. ॥६०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सूक्ष्मपंचभूतनिरुपणनाम' समास चवथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सूक्ष्मपंचभूते' नावाचा चवथा समास समाप्त

दशक आठवा : मायोद्भव अथवा ज्ञानदशक

समास पाचवा : स्थूळपंचमहाभूतेस्वरूपाकाशभेदोनाम

॥ श्रीराम समर्थ ॥

केवळ मूर्ख तें नेणे । ह्मणौन घडलें सांगणें । पंचभूतांचीं लक्षणें । विशद करूनि ।।१।।

अगदीच अडाण्याला पंचमहाभूतांचा संगम लक्षात येत नाही म्हणून त्याचे एवढे स्पष्टीकरण करावे लागत आहे! ॥१॥

पंचभूतांचा कर्दम जाला । आतां नवचे वेगळा केला । परंतु कांहीं येक वेगळाला । करून दाऊं ।।२।।

जे पंचीकरण एकदा झाले ते आता वेगळे करणे शक्य नाही. तरीही प्रत्येक महाभूताचे प्राधान्य असलेले पदार्थ वेगळे करून दाखवू. ॥२॥

पर्वत पाषाण शिळा शिखरें । नाना वर्णें लाहान थोरें । खडे गुंडे बहु प्रकारें । जाणिजे पृथ्वी ।।३।।

नाना रंगांची मृत्तिका । नाना स्थळोस्थळीं जे कां । वाळुकें वाळु अनेका । मिळोन पृथ्वी ।।४।।

पुरें पट्टणें मनोहरें । नाना मंदिरें दामोदरें । नाना देवाळयें शिखरें । मिळोन पृथ्वी ।।५।।

सप्त द्वीपावती पृथ्वी । काये ह्मणोनि सांगावी । नव खंडें मिळोन जाणावी । वसुंधरा ।।६।।

नाना देव नाना नृपती । नाना भाषा नाना रिती । लक्ष चौऱ्यासी उत्पत्ती । मिळोन पृथ्वी ।।७।।

नाना उद्वसें जें वनें । नाना तरुवरांचीं बनें । गिरीकंदरें नाना स्थानें । मिळोन पृथ्वी ।।८।।

नाना रचना केली देवीं । जे जे निर्मिली मानवीं । सकळ मिळोन पृथ्वी । जाणिजे श्रोतीं ।।९।।

नाना धातु सुवर्णादिक । नाना रत्नें जे अनेक । नाना काष्ठवृक्षादिक । मिळोन पृथ्वी ।।१०।।

पर्वत, पत्थर, शिळा, सुळके, अनेक रंगांचे व आकारांचे खडे, दगड, जागोजागी असलेली अनेक रंगांची माती, नाना प्रकारची वाळू, सुंदर खेडी, शहरे, मोठमोठी मंदिरे, देवळे व त्यांची शिखरे, सात बेटांची पृथ्वी किंवा नऊ खंडांची पृथ्वी, अनेक देव, राजे, भाषा, रीतिरिवाज, चौऱ्यांशी लक्ष योनी, घनदाट जंगले, वृक्षांनी भरलेली उपवने, गूढ गुहा, ईशरचित व जीवरचित सृष्टी, सुवर्णादी अनेक धातू व रत्ने, लाकडे व झाडे हे सर्व पदार्थ पृथ्वीतत्त्वाचे आधिक्य असलेले आहेत. ॥३ ते १०॥

आतां असो हें बहुवस । जडांश आणी कठिणांश । सकळ पृथ्वी हा विश्वास । मानिला पाहिजे ।।११।।

आतां हा तपशील पुरे. जेथे वजन व टणकपणा असतो तो पृथ्वीचा असतो असा निश्चय करावा. ॥११॥

बोलिलें पृथ्वीचें रूप । आतां सांगिजेल आप । श्रोतीं वोळखावें रूप । सावध होऊनी ।।१२।।

पृथ्वीचे पदार्थ सांगून झाले. आता जळतत्त्वाचे सांगू. ते सावध होऊन ऐकावेत. ॥१२॥

वापी कूप सरोवर । नाना सरितांचें जें नीर । मेघ आणी सप्त सागर । मिळोन आप ।।१३।।

बारव, विहीर, सरोवर व नद्यांचे पाणी, ढग व सात समुद्र हे सर्व आपतत्त्वाचे आहेत. ॥१३॥

श्लोकार्ध– क्षारक्षीरसुरासर्पिर्दधि इक्षुर्जलं तथा ।।छ।।

श्लोकार्थ– 'समुद्र, दूध, मद्य, तूप, दही व इक्षुरस.'

क्षारसमुद्र दिसताहे । सकळ जन दृष्टीस पाहे । जेथें लवण होताहे । तोचि क्षारसिंधु ।।१४।।
येक दुधाचा सागर । त्या नाव क्षीरसागर । देवें दिधला निरंतर । उपमन्यासी ।।१५।।
येक समुद्र मद्याचा । येक जाणावा घृताचा । येक निखळ दह्याचा । समुद्र असे ।।१६।।
येक उसाच्या रसाचा । येक तो शुद्ध जळाचा । ऐसा सातां समुद्रांचा । वेढा पृथ्वीयेसी ।।१७।।
एवं भूमंडळीचें जळ । नाना स्थळींचें सकळ । मिळोन अवघें केवळ । आप जाणावें ।।१८।।
पृथ्वीगर्भी कितीयेक । पृथ्वींतळीं आवर्णोदक । तिहीं लोकींचें उदक । मिळोन आप ।।१९।।
नाना वल्ली बहुवस । नाना तरुवरांचे रस । मध पारा अमृत विष । मिळोन आप ।।२०।।
नाना रस स्नेहादिक । याहि वेगळे अनेक । जळावेगळें अवश्यक । आप बोलिजे ।।२१।।
सारद्र आणी सीतळ । जळासारिखें पातळ । शुक्लीत श्रोणीत मूत्र लाळ । आप बोलिजे ।।२२।।
आप संकेतें जाणावें । पातळ वोले वोळखावें । मृद सीतळ स्वभावें । आप बोलिजे ।।२३।।
जाला आपाचा संकेत । पातळ मृद गुळगुळित । स्वेद श्लेष्मा अश्रु समस्त । आप जाणावें ।।२४।।

सर्वांना दिसणारा खारट पाण्याचा समुद्र, देवांनी उपमन्यूला दिलेला दुधाचा समुद्र, मद्य, तूप, दही, उसाचा रस, गोड पाणी ह्या सात समुद्रांचा पृथ्वीला वेढा आहे. पृथ्वीवर जेवढे 'पाणी' जेथे आहे ते सर्व आप होय. पृथ्वीच्या पोटात, पृथ्वीभोवतीच्या वातावरणात, स्वर्गादी तिन्ही लोकातील पाणी आप होय. वेली व वृक्षांचे रस, मध, पारा, अमृत, विष, फळादिकांचे रस, तूपतेल, आपरूप होत. जलासारखे न दिसणारे पण जळरूप असणारे ओलसर थंड, व द्रव पदार्थ आपच होत. उदा– रेत, रक्त, मूत्र, लाळ इ. अशा रीतीने शैत्य, पातळपणा व ओलेपणा दिसला की तो आपाचा मानावा. पातळ, मऊ, गुळगळीत असलेले घाम, बेडका, अश्रू हे सर्व आपमय होत. ।।१४–२४।।

तेज ऐका सावधपणें । चंद्र सूर्य तारांगणें । दिव्य देह सतेजपणें । तेज बोलिजे ।।२५।।
वन्ही मेघीं विद्युल्यता । वन्ही सृष्टी संव्हारिता । वन्ही सागरा जाळिता । वडवानळु ।।२६।।
वन्ही शंकराचे नेत्रींचा । वन्ही काळाचे क्षुधेचा । वन्ही परीघ भूगोळाचा । तेज बोलिजे ।।२७।।
जें जें प्रकाशरूप । तें तें तेजाचें स्वरूप । शोषक उष्णादि आरोप । तेज जाणावें ।।२८।।

चंद्र, सूर्य, तारकासमूह, इंद्रादी तेजस्वी दिव्य देह, अग्नी, ढगात चमकणारी वीज, प्रळयाग्नी, वडवानल, शंकरांच्या नेत्रातून बाहेर पडलेला क्रोधाग्नी, जठराग्नी, पृथ्वीच्या वातावरणात फाकलेला प्रकाश ही सर्व तेजाची रूपे होत. जे जे प्रकाशरूप शोषण करणारे व उष्ण असते ते सर्व तेजाचे असते. ।।२५ - २८।।

वायो जाणावा चंचळ । चैतन्य चेतवी केवळ । बोलणें चालणें सकळ । वायोमुळें ।।२९।।

वायू चंचल असून कोणतीही हालचाल त्याचेमुळेच होते. बोलणे, चालणे इ. क्रिया प्राणरूप वायूमुळे होतात. ।।२९।।

हाले डोले तितुका पवन । कांहीं न चले पवनेंविण । सृष्टी चाळाया कारण । मूळ तो वायो ।।३०।।

जे हालणारे, डोलणारे असते ते वायूमुळे हालते, डोलते. वायूशिवाय जराही चलनवलन होत नाही. सृष्टीच्या व सृष्टीतील सर्व गती वायूमुळे होतात. ।।३०।।

चळण वळण आणी प्रासारण । निरोध आणि अकोचन । सकळ जाणावा पवन । चंचळरूपी ।।३१।।

हालणे, वळणे, फुगणे किंवा वाढणें, आडवणे, संकोच इ. सर्व क्रिया चंचल वायूच्या असतात. ।।३१।।

प्राण अपान आणी व्यान । चौथा उदान आणी समान । नाग कूर्म कर्कश जाण । देवदत्त धनंजये ।।३२।।

प्राण, अपान, व्यान, उदान व समान हे मुख्य प्राण व नाग, कूर्म, कृकल, देवदत्त व धनंजय हे उपप्राण वायुतत्त्वाचे आहेत. ॥३२॥

जितुकें कांहीं होतें चळण । तितुकें वायोचे लक्षण । चंद्र सूर्य तारांगण । वायोचि धर्ता ।।३३।।

जेथे हालचाल तेथे वायू. चंद्र, सूर्य व तारकासमूह आपापल्या कक्षेत व स्वत:भोवती फिरतात ते वायूच्या सामर्थ्यामुळेच. (त्या काळची कल्पना. Gravitational force) ॥३३॥

आकाश जाणावें पोकळ । निर्मळ आणी निश्चळ । अवकाशरूप सकळ । आकाश जाणावें ।।३४।।

पोकळी हेच स्वरूप असणारे, स्वच्छ, शांत व सर्व पदार्थांना अवकाश पुरविणारे महाभूत आकाश आहे. ॥३४॥

आकाश सकळांस व्यापक । आकाश अनेकीं येक । आकाशामध्यें कौतुक । चहूं भूतांचें ।।३५।।

आकाश सर्व ब्रह्मांड व्यापून राहते. पदार्थ अनेक असले तरी त्यातील आकाश तेच असून इतर चार महाभूतांचे सर्व व्यापार आकाशात चालतात. ॥३५॥

आकाशाऐसें नाहीं सार । आकाश सकळांहून थोर । पाहातां आकाशाचा विचार । स्वरूपासारिखा ।।३६।।

आकाशासारखी अतिसूक्ष्म वस्तू सर्व सृष्टीत नाही. ते सर्वाहून व्यापक आहे. जवळजवळ ब्रह्मासारखे आहे. ॥३६॥

तव शिष्यें केला आक्षेप । दोहीचें सारखेंचि रूप । तरी आकाशचि स्वरूप । कां म्हणों नये ।।३७।।

शिष्य– जर आकाश जवळजवळ ब्रह्मासारखेच असेल तर त्याला ब्रह्मच का म्हणू नये? ॥३७॥

आकाश स्वरूपा कोण भेद । पाहातां दिसती अभेद । आकाश वस्तुच स्वतसिद्ध । कां न म्हणावी ।।३८।।

आकाश व ब्रह्म ह्यांतील भेद पाहू गेले तर त्यात अभेदच दिसतो. मग आकाशाला स्वयंभू ब्रह्म का म्हणू नये? ॥३८॥

वस्तु अचळ अढळ । वस्तु निर्मळ निश्चळ । तैसेंचि आकाश केवळ । वस्तुसारिखें ।।३९।।

ब्रह्म न चळणारी, न ढळणारी, विमल व शांत वस्तू आहे. आकाशही तसेच आहे. ॥३९॥

ऐकोनि वक्ता बोले वचन । वस्तु निर्गुण पुरातन । आकाशाआंगीं सप्त गुण । शास्त्रीं निरोपिले ।।४०।।

वक्त्याचे उत्तर– ब्रह्म त्रिगुणरहित, आद्य व अनादि आहे. आकाशात मात्र दडलेले सात गुण असतात असे शास्त्र सांगते. ॥४०॥

काम क्रोध शोक मोहो । भय अज्ञान सुन्यत्व पाहो । ऐसा सप्तविध स्वभाव । आकाशाचा ।।४१।।

काम, क्रोध, शोक, मोह, भय, अज्ञान व शून्यत्व असे आकाशाचे सात गुण शास्त्र सांगते. (शिवाय शब्द हा आकाशाचा गुण शास्त्रात सांगितला आहे) ॥४१॥

ऐसें शास्त्राकारें बोलिलें । ह्मणौनि आकाश भूत जालें । स्वरूप निर्विकार संचलें । उपमेरहित ।।४२।।

शास्त्र सांगते म्हणून आकाश हे महाभूत आहे. ब्रह्म एकमेव असून त्याला खरे तर आकाशाचाही दृष्टान्त देता येत नाही. ॥४२॥

काचबंदि आणी जळ । सारिखेंच वाटे सकळ । परी येक काच येक जळ । शाहाणे जाणती ।।४३।।

काचेची फरशी व पाणी सारखीच दिसतात (महाभारतातील मयसभा) पण शहाणे त्यातील फरक जाणतात. ॥४३॥

रुवामध्यें स्फटिक पडिला । लोकीं तद्रूप देखिला । तेणें कपाळमोक्ष जाला । कापुस न करी ।।४४।।

कापसाच्या ढिगात स्फटिक पडला तर ओळखू येत नाही. पण स्फटिकाने जखम होते. कापसाने नाही. ।।४४।।

तंदुलामधें श्वेत खडे । तंदुलासारिखेच वांकुडे । चाऊं जातां दांत पडे । तेव्हां कळे ।।४५।।

तांदळात मिसळलेले त्याच आकाराचे पांढरे खडे असतात. जेवताना खड्याने दात पडतो तेव्हां ते कळते. ।।४५।।

त्रिभागामधें खडा असे । त्रिभागासारिखाच भासे । शोधूं जातां वेगळा दिसे । कठिणपणें ।।४६।।

चुना, कात व सुपारी ह्यांच्या बारीक केलेल्या मिश्रणात त्यासारखा दिसणारा खडा असतो. नीट पाहिले तर तो टणक असल्याने वेगळा काढता येतो. ।।४६।।

गुळासारिखा गुळदगड । परी तो कठिण निचाड । नागकांडी आणी वेखंड । येक म्हणों नये ।।४७।।

गुळामध्यें गुळाच्या रंगाचा खडा असतो. पण तो पक्का टणक असतो. गूळ मऊ असतो. नागासारखी दिसणारी वाकडी काटकी व तसेच दिसणारे वेखंड ह्यांत फार फरक आहे. ।।४७।।

सोनें आणी सोनपितळ । येकचि वाटती केवळ । परी पितळेसी मिळतां ज्वाळ । काळिमा चढे ।।४८।।

सोने व पिवळे दिसणारे पितळ अगदी सारखी दिसतात. पण पितळ अग्नीत घातले तर काळे पडते. सोने नाही. ।।४८।।

असो हे हीन दृष्टांत । आकाश म्हणिजे केवळ भूत । तें भूत आणि अनंत । येक कैसे ।।४९।।

असे किती दृष्टान्त दिले तरी ते कमीच पडतात. आकाश हे केवळ एक भूत आहे. ब्रह्म व भूत एक कसे असतील? ।।४९।।

वस्तुसी वर्णचि नसे । आकाश शामवर्ण असे । दोहींस साम्यता कैसे । करिती विचक्षण ।।५०।।

ब्रह्म वर्णरहित असून आकाश निळ्या वर्णाचे आहे. विद्वान त्या दोन्हीत साम्य कसे पहातील? ।।५०।।

श्रोते म्हणती कैचें रूप । आकाश ठाईंचें अरूप । आकाश वस्तुच तद्रूप । भेद नाहीं ।।५१।।

श्रोते– आकाशाला रूप नाही. त्यामुळे रंग असणे शक्य नाही. म्हणून ब्रह्म व आकाश ह्यांत भेद नाही. ।।५१।।

चहूं भूतांस नाश आहे । आकाश कैसें नासताहे । आकाशास न साहे । वर्ण वेक्ती विकार ।।५२।।

आकाश सोडून इतर चार भूतांना नाश आहे हे खरे, पण आकाशाचा नाश कसा होणार? त्याला रूप नाही, रंग नाही व म्हणून ते विकारही नाहीत. ।।५२।।

आकाश अचळ दिसतें । त्याचें काय नासों पाहातें । पाहातां आमुचेनि मतें । आकाश शाश्वत ।।५३।।

न ढळणाऱ्या शांत व शुद्ध आकाशात नाश होणारे आहेच काय? त्यामुळे आमच्या मतें आकाश सत्य आहे. ।।५३।।

ऐसें ऐकोन वचन । वक्ता बोले प्रतिवचन । ऐका आतां लक्षण । आकाशाचें ।।५४।।

आकाश तमापासून जालें । म्हणौन काम क्रोधें वेष्टिलें । अज्ञान सुन्यत्व बोलिलें । नाम तयाचें ।।५५।।

ह्यावर उत्तर देताना वक्ता म्हणतो– आता आकाशाची लक्षणे ऐका. आकाशाची उत्पत्ती तमोगुणापासून झाली आहे. काम, क्रोध, अज्ञान व शून्यत्व ही तमाची लक्षणे असल्याने ती सहजच आकाशाची लक्षणे ठरतात. ।।(५४-५५) ।।

अज्ञानें कामक्रोधादिक । मोहो भये आणी शोक । हा अज्ञानाचा विवेक । आकाशागुणें ।।५६।।

अज्ञानामुळे काम, क्रोध, भय, मोह व शोक होतात. हे अज्ञान आकाशाचे (मुळे) असते. ।।५६।।

नास्तिक नकारवचन । तेंचि सुन्याचें लक्षण । तयास म्हणती हृदयसुन्य । अज्ञान प्राणी ।।५७।।

जे वेदांना प्रमाण मानीत नाहीत त्यांचा नकार हेच शून्याचे लक्षण आहे (शून्यवादी जैनमत). त्यांना वेदान्ती अज्ञानी व हृदयशून्य म्हणतात! ।।५७।।

आकाश स्तब्धपणें सुन्य । सुन्य म्हणिजे तें अज्ञान । अज्ञान म्हणिजे कठिण । रूप तयाचें ।।५८।।

आकाश स्तब्ध असल्याने शून्य असून शून्य म्हणजेच अज्ञान. अज्ञानाचे रूप कठीण असते. (आकाशासह जग तमोगुणाचे. तमोगुण पृथ्वीचा. पृथ्वी कठीण. ती आकाशात असते. (पहा. ८-४-१६ ते २०). ।।५८।।

कठिण सुन्य विकारवंत । तयास कैसें म्हणावें संत । मनास वाटे हें तद्वत । आहाच दृष्टीं ।।५९।।

शून्य कठीण असल्याने विकारी आहे. (अस्ति, जायते इ.) ते सत्य कसे असेल? केवळ उथळ विचारामुळेच ते सत्य वाटणे शक्य आहे. ।।५९।।

अज्ञान कालवलें आकाशीं । तया कर्दमा ज्ञान नासी । म्हणोनियां आकाशासी । नाश आहे ।।६०।।

आकाशात अज्ञानाचा समावेश आहे. ह्या युतीचा ज्ञानाने नाश होतो. म्हणून आकाश विनाशी आहे. ।।६०।।

तैसें आकाश आणि स्वरूप । पाहातां वाटती येकरूप । परी दोहींमध्ये विक्षेप । सुन्यत्वाचा ।।६१।।

अशा प्रकारे आकाश व ब्रह्म एकरूप भासतात. पण आकाशाच्या शून्यत्व ह्या गुणामुळे दोन्हीत फार मोठी तफावत पडते. त्यांचे तथाकथित ऐक्य मोडते. ।।६१।।

आहाच पाहातां कल्पनेसी । सारिखेंच वाटे निश्चयेंसीं । परी आकाश स्वरूपासी । भेद आहे ।।६२।।

उथळपणे व घाईने विचार केला तर दोन्ही सारखी वाटतात हे खरे. पण सूक्ष्म विचाराने त्यांतील भेद लक्षात येतो. ।।६२।।

उन्मनी आणि सुषुप्ति अवस्ता । सारिखेच वाटे तत्वता । परी विवंचून पाहों जातां । भेद आहे ।।६३।।

उन्मनी व सुषुप्ती ह्या दोन अवस्थाही सारख्याच वाटतात. पण शास्त्रशुद्ध विचाराने त्यातील भेद कळतो. (ध्यानकाळी तुर्येनंतर उन्मनी येते. सुषुप्ती सर्व जीवांना सहज आहे.–ऐसे शास्त्राधारे बोलिले). ।।६३।।

खोटें खऱ्यासारिखें भाविती । परी परीक्षवंत निवडिती । कां कुरंगें देखोन भुलती । मृगजळासी ।।६४।।

ख़ोटे कितीही खऱ्यासारखे दिसले तरी परीक्षा करणारे त्यातील खरे बरोबर निवडतात. हरिणे मृगजळाला खरे पाणी समजून त्यामागे धावतात. ।।६४।।

आतां असो हा दृष्टांत । बोलिला कळाया संकेत । म्हणौनि भूत आणि अनंत । येक नव्हेती ।।६५।।

हे एकच उदाहरण पुरे. वस्तुस्थिती लक्षात यावी म्हणून ते सांगितले. म्हणून महाभूत (आकाश) व ब्रह्म एक नाहीत. ।।६५।।

आकाश वेगळेपणें पाहावें । स्वरूपीं स्वरूपचि व्हावें । वस्तुचें पाहाणें स्वभावें । ऐसे असे ।।६६।।

आकाशाच्या गुणानुसार ते आत्म्याहून वेगळे जाणावे. अन्त:करण वृत्तीतील चिदाभास आत्माकार करावा. आत्मज्ञानाचे हेच स्वाभाविक वर्म आहे. ।।६६।।

येथें आशंका फिटली । संदेहवृत्ती मावळली । भिन्नपणें नवचे अनुभवली । स्वरूपस्थिती ।।६७।।

असे हे शंकेचे उत्तर दिले. संशय नाहीसे झाले. मात्र आत्मस्वरूपापासून वेगळेपणा कायम ठेवून जीवाला स्वरूपानुभव येत नाही हे पक्के लक्षात ठेवावे. ।।६७।।

आकाश अनुभवा येतें । स्वरूप अनुभवापरतें । म्हणोनिया आकाशातें । साम्यता न घडे ।।६८।।

'हे आकाश' अशा रीतीने आकाशाचा वेगळेपणाने अनुभव येतो. असे स्वरूपाच्या बाबतीत होत नाही. म्हणून आकाश व ब्रह्म सारखी किंवा एक नसतात. ।।६८।।

दुग्धासारिखा जळांश । निवडूं जाणती राजहंस । तैसें स्वरूप आणी आकाश । संत जाणती ।।६९।।

दुधात मिसळलेले पाणी फक्त राजहंस निवडू शकतात. त्याप्रमाणें आकाश व ब्रह्म ह्यातील फरक संत जाणतात. ।।६९।।

सकळ माया गथागोवी । संतसंगे हे उगवावी । पाविजे मोक्षाची पदवी । सत्समागमें ।।७०।।

आतापर्यन्त केलेले सर्व विवेचन जीवावर मायेच्या असलेल्या जबर पगड्यामुळे करावे लागले. ह्या मायेचा संतसंगतीत निरास करावा. त्यांच्या संगतीत मोक्ष ही महान पदवी मिळवावी. ।।७०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'स्थूळपंचमहाभूतेंस्वरूपाकाशभेदोनाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'स्थूळपंचभूतेस्वरूपाकाशभेद' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक आठवा : मायोद्भव अथवा ज्ञानदशक

समास सहावा : दुश्चीतनिरूपण

॥ श्रीरामसमर्थ ॥

श्रोता विनवी वक्तयासी । सत्संगाची महिमा कैसी । मोक्ष लाभे कितां दिवसीं । हें मज निरोपावें ।।१।।

मागील समासातील शेवटी आलेल्या 'मोक्ष' ह्या संकल्पनेचा धागा पकडून श्रोता नम्रतापूर्वक प्रश्न विचारतो– संतसंगतीचा महिमा कसा असतो? काय असतो? मोक्ष किती मुदतीत मिळू शकतो? हे मला सांगावे. ॥१॥

धरितां साधूची संगती । कितां दिवसां होते मुक्ती । हा निश्चय कृपामूर्ती । मज दीनास करावा ।।२।।

आपण सांगता त्याप्रमाणे संतांच्या संगतीत राहिले तर मोक्षासाठी किती काळ लागतो? मी आपणांस शरण आलो आहे. मला ह्या प्रश्नाचे निश्चयात्मक उत्तर द्यावे. ॥२॥

मुक्ती लाभे तत्क्षणीं । विश्वासतां निरूपणीं । दुश्चीतपणें हानी । होतसे ।।३।।

उत्तर– श्रीगुरुमुखातून येणाऱ्या 'तत्त्वमसि'सारख्या महावाक्यावर नितान्त श्रद्धा ठेवून 'सोऽहं'वर आरूढ होण्याचा अधिकार शिष्याने कमाविलेला असेल तर तो त्याच क्षणी मुक्त होतो! पण अधिकार नसल्यामुळे अन्त:करणवृत्ती चंचल झाली तर मोक्ष लाभत नाही. (कानावचनाचिये भेटी । सरिसाचि पै किरिटी । वस्तु होऊनि उठी । कवणु एक जो ॥ ज्ञानेश्वरी. १८-९८९. असा विरळा असतो.) ॥३॥

सुचितपणें दुश्चीत । मन होतें अकस्मात । त्यास करावें निवांत । कोणे परीं ।।४।।

चंचलतेमुळें एकाग्र मन अचानक पांगते. त्याला कसे आवरून घ्यावे ते आता ऐक. ॥४॥

मनाच्या तोडून वोढी । श्रवणीं बैसावें आवडीं । सावधपणें घडीनें घडी । काळ सार्थक करावा ।।५।।

मनाचे संकल्पविकल्प वैराग्याच्या मदतीने थांबवून अत्यंत आवडीने संतसंगतीत श्रवणाला बसावे. मिळालेले आयुष्य सावधपणाने वापरून श्रवणाचा धागा सुटू न देता येणारा प्रत्येक दिवस सार्थकी लावावा. ॥५॥

अर्थप्रमेय ग्रंथांतरीं । शोधून घ्यावें अभ्यांतरीं । दुश्चीतपण आलें तरी । पुन्हां श्रवण करावें ।।६।।

श्रीगुरूंच्या मुखातून येणाऱ्या शब्दांचे अर्थ व त्यातील वेदान्तशास्त्राची प्रमेये किंवा सिद्धान्त अनेक शास्त्रग्रंथांतून शोधावेत व बुद्धीत ठसवून घ्यावेत. मन पांगले तर त्याला पुन:पुन्हा आवरावे व पुन्हा अभ्यास करावा. ॥६॥

अर्थांतर पाहिल्यावीण । उगेंचि करी जो श्रवण । तो श्रोता नव्हे पाषाण । मनुष्यवेषें ।।७।।

वर वर कळणारा अर्थ प्रसंगी बाजूला ठेवून लक्ष्यार्थ, ध्वन्यर्थ, तिरकस अर्थ इ. लक्षात घेतल्याशिवाय जो उगीचच ऐकत बसतो त्याला श्रोता न म्हणता मनुष्यरूपातील धोंडा म्हणावे. ॥७॥

येथें श्रोते मानितील सीण । आम्हांस केलें पाषाण । तरी पाषाणाचें लक्षण । सावध ऐका ।।८।।

तुम्ही श्रोते म्हणाल की मी तुम्हाला धोंडा म्हटले. त्याचे तुम्हाला दु:खही होईल. पण आता धोंड्याचा एक सद्‌गुण ऐका! ॥८॥

वांकुडा तिकडा फोडिला । पाषाण घडून नीट केला । दुसरे वेळेसी पाहिला । तरी तो तैसाचि असे ।।९।।

ओबडधोबड धोंड्याला जर व्यवस्थित फोडून मूर्ती इ. आकार दिला तर काही काळानंतरही तो आकार तसाच रहातो. ॥९॥

टांकीनें खपली फोडिली । ते मागुती नाहीं जडली । मनुष्याची कुबुद्धि झाडिली । तरी ते पुन्हा लागे ।।१०।।

हातोडी छिन्नीने (टांकी) धोंड्याचा तुकडा काढला तर तो तुकडा पुन्हा धोंड्याला जाऊन चिकटत नाही. पण माणसाच्या वाईट सवयी काढून टाकल्या तरी पुन्हा त्या जडतात! ॥१०॥

सांगतां अवगुण गेला । पुन्हा मागुता जडला । याकारणें माहांभला । पाषाणगोटा ।।११।।

कोणाच्या उपदेशामुळें अवगुण सोडला तरी तो पुन्हा जडतो. म्हणून माणसापेक्षा धोंडा फार फार चांगला! ॥११॥

ज्याचा अवगुण झडेना । तो पाषाणाहून उणा । पाषाण आगळा जाणा । कोटिगुणें ।।१२।।

ज्याला आपला अवगुण सोडता येत नाही तो दगडापेक्षा हीन समजावा. दगड त्यापेक्षा कोटीपटीने श्रेष्ठ समजावा. ॥१२॥

कोटिगुणें कैसा पाषाण । त्याचेंहि ऐका लक्षण । श्रोतीं करावें श्रवण । सावध होउनी ।।१३।।

कांही दगड किंवा खडे कोटीपटीने कसे श्रेष्ठ असतात तेही आता नीट लक्ष देवून ऐका. ॥१३॥

माणीक मोतीं प्रवाळ । पाचि वैडूर्य वज्रनीळ । गोमेदमणी परिस केवळ । पाषाण बोलिजे ।।१४।।

माणिक, मोती, प्रवाळ, वैडुर्य, निळसर हिरा, गोमेद, परीस हे सर्व दगड किंवा खडेच असतात. ॥१४॥

याहि वेगळे बहुत । सूर्यकांत सोमकांत । नाना मोहरे सप्रचित । औषधाकारणें ।।१५।।

ह्यांचेशिवाय कित्येक सूर्यकांत, चंद्रकान्त ह्या नावाची रत्ने असतात. औषधासाठी उपयोगी मणीही असतात. ॥१५॥

याहि वेगळे पाषाण भले । नाना तीर्थीं जे लागले । वापी कूप सेखीं जाले । हरिहरमूर्ती ।।१६।।

तीर्थक्षेत्रात सापडणारे सुंदर गोटेही आकर्षक असतात. काही दगडांच्या विहिरी, बारव व देवांच्या मूर्तीही बनतात. ॥१६॥

याचा पाहातां विचार । पाषाणाऐसें नाहीं सार । मनुष्य तें काये पामर । पाषाणापुढें ।।१७।।

अशा प्रकारे विचार केला तर दगडासारखे मौल्यवान काहीच नाही. त्यांचे पुढे क्षुल्लक माणसाची काय किंमत! ॥१७॥

तरी तो ऐसा नव्हे पाषाण । जो अपवित्र निःकारण । तयासारिखा देह जाण । दुश्चीत अभक्तांचा ।।१८।।

पण जो दगड वरीलपैकी कशालाच उपयोगी न पडण्यासारखा कुजका व टाकावू असतो तो व चंचल मनाचे अभक्त ह्यांची योग्यता सारखीच समजावी. ॥१८॥

आतां असो हें बोलणें । घात होतो दुश्चीतपणें । दुश्चीतपणाचेनि गुणें । प्रपंच ना परमार्थ ।।१९।।

आता हे धोंडापुराण पुरे. मनाच्या चंचलतेमुळें सर्वनाश होतो. चित्त थाऱ्यावर नसणाऱ्याचा प्रपंच किंवा परमार्थ ह्यातील काहीच साधत नाही. ॥१९॥

दुश्चीतपणें कार्य नासे । दुश्चीतपणें चिंता वसे । दुश्चीतपणें स्मरण नसे । क्षण येक पाहतां ।।२०।।
दुश्चीतपणें शत्रुजिणें । दुश्चीतपणें जन्ममरणें । दुश्चीतपणाचेनि गुणें । हानी होये ।।२१।।
दुश्चीतपणें नव्हे साधन । दुश्चीतपणें न घडे भजन । दुश्चीतपणें नव्हे ज्ञान । साधकांसी ।।२२।।
दुश्चीतपणें नव्हे निश्चयो । दुश्चीतपणें न घडे जयो । दुश्चीतपणें होये क्षयो । आपुल्या स्वहिताचा ।।२३।।
दुश्चीतपणें न घडे श्रवण । दुश्चीतपणें न घडे विवरण । दुश्चीतपणें निरूपण । हातीचें जाये ।।२४।।

कोठेच मनाची एकाग्रता होत नसेल तर हाती घेतलेले काम बिघडून जाते, काळज्या निर्माण होतात. क्षणात विस्मरण होते, शत्रूकडून पराभव होतो, जन्ममरणाचे चक्र न सुटल्याने हानी होते, साधना व भजन घडत नाही, अध्यात्मविद्या आत्मसात होत नाही, केलेला निश्चय टिकत नाही, यश येत नाही, हित दुरावते, धड श्रवण होत नाही, नीट विवरण करता येत नाही. चालू झालेले निरूपण विस्कळित होऊन त्यावरील पकड सुटते. ॥२०-२४॥

दुश्चीत बैसलाचि दिसे । परी तो असतचि नसे । चंचळ चक्रीं पडिलें असे । मानस तयाचें ।।२५।।

लक्ष नसलेला श्रोता शरीराने श्रवणाला बसल्यासारखा दिसला तरी चित्ताने तो तेथे नसतो. त्याचे मन चंचळतेच्या चक्रावर बसून गरागर फिरत असते. ॥२५॥

वेडें पिशाच्य निरंतर । अंध मुके आणी बधिर । तैसा जाणावा संसार । दुश्चीत प्राणीयांचा ।।२६।।

वेडा, माथेफिरू, आंधळा, मुका व बहिरा ह्यांना जसा त्यांच्या जीवनाचा उपयोग करून घेता येत नाही त्याचप्रमाणे चंचल माणसाचेही जीवन व्यर्थ जाते. ॥२६॥

सावध असोन उमजेना । श्रवण असोन ऐकेना । ज्ञान असोन कळेना । सारासारविचार ।।२७।।

श्रवणाला बसण्याविषयी सावध असूनही दुर्लक्ष होत असल्याने काही कळत नाही. शब्द कानावर पडत असूनही काहीच स्वीकारले जात नाही. अध्यात्मविद्या सांगितली जात असूनही सार ब्रह्म व असार जगत् ह्यांचा निश्चय होत नाही. ॥२७॥

ऐसा जो दुश्चीत आळसी । परलोक कैंचा त्यासी । जयाचे जिवीं अहिर्निशीं । आळस वसे ।।२८।।

चांचल्याच्या जोडीला आळस असेल तर त्याला मोक्ष कसा मिळेल? चोवीस तास आळस असेल तर दुसरे काय होणार? ॥२८॥

दुश्चीतपणापासुनि सुटला । तरी तो सवेंच आळस आला । आळसाहातीं प्राणीयांला । उसंतचि नाहीं ।।२९।।

कदाचित चांचल्य थांबून आळसाच्या कचाट्यात सापडला तर आळशीपणात गुंतल्याने त्याला सवडच मिळत नाही! ॥२९॥

आळसें राहिला विचार । आळसें बुडाला आचार । आळसें नव्हे पाठांतर । कांहीं केल्यां ।।३०।।
आळसें घडेना श्रवण । आळसें नव्हे निरूपण । आळसें परमार्थाची खूण । मळिण जाली ।।३१।।
आळसें नित्यनेम राहिला । आळसें अभ्यास बुडाला । आळसें आळस वाढला । असंभाव्य ।।३२।।
आळसें गेली धारणा धृती । आळसें मळिण जाली वृत्ती । आळसें विवेकाची गती । मंद जाली ।।३३।।
आळसें निद्रा वाढली । आळसें वासना विस्तारली । आळसें सुन्याकार जाली । सद्बुद्धि निश्चयाची ।।३४।।

आळसामुळे विचार सुचत नाही, नित्य नैमित्तिक कर्मे होत नाहीत, पाठांतर, श्रवण, कीर्तन काहीच घडत नाही. अध्यात्मविद्या कोपऱ्यात पडते. नित्यनेम व अभ्यास न होता आळसच अमर्याद वाढतो. स्मरणशक्ती व धैर्य नष्ट होऊन अन्त:करणात तमोगुण भरून रहातो. विवेकाचा विचार मंदावत जाऊन झोप वाढते. व तीच वासना वाढते. चांगल्या विचाराबाबत झालेला बुद्धीचा निश्चय नष्टप्राय होतो. ॥३०-३४॥

दुश्चीतपणासवें आळस । आळसें निद्राविळास । निद्राविळासें केवळ नास । आयुष्याचा ।।३५।।

चंचलतेबरोबर आळस, आळसाने सतत झोप व झोपेने आयुष्याचा नाश होतो. ॥३५॥

निद्रा आळस दुश्चीतपण । हेंचि मूर्खाचें लक्षण । येणेंकरितां निरूपण । उमजेचिना ।।३६।।

झोप, आळस व चांचल्य ही मूर्खाची मुख्य लक्षणे आहेत. त्यामुळे निरूपणादी श्रवण घडत नाही. ॥३६॥

हें तिन्हीं लक्षणें जेथें । विवेक कैचा असेल तेथें । अज्ञानास यापरतें । सुखचि नाहीं ।।३७।।

वरील तीनही लक्षणे जेथे असतील तेथे विवेकाला थारा कसा मिळेल? अज्ञानाला त्याच्या सुखासाठी त्यांचा मोठा आधार आहे! (त्यामुळे अज्ञान तसेच राहते). ॥३७॥

क्षुधा लागतांच जेविला । जेऊन उठतां आळस आला । आळस येतां निजेला । सावकास ।।३८।।

भूक लागली की खायचे, पोट भरले की आळस द्यायचे व आळस देता देता हळूहळू झोपायचे! ॥३८॥

निजोन उठतांच दुश्चीत । कदा नाहीं सावचित । तेथें कैचें आत्महित । निरूपणीं ।।३९।।

झोपून उठताच वृत्ती चंचल राहून स्थिरपणे सावध होतच नाही. त्याला निरूपणाने लाभणारे आत्महित कसे साधेल? ॥३९॥

मर्कटापासीं दिल्हें रत्न । पिशाच्याहातीं निधान । दुश्चीतापुढें निरूपण । तयापरी होये ।।४०।।

ज्याप्रमाणे माकडाच्या हातात रत्न द्यावे किंवा माथेफिरूकडे धन सांभाळण्यास द्यावे त्याप्रमाणे चंचल चित्ताच्या श्रोत्याला श्रवणाचा उपयोग होत नाही. ॥४०॥

आतां असो हे उपपत्ती । आशंकेची कोण गती । कितां दिवसां होते मुक्ती । सज्जनाचेनि संगें ।।४१।।

निद्रा, आळस व चांचल्य ह्यांचे प्रासंगिक वर्णन पुरे. संतसंगतीत राहणाऱ्याला किती दिवसात मोक्ष मिळतो ह्या प्रश्नाचे आता उत्तर देऊ. ॥४१॥

ऐका याचें प्रत्योत्तर । कथेसि व्हावें निरोत्तर । संतसंगाचा विचार । ऐसा असे ।।४२।।

आता ह्या प्रश्नाचे उत्तर जाणून घेऊन श्रोत्यांनी ते नीटपणे समजावून घ्यावे. संतसंगतीचे माहात्म्यच तसे आहे. ॥४२॥

लोहो परीसेसी लागला । थेंबुटा सागरीं मिळाला । गंगे सरिते संगम जाला । तत्क्षणीं ।।४३।।
सावध साक्षपी आणी दक्ष । तयास तत्काळचि मोक्ष । इतरांस तें अलक्ष । लक्षिलें नवचे ।।४४।।

शुद्ध लोखंडाला परिसाचा स्पर्श होताक्षणी त्याचे सोने होते. समुद्रातूनच उडालेला पाण्याचा थेंब पुन्हा समुद्रात पडताच समुद्राएवढा होतो. ओढा मोठ्या नदीला मिळाल्याबरोबर नदीच बनतो! त्याप्रमाणे श्रीगुरूंनी दिलेल्या साधनाविषयी सावध, सतत प्रयत्नशील व शमदमादिकांचा अभ्यास मोडू नये म्हणून दक्ष असणारा त्वरेने मुक्त होतो. इतरांना स्वसंवेद्य ब्रह्माचा अनुभव घेता येत नाही. ॥४३-४४॥

येथें शिष्यप्रज्ञाच केवळ । प्रज्ञावंतां नलगे वेळ । अनन्यास तत्काळ । मोक्ष लाभे ।।४५।।

अशा तात्काळ मोक्षासाठी शिष्याजवळ साधन चतुष्टयपूर्वक कमाविलेली सांख्यबुद्धीच आवश्यक असते. (गीता. अ. २) अशी बुद्धी असेल तर मोक्षाला वेळ लागत नाही. जो श्रीगुरू व साधना ह्यांच्याशी निष्ठा ठेवतो त्याला तात्काळ मोक्ष लाभतो. ॥४५॥

प्रज्ञावंत आणी अनन्य । तयास नलगे येक क्षण । अनन्य भावार्थेविण । प्रज्ञा खोटी ।।४६।।

बुद्धीच्या जोडीला निष्ठा असेल तर मोक्ष दूर नाही. निष्ठेशिवाय असलेली बुद्धी मोक्षाला निरुपयोगी आहे. ॥४६॥

प्रज्ञेविण अर्थ न कळे । विश्वासेंविण वस्तु ना कळे । प्रज्ञाविश्वासें गळे । देहाभिमान ।।४७ ।

बुद्धीशिवाय अध्यात्मविद्या कळत नाही. श्रद्धा व निष्ठेशिवाय अध्यात्मविद्येने समजलेल्या ब्रह्माचा अनुभव येत नाही. बुद्धी व श्रद्धा ह्यांच्या संयोगाने 'मी देह' हा जन्मोजन्मीचा निश्चय गळून पडतो. ॥४७॥

देहाभिमानाचे अंतीं । सहजचि वस्तुप्राप्ती । सत्संगें सद्गती । विलंबचि नाहीं ।।४८।।

हा निश्चय गळून पडणें हेच ब्रह्मानुभवाचे स्वरूप आहे. संतसंगतीत अशी सद्गती त्वरेने मिळते. ॥४८॥

सावध साक्षपी विशेष । प्रज्ञावंत आणी विश्वास । तयास साधनीं सायास । करणेंचि नलगे ।।४९।।

सावध, विशेष प्रयत्नशील, बुद्धिमान व श्रद्धावन्ताचे साधन कष्टमय होत नाही. ।।४९।।

इतर भाविक साबडे । तयांसहि साधनें मोक्ष जोडे । साधुसंगें तत्काळ, उडे– । विवेकदृष्टी ।।५०।।

इतर जे सामान्य बुद्धीचे, भोळे भाविक असतात त्यांना मात्र मोक्षासाठी साधना करावी लागते. संतांच्या संगतीत त्यांनाही साध्या सरळ भाषेतून विवेकाची नजर लाभते. ।।५०।।

परी तें साधन मोडूं नये । निरूपणाचा उपाये । निरूपणें लागे सोय । सर्वत्रांसी ।।५१।।

पण साधनेची गरज नसणाऱ्यानेही साधना सोडू नये. इतरांसाठी आदर्श समोर ठेवून अध्यात्मविद्या सांगत रहावी. त्याचा सर्वांनाच लाभ होतो. ।।५१।।

आतां मोक्ष आहे कैसा । कैसी स्वरूपाची दशा । त्याचे प्राप्तीचा भर्वसा । सत्संगें केवी ।।५२।।

मोक्ष म्हणजे नेमके काय? ती अवस्था कशी असते? संतसंगतीत मोक्षाची हमी कशी मिळते? ।।५२।।

ऐसें निरूपण प्रांजळ । पुढें बोलिलें असे सकळ । श्रोतीं होऊनियां निश्चळ । अवधान द्यावें ।।५३।।

इत्यादी प्रश्नांची सुस्पष्ट उत्तरे पुढील समासात सांगू. श्रोत्यांनी सावधपणें ती ऐकावीत. ।।५३।।

अवगुण त्यागावयाकारणें । न्यायनिष्ठुर लागे बोलणें । श्रोतीं कोप न धरणें । ऐसिया वचनाचा ।।५४।।

साधकांचे अवगुण जावेत ह्यासाठी प्रसंगी शास्त्रशुद्ध व कठोर बोलावे लागते. माझ्या बोलण्यातील अशा भागाचा श्रोत्यांनी राग मानू नये. ।।५४।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'दुश्चीतनिरूपणनाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'दुश्चीतनिरूपण' नावाचा सहावा समास समाप्त

दशक आठवा : मायोद्भव अथवा ज्ञानलक्षण

समास सातवा : मोक्षलक्षण

॥श्रीरामसमर्थ॥

मागां श्रोतयांचा पक्ष । कितां दिवसां होतो मोक्ष । तेचि कथा श्रोते दक्ष । होऊन ऐका ।।१।।

'किती मुदतीत मोक्ष मिळतो' असा प्रश्न श्रोत्याने विचारला आहे. त्याचे उत्तर आता लक्ष देऊन ऐका. ॥१॥

मोक्षास कैसें जाणावें । मोक्ष कोणास ह्मणावें । संतसंगें पावावें । मोक्षास कैसें ।।२।।

मोक्ष म्हणजे नेमके काय? मोक्षाची लक्षणे कोणती? संतांचे संगतीत तो कसा मिळवावा? ॥२॥

तरी बद्ध म्हणिजे बांधला । आणी मोक्ष म्हणिजे मोकळा जाला । तो संतसंगें कैसा लाधला । तेंहि ऐका ।।३।।

याचे थोडक्यात उत्तर असे की जो बांधला गेला आहे तो बद्ध व मोकळा झाला तो मुक्त. संत सहवासाने मोक्ष कसा लाभतो ते आता ऐका. ॥३॥

प्राणी संकल्पें बांधला । जीवपणें बद्ध जाला । तो विवेकें मुक्त केला । साधुजनीं ।।४।।

'मी जीव आहे' अशा सहज निश्चयाने बांधला गेलेल्याला 'मी ब्रह्म आहे' या विवेकाच्या शिकवणीने संत मुक्त करतात. ॥४॥

मी जीव ऐसा संकल्प । दृढ धरितां गेले कल्प । तेणें प्राणी जाला अल्प । देहबुद्धीचा ।।५ ।

'मी जीव आहे' अशा बुद्धीच्या सहज निश्चयात अनेक कल्प, अनेक योनीत जन्माला येऊन तो जीव त्याच्या देहाएवढा (परिच्छिन्न, एकदेशी) बनून जगतो. ॥५॥

मी जीव मज बंधन । मज आहे जन्ममरण । केल्या कर्माचें फळ आपण । भोगीन आतां ।।६।।

तो देहधारी जीव असा विचार करतो की मला जन्ममरणांचे चक्र भोगण्याचे व केलेल्या कर्मांची फळे भोगण्याचे अनिवार बंधन आहे. ती मला भोगावीच लागतील. ॥६॥

पापाचें फळ तें दुख । आणी पुण्याचें फळ तें सुख । पापपुण्य अवश्यक । भोगणे लागे ।।७।।

पापकर्माने दु:ख व पुण्यकर्माने सुख अशी व्यवस्था असल्याने पापपुण्याची ती ती फळे भोगणे भाग आहे. ॥७॥

पापपुण्यभोग सुटेना । आणि गर्भवासहि तुटेना । ऐसी जयाची कल्पना । दृढ जाली ।।८।।

पापपुण्याची सुखदु:खे व अखंड गर्भवासाचे चक्र अटळ आहेत असा त्याचा पक्का निश्चय झालेला असतो. ॥८॥

तया नाव बांधला । जीवपणें बद्ध जाला । जैसा स्वयें बांधोन कोसला । मृत्य पावे ।।९।।

अशा 'मी जीव' या निश्चयाने बांधला गेलेल्याला बद्ध म्हणतात. उदा. रेशमाचा किडा स्वत:भोवती कोश तयार करून त्यातच गुदमरून मरतो. ॥९॥

तैसा प्राणी तो अज्ञान । नेणें भगवंताचें ज्ञान । ह्मणें माझें जन्ममरण । सुटेचिना ।।१०।।

त्या किड्याप्रमाणे भगवंताच्या (स्वरुप) अज्ञानात गुरफटून घेऊन तो जीव जन्ममरण अटळ असल्याच्या कल्पनेत राहतो. ॥१०॥

आतां कांहीं दान करूं । पुढिल्या जन्मास आधारु । तेणें सुखरूप संसारु । होईल माझा ।।११।।

(अटळ जन्ममरण सुखाचे असावेत या कल्पनेने तो तथाकथित पुण्ये करतो–) आता थोडा दानधर्म केला तर ते पुण्य पुढील जन्मात सुख देईल व माझा तो संसार सुखाचा होईल. ॥११॥

पूर्वीं दान नाहीं केलें । ह्मणोन दरिद्र प्राप्त जालें । आतां तरी कांहीं केलें । पाहिजे कीं ।।१२।।

मागील जन्मात दानधर्म न केल्याने या जन्मात दारिद्र्य आले. आता थोडा दानधर्म केला पाहिजे. ॥१२॥

म्हणौनि दिलें वस्त्र जुनें । आणी येक तांब्र नाणें । म्हणे आतां कोटिगुणें । पावेन पुढें ।।१३।।

असा विचार करून एक जुना कपडा व एक तांब्याचे नाणें दान करून पुढील जन्मी त्याचे कोटीपट फळ मिळेल असा विश्वास धरून राहतो. ॥१३॥

कुशावर्तीं कुरुक्षेत्रीं । महिमा ऐकोन दान करी । आशा धरिली अभ्यांतरीं । कोटिगुणांची ।।१४।।

कुशावर्त (त्र्यंबकेश्वर) व कुरुक्षेत्र या क्षेत्रामध्ये दानाचे माहात्म्य फार मोठे असल्याचे ऐकून तेथे दान करतो व कोटीपट परतीची मनात अपेक्षा ठेवतो. ॥१४॥

रुका आडका दान केला । अतितास टुकडा घातला । ह्मणे माझा ढीग जाला । कोटि टुकड्यांचा ।।१५।।

पै पैसा दान करतो, भिकाऱ्याला भाकरीचा तुकडा घालतो व आता कोटीपट तुकडे मला मिळाल्यासारखेच आहेत असा निश्चय करतो. ॥१५॥

तो मी खाईन पुढिलिये जन्मीं । ऐसें कल्पी अंतर्यामीं । वासना गुंतली जन्मकर्मीं । प्राणीयांची ।।१६।।

हा सर्व साठा मला पुढील जन्मी उपयोगी पडेल अशी वासना धरल्याने तीच वासना पुढील जन्माचे बीज बनते. ॥१६॥

आतां मी जें देईन । तें पुढिले जन्मीं पावेन । ऐसें कल्पी तो अज्ञान । बद्ध जाणावा ।।१७।।

आता ज्या प्रमाणात मी दानधर्म करीन त्याच्या अनंत पटीने मला पुढील जन्मात मिळेल अशी कल्पना करणारा अज्ञानी व बद्ध आहे असे समजावे. ॥१७॥

बहुतां जन्मांचे अंतीं । होये नरदेहाची प्राप्ती । येथें न होतां ज्ञानें सद्गती । गर्भवास चुकेना ।।१८।।

अनंत वेळा अनंत देहांत जन्म मिळाल्यावर अचानक मनुष्यशरीराचा लाभ होतो. त्यात ब्रह्मज्ञान होऊन मोक्ष मिळाला नाही, तर जन्ममरणाचे फेरे चुकत नाहीत. ॥१८॥

गर्भवास नरदेहीं घडे । ऐसें हें सर्वथा न घडे । अकस्मात भोगणें पडें । पुन्हा नीच योनी ।।१९।।

हे जन्ममरण सतत मनुष्यशरीरात होतील असे मुळीच नाही. अकस्मात कृमि-कीटकादी शरीरे मिळतात. ॥१९॥

ऐसा निश्चयो शास्त्रांतरीं । बहुतीं केला बहुतांपरीं । नरदेह संसारीं । परम दुल्लभ असे ।।२०।।

अनेक शास्त्रग्रंथांतून हा निर्णय अनेक प्रकारे सांगितला गेला आहे. पण मनुष्यशरीराचा लाभ अतिदुर्लभ आहे असे सर्वच सांगतात. ॥२०॥

पापपुण्य समता घडे । तरीच नरदेह जोडे । येरवीं हा जन्म न घडे । हें व्यासवचन भागवतीं ।।२१।।

अनंत जन्ममरणांच्या प्रवासात पाप व पुण्य यांचे बळ अचानक समान झाले की नरदेह मिळतो असे भगवान व्यास भागवतात सांगतात. ॥२१॥

श्लोक

नरदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं । प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारं ।
मयानुकूलेन नभस्वतेरितं । पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा ।।छ।।

(अन्वय) आद्यं नरदेहं सुदुर्लभम । भवाब्धिं नभस्वत् ईरितम् ।

पुमान् स आत्महा न तरेत् । मयानुकुलेन प्लव सुकल्पं गुरुकर्ण धारं सुलभम् ।

श्लोकार्थ– मूळ नरदेह प्राप्त होणे फार दुष्प्राप्य आहे. त्यात हा संसारसमुद्र दाट धुक्याने झाकला गेला आहे असे म्हटले जाते. तो स्वबळाने तरू पाहणारा आत्मघातकी ठरतो. पण माझ्या सुदैवाने, निष्णात असे जिचे कर्णधार आहेत अशी नौका मला मिळाली असल्याने हा भवसागर तरून जाणे सोपे होईल. श्रीगुरूरूप नौका मिळाल्यास, तो तरणे सोपे होते.

नरदेह दुल्लभ । अल्प संकल्पाचा लाभ । गुरु कर्णधारी स्वयंभ । सुख पाववी ।।२२।।

नरदेह मिळणे फार दुर्मिळ आहे. पण श्रीगुरूंच्या आज्ञेत राहणाऱ्यांसाठी त्यांना झालेला 'याचे कल्याण व्हावे' हा क्षणिक संकल्पसुद्धा आत्मसुखाचा लाभ करून देतो. ।।२२।।

देव अनुकूळ नव्हे जया । स्वयें पापी तो प्राणीया । भवाब्धी न तरवे तया । आत्महत्यारा बोलिजे ।।२३।।

पापमय जीवन जगणाऱ्याला ईश्वरकृपा लाभत नाही. तो, भवसमुद्र तरून न जाणारा आत्मघातकी ठरतो. ।।२३।।

ज्ञानेंविण प्राणीयांसी । जन्ममृत्य लक्ष चौऱ्यासी । तितुक्या आत्महत्या त्यासी । ह्मणौन आत्महत्यारा ।।२४।।

ज्याला आत्मज्ञान होत नाही त्याला चौऱ्यांशी लक्ष वेळा जन्माला येऊन मरावे लागते. म्हणून तो आत्मघातकी म्हटला जातो. ।।२४।।

नरदेहीं ज्ञानेंविण । कदा न चुके जन्ममरण । भोगणें लागती दारुण । नाना नीच योनी ।।२५।।

मनुष्यजन्मात जर ज्ञान झाले नाही तर जन्ममरण चुकत नाहीत. अनेक प्रकारच्या नीच योनीतील जीवनांचे हाल सोसावे लागतात. ।।२५।।

रीस मर्कट श्वान सूकर । अश्व वृषभ ह्मैसा खर । काक कुर्कुट जंबुक मार्जर । सरड बेडुक मक्षिका ।।२६।।

अस्वल, माकड, कुत्रा, डुक्कर, घोडा, बैल, म्हैस, गाढव, कावळा, कोंबडा, कोल्हा, मांजर, सरडा, बेडूक, माशी. ।।२६।।

इत्यादिक नीच योनी । ज्ञान नस्तां भोगणें जनीं । आशा धरी मूर्ख प्राणी । पुढिलिया जन्माची ।।२७।।

आत्मज्ञान न झाल्यामुळें अशा नीच योनीत जन्म घ्यावे लागतात. तरीही मूर्ख माणूस पुढील जन्म स्वीकारण्याचा संकल्प करतो. ।।२७।।

हा नरदेह पडतां । तोचि पाविजे मागुतां । ऐसा विश्वास धरितां । लाज नाहीं ।।२८।।

आज असलेल्या मनुष्यशरीराला मरण आल्यावर पुन्हा मनुष्य शरीर मिळेल अशी खात्री बाळगणाराला लाज वाटली पाहिजे. ।।२८।।

कोण पुण्याचा संग्रहो । जे पुन्हां पाविजे नरदेहो । दुराशा धरिली पाहो । पुढिलिया जन्माची ।।२९।।

अशी कोणती अगाध पुण्याई जोडली आहे की त्यामुळे पुन्हा मनुष्यजन्म मिळावा? व त्या भरवशावर त्याची तीव्र इच्छा धरावी? ।।२९।।

ऐसे मूर्ख अज्ञान जन । केलें संकल्पें बंधन । शत्रू आपणासि आपण । होऊन ठेला ।।३०।।

असे अज्ञानी मूर्ख स्वत:च्याच संकल्पाच्या बंधनात सापडतात व स्वत:च स्वत:चे वैरी बनतात. ।।३०।।

श्लोक

आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ।।छ।।

श्लोकार्थ– आपणच आपले हितकर्ते असतो व आपणच आपले हितशत्रू असतो.

ऐसें संकल्पाचे बंधन । संतसंगे तुटे जाण । ऐक तयाचें लक्षण । सांगिजेल ।।३१।।

असे हे संकल्पाचे बंधन संतांच्या संगतीत सुटते. ते कसे ते आता ऐका. ।।३१।।

पांचा भूतांचे शरीर । निर्माण जालें सचराचर । प्रकृतिस्वभावें जगदाकार । वर्तो लागे ।।३२।।

पंचमहाभूतांनी घडलेली चर-अचर सृष्टी (ब्रह्मांड = ईश्वराचे शरीर) निर्माण होऊन प्रकृती किंवा मायेच्या स्वभावानुसार गतिशील झाली. (जग = गती) ।।३२।।

देह अवस्ता अभिमान । स्थानें भोग मात्रा गुण । शक्ती आदिकरून लक्षण । चौपुटी तत्वांचें ।।३३।।

जागृती, स्वप्न, सुषुप्ती या जीवाच्या अवस्था, विश्व, तैजस, प्राज्ञ, हे जीवाचे अभिमान, विश्वाचे जागरित हे स्थान, तैजसाचे स्वप्न हे स्थान, प्राज्ञाचे सुषुप्त हे स्थान, त्याचे स्थूल, सूक्ष्म व प्रविविक्त हे भोग, पाद याच मात्रा व जागृतीचा रजोगुण, स्वप्नाचा सत्वगुण व निद्रेचा तमोगुण; इच्छाशक्ती, क्रियाशक्ती, ज्ञानशक्ती, द्रव्यशक्ती (पहा मांडुक्य १-३, ४, ५, ६) अशी पिंडाची रचना आहे. ।।३३।।

ऐसी पिंडब्रह्मांडरचना । विस्तारें वाढली कल्पना । निर्धारितां तत्वज्ञाना । मतें भांबावलीं ।।३४।।

अशी ही पिंडाची व ब्रह्मांडाची रचना 'एकोऽहं' या संकल्पातून विस्तारली. या तत्त्वांचा निर्णय करून तो जाणताना अनेक मतवादी भांबावून गेले. त्यांचे एकमत होईना. ।।३४।।

नाना मतीं नाना भेद । भेदें वाढती वेवाद । परी तो ऐक्यतेचा संवाद । साधु जाणती ।।३५।।

जेवढी मते तेवढी विविधता व विविधतेतून वाद वाढतात. मात्र या सर्व विविधतेला कोठे पूर्णविराम मिळतो त्याचा निर्णय संतांनी केलेला असतो! ।।३५।।

तया संवादाचें लक्षण । पंचभूतिक देह जाण । त्या देहामध्यें कारण । आत्मा वोळखावा ।।३६।।

देह पांचभौतिक असून त्याचे अधिष्ठान आत्मा आहे या निर्णयात सर्व वादांना पूर्णविराम मिळतो. तो आत्मा मी आहे असा अनुभव घ्यावा. ।।३६।।

देह अंती नासोन जाये । त्यास आत्मा ह्मणों नये । नानां तत्वांचा समुदाय । देहामध्यें आला ।।३७।।

ब्याऐंशी तत्त्वांच्या समुदायासह असलेला देह आयुष्य संपले की नष्ट होतो, त्या देहालाच आत्मा समजू नये. ।।३७।।

अंतःकर्ण प्राणादिक । विषये इंद्रियें दशक । हा सूक्ष्माचा विवेक । बोलिला शास्त्रीं ।।३८।।
घेता सूक्ष्माची शुद्धी । भिन्न अंतःकरण मन बुद्धी । नाना तत्वांचे उपाधी– । वेगळा आत्मा ।।३९।।
स्थूळ सूक्ष्म कारण । माहाकारण विराट हिरण्य । अव्याकृत मूळप्रकृति जाण । ऐसे अष्टदेह ।।४०।।
च्यारी पिंडी च्यारी ब्रह्मांडीं । ऐसी अष्टदेहाची प्रौढी । प्रकृतिपुरुषांची वाढी । दशदेह बोलिजे ।।४१।।

मन, बुद्धी, चित्त, अहंकार, व अन्तःकरण (अंतःकरण पंचक)
प्राण, व्यान, अपान, समान व उदान (प्राणपंचक)
शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे विषय (विषयपंचक)
कान, त्वचा, नेत्र, जीभ, नाक ही ज्ञानेंद्रिये (पंचज्ञानेंद्रिये)
वाणी, हात, पाय, जननेंद्रिय, गुदद्वार ही पाच (कर्मेंद्रिये)

अशा पंचवीस तत्त्वांच्या समुदायाला शास्त्रात सूक्ष्म देह म्हटले आहे. सूक्ष्म देहाचा सूक्ष्म विचार केला तर असे दिसते की मन-बुद्ध्यादी अन्त:करण व इतर तत्त्वे याहून आत्मा भिन्न व अलिप्त आहे.

स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण हे पिंडाचे देह.

विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत, व मूळप्रकृती हे ब्रह्मांडाचे देह.

असे पिंडाचे चार व ब्रह्मांडाचे चार, असे आठ देह म्हटले जातात. त्यात प्रकृती व पुरुष हे मिळवले तर देहांची संख्या दहा भरते. ।।३९-४१।।

ऐसें तत्वांचें लक्षण । आत्मा साक्षी विलक्षण । कार्य कर्ता कारण । दृश्य तयाचें ।।४२।।

असा हा तत्त्व विचार आहे. ती तत्त्वे अचेतन असून आत्मा त्याहून वेगळ्या लक्षणाचा म्हणजे चेतन असून साक्षी आहे. निमित्त कारण व कर्ता ईश्वर, उपादानकारण प्रकृती व जगत् हे कार्य इ. दृष्याचा तो द्रष्टा आहे. ।।४२।।

जीवशिव पिंडब्रह्मांड । मायेअविद्येचें बंड । हें सांगतां असे उदंड । परी आत्मा तो वेगळा ।।४३।।

जीव, शिव, पिंड, ब्रह्मांड, माया, अविद्या इ. दृश्याचा पसारा सांगू म्हटले तर तो फार मोठा आहे. पण आत्मा त्या सर्वाहून भिन्न व अलिप्त आहे. ।।४३।।

पाहों जातां आत्मे च्यारी । त्यांचें लक्षण अवधारी । हें जाणोनि अभ्यांतरीं । सदृढ धरावें ।।४४।।

एकूण चार आत्म्यांची कल्पना करता येते. त्यांची लक्षणे आता ऐक. ती जाणून चांगली लक्षात ठेवावीत. ।।४४।।

येक जीवात्मा दुसरा शिवात्मा । तिसरा परमात्मा जो विश्वात्मा । चौथा जाणिजे निर्मळात्मा । ऐसे च्यारी आत्मे ।।४५।।

भेद उंच नीच भासती । परी च्यारी येकचि असती । येविषीं दृष्टांतसंमती । सावध ऐका ।।४६।।

एक जीवात्मा, दुसरा शिवात्मा, तिसरा परमात्मा, यालाच विश्वात्मा म्हणतात आणि चौथा निर्मलात्मा होय. असे चार आत्मे आहेत. उच्च-नीच, किंवा श्रेष्ठ-कनिष्ठ असे भेद असल्याचा या चार आत्म्यामध्ये भास होत असला तरी मुळात चारही आत्मे एकच आहेत यासंबंधीचा दृष्टांत सावध होऊन ऐका. ।।४५-४६।।

घटाकाश मठाकाश । महदाकाश चिदाकाश । अवघे मिळोन आकाश । येकचि असे ।।४७।।

तैसा जीवात्मा आणी शिवात्मा । परमात्मा आणी निर्मळात्मा । अवघा मिळोन आत्मा । येकचि असे ।।४८।।

घटीं व्यापक जें आकाश । तया नांव घटाकाश । पिंडीं व्यापक ब्रह्मांश । त्यास जीवात्मा बोलिजे ।।४९।।

मठीं व्यापक जे आकाश । तया नांव मठाकाश । तैसा ब्रह्मांडी जो ब्रह्मांश । त्यास शिवात्मा बोलिजे ।।५०।।

मठाबाहेरील आकाश । तया नांव महदाकाश । ब्रह्मांडाबाहेरील ब्रह्मांश । त्यास परमात्मा बोलिजे ।।५१।।

उपाधीवेगळें आकाश । तया नांव चिदाकाश । तैसा निर्मळात्मा परेश । तो उपाधीवेगळा ।।५२।।

आकाश चार प्रकारचे आहे. घटाला व्यापून असणारे घटाकाश, मठाला व्यापून असणारे मठाकाश, मठाबाहेरील महदाकाश आणि उपाधीविरहित आकाश म्हणजे चिदाकाश होय. आकाशाचे हे चार प्रकार दिसले तरी मूळ आकाश एक आहे. तसेच चार आत्मा मिळून एकच आत्मा आहे हे खालील तक्त्यावरून लक्षात येईल.

आकाश	उपाधी	नाव
१. घटाकाश	घट	जीव-जीवचैतन्य
२. मठाकाश	मठ (घर)	शिव-कूटस्थ चैतन्य
३. महदाकाश	विश्व	परमात्मा–ईश्वर चैतन्य
४. चिदाकाश	उपाधी नाही	निर्मळात्मा-ब्रह्मचैतन्य.

(जी आपले धर्म उपहितावर न घालता वेगळी राहते ती उपाधी. उदा. आकाश = उपहित. घट = उपाधी. घट या उपाधीला घटाच्या आकाराचे रूप आहे. पण तो आकार हा घटाचा धर्म आकाशावर घातला जात नाही. आकाश घटाकार झाल्यासारखे वाटले तरी निराकारच असते. आत्मा देहाकार वाटला तरी निराकार असतो.) ।।४७-५२)

उपाधीयोगे वाटे भिन्न । परी तें आकाश अभिन्न । तैसा आत्मा स्वानंदघन । येकचि असे ।।५३।।

तीन वेगळ्या उपाधींमुळे आकाश तीन प्रकारचे झाल्यासारखे वाटले तरी ते एकच असते. त्याप्रमाणे सत्‌चिदानंदघन आत्मा एकच असतो. ।।५३।।

दृश्यासबाह्य अंतरीं । सूक्ष्मात्मा निरंतरीं । त्याची वर्णाविया थोरी । शेष समर्थ नव्हे ।।५४।।

दृश्य सृष्टीच्या आत व बाहेर सूक्ष्म आत्मा सतत व्यापून असतो. त्या आत्म्याचे हे ऐश्वर्य वर्णन करणे वेदांनाही शक्य होत नाही. ।।५४।।

ऐसें आत्म्याचें लक्षण । जाणतां नाहीं जीवपण । उपाधी शोधितां, अभिन्न– । मुळींच आहे ।।५५।।

असे हे आत्म्याचे लक्षण आहे (निरुपाधिक). ते जाणले की जीवदशा राहत नाही. उपाधी या संकल्पनेचा नीट विचार केला तर आत्मा मूळचा निरुपाधिक असल्याने एकच आहे असे लक्षात येते. ।।५५।।

जीवपणें येकदेसी । अहंकारें जन्म सोसी । विवेक पाहतां प्राणीयांसी । जन्म कैंचा ।।५६।।

'मी जीव आहे' या भ्रमाने मूळचा व्यापक असलेला तो मर्यादित किंवा संकुचित बनतो व 'मी उपाधी' या अहंकारामुळे जन्ममरण भोगत राहतो. विवेक अंगी बाणल्यावर जीवाला तथाकथित जन्म व मरण कसे असेल? ।।५६।।

जन्ममृत्यापासून सुटला । या नाव जाणिजे मोक्ष जाला । तत्वें शोधितां पावला । तत्वतां वस्तु ।।५७।।

जो जन्ममरणाच्या चक्रातून सुटला तोच मुक्त. चौऱ्यांशी तत्त्वे अनात्म आहेत असा निर्णय ती तत्त्वे तपासताना होतो व 'तत्त्वाहून अलिप्त आत्मा मी आहे' अशी आत्मभेट होते. ।।५७।।

तेचि वस्तु ते आपण । हें माहावाक्याचें लक्षण । साधु करिती निरूपण । आपुलेन मुखें ।।५८।।

'तत् त्वम् असि' हे महावाक्य असून (छांदोग्य) 'ती आत्मवस्तू मी आहे' असा त्याचा अर्थ सद्‌गुरू परोपरीने समजावितात. ।।५८।।

जेचि क्षणीं अनुग्रह केला । तेचि क्षणीं मोक्ष जाला । बंधन कांहीं आत्मयाला । बोलोंचि नये ।।५९।।

सद्‌गुरू जेव्हा अशी कृपा करतात, त्या क्षणी मोक्ष मिळतो. कारण ब्रह्म किंवा आत्मा वस्तुत: कधीच बंधनात नसतो. बंधन कल्पित असते. ते खरे वाटणे हीच अविद्या. ती अविद्या महावाक्याच्या मननाने निवृत्त होते. ।।५९।।

आतां आशंका फिटली । संदेहवृत्ती मावळली । संतसंगें तत्काळ जाली । मोक्षपदवी ।।६०।।

आता श्रोत्याने विचारलेल्या शंकेचे उत्तर मिळाले. त्याच्या मनातील संशय गेला. संतसंगतीत तात्काळ मोक्ष मिळतो. ।।६०।।

स्वप्नामधें जो बांधला । तो जागृतीनें मोकळा केला । ज्ञानविवेकें प्राणीयाला । मोक्षप्राप्ती ।।६१।।

स्वप्नात 'मी बंधनात आहे' असा अनुभव घेणारा जागा होताच त्यातून सुटतो. तसा आत्मज्ञानाने जागा झालेला मुक्त होतो. ।।६१।।

अज्ञाननिसीचा अंतीं । संकल्पदु:खें नासती । तेणें गुणें होये प्राप्ती । तत्काळ मोक्षाची ।।६२।।

अज्ञानाची रात्र संपताच 'मी देह', जगत् सत्य इ. संकल्पजन्य दु:खे नष्ट होतात व त्यामुळे तेथल्या तेथे मोक्ष लाभतो.।।६२।।

तोडावया स्वप्नबंधन । नलगे आणीक साधन । तयास प्रेत्न जागृतीवीण । बोलोंचि नये ।।६३।।

स्वप्नामध्ये भासलेले बंधन तोडण्यासाठी इतर कोणत्याच साधनाची गरज नाही. 'जाग येणे' याशिवाय अन्य साधन असूच शकत नाही. ।।६३।।

तैसा संकल्पें बांधला जीव । त्यास आणीक नाहीं उपाव । विवेक पाहातां वाव । बंधन होये ।।६४।।

'एकोऽ हं' या मूळ संकल्पामुळे 'देहोऽहं' असा संकल्प जीवाला झाला. त्यानेच तो बांधला गेला. (मूळ अविद्या.) त्यातून सुटण्यासाठी 'मी ब्रह्म' हा विवेकच उपयोगी आहे. इतर प्रयत्न व्यर्थ जातात. ।।६४।।

विवेक पाहिल्याविण । जो जो उपाव तो तो सीण । विवेक पाहातां आपण । आत्माच असे ।।६५।।

विवेकावाचून केलेली कोणतीही मोक्षसाधना केवळ शीण देते. विवेक असे सांगतो की मी देहादी नसून आत्मा आहे. ब्याऐंशी तत्त्वे मी नाही. मी ब्रह्म आहे. ।।६५।।

आत्मयाचा ठाईं कांहीं । बद्ध मोक्ष दोनी नाहीं । जन्ममृत्य हें सर्वहि । आत्मत्वीं न घडे ।।६६।।

नित्यमुक्त आत्म्याला बंधन व मोक्ष दोन्ही नसतात. त्याला जन्म व मरण दोन्ही नसतात. ती जीवाला असतात. ।।६६।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मोक्षलक्षणनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'मोक्षलक्षण' नावाचा सातवा समास समाप्त.

दशक आठवा : मायोद्भव अथवा ज्ञानदशक

समास आठवा : आत्मदर्शन

॥ श्रीराम समर्थ ॥

मागां जालें निरूपण । परमात्मा तो तूंचि जाण । तया परमात्मयाचें लक्षण । तें हें ऐसें असे ।।१।।

जो परमात्मा तू आहेस असे मागील समासात सांगितले त्या परमात्म्याचे लक्षण कसे आहे ते आता सांगू. ॥१॥

जन्म नाहीं मृत्य नाहीं । येणें नाहीं जाणें नाही । बद्ध मोक्ष दोनी नाहीं । परमात्मयासी ।।२।।

परब्रह्मरूप परमात्म्याला जन्म, मृत्यू, अवतार, तिरोधान (अवतार समाप्ती) बंधन व मोक्ष यांतील काहीच नाहीत. (रामकृष्णादी अवतारांचे येणे-जाणे ईश्वराचे असते.) ॥२॥

परमात्मा निर्गुण निराकार । परमात्मा अनंत अपार । परमात्मा नित्य निरंतर । जैसा तैसा ।।३।।

ब्रह्म त्रिगुण वा यशादी गुणरहित, निराकार, अन्तपार नसलेले, नित्य, सत्य व विकारशून्य आहे. ॥३॥

परमात्मा सर्वांस व्यापक । परमात्मा अनेकीं येक । परमात्मयाचा विवेक । अतर्क्य आहे ।।४।।

ब्रह्म निरपेक्ष व्यापक, सर्व उपाधीत एकच असून 'ते असे आहे' असे ठामपणे सांगता येत नाही. तर्कापलीकडे आहे. ॥४॥

ऐसी परमात्मयाची स्थिती । बोलताती वेद श्रुती । परमात्मा पाविजे भक्तीं । येथें संशय नाहीं ।।५।।

वेद व श्रुती परमात्म्याचे स्वरूप याप्रमाणे सांगतात. नऊ भक्तीतील आत्मनिवेदनाने त्याचा अनुभव येतो, यात जराही शंका नाही. ॥५॥

तये भक्तीचें लक्षण । भक्ती नवविधा भजन । नवविधा भजनें पावन । बहु भक्त जाले ।।६।।

त्या भक्तीमध्ये नऊ पायऱ्या आहेत. त्यांच्या साह्याने आजपर्यंत अनेक उपासक भक्त झाले. भगवद्रूप झाले. ॥६॥

तया नवविधामध्यें सार । आत्मनिवेदन थोर । तयेचा करावा विचार । स्वानुभवें स्वयें ।।७।।

त्या नऊ पायऱ्यांमध्ये आत्मनिवेदन सर्वश्रेष्ठ असून त्याचे स्वरूप विचारपूर्वक अनुभवावे. जीव आत्म्यात निवेदावा. एकरूप करावा. ॥७॥

आपुलिया स्वानुभवें । आपणास निवेदावें । आत्मनिवेदन जाणावें । ऐसें असे ।।८।।

जीवरूप 'मी'चे आत्मरूपात ऐक्य साधावे. तसा स्वत: प्रत्यक्ष अनुभव घ्यावा. खरे आत्मनिवेदन ते हेच! ॥८॥

महत्पूजेचा अंतीं । देवास मस्तक वाहाती । तैसी आहे निकट भक्ती । आत्मनिवेदनाची ।।९।।

आपणांस निवेदिती । ऐसे भक्त थोडे असती । तयांस परमात्मा मुक्ती । तत्काळ देतो ।।१०।।

देवाची षोडशोपचारपूर्वक महापूजा केल्यावर त्याला शेवटी साष्टांग नमस्कार घालून जणू मस्तक वाहतात. (याचे अर्थांतर पुढेच सांगितले आहे.) पण असे भक्त फार कमी असतात. पण परमात्मा त्यांना तात्काळ मुक्त करतो. ॥९-१०॥

आपणास कैसें निवेदावें । कोठें जाऊन पडावें । किंवा मस्तक तोडावें । देवापुढें ।।११।।

श्रोता विचारतो– आपले आपण निवेदन कसे करावे? कोणत्या क्षेत्रात देहत्याग करावा? की आपले मस्तक आपणच शस्त्राने तोडून देवाला वहावे? ॥११॥

ऐसें ऐकोन बोलणें । वक्ता वदे सर्वज्ञपणें । श्रोतां सावधान होणें । येकाग्र चित्तें ।।१२।।

सर्वज्ञ वक्ता उत्तर देतो– हे श्रोते हो, अत्यंत सावधचित्ताने या प्रश्नांचे उत्तर ऐका. मन एकाग्र करा. ॥१२॥

आत्मनिवेदनाचें लक्षण । आधीं पाहावें मी कोण । मग परमात्मा निर्गुण । तो वोळखावा ।।१३।।

आत्मनिवेदनाचे स्वरूप असे की प्रथम 'मी' चा अत्यंत सूक्ष्म शोध घ्यावा. नंतर निर्गुण ब्रह्माचे स्वरूप शास्त्रशुद्ध रीतीने जाणून घ्यावे. ॥१३॥

देवाभक्ताचें शोधन । करितां होतें आत्मनिवेदन । देव आहे पुरातन । भक्त पाहे ।।१४।।

मीरूप 'भक्त' व ब्रह्मरूप 'देव' यांच्या आपापसातील नात्याचा शोध घेता घेता भक्त देवामध्ये हरवून जातो! अनादी देव मी आहे असा भक्त अनुभव घेतो. ॥१४॥

देवास वोळखों जातां । तेथें जाली तद्रूपता । देवभक्तविभक्तता । मुळींच नाहीं ।।१५।।

देवाचे स्वरूप समजावून घेता घेता समजावून घेणारा देवात विलीन होतो. देव व भक्त वेगळे कधीच नसतात. ॥१५॥

विभक्त नाहीं म्हणोन भक्त । बद्धन नाहीं म्हणोनि मुक्त । अयुक्त नाहीं बोलणें युक्त । शास्त्राधारें ।।१६।।

जो देवाहून विभक्त नाही म्हणजे वेगळा नाही तोच भक्त! जो कधीच बद्ध नसतो तोच मुक्त. हे माझे बोलणे अत्यंत शास्त्रशुद्ध असल्याने मुळीच अयोग्य नाही. यथार्थ आहे. ॥१६॥

देवाभक्ताचें पाहातां मूळ । होये भेदाचें निर्मूळ । येक परमात्मा सकळ । दृश्यावेगळा ।।१७।।

ब्रह्मचैतन्य (देव) व जीवचैतन्य (उपासक) यांत चैतन्य समान (मूळ) असल्याने भेदाला जागाच नाही. जीवाची उपाधी शरीर व ईश्वराची उपाधी ब्रह्मांड या सर्व दृश्याहून देव संपूर्ण अलिप्त आहे. उपाधी मिथ्या आहे. ॥१७॥

तयासि होतां मिळणी । उरी नाहीं दुजेपणीं । देवभक्त हे कडसणी । निरसोन गेली ।।१८।।

उपाधीचा निरास होताच तथाकथित दोन चैतन्ये एक झाल्यावर देव व भक्त हा भेद रहात नाही. ॥१८॥

आत्मनिवेदनाचे अंतीं । जें कां घडलीं अभेद भक्ती । तये नाव सायोज्यमुक्ती । सत्य जाणावी ।।१९।।

आत्मनिवेदन घडताच जी अभेदरूप भक्ती सिद्ध होते, तिलाच सायुज्यमुक्ती म्हणतात यात शंका नाही. ॥१९॥

जो संतांस शरण गेला । अद्वैतनिरूपणें बोधला । मग जरी वेगळा केला । तरी होणार नाहीं ।।२०।।

जो श्रीगुरूंना शरण जाऊन त्यांचेकडून अद्वैताचा बोध दृढ करून घेतो तो कितीही प्रयत्न केला तरी देवाहून भिन्न होत नाही. ॥२०॥

नदी मिळाली सागरीं । ते निवडावी कोणेपरी । लोहो सोनें होतां माघारी । काळिमा न ये ।।२१।।

नदी समुद्राला मिळाल्यावर तिचे पाणी समुद्राच्या पाण्यातून वेगळे कसे करणार? परिसस्पर्शाने लोखंडाचे सोने झाल्यावर ते अग्नीत तापविले तरी पूर्वीप्रमाणे काळे होत नाही. ॥२१॥

तैसा भगवंतीं मिळाला । तो नवचे वेगळा केला । देव भक्त आपण जाला । विभक्त नव्हे ।।२२।।

त्याप्रमाणे जो भगवद्रूप होतो त्याला भगवंतापासून वेगळा करता येत नाही. तो व देव एक होतात. वेगळे रहात नाहीत. ॥२२॥

देव भक्त दोनी येक । ज्यासी कळला विवेक । साधुजनीं मोक्षदायेक । तोचि जाणावा ।।२३।।

वस्तुत: देव व भक्त मूळचेच एक असतात. संतांच्या संगतीत राहिल्यानंतर मोक्ष देणारा केवळ विवेकच आहे तो जाणून घ्यावा. ॥२३॥

आतां असो हें बोलणें । देव पाहावा भक्तपणें । तेणें त्यांचें ऐश्वर्य बाणे । तत्काळ आंगीं ।।२४।।

तात्पर्य असे की उपासकाने देवाचा शोध घेण्यासाठी त्याचेशी एकरूप व्हावे. म्हणजे अजत्व, अमरत्व, अनादित्व, व्यापकत्व, पूर्णत्व इ. त्याची ऐश्वर्ये लाभतात. ॥२४॥

देहचि होऊन राहिजे । तेणें देहदु:ख साहिजे । देहातीत होतां पाविजे । परब्रह्म तें ।।२५।।

जो 'मी देह' या भ्रमात राहतो त्याला देहतादात्म्यामुळे देहाची दु:खे भोगावी लागतात. ते तादात्म्य सोडताच ब्रह्मत्व येते. ॥२५॥

देहातीत कैसें होणें । कैसें परब्रह्म पावणें । ऐश्वर्याचीं लक्षणें । कवण सांगिजे ।।२६।।

ऐसें श्रोतां आक्षेपिलें । याचें उत्तर काये बोलिलें । तेंचि आतां निरोपिलें । सावध ऐका ।।२७।।

श्रोता– देहतादात्म्य कसे सोडावे? त्यामुळे ब्रह्मत्व कसे येते? त्याच्या ऐश्वर्याची लक्षणे कोणती? या श्रोत्याच्या प्रश्नाचे उत्तर आता एकाग्र चित्ताने ऐका. ॥२६-२७॥

देहातीत वस्तु आहे । तें तूं परब्रह्म पाहें । देहसंग हा न साहे । तुज विदेहासी ।।२८।।

परब्रह्म नावाचे देहाहून भिन्न, तरी देहात व्यापून राहणारे, असे एक तत्त्व निश्चितपणे आहे. ते परब्रह्म तू आहेस. खरे तर देहातीत असलेल्या तुला 'देहाचा संग' ही भाषासुद्धा सहन होऊ नये! ॥२८॥

ज्याची बुद्धी होये ऐसी । वेद वर्णिती तयासी । शोधितां नाना शास्त्रांसी । न पडे ठाईं ।।२९।।

'मी ब्रह्म आहे' असा सहज निश्चय झालेल्याची वेदसुद्धा स्तुती करतात. (केन ४-६) न्याय, पूर्व मीमांसा, सांख्य इ. शास्त्रांना त्याच्या स्थितीचा अंदाजही येत नाही. ॥२९॥

ऐश्वर्य ऐसें तत्वता । बाणे देहबुद्धि सोडितां । देह मी ऐसें भावितां । अधोगती ।।३०।।

देहबुद्धी सोडताच असे माहात्म्य लाभते. त्याउलट 'मी देह' ही देहबुद्धी धरताच जन्ममरण, द्वंद्वे इ. अधोगती होते. ॥३०॥

याकारणें साधुवचन । मानूं नये अप्रमाण । मिथ्या मानितां दूषण । लागों पाहे ।।३१।।

म्हणून गुरुवाक्यावर अविश्वास धरू नये. ते वाक्य चूक आहे मानले तर अधोगतीचा दोष येतो. ॥३१॥

साधुवचन तें कैसें । काये धरावें विश्वासें । येक वेळ स्वामी ऐसें । मज निरोपावें ।।३२।।

श्रोता– सद्‌गुरुवाक्य कोणते? त्यावरील विश्वासाचे स्वरूप काय आहे? ते एकदा, हे गुरुदेवा, मला सांगावे. ॥३२॥

सोहं आत्मा स्वानंदघन । अजन्मा तो तूंचि जाण । हेंचि साधूचें वचन । सदृढ धरावें ।।३३।।

वक्ता– 'कोणत्याही रूपाने व्यक्त न होणारा (अजन्मा) व विषयनिरपेक्ष आनंदाने परिपूर्ण असलेला व ज्याचे 'सोऽहं' असे ध्यान केले जाते, तो आत्मा तू आहेस' असे गुरुवाक्य मननाने बुद्धीत ठसवून घ्यावे. ॥३३॥

महावाक्याचें अंतर । तूंचि ब्रह्म निरंतर । ऐसिया वचनाचा विसर । पडोंचि नये ।।३४।।

महावाक्याचे वाच्य व लक्ष्य अंतरंग असे सांगतात की 'तू सतत ब्रह्मरूप आहेस. हे वाक्य कधीच विसरू नये. ('ते तू आहेस' हे एक महावाक्य आहे. त्याच्या अंतरंगात वाच्यार्थ व लक्ष्यार्थ दडलेले आहेत. ते असे– 'तू' 'वाच्यार्थाने' जीव असून लक्ष्यार्थाने कूटस्थ चैतन्य (आत्मा) आहेस. 'ते' वाच्यार्थाने ईश्वर असून लक्ष्यार्थाने ब्रह्म आहे. आत्मा व ब्रह्म निरुपाधिक असून त्यांचे सहजच ऐक्य आहे. दोन्हीतील लक्ष्यांचे ऐक्य आहे). ॥३४॥

देहासि होईल अंत । मग मी पावेन अनंत । ऐसें बोलणें निभ्रांत । मानूंचि नये ।।३५।।

'माझे शरीर मरण पावल्यानंतर मी ब्रह्मरूप होईन' असा विचार मुळीच खरा मानू नये. ।।३५।।

येक मूर्ख ऐसें म्हणती । माया नासेल कल्पांतीं । मग आम्हांस ब्रह्मप्राप्ती । येरवीं नाहीं ।।३६।।

याही पलीकडे काही मूर्ख असे मानतात की कल्पाच्या शेवटी मायाच नष्ट झाल्यावर आम्ही ब्रह्मरूप होऊ. तोपर्यंत नाही. ।।३६।।

मायेसी होईल कल्पांत । अथवा देहासी येईल अंत । तेव्हां पावेन निवांत । परब्रह्म मी ।।३७।।

कल्पान्ती माया नष्ट झाल्यावर किंवा देहाला मरण आल्यावर माझे शांतब्रह्माशी ऐक्य साधेल. ।।३७।।

हें बोलणें अप्रमाण । ऐसें नव्हे समाधान । समाधानाचें लक्षण । वेगळेंचि असे ।।३८।।

हे बोलणे शास्त्र व अनुभव यांचे विरुद्ध असून त्याने शाश्वत समाधान होत नाही. शाश्वत समाधानाचा मार्ग वेगळाच आहे. ।।३८।।

शैन्य अवघेंचि मरावें । मग राज्यपद प्राप्त व्हावें । शैन्य अस्तांचि राज्य करावें । हें कळेना ।।३९।।

भरती झालेले सर्व सैनिक मेल्यावर विजय मिळून राज्यावर बसावे की सैन्यसंभारासह राज्य करावे हेही समजत नाही! (देह व जगतात राहूनच मोक्षसुख भोगावे.) ।।३९।।

माया असोनिच नाहीं । देह असतांच विदेही । ऐसें समाधान कांहीं । वोळखावें ।।४०।।

अनिर्वचनीय माया आहे व नाही! देह जिवन्त असून देहतादात्म्य नसेल तर त्या स्थितीतील समाधान लक्षात घ्यावे. देह मायेप्रमाणे आहेही व नाहीही! ।।४०।।

राज्यपद हातासी आलें । मग परिवारें काय केलें । परिवारा देखतां राज्य गेलें । हें तों घडेना ।।४१।।

राज्यावर बसल्यावर सैन्यादी परिवार असल्याने काय बिघडते? परिवाराने राजावर दृष्टी टाकल्याने किंवा तो राजाने पाहिल्याने राज्य जाते असे कधीच होत नाही. परिवार राजाच्या स्वाधीन असतो. तशी जीवन्मुक्ताच्या माया स्वाधीन असते. ।।४१।।

प्राप्त जालियां आत्मज्ञान । तैसें दृश्य देहभान । दृष्टीं पडतां समाधान । जाणार नाहीं ।।४२।।

आत्मज्ञान झाल्यानंतर देह व जगत् यांचे अस्तित्व जाणवले तरी झालेले समाधान मोडणार नाही. ।।४२।।

मार्गीं मुळी सर्पाकार । देखतां भये आलें थोर । कळतां तेथीचा विचार । मग मारणें काये ।।४३।।

रस्त्याने चालत असता सर्पाच्या आकाराची काठी पाहिली व फार भीति वाटली. पण नीट पाहिल्यावर हा साप नसून काठी आहे असे कळल्यावर मारण्यासाठी काय उरले? ।।४३।।

तैसी माया भयानक । विचार पाहातां माईक । मग तयेचा धाक । कासया धरावा ।।४४।।

त्याप्रमाणे मायिक देह व जगत् यांच्या माध्यमातून भयंकर दुःखे भोगावी लागतात. पण मायेचे स्वरूप कळल्यानंतर दुःखांची भीती वाटण्याचे काय कारण? ।।४४।।

देखतां मृगजळाचे पूर । म्हणे कैसा पावों पैलपार । कळतां तेथीचा विचार । सांकडें कैंचें ।।४५।।

समोर पाण्याचा महापूर पाहून पलीकडे कसा जाणार असा प्रश्न पडला. पण ते मृगजळ आहे हे कळल्यावर कसला प्रश्न? ।।४५।।

देखतां स्वप्न भयानक । स्वप्नीं वाटे परम धाक । जागृती आलीयां साशंक । कासया व्हावें ।।४६।।

स्वप्नात अत्यंत भीतिदायक दृश्य दिसले व फार भीति वाटली. पण जाग आल्यावर भिण्याचे काय कारण? ।।४६।।

तथापी माया कल्पनेसी दिसे । आपण कल्पनेतीत असे । तेथें उद्वेग काईसे । निर्विकल्पासी ।।४७।।

मायिक दृश्य जगत् ही कल्पनेची निर्मिती आहे. पण आत्मरूप 'मी' त्या कल्पनेहून भिन्न आहे. त्या निर्विकल्पाला

उद्वेग का होईल? ॥४७॥

अंतीं मती तेचि गती । ऐसें सर्वत्र बोलती । तुझा अंतीं तुझी प्राप्ती । सहजचि जाली ।।४८।।

मृत्यूच्या क्षणी जो संकल्प होतो, त्यानुसार त्या जीवाला गती मिळते हे प्रसिद्ध आहे. पण ज्या क्षणी संकल्पाचाच लोप होतो. त्या क्षणी तुझ्या जीवभावाचा लोप झाल्याने आत्माच प्राप्त होतो. ॥४८॥

चौदेहाचा अंत । आणी जन्म मुळाचा प्रांत । अंतांप्रांतासी अलिप्त । तो तूं आत्मा ।।४९।।

स्थूलादी चार देहांचा व जन्माला कारण होणाऱ्या अहंकाराचा लय झाल्यावर देह व अहंकार यापासून अलिप्त असलेला आत्मा हेच तुझे स्वरूप आहे. ॥४९॥

जयासी ऐसी आहे मती । तयास ज्ञानें आत्मगती । गती आणी अवगती । वेगळाचि तो ।।५०।।

या स्वरूपाविषयी ज्याचा सहज निश्चय झालेला आहे, (सांख्यबुद्धी-गीता) त्याला त्या ज्ञानाने मोक्षच मिळतो. तो जन्ममरणादी गती व परोक्षज्ञान याहून वेगळाच असतो. (अवगती म्हणजे अवगत होणे. कळणे. अधोगती नव्हे.) ॥५०॥

मति खुंटली वेदांची । तेथें गती आणी अवगती कैंची । आत्मशास्त्रगुरुप्रचितीची । ऐक्यता आली ।।५१।।

या स्वरूपाचा विचार करताना वेदांची बुद्धी थकली. त्याला गती व वृत्तिज्ञान कोठून असणार? स्वरूपाचा अनुभव आला असता श्रीगुरुवाक्य वेदान्तशास्त्र व आत्मानुभव या तिन्हीत सुसंवाद असतो. अनुभवात तिन्हींचा परिपाक होतो. तिन्ही जणू एक होतात. ॥५१॥

जीवपणाची फिटली भ्रांती । वस्तु आली आत्मप्रचिती । प्राणी पावला उत्तम गती । सद्‌गुरुबोधें ।।५२।।

'मी जीव' हा भ्रम गेला. आत्मस्वरूपाचा 'मी' असा अनुभव आला. हे सर्व श्रीगुरूंच्या बोधाने होऊन मोक्ष मिळतो. ॥५२॥

सद्‌गुरुबोध जेव्हां जाला । चौदेहांस अंत आला । तेणें निजध्यास लागला । सस्वरूपीं ।।५३।।

सद्‌गुरुमुखातून 'ते तू आहेस' हे महावाक्य ऐकल्यावर चार देहावरील ममत्व व तादात्म्य गेले व आत्मस्वरूपाचे अखंड अनुसंधान लागले. ॥५३॥

तेणें निजध्यासें प्राणी । ध्येयंचि जाला निर्वाणीं । सायोज्यमुक्तीचा धनी । होऊन बैसला ।।५४।।

त्या अनुसंधानामुळे ध्याता (जीव) ध्येयाकार (आत्मा) झाला. सायुज्यमुक्तीचा धनी झाला. 'आनंदाचें स्थळ' झाला. ॥५४॥

दृश्य पदार्थ वोसरतां । आवघा आत्माचि तत्वता । नेहटून विचारें पाहातां । दृश्य मुळींच नाही ।।५५।।

दृश्य सृष्टीचा विचाराने बाध केला असता सर्वत्र आत्माच आत्मा भरलेला होतो. पृथ्वीपासून उलट्याक्रमाने तत्त्वात तत्त्वाचा लय केल्यावर दृश्य शिल्लक रहात नाही. ॥५५॥

मिथ्या मिथ्यत्वें पाहिलें । मिथ्यापणें अनुभवा आलें । श्रोतीं पाहिजे ऐकिलें । या नाव मोक्ष ।।५६।।

मिथ्या सृष्टीकडे मिथ्यत्वाच्या नजरेने पहाता पहाता मिथ्यत्वाचा अनुभव येतो. श्रोत्यांनी हे नीट ऐकावे की यालाच मोक्ष म्हणतात. ॥५६॥

सद्‌गुरुवचन हृदईं धरी । तोचि मोक्षाचा अधिकारी । श्रवण मनन केलेंचि करी । अत्यादरें ।।५७।।

'ब्रह्म सत्य व जगत् मिथ्या' हा सद्‌गुरूंचा उपदेश सतत लक्षात ठेवून ऐकलेले पुन्हा पुन्हा श्रद्धेने ऐकतो व त्यावर केलेला साधकबाधक विचार पुन्हा पुन्हा करतो त्याला मोक्षाचा अधिकार प्राप्त होतो. ॥५७॥

जेथें आटती दोनी पक्ष । तेथें लक्ष ना अलक्ष । या नाव जाणिजे मोक्ष । नेमस्त आत्मा ।।५८।।

मायेचे मिथ्यत्व व तत्सापेक्ष ब्रह्माचे सत्यत्व हे दोन्ही पक्ष अनुभवरूप जीवन्मुक्तीत लुप्त होतात. जीवभावातून केलेल्या साधनेसाठी मायिक पदार्थ लक्ष्य असून ब्रह्म अलक्ष्य आहे असा केलेला विचारही मावळतो. हाच खरा आत्मानुभवरूप मोक्ष. ।।५८।।

जेथें ध्यान धारणा सरे । कल्पना निर्विकल्पीं मुरे । केवळ ज्ञेप्तिमात्र उरे । सूक्ष्म ब्रह्म ।।५९।।

अलक्ष्य ब्रह्माला आलंबन देऊन त्यावर केलेली ध्यानधारणा अनुभवात हरवून जाते! 'मी ब्रह्म' ही साधनारूप कल्पना सुद्धा निर्विकल्पात लुप्त होते. केवळ शुद्धज्ञान उरते. सूक्ष्म ब्रह्माचे ज्ञाता व ज्ञेयावाचून केवळ ज्ञान हे स्वरूप आहे. ।।५९।।

भवमृगजळ आटलें । लटिकें बंधन सुटलें । अजन्म्यास मुक्त केलें । जन्मदुःखापासुनी ।।६०।।

मृगजळासारखा असणारा संसार जणू आटला! जे नव्हतेच ते बंधन सुटले. जो जीवरूपाने कधीच जन्माला येत नाही, त्याला जन्ममरणांच्या दुःखातून सोडवले! ।।६०।।

निःसंगाची संगव्याधी । विदेहाची देहबुध्दी । विवेकें तोडिली उपाधी । निःप्रपंचाची ।।६१।।

मुळात असंग आत्म्यास देहादिकांच्या संगातून जणू सोडविले. ज्या आत्म्याला कधीच देह नाही त्याची देहतादात्म्यातून सुटका केली. जो प्रपंच कधीच नसतो, त्या प्रपंचाच्या उपाधीतून निरुपाधिक आत्म्याची मुक्तता केली! ।।६१।।

अद्वैताचें तोडिले द्वैत । येकांतास दिला येकांत । अनंतास दिला अंत । अनंताचा ।।६२।।

'अद्वैत' हा शब्द उच्चारताच द्वैत उफाळते. ते छाटून टाकले. लोकांन्त सापेक्ष एकान्ताला कायमचे कोपऱ्यात टाकले! सान्त सापेक्ष अनंताचा अंत केला!! ।।६२।।

जागृतीस चेवविलें । चेईऱ्यास सावध केलें । निजबोधास प्रबोधिलें । आत्मज्ञान ।।६३।।

जागृतीला जागे केले, जो दुसऱ्यांना जागा करतो, त्याला जाग आणली, ब्रह्मानुभवाला अध्यात्मविद्या समजावून सांगितली! ।।६३।।

अमृतास केलें अमर । मोक्षास मुक्तीचें घर । संयोगास निरंतर । योग केला ।।६४।।

अमृताला अमरत्व बहाल केले, मोक्षाची मुक्तीच्या घरात स्थापना केली. अखंड ब्रह्माशी जीवाला जोडून दिले. (ब्रह्मात जीव हा खंड वस्तुतः कधीच पडत नाही). ।।६४।।

निर्गुणास निर्गुण केलें । सार्थकाचे सार्थक जालें । बहुतां दिवसां भेटलें । आपणासि आपण ।।६५।।

जे स्वरूपानेच निर्गुण आहे त्याला 'तू निर्गुण आहेस' असा अनुभव दिला. मोक्ष हे मानवी जीवनाचे सार्थक आहे. नित्यमुक्ताला मुक्त करून सार्थकाचे सार्थक केले. फार फार दिवसांनी माझ्याशी माझी भेट झाली! ।।६५।।

तुटला द्वैताचा पडदा । अभेदें तोडिलें भेदा । भूतपंचकाची बाधा । निरसोन गेली ।।६६।।

कल्पित द्वैताच्या कल्पनेचे आवरण दूर केले. अभेदनिश्चयाने भेदाला संपवले. पंचमहाभूतांनी झपाटलेल्या जीवाला सोडविले. ।।६६।।

जालें साधनाचें फळ । निश्चळास केलें निश्चळ । निर्मळाचा गेला मळ । विवेकबळें ।।६७।।

श्रीगुरूंनी दिलेल्या साधनेला यश आले. अचल ब्रह्माचे अचलत्व अनुभवले. ब्रह्माला झाकून टाकणारा मायेचा मळ विवेकाने धुऊन टाकला. ।।६७।।

होतें सन्निध चुकलें । ज्याचें त्यास प्राप्त जालें । आपणा देखतां फिटलें । जन्मदुःख ।।६८।।

अति जवळ असून दूर वाटत होते ते व जे त्याचेच होते ते त्याला मिळाले. ('तद् दूरे' तद्वन्तिके– ईश.उप.) जो जन्मदु:ख भोगत होता, त्याचे ते दु:ख आत्मदर्शनाने नष्ट झाले. ॥६८॥

दुष्ट स्वप्नें जाजावला । ब्राह्मण नीच याती पावला । आपणासि आपण सांपडला । जागेपणें ।।६९।।

षट्कर्मे व्यवस्थित पार पाडणाऱ्या ब्राह्मणाला स्वप्नात आपण चांडाळकर्म करीत असल्याचे पाहून दु:ख झाले. पण जाग येताच पुन्हा तो ब्राह्मण झाला! ॥६९॥

ऐसें जयास जालें ज्ञान । तया पुरुषाचें लक्षण । पुढिले समासीं निरूपण । बोलिलें असे ।।७०।।

ज्या महात्म्याला असे ज्ञान झाले आहे, त्याची लक्षणे पुढील समासात सांगितली आहेत. ॥७०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आत्मदर्शननाम' समास आठवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आत्मदर्शन' नावाचा आठवा समास समाप्त

दशक आठवा : मायोद्भव अथवा ज्ञानदशक

समास नववा : सिद्धलक्षण

॥श्रीरामसमर्थ॥

अंतरीं गेलियां अमृत । बाह्य काया लखलखित । अंतरस्थिति बाणतां, संत– । लक्षणें कैसीं ।।१।।

असे म्हणतात की स्वर्गात अमृतसेवनानंतर बाहेरील शरीरही तेज:पुंज होते. त्याप्रमाणे ब्रह्मानुभवाने मोक्षस्थिती बाणलेल्या संतांची स्थिती पुढीलप्रमाणे असते. (पहा– गीता– स्थितप्रज्ञलक्षणे, ज्ञान लक्षणे.) ॥१॥

जालें आत्मज्ञान बरवें । हे कैसेनि पां जाणावें । म्हणोनि बोलिलीं स्वभावें । साधुलक्षणें ।।२।।

जसे झाले पाहिजे तसे आत्मज्ञान झाले आहे की नाही हे ओळखण्यासाठी जीवन्मुक्ताची लक्षणे आता विषयाच्या ओघात सांगू.॥२॥

ऐक सिद्धांचे लक्षण । सिद्ध म्हणिजे स्वरूप जाण । तेथें पाहातां वेगळेपण । मुळींच नाहीं ।।३।।

ज्याचे जीव व ब्रह्म यांचे मूळचे ऐक्य सिद्धीला गेले आहे, तो सिद्ध. तो व ब्रह्म यात कोणताच फरक शिल्लक रहात नाही. कारण फरक मूळचाच नसतो. ॥३॥

स्वरूप होऊन राहिजे । तया नांव सिद्ध बोलिजे । सिद्धस्वरूपींच साजे । सिद्धपण ।।४।।

जो स्वरूपाकार होऊन रहातो तो सिद्ध. सिद्ध ही पदवी त्यालाच शोभते. ॥४॥

वेदशास्त्रीं जें प्रसिद्ध । सस्वरूप स्वतसिद्ध । तयासिच बोलिजे सिद्ध । अन्यथा न घडे ।।५।।

नित्यसिद्ध, आद्य, नित्य इ. प्रकारे वेदान्तशास्त्र ज्याचे वर्णन करते त्या ब्रह्माशी जो दृढ व अपरिवर्तनीय ऐक्य साधतो त्यालाच सिद्ध म्हणावे. दुसऱ्याला नाही. ॥५॥

तथापी बोलों कांहीं येक । साधकास कळाया विवेक । सिद्धलक्षणाचें कौतुक । तें हें ऐसें असे ।।६।।

आत्मानुभव स्वसंवेद्य असला तरी त्या सिद्धाची काही लक्षणे साधकाला तो ओळखू यावा म्हणून सांगू. ती वैशिष्ट्ये अशी– ॥६॥

अंतरस्थित स्वरूप जाली । पुढें काया कैसी वर्तली । जैसी स्वप्नींची नाथिली । स्वप्नरचना ।।७।।

त्याची अंतरस्थिती स्वरूपाकार झाल्यानंतर त्याच्या शरीराचे सर्व व्यवहार स्वप्नातील भ्रामक दृश्यांप्रमाणे असतात. ॥७॥

तथापी सिद्धांचें लक्षण । कांहीं करूं निरूपण । जेणें बाणे अंतर्खूण । परमार्थाची ।।८।।

असे असले तरी मोक्षाचे स्वरूप (परमार्थ) लक्षात येण्यासाठी व त्याच्या खाणाखुणा कळण्यासाठी काही वर्णन करू. ॥८॥

सदा स्वरूपानुसंधान । हें मुख्य साधूचें लक्षण । जनीं असोन आपण । जनावेगळा ।।९।।

जो सतत स्वरूपानुसंधानात राहतो तो साधू. हे त्याचे मुख्य लक्षण आहे. लोकव्यवहारात राहूनही तो अनासक्त असतो. ॥९॥

स्वरूपीं दृष्टी पडतां । तुटोन गेली संसारचिंता । पुढें लागली ममता । निरूपणाची ।।१०।।

अंत:करण वृत्तीला सतत शुद्ध जाणिवेचे अनुसंधान असल्याने संसाराविषयी अनुकूल प्रतिकूल चिंतन घडत नाही. उरलेले आयुष्य सगुण व निर्गुणाच्या श्रवणात किंवा त्याचे निरूपण सांगण्यात खर्च होते. त्याची गोडी वाटते. ।।१०।।

हें साधकाचें लक्षण । परी सिद्धाआंगीं असे जाण । सिद्धलक्षण साधकेंविण । बोलोंच नये ।।११।।

तसे पाहिले तर हे साधकाचे लक्षण आहे. पण सिद्धांनाही ते असते. सिद्ध लक्षणांत काही साधक लक्षणांचा समावेश असतोच. ।।११।।

बाह्य साधकाचे परी । आणि स्वरूपाकार अंतरीं । सिद्धलक्षण तें चतुरीं । जाणिजे ऐसें ।।१२।।

त्याचे बाह्य वर्तन साधकाप्रमाणे दिसते, पण आत स्वरूपस्थिती अखंड असते. सुज्ञांनी हे लक्षात ठेवावे. बहिरंगाने चकू नये. ।।१२।।

संदेहरहित साधन । तेंचि सिद्धांचें लक्षण । अंतर्बाह्य समाधान । चळेना ऐसें ।।१३।।

जीवाच्या मूळच्या ब्रह्मस्वरूपाविषयी जराही संशय नसताना व तो अनुभव आलेला असूनही साधना करतो तो सिद्ध! लोकव्यवहार व अंत:करण या दोन्हीमुळे त्याचे समाधान बिघडत नाही. ।।१३।।

अचळ जाली अंतरस्थिती । तेथें चळणास कैंची गती । स्वरूपीं लागतां वृत्ती । स्वरूपचि जाली ।।१४।।

प्रज्ञा आत्मस्वरूपी स्थित झाल्याने चांचल्य जराही नसते. बुद्धिवृत्ती स्वरूपाकार होऊन स्वरूपच झाली. ।।१४।।

मग तो चळतांच अचळ । चंचळपणें निश्चळ । निश्चळ असोन, चंचळ– । देह त्याचा ।।१५।।

नंतर त्याच्या देहाने कितीही हालचाल केली तरी तो स्थिर असतो. चंचळतेत निश्चळता सांभाळली जाते. आत्मा निश्चळ तर देह मात्र चंचळ दिसतो. ।।१५।।

स्वरूपीं स्वरूपचि जाला । मग तो पडोनिच राहिला । अथवा उठोनि पळाला । तरी चळेना ।।१६।।

स्वरूपाकार झाल्यानंतर तो आळशाप्रमाणे पडून राहिला किंवा सतत कार्यमग्न राहिला (पळाला) तरी तो निश्चळ असतो. ।।१६।।

येथें कारण अंतरस्थिती । अंतरींच पाहिजे निवृत्ती । अंतर लागलें भगवंतीं । तोचि साधु ।।१७।।

या सर्वांत अंतरस्थितीचेच खरे महत्त्व आहे. अंत:करण जर मायिक प्रपंचापासून नित्य निवृत्त राहून भगवंताच्या अनुसंधानात रहात असेल तर तेथे साधुत्व आहे. ।।१७।।

बाह्य भलतैसें असावें । परी अंतर स्वरूपीं लागावें । लक्षणें दिसती स्वभावें । साधुआंगीं ।।१८।।

बहिरंग पाहिले तर 'हा मुक्त' अशी कोणतीच लक्षणे दिसत नाहीत. शरीर, शिक्षण, परिस्थिती, कुटुंब, पोषाख इत्यादिकांत अत्यंत विविधता असू शकते. पण अंतरंग मात्र स्वरूपानुभवाने भरून गेलेले असते. ('अंतस्त्यागी बहिर्भोगी लोके विहर राघव' योग-वासिष्ठ). याचा परिणाम म्हणून त्याच्या स्वभावात व मनोरचनेत असलेली काही लक्षणे त्याच्या प्रदीर्घ सहवासात राहिल्यानंतर लक्षात येतात. ।।१८।।

राजीं बैसतां अवलिळा । आंगीं बाणे राजकळा । स्वरूपीं लागतां जिव्हाळा । लक्षणें बाणती ।।१९।।

सत्ता मिळाली की सत्ताधीशांची लक्षणे सहजच अंगी बाणतात, त्याप्रमाणें सुस्थिर स्वरूपानुभवामुळे स्थितप्रज्ञाची, ज्ञान्याची, भक्ताची, वैराग्याची लक्षणें अंगी बाणतात. ।।१९।।

येरव्ही अभ्यास करितां । हातां न चढती सर्वथा । स्वरूपीं राहावें तत्वतां । स्वरूप होऊनी ।।२०।।

ही लक्षणे अंगी बाणण्यासाठी कृत्रिमपणाने त्यांचा सराव करून मुळीच उपयोग होत नाही. स्वरूपस्थिती प्राप्त होताच ती आपोआप अंगी मुरतात. ।।२०।।

अभ्यासाचा मुगुटमणी । वृत्ती राहावी निर्गुणीं । संतसंगें निरूपणीं । स्थिती बाणे ।।२१।।

अंत:करणवृत्ती शुद्ध जाणिवेच्या अनुसंधानात ठेवता येणे हा सर्वश्रेष्ठ अभ्यास आहे. संतांच्या मुखातून झालेल्या सततच्या श्रवणाने हे साध्य होते. ॥२१॥

ऐसीं लक्षणें बरवीं । स्वरूपाकारें अभ्यासावीं । स्वरूप सोडितां गोसावी । भांबावती ।। २२।।

स्वरूपाकार रहाण्याचा अभ्यास हाच ती सुलक्षणे अंगी बाणवण्याचा अभ्यास होय! स्वरूपस्थितीतून बाजूला होताच वैराग्यसंपन्न साधक सुद्धा मूळ स्वभावावर जातात. ॥२२॥

आतां असो हें बोलणें । ऐका साधूचीं लक्षणें । जेणें समाधान बाणे । साधकाआंगीं ।। २३।।

आता हा आनुषंगिक विषय पुरे. साधकाला साधूची लक्षणे ओळखता येऊन समाधान वाटेल, अशा रीतीने ती आता सांगू. ॥२३॥

स्वरूपीं भरतां कल्पना । तेथें कैची उरेल कामना । म्हणौनियां साधुजना । कामचि नाहीं ।। २४।।

'हे असावे किंवा असे नसावे' असा काम साधूला नसतो. कारण कामाला कारण असलेली कल्पना स्वरूपात लीन झाल्यावर काम करील कोण? संकल्प कोणाला होईल? (स्वत:च्या स्वार्थासाठी अगर सुखासाठी तो नसतो. भगवंताचे कार्य व लोकोद्धारासाठी तो असू शकतो.) ॥२४॥

कल्पिला विषयो हातींचा जावा । तेणें गुणें क्रोध यावा । साधुजनाचा अक्षै ठेवा । जाणार नाहीं ।। २५।।

ज्याची इच्छा केली तो विषय मिळता मिळता दुरावला तर सामान्याला संताप येतो. पण साधूला सुखरूप व चिरंतन आत्मा लाभला असल्याने तो कधीच दुरावत नाही. ॥२५॥

म्हणोनि ते क्रोधरहित । जाणती स्वरूप संत । नासिवंत हे पदार्थ । सांडुनियां ।। २६।।

म्हणून त्यांना कधीच क्रोध येत नाही. (ते क्रोध 'आणू' शकतात!) कारण विनाशी वस्तूंचा काम सुटून अविनाशी स्वरूपाचे त्यांना ज्ञान झालेले असते. ॥२६॥

जेथें नाहीं दुसरी परी । क्रोध यावा कोणावरी । क्रोधरहित सचराचरीं । साधुजन वर्तती ।। २७।।

क्रोध दुसऱ्याचा येतो. जेथे दुसरे असे काही नाहीच त्या आत्मस्थितीत कोणावर संतापावे? साधू आत्मस्वरूपाप्रमाणे चराचर सृष्टी व्यापून क्रोधरहित जीवन जगतात. ॥२७॥

आपुला आपण स्वानंद । कोणावरी करावा मद । याकारणें वादवेवाद । तुटोन गेला ।। २८।।

स्वरूपानंदात रममाण झालेल्या जीवन्मुक्ताला सत्ता, संपत्ती, बुद्धिमत्ता इत्यादींचा अहंकार नसतो. दर्प किंवा घमेंड नसते. त्यामुळे वाद घालण्याची खुमखुमी नसते. ॥२८॥

साधु स्वरूप निर्विकार । तेथें कैंचा तिरस्कार । आपला आपण मत्सर । कोणावरी करावा ।। २९।।

भेदशून्य व निर्विकार स्वरूपाच्या अनुभवामुळे तिरस्कार व मत्सर हे विकार नसतात. अभेदात मत्सरासाठी कोण दुसरा आहे? ॥२९॥

साधु वस्तु अनायासें । याकारणें मत्सर नसे । मदमत्सराचें पिसें । साधुसी नाहीं ।। ३०।।

अखंड ब्रह्म हे साधूचे स्वरूप बनते. त्यामुळे मत्सर व मद यांचेसाठी दुसऱ्या व्यक्तीचे खंड नसतात. (खंड = भाग, भेद, द्वैत) म्हणून ते मदमत्सराने धुमसत नाहीत. ॥३०॥

साधु स्वरूप स्वयंभ । तेथें कैचा असेल दंभ । जेथें द्वैताचा आरंभ । जालाच नाहीं ।। ३१।।

दंभ हा नेहमी दुसऱ्याला दाखवण्यासाठी असतो. द्वैतरहित नित्यसिद्ध स्वरूपात दुसरा कोणीच नसल्याने दंभ कसा असेल? ॥३१॥

जेणें दृश्य केलें विसंच । तयास कैंचा हो प्रपंच । याकारणें नि:प्रपंच । साधु जाणावा ।। ३२।।

ज्याने दृश्य सृष्टीची घडी मोडली आहे, त्याला प्रपंच कोठला? त्यामुळे साधू प्रपंचात कधीच लिप्त होऊन रहात नाही. लोकांच्या मते तो प्रापंचिक असतो. पारमार्थिक दृष्टीने नसतो. (उदा. तुकाराम, एकनाथ) ॥३२॥

अवघे ब्रह्मांड त्याचें घर । पंचभूतिक हा जोजार । मिथ्या जाणोन सत्वर । त्याग केला ।।३३।।

याकारणें लोभ नसे । साधु सदा निर्लोभ असे । जयाची वासना समरसे । शुद्धस्वरूपीं ।।३४।।

पंचमहाभूतांचे ठिसूळ जग मिथ्या आहे हे जाणून त्याविषयी वैराग्य धरून जो विश्वव्यापी होऊन रहातो, त्याला लोभ स्पर्श करीत नाही. त्याची वासना ब्रह्मात लीन होते. ॥३३-३४॥

आपुला आपण आघवा । स्वार्थ कोणाचा करावा । म्हणोनि साधु तो जाणावा । शोकरहित ।।३५।।

साधू ब्रह्माप्रमाणे एकमेव अद्वितीय असल्याने स्वार्थासाठी धन, सत्ता, घर, शेत इ. वेगळेपणाने काहीच नसते. त्यामुळे तो स्वार्थरहित असतो. ॥३५॥

दृश्य सांडून नासिवंत । स्वरूप सेविलें शाश्वत । याकारणें शोकरहित । साधु जाणावा ।।३६।।

शोकें दुखवावी वृत्ती । तरी ते जाहाली निवृत्ती । ह्मणौनि साधु आदिअंतीं । शोकरहित ।।३७।।

होऊन गेलेल्या अगर संभाव्य घटनेचा शोक होतो. सर्व घटना जगात घडतात. विनाशी जगाचा त्याग करून शाश्वत ब्रह्माचा अनुभव घेतल्याने जग व जगातील घटना मिथ्या ठरतात. वृत्तीचा देहरूप जगातच समावेश होत असल्याने तीही मिथ्या ठरते. त्यामुळे शोकासाठी जग व वृत्तीच उरत नाही! म्हणून साधूला शोक नसतो. ॥३६-३७॥

मोहें झळंबावें मन । तरी तें जाहालें उन्मन । याकारणें साधुजन । मोहातीत ।।३८।।

मनाची मोहामुळे चलबिचल होते. साधूचे मन उन्मन झाल्याने त्याला मोह होत नाही. ते मोहातीत असतात. ॥३८॥

साधु वस्तु अद्वये । तेथें कैंचें वाटेल भये । परब्रह्म तें निर्भये । तोचि साधु ।।३९।।

याकारणें भयातीत । साधु निर्भय निवांत । सकळांस मांडेल अंत । साधु अनंतरूपी ।।४०।।

सत्यस्वरूपें अमर जाला । भये कैंचें वाटेल त्याला । याकारणें साधुजनाला । भयेचि नाहीं ।।४१।।

एकाला दुसऱ्याची भीती वाटते. ब्रह्मात दुसरे काही नसते. म्हणून ब्रह्मानुभवी साधूला कोणाची भीती वाटणार? असा भयरहित साधू शांत असतो. मायिक जगाचा नाश होणार हे ठरलेले असले तरी साधू अविनाशीच असतो. सर्वांना मरणाची भीती वाटते. साधू सत्य व अमृत ब्रह्माशी एकरूप झाल्याने त्याला मरणाचे भय नसते. ॥३९-४१॥

जेथें नाहीं द्वंद्वभेद । आपला आपण अभेद । तेथे कैंचा उठेल खेद । देहबुद्धीचा ।।४२।।

बुद्धीनें नेमिलें निर्गुणा । त्यास कोणीच नेईना । याकारणें साधुजना । खेदचि नाहीं ।।४३।।

फायदा व तोटा इ. द्वंद्वामुळे माणसाला खेद किंवा दु:ख होते. एकमेव अखंड ब्रह्मात द्वंद्व (दोन) नाही. ब्रह्मानुभव घेतल्यानंतर देहबुद्धी नष्ट झाल्याने दु:ख होत नाही. ज्या निर्गुणाला कोणी कोठे नेणे शक्य नाही, ते निर्गुण बुद्धीत ठसल्यावर दु:खाचे कारणच नाही. ॥४२-४३॥

आपण येकला ठाईंचा । स्वार्थ करावा कोणाचा । दृश्य नस्तां स्वार्थाचा । ठावचि नाहीं ।।४४।।

'मी एकमेव आहे' असा निर्णय झाल्यावर स्वार्थासाठी दुसरे काहीच नसते. दृश्य जगत् बाधित केल्याने स्वार्थाला वावच मिळत नाही. ॥४४॥

साधु आपणाचि येक । तेथें कैंचा दु:खशोक । दुजेविण अविवेक । येणार नाहीं ।।४५।।

अविवेक हे शोकाचे व दु:खाचे कारण आहे. विवेक, म्हणजे निवड करण्यासाठी किमान दोन पदार्थ लागतात. जेथे ब्रह्म ही एकच वस्तू अनुभवाला येते तेथे अविवेकाला किंवा विवेकालाही वावच नसतो. म्हणून साधूला दु:ख व शोक नसतात. ॥४५॥

आशा धरितां परमार्थाची । दुराशा तुटली स्वार्थाची । म्हणोन नैराशता साधूची । वोळखण ।।४६।।

केवळ मोक्षाची इच्छा धरल्याने स्वार्थाची हाव नष्ट होते. म्हणून साधू वैराग्यसंपन्न असतो. तो त्यावरून ओळखावा.।।४६।।

मृदपणें जैसें गगन । तैसें साधूचें लक्षण । याकारणें साधुवचन । कठीण नाहीं ।।४७।।

आकाश जसे कोणालाच टोचत नाही, त्याप्रमाणे साधूचे शब्द कोणालाही झोंबत नाहीत. ।।४७।।

स्वरूपाचा संयोगीं । स्वरूपचि जाला योगी । याकारणें वीतरागी । निरंतर ।।४८।।

जीवाचा स्वरूपाशी संयोग झाल्याने योगी झालेला साधु तो मिथ्या जगताविषयी सतत अनासक्त असतो. (राग = प्रेम. वीतराग = प्रेम नसलेला = अनासक्त.) ।।४८।।

स्थिती बाणतां स्वरूपाची । चिंता सोडिली देहाची । याकारणें होणाराची । चिंता नसे ।।४९।।

देहबुद्धी नष्ट होऊन आत्मबुद्धी स्थिर झाल्याने देह व देहसापेक्ष प्रपंचाची त्याला काळजी वाटत नाही. म्हणून 'आता काय होणार, माझे कसे होणार' इ. विवंचना त्याला नसतात. ।।४९।।

स्वरूपीं लागतां बुद्धी । तुटे अवघी उपाधी । याकारणें निरोपाधीं । साधुजन ।।५०।।

स्वरूप निरुपाधिक आहे. तेथे बुद्धी स्थिर झालेल्या साधूची उपाधी सुटल्याने तेही निरुपाधिक होतात. ।।५०।।

साधु स्वरूपींच राहे । तेथें संगचि न साहे । म्हणोनि साधु तो न पाहे । मानापमान ।।५१।।

दुसऱ्याच्या संगतीत गेल्यानंतर मान व अपमान होणे शक्य असते. साधूने संगरहित स्वरूपाशी ऐक्य साधल्याने त्याला संगत हा शब्दही कळत नाही! म्हणून त्याचे मानापमान होत नाहीत. ।।५१।।

अलक्षास लावी लक्ष । म्हणोन साधु परम दक्ष । वोढूं जाणती कैपक्ष । परमार्थाचा ।।५२।।

स्वसंवेद्य ब्रह्माशी अंत:करण वृत्तीचे ऐक्य झाल्याने साधू सतत सावध असतो. (स्वस्वरूपी सावधपण । ते चि ज्ञानाचे लक्षण । ''पंच समासी''. `Awareness'– जे. कृष्णमूर्ती. शुद्ध जाणिवेचे सतत भान असणे.) शुद्ध परमार्थाच्या बाजूने ठामपणे उभे राहिले पाहिजे याचे त्याला भान असते. ।।५२।।

स्वरूपीं न साहे मळ । ह्मणौन साधु तो निर्मळ । साधु स्वरूपचि केवळ । म्हणोनियां ।।५३।।

ब्रह्म विमल असल्याने मळरहित असते. साधू ब्रह्मरूप होऊन रहात असल्याने तोही तसाच निर्मळ असतो. ।।५३।।

सकळ धर्मांमधें धर्म । स्वरूपीं राहाणें हा स्वधर्म । हेंचि जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचें ।।५४।।

स्वरूपाकार होऊन रहाणें हा सर्वश्रेष्ठ स्वधर्म आहे. इतर सर्व धर्म गौण आहेत. अशी धार्मिकता हे साधूच्या लक्षणांचे वर्म आहे. ।।५४।।

धरितां साधूची संगती । आपषाच लागे स्वरूपस्थिती । स्वरूपस्थितीनें बाणती । लक्षणें आंगीं ।।५५।।

अशा साधूच्या संगतीत अधिकारसंपन्न होऊन यथार्थश्रवण झाल्यावर सहजच त्याची स्थिती लाभते व त्या स्थितीची लक्षणेही अंगी बाणतात. ।।५५।।

ऐसीं साधूचीं लक्षणें । आंगीं बाणती निरूपणें । परंतु स्वरूपीं राहाणें । निरंतर ।।५६।।

ही साधूची लक्षणे निरूपणात ऐकल्यावर अंगी बाणणे शक्य आहे. पण त्यासाठी सतत स्वरूपाकार वृत्तीने राहिले पाहिजे. ।।५६।।

निरंतर स्वरूपीं राहातां । स्वरूपचि होईजे तत्वतां । मग लक्षणें आंगीं बाणतां । वेळ नाहीं ।।५७।।

सतत स्वरूपाकार वृत्ती ठेविली तर स्वरूपच होऊन रहाता येते. नंतर ती लक्षणे अंगी बाणण्यास उशीर लागत

नाही. ॥५७॥

स्वरूपीं राहिल्यां मती । अवगुण अवघेचि सांडती । परंतु यासी सत्संगती । निरूपण पाहिजे ।।५८।।

वृत्ती निर्मळस्वरूपाकार होऊन राहिल्यास मोहिनी, राक्षसी, आसुरी इ. प्रवृत्ती नष्ट होतात. पण असे होण्यासाठी ज्यात सतत कर्म, उपासना, वैराग्य, योग व वेदान्त यांचे निरूपण चालते, असा सत्संग असावा लागतो. ॥५८॥

सकळ सृष्टीचा ठाईं । अनुभव येकचि नाहीं । तो बोलिजेल सर्वही । पुढिले समासीं ।।५९।।

जगात जे परमार्थाच्या संदर्भात विचार सांगितले जातात, त्यांत अत्यंत विविधता आहे. ती सर्व विविधता पुढील समासात सांगू. ॥५९॥

कोणें स्थितीनें राहाती । कैसा अनुभव पाहाती । रामदास म्हणे श्रोतीं । अवधान देणें ।।६०।।

असे विचार करणारे कोणत्या स्थितीत असतात, त्यांच्या अनुभवाचे स्वरूप काय ते आता श्रोत्यांनी लक्षपूर्वक ऐकावे असे मी रामदास आपणाला म्हणतो. ॥६०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सिद्धलक्षणनाम' समास नववा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सिद्धलक्षण' नावाचा नववा समास समाप्त.

दशक आठवा : मायोद्भव अथवा ज्ञानदशक

समास दहावा : शून्यत्वनिरसन

॥ श्रीराम समर्थ ॥

जनाचे अनुभव पुसतां । कळहो उठिला अवचिता । हा कथाकल्लोळ श्रोतां । कौतुकें ऐकावा ।।१।।

लोकांना परमार्थाच्या संदर्भात प्रश्न विचारले असता मोठे वादविवाद झडतात. त्यांच्या विचारांच्या एकामागून एक उठणाऱ्या लाटांचे स्वरूप आता उत्सुकतेने ऐका. ॥१॥

येक म्हणती हा संसारु । करितां पाविजे पैलपारु । आपला नव्हे कीं जोजारु । जीव देवाचे ।।२।।

कोणी म्हणतात– (हे पुढील सर्व ओव्यांच्या सुरुवातीचे पालूपद आहे. अर्थ करताना ते पुन्हा पुन्हा लिहिलेले नाही.) आपापला संसार करीत असतानाच तो तरून जावा. सर्व जीव देवाचे अंश असल्याने संसार करण्याचे ओझे आपल्यावर नाही. कुटुंबसेवा हीच ईश्वरसेवा होय. ॥२॥

येक म्हणती हें न घडे । लोभ येऊन आंगीं जडे । पोटस्तें करणें घडे । सेवा कुटुंबाची ।।३।।

हे म्हणणे योग्य नाही. प्रत्यक्षात लोभामुळे व चरितार्थासाठी कुटुंबाची सेवा केली जाते. ॥३॥

येक म्हणती स्वभावें । संसार करावा सुखें नावें । कांहीं दानपुण्य करावें । सद्‌गतीकारणें ।।४।।

खरे तर सुखाने संसार करीत सद्‌गती मिळण्यासाठी त्या संसाराचाच एक भाग म्हणून (नावे) यथाशक्ती दाने देऊन पुण्य जोडावे. ॥४॥

येक म्हणती संसार खोटा । वैराग्यें घ्यावा देशवटा । येणें स्वर्गलोकींच्या वाटा । मोकळ्या होती ।।५।।

नीट विचार केला तर हा संसार मायिक आहे. संन्यास घेऊन दूरदेशी गेले म्हणजे स्वर्गाची प्राप्ती होते. वाट सापडते. ॥५॥

येक म्हणती कोठें जावें । वेर्थची कासया हिंडावें । आपुले आश्रमीं असावें । आश्रमधर्म करूनी ।।६।।

असे फिरण्याची मुळीच गरज नाही. त्या त्या आश्रमात त्याचे नियम पाळून जीवन जगावे. ॥६॥

येक म्हणतीं कैंचा धर्म । अवघा होतसे अधर्म । ये संसारीं नाना कर्म । करणें लागे ।।७।।

आश्रमादी सांगणाऱ्या धर्मात काहीच अर्थ नाही. सर्वत्र अधर्माचे साम्राज्य आहे. संसारामध्ये सतत कार्यमग्न रहावे लागते. ॥७॥

येक म्हणती बहुतांपरी । वासना असावी बरी । येणेंचि तरिजे संसारीं । अनायासें ।।८।।

जीवमात्राच्या भल्याची इच्छा करीत जगावे. एवढ्यानेच हा संसारसागर तरून जाता येतो. ॥८॥

येक म्हणती कारण भाव । भावेंचि पाविजे देव । येर हें अवघेंचि वाव । गथागोवी ।।९।।

सद्‌गतीसाठी फक्त भावाची गरज आहे. त्यानेच देव मिळतो. इतर सर्व प्रकार निरर्थक आहेत. ॥९॥

येक म्हणती वडिलें जीवीं । अवघीं देवचि मानावीं । मायेबापें पूजित जावीं । येकाभावें ।।१०।।

घरातील वडीलधारी मंडळी व मातापिता यांना देव मानून त्यांची त्याच भावाने पूजा करण्यात कल्याण आहे. ॥१०॥

येक म्हणती देवब्राह्मण । त्यांचें करावें पूजन । मायेबाप नारायेण । विश्वजनाचा ।।११।।

देव व ब्राह्मणांच्या रूपाने नारायण रहातो. त्या विश्वाचा जनिता व पोशिंदा असलेल्या देवब्राह्मणांची पूजा करावी. ॥११॥

येक म्हणती शास्त्र पाहावें । तेथें निरोपिलें देवें । तेणें प्रमाणेंचि जावें । परलोकासी ।।१२।।

ईश्वराने सांगितलेल्या वेदशास्त्रांचा अभ्यास करून त्याप्रमाणे आचरण करून परलोकाची प्राप्ती करावी. ॥१२॥

येक म्हणती अहो जना । शास्त्र पाहातां पुरवेना । याकारणें साधुजना । शरण जावें ।।१३।।

पण शास्त्राचा पसारा फार मोठा असून ते समजतही नाही. यासाठी साधुसंतांना शरण जावे. ॥१३॥

येक म्हणती सांडा गोठी । वायांचि करितां चाउटी । सर्वांस कारण पोटीं । भूतदया असावी ।।१४।।

या सर्वांत खरोखर अर्थ नाही. हे सर्व प्रलाप थांबवून भूतांविषयी दया दाखवावी. सर्व कल्याण त्यांत आहे. ॥१४॥

येक म्हणती येकचि बरवें । आपुल्या आचारें असावें । अंतकाळीं नाम घ्यावें । सर्वोत्तमाचें ।।१५।।

ज्याने त्याने आपापली कर्तव्यकर्मे करीत असावे. हेच सर्वांत चांगले, मृत्यूच्या वेळी परमेश्वराचे नाव घेऊन शेवटचा श्वास सोडावा. ॥१५॥

येक म्हणती पुण्य असेल । तरीच नाम येईल । नाहीं तरी भुली पडेल । अंतकाळीं ।।१६।।

अहो पण गाठी पुण्य असेल तरच अंतकाळी मुखात परमेश्वराचे नाम येईल! पुण्य नसेल तर त्याचा विसर पडेल. ॥१६॥

येक म्हणती जीत असावें । तंवचि सार्थक करावें । येक म्हणती फिरावें । तीर्थाटण ।।१७।।

अंतकाळाचा विचार करणे चूक आहे. जिवंत असतानाच मोक्ष प्राप्त करून घ्यावा. (उत्तरार्ध पुढील अर्थात–) ॥१७॥

येक म्हणती हें अटाटी । पाणीपाषाणाची भेटी । चुबकुळ्या मारितां हिंपुटी । कासाविस व्हावें ।।१८।।
येक म्हणतीं सांडीं वाचाळी । अगाध महिमा भूमंडळीं । दर्शनमात्रें होये होळी । माहापातकाची ।।१९।।
येक म्हणती तीर्थ स्वभावें । कारण मन अवरावें । येक म्हणती कीर्तन करावें । सावकास ।।२०।।

सतत तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेत असावे. पण अशी ही यातायात करून काय उपयोग? तीर्थक्षेत्रात नदी किंवा सरोवराचे रूपाने पाणी व देवाच्या रूपात दगड यांचीच भेट होते! त्या पाण्यात डुबक्या खाऊन का गुदमरावे? अहो ही बडबड बंद करा! या पृथ्वीवर तीर्थक्षेत्रांचे अपार माहात्म्य असून त्यांचे दर्शन होता क्षणी जन्मोजन्मीची महापापे भस्म होतात! खरे म्हणाल तर शमदमाने शुद्ध झालेले स्वत:चे मन हेच तीर्थ! देवाच्या प्रसन्नतेसाठी कीर्तन करावे. ॥१८-२०॥

येक म्हणती योग बरवा । मुख्य तोचि आधीं साधावा । देहो अमरचि करावा । अकस्मात ।।२१।।

योगसाधनाच श्रेष्ठ आहे. तो मुख्य असून तो सिद्ध झाल्यावर अचानक देह अमर करून घ्यावा! ॥२१॥

येक म्हणती ऐसें काये । काळवंचना करूं नये । येक म्हणती धरावी सोये । भक्तिमार्गाची ।।२२।।

या मार्गात मुळीच वेळ घालवू नये. योगाभ्यास न करता भक्तिमार्गाची कास धरावी. ॥२२॥

येक म्हणती ज्ञान बरवें । येक म्हणती साधन करावें । येक म्हणती मुक्त असावें । निरंतर ।।२३।।
येक म्हणती अनर्गळा । धरीं पापाचा कंटाळा । येक म्हणती रे मोकळा । मार्ग आमुचा ।।२४।।
येक म्हणतीं हें विशेष । करूं नये निंदा द्वेष । येक म्हणती सावकास । दुष्टसंग त्यागावा ।।२५।।
येक म्हणती ज्याचें खावें । त्या सन्मुखचि मरावें । तेणें तत्काळचि पावावें । मोक्षपद ।।२६।।
येक म्हणती सांडा गोठी । आधीं पाहिजे ते रोटी । मग करावी चाउटी । सावकास ।।२७।।
येक म्हणती पाउस असावा । मग सकळ योग बरवा । कारण दुष्काळ न पडावा । म्हणिजे बरें ।।२८।।
येक म्हणती तपोनिधी– । होतां, वोळती सकळ सिद्धी । येक म्हणती रे आधीं । इंद्रपद साधावें ।।२९।।
येक म्हणती आगम पाहावा । वेताळ प्रसन्न करून घ्यावा । तेणें पाविजे देवा । स्वर्गलोकीं ।।३०।।

येक म्हणती अघोरमंत्र । तेणें होईजे स्वतंत्र । श्रीहरी जयेचा कळत्र । तेचि वोळे ।।३१।।
ती लागले सर्व धर्म । तेथें कैंचें क्रियाकर्म । येक म्हणती कुकर्म । तिच्या मदें ।।३२।।
येक म्हणती येक साक्षप । करावा मृत्युंजयाचा जप । तेणें गुणें सर्व संकल्प । सिद्धीतें पावती ।।३३।।
येक म्हणती बटु भैरव । तेणें पाविजे वैभव । येक म्हणती झोटिंग सर्व । पुर्वितसे ।।३४।।
येक म्हणती काळी कंकाळी । येक म्हणती भद्रकाळी । येक म्हणती उचिष्ट चांडाळी । साहें करावी ।।३५।।
येक म्हणती विघ्नहर । येक म्हणती भोळा शंकर । येक म्हणती सत्वर । पावे भगवती ।।३६।।
येक म्हणती मल्लारी । सत्वरचि सभाग्य करी । येक म्हणती माहा बरी । भक्ति वेंकटेशाची ।।३७।।
येक म्हणती पूर्व ठेवा । येक म्हणती प्रेत्न करावा । येक म्हणती भार घालावा । देवाचवरी ।।३८।।
येक म्हणती देव कैंचा । अंतचि पाहातो भल्यांचा । येक म्हणती हा युगाचा । युगधर्म ।।३९।।
येक आश्चीर्य मानिती । येक विस्मयो करिती । येक कंटाळोन म्हणती । काये होईल तें पाहावें ।।४०।।

'आत्मज्ञानच सर्वांत चांगले. पण नुसते शब्द काय उपयोगाचे? प्रत्यक्ष साधना करावी.' 'ह्यातील कांहीच न करता मोकळेपणाने जीवन जगावे.' 'अहो मोकाट! पापकर्म कधी करू नका.' 'हे तुम्ही कोण सांगणार? आमचा मार्ग आम्हाला मोकळा आहे.' 'हे सर्वच सोडून द्या. फक्त कोणाची निंदा व द्वेष न करता दुर्जनांची संगत टाळा म्हणजे पुरे.' 'आम्हाला असे वाटते की ज्या देवाचे वा धन्याचे अन्न आम्ही खातो त्याचे समोर मरण आले की मोक्ष ठेवलेला!' कोणाला वाटते की अन्नाशिवाय जीवन अशक्य आहे. म्हणून दुष्काळ नको असेल तर पाऊस पडला म्हणजे सर्व ठीक होते. कोणी म्हणतात की घोर तपश्चर्या करून सर्व सिद्धी मिळवाव्यात. कोणाला इंद्रपदाचेच फार महत्त्व वाटते. एक म्हणतात की तंत्रमार्गाने वेताळ प्रसन्न करून त्याच्या मदतीने स्वर्गात देवपद मिळवावे. कोणी म्हणतात की अघोर मंत्राच्या अनुष्ठानाने लक्ष्मीला प्रसन्न करून स्वावलंबी जीवन जगावे. तिच्या आश्रयाने सर्व धर्म रहातात. पण तिचा मद चढला तर क्रियाभ्रष्ट होतात त्याचे काय? कोणी म्हणते की महामृत्युंजय मंत्राचा जप केला तर सर्व इच्छा पूर्ण होतात. तोच सतत करावा. बटुक भैरवाच्या (उज्जैन) मंत्राने सर्व वैभव मिळते. झोटिंग प्रसन्न झाला तर हवी ती सामुग्री तो आणून देतो. कोणाला वाटते की काली, कंकाळी, भद्रकाली व उष्टे मागून खाणाऱ्या चांडाळीचे साह्य घ्यावे. कोणी गणपती, भोळा शंकर किंवा लवकर प्रसन्न होणाऱ्या भगवतीची उपासना सांगतात. ''मल्हारीच्या उपासनेने भाग्य लवकर उदयाला येते.'' ''तिरुपतीच्या व्यंकटेशाची उपासना सर्वांत चांगली'' कोणाला वाटते की पूर्व सुकृताशिवाय काहीच होत नाही. दुसरा म्हणतो की त्याच्या जोडीला अखंड प्रयत्न हवेत. तिसरा म्हणतो, सर्व भार देवावर घालावा. कोणी म्हणतात की देवाच्या घरी न्याय नाही. तो सज्जनांनाच अतिशय छळतो. 'कलियुगात हे असेच असावयाचे' असे दुसरे त्याचे स्पष्टीकरण देतात! कोणाला एकूणच देव व त्याचे जग ह्यांचे फार आश्चर्य वाटते. दुसऱ्यांना त्याची नवलाई चकित करते. तिसरे वैतागून 'जे होईल ते होईल' असे म्हणतात. ॥२३-४०॥

ऐसे प्रपंचिक जन । लक्षणें सांगतां गहन । परंतु कांहीं येक चिन्ह । अल्पमात्र बोलिलें ।।४१।।

प्रापंचिक अज्ञानी लोकांची ही मतमतांतरे सांगून संपणार नाहीत. पण थोडक्यात ती सांगितली. ॥४१॥

आतां असो हा स्वभाव । ज्ञात्यांचा कैसा अनुभव । तोहि सांगिजेल सर्व । सावध ऐका ।।४२।।

अज्ञानी असेच असणार! पण शास्त्र जाणणाऱ्यांची मतमतांतरे कशी आहेत ती सर्व आता सावधपणे ऐका. ॥४२॥

येक म्हणती करावी भक्ती । श्रीहरी देईल सद्‌गती । येक म्हणती ब्रह्मप्राप्ती । कर्मेंचि होये ।।४३।।

कोणी म्हणतात की श्रीहरीची भक्ती केली तर तोच मुक्ती देईल. दुसरा म्हणतो की वेदानुसारी कर्म निष्काम केले तरच ब्रह्मज्ञान होते. (ह्यामुळे एकेकाचे मत सांगताना सुरुवातीला– अशी खूण केली आहे) ॥४३॥

येक म्हणती भोग सुटेना । जन्ममरण हें तुटेना । येक म्हणती उर्मी नाना । अज्ञानाच्या ।।४४।।

–जन्मोजन्मीच्या पापपुण्यामुळे येणारे सुखदु:खांच्या भोगांचे चक्र अनिवार असल्याने जन्ममरणातून सुटका होणे शक्य नाही- शोक, मोह, तहान, भूक, जरा व मरण ह्या अज्ञानाच्या सहा ऊर्मी अटळपणे उठतच रहाणार. ॥४४॥

येक म्हणती सर्व ब्रह्म । तेथें कैंचे क्रियाकर्म । येक म्हणती हा अधर्म । बोलोंचि नये ।।४५।।
येक म्हणती सर्व नासे । उरलें तेंचि ब्रह्म असे । येक म्हणती ऐसें नसे । समाधान ।।४६।।
सर्व ब्रह्म केवळ ब्रह्म । दोनी पूर्वपक्षाचे भ्रम । अनुभवाचें वेगळें वर्म । म्हणती येक ।।४७।।
येक म्हणती हें न घडे । अनुर्वाच्य वस्तु घडे । जें बोलतां मोन्य पडे । वेदशास्त्रांसी ।।४८।।
तव श्रोता अनुवादला । म्हणे निश्चये कोण केला । सिद्धांतमतें अनुभवाला । उरी कैंची ।।४९।।
अनुभव देहीं वेगळाले । हें पूर्वीच बोलिलें । आतां कांहीं येक केलें । नवचे कीं ।।५०।।
येक साक्षत्वें वर्तती । साक्षी वेगळाची म्हणती । आपण द्रष्टा ऐसी स्थिती । स्वानुभवाची ।।५१।।
दृश्यापासून द्रष्टा वेगळा । ऐसी अलिप्तपणाची कळा । आपण साक्षत्वें निराळा । स्वानुभवें ।।५२।।
सकळ पदार्थ जाणतां । तो पदार्थाहून पर्ता । देहीं असोन अलिप्तता । सहजचि जाली ।।५३।।
येक ऐसें स्वानुभवें । म्हणती साक्षत्वें वर्तावें । दृश्य असोनि वेगळें व्हावें । द्रष्टेपणें ।।५४।।
येक म्हणती नाहीं भेद । वस्तु ठाईंची अभेद । तेथें कैंचा मतिमंद । द्रष्टा आणिला ।।५५।।
अवघी साकरचि स्वभावें । तेथें कडु काय निवडावें । द्रष्टा कैंचा स्वानुभवें । अवघेंचि ब्रह्म ।।५६।।
प्रपंच परब्रह्म अभेद । भेदवादी मानिती भेद । परी हा आत्मा स्वानंद । आकारला ।।५७।।
विघुरलें तुप थिजलें । तैसें निर्गुणचि गुणा आलें । तेथें काये वेगळें केलें । द्रष्टेपणें ।।५८।।
म्हणौनि द्रष्टा आणि दृश्य । अवघा येकचि जगदीश । द्रष्टेपणाचे सायास । कासयासी ।।५९।।
ब्रह्मचि आकारलें सर्व । ऐसा येकांचा अनुभव । ऐसे हे दोनी स्वभाव । निरोपिले ।।६०।।
अवघा आत्मा आकारला । आपण भिन्न कैंचा उरला । दुसरा अनुभव बोलिला । ऐसियापरी ।।६१।।
ऐक तिसरा अनुभव । प्रपंच सारूनियां सर्व । कांहीं नाहीं तोचि देव । ऐसें म्हणती ।।६२।।
दृश्य अवघें वेगळें केलें । केवळ अदृश्यचि उरलें । तेंचि ब्रह्म अनुभविलें । म्हणती येक ।।६३।।

–'सर्वं खल्विदं ब्रह्म' दृश्य व अदृश्य सर्व ब्रह्मरूप असल्यामुळे व ते निष्क्रिय असल्यामुळे त्यांत सोळा संस्कारांसारख्या क्रिया व स्नानादी कर्मे संभवत नाहीत– हा विचार धर्माला बुडविणारा असल्याने त्याचा विचारही करू नये– सर्व दृश्य जगताचा नाश झाल्यावर जे उरते ते अनायासे ब्रह्म असते– ह्या विचारात चालू जीवन समाधानात जाण्याची व्यवस्था नाही.– जगतासह ब्रह्म व शुद्ध ब्रह्म ह्या दोन्ही कल्पना पूर्वपक्षीय भ्रमामुळें मांडतात. ब्रह्मानुभवाचे रहस्य वेगळेच आहे–

ज्या ब्रह्मासंबंधी 'हे असे ब्रह्म' ह्या भाषेत वेदांना काहीच सांगता येत नाही त्या स्वसंवेद्य ब्रह्माचा अनुभव येणें शक्य नाही– ह्यावर श्रोता विचारतो की मग ह्या मतमतांतराविषयी निर्णय करणारे कोण आहे? उत्तरमीमांसा शास्त्र सांगते की अनुभव घेणाराला अनुभव घेतला असे सांगता येत नाही– 'पिंडे पिंडे मतिर्भिन्न:' असे पूर्वापारपासून सांगितले जाते. म्हणून आता त्याला कोण काय करणार!– आत्म्याला साक्षी म्हणतात. त्याच्या अनुसंधानात रहाणारे दृष्य जगाकडे अलिप्ततेने पहातात. त्या दृष्टीमागील द्रष्टा मी आहे असा अनुभव सांगतात– जे जे पदार्थ जाणले जातात त्याहून ब्रह्म पलीकडे (सूक्ष्म, अधिष्ठान, प्रकाशक) असते. देह हा पदार्थच असल्याने ब्रह्म देहाहून अलिप्त आहे हे वेगळे सांगावयास नको.– ह्या प्रकारचा स्वानुभव घेऊन असे सांगतात की देहादी दृश्यापासून अलिप्त राहून द्रष्टाभाव सांभाळून रहावे– ब्रह्मस्वरूपात मूळचाच भेद नसल्याने (अखंड) त्यांत द्रष्टा दृश्य व दर्शन अशी त्रिपुटी केवळ मंद बुद्धीचेच आणू शकतात. पसाभर साखरेत कडू कण कसा निवडणार? सर्व ब्रह्मात द्रष्टा कोठून आणणार?– परब्रह्म व प्रपंच (कार्यब्रह्म) ह्यांत वस्तुत: अभेद असून द्वैती त्यांत भेद मानतात. खरे तर आनंदघन

आत्माच जगत्‌रूपाने साकार झाला आहे. किंवा पातळ तूप थिजल्यावर वेगळे वाटते त्याप्रमाणे निर्गुण साकार झाल्यावर भिन्न भासते. त्यामुळें द्रष्टा व दृश्य जगदीशरूप असताना द्रष्टेपणा सांभाळण्याचे कष्ट करण्यात काय अर्थ आहे? सर्व ब्रह्मवादी व भेदवादी (अद्वैत व द्वैत) असे हे दोन मुख्य आध्यात्मिक प्रवाह सांगून झाले. सर्व आत्मरूप असताना 'मी' असा वेगळा कसा उरेल? असा हा दुसरा मतप्रवाह आहे. सर्व दृश्यसृष्टी विचाराने दूर सारून पाहिले तर 'काही नाही' असा अनुभव येतो. हा तिसरा (शून्यवादी) मतप्रवाह आहे. त्यालाच ते देव म्हणतात. ।।४५-६३।।

परी तें ब्रह्म म्हणों नये । उपायासारिखा अपाये । सुन्यत्वास ब्रह्म काये । म्हणों येईल ।।६४।।

पण तो देव असणे शक्य नाही. रोगाचा उपाय व अपाय सारखे कसे असतील? शून्य व ब्रह्म एकच कसे असतील? ।।६४।।

दृश्य अवघें वोलांडिलें । अदृश्य सुन्यत्वीं पडिलें । ब्रह्म म्हणौनि मुरडलें । तेथुनिच मागे ।।६५।।

ध्यानाभ्यासामध्ये क्रमाने स्थूलादी चार देह (दृश्य) मागे टाकल्यावर त्यांचा निरास होऊन 'काही नाही' असा शून्यानुभव येतो. किंवा विचाराने पंचमहाभूतांचा स्थूलापासून (पृथ्वी) सूक्ष्मापर्यन्त (आकाश) निरास केल्यानंतर 'काही नाही' असा शून्यानुभव येतो. ते शून्य हेच ब्रह्म असे समजून शून्यवादी तेथून मागे फिरतात. देहावर येतात. ।।६५।।

इकडे दृश्य तिकडे देव । मध्यें सुन्यत्वाचा ठाव । तयास मंदबुद्धीस्तव । प्राणी ब्रह्म ह्मणे ।।६६।।

शून्याच्या अनुभवाच्या अलीकडे जे असते ते सर्व ज्ञानेंद्रिये किंवा अन्त:करण ह्यांना कळण्यासारखे असल्यामुळे त्याला 'दृश्य' म्हणतात. शून्यानुभवापलीकडे न कळण्यासारखा आत्मा किंवा देव असतो. असे हे दृश्य व देव ह्यांच्यामध्ये शून्य अनुभवाला येते. शास्त्रसंस्कार व श्रीगुरुप्रसादाने संस्कारित नसलेली बुद्धी शून्यालाच ब्रह्म समजते. ।।६६।।

रायास नाहीं वोळखिलें । सेवकास रावसें कल्पिलें । परी तें अवघें वेर्थ गेलें । राजा देखतां ।।६७।।

राजाला न ओळखून सेवकालाच राजा समजणाऱ्याला नंतर राजाची ओळख झाली की सेवकाचे राजेपण नष्ट होते! ।।६७।।

तैसें सुन्यत्व कल्पिलें ब्रह्म । पुढें देखतां परब्रह्म । सुन्यत्वाचा अवघा भ्रम । तुटोन गेला ।।६८।।

त्याप्रमाणे ब्रह्म न ओळखून शून्यालाच ब्रह्म समजणाऱ्याला नंतर ब्रह्मानुभव आला की 'शून्य हेच ब्रह्म' असा झालेला भ्रम निघून जातो. ।।६८।।

परी हा सूक्ष्म आडताळा । वारी विवेकें वेगळा । जैसें दुग्ध घेऊन, जळा– । राजहंस सांडी ।।६९।।

पाणी वगळून दूध चोचीने ओढण्याची कला फक्त राजहंसाकडे असते. त्याप्रमाणें हा शून्याचा सूक्ष्म अडथळा दूर करण्याचे कसब केवळ शास्त्राभ्यासाने विवेकसंपन्न बुद्धी असलेल्या साधकाकडे असते. ।।६९।।

आधीं दृश्य सोडिलें । मग सुन्यत्व वोलांडिलें । मूळमायेपरतें देखिलें । परब्रह्म ।।७०।।

ध्यानाभ्यास करणाऱ्या सूक्ष्म बुद्धिवृत्तीने प्रथम दृश्याचा पसारा बाजूला सारून, शून्य ओलांडून, मूळमायेचेही अधिष्ठान असलेले ब्रह्म अनुभवावे. ब्रह्मात स्वत:ला विसरावे! ।।७०।।

वेगळेपणें पाहाणें घडे । तेणें वृत्ति सुन्यत्वीं पडे । पोटीं संदेह पवाडे । सुन्यत्वाचा ।।७१।।

'हे शून्य' अशा रीतीने सूक्ष्म बुद्धिवृत्ती त्यापासून वेगळी राहून त्याचा अनुभव घेते. त्यामुळे तिला शून्य हेच अन्तिम तत्त्व किंवा देव वा ब्रह्म आहे असा भ्रम होतो. (संदेह = भ्रम) ।।७१।।

भिन्नपणें अनुभविलें । तयास सुन्य ऐसें बोलिलें । वस्तु लक्षितां अभिन्न जालें । पाहिजे आधीं ।।७२।।

शून्याचा शून्यापासून वेगळे राहून अनुभव घेऊन 'हे शून्य' असे वृत्तिज्ञान होते. शून्याच्या प्रकाशक असलेल्या-ब्रह्माच्या अनुभवात वृत्तीने पूर्णपणे विलीन होऊन आत्मनिवेदन साधले पाहिजे. (हीच अस्सल समाधी होय). ।।७२।।

वस्तु आपणचि होणें । ऐसें वस्तूचें पाहणें । निश्चयेंसीं भिन्नपणें । सुन्यत्व लाभे ।।७३।।

जीवाने स्वत:ला आत्मस्वरूपात विलीन करून तो प्रत्यक्ष अनुभवणे हेच आत्मदर्शन होय. जीव आत्म्यापासून वेगळा राहिला की शून्यानुभव येतो हे पक्के लक्षात ठेवावे. ॥७३॥

याकारणें सुन्य कांहीं । परब्रह्म होणार नाहीं । वस्तुरूप होऊन पाहीं । स्वानुभवें ।।७४।।

म्हणून शून्य हे कधीच ब्रह्म असू शकणार नाही. 'मी ब्रह्म' ह्याच साधनाने त्याचा अनुभव घ्यावा. तेच आपण व्हावे. ॥७४॥

आपण वस्तु सिद्धचि आहे । मन मी ऐसें कल्पूं नये । साधु सांगती उपाये । तूंचि आत्मा ।।७५।।

जीवरूप भासणारा मी मूळचा ब्रह्मरूपच आहे. त्यामुळे 'मी ब्रह्म' हे नित्य सिद्ध वास्तव आहे. तरीही अविद्येमुळे 'मी मन' असा भ्रम होतो. तो सोडावा. सद्गुरू 'तू ब्रह्म' असे सांगतात. ॥७५॥

मन मी ऐसें नाथिलें । संतीं नाहीं निरोपिलें । मानावें कोणाच्या बोलें । मन मी ऐसें ।।७६।।

'मी मन आहे' किंवा मन हे 'मी' चे स्वरूप आहे असा भ्रम होतो. संत असे कधीच सांगत नसताना हा भ्रम कोणाच्या आधाराने सांभाळून ठेवावा? त्याला प्रमाण काय? ॥७६॥

संतवचनीं ठेवितां भाव । तोचि शुद्ध स्वानुभव । मनाचा तैसाच स्वभाव । आपण वस्तु ।।७७।।

संतवचनावर दृढ श्रद्धा ठेवली तर त्याची परिणती ब्रह्मानुभवात होते. वासनानुसारी संकल्प करीत राहणे हा मनाचा सहज स्वभाव आहे. ते मन 'मी मन' असा संकल्प करीत असले तरी जीवाने त्याचा संकल्प बाजूला सारून आपण ब्रह्म आहोत असा निश्चय करावा. (जीव, अन्त:करण, प्राण व आत्मा यांतील फरक साधकाने समजावून घेणे फार आवश्यक आहे.) ॥७७॥

जयाचा घ्यावा अनुभव । तोचि आपण निरावेव । आपुला घेती अनुभव । विश्वजन ।।७८।।

ज्याचा 'मी' म्हणून अनुभव घ्यावयाचा आहे तो निरवयव निर्गुण निराकार आत्मा आहे. जगातील लोक त्यांच्या त्यांच्या मताप्रमाणे अनुभव घेतात. तो हा नव्हे. ॥७८॥

लोभी धन साधूं गेले । तंव ते लोभी धनचि जाले । मग तें भाग्यपुरुषीं भोगिलें । सावकास ।।७९।।

अत्यंत लोभी माणूस कमविलेल्या धनाशी एकरूप होऊन त्याचा भोग घेत नाही. तो लोभी मेल्यानंतर त्याचे भाग्यवान वारस ते भोगतात! ॥७९॥

तैसें देहबुद्धि सोडितां । साधकास जालें तत्वतां । अनुभवाची मुख्य वार्ता । ते हे ऐसी ।।८०।।

त्याप्रमाणे देहासक्त माणूस आत्मभोग घेत नाही. देहासक्ती सुटताच आत्मसुखाचा भोग घडतो. देहतादात्म्य सोडणे हे आत्मानुभवाचे वर्म आहे. ॥८०॥

आपण वस्तु मुळीं येक । ऐसा ज्ञानाचा विवेक । येथून हा ज्ञानदशक । संपूर्ण जाला ।।८१।।

जीवरूप 'मी' व ब्रह्म मूळचेच एक आहोत असा खऱ्या ज्ञान्याला विवेक असतो. येथे ज्ञानदशक संपला. ॥८१॥

आत्मज्ञान निरोपिलें । येथामतीनें बोलिलें । न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ।।८२।।

या दशकात मी आत्मज्ञान सांगितले. ते माझ्या बुद्धीनुसार सांगितले असल्याने त्यांतील कमी-अधिकाची श्रोत्यांनी क्षमा करावी. (शास्त्रात याला 'परिहार' म्हणतात. 'सकळ करणे जगदीशाचे' ही समर्थांची मुख्य भूमिका आहे) ॥८२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'शून्यत्वनिर्शननाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'शून्यत्वनिर्शन' नावाचा दहावा समास समाप्त
–दशक आठवा समाप्त–

दशक नववा : गुणरूप

समास पहिला : आशंका

॥ श्रीराम समर्थ ॥

निराकार म्हणिजे काये । निराधार म्हणिजे काये । निर्विकल्प म्हणिजे काये । मज निरोपावें ।।१।।

निराकार म्हणिजे आकार नाहीं । निराधार म्हणिजे आधार नाहीं । निर्विकल्प म्हणिजे कल्पना नाहीं । परब्रह्मासी ।।२।।

श्रोता-निराकार, निराधार व निर्विकल्प म्हणजे काय ते मला समजावून सांगावे. वक्ता– आकार नाही ते निराकार, ज्याला कोणाचा आधार नाही ते निराधार व जेथे कल्पना म्हणजे विचार उमटत नाही ते निर्विकल्प. (निरवयत्वामुळे निराकार, एकमेवत्वामुळे निराधार व अमन असल्याने विचाररहित असे ब्रह्म आहे.) ॥१-२॥

निरामय म्हणिजे काये । निराभास म्हणिजे काये । निरावेव म्हणिजे काये । मज निरोपावें ।।३।।

निरामय म्हणिजे जळमये नाहीं । निराभास म्हणिजे भासचि नाहीं । निरावेव म्हणिजे अवेव नाहीं । परब्रह्मासी ।।४।।

श्रोता- निरामय, निराभास व निरवयव ह्यांचा अर्थ सांगावा. वक्ता– निरामय म्हणजे दोषरहित, ज्ञानेंद्रियांनी न कळणारे व अखंड, त्याच्या ठिकाणी भास नाही, म्हणून निराभास, त्यास आकार नाही, अवयव नाहीत म्हणून निरामय. ॥३-४॥

नि:प्रपंच म्हणिजे काये । नि:कळंक म्हणिजे काये । निरोपाधी म्हणिजे काये । मज निरोपावें ।।५।।

नि:प्रपंच म्हणिजे प्रपंच नाहीं । नि:कळंक म्हणिजे कळंक नाही । निरोपाधी म्हणिजे उपाधी नाहीं । परब्रह्मासी ।।६।।

नि:प्रपंच, नि:कळंक, निरुपाधिक म्हणजे काय ते सांगावे. पांचभौतिक प्रपंचाचा दोष, कसलाही कलंक नसलेले व उपाधी नसलेले ते ब्रह्म आहे. ॥५-६॥

निरोपम्य म्हणिजे काये । निरालंब म्हणिजे काये । निरापेक्षा म्हणिजे काये । मज निरोपावें ।।७।।

निरोपम्य म्हणिजे उपमा नाहीं । निरालंब म्हणिजे अवलंबन नाहीं । निरापेक्षा म्हणिजे अपेक्षा नाहीं । परब्रह्मासी ।।८।।

निरूपम, निरालंब, निरपेक्ष म्हणजे काय ते सांगावे. एकमेव असल्याने उपमेला काही नाही, आधारासाठी काही नाही व अपेक्षेला (तुलना) दुसरे काही नाही. ॥७-८॥

निरंजन म्हणिजे काये । निरंतर म्हणिजे काये । निर्गुण म्हणिजे काये । मज निरोपावें ।।९।।

निरंजन म्हणिजे जनचि नाहीं । निरंतर म्हणिजे अंतर नाहीं । निर्गुण म्हणिजे गुणचि नाहीं । परब्रह्मासी ।।१०।।

निरंजन, निरंतर व निर्गुण म्हणजे काय ते सांगावे. ब्रह्मस्वरूप निर्जन, नित्य व त्रिगुणातीत (अगुण) आहे. ॥९-१०॥

नि:संग म्हणिजे काये । निर्मळ म्हणिजे काये । निश्चळ म्हणिजे काये । मज निरोपावें ।।११।।
नि:संग म्हणिजे संगचि नाहीं । निर्मळ म्हणिजे मळचि नाहीं । निश्चळ म्हणिजे चळण नाहीं । परब्रह्मासी ।।१२।।

नि:संग, निर्मळ, निश्चळ म्हणजे काय ते मला सांगावे. अद्वितीय असल्याने कोणाचा संग नाही. कर्म नसल्याने पापाचा मल नाही. व्यापक असल्याने अढळ आहे. ॥११-१२॥

निशब्द म्हणिजे काये । निर्दोष म्हणिजे काये । निवृत्ती म्हणिजे काये । मज निरोपावें ।।१३।।
निशब्द म्हणिजे शब्दचि नाहीं । निर्दोष म्हणिजे दोषचि नाहीं । निवृत्ती म्हणिजे वृत्तिच नाहीं । परब्रह्मासी ।।१४।।

नि:शब्द, निर्दोष व निवृत्त म्हणजे काय ते मला सांगावे. शब्द हा आकाशाचा गुण आहे. ब्रह्मात आकाश नसल्याने त्याला शब्द नाही. अखंड असल्याने कोठे फट नाही. (defect, fault) अन्त:करण नसल्याने वृत्ती नाही. ॥१३-१४॥

नि:काम म्हणिजे काये । निर्लेप म्हणिजे काये । नि:कर्म म्हणिजे काये । मज निरोपावें ।।१५।।
नि:काम म्हणिजे कामचि नाहीं । निर्लेप म्हणिजे लेपचि नाहीं । नि:कर्म म्हणिजे कर्मचि नाहीं । परब्रह्मासी ।।१६।।

नि:काम, निर्लेप व नि:कर्म म्हणजे काय ते मला सांगावे. मन नसल्याने कामना नाही, अरूप असल्याने पृष्ठभाग नाही. त्यामुळे कशाचाच लेप नाही. (उदा. रंग) किंवा अन्त:करण नसल्याने कर्मलेप नाही. कर्मेंद्रिये नसल्याने ('अपादपाणि') ब्रह्म कर्मरहित आहे. ॥१५-१६॥

अनाम्य म्हणिजे काये । अजन्मा म्हणिजे काये । अप्रत्यक्ष म्हणिजे काये । मज निरोपावें ।।१७।।
अनाम्य म्हणिजे नामचि नाहीं । अजन्मा म्हणिजे जन्मचि नाहीं । अप्रत्यक्ष म्हणिजे प्रत्यक्ष नाहीं । परब्रह्म तें ।।१८।।

अनाम, अजन्म व अप्रत्यक्ष म्हणजे काय ते मला सांगावे. रूप नसल्याने नाम नाही, कोणत्याही स्वरूपात व्यक्त होत नाही व ज्ञानेंद्रिये व अन्त:करणाने कळत नाही. ॥१७-१८॥

अगणीत म्हणिजे काये । अकर्तव्य म्हणिजे काये । अक्षै म्हणिजे काये । मज निरोपावें ।।१९।।
अगणीत म्हणिजे गणीत नाहीं । अकर्तव्य म्हणिजे कर्तव्यता नाहीं । अक्षै म्हणिजे क्षयचि नाहीं । परब्रह्मासी ।।२०।।

अगणित, अकर्तव्य व अक्षय म्हणजे काय ते मला सांगावे. व्यापकतेमुळे लांबी-रुंदी इ. मोजता येत नाही. अकाम असल्याने कर्तव्यरहित व निर्विकार असल्याने क्षय नाही. ॥१९-२०॥

अरूप म्हणिजे काये । अलक्ष म्हणिजे काये । अनंत म्हणिजे काये । मज निरोपावें ।।२१।।
अरूप म्हणिजे रूपचि नाहीं । अलक्ष म्हणिजे लक्षत नाहीं । अनंत म्हणिजे अंतचि नाहीं । परब्रह्मासी ।।२२।।

अरूप, अलक्ष, अनंत म्हणजे काय ते मला सांगावे. निरवयव असल्याने रूप नाही, अरूप असल्याने ते 'लक्ष्य' होत नाही. व्यापक असल्याने अन्तपार लागत नाही. ॥२१-२२॥

अपार म्हणिजे काये । अढळ म्हणिजे काये । अतर्क्यें म्हणिजे काये । मज निरोपावें ।।२३।।
अपार म्हणिजे पारचि नाहीं । अढळ म्हणिजे ढळचि नाहीं । अतर्क्यें म्हणिजे तर्कत नाहीं । परब्रह्म तें ।।२४।।

अपार, अढळ व अतर्क्य म्हणजे काय ते मला सांगावे. 'अलीकडे व पलीकडे' या भाषेत बोलता येत नाही, व्यापकतेमुळे इकडून तिकडे जात नाही. दृष्टान्त नसल्याने तर्क मांडता येत नाही. ॥२३-२४॥

अद्वैत म्हणिजे काये । अदृश्य म्हणिजे काये । अच्युत म्हणिजे काये । मज निरोपावें ।।२५।।

अद्वैत म्हणिजे द्वैतचि नाहीं । अदृश्य म्हणिजे दृश्यचि नाहीं । अच्युत म्हणिजे चेवत नाहीं । परब्रह्म तें ।।२६।।

अद्वैत, अदृश्य व अच्युत म्हणजे काय ते मला सांगावे. ज्याला किंवा ज्यात दुसरे काही व कोणी नाही, रूप नसल्याने दिसत नाही व अच्युत म्हणजे अढळ. ॥२५-२६॥

अछेद म्हणिजे काये । अदाह्य म्हणिजे काये । अक्लेद म्हणिजे काये । मज निरोपावें ।।२७।।

अछेद म्हणिजे छेदेना । अदाह्य म्हणिजे जळेना । अक्लेद म्हणिजे कालवेना । परब्रह्म तें ।।२८।।

अच्छेद्य, अदाह्य, अक्लेद म्हणजे काय ते मला सांगावे. रूप नसल्याने खंड पाडता येत नाहीत. ज्वलनशीलता हा गुण नसल्याने जळत नाही. कालवण्यासाठी त्याला रूप नाही व दुसरा द्रव पदार्थ नाही, पाण्याने ते ओले होत नाही. ॥२७-२८॥

परब्रह्म म्हणिजे सकळांपरतें । तयास पाहातां आपणचि तें । हें कळे अनुभवमतें । सद्गुरू केलियां ।।२९।।

परब्रह्म हे सर्वांत सूक्ष्म, सर्वाहून पलीकडचे, सर्वश्रेष्ठ व अधिष्ठानरूप आहे. ते जाणावयाचा प्रयत्न करावा तर ते मीच आहे! पण श्रीगुरुकृपेने त्याला केवळ सिद्धान्ताचे स्वरूप न रहाता अनुभवाचे स्वरूप येते. ॥२९॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आशंकानाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आशंका' नावाचा पहिला समास समाप्त

दशक नववा : गुणरूप

समास दुसरा : ब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

जें जें कांहीं साकार दिसे । तें तें कल्पांतीं नासे । स्वरूप तें असतचि असे । सर्वकाळ ।।१।।

ज्याला आकार असतो ते कल्पाचा प्रलय होताना नष्ट होते. ब्रह्म मात्र तिन्ही काळात अबाधित व नित्य असते. ॥१॥

जें सकळांमध्यें सार । मिथ्या नव्हे तें साचार । जें कां नित्य निरंतर । संचले असे ।।२।।

जे सर्वाचे सार असते ते कधीच मिथ्या नसते. सत्य असते ते नित्य, निरंतर व सर्वांत व्यापून असते. (उदा. पाणी हे बर्फाचे सार आहे. ब्रह्म जगताचे सार आहे. बर्फ नसले तरी पाणी असते. जग नसले तरी ब्रह्म असते.) ॥२॥

तें भगवंताचे निजरूप । त्यासि बोलिजे स्वरूप । याहि वेगळीं अमूप । नामें तयाचीं ।।३।।

सगुण साकार भगवंताचे सार निर्गुण निराकार ब्रह्म आहे. तेच स्वरूप. त्याहून त्याला साक्षी, अद्वैत, परमात्मा इ. सांकेतिक नावे बरीच आहेत. ॥३॥

त्यास नामाचा संकेत । कळावया हा दृष्टांत । परी तें स्वरूप नामातीत । असतचि असे ।।४।।

कोणतेही विशेष किंवा धर्मसूचक नाव हे केवळ ब्रह्माचा अंदाज येण्यासाठी असते. कारण व्यापक व नित्य ब्रह्म नाम व रूप यात सापडत नाही. ॥४॥

दृश्यासबाह्य संचलें । परी तें विश्वास चोरलें । जवळिच नाहींसें जालें । असतचि कैसें ।।५।।

जाणिवेच्या आवाक्यात येणाऱ्या सर्व दृश्यात ते आत व बाहेर भरून राहिले असूनही त्यापासून अलिप्त आहे. ते अत्यन्त जवळ आहे व त्यामुळेच दिसत नाही, कळत नाही. ॥५॥

ऐसा ऐकोनियां देव । उठे दृष्टीचा भाव । पाहों जातां दिसे सर्व । दृश्यचि आवघें ।।६।।

देवाचे हे वर्णन ऐकून तो पहाण्याचा प्रयत्न केला तर सर्वत्र दृश्याचाच पसारा दिसतो. ॥६॥

दृष्टीचा विषयो दृश्य । तोचि जालियां सादृश्य । तेणें दृष्टी पावें संतोष । परी तें देखणें नव्हे ।।७।।

दृष्टीचा रूप हा विषय आहे. तो समोर दिसला की दृष्टीचे सार्थक होते. पण देवाला रूप नसल्याने तो दिसत नाही. ॥७॥

दृष्टीस दिसे तें नासे । येतद्विषईं श्रुति असे । म्हणौन जें दृष्टीस दिसे । तें स्वरूप नव्हे ।।८।।

जे रूप डोळ्याला दिसते ते विनाशी असते असे श्रुती सांगते. म्हणून डोळ्याला दिसणारे स्वरूप असणे शक्य नाही. ॥८॥

स्वरूप तें निराभास । आणी दृश्य भासलें साभास । भासास बोलिला नास । वेदांतशास्त्रीं ।।९।।

ब्रह्म वृत्तीला कळत नाही. पण रूपवान सृष्टी डोळ्यामार्फत वृत्तीला कळते. जे जे वृत्तीला कळते ते नाशवान असते असे श्रुती सांगते. ॥९॥

आणी पाहातां दृश्यचि भासे । वस्तु दृश्यावेगळी असे । स्वानुभवें पाहातां दिसे । दृश्यासबाह्य ।।१०।।

आपल्या डोळ्यांनी जे जे दिसते ते ते दृश्य होय. सद्वस्तू मात्र दृश्याहून वेगळी आहे. स्वरूपानुभव आला म्हणजे

सद्वस्तू दृश्याला आतबाहेर व्यापून आहे असे प्रत्ययाला येते. ॥१०॥

जें निराभास निर्गुण । त्याची काये सांगावी खूण । परी तें स्वरूप जाण । सन्निधचि असे ।।११।।

जे गुणातीत व अन्त:करणवृत्तीला कळत नाही त्याचे वर्णन तरी कसे करणार? पण तेच ब्रह्म आत्मा असून तो अत्यंत जवळ (स्वत:च) असतो! ॥११॥

जैसा आकाशीं भासला भास । आणि सकळांमधें आकाश । तैसा जाणिजे जगदीश । सबाह्य अभ्यांतरीं ।।१२।।

'हे आकाश' असे उगीचच वाटते. ते सर्वांमध्ये व्यापून राहते. त्याप्रमाणे ब्रह्म सर्वांच्या आतबाहेर व्यापून आहे. ॥१२॥

उदकामधें परी भिजेना । पृथ्वीमधें परी झिजेना । वन्हीमधें परी सिजेना । स्वरूप देवाचें ।।१३।।

ब्रह्म पाण्यात असून भिजत नाही. पृथ्वीत असून त्याला झीज नाही. अग्नीत असून ते शिजत नाही. ॥१३॥

तें रेंद्यामध्यें परी बुडेना । तें वायोमधें परी उडेना । सुवर्णी असे परी घडेना । सुवर्णासारिखें ।।१४।।

ब्रह्म चिखलात असून बुडत नाही. वाऱ्यात असून त्याबरोबर उडत नाही. सोन्यात असून त्याचे सोन्याबरोबर दागिने घडत नाहीत. ॥१४॥

ऐसें जें संचलें सर्वदा । परी तें आकळेना कदा । अभेदामाजी वाढवी भेदा । ते हे अहंता ।।१५।।

असे ते सर्वत्र व्यापून असूनही दिसत वा कळत नाही. वास्तविक सर्वत्र अभेद असून जीवाची अहंता सर्वत्र भेद पहाते.(अहं आला की त्वं आलाच!) ॥१५॥

तिच्या स्वरूपाची खूण । सांगों कांहीं वोळखण । अहंतेचें निरूपण । सावध ऐका ।।१६।।

अहंता कशी आहे त्याचा अंदाज येण्यासाठी अहंतेची लक्षणे सावधपणे ऐका. ॥१६॥

जे स्वरूपाकडे पावे । अनुभवासवें झेंपावे । अनुभवाचे शब्द आघवे । बोलोन दावी ।।१७।।

अहं हा स्वरूपाचा अनुभव घेण्यासाठी एक एक देह मागे टाकताना 'मी स्थूल शरीर नाही' इ. अनुभव स्वत:लाच तो सांगत जातो. ॥१७॥

म्हणे आतां मीच स्वरूप । तेंचि अहंतेचें रूप । निराकारीं आपेंआप । वेगळी पडे ।।१८।।

शेवटी 'मी आत्मा आहे' असे अहंता म्हणते व तिला वृत्तीचे रूप असल्याने अरूप आत्म्याहून सहजच वेगळी ठरते.॥१८॥

स्वयें मीच आहे ब्रह्म । ऐसा अहंतेचा भ्रम । ऐसियें सूक्ष्मीं सूक्ष्म । पाहातां दिसे ।।१९।।

सूक्ष्म अन्त:करणवृत्ती अतिसूक्ष्म आत्म्याचा अनुभव घेताना तिला 'मी ब्रह्म आहे' असा भ्रम होतो! ॥१९॥

कल्पना आकळी हेत । वस्तु कल्पनातीत । म्हणौन नाकळे अंत । अनंताचा ।।२०।।

'मी ब्रह्म' या हेतूला कल्पना पकडून बसते. (हेतु = साध्य) ब्रह्म साध्य नसल्याने (नित्यसिद्ध) अनंत ब्रह्माचे या रीतीने अपरोक्ष ज्ञान होत नाही. ॥२०॥

अन्वये आणी वीतरेक । हा शब्दभेद कोणीयेक । निशब्दाचा अंतरविवेक । शोधिला पाहिजे ।।२१।।

अन्वय आणि व्यतिरेक या दोन्ही पद्धतीने ब्रह्मज्ञान झाले पाहिजे असे वेदान्तशास्त्र सांगते. पण हा विचार केवळ शाब्दिक आहे. प्रत्यक्ष ब्रह्मात असा भेद नाही. म्हणून शब्दप्रमाणानेही प्रत्यक्ष अनुभवाला न येणाऱ्या ब्रह्माचा ध्यानकाळी विवेकाने शोध घ्यावा. (अन्वय- जेथे घट असतो तेथे माती असते. व्यतिरेक- मातीच नसेल तर घट कोठून असणार? जग दिसते तेथे अधिष्ठान ब्रह्म असते. अधिष्ठान नसेल तर अध्यस्त नसते.) ॥२१॥

आधीं घेईजे वाच्यांश । मग वोळखिजे लक्ष्यांश । लक्ष्यांशी पाहातां वाच्यांश । असेल कैंचा ।।२२।।

प्रथम वाच्यांशाचा विचार करून नंतर त्याच्या लक्षांशाचा विचार करावा. लक्षांशामध्ये वाच्यांश विलीन झाल्यावर तो उरेल कसा? जसे- ॥२२॥

सर्वब्रह्म आणि विमळब्रह्म । हा वाच्यांशाचा अनुक्रम । शोधितां लक्ष्यांशाचें वर्म । वाच्यांश नसे ।।२३।।

'दृश्यासह सर्व ब्रह्मच आहे' व 'दृश्य दूर करून उरते ते विमल ब्रह्म' असे दोन पक्ष मांडले जातात (वाच्य) परंतु प्रत्यक्ष ब्रह्मानुभवात (लक्ष्य) वाच्याला थारा नसतो. ॥२३॥

सर्व, विमळ दोनी पक्ष । वाच्यांशी आटती प्रत्यक्ष । लक्ष्यांशीं लावितां लक्ष । पक्षपात घडे ।।२४।।

सर्वब्रह्मवाद व विमलब्रह्म वाद हे दोन्ही केवळ सैद्धान्तिक वाद आहेत. ते केवळ वाणीचे व्यवहार आहेत हे प्रत्यक्षात कळून येते. ते वाणीत आढळतात! अनुभवकाळी (लक्ष्य) ते दोन्ही पक्ष पतन पावतात. ॥२४॥

हें लक्ष्यांशें अनुभवणें । येथें नाहीं वाच्यांश बोलणें । मुख्य अनुभवाचे खुणे । वाचारंभ कैंचा ।।२५।।

लक्ष्यानुभवात वाच्यांश गडप होतो. हे अनुभवानेच कळते. तो आल्यावर वाच्य, लक्ष्य इ. बोलण्यासाठी वाणी आरंभ करीलच कशी? ॥२५॥

परा पश्यंती मधेमां वैखरी । जेथें वोसरती च्यारी । तेथें शब्दकळाकुंसरी । कोण काज ।।२६।।

परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी या चारी वाणी ज्या आत्मानुभवकाळी विरून जातात तेथे असे शाब्दिक खेळ किंवा कसरती कोण करणार? सूक्ष्मातिसूक्ष्म विचारांची कला कोण व्यक्त करणार? ॥२६॥

शब्द बोलतां सवेंच नासे । तेथें शाश्वतता कोठें असे । प्रत्यक्षास प्रमाण नसे । बरें पाहा ।।२७।।

कोणताही शब्द उच्चारल्याबरोबर नष्ट होतो म्हणून तो शाश्वत नाही हे प्रत्यक्ष अनुभवाला येत असल्याने त्याला वेगळ्या प्रमाणाची गरज नाही हे लक्षात घ्यावे. ॥ ।२७॥

शब्द प्रत्यक्ष नासिवंत । म्हणोन घडे पक्षपात । सर्व विमळ ऐसा हेत । अनुभवीं नाहीं ।।२८।।

शब्द नाशवान असल्याने शब्दांनी मांडलेले पक्षही पतन पावतात. सर्वब्रह्म व विमळ ब्रह्म हे दोन्ही पक्ष ब्रह्मानुभवात नसतात. (विमलब्रह्मवाद = अजातवाद) ॥२८॥

ऐक अनुभवाचें लक्षण । अनुभव म्हणिजे अनन्य जाण । ऐक अनन्याचें लक्षण । ऐसें असे ।।२९।।

ब्रह्मापासून वेगळेपणाने न उरणे हे अनुभवाचे लक्षण आहे. ते कसे ते आता सांगतो. ॥२९॥

अनन्य म्हणिजे अन्य नसे । आत्मनिवेदन जैसें । संगभंगें असतचि असे । आत्मा आत्मपणें ।।३०।।

जो अन्यत्वाने रहात नाही तो अनन्य किंवा ज्याला दुसरा कोणी नाही तो अनन्य. आत्मनिवेदन झाले की जीव ब्रह्मापासून वेगळेपणाने नसतो. जीव पुन्हा वेगळा झाला तरी आत्मा असावयाचा तसाच असतो. त्यात काही उणीव निर्माण होत नाही. ॥३०॥

आत्म्यास नाहीं आत्मपण । हेंचि निःसंगाचें लक्षण । हें वाच्यांशें बोलिलें जाण । कळावया कारणें ।।३१।।

'मी आत्मा आहे' हे जसे आत्म्याला भान नसते तसेच ते आत्मानुभवातही नसते. ही निःसंगपणाची परिसीमा होय. हे केवळ कळावे म्हणून शब्दाने बोललो. ॥३१॥

येरवीं लक्ष्यांश तो वाच्यांशें । सांगिजेल हें घडे कैसें । वाक्यविवरणें अपैसें । कळों लागे ।।३२।।

एऱ्हवी केवळ वाणीने (वाच्य) ब्रह्मस्वरूप (लक्ष्य) सांगणे कसे शक्य आहे? पण तेही महावाक्याच्या मननाने हळूहळू समजू लागते. (पहा ८-८-३४) ॥३२॥

करावें तत्वविवरण । शोधावें ब्रह्म निर्गुण । पाहावें आपणास आपण । म्हणिजे कळे ।।३३।।

ब्रह्म व माया या तत्त्वांचे स्वरूप जाणून घेऊन निर्गुण ब्रह्म त्यातून गाळून घ्यावे (शोधन) जीवाने (आपण) ब्रह्माला (आपणासी) ऐक्यभावाने अनुभवावे (पहावे) म्हणजे ब्रह्मानुभव येतो. ।।३३।।

हें न बोलतांच विवरिजे । विवरोन विरोन राहिजे । मग अबोलणेंचि साजे । माहापुरुषीं ।।३४।।

वाणीचे सर्व व्यवहार थांबवून तत्त्वविवरण करीत करीत तत्त्वाशी (ब्रह्म) एकरूप होऊन रहावे. असे हे सहज व नित्यसिद्ध मौन महापुरुषांचे ठिकाणी शोभते. ।।३४।।

शब्दचि निशब्द होती । श्रुति नेति नेति ह्मणती । हें तों आलें आत्मप्रचिती । प्रत्यक्ष आतां ।।३५।।

तेथे शब्दांचे शब्दपण संपते, श्रुती सुद्धा 'हे ब्रह्म नाही' 'हे ब्रह्म नाही' असे म्हणत मौन धरतात. अनुभव असा असतो हे आताच आपण पाहिले आहे. (ओवी ३४) ।।३५।।

प्रचित आलियां अनुमान । हा तों प्रत्यक्ष दुराभिमान । तरी आतां मी अज्ञान । मज कांहीच न कळे ।।३६।।

असे असूनही त्याविषयी पुन्हा कोणी शंका घेईल तर तो दुराग्रहीच होय. त्याच्यासाठी मी अज्ञानी असून मला काही कळत नाही असे म्हणणे योग्य! ।।३६।।

मी लटिका माझें बोलणें लटिकें । मी लटिका माझें चालणें लटिकें । मी माझें अवघेंचि लटिकें । काल्पनिक ।।३७।।

जीवरूप 'मी' मायिक असल्याने माझे बोलणे व चालणेही मायिकच आहे. 'मी व माझे' वर आधारलेला सर्व व्यवहार मायिक किंवा कल्पित आहे. ।।३७।।

मज मुळींच नाहीं ठाव । माझें बोलणें अवघेंचि वाव । हा प्रकृतीचा स्वभाव । प्रकृती लटिकी ।।३८।।

'मी'चे अस्तित्वच मुळात नाही! त्यामुळे प्रकृतीच्या बळाने होणारे माझे बोलणेही प्रकृती मायिक असल्याने मायिक आहे. ।।३८।।

प्रकृति आणी पुरुष । यां दोहींस जेथें निरास । तेथें मीपण विशेष । हें केंवि घडे ।।३९।।

अचेतन प्रकृती व चेतन अक्षर पुरुष हे सुद्धा जेथे उत्तम पुरुषात निरस्त असतात तेथे सामान्य 'अहं' ला काय किंमत असणार! ।।३९।।

जेथें सर्वही अशेष जालें । तेथें विशेष कैंचें आलें । मी मौनी म्हणतां भंगलें । मौन्य जैसें ।।४०।।

ज्या ब्रह्मस्वरूपात प्रकृती व पुरुष उरत नाहीत तेथे कोणताच विशेष नसतो.(विशेष– पदार्थ सापेक्ष धर्म) 'मी मौनी' असे म्हटल्याने जसे मौन मोडते त्याप्रमाणे निर्विशेष ब्रह्मात 'मी'चा विशेष आल्याने ब्रह्माचे निर्विशेषत्व मोडते. ।।४०।।

आता मौन्य न भंगावें । करून कांहींच न करावें । असोन निशेष नसावें । विवेकबळें ।।४१।।

आता असे मौन मोडू नये! देहाचे सर्व व्यापार चालू असूनही 'स्वस्थ' असावे. विवेकाच्या आधाराने देहाने जगात राहूनही नसल्याप्रमाणे असावे. ।।४१।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'ब्रह्मनिरूपणनाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'ब्रह्मनिरूपण' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक नववा : गुणरूप

समास तिसरा : नि:संदेहनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

श्रोतीं केला अनुमान । ऐसें कैसें ब्रह्मज्ञान । कांहींच नाहीं असोन । हें केंवि घडे ।।१।।

श्रोत्याला अशी शंका आली की असे हे ब्रह्माचे ज्ञान कसले की जे झाल्यावर असून काहीच नसते? असे घडेल का? ॥१॥

सकळ करून अकर्ता । सकळ भोगून अभोक्ता । सकळांमधें अलिप्तता । येईल कैसी ।।२।।

सर्व काही करून अकर्ता, सर्व भोगून अभोक्ता इ. प्रकारे या सर्वापासून अलिप्तपणा साधेल कसा? ॥२॥

तथापी तुम्ही म्हणतां । योगी भोगून अभोक्ता । स्वर्गनर्कहि आतां । येणें न्यायें ।।३।।

तुम्ही म्हणता की योगी भोगून अभोक्ता असतो. मग त्याला स्वर्ग व नर्कादि सुद्धां भोगून न भोगल्यासारखेच होणार! ॥३॥

जन्म मृत्य भोगीलेच भोगी । परी तो भोगून अभोक्ता योगी । यातनाहि तयालागीं । येणेंचि पाडें ।।४।।

जन्ममरण भोगणारा योगी सुद्धा भोगून ते भोगत नाही. त्याला यातना होऊनही होत नाहीत. ॥४॥

कुटून नाहीं कुटिला । रडोन नाहीं रडला । कुंथोन नाहीं कुंथिला । योगेश्वर ।।५।।

योगी मार खाऊनही मार खात नाही, रडूनही रडत नाही, कुंथला तरी कुंथत नाही असेच म्हणावे लागेल. ॥५॥

जन्म नसोन घातला । पतित नसोन जाला । यातना नसोन पावला । नानापरी ।।६।।

योग्याला जन्म नसून तो जन्माला आला, पापी नसून पतित झाला व अनेक यातना न भोगता भोगतो! ॥६॥

ऐसा श्रोतयांचा अनुमान । श्रोतीं घेतलें आडरान । आतां याचें समाधान । केलें पाहिजे ।।७।।

श्रोता विचार करून असा आडरानात शिरला. आता त्याला परमार्थत: जे सत्य आहे ते सांगितले पाहिजे. ॥७॥

वक्ता म्हणे सावध व्हावें । तुम्ही बोलतां बरवें । परी हें तुमच्याच अनुभवें । तुम्हास घडे ।।८।।

वक्ता म्हणतो की आता लक्ष देऊन कुतर्काचे उत्तर ऐका. तुम्ही जे बोलता ते तुमच्या दृष्टीने बरोबर आहे. कारण देहतादात्म्यातून तुम्हाला जे अनुभव येतात ते तुम्ही बोलता. ॥८॥

ज्याचा अनुभव जैसा । तो तो बोलतो तैसा । संपदेविण जो धिवसा । तो निरार्थक ।।९।।

ज्याला जसा अनुभव येतो तसे तो बोलतो, पण संपत्तीवाचून जसा व्यापार करणे व्यर्थ असते त्याप्रमाणे, ॥९॥

नाहीं ज्ञानाची संपदा । अज्ञानदारिद्रें आपदा । भोगिल्याच भोगी सदा । शब्दज्ञानें ।।१०।।

ज्ञानाची संपत्ती नसताना अज्ञानरूप दारिद्र्याची संकटे भोगावी लागतात. केवळ शब्दज्ञानाच्या संपत्तीमुळे नाना जन्मांत भोगाव्या लागणाऱ्या आपदा भोगीतच रहावे लागते. ॥१०॥

योगी वोळखावा योगेश्वरें । ज्ञानी वोळखावा ज्ञानेश्वरें । माहाचतुर तो चतुरें । वोळखावा ।।११।।

योगेश्वर योग्याला, ज्ञानेश्वर ज्ञान्याला व चतुर महाचतुराला सहज ओळखू शकतो. ॥११॥

अनुभवी अनुभवियास कळे । अलिप्त अलिप्तपणें निवळें । विदेहाचा देहभाव गळे । विदेही देखतां ।।१२।।

एक अनुभवी दुसऱ्याचा अनुभवीपणा जाणतो. एक असंग दुसऱ्याची नि:संगता ओळखतो. दुसरी विदेहावस्थेतील व्यक्ती पाहून विदेही व्यक्तीचे देहभान हारपते. ॥१२॥

बद्धासारिखा सिद्ध । आणी सिद्धासारिखा बद्ध । येक भावील तो अबद्ध । म्हणावाच नलगे ।।१३।।

सिद्ध बद्धाप्रमाणे असतो व बद्ध सिद्धाप्रमाणे असतो असे मानणारा मूर्ख असतो हे मुद्दाम सांगावे लागत नाही. ॥१३॥

झडपला तो देहधारी । आणी देहधारक पंचाक्षरी । परंतु दोघां येकसरी । कैसी द्यावी ।।१४।।

पिशाच्चाने झपाटलेलाही माणूस व ते काढणारा पंचाक्षरीही माणूसच असला तरी दोघे सारखेच कसे म्हणावे? ॥१४॥

तैसा अज्ञान पतित । आणी ज्ञानी जीवन्मुक्त । दोघे समान मानील तो युक्त । कैसा म्हणावा ।।१५।।

त्याप्रमाणे पापी अज्ञानी व जीवन्मुक्त ज्ञानी जो सारखेच समजतो त्याला शहाणा कसा म्हणावा? ॥१५॥

आतां असो हे दृष्टांत । प्रचित बोलों कांहीं हेत । येथें श्रोतीं सावचित्त । क्षणयेक व्हावें ।।१६।।

आता उदाहरणे पुरेत. अनुभवाला येईल असे काही आता सांगतो. लक्ष देऊन ऐकावे. ॥१६॥

जो जो ज्ञानें गुप्त जाला । जो विवेकें विराला । जो अनन्यपणें, उरला– । नाहींच कांहीं ।।१७।।

ज्याचा जीव ब्रह्मरूप झाल्याने जीवभाव नष्ट होतो 'तो' ब्रह्मभावात गडप होतो. जणू गुप्त होतो. विवेकरूप विचाराने विरून जातो. ब्रह्मापासून वेगळेपणाने उरत नाही. ॥१७॥

तयास कैसें गवसावें । शोधूं जातां तोचि व्हावें । तोचि होतां म्हणावें । नलगे कांहीं ।।१८।।

'त्याचा' जीवभाव वेगळेपणाने कसा शोधावा? ज्याचा स्वत:चा जीवभाव संपला आहे तो त्याचा जीवभाव शोधू पाहील तर तोही ब्रह्मभावात गडप होतो! (ओवी १२) व त्यामुळे बोलणे होत नाही. ॥१८॥

देहीं पाहातां दिसेना । तत्त्वें शोधितां भासेना । ब्रह्म आहे, निवडेना– । कांहीं केल्यां ।।१९।।

त्याला त्याच्या देहात शोधावे तर देहाच्या उपाधीत 'तो' नसतो. त्याच्या देहातील सर्व अनात्म तत्त्वे दूर सारली तरी तो दिसत नाही. तो ब्रह्म झाल्याने ब्रह्माप्रमाणेच दिसत नाही. ॥१९॥

दिसतो तरी देहधारी । परी कांहींच नाहीं अंतरीं । तयास पाहातां वरिवरी । कळेल कैसा ।।२०।।

'तो' इतर चारचौघांसारखा देहधारी दिसतो, पण आत देहतादात्म्याचा लेशही नसतो. स्थूल दृष्टीने बघणाऱ्याला 'तो' कसा दिसेल? ॥२०॥

कळाया शोधावें अंतर । तंव तो नित्य निरंतर । जयास धुंडितां विकार । निर्विकार होती ।।२१।।

त्याचे स्वरूप कळण्यासाठी अंतरंग शोधावेत तर त्यांत 'तो' नित्य व अनन्तस्वरूपाने असतो. कामादी विकार जेव्हा त्याला शोधावयास जातात तेव्हा तेच त्याच्यासारखे निर्विकार होतात! ॥२१॥

तो परमात्मा केवळ । तयास नाहीं मायामळ । अखंड हेतूचा विटाळ । जालाच नाहीं ।।२२।।

'तो' परब्रह्मच झाल्याने त्याला मायिक तत्त्वांचा लेप नसतो. तो अखंडबोधात असून त्याला कोणताही विशेष नसतो. ॥२२॥

ऐसा जो कां योगीराज । तो आत्मा सहजीं सहज । पूर्णब्रह्म वेदबीज । देहाकारें कळेना ।।२३।।

असा श्रेष्ठ योगी सहजस्थितीत सहजतेने रहातो. वेदांचे ज्यात तात्पर्य आहे ते ब्रह्म होऊन तो असतो. पण अज्ञानी जनांना देहाची आकृती दिसते. स्थिती कळत नाही. ॥२३॥

देह भावितां देहचि दिसे । परी अंतर अनारिसें असे । तयास शोधितां नसे । जन्ममरण ।।२४।।

देहदृष्टीने पाहिले तर त्याचा देहच दिसतो. पण अन्तरस्थिती वेगळीच असते. ती स्थिती कळली तर तो जन्ममरणातून सुटल्याचे लक्षात येईल. ॥२४॥

जयास जन्ममरण व्हावें । तें तो नव्हेचि स्वभावें । नाहींच तें आणावें । कोठून कैंचें ।।२५।।

जन्ममरण वासनेसहित असलेल्या जीवाला असतात. मुक्ताचा जीवभाव नष्ट होऊन वासनाक्षय होतो व तो ब्रह्मच होऊन राहतो. ब्रह्माला जन्ममरण सहजच नसतात. ते त्याला कोठून येणार? ॥२५॥

निर्गुणास जन्म कल्पिला । अथवा निर्गुण उडविला । तरी उडाला आणी जन्मला । आपला आपण ।।२६।।

कोणी निर्गुण ब्रह्म जन्माला येते व नष्ट होते असे म्हटले तरी तो म्हणणाराच जन्माला येऊन मरणार! ॥२६॥

माध्यांनी थुंकितां सूर्यावरी । तो थुंका पडेल आपणाच वरी । दुसऱ्यास चिंतितां अंतरीं । आपणास घडे ।।२७।।

सूर्य मध्यान्ही असताना तोंड वर करून त्यावर थुंकले तर तो थुंका थुंकणाऱ्याच्याच तोंडावर पडतो! दुसऱ्याविषयी केलेला शुभ वा अशुभ संकल्प स्वत:कडेच परत येतो. ॥२७॥

समर्थ रायाचें महिमान । जाणतां होतें समाधान । परंतु भुंको लागलें स्वान । तरी तें स्वानचि आहे ।।२८।।

एखाद्या सम्राटाचे वैभव ऐकून समाधान वाटते. पण त्यावर कुत्रे भुंकू लागले तर काय करणार? त्याचा तो स्वभावच असतो! ॥२८॥

ज्ञानी तो सत्यस्वरूप । अज्ञान देखे मनुष्यरूप । भावासारिखा फळद्रूप । देव तैसा ।।२९।।

ब्रह्मज्ञानी सत्यस्वरूप होतो. अज्ञान्याला तो मर्त्य माणूस वाटतो. देव व सन्त यांचेविषयी जी भावना करावी तसे फळ मिळते. ॥२९॥

देव निराकार निर्गुण । लोक भाविती पाषाण । पाषाण फुटतो निर्गुण । फुटेल कैसा ।।३०।।

निर्गुण निराकार ब्रह्माला सामान्य लोक मूर्तीत पहातात. मूर्तीचा दगड फुटतो. निर्गुणत्व व निराकारत्व फुटेल कसे? ॥३०॥

देव सदोदित संचला । लोकीं बहुविध केला । परंतु बहुविध जाला । हें तो घडेना ।।३१।।

ब्रह्मरूप देव नित्य व्यापक व अखंड आहे. लोकांनी त्याला अनेक रूपे दिली तरी तो वास्तविक तितक्या रूपांचा होत नाही. ॥३१॥

तैसा साधु आत्मज्ञानी । बोधें पूर्ण समाधानी । विवेकें आत्मनिवेदनी । आत्मरूपी ।।३२।।

ब्रह्म सत्य आहे व दृश्य मिथ्या आहे या विवेकामुळे सर्व कारण असलेल्या आत्मरूपाचा पूर्ण बोध झालेला आत्मज्ञानी सतत समाधानात असतो.॥३२॥

जळोन काष्ठाचा आकार । अग्नि दिसे काष्ठाकार । परी काष्ठ होईल हा विचार । बोलोंच नये ।।३३।।

लाकडाचा आकारही अग्नी लाकडाबरोबर जाळतो व अग्नी त्या आकाराचा दिसतो. पण अग्नी कधीच लाकूड नसतो. ॥३३॥

कर्पूर असे तो जळतां दिसे । तैसा ज्ञानीदेह भासे । तयास जन्मवितां कैसें । कर्दळीउदरीं ।।३४।।

कापूर आहे तोपर्यन्त तो जळताना दिसतो. त्या कापराला नंतर पुन्हा केळीच्या गाभ्यातून काढता येत नाही. त्याप्रमाणे प्रारब्ध आहे तोपर्यंत ज्ञान्याचा देह दिसतो. ते संपल्यावर तो पुन्हा जन्माला येत नाही. ॥३४॥

बीज भाजलें उगवेना । वस्त्र जळालें उकलेना । वोघ निवडितां निवडेना । गंगेमधें ।।३५।।

भाजलेल्या बीजाला अंकुर फुटत नाही, जळलेली कापडाची घडी उलगडत नाही, गंगेला मिळालेल्या ओढ्याचे पाणी वेगळे दाखविता येत नाही. ॥३५॥

वोघ गंगेमागें दिसे । गंगा येकदेसी असे । साधु कांहीच न भासे । आणी आत्मा सर्वगत ।।३६।।

उदाहरण नेहमीच अपूर्ण (एकदेशी) असते. म्हणून वरील उदाहरणात गंगेला मिळण्यापूर्वी ओढ्याचे पाणी वेगळे दिसते. परंतु आत्मरूप होण्यापूर्वीचा साधू व आत्मरूप झालेला साधू वेगळा दाखविता येत नाही. कारण आत्मा व्यापक आहे. पूर्वीचा जीवभाव कल्पित आहे. ।।३६।।

सुवर्ण नव्हे लोखंड । साधूस जन्म थोतांड । अज्ञान प्राणी जडमूढ । तयास हें उमजेचिना ।।३७।।

परिसस्पर्शानंतर लोखंडाचे झालेले सोने पुन्हा कधीच लोखंड होत नाही. त्याप्रमाणे आत्मज्ञानाने ब्रह्म झालेला साधूचा जीव पुन्हा जन्ममरणाच्या बंधनात सापडत नाही. अज्ञानामुळे ज्यांची बुद्धी दगडासारखी झालेली असते किंवा मोहित (मूढ) होते त्यांना हे काही केल्या समजत नाही! ।।३७।।

अंधास काहींच न दिसे । तरी ते लोक आंधळे कैसे । सन्नपातें बरळतसे । सन्नपाती ।।३८।।

आंधळ्याला काहीच दिसत नसले तरी सर्वच लोक आंधळे नसतात! ताप चढलेला आजारी माणूस वाटेल ते बरळतो. ।।३८।।

जो स्वप्नामधें भ्याला । तो स्वप्नभयें वोसणाला । तें भये जागत्याला । केवि लागे ।।३९।।

जो स्वप्नात भ्यालेला असतो तोच त्या भयाने दु:खी होतो. जागा असणाऱ्याला ते दु:ख कसे होईल? ।।३९।।

मुळी सर्पाकार देखिली । येक भ्याला येकें वोळखिली । दोघांची अवस्था लेखिली । सारिखीच कैसी ।।४०।।

सर्पाच्या आकाराचे लाकूड मंद प्रकाशात पाहिल्यावर एकाला तो सर्प वाटला पण दुसऱ्याने लाकूड ओळखले. दोघांची प्रतिक्रिया सारखीच कशी असेल? ।।४०।।

हातीं धरितांहि डसेना । हें येकास भासेना । तरी ते त्याची कल्पना । तयासीच बाधी ।।४१।।

तो तथाकथित सर्प हातात धरला तरी चावत नाही हे बहुतेकांना कळत नाही. त्याची कल्पना त्यालाच भोवते. ।।४१।।

विंचु सर्प डसला । तेणें तोचि जाकळला । तयाचेनि लोक जाला । कासावीस कैसा ।।४२।।

एकाला विंचू किंवा साप चावला तर त्याचे परिणाम त्यालाच भोगावे लागतात. इतर लोक त्याने का कासावीस होतील? ।।४२।।

आतां तुटला अनुमान । ज्ञानियांस कळे ज्ञान । अज्ञानास जन्ममरण । चुकेचिना ।।४३।।

श्रोत्याने घेतलेल्या शंकेचे उत्तर दिले. शंका फिटली. (पहिल्या सहा ओव्या.) ज्ञान्याला ज्ञानानुभवाने मोक्ष मिळतो. अज्ञान्यांना जन्ममरण चुकत नाहीत. ।।४३।।

येका जाणण्यासाठी । लोक पडिले अटाटी । नेणपणें हिंपुटी होती । जन्ममृत्यें ।।४४।।

हे आत्मज्ञान व्हावे म्हणून साधक अपार कष्ट करितात. पण ज्यांना आत्मज्ञान होत नाही ते जन्ममरणांच्या दु:खात सापडतात. ।।४४।।

तेंचि कथानुसंधान । पुढें केलें परिछिन्न । सावधान सावधान । म्हणे वक्ता ।।४५।।

एकाला आत्मज्ञान होते व दुसऱ्याला होत नाही असे का व्हावे? याचे उत्तर पुढील समासात स्पष्ट करून सांगू. श्रोत्यांनी सावध होऊन ऐकावे. ।।४५।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'नि:संदेहनिरूपणनाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'नि:संदेहनिरूपण' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक नववा : गुणरूप

समास चवथा : जाणपणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

पृथ्वीमधें लोक सकळ । येक संपन्न येक दुर्बळ । येक निर्मळ येक वोंगळ । काय निमित्य ।।१।।

श्रोता– पृथ्वीच्या पाठीवर प्रचंड संख्येने माणसे राहतात. त्यांत काही सामर्थ्यसंपन्न तर काही दुबळी असतात. काही स्वच्छ तर काही गलिच्छ असतात. याचे कारण काय? ॥१॥

कित्येक राजे नांदती । कित्येक दरिद्र भोगिती । कितीयेकांची उत्तम स्थिती । कित्येक अधमोद्धम ।।२।।

काही सत्ताधीश सुखात राहतात तर काहीं माणसांना दारिद्र्याचे चटके सोसावे लागतात. कित्येक उत्तम परिस्थितीत रहातात तर बरेच अत्यंत हालाखीचे जिणे जगतात. ॥२॥

ऐसें काय निमित्य जालें । हें मज पाहिजे निरोपिलें । याचें उत्तर ऐकिलें । पाहिजे श्रोतीं ।।३।।

असे कोणत्या कारणाने झाले ते मला सांगावे. वक्ता– या प्रश्नाचे उत्तर आता श्रोत्यांनी ऐकावे. ॥३॥

हे सकळ गुणापासी गती । सगुण भाग्यश्री भोगिती । अवगुणास दरिद्रप्राप्ती । येदर्थीं संदेह नाहीं ।।४।।

हा सर्व गुणांचा प्रभाव आहे. सद्‌गुणाकडे भाग्योदय होऊन सुख मिळते. दुर्गुणामुळे दारिद्र्य मिळते यात शंका नाही. ॥४॥

जो जो जेथें उपजला । तो ते वेवसाई उमजला । तयास लोक म्हणती भला । कार्यकर्ता ।।५।।

जो ज्या देशात, कालात व परिस्थितीत जन्माला येतो त्यानुसार जो योग्य दिशेने (उमज) प्रयत्न (व्यवसाय) करतो त्याला लोक उत्तम कार्यकर्ता म्हणतात. ॥५॥

जाणता तो कार्य करी । नेणता कांहींच न करी । जाणता तो पोट भरी । नेणता भीक मागे ।।६।।

देशकाल परिस्थिती जाणणारा योग्य प्रयत्न करतो व चरितार्थ चालवितो. ते न जाणणारा भिकेला लागतो. ॥६॥

हें तों प्रगटचि असे । जनीं पाहातां प्रत्यक्ष दिसे । विद्येवीण करंटा वसे । विद्या तो भाग्यवंत ।।७।।

हे तर समाजात प्रत्यक्ष दिसते. ज्ञानासह प्रयत्न करणारा भाग्यवान होतो व अज्ञानामुळे करंटा होतो. ॥७॥

आपुली विद्या न सिकसी । तरी काये भीक मागसी । जेथें तेथें बुद्धी ऐसी । वडिलें सांगती ।।८।।

सर्व जाणते व अनुभवी असे सांगतात की चरितार्थाची विद्या संपादन केली नाही, तर भीक मागावी लागते. ॥८॥

वडिल आहे करंटा । आणि समर्थ होये धाकुटा । कां जे विद्येनें मोठा । म्हणोनियां ।।९।।

कोठे असे दिसते की मोठा भाऊ दरिद्री असून त्याचा लहान भाऊ भाग्यवान आहे. कारण एकच की तो उदंड विद्या शिकतो. ॥९॥

विद्या नाहीं बुद्धि नाहीं । विवेक नाहीं साक्षेप नाहीं । कुशळता नाहीं व्याप नाहीं । म्हणोन प्राणी करंटा ।।१०।।

आवश्यक ती विद्या, कमावलेली बुद्धी, व्यावहारिक साधक-बाधक विचार, प्रयत्नांचे सातत्य, कौशल्य व वाढता व्याप नसेल तर माणूस करंटा होतो. ॥१०॥

इतुकेंहि जेथें वसे । तेथें वैभवास उणें नसे । वैभव सांडितां अपैसें । पाठी लागे ।।११।।

ही सर्व गुणसंपदा असते तेथे वैभवात काय उणीव राहील? वैभव नको असले तरी ते मागे लागते! ॥११॥

वडिल समर्थ धाकुटा भिकारी । ऐका याची कैसी परी । वडिलाऐसा व्याप न करी । म्हणोनियां ।।१२।।

कोठे कोठे मोठा भाऊ भाग्यवान तर धाकटा करंटा असतो. कारण तो मोठ्यासारखा वाढता उद्योग करीत नाही. ॥१२॥

जैसी विद्या तैसी हांव । जैसा व्याप तैसें वैभव । तोलासारिखा हावभाव । लोक करिती ।।१३।।

पुरेपूर विद्या असेल तर आकांक्षांचीं क्षितिजे रुंदावतात. व्याप वाढेल तसे वैभव वाढते. लोक आपापल्या यशाच्या उंचीनुसार रुबाबात रहातात. ॥१३॥

विद्या नसे वैभव नसे । तेथें निर्मळ कैंचा असे । करंटपणें वोखटा दिसे । वोंगळ आणी विकारी ।।१४।।

जेथे विद्या व वैभव नसते तेथे स्वच्छता तरी कशी असणार? तो दारिद्र्यामुळे गलिच्छ, रोगट व कुरूप दिसतो. ॥१४॥

पशु पक्षी गुणवंत । त्यास कृपा करी समर्थ । गुण नस्तां जिणें वेर्थ । प्राणीमात्राचें ।।१५।।

पशु व पक्षीसुद्धा उपयोगी गुणांचे असतील तर त्यांना मोठे लोक सांभाळतात. सद्‌गुण नसलेल्या माणसाचे जीवन फुकट जाते. ॥१५॥

गुण नाहीं गौरव नाहीं । सामर्थ्य नाहीं महत्व नाहीं । कुशळता नाहीं तर्क नाहीं । प्राणीमात्रांसी ।।१६।।

अनेक माणसांजवळ सद्‌गुण नसल्यामुळे त्यांच्याजवळ गौरवास्पद असे काहीच नसते. सामर्थ्य, महत्त्व, व्याप, वैभव यांतील काहीही नसते. ॥१६॥

याकारणें उत्तम गुण । तेंचि भाग्याचें लक्षण । लक्षणेंविण अवलक्षण । सहजचि जालें ।।१७।।

म्हणून उत्तम गुणसंपदा हेच खरे भाग्य. उत्तम गुणांमुळे येणारी चांगली लक्षणे नसतील तर त्याला कुलक्षणी सहजच म्हणावे लागते. ॥१७॥

जनामधें जो जाणता । त्यास आहे मान्यता । कोणी येक विद्या असतां । महत्व पावे ।।१८।।

समाजामध्ये विद्यासंपन्न बुद्धिमन्ताला मान्यता मिळते. एका विद्येतही पारंगत असलेल्याला महत्त्व मिळते. ॥१८॥

प्रपंच अथवा परमार्थ । जाणता तोचि समर्थ । नेणता जाणिजे वेर्थ । निःकारण ।।१९।।

प्रपंच असो की परमार्थ या दोन्हीसंबंधी ज्ञान असले तरच ते ते सामर्थ्य मिळते. अज्ञानी माणूस फुकट जातो. त्याचे जीवनच वाया जाते. ॥१९॥

नेणतां विंचु सर्प डसे । नेणतां जीवघात असे । नेणतां कार्य नासे । कोणी येक ।।२०।।

अज्ञानी लहान मुलाने सापाला किंवा विंचवाला हात लावला तरी तो चावतोच किंवा एखाद्या ठिकाणी साप किंवा विंचू असणे शक्य आहे हे लक्षात न घेता हात किंवा पाय पडला तरी ते चावणारच! अज्ञान हे अनेक वेळा मरणाला कारण होते. अज्ञानामुळे सर्व कार्यांचा नाश होतो. ॥२०॥

नेणतां प्राणी सिंतरे । नेणपणें तऱ्हे भरे । नेणपणें ठके विसरे । पदार्थ कांहीं ।।२१।।

अज्ञानामुळेच भूतबाधा होते, तऱ्हेवाईकपणे वागणे घडते, माणूस फसतो व विसराळू बनतो. ॥२१॥

नेणतां वैरी जिंकती । नेणतां अपाईं पडती । नेणतां संव्हारती, घडती— । जीवनास ।।२२।।

बेसावधपणा अज्ञानातून येतो. त्यामुळे शत्रू त्याचा पराभव करतो. डावपेचांचे ज्ञान नसेल तर पराभव होतो. अज्ञानामुळे संकटे येतात. पिके, पशुपक्षी, मालमत्ता इ. नाश होतो. जीविताची हानी होते. ॥२२॥

आपुलें स्वहित न कळे जना । तेणें भोगिती यातना । ज्ञान नेणतां अज्ञाना । अधोगती ।।२३।।

आपले खरे हित कशात आहे ते लोकांना अज्ञानामुळे कळत नाही. त्यामुळे घात होऊन दु:खे भोगावी लागतात. ज्ञान नसलेल्या अज्ञानी माणसांची अधोगतीच होते. ॥२३॥

मायाब्रह्म जीवशिव । सारासार भावाभाव । जाटिल्यासाठीं होतें वाव । जन्ममरण ।। २४।।

माया, ब्रह्म, जीव, शिव, सार, असार, भाव, अभाव इत्यादींच्या शास्त्रशुद्ध ज्ञानाने जन्ममरणाच्या चक्रातून सुटका होते. मोक्ष मिळतो. (केवळ सदाचार, लोकोपकार व उपासनेने नव्हे!) ॥२४॥

कोण कर्ता निश्चयेंसी । बद्ध मोक्ष तो कोणासी । ऐसें जाणतां प्राणियांसीं । सुटिका घडे ।।२५।।

दृश्य जगाची उत्पत्ती, स्थिती व लय यांचे कर्तृत्व कोणाचे आहे याचे ज्ञान हवे. पिंडामध्ये आत्मा कर्ता की जीव कर्ता हे कळावे. जगात घडणाऱ्या अनिवार घटनांचे सूत्र कोणाचे हाती आहे त्याचे ज्ञान पाहिजे. बंध व मोक्ष जीवाला की आत्म्याला यांचे ज्ञान मोक्षाला कारण होते. ॥२५॥

जाणिजे देव निर्गुण । जाणिजे मी तो कोण । जाणिजे अनन्यलक्षण । म्हणिजे मुक्त ।।२६।।

खरा देव निर्गुण आहे, 'मी' कोण आहे व 'मी' ने देवाशी अनन्य होणे म्हणजे काय हे जाणणारा मुक्त होतो. ॥२६॥

जितुकें जाणोन सांडिलें । तितुकें दृश्य वोलांडिलें । जाणत्यास जाणतां तुटलें । मूळ मीपणांचें ।।२७।।

वृत्तिज्ञानाने जे जे जाणता येते ते ते विचाराने मागे सारीत सर्व दृश्य ओलांडावे. जाणण्यामागे जो जाणता आहे तो जाणला की 'मी जाणता' हा अहंकार नष्ट होतो. (दृष्टीमागील द्रष्टा = जीवात्मा. बुद्धीची उपाधी दूर होताच त्याला आत्मा म्हणतात) ॥२७॥

न जाणतां कोटीवरी । साधनें केलीं परोपरीं । तरी मोक्षास अधिकारी । होणार नाहीं ।।२८।।

अध्यात्मशास्त्राचा अभ्यास न करता हर प्रकारची कोट्यावधी साधने केली तरी मोक्षाचा साधा अधिकार सुद्धा मिळणार नाही. मोक्ष तर दूरच! ॥२८॥

मायाब्रह्म वोळखावें । आपणास आपण जाणावें । इतुक्यासाठीं स्वभावें । चुके जन्म ।।२९।।

माया व मायेचे अधिष्ठान ब्रह्म यांचे ज्ञान करून घ्यावे. जाणणारा जीवरूप 'आपण' मायिक असून जो जाणावयाचा तो आत्मरूप 'आपण' ओळखला की मोक्ष ठेवलेलाच आहे. ॥२९॥

जाणतां समर्थाचें अंतर । प्रसंगें वर्ते तदनंतर । भाग्य वैभव अपार । तेणेंचि पावे ।।३०।।

सामर्थ्यवन्ताच्या बुद्धीचे असामान्यत्व लक्षात घेऊन त्यानुसार स्वत: प्रसंगानुसार आचरण करणाराला अपार वैभव व भाग्य लाभते. सामर्थ्यवन्ताची बुद्धी घ्यावी व स्वत: तसे व्हावे. ॥३०॥

म्हणौन जाणणें नव्हे सामान्य । जाणतां होईजे सर्वमान्य । कांहींच नेणतां अमान्य । सर्वत्र करिती ।।३१।।

म्हणून कोणतेही ज्ञान कधी कमी लेखू नये. ज्ञान्याला लोकमान्यता मिळते. अज्ञान्याकडे लोक दुर्लक्ष करतात. तुच्छ समजतात. ॥३१॥

पदार्थ देखोन भूत भावी । नेणतें झडपोन प्राण ठेवी । मिथ्या आहे उठाठेवी । जाणते जाणती ।।३२।।

मंद प्रकाशात झाडाचे खोड पाहून अज्ञानी माणूस त्याला भूत समजून व त्याने आपणास झपाटले आहे असे मानून भयाने प्राण सोडतो! शहाणे अशी मूर्खपणाची व आत्मघातकी उठाठेव करीत नाहीत. ते झाडाचे खोड जाणून असतात. ॥३२॥

जाणत्यास कळे वर्म । नेणत्याचें खोटें कर्म । सकळ कांहीं धर्माधर्म । जाणतां कळे ।।३३।।

जाणता वर्मज्ञ असतो. नेणत्याचे सगळे प्रयत्न निष्फळ ठरतात. धर्म व अधर्मादी निर्णय ज्ञानामुळेच होतात. ॥३३॥

नेणत्यास येमयातना । जाणत्यास कांहींच लागेना । सकळ जाणोन, विवंचना– । करी तो मुक्त ।।३४।।

पापामुळे यमयातना भोगाव्या लागतात हे न कळल्याने नेणता त्याच भोगतो. जाणता पापकर्मापासून दूर राहून अध्यात्मशास्त्राचा संप्रदायशुद्ध अभ्यास करून मुक्त होतो. ॥३४॥

नेणतां काहीं राजकारण । अपमान करून घेती प्राण । नेणतां कठीण वर्तमान । समस्तांस होये ।।३५।।

राजकारण, समाजकारण, अर्थकारण इ. जीवनाची शास्त्रे न जाणणाऱ्यास पदोपदी अपमान सोसावे लागतात. चालू परिस्थितीचे भान नसेल तर जगणे कठीण होते. ॥३५॥

म्हणोनियां नेणणें खोटें । नेणते प्राणी ते करंटे । जाणतां विवरतां तुटे । जन्ममरण ।।३६।।

म्हणून अज्ञानाने आयुष्याचा नाश होतो व करंटपणा वाट्याला येतो. पण अध्यात्मशास्त्राच्या श्रवण, मनन व निदिध्यासनाने जन्ममरणाचे बंधन गळून पडते. ॥३६॥

म्हणोन अलक्ष करूं नये । जाणणें हाचि उपाये । जाणतां सांपडे सोये । परलोकाची ।।३७।।

म्हणून ज्ञानाकडे जराही दुर्लक्ष करू नये. ज्ञान हाच यशस्वी जीवनाचा एकमेव उपाय आहे. आत्मज्ञान झाले की मोक्षरूप परलोक हाती लागतो. ॥३७॥

जाणणें सकळांस प्रमाण । मूर्खास वाटे अप्रमाण । परंतु अलिप्तपणाची खूण । जाणतां कळे ।।३८।।

सर्वसाधारण सर्वांनाच ज्ञानाचे अपार महत्त्व कळते. केवळ मूर्खांना त्याचे सोयरसुतक नसते! पण जीवनात आपले असंगत्व कसे सांभाळावे ते ज्ञान्यालाच कळते. ॥३८॥

येक जाणणें करून परतें । कोण सोडी प्राणीयातें । कोणी येक कार्य जें तें । जाटिल्याविण न कळे ।।३९।।

एका ब्रह्मज्ञानावाचून या जगात माणसाला संसारबंधनातून सोडविणारे आहे कोण? व्यवहार किंवा परमार्थ दोन्ही ज्ञानावाचून यशस्वी होत नाहीत. ॥३९॥

जाणणें म्हणिजे स्मरण । नेणणें म्हणिजे विस्मरण । दोन्हींमधें कोण प्रमाण । शाहाणे जाणती ।।४०।।

आत्मस्वरूपाचे स्मरण हेच ज्ञान. त्याचे विस्मरण हेच अज्ञान. यातील काय मानावे हे विद्वानांनाच कळते. ॥४०॥

जाणते लोक शाहाणे । नेणते वेडे दैन्यवाणे । विज्ञान तेंहि जाणपणें । कळों आलें ।।४१।।

जे ज्ञानी असतात तेच शहाणे असून अज्ञानी लोक वेडेपणामुळे दैन्यवाणे जीवन जगतात. या ज्ञान व अज्ञानाबरोबर विज्ञान म्हणजे काय हेही ज्ञानानेच कळते! ॥४१॥

जेथें जाणपण खुंटले । तेथें बोलणेंही तुटलें । हेतुरहित जालें । समाधान ।।४२।।

'मी ब्रह्म जाणले' अशी अन्त:करण वृत्तीही जेथे शिल्लक रहात नाही अशा सिद्ध स्थितीला विज्ञान म्हणतात. तेथे सांगणे व साधना संपून विषयरहित वा निरपेक्ष समाधान मिळते. ॥४२॥

श्रोते म्हणती हें प्रमाण । जालें परम समाधान । परी पिंडब्रह्मांडऐक्यलक्षण । मज निरोपावें ।।४३।।

श्रोता- हे सर्व मला पटले. पूर्ण समाधान वाटले. आता पिण्ड व ब्रह्मांडाच्या ऐक्याचे लक्षण सांगावे. ॥४३॥

ब्रह्मांडी तेचि पिंडीं असे । बहुत बोलती ऐसें । परंतु याचा प्रत्यय विलसे । ऐसें केलें पाहिजे ।।४४।।

अनेक ग्रंथांतून व प्रवचनातून 'पिण्डी ते ब्रह्माण्डी' असे सांगितले जाते. परंतु ते स्पष्टपणे समजेल अशा रीतीने सांगावे. ॥४४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'जाणपणनिरूपणनाम' समास चवथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'जाणपणनिरूपण' नावाचा चवथा समास समाप्त

दशक नववा : गुणरूप

समास पाचवा : अनुमाननिर्शन

॥ श्रीराम समर्थ ॥

पिंडासारिखी ब्रह्मांडरचना । नये आमुच्या अनुमाना । प्रचित पाहातां नाना । मतें भांबावती ।।१।।

श्रोता– ब्रह्मांडाची रचना पिंडासारखीच आहे हे आम्हाला पटत नाही. तसा अनुभव घ्यावा तर त्यासंबंधी अनेक मते गोंधळ निर्माण करतात. ॥१॥

जें पिंडीं तेचि ब्रह्मांडीं । ऐसी बोलावयाची प्रौढी । हें वचन घडीनें घडी । तत्वज्ञ बोलती ।।२।।

'जे पिंडी ते ब्रह्मांडी' असे मोठ्या झोकात बोलण्याची रीत आहे. तत्त्ववेत्ते सुद्धा वरचेवर तसे सांगत असतात. ॥२॥

पिंड ब्रह्मांड येक राहाटी । ऐसी लोकांची लोकधाटी । परी प्रत्ययाचे परीपाटीं । तगों न सके ।।३।।

पिंड व ब्रह्मांड ह्यांची घटना सारखीच आहे असे परंपरेने सांगितले जाते. पण अनुभवाच्या कसोटीवर हे सांगणे टिकत नाही. ॥३॥

स्थूळ सूक्ष्म कारण माहाकारण । हे च्यारी पिंडींचे देह जाण । विराट हिरण्य अव्याकृत मूळप्रकृती हे खूण । ब्रह्मांडींची ।।४।।

स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण हे पिंडाचे चार देह असून ब्रह्मांडाच्या त्याच देहांना विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत व मूळ प्रकृती असे अनुक्रमे म्हणतात. ॥४॥

हे शास्त्राधाटी जाणावी । परी प्रचित कैसी आणावी । प्रचित पाहातां गथागोवी । होत आहे ।।५।।

असे सांगण्याची शास्त्राची रीत असली तरी त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेताना गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. ॥५॥

पिंडीं आहे अंत:करण । तरी ब्रह्मांडीं विष्णु जाण । पिंडी बोलिजेतें मन । तरी ब्रह्मांडीं चंद्रमा ।।६।।

पिंडी बुद्धी ऐसें बोलिजे । तरी ब्रह्मांडीं ब्रह्मा ऐसें जाणिजे । पिंडी चित्त ब्रह्मांडी वोळखिजे । नारायेणु ।।७।।

पिंडी बोलिजे अहंकार । ब्रह्मांडीं रुद्र हा निर्धार । ऐसा बोलिला विचार । शास्त्रांतरीं ।।८।।

पिंड ➔ ब्रह्मांड
🡣 🡣
अन्त:करण ➔ विष्णू
🡣 🡣
मन ➔ चंद्रमा
🡣 🡣
बुद्धी ➔ ब्रह्मदेव
🡣 🡣
चित्त ➔ नारायण
🡣 🡣
अहंकार ➔ रुद्र ॥६ ते ८॥

तरी कोण विष्णूचें अंत:कर्ण । चंद्राचें कैसें मन । ब्रह्मयाचें बुद्धिलक्षण । मज निरोपावें ।।९।।
नारायेणाचें कैसें चित्त । रुद्रअहंकाराचा हेत । हा विचार पाहोन नेमस्त । मज निरोपावा ।।१०।।

पण विष्णूचे अन्त:करण, चंद्राचे मन, ब्रह्माची बुद्धी, नारायणाचे चित्त, रुद्राचा अहंकार इत्यादींचे स्पष्टीकरण सांगावे. ॥९-१०॥

प्रचितनिश्चयापुढें अनुमान । जैसें सिंहापुढें आलें स्वान । खऱ्यापुढें खोटें प्रमाण । होईल कैसें ।।११।।

अनुभवाने होणाऱ्या निश्चयापुढे केवळ कल्पना कशी टिकेल? सिंहापुढे कुत्र्याचा टिकाव कसा लागेल? खऱ्यासमोर खोटे कसे उभे राहील? ॥११॥

परी यास पारखी पाहिजे । पारखीनें निश्चय लाहिजे । परीक्षा नस्तां राहिजे । अनुमानसंशई ।।१२।।

हा विषय लक्षात येण्यासाठी त्या विषयाचा जाणता पाहिजे. त्याच्या मदतीनेच निश्चय होतो. अन्यथा केवळ कल्पना संशयातच अडकवून ठेवते. ॥१२॥

विष्णु चंद्र आणी ब्रह्मा । नारायेण आणी रुद्रनामा । यां पाचांचीं अंत:कर्णपंचकें आम्हा । स्वामी निरोपावी ।।१३।।

विष्णू, चंद्र, ब्रह्मदेव, नारायण व रुद्र ह्यांची अन्त:करण पंचके आम्हाला समजावून सांगावीत. ॥१३॥

येथें प्रचित हें प्रमाण । नलगे शास्त्राचा अनुमान । अथवा शास्त्रीं तरी पाहोन । प्रत्ययो आणावा ।।१४।।

ह्या बाबतीत प्रत्यक्ष अनुभवच आला पाहिजे. केवळ शास्त्राचे शाब्दिक प्रमाण नको. शास्त्राभ्यासाने अनुभव येत असेल तर त्यालाही हरकत नाही. ॥१४॥

प्रचितीवीण जें बोलणें । तें अवघेंचि कंटाळवाणें । तोंड पसरून जैसें सुणें । रडोन गेलें ।।१५।।

अनुभवावाचून असलेले बोलणें तोंड उघडून विव्हळणाऱ्या कुत्र्याच्या रडण्याप्रमाणें कंटाळवाणे असते! ॥१५॥

तेथें काये हो ऐकावें । आणी काये शोधून पाहावें । जेथें प्रत्ययाच्या नावें । सुन्याकार ।।१६।।

जेथे अनुभवाचा खडखडाट असतो त्याचे काय ऐकावे? त्यातून कोणत्या लाभाची अपेक्षा ठेवावी? ॥१६॥

आवघें आंधळेचि मिळाले । तेथें डोळसाचें काय चाले । अनुभवाचे नेत्र गेले । तेथें अंधकार ।।१७।।

आंधळ्यांच्या सभेत डोळसाचे शहाणपण चालत नाही. जेथे अनुभवाचे डोळे नसतात तेथे आंधळ्यांचे साम्राज्य असते. ॥१७॥

नाहीं दुग्ध नाहीं पाणी । केली विष्ठेची सारणी । तेथें निवडायाचे धनी । ते एक डोंबकावळे ।।१८।।

राजहंस दूध व पाण्यातून दूध निवडतो. जेथे दूध व पाणी ह्यांचेऐवजी विष्ठाच असते तेथे निवडण्याचे काम करणारे डोमकावळेच असतात! ॥१८॥

आपुले इछेनें बोलिले । पिंडाऐसें ब्रह्मांड कल्पिलें । परी तें प्रचितीस आलें । कोण्या प्रकारें ।।१९।।

स्वत:चे डोके लढवून पिंड व ब्रह्मांडाच्या ऐक्याची कल्पना केली तर ती प्रत्यक्ष अनुभवाला कशी येणार? ॥१९॥

म्हणोन हा अवघाच अनुमान । अवघें कल्पनेचें रान । भलीं न घ्यावें आडरान । तश्करीं घ्यावें ।।२०।।

येथे केवळ अंदाज व कल्पनांचे जंगल माजलेले असते. साधकाने त्यात शिरू नये. अशा आडरानात परमार्थ प्रांतातील उपऱ्यांनी खुशाल शिरावे! ॥२०॥

कल्पून निर्मिले मंत्र । देव ते कल्पनामात्र । देव नाहीं स्वतंत्र । मंत्राधेन ।।२१।।

मूर्तीमध्ये प्राणप्रतिष्ठा करण्याचे मंत्र ही मानवी कल्पना आहे. देव ही सुद्धा कल्पनाच आहे. कारण 'देवता मंत्राधीन असतात' असे शास्त्र सांगते. ते स्वतंत्र नसतात. ॥२१॥

येथें न बोलतां जाणावें । बोलणें विवेका आणावें । आंधळें पाउलीं वोळखावें । विचक्षणें ।।२२।।

हा विचार फारसा गाजावाजा न करता समजावून घ्यावा. (श्रद्धेला धक्का लावू नये.) तो विवेकाने जाणून घ्यावा. जो चाणाक्ष असतो तो एखाद्याच्या चालण्यावरूनच त्याला दिसत नाही हे ओळखतो. ते बोलून दाखवत नाही. ।।२२।।

जयास जैसें भासलें । तेणें तैसें कवित्व केलें । परी हें पाहिजे निवडिलें । प्रचितीनें ।।२३।।

ज्याला जसे वाटते तसे तो शब्दबद्ध करतो. पण त्याचा खरे-खोटेपणा अनुभवाने निवडावा. ।।२३।।

ब्रह्म्यानें सकळ निर्मिलें । ब्रह्म्यास कोणें निर्माण केलें । विष्णूनें विश्व पाळिलें । विष्णूस पाळिता कवणु ।।२४।।

शास्त्र सांगते की ही सर्व सृष्टी ब्रह्मदेवाने उत्पन्न केली. पण ब्रह्मदेवाला कोणी निर्माण केले? विष्णू ती सांभाळतो. पण विष्णूला कोण सांभाळतो? ।।२४।।

रुद्र विश्वसंव्हारकर्ता । परी कोण रुद्रास संव्हारिता । कोण काळाचा नियंता । कळला पाहिजे ।।२५।।

रुद्र सृष्टीचा संहार करतो. पण त्याचा नाश कोण करतो? काळावर कोणाचे नियंत्रण आहे? ।।२५।।

याचा कळेना विचार । तो अवघा अंधकार । म्हणोनियां सारासार । विचार करणें ।।२६।।

हे सर्व जोपर्यन्त समजत नाही तोपर्यन्त अज्ञानाचा अंधार पसरलेला असतो. म्हणून वस्तुस्थितीचा विचार करावा. ।।२६।।

ब्रह्मांड स्वभावेंचि जालें । परंतु हें पिंडाकार कल्पिलें । कल्पिलें परी प्रत्यया आलें । नाहीं कदा ।।२७।।

ब्रह्मांड त्याचे ते उत्पन्न झाले असेही म्हणतात. त्याला पिंडासारख्या आकाराची कल्पना केली. पण तसा अनुभव कधीच येत नाही. ।।२७।।

पाहातां ब्रह्मांडाची प्रचिती । कित्येक संशय उठती । हें कल्पनिक श्रोतीं । नेमस्त जाणावें ।।२८।।

ब्रह्मांडाचे प्रत्यक्ष स्वरूप पाहिले तर वरील संदर्भात अनेक शंका निर्माण होतात. म्हणून त्यांच्या ऐक्याचा विचार काल्पनिक आहे हे श्रोत्याने पक्के लक्षात ठेवावे. ।।२८।।

पिंडासारिखी ब्रह्मांडरचना । कोण आणितो अनुमाना । ब्रह्मांडीं पदार्थ नाना । ते पिंडीं कैंचे ।।२९।।

ब्रह्मांडाची व पिंडाची रचना सारखी आहे असा तर्क कोणाला तरी करणे शक्य आहे का? ब्रह्मांड ज्या अनेक पदार्थांनी भरलेले दिसते ते पिंडात असणे शक्य नाही. ।।२९।।

औटकोटी भुतावळी । औटकोटी तीर्थावळी । औटकोटी मंत्रावळी । पिंडी कोठें ।।३०।।

ब्रह्मांडात साडेतीन कोटी भूते, तीर्थे व मंत्र आहेत असे म्हणतात. हे सर्व पिंडात कोठे असतात? ।।३०।।

तेतीस कोटी सुरवर । अठ्यासि सहस्र ऋषेश्वर । नवकोटी कात्यायेणीचा विचार । पिंडीं कोठें ।।३१।।

च्यामुंडा छपन्न कोटी । कित्येक जीव कोट्यानुकोटी । चौऱ्यासी लक्ष योनींची दाटी । पिंडी कोठें ।।३२।।

ब्रह्मांडीं पदार्थ निर्माण जाले । पृथकाकारें वेगळाले । तेहि तितुके निरोपिले । पाहिजेत पिंडीं ।।३३।।

जितुक्या औषधी तितुकीं फळे । नाना प्रकारीं रसाळें । नाना बीजें धान्यें सकळें । पिंडी निरोपावीं ।।३४।।

हे सांगतां पुरवेना । तरी उगेचि बोलावेना । बोलिलें न येतां अनुमाना । लाजिरवाणें ।।३५।।

तरी हें निरोपिलें नवचे । फुकट बोलतां काय वेचे । याकारणें अनुमानाचें । कार्य नाहीं ।।३६।।

तेहेतीस कोटी देव, अठ्यांशी हजार ऋषी, नऊ कोटी कात्यायनी, छप्पन्न कोटी चामुंडा, कोट्यवधी जीव, चौऱ्यांशी लक्ष योनींची गर्दी पिंडात कोठे असते? ब्रह्मांडात निरनिराळ्या आकाराचे पर्वतादी पदार्थ निर्माण झाले आहेत. ते सर्व पिंडात दाखवता आले पाहिजेत. अनेक वनस्पती व त्यांची नाना रसांची फळे, बिया व धान्ये पिंडात दाखवावीत. हे असे किती सांगावे? उगीच किती बोलत बसावे? जे बोलणे अनुभवाला येत नाही ते लाजलावणे असते. म्हणून हे कितीही सांगितले तरी संपणार नाही. फुकट बोलायला काय बिघडते? म्हणून हे अंदाजाचे काम नाही. ॥३१-३६॥

पांचभूतें ते ब्रह्मांडी । आणी पांचचि वर्तती पिंडी । याची पाहावी रोकडी । प्रचीत आतां ।।३७।।

वक्ता– ब्रह्मांडात जशी पंचमहाभूते आहेत तशीच ती पिंडात आहेत ह्याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा. ॥३७॥

पांचा भूतांचे ब्रह्मांड । आणी पंचभूतिक हें पिंड । यावेगळें तें उदंड । अनुमानज्ञान ।।३८।।

ब्रह्मांडांच्या व पिंडाच्या घटनेत पाच महाभूतेच आहेत. याहून ह्या संदर्भात केलेला उदंड विचार केवळ काल्पनिक आहे. (देह पंचभूत मेळावा– 'ज्ञानेश्वरी' 'पंचभूतात्मकम् विश्वं'– योगवाशिष्ठ.) ॥३८॥

जितुकें अनुमानाचें बोलणें । तितुकें वमनप्राये त्यागणें । निश्चयात्मक तेंचि बोलणें । प्रत्ययाचें ।।३९।।

जे बोलणे केवळ अंदाजाचे असते ते उलटीतून पडणाऱ्या अन्नाप्रमाणे त्याज्य मानावे. अनुभवातून उतरलेले निश्चयात्मक बोलणेच स्वीकारावे. ॥३९॥

जें चि पिंडीं तेंचि ब्रह्मांडीं । प्रचित नाहीं कीं रोकडी । पंचभूतांची तांतडी । दोहीकडे ।।४०।।

दोन्हीत पांचमहाभूते भरलेली आहेत हे कळणे हाच प्रत्यक्ष अनुभव नाही काय? म्हणून पिंड व ब्रह्मांड एक आहेत. ॥४०॥

म्हणोनि देहींचे थानमान । हा तों अवघाचि अनुमान । आतां येक समाधान । मुख्य तें कैसें ।।४१।।

ब्रह्मांडातील वेगळ्या वेगळ्या ठिकाणी असलेल्या (स्थान) व निरनिराळ्या आकाराच्या (मान) वस्तू पिंडात आहेत, अशी कल्पना करणे हा कुतर्क आहे. आता ह्या विषयाचे समाधान करणारे मुख्य व स्पष्ट विवेचन ऐका. ॥४१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अनुमाननिर्शननाम' समास पाचवा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'अनुमाननिरसन' नांवाचा पाचवा समास समाप्त

दशक नववा : गुणरूप

समास सहावा : गुणरूपनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

आकाश जैसें निराकार । तैसा ब्रह्माचा विचार । तेथें वायोचा विकार । तैसी मूळमाया ।।१।।

ब्रह्म आकाशाप्रमाणे निराकार आहे. आकाशात जसा अचानक वायू निर्माण होतो त्याप्रमाणे ब्रह्मस्वरूपात माया उद्भवते. ॥१॥

हें दासबोधीं असे बोलिलें । ज्ञानदशकीं प्रांजळ केलें । मूळमायेंत दाखविलें । पंचभूतिक ।।२।।

हे ह्याच ग्रंथाच्या ज्ञानदशकात सविस्तर सांगितले आहे. सूक्ष्म पंचभूतांचा मूळमायेत समावेश असल्याचे तेथे म्हटले आहे. ॥२॥

तेथें जाणीव तो सत्वगुण । मध्य तो रजोगुण । नेणीव तमोगुण । जाणिजे श्रोतीं ।।३।।

त्याच मूळमायेत त्रिगुणही सुप्तपणे असतात. ज्ञान हे सत्त्वगुणाचे, ज्ञान व अज्ञान ह्यांचे साहचर्य रजोगुणाचे व अज्ञान तमोगुणाचे असते (जाणीव = ज्ञान.). ॥३॥

म्हणाल तेथें कैंची जाणीव । तरी ऐका याचा अभिप्राव । पिंडीं माहाकारण देहीं सर्व– । साक्षिणी अवस्था ।।४।।

मूळमायेत जाणीव काय स्वरूपात रहाते ते आता समजावून घ्यावे. पिंडाच्या सर्वसाक्षिणी तुर्यावस्थेला महाकारण शरीर म्हणतात. त्यात शुद्ध ज्ञान असते. (पिंड म्हणजे जीवाचे शरीर. त्या जीवाच्या जागृती, स्वप्न व सुषुप्ती ह्या तीन अवस्था आहेत. ह्या सर्व अवस्थांचे साक्षित्व करणारी तुर्य नावाची चौथी अवस्था आहे. तुर्य तिन्ही अवस्थांच्या अनुभवांनी लिप्त होत नाही. ज्ञानरूप आत्मा हे तिचे स्वरूप आहे. म्हणून त्यांत ज्ञान किंवा जाणीव आहे. महाकारण देह– पहा. विवेक सिंधू. उत्तरार्ध प्रकरण ४) ॥४॥

तैसी मूळप्रकृती ती ब्रह्मांडींचें । देह माहाकारण साचें । म्हणोन तेथें जाणीवेचें । अधिष्ठान आलें ।।५।।

ब्रह्मांड हे ईश्वराचे शरीर आहे. त्या ईश्वराचा मूळप्रकृती हा महाकारण देह आहे. ईश्वर नित्यमुक्त, व शुद्धसत्त्वाचा असल्याने त्यालाही ज्ञान आहे. ॥५॥

असो मूळमायेभीतरीं । गुप्त त्रिगुण वास करी । पष्ट होती संधी चतुरीं । जाणावी गुणक्षोभिणी ।।६।।

मूळमायेमध्ये त्रिगुण गुप्तपणे असतात. अव्यक्त व्यक्त दशेला येण्याच्या संधिकाळी ते गुण प्रगट होऊ लागतात. ह्या मायेला गुणांचा क्षोभ करणारी माया म्हणतात. ॥६॥

जैसा तृणाचा पोटराकळा । पुढें उकलोन होये मोकळा । तैसी मूळमाया अवलीळा । गुणा प्रसवली ।।७।।

मका, गहू इ. धान्ये गवताच्या जातीची आहेत. त्या गवताच्या पोटात धान्याचे कणीस गुप्तपणे रहाते व नंतर ते उमलून मोकळे होते. त्याप्रमाणे मूळमाया अगदी सहजतेने गुणांना प्रगट करते. ॥७॥

मूळमाया वायोस्वरुप । ऐक गुणक्षोभिणीचें रुप । गुणविकार होतांचि अल्प । गुणक्षोभिणी बोलिजे ।।८।।

वायू हे मूळमायेचे स्वरूप आहे. (वायू म्हणजे शक्ती.) तिचे किंचित गुणांत परिवर्तन (विकार) होऊ लागताच तिला गुणक्षोभिणी म्हणतात. (विकार = बदल) ॥८॥

पुढें जाणीव मध्यस्त नेणीव । मिश्रित चालिला स्वभाव । तेथें मातृकास ठाव । शब्द जाला ।।९।।

ह्या गुणक्षोभिणीला व्यक्तदशा येताना जाणीव (सत्त्व) मध्यस्थ (रज) व नेणीव (तम) असे त्रिगुणात्मक परिवर्तन होते. त्यांचे ठिकाणी ध्वनी उत्पन्न झाला. वर्ण मालेचे मूळ ह्या ध्वनीत आहे. (ध्वनी = प्रणव.) ॥९॥

तों शब्दगुण आकाशींचा । ऐसा अभिप्राव येथीचा । शब्देंचि वेदशास्त्रांचा । आकार जाला ।।१०।।

शब्द किंवा ध्वनी हा आकाश ह्या महाभूताचा गुण आहे असे समजावे. बाराखडीमुळेच वेदांची रचना होऊ शकली. (बाराखडी = वर्णमाला.) ॥१०॥

पंचभूतें त्रिगुणाकार । अवघा वायोचा विकार । जाणीवनेणीवेचा विचार । वायोचि करितां ।।११।।

पाच महाभूते व त्रिगुणांनी तयार झालेली जीवसृष्टी ही वायुरूप शक्तीची अभिव्यक्ती (विकार) असून ज्ञान व अज्ञान हा बुद्धिसापेक्ष विचार शक्तीमुळेच होऊ शकतो. (समर्थांचा वायू हा शक्तिवाचक शब्द फार आवडता आहे.) ॥११॥

वायो नस्तां कैंची जाणीव । जाणीव नस्तां कैंची नेणीव । जाणीवनेणीवेस ठाव । वायोगुणें ।।१२।।

प्राण हे वायूचेच एक स्वरूप आहे. तो आहे म्हणून बुद्धी कार्यक्षम आहे. बुद्धीमुळे ज्ञान होते. अज्ञान ही ज्ञानसापेक्ष संकल्पना असून ती दोन्ही वायूमुळेच होतात. ॥१२॥

जेथें मुळींच नाहीं चळण । तेथें कैंचें जाणीवलक्षण । म्हणोनि वायोचा गुण । नेमस्त जाणावा ।।१३।।

जेथे कोणतेच स्पंदन (Activity) नसते तेथे वृत्तिज्ञान कसे असेल? म्हणून वृत्तिज्ञान वायूमुळेच होते हे नक्की. ॥१३॥

येकापासून येक जालें । हें येक उगेंचि दिसोन आलें । स्वरुप मुळींच भासलें । त्रिगुणभूतांचें ।।१४।।

आकाश, वायू, अग्नी इ. उत्पत्तीचा क्रम असला तरी पंचभूते व त्रिगुण ह्यापासून झालेला अष्टधा प्रकृतीचा एक पिंड तेवढा दिसतो. प्रत्यक्षात तोच दिसतो. ॥१४॥

ऐसा हा मुळींचा कर्दमु । पुढें पष्टतेचा अनुक्रमु । सांगतां येकापासून येक उगमु । हें हि खरें ।।१५।।

एकूण हे मूळमायेचे मिश्रण आहे. पुढे आकाशापासून पृथ्वीपर्यन्त ती तत्त्वे एकामागून एक व एकातून एक स्पष्ट होत गेली हेही शास्त्र सांगते त्याप्रमाणे खरेच आहे. ॥१५॥

वायोचा कर्दम बोलिला । तयापासून अग्नि जाला । तोहि पाहातां देखिला । कर्दमुचि ।।१६।।

आकाश व वायूच्या मिश्रणातून अग्नी उत्पन्न झाला व तोही त्याचे सगट तिन्हींचे मिश्रणच आहे. ॥१६॥

अग्नीपासून जालें आप । तेंहि कर्दमस्वरूप । आपापासून पृथ्वीचें रूप । तेंहि कर्दमरूपी ।।१७।।

अग्नीरूप मिश्रणापासून आपरूप मिश्रण व आपरूप मिश्रणापासून पृथ्वीरूप मिश्रण झाले. ॥१७॥

येथे आशंका उठिली । भूतांस जाणीव कोठें देखिली । तरी भूतांत जाणीव हे ऐकिली । नाहीं वार्ता ।।१८।।

येथे अशी शंका येते की पाच महाभूतांत ज्ञान कोठे पहावे? अचेतन महाभूतांना जाणीव असते असे कोठेही सांगितलेले नाही. ॥१८॥

जाणीव म्हणिजे जाणतें चळण । तेंचि वायोचें लक्षण । वायोआंगीं सकळ गुण । मागां निरोपिलें ।।१९।।

शुद्ध जाणीव वृत्तिसापेक्ष जाणिवेच्या स्वरूपात वायूमुळे भासते. शुद्ध जाणिवेत जणू हालचाल होते ती वायूमुळे होय. जाणीवपूर्वक गतिशीलता हे वायूचे लक्षण आहे. ८-५ मध्ये वायूचे सर्व गुण सांगितले आहेत. ॥१९॥

म्हणोन जाणीवनेणीवमिश्रित । अवघें चालिलें पंचभूत । म्हणोनियां भूतांत । जाणीव असे ।।२०।।

पंचभूतांचे सर्व व्यापार सत्त्व-तम-रजाच्या मिश्रणामुळें होतात. म्हणून पंचभूतात जाणीव आहे. (मायेत ब्रह्माचे प्रतिबिंब पडले की त्याला ईश्वर म्हणतात. तो सर्वज्ञ आहे. ईश्वर सर्वच चेतन अचेतन सृष्टीत व्यापून असल्याने त्याचा ज्ञान हा गुणही भूतांत व सत्वादि त्रिगुणात आहे. तो त्यांच्यात व्यापून राहून त्यांचे नियमन करतो. समर्थ अनेक ठिकाणी ईश्वराला वायो म्हणतात.) ॥२०॥

कोठें दिसे कोठें न दिसे । परी ते भूतीं व्यापून असे । तिक्षण बुद्धि करितां भासे । स्थूळ सूक्ष्म ।।२१।।

ही जाणीव किंवा ज्ञान चेतनात दिसते व अचेतनात दिसत नाही तरी ती सर्वत्र व्यापून आहे. अति सूक्ष्म विचाराने हे लक्षात येते की चेतनात ती स्पष्ट दिसते. अचेतनात दिसत नाही. लक्षात घ्यावी लागते. ॥२१॥

पंचभूतें आकारलीं । भूतीं भूतें कालवलीं । तरी पाहातां भासली । येक स्थूळ येक सूक्ष्में ।।२२।।

भूतांचे परस्पर पंचीकरण होऊन ती साकार झाली. तरी त्यांत एक सूक्ष्म (आकाश) तर एक स्थूळ (पृथ्वी) दिसते. ॥२२॥

निरोधवायो न भासे । तैसी जाणीव न दिसे । न दिसे परी ते असे । भूतरूपें ।।२३।।

वारा पडला की त्याचा स्पर्श जाणवत नाही. किंवा तो आडला तरी जणू नाहीसा होतो. त्याप्रमाणे जाणीव दिसली नाही तरी ती भूतांमध्ये असते. ॥२३॥

काष्ठीं अग्नी दिसेना । निरोधवायो भासेना । जाणीव तैसी लक्षेना । येकायेकीं ।।२४।।

लाकडातील अग्नी सुप्त असतो. वायू आडला की तो नाही असे वाटते. त्याप्रमाणे जाणीव चटकन कळत नाही. ॥२४॥

भूतें वेगळालीं दिसती । पाहातां येकचि भासती । बहुत धूर्तपणें प्रचिती । वोळखावी ।।२५।।

वर वर पाहिले तर पांची भूते वेगळी दिसतात. पण सूक्ष्म बुद्धीने त्यांचा ठाव घेऊन त्यांच्यात झालेले पंचीकरण ओळखावे. ॥२५॥

ब्रह्मापासून मूळमाया । मूळमायेपासून गुणमाया । गुणमायेपासून तया । गुणास जन्म ।।२६।।

ब्रह्म-मूळमाया-गुणमाया-त्रिगुण अशी उत्पत्तीची परंपरा आहे. ॥२६॥

गुणापासूनियां भूतें । पावलीं पष्ट दशेतें । ऐसियांचीं रूपें समस्तें । निरोपिलीं ।।२७।।

त्रिगुणांपासून पंचमहाभूते साकार झाली. अशा रीतीने त्या सर्वांचे स्वरूप सांगून झाले. ॥२७॥

आकाश गुणापासून जालें । हें कदापी नाहीं घडलें । शब्दगुणास कल्पिलें । आकाश वायां ।।२८।।

श्रोता– गुणांपासून आकाश निर्माण होणे कधीच शक्य नाही. आकाशाचा शब्द हा गुण आहे असे पूर्वी (ओवी १०) सांगितले आहे. गुणापासून गुणी कसा उत्पन्न होईल? हे बोलणे व्यर्थ होय. (येथे श्रोत्याने सत्त्वादी त्रिगुण व शब्दस्पर्शादी तन्मात्रा स्वरूप गुण यांची गल्लत केली आहे. त्यामुळे समर्थ त्याला झाडतात!) ॥२८॥

येक सांगतां येकचि भावी । उगीच करी गथागोवी । तया वेड्याची उगवी । कोणें करावी ।।२९।।

एक सांगितले असता दुसरेच डोक्यात घेऊन बसतो! उगीच गोंधळ माजवतो. त्या मूर्खाचे समाधान कोण व कसे करणार? ॥२९॥

सिकविल्यां हि कळेना । उमजविल्यां हि उमजेना । दृष्टांतेंहि तर्केना । मंदरूप ।।३०।।

व्यवस्थित सांगूनही समजत नाही. फोड करूनही डोक्यात शिरत नाही. योग्य दृष्टान्त देऊनही मठ्ठपणामुळे कळत नाही. ॥३०॥

भूतांहून भूत थोर । हा हि दाविला विचार । परी भूतांवडिल स्वतंत्र । कोण आहे ।।३१।।

पृथ्व्यादिकांपासून आकाशापर्यंत अधिकाधिक सूक्ष्म (थोर) आहेत हे सांगितलेच आहे. पण त्यांच्याहून सूक्ष्म व स्वतंत्र कोण आहे? त्यांचा शास्ता कोण? ॥३१॥

जेथें मूळमाया पंचभूतिक । तेथें काये राहिला विवेक । मूळमायेपरतें येक । निर्गुणब्रह्म ।।३२।।

मुळात मूळमायेतच सुप्त पंचभूते असल्याने त्यांचा विचार कितीसा करावा? त्या मूळ मायेचे अधिष्ठान (परते) निर्गुण परब्रह्म आहे. ॥३२॥

ब्रह्मीं मूळमाया जाली । तिची लीळा परीक्षिली । तंव ते निखळ वोतली । भूतेंत्रिगुणांची ।।३३।।

ब्रह्मावर मूळमाया प्रगट झाली. तिच्या खेळावरून तिची परीक्षा करताना ती भूते व गुणांची ओतीव मूर्ती आहे हे कळते (उदा. उत्पत्ती हा मायेचा खेळ दिसतो. रजोगुणाचा उत्पत्ती हा धर्म आहे. म्हणून मायेत रजोगुण आहे. इ. इ.) ॥३३॥

भूतें विकारवंत चत्वार । आकाश पाहातां निर्विकार । आकाश भूत हा विचार । उपाधीकरितां ।।३४।।

वायू, अग्नी, आप व पृथ्वी या चार भूतांना विकार आहेत. आकाश निर्विकार आहे. (उदा. भेद हा विकार आहे. वायूमध्ये भेद आहेत.) घट-मठादी उपाधीत सापडल्यासारखे होते म्हणून आकाशाला भूत मानले एवढेच! ॥३४॥

पिंडी व्यापक म्हणोन जीव । ब्रह्मांडीं व्यापक म्हणोन शिव । तैसाच हाहि अभिप्राव । आकाशाचा ।।३५।।

पिंडाच्या उपाधीत व्यापून राहतो तो जीव. ब्रह्मांडाच्या उपाधीत व्यापून राहतो तो शिव. हे दोन्ही जसे निराकार आहेत तसेच घटाकाश व मठाकाश निराकार आहे. ॥३५॥

उपाधीमधें सापडलें । सूक्ष्म पाहातां भासलें । इतुक्यासाठीं आकाश जालें । भूतरूप ।।३६।।

उपाधीत सापडल्यासारखे वाटले व 'ज्या अर्थी आकाश व्यापक आहे त्या अर्थी ते घटादी उपाधीत आहे' असा तर्कशुद्ध विचार करून त्याचे अस्तित्व स्वीकारावे लागते म्हणून ते भूत आहे. ॥३६॥

आकाश अवकाश तो भकास । परब्रह्म तें निराभास । उपाधी नस्ता जें आकाश । तेंचि ब्रह्म ।।३७।।

आकाशात सर्व पदार्थ सामावून घेण्यासाठी वाव म्हणजे अवकाश असतो. कारण ते पूर्ण रिकामे (भकास) असते. 'येथे पोकळी आहे' अशा रीतीने आकाश भासते. ब्रह्म अशा प्रकारे भासत नाही. आकाशाचा हा भास बाजूला केला की तेथे ब्रह्म आहेच! (पहा ७-३-१२) ॥३७॥

जाणीव नेणीव मध्यमान । हेंचि गुणांचे प्रमाण । येथें निरोपिले त्रिगुण । रूपेंसहित ।।३८।।

सत्त्व, तम व रज असे तीनच (प्रमाण) गुण आहेत. या समासात हे तीन गुण व त्यांना रूपाला आणणारी पाच महाभूते यांचेच वर्णन केले आहे. (उदा. पृथ्वी तमोगुणाची) ॥३८॥

प्रकृती पावली विस्तारातें । पुढें येकाचें येकचि होतें । विकारवंतचि तयातें । नेम कैंचा ।।३९।।

पुढे गुणभूतात्मक प्रकृतीचा अफाट विस्तार झाला व त्यात कशाचेही काहीही होते! हा सगळा विकारांचाच खेळ असल्याने तो कोणत्याही नियमाने बांधलेला नाही. ॥३९॥

काळें पांढरें मेळवितां । पारवे होतें तत्वता । काळें पिवळे मेळवितां । हिरवें होये ।।४०।।

काळ्यात पांढरा रंग मिळविला की पारवा व काळ्यात पिवळा मिळविला की हिरवा रंग तयार होतो. ॥४०॥

ऐसे रंग नानापरी । मेळवितां पालट धरी । तैसें दृश्य हें विकारी । विकारवंत ।।४१।।

अशा कितीतरी रंगछटा एकमेकांत रंग मिसळून तयार होतात. त्याप्रमाणे विविधतेने भरलेले हे विकारमय जगत् दिसू लागते. ॥४१॥

येका जीवनें नाना रंग । उमटों लागती तरंग । पालटाचा लागवेग । किती म्हणोन पाहावा ।।४२।।

पाणी एक असले तरी रंगात मिसळल्यावर अनेक रंगाचे ते होते. एकाच पाण्यावर कितीतरी आकाराचे तरंग उठतात. या सर्वांची संख्या व आकाराचे प्रकार कोणी व कसे मोजावेत? ॥४२॥

येका उदकाचे विकार । पाहातां दिसती अपार । पांचा भूतांचे विस्तार । चौऱ्यासी लक्ष योनी ।।४३।।

एका पाण्याचेच तरंग, फेनादी विकार मोजू गेले तर ते असंख्य आहेत. पांच महाभूतांचे चौऱ्यांशी लक्ष विकार योनींच्या रूपाने दिसतात. ॥४३॥

नाना देहाचें बीज उदक । उदकापासून सकळ लोक । किडा मुंगी स्वापदादिक । उदकेंचि होयें ।।४४।।
शुक्लीत श्रोणीत ह्मणिजे नीर । त्या नीराचें हें शरीर । नखें दंत अस्तिमात्र । उदकाच्या होती ।।४५।।
मुळ्यांचे बारीक पागोरे । तेणें पंथें उदक भरे । त्या उदकेंचि विस्तारे । वृक्षमात्र ।।४६।।
अंब्रवृक्ष मोहरा आले । अवघे उदकाकरितां जाले । फळीं फुलीं लगडले । सावकास ।।४७।।
खोड फोडून अंबे पाहतां । तेथें दिसेना सर्वथा । खांद्या फोडून फळें पाहातां । वोलीं सालें ।।४८।।
मुळापासून सेवटवरी । फळ नाहीं तदनंतरीं । जळरूप फळ चतुरीं । विवेकें जाणावें ।।४९।।
तेंचि जळ सेंड्या चढे । तेव्हां वृक्षमात्र लगडे । येकाचें येकचि घडे । येणें प्रकारें ।।५०।।
पत्रें पुष्पें फळें भेद । किती करावा अनुवाद । सूक्ष्म दृष्टीनें विशद । होत आहे ।।५१।।

मनुष्यादी सर्व शरीरात पाण्याचे प्रमाण फार मोठे आहे. सर्व लोक, किडे, मुंग्या, पशू पाण्यानेच होतात. रेत व स्त्रीबीजात पाणीच असते. त्या पाण्याने मनुष्यादी देह तयार होतात. नखे, दात व हाडे इ. कठीण पदार्थसुद्धा उदकाचेच असतात. मुळ्यांचे तंतू पाणी वाहून नेतात व त्यामुळे मोठे वृक्ष तयार होतात. आंब्यासारख्या वृक्षाला मोहर येतो तो पाण्यामुळेच. पुढे त्या वृक्षांना पाने, फुले व फळे लगडतात. खोड फोडून त्यात आंबा पाहू गेलो तर तो मुळीच दिसत नाही. फांद्या फोडून त्यांत फळ पाहू गेलो तर ओल्या सालांशिवाय काहीच दिसत नाही. मुळापासून शेंड्यापर्यंत त्यांत फळ नसते. पाण्यामुळेच फळ धरते हे चतुराने लक्षात घ्यावे. मुळातील पाणी शेंड्यापर्यंत चढून वृक्षाला फळे लगडतात. अशा प्रकारे पाण्याची फळे होतात! शिवाय पाने, फुले, फळे असे सूक्ष्म बुद्धीने निरीक्षण केल्यावर कितीतरी विस्तार दिसतो. ॥४४-५१॥

भूतांचे विकार सांगों किती । क्षणक्षणा पालटती । येकाचे येकचि होती । नाना वर्ण ।।५२।।

भूतांचे विकार किती म्हणून सांगावेत? ते क्षणाक्षणाला पालटतात. एका रंगाचे कित्येक रंग होतात. ॥५२॥

त्रिगुणभूतांची लटपट । पाहों जाता हे खटपट । बहुरूप बहु पालट । किती म्हणोन सांगावा ।।५३।।

तीन गुण व पांच महाभूते यांची ही हातचलाखी पाहण्यासाठी हा खटाटोप करावा लागला. ते किती रूपे घेतात व किती बदल घडवून आणतात ते किती सांगावेत? ॥५३॥

ये प्रकृतीचा निरास । विवेकें वारावा सावकास । मग परमात्मा परेश । अनन्यभावें भजावा ।।५४।।

या दृश्य प्रकृतीचा विवेकाने शांतपणे निरास करून तिचे अधिष्ठान असलेल्या सर्वश्रेष्ठ परमात्म्याचे सतत अनुसंधान साधावे. त्याचे भजन करावे. ॥५४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'गुणरूपनिरूपण नाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'गुणरूपनिरूपण' नावाचा सहावा समास समाप्त

दशक नववा : गुणरूप

समास सातवा : विकल्पनिर्शन

॥ श्रीराम समर्थ ॥

आधीं स्थूळ आहे येक । तरी मग अंत:कर्णपंचक । जाणतेपणाचा विवेक । स्थूळाकरितां ।।१।।

श्रोता– प्रथम स्थूल शरीराचा आधार आहे. म्हणूनच अन्त:करणपंचकाला अस्तित्व आहे. त्या अन्त:करणात जी जाणीव आहे ती स्थूलाच्या आधाराने रहाते. ॥१॥

तैसेंचि ब्रह्मांडेंवीण कांहीं । मूळमायेसि जाणीव नाहीं । स्थूळाच्या आधारें सर्व हि । कार्य चाले ।।२।।

त्याचप्रमाणे ब्रह्मांड या ईश्वराच्या स्थूलशरीरामुळें मूळमायेला अस्तित्व व जाणीव आहे. एकूण स्थूलाच्या आधाराने सूक्ष्माचे कार्य चालते. ॥२॥

तें स्थूळचि नस्तां निर्माण । कोठें राहेल अंत:कर्ण । ऐसा श्रोतीं केला प्रश्न । याचें उत्तर ऐका ।।३।।

हे स्थूलच नसेल तर अन्त:करण कोठे राहील? त्याचे उत्तर ऐका. ॥३॥

कोसले अथवा कांटेघरें । नाना पृष्ठिभागीं चालती घरें । जीव करिती लहानथोरें । शक्तीनुसार ।।४।।

वक्ता- कोशकिडे किंवा समुद्रातील स्वत:भोवती काटेरी शिंपला तयार करणारे जलचर आपल्या शक्तीनुसार घर तयार करून जमिनीवर फिरतात. ॥४॥

शंख सिंपी घुला कवडें । आधीं त्यांचें घर घडे । किंवा आधीं निर्माण किडे । हें विचारावें ।।५।।

शंख, शिंपली, घुला, कवडी ही घरे अशीच असतात. ही घरे आधी की ती तयार करणारे प्राणी आधी हा विचार करावा. ॥५॥

आधीं प्राणी ते होती । मग घरें निर्माण करिती । हे तों प्रत्यक्ष प्रचिती । सांगणे नलगे ।।६।।

आधी प्राणी असतात व मग ते घरे तयार करतात हे तर सर्वांनाच प्रत्यक्ष दिसते. नव्याने सांगावयास नको. ॥६॥

तैसें आधीं सूक्ष्म जाण । मग स्थूळ होतें निर्माण । येणें दृष्टांतें प्रश्न । फिटला श्रोतयांचा ।।७।।

त्याप्रमाणे प्रथम सूक्ष्म सृष्टी निर्माण होते व मग त्यासाठी स्थूलसृष्टी तयार होते. वरील उदाहरणाने श्रोत्याला त्याच्या प्रश्नाचे उत्तर दिले. (प्रथम वासना, नंतर अन्त:करण, शरीर व जग या प्रकारे सूक्ष्मातून स्थूल सृष्टी निर्माण होते) ॥७॥

तव श्रोता पुसे आणीक । जी आठवलें कांहीं येक । जन्ममृत्याचा विवेक । मज निरोपावा ।।८।।
कोण जन्मास घालितें । आणी मागुता कोण जन्म घेतें । हें प्रत्यया कैसें येतें । कोण्या प्रकारें ।।९।।
ब्रह्मा जन्मास घालितो । विष्णु प्रतिपाळ करितो । रुद्र अवघें संव्हारितो । ऐसें बोलती ।।१०।।
तरी हें प्रवृत्तीचें बोलणें । प्रत्ययास आणी उणें । प्रत्यय पाहातां श्लाघ्यवाणें । होणार नाहीं ।।११।।
ब्रह्म्यास कोणें जन्मास घातलें । विष्णूस कोणें प्रतिपाळिलें । रुद्रास कोणे संव्हारिलें । माहाप्रळईं ।।१२।।
म्हणौनि हां सृष्टीभाव । अवघा मायेचा स्वभाव । कर्ता म्हणों निर्गुण देव । तरी तो निर्विकारी ।।१३।।
म्हणावें माया जन्मास घाली । तरी हे आपणचि विस्तारली । आणी विचारितां थारली । हें हि घडेना ।।१४।।

आतां जन्मतो तो कोण । कैसी त्याची वोळखण । आणी संचिताचें लक्षण । तेंहि निरोपावें ।।१५।।
पुण्याचें कैसें रूप । आणी पापाचें कैसें स्वरूप । याहि शब्दाचा आक्षेप । कोण कर्ता ।।१६।।
हें कांहीं च न ये अनुमाना । म्हणती जन्म घेते वासना । परी ते पाहातां दिसेना । ना धरितां न ये ।।१७।।
वासना कामना आणी कल्पना । हेतु भावना मति नाना । ऐशा अनंत वृत्ती जाणा । अंत:कर्णपंचकाच्या ।।१८।।
असो हें अवघें जाणीव यंत्र । जाणीव म्हणिजे स्मरणमात्र । त्या स्मरणास जन्मसूत्र । कैसें लागे ।।१९।।
देहो निर्माण पांचा भूतांचा । वायो चाळक तयाचा । जाणणें हा मनाचा । मनोभाव ।।२०।।
ऐसें हें सहजचि घडलें । तत्वांचें गुंथाडें जालें । कोणास कोणें जन्मविलें । कोण्या प्रकारें ।।२१।।
तरी हें पाहातां दिसेना । म्हणोन जन्मचि असेना । उपजला प्राणी येना । मागुता जन्मा ।।२२।।
कोणासीच जन्म नाहीं । तरी संतसंगे केलें काई । ऐसा अभिप्राव सर्वहि । श्रोतयांचा ।।२३।।
पूर्वीं स्मरण ना विस्मरण । मधेंचि हे जालें स्मरण । अंतर्यामी अंत:कर्ण । जाणती कळा ।।२४।।
सावध आहे तों स्मरण । विकळ होतां विस्मरण । विस्मरण पडतां मरण । पावती प्राणी ।।२५।।
स्मरण विस्मरण राहिलें । मग देहास मरण आलें । पुढें जन्मास घातलें । कोणास कोणें ।।२६।।
म्हणोनी जन्मचि असेना । आणी यातना हि दिसेना । अवघी वेर्थचि कल्पना । बळावली ।।२७।।
म्हणौन जन्मचि नाहीं कोणासी । श्रोतयांची आशंका ऐसी । मरोन गेलें तें जन्मासी । मागुतें न ये ।।२८।।
वाळलें काष्ठ हिरवळेना । पडिलें फळ तें पुन्हां लागेना । तैसें पडिलें शरीर येना । जन्मास मागुतें ।।२९।।
मडकें अवचितें फुटलें । फुटलें तें फुटोनिच गेलें । तैसेंचि पुन्हां जन्मलें । नाहीं मनुष्य ।।३०।।
येथें अज्ञान आणी सज्ञान । सारिखेच जालें समान । ऐसा बळावला अनुमान । श्रोतायासी ।।३१।।

श्रोता– मला विचारण्यासारखे आणखी काही आठवत आहे. जन्म व मरणासंबंधीचे तत्त्वज्ञान मला सांगावे. जन्माला घालणारा कोण? पुन्हा जन्माला येणारा कोण? हे प्रत्यक्ष कसे कळते? असे म्हणतात की ब्रह्मदेव जन्माला घालतो, विष्णू सांभाळतो व शंकर सर्वांचा नाश करतो. पण हे परंपरेने सांगितले जाते. प्रत्यक्ष अनुभवाला ते टिकत नाही. अनुभव घेण्याचा प्रयत्न केला तर ते परंपरेला भूषणावह होणार नाही! (परंपरेवरील विश्वास उडेल.) पण ब्रह्मदेवाला कोण जन्माला घालतो? विष्णूला कोण सांभाळतो? महाप्रलयाच्या वेळी शंकराचा नाश कोण करतो? म्हणून असे म्हणावे लागते की, हे सर्व सृष्टीचे चक्र चालू ठेवणे हा मायेचा स्वभाव आहे. निर्गुण ब्रह्म हे सर्व करते असे म्हणावे तर ते विकाररहित असल्याने त्याला कर्तृत्व हा विकार संभवत नाही. मायाच जन्माला घालते असे म्हणावे तर तिला कोणी कर्ता नसल्याने ती स्वत:च हा सर्व पसारा मांडून बसली आहे, असे म्हणावे लागते. बरे ती नंतर टिकते असेही दिसत नाही. तसेच जन्माला येतो तो कोण? ते कसे ओळखावे? संचितामुळे जन्म घ्यावा लागतो ते संचित कसे असते? संचित पापपुण्यमय असते. पाप व पुण्याचे लक्षण काय? ही पापपुण्ये कोण करतो? यासंबंधी काहीच धड कळत नाही. वासनेने जन्म मिळतो असे म्हणतात, पण वासना तर दिसत नाही व पकडताही येत नाही! वासना, कामना, कल्पना, भावना, इ. अनेक प्रकारच्या अन्त:करणवृत्ती असतात. असे हे गुंतागुंतीचे जाणीव यंत्र असून सर्व जाणिवा स्मरणात स्थिर होतात. त्या स्मरणामागे जन्माचा धागा कसा बांधला जातो? देह पंचभूतांचा असून प्राणरूप वायू त्याचे व्यापार चालवितो. जाणीव हा मनाचा सहज भाव आहे. असे हे सर्व सहज घडून ब्याऐंशी तत्त्वांचे गाठोडे तयार झाले. त्यातील कोणी कोणाला कसे जन्माला घातले? हे पाहू गेले तर काहीच दिसत नाही. म्हणून पुनर्जन्म असणे शक्य नाही. एकदा जन्मलेला पुन्हा जन्मणार नाही. पुन्हा जन्मच नसेल तर संतसंगतीचे कारणच काय? (मोक्षाची खटपट कशाला?) आम्हा सर्व श्रोत्यांचे हेच मत आहे! जन्मापूर्वी स्मरण व विस्मरण यातील काहीच नव्हते. मधेच ही सृष्टी तयार होऊन देहातील अन्त:करणात ज्ञानरूप जाणीव प्रगट झाली. जागृतीत स्मरण, गाढ

झोपेत व बेशुद्धीत तात्पुरते विस्मरण व मरणात पूर्ण विस्मरण होते. स्मरण व विस्मरण या दोन्ही प्रेरणा नंतर नसतात. त्यानंतर कोणी कोणाला जन्माला घालावे? म्हणून पुनर्जन्म, यमयातना इ. सर्व कल्पनांचे बंड माजले. मला (श्रोता-पूर्वपक्ष) असे वाटते की पुनर्जन्म कोणालाच नाही. मेलेले पुन्हा जन्माला येत नाही. एकदा वाळलेली काठी पुन्हा हिरवी होत नाही. पडलेले फळ पुन्हा झाडाला लागत नाही. मेलेले शरीर पुन्हा जन्माला येत नाही. मडके फुटले की फुटलेच! तसेच माणूस पुन्हा जन्माला येत नाही. त्यामुळे अध्यात्म शास्त्राचे जाणकार व अज्ञानी दोन्ही सारखेच ठरतात. असा हा श्रोत्याचा जबरदस्त तार्किक विचार आहे. ॥८-३१॥

वक्ता म्हणे हो ऐका । अवघें पाषांड करु नका । अनुमान असेल तरी विवेका । अवलोकावे ।।३२।।

वक्ता– (सिद्धान्तपक्ष) असा सर्व नास्तिक विचार करणे ठीक नाही. त्याची शंकेची दुसरी बाजू (विवेक) लक्षपूर्वक ऐकून घ्या. ॥३२॥

प्रेत्नेंवीण कार्य जालें । जेविल्यावीण पोट भरलें । ज्ञानेंवीण मुक्त जालें । हें तों घडेना ।।३३।।

प्रयत्नावाचून जसे कार्य सिद्धीला जात नाही, जेवल्याशिवाय पोट भरत नाही त्याप्रमाणे आत्मज्ञानाशिवाय मोक्ष नाही. ॥३३॥

स्वयें आपण जेविला । त्यास वाटे लोक धाला । परंतु हें समस्तांला । घडलें पाहिजे ।।३४।।

ज्याचे पोट भरले त्याला वाटते की सगळेच जेवून तृप्त झाले. पण सर्वांना तो अनुभव यावयास हवा. (एकाचे मत हे सर्वांचे मत असू शकत नाही.) ॥३४॥

पोहणें सिकला तो तरेल । पोहणें नेणे तो बुडेल । येथें हि अनुमान करील । ऐसा कवणु ।।३५।।

जो पोहावयास शिकतो तो पाण्यावर तरंगतो. जो शिकत नाही तो बुडतो. याविषयी सुद्धा शंका घेणारा कोण आहे? ॥३५॥

तैसें जयांस ज्ञान जालें । ते ते तितुकेच तरले । ज्याचें बंधनचि तुटलें । तोचि मुक्त ।।३६।।

त्याप्रमाणे ज्यांना आत्मज्ञान होऊन अविद्येची बंधने तुटतात तेच संसारसमुद्रातून तरून जातात. मुक्त होतात. ॥३६॥

मोकळा म्हणे नाही बंधन । आणि प्रत्यक्ष बंदी पडिले जन । त्यांचे कैसें समाधान । तें तुम्ही पहा ।।३७।।

जो मुक्त असतो त्याला बंधन दिसतच नाही. पण जे प्रत्यक्ष बंधनात असतात त्यांना मुक्तीचे समाधान कसे मिळणार? त्याचा तुम्ही विचार करा. (शास्त्रदृष्टीने बंधन कल्पित आहे. आत्मज्ञानी ती कल्पना झुगारून जणू मुक्त होतो. पण हे ज्यांना साधत नाही ते कल्पित बंधनाचे दुःख भोगतात.) ॥३७॥

नेणे दुसऱ्याची तळमळ । तें मनुष्य परदुःखसीतळ । तैसाच हाहि केवळ । अनुभव जाणावा ।।३८।।

ज्यांना दुसऱ्याच्या दुःखांची फिकीर नसते ते त्यांची तळमळ जाणत नाहीत. तसेच मुक्ती व बंधन यांचेविषयी जाणावे. ॥३८॥

जयास आत्मज्ञान जालें । तत्वें तत्व विवंचिलें । खुणेसी पावतांच बाणलें । समाधान ।।३९।।

जो पुढील तत्वाने मागील तत्वाचा निरास करीत श्रीगुरूंनी सांगितलेला अनुभव घेतो (खूण) त्याला आत्मज्ञान होऊन समाधान लाभते. (आपाने पृथ्वीचा, अग्नीने आपाचा इ.) ॥३९॥

ज्ञानें चुके जन्ममरण । सगट बोलणें अप्रमाण । वेदशास्त्र आणी पुराण । मग कासयासी ।।४०।।

सामान्य लोकांची मते व बोलणी विश्वसनीय नसतात. ज्ञानाने जन्ममरण चुकते असे वेदान्तशास्त्र सांगते. सामान्यांवर विश्वास ठेवावयाचा असेल तर वेदान्तशास्त्रे व पुराणे हवीतच कशाला? ॥४०॥

वेदशास्त्रविचारबोली । माहानुभावांची मंडळी । भूमंडळीं लोक सकळी । हें मानीतना ।।४१।।

भ्रम, प्रमाद, इंद्रियांची अक्षमता व स्वार्थ हे मानवी बुद्धीतील चार दोष नसणाऱ्या ईश्वराने वेदांचे विचार शब्दबद्ध

केले आहेत. व्यास वसिष्ठादी महान ऋषींनी त्या विचारांचा अनुभव घेऊन ते अधिक स्पष्ट केले आहेत. वेद व ऋषी यांनी सामान्यांची मते फेटाळली आहेत. ॥४१॥

अवघें होतां अप्रमाण । मग आपलेंच काय प्रमाण । म्हणोन जेथें आत्मज्ञान । तोचि मुक्त ।।४२।।

या सर्वांना जर खोटे ठरवावयाचे असेल तर तुमचे (श्रोत्याचे, पूर्वपक्षाचे) मत तरी खरे कशावरून? म्हणून ज्याला आत्मज्ञान झाले तोच मुक्त समजावा. ॥४२॥

अवघेच मुक्त पाहातां नर । हाहि ज्ञानाचा उद्‌गार । ज्ञानेंविण तो उद्धार । होणार नाहीं ।।४३।।

परिपूर्ण ज्ञान (व्यतिरेक व अन्वयाचे) झाल्यावर तो सत्‌पुरुष सर्वच जीवसृष्टीला मुक्तस्थितीत पाहतो. हा त्याच्या ज्ञानाचा सहज होणारा परिणाम आहे. म्हणून ज्ञानावाचून तरणोपाय नाही. ॥४३॥

आत्मज्ञान कळों आलें । म्हणोन दृश्य मिथ्या जालें । परंतु वेढा लाविलें । सकळांस येणें ।।४४।।

आत्म्याचे ज्ञान झाल्यावर सर्व दृश्य सृष्टी अनिर्वचनीय मिथ्या होते. पण त्याच सृष्टीने सर्वांना बंधनात टाकले आहे! ॥४४॥

आतां प्रश्न हा फिटला । ज्ञानी ज्ञानें मुक्त जाला । अज्ञान तो बांधला । आपले कल्पनेने ।।४५।।

आता श्रोत्याचे समाधान केले आहे. ज्ञानानेच ज्ञानी मुक्त होतो. अज्ञानी स्वत:च्या भ्रामक कल्पनेने स्वत:ला बंधनात अडकवून ठेवतो. ॥४५॥

विज्ञानासारिखें अज्ञान । आणी मुक्तासारिखें बंधन । निश्चयासारिखा अनुमान । मानूं चि नये ।।४६।।

विज्ञान व अज्ञान (विज्ञान– ४३ ओवीतील ज्ञानी) मोक्ष व बंधन, निश्चय (अनुभव) व तर्क कधीच सारखे मानता कामा नये. ॥४६॥

बंधन म्हणिजे कांहींच नाहीं । परी वेढा लाविलें सर्व हि । यास उपावचि नाहीं । कळल्यावाचुंनी ।।४७।।

वास्तविक बंधन म्हणून काही अस्तित्वातच नाही! ते सत्य नाही. पण त्याने सर्व माणसांना अडकवून ठेवले आहे. या बोलण्याचे रहस्य कळल्यावाचून त्यातून सुटका नाही. ॥४७॥

कांहींच नाहीं आणी बाधी । हेंचि नवल पाहा आधीं । मिथ्या जाणिजेना बद्धि । म्हणोन बद्ध ।।४८।।

'अस्तित्वात नसून संकटात टाकते' या आश्चर्यकारक गोष्टीचा प्रथम विचार करा. बंधन उपाधीचे असते व उपाधी कल्पित असते हे कळत नाही म्हणून बंधनांची संकटे व दु:खे भोगावी लागतात. (पहा ८-८-१७) ॥४८॥

भोळा भाव सिद्धी जाव । हा उधाराचा उपाव । रोकडा मोक्षाचा अभिप्राव । विवेकें जाणावा ।।४९।।

'भोळ्या भावाने मुक्त व्हावे' हा विचार बेभरवशाचा (उधार) आहे. विवेकाने मोक्षाचे स्वरूप कळून प्रत्यक्ष अनुभव येतो. ॥४९॥

प्राणी व्हावया मोकळा । आधीं पाहिजे जाणीवकळा । सकळ जाणतां निराळा । सहजचि होये ।।५०।।

मुक्तीसाठी ज्ञान अनिवार्य आहे. या ज्ञानाचा सर्व आवाका कळून (परोक्ष) 'मी ब्रह्म' असा अनुभव येताच (अपरोक्ष) तो ज्ञानी कल्पित सृष्टीपासून अलिप्त होतो. ॥५०॥

कांहींच नेणिजे तें अज्ञान । सकळ जाणिजे तें ज्ञान । जाणीव राहतां विज्ञान । स्वयेंचि आत्मा ।।५१।।

अध्यात्मशास्त्राची जराही कल्पना नसते ते अज्ञान. वरील ओवीप्रमाणे अनुभव आला की ज्ञान. ज्ञानाला सहजता आली की विज्ञान होते व तो आत्मरूप होतो. ॥५१॥

अमृत सेऊन अमर जाला । तो म्हणे मृत्य कैसा येतो जनाला । तैसा विवेकी म्हणे बद्धाला । जन्म तो कैसा ।।५२।।

जो स्वर्गातील अमृत पिऊन अमर झाला तो म्हणतो की जीवाला मरण कसे येते? त्याप्रमाणे विवेकाने मुक्त झालेला बद्धांना विचारतो की तुम्हाला पुनर्जन्म कसा मिळतो? ।।५२।।

जाणता म्हणे जनातें । तुम्हांस भूत कैसें झडपितें । तुम्हांस वीष कैसें चढतें । निर्विष म्हणे ।।५३।।

पिशाच्च निवारणाचे ज्ञान असणारा लोकांना विचारतो की तुम्हाला भूत कसे लागते? ज्याला विषबाधा झाली नाही तो झालेल्याला विचारतो की तुम्हाला विष कसे चढते? ।।५३।।

आधीं बद्धासारिखें व्हावें । मग हें नलगेचि पुसावें । विवेक दुरी ठेऊन पाहावें । लक्षण बद्धाचें ।।५४।।

जो बंधनाचा अनुभव घेऊन मुक्त होतो तो असे प्रश्न विचारीत नाही. बद्धाची बद्धता पहाताना विवेकज्ञान दूर ठेवावे. ।।५४।।

निजेल्यास चेईला तो । म्हणे हा कां रे वोसणातो । अनुभव पाहाणेंचि आहे तो । तरी मग निजोन पाहावा ।।५५।।

झोपेत असलेल्याला पाहून जागा असलेला विचारतो की हा असा का बरळतो? त्याचे उत्तर हवे असेल तर त्याने झोपले पाहिजे! ।।५५।।

ज्ञात्याची उगवली वृत्ती । बद्धऐसी न पडे गुंती । भुकेल्याची अनुभवप्राप्ती । धाल्यास नाहीं ।।५६।।

आत्मज्ञान्याची अन्त:करणवृत्ती सतत आत्मानुसंधानात असल्याने ती बंधनात सापडत नाही. जो जेवून तृप्त असतो त्याच्या तृप्तीचा अनुभव भुकेल्याला नसतो. ।।५६।।

इतुकेन आशंका तुटली । ज्ञानें मोक्षप्राप्ती जाली । विवेक पाहतां बाणली । अंतरस्थिती ।।५७।।

आता शंकेला जागा राहिली नाही. ज्ञानाने मोक्ष प्राप्त होऊन विवेकाने आत्मस्थितीला सहजता येते. ।।५७।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'विकल्पनिर्शननाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'विकल्पनिरसन' नावाचा सातवा समास समाप्त

दशक नववा : गुणरूप

समास आठवा : देहान्तनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ज्ञाता सुटला ज्ञानमतें । परंतु जन्म कैसा बद्धातें । बद्धाचें काये जन्मतें । अंतकाळीं ।।१।।
बद्ध प्राणी मरोन गेले । तेथें कांहींच नाहीं उरलें । जाणीवेचें विस्मरण जालें । मरणापूर्वीं ।।२।।

श्रोता– ज्ञानावर लक्ष केंद्रित करून किंवा ज्ञानयोगाने (मत = ध्यान. आपटे संस्कृत-इंग्रजी शब्दकोश) ज्ञाता मुक्त झाला. पण बद्धाला पुनर्जन्म कसा मिळतो? त्यामध्ये जन्माला येण्यासारखे काय उरते? बद्ध प्राणी मेल्यावर त्यांचे काहीच उरत नाही. मरणापूर्वी त्याच्या अन्त:करणातील जाणीव नष्ट होते. ती विस्मरणात जाते. ॥१-२॥

ऐसी घेतली आशंका । याचें उत्तर ऐका । आतां दुश्चीत होऊ नका । म्हणे वक्ता ।।३।।

वक्ता– आतां नीट लक्ष द्या. तुमच्या शंकेचे उत्तर ऐका. ॥३॥

पंचप्राण स्थळे सोडिती । प्राणरुप वासनावृत्ती । वासनामिश्रीत प्राण जाती । देह सोडुनियां ।।४।।

जीव मेल्यावर पाच प्राण आपापल्या जागा सोडतात. जीवाची वासना उदानासह त्याच्या देहाबाहेर पडते. ॥४॥

वायोसरिसी वासना गेली । ते वायोरुपेंचि राहिली । पुन्हां जन्म घेऊन आली । हेतुपरत्वें ।।५।।

वायूबरोबर गेलेली वासना वायुरूपाने राहून त्या जीवाच्या संचितानुसार (हेतू) पुन्हा नव्या देहात प्रवेश करते. ॥५॥

कित्येक प्राणी नि:शेष मरती । पुन्हा मागुते जीव येती । ढकलून दिल्हें तेणें दुखवती । हस्तपादादिक ।।६।।

पूर्णपणें मेलेला माणूस पुन्हा जिवंत होतो. तो मेला असे समजून त्याला हवे तसे ढकलल्यामुळे जिवंत झाल्यावर त्याचे हातपाय सुद्धा दुखतात! ॥६॥

सर्पदृष्टी जालियांवरी । तीं दिवसां उठवी धन्वंतरी । तेव्हां ते माघारी । वासना येते की ।।७।।

सर्पदंशाने मरण आल्यावर तीन दिवसांनी सुद्धां त्याला धन्वन्तरी जिवन्त करतो. तेव्हा ती वासनाच मागे येते. ॥७॥

कित्येक सेवें होऊन पडती । कित्येक तयांस उठविती । येमलोकींहून आणिती । माघारे प्राणी ।।८।।

कित्येक दिवस पडलेली प्रेते चांगदेवासारखा योगी उठवितो व यमलोकातून त्यांच्या वासना व जीव परत घेऊन येतो. ॥८॥

कित्येक पूर्वीं श्रापिले । ते शापें देह पावले । उश्रापकाळीं पुन्हां आले । पूर्वदेहीं ।।९।।

काही माणसे शापाने दुसऱ्या देहात जन्माला येतात व नंतर उ:शापाने पुन्हा पहिल्या देहात येतात. ॥९॥

कित्येकी बहु जन्म घेतले । कित्येक परकाया प्रवेशले । ऐसे आले आणी गेले । बहुत लोक ।।१०।।

बहिणाबाईसारखीला कित्येक मागील जन्म आठवतात तर आद्य शंकराचार्यांसारखे परकाया प्रवेश करतात व पुन्हा स्वत:च्या शरीरात येतात. असे अनेकांचे बाबतीत घडले. ॥१०॥

फुंकिल्यासरिसा वायो गेला । तेथें वायोसूत निर्माण जाला । म्हणोन वायोरूप वासनेला । जन्म आहे ।।११।।

मृत्यूच्या वेळी शेवटचा श्वास सोडताना प्राण बाहेर पडताच त्याचे रूपान्तर दुसऱ्या देहाने जन्मणाऱ्या प्राणात होते. म्हणून वायुरूप वासना जन्माला येते. ।११॥

मनाच्या वृत्ती नाना । त्यांत जन्म घेते वासना । वासना पाहतां दिसेना । परंतु आहे ।।१२।।

मनात कित्येक आशा-आकांक्षा असतात. त्यातील प्रबळ व अपूर्ण राहिलेल्या, वासनारूपाने स्थिर होतात. ही वासना जाणवत नसली तरी ती आहे हे निश्चित. ॥१२॥

वासना जाणिजे जाणीवहेत । जाणीव मुळींचा मूळतंत । मूळमायेंत असे मिश्रित । कारणरुपें ।।१३।।

अन्त:करणातील जाणीव ही वासनेला जन्म देते. मूळमायेमुळे अन्त:करण होते व ते मूळमायेत कारण रूपाने मिसळून रहाते. ॥१३॥

कारणरूप आहे ब्रह्मांडीं । कार्यरुपें वर्ते पिंडीं । अनुमानितां तांतडीं । अनुमानेना ।।१४।।

जाणीव कारण रूपाने ब्रह्मांडात व कार्यरूपाने पिंडात रहाते. तिच्याविषयी गडबडीने विचार केला तर तिचे स्वरूप कळत नाही. ('एकोऽहं' ही मूळ जाणीव ब्रह्मांडाचे कारण आहे. नंतर त्याच कारणातून जीवसृष्टी निर्माण झाली म्हणून ती कार्य) ॥१४॥

परंतु आहे सूक्ष्मरूप । जैसें वायोचें स्वरूप । सकळ देव वायोरूप । आणी भूतसृष्टि ।।१५।।

वायू जसा सूक्ष्म तशी जाणीवही सूक्ष्म. सर्व देव व पिशाच्च सृष्टी वायुरूप आहे. ॥१५॥

वायोमधें विकार नाना । वायो तरी पाहातां दिसेना । तैसी जाणीववासना । अति सूक्ष्म ।।१६।।

वायूमध्ये अनेक भेदांचे विकार आहेत पण तो डोळ्यांनी दिसत नाही. (उदा. पंचप्राण हे वायूचेच भेद होत.) त्याप्रमाणे जाणीव व वासना अतिसूक्ष्म असल्याने दिसत नाहीत. ॥१६॥

त्रिगुण आणी पंचभूतें । हे वायोमध्यें मिश्रिते । अनुमानेना म्हणोन त्यातें । मिथ्या म्हणों नये ।।१७।।

तीन गुण व पंचमहाभूते वायूत सुप्तस्वरूपात रहातात. त्यांचे ज्ञान होत नाही. म्हणून त्यांचे अस्तित्व नाकारता येत नाही. ॥१७॥

सहज वायो चाले । तरी सुगंध दुर्गंध कळों आले । उष्ण सीतळ तप्त निवाले । प्रत्यक्ष प्राणी ।।१८।।

वायूच्या अस्तित्वामुळे सुगंध व दुर्गंध कळतात. गरम वारा वाहू लागला की माणसाचे शरीर तापते व थंड वाऱ्याने ते गार पडते असा प्रत्यक्ष अनुभव येतो. ॥१८॥

वायोचेनि मेघ वोळती । वायोचेनि नक्षत्रें चालती । सकळ सृष्टीची वर्तती गती । सकळ तो वायो ।।१९।।

वायुरूप वाऱ्याने ढग जमा होतात किंवा पांगतात. वायुरूप शक्तीने नक्षत्रे त्यांच्या कक्षेत फिरतात व त्याच शक्तीने (ऊर्जा) या पृथ्वीचे सर्व व्यवहार चालतात. ॥१९॥

वायोरूपें देवतें भूतें । आंगीं भरती अकस्मातें । वीध केलियां प्रेतें । सावध होतीं ।।२०।।

वायुरूप देवता व पिशाच्चे अचानक माणसाला झडपतात. संजीवनी मंत्रासारख्या विधीने प्रेतेही जिवंत होतात. (झडपणारा वायूच व मंत्र सामर्थ्यात शक्तिरूपाने वायूच) ॥२०॥

वारें निराळें न बोले । देहामधें भरोन डोले । आळी घेऊन जन्मा आले । कित्येक प्राणी ।।२१।।

अंगात भरलेले वायुरूप वारे एकट्याने किंवा स्वतंत्रपणे देहापासून अलग राहून काहीच बोलत नाही. एखाद्या देहात शिरून ते घुमू लागते. (डोले) 'या जन्मात नाही तर पुढील जन्मात मी हे करीन' अशा जिद्दीने अनेक लोक पुन्हा जन्माला येतात (वारे = समंध) ॥२१॥

राहाणें ब्राह्मणसमंध जाती । राहणें ठेवणी सांपडती । नाना गुंतले उगवती । प्रत्यक्ष राहणें ।।२२।।

राहाण नावाच्या मंत्रयुक्त विधीने अंगात आलेले ब्रह्मसमंध निघून जातात, भूमिगत धन सापडते व अनेक प्रापंचिक अडचणी किंवा गुंतागुंतीच्या समस्या दूर होतात. ॥२२॥

ऐसा वायोचा विकार । येवंचे कळेना विस्तार । सकळ कांहीं चराचर । वायोमुळें ।। २३ ।।

वायूची कार्ये एवढ्या प्रकारांनी चालतात. म्हणून त्याच्या विकारांचा (कार्यरूप भेद) अंदाज लागत नाही. सर्व चर व अचर सृष्टीला वायुशक्तीचा आधार आहे. ॥२३॥

वायो स्तब्धरुपें सृष्टीधर्ता । वायो चंचळरूपें सृष्टीकर्ता । न कळे तरी विचारीं प्रवर्ता । म्हणिजे कळे ।। २४ ।।

वायू जेव्हा मूळमायेत लीन होऊन (स्तब्ध) असतो तेव्हा त्यात सृष्टी बीजरूपाने (धर्ता) रहाते. तो जेव्हा प्रकट होऊन क्रियाशील (चंचल) होतो तेव्हा तो सृष्टीला उत्पन्न करतो. हे लक्षात येण्यासाठी शास्त्रानुसारी विचार करावा. ॥२४॥

मुळापासून सेवटवरी । वायोचि सकळ कांही करी । वायोवेगळें कर्तुत्व चतुरीं । मज निरोपावें ।। २५ ।।

मूळमायेच्या अतिसूक्ष्म अस्तित्वापासून पृथ्वीच्या (शेवटच्या) स्थूल अस्तित्वापर्यंत सर्व कर्तृत्व वायूचे आहे. कोणाही विद्वानाला याहून वेगळा कर्ता दिसत असेल तर त्याने तो मला अवश्य सांगावा! ॥२५॥

जाणीवरूप मूळमाया । जाणीव जाते आपल्या ठाया । गुप्त प्रगट होऊनियां । विश्वीं वर्ते ।। २६ ।।

जाणीव (अहं) हे मूळमायेचे स्वरूप आहे. सृष्टी निर्माण होताना ती त्या सृष्टीत शिरते (प्रगट) व सृष्टीचा लय झाल्यावर स्वत:च्या मूळ स्वरूपात लीन (गुप्त) होते. ॥२६॥

कोठे गुप्त कोठे प्रगटे । जैसें जीवन उफाळे आटे । पुढें मागुता वोघ लोटे । भूमंडळीं ।। २७ ।।

ती मूळमाया जीवात प्रगट तर जडात अप्रगट असते किंवा सृष्टिकाळी प्रगट व प्रलयकाळी अप्रगट असते. उदा. पृथ्वीवर पावसाळ्यात पाण्याचे लोट येतात तर उन्हाळ्यात त्या पाण्याचा मागमूसही रहात नाही. ॥२७॥

तैसाच वायोमधें जाणीवप्रकार । उमटे आटे निरंतर । कोठें विकारें कोठें समीर । उगाच वाजे ।। २८ ।।

त्याप्रमाणे वायूत जाणीव प्रगट होते किंवा गुप्त होऊन राहते. हे चक्र सतत चालते. कोठे वायू (समीर) अनेक प्रकारे कार्य करतो तर काही वेळा तो शांत असतो. ॥२८॥

वारी आंगावरुन जाती । तेणें हातपाये वाळती । वारा वाजतां करपती । आलीं पिकें ।। २९ ।।

माणसाच्या अंगावरून वारे गेले (अर्धांगवायू) तर त्याचे हात, पाय निष्क्रिय होतात किंवा वाळतात. भयंकर वादळ झाले तर उभी पिके आडवी होऊन वाळतात. ॥२९॥

नाना रोगांची नाना वारी । पीडा करिती पृथ्वीवरी । वीज कडाडी अंबरीं । वायोमुळें ।। ३० ।।

प्रत्येक रोगाचे एक वारे (उदा– देवी) याप्रमाणे अनेक रोगांची अनेक वारी पृथ्वीवरील जीवांना यातना देतात. (समर्थांच्या काळी असलेली लोकांची समजूत.) आकाशात वीज कडाडते ती वायुरूप शक्तीमुळेच. ॥३०॥

वायोकरितां रागोद्धार । कळे वोळखीचा निर्धार । दीप लागे मेघ पडे हा चमत्कार । रागाद्धारीं ।। ३१ ।।

गायकाच्या स्वरयंत्रातील प्राणशक्तिरूप वायूमुळेच निरनिराळे राग आळवले जातात. त्यांची ओळखही पटते. दीप रागाने दिवे लागणे व मेघमल्हाराने पाऊस पडणे इ. चमत्कार घडतात. ॥३१॥

वायो फुंकितां भुली पडती । वायो फुंकितां खांडकें करपती । वायोकरितां चालती । नाना मंत्र ।। ३२ ।।

तळहातावरील अंगारा फुंकला की समोरच्या माणसाला संभ्रम निर्माण होणे, फुंकर घातल्याने फोड सुकणे व मंत्रांमध्ये सामर्थ्य निर्माण होणे इ. सर्व वायूमुळे होते. ॥३२॥

मंत्रें देव प्रगटती । मंत्रें भूते अखरकिती । बाजीगरी बोडंबरी करिती । मंत्रसामर्थ्यें ।। ३३ ।।

मंत्रसामर्थ्याने देव प्रगट होतात. पिशाच्चे घाबरून झपाटलेल्याचा देह सोडतात व निरनिराळे चमत्कार होतात. ॥३३॥

राक्षसांची मावरचना । ते हे देवांदिकां कळेना । विचित्र सामर्थ्ये नाना । स्तंबनमोहनादिकें ।।३४।।

स्तंभन (जागीच खिळवून ठेवणे) मोहन (स्थलकालांविषयी संभ्रम) इत्यादी प्रकारची राक्षसांजवळ असलेली मायिक विद्या देवादिकांनाही कळत नाही. ॥३४॥

धडचि पिसें करावें । पिसेंच उमजवावें । नाना विकार सांगावे । किती म्हणोनी ।।३५।।

शहाण्याला वेडे करणे, वेड्याला शहाणा करणे, इ. उलट-सुलट प्रकारची वायुप्रेरित मंत्रविद्या किती सांगावी? ॥३५॥

मंत्री संग्राम देवांचा । मंत्रीं साभिमान ऋषींचा । महिमा मंत्रसामर्थ्याचा । कोण जाणे ।।३६।।

(मंत्री = मंत्राने) मंत्राच्या मदतीने देव लढतात. ऋषींना त्यांच्या मंत्र सामर्थ्याचा अभिमान असतो. असा हा वायूच्या आधाराने रहाणाऱ्या मंत्राचा महिमा किती सांगावा? ॥३६॥

मंत्रीं पक्षी आटोपिती । मूशकें स्वापदें बांधती । मंत्री माहांसर्प खिळिती । आणी धनलाभ ।।३७।।

मंत्रसामर्थ्याने पक्ष्यांना ओढून घेतात, उंदीर व पशूंना खिळवून ठेवतात, मोठ्या सर्पांना जागेवरून हालू देत नाहीत व गुप्त संपत्ती दिसते. ॥३७॥

आतां असो हा प्रश्न जाला । बद्धाचा जन्म प्रत्यया आला । मागील प्रश्न फिटला । श्रोतयाचा ।।३८।।

ही उदाहरणे पुरेत. बद्धाला जन्म कसा मिळतो ह्या प्रश्नाचे उत्तर चांगले समजेल असे दिले. श्रोत्यांची शंका दूर झाली. ॥३८॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देहान्तनिरूपणनाम' समास आठवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'देहान्तनिरूपण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक नववा : गुणरूप

समास नववा : संदेहवारण

॥ श्रीराम समर्थ ॥

ब्रह्म वारितां वारेना । ब्रह्म सारितां सरेना । ब्रह्म कांही वोसरेना । येकीकडे ।।१।।
ब्रह्म भेदितां भेदेना । ब्रह्म छेदितां छेदेना । ब्रह्म परतें होयेना । केलें तरी ।।२।।
ब्रह्म खंडेना अखंड । ब्रह्मीं नाहीं दुसरें बंड । तरी कैसें हें ब्रह्मांड । सिरकलें मधें ।।३।।

ब्रह्म दूर करणे, सरकवणे शक्य नाही. ते एका बाजूला ओसरतही नाही. (पाण्याप्रमाणे) ब्रह्माचे तुकडे करता येत नाहीत, ते कापता येत नाही व ते प्रयत्न केला तरी ढकलले जात नाही. ते अखंड असल्याने त्याचे भाग पडत नाहीत. ब्रह्मामध्ये, ते घनदाट व एकमेव असल्याने दुसऱ्या पदार्थाला अस्तित्वच नाही. असे असताना एवढे मोठे ब्रह्मांड ब्रह्मात कसे शिरले? ॥१-३॥

पर्वत पाषाण सिळा सिखरें । नाना स्थळें स्थळांतरें । भूगोळरचना कोण्या प्रकारें । जालीं परब्रह्मीं ।।४।।
भूगोल आहे ब्रह्मामधें । ब्रह्म आहे भूगोळामधें । पाहातां येक येकामधें । प्रत्यक्ष दिसे ।।५।।
ब्रह्मी भूगोळें पैस केला । आणि भूगोळहि ब्रह्में भेदिला । विचार पाहातां प्रत्यय आला । प्रत्यक्ष आतां ।।६।।
ब्रह्मे ब्रह्मांड भेदिलें । हें तों पाहातां नीटचि जालें । परी ब्रह्मास ब्रह्मांडे भेदिलें । हें विपरीत दिसे ।।७।।
भेदिलें नाहीं म्हणावें । तरी ब्रह्मीं ब्रह्मांड स्वभावें । हें सकळांस अनुभवें । दिसत आहे ।।८।।
तरी हें आतां कैसें जालें । विचारुन पाहिजे बोलिलें । ऐसें श्रोतीं आक्षेपिलें । आक्षेपवचन ।।९।।

श्रोता– पर्वत, पर्वताची शिखरे, दगड, पत्थर, अनेक स्थळे (देश, समुद्र इ.) भूगोलाची रचना ब्रह्मस्वरूपात कशी झाली? ही पृथ्वी ब्रह्मस्वरूपात आहे व ब्रह्म पृथ्वीत आहे अशी ते परस्परांत प्रविष्ट आहेत हे तर उघड आहे. पृथ्वी ब्रह्मात ऐसपैस पसरली व ब्रह्मांडाने ब्रह्म भेदले हे ऐकताना कसेतरीच वाटते. ब्रह्मांडाने ब्रह्माचा भेद केला नाही असे म्हणावे तर ब्रह्मांड ब्रह्मातच असले पाहिजे हे तर स्पष्टच आहे. ब्रह्माने ब्रह्मांडात प्रवेश केला हे बरोबर वाटते. तरी याचे वैचारिक स्पष्टीकरण सांगावे. (वक्त्याने विचार करून उत्तर द्यावे असे म्हणण्याचा उद्धटपणा श्रोत्याजवळ नसावा.) ॥४-९॥

आतां याचें प्रत्योत्तर । सावध ऐका निरोत्तर । येथें पडिले कीं विचार । संदेहाचे ।।१०।।

वक्ता– आतां या प्रश्नाचे उत्तर ऐका. हा प्रश्न संशयातून निर्माण झाला असल्याने त्याचे उत्तर सावध होऊन तुम्ही ऐकले तर नि:शंक (निरुत्तर) व्हाल. ॥१०॥

ब्रह्मांड नाहीं म्हणों तरी दिसे । आणी दिसे म्हणों तरी नासे । आतां हें समजती कैसें । श्रोतेजन ।।११।।

ब्रह्मांडाचे अस्तित्व नाकारावे तर ते प्रत्यक्षच दिसते व दिसते म्हणून आहे असे म्हणावे तर त्याचा कल्पांती नाश होतो व ज्ञानाने बाध होतो. आता हे श्रोत्यांनी कसे समजावून घ्यावे? ॥११॥

तंव श्रोते जाले उद्दित । आहों म्हणती सावचित । प्रसंगें बोलों उचित । प्रत्योत्तर ।।१२।।

हे ऐकून श्रोत्यांची उत्कंठा वाढली. वक्ता म्हणाला नीट लक्ष देऊन ऐका. या निमित्ताने शास्त्रशुद्ध उत्तर देऊ. ॥१२॥

आकाशीं दीपास लाविलें। दीपें आकाश परतें केलें। हें तों घडेना पाहिलें। पाहिजे श्रोतीं ।।१३।।

आकाशात उंच दिवा लावल्यामुळे त्या दिव्याने आकाश पुढे सरकले असे होत नाही किंवा त्या दिव्याच्या आकाराएवढे आकाश (पाण्याप्रमाणे) बाजूला सरकत नाही. हे श्रोत्यांनी लक्षात घ्यावे. ॥१३॥

आप तेज अथवा पवन। सारूं न सकती गगन। गगन पाहातां सघन। चळेल कैसें ।।१४।।

पाणी, अग्नी व वायू आकाशाला ढकलू शकत नाहीत. आकाश अतिसूक्ष्म, व्यापक व सर्वसमावेशक असल्याने कसे दूर सरकेल? ॥१४॥

अथवा कठीण जाली मेदनी। तरी गगनें केली चाळणी। पृथ्वीचें सर्वांग भेदुनी। राहिलें गगन ।।१५।।

पृथ्वी अत्यंत कठीण असली तरी सूक्ष्म आकाश तिच्यात शिरून तिला व्यापून राहते. (प्रत्येक अणूच्या रचनेत आकाश किंवा space असते असे विज्ञान सांगते.) ॥१५॥

याची प्रचित ऐसी असे। जें जडत्वा आलें तितुकें नासे। आकाश जैसें तैसें असे। चळणार नाहीं ।।१६।।

याचा निर्णय करण्यासाठी एक लक्षात घ्यावे की पृथ्वीपासून वायूपर्यंत जे अचेतन पदार्थ आहेत ते सर्व नाश पावतात. आकाश मात्र अढळपणे जसेच्या तसे राहते. ॥१६॥

वेगळेपणें पाहावें। तयास आकाश म्हणावें। अभिन्न होतां स्वभावें। आकाश ब्रह्म ।।१७।।

ब्रह्मवस्तूपासून किंचित, द्वैतात उतरले की आकाशच जाणवते. पुन्हा ऐक्य होताच ते आकाश जणू ब्रह्मच होते. ॥१७॥

तस्मात आकाश चळेना। भेद गगनाचा कळेना। भासलें ब्रह्म तयास जाणा। आकाश म्हणावें ।।१८।।

एकूण काय तर आकाश अढळ असते त्याचा ब्रह्मापासून असलेला सूक्ष्म भेद कळत नाही. ब्रह्माच्या 'अस्ति'चा जो भास तेच आकाश समजावे. ॥१८॥

निर्गुण ब्रह्मसें भासलें। कल्पूं जातां अनुमानलें। म्हणोन आकाश बोलिलें। कल्पनेसाठीं ।।१९।।

'हे निर्गुण ब्रह्म' अशा भासाची कल्पना करताच तसा अंदाजही येऊ लागतो. म्हणजे तसा भासही होऊ लागतो. या कल्पनेलाच आकाश हे नाव दिले. ॥१९॥

कल्पनेसि भासे भास। तितुकें जाणावें आकाश। परब्रह्म निराभास। निर्विकल्प ।।२०।।

कल्पनेने जो आभासाचा भास होतो त्यालाच आकाश म्हणावे! एऱ्हवी ब्रह्म स्वसंवेद्य व कल्पनारहित आहे. ॥२०॥

पंचभूतांमधें वास। म्हणौन बोलिजे आकाश। भूतांतरीं जो ब्रह्मांश। तेंचि गगन ।।२१।।

आकाश स्वत:सह पंचमहाभूतात व्यापून रहाते व त्यांना अवकाश पुरवते म्हणून त्याला आकाश म्हणतात. पंचमहाभूतातील ब्रह्मांशाला आकाश म्हणावे. ॥२१॥

प्रत्यक्ष होतें जातें। अचळ कैसें म्हणावें त्यातें। म्हणोनियां गगनातें। भेदिलें नाहीं ।।२२।।

भूते निर्माण होतात, टिकतात व नष्ट होतात म्हणून त्यांना अचल म्हणता येत नाही. पण ती आकाश भेदून त्यात शिरत नाहीत म्हणून आकाश अचल आहे. ॥२२॥

पृथ्वी विरोन उरे जीवन। जीवन नस्तां उरे अग्न। अग्न विझतां उरे पवन। तोहि नासे ।।२३।।

पृथ्वीचा नाश झाला की पाणी उरते, पाणी आटले तरी अग्नी राहतो, अग्नी विझला तरी वायू असतो व तोही नंतर नष्ट होतो. ॥२३॥

मिथ्या आलें आणि गेलें। तेणें खरें तें भंगलें। ऐसें हें प्रचितीस आलें। कोणेंपरी ।।२४।।

जे मिथ्या असते ते आले व गेले व त्याने सत्यवस्तूला भेदले हे कोणाला व कसे अनुभवाला येणार? ॥२४॥

भ्रमें प्रत्यक्ष दिसतें । विचार पाहातां काये तेथें । भ्रममूळ या जगातें । खरें कैसें म्हणावें ।।२५।।

केवळ भ्रमाने या जगाला सत्यत्व दिले जाते. सूक्ष्म विचार केला तर जग म्हणून आहेच काय? ज्याचे अस्तित्व केवळ भ्रमावर अवलंबून आहे त्या जगाला सत्य कसे म्हणावे? ॥२५॥

भ्रम शोधितां कांहींच नाहीं । तेथें भेदिलें कोणें काई । भ्रमें भेदिलें म्हणतां ठाईं । भ्रमचि मिथ्या ।।२६।।

भ्रम तपासून पाहिला तर त्याला सत्यत्व कधीच नसते. त्या भ्रमाने होणाऱ्या भासात कोण कोणाचा भेद करील? भेदले असे भ्रमाने म्हणावे तर तोच मिथ्या असतो. ॥२६॥

भ्रमाचें रुप मिथ्या जालें । मग सुखें म्हणावें भेदिलें । मुळीं लटिकें त्यानें केलें । तेंहि तैसें ।।२७।।

एकदा भ्रम मिथ्या आहे असा निश्चय झाल्यावर कोणीही कोणालाही भेदले असे खुशाल म्हणावे! जे मुळात भ्रामक असते त्याचेकडून जे जे होते तेही भ्रामकच असते. ॥२७॥

लटिक्यानें उदंड केलें । तरी आमुचें काये गेलें । केलें म्हणतांच नाथिलें । शाहाणे जाणती ।।२८।।

जे मिथ्या (लटिके) असते त्याचे अफाट कर्तृत्व कोणी सांगितले तर त्याने आमचे काय बिघडते? 'मिथ्या मायेने केले' असे म्हणताच ते केलेले मिथ्या असते असे तत्त्ववेत्ते जाणतात. ॥२८॥

सागरामधें खसखस । तैसें परब्रह्मीं दृश्य । मतीसारिखा मतिप्रकाश । अंतरीं वाढे ।।२९।।

सागरात मूठभर खसखस टाकावी त्याप्रमाणे ब्रह्मस्वरूपावर ब्रह्मांडे भासतात. बुद्धीची सूक्ष्मता जशी वाढेल तशी तिची ज्ञानाची कक्षा वाढत जाते. ॥२९॥

मती करितां विशाळ । कवळो लागे अंतराळ । पाहातां भासे ब्रह्मगोळ । कवीठ जैसें ।।३०।।

सूक्ष्म बुद्धी व्यापक झाल्यावर (जे सूक्ष्म असते ते व्यापक असते. उदा. आकाश व ब्रह्म) ती अनंत आकाशाशी एकरूप झाल्याने ब्रह्मांड कवठाप्रमाणे दिसते. ॥३०॥

वृत्ति त्याहून विशाळ । करिता ब्रह्मांड बद्रिफळ । ब्रह्माकार होतां केवळ । कांहींच नाहीं ।।३१।।

अन्तःकरण वृत्ती अधिक सूक्ष्म झाली तर ब्रह्मांड बोराएवढे दिसून वृत्ती ब्रह्मस्वरूपात गडप झाल्यावर तेही (बोर) दिसत नाही. ॥३१॥

आपण विवेकें विशाळला । मर्यादेवेगळा जाला । मग ब्रह्मगोळ देखिला । वटबीजन्यायें ।।३२।।

याच विचारानुसार अन्तःकरणवृत्ती अमर्याद सूक्ष्म होऊन व्यापक झाली तर तिला ब्रह्मांड वडाच्या बीएवढे लहान दिसते. (येथे 'न्याय' हा शब्द 'वृक्षबीज न्याय' सूचक नाही. केवळ परिमाणसूचक आहे.) ॥३२॥

होतां त्याहून विस्तीर्ण । वटबीज कोटिप्रमाण । आपण होतां परिपूर्ण । कांहीच नाहीं ।।३३।।

वृत्ती त्याहून व्यापक झाल्यावर वडाच्या बीच्या एक कोट्यांश एवढ्या परिमाणाचे ब्रह्मांड दिसते व ती ब्रह्मरूप झाल्यावर (परिपूर्ण) सर्व दृश्य मावळते. ॥३३॥

आपण भ्रमें लाहानाळला । केवळ देहधारी जाला । तरी मग ब्रह्मांड त्याला । कवळेल कैसें ।।३४।।

जो भ्रमाने स्वतःच्या देहाशी तादात्म्य पावून त्याचेएवढा संकुचित होतो त्याला ब्रह्मांडाएवढे व्यापक कसे होता येईल? ॥३४॥

वृत्ति ऐसी वाढवावी । पसरुन नाहींच करावी । पूर्णब्रह्मास पुरवावी । चहूंकडे ।।३५।।

अन्तःकरण वृत्ती एवढी सूक्ष्म करून (वाढवावी) व्यापक करीत करीत तिचे अस्तित्व नाहीसे करून सर्वत्र व्यापून राहिलेल्या ब्रह्माएवढी करावी. ॥३५॥

जंव येक सुवर्ण आणितां । तेणें ब्रह्मांड मढवितां । कैसें होईल तें तत्वतां । बरें पाहा ।।३६।।

वस्तु वृत्तीस कवळे । तेणें वृत्ति फाटोन वितुळे । निर्गुण आत्माच निवळे । जैसा तैसा ।।३७।।

एक गुंज सोन्याचा कितीही पातळ पत्रा केला तरी त्याने ब्रह्मांड मढवू गेले तर जसे होईल त्याप्रमाणे संकुचित व स्थूल अन्त:करण वृत्तीला ब्रह्म व्यापता येत नाही. ती त्या प्रयत्नात जणू फाटून नष्ट होते व आत्मा जसा आहे तसा अनुभवाला येतो. 'तोच मी' असे ज्ञान होते. ।।३६-३७।।

येथें फिटली आशंका । श्रोते हो संदेह धरूं नका । अनुमान असेल तरी विवेका । अवलोकावें ।।३८।।

येथें सर्व शंका फिटल्या. श्रोतेहो, आता शंका धरू नका व संशय राहिलाच असेल तर पुन्हा वरील तत्त्वज्ञानरूप विवेकाची कास धरा. ।।३८।।

विवेकें तुटे अनुमान । विवेकें होये समाधान । विवेकें आत्मनिवेदन । मोक्ष लाभे ।।३९।।

विवेकाने संशय जातात. समाधान होते व आत्मनिवेदन साध्य होऊन मोक्ष लाभतो. (पहा. ४-९, १२-५) ।।३९।।

केली मोक्षाची उपेक्षा । विवेकें सारिलें पूर्वपक्षा । सिद्धांत आत्मा प्रत्यक्षा । प्रमाण नलगे ।।४०।।

मोक्ष बंधनसापेक्ष असल्याने त्याचाही विचार बाजूला सारावा. पूर्वपक्षाला (ओवी ४ ते ९) विवेकाने दूर करावे. 'मी ब्रह्म' ह्या प्रत्यक्ष अनुभवाला (सिद्धान्त) शास्त्रप्रामाण्याची गरज नाही. ।।४०।।

हे प्रचितीचीं उत्तरें । कळती सारासारविचारें । मननध्यासें साक्षात्कारें । पावन होईजे ।।४१।।

ही बोलणी प्रत्यक्षानुभवातून आलेली असतात. सारासार (आत्मा सार, जगत् असार) विचाराने त्यातील रहस्य समजते. या विचाराचे मनन व निदिध्यासन केल्याने जीव पावन (ब्रह्म) होतो. ।।४१।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'संदेहवारणनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'संदेहवारण' नावाचा नववा समास समाप्त

दशक नववा : गुणरूप

समास दहावा : स्थितिनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

देउळामधें जगन्नायेक । आणी देउळावरी बैसला काक । परी तो देवाहून अधिक । म्हणों नये कीं ।।१।।

देव मंदिरात असतो व कावळा मंदिराच्या कळसावर उंच बसतो एवढ्याने तो देवाहून श्रेष्ठ ठरत नाही. ॥१॥

सभा बैसली राजद्वारीं । आणी मर्कट गेलें स्तंभावरी । परी तें सभेहून श्रेष्ठ चतुरीं । कैसें मानावे ।।२।।

राजा व त्याचे मंत्री दरबारात बसले असता माकड ध्वजस्तंभावर जाऊन बसले म्हणून ते दरबारी महाजनांहून श्रेष्ठ आहे असे शहाणा कसे म्हणेल? ॥२॥

ब्राह्मण स्नान करून गेले । आणी बक तैसेचि बैसले । परी ते ब्राह्मणापरीस भले । कैसे मानावे ।।३।।

पवित्र ब्राह्मण नदीत स्नान करून बाहेर पडतात व बगळे पाण्यातच बसतात म्हणून ते ब्राह्मणांहून श्रेष्ठ कसे मानावे?॥३॥

ब्राह्मणामधें कोणी नेमस्त । कोणी जाले अव्यावेस्त । आणी स्वान सदा ध्यानस्त । परी तें उत्तम नव्हे ।।४।।

ब्राह्मणांमध्ये काही ब्राह्मण ध्यानादी नित्यनेम करतात व काही करीत नाहीत. एखादा बगळा जरी ध्यान करिताना दिसला तरी तो ब्राह्मणाहून श्रेष्ठ कसा म्हणावा? ॥४॥

ब्राह्मण लक्षमुद्रा नेणे । मार्जर लक्षविषईं शाहाणें । परी ब्राह्मणापरीस विशेष कोणें । म्हणावें तयासी ।।५।।

ब्राह्मणाला लक्ष्याकडे टक लावून बघता येत नाही. मांजर मात्र त्यात तरबेज असते म्हणून ते ब्राह्मणाहून श्रेष्ठ कोण म्हणेल? ॥५॥

ब्राह्मण पाहे भेदाभेद । मक्षिका सर्वांस अभेद । परी तीस जाला ज्ञानबोध । हें तों न घडे कीं ।।६।।

ब्राह्मण भक्ष्य व अभक्ष्य असा फरक करतो. माशी असा फरक न करता पक्वान्न तसेच घाणीवरही बसते. म्हणून माशी 'सर्वत्र समबुद्धी झालेली ज्ञानी आहे,' असे म्हणणे शक्य नाही! ॥६॥

उंच वस्त्रें नीच ल्याला । आणि समर्थ उघडाच बैसला । परी तो आहे परीक्षिला । परीक्षवंतीं ।।७।।

कोणी क्षुल्लक व्यक्तीने राजवस्त्रे चढवली व राजा उघडा बसला तरी परीक्षा करणाऱ्यांना त्यांची ओळख पटते. ॥७॥

बाह्याकार केला अधीक । परी तो अवघा लोकिक । येथें पाहिजे मुख्य येक । अंतरनिष्ठा ।।८।।

धर्मपालन व उपासनेच्या बहिरंगांचे माजवलेले अवडंबर केवळ लौकिकासाठी असते. आत्मज्ञानासाठी अंतरनिष्ठाच आवश्यक आहे. ॥८॥

लोकिक बरा संपादिला । परी अंतरीं सावध नाहीं जाला । मुख्य देवास चुकला । तो आत्मघातकी ।।९।।

व्यवहारात बऱ्यापैकी यश मिळविले पण अंतरंगात सावध न झाल्याने आत्मज्ञान झाले नाही, तर आत्मघातच होतो. ॥९॥

देवास भजतां देवलोक । पित्रांस भजतां पित्रलोक । भूतांस भजतां भूतलोक । पाविजेतो ।।१०।।

देवतांच्या उपासनेने देवतालोक, पितरांच्या उपासनेने पितृलोक व पिशाचांच्या उपासनेने पिशाच लोक मिळतो. ।।१०।। (पहा– भ. गीता ९-२५)

जेणें जयास भजावें । तेणें त्या लोकासी जावें । निर्गुणीं भजतां व्हावें । निर्गुणचि स्वयें ।।११।।

जो ज्याचे भजन करतो तो त्याच्या लोकात जातो. निर्गुणाची उपासना उपासकाला 'निर्गुण ब्रह्म मी आहे' असा अनुभव देते. ।।११।।

निर्गुणाचे कैसें भजन । निर्गुणीं असावें अनन्य । अनन्य होता होईजे धन्य । निश्चयेंसी ।।१२।।

निर्गुणाच्या उपासनेची रीत अशी आहे की जीवाने ब्रह्माहून वेगळे राहू नये. त्याच्याशी ऐक्य साधताच मोक्ष मिळतो (धन्य). ।।१२।।

सकळ केलियाचें सार्थक । देव वोळखावा येक । आपण कोण हा विवेक । पाहिला पाहिजे ।।१३।।

कृत्य म्हणजे जे जे करावयाचे ते. कृतकृत्य म्हणजे जे करावयाचे ते केलेला. खरा देव ओळखल्याने माणूस कृतकृत्य होतो. त्यासाठी; 'मी'चे खरे स्वरूप जाणण्यासाठी विचार केला पाहिजे. ।।१३।।

देव पाहातां निराकार । आपला तों माईक विचार । सोहं आत्मा हा निर्धार । बाणोन गेला ।।१४।।

आत्मरूप देव निर्गुण निराकार आहे. 'मी'शी संबंधित असलेला सर्व विचार देहाच्या संदर्भात असल्याने मायिक असतो. 'मी आत्मा आहे' असा 'सोऽहं'चा पारमार्थिक विचार बाणला पाहिजे. ।।१४।।

आतां अनुमान तो काई । वस्तु आहे वस्तुचा ठाईं । देहभाव काहींच नाहीं । धांडोळितां ।।१५।।

तो बाणल्यावर संशय व तर्काचे कारणच काय? आत्मा आत्मरूपाने असायचा तेथेच आहे. त्याचा 'मी' म्हणून अनुभव आल्यावर देहभाव कितीही शोधला तरी सापडत नाही! ।।१५।।

सिद्धास आणी साधन । हा तों अवघाच अनुमान । मुक्तास आणी बंधन । आडळेना ।।१६।।

मोक्षस्थिती मिळाल्यावर त्याने साधन केले पाहिजे असे म्हणणे वायफळ होय. कारण त्याला देहभावाचे बंधन सापडतच नाही. ।।१६।।

साधनें जें काही साधावें । तें तों आपणचि स्वभावें । आतां साधकाच्या नावें । सुन्याकार ।।१७।।

साधन करून जे साधावयाचे ते ब्रह्म सहजच मी आहे असा अनुभव आल्यानंतर साधनांचा साधनपणाच संपून जातो. ।।१७।।

कुल्लाळ पावला राजपदवी । आतां रासभें कासया राखावीं । कुल्लाळपणाची उठाठेवी । कासया पाहिजे ।।१८।।

कुंभार जर राजा झाला तर त्याने पूर्वीसारखी गाढवे सांभाळण्याचे काम कशासाठी करावे? व कुंभारकी तरी कां करावी? ।।१८।।

तैसा अवघा वृत्तीभाव । नाना साधनांचा उपाव । साध्य जालियां कैंचा ठाव । साधनांसी ।।१९।।

त्याचप्रमाणें अन्त:करण वृत्तीचे सर्व व्यवहार आत्मानुसंधानात होऊ लागल्यावर (राजा होणे) अनेक प्रकारची साधने करणें (गाढवे वळणे) निरर्थक ठरून त्यांचे साधनत्व संपते. ।।१९।।

साधनें काय साधावें । नेमें काये फळ घ्यावें । आपण वस्तु भरंगळावे । कासयासी ।।२०।।

ती साधने आता काय साधून देतील? नित्यनेम करून कोणते अधिक फळ मिळेल? साधना व नित्यनेमाच्या निमित्ताने आत्मरूप मी ने 'स्वस्थता' सोडून का हिंडावे? ।।२०।।

देह तरी पांचा भूतांचा । जीव तरी अंश ब्रह्मींचा । परमात्मा तरी अनन्याचा । ठाव पाहा ।।२१।।

देहाच्या घटनेत पांच महाभूते आहेत. जीवात्मा हा परमात्म्याचा कल्पित अंश आहे. म्हणून जीवाने ब्रह्माशी अनन्य होण्याची परिसीमा (ठाव) गाठावी. अनन्यरूप व्हावे.।।२१।।

उगेंचि पाहातां मीपण दिसे । शोध घेतां काहींच नसे । तत्वें तत्व निरसें । पुढें निखळ आत्मा ।।२२।।

वरवर पाहिले तर 'अहं' भासतो. त्याचा ठाव घेण्याचा प्रयत्न करताच तो मिथ्या असल्याने कोठे जातो ते कळत नाही. पुढील तत्त्वाच्या अनुसंधानाने मागील निरस्त होताच आत्मा उरतो. ।।२२।।

आत्मा आहे आत्मपणें । जीव आहे जीवपणें । माया आहे मायापणें । विस्तारली ।।२३।।

आत्मा आत्मरूपाने व्यापून आहे. जीव जीवत्वामुळें परिच्छिन्न आहे. माया अध्यस्तरूपाने आपली विविधरूपे दाखविते. ।।२३।।

ऐसें अवघेंचि आहे । आणी आपण हि कोणीयेक आहे । हे सकळ शोधून पाहे । तोचि ज्ञानी ।।२४।।

असे हे सर्व त्या त्या रूपाने आहे. ह्याशिवाय 'मी' हेही स्फुरण आहे. ह्या सर्वांचे यथार्थ ज्ञान ज्याला आहे तोच खरा ज्ञानी. ।।२४।।

शोधूं जाणें सकळांसी । परी पाहों नेणे आपणासी । ऐसा ज्ञानी येकदेसी । वृत्तिरूपें ।।२५।।

दृश्याच्या प्रचंड पसाऱ्याचा शोध घेतो पण जो 'मी'चा शोध घेत नाही असा वृत्तिज्ञानावर समाधान मानणारा एकांगी होतो. ।।२५।।

तें वृत्तिरूप जरी पाहिलें । तरी मग कांहीच नाहीं राहिलें । प्रकृतिनिरासें अवघें चि गेलें । विकारवंत ।।२६।।

वृत्तिज्ञानाचा ठाव घेता घेता प्रकृतीचा निरास होऊन सर्व विकारी तत्त्वे मागे पडून काहीच शिल्लक राहत नाही. (सर्व सगुण पांचभौतिक पसारा, देह व जगतासह बाधित होतो.) ।।२६।।

उरलें ते निखळ निर्गुण । विवंचितां तेंचि आपण । ऐसी हे परमार्थाची खूण । अगाध आहे ।।२७।।

उरते ते केवळ शुद्ध निर्गुण ब्रह्म. त्याचा विचार करता तेच 'मीचे' स्वरूप आहे. असे हे परमार्थाचे रहस्य मोठे गहन गूढ आहे. ।।२७।।

फळ येक आपण येक । ऐसा नाहीं हा विवेक । फळांचे फळ कोणीयेक । स्वयेंचि होईजे ।।२८।।

फळ वेगळे व फळाचा भोक्ता वेगळा असे परमार्थिक तत्त्वज्ञान सांगत नाही. भोक्त्याने (जीव) फळच व्हावे. (आत्मा) ।।२८।।

रंक होता राजा झाला । बरें पाहातां प्रत्यये आला । रंकपणाचा गल्बला । रंकी करावा ।।२९।।

रंकाचा वास्तवात राजा झाला (स्वप्नात नव्हे) तर दारिद्र्याचे चटके दरिद्र्याने खुशाल भोगावेत. ह्या राजाने नव्हे! ।।२९।।

वेद शास्त्रें पुराणें । नाना साधनें निरूपणें । सिद्ध साधु ज्याकारणें । नाना सायास करिती ।।३०।।

वेद, उत्तर मीमांसादी शास्त्रे व पुराणे, प्रवचने, ध्यानादी साधने ज्यासाठी आहेत व सिद्ध आणि साधुसुद्धा ज्यासाठी अनेक खडतर साधने करतात..... ।।३०।।

तें ब्रह्मरूप आपणचि आंगें । सारासारविचारप्रसंगे । करणें न करणें वाउगें । काहीच नाहीं ।।३१।।

ते 'ब्रह्म मीच आहे' असा सारासार विचाराने अनुभव आल्यावर हे करावे, हे करू नये ही दोन्ही किंवा साधन करावे किंवा करू नये ही दोन्ही निरर्थक होतात. ।।३१।।

रंक राजआज्ञेसि भ्यालें । तेंचि पुढें राजा जालें । मग तें भयेचि उडालें । रंकपणासरिसें ।।३२।।

रंकाने राजाच्या अनुशासनाला भिऊन असावे. पण तो रंकच राजा झाल्यावर ते भय रंकपणाबरोबरच नष्ट होते. ।।३२।।

वेदे वेदाज्ञेने चालावें । सच्छास्त्रें शास्त्र अभ्यासावें । तीर्थे तीर्थास जावे । कोण्या प्रकारें ।।३३।।

वेदाने वेदाज्ञेप्रमाणें वागावे, शास्त्रानेच शास्त्राचा अभ्यास करावा, तीर्थाने तीर्थयात्रेला जावे हे सर्व कसे शक्य आहे? ।।३३।।

अमृतें सेवावे अमृत । अनंतें पाहावा अनंत । भगवंतें लक्षावा भगवंत । कोण्या प्रकारें ।।३४।।
संतें असंत त्यागावे । निर्गुणें निर्गुणासी भंगावें । स्वरूपें स्वरूपी रंगावें । कोण्या प्रकारें ।।३५।।
अंजनें ल्यावें अंजन । धनें साधावें धन । निरंजनें निरंजन । कैसें अनुभवावें ।।३६।।

अमृताने अमृत प्यावे, अनंताने अनंताचे दर्शन घ्यावे. भगवंताने भगवंताचे ध्यान करावे. सत् ने असत् त्यागावे, निर्गुणाने निर्गुणाचा बाध करावा, आत्म्याने आत्मरंग लावावा, अंजनाने अंजन घालावे, धनाने धनाचा शोध घ्यावा, निरंजनाने निरंजनाचा अनुभव घ्यावा हे सर्व कसे शक्य आहे? ।।३४ ते ३६।।

साध्य करावें साधनासी । ध्येयें धरावें ध्यानासी । उन्मनें आवरावें मनासी । कोण्या प्रकारें ।।३७।।

साध्याने साधना करावी, ध्येयाने स्वत:चे ध्यान करावे व उन्मनाने मनाला आवरावे हे सर्व कसे शक्य आहे? तात्पर्य जीवनमुक्ताला साधना व विधिकिंकरत्व नाही. ।।३७।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'स्थितिनिरूपणनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'स्थितिनिरूपण' नावाचा दहावा समास समाप्त
—दशक नववा समाप्त—

दशक दहावा : जगज्ज्योती

समास पहिला : अंत:कर्णयेक

॥ श्रीराम समर्थ ॥

सकळांचे अंत:करण येक । किंवा येक नव्हे अनेक । ऐसें हे निश्चयात्मक । मज निरोपावें ।।१।।

श्रोता– सर्व जीवांचे अन्त:करण एकच आहे की ती अनेक आहेत त्याचे निश्चित उत्तर मला द्यावे. ॥१॥

ऐसें श्रोतयानें पुसिलें । अंत:करण येक किं वेगळालें । यांचे उत्तर ऐकिलें । पाहिजे श्रोतीं ।।२।।

वक्ता– सर्वांचे अन्त:करण एक की वेगळे वेगळे असा प्रश्न श्रोत्याने विचारला आहे. त्याचे उत्तर आता श्रोत्याने ऐकावे. ॥२॥

समस्तांचें अंत:कर्ण येक । निश्चयो जाणावा नेमक । हा प्रत्ययाचा विवेक । तुज निरोपिला ।।३।।

सर्व जीवांचे (माणसांचे) अन्त:करण एकच आहे असा ह्या बाबतीत ठाम निर्णय आहे. हे विचाराने पटते. (प्रत्यय) ॥३॥

श्रोता म्हणे वक्तयासी । अंत:कर्ण येक समस्तांसी । तरी मिळेना येकयेकासी । काये निमित्य ।।४।।
येक जेवितां अवघे धाले । येक निवतां अवघे निवाले । येक मरतां अवघे मेले । पाहिजेत कीं ।।५।।
येक सुखी येक दु:खी । ऐसें वर्ततें लोकिकी । येका अंत:करणाची वोळखी । कैसी जाणावी ।।६।।
जनीं वेगळाली भावना । कोणास कोणीच मिळेना । म्हणौन हें अनुमाना । येत नाहीं ।।७।।
अंत:कर्ण येक असतें । तरी येकाचे येकास कळों येतें । कांही चोरितांच न येतें । गौप्य गुह्य ।।८।।
याकारणें अनुमानेना । अंत:कर्ण येक हें घडेना । विरोध लागला तना । काये निमित्य ।।९।।
सर्प डसाया येतो । प्राणी भेऊन पळतो । येक अंत:करण तरी तो । विरोध नसावा ।।१०।।

श्रोता–

सर्वांचे अन्त:करण एक असते तर सर्वांच्या अन्त:करणांची एकवाक्यता होऊन सारखा अनुभव येऊन त्यात सामरस्य हवे होते. ते का नाही? एक जेवल्यावर सर्वांना तृप्ती आली पाहिजे. एकाचे समाधान झाले की सर्वांचे व्हावयाला हवे. एकाला मरण आले की सर्वांना आले पाहिजे! व्यवहारात एक सुखी व दुसरा दु:खी असे दिसत असताना अन्त:करण एक हे कसे पटावे? माणसामाणसांचे वेगळे वेगळे विचार व प्रवृत्ती असून कोणाचे कोणाशी जुळत नसताना अन्त:करण एक हा सिद्धान्त तर्काला टिकत नाही. अन्त:करण एक असते तर एकाचे विचार दुसऱ्याला कळले असते. कोणालाही मनात काहीच ठेवता आले नसते. सर्वत्र संघर्ष दिसला नसता, म्हणून हे पटत नाही. साप येताना पाहून तो चावण्याच्या भीतीने प्राणी पळतात. अशी भीती वाटावयास नको. म्हणून अन्त:करण एक नाही. ॥४-१०॥

ऐसी श्रोतयाची आशंका । वक्ता म्हणे चळों नका । सावध होऊन ऐका । निरूपण ।।११।।

वक्ता– श्रोतेहो, विवेकापासून ढळू नका. सावध चित्ताने ह्यासंबंधीचे स्पष्टीकरण ऐका. ॥११॥

अंत:कर्ण ह्मणिजे जाणीव । जाणीव जाणता स्वभाव । देहरक्षणाचा उपाव । जाणती कळा ।।१२।।

अन्त:करण म्हणजे अचेतन मनबुद्ध्यादि नसून जाणीव हे त्याचे स्वरूप आहे (चिदाभास). प्राण्याचा ‘कळणे’ हा

सहजस्वभाव आहे. कळणे हीच जाणीव व तेच अन्त:करण. प्राण्यांना स्वरक्षणाची सहज जाणीव (Instinct) असते.

सर्प जाणोन डंखू आला । प्राणी जाणोन पळाला । दोहींकडे जाणीवेला । बरें पाहा ।।१३।।

साप स्वरक्षणाच्या जाणिवेने चावतो व प्राणी स्वरक्षणाच्या जाणिवेने पळतो, दोन्हीतील जाणीव नीट लक्षात घ्या. ।।१३।।

दोहींकडे जाणीवेसी पाहिलें । तरी अंत:कर्ण येकचि जालें । विचारितां प्रत्यया आलें । जाणीवरूपें ।।१४।।

दोन्हीकडील फक्त जाणिवेचा विचार केला तर जाणीवरूप अन्त:करण एक आहे हे विचाराने पटते. (प्रत्यय.) ।।१४।।

जाणीवरूपें अंत:कर्ण । सकळांचे येक हें प्रमाण । जीवमात्रास जाणपण । येकचि असे ।।१५।।

जाणीवरूप अन्त:करण सर्वांचे एक आहे हे आता प्रमाणित म्हणजे सिद्ध झाले. सर्व जीवांचे अन्त:करण एक आहे. ।।१५।।

येके दृष्टीचें देखणें । येकें जिव्हेचें चाखणें । ऐकणें स्पर्शणें वास घेणें । सर्वत्रास येक ।।१६।।

डोळ्यांनी पाहून, जिभेने चव घेऊन, ऐकून, स्पर्श करून, वास घेऊन सर्व प्राण्यांना रूपादी कळतात. हे कळणे एकच आहे. ।।१६।।

पशु पक्षी किडा मुंगी । जीवमात्र निर्माण जगीं । जाणीवकळा सर्वांलागीं । येकचि आहे. ।।१७।।

पशू, पक्षी, कीटक, मुंगी इ अनंत जीव या सृष्टीत होतात. पण 'जाणणे' हे सर्वांना सामान्य आहे. एकच आहे. ।।१७।।

सर्वांस जळ तें सीतळ । सर्वांस अग्नि ते जाळ । सर्वांस अंत:कर्ण केवळ । जाणती कळा ।।१८।।

सर्व प्राण्यांना पाणी शीतल आहे, अग्नी उष्ण आहे. कारण सर्वांची जाणती कळा म्हणजे अंत:करण एकच आहे. ।।१८।।

आवडे नावडे ऐसें जालें । तरी हें देहस्वभावावरी गेलें । परंतु हें कळों आलें । अंत:कर्णयोगें ।।१९।।

'हे आवडते' 'ते आवडत नाही' हे सहजस्वभावानुसार असते. पण ही आवड-नावड निवड सर्वांनाच अंत:करणामुळे कळते. ।।१९।।

सर्वांचे अंत:कर्ण येक । ऐसा निश्चयो निश्चयात्मक । जाणती याचें कौतुक । चहुंकडे ।।२०।।

यावरून 'सर्वांचे अंत:करण एक' असा दृढ निश्चय व्हावा. या सिद्धांताचा सर्व प्राण्यांमध्ये अनुभव येतो हा त्याचा विशेष आहे. (कौतुक) ।।२०।।

इतुकेन फिटली आशंका । आतां अनुमान करूं नका । जाणणें तितुकें येका । अंत:कर्णाचें ।।२१।।

आता शंकेला जागाच राहिली नाही. तर्क चालवू नये हे चांगले. जेथे जेथे जाणणे आहे, ते अंत:करणाचे असून ते एक आहे. ।।२१।।

जाणोन जीव चारा घेती । जाणोन भिती लपती । जाणोनियां पळोन जाती । प्राणीमात्र ।।२२।।

भूक जाणून जीव अन्न खातात, धोका ओळखून लपतात व स्वरक्षणाची गरज लक्षात घेऊन पळतात. (येथे समर्थ अंत:करणाऐवजी जीव असा शब्द वापरतात. बाराव्या ओवीत अंत:करणाचे जाणीव हे स्वरूप सांगितले आहे. मन, बुद्धी, चित्त, अहंकार व अंत:करण हे अंत:करण पंचक पांचभौतिक व त्रिगुणात्मक असल्याने अचेतन आहे. त्यांत आत्म्याचा ज्ञान प्रकाश फाकला (चिदाभास) की तोच जीव. अचेतनाला जाणीव नसते. चेतनाला असते. म्हणून 'चिदाभासासह अंत:करण' जाणते.) ।।२२।।

किडामुंगीपासून ब्रह्मादिक । समस्तांस अंत:कर्ण येक । ये गोष्टीचें कौतुक । प्रत्यें जाणावें ।।२३।।

किडामुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत सर्वांच्या अंत:करणाचे स्वरूप सारखेच म्हणजे एकच आहे. हे वैशिष्ट्य प्रत्यक्षच कळते. ॥२३॥

थोर लहान तरी अग्नी । थोडें बहु तरी पाणी । न्यून पूर्ण तरी प्राणी । अंत:कर्णें जाणती ।।२४।।

अग्नी लहान असला काय किंवा मोठा असला तरी तो अग्नीच असतो. पाणी थोडे असले काय आणि पुष्कळ असले तरी पाणीच असते. त्याचप्रमाणे जाणीव कमी अथवा पूर्ण असली तरी सर्व प्राणी अंत:करणाने जाणतात. ॥२४॥

कोठें उणें कोठें अधीक । परंतु जिनसमासला येक । जंगम प्राणी कोणायेक । जाटिल्याविण नाहीं ।।२५।।

ही जाणीव कोठे प्रगल्भ (माणूस) असते तर कोठे अगदीच देहजीवनापुरती (मुंगी) असते. परंतु अंत:करण व त्यातील चिदाभास ही सामुग्री किंवा घटक तेच असतात. परंतु कोणताही सजीव प्राणी (जंगम) जाणिवेशिवाय नाही. ॥२५॥

जाणीव ह्मणिजे अंत:कर्ण । अंत:कर्ण विष्णूचा अंश जाण । विष्णू करितो पाळण । येणें प्रकारें ।।२६।।

जाणीव म्हणजे अंत:करण हा देहातील विष्णूचा अंश मानावा. तो जीवाला अशा प्रकारे (ओवी २२) सांभाळतो. ॥२६॥

नेणतां प्राणी संव्हारतो । नेणीव तमोगुण बोलिजेतो । तमोगुणें रुद्र संव्हारितो । येणें प्रकारें ।।२७।।

कळले नाही तर प्राण्याचा नाश होतो. न कळणे यालाच तमोगुण म्हणतात व तोच रुद्र समजावा. तो नाश करतो. ॥२७॥

कांहीं जाणीव कांहीं नेणीव । हा रजोगुणाचा स्वभाव । जाणतां नेणतां जीव । जन्मास येती ।।२८।।

काहीं कळणे, काहीं न कळणे हे रजोगुणाचे स्वरूप असून असा काही जाणता काही न जाणता जीव जन्माला येतो. ॥२८॥

जाणीवेनें होतें सुख । नेणीवेनें होतें दु:ख । सुखदु:ख अवश्यक । उत्पत्तिगुणें ।।२९।।

ज्ञानामुळे सुख, न कळले तर दु:ख. जन्माला आल्यामुळेच सुखदु:खाचे भोग भोगावे लागतात. ॥२९॥

जाणण्यानेणण्याची बुद्धि । तोचि देहीं जाणावा विधी । स्थूळ देहीं ब्रह्मा त्रिशुद्धि । उत्पत्तिकर्ता ।।३०।।

ही जाणणारी व न जाणणारी रजोगुणात्मक बुद्धी म्हणजेच देहातील ब्रह्मदेव समजावा. स्थूल शरीराला जन्माला घालणारा निश्चितपणे ब्रह्मदेव होय. ॥३०॥

ऐसा उत्पत्ती स्थिती संहार । प्रसंगें बोलिला विचार । परंतु याचा निर्धार । प्रत्यें पाहावा ।।३१।।

असा हा उत्पत्ती, स्थिती व नाशाचा विचार प्रसंगाने सांगितला (पहा– ९-७-१ ते ५) पण सूक्ष्म विचाराने हा निश्चय पक्का करून घ्यावा. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अंत:कर्णयेकनाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'अंत:कर्णयेक' नावाचा पहिला समास समाप्त

दशक दहावा : जगज्जोती

समास दुसरा : देहआशंका

॥ श्रीराम समर्थ ॥

स्वामीनें विचार दाखविला । येथें विष्णूचा अभाव दिसोन आला । ब्रह्मा विष्णु महेशाला । उरी नाहीं ।।१।।
उत्पत्ति स्थिती संव्हार । ब्रह्मा विष्णु महेश्वर । याचा पाहतां विचार । प्रत्ययो नाहीं ।।२।।
ब्रह्मा उत्पत्तिकर्ता चौमुखांचा । येथें प्रत्ययो नाहीं त्याचा । पाळणकर्ता विष्णु चौभुजांचा । तो हि ऐकोन जाणों ।।३।।
महेश संव्हार करितो । हाहि प्रत्ययो कैसा येतो । लिंगमहिमा पुराणीं तो । विपरीत बोलिला ।।४।।

श्रोता– आताच आपण जे सांगितले त्यात ब्रह्मदेव, विष्णू व महेशांच्या प्रसिद्ध रूपांचा कोठेच समावेश नाही. ब्रह्मदेवाची उत्पत्ती, विष्णूचा सांभाळ व महेशाचा संहार या त्यांच्या कार्यांचा पत्ताच नाही. उत्पत्ती करणाऱ्या ब्रह्मदेवाला चार तोंडे आहेत व तो तर आपल्या सांगण्यात नाही. सांभाळ करणाऱ्या विष्णूला चार हात आहेत हेही ऐकूनच समाधान मानावयाचे! महेशाकडून होणारा संहार कोठे दिसतो? पुराणांमध्ये शिवलिंग माहात्म्य सांगताना तोच उत्पत्त्यादि सर्व करतो (विपरीत) असे म्हटले आहे. ॥१-४॥

मूळमायेस कोणें केलें । हें तों पाहिजे कळलें । तिही देवांचे रूप जालें । ऐलिकडे ।।५।।
मूळमाया लोकजननी । तयेपासून गुणक्षोभिणी । गुणक्षोभिणीपासून त्रिगुणी । जन्म देवा ।।६।।
ऐसें बोलती शास्त्रकारक । आणि प्रवृत्तीचेहि लोक । प्रत्यये पुसतां कित्येक । आकांत करिती ।।७।।
म्हणोन त्यास पुसावेना । त्यांचेन प्रत्ययो आणवेना । प्रत्ययेंविण प्रेत्न नाना । ठकाठकी ।।८।।
प्रचितीवीण वैद्य म्हणवी । उगीच करी उठाठेवी । तया मूर्खाला गोवी । प्राणीमात्र ।।९।।
तैसाच हाहि विचार । प्रत्यये करावा निर्धार । प्रत्ययें नस्तां अंधकार । गुरुशिष्यांसी ।।१०।।
बरें लोकांस काये म्हणावें । लोक म्हणती तेंचि बरवें । परंतु स्वामीनें सांगावें । विशद करूनी ।।११।।

मूळमाया कोणी निर्माण केली हेही समजले पाहिजे. कारण तिन्ही देव तिच्या नंतरचे आहेत (ऐलीकडे). मूळमायेत बीजरूपाने सर्व लोक (विष्णुलोक इ.) असतात. तीच गुणक्षोभिणी होऊन नंतर तिच्यापासून त्रिगुणात्मक ब्रह्मादी जन्माला आले. अध्यात्म शास्त्र व लोकव्यवहार हेच सांगतो. पण त्यांना यासंबंधी काही स्पष्टीकरण विचारावे तर ते 'तुम्ही पाखंडी आहात, बुद्धिवादी आहात' इ. प्रकारे आगपाखड करतात! म्हणून त्यांना विचारता येत नाही व त्यांची स्पष्टीकरण करून समाधान करण्याइतकी पात्रता नाही. नीट समजल्याशिवाय काही साधना करावी (प्रेत्न) तर त्यात स्वत:ची व दुसऱ्याची फसवणूकच होते (ठका-ठकी). ज्ञान व अनुभव नसताना कोणी वैद्य म्हणून मिरवू लागून व्यवसाय करू लागला तर त्या मूर्खाची सर्वच लोक भंबेरी उडवितात! गुरुशिष्यांचे बाबतीत असेच होते. ज्ञान व अनुभवानेच श्रीगुरूंनी शिष्याचा निश्चय करून द्यावा. अनुभव नसेल तर अज्ञानाचा अंधार पसरतो. अशा परिस्थितीत सामान्य लोकांना तरी काय दोष द्यावा? त्यांचे असते ते त्यांच्यापरीने ठीकच असते! पण श्रीगुरूंनी हे सर्व स्पष्ट करून सांगावे. ॥५-११॥

म्हणों देवीं माया केली । तरी देवांची रूपें मायेंत आलीं । जरी म्हणों मायेनें माया केली । तरी दुसरी नाहीं ।।१२।।

जरी म्हणों भूतीं केली । तरी ते भूतांचीच वळली । म्हणावें जरी परब्रह्मीं केली । तरी ब्रह्मीं कर्तुत्व नाहीं ।।१३।।

आणि माया खरी असावी । तरी ब्रह्मीं कर्तृत्वाची गोवी । माया मिथ्या ऐसी जाणावी । तरी कर्तृत्व कैंचे ।।१४।।

आतां हें अवघेंचि उगवें । आणी मनास प्रत्यये फावे । ऐसें केलें पाहिजे देवें । कृपाळूपणें ।।१५।।

मूळमाया देवांनी निर्माण केली असे म्हणावे तर त्रिगुणात्मक देव बीज रूपाने मूळमायेत असतात. मायेनेच माया केली असे म्हटले तर माया एकच आहे. पंचमहाभूतांनी माया उत्पन्न केली असे म्हणावे तर तीही बीजरूपाने तिच्यातच असतात. (पहा– ९-६-१५, १६). परब्रह्माने माया उत्पन्न केली असे म्हटले तर ब्रह्म 'अकर्ते' आहे. (निष्क्रिय.) शिवाय माया सत्य असती तर ब्रह्माकडे तिच्या उत्पत्तीचे कर्तृत्व देणे एक वेळ शक्य होते. पण ती मिथ्या असल्याने तेही शक्य नाही! आता सर्व गुंतागुंत सुटेल व पूर्ण पटेल असे उत्तर आपण कृपाळू होऊन द्यावे. ॥१२-१५॥

वेद मातृकावीण नाहीं । मातृका देहावीण नाहीं । देह निर्माण होत नाहीं । देहावेगळा ।।१६।।
तया देहामधें नरदेहो । त्या नरदेहांत ब्राह्मणदेहो । तया ब्राह्मणदेहास पाहो । अधिकार वेदीं ।।१७।।
असो वेद कोठून जाले । देह कासयाचे केले । देव कैसे प्रगटले । कोण्या प्रकारें ।।१८।।

वर्णमालेशिवाय शब्द तयार होत नाहीत. वर्ण उच्चारणारा देहधारी असल्याशिवाय वर्णांना अस्तित्व नाही व एका देहाशिवाय दुसरा देह जन्माला येत नाही. त्या देहांत पुरुष, पुरुषांत ब्राह्मण विशेष असून त्याला वेदांनी वेदविद्येचा अधिकार दिला आहे. हे वेद कोठून आले? देह कोणत्या सामुग्रीने केले? देव कसे प्रकट झाले? ॥१६-१८॥

ऐसा बळावला अनुमान । केलें पाहिजे समाधान । वक्ता म्हणे सावधान । होईं आतां ।।१९।।

वक्ता– अशा शंका वाढतच चालल्या. त्यांचे समाधान करणे आवश्यकच आहे. तरी आता लक्ष देऊन ऐकावे. ॥१९॥

प्रत्यये पाहाता सांकडी । अवघी होते विघडाविघडी । अनुमानितां घडीनें घडी । काळ जातो ।।२०।।
लोकघाटी शास्त्रनिर्णये । येथे बहुधा निश्चये । म्हणोनियां येक प्रत्यये । येणार नाहीं ।।२१।।
आतां शास्त्राची भीड धरावी । तरी सुटेना हे गथागोवी । गथागोवी हे उगवावी । तरी शास्त्रभेद दिसे ।।२२।।
शास्त्र रक्षून प्रत्यये आणिला । पूर्वपक्ष त्यागून सिद्धांत पाहिला । शाहाणा मूर्ख समजाविला । येका वचनें ।।२३।।
शास्त्रींच पूर्वपक्ष बोलिला । पूर्वपक्ष म्हणावें लटक्याला । विचार पाहातां आम्हांला । शब्द नाहीं ।।२४।।
तथापि बोलों कांहींयेक । शास्त्र रक्षून कौतुक । श्रोतीं सादर विवेक । केला पाहिजे ।।२५।।

तर्कशुद्ध व अनुभवण्यासारखे उत्तर हवे असेल तर मोठ्या अडचणी निर्माण होऊन पारंपरिक समजुती विस्कटतात व शंकाच वाढत राहिल्या तर आयुष्य हळूहळू संपत जाते. पारंपरिक समजुती व वेदान्तशास्त्र यात फार मोठी विसंगती (बहुधा निश्चय) दिसते. म्हणून त्यांत एकवाक्यता नाही. शास्त्रनिष्ठा सोडली (भीड) तर वरील प्रश्नांची उत्तरे मिळत

नाहीत. उत्तरे मिळविण्यासाठी शास्त्र प्रमाण मानावे तर शास्त्रात अनेक मतमतांतरे दिसतात (भेद). शास्त्रनिष्ठा सांभाळून पटण्यासारखी उत्तरे (प्रत्यय) देण्यासाठी पूर्वपक्षाचा त्याग करून शहाणा व अडाणी या दोन्हींचे समाधान होईल असे एक वाक्य सांगतो. शास्त्रातच पूर्वपक्षाची मांडणी केलेली असून तो चुकीचा व म्हणून खंडण करावयाचा असतो. त्यामुळे पूर्वपक्ष व सिद्धांतपक्ष एकत्र आल्याने झालेल्या गोंधळाला आम्ही (वक्ता) जबाबदार नाही! (शांकरभाष्ये वाचताना असा अनेकांचा गोंधळ होतो.) तरीही काही स्पष्टीकरण अवश्य करू. शास्त्राधाराने वरील शंकांच्या समाधानाची मौज अनुभवू. श्रोत्यांनी श्रद्धापूर्वक त्या अनुरोधाने विचार करावा. ॥२०-२५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देहआशंकानाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'देहआशंका' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक दहावा : जगज्जोती

समास तिसरा : देहआशंकाशोधन

॥ श्रीराम समर्थ ॥

उपाधीविण जें आकाश । तेंचि ब्रह्म निराभास । तें निराभासीं मूळमायेस । जन्म जाला ।।१।।

शब्द ही आकाशाची उपाधी आहे किंवा गुण आहे. ती काढल्यावर जे उरते ते न भासणारे ब्रह्म होय. त्यापासून मूळमाया जन्माला आली. ॥१॥

तें मूळमायेचें लक्षण । वायोस्वरूपचि जाण । पंचभूते आणि त्रिगुण । वायोआंगीं ।।२।।

वायू हेच मूळमायेचे स्वरूप असून वायुरूप शक्तीमध्ये पंचभूते व त्रिगुण सुप्त रीतीने राहतात. ॥२॥

आकाशापासून वायो जाला । तो वायोदेव बोलिला । वायोपासून अग्नी जाला । तो अग्निदेव ।।३।।

आकाशापासून उत्पन्न झालेल्याला वायुदेव व वायूपासून उत्पन्न झालेल्या अग्नीला अग्निदेव म्हणतात. ॥३॥

अग्नीपासून जालें आप । तें नारायणाचें स्वरूप । आपापासून पृथ्वीचें रूप । तें बीजाकारें ।।४।।

अग्नीपासून निर्माण झालेल्या आपोला आपोनारायण व आपापासून पृथ्वी निर्माण होऊन तिच्यात वनस्पतींची असंख्य बीजे आहेत. (आकाश-वायू-अग्नी-आप-पृथ्वी-औषधी-वनस्पती) ॥४॥

ते पृथ्वीचे पोटीं पाषाण । बहु देवांचे लक्षण । नाना प्रचित प्रमाण । पाषाणदेवीं ।।५।।

त्या पृथ्वीच्या पोटात दगडगोटे असतात व त्यांचेच अनेक देव तयार करतात. त्या पाषाणांच्या देवांचा अनेकांना अनेक प्रकारे अनुभव येतो. ॥५॥

नाना वृक्ष मृत्तिका । प्रचित रोकडी विश्वलोकां । समस्त देवांचा थारा येका । वायोमध्यें ।।६।।

वृक्षावरील देव, लाकडाच्या प्रतिमा, मातीच्या मूर्ती इत्यादी देवांचा जगातील लोकांना प्रत्यक्ष अनुभव येतो. पण हे खरे देव नसून खरे देवत्व वायुरूप शक्तीमध्ये असते. तो शक्ती रूप देव प्रतिमादिकांत राहिल्याने त्यांना देवत्व येते. ॥६॥

देव यक्षिणी कात्यायेणी । चामुंडा जखिणी मानविणी । नाना शक्ति नाना स्थानीं । देशपरत्वें ।।७।।

देव, यक्षिणी, कात्यायनी, चामुंडा, जखीण, मानविणी इ. रूपांनी शक्ती देशपरत्वे अनेक स्थळी राहतात. ॥७॥

पुरुषनामें कित्येक । देव असती अनेक । भूतें देवतें नपुषक । नामें बोलिजेती ।।८।।

कित्येक देव पुल्लिंगी नावाचे आहेत (उदा. खंडोबा.) अनेक भूते, दैवते नपुसकलिंगी नावाचे आहेत. (उदा. ते दैवत.) ॥८॥

देव देवता देवतें भूतें । पृथ्वीमध्यें असंख्यातें । परंतु या समस्तांते । वायोस्वरुप बोलिजे ।।९।।

देव, देवता, दैवते, भूते इ. या पृथ्वीवर अगणित आहेत. पण हे सर्व देव वायुरूप (तरल) आहेत. ॥९॥

वायोस्वरुप सदा असणें । प्रसंगें नाना देह धरणें । गुप्त प्रगट होणें जाणें । समस्तांसी ।।१०।।

ते सतत वायुरूपाने राहून प्रसंगी अनेक प्रकारची रूपे घेतात, प्रगट होतात व सर्वांच्या देखत देखत गुप्त होतात. किंवा प्रगट होऊन येणे व गुप्त होऊन जाणे सर्व देवांना शक्य असते. ॥१०॥

वायोस्वरूपें विचरती। वायोमध्यें जगज्जोती। जाणतीकळा वासना वृत्ति। नाना भेदें।।११।।

ते देव वायुस्वरूपाने असतात व त्या वायूत जाणीवरूप जगत् ज्योती व्यापून राहते. त्या जाणिवेत अनेक प्रकारच्या वासना व त्यांच्या वृत्ती असतात. ॥११॥

आकाशापासून वायो जाला। तो दों प्रकारें विभागला। सावधपणें विचार केला। पाहिजे श्रोतीं।।१२।।

आकाशापासून उत्पन्न झालेल्या वायूचे दोन भाग होतात. याचा श्रोत्याने सूक्ष्म विचार करावा. ॥१२॥

येक वारा सकळ जाणती। येक वायोमधील जगज्जोती। जगज्जोतीच्या अनंत मूर्ती। देवदेवतांच्या।।१३।।

एक सर्वांना माहीत असलेला वारा व एक वायूतील जाणीव कळा. या जाणीव कळेच्या देवदेवतांच्या असंख्य मूर्ती झाल्या. ॥१३॥

वायो बहुत विकारला। परंतु दों प्रकारें विभागला। आतां विचार ऐकिला। पाहिजे तेजाचा।।१४।।

वरील वायूचे प्राणापानादी बरेच विकार असले तरी मुख्य विकार दोन आहेत. आता तेजाचा विचार करू. ॥१४॥

वायोपासून तेज जालें। उष्ण सीतळ प्रकाशलें। द्विविध रूप ऐकिलें। पाहिजे तेजाचें।।१५।।

वायूपासून झालेल्या तेजाचे उष्ण व थंड असे दोन भाग झाले. ते दोन रूपांनी प्रगट झाले. ॥१५॥

उष्णापासून जाला भानु। प्रकाशरूप दैदीप्यमानु। सर्वभक्षक हुताशनु। आणी विद्युल्यता।।१६।।

उष्ण तेजापासून अत्यंत दाहक व प्रकाशमय सूर्य तयार झाला. शिवाय अग्नी व वीज उत्पन्न झाले. ॥१६॥

सीतळापासून आप अमृत। चंद्र तारा आणी सीत। आतां परिसा सावचित्त। होऊन श्रोते।।१७।।

शीत तेजापासून पाणी, अमृत, चंद्र, तारका व बर्फ तयार झाले. यापुढील भाग सावधपणे ऐका. ॥१७॥

तेज बहुत विकारलें। परंतु द्विविधाच बोलिलें। आपहि द्विविधाच निरोपिलें। आप आणि अमृत।।१८।।

तेजाचेही बरेच विचार असले तरी मुख्य दोनच सांगितले. आपाचेही पाणी व अमृत असे दोनच प्रकार सांगितले. ॥१८॥

ऐकें पृथ्वीचा विचार। पाषाण मृत्तिका निरंतर। आणीक दुसरा प्रकार। सुवर्ण परीस नाना रत्नें।।१९।।

पृथ्वीचेही दोनच मुख्य विकार आहेत. दगड व मातीचे ढीग हा एक व सोने, परीस व रत्ने हा दुसरा. ॥१९॥

बहुरत्ना वसुंधरा। कोण खोटा कोण खरा। अवघें कळे विचारा-। रूढ होतां।।२०।।

पृथ्वीला बहुरत्ना म्हणतात. पण त्या रत्नातील खरे व खोटे विचारावर आरूढ झाल्यावरच कळते. ॥२०॥

मनुष्यें कोठून जालीं। हे मुख्य आशंका राहिली। पुढें वृत्ति सावध केली। पाहिजे श्रोतीं।।२१।।

आता मनुष्य प्राणी कोठून आला हा मुख्य प्रश्न राहून गेला आहे. त्याचे उत्तर सावधानतेने ऐका. ॥२१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देहआशंकाशोधननाम' समास तिसरा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'देहआशंकाशोधन' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक दहावा : जगज्जोती

समास चवथा : बीजलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

आतां पाहों जातां उत्पत्ती । मनुष्यांपासून मनुष्ये होती । पशुपासून पशु निपजती । प्रत्यक्ष आतां ।।१।।

'माणूस कोठून आला' या प्रश्नाचे उत्तर शोधताना प्रथम हे स्पष्टच कळते की माणूस माणसापासून व पशू पशूपासून जन्माला येतो. ॥१॥

खेचरें आणी भूचरें । वनचरें आणी जळचरें । नाना प्रकारीचीं शरीरें । शेरीरांपासून होती ।।२।।

आकाशात फिरणारे पक्षी, जमिनीवर चालणारे बैल इ. पाळीव प्राणी, जंगलात राहणारे व्याघ्रादी व पाण्यातील मासे इ. प्राणी त्या त्या शरीरापासून होतात. ॥२॥

प्रत्यक्षास आणी प्रमाण । निश्चयास आणि अनुमान । मार्ग देखोन आडरान । घेऊंच नये ।।३।।

प्रत्यक्षाला पुराव्याची, निश्चयाला तर्काची आवश्यकता असू नये. सरळ राजरस्ता असताना आडरानात शिरू नये. ॥३॥

विपरीतापासून विपरीतें होती । परी शरीरेंच बोलिजेती । शरीरावांचून उत्पत्ती । होणार नाहीं ।।४।।

क्वचित माणसाला माकडासारखे मूल होऊ शकते. पण त्यालाही शरीरच म्हणतात. शरीराशिवाय शरीर जन्माला येत नाही. ॥४॥

तरी हे उत्पत्ति कैसी जाली । कासयाची कोणें केली । जेणें केली त्याची निर्मिली । काया कोणें ।।५।।
ऐसें पाहातां उदंड लांबलें । परी मुळीं शेरीर कैसें जालें । कासयाचें उभारिलें । कोणें कैसें ।।६।।

तरी मनुष्यशरीराची निर्मिती कशी व कोणी केली व ज्याने ही निर्मिती केली, त्याचे शरीर कोणी व कशाचे केले हा प्रश्न राहतोच. ॥५-६॥

ऐसी हे मागील आशंका । राहात गेली ते ऐका । कदापी जाजु घेऊं नका । प्रत्ययो आलियानें ।।७।।

अशी ही मागील शंका उत्तरावाचून तशीच राहिली तिचे उत्तर ऐका. अनुभवांनंतर मात्र पुन्हा शंका कधीच घेता कामा नये. ॥७॥

प्रत्ययोचि आहे प्रमाण । मूर्खास वाटे अप्रमाण । पिंडें प्रचितशब्दें जाण । विश्वासासी ।।८।।

प्रत्यक्ष अनुभवावर सुद्धा मूर्ख विश्वास ठेवीत नाही. ज्यांना अनुभव आला आहे, त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून अनुभव घेणे मनुष्यशरीरात (पिंडे) शक्य आहे. ॥८॥

ब्रह्मीं मूळमाया जाली । तेचि अष्टधा प्रकृति बोलिली । भूतीं त्रिगुणीं कालवली । मूळमाया ।।९।।

ब्रह्म स्वरूपात मूळमाया झाली. पाच महाभूते व तीन गुण अशा आठांच्या मिश्रणाची प्रकृती हेच मूळमायेचे स्वरूप आहे. ॥९॥

ते मूळमाया वायोस्वरूप । वायोमध्यें जाणीवेचें रुप । तेचि इच्छा परी आरोप । ब्रह्मीं न घडे ।।१०।।

ही मूळमाया म्हणजेच शक्ती (वायो) असून तिच्यात ब्रह्मप्रकाश रूप जाणीव व्यापून रहाते. (ईश्वर). तिलाच 'एकोऽहं बहुस्याम' असा संकल्प होतो. त्यामुळे हा संकल्प ब्रह्माला होतो. असा आरोप करता येत नाही.

(ते निष्क्रिय आहे) ॥१०॥

तथापि ब्रह्मीं कल्पिला । तरी तो शब्द वायां गेला । आत्मा निर्गुण संचला । शब्दातीत ।।११।।

कोणी 'ब्रह्म संकल्प करते' असे अज्ञानाने म्हटलेच तर ते त्याचे बोलणे व्यर्थ होय. निर्गुण ब्रह्मासंबंधी काही बोलणे व्यर्थ असून ते सर्वत्र व्यापून राहिले आहे. ॥११॥

आत्मा निर्गुण वस्तु ब्रह्म । नाममात्र तितुका भ्रम । कल्पून लाविला संभ्रम । तरी तो लागणार नाहीं ।।१२।।

आत्म्यालाच निर्गुण, वस्तू व ब्रह्म म्हणतात. ज्याला रूप व त्यामुळे नाव देता येते ते सर्व भ्रमरूप आहे. (आत्मा किंवा ब्रह्म हे कोणा रूपवान पदार्थाचे नाव नसून ती एक संकल्पना आहे.) केवळ कल्पना लढवून ब्रह्माचे शब्दाने वर्णन करावयाचे ठरविले तरी ते शक्य नाही. ॥१२॥

तथापि आग्रहें लाविला । जरी धोंडा मारिला आकाशाला । आकाशावरी कुंथिला । तरी तें तुटेना ।।१३।।

इतके करून तसा हट्ट केलाच तर ते आकाशाला दगड मारल्यासारखे किंवा आकाशावर थुंकल्याप्रमाणे होईल. आकाश याने तुटत नाही. ॥१३॥

तैसें ब्रह्म निर्विकार । निर्विकार लाविती विकार । विकार नासे निर्विकार । जैसें तैसें ।।१४।।

त्याप्रमाणे निर्विकार ब्रह्माला विकार चिकटविण्याचा प्रयत्न केला तर विकार नष्ट होतो. ब्रह्म जसेच्या तसे रहाते. ॥१४॥

आतां ऐका प्रत्ययो । जाणोनि धरावा निश्चयो । तरीच पाविजे जयो । अनुभवाचा ।।१५।।

आता हे लक्षात घ्या की जाणत्यांच्या झालेल्या निश्चयावर श्रद्धा ठेवली तरच त्यांच्यासारखा तुमचा निश्चय होईल. ॥१५॥

मायाब्रह्मीं जो समीर । त्यांत जाणता तो ईश्वर । ईश्वर आणि सर्वेश्वर । तयासीच बोलिजे ।।१६।।

माया हीच वायू असून तिच्यातील जाणत्याला (चिदाभास) ईश्वर किंवा सर्वेश्वर म्हणतात. (ईश्वर = मायाविशिष्ट चैतन्य.) ॥१६॥

तोचि ईश्वर गुणासी आला । त्याचा त्रिगुणभेद जाला । ब्रह्मा विष्णु महेश उपजला । तये ठाईं ।।१७।।

तोच ईश्वर त्रिगुणात्मक होऊन त्यापासून ब्रह्मा, विष्णू व महेश जन्माला आले. ॥१७॥

सत्व रज आणि तम । हे त्रिगुण उत्तमोत्तम । यांच्या स्वरुपाचा अनुक्रम । मागां निरोपिला ।।१८।।

सत्व, रज व तम हे तीन गुण ही अत्यंत श्रेष्ठ सामुग्री आहे. त्यांच्या स्वरूपाविषयी पूर्वी सांगितले आहे. (२-५, ६,७) ॥१८॥

जाणता विष्णू भगवान । जाणतानेणता चतुरानन । नेणता महेश पंचानन । अत्यंत भोळा ।।१९।।

जाणिवेचा स्वामी विष्णू भगवान, जाणीव-नेणिवेचा स्वामी ब्रह्मदेव व नेणिवेचा स्वामी भोळा शंकर होय. (शंकराला नेणीव म्हणजे अज्ञान नाही. तो अज्ञान या जीवाच्या अवस्थेचा स्वामी आहे. अन्यथा शंकराचे भक्त अज्ञानाचे उपासक ठरतील!) (जाणीव-जाग्रति; जाणीव नेणीव-स्वप्न; नेणीव-सुषुप्ती) ॥१९॥

त्रिगुण त्रिगुणीं कालवले । कैसे होती वेगळाले । परी विशेष न्यून भासले । ते बोलावे लागती ।।२०।।

तसे पाहिले तर तीन गुण परस्परात मिसळलेले असतात ते एकमेकापासून वेगळे कसे होतील? पण त्यांचा वेगळा भास होतो व म्हणून तो तसा सांगावा लागतो. ॥२०॥

वायोमध्यें विष्णू होता । तो वायोस्वरुपचि तत्वता । पुढें जाला देहधर्ता । चतुर्भुजु ।।२१।।

वायूमध्ये विष्णु वायुमयस्वरूपांत बीजरूपाने होता. पुढे तोच व्यक्त होऊन चतुर्भुज झाला. विदेहाचा देही झाला. ॥२१॥

तैसाच ब्रह्मा आणि महेश । देह धरिती सावकास । गुप्त प्रगट होतां तयांस । वेळ नाहीं ।।२२।।

त्याचप्रमाणे ब्रह्मदेव व महेश योग्य वेळी देहधारी होतात. ते क्षणात गुप्त व प्रगट होऊ शकतात. ॥२२॥

आतां रोकडी प्रचिती । मनुष्यें गुप्त प्रगटती । मां त्या देवांच्याच मूर्ती । सामर्थ्यवंत ।।२३।।

क्वचित माणसे सुद्धा गुप्त व प्रगट होतात, हे प्रत्यक्ष दिसते. ब्रह्मादिक तर सामर्थ्यसंपन्न देवच आहेत. ॥२३॥

देव देवता भूतें देवतें । चढतें सामर्थ्य आहे तेथें । येणेंचि न्यायें राक्षसांतें । सामर्थ्यकळा ।।२४।।

देव, देवता, भूते व दैवते यांच्यापाशी माणसाहून अधिक सामर्थ्य आहे. याच कारणाने राक्षसही तशा सामर्थ्याचे असतात. ॥२४॥

झोटिंग वायोस्वरूप असती । सवेंच खुळखुळां चालती । खोबरी खारिका टाकून देती । अकस्मात ।।२५।।

झोटिंग ही छळणारी भूते वायुस्वरूप असूनही त्यांच्या हालचालींचा पायातील चाळांप्रमाणे आवाज येतो. हे झोटिंग कोणासमोर खोबरे व खारीक टाकून चकित करतात. ॥२५॥

अवघेंचि न्याल अभावें । तरी हें बहुतेकांस ठावें । आपुलाल्या अनुभवें । विश्वलोक जाणती ।।२६।।

या सर्व भाकडकथा आहेत, असे म्हणाल तर यांचा बऱ्याच लोकांना जगभर प्रत्यक्ष अनुभव आहे. ॥२६॥

मनुष्ये धरिती शरीरवेष । नाना परकाया प्रवेश । मां तो परमात्मा जगदीश । कैसा न धरी ।।२७।।

माणसातील महायोगी सुद्धा अनेक शरीरे धारण करतात व परकायाप्रवेशसुद्धा करतात. मग त्या जगताचा स्वामी असलेल्या सर्वशक्तिमान परमेश्वराला तसे करता येत नाही, असे कसे होईल? ॥२७॥

म्हणोनि वायोस्वरूपें देह धरिलें । ब्रह्मा विष्णु महेश जाले । पुढें तेचि विस्तारलें । पुत्रपौत्रीं ।।२८।।

एकूण मूळ वायुरूप असलेल्या त्रिगुणात्मक ब्रह्मा, विष्णू व महेशांनी देह स्वीकारले व पुढे त्यांच्या मानस पुत्रपौत्रांचा विस्तार झाला. ॥२८॥

अंतरींच स्त्रिया कल्पिल्या । तों त्या कल्पितांच निर्माण जाल्या । परी तयापासून प्रजा निर्मिल्या । नाहींत कदा ।।२९।।

ईश्वररूप ब्रह्मादिकांनी अंत:करणांत स्त्री या जातीची कल्पना करून स्त्री जात निर्माण केली. पण त्यांनी स्वत: त्यांच्यापासून प्रजेचा विस्तार केला नाही. ॥२९॥

इछून पुत्र कल्पिले । ते ते प्रसंगी निर्माण जाले । येणें प्रकारें वर्तले । हरिहरादिक ।।३०।।

त्याचबरोबर त्यांनी पुरुष जातीची (पुत्र) कल्पना करिताच पुरुष जात निर्माण झाली. (या स्त्री व पुरुषांनी पुढे प्रजेचा विस्तार केला.) हरिहरांपासून झालेला माणसांच्या प्रजेचा विस्तार हा त्यांच्या अशा क्रियेपासून झाला. ॥३०॥

पुढें ब्रह्मयानें सृष्टी कल्पिली । इछेसरिसी सृष्टी जाली । जीवसृष्टि निर्माण केली । ब्रह्मदेवें ।।३१।।

नंतर ब्रह्मदेवाने सृष्टीची कल्पना करताच त्या इच्छेनुसार ती झाली व नंतर अपरंपार जीवसृष्टी त्याने अशीच निर्माण केली. ॥३१॥

नाना प्रकारीचे प्राणी कल्पिले । इछेसरिसे निर्माण जाले । अवघे जोडेचि उदेले । अंडजजारजादिक ।।३२।।

त्याने लक्षावधी योनींची (प्राणी) कल्पना केल्यावर त्या त्याच्या इच्छेनुसार स्त्रीलिंगी व पुल्लिंगी जोड्या निर्माण झाल्या. त्या योनींचें अंडज, जारज इ. चार मुख्य प्रकार झाले. ॥३२॥

येक जळस्वेदापासून जाले । ते प्राणी स्वेदज बोलिले । येक वायोकरितां जाले । अकस्मात उद्भिज ।।३३।।

जळरूप घामातून स्वेदज व हवेच्या अनुकूलतेने जमिनीतून किंवा हवेतून अकस्मात निर्माण झालेल्या उद्भिज योनी झाल्या. (जीव विकासाच्या प्राथमिक कल्पना) ॥३३॥

मनुष्याची गौडविद्या । राक्षसांची वोडंबरीविद्या । ब्रह्मयाची सृष्टिविद्या । येणें प्रकारें ।।३४।।

माणूस दाखवीत असलेली जादू, राक्षसांची वोडंबरी विद्या व ईश्वराची सृष्टिविद्या क्रमाने अधिकाधिक प्रभावी आहेत. ॥३४॥

कांहीयेक मनुष्यांची । त्याहून विशेष राक्षेसांची । त्याहून विशेष ब्रह्मयाची । सृष्टिविद्या ।।३५।।

माणसाच्या जादूने भ्रम निर्माण होऊन फसगत होते. राक्षसांच्या वोडंबरी विद्येने काही मर्यादेपर्यंत रूपात बदल इ. प्रकार होतात. पण ब्रह्मदेवाच्या विद्येने ही सत्य वाटणारी अपरंपार सृष्टी निर्माण होते. ॥३५॥

जाणते नेणते प्राणी निर्मिले । वेद वदोन मार्ग लाविले । ब्रह्मयानें निर्माण केले । येणें प्रकारें ।।३६।।

ज्ञान व अज्ञान या दोन्हींनी युक्त असलेल्या बुद्धीचे प्राणी निर्माण करून (माणूस) त्यांच्यासाठी वेद निर्माण करून त्यांना शोभेल असे जीवन जगण्यासाठी त्रिकांडात्मक मार्ग दाखविले. ॥३६॥

मग शरीरांपासून शरीरें । सृष्टि वाढली विकारें । सकळ शरीरे येणें प्रकारें । निर्माण जालीं ।।३७।।

नंतर पुढे त्या शरीरापासून अगणित शरीरे निर्माण होऊन विकाररूप सृष्टी वाढली. किंवा विकारामुळे (बदल) सृष्टी वाढली. सर्व शरीरांची निर्मिती अशा प्रकारे झाली. ॥३७॥

येथें आशंका फिटली । सकळ सृष्टि विस्तारली । विचार पाहातां प्रत्यया आली । येथान्वयें ।।३८।।

विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिले. वर सांगितलेल्या क्रमाने सृष्टिनिर्मितीचा विचार केल्यास तसा निश्चय होईल व सर्व सृष्टीच्या विस्ताराचे आकलन होईल. ॥३८॥

ऐसी सृष्टि निर्माण केली । पुढें विष्णूनें कैसी प्रतिपाळिली । हेहि विवंचना पाहिली । पाहिजे श्रोतीं ।।३९।।

सृष्टी निर्माण केल्यावर श्रीविष्णूने तिचा सांभाळ कसा केला या श्रोत्याच्या प्रश्नाचे आता उत्तर दिले पाहिजे. ते ऐकावे. ॥३९॥

सकळ प्राणी निर्माण जाले । ते मूळरुपें जाणोन पाळिले । शरीरें दैत्य निर्दाळिले । नाना प्रकारींचे ।।४०।।

सर्व प्राणी निर्माण केल्यावर त्यांच्यातील अंत:करणाने (जाणीव) त्यांचा सांभाळ होतो. पहा (१०-१-११ ते १४) व स्वत:च्या लीलाविग्रहाने (अवतार) दैत्यराक्षसांचा संहार करून वेळोवेळी त्यांचा सांभाळ केला. ॥४०॥

नाना अवतार धरणें । दुष्टांचा संहार करणें । धर्म स्थापायाकारणें । विष्णूस जन्म ।।४१।।

दुष्टांचा नाश करून धर्मस्थापनेने माणसांचा सांभाळ करावा म्हणून विष्णू अनेक अवतार स्वरूप जन्म घेतो. ॥४१॥

म्हणोन धर्मस्थापनेचे नर । तेहिं विष्णूचे अवतार । अभक्त दुर्जन रजनीचर । सहजचि जाले ।।४२।।

म्हणून धर्मस्थापना करणारे पुरुष (उदा. शिवछत्रपती) हेही श्री विष्णूचेच अवतार होत. अभक्त व दुष्ट राक्षसांचा

नाश करणारे असे ते अवतार जन्माला येतात. ।।४२।।

आतां प्राणी जे जन्मले । ते नेणोन संव्हारले । मूळरुपें संव्हारिले । येणें प्रकारें ।।४३।।

जन्माला येणाऱ्या प्राण्यांचा अज्ञानामुळे आतून नाश होतो. त्यांचा तमोगुण (मूळरूप) त्यांचा नाश करतो. ।।४३।।

शरीरें रुद्र खवळेल । तैं जीवसृष्टि संव्हारेल । अवघें ब्रह्मांडचि जळेल । संव्हारकाळी ।।४४।।

तमोगुणाचे स्वामी शंकर जेव्हा रुद्र होऊन खवळतात तेव्हा जीवसृष्टी सर्व ब्रह्मांडासह प्रलयकाळी जळून जाईल. ।।४४।।

एवं उत्पत्ती स्थिती संव्हार । याचा ऐसा आहे विचार । श्रोतीं होऊन तत्पर । अवधान द्यावें ।।४५।।

असा हा उत्पत्ती, स्थिती व संहाराचा विचार असून श्रोत्यांनी तो मनापासून ऐकावा. ।।४५।।

कल्पांतीं संव्हार घडेल । तोचि पुढें सांगिजेल । पंचप्रळय वोळखेल । तोचि ज्ञानी ।।४६।।

कल्पांताची वेळ आल्यावर घडणाऱ्या संहाराचे पुढे वर्णन करू. पण पांचप्रळय जाणणाराच खरा ज्ञानी असतो! ।।४६।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'बीजलक्षणनाम' समास चवथा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'बीजलक्षण' नावाचा चवथा समास समाप्त

दशक दहावा : जगज्जोती

समास पाचवा : पंचप्रळयनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ऐका प्रळयाचें लक्षण । पिंडी दोनी प्रळये जाण । येकनिद्रा येक मरण । देहांतकाळ ।।१।।

आता प्रळयाची लक्षणें ऐका. गाढ झोप व प्रारब्ध भोगून झाल्यावर देहाला येणारे मरण असे दोन प्रळय, पिंडाचे आहेत. ॥१॥

देहधारक तिनी मूर्ती । निद्रा जेव्हां संपादिती । तो निद्राप्रळय श्रोतीं । ब्रह्मांडींचा जाणावा ।।२।।

व्यक्त झालेले त्रिगुणात्मक ब्रह्मदेवादी तीन देव जेव्हा गाढ झोपतात, तेव्हा ब्रह्मांडाचा निद्राप्रळय होतो. ॥२॥

तिनी मूर्तीस होईल अंत । ब्रह्मांडास मांडेल कल्पांत । तेव्हा जाणावा नेमस्त । ब्रह्मप्रळये जाला ।।३।।

जेव्हा या तीन मूर्ती मरण पावतात तेव्हां ब्रह्मांडाचा कल्पपर्यंत अंत होतो. महाप्रलय होतो. तोच ब्रह्मप्रलय. ॥३॥

दोनी पिंडीं दोनी ब्रह्मांडी । च्यारी प्रळय नवखंडी । पांचवा प्रळय उदंडी । जाणिजे विवेकाचा ।।४।।

दोन पिंडाचे व दोन ब्रह्मांडाचे असे चार प्रलय नऊ खंडांत होतात. पाचवा विवेकप्रलय असून तो शाश्वत असतो. त्यांत जग हे मिथ्या आहे किंवा झालेलेच नाही असा निश्चय होतो. ॥४॥

ऐसे हे पांचहि प्रळये । सांगितले येथान्वयें । आतां हे अनुभवास ये । ऐसें करूं ।।५।।

असे हे पाच प्रलय क्रमाने सांगितले. आता त्यांचे स्पष्टीकरण करून ते पटतील असे सांगू. ॥५॥

निद्रा जेव्हा संचरे । तेव्हां जागृतीव्यापार सरे । सुषुप्ति अथवा स्वप्न भरे । अकस्मात आंगीं ।।६।।

जेव्हा माणसाला गाढ झोप लागते, तेव्हा जागृतीमधील सर्व व्यवहार व अनुभव पुसून जातात. एकतर गाढ झोप लागते किंवा अचानक स्वप्ने पडू लागतात. ॥६॥

या नांव निद्राप्रळये । जागृतीचा होये क्षये । आतां ऐका देहांतसमये । म्हणिजे मृत्यप्रळये ।।७।।

हाच तो निद्रेने होणारा त्या व्यक्तीपुरता जगाचा तात्पुरता प्रळय. त्यात जागृती लीन होते. त्या माणसाचे (पिंड) मरण हाच मृत्युप्रलय असून त्यात त्याच्या त्या देहाचा नाश होतो. ॥७॥

देहीं रोग बळावती । अथवा कठीण प्रसंग पडती । तेणे पंचप्राण जाती । व्यापार सांडुनी ।।८।।

देहाला ग्रासणारे रोग, अपघात, घात इत्यादीमुळे प्राणादी पाच प्राण त्यांची त्यांची नियोजित स्थाने सोडतात. ॥८॥

तिकडे गेला मनपवनु । इकडे राहिली नुस्ती तनु । दुसरा प्रळये अनुमानु । असेचिना ।।९।।

सूक्ष्म अंत:करण व प्राण निघून गेल्यावर मागे केवळ शरीर उरते, या प्रळयाबद्दल कोणालाही शंका वाटण्यासारखे नाही. ॥९॥

तिसरा ब्रह्मा निजेला । तों हा मृत्यलोक गोळा जाला । अवघा व्यापार खुंटला । प्राणीमात्रांचा ।।१०।।

ब्रह्मदेवाची गाढ झोप हा ब्रह्मांडाचे संदर्भातील तिसरा प्रळय होय. त्यांत मृत्युलोकावरील सर्व व्यवहार मृत्युलोकाचा नाश झाल्याने बंद पडतात. ॥१०॥

तेव्हां प्राणीयांचे सूक्ष्मांश । वायोचक्रीं करिती वास । कित्येक काळ जातां ब्रह्मयास । जागृती घडे ।।११।।

जीवसृष्टी नष्ट होऊन प्राण्यांचे सूक्ष्म देह अव्यक्तात राहतात. प्रदीर्घ काळानंतर ब्रह्मदेव जागा होतो. ॥११॥

पुन्हा मागुती सृष्टि रची । विसंचिले जीव मागुतें संची । सीमा होतां आयुष्याची । ब्रह्मप्रळय मांडे ।।१२।।

तो पुन्हा सृष्टिरचना करून सुप्त व पांगलेले जीवांचे सूक्ष्म देह ताब्यात घेऊन सृष्टी सुरू करतो. त्याचे आयुष्य जेव्हा संपते तेव्हा चवथा ब्रह्मप्रळय होतो. ॥१२॥

शत वरुषें मेघ जाती । तेणें प्राणी मृत्य पावती । असंभाव्य तर्के क्षिती । मर्यादेवेगळी ।।१३।।

शंभर वर्षे आकाशात पांढरा ढगही दिसत नाही. त्या अनावृष्टीमुळे जीवसृष्टी मरून, तापलेल्या पृथ्वीला प्रचंड तडे जातात. ॥१३॥

सूर्य तपे बाराकळी । तेणें पृथ्वीची होय होळी । अग्नी पावतां पाताळीं । शेष विष वमी ।।१४।।

त्या काळात सूर्य त्याच्या बाराही कलांनी तापू लागतो (जालिनी, करिनी, दाहिनी, दीपिनी इ.) त्यामुळे पृथ्वीची जणू होळी होते. अग्नी पृथ्वीच्या पोटात शिरल्याने दाह झालेला शेष जणू विष ओकतो. ॥१४॥

आकाशीं सूर्याच्या ज्वाळा । पाताळीं शेष विष वमी गरळा । दोहिकडून जळतां भूगोळा । उरी कैंची ।।१५।।

आकाश ज्वाळांनी भरून जाते व पाताळात शेष विषाचे गरळ ओकतो. असे दोन्हीकडून पेटलेले जग कसे टिकेल? (पृथ्वीच्या पोटातील अग्नी बाहेर पडतो) ॥१५॥

सूर्यास खडतरता चढे । हलकालोळ चहुंकडे । कोंसळती मेरुचे कडे । घडघडायमान ।।१६।।

सूर्याच्या उष्णतेची प्रखरता वाढत जाते. चहूंकडे हळकल्लोळ होऊन मेरूपर्वताचे कडे धडाधड कोसळतात. ॥१६॥

अमरावती सत्यलोक । वैकुंठ कैळासादिक । याहिवेगळे नाना लोक । भस्मोन जाती ।।१७।।

स्वर्गाची राजधानी, सत्यलोक, वैकुंठ, कैलास हे व असे सर्व लोक भस्म होतात. (शेष, मेरू, लोक इ. पौराणिक कल्पना.) ॥१७॥

मेरु अवघाचि घसरे । तेथील महिमाच वोसरे । देवसमुदाव वावरे । वायोचक्रीं ।।१८।।

मेरूपर्वत भुईसपाट होतो, त्याचा सोनेपणा नष्ट होतो, देव सुद्धा वातावरणात सूक्ष्म रूपाने राहतात. ॥१८॥

भस्म जालियां धरत्री । प्रजन्य पडें शुंडाधारीं । मही विरे जळांतरी । निमिष्यमात्रें ।।१९।।

पृथ्वीची राख झाल्यानंतर हत्तीच्या सोंडेसारख्या प्रचंड धारांनी अनावर पाऊस पडू लागतो. ती राख थोड्याच काळात त्या पाण्यात मिळून रहाते. ॥१९॥

पुढें नुस्तें उरेल जळ । तयास शोषील अनळ । पुढें येकवटती ज्वाळ । मर्यादेवेगळे ।।२०।।

नंतर जेव्हा फक्त पाणीच उरते, त्याचे अग्नी शोषण करतो व अग्नीच्या प्रचंड ज्वाला एकवटून भडका उडतो. ॥२०॥

समुद्रींचा वडवानळ । शिवनेत्रींचा नेत्रावळ । सप्तकंचुकींचा आवर्णानळ । सूर्य आणि विद्युल्यता ।।२१।।

समुद्रातील वडवानळ, शंकराच्या तिसऱ्या डोळ्यातील क्रोधाग्नी, पृथ्वीच्या सातही आवरणातील अग्नी, सूर्य व वीज. ॥२१॥

ऐसे ज्वाळ येकवटती । तेणें देव देह सोडिती । पूर्वरूपें मिळोन जाती । प्रभंजनीं ।।२२।।

असे सर्व अग्नी एकत्र येतात व त्यामुळे देवांनाही मरण येते व ते आपल्या मूळच्या वायुरूपात विरतात. ॥२२॥

तो वारा झडपी वैश्वानरा । वन्ही विझेल येकसरा । वायो धावें सैरावैरा । परब्रह्मीं ।।२३।।

प्रचंड वेगाने वाहणारे वारे अग्नीवर हल्ला करून त्याला विझवतात व वाराच ब्रह्मांडभर उभा-आडवा वाहतो. ॥२३॥

धूम्र वितुळे आकाशीं । तैसें होईल समीरासी । बहुतांमध्ये थोडियासी । नाश बोलिला ।।२४।।

धूर जसा आकाशात कोठे गडप होतो कळत नाही, त्याप्रमाणे वायू आकाशात नाहीसा होतो. जे अधिक व्यापक असते, त्यात कमी व्यापक असणारे दडून जाते. ॥२४॥

वायो वितुळतांच जाण । सूक्ष्म भूतें आणि त्रिगुण । ईश्वर सांडी अधिष्ठान । निर्विकल्पीं ।।२५।।

वायू नाहीसा होताच सूक्ष्मपंचमहाभूते, तीन गुण व ईश्वर ही सर्व परब्रह्माच्या स्वरूपात लीन होतात. ॥२५॥

तेथें जाणीव राहिली । आणी जगज्जोती निमाली । शुद्ध सारांश उरली । स्वरूपस्थिती ।।२६।।

त्या वेळी शुद्ध जाणीव रहाते. मायाविशिष्ट जाणीव नष्ट होते. ही जगज्जोती लीन होऊन शुद्ध स्वरूपस्थिती उरते. (ब्रह्म.) ॥२६॥

जितुकीं कांही नामाभिधानें । तये प्रकृतीचेनी गुणें । प्रकृती नस्तां बोलणें । कैसें बोलावें ।।२७।।

केवळ प्रकृतीच्या अस्तित्वावरच रूपे व नामे यांचे अस्तित्व असते. प्रकृतीच नसताना कशाविषयी, कोणी व काय बोलावे? ॥२७॥

प्रकृती अस्तां विवेक कीजे । त्यास विवेकप्रळये बोलिजे । पांचहि प्रळय वोजें । तुज निरोपिले ।।२८।।

प्रकृती असतानाच ब्रह्म सत्य आहे व दृष्य जगत् मिथ्या आहे, असा विवेक करावा. हाच तो विवेक प्रलय. अशा प्रकारे हे पाच प्रळय तुला सांगून झाले. ॥२८॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'पंचप्रळयनिरूपणनाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'पंचप्रळयनिरूपण' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक दहावा : जगज्जोती

समास सहावा : भ्रमनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

उत्पत्ती स्थिती संव्हार । याचा निरोपिला वेव्हार । परमात्मा निर्गुण निराकार । जैसा तैसा ।।१।।

जगाची व जीवसृष्टीची उत्पत्ती, स्थिती व नाश कसा होतो, ते सांगून झाले. पण निर्गुण निराकार परमात्मरूप ब्रह्माला हे विकार नाहीत. त्याला जगाच्या विकारांचा स्पर्शही होत नाही. ॥१॥

होतें वर्ततें आणी जातें । याचा समंध नाहीं तेथें । आद्य मद्य अवसाने तें । संचलेंचि आहे ।।२।।

जग निर्माण होते, टिकते व नष्ट होते. त्याचा परब्रह्माशी काही संबंध नसतो. ब्रह्म जगाच्या उत्पत्तिकाळी, स्थितिकाळी व लयकाळी घनदाट भरून असते. ॥२॥

परब्रह्म असतचि असे । मध्येंचि हा भ्रम भासे । भासे परंतु अवघा नासे । काळांतरी ।।३।।

ब्रह्म नित्य, सत्य व अखंड आहे. मधेच अचानक हा अनंत विश्वाचा भ्रम त्यावर भासतो. हा भासला तरी काही काळाने पूर्णपणे नष्ट होतो. ॥३॥

उत्पत्तीस्थितीसंव्हारत । मध्येंहि अखंड होत जात । पुढे सेवटीं कल्पांत । सकळांस आहे ।।४।।

उत्पत्ती, स्थिती व संहाराचे हे चक्र मधेच अखंडपणे भासते व सरते. पण कल्पाच्या अंती सर्वाचा नाश आहे. ॥४॥

यामधें ज्यास विवेक आहे । तो आधींच जाणताहे । सारासार विचारें पडे । म्हणौनियां ।।५।।

या चक्रामध्ये जगणाऱ्या माणसाला जर सार व असार यांचा विवेक असेल तर तो या चक्राला चांगले ओळखून राहतो. त्याचा भ्रामकपणा व अनित्यत्व जाणून असतो. ॥५॥

बहुत भ्रमिष्ट मिळाले । त्यांत उमजल्याचें काय चाले । सृष्टीमधें उमजले । ऐसे थोडे ।।६।।

'जग सत्य आहे' असा भ्रम झालेल्यांची संख्या प्रचंड असल्याने एकट्या-दुकट्या ज्ञान्याचे शहाणपण त्यांच्यापुढे चालत नाही! या मनुष्यजातीचे स्वरूपच असे आहे की त्यांत ज्ञाते अत्यल्प असतात. ॥६॥

त्या उमजल्यांचे लक्षण । कांहीं करूं निरूपण । भ्रमाहून विलक्षण । महापुरुष ।।७।।

ज्या महापुरुषांनी भ्रम दूर करून सत्याचा अनुभव घेतला आहे त्यांची लक्षणे आता सांगण्याचा प्रयत्न करू. ॥७॥

भ्रम हा नसेल जयासी । मनीं वोळखावे तयासी । ऐक आतां भ्रमासी । निरोपिजेल ।।८।।

भ्रमाची लक्षणे समजावून घेऊन तो ज्यांना नाही त्यांना (संत) मनोमनी ओळखावे. त्यासाठी आता भ्रमाचे स्वरूप ऐका. ॥८॥

येक परब्रह्म संचलें । कदापी नाहीं विकारलें । त्यावेगळें भासलें । ते भ्रमरूप ।।९।।

भ्रम ओळखण्यामागील मुख्य विचार असा की केवळ परब्रह्म घनदाट भरले असून ते कोणत्याही स्वरूपात आकाराला येत नाही. निराकार ब्रह्माऐवजी जे जे साकार दिसते तो सर्व भ्रम होय. ॥९॥

जयासी बोलिला कल्पांत । त्रिगुण आणि पंचभूत । हें अवघेंचि समस्त । भ्रमरूप ।।१०।।

ज्यात त्रिगुण व पंचमहाभूते मिसळली आहेत व ज्याचा कल्पाचे शेवटी अंत होतो ते ते सर्व वृत्तिज्ञानाने कळणारे जगत् भ्रमरूप आहे. ॥१०॥

मी तूं हा भ्रम । उपासनाहि भ्रम । ईश्वरभाव हाहि भ्रम । निश्चयेंसी ।।११।।

मी व तू च्या आधाराने चाललेले व्यवहार, सगुणोपासना, ईश्वरावरील श्रद्धा हेही भ्रम आहेत, यांत शंका नाही. ।।११।।

श्लोक–

भ्रमेणाहं भ्रमेण त्वं । भ्रमेणोपासका जनाः । भ्रमेणेश्वरभावत्वं । भ्रममूलमिदं जगत् ।।१।।

श्लोकार्थ– 'मी' हे स्फुरण भ्रमजन्य असून 'तू' सुद्धा भ्रमानेच भासतो. उपासकांची उपासना भ्रमामुळेच चालते. ज्या ईश्वराचे जग हे शरीर आहे ते जगच भ्रमामुळे भासत असल्याने ईश्वरत्वही भ्रमरूप आहे.

याकारणें सृष्टि भासत । परंतु भ्रमचि हा समस्त । यामध्यें जे विचारवंत । तेचि धन्य ।।१२।।

याप्रमाणे भ्रमामुळे भासलेली सृष्टी कितीही सत्य वाटली तरी तो सर्व जडजीवात्मक पसारा भ्रामक आहे. जी माणसे विचाररूप विवेकाने हे ओळखतात तेच धन्य होत. ।।१२।।

आतां भ्रमाचा विचारु । अत्यंतचि प्रांजळ करूं । दृष्टांतद्वारें विवरूं । श्रोतयांसी ।।१३।।

आता या भ्रमाचा अनेक उदाहरणे देऊन तपशीलवार विचार करू. हा अत्यंत सूक्ष्म विचार श्रोत्यांनी ऐकावा. ।।१३।।

भ्रमण करितां दुरी देसीं । दिशाभूलि आपणासी । कां वोळखी मोडे जीवलगांसी । या नांव भ्रम ।।१४।।

अपरिचित प्रदेशात प्रवास करीत असता वाट चुकते किंवा दिशा कळत नाहीत. अत्यंत परिचयाची व्यक्ती अचानक व अनपेक्षित भेटली तर क्षणभर ओळख पटत नाही. किंवा बालपणी मैत्री असूनही नंतर वृद्धावस्थेत भेट झाली तर ओळख पटत नाही. ।।१४।।

कां उन्मत द्रव्य सेविलें । तेणें अनेक भासों लागलें । नाना वेथां कां झडपिलें । भूतें तो भ्रम ।।१५।।

अमली पदार्थांच्या सेवनाने एकाऐवजी अनेक पदार्थ किंवा व्यक्ती दिसणे व काही रोगांची लक्षणे न ओळखल्याने 'भूत लागले' असे वाटणे हा भ्रम होय. ।।१५।।

दशावतारीं वाटती नारी । कां ते मांडली बाजीगरी । उगाच संदेह अंतरीं । या नांव भ्रम ।।१६।।

दशावतारी नाटकात स्त्रीभूमिका करणारे पुरुष असून त्या स्त्रिया वाटतात, जादूचे खेळ खरे वाटतात व अकारण संशय बळावतो. ।।१६।।

ठेविला ठाव तो विसरला । कां मार्गीं जातां मार्ग चुकला । पट्टणामधें भांबावला । या नांव भ्रम ।।१७।।

आठवणीने ठेवलेली वस्तू सापडत नाही, प्रवासात रस्ता चुकतो व मोठ्या शहरात काही कळेनासे होते. ।।१७।।

वस्तु आपणापासीं असतां । गेली म्हणोनि होये दुचिता । आपलें आपण विसरतां । या नांव भ्रम ।।१८।।

घरात किंवा खिशात असलेली वस्तू धांदरटपणामुळे हरवल्यासारखी वाटते व त्यामुळे मन अस्वस्थ होते. कठीण प्रसंगी आपण कोठे, काय, कसे आहोत याचा विसर पडतो.।।१८।।

कांहीं पदार्थ विसरोन गेला । कां जें सिकला तें विसरला । स्वप्नदुःखें घाबिरा जाला । या नांव भ्रम ।।१९।।

जवळ असलेल्या काही वस्तू पूर्ण विस्मरणात जातात, पाठ केलेले विसरतो व स्वप्नात वाटलेल्या भीतीच्या दुःखाने व्यथित होतो. ।।१९।।

दुश्चिन्हें अथवा अपशकुन । मिथ्या वार्तेनें भंगे मन । वचके पदार्थ देखोन । या नांव भ्रम ।।२०।।

कावळा घरात शिरण्यासारखे दुश्चिन्ह किंवा मांजर आडवे गेल्याचा अपशकुन झाल्याने व खोटी बातमी ऐकून मन नाराज होते. पदार्थ एक असताना दुसराच असल्यासारखे वाटून दचकतो (उदा. दोरीवर साप वाटणें). ।।२०।।

वृक्ष काष्ठ देखिलें । मनांत वाटे भूत आलें । कांहींच नस्तां हडबडिलें । या नांव भ्रम ।।२१।।

मंद प्रकाशात झाडाचे खोड पाहून भूताचा भ्रम झाल्याने भयभीत होतो. ॥२१॥

काच म्हणोन उदकांत पडे । कां सभा देखोन दर्पणीं पवाडे । द्वार चुकोन भलतीकडे । जाणें या नांव भ्रम ।।२२।।

शांत पाण्याला काच समजून पाण्यात पडतो (मयसभा). आरशात दिसणारी सभा खरी वाटते. अनोळखी घरात दार कोणीकडे आहे ते समजत नाही. ॥२२॥

येक अस्तां येक वाटे । येक सांगतां येक निवटे । येक दिसतां येक उठे । या नांव भ्रम ।।२३।।

असते एक वाटते भलतेच. एक सांगितले असता भलतेच ऐकू येते, एक दिसत असता त्या जागी अचानक दुसरेच दिसते. ॥२३॥

आतां जें जें देइजेतें । तें तें पुढें पाविजेतें । मेलें माणुस भोजना येतें । या नांव भ्रम ।।२४।।

या जन्मात दिलेले दान पुढील जन्मात फळाला येते व मेलेल्या व्यक्ती प्रत्यक्ष जेवावयास येतात हे दोन्ही भ्रम आहेत. ॥२४॥

ये जन्मीचें पुढिले जन्मीं । कांहीं येक पावेन मी । प्रीती गुंतली मनुष्याचे नामीं । या नांव भ्रम ।।२५।।

चालू जन्मात केलेले कर्म पुढील जन्मात फळाला येईल असा समज व स्वत:च्या किंवा दुसऱ्याच्या नावलौकिकामध्ये गुरफटून रहाणे हे भ्रम होत. ॥२५॥

मेलें मनुष्य स्वप्ना आलें । तेणें कांहीं मागितलें । मनीं अखंड बैसलें । या नांव भ्रम ।।२६।।

मेलेल्या व्यक्तीने स्वप्नात भेटून काही मागणी केल्याने त्याच दृश्याने मनात ठाण मांडले असता हा सर्वच प्रकार भ्रामक आहे असे समजावे. ॥२६॥

अवघें मिथ्या म्हणौन बोले । आणि सामर्थ्यावरी मन चाले । ज्ञाते वैभवें दपटले । या नांव भ्रम ।।२७।।

देहादी जगत् मिथ्या आहे असे म्हणावयाचे व सिद्धीची मनात अपेक्षा ठेवावयाची या भ्रमाने शब्दज्ञानी विद्वान पछाडलेले असतात. ॥२७॥

कर्मठपणें ज्ञान विटे । कां ज्ञातेपणें बळें भ्रष्टे । कोणीयेक सीमा फिटे । या नांव भ्रम ।।२८।।

कर्म केल्याने ब्रह्मज्ञानाला उणेपणा येतो. 'मी ज्ञानी' या धुंदीत आचारभ्रष्ट होतो व मर्यादा ओलांडतो हे सर्व भ्रमाने घडते. ॥२८॥

देहाभिमान कर्माभिमान । ज्यात्याभिमान कुळाभिमान । ज्ञानाभिमान मोक्षाभिमान । या नांव भ्रम ।।२९।।

आरोग्यसंपन्न बलवान शरीर, यथासांग कर्मकांडाचे आचरण, जात, कुळ, ज्ञान, व मोक्ष यांचा अहंकार निर्माण होतो तो भ्रमामुळेच! ॥२९॥

कैसा न्याय तो न कळे । केला अन्याये तो नाडळे । उगाच अभिमानें खवळे । या नांव भ्रम ।।३०।।

न्याय कशाशी खातात ते कळत नाही. अन्याय करूनही त्याची जाणीव नसते व सत्तासंपत्ती इ. काहीच नसताना उगीचच मस्तवालपणे वागतो. ॥३०॥

मागील कांहीं आठवेना । पुढील विचार सुचेना । अखंड आरुढ अनुमाना । या नांव भ्रम ।।३१।।

मागे शिकलेले लक्षात रहात नाही, पुढचा विचार करण्याची क्षमता नाही व त्यामुळे सतत संशयातच राहतो. हा भ्रमिष्ट. ॥३१॥

प्रचीतिविण औषध घेणें । प्रचित नस्ता पथ्य करणें । प्रचीतीवीण ज्ञान सांगणें । या नांव भ्रम ।।३२।।

गुण येत नसून औषध घेत रहाणे, भलतीच पथ्ये करणे व अनुभव नसताना इतरांना शिकवणे वा उपदेश देणे हा भ्रम होय. ॥३२॥

फळश्रुतीवीण प्रयोग । ज्ञानेंविण नुस्ता योग । उगाच शरीरें भोगिजे भोग । या नांव भ्रम ॥३३॥

व्रतांच्या फळश्रुतीची माहिती नसताना व्रते करणे, अध्यात्मशास्त्राची जोड दिल्याशिवाय किंवा त्या त्या योगाचे तत्त्वज्ञान न समजता योगसाधना (हठादी) व शरीर केवळ भोगासांठी वापरणे ही भ्रमाची लक्षणे होत. ॥३३॥

ब्रह्मा लिहितो अदृष्टीं । आणि वाचून जाते सटी । ऐशा प्रकारीच्या गोष्टी । या नांव भ्रम ॥३४॥

ब्रह्मदेव आपले प्रारब्ध कपाळावर लिहितो व सटवी पाचवीला ते वाचून जाते इत्यादी प्रकारचे समज भ्रम असतात. ॥३४॥

उदंड भ्रम विस्तारला । अज्ञानजनीं पैसावला । अल्प संकेतें बोलिला । कळावयाकारणें ॥३५॥

लोकांमध्ये भ्रमाचे असे उदंड प्रकार आहेत. अज्ञानामुळे त्याचा आडवातिडवा अफाट विस्तार झाला असून आतापर्यंत केवळ उदाहरणापुरते काही भ्रम सांगितले. ॥३५॥

भ्रमरूप विश्व स्वभावें । तेथें काये म्हणोन सांगावें । निर्गुण ब्रह्मावेगळें अवघें । भ्रमरूप ॥३६॥

ब्रह्मदृष्टीने पाहिले तर सर्व जगच भ्रमरूप आहे. त्यातील भ्रमाचे किती म्हणून वर्णन करावे! निर्गुण ब्रह्माव्यतिरिक्त सर्व भ्रम होय. ॥३६॥

ज्ञात्यास नाही संसार । ऐसें बोलती अपार । गत ज्ञात्याचे चमत्कार । या नांव भ्रम ॥३७॥

जीवनमुक्त ज्ञानी संसारापासून अलिप्त असतो. त्याच्या दृष्टीने संसार बाधित असतो. असे वेदान्तशास्त्र जागोजागी सांगत असूनही अज्ञानी लोक देह ठेविलेल्या ज्ञात्यांच्या चमत्कारांचे अनुभव सांगतच राहतात! भ्रम तो हाच. ॥३७॥

येथें आशंका उठिली । ज्ञात्याची समाधी पूजिली । तेथें कांही प्रचित आली । किंवा नाहीं ॥३८॥

येथे अशी शंका येते की जीवनमुक्त महात्म्याच्या समाधीची पूजा केली असता त्या स्थानाचा काही अनुभव येतो की नाही? (बरेच भक्त बरेच अनुभव सांगतात.) ॥३८॥

तैसेचि अवतारी संपले । त्यांचेहि सामर्थ्य उदंड चाले । तरी ते काये गुंतले । वासना धरुनि ॥३९॥

त्याचप्रमाणे रामकृष्णादी अवतारांचे तिरोधान झाल्यानंतरही (संपले) त्यांच्या अतर्क्य सामर्थ्याची भरपूर प्रचीती येते. मग ते वासनारूपाने पृथ्वीवर राहतात का? तेही वासनेने बद्ध आहेत असे समजावयाचे का? ॥३९॥

ऐसी आशंका उद्भवली । समर्थें पाहिजे निरसिली । इतुकेन हे समाप्त जाली । कथा भ्रमाची ॥४०॥

अशी श्रोत्याने शंका विचारल्यावर तिचे शास्त्रशुद्ध व स्पष्ट उत्तर (समर्थ) दिले पाहिजे. पण भ्रमाची कथा येथे संपली! ॥४०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'भ्रमनिरूपणनाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'भ्रमनिरूपण' नावाचा सहावा समास समाप्त

दशक दहावा : जगज्जोती

समास सातवा : सगुणभजननिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

अवतारादिक ज्ञानी संत । सारासारविचारें मुक्त । त्यांचें सामर्थ्य चालत । कोण्या प्रकारें ।।१।।

सारासारविवेकाने मुक्त झालेले ज्ञानी संत व अवतार यांच्या सामर्थ्याची त्यांच्या निर्वाणानंतर कशी प्रचीती येते असा प्रश्न श्रोत्याने विचारला आहे. ॥१॥

हे श्रोतयांची आशंका । पाहातां प्रश्न केला निका । सावध होऊन ऐका । म्हणे वक्ता ।।२।।

हा विचारलेला प्रश्न मार्मिक असून त्याचे उत्तर सावधपणे ऐका. ॥२॥

ज्ञानी मुक्त होऊन गेले । मागें त्यांचें सामर्थ्य चाले । परंतु ते नाहीं आले । वासना धरूनी ।।३।।

ब्रह्मज्ञानाने मुक्त होऊन, शरीर सोडल्यावर त्यांच्या सामर्थ्याची नंतर प्रचीती येते हे खरे. पण त्यांच्या वासना उरलेल्या नसतात. ती प्रचीती वासनाशरीराच्या अस्तित्वामुळे येत नाही. ॥३॥

लोकांस होतो चमत्कार । लोक मानिती साचार । परंतु याचा विचार । पाहिला पाहिजे ।।४।।

लोकांना काही चमत्काराचा अनुभव येऊन त्यांना तो खरा वाटतो. पण त्याचा नीट विचार केला पाहिजे. ॥४॥

जीत अस्तां नेणों किती । जनामधें चमत्कार होती । ऐसियाची सद्यप्रचिती । रोकडी पाहावी ।।५।।

तो जिवंत असतानाच लोकांना अनेक चमत्कारांचा अनुभव येतो. त्यांचा मागोवा घेऊन त्याची सत्यता पडताळून पहावी. ॥५॥

तो तरी आपण नाहीं गेला । लोकीं प्रत्यक्ष देखिला । ऐसा हा चमत्कार जाला । यास काय म्हणावें ।।६।।

आत्मरूपाने तो आलेला नसल्याने तो गेलेलाही नसतो. पण देहरूपाने गेलेला तो अनेकांना देहाच्या मृत्यूनंतरही प्रत्यक्ष भेटतो. या चमत्काराचे स्पष्टीकरण काय? ॥६॥

तरी हा लोकांचा भावार्थ । भाविकां देव येथार्थ । अनेत्र कल्पना वेर्थ । कुतर्काची ।।७।।

हे भाविकांचे व्यक्तिनिष्ठ (Subjective) अनुभव असून ते त्यांना त्यांच्या भावबळाने येतात. भाव तसा देव! इतर स्पष्टीकरणे कुतर्कात जमा होतात. ॥७॥

आवडे तें स्वप्नीं देखिलें । तरी काय तेथून आलें । म्हणाल तेणें आठविलें । तरी द्रव्य कां दिसे ।।८।।

ज्याची फार आवड असते ते स्वप्नात दिसते. जे दिसते ते कोठून येते काय? केवळ आठवण झाली म्हणून त्याचे प्रत्यक्ष रूप का दिसावे? (आठवणीने रूप दिसते असा अनुभव नाही.) ॥८॥

एवं आपली कल्पना । स्वप्नीं येती पदार्थ नाना । परी ते पदार्थ चालतीना । अथवा आठऊ नाहीं ।।९।।

तात्पर्य असे की आपण केलेल्या कल्पनेनुसार स्वप्नात अनेक पदार्थ ‘येतात.’ पण ते चालत येत नाहीत किंवा आठवण झाल्याने दिसतात असेही नाही. ॥९॥

येथें तुटली आशंका । ज्ञात्यास जन्म कल्पूं नका । उमजेना तरी विवेका । बरें पाहा ।।१०।।

प्रश्नाचे उत्तर दिले. आत्मज्ञानी वासनाशरीर घेऊन मृत्यूनंतर पुन्हा परत येतो (व चमत्कारांचे अनुभव देतो) अशी कल्पना करू नका. तुम्हाला स्वत:ला कळत नसेल तर त्यासंबंधीचे शास्त्र (विवेक) काय सांगते ते पहा. ॥१०॥

ज्ञानी मुक्त होऊन गेले । त्यांचें सामर्थ्य उगेंचि चाले । कां जे पुण्यमार्गें चालिलें । म्हणोनियां ।।११।।

आयुष्यभर पुण्यमार्गाने वाटचाल केल्यामुळे जे ज्ञान होऊन मुक्त झाले त्यांचे सामर्थ्य त्यांच्या देहत्यागानंतर सहजच चालते. (तो पुण्याचा प्रभाव असतो.) ॥११॥

याकारणें पुण्यमार्गें चालावें । भजन देवाचें वाढवावें । न्याये सांडून न जावें । अन्यायमार्गें ।।१२।।

म्हणून पुण्यमार्गाने जीवन घालवावे. अन्याय सोडून न्यायाने वागून देवाचे भजन सतत करावे. ॥१२॥

नाना पुरश्चरणें करावीं । नाना तीर्थाटणें फिरावीं । नाना सामर्थ्यें वाढवावीं । वैराग्यबळें ।।१३।।

गायत्री पुरश्चरणासारखी अनेक पुरश्चरणे करावीत, तीर्थयात्रा कराव्यात व वैराग्याच्या बळाने अनेक सामर्थ्ये संपादन करावीत. (समर्थांच्या सामर्थ्यांचे हे रहस्य आहे) ॥१३॥

निश्चयें बैसे वस्तूकडे । तरी ज्ञानमार्गेंहि सामर्थ्य चढे । कोणीयेक येकांत मोडे । ऐसें न करावें ।।१४।।

अंत:करणवृत्ती आत्माकार ठेवण्याचा ज्ञानमार्ग साधला तर त्यानेही सामर्थ्य मिळते. पण हे साधण्यासाठी अंत:करण वृत्ती पांगण्यासारखी स्थळे, परिस्थिती व व्यक्ती टाळाव्या लागतात. एकांत टिकवावा लागतो. (हा साधकदशेतील एकांत आहे. सिद्ध दशेत तो सहजच टिकतो. द्वैत मोडलेले असते.) ॥१४॥

येक गुरु येक देव । कोठें तरी असावा भाव । भावार्थ नस्तां वाव । सर्व कांहीं ।।१५।।

सद्गुरू किंवा ईश्वराचा सगुण अवतार (देव) यांपैकी एका ठिकाणी तरी पूर्ण श्रद्धा ठेवावी. श्रद्धा नसेल तर सर्व प्रयत्न व आशाआकांक्षा (पारमार्थिक) वाया जातात. ॥१५॥

निर्गुणीं ज्ञान जालें । म्हणोंन सगुण अलक्ष केलें । तरी तें ज्ञातें नागवलें । दोहिंकडे ।।१६।।

'निर्गुण ब्रह्म मी आहे' असा निश्चय झाल्याने (परोक्षज्ञान) सगुण गौण मानून त्याकडे दुर्लक्ष केले तर तो तथाकथित ज्ञाता दोन्हीकडून निराधार बनतो. ॥१६॥

नाहीं भक्ती नाहीं ज्ञान । मधेंच पैसावला अभिमान । म्हणौनियां जपध्यान । सांडूंच नये ।।१७।।

सगुणाची परिपूर्ण प्रेमलक्षणा भक्ती किंवा 'निर्गुण ब्रह्म मी आहे' असा दृढ, अपरिवर्तनीय प्रत्यक्ष अनुभव ह्यांतील एकही नसताना अगांतुक अहंकाराचे साम्राज्य पसरते म्हणून सगुणनामाचा जप व सोऽहं ध्यान ही दोन्ही सोडू नयेत. ॥१७॥

सांडील सगुणभजनासी । तरी तो ज्ञाता परी अपेसी । म्हणौनियां सगुणभजनासी । सांडूंचि नये ।।१८।।

ब्रह्मज्ञान्याला सुद्धा सगुणभजनाची (नामजप) जोड नसेल तर त्याला ब्रह्मसुखाचा लाभ होत नाही (अपेसी) म्हणून सगुणाचा कोणीच त्याग करू नये. ॥१८॥

नि:काम बुद्धीचिया भजना । त्रैलोकीं नाहीं तुळणा । सामर्थ्येंविण घडेना । नि:काम भजन ।।१९।।

निष्काम बुद्धीने केलेल्या प्रेमलक्षणा भक्तीसारखे श्रेष्ठ साधन ह्या जगात नाही. पण त्यासाठी अनासक्तीचे मोठे सामर्थ्य लागते. (देह व प्रपंचासक्त व्यक्ती निष्कामता सांभाळू शकत नाही.) ॥१९॥

कामनेनें फळ घडे । नि:काम भजनें भगवंत जोडे । फळ भगवंता कोणीकडे । महदांतर ।।२०।।

भक्तीच्या मोबदल्यात एखादी प्रापंचिक कामना पूर्ण होईलही, पण निष्काम उपासनेने प्रत्यक्ष परमेश्वराचा लाभ होतो. प्रापंचिक फळ व प्रत्यक्ष भगवंत ह्यांत केवढा फरक आहे! ॥२०॥

नाना फळें देवापासी । आणी फळ अंतरीं भगवंतासी । याकारणें परमेश्वरासी । नि:काम भजावें ।।२१।।

देवाजवळ उपासकाला देण्यासाठी कितीतरी फळे आहेत. पण त्यांची इच्छा ठेवली तर देव दुरावतो. म्हणून देवाची निष्काम उपासना करावी. ॥२१॥

निःकामभजनाचें फळ आगळें । सामर्थ्य चढे मर्यादेवेगळें । तेथें बापुडी फळें । कोणीकडे ।।२२।।

निष्काम बुद्धीने उपासना केल्याचे फळ वेगळेच असते. त्यामुळे उपासकाच्या अंगी अमर्याद सामर्थ्य संचय होतो. त्यापुढे सकाम उपासनेच्या फळांची मुळीच किंमत रहात नाही. ॥२२॥

भक्तें जे मनीं धरावें । तें देवें आपणचि करावें । तेथें वेगळें भावावें । नलगे कदा ।।२३।।

निष्काम बुद्धीने उपासना करणाऱ्या भक्ताच्या अंत:करणात चुकून एखादा संकल्प रुजला तरी देव तो स्वत: होऊन पूर्ण करतो. भक्ताला 'हे मला हवे' असे वेगळे काही व कधीच मागावे लागत नाही. ॥२३॥

दोनी सामर्थ्यें येक होतां । काळास नाटोपे सर्वथा । तेथें इतरांची कोण कथा । कीटकन्यायें ।।२४।।

षड्‌गुणैश्वर्यसंपन्न ईश्वर व निरपेक्ष अनासक्त भक्त अशी दोन्ही सामर्थ्ये एकत्र आल्यावर तो काळासही आवरत नाही. मग इतर सामान्यांची काय कथा! त्यांचे मूल्य किडामुंगीहून अधिक नाही. ॥२४॥

म्हणोनि निःकाम भजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान । तयास तुळितां त्रिभुवन । उणें वाटे ।।२५।।

म्हणून निष्काम सगुण भजनाच्या जोडीला ब्रह्मविद्या असेल तर अशा भक्ताला त्रिभुवनात तोड नसते. त्रिभुवनाहून तो श्रेष्ठ असतो. ॥२५॥

येथें बुद्धीचा प्रकाश । आणीक न चढे विशेष । प्रताप कीर्ती आणि येश । निरंतर ।।२६।।

आत्मप्रकाशाच्या साक्षात्काराने भारलेल्या बुद्धीहून विशेष किंवा श्रेष्ठ बुद्धी नसते. त्या बुद्धीच्या स्वामीला पराक्रम, कीर्ती व यशाची सतत साथ मिळते. ॥२६॥

निरूपणाचा विचार । आणी हरिकथेचा गजर । तेथें होती तत्पर । प्राणीमात्र ।।२७।।

निर्गुणाचे प्रवचन व सगुण हरिकथेचा गजर जेथे एकत्र येतात तेथे सर्वांनाच ओढ निर्माण होते. ॥२७॥

जेथें भ्रष्टाकार घडेना । तो परमार्थहि दडेना । समाधान विघडेना । निश्चयाचें ।।२८।।

ज्यात आचारविचार भ्रष्ट नसतात असा परमार्थ फार काळ झाकून रहात नाही. सदाचार, सद्ग्रंथ, सद्‌गुरू व सद्‌साधन ह्यांनी झालेला निश्चय समाधान बिघडू देत नाही. ॥२८॥

सारासारविचार करणें । न्यायेअन्याये अखंड पाहाणें । बुद्धि भगवंताचें देणें । पालटेना ।।२९।।

व्यवहारात न्यायाची बूज राखून अन्यायाला थारा न देणे व परमार्थात सार व असाराचा विवेक सांभाळणे ह्या दोन गोष्टी ज्या बुद्धीत स्थिर झाल्या आहेत ती बुद्धी भगवंताची देणगी होय. अशी बुद्धी लाभलेला वरील दोन गोष्टी नेहमी सांभाळतो. ॥२९॥

भक्त भगवंतीं अनन्य । त्यासी बुद्धि देतो आपण । येदर्थीं भगवद्वचन । सावध ऐका ।।३०।।

जो भक्त भगवंताच्या अनुसंधानाशिवाय अन्य काही जाणीत नाही त्या अनन्य भक्ताला भगवंत सांख्यबुद्धी देतो. त्याविषयी भगवंताचेच असलेले वचन नीट ऐका. ॥३०॥

श्लोक– ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ।।छ।।

श्लोकार्थ– मी त्यांना बुद्धियोग देतो की ज्यामुळे ते माझ्या स्वरूपाला प्राप्त होतात.

म्हणोन सगुण भजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान । प्रत्ययाचें समाधान । दुर्ल्लभ जगीं ।।३१।।

म्हणून सगुण भगवंताची श्रवण-कीर्तनादी उपासना व ह्या जोडीला निर्दोष व संप्रदायशुद्ध वेदांतविद्या असल्याने जो ब्रह्मानुभव येतो तो जगात दुर्लभ आहे. त्याने होणारे अपूर्व समाधान दुर्मिळ आहे. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सगुणभजननिरुपणनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सगुणभजननिरूपण' नावाचा सातवा समास समाप्त

दशक दहावा : जगज्जोती

समास आठवा : प्रचितनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ऐका प्रचितीचीं लक्षणें । प्रचित पाहेल तें शाहाणें । येर वेडे दैन्यवाणे । प्रचितीवीण ।।१।।

आता प्रत्यक्ष अनुभवाची लक्षणे ऐका. तो घेतील तेच शहाणे ठरतात व तो न घेणारे खुळे व आशाळभूत समजावेत. ॥१॥

नाना रत्नें नाना नाणीं । परीक्षून न घेतां हानी । प्रचित न येतां निरूपणीं । बैसोंच नये ।।२।।

मौल्यवान रत्ने व नाणी तपासून न घेतल्यास नुकसान होते. स्वत:चे सर्वांगीण समाधान होऊन अनुभव आल्याशिवाय प्रवचनाला बसूच नये. ॥२॥

तुरंग शस्त्र दमून पाहिलें । बरें पाहातां प्रचितीस आले । तरी मग पाहिजे घेतलें । जाणते पुरुषीं ।।३।।

अश्वपरीक्षा केल्याशिवाय घोडा घेऊ नये. शस्त्राचे धार, आकार इ. पाहिल्याशिवाय ते विकत घेऊ नये. कसोटीला उतरल्याशिवाय (अनुभवाशिवाय) जाणत्याने व्यवहार करू नये. ॥३॥

बीज उगवेलसें पाहावें । तरी मग द्रव्य घालून घ्यावें । प्रचित आलियां ऐकावें । निरूपण ।।४।।

पेरल्यावर उगवेल अशी खात्री झाली तरच पैसे मोजून बियाणे विकत घ्यावे. त्याचप्रमाणे सत्तर्क, सत्शास्त्र व सुसंगत दृष्टांत ह्यांसह चालू असलेली पाठ-प्रवचने ऐकावीत. (अनुभव हा शब्द समर्थ व्यापक अर्थाने वापरतात.) ॥४॥

देहीं आरोग्यता जाली । ऐसी जना प्रचित आली । तर मग आगत्य घेतली । पाहिजे मात्रा ।।५।।

एखाद्या औषधाचा वापर केल्यावर रुग्ण बरा झाला आहे अशी खात्री झाल्यावर ते औषध अवश्य घ्यावे. (हल्लीसुद्धा Clinical trials चे औषधांच्या क्षेत्रात फार महत्त्व आहे.) ॥५॥

प्रचितीविण औषध घेणें । तरी मग धडचि विघडणें । अनुमानें जें कार्य करणें । तेंचि मूर्खपण ।।६।।

कोणालाच अनुभव आलेला नसताना औषध घेतले तर चांगले असलेले आरोग्यही बिघडणे शक्य आहे. त्याचप्रमाणे कोणतेही काम अंदाजाने किंवा दडपून करणे हा मूर्खपणा आहे. ॥६॥

प्रचितीस नाहीं आलें । आणी सुवर्ण करविलें । तरी मग जाणावें ठकिलें । देखतदेखतां ।।७।।

तथाकथित किमया करणाराने 'मी लोखंडाचे सोने करतो' असे सांगितले व प्रत्यक्षात तसे घडले नाही तर हातचलाखीमुळें डोळ्यासमोर फसवणूक होते! ॥७॥

शोधून पाहिल्याविण । कांहींतरी येक कारण । होणार नाहीं निर्वाण । प्राणास घडे ।।८।।

शहानिशा केल्याशिवाय कोणत्याही कामात हात घातला तर ते यशाला कारण होण्याऐवजी प्राणहानीला कारण होऊ शकेल. ॥८॥

म्हणोनी अनुमानाचें कार्य । भल्यानी कदापि करूं नये । उपाय पाहातां अपाये । नेमस्त घडे ।।९।।

म्हणून केवळ अंदाजाने किंवा पूर्ण माहिती नसलेले कार्य शहाण्याने कधी हाती घेऊ नये. त्यात लाभापेक्षा हानीच होईल. ॥९॥

पाण्यांतील म्हैसीची साटी । करणें हें बुद्धिच खोटी । शोधिल्याविण हिंपुटी । होणें घडे ।।१०।।

तलावातील पाण्यात मानेपर्यंत बुडून डुंबणाऱ्या म्हशीची खरेदी-विक्री करणारी बुद्धी खोटीच असते! तिचे सर्व शरीर न पहाता व्यवहार केला तर फजितीच होणार. ॥१०॥

विश्वासें घर घेतलें । ऐसें किती नाहीं ऐकिलें । मैदें मैंदावें केलें । परी तें शोधिले पाहिजे ।।११।।

केवळ कोणाच्या तरी सांगण्यावरून एखादे घर ते न पहाताच घेतले असे ऐकावयास मिळत नाही. कपट्याचे कपट कळल्यावर त्याची पाळेमुळे शोधून काढावी लागतात. ॥११॥

शोधल्याविण अन्नवस्त्र घेणें । तेणें प्राणास मुकणें । लटिक्याचा विश्वास धरणें । हेंचि मूर्खपण ।।१२।।

अन्न-वस्त्रादी दान देणारा, त्याचा हेतू व प्रत्यक्ष अन्न व वस्त्र हे सर्व तपासून न पहाताच घेतले तर प्राणावर बेतण्याचा संभव असतो. ठकावर विश्वास ठेवणे हा महामूर्खपणा आहे. (विष मिसळलेले अन्न व शीघ्रज्वालाग्राही वस्त्र घेऊ नये.) ॥१२॥

संगती चोराची धरितां । घात होईल तत्त्वता । ठकु सिंतरु शोधितां । ठाईं पडे ।।१३।।

चोर वा कारस्थानी व्यक्तीची संगत धरली तर घात होणारच. भामटा व दगलबाज माणूस थोड्या निरीक्षणानेही कळतो. ॥१३॥

गैरसाळ तामगिरी । कोणी नवी मुद्रा करी । नाना कपट परोपरीं । शोधून पाहावें ।।१४।।

कोणी भामटा तांबट बनावट नाणी तयार करतो. काहीं कपटी व्यक्ती कित्येक कपटी चाली खेळतात. त्यांचा धांडोळा घ्यावा. ॥१४॥

दिवाळखोराचा मांड । पाहातां वैभव दिसे उदंड । परी तें अवघें थोतांड । भंड पुढें ।।१५।।

कर्जात पूर्ण बुडालेल्याचे रहाणीमान भपकेबाज असू शकते. पण तो बाहेरचा देखावा पुढील फजिती थांबवू शकत नाही. ॥१५॥

तैसें प्रचितीवीण ज्ञान । तेथें नाहीं समाधान । करून बहुतांचा अनुमान । अन्हीत जालें ।।१६।।

त्याप्रमाणे अनुभवावाचून वक्त्याचे व श्रोत्याचेही समाधान होत नाही. उलट अनेक श्रोते गोंधळात पडून ते पारमार्थिक हिताला मुकतात. ॥१६॥

मंत्र यंत्र उपदेसिले । नेणतें प्राणी तें गोविलें । जैसें झांकून मारिलें । दुखणाईत ।।१७।।

ज्याप्रमाणे एखाद्या आजाऱ्याला औषध न देता मारावे त्याप्रमाणे साधक अज्ञानामुळे यंत्र व मंत्र सांगणाऱ्यांच्या कचाट्यात सापडून आध्यात्मिक दृष्ट्या नागवले जातात, त्यांना मुक्तीसाठी आवश्यक ते मार्गदर्शन मिळत नाही. ॥१७॥

वैद्य पाहिला परी कच्चा । तरी प्राण गेला पोराचा । येथें उपाये दुसऱ्याचा । काये चाले ।।१८।।

ज्ञान व अनुभवाने कच्च्या असलेल्या वैद्याकडे गंभीर आजार असलेल्या मुलाला नेले व त्याचा प्राण गेला तर त्याला कोण काय करणार? ॥१८॥

दु:खें अंतरीं झिजे । आणी वैद्य पुसतां लाजे । तरीच मग त्यासी साजे । आत्महत्यारेपण ।।१९।।

अवघड जागी असलेल्या दुखण्याचे दु:ख तर आहे, पण वैद्याने प्रश्न विचारल्यावर ते सांगावयास लाजतो तो आत्महत्या करणाराच मानला पाहिजे. ॥१९॥

जाणत्यावरी गर्व केला । तरी नेणत्याकरितां बुडाला । येथें कोणाचा घात जाला । बरें पाहा ।।२०।।

अहंकारामुळे जाणत्याचा सल्ला घेतला नाही व अहंकार सांभाळून मूर्खाचा सल्ला मिळून बुडला तर त्यात कोणाचा घात झाला? ॥२०॥

पापाची खंडणा जाली । जन्मयातना चुकली । ऐसी स्वयें प्रचित आली । म्हणिजे बरें ।।२१।।

म्हणून साधना अशा सत्पुरुषाच्या मार्गदर्शनाने करावी की ज्यामुळे सर्व पापांचा नाश होऊन जन्ममरणातून सुटका होईल. हेच खरे हित. ॥२१॥

परमेश्वरास वोळखिलें । आपण कोणसें कळलें । आत्मनिवेदन जालें । म्हणिजे बरें ।।२२।।

ईश्वर ब्रह्माचे ज्ञान होऊन 'मी कोण' ह्या प्रश्नाचे उत्तर मिळून 'मी'चे ब्रह्मात निवेदन झाले की जिंकली! ॥२२॥

ब्रह्मांड कोणें केलें । कासयाचें उभारलें । मुख्य कर्त्यास वोळखिलें । म्हणिजे बरें ।।२३।।

ही अनंत दृश्य सृष्टी कोणी केली? त्यासाठी काय साहित्य वापरले? ह्या जीवजडात्मक सृष्टीच्या मुख्य कर्त्याला ओळखण्यातच हित आहे. ॥२३॥

येथें अनुमान राहिला । तरी परमार्थ केला तो वायां गेला । प्राणी संशईं बुडाला । प्रचितीविण ।।२४।।

ह्या वर्माच्या बाबतीत संशय शिल्लक राहिला तर केलेली सर्व साधने फुकट जातात. बुद्धीचा निश्चय न झालेला साधक संशयात बुडतो. ॥२४॥

हें परमार्थाचें वर्म । लटिकें बोले तो अधम । लटिकें मानी तो अधमोद्धम । येथार्थ जाणावा ।।२५।।

हे परमार्थाचे वर्म आहे. हे न सांगता चार गप्पा मारणारा वक्ता अधम होय. अस्सल अध्यात्मविद्या न सांगणाऱ्याच्या अवांतर गप्पा ज्याला आवडतात तो अधमात अधम समजावा. ॥२५॥

येथें बोलण्याची जाली सीमा । नेणतां न कळे परमात्मा । असत्य नाहीं सर्वोत्तमा । तूं जाणसी ।।२६।।

ह्या बाबतीत जेवढे स्पष्ट बोलणे आवश्यक आहे तेवढे बोलून झाले. अध्यात्मशास्त्राच्या मननचिंतनाशिवाय ब्रह्मज्ञान होत नाही हेच ह्या सांगण्याचे तात्पर्य आहे. हे परमेश्वरा, हे खरे आहे हे तू जाणतोसच. (अध्यात्मशास्त्र न रुचणाऱ्या श्रोत्यांसाठी समर्थांना परमेश्वराची साक्ष काढण्याची पाळी आली!) ॥२६॥

माझे उपासनेचा बडिवार । ज्ञान सांगावें साचार । मिथ्या बोलतां उत्तर । प्रभूस लागे ।।२७।।

माझ्या उपासनेच्या वैभवातून मला जे आकलन झाले आहे त्याचे तात्पर्य असे की शास्त्रशुद्ध वेदांत सांगावा. माझे सांगणे खोटे असेल तर माझ्या उपास्य श्रीरामाला त्याने कमीपणा येईल. ॥२७॥

म्हणोनि सत्यचि बोलिलें । कर्त्यास पाहिजे वोळखिलें । मायोद्भवाचें शोधिलें । पाहिजे मूळ ।।२८।।

म्हणून मी खरे तेच सांगितले. दृश्य सृष्टीचा कर्ता ओळखावा. ह्या मायिक जगताचे अधिष्ठान (मूळ = ब्रह्म) शोधले पाहिजे. ॥२८॥

तेंचि पुढें निरूपण । बोलिलेंचि बोलिलें प्रमाण । श्रोतीं सावध अंत:कर्ण । घातलेंचि घालावें ।।२९।।

ह्यानंतर मी हाच विषय सांगणार असून वेदांतशास्त्राचे प्रामाण्य समोर ठेवून (बोलिलेचि) मांडणी करणार आहे (बोलिले). आतापर्यंत श्रोत्यांनी जसे मनापासून ऐकले तसेच ऐकावे. ॥२९॥

सूक्ष्म निरूपण लागलें । तेथे बोलिलेंचि मागुतें बोलिलें । श्रोत्यांस पाहिजे उमजलें । म्हणौनियां ।।३०।।

विषय अत्यंत सूक्ष्म असल्याने एकदा सांगितलेलेच पुन्हा सांगत आहे. त्याने श्रोत्यांना नीट व स्पष्ट आकलन होईल. ॥३०॥

प्रचित पाहातां निकट । उडोन जाती परिपाठ । म्हणोनि हे खटपट । करणें लागे ।।३१।।

'मी ब्रह्म आहे' असा अनुभव प्रत्यक्ष घेण्याची वेळ आली (निकट) की पारंपरिक उथळ समजुती छाटून टाकाव्या लागतात, त्या छाटता येण्यासाठी सूक्ष्म भाग पुन्हा पुन्हा सांगावा लागतो. ॥३१॥

परिपाठेंचि जरी बोलिलें । तरी प्रचितसमाधान बुडालें । प्रचितसमाधान राखिलें । तरी परिपाठ उडे ।।३२।।

पारंपरिक उथळ समजुती जपल्या तर प्रत्यक्ष अनुभव येत नाही. अनुभवासाठी आवश्यक ते सूक्ष्म शास्त्र सांगावे

तर त्या समजुतींना हादरे बसतात. ॥३२॥

ऐसी सांकडी दोहींकडे । म्हणौन बोलिलेंचि बोलणें घडे । दोनी राखोनियां कोडें । उकलून दाऊं ।।३३।।

अशी दोन्हीकडे मोठी अडचण पडते. पण तरीही दोन्हींना सांभाळून हे ब्रह्मज्ञानाचे कोडे सोडवून दाखवू. ॥३३॥

परिपाठ आणी प्रचित प्रमाण । दोनी राखोन निरूपण । श्रोते परम विचक्षण । विवरोत पुढें ।।३४।।

परंपरा व अनुभूती ह्या दोन्हींना न्याय देत होणारे निरूपण जाणकार श्रोत्यांनी यापुढे ऐकावे. ॥३४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'प्रचितनिरूपणनाम' समास आठवा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'प्रचितनिरूपण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक दहावा : जगज्जोती

समास नववा : पुरुषप्रकृतिनिरूपण

।। श्रीराम समर्थ ।।

आकाशीं वायो जाला निर्माण । तैसी ब्रह्मीं मूळमाया जाण । त्या वायोमधें त्रिगुण । आणी पंचभूतें ।।१।।

आकाशात अचानक वायू निर्माण झाला. त्याप्रमाणे परब्रह्मात मूळमाया प्रगट झाली. वायूमध्ये पंचभूते व त्रिगुण सूक्ष्मरूपाने असतात. ।।१।।

वटबीजीं असे वाड । फोडून पाहातां न दिसे झाड । नाना वृक्षांचे जुंबाड । बीजापासून होती ।।२।।

वडाच्या बीजामध्ये प्रचंड वृक्ष सुप्त रीतीने सामावलेला असतो. पण ते बीज फोडून पाहिले तर त्याचा मागमूसही नसतो. अनेक बीजांत असेच अनेक वृक्षांचे पसारे असतात. ।।२।।

तैसी बीजरूप मूळमाया । विस्तार जाला तेथूनियां । तिचें स्वरूप शोधुनियां । बरें पाहावें ।।३।।

त्याचप्रमाणे मूळमाया बीजरूप असून त्यात अनंतकोटी ब्रह्मांडे सूक्ष्मरूपाने सामावलेली असतात. त्यांतूनच पुढे ती व्यक्त होतात. त्या मूळमायेचे खरे स्वरूप नीट पारखून घ्यावे. ।।३।।

तेथें दोनी भेद दिसती । विवेकें पाहावी प्रचिती । निश्चळीं जे चंचळ स्थिती । तोचि वाये ।।४।।

त्या मूळमायेत दोन मुख्य तत्त्वे असून त्यांचा सूक्ष्म विचार करावा. निश्चळ स्वरूपात जी हालचाल दिसते तीच वायुरूप शक्ती होय. ।।४।।

तयामधें जाणीवकळा । जगज्जोतीचा जिव्हाळा । वायो जाणीव मिळोन मेळा । मूळमाया बोलिजे ।।५।।

त्या वायूत, ज्यातून जगज्ज्योती निर्माण होते (जिव्हाळा). ती जाणीवकळा असते. तो वायू व त्यातील जाणीवकळा ह्या दोन्ही मिळून मूळमाया तयार होते. ।।५।।

सरिता म्हणतां बायको भासे । तेथें पाहातां पाणीच असे । विवेकी हो समजा तैसें । मूळमायेसी ।।६।।

'सरिता' हा शब्द उच्चारताच कोणा स्त्रीची भावना होते. पण सरिता म्हणजे नदीमध्ये केवळ पाणीच असते. विवेकी माणसाने ह्यावरून लक्षात घ्यावे की मूळमाया शब्द स्त्रीलिङ्गी असला तरी त्यात पुल्लिंगी वायू व स्त्रीलिङ्गी जाणीव कळा ह्या दोन्हींचा समावेश आहे. ।।६।।

वायो जाणीव जगज्जोती । तयास मूळमाया म्हणती । पुरुष आणी प्रकृती । याचेच नांव ।।७।।

वायू हीच जाणीवरूप जगज्जोती असून त्या वायूला मूळमाया म्हणतात, त्यांनाच पुरुष व प्रकृती असेही म्हणतात. ।।७।।

वायोस म्हणती प्रकृती । आणि पुरुष म्हणती जगज्जोती । पुरुषप्रकृती शिवशक्ती । याचेच नांव ।।८।।

वायूला (पु.) प्रकृती (स्त्री) व पुरुषाला जगज्जोती (स्त्री) म्हणतात. प्रकृती-पुरुष, शिव-शक्ती ह्या जोड्या त्या ह्याच. (अर्धनारी नटेश्वर) ।।८।।

वायोमधें जाणीव विशेष । तोचि प्रकृतीमधें पुरुष । ये गोष्टीचा विश्वास । धरिला पाहिजे ।।९।।

वायूत जो जाणिवेचा भाग असतो तोच प्रकृतीतील पुरुष होय. हे श्रद्धेनेच स्वीकारले पाहिजे. ।।९।।

वायो शक्ति जाणीव ईश्वर । अर्धनारी नटेश्वर । लोक म्हणती निरंतर । येणें प्रकारें ।।१०।।

वायू = शक्ती. ईश्वर = जाणीव. हे दोन्ही एकत्र आल्याने लोक त्या एकत्रित तत्त्वाला अर्धनारीनटेश्वर म्हणत आले आहेत. ॥१०॥

वायोमध्ये जाणीव गुण । तेंचि ईश्वराचें लक्षण । तयापासून त्रिगुण । पुढें जालें ।।११।।

वायूत जी जाणीव असते तोच ईश्वर. पुढे त्यापासून सत्त्वादी त्रिगुण प्रगट झाले. ॥११॥

तया गुणांमधें सत्वगुण । निखळ जाणीवलक्षण । त्याचा देहधारी आपण । विष्णु जाला ।।१२।।

त्या त्रिगुणांत जो सत्त्व गुण त्याचे शुद्ध जाणीव हे स्वरूप आहे. तो गुण विष्णूच्या रूपाने साकार झाला. ॥१२॥

त्याच्या अंशे जग चाले । ऐसें भगवद्गीता बोले । गुंतले तेचि उगवले । विचार पाहातां ।।१३।।

श्री विष्णूच्या सत्त्वांशाने जगाची 'स्थिती' ही अवस्था चालू रहाते असे भगवत्गीता सांगते. ज्यांना हा गुंता सुटत नाही त्यांनी असा शास्त्रशुद्ध विचार केला की सर्व उलगडा होतो. ॥१३॥

येक जाणीव वांटली । प्राणीमात्रास विभागली । जाणजाणों वांचविली । सर्वत्र काया ।।१४।।

एकच ज्ञानरूप जाणीव सर्व जीवसृष्टीत व्यापून रहाते. जीव तिच्या मदतीने स्वत:च्या शरीराचे रक्षण करतात असे सर्वत्र दिसते. ॥१४॥

तयेचें नांव जगज्जोती । प्राणीमात्र तिचेन जिती । याची रोकडी प्रचिती । प्रत्यक्ष पाहावी ।।१५।।

तीच जगज्जोती असून जीव तिच्यामुळे जिवंत रहातात, हा अनुभव प्रत्यक्षात सहज घेण्यासारखा आहे. ॥१५॥

पक्षी श्वापद किडा मुंगी । कोणीयेक प्राणी जगीं । जाणीव खेळे त्याचा आंगी । निरंतर ।।१६।।

पक्षी, पशू, किडा वा मुंगी इ. प्राणी जिवंत असताना जाणीव त्यांचे शरीर व्यापून रहाते. ती ते मरेपर्यंत असते. ॥१६॥

जाणोनि काया पळविती । तेणें गुणें वांचती । दडती आणी लपती । जाणजाणों ।।१७।।

प्राणावर संकट आल्यावर ते लक्षात घेऊन ती जाणीव प्राण्याचे शरीरातील बुद्धीला पळून जाण्याला उद्युक्त करते. त्यामुळेच प्राणी झुडपाआड लपतात किंवा सांदीकपारीत दडी मारून स्वत:चे प्राण वाचवतात. ॥१७॥

आवघ्या जगास वांचविती । म्हणोनि नामें जगज्जोती । ते गेलियां प्राणी मरती । जेथील तेथें ।।१८।।

सर्व जीवसृष्टीला ती जाणीव आयुष्य असेपर्यंत जिवंत ठेवते. म्हणूनच तिला जगज्जोती म्हणतात. तिने शरीर सोडताच प्राणी जेथे असतील तेथे त्याच क्षणी मरण पावतात. ॥१८॥

मुळींचे जाणीवेचा विकार । पुढें जाला विस्तार । जैसे उदकाचे तुषार । अनंत रेणु ।।१९।।

मूळमायेतील जाणिवेचा पदर धरून पुढे अपार जीवसृष्टी निर्माण झाली. (जीवसृष्टीचे उत्पत्त्यादी विकार ईश्वराच्या स्वाधीन असतात.) पाण्याचे रेणुसारखे तुषार उडावेत त्याप्रमाणे! ॥१९॥

तैसे देव देवता देवतें भूतें । मिथ्या म्हणों नये त्यांतें । आपल्याला सामर्थ्ये ते । सृष्टीमधें फिरती ।।२०।।

त्या तुषारांपैकीच असलेले देव, देवता, दैवते, भूते इ. आपापल्या ईश्वरदत्त सामर्थ्याप्रमाणे सृष्टीत कार्य करतात. त्यांना खोटे ठरवू नये. ॥२०॥

सदा विचरती वायोस्वरूपें । स्वइच्छा पालटिती रूपें । अज्ञान प्राणी भ्रमें संकल्पे । त्यास बाधिती ।।२१।।

हे देवदेवतादी सतत वायुस्वरूपात असतात व आपल्या इच्छेनुसार निरनिराळी रूपे घेतात. हे ठाऊक नसल्यामुळे त्यांचेविषयी वेडेवाकडे संकल्प करून 'मला भूतबाधा झाली' इत्यादी प्रकारे माणूस भ्रमिष्ट होतो. ॥२१॥

ज्ञात्यास संकल्पचि असेना । म्हणोन त्यांचेच बाधवेना । याकारणें आत्मज्ञाना । अभ्यासावें ।।२२।।

जीवन्मुक्त ज्ञात्याला संकल्प किंवा कल्पना नसल्याने ते त्याला बाधत नाहीत. ('जीवा ब्रह्मत्व आहे संकल्पलोपी'

ज्ञाने.) म्हणून प्रत्येकाने आत्मविद्येचा अभ्यास करून आत्मज्ञान प्राप्त करावे. ॥२२॥

अभ्यासिलीयां आत्मज्ञान । सर्व कर्मास होये खंडण । हे रोकडी प्रचित प्रमाण । संदेह नाहीं ।।२३।।

सुस्थिर आत्मज्ञानामुळे ज्ञात्याच्या सर्व कर्मांचे भस्म होते ('ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते'– गीता.) हा ज्ञात्यांचा प्रत्यक्ष अनुभव असतो. त्याविषयी जराही शंका नाही. (संचित प्रारब्ध क्रियमाण । अवघा झाला नारायण ॥ तुकाराम ॥ 'एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा । हरिकृपे त्याचा नाश झाला ॥एकनाथ ॥') ॥२३॥

ज्ञानेविण कर्म विघडे । हें तों कदापि न घडे । सद्गुरुवीण ज्ञान जोडे । हेंहि अघटीत ।।२४।।

ज्ञानावाचून कर्मबंधन सुटणे केवळ अशक्य आहे आणि सद्गुरुकृपेशिवाय आजपर्यंत कोणालाही ज्ञान मिळालेले नाही. (अघटित– न घडलेले. असंभव.) ॥२४॥

म्हणोन सद्गुरू करावा । सत्संग शोधून धरावा । तत्त्वविचार विवरावा । अंतर्यामीं ।।२५।।

म्हणून सद्गुरूंचा अनुग्रह घ्यावा. विचारपूर्वक त्यांच्या सत्संगतीत रहावे. सत्संग पारखून धरावा व ब्रह्मवस्तूचे अंत:करणात श्रवण-मनन करावे. मायाब्रह्माचा विचार करावा. ॥२५॥

तत्वें तत्व निरसोन जातां । आपला आपणचि तत्वता । अनन्यभावें सार्थकता । सहजचि जाली ।।२६।।

पिंड-ब्रह्मांडातील एका मायिक तत्वाने दुसरे निरस्त केले असता केवळ आत्मरूप 'मी' शिल्लक रहातो. त्या 'मी' च्या सतत अनुसंधनात राहून मायिक तत्वांचे अनुसंधान सुटले की जीवनाचे सार्थक होते. ॥२६॥

विचार न करितां जें जें केलें । तें तें वाउगें वेर्थ गेलें । म्हणोनि विचारीं प्रवर्तलें । पाहिजे आधीं ।।२७।।

शास्त्रशुद्ध विचार न करता केलेली अध्यात्मसाधना अगदी फुकट जाते. म्हणून तो विचार करण्यास प्रथम शिकावे व नंतर तो तसा करत रहावे. ॥२७॥

विचार पाहेल तो पुरुषु । विचार न पाहे तो पशु । ऐसी वचनें सर्वेशु । ठाईं ठाईं बोलिला ।।२८।।

विचार करतो तो माणूस. न करील तो पशू. अशी वचने भगवंताच्या उपदेशात जागोजागी आढळतात. ॥२८॥

सिद्धांत साधायाकारणें । पूर्वपक्ष लागे उडवणें । परंतु साधकां निरूपणें । साक्षात्कार ।।२९।।

अद्वैत सिद्धान्ताला असलेल्या विरोधी विचाराचे खंडण करूनच सिद्धांत मांडावा लागतो. शास्त्रकारांनी असे केले असले तरी साधकाने मात्र सिद्धांताच्या श्रवणाने साक्षात्कार करून घ्यावा. ॥२९॥

श्रवण मनन निजध्यास । प्रचितीनें बाणतां विश्वास । रोकडा साक्षात्कार सायास । करणेंचि नलगे ।।३०।।

श्रवण, मनन व निदिध्यासन ही अध्यात्मविद्येची साधने आहेत. निदिध्यासनाने जीव- ब्रह्मैक्याचा अनुभव आल्यावर श्रद्धेचे रूपांतर प्रचीतीमध्ये होते. आत्मसाक्षात्कार नि:संदिग्धपणे होण्याचे हेच साधन असून इतर खटपटी करण्याचे कारणच नाही. (स्थूलमानाने उपनिषदात अध्यात्माचे श्रवण, ब्रह्मसूत्रात मनन व गीतेमध्ये निदिध्यासन सांगितले आहे. विचारसागररहस्य, पंचदशी इ. ग्रंथ ह्या तिन्हींचे सार सांगतात.) ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'पुरुषप्रकृतीनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'पुरुषप्रकृती' नावाचा नववा समास समाप्त

दशक दहावा : जगज्जोती

समास दहावा : चळाचळनिरूपण.

॥ श्रीराम समर्थ ॥

गगनासारिखे ब्रह्म पोकळ । उदंड उंच अंतराळ । निर्गुण निर्मळ निश्चळ । सदोदित ।।१।।
त्यास परमात्मा म्हणती । आणिक नामें नेणों किती । परी तें जाणिजे आदिअंतीं । जैसें तैसें ।।२।।

ब्रह्म आकाशाप्रमाणे सर्वसमावेशक व सर्वव्यापक आहे. ठाव न लागणाऱ्या अपार अंतराळाच्या तथाकथित उंचीमध्ये ते घनदाट भरून आहे. ('रिता ठाव ह्या राघवेवीण नाहीं'–समर्थ) ते गुणातीत, विमल, अचळ व नित्य (सदोदित) आहे. त्यालाच, इतर अनेक संज्ञांबरोबरच, परमात्मा ही सुद्धा एक संज्ञा आहे. जगाच्या आधी व जगतप्रलयानंतर पूर्ण असलेले ब्रह्म विकाररहित (जैसे पूर्वी तैसे नंतर) असते. ॥१,२॥

विस्तीर्ण पसरला पैस । भोंवता दाटला अवकाश । भासचि नाहीं निराभास । जैसें तैसें ।।३।।

ब्रह्म अमर्याद व्यापक (विभु) आहे. अनंत विश्वाच्या सर्व बाजूंना (भोवता) ते घनदाट भरले असून त्यात जराही पोकळी नाही. फट नाही. (ओवीचा अन्वय– अवकाश नाही. भासचि नाही. जैसे आकाश तैसे निराभास.) आकाशाचे ज्ञान पाचही ज्ञानेंद्रियांनी होत नाही. (त्याची निळाई भ्रामक आहे.) ब्रह्म आकाशासारखे निराभास आहे. ॥३॥

चहुंकडे पाताळतळीं । अंतचि नाहीं अंतराळीं । कल्पांतकाळीं सर्वकाळीं । संचलेंचि असे ।।४।।

पाताळासह (अध) दशदिशात ब्रह्म कोंदाटले आहे. अनंत अंतराळात ते अमर्याद व्यापून राहिले आहे. सृष्टीच्या आधी, नंतर, कालातीत असे ते घनदाट भरून असते. ॥४॥

ऐसें कांहींएक अचंचळ । ते अचंचळीं भासे चंचळ । त्यास नामेंहि पुष्कळ । त्रिविधा प्रकारें ।।५।।

ब्रह्मतत्त्व अचल असून त्यात मधेच उत्पत्ती, स्थिती व लयाची गती असलेले दृश्य भासते. त्या गतीच्या स्वामींना अनेक नामे आहेत. (ब्रह्मदेव– उत्पत्तीचा स्वामी इ.) ॥५॥

न दिसतां नांव ठेवणें । न देखतां खूण सांगणें । असो हें जाणयाकारणें । नामाभिधानें ।।६।।

वास्तविक हे स्वामी केवळ शास्त्रानेच सिद्ध होतात. ते दिसत नाहीत. तरी त्यांना नावे द्यावी लागतात. त्यांची ओळख पटण्यासाठी संकेत ठरवावे लागतात. ॥६॥

मूळमाया मूळप्रकृति । मुळपुरुष ऐसें ह्मणती । शिवशक्ति नामें किती । नाना प्रकारे ।।७।।

मूळ माया, मूळ प्रकृती, मूळ पुरुष, शिव, शक्ती अशा अनेक प्रकारच्या त्यांना संज्ञा आहेत. ॥७॥

परी जें नाम ठेविलें जया । आधीं वोळखावें तया । प्रचितीवीण कासया । वलगना करावी ।।८।।

पण ज्याला संज्ञा दिली त्याची शास्त्राने सांगितलेली ओळख करून घ्यावी. ओळख नसताना संज्ञा वापरल्या तर त्यांना बालिश बडबडीचीच किंमत असते. ॥८॥

रूपाची न धरितां सोये । नामासरिसें भरंगळों नये । प्रत्ययाविण गळंगा होये । अनुमानज्ञानें ।।९।।

रूपासंबंधी माहिती नसताना नामांची जंत्री घोकत राहिल्याने (भरंगळ) निश्चय दूर राहून गोंधळ तेवढा होतो. संशयाच्या ज्ञानाची हीच फळश्रुती! ॥९॥

निश्चळ गगनी चंचळ वारा । वाजों लागला भरारां । परी त्या गगना आणि समीरा । भेद आहे ।।१०।।

अचळ आकाशात चपळ वारा अचानक वेगाने वाहू लागला तरी आकाश व वारा ह्यांत निश्चित फरक आहे. ॥१०॥

तैसें निश्चळ परब्रह्म । चंचळ माया भासला भ्रम । त्या भ्रमाचा संभ्रम । करून दाऊं ।।११।।

त्याप्रमाणे अचल ब्रह्म व त्यात भासलेला गतिमान मायेच्या भ्रमाचा विस्तार किंवा विकास स्पष्ट करून दाखवू. ॥११॥

जैसा गगनी चालिला पवन । तैसें निश्चळीं जालें चळण । इछा स्फूर्तिलक्षण । स्फूर्णरूप ।।१२।।

आकाशात जसा वायू वाहतो त्याप्रमाणे निश्चळ ब्रह्मात गतिशील माया प्रगट झाली. आदि संकल्प, स्फूर्ती हे तिचे लक्षण असून त्या स्फुरणाचीच ती घडलेली आहे (स्फुरण रूप). ॥१२॥

अहंपणे जाणीव जाली । तेचि मूळप्रकृति बोलिली । माहाकारणकाया रचली । ब्रह्मांडीची ।।१३।।

ज्या जाणिवेला 'एकोऽहं' स्फुरणामुळे अहं चे रूप आले तिलाच मूळ प्रकृती म्हणतात. ब्रह्मांडाचा महाकारणदेह तो हाच! (पिंडी ते ब्रह्मांडी हा सिद्धान्त समजण्यापुरताच ह्याचा उपयोग आहे.) ॥१३॥

महामाया मूळप्रकृती । कारण ते अव्याकृती । सूक्ष्म हिरण्यगर्भ म्हणती । विराट ते स्थूळ ।।१४।।

पिंड-देह		ब्रह्मांड-देह.
↓		↓
महाकारण (महामाया)	➔	मूळप्रकृती.
कारण	➔	अव्याकृत.
सूक्ष्म	➔	हिरण्यगर्भ
स्थूल	➔	विराट ॥१४॥

ऐसें पंचीकर्ण शास्त्रप्रमये । ईश्वरतनुचतुष्टये । ह्मणोन हें बोलणें होये । जाणीव मूळमाया ।।१५।।

पंचीकरणाच्या शास्त्रात पिंडब्रह्मांडांच्या चार शरीरांची नावे अशी सांगितली आहेत. ब्रह्मांडाच्या देहानांच ईश्वरतनुचतुष्टय असेही म्हणतात. जीव व ईश्वर ह्यात व्यापून राहणारी जाणीव (चिदाभास) तीच मूळमाया होय. ॥१५॥

परमात्म्याची पुल्लिंगी नामे–

परमात्मा परमेश्वरू । परेश ज्ञानघन ईश्वरु । जगदीश जगदात्मा जगदेश्वरु । पुरुषनामें ।।१६।।

सत्तारूप ज्ञानस्वरूप । प्रकाशरूप जोतिरूप । कारणरूप चिद्रूप । शुद्ध सूक्ष्म अलिप्त ।।१७।।

आत्मा अंतरात्मा विश्वात्मा । द्रष्टा साक्षी सर्वात्मा । क्षेत्रज्ञ शिवात्मा जीवात्मा । देही कूटस्त बोलिजे ।।१८।।

इंद्रात्मा ब्रह्मात्मा हरिहरात्मा । येमात्मा धर्मात्मा नैरूत्यात्मा । वरुणवायोकुबेरात्मा । ऋृषीदेवमुनिधर्ता ।।१९।।

गण गंधर्व विद्याधर । येक्ष किन्नर नारद तुंबर । सर्व लोकांचे अंतर । तो सर्वांतरात्मा बोलिजे ।।२०।।

चंद्र सूर्य तारामंडळें । भूमंडळें मेघमंडळें । येकवीस स्वर्गें सप्त पाताळें । अंतरात्माच वर्तवी ।।२१।।

गुप्त वल्ली पाल्हाळली । तिचीं पुरुषनामें घेतलीं । आतां स्त्रीनामें ऐकिलीं । पाहिजे श्रोतीं ।।२२।।

परमात्मा, परेश, परमेश्वर, ज्ञानघन, ईश्वर, जगदीश, जगदात्मा, जगदीश्वर, सत्‌घन, ज्ञानघन, प्रकाशरूप, ज्योतिरूप, कारणरूप, चित्‌घन, शुद्ध, सूक्ष्म, अलिप्त, आत्मा, अंतरात्मा. विश्वात्मा, द्रष्टा, साक्षी, सर्वात्मा, क्षेत्रज्ञ, जीवात्मा, शिवात्मा, देहातीत कूटस्थ, इंद्रात्मा, ब्रह्मात्मा, हरिहरात्मा, यमात्मा, धर्मात्मा, नैऋतीचा आत्मा, वरुणात्मा, वायुरात्मा, कुबेरात्मा, ऋषी, देव व मुनी ह्यांना धारण करणारा, गण, गंधर्व, विद्याधर, यक्ष, किन्नर, नारद, तुंबर

ह्या सर्वांचा आत्मा म्हणजेच सर्वांतरात्मा. ह्या अंतरात्म्याच्या सत्तेनेच चंद्र, सूर्य, तारामंडळे, भूमंडळे (ग्रह) मेघमंडळे, एकवीस स्वर्ग, सात पाताळ आपापल्या कक्षेत फिरतात. जाणिवेच्या गुप्तवेलीचा हा प्रचंड पसारा आहे ॥१६ ते २२॥

परमात्म्याची स्त्रीलिङ्गी नामे–

मूळमाया जगदेश्वरी । परमविद्या परमेश्वरी । विश्ववंद्या विश्वेश्वरी । त्रैलोक्यजननी ।।२३।।

अंतर्हेतु अंतर्कळा । मौन्यगर्भ जाणीवकळा । चपळ जगज्जोती जीवनकळा । परा पश्यंती मध्यमा ।।२४।।

युक्ति बुद्धि मति धारणा । सावधानता नाना चाळणा । भूत भविष्य वर्तमाना । उकलून दावी ।।२५।।

जागृति स्वप्न सुषुप्ती जाणे । तुर्या ताटस्ता अवस्ता जाणे । सुख दुःख सकळ जाणे । मानापमान ।।२६।।

ते परम कठीण कृपाळु । ते परम कोमळ स्नेहाळु । ते परम क्रोधी लोभाळु । मर्यादेवेगळी ।।२७।।

शांती क्ष्मा विरक्ती भक्ती । अध्यात्मविद्या सायोज्यमुक्ति । विचारणा सहजस्थिती । जयेचेनी ।।२८।।

पूर्वीं पुरुषनामें बोलिलीं । उपरीं स्त्रीनामें निरोपिलीं । आतां नपुषकनामें ऐकिलीं । पाहिजे चंचळाचीं ।।२९।।

मूळ माया, जगदीश्वरी, परमविद्या, परमेश्वरी, विश्ववंद्या, विश्वेश्वरी, त्रैलोक्यजननी, अंतर्हेतु, अंतरकळा, मौन्यगर्भा, जीवनकळा, चपला, जगज्जोती, जीवनकळा, परा, पश्यंती, मध्यमा, युक्ती, बुद्धी, मती, धारणा, सावधानता, अनेक विचार व तिन्ही काळांची उद्गाती, जागृती, स्वप्न व सुषुप्ती जाणणारी, तुर्या व समाधी जाणणारी, सुख, दुःख, मानापमान जाणणारी. कठोर व कृपाळू, कोमल व स्नेहल, तापट व अतिलोभी तीच असते. शांती, क्षमा, विरक्ती, भक्ती, अध्यात्मविद्या, सायुज्य मुक्ती तीच होय. सत्यमिथ्या विचार व सहज स्थिती तिच्या कृपेने लाभतात. पुल्लिंगी व स्त्रीलिङ्गी नावे सांगून झाली. (अंतर्हेतु– अंतःकरणात आभासणारी. मौन्यगर्भा– मौनामध्येही जाणीवरूपाने असणारी) ॥२३–२९॥

परमेश्वराची नपुंसक नामे–

जाणणें अंतःकर्ण चित्त । श्रवण मनन चैतन्य जीवित । येतें जातें सुचीत । होऊन पाहा ।।३०।।

मीपण तूंपण जाणपण । ज्ञातेपण सर्वज्ञपण । जीवपण शिवपण ईश्वरपण । अलिप्तपण बोलिजे ।।३१।।

ऐसी नामें उदंड असती । परी ते येकचि जगज्जोती । विचारवंत ते जाणती । सर्वांतरात्मा ।।३२।।

जाणणे, अंतःकरण, चित्त, श्रवण, मनन, चैतन्य, जीवित, येणारे, जाणारे, मीपण, तूपण, जाणपण, ज्ञातेपण, सर्वज्ञपण, जीवपण, शिवपण, ईश्वरपण, अलिप्तपण इ. हवी तेवढी नावे आहेत. पण त्या सर्वांचे जगज्जोतीरूप अंतरात्मा हेच स्वरूप आहे. असे विचारवंतांना लक्षात येते. ॥३०–३२॥

आत्मा जगज्जोती सर्वज्ञपण । तीनी मिळोन येकचि जाण । अंतःकर्णचि प्रमाण । ज्ञेप्तीमात्र ।।३३।।

आत्मा, जगज्जोति व सर्वज्ञपण (अनुक्रमे पु., स्त्री. व नपु.) ही तिन्ही एकच. केवळ ज्ञान हेच स्वरूप असलेली अंतर्कळा त्यांचे अधिष्ठान (प्रमाण) आहे. ॥३३॥

ढीग जाले पदार्थांचे । पुरुष स्त्री नपुंसक नामांचे । परंतु सृष्टीरचनेचें । किती ह्मणोन सांगावें ।।३४।।

ह्या सृष्टीमध्ये तिन्ही लिङ्गांच्या पदार्थांचे ढीग पडले असले तरी तेवढ्याने अपार सृष्टिरचनेची कितीशी कल्पना येणार! ॥३४॥

सकळ चाळिता येक । अंतरात्मा वर्तवी अनेक । मुंगीपासून ब्रह्मादिक । तेणेंचि चालती ।।३५।।

त्या सर्वांचा अंतरात्मा हा एकच चालक असून मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत सर्व जीवसृष्टी तोच चालवितो. ॥३५॥

तो अंतरात्मा आहे कैसा । प्रस्तुत वोळखावा आमासा । नाना प्रकारींचा तमासा । येथेंचि आहे ।।३६।।

त्या अंतरात्म्याची किंचित ओळख करून घ्या. सृष्टीतील सर्व खेळ त्याच्या सत्तेनेच चालतात. ॥३६॥

तो कळतो परी दिसेना । प्रचित येते परी भासेना । शरीरीं असे परी वसेना । येके ठाईं ।।३७।।

अंतरात्मा जाणिवेच्या रूपाने कळतो, पण पाच ज्ञानेंद्रियांच्या आवाक्यात येत नाही (दिसेना.) त्याचा अनुभव येतो, पण तो वृत्तिज्ञानाचा विषय होत नाही. शरीरभर व्यापून असतो, पण कोठेच सापडत नाही! ॥३७॥

तीक्षणपणें गगनीं भरे । सरोवर देखतां च पसरे । पदार्थ लक्षून उरे । चहुंकडे ।।३८।।

अत्यंत सूक्ष्म (तीक्ष्ण) असल्याने आकाशातून जणू बाहेर पडतो, जलाशय पहाताच त्याच्या व्याप्तीएवढा जणू पसरतो, सर्व पदार्थांना आत बाहेर व्यापून (लक्षून) शिल्लक उरतो. ॥३८॥

जैसा पदार्थ दृष्टीस दिसतो । तो त्यासारिखाच होतो । वायोहूनि विशेष तो । चंचळविषई ।।३९।।

पदार्थाच्या आकाराप्रमाणे तो आकार धरतो (पहा. कठ उप.) तर वायूहून तो अधिक वेगवान असतो. (पहा– ईश. उप.) ॥३९॥

कित्येक दृष्टीनें देखे । कितीयेक रसनेनें चाखे । कितीयेक ते वोळखे । मनेंकरूनि ।।४०।।

डोळ्यांच्या माध्यमातून कित्येक रूपे पहातो, जिभेच्या माध्यमातून अनेक पदार्थांची चव घेतो व मनामार्फत अनेक वस्तूंचे स्वरूप जाणतो. (उदा.– डोळ्याने सूर्याचे रूप पाहून तो गोल आहे हे मनाने जाणतो.) ॥४०॥

श्रोतीं बैसोन शब्द ऐकतो । घ्राणेंद्रियें वास घेतो । त्वचेइंद्रियें जाणतो । सीतोष्णादिक ।।४१।।

कानात जणू बसतो व शब्द ऐकतो. (कानाचा कान– केन उप.) नाकाच्या साह्याने वास घेतो, त्वचेने शीत, उष्ण इ. स्पर्श जाणतो. ॥४१॥

ऐशा जाणे अंतर्कळा । सकळामधें परी निराळा । पाहातां त्याची अगाध लीळा । तोचि जाणे ।।४२।।

असा तो परमात्मा वृत्तिज्ञानाचे अधिष्ठान असून त्याने तो लिप्त मात्र होत नाही. हे अगाध रहस्य त्याचे तोच जाणे! (आभासवादाच्या प्रक्रियेप्रमाणे चिदाभास जाणतो. कूटस्थ चैतन्य ज्ञानरूप असते.) ॥४२॥

तो पुरुष ना सुंदरी । बाळ तारुण्य ना कुमारी । नपुंसकाचा देहधारी । परी नपुसक नव्हे ।।४३।।

आत्मा पुरुष, स्त्री, बालक, तरुण, मुलगी इ. कोणीच नसतो. नपुंसक व्यक्तीच्या शरीरात तोच व्यापून असला तरी तो नपुंसक नाही! ॥४३॥

तो चालवी सकळ देहासी । करून अकर्ता म्हणती त्यासी । तो क्षेत्रज्ञ क्षेत्रवासी । देही कूटस्त बोलिजे ।।४४।।

सर्व देहांचे सर्व व्यवहार तो चालवतो, पण एवढे करून तो अकर्ताच असतो. शरीरात रहाणाऱ्या त्याला (क्षेत्रवासी) क्षेत्रज्ञ किंवा जीव असेही म्हणतात. उपाधिभेदाने त्यालाच कूटस्थ ईश्वर म्हणतात. ॥४४॥

श्लोक–

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च । क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोक्षर उच्यते ।।छ।।

श्लोकार्थ– ह्या दृश्य जगात दोन पुरुष आहत. एक क्षर व एक अक्षर. सर्व भूतातील जीवात्म्याला क्षर पुरुष म्हणतात, तर कूटस्थाला अक्षर असे म्हणतात. (कूट म्हणजे गूढ, गुप्तपणे राहणारा ईश्वर. कूट शब्दाचा दुसरा अर्थ ऐरण. ऐरणीवर घडणाऱ्या दागिन्यांविषयी ऐरणीला काहीच माहीत नसते. त्याप्रमाणे कूटस्थ आत्मा साक्षी असतो.)

दोनी पुरुष लोकीं असती । क्षराक्षर बोलिजेती । सर्व भूतें क्षर म्हणती । अक्षर कूटस्त बोलिजे ।।४५।।

जीवसृष्टीत दोन पुरुष असतात. त्यांना क्षर व अक्षर म्हणतात. प्राण्यांतील जीवचैतन्याला क्षर म्हणतात. ईश्वरचैतन्याला अक्षर म्हणतात. ॥४५॥

उत्तम पुरुष तो आणीक । नि:प्रपंच नि:कळंक । निरंजन परमात्मा येक । निर्विकारी ।।४६।।

ह्या दोन्हींहून उत्तम पुरुष वेगळाच आहे. तो प्रपंचातीत, निर्दोष, निराकार, सर्वश्रेष्ठ, एकमेव व निर्विकार आहे.

चैतन्य	**उपाधी**
जीवचैतन्य	पिंड
ईश्वरचैतन्य	ब्रह्मांड
ब्रह्मचैतन्य	निरुपाधिक ।।४६।।

च्यारी देह निरसावे । साधकें देहातीत व्हावें । देहातीत होतां जाणावें । अनन्य भक्त ।।४७।।

स्थूलादी देहांचा निरास करावा, (ते 'मी' नाही असा दृढनिश्चय करावा) व साधकाने विदेही होऊन देहात रहावे! ह्यालाच अनन्य भक्त म्हणतात! ।।४७।।

देहमात्र निरसुनी गेला । तेथें अंतरात्मा कैसा उरला । निर्विकारीं विकाराला । ठाव नाहीं ।।४८।।

चारी देहांचा निरास झाल्यावर उपाधीसापेक्ष असलेली 'अंतरात्मा' ही संकल्पना मोडून पडते. आत्मा निर्विकार असल्याने 'आत रहाणे' हा विकार म्हणजे विशेष संभवत नाही किंवा अंतरात्मा देहात असल्याने त्याला देहाप्रमाणे विकार असल्याचा भ्रम अविद्येमुळे होतो, तो नंतर रहात नाही. ।।४८।।

निश्चळ परब्रह्म येक । चंचळ जाणावें माईक । ऐसा प्रत्यय निश्चयात्मक । विवेकें पाहावा ।।४९।।

एकमेव परब्रह्म निश्चळ असून इतर सर्व उत्पत्ती, स्थिती व लयाचे चांचल्य असलेले दृश्य जगत् मायिक आहे. विवेकाचा अभ्यास करून असा निश्चय दृढ करून घ्यावा. ।।४९।।

येथें बहुत नलगे खळखळ । येक चंचळ येक निश्चळ । शाश्वत कोणतें केवळ । ज्ञानें वोळखावें ।।५०।।

अशा निश्चयासाठीं फार मोठ्या सैद्धान्तिक झटापटींची खरे तर गरज नाही किंवा हे स्वीकारण्यासाठी खळखळ करण्याचे कारण नाही. ब्रह्म निश्चळ असून जगत् चंचळ आहे. ह्यातील शाश्वत काय आहे ह्याचा निवाडा ज्ञात्यांनी करून ठेवला आहे. ।।५०।।

असार त्यागून घेईजे सार । म्हणोन सारासार विचार । नित्यानित्य निरंतर । पाहाती ज्ञानी ।।५१।।

असार सारून सार घ्यावे हाच सारासार विचार होय. ज्ञानी महात्मे नित्य व अनित्य ह्यांचा निरंतर विवेक करतात. ।।५१।।

जेथे ज्ञानचि होतें विज्ञान । जेथें मनाचे होतें उन्मन । तेथें कैसें चंचळपण । आत्मयासी ।।५२।।

त्या ज्ञानी महात्म्यांचे ठिकाणी ज्ञानाचे विज्ञान होते व मन उन्मन होते. मनाच्या चांचल्यामुळे आत्म्यावर होणारा चांचल्याचा आरोप तेथे नसतो. (अविद्या निवृत्तीसाठी अध्यात्म विद्या, अध्यात्मविद्येने आत्मज्ञान व ज्ञानाभिमानाच्या निवृत्तीने विज्ञान असा हा प्रवास आहे.) ।।५२।।

सांगणोवांगणीचें काम नव्हे । आपुल्या अनुभवें जाणावें । प्रत्ययाविण सिणावें । तेंचि पाप ।।५३।।

ज्ञानाचे विज्ञान होणे हे गप्पागोष्टी करून साधणारे नाही किंवा एकाने दुसऱ्याला, दुसऱ्याने तिसऱ्याला उडत उडत सांगून साध्य होणार नाही. ग्रंथ वाचून जमणारे नाही. तर प्रत्यक्ष साधनेच्या साह्याने प्रत्यक्ष अनुभव घेऊनच ते साधते. (बुद्धीचा सहज निश्चय हे कोणत्याही साधनापद्धतीचे फलित आहे.) अनुभव येईपर्यंत किंवा अनुभव न येता केलेले सर्व कष्ट पापच होय. ('मी ब्रह्म आहे' हे अखंड वास्तव अनुभवातून निसटणे हे पहिले पाप : त्याचा पुन्हा अनुभव घेण्यासाठी साधना करणे हे दुसरे पाप. साधना करूनही अनुभव न येणे हे तिसरे पाप होय!) ।।५३।।

सत्यायेवढें सुकृत नाहीं । असत्यायेवढें पाप नाहीं । प्रचितीविण कोठेंचि नाहीं । समाधान ।।५४।।

त्रिकालाबाधित सत्यरूप ब्रह्म मी आहे असा अनुभव घेणे हे सर्वश्रेष्ठ सुकृत आहे. 'मी देह' ह्या असत्य समजुतीत

जगणे ह्यासारखे दुसरे पाप नाही. खऱ्या समाधानासाठी कोणत्याही क्षेत्रात प्रत्यक्ष अनुभवाशिवाय दुसरा उपाय नाही. ।।५४।।

सत्य म्हणिजे स्वरूप जाण । असत्य माया हें प्रमाण । येथें निरोपिलें पापपुण्य । रूपेंसहित ।।५५।।

आत्मस्वरूप हेच सत्य असून मायिक सृष्टी असत्य आहे असे सर्वच शास्त्रे सांगतात. मागील ओवीतील पाप-पुण्यांची ओळख पटवून देण्याचे काम येथे केले. म्हणजे सत्यब्रह्माचे म्हणजे आत्मस्वरूपाचे ज्ञान हेच पुण्य. असत्य म्हणजे मायिक सृष्टी सत्य मानणे हेच पाप. ।।५५।।

दृश्य पाप वोसरलें । पुण्य परब्रह्म उरलें । अनन्य होताच जालें । नामातीत ।।५६।।

दृश्य सृष्टीच्या पापाचा निरास झाला. पुण्यरूप ब्रह्म उरले. 'ते मी आहे' असे अनुभवजन्य अनन्यत्व येताच दृश्य जगताच्या नामरूपांचा बाध होतो. ।।५६।।

आपण वस्तु स्वतसिद्ध । तेथें नाहीं देहसमंध । पापरासी होती दग्ध । येणें प्रकारें ।।५७।।

नित्यसिद्ध ब्रह्म निरूपाधिक असल्याने व ते मी असल्याने माझाही देहाशी काहीच संबंध नाही. पाप चार देहांच्या माध्यमातून होते. त्यांचा निरास झाल्यावर त्यांनी केलेल्या पापांच्या राशी जळून जातात त्या अशा! ।।५७।।

येरवी ब्रह्मज्ञानेंवीण । जें जें साधन तो तो सीण । नाना दोषांचे क्षाळण । होईल कैसें ।।५८।।

म्हणून ब्रह्मज्ञानावाचून केलेले सर्व प्रयत्न केवळ कष्टरूप असतात. त्यांनी अनंत पापे कशी धुतली जातील? ।।५८।।

पापाचें वळलें शरीर । पापचि घडे तदनंतर । अंतरीं रोग वरीवरी उपचार । काय करी ।।५९।।

पूर्वजन्मांच्या पापांमुळे चालू शरीर मिळालेले असल्याने ते जणू पापाचे घडले आहे. ते शरीर पुढे अधिक पापांचे साधन बनते. अविद्येचा आजार आत असताना ब्रह्मज्ञानावाचून फुटकळ साधनांचे उपचार काय करतील? ।।५९।।

नाना क्षेत्री हें मुंडिलें । नाना तीर्थी हें दंडिलें । नाना निग्रहीं खंडिलें । ठाईं ठाईं ।।६०।।

गयेसारख्या क्षेत्रात मुंडण केले, अमरनाथसारख्या क्षेत्रात पायाने पर्वत चढला, खडतर व्रतांनी शरीराचे जागोजागी हाल केले. ।।६०।।

नाना मृत्तिकेनें घांसिलें । अथवा तप्तमुद्रेनें लासिलें । जरी हें वरीवरी तासिलें । तरी शुद्ध नव्हे ।।६१।।

अंगावर मातीचे लेप लावले, तापलेल्या सळीने डागले व त्वचा कितीही खरडून काढली तरी त्याने जीवाची शुद्धी होणार नाही. ।।६१।।

सेणाचे गोळे गिळिले । गोमुत्राचे मोघे घेतले । माळा रुद्राक्ष घातले । काष्ठमणी ।।६२।।

गोमयाचे गोळे गिळले, गोमूत्राची मडकी गटागटा प्यायली किंवा तुळस व रुद्राक्षाच्या मोठमोठ्या माळा गळ्यात घातल्या. ।।६२।।

वेष वरीवरी केला । परी अंतरीं दोष भरला । त्या दोषाच्या दहनाला । आत्मज्ञान पाहिजे ।।६३।।

साधूचा केवळ वेष घेतला पण आत कामादीविकार तसेच राहिले तर ते दोष जळून जाण्यासाठी आत्मज्ञानच हवे. ।।६३।।

नाना व्रतें नाना दानें । नाना योग तीर्थाटणें । सर्वांहुनी कोटीगुणें । महिमा आत्मज्ञानाचा ।।६४।।

अनंतादी व्रते, गोदानादी दाने, हठादी योगसाधना, काशीसारखी तीर्थे इत्यादिकांपेक्षा आत्मज्ञानाचे माहात्म्य कोटीपट अधिक आहे. ।।६४।।

आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यास नाहीं मर्यादा । दुष्ट पातकाची बाधा । निरसोन गेली ।।६५।।

जो अध्यात्मविद्येचे सतत चिंतन करतो त्याच्या पदरी पुण्याच्या अमर्याद राशी असतात. दुष्ट पाप पाचोळ्यासारखे उडून जाते. ॥६५॥

वेदशास्त्रीं सत्यस्वरूप । तेंचि ज्ञानियांचे रूप । पुण्या जालें अमूप । सुकृतें सीमा सांडिली ।।६६।।

वेदान्तशास्त्रात सत्याचे जे स्वरूप सांगितलेले आहे तेच ज्ञान्यांचे असते, अमर्याद सुकृत हातून घडून अमोज शुद्ध पुण्य त्यांच्या पदरी असते. (अमूप = अमोज = न मोजता येण्यासारखे) ॥६६॥

या प्रचितीच्या गोष्टी । प्रचित पाहावी आत्मदृष्टीं । प्रचितवेगळे कष्टी । होऊंच नये ।।६७।।

हा सर्व प्रत्यक्ष अनुभवाचा विषय आहे. सतत आत्मानुसंधानाने अनुभव येतो. हा अनुभव न घेता ढोर मेहनत करू नये. ॥६७॥

आगा ये प्रचितीचे लोक हो । प्रचित नस्तां अवघा शोक हो । रघुनाथकृपेनें राहो । प्रत्यय निश्चयाचा ।।६८।।

अहो, अनुभव घेण्याची इच्छा करणाऱ्या मुमुक्षूंनो! अनुभव नसेल तर केवळ शोकच राहील. श्री रघुनाथाच्या कृपेने तुम्हाला आलेला जीव-ब्रह्मैक्याचा अनुभव टिकून राहो!!

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'चळाचळनिरुपणनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'चळाचळनिरूपण' नावाचा दहावा समास समाप्त
—दशक दहावा समाप्त—

दशक अकरावा : भीमदशक

समास पहिला : सिद्धांतनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

आकाशापासून वायो होतो । हा तों प्रत्यये येतो । वायोपासून अग्नी जो तो । सावध ऐका ।।१।।

आकाशात अकस्मात वायू वाहू लागतो हे तर सर्वांच्या प्रत्यक्ष अनुभवाला येते. त्या वायूपासून अग्नी निर्माण होतो ते समजावून घ्या. ॥१॥

वायोची कठिण घिसणी । तेथें निर्माण जाला वन्ही । मंद वायो सीतळ पाणी । तेथुनि जालें ।।२।।

वायूच्या जबरदस्त घर्षणातून अग्नी निर्माण झाला. वायूच्या मंद वेगातून शीतळ आप (पाणी) निर्माण झाले. (पहा– तैतिरीय उप.) ॥२॥

आपापासून जाली पृथ्वी । ते नाना बीजरूप जाणावी । बीजापासून उत्पत्ति व्हावी । हा स्वभावचि आहे ।।३।।

आपापासून अनंत प्रकारची बीजे पोटात असलेली पृथ्वी तयार झाली. बीजांना अंकुर फुटणे नैसर्गिक आहे. ॥३॥

मुळीं सृष्टी कल्पनेची । कल्पना आहे मुळींची । जयेपासून देवत्रयाची । काया जाली ।।४।।

खरेतर सृष्टीची निर्मिती कल्पनेतून झाली असून तीच सर्वाचे मूळ आहे. ब्रह्मदेवादी तीन देव कल्पनेतून जन्माला आले. ॥४॥

निश्चळामधें चंचळ । ते चि कल्पना केवळ । अष्टधा प्रकृतिचें मूळ । कल्पनारूप ।।५।।

निश्चळ ब्रह्मस्वरूपात निर्माण झालेली कल्पना हेच चंचलतेचे स्वरूप आहे. पाचभूते व त्रिगुण अशी अष्टधा प्रकृती कल्पनारूपच आहे. ॥५॥

कल्पना तेचि अष्टधा प्रकृति । अष्टधा तेचि कल्पनामूर्ती । मुळाग्रापासून उत्पत्ति । अष्टधा जाणावी ।।६।।

कल्पना म्हणजेच अष्टधाप्रकृती. अष्टधा प्रकृतीचीच कल्पना घडली आहे. मूळ मायेत अष्टधा प्रकृतीची बीजे असतात. ॥६॥

पांच भूतें तीन गुण । आठ जालीं दोनी मिळोन । म्हणौनि अष्टधा प्रकृति जाण । बोलिजेते ।।७।।

पाच भूतात तीन गुण मिसळून अष्टधा प्रकृती तयार झाली. म्हणूनच तिला ते नाव मिळाले. ॥७॥

मुळीं कल्पनारूप जाली । पुढें तेचि फापावली । केवळ जडत्वास आली । सृष्टिरूपें ।।८।।

मुळात कल्पनारूप असलेली ती प्रकृती फोफावली व पुढे तिला घनता निर्माण होऊन सृष्टी तयार झाली. ॥८॥

मुळीं जाली ते मूळमाया । त्रिगुण जाले ते गुणमाया । जडत्व पावली ते अविद्या माया । सृष्टिरूपें ।।९।।

मुळात स्फुरणरूपाने झाली ती मूळमाया, त्रिगुण व्यक्त झाल्यावर गुणमाया, घनता आल्यावर सृष्टिरूप झालेली अविद्या माया. ॥९॥

पुढें च्यारी खाणी जाल्या । च्यारी वाणी विस्तारल्या । नाना योनी प्रगटल्या । नाना वेक्ती ।।१०।।

पुढे जारजादी चार खाणी, परादी चार वाणी, लक्षावधी योनी व प्रत्येक योनीतील अनेक व्यक्ती प्रगट झाल्या. (उदा. मानव योनी–अब्जावधी व्यक्ती) ॥१०॥

ऐसी जाली उभारणी । आतां ऐका संव्हारणी । मागील दशकीं विशद करूनि । बोलिलें असे ।।११।।
परतु आतां संकळित । बोलिजेल संव्हारसंकेत । श्रोते वक्ते येथें चित्त । देऊन ऐका ।।१२।।

सृष्टीची उभारणी अशी झाली. मागील दशकात सविस्तर सांगितलेला सृष्टीचा संहार आता थोडक्यात सांगू. तो श्रोत्यांनी मनापासून ऐकावा. ।।११-१२।।

शत वरुषें अनावृष्टि । तेथें आटेल जीवसृष्टि । ऐशा कल्पांताच्या गोष्टी । शास्त्रीं निरोपिल्या ।।१३।।
बाराकळीं तपे सूर्य । तेणें पृथ्वीची रक्षा होये । मग ते रक्षा विरोन जाये । जळांतरी ।।१४।।
तें जळ शोषी वैश्वानरु । वन्ही झडपी समीरु । समीर वितुळे निराकारु । जैसें तैसें ।१५।।
ऐसी सृष्टिसंहारणी जाली । मागां विस्तारें बोलिली । मायानिरासें उरली । स्वरूपस्थिति ।।१६।।

शंभर वर्षे पाऊस न पडल्याने जीवसृष्टी नष्ट होईल. कल्पांतासंबंधी शास्त्र असे सांगते की सूर्य बारा कलांनी तापू लागून पृथ्वीची राख होऊन नंतर ती पाण्यात मिसळेल. ते पाणी भयानक अग्नी वाळवून टाकील. वायू अग्नीला विझवील व वायू निराकार आकाशात पूर्वी होता तसा राहील. सृष्टीचा संहार असा होतो. मागे त्यासंबंधी सविस्तर सांगितले होते. मायेचा असा निरास झाल्यावर ब्रह्म शेष रहाते. ।।१३-१६।।

तेथें जीवशिव पिंडब्रह्मांड । आटोन गेलें थोतांड । मायेअविद्येचे बंड । वितळोन गेलें ।।१७।।

पिंड व त्यातील जीव, ब्रह्मांड व त्यातील ईश्वर हा सर्व मायिक बडिवार संपला. माया व अविद्येचा गोंधळ आटोपला. ।।१७।।

विवेकेंचि बोलिला क्षये । म्हणोनि विवेकप्रळये । विवेकी जाणती काये । मूर्खास कळे ।।१८।।

जग मिथ्यात्व निश्चयाने जो सृष्टीचा प्रलय केला जातो त्याला विवेकप्रलय म्हणतात. त्यासाठी प्रत्यक्ष नाश अपेक्षित नाही. ह्याचे रहस्य विवेकीच जाणतात. ब्रह्मविद्येचा अभ्यास नसणाऱ्याला ते कळतही नाही. ।।१८।।

सृष्टि शोधितां सकळ । येक चंचळ येक निश्चळ । चंचळास कर्ता चंचळ । चंचळरूपी ।।१९।।

सर्व सृष्टीचे पृथक्करण केले असता एक चंचळ व एक निश्चळ असे दोन मुख्य भाग दिसतात. ईश्वररूप चंचळाने सृष्टिरूप चंचळाची निर्मिती केली आहे. कारण चंचळ चंचळाकडूनच होते. (समान सत्ता) ।।१९।।

जो सकळ शरीरीं वर्ते । सकळ कर्तुत्वास प्रवर्ते । करून अकर्ता हा वर्ते । शब्द जया ।।२०।।

जीवसृष्टीची अन्त:करणे व्यापून राहून ईश्वर तिचे सर्व व्यापार चालवूनही अकर्ता म्हणून ओळखला जातो. (ईश्वर: सर्व भूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति- गीता १८-६१) ।।२०।।

राव रंक ब्रह्मादिक । सकळांमधें वर्ते येक । नाना शरीरे चाळक । इंद्रियेंद्वारें ।।२१।।

तो ईश्वर राजा, दरिद्री, ब्रह्मदेव इत्यादिकांत समत्वाने राहून त्यांच्या इंद्रियांमार्फत त्यांच्या शरीरांचे व्यापार चालवितो. ।।२१।।

त्यास परमात्मा बोलती । सकळ कर्ता ऐसें जाणती । परि तो नासेल प्रचिती । विवेकें पाहावी ।।२२।।

त्याला सर्वकारक परमात्मा असे आदराने म्हणतात खरे. पण तो ईश्वरही नष्ट होतो हे विवेकाने (वेदान्तशास्त्र) जाणावे. ।।२२।।

जो स्वानामधें गुरुगुरितो । जो सूकरांमधें कुरुकुरितो । गाढवीं भरोन भुंकतो । आटाहास्यें ।।२३।।

ईश्वर सर्वकर्ता असल्याने कुत्र्याच्या शरीरात जणू तोच गुरगुरतो, डुकरात जणू तोच कुरकुरतो व गाढवाच्या

शरीरात मोठ्याने बराच वेळ ओरडत रहातो. ॥२३॥

लोक नाना देह देखती । विवेकी देहांत पाहाती । पंडित समदर्शनें घेती । येणें प्रकारें ।।२४।।

सामान्य माणसे प्राण्यांची विविधता पाहतात. विवेकी प्राण्याच्या शरीरातील चैतन्याचा विचार करून त्यांचे समत्वाने दर्शन घेतात. ॥२४॥

श्लोक–

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि । शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ।।छ।।

श्लोकार्थ– विद्यासंपन्न व विनयसंपन्न ब्राह्मण, गाय, हत्ती, श्वान व चांडाल ह्यांचेकडे पंडित समदृष्टीने पहातात.

देह पाहातां वेगळाले । परंतु अंतर येकचि जालें । प्राणीमात्र देखिलें । येकांतरें ।।२५।।

प्राण्यांचे देह अगदी भिन्न दिसतात पण त्यांच्या अन्त:करणात तेच चैतन्य व्यापून राहते. पंडित त्यावरच दृष्टी ठेवतात. ॥२५॥

अनेक प्राणी निर्माण होती । परी येकचि कळा वर्तती । तेथे नांव जगज्जोती । जाणतीकळा ।२६।।

कोट्यवधी प्राणी जन्माला आले तरी त्या सर्वातील चैतन्य तेच असते. त्यालाच जगज्जोती किंवा जाणती कळा म्हणतात. ॥२६॥

श्रोत्रीं नाना शब्द जाणे । त्वचेमधे सीतोष्ण जाणे । चक्षुमधें पाहों जाणे । नाना पदार्थ ।।२७।।

रसनेमधें रस जाणे । घ्राणामधें वास तो जाणे । कर्मइंद्रियामधें जाणे । नाना विषयस्वाद ।।२८।।

सूक्ष्म रूपें स्थूळ रक्षी । नाना सुखदुःखें परीक्षी । त्यास म्हणती अंतरसाक्षी । अंतरात्मा ।।२९।।

कानात शिरलेले अनेक शब्द जाणणे, त्वचेला झालेले शीत व उष्ण स्पर्श जाणणे, डोळ्यासमोर आलेले अनेक पदार्थ जाणणे, जिभेवरील पदार्थाची चव, नाकाने गंध जाणणे हे सर्व जाणणे त्याचेच असते. हात ह्या कर्मेंद्रियाचे पकडणे हे कर्म आहे. पकडण्याचा विषय तोच जाणतो. अशा रीतीने तो अनेक विषयांचे ग्रहण करतो. स्वत: अतिसूक्ष्म असून स्थूल शरीराचे रक्षण करतो, हे सुख हे दु:ख (अनुकूल व प्रतिकूल) असे जाणतो. हाच तो अंतरसाक्षी अंतरात्मा होय. ॥२७–२९॥

आत्मा अंतरात्मा विश्वात्मा । चैतन्य सर्वात्मा सूक्ष्मात्मा । जीवात्मा शिवात्मा परमात्मा । द्रष्टा साक्षी सत्तारूप ।।३०।।

ह्या अंतरात्म्याला आत्मा, विश्वात्मा, चैतन्य, सर्वात्मा, सूक्ष्मात्मा, जीवात्मा, शिवात्मा, परमात्मा, द्रष्टा, साक्षी, सत्तारूप ही नावे आहेत. ॥३०॥

विकारामधील विकारी । अखंड नाना विकार करी । तयास वस्तु म्हणती भिकारी । परम हीन ।।३१।।

सर्व अचेतन वस्तूंमध्ये विकार घडवून आणण्याचे कार्य करणाऱ्या व स्वत:ही विकारी असलेल्या ईश्वराला, वेदान्तशास्त्राच्या ज्ञानाचे दारिद्र्य असणारा महामूढ, ब्रह्म समजतो. ॥३१॥

सर्व येकचि दिसती । अवघा येकंकार करिती । ते अवघी माईक स्थिती । चंचळामधें ।।३२।।

ईश्वर व ब्रह्म ह्यांना एकच समजणारे सबगोलंकार करतात. उत्पत्ती, स्थिती व लयाची चंचलता केवळ मायिक पदार्थात असते. ॥३२॥

चंचळ माया ते माईक । निश्चळ परब्रह्म येक । नित्यानित्यविवेक । याकारणे ।।३३।।

असे चंचळ पदार्थ मायिक असतात व हे एकमेव भेदशून्य परब्रह्म अचळ म्हणजे जन्म-जरा-मरण किंवा उत्पत्ती, स्थिती व लयाचे अतीत असते. मायिक अनित्य तर ब्रह्म नित्य असते. हा विवेक सतत सांभाळावा लागतो. ॥३३॥

जातो जीव तो प्राण । नेणे जीव तो अज्ञान । जन्मतो जीव तो जाण । वासनात्मक ।।३४।।

जो प्राणमय जाणता असतो तो जीव, जो जीव स्वरूप जाणीत नाही तो अज्ञानी व जन्माला येणारा तो वासनात्मक जीव होय ('जीव प्राणधारणे' असे जीवाचे लक्षण आहे. शरीरात प्राण असल्याशिवाय जीवत्व नाही. उलट जीवत्व असेल तर प्राण हवेतच. प्राण हा वायू असल्याने अचेतन असून जाणता नसतो.) ॥३४॥

ऐक्य जीव तो ब्रह्मांश । जेथें पिंडब्रह्मांडनिरास । येथें सांगितले विशेष । चत्वार जीव ।।३५।।

पिंड व ब्रह्मांडाचा निरास करून ध्यानाने जो जीव सविकल्प समाधी साधतो तो 'ऐक्यजीव' असून तो ब्रह्माचा अंश असतो. येथे जीवांचे चार विशेष प्रकार सांगितले (वास्तविक जीव ब्रह्मरूप आहे. पण तसा अनुभव येईपर्यंत क्रमाक्रमाने काही गोष्टी बसवून द्याव्या लागतात. अखंड ब्रह्मवस्तूमध्ये अंशअंशी भाव नाही. पण सविकल्प समाधीत किंचित द्वैत रहात असल्याने अंशाची कल्पना केली आहे.) ॥३५॥

असो हें अवघें चंचळ । चंचळ जाईल सकळ । निश्चळ तें निश्चळ । आदिअंतीं ।।३६।।

हे चारही जीव चंचळ आहेत. जे जे चंचळ असते ते नष्ट होते. चंचळाच्या आधी व नंतर निश्चळ असायचे तसे असते. ॥३६॥

आद्य मध्य अवसान । जे वस्तु समसमान । निर्विकारी निर्गुण निरंजन । निःसंग निःप्रपंच ।।३७।।

दृश्य सृष्टीच्या आधी, तिच्या स्थितिकाळी व लयानंतर ब्रह्म समानत्वाने असते (पूर्ण). ते निर्विकार, गुणातीत, निर्दोष, असंग व प्रपंचाचा मागमूस नसलेले असते. ॥३७॥

उपाधिनिरासें तत्वता । जीवशिवास ऐक्यता । विवंचून पाहों जातां । उपाधि कैंची ।।३८।।

विचारी साधकाने सद्गुरूंच्या सांगण्याप्रमाणे स्वतःच्या जीवाच्या पिंडरूप उपाधीचा व ईश्वराच्या ब्रह्मांडरूप उपाधीचा निरास केला असता तो त्याच्याशी ऐक्य पावतो. खरे तर विचार केल्यावर उपाधीसुद्धा कल्पितच आहे हे कळते. (पिंड व ब्रह्मांड पंचभौतिक असल्याने कल्पित असून त्यामुळे जीव व शिव ह्यांचे ऐक्यही कल्पितच आहे.) ॥३८॥

असो जाणणें तितुकें ज्ञान । परंतु होतें विज्ञान । मनें वोळखावें उन्मन । कोण्या प्रकारें ।।३९।।

एकूण कोणत्याही जाणण्याला ज्ञान म्हणतात. पण आत्मज्ञानानंतर 'मी ज्ञाता' हा सूक्ष्म अहंकार गेल्यावर त्याचे विज्ञान होते. पण आता असा प्रश्न येतो की उन्मन झालेली अवस्था मनाने कशी जाणावी? ॥३९॥

वृत्तीस न कळे निवृत्ति । गुणास कैंची निर्गुणप्राप्ती । गुणातीत साधक संतीं । विवेकें केलें ।।४०।।

वृत्ती आहे तोपर्यंत निवृत्ती कळत नाही! गुणात गुरफटलेल्याला गुणातीताचा अनुभव येत नाही!! पण सद्गुरू मात्र साधकांना विवेकाचा सांगोपांग उपदेश करून गुणातीत करतात. (मन, वृत्ती व गुण ह्यांपासून अलिप्त करतात). ॥४०॥

श्रवणापरीस मनन सार । मननें कळे सारासार । निजध्यासें साक्षात्कार । निःसंग वस्तु ।।४१।।

अध्यात्मशास्त्राच्या श्रवणाहून मनन अधिक उपयुक्त असून मननाने झालेल्या निर्णयाचे (मी ब्रह्म आहे) अखंड चिंतन केले असता 'असंग आत्मा मी आहे' असा साक्षात्कार होतो. मननाने सार आत्मा व असार पिंड-ब्रह्मांड ह्यांचा निर्णय होतो. ॥४१॥

निर्गुणीं जे अनन्यता । तेचि मुक्ति सायोज्यता । लक्ष्यांश वाच्यांश आतां । पुरे जाला ।।४२।।

जीव जेव्हा निर्गुण ब्रह्माहून अन्य न रहाता त्यात विलीन होतो तेव्हाच त्याला सायुज्यता मुक्ती लाभते. वाच्य जीव व लक्ष्य ब्रह्म हा विचार येथे समाप्त झाला. त्याचे काम संपले. ॥४२॥

अलक्षीं राहिलें लक्ष । सिद्धांतीं कैंचा पूर्वपक्ष । अप्रत्यक्षास कैचें प्रत्यक्ष । असोन नाहीं ।।४३।।

अन्त:करणवृत्ती जेव्हा तिला विषय न होणाऱ्या (अलक्ष्य) आत्मस्वरूपात हरवून जाते (लक्ष्य) तेव्हा आत्मरूप सिद्धान्ताचा अनुभव येतो. ह्या परिस्थितीत संशय किंवा विकल्प (पूर्व पक्ष) आणावा कोठून? आत्मा हा वस्तुत: साक्षात किंवा प्रत्यक्ष आहे. पण त्याचे प्रत्यक्षत्व परोक्ष नाही. अपरोक्ष आहे. स्वसंवेद्य आत्मा (अप्रत्यक्ष) ज्ञानेंद्रियांनी होणाऱ्या प्रमाणज्ञानाप्रमाणे (प्रत्यक्ष) कळत नाही. ।।४३।।

असोन माईक उपाधी । तेचि सहजसमाधी । श्रवणें वळावी बुद्धी । निश्चयाची ।।४४।।

देह व बुद्धीची मायिकउपाधी असूनही सतत श्रवण व मननाने 'मी ब्रह्म आहे' अशी निश्चयात्मक बुद्धी सहजपणे नांदावी. त्या अवस्थेला सहजसमाधी म्हणतात. (सांख्यबुद्धी– गीता. अ. २) ।।४४।।

इति श्रीदासबोधे श्रीगुरुशिष्यसंवादे 'सिद्धांतनिरूपणनाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सिद्धांतनिरूपण' नावाचा पहिला समास समाप्त

दशक अकरा : भीमदशक

समास दुसरा : चत्वारदेवनिरूपण

।। श्रीराम समर्थ ।।

येक निश्चळ येक चंचळ । चंचळीं गुंतलें सकळ । निश्चळ तें निश्चळ । जैसें तैसें ।।१।।

ह्या सृष्टीत एक चंचळ व एक निश्चळ असे दोनच मुख्य घटक आहेत असे आपण पाहिले. (११-१-१९) बहुतेक सर्व माणसे चंचळाच्या नादातच जीवन घालवितात. क्वचित कोणीतरी जसे निश्चळ असते तसे होऊन राहतो. ।।१।।

पाहे निश्चळाचा विवेक । ऐसा लक्षांमधें येक । निश्चळाऐसा निश्चयात्मक । निश्चळचि तो ।।२।।

निश्चळासंबंधी ज्ञानाची जिज्ञासा असणारा लाखो माणसांत एखादाच असतो. त्याचा निश्चय होऊन निश्चळाप्रमाणे तो निश्चळ होऊन रहातो. (उजेडी राहिले उजेड होऊन– नामदेव) ।।२।।

या निश्चळाच्या गोष्टी सांगती । पुन्हां चंचळाकडे धांवती । चंचळचक्रीं निघोन जाती । ऐसे थोडे ।।३।।

निश्चळ ब्रह्माविषयी बरेच लोक वाचतात, प्रवचन-कीर्तनात सांगतात व आपापसात चर्चाही करतात. पण ते संपल्याबरोबर पुन्हा चंचळाकडे धाव घेतात! चक्राकार गती असलेल्या देह व सृष्टिरूप चंचळातून मुक्त होणारे फार फार थोडे!! ।।३।।

चंचळीं चंचळ जन्मलें । चंचळाचि मधें वाढलें । अवघें चंचळचि बिंबलें । जन्मवरी ।।४।।

चंचळ सृष्टीत चंचळ जीव जन्माला येतात, चंचळ सृष्टीत जगतात, वाढतात व त्याचाच ठसा आयुष्यभर त्यांच्या मनात उमटून रहातो. ।।४।।

पृथ्वी अवघी चंचळाकडे । करणें तितुकें चंचळीं घडे । चंचळ सांडून निश्चळीं पवाडे । ऐसा कैंचा ।।५।।

पृथ्वी व पृथ्वीवरील जीवनातील सर्व घडामोडी चंचळ म्हणजे मायिक आहेत. मायिकाचा त्याग करून ब्रह्मवस्तूच्या अनुसंधानात रहाणारा कोठून आणावा! तो दुर्मिळच असतो. ।।५।।

चंचळ कांही निश्चळेना । निश्चळ कदापी चळेना । नित्यानित्यविवेकें जना । उमजे कांहीं ।।६।।

मायिक कधीच ब्रह्मरूप होत नाही व ब्रह्म केव्हाच स्वरूपापासून ढळत नाही. जिज्ञासूने नित्य व अनित्याचा विचार केल्यावर त्याला हे कळते. ।।६।।

कांहीं उमजलें तरी नुमजे । कांहीं समजलें तरी न समजे । कांहीं बुझे तरी निर्बुजे । किंचित मात्र ।।७।।

थोडे कळल्यासारखे वाटते पण खरे आकलन होत नाही. समजूत पटल्यासारखी वाटते पण गैरसमज रहातात, थोडे समाधान होते पण काही संशय राहूनच जातात. ।।७।।

संदेह अनुमान आणि भ्रम । अवघा चंचळामधें श्रम । निश्चळीं कदा नाहीं वर्म । समजलें पाहिजे ।।८।।

संशय, तर्क व भ्रम ह्यांनी होणारा त्रास फक्त मायिकासंबंधी होतो. ब्रह्मस्वरूपात ह्यातील काहीच नसते. पण वर्म कळले तर! ।।८।।

चंचळाकरी तितुकी माया । माईक जाये विलया । लहान थोर म्हणावया । कार्य नाहीं ।।९।।

ज्याचा चंचळात समावेश होतो ते सर्व मायिक असते व ते नष्ट होते. एका पेशीचा जीव व ईश्वर हे दोन्ही

सारखेच! एक परमाणू किंवा प्रचंड सूर्याचे मूल्य तेच!! लहानमोठे कोणी नाही. ॥९॥

सगट माया विस्तारली । अष्टधा प्रकृति फांपावली । चित्रविचित्र विकारली । नाना रूपें ।।१०।।

अत्यंत वेगवेगळी रूपे धरून चित्रविचित्र प्रकारे विकार पावून प्रगट होणारी मायाच सर्वत्र पसरली आहे. अष्टधा प्रकृती ही तिची घटना आहे. ॥१०॥

नाना उत्पत्ती नाना विकार । नाना प्राणी लाहान थोर । नाना पदार्थ मकार । नाना रूपें ।।११।।

चेतन व अचेतनाची कित्येक प्रकारे उत्पत्ती झाली. अस्ति, जायते इ. विकार झाले. एका पदार्थाची अनेक रूपांतरे (विकार) होऊ लागली (उदा. वाफ, पाणी, बर्फ.) लहान-मोठे अनेक प्राणी निर्माण झाले. पदार्थांचे कित्येक प्रकार तयार झाले. (उदा.– १०८ मूलतत्त्वे) ॥११॥

विकारवंत विकारलें । सूक्ष्म जडत्वास आलें । अमर्याद दिसों लागलें । कांहीचाबाहीं ।।१२।।

जे सहजच विकारशील आहे त्यात रूपांतरे (विकार) होऊन सूक्ष्माला घनत्व आले. कल्पना करता न येण्याएवढा त्याचा पसारा अमर्याद वाढला. ॥१२॥

मग नाना शरीरें निर्माण जालीं । नाना नामाभिधानें ठेविलीं । भाषा परत्वें कळों आलीं । कांहीं कांहीं ।।१३।।

त्यानंतर कित्येक योनींची कित्येक शरीरे तयार झाली. त्यांना वेगळी वेगळी नावे वेगळ्या वेगळ्या भाषेत ठेविली गेली. त्यांतील काही कळतात तर काही कळत नाहीत. ॥१३॥

मग नाना रीति नाना दंडक । आचार येकाहून येक । वर्तों लागले सकळ लोक । लोकाचारें ।।१४।।

त्यानंतर अनेक रीतीरिवाज, नियम, विधी इत्यादींच्या मर्यादेत लोकजीवन सुरू झाले. लोकाचार रूढ झाले. ॥१४॥

अष्टधा प्रकृतीचीं शरीरें । निर्माण जालीं लाहानथोरें । पुढें आपुलाल्या प्रकारें । वर्तों लागती ।।१५।।

अष्टधा प्रकृतीचीच पण लहानमोठी कित्येक शरीरे निर्माण होऊन ती त्यांच्या गटाला योग्य अशा पद्धतीने जगू लागली. (उदा.– मनुष्य गट, पशुगट, पक्षी गट इ.) ॥१५॥

नाना मतें निर्माण जालीं । नाना पाषांडे वाढलीं । नाना प्रकारीचीं उठिलीं । नाना बंडें ।।१६।।

पुढे मनुष्यांच्या गटात अनेक मते फोफावली. वेदांच्या विरुद्ध विचार पुढे आले तर काहींनी बंडाचे झेंडे उभे केले. ॥१६॥

जैसा प्रवाह पडिला । तैसाच लोक चालिला । कोण वारील कोणाला । येक नाहीं ।।१७।।

जेवढ्या मतांचे किंवा संप्रदायांचे प्रवाह निर्माण झाले त्या सर्वांत लोक शिरले. अशा परिस्थितीत कोणाला कोणी आवरावे? सर्वांना आवरणारा एकही नव्हता. ॥१७॥

पृथ्वीचा जाला गळांठा । येकाहून येक मोठा । कोण खरा कोण खोटा । कोण जाणे ।।१८।।

पृथ्वीवर सर्वत्र गोंधळ माजला. प्रत्येक संप्रदाय व त्याचा नेता स्वत:ला सर्वांहून श्रेष्ठ समजू लागला. त्यातील खरा कोणता नि खोटा कोणता हे कोणालाच कळेनासे झाले. ॥१८॥

आचार बहुकचिंत पडिला । कित्येक पोटासाठीं बुडाला । अवघा वरपंगचि जाला । साभिमानें ।।१९।।

धर्माचरणाच्या अनेक व्याख्या तयार होऊन ते त्यांच्या तावडीत सापडले. चरितार्थासाठी अनेकांनी स्वधर्म सोडला. आपण करतो तेच धर्माचरण असा अहंकार निर्माण होऊन दिखाऊपणालाच चांगले दिवस आले. ॥१९॥

देव जाले उदंड । देवांचें मांडलें भंड । भूतादेवतांचे थोतांड । येकचि जालें ।।२०।।

हजारो देवांची जागोजागी स्थापना होऊन त्यांच्या उपासनांचा गदारोळ सुरू झाला. पिशाच्चांना देवतांचा दर्जा प्राप्त झाला! ॥२०॥

मुख्य देव तो कळेना । काशास कांहींच मिळेना । येकास येक वळेना । अनावर ।।२१।।

खरा देव न कळल्याने तो बाजूलाच राहिला. उपासकांचे परस्परांशी पटेनासे झाले. कोणी कोणाला न जुमानल्याने सगळेच अनावर झाले. ॥२१॥

ऐसा नासला विचार । कोण पाहातो सारासार । कैंचा लहान कैंचा थोर । कळेचिना ।।२२।।

अशा रीतीने अस्सल ब्रह्मविचार नष्ट झाला. सार व असार विवेक करण्याची कोणालाच गरज उरली नाही. अध्यात्मविद्येचा अधिकारी व अनाधिकारी सर्व सारखेच झाले! ॥२२॥

शास्त्रांचा बाजार भरला । देवांचा गल्बला जाला । लोक कामनेच्या व्रताला । झोंबोन पडती ।।२३।।

प्रत्येकाने आपल्या संप्रदायाचे स्वतंत्र शास्त्र तयार करून ते विक्रीसाठी खुल्या बाजारात ठेवले. 'बा' आणि 'आई' असे शब्द जोडून देवांची मोठी गर्दी झाली (उदा.– म्हसोबा व मरगाई). तथाकथित उपासकांच्या सकाम व्रतवैकल्यांवर उड्या पडू लागल्या. ॥२३॥

ऐसें अवघें नासलें । सत्यासत्य हारपलें । अवघें अनायेक जालें । चहूंकडे ।।२४।।

उपासनेचे तत्त्वच सडले. सत्य व असत्य ह्यांतील विवेक नष्ट झाला. सर्वत्र अनागोंदी माजली. ॥२४॥

मतामतांचा गल्बला । कोणी पुसेना कोणाला । जो जे मतीं सांपडला । तयास तेंचि थोर ।।२५।।

मतमतांतरांचा गोंधळ उडाला. कोणी कोणाला विचारीना असे झाले. जो ज्या संप्रदायात अडकवला गेला त्याला तोच सर्वश्रेष्ठ वाटू लागला. ॥२५॥

असत्याचा अभिमान । तेणें पाविजे पतन । ह्मणोनियां ज्ञाते जन । सत्य शोधिती ।।२६।।

उपनिषदांशी विसंगत असलेल्या असत्य मताचा अभिमान धरला तर पतन होते. म्हणून जाणते लोक उपनिषदातील सत्य शोधतात. ॥२६॥

लोक वर्तती सकळ । तें ज्ञात्यास करतळामळ । आतां ऐका केवळ । विवेकी हो ।।२७।।

सर्व लोक ज्या सत्यानुभवासाठी चुकीचे वा बरोबर प्रयत्न करतात ते सत्य तळहातावरील आवळ्याप्रमाणे ज्ञात्याला स्पष्ट कळते. जे विवेकी आहेत त्यांनी त्यासंबंधी आता ऐकावे. ॥२७॥

लोक कोण्या पंथें जाती । आणि कोण्या देवास भजती । ऐसी हे रोकडी प्रचिती । सावध ऐका ।।२८।।

लोक कोणत्या देवांची उपासना करून भक्तिपंथाची वाटचाल कशी करतात ते ऐका. त्याचा सर्व तपशील स्पष्ट सांगतो. (रोकडी प्रचीती) ॥२८॥

मृत्तिका धातु पाषाणादिक । ऐसिया प्रतिमा अनेक । बहुतेक लोकांचा दंडक । प्रतिमादेवीं ।।२९।।

बहुतेक उपासकांची, माती, धातू व दगडांच्या अनेक प्रतिमांची देव म्हणून पूजा करण्याची पद्धत ठरून गेली आहे. ॥२९॥

नाना देवांचे अवतार । चरित्रें ऐकती येक नर । जप ध्यान निरंतर । करिती पूजा ।।३०।।

अनेक देवांच्या अनेक अवतारांची चरित्रे काहीजण वाचतात. काही सतत जप व ध्यान करतात तर काही पूजा करतात. ॥३०॥

येक सकळांचा अंतरात्मा । विश्वीं वर्ते जो विश्वात्मा । द्रष्टा साक्षी ज्ञानात्मा । मानिती येक ।।३१।।

सर्व जीवांचा अंतरात्मा, विश्वात व्यापून राहणारा विश्वात्मा व द्रष्टा किंवा साक्षी असणारा चित्घन आत्मा ह्यांना

काहीजण देव मानतात. ॥३१॥

येक ते निर्मळ निश्चळ । कदापी नव्हेति चंचळ । अनन्यभावें केवळ । वस्तुच ते ।।३२।।

काहीजण निर्मळ व निश्चळ ब्रह्मस्वरूपाची 'सोऽहं' अशा भावाने उपासना करून ब्रह्मच होतात. मायिकाकडे ढुंकूनही पहात नाहीत. ॥३२॥

येक नाना प्रतिमा । दुसरा अवतारमहिमा । तिसरा तो अंतरात्मा । चौथा तो निर्विकारी ।।३३।।

१) प्रतिमा २) अवतार ३) अंतरात्मा ४) निर्विकार ब्रह्म अशा चार प्रकारांनी उपासना करतात. ॥३३॥

ऐसे हे चत्वार देव । सृष्टीमधील स्वभाव । यावेगळा अंतर्भाव । कोठेंचि नाहीं ।।३४।।

अशा ह्या चार देवांची लोक स्वाभाविकपणे उपासना करतात. ह्याहून पाचवा देव कोठेच अस्तित्वात नाही. (किंवा ते चार देव सृष्टीत स्वभावाने व्यापून राहतात.) ॥३४॥

अवघें येकचि मानिती । ते साक्ष देव जाणती । परंतु अष्टधा प्रकृति । वोळखिली पाहिजे ।।३५।।

हे चारी देव एकच आहेत असे जे मानतात ते सर्वसाक्षी परमेश्वराला जाणतात. पण असे मानणाऱ्यांनी असार असलेली अष्टधा प्रकृती त्याहून वेगळी आहे ह्याचे भान ठेविले पाहिजे. ॥३५॥

प्रकृतीमधील देव । तो प्रकृतीचा स्वभाव । भावातीत माहानभाव । विवेकें जाणावा ।।३६।।

माती, धातू ह्यांचे तयार केलेले देव, त्यांना देव मानले तरी, पंचभौतिक प्रकृतीचेच असतात. प्रकृतीला भाव म्हणजे जन्म असतो. खरा देव 'अज' म्हणजे कोणत्याही प्रकारे प्रगट होत नाही. त्या भावातीत देवाचा श्रेष्ठ अनुभव विवेकानेच घ्यावा लागतो. ॥३६॥

जो निर्मळास ध्याईल । तो निर्मळचि होईल । जो जयास भजेल । तो तद्रूप जाणावा ।।३७।।

जो विमल ब्रह्माचे ध्यान करील (अहंग्रहध्यान) तो ब्रह्मच होईल. जो ज्याचे ध्यान करतो तो तोच होतो, हे लक्षात घ्यावे. ॥३७॥

क्षीर नीर निवडिती । ते राजहंस बोलिजेती । सारासार जाणती । ते महानभाव ।।३८।।

दूध व पाणी वेगळे करणारांना राजहंस म्हणतात. त्याप्रमाणे सार व असार यांचा विवेक करणारांना महानुभाव म्हणतात. ॥ ३८ ॥

अरे जो चंचळास ध्याईल । तो सहजचि चळेल । जो निश्चळास भजेल । तो निश्चळचि ।।३९।।

अरे, जो मायिकाचे ध्यान करील त्याला मायिकाचाच लाभ होईल व ब्रह्माचे ध्यान करील तो ब्रह्मच होईल. ॥३९॥

प्रकृतीसारिखें चालावें । परी अंतरी शाश्वत वोळखावें । सत्य होऊन वर्तावें । लोकांऐसें ।।४०।।

देहात राहणाऱ्याने सृष्टी व इतर देहधाऱ्यात जीवन जगताना लोकव्यवहार सांभाळावा. पण आत शाश्वत आत्मा ओळखून असावे. ब्रह्मरूप होऊन जनरीतीप्रमाणे वागावे किंवा सत्याची कास न सोडता चारचौघात, चारचौघांप्रमाणे वागावे (सत्य होऊन म्हणजे ब्रह्म होऊन.) ॥४०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'चत्वारदेवनिरूपणनाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'चत्वारदेवनिरूपण' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक अकरावा : भीमदशक

समास तिसरा : सिकवणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

बहुतां जन्मांचा सेवट । नरदेह सांपडे अवचट । येथें वर्तावें चोखट । नीतिन्यायें ।।१।।

कित्येक जन्ममरणे झाल्यावर पापपुण्य समान होता क्षणी अचानक मनुष्य शरीर प्राप्त होते. त्यात न्यायनीतीचे पवित्र जीवन जगावे. ॥१॥

प्रपंच करावा नेमक । पाहावा परमार्थविवेक । जेणेंकरितां उभय लोक । संतुष्ट होती ।।२।।

प्रपंच आश्रमांच्या नियमाप्रमाणे करीत सारासारादी पारमार्थिक विवेक सांभाळून असावे. त्यामुळे इह व पर अशा दोन्हीं लोकांचे सार्थक होते. ऐहिक व पारमार्थिक जीवन समृद्ध होते. ॥२॥

शत वरुषे वय नेमिलें । त्यात बाळपण नेणतां गेलें । तारुण्य अवघें वेचलें । विषयांकडे ।।३।।

मानवी आयुष्य साधारणत: शंभर वर्षांचे आहे. त्यातील बालपण अज्ञानात व तारुण्य अनियंत्रित विषय भोगात सरते. ॥३॥

वृद्धपणी नाना रोग । भोगणें लागे कर्मभोग । आतां भगवंताचा योग । कोणे वेळे ।।४।।

वृद्धपणात अनेक रोग जडून सर्व कर्म भोग भोगावे लागतात. अशा स्थितीत ब्रह्मज्ञानासाठी वेळच कोठे उरतो? ॥४॥

राजिक देविक उदेग चिंता । अन्न वस्त्र देहममता । नाना प्रसंगे अवचिता । जन्म गेला ।।५।।

राजदंडाचे भय, दैवी आपत्ती, व्यवहारातील उद्वेग, प्रापंचिक चिंता, अन्नवस्त्रांसाठी होणारे श्रम, देहाची कौतुके व येणाऱ्या प्रसंगांना तोंड देत आयुष्य निघून जाते. ॥५॥

लोक मरमरों जाती । वडिलें गेलीं हे प्रचिती । जाणत जाणत निश्चिती । काये मानिलें ।।६।।

अनेकांचा मृत्यू झाल्याचे कळते. वडीलधाऱ्यांचा मृत्यू समोरच झालेला असतो. हे सर्व ठाऊक असून स्वत:च्या अमरत्वाची खात्री कोणत्या आधाराने बाळगावी? ॥६॥

अग्न गृहासी लागला । आणि सावकास निजेला । तो कैसा म्हणावा भला । आत्महत्यारा ।।७।।

घर पेटले असता शांतपणे झोपलेल्याला शहाणा कोण म्हणेल? तो आत्मघातकीच समजला पाहिजे. ॥७॥

पुण्यमार्ग अवघा बुडाला । पापसंग्रह उदंड जाला । येमयातनेचा झोला । कठीण आहे ।।८।।

जर पुण्याचरणाकडे दुर्लक्ष करून पापांचा साठाच वाढवीत राहिले तर पुढे यमयातनांचा दणका अटळ आहे. ॥८॥

तरी आता ऐसें न करावें । बहुत विवेकें वर्तावें । इह लोक परत्र साधावें । दोहीकडे ।।९।।

म्हणून आता तरी असे न करता व्यवहार व परमार्थ या दोन्हीतील विवेक सांभाळून इह व परत्राचे कल्याण साधावे. ॥९॥

आळसाचे फळ रोकडें । जांभया देऊन निद्रा पडे । सुख म्हणौन आवडे । आळसी लोकां ।।१०।।

आळसाचा परिणाम प्रत्यक्षच दिसतो. आळशी माणूस जांभया देत झोपलेला असतो. आळसाने जी तथाकथित

विश्रांती मिळते त्या सुखासाठी सर्वांना आळस प्रिय असतो. ॥१०॥

साक्षेप करितां कष्टती । परंतु पुढे सुरवाडती । खाती जेविती सुखी होती । येत्नेंकरूनी ।।११।।

प्रयत्न करताना कष्ट होतात खरे. पण पुढे सुख मिळते. त्या प्रयत्नांच्या बळावरच खाऊन-पिऊन सुखाने राहता येते. ॥११॥

आळस उदास नागवणा । आळस प्रेत्न बुडवणा । आळसें करंटपणाच्या खुणा । प्रकट होती ।।१२।।

त्याउलट आळसाने उत्साह संपून माणूस दरिद्री होतो. प्रयत्न शिथिल होऊन करंटेपणाची सर्व लक्षणे दिसू लागतात. ॥१२॥

म्हणौन आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा । अरत्रीं परत्रीं जीवा । समाधान ।।१३।।

म्हणून आळसाचा सर्वथा त्याग करावा. तरच वैभव प्राप्त होणे शक्य आहे. त्यामुळे ऐहिक व पारलौकिक जीवनात समाधान मिळते. ॥१३॥

प्रेत्न करावा तो कोण । हेंचि ऐका निरूपण । सावध करून अंत:करण । निमिष्य येक ।।१४।।

प्रयत्न कसा करावा त्यासंबंधी आता सावधानतेने ऐका. ॥१४॥

प्रात:काळीं उठावे । कांहीं पाठांतर करावें । येथानशक्ति आठवावें । सर्वोत्तमासी ।।१५।।

पहाटे उठून अध्यात्म ग्रंथांचे पाठांतर करावे व आपल्या समजुतीप्रमाणे ईश्वराचे स्मरण चिंतन करावे. ॥१५॥

मग दिशेकडे जावें । जे कोणासिच नव्हे ठावें । शौच्य आच्मन करावें । निर्मळ जळें ।।१६।।

नंतर शौचमुखमार्जनादी आटोपून स्वच्छ पाण्याने आचमन करावे. उष:पान करावे. ॥१६॥

मुखमार्जन प्रात:स्नान । संध्या तर्पण देवतार्चन । पुढें वैश्वदेवउपासन । येथासांग ।।१७।।

तोंड धुणे, स्नान, प्रात:संध्या व घरातील देवांची पूजा करून पुढे यथाविधी पंचमहायज्ञ करावेत. (भूत, मनुष्य, मातृपितृ इ.) ॥१७॥

कांही फळाहार घ्यावा । मग संसारधंदा करावा । सुशब्दें राजी राखावा । सकळ लोक ।।१८।।

काही फळाहार (हलका फराळ) घेऊन प्रापंचिक उद्योगाला लागावे. सर्वांशी सरळ व गोड भाषेत बोलून त्यांना संतुष्ट ठेवावे. ॥१८॥

ज्या ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबर्दार । दुश्चितपणें तरी पोर । वेढा लावी ।।१९।।

ज्याचा जो उद्योग, व्यवहार, व्यवसाय, नोकरी इ. असेल त्यात सतत सावध व जागरूक असावे. गाफील राहिल्यास एखाद्या पोराकडूनही फसगत होते. सामान्य माणूसही फसवून जातो. ॥१९॥

चुके ठके विसरे सांडी । आठवण जालियां चर्फडी । दुश्चित आळसाची रोकडी । प्रचित पाहा ।।२०।।

चूक करणे, फसणे, विसरणे, हारवणे इ. गोष्टी होऊन नंतर त्या लक्षात आल्या की स्वत:वरच चरफडण्यापलीकडे काही करता येत नाही. दुर्लक्ष व आळसाचे हे प्रत्यक्ष फळ आहे! ॥२०॥

याकारणें सावधान । येकाग्र असावें मन । तरी मग जेवितां भोजन । गोड वाटे ।।२१।।

म्हणून सतत सावध रहावे. एकाग्र चित्ताने व्यवहार करावेत. म्हणजे सुखाने जेवता येते. (चरफडण्याचे कारण नसते.) ॥२१॥

पुढें भोजन जालियांवरी । कांही वाची चर्चा करी । येकांतीं जाऊन विवरी । नाना ग्रंथ ।।२२।।

जेवणानंतर व्यवसायाशी संबंधित ज्ञान वाढण्यासाठी वाचन करावे, संबंधितांशी चर्चा करावी. एकांतात बसून अनेक ग्रंथांचा अभ्यास करून बहुश्रुत व्हावे. ॥२२॥

तरीच प्राणी शाहाणा होतो । नाहींतरी मूर्खचि राहतो । लोक खाती आपण पाहतो । दैन्यवाणा ।।२३।।

यानेच बुद्धीचा विकास होतो. नाहीतर 'यथाजात' म्हणजे जन्मताना जेवढी बुद्धी असते तेवढीच असणारा मूर्ख राहतो! सभोवतीचे लोक प्रगती करताना दिसतात (खाती) व हा तसाच राहून आर्थिक, लौकिक, बौद्धिक दारिद्र्य भोगतो. ।।२३।।

ऐक सदेवपणाचें लक्षण । रिकामा जाऊं नेदी येक क्षण । प्रपंचवेवसायाचें ज्ञान । बरें पाहे ।।२४।।

आपल्या आयुष्याचा एक क्षणही वाया जाऊ न देणे हेच भाग्याचे लक्षण होय. प्रपंच चालविण्यासाठी स्वीकारलेल्या व्यवसायाचे उत्तम ज्ञान आपल्याला असावे हे बरे. ।।२४।।

कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांसी उगवी । शरीर कारणीं लावी । कांही तरी ।।२५।।

स्वत: कष्ट करून काही मिळवावे व मगच पाटावर जेवण्यासाठी बसावे. अडचणीत असणाऱ्यांना यथाशक्ती मदत करावी. व ह्या ना त्या प्रकारे मनुष्यजन्माचे सार्थक करावे. ।।२५।।

कांहीं धर्मचर्चा पुराण । हरीकथा निरूपण । वायां जाऊं नेदी क्षण । दोहींकडे ।।२६।।

धर्मासंबंधी अभ्यास व विचारविनिमय करून पुराण, हरिकथा इ. श्रवण करावे. व्यवहार व अध्यात्म साधण्याच्या दृष्टीने वेळ जराही फुकट घालवू नये. दोन्ही साधावेत. ।।२६।।

ऐसा जो सर्वसावध । त्याचा कैंचा असेल खेद । विवेकें तुटला समंध । देहबुद्धीचा ।।२७।।

असा जो सर्वांगाने सावध असेल त्याला दु:ख भोगण्याचे कारणच कसे उरेल? कर्म, धर्म, उपासना व अध्यात्म यांच्या विवेकाने त्याची देहबुद्धी क्षीण होऊन ती नष्ट होते. ।।२७।।

आहे तितुकें देवाचें । ऐसे वर्तणें निश्चयाचें । मूळ तुटें उद्वेगाचें । येणें रीतीं ।।२८।।

जे जे काही 'आहे' ते सर्व देवाचे आहे, असा सहज निश्चय झाल्यानंतर दु:खाचे कारणच उरत नाही. ।।२८।।

प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थीं पंचिकर्ण । महावाक्याचें विवरण । करितां सुटे ।।२९।।

प्रपंच व्यवहारासाठी पैसे हवेतच. परमार्थामध्ये पंचीकरण व 'तत्त्वमसि' सारख्या महावाक्याचे शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण गुरुमुखातून होणे अनिवार्य आहे. अशा रीतीने प्रपंच व जन्ममरणांचे चक्र या दोन्हीतून सुटका होते. ।।२९।।

कर्म उपासना आणि ज्ञान । येणें राहे समाधान । परमार्थाचें जें साधन । तेंचि ऐकत जावें ।।३०।।

वेदविहित निष्काम कर्म व उपासना, श्रीगुरुप्रणीत अध्यात्मविद्या व मोक्षाची साधने यांचेसंबंधी सतत श्रवण करीत रहावे. ।।३०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सिकवणनिरूपणनाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सिकवणनिरूपण' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक अकरावा : भीमदशक

समास चवथा : विवेकनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ब्रह्म म्हणिजे निराकार । गगनासारिखा विचार । विकार नाहीं निर्विकार । तेंचि ब्रह्म ।।१।।

ब्रह्म अरूप असल्याने निराकार आहे. त्याला आकाशाचा दृष्टान्त देता येतो. ज्याला रूप असते त्यालाच विकार असतात. अरूप ब्रह्म निर्विकार आहे. ॥१॥

ब्रह्म म्हणिजे निश्चळ । अंतरात्मा तो चंचळ । द्रष्टा साक्षी केवळ । बोलिजे तया ।।२।।

ब्रह्म अचल आहे. ईश्वर चंचल आहे. ईश्वराला केवळ साक्षी किंवा केवळ द्रष्टा म्हणतात. ॥२॥

तो अंतरात्मा म्हणिजे देव । त्याचा चंचळ स्वभाव । पाळिताहे सकळ जीव । अंतरीं वसोनी ।।३।।

तो अंतरात्मा किंवा ईश्वर हाच देव असून त्याला उत्पत्ती, स्थिती व लय आहेत. (चंचळ) तो शरीरात व्यापून राहून जीवात्म्याचे नियमन करतो. (पाळणे = नियमन.) ॥ ३ ॥

त्यावेगळे जड पदार्थ । तेणेंवीण देह वेर्थ । तेणेंचि कळे परमार्थ । सकळ कांहीं ।।४।।

ईश्वररूप देवाहून जे जे वेगळे आहे ते ते अचेतन असून तो नसेल तर देहही अचेतन होतो. (ईश्वरचैतन्य व जीवचैतन्य यात केवळ उपाधीचाच भेद आहे.) कळणे हे चैतन्याचे लक्षण असून त्यामुळेच परमार्थासह सर्व विषयांचे ज्ञान होते. ॥४॥

कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग । प्रवृत्तिमार्ग निवृत्तिमार्ग । देवचि चालवी ।।५।।

कर्म, उपासना, ज्ञान, गुरू, प्रवृत्ती, निवृत्ती इत्यादी परमार्थाचे सर्व मार्ग देवच चालवतो. त्याचेमुळे ते अस्तित्वात आले व त्याच्या सत्तेवर ते जीवाला कळतात. (सर्व मार्ग वेदप्रणीत आहेत. वेद ईश्वराने केले आहेत.) ॥५॥

चंचळेविण निश्चळ कळेना । चंचळ तरी स्थिरावेना । ऐसें हे विचार नाना । बरे पाहा ।।६।।

ब्रह्माचे ज्ञान होण्यासाठी मायिक बुद्धीची (चिदाभासासह) आवश्यकता आहे. बुद्धी, देहाबरोबर येते, राहते व जाते. (चंचळ). म्हणजे निश्चळाचे ज्ञान चंचळाशिवाय होत नाही! असे गुंतागुंतीचे विचार नीट समजावून घ्यावेत. (चंचळ हा अध्यारोप आहे.) ॥६॥

चंचळनिश्चळाची संधी । तेथें भांबावते बुद्धि । कर्ममार्गाचे जे विधी । ते मग ऐलिकडे ।।७।।

चंचळ बुद्धिवृत्ती व निश्चळ आत्मा यांच्या संधीचा ध्यानकाळी शून्यरूपाने अनुभव येऊन तेथे बुद्धी गोंधळून जाते. कर्ममार्गातील सर्व यज्ञादी विधी चंचळातील म्हणजे मायिक असतात. त्यात बुद्धिवृत्ती अडकून पडली तर ती अलीकडेच थांबते. (पाचव्या ओवीतील पहिल्याच कर्ममार्गाचा येथे संदर्भ लक्षात घ्यावा लागतो. कर्माभिमानामुळे ध्यान नाही. ते नसल्याने शून्यही नाही. मग आत्मानुभव कोठला?) ॥७॥

देव या सकळांचे मूळ । देवास मूळ ना डाळ । परब्रह्म तें निश्चळ । निर्विकारी ।।८।।

सृष्टी, जीव, बंधन, धर्म, शास्त्र, साधना, श्रीगुरू, मोक्ष इ. सर्वांचे अस्तित्व देवामुळे आहे. त्या ब्रह्मरूप देवाला ना आदि ना अन्त! ते अचल असून निर्विकार आहे. ॥८॥

निर्विकारी आणि विकारी । येक म्हणेल तो भिकारी । विचाराची होते वारी । देखतदेखतां ।।९।।

निर्विकार ब्रह्म व विकारमय सृष्टी या दोन्हींना सारखेच समजणाऱ्याची बुद्धी अज्ञानामुळे दरिद्री असते. ती बुद्धी पाहता पाहता शास्त्रशुद्ध विचारांना तिलांजली देते. (वारी) ॥९॥

सकळ परमार्थास मूळ । पंचीकर्ण माहावाक्य केवळ । तेंचि करावें प्रांजळ । पुनःपुन्हां ।।१०।।

म्हणून परमार्थशास्त्राचे वर्म असलेले पंचीकरण व महावाक्यविवरण यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास पुन्हां पुन्हां करावा. ॥१०॥

पहिला देह स्थूळकाया । आठवा देह मूळमाया । अष्ट देह निर्शलियां । विकार कैंचा ।।११।।

'स्थूल' हे पिंडाचे पहिले शरीर व मूळमाया हे ईश्वराचे आठवे शरीर (पिंडाचे चार धरून) अशा आठी शरीरांचा निरास केल्यावर माया व विकार उरतील कसे? (पहा १०-१०-१४) ॥११॥

याकारणें विकारी । साचाऐसी बाजीगरी । येक समजे येक खरी । मानिताहे ।।१२।।

पण विकारी मायिक पदार्थ सत्य असल्याचा भ्रम होतो. (बाजीगरी.) जो ज्ञाता असतो तो मायिक पदार्थांचे मिथ्यात्व जाणतो. अज्ञानी असतो त्याला मायिक पदार्थ सत्य वाटतो. ॥१२॥

उत्पत्ति स्थिती संव्हार । यावेगळा निर्विकार । कळायासाठीं सारासार । विचार केला ।।१३।।

ज्याला उत्पत्ती, स्थिती व लय असतो तो पदार्थ विकारी असतो. त्याहून निराळी अज, अजर व अमर चेतना वस्तू ब्रह्म होय. हे समजण्यासाठी ब्रह्म सार व माया असार हा विचार ठसावा. ॥१३॥

सार असार दोनी येक । तेथें कैंचा उरला विवेक । परीक्षा नेणती रंक । पापी करंटे ।।१४।।

सार व असार एकच असे मानले तर तेथे विवेक उरतोच कोठे? हा विवेक न जाणणारे बुद्धीने दरिद्री, जन्मोजन्मीचे पापी व चालू जन्मात करंटे असतात. ॥१४॥

जो येकचि विस्तारला । तो अंतरात्मा बोलिला । नाना विकारीं विकारला । निर्विकारी नव्हे ।।१५।।

जो एकच असून सृष्टीच्या रूपाने विस्तार पावला तो ईश्वर होय. (तो सृष्टीचे उपादान कारण आहे.) ब्रह्म निर्विकार असल्याने ते विकारी जगाच्या रूपाने विस्तार पावणे शक्य नाही. ॥१५॥

ऐसें प्रगटचि आहे । आपुल्या प्रत्ययें पाहे । काय राहे काय न राहें । हे कळेना ।।१६।।

हे तर शास्त्रदृष्टीने उघडच कळते व त्याचा यथार्थ विचाराने निश्चय होतो. शास्त्रदृष्टी नसेल तर शाश्वत काय व अशाश्वत काय याचाही निवाडा होत नाही. ।१६॥

जें अखंड होत जातें । जें सर्वदा संव्हारतें । रोकडें प्रचितीस येतें । जनामधें ।।१७।।

जे होते ते जाते असा अखंड अनुभव सर्वांना प्रत्यक्ष येतो. ॥१७॥

येक रडे येक चर्फडी । येकांची धरी नरडी । येकमेकां झोंबती बराडी । दुकळ्ळले जैसें ।।१८।।

(सार व असाराचा विवेक सुटल्याचा परिणाम-) कोणी दुःख किंवा शोक करतो, कोणी दांतओठ खातो, एक दुसऱ्याची नरडी धरतो, कोणी दुष्काळ पडल्याप्रमाणे एकमेकांना भिडून लुटालूट करतात. ॥१८॥

नाहीं न्याये नाहीं नीति । ऐसे हे लोक वर्तती । आणि अवघेंच सार म्हणती । विवेकहीन ।।१९।।

न्याय व नीतीची तमा न बाळगणारे लोक समाजात असताना, 'सर्वं खल्विदं ब्रह्म' या मंत्राचा आधार घेऊन सर्वच सार आहे असे अविचाराने म्हणतात. ('सर्व ब्रह्म आहे' हा सिद्धान्त आहे. अविद्येच्या साम्राज्यात हा सिद्धान्त खरा असला तरी फसवा आहे.) ॥१९॥

धोंडे सांडून सोनें घ्यावें । माती सांडून अन्न खावें । आणि आवघेंचि सार म्हणावें । बाष्कळपणें ।।२०।।

व्यवहारामध्ये लोक दगडधोंडे टाकून सोने घेतात. जेवताना माती न खाता अन्नच खातात व तरीही सर्वच सार

असे म्हणतात! (सर्वच सार असेल तर दगड व माती का स्वीकारू नये?) ही निव्वळ निरर्थक बडबड होय. ॥२०॥

म्हणौनि हा विचार करावा । सत्यमार्ग तोचि धरावा । लाभ जाणोन घ्यावा । विवेकाचा ।।२१।।

असा व्यवस्थित विचार करून आपल्या शाश्वत हिताचा मार्ग धरावा. सार व असार विवेकातच लाभ आहे म्हणून तो स्वीकारावा. ॥२१॥

सारगार येकचि सरी । तेथें परीक्षेस कैंची उरी । याकारणें चतुरीं । परीक्षा करावी ।।२२।।

हिरा व गारगोटी ह्यांची किंमत सारखीच समजणाराला परीक्षेसाठी काहीच उरत नाही. म्हणून चतुराने आधीच परीक्षा करावी. ॥२२॥

जेथे परीक्षेचा अभाव । तेथें दे घाव घे घाव । सगट सारिका स्वभाव । लौंदपणाचा ।।२३।।

जेथे परीक्षा करण्याची अक्कल नसते तेथे गुद्दागुद्दीच होते. सर्व सरसकट सारखे मानल्याने मूर्खपणाच पदरी पडतो. ॥२३॥

घेव ये तेंचि घ्यावें । घेव न ये तें सोंडावें । उंच नीच वोळखावें । त्या नाव ज्ञान ।।२४।।

जे घेण्यासारखे असते तेच घ्यावे. जे टाकण्यासारखे असते ते टाकावेच. मौल्यवान व हलके यांची पारख हेच ज्ञान. ॥२४॥

संसारसांतेस आले । येक लाभें अमर जाले । येक ते करंटे ठकले । मुदल गेलें ।।२५।।

संसाराच्या बाजाराला येणारे काही, 'मी ब्रह्म' असा अनुभव घेऊन अमृतरूप झाले. दुसरे करंटे लोक फसले व त्यांना मिळालेल्या मनुष्यजन्माचे मुद्दलच घालवून बसले! ॥२५॥

जाणत्यानें ऐसें न करावें । सार तेंचि शोधून घ्यावें । असार तें जाणोन त्यागावे । वमक जैसें ।।२६।।

शहाण्याने असे न करता सार विचार करून स्वीकारावे व असार उलटीच्या अन्नाप्रमाणे टाकावे. ॥२६॥

तें वमक करी प्राशन । तरी तें स्वानाचें लक्षण । तेथें सुचिस्मंत ब्राह्मण । काय करी ।।२७।।

उलटीचे अन्न खाणे हे कुत्र्याचे काम आहे. एखाद्याने तेच खायचे ठरविले तर तेथे पवित्र ब्राह्मणाने काय करावे! तो ते खाणाऱ्याला थांबवू शकत नाही. ॥२७॥

जेहिं जैसें संचित केलें । तयास तैसेंचि घडलें । जें अभ्यासीं पडोन जडलें । तें तों सुटेना ।।२८।।

अनेक जन्मात जे कर्म केलेले असते त्यानुसारच चालू जन्मात बुद्धी होते व त्याच सवयी जडतात, त्या सुटत नाहीत. ॥२८॥

येक दिव्यान्ने भक्षिती । येक विष्ठा सावडिती । आपल्या वडिलांचा घेती । साभिमान ।।२९।।

कोणाला पक्वान्नांचे सुग्रास भोजन मिळते तर दुसरे अन्नासाठी उकिरडे चिवडीत बसतात. त्या दोघांनाही आपापल्या कुळांचा अभिमान असतो. ॥२९॥

असो विवेकविण । बोलणें तितुका सीण । कोणीयेकें श्रवण मनन । केलेंचि करावें ।।३०।।

एकूण काय तर विवेकाशिवाय केलेला विचार व कृती हा केवळ शीण होय. म्हणून प्रत्येकाने अध्यात्म शास्त्राचे श्रवण व मनन पुन्हा पुन्हा करीत रहावे. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'विवेकनिरूपणनाम' समास चवथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'विवेकनिरूपण' नावाचा चवथा समास समाप्त

दशक अकरावा : भीमदशक

समास पाचवा : राजकारणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

कर्म केलेंचि करावें । ध्यान धरिलेंचे धरावें । विवरलेंचि विवरावें । पुन्हा निरूपण ।।१।।

स्नानसंध्यादी धर्मकर्म पुन्हा पुन्हा (नित्य) करावे, ध्यानाभ्यास तोच व तसाच रोज करावा व प्रवचनात तोच वेदान्त पुन्हा पुन्हा सविस्तर ऐकावा. ॥१॥

तैसें आम्हांस घडलें । बोलिलेंचि बोलणें पडिलें । कां जें बिघडलेंचि घडलें । पाहिजे समाधान ।।२।।

तसेच मलाही करावे लागले. सांगितलेलेच पुन्हा सांगावे लागले. कारण एकदा समजूत पटली तरी ती पुन्हा पुन्हा बिघडते. ॥२॥

अनन्य राहे समुदाव । इतर जनास उपजे भाव । ऐसा आहे अभिप्राव । उपायाचा ।।३।।

ती बिघडली तर झालेला लोकसंग्रह बिघडतो. तो टिकून रहावा, व इतर लोकांना आवड निर्माण व्हावी म्हणून असे करावे लागते. ॥३॥

मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण । तिसरें तें सावधपण । सर्वविषई ।।४।।

लोकसंग्रहासाठी प्रथम सगुण हरीची कथा असलेले कीर्तन करावे व निर्गुण हरीच्या ज्ञानासाठी प्रवचन करावे. नंतर लोकव्यवहार सुरळीत चालून धर्म व राष्ट्राच्या रक्षणासाठी राजकारण करावे. समाजाची भौतिक प्रगती व्हावी. त्यानंतर व्यवहार व परमार्थ सिद्धीला जाण्यात येणाऱ्या संभाव्य अडचणींचा विचार करून त्या न येण्यासाठी सावध रहावे. त्या लक्षात घेऊन त्याचे निवारण आधीच करून ठेवावे. (ही व यापुढील शिकवण सामान्य व्यक्ती व समाजाचा नेता या दोघांसाठी आहे. ही शिकवण अमलात आणणारी सामान्य व्यक्ती पुढे नेता बनेल.) ॥४॥

चौथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप । अन्याये थोर अथवा अल्प । क्ष्मा करीत जावे ।।५।।

कष्टांची पर्वा न करता योग्य दिशेने सतत काम करीत रहावे. संस्कृती, धर्म व अध्यात्म याविषयी घेतल्या जाणाऱ्या शंकांचे शास्त्रशुद्ध पद्धतीने निवारण करावे. विचारलेल्या प्रश्नांची तर्कसंगत उत्तरे द्यावीत. (आक्षेप = शंका व प्रश्न.) कुटुंब व समाजात बेदिली होऊ नये म्हणून संबंधितांकडून होणारे लहानमोठे त्रास हसतमुखाने सोसावेत. (या बाबतीत स्वकीय व समाजाचे किंवा राष्ट्राचे वैरी यात भेदभाव केलाच पाहिजे. भोंगळपणा नको असे समर्थांचेच सांगणे आहे. पहा-१३-१०) ॥५॥

जाणावें पराचें अंतर । उदासीनता निरंतर । नीतिन्यायासि अंतर । पडोंच नेदावें ।।६।।

दुसऱ्यांच्या स्वभावाचे परीक्षण करून तो जाणून घ्यावा. स्वत:ची अनासक्ती सांभाळीत न्याय व नीती यांचा कधीही त्याग करू नये. (हा समर्थांचा उपदेश अत्यंत मोलाचा आहे. यात व्यक्ती व समाज यांचे हित सामावलेले आहे.) ॥६॥

संकेतें लोक वेधावा । येकूनयेक बोधावा । प्रपंचहि सावरावा । येथानशक्त्या ।।७।।

थोड्या पण नेमक्या शब्दात बोलून लोकांचे लक्ष वेधून घ्यावे व जास्तीत जास्त लोकांना धर्म, नीती, अध्यात्म व राजकारण समजावून सांगावे. स्वत:च्या प्रपंचाबरोबरच शक्तीनुसार इतरांच्याही प्रपंचाला हातभार लावावा. ॥७॥

प्रपंचसमयो वोळखावा । धीर बहुत असावा । संमंध पडों नेदावा । अति परी तयाचा ।।८।।

प्रपंचात येणारे प्रसंग जाणून त्यांना पूर्ण धैर्याने सामोरे जावे. कोणाशीही फार सलगीचे संबंध वाढवू नयेत.

(त्यामुळे पक्षपाताचे आरोप होऊ शकतात. भीड पडू शकते. शब्दाची किंमत कमी होते.) ॥८॥

उपाधीसी विस्तारावें । उपाधींत न संपडावें । नीचत्व पहिलेंच घ्यावें । आणि मूर्खपण ।।९।।

आपल्या कार्याचा व्याप व कार्यक्षेत्र वाढवावे. पण त्यात गुंतून पडू नये. (व्याप-धर्मकारण, समाजकारण, अध्यात्मकारण इ.) आपण कोणी मोठे व विद्वान आहोत अशी भूमिका कार्य करताना नसावी. (त्यामुळे सर्वांशी जुळवून घेणे सोपे पडते. कार्यनाश होत नाही.) ॥९॥

दोष देखोन झांकावे । अवगुण अखंड न बोलावे । दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करुनी ।।१०।।

इतरांचे दोष लक्षात आले तरी त्यांची वाच्यता करू नये. दुसऱ्यांचे दुर्गुण कोणाला तरी चवीने सांगण्याचा उद्योग नसावा. दुष्ट व दुर्जनांशी संबंध आल्यास त्यांना त्यांच्या अडचणीत मदतच करावी. (त्यांच्याशी अकारण वैर धरू नये. म्हणजे किमान त्यांचा त्रास तरी होत नाही.) ॥१०॥

तऱ्हे भरोंच नये । सुचावे नाना उपाये । नव्हे तेंचि करावें कार्ये । दीर्घ प्रेत्नें ।।११।।

तऱ्हेवाईक, विचित्र किंवा विक्षिप्ताप्रमाणे वागू नये. त्यामुळे लोक दुरावतात. प्रत्येक समस्या किंवा अडचणीच्या सोडवणीसाठी अनेक उपायांचा विचार करून ठेवावा. मोठे बिकट वाटणारे कार्य हरप्रयत्नाने सिद्धीला न्यावे. त्यामुळे लोकांचा विश्वास वाढतो. ॥११॥

फड नासोंचि नेदावा । पडिला प्रसंग सांवरावा । अतिवाद न करावा । कोणीयेकासी ।।१२।।

कार्यासाठी एकत्र केलेल्या किंवा झालेल्या लोकांत दुफळी पडू देऊ नये. येईल तो प्रसंग सांभाळून घेऊन निभावून न्यावा. कोणत्याही मुद्द्यावर कोणाशीही फार वाद घालू नये. जे सत्य असेल ते यथासमय आपोआप पुढे येते. ॥१२॥

दुसऱ्याचें अभिष्ट जाणावें । बहुतांचें बहुत सोसावें । न सोसे तरी जावें । दिगांतराप्रती ।।१३।।

दुसऱ्याला काय अनुकूल वाटते ते लक्षात घेऊन त्याचे वागणे बोलणे त्या दिशेने राहणार आहे हे समजून असावे. त्रिगुणात्मक प्रकृतीच्या जगात भिन्न स्वभावाच्या लोकांशी संबंध येतो, त्यामुळे नेत्याने कोणाच्याही वागण्या-बोलण्याने व्यथित होऊ नये. शांतपणे सर्व सोसावे. सोसणे अगदीच अशक्य झाले तर अन्य प्रदेशात निघून जावे. आपल्यामुळे बेदिली होऊ नये. ॥१३॥

दुःख दुसऱ्याचे जाणावें । ऐकोन तरी वांटून घ्यावें । बरें वाईट सोसावें । समुदायाचें ।।१४।।

दुसऱ्याच्या व्यथा वेदना लक्षात घ्याव्यात. त्या ऐकून घेऊन सांत्वनात्मक शब्दाने किंवा शक्य झाल्यास प्रत्यक्ष मदत करून त्या हलक्या कराव्यात. समाजाच्या सर्वच क्रिया-प्रतिक्रिया सतत सारख्या नसतात. त्या बऱ्या किंवा वाईट असल्या तरी सोसाव्यात. ॥१४॥

अपार असावें पाठांतर । सन्निधाचि असावा विचार । सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ।।१५।।

धर्म, न्याय, नीती व अध्यात्म या सर्व शास्त्रांचे भरपूर पाठांतर असावे. विचारलेल्या प्रश्नाचे शास्त्रशुद्ध उत्तर तात्काळ देता यावे अशी तयारी असावी. दुसऱ्याला मदत करण्यास सतत तत्पर रहावे. ॥१५॥

शांती करून करवावी । तऱ्हे सांडून सांडवावी । क्रिया करून करवावी । बहुतांकरवी ।।१६।।

समेट, तडजोड, बिनतोड विचार इत्यादींचे मदतीने समाजात शांतता राखावी व इतरांकडून तसेच करून घ्यावे. तऱ्हेवाईकपणा स्वत: करू नये व दुसऱ्यांचा कमी करण्याचा प्रयत्न करावा. स्वत: क्रियाशील राहून इतरांकडून ती करवून घ्यावी. (अध्यात्म व निष्क्रियता यांचे जनमानसात रुजलेले समीकरण उद्ध्वस्त करावे. ओंडक्याप्रमाणे पडून राहणारा जीवन्मुक्त आदर्श नाही.) ॥१६॥

करणें असेल अपाये । तरी बोलोन दाखऊं नये । परस्परेंचि प्रत्यये । प्रचितीस आणावा ।।१७।।

कोणा विघ्नसंतोषी गुंडाला धडा शिकविणे आवश्यक असेल तर वाच्यता न करता परहस्ते ते करावे. अशा

प्रकरणात महंताने स्वत: पडू नये. ॥१७॥

जो बहुतांचे सोसीना । त्यास बहुत लोक मिळेना । बहुत सोसितां उरेना । महत्व आपुलें ।।१८।।

बऱ्याच जणांचे बरेच सोसल्याशिवाय कार्याचा व्याप वाढत नाही. पण सर्वांचे सर्वच सोसले तर महंताची किंमत राहत नाही. तो त्याचा दुबळेपणा ठरतो. दुबळ्याला सहानुभूती मिळते. पाठिंबा नाही. ॥१८॥

राजकारण बहुत करावें । परंतु कळोंच नेदावें । परपीडेवरी नसावें । अंत:करण ।।१९।।

लोकजागृतीच्या माध्यमातून समाजोन्नती साधण्यासाठी लोककार्य किंवा राजकारण पुष्कळ करावे. पण त्याला सत्तेच्या राजकारणाचा स्पर्श नसावा. ते राजकारण उघडे-नागडे नसावे. लोककार्यातून जे सामर्थ्य प्राप्त होते त्याचा उपयोग करून कोणाला तरी छळू नये. ॥१९॥

लोक पारखून सांडावे । राजकारणें अभिमान झाडावे । पुन्हा मेळवून घ्यावें । दुरील दोरे ।।२०।।

कार्यक्षेत्रातील सर्व संबंधितांची चांगली पारख केलेली असावी. ज्यांच्या अहंमन्यतेमुळे कार्यनाश होण्याचा संभव आहे त्यांचा अहंकार परस्पर उतरवून ठेवावा व नंतर पुन्हा तिसऱ्याकडून त्याला कार्यात सामील करून घ्यावे. ॥२०॥

हिरवटासी दुरी धरावे । कचरटासी न बोलावे । समंध पडता सोडून जावे । येकीकडे ।।२१।।

हट्टी व भांडखोराला दूर ठेवावे. कच खाणाऱ्या भित्र्याशी बोलूही नये. यांचा संबंध येण्याचा प्रसंग आलाच तर स्वत:च काही निमित्त काढून दूर निघून जावे. ॥२१॥

ऐसें असो राजकारण । सांगतां तें असाधारण । सुचित अस्तां अंत:करण । राजकारण जाणे ।।२२।।

राजकारणातील युक्त्या; सांगाव्या तेवढ्या थोड्याच! कारण ते क्षेत्रच असामान्य आहे. ज्याचे चित्त स्थिर व सावध असते त्याला प्रसंगानुरूप सर्व काही सुचत जाते. ॥२२॥

वृक्षीं रूढासी उचलावें । युद्धकर्त्यास ढकलून द्यावें । कारबाराचें सांगावें । आंग कैसें ।।२३।।

ज्याने आधीच विशिष्ट उंची गाठलेली आहे त्याला उत्तेजन द्यावे. जो वृत्तीने लढाऊ असेल त्याला लढाईसांठी प्रवृत्त करावे. (ढकलावे) राजनीतीची सर्वच अंगे स्पष्ट सांगता येत नाहीत. ॥२३॥

पाहातां तरी सांपडेना । कीर्ति करूं तरी राहेना । आलें वैभव अभिळासीना । कांही केल्यां ।।२४।।

राजकारणात महंताला गोवण्याचा प्रयत्न करावा तर तो कशातच सापडत नाही. त्याची कीर्ती सांगावीशी वाटली तर तो ठिकाणावर नसतो. अधिकाराचे पद, संपत्ती इत्यादी वैभव चालून आले तरी ते तो मुळीच स्वीकारीत नाही. ॥२४॥

येकांची पाठी राखणें । येकांस देखो न सकणें । ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । चातुर्याचीं ।।२५।।

कोणाचा सतत पाठपुरावा करणे व कोणाची साधी भेटही न घेणे ही राजकीय चातुर्याची लक्षणे नाहीत. त्यामुळे पक्षपातीपणा किंवा गटबाजी दिसते. ॥२५॥

न्याय बोलतांही मानेना । हित तेंचि न ये मना । येथें कांहींच चालेना । त्यागेंविण ।।२६।।

जे उघड उघड न्यायाचे आहे ते न जुमानणारा व तळमळीने सांगितलेल्या हिताच्या गोष्टी न मानणारा अशा दोघांचा नाद सोडून देण्याशिवाय काहीच करता येत नाही. ॥२६॥

श्रोतीं कळोन आक्षेपिलें । म्हणौन बोलिलेंचि बोलिलें । न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ।।२७।।

माहीत असूनही श्रोत्यांनी प्रश्न विचारल्यामुळे मला पुन्हा तेच सांगावे लागले. काही उणे- अधिक झाले असल्यास क्षमा करावी. ॥२७॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'राजकारणनिरूपणनाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'राजकारणनिरूपण' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक अकरावा : भीमदशक

समास सहावा : महंतलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

शुद्ध नेटके ल्याहावें । लेहोन शुद्ध शोधावें । शोधून शुद्ध वाचावें । चुकों नये ।।१।।

लिहिताना शुद्ध व व्यवस्थित लिहावे, लिहिल्यानंतर ते शुद्ध व व्यवस्थित आहे वा नाही याची खात्री करून घ्यावी व नंतर ते वाचताना शुद्ध उच्चाराने व विरामादिकांना अनुसरून व्यवस्थित वाचावे. त्यात चुका करू नये. ॥१॥

विश्कळित मात्रुका नेमस्त कराव्या । धाट्या जाणोन सदृढ धराव्या । रंग राखोन भराव्या । नाना कथा ।।२।।

वेलांट्या, काने इ. तिरक्या, वाकड्या असतील तर त्या दुरुस्त कराव्यात. अक्षराचे वळण एकच एक सांभाळावे. अनेक कथांमध्ये असलेले नाट्य, अलंकारादी लक्षात घेऊन लिहिता-वाचताना त्यात रंगत आणावी. ॥२॥

जाणायाचें सांगतां न ये । सांगायाचें नेमस्त न ये । समजल्याविण कांहींच न ये । कोणीयेक ।।३।।

ज्याचा (आत्मा) केवळ स्वसंवेद्य अनुभव येऊ शकतो तो शब्दाने सांगता येत नाही. आत्म्याविषयीचे शब्दज्ञान श्रुतिप्रामाण्यावर (श्रद्धा) आधारलेले असल्यामुळे त्याविषयी भौतिक नियमांच्या (नेमस्त) भाषेत बोलता येत नाही. आणि यथार्थ ज्ञानाशिवाय तर कशालाच काही अर्थ नाही. ॥३॥

हरिकथा निरूपण । नेमस्तपणें राजकारण । वर्तायाचें लक्षण । तेंहि असावें ।।४।।

श्रीहरीची सगुण व निर्गुण कथा करावी. गुप्त व अप्रत्यक्ष राजकारण करावे व सदाचारसंपन्न असावे. ॥४॥

पुसों जाणे सांगों जाणे । अर्थांतर करूं जाणे । सकळिकांचे राखों जाणे । समाधान ।।५।।

जे कळत नसेल ते अधिकाऱ्याला विचारण्यात संकोच न करणारा, जे समजले असेल ते सांगणारा, उपनिषदादिकांच्या मंत्रांचे पर्यायी पण शास्त्रशुद्ध अर्थ करण्याची प्रतिभा असणारा व या पद्धतीने प्रबोधनाच्या क्षेत्रात सर्वांचे समाधान करणारा महंत असावा. ॥५॥

दीर्घ सूचना आधीं कळें । सावधपणें तर्क प्रबळें । जाणजाणोनि निवळे । येथायोग्य ।।६।।

संभाव्य घटनांची आगाऊ कल्पना असणारा, सर्व परिस्थितीचे सावधपणामुळे तर्कशुद्ध पृथक्करण करणारा व जाणीवपूर्वक सर्वांचे समाधान करणारा महंत असावा. ॥६॥

ऐसा जाणे जो समस्त । तोचि महंत बुद्धिवंत । यावेगळें अंतवंत । सकळ कांही ।।७।।

अशा सर्वज्ञ महंतालाच बुद्धिमान म्हणावे. असे नसतील त्यांचा समाजावरील प्रभाव टिकत नाही. ॥७॥

ताळवेळ तानमानें । प्रबंद कविता जाड वचनें । मज्यालसी नाना चिन्हें । सुचती जया ।।८।।

संगीतातील ताल, रागांच्या वेळा व ताना यांचे ज्ञान असावे. आध्यात्मिक लेख, काव्यरचना व शास्त्रसिद्धान्त यांची जाण असावी. विद्वत्सभेत त्याच्या प्रतिभेला बहर येऊन त्यातील वैचारिक देवघेवीत याचा मोठा वाटा असतो. ॥८॥

जो येकांतास तत्पर । आधीं करी पाठांतर । अथवा शोधी अर्थांतर । ग्रंथगर्भींचें ।।९।।

महंत एकान्तासाठी आतुर असून, त्या एकान्ताचा तो पाठ पाठान्तर व अध्यात्म ग्रंथाच्या सखोल व सर्वांगीण अभ्यासासाठी उपयोग करतो. ॥९॥

आधींच सिकोन जो सिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी । गुंतल्या लोकांस उगवी । विवेकबळें ।।१०।।

जो स्वत: शब्दज्ञानात पारंगत होऊन नंतर प्रबोधन करतो त्याला सर्वतोपरी आदर व सन्मान मिळतात व तोच स्वत:च्या विवेक बळाने साधनमार्गात घोटाळणाऱ्यांना मार्गदर्शन करतो. ॥१०॥

अक्षर सुंदर वाचणें सुंदर । बोलणें सुंदर चालणें सुंदर । भक्ति ज्ञान वैराग्य सुंदर । करून दावी ।।११।।

त्याचे अक्षर वळणदार व एकसारखे असते. वाचताना तो विषयाशी समरस होऊन विरामचिन्हे, प्रश्नचिन्हे, उद्‌गार, रस इत्यादींचा विचार करून परिणामकारक वाचन करतो. त्याचे बोलणे मृदु, शांत, मधुर व निश्चयात्मक असते. चालण्यात अहंकार नसतो पण आत्मविश्वास असतो. त्याच्या रूपाने आदर्श भक्ती, ज्ञान व वैराग्याचे इतरांना वस्तुपाठ मिळतात. ।११॥

जयास येत्नचि आवडे । नाना प्रसंगी पवाडे । धीटपणें प्रगटे दडे । ऐसा नव्हे ।।१२।।

त्याला काम करण्याची आवड असते. उत्सव, सभा, संघर्ष इत्यादी प्रसंगांत तो धीटपणे व उघडपणे पुढे होतो. अंग चोरून दूर रहात नाही. ॥१२॥

सांकडीमधें वर्तों जाणे । उपाधीमधें मिळों जाणे । अलिप्तपणें राखों जाणे । आपणासी ।।१३।।

संकट किंवा अडचणीत शांतपणे मार्ग काढणारा, अनेक प्रकारच्या लोकसमुदायात वावरू शकणारा व एवढे करून स्वत:चे असंगत्व सांभाळणारा महंत असतो. ॥१३॥

आहे तरी सर्वां ठाई । पाहों जातां कोठेंचि नाहीं । जैसा अंतरात्मा ठाईंचा ठाई । गुप्त जाला ।।१४।।

आत्मा ज्याप्रमाणे त्याच्या जागी गुप्तपणाने असतो त्याप्रमाणे हा सर्व कार्यात व्यापकतेने राहूनही नेतृत्व किंवा श्रेयाच्या दृष्टीने कशातच नसतो. ॥१४॥

त्यावेगळें काहीच नसे । पाहों जातां तो न दिसे । दिसोन वर्तवीतसे । प्राणीमात्रांसी ।।१५।।

महंताशिवाय कोणतेच कार्य होत नाही. पण तो कशातच अडकून पडत नाही. स्वत: अलिप्त राहून सर्वांकडून काम करून घेतो (हे अंतरात्म्याचेही वर्णन आहे). ॥१५॥

तैसाच हाहि नानापरी । बहुत जनास शाहाणे करी । नाना विद्या त्या विवरी । स्थूळ सूक्ष्मा ।।१६।।

महंत अंतरात्म्याप्रमाणेच अनेकांना प्रेरणा देऊन मोठ्या लोकसमुदायाला भौतिक (स्थूल) व आध्यात्मिक (सूक्ष्म) विद्या शिकवून शहाणे करतो. ॥१६॥

आपणाकरितां शाहाणे होती । ते सहज चि सोये धरिती । जाणतेपणाची महंती । ऐसी असे ।।१७।।

जे त्या महंतामुळे शिकून शहाणे होतात ते सहजच त्याला मानतात व आज्ञेत रहातात. जाणतेपणाच्या महंतीचे हे वर्म आहे. ॥१७॥

राखों जाणें नीतिन्याय । न करी न करवी अन्याये । कठीण प्रसंगी उपाये । करूं जाणे ।।१८।।

न्याय व नीतीचा समाजावरील पगडा टिकवून ठेवतो. स्वत: अन्याय करीत नाही व परहस्तेही तो करीत नाही. धर्म, अध्यात्म, व्यवहार इ. क्षेत्रांत कठीण प्रसंग आला असता त्यातून मार्ग काढतो. ॥१८॥

ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुतांचा । दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ।।१९।।

अशा कर्तृत्वसंपन्न, विरक्त, ज्ञानी व क्रियाशील महंताचा समाजाला मोठा आधार असतो. रघुनाथाचा दास असलेला मी (समर्थ) असे म्हणतो की त्याचे हे गुण सर्वांनी अंगिकारावेत. ॥१९॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'महंतलक्षणनाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'महंतलक्षण' नावाचा सहावा समास समाप्त

दशक अकरावा : भीमदशक

समास सातवा : चंचळनदीनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

चंचळ नदी गुप्त गंगा । स्मरणें पावन करीं जगा । प्रचित रोकडी पाहा गा । अन्यथा नव्हे ।।१।।

या मायानदीचा उगम गुप्त असला तरी ती गतिशील (चंचळ) आहे. त्या उगमाचे (ब्रह्माचे) जर जगाने स्मरण केले. तर जग उद्धरून जाईल हा अनुभव प्रत्यक्ष येतो. ही वस्तुस्थिती कधी बदलत नाही. ॥१॥

केवळ अचंचळीं निर्माण जाली । अधोमुखें बळें चालिली । अखंड वाहे परी देखिली । नाहींच कोणीं ।।२।।

ही माया नदी अचल ब्रह्मस्वरूपात उगम पावून खालील दिशेला वेगाने वहात गेली. (ऊर्ध्वमूलमध:शाखं) ती मूळ मायेच्या स्वरूपात कोणालाच दिसत नसली तरी गुणमाया व जडमायेच्या स्वरूपात मात्र अखंड वाहताना दिसते. ॥२॥

वळणें वांकाणें भोवरे । उकळ्या तरंग झरे । लादा लाटा कातरे । ठाईं ठाईं ।।३।।

मायानदीच्या प्रवाहात वळणे, लघुकोन, भोवरे, उसाळे, तरंग, वेगवान प्रवाह, धबधबे, लाटा, कापत जाणारे पाणी इ. जागोजागी दिसतात. ॥३॥

शुष्क जळाचे चळाळ । धारा धबाबे खळाळ । चिपळ्या चळक्या भळाळ । चपळ पाणी ।।४।।

आत कोरडे असलेले बुडबुडे, कापत जाणारी धार, धबधबे, खळाळाचा आवाज, चिळकांड्या, कारंजी, भळभळ इ. अनेक प्रकारे पाणी वाहते. ॥४॥

फेण फुगे हेलावे । सैरौवरा उदक धावे । थेंब फुई मोजावे । अणुरेणु किती ।।५।।

फेस, फुगणे, हेलकावे इ. प्रकारे वाट फुटेल तिकडे पाणी धावते. त्याच्या वेगामुळे उडणाऱ्या लहानमोठ्या थेंबांची गणती कशी करावी! ॥५॥

वोसाणे वाहती उदंड । झोतावे दर्कुटे दगड । खडकें बेटें आड । वळसा उठे ।।६।।

पाण्यावर कचऱ्याचे ढीग वहातात, कमी-जास्त उंचीवरून पाणी आदळते. वाटेतील दगड, पत्थर, बेटे, खडक इत्यादींना वळसा घालून पाणी पुढे जाते. ॥६॥

मृद भूमी तुटोन गेल्या । कठीण तैश्याचि राहिल्या । ठाईं ठाईं उदंड पाहिल्या । सृष्टीमधें ।।७।।

पाण्याच्या प्रवाहामुळे ठिसूळ जमिनीची धूप होते व कठीण जमिनी अभंग रहातात. हा प्रकार जगात जागोजागी दिसतो (आतापर्यंत मायेच्या अनेक अभिव्यक्ती सांगितल्या. मायेच्या शक्ती किती विविध प्रकारांनी अनुभवाला येतात ते नदीच्या रूपकाने सांगितले. जीवाला अनुभवाला येणाऱ्या विविध तापांची विविध निमित्ते येथे आढळतात. उदा. आधिभौतिक संकटांच्या तरंग, उकळ्या, लाटा, धारा, धबधबे इ. श्रेणी असतात. यापुढील ओव्यांत या नदीत सापडलेले कोणत्या पद्धतीने त्या प्रवाहाला तोंड देतात त्याचे वर्णन आहे). ॥७॥

येक ते वाहतचि गेले । येक वळशामधें पडिले । येक सांकडींत आडकले । अधोमुख ।।८।।

काहीजण या प्रवाहाबरोबर पराधीनपणे वाहतच जातात. काही या प्रवाहाच्या आडमार्गात सापडतात. काही एखाद्या कपारीमध्ये खाली तोंड वर पाय करून अडकून पडतात. ॥८॥

येक आपटआपटोंच गेली । येक चिरडचिर्डोंच मेलीं । कितीयेक ते फुगलीं । पाणी भरलें ।।९।।

काही प्रवाहात आदळून मरतात, काही चिरडून मरतात (अपघात). काहींच्यात अहंकाररूप माया एवढी भरते की ते त्याने फुगून रहातात. ॥९॥

येक बळाचे निवडले । ते पोहतचि उगमास गेले । उगमदर्शनें पवित्र जाले । तीर्थरूप ।।१०।।

काही थोडे लोक विवेक, वैराग्य व साधना यांच्या बळाने नदीच्या प्रवाहाविरुद्ध पोहून तीर्थरूप उगमापर्यंत पोहोचून ब्रह्मरूप झाले. मुक्त झाले. ॥१०॥

तेथें ब्रह्मादिकांची भुवनें । ब्रह्मांडदेवतांची स्थानें । उफराटी गंगा पाहातां मिळणें । सकळांस तेथें ।।११।।

त्या ब्रह्मरूप मुळाजवळ ब्रह्मांडातील सर्व देवतांची स्थाने असतात. नदीच्या प्रवाहाविरुद्ध गेल्यास त्या सर्व स्थानांचे दर्शन सर्वांना होते. ॥११॥

त्या जळाऐसें नाहीं निर्मळ । त्या जळाऐसें नाहीं चंचळ । आपोनारायण केवळ । बोलिजे त्यासी ।।१२।।

उगमाजवळील पाणी अत्यंत पवित्र असून ते मायिक असले तरी सर्वश्रेष्ठ आहे. त्याला आपोनारायण म्हणतात. ॥१२॥

माहानदी परी अंतराळीं । प्रत्यक्ष वाहे सर्वकाळीं । स्वर्गमृत्यपाताळी । पसरली पाहा ।।१३।।

मायानदी एवढी प्रचंड असूनही तिला तळ किंवा काठ नाहीत. (River bed and banks) तरी ती तिन्ही काळात वाहत राहते (ती भासत रहाते). स्वर्ग, मृत्यू व पाताळ अशा त्रैलोक्यात तिचे पाणी भरून राहिले आहे. ॥१३॥

अधोर्ध अष्टहि दिशा । तिचें उदक करी वळसा । जाणते जाणती जगदीशा । सारिखीच ते ।।१४।।

अध व ऊर्ध्व या दिशांसह दहाही दिशांत तिची व्याप्ती आहे. ती मूळमाया म्हणजेच जगदीशरूप ईश्वर असे जाणत्यांना चांगले ठाऊक असते. ॥१४॥

अनंत पात्रीं उदक भरलें । कोठें पाझपाझरोंच गेलें । कितीयेक तें वेचलें । संसारासी ।।१५।।

हे मायेचे पाणी लक्षावधी शरीरात (योनी) भरले आहे. क्वचित कोणी ते पाणी आटवले (मुक्त) पण बहुतेकांनी त्याचा भोगासाठी उपयोग केला. ॥१५॥

येक्यासंगें तें कडवट । येक्यासंगें तें गुळचट । येक्यासंगें तें तिखट । तुरट क्षार ।।१६।।

मायाजल अविद्याग्रस्तांना कडू, तिखट, तुरट व खारट लागते. जीवन्मुक्तांना ते मधुर वाटते. (काम व क्रोधादी विकारांचा कडूपणा, तिखटपणा इ.) जीवन्मुक्तांना मायेच्या माध्यमातून ब्रह्मसुखाचा भोग मिळतो. ॥१६॥

ज्या ज्या पदार्थास मिळे । तेथें तद्रूपचि मिसळे । सखोल भूमीस तुंबळे । सखोलपणें ।।१७।।

मायाजल ज्या पदार्थांना व्यापते त्या पदार्थाच्या आकाराचे होते. खड्डे भरून काढून ते तेवढ्या खोलीने त्यात रहाते. (माया त्या त्या पदार्थाप्रमाणे सूक्ष्म किंवा स्थूल असते.) ॥१७॥

विषामधें विषचि होतें । अमृतामधें मिळोन जाते । सुगंधीं सुगंध तें । दुर्गंधीं दुर्गंध ।।१८।।

विषातील विषत्व, अमृतातील अमृतत्व, सुगंधी द्रव्यातील सुगंध व दुर्गंधयुक्त पदार्थातील दुर्गंध मायेचा असतो. ॥१८॥

गुणीं अवगुणीं मिळे । ज्याचें त्यापरी निवळे । त्या उदकाचा महिमा न कळे । उदकेंविण ।।१९।।

सद्‌गुण व दुर्गुण यात गुणरूपाने माया आहे. माया ज्या त्या पदार्थाच्या गुणांचे कारण असते. माया जळाची ही अतर्क्य लीला त्याची त्यालाच माहीत! ॥१९॥

उदक वाहे अपरांपर । न कळे नदी कीं सरोवर । जळवास करून नर । राहिले कितीयेक ।।२०।।

मायाजळाची व्याप्ती अपरंपार आहे. त्या पाण्याच्या पसाऱ्याला नदी म्हणावे की सरोवर हे कळत नाही. त्या पाण्यात कित्येक प्राणी जळचरांप्रमाणे वास्तव्य करून आहेत. ॥२०॥

उगमापैलिकडे गेले । तेथें परतोन पाहिलें । तंव तें पाणीच आटलें । कांही नाहीं ।।२१।।

जे साधक मायाजळाच्या उगमापलीकडे पोहोचले (ब्रह्म) व त्यांनी जेव्हा मागे वळून पाहिले तेव्हा त्या पाण्याचा मागमूसही त्यांना आढळला नाही! (या मा = जी मुळातच नाही.) ॥२१॥

वृत्तिसुन्य योगेश्वर । याचा पाहावा विचार । दास म्हणे वारंवार । किती सांगों ।।२२।।

जीवन्मुक्त योगेश्वराची अन्त:करणवृत्ती जेव्हा आत्मस्वरूपी लीन होते तेव्हा तिला वृत्तिज्ञान होणे थांबते. जेव्हा वृत्तीमागील ज्ञाता ज्ञानरूप होतो तेव्हा ज्ञेयरूप मायिक जगाचा बाध होतो. माया जणू आटून जाते. हा वेदान्ताचा विचार किती म्हणून व किती वेळा समजावून सांगावा. ॥२२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'चंचळनदीनिरूपणनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'चंचळनदीनिरूपण' नावाचा सातवा समास समाप्त

दशक अकरावा : भीमदशक
समास आठवा : अंतरात्माविवरण
॥ श्रीराम समर्थ ॥

आधीं वंदूं सकळकर्ता । समस्त देवांचा जो भर्ता । त्याचे भजनीं प्रवर्ता । कोणीतरी ।।१।।

आता सर्वकर्त्या ईश्वराला नमस्कार करू. तो सर्व देवदेवतांचा पोशिंदा असून त्याची कोणी तरी जाणत्याने उपासना करावी. ॥१॥

तेणेंविण कार्य न चले । पडिलें पर्ण तेंहि न हाले । अवघें त्रैलोक्येंचि चाले । जयाचेनी ।।२।।

त्याचे सत्तेशिवाय जमिनीवर पडलेले वाळके पान हालण्यासारखे सामान्य कामही होत नाही. त्रैलोक्याचे उत्पत्ती, स्थिती व लय त्याच्या समार्थ्याने होतात. ॥२॥

तो अंतरात्मा सकळांचा । देवदानवमानवांचा । चत्वारखाणीचत्वारवाणीचा । प्रवर्तकु ।।३।।

तो सर्व देव, दानव व मानवादी जीवांचा अंतरात्मा असून जरायुजादी चार खाणी व परादी चार वाणींचा प्रवर्तक आहे. ॥३॥

तो येकलाचि सकळां घटीं । करी भिन्नभिन्ना राहाटी । सकळ सृष्टीची गोष्टी । किती म्हणौन सांगावी ।।४।।

तो सर्व जीवांच्या अन्त:करणात (घट) राहून त्यांना त्यांच्या प्रारब्धानुसार वागवितो किंवा त्यांचे व्यापार चालवितो. सर्व सृष्टीच्या सर्व व्यवहारांचा विचारही करता येणार नाही एवढे ते प्रचंड व गुंतागुंतीचे आहेत. ॥४॥

ऐसा जो गुप्तेश्वर । त्यास म्हणावें ईश्वर । सकळ ऐश्वर्य थोर थोर । जयाचेनि भोगिती ।।५।।

असा जो गुप्तरूपाने कार्य करणारा ईशान किंवा नियंता, त्याला ईश्वर म्हणतात. मोठे ऐश्वर्यवन्त जी ऐश्वर्ये भोगतात ती सर्व त्याच्या सृष्टीतील व त्याच्या नियंत्रणाखाली असतात. ॥५॥

ऐसा जेणें वोळखिला । तो विश्वंभरचि जाला । समाधी सहजस्थितीला । कोण पुसे ।।६।।

असा ईश्वर जो पूर्णत्वाने जाणतो तो स्वत:च विश्वात भरून राहतो. असे झाल्यावर समाधी व वेदान्तातील सहजस्थितीची काय मातब्बरी! (विज्ञान) ॥६॥

अवघे त्रैलोक्य विवरावें । तेव्हां वर्म पडेल ठावें । आवचटें घबाड सिणावें । नलगेचि कांहीं ।।७।।

सर्व दृश्य वा शास्त्रात सांगितलेल्या ब्रह्मांडांचे पृथक्करण करता करता अचानक रहस्याचा उलगडा होतो व जणू ज्ञानाचे घबाड हाती येते. भलत्या कष्टांची गरजच नाही. (रमण महर्षींचे तत्त्वज्ञान ह्या पद्धतीचे आहे.) ॥७॥

पाहातां ऐसा कोण आहे । जो अंतरात्मा विवरोन पाहे । अल्प स्वल्प कळोन राहे । समाधानें ।।८।।

असे दृश्य सृष्टीचे पृथक्करण सांगोपांग करून अंतरात्म्याचा शोध घेणारा पाहू गेले तर फार क्वचित सापडतो. बहुतेक सर्व थातुरमातुर माहितीवर समाधान मानतात. ॥८॥

आरे हें पाहिलेंच पाहावें । विवरलेंचि मागुतें विवरावें । वाचिलेंचि वाचावें । पुन्हपुन्हा ।।९।।

अरे साधका, अभ्यास केलेल्या वेदान्तशास्त्राचा पुन्हा पुन्हा अभ्यास कर. समजावून घेतलेले पुन्हा समजावून घे. वाचलेले पुन्हा पुन्हा वाच. ॥९॥

अंतरात्मा केवढा कैसा । पाहाणाराची कोण दशा । देखिल्या ऐकिल्या ऐसा । विवेक सांगे ।।१०।।

अंतरात्म्याची व्याप्ती किती? त्याचे स्वरूप कसे आहे? त्याला जाणलेल्याची ज्ञानोत्तर स्थिती कशी असते? हे ज्याने अनुभवले आहे, तो ऐकणाऱ्याला समजेल असे ज्ञान सांगतो. ॥१०॥

उदंड ऐकिलें देखिलें । अंतरात्म्यास नवचे पुरविलें । प्राणी देहधारी बाउलें । काये जाणे ।।११।।

अध्यात्मशास्त्र, धर्मशास्त्र, पोथ्या इत्यादींचे केलेले भरपूर वाचन आणि त्या क्षेत्रातील व्यक्तींची घेतलेली दर्शने एवढ्या भांडवलावर अंतरात्मा जाणता येत नाही. देहामध्ये तादात्म्याने राहणाऱ्या सामान्य अज्ञान्याला तो कसा कळणार! ॥११॥

पूर्णास अपूर्ण पुरेना । कां जें अखंड विवरेना । विवरतां विवरतां उरेना । देवावेगळा ।।१२।।

ब्रह्म पूर्ण आहे. जीव अपूर्ण असल्याने त्याने अखंड व यथार्थ जीवब्रह्मैक्याचे चिंतन केल्याशिवाय तो पूर्णाला गवसणी घालू शकत नाही. असे चिंतन करीत करीत तो ब्रह्माहून वेगळा उरता कामा नये. ॥१२॥

विभक्तपणें नसावें । तरीच भक्त म्हणवावें । नाहीतरी वेर्थचि सिणावें । खटाटोपें ।।१३।।

ब्रह्मस्वरूपापासून जो वेगळेपणाने उरत नाही तोच भक्त म्हणविण्यास पात्र आहे. हे साध्य होण्यासाठी जे केले पाहिजे ते न करता केलेले इतर सर्व प्रयत्न केवळ कष्ट होत. ॥१३॥

उगाच घर पाहोन गेला । घरधनी नाहीं वोळखिला । राज्यामधूनचि आला । परी राजा नेणे ।।१४।।

देहरूप घरात मुक्काम करूनही त्याच्या स्वामीला जाणले नाही तर तो मुक्काम फुकटच! राज्यभर प्रवास करून राजाला न ओळखण्यासारखेच ते होय. (राज्य = जग) ॥१४॥

देहसंगें विषये भोगिले । देहसंगें प्राणी मिरवलें । देहधर्त्यास चुकलें । नवल मोठें ।।१५।।

देहाच्या आधाराने जगातील विषय भोगले, देहाच्याच आधाराने मी मी म्हणून जगले व एवढे करून देहाला धारण करणाऱ्याला ओळखत नाहीत हे खरोखर आश्चर्य होय. ॥१५॥

ऐसे लोक अविवेकी । आणि म्हणती आम्ही विवेकी । बरें ज्याची जैसी टाकी । तैसें करावें ।।१६।।

अशी अविवेकी माणसेही स्वत:ला विवेकी समजतात. एकूण काय तर जो तो त्याच्या मगदूराप्रमाणे विचार करतो ॥१६॥

मूर्ख अंतर राखों नेणे । म्हणौन असावें शाहाणे । ते शाहाणेहि दैन्यवाणे । होऊन गेले ।।१७।।

मूर्ख माणूस अंतरात्म्याचा अंदाजही घेऊ शकत नाही. म्हणून जे फक्त शास्त्राभ्यासाने शहाणे होतात तेही त्यांच्यासारखेच देहतादात्म्याचे दीन जीवन जगतात. ॥१७॥

अंतरीं ठेवणें चुकलें । दारोदारीं धुंडूं लागलें । तैसें अज्ञानास जालें । देव न कळे ।।१८।।

अन्त:करणातील नित्यप्राप्त सुखरूप आत्मवस्तू विसरून ते सुखासाठी पंचविषयाची दारे ठोठावू लागतात. ज्याप्रमाणे कोणी घरात पुरलेली संपत्ती माहीत नसल्याने सर्वत्र ती शोधतो त्याप्रमाणे. ॥१८॥

या देवाचें ध्यान करी । ऐसा कोण सृष्टीवरी । वृत्ती येकदेंसी तर्तरी । पवाडेल कोठें ।।१९।।

ब्रह्मवस्तूचे ध्यान करणारा ध्याता पृथ्वीच्या पाठीवर अजून जन्माला यावयाचा आहे! ध्यानाचे साधन असलेली अन्त:करण वृत्ती अचेतन व चंचल असल्याने ती ध्यान कसे करील? ॥१९॥

ब्रह्मांडी दाटले प्राणी । बहुरूपें बहुवाणी । भूगर्भीं आणि पाषाणीं । कितीयेक ।।२०।।

या ब्रह्मांडात अनेक आकारांचे व अनेक शब्द करणारे असंख्य प्राणी आहेत. काही जमिनीत तर काही खडकातही राहतात. ॥२०॥

इतुके ठाईं पुरवला । अनेकीं येकचि वर्तला । गुप्त आणि प्रगटला । कितीयेक ।।२१।।

त्या सर्वांत ते एकच व्यापून राहिले आहे. कोठे त्याचे अस्तित्व उघडपणे जाणवते तर कोठे ते गुप्त असते एवढेच. ॥२१॥

चंचळें न होईजे निश्चळ । प्रचित जाणावी केवळ । चंचळ तें नव्हे निश्चळ । परब्रह्म तें ।।२२।।

अचेतन अन्त:करणवृत्तीला चेतन ब्रह्माचे कधीच ज्ञान होत नाही. अनुभवानेच असा निर्णय घ्यावा. मायिक चित्तवृत्तीला निश्चळ परब्रह्माचा 'मी' म्हणून अनुभव येणे शक्य नाही. ॥२२॥

तत्वें तत्व जेव्हां उडे । तेव्हां देहबुद्धि झडे । निर्मळ निश्चळ चहुंकडे । निरंजन ।।२३।।

एका तत्त्वाने दुसरे तत्त्व बाधित केले की 'मी देह' हा भ्रम नष्ट होऊन सर्वत्र विमल, अचल व अरूप ब्रह्म असल्याचा अनुभव येतो. ॥२३॥

आपण कोण कोठें कैंचा । ऐसा मार्ग विवेकाचा । प्राणी जो स्वयें काचा । त्यास हें कळेना ।।२४।।

मी कोण? मी कोठून आलो? मी कसा आलो? इ. प्रश्नांची यथार्थ उत्तरे मिळणे हा विवेकाचा मार्ग आहे. मंदबुद्धीच्या बद्ध जीवाला हा मार्ग सापडत नाही. ॥२४॥

भल्यानें विवेक धरावा । दुस्तर संसार तरावा । अवघा वंशचि उधरावा । हरिभक्ती करूनी ।।२५।।

जो शुद्धबुद्धीचा पुण्यशील आहे त्याने हा विवेकाचा मार्ग धरावा. तरण्यास कठीण संसार तरून जाऊन सर्व कुळ उद्धरून न्यावे. ॥२५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अंतरात्माविवरणनाम' समास आठवा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'अंतरात्माविवरण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक अकरावा : भीमदशक

समास नववा : उपदेशनाम

॥ श्रीराम समर्थ ॥

आधीं कर्माचा प्रसंग । कर्म केलें पाहिजे सांग । कदाचित पडिलें व्यंग । तरी प्रत्यवाय घडे ।।१।।

जीवाच्या उत्कर्षासाठी प्रथम कर्म करावे लागते. ते कर्म यथाशास्त्र व्हावे लागते. त्यात जराही चूक झाली तर दोष लागतो. ॥१॥

म्हणौन कर्म आरंभिलें । कांहीयेक सांग घडलें । जेथजेथें अंतर पडिलें । तेथें हरिस्मरण करावें ।।२।।

असा दोष लागू नये म्हणून हाती घेतलेले कर्म शक्यतो शास्त्रशुद्ध होऊनही क्वचित चूक झालीच तर हरिनामाचे स्मरण करावे. ('नामे पावन धर्म अधर्म'– ज्ञानेश्वर) त्याने ते कर्म शुद्ध होते. ॥२॥

तरी तो हरी आहे कैसा । विचार पाहावा ऐसा । संधेपूर्वी जगदीशा । चोविसां नामीं स्मरावें ।।३।।

एवढे माहात्म्य असलेला हरी कसा आहे याचा थोडासा तरी विचार करावा. त्या हरीच्या गोविंदादी चोवीस नामांचे संध्याविधी करण्यापूर्वी स्मरण करावे. ॥३॥

चोविसनामी सहस्रनामी । अनंतनामी तो अनामी । तो कैसा आहे अंतर्यामीं । विवेकें वोळखावा ।।४।।

हा हरी चोवीस नामांचाच काय पण हजार नामांचा व अनंत नामांचाही आहे! एवढेच नव्हे, तर अंतर्यामी व अनामी असून विवेकाने तो जाणावा. (अंतर्यामी– अंत:करणात राहणारा. अनामी– अरूप) ॥४॥

ब्राह्मण स्नानसंध्या करून आला । मग तो देवार्चनास बैसला । येथासांग तो पूजिला । प्रतिमादेवो ।।५।।

कोणी ब्राह्मण स्नान व संध्या करून घरातील देवांच्या नाना प्रतिमांची पूजा करण्यास बसून त्या प्रतिमारूप देवाची यथासांग पूजा करतो. ॥५॥

नाना देवांच्या प्रतिमा । लोक पूजिती धरून प्रेमा । ज्याच्या प्रतिमा तो परमात्मा । कैसा आहे ।।६।।

नाना देवांच्या अनेक प्रतिमा असतात व लोक त्यांची मोठ्या प्रेमाने पूजा करतात. पण ज्या परमात्म्याच्या त्या प्रतिमा असतात तो कसा आहे हे जाणले पाहिजे. ॥६॥

ऐसें वोळखिलें पाहिजे । वोळखोन भजन कीजे । जैसा साहेब नमस्कारिजे । वोळखिल्याउपरी ।।७।।

ज्याप्रमाणे शासकीय अधिकाऱ्याला ओळखून नमस्कार करावा त्याप्रमाणे परमेश्वराला ओळखून त्याची उपासना करावी. ॥७॥

तैसा परमात्मा परमेश्वर । बरा वोळखावा पाहोन विचार । तरीच पाविजे पार । भ्रमसागराचा ।।८।।

त्या परमात्मरूप परमेश्वराचे स्वरूप वेदान्तशास्त्रानुसार समजावून घेऊन त्या शास्त्रानुसार भक्ती घडली तरच संसारसागरातून पलीकडे जाता येते. ॥८॥

पूजा घेताती प्रतिमा । आंगा येतो अंतरात्मा । अवतारी तरी निजधामा । येऊन गेले ।।९।।

उपासकाने केलेली प्रतिमांची पूजा देवाला पोहोचते. उपासकाच्या अंत:करणात अंतरात्मा व्यापून असून प्रतिमा त्याची प्रतीके असतात. रामकृष्णांसारखे ईश्वरी अवतार जन्माला आले व देहासह गुप्त झाले. (ईश्वर = अन्तरात्मा) ॥९॥

परी ते निजरूपें असती । तें निजरूप ते जगज्जोती । सत्वगुण तयेस म्हणती । जाणती कळा ।।१०।।

पण हे अवतार त्याच्या मूळच्या ईश्वर या स्वरूपात अवतार समाप्तीनंतरही असतात. त्या मूळच्या स्वरूपाला जगज्जोती, शुद्धसत्व व जाणती कळा अशी नावे आहेत. ।।१०।।

तये कळेचे पोटीं । देव असती कोट्यानुकोटी । या अनुभवाच्या गोष्टी । प्रत्ययें पाहाव्या ।।११।।

त्या जाणत्या कळेमध्ये कोट्यवधी देव समाविष्ट असतात. मुख्य देवाचा 'मी' असा अनुभव आल्यावर ते सर्व देव कल्पित असतात असा प्रत्यक्षच अनुभव येतो! ।।११।।

देहपुरामधें ईश । म्हणोन तया नांव पुरुष । जगामधें जगदीश । तैसा वोळखावा ।।१२।।

शरीररूप शहरात ईश्वर राहतो म्हणून त्याला पुरुष म्हणतात. (पुर = शहर 'पुरि शेते इति पुरुष:') जगात रहाणाऱ्या ईश्वराला जगदीश म्हणतात. ।।१२।।

जाणीवरूपें जगदांतरें । प्रस्तुत वर्तती शरीरें । अंत:करणविष्णु येणें प्रकारें । वोळखावा ।।१३।।

जगातील जीवसृष्टीत जाणीवरूपाने राहून जीवांच्या शरीरांचे व्यापार चालविणाऱ्या ईश्वराला विष्णू म्हणतात. तो अंत:करणात व्यापून रहातो. ।।१३।।

तो विष्णु आहे जगदांतरी । तोचि आपुले अंतरीं ।कर्ता भोक्ता चतुरी । अंतरात्मा वोळखावा ।।१४।।

जो सर्व जगात व्यापून रहातो तोच विष्णु आपल्या अंत:करणात असून तो कर्ता भोक्ता अंतरात्मा शहाण्याने जाणावा. (अंतरात्मा = विष्णू = ईश्वर = कर्ताभोक्ता) ।।१४ ।.

ऐके देखे हुंगे चाखे । जाणोन विचारें ओळखे । कित्येक आपुले पारिखे । जाणताहे ।।१५।।

तोच ऐकतो, पहातो, वास घेतो, चव घेतो, समजून विचार करून ओळखतो व त्यातील आपपर भाव जाणतो. ।।१५।।

येकचि जगाचा जिव्हाळा । परी देहलोभाचा आडताळा । देहसमंधें वेगळा । अभिमान धरी ।।१६।।

अनंत सृष्टीचे तो एकच मूळ असला तरी प्रत्येक जीवाच्या देहतादात्म्यातून निर्माण होणाऱ्या देहावरील प्रेमामुळे भेद निर्माण होऊन अद्वैताच्या अनुभवात अडथळा येतो. ।।१६।।

उपजे वाढे मरे मारी । जैशा उचलती लहरीवरी लहरी । चंचळ सागरीं भरोवरी । त्रैलोक्य होत जातें ।।१७।।

जीवात्मा देहाबरोबर जन्माला येतो, वाढतो, मारतो व मरतो. ज्याप्रमाणे खवळलेल्या समुद्रावर एकामागून एक लाटा उसळतात त्याप्रमाणे अनंत ब्रह्मांडे निर्माण होतात व नष्ट होतात. ।।१७।।

त्रैलोका वर्तवतो येक । म्हणौन त्रैलोक्यनायेक । ऐसा प्रत्ययाचा विवेक । पाहाना कैसा ।।१८।।

अनंत ब्रह्मांडांचा शास्ता असल्याने त्याला त्रैलोक्यनायक म्हणतात हे चांगल्या रीतीने समजावून घ्या ना! ।।१८।।

ऐसा अंतरात्मा बोलिला । परी तोहि तत्वांमध्यें आला । पुढें विचार पाहिजे केला । माहावाक्याचा ।।१९।।

असा हा महान अंतरात्मा सुद्धा (ईश्वर) मायिक तत्त्वांतच समाविष्ट आहे. म्हणून साधकाने त्याच्या अनुसंधानात न राहता महावाक्याचे श्रवण, मनन व चिंतन करावे. ।।१९।।

आधीं देखिला देहधारी । मग पाहावें जगदांतरीं । तयाचेनियां उपरी । परब्रह्म पावे ।।२०।।

प्रथम देहधारी जीव नंतर जगताचा नियामक ईश्वर ह्यांचेहून निरुपाधिक ब्रह्म सूक्ष्म व व्यापक आहे. ।।२०।।

परब्रह्माचा विचार । होतां निवडे सारासार । चंचळ जाईल हा निर्धार । चुकेना कीं ।।२१।।

सार व असाराचा निवाडा करीतच परब्रह्माचा विचार होतो. असार चंचळ नष्ट होते व सार ब्रह्म राहते हा निर्णय कधीच चुकत नाही. ॥२१॥

उत्पत्ति स्थिती संव्हार जाण । त्याहून वेगळा निरंजन । येथें ज्ञानाचें विज्ञान । होत आहे ।।२२।।

उत्पत्ती, स्थिती व नाश ह्यांचा कारक असलेल्या ईश्वराहून निराकार परब्रह्म अलिप्त आहे. त्याचे ज्ञान झाल्यानंतर अभ्यासाने विज्ञान सिद्ध होते. (अनुभवाला येते.) ॥२२॥

अष्टदेह थानमान । जाणोन जालियां निर्शन । पुढें उरे निरंजन । विमळ ब्रह्म ।।२३।।

पिंड व ब्रह्मांडाच्या प्रत्येकी चार देहांची स्थाने व व्याप्ती लक्षात घेऊन त्यांचा निरास केल्यानंतर (ते मी नाही असा निर्णय केल्यानंतर) पुढे निराकार विमळ ब्रह्म उरते. ॥२३॥

विचारेंचि अनन्य जाला । पाहाणाराविण प्रत्यय आला । तेहि वृत्ति निवृत्तीला । बरें पाहा ।।२४।।

'मी ब्रह्म आहे' ह्या विचाराने ब्रह्माशी ऐक्य पावल्यावर ज्ञाता व ज्ञेय निवृत्त होऊन केवळ ज्ञानरूपता येते. असे झाल्यावर 'मी ब्रह्म' ही वृत्तीसुद्धा निवृत्त होते हे नीट लक्षात घ्या. ॥२४॥

येथें राहिला वाच्यांश । पाहोन सांडिला लक्ष्यांश । लक्ष्यांशासरिसा वृत्तिलेश । तोहि गेला ।।२५।।

येथे त्वं वाच्य जीव व तत् वाच्य ईश्वर आधीच मागे पडले. नंतर त्वं लक्ष्य कूटस्थ चैतन्य व तत् लक्ष्य ब्रह्म सुद्धा ऐक्यरूपाने घेऊन सोडून दिले व त्याच क्षणी हा सर्व विचार करणारी अन्त:करणवृत्तीही सुटली. ॥२५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'उपदेशनिरूपणनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'उपदेशनिरूपण' नावाचा नववा समास समाप्त

दशक अकरावा : भीमदशक

समास दहावा : निःस्पृहवर्तणूक

॥ श्रीराम समर्थ ॥

मूर्ख येकदेसी होतो । चतुर सर्वत्र पाहातो । जैसा बहुधा होऊन भोगितो । नाना सुखें ।।१।।

मूर्ख माणूस संकुचित व मर्यादित जीवन जगतो. चतुर माणूस बहुश्रुत बनून व्यापक होऊन अनेक सुखे भोगतो. ॥१॥

तोचि अंतरात्मा महंत । तो कां होईल संकोचित । प्रशस्त जाणता समस्त । विख्यात योगी ।।२।।

जो महंत ईश्वरासारखा व्यापक होतो तो संकुचित जिणे का जगेल? तो व्यापक, सर्वज्ञ व प्रसिद्ध योगी होतो. ॥२॥

कर्ता भोक्ता तत्वता । भूमंडळीं सर्व सत्ता । त्यावेगळा त्यास ज्ञाता । पाहेसा कवणु ।।३।।

तत्त्वदृष्टीने तो सर्वकर्ता व सर्वभोक्ता असून सर्व ब्रह्मांडावर जणू त्याची सत्ता चालते. त्याचे खरे स्वरूप जाणणारा त्या स्वत:हून वेगळा कोण आणावा? ॥३॥

ऐसें महंतें असावें । सर्व सार शोधून घ्यावें । पाहों जातां न संपडावें । येकायेकी ।।४।।

महंताने सर्वाचे सार निवडून घेऊन सारनिष्ठ रहावे. कोणाला कितीही हवासा वाटला तरी सहसा सापडू नये. (लोकेषणा नसावी.) ॥४॥

कीर्तिरूपें उदंड ख्यात । जाणती लाहान थोर समस्त । वेश पाहातां शाश्वत । येकहि नाहीं ।।५।।

उदंड कीर्तीच्या रूपाने तो सुविख्यात असून समाजाच्या सर्व स्तरांतील लोक त्याला जाणतात. पण 'हा असा' असे त्याचे बहिरंग ठामपणे सांगता येत नाहीत. ॥५॥

प्रगट कीर्ति ते ढळेना । बहुत जनास कळेना । पाहों जातां आडळेना । काये कैसें ।।६।।

त्याच्या उघडपणे असलेल्या कीर्तीला उणेपणा कधीच येत नाही. पण फार मोठ्या समाजाला त्याचेविषयी नक्की अंदाज बांधता येत नाही व तसा प्रयत्न केला तर बऱ्याच गोष्टी न कळता तशाच राहून जातात. ॥६॥

वेषभूषण तें दूषण । कीर्तीभूषण तें भूषण । चाळणेविण येक क्षण । जाऊंच नेदी ।।७।।

केवळ वेशामुळे महंती ओळखू येत असेल तर ते महंतीला दूषणास्पद आहे. कीर्तीमुळे महंत ओळखला जात असेल तर ते भूषण आहे. असा महंत कार्याविषयी सतत विचार करून धोरणे बांधीत असतो. ॥७॥

त्यागी वोळखीचे जन । सर्वकाळ नित्य नूतन । लोक शोधून पाहाती मन । परी इच्छा दिसेना ।।८।।

कार्याच्या निमित्ताने जेथे बऱ्याच लोकांची ओळख होऊन जम बसलेला असतो, ते ठिकाण सोडून तो नव्या क्षेत्रात कार्यासाठी जातो. सर्वत्र लोक त्याच्या अंतरंगाचा ठाव घेतात, पण त्यांना महंताचा स्वार्थ कोठेही दिसत नाही. ॥८॥

पुर्ते कोणाकडे पाहेना । पुर्ते कोणासीं बोलेना । पुर्ते येके स्थळीं राहेना । उठोन जातो ।।९।।

काही ठराविक व्यक्तींशीच सतत अनुसंधान बांधून राहत नाही. सतत त्याच त्याच लोकांशी मसलत करीत नाही व एकाच ठिकाणी स्थिरपणे राहत नाही. कार्य मार्गी लागताच तेथून निघून जातो. ॥९॥

जातें स्थळ तें सांगेना । सांगितलें तेथें तरी जायेना । आपुली स्थिती अनुमाना । येवोंच नेदी ।।१०।।

लोकेषणा टाळण्यासाठी व कार्याची गुप्तता सांभाळण्यासाठी पुढील मुक्कामाची जागा सांगत नाही व सांगितलीच

तर तेथे जाईलच असे नाही. अशा रीतीने स्वत:चा व कार्याचा कोठे बभ्रा होऊ देत नाही. ॥१०॥

लोकीं केलें तें चुकावी । लोकीं भाविलें तें उलथवी । लोकीं तर्किलें तें दावी । निर्फळ करूनी ।।११।।

महंताच्या बहिरंगावरून त्याच्यासंबंधी कोणी अंदाज केला तर तो चुकीचा ठरवतो. लोकांची काही अनुकूल प्रतिकूल भावना झाली असेल तर ती निरर्थक करतो. लोकांनी त्याचे व्यक्तिमत्त्व व कार्य ह्यासंबंधी काही तर्क बांधला असेल तर त्यावरून कोणाला काही ठरविता येत नाही. ॥११॥

लोकांस पाह्याचा आदर । तेथें याचा अनादर । लोक सर्वकाळ तत्पर । तेथें याची अनिछ्या ।।१२।।

लोकांना तो भेटावे असे वाटते, पण त्याला ते नको असते. लोक त्याची सेवा करण्यासाठी तत्पर असतात, पण त्याला ती नको असते. ॥१२॥

एवं कल्पितां कल्पेना । ना तर्कितांहि तर्केना । कदापी भावितां भावेना । योगेश्वर ।।१३।।

एकूण हा श्रेष्ठ योगी कल्पना, तर्क व भावना ह्यांच्या आवाक्यात सापडत नाही. (ज्ञानी व अज्ञानी ह्यांच्यातील संबंध असेच असावयाचे.) ॥१३॥

ऐसें अंतर सापडेना । शरीर ठाईं पडेना । क्षणयेक विशंभेना । कथाकीर्तन ।।१४।।

अशा प्रकारे त्याच्या अन्तरंगांचा अंदाज लागत नाही व शरीरानेही तो एके ठिकाणी राहत नाही, पण कथाकीर्तनादी उपासना मात्र कधीच चुकत नाही. ॥१४॥

लोक संकल्प विकल्प करिती । ते अवघेचि निर्फळ होती । जनाची जना लाजवी वृत्ति । तेव्हां योगेश्वर ।।१५।।

लोक महंतासंबंधी त्यांच्या बुद्धीप्रमाणे 'हा असा आहे, तसा आहे' इ. प्रकारे समजुती करून घेतात. पण त्या सर्वच चुकीच्या ठरतात. नंतर लोकांनाच आपल्या समजुतींचे वैगुण्य लक्षात आले की ते वरमतात. योगेश्वर असावा तर असा! ॥१५॥

बहुतीं शोधून पाहिलें । बहुतांच्या मनास आलें । तरी मग जाणावें साधिलें । महत्कृत्य ।।१६।।

मोठ्या जनसमुदायाने परीक्षा केल्यावर त्याच्या कसोटीला जर उतरले तर मग एखाद्या मोठ्या कार्याची सिद्धी झालीच म्हणून समजावे. ते कार्य हाती घेऊन तडीला नेता येते. ॥१६॥

अखंड येकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा । काळ सार्थकचि करावा । जनासहित ।।१७।।

महंताने जास्तीत जास्त वेळ एकांतात राहून कार्यासंबंधी अभ्यास करीत रहावे. वेदान्तचिंतन सोडू नये. आपले आयुष्य लोकांसह सार्थकी लावावे. ॥१७॥

उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनास सिकवावे । उदंड समुदाये करावे । परी गुप्तरूपें ।।१८।।

जेथे जे चांगले असेल ते शिकून लोकांना शिकवावे. स्वत: अलिप्त राहून समाजात संघटना उभाराव्यात. ॥१८॥

अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावें जग । लोक समजोन मग । आज्ञा इछिती ।।१९।।

सतत कार्यतत्पर राहून समाजाला उपासनेला प्रवृत्त करावे. लोकांना जेव्हा त्याची तळमळ लक्षात येते तेव्हा ते त्याच्या सर्व आज्ञा आनंदाने पाळतात. ॥१९॥

आधीं कष्ट मग फळ । कष्टचि नाहीं तें निर्फळ । साक्षेपेंविण केवळ । वृथापुष्ट ।।२०।।

प्रथम अथक प्रयत्न योग्य दिशेने केल्याशिवाय फळ मिळत नाही. कष्टावाचून आशाआकांक्षा व्यर्थ जातात. सतत प्रयत्न नसतील तर ते न करणारा स्वत:ला अकारण पोसतो. ॥२०॥

लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे । जाणजाणोन धरावे । जवळ दुरी ।।२१।।

जागोजागी अनेक लोक शोधावेत, त्यांची योग्यता लक्षात घेऊन त्यांना जवळ करावे किंवा दूर ठेवावे. ॥२१॥

अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नस्तां वेर्थ जातें । जाणोनि शोधावीं चित्तें । नाना प्रकारें ।।२२।।

आवश्यक ती योग्यता असेल तरच कार्य होते. भलत्या माणसाकडे कार्य सोपवले तर कार्यनाश होतो. म्हणून अनेकांची मने तपासून पहावीत. ॥२२॥

अधिकार पाहोन कार्य सांगणें । साक्षेप पाहोन विश्वास धरणें । आपला मगज राखणें । कांहींतरी ।।२३।।

अधिकार असेल तरच काम सांगावे. क्रियाशीलता पाहून त्यावर विसंबून राहावे व ह्या सर्व उलाढालीत प्रवाहपतित न होता आपली बुद्धी शाबूत ठेवावी. ॥२३॥

हें प्रचितीचें बोलिलें । आधीं केलें मग सांगितलें । मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणीयेकें ।।२४।।

आतापर्यन्त जे मी सांगितले ते अनुभवातून आलेले असून ते प्रत्यक्ष कृतीवर आधारलेले आहे. हे मी आधी केले आहे. ते पटले तर कोणीतरी स्वीकारावे. ॥२४॥

महंते महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे । जाणते करून विखरावे । नाना देसीं ।।२५।।

महंताने स्वत:सारखे महंत तयार करावेत. त्यांना सर्व प्रकारचे ज्ञान व युक्त्या सांगून अधिकारसंपन्न करून कार्यासाठी जागोजागी पाठवावे. ॥२५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'निःस्पृहवर्तणूकनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'निःस्पृहवर्तणूक' नावाचा दहावा समास समाप्त
—दशक अकरावा समाप्त—

दशक बारावा : विवेकवैराग्य

समास पहिला : विमळलक्षण

।। श्रीराम समर्थ ।।

आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थविवेका । येथें आळस करूं नका । विवेकी हो ।।१।।

दिवसभराच्या जीवनात चरितार्थ व प्रपंच नेटाने करून दिवसाच्या उत्तरार्धात परमार्थातील विवेकाचे चिंतन करावे किंवा जीवनाच्या पूर्वार्धात प्राधान्याने प्रपंच करून उत्तरार्धात पारमार्थिक विवेकाचा अभ्यास करीत असावे.(उत्तरार्धात प्रपंचाला गौणत्व देऊन प्राधान्याने परमार्थ करावा.) ॥१॥

प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल । प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी ।।२।।

प्रपंचाकडे दुर्लक्ष करून केवळ परमार्थात दंग रहाल तरी तुम्ही कष्टी व्हाल. प्रपंच व परमार्थ दोन्ही चालवाल तर तुम्हाला विचारी म्हणता येईल. ॥२॥

प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला । मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ।।३।।

प्रापंचिक जबाबदाऱ्या व व्यवसायादी सोडून परमार्थ साधण्याचा प्रयत्न केला तर दोन वेळा जेवण मिळणेही अवघड होते. ह्या भुकेल्या करंट्याला परमार्थ कसा साधेल? ॥३॥

परमार्थ सांडून प्रपंच करिसी । तरी तूं येमयातना भोगिसी । अंती परम कष्टी होसी । येमयातना भोगितां ।।४।।

परमार्थाचा विचारही न करता केवळ प्रपंचाचा गाडा चालवीत राहिले तर त्रिविध तापांचे नर्कातील जीवन भोगावे लागते. आयुष्याच्या अखेरीस यातना भोगाव्या लागतात. ॥४॥

साहेबकामास नाहीं गेला । गृहींच सुरवाडोन बैसला । तरी साहेब कुटील तयाला । पाहाती लोक ।।५।।

नोकर मालकाकडे कामाला गेला नाही, तर मालक त्याला दंड करतो. अशा कामचुकार, सुखलोलुप, माणसाला होणारे शासन सर्वांना दिसते. ॥५॥

तेव्हां महत्वचि गेलें । दुर्जनाचें हासें जालें । दुःख उदंड भोगिलें । आपुल्या जीवें ।।६।।

असे झाले म्हणजे समाजातील प्रतिष्ठा जाते, टवाळ लोक टर उडवितात व त्यालाही सतत यातना भोगाव्या लागतात. ॥६॥

तैसेंचि होणार अंतीं । म्हणौन भजावें भगवंती । परमार्थाची प्रचिती । रोकडी घ्यावी ।।७।।

परमार्थ न केल्यास आयुष्याच्या अखेरीस असेच होईल. म्हणून ईश्वराची उपासना करून ज्ञानाने मुक्त होऊन पारमार्थिक आनंदाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा. ॥७॥

संसारीं असतां मुक्त । तोचि जाणावा संयुक्त । अखंड पाहे युक्तायुक्त । विचारणा हे ।।८।।

प्रपंचव्यवहार करीत असताना जीवनमुक्ती भोगणारा, प्रपंच व परमार्थ अशा दोन्हीकडे (संयुक्त) मान्य होतो.

असा जो असतो तो सत्य, नित्य, अनादि, अनंत (युक्त) व मिथ्या अनित्य, सादि, सान्त (अयुक्त) ह्यांचा सतत विवेक करतो. (उदा. श्री एकनाथ महाराज). ॥८॥

प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करील जाण । प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ।।९।।

जो जागरूकतेने प्रपंच करतो त्यालाच निश्चितपणे परमार्थ साधता येतो. प्रपंच ज्याला धड करता येत नाही तो परमार्थात अपयशीच होणार. जागरूकता हा गुण दोन्हीत सारखाच आवश्यक आहे. (श्री. संत तुकाराम महाराज हे या सामान्य नियमाला अत्यंत सन्माननीय अपवाद आहेत. त्यांची सामान्यात गणना करणे हा महाअपराध होय.) ॥९॥

म्हणौन सावधानपणें । प्रपंच परमार्थ चालवणें । ऐसें न करितां भोगणें । नाना दुःखें ।।१०।।

म्हणून अत्यंत सावधपणे प्रपंच तडीला नेऊन परमार्थही सिद्धीला न्यावा. अन्यथा अनंत दुःखे भोगावी लागतात. ॥१०॥

पर्णाळि पाहोन उचले । जीवसृष्टी विवेकें चाले । आणि पुरुष होऊन भ्रमले । यासी काय म्हणावें ।।११।।

पानावरील क्षुद्र आळीसुद्धा पुढील पानावर स्थिर झाल्याशिवाय मागील पान सोडीत नाही. सर्व जीवसृष्टी अशीच सावधपणे जीवन जगते आणि माणसाचे शरीर मिळूनही बेसावध असेल त्याला काय म्हणावे! ॥११॥

म्हणौन असावी दीर्घ सूचना । अखंड करावी चाळणा । पुढील होणार अनुमाना । आणून सोडावें ।।१२।।

म्हणून दूरदृष्टीने सतत विचार करून संभाव्य परिस्थितीचा अगोदरच अंदाज बांधून ठेवावा. ॥१२॥

सुखी असतो खबर्दार । दुःखी होतो बेखबर । ऐसा हा लोकिक विचार । दिसतचि आहे ।।१३।।

जो सावध असतो तो सुखाने जगतो व बेसावधाला नाना प्रकारचे ताप भोगावे लागतात. व्यवहारातील हे वास्तव सर्वांनाच ठाऊक आहे. ॥१३॥

म्हणौन सर्वसावधान । धन्य तयाचें महिमान । जनीं राखें समाधान । तोचि येक ।।१४।।

म्हणून कुटुंब, व्यवसाय, समाज, राजकारण, धर्म, न्याय इ. सर्व बाबतीत जो सावध असतो, त्याचे माहात्म्य खरोखर अवर्णनीय असते. सर्वात राहूनही तो एकटाच स्वतःचे समाधान बिघडू देत नाही. किंवा सर्वांचे समाधान होईल अशा रीतीने वागतो. ॥१४॥

चाळणेचा आळस केला । तरी अवचिता पडेल घाला । ते वेळे सावरायाला । अवकाश कैंचा ।।१५।।

अचूक विचार करण्यात कसूर झाली तर अचानक संकट येऊन कोसळते. त्यातून स्वतःला वाचवण्यासाठी वेळ कोठून आणणार? किंवा वाट कशी सापडणार? ॥१५॥

म्हणौन दीर्घसूचनेचे लोक । त्यांचा पाहावा विवेक । लोकांकरितां लोक । शाहाणे होती ।।१६।।

म्हणून दूरदृष्टीने जीवन जगणाऱ्यांचा आदर्श पुढे ठेवावा. एक शहाणा झाला की पुढे अनेक लोक शहाणे होत जातात. ॥१६॥

परी ते शाहाणे वोळखावे । गुणवंताचे गुण घ्यावे । अवगुण देखोन सांडावे । जनामधें ।।१७।।

पण असे शहाणे ओळखण्यासाठी दृष्टी असावी लागते. ते ओळखून त्यांचे सद्‌गुण वेचून घ्यावेत. लोकांमध्ये वावरताना जे दुर्गुण दिसून येतील, ते दुर्गुण स्वतःपासून दूर ठेवावेत. ॥१७॥

मनुष्य पारखूं राहेना । आणि कोणाचें मन तोडीना । मनुष्यमात्र अनुमाना । आणून पाहे ।।१८।।

शहाणा सर्वांना बरोबर पारखून कोणाचेही संबंध न बिघडू देता सर्व माणसांचे अंतरंग जाणून त्यांच्यात वावरतो. ॥१८॥

दिसे सकळांस सारिखा । पाहातां विवेकी नेटका । कामी निकामी लोकां । बरें पाहे ॥१९॥

तो सर्वांशी सारख्याच सलोख्याने वागतो असे सर्वांनाच वाटते! पण आतून त्याने सर्वांना पारखून ठेवून त्यातील कार्यक्षम व उपयुक्त कोण व टाकावू कोण ह्याचा निवाडा केलेला असतो. ॥१९॥

जाणोन पाहिजेत सर्व । हेंचि तयाचें अपूर्व । ज्याचें त्यापरी गौरव । राखों जाणे ॥२०॥

ज्यांना त्यांना ओळखून तो जवळ करतो. ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार त्याच्याशी वागतो हेच त्याचे माहात्म्य होय. ॥२०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'विमळलक्षणनाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'विमळलक्षण' नावाचा पहिला समास समाप्त

दशक बारावा : विवेकवैराग्य

समास दुसरा : प्रत्ययनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ऐका संसारासी आले हो । स्त्री पुरुष निस्पृह हो । सुचितपणें पाहो । अर्थांतर ।।१।।

हे ह्या पृथ्वीवर जन्मलेल्या निस्पृह स्त्रीपुरुषांनो, परमार्थाहून वेगळ्या प्राप्तव्याविषयी (अर्थांतर) आता नीट लक्ष देऊन ऐका, (अर्थ = प्राप्तव्य = जे मिळवावयाचे ते. अर्थान्तर = वेगळे प्राप्तव्य.)

काये म्हणते वासना । काये कल्पिते कल्पना । अंतरींचे तरंग नाना । प्रकारें उठती ।।२।।

वासनेच्या पोटात कोणत्या कामना दडलेल्या असतात, कल्पनेच्या भराऱ्या कोणत्या विषयांच्या असतात व अन्त:करणात उमटणाऱ्या अनेक विचारतरंगांचे खेळ कसे चालतात ते आता ऐका. ॥२॥

बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें । मनासारिखें असावें । सकळ कांहीं ।।३।।

रोजच्या खाण्यापिण्यात व जेवण्यात रुचकर व पौष्टिक पदार्थ भरपूर असावेत. अंगावरील वस्त्रे उत्तम असावीत, भूषणांनी देह सजवावा व जीवनातील प्रत्येक गोष्ट आपल्या मनासारखी सतत मिळत रहावी. ॥३॥

ऐसें आहे मनोगत । तरी ते कांहींच न होत । बरें करितां अकस्मात । वाईट होतें ।।४।।

असे सर्वांचेच मनोगत असले तरी तसे कोणाचेही व कधीही सातत्याने पूर्ण होत नाहीत व अनपेक्षितपणे प्रतिकूल घटना घडतात. ॥४॥

येक सुखी येक दु:खी । प्रत्यक्ष वर्ततें लोकीं । कष्टी होऊनियां सेखीं । प्रारब्धावरी घालिती ।।५।।

दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष असे दिसते की कोणी सुखात असतात तर कोणी दु:खात. दु:ख वाट्याला येऊन हतबल झाल्यावर प्रारब्धाच्या नावाने बोटे मोडीत बसतात. ॥५॥

अचुक येत्न करवेना । म्हणौन केलें तें सजेना । आपला अवगुण जाणवेना । कांहीं केल्यां ।।६।।

यश व सुखासाठी जसा अचूक प्रयत्न करणे जरूर असते तसा तो हातून होत नाही व म्हणून हाती घेतलेल्या कार्यात यश येत नाही. ह्यात आपल्याकडे येणारा दोष काही केले तरी कळत नाही व मान्यही होत नाही! ॥६॥

जो आपला आपण नेणे । तो दुसऱ्याचें काये जाणे । न्याये सांडितां दैन्यवाणे । होती लोक ।।७।।

जो स्वत: स्वत:चीच नीट परीक्षा करू शकत नाही तो दुसऱ्याचे अंतरंग काय जाणणार? 'प्रयत्न अचूक असलाच पाहिजे' हा नियम जे मोडतात त्यांना हाल अपेष्टा सोसाव्या लागून दैन्य वाट्याला येते. ॥७॥

लोकांचें मनोगत कळेना । लोकांसारिखें वर्तवेना । मूर्खपणें लोकीं नाना । कळह उठती ।।८।।

लोकांच्या विचारांची दिशा कळत नाही. त्यानुसार जगात वागता येत नाही. ह्या मूर्खपणामुळे व्यवहारात अनेक संघर्ष उभे राहतात. ॥८॥

मग ते कळो वाढती । परस्परें कष्टी होती । प्रेत्न राहातां अंतीं । श्रमचि होयें ।।९।।

हे संघर्ष वाढतच राहिले की एकमेकांना यातना देणेही वाढतच राहते व शेवटी सर्व प्रयत्न संपून केवळ कष्टच उरतात. ॥९॥

ऐसी नव्हे वर्तणुक । परीक्षावे नाना लोक । समजलें पाहिजे नेमक । ज्याचें त्यापरी ।।१०।।

जगात असे वागून चालत नाही. सर्व संबंधितांची सर्व प्रकारे परीक्षा करता आली पाहिजे. त्यानुसार प्रत्येकाशी वागता आले पाहिजे. ॥१०॥

शब्दपरीक्षा अंतरपरीक्षा । कांही येक कळे दक्षा । मनोगत नतद्रक्षा । काय कळे ।।११।।

माणसाच्या बोलण्यावरून व हालचालींवरून (Body Language) त्याची अंतर्परीक्षा करण्याचे कसब चाणाक्ष व्यक्तीजवळ असते. विचाराची दृष्टी गमावून बसलेल्याला काय कळणार? ॥११॥

दुसऱ्यास शब्द ठेवणें । आपला कैपक्ष घेणें । पाहों जातां लोकिक लक्षणें । बहुतेक ऐसीं ।।१२।।

दुसऱ्याला दोष देऊन स्वत:च्या वागण्याचे समर्थन करण्याचा प्रकार ह्या जगात बहुतेक सर्वांकडेच असतो. ॥१२॥

लोकीं बरें म्हणायाकारणें । भल्यास लागतें सोसणें । न सोसितां भंडवाणें । सहजचि होये ।।१३।।

समाजामध्ये भलेपणाने राहावयाचे असेल तर त्या भल्या माणसाला समाजाचे पुष्कळ सोसावे लागते. सोसले नाही तर भांडखोर म्हणवून घ्यावे लागणे सहजच घडते. ॥१३॥

आपणास जें मानेना । तेथें कदापि राहावेना । उरी तोडून जावेना । कोणीयेकें ।।१४।।

जेथे सर्व मनाविरुद्ध घडते, तेथे थांबणेही कठीण होते व भीड पडल्यामुळे तुकडा पाडून निघूनही जाता येत नाही. ॥१४॥

बोलतो खरें चालतो खरें । त्यास मानिती लहानथोरें । न्याये अन्याये परस्परें । सहजचि कळे ।।१५।।

जो योग्य ते बोलतो व तसे स्वत: वागतो त्याला समाजाच्या सर्व थरातील लोक मान देतात. न्याय व अन्याय ह्यांचा निवाडा समाज अगदी सहजतेने करीत असतो. (न्याय = खरे. अन्याय = खोटे) ॥१५॥

लोकांस कळेना तंवरी । विवेकें क्ष्मा जो न करी । तेणेंकरितां बराबरी । होत जाते ।।१६।।

जोपर्यन्त बहुसंख्य लोकांना थोरवी कळत नाही तोपर्यन्त ते थोरालाही दूषणे देतात. खरा थोर असतो तो अशा प्रसंगी क्षमाशील असतो. असे नसेल तर थोर व सामान्य ह्यांत फरक तो काय उरला? दोन्ही एकाच पातळीवर येतात. ॥१६॥

जंवरी चंदन झिजेना । तंव तो सुगंध कळेना । चंदन आणि वृक्ष नाना । सगट होती ।।१७।।

चंदनाचे खोड उगाळल्याशिवाय त्याचा सुगंध पसरत नाही. तोपर्यंत इतर वृक्ष व चंदन सारखेच वाटतात. ॥१७॥

जंव उत्तम गुण न कळे । तों या जनास काये कळे । उत्तम गुण देखतां निवळे । जगदांतर ।।१८।।

त्याप्रमाणे क्षमेचे व्रत अंगिकारल्याशिवाय व महात्म्याचे उत्तम गुण लक्षात येईपर्यन्त सामान्य माणसांना काय समजणार? ते लक्षात येताच समाजाचे त्याचेविषयीचे संशय दूर होतात. ॥१८॥

जगदांतर निवळत गेलें । जगदांतरीं सख्य जालें । मग जाणावें वोळले । विश्वजन ।।१९।।

समाजमन असे निवून गेल्यावर सर्वत्र अनुकूलता मिळते व सर्व जग आपलेसे होते असे खुशाल समजावे. ॥१९॥

जनींजनार्दन वोळला । तरी काये उणें तयाला । राजी राखावें सकळांला । कठीण आहे ।।२०।।

सर्व लोकांच्या रूपाने असलेला जनार्दन ज्यावर प्रसन्न होतो त्याला काय कमी पडणार? (ज्याची लोक पूजा व प्रार्थना करतात तो जनार्दन.) पण त्यासाठी सर्वांची मने सांभाळावी लागतात. हे वाटते तेवढे सोपे नाही! ॥२०॥

पेरिलें तें उगवतें । उसिणें द्यावें घ्यावे लागतें । वर्म काढितां भंगतें । परांतर ।।२१।।

जे पेरावे ते उगवते. व्यवहारात काही मागावे लागते, काही द्यावे लागते. दुसऱ्यांची उणीदुणी काढली तर ते दुखावले जातात. वैरी बनतात. ॥२१॥

लोकिकीं बरेंपण केलें । तेणें सौख्य वाढलें । उत्तरासारिखें आलें । प्रत्योत्तर ।।२२।।

समाजात चांगुलपणाने वागले तर जीवन सुखाचे होते. जसे आपण समाजाशी वागतो तसा प्रतिसाद समाज देतो. ॥२२॥

हें आवघें आपणांपासी । येथें बोल नाही जनासी । सिकवावें आपल्या मनासी । क्षणक्षणा ।।२३।।

हा सर्व विचार आपला आपणच करावयाचा आहे. लोकांना दोष देण्यात अर्थ नाही. आतापर्यंत सांगितलेली शिकवण स्वत:च्या मनाला सतत देत रहावी. ॥२३॥

खळ दुर्जन भेटला । क्षमेचा धीर बुडाला । तरी मोनेंचि स्थळत्याग केला । पाहिजे साधकें ।।२४।।

प्रामाणिक साधकाची अत्यंत दुष्ट दुर्जनाशी गाठ पडल्यावर जर त्याचा त्रास सहन करणे अशक्यच झाले तर आरडाओरडा किंवा आदळआपट इ. प्रकारे त्रागा न करता दुसरे कार्यक्षेत्र निवडावे. ॥२४॥

लोक नाना परीक्षा जाणती । अंतरपरीक्षा नेणती । तेणें प्राणी करंटे होती । संदेह नाहीं ।।२५।।

सामान्य माणसे बहिरंगावरून परीक्षा करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना अंतरंगाची परीक्षा करता येत नाही. त्यामुळे ते करंटे होतात ह्यांत शंका नाही. ॥२५॥

आपणास आहे मरण । म्हणौन राखावें बरेंपण । कठिण आहे लक्षण । विवेकाचें ।।२६।।

आपल्याला एक दिवस मरण यावयाचे आहे व सर्व सोडून जायचे आहे, हे लक्षात घेऊन जेवढी शक्य तेवढी किंमत देऊन आपला चांगुलपणा सांभाळावा. असा विवेक सांभाळून रहाणे कठीण आहे हे मात्र खरे. ॥२६॥

थोर लाहान समान । आपले पारिखे सकळ जन । चढतें वाढतें सनेधान । करितां बरें ।।२७।।

प्रतिष्ठित श्रीमंत व सामान्य गरीब, परिचयाचे व अनोळखी अशा सर्वांशी सारखेपणाने वागावे. त्यांच्याशी अधिकाधिक संबंध वाढवीत रहावे हे चांगले. ॥२७॥

बरें करितां बरें होतें । हें तों प्रत्ययास येतें । आतां पुढे सांगावें तें । कोणास काये ।।२८।।

आपण चांगले असलो तर सर्व चांगले होते हा तर सर्वांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. शहाण्याला आणखी काय सांगावें. ॥२८॥

हरिकथानिरूपण । बरेपणें राजकारण । प्रसंग पाहिल्याविण । सकळ खोटें ।।२९।।

हरिकथा करावी, निर्गुण हरीचे निरूपण करावे. सर्वांचे हित डोळ्यासमोर ठेवून नेमस्त राजकारण करावे. प्रसंगमान व कालमान ओळखून कार्य केले नाही तर अपयश येते. ॥२९॥

विद्या उदंडचि सिकला । प्रसंगमान चुकतचि गेला । तरी मग तये विद्येला । कोण पुसे ।।३०।।

ग्रंथज्ञानाने कितीही पदव्या मिळविल्या पण त्या त्या प्रसंगाशी सुसंगत वागता बोलता आले नाही, तर मग त्या पदव्यांची काय किंमत? सर्व ज्ञान व्यर्थ जाते. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'प्रत्ययनिरूपणनाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'प्रत्ययनिरूपण' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक बारावा : विवेकवैराग्य

समास तिसरा : भक्तनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

पृथ्वीमधें बहुत लोक । तेंहि पाहावा विवेक । इहलोक आणि परलोक । बरा पाहावा ।।१।।

या पृथ्वीवर राहणाऱ्या पुष्कळ लोकांनी हा मर्त्यलोक व वैकुंठादी लोक यातील फरक (विवेक) लक्षात घ्यावा आणि नित्यअनित्यादी विवेकाचा सतत विचार करावा. (पहा कठ उप. २-३-५) ॥१॥

इहलोक साधायाकारणें । जाणत्याची संगती धरणें । परलोक साधायाकारणें । सद्‌गुरु पाहिजे ।।२।।

या जगातील यशस्वी जीवनासाठी अनुभवी बुद्धिवानाची संगत धरावी. परलोकातील सद्‌गतीसाठी सद्‌गुरूंना शरण जावे. (लोक = वैकुंठादी पौराणिक लोक. वेदांतदृष्ट्या आत्मज्ञान हाच आत्मलोक समजावा.) ॥२॥

सद्‌गुरुसी काये पुसावें । हेंहि कळेना स्वभावें । अनन्यभावें येकभावें । दोनी गोष्टी पुसाव्या ।।३।।

सद्‌गुरूंना शरण जाऊन त्यांचा अनुग्रह घेऊनही त्यांना नेमका कोणता प्रश्न विचारावा हे अविद्येच्या बुद्धीवरील प्रभावामुळे (स्वभावे) समजत नाही. म्हणून त्यांना निष्ठापूर्वक अनन्यभावाने शरण जाऊन दोन प्रश्न विचारावेत. ते असे– ॥३॥

दोनी गोष्टी त्या कोण । देव कोण आपण कोण । या गोष्टींचे विवरण । केलेंचि करावें ।।४।।

मी कोण आहे व देवाचे स्वरूप काय आहे असे ते दोन प्रश्न असून त्यांच्या मिळालेल्या उत्तरांचे सतत मनन व चिंतन करावे. सतत स्पष्टीकरण वाचावे, ऐकावे, सांगावे. ॥४॥

आधीं मुख्य देव तो कोण । मग आपण भक्त तो कोण । पंचीकर्ण माहावाक्यविवरण । केलेंचि करावें ।।५।।

मुख्य देव कोणता व त्याचा भक्त होऊ पाहणार 'मी' नेमका कोण हे समजावून घ्यावे. पंचीकरण शास्त्राचा सतत अभ्यास करावा. 'तत् त्वम् असि', 'अयमात्मा ब्रह्म' इ. महावाक्यांचा अत्यंत सूक्ष्म विचार पुन्हा पुन्हा करावा. ॥५॥

सकळ केलियाचें फळ । शाश्वत वोळखावें निश्चळ । आपण कोण हा केवळ । शोध घ्यावा ।।६।।

हे सर्व करण्याचे एकमेव फळ म्हणजे शाश्वताचा कायम झालेला निवाडा हे होय. त्या आधारे 'मी कोण' या प्रश्नाचे शास्त्रानुसारी उत्तर मिळवून त्या चिंतनात असावे. ॥६॥

सारासार विचार घेतां । पदांस नाहीं शाश्वतता । आधी कारण भगवंता । वोळखिलें पाहिजे ।।७।।

सार व असार यांचा निवाडा करता करता नामरूपांचे पदार्थ अशाश्वत म्हणजे असार असतात असे ठरते, त्यांना ज्याने निर्माण केले (कारण) त्या भगवंताला जाणले पाहिजे. ॥७॥

निश्चळ चंचळ आणी जड । अवघा मायेचा पवाड । यामधें वस्तु जाड । जाणार नाहीं ।।८।।

पांचभौतिक अचेतन (जड), जीव व ईश्वरात्मक चंचळ व तत् सापेक्ष निश्चळ ब्रह्म ही सर्व केवळ बोलणी असून ती सर्व मायिक आहेत. सत्यस्वरूप तत्त्वांत असे विभाग कधीच नसतात.('अविभागेन दृष्टत्वात्'–ब्र.सू.) ॥८॥

तें परब्रह्म धुंडावें । विवेकें त्रैलोक्य हिंडावें । माईक विचारें खंडावें । परीक्षवंती ।।९।।

त्या परब्रह्माचे ज्ञान होण्यासाठी हवे तर त्रैलोक्याचा झाडा घ्यावा व विवेकाच्या दृष्टीने त्याकडे पहावे. विवेक

बुद्धीने परीक्षा करण्याचे कसब मिळवून त्रैलोक्य हे पांचभौतिक असल्याने मायिक आहे असे निश्चित करून त्या विषयीची आसक्ती झटकून टाकावी. (खंडून) ॥९॥

खोटें सोडून खरें घ्यावे । परीक्षवंतीं परीक्षावें । मायेचें अवघेंचि जाणावें । रूप माईक ।।१०।।

परीक्षकांनी परीक्षा करून मिथ्या दृश्यसृष्टीला बाजूला सारून तिचे अधिष्ठान असलेल्या सत्य तत्त्वाच्या अनुसंधानात रहावे. मायिक दृश्यसृष्टी समग्र मायिक असते हे लक्षात घ्यावे. ॥१०॥

पंचभूतिक हे माया । माईक जाये विलया । पिंडब्रह्मांड अष्टकाया । नासिवंत ।।११।।

मायेच्या पंचभूतांची सृष्टी तयार झाली असून ती मायिक असल्याने तिचा प्रलय होणारच. पिंड व ब्रह्मांडाचे आठ देह नाशिवंत असतात. ॥११॥

दिसेल तितुकें नासेल । उपजेल तितुकें मरेल । रचेल तितुकें खचेल । रूप मायेचें ।।१२।।

जे जे पंचज्ञानेंद्रियांना कळते ते विनाशी असते. जे जन्माला येते त्याला मरण येणारच. जे उभारले जाते ते खचते. कळणे, जन्मणे व उभारणे ही सर्व मायेची रूपे आहेत. ॥१२॥

वाढेल तितुकें मोडेल । येईल तितुकें जाईल । भूतांस भूत खाईल । कल्पांतकाळीं ।।१३।।

जे जे वाढीला लागते ते ते मोडते. जे आलेले असते ते हमखास जाते. कल्पाचा अंत होताना उलट्या क्रमाने भूतात भूते लय पावतील. (पृथ्वी पाण्यात विरेल. इ.) ॥१३॥

देहधारक तितुके नासती । हे तों रोकडी प्रचिती । मनुष्येंविण उत्पत्ति । रेत कैंचें ।।१४।।

ज्यांना शरीर असते त्यांना मरण असते, हे तर हरघडी सर्वांना दिसते. माणसाचे शरीर आहे म्हणून त्यात शुक्रजंतू आहेत (त्यापासून आणखी शरीरे जन्माला येतात.) ॥१४॥

अन्न नस्तां रेत कैंचें । वोषधी नस्तां अन्न कैंचें । वोषधीस जीणें कैंचें । पृथ्वी नस्तां ।।१५।।

अन्नाने शरीर पुष्ट होऊन तारुण्य आल्याशिवाय शुक्रजंतू कोठून येतील? धान्य नसेल तर, अन्न कसे निर्माण होईल? जमीन नसेल तर धान्य कसे उगवेल? ॥१५॥

आप नस्तां पृथ्वी नाहीं । तेज नस्तां आप नाहीं । वायो नस्तां तेज नाहीं । ऐसें जाणावें ।।१६।।

पाण्यातून पृथ्वी निर्माण झाली असल्यामुळे पाणी नसेल तर पृथ्वी नाही, तेज नसेल तर पाणी नाही, वायू नसेल तर तेज नाही असा क्रम लक्षात घ्यावा. ॥१६॥

अंतरात्मा नस्तां वायो कैंचा । विकार नस्तां अंतरात्मा कैंचा । निर्विकारीं विकार कैंचा । बरें पाहा ।।१७।।

आकाश नसेल तर वायू नाही. येथे आकाश म्हणजे 'अहं' हा मूळ विकार (अंतरात्मा) मानावा. अंतरात्मा नसेल तर वायू नाही, विकार आहे म्हणून अंतरात्मा आहे. पण निर्विकार ब्रह्म तत्त्वाला मूळ विकार तरी कोठून आणावा? त्यातील रहस्य जाणून घ्यावे.(अजातवाद) ॥१७॥

पृथ्वी नाहीं आप नाहीं । तेज नाहीं वायो नाहीं । अंतरात्मा विकार नाहीं । निर्विकारीं ।।१८।।

निर्विकार ब्रह्मामध्ये पृथ्वी, आप, तेज, वायू, अंतरात्मा व विकार यांतील काहीच नाही. ॥१८॥

निर्विकार जें निर्गुण । तेचि शाश्वताची खूण । अष्टधा प्रकृति संपूर्ण । नासिवंत ।।१९।।

जे निर्विकार असते ते निर्गुण असते व तेच शाश्वत असते. इतर संपूर्ण अष्टधा प्रकृती (पांचभूते + तीन गुण) विनाशी आहे. ॥१९॥

नासिवंत समजोन पाहिलें । तों तें अस्तांचि नस्तें जालें । सारासारें कळों आलें । समाधान ।।२०।।

'हे विनाशी आहे' असा सहज निश्चय झाल्यावर ते दिसूनही नसल्यासारखेच होते! विनाशी असार व शाश्वत सार

एकदा कळले की समाधान टिकून रहाते. ॥२०॥

विवेकें पाहिला विचार । मनास आलें सारासार । येणेंकरितां विचार । सदृढ जाला ।।२१।।

विवेकाचा वापर करून सार व असार यांचा विचार करीत राहिले तर तो विचार दृढ होऊन रहातो. ॥२१॥

शाश्वत देव तो निर्गुण । ऐसी अंतरीं बाणली खूण । देव कळला मी कोण । कळलें पाहिजे ।।२२।।

देव निर्गुण व शाश्वत आहे असा निश्चय स्थिर झाल्याने देवाचे स्वरूप कळले हे खरे. पण 'मी' कोण याचेही ज्ञान होणे अनिवार्य आहे. ॥२२॥

मी कोण पाहिजे कळलें । देहतत्व तितुकें शोधिलें । मनोवृत्तीचा ठाईं आलें । मीतूंपण ।।२३।।

'मी' कोण आहे या प्रश्नाचे, संशय व विपर्ययरहित उत्तर मिळाले पाहिजे. देहाच्या सर्व घटक तत्त्वांचा निरास करावा. मी व तू ने होणारे सर्व व्यवहार अंत:करणाचा खेळ आहे हे लक्षात घ्यावे. ॥२३॥

सकळ देहाचा शोध घेतां । मीपण दिसेना पाहातां । मीतूंपण हें तत्वता । तत्वीं मावळलें ।।२४।।

देहाच्या सर्व घटक तत्त्वांचा झाडा घेतला असता 'मी' असा कोठेच सापडत नाही. (ती तत्त्वे माझ्या देहाची म्हणजे माझी असतात. ती मी नसतात.) मीपणा व तूपणा यांचा आत्मानुभवात (तत्त्वात) बाध होतो. ॥२४॥

दृश्य पदार्थचि वोसरे । तत्वें तत्व तेव्हां सरे । मीतूंपण हें कैंचें उरे । तत्वता वस्तु ।।२५।।

तत्त्वाने तत्त्वाचा निरास केल्यावर दृश्य सृष्टीचा बाध होतो, तेव्हा त्यात देह व अंत:करणाचा समावेश असल्याने मी व तू शिल्लक रहात नाहीत. एक ब्रह्मवस्तू तेवढी उरते. ॥२५॥

पंचीकर्ण तत्वविवर्ण । माहावाक्यें वस्तु आपण । निसंगपणें निवेदन । केले पाहिजे ।।२६।।

पंचीकरणाचा अभ्यास करावा, ब्याऐंशी तत्त्वांचा निरास करून महावाक्याच्या मनन- चिंतनाने जीवभावाचे आत्म्यात निवेदन (ऐक्य) करून नि:संगत्वाने उरावे. ॥२६॥

देवाभक्तांचे मूळ । शोधून पाहातां सकळ । उपाधीवेगळा केवळ । निरोपाधी आत्मा ।।२७।।

देव आणि त्याचा भक्त यांच्या नात्याचा विचार सखोलपणे केला तर त्यांच्यात केवळ भक्ताच्या देहाच्या कल्पित उपाधीचा भेद आहे. कारण व्यापक आत्मा निरुपाधिक आहे. ॥२७॥

मीपण तें बुडालें । विवेकें वेगळेपणे गेलें । निवृत्तिपदास प्राप्त जालें । उन्मनीपद ।।२८।।

जेव्हा देहसापेक्ष 'मी' पणा लीन होतो व विवेकरूप विचाराने सर्व भेद मावळतात तेव्हा तथाकथित उन्मनी अवस्था सुद्धा अवस्थारूपाने न रहाता तत् सापेक्ष सहजावस्था येते. (वेगळेपण = भेद = जीव जडांतील भेद, जीव ईश्वरातील भेद इ. सहा प्रकार.) ॥२८॥

विज्ञानीं राहिलें ज्ञान । ध्येये राहिलें ध्यान । सकळ कांहीं कार्याकारण । पाहोन सांडिलें ।।२९।।

'मी ज्ञानी' हे झालेले ज्ञान विज्ञानाच्या सहजतेत गडप होते. 'ध्येय (आत्मा) मी आहे' असा बोध झाल्यावर त्याचे ध्यान उरत नाही. सर्व प्रकारचे कार्य-कारणभाव लक्षात घेऊन कारण ब्रह्म व कार्यब्रह्म हे दोन्ही परब्रह्मात लीन झाले. कारण व कार्य या दोन्हीत ब्रह्म व्यापून आहे, असा दृढ निश्चय झाला. ॥२९॥

जन्ममरणाचें चुकलें । पाप अवघेंचि बुडालें । येमयातनेचें जालें । निसंतान ।।३०।।

जन्ममरणांच्या चक्रातून सुटका झाली. अनंत जन्मांचे पाप नष्ट झाले. यमयातनांचा प्रश्नच उरला नाही. ॥३०॥

निर्बंद अवघाचि तुटला । विचारें मोक्ष प्राप्त जाला । जन्म सार्थकचि वाटला । सकळ कांहीं ।।३१।।

वेद, शास्त्र व गुरू यांच्या विधिनिषेधात्मक बंधनातून सुटका झाली, आत्मानात्म विचाराने अनात्मजीवभाव नष्ट होऊन आत्मभाव स्थिर झाला. मोक्ष मिळाला. जन्माचे सर्व प्रकारे सार्थक झाले. ॥३१॥

नाना किंत निवारले । धोके अवघेचि तुटले । ज्ञानविवेकें पावन जाले । बहुत लोक ।।३२।।

अनेक प्रकारचे संशय फिटले. (पहा ९-९) देहबुद्धी, जगत्सत्यत्व बुद्धी, कर्तृत्वभोक्तृत्व बुद्धी इत्यादींमधील धोके, ती बुद्धी गेल्याने, नष्ट झाले. विवेकरूप ज्ञानाने आजपर्यंत अनेक लोक मुक्त झाले आहेत. ॥३२॥

पतितपावनाचे दास । तेहि पावन करिती जगास । ऐसी हे प्रचित मनास । बहुतांच्या आली ।।३३।।

पतितपावन श्रीरामाच्या दासांमध्ये सुद्धा जगाचा उद्धार करण्याचे सामर्थ्य असते. हे बऱ्याच जणांनी अनुभवले आहे. ॥३३॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'भक्तनिरूपणनाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'भक्तनिरूपण' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक बारावा : विवेकवैराग्य
समास चौथा : विवेकवैराग्यनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

महद्भाग्य हातासी आलें । परी भोगूं नाहीं जाणितलें । तैसें वैराग्य उत्पन्न जालें । परी विवेक नाहीं ।।१।।

कोणा एखाद्याच्या वाट्याला मोठे भाग्य यावे. पण ते कसे भोगावे ते कळत नसावे, त्याप्रमाणे वैराग्य आहे, पण विवेक नाही अशी अवस्था असणाऱ्याची, परिस्थिती होते. (मोठ्या भाग्याने वैराग्य असते, पण त्याचा उपयोग करण्यासाठी आवश्यक तो विवेक नसतो.) ॥१॥

आदळतें आफळतें । कष्टी होतें दुःखी होतें । ऐकतें देखते येतें । वैराग्य तेणें ।।२।।

जगामध्ये प्रापंचिकांची चालू असलेली आदळआपट, कष्ट व यातना पाहून व ऐकून विचारी माणसाला वैराग्य निर्माण होते. ॥२॥

नाना प्रपंचाच्या वोढी । नाना संकटें सांकडीं । संसार सांडुनी देशधडी । होये तेणें ।।३।।

प्रपंचात होणारी ओढाताण, विघ्ने, समस्या इत्यादींमुळे काहीजण संसार सोडून देशांतरी निघून जातात. ॥३॥

तो चिंतेपासून सुटला । पराधेनतेपासुनि पळाला । दुःखत्यागें मोकळा जाला । रोगी जैसा ।।४।।

हे लोक चिंतेतून सुटतात, प्रपंचाच्या जोखडातून मुक्त होतात हे खरे. जणू एखाद्याचा जुनाट आजार पूर्णपणे बरा व्हावा व त्याची त्यातून सुटका व्हावी. ॥४॥

परी तो होऊं नये मोकाट । नष्ट भ्रष्ट आणि चाट । सीमाच नाहीं सैराट । गुरूं जैसें ।।५।।

पण अशा माणसाने स्वैराचारी, दिशाहीन, नीतिभ्रष्ट, दुराचारी व एखाद्या पशूप्रमाणे मर्यादारहित वागू नये. ॥५॥

विवेकेंविण वैराग्ये केलें । तरी अविवेकें अनर्थी घातलें । अवघें वेर्थचि गेलें । दोहिंकडे ।।६।।

वैराग्याला विवेकाची साथ नसेल तर अविवेकामुळे जीवन अनर्थकारी होते. त्यामुळे प्रपंच व परमार्थ दोन्ही बुडतात. (विवेकावाचून वैराग्य आंधळे आहे– श्री एकनाथ महाराज). ॥६॥

ना प्रपंच ना परमार्थ । अवघें जिणेंचि जालें वेर्थ । अविवेकें अनर्थ । ऐसा केला ।।७।।

प्रपंच व परमार्थ दोन्ही बुडाल्यानंतर मानवी जीवनच निरर्थक ठरते. असा हा अविवेकाचा अनर्थ आहे. ॥७॥

कां वेर्थचि ज्ञान बडबडिला । परी वैराग्ययोग नाहीं घडला । जैसा कारागृहीं अडकला । पुरुषार्थ सांगे ।।८।।

याउलट कोणा तुरुंगात डांबलेल्याने आपल्या पराक्रमाच्या गप्पा माराव्यात त्याप्रमाणे वैराग्य नसलेला ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगतो. (प्रपंचासक्ताने वेदांत सांगावा तसे.) ॥८॥

वैराग्येंविण ज्ञान । तो वेर्थचि साभिमान । लोभदंभें घोसळून । कासाविस केला ।।९।।

वैराग्यावाचून केवळ शब्दज्ञानामुळे फुकटचा अहंकारच वाढतो. लोभ व दंभाने बरबटून तो कासावीस होतो. ॥९॥

स्वान बांधलें तरी भुंके । तैसा स्वार्थमुळें थिंके । पराधीक देखों न सके । साभिमानें ।।१०।।

बांधलेले कुत्रे मोकळे चालणाऱ्यावर भुंकते! स्वार्थाने बांधलेला दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून चरफडतो. दुसऱ्याला मानसन्मानादी अधिक मिळाले, तर अहंमन्यतेमुळे ते त्याला सहन होत नाही. ॥१०॥

हें येकेंविण येक । तेणें उगाच वाढे शोक । आतां वैराग्य आणि विवेक । योग ऐका ।।११।।

विवेक व वैराग्य एकमेकावाचून राहिले, तर सतत शोकच वाट्याला येतो. आता ते दोन्ही एकत्र आले तर काय होते ते ऐका. ।।११।।

विवेकें अंतरीं सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला । अंतर्बाह्य मोकळा जाला । निःसंग योगी ।।१२।।

विवेकाने प्रपंचाचा आंतरिक त्याग होतो, तर वैराग्याने बाहेरील प्रपंच सोडला जातो. असा तो योगी आतून व बाहेरून संगरहित होऊन रहातो. (विवेकाने संगत्याग, वैराग्याने वस्तुत्याग.) ।।१२।।

जैसें मुखें ज्ञान बोले । तैसीच सर्वे क्रिया चाले । दीक्षा देखोनी चक्कित जाले । सुचिस्मंत ।।१३।।

'जगत् मिथ्या आहे' असे तत्त्वज्ञान मांडताना त्याचे सर्व जीवन त्यावर आधारलेले प्रत्यक्ष दिसते. पवित्र सज्जनांना त्याची बाणलेली आत्मस्थिती पाहून साश्चर्य कौतुक वाटते. ।।१३।।

आस्था नाहीं त्रैलोक्याची । स्थिती बाणली वैराग्याची । येत्नविवेकधारणेची । सीमा नाहीं ।।१४।।

तिन्ही लोकांतील व्यक्ती वा वस्तूची त्याला जराही आसक्ती नसते. एवढे वैराग्य बाणलेले असते. ब्रह्म सत्य आहे व जगत् मिथ्या आहे हा विवेक त्याने किती हद्दीपर्यंत यत्नपूर्वक बाणवलेला असतो ते कळत नाही. ।।१४।।

संगीत रसाळ हरिकीर्तन । ताळबद्ध तानमान । प्रेमळ आवडीचें भजन । अंतरापासुनी ।।१५।।

भगवंताचे कीर्तन करताना रसपूर्ण कथा सांगतो व ताल व तान सांभाळीत प्रेमाने व निष्ठेने मनापासून भजन करतो. ।।१५।।

तत्काळचि सन्मार्ग लागे । ऐसा अंतरीं विवेक जागे । वगत्रृत्व करितां न भंगे । साहित्य प्रत्ययाचें ।।१६।।

त्याचे असे निरूपण ऐकल्यावर श्रोता तात्काळ सन्मार्गाला लागून त्याच्या अंत:करणांत विवेक जागा होतो. त्याच्या प्रवचनांत उपनिषदादी अनुभवसिद्ध अध्यात्मशास्त्राशी विसंगत असे काहीही सांगितले जात नाही. ।।१६।।

सन्मार्गे जगास मिळाला । म्हणिजे जगदीश वोळला । प्रसंग पाहिजे कळला । कोणीयेक ।।१७।।

सन्मार्गावर वाटचाल करून तो समाजाचे अंत:करणात मिळून रहातो. त्यामुळे जगदीशाची त्यावर कृपा होते. हे असे प्रत्यक्षात घडते हे लक्षात घ्यावे. ।।१७।।

प्रखर वैराग्य उदासीन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान । स्नानसंध्या भक्तवद्धजन । पुण्यमार्ग ।।१८।।

प्रखर वैराग्यामुळे त्याच्या आशा-आकांक्षा हद्दपार झालेल्या असतात. (उद् आस = उडालेली आशा.) 'मी ब्रह्म आहे' असा त्याला प्रत्यक्ष अनुभव आलेला असतो. असे असूनही पुण्यमार्गाचा आदर्श ठेवण्यासाठी तो स्नानसंध्यादी कर्मे व ईशोपासना करतो. ।।१८।।

विवेकवैराग्य तें ऐसें । नुस्तें वैराग्य हेंकाडपिसें । शब्दज्ञान येळिलसें । आपणचि वाटे ।।१९।।

एकत्रित विवेक वैराग्याचा असा परिणाम होतो. केवळ वैराग्य हट्टी वेड्यासारखे असते. वैराग्यावाचून विवेकाचे शब्द त्याचे त्यालाच कंटाळवाणे वाटतात. ।।१९।।

म्हणौन विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणिजे महद्भाग्य । रामदास म्हणे योग्य । साधु जाणती ।।२०।।

म्हणून विवेक व वैराग्य दोन्ही असणे हे अत्यंत भाग्यवान साधकाचे लक्षण आहे. मी रामदास म्हणतो की साधूंना हे माझे म्हणणे नीट कळते. ।।२०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'विवेकवैराग्यनिरूपणनाम' समास चौथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'विवेकवैराग्यनिरूपण' नावाचा चौथा समास समाप्त

दशक बारावा : विवेकवैराग्य

समास पाचवा : आत्मनिवेदन

॥ श्रीराम समर्थ ॥

रेखेचें गुंडाळें केलें । मात्रुकाक्षरीं शब्द जाले । शब्द मेळऊन चाले । श्लोक गद्य प्रबंध ।।१।।

रेघ किंवा रेषेला वेगळी वेगळी वळणे देऊन वर्णमालेची अक्षरे तयार होतात. अक्षरांचे शब्द बनून शब्दांच्या समुदायाने श्लोक (काव्य) व गद्यरचना होतात. ॥१॥

वेदशास्त्रें पुराणें । नाना काव्यें निरूपणें । ग्रंथभेद अनुवादणें । किती म्हणोनि ।।२।।

चार वेद, अठरा पुराणे, अभंग, ओव्या व आर्यांच्या काव्यरचना असे ग्रंथांचे किंवा रचनांचे प्रकार किती म्हणून सांगावेत! ॥२॥

नाना ऋषी नाना मतें । पाहों जातां असंख्यातें । भाषा लिपी जेथ तेथें । काये उणें ।।३।।

व्यास व पतंजली सारख्या असंख्य ऋषींचे वेगळे वेगळे विचार दिसतात. जेथे लिपी व भाषा उपलब्ध आहे, तेथे विचारांच्या मांडणीला काय कमतरता! ॥३॥

वर्ग ऋचा श्रुति स्मृति । अधे स्वर्ग स्तबक जाती । प्रसंग मानें समास पोथी । बहुधा नामें ।।४।।

नाना पदें नाना श्लोक । नाना बीर नाना कडक । नाना साख्या दोहडे अनेक । नामाभिधानें ।।५।।

डफगाणें माचिगाणें । दंडिगाणें कथागाणें । नाना मानें नाना जसनें । नाना खेळ ।।६।।

अमरकोशातील वर्ग, वेदमंत्र, उपनिषदे, मनुस्मृतीसारख्या स्मृती, अध्याय, सर्ग, काव्यांचे भाग, प्रसंग, मान, समास ही प्रकरणांची नावे, पदे, श्लोक, वीर व कडक हे उत्तरेकडील कवितांचे छंद, साक्या, दोहे, डफगाणे, दिंड्या, चरित्रकाव्ये, माने व उपकथानके, ॥४-६॥

ध्वनि घोष नाद रेखा । चहुं वाचामध्यें देखा । वाचारूपेंहि ऐका । नाना भेद ।।७।।

प्रणवाचे घोष, ध्वनी, नाद व साडेतीन मात्रा यांत अक्षरेच आहेत. शब्द उमटताना तो चार वाणीतून चार प्रकारे प्रगट होतो. ॥७॥

उन्मेष परा ध्वनि पश्यंती । नाद मध्यमा शब्द चौथी । वैखरीपासून उमटती । नाना शब्दरत्नें ।।८।।

परावाणीत स्फुरण, पश्यन्तीत ध्वनी, मध्यमेत नाद व वैखरीत प्रत्यक्ष शब्द उमटतो. हे शब्द विविध व अत्यंत मौल्यवान असतात. ॥८॥

अकार उकार मकार । अर्धमात्राचें अंतर । औटमात्रा तदनंतर । बावन मात्रुका ।।९।।

अ, उ, म व अर्धमात्रा मिळून साडेतीन मात्रांचा प्रणव तयार होतो. त्याच्या आधाराने सोळा स्वर व छत्तीस व्यंजने मिळून लिपी व भाषा तयार होते. ॥९॥

नाना भेद रागज्ञान । नृत्यभेद तानमान । अर्थभेद तत्वज्ञान । विवंचना ।।१०।।

त्या लिपी व भाषेच्या आधाराने संगीतातील अनेक रागांचे ज्ञान, नृत्यकलेतील आविष्कारांचे ज्ञान, एका शब्दाचे अनेक अर्थ व तत्त्वज्ञानाचा अफाट विस्तार प्रगट होतो. ॥१०॥

तत्वांमध्ये मुख्य तत्व । तें जाणावें शुद्धसत्व । अर्धमात्रा महत्तत्व । मूळमाया ।।११।।

तत्त्वज्ञानाच्या विचारात शुद्धसत्त्वगुण प्रमुख आहे. प्रणवातील अर्धमात्रा हे मूळमायारूप महत्‌तत्त्वाचे प्रतीक होय. (पहा १७-९. दा.बो.) ॥११॥

नाना तत्वें लाहानथोरें । मिळोन अष्टहि शरीरें । अष्टधा प्रकृतींचे वारें । निघोन जातें ।।१२।।

ब्रह्मांडाची चार व पिंडाची चार अशी आठही शरीरे ब्याऐंशी तत्त्वांपैकी स्थूलसूक्ष्म तत्त्वांच्या संयोगाने तयार होतात. त्यांच्यात पाच भूते व तीन गुण यांचे जणू वारे भरते व नंतर ते निघूनही जाते! ॥१२॥

वारें नस्तां जें गगन । तैसें परब्रह्म सघन । अष्ट देहाचें निर्शन । करून पाहावें ।।१३।।

वायू शांत असताना जसे आकाश असावे, त्याप्रमाणे अष्टधा प्रकृती लीन असताना घनदाट ब्रह्म असते. (अष्टधा प्रकृती नसताना काहीच नसते असे नाही. ब्रह्म असते!) साधकाने शांत बसून आठही शरीरांचा विचाराने निरास करून पहावा. त्याला 'असलेल्या' आत्म्याचा प्रत्यक्ष अनुभव येईल. ॥१३॥

ब्रह्मांडपिंडउभार । पिंडब्रह्मांडसंव्हार । दोहिवेगळें सारासार । विमळब्रह्म ।।१४।।

शांत बसून साधकाने शास्त्रात सांगितल्याप्रमाणे पिंड व ब्रह्मांडाची रचना कशी झाली त्याचा विचार करून त्यांच्या संहाराचाही तसाच विचार करावा. पिंडब्रह्मांडाची उभारणी व संहार हे असार असून विमल व साररूप ब्रह्म त्या दोन्हीहून अलिप्त असल्याचा विचाराने निश्चय करावा. ॥१४॥

पदार्थ जड आत्मा चंचळ । विमळब्रह्म तें निश्चळ । विवरोन विरे तत्काळ । तद्रूप होये ।।१५।।

पांचभौतिक सृष्टी अचेतन आहे. जीव व ईशसृष्टी चंचळ (विकारी) पण चेतन आहे. विमल ब्रह्म चेतन असून निर्विकार (निश्चळ) आहे. असा विचार सूक्ष्मपणे केला असता साधक निश्चळ ब्रह्मात एकरूप होतो. त्याचे निवेदन होते. ॥१५॥

पदार्थ मनें काया वाचा । मी हा अवघाचि देवाचा । जड आत्मनिवेदनाचा । विचार ऐसा ।।१६।।

माझ्या मालकीचे पदार्थ, माझे मन, शरीर व वाणी या सर्व अचेतनांसह असलेला मी सर्वस्वी देवाचा आहे. अशा समर्पणाला जड आत्मनिवेदन असे म्हणतात. ॥१६॥

चंचळकर्ता तो जगदीश । प्राणीमात्र त्याचा अंश । त्याचा तोचि आपणास । ठाव नाहीं ।।१७।।

विकारी जीवसृष्टीचा कर्ता ईश्वर असून सर्व प्राणी म्हणजे प्राण असलेली जीवांची शरीरे, त्याचे अंश आहेत. सर्वत्र तोच व्यापून असल्याने जड आत्मनिवेदनातील 'मी' चे अस्तित्वच सिद्ध होत नाही. ॥१७॥

चंचळ आत्मनिवेदन । याचें सांगितलें लक्षण । कर्ता देव तो आपण । कोठेंचि नाहीं ।।१८।।

यालाच चंचळ आत्मनिवेदन म्हणतात. देवच कर्ता असून तोच जगाचे उपादान कारण असल्याने 'मी' चे अस्तित्वच नसते. ॥१८॥

चंचळ चळे स्वप्नाकार । निश्चळ देव तो निराकार । आत्मनिवेदनाचा प्रकार । जाणिजे ऐसा ।।१९।।

विकारी जीवाला स्वप्नादी अवस्थांचे विकार किंवा चांचल्य असते. ब्रह्मस्वरूप देव निर्विकार व निराकार आहे. विकारी जीवाचे अविकारी देवात निवेदन किंवा ऐक्य म्हणजेच आत्मनिवेदन. ॥१९॥

ठावचि नाहीं चंचळाचा । तेथें आधीं आपण कैंचा । निश्चळ आत्मनिवेदनाचा । विवेक ऐसा ।।२०।।

ब्रह्मदृष्टीने पाहिले तर जडजीवात्मक चंचळ सृष्टी अस्तित्वातच नाही. मग त्यांत 'मी' कोठून आणावा? हेच ते निश्चळ आत्मनिवेदन होय. ॥२०॥

तिहिं प्रकारें आपण । नाहीं नाहीं दुजेपण । आपण नस्तां मीपण । नाहींच कोठें ।।२१।।

जड, चंचळ व तत्सापेक्ष निश्चळ या तिन्हींत ब्रह्मरूप मी च व्यापून आहे. यात जराही द्वैत किंवा भेद नाही. जीवालाच (आपण) वेगळे अस्तित्व नसेल तर मी पणा (अहं) सुद्धा अस्तित्वात नाही. ॥२१॥

पाहातां पाहातां अनुमानलें । कळतां कळतां कळों आलें । पाहातां अवघेंचि निवांत जालें । बोलणें आतां ।।२२।।

अभ्यास करता करता प्रथम आत्मनिवेदनाचा अंदाज येतो. पुढे समजता समजता ज्ञान होते. नंतर त्या ज्ञानातील 'मी ज्ञानी' ही कृत्रिमता निघून गेल्यावर शांत सहजता येऊन बोलणे थांबते. ॥२२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आत्मनिवेदननाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आत्मनिवेदन' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक बारावा : विवेकवैराग्य

समास सहावा : सृष्टिक्रमनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ब्रह्म निर्मळ निश्चळ । शाश्वत सार अमल विमळ । अवकाश घन पोकळ । गगनाऐसें ।।१।।

शुद्ध ब्रह्म निर्विकार, नित्य, सारभूत, मलरहित विमल आहे. ते अवयवरहित, व्यापक असून आकाशाप्रमाणे पोकळ आहे. (घन = भरून राहिलेले. व्यापक. जे निरवयव असते ते सूक्ष्म व म्हणून व्यापक असते.) ॥१॥

तयास करणें ना धरणें । तयास जन्म ना मरणें । तेथें जाणणें ना नेणणें । सुन्यातीत ।।२।।

ब्रह्म निर्माण केलेले नाही, ते पकडता येत नाही. त्याला जन्ममरण नाही. त्याला कशाचे ज्ञान होत नाही. पण ते अज्ञानरूपही नाही! ('जाणीव नेणीव भगवंती नाही'– हरिपाठ) ते शून्यही नाही. (सत् आहे). ॥२॥

तें रचेना ना खचेना । तें होयेना ना जायेना । मायातीत निरंजना । पारचि नाहीं ।।३।।

ते उभारले जात नाही, खचत नाही, होत नाही, जात नाही, मायेने लिप्त होत नाही, पृष्ठरहित असून अपार आहे. ॥३॥

पुढें संकल्प उठिला । षडगुणेश्वर बोलिजे त्याला । अर्धनारीनटेश्वराला । बोलिजेतें ।।४।।

पुढे अचानक 'मी एक आहे. मी बहु व्हावे' असा संकल्प झाला. त्या संकल्पसहित ब्रह्माला यशादी सहा गुणांचा ईश्वर किंवा अर्धनारीनटेश्वर अशा संज्ञा मिळाल्या. ॥४॥

सर्वेश्वर सर्वज्ञ । साक्षी द्रष्टा ज्ञानघन । परेश परमात्मा जगजीवन । मूळपुरुष ।।५।।

याशिवाय त्यालाच सर्वनियामक, सर्वज्ञ, साक्षी, द्रष्टा, ज्ञानघन, परेश, परमात्मा, जगज्जीवन, मूळपुरुष अशाही संज्ञा आहेत. (तो सर्व जडचेतनात्मक सृष्टीत सूक्ष्मरूपाने व्यापून रहात असूनही अलिप्त असल्याने या संज्ञा मिळाल्या आहेत.) ॥५॥

ते मूळमाया बहुगुणी । अधोमुखें गुणक्षोभिणी । गुणत्रये तिजपासूनि । निर्माण जाले ।।६।।

त्या संकल्पाला मूळमाया कारण असून ती अनेक प्रकारे क्रमाने व्यक्त होते (बहुगुणी). ती व्यक्त होण्यासाठी जणू पालथी झाल्यावर (अधोमुख) गुणक्षोभिणी होते. नंतर तिच्यातून त्रिगुण व्यक्त झाले. ॥६॥

पुढें विष्णु जाला निर्माण । जाणतीकळा सत्त्वगुण । जो करिताहे पाळण । त्रैलोक्याचें ।।७।।

पुढे ज्ञानयुक्त सत्त्वगुणात्मक विष्णुतत्त्व निर्माण होऊन तो विष्णू तिन्ही लोकांची 'स्थिती' ही अवस्था सांभाळतो. ॥७॥

पुढें जाणीवनेणीवमिश्रित । ब्रह्मा जाणावा नेमस्त । त्याच्या गुणें उत्पत्ति होत । भुवनत्रैं ।।८।।

नंतर ज्ञान व अज्ञान यांचे मिश्रण असलेला ब्रह्मदेव उत्पन्न होऊन त्याचेकडे सृष्टीच्या 'उत्पत्ती' या स्थितीचे काम आले. ॥८॥

पुढें रुद्र तमोगुण । सकळ संव्हाराचें कारण । सकळ कांहीं कर्तेपण । तेथेंचि आलें ।।९।।

पुढे तमोगुणात्मक रुद्र उत्पन्न होऊन सर्व प्रकारच्या संहाराचे कार्य त्याला मिळाले. अशा प्रकारे उत्पत्ती, स्थिती व लय या तिन्ही अवस्थांचे कर्तृत्व ब्रह्मा, विष्णू व महेश यांचेकडे आले. ॥९॥

तेथून पुढें पंचभूतें । पावलीं पष्ट दशेतें । अष्टधा प्रकृतीचें स्वरूप तें । मुळींच आहे ।।१०।।

नंतर सूक्ष्मपंचमहाभूते स्थूल झाली. अष्टधा प्रकृतीचे स्पष्ट घटक पंचभूतेच आहेत. ॥१०॥

निश्चळीं जालें चळण । तेंचि वायोचें लक्षण । पंचभूतें आणि त्रिगुण । सूक्ष्म अष्टधा ।।११।।

निश्चळ परब्रह्मात जे स्फुरणरूप चलन (अविकारीचे ठिकाणी जणू विकार.) निर्माण झाले, तेच वायूचे स्वरूप आहे. त्यात सूक्ष्म पंचभूते व अव्यक्त त्रिगुण सुप्त दशेत असतात. (पहा– १६-६.) ॥११॥

आकाश म्हणिजे अंतरात्मा । प्रत्ययें पाहावा महिमा । त्या आकाशापासून जन्मा । वायो आला ।।१२।।

आकाश हेच अंतरात्म्याचे स्वरूप असून त्याचे माहात्म्य प्रत्यक्षच अनुभवावे. (पहा– १६-७) त्यापासून वायूची उत्पत्ती झाली. ॥१२॥

तया वायोच्या दोनी झुळुका । उष्ण सीतळ ऐका । सीतळापासून तारा मयंका । जन्म जाला ।।१३।।

त्या वायूचे उष्ण व शीत असे दोन प्रकार असतात. त्यातील शीतप्रवाहापासून तारकासमूह व चंद्र निर्माण झाले. ॥१३॥

उष्णापासून रवि वन्ही । विद्युल्यता आदिकरूनि । सीतळ उष्ण मिळोनि । तेज जाणावें ।।१४।।

उष्ण प्रवाहापासून सूर्य, अग्नी, वीज इत्यादी पदार्थ तयार झाले. 'तेज' या संकल्पनेत उष्ण व शीत या दोन्हींचा समावेश होतो. ॥१४॥

तया तेजापासून जालें आप । आप आळोन पृथ्वीचें रूप । पुढें औषधी अमूप । निर्माण जाल्यां ।।१५।।

तेजापासून पाणी तयार होऊन पाण्याचे घनीभवन झाल्याने पृथ्वी तयार होते. पृथ्वीवर अनेक प्रकारच्या औषधी तयार झाल्या. (औषधी म्हणजे औषध नव्हे. एकदाच फळ येऊन नष्ट होते, त्या झाडाला औषधी म्हणतात. पुन्हा पुन्हा फळ देते ती वनस्पती.) ॥१५॥

औषधीपासून नाना रस । नाना बीज अन्नरस । चौऱ्यासि लक्ष योनीचा वास । भूमंडळीं ।।१६।।

औषधीपासून मधुरादी सहा रस, शेकडो बीजे व अन्न म्हणून वापरण्यासारखे रस तयार झाले. त्याने पृथ्वीवर चौऱ्याऐंशी लक्ष योनींच्या पोषणाची सोय झाली. ॥१६॥

ऐसी जाली सृष्टिरचना । विचार आणिला पाहिजे मना । प्रत्ययेंविण अनुमाना । पात्र होईजे ।।१७।।

अशी सृष्टीची रचना झाली. ती नीट समजावून घेतली नाही (प्रत्यय) तर संशयच शिल्लक राहतात. ॥१७॥

ऐसा जाला आकार । येणेंचि न्यायें संव्हार । सारासारविचार । यास बोलिजे ।।१८।।

जशी रचना झाली तसाच उलटक्रमाने संहार होतो. रचना व संहार असार असून ब्रह्म सार आहे, असा सारासारविचार करावा. ॥१८॥

जें जें जेथून निर्माण जालें । तें तें तेथेंचि निमालें । येणेंचि न्यायें संव्हारलें । माहाप्रळईं ।।१९।।

जे जेथून उत्पन्न होते, ते त्यातच लीन होते. महाप्रळयकाळी जो संहार होतो, तो असाच होतो. ॥१९॥

आद्य मध्य अवसान । जें शाश्वत निरंजन । तेथें लावावें अनुसंधान । जाणते पुरुषीं ।।२०।।

उत्पत्ती, स्थिती व लय या सृष्टीच्या तीनही अवस्थांमध्ये जे नित्य व निर्विकार ब्रह्म अलिप्तपणे रहाते त्याच्या अनुसंधानात विचारी साधकाने रहावे. ॥२०॥

होत जाते नाना रचना । परी ते कांहींच तगेना । सारासार विचारणा । याकारणें ।।२१।।

कोट्यवधी ब्रह्मांडांची उत्पत्ती झाली तरी त्यातील एकही शाश्वत नाही. म्हणूनच त्या असारामागे असलेल्या सार तत्त्वाचा विचार करावा लागतो. ॥२१॥

द्रष्टा साक्षी अंतरात्मा । सर्वत्र बोलती महिमा । परी हे सर्वसाक्षिणी अवस्ता मां । प्रत्ययें पाहावी ।।२२।।

साररूप ब्रह्माचे संदर्भात, द्रष्टा, साक्षी, अंतरात्मा या संज्ञांचे मोठे महत्त्व सांगितले जाते. पण उत्पत्त्यादी ब्रह्मांडाच्या व जागृती इ. पिंडाच्या तिन्ही अवस्थांचे साक्षित्व करणाऱ्या 'सर्वसाक्षिणी' या अवस्थेचा साधकाने अनुभव

घ्यावा. (द्रष्टा इ. सैद्धांतिक असून 'सर्वसाक्षिणी' साधकांच्या अनुभवासाठी आहे.) ॥२२॥

मुळापासून सेवटवरी । अवघी मायेची भरोवरी । नाना विद्या कळाकुंसरी । तयेमधें ।।२३।।

मूळ स्फुरणापासून चौऱ्याऐंशी लक्ष जीवयोनींच्या विस्तारापर्यंत सर्व व्याप व कारभार मायेचा आहे. जीवाच्या अनेक विद्या, कला व कौशल्यांचा समावेश मायेतच होतो. ॥२३॥

जो उपाधीचा सेवट पावेल । त्यास भ्रम ऐसें वाटेल । जो उपाधीमध्यें आडकेल । त्यास काढिता कवण ।।२४।।

जो सर्व उपाधींचा निरास करील त्याला उपाधी हे स्वरूप असलेली सृष्टी भ्रमात्मक आहे, हे लक्षात येईल. जो त्या सृष्टीरूप उपाधीत आसक्त होऊन राहील, त्याला कोण मुक्त करणार? ॥२४॥

विवेकप्रत्ययाचीं कामें । कैसीं घडतील अनुमानभ्रमें । सारासारविचाराचेन संभ्रमें । पाविजे ब्रह्म ।।२५।।

मोक्ष हा विवेक व त्याच्या साह्याने घेतलेल्या प्रत्यक्ष अनुभवाने सिद्ध होतो. केवळ अंदाज व त्यावर आधारलेल्या संभ्रमाने नाही! सार व असाराच्या शास्त्रशुद्ध व सतत विचाराने (संभ्रमे) जीव व ब्रह्म यांच्या ऐक्याचा अनुभव येतो. ॥२५॥

ब्रह्मांडींचें माहाकारण । ते मूळमाया जाण । अपूर्णास म्हणती ब्रह्म पूर्ण । विवेकहीन ।।२६।।

ब्रह्मदेवाच्या ब्रह्मांडरूप विराट या नावाच्या शरीरातील महाकारण देह म्हणजे मूळमाया. तो देह शबल व म्हणून अपूर्ण आहे. विवेकाची दृष्टी नसलेले त्या देहालाच पूर्णब्रह्म मानतात. (अत्यंत सूक्ष्म वृत्तिज्ञानही, ब्रह्मानुभव नव्हे. किंवा अतिसूक्ष्म मायिक तत्त्वही ब्रह्म नव्हे.) ॥२६॥

सृष्टीमधें बहुजन । येक भोगिती नृपासन । येक विष्ठा टाकिती जाण । प्रत्येक्ष आतां ।।२७।।

या सृष्टीत कोट्यवधी माणसे राहतात. त्यातील काही सत्तेची आसने भोगतात, तर काही (जुन्याकाळी–) विष्ठा स्वच्छ करून दूर नेऊन टाकण्याचे काम करतात. हे तर स्पष्टच दिसते. ॥२७॥

ऐसे उदंड लोक असती । आपणास थोर म्हणती । परी ते विवेकी जाणती । सकळ कांहीं ।।२८।।

शिवाय असे कित्येक लोक असतात की ते स्वत:ला श्रेष्ठ समजतात. पण खऱ्या विवेक्याला खरा मोठा कोण ते चांगले कळते. (ते ज्याला मोठा म्हणतात, तोच खरा मोठा. येथे विवेकाचे महत्त्व सांगावयाचे आहे.) ॥२८॥

ऐसा आहे समाचार । कारण पाहिजे विचार । बहुतांच्या बोलें हा संसार । नासूं नये ।।२९।।

ही अशी परिस्थिती आहे. म्हणून विवेकरूप विचार महत्त्वाचा आहे. अविवेक्यांची संख्या फार मोठी असते. त्यांच्या नादी लागून जीवन व्यर्थ दवडू नये. ॥२९॥

पुस्तकज्ञानें निश्चये धरणें । तरी गुरु कासया करणें । याकारणें विवरणें । आपुल्या प्रत्ययें ।।३०।।

जर ग्रंथ वाचून विवेक शिकता आला असता तर सद्गुरूंची गरजच काय? तो तसा शिकता येत नाही हे स्वत:च्या व्यावहारिक अनुभवातून ठरवावे. (उदा. ग्रंथ वाचून मोटार चालविता येत नाही.) ॥३०॥

जो बहुतांच्या बोलें लागला । तो नेमस्त जाणावा बुडाला । येक साहेब नस्तां कोणाला । मुश्यारा मागावा ।।३१।।

जो फार मोठ्या लोकसमुदायाच्या विचाराप्रमाणे वागतो तो पारमार्थिक दृष्टीने नक्कीच बुडाला असे समजावे. ज्याप्रमाणे मुख्य अधिकारी हजर नसेल तर कामाचा मोबदला मिळत नाही, त्याप्रमाणे विवेकी नसेल तर मोक्ष लाभत नाही. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सृष्टिक्रमनिरूपणनाम' समास सहावा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सृष्टिक्रमनिरूपण' नावाचा सहावा समास समाप्त

दशक बारावा : विवेकवैराग्य

समास सातवा : विषयत्यागनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

न्यायें निष्ठुर बोलणें । बहुतांस वाटे कंटाळवाणें । मळमळ करितां जेवणें । विहित नव्हे ।।१।।

सत्य बोलणे सर्वांना कठोर वाटते व म्हणून ते त्यांना कंटाळवाणे होते. पण ज्याप्रमाणे पोटात मळमळत असेल तर जेवू नये त्याप्रमाणे कंटाळवाणे वाटते ते ऐकूच नये हे बरे! ॥१॥

बहुतीं विषय निंदिले । आणि तेचि सेवित गेले । विषयत्यागें देह चाले । हें तों घडेना ।।२।।

पारमार्थिक चर्चा चालू असताना सर्वच जण विषयांची निंदा करतात. पण चर्चा करणारे सर्व जण विषय भोगतात. कारण त्याशिवाय त्यांचा निर्वाहच होत नाही. ॥२॥

बोलणें येक चालणें येक । त्याचें नावं हीन विवेक । येणें करितां सकळ लोक । हांसों लागती ।।३।।

बोलायचे एक व वागायचे दुसरेच हेच अविवेकाचे लक्षण आहे. त्यामुळे अशी व्यक्ती सर्वत्र थट्टेचा विषय होते. ॥३॥

विषयत्यागेंविण तों कांहीं । परलोक तो प्राप्त नाहीं । ऐसें बोलणें ठाईं ठाईं । बरें पाहा ।।४।।

विषयांचा त्याग केल्याशिवाय आत्मज्ञान होत नाही, असे अध्यात्मशास्त्रात जागोजागी सांगितले आहे, ते लक्षात घ्यावे. ॥४॥

प्रपंची खाती जेविती । परमार्थी काये उपवास करिती । उभयता सारिखे दिसती । विषयाविषईं ।।५।।

शंका– प्रापंचिक माणसे खातात जेवतात. पारमार्थिक लोक न जेवताच राहतात काय? विषयभोगांच्या बाबतीत दोन्ही सारखेच दिसतात. ॥५॥

देह चालतां विषय त्यागी । ऐसा कोण आहे जगीं । याचा निर्वाह मजलागीं । देवें निरोपावा ।।६।।

देह जिवंत असताना सर्व विषयांचा त्याग साधणारा या जगात एक तरी माणूस असेल काय? या शंकेचे समाधान आपण सांगावे. ॥६॥

विषय अवघा त्यागावा । तरीच परमार्थ करावा । ऐसें पाहातां गोवा । दिसतों किं ।।७।।

'सर्व विषयांचा त्याग साधला तरच परमार्थ सिद्ध होतो' या विधानात घोटाळा दिसतो. ॥७॥

ऐसा श्रोता अनुवादला । वक्ता उत्तर देता जाला । सावध होऊन मन घाला । येतद्विषईं ।।८।।

या श्रोत्याच्या प्रश्नाला वक्त्याने जे उत्तर दिले ते त्या विषयीचे उत्तर सावधपणे ऐका. ॥८॥

वैराग्यें करावा त्याग । तरीच परमार्थयोग । प्रपंचत्यागें सर्व सांग । परमार्थ घडे ।।९।।

वैराग्यपूर्वक विषयत्याग केला, तरच परमार्थ साधतो. प्रपंचाचा त्याग केला तरच जसा साधला पाहिजे तसा परिपूर्ण परमार्थ साधतो. ॥९॥

मागें ज्ञानी होऊन गेले । तेंहिं बहुत कष्ट केले । तरी मग विख्यात जाले । भूमंडळीं ।।१०।।

आजपर्यंत होऊन गेलेल्या आत्मज्ञान्यांनी वैराग्याचे सर्व कष्ट सोसल्यावरच त्यांना जगात उदंड कीर्ती मिळाली. ॥१०॥

येर मत्सर करितांच गेलीं । अन्न अन्न म्हणतां मेलीं । कित्येक भ्रष्टलीं । पोटासाठीं ।।११।।

इतर बरेच; अस्सल विरक्तांचा मत्सर करीत गेले. काही उपाशीपोटी मेले, तर अनेकांनी पोटासांठी भ्रष्ट मार्ग स्वीकारले. ॥११॥

वैराग्य मुळींहून नाहीं । ज्ञान प्रत्ययाचें नाहीं । सुचि आचार तोहि नाहीं । भजन कैंचें ।।१२।।

जेथे अस्सल वैराग्य नाही, वेदान्त तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव नाही, शुद्ध आचरण नाही, तेथे उपासना कशी होईल? ॥१२॥

ऐसे प्रकारीचे जन । आपणास म्हणती सज्जन । पाहों जातां अनुमान । अवघाच दिसे ।।१३।।

अशा प्रकारचे हे लोक स्वत:ला सिद्ध समजतात! जरा निरीक्षण केल्यावर ते संशयग्रस्त आहेत, हे कळून येते. ॥१३॥

जयास नाहीं अनुताप । हेंचि येक पूर्वपाप । क्षणक्ष्णा विक्षेप । पराधीकपणें ।।१४।।

पूर्वजन्मीच्या पापसंचयामुळे टिकाऊ अनुताप होत नाही. शिवाय दुसऱ्यांची प्रगती पाहून मत्सर वाटल्याने मन सतत चंचल रहाते. साधना होत नाही. ॥१४॥

मज नाहीं तुज साजेना । हें तों अवघें ठाऊकें आहे जना । खात्यास नखातें देखों सकेना । ऐसें आहे ।।१५।।

'जे मला हवे ते मिळत नाही व तुला मिळालेले सहन होत नाही.' अशी एक प्रवृत्ती सर्वांनाच ठाऊक आहे. ज्याला खावयास मिळत नाही, तो खाणाऱ्याचा द्वेष करतो ही वस्तुस्थिती आहे. ॥१५॥

भाग्यपुरुष थोर थोर । त्यास निंदिती डीवाळखोर । सावास देखतां चोर । चर्फडी जैसा ।।१६।।

जगामध्ये जे अतिभाग्यवान श्रीमन्त असतात, त्यांची दिवाळखोर लोक निंदा करतात. (स्वत:ला टिकवता येत नाही. दुसऱ्याचे वाढलेले बघवत नाही.) सज्जन पाहिल्यावर दुर्जनाच्या तळपायाची आग मस्तकाला जाते. ॥१६॥

वैराग्यापरतें नाहीं भाग्य । वैराग्य नाहीं तें अभाग्य । वैराग्य नस्तां योग्य । परमार्थ नव्हे ।।१७।।

पण साधकाने हे लक्षात ठेवावे की खरे भाग्य वैराग्यात आहे. वैराग्य नसणे हेच दुर्भाग्य. वैराग्यशिवाय अस्सल परमार्थ तडीला जात नाही. ॥१७॥

प्रत्ययेज्ञानी वीतरागी । विवेकबळें सकळ त्यागी । ते जाणीजे माहांयोगी । ईश्वरी पुरुष ।।१८।।

ज्या अनासक्त भाग्यवंताला आत्मानुभव येतो तो विवेकामुळे सर्वस्वाचा त्याग करतो. तो महान योगी जणू ईश्वरच आहे असे समजावे. ॥१८॥

अष्टमा सिद्धीची उपेक्षा । करून घेतली योगदीक्षा । घरोघरीं मागे भिक्षा । माहादेव ।।१९।।

साधनकाळात अष्टमहासिद्धींची जराही अपेक्षा न ठेवता तो योगारूढ रहातो. भिक्षेवर पोट भरतो. जणू प्रत्यक्ष महादेव असून दारोदारी भिक्षा मागतो. ॥१९॥

ईश्वराची बराबरी । कैसा करील वेषधारी । म्हणोनियां सगट सरी । होत नाहीं ।।२०।।

केवळ वेश धारण करून सिद्ध बनलेला महादेवाची बरोबरी कशी करील? म्हणून अस्सल सिद्ध व बनावट सिद्ध यांची योग्यता कधीच सारखी नसते. ॥२०॥

उदास आणी विवेक । त्यास शोधिती सकळ लोक । जैसें लालची मूर्ख रंक । तें दैन्यवाणें ।।२१।।

विरक्त व विवेकी जेथे असेल तेथे त्याला सर्व लोक शोधीत येतात. पण लोभी, अविवेकी व दरिद्री मात्र लोकांच्या प्रतीक्षेत रहातो! ॥२१॥

जे विचारापासून चेवले । जे आचारापासून भ्रष्ठले । विवेक करूं विसरले । विषयलोभी ।।२२।।

असे लोक विचारापासून भ्रष्ट, आचारनष्ट असून विषयलोभामुळे शाब्दिक विवेक असूनही तो त्यांना वापरता येत नाही. ॥२२॥

भजन तरी आवडेना । पुरश्चर्ण कदापि घडेना । भल्यांस त्यांस पडेना । येतन्निमित्य ।।२३।।

भजनात गोडी वाटत नाही, पुरश्चरण कधीच घडत नाही. स्वत:ला शहाणे म्हणविणाऱ्यांना सुद्धा त्यांचे प्रयोजन कळत नाही. ॥२३॥

वैराग्यें करून भ्रष्टेना । ज्ञान भजन सांडीना । वित्पन्न आणि वाद घेना । ऐसा थोडा ।।२४।।

संन्यास घेतल्यावर भ्रष्ट न होणारा, वेदांतचिंतन करीत रहाणारा, भजन करणारा, पांडित्य असून वादात न शिरणारा क्वचितच कोणी सापडतो. ॥२४॥

कष्ट करितां सेत पिके । उंच वस्त तत्काळ विके । जाणत्या लोकांच्या कौतुकें । उड्या पडती ।।२५।।

उत्तम मशागतीचे कष्ट केले तर पीक चांगले येते, दर्जेदार वस्तू लगेच विकली जाते व जे परीक्षावंत असतात, त्यांच्या त्या वस्तूवर कौतुकाने उड्या पडतात. ॥२५॥

येर ते अवघेचि मंदले । दुराशेनें खोटे जाले । कानकोंडें ज्ञान केलें । भ्रष्टाकारें ।।२६।।

संन्यास घेतल्यावर त्याला शोभेल असे न वागणारे साधनेत थंडावतात. भलत्या आशा बाळगून खोटे ठरतात व भ्रष्ट होऊन वेदांतशास्त्राला काळिमा फासतात. ॥२६॥

सबळ विषय त्यागणें । शुद्ध कार्याकारण घेणें । विषयत्यागाचीं लक्षणें । वोळखा ऐसीं ।।२७।।

निषिद्ध विषयाचा त्याग करावा, विहित विषयांची निवड करून ते स्वीकारावेत. हाच विषयत्याग होय. (विधीने सेवन ते त्यागाचे समान– संत एकनाथ महाराज). ॥२७॥

सकळ कांहीं कर्ता देव । नाहीं प्रकृतीचा ठाव । विवेकाचा अभिप्राव । विवेकी जाणती ।।२८।।

सर्व कर्तृत्व चेतन ईश्वराचे आहे. अचेतन प्रकृती काहीच करीत नाही. ब्रह्म, ईश्वर, जीव व प्रकृती यांचा निवाडा विवेक्याला ठाऊक असतो. ॥२८॥

शूरत्वविषईं खडतर । त्यास मानिती लाहानथोर । कामगार आणि आंगचोर । येक कैसा ।।२९।।

जो तत्पर व कर्तबगार असतो, त्याला सर्व लोक मान देतात. कष्ट करणारा व कामचुकार सारखे कसे असतील? ॥२९॥

त्यागात्याग तार्किक जाणे । बोलाऐसें चालों जाणे । पिंडब्रह्मांड सकळ जाणे । येथायोग्य ।।३०।।

जो शास्त्राभ्यासाने परिपूर्ण असतो, त्याला विषयाचा त्याग व भोग यांचे रहस्य कळते. त्यामुळे तो जसे बोलतो तसे वागू शकतो. पिंड-ब्रह्मांडादीसंबंधी अध्यात्मशास्त्र तो यथार्थपणे जाणतो. ॥३०॥

ऐसा जो सर्वजाणता । उत्तमलक्षणी पुरुता । तयाचेनि सार्थकता । सहजचि होये ।।३१।।

असा जो सर्वज्ञ व पूर्ण उत्तमलक्षणांनी युक्त असतो, त्याच्या जीवनाचे सहजच मोक्षरूप सार्थक होते. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'विषयत्यागनिरूपणनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'विषयत्याग' नावाचा सातवा समास समाप्त

दशक बारावा : विवेकवैराग्य

समास आठवा : काळरूपनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

मूळमाया जगदेश्वर । पुढें अष्टधेचा विस्तार । सृष्टिक्रमें आकार । आकारला ।।१।।

मूळमाया हेच ज्याचे स्वरूप आहे, त्या जगदीश्वरापासून पुढे अष्टधा प्रकृतीचा विस्तार झाला व क्रमाने या सृष्टीला आकार (रूप) प्राप्त झाला. ॥१॥

हें अवघेच नस्तां निर्मळ । जैसें गगन अंतराळ । निराकारीं काळवेळ । कांहींच नाहीं ।।२।।

यातील काहीच नसते तेव्हा अंतराळरूप गगनाप्रमाणे फक्त विमल ब्रह्म असते. त्या निराकारात काळ व वेळ या दोन्हींना अस्तित्वच नसते. ॥२॥

उपाधीचा विस्तार जाला । तेथें काळ दिसोन आला । येरवीं पाहातां काळाला । ठावचि नाहीं ।।३।।

जेव्हा उपाधीचा विस्तार झाला, तेव्हा काळ व वेळ या संकल्पना तयार झाल्या. तसे पाहिले तर वास्तवात 'काळ' असे काही अस्तित्वातच नाही. ॥३॥

येक चंचळ येक निश्चळ । यावेगळा कोठें काळ । चंचळ आहे तावत्काळ । काळ म्हणावें ।।४।।

ब्रह्म निश्चळ व उपाधी चंचळ अशी वाटणी असताना त्याहून तिसरा काळ कोठेसा आहे? उपाधी आहे तोपर्यंत 'काळ' हे परिमाण मोजले जाते एवढेच. ॥४॥

आकाश म्हणिजे अवकाश । अवकाश बोलिजे विलंबास । त्या विलंबरूप काळास । जाणोनि घ्यावें ।।५।।

आकाशालाच अवकाशही म्हणतात. 'मला अजून बाहेर पडण्यास अवकाश आहे' या वाक्यातील अवकाश या शब्दाचा विलंब किंवा उशीर असा अर्थ होतो. या विलंबातील काळ जाणून घ्यावा. ॥५॥

सूर्याकरितां विलंब कळे । गणना सकळांची आकळे । पळापासून निवळे । युगपरियंत ।।६।।

सूर्याच्या उदयास्तामुळे दिवस हे काळपरिमाण कळते व त्यावरून पुढील सर्व परिमाणे कळतात. 'पळ' या लहान परिमाणापासून युग या फार मोठ्या परिमाणापर्यंत कालगणना करता येते. ॥६॥

पळ घटिका प्रहर दिवस । अहोरात्र पक्ष मास । शड्मास वरि युगास । ठाव जाला ।।७।।

पळ, घटिका, प्रहर, दिवस, रात्रंदिवस, पंधरवडा, महिना, अर्धवर्ष इ. क्रमाने युगापर्यंत काळ मोजता येतो. ॥७॥

क्रेत त्रेत द्वापार कळी । संख्या चालिली भूमंडळी । देवांचीं आयुष्यें आगळीं । शास्त्रीं निरोपिलीं ।।८।।

कृत, त्रेता, द्वापार व कलि या युगांच्या प्रत्येकी वर्षाची परिपाठी रूढ आहे. देवांचे जीवनमानही शास्त्रात सांगितले आहे. ॥८॥

ते देवेत्रयाची खटपट । सूक्ष्मरूपें विलगट । दंडक सांडितां चटपट । लोकांस होते ।।९।।

ब्रह्मदेवादी तीन देवांचे कार्य ठरविण्याचा खटाटोप कितीही मनापासून केला (विलगट) तरी तो फार सूक्ष्म आहे. त्यासंबंधी पुराणात जे सांगितले असेल, त्याला धक्का लागला तर लोकांना चुटपुट लागते. (पिंडामध्ये प्रत्येक क्षणाला कमी-जास्त प्रमाणात उत्पत्ती, स्थिती व लय प्रत्येक पेशीत चालू असतात. ही प्रक्रिया अतिसूक्ष्म आहे. पण

सामान्यांना शेषशायी विष्णू आवडतो!) ॥९॥

मिश्रित त्रिगुण निवडेना । तेणें आद्यंत सृष्टिरचना । कोण थोर कोण साना । कैसा म्हणावा ।।१०।।

तीन देवांच्या तीन गुणांचे पिंडातील मिश्रण एवढे बेमालूम असते की, ते वेगळे करता येत नाही. सुरुवातीपासून शेवटपर्यंत सृष्टी त्रिगुणमय आहे. त्यातील कोणता गुण श्रेष्ठ मानावा? कोणता कनिष्ठ मानावा? व तसा तो का मानावा? ॥१०॥

असो हीं जाणत्याचीं कामें । नेणता उगाच गुंते भ्रमें । प्रत्यये जाणजाणों वर्मे । ठाईं पाडावीं ।।११।।

या प्रश्नांची उत्तरे जाणकारालाच ठाऊक असतात. अज्ञानी माणूस भ्रमाने उगीच गुंता निर्माण करून ठेवतो. शहाण्याने सर्वांगीण अभ्यासाने वर्मे जाणून घ्यावीत. (तीन गुणांशिवाय या सृष्टीत कोणतेच कार्य होत नाही. सृष्टिचक्र चालत नाही. साधकाच्या दृष्टीने सत्त्वगुणाचे महत्त्व असले तरी जगरहाटीसाठी सर्व गुण सारखेच महत्त्वाचे असतात.) ॥११॥

उत्पन्नकाळ सृष्टिकाळ । स्थितिकाळ संव्हारकाळ । आद्यंत अवघा काळ । विलबंरूपी ।।१२।।

सृष्टीच्या संदर्भात उत्पत्ती, स्थिती व नाश असे तीन काळ सृष्टीचे असतात. उत्पत्तीपासून नाशापर्यंत तिन्ही काळात अवकाश किंवा विलंब असतो. ॥१२॥

जें जें जये प्रसंगीं जालें । तेथें काळाचें नांव पडिलें । बरें नसेल अनुमानलें । तरी पुढें ऐका ।।१३।।

स्थितिप्रसंग, स्थितीकाळ इ. प्रकारे जसा प्रसंग असेल तसे त्या काळाला नाव पडले. तुम्हाला हे आकलन नीट होत नसेल तर त्याचा तपशील ऐका. ॥१३॥

प्रजन्यकाळ शीतकाळ । उष्णकाळ संतोषकाळ । सुखदुःखआनंदकाळ । प्रत्यये येतो ।।१४।।

पाऊस, थंडी, उन्हाळा हे निसर्गकाळ, समाधान, सुख, दुःख, आनंद हा मनःस्थितीचा काळ सर्वांच्या अनुभवाचा आहे. ॥१४॥

प्रातःकाळ माध्यानकाळ । सायंकाळ वसंतकाळ । पर्वकाळ कठिणकाळ । जाणिजे लोकीं ।।१५।।

सकाळ, दुपार व संध्याकाळ हे एका दिवसातील तीन काळ, वसंत ऋतूचा काळ, पर्वकाळ हा धार्मिक काळ, कठीण काळ हा प्रापंचिक स्थितीचा काळ सर्वांना माहीत आहे. ॥१५॥

जन्मकाळ बाळत्वकाळ । तारुण्यकाळ वृधाप्यकाळ । अंतकाळ विषमकाळ । वेळरूपें ।।१६।।

जन्म, शिशुत्व, तारुण्य, वृद्धत्व व अंत हे शरीरसापेक्ष काळ, अडचणींचा काळ हा व्यवहारसापेक्ष काळ आहे. ॥१६॥

सुकाळ आणि दुष्काळ । प्रदोषकाळ पुण्यकाळ । सकळा वेळा मिळोन काळ । तयास म्हणावें ।।१७।।

सुकाळ व दुष्काळ हे पीकपाण्याचे संदर्भातील काळ, प्रदोषादी पुण्यकाळ या सर्व वेळा मिळून काळ ही संकल्पना समजते. ॥१७॥

असते येक वाटतें येक । त्याचें नांव हीन विवेक । नाना प्रवृत्तीचे लोक । प्रवृत्ति जाणती ।।१८।।

(याच समासातील तिसऱ्या ओवीचा संदर्भ लक्षात घेऊन पुढील ओव्या वाचाव्यात–) असते एक व वाटते भलतेच हे हलक्या विवेकाचे लक्षण आहे. हा काळाचा विचार प्रापंचिक लोकांना चांगला समजतो. (वास्तविक काळ या नावाचे तत्त्व नसून ते आहे असे वाटते. कारण प्रवृत्ती म्हणजे प्रपंचात रमलेल्यांना काळाचा विचार महत्त्वाचा असतो.) ॥१८॥

प्रवृत्ति चाले अधोमुखें । निवृत्ति धावे ऊर्धमुखें । ऊर्ध्वमुखें नाना सुखें । विवेकी जाणती ।।१९।।

प्रपंचात रमणारे जन्ममरणांच्या, द्वंद्वाच्या व अज्ञानमय जीवनाच्या उतारावर गडगडत जातात. तर अनासक्त जीवन जगणारे मोक्ष, द्वंद्वातीतपणा व ज्ञानाच्या प्रगतिपथावर अवरोहण करतात. याच जीवनात सुखरूपता आहे, हे

विवेकी जाणतात. (नाना सुखे म्हणजे सर्व प्रकारची विषयजन्य सुखे नव्हेत.) ॥१९॥

ब्रह्मांडरचना जेथून जाली । तेथें विवेकी दृष्टि घाली । विवरतां विवरतां लाधली । पूर्वापर स्थिति ।।२०।।

शुद्ध ब्रह्मापासून कारण ब्रह्म (स्फुरण) व कार्यब्रह्म (सृष्टी) निर्माण झाले. विवेकयुक्त विचाराने स्थूलाकडून त्या सूक्ष्माकडे अंत:करणवृत्ती न्यावी. असा विचार करता करता आपली मूळची आत्मस्थिती पुन्हा लाभते. ॥२०॥

प्रपंचीं असोन परमार्थ पाहे । तोहि ये स्थितीतें लाहे । प्रारब्धयोगें करून राहे । लोकांमधें ।।२१।।

जो अनासक्त बुद्धीने प्रपंचात राहून पारमार्थिक साधना करतो त्याला 'ही' आत्मस्थिती लाभते. त्यानंतरचे त्याचे लोकजीवन केवळ शेषप्रारब्धामुळे असते. ॥२१॥

सकळांचें येकचि मूळ । येक जाणते येक बाष्कळ । विवेकें करून तत्काळ । परलोक साधावा ।।२२।।

विविधतेने भरलेल्या सर्व सृष्टीचे उपादनाकारण (मूळ) एकच आहे. (अध्यस्तसृष्टीचे अधिष्ठान ब्रह्म.) जाणत्याला हे कळते व बहिर्मुखाला नाही. हा मुळासंबंधी विवेक साध्य करून आत्मस्थिती प्राप्त करून घ्यावी. (परलोक) ॥२२॥

तरीच जन्माचें सार्थक । भले पाहाती उभये लोक । कारण मुळींचा विवेक । पाहिला पाहिजे ।।२३।।

जे प्रपंच व परमार्थ या दोन्हींचा विचार करणारे पुण्यवंत व विचारी असतात, त्यांच्या जन्माचे सार्थक होते. त्यासाठी दृश्यसृष्टीला कारण असलेल्या ब्रह्मस्वरूपाचा विचार करावा. ॥२३॥

विवेकहीन जे जन । ते जाणावे पशुसमान । त्यांचें ऐकतां भाषण । परलोक कैंचा ।।२४।।

ज्यांचेजवळ वरील विचार नसतो ते व पशू सारखेच. सतत त्यांच्याच संगतीत राहिले (भाषण) तर परमार्थ कसा साधेल? ॥२४॥

बरें आमचें काये गेलें । जें केलें तें फळास आलें । पेरिलें तें उगवलें । भोगिती आतां ।।२५।।

कोणी परमार्थ साधला नाही, तर माझे काय बिघडते? कारण ज्याने जे केले असेल ते बीजरूपाने पेरले जाते व फळरूपाने उगवते व ते भोगावेच लागते. ॥२५॥

पुढेंहि करी तो पावे । भक्तियोगें भगवंत फावे । देव भक्त मिळतां दुणावें । समाधान ।।२६।।

पुढे सुद्धा जी कर्मबीजे पेरली जातील, तीच उगवतील. भक्ती केली तर त्याला भगवंताच्या प्राप्तीचे फळ मिळते. सुखरूप देव व त्याचेच मूळरूप असलेला भक्त एकरूप झाले की समाधान नांदते. ॥२६॥

कीर्ति करून नाहीं मेले । उगेच आले आणि गेले । शाहाणे होऊन भुलले । काये सांगावें ।।२७।।

आपले नाव उरण्यासारखे काही न करताच जे मरून जातात, ते केवळ जन्माला आले व गेले! मानवी बुद्धी असूनही ज्यांना हे कळत नाही, त्यांना काय म्हणावे! ॥२७॥

येथील येथें अवघेंचि राहातें । ऐसें प्रत्ययास येतें । कोण काये घेऊन जातें । सांगाना कां ।।२८।।

येथील व्यावहारिक कमाई येथेच रहाते हे सगळ्यांना प्रत्यक्ष दिसते. मरणानंतर येथील कोण काय घेऊन जाते ते मला जरा सांगा ना! ॥२८॥

पदार्थी असावें उदास । विवेक पाहावा सावकास । येणेंकरिता जगदीश । अलभ्य लाभे ।।२९।।

म्हणून स्थावर जंगम कमाईविषयी अनासक्त रहावे. नित्य व अनित्याचा विवेक सातत्याने व शांतपणे करावा. त्याने सहसा न प्राप्त होणारा ईश्वर प्रसन्न होतो. ॥२९॥

जगदीशापरता लाभ नाहीं । कार्यकारण सर्व कांहीं । संसार करित असतांहि । समाधान ।।३०।।

जगदीश कारण व कार्यरूप सर्वच असल्याने त्याच्या प्राप्तीसारखा मोठा लाभ नाही. प्रारब्धानुसार संसारात राहूनही

समाधान राहते. ॥३०॥

मागां होते जनकादिक । राज्य करितांहि अनेक । तैसेचि आतां पुण्यश्लोक । कित्येक असती ।।३१।।

पूर्वी जनकासारखे सम्राटही परमार्थ साधलेले होते. राज्यकारभार आड आला नाही. अलीकडे सुद्धा पुण्यश्लोक शिवछत्रपतींसारखे कार्यमग्न असलेले किती तरी पारमार्थिक लोक आहेत. ॥३१॥

राजा असतां मृत्य आला । लक्ष कोटी कबुल जाला । परि सोडिना तयाला । मृत्य कांहीं ।।३२।।

राजाने, मृत्यू येताना मृत्यूला कित्येक लक्षकोटी रुपये देण्याचे मान्य केले तरी मृत्यू त्याला सोडीत नाही. ॥३२॥

ऐसें हें पराधेन जिणें । यामध्ये दुखणें बाहाणें । नान उद्वेग चिंता करणें । किती म्हणोनि ।।३३।।

असे हे मानवी जीवन सर्वस्वी पराधीन आहे. त्यात आजार, अपघात, उद्वेग, काळजी यांची फार मोठी भर पडते. ॥३३॥

हाट भरला संसाराचा । नफा पाहावा देवाचा । तरीच या कष्टाचा । परियाये होतो ।।३४।।

अशा या संसाराच्या भरलेल्या बाजारात माणसाने देवरूप नफ्यावर नजर ठेवावी. तरच या सर्व कष्टातून सुटका होते. ॥३४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'काळरूपनिरूपणनाम' समास आठवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'काळरूपनिरूपण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक बारावा : विवेकवैराग्य

समास नववा : यत्नसिकवण

॥ श्रीराम समर्थ ॥

कोणी एकाने प्रश्न विचारला की–

दुर्बल नाचारी वोडगस्त । आळसी खादाड रिणगस्त । मूर्खपणें अवघें वेस्त । कांहींच नाहीं ।।१।।
खाया नाहीं जेवाया नाहीं । लेया नाहीं नेसाया नाहीं । अंथराया नाहीं पांघराया नाहीं । कोंपट नाहीं अभागी ।।२।।
सोयरे नाहीं धायेरे नाहीं । इष्ट नाहीं मित्र नाहीं । पाहातां कोठें वोळखी नाहीं । आश्रयेंविण परदेसी ।।३।।
तेणें कैसें करावें । काये जीवेंसी धरावें । वाचावें किं मरावें । कोण्या प्रकारें ।।४।।
ऐसें कोणीयेकें पुसिलें । कोणीयेकें उत्तर दिधलें । श्रोतीं सावध ऐकिलें । पाहिजे आतां ।।५।।

जो शरीराने दुर्बळ, वर्तणुकीने वाईट, सर्वत्र ओढाताण असलेला, आळशी, खादाड, कर्जबाजारी, मूर्खपणामुळे अस्ताव्यस्त जीवन जगणारा, घरात खायला नाही, जेवायला नाही, अंगावर वस्त्र नाही, अंथरूण, पांघरूण नाही, दुर्दैवी असल्याने साधी झोपडी सुद्धा निवाऱ्याला नाही. सोयरेधायरे फिरकत नाहीत, इष्टमित्र नाहीत. कोठे ओळख नाही, आधार नाही. अशा जणू, परदेशी असलेल्याने काय करावे? जीव कसा सांभाळावा? जगावे कसे? मरावे तरी कसे? आता या प्रश्नांचे उत्तर सावधपणे ऐका. ॥१-५॥

लाहानथोर काम कांहीं । केल्यावेगळें होत नाहीं । करंट्या सावध पाहीं । सदेव होसी ।।६।।

असे जीवन जगणाऱ्या हे करंट्या, तू सावध हो. कोणतेही काम प्रत्यक्ष ते केल्याशिवाय तडीला जात नाही. ते काम किरकोळ असो की मोठे असो. काम केल्यानेच तुझे भाग्य उदयाला येईल. ॥६॥

अंतरीं नाहीं सावधानता । येत्न ठाकेना पुरता । सुखसंतोषाची वार्ता । तेथें कैंची ।।७।।

जेथे जागरूकता किंवा तत्परता नाही व पुरेसे प्रयत्न योग्य दिशेने व पद्धतीने केले जात नाहीत, तेथे सुख व समाधान कोठून येईल? ॥७॥

म्हणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपें जोडावा । दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ।।८।।

म्हणून आळस किंवा कंटाळा संपूर्ण सोडावा, सतत प्रयत्न करीत रहावा आणि दुर्लक्ष, विसरभोळेपणा, चंचलता इत्यादींचा निर्धारपूर्वक त्याग करावा. ॥८॥

प्रात:काळीं उठत जावें । प्रात:स्मरामि करावें । नित्य नेमें स्मरावें । पाठांतर ।।९।।

भल्या पहाटे उठावे, प्रात:स्मरणाचे स्तोत्र म्हणावे व काही नियमाचे पाठांतर करावे व केलेल्याची उजळणी करावी. ॥९॥

मागील उजळणी पुढें पाठ । नेम धरावा निकट । बाष्कळपणाची वटवट । करूंच नये ।।१०।।

पाठ केलेले पुन्हा म्हणावे, काही नवीन पाठांतर करावे व ध्यान, पूजा, पाठादी नियम निश्चयपूर्वक चालवावेत. वायफळ बडबड करीत वेळ फुकट दवडू नये. ॥१०॥

दिशेकडे दुरी जावें । सुचिस्मंत होऊन यावें । येतां कांहीं तरी आणावें । रितें खोटें ।।११।।

शौच विधीसाठी गावापासून दूर जाऊन पवित्र होऊन परत यावे. नदी किंवा तलावात सर्व प्रात:विधी उरकून यावे, येताना पाणी, शेण, रस्त्यावर पडलेली चार लाकडे इ. काहीतरी घेऊन यावे. (हे साडेतीनशे वर्षांपूर्वी ठीक होते. आजही हजारो खेड्यांतून हा नियम लागू आहे. शहरातही झोपडपट्ट्यांत असेच करावे लागते.) ॥११॥

धूतवस्त्रें घालावीं पिळून । करावें चरणक्षाळण । देवदर्शन देवार्चन । येथासांग ।।१२।।

घरी आल्यावर धुऊन आणलेले कपडे चांगले घट्ट पिळून वाळत घालावेत, पाय स्वच्छ धुवावेत. देवाचे दर्शन घेऊन व्यवस्थित पूजा करावी. (रेडिओत कान आणि टी. व्ही. व पेपरमध्ये डोळे घालून, चहा पीत गप्पा मारत बसू नये.) ॥१२॥

कांहीं फळाहार घ्यावा । पुढें वेवसाये करावा । लोक आपला परावा । म्हणत जावा ।।१३।।

न्याहारी करून आपल्या उद्योगधंद्याला लागावे. अगदी अनोळखी व्यक्तींशीसुद्धा जुनी ओळख असल्याप्रमाणे वागावे व बोलावे. (आंत सावध राहून असे वागले तर लोक संतुष्ट राहतात व स्वत:चेही नुकसान होत नाही.) ॥१३॥

सुंदर अक्षर ल्याहावें । पष्ट नेमस्त वाचावें । विवरविवरों जाणावें । अर्थांतर ।।१४।।

लिहिताना अक्षर सुंदर असावे, वाचताना स्पष्ट उच्चार असावेत व जे वाचले असेल त्याचे सर्व अर्थ समजावून घ्यावेत. (लिहिणाऱ्याचे मनोगत जाणून घेण्याचे कौशल्य असावे.) ॥१४॥

नेमस्त नेटकें पुसावें । विशद करून सांगावें । प्रत्ययेंविण बोलावें । तेंचि पाप ।।१५।।

कोणाला काही विचारावे लागले तर योग्य शब्दांत, पाल्हाळ न लावता स्पष्टपणे विचारावे. काही सांगावयाची वेळ आली तर आवश्यक ते सर्व स्पष्टीकरण करावे. माहीत नसेल ते दडपून सांगू नये. त्याने दुसऱ्याचे नुकसान होते. (स्वत:ला माहीत नसताना दडपून दुसऱ्याला सांगणे हे एक प्रकारचे पापच होय). ॥१५॥

सावधानता असावी । नीतिमर्यादा राखावी । जनास माने ऐसी करावी । क्रियासिद्धि ।।१६।।

आत सतत सावध असावे (पण त्यामुळे वागण्याबोलण्यात अनिश्चितपणा, संशय व तुटकपणा येऊ नये.) नीतीच्या मर्यादा सांभाळाव्यात व आपल्या कृतीने लोक संतुष्ट करावेत. ॥१६॥

आलियाचें समाधान । हरिकथा निरूपण । सर्वदा प्रसंग पाहोन । वर्तत जावें ।।१७।।

व्यवसायाच्या निमित्ताने किंवा व्यक्तिगत जीवनात ज्यांचा संबंध येतो त्यांचे समाधान करावे. हरीची सगुण व निर्गुण कथा करीत जावे व सर्व वागणे प्रसंगोचित असावे. ॥१७॥

ताळ धाटी मुद्रा शुद्ध । अर्थ प्रमये अन्वये शुद्ध । गद्यपद्यें दृष्टांत शुद्ध । अन्वयाचे ।।१८।।

(ह्यापुढील शिकवण महंतासाठी आहे–) कीर्तन करताना संगीताचा ठेका, अभंग किंवा आर्या म्हणण्याची विशिष्ट रीत (धाटी), व रसपरिपोषासाठी विविध मुद्रांचे भान असावे. त्या सर्व शुद्ध असाव्यात (पांचट नसाव्यात). श्लोकादिकांचा अर्थ व त्यातील अध्यात्मशास्त्र यथार्थपणे सांगावे. विषय समजावून सांगण्यासाठी दिले जाणारे दृष्टांत (व्यावहारिक उदाहरणे) विषयाशी सुसंगत व उच्च अभिरुचीचे (शुद्ध) असावेत. ॥१८॥

गाणें वाजवाणें नाचणें । हस्तन्यास दाखवणें । सभारंजकें वचनें । आडकथा छंदबंद ।।१९।।

कीर्तनांत रागदारीत गावे, वाद्यांची साथ असावी, भावाच्या अधिक आविष्कारांसाठी मर्यादशील नाचावे, हातांच्या योग्य हालचाली करून विषय खुलवावा, श्रोत्यांची थोडी करमणूक होण्यासारख्या वाक्ययोजना असाव्यात, कोणाला माहीत नसलेल्या गोष्टी सांगाव्यात व सर्व निरूपणाची काव्ये छंद, वृत्त इत्यादींनी बद्ध असावीत. (मुक्तछंद नसावा.) ॥१९॥

बहुतांचें समाधान राखावें । बहुतांस मानेल तें बोलावें । विलग पडों नेदावें । कथेमधें ।।२०।।

बहुसंख्य श्रोत्यांचे समाधान होण्यासाठी त्यांच्या कलाने बोलावे. घणाघाती टीका, टिंगलटवाळी, मर्मभेदक शब्द

इत्यादींनी कीर्तनाचा बेरंग होऊ देऊ नये. ॥२०॥

लोकांस उदंड वाजी आणूं नये । लोकांचें उकलावें हृदये । तरी मग स्वभावें होये । नामघोष ।।२१।।

तेच तेच बोलून, पाचकळ बोलून व कंटाळा येईपर्यंत कथा लांबवून श्रोत्यांना जिकिरीस आणू नये. लोकांच्या अंतस्थितीला स्पर्श करून त्यांची मने मोकळी होऊन ती वक्त्याच्या ताब्यात आली की लोक उत्स्फूर्तपणे नामघोष करून कीर्तनकाराला साथ देतात. ॥२१॥

भक्ति ज्ञान वैराग्य योग । नाना साधनाचे प्रयोग । जेणें तुटे भवरोग । मननमात्रें ।।२२।।

कीर्तनामध्ये भक्ती, ज्ञान व वैराग्य मिळविण्यावर (योग) भर असावा. त्यासाठी आवश्यक ते उपाय किंवा प्रयोग स्पष्ट करून सांगावेत. श्रोत्यांनी त्यांचे मनन-चिंतन केल्यावर त्यांचा भवरोग बरा होतो. ॥२२॥

जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें । मग महंतलीळा स्वभावें । आंगीं बाणें ।।२३।।

महंत जे जसे सांगतो ते व तसेच त्याचे आचरण असावे. त्याच्या जीवनात ते दिसावे. असे असेल तरच महंताची महंती सहजच परिणामकारक होते. तो खरा महंत होतो. ॥२३॥

युक्तिवीण साजिरा योग । तो दुराशेचा रोग । संगतीच्या लोकांचा भोग । उभा ठेला ।।२४।।

सर्व दृष्टीने महंत चांगला असला व त्याला महंती जर युक्तीने चालविता आली नाही, तर कार्याबद्दल भाकड आशा बाळगण्याशिवाय काही साधत नाही (दुराशा). त्याच्या सहकाऱ्यांना मात्र हात चोळीत बसावे लागते. ॥२४॥

ऐसें न करावें सर्वथा । जनास पावऊं नये वेथा । हृदईं चिंतावें समर्था । रघुनाथजीसी ।।२५।।

म्हणून असे कधीही होऊ देऊ नये. सहकाऱ्यांना व संबंधितांना अशी व्यथा लावू नये. आशीर्वादासाठी सर्वशक्तिमान श्रीरामाचे अंत:करणात चिंतन करावे. ॥२५॥

उदासवृत्तीस मानवे जन । विशेष कथानिरूपण । रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी ।।२६।।

सामान्य माणसाला महंताची विरक्तता ओढ निर्माण करते. त्यावर तो हरिकथा करीत असेल तर त्यांना अधिकच प्रिय होतो. म्हणून श्रीरामाची कथा मोठ्या जोमाने सर्वत्र करावी. त्या कथेने ब्रह्मांडाच्या सीमा पार कराव्यात. ॥२६॥

सांग महंती संगीत गाणें । तेथें वैभवास काय उणें । नभामाजी तारांगणें । तैसे लोक ।।२७।।

परिपूर्ण महंतीच्या जोडीला संगीताच्या साथीसह रामकथा असेल तर महंताला अपार वैभव लाभते. आकाशात चंद्राभोवती चांदण्या असतात तेवढे लोक त्याचे भोवती जमतात. संघटना तयार होते. ॥२७॥

आकलबंद नाहीं जेथें । अवघेंचि विश्कळित तेथें । येकें आकलेविण तें । काये आहे ।।२८।।

ज्या ठिकाणी अशा सामुग्रीने सज्ज असलेली बुद्धिमत्ता नसते तेथे अवघा गोंधळ होतो. त्या बुद्धिमत्तेशिवाय सर्व व्यर्थ आहे. ॥२८॥

घालून अकलेचा पवाड । व्हावें ब्रह्मांडाहून जाड । तेथें कैचें आणिलें द्वाड । करंटपण ।।२९।।

म्हणून बुद्धिमत्तेच्या साह्याने ब्रह्मांडाला गवसणी घालून त्याहून व्यापक व्हावे. ब्रह्म व्हावे. एवढी क्षमता असणाऱ्याने भिकार करंटपणा काय म्हणून पत्करावा? ॥२९॥

येथें आशंका फिटली । बुद्धि येत्नीं प्रवेशली । कांहींयेक आशा वाढली । अंत:कर्णी ।।३०।।

सुरुवातीला श्रोत्याने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिले. कमावलेली बुद्धी जेव्हा अथक प्रयत्नांची कास धरते तेव्हा आशादायक परिस्थिती तयार होते व मनाला उभारी निर्माण होते. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'यत्नसिकवणनाम' समास नववा
गुरुशिष्य संवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'यत्नसिकवण' नावाचा नववा समास समाप्त

दशक बारावा : विवेकवैराग्य

समास दहावा : उत्तमपुरुषनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

आपण येथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वाटणें । परंतु वाया दवडणें । हा धर्म नव्हे ।।१।।

आपण पोटभर जेवल्यावर उरलेले अन्न इतरांना द्यावे. ते टाकून देऊ नये. धर्म असे सांगत नाही. ॥१॥

तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनास सांगावें । तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ।।२।।

त्याप्रमाणे स्वत: ब्रह्मज्ञानाने मुक्त व्हावे व ते ज्ञान इतरांना सांगावे. उत्तम पोहोणाऱ्याने बुडणाऱ्यालाही तारून न्यावे. ॥२॥

उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे । वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ।।३।।

स्वत: सद्‌गुणांची जोपासना करून ते स्वत:मध्ये बाणल्यावर दुसऱ्यांना ते जोपासण्यास सांगावे. आचरण व अनुभवाचे पाठबळ नसलेला उपदेश परिणामशून्य होतो. ॥३॥

स्नान संध्या देवार्चन । येकाग्र करावें जपध्यान । हरिकथा निरूपण । केलें पाहिजे ।।४।।

स्वत: स्नान, संध्या, देवपूजा, एकाग्र चित्ताने नामजप व सोऽहं ध्यान करावे. समाजात कीर्तन-प्रवचन करावे. ॥४॥

शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यावें । उणें पडों नेदावें । कोणियेकाचें ।।५।।

स्वत:चा देह दुसऱ्यांना मदत करण्यासाठी वापरून अनेकांना उपयोगी पडावे. जेथे उणीव दिसेल ती भरून काढावी. ॥५॥

आडलें जाकसलें जाणावें । यथानशक्ति कामास यावें । मृदवचनें बोलत जावें । कोणीयेकासी ।।६।।

कोण कशाने अडला आहे, कोण कशाने गांजला आहे ते जाणून आपल्या शक्तीनुसार त्याला त्यातून मार्ग काढून द्यावा. सर्वांशी बोलताना मवाळ, आर्जवी व गोड शब्दाने बोलावे. (मात्र त्यात कृत्रिमता नसावी.) ॥६॥

दुसऱ्याच्या दुःखें दुःखवावें । परसंतोषें सुखी व्हावें । प्राणीमात्रास मेळऊन घ्यावें । बऱ्या शब्दें ।।७।।

दुसऱ्याच्या दु:खात व सुखात सहभागी व्हावे, योग्य शब्दांनी दुसऱ्यांना आपलेसे करावे. ॥७॥

बहुतांचे अन्याये क्ष्मावे । बहुतांचे कार्यभाग करावे । आपल्यापरीस व्हावे । पारखे जन ।।८।।

जास्तीत जास्त लोकांनी केलेल्या स्वत:विषयीच्या अपराधांची क्षमा करावी. ते मनात धरून ठेवू नये. अधिकाधिक लोकांना त्यांच्या कामात मदत करावी. परके लोक स्वजनांप्रमाणे व्हावेत. ॥८॥

दुसऱ्यांचें अंतर जाणावें । तदनुसारचि वर्तावें । लोकांस परीक्षित जावें । नाना प्रकारें ।।९।।

दुसऱ्याचे अंतरंग ओळखावे व त्यानुसार त्याच्याशी व्यवहार करावा. त्यासाठी सर्वांची अनेक दृष्टीने परीक्षा करीत असावे. ॥९॥

नेमकचि बोलावें । तत्काळचि प्रतिवचन द्यावें । कदापी रागास न यावें । क्ष्मारूपें ।।१०।।

आवश्यक तेवढेच व मुद्देसूद बोलावे. आवश्यक तेथे न घोटाळता प्रत्युत्तर द्यावे. आणि क्षमावृत्ती सांभाळीत रागाने आवाज न चढविता बोलावे. ॥१०॥

आलस्य अवघाच दवडावा । येत्न उदंडचि करावा । शब्दमत्सर न करावा । कोणीयेकाचा ।।११।।

जराही आळस न करता अखंड कार्यमग्न असावे. आत दुसऱ्याच्या मत्सराचा तरंग उठलाच तरी तो शब्दानेही बोलू नये. ।।११।।

उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा । सावधपणें करीत जावा । संसार आपला ।।१२।।

आपल्याजवळील उत्तम पदार्थांपैकी पदार्थ दुसऱ्याला द्यावा. बोलताना शब्द निवडून बोलावा. (अयोग्य शब्दयोजनेने दुसरा नाराज होतो.) आपला प्रपंच व्यवहार सावधपणे चालवावा. ।।१२।।

मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीस सादर व्हावें । मरोन कीर्तीस उरवावें । येणें प्रकारें ।।१३।।

आपण अमर नाही ह्याचे भान असावे. (मरणाच्या भीतीमध्ये जीवन कंठावयाचे नाही हे जेवढे खरे तेवढेच अमरपट्टा घेऊन आल्याच्या भ्रमात राहू नये हेही खरे. ज्या अनंत क्षुल्लक बाबींना फार महत्त्व देऊन आयुष्य फुकट जाते त्या बाबी मनातून झटकून टाकाव्यात.) हरिभजनासाठी तत्पर असावे व मेल्यावर काही कीर्ती वरील प्रकारे मागे ठेवावी. ।।१३।।

नेमकेपणें वर्तो लागला । तो बहुतांस कळों आला । सर्व आर्जवी तयाला । काये उणें ।।१४।।

असा जो सुव्यवस्थितपणे वागतो त्याचे ते वागणे सर्वांच्याच लक्षात येते व सर्वजण त्याच्याशी सरळपणे व्यवहार करतात. अशाला काय कमी पडणार? ।।१४।।

ऐसा उत्तम गुणी विशेष । तयास म्हणावें पुरुष । जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होये ।।१५।।

असा जो उत्तम गुणांनी विभूषित असतो त्यालाच खरा माणूस म्हणावे. त्याने केलेली उपासना ईश्वराला संतुष्ट करते. ।।१५।।

उदंड धि:कारून बोलती । तरी चळों नेदावी शांती । दुर्जनास मिळोन जाती । धन्य ते साधु ।।१६।।

कोणी वाटेल तेवढे अपमानास्पद बोलले तरी स्वत:ची शांती ढळू देऊ नये. दुष्ट दुर्जनांचे अपराध जे पोटात घालतात ते साधू धन्य होत. ।।१६।।

उत्तम गुणी श्रृंघारला । ज्ञानवैराग्यें शोभला । तोचि येक जाणावा भला । भूमंडळीं ।।१७।।

जो उत्तम गुणांनी मंडित आहे व ज्ञान व वैराग्याने शोभायमान आहे तोच ह्या पृथ्वीवर सर्वश्रेष्ठ समजावा. ।।१७।।

स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोसित जावें । झिजोन कीर्तीस उरवावें । नाना प्रकारें ।।१८।।

आपण सतत कार्यासाठी कष्ट करावेत, अनेकांची वागणी-बोलणी शांतपणे सोसावी व स्वत: झिजून अनेक क्षेत्रांत आपली कीर्ती मागे ठेवावी. ।।१८।।

कीर्ती पाहों जातां सुख नाहीं । सुख पाहातां कीर्ती नाहीं । विचारेंविण कोठेंचि नाहीं । समाधान ।।१९।।

कीर्ती हवी असेल तर देहाला सुख मिळणार नाही. देहाला ऐषआराम हवा असेल तर कीर्ती मिळणार नाही. विवेकयुक्त विचाराशिवाय समाधान मिळत नाही. ।।१९।।

परांतरास न लावावा ढका । कदापि पडों नेदावा चुका । क्षमासीळ तयाच्या तुका । हानी नाहीं ।।२०।।

दुसऱ्याचे मन दुखवू नये हा नियम कधी मोडू नये. जो क्षमावंत असतो त्याच्या नावलौकिकाला धक्का लागत नाही. ।।२०।।

आपलें अथवा परावें । कार्य अवघेंच करावें । प्रसंगीं कामास चुकवावें । हें विहित नव्हे ।।२१।।

स्वत:चे किंवा दुसऱ्याचे काम तडीला न्यावे. प्रसंग उभा राहिला असता काढता पाय घेणे योग्य नाही. ।।२१।।

बरें बोलतां सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष कळतें । आत्मवत परावें तें । मानीत जावें ।।२२।।

कोणी आपल्याशी नीट बोलले तर आपल्याला बरे वाटते असा सर्वांचा अनुभव आहे. 'जसे मला तसे दुसऱ्याला' असा विवेक करीत जावे. ।।२२।।

कठिण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें । तरी मग वाईट बोलावें तें । कायें निमित्य ।।२३।।

अपशब्द वापरून कोणी बोलले तर दु:ख होते हेही अनुभवाला येते. मग तसे दुसऱ्याला का बोलावे? ॥२३॥

आपणास चिमोटा घेतला । तेणें कासाविस जाला । आपणावरून दुसऱ्याला । राखत जावें ।।२४।।

आपल्याला साधा चिमटा काढला तरी जीव कासावीस होतो. तसेच दुसऱ्याला होईल हे समजून राहावे. ॥२४॥

जे दुसऱ्यास दु:ख करी । ते अपवित्र वैखरी । आपणास घात करी । कोणियेके प्रसंगीं ।।२५।।

जी वाणी अपशब्दाने दुसऱ्याला दु:ख देते ती अपवित्र असून एखाद्या प्रसंगी वापरणाऱ्याला धडा शिकवते. ॥२५॥

पेरिलें ते उगवतें । बोलण्यासारिखें उत्तर येतें । तरी मग कर्कश बोलावें तें । काये निमित्य ।।२६।।

पेरावे ते उगवते, ध्वनीसारखा प्रतिध्वनी उमटतो हे ठाऊक असून कठोर व झोंबऱ्या शब्दांनी का बोलावे? ॥२६॥

आपल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें । परंतु कष्टी करावें । हे राक्षेसी क्रिया ।।२७।।

स्वत:च्या कर्तबगारीने कमाविलेल्या वैभवाने इतरांना सुख द्यावे. उलट त्याने उन्मत्त होऊन छळणे हे राक्षसी प्रवृत्तीचे लक्षण आहे. ॥२७॥

दंभ दर्प अभिमान । क्रोध आणी कठिण वचन । हें अज्ञानाचें लक्षण । भगवद्गीतेंत बोलिलें ।।२८।।

भगवद्गीतेमध्ये (१६-४) दंभ, दर्प, अभिमान, क्रोध व कठोर बोलणे ही अज्ञानाची लक्षणे सांगितली आहेत. ॥२८॥

जो उत्तम गुणें शोभला । तोचि पुरुष माहा भला । कित्येक लोक तयाला । शोधीत फिरती ।।२९।।

जो उत्तम गुणांनी नटला आहे तोच भाग्यवान सर्वश्रेष्ठ पुरुष असून त्याला भेटण्यासाठी कित्येक लोक त्याच्या मागावर असतात. ॥२९॥

क्रियेविण शब्दज्ञान । तेंचि स्वानाचें वमन । भले तेथें अवलोकन । कदापी न करिती ।।३०।।

कुत्र्याने ओकलेले अन्न व प्रत्यक्ष कृतीवाचूनचे शब्दज्ञान दोन्ही सारखीच! जाणते लोक अशा शब्दज्ञानी व्यक्तीकडे ढुंकूनही पाहत नाहीत. ॥३०॥

मनापासून भक्ति करणे । उत्तम गुण अगत्य धरणें । तया माहापुरुषाकारणें । धुंडीत येती ।।३१।।

अत्यंत आवडीने जो भक्ती करतो व जाणीवपूर्वक दैवी संपदेची जोपासना करतो अशा महापुरुषाला लोक तो असेल तेथे शोधत येतात. ॥३१॥

ऐसा जो माहानुभाव । तेणें करावा समुदाव । भक्तियोगें देवाधिदेव । आपुला करावा ।।३२।।

असा जो महात्मा असेल त्याने लोकांना संप्रदायाच्या चौकटीत बांधावे व त्यांच्यासह भक्तीने देव आपलासा करावा. ॥३२॥

आपण आवचितें मरोन जावें । मग भजन कोणें करावें । याकारणें भजनास लावावे । बहुत लोक ।।३३।।

त्या महात्म्याने असा विचार करावा की आपण अकस्मात देह सोडला तर नंतर संप्रदाय कोणी चालवावा? म्हणून मोठ्या जनसमुदायाला संप्रदायात सामील करून घ्यावे. ॥३३॥

आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी । आपणामागें जगदीशासी । भजत जावें ।।३४।।

आमची तर अशी प्रतिज्ञा आहे की स्वत: शिष्यांकडे काही मागू नये. मात्र त्यांनी आमच्या नंतरही उपासना व संप्रदाय व्यवस्थित चालू ठेवावा. ॥३४॥

याकारणें समुदाव । जाला पाहिजे मोहोछाव । हातोपाती देवाधिदेव । वोळेसा करावा ।।३५।।

ह्यासाठी मोठा समुदाय एकत्र करून देवाचे मोठे मोठे उत्सव साजरे केले पाहिजेत. त्यातील भावपूर्ण उपासनेने

देवाधिदेव हातोहात प्रसन्न करून घ्यावा. ॥३५॥

आता समुदायाकारणें । पाहिजेती दोनी लक्षणें । श्रोतीं येथें सावधपणें । मन घालावें ।।३६।।

संप्रदायांतर्गत समुदाय एकत्र करण्यासाठी व नंतर तो सांभाळण्यासाठी महंताजवळ दोन मुख्य लक्षणे असली पाहिजेत. ती लक्षपूर्वक ऐका. ॥३६॥

जेणें बहुतांस घडे भक्ति । ते हे रोकडी प्रबोधशक्ति । बहुतांचें मनोगत हातीं । घेतलें पाहिजे ।।३७।।

पहिले लक्षण असे की अधिकाधिक लोक भक्तिमार्गाला लागण्यासाठी प्रत्ययकारी व प्रभावी प्रबोधन सामर्थ्य असावे. वक्तृत्वातून अनेकांच्या हृदयाला त्याने हात घातला पाहिजे. त्यांची मने आकृष्ट करून घेतली पाहिजेत. ॥३७॥

मागां बोलिले उत्तम गुण । तयास मानिती प्रमाण । प्रबोधशक्तींचें लक्षण । पुढे चाले ।।३८।।

मागे सांगितलेले उत्तम गुण ज्याचे जवळ असतात त्याचे सांगणे लोक प्रमाण मानतात. त्यामुळेच प्रबोधसामर्थ्याचा प्रवाह अखंड चालतो. ॥३८॥

बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें । तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ।।३९।।

दुसरे लक्षण असे की महंत जे सांगतो तसे त्याने प्रत्यक्षात वागले पाहिजे. करून मग सांगितले पाहिजे. त्याच्या त्या सांगण्याला मोठे वजन प्राप्त होते व ते लोक मानतात. ॥३९॥

जें जें जनास मानेना । तें तें जनहि मानीना । आपण येकला जन नाना । सृष्टिमधें ।।४०।।

असे झाले नाही तर ते सांगणे लोकांना आवडतही नाही व पटतही नाही, सांगणारा एकटा व लोक पुष्कळ असे द्वैत तयार होऊन राहते. त्यांच्यात सूर जुळत नाहीत. ॥४०॥

म्हणोन सांगाती असावे । मानत मानत शिकवावे । हळुहळु सेवटा न्यावे । विवेकानें ।।४१।।

म्हणून महंताला अनुयायी असावेत व त्यांना त्याने हळूहळू समजावत समजावत अत्यंत विवेकाने पुढे मोक्षापर्यंत न्यावे. ॥४१॥

परंतु हे विवेकांचीं कामें । विवेकी करील नेमें । इतर ते बापुडे भ्रमें । भांडोंच लागले ।।४२।।

पण ही अत्यंत मोलाची कामगिरी केवळ विवेकानेच होते. विवेक्यालाच ती जमतील. इतर सामान्य बिचारे मतभेदांना तोंड देत भ्रमाने भांडत बसतील. ॥४२॥

बहुतांसीं भांडतां येकला । शैन्यावांचून पुरवला । याकारणें बहुतांला । राजी राखावें ।।४३।।

कोणी एकाला अनेकांशी झुंज घेण्याची वेळ आली तर त्याला संघटनेच्या मदतीची गरज असते. म्हणून अनेकांना आपलेसे करून ठेविलेले असावे. ॥४३॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'उत्तमपुरुषनिरूपणनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'उत्तमपुरुषनिरूपण' नावाचा दहावा समास समाप्त
—दशक बारावा समाप्त—

दशक तेरावा : नामरूप

समास पहिला : आत्मानात्मविवेक

॥ श्रीराम समर्थ ॥

आत्मानात्मविवेक करावा । करून बरा विवरावा । विवरोन सदृढ धरावा । जीवामध्यें ।।१।।

आत्मवस्तू (चेतन) व अनात्मवस्तू (अचेतन, जड) ह्यांचा विवेक करून त्यांची व्यापक मीमांसा करावी. ती केल्यावर अंत:करणात ती कायम धरून ठेवावी. विसरू नये. ॥१॥

आत्मा कोण अनात्मा कोण । त्याचें करावें विवरण । तेंचि आतां निरूपण । सावध ऐका ।।२।।

आत्मा कोण व अनात्मा कोण ह्याचे स्पष्ट विवरण करावे. आता ते सावध होऊन ऐका. ॥२॥

च्यारि खाणी च्यारि वाणी । चौऱ्यासि लक्ष जीवप्राणी । संख्या बोलिली पुराणीं । वर्तती आतां ।।३।।

पुराणात सांगितलेल्या जरायुजादी चार खाणी, परादी चार वाणी व मनुष्यादी चौऱ्याऐंशी योनी आजही आहेत असे दिसते. ॥३॥

नाना प्रकारीचीं शरीरें । सृष्टींत दिसती अपारें । तयामधें निधरिं । आत्मा कवणु ।।४।।

दृश्य सृष्टीमध्ये अनंत प्रकारचे अनंत देह दिसतात. त्यात निश्चितपणे आत्मा कोठेसा असतो? कोणाला म्हणावे? ॥४॥

दृष्टीमधें पाहातो । श्रवणामध्यें ऐकतो । रसनेमध्यें स्वाद घेतो । प्रत्यक्ष आतां ।।५।।

आत्मा जीवात्म्याचे रूपाने डोळ्यांनी पहातो, कानांनी ऐकतो, जिभेने चव घेतो, हे सर्व प्रत्यक्षात घडते. ॥५॥

घ्राणामधें वास घेतो । सर्वांगीं तो स्पर्शतो । वाचेमधें बोलवितो । जाणोनि शब्द ।।६।।

तोच नाकाने वास घेतो, सर्व त्वचेने स्पर्श जाणतो, वाणीने शब्दार्थ लक्षात घेऊन बोलतो. ॥६॥

सावधान आणि चंचळ । चहुंकडे चळवळ । येकलांचि चालवी सकळ । इंद्रियेंद्वारा ।।७।।

सतत जागा राहून व सर्वत्र व्यापून राहून (चंचळ) देहाचे सर्व व्यापार चालवितो. इंद्रियांच्या माध्यमातून तो एकटाच हे सर्व करतो. (चंचळ म्हणजे फिरणारा नव्हे. आत्मा व जीव ही दोन्ही तत्त्वे सर्व देहभर व्यापून राहतात. त्यामुळे जीव हा डोळे, कान, वाणी इत्यादिकांत सतत व्यापूनच असतो. प्रत्येक ज्ञानेंद्रियात प्रत्येक ज्ञानासाठी त्याला जावे लागत नाही!) ॥७॥

पाये चालवी हात हालवी । भृकुटी पालवी डोळा घालवी । संकेत खुणा बोलवी । तोचि आत्मा ।।८।।

तोच पायांना चालवितो, हातांना हालवितो, भुवई वाकडी करतो व डोळ्यांच्या हालचालींनी सांकेतिक खुणा करतो. (उदा. डोळे वटारून रागाचा संकेत देतो.) ॥८॥

धिटाई लाजवी खाजवी । खोंकवी वोकवी थुंकवी । अन्न जेऊन उदक सेववी । तोचि आत्मा ।।९।।

धीटपणा, लाजणे, खाजविणे, खोकणे, ओकणे, थुंकणे, अन्न खाणे, पाणी पिणे इ. सर्व तोच आत्मा करतो. ॥९॥

मळमूत्रत्याग करी । शरीरमात्र सावरी । प्रवृत्ति निवृत्ति विवरी । तोचि आत्मा ।।१०।।

मळत्याग, मूत्रविसर्जन, तोल सांभाळणे, प्रवृत्तिमार्ग व निवृत्तिमार्ग (धर्मजीवन व अध्यात्मजीवन) ह्यांचा विचार तो आत्माच करतो. ॥१०॥

ऐके देखे हुंगे चाखे । नाना प्रकारें वोळखे । संतोष पावे आणी धाके । तोचि आत्मा ।।११।।

ऐकतो, वास घेतो, पहातो, चव घेतो, वस्तू ओळखतो, संतुष्ट होतो व घाबरतो तोच जीवात्मा. ॥११॥

आनंद विनोद उदेग चिंता । काया छ्याया माया ममता । जीवित्वें पावे नाना वेथा । तोचि आत्मा ।।१२।।

आनंद, विनोदबुद्धी, संत्रस्तता व काळजी त्याचेच धर्म आहेत. देहतादात्म्य, माया व ममतेचे पटल (छाया) इत्यादी कारणांनी जीवात्म्याची सर्व दु:खे आत्म्याच्या सत्तेवर होतात. ॥१२॥

पदार्थाची आस्था धरी । जनीं वाईट बरें करी । आपल्यां राखे पराव्यां मारी । तोचि आत्मा ।।१३।।

पदार्थाची आसक्ती, समाजात बरी-वाईट वर्तणूक, स्वकीयांचे रक्षण व वैऱ्यांचे निर्दाळण जीवात्माच करतो. ॥१३॥

युद्धे होतां दोहिंकडे । नाना शरीरीं वावडे । परस्परें पाडी पडे । तोचि आत्मा ।।१४।।

लढाईमध्ये दोन्ही बाजूंनी देहरूपाने तोच लढतो. दुसऱ्याचा देह मारतो किंवा स्वत:चा देह मरतो त्या दोन्हीत जीवात्माच असतो. ॥१४॥

तो येतो जातो देहीं वर्ततो । हासतो रडतो प्रस्तावतो । समर्थ करंटा होतो । व्यापासारिखा ।।१५।।

तो जन्माला येतो, देहात रहातो, देहातून जातो, हसतो, रडतो, पश्चात्ताप करतो व व्यावहारिक व्यापानुसार वैभवसंपन्न किंवा दरिद्री होतो. ॥१५॥

होतो लंडी होतो बळकट । होतो विद्यावंत होतो धट । न्यायेवंत होतो उत्धट । तोचि आत्मा ।।१६।।

तोच भित्रा किंवा बलवान होतो, विद्वान किंवा मतिमंद होतो, न्यायी किंवा न्यायाला न जुमानणारा होतो. ॥१६॥

धीर उदार आणि कृपण । वेडा आणि विचक्षण । उछक आणि सहिष्ण । तोचि आत्मा ।।१७।।

तोच जीवात्मा धैर्यवान, उदार व कंजूषही होतो. वेडा व शहाणा, आततायी व सहनशील होतो. ॥१७॥

विद्या कुविद्या दोहिकडे । आनंदरूप वावडे । जेथें तेथें सर्वांकडे । तोचि आत्मा ।।१८।।

तोच आनंदरूप आत्मा विद्यावंत व कुविद्यावंत बुद्धीत रहातो. सर्व देहभर तोच व्यापून रहातो. (आत्मा अकर्ता आहे. जीवात्मा कर्ता आहे व भोक्ता आहे.) ॥१८॥

निजे उठे बैसे चाले । धावे धावडी डोले तोले । सोइरे धायेरे केले । तोचि आत्मा ।।१९।।

झोपतो, उठतो, बसतो, चालतो, धावतो, धावावयास लावतो, डोलतो, वजन करतो, सगे-सोयरे जोडतो तो जीवात्माच. ॥१९॥

पोथी वाची अर्थ सांगे । ताळ धरी गाऊं लागे । वादविवाद वाउगे । तोचि आत्मा ।।२०।।

जीवात्माच ग्रंथ वाचून त्यावर प्रवचन करतो, ताल धरतो, गाऊ लागतो, उगीचच वादंग करतो. ॥२०॥

आत्मा नस्तां देहांतरीं । मग तें प्रेत सचराचरीं । देहसंगें आत्मा करी । सर्व कांहीं ।।२१।।

जर जीवात्मा देहात नसेल तर त्याला ह्या चर व अचर सृष्टीत प्रेताची किंमत रहाते. जीवात्मा ह्या देहामध्ये व्यापून देहाचे सर्व व्यापार चालवितो. ॥२१॥

येकेंविण येक काये । कामा नये वायां जाये । ह्मणोनि हा उपाये । देहयोगें ।।२२।।

जीवात्म्याला देह नसेल व देहात जीवात्मा नसेल तर दोन्ही एकमेकावाचून वाया जातात! ईश्वराने दोघांना एकत्र आणून सृष्टीचा व्याप मांडला. ॥२२॥

देह अनित्य आत्मा नित्य । हाचि विवेक नित्यानित्य । अवघें सूक्ष्माचें कृत्य । जाणती ज्ञानी ।।२३।।

देह व आत्मा ह्या अजब जोडीपैकी देह अनित्य असून आत्मा नित्य आहे. यालाच नित्यानित्यविवेक म्हणतात. पण हा विवेक अतिसूक्ष्म असून तो फक्त ज्ञानीच जाणतात. ॥२३॥

पिंडी देहधर्ता जीव । ब्रह्मांडीं देहधर्ता शिव । ईश्वरतनुचतुष्टेय सर्व । ईश्वर धर्ता ।।२४।।

पिंडामध्ये देहाचे व्यापार चालवून त्याला जिवंत ठेवतो तो जीव असून ब्रह्मांड व्यापून त्याचे व्यापार चालवून त्याचे अस्तित्व सांभाळतो त्याला शिव म्हणतात. जीव व ईश्वर त्याच्या त्याच्या चारही देहांना धारण करतात. (येथे जीवतनुचतुष्टयाचा अध्याहार घेतला आहे.) ॥२४॥

त्रिगुणापर्ता जो ईश्वर । अर्धनारीनटेश्वर । सकळ सृष्टीचा विचार । तेथून जाला ।।२५।।

सत्यब्रह्म व कल्पित माया अशा दोन्हींच्या जणू एकत्रीकरणाने झालेला ईश्वर अर्धनारीनटेश्वर हा सत्त्वादी गुणांच्या अतीत असून सर्व सृष्टीचा विस्तार त्यापासून झाला आहे. ॥२५॥

बरवें विचारून पाहीं । स्त्री पुरुष तेथें नाहीं । चंचळरूप येतें कांहीं । प्रत्ययासी ।।२६।।

अगदी काटेकोर विचार केला तर त्या ठिकाणी लिङ्गदर्शक स्त्रीत्व किंवा पुरुषत्व नाही. कल्पित माया कल्पित स्त्री असून तिच्या अचिन्त्य प्रभावामुळे ब्रह्मवस्तूमध्ये स्फुरणरूप हालचाल (चंचळरूप) भासते. ॥२६॥

मुळींहून सेंवटवरी । ब्रह्मादि पिप्लीका देहधारी । नित्यानित्य विवेक चतुरीं । जाणिजे ऐसा ।।२७।।

ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत जे जे देहधारी जीव आहेत त्यांच्या बाबतीत सृष्टीच्या निर्मितीपासून नाशापर्यंत हाच नित्यानित्यविवेक विचारवंतांनी लक्षात घ्यावा. ॥२७॥

जड तितुकें अनित्य । आणि सूक्ष्म तितुकें नित्य । याहिमध्यें नित्यानित्य । पुढें निरोपिलें ।।२८।।

जे स्थूल म्हणजे कळणारे असते ते सर्व अनित्य असते. जे अतिसूक्ष्म असून वृत्तीला कळत नाही, ते ब्रह्म नित्य आहे. ह्या स्थूल व अंतिम सूक्ष्माच्या दरम्यान काही सापेक्ष नित्य व अनित्याचा तपशील पुढील समासात सांगू. ॥२८॥

स्थूळ सूक्ष्म वोलांडिलें । कारण माहाकारण सांडिलें । विराट हिरण्यगर्भ खंडिलें । विवेकानें ।।२९।।

मायिक स्थूल व सूक्ष्म मागे टाकले. कारण महाकारण देह ओलांडले व विराट व हिरण्यगर्भ ह्यांचा निरास केला (खंडिले) हे सर्व विवेकज्ञानाने साधले. (ध्यानाभ्यास) ॥२९॥

अव्याकृत मूळप्रकृती । तेथें जाऊन बैसली वृत्ती । तें वृत्ति व्हावया निवृत्ति । निरूपण ऐका ।।३०।।

ध्यानाभ्यास करणारी सूक्ष्म अंत:करणवृत्ती अव्याकृत असलेल्या मूळप्रकृतीपाशी जाऊन थांबली. तिचा निरास कसा करावा त्याचे तत्त्वज्ञान आता ऐका. ॥३०॥

आत्मानात्मविवेक बोलिला । चंचळात्मा प्रत्यया आला । पुढिले समासीं निरोपिला । सारासार विचार ।।३१।।

ह्या समासात आत्मा व अनात्मा ह्यांचा विवेक सांगता सांगता स्फुरणरूप हालचाल (ओवी २६) लक्षात घेतली. आता पुढील समासात सार व असार ह्यांचा विवेक ऐका. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आत्मानात्मविवेकनाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आत्मानात्मविवेक' नावाचा पहिला समास समाप्त

दशक तेरावा : नामरूप

समास दुसरा : सारासारनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ऐका सारासार विचार । उभारलें जगडंबर । त्यांत कोण सार कोण असार । विवेकें वोळखा ।।१।।

ही जी अवाढव्य विश्वरचना दिसते आहे, त्यात सार काय व असार काय ते ओळखण्यासाठी सारासारविवेक ऐका. (सार = मूलतत्त्व. असार = आवांतर पसारा.) ॥१॥

दिसेल तें नासेल । आणि येईल तें जाईल । जें असतचि असेल । तेंचि सार ।।२।।

जे पांचज्ञानेंद्रियांनी कळते ते नष्ट होते. (दिसणे हे कळण्याचे उपलक्षण आहे. दिसून, ऐकून, स्पर्श करून कळते.) जे जन्माला येते किंवा प्रगट होते ते मरते किंवा नष्ट होत जाते. जे तिन्ही काळात सातत्याने असते ते सार होय. ॥२॥

मागा आत्मानात्मविवेक बोलिला । अनात्मा वोळखोन सांडिला । आत्मा जाणतां लागला । मुळींचा मूळतंतु ।।३।।

मागील समासात आत्मानात्मविवेक सांगितला. त्यात अनात्म वस्तू लक्षात घेऊन तिचा त्याग करावा असे सांगितले. (ती 'मी' नाही हे भान ठेवावे.) ध्यानाभ्यासात आत्मा जाणण्याच्या प्रयत्नात स्फुरणरूप हालचाल म्हणजे जगताचे मूळ असलेली मूळमाया लक्षात घेतली. ॥३॥

मुळीं जे राहिली वृत्ति । जाली पाहिजे निवृत्ति । सारासार विचार श्रोतीं । बरा पाहावा ।।४।।

त्या मूळमायेपाशी जाऊन थबकलेली अंत:करणवृत्ती ध्यानाभ्यासात निवृत्त व्हावी लागते. त्यासाठी श्रोत्याने सार व असार विवेक करावा असे सांगितले. (आत्मा हे सार असून त्याच्या ज्ञानप्रकाशात कळणारे सर्व असार होय.) ॥४॥

नित्यानित्य विवेक केला । आत्मा नित्यसा निवडिला । निवृत्तिरूपें हेत उरला । निराकारीं ।।५।।

प्रथम नित्य व अनित्याचा विचार करून त्यातील आत्म्याची, तो नित्य असल्याने, निवड केली. 'मी ब्रह्म आहे' ही वृत्ती आता मावळली पाहिजे' एवढाच विचार त्या निराकार ब्रह्माचा अनुभव घेण्याआड शिल्लक राहिला. ॥५॥

हेत म्हणिजे तो चंचळ । निर्गुण म्हणिजे निश्चळ । सारासारविचारें चंचळ । होऊन जातें ।।६।।

तो विचार मायिक (चंचळ) असून अनुभवण्याचे ब्रह्म निश्चळ व निर्गुण आहे. मायिक असार व ब्रह्म सार या विचाराने चंचळ असार निवृत्त होऊन जाते. ॥६॥

चळे म्हणोनि ते चंचळ । न चळे म्हणोनि निश्चळ । निश्चळीं उडे चंचळ । निश्चयेसीं ।।७।।

ते असार निवृत्त होत असल्याने चंचळ असून, ब्रह्म सत्‌रूपाने अखंड असते म्हणून ते निश्चळ होय. निश्चळाचा निश्चय झाला की चंचळाला निश्चितपणे अस्तित्व उरत नाही. ॥७॥

ज्ञान आणि उपासना । दोनी येकचि पाहाना । उपासनेकरितां जना । जगोद्धार ।।८।।

वेदान्तातील ज्ञानयोग व भक्तिशास्त्रातील उपासना ही दोन्ही आत्मानुभवाची साधने असल्याने 'साधन' या दृष्टीने सारखीच आहेत. पण उपासनेमध्ये कोट्यवधी सामान्यजनांच्या सर्व प्रकारच्या उद्धाराची व्यवस्था आहे. (उपासनेतील

सगुणमूर्तीचे चरित्र, रूप, नाम, उत्सव, प्रेम, आलंबन, विरहादिभाव, तीर्थयात्रा, समूहाचा आधार इ. बाबींची सर्वांनाच नितान्त गरज असते.) ॥८॥

द्रष्टा साक्षी जाणता । ज्ञानघन चैतन्यसत्ता । ज्ञान देवचि तत्वता । बरें पाहा ।।९।।

ज्याला द्रष्टा, साक्षी, ज्ञाता, ज्ञानघन, चित्घन, सत्घन म्हटले जाते तो ज्ञानरूप देवच अनुभवण्याचा प्रयत्न करावा. ॥९॥

त्या ज्ञानाचें विज्ञान होतें । शोधून पाहा बहुत मतें । चंचळ अवघें नासतें । येणें प्रकारें ।।१०।।

त्याच ज्ञानाचे विज्ञान होते असे सर्व अद्वैतशास्त्राचे ग्रंथ सांगतात. अशा रीतीने भेदमय चंचळाचा निरास होतो. ॥१०॥

नासिवंत नासेल किं नासेना । ऐसा अनुमानचि आहे मना । तरी तो पुरुष सहसा ज्ञाना । अधिकारी नव्हे ।।११।।

जे मायिक आहे ते नष्ट होते वा होत नाही अशी शंका ज्याचे मनात डोकावत राहते त्याला ब्रह्मज्ञान होण्याचा सहसा अधिकार नसतो. (मायिकाच्या आसक्तीमुळे शंका येते. जेथे आसक्ती तेथे वैराग्य नाही. वैराग्याशिवाय ज्ञान नाही.) ॥११॥

नित्य निश्चये केला । संदेह उरतचि गेला । तरी तो जाणावा वाहावला । माहा मृगजळीं ।।१२।।

श्रवणाने सतत निश्चय करूनही शंका रेंगाळली तर तो शंकाखोर मायारूप मृगजळाच्या महापुरात वाहून जातो. ॥१२॥

क्षयेचि नाहीं जो अक्षई । व्यापकपणें सर्वां ठाईं । तेथें हेत संदेह नाहीं । निर्विकारीं ।।१३।।

ब्रह्म अक्षय असल्याने त्याला क्षय नाही. व्यापक असल्याने जीव जडात समानत्वाने व्यापून रहाते. त्या निर्विकार ब्रह्माचे बाबतीत शंका घेऊच नये. (शंकेने सर्वनाश होतो.) ॥१३॥

जें उदंड घनदाट । आद्य मध्य सेवट । अचळ अढळ अतुट । जैसें तैसें ।।१४।।

ब्रह्म पुरेपूर ओतप्रोत असून ब्रह्मांडाच्या आधी, ते असताना व त्याच्या शेवटानंतरही आहे. ते अचल, निश्चळ, भेदशून्य व जसेच्या तसे आहे. ॥१४॥

पाहतां जैसें गगन । गगनाहून तें सघन । जनचि नाहीं निरंजन । सदोदित ।।१५।।

ब्रह्माला आकाशाची उपमा देतात, पण ते त्याहून सूक्ष्म व व्यापक आहे. त्यामध्ये सर्व जीवसृष्टी (जन) कल्पित असून ते निर्जन (निरंजन) आहे! ॥१५॥

चर्मचक्षु ज्ञानचक्षु । हा तों अवघाच पूर्वपक्षु । निर्गुण ठाईंचा अलक्षु । लक्षवेना ।।१६।।

सृष्टीच्या ज्ञानासाठी चर्मचक्षु (डोळे) व ब्रह्मदर्शनासाठी ज्ञानचक्षु हवेत असे सांगितले जाते. पण हे सांगणे पूर्वपक्षच होय. सिद्धान्तपक्ष असा की निर्गुण ब्रह्म स्वभावानेच अलक्ष्य असल्याने कोणत्याच चक्षूने त्याकडे पहाता येत नाही. (पूर्वपक्ष-ज्याचे खंडण करावयाचे तो. सिद्धान्तपक्ष-जो सिद्ध करावयाचा तो.) ॥१६॥

संगत्यागेंविण कांहीं । परब्रह्म होणार नाहीं । संगत्याग करून पाही । मौन्यगर्भा ।।१७।।

जे जणू मौनात दडून राहिले आहे त्या ब्रह्माचा 'मी ब्रह्म' असा अनुभव संगत्यागाशिवाय येत नाही. संग हा नेहमी द्वैतरूप असतो. संग सोडल्याशिवाय अद्वैत ब्रह्माचा अनुभव येत नाही. (मौन = वृत्तिरहित ज्ञानरूपता) ॥१७॥

निर्शतां अवघेंचि निर्शलें । चंचळ तितुकें निघोन गेलें । निश्चळ परब्रह्म उरलें । तेंचि सार ।।१८।।

एक एक तत्त्वाचा निरास करीत गेले असता जे मायिक असते ते न राहून निश्चळ परब्रह्म उरते. तेच सार होय. ॥१८॥

आठवा देह मूळमाया । निर्शोन गेल्या अष्टकाया । साधु सांगती उपाया । कृपाळुपणें ।।१९।।

मूळ माया हा पिंड-ब्रह्मांडाच्या देहातील आठवा देह असून त्या सर्वांचा निरास करण्याचा उपाय कृपाळू साधू सांगतात. ॥१९॥

सोहं हंसा तत्वमसी । तें ब्रह्म तूं आहेसी । विचार पाहातां स्थिति ऐसी । सहजचि होते ।।२०।।

'ते ब्रह्म मी आहे', 'मी ते ब्रह्म आहे' असा अभ्यास 'ते तू आहेस' असे श्रीगुरूंनी सांगितल्यावर करावा. तसा विचार करीत राहिले असता केव्हातरी अचानक ते तसे होऊन जाते! ॥२०॥

साधक असोन ब्रह्म उरलें । तेथें वृत्तिसुन्य जालें । सारासार विचारिलें । येणें प्रकारें ।।२१।।

विचार करणारा साधक जिवंत असतानाच ब्रह्मरूपाने उरतो (ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति' मुंडक ३-२-९) त्याची अंत:करण वृत्ती निवृत्त झालेली असते. असा हा सार व असाराचा विचार करून झाला (ब्रह्म सार, वृत्ती असार). ॥२१॥

तें तापेना ना निवेना । उजळेना ना काळवंडेना । डहुळेना ना निवळेना । परब्रह्म तें ।।२२।।

त्या ब्रह्म स्वरूपात गरम होणे व निवणे, स्वच्छ होणे व मळणे, गढूळ होणे व निवळणे अशी द्वन्द्वे नसतात. ॥२२॥

दिसेना ना भासेना । उपजेना ना नासेना । तें येना ना जाईना । परब्रह्म तें ।।२३।।

ब्रह्म ज्ञानेंद्रियांनी कळत नाही किंवा मनाने त्याची कल्पना करता येत नाही (दिसेना भासेना). निर्माण होत नाही व नष्ट होत नाही. येत नाही व जात नाही. ॥२३॥

तें भिजेना ना वाळेना । तें विझेना ना जळेना । जयास कोणीच नेईना । परब्रह्म तें ।।२४।।

ब्रह्म भिजत नाही, वाळत नाही, जळत नाही, विझत नाही, व ते कोणाला कशातून कोठे नेता येत नाही! ॥२४॥

जें सन्मुख चि चहुंकडे । जेथें दृश्य भास उडे । धन्य साधु तो पवाडे । निर्विकारीं ।।२५।।

ते सर्वत्र सतत समोर (प्रत्यक्ष) आहे, त्याच्या अनुभवानंतर दृश्यसृष्टीचा भास मावळतो. अशा निर्विकार ब्रह्मानुभवात राहणारा साधू धन्य होय. ॥२५॥

निर्विकल्पीं कल्पनातीत । तोचि वोळखावा संत । येर अवघेचि असंत । भ्रमरूप ।।२६।।

जो निर्विकल्प ब्रह्माच्या अनुभवानंतर सर्व कल्पनातरंगांचा सहज बाध करून जीवन जगतो तोच खरा संत. इतर भ्रमरूप कल्पनेत रमणारे असंत समजावेत. ॥२६॥

खोटें सांडून खरें घ्यावे । तरीच परीक्षवंत म्हणावें । असार सांडून सार घ्यावें । परब्रह्म तें ।।२७।।

खरा परीक्षक तोच की जो नकली असेल ते वगळून अस्सल असेल ते निवडतो. त्याप्रमाणे श्रद्धावन्त साधकाने असार बाजूला सारून सार ब्रह्म स्वीकारावे. (श्रद्धा आवश्यक. ओवी १२) ॥२७॥

जाणतां जाणतां जाणीव जाते । आपली वृत्ति तद्रूप होते । आत्मनिवेदन भक्ति ते । ऐसी आहे ।।२८।।

ब्रह्मानुभव घेता घेता वृत्ती मावळते व ती त्या अनुभवात हरवून जाते. हीच ती आत्मनिवेदन भक्ती होय. ॥२८॥

वाच्यांशें भक्ति मुक्ति बोलावी । लक्ष्यांशें तद्रूपता विवरावी । विवरतां हेतु नुरावी । ते तद्रूपता ।।२९।।

भक्ती व मुक्ती हे सांगावयाचे विषय असून (वाच्य) अंत:करणवृत्ती आत्मस्वरूपात लीन करणे ही ध्यानातील

कृती (लक्ष्य) आहे. ती तशी लीन झाली (विवरता) की शिल्लक रहात नाही. हीच तद्रूप अवस्था होय. (येथे विवरणें म्हणजे स्पष्टीकरण करणे नव्हे. कठोपनिषदात 'यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्माविवृणुते तनूं स्वाम्' १-२-२२ असे म्हटले आहे. येथे विवरणे म्हणजे 'विवृणुते' म्हणजे उघड करतो असा अर्थ आहे.) ॥२९॥

सद्रूप चिद्रूप आणि तद्रूप । सस्वरूप म्हणिजे आपलें रूप । आपलें रूप म्हणिजे अरूप । तत्वनिर्शनाउपरी ।।३०।।

ब्याऐंशी तत्त्वांचा निरास करीत गेल्यानंतर मूळचे आपलेच असलेले (तद्रूप) सत्घन व चित्घन असे रूपरहित स्वरूप हे 'मी'चे खरे रूप आहे असा अनुभव येतो. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सारासारनिरूपणनाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सारासारनिरूपण' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक तेरावा : नामरूप

समास तिसरा : उभारणीनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ब्रह्म घन आणि पोकळ । आकाशाहून विशाळ । निर्मळ आणि निश्चळ । निर्विकारी ।।१।।

आकाशाहून व्यापक असलेले ब्रह्म सत्, घन, मोकळे, विमल, निश्चळ व निर्विकार आहे. ॥१॥

ऐसेंचि असतां कित्येक काळ । तेथें आरंभला भूगोळ । तया भूगोळाचें मूळ । सावध ऐका ।।२।।

ते अगणित काळपर्यंत असेच असताना अचानक सृष्टी निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्या सृष्टीची सुरुवात आता सावधपणे ऐका. ॥२॥

परब्रह्म असतां निश्चळ । तेथें संकल्प उठिला चंचळ । तयास बोलिजे केवळ । आदिनारायेण ।।३।।

परब्रह्म शांत असताना तेथे क्रियात्मक संकल्प अचानक झाला. त्यालाच आदिनारायण म्हणतात. ॥३॥

मूळमाया जगदेश्वर । त्यासीच म्हणिजे शड्गुणैश्वर । अष्टधा प्रकृतीचा विचार । तेथें पाहा ।।४।।

त्याला मूळमाया, जगदीश्वर, षड्गुणेश्वर अशीही नावे आहेत. त्याचे ठिकाणी असलेल्या अष्टधा प्रकृतीचा आता विचार पाहू. ॥४॥

ऐलिकडे गुणक्षोभिणी । तेथें जन्म घेतला त्रिगुणीं । मूळ वोंकांराची मांडणी । तेथून जाणावी ।।५।।

दृश्य सृष्टीच्या आधी गुणक्षोभिणी माया असून त्यातून त्रिगुण उत्पन्न झाले. ओंकाराची अक्षरे ही त्यांची प्रतीके लक्षात घ्यावीत. ॥५॥

अकार उकार मकार । तिनी मिळोन वोंकार । पुढें पंचभूतांचा विस्तार । विस्तारला ।।६।।

अ, उ व म या तीन अक्षरांचा ॐकार तयार झाला. नंतर पंचमहाभूतांचा विस्तार झाला. ॥६॥

आकाश म्हणिजेतें अंतरात्म्यासी । तयापासून जन्म वायोसी । वायोपासून तेजासी । जन्म जाला ।।७।।

त्यातील आकाशाला अंतरात्मा म्हणतात. त्यापासून वायू, वायूपासून तेज उत्पन्न झाले. ॥७॥

वायोचा कातरा घसवटे । तेणें उष्णें वन्हि पेटे । सूर्यबिंब तें प्रगटे । तये ठाई ।।८।।

वायूचे जणू कापीव कडे एकमेकांवर घासून त्यातून निर्माण झालेल्या उष्णतेतून सूर्यबिंब प्रगट झाले. ॥८॥

वारा वाजतो सीतळ । तेथें निर्माण जालें जळ । तें जळ आळोन भूगोळ । निर्माण जाला ।।९।।

थंड वारे वाहू लागल्यावर त्यातून पाणी उत्पन्न होऊन ते थिजल्यावर पृथ्वी तयार झाली. ॥९॥

त्या भूगोळाचे पोटीं । अनंत बीजांचिया कोटी । पृथ्वी पाण्या होता भेटी । अंकुर निघती ।।१०।।

त्या पृथ्वीमध्ये अनंत प्रकारची बीजे असून त्यांना पाणी मिळताच त्यांतून अंकुर फुटतात. ॥१०॥

पृथ्वी वल्ली नाना रंग । पत्रें पुष्पांचे तरंग । नाना स्वाद ते मग । फळें जालीं ।।११।।

पृथ्वीवर मग अनेक रंगांच्या वेली दिसू लागल्या. पाने व फुले प्रगट झाली व अनेक चवींची फळे उत्पन्न झाली. ॥११॥

पत्रें पुष्पें फळें मुळें । नाना वर्ण नाना रसाळें । नाना धान्यें अन्नें केवळें । तेथून जालीं ।।१२।।

पाने, फुले, फळे, मुळे यांचे अनेक रंग व त्यांत नाना रस प्रगट झाले. त्यातूनच बऱ्याच प्रकारची अन्नधान्ये

उत्पन्न झाली. ॥१२॥

अन्नापासून जाले रेत । रेतापासून प्राणी निपजत । ऐसी हे रोकडी प्रचित । उत्पत्तीचीं ।।१३।।

अन्नापासून शुक्रबीजे, शुक्रबीजांपासून अनेक प्राणी जन्माला येतात. अशी ही उत्पत्ती स्पष्टपणे कळते. ॥१३॥

अंडज जारज श्वेतज उद्धीज । पृथ्वी पाणी सकळांचे बीज । ऐसें हें नवल चोज । सृष्टिरचनेचें ।।१४।।

अंडे, वार, घाम व माती अशा जीवांच्या चार खाणी असून त्यांची त्यांची बीजे, जमीन व पाणी यातून हे सृष्टिरचनेचे कौतुक जन्माला येते. ॥१४॥

च्यारि खाणी च्यारि वाणी । चौऱ्यासि लक्ष जीवयोनी । निर्माण जाले लोक तिनी । पिंडब्रह्मांड ।।१५।।

चार खाणी, चार वाणी, चौऱ्यांशी लक्ष जीवांचे प्रकार व तीन लोक अशी ही पिंड व ब्रह्मांडाची उत्पत्ती झाली. ॥१५॥

मुळीं अष्टधा प्रकृती । अवघे पाण्यापासून जन्मती । पाणी नसतां मरती । सकळ प्राणी ।।१६।।

मुळीं म्हणजे अष्टधाप्रकृतीची मूळ घटना असलेले सर्व प्राणी; पाण्याच्या साहाय्याने जन्माला येतात व पाण्यामुळे जगतात आणि पाणी नसल्यास नष्ट होतात. ॥१६॥

नव्हे अनुमानाचें बोलणें । याचा बरा प्रत्यये घेणें । वेदशास्त्रें पुराणें । प्रत्ययें घ्यावीं ।।१७।।

हे अंदाजपंचे बोलणे नसून वेदशास्त्रे व पुराणे यात तसे प्रत्यक्ष सांगितले आहे. ॥१७॥

जें आपल्या प्रत्यया येना । तें अनुमानिक घ्यावेना । प्रत्ययाविण सकळ जना । वेवासाये नाहीं ।।१८।।

ज्याला प्रमाण नाही ते अंदाजाचे बोलणे स्वीकारू नये. प्रमाणाशिवाय सर्व लोकांचा तसा निश्चय (व्यवसाय) होत नाही. ॥१८॥

वेवसाये प्रवृत्ती निवृत्ती । दोहिंकडे पाहिजे प्रचिती । प्रचितीविण अनुमानें असती । ते विवेकहीन ।।१९।।

निश्चयाच्या बळावरच प्रवृत्ती व निवृत्तीचे व्यवहार चालतात. या दोन्ही क्षेत्रांत शास्त्रप्रामाण्य (प्रचीती) आवश्यक आहे. त्यांचा विचार न करता जे तर्क लढवतात ते अविवेकी समजावेत. ॥१९॥

ऐसा सृष्टिरचनेचा विचार । संकळित बोलिला प्रकार । आतां विस्ताराचा संहार । तोहि ऐका ।।२०।।

अशी ही सृष्टिरचना थोडक्यात सांगितली. आता हा सृष्टीचा विस्तार कसा नष्ट होतो तेही ऐका. ॥२०॥

मुळापासून सेवटवरी । अवघा आत्मारामचि करी । करी आणि विवरी । येथायोग्य ।।२१।।

हा उत्पत्तीपासून संहारापर्यंत सर्व काही ईश्वरच करतो. सृष्टी तयार करून तिचा यथायोग्य विस्तारही तोच करतो. ॥२१॥

पुढे संव्हार निरोपिला । श्रोतीं पाहिजे ऐकिला । इतुक्याउपरी जाला । समास पूर्ण ।।२२।।

पुढील समासात संहाराचे वर्णन केले असून तो श्रोत्यांनी ऐकावा. असा हा समास पूर्ण झाला. ॥२२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'उभारणीनिरूपणनाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'उभारणीनिरूपण' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक तेरावा : नामरूप

समास चवथा : प्रलयनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

पृथ्वीस होईल अंत । भूतांस मांडेल कल्पांत । ऐसा समाचार साध्यंत । शास्त्रीं निरोपिला ।।१।।

पृथ्वी नष्ट होऊन पंचभूतांचा शेवट होईल, असे तपशीलवार वर्णन शास्त्रात सांगितले आहे. ॥१॥

शत वरुषें अनावृष्टि । तेणें जळेल हे सृष्टि । पर्वत माती ऐसी पृष्ठी । भूमीची तरके ।।२।।

शंभर वर्षे पाऊस पडत नाही व त्यामुळे पृथ्वी जळते. प्रचंड पर्वत भुईसपाट होऊन पृथ्वीला भेगा पडतात. ॥२॥

बारा कळी सूर्यमंडळा । किर्णापासून निघती ज्वाळा । शत वरुषें भूगोळा । दहन होये ।।३।।

सूर्य बारा कलांनी तळपून त्यातून भयानक ज्वाला निघून त्यांनी शंभर वर्षे पृथ्वी जळत राहते. ॥३॥

सिंधूरवर्ण वसुंधरा । ज्वाळा लागती फणिवरा । तो आहाळोन सरारां । विष वमी ।।४।।

पृथ्वी तापून शेंदरासारखी दिसू लागेल. तिच्या ज्वाळा शेषाला भिडतील व तो विष ओकू लागतो. ॥४॥

त्या विषाच्या ज्वाळा निघती । तेणें पाताळें जळती । माहापावकें भस्म होती । पाताळ लोक ।।५।।

त्या विषाच्या फवाऱ्यांनी पाताळें जळून त्या महाभयानक अग्नीने ती खाक होतात. ॥५॥

तेथें महाभूतें खवळती । प्रळयेवात सुटती । प्रळयेपावक वाढती । चहुंकडे ।।६।।

पंचभूते क्षुब्ध होतात, प्रळयाचा वारा घोंघावू लागतो व चारी बाजूंनी प्रळयकारी सर्व अग्नी एक होतात, सर्व अग्निमय होते. ॥६॥

तेथें अक्रा रुद्र खवळले । बारा सूर्य कडकडिले । पावकमात्र येकवटले । प्रळयेकाळीं ।।७।।

अकरा रुद्र जणू कृद्ध होतात, बारा सूर्य भडकतात व सर्व अग्नी एक होऊन प्रलय ओढवतो. ॥७॥

वायो विजांचे तडाखे । तेणें पृथ्वी अवघी तरखे । कठिणत्व अवघेंचि फांके । चहुंकडे ।।८।।

वादळाचे व विजांचे पृथ्वीला तडाखे बसून ती कापू लागते व तिचा टणकपणा चारी बाजूंनी वितळू लागतो. ॥८॥

तेथें मेरूची कोण गणना । कोण सांभाळिल कोणा । चंद्र सूर्य तारांगणा । मूस जाली ।।९।।

अशा परिस्थितीत मेरूही क:पदार्थ होतो. जेथे सूर्य-चंद्रसुद्धा आटवले जातात तेथे कोणी कोणाचे रक्षण करावे? ॥९॥

पृथ्वीने विरी सांडिली । अवघी धगधगायेमान जाली । ब्रह्मांडभटी जळोन गेली । येकसरां ।।१०।।

पृथ्वीने आपला टणकपणा टाकला व ती ज्वालामय बनली. सर्व ब्रह्मांड जणू भट्टीत घालून जळाले. ॥१०॥

जळोनि विरी सांडिली । विशेष माहावृष्टी जाली । तेणें पृथ्वी विराली । जळामधें ।।११।।

पृथ्वीचा टणकपणा संपल्यावर प्रचंड पाऊस पडून पृथ्वी त्या पाण्यात विरघळून गेली. ॥११॥

भाजला चुना जळीं विरे । तैसा पृथ्वीस धीर न धरे । विरी सांडूनिया त्वरें । जळीं मिळाली ।।१२।।

भाजलेला चुना जसा पाण्यात चटकन विरतो त्याप्रमाणे पृथ्वीला कठीणपणा सांभाळणे अशक्य होऊन ती तो सोडून पाण्यात विरघळली. ॥१२॥

शेष कूर्म वाऱ्हाव गेला । पृथ्वीचा आधार तुटला । सत्त्व सांडून जळाला । मिळोन गेली ।।१३।।

शेष, कूर्म व वराह हे पृथ्वीचे तिन्ही आधार गेल्याने ती निराधार होऊन स्वत्व सोडून पाण्यात विरली. ॥१३॥

तेथें प्रळयेमेघ उचलले । कठिण घोषें गर्जिनले । अखंड विजा कडकडिले । ध्वनि घोष ।।१४।।

नंतर प्रळयकाळचे महाप्रचंड ढग गोळा होऊन भयानक गडगडाट करू लागतात व विजांचे सतत कडकडाट होऊ लागतात. ॥१४॥

पर्वतप्राये पडती गारा । पर्वत उडती ऐसा वारा । निबिड तया अंधकारा । उपमाचि नाहीं ।।१५।।

पर्वताएवढ्या गारा पडून डोंगरांना उडविण्यासारख्या वेगाने वारे वाहू लागतात. ज्याच्या काळेपणाला उपमा देता येत नाही असा गडद अंधकार सर्वत्र पसरतो. ॥१५॥

सिंधु नद्या एकवटल्या । नेणो नभींहून रिचवल्या । संधिच नाहीं धारा मिळाल्या । अखंड पाणी ।।१६।।

सर्व समुद्र व सर्व नद्या एक होऊन असे वाटते की त्या सर्व आकाशातून खाली पडून समुद्रात गडप होत आहेत. ते पाणी एक झाल्याने मधे बोटभर सुद्धा जमीन दिसत नाही. ॥१६॥

तेथें मछ कूर्म सर्प पडती । पर्वतासारिखे दिसती । गर्जना होतां मिसळती । जळात जळें ।।१७।।

त्या पाण्यात मेलेले मासे, कासवे व सर्पांचे पर्वताएवढे ढीग दिसतात. मेघगर्जना होता होताच सर्व पाणी एक होते. ॥१७॥

सप्त सिंधु आवर्णी गेले । आवर्णवेडे मोकळे जाले । जळरूप जालियां खवळले । प्रळयेपावक ।।१८।।

साती समुद्रांभोवतीचे जमिनीचे आवरण नष्ट झाल्याने ते त्या मर्यादेतून सुटले. सर्वत्र पाणीच पाणी झाल्यावर प्रळयाग्नी धडाडून पेटला. ॥१८॥

ब्रह्मांडा ऐसा तप्तलोहो । शोषी जळाचा समूहो । तैसें जळास जालें पाहो । अपूर्व मोठें ।।१९।।

ब्रह्मांड तापलेल्या लोखंडाच्या गोळ्याप्रमाणे तप्त होताच सर्व पाण्याची वाफ होऊन एक मोठे आश्चर्य घडते. ॥१९॥

तेणें आटोन गेलें पाणी । असंभाव्य माजला वन्ही । तया वन्हीस केली झडपणी । प्रळयवातें ।।२०।।

त्यामुळे सर्व पाणी आटून अग्नीला कोठेच प्रतिबंध उरला नाही. त्या अग्नीवर प्रळयवाताने झडप घातली. ॥२०॥

दीपास पालव घातला । तैसा प्रळयेपावक विझाला । पुढें वायो प्रबळला । असंभाव्य ।।२१।।

दिवा जसा फुंकरून विझावा त्याप्रमाणे तो प्रळयाग्नी विझून गेला व सर्वत्र अनावर वायूचे साम्राज्य पसरले. ॥२१॥

उदंड पोकळी थोडा वारा । तेणें वितळोन गेला सारा । पंचभूतांचा पसारा । आटोपला ।।२२।।

किंचित वायू राहून बाकी सर्व आकाशच आकाश उरले. त्यामुळे पंचमहाभूतांचा सर्व पसारा नष्ट झाला. ॥२२॥

महद्भूत मूळमाया । विस्मरणें वितुळे काया । पदार्थमात्र राहावया । ठाव नाहीं ।।२३।।

मूळ माया हे पंचमहाभूतांचेही महाभूत (कारण) असून ते ब्रह्मस्वरूपात लीन झाल्याने (विस्मरण) ब्रह्मांड नष्ट होते व नामरूपांच्या सृष्टीचा मागमूस रहात नाही. ॥२३॥

दृश्य हलकालोळें नेलें । जड चंचळ वितुळलें । याउपरी शाश्वत उरलें । परब्रह्म तें ।।२४।।

अशा प्रचंड उत्पातांनी दृश्यसृष्टी नष्ट होते व अचेतन जग व चेतन जीवेश्वर सृष्टी जणू वितळून जाते. अनादि, नित्य, सत्य व अनंत ब्रह्म शिल्लक राहते. ॥२४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'प्रलयनिरूपणनाम' समास चवथा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'प्रलयनिरूपण' नावाचा चवथा समास समाप्त

दशक तेरावा : नामरूप

समास पाचवा : कहाणीनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

(स्त्रीपुरुषाच्या जोडप्याचे रूपक करून सृष्टीचा सांगितलेला विस्तार)

कोणी येक दोघे जण । पृथ्वी फिरती उदासीन । काळक्रमणें लागून । कथा आरंभिली ।।१।।

कोणी दोघेजण संन्यस्त वृत्तीने देशाटण करीत असता वेळ जाण्यासाठी त्यांनी एक गोष्ट सांगायला सुरुवात केली. ॥१॥

श्रोता पुसे वक्तयासी । काहाणी सांगा जी बरवीसी । वक्ता म्हणे श्रोतयासी । सावध ऐकें ।।२।।

त्यांच्यातील श्रोता वक्त्याला म्हणाला की एक चांगली गोष्ट सांगा. वक्ता श्रोत्याला म्हणाला की गोष्ट नीट ऐक. ॥२॥

येकें स्त्रीपुरुषें होतीं । उभयेतांमधें बहु प्रीति । येकरूपेंचि वर्तती । भिन्न नाहीं ।।३।।

कोणे एके काळी एक स्त्री व पुरुषाची जोडी होती. त्यांचे परस्परांवर अत्यंत प्रेम असून ते जराही वेगळेपणा न ठेवता अद्वैतभावाने राहत असत. (माया तेंचि ब्रह्म ब्रह्म तेंचि माया । अंग आणि छाया जयापरी । तु. म.) ॥३॥

ऐसा कांही येक काळ लोटला । तयांस येक पुत्र जाला । कार्यकर्ता आणि भला । सर्वविषीं ।।४।।

असा काही काळ गेल्यानंतर त्यांना एक सत्त्वशील (भला) व अनेक कामे तडीला नेणारा मुलगा झाला. (विष्णू.) ॥४॥

पुढें त्यासहि जाला कुमर । तो पित्याहून आतुर । कांहीं तदर्ध चतुर । व्यापकपणें ।।५।।

त्या मुलाला पुढे मुलगा झाला. तो बापाहून अत्यंत क्रियाशील (रजोप्रधान ब्रह्मदेव) पण व्यापकपणाच्या बाबतीत बापाच्या अर्ध्याने होता. (जाणीव व नेणीव युक्त) ॥५॥

तेणें व्याप उदंड केला । बहुत कन्यापुत्र व्याला । उदंड लोक संचिला । नाना प्रकारें ।।६।।

त्याने प्रचंड व्याप मांडला. त्याला अगणित कन्या व पुत्र झाले व त्याने अनेक प्रपंच मांडले. (चौदा भुवने.) ॥६॥

त्याचा पुत्र जेष्ठ । तो अज्ञान आणि रागिट । अथवा चुकता नीट । संव्हार करी ।।७।।

त्याचा मोठा मुलगा तमोगुणाचा व संतापी असून अपराध असो की नसो कोणालाही ठार मारावयाचा. (नीट अथवा चुकता. वेळ आली की सर्व सारखेच-रूद्र.) ॥७॥

पिता उगाच बैसला । लेकें बहुत व्याप केला । सर्वज्ञ जाणता भला । जेष्ठ पुत्र ।।८।।

विष्णू शांत बसला. ब्रह्मदेवाने मोठा व्याप मांडला. हा विष्णूचा मुलगा सर्वज्ञ होता. ॥८॥

नातु त्याचें अर्ध जाणे । पणतु तो कांहींच नेणे । चुकतां संव्हारणें । माहा क्रोधी ।।९।।

विष्णूच्या ज्ञानाच्या निम्मे ज्ञान ब्रह्मदेवाचे, तर शंकर मात्र पूर्ण अज्ञानी असून जरा बिघाड झाला की सर्वांना ठार मारी. ॥९॥

लेक सकळांचें पाळण करी । नातु मेळवी वरिचावरी । पणतु चुकल्यां संव्हार करी । अकस्मात ।।१०।।

विष्णू सर्वांचा सांभाळ करतो, ब्रह्मदेव सतत काहीतरी निर्माण करून भर घालतो, पण पणतु मात्र जरा चुकले की लगेच ठार मारतो. ॥१०॥

नेमस्तपणें वंश वाढला । विस्तार उदंडचि जाला । ऐसा बहुत काळ गेला । आनंदरूप ।।११।।

अशा ह्या पद्धतीने वंश वाढून उदंड विस्तार होता होता फार मोठा कालावधी आनंदात निघून गेला. ॥११॥

विस्तार वाढला गणवेना । वडिलांस कोणीच मानीना । परस्परें किंत मना । बहुत पडिला ।।१२।।

पुढे अगणित विस्तार वाढल्यावर मूळ आई-वडिलांचे सर्वांना विस्मरण होऊन परस्परांत अत्यंत अविश्वास निर्माण झाला. ॥१२॥

उदंड घरकळहो लागला । तेणें कित्येक संव्हार जाला । विपट पडिलें थोरथोरांला । बेबंद जालें ।।१३।।

नंतर घरात सतत भांडणे लागून त्यात बरीच जीवितहानी झाली. मोठ्या मोठ्यांत वैर निर्माण होऊन बेबंदशाही माजली. ॥१३॥

नेणपणें भरीं भरले । मग ते अवघेच संव्हारले । जैसे यादव निमाले । उन्मत्तपणें ।।१४।।

अविद्येमुळें प्रपंचासक्तीच्या भरीस पडल्याने सर्वांचाच संहार झाला. उन्मत्त यादवकुळाचे उदाहरण पुरेसे आहे. ॥१४॥

बाप लेंक नातु पणतु । सकळांचा जाला निपातु । कन्या पुत्र हेतु मातु । अणुमात्र नाहीं ।।१५।।

बाप, मुलगा, नातू, पणतू इत्यादी सर्वांचा नाश झाला. ही मुलगी, हा मुलगा, हा श्रेष्ठ असा जराही विचार उरला नाही. ॥१५॥

ऐसी कहाणी जो विवरला । तो जन्मापासून सुटला । श्रोता वक्ता धन्य जाला । प्रचितीनें ।।१६।।

ही कहाणी जो, त्याने दर्शविलेल्या संकेतासह समजावून घेईल, तो श्रोता व वक्ता ती कहाणी पटून सावध होऊन मुक्त होईल. ॥१६॥

ऐसी काहाणी अपूर्व जे ते । उदंड वेळ होत जाते । इतुकें बोलोन गोसावी ते । निवांत जाले ।।१७।।

ही अशी आश्चर्यकारक कथा अनंत वेळा होत रहाते. एवढे बोलून दोघे संन्यस्त वृत्तीने फिरणारे गप्प बसले. ॥१७॥

आमची काहाणी सरो । तुमचे अंतरीं भरो । ऐसें बोलणें विवरो । कोणीतरी ।।१८।।

समर्थ म्हणतात– त्यांनी सांगितलेली कहाणी मी तुम्हाला सांगितली. ती तुम्ही त्यातील रहस्यासह चांगली समजावून घेऊन तुमच्यातील कोणी ती इतरांना सांगा. ॥१८॥

चुकत वांकत आठवलें । इतुकें संकळित बोलिलें । न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ।।१९।।

जेवढा कथाभाग आठवला तेवढा कसातरी सांगितला. त्यात काही राहून गेले असेल तर श्रोत्यांनी ते सुधारून घ्यावे व मला क्षमा करावी. ॥१९॥

ऐसी काहाणी निरंतर । विवेकें ऐकती जे नर । दास म्हणे जग्गोधार । तेचि करिती ।।२०।।

ह्या कहाणीचे जे सतत विवेकाने मनन करतात त्यांच्या हातूनच जगताचा उद्धार होतो. ॥२०॥

त्या जगोद्धाराचें लक्षण । केलें पाहिजे विवरण । सार निवडावें निरूपण । यास बोलिजे ।।२१।।

जगाच्या उद्धाराचे पहिले साधन म्हणजे अशा प्रकारच्या सांकेतिक रचनांचे व अध्यात्मशास्त्राचे विवरण समाजात

करणे हे होय. असे सार निवडून घेण्यालाच निरूपण म्हणतात. ॥२१॥

निरूपणीं प्रत्ययें विवरावें । नाना तत्वकोडें उकलावें । समजतां समजतां व्हावें । निःसंदेह ।।२२।।

संपूर्णपणे पटेल असे तर्कसंगत व साधार विवरण करावे. तत्त्वांचे रहस्य समजावून सांगावे व तसे सांगता सांगता संशयरहित व्हावे. ॥२२॥

विवरोन पाहातां अष्ट देह । पुढें सहजचि निःसंदेह । अखंड निरूपणें राहे । समाधान ।।२३।।

पिंड-ब्रह्मांडाचे आठ देह विवरून पाहिल्यानंतर त्यांचे प्रकाशक तत्त्व समजून त्या देहांच्या मिथ्यत्वाविषयी शंका रहात नाही. हा विषय सतत सांगत ऐकत राहिले की समाधान टिकून रहाते. ॥२३॥

तत्वांचा गल्बला जेथें । निवांत कैंचें असेल तेथें । याकारणें गुल्लिपरतें । कोणीयेकें असावें ।।२४।।

जेथें मायिक तत्त्वांचा गोंधळ चालतो तेथे शांती कशी असेल? म्हणून शहाण्याने गोंधळापासून लांब रहावे. ॥२४॥

ऐसा सूक्ष्म संवाद । केलाचि करावा विशद । पुढिले समासीं लघुबोध । सावध ऐका ।।२५।।

असे हे अतिसूक्ष्म तत्त्वज्ञान पुन्हा पुन्हा सांगावे व ऐकावे. पुढील समासात लघुबोध सांगितला असून तो लक्ष देऊन ऐका. (हा समास समर्थांनी शिवछत्रपतींना सांगितला असे परंपरेने मानले जाते.) ॥२५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'कहाणीनिरूपणनाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'कहाणीनिरूपण' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक तेरावा : नामरूप

समास सहावा : लघुबोध

॥ श्रीराम समर्थ ॥

जें बोलिजेती पंचतत्वें । त्यांची अभ्यासाया नावें । तदुपरी स्वानुभवें । रूपें जाणावीं ।।१।।

ज्यांना पंचमहाभूते म्हणतात त्यांची नावे लक्षात ठेवून त्यांची लक्षणे पारखून घ्यावीत. ॥१॥

यामधें शाश्वत कोण । आणी अशाश्वत कोण । ऐसें करावें विवरण । प्रत्ययाचें ।।२।।

त्यात शाश्वत तत्त्व व अशाश्वत तत्त्व असा निवाडा शाश्वतपणाचा कस लावून करावा. ॥२॥

पंचभूतांचा विचार । नांवरूप सारासार । तोचि बोलिला निर्धार । सावध ऐका ।।३।।

आता ह्यापुढें पंचभूतांचा विचार सांगितला असून त्यांची नावें, रूपे, त्यांच्यातील सार व असार ह्यांचा निवाडा केला असून तो सावधपणे ऐका. ॥३॥

पृथ्वी आप तेज वायो आकाश । नावें बोलिलीं सावकास । आतां रूपाचा विश्वास । श्रवणें धरावा ।।४।।

पृथ्वी, आप, तेज, वायू अशी त्यांची नावे असून आता त्यांच्या लक्षणांवर (रूप) श्रवणाने श्रद्धा ठेवावी. ॥४॥

पृथ्वी म्हणिजे ते धरणी । आप म्हणिजे तें पाणी । तेज म्हणिजे अग्नि तरणी । सतेजादिक ।।५।।

पृथ्वी म्हणजे जमीन किंवा माती, आप म्हणजे पाणी व तेज म्हणजे सूर्यादी तेजस्वी पदार्थातील अग्नी होय. ॥५॥

वायो म्हणिजे तो वारा । आकाश म्हणिजे पैस सारा । आतां शाश्वत तें विचारा । आपलें मनीं ।।६।।

वायू म्हणजेच वारा व आकाश म्हणजे संपूर्ण मोकळी पोकळी होय. ह्यांतील शाश्वत काय असेल ह्याचा स्वत:शीच विचार करा! ॥६॥

येक शीत चांचपावें । म्हणिजे वर्म पडे ठावें । तैसें थोड्या अनुभवें । बहुत जाणावें ।।७।।

भाताचे एक शीत चिमटीत दाबून पाहिले की भाताची परीक्षा होते त्याप्रमाणे थोड्याचा अभ्यास करून सर्वाचे ज्ञान करून घ्यावे. ॥७॥

पृथ्वी रचते आणि खचते । हें तों प्रत्ययास येतें । नाना रचना होत जाते । सृष्टिमधें ।।८।।

पृथ्वी निर्माण होते व नष्ट होते हे सर्वांनाच ठाऊक आहे. पृथ्वीमध्ये जुन्या रचना मोडून नव्या रचना होतात हे अनुभवाला येते. (उदा. भूकंप) ॥८॥

म्हणौन रचतें तें खचतें । आप तें हि आटोन जाते । तेज हि प्रगटोन विझतें । वारें हि राहे ।।९।।

म्हणून जे निर्माण होते ते नष्ट होते, पाणी सुद्धा आटून जाते. अग्नी पेटून विझतो. वाहणारा वारा पडतो. ॥९॥

अवकाश नाममात्र आहे । तें हि विचारिता न राहे । एवं पंचभूति राहे । हें तों घडेना ।।१०।।

आकाशाला 'ते आहे' म्हणावयाचे इतकेच! विचार केला की त्याचे अस्तित्व नाहीसे होते. एकूण पंचमहाभूते सत्यत्वाने नसतात. ॥१०॥

ऐसा पांचा भूतांचा विस्तार । नासिवंत हा निर्धार । शाश्वत आत्मा निराकार । सत्य जाणावा ।।११।।

असा हा पंचमहाभूतांचा पसारा नाशिवंत आहे, असा निश्चय करावा. निर्विकार आत्मा सत्य व शाश्वत आहे असा निर्णय करावा. ॥११॥

तो आत्मा कोणास कळेना । ज्ञानेंविण आकळेना । म्हणोनियां संतजना । विचारावें ।।१२।।

त्या आत्म्याचे अस्तित्व सहसा कोणालाच कळत नाही. अपरोक्ष ज्ञानाने त्याचा अनुभव येतो. त्यासाठी श्रीगुरूंना प्रणिपात करून व सेवापूर्वक शरण जाऊन आत्म्यासंबंधी विचारावे. ॥१२॥

विचारितां सज्जनांसी । ते म्हणती कीं अविनासी । जन्म मृत्यु आत्मयासी । बोलोंच नये ।।१३।।

त्यांना विचारल्यावर ते असे सांगतात की आत्मा अविनाशी असून जन्म व मरणाची भाषा आत्म्याला संभवत नाही. ॥१३॥

निराकारीं भासे आकार । आणी आकारीं भासे निराकार । निराकार आणी आकार । विवेकें वोळखावा ।।१४।।

निराकार ब्रह्मवस्तूवर अचानक नामरूपात्मक सृष्टी भासू लागते व नामरूपात्मक अध्यस्ताचे निराकार ब्रह्म अधिष्ठान असते. हा निराकार व आकाराचा संबंध विवेकाने ओळखावा. ॥१४॥

निराकार जाणावा नित्य । आकार जाणावा अनित्य । यास बोलिजे नित्यानित्य । विचारणा ।।१५।।

निराकार नित्य असून साकार अनित्य असते या विचाराला नित्यानित्य विचार म्हणतात. (नित्य=कधीच अभावरूप नसणे). ॥१५॥

सारी भासे असार । आणि असारीं भासें सार । सारासार विचार । शोधून पाहावा ।।१६।।

साररूप ब्रह्मावर असार सृष्टी भासते व असार सृष्टीत सार ब्रह्म असंगत्वाने व्यापून भासते हा सारासार विचार समजावून घ्यावा. ॥१६॥

पंचभूतिक तें माइक । परंतु भासे अनेक । आणि आत्मा येक । व्यापून असे ।।१७।।

मायिक पांचभौतिक सृष्टी भेदाने भरलेली दिसते. पण त्या सर्वात एकमेव भेदशून्य आत्मा व्यापून असतो. ॥१७॥

चहुं भूतांमधे गगन । तैसें गगनीं असे सघन । नेहटून पाहतां अभिन्न । गगन आणि वस्तु ।।१८।।

चार भूतांत जसे आकाश व्यापून असते तसे ब्रह्म आकाशात घनदाट व्यापून असते. शास्त्रशुद्ध विचार केला तर आकाश व ब्रह्म यांत फारसा फरक नाही. ॥१८॥

उपाधीयोगेंचि आकाश । उपाधी नस्तां निराभास । निराभास तें अविनाश । तैसें गगन ।।१९।।

दृश्य सृष्टीची उपाधी गृहीत धरली तरच आकाशाचे अस्तित्व आहे. (आकाशाचा शब्द हा गुण आहे असे शास्त्र सांगते. शब्दाचे अस्तित्व सृष्टिसापेक्ष आहे. सृष्टी अध्यस्त म्हणजे कल्पित आहे.) उपाधीचा निरास होताच निराभासरूप तथाकथित आकाश उरते. ब्रह्मही निराभास असल्याने दोन्ही सारखीच. ॥१९॥

आतां असो हे विवंचना । परंतु जें पाहातां नासेना । तें गे तेंचि अनुमाना । विवेकें आणावें ।।२०।।

आता हे स्पष्टीकरण पुरे. शास्त्रदृष्टीने पाहिल्यावर जे अविनाशी तत्त्व उरते तेच विवेकाच्या बळावर बुद्धीत ठसवावे. ॥२०॥

परमात्मा तो निराकार । जाणिजे हा विचार सार । आणि आपण कोण विचार । पाहिला पाहिजे ।।२१।।

परमात्मारूप ब्रह्म निराकार आहे, हे ब्रह्मविचाराचे सार किंवा तात्पर्य आहे. हे लक्षात घेऊन 'मी कोण' या प्रश्नाचे उत्तर शोधावे. (पांचभौतिक देहाचा निरास होताच म्हणजे उपाधीचा निरास होताच आकाशासारखे उरणारे 'ब्रह्म' मी होय. ॥२१॥

देहास अंत येतां । वायो जातो तत्वता । हें लटिकें म्हणाल तरी आतां । स्वासोस्वास धरावा ।।२२।।

देह मरण पावताच वायू हे चौथे महाभूत शरीरातून निघून जाते. (वायू = प्राण). याविषयी शंका असेल तर आताच स्वत:चे नाक व तोंड दाबून पहा! (शरीराचा जिवंतपणा प्राणांवर अवलंबून आहे. शरीर मरते तेव्हा प्राण आधीच गेलेले असतात). ॥२२॥

स्वास कोंडतां देह पडे । देह पडतां म्हणती मडें । मड्यास कर्तुत्व न घडे । कदाकाळीं ।।२३।।

श्वास बंद पडताच देह मरतो. मेलेल्या देहाला मढे म्हणतात. व त्याचेकडून कधीही व कोणतीच क्रिया घडत नाही. ॥२३॥

देहावेगळा वायो न करी । वायोवेगळा देह न करी । विचार पाहातां कांहींच न करी । येकवेगळें येक ।।२४।।

केवळ वायूला देहावाचून काहीच करता येत नाही. केवळ देह वायूशिवाय काही करू शकत नाही. असा विचार केला तर ते एकमेकाशिवाय क्रियाशून्य असतात हे कळते. ॥२४॥

उगें च पाहातां मनुष्य दिसे । विचार घेतां कांहींच नसे । अभेदभक्तीचें लक्षण ऐसें । वोळखावें ।।२५।।

अज्ञानाच्या दृष्टीतून पाहिले तर 'हा माणूस' असे दिसते. पण ज्ञानदृष्टीने पाहिले (१७-८) तर तत्त्वनिरासानंतर काहीच नसते. हीच ती अभेद भक्ती! (येथे भक्ती म्हणजे स्थिती होय. ओवी २१ प्रमाणे 'मी'चा शोध घेता घेता देह व जगाचा निरास होऊन शेष ब्रह्मस्थिती म्हणजे विभक्ती नसलेली भेदशून्य भक्ती उरते). ॥२५॥

कर्ता आपण ऐसें म्हणावें । तरी आपलें इछेसारिखें व्हावे । इछेसारिखें न होतां मानावें । अवघेंच वाव ।।२६।।

(मागील ओवीतील अभेद भक्तीप्रमाणे या ओवीत समासाचा विचारप्रवाह सुटून अचानक 'कर्तेपणा' हा विषय आला आहे असे वाटते. ओवी २१ मधील 'आपण कोण' हा संदर्भ पकडून आपण म्हणजे 'मी कर्ता नाही' असे जुळवून घ्यावे. 'कशाचा कर्ता नाही?' या प्रश्नाचे उत्तर मिळण्यासाठी ओवी २२ मधील प्राणांचा संदर्भ धरून प्राण असणे किंवा नसणे आपल्या हातात नसून एकूण सर्व जगरहाटीचे कर्तृत्व ईश्वराचे आहे हे लक्षात घ्यावे.) 'मी जर कर्ता असेन' तर मला जे जसे व्हावेसे वाटते ते तसे झाले पाहिजे. पण तसे होत नसेल तर 'मी कर्ता' म्हणणे अगदीच निरर्थक आहे. (माणसाने आपल्या अगणित आशा-आकांक्षांचा विचार करून त्यातील किती सफळ होतात त्याचा विचार करावा.) ॥२६॥

म्हणोन कर्ता नव्हे किं आपण । तेथें भोक्ता कैंचा कोण । हें विचाराचें लक्षण । अविचारें न घडे ।।२७।।

म्हणून मी कर्ता असणे शक्य नाही. मग भोक्तातरी मी कसा असेन? (जो कर्ता तोच भोक्ता असतो) हे विचारानेच कळते. अविचाराने ते कळणे शक्य नाही. ॥२७॥

अविचार आणि विचार । जैसा प्रकाश अंधकार । विकार आणि निर्विकार । येक नव्हे कीं ।।२८।।

विचार हाच प्रकाश. अविचार हाच अंधार. जसे विकार व निर्विकार अत्यंत भिन्न असतात तसेच विचार व अविचार असतात. ॥२८॥

जेथें नाहीं विवंचना । तेथें कांहींच चालेना । खरें तेंचि अनुमाना । कदा न ये ।।२९।।

जेथें शास्त्रानुसारी विचार नसतो तेथे कांहीच शाश्वत हित साधत नाही. सत्यरूप ब्रह्माचा कधीच निश्चय होत

नाही ॥२९॥

प्रत्ययास बोलिजे न्याये । अप्रत्यये तो अन्याये । ज्यात्यांधास परीक्षा काये । नाना रत्नांची ।।३०।।

जे अनुभवाचे असते ते योग्य (न्याय) असून जे केवळ अनुमानाचे व शाब्दिक असते ते अयोग्य असते. जन्मत:च अंध असणाऱ्याला जशी रत्नपरीक्षा होत नाही त्याप्रमाणे ज्ञानांधाला ब्रह्मानुभव येत नाही. ॥३०॥

म्हणोन ज्ञाता धन्य धन्य । जो निर्गुणेंसी अनन्य । आत्मनिवेदनें मान्य । परम पुरुष ।।३१।।

म्हणून ज्याला ज्ञानचक्षू असतात तो कृतार्थ व धन्य होतो. तोच जीवाचे ब्रह्मात निवेदन करून निर्गुण ब्रह्माशी ऐक्य साधलेला (मान्य) उत्तम पुरुष होतो. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'लघुबोधनिरूपणनाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'लघुबोध' नावाचा सहावा समास समाप्त

दशक तेरावा : नामरूप

समास सातवा : प्रत्ययविवरण

॥ श्रीराम समर्थ ॥

निर्मळ निश्चळ निराभास । तयास दृष्टांत आकाश । आकाश म्हणिजे अवकाश । पसरला पैस ।।१।।

ब्रह्म विमल, अढळ व वृत्तिज्ञानाने न कळणारे असून त्याला आकाशाचा दृष्टांत देतात. आकाश म्हणजे अपरंपार व्यापून असलेली सर्वांना सामावून घेणारी पोकळी होय. ॥१॥

आधीं पैस मग पदार्थ । प्रत्यये पाहातां यथार्थ । प्रत्ययेंविण पाहातां वेर्थ । सकळ कांहीं ।।२।।

प्रथम पोकळी असते व नंतर त्यात नामरूपात्मक सृष्टी समाविष्ट होते हे तर्कशुद्ध व शास्त्रविचाराने व्यवस्थित कळते. ही दोन्ही नसतील तर विचारशून्य जीवनच व्यर्थ जाते. ॥२॥

ब्रह्म म्हणिजे तें निश्चळ । आत्मा म्हणिजे तो चंचळ । तयास दृष्टांत केवळ । वायो जाणावा ।।३।।

ब्रह्म अढळ तर जीवात्मा चंचल असतो, त्याला वायूचा दृष्टान्त अगदी योग्य आहे. ॥३॥

घटाकाश दृष्टांत ब्रह्माचा । घटबिंब दृष्टांत आत्म्याचा । विवरतां अर्थ दोहींचा । भिन्न आहे ।।४।।

वेदान्तशास्त्रात ब्रह्माला घटातील आकाशाचा दृष्टान्त देतात व घटातील पाण्यात जे आकाश प्रतिबिंबित होते त्याचा जीवात्म्याला दृष्टांत देतात. ब्रह्मरूप आकाश निश्चळ व प्रतिबिंबातील आकाश चंचळ आहे. असा दोन्हीतील फरक लक्षात घ्यावा. ॥४॥

भूत म्हणिजे जितुकें जालें । जालें तितुकें निमालें । चंचळ आलें आणी गेलें । ऐसें जाणावें ।।५।।

भूतसृष्टी जन्माला येते व जे जन्माला येते ते नष्ट होऊन जाते. असे जे येते व जाते ते चंचल असते. ॥५॥

अविद्या जड आत्मा चंचळ । जड कर्पूर आत्मा अनळ । दोनी जळोन तत्काळ । विझोन जाती ।।६।।

पांचभौतिक सृष्टी अचेतन असून जणू कापूर आहे. जीवेश्वर सृष्टी चेतन असून जणू अग्नी आहे. अग्नी कापूर जाळून स्वत:ही विझतो. त्याप्रमाणे ईश्वर सृष्टीचा प्रलय करून स्वत: लीन होतो. ॥६॥

ब्रह्म आकाश निश्चळ जाती । आत्मा वायो चंचळ जाती । परीक्षवंत परीक्षिती । खरें किं खोटें ।।७।।

ब्रह्म व आकाश निश्चळ गटातील असून ईश्वर व वायू चंचल गटातील आहेत. जे वेदान्तवेत्ते असतात ते हे रहस्य जाणतात. ॥७॥

जड अनेक आत्मा येक । ऐसा आत्मानात्माविवेक । जगा वर्तविता जगन्नायेक । तयास म्हणावें ।।८।।

नामरूपात्मक अचेतन सृष्टी अफाट विविधतेने भरलेली असून आत्मा मात्र अखंड, भेदशून्य व एकमेव आहे. हाच आत्मानात्मविवेक होय. या सृष्टीचा नियामक ईश्वर आहे. ॥८॥

जड अनात्मा चेतवी आत्मा । सर्वी वर्ते सर्वात्मा । अवघा मिळोन चंचळात्मा । निश्चळ नव्हे ।।९।।

अनात्म अचेतन पदार्थांना आत्मा प्रकाशित करतो. आत्म्यामुळे त्यांचे ज्ञान होते. आत्मा ईश्वररूपाने सर्व अचेतन व जीवादी चेतन पदार्थांत व्यापून राहतो. हा ईशसृष्ट पसारा चंचळ ईश्वराचा आहे. निश्चळ ब्रह्माचा नाही. ॥९॥

निश्चळ तें परब्रह्म । जेथे नाहीं दृश्यभ्रम । विमळ ब्रह्म तें निभ्रम । जैसें तैसें ।।१०।।

परब्रह्म निश्चळ असून त्यात दृश्यसृष्टी सत्यत्वाने नाही. विमल ब्रह्माला सृष्टीचा भ्रम स्पर्शही करीत नाही. ॥१०॥

आधीं आत्मानात्माविवेक थोर । मग सारासारविचार । सारासारविचारें संव्हार । प्रकृतीचा ।।११।।

प्रथम शास्त्रशुद्ध आत्मानात्मविवेक करून नंतर तसाच सारासारविवेक केला असता प्रकृतीचा विवेकप्रलय पाहता येतो. ॥११॥

विचारें प्रकृति संव्हारे । दृश्य अस्तांच वोसरे । अंतरात्मा निर्गुणी संचरे । अध्यात्मश्रवणें ।।१२।।

या विचाराने दृश्य सृष्टी अध्यस्तरूपाने असल्याचे अनुभवाला आल्याने ती दिसत असून मावळते. तिचा प्रलय होतो. अध्यात्मशास्त्राच्या यथार्थ चिंतनाने सृष्टीचा नियामक ईश्वर निर्गुण ब्रह्मात हरवून जातो. ॥१२॥

चढता अर्थ लागला । तरी अंतरात्मा चढतचि गेला । उतरल्या अर्थे उतरला । भूमंडळीं ।।१३।।

अध्यात्मशास्त्राच्या चिंतनाने जगत्सत्यत्व निश्चयाकडून ब्रह्मसत्यत्वाच्या निश्चयाकडे झेप घेतली तर ईश्वर ब्रह्मामध्ये हरवतो. ब्रह्मसत्यत्वाऐवजी जगत्सत्यत्वाचा निर्णय झाला तर ईश्वर जगताचा स्वामी बनतो! ॥१३॥

अर्थासारिखा आत्मा होतो । जिकडे नेला तिकडे जातो । अनुमानें संदेहीं पडतो । कांहीयेक ।।१४।।

विचार करणाऱ्याची जशी झेप असेल तसा जणू आत्मा होतो! झेप घेतली तर तो निर्गुण निराकार आहे. झेप नसेल तर तोच ईश्वरही आहे. हे कळले नाही, तर अंदाज व शंका यांचे राज्य चालते. ॥१४॥

निसंदेह अर्थ चालिला । तरी आत्मा निसंदेहचि जाला । अनुमानअर्थे जाला । अनुमानरूपी ।।१५।।

संशयविपर्ययरहित अध्यात्मशास्त्राचे मनन चिंतन झाले तर जीवब्रह्मैक्याचा अपरोक्ष अनुभव येतो. बुद्धी संशयग्रस्त असेल तर ज्ञानही तसेच असते. ॥१५॥

नवरसिक अर्थ चाले । श्रोते तद्रूपचि जाले । चाटपणें होऊन गेलें । चाटचि अवघे ।।१६।।

करुणादि नवरसांनी परिपूर्ण कथा सांगितली जात असेल तर श्रोते नवरसांत डुंबतात व त्या धुंदीमध्येच धुंद होतात. (त्याचप्रमाणे यथार्थ चिंतनाने यथार्थ अनुभव येतो). ॥१६॥

जैसा जैसा घडे संग । तैसे गुह्यराचे रंग । याकारणें उत्तम मार्ग । पाहोन धरावा ।।१७।।

ऋतुमानाप्रमाणे निसर्गातील रंग बदलले की सरडाही रंग बदलतो. त्याप्रमाणे संगतीनुसार माणसाच्या मनाचेही रंग बदलतात. म्हणून संतसंगतीत रहावे. (उत्तम मार्ग). ॥१७॥

उत्तम अन्नें बोलत गेले । तरी मन अन्नाकारचि जालें । लावण्य वनितेचें वर्णिलें । तरी मन तेथेंचि बैसे ।।१८।।

चविष्ट खाद्यपदार्थांविषयी गप्पा सुरू झाल्या की मन जणू त्या पदार्थात हरवून जाते. स्त्रीच्या सौंदर्याविषयी बोलणी चालू झाली तर अंत:करण तेथेच रमते. ॥१८॥

पदार्थवर्णन अघवें । किती म्हणोन सांगावें । परंतु अंतरीं समजावें । होय किं नव्हे ।।१९।।

असे सर्वच पदार्थांचे वर्णन करावयाचे ठरविले तर ते सांगून किती सांगणार? खाद्यपदार्थ, स्त्री, इतर अनेक पदार्थ इत्यादिकांत रमावयाचे किंवा नाही हे ज्याचे त्याने ठरवावे. ॥१९॥

जें जें देखिलें आणी ऐकिलें । तें अंतरीं सदृढ बैसलें । हित अन्हित परीक्षिलें । परीक्षवंतीं ।।२०।।

जे जे आपण ऐकतो व पाहतो त्याचा अंत:करणावर ठसा उमटतो. त्यातील हिताचे व घाताचे विवेकाने परीक्षा करून निवडावे. ॥२०॥

याकारणें सर्व सांडावें । येक देवास धुंडावें । तरीच वर्म पडे ठावें । कांहीयेक ।।२१।।

म्हणून सर्व फालतू विचार दूर सारून एका देवाचा ध्यास घ्यावा. तरच देव समजून देवाचा अनुभव घेता येतो. ॥२१॥

नाना सुखें देवें केली । लोकें तयास चुकलीं । ऐसीं चुकतां च गेलीं । जन्मवरी ।।२२।।

देवाने पंचविषयाच्या इंद्रियजन्य भोगांची सोय केल्याने माणूस, त्या नादात देवालाच विसरतो व भोगात आयुष्य व्यर्थ घालवतो. ।।२२।।

सर्व सांडून शोधा मजला । ऐसें देवचि बोलिला । लोकीं शब्द अमान्य केला । भगवंताचा ।।२३।।

प्रत्यक्ष भ. श्रीकृष्ण सांगतात की सर्व काही दूर सारून माझा शोध घ्यावा. (गीता १८-६६) पण लोक त्याचा हा उपदेश मानीत नाहीत. ।।२३।।

म्हणोन नाना दुःखें भोगिती । सर्वकाळ कष्टी होती । मनीं सुखचि इछिती । परी तें कैचें ।।२४।।

त्यामुळेच ते नाना दुःखे भोगून सतत कष्टीच राहतात. सुख हवे असते खरे, पण ते विषयात कोठून आणावे? ।।२४।।

उदंड सुख जया लागलें । वेडें तयास चुकलें । सुख सुख म्हणताच मेलें । दुःख भोगितां ।।२५।।

जो आत्मा सुखरूप आहे त्याला विषयवेडा जीव मुकतो व सुखासाठी तळमळत दुःख भोगून मरून जातो. ।।२५।।

शाहाण्यानें ऐसें न करावें । सुख होये तेंचि करावें । देवासी धुंडित जावें । ब्रह्मांडापरतें ।।२६।।

शहाण्याने असे न करता ज्याने सुखरूपता येईल असा उपाय करावा. दृश्य जगताचे अधिष्ठान असलेल्या सुखरूप देवाचा (ब्रह्म) शोध घ्यावा. ।।२६।।

मुख्य देवचि ठाईं पडिला । मग काये उणें तयाला । लोक वेडे विवेकाला । सांडून जाती ।।२७।।

हा देव ज्याला सापडला त्याला सुखाची काय कमतरता? पण यासाठी आवश्यक तो विवेक लोक सांभाळत नाहीत. ।।२७।।

विवेकांचें फळ तें सुख । अविवेकाचें फळ ते दुःख । यांत मानेल तें अवश्यक । केलें पाहिजे ।।२८।।

विवेकाला सुखाची व अविवेकाला दुःखाची फळे लागतात. यातील आपल्यास काय हवे ते नक्की ठरवून केले पाहिजे. ।।२८।।

कर्तयासी वोळखावें । यास विवेक म्हणावें । विवेक सांडितां व्हावें । परम दुःखी ।।२९।।

कर्ता कोण ते ओळखणे हाच विवेक. (६-२६) हे ओळखले नाही, तर खडतर दुःखे भोगावी लागतात. ।।२९।।

आतां असो हें बोलणें । कर्त्यास वोळखणें । आपलें हित विचक्षणें । चुकों नये ।।३०।।

आता सांगितले एवढे पुरे. शहाण्याने कर्ता कोण ते ओळखून स्वतःचे हित साधावे. ते साधण्यास चुकू नये. ।।३०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'प्रत्ययविवरणनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'प्रत्ययविवरण' नावाचा सातवा समास समाप्त

दशक तेरावा : नामरूप

समास आठवा : कर्तानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

श्रोता म्हणे वक्तयासी । कोण कर्ता निश्चयेंसीं । सकळ सृष्टि ब्रह्मांडासी । कोणें केलें ।।१।।

श्रोता वक्त्याला विचारतो– खरोखर कर्ता कोण आहे? ह्या ब्रह्मांडरूप सृष्टीची रचना कोणी केली? ॥१॥

तव बोलिले सभानायेक । जे बोलिके येकाहून येक । या बोलण्याचें कौतुक । श्रोतीं सादर ऐकावें ।।२।।

तेव्हां निरनिराळ्या संप्रदायांचे प्रमुख (सभानायक) एकामागून एक उत्तरे देऊ लागले. श्रोत्यांनी ती ऐकावीत. ॥२॥

येक म्हणती कर्ता देव । येक म्हणती कोण देव । आपुलाला अभिप्राव । बोलते जाले ।।३।।

कोणी म्हणतात की देव सृष्टिकर्ता आहे. दुसरे म्हणतात की कोणत्या देवाकडे कर्तृत्व आहे ते आम्ही सांगतो. असे म्हणून ते आपापले मत सांगू लागले. ॥३॥

उत्तम मध्यम कनिष्ठ । भावार्थें बोलती पष्ट । आपुलाली उपासना श्रेष्ठ । मानिती जनीं ।।४।।

त्यांच्यात उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशी मंडळी होती व त्याप्रमाणे त्यांनी सांगावयाला सुरुवात केली. प्रत्येकाला त्यांचे त्यांचे उपास्य दैवत श्रेष्ठ वाटत होते व सृष्टीचे कर्तृत्व त्यांचे असल्याचे ते सांगू लागले. ॥४॥

कोणीयेक ऐसें म्हणती । कर्ता देव मंगळमूर्ती । येक म्हणती सरस्वती । सर्व करी ।।५।।

कोणी कर्तेपणा गणपतीला देतात तर कोणी सरस्वती सर्व करते असे म्हणतात. ॥५॥

येक म्हणती कर्ता भैरव । येक म्हणती खंडेराव । येक म्हणती बीरेदेव । येक म्हणती भगवती ।।६।।
येक म्हणती नरहरी । येक म्हणती बनशंकरी । येक म्हणती सर्व करी । नारायेणु ।।७।।
येक म्हणती श्रीराम कर्ता । येक म्हणती श्रीकृष्ण कर्ता । येक म्हणती भगवंत कर्ता । केशवराज ।।८।।
येक म्हणती पांडुरंग । येक म्हणती श्रीरंग । येक म्हणती झोटिंग । सर्व करी ।।९।।
येक म्हणती मुंज्या कर्ता । येक म्हणती सूर्य कर्ता । येक म्हणती अग्न कर्ता । सकळ कांहीं ।।१०।।
येक म्हणती लक्ष्मी करी । येक म्हणती मारुती करी । येक म्हणती धरत्री करी । सर्व कांहीं ।।११।।
येक म्हणती तुकाई । येक म्हणती येमाई । येक म्हणती सटवाई । सर्व करी ।।१२।।
येक म्हणती भार्गव कर्ता । येक म्हणती वामन कर्ता । येक म्हणती परमात्मा कर्ता । येकचि आहे ।।१३।।
येक म्हणती विरणा कर्ता । येक म्हणती बस्वंणा कर्ता । येक म्हणती रेवंणा कर्ता । सर्व कांहीं ।।१४।।
कोणी म्हणती रवळया कर्ता । येक म्हणती स्वामी कार्तिक कर्ता । येक म्हणती वेंकटेश कर्ता । सर्व कांहीं ।।१५।।
येक म्हणती गुरु कर्ता । येक म्हणती दत्त कर्ता । येक म्हणती मुख्य कर्ता । वोढ्या जगन्नाथ ।।१६।।
येक म्हणती ब्रह्मा कर्ता । येक म्हणती विष्णु कर्ता । येक म्हणती महेश कर्ता । निश्चयेंसीं ।।१७।।
येक म्हणती प्रजन्य कर्ता । येक म्हणती वायो कर्ता । येक म्हणती करून अकर्ता । निर्गुण देव ।।१८।।

येक म्हणती माया करी । येक म्हणती जीव करी । येक म्हणती सर्व करी । प्रारब्धयोग ।।१९।।
येक म्हणती प्रेत्न करी । येक म्हणती स्वभाव करी । येक म्हणती कोण करी । कोण जाणे ।।२०।।

भैरव, खंडेराव, बिरदेव, भगवती, नरहरी, बनशंकरी, नारायण, राम, कृष्ण, केशवराज, पांडुरंग, श्रीरंग, झोटिंग, मुंज्या, सूर्य, अग्नी, लक्ष्मी, मारुती, पृथ्वी, तुकाई, यमाई, सटवाई, भार्गव, वामन, एकमेव परमात्मा, विरण्णा, बसवण्णा, रेवण्णा, रवळनाथ, कार्तिक, व्यंकटेश, श्रीगुरू, दत्त, औंढ्या नागनाथ, ब्रह्मदेव, विष्णू, शंकर, पर्जन्य, वायू, करून अकर्ता असलेले ब्रह्म, माया, जीव, प्रारब्ध, प्रयत्न व स्वभाव ह्यांचेकडे कर्तृत्व आहे. कोणी म्हणते की कर्तृत्व कोणाकडे ते सांगता येत नाही. ॥६ ते २०॥

ऐसा कर्त्याचा विचार । पुसतां भरला बाजार । आतां कोणाचें उत्तर । खरें मानावें ।।२१।।

जगताचा कर्ता कोण ह्याविषयी मतांचा असा बाजार भरला असून ह्यांतील कोणाकडे कर्तृत्व आहे असे निश्चित करावे? ॥२१॥

जेहिं जो देव मानिला । कर्ता म्हणती तयाला । ऐसा लोकांचा गल्बला । वोसरेना ।।२२।।

ज्यांनी जो देव मानला ते त्याचेकडे कर्तृत्व देतात व त्यामुळे हा गोंधळ कधीच संपत नाही. ॥२२॥

आपुलाल्या साभिमानें । निश्चयेचि केला मनें । याचा विचार पाहाणें । घडेचिना ।।२३।।

जो तो आपल्या उपास्य दैवताचा अभिमान धरून तसा निर्णय करतात. खरे उत्तर कोणालाच नको असते. ॥२३॥

बहु लोकांचा बहु विचार । अवघा राहों द्या बाजार । परंतु याचा विचार । ऐसा आहे ।।२४।।

असा हा अनेकांच्या विचारांचा गलबला सोडून देऊन कर्ता कोण हे निश्चित केले पाहिजे. ॥२४॥

श्रोतीं व्हावें सावधान । निश्चयें तोडावा अनुमान । प्रत्यये मानावा प्रमाण । जाणते पुरुषीं ।।२५।।

श्रोत्यांनी सावध होऊन खरे उत्तर समजावून घेऊन भ्रामक समजुती सोडून द्याव्यात. जाणत्याने शास्त्रशुद्ध, तर्कसंगत व म्हणून पटणारा निश्चय करावा. ॥२५॥

जें जें कर्तयाने केलें । तें तें त्याउपरी जालें । कर्त्यापूर्वी आडळलें । न पाहिजे कीं ।।२६।।

कर्त्याने जे निर्माण केलेले असते ते कर्त्यानंतर निर्माण होते. कर्त्यापूर्वी त्याने केलेली निर्मिती असणे शक्य नाही. ॥२६॥

केलें तें पंचभूतिक । आणि पंचभूतिक ब्रह्मादिक । तरी भूतांशें पंचभूतिक । केलें तें घडेना ।।२७।।

सृष्टिरूप कार्य पांचभौतिक असून तिचे कर्ते ब्रह्मदेवादि सुद्धां पांचभौतिकच आहेत. त्यामुळें पंचभूतांच्या अंशाने पांचभौतिक सृष्टी निर्माण करणे शक्य नाही. ॥२७॥

पंचभूतांस वेगळें करावें । मग कर्त्यास वोळखावें । पंचभूतिक तें स्वभावें । कर्त्यास आलें ।।२८।।

पांचभौतिक कार्य वेगळे व कर्ता वेगळा असे निश्चित केले तरच कर्त्याला ओळखता येईल. जर दोन्ही एकच मानले तर कार्याचे गुण कर्त्यात असणे स्वाभाविक आहे. (दोन्ही पांचभौतिक मानावी लागतील.) ॥२८॥

पंचभूतांवेगळें निर्गुण । तेथें नाहीं कर्तेपण । निर्विकारास विकार कोण । लाऊं शके ।।२९।।

निर्गुण ब्रह्म पंचमहाभूतांपासून अलिप्त असून ते निर्विकार असल्याने त्याला कर्तृत्वाचा व कार्याचा विकार संभवत नाही. ॥२९॥

निर्गुणास कर्तव्य न घडे । सगुण जाल्यांत सांपडे । आतां कर्तव्यता कोणेकडे । बरें पाहा ।।३०।।

निर्गुण ब्रह्म निष्क्रिय असल्याने त्याला कर्तृत्व नाही. तीन गुण तर कार्यात समाविष्ट असतात. (म्हणून त्यांनाही कर्तृत्व संभवत नाही) अशा परिस्थितीत सृष्टिनिर्मितीचे कर्तृत्व कोणाकडे जाते ह्याचा सूक्ष्म विचार करून पहा. ॥३०॥

लटिक्याचा कर्ता कोण । हें पुसणेंचि अप्रमाण । म्हणोनि हेंचि प्रमाण । जें स्वभावेंचि जालें ।। ३१ ।।

तसे पहाता मायिक सृष्टी कोणी केली हा प्रश्नच चुकीचा (तर्कविसंगत) आहे. म्हणून त्याचा निर्णय असा करावा की सृष्टीची निर्मिती होणे हा तिचा स्वभावच आहे. (समर्थांनी येथे स्वभाववाद स्वीकारलेला नाही. पुढे ओवी ३७ मध्ये ते म्हणतात की पूर्वपक्षाला उडवून लावण्यासाठी हे उत्तर दिले असून सिद्धान्तपक्ष असा की सृष्टी सतासत्‌विलक्षण अनिर्वचनीय मिथ्या आहे.) ॥३१॥

येक सगुण येक निर्गुण । कोठें लाऊं कर्तेपण । या अर्थाचें विवरण । बरें पाहा ।। ३२ ।।

ब्रह्म निर्गुण व ब्रह्मदेवादि सगुण असल्याने कर्तृत्व कोणाकडे द्यावे ह्याचे स्पष्टीकरण नीट समजावून घ्यावे. ॥३२॥

सगुणें सगुण केलें । तरी तें पूर्वींच आहे जालें । निर्गुणास कर्तव्य लाविलें । नवचे कीं कदा ।। ३३ ।।

सगुण ब्रह्मदेवादिकांनी सृष्टी केली म्हणावे तर दोन्ही गुणात्मक असल्याने सृष्टी ब्रह्मदेवाच्या रूपाने निर्मितीच्या आधीपासूनच आहे! निर्गुण ब्रह्म निष्क्रिय असल्याने निर्मितीची क्रिया ते करणे कधीच शक्य नाही. ॥३३॥

येथें कर्ताचि दिसेना । प्रत्यये आणावा अनुमाना । दृश्य सत्यत्वें असेना । म्हणोनियां ।। ३४ ।।

म्हणून सृष्टीचा कर्ता अस्तित्वातच नाही. सृष्टी अध्यस्त म्हणजे भ्रमरूप असल्याने ती सत्य नाही असा बुद्धीचा निश्चय करावा. ॥३४॥

केलें तें अवघेंच लटिकें । तरी कर्ता हें बोलणेंचि फिकें । वक्ता म्हणे रे विवेकें । बरें पाहा ।। ३५ ।।

जी केली असे म्हटले जाते ती सृष्टी मुळातच भ्रमरूप असल्याने 'तिचा कर्ता' ही कल्पनाही भ्रामक आहे. विवेकाचा वापर करून सत्याचा मागोवा घ्या. ॥३५॥

बरें पाहातां प्रत्ययें आला । तरी कां करावा गल्बला । प्रचित आलियां आपणाला । अंतर्यामीं ।। ३६ ।।

अशा शोधाने जर निश्चय झाला तर गोंधळात कां पडावे? बुद्धीचा यथार्थ निर्णय झाल्यावर गोंधळाचे काहीच कारण नाही. ॥३६॥

आतां असो हें बोलणें । विवेकी तोचि हें जाणें । पूर्वपक्ष लागे उडवणें । येरवीं अनुर्वाच ।। ३७ ।।

आता हे स्पष्टीकरण पुरे. जो विवेकी असतो त्याला त्यातील वर्म समजते. पूर्वपक्षाला जग सत्य वाटते. त्याच्या समाधानासाठी स्वभाववाद सांगावा लागतो. वस्तुत: सृष्टी अनिर्वचनीय आहे. ॥३७॥

तंव श्रोता करी प्रस्न । देहीं सुखदु:खभोक्ता कोण । पुढें हेंचि निरूपण । बोलिलें असे ।। ३८ ।।

आता श्रोता प्रश्न विचारतो की शरीरामध्ये सुखदु:खांचा भोक्ता कोण आहे? ती कोण भोगतो? पुढील समासात ह्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर दिले आहे. ॥३८॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'कर्तानिरूपणनाम' समास आठवा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'कर्तानिरूपण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक तेरावा : नामरूप

समास नववा : आत्माविवरण

॥ श्रीराम समर्थ ॥

आत्मयास शेरीरयोगें । उद्वेग चिंता करणें लागे । शरीरयोगें आत्मा जगे । हें तों प्रगटचि आहे ।।१।।

आत्मा (कूटस्थ चैतन्य) जेव्हा देहतादात्म्यामुळे जणू जीवदशेला येतो, तेव्हा त्याला उद्वेग व चिंता कराव्या लागतात. ॥१॥

देह अन्नचि खायेना । तरी आत्मा कदापि जगेना । आत्म्याविण चेतना । देहास कैंची ।।२।।

जीवात्म्याची जीवदशा शरीराच्या अस्तित्वावर अवलंबून आहे. देहाला अन्न मिळाले नाही, तर जीवात्मा जगत नाही आणि त्याउलट जीवात्म्यावाचून देहाला जिवंतपणा कोठून येईल? ॥२॥

हें येकावेगळें येक । करूं जातां निरार्थक । उभयेयोगें कोणीयेक । कार्य चाले ।।३।।

हे दोन्ही एकमेकांपासून वेगळे केले तर दोन्ही निरर्थक होतात. दोघांच्या संयोगानेच कार्य होते. ॥३॥

देहाला नाहीं चेतना । आत्म्यास पदार्थ उचलेना । स्वप्नभोजनें भरेना । पोट कांहीं ।।४।।

देहाला आत्म्यावाचून जिवन्तपणा नसतो (जाणीव नसते) व आत्मा स्वत: काडीसुद्धा हालवू शकत नाही. उदा. स्वप्नात जेवल्याने पोट भरत नाही. (पोटात प्रत्यक्ष अन्न जावे लागते.) ॥४॥

आत्मा स्वप्नअवस्थेंत जातो । परन्तु देहामध्यें हि असतो । निदसुरेपणें खाजवितो । चमत्कार पाहा ।।५।।

जीवात्मा जेव्हा स्वप्नात प्रवेश करतो तेव्हा तो सर्व शरीरभरही व्यापून रहातो. त्यामुळेच अर्धवट झोपेत सुद्धा कंड सुटल्यावर तो हाताने खाजवतो हे आश्चर्य नव्हे काय? ॥५॥

अन्नरसें वाढे शरीर । शरीरप्रमाणें विचार । वृद्धपणीं तदनंतर । दोनी लाहानाळती ।।६।।

शरीराला पोषक अन्नरस मिळाल्यावर शरीराची व त्याबरोबर बुद्धीचीही (विचार) वाढ होते. वृद्धावस्थेत तेच शरीर क्षीण होऊन बुद्धीचे सामर्थ्यही कमी होते. ॥६॥

उन्मत्त द्रव्य देह खातो । देहयोगें आत्मा भुलतो । विस्मरणें शुद्धि सांडितो । सकळ कांहीं ।।७।।

जेव्हा शरीरात मदिरेसारखे पदार्थ घातले जातात तेव्हा जीवात्माही देहाशी असलेल्या संयोगामुळें भ्रमिष्ट होऊन स्मरण व शुद्ध हरवून बसतो. ॥७॥

देहानें घेतले वीष । आत्मा जाये सावकास । वाढणें मोडणें आत्मयास । नेमस्त आहे ।।८।।

देहाला विष खायला घातले तर जीवात्म्याला यथाकाळ मरण येते. जीवात्मा सर्व देहात व्यापून असल्याने तो जणू देहाबरोबर वाढतो व देह मोडला तर मोडतो हे ठरलेले आहे. ॥८॥

वाढणें मोडणें जाणें येणें । सुख दुःख देहाचेनि गुणें । नाना प्रकारें भोगणें । आत्मयास घडे ।।९।।

देहाशी संयोग झाल्यामुळेच जीवात्म्याला वाढणे, मोडणे, जन्माला येणे, मरणे, सुखी व दु:खी होणे इ. भोग भोगणे भाग पडते. ॥९॥

वारुळ म्हणिजे पोकळ । मुंग्यांचे मार्गचि सकळ । तैसेंचि हें केवळ । शरीर जाणावें ।।१०।।

मुंग्यांच्या जाण्यायेण्याच्या बारीक वाटांचेच पोकळ वारुळ तयार होते. शरीरही तसेच समजावे. (ते असे–) ॥१०॥

शरीरीं नाडीचा खेटा । नाडीमध्यें पोकळ वाटा । लाहान थोर सगटा । दाटल्या नाडी ।।११।।

शरीरामध्ये हजारो नाड्या असून त्यांतील पोकळ वाटांतून प्राण वाहातो. अशा बारीक व मोठ्या वाटा नाड्यांतून दाटून रहातात. ।।११।।

प्राणी अन्नोदक घेतो । त्याचा अन्नरस होतो । त्यास वायो प्रवर्ततो । स्वासोस्वासें ।।१२।।

प्राण्याने घेतलेल्या अन्नपाण्याचे रूपांतर अन्नरसात होते व तो अन्नरस श्वास व उच्छवासरूप प्राणांमुळें वाहून नेला जातो. ।।१२।।

नाडीद्वारां धांवे जीवन । जीवनामधें खेळे पवन । त्या पवनासरिसा जाण । आत्मा हि विवरे ।।१३।।

त्या नाड्यांमधून प्राण्याचा जिवन्तपणा शरीरभर खेळतो व त्या जिवंतपणांत, प्राण व जीवात्माही वावरतो. (प्राण व जीवात्म्यामुळेंच जिवंतपणा असतो.) ।।१३।।

तृषेनें शोकलें शरीर । आत्म्यास कळे हा विचार । मग उठवून शरीर । चालवी उदकाकडे ।।१४।।

तहान लागून जिभेला कोरड पडली तर ती जीवात्म्याला कळते व तो शरीराला पाण्याकडे जाण्यास प्रवृत्त करतो. ।।१४।।

उदक मागे शब्द बोलवी । मार्ग पाहोन शरीर चालवी । शरीर अवघें च हालवी । प्रसंगानुसार ।।१५।।

'मला पाणी द्या' असे शब्द बोलण्यास प्रवृत्त करतो किंवा पाण्याचा साठा लक्षात घेऊन तिकडे जाण्यास प्रेरणा देतो व वेळेनुसार पाण्यासाठी शरीराच्या अनेक हालचाली करवतो. ।।१५।।

क्षुधा लागते ऐसें जाणतो । मग देहाला उठवितो । आच्यावाच्या बोलवितो । ज्यासी त्यासी ।।१६।।

भुकेची संवेदना झाल्यावर जीवात्मा देहाला जेवण्यासाठी उठवितो व ते मिळाले नाही, तर अन्न वाढणाऱ्यांना वेडेवाकडे बोलावयास लावतो. कदाचित काही संबंध नसणाऱ्यांवरही राग काढावयास लावतो! ।।१६।।

बायेकांत म्हणे जालें जालें । देह सोवळें करून आणिलें । पायांत भरून चालविलें । तांतडीं तांतडीं ।।१७।।

घरातील अन्न वाढणाऱ्या बायकांना तो म्हणतो की माझे पूजा व स्नानादि आवरले आहे व नंतर तो घाईघाईने स्वयंपाकघराकडे पायांत उत्साह भरून शरीराला चालत नेतो! ।।१७।।

त्यासी पात्रावरी बैसविलें । नेत्रीं भरोन पात्र पाहिलें । हाताकरवीं आरंभिलें । आपोशन ।।१८।।

त्याला पाटावर बसविल्यानंतर जीवात्मा अन्नाचे ताट डोळे भरून पहातो व हाताने आपोष्णी घेतो. ।।१८।।

हाताकरवीं ग्रास उचलवी । मुखीं जाऊन मुख पसरवी । दातांकरवीं चाववी । नेटें नेटें ।।१९।।

हाताने घास घेऊन तो मुख उघडून ते आत घालतो व दातांनी व्यवस्थित चावतो. ।।१९।।

आपण जिव्हेमधें खेळे । पाहातो परिमळसोहळे । केंस काडी खडा कळे । तत्काळ थुंकी ।।२०।।

जिव्हेमध्यें असलेला जीवात्मा अन्नाची चव व गंध घेतो. घासात केंस, काडी व खडा असेल तर लगेच काढून टाकतो. ।।२०।।

आळणी कळतां मीठ मागे । बायलेसि म्हणे आगे कांगे । डोळे ताऊन पाहों लागे । रागें रागें ।।२१।।

अन्नात मीठ कमी वाटले तर बायकोला वाटेल तसे बोलून मीठ मागून घेतो व रागाने तिच्याकडे डोळे फाडून पहातो! ।।२१।।

गोडी लागतांच आनंदे । गोड नस्तां परम खेदे । वांकडी गोष्टी अंतरीं भेदे । आत्मयासी ।।२२।।

जेवणात गोड पदार्थ खाऊन सुखी होतो व गोड नसेल तर फार दु:ख होते. असे काही मनाविरुद्ध झाले की

जीवात्म्याला फार यातना होतात. ॥२२॥

नाना अन्नाची गोडी । नाना रसे स्वाद निवडी । तिखट लागतां मस्तक झाडी । आणी खोंकी ।।२३।।

रुचकर अन्नपदार्थ चवीने खातो, आपल्याला हव्या त्या चवीचा पदार्थ निवडून घेतो व फार तिखट लागले तर जोरजोरात डोके हलवून ठसकू लागतो. ॥२३॥

मिरपुडी घातली फार । कायसें करितें खापर । जिव्हेकरवीं कठिणोत्तर । बोलवी रागें ।।२४।।

एखाद्या पदार्थात मिरपूड जास्त झाली तर बायकोला म्हणतो की 'मिरपूड घालीत असताना तुझ्या डोक्याचे मडके झाले होते काय?' अशा कठोर शब्दांनी तिला रागाने बोलतो. ॥२४॥

आज्य उदंड जेविला । सवेंच तांब्या उचलिला । घळघळां घेऊं लागला । सावकास ।।२५।।

तुपासह भरपूर जेवल्यावर तांब्या उचलून घटाघटा पाणी पितो. ॥२५॥

देहीं सुखदु:खभोक्ता । तो येक आत्माचि पाहातां । आत्म्याविण देह वृथा । मडें होये ।।२६।।

म्हणून देहामध्ये जीवात्मा सुखदु:खांचे भोग भोगतो. जीवात्मा नसेल तर देहाला मढे म्हणतात व ते तर टाकाऊ असते. ॥२६॥

मनाच्या अनंत वृत्ति । जाणणें तेचि आत्मस्थिती । त्रैलोकीं जितुक्या वेक्ती । तदांतरीं आत्मा ।।२७।।

अन्त:करण अनेक वृत्तींनी पांगते. पण त्यांतील जाणीव हेच आत्म्याचे स्वरूप होय. त्रैलोक्यात जेवढी शरीरे आहेत त्या सर्वांत आत्मा आहे. ॥२७॥

जगामध्यें जगदात्मा । विश्वामधें विश्वात्मा । सर्व चालवी सर्वात्मा । नाना रूपें ।।२८।।

जगामध्ये जगदात्मा, विश्वात विश्वात्मा व सर्व जीवमात्रांत जीवात्म्याच्या रूपाने सर्व घडामोडी घडवतो. हालचाली किंवा क्रिया करतो. ॥२८॥

हुंगे चाखे ऐके देखे । मृद कठिण वोळखे । शीत उष्ण ठाउकें । तत्काळ होये ।।२९।।

वास घेतो, चव घेतो, ऐकतो, पहातो, टणक व मऊ ओळखतो व उष्ण व थंड लगेच जाणतो. ॥२९॥

सावधपणें लाघवी । बहुत करी उठाठेवी । या धूर्ताच्या उगवी । धूर्तचि करी ।।३०।।

सावधानतेने व मोठ्या कौशल्याने अनेक कार्ये पार पाडतो. अशा धूर्ताचा धूर्तपणा दुसरा धूर्तच जाणतो. ॥३०॥

वायोसरिसा परिमळ येतो । परि तो परिमळ वितळोन जातो । वायो धुळी घेऊनी येतो । परी ते हि जाये ।।३१।।

वाऱ्याबरोबर येणारा गंध व धूळ दोन्ही थोड्याच वेळात नाहीसे होतात. ॥३१॥

शीत उष्ण वायोसरिसें । सुवासें अथवा कुवासें । असिजे परी सावकासें । तगणें न घडे ।।३२।।

वायू उष्ण असेल तर उष्ण व थंड असेल तर तसा तो कळतो. त्याबरोबरच सुगंध व दुर्गंधही येतो. पण काही काळाने ह्यांतील काहीच टिकत नाही. ॥३२॥

वायोसरिसे रोग येती । वायोसरिसी भूतें धांवती । धूर आणी धुकटें येती । वायोसवें ।।३३।।

वायूबरोबर रोगजंतू येतात, हलकी चिलटे इ. धावतात. धूर व धुकेही येते. ॥३३॥

वायोसवें काहींच जगेना । आत्म्यासवें वायो तगेना । आत्म्याची चपळता जाणा । अधिक आहे ।।३४।।

पण ह्यातील काहीच वायूबरोबर टिकून रहात नाही. आत्म्याबरोबर वायूचा टिकाव लागत नाही. (चपळतेच्या बाबतीत.) कारण तो अधिक वेगवान आहे. (जेथे वायू वेगाने पोहोचतो तेथे व्यापक आत्मा आधीच असतो). ॥३४॥

वायो कठिणास आडतो । आत्मा कठिण भेदून जातो । कठिण पाहों तरी तो । छेदेहिना ।।३५।।

भिंतीसारख्या अडथळ्याने वायू आडतो. सूक्ष्म व व्यापक आत्मा भिंतीअलीकडे, भिंतीमध्यें व भिंतीपलीकडे असतो. भिंतीला तडा न जाता जणू तो पलीकडे जातो! ॥३५॥

वायो झडझडां वाजे । आत्मा कांहींच न वाजे । मोनेंचि अंतरीं समजे । विवरोन पाहतां ।।३६।।

वादळ सुटले की वायू जोराने वाजतो. आत्म्याचा जराही आवाज होत नाही. वेदान्त विचारातून आलेल्या मौनरूप शांतीतच त्याचा अनुभव येतो. ॥३६॥

शरीरास बरें केलें । तें आत्मयास पावलें । शरीरयोगें जालें । समाधान ।।३७।।

शरीराच्या वेदना थांबवल्या की जीवात्मा सुखी होतो. ह्या रीतीने शरीराच्या संगतीने तो सुखीही होतो. ॥३७॥

देहावेगळे उपाये नाना । करितां आत्मयास पावेना । समाधान पावे वासना । देहाचेनि ।।३८।।

पण देह बाजूला ठेवून वाटेल तेवढे उपाय केले तरी जीवात्म्यावर त्यांचा परिणाम होत नाही. देहाचे कोड पुरवले की वासनेचेही तात्पुरते समाधान होते. ॥३८॥

देहआत्मयाचे कौतुक । पाहों जातां हें अनेक । देहावेगळी आडणुक । आत्मयास होये ।।३९।।

देह व जीवात्मा यांच्या संयोगातून निर्माण होणारे हे कौतुक कितीतरी सांगता येईल. तात्पर्य एकच की जीवात्म्याला देहावाचून काही करता येत नाही. ॥३९॥

येक असतां उदंड घडे । वेगळें पाहातां कांहींच न घडे । विवेकें त्रैलोकीं पवाडे । देहात्मयोगें ।।४०।।

जीवात्मा व शरीर एकत्र असताना उदंड कार्ये घडतात. पण ते वेगळे होताच काहीच घडत नाही. व्यासांसारखे महात्मे, देह व जीवात्म्याच्या संयोगातून प्राप्त झालेल्या विवेकाने त्रैलोक्यात ख्यातनाम झाले. ॥४०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आत्माविवरणनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आत्माविवरण' नावाचा नववा समास समाप्त

दशक तेरावा : नामरूप

समास दहावा : शिकवणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

पालेमाळा सुमनमाळा । फळमाळा बीजमाळा । पाषाणमाळा कवडेमाळा । सूत्रें चालती ।।१।।
स्फटिकमाळा मोहरेमाळा । काष्ठमाळा गंधमाळा । धातुमाळा रत्नमाळा । जाळ्या वोलि चांदोवे ।।२।।
परी हें तंतूनें चालतें । तंतू नस्तां विष्कळित होतें । तैसें म्हणो आत्मयातें । तरी साहित्य न पडे ।।३।।

पाने, फुले, फळे, बिया, खडे, कवड्या, स्फटिक, मोहोर, लाकूड, चंदन, धातू, रत्ने, जाळ्या, वेली, चांदोवे, इत्यादींच्या केलेल्या माळांमध्ये दोरा किंवा तार असते. त्या दोरीमुळेंच त्या माळांचे माळापण टिकून राहते. ती नसेल तर पाने इ. सर्व इतस्तत: विखरतात. आत्मा हा या दोरीप्रमाणे दृश्य जगताचा आधार आहे असे म्हणावे. साहित्यातील दृष्टान्ताच्या व्याख्येशी ते जुळत नाही. ॥१-३॥

तंतूस मणी वोविला । तंतूमध्येंचि राहिला । आत्मा सर्वांगी व्यापला । पाहाना कां ।।४।।

कारण तंतूमध्ये मणी ओवले तर तंतू (दोरी) मध्ये राहतो व मणी बाजूने असतात. आत्मा सर्वव्यापक आहे हे हा दृष्टान्त देताना का लक्षात घेऊ नये? (म्हणून श्री ज्ञानदेवांनी, ''सुवर्णाचे मणी केले । ते सुवर्णाचे सुती वोविले ।'' असे म्हणून दोन्हीत सोनेच व्यापून राहते असा समर्पक दृष्टान्त दिला आहे). ॥४॥

आत्मा चपळ सहजगुणें । दोरी काये चळों जाणे । म्हणोन दृष्टांत देणें । साहित्य न घडे ।।५।।

ईश्वररूप अंतरात्मा सहजच चंचळ असतो. दोरी तशी नसते. म्हणून हाही दृष्टान्त योग्य नाही. ॥५॥

नाना वल्लींत जळांश । उसांमध्ये दाटला रस । परी तो रस आणी वाकस । येक नव्हे ।।६।।

अनेक वेली व ऊस यांमध्ये त्यांचा त्यांचा रस भरलेला असतो. पण रस व साल एकच नसतात. ॥६॥

देही आत्मा देह अनात्मा । त्याहून पर तो परमात्मा । निरंजनास उपमा । असेचिना ।।७।।

अचेतन पिंडरूप शरीरात चेतन आत्मा असतो. ब्रह्मांडरूप अचेतन शरीरात चेतन ईश्वर असतो. पिंड ब्रह्मांड निरपेक्ष निर्विकार परमात्म्याला कशाचीही उपमा देता येत नाही. ॥७॥

रायापासून रंकवरी । अवघ्या मनुष्यांचियां हारी । सगट समान सरी । कैसी करावी ।।८।।

सम्राटापासून कफल्लकापर्यंत असलेल्या सर्व श्रेणींत माणसेच असतात. पण ती सर्व सारखीच कशी म्हणावीत? ॥८॥

देव दानव मानव । नीच योनी हीन जीव । पापी सुकृति अभिप्राव । उदंड आहे ।।९।।

देव, दानव, माणूस, सर्पादी खालच्या योनीतील जीव, पापी, पुण्यवंत इ. प्रकारचे अनेक भेद सांगता येतील. ॥९॥

येकांशे जग चाले । परी सामर्थ्य वेगळालें । येकासंगें मुक्त केलें । येकासंगें रवरव ।।१०।।

परमेश्वराच्या एका अंशावर हे जग चालते. पण त्या परमेश्वराचे अंश असलेल्यांची योग्यता मात्र वेगळी वेगळी आहे. एक जीव त्याच परमेश्वराच्या संगतीत मुक्त होतो तर दुसरा रौरव नरकात खितपत पडतो. ॥१०॥

साकर माती पृथ्वी होये । परी ते माती खातां न ये । गरळ आप नव्हे काये । परी तें खोटें ।।११।।

साखर व माती ही पृथ्वीची रूपे असली तरी माती खाता येत नाही. विष हे सुद्धा पाणीच नसते काय? पण ते

घातक आहे. ॥११॥

पुण्यात्मा आणी पापात्मा । दोहिंकडे अंतरात्मा । साधु भोंदु सीमा । सांडूंच नये ।।१२।।

पुण्यवंत व पापी यांच्यात ईश्वर तोच आहे. साधू व भोंदू यातही तोच असला तरी त्यांच्यातील मोठा फरक लक्षात घ्यावाच लागतो. ॥१२॥

अंतर येक तों खरें । परी सांगातें घेऊं न येती माहारें । पंडित आणि चाटें पोरें । येक कैसीं ।।१३।।

सर्वांच्या अंत:करणात तोच आत्मा व्यापून असला तरी हलक्या माणसांची संगत करता येत नाही. पंडित व मूर्ख पोरकट सारखेच कसे असतील? ॥१३॥

मनुष्य आणि गधडे । राजहंस आणि कोंबडें । राजे आणि माकडें । एक कैसीं ।।१४।।

माणूस व गाढव, राजहंस व कोंबडा, राजे व माकडे सारखीच कशी म्हणावी? ॥१४॥

भागीरथीचें जळ आप । मोरी संवदणी तेंहि आप । कुश्चिळ उदक अल्प । सेववेना ।।१५।।

गंगेतही पाणीच व सांडपाणीही पाणीच. पण घाण पाण्याने चूळसुद्धा भरवत नाही. ॥१५॥

याकारणें आचारशुद्ध । त्याउपरी विचारशुद्ध । वीतरागी आणि सुबुद्ध । ऐसा पाहिजे ।।१६।।

म्हणून आचरणाने पवित्र, त्याहून महत्त्वाचे म्हणजे विचाराने पवित्र व त्याहून विरक्त व वेदान्तशास्त्रसंपन्न असे असावे. ॥१६॥

शूरांहून मानिलें लंडी । तरी युद्धप्रसंगीं नरकाडी । श्रीमंत सांडून बराडी । सेविता कैसें ।।१७।।

शूरापेक्षा भित्र्याला जर मान दिला तर युद्धाच्या प्रसंगी पराभवाची नामुष्की येते. श्रीमंताऐवजी दारिद्र्याकडे नोकरी केली तर काय होईल? ॥१७॥

येका उदकें सकळ जालें । परी पाहोन पाहिजे सेविलें । सगट अवघेंच घेतलें । तरी तें मूर्खपण ।।१८।।

उसाचा रस, विष, नत्राम्ल इ. जलमय असले तरी कोणत्याही कामाला त्यातील काहीही वापरले तर मूर्खपणा पदरी येतो. ॥१८॥

जीवनाचेंच जालें अन्न । अन्नाचें जालें वमन । परी वमनाचें भोजन । करितां न ये ।।१९।।

अन्न हे पाण्यापासून होते व ओकारीतही तेच असले तरी ते अन्न खाता येत नाही. ॥१९॥

तैसें निंद्य सोडून द्यावें । वंद्य ते हृदईं धरावें । सत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ।।२०।।

म्हणून जे निंदनीय असते त्याचा त्याग करावा व जे वंदनीय म्हणजे कल्याणकारक असते ते स्वीकारावे व या जगात उदंड कीर्ती मिळवावी. ॥२०॥

उत्तमांसि उत्तम माने । कनिष्ठांस तें न माने । म्हणौन करंटे देवानें । करून ठेवले ।।२१।।

जो उत्तम पुरुष असतो त्याला उत्तमाची ओढ असते. अधमांना ते आवडत नाही व म्हणूनच देव त्यांना करंटे ठेवतो. (करंटपणा देवाकडून येत नाही.) ॥२१॥

सांडा अवघें करंटपण । धरावें उत्तम लक्षण । हरिकथा पुराण श्रवण । नीति न्याये ।।२२।।

सर्व प्रकारचा करंटेपणा सोडावा, उत्तम लक्षणे हळूहळू बाणवून घ्यावीत. नीती व न्यायाने वागत हरिकथा व पुराणे यांचे श्रवण करावे. ॥२२॥

वर्तायाचा विवेक । राजी राखणें सकळ लोक । हळुहळु पुण्यश्लोक । करीत जावे ।।२३।।

सर्वांची मने सांभाळणे हेच जीवनातील विवेकाचे लक्षण आहे. त्या सर्वांची हळूहळू पुण्याचरणाकडे प्रवृत्ती तयार करावी. ॥२३॥

मुलाचे चालीने चालावें। मुलाच्या मनोगते बोलावें। तैसें जनास सिकवावें। हळुहळु।।२४।।

ज्याप्रमाणे घरातील लहान मुलांना चालणे शिकविण्यासाठी त्यांच्याबरोबर चालावे लागते व त्यांची मने ओळखून बोलावे लागते, त्याप्रमाणे समाजातील लोकांना बेताबेताने त्यांच्या कलाने शिकवावे. ॥२४॥

मुख्य मनोगत राखणें। हेंचि चातुर्याची लक्षणें। चतुर तो चतुरांग जाणे। इतर तीं वेडीं।।२५।।

बहुतांची अंतरे राखणें यातच खरे चातुर्य सामावलेले आहे. चतुरालाच चातुर्याची सर्व अंगे ठाऊक असतात. इतर माणसे अर्धवटच असतात. ॥२५॥

वेड्यास वेडें म्हणों नये। वर्म कदापि बोलों नये। तरीच घडे दिग्विजये। निस्पृहासी।।२६।।

अर्धवटालासुद्धा तसे म्हणून त्याचे मन दुखवू नये. कोणाचे वर्म काढणे टाळावे. नि:स्पृहालासुद्धा त्याच्या कार्यात सर्वत्र यश हवे असेल तर त्याने हा नियम कटाक्षाने सांभाळला पाहिजे. ॥२६॥

उदंड स्थळी उदंड प्रसंग। जाणोनि करणें येथासांग। प्राणिमात्राचा अंतरंग। होऊन जावें।।२७।।

समाजप्रबोधन करताना अनेक ठिकाणी नवेनवे प्रसंग उभे राहतात. ते ओळखून ते यशस्वीपणे निभावून न्यावे. सर्व लोकांचे अंतरंग जाणून तसे वागावे व बोलावे. ॥२७॥

मनोगत राखोन जातां। परस्परें होये अवस्ता। मनोगत तोडितां वेवस्ता। बरी नाहीं।।२८।।

लोकांचे अंतरंग सांभाळले तर मुद्दाम काही वेगळे न करता प्रबोधनकाराविषयी ओढ वाटू लागते. पण तसे जमले नाही, तर प्रबोधनाचे कार्य बिघडते. ॥२८॥

याकारणें मनोगत। राखेल तो मोठा महंत। मनोगत राखतां समस्त। वोढोन येती।।२९।।

म्हणून जो लोकांचे मनोगत ओळखून व त्यांना न दुखविता वागतो, बोलतो, तोच श्रेष्ठ महंत होय. अशा महंताकडे सर्व लोक आकृष्ट होतात. ॥२९॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'शिकवणनिरूपणनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'शिकवणनिरूपण' नावाचा दहावा समास समाप्त
—दशक तेरावा समाप्त—

दशक चौदावा : अखंडध्याननाम

समास पहिला : निःस्पृहलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

ऐका निस्पृहाची सिकवण । युक्ति बुद्धि शाहाणपण । जेणें राहें समाधान । निरंतर ।।१।।

आता निःस्पृहांसाठी असलेली शिकवण ऐका. निःस्पृहाजवळ युक्ती, धारदार बुद्धी व व्यावहारिक शहाणपणा असणे आवश्यक आहे. या गुणसंपदेमुळे ज्या समाजात तो कार्य करतो त्या समाजात सतत समाधान टिकून राहते. संघटना मोडत नाही. ॥१॥

सोपा मंत्र परी नेमस्त । साधें वोषध गुणवंत । साधें बोलणें सप्रचीत । तैसें माझें ।।२।।

एखादा मंत्र म्हणावयाला सोपा पण परिणामकारक असावा, औषध मिळवायला व घ्यावयाला सोपे असून गुणकारी असावे त्याप्रमाणे माझे सरळ साधे बोलणे अनुभवाचे आहे. ॥२॥

तत्काळचि अवगुण जाती । उत्तम गुणाची होये प्राप्ती । शब्दवोषध तीव्र श्रोतीं । साक्षपें सेवावें ।।३।।

उपदेशरूप शब्दांचे औषध अत्यंत परिणामकारक असून ते घेतले असता अवगुणांचा त्याग करता येऊन सद्‌गुण अंगी बाणतात. म्हणून ते औषध नियमाने घ्यावे. ॥३॥

निस्पृहता धरूं नये । धरिली तरी सोडूं नये । सोडिली तरी हिंडों नये । वोळखीमधें ।।४।।

निःस्पृहपणाची महंती करता येईल अशी खात्री नसेल तर महंती स्वीकारू नये. एकदा स्वीकारली तर ती निग्रहाने सांभाळावी. त्यातूनही निःस्पृहता सुटलीच तर ज्यांच्यात कार्य केलेले असते त्यांचेपासून दूर रहावे. व्यक्तीची विश्वासार्हता संपली तरी देवकार्याची संपू देऊ नये. ॥४॥

कांता दृष्टी राखों नये । मनास गोडी चाखऊं नये । धारिष्ट चळतां दाखऊं नये । मुख आपुलें ।।५।।

स्त्रीकडे डोळे भरून पाहण्याची अंतःकरणाला चटक लावू नये. त्यातून मन आवरले नाही, तर कार्य सोडून दूर निघून जावे. एकाच्या दुबळेपणासाठी कार्यनाश होऊ नये. ॥५॥

येके स्थळीं राहों नये । कानकोंडें साहों नये । द्रव्य दारा पाहों नये । आळकेपणें ।।६।।

समाजात कार्य करताना एकाच ठिकाणी फार राहू नये. कोणाच्या उपकारांचे ओझे अंगावर घेऊ नये. स्त्री व वैभव यांचेकडे आशाळभूतपणे पाहू नये. त्याने वैराग्य नष्ट होते. कार्य बिघडते. ॥६॥

आचारभ्रष्ट होऊं नये । दिल्यां द्रव्य घेऊं नये । उणा शब्द येऊं नये । आपणावरी ।।७।।

सदाचार कधी सोडू नये. घर, जमीन, पैसे इ. कोणी देऊ केले तरी ते स्वीकारू नये. आपल्यावर दोष येईल असे काही करू नये. आपल्याला नावे ठेवण्यास कोणाला संधी मिळू देऊ नये. ॥७॥

भिक्षेविषीं लाजों नये । बहुत भिक्षा घेऊं नये । पुसतांहि देऊं नये । वोळखी आपली ।।८।।

समाजाला वाहून घेतलेल्या विरक्ताने भिक्षा मागण्यास संकोच करण्याचे काहीच कारण नाही. मात्र दोन वेळा पुरेल त्यापेक्षा जास्त भिक्षा मागू नये. आपले गांव, नातलग इ. व्यक्तिगत माहिती कोणी खोदून विचारली तरी सांगू नये. ॥८॥

धड मळिण नेसों नये । गोड अन्न खाऊं नये । दुराग्रह करूं नये । प्रसंगें वर्तावें ।।९।।

अंगावरील वस्त्र मळके नसावे. मिष्टान्न भोजन करू नये. त्याची चटक लागते. कोणत्याही बाबतीत दुराग्रही असू नये. प्रसंग ओळखून त्यानुसार बोलावे, वागावे. ॥९॥

भोगीं मन असो नये । देह दु:खें त्रासों नये । पुढें आशा धरूं नये । जीवित्वाची ।।१०।।

पंचविषयांच्या भोगांचे चिंतन नसावे. कार्य करताना देहाला कष्ट झाले तरी त्याने त्रासून जाऊ नये. नि:स्पृहपणे महंती करीत असता आपण जगू किंवा मरू हा विचारही मनात आणू नये. ॥१०॥

विरक्ती गळों देऊं नये । धारिष्ट चळों देऊ नये । ज्ञान मळिण होऊं नये । विवेकबळें ।।११।।

आपल्या वैराग्याचे बाबतीत ढिलाई असू नये. देह, परिस्थिती, मन इ. प्रतिकूल असली तरी, धैर्य न सोडता सतत आत्मानात्मादि विवेकांच्या अभ्यासाने परोक्ष व अपरोक्ष ज्ञान सांभाळून असावे. ॥११॥

करुणाकीर्तन सोडूं नये । अंतर्ध्यान मोडू नये । प्रेमतंतु तोडूं नये । सगुणमूर्तीचा ।।१२।।

करुणरसाच्या परिपोषाचे कीर्तन करीत रहावे. सोऽहं सारखे अंतरंग ध्यान सोडू नये. सगुण श्रीरामाच्या प्रेमाचा तंतू निर्गुणाच्या भरात सुटू देऊ नये. ॥१२॥

पोटीं चिंता धरूं नये । कष्टें खेद मानूं नये । समइं धीर सांडूं नये । कांही केल्यां ।।१३।।

अंत:करण सतत चिंतामुक्त ठेवून कार्य करताना होणाऱ्या कष्टाने त्रासून जाऊ नये. प्रतिकूल प्रसंगी धैर्य मुळीच सोडू नये. वाटेल ते झाले तरी धैर्याने प्रसंगाला सामोरे जावे. ॥१३॥

अपमानितां सिणों नये । निखंदितां कष्टों नये । धि:कारिता झुरों नये । कांहीं केल्यां ।।१४।।

अपमानाने नाउमेद होऊ नये. निंदेने खचून जाऊ नये. कोणी धिक्कार केला तरी तो जराही मनाला लावून घेऊ नये. समाजात देवकार्य नि:स्पृहपणे करतानासुद्धा विरोध होणार नाही असे नाही. तीनही गुणांच्या माणसांशी संबंध येणे अपरिहार्य आहे. ईर्षा, स्पर्धा, मत्सर, हेवेदावे, डाव, प्रतिडाव, निंदा, द्वेष, पक्षपात, इ. सर्वांचा प्रभाव कार्यावर पडतो हे गृहीत धरूनच समाजात उतरावे. ॥१४॥

लोकलाज धरूं नये । लाजवितां लाजों नये । खिजवितां खिजों नये । विरक्त पुरुषें ।।१५।।

लोक काय म्हणतील, लोकांत कसे दिसेल इ. प्रकारचा संकोच किंवा लाज धरू नये. कोणी काही म्हणाले तरी लाजू नये. जो विरक्त असतो त्याने कोणी खिजविले, उपरोधिकपणे बोलले, नावे ठेवली, हेटाळणा केली तरी खट्टू होऊ नये. मात्र त्याने पुढील पथ्ये सांभाळावी. ॥१५॥

शुद्धमार्ग सोडूं नये । दुर्जनासी तंडों नये । समंध पडों देऊं नये । चांडाळासी ।।१६।।

न्याय, नीती, धर्माचा संतप्रणीत मार्ग सोडू नये. दुष्ट व दुर्जनाशी वाद घालण्याचे टाळावे. चांडाळ प्रवृत्तीच्या लोकांपासून दूर रहावे. ॥१६॥

तपीळपण धरूं नये । भांडवितां भांडों नये । उडवितां उडऊं नये । निजस्थिती आपुली ।।१७।।

क्रोध येऊ देऊ नये. कोणी भांडायला उठले तरी भांडू नये. स्वत:च्या मनाचा समतोलपणा कोणी बिघडविण्यासारखे वागले तरी तो सांभाळावा. ॥१७॥

हांसवितां हासों नये । बोलवितां बोलों नये । चालवितां चालों नये । क्षणक्ष्णा ।।१८।।

कोणाच्या उथळ किंवा पाचकळ विनोदाने हसू नये. बडबड करणाऱ्याने बोलण्यास प्रवृत्त केले तरी उगीच बोलू नये. कोण जिकडे नेईल तिकडे जाऊन क्षणोक्षणी आपला कार्यक्रम बदलू नये. ॥१८॥

येक वेष धरूं नये । येक साज करूं नये । येकदेसी होऊ नये । भ्रमण करावें ।।१९।।

कोणताही विशिष्ट पोषाख नसावा. माळा, गंध, खडावा इत्यादींमध्ये तोचतोपणा नसावा. एखाद्या लहान भागात स्वत:ला कोंडून घेऊ नये. दूरदूर भ्रमण करावे. ॥१९॥

सलगी पडों देऊं नये । प्रतिग्रह घेऊं नये । सभेमध्यें बैसों नये । सर्वकाळ ।।२०।।

कोणाशी फार जवळिकीचे संबंध असू नयेत. दान घेऊ नये. सतत या ना त्या मंडळींच्या बैठकीत बसू नये. (चिंतन, साधन, लेखन, इ.साठी वेळ असावा.) ॥२०॥

नेम आंगी लाऊं नये । भरवसा कोणास देऊं नये । अंगीकार करूं नये । नेमस्तपणाचा ।।२१।।

एखाद्या नियमाचे कडक बंधन स्वत:वर घालू नये. कोणाला कोणतेही आश्वासन देऊ नये किंवा एकाला दुसऱ्याविषयी भरवसा सांगू नये. 'मी काटेकोर नियम पाळतो' अशी स्वत:ची प्रतिमा तयार करू नये. (प्रसंगी नियम मोडावे लागले तर विश्वासार्हतेला तडा जातो.) ॥२१॥

नित्यनेम सांडूं नये । अभ्यास बुडों देऊं नये । परतंत्र होऊं नये । कांहीं केल्या ।।२२।।

नाम, जप, ध्यान, स्वाध्यायादी नित्यनेम सांभाळावेत. प्रवचन पाठादी अभ्यास चुकवू नये. आपल्या चरितार्थासाठी कोणत्याही परिस्थितीत कोणी एक व्यक्ती किंवा कुटुंबावर अवलंबून राहू नये. किंवा त्यांच्या आश्रयाने राहू नये. ॥२२॥

स्वतंत्रता मोडूं नये । निरापेक्षा तोडूं नये । परापेक्षा होऊं नये । क्षणक्ष्णा ।।२३।।

स्वत:चे स्वातंत्र्य सांभाळावे. निरपेक्षतेच्या बाबतीत तडजोड करू नये. सतत कोणीतरी मदत करील अशी अपेक्षा ठेवू नये. ॥२३॥

वैभव दृष्टी पाहों नये । उपाधीसुखें राहों नये । येकांत मोडूं देऊं नये । स्वरूपस्थितीचा ।।२४।।

कोणाचेही वैभव डोळे भरून पाहून भारून जाऊ नये. कार्याच्या उपाधीमध्ये मिळणाऱ्या सुखात रेंगाळू नये. (प्रामाणिक कार्यकर्त्याला आदरसत्कार, भोजन, वस्त्रादी सुखे समाजाकडून मिळतात. उपाधी म्हणजे कार्य.) आत्मानुभवातील अस्सल एकांत अनुभवून तो उपाधीच्या नादात गमावून बसू नये. ॥२४॥

अनर्गळता करूं नये । लोकलाज धरूं नये । कोठेंतरी होऊं नये । आसक्त कदां ।।२५।।

अंत:करण उथळ होऊ देऊ नये. लोकांची भीड धरून कार्याची हानी करू नये. कोणत्याही व्यक्ती, स्थळ, संस्था, कार्यक्षेत्र इत्यादीत आसक्त होऊ नये. गुंतून पडू नये. ॥२५॥

परंपरा तोडूं नये । उपाधी मोडूं देऊं नये । ज्ञानमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ।।२६।।

आपल्या संप्रदायाची परंपरा नीट चालवावी. देवकार्याची उपाधी मोडू देऊ नये. (देवकार्य-देवाच्या आज्ञेनुसार देवाच्या प्राप्तीसाठी व समाजहितासाठी अपेक्षित कार्य.) आत्मज्ञानासाठी अभिप्रेत असलेला ज्ञानमार्ग सोडू नये. ॥२६॥

कर्ममार्ग सांडूं नये । वैराग्य मोडूं देऊं नये । साधन भजन खंडूं नये । कदाकाळीं ।।२७।।

चित्तशुद्धीसाठी वेदप्रणीत निष्काम कर्मे करीत रहावीत. ज्ञान स्थिर होण्यासाठी वैराग्य सांभाळावे. नामसाधनादी भजनमार्ग चित्तशांतीसाठी सतत चालू ठेवावा. (एकाही मार्गाची परंपरा मोडू नये) ॥२७॥

अतिवाद करूं नये । अनित्य पोटीं धरूं नये । रागें भरीं भरों नये । भलतीकडे ।।२८।।

कोणत्याही कारणाने कोणाशीही वादाचा अतिरेक करून संबंध बिघडू देऊ नयेत. अनित्य पदार्थांची आसक्ती धरू नये. संतापाच्या भरात भलतीकडे भरकटू नये. संताप, व्यक्ती किंवा कार्य, यांचेवर काढू नये. ॥२८॥

न मनी त्यास सांगों नये । कंटाळवाणें बोलों नये । बहुसाल असों नये । येकें स्थळीं ।।२९।।

आपले बोलणे ज्याला आवडत नाही किंवा पटत नाही त्याला ते बळजबरीने सांगू नये. इतरांना कंटाळा येण्यासारखे किंवा येण्याइतके बोलू नये. एकाच भागात किंवा गावात फार काळ थांबू नये. ॥२९॥

कांहीं उपाधी करूं नये । केली तरी धरूं नये । धरिली तरी सांपडों नये । उपाधीमध्यें ।।३०।।

संस्थेसारखी उपाधी स्वत: करू नये. केली तरी तिला चिकटून बसू नये व त्यात अडकून पडू नये. ॥३०॥

थोरपणें असों नये । महत्त्व धरून बैसों नये । कांहीं मान इछूं नये । कोठेंतरी ।।३१।।

'मी मोठा' अशी स्वत:विषयी कल्पना करून त्या कल्पनेत समाजामध्ये वावरू नये. मानसन्मान किंवा पुरस्कारादी मिळण्याची अपेक्षा धरून बसू नये. ॥३१॥

साधेपण सोडूं नये । सानेपण मोडूं नये । बळात्कारें जोडूं नये । अभिमान आंगीं ।।३२।।

पोषाख व बोलण्यावागण्यात साधेपणा असावा. भपका किंवा अहंमन्यता नसावी. आपण सर्व दृष्टीने लहान आहोत अशी भूमिका असावी. (जै जगा धाकुटे होइजे । तै जवळीक माझी । ज्ञाने.) बळेबळेच ताठा धरून बसू नये. ॥३२॥

अधिकारेवीण सांगों नये । दाटून उपदेश देऊं नये । कानकोंडा करूं नये । परमार्थ कदा ।।३३।।

आपण अधिकारसंपन्न असल्याशिवाय किंवा दुसऱ्यांना तो मान्य झाल्याशिवाय उपदेश करू नये. कोणालाही बळजबरीने अनुग्रह देऊ नये. परमार्थ बदनाम करू नये. ॥३३॥

कठिण वैराग्य सोडूं नये । कठिण अभ्यास सांडूं नये । कठिणता धरूं नये । कोणेकेविशइं ।।३४।।

वैराग्य कठीण असले तरी सांभाळावे, अभ्यास कठीण असला तरी सोडू नये. पण कोणा व्यक्तीच्या बाबतीत मात्र कठोर होऊ नये. किंवा कोणत्याही विषयी टोकाची भूमिका धरून बसू नये. ॥३४॥

कठिण शब्द बोलों नये । कठिण आज्ञा करूं नये । कठिण धीरत्व सोडूं नये । कांहीं केल्यां ।।३५।।

कोणाला कठोर शब्दाने बोलू नये. पाळणे अवघड असलेली आज्ञा करू नये. धैर्य धरणे कठीण असले तरी ते सोडू नये. ॥३५॥

आपण आसक्त होऊं नये । केल्यावीण सांगों नये । बहुसाल मागों नये । शिष्यवर्गांसी ।।३६।।

स्वत: कोठेही आसक्त होऊन राहू नये. स्वत: केल्याशिवाय दुसऱ्यांना ते करण्यास सांगू नये. शिष्यांकडे सतत ह्या ना त्या कारणाने द्रव्यादी मागत राहू नये. ॥३६॥

उद्धट शब्द बोलों नये । इंद्रियेंस्मरण करूं नये । शाक्तमार्गें भरों नये । मुक्तपणें भरीं ।।३७।।

कोणालाही उद्धटपणाने व वर्मी झोंबेल असे बोलू नये. इंद्रियांचे लाड पुरवण्याचा विचार झटकून टाकावा. 'मी मुक्त आहे' ह्या कल्पनेने शाक्तपंथाचा स्वैर आचार स्वीकारू नये. ॥३७॥

नीच कृतीं लाजों नये । वैभव होतां माजों नये । क्रोधें भरीं भरों नये । जाणपणें ।।३८।।

झाडझूड करण्यासारखी हलकी कामे करण्यास लाजू नये. मोठी शिष्यसंख्या व त्यामुळे प्राप्त झालेल्या वैभवाने उन्मत्त होऊ नये. 'मी फार ज्ञानी आहे' ह्या कल्पनेने अज्ञानी जनांवर संतप्त होऊ नये. ॥३८॥

थोरपणें चुकों नये । न्याये नीति सांडूं नये । अप्रमाण वर्तों नये । कांहीं केल्यां ।।३९।।

'मी फार मोठा आहे' ह्या विचाराने वाटेल तसे वागू नये. न्याय, नीती व शास्त्र ह्यांचा अव्हेर करू नये. ॥३९॥

कळल्यावीण बोलों नये । अनुमानें निश्चये करूं नये । सांगतां दु:ख धरूं नये । मूर्खपणें ।।४०।।

आपल्याला ज्या विषयाचे आकलन झालेले नाही त्याचे निरूपण करू नये. केवळ तर्क किंवा अंदाजाने कोणताही निर्णय करू नये. कोणी चूक लक्षात आणून दिल्यावर मूर्खपणाने संतापू नये. ॥४०॥

सावधपण सोडूं नये । व्यापकपण सांडूं नये । कदा सुख मानूं नये । निसुगपणाचें ।।४१।।

सावधपणा व व्यापकपणा कधीच सोडू नये. लाज सोडल्यावर सर्व सुखच सुख असते! नि:स्पृहाने हे सुख भोगू नये!! ॥४१॥

विकल्प पोटीं धरूं नये । स्वार्थआज्ञा करूं नये । केली तरी टाकूं नये । आपणास पुढें ।।४२।।

सदासर्वदा संशयग्रस्त असू नये. व्यक्तिगत स्वार्थासाठी शिष्यांना आज्ञा करू नये. कारण पुढे तशी अपेक्षा कोणी

आपणांकडून केली तर ती मानावी लागेल. (पुढे आपणांस कोणी स्वार्थ आज्ञा केली तरी ती टाकू नये.) ॥४२॥

प्रसंगेंवीण बोलों नये । अन्वयेंवीण गाऊं नये । विचारेंवीण जाऊं नये । अविचारपंथें ।।४३।।

प्रसंगाला उचित असेल तेच बोलावे. ताल व सूर सांभाळून गावे. विचार न करता अविचारी मार्गाने जाऊ नये. प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करावी. ॥४३॥

परोपकार सांडूं नये । परपीडा करूं नये । विकल्प पडों देऊं नये । कोणीयेकासी ।।४४।।

सतत दुसऱ्यांना मदत करीत असावे. पण इतरांना त्रास देऊ नये. कोणाच्या मनात स्वत:विषयी संशय निर्माण होईल असे वागू नये. ॥४४॥

नेणपण सोडूं नये । महंतपण सांडूं नये । द्रव्यासाठी हिंडों नये । कीर्तन करीत ।।४५।।

आपण ज्ञानी आहोत, महंत आहोत अशा तोऱ्यात राहू नये. द्रव्यप्राप्तीसाठी गावोगावी कीर्तने करू नयेत. ॥४५॥

संशयात्मक बोलों नये । बहुत निश्चये करूं नये । निर्वाहेंवीण धरूं नये । ग्रंथ हातीं ।।४६।।

दुसऱ्याच्या मनात संशय निर्माण होतील असे बोलू नये. मी हे करीन ते करीन असे ठरवू नये. शास्त्रशुद्ध अभ्यासाने ग्रंथ सांगण्याची क्षमता असल्याशिवाय ग्रंथ सांगण्यास सुरुवात करू नये. ॥४६॥

जाणपणें पुसों नये । अहंभाव दिसों नये । सांगेन ऐसें म्हणों नये । कोणीयेकासी ।।४७।।

परीक्षकाच्या थाटात प्रश्न विचारू नये. कारण त्यातून जो अहंपणा डोकावतो तो अहंपणा असू नये. मी एखादा वेदांतग्रंथ समजावून सांगेन असे कोणाला सांगू नये. ('आपण त्याचा अभ्यास करू या' अशी भाषा असावी.) ॥४७॥

ज्ञानगर्व धरूं नये । सहसा छळणा करूं नये । कोठें वाद घालूं नये । कोणीयेकासीं ।।४८।।

आपल्या शब्दज्ञानाच्या पांडित्याचा गर्व धरू नये. त्या गर्वाच्या भरात कोणाला आडवळणाने कूट प्रश्न विचारून पेचात धरू नये. कोणाशी वाद घालून भरीस पडू नये. ॥४८॥

स्वार्थबुद्धी जडों नये । कारबारीं पडों नये । कार्येकर्ते होऊं नये । राजद्वारीं ।।४९।।

स्वार्थबुद्धीला थारा देऊ नये. संस्था किंवा सत्ता केंद्राच्या कारभारात अडकून पडू नये. सत्ताधीशांचा कार्यकर्ता होऊ नये. त्यांच्या आज्ञेत राहून तालावर नाचू नये. ॥४९॥

कोणास भर्वसा देऊं नये । जड भिक्षा मागों नये । भिक्षेसाठी सांगों नये । परंपरा आपुली ।।५०।।

'मी तुझे हे काम करीन' असे आश्वासन कोणालाही देऊ नये. भांडे, वस्त्र इ. भिक्षा मागू नये. अन्नभिक्षा मागावी. भिक्षेसाठी परमार्थशास्त्र सांगण्याचे मूल्य देऊ नये. ॥५०॥

सोईरिकींत पडों नये । मध्यावर्ति घडों नये । प्रपंचाची जडों नये । उपाधी आंगीं ।।५१।।

विवाह जुळविण्याच्या फंदात पडू नये. प्रापंचिक समस्यात मध्यस्थी करू नये. अशी कोणतीच प्रापंचिक उपाधी मागे लावून घेऊ नये. ॥५१॥

प्रपंचप्रस्तीं जाऊं नये । बाष्कळ अन्न खाऊं नये । पाहुण्यासरिसें घेऊं नये । आमंत्रणें कदां ।।५२।।

नि:स्पृहाने मांडलेला व्याप (प्रपंच) कोणा घुसखोरांच्या हातात जाणार नाही याची काळजी घ्यावी. रस्त्यावर विकले जाणारे अन्न खाऊ नये किंवा बाष्कळ माणसाकडे जेवण घेऊ नये. ज्याला भोजनाचे आमंत्रण आहे त्याच्याबरोबर नंतर आमंत्रण मिळाले तरी भोजनास जाऊ नये. ॥५२॥

श्राध पक्ष सटी सामासें । शांतीं फळशोबन बारसें । भोग राहण बहुवसें । नवस व्रतें उद्यापनें ।।५३।।

श्राद्ध, सटवीची शांती, सहामाही श्राद्ध, वास्तुशांत, गर्भाधान, बारसे, विवाह, राहण, नवस, उद्यापने, इ. कारणांनी कोणाकडे भोजनास जाऊ नये. (या सर्वांत सकामता, रजोगुण, ईषणा, लोकरहाटी इत्यादींचा समावेश

असून वातावरण व मने उथळ असतात.) ।।५३।।

तेथें निस्पृहें जाऊं नये । त्याचें अन्न खाऊं नये । येळिलवाणें करूं नये । आपणासी ।।५४।।

नि:स्पृहाने असे भोजनसमारंभ टाळावेत. भिक्षान्न न घेता त्यांचे अन्न घेऊन स्वत:ला ओशाळवाणे करून घेऊ नये. ।।५४।।

लग्नमुहुर्तीं जाऊं नये । पोटासाठीं गाऊं नये । मोलें कीर्तन करूं नये । कोठेंतरी ।।५५।।

लग्नमुहूर्ताची वेळ टाळून भिक्षेला जावे. पोटासाठी भजने म्हणत फिरू नये व बिदागी ठरवून कीर्तन करू नये. ।।५५।।

आपली भिक्षा सोडूं नये । वारें अन्न खाऊं नये । निस्पृहासि घडों नये । मोलयात्रा ।।५६।।

आपले भिक्षेचे व्रत सोडू नये. गावात वार लावून जेवू नये. नि:स्पृहाने दुबळे, वृद्ध, पांगळे, निराधार इत्यादींना मदत करण्यासाठी त्यांच्याबरोबर त्यांच्या खर्चाने तीर्थयात्रेला जाऊ नये. ।।५६।।

मोलें सुकृत करूं नये । मोलपुजारी होऊं नये । दिल्हा तरी घेऊं नये । इनाम निस्पृहें ।।५७।।

मोबदला घेऊन कोणाचे वतीने अन्नदानासारखे पुण्य करू नये. कोणाच्या घरी वा देवळात पगारी पुजारी होऊ नये. शासन किंवा कोणी दात्याने इनाम जमिनी दिल्या तरी स्वत:साठी त्या घेऊ नयेत. ।।५७।।

कोठे मठ करूं नये । केला तरी तो धरूं नये ।। मठपती होऊन बैसों नये । निस्पृह पुरुषें ।।५८।।

नि:स्पृह पुरुषाने स्वत:चा मठ बांधू नये. बांधलाच तर त्यात मठपती बनून अडकून पडू नये. कार्यासाठी त्याची व्यवस्था लावून देऊन स्वत: मोकळे असावे. ।।५८।।

निस्पृहें अवघेंचि करावें । परी आपण तेथें न संपडावें । परस्परें उभारावें । भक्तिमार्गासी ।।५९।।

नि:स्पृहाने कार्यासाठी आवश्यक ते सर्व करावे, पण त्यात स्वत: गुंतून पडू नये. भक्तिमार्ग भाविक कार्यकर्त्यांमार्फत चालू राहण्याची व फोफावण्याची व्यवस्था लावून द्यावी. ।।५९।।

प्रेत्नेंविण राहों नये । आळस दृष्टी आणूं नये । देह अस्तां पाहों नये । वियोग उपासनेचा ।।६०।।

स्वत: भक्तिमार्गासाठी जराही कंटाळा न करता सतत प्रयत्न करीत असावे आणि जिवंत असेपर्यंत ईश्वरोपासना चुकवू नये. ।।६०।।

उपाधीमध्यें पडों नये । उपाधी आंगीं जडों नये । भजनमार्ग मोडूं नये । निसंगळपणें ।।६१।।

कोणत्याही प्रापंचिक किंवा परमार्थिक उपाधीत पडून त्यात आसक्त होऊन राहू नये. अनासक्ती सांभाळीत भक्तिमार्ग बिघडू देऊ नये. ।।६१।।

बहु उपाधी करूं नये । उपाधीविण कामा नये । सगुणभक्ति सोडूं नये । विभक्ति खोटी ।।६२।।

उपाधींचा फार पसारा मांडू नये हे जरी खरे असले तरी उपाधीवाचून कार्य होत नाही हेही खरे. सगुण भक्ती सोडू नये. सगुणोपासनेच्या निमित्ताने ब्रह्म वस्तूहून वेगळे राहणेही चूक आहे. अद्वैतानुभूती घेणेही आवश्यक आहे. ।।६२।।

बहुसाल धांवों नये । बहुसाल राहों नये । बहुत कष्ट करू नये । असुदें खोटें ।।६३।।

कार्यासाठी फार धावाधाव करू नये व एकेजागी बसूनही राहू नये. तसेच अपरंपार कष्ट करू नयेत व निष्क्रियही असू नये. (व्यवहार, परमार्थ, व लोककार्य यात प्रत्येक गोष्टीला मूल्य असते व त्याची एक मर्यादाही असते हे लक्षात घ्यावे. 'अति सर्वत्र वर्जयेत्' हे ध्यानात ठेवावे.) ।।६३।।

बहुसाल बोलों नये । अबोलणें कामा नये । बहुत अन्न खाऊं नये । उपवास खोटा ।।६४।।

अखंड बडबड करू नये व मौन धरून बसू नये. फार अन्न खाऊ नये. पण खडतर उपासही करू नये. ।।६४।।

बहुसाल निजों नये । बहुत निद्रा मोडूं नये । बहुनेम धरूं नये । बाश्कळ खोटें ।।६५।।

फार झोपणे किंवा फार जागरणे करणे दोन्ही चूकच. नियमांच्या विळख्यात राहू नये व एकही नियम न करणेही चूक आहे. ॥६५॥

बहु जनीं असों नये । बहु आरण्य सेऊं नये । बहु देह पाळूं नये । आत्महत्या खोटी ।।६६।।

सतत लोकांच्या घोळक्यात राहू नये व फार काळ वनातील एकान्तातही असू नये. देहाचे फाजील लाड करू नयेत, पण त्याकडे दुर्लक्ष करून तो मरण्याची वेळही येऊ नये! ॥६६॥

बहु संग धरूं नये । संतसंग सांडूं नये । कर्मठपण कामा नये । अनाचार खोटा ।।६७।।

फार लोकांशी घनिष्ट संबंध जोडू नयेत व संतसंग मात्र कधी सोडू नये. हट्टी कर्मठपणा नसावा पण कर्मकांडाचा त्याग करून आचारहीन होऊ नये. ॥६७॥

बहु लोकिक सांडूं नये । लोकाधेन होऊं नये । बहु प्रीती कामा नये । निष्ठुरता खोटी ।।६८।।

लौकिकाच्या फार भरीस पडू नये कारण त्यातून लोकांवर अवलंबून राहण्याची सवय लागून लोकेषणेचा दोष लागतो. फार प्रेमळपणाने भावनाप्रधान असणे ठीक नाही व कठोरपणाही चांगला नाही. ॥६८॥

बहु संशये धरूं नये । मुक्तमार्ग कामा नये । बहु साधनीं पडों नये । साधनेंवीण खोटें ।।६९।।

तत्त्वज्ञानाविषयी श्रद्धा बाळगावी. सारखे संशय घेऊन तत्त्वज्ञानाला बगल देऊ नये. मोकाटपणे राहू नये. अनेक प्रकारच्या साधना करून सतत साधनामग्न राहू नये पण साधना न करणेही घातकच आहे. ॥६९॥

बहु विषये भोगूं नये । विषयत्याग करितां नये । देहलोभ धरूं नये । बहु त्रास खोटा ।।७०।।

विषयलंपट असू नये. विषयाचा सर्वथा त्याग कधीच व कोणालाच करता येत नाही. देहाची आसक्ती धरू नये. पण तपाच्या नावाने देहाचे हाल करू नयेत. ॥७०॥

वेगळा अनुभव घेऊं नये । अनुभवेंवीण कामा नये । आत्मस्थिती बोलों नये । स्तब्धता खोटी ।।७१।।

वेदान्तशास्त्र, संत, भगवंत व श्रीगुरू ज्याला ब्रह्मानुभव म्हणतात तोच अनुभव घ्यावा. त्याहून वेगळ्या अनुभवाला अनुभव म्हणूच नये. पण अनुभव मात्र घेतलाच पाहिजे. स्वत:ची आत्मस्थिती सांगता येत नसल्याने ती सांगू नये. पण त्या स्थितीत काष्ठवत् पडून रहाणे चूकच आहे. ॥७१॥

मन उरों देऊं नये । मनेंवीण कामा नये । अलक्ष वस्तु लक्षा नये । लक्षेंवीण खोटें ।।७२।।

मनाचे मिथ्यात्व जाणून त्याचा बाध करावा पण मनाशिवाय उपासना, अभ्यास व लोककार्य होत नाही. ब्रह्म हे अलक्ष्य असल्याने ते लक्ष्य होत नाही हे खरे. पण त्याला लक्ष्य करण्याचा प्रयत्न करून त्यांत निवेदन करावे. ॥७२॥

मनबुद्धीअगोचर । बुद्धीवीण अंधकार । जाणीवेचा पडो विसर । नेणीव खोटी ।।७३।।

ब्रह्म हे मनाने व बुद्धीने अनुभवाला येत नाही हे खरे. पण म्हणून बुद्धीच नसेल तर सर्वत्र अज्ञानाचा अंधारच असतो. 'अहं' चा ध्यानात लय व्हावा व विचाराने बाध करावा. पण अज्ञान मात्र घातक आहे. (नेणीव = अज्ञान) ॥७३॥

ज्ञातेपण धरूं नये । ज्ञानेंवीण कामा नये । अतर्क्य वस्तु तर्का न ये । तर्केंवीण खोटें ।।७४।।

'मी ब्रह्मज्ञानी' असे म्हणणे सर्वथा चूक आहे, पण त्याचबरोबर अध्यात्मशास्त्रातील शब्दज्ञानावाचून भागत नाही. ब्रह्म तर्काने कळत नाही, पण श्रुतीला अनुकूल तर्क केल्याशिवाय नि:संदिग्ध बोध होत नाही. ॥७४॥

दृश्यस्मरण कामा नये । विस्मरण पडों नये । कांहीं चर्चा करूं नये । केलीयावीण न चले ।।७५।।

दृश्य जगत् मिथ्या असल्याने त्याचे सततचे चिंतन निरुपयोगी आहे. पण कार्यासाठी त्याचे स्मरण आवश्यक आहे. ते विसरून चालणार नाही. उगीचच चर्चा करू नये पण कारणपरत्वे चर्चा केली पाहिजे. ॥७५॥

जगीं भेद कामा नये । वर्णसंकर करूं नये । आपला धर्म उडऊं नये । अभिमान खोटा ।।७६।।

जगताकडे भेददृष्टीने पाहणे पारमार्थिक सत्तेत चूक आहे. पण व्यावहारिक सत्तेमध्ये वर्णसंकर करू नये. धर्माचा कडवा अभिमान नसावा, पण धर्माचा त्याग करू नये. ।।७६।।

आशाबद्धत बोलों नये । विवेकेंवीण चालों नये । समाधान हालों नये । कांहीं केल्यां ।७७।।

आशाळभूताप्रमाणे प्रत्येक वेळी काही अपेक्षा बोलून दाखवू नये. विवेकाशिवाय पाऊलही पुढे टाकू नये. आपल्या अन्त:करणाचे समाधान कशानेही बिघडू देऊ नये. ।।७७।।

अबद्ध पोथी लेहों नये । पोथीवीण कामा नये । अबद्ध वाचूं नये । वाचिल्यावीण खोटें ।।७८।।

ग्रंथाची प्रत तयार करताना त्यात घोटाळे करू नयेत कारण व्यवस्थित ग्रंथाशिवाय शास्त्राध्ययन होत नाही. तसेच ग्रंथ वाचताना नीट वाचावा कारण वाचल्याशिवाय शास्त्र समजत नाही. ।।७८।।

निस्पृहें वगत्रुत्व सांडूं नये । आशंका घेतां भांडों नये । श्रोतयांचा मानूं नये । वीट कदा ।।७९।।

नि:स्पृह महंताने पाठ, प्रवचन कीर्तन करणे कधी टाळू नये. श्रोत्यांपैकी कोणी शंका घेतल्यास रागावू नये. श्रोत्यांचा कधी त्रास मानू नये. श्रोता हा कार्याचा आधार आहे. ।।७९।।

हे सिकवण धरितां चित्तीं । सकळ सुखें वोळगती । आंगीं बाणे महंती । अकस्मात ।।८०।।

ही शिकवण सतत लक्षात ठेवून अंगी बाणविली तर नि:स्पृहापुढे सर्व सुखे हात जोडून उभी राहतील व एक दिवस त्याला सहजपणे महंती प्राप्त होईल. ।।८०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'नि:स्पृहलक्षणनाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'नि:स्पृहलक्षण' नावाचा पहिला समास समाप्त

दशक चौदावा : अखंडध्याननाम

समास दुसरा : भिक्षानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा । वों भवति या पक्षा । रक्षिलें पाहिजे ।।१।।

ब्रह्मचर्याश्रमात गुरुगृही राहून शिक्षण घेणाऱ्या ब्राह्मणाने किंवा महंताने किंवा विधिवत् संन्यासाश्रम स्वीकारलेल्याने 'ओम् भवति भिक्षां देहि' ('कल्याण असो. भिक्षा द्यावी.') असे म्हणून भिक्षा मागण्याचे व्रत चालविले पाहिजे. त्याने घेतलेल्या दीक्षेचे हे महत्त्वाचे अंग आहे. ॥१॥

भिक्षा मागोन जो जेविला । तो निराहारी बोलिला । प्रतिग्रहावेगळा जाला । भिक्षा मागतां ।।२।।

भिक्षा मागणाऱ्याला प्रापंचिकाप्रमाणे वस्तूंचा व खाद्य पदार्थांचा संग्रह करावा लागत नाही. त्या प्रचंड व्यापातून तो सुटतो. त्यामुळे त्याला दान घ्यावे लागत नाही. भिक्षान्न खाणाऱ्याला निराहार व्रताचे पुण्य मिळते. ॥२॥

संतासंत जे जन । तेथें कोरान्न मागोन करी भोजन । तेणें केलें अमृतप्राशन । प्रतिदिनीं ।।३।।

समाजातील सुष्टदुष्टत्वाचा विचार न करता त्यांच्या घरी जो कोरड्या धान्याची भिक्षा मागून त्याचे जेवण करून जेवतो तो रोज जणू अमृताचेच सेवन करतो. (तयार अन्न न घेता धान्य घ्यावे असा समर्थांचा कल दिसतो. विसाव्या ओवीत म्हटल्याप्रमाणे एक मूठ भिक्षा घ्यावयाची असेल तर ती धान्य रूपाने हवी. 'मुठीत मावण्याएवढी' असा अर्थ घेतला तरच भात, भाजी इ. तयार अन्न घेणे शक्य होईल.) ॥३॥

श्लोक

भिक्षाहारी निराहारी । भिक्षा नैव प्रतिग्रहः । असंतो वापि संतो वा । सोमपानं दिने दिने ।।१।।

श्लोकार्थ– भिक्षेतून मिळालेल्या धान्याचा जो आहार घेतो तो निराहारीच समजावा. भिक्षा घेणे म्हणजे दान घेणे नव्हे. भिक्षा घालणारा सज्जन असो की दुर्जन, त्याने घातलेल्या भिक्षेने सोमपानाप्रमाणे दिवसानुदिवस पुष्टी व उत्साह मिळतो. (सोम = अमृत व एका वेदकालीन वेलीचा उत्साहवर्धक रस.)

ऐसा भिक्षेचा महिमा । भिक्षा माने सर्वोत्तमा । ईश्वराचा अगाध महिमा । तोहि भिक्षा मागे ।।४।।

असे हे भिक्षेचे माहात्म्य असून सर्वज्ञ सर्वशक्तिमान ईश्वररूप भ. शंकरालाही तो मान्य असल्याने ते सुद्धा भिक्षा मागतात! ॥४॥

दत्त गोरक्ष आदिकरुनी । सिद्ध भिक्षा मागती जनीं । निस्पृहता भिक्षेपासुनी । प्रगट होये ।।५।।

श्री. दत्तात्रेय स्वामी व गोरक्षनाथादि महान नाथपंथीय सिद्धही समाजात भिक्षा मागतात. भिक्षा हे नि:स्पृहतेचे खास लक्षण आहे. ॥५॥

वार लाऊन बैसला । तरी तो पराधेन जाला । तैसीच नित्यावळीला । स्वतंत्रता कैंची ।।६।।

जो महंत वार लावून घरी जेवण्यास जातो किंवा ठराविक वारी ठराविक घरी भिक्षा मागतो त्याला त्या त्या वारी त्या त्या घरी जावेच लागल्याने त्याचे स्वातंत्र्य नष्ट होते. ॥६॥

आठां दिवसां धान्य मेळविलें । तरी तें कंटाळवाणें जालें । प्राणी येकायेकीं चेवलें । नित्यनूतनतेपासुनी ।।७।।

एकाच दिवशी आठवड्याचे धान्य भिक्षा मागून आणले तरी ते साठवावे लागते व रोजची भ्रमंती थांबून कंटाळवाणे वाटते. शिवाय रोजच्या रोज नवी घरे, नवी माणसे इ. नवीनतेला मुकावे लागते. ॥७॥

नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटण करावें । तरीच भिक्षा मागतां बरवें । श्लाघ्यवाणें ।।८।।

सतत नव्या नव्या प्रदेशात भ्रमंती केल्यानेच भिक्षेला प्रतिष्ठा लाभून ती मागणे शोभून दिसते. त्याच घरी सतत भिक्षा मागितली तर महंताचे महत्त्व कमी होते. ॥८॥

अखंड भिक्षेचा अभ्यास । तयास वाटेना परदेश । जिकडे तिकडे स्वदेश । भुवनत्रैं ।।९।।

ज्याने भिक्षा मागण्याचे व्रत घेतले आहे तो कोणत्याही प्रदेशात गेला तरी त्याला तो परका भाग वाटत नाही. त्याला त्रिभुवनेही जणू स्वदेशाप्रमाणेच होतात. ॥९॥

भिक्षा मागतां किरकों नये । भिक्षा मागतां लाजों नये । भिक्षा मागतां भागों नये । परिभ्रमण करावें ।।१०।।

भिक्षा मागताना तिरसटपणा नसावा, लाज वाटू नये व अधिक घरे मागण्याची वेळ आली तरी न दमता सतत परिभ्रमण करीत रहावे. ॥१०॥

भिक्षा आणि चमत्कार । च्चाकाटती लहानथोर । कीर्ति वर्णी निरंतर । भगवंताची ।।११।।

अधिकारसंपन्न विद्वान जेव्हा भिक्षा मागतो तेव्हा समाजाला तोच एक चमत्कार वाटून त्याचे समाजातील सर्व स्तरातील लोकांना मोठे नवल वाटते. त्याने केलेले भगवन्ताचे गुणानुवाद सर्वांना आवडतात. ॥११॥

भिक्षा म्हणिजे कामधेनु । सदा फळ नव्हे सामान्यु । भिक्षेस करी जो अमान्यु । तो करंटा जोगी ।।१२।।

भिक्षारूप कामधेनू सतत असामान्य फळे देते. ज्या गोसाव्याला भिक्षा मागणे आवडत नाही तो करंटा होय. ॥१२॥

भिक्षेनें वोळखी होती । भिक्षेनें भरम चुकती । सामान्य भिक्षा मान्य करिती । सकळ प्राणी ।।१३।।

भिक्षेच्या निमित्ताने नव्या नव्या ओळखी होऊन लोकांची महंताशी जवळीक साधल्यामुळे त्यांच्यात संवाद साधला जाऊन लोकांच्या कित्येक शंका-कुशंका दूर होतात. त्याने मागितलेली थोडी व साधी भिक्षा सर्वांनाच परवडते. ॥१३॥

भिक्षा म्हणजे निर्भये स्थिती । भिक्षेनें प्रगटे महंती । स्वतंत्रता ईश्वरप्राप्ती । भिक्षागुणें ।।१४।।

समाज, चोर व असुरक्षिततेची भावना ह्या भीतींचा भिक्षेकऱ्याला स्पर्शही होत नाही. (तो अजातशत्रू होतो.) महंताला अनिर्वाय असलेली नि:स्पृहता भिक्षेने समाजाला कळते व महंत लोकमान्य होतो. भिक्षेने महंताची स्वतंत्रता सांभाळली जाऊन जनता जनार्दन प्रसन्न होतो. (ईश्वर समाजाच्या माध्यमातून प्राप्त होतो.) ॥१४॥

भिक्षेस नाहीं आडथाळा । भिक्षाहारी तो मोकळा । भिक्षेकरितां सार्थक वेळा । काळ जातो ।।१५।।

भिक्षा मागणाऱ्याला बाजारहाट, स्वयंपाक, संग्रह इत्यादींचा अडथळा होत नाही. (समर्थांच्या काळी भिक्षा मागणाऱ्याला कोणाचा विरोध नव्हता.) भिक्षेकरी जास्तीतजास्त वेळ कार्यासाठी मोकळा राहतो व त्याच्या वेळाचे सार्थक होते. ॥१५॥

भिक्षा म्हणिजे अमरवल्ली । जिकडे तिकडे लगडली । अवकाळीं फलदायेनी जाली । निर्ल्लजासी ।।१६।।

भिक्षा ही कधी न वाळणारी व सतत फळे देणारी जणू अमृताची वेल असून ती सर्व प्रदेशात फळे लगडलेलीच असते. भीड न धरणाऱ्या महंताला ती दुष्काळात सुद्धा फळे देते! तो उपाशी रहात नाही. ॥१६॥

पृथ्वीमधें देश नाना । फिरतां उपवासी मरेना । कोणे येके ठाईं जना । जड नव्हे ।।१७।।

पृथ्वीच्या पाठीवर कित्येक प्रदेश आहेत. भ्रमन्ती करणारा महन्त समृद्ध प्रदेशात भिक्षा मागून उपाशीपोटी मरत नाही. चार-दोन महंतांचे त्या प्रदेशाला ओझे होत नाही. ॥१७॥

गोरज्य वाणिज्य कृषी । त्याहून प्रतिष्ठा भिक्षेसी । विसंभों नये झोळीसी । कदाकाळीं ।।१८।।

दूध, व्यापार व शेती ह्या व्यवसायांपेक्षा महंतांसाठी भिक्षेची प्रतिष्ठा मोठी आहे. म्हणून झोळी म्हणजे भिक्षाव्रत कधी सोडू नये. ।।१८।।

भिक्षेऐसें नाहीं वैराग्य । वैराग्यापरतें नाहीं भाग्य । वैराग्य नस्तां अभाग्य । येकदेसी ।।१९।।

भिक्षा ही वैराग्याची परिसीमा आहे व वैराग्यासारखे दुसरे भाग्य नाही. वैराग्य नसलेला अभागी देहाएवढा संकुचित होऊन राहतो. ।।१९।।

कांहीं भिक्षा आहे म्हणावें । अल्पसंतोषी असावें । बहुत आणितां घ्यावें । मुष्टी येक ।।२०।।

दारासमोर उभे राहून 'काही भिक्षा मिळेल का?' असे म्हणावे. मिळेल त्यावर संतुष्ट रहावे. कोणी फार भिक्षा आणली तर त्यातील मूठभरच घ्यावी. ।।२०।।

सुखरूप भिक्षा मागणें । ऐंसी निस्पृहतेचीं लक्षणें । मृद वागविळास करणें । परम सौख्यकारी ।।२१।।

अशी ही सुखरूप भिक्षा मागावी. भिक्षा हे नि:स्पृहत्वाचे लक्षण असून त्या निस्पृहाने मृदु व गोड वचनाने सर्वांना संतुष्ट करावे. (नि:स्पृहतेमुळे अहंकारी व तिरसट होऊ नये.) ।।२१।।

ऐसी भिक्षेची स्थिती । अल्प बोलिलें येथामतीं । भिक्षा वांचवी विपत्ती । होणार काळीं ।।२२।।

असे हे भिक्षेचे माहात्म्य मला समजले तेवढे सांगितले. भिक्षेच्या निमित्ताने होणाऱ्या भ्रमन्तीमुळे व्यापक समाजाची मन:स्थिती, राजकारण, समाजकारण यांचा अंदाज येऊन संभाव्य संकटांवर मात करता येते.

(काळी होणार = कालांतराने होणाऱ्या. येथे समर्थांनी भिक्षा मागणाऱ्या महंताच्या फार मोठ्या जबाबदारीचे दिग्दर्शन केले आहे.) ।।२२।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'भिक्षानिरूपणनाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'भिक्षानिरूपण' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक चौदावा : अखंडध्याननाम

समास तिसरा : कवित्वकळानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

कवित्व शब्दसुमनमाळा । अर्थ परिमळ आगळा । तेणें संतषट्पदकुळा । आनंद होये ।।१।।

कविता म्हणजे सुंदर शब्दरूप फुलांची माळ असून तिला असणाऱ्या सरलार्थाच्या सुगंधामुळे संतरूप भ्रमरांच्या समुदायाला आनंद होतो. ॥१॥

ऐसी माळा अंतःकरणीं । गुंफून पूजा रामचरणीं ।वोंकारतंत अखंडपणीं । खंडूं च नये ।।२।।

अशी माळ अन्त:करणात गुंफून तिने रामाच्या चरणांची पूजा करावी. शब्दातील अक्षरांत स्वरव्यंजन रूपाने असलेला ओंकार अखंड काव्यरचनेच्या निमित्ताने स्फुरत राहावा. सतत काव्य करावे. ॥२॥

परोपकाराकारणें । कवित्व अगत्य करणें । तया कवित्वाचीं लक्षणें । बोलिजेती ।।३।।

सामाजिक प्रबोधनासाठी काव्यरचना अवश्य करावी. अशा काव्याची लक्षणे आता सांगू. ॥३॥

जेणें घडे भगवभद्क्ती । जेणें घडे विरक्ती । ऐसिया कवित्वाची युक्ती । आधीं वाढवावी ।।४।।

कवित्वामध्ये अशी खुबी असावी की त्याने वैराग्य व भगवंताच्या भक्तीची आवड निर्माण व्हावी. ॥४॥

क्रियेवीण शब्दज्ञान । तया न मनिती सज्जन । म्हणौनी देव प्रसन्न । अनुतापें करावा ।।५।।

स्वत: विरक्त व भगवद्भक्त झाल्याशिवाय केवळ शब्दरूप काव्याने सज्जन प्रसन्न होत नाहीत. म्हणून कवीने अनुतापपूर्वक ईश्वरकृपा संपादन करावी ॥५॥

देवाचेन प्रसन्नपणें । जें जें घडे बोलणें । तें तें अत्यंत श्लाघ्यवाणें । या नाव प्रासादिक ।।६।।

ईश्वरी कृपेचे सामर्थ्य मागे असताना जी जी शब्दरचना होते त्याचे समाजात मोठे कौतुक होते. अशा शब्द रचनांना प्रासादिक म्हणतात. ॥६॥

धीट पाठ प्रसादिक । ऐसें बोलती अनेक । तरी हा त्रिविध विवेक । बोलिजेल ।।७।।

कवितेचे धीटकाव्य, पाठकाव्य व प्रासादिक काव्य असे तीन प्रकार सांगतात. त्यांचे आता स्पष्टीकरण करू. ॥७॥

धीट म्हणिजे धीटपणें केलें । जें जें आपुल्या मनास आलें । बळेंचि कवित्व रचिलें । या नाव धीट बोलिजे ।।८।।

जो विषय मनात येईल त्यावर दडपून काव्य तयार केले की ते धीट म्हणजे नसता आव आणून केलेले काव्य होय. (अनेक नवकाव्ये.) ॥८॥

पाठ म्हणिजे पाठांतर । बहुत पाहिलें ग्रंथांतर । तयासारिखा उतार । आपणहि केला ।।९।।

अनेक ग्रंथांचा अभ्यास करून त्यांतील विषय, आशय, प्रसंग इ. लक्षात घेऊन त्याप्रमाणे काव्यरचना करणे हे पाठ काव्य होय. (उदा. गीतरामायण) ॥९॥

सीघ्रचि कवित्व जोडिलें । दृष्टी पडिलें तें चि वर्णिलें । भक्तिवांचून जें केलें । त्या नाव धीटपाठ ।।१०।।

धीट व पाठ अशा जोडकाव्यात समोर जे दिसेल त्यावर तेथल्या तेथे काव्य तयार होते. ह्या शीघ्रकवीमध्ये भगवद्भक्तीचा लेशही नसतो. ॥१०॥

कामिक रसिक श्रृंघारिक । वीर हास्य प्रस्ताविक । कौतुक विनोद अनेक । या नाव धीटपाठ ।।११।।

रसिकतेने श्रृंगाररसाच्या काव्यरचनेतून काम जागा करणे, वीररस, हास्यरस, करुणरस, व्यक्तिमाहात्म्य, विनोद इ. असलेले काव्य हे धीटपाठ काव्य होय. ।।११।।

मन जालें कामाकार । तैसेचि निघती उद्गार । धीटपाठें परपार । पाविजेत नाहीं ।।१२।।

अन्त:करण शब्दस्पर्शादि कामांनी भरून गेले की तसेच धीटपाठ काव्य तयार होते. त्याने मोक्ष लाभत नाही. ।।१२।।

व्हावया उदरशांती । करणें लागे नरस्तुती । तेथें केली जे विपत्ती । त्या नाव धीटपाठ ।।१३।।

स्वत:च्या चरितार्थासाठी जेव्हा भाटगिरीचे काव्य रचून पांडित्याचा उपयोग केला जातो तेव्हा त्यातून धीटपाठ काव्य निर्माण होते. ।।१३।।

कवित्व नसावें धीटपाठ । कवित्व नसावें खटापट । कवित्व नसावें उद्धट । पाषांडमत ।।१४।।

काव्य कधीच धीटपाठ नसावे. छंद व अनुप्रासादी अलंकार साधण्यासाठी शब्दांची ओढाताण करू नये. म्हणजे काव्यरचना कष्टाची असू नये! त्यातून नास्तिक मताचा उद्धटपणे प्रचार नसावा. ।।१४।।

कवित्व नसावें वादांग । कवित्व नसावें रसभंग । कवित्व नसावें रंगभंग । दृष्टांतहीन ।।१५।।

काव्यात वादविवाद, रसहानी, रंगाचा बेरंग व उपमा-उत्प्रेक्षांचा अभाव नसावा. ।।१५।।

कवित्व नसावें पाल्हाळ । कवित्व नसावें बाष्कळ । कवित्व नसावें कुटीळ । लक्षुनियां ।।१६।।

काव्याचा विषय अकारण लांबवलेला किंवा वाढवलेला नसावा. त्यात उथळ व वायफळ विचार नसून कोणाची तरी निंदानालस्ती करण्यासाठी ते करू नये. ।।१६।।

हीन कवित्व नसावें । बोलिलेंचि न बोलावें । छंदभंग न करावें । मुद्राहीन ।।१७।।

काव्याची वैचारिक पातळी व शब्द हीन अभिरुचीचे नसावेत. तेच तेच सांगत राहू नये. काव्य छन्दोबद्ध असावे. (मुक्त छंद हा छंद नाही) काव्य कोणाचे आहे हे वाचकाला समजावे म्हणून कवीच्या नावाचा उल्लेख असावा. ।।१७।।

वित्पत्तीहीन तर्कहीन । कळाहीन शब्दहीन । भक्तिज्ञानवैराग्यहीन । कवित्व नसावें ।।१८।।

विद्वत्तारहित, तर्कशून्य, कलात्मकता नसलेले काव्य नसावे. योग्य शब्दांच्या वापरासह त्यात भक्ती, ज्ञान व वैराग्य ह्यांचा पुरस्कार असावा. ।।१८।।

भक्तिहीन जें कवित्व । तेंचि जाणावें ठोंबें मत । आवडीहीन जें वगत्रुत्व । कंटाळवाणें ।।१९।।

ज्या काव्यरचनेत भक्तीचा ओलावा नाही ती सद्बुद्धी नसलेल्याची समजावी. त्यांत सर्वांची आवड (भक्ती) विचारात घेतलेली नसल्याने ती कंटाळवाणी ठरते. ।।१९।।

भक्तिवीण जो अनुवाद ।तोचि जाणावा विनोद । प्रीतीविण संवाद । घडे केवी ।।२०।।

भक्तिरसावाचून असलेली कविता टवाळकी समजावी. भगवंतावर ज्याचे प्रेम नाही तो त्याच्याशी काव्याच्या माध्यमातून संवाद करीलच कसा? ।।२०।।

असो धीट पाठ तें ऐसें । नाथिलें अहंतेचें पिसें । आतां प्रसादिक तें कैसें । सांगिजेल ।।२१।।

धीट कवी, पाठकवी व धीटपाठ कवी असे असतात! 'मी कवी' हा अहंकार काव्यगुण नसूनही त्यांना झपाटतो. आता प्रासादिक काव्याची लक्षणे सांगू. ।।२१।।

वैभव कांता कांचन । जयास वाटे हें वमन । अंतरीं लागलें ध्यान । सर्वोत्तमाचें ।।२२।।

अन्त:करण वृत्तीला ब्रह्मरूप श्रीरामाचे सतत अनुसंधान लागल्याने स्त्री, संपत्ती व वैभवाचा ज्याला तिटकारा वाटतो त्याला स्फुरलेली काव्यरचना प्रासादिक मानावी. ।।२२।।

जयास घडीनें घडी । लागे भगवंतीं आवडी । चढती वाढती गोडी । भगवद्भजनाची ।।२३।।

सतत वाढत्या प्रमाणात, वाढत्या दर्जाची देवाची आवड निर्माण होऊन अधिकाधिक भगवद्भजन करावेसे वाटते. ॥२३॥

जो भगवद्भजनेंवीण । जाऊं नेदी येक क्षण । सर्वकाळ अंतःकरण । भक्तिरंगें रंगलें ।।२४।।

क्षणभरसुद्धा जो भगवद्भजनावाचून घालवीत नाही व म्हणून ज्याचे अन्तःकरण सर्वदा भक्तीने रंगले आहे. ॥२४॥

जया अंतरीं भगवंत । अचळ राहिला निवांत । तो स्वभावें जें बोलत । तें ब्रह्मनिरूपण ।।२५।।

ज्याच्या अंतःकरणात भगवंत अढळपणे राहतो तो जे काही बोलतो त्याला ब्रह्मनिरूपणाचे रूप येते. ॥२५॥

अंतरीं बैसला गोविंद । तेणें लागला भक्तिछंद । भक्तिविण अनुवाद । आणीक नाहीं ।।२६।।

हृदयाकाशात गोविंद सुस्थिर झाल्याने त्याच्या भक्तीचा चित्ताने छंद घेतला व त्यामुळे भक्तीशिवाय काव्याला दुसरा विषय उरला नाही. ॥२६॥

आवडी लागली अंतरीं । तैसीच वदे वैखरी । भावें करुणाकीर्तन करी । प्रेमभरें नाचतु ।।२७।।

अन्तःकरणात भगवन्ताची अत्यन्त आवड निर्माण झाल्याने वाणीवाटे ती प्रगट होऊन करुण भावाने भरलेले कीर्तन करताना तो प्रेमाने नाचतो. ॥२७॥

भगवंती लागलें मन । तेणें नाठवे देहभान । शंका लज्या पळोन । दुरी ठेली ।।२८।।

चित्तवृत्तीने भगवंताचा आकार घेतल्यामुळे 'मी देह' ही गाठ सुटली. नाचावे की नाचू नये ही शंका व नाचले तर कोण काय म्हणेल ही लाज दूर निघून गेली. ॥२८॥

तो प्रेमरंगे रंगला । तो भक्तिमदें मातला । तेणें अहंभाव घातला । पायांतळीं ।।२९।।

तो प्रेमाच्या रंगाने न्हाऊन भक्तीने बेभान झाल्याने त्याचा अहंकार जणू त्याने पायदळी तुडविला. नष्ट केला. ॥२९॥

गात नाचत निशंक । तयास कैचे दिसत लोक । दृष्टीं त्रैलोक्यानायेक । वसोन ठेला ।।३०।।

तो निःशंकपणे गात गात नाचत असताना त्याला सतत त्रैलोक्याचा स्वामी दिसत असल्याने नामरूपात्मक व्यक्ती व वस्तू दिसतीलच कशा? ॥३०॥

ऐसा भगवंतीं रंगला । आणीक कांहीं नलगे त्याला । स्वइच्छा वर्णूं लागला । ध्यान कीर्ती प्रताप ।।३१।।

असा जो भगवत्चिन्तनात रममाण होतो त्याला ह्या दृश्य सृष्टीतील कशाचीच गरज नसते. तो स्वतःच्या आनंदाच्या भरात भगवन्ताचे रूप, कीर्ती व पराक्रम ह्यांचे वर्णन करतो. ॥३१॥

नाना ध्यानें नाना मूर्ती । नाना प्रताप नाना कीर्ती । तयापुढें नरस्तुती । त्रुणतुल्य वाटे ।।३२।।

भगवन्ताची अनके रूपे, मूर्ती, पराक्रम व कीर्ती गाताना त्याला सामान्य माणसाची स्तुती अगदी क्षुल्लक वाटते. (ध्यान = वस्त्रालंकारादिकांची शोभा, गदादी आयुधे, प्रसन्न वदन इ.इ.) ॥३२॥

असो ऐसा भगवद्भक्त । जो ये संसारीं विरक्त । तयास मानिती मुक्त । साधुजन ।।३३।।

ह्या दृश्य संसारापासून अलिप्त झालेल्या भगवद्भक्ताला साधूजन मुक्त म्हणतात. ॥३३॥

त्याचे भक्तीचें कौतुक । तया नाव प्रसादिक । सहज बोलतां विवेक । प्रगट होय ।।३४।।

त्याच्या परिपूर्ण भक्तिभावातून सहज येणाऱ्या विवेकपूर्ण रचनांना प्रासादिक काव्य म्हणावे. ॥३४॥

ऐका कवित्वलक्षण । केलेंच करूं निरूपण । जेणे निवे अंतःकर्ण । श्रोतयांचें ।।३५।।

आता कवित्व किंवा काव्य कसे असावे त्याचे एकदा केलेले स्पष्टीकरण पुन्हा करू. त्यामुळे श्रोत्यांना त्याबाबत शंका उरणार नाही. ॥३५॥

कवित्व असावें निर्मळ । कवित्व असावें सरळ । कवित्व असावें प्रांजळ । अन्वयाचें ।।३६।।

काव्य शुद्ध बुद्धीने शुद्ध विषयासंबंधी केलेले, सरलार्थ सांगणारे, सुस्पष्ट व सुसंगत असावे. ॥३६॥

कवित्व असावें भक्तिबळें । कवित्व असावें अर्थागळें । कवित्व असावें वेगळें । अहंतेसी ।।३७।।

भक्तीचा स्थायीभाव असलेली, अर्थांतरांच्या चातुर्याने भरलेली व अहंकाराचा वारा नसलेली कविता असावी. ॥३७॥

कवित्व असावें कीर्तिवाड । कवित्व असावें रम्य गोड । कवित्व असावें जाड । प्रतापविषीं ।।३८।।

काव्यात हरिकीर्ती भरून उरावी व ती रमणीय व गोड शब्दात सांगावी. श्रीहरीचे अद्भुत पराक्रम त्यांत भरपूर गायलेले असावेत. ॥३८॥

कवित्व असावें सोपें । कवित्व असावें अल्परूपें । कवित्व असावें सुल्लपें । चरणबंद ।।३९।।

सर्वांना सहज समजणारे, थोडक्यात मांडलेले व अनुप्रासादी अलंकार सहजपणे साधलेले काव्य असावे. ॥३९॥

मृदु मंजुळ कोमळ । भव्य अद्भुत विशाळ । गौल्य माधुर्य रसाळ । भक्तिरसें ।।४०।।

काव्य काही वेळा मवाळ, मंजुळ व नाजुक शब्दांनी गुंफलेले असावे. काही वेळा प्रसंगानुरूप अद्भुत रसाचे, भव्य व प्रदीर्घ असावे तर कधी गोड व मधुर अशा भक्तिरसाने भरलेले असावे. ॥४०॥

अक्षरबंद पदबंद । नाना चातुर्य प्रबंद । नाना कौशल्यता छंदबंद । धाटी मुद्रा अनेक ।।४१।।

काव्यातील अक्षरे ऱ्हस्व, दीर्घ व्यवस्थित लिहिलेली असावीत. शब्द (पद) अर्थवाही असावेत. व रचना चातुर्यपूर्ण असाव्यात. अनुष्टुपादी छंद, कुसुमबाणासारख्या जाती व शार्दूलविक्रीडितादी वृत्ते वापरण्याचे कौशल्य असावे. कविता मोकाट नसावी. ॥४१॥

नाना युक्ती नाना बुद्धी । नाना कळा नाना सिद्धी । नाना अन्वये साधी । नाना कवित्व ।।४२।।

काव्यरचनेचे सर्व प्रकार हाताळून त्यांत खुब्या, बुद्धिचातुर्य, कला व सहजता असावी. कवितेच्या कडव्यातील प्रत्येक चरणात सुसंगती असावी. ॥४२॥

नाना साहित्य दृष्टांत । नाना तर्क धात मात । नाना संमती सिद्धांत । पूर्वपक्षेंसीं ।।४३।।

काव्यरचनेत साहित्यशास्त्रातील रसालंकार, उदाहरणे, तर्कशुद्धता, वास्तव व कल्पना, श्रेष्ठांची प्रमाणे व पूर्वपक्षासह सिद्धान्त पक्ष मांडावा. ॥४३॥

नाना गती नाना वित्पत्ती । नाना मती नाना स्फूर्ति । नाना धारणा नाना धृती । या नाव कवित्व ।।४४।।

जनजीवनाच्या सर्व क्षेत्रात कवीला गती असावी. पांडित्याची जोड, चतुरस्र बुद्धी, अखंड स्फूर्ती, स्मरणशक्ती व अभिव्यक्तीचे धैर्य ह्यांची कवीला साथ हवी. ॥४४॥

शंका आशंका प्रत्योत्तरें । नाना काव्यें शास्त्राधारें । तुटे संशये निर्धारें । निर्धारितां ।।४५।।

वेदान्तशास्त्राच्या यथार्थ अभ्यासातून झालेल्या काव्यरचनेत शंका, कुशंका, संशयादिकांचा योजनापूर्वक व निर्धारपूर्वक समाचार घेऊन त्यांचे परिमार्जन झाले पाहिजे. ॥४५॥

नाना प्रसंग नाना विचार । नाना योग नाना विवर । नाना तत्त्वचर्चासार । या नाव कवित्व ।।४६।।

ज्यामध्ये अनेक घटना, तत्त्वज्ञान, योगांचे प्रकार, स्पष्टीकरणे व तत्त्वचर्चेचे सार असेल तेच खरे कवित्व. ॥४६॥

नाना साधनें पुरश्चरणें । नाना तपें तीर्थाटणें । नाना संदेह फेडणें । या नाव कवित्व ।।४७।।

अनेक साधनापद्धतींचे वर्म उकलून सांगणे, पुरश्चरणांची रीत व फळ सांगणे, कायिकादी तपांचे वर्णन करणे, तीर्थमाहात्म्य समजावणे व अनेक प्रकारच्या शंकांचे निरसन करणे या गोष्टी काव्यात असाव्यात. ॥४७॥

जेणें अनुताप उपजे । जेणें लोकिक लाजे । जेणें ज्ञान उमजे । या नाव कवित्व ।।४८।।

काव्य वाचल्यावर वाचकाला फुकट गेलेल्या आयुष्याचा पश्चात्ताप व्हावा, लौकिक जीवनात रमल्याची लाज वाटावी व अध्यात्मशास्त्राचे यथार्थ ज्ञान व्हावे. ॥४८॥

जेणें ज्ञान हें प्रबळे । जेणें वृत्ती हे मावळे । जेणें भक्तिमार्ग कळे । या नाव कवित्व ।।४९।।

हे झालेले ज्ञान ठसावे, अंतर्निष्ठता लाभून भक्तिमार्गाचे योग्य आकलन व्हावे ही चांगल्या काव्याची लक्षणे होत. ॥४९॥

जेणें देहबुद्धी तुटे । जेणें भवसिंधु आटे । जेणें भगवंत प्रगटे । या नाव कवित्व ।।५०।।

काव्यात असे सामर्थ्य असावे की ज्यामुळे 'मी देह' हा भ्रम जावा, जगाचे सत्यत्व जाऊन मिथ्यात्व दृढ व्हावे व सगुण देवाचे दर्शन व निर्गुणाचे ज्ञान व्हावे. ॥५०॥

जेणें सद्‌बुद्धि लागे । जेणें पाषांड भंगे । जेणें विवेक जागे । या नाव कवित्व ।।५१।।

प्रासादिक काव्यरचनेने वाचकाला सद्बुद्धी होते, नास्तिक मत नष्ट होऊन पारमार्थिक विवेक जागा होतो. ॥५१॥

जेणें सद्वस्तु भासे । जेणें भास हा निरसे । जेणें भिन्नत्व नासे । या नाव कवित्व ।।५२।।

साधुकाव्याने ब्रह्माचा अंदाज येतो, दृश्य जगताचा भ्रम दूर होतो व भेदभ्रान्ती नष्ट होते. ॥५२॥

जेणें होये समाधान । जेणें तुटे संसारबंधन । जया मानिती सज्जन । तया नाव कवित्व ।।५३।।

सत् काव्याने वाचकाच्या अन्त:करणवृत्तीचे सम्यक् आधान टिकून राहते, संसाराच्या आसक्तीचे बंधन तुटते व म्हणून ते संतांना मान्य होते. ॥५३॥

ऐसें कवित्वलक्षण । सांगतां तें असाधारण । परंतु कांहींयेक निरूपण । बुझावया केलें ।।५४।।

अशी काव्याची लक्षणे आणखी कितीतरी सांगता येतील परंतु साधारण समाधान होण्याइतके स्पष्टीकरण केले. ॥५४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'कवित्वकळानिरूपणनाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'कवित्वकळानिरूपण' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक चौदावा : अखंडध्याननाम

समास चवथा : कीर्तनलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

कलयुगीं कीर्तन करावें । केवळ कोमळ कुशळ गावें । कठीण कर्कश कुर्टे सांडावें । येकीकडे ।।१।।

कलियुगात कीर्तनाचे माहात्म्य आहे. कीर्तनाला अर्धशास्त्रीय गायनाची जोड असावी व ते नियमाने (केवळ) हळुवार व कौशल्यपूर्ण असावे. कठोर, कर्कश व बदसूर नसावे. ॥१॥

खटखट खुंटून टाकावी । खळखळ खळांसीं न करावी । खरें खोटें खवळों नेदावी । वृत्ती आपुली ।।२।।

वादविवादाचे विषय टाळावेत, दुष्टदुर्जनांशी वाद घालू नये. त्यांनी मधेच उपस्थित केलेले मुद्दे बरोबर किंवा चूक असले तरी आपली शांती सोडू नये. ॥२॥

गर्वगाणें गाऊं नये । गातां गातां गळों नये । गोप्य गुज गर्जों नये । गुण गावे ।।३।।

स्वत:चे माहात्म्य सांगू नये. कीर्तनात मधेच धीर गळू देऊ नये. कोणा व्यक्तीची किंवा संस्थेची गुप्त गोष्ट भर कीर्तनात सांगू नये. भगवद्गुण गावे. ॥३॥

घष्टणी घिसणी घस्मरपणें । घसर घसरूं घसा खाणें । घुमघुमों चि घुमणें । योग्य नव्हे ।।४।।

फार सलगी किंवा घासाघीस घालून घसा खरवडून तो फाटेपर्यन्त ओरडणे किंवा आपल्याच नादात ताना घेणे ठीक नाही. ॥४॥

नाना नामें भगवंताचीं । नाना ध्यानें सगुणाचीं । नाना कीर्तनें कीर्तीचीं । अद्भुत करावीं ।।५।।

भगवन्ताची अनेक नावे, त्याची रूपे, वैभव व कीर्तीचे अद्भुत वर्णन करावे. ॥५॥

चकचक चुकावेना ।चाट चावट चळावेना । चरचर चुरचुर लागेना । ऐसें करावें ।।६।।

आपल्या बोलण्याने, ते न आवडून कोणी चक् चक् म्हणू नये. रंगेल श्रोत्याची ती वृत्ती जागी होऊ नये. कोणाच्या वर्मावर बोट ठेवल्याने त्याने अस्वस्थ व्हावे असे होऊ नये. ॥६॥

छळछळ छळणा करूं नये । छळितां छळितां छळों नये । छळणें छळणा करूं नये । कोणीयेकाची ।।७।।

कोणी व्यक्ती, मत किंवा संप्रदायावर सतत टीकेची धार धरून त्यांना छळू नये. दुसऱ्याने छळण्याचा प्रयत्न केला तरी आपण छळून घेऊ नये किंवा उलट त्याला छळू नये. ॥७॥

जि जि जि जि म्हणावेना । जो जो जागे तो तो पावना । जपजपों जनींजनार्दना । संतुष्ट करावें ।।८।।

कीर्तनात; पोवाड्यात म्हणतात तसे जी जी म्हणू नये. (कीर्तन व पोवाडा ह्यांचे स्वरूप वेगळे आहे.) कीर्तन असे असावे की ज्याला त्याने विवेकाची जाग येईल तो तरून जाईल. नामजप करून व करवून घेऊन जनरूप जनार्दनाला संतुष्ट करावे. ॥८॥

झिरपे झरे पाझरे जळ । झळके दुरुनी झळाळ । झडझडां झळकती सकळ । प्राणी तेथें ।।९।।

कीर्तनकाराने करुणरसाचा असा आविष्कार करावा की त्याने त्याच्या व श्रोत्यांच्या डोळ्यांत पाणी भरावे. कीर्तनाचा थाट असा असावा की ते वैभव पाहून लांबून पाहणाराही जवळ येऊन बसावा. अभावितपणे येऊन

धडकावा. ॥९॥

या या या या म्हणावें नलगे । या या या या उपाव नलगे । या या या कांहीं च नलगे । सुबुद्धासी ।।१०।।

अशा थाटामुळे श्रोत्यांना ते येण्यासाठी आर्जवे करावयास लागत नाहीत किंवा आमंत्रणे देऊन प्रसादादी लालूचही दाखवावी लागत नाही. सात्त्विक बुद्धीच्या श्रोत्यांना अशा उपायांनी बोलवावे लागत नाही. ते येतातच. ॥१०॥

टक टक टक करूं नये । टाळाटाळी टिकों नये । टम टम टम टम लाऊं नये । कंटाळवाणी ।।११।।

कीर्तन करताना तेच ते बोलू नये, कोणी 'कीर्तन आवरते घ्या' असे म्हणणारा चुकार श्रोता असला तरी तसे करू नये. रटाळपणाने काहीतरी सांगत राहू नये. ॥११॥

ठस ठोंबस ठाकावेना । ठक ठक ठक करावेना । ठाकें ठमकें ठसावेना । मूर्तिध्यान ।।१२।।

कीर्तनात सगुणमूर्तीचे ध्यान श्रोत्यांच्या अन्त:करणात ठसावे अशी अपेक्षा आहे. म्हणून अर्धवटाने कीर्तनाला उभे ठाकू नये. तबला-मृदुंगाचे मोठे आवाज काढू नये व पायातील चाळांचा नाचत फार गलका करू नये. ॥१२॥

डळमळ डळमळ डकों नये । डगमग डगमग कामा नये । डंडळ डंडळ चुकों नये । हेंकाडपणें ।।१३।।

कीर्तनात सिद्धान्त मांडताना मांडणी डळमळीत नसावी. बोलण्याच्या ओघात अपसिद्धान्त, चुकीचा दृष्टान्त, अयोग्य प्रमाण इ. दोष येतील म्हणून डगमगू नये. सर्व काही शान्तपणे सावरून न्यावे. हट्टाने इरेला पडून आपले अन्त:करण बिथरू देऊ नये. ॥१३॥

ढिसाळ ढाला ढळती कुंचे । ढोबळा ढसकण डुले नाचे । ढळेचिना ढिगढिगांचे । कंटाळवाणे ।।१४।।

कोणी उथळ श्रोते पंख्याने वारा घेतात, काही स्थूल विषयाच्या मांडणीत रमणारे डोलू लागतात व अनियंत्रित हावभाव करतात तर बरेच श्रोते ढिगाऱ्याप्रमाणे प्रतिक्रियाशून्य बसून राहतात. हा सर्व कंटाळवाणा प्रकार कीर्तनकाराने शांतपणे सोसावा. ॥१४॥

नाना नेटक नागर । नाना नम्र गुणागर । नाना नेमक मधुर । नेमस्त गाणें ।।१५।।

कीर्तनकाराने नेटकेपणाने, सभ्यतेच्या मर्यादा सांभाळीत व नम्रतेने विषय मांडावा, अशा गुणसंपन्नतेने कीर्तन करताना प्रसंगानुरूप, अनेक रागदारीत गायनाचा तंतू सांभाळावा. मधून मधून गावे. ॥१५॥

ताळ तंबुरे तानमानें । ताळबव्द तंतगाणें । तूर्त तार्किक तनें मनें । तल्लीन होती ।।१६।।

तंबोऱ्याची तालबद्ध साथ, मर्यादित ताना, तारा जुळविलेली तंतुवाद्ये यांचा योग्य उपयोग केल्याने जाणकार श्रोते (तार्किक) अल्पावधीत (तूर्त) शरीर व मनाने कीर्तनात तल्लीन होतात. ॥१६॥

थर्थरां थरकती रोमांच । थै थै थै स्वरें उंच । थिरथिर थिरावे नाच । प्रेमळ भक्तांचा ।।१७।।

काही वेळा भावावेशामध्ये भक्तांच्या अंगावर रोमांच उभे राहून त्यांना कंप सुटतो. वाद्यांना साथ देण्याच्या भरात ते थै थै थै असे मोठ्याने ओरडत थिरकत नाचू लागतात व नाचतच रहातात! ॥१७॥

दक्षदाक्षण्य दाटलें । बंदें प्रबंदें कोंदाटलें । दमदम दुमदुमों लागलें । जगदांतर ।।१८।।

कीर्तनकाराचे प्रसंगावधान, मर्यादाशीलता, शुद्ध तत्त्वज्ञानाने बंदिस्त वक्तृत्व इत्यादींची लोकांत प्रसिद्धी होऊन ते त्याने भारावून जातात. ॥१८॥

धूर्त तूर्त धावोन आला । धिंगबुद्धीनें धिंग जाला । धाकें धाकें धोकला । रंग अवधा ।।१९।।

आवडीचे व जाणकार लोक आवर्जून कीर्तनाला येऊ लागतात व तेथील वातावरणनिर्मितीने दंग होतात. सर्व जण आपापली मर्यादा सांभाळून (धाके) कीर्तनात रंग भरतात. ॥१९॥

नाना नाटक नेटकें । नाना मानें तुकें कौतुकें । नाना नेमक अनेकें । विद्यापात्रें ।।२०।।

मर्यादशील नाट्याभिनयाने प्रसन्न झालेले मर्यादशील विद्वान, कीर्तनकाराचे यथायोग्य प्रमाणात (तुके माने) कौतुक

करतात. ॥२०॥

पाप पळोन गेलें दुरी । पुण्य पुष्कळ प्रगटे वरी । परतरतो परे अंतरीं । चटक लागे ।।२१।।

अशा कीर्तनामुळे श्रोत्यांची पापवासना नष्ट होऊन अपार पुण्याचरणाकडे प्रवृत्ती होते. कीर्तन संपल्यावर श्रोते घरी परतले तरी त्यांना कीर्तनाने चटका लावलेला असतो. ॥२१॥

फुकट फाकट फटवणें नाहीं । फटकळ फुगडी पिंगा नाहीं । फिकें फसकट फोल नाहीं । भकाध्या निंदा ।।२२।।

कीर्तनात वायफळ बोलणे, फसवणे, तोंडाळपणा, धांगडधिंगा, रसहीनता, निरर्थकता, बहकणे, निंदानालस्ती इ. मुळीच नसावी. ॥२२॥

बरें बरें बरें म्हणती । बाबा बाबा उदंड करिती । बळें बळेंचि बळाविती । कथेलागीं ।।२३।।

हे नसलेले कीर्तन लोकांना फार फार आवडून ते कीर्तनकाराला आदराने वागवून पुन्हा पुन्हा कीर्तनाला येण्यासाठी अत्यंत आग्रहाने बोलावतात. ॥२३॥

भला भला भला लोकीं । भक्तिभावें भव्य अनेकीं । भूषण भाविक लोकीं । परोपकारे ।।२४।।

अशा कीर्तनकाराने समाजावर मोठेच उपकार केलेले असल्याने लोकांमध्ये मान व मोठेपणा मिळतो. त्याचा भक्तिभाव व भव्यपणा भाविकजनांचे भूषण होऊन बसतो. ॥२४॥

मानेल तरी मानावें मनें । मत्त न व्हावें ममतेनें । मी मी मी मी बहुत जनें । म्हणिजेत आहे ।।२५।।

लोकांनी असा कितीही मानसन्मान केला तरी कीर्तनकाराने स्वतःच्या मनाला नीट समजवावे. (मानावे– मनवावे) हे मानसन्मान भगवत् कथेचे असतात. ते आपलेच आहेत असे समजून उन्मत्त होऊ नये. एऱ्हवी सामान्य माणसे सुद्धा मी मी असे म्हणून गर्विष्ठ बनतातच! (त्यांच्यात व कीर्तनकारात काय फरक?) ॥२५॥

येकें टोंकत येकांपासीं । येऊं येऊं येती झडेसीं । या या या या असे तयासी । म्हणावें नलगे ।।२६।।

याउलट काही कीर्तनकार ‘आम्ही तुमच्याकडे अवश्य येऊ’ असे म्हणून लोकांच्या गळ्यात पडतात. त्यांना आमंत्रण देण्याचीही गरज पडत नाही! ॥२६॥

राग रंग रसाळ सुरंगें । अंतर संगित रागें । रत्नपरीक्षा रत्नामागें । धांवती लोक ।।२७।।

खरे तर असे करावे लागू नये. कारण उत्कृष्ट रागदारीमागे रसिक, रंगकलेमागे त्याचा भोक्ता, रसाळ फळामागे पक्षी, सुगंधामागे भुंगा, संगीतात रमणारा संगीतकारामागे व रत्नपरीक्षक अस्सल रत्नामागे आपोआप येतात. ॥२७॥

लवलवां लवती लोचन । लकलकां लकलें मन । लपलपों लपती जन । आवडीनें ।।२८।।

कीर्तनकाराकडे कौतुकाने पहाताना लोकांच्या डोळ्यांच्या पापण्या वरखाली होतात, मन नवलाईने चकित होते व ते मोठ्या आवडीने नम्रता धरून त्याचेकडे येतात. ॥२८॥

वचनें वाउगीं वदेना । वावरेविवरे वसेना । वगत्रुत्वें निववी जना । विनित होउनी ।।२९।।

तो कीर्तनकार कधीच भलतेसलते बोलत नाही. त्याच्या मनात भलत्यासलत्या गोष्टींना थारा नसतो व नम्रभावाने केलेल्या वक्तृत्वाने श्रोत्यांना समाधान देतो. ॥२९॥

सारासार समस्तांला । सिकऊं सिकऊं जनाला । साहित संगित सज्जनाला । बरें वाटे ।।३०।।

साहित्यकाराच्या शैलीत व संगीताच्या साथीत तो सरसकट सर्वांना सारासार विचार सतत सांगत रहातो. यामुळे सज्जन त्याचेवर प्रसन्न होतात. ॥३०॥

खरेंखोटें खरें वाटलें । खर्खर खुर्खुर खुंटलें । खोटें खोटेपणें गेलें । खोटें म्हणोनियां ।।३१।।

खरे काय व खोटे काय ह्याचा निवाडा होऊन खरे समजले म्हणजे श्रोत्यांच्या मनातील खुरखुर थांबते. जे खोटे असते ते त्याच्या खोटेपणानेच बाजूला होते! ॥३१॥

शाहाणे शोधितां शोधेना । शास्त्रार्थ श्रुती बोधेना । शुक शारिका शमेना । शब्द तयाचा ।।३२।।

बराच शोध घेऊनही सात्त्विक विद्वान सापडत नाही व त्यामुळे उपनिषदादी शास्त्रांचे यथार्थ ज्ञान होत नाही. केवळ पोपटपंची करणाऱ्याकडून समाधान होत नाही. ॥३२॥

हरुषें हरुषें हासिला । हाहाहोहोनें भुलला । हित होईना तयाला । परत्रीचें ।।३३।।

जो हर्ष झाल्यावर उथळपणाने हसतच सुटतो व रटाळ बडबडीला भुलतो त्याला मोक्षसुखरूप हित प्राप्त होत नाही. ॥३३॥

लक्षावें लक्षितां अलक्षीं । लक्षिलें लोचनातें लक्षी । लंगलें लयेतें अलक्षी । विहिंगममार्गें ।।३४।।

अलक्ष्य आत्मवस्तूवर अन्त:करणवृत्ती स्थिर करावी. डोळ्याचा डोळा असलेल्या आत्म्याचे अनुसंधान साधावे. लयचिंतनाच्या माध्यमातून अंत:करण वृत्तीचा क्रमाने लय साधून (पहा– कठ उप. वाणीचा मनात, मनाचा बुद्धीत लय करावा इ.) पक्षी फळावर झेप घेतो त्याप्रमाणे आत्मानुभव घ्यावा. ॥३४॥

क्षेत्र क्षेत्रज्ञ क्षोभतो । क्षमेनें क्षमून क्ष्मवितो । क्ष्मणें क्षोभणें क्षेत्रज्ञ तो । सर्वां ठाईं ।।३५।।

देहरूप क्षेत्रात जीवरूप क्षेत्रज्ञ कधी क्षुब्ध होतो. कधी क्षमाशीलही होतो. असा क्षुब्ध होणारा व क्षमा करणारा, जीव सर्व माणसांमध्ये आहे. (हे लक्षात घेऊन कीर्तनकाराने समाजात वावरावे. ह्या सर्व समासात समर्थांनी शब्दविभ्रमावर फार भर दिला असून त्यामुळे अर्थवाहीपणाला गौणत्व आले आहे. ओव्या वाचताना शब्दविभ्रमाचा आनंद मिळतो. अर्थ करताना सरळ अर्थ करण्याचा प्रयत्न केला आहे.) ॥३५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'कीर्तनलक्षणनाम' समास चवथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'कीर्तनलक्षण' नावाचा चवथा समास समाप्त

दशक चौदावा : अखंडध्याननाम

समास पाचवा : हरिकथालक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

मागां हरिकथेचें लक्षण । श्रोतीं केला होता प्रस्न । सावध होऊन विचक्षण । परिसोत आतां ।।१।।

ह्यापूर्वी श्रोत्यांनी हरिकथेच्या लक्षणांविषयी प्रश्न विचारला होता. त्याचे उत्तर आता सावधपणाने ऐका. (संदर्भ– ४-२-२) ॥१॥

हरिकथा कैसी करावी । रंगें कैसी भरावी । जेणें पाविजे पदवी । रघुनाथकृपेची ।।२।।

'रघुनाथकृपांकित' ही पदवी मिळण्यासाठी आवश्यक अशी हरिकथा कशी करावी व तिच्यात रंग कसा भरावा ते ऐका. ॥२॥

सोनें आणि परिमळे । युक्षदंडा लागती फळें । गौल्य माधुर्य रसाळें । तरी ते अपूर्वता ।।३।।

(हरिकथाकार कसा असावा ते समर्थ सांगतात–) ज्याप्रमाणे सोन्याला सुगंध येऊ लागला व उसाला गोड फळे धरू लागली तर अपूर्वाई वाटेल त्याप्रमाणे– ॥३॥

तैसा हरिदास आणी विरक्त । ज्ञाता आणि प्रेमळ भक्त । वित्पन्न आणि वादरहित । तरी हेहि अपूर्वता ।।४।।

हरिदास विरक्त असेल, वेदान्ती प्रेमळ भक्त असेल व पंडित असून वादाची खुमखुमी नसेल तर ते अपूर्वच होय. ॥४॥

रागज्ञानी ताळज्ञानी । सकळकळा ब्रह्मज्ञानी । निराभिमानें वर्ते जनीं । तरी हेहि अपूर्वता ।।५।।

मालकंसादी रागांची उत्तम जाण, त्रितालादी तालांचे ज्ञान, अनेककलासंपन्न, ब्रह्मविद्येत प्रवीण असून अहंकाररहित होऊन लोकांत वावरत असेल तर तेही अपूर्वच! ॥५॥

मछर नाहीं जयासी । जो अत्यंत प्रिये सज्जनासी । चतुरांग जाणे मानसीं । अंतरनिष्ठ ।।६।।

हरिकथाकार मत्सररहित असून सज्जनांना प्रिय असावा. चौफेर दृष्टीचा असून मनाने अंतर्निष्ठ असावा. ॥६॥

जयंत्यादिकें नाना पर्वें । तीर्थ क्षेत्रें जें अपूर्वें । जेथें वसिजे देवाधिदेवें । सामर्थ्यरूपें ।।७।।

वाराणशीसारखी तीर्थे अद्भुत असून तेथे महादेव त्याच्या सामर्थ्यरूपाने रहातो. गाणगापूरसारख्या ठिकाणी दत्तजयंतीसारखे महोत्सव व पर्वकाळ साजरे होतात. ॥७॥

तया तीर्थातें जे न मानिती । शब्दज्ञानें मिथ्या म्हणती । तया पामरां श्रीपती । जोडेल कैंचा ।।८।।

वेदान्ताच्या शब्दज्ञानाने जे त्या तीर्थांना मायिक म्हणतात त्या पामरांना ईशकृपा कशी होईल? ॥८॥

निर्गुण नेलें संदेहानें । सगुण नेलें ब्रह्मज्ञानें । दोहिकडे अभिमानें । वोस केलें ।।९।।

त्यांची अशी शोकान्तिका होते की निर्गुणाचे दृढ, अपरिवर्तनीय व अपरोक्ष ज्ञानही झालेले नसते व ब्रह्म विद्येच्या शब्दज्ञानामुळे सगुणावर प्रेमही नसते! अशा प्रकारे 'मी' चेच प्राबल्य होऊन दोन्हीकडून तो नागवला जातो. ॥९॥

पुढें असतां सगुणमूर्ती । निर्गुणकथा जे करिती । प्रतिपादून उछेदिती । तेचि पढतमूर्ख ।।१०।।

समोर श्रीरामासारख्या सगुण दैवताची मूर्ती असताना निर्भेळ ब्रह्मविद्या सांगून सगुणाचा अव्हेर करतात ते केवळ

पढतमूर्खच होत. (पहा– २-१०-४) ॥१०॥

ऐसी न कीजे हरिकथा । अंतर पडे उभये पंथा । परिस लक्षणें आतां । हरिकथेचीं ।।११।।

हरिकथा ह्या पद्धतीने करू नये. कारण त्यामुळे सगुण व निर्गुण ह्या दोन्ही उपासनात दुरावा निर्माण होतो. आता उत्तम हरिकथेची लक्षणे ऐका. ॥११॥

सगुणमूर्तीपुढें भावें । करुणाकीर्तन करावें । नाना ध्यानें वर्णावें । प्रतापकीर्तीतें ।।१२।।

सगुण अवताराची मूर्ती समोर ठेवून किंवा सगुण मूर्तीपुढे करुणरसप्रधान भावपूर्ण कीर्तन करावे. समचरणदृष्टी असलेले विठ्ठलाचे ध्यान, कोदंडधारी रामाचे ध्यान, त्रिभंगाकृती कृष्णाचे ध्यान इ. ध्यानांची रसभरित वर्णने करावीत. त्यांचे पराक्रम व उज्ज्वल कीर्ती सांगावी. ॥१२॥

ऐसें गातां स्वभावें । रसाळ कथा वोढवे । सर्वांतरी हेलावे । प्रेमसुख ।।१३।।

अशा सांगण्यामुळे सहजच रसाळ हरिकथा खुलत जाते व सर्व श्रोत्यांच्या अंत:करणांत प्रेमाच्या सुखाला भरती येते. ॥१३॥

कथा रचायाची खूण । सगुणीं नाणावें निर्गुण । न बोलावे दोष गुण । पुढिलांचे कदा ।।१४।।

उत्तम हरिकथेची उभारणी करावयाची असेल तर सगुणांत निर्गुणाची सरमिसळ करू नये. अन्य वक्त्यांचे, मागे होऊन गेलेल्या श्रेष्ठांचे किंवा पुढे बसलेल्या श्रोत्यांचे गुणदोष बोलू नये. ॥१४॥

देवाचें वर्णावें वैभव । नाना प्रकारें महत्त्व । सगुणीं ठेउनियां भाव । हरिकथा करावी ।।१५।।

रामकृष्णादिकांचे व ईश्वराचे वैभव सांगून त्यांचे माहात्म्य गावे. सगुणावरील अखंड प्रेमाने हरिकीर्तन रंगवावे. ॥१५॥

लाज सांडून जनाची । आस्था सांडून धनाची । नीच नवी कीर्तनाची । आवडी धरावी ।।१६।।

लोकांची भीड न धरता नि:संकोचपणे व बिदागीची अपेक्षा न ठेवता नव्या नव्या उन्मेषाने नव्या नव्या ठिकाणी कीर्तन करण्याची आवड असावी. ॥१६॥

नम्र होऊन राजांगणीं । नि:शंक जावें लोटांगणीं । करताळिका नृत्य वाणी । नामघोषें गर्जावें ।।१७।।

अत्यंत नम्रता स्वीकारून सभामंडपात कीर्तन करताना वारंवार लोटांगणे घालावीत, मुद्रांसह नृत्य करून वाणीने नामाचा गर्जनापूर्वक घोष करावा. ॥१७॥

येकांची कीर्ति येकापुढें । वर्णितां साहित्य न पडे । म्हणोनियां निवाडे । जेथील तेथें ।।१८।।

एक दैवत समोर असताना कीर्तनात दुसऱ्याच दैवतांची कीर्ती सांगणे योग्य नाही. म्हणून ज्या त्या दैवतासमोर ज्याचे त्याचे माहात्म्य प्रामुख्याने सांगावे. ॥१८॥

मूर्ती नस्तां सगुण । श्रवणीं बैसले साधुजन । तरी अद्वैतनिरूपण । अवश्य करावें ।।१९।।

समोर सगुणाची मूर्ती नसताना व अधिकारी श्रोते बसले असतील तर वेदान्तातील अद्वैताचे शास्त्र अवश्य सांगावे. ॥१९॥

नाहीं मूर्ती नाहीं सज्जन । श्रवणीं बैसले भाविक जन । तरी करावें कीर्तन । प्रस्ताविक वैराग्य ।।२०।।

समोर मूर्ती नाही, अधिकारी श्रोते नाहीत व सामान्य भाविक जन असतील तर त्यांना अनुताप व वैराग्य निर्माण होईल असे कीर्तन करावे. ॥२०॥

श्रुंघारिक नवरसिक । यामधें सांडावें येक । स्त्रियादिकांचें कौतुक । वर्णूं नये कीं ।।२१।।

नऊरसांपैकी पहिल्या श्रृंगार रसाचा वापर कमीत कमी असावा. (पहा ४-२-१५) गंधर्वस्त्रिया किंवा अन्य स्त्रियांचा संदर्भ आला असता तो थोडक्यात आवरता घ्यावा. ॥२१॥

लावण्य स्त्रियांचें वर्णितां । विकार बाधिजे तत्त्वता । धारिष्टापासून श्रोता । चळे तत्काळ ।।२२।।
म्हणउन तें तजावें । जें बाधक साधकां स्वभावें । घेतां अंतरीं ठसावें । ध्यान स्त्रियांचें ।।२३।।
लावण्य स्त्रियांचें ध्यान । कामाकार जालें मन । कैचें आठवेल ध्यान । ईश्वराचें ।।२४।।
स्त्री वर्णितां सुखावला । लावण्याचे भरीं भरला । तो स्वयें जाणावा चेवला । ईश्वरापासुनी ।।२५।।

स्त्रीच्या सौंदर्याचे उत्तान वर्णन केले तर कामविकार जागा होऊन मनाची चलबिचल होते. साधकांच्या मूळच्या सहजप्रवृत्तीमुळे ते वर्णन बाधक ठरून स्त्रीचेच चिंतन सुरू होणे शक्य असल्याने ते टाळावे. स्त्रीमूर्तीचेच ध्यान लागून अंत:करणवृत्ती कामाने भरून जाते. तो ईश्वराचे ध्यान कसे करणार? स्त्रीच्या वर्णनाने वृत्ती सुखाकार होऊन जो त्या सौंदर्यात स्वत:ला हरवून बसतो तो ईशचिंतनापासून अवश्य ढळतो. ।।२२-२५।।

हरिकथेसी भावबळें । गेला रंग तो तुंबळे । निमिष्य येक जरी आकळे । ध्यानीं परमात्मा ।।२६।।

हरिकथेत जर भक्तिभावाचे सामर्थ्य असेल तर क्षणभर तरी परमात्म्याचे ध्यान लागून गमावलेला हरिकथेतील रंग त्याला परत मिळेल. ।।२६।।

ध्यानीं गुंतलें मन । कैचें आठवेल जन । निशंक निर्ल्लज कीर्तन । करितां रंग माजे ।।२७।।

एकदा मन ध्यानात गुंतले की त्याला इतरांचे भान न राहून नि:शंकपणे संकोचरहित कीर्तन तो करू लागला की हरिकथेत हरिरंगच भरून रहातो. ।।२७।।

रागज्ञान ताळज्ञान । स्वरज्ञानेंसीं वित्पन्न । अर्थान्वयाचें कीर्तन । करूं जाणे ।।२८।।

राग, ताल, स्वर ह्यांच्या ज्ञानासह जो वेदान्तशास्त्रवेत्ता असतो तो अर्थपूर्ण व सुसंबद्ध कीर्तन करू शकतो. ।।२८।।

छपन्न भाषा नाना कळा । कंठमाधुर्य कोकिळा । परी तो भक्तिमार्ग वेगळा । भक्त जाणती ।।२९।।

एखाद्याजवळ अनेक भाषांचे ज्ञान असेल, कोकिळाप्रमाणे आवाजही गोड असेल. पण भक्तीचा गोडवा काही वेगळाच असतो व तो भक्तच जाणतात. ।।२९।।

भक्तांस देवाचें ध्यान । देवावांचून नेणे अन्न । कळावंतांचें जें मन । तें कळाकार जालें ।।३०।।

भक्ताला देवाचे ध्यान लागले की तो देवावाचून दुसरे काही जाणीत नाही. परंतु सामान्य कलाकार सहजच कलासक्त असतो. त्याला भगवद्प्रेम नसते. ।।३०।।

श्रीहरिवीण जे कळा । तेचि जाणावी अवकळा । देवास सांडून वेगळा । प्रत्यक्ष पडिला ।।३१।।

श्रीहरीचे प्रेम नसताना असलेली इतर कोणतीही कला ही अवकळाच होय. कारण तो कलावंत आनंदरूप देवापासून वेगळा पडतो. ।।३१।।

सर्पीं वेढिलें चंदनासी । निधानाआड विवसी । नाना कळा देवासी । आड तैस्या ।।३२।।

ज्याप्रमाणे चंदनाच्या झाडाला सर्प विळखा घालून बसतो किंवा गुप्तधनाच्या साठ्यावर डाकीण बसलेली असते त्याप्रमाणे सर्व प्रकारच्या कला, भगवत्प्रेम नसेल तर, देवाच्या प्राप्तीच्या आड येतात. (छंदे नाना परी । कळा न पाविजे हरी– तुका.) ।।३२।।

सांडून देव सर्वज्ञ । नादामध्यें व्हावें मग्न । तें प्रत्यक्ष विघ्न । आडवें आलें ।।३३।।

सर्वज्ञ देव बाजूला सारून संगीतासारख्या कलेच्या नादात तल्लीन होणे हे देवप्राप्तीच्या आड येणारे साक्षात विघ्न आहे. ।।३३।।

येक मन गुंतलें स्वरीं । कोणें चिंतावा श्रीहरी । बळेंचि धरुनियां चोरीं । शिश्रूषा घेतली ।।३४।।

मन एकच असते. ते स्वरात गुंतले तर हरीचे चिंतन कोण करणार? स्वररूप चोर कलाकाराला धरून नेऊन

स्वत:ची जणू सेवाच करून घेतो! तो भगवत् सेवेला मुकतो. ।।३४।।

करितां देवाचें दर्शन । आडवें आलें रागज्ञान । तेणें धरुनियां मन । स्वरामागें नेलें ।।३५।।

देवाचे दर्शन घ्यावयास जावे तो एखाद्या रागाची आलापी आडवी येऊन ती मनाला स्वरामागे ओढीत नेते! ।।३५।।

भेटों जातां राजद्वारीं । बळेंचि धरिला बेगारी । कळावंतां तैसी परी । कळेनें केली ।।३६।।

राजाला भेटण्यासाठी राजाच्या द्वारात जावे व कोणा राजसेवकाने ओढून नेऊन वेठबिगारीला लावावे तसे कलाकाराचे होते. ।।३६।।

मन ठेऊन ईश्वरीं । जो कोणी हरिकथा करी । तोचि ये संसारीं । धन्य जाणा ।।३७।।

जो चित्तवृत्ती ईश्वराकडे ठेवून हरिकथा करतो तोच ह्या प्रपंचात जन्माला येऊन धन्य होतो. ।।३७।।

जयास हरिकथेची गोडी । उठे नीच नवी आवडी । तयास जोडली जोडी । सर्वोत्तमाची ।।३८।।

भगवत्प्रेमाची चढती वाढती आवड होऊन जो हरिकथा करतो त्याला सर्वोत्तमहरीचे दर्शन होते. ।।३८।।

हरिकथा मांडली जेथें । सर्व सांडून धावे तेथें । आलस्य निद्रा दवडून स्वार्थें । हरिकथेसि सादर ।।३९।।

जेथे हरिकथा चालू असेल तेथे जो आळस, झोप व इतर आवडी सोडून धावत जातो व मनापासून त्या कथेत सामील होतो– ।।३९।।

हरिभक्तांचिये घरीं । नीच कृत्य अंगिकारी । साहेभूत सर्वांपरीं । साक्षपें होये ।।४०।।

व हरिभक्ताचे घरी सर्व प्रकारची कामे करून सर्व प्रकारे त्याला सतत मदत करतो– ।।४०।।

या नाव हरिदास । जयासि नामीं विश्वास । येथून हा समास । संपूर्ण जाला ।।४१।।

तोच खरा हरिदास. त्याची नामावर अपार श्रद्धा असते. हा समास येथे पूर्ण झाला. ।।४१।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'हरिकथालक्षणनाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'हरिकथालक्षण' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक चौदावा : अखंडध्याननाम

समास सहावा : चातुर्यलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

रूप लावण्य अभ्यासितां न ये । सहजगुणास न चले उपाये । कांहीं तरी धरावी सोये । अगांतुक गुणाची ।।१।।

शरीराची ठेवण (स्वरूप) व सौंदर्य ह्यात प्रयत्नाने बदल करता येत नाही. उपजत असणाऱ्या ह्या विशेषांवर काहीच इलाज नसतो. म्हणून जे गुण बाणविण्यासारखे आहेत त्यांचेसाठी प्रयत्न करावा. ॥१॥

काळें माणुस गोरें होयेना । वनाळास येत्न चालेना । मुक्यास वाचा फुटेना । हा सहजगुण ।।२।।

जन्मत: काळ्या वर्णाचा माणूस गोरा होत नाही. जो जन्मजात मुका आहे त्याला बोलता येत नाही. जन्मखुणा, व्रण इ. काढता येत नाहीत. (समर्थांच्या काळी शल्यचिकित्सेला असलेल्या मर्यादा लक्षात घ्याव्यात.) ॥२॥

आंधळें डोळस होयेना । बधिर तें ऐकेना । पांगुळ पाये घेइना । हा सहजगुण ।।३।।

जन्मांधाला दृष्टी येत नाही. बहिरा ऐकू शकत नाही. पांगळ्याला काही केले तरी चालता येत नाही. ॥३॥

कुरूपतेचीं लक्षणें । किती म्हणोनि सांगणें । रूप लावण्य याकारणें । पालटेना ।।४।।

'कुरूपता' ह्या शब्दाची व्याप्ती फार मोठी असून त्याची लक्षणे कितीतरी आहेत. म्हणून शरीराची ठेवण, इंद्रियांचे वैगुण्य व सौंदर्य ह्यांत बदल करता येत नाही. ॥४॥

अवगुण सोडितां जाती । उत्तम गुण अभ्यासितां येती । कुविद्या सांडून सिकती । शाहाणे विद्या ।।५।।

पण स्वभावाचे दोष मात्र घालवता येतात व सद्‌गुणांची जोपासना करता येते. शहाण्यांना कुविद्या सोडून सद्विद्या कमाविता येते. (पहा– २– १, २, ३) ॥५॥

मूर्खपण सांडितां जातें । शाहाणपण सिकतां येतें । कारबार करितां उमजतें । सकळ कांहीं ।।६।।

मूर्खपणा लक्षात घेऊन तो जाणीवपूर्वक सोडता येतो व शहाणपणा आत्मसात करता येतो. प्रयत्नाने हे जमते. ॥६॥

मान्यता आवडे जीवीं । तरी कां उपेक्षा करावी । चातुर्येविण उंच पदवी । कदापी नाहीं ।।७।।

प्रत्येकाला मानसन्मान, लोकप्रियता व भलेपणा हवासा वाटतो. मग सद्‌गुणांच्या जोपासनेकडे दुर्लक्ष करून कसे चालेल? शहाणपणा व सद्‌गुणाशिवाय खरे श्रेष्ठत्व कधीच मिळत नाही. ॥७॥

ऐसी प्रचित येते मना । तरी कां स्वहित कराना । सन्मार्गे चालातां जनां । सज्जना माने ।।८।।

हे नेहमीच अनुभवाला येत असताना तसे वागून आपले हित का साधू नये? सन्मार्गावरून चालणारे सज्जनांना आवडतात. ॥८॥

देहे नेटकें श्रृंघारिलें । परी चातुर्येविण नासलें । गुणेंविण साजिरें केलें । बाष्कळ जैसें ।।९।।

शरीर वस्त्र, अलंकार, केशभूषा इत्यादींनी सजविले तरी बुद्धीमत्ता नसेल तर सर्व व्यर्थ होय. एकही सद्‌गुण नसताना कोणाचा तरी सत्कारसमारंभ साजरा करावा त्याप्रमाणे. ॥९॥

अंतर्कळा श्रृंघारावी । नानापरी उमजवावी । संपदा मेळऊन भोगावी । सावकास ।।१०।।

माणसाने आपले अंतरंग अनेक प्रकारे नटवावे, बुद्धिमत्ता व कर्तबगारीतून अनेक प्रकारे वैभव मिळवून ते सुखाने भोगावे. ।।१०।।

प्रेत्न करीना सिकेना । शरीर तेंहि कष्टवीना । उत्तम गुण घेईना । सदाकोपी ।।११।।

प्रयत्नाने काही शिकायचे नाही, शरीराला कष्ट द्यायचे नाहीत, सद्गुण बाणवायचे नाहीत व दारिद्र्य व फजितीने सतत संतप्त असायचे! ।।११।।

आपण दुसऱ्यास करावें । तें उसिणें सवेंचि घ्यावें । जना कष्टवितां कष्टावें । लागेल बहु ।।१२।।

आपण दुसऱ्याशी जसे वागतो तशीच वागणूक आपल्याला तेथल्या तेथे मिळते. ज्या प्रमाणात इतरांना त्रास द्यावा त्याहून अधिक त्रास सोसावा लागतो. ।।१२।।

न्यायें वर्तेल तो शाहाणा । अन्याइ तो दैन्यवाणा । नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ।।१३।।

समाजात जो न्यायाने वागेल तोच शहाणा ठरतो. अन्याय करणाराला आपत्ती सोसाव्या लागतात. चातुर्याचे वागणे कसे असते ते चतुरालाच कळते. ।।१३।।

जें बहुतांस मानलें । तें बहुतीं मान्य केलें । येर तें वेर्थचि गेलें । जगनिंद्य ।।१४।।

जे बहुसंख्य लोकांना योग्य वाटते तेच ह्या जगात मान्यता पावते. त्यावेगळे जगाकडून निंदनीय ठरून व्यर्थ जाते. ।।१४।।

लोक आपणासि वोळावे । किंवा आवघेच कोंसळावे । आपणास समाधान फावे । ऐसें करावें ।।१५।।

लोक आपल्यावर संतुष्ट होऊन आपलेसे व्हावेत की ते सर्व विरोधात असावेत? ह्यातील जे समाधानकारक असेल ते करावे! ।।१५।।

समाधानें समाधान वाढे । मित्रिनें मित्रि जोडे । मोडितां क्षणमात्रें मोडे । बरेपण ।।१६।।

दुसऱ्यांचे समाधान केले तर आपलेही समाधान वाढते. एका मित्राबरोबर अनेक मित्र जोडले जातात. पण अनेक दिवसांचे चांगले संबंध क्षणात मोडले जाऊ शकतात. ।।१६।।

अहो कांहो अरे कांरे । जनीं ऐकिजेतें किं रे । कळत असतांच कां रे । निकामीपण ।।१७।।

'अहो' ला 'काहो' चा प्रतिसाद मिळतो. 'अरे' ला 'कारे' चे उत्तर मिळते असे सर्वांकडून ऐकावयास मिळते. हे कळूनही ते लक्षात न घेण्याचा नतद्रष्टपणा का करावा? ।।१७।।

चातुर्यें श्रृंघारे अंतर । वस्त्रें श्रृंघारे शरीर । दोहिमधें कोण थोर । बरें पाहा ।।१८।।

बुद्धिमत्तेने अंतरंग शोभते व वस्त्राने शरीर शोभून दिसते. ह्या दोन्हींत श्रेष्ठ काय ते विचार करून ठरवा. ।।१८।।

बाह्याकार श्रृंघारिलें । तेणें लोकांच्या हातासि काये आलें । चातुर्यें बहुतांसी रक्षिलें । नाना प्रकारें ।।१९।।

शरीर वस्त्रालंकारांनी शोभिवंत करून लोकांना प्रत्यक्ष काय मिळते? पण बुद्धिमत्तेमुळे अनेकांचे अनेक प्रकारे रक्षण होते. त्यांचे कल्याण होते. ।।१९।।

बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें । समस्तीं बरें म्हणावें । ऐसी वासना ।।२०।।

जेवणखाण व्यवस्थित असावे, वस्त्रालंकार चांगले घालावेत. सर्वांनी आपली वाहवा करावी असे सर्वांनाच वाटते. ।।२०।।

तनें मनें झिजावें । तेणें भले म्हणोन घ्यावें । उगें चि कल्पितां सिणावें । लागेल पुढें ।।२१।।

जर सर्वांकडून चांगले म्हणवून घ्यावयाचे असेल तर त्यासाठी शरीराला कष्ट द्यावे लागतात व मनाला मुरड

घालून इतरांसाठी झटावे लागते. असे न करता केवळ लोकांनी आपल्याला भले म्हणावे हा मनोरथच ठरून शीण होईल. ॥२१॥

लोकीं कार्यभाग आडे । तो कार्यभाग जेथें घडे । लोक सहजचि वोढे । कामासाठीं ।।२२।।

लोकांचे काम जेव्हा खोळंबते व त्या वेळी त्यांना आपली मदत होते तेव्हाच आपल्या कामाला लोक धावून येतात. ॥२२॥

म्हणोन दुसऱ्यास सुखी करावें । तेणें आपण सुखी व्हावें । दुसऱ्यास कष्टवितां कष्टावें । लागेल स्वयें ।।२३।।

म्हणून दुसऱ्यांना अधिकाधिक सुखी केले तरच आपल्याला सुख मिळेल. उलट दुसऱ्यांना त्रास दिला तर आपल्यालाही त्रास होईल. ॥२३॥

हें तों प्रगटचि आहे । पाहिल्याविण कामा नये । समजणें हा उपाये । प्राणीमात्रासी ।।२४।।

हे तर उघडपणें कळण्यासारखे आहे. मात्र तसा विचार केला असेल तरच तो उपयोगी पडतो हे सर्वांनीच नीट लक्षात ठेवावे. ॥२४॥

समजले आणी वर्तले । तेचि भाग्यपुरुष जाले । यावेगळे उरले । तें करंटे पुरुष ।।२५।।

सर्व काही नीट समजावून घेऊन त्याप्रमाणे जे प्रत्यक्षात वागतात त्यांनाच भाग्य मिळते. असे जे करीत नाहीत ते करंटेच रहातात. ॥२५॥

जितुका व्याप तितुकें वैभव । वैभवासारिखा हावभाव । समजले पाहिजे उपाव । प्रगटचि आहे ।।२६।।

व्यावहारिक जीवनात उद्योग-व्यवसायाचा जेवढा व्याप अधिक करावा तेवढे अधिक वैभव मिळते. त्या वैभवाच्या प्रमाणात श्रीमंतीचे जीवन जगता येते. हे सर्वत्र स्पष्टपणे दिसते. पण ते लक्षात घेतले पाहिजे. ॥२६॥

आळसें कार्येभाग नासतो । साक्षेप होत होत होतो । दिसते गोष्टी कळेना तो । शाहाणा कैसा ।।२७।।

आळस केला तर मांडलेला व्याप फुकट जातो. सातत्याने कष्ट करीत गेले तर व्याप वाढता वाढता वाढतच जातो. हे उघड असताना ज्याला कळत नाही त्याला शहाणा कसा म्हणावा? ॥२७॥

मित्रि करितां होतें कृत्य । वैर करितां होतो मृत्य । बोलिलें हें सत्य किं असत्य । वोळखावें ।।२८।।

सर्वांच्यात मिळूनमिसळून राहिले तर अनेक कामे होतात. फटकून राहिले तर सर्वत्र अपयश येते (मृत्य). हे माझे सांगणे खरे की खोटे ते थोड्याच निरीक्षणाने ओळखावे. ॥२९॥

आपणास शाहाणें करूं नेणे । आपलें हित आपण नेणे । जनीं मैत्रि राखों नेणे । वैर करी ।।२९।।

जो स्वत:ला शहाणा न करता, सर्वांत मिळूनमिसळून न राहता वैर करतो त्याला स्वत:चे हित साधता येत नाही. ॥२९॥

ऐसे प्रकारीचे जन । त्यास म्हणावें अज्ञान । तयापासीं समाधान । कोण पावे ।।३०।।

ह्याच प्रकारच्या लोकांना अज्ञानी म्हणतात. ते कोणालाही (स्वत:सह) समाधान देऊ शकत नाहीत. ॥३०॥

आपण येकायेकी येकला । सृष्टींत भांडत चालिला । बहुतांमध्यें येकल्याला । येश कैंचें ।।३१।।

स्वत:ला एकटा पाडून सर्वांशी सरसकट भांडतो, त्या समाजात एकाकी पडणाऱ्याला, यश कसे मिळेल? ॥३१॥

बहुतांचे मुखीं उरावें । बहुतांचे अंतरीं भरावें । उत्तम गुणीं विवरावें । प्राणीमात्रासी ।।३२।।

अनेकांच्या अंत:करणात स्वत:साठी अढळ स्थान तयार करावे. त्यामुळे त्यांच्या वाणीवर सतत आपले नाव असते. आपल्या सद्‌गुणांच्या सामर्थ्याने समाजात जणू व्यापून असावे. समाजालाही सद्‌गुणी करावे. ॥३२॥

शाहाणे करावे जन । पतित करावे पावन । सृष्टिमधें भगवद्भजन । वाढवावें ।। ३ ३।।

समाजाला शहाणे करावे. अनेक प्रकारांनी पतन झालेल्यांना पावन करण्यासाठी आपला आदर्श त्यांचेपुढे ठेवून त्यांना पावन करून घ्यावे व जगात भगवंताची भक्ती वाढवावी. ॥३३॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'चातुर्यलक्षणनाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'चातुर्यलक्षण' नावाचा सहावा समास समाप्त

दशक चौदावा : अखंडध्याननाम

समास सातवा : युगधर्मनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

नाना वेश नाना आश्रम । सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम । जेथें पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ।।१।।

चार आश्रम व त्यांचे ते ते वेश आहेत खरे. पण सर्वांना गृहस्थाश्रमाचाच आधार आहे. किंवा गृहस्थाश्रमातून म्हणजे विवाहातून ते सर्व आश्रमी जन्माला येतात. समाजातील सर्वांना त्या आश्रमात आधार मिळतो. ॥१॥

देव ऋषी मुनी योगी । नाना तापसी वीतरागी । पितृआदिकरून विभागी । अतीत अभ्यागत ।।२।।

गृहस्थाश्रमीं निर्माण जाले । आपला आश्रम टाकून गेले । परंतु गृहस्थागृहीं हिंडों लागले । कीर्तिरूपें ।।३।।

देव, ऋषी, मुनी, योगी, तपस्वी, विरक्त, पितर ह्या प्रकारात मोडणारे, अचानक येणारे पाहुणे, बोलाविलेले पाहुणे इ. सर्व. गृहस्थाश्रमातून जन्माला येतात. हे सर्व आपापले आश्रम बदलतात. परंतु त्यांची कीर्ती अनेक गृहस्थांच्या घरात मागे उरते. (ते अमुक घरात जन्मले, वाढले इ.) त्या रूपाने ते गृहस्थांच्या घरातच जणू फिरतात! ॥२-३॥

याकारणें गृहस्थाश्रम । सकळामधें उत्तमोत्तम । परंतु पाहिजे स्वधर्म । आणी भूतदया ।।४।।

म्हणून सर्व आश्रमांत गृहस्थाश्रम सर्वोत्तम आहे. पण त्यात स्वधर्माचरण व भूतदया असणे आवश्यक आहे. ॥४॥

जेथें शडकर्में चालती । विध्योक्त क्रिया आचरती । वाग्माधुर्यें बोलती । प्राणीमात्रासी ।।५।।

यज्ञ करणे, यज्ञ करवणे, अध्ययन करून अध्यापन करणे, दान देणे व घेणे अशी सहा कर्मे तेथे चालावीत. प्रत्येक कर्म विधिनुसार व्हावे व सर्व जीवांशी मधुरवाणीने बोलावे. ॥५॥

सर्व प्रकारें नेमक । शास्त्रोक्त करणें कांहीयेंक । त्याहिमध्यें अलोलिक । तो हा भक्तिमार्ग ।।६।।

सर्व नित्य, नैमित्तिक कर्मे शास्त्राप्रमाणे तंतोतंत करावीत. याला भक्तिमार्गाची जोड असेल तर तो गृहस्थाश्रमी अलौकिकच मानला पाहिजे. ॥६॥

पुरश्चरणी कायाक्लेसी । दृढव्रती परम सायासी । जगदीशावेगळें जयासी । थोर नाहीं ।।७।।

अनेक पुरश्चरणे करून कायिक तप करावे. प्रयत्नपूर्वक सर्व व्रते दृढतेने चालवावीत व जगदीशाहून श्रेष्ठ कोणीच नाही असा त्याचा निर्धार असावा.(असतो.) ॥७॥

काया वाचा जीवें प्राणें । कष्टे भगवंताकारणें । मनें घेतलें धरणें । भजनमार्गीं ।।८।।

शरीर, वाणी, जीव व प्राण या सर्वांना कितीही कष्ट झाले तरी भगवंताची उपासना सोडीत नाही किंवा देवांसाठीच त्या सर्वांना राबवतो व भजनाची अत्यंत आवड असते. ॥८॥

ऐसा भगवंताचा भक्त । विशेष अंतरीं विरक्त । संसार सांडून झाला मुक्त । देवाकारणें ।।९।।

असा भगवद्भक्त मनाने विरक्त असेल तर फारच चांगले. तो भगवंताच्या प्राप्तीसाठी यथासमय गृहस्थाश्रम सोडून देतो. ॥९॥

अंतरापासून वैराग्य । तेंचि जाणावें महद्भाग्य । लोलंगतेयेवढें अभाग्य । आणीक नाहीं ।।१०।।

वैराग्य मनापासून असेल तर त्यासारखे भाग्य नाही व उलट लोलुपता असेल तर तसे दुर्भाग्य नाही. ।।१०।।

राजे राज्य सांडून गेले । भगवंताकारणें हिंडलें । कीर्तिरूपें पावन जाले । भूमंडळीं ।।११।।

जडभरतासारखे राजे भगवद्प्राप्तीसाठी राज्य सोडून रानोमाळ हिंडले व तीर्थयात्रा केल्या. या जगात ते त्यांच्या या वैराग्याच्या कीर्तीने पावन झाले. ।।११।।

ऐसा जो कां योगेश्वर । अंतरीं प्रत्ययाचा विचार । उकलूं जाणे अंतर । प्राणीमात्रांचे ।।१२।।

अंत:करणात 'मी ब्रह्म आहे' असा दृढ व अपरिवर्तनीय निश्चय झालेला योगेश्वर सर्व जीवांचे मनोगत जाणून त्यांचे सुप्त भाव जागे करू शकतो. ।।१२।।

ऐसी वृत्ती उदासीन । त्याहिवरी विशेष आत्मज्ञान । दर्शनमात्रें समाधान । पावती लोक ।।१३।।

असा वैराग्यसंपन्न योगेश्वर ब्रह्मविद्येत प्रवीण, ब्रह्मज्ञ असेल तर त्याच्या केवळ दर्शनाने लोकांना समाधान मिळते. ।।१३।।

बहुतांसी करी उपाये । तो जनाच्या वाट्या न ये । अखंड जयाचे हृदये । भगवद्रूप ।।१४।।

तो अनेकांचे अध्यात्मविषयक संशय दूर करून त्यांचे मुमुक्षुत्व जागे करतो. त्याची अंत:करणवृत्ती सतत भगवत्‌चिंतनात रंगलेली असल्याने जनसामान्यांच्या उलाढालीत तो सापडत नाही. ।।१४।।

जनास दिसे हा दुश्चित । परी तो आहे सावचित । अखंड जयाचें चित्त । परमेश्वरीं ।।१५।।

दुरून पाहणाऱ्या अज्ञानी जनांना त्याचे कोठेच व कशातच लक्ष नाही असे वाटते. पण तो स्वरूपी अत्यंत सावधान असतो. त्याचे चित्त भगवत्स्मरणात असते. ।।१५।।

उपासनामूर्तिध्यानीं । अथवा आत्मानुसंधानीं । नाहीं तरी श्रवणमननीं । निरंतर ।।१६।।

कधी त्याच्या चित्तवृत्तीला सतत उपास्यमूर्तीचा वेध असतो, कधी ती आत्मानुसंधानात असते, तर कधी तो वेदान्ताच्या श्रवणमननात गुंतलेला दिसतो. ।।१६।।

पूर्वजांच्या पुण्यकोटी । संग्रह असिल्या गांठी । तरीच ऐसीयाची भेटी । होये जनासी ।।१७।।

पूर्वजांचे अमोल पुण्य संग्रही असल्याशिवाय अशा महात्म्याचे दर्शनसुद्धा होत नाही. ।।१७।।

प्रचीतिविण जें ज्ञान । तो आवघाचि अनुमान । तेथें कैंचें परत्रसाधन । प्राणीयासी ।।१८।।

प्रत्यक्ष ब्रह्मानुभवावाचून असलेले सर्व शब्दज्ञान केवळ अंदाजाचे असते. त्याने जीवाला मोक्ष कसा मिळेल? किंवा दुसऱ्याला मोक्षासाठी मार्गदर्शन कसे करता येईल? ।।१८।।

याकारणें मुख्य प्रत्यये । प्रचीतिविण कामा नये । उपायासारिखा अपाये । शाहाणे जाणती ।।१९।।

म्हणून प्रचीती किंवा अनुभव हाच मुख्य आहे. त्याशिवाय साफल्य नाही. अंदाजाचे शब्दज्ञान हा अपाय असून अनुभवज्ञान हा उपाय आहे असे बुद्धिमंतांना समजते. ।।१९।।

वेडें संसार सांडून गेलें । तरी तें कष्टकष्टोंचि मेलें । दोहिकडे अंतरलें । इहलोक परत्र ।।२०।।

अविचारी माणूस विरक्ताप्रमाणे संसारातून निघून जातो. पण अविचारी माणसाला कष्ट व यातनांशिवाय काहीच वाट्याला येत नाही. तो लौकिक व पारलौकिक कल्याण न साधताच मरून जातो. (पहा ओवी ९ व १०) ।।२०।।

रागें रागें निघोन गेला । तरी तो भांडभांडोंचि मेला । बहुत लोक कष्टी केला । आपणहि कष्टी ।।२१।।

जो संतापाच्या भरात संसार सोडून जातो तो त्याच्या संतापी स्वभावामुळे जाईल तेथे भांडतच राहतो. तो स्वत:बरोबर इतरांना छळून मरून जातो. ।।२१।।

निघोन गेला परी अज्ञान । त्याचे संगती लागले जन । गुरु शिष्य दोघे समान । अज्ञानरूपें ।।२२।।

‘जो संसाराचा त्याग करतो तो गुरू’ अशी उथळ व्याख्या करणारे मूर्ख त्याच्या नादी लागतात! तेथे तथाकथित गुरू व शिष्य सारखेच अज्ञानी असतात. ॥२२॥

आशाबद्धी अनाचारी । निघोनि गेला देशांतरीं । तरी तो अनाचारचि करी । जनामध्यें ।।२३।।

जो विषयासक्त व दुराचारी असतो तो घर सोडून दूर गेला तरी समाजात तो दुराचारानेच वागतो. ॥२३॥

गृहीं पोटेंविण कष्टती । कष्टी होऊन निघोन जाती । त्यास ठाईं ठाईं मारिती । चोरी भरतां ।।२४।।

त्याच्या घरातील माणसे उपाशी राहून दु:ख भोगतात. नाइलाजाने ती चोऱ्या करू लागली की सापडतात व लोक त्यांना भरपूर बडवतात. मग त्यांनाही देशोधडीला लागावे लागते. ॥२४॥

संसार मिथ्या ऐसा कळला । ज्ञान समजोन निघोन गेला । तेणें जन पावन केला । आपणाऐसा ।।२५।।

परंतु ज्याला संसाराचे मिथ्यात्व शास्त्रशुद्ध विचाराने मनापासून पटले आहे व ज्याला वेदान्तशास्त्राचे तत्त्वज्ञान पूर्णपणे आकलन झाले आहे तो संसारातून निघून गेला तर स्वत:बरोबर इतरांच्या जीवनाचे सार्थक करतो. त्यांना पावन करतो. ॥२५॥

येके संगतीनें तरती । येके संगतीनें बुडती । याकारणें सत्संगती । बरी पाहावी ।।२६।।

अशाच्या संगतीत लोक मुक्त होतात (ओवी २५) व दुसऱ्याच्या संगतीत (ओवी २२) वाया जातात म्हणून विचारपूर्वक सत्‌संगती साधावी. ॥२६॥

जेथें नाहीं विवेकपरीक्षा । तेथें कैंची असेल दीक्षा । घरोघरीं मागतां भिक्षा । कोठेंहि मिळेना ।।२७।।

जेथे ‘ब्रह्मसत्य जगन्मिथ्यात्व’ विवेक नसतो, तेथे अनुग्रहाचा अधिकार नसतो. केवळ ढोंग असते. अशा ढोंग्याला समाजात फार काळ मान्यता मिळत नाही. त्याच्या सामान्य पोटापाण्याचीही समाज व्यवस्था करीत नाही. ॥२७॥

जो दुसऱ्याचें अंतर जाणे । देश काळ प्रसंग जाणे । तया पुरुषा काय उणें । भूमंडळीं ।।२८।।

जो दुसऱ्याला काय हवे ते नेमकेपणाने जाणतो, प्रदेशाचे रीतीरिवाज, कालगतीने होणारे बदल व चालू परिस्थिती ओळखून लोकात वागतो त्याला या जगात काय कमी पडेल? ॥२८॥

नीच प्राणी गुरुत्व पावला । तेथें आचारचि बुडाला । वेदशास्त्रब्राह्मणाला । कोण पुसे ।।२९।।

जेव्हा ढोंग्याकडे (ओवी २७) व दुराचाऱ्याकडे (ओवी २३) गुरुत्व जाते तेव्हा धर्मपरमार्थाचे आचरणच नष्ट होते. अशा परिस्थितीत वेदवेदान्त, धर्मशास्त्र, व षट्‌कर्मे करणाऱ्या ब्राह्मणाला कोण विचारतो? ॥२९॥

ब्रह्मज्ञानाचा विचारू । त्याचा ब्राह्मणासीच अधिकारू । वर्णानां ब्राह्मणो गुरुः । ऐसें वचन ।।३०।।

(१४-३-४३ मध्ये “नाना संमति सिद्धान्त । पूर्व पक्षेसी’ मांडावेत असे समर्थ सांगतात. येथे लोकांमध्ये असलेली समजूत पूर्वपक्ष म्हणून मांडली असून पुढील ओवीत त्याचे खंडण करून वस्तुस्थिती मांडली आहे.) जेव्हा ब्रह्मज्ञानाचा विचार सांगावयाचा असतो तेव्हा तो सांगण्याचा अधिकार ब्राह्मणांनाच आहे असे समजतात. कारण ‘वर्णात ब्राह्मण श्रेष्ठ आहे’ असे शास्त्रवचन आहे. ॥३०॥

ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले । गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचें ।।३१।।

पण हल्लीच्या काळी ब्राह्मणांनी शास्त्रबुद्धी सोडली असून षट्‌कर्मादी सोडल्याने ते आचारभ्रष्ट झाले आहेत. स्वत:चे श्रेष्ठत्व सोडून दावलमलकाला भजणाऱ्याचे शिष्यत्व पत्करीत आहेत. (संदर्भ पुढील ओवी.) ॥३१॥

कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरास भजती । कित्येक तुरुक होती । आपले इच्छेने ।।३२।।

कित्येक ब्राह्मण मूर्खपणामुळे, लोभामुळे व स्वाभिमानशून्यतेमुळे दावलमलकाच्या वाऱ्या करू लागले. पीरांची उपासना करण्यासाठी स्वेच्छेने मुसलमान बनले! ॥३२॥

ऐसा कलयुगींचा आचार । कोठें राहिला विचार । पुढे पुढें वर्णसंकर । होणार आहे ।।३३।।

कलियुगातील समाजाचा आचार असाच असतो. त्यात आदर्श विचाराला वाव आहेच कोठे? यापुढे सर्व वर्णांचे (स्मृतिप्रणीत) एकीकरण अटळ आहे. ।।३३।।

गुरुत्व आलें नीचयाती । कांहींयेक वाढली महंती । शूद्र आचार बुडविती । ब्राह्मणाचा ।।३४।।

ढोंगी व दुराचारी व्यक्तींकडे गुरुत्व गेले व त्यांचे संप्रदाय वाढत चालले. ज्यांच्यावर धर्मशास्त्र व वेदान्तशास्त्र यांचे संस्कार नाहीत असे शूद्रवर्णीय तसे संस्कार असणाऱ्यांची जागा घेत आहेत. (संस्काराने शूद्राचा ब्राह्मण होतो व उलट ब्राह्मणाचा शूद्र होतो असे ब्रह्मपुराण सांगते). ।।३४।।

हें ब्राह्मणास कळेना । त्याची वृत्तिच वळेना । मिथ्या अभिमान गळेना । मूर्खपणाचा ।।३५।।

हे ब्राह्मणकुळात जन्मलेल्यांच्या लक्षात येत नाही व त्यांना त्याचे काही वाटत नाही! केवळ मूर्खपणामुळे 'मी ब्राह्मण' हा त्यांचा खोटा अहंकार जात नाही. ।।३५।।

राज्य नेलें म्लेंचिं क्षेत्रीं । गुरुत्व नेलें कुपात्रीं । आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहींच नाहीं ।।३६।।

सत्ता मुसलमानांच्या हातात गेल्याने धर्मजीवन बुडाले. परमार्थरूप मोक्षासाठी आवश्यक ते गुरुपद नालायकांच्या हातात गेले. त्यामुळे ऐहिक व पारलौकिक अशी दोन्ही जीवनांगे संपुष्टात आली. ।।३६।।

ब्राह्मणास ग्रामणीनें बुडविलें । विष्णूनें श्रीवत्स मिरविलें । त्याच विष्णूनें श्रापिलें । फरशरामें ।।३७।।

ब्राह्मणांचे ब्राह्मण्य अनाचारामुळे नष्ट झाले. त्याचा परिणाम असा झाला की ज्या भृगुब्राह्मणाने श्रीविष्णूच्या छातीवर मारलेली लाथ श्रीविष्णूने भूषण म्हणून मिरवली, त्याच विष्णूने स्वत:च्या परशुराम अवतारात ब्राह्मणांना शाप दिला! (देवांजवळ सद्गुणांचे कवतुक आहे. दुर्गुणांचे नाही. पुराणात सर्वश्रेष्ठ देव कोण ते ठरविण्यासाठी भृगुने ब्रह्मा, विष्णू व महेश यांच्या छातीवर लाथ मारल्याची कथा आहे. त्यात विष्णू श्रेष्ठ ठरले.) ।।३७।।

आम्हीहि तेचि ब्राह्मण । दु:खें बोलिलें हें वचन । वडिल गेले ग्रामणी करून । आम्हां भोंवते ।।३८।।

आम्ही त्या शापित ब्राह्मणांचेच वंशज आहोत! हे मला मोठ्या खेदाने सांगावे लागत आहे. पूर्वजांनी अनाचार केला खरा, पण आम्हाला त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत. ।।३८।।

अतांचे ब्राह्मणीं काये केलें । अन्न मिळेना ऐसें जालें । तुम्हा बहुतांचे प्रचितीस आलें । किंवा नाहीं ।।३९।।

त्यांत खरे तर हल्लींच्या ब्राह्मणांचा काय दोष? पण ते अन्नाला महाग झाले हे बहुतेकांना समजून आले की नाही ते तुम्हीच (श्रोते) सांगा. ।।३९।।

बरें वडिलांस काये म्हणावें । ब्राह्मणाचें अदृष्ट जाणावें । प्रसंगें बोलिलें स्वभावें । क्षमा केलें पाहिजे ।।४०।।

शास्त्रानुसार पूर्वजांना नावे ठेवू नयेत, हेही खरे. एकूण ब्राह्मणांचे प्रारब्धच तसे होते व आहे! हे सर्व प्रसंगाने बोलावे लागले. ते कोणाला झोंबले असेल तर त्यांनी क्षमा करावी!! ।।४०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'युगधर्मनिरूपणनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'युगधर्मनिरूपण' नावाचा सातवा समास समाप्त

दशक चौदावा : अखंडध्याननाम

समास आठवा : अखंडध्याननिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

बरें ऐसा प्रसंग जाला । जाला तो होऊन गेला । आतां तरी ब्राह्मणीं आपणाला । शाहाणे करावें ।।१।।

आज असा प्रसंग आला आहे हे खरे. पूर्वी जे झाले ते झाले. यापुढे तरी ब्राह्मणांनी ब्राह्मणासारखे वागावे. शहाणे व्हावे. (त्यांचा व कोणाचाही शहाणपणा पुढील आचाराने ठरतो–) ॥१॥

देव पुजावा विमळहस्तीं । तेणें भाग्य पाविजे समस्तीं । मूर्ख अभक्त वेस्तीं । दरिद्र भोगिजे ।।२।।

देवाची स्वच्छ हाताने व स्वच्छ चारित्र्याने पूजा करावी. त्यामुळे सर्व भाग्ये लाभतात. मूर्ख, प्रपंचात व्यस्त व अभक्त यांना दारिद्र्य भोगावे लागते. ॥२॥

आधीं देवास वोळखावें । मग अनन्यभावें भजावें । अखंड ध्यानचि धरावें । सर्वोत्तमाचें ।।३।।

प्रथम देव ही संकल्पना शास्त्रशुद्ध पद्धतीने समजावून घ्यावी व मग केवळ त्याचीच निष्ठापूर्वक उपासना करावी. अंत:करणवृत्तीला सर्वोत्तम परमेश्वराचे सतत अनुसंधान असावे. ॥३॥

सर्वांमधें जो उत्तम । तया नाव सर्वोत्तम । आत्मानात्मविवेकवर्म । ठाईं पाडावें ।।४।।

जो सर्वांत सूक्ष्म, व्यापक व सच्चिदानंदघन असतो, तो सर्वोत्तम म्हणावा. त्यालाच आत्मा म्हणतात व तो सोडून सर्व अनात्मसृष्टी असते, हे वर्म लक्षात ठेवावे. ॥४॥

जाणजाणों देह रक्षी । आत्मा द्रष्टा अंतरसाक्षी । पदार्थमात्रास परीक्षी । जाणपणें ।।५।।

जीवात्मा शरीररक्षणासाठी आवश्यक ते ते लक्षात घेऊन ते स्वीकारून किंवा टाळून शरीराचे रक्षण करतो व पूर्वसंस्काराने सर्व पदार्थांची परीक्षा करतो. त्या जीवात्म्यालाच उपाधिभेदाने व कार्यभेदाने आत्मा, द्रष्टा व अंतरसाक्षी म्हणतात. ॥५॥

तो सकळ देहामधें वर्ततो । इंद्रियेंग्राम चेष्टवितो । प्रचितीनें प्रत्यये येतो । प्राणीमात्रीं ।।६।।

तो सर्व प्राण्यांच्या शरीरात राहून त्यांच्या इंद्रियांना कार्याकडे प्रवृत्त करतो. प्राण्यांमध्ये दिसणाऱ्या जिवंतपणावरून त्याचे त्यांच्यातील अस्तित्व कळते. ॥६॥

प्राणीमात्रीं जगदांतरें । म्हणोनि राखावीं अंतरें । दाता भोक्ता परस्परें । सकळ कांहीं ।।७।।

आत्मा सर्व प्राण्यांत व पांचभौतिक सृष्टीत व्यापून आहे. तोच दाता व भोक्ता इ. भूमिका निरनिराळ्या शरीरांत पार पाडतो. म्हणून सर्वांची मने सांभाळावीत. ॥७॥

देव वर्ततो जगदांतरीं । तोचि आपुले अंतरीं । त्रैलोकींचे प्राणीमात्रीं । बरें पाहा ।।८।।

जो देव सर्व जगात, त्रैलोक्यातील जीवसृष्टीत व्यापून आहे, तोच आपल्याही देहात आहे हे नीट लक्षात घ्या. ॥८॥

मुळीं पाहाणार तो येकला । सकळां ठाईं विभागला । देहप्रकृतीनें जाला । भिन्न भिन्न ।।९।।

ईक्षण करणारा देव मूळचा एकटाच आहे. त्यानेच सृष्टीत जणू प्रवेश करून स्वत:ची सर्वांच्यात वाटणी केली व त्यांच्या त्यांच्या त्रिगुणात्मक बुद्धीनुसार स्वभावाने व योनीनुसार देहाने वेगळा झाला. ॥९॥

भिन्न भासे देहाकारें । प्रस्तुत येकचि अंतरें । बोलणें चालणें निर्धारें । त्यासीच घडे ।।१०।।

देह वेगळे असल्याने तो वेगळा वेगळा भासतो. पण त्या त्या अंत:करणांत आत्मा तोच, तसाच व तेवढाच असतो. त्यामुळे बोलणे, चालणे इ. कर्मे खरे तर तोच करतो. ॥१०॥

आपुले पारिखे सकळ लोक । पक्षी स्वापद पश्वादिक । किडा मुंगी देहधारक । सकळ प्राणी ।।११।।

खेचर भूचर वनचर । नाना प्रकारें जळचर । चत्वार खाणी विस्तार । किती म्हणोन सांगावा ।।१२।।

आपली व परकी माणसे, पक्षी, व्याघ्रादी, गायी, म्हशी, किडे, मुंग्या इ. सर्व प्राणी, आकाशात फिरणारे, जमिनीवर चालणारे, अरण्यात राहणारे इ. चारी खाणींचा पसारा किती म्हणून सांगावा! ॥११-१२॥

समस्त जाणीवेनें वर्तती । रोकडी पाहावी प्रचिती । त्याची आपुली संगती । अखंड आहे ।।१३।।

हे सर्व जीव सतत आपल्या सहवासात असल्याने ते ज्ञानपूर्वक समजून उमजून जीवन जगतात हे प्रत्यक्षात पहाता येते. त्यांचा आपल्याला सतत सहवास असतो. ॥१३॥

जगदांतरें वोळला धणी । किती येकवटील प्राणी । परी ते वोळायची करणी । आपणापासीं ।।१४।।

या जगाचा स्वामी सर्वांच्या अंत:करणांत राहून आपल्यावर प्रसन्न झाला तर किती तरी जीव आपलेसे होतील. पण त्याची प्रसन्नता आपल्याच हातात आहे! ॥१४॥

हें आपणाकडेच येतें । राजी राखिजे समस्तें । देहासि बरें करावें तें । आत्मयास पावे ।।१५।।

ती जबाबदारी आपलीच आहे. त्यासाठी जास्तीत जास्त लोकांची मने सांभाळावीत. त्यांच्या शरीराच्या सुखासाठी जे करावे त्याने त्यातील जीवात्मा प्रसन्न होतो. ॥१५॥

दुर्जन प्राणी त्यांतील देव । त्याचा लाताड स्वभाव । रागास आला जरी राव । तरी तंडों नये कीं ।।१६।।

दुष्ट व दुर्जनांच्या देहातील देवरूप जीवात्म्याचा स्वभाव तिरसट किंवा भांडखोर असल्याने तो संतापला तरी त्याच्यातील स्वामीशी आपण उलट भांडू नये. ॥१६॥

प्रसंगी सांडीच करणें । पुढें विवेकें विवरणें । विवेक सज्जनचि होणें । सकळ लोकीं ।।१७।।

अशा प्रसंगी आपणच शांतपणे दूर होऊन नंतर त्याची समजूत घालावी. विवेकाने सर्वांना सज्जन करावे. ॥१७॥

आत्मत्वीं दिसतो भेद । हा अवघाचि देहसमंध । येका जीवनें नाना स्वाद । औषधीभेदें ।।१८।।

ज्याप्रमाणें त्यांना मिळणारे पाणी एकच असले तरी प्रत्येक वनस्पतीची चव वेगळी असते, त्याप्रमाणे सर्वांचा आत्मा एकच असला तरी देहभेदामुळें व स्वभावभेदामुळें आत्मा वेगळा भासतो. ॥१८॥

गरळ आणि अमृत जालें । परी आपपण नाहीं गेलें । साक्षत्वें आत्मयास पाहिलें । पाहिजे तैसें ।।१९।।

सर्पाचें विष व अमृत या दोन्हींत पाण्याचा भाग असतोच. त्याप्रमाणे कोणत्याही बुद्धीत साक्षीरूपाने आत्मा असतो हे लक्षात ठेवून त्या दृष्टीने पहावे. ॥१९॥

अंतरनिष्ठ जो पुरुष । तो अंतरनिष्ठेनें विशेष । जगामधें जो जगदीश । तो तयास वोळखे ।।२०।।

आत्मानुसंधानात राहणारा साधू त्या अनुसंधानाच्या विशेषामुळे (परिणाम) जगतात भरून राहिलेल्या जगदीशाला सतत ओळखून राहतो. ॥२०॥

नयनेंचि पाहावा नयेन । मनें शोधावें मन । तैसाचि हा भगवान् । सकळां घटीं ।।२१।।

ज्याप्रमाणे डोळ्याने जणू स्वत:ला पहावे, मनाने मनालाच शोधावे, त्याप्रमाणे हा भगवन्त, सर्व जीवजडसृष्टीत आपला आपणच असतो. डोळ्यांत डोळा असतोच. तो वेगळेपणाने पाहावा लागत नाही. (पहा– अमृतानुभव– अज्ञान खंडण ओवी १२४) ॥२१॥

तेणेंविण कार्यभाग आडे । सकळ कांहीं तेणेंचि घडे । प्राणी विवेकें पवाडे । तेणेंचि योगें ।।२२।।

त्या आत्म्याच्या अधिष्ठानावाचून शरीराचा एकही व्यापार चालत नाही. सर्व व्यापार त्याच्या सत्तेवर चालतात. जीवसृष्टी विवेकाने चालते ती ज्ञानरूप आत्मा असतो म्हणूनच. ॥२२॥

जागृतीस व्यापार घडतो । समंध तयासीच पडतो । स्वप्नामधें घडे जो तो । येणेंचि न्यायें ।।२३।।

माणूस झोपेतून जागा झाल्यावर घडणारे सर्व व्यवहार आत्मरूप चिदाभासाला दृश्य दिसू लागल्याने होतात. स्वप्नातील तैजसरूप जीवात्माच मनोमय सृष्टी निर्माण करून ती पहातो. ॥२३॥

अखंड ध्यानाचें लक्षण । अखंड देवाचें स्मरण । याचें कळतां विवरण । सहजचि घडे ।।२४।।

हे लक्षात घेऊन त्या देवाच्या अखंड अनुसंधानात राहणें हेच ध्यानाचे लक्षण होय. विश्व हा जागृतीचा, तैजस हा स्वप्नाचा व प्राज्ञ हा सुषुप्तीचा भोक्ता असून तुरीय तिन्ही अवस्थांचा साक्षी आहे. हा साक्षीच देव आहे हे कायमचे ठसले तर 'सहजध्यान' घडते. ॥२४॥

सहज सांडून सायास । हाचि कोणीयेक दोष । आत्मा सांडून अनात्म्यास । ध्यानीं धरिती ।।२५।।

हे सहज होणारे ध्यान सोडून कष्टाच्या व क्लिष्ट ध्यानप्रक्रिया वापरणे हा दोषच आहे. हे लोक तुरीयरूप आत्मा सोडून मनचित्तादी अनात्म पदार्थांचा ध्यानासाठी उपयोग करतात. ॥२५॥

परी तें धरितांहि धरेना । ध्यानीं येती वेक्ति नाना । उगेंचि कष्टती मना । कासाविस करूनी ।।२६।।

पण ते कितीही धरू गेले तरी धरले जात नाही! ध्यानात कित्येक नामे व रूपे समोर येतात व हे टाळण्यासाठी जीव कासावीस करून मनाला यातना देतात. ॥२६॥

मूर्तिध्यान करितां सायासें । तेथें येकाचें येकचि दिसे । भासों नये तेंचि भासे । विलक्षण ।।२७।।

मूर्तीचे ध्यान करू गेले तर ज्याची मूर्ती आहे, त्याऐवजी काहीही दिसू लागते! जे दिसू नये, अशी अपेक्षा असते असे विचित्र काहीतरी भासू लागते. ॥२७॥

ध्यान देवाचें करावें । किंवा देवाल्याचें करावें । हेंचि बरें विवरावें । आपले ठाईं ।।२८।।

ध्यान देवाचे करावयाचे की देवालयाचे यांचा स्वत:शी एकदाच ठाम निर्णय करावा. ॥२८॥

देह देउळ आत्मा देव । कोठें धरूं पाहातां भाव । देव वोळखोन जीव । तेथेंचि लावावा ।।२९।।

अचेतन शरीर हे देवालय असून चेतन आत्मा त्यातील देव आहे. त्याला ओळखून त्यात जीवभावाचे निवेदन म्हणजे विलीनीकरण करावे. ॥२९॥

अंतरनिष्ठा ध्यान ऐसें । दंडकध्यान अनारिसें । प्रत्ययेविण सकळ पिसें । अनुमानध्यान ।।३०।।

अंतरनिष्ठ असे ध्यान करतो. इतर अन्तर्भ्रष्टांचे ध्यान याहून वेगळे म्हणजे पारंपरिक पद्धतीचे असते. केवळ कल्पनेने कशीतरी बसवलेली ध्यानाची रीत वेडेपणाची असून ती अनुभव देऊ शकत नाही. ॥३०॥

अनुमानें अनुमान वाढे । ध्यान धरितां सवेंचि मोडे । उगेचि कष्टती बापुडे । स्थूळध्यानें ।।३१।।

स्थूल म्हणजे अनात्मवस्तूंच्या साह्याने केलेले ध्यान काल्पनिक असून त्यातून अनेक कल्पना निर्माण होतात. असे ध्यान साधले असे वाटते तोच मोडते व अकारण कष्ट मात्र पदरात पडतात. ॥३१॥

देवास देहधारी कल्पिती । तेथें नाना विकल्प उठती । भोगणें त्यागणें विपत्ति । देहयोगें ।।३२।।

देवाला देह असतो अशी कल्पना केल्याने अनेक देहधारी देवांचे विकल्प किंवा पर्यायांची कल्पना निर्माण होते. देह असला की भोग, त्याग, संकटे इ. हजरच असतात! (देव भोगतात, त्याग करतात, संकटे सहन करतात इ.) ॥३२॥

ऐसें मनीं आठवतें । विचारितां भलतेंचि होतें । दिसों नये तें दिसतें । नाना स्वप्नीं ।।३३।।

ध्यानाच्या वेळी हे सर्व आठवत रहाते. ध्यानाच्या प्रक्रियेचा विचार करू लागले तर भलतेच विचार येतात व डोळ्यासमोर अनपेक्षितपणे नको ती दृश्ये दिसू लागतात. (ध्यानकाळीचे स्वप्न) ॥३३॥

दिसतें तें सांगतां न ये । बळें भावार्थ धरितां नये । साधक कासाविस होये । अंतर्यामीं ।।३४।।

जे दिसते ते कोणाला सांगायची सोय नाही (त्यामुळे ध्यानातील अपयश जगाला कळते). बळजबरीने ध्येयरूप निराकार देवाचे अनुसंधान साधत नाही. असा कोंडमारा झाल्याने साधक मनात कासावीस होतो. ॥३४॥

सांगोपांग धडे ध्यान । त्यास साक्ष आपुलें मन । मनामध्यें विकल्पदर्शन । होऊंच नये ।।३५।।

जसे साधले पाहिजे तसे ध्यान साधत आहे की नाही हे त्या साधकालाच कळते. ध्यानावस्थेत एकही विचारतरंग न उमटता शुद्ध जाणिवेत असणे हेच यशस्वी ध्यान होय. ॥३५॥

फुटक मन येकवटिलें । तेणें तुटक ध्यान केलें । तेथें कोण सार्थक जालें । पाहाना कां ।।३६।।

अन्त:करणवृत्ती एकाग्र करण्याच्या प्रयत्नात ती क्षणभर एकाग्र होते व क्षणात दुसरे विचार येऊ लागतात. असे तुटक ध्यान घडले तर एकाग्रतेचे सर्व प्रयत्न फुकट ठरतात. त्याने अस्सल ध्यान सिद्ध होत नाही हे लक्षात घ्यावे. ॥३६॥

अखंड ध्यानें न घडे हित । तरी तो जाणावा पतित । हाचि अर्थ सावचित । बरा पाहावा ।।३७।।

जो अतूट ध्यानाने जीव ब्रह्मैक्याचा अनुभव घेत नाही व स्वत:चे हित साधत नाही, त्यालाच पतित म्हणावे... हे नीट लक्ष देऊन लक्षात घ्यावे. ॥३७॥

ध्यान धरितें तें कोण । ध्यानीं आठवतें तें कोण । दोनीमधें अनन्य लक्षण । असिलें पाहिजे ।।३८।।

ध्यान धरू पहाणारा व ज्याचे ध्यान धरावयाचे तो यांच्यात मूळचे ऐक्य असले पाहिजे. (ध्याता जीव व ध्येय आत्मा मूळचे एक आहेत.) ॥३८॥

अनन्य सहजचि आहे । साधक शोधून न पाहे । ज्ञानी तो विवरोन राहे । समाधानें ।।३९।।

दोघांतील ऐक्य मूळचेच आहे. पण साधक ते अनुभवण्याचा योग्य प्रयत्न करीत नाही... जीवन्मुक्त ते ऐक्य जाणून व अनुभवून समाधानात रहातो. ॥३९॥

ऐसीं हे प्रत्ययाची कामें । प्रत्ययेंविण बाधिजे भ्रमें । लोकदंडकसंभ्रमें । चालती प्राणी ।।४०।।

ध्यान हे अनुभवाचेच काम आहे. अनुभवावाचून जे काही असते ते सर्व भ्रमरूप असते. सामान्य साधक रूढ, पारंपरिक व अशास्त्रीय पद्धतीने ध्यान करतो. ॥४०॥

दंडकध्यानाचें लक्षण । धरून बैसलें अवलक्षण । प्रमाण आणि अप्रमाण । बाजारी नेणती ।।४१।।

हीच ध्यानाची पद्धत बरोबर आहे, अशा भ्रमात राहणारा दुर्दैवी साधक शास्त्र व शास्त्रबाह्य असा फरक जाणीत नाही. त्याची बुद्धी अतिसामान्य असते. ॥४१॥

मिथ्या समाचार उठविती । वाउग्याच बोंबा घालिती । मनास आणितां अंतीं । आवघेंचि मिथ्या ।।४२।।

ध्यानासंबंधी व ध्यानस्थासंबंधी हव्या त्या अफवा पसरवितात. (जमिनीपासून सहा इंचावर तरंगत रहाणे इ.) वाटेल त्या कंड्या पिकवितात. (ध्यानस्थ स्थितीत अंगात देवाचा संचार होणे इ.) या सर्वांचा शास्त्रशुद्ध विचार केला तर त्याला काडीइतकी किंमत नाही. ॥४२॥

कोणीयेक ध्यानस्त बैसला । कोणीयेक सिकवी त्याला । मुकुट काढूनि माळ घाला । म्हणिजे बरे ।।४३।।

(मानसपूजेत देवाला हार घालीत असता ती आखूड असल्याने व देवाचा मुगुट मोठा असल्याने तो देवाच्या

गळ्यात जाईना! तेव्हा त्या पूजेतच–) ध्यानस्थ बसलेल्याला कोणी सल्ला देऊ लागला की देवाच्या मस्तकावरील मुगुट काढा म्हणजे हार गळ्यात घालता येईल! ।।४३।।

मनाचेथें काये दुष्काळ । जे आखुड कल्पिली माळ । सांगते ऐकते केवळ । मूर्ख जाणावे ।।४४।।

वास्तविक मानसपूजेत सामुग्रीला काय तोटा? कल्पनाच करायची तर आखूड हाराची कल्पना का करावी? मुगुट काढून हार घाला असे सांगणारा, व आखूड हाराची कंजूष कल्पना करणारा दोघे मूर्खच! ।।४४।।

प्रत्यक्ष कष्ट करावे न लगती । दोरे फुलें गुंफावी न लगती । कल्पनेची माळ थिटी करिती । काये निमित्य ।।४५।।

मानसपूजेतील अर्चनरूप ध्यानासाठी, दोरा घेऊन त्यात बाहेरून आणलेली फुले गुंफण्याचे कष्ट मुळीच नसतात. केवळ कल्पनेचा हार आखूड का करावा? ।।४५।।

बुधीविण प्राणी सकळ । ते ते अवघेचि बाष्कळ । तया मूर्खासीं खळखळ । कोणें करावी ।।४६।।

निर्बुद्ध माणसे खरोखर टाकावू असतात. निरर्थक असतात. त्या मूर्खांना काही समजावण्यासाठी त्यांच्याशी हुज्जत कशासाठी घालावी? ।।४६।।

जेणें जैसा परमार्थ केला । तैसाच पृथ्वीवरी दंडक चालिला । साता पांचाचा बळावला । साभिमान ।।४७।।

जो आपल्या मनाने जसा परमार्थ करतो, तसा संप्रदाय तो निर्माण करून त्यातील पांच सात शिष्यांच्या बळावर आचार्यपदाचा अभिमान बाळगतो. त्याने मांडलेला हा फड थोडा काळ टिकूनही राहतो. ।।४७।।

प्रत्ययेंविण साभिमान । रोगी मारिले झांकून । तेथें अवघाचि अनुमान । ज्ञान कैंचें ।।४८।।

कोणा रोग्याला औषध न देता झोपवून ठेवून मारावे त्याप्रमाणे अनुभवावाचून केवळ अभिमान व अंदाज या सामुग्रीवर आत्मज्ञान कसे होईल? ।।४८।।

सर्व साभिमान सांडावा । प्रत्ययें विवेक मांडावा । माया पूर्वपक्ष खंडावा । विवेकबळें ।।४९।।

म्हणून सर्व तऱ्हेचा स्वतंत्र विचाराचा अहंकार सोडावा व शास्त्रशुद्ध विवेक अनुभवपूर्वक मांडावा. मायेचा अध्यारोप व अपवादरूप विवेक सांगून घालवावा. ।।४९।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अखंडध्याननिरूपणनाम' समास आठवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'अखंडध्याननिरूपण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक चौदावा : अखंडध्याननाम

समास नववा : शाश्वतनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

पिंडाचें पाहिलें कौतुक । शोधिला आत्मानात्मा विवेक । पिंड अनात्मा आत्मा येक । सकळ कर्ता ।।१।।

अध्यात्माला अनुकूल मानवी शरीराची ईश्वरालाही आवडलेली रचना परमार्थाचे दृष्टीने पाहिली. (पहा– ऐतरेय.उप. १-२-३) त्यांत पांचभौतिक शरीर अनात्म असून एका चेतन आत्म्याच्या सत्तेवर, शरीराचे सर्व व्यापार चालतात असेही पाहिले. ॥१॥

आत्म्यास अनन्यता बोलिली । ते विवेकें प्रत्यया आली । आतां पाहिजे समजली । ब्रह्मांडरचना ।।२।।

जीव आत्म्याहून वेगळा नाही हे शास्त्रवचन प्रत्यक्ष अनुभवले. आता ब्रह्मांडरचना समजावून घ्यावी. ॥२॥

आत्मानात्माविवेक पिंडीं । सारासारविचार ब्रह्मांडी । विवरविवरों हे गोडी । घेतली पाहिजे ।।३।।

शरीराचे संदर्भात आत्म व अनात्म विचार करावा व ब्रह्मांडाचे बाबतीत सार व असार विचार करावा. ही स्पष्टीकरणपूर्वक विचार करण्याची गोडी लागावी. ॥३॥

पिंड कार्य ब्रह्मांड कारण । याचे करावें विवरण । हेंचि पुढें निरूपण । बोलिलें असे ।।४।।

ब्रह्मांड हे कारण असून पिंड हे कार्य आहे. याचे स्पष्टीकरण समजावून घ्यावे. तेच आता ऐका. ॥४॥

असार म्हणिजे नासिवंत । सार म्हणिजे तें शाश्वत । जयास होईल कल्पांत । तें सार नव्हे ।।५।।

जे नाश होणारे असते, ते असार असून अविनाशी ते सार असते. कल्पाएवढे प्रदीर्घ आयुष्य असूनही ज्याला विनाश असतो ते असारच असते. ॥५॥

पृथ्वी जळापासून जाली । पुढें ते जळीं मिळाली । जळाची उत्पत्ति वाढली । तेजापासुनी ।।६।।

पृथ्वी पाण्यापासून तयार होऊन शेवटी ती पाण्यातच विरते (कार्य कारणात विलीन होते) पाणी तेजापासून तयार होते. ॥६॥

तें जळ तेजें शोषिलें । महत्तेजें आटोन गेलें । पुढें तेजचि उरलें । सावकाश ।।७।।

पुढें प्रलयकाळी तेज पाण्याला शोषते. भयंकर तेजाने पाणी आटून गेल्यावर केवळ तेज उरते. ॥७॥

तेज जालें वायोपासुनी । वायो झडपी तयालागुनी । तेज जाउनी दाटणी । वायोचीच जाली ।।८।।

तेज वायूपासून होते. वायू तेजाला शांत करतो व तेज शांत झाल्यावर केवळ वायूच भरून राहतो. ॥८॥

वायो गगनापासुनी जाला । मागुतां तेथेंचि विराला । ऐसा हा कल्पांत बोलिला । वेदांतशास्त्रीं ।।९।।

वायू आकाशापासून होतो. पुढे तो त्यांतच लीन होतो. कल्पांताचे हे वर्णन वेदान्तशास्त्रात आहे. ॥९॥

गुणमाया मूळमाया । परब्रह्मीं पावती लया । तें परब्रह्म विवराया । विवेक पाहिजे ।।१०।।

गुणमाया व ती जिच्यातून प्रगट होते ती मूळमाया, दोन्ही परब्रह्मात लीन होतात. त्या परब्रह्माची ओळख करून घेऊन (परोक्षज्ञान) ते अनुभवण्यासाठी (अपरोक्षज्ञान) ब्रह्मविद्येची आवश्यकता आहे. (विवेक) ॥१०॥

सर्व उपाधींचा सेवट । तेथें नाहीं दृश्य खटपट । निर्गुण ब्रह्म घनदाट । सकळां ठाईं ।।११।।

जेथे स्थूल व सूक्ष्म अशी एकही उपाधी नाही, जेथे नामरूपात्मक सृष्टीचा (दृश्य) लेशही नाही ते सत्घन, चित्घन व आनंदघन ब्रह्म निर्गुण स्वरूपात सर्वत्र व्यापून राहिलेले असते. ॥११॥

उदंड कल्पांत जाला । तरी नाश नाहीं तयाला । मायात्यागें शाश्वताला । वोळखावें ।।१२।।

लक्षावधी वेळा कल्पोकल्पी सृष्टीचा नाश होत राहिला तरी ब्रह्म अविनाशी असते. मायिक सृष्टीचा निरास करून नित्य अधिष्ठान ब्रह्म जाणावे. ॥१२॥

देव अंतरात्मा सगुण । सगुणें पाविजे निर्गुण । निर्गुणज्ञानें विज्ञान । होत असे ।।१३।।

देवाचे ईश्वर (अंतरात्मा) हे सगुण रूप असून त्याच्या उपासनेने निर्गुण देवाचा 'तो मी' असा अनुभवाभ्यास करावा. नंतर 'तो व मी' असा अभ्यास संपून सहजस्थितिरूप विज्ञान होते. ॥१३॥

कल्पनेतीत जें निर्मळ । तेथें नाहीं मायामळ । मिथ्यत्वें दृश्य सकळ । होत जातें ।।१४।।

कल्पनारूप मायेचा जराही डाग नसलेले ते ब्रह्म विमल आहे. सर्व दृश्य सृष्टी अध्यस्त म्हणजे भ्रमरूप आहे, असा निश्चय होत जातो. (सृष्टी ही कल्पना आहे.) ॥१४॥

जें होतें आणि सवेंचि जातें । तें तें प्रत्ययास येतें । जेथें होणें जाणें नाहीं तें । विवेकें वोळखावें ।।१५।।

जे उत्पन्न होते व लगेच नष्ट होते ते पंचज्ञानेंद्रियांचे मदतीने कळते. (दिसते, ऐकू येते इ. येथील 'सवेचि' हा शब्द सापेक्ष समजावा.) पण ब्रह्माला उत्पत्ती व नाश नाही हे विचाराने समजून घ्यावे. ॥१५॥

येक ज्ञान येक अज्ञान । येक जाणावें विपरीत ज्ञान । हे त्रिपुटी होये क्षीण । तेंचि विज्ञान ।।१६।।

जे ज्ञानाला विरोधी असते ते अज्ञान. ज्ञानाचा अभाव म्हणजे अज्ञान नव्हे. अज्ञानाचा परिणाम म्हणून विपरीत ज्ञान होते. वेदान्त शास्त्राच्या अभ्यासाने व श्रीगुरूंकडून मिळालेल्या महावाक्याने ज्ञान होऊन अज्ञान व विपरीत ज्ञान जाते. पुढे अज्ञान, विपरीत ज्ञान व ज्ञान तिन्ही मावळून विज्ञान उरते. (अधिष्ठान ब्रह्माच्या अज्ञानामुळें त्यावर जगताचे विपरीत ज्ञान होते. वेदान्तचिंतनाने अधिष्ठानाचे ज्ञान होऊन विपरीत ज्ञान मावळते व विज्ञानात तिन्ही मावळतात. अज्ञान अनिर्वचनीय आहे.) ॥१६॥

वेदांत सिधांत धादांत । याची पाहावी प्रचित । निर्विकार सदोदित । जेथें तेथें ।।१७।।

ध पासून सुरुवात केलेल्या उलट्या वर्णमालेतील द पर्यंत म्हणजे संपूर्णपणें वेदान्ताच्या सिद्धान्ताच्या सत्यत्वाची प्रचीती घ्यावी. निर्विकार व नित्यब्रह्म सर्वत्र व्यापून आहे. (हाच तो सिद्धान्त.) ॥१७॥

तें ज्ञानदृष्टीनें पाहावें । पाहोन अनन्य राहावें । मुख्य आत्मनिवेदन जाणावें । याचें नांव ।।१८।।

हे केवळ ज्ञानाच्या दृष्टीने पहावयाचे आहे. (ब्रह्म डोळ्याने प्रत्यक्ष कधीच दिसत नाही.) ते पाहून 'ते मी आहे' असे ऐक्य साधलेल्या स्थितीत रहावे. यालाच खरे आत्मनिवेदन म्हणतात. ॥१८॥

दृश्यास दिसतें दृश्य । मनास भासतो भास । दृश्यभासातीत अविनाश । परब्रह्म तें ।।१९।।

जे चर्मचक्षूंना दिसते त्याला दृश्य म्हणतात. जो मनाला जाणवतो तो भास होय. अविनाशी ब्रह्म दृश्यही नाही व त्याचा भासही होत नाही. ॥१९॥

पाहों जातां दुरीच्या दुरी । परब्रह्म सबाहेअंतरीं । अंतचि नाहीं अनंत सरी । कोणास द्यावी ।।२०।।

जेवढ्या दूर अंतराची कल्पना करावी त्याहून; व्यापक ब्रह्म दूर आहे. ब्रह्म देह व जगताच्या आतबाहेर व्यापून आहे. त्याच्या अनन्तत्वाला देण्यासाठी उदाहरणच सापडत नाही. (पहा. ईश.उप. ५) ॥२०॥

चंचळ तें स्थिरावेना । निश्चळ तें कदापी चळेना । आभाळ येतें जातें गगना । चळण नाहीं ।।२१।।

जे चंचळ असते ते कधीच स्थिर नसते. जे अचळ असते ते कधीच ढळत नाही. उदा. आकाशातील चंचळ ढग उडून गेले तरी आकाश जसेच्या तसे रहाते. ॥२१॥

जें विकारें वाढे मोडे । तेथें शाश्वतता कैंची घडे । कल्पांत होताच विघडे । सकळ कांहीं ।।२२।।

वाढणे व मोडणे (वर्धते, म्रियते) हे विकार ज्याला असतात ते शाश्वत नसते. कल्पाचा शेवट होताच सर्व दृश्याचे विघटन होते. ।।२२।।

जें अंतरींच भ्रमलें । मायासंभ्रमें संभ्रमलें । तयास हें कैसें उकले । आव्हाट चक्र ।।२३।।

ज्यांच्या बुद्धीलाच मायेच्या प्रभावामुळे भ्रम झाला आहे, त्यांना या गतिमान सृष्टिचक्राचे आकलन होत नाही. ।।२३।।

भिडेनें वेव्हार निवडेना । भिडेनें सिधांत कळेना । भिडेनें देव आकळेना । आंतर्यामीं ।।२४।।

व्यवहारात भीड धरली तर तो योग्य पद्धतीने करता येत नाही. स्वत:चे पूर्वग्रह कायम ठेवून वेदान्त शास्त्राचा अभ्यास केला तर त्याचे रहस्य उलगडत नाही व अहंता, सांभाळून ठेवली तर 'मी ब्रह्म' असा अनुभव येत नाही. (येथे भीड या शब्दाचे तीन संदर्भात तीन अर्थ केले आहेत.) ।।२४।।

वैद्याची प्रचित येईना । आणि भीडहि उलंघेना । तरी मग रोगी वांचेना । ऐसें जाणावें ।।२५।।

वैद्याच्या औषधाने आजार बराही होत नाही व भीड पडल्याने दुसऱ्या वैद्याकडेही जाता येत नाही असे झाले तर रोगी वाचणे शक्य नाही हे निश्चित समजावे. ।। ।२५।।

जेणें राजा वोळखिला । तो राव म्हणेना भलत्याला । जेणें देव वोळखिला । तो देवरूपी ।।२६।।

ज्याला राजा नक्की माहीत आहे, तो भलत्याला राजा समजत नाही. त्याप्रमाणे ज्याने खरा देव ओळखला आहे तो स्वत:च देव होतो. (बाहेरील देवाला देव समजत नाही. त्याची त्याला भीड पडत नाही). ।।२६।।

जयास माईकाची भीड । तें काये बोलेल द्वाड । विचार पाहातां उघड । सकळ कांहीं ।।२७।।

ज्याला दृश्य मायिक सृष्टीची आसक्ती (भीड) सुटत नाही त्या मूढाला देवाविषयी काय सांगता येईल? हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. ।।२७।।

भीड मायेऐलीकडे । परब्रह्म तें पैलीकडे । पैलीकडे ऐलीकडे । सदोदित ।।२८।।

आसक्त (भिडस्त) जीव मायेहून स्थूल असून ब्रह्म मायेहून सूक्ष्म आहे. ही वाटणी सतत तशीच आहे. ।।२८।।

लटिक्याची भीड धरणें । भ्रमें भलतेंचि करणें । ऐसी नव्हेंती लक्षणें । विवेकाचीं ।।२९।।

जे भ्रमरूप आहे त्याची आसक्ती धरून त्या भ्रमिष्ट स्थितीत मदमत्सरादी जीवन जगणे ही विवेकाची लक्षणे नव्हेत. ।।२९।।

खोटें आवघेंचि सांडावें । खरें प्रत्ययें वोळखावें । मायात्यागें समजावें । परब्रह्म ।।३०।।

जे अनिर्वचनीय आहे त्याची आसक्ती सोडून सत्य जाणून त्याचा अनुभव घ्यावा. अध्यस्त मायेचा निरास केला असता ब्रह्मानुभव येतो. ।।३०।।

तें मायेचें जें लक्षण । तेंचि पुढें निरूपण । सुचितपणें विवरण । केलें पाहिजे ।।३१।।

या मायेचे स्वरूप स्पष्टपणे जाणले पाहिजे. ते विवरण आता लक्ष देऊन ऐका. ।।३१।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'शाश्वतनिरूपणनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'शाश्वतनिरूपण' नावाचा नववा समास समाप्त

समास चौदावा : अखंडध्याननाम

समास दहावा : मायानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

माया दिसे परी नासे । वस्तु न दिसे परी न नासे । माया सत्य वाटे परी मिथ्या असे । निरंतर ।।१।।

माया जीवजडात्मक सृष्टीच्या रूपाने भासते पण ती नाश पावते. ब्रह्म दिसत नाही व भासत नाही, पण ते अविनाशी आहे. सृष्टी सत्य म्हणजे त्रिकालाबाधित वाटते पण ती प्रथमपासून शेवटपर्यंत सतासत्‌विलक्षण अनिर्वचनीय मिथ्या आहे. ॥१॥

करंटा पडोनी उताणा । करी नानापरी कल्पना । परी तें कांहींच घडेना । तैसी माया ।।२।।

करंटा माणूस उताणा पडून शेकडो कल्पना करीत असला तरी त्यातील एकही प्रत्यक्षात उतरत नाही. त्याप्रमाणे प्रचंड घडामोडी होऊनही प्रत्यक्षात काहीच नसते! हीच माया होय. ॥२॥

द्रव्यदारेचें स्वप्नवैभव । नाना विळासें हावभाव । क्षणीक वाटे परी माव । तैसी माया ।।३।।

स्वप्नामध्यें अफाट संपत्ती मिळविली, स्त्रिया प्राप्त झाल्या, भोगविलास भोगले व मिजासीत राहिले तरी जाग आल्याक्षणी त्यांतील काहीच नसते. त्याप्रमाणे माया असते. ॥३॥

गगनीं गंधर्वनगरें । दिसताती नाना प्रकारें । नाना रूपें नाना विकारें । तैसी माया ।।४।।

आकाशात मोठे ढग जमले की त्यांना एखाद्या शहरासारखे स्वरूप येते व त्यात कित्येक रूपे, बदलते आकार इ. कित्येक प्रकार दिसतात. माया तशीच असते. ॥४॥

लक्ष्मुमी रायेविनोदाची । बोलतां वाटे साची । मिथ्या प्रचित तेथीची । तैसी माया ।।५।।

राजाची भूमिका करणारा आपल्या श्रीमंतीचा थाट सांगतो तेव्हा ती खरी वाटते. पण भूमिका संपल्यावर ती सर्व खोटी असते. माया तशीच आहे. ॥५॥

दसऱ्याचे सुवर्णाचे लाटे । लोक म्हणती परी ते कांटे । परी सर्वत्र रहाटे । तैसी माया ।।६।।

दसऱ्याला आपट्याच्या पानांना सोने म्हणतात व ते लुटतात, पण त्यांत पाने व काटे असतात. तरी ती रूढी सर्वत्र आहे. माया तशीच जाणावी. ॥६॥

मेल्याचा मोहोछाव करणें । सतीचें वैभव वाढवणें । मसणीं जाउनी रुदन करणें । तैसी माया ।।७।।

मेलेल्याचा वाढदिवस थाटात साजरा करावा, सती जाणारीला दागदागिने व उंची वस्त्रे नेसवावीत व स्मशानात जाऊन रडत बसावे, तशी माया आहे. हे सर्व जसे निरर्थक तशी माया निरर्थक आहे. ॥७॥

राखेसी म्हणती लक्ष्मुमी । दुसरी भारदोरी लक्ष्मुमी । तिसरी नाममात्र लक्ष्मुमी । तैसी माया ।।८।।

रखेलीचे नाव लक्ष्मी असावे, मंत्राने सिद्ध केलेल्या दोरीला लक्ष्मी म्हणतात व एखादी दरिद्री स्त्री नावाचीच लक्ष्मी असते. तशी माया आहे. ॥८॥

मुळीं बाळविधवा नारी । तिचें नांव जन्मसावित्री । कुबेर हिंडे घरोघरीं । तैसी माया ।।९।।

बालवयातच वैधव्य आलेल्या स्त्रीचे नाव सावित्री असावे व कुबेराने दारोदार भीक मागावी, यांत जेवढा अर्थ आहे, तेवढाच मायेत अर्थ आहे. ॥९॥

दशअवतारांतील कृष्णा । उपजे जीर्ण वस्त्रांची तृष्णा । नदी नामें पीयुष्णा । तैसी माया ।।१०।।

दशावताराच्या नाटकात कृष्णाचे काम करणाऱ्याला जुन्या वस्त्रांची इच्छा व्हावी, 'अमृतवाहिनी' नाव असलेल्या नदीत साधे पाणीच असावे तशी माया दिसायला भपकेबाज पण असायला निष्फळ आहे. ॥१०॥

बहुरूपांतील रामदेवराव । ग्रामस्तांपुढे दाखवी हावभाव । कां माहांराज म्हणोनि लाघव । तैसी माया ।।११।।

कोणी बहुरूपी सम्राट रामदेवरायाचे रूप घेऊन गावातील लोकांसमोर दिमाखाने समोर आला असता गावकऱ्यांनी त्याला 'या महाराज' म्हणावे, तशी माया आहे. ॥११॥

देव्हारां असे अन्नपूर्णा । आणी गृहीं अन्नचि मिळेना । नामें सरस्वती सिकेना । शुभावळु ।।१२।।

देवघरात अन्नपूर्णा देवी असावी व घरात खायलाही मिळू नये. नाव सरस्वती असून अक्षरशत्रू असावे व गोवऱ्या थापत असावी तशी माया आहे. ॥१२॥

सुण्यास व्याघ्र नाम ठेविलें । पुत्रास इंद्रनामें पाचारिलें । कुरूप परी आळविलें । सुंदरा ऐसें ।।१३।।

गावठी कुत्र्याला 'वाघ्या' म्हणावे, मुलाला इंद्र म्हणून हाक मारावी व कुरूप स्त्रीची सौंदर्यवती म्हणून वाखाणणी करावी तशी माया आहे. ॥१३॥

मूर्ख नामें सकळकळा । राशभी नामें कोकिळा । नातरी डोळसेचा डोळा । फुटका जैसा ।।१४।।

मूर्खाला सकलकलासंपन्न म्हणणे जेवढे निरर्थक, गाढवीला कोकिळा मानणे जेवढे व्यर्थ, सुनेत्रा नावाच्या मुलीचा डोळा फुटका असला तर तिचे नाव जसे हास्यास्पद तशीच माया आहे. ॥१४॥

मातांगीचें नाम तुळसी । चर्मिकीचें नाम कासी । बोलती अतिशूद्रिणीसी । भागीरथी ऐसें ।।१५।।

मांगिणीचे नाव तुळशी, चांभारणीचे काशी व वर्णबाह्य स्त्रीचे नाव भागीरथी असावे तशी माया जाणावी. (साडेतीनशे वर्षांपूर्वीचा सामाजिक व्यवस्थेचा संदर्भ लक्षात घ्यावा. आज समर्थ असते तर त्यांनी खचितच हे लिहिले नसते.) ॥१५॥

साउली आणी अंधकार । येक होतां तेथीचा विचार । उगाचि दिसे भासमात्र । तैसी माया ।।१६।।

आधीच असलेल्या सावलीवर रात्रीचा अंधार पसरला असता ती जशी कल्पनामात्र असते, तशी माया आहे. ॥१६॥

श्रवण बोटें संधी करतळ । रविरश्में दिसती इंगळ । रम्य आरक्तकल्होळ । तैसी माया ।।१७।।

कानाची पाळी, हाताच्या बोटांची पेरे व तळहातावर ऊन पडल्यावर निखाऱ्यांसारखे लाल होऊन त्यांची शोभा दिसावी तशी माया आहे. ॥१७॥

भगवें वस्त्र देखतां मनाला । वाटे अग्नचि लागला । विवंचितां प्रत्ये आला । तैसी माया ।।१८।।

लालसर भगवे रेशमी वस्त्र अचानक उन्हात झळकले तर आगीचा भास होतो. पण निरखून पाहिले की सत्य कळते. मायाही निरखून पाहिली तर तर्काला टिकत नाही. ॥१८॥

जळीं चरणकरांगुळें । आखुड लांबें किरकोळें । विपरीत काणें दिसती जळें । तैसी माया ।।१९।।

कमरेएवढ्या स्वच्छ पाण्यात हात व पाय बुडविले तर बोटे असतात त्याहून वेगळी व वाकडी दिसतात. तशीच ब्रह्म असून वेगळीच माया दिसू लागते. ॥१९॥

भोवंडीनें पृथ्वी कलथली । कामिणीनें पिवळी जाली । सन्यपातस्थां अनुभवली । तैसी माया ।।२०।।

भोवळ आली तर जमीन फिरल्यासारखी वाटते, कावीळ झाल्यावर सर्वच पिवळे भासते, शरीराचे तपमान अति वाढले तर त्याला विचित्र दृश्ये दिसू लागतात. माया अशीच आहे. ।।२०।।

कोणीयेक पदार्थविकार । उगाचि दिसे भासमात्र । अनन्याचा अन्य प्रकार । तैसी माया ।।२१।।

बर्फ हा पाण्याचा विकार (स्वरूपात बदल) आहे. ते खरे तर पाणीच असून बर्फाचा भास होतो. एकावर दुसरेच भासते. तशी माया ब्रह्मावर भासते. ।।२१।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मायानिरूपणनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'मायानिरूपण' नावाचा दहावा समास समाप्त
—दशक चौदावा समाप्त—

दशक पंधरावा : आत्मदशक

समास पहिला : चातुर्यलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

अस्तिमांशांचीं शरीरें । त्यांत राहिजे जीवेश्वरें । नाना विकारीं विकारे । प्रविण होईजे ।।१।।

जीवसृष्टीतील सर्वांची शरीरे अस्थी व मांसांची झाली असून त्यांत जीवात्मा व ईश्वर (अंतरात्मा) हे दोन्ही राहतात. (घरात मठाकाश असते त्याप्रमाणें) त्यांना अनेक विकार असून त्यांचा त्यांना सराव झालेला असतो! (प्रवीण)॥१॥

घनवट पोंचट स्वभावें । विवरोन जाणिजे जीवें । व्हावें न व्हावें आघवें । जीव जाणे ।।२।।

टणक व मऊ, (किंवा भरीव व पोकळ) काय हवे व काय नको इ. प्रकारचे ज्ञान जीवाला विचाराने होते. ॥२॥

येंकीं मागमागों घेणें । येकां न मागतांच देणें । प्रचीतीनें सुलक्षणें । ओळखावीं ।।३।।

एकाला सतत याचना करून भांडून कष्टाने काही मिळवावे लागते. एकाला सहजासहजी हवे ते मिळते. या प्रत्यक्ष अनुभवावरून सुलक्षणी कोण ते ओळखावे. ॥३॥

जीव जीवांत घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा । राहराहों शोध घ्यावा । परांतरांचा ।।४।।

स्वत:चा अहं बाजूला ठेवून दुसऱ्याचा जीव व आत्मा आपलाच आहे, इतके ऐक्य साधून दुसऱ्यांचे अंतरंग जाणण्याचा सतत प्रयत्न करावा. आत्मवत् सर्वभूतेषु, प्रत्येक जण सुखाच्या शोधात असतो. प्रत्येकाला दुसरा प्रिय वाटतो, तो स्वत:साठी वाटतो इ. लक्षात ठेवावे. ॥४॥

जानवें हेंवडकारें जालें । ढिलेपणें हेवड आलें । नेमस्तपणें शोभलें । दृष्टीपुढें ।।५।।

सूत सैल झाले की जानव्याला वळ्या पडतात. किंवा जानव्याविषयी बेफिकीर राहिले तर ते चुरगळते किंवा गुंतते. सूत चांगले असले तर किंवा नीट सांभाळले तर स्वच्छ व सरळ जानवे शोभून दिसते. ॥५॥

तैसेंचि हें मनास मन । विवेकें जावें मिळोन । ढिलेपणें अनुमान । होत आहे ।।६।।

त्याचप्रमाणे आपले मन स्वच्छ ठेवून वरील प्रकारच्या विचाराने दुसऱ्यांच्या मनाशी ऐक्य साधून त्यांचे मनोगत जाणून घ्यावे. यात कुचराई केली तर मनोगत समजत नाही. केवळ अंदाज येतो ॥६॥

अनुमानें अनुमान वाढतो । भिडेनें कार्यभाग नासतो । याकारणें प्रत्यये तो । आधीं पाहावा ।।७।।

अंदाजाने अंदाजाचेच साम्राज्य पसरते! त्यांत कसूर झाली तर संबंधितांचे अंतरंग न जाणल्याने हाती घेतलेले कार्य बिघडते. म्हणून ते प्रथम जाणून घ्यावेत. ॥७॥

दुसऱ्याचे जीवीचें कळेना । परांतर तें जाणवेना । वश्य होती लोक नाना । कोण्या प्रकारें ।।८।।

जर दुसऱ्याचे मनोगत कळले नाहीत तर अनेक लोक आपल्याला अनुकूल कसे रहातील? (मनोगत जाणले तर त्यांच्याशी त्या त्या प्रकारे वागता, बोलता, करता येऊन ते अनुकूल होण्याचा संभव वाढतो.) ॥८॥

आकल सांडून परती । लोक वश्यकर्ण करिती । अपूर्णपणें हळु पडती । ठाईं ठाईं ।।९।।

असलेली बुद्धी न वापरता काही लोक दुसऱ्याला अनुकूल करून घेण्यासाठी वशीकरण विद्या वापरतात. तिचा परिणाम अनिश्चित असल्याने ती वापरणारे चाचपडत असतात असे जागोजागी दिसते. ॥९॥

जगदीश आहे जगदांतरीं । चेटकें करावीं कोणावरी । जो कोणीं विवेकें विवरी । तोचि श्रेष्ठ ।।१०।।

ईश्वर सर्व जीवांचे अन्त:करण व्यापून असतो. असे असताना वशीकरणासारखे चेटकी उपाय कोणी कोणावर करावेत? जो बुद्धी वापरून विवेकाने वागतो तोच श्रेष्ठ. ॥१०॥

श्रेष्ठ कार्ये करी श्रेष्ठ । कृत्रिम करी तो कनिष्ठ । कर्मानुसार प्राणी नष्ट । अथवा भले ।।११।।

उत्तम व सहज कार्य उत्तमाकडूनच होते. मंत्रतंत्राचे कृत्रिम कार्य कनिष्ठाकडून होते. या कार्यावरून माणसाचे श्रेष्ठत्व किंवा हलकेपणा ठरतो. ॥११॥

राजे जाती राजपंथें । चोर जाती चोरपंथें । वेडें ठके अल्पस्वार्थें । मूर्खपणें ।।१२।।

राजा राजमार्गावरून जातो. चोर चोरमार्गानेच जाणार! मूर्ख व अविचारी किरकोळ स्वार्थासाठी स्वत:च फसतात. ॥१२॥

मूर्खास वाटे मी शाहाणा । परी तो वेडा दैन्यवाणा । नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ।।१३।।

मूर्खाचे मुख्य लक्षण, म्हणजे तो स्वत:ला शहाणा समजतो! पण तो वेडा व फजीतखोर असतो. चातुर्याची खरी लक्षणे चतुरालाच ठाऊक असतात. ॥१३॥

जो जगदांतरें मिळाला । तो जगदांतरचि जाला । अरत्रीं परत्रीं तयाला । काय उणें ।।१४।।

जो समष्टीशी एकरूप होतो, तो समष्टिरूपच होतो ('हे विश्वचि माझे घर'...) त्यालाच भौतिक व पारलौकिक अनुकूलतेत कोणतीच उणीव नसते. (स्वत:च्या मोक्षाबरोबरच त्याला लोकसंग्रहही उत्तम साधतो.) ॥१४॥

बुध्दि देणें भगवंताचें । बुद्धिविण माणुस काचें । राज्य सांडून फुकाचे । भीक मागे ।।१५।।

अशी बुद्धी ईश्वरी अनुग्रहानेच लाभते. बुद्धी नसेल तर माणूस संकुचित होतो व सहजप्राप्त असलेले स्वानंदसाम्राज्य सोडून सुखासाठी भीक मागतो. दीनवाणा बनतो. ॥१५॥

जें जें जेंथें निर्माण जालें । तें तें तयास मानलें । अभिमान देऊन गोविलें । ठाईं ठाईं ।।१६।।

जो ज्या परिस्थितीत जन्माला येऊन वाढतो ती परिस्थिती त्याला सुखाची वाटल्याने तो तेथेच आसक्ती ठेवून गुंतून पडतो असे जागोजागी दिसते. ॥१६॥

अवघेच म्हणती आम्ही थोर । अवघेचि म्हणती आम्ही सुंदर । अवघेचि म्हणती आम्ही चतुर । भूमंडळीं ।।१७।।

अशी सर्व माणसे स्वत:ला जगात श्रेष्ठ, प्रतिष्ठित (सुंदर) व बुद्धिमान समजतात. ॥१७॥

ऐसा विचार आणितां मना । कोणीच लहान म्हणवीना । जाणते आणिती अनुमाना । सकळ कांहीं ।।१८।।

हे सर्व पाहून असे दिसते की स्वत:ला कोणीच कमी समजत नाही. पण जाणकारांना वस्तुस्थिती कळते. ॥१८॥

आपुलाल्या साभिमानें । लोक चालिले अनुमानें । परंतु हें विवेकानें । पाहिलें पाहिजे ।।१९।।

आपापल्या मोठेपणाच्या कल्पनेत हे लोक अविचाराने (अनुमान) जीवन जगतात. परंतु जीवनाचा विवेकाने विचार करावा. ॥१९॥

लटिक्याचा साभिमान घेणें । सत्य अवघेंच सोडणें । मूर्खपणाचीं लक्षणें । ते हे ऐसीं ।।२०।।

अविचारी जीवनाचाच अभिमान वाटून हिताचा मार्ग सोडून देणे, हीच मूर्खपणाची लक्षणे होत. (व्यावहारिक व पारमार्थिक सत्यच हिताचे असते.) ॥२०॥

सत्याचा जो साभिमान । तो जाणावा निराभिमान । न्याये अन्याये समान । कदापि नव्हे ।।२१।।

सत्यमार्गाशी निष्ठा असण्यात अहंकार नसतो. निष्ठा व अभिमान सारखीच नव्हेत. उदा. न्याय व अन्याय दोन्ही

समान कधीच नसतात. ॥२१॥

न्याये ह्मणिजे तो शाश्वत । अन्याये ह्मणिजे तो अशाश्वत । बाष्कळ आणि नेमस्त । येक कैसा ।।२२।।

न्याय ही माणसाची शाश्वत गरज आहे. अन्याय तात्कालिक होत राहिले तरी प्रतिष्ठा न्यायालाच आहे. उदा. वेंधळ्याला नीटनेटक्याचा दर्जा कधीच मिळत नाही. ॥२२॥

येक उघड भाग्य भोगिती । येक तश्कर पळोन जाती । येकांची प्रगट महंती । येकांची कानकोंडी ।।२३।।

न्यायी व नीटनेटका उघडपणे भाग्य भोगतो. अन्यायी व वेंधळा चोरट्यासारखा असतो. खरा महंत सर्व समाजाला मान्य होतो. ढोंग्याला मान खाली घालावी लागते. ॥२३॥

आचारविचारेंविण । जें जें करणें तो तो सीण । धूर्त आणि विचक्षण । तेचि शोधावे ।।२४।।

न्यायनीती व धर्माचा विचार व तसा आचार नसताना केलेल्या महंतीने पदरात शीणच पडतो. म्हणून माणसाने बुद्धिमान व चतुर महंतांचा शोध घ्यावा. (चतुर महंतांचे आचारविचार शुद्ध असतात.) ॥२४॥

उदंड बाजारी मिळाले । परी ते धूर्तेंचि आळिले । धूर्तापासीं कांहीं न चले । बाजाऱ्यांचें ।।२५।।

सामान्य हडेलप्पी करणारे कितीही असले तरी एक बुद्धिमान त्यांना स्वाधीन ठेवतो. त्याच्या स्वाधीन रहाण्याशिवाय ते काही करूच शकत नाहीत. ॥२५॥

याकारणें मुख्य मुख्य । तयांसी करावे सख्य । येणेंकरितां असंख्य । बाजारी मिळती ।।२६।।

म्हणून चतुराने सर्व क्षेत्रातील बुद्धिमान नेत्यांशी संधान बांधावे. त्यामुळे सहजच त्यांच्या स्वाधीन असलेल्यांचा त्याला पाठिंबा मिळतो. ॥२६॥

धूर्तासि धूर्तचि आवडे । धूर्त धूर्तीच पवाडे । उगेचि हिंडती वेडे । कार्येविण ।।२७।।

एका बुद्धिमान चतुराचे दुसऱ्याशी चटकन सख्य होते व त्यांचे संबंध वाढीला लागतात. मूर्ख असतात ते काही न साधता नको ते संबंध वाढवीत राहतात. ॥२७॥

धूर्तासि धूर्तपण कळलें । तेणें मनास मन मिळालें । परी हें गुप्तरूपें केलें । पाहिजे सर्वें ।।२८।।

एका चतुराला दुसऱ्याचे चातुर्य लक्षात येताच त्यांचे मनोमीलन होते. पण ही युती कोणाच्या डोळ्यात न भरता व्हावी. गटबाजीचे स्वरूप येऊ नये किंवा युतीच्या हेतूविषयी समाज साशंक होऊ नये. ॥२८॥

समर्थाचें राखता मन । तेथे येती उदंड जन । जन आणि सज्जन । आर्जव करिती ।।२९।।

एकदा चतुर भाग्यवन्ताला अनुकूल करून घेतले की त्याचे अनुयायी अनुकूल होतात आणि सामान्य माणसे व सज्जन नम्रतेने बोलू लागतात. ॥२९॥

वोळखीनें वोळखी साधावी । बुद्धीनें बुद्धि बोधावी । नीतिन्यायें वाट रोधावी । पाषांडाची ।।३०।।

ओळखीने ओळखी वाढवाव्यात, बुद्धिमन्ताला अधिक बोध करावा व न्यायनीतीच्या प्रचाराने पाखंडी लोकांना पायबंद घालावा. ॥३०॥

वेष धरावा बावळा । अंतरी असाव्या नाना कळा । सगट लोकांचा जिव्हाळा । मोडूं नये ।।३१।।

स्वत:चा वेश साधासुधा असावा पण बुद्धी सर्वंकश असून चातुर्यसंपन्न असावी. सद्‌गुणांनी परिपूर्ण असावी. सामान्यांचे प्रेम सांभाळावे. ॥३१॥

निस्पृह आणि नित्य नूतन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान । प्रगट जाणता सज्जन । दुल्लभ जगीं ।।३२।।

निरिच्छ, नव्या नव्या प्रदेशात भ्रमण करणारा, अनुभवासह ब्रह्मविद्या सांगणारा, उघडपणे महंती करणारा,

देशकालप्रसंग जाणणारा व नीतिमान सज्जन या जगात फार दुर्मिळ आहे. ॥३२॥

नाना जिनसपाठांतरे । निवती सकळांचीं अंतरें । चंचळपणें तदनंतरें । सकळां ठाईं ।।३३।।

वेदान्तशास्त्र, संतवाङमय, पुराणे, संतचरित्रे, पोथ्या इत्यादींचे पाठपाठान्तर असे असावे की त्यामुळे अनेकांच्या अनेक समस्या शास्त्राधारपूर्वक सुटून ते संतुष्ट होतात. त्याने सर्वांमध्ये मिसळून दूर दूर संचार करावा. ॥३३॥

येके ठाईं बैसोन राहिला । तरी मग व्यापचि बुडाला । सावधपणें ज्याला त्याला । भेटि द्यावी ।।३४।।

सर्व गुणसंपदा असून गावातच बसून राहिले तर धर्मपरमार्थाचा व्याप वाढत नाही. म्हणून स्वत:ला व लोक व्यवहाराला सांभाळून सर्वत्र भ्रमण करावे. ॥३४॥

भेटभेटों उरी राखणें । हे चातुर्याची लक्षणें । मनुष्यमात्र उत्तम गुणें । समाधान पावे ।।३५।।

अशी महान व्यक्ती सतत भेटावी अशी तळमळ सर्वांना लागली तर समजावे की तेथे चातुर्याची लक्षणे आहेत. उत्तम गुणांचा सहजच परिणाम असा आहे की त्याने मोठ्या समाजाला समाधान मिळते. ॥३५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'चातुर्यलक्षणनाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'चातुर्यलक्षण' नावाचा पहिला समास समाप्त

दशक पंधरावा : आत्मदशक

समास दुसरा : निःस्पृहव्याप

॥ श्रीराम समर्थ ॥

पृथ्वीमधें मानवी शरीरें । उदंड दाटलीं लाहान थोरें । पालटती मनोविकारें । क्षणाक्षणा ।।१।।

पृथ्वीवर असंख्य माणसे आहेत. आकार, रूप, बुद्धी, परिस्थिती इ. कारणांनी ती लहान किंवा मोठी आहेत. त्रिगुणांच्या मनावरील प्रभावानुसार त्यांच्या वागण्या-बोलण्यात सतत बदल होत राहतो. ॥१॥

जितुक्या मूर्ती तितुक्या प्रकृती । सारिख्या नस्ती आदिअंतीं । नेमचि नाहीं पाहावें किती । काये म्हणोनी ।।२।।

व्यक्ती तितके स्वभाव किंवा प्रवृत्ती भिन्न असतात. त्या प्रवृत्ती जन्मापासून मरणापर्यंत सतत सारख्याही नसतात. या भिन्नतेला कोणताच नियम नसल्याने त्यांच्या तऱ्हा किती म्हणून सांगाव्यात! ॥२॥

कित्येक म्लेंच होऊन गेले । कित्येक फिरंगणांत आटले । देशभाषानें रुधिले । कितीयेक ।।३।।

(त्यांचा परिणामही तेवढाच भिन्न भिन्न होतो. तो असा–) अनेकांनी मुसलमान धर्म स्वीकारला. कित्येक ख्रिस्ती धर्माशी एकरूप झाले. फार मोठी लोकसंख्या प्रदेश व भाषेमुळे परस्परांपासून दुरावली. ॥३॥

मऱ्हाष्टदेश थोडा उरला । राजकारणें लोक रुधिला । अवकाश नाहीं जेवायाला । उदंड कामें ।।४।।

स्वतंत्र मराठी राज्य थोडेच उरले. त्याचे रक्षण व विस्तार करण्यासाठी लोक राजकारणांत गुंतून पडले. त्यांच्या मागे एवढे व्याप लागले की जेवण्यासही सवड मिळू नये. ॥४॥

कित्येक युद्धप्रसंगी गुंतले । तेणें गुणें उन्मत्त जाले । रात्रंदिवस करूं लागले । युध्यचर्चा ।।५।।

अनेक लोक सतत युद्धामध्ये अडकून राहिल्याने त्यांना युद्धज्वर चढून ते रात्रंदिवस त्याविषयीच बोलू लागले. ॥५॥

उदिम्यास व्यासंग लागला । अवकाश नाहींसा जाला । अवघा पोटधंदाच लागला । निरंतर ।।६।।

व्यापारी मंडळींना उद्योगाचा छंद जडून त्यांना इतर कशालाच सवड नाही, इतकी कामे मागे लागली. पोट हाच धंदा झाला. ॥६॥

शड्दर्शनें नाना मतें । पाषांडें वाढलीं बहुतें । पृथ्वीमधें जेथतेथें । उपदेसिती ।।७।।

न्याय, वैशेषिकादि सहा आस्तिक दर्शने व चार्वाक बौद्धादि सहा नास्तिक दर्शने यांच्या निमित्ताने बुद्धिजीवी मंडळीत प्रथमपासून भेद आहेच. त्यांत विकृत श्रद्धांची भर पडली. या सर्वांचे संप्रदाय समाजात सर्वत्र आहेत. ॥७॥

स्मार्थीं आणि वैष्णवीं । उरलीं सुरलीं नेलीं लाघवी । ऐसी पाहातां गथागोवी । उदंड जाली ।।८।।

या गदारोळातून जे सुटले त्यांना यज्ञप्रधान स्मार्त व द्वैती वैष्णवांनी ओढून नेले! असा सर्वत्र उदंड गोंधळ झाला. ॥८॥

कित्येक कामनेचे भक्त । ठाइं ठाइं जाले आसक्त । युक्त अथवा अयुक्त । पाहातो कोण ।।९।।

कित्येक सकाम भक्त जागृत दैवते व भरभरून आशीर्वाद देणाऱ्या बुवा व महाराजांच्या नादी लागले. यांत खरे-खोटे, योग्य-अयोग्य, शास्त्रीय व अशास्त्रीय इ. चिकित्सा करणारे आहेतच कोण? ॥९॥

या गल्बल्यामध्यें गल्बला । कोणीं कोणीं वाढविला । त्यास देखों सकेनासा जाला । वैदिक लोक ।।१०।।

या सर्व गोंधळात ज्यांनी अधिकाधिक घोटाळ्यांची भर घातली ते वैदिकांना सहन होईनासे झाले. ॥१०॥

त्याहिमधें हरिकीर्तन । तेथें वोढले कित्येक जन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान । कोण पाहे ।।११।।

यातच कथा, नाट्य व संगीतप्रधान हरिकीर्तनाकडे कित्येक लोक ओढले गेले. अनुभवाचे ब्रह्मज्ञान कोणालाच नकोसे झाले. ॥११॥

या कारणें ज्ञान दुल्लभ । पुण्यें घडे अलभ्य लाभ । विचारवंतां सुल्लभ । सकळ कांहीं ।।१२।।

म्हणूनच ब्रह्मज्ञान फार दुर्लभ असून शुद्ध पुण्यानेच त्याची प्राप्ती होते. हा अलभ्य लाभ विचारवन्तांना होतो. विचाराने तो लाभ सुलभ होतो. ॥१२॥

विचार कळला सांगतां नये । उदंड येती अंतराये । उपाये योजितां अपाये । आडवे येती ।।१३।।

कोणाला ब्रह्मविद्येचे आकलन झाले तरी प्रबोधनाचे कौशल्य नसते. म्हणून समाजात ती सांगताना अनेक अडचणी येतात व जे उपाय करावे तेच अपाय होतात! ॥१३॥

त्याहिमधें जो तिक्षण । रिकामा जाऊं नेदी क्षण । धूर्त तार्किक विचक्षण । सकळां माने ।।१४।।

त्यांच्यात एखादाच तीक्ष्ण बुद्धीचा असून सदाचार, साधना व अध्ययन असा सतत व्यासंग करतो. जराही वेळ वाया घालवीत नाही. असा बुद्धिमान, तर्कशुद्ध विचार सांगणारा व चतुर सर्वांना आवडतो. ॥१४॥

नाना जिनस उदंड पाठ । वदों लागला घडघडाट । अव्हाटचि केली वाट । सामर्थ्यबळें ।।१५।।

तो गीताउपनिषदादी, न्यायमीमांसा, सन्तवाङ्मय इ. पाठ करून समाजात उघडपणे अस्खलित प्रबोधन करून चुकीच्या मार्गाने जाणाऱ्यांना सरळ मार्गावर आणून सोडतो. (झाडू संतांचे मार्ग । आडराने भरले जग– तुका.) ॥१५॥

प्रबोधशक्तीचीं अनंत द्वारें । जाणें सकळांची अंतरें । निरूपणें तदनंतरें । चटक लागे ।।१६।।

जनप्रबोधनाला अनेक पैलू आहेत. त्यासाठी विविध मार्ग आहेत. (पहा १३-७, ५-६, ११-६) सर्वांच्या मनाचा कल जाणून निरूपण करणे हा मुख्य मार्ग त्याला कळतो. त्यामुळे अधिकाधिक समाजाला तो फार प्रिय होतो. ॥१६॥

मतें मतांतरें सगट । प्रत्यये बोलोन करी सपाट । दंडक सांडून नीट । वेधी जना ।।१७।।

अद्वैतमताच्या स्थापनेसाठी तो इतर सर्वमतांचे सरसगट संपूर्ण खंडण करताना स्वत:ची अद्वैतानुभूती पणाला लावतो. इतरांच्या अनुभवांचा आधार घेतो. निर्जीव परंपरांना फाटा देऊन अस्सल तत्त्वज्ञानाकडे त्यांना प्रवृत्त करतो व लोकांच्या अन्त:करणांत भरून राहतो. ॥१७॥

नेमकें भेदकें वचनें । अखंड पाहे प्रसंगमानें । उदास वृत्तीच्या गुमानें । उठोन जातो ।।१८।।

त्याचे बोलणे जे व जसे असावे तसे असते व अनेक रहस्ये उलगडणारे असते. (Precise and incisive) मर्म सांगणारे असते. प्रसंगाची त्याला उत्तम जाण असते. स्वत: निरिच्छ असल्याने कोणाचा मुलाहिजा ठेवीत नाही किंवा काम संपले की जराही रेंगाळत नाही. वैराग्याच्या मस्तीत असतो! ॥१८॥

प्रत्यये बोलोन उठोन गेला । चटक लागली लोकांला । नाना मार्ग सांडून त्याला । शरण येती ।।१९।।

जो अनुभवाचे बोल बोलून निघून जातो तो लोकांना फार प्रिय होतो. इतर पारंपरिक विचार सांगणाऱ्यांना सोडून देऊन लोक त्याला शरण येतात. अनुग्रह घेतात. ॥१९॥

परी तो कोठें आडळेना । कोणे स्थळीं सांपडेना । वेष पाहातां हीन दीना । सारिखा दिसे ।।२०।।

पण तो तसा सहजासहजी सापडत नाही. कोणत्याही ठिकाणी तो हमखास असेल असे नाही. त्याचा पोशाख

पहावा तर तो दरिद्रीच असावा असे वाटते. ॥२०॥

उदंड करी गुप्तरूपें । भिकाऱ्यासारिखा स्वरूपें । तेथें येशकीर्तिप्रतापें । सीमा सांडिली ।।२१।।

तो महान कार्य करतो पण त्याचा गाजावाजा मुळीच नसतो. दिसायला सामान्य याचकासारखा दिसतो. पण त्याचे यश, कीर्ती व कार्यक्षमता ह्यांचा सर्वत्र बोलबाला होतो. ॥२१॥

ठाइं ठाइं भजन लावी । आपण तेथून चुकावी । मछरमतांची गोवी । लागोंच नेदी ।।२२।।

जागोजागी अनेकांना भक्तिमार्गाकडे प्रवृत्त करतो. पण स्वत: त्यांच्यात थांबत नाही. कोणी त्याचे महत्त्व सहन न होऊन मत्सर करावा असा प्रसंगच येऊ देत नाही. ॥२२॥

खनाळामधें जाऊन राहे । तेथें कोणीच न पाहे । सर्वत्रांची चिंता वाहे । सर्वकाळ ।।२३।।

स्वत: डोंगरकपारीत रहातो म्हणून त्याच्यापर्यन्त कोणी पोहोचत नाही. पण तेथे राहून तो सर्वांच्या हिताचा अखंड विचार करतो. ॥२३॥

अवघड स्थळीं कठीण लोक । तेथें राहाणें नेमक । सृष्टीमधें सकळ लोक । धुंडीत येती ।।२४।।

ज्या अवघड ठिकाणी केवळ काटक लोक राहू शकतात तेथेच हा राहतो. तरी तेथेही लोक त्याला शोधीत येतात. ॥२४॥

तेथें कोणाचें चालेना । अनुमात्र अनुमानेना । कट्ट घालून राजकारणा । लोक लावी ।।२५।।

त्याचेपुढे सर्वांची बुद्धी व तर्क निष्फळ ठरतात. कोणालाच त्याचा धड अंदाज येत नाही. त्याचे स्वरूप कळत नाही. मात्र तो सर्वांना राजकारण करणे भाग पाडतो. क्रियाशील बनवतो. ॥२५॥

लोकीं लोक वाढविले । तेणें अमर्याद जाले । भूमंडळीं सत्ता चाले । गुप्तरूपें ।।२६।।

असे लोक त्याला भेटू लागले की त्यामुळे अधिकाधिक लोक त्याचेकडे आकृष्ट होतात व त्यांची संख्या अमर्याद वाढल्याने त्यांच्यामार्फत ह्या नि:स्पृहाची गुप्त रूपाने जगावर सत्ता चालते. ॥२६॥

ठाइं ठाइं उदंड ताबे । मनुष्यमात्र तितुकें झोंबे । चहुंकडे उदंड लांबे । परमार्थबुद्धी ।।२७।।

असे समुदाय जागोजागी तयार होऊन सर्व लोक त्यांच्यात सामील होतात. त्यामुळें परमार्थ मार्गाचा दूरवर प्रसार होतो. ती बुद्धी वाढीला लागते. ॥२७॥

उपासनेचा गजर । स्थळोस्थळीं थोर थोर । प्रत्ययानें प्राणीमात्र । सोडविले ।।२८।।

सर्वत्र उघडपणे उपासना सुरू होते. समाजातील प्रतिष्ठित माणसे जागोजागी त्यांत सहभागी होतात. अनुभवाच्या प्रबोधनाने अनेक लोक कृतार्थ होतात. ॥२८॥

ऐसे कैवाडे उदंड जाणे । तेणें लोक होती शहाणे । जेथें तेथें प्रत्येय बाणे । प्राणीमात्रासी ।।२९।।

प्रबोधनाच्या अनेक युक्त्या त्याचेपाशी असतात. त्यामुळे लोकजागृती होऊन अनेकांना अनुभवाचे ज्ञान कसे असते ते कळते. ॥२९॥

ऐसी कीर्ति करून जावें । तरीच संसारास यावें । दास म्हणे हें स्वभावें । संकेतें बोलिलें ।।३०।।

अशी ही कीर्ती करून जाणाऱ्याचेच जगात जन्माला येणे सार्थ ठरते. मी रामदास हे माझ्या स्वभावानुसार व थोडक्यात सांगत आहे. (माझ्या अनुभवाचे बोल बोलत आहे.) ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'नि:स्पृहव्यापनाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'नि:स्पृहव्याप' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक पंधरावा : आत्मदशक

समास तिसरा : श्रेष्ठअंतरात्मानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

मुळापासून सैरावैरा । अवघा पंचीकर्ण पसारा । त्यांत साक्षत्वाचा दोरा । तोहि तत्त्वरूप ।।१।।

मूळमायेपासून पंचीकृत पंचभूतांचा नामरूपात्मक पसारा सर्वत्र फैलावला आहे. त्यांत व्यापून रहाणारा त्याचा 'साक्षी' ईश्वरसुद्धा मायिकच आहे. ॥१॥

दुरस्ता दाटल्या फौजा । उंच सिंहासनीं राजा । याचा विचार समजा । अंतर्यामी ।।२।।

राजा उंच सिंहासनावर बसतो. त्याची फौज दोन ओळीत त्याच्या समोर दाटीवाटीने उभी असते. ह्यातील वर्म समजावून घ्यावे. (राजाच्या केवळ सत्तेवर फौज काम करते. ईश्वराच्या केवळ सत्तेवर जड चेतन सृष्टी चालते.) ॥२॥

देहमात्र अस्तिमांशाचें । तैसेंचि जाणावें नृपतीचें । मुळापासून सृष्टीचें । तत्वरूप ।।३।।

सर्वच शरीरे अस्थि व मांसाची असतात. फौजेतील सैनिक व राजा यांची शरीरे सारखीच असतात. त्याचप्रमाणे जडचेतनात्मक सृष्टी व तिचा साक्षी ईश्वर दोन्ही मायिकच आहेत. ॥३॥

रायाचे सत्तेनें चालतें । परन्तु अवघीं पंचभूतें । मुळीं आधिक जाणिवेचे तें । अधिष्ठान आहे ।।४।।

राजाच्या सत्तेने सैन्य चालते पण दोघांचे शरीर पांचभौतिक आहे. तरी राजाजवळ सत्ता हे अधिक तत्त्व आहे. (अचेतन पदार्थात बुद्धी नसल्याने त्यांत चिदाभास नसतो. जीवामध्ये त्रिगुणात्मक बुद्धीतील चिदाभास मलिन वाटतो.) ईश्वर शुद्धसत्वगुणी असल्याने त्याचा चिदाभास स्वच्छ भासतो. त्याला समर्थ 'मुळातील अधिक जाणीव' म्हणतात. ॥४॥

विवेकें बहुत पैसावले । म्हणौन अवतारी बोलिले । मनु चक्रवती जाले । येणेंचि न्यायें ।।५।।

जे महात्मे विवेकाने व्यापक होतात त्यांना अवतार असे म्हणतात. ('हे विश्वचि माझे घर'– ज्ञानेश्वर. 'मी आहे जगज्जीवनी निरंतर'– समर्थ.) मनू हा जगाचा आद्यपुरुष व सर्वसत्ताधीश असल्याने त्याला चक्रवर्ती म्हणतात. (एक विवेकाने व दुसरा सत्तेने व्यापक झाल्यावर त्यांना अनुक्रमे अवतार व चक्रवर्ती म्हटले जाते.) ॥५॥

जेथें उदंड जाणीव । तेचि तितुके सदेव । थोडे जाणीवेनें नर्देव । होती लोक ।।६।।

बुद्धी शुद्ध असल्याने प्रकाशमान चिदाभास जेवढा अधिक जाणवत रहातो तेवढी ती व्यक्ती दैवी मानावी. अशुद्ध बुद्धीत प्रकाशमान चिदाभासाचे भान फार कमी असल्याने ते निर्दैवी होत. ॥६॥

व्याप आटोप करिती । धके चपेटे सोसिती । तेणें प्राणी सदेव होती । देखतदेखतां ।।७।।

व्यवहारातही जे लोक आपला व्याप वाढविण्याच्या खटाटोपात सर्व तऱ्हेचे कष्ट व संघर्ष सोसतात ते सर्वांच्या देखत देखत नशीब काढतात. (परमार्थात जाणिवेचा व्याप व व्यवहारात व्यावसायिक व्याप भाग्यकारक आहे. एकूण व्याप अत्यंत महत्त्वाचा आहे.) ॥७॥

ऐसें हें आतां वर्ततें । मूर्ख लोकांस कळेना तें । विवेकी मनुष्ये समजतें । सकळ कांहीं ।।८।।

व्याप वाढवणारे वर्तन असेल तर असे फळ मिळते. पण मूर्खांच्या ते लक्षात येत नाही. जो बुद्धिमान असतो त्याला सर्वाचेच उत्तम आकलन होते. ॥८॥

थोर लाहान बुद्धीपासी । सगट कळेना लोकांसी । आधीं उपजलें तयासी । थोर म्हणती ।।९।।

वय लहान असले तरी बुद्धी महान असू शकते. पण सर्वसामान्य लोकांना हे कळत नाही. ज्याचे वय जास्त त्यालाच ते थोर समजतात. ॥९॥

वयें धाकुटा नृपती । वृद्ध तयास नमस्कार करिती । विचित्र विवेकाची गती । कळली पाहिजे ।।१०।।

राजा वयाने लहान असला तरी प्रजेतील वृद्ध त्याला नमस्कार करतात. विवेकाने असे हे वैचित्र्य समजावून घ्यावे. ॥१०॥

सामान्य लोकांचें ज्ञान । तो अवघाच अनुमान । दीक्षादंडकाचें लक्षण । येणेंचि पाडें ।।११।।

सर्वसामान्य लोकांची बुद्धी परंपरागत ठोकताळ्यावर आधारलेली असते. पारंपरिक व्रतबंधातील गायत्री मंत्रासारख्या दीक्षा अशाच असतात. (पिता मूढ असला तरी परंपरेने त्याचेकडून दीक्षा घेतात!) ॥११॥

नव्हें कोणास म्हणावें । सामान्यास काये ठावें । कोणकोणास म्हणावें । किती म्हणोनी ।।१२।।

'जे तुम्ही समजता ते बरोबर नाही' असे किती जणांना समजावून द्यावे? कारण सामान्यांना काहीच कळत नाही. कोणाकोणाला किती वेळा हे सांगायचे! ॥१२॥

धाकुटा भाग्यास चढला । तरी तुछ्य करिती तयाला । याकारणें सलगीच्या लोकांला । दुरी धरावें ।।१३।।

कुटुंबातील किंवा समाजातील वयाने व प्रतिष्ठेने लहान असलेल्याचे भाग्य उदयाला आले तरी ते त्याला क्षुद्रच समजतात. म्हणून भाग्यवन्ताने अशा लोकांपासून चार हात दूरच राहावे! ॥१३॥

नेमस्त कळेना वचन । नेमस्त नये राजकारण । उगेचि धरिती थोरपण । मूर्खपणें ।।१४।।

ज्याला बोलण्याचा स्पष्ट अर्थ कळत नाही व राजकारणाची वर्मे लक्षात येत नाहीत तो सुद्धा मूर्खपणाने आपल्या वयाने आलेला मोठेपणा घट्ट धरून बसतो. ॥१४॥

नेमस्त कांहींच कळेना । नेमस्त कोणीच मानीना । आधीं उपजलें त्या थोरपणा । कोण पुसे ।।१५।।

स्वत:ला निश्चितपणे कशाचेच आकलन होत नाही. ज्यांना आकलन झाले आहे त्यांचे ऐकावयाचे नाही. असा माणूस केवळ आधी जन्माला आल्याने मोठा ठरतो. त्याच्या मोठेपणाला कोण किंमत देणार? ॥१५॥

वडिलां वडिलपण नाहीं । धाकुट्यां धाकुटपण नाहीं । ऐसें बोलती त्यांस नाहीं । शाहाणपण ।।१६।।

जे खरे मोठे आहेत त्यांना मोठेपण द्यावयाचे नाही. जे खरोखर कनिष्ठ आहेत त्यांना तसे म्हणावयाचे नाही! असे ज्यांचे बोलणे असते ते शहाणे नसतात. ॥१६॥

गुणेविण वडिलपण । हें तों आवघेंच अप्रमाण । त्याची प्रचीत प्रमाण । थोरपणीं ।।१७।।

गुणसंपदेवाचून येणारा मोठेपणा निरर्थकच असतो. असा खरा गुणसंपन्न मोठा समोर आला की हे पटते. ॥१७॥

तथापि वडिलांस मानावें । वडिलें वडिलपण जाणावें । नेणतां पुढें कष्टावें । थोरपणीं ।।१८।।

हे सर्व खरे असले तरी वयाने वडील असणाऱ्यांचा आदर करावा व वडिलांनी आपला वडीलपणा सांभाळावा! हे जमले नाही, तर वाढत्या वयात अपमान होतो. ॥१८॥

तस्मात वडिल अंतरात्मा । जेथें चेतला तेथें महिमा । हें तों प्रगटचि आहे आम्हा । शब्द नाहीं ।।१९।।

(प्रसंगाने केलेला व्यावहारिक उपदेश येथे संपला.) एकूण अंतरात्मा सर्वश्रेष्ठ असून जेथे त्याचा ज्ञानप्रकाश अधिक अनुभवाला येतो तेथे पारमार्थिक मोठेपणा असतो हे उघड आहे. हे स्पष्टपणें मी सांगितले म्हणून मला दूषणे देऊ नयेत. ॥१९॥

याकारणें कोणीयेकें । शाहाणपण सिकावें विवेकें । विवेक न सिकतां तुकें । तुटोन जाती ।।२०।।

म्हणून सर्वांनी विवेकाची कास धरून शहाणे व्हावे. विवेक नसेल तर सर्व प्रकारे माणसाची किंमत जाते. ॥२०॥

तुक तुटलें म्हणिजे गेलें । जन्मा येऊन काये केलें । बळेंचि सांदीस घातलें । आपणासी ।।२१।।

माणसाची किंमत गेली की सर्वस्व गेले! जन्माला येऊन त्याने काय मिळविले? त्याने जणू मोठ्या प्रयत्नाने स्वत:ला अडगळीत टाकून घेतलेले असते. ॥२१॥

सगट बायेका सिव्या देती । सांदीस पडिला ऐसें म्हणती । मूर्खपणाची प्राप्ती । ठाकून आली ।।२२।।

सर्व स्त्रिया त्याची छी थू करतात व तो अडगळीत पडला असे म्हणतात. आयुष्यभर केलेल्या मूर्खपणाचे फळ भोगण्याची वेळ आली. ॥२२॥

ऐसें कोणीयेकें न करावें । सर्व सार्थकचि करावें । कळेना तरी विवरावें । ग्रंथांतरीं ।।२३।।

म्हणून कोणीच असे करू नये. जीवनाचे सर्व प्रकारे सार्थक करावे. ते कसे करावे हे स्वत:ला कळत नसेल तर अनेक शास्त्रग्रंथांतून ते समजावून घ्यावे. ॥२३॥

शाहाण्यास कोणीतरी बाहाती । मूर्खास लोक दवडून देती । जीवास आवडे संपत्ति । तरी शाहाणे व्हावें ।।२४।।

चतुर बुद्धिमन्ताला लोक स्वत:च बोलावतात. मूर्ख घरी आला तरी त्याला बाहेर काढतात. माणसाला जर गुणसंपदा व कीर्ती हवी असेल तर त्याने शहाणे व्हावे. ॥२४॥

आहो या शाहाणपणाकारणें । बहुतांचे कष्ट करणें । परंतु शाहाणपण शिकणें । हें उत्तमोत्तम ।।२५।।

अहो, या शहाणपणासाठी अनेक लोक अनेक प्रकारे कष्ट करतात. पण कितीही कष्ट पडले तरी शहाणपणा शिकणे हेच अधिकाधिक हिताचे आहे. ॥२५॥

जों बहुतांस मानला । तो जाणावा शाहाणा जाला । जनीं शाहाण्या मनुष्याला । काये उणें ।।२६।।

जो अधिकाधिक लोकांना मान्य होतो तो शहाणा आहे असे समजावे. त्याला ह्या जगात काय कमी पडेल? ॥२६॥

आपलें हित न करी लोकिकीं । तो जाणावा आत्मघातकी । या मूर्खायेवढा पातकी । आणिक नाहीं ।।२७।।

ज्याला आपले व्यावहारिक हित सुद्धा साधता येत नाही तो आत्मघातकी समजावा. त्या मूर्खासारखा पापी कोणीच नाही. ॥२७॥

आपण संसारीं कष्टतो । लोकांकरवीं रागेजोन घेतो । जनामध्यें शहाणा तो । ऐसें न करी ।।२८।।

तो संसारात मेहेनत करूनही लोकांकडून नावे ठेवून घेतो. शहाणा असे कधीच करीत नाही. ॥२८॥

साधकां सिकविलें स्वभावें । मानेल तरी सुखें घ्यावें । मानेना तरी सांडावें । येकिकडे ।।२९।।

प्रपंच व परमार्थ साधू पहाणाऱ्याने कसे वागावे ते मी सहजगत्या सांगितले. आवडले तर आनंदाने स्वीकारावे. पटले नाही तर खुशाल दूर सारावे. ॥२९॥

तुम्ही श्रोते परम दक्ष । अलक्षास लावितां लक्ष । हें तों सामान्य प्रत्यक्ष । जाणतसा ।।३०।।

खरे तर तुम्ही सर्व श्रोते परमार्थाविषयी दक्ष आहात. स्वसंवेद्य ब्रह्मवस्तूच्या अनुसंधानात रहाण्याचा तुमचा प्रयत्न असतो. मी केलेला हा उपदेश सामान्य व्यवहारातील आहे हे तुम्ही जाणता. (येथे समर्थांनी परिहार दिला आहे.) ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'श्रेष्ठअन्तरात्मानिरूपणनाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'श्रेष्ठअन्तरात्मानिरूपण' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक पंधरावा : आत्मदशक

समास चवथा : शाश्वतब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

पृथ्वीपासून जालीं झाडें । झाडापासून होती लांकडें । लांकडें भस्मोन पुढें । पृथ्वीच होये ।।१।।

पृथ्वीतून पाणी व अन्नरस घेऊन झाडे वाढतात. झाडे वाळली की त्याची लाकडे होतात. नंतर पुढे ती जळून किंवा कुजून पुन्हा पृथ्वीशी एकरूप होतात. ॥१॥

पृथ्वीपासून वेल होती । नाना जिनस फापावती । वाळोन कुजोन मागुती । पृथ्वीच होये ।।२।।

पृथ्वीतून अनेक प्रकारच्या वेली वाढून त्यांवर पाने, फुले, शेंगा, फळे इ. विस्तार होतो. नंतर तो सर्व वाळून कुजून पुन्हा पृथ्वीमय होतो. ॥२॥

नाना धान्यांचीं नाना अन्नें । मनुष्यें करिती भोजनें । नाना विष्ठा नाना वमनें । पृथ्वीच होये ।।३।।

गहू-तांदळादी अनेक धान्यांचे अनेक अन्नपदार्थ करून माणसे खातात. ते पचले तर त्यातून विष्ठा व न पचले तर ओकारी होऊन पृथ्वीला मिळते. ॥३॥

नाना पक्षादिकीं भक्षिलें । तरीं पुढें तैसेंचि जालें । वाळोन भस्म होऊन गेलें । पुन्हा पृथ्वी ।।४।।

पशुपक्षीसुद्धा जे खातात त्याचे असेच होते. त्यांची विष्ठा उन्हाने वाळून जळून पृथ्वीमय होते. ॥४॥

मनुष्यें मरतांच ऐका । क्रिमि भस्म कां मृत्तिका । ऐशा काया पडती अनेका । पुढें पृथ्वी ।।५।।

माणूस मरण पावल्यावर प्रेत तसेच पडून राहिले तर त्यांत किडे होतात. त्यावर संस्कार केले तर ते जळून किंवा पुरून पुन्हा पृथ्वीत विलीन होते. किडे झालेले प्रेतही पृथ्वीरूप होते. ॥५॥

नाना तृण पदार्थ कुजती । पुढें त्याची होये माती । नाना किडे मरोन जाती । पुढें पृथ्वी ।।६।।

गवत व झुडुपांसारखे कित्येक पदार्थ कुजून व किडे इ. मरून मातीला मिळून पृथ्वीशी एक होतात. ॥६॥

पदार्थ दाटले अपार । किती सांगावा विस्तार । पृथ्वीवांचून थार । कोणास आहे ।।७।।

आजपर्यन्त असे अगणित पदार्थ पृथ्वीशी एकरूप झाले आहेत. त्यांना पृथ्वीशिवाय कोणती गती आहे? ॥७॥

झाड पाले आणि तृण । पशु भक्षितां होतें सेण । खात मूत भस्म मिळोन । पुन्हा पृथ्वी ।।८।।

झाडे, पाले, गवत इ. पशू खातात व त्यांचे नंतर शेण, मूत्र, खत, भस्म इ. होऊन पृथ्वीला मिळते. ॥८॥

उत्पत्तिस्थितिसंव्हारतें । तें तें पृथ्वीस मिळोन जातें । जितुकें होतें आणि जातें । पुन्हा पृथ्वी ।।९।।

जे जे निर्माण होते, काही काळ टिकते व नंतर नष्ट होते ते सर्व पृथ्वीत विलीन होते. म्हणून होणारे व जाणारे पुन्हा पृथ्वीमय होते. ॥९॥

नाना बीजांचिया रासी । विरढोन लागती गगनासी । पुढें सेवटीं पृथ्वीसी । मिळोन जाती ।।१०।।

अनेक प्रकारच्या धान्यांची अगणित बीजे पेरल्यावर त्यातून उगवणारी ताटे कितीही उंच वाढली तरी ती शेवटी पृथ्वीलाच मिळावयाची! ॥१०॥

लोक नाना धातु पुरिती । बहुतां दिवसां होये माती । सुवर्णपाषाणाचीगती । तैसीच आहे ।।११।।

लोक सोने-चांदीसारखे धातू संरक्षणासाठी पुरून ठेवतात, पण दीर्घ कालाने त्यांचीही माती होते. दगड व सोने ह्यांचा शेवट सारखाच आहे! ॥११॥

मातीचें होतें सुवर्ण । आणी मृत्तिकेचे होती पाषाण । माहा अग्निसंगें भस्मोन । पृथ्वीच होये ।।१२।।

सुवर्णकण मातीतूनच निघतात व धोंडेही मातीचेच तयार होतात. पण प्रलयाग्नीने त्यांचे भस्म होऊन ते पृथ्वीमय होतात. ॥१२॥

सुवर्णाचें जर होतें । जर सेवटीं कुजोन जातें । रस होऊन वितुळतें । पुन्हा पृथ्वी ।।१३।।

सोन्याची 'जर' तयार करतात. शेवटी ती जर कुजते किंवा ती वितळवली तर तिचे पाणी पृथ्वीरूप होते. ॥१३॥

पृथ्वीपासून धातु निपजती । अग्निसंगें रस होती । तया रसाची होये जगती । कठीणरूपें ।।१४।।

पृथ्वीतून अनेक धातू निघतात. ते अग्नीत घातले तर वितळतात व त्यांना ह्या जगात वेगळे वेगळे आकार दिल्यावर ते पृथ्वीसारखे कठीण होतात. पृथ्वीच होतात. ॥१४॥

नाना जळासी गंधी सुटे । तेथें पृथ्वीचें रूप प्रगटे । दिवसेंदिवस जळ आटे । पुढें पृथ्वी ।।१५।।

ठिकठिकाणच्या पाण्याला जो वेगळा वेगळा गंध असतो तो मातीचा असतो. ते पाणी आटले की ती माती पुन्हा पृथ्वीच होते. ॥१५॥

पत्रें पुष्पें फळें येती । नाना जीव खाऊन जाती । ते जीव मरतां जगती । नेमस्त होये ।।१६।।

झाडाची पाने, फुले व फळे खाणारे अनेक पक्षी व कीटक आहेत. ते पक्षी इ. मरण पावले की त्यांची नियमाने तीच गती होते. पृथ्वी होते. ॥१६॥

जितुका कांहीं जाला आकार । तितुक्यास पृथ्वीचा आधार । होती जाती प्राणीमात्र । सेवट पृथ्वी ।।१७।।

प्रत्येक नामरूपात्मक पदार्थाला पृथ्वीच उपादानकारण आहे. प्राणी जन्माला येऊन मरून पुन्हा पृथ्वी होतात. ॥१७॥

हें किती म्हणौन सांगावें । विवेकें अवघेंचि जाणावें । खांजणीभाजणीचें समजावें । मूळ तैसें ।।१८।।

असे वर्णन किती करावे? विचाराने सर्व तपशील जाणता येतो. सृष्टीच्या उत्पत्तीचे व लयाचे वर्म ह्याच रीतीने समजावून घ्यावे. ॥१८॥

आप आळोन पृथ्वी जाली । पुन्हां आपींच विराली । अग्नियोगें भस्म जाली । म्हणोनियां ।।१९।।

पाण्याचे घनीभवन होऊन पृथ्वी झाली. प्रळयाग्नीने तिचे भस्म होऊन ती पुन्हा पाण्यात विरते. ॥१९॥

आप जालें तेजापासुनी । पुढें तेजें घेतलें सोखुनी । तें तेज जालें वायोचेनी । पुढें वायो झडपी ।।२०।।

तेजापासून पाणी झाले. पुढे प्रळयकाळी तेजाने ते वाळवले. ते तेज वायूपासून झाले आणि वायूनेच तेज विझवले. ॥२०॥

वायो गगनीं निर्माण जाला । पुढें गगनींच विराला । ऐसें खांजणीभांजणीला । बरें पाहा ।।२१।।

वायू आकाशात अकस्मात निर्माण झाला व पुढे आकाशातच गडप झाला. अशी ही सृष्टीची उत्पत्ती व लय नीट समजावून घ्यावी. ॥२१॥

जें जें जेथें निर्माण होतें । तें तें तेथें लया जातें । येणें रितीं पंचभूतें । नाश पावती ।।२२।।

जे जेथून निर्माण होते ते त्यातच लयाला जाते. पांच महाभूते अशीच आपापल्या कारणांत लीन होतात. ॥२२॥

भूत म्हणिजे निर्माण जालें । पुन्हां मागुतें निमालें । पुढें शाश्वत उरलें । परब्रह्म तें ।।२३।।

ज्याला उत्पत्ती आहे त्याला भूत म्हणतात. ते नंतर नष्ट होते. शाश्वत ब्रह्म मात्र अबाधित राहते. ॥२३॥

तें परब्रह्म जों कळेना । तो जन्ममृत्य चुकेना । चत्वार खाणी जीव नाना । होणें घडे ।।२४।।

ते ब्रह्म जाणून 'ते मी आहे' असा अनुभव येईपर्यन्त जन्ममरणांचे चक्र सुटत नाही. चार खाणीत नाना जीवांच्या रूपाने जन्माला यावेच लागते. ॥२४॥

जडाचें मूळ तें चंचळ । चंचळाचें मूळ तें निश्चळ । निश्चळासी नाहीं मूळ । बरें पाहा ।।२५।।

अचेतन सृष्टी ईश्वरापासून तर ईश्वर परब्रह्मापासून उत्पन्न होतो. परब्रह्माला मात्र उत्पत्ती नाही हे नीट लक्षात घ्यावे. ॥२५॥

पूर्वपक्ष म्हणिजे जालें । सिद्धांत म्हणिजे निमालें । पक्षातीत जें संचलें । परब्रह्म तें ।।२६।।

'दृश्य सृष्टी सत्यत्वाने निर्माण झाली आहे' हा पूर्वपक्ष आहे. 'दोरीवरील सर्प जसा प्रकाशात निवृत्त होतो, (निमाले) तशी सृष्टी ज्ञानाने निवृत्त होते' हा सिद्धान्तपक्ष आहे. ब्रह्मज्ञान होईपर्यन्त हा पक्षांचा खेळ चालतो. ब्रह्म त्यापासून अलिप्त आहे. घनदाट ब्रह्मस्वरूपात पूर्वपक्ष व उत्तरपक्षादी भेद नाहीत. ॥२६॥

हें प्रचितीनें जाणावें । विचारें खुणेसी बाणावें । विचारेंविण सिणावें । तेंचि मूर्खपणें ।।२७।।

हा असा अनुभवच घ्यावा. शास्त्रशुद्ध विचाराने मिळालेल्या खुणेने तो अनुभव स्थिर करावा. विचारावाचून ब्रह्मज्ञानासाठी खटपट करून दमणारा मूर्खच असतो. ॥२७॥

ज्ञानी भिडेनें दडपला । निश्चळ परब्रह्म कैंचें त्याला । उगाच करितो गल्बला । मायेंमधें ।।२८।।

शब्दज्ञान होऊनसुद्धा जो दृश्यसृष्टीचे मिथ्यात्व पूर्णपणे स्वीकारीत नाही (भिडेने दडपला), त्या साधकाला निश्चळ ब्रह्मानुभव येत नाही. त्याच्या तथाकथित 'साधनेचा गोंधळ' (गल्बला) मायिक दृश्य सृष्टीच्या आवारातच चालतो! ॥२८॥

माया निशेष नासली । पुढें स्थिति कैसी उरली । विचक्षणें विवरिली । पाहिजे स्वयें ।।२९।।

मायेचे आवार संपूर्णपणे ओलांडल्यावर साधकाची अन्त:स्थिती कशी असते ती बुद्धिमान व चाणाक्ष साधकाने स्वत:ची स्वत:च जाणून घेतली पाहिजे! (ती कोणी सांगू शकत नाही. ग्रंथात सापडत नाही.) ॥२९॥

निशेष मायेचें निर्शन । होतां आत्मनिवेदन । वाच्यांश नाहीं विज्ञान । कैसें जाणावें ।।३०।।

मायेचा संपूर्ण निरास झाल्यावर जीवभाव गेल्याने खरे आत्मनिवेदन साधते. आत्मा वाच्य नाही. म्हणजे आत्मानुभव शब्दातीत आहे. साधनाची खटपट संपून आलेला स्थिर आत्मानुभव (विज्ञान) हा जाणण्याच्या मर्यादेत सापडत नाही. (विज्ञान कैसे जाणावे?) ॥३०॥

लोकांचे बोलीं जो लागला । तो अनुमानेंच बुडाला । याकारणें प्रत्ययाला । पाहिलेंच पाहावें ।।३१।।

परमार्थाच्या क्षेत्रात लुडबुड करणाऱ्या लोकांचे विचार लक्षात घेतले तर अंदाजांच्या उलाढालीत परमार्थ बुडतो. म्हणून साधकाने स्वत:च आत्मानुभूती वरचेवर घेत रहावी. रोज एकदा तरी आत्मवारी करावी! ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'शाश्वतब्रह्मनिरूपणनाम' समास चवथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'शाश्वतब्रह्मनिरूपण' नावाचा चवथा समास समाप्त

दशक पंधरावा : आत्मदशक

समास पाचवा : चंचळलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

दोघां ऐसीं तीन चालती । अगुणी अष्टधा प्रकृती । अधोर्ध सांडून वर्तती । इंद्रफणी ऐसीं ।।१।।

ईश्वर व माया ह्या दोघांच्या नियोजनानुसार सत्त्व, रज व तम ह्या तीन गुणांचे व्यापार चालतात. गुणरहित ब्रह्मस्वरूपात हे तीन गुण व पंचमहाभूते ह्यांचा जणू खेळ चालतो. ऊर्ध्व म्हणजे सूक्ष्म असलेले ईश्वर व माया आणि अध म्हणजे स्थूल असलेली पांचभौतिक व त्रिगुणात्मक सृष्टी ह्या दोन्हींचे नाते जणू मांजर व सर्पासारखे असते. ईश्वर व माया अव्यक्त असून पांचभौतिक व त्रिगुणात्मक सृष्टी व्यक्त आहे. असा त्यांचा परस्परात विरोध आहे. ॥१॥

पणतोंडें भक्षितो पणजा । मूल बापास मारी वोजा । चुकाऱ्या गेला राजा । चौघां जणांचा ।।२।।

ब्रह्म = राजा. पणजोबा = ईश्वर. मुलगा = सत्त्वगुणरूप विष्णू. नातू = रजोगुणरूप ब्रह्मदेव. पणतू = तमोगुणरूप महेश. तमोगुण ईश्वराला जुमानीत नाही. रजोगुणाची कृतिशीलता, भोगेच्छा व चांचल्य; सत्त्वगुणाच्या शांती, वैराग्य व स्थिरतेला मारून टाकते. ह्यामुळे ईश्वर, सत्त्व, रज व तम ह्या चौघांना ब्रह्म सापडत नाही. (ईश्वर नित्यमुक्त असला तरी कल्पांतापर्यन्त तो शुद्धसत्त्वाच्या उपाधीने ब्रह्मवस्तूपासून वेगळा राहतो. पहा– १२-६.) ॥२॥

देव देवाळयामधें लपाला । देऊळ पूजितां पावे त्याला । सृष्टिमधें ज्याला त्याला । ऐसेंचि आहे ।।३।।

देवळाच्या गाभाऱ्यात देव जणू खोलवर लपून असतो. पण देवळाची पूजा केली तरी तो देवळात असल्याने त्यालाही ती पूजा पोहोचते. देहरूप देवळातही देव व्यापून असल्याने देहाला संतुष्ट केले की देव संतुष्ट होतो किंवा देहाची पूजा देवाला पावते. ॥३॥

दोनी नामें येकास पडिलीं । लोकीं नेमस्त कल्पिलीं । विवेकें प्रत्ययें पाहिलीं । तों येकचि नाम ।।४।।

एकाच ब्रह्मवस्तूला ईश्वर व माया अशी दोन नावे शास्त्रकारांनी समजुतीपुरती दिली. पण विचाराने अनुभव आल्यावर ईश्वर व माया निवृत्त होऊन एक ब्रह्मवस्तू तेवढी उरते. ॥४॥

नाहीं पुरुष ना वनिता । लोकीं कल्पिलें तत्त्वता । त्याचा बरा शोध घेतां । कांहींच नाहीं ।।५।।

त्याच शास्त्रकारांनी ईश्वर पुल्लिंगी व माया स्त्रीलिंगी असल्याची कल्पना केली. त्याचा नीट विचार केला तर तसे काहीच नाही हे कळते. ॥५॥

स्त्री नदी पुरुष खळाळ । ऐसें बोलती सकळ । विचार पाहातां निवळ । देह नाहीं ।।६।।

नदी स्त्रीलिंगी तर ओढा पुल्लिंगी शब्द आहे. पण विचार केल्यावर त्यातील पाण्याला लिंग सांगण्यासारखे काहीच नसते. ॥६॥

आपण आपणास कळेना । पाहों जातां आकळेना । काशास कांहींच मिळेना । उदंडपणें ।।७।।

मी कोण आहे हे मलाच कळत नाही! उथळ दृष्टीने कितीही प्रयत्न केला तरी सापडत नाही. कारण देह व जग ह्यांत अगणित भेद आहेत. त्यांतील नेमका मी कोण हे लक्षात येत नाही. ॥७॥

येकलाचि उदंड जाला । उदंडचि येकला पडिला । आपणासी आपला । गल्बला सोसवेना ।।८।।

ब्रह्मवस्तू एकच आहे. त्याने अनेक रूपे धारण केली असली तरी त्या असंख्य रूपांत ते एकटेच भरलेले आहे.

परंतु आपलाच पुष्कळपणाचा पसारा त्याला सहन होत नाही. ॥८॥

येक असोन फुटी पडिली । फुटी असोन स्थिति येकली । विचित्र कळा पैसावली । प्राणिमात्रीं ।।९।।

वास्तविक एकमेव भेदशून्य ब्रह्मच जणू अतर्क्य भेदमय झाले. त्यांतही नवल असे की एवढे अफाट भेद असूनही त्याचे एकत्व मोडत नाही. त्याचे हे चकित करणारे कौशल्य सर्व जीवसृष्टीत दिसते. ॥९॥

वल्लीमधें जळ संचरे । कोरडेपणें हें वावरे । वोलेवांचून न थिरे । कांहीं केल्यां ।।१०।।

जाईसारख्या वेलीत पाणी पुष्कळ असते. पण ती दिसायला कोरडी दिसते. वास्तविक पाण्याशिवाय ती कधीच जिवंत रहाणार नाही. ॥१०॥

झाडांमधें केलीं आळीं । झाडें धांवती निराळीं । कित्येक झाडें अंतराळीं । उडोन जाती ।।११।।

कुंदाच्या झाडाला आळे करून पाणी घातल्यावर त्या आळ्यापासून दूरपर्यन्त कुंदाच्या वेली उगवतात. किंवा केळीशेजारी दुसरे केळीचे झाड उगवते. काही बांडगुळे तर दुसऱ्या झाडांच्या शेंड्यावरच उगवतात. ॥११॥

भूमीपासून वेगळीं जालीं । परी तें नाहींत वाळलीं । निराळींच बळावलीं । जेथतेथें ।।१२।।

त्या बांडगुळांचा जमिनीशी प्रत्यक्ष संबंध नसला तरी ती पाण्याअभावी वाळत नाहीत. जमिनीचे नाते तुटूनसुद्धा ती वेगळेपणाने फोफावतात. ॥१२॥

देवाकरितां चालती झाडें । देव नस्तां होती लाकडें । नीटचि आहे कुवाडें । सर्वथा नव्हे ।।१३।।

देवामुळेच झाडांची जीवनयात्रा चालते. झाडातील जीवरूप देव गेला की ती वाळून लाकडे तयार होतात (वृक्ष सजीव असतो.) हे अगदी सरळ दिसते. ह्यांत काही गूढ नाही. ॥१३॥

झाडापासून झाडें होती । तेहि अंतरीक्ष जाती । मुळानें भेदिली जगती । कदापि नाहीं ।।१४।।

वृक्षापासून दुसरे वृक्ष तयार होतात व तेही उंच उंच वाढतात. त्यांची मुळे पृथ्वीचे अनेक भाग पाडू शकत नाहीत. पृथ्वीचे तुकडे होत नाहीत. ॥१४॥

झाडास झाडें खातपाणी । घालून पाळिलीं प्रतिदिनीं । बोलकीं झाडें शब्दमथनीं । विचार घेती ।।१५।।

झाडांना झाडांच्याच कुजक्या पानादिकांचे खत मिळते! ती त्यानेच दररोज वाढतात. माणसासारखी बोलकी झाडे (जीव) कोणी बोललेल्या शब्दांतून साररूप विचार घेतात. (विचारांची देवघेव करतात) ॥१५॥

होणार तितुकें आधींच जालें । मग कल्पकल्पून बोलिलें । जाणतयासी समजलें । सकळ कांहीं ।।१६।।

अनंत ब्रह्मांडांची व्हावयाची ती निर्मिती होऊन गेली! आता त्यांच्या निर्मितीविषयी अनेक कल्पना लढवून लोक बोलत राहतात. जो जाणता आहे तो हे ओळखून असतो. (मिथ्या जगाच्या निर्मितीचा तो फार विचार करीत नाही. उपनिषदांनी सांगितलेले जगाचे स्वरूप ओळखून स्वस्थ राहतो.) ॥१६॥

समजलें तरी उमजेना । उमजलें तरी समजेना । प्रत्ययेंविण अनुमानेना । सकळ कांहीं ।।१७।।

विचाराने समजले तरी पूर्ण उलगडा होत नाही. उलगडा झाला तरी तो शब्दाच्या आवाक्यात पकडता येत नाही. 'मी ब्रह्म' असा प्रत्यय आल्यावरच दृश्य जगताच्या स्वरूपाची खरी कल्पना येते. तोवर नाही. ॥१७॥

सर्वत्रांचा वडिल कोण । हेचि पाहावी वोळखण । भेटे आपणास आपण । जगदांतरें ।।१८।।

ह्या सर्व दृश्य पसाऱ्यामागे अनादि आद्य (वडील) असलेले अधिष्ठान ब्रह्म ओळखावे. ते सर्व जगात व्यापून असल्याने तेच जणू स्वत:च्या एका रूपाने स्वत:च्याच दुसऱ्या रूपाला भेटते. (रूप = उपाधी) ॥१८॥

अंतरनिष्ठांची उंच कोटी । बाहेरमुद्यांची संगती खोटी । मूर्ख काये समजेल गोष्टी । शाहाणे जाणती ।।१९।।

आत्मवेत्त्या आत्मनिष्ठांची श्रेणी सर्वांत मोठी असते. दृश्य जगात रमलेल्यांची संगत टाकावू असते. मूर्खाला हे कधीच समजत नाही. शहाणे हे जाणतात. ॥१९॥

अंतरें राखतां राजी । भलत्यास भलताच नवाजी । अंतरें न राखतां भाजी । मिळणार नाहीं ।।२०।।

(अठराव्या ओवीचे रहस्य लक्षात घेऊन–) सर्वांची मने संतुष्ट ठेवली तर अपरिचिताकडूनही मदत मिळते. मने सांभाळली नाहीत, तर क्षुल्लक मदतही (भाजी) मिळणार नाही. ॥२०॥

ऐसें वर्ततें प्रत्यक्ष । अलक्षीं लावावें लक्ष । दक्षास भेटतां दक्ष । समाधान होतें ।।२१।।

असा अनुभव प्रत्यक्ष येतो. तात्पर्य अलक्ष्य स्वरूपाच्या अनुसंधानात रहावे. अशा अनुसंधानात दक्ष असणाऱ्याला दुसरा तसाच भेटला की समाधान वाटते. (माझीया जातीचे मज भेटो कोणी । आवडीची धणी फेडावया– तुका.) ॥२१॥

मनास मिळतां मन । पाहोन येती निरंजन । चंचळचक्र उलंघून । पैलाड जाती ।।२२।।

असे दोघे भेटून त्यांची मने जुळली की ते दोघेही परस्परांच्या सान्निध्यात आपापल्या साधनेने आत्मानुभव घेतात. अध्यस्त अहंकारादी जगाला बाजूला सारून अधिष्ठानाशी ऐक्य पावतात. (अध्यस्तापलीकडे अधिष्ठान असते.) ॥२२॥

येकदा जाऊन पाहोन आले । मग तें सन्निध देखिलें । चर्मचक्षीं लक्षिलें । न वचे कदा ।।२३।।

एकदा आत्मरूप अधिष्ठान मी आहे असा अनुभव आला की आत्मा हे स्वत:चेच स्वरूप आहे (सन्निध) असे जाणवू लागते. आत्मा डोळ्यांना दिसत नाही, पण ज्ञानचक्षूंनी जाणता येतो. ॥२३॥

नाना शरीरीं चंचळ । अखंड करी चळवळ । परब्रह्म तें निश्चळ । सर्वां ठाईं ।।२४।।

चंचळ जीवात्मा सर्व शरीरात व्यापून राहून अनेक कार्ये करतो. आत्मरूप निश्चळ ब्रह्म सर्वांच्या शरीरात अकर्तेपणाने राहते. (जीव गेला तरी आत्मा असतो.) ॥२४॥

चंचळ धांवे येकीकडे । वोस पडे दुसरेकडे । चंचळ पुरे सर्वांकडे । हें तो घडेना ।।२५।।

वारा चंचळ असतो. तो एकीकडे वाहू लागला की दुसरीकडे नसतो. तो चारी दिशांना पुरा पडत नाही. तसे चंचळ मन एकावेळी एकच विचार करू शकते. ॥२५॥

चंचळ चंचळास पुरेना । आवघें चंचळ विवरेना । निश्चळ अपार अनुमाना । कैसें येतें ।।२६।।

चंचळ मनाला चंचळ जगाचेसुद्धा पूर्ण आकलन होत नाही. त्याला निश्चळ अपरंपार ब्रह्म कसे कळेल? ॥२६॥

गगनीं चालिली हवावी । कैसी पावेल पार पदवी । जातां मधेंचि विझावी । हा स्वभावचि तिचा ।।२७।।

दारूचा बाण आकाशात कितीही उंच गेला तरी अल्पशा कक्षेपलीकडे जात नाही. थोड्या उंचीवर जाताच तो विझणें स्वाभाविक आहे. ॥२७॥

मनोधर्म येकदेशी । कैसा आकळिल वस्तुसी । निर्गुण सांडून अपेसी । सर्व ब्रह्म म्हणे ।।२८।।

तशी अन्त:करणवृत्तीने कितीही झेप घेतली तरी ती दृश्याची कक्षा ओलांडून ब्रह्माचा वेध घेऊ शकत नाही. कारण ती मर्यादित किंवा एकदेशी आहे. अपयशी वृत्तीने निर्गुणाचा अनुभव न घेताच तो साधक 'हे सर्व ब्रह्म आहे' अशी पोपटपंची करतो. ॥२८॥

नाहीं सारासारविचार । तेथें अवघा अंधकार । खरें सांडून खोटें पोर । नेणतें घेतें ।।२९।।

जेथे ब्रह्मरूप सार व दृश्यरूप असार ह्यांचा निवाडा होत नाही तेथे सर्वत्र अज्ञानाचा अंधार असतो. अजाण पोर खरे टाकून खोट्याला भुलते. (त्याप्रमाणें नेणते पोर खरे सांडून खोटे घेते). ॥२९॥

ब्रह्मांडाचें माहाकारण । तेथून हें पंचीकर्ण । माहावाक्याचें विवर्ण । वेगळें असे ।।३०।।

मूळमायेला ब्रह्मांडाचा महाकारणदेह म्हणतात. मूळमायेतून पंचीकृत ब्रह्मांडाचा पसारा व्यक्त होतो. पण महावाक्यांचे स्पष्टीकरण मूळमायेशी निगडित नाही. (मूळमाया अचेतन आहे. महावाक्यातील त्वम् व तत् ही दोन्ही पदे चेतन आहेत.) ॥३०॥

महत्त्वत्त्व महद्भूत । तोचि जाणावा भगवंत । उपासना हे समाप्त । येथून जाली ।।३१।।

मायेत (महत्‌भूत) पडलेल्या ब्रह्माच्या प्रतिबिंबाला (महत्‌तत्त्व) ईश्वर (भगवंत) म्हणतात. (साभास मायाविशिष्ट चेतन म्हणजे ईश्वर.) ईश्वर हीच उपासनेची हद्द आहे. ब्रह्म अनुपास्य आहे. ॥३१॥

कर्म उपासना आणि ज्ञान । त्रिकांड वेद हें प्रमाण । ज्ञानाचें होतें विज्ञान । परब्रह्मी ।।३२।।

वेदांची कर्मकांड, उपासनाकांड व ज्ञानकांड अशी तीन कांडे आहेत असे शास्त्र सांगते; शब्दाने ब्रह्माचे ज्ञान करून देणें एवढेच वेदांचे काम आहे. ब्रह्मानुभव घेऊ पहाणाऱ्याच्या 'सोऽहं' वृत्तीला महाकारण शरीर म्हणतात. अहं स: मध्यें लीन झाल्याने सोऽहं वृत्ती मावळून महाकारणदेह मागे पडला की सोऽहं ह्या ज्ञानाचे विज्ञान होते. ॥३२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'चंचळलक्षणनाम' समास पाचवा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'चंचळलक्षण' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक पंधरावा : आत्मदशक

समास सहावा : चातुर्यविवरण

॥ श्रीराम समर्थ ॥

पीतापासून कृष्ण जालें । भूमंडळीं विस्तारलें । तेणेंविण उमजलें । हें तों घडेना ।।१।।

(पहिल्या चार ओव्यांत कूट रचना आहे) दिव्याच्या पिवळ्या ज्योतीवर येणारा काळा धूर कांचेवर जमवला की काजळी तयार होते. काजळीची शाई लिहिण्यासाठीं जगभर वापरू लागले. लिहिल्याशिवाय ज्ञानाचा प्रसार होत नाही. ॥१॥

आहे तरी स्वल्प लक्षण । सर्वत्रांची सांठवण । अद्धम आणी उत्तम गुण । तेथेंचि असती ।।२।।

शाई तयार करणे सोपे व तिची किंमतही किरकोळ आहे. पण तिच्या साह्याने सर्वांना सर्व प्रकारच्या ज्ञानाचा संग्रह लाभतो. अती वाईट व अत्यंत दर्जेदार वाङ्मय शाईनेच लिहिले जाते. ॥२॥

महीसुत सरसाविला । सरसाऊन द्विधा केला । उभयेता मिळोन चालिला । कार्येभाग ।।३।।

बोरूच्या (महीसुत) गाठी छाटून टाकून त्याचे टोक तयार करून ते मध्यावर चिरले. असे चिरलेले दोन भाग मिळून लिहिता येते. ॥३॥

स्वेतास्वेतास गांठीं पडतां । मधें कृष्ण मिश्रित होतां । इहलोकसार्थकता । होत आहे ।।४।।

पिवळा बोरू (अश्वेत) काळ्या शाईत बुडवून त्याने पांढऱ्या कागदावर लिहिले की ऐहिक जीवन व मोक्ष ह्या दोन्हींत यश मिळण्यासाठीं आवश्यक ते ज्ञान लिहिता-वाचता येते. ॥४॥

विवरतां याचा विचार । मूर्ख तोचि होये चतुर । सद्यप्रचित साक्षात्कार । परलोकींचा ।।५।।

अशा लिखित ज्ञानसंग्रहाचे महत्त्व पुरेसे समजावून घेतले तर मूर्खही शहाणा होतो आणि 'मी ब्रह्म आहे' हा साक्षात्कार होण्यास वेळ लागत नाही. ॥५॥

सकळांस जे मान्य । तेंचि होतसे सामान्य । सामान्यास अनन्य । होईजेत नाहीं ।।६।।

सर्वांची जी समजूत असते तीच समाजात रूढ असते. पण विचारवंत त्याच्याशी सहमत होत नाही. त्याला ते पटत नाही. ॥६॥

उत्तम मध्यम कनिष्ठ रेखा । अदृष्टीची गुप्त रेखा । चत्वार अनुभव सारिखा । होत नाहीं ।।७।।

तळहातावर किंवा कपाळावर उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा तीन व प्रारब्धाची गुप्त असलेली चौथी रेखा असते अशी सर्वसामान्य समजूत आहे. पण त्या रेखा वाचून त्यांचे लाविलेले अर्थ व अनुभव सर्वांचे सारखे नसतात! विचारवंत हे लक्षात घेतो. ॥७॥

चौदा पीड्यांचे पवाडे । सांगती ते शाहाणे कीं वेडे । ऐकत्यानें घडे कीं न घडे । ऐसें पाहावें ।।८।।

चौदा पिढ्यांच्या पराक्रमांचे यशोगान गाणारे शहाणे असोत की वेडे असोत, ऐकणाऱ्याने आपल्याला तसे जमेल की न जमेल त्याचा विचार करावा. ॥८॥

रेखा तितुकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येतें । डोळेझांकणी करावी ते । कायेनिमित्य ।।९।।

(चीरो ह्या जगप्रसिद्ध हस्तरेषा तज्ज्ञाचे असे मत आहे की जिद्दीच्या प्रयत्नांमुळें हातावरील रेषा बदलतात.) योग्य

दिशेने केलेल्या अथक प्रयत्नाने अनेकांनी आपल्या प्रारब्ध रेषा पुसल्याची प्रत्यक्ष उदाहरणे आहेत. ह्या वास्तवाकडे दुर्लक्ष का करावे? ॥९॥

बहुतांचे बोलीं लागलें । तें प्राणी अनुमानीं बुडाले । मुख्य निश्चये चुकलें । प्रत्ययाचा ॥१०॥

जो अनेकांच्या अनेक मतांचे नादी लागतो तो संशयात बुडतो. विचारवंतांनी अनुभवाने केलेले निर्णय त्याला उपयोगी पडत नाहीत. ॥१०॥

उदंडाचें उदंड ऐकावें । परी तें प्रत्ययें पाहावे । खरेंखोटें निवडावें । अंतर्यामीं ॥११॥

कित्येकांचे कित्येक विचार ऐकावेत. पण ते सर्व त्यांच्या किंवा इतरांच्या अनुभवांशी ताडून पाहून त्यांतील खरे-खोटे मनातल्या मनात निवडावे. ॥११॥

कोणासी नव्हे म्हणों नये । समजावे अपाये उपाये । प्रत्यये घ्यावा बहुत काये । बोलोनियां ॥१२॥

'तुझे विचार चूक आहेत' असे कोणाला म्हणू नये. पण त्या विचारातील लाभ व हानीचा विचार करावा. स्वत: अनुभव घ्यावा. उगीच कोणाच्या तोंडी लागण्यात काय अर्थ आहे? ॥१२॥

माणुस हेंकाड आणी कच्चें । मान्य करावें तयाचें । येणें प्रकारें बहुतांचें । अंतर राखावें ॥१३॥

काही माणसे हट्टी व अर्धवट असतात. त्यांना हो ला हो म्हणावे. अनेकांची मने अशी सांभाळावी. ॥१३॥

अंतरीं पीळ पेच वळसा । तोचि वाढवी बहुवसा । तरी मग शाहाणा कैसा । निवऊं नेणें ॥१४॥

मनात जर हट्टीपणा, दुसऱ्याला पेचात पकडण्याची ईर्षा व तिरक्या चाली असतील तर हेच सर्व वाढत राहते. याला शहाणा कसे म्हणावे? त्याला इतरांना राजी राखता येत नाही. ॥१४॥

वेडें करावें शाहाणें । तरीच जिणें श्लाघ्यवाणें । उगेंच वादांग वाढविणें । हें मूर्खपण ॥१५॥

अज्ञानी जनांना ज्ञानी करणाऱ्याचे जीवनच वाखाणण्यासारखे असते. उगीच वाद वाढवीत राहणे मूर्खपणाचे आहे. ॥१५॥

मिळोन जाऊन मेळवावें । पडी घेऊन उलथावें । कांहींच कळों नेदावें । विवेकबळें ॥१६॥

समाजात मिसळून लोकांना आपलेसे करावे. प्रसंगी नमते घेऊन वेळ साधून बाजू उलटवावी. पण हे अशा युक्तीने करावे की बाजू उलटली आहे हे कळूनही त्याने कटुता निर्माण होऊ नये. ॥१६॥

दुसऱ्याचे चालणीं चालावें । दुसऱ्याचे बोलणीं बोलावें । दुसऱ्याचे मनोगतें जावें । मिळोनियां ॥१७॥

दुसऱ्याच्या कलाने वागावे, विरोध न करता बोलावे व त्याच्याशी जणू एकरूप व्हावे. ॥१७॥

जो दुसऱ्याच्या हितावरी । तो विपट कहिंच न करी । मानत मानत विवरी । अंतर तयाचें ॥१८॥

जो दुसऱ्याच्या हिताचा विचार करतो तो त्याच्या संगतीत राहूनही निषिद्ध वागत नाही. उलट त्याच्या कलाने वागून त्याची बुद्धी बदलतो. ॥१८॥

आधीं अंतर हातीं घ्यावें । मग हळुहळु उकलावें । नाना उपायें न्यावें । परलोकासी ॥१९॥

आधी त्याचा विश्वास संपादन करावा व मग बेताबेताने त्याच्या बुद्धीची समजूत घालत घालत आवश्यक त्या सर्व उपायांनी त्याला परमार्थ समजावून सांगावा. त्याला मुक्त करावा. ॥१९॥

हेंकाडास हेंकाड मिळाला । तेथें गल्बलाचि जाला । कळहो उठतां च्यातुर्याला । ठाव कैंचा ॥२०॥

दोन हट्टी व दुराग्रही एकत्र आले तर भांडणे होऊन आरडाओरडाच होतो. त्यांत चातुर्याला वावच नसतो. कोण कोणाचे ऐकणार? ॥२०॥

उगीच करिती बडबड । परी करून दाखविणें हें अवघड । परस्थळ साधणें जड । कठिण आहे ॥२१॥

उपदेशाची अकारण बडबड करणारे पुष्कळ असतात. पण प्रत्यक्ष उपदेश ऐकणाऱ्यांची भूमिका तयार करणे फार कठीण असते. अज्ञानाने कठीण झालेले दुसऱ्याचे अन्तःकरण जिंकणे फार अवघड आहे. ॥२१॥

धके चपेटे सोसावे । नीच शब्द साहात जावे । प्रस्तावोन परावे । आपले होती ।।२२।।

लोकांनी केलेली अवहेलना, पडणारे कष्ट व विरोध इ. सर्व सोसावे लागते. शेवटी लोकांची बुद्धी पालटून त्यांचा दुरावा संपून ते आपलेसे होतात. ॥२२॥

प्रसंग जाणोनि बोलावें । जाणपण कांहींच न घ्यावें । लीनता धरून जावें । जेथतेथें ।।२३।।

प्रसंग ओळखून बोलावे. 'आपण ज्ञानी आहोत' ही भूमिका कोठेच नसावी. सर्वत्र नम्रता धरून असावे. (महापुरे झाडे मोडती । तेथे लव्हाळी वाचती ॥तुका.॥) ॥२३॥

कुग्रामें अथवा नगरें । पाहावीं घरांचीं घरें । भिक्षामिसें लाहानथोरें । परीक्षून सोडावीं ।।२४।।

कुख्यात खेडी किंवा शहरात हिंडावे. मानवी शरीररूप घरे ज्या घरात राहतात त्यांचे निरीक्षण करावे. भिक्षेच्या निमित्ताने लहान व मोठ्या लोकांचे अंतरंग जाणावे. ॥२४॥

बहुतीं कांहींतरी सांपडे । विचक्षण लोकीं मित्री घडे । उगेच बैसतां कांहींच न घडे । फिर्णे विवरणें ।।२५।।

अनेक लोकांत वावरले की त्यांत थोडेतरी कार्यासाठी उपयुक्त लोक सापडतात. जाणत्या व चतुरांशी संबंध वाढतात. एके जागी स्वस्थ बसले तर ईश्वरकार्यासाठी फिरणे व प्रबोधन करणे साधत नाही. ॥२५॥

सावधपणें सर्व जाणावें । वर्तमान आधींच घ्यावें । जाऊं ये तिकडे जावें । विवेकें सहित ।।२६।।

गाफील न राहाता परिस्थितीचे यथार्थ आकलन करावे. पुढील परिस्थितीचा आधीच अंदाज घ्यावा. जिकडे कार्यासाठी जायचे असेल तेथील राजकारण, आर्थिक स्थिती, नेतृत्व व लहानमोठ्या व्यक्तींची माहिती घ्यावी. ॥२६॥

नाना जिनसपाठांतरें । निवती सकळांची अंतरें । लेहोन देतां परोपकारें । सीमा सांडावी ।।२७।।

प्रबोधनासाठी आवश्यक ते पाठांतर मुबलक असावे. त्यामुळें अनेकांना समाधान वाटते. काही विषय कोणाला लिहून देऊन मदतीची पराकाष्ठा करावी. ॥२७॥

जैसें जयास पाहिजे । तैसें तयास दीजे । तरी मग श्रेष्ठचि होइजे । सकळां मान्ये ।।२८।।

ज्याच्या त्याच्या अपेक्षेप्रमाणे ते ते देण्याचा पुरेपूर प्रयत्न करावा. त्यामुळे सर्वांची मान्यता लाभून नेतृत्वही लाभते. ॥२८॥

भूमंडळीं सकळांस मान्य । तो म्हणों नये सामान्य । कित्येक लोक अनन्य । तया पुरुषासी ।।२९।।

जो जगामध्ये सर्वांचा आवडता होतो त्याला सामान्य समजू नये. अनेक लोक त्याच्याशी एकनिष्ठ असतात. ॥२९॥

ऐसीं चातुर्याचीं लक्षणें । चातुर्यें दिग्विजये करणें । मग तयास काये उणें । जेथतेथें ।।३०।।

अशी ही चातुर्याची लक्षणे असणाऱ्याला त्याच्या कार्यात सर्वत्र यश लाभते. तो जेथे जातो तेथे त्याला काहीच कमी पडत नाही. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'चातुर्यविवरणनाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'चातुर्यविवरण' नावाचा सहावा समास समाप्त

दशक पंधरावा : आत्मदशक

समास सातवा : अधोर्धनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

नाना विकाराचें मूळ । ते हे मूळमायाच केवळ । अचंचळी जे चंचळ । सूक्ष्मरुपें ।। १ ।।

अस्ति, जायते इ. विकारांना किंवा नाना नामरूपात्मक पदार्थांना मूळमायाच कारण आहे. ती निश्चळ ब्रह्मांत चंचळ व सूक्ष्मरूपाने राहते. ॥१॥

मूळमाया जाणीवेची । मुळींच्या मूळ संकल्पाची । वोळखी शडगुणैश्वराची । येणेंचि न्यायें ।। २ ।।

मूळमायेत चिदाभास असल्याने ती जाणीवयुक्त आहे. तिचे अधिष्ठान (मूळ) असलेल्या परब्रह्माचे ठिकाणी झालेले आद्य स्फुरण (मूळ) तीच मूळमाया. (स्फुरणाला मूळमाया हे नाव आहे) यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य अशा सहागुणांचा ईश्वरही मूळमायेचाच होय. ॥२॥

प्रकृतिपुरुष शिवशक्ती । आर्धनारीनटेश्वर म्हणती । परी ते आवघी जगज्जोती । मूळ त्यासी ।। ३ ।।

प्रकृति-पुरुष, शिव-शक्ती, अर्धनारीनटेश्वर इ. नावाने ईश्वर ओळखला जातो. या सर्वांचे मूळ जगज्ज्योती आहे. (पहा १०-९-१०, ११) ॥३॥

संकल्पाचें जें चळण । तेंचि वायोचें लक्षण । वायो आणी त्रिगुण । आणी पंचभूतें ।।४।।

संकल्परूप हालचाल हेच वायूचे लक्षण असून संकल्पात पंचभूते व त्रिगुण बीजरूपाने असतात. ॥४॥

पाहातां कोणीयेक वेल । त्याच्या मुळ्या असती खोल । पत्रें पुष्पें फळें केवळ । मुळाचपासीं ।।५।।

कोणत्याही वेलीच्या मुळ्या जमिनीत खोलवर गेलेल्या असतात. वेलीची पाने, फुले व फळे त्या मुळ्यांमुळे येतात. ॥५॥

याहिवेगळे नाना रंग । आकार विकार तरंग । नाना स्वाद अंतरंग । मुळामध्यें ।।६।।

याखेरीज वेलीला असलेले विविध रंग, आकार, वाढणे, वाळणे इ. विकार, गोलाकार रेषा (तरंग), चवी व वेलीचा गाभा (अंतरंग) इ. सर्व मुळांनी पुरविलेल्या अन्नरसावर निर्भर असतात. ॥६॥

तेंचि मूळ फोडून पाहातां । कांहींच नाहीं वाटे आतां । पुढें वाढतां वाढतां । दिसों लागे ।।७।।

मूळ जर फोडून पाहिले तर ह्यातील काहीच दिसत नाही. वेल वाढू लागला की सर्व गोष्टी व्यक्त होऊ लागतात.

कड्यावरी वेल निघाला । अधोमुखें बळें चालिला । फांपावोन पुढें आला । भूमंडळीं ।।८।।

डोंगराच्या कड्यावर उगवणारी वेल डोंगरउतारावरून फोफावत जमिनीवर उतरते. ॥८॥

तैसी मूळमाया जाण । पंचभूतें आणी त्रिगुण । मुळीं आहेत हें प्रमाण । प्रत्ययें जाणावें ।।९।।

मूळमाया वेलीच्या मुळाप्रमाणे आहे. मुळात जसे वेलीचे सर्व अवयव सुप्त असतात, त्याप्रमाणे मूळमायेत पंचभूते व त्रिगुण अव्यक्त स्थितीत असतात. वेलीवरून हे लक्षात घ्यावे. ॥९॥

अखंड वेल पुढें वाढला । नाना विकारीं शोभला । विकारांचा विकार जाला । असंभाव्य ।।१०।।

मूळमायेतून जगतरूप वेल पुढे वाढत गेला. त्या जगताला नामरूपात्मक विकारांनी शोभा येते. विकारातून पुढे असंख्य विकार निर्माण झाले. ॥१०॥

नाना फडगरें फुटलीं । नाना जुंबाडें वाढलीं । अनंत अग्रें चालिलीं । सृष्टीमधें ।।११।।

वेलीला असंख्य फांद्या फुटल्या. त्या एकमेकीत गुंतून त्यांचा गुंताडा झाला. अशा अनेकानेक वेलींची टोके सृष्टीत सर्वत्र पसरली. (अनंत जीवसृष्टी निर्माण झाली.) ॥११॥

कित्येक फळें तीं पडती । सवेंचि आणीक निघती । ऐसीं होती आणी जाती । सर्वकाळ ।।१२।।

कित्येक फळे गळून पडतात तोच अनेक फळे लागतात. असे फळांचे लागणे, गळणे सतत चालू राहते. ॥१२॥

येक वेलचि वाळले । पुन्हां तेथेंचि फुटले । ऐसे आले आणी गेले । कितीयेक ।।१३।।

एक वेल वाळतो न वाळतो तो त्याच्याच मुळातून दुसरा वेल फुटतो. असे कित्येक वेल फुटले व वाळले. ॥१३॥

पानें झडती आणि फुटती । पुष्पें फळें तेणेंचि रीतीं । मध्यें जीव हे जगती । असंभाव्य ।।१४।।

पाने गळून पडताच नवा फुटवा फुटतो. त्याचप्रमाणे फुले व फळे लागतात व गळून पडतात. त्या फुला-फळांत असंख्य कृमी तयार होतात. ॥१४॥

अवघा वेलचि कर्पतो । मूळापासून पुन्हा होतो । ऐसा अवघा विचार जो तो । प्रत्यक्ष जाणावा ।।१५।।

काही वेळा सर्व वेल करपला तरी मुळातून पुन्हा वेल उगवतो. सृष्टीच्या उत्पत्ती, स्थिती व लयासंबंधी असेच समजावून घ्यावे. ॥१५॥

मूळ खाणोन काढिलें । प्रत्ययेज्ञानें निर्मूळ केलें । तरी मग वाढणेंचि राहिलें । सकळ कांहीं ।।१६।।

वेलीचे मूळ खणून उपटले तर वेल वाळतो व पुन्हा नवा वेल उगवत नाही. त्याप्रमाणे मूळमायेचा बाध करून ब्रह्मानुभव घेतला की जन्ममरणांचे चक्र थांबते. ॥१६॥

मुळीं बीज सेवटीं बीज । मध्यें जळरूप बीज । ऐसा हा स्वभाव सहज । विस्तारला ।।१७।।

वेल बीजातून उगवते. वेलीच्या फळातून पुन्हा बीज तयार होते. मधे बीजांकुराला वाढविणारे जळरूप बीज (कारण) असते. असा हा सर्व जीवसृष्टीचा सहज विस्तार होतो. ॥१७॥

मुळामधील ज्या गोष्टी । सांगताहे बीजसृष्टी । जेथील अंश तेथें कष्टी । न होतां जातो ।।१८।।

बीजाच्या घटनेत मुळामध्ये काय दडून आहे ते ठरते. (प्रथम बीज, नंतर मूळ, नंतर वेल असा क्रम आहे.) रंग, स्वादादी वेलीत असणारे विशेष क्रमाने सहजच जेथील तेथे जातात. (मूळमायेच्या बीजात अष्टधाप्रकृती सुप्त असते.) ॥१८॥

जातो येतो पुन्हा जातो । ऐसा प्रत्यावृत्ति करितो । परंतु आत्मज्ञानी जो तो । अन्यथा न घडे ।।१९।।

अज्ञानी जीव मरण, जन्म व मरण अशा चक्रात फिरत राहतो. आत्मज्ञानी त्यांत सापडत नाही. ॥१९॥

न घडे ऐसें जरी म्हणावें । तरी कांहींतरी लागे जाणावें । अंतरींच परी ठावें । सकळांस कैचें ।।२०।।

हे खरे असले तरी त्याला अन्त:करणात व्यापून असणारा आत्मा जाणावा लागतो. पण हे जाणणारा विरळाच. सर्वांना ते कसे साधेल? ॥२०॥

तेणेंसीच कार्यभाग करिती । परंतु तयास नेणती । दिसेना ते काये करिती । बापुडे लोक ।।२१।।

आत्म्याच्या सत्तेवरच शरीराचे सर्व व्यवहार चालतात, पण त्याला जाणीत नाहीत. सामान्य अज्ञानी जनांनी तरी काय करावे! ॥२१॥

विषयेभोग तेणेंचि घडे । तेणेंविण कांहींच न घडे । स्थूळ सांडून सूक्ष्मीं पवाडे । ऐसा पाहिजे ।।२२।।

सुखरूप आत्मा आहे म्हणूनच विषयांचे सुख अनुभवाला येते. खरे तर आत्म्यावाचून देहात एकही क्रिया घडत

नाही. पण स्थूल दूर सारून सूक्ष्माचा वेध घेण्याची क्षमता हवी. ॥२२॥

जें आपलेंचि अंतर । तद्रूपचि जगदांतर । शरीरभेदाचे विकार । वेगळाले ।।२३।।

आपल्याला जसे अन्त:करण आहे तसे जगातील जीवांनाही आहे. शरीरे मात्र वेगळी असतात. ॥२३॥

आंगोळीची आंगोळीस वेधना । येकीची येकीस कळेना । हात पाये अवेव नाना । येणेंचि न्यायें ।।२४।।

बोटाची वेदना शेजारच्या बोटाला कळत नाही. त्याचप्रमाणे हातापायांच्या वेदना परस्परांना कळत नाहीत. सर्व अवयवांची हीच स्थिती आहे. ॥२४॥

अवेवाचें अवेव नेणे । मा तो परांचें काये जाणे । परांतर याकारणें । जाणवेना ।।२५।।

एकाच शरीराच्या अवयवांना एकमेकांचे ज्ञान नसते, तर दुसऱ्यांचे ज्ञान कसे होईल? म्हणून दुसऱ्याचे मन जाणता येत नाही. (त्याचा केवळ अंदाज करता येतो. प्रत्यक्ष ज्ञान नाही.) ॥२५॥

येकाचि उदकें सकळ वनस्पती । नाना अग्रेभेद दिसती । खुडिलीं तितुकींच सुकती । येर ते टवटवीत ।।२६।।

सर्व वनस्पतींना पाणी जगवते. त्या वनस्पतींचे शेंडे वेगळे दिसतात. जेवढे शेंडे छाटावे तेवढेच वाळतात. बाकीचे टवटवीत दिसतात. ॥२६॥

येणेंचि न्यायें भेद जाला । कळेना येकाचें येकाला । जाणपणें आत्मयाला । भेद नाहीं ।।२७।।

शरीरांचे भेद असेच आहेत. एकाचे एकाला कळत नाही. पण सर्व शरीरात जाणीवरूप आत्मा एकच आहे. (पहा १०-१-१५) ॥२७॥

आत्मत्वीं भेद दिसे । देहप्रकृतिकरितां भासे । तरी जाणतचि असे । बहुतेक ।।२८।।

आत्मस्वरूपात भासणारा भेद देहधाऱ्याच्या भिन्न स्वभावामुळे भासतो. तरी बहुतेकांना आत्मभेद खरा वाटतो. ॥२८॥

देखोन ऐकोन जाणती । शाहाणे अंतर परीक्षिती । धूर्त ते अवघेंच समजती । गुप्तरूपें ।।२९।।

शहाणा असतो तो प्रत्यक्ष पाहून किंवा माहिती काढून सर्वकाही जाणून घेतो. इतरांच्या मनाची अचूक पारख करतो. बुद्धिमान लोक कोणाला अंदाज लागू न देता सर्व समजून घेतात. ॥२९॥

जो बहुतांचें पाळण करी । तो बहुतांचें अंतर विवरी । धूर्तपणें ठाउकें करी । सकळ कांहीं ।।३०।।

ज्याला अनेकांचे प्रबोधन करावयाचे आहे ते सर्वांच्या अन्त:करणाचा ठाव घेतो व जे माहीत करून घ्यावयाचे ते चाणाक्षपणे माहीत करून घेतो. ॥३०॥

आधीं मनोगत पाहाती । मग विश्वास धरिती । प्राणीमात्र येणें रितीं । वर्तताहे ।।३१।।

समाजपुरुष प्रथम त्याच्या हेतूंचा अंदाज घेऊनच त्यावर विश्वास ठेवतो. जगात सर्वच माणसे अशी असतात. ॥३१॥

स्मरणामागें विस्मरण । रोकडी प्रचित प्रमाण । आपलें ठेवणें आपण । चुकताहे ।।३२।।
आपलेंच आपणा स्मरेना । बोलिलें तें आठवेना । उठती अनंत कल्पना । ठाउक्या कैंच्या ।।३३।।

आठवत आहे असे वाटते तोपर्यंत विसरते, हा सर्वांचाच अनुभव आहे. आपण बोललेले आपण विसरतो. ठेवलेली वस्तू आपणास सापडत नाही. ॥३२-३३॥

ऐसें हें चंचळ चक्र । कांहीं नीट कांहीं वक्र । जाला रंक अथवा शक्र । तरी स्मरणास्मरणें ।।३४।।

चंचळ संसाराची अशीच गती आहे. काही सरळ होते, काही वाकडे. दरिद्री किंवा इंद्र यांना स्मरण व विस्मरण

चुकत नाही. ॥३४॥

स्मरण म्हणिजे देव । विस्मरण म्हणिजे दानव । स्मरणविस्मरणें मानव । वर्तती आतां ।।३५।।

स्वरूपाचे स्मरण देवांना असते. ज्यांना हे स्मरण नसते त्यांना दानव म्हणतात. माणसाला स्मरण व विस्मरण दोन्ही असतात. ॥३५॥

म्हणोनि देवी आणि दानवी । संपत्ति द्विधा जाणावी । प्रचित मानसीं आणावी । विवेकेंसहित ।।३६।।

दैवी व दानवी अशी दोन प्रकारची संपत्ती यामुळेच तयार होते. विचाराने याचा अनुभव घ्यावा. ॥३६॥

विवेकें विवेक जाणावा । आत्म्यानें आत्मा वोळखावा । नेत्रें नेत्रचि पाहावा । दर्पणींचा ।।३७।।

जसा आरशातील डोळा डोळ्यानेच पाहावा त्याप्रमाणे विवेकाने विवेक व जीवात्म्याने जीवात्मा ओळखावा. आपला आपण जाणावा. ॥३७॥

स्थूळें स्थूळ खाजवावें । सूक्ष्में सूक्ष्म समजावें । खुणेनें खुणेसी बाणावें । अंतर्यामीं ।।३८।।

स्थूल त्वचेला कंड सुटली तर स्थूल नखांनी ती खाजवावी. (स्थूलाचा समाचार स्थूलाने घ्यावा) सुखदु:खादी सूक्ष्म अनुभव सूक्ष्म मनानेच समजावून घ्यावेत. खूण पटल्यावर ते पटलेले तत्त्व किंवा विचार चित्तात ठसवावा. (खुणेने खूण पटल्यावर, खूण म्हणजे ओळख पटल्याने. खुणेसी = खुणेसह. ओळखीसह.) ॥३८॥

विचारें जाणावा विचार । अंतरें जाणावें अंतर । अंतरें जाणावें परांतर । होउनियां ।।३९।।

मानवी मनाचा विचार करून इतरांचे विचार जाणावेत. 'आत्मवत् सर्व भूतेषु' या न्यायाने दुसऱ्यांचे अन्त:करण जाणावे. आपले मन दुसऱ्याच्या मनाशी एक करून त्याचा ठाव घ्यावा. (स्वार्थशून्य, परहिततत्पर उन्नत मनालाच हे शक्य असते.) ॥३९॥

स्मरणामाजीं विस्मरण । हेंचि भेदाचें लक्षण । येकदेसी परिपूर्ण । होत नाहीं ।।४०।।

'मी ब्रह्म आहे' या स्मरणात 'मी देह आहे' अशी वृत्ती जागी होणे हेच विस्मरण. विस्मरणाने जीव-जड, जीव-ईश्वर, जड-जड, जड-ब्रह्म इ. प्रकारचे भेद तयार होतात. 'मी देह' अशा संकुचित अनुभवामुळे 'मी ब्रह्म' असे पूर्णत्व जीवाला लाभत नाही. ॥४०॥

पुढें सिके मागें विसरे । पुढें उजेडे मागें अंधारे । पुढें स्मरे मागें विस्मरे । सकळ कांहीं ।।४१।।

'मी ब्रह्म' अशी समजूत पटते न पटते तोच ती विसरते! ज्ञानाचा अंदाज येईपर्यंत अज्ञानाचे साम्राज्य पसरते. 'आठवण आहे' असे वाटत असतानाच सर्व विसरते! ॥४१॥

तुर्या जाणावी स्मरण । सुषुप्ति जाणावी विस्मरण । उभयेता शरीरीं जाण । वर्तती आतां ।।४२।।

तुर्या ही तीन अवस्थांचे साक्षित्व करणारी अवस्था स्मरणरूप असून गाढ झोप ही अवस्था आत्मविस्मृतीची आहे. प्रत्येकाला त्यांचा अनुभव असतो. (पण तो लक्षात येत नाही.) ॥४२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अधोर्धनिरूपणनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'अधोर्धनिरूपण' नावाचा सातवा समास समाप्त

दशक पंधरावा : आत्मदशक

समास आठवा : सूक्ष्मजीवनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

रेणूहून सूक्ष्म किडे । त्यांचें आयुष्य निपटचि थोडें । युक्ति बुद्धि तेणेंचि पाडें । तयामधें ।। १ ।।

काही जंतू कणाहून सूक्ष्म असतात. त्यांचे आयुष्य, बुद्धी व तिचा वापर हे सर्व अत्यल्प असतात. ॥१॥

ऐसे नाना जीव असती । पाहों जातां न दिसती । अंत:कर्णपंचकाची स्थिती । तेथेंहि आहे ।। २ ।।

डोळ्यांनी न दिसणाऱ्या अशा अगणित जंतूंमध्ये सुद्धा अन्त:करण पंचक असते. ॥२॥

त्यांपुरतें त्यांचें ज्ञान । विषये इंद्रियें समान । सूक्ष्म शरीरें विवरोन । पाहातो कोण ।। ३ ।।

त्यांच्या अन्त:करणांत त्यांच्या जीवनाला आवश्यक तेवढेच ज्ञान असते. त्यांची इंद्रिये व विषयही जीवनाला आवश्यक तेवढीच (समान) असतात. पण त्या शरीरांचा अभ्यास कोणी करीत नाही. (समर्थांच्या काळी तो नव्हता.) ॥३॥

त्यास मुंगी माहा थोर । नेणों चालिला कुंजर । मुंगीस मुताचा पूर । ऐसें बोलती ।।४।।

त्यांच्या दृष्टीने मुंगीसुद्धा जणू हत्तीसारखी वाटते. 'माणसाच्या लघवीचे पाणी मुंगीला महापुरासारखे वाटते' अशी म्हण आहे. ॥४॥

तें मुंगीसमान शरीरें । उदंड असती लाहानथोरें । समस्तांमध्यें जीवेश्वरें । वस्ति कीजे ।।५।।

मुंगीएवढी किंवा तिच्याहून लहान-मोठी अगणित शरीरे असून त्या सर्वांत जीवात्मा व ईश्वर राहतात. ॥५॥

ऐसिया किड्यांचा संभार । उदंड दाटला विस्तार । अत्यंत साक्षपी जो नर । तो विवरोन पाहे ।। ६ ।।

अशा जंतू व कीटकांची संख्या अगणित असून एखादाच यत्नशील माणूस त्यांचा अभ्यास करतो. ॥६॥

नाना नक्षत्रीं नाना किडे । त्यांस भासती पर्वतायेवढे । आयुष्यहि तेणेंचि पाडें । उदंड वाटे ।।७।।

नक्षत्रांनुसार निरनिराळे तयार होणारे मोठे किडे, लहान जंतूंना आकार व आयुष्याने, फार मोठे वाटतात. ॥७॥

पक्षायेवढें लाहान नाहीं । पक्षायेवढें थोर नाहीं । सर्प आणि मछ पाहीं । येणेंचि पाडें ।।८।।

पक्षी, सर्प व मासे यांत अत्यंत मोठ्यापासून अगदी लहानापर्यंत विविध आकार असतात. ॥८॥

मुंगीपासून थोरथोरें । चढतीं वाढतीं शरीरें । त्यांचीं निर्धारितां अंतरें । कळों येती ।। ९ ।।

मुंगीपासून हत्तीपर्यंत शरीराचे आकार वाढते असतात. अभ्यासाने त्यांच्या मनोरचना समजतात. ॥९॥

नाना वर्ण नाना रंग । नाना जीवनाचे तरंग । येक सुरंग येक विरंग । किती म्हणौनि सांगावे ।। १० ।।

प्रवृत्ती, रंग व जीवनपद्धती अत्यंत भिन्न असलेले प्राणी असतात. मोरासारखे सुंदर रंगाचे, तर पाणघोड्यासारखे कळाहीन किती सांगावेत? ॥१०॥

येकें सकुमारें येकें कठोरें । निर्माण केलीं जगदेश्वरें । सुवर्णासारिखीं शरीरें । दैदिप्यमानें ।।११।।

नाजूक फुलपाखरू, कठोर वाघ, तप्त सुवर्णाप्रमाणें कांती असलेला माणूस ही सर्व शरीरे ईश्वरानेच निर्माण केली. ॥११॥

शरीरभेदें आहारभेदें । वाचाभेदें गुणभेदें । अंतरीं वसिजे अभेदें । येकरूपें ।।१२।।

शरीर, अन्न, आवाज, गुण इ. प्रकारे प्राण्यांत असंख्य भेद असले तरी त्यांच्यातील ईश्वर एकच असतो. ॥१२॥

येक त्रासकें येक मारकें । पाहो जातां नाना कौतुकें । कितीयेक आमोलिकें । सृष्टीमध्यें ।।१३।।

त्रासदायक उंदीर, जीव घेणारा सर्प, कस्तुरीमृगासारखा मौल्यवान प्राणी इत्यादींची निर्मिती हे ईश्वराचेच कौतुक आहे. ॥१३॥

ऐसीं अवघीं विवरोन पाहे । ऐसा प्राणी कोण आहे । आपल्यापुरतें जाणोन राहे । किंचितमात्र ।।१४।।

या सर्वांचा अभ्यास सहसा कोणी करीत नाही. जो तो आपल्यापुरता थोडा विचार करून जगतो. ॥१४॥

नवखंड हे वसुंधरा । सप्तसागरांचा फेरा । ब्रह्मांडाबाहेरील नीरा । कोण पाहे ।।१५।।

पृथ्वीचे नऊ खंड असून तिला सात सागरांचा वेढा आहे. पृथ्वीच्या वातावरणात असलेले बाष्परूप पाणी विचारात घेतले जात नाही. ॥१५॥

त्या नीरामध्यें जीव असती । पाहों जातां असंख्याती । त्या विशाळ जीवांची स्थिती । कोण जाणे ।।१६।।

त्या बाष्पातही असंख्य जीव व्यापून असतात. (विशाल) त्यांचा कोण विचार करतो? ॥१६॥

जेथें जीवन तेथें जीव । हा उत्पत्तीचा स्वभाव । पाहातां याचा अभिप्राव । उदंड असे ।।१७।।

जीवत्वासाठी पाणी हवेच हा उत्पत्तीचा नियम आहे. या नियमाची व्याप्ती दूरगामी आहे. उदा– ॥१७॥

पृथ्वीगर्भीं नाना नीरें । त्या नीरामधें शरीरें । नाना जिनस लाहानथोरें । कोण जाणे ।।१८।।

पृथ्वीच्या पोटात जागोजागी पाणी आहे. त्यांतील असंख्य लहान-मोठ्या प्राण्यांची कोण गणती करतो?

(मंगळासारख्या ग्रहावर पाणी असण्याची शक्यता समर्थकालीन विज्ञानाला ठाऊक नव्हती. तर्क करणे शक्य आहे. 'ब्रह्मांडाबाहेरील नीर' (ओवी १५) ही संकल्पना अशी समजावून घ्यावी. 'संतांना भौतिक विज्ञानाचे पूर्ण ज्ञान होते' अशा कल्पना न करणे चांगले.) ॥१८॥

येक प्राणी अंतरिक्ष असती । तेहीं नाहीं देखिली क्षिती । वरीच्यावरी उडोन जाती । पक्ष फुटल्यानंतरें ।।१९।।

झाडावरील घरट्यातील अंड्यातून बाहेर पडणारे पक्षी पंख फुटल्यावर तेथूनच आकाशात उडतात. त्यांना तोपर्यंत जमीन दिसतही नाही. ॥१९॥

नाना खेचरें आणि भूचरें । नाना वनचरें आणि जळचरें । चौऱ्यासि योनीप्रकारें । कोण जाणे ।।२०।।

आकाश, जमीन, जंगल, पाणी इत्यादीत वावरणारे चौऱ्यांशी लक्ष प्राणी कोणाला ठाऊक असतात? ॥२०॥

उष्ण तेज वेगळें करूनी । जेथें तेथें जीवयोनी । कल्पनेपासुनी होती प्राणी । कोण जाणे ।।२१।।

फक्त प्रखर अग्नीत जीव नसतात. इतर सर्वत्र असतात. 'एकोऽहं'च्या ईश्वरी कल्पनेतून जीवसृष्टी होते हे कसे आकलन होणार? ॥२१॥

येक नाना सामर्थ्यें केलें । येक इच्छेपासून जाले । येक शब्दासरिसे पावले । श्रापदेह ।।२२।।

धृष्टद्युम्नासारखा पुरुष यज्ञसामर्थ्याने जन्मतो. नरसिंह सरस्वतींसारखे योगी इच्छेने दुसरे शरीर धारण करतात. जयविजयांना शापाने विमलार्जुनांचे वृक्षदेह मिळतात. ॥२२॥

येक देह बाजीगरीचे । येक देह वोडंबरीचे । येक देह देवतांचे । नाना प्रकारें ।।२३।।

संमोहन घालून जादूगार नव्या देहाचा भास निर्माण करतो. राक्षस निराळी रूपे घेऊन प्रगट होतात (सुवर्णमृग),

तर देवता विविध देह धारण करतात. ॥२३॥

येक क्रोधापासून जाले । येक तपापासून जन्मले । येक उश्रापें पावले । पूर्वदेह ।।२४।।

क्रोधाने दिलेल्या शापातून (नहुष राजा सर्प झाला) तपोबलातून (सनकादि) तर काही उ:शापाने मिळालेल्या पूर्व देहाने (जय विजय) व्यक्त होतात. ॥२४॥

ऐसें भगवंताचें करणें । किती म्हणौन सांगणें । विचित्र मायेच्या गुणें । होत जातें ।।२५।।

अशी ही ईश्वरी सामर्थ्याची लीला किती म्हणून सांगावी? अतर्क्य घटना घडवून आणणाऱ्या मायेच्या अद्भुत सामर्थ्याने हे सर्व शक्य होते. ॥२५॥

नाना अवघड करणी केली । कोणीं देखिली ना ऐकिली । विचित्र कळा समजली । पाहिजे सर्वे ।।२६।।

अशक्य वाटणाऱ्या गोष्टी माया सहजतेने करते. त्या गोष्टी सामान्याने केलेल्या दिसत नाहीत व ऐकायलाही मिळत नाहीत. सर्वांनी मायेचे असामान्य सामर्थ्य समजून असावे. ॥२६॥

थोडें बहुत समजलें । पोटापुरती विद्या सिकलें । प्राणी उगेंच गर्वे गेलें । मी ज्ञाता म्हणोनी ।।२७।।

पोटापुरती थोडी विद्या व किरकोळ ज्ञानाने 'मी ज्ञानी' असे समजून गर्वाने लोक फुकट जातात. ॥२७॥

ज्ञानी येक अंतरात्मा । सर्वांमधें सर्वात्मा । त्याचा कळावया महिमा । बुद्धि कैंची ।।२८।।

एक सर्वज्ञ ईश्वर ज्ञानी म्हणण्यास योग्य आहे. कारण तो सर्व सृष्टीत व्यापून राहतो. त्याचे माहात्म्य कळण्यासारखी शुद्ध बुद्धी कोठून आणावी? ॥२८॥

सप्तकंचुक ब्रह्मांड । त्यांत सप्तकंचुक पिंड । त्या पिंडामध्ये उदंड । प्राणी असती ।।२९।।

पाच महाभूते, महत् व अहंकार हे ब्रह्मांडाचे सात घटक (आवरणे-कंचुक) आहेत. ब्रह्मांडातील पिंडाचे तेच घटक असून अनेक प्राण्यांचे असे अनेक पिंड आहेत. ॥२९॥

आपल्या देहांतील न कळे । मा तें अवघें कैंचें कळे । लोक होती उतावळे । अल्पज्ञानें ।।३०।।

जीवाला स्वत:च्या शरीराच्या घटनेचे आकलन होत नाही. मग ब्रह्मांडाचे कसे होणार? तरी उथळ लोक क्षुल्लक ज्ञानाने स्वत:ला ज्ञानी म्हणवून घेण्यास उतावीळ असतात! ॥३०॥

अनुरेणाऐसें जिनस । त्यांचे आम्ही विराट पुरुष । आमचें उदंडचि आयुष्य । त्यांच्या हिसेबें ।।३१।।

विषाणूंच्या (Virus) मानाने माणसाचे शरीर अवाढव्य आहे. त्यांच्या तुलनेत आपले आयुष्यही फार मोठे आहे. ॥३१॥

त्यांच्या रिती त्यांचे दंडक । वर्तायाचे असती अनेक । जाणे सर्वहि कौतुक । ऐसा कैंचा ।।३२।।

विषाणू व जीवाणूंच्या जीवनाची तऱ्हा व रीत कित्येक प्रकारची असते. ते सर्व जाणणारा कोठून आणावा? ॥३२॥

धन्य परमेश्वराची करणी । अनुमानेना अंत:करणीं । उगीच अहंता पापिणी । वेढा लावी ।।३३।।

अशी ही ईश्वरी करणी अगाध आहे. त्याचा साधा अंदाजही करणे शक्य नाही. असे असूनही 'मी ज्ञानी' ही पापरूप अहंता मानेवर बसते. ॥३३॥

अहंता सांडून विवरणें । कित्येक देवाचें करणें । पाहतां मनुष्याचें जिणें । थोडें आहे ।।३४।।

म्हणून अल्पायुषी असणाऱ्या माणसाने अहंकार दूर ठेवून ईश्वराच्या अतर्क्य लीलांचे चिंतन करावे. ॥३४॥

थोडें जिणें अर्धपुडी काया । गर्व करिती रडाया । शरीर आवघें पडाया । वेळ नाहीं ।।३५।।

क्षणभंगुरत्वामुळे देहाचे आयुष्य अतिअल्प आहे. असे असून गर्व करणाऱ्याला रडण्याचीच वेळ येते. कारण

मरणाला अवधी लागत नाही. ॥३५॥

कुश्चीळ ठांईं जन्मलें । आणि कुश्चीळ रसेंचि वाढलें । यास म्हणती थोरलें । कोण्या हिसेबें ।।३६।।

जे शरीर अपवित्र शरीरातून जन्माला येते व शिसारी येणाऱ्या अन्नरसाने वाढते (पचनसंस्थेतील अन्नरस) त्याचे गोडवे का गावेत? ॥३६॥

कुश्चीळ आणि क्षणभंगुर । अखंड वेथा चिंतातुर । लोक उगेच म्हणती थोर । वेडपणें ।।३७।।

अपवित्र, अल्पजीवी, रोगी व चिंताग्रस्त देहाला लोक मोहामुळे महत्त्व देतात. ॥३७॥

काया माया दों दिसांची । आदिअंतीं अवघी ची ची । झांकातापा करून उगीचि । थोरीव दाविती ।।३८।।

लक्ष्मी क्षणिक व शरीर अल्पायुषी आहे. जन्माला येताना व मरताना अनेक यातना होतात किंवा प्रथमपासून शेवटपर्यंत फजितीच असते. कपड्याने शरीर व उसन्या अवसानाने फजिती दडवून लोक आपल्या मोठेपणाची ऐट मिरवितात. ॥३८॥

झांकिलें तरी उपंढर पडे । दुर्गंधी सुटे जिकडे तिकडे । जो कोणी विवेकें पवाडे । तोचि धन्य ।।३९।।

प्रेत झाकले तरी त्याची दुर्गंधी सर्वत्र पसरून ते उघड होतेच. जो विवेकाने देहबुद्धीतून सुटून व्यापक होतो तोच कृतार्थ होय. ॥३९॥

उगेंचि कायसा तंडावें । मोडा अहंतेचें पुंडावें । विवेकें देवास धुंडावें । हें उत्तमोत्तम ।।४०।।

उगीच का भांडत बसावे? अहंकाराचा मस्तवालपणा मोडून काढावा. विवेकाने ब्रह्मानुभव घेणे हे सर्वांत श्रेयस्कर आहे. ॥४०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सूक्ष्मजीवनिरूपणनाम' समास आठवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सूक्ष्मजीवनिरूपण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक पंधरावा : आत्मदशक

समास नववा : पिंडोत्पत्तीनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

चौंखाणीचे प्राणी असती । अवघे उदकेंचि वाढती । ऐसे होती आणि जाती । असंख्यात ।। १ ।।

जारजादि चारी योनी पाण्याने वाढतात. असे असंख्य प्राणी जन्माला येऊन मरतात. ॥१॥

तत्त्वांचें शरीर जालें । अंतरात्म्यासगट वळलें । त्यांचे मूळ जों शोधिलें । तों उदकरूप ।। २ ।।

अष्टधा प्रकृतीचा पिंड ईश्वरासह तयार झाला. त्याचे मूळ उदकात आहे. (जलप्राधान्य) ॥२॥

शरत्काळींचीं शरीरें । पीळपीळों झिरपती नीरें । उभये रेतें येकत्रें । मिसळती रक्तीं ।। ३ ।।

पावसाळ्यातील लतावेली दाबून पाहिल्या तर त्यातून पाणी गळते. जलप्रधान रेत व स्त्री बीजाने गर्भधारणा होऊन त्याला वारेतून रक्तपुरवठा होतो. (एकूण काय तर जीवसृष्टी जलप्रधान आहे. (पाहा– ऐत. उप. खंड. ३) ॥३॥

अन्नरस देहरस । रक्तरेतें बांधे मूस । रसद्वयें सावकास । वाढों लागे ।। ४ ।।

जलप्रधान रेत (रेतरस) व स्त्रीबीज (रक्तरस) या दोन रसांना अन्नरसाचा व अन्य स्वादुपिंडादी रसांचा (देहरस = देहात तयार होणारे अन्नरसाखेरीज स्वादुपिंडरस, जाठररस इ. रस) पुरवठा होतो व त्याने तो पिंड वाढीला लागतो. ॥४॥

वाढतां वाढतां वाढलें । कोमळाचें कठीण जालें । पुढें उदक पैसावलें । नाना अवेवीं ।। ५ ।।

मूळ पिंड नाजूक व मऊ असतो. तो वाढल्यावर टणक होऊन सर्व अवयवांत अनेक रूपाने पाणी पसरते. ॥५॥

संपूर्ण होतां बाहेरी पडे । भूमीस पडतां मग तें रडे । अवघ्याचें अवघेंच घडे । ऐसें आहे ।। ६ ।।

गर्भाची पूर्ण वाढ होऊन तो बाहेर येऊन जमिनीवर पडताच रडू लागतो. सर्व जन्माला येणाऱ्यांचे असेच होते. ॥६॥

कुडी वाढे कुबुद्धि वाढे । मुळापासून अवघेंचि घडे । अवघेंचि मोडे आणि वाढे । देखतदेखतां ।। ७ ।।

मुलाची वाढ होऊन त्याला भेद, स्वार्थादी कळू लागतात, हे अगदी सुरुवातीपासून कळत न कळत होत जाते. सुरुवातीच्या (जुन्या) सवयी, प्रवृत्ती इ. मोडून सर्वांच्या देखत नव्या घडतात. ॥७॥

पुढें अवघियांचे शरीर । दिवसेंदिवस जालें थोर । सुचों लागला विचार । कांही कांही ।। ८ ।।

पुढे सर्वांची शरीरे वाढत जाऊन बुद्धीही अनेक प्रकारे काम करू लागते. ॥८॥

फळामधें बीज आलें । तेणें न्यायें तेथें जालें । ऐकतां देखतां उमजलें । सकळ कांहीं ।। ९ ।।

बीज फळात रूपांतरित होते तसे येथे होते हे लक्षात घ्यावे. ऐकून व निरीक्षणाने हे कळते. ॥९॥

बीजें उदकें अंकुरती । उदक नस्तां उडोन जाती । येके ठाईं उदक माती । होतां बरें ।। १० ।।

बीजांना पाणी मिळाले की त्यांना अंकुर फुटतात. नाहीतर ती वाऱ्याबरोबर उडून जातात. बीज, माती व पाणी यांचा संयोग झाला तरच अंकुर फुटतो. ॥१०॥

दोहिंमधें असतां बीज । भिजोन अंकुर सहज । वाढतां वाढतां पुढें रीझ । उदंड आहे ।। ११ ।।

खाली माती व वर पाणी असले की आपोआप अंकुर वाढून पुढे अमाप पीक येते. ॥११॥

इकडे मुळ्या धावा घेती । तिकडे अग्रें हेलावती । मुळें अग्र द्विधा होती । बीजापासून ।।१२।।

जमिनीत मुळ्या जातात, वनस्पतींचे शेंडे आकाशाकडे वाढतात. हे दोन्ही एका बीजापासून घडते.।।१२।।

मुळ्या चालिल्या पाताळीं । अग्रे धांवती अंतराळीं । नाना पत्रीं पुष्पीं फळीं । लगडली झाडें ।।१३।।

जमिनीखाली मुळे पसरतात, वर वनस्पतींचे शेंडे फोफावतात व झाडांना अनेक पाने, फुले व फळे लागतात. ।।१३।।

फळांवडिल सुमनें । सुमनांवडिल पानें । पानांवडिल अनुसंधानें । काष्ठें आवघीं ।।१४।।

फळांआधी फुले येतात, फुलांअगोदर पाने उगवतात व पानांपूर्वी वेली किंवा खोडे असतात. ।।१४।।

काष्ठांवडिल मुळ्या बारीक । मुळ्यांवडिल तें उदक । उदक आळोन कौतुक । भूमंडळाचें ।।१५।।

खोडाआधी असणारी मूळे सूक्ष्म असून त्या मुळांना पाण्याने जीवन मिळते. पाणी जमिनीत जिरल्यानेच पृथ्वी वृक्ष-वेलींनी हिरवीगार दिसते. ।।१५।।

याची ऐसी आहे प्रचिती । तेव्हां सकळांवडिल जगती । जगतीवडिल मूर्ती । आपोनारायेणाची ।।१६।।

हे सर्वांनाच सहज कळते. मूळाहून पृथ्वी आधीची असली तरी जलदेवता त्या अगोदरची आहे. ।।१६।।

तयावडिल अग्निदेव । अग्नीवडिल वायेदेव । वायेदेवावडिल स्वभाव । अंतरात्म्यांचा ।।१७।।

जळाहून अग्नी, वायू व ईश्वर हे अधिकाधिक सूक्ष्म (वडील) व क्रमाने अगोदरचे आहेत. ।।१७।।

सकळांवडिल अंतरात्मा । त्यासि नेणे तो दुरात्मा । दुरात्मा म्हणिजे दुरी आत्मा । अंतरला तया ।।१८।।

सर्वप्रथम ईश्वर असून त्याला न जाणणारा तोच दुरात्मा! ज्याला आत्मज्ञान न झाल्याने आत्मा दूर राहतो तोच दुरात्मा!! (खास समर्थांची व्युत्पत्ती.) ।।१८।।

जवळी असोन चुकलें । प्रत्ययास नाहीं सोकलें । उगेचि आलें आणी गेलें । देवाचकरितां ।।१९।।

पृथ्वीवरील प्राण्यांचे जन्ममरण देवामुळेच होतात (देवाचकरितां). अतिजवळ म्हणजे अन्त:करणातच देव व्यापून असूनही त्याची जिज्ञासा न होणारे जन्माला येऊन फुकट मरतात. ।।१९।।

म्हणौन सकळांवडिल देव । त्यासी होतां अनन्यभाव । मग हे प्रकृतीचा स्वभाव । पालटों लागे ।।२०।।

म्हणून देव आद्य आहे. (ओम् नमो जी आद्या ।– ज्ञाने. १-१) 'तो मी आहे' असा निश्चय झाला तर दृश्य जगाचे सत्यत्व मावळते. प्रकृती स्वभावाने सत्य आहे असे वाटत नाही किंवा अज्ञान लक्षणे जाऊन ज्ञानाची लक्षणे प्रगट होतात. ।।२०।।

करी आपुला व्यासंग । कदापि नव्हे ध्यानभंग । बोलणें चालणें वेंग । पडोंच नेदी ।।२१।।

आपला व्यवसाय करीत असतानाही सतत देवाच्या अनुसंधानात राहता येते. ('करी धंदा परी आठवती पाय ।' तुका.) मुक्ताला न शोभेल असे त्याचे वागणे व बोलणे नसते. ।।२१।।

जें वडिलीं निर्माण केलें । तें पाहिजे पाहिलें । काये काये वडिलीं केलें । किती पाहावें ।।२२।।

पूर्वजांनी निर्माण केलेली भाग्यसंपदा व्यवहारात पाहावी व सांभाळावी. सर्वांत जो आद्य पुरुष ईश्वर (जुनाट पुरुष) त्याने निर्माण केलेली अफाट सृष्टी किती म्हणून पहावी! ।।२२।।

तो वडिल जेथें चेतला । तोचि भाग्यपुरुष जाला । अल्प चेतनें तयाला । अल्पभाग्य ।।२३।।

त्याचा ज्याला पूर्णानुभव येतो त्याचाच खरा भाग्योदय होतो. केवळ भावना व शब्दज्ञान (अल्प चेतना) असलेल्याचे भाग्य अल्पच असते. ।।२३।।

तया नारायेणाला मनीं । अखंड आठवावें ध्यानीं । मग ते लक्ष्मी तयापासुनी । जाईल कोठें ।।२४।।

त्या ईश्वररूप नारायणाचाच सतत विचार व अनुसंधान असेल तर लक्ष्मी त्याला सोडून कोठे जाईल? ।।२४।।

नारायेण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी । याकारणें तोषवावी । कोणीतरी काया ।। २५ ।।

नारायण सर्व विश्वात कोंदाटून राहिला असून त्याच्या उपासनेसाठी तो व्यापून असलेल्या कोणत्या ना कोणत्या जीवाला संतुष्ट करीत असावे. शिवभावे जीवसेवा करावी. ॥२५॥

उपासना शोधून पाहिली । तों ते विश्वपाळिती जाली । न कळे लीळा परीक्षिली । न वचे कोणा ।। २६ ।।

उपासनेचे वर्म शोधू जाता ते विश्व आपलेसे करण्यात आहे. कोणा उपासकाची अशी उपासना सहजासहजी कळत नाही. ती कळणे व करणे क्वचित कोणाला जमते. ॥२६॥

देवाची लीळा देवेंविण । आणीक दुसरा पाहे कोण । पाहाणें तितुकें आपण । देवचि असे ।। २७ ।।

ईश्वराची चाललेली ही क्रीडा त्याच्यावाचून कोणाला आकलन होणार? पाहणारा (आपण), पाहणे व पाहिले जाणारे (तितुके) सर्व ईश्वरमय आहे. ॥२७॥

उपासना सकळां ठाईं । आत्माराम कोठें नाहीं । याकारणें ठाईं ठाईं । रामे आटोपिलें ।। २८ ।।

ईश्वररूप आत्माराम नाही असा एकही जीव नसल्याने जीवांच्या उपासनेला व्यापक स्वरूप येते. म्हणून जीवाजीवात रामाचे अस्तित्व पाहावे. ॥२८॥

ऐसी माझी उपासना । आणितां नये अनुमाना । नेऊन घाली निरंजना । पैलिकडे ।। २९ ।।

माझ्या उपासनेचा 'बडिवार' असा आहे! सहसा ती कोणाच्या लक्षात येणे कठीण आहे. पण दृश्य विश्वाभासाच्या अधिष्ठान ब्रह्माशी ऐक्य साधून देण्याचे तिचे सामर्थ्य आहे. (आत्मनिवेदन.) ॥२९॥

देवाकरितां कर्मे चालती । देवाकरितां उपासक होती । देवाकरितां ज्ञानी असती । कितियेक ।। ३० ।।

यज्ञयागादी कर्मे ईश्वराच्या वेदाज्ञांनुसार चालतात. देवावरील प्रेमामुळे लोक उपासना करतात व देवाच्या जिज्ञासेमुळे अनेक साधक ज्ञानमार्गाने जातात. ॥३०॥

नाना शास्त्रें नाना मतें । देवचि बोलिला समस्तें । नेमकांनेमक वेस्तावेस्तें । कर्मानुसार ।। ३१ ।।

अनेक प्रकारची शास्त्रे व त्यांतील नाना मते यांना ईश्वराच्या वेदांचाच आधार आहे. (वेद ईश्वराचे नि:श्वसित आहेत.) कर्मे विधीप्रमाणे करणे किंवा न करणे व मते व्यवस्थित समजावून घेणे किंवा न घेणे माणसांच्या कर्मानुसार घडते. ते त्यांच्या हातात आहे. ॥३१॥

देवास अवघें लागे करावें । त्यांत घेऊं ये तितुकें घ्यावें । अधिकारासारिखें चालावें । म्हणिजे बरें ।। ३२ ।।

देवाच्या सृष्टीत बऱ्या व वाईट अशा सर्वच गोष्टी आहेत. त्यांतील घेण्यास योग्य असतील त्या घ्याव्यात. स्वत:ची क्षमता ओळखून योग्य साधनामार्ग स्वीकारल्याने कल्याण होते. ॥३२॥

आवाहान विसर्जन । ऐसेंचि बोलिलें विधान । पूर्वपक्ष जाला येथून । सिद्धांत पुढें ।। ३३ ।।

'आधी मिथ्या उभारावे' हे आवाहन व 'मग ते उभारून सांडावे' हे विसर्जन अशी तत्त्वज्ञानाच्या मांडणीची रीत आहे. आतापर्यंत जग सत्य आहे हे गृहीत धरून आवाहनात्मक पूर्वपक्ष मांडून झाला. पुढील समासात विसर्जनात्मक सिद्धान्तपक्ष सांगू. ॥३३॥

वेदांत सिद्धांत धादांत । प्रचित प्रमाण नेमस्त । पंचिकर्ण सांडून हित । वाक्यार्थ पाहावा ।। ३४ ।।

वेदान्त शास्त्रातील तत्त्वज्ञान श्रीगुरुमुखातून श्रवण करून त्याचा अपरोक्ष अनुभव घ्यावा. अपरोक्षानुभूतीच सर्वांत महत्त्वाची असल्याने त्यासाठी पंचीकृत दृश्य जगत् बाजूला सारून 'तत्त्वमसि' सारख्या महावाक्याच्या तीनही पदांचा श्रीगुरूंकडून बोध करून घ्यावा. ॥३४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'पिंडोत्पत्तीनिरूपणनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'पिंडोत्पत्तीनिरूपण' नावाचा नववा समास समाप्त

दशक पंधरावा : आत्मदशक

समास दहावा : सिद्धान्तनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

गगनीं अवघेंचि होत जातें । गगनाऐसें तगेना तें । निश्चळीं चंचळ नाना तें । येणेंचि न्यायें ।।१।।

ढग, वारा, ऊन, चांदणे, थंडी इ. अनेक गोष्टी आकाशात होतात व जातात. त्या आकाशासारख्या स्थिर नाहीत. अशाच प्रकारे निश्चळ ब्रह्मात नामरूपात्मक चंचळ सृष्टी अनेक वेळा होते व जाते. ॥१॥

अंधार दाटला बळें । वाटे गगन जालें काळें । रविकिर्णें तें पिवळें । सर्वेंचि वाटे ।।२।।

भर अंधारात आकाश काळे वाटते व सूर्यादय होताच ते पिवळेही दिसू लागते. ॥२॥

उदंड हिंव जेव्हां पडिलें । गमे गगन थंड जालें । उष्ण झळेनें वाळलें । ऐसें वाटे ।।३।।

हवेत गारठा भरला की आकाश थंड वाटते व कडक उन्हामुळे ते जणू वाळून जाते! ॥३॥

ऐसें जें कांहीं वाटलें । तें तें जाले आणि गेलें । आकाशासारिखें तगलें । हें तों घडेना ।।४।।

असे हे सर्व वाटलेले व दिसलेले, होते व जाते. ते आकाशाप्रमाणे शाश्वत (सापेक्षतेने) नसते. ॥४॥

उत्तम जाणीवेचा जिनस । समजोन पाहे सावकास । निराभास तें आकाश । भास मिथ्या ।।५।।

शुद्ध जाणीवरूप ब्रह्माचा शांत अनुभव येतो तेव्हा त्यात वेगळेपणाने येणारा कोणताच भास नसतो. खरे तर आकाशाचा निळेपणा भ्रामकच आहे. ॥५॥

उदक पसरे वायो पसरे । आत्मा अत्यंतचि पसरे । तत्त्वें तत्त्व अवघेंचि पसरे । अंतर्यामीं ।।६।।

पाण्याहून वायू व वायूहून आत्मा अत्यंत व्यापक आहे. 'आत्मन: आकाश: संभूत:' या श्रुतीचे उलटीकडून मनन केले असता कमी व्यापक तत्त्वापासून सर्वांत व्यापक तत्त्व सापडते. ॥६॥

चळतें आणि चळेना तें । अंतरीं अवघेंच कळतें । विवरणेंचि निवळतें । प्राणीमात्रासी ।।७।।

निश्चळ आत्मा व चंचळ वृत्तिज्ञान, स्मृतिज्ञान इ. निवाडा शास्त्रशुद्ध विचाराने ज्याचा त्यालाच होतो. ॥७॥

विवरतां विवरतां शेवटीं । निवृत्तिपदीं अखंड भेटी । जालियानें तुटी । होणार नाहीं ।।८।।

श्रवण, मनन व निदिध्यासन या क्रमाने अन्त:करणवृत्ती निवृत्त झाल्यावर होणाऱ्या जीवब्रह्मैक्याचेपुढे विज्ञान होते. (अतूट) ॥८॥

जेथें ज्ञानाचें होतें विज्ञान । आणि मनाचें होतें उन्मन । तत्त्वनिर्शनीं अनन्य । विवेकें होतें ।।९।।

श्रवणादिकांनी मनाचे उन्मन झाल्यावर मायिक तत्त्वांच्या दृश्य सृष्टीचा विवेकाने निरास होऊन ज्ञानाचे विज्ञान होते. ॥९॥

वडिलांस शोधून पाहिलें । तों चंचळाचें निश्चळ जालें । देवभक्तपण गेलें । तये ठाइं ।।१०।।

अनादी, आद्य व नित्य (वडील) ब्रह्माशी जीव एकरूप होताच चंचळ अन्त:करणवृत्ती लीन होऊन देव व भक्त हे द्वैतही तेथे मोडले. ॥१०॥

ठाव म्हणतां पदार्थ नाहीं । पदार्थमात्र मुळीं नाहीं । जैसें तैसें बोलों कांहीं । कळावया ।।११।।

'तेथे' या शब्दाने सुचवलेली अवस्थाही खरी अवस्था नाही. जीव व जगत् आणि तत् सापेक्ष जाग्रतादी अवस्था गृहीत धरून मोक्ष समजाविण्यासाठी तसे बोलावे लागते इतकेच. (अध्यारोप) ॥११॥

अज्ञानशक्ति निरसली । ज्ञानशक्ति मावळली । वृत्तिसुन्यें कैसी जाली । स्थिती पाहा ।।१२।।

मायेच्या मल, विक्षेप व आवरण या तीन शक्ती मावळतात. 'मी ब्रह्म' ही ज्ञानशक्तीही मागे पडल्यावर निवृत्त स्थितीत तथाकथित आत्मस्थिती उरते. ॥१२॥

मुख्य शक्तिपात तो ऐसा । नाहीं चंचळाचा वळसा । निवांतीं निवांत कैसा । निर्विकारी ।।१३।।

हाच शक्तिपाताचा मुख्य परिणाम आहे. त्यामुळे जन्ममरणांचा फेरा चुकतो. अद्वैताच्या पराशांतीमध्ये निर्विकार ब्रह्मानुभव स्थिर होतो. (शक्तिपात म्हणजे शक्तिसंक्रमण होय. श्रीगुरूंजवळ शिष्यात असे संक्रमण करण्याचे परंपरागत सामर्थ्य असते. अधिकारी शिष्याने त्याच्या साहाय्याने महावाक्य श्रवणाने मुक्त व्हावे.) ॥१३॥

चंचळाचीं विकार बालटें । तें चंचळचि जेथे आटे । चंचळ निश्चळ घनवटे । हें तों घडेना ।।१४।।

जोपर्यंत चंचळ जगत् सत्य वाटते तोपर्यंत त्यावर अस्ति, जायते इ. विकारांचे बालंट (आरोप) येतच राहतो! ते जगत् जेव्हा बाधित होते तेव्हाच ते जाते. अचेतन माया व चेतन ब्रह्म यांचे ऐक्य कधीच शक्य नसल्याने ब्रह्मानुभवानंतर कल्पित माया टिकत नाही. ॥१४॥

माहावाक्याचा विचारु । तेथें संन्याशास अधिकारु । दैवीकृपेचा जो नरु । तोहि विवरोन पाहे ।।१५।।

'अयमात्मा ब्रह्म' इ. महावाक्याच्या अभ्यासाचा अधिकार विधिवत् संन्यास घेतलेल्यालाच आहे असे शास्त्र सांगते. पण ज्याला ईश्वरी कृपा लाभलेली आहे तोही तो अभ्यास अवश्य करू शकतो. ॥१५॥

संन्यासी म्हणिजे शडन्यासी । विचारवंत संन्यासी । आपली करणी आपणासी । निश्चयेंसी ।।१६।।

काम-क्रोधादि सहा वैऱ्यांना ज्यांनी शांत केले आहे ते संन्यासी! त्यामुळे स्वतः शांत होऊन जे आत्मानात्म, सारासार, नित्यानित्य इ. विचार करतात तेही संन्यासी होत. असा विचार करणाऱ्याला निश्चितपणे मोक्ष लाभतो. ॥१६॥

जगदीश वोळल्यावरी । तेथें कोण अनुमान करी । आतां असो हें विचारी । विचार जाणती ।।१७।।

प्रत्यक्ष ईश्वर प्रसन्न झाल्यावर 'असे कसे होईल?' इ. शंका कोण घेऊ शकणार? असो. यथार्थ अभ्यास केलेला हे विचार जाणू शकतो. ॥१७॥

जे जे विचारी समजले । ते ते निःसंग होऊन गेले । देहाभिमानी जे उरले । ते देहाभिमान रक्षिती ।।१८।।

ज्यांना परमार्थविचार समजला ते वृत्तीने संन्यासी झाले. देहबुद्धीचे पामर त्यांची देहबुद्धी सांभाळीत बसतात! ॥१८॥

लक्षीं बैसलें अलक्ष । उडोन गेला पूर्वपक्ष । हेतुरूपें अंतरसाक्ष । तोहि मावळला ।।१९।।

अन्तःकरणवृत्ती अलक्ष्य आत्मस्वरूपापाशी स्थिर झाली. (स्थितप्रज्ञ.) साधनकाळातील अध्यारोपाचा पूर्वपक्ष खंडित झाला. (पहा. १५-९-३३) देहबुद्धी असेपर्यंत जीवाच्या नियमनाच्या हेतूने राहणारा अन्तर्यामीही निरर्थक झाला. (जीव-ईश्वर-ब्रह्म हा भेद गेला.) ॥१९॥

आकाश आणि पाताळ । दोनी नामें अंतराळ । काढितां दृश्याचें चडळ । अखंड जालें ।।२०।।

आकाश व पाताळ या दोन्हींचा अन्तराळात (पोकळी, अवकाश) समावेश होतो. जगताच्या अपेक्षेने (उपाधी) हे भेद होतात. जगताचा बाध होताच भेद मावळून अखंड अन्तराळ उरते. ॥२०॥

तें तों अखंडचि आहे । मन उपाधी लक्षून पाहे । उपाधीनिरासें साहे । शब्द कैसा ।।२१।।

अन्तराळ मूळचेच अखंड आहे. पण माणसाचे मन जगत्रूप उपाधीतच गुरफटून राहते. त्या उपाधीचा निरास होताच आकाश व पाताळ या दोन शब्दांना स्थान उरत नाही. ॥२१॥

शब्दपर कल्पनेपर । मनबुद्धिअगोचर । विचारें पाहावा विचार । अंतर्यामीं ।।२२।।

शब्द, कल्पना, मन व बुद्धी यांनी प्रत्यक्ष आत्मानुभव येत नाही. तो त्यांच्या अतीत आहे. या गुरुगम्यज्ञानाचा अंत:करणात विचार करावा. ॥२२॥

पाहातां पाहातां कळों येतें । कळलें तितुकें वेर्थ जातें । अवघड कैसें बोलावें तें । कोण्या प्रकारें ।।२३।।

अनुभव घेता घेता अन्त:करणवृत्ती अनुभवकाळी लीन होते. अनुभव घेण्याच्या प्रक्रियेत जे जे लक्षात आलेले असते ते अनुभवात हारवून जाते! हे वर्म व गूढ कोणी कोणाला कसे सांगावे! (पहा– केन उप. १-३) ॥२३॥

वाक्यार्थवाच्यांश शोधिला । अलक्षीं लक्ष्यांश बुडाला । पुढें समजोन बोला । कोणीतरी ।।२४।।

'तत् त्वम् असि' या महावाक्यातील तत् पदाचा वाच्यार्थ ईश्वर असून लक्ष्यार्थ ब्रह्म आहे. ब्रह्मानुभवात ब्रह्म लक्ष्यार्थ न राहता स्वरूपच झाले! (वाच्य, लक्ष्य ही साधनकाळातील साधनांतर्गत प्रक्रिया आहे, सिद्धदशेत प्रक्रिया लोपते.) लक्ष्यांश अलक्ष्य स्वरूपात विरला. असे झाल्यावर बोलणारा कोणी उरत नाही. ॥२४॥

शाश्वतास शोधीत गेला । तेणें ज्ञानी साच जाला । विकार सांडून मिळाला । निर्विकारी ।।२५।।

शाश्वताचा वेध घेणाऱ्या अन्त:करणवृत्तीतील चिदाभास आत्मरूपाशी, मूळचा असतो तसा, एकरूप होतो. बुद्धीतील सर्व विकार उपाधिरूप बुद्धीबरोबर सोडून देऊन तो निर्विकार आत्म्याशी ऐक्य पावतो. ॥२५॥

दु:स्वप्न उदंड देखिलें । जागें होतां लटिकें जालें । पुन्हां जरी तें आठविलें । तरी तें मिथ्या ।।२६।।

प्रदीर्घ स्वप्नात पाहिलेली व स्वप्नकाळी अत्यंत यातना देणारी दृश्ये जाग येताच नाहीशी होतात. ती जशीच्या तशी आठवली तरी ती भ्रमरूपच असतात. ॥२६॥

प्रारब्धयोगें देह असे । असे अथवा नासे । विचार अंतरीं बैसे । चळेना ऐसा ।।२७।।

जीवन्मुक्ताचे शरीर प्रारब्धामुळे जिवंत राहून व्यवहार करते. पण त्याची अन्त:करणवृत्ती ब्रह्मस्वरूपात स्थिर असते. शरीर राहील किंवा जायचे तेव्हा जाईल. ॥२७॥

बीज अग्नीनें भाजलें । त्याचें वाढणें खुंटलें । ज्ञात्यास तैसें जालें । वासनाबीज ।।२८।।

बीज अग्नीने भाजले की त्याला अंकुर फुटत नाही. त्याप्रमाणे त्याचे वासनाबीज ज्ञानाग्नीने जळून गेल्यावर त्याला पुढील जन्माचा अंकुर फुटत नाही. ॥२८॥

विचारें निश्चळ जाली बुद्धि । बुद्धिपासीं कार्यसिद्धि । पाहातां वडिलांची बुद्धि । निश्चळीं गेलीं ।।२९।।

विचाराने आत्मबुद्धी स्थिर झाली. त्यामुळेच जीव व ब्रह्म यांचे ऐक्य सिद्ध झाले. ज्ञानदेवांसारख्या पूर्वसूरींची बुद्धी अशीच निश्चळ ब्रह्मात स्थिर झाली. ॥२९॥

निश्चळास ध्यातो तो निश्चळ । चंचळास ध्यातो तो चंचळ । भूतास ध्यातो तो केवळ । भूत होये ।।३०।।

निश्चळ, चंचळ व भूते यांचे ध्यान करणाऱ्यास ती ती फळे मिळतात. ते तेच होतात. ॥३०॥

जो पावला सेवटवरी । तयास हें कांहींच न करी । अंतरनिष्ठा बाजीगरी । तैसी माया ।।३१।।

जो ब्रह्मरूप अधिष्ठानाचा अनुभव घेतो त्याला अध्यस्त माया बंधन करीत नाही. जादूगाराला जशी त्याची जादू फसवीत नाही त्याप्रमाणे आत्मनिष्ठाला माया ठकवीत नाही. ॥३१॥

मिथ्या ऐसें कळों आलें । विचारानें सदृढ जालें । अवघें भयेंचि उडालें । अकस्मात ।।३२।।

दृश्य सृष्टी मिथ्या आहे हे समजून तसा दृढ निश्चय झाल्यावर देह व जगाच्या विनाशाची भीती कारणासह नष्ट होते. ।।३२।।

उपासनेचें उत्तीर्ण व्हावें । भक्तजनें वाढवावें । अंतरीं विवकें उमजावें । सकळ कांही ।।३३।।

ज्या उपासनेच्या आधाराने आपण कृतार्थ झालो ती उपासना सर्वांना तशीच उपयोगी पडावी म्हणून जगात उपासनेचा प्रसार करावा. उपासनेचे ऋण फेडावे. लोकसंग्रह तो हाच. ('उरलो उपकारापुरता'– तुका. 'निष्कर्मी विशेषे दावावी । आचरोनी ।। ज्ञाने.।।) जीवन्मुक्ताने ही आपली जबाबदारी ओळखून तसे वागावे. ।।३३।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सिद्धांतनिरूपणनाम' समास दहावा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सिद्धांतनिरूपण' नावाचा दहावा समास समाप्त

–दशक पंधरावा समाप्त–

दशक सोळावा : सप्ततिन्वयाचा

समास पहिला : वाल्मिकिस्तवन

॥ श्रीराम समर्थ ॥

धन्य धन्य तो वाल्मीक । ऋषीमाजी पुण्यश्लोक । जयाचेन हा त्रिलोक्य । पावन जाला ।।१।।

वाल्मिकी ऋषी खरोखर धन्य होत. त्यांच्या श्रीरामचरित्रामुळे त्र्यैलोक्याला तरून जाण्याची सोय झाल्याने ते सर्वांत पुण्यवन्त ऋषी आहेत. ॥१॥

भविष्य आणी शतकोटी । हें तों नाहीं देखिलें दृष्टीं । धांडोळितां सकळ सृष्टि । श्रुत नव्हे ।।२।।

शंभर कोटी श्लोकांचे भविष्य जगाच्या इतिहासात कोणी पाहिले नाही व ऐकलेही नाही. ॥२॥

भविष्याचें येक वचन । कदाचित जालें प्रमाण । तरी आश्चिर्य मानिती जन । भूमंडळीचे ।।३।।

शंभरातील एक भविष्य खरे ठरले तरी लोकांना फार आश्चर्य वाटते. ॥३॥

नसतां रघुनाथअवतार । नाहीं पाहिला शास्त्राधार । रामकथेचा विस्तार । विस्तारिला जेणें ।।४।।

प्रत्यक्ष रामाचा जन्मही झालेला नसताना व कोणत्याही शास्त्रग्रंथाचा अभ्यास न करता रामकथेचा प्रचंड विस्तार त्यांनी केला. (व त्यानुसार रामचरित्र प्रत्यक्ष घडले.) ॥४॥

ऐसा जयाचा वाग्विळास । ऐकोनी संतोषला महेश । मग विभागिलें त्रयलोक्यास । शतकोटी रामायेण ।।५।।

त्यांच्या वाणीचे हे वैभव पाहून भ. शंकरही संतुष्ट झाले. नंतर वाल्मिकीने अनेक कांडे असलेले रामायण तिन्ही लोकांसाठी उपलब्ध केले. ॥५॥

ज्याचें कवित्व शंकरें पाहिलें । इतरां न वचे अनुमानलें । रामउपासकांसी जालें । परम समाधान ।।६।।

ज्या वाल्मिकीचे हे भव्य काव्य प्रत्यक्ष शंकराने वाचले त्या काव्याची भव्यता व रहस्य सामान्यांच्या लक्षात येत नाही. पण रामोपासकांना मात्र त्याचा मोठा आधार मिळून त्यांना समाधान झाले. ॥६॥

ऋषी होते थोर थोर । बहुतीं केला कवित्वविचार । परी वाल्मीकासारिखा कवेश्वर । न भूतो न भविष्यति ।।७।।

बऱ्याच महान ऋषींनी काव्यरचना केली खरी, पण वाल्मिकासारखा महान कवी आजपर्यंत झाला नाही व होणारही नाही. ॥७॥

पूर्वी केली दुष्ट कर्मे । परी पावन जाला रामनामें । नाम जपतां दृढ नेमें । पुण्यें सीमा सांडिली ।।८।।

पूर्वायुष्यात त्याने अनेक भयानक पापकर्मे केली. पण नंतर अखंड रामनामाने तो पूर्ण शुद्ध होऊन त्या नामजपाने अगणित पुण्य निर्माण झाले. ॥८॥

उफराटें नाम म्हणतां वाचें । पर्वत फुटले पापाचे । ध्वज उभारले पुण्याचे । ब्रह्मांडावरुते ।।९।।

‘राम’ म्हणता म्हणता ‘मरा’ असा नामोच्चार होऊनही पापांचे डोंगर फुटून त्याची पुण्यध्वजा ब्रह्मांडाच्या कक्षेपलीकडे पोहोचली! ॥९॥

वाल्मीकें जेथें तप केलें । तें वन पुण्यापावन जालें । शुष्क काळीं अंकुर फुटले । तपोबळें जयाच्या ।।१०।।

वाल्मिकीने ज्या अरण्यात रामनामजपाचे तप केले ते अरण्यही पवित्र होऊन त्या पुण्यभूमीतील वाळलेल्या लाकडांनाही त्याच्या तपोबळाने पालवी फुटली. ॥१०॥

पूर्वी होता वाल्हाकोळी । जीवघातकी भूमंडळीं । तोचि वंदिजे सकळीं । विबुधीं आणि ॠषेश्वरीं ।।११।।

वाल्मिकीचे आधीचे नाव 'वाल्याकोळी' असे होते. वाल्या असताना त्याने धनासाठी अनेक लोकांची हत्या केली. तोच वाल्मिकी झाल्यावर त्याच्या रामायणरचनेमुळे अनेक विद्वान व ऋषींना तो वंद्य झाला. जगाला वंद्य झाला. ॥११॥

उपरति आणि अनुताप । तेथें कैचें उरेल पाप । देह्यांततपें पुण्यरूप । दुसरा जन्म जाला ।।१२।।

जेथे वैराग्य व प्रामाणिक आणि टिकाऊ पश्चात्ताप असतो तेथे पाप टिकत नाही. (त्या तीर्थाने ते धुऊन जाते.) अनुतापामुळे होणाऱ्या तपाने व पुण्याने त्याच देहातील जीवाचा जणू पुनर्जन्म होतो. ॥१२॥

अनुतापें आसन घातलें । देह्यांचें वारुळ जालें । तेंचि नाम पुडें पडिलें । वाल्मीक ऐसें ।।१३।।

वाल्याकोळी अनुतापाच्या दृढ आसनावर स्थिर झाल्यामुळे देहाचे शोषण होऊन तो वारूळासारखा आतून पोखरला. (देहावर वारूळ तयार झाले असेही म्हणतात.) पुढे तो 'वाल्मिकी' या नावाने प्रसिद्ध झाला. कारण– ॥१३॥

वारुळास वाल्मीक बोलिजे । म्हणोनि वाल्मीक नाम साजे । जयाच्या तीव्र तपें झिजे । हृदय तापसाचें ।।१४।।

वारूळ म्हणजेच वल्मीक म्हणून वाल्याला वाल्मिकी हे नाव शोभते. त्याने अथक व प्रदीर्घ तप केल्याने त्याच्या अन्त:करणातील वासना नष्ट झाल्या. (हृदय = अन्त:करण) ॥१४॥

जो तापसांमाजीं श्रेष्ठ । जो कवेश्वरांमधें वरिष्ठ । जयाचें बोलणें पष्ट । निश्चयाचें ।।१५।।

म्हणून तो तपस्व्यांत सर्वश्रेष्ठ व श्रेष्ठ कवीत महाकवी होय. त्याचे काव्य सुस्पष्ट व निश्चयात्मक आहे. (ईश्वरी कृपेतून स्फुरलेले आहे.) ॥१५॥

जो निष्ठावंतांचें मंडण । रघुनाथभक्तांचें भूषण । ज्याची धारणा असाधारण । साधकां सदृढ करी ।।१६।।

नामनिष्ठा, तपोनिष्ठा, अनुतापनिष्ठा इ. निष्ठा सांभाळणाऱ्यांचे तो अलंकार आहे. श्रीरामभक्तांचे तो भूषण आहे. त्याच्या निश्चयात्मक बुद्धीने केलेल्या रचनेतून साधकाची बुद्धी तशीच तयार होते. ॥१६॥

धन्य वाल्मीक ॠषेश्वर । समर्थाचा कवेश्वर । तयासी माझा नमस्कार । साष्टांगभावें ।।१७।।

सर्व महान कवीत श्रेष्ठ असलेला वाल्मिकी खरोखर धन्य होय. मी त्याला भावपूर्वक साष्टांग नमस्कार करतो. ॥१७॥

वाल्मीक ॠषी बोलिला नसता । तरी आम्हांसी कैंची रामकथा । म्हणोनियां समर्था । काय म्हणोनी वर्णावें ।।१८।।

वाल्मिकीने जर लिहिली नसती तर आम्हाला रामकथेचा अपूर्व लाभ कसा झाला असता? अशा महात्म्याचे वर्णन कसे करावे! ॥१८॥

रघुनाथकीर्ति प्रगट केली । तेणें तयाची महिमा वाढली । भक्तमंडळी सुखी जाली । श्रवणमात्रें ।।१९।।

त्याने श्रीरामाची कथा जगासमोर मांडल्याने त्याची महती सर्वांना कळून ती सर्वत्र पसरली व ती ऐकून भक्तमंडळी संतुष्ट झाली. ॥१९॥

आपुला काळ सार्थक केला । रघुनाथकीर्तीमधें बुडाला । भूमंडळी उधरिला । बहुत लोक ।। २० ।।

वाल्मिकीने स्वत:चे आयुष्य सार्थकी लावले. तो श्रीराममाहात्म्यात रंगून गेला व या जगातील अनेक भक्तांना तरून जाण्यासाठी सहाय्य केले. ॥२०॥

रघुनाथभक्त थोर थोर । महिमा जयांचा अपार । त्या समस्तांचा किंकर । रामदास म्हणे ।। २१ ।।

अनेक महान रामभक्तांचा मी दास आहे असे मी रामदास म्हणतो. ॥२१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'वाल्मिकिस्तवननाम' समास समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'वाल्मिकिस्तवन' नावाचा पहिला समास समाप्त

दशक सोळावा : सप्ततिन्वयाचा

समास दुसरा : सूर्यस्तवन

॥ श्रीराम समर्थ ॥

धन्य धन्य हा सूर्यवौंश । सकळ वौंशामधें विशेष । मार्तंडमंडळाचा प्रकाश । फांकला भूमंडळीं ।।१।।

ज्या वंशात प्रभू श्रीराम जन्माला आले तो सूर्यवंश धन्य आहे. सूर्याचा वंश सर्वश्रेष्ठ असून त्याच्या तेजाचा प्रकाश पृथ्वीवर पसरला आहे. ॥१॥

सोमाआंगीं आहे लांछन । पक्षा येका होय क्षीण । रविकिर्ण फांकतां आपण । कळाहीन होये ।।२।।

कृष्णपक्षात क्षीण होत जाणे व सूर्योदय होताच त्याच्या प्रखर प्रकाशात लुप्त होणे हे चंद्राचे दोष आहेत. ॥२॥

याकारणें सूर्यापुढें । दुसरी साम्यता न घडे । जयाच्या प्रकाशें उजेडे । प्राणीमात्रासी ।।३।।

म्हणून सूर्याच्या योग्यतेचे दुसरे तेज नाही. सर्व प्राण्यांना त्याच्या प्रकाशात दिसू लागते. ॥३॥

नाना धर्म नाना कर्मे । उत्तमें मध्यमें अधमें । सुगमें दुर्गमें नित्य नेमें । सृष्टीमधें चालती ।।४।।

उत्तम, मध्यम, कनिष्ठ, सहजसाध्य, कष्टसाध्य, इ. धर्म व कर्मे या सृष्टीत सतत चालू असतात. ॥४॥

वेदशास्त्रें आणी पुराणें । मंत्र यंत्र नाना साधनें । संध्या स्नान पूजाविधानें । सूर्येविण बापुडीं ।।५।।

सूर्यदेवता व सूर्यप्रकाशावाचून वेदशास्त्रांचे पाठ, पुराणांचे वाचन, मंत्रजप, तंत्रसाधना, संध्या, स्नान, पूजा इत्यादी करता येत नाहीत. ॥५॥

नाना योग नाना मतें । पाहों जातां असंख्यातें । जाती आपुलाल्या पंथें । सूर्यउदय जालियां ।।६।।

राज वा हठयोगादी योग, भक्तिज्ञानादी योग इ. सर्व योगसाधनांत कितीही विविधता असली तरी ती सर्व सूर्योदयानंतरच सुरू करतात. ॥६॥

प्रपंचिक अथवा परमार्थिक । कार्य करणें कोणीयेक । दिवसेंविण निरार्थक । सार्थक नव्हे ।।७।।

कोणतेही व्यावहारिक किंवा पारमार्थिक कर्म व साधना करण्यासाठी उजेड लागतोच. ॥७॥

सूर्याचें अधिष्ठान डोळे । डोळे नसतां सर्व आंधळे । याकारणें कांहींच न चले । सूर्येविण ।।८।।

सूर्य ही डोळ्याची अनुग्राहक देवता आहे. ती नसेल तर डोळ्यांना दिसत नाही. म्हणून सूर्यावाचून काहीच करता येत नाही. ॥८॥

म्हणाल अंध कवित्वें करिती । तरी हेहि सूर्याचीच गती । थंड जालियां आपुली मती । मग मतिप्रकाश कैचा ।।९।।

डोळ्यांनी न दिसणारे काव्यरचना करतात हे खरे, (उदा. गुलाबराव महाराज) पण शरीराची उष्णता सूर्यामुळे टिकते व त्यामुळे जिवन्त राहून ती रचना आंधळ्यालाही करता येते. बुद्धी थंड झाली तर ती काम करीत नाही. ॥९॥

उष्ण प्रकाश तो सूर्याचा । शीत प्रकाश तो चंद्राचा । उष्णत्व नस्तां देह्याचा । घात होये ।१०।।

रात्रीही सूर्याची उष्णता थोडी टिकून असते. त्यामुळे थंड चंद्रप्रकाशातही शरीर उष्ण राहते. नाहीतर मरण आले असते. ॥१०॥

याकारणें सूर्येविण । सहसा न चले कारण । श्रोते तुम्ही विचक्षण । शोधून पाहा ।।११।।

म्हणून सूर्यावाचून जगात बहुधा काही करता येत नाही. तुम्ही श्रोते जाणते आहात. हे तुम्ही समजून घ्यालच. (संतांच्या काळात असलेल्या वैज्ञानिक प्रगतीची मर्यादा संतांच्या लेखनात दिसते.) ॥११॥

हरिहरांच्या अवतारमूर्ती । शिवशक्तीच्या अनंत वेक्ती । यापूर्वी होता गभस्ती । आतां हि आहे ।।१२।।

विष्णू व शंकर यांचे अवतार व शिव व शक्तीच्या अनंत अभिव्यक्ती झाल्या. पण सूर्य त्यांचे आधीपासून होता व आजहि आहे. ॥१२॥

जितुके संसारासी आले । तितुके सूर्याखालें वर्तले । अंतीं देहे त्यागून गेले । प्रभाकरादेखतां ।।१३।।

सर्व जीवसृष्टी व जडसृष्टी सूर्याच्या साक्षीने निर्माण होऊन नष्ट झाली. ॥१३॥

चंद्र ऐलीकडे जाला । क्षीरसागरीं मथून काढिला । चौदा रत्नांमधें आला । बंधु लक्ष्मीचा ।।१४।।

त्यामानाने चंद्र फारच अलीकडचा आहे. समुद्रमंथनातून वर आलेल्या चौदा रत्नांपैकी लक्ष्मीबरोबरच चंद्रही होता. ॥१४॥

विश्वचक्षु हा भास्कर । ऐसें जाणती लाहानथोर । याकारणें दिवाकर । श्रेष्ठांहून श्रेष्ठ ।।१५।।

सूर्य हा जगाचा डोळा आहे हे सर्व आबालवृद्धांनाही कळते. म्हणून तो सर्वश्रेष्ठ आहे. ॥१५॥

अपार नभमार्ग क्रमणें । ऐसेंचि प्रत्यहीं येणें जाणें । या लोकोपकाराकारणें । आज्ञा समर्थाची ।।१६।।

सूर्य ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे लोकांना उपयोगी पडण्यासाठी दिवसांमागून दिवस अनंत आकाशाचा प्रवास पार पाडतो. ॥१६॥

दिवस नस्तां अंधकार । सर्वांसी नकळें सारासार । दिवसेंविण तश्कर । कां दिवाभीत पक्षी ।।१७।।

सूर्य नसेल तर अंधार पडून प्रत्येक गोष्ट सर्वांना अस्पष्ट दिसते. अंधारात चोर व घुबडे यांचे फावते. ॥१७॥

सूर्यापुढें आणिक दुसरें । कोण आणावें सामोरें । तेजोरासी निर्धारिं । उपमेरहित ।।१८।।

सूर्यासारखा दुसरा तेजस्वी पदार्थ नसल्याने त्या अपरंपार तेजोनिधीला उपमा देण्यासाठी कोणाला पुढे करावे? ॥१८॥

ऐसा हा सविता सकळांचा । पूर्वज होय रघुनाथाचा । अगाध महिमा मानवी वाचा । काये म्हणोनि वर्णावी ।।१९।।

असा हा सर्वांचा सूर्य श्रीरामाचा पूर्वज असून त्याचे माहात्म्य मानवी वाणीने कसे सांगावे? ॥१९॥

रघुनाथवौंश पूर्वापर । येकाहूनि येक थोर । मज मतिमंदास हा विचार । काये कळे ।।२०।।

हा सूर्यवंश पुरातन असून त्यांत एकाहून एक श्रेष्ठ असे पुरुष झाले. त्या सर्वांचे चरित्र व माहात्म्य माझ्या अल्पबुद्धीला कसे कळणार! ॥२०॥

रघुनाथाचा समुदाव । तेथें गुंतला अंतर्भाव । म्हणोनी वर्णितां महत्त्व । वाग्दुर्बळ मी ।।२१।।

जेथे प्रभुरामचंद्राचे भक्त एकत्र येतात तेथे माझे मन त्यांत रमून हारवून जाते. त्यामुळे त्याचे माहात्म्य सांगणे माझ्या वाणीला शक्य होत नाही. ॥२१॥

सकळ दोषाचा परिहार । करितां सूर्यास नमस्कार । स्फूर्ति वाढे निरंतर । सूर्यदर्शन घेतां ।।२२।।

सूर्याला मनापासून वंदन केले तर सर्व पापे जळतात. त्याच्या दर्शनाने प्रतिभा बहरते. ॥२२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सूर्यस्तवननाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सूर्यस्तवन' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक सोळावा : सप्ततिन्वयाचा

समास तिसरा : पृथ्वीस्तवन

॥ श्रीराम समर्थ ॥

धन्य धन्य हे वसुमती । इचा महिमा सांगों किती । प्राणीमात्र तितुके राहाती । तिच्या आधारें ।।१।।

जिच्या आधाराने सर्व जीवसृष्टी जगते ती पृथ्वी खरोखर धन्य असून तिचे माहात्म्य कसे व किती वर्णावे! ॥१॥

अंतरीक्ष राहाती जीव । तोहि पृथ्वीचा स्वभाव । देहे जड नस्तां जीव । कैसे तगती ।।२।।

पृथ्वीभोवतीच्या वातावरणात राहणाऱ्या जीवांचे शरीरातही पृथ्वीतत्त्व असते. (जलप्रधान जीवशरीरात पृथ्वीही असते. पहा– १५-९-३) अचेतन शरीराशिवाय जीव जगू शकत नाही. ॥२॥

जाळिती पोळिती कुदळिती । नांगरिती उकरिती खाणती । मळ मूत्र तिजवरी करिती । आणी वमन ।।३।।

नासकें कुजकें जर्जर । पृथ्वीविण कैची थार । देह्यांतकाळीं शरीर । तिजवरी पडे ।।४।।

बरें वाईट सकळ कांहीं । पृथ्वीविण थार नाहीं । नाना धातु द्रव्य तें हि । भूमीचे पोटीं ।।५।।

विटा करण्यासाठी माती (पृथ्वी) जाळतात, शेकोटी पेटवून चटके देतात. कुदळ, नांगर, पहार, टिकाव इत्यादींनी जखमा करतात. विष्ठा, मूत्र व ओकारी इ. घाण तिच्यावर टाकतात. नासक्या, कुजक्या व फाटक्या वस्तू पृथ्वीतच सामावतात. मेलेली शरीरे पृथ्वीमय होतात. अशा रीतीने सर्व बऱ्या-वाईट पदार्थांना पृथ्वीशिवाय गती नाही. अनेक प्रकारचे धातू व कोळसा, तेल इ. पृथ्वीत असतात. ॥३-५॥

येकास येक संव्हारिती । प्राणी भूमीवरी असती । भूमी सांडून जाती । कोणीकडे ।।६।।

प्राणी दुसऱ्या प्राण्यांना ठार मारतात. ते सर्व भूमीवरच राहतात. ती सोडून ते जातील कोठे? ॥६॥

गड कोठ पुरें पट्टणें । नाना देश कळती अटणें । देव दानव मानव राहाणें । पृथ्वीवरी ।।७।।

किल्ले, तटबंद्या, गावे, शहरे पृथ्वीवरच असतात. देशाटणाने पृथ्वीवरील अनेक देश कळतात. देवमूर्ती, दानव व मानव हे सर्व पृथ्वीवरच राहतात. ॥७॥

नाना रत्नें हिरे परीस । नाना धातु द्रव्यांश । गुप्त प्रगट कराव्यास । पृथ्वीविण नाहीं ।।८।।

वैडुर्यादी रत्ने, हिरे, परीस, अनेक धातू व द्रव्ये पृथ्वीत दडून असतात व ती पृथ्वीतून बाहेर काढतात. ॥८॥

मेरुमांदाळ हिमाचळ । नाना अष्टकुळाचळ । नाना पक्षी मछ व्याळ । भूमंडळीं ।।९।।

मेरू व मांदार व हिमालय ह्यांसह महेंद्र, मलय, सह्य, शक्तिमान, ऋक्ष, विन्ध्य व परियात्र असे आठ कुलाचल पर्वत, अनेक पक्षी, मासे व सर्प ह्या पृथ्वीवर आहेत. ॥९॥

नाना समुद्रापैलीकडे । भोंवतें आवर्णोदका कडें । असंभाव्य तुटले कडे । भूमंडळाचे ।।१०।।

अनेक सागरांशिवाय (पैलीकडे) पृथ्वीभोवतीच्या वातावरणातील पाण्याचे जणू तिच्याभोवती रिंगण आहे. पृथ्वीचे उंच उंच कडे जागोजागी तुटलेले दिसतात. ॥१०॥

त्यांमधें गुप्त विवरें । लाहानथोरें अपारें । तेथें निबिड अंधकारें । वस्ती कीजे ।।११।।

त्या पर्वतांच्या कड्यांत लहान मोठी कित्येक विवरे (गुहा) असून त्यांत अंधारच अंधार असतो. ॥११॥

आवर्णोदक तें अपार । त्याचा कोण जाणे पार । उदंड दाटले जळचर । असंभाव्य मोठे ।।१२।।

पृथ्वीभोवतीच्या सागरी पाण्याच्या वेढ्यामध्ये अगदी क्षुद्र व प्रचंड जळचर राहतात. ॥१२॥

त्या जीवनास आधार पवन । निबिड दाट आणी घन । फुटों शकेना जीवन । कोणेकडे ।।१३।।

ते पाणी दाट, एकसंध व वजनदार वातावरणाच्या (वायू) दाबाच्या आधाराने राहिल्यामुळे कोठेतरी वाहून जात नाही. ॥१३॥

त्या प्रभंजनासी आधार । कठीणपणें अहंकार । ऐसा त्या भूगोळाचा पार । कोण जाणे ।।१४।।

हा वायू 'एकोऽहं' ह्या मूळ अहंकाराच्या सत्तेमुळे (कठीणपणें) सूत्रवायूच्या रूपाने असतो. अशा ह्या पृथ्वीचा अन्तपार कोण जाणेल? ॥१४॥

नाना पदार्थांच्या खाणी । धातुरत्नांच्या दाटणी । कल्पतरु चिंतामणी । अमृतकुंडें ।।१५।।

कोळसा, दगड इ. खाणी, धातू व रत्ने असलेल्या खाणी, कल्पतरू, चिंतामणी, अमृतकुंडे इ. सर्व पृथ्वीमुळे आहेत. ॥१५॥

नाना दीपें नाना खंडें । वसती उद्वसें उदंडें । तेथें नाना जीवनाचीं बंडें । वेगळालीं ।।१६।।

काही सलग भूभाग (खंड) व कित्येक बेटे पृथ्वीवर असून त्यांवर मनुष्यादी प्राण्यांची वसती आहे. त्या सर्वांची जीवनपद्धती वेगळी वेगळी आहे. ॥१६॥

मेरुभोंवते कडे कापले । असंभाव्य कडोसें पडिलें । निबिड तरु लागले । नाना जिनसी ।।१७।।

मोठ्या पर्वतांच्या बाजूने काही कापीव कडे असतात. त्यांच्या चकचकीत पाषाणांच्या पृष्ठावर सूर्यकिरण चमकतात. पृथ्वीवर अनेक प्रकारच्या प्रचंड वृक्षांची मोठी जंगले असतात. ॥१७॥

त्यासन्निध लोकालोक । जेथें सूर्याचें फिरे चाक । चंद्राद्रि द्रोणाद्रि मैनाक । माहां गिरी ।।१८।।

ह्या पर्वतांमध्येच लोकालोक नावाचा पौराणिक पर्वत असून तो पृथ्वीभोवती फिरतो! सूर्याच्या भ्रमणाची कक्षा तेथे असून त्यापलीकडे अंधारच अंधार आहे. चंद्राद्री, द्रोणाद्री व मैनाक हे प्रचंड पर्वतही तेथे आहेत. (ह्या सर्व पौराणिक कल्पना आहेत.) ॥१८॥

नाना देशीं पाषाणभेद । नाना जिनसी मृत्तिकाभेद । नाना विभूति छंद बंद । नाना खाणी ।।१९।।

वेगळ्या वेगळ्या प्रदेशात कडाप्पासारखे वेगळे दगड आहेत. लाल, काळी, पांढरी इ. जमिनी आहेत. ह्या पृथ्वीवर फार मोठ्या विभूती झाल्या व आहेत. अनेक छंद जोपासणारी माणसे आहेत. त्याचबरोबर जरायुजादी चार खाणींच्या बंदिस्तीत कित्येक जीव आहेत. (नाना खाणीबंद) ॥१९॥

बहुरत्न हे वसुंधरा । ऐसा पदार्थ कैचा दुसरा । अफाट पडिलें सैरावैरा । जिकडे तिकडे ।।२०।।

पृथ्वीला रत्नगर्भा म्हणतात. तिच्या पोटात कित्येक रत्ने आहेत. तिच्यासारखी दुसरी वस्तू नाही. ह्या पृथ्वीवर अनेक प्रकारचे जिन्नस वाटेल तसे व वाटेल तिकडे पसरलेले आहेत. ॥२०॥

अवघी पृथ्वी फिरोन पाहे । ऐसा प्राणी कोण आहे । दुजी तुळणा न साहे । धरणीविषीं ।।२१।।

पृथ्वीचा धांडोळा घेण्याचे सामर्थ्य कोणांत आहे? म्हणून पृथ्वीच्या बरोबरीचे दुसरे काही नाही. ॥२१॥

नाना वल्ली नाना पिकें । देसोदेसीं अनेकें । पाहों जातां सारिख्या सारिखें । येक हि नाहीं ।।२२।।

पृथ्वीवरील अनेक देशांत अनेक प्रकारच्या वेली व फळे, धान्ये इ. पिके येतात. त्यांत कितीतरी विविधता आहे. ॥२२॥

स्वर्ग मृत्य आणी पाताळें । अपूर्व रचिलीं तीन ताळें । पाताळलोकीं माहां व्याळें । वस्ती कीजे ।।२३।।

पृथ्वीवरच स्वर्ग, मृत्यू व पाताळ अशा तीन लोकांची अपूर्व रचना आहे. त्यांपैकीं पाताळी शेष नाग राहतो. (हिमालयात स्वर्ग आहे व समुद्रकांठी घाटाखाली पाताळ आहे. मधे मृत्युलोक आहे. पाताळात राहणाऱ्या अहिरावण महिरावणाचे मंदिर कोकणातील ठाणे जिल्ह्यात आहे. पाताळगंगा नदी कोकणातून वाहते.) ॥२३॥

नाना वल्ली बीजांची खाणी । ते हे विशाळ धरणी । अभिनव कर्त्याची करणी । होऊन गेली ।।२४।।

असंख्य औषधी व वनस्पतींच्या बीजांची पृथ्वी ही जणू खाण आहे. ईश्वराच्या अनादि संकल्पाने अशी सर्व अद्भुत रचना होऊन गेली. ॥२४॥

गड कोठ नाना नगरें । पुरें पट्टणें मनोहरें । सकळां ठाईं जगदेश्वरें । वस्ती कीजे ।।२५।।

अनेक किल्ले, तटबंद्या, सुंदर गावे, शहरे व महानगरे इ. सर्वांत तो ईश्वर व्यापून राहतो. ॥२५॥

माहां बळी होऊन गेले । पृथ्वीवरी चौताळले । सामर्थ्यें निराळे राहिले । हें तों घडेना ।।२६।।

आजपर्यन्त जगात वालीसारख्या प्रचंड सामर्थ्यशाली पुरुषांनी अचाट कृत्ये करून धिंगाणा घातला असला तरी त्यांना पृथ्वीला सोडून राहता आले नाही. ॥२६॥

असंभाव्य हे जगती । जीव कितीयेक जाती । नाना अवतारपंगती । भूमंडळावरी ।।२७।।

अशा ह्या अफाट जगात कितीतरी सामान्य जीव जन्मून मरतात. ईश्वराचे पूर्ण, अर्ध, अंशादी अवतारही कितीतरी झाले व गेले. ॥२७॥

सध्यां रोकडें प्रमाण । कांहीं करावा नलगे अनुमान । नाना प्रकारीचें जीवन । पृथ्वीचेनि आधारें ।।२८।।

सर्व जीवांचे जीवन पृथ्वीच्या आधाराने चालते हे समजण्यासाठीं तर्काची गरज नाही. आजही ते सर्वांना प्रत्यक्ष दिसते. ॥२८॥

कित्तेक भूमी माझी म्हणती । सेवटीं आपणचि मरोन जाती । कित्तेक काळ होतां जगती । जैसी तैसी ।।२९।।

जमिनीवर मालकी हक्क सांगणारे शेवटी स्वत:च मरतात. पृथ्वी मात्र अनंतकाळपर्यन्त टिकून राहते. ॥२९॥

ऐसा पृथ्वीचा महिमा । दुसरी काये द्यावी उपमा । ब्रह्मादिकापासुनी आम्हां । आश्रयोचि आहे ।।३०।।

असे हे पृथ्वीचे माहात्म्य आहे. ब्रह्मदेवापासून आम्हा जीवसृष्टीपर्यन्त सर्वांनाच आश्रय देणाऱ्या ह्या पृथ्वीला उपमा कोणाची द्यावी? ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'पृथ्वीस्तवननिरूपणनाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'पृथ्वीस्तवन' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक सोळावा : सप्ततिन्वयाचा

समास चवथा : आपनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

आतां सकळांचें जन्मस्थान । सकळ जीवांचे जीवन । जयास आपोनारायेण । ऐसें बोलिजे ।।१।।

पाण्याला जीवन असे नाव असून जीवसृष्टीची निर्मिती त्यातून होते. (पहा– १५-९-४) त्यानेच जीव जगतात. म्हणून त्यास आपोनारायण म्हणतात. ॥१॥

पृथ्वीस आधार आवर्णोदक । सप्तसिंधूचें सिंधोदक । नाना मेघीचें मेघोदक । भूमंडळीं चालिलें ।।२।।

सात समुद्रांच्या पाण्याचा वेढा पृथ्वीला आधार आहे. ढगात भरून राहिलेले पाणी पृथ्वीवर वाहते. ॥२॥

नाना नद्या नाना देसीं । वाहात मिळाल्या सागरासी । लाहानथोर पुण्यरासी । अगाध महिमे ।।३।।

अनेक प्रदेशांतून वाहत येणाऱ्या कित्येक नद्या समुद्राला मिळतात. गंगा-गोदावरीसारख्या नद्या पुण्यवन्त असून त्यांचे कमी-अधिक माहात्म्य सांगितले जाते. त्यांच्या काठी तीर्थक्षेत्रे वसतात. ॥३॥

नद्या पर्वतींहून कोंसळल्या । नाना सांकडीमधें रिचवल्या । धबाबां खळाळां चालिल्या । असंभाव्य ।।४।।

उंच पर्वतावरून नद्या सपाटीवर कोसळून वाहू लागतात. त्यांचे पाणी काही ठिकाणी धरणे, कपारी इत्यादिकांत अडकून पडते. काही नद्या गर्जना करीत प्रचंड पाण्यासह वेगाने वाहतात. ॥४॥

कूप बावी सरोवरें । उदंड तळीं थोरथोरें । निर्मळें उचंबळती नीरें । नाना देसीं ।।५।।

अनेक देशांत विहिरी, बारव, सरोवर, तळे इत्यादिकांत स्वच्छ पाणी उचंबळते. ॥५॥

गायेमुखें पाट जाती । नाना कालवे वाहाती । नाना झऱ्या झिरपती । झरती नीरें ।।६।।

डोंगरातून येणारे पाणी गोमुखातून वाहते. काही पाणी कालव्यातून तर काही निर्झर व पाझरातून वाहते. ॥६॥

डुरें विहीरे पाझर । पर्वत फुटोन वाहे नीर । ऐसे उदकाचे प्रकार । भूमंडळीं ।।७।।

ह्या पृथ्वीवरील पाणी बावडी, कूप व डोंगरातील पाझरांचे रूपाने वाहते. त्याचे नाना प्रकार आहेत. ॥७॥

जितुके गिरी तितुक्या धारा । कोंसळती भयंकरा । पाभळ वाहाळा अपारा । उकळ्या सांडिती ।।८।।

प्रत्येक पर्वतावरून लहान-मोठ्या असंख्य धारा पडताना त्या रौद्र स्वरूपाच्या दिसतात. त्यांचे ओहोळ, झरे वहातात. काही ठिकाणीं उकळत्या पाण्याचे झरे असतात. ॥८॥

भूमंडळीचें जळ आघवें । किती म्हणोनी सांगावें । नाना कारंजीं आणावें । बांधोनी पाणी ।।९।।

पृथ्वीवरील पाण्याचे असे वर्णन किती करावे. ते पाणी नळीतून कारंजापर्यन्त वाहून नेता येते. ॥९॥

डोहो डवंकें खबाडीं टाकीं । नाना गिरिकंदरीं अनेकीं । नाना जळें नाना लोकीं । वेगळालीं ।।१०।।

डोह, डबके, दगडाच्या खाणी, टाक्या इ. पाण्याचे लहानमोठे साठे डोंगरदऱ्यांत असतात. जड, हलके, मचूळ इ. प्रकारचे पाणी निरनिराळ्या प्रदेशात (लोक) असते. ॥१०॥

तीर्थें येकाहून येक । माहां पवित्र पुण्यदायक । अगाध महिमा शास्त्रकारक । बोलोनि गेले ।।११।।

काशी, मानसरोवर इ. एकाहून एक श्रेष्ठ, अतिपवित्र व पुण्यदायक तीर्थक्षेत्रांचे माहात्म्य शास्त्रकारांनी सांगितले आहे. ॥११॥

नाना तीर्थांचीं पुण्योदकें । नाना स्थळोस्थळीं सीतळोदकें । तैसींच नाना उष्णोदकें । ठाईं ठाईं ।।१२।।

तीर्थक्षेत्रातील पवित्र पाणी, उत्तरकाशीचे गार पाणी, बदरीनाथातील कुंडाचे उष्ण पाणी इ. प्रकारचे पाणी जागोजागी आहे. ॥१२॥

नाना वल्लीमधें जीवन । नाना फळीं फुलीं जीवन । नाना कंदीं मुळीं जीवन । गुणकारकें ।।१३।।

अनेक वेली, फळे, फुले, कंदमुळे इत्यादिकांत असलेल्या पाण्याला (रस) औषधी गुण असतात. ॥१३॥

क्षारोदके सिंधोदकें । विषोदकें पीयूषोदकें । नाना स्थळांतरीं उदकें । नाना गुणाचीं ।।१४।।

खारटणातील व समुद्रातील पाणी, विषारी पाणी, गोड पाणी इ. प्रकारे अनेक जागी अनेक प्रकारचे पाणी आहे. ॥१४॥

नाना युक्षदंडाचे रस । नाना फळांचे नाना रस । नाना प्रकारीचे गोरस । मद पारा गुळत्र ।।१५।।

ऊस, फळे, दूध, मध, पारा, राब, काकवी व गुळवणी इत्यादिकांत अनेक प्रकारचे पाणी रस रूपाने असते. ॥१५॥

नाना मुक्तफळांचें पाणी । नाना रत्नीं तळपे पाणी । नाना शास्त्रामधें पाणी । नाना गुणाचें ।।१६।।

मोत्याच्या व रत्नांच्या तेजाला पाणी म्हणतात. तलवारीला धार दिल्यावर तिच्या तळपण्याला पाणी म्हणतात. असे पाण्याचे विविध प्रकार आहेत. ॥१६॥

शुक्लीत श्रोणीत लाळ मूत्र स्वेद । नाना उदकाचे नाना भेद । विवरोन पाहातां विशद । होत जातें ।।१७।।

वीर्य, रक्त, लाळ, मूत्र व घाम ह्यांतही पाणीच असते. त्याचे वेगळे स्वरूप समजावून घेतले म्हणजे समजते. ॥१७॥

उदकाचे देह केवळ । उदकाचेंचि भूमंडळ । चंद्रमंडळ सूर्यमंडळ । उदकाकरितां ।।१८।।

सर्व शरीरे उदकप्रधान असतात. पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण फार मोठे आहे. सूर्यचंद्रादिकांच्या निर्मितीत पाण्याचा वाटा आहे. ॥१८॥

क्षारसिंधु क्षीरसिंधु । सुरासिंधु आज्यसिंधु । दधिसिंधु युक्षरससिंधु । शुद्ध सिंधु उदकाचा ।।१९।।

मीठ, दूध, मद्य, तूप, दही, उसाचा रस व शुद्धपाणी ह्या सर्वांच्या समुद्रांचे पुराणांत वर्णन आहे. ॥१९॥

ऐसें उदक विस्तारलें । मुळापासून सेवटा आलें । मधेंहि ठाई ठाई उमटलें । ठाई ठाई गुप्त ।।२०।।

असा हा सुरुवातीपासून शेवटपर्यन्त पाण्याचा विस्तार आहे. मधेच पाणी कोठेतरी दिसते व मधेच ते गुप्तही होते. ॥२०॥

जे जे बीजीं मिश्रित जालें । तो तो स्वाद घेऊन उठिलें । उसामधें गोडीस आलें । परम सुंदर ।।२१।।

ज्या बीजाशी पाण्याचा संयोग होतो त्या बीजाचा गंध घेऊन ते त्या वनस्पतीत पसरते. उदा. उसात ते पाणी रम्य गोडीला येते. ॥२१॥

उदकाचें बांधा हें शरीर । उदकचि पाहिजे तदनंतर । उदकचि उत्पत्तिविस्तार । किती म्हणोनी सांगावा ।।२२।।

मानवी शरीराच्या घटनेत पाण्याचा वाटा मोठा आहे. ते शरीर जगण्यासाठीही पाण्याची अत्यंत जरूर आहे. अशा ह्या उदकापासून किती जीव जन्मतात हे कोणी सांगावे! ॥२२॥

उदक तारक उदक मारक । उदक नाना सौख्यदायक । पाहातां उदकाचा विवेक । अलोलीक आहे ।।२३।।

जगण्यासाठी पाणी हवे व पाण्यात बुडून मरणही येते! तहान, उष्णता इ. दुःखे दूर करून पाणी जीवाला सुखी करते. एकूण पाण्याची महती अलौकिक आहे. ॥२३॥

भूमंडळीं धांवे नीर । नाना ध्वनी त्या सुंदर । धबाबां धबाबां थोर । रिचवती धारा ।।२४।।

पावसाळ्यात जेव्हा पाण्याचे लोट पृथ्वीवर धावतात तेव्हा त्यांचे येणारे धबा धबा असे नाद मन रिझवतात. ॥२४॥

ठाईं ठाईं डोहो तुंबती । विशाळ तळीं डबाबिती । चबाबिती थबाबिती । कालवे पाट ।।२५।।

जागोजागी नदीतील डोह तुडुंब भरतात. मोठी तळी भरली की काठावर आदळणारे पाणी डबक् डबक् असा आवाज करते. मोठे कालवे व शेतातील पाट चबक् थबक् असे आवाज करीत वाहतात. ॥२५॥

येकी पालथ्या गंगा वाहाती । उदकें सन्निधचि असती । खळाळां झरे वाहाती । भूमीचे पोटीं ।।२६।।

पाण्याचे काही प्रवाह जमिनीखालून वाहतात. ते पाणी जमिनीचे खाली जवळच असते. अशा झऱ्यांचा खळाळ जाणकारांना कळतो. ॥२६॥

भूमीगर्भी डोहो भरले । कोण्ही देखिले ना ऐकिले । ठाईं ठाईं झोवीरे जाले । विदुल्यतांचे ।।२७।।

कोणालाच माहीत नसलेले व कोणी न ऐकलेले असे पाण्याचे मोठे साठे भूमीखाली असतात. वीज पडून होणाऱ्या खड्ड्यात पाणी साठते. ॥२७॥

पृथ्वीतळीं पाणी भरलें । पृथ्वीमधें पाणी खेळे । पृथ्वीवरी प्रगटलें । उदंड पाणी ।।२८।।

भूगर्भ, भूमीखाली व भूमीवर असे सर्व स्तरावर पाणी भरपूर प्रमाणात वाहते. ॥२८॥

स्वर्गमृत्यपाताळीं । येक नदी तीन ताळीं । मेघोदक अंतराळीं । वृष्टी करी ।।२९।।

गंगानदी स्वर्गात उगम पावून पृथ्वीवर वाहून पाताळलोकात पोहोचते. ढगांचे पाणी आकाशात वृष्टी करते. ॥२९॥

पृथ्वीचें मूळ जीवन । जीवनाचें मूळ दहन । दहनाचें मूळ पवन । थोराहून थोर ।।३०।।

पृथ्वी पाण्यापासून, पाणी अग्नीपासून, अग्नी वायूपासून निर्माण होतो. ते एकाहून एक सूक्ष्म व आधी निर्माण होतात. ॥३०॥

त्याहून थोर परमेश्वर । महद्भूतांचा विचार । त्याहून थोर परात्पर । परब्रह्म जाणावें ।।३१।।

त्या वायूहून ईश्वर हे सर्वश्रेष्ठ भूत होय. त्या ईश्वराहून परमश्रेष्ठ परब्रह्म आहे. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आपनिरूपणनाम' समास चवथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आपनिरूपण' नावाचा चवथा समास समाप्त

दशक सोळावा : सप्ततिन्वयाचा

समास पाचवा : अग्निनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

धन्य धन्य हा वैश्वानरु । होये रघुनाथाचा श्वशुरु । विश्वव्यापक विश्वंभरु । पिता जानकीचा ।।१।।

सीताहरणापूर्वी खऱ्या सीतेला अग्नीच्या स्वाधीन करून भासमय सीता रावणासमोर गेल्याची कथा आहे. म्हणून ती अग्नीची कन्या व अग्नी श्रीरामाचे श्वशुर झाले. असा विश्वव्यापक, विश्वपोषक वैश्वानर धन्य आहे. (विश्वातील माणसांना सारखाच उपयुक्त.) ॥१॥

ज्याच्या मुखें भगवंत भोक्ता । जो ऋषीचा फळदाता । तमहिमरोगहर्ता । भर्ता विश्वजनाचा ।।२।।

यज्ञात दिलेल्या आहुतींचा स्वीकार भगवंत अग्नीच्या मुखातून करतो. ऋषींच्या यज्ञाचे फळ अग्नीच्या माध्यमातून मिळते. अंधार, थंडी व रोग ह्यांचे अग्नी निवारण करतो. विश्वाला उष्णता देऊन त्याचे पोषण करतो. ('पूषन'-ईश उप.) ॥२॥

नाना वर्ण नाना भेद । जीवमात्रास अभेद । अभेद आणी परम शुध । ब्रह्मादिकासी ।।३।।

लाल, निळी, इ. प्रकारे अग्नीची ज्योत वेगळी वेगळी असते. लाकडाचा अग्नी, तेलवातीचा अग्नी इ. अग्नीचे प्रकार आहेत. ब्रह्मदेवापासून सामान्य जीवापर्यंत सर्वांना अग्नीची सारखीच आवश्यकता असून तो त्यांच्यासाठी त्यांचा परिसर शुद्ध करतो. ॥३॥

अग्नीकरितां सृष्टी चाले । अग्नीकरिता लोक धाले । अग्नीकरितां सकळ ज्याले । लाहानथोर ।।४।।

सृष्टिचक्रात अग्नी महत्त्वाचा असून अग्नीने शिजविलेले अन्न खाऊन माणसे तृप्त होतात. लहान-मोठे जीव अग्नीमुळे जिवंत राहतात. ॥४॥

अग्नीनें आळलें भूमंडळ । लोकांस राहाव्या जाले स्थळ । दीप दीपिका नाना ज्वाळ । जेथें तेथें ।।५।।

जलमय पृथ्वी अग्नीमुळे कठीण होऊन तीवर प्राण्यांना राहता आले. लहानमोठ्या दिव्यांच्या व मशालींच्या प्रकाशात माणसाचे जीवन सुसह्य झाले. ॥५॥

पोटामध्यें जठराग्नी । तेणें क्षुधा लागे जनी । अग्नीकरितां भोजनीं । रुची येते ।।६।।

जठराग्नी प्रदीप्त झाला की प्राण्याला भूक लागते. अग्नीने शिजविलेल्या गरम अन्नामुळे भोजन रुचकर लागते. ॥६॥

अग्नी सर्वांगी व्यापक । उष्णें राहें कोणी येक । उष्ण नस्तां सकळ लोक । मरोन जाती ।।७।।

अग्नी सर्व शरीरात व्यापून राहिल्याने सर्वांची शरीरे उष्ण राहतात. अग्नीशिवाय जीवसृष्टी जगत नाही. ॥७॥

आधीं अग्नी मंद होतो । पुढें प्राणी तो नासतो । ऐसा हा अनुभव येतो । प्राणीमात्रासी ।।८।।

जठराग्नी मंद होत गेल्यानंतर माणसाला मरण येते, हा सर्वांनाच येणारा अनुभव आहे. ॥८॥

असतां अग्नीचें बळ । शत्रु जिंके तात्काळ । अग्नी आहे तावत्काळ । जिणें आहे ।।९।।

अग्नीमुळें रणोत्साह येऊन शत्रूवर सहज मात करता येते किंवा अग्नीमुळे आरोग्याचे वैरी असलेल्या रोगांवर मात करता येते. अग्नी आहे तोपर्यंत जीव जगतो. ॥९॥

नाना रस निर्माण जाले । अग्नीकरितां निपजले । माहांरोगी आरोग्य जाले । निमिषमात्रें ।।१०।।

लोखंडाचा रस, साखरेचा पाक इ. अग्नीमुळेच होतात. जठराग्नी प्रदीप्त असेल तर क्षय रोगासारखा मोठा रोगही लवकर बरा होण्यास मदत होते. ॥१०॥

सूर्य सकळांहून विशेष । सूर्याउपरी अग्नीप्रकाश । रात्रभागीं लोक अग्नीस । साहें करिती ।।११।।

सूर्यासारखा अग्नीचा गोळा दुसरा नाही. पण रात्री तो नसताना लोक उष्णतेसाठी अग्नीचीच मदत घेतात. ॥११॥

अंत्यजगृहींचा अग्नी आणिला । त्यास दोष नाहीं बोलिला । सकळां गृहीं पवित्र जाला । वैश्वानरु ।।१२।।

शूद्राघरचाही अग्नी पवित्र असल्याने तो कोणीही आणावा. कारण कोणाच्याही घरातील अग्नी पवित्रच असतो. ॥१२॥

अग्नीहोत्र नाना याग । अग्नीकरितां होती सांग । अग्नी त्रुप्त होतां मग । सुप्रसन्न होतो ।।१३।।

दैनंदिन अग्निहोत्र व सर्व यज्ञ अग्निमुळेच यथासांग होतात. अग्नीत यथाविधी हवन केल्यावर यज्ञभोक्ता प्रसन्न होतो. ॥१३॥

देव दानव मानव । अग्नीकरितां चाले सर्व । सकळ जनासी उपाव । अग्नी आहे ।।१४।।

देव, दानव व मानव या सर्वांचे जीवन अग्नीवर अवलंबून आहे. सर्वांच्या जीवनाचा तो आधार आहे. ॥१४॥

लग्नें करिती थोर थोर । नाना दारूचा प्रकार । भूमंडळीं यात्रा थोर । दारूनें शोभती ।।१५।।

मातब्बर श्रीमंतांकडील विवाह सोहोळ्यात सुरनळे, चंद्रज्योती इ. दारूकामात अग्नीची मनोहर अभिव्यक्ती दिसते. मोठमोठ्या यात्रांतून असेच दारूकाम होते. त्यांची शोभा वाढते. ॥१५॥

नाना लोक रोगी होती । उष्ण औशधें सेविती । तेणें लोक आरोग्य होती । वन्हीकरितां ।।१६।।

माणसांना होणाऱ्या कित्येक आजारांसाठी उष्णवीर्य असणारी औषधे वापरल्यावर त्यातील अग्नीमुळे ते आजार बरे होतात. ॥१६॥

ब्राह्मणास तनुमनु । सूर्यदेव हुताशनु । येतद्विषईं अनुमानु । कांहींच नाहीं ।।१७।।

अर्घ्य देण्यासाठी सूर्य व हवनासाठी अग्नी हे दोन्ही ब्रह्मकर्म करणाऱ्या ब्राह्मणांना तनुमनाने प्रिय असतात, हे स्पष्टच दिसते. तर्क नको. ॥१७॥

लोकामध्ये जठरानळु । सागरी आहे वडवानळु । भूगोळाबाहेर आवर्णानळु । शिवनेत्रीं विदुल्यता ।।१८।।

प्राण्यांत जठराग्नी, समुद्रात वडवानल, पृथ्वीभोवतीच्या आवरणात आवरणानल व शंकरांच्या नेत्रांत विद्युतरूप अग्नी असतो. (वडवानल-समुद्रात चकाकणारा फॉस्फरस) ॥१८॥

कुपीपासून अग्नी होतो । उंचदर्पणी अग्नी निघतो । काष्ठमंथनी प्रगटतो । चकमकेनें ।।१९।।

बाटलीचा (कुपी) तळ भिंगाप्रमाणे वापरल्यास अग्नी प्रकट होतो. सूर्यासमोर उंचीवर आरसा धरल्यास त्यातून उष्णकिरण बाहेर पडतात. लाकडावर लाकूड व लोखंडावर गारगोटी घासल्यास ठिणगी पडते. ॥१९॥

अग्नी सकळां ठाईं आहे । कठीण घिसणीं प्रगट होये । आग्यासर्पें दग्ध होये । गिरीकंदरें ।।२०।।

प्रत्येक पदार्थात सुप्त असणारा अग्नी जोरात झालेल्या घर्षणाने प्रगट होतो. आग ओकणाऱ्या सर्पामुळे जंगले भस्मसात होतात. ॥२०॥

अग्नीकरितां नाना उपाये । अग्नीकरितां नाना अपाय । विवेकेंविण सकळ होये । निरार्थक ।।२१।।

अग्नीमुळें अन्नही शिजते (उपाय) व घराला आगही लागते (अपाय). हा विचार समजावून घेऊन अग्नीचा उपयोग

करून घ्यावा. ॥२१॥

भूमंडळीं लाहानथोर । सकळांस वन्हीचा आधार । अग्नीमुखें परमेश्वर । संतुष्ट होये ।।२२।।

पृथ्वीवरील लहानमोठ्या जीवसृष्टीला अग्नीचा आधार आहे. अग्नीत घातलेल्या हविर्द्रव्याने यज्ञदेवता संतुष्ट होते. ॥२२॥

ऐसा अग्नीचा महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा । उत्तरोत्तर अगाध महिमा । अग्नीपुरुषाचा ।।२३।।

असा हा अग्नीपुरुषाचा अगाध महिमा सांगावा तेवढा थोडा आहे. कितीही सांगता येईल. ॥२३॥

जीत असतां सुखी करी । मेल्यां प्रेत भस्म करी । सर्वभक्षकु त्याची थोरी । काये म्हणोनि सांगावी ।।२४।।

माणूस जिवंत असताना अग्नी त्याला हरप्रकारे सुखी करतो व मेल्यावर जाळून भस्मही करतो. अशा सर्वभक्षक अग्नीचे माहात्म्य किती म्हणून सांगावे? ॥२४॥

सकळ सृष्टीचा संव्हार । प्रळय करी वैश्वानर । वैश्वानरे पदार्थमात्र । कांहींच उरेना ।।२५।।

अग्निप्रळय झाल्यानंतर सृष्टीचा संहार होऊन तिचा मागमूसही राहत नाही. ॥२५॥

नाना होम उदंड करिती । घरोघरीं वैशदेव चालती । नाना क्षेत्रीं दीप जळती । देवापासीं ।।२६।।

घरोघर चालणारे होम व वैश्वदेव अग्नीसाठी असतात. कित्येक तीर्थक्षेत्रातील देवापाशी नंदादीप तेवतात. ॥२६॥

दीपाराधनें निलांजनें । देव वोवाळिजे जनें । खरें खोटें निवडणें । दिव्य होतां ।।२७।।

कापूर, नीरांजने इ. ओवाळून भक्त देवाची आराधना करतात. तापलेल्या लोखंडाला स्पर्श करून आरोपीच्या अपराधाची शहानिशा करतात. (पहा छांदो. उप. तत्त्वमसि प्रकरण किंवा सीतेचे अग्निदिव्य) ॥२७॥

अष्टधा प्रकुर्ती लोक तिन्ही । सकळ व्यापून राहिला वन्ही । अगाध महिमा वदनीं । किती म्हणोनी बोलावा ।।२८।।

अष्टधा प्रकृतीची जीवसृष्टी व अचेतन पांचभौतिक सृष्टी या सर्वांना अग्नी व्यापून राहतो. त्याचे अगाध माहात्म्य किती सांगावे? ॥२८॥

च्यारी श्रृंगे त्रिपदीं जात । दोनी शिरें सप्त हात । ऐसा बोलिला शास्त्रार्थ । प्रचितीविण ।।२९।।

अग्निदेवाला चार शिंगे, तीन पाय, दोन डोकी व सात हात आहेत असे शास्त्र अनुभवपूर्वक सांगते. (काली, कराली इ. प्रकारे अग्नीच्या सात जिभांचेही वर्णन मुंडक उपनिषदात आहे. हे सर्व वर्णन रूपकात्मक आहे. गार्हपत्यादी चार अग्नी ही चार शिंगे, स्वर्गादी तीन पाय इ.) ॥२९॥

ऐसा वन्ही उष्णमूर्ती । तो मी बोलिलों येथामती । न्यून्यपूर्ण क्षमा श्रोतीं । केलें पाहिजे ।।३०।।

उष्णता हे स्वरूप असलेल्या अग्नीचे मी माझ्या बुद्धीनुसार वर्णन केले. काही कमीजास्त झाले असल्यास श्रोत्यांनी क्षमा करावी. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अग्निनिरूपणनाम' समास पाचवा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'अग्निनिरूपण' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक सोळावा : सप्ततिन्वयाचा

समास सहावा : वायोस्तवन

॥ श्रीराम समर्थ ॥

धन्य धन्य हा वायदेव । याचा विचित्र स्वभाव । वायोकरितां सकळ जीव । वर्तती जनीं ।। १ ।।

वायुदेव खरोखर धन्य आहे. गतिमानता हे त्याचे वैशिष्ट्य असून प्राणरूप वायुमुळे प्राणी जिवंत राहतात. ॥१॥

वायोकरितां श्वासोश्वास । नाना विद्यांचा अभ्यास । वायोकरितां शरीरास । चळण घडे ।। २ ।।

श्वासोच्छ्वासातून वायूची फुफ्फुसात ये-जा होते. विद्याभ्यासासाठी वायूच्या साहाय्याने जळणाऱ्या दिव्याची मदत होते. शरीराच्या सर्व हालचाली प्राणरूप वायूने होतात. ॥२॥

चळण वळण प्रासारण । निरोधन आणी आकोचन । प्राण अपान व्यान उदान । समान वायु ।। ३ ।।

हालणे, गती, पसरणे, आवरून धरणे व आकुंचन या शरीरातील क्रिया वायूने होतात. प्राण, अपान, व्यान, समान व उदान असे मुख्य पंचप्राण आहेत. ॥३॥

नाग कूर्म कर्कश वायो । देवदत्त धनंजयो । ऐसे हे वायोचे स्वभावो । उदंड असती ।।४।।

नाग, कूर्म, उत्कल, देवदत्त व धनंजय हे पाच उपप्राण आहेत. त्यांची कार्ये (स्वभाव) वेगळी आहेत. ॥४॥

वायो ब्रह्मांडीं प्रगटला । ब्रह्मांडदेवतांस पुरवला । तेथुनी पिंडीं प्रगटला । नाना गुणें ।।५।।

प्रथम वायू आकाशात अकस्मात निर्माण झाला व त्याने ब्रह्मांडातील देवतांच्या हालचाली सुरू झाल्या. हा सूत्रवायू पुढे अध्यात्मवायूच्या रूपाने प्राण्यांच्या देहात शिरला व अनेक कार्ये करू लागला. ॥५॥

स्वर्गलोकीं सकळ देव । तैसेचि पुरुषार्थी दानव । मृत्यलोकीचे मानव । विख्यात राजे ।।६।।

नरदेहीं नाना भेदे । अनंत भेदाचीं श्वापदें । वनचरें जळचरें आनंदें । क्रीडा करिती ।।७।।

त्या समस्तांमध्यें वायु खेळे । खेचरकुळ अवघें चळे । उठती वन्हीचे उबाळे । वायोकरितां ।।८।।

स्वर्गातील सर्व देव, पराक्रमी दानव, पृथ्वीवरील प्रसिद्ध राजे व सामान्य माणसे, माणसांचे अनेक प्रकार, नाना श्वापदे, वनातील प्राणी, जळचर ही सर्व वायूंच्या आधाराने, सुखाने जीवन जगतात. या सर्वांत वायू खेळतो. पक्षी हवेत उडतात व वणवा भडकतो तो वायूच्या सामर्थ्यानेच! ॥६-८॥

वायो मेघाचें भरण भरी । सवेंच पिटून परतें सारी । वायो ऐसा कारबारी । दुसरा नाहीं ।।९।।

वायू आकाशात बाष्प एकत्र करून ढग तयार करतो व लगेच ते मोडूनही टाकतो. म्हणून वायूप्रमाणे या जगाला दुसरा कारभारी नाही. ॥९॥

परी ते आत्मयाची सत्ता । वर्ते शरीरी तत्त्वता । परी व्यापकपणें या समर्था । तुळणा नाहीं ।।१०।।

खरे तर वायूचा कारभार आत्म्याच्या नियमनाखाली चालतो व तो शरीरात व्यापून असतो. तरी आत्मा व आकाशानंतर वायूसारखे व्यापक तत्त्व नाही. ॥१०॥

गिरीहून दाट फौजा । मेघ उठिले लोककाजा । गर्जगर्जो तडक विजा । वायोबळें ।।११।।

लोकोपकारासाठी डोंगराहून मोठे ढग आकाशात गोळा होऊन भयंकर विजा चमकून मेघगर्जना होते. हे सर्व

वायूच्या सामर्थ्याने होते.॥११॥

चंद्र सूर्य नक्षत्रमाळा । ग्रहमंडळे मेघमाळा । ये ब्रह्मांडीं नाना कळा । वायोकरितां ।।१२।।

या ब्रह्मांडामध्ये चंद्र, सूर्य, नक्षत्रे, ग्रह इ. ज्योती वायूमुळे गतिमान होतात. ढगांचे थवे वायूनेच गोळा होतात. ॥१२॥

येकवटलें तें निवडेना । कालवलें तें वेगळें होयेना । तैसें हे बेंचाड नाना । केवी कळे ।।१३।।

वायूच्या सामर्थ्याने घडून आलेले महाभूतांचे पंचीकरण आता सुटे करता येत नाही. म्हणून या पंचीकरणाचा गुंता लक्षात येणे अतिकठीण आहे. ॥१३॥

वायो सुटे सरारां । असंभाव्य पडती गारा । तैसे जीव हे नीरा- । सरिसे पडती ।।१४।।

भयंकर वादळ होऊन पावसाबरोबर जशा गारा पडतात त्याप्रमाणे पावसाच्या थेंबातून नाना जीव या सृष्टीत पडतात. (पितृलोकातून अनुशयी जीव आपांबरोबर पृथ्वीवर जन्म घेतात असे शास्त्र सांगते.) ॥१४॥

वायुरूपें कमळकळा । तोचि आधार जळा । तया जळाच्या आधारें भूगोळा । शेषें धरिलें ।।१५।।

ब्रह्मदेव राहतो त्या वायुरूप कमळाचा पाण्याला आधार आहे. त्या पाण्याचे आधारे शेष पृथ्वीला तोलून धरतो. ॥१५॥

शेषास पवनाचा आहार । आहारें फुगे शरीर । तरी मग घेतला भार । भूमंडळाचा ।।१६।।

शेष वायूभक्षण करतो. त्याने त्याचे शरीर फुगून पृथ्वीचे ओझे सहन करण्याची त्याला शक्ती येते. ॥१६॥

माहांकूर्माचें शरीर भलें । नेणों ब्रह्मांड पालथें घातलें । येवढें शरीर तें राहिलें । वायोचेनी ।।१७।।

श्री विष्णूच्या कूर्मावताराचे प्रचंड शरीर वायूमुळे तयार होऊन त्याने पृथ्वीला पाठीवर घेता आले. ॥१७॥

वाराहें आपुलें दंतीं । पृथ्वी धरिली होती । तयाची येवढी शक्ती । वायुबळें ।।१८।।

वराह अवतारात वायूच्या सामर्थ्याने एका दातावर त्याला पृथ्वीला उचलून धरता आले. ॥१८॥

ब्रह्मा विष्णु महेश्वर । चौथा आपण जगदेश्वर । वायोस्वरूप विचार । विवेकी जाणती ।।१९।।

ब्रह्मदेव, विष्णू व महेश्वरानंतर चौथा जगदीश म्हणजेच वायू हे जाणकार जाणतात. ॥१९॥

तेतिस कोटी सुरवर । अठ्यासी सहश्र ॠषेश्वर । सिध योगी भारेंभार । वायोकरितां ।।२०।।
नव कोटी कात्यायणी । छेपन कोटी च्यामुंडिणी । औट कोटी भूतखाणी । वायोरूपें ।।२१।।
भूतें देवतें नाना शक्ती । वायोरूप त्यांच्या वेक्ती । नाना जीव नेणो किती । भूमंडळीं ।।२२।।
पिंडी ब्रह्मांडीं पुरवला । बाहेर कंचुकास गेला । सकळां ठाईं पुरवला । समर्थ वायु ।।२३।।

तेहेतीस कोटी देव, अठ्यांऐंशी हजार थोर ऋषी, अगणित सिद्धयोगी वायूच्याच सामर्थ्याने उत्पन्न झाले. नऊ कोटी कात्यायनी, छपन्न कोटी चामुंडिणी, साडेतीन कोटी पिशाच्चांचे प्रकार वायुरूप असतात. भुते, दैवते, शक्ती यांची वायुरूपे आहेत. असे या पृथ्वीवर अगणित जीव आहेत. पिंड, ब्रह्मांड व त्याचे आवरण या सर्वांना वायू व्यापून आहे. असे त्याचे सामर्थ्य आहे. ॥२०-२३॥

ऐसा हा समर्थ पवन । हनुमंत जयाचा नंदन । रघुनाथस्मरणीं तनमन । हनुमंताचें ।।२४।।

अशा या सामर्थ्यसंपन्न वायूचा हनुमंत हा पुत्र असून तो तन व मनाने श्रीरामाच्या स्मरणांत तल्लीन असतो. ॥२४॥

हनुमंत वायोचा प्रसीध । पित्यापुत्रांस नाहीं भेद । म्हणोनि दोघेहि अभेद । पुरुषार्थविषीं ।।२५।।

हनुमंत हा वायूचा प्रसिद्ध पुत्र असून (वायुसुत) ते दोघे पराक्रमाचे बाबतीत अगदी सारखे आहेत. ॥२५॥

हनुमंतास बोलिजे प्राणनाथ । येणें गुणें हा समर्थ । प्राणेंविण सकळ वेर्थ । होत जातें ।। २६ ।।

हनुमंताला 'प्राणनाथ' असे म्हणतात व ते अगदी यथार्थ आहे. प्राणावाचून सर्वच व्यर्थ होते. ॥२६॥

मागें मृत्य आला हनुमंता । तेव्हां वायो रोधला होता । सकळ देवांस आवस्ता । प्राणांत मांडलें ।। २७ ।।

बाल हनुमन्ताने सूर्य गिळण्याचा पराक्रम केला तेव्हा इंद्राने त्याच्या हनुवटीवर वज्र मारल्याने तो बेशुद्ध झाला. त्याचा क्रोध येऊन वायूने स्वत:ला रोधून ठेविल्याने सर्व देवांचे प्राण कासावीस झाले. ॥२७॥

देव सकळ मिळोन । केलें वायूचें स्तवन । वायो प्रसन्न होऊन । मोकळें केलें ।। २८ ।।

मग सर्व देवांनी वायूदेवाची प्रार्थना केल्यावर तो प्रसन्न होऊन त्याने स्वत:ला पुन्हा सक्रिय केले. ॥२८॥

म्हणोनि प्रतापी थोर । हनुमंत ईश्वरी अवतार । याचा पुरुषार्थ सुरवर । पाहातचि राहिले ।। २९ ।।

अशा पराक्रमी पित्याचा पुत्र असल्याने हनुमानही महाप्रतापी झाला. श्री. शंकरांचा अवतार असलेल्या हनुमानाचे अचाट पराक्रम पाहून देवही आश्चर्याने थक्क झाले. ॥२९॥

देव कारागृहीं होते । हनुमंतें देखिलें अवचितें । संव्हार करूनी लंकेभोंवतें । विटंबून पाडिलें ।। ३० ।।

रावणाने देवांना तुरुंगात टाकल्याचे पाहून हनुमन्ताने लंकेचा संहार करून राक्षसांची धूळधाण केली व त्यांची प्रेते लंकेभोवती अस्ताव्यस्त टाकली. ॥३०॥

उसिणें घेतलें देवांचें । मूळ शोधिलें राक्षसांचें । मोठें कौतुक पुछयकेताचें । आश्चीर्य वाटे ।। ३१ ।।

देवांच्या अपमानाचे उट्टे काढले, राक्षसांचा समूळ नायनाट केला. या पराक्रमी शेपूटधारी वानराच्या पराक्रमाचे खरोखर नवल वाटते. ॥३१॥

रावण होता सिंह्यासनावरी । तेथें जाऊन ठोंसरे मारी । लंकेमधें निरोध करी । उदक कैचें ।। ३२ ।।

सिंहासनावर बसलेल्या रावणाला बदडून काढले. लंकेत वायूचा निरोध करून पाणी आटवले. ॥३२॥

देवास आधार वाटला । मोठा पुरुषार्थ देखिला । मनामधें रघुनाथाला । करुणा करिती ।। ३३ ।।

त्याचा पराक्रम पाहून देवांना मोठा आधार मिळाला. त्यांनी मनोमनी श्रीरामाच्या करुणेची स्तुती केली. ॥३३॥

दैत्य आवघे संव्हारिले । देव तत्काळ सोडिले । प्राणीमात्र सुखी जाले । त्रयलोक्यवासी ।। ३४ ।।

सर्व राक्षसांचा संहार करून देवांची सुटका केली व त्रैलोक्यातील प्राण्यांना सुखी केले. ॥३४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'वायोस्तवननिरूपणनाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'वायोस्तवन' नावाचा सहावा समास समाप्त

दशक सोळावा : सप्ततिन्वयाचा

समास सातवा : महद्भूतनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

पृथ्वीचें मूळ जीवन । जीवनाचें मूळ अग्न । अग्नीचें मूळ पवन । मागां निरोपिलें ।।१।।

पृथ्वी पाण्यापासून, पाणी अग्नीपासून व अग्नी वायूपासून निर्माण झाला हे आधी सांगितले आहेच. ॥१॥

आतां ऐका पवनाचें मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ । अत्यंतचि चंचळ । सकळांमधें ।।२।।

आता वायू कोणापासून झाला ते ऐका. अंतरात्म्यापासून वायू झाला. हा अंतरात्मा जणू सर्वाहून अत्यंत चपळ किंवा चंचळ आहे. ॥२॥

तो येतो जातो दिसेना । स्थिर होऊन बैसेना । ज्याचें रूप अनुमानेना । वेदश्रुतीसी ।।३।।

अष्टधा प्रकृतीमधील त्याचा प्रवेश व निकास दोन्ही कळत नाहीत. तरी तो निष्क्रीय (स्थिर) आहे, असेही म्हणता येत नाही. वेद व उपनिषदांना त्याचा अंदाजच करावा लागतो. (अंतरात्मा म्हणजे ईश्वराचा अपरोक्ष अनुभव येत नाही. शास्त्र व तर्काने तो स्वीकारावा लागतो.) ॥३॥

मुळीं मुळींचे स्फुर्ण । तेंचि अंतरात्म्याचें लक्षण । जगदेश्वरापासून त्रिगुण । पुढें जाले ।।४।।

ब्रह्मस्वरूपाला झालेले मूळचे पहिले स्फुरण तोच अंतरात्मा. त्यानंतर अन्तरात्मारूप जगदीश्वरापासून त्रिगुण उत्पन्न झाले. (तो सक्रिय झाला.) ॥४॥

त्रिगुणापासून जालीं भूतें । पावलीं पष्ट दशेतें । त्या भूतांचें स्वरूप तें । विवेकें वोळखावें ।।५।।

नंतर त्या त्रिगुणांपासून सूक्ष्म व स्थूल पंचभूते निर्माण झाली. त्यांचे स्वरूप विचाराने जाणावे. ॥५॥

त्यामधें मुख्य आकाश । चौ भूतामधें विशेष । याच्या प्रकाशें प्रकाश । सकळ कांहीं ।।६।।

पंचभूतांत अतिसूक्ष्मत्व हा विशेष असलेले आकाश मुख्य आहे. त्यांतील चैतन्याच्या प्रकाशाने (ईश्वर) सर्व जग प्रकाशित होते. ॥६॥

येक विष्णु महद्भूत । ऐसा भूतांचा संकेत । परंतु याची प्रचीत । पाहिली पाहिजे ।।७।।

श्री विष्णू हे आकाशरूप अंतरात्म्याचे प्रगट रूप आहे असा पंचभूतांच्या विचाराचा संकेत आहे. या विष्णुरूप अंतरात्म्याचा प्रभाव प्रत्यक्ष पाहिला पाहिजे. (तो पुढील ओव्यांत सांगितला आहे.) ॥७॥

विस्तारें बोलिलीं भूतें । त्या भूतामधें व्यापक तें । विवरोन पाहातां येतें । प्रत्ययासी ।।८।।

भूतांसंबंधी सविस्तर केलेल्या विचारात आकाश हे सर्वांत व्यापक असल्याचे सूक्ष्म विचाराने कळते. ॥८॥

आत्मयाच्या चपळपणापुढें । वायो तें किती बापुडें । आत्म्याचें चपळपण रोकडें । समजोन पाहावें ।।९।।

अंतरात्म्याच्या क्रियाशीलतेपुढें वायू बिचारा अगदी फिका पडतो. त्या क्रियेचा अद्भुत प्रभाव प्रत्यक्षच समजावून घेऊ. (दुसऱ्या ओवीत वायू अंतरात्म्यापासून झाला असे म्हटले आहे. श्रुतीमध्ये वायू आकाशापासून होतो असे सांगितले आहे. त्यामुळे आकाश, अंतरात्मा व विष्णू हे तीन एकच ठरतात. जीवात्मा, अंतरात्मा, आत्मा, ईश्वर, परमेश्वर, आत्माराम इ. शब्द प्रत्येक ठिकाणी काटेकोरपणे वापरलेले नाहीत. त्यामुळे वाचक गोंधळण्याची शक्यता आहे –प्रस्तावना पाहावी. ॥९॥

आत्म्यावेगळें काम चालेना । आत्मा दिसेना ना आडळेना । गुप्तरूपें विचार नाना । पाहोन सोडी ।।१०।।

आत्म्याच्या सत्तेशिवाय पिंड ब्रह्मांडात एकही क्रिया घडत नाही. पण तो आत्मा ज्ञानेंद्रियांच्या आवाक्यात येत नाही व बुद्धीला कळत नाही. जीवात्मा स्वतः गुप्त राहून विचार करतो व सोडूनही देतो. (कर्तृत्व जीवाचे असते. आत्मा निष्क्रिय आहे.) ।।१०।।

पिंड ब्रह्मांड व्यापून धरिलें । नाना शरीरीं विळासलें । विवेकी जनासी भासलें । जगदांतरीं ।।११।।

आत्मा पिंड व ब्रह्मांडात व्यापून राहतो. सर्व शरीरांच्या सर्व हालचाली त्याच्या सत्तेवर चालतात. जीवन्मुक्तांना तो जगभर व्यापून असल्याचे जाणवते. ।।११।।

आत्म्याविण देहे चालती । हें तों न घडे कल्पांतीं । अष्टधा प्रकुर्तीच्या वेक्ती । रूपासी आल्या ।।१२।।

आत्म्याशिवाय देहाचे व्यापार चालणे कधीच शक्य नाही. आत्म्यामुळेच आकाशादी क्रमाने व गुणक्षोभिणीच्या माध्यमातून अष्टधा प्रकृतीची शरीरे तयार झाली. ।।१२।।

मुळापासून सेवटवरी । सकळ कांहीं आत्माच करी । आत्म्यापैलीकडे निर्विकारी । परब्रह्म ते ।।१३।।

जीवजडसृष्टीच्या उत्पत्तीपासून लयापर्यंत सर्व काही ईश्वरी योजनेनुसार होते. ईश्वराहून पलीकडे (सूक्ष्म, अधिष्ठान) परब्रह्म आहे. ।।१३।।

आत्मा शरीरीं वर्ततो । इंद्रियेंग्राम चेष्टवितो । नाना सुखदुःखें भोगितो । देह्यात्मयोगें ।।१४।।

आत्मा शरीरात व्यापून राहून सर्व इंद्रियांच्या व्यापारांचे अधिष्ठान बनतो. त्यांचेपासून अलिप्त राहतो. पण तोच आत्मा बुद्धीशी जणू तादात्म्य पावून जीवदशेला येऊन भोक्ता बनून सुख- दुःखांचे भोग भोगतो. (आत्मा साक्षी. ईश्वर नियामक, जीव भोक्ता.) ।।१४।।

सप्तकंचुक हें ब्रह्मांड । त्यामधें सप्तकंचुक पिंड । त्या पिंडामधें आत्मा जाड । विवेकें वोळखा ।।१५।।

ब्रह्मांडात पंचभूते व हिरण्यगर्भ आणि महत् व पिंडात पंचभूते व प्राण आणि बुद्धी असे सात घटक आहेत. त्यांतील पिंडात असलेला अति सूक्ष्म (जाड) आत्मा विवेकाने ओळखावा. ।।१५।।

शब्द ऐकोन समजतो । समजोन प्रत्योत्तर देतो । कठीण मृद सीतोष्ण जाणतो । त्वचेमधें ।।१६।।

शब्द ऐकून त्यांचा अर्थ कळणे, त्याला योग्य ते उत्तर देणे व त्वचेने कठीण, मऊ, शीत आणि उष्ण जाणून घेणे इ. गोष्टी जीवात्मा करतो. ।।१६।।

नेत्रीं भरोनी पदार्थ पाहाणें । नाना पदार्थ परीक्षणें । उंच नीच समजणें । मनामधें ।।१७।।

डोळ्यांच्या साह्याने पदार्थ पाहणे, अनेक वस्तू निरखून तपासून पाहणें व मनात श्रेष्ठ-कनिष्ठ भाव लक्षात घेणे ही कामे जीवात्मा करतो. ।।१७।।

क्रूरदृष्टी सौम्यदृष्टी । कपटदृष्टी कृपादृष्टी । नाना प्रकारींच्या दृष्टी । भेद जाणे ।।१८।।

डोळ्यांकडे पाहून त्यांतील क्रौर्य, सौम्यता, कपट, कृपा इ. भाव टिपण्याचे काम तोच करतो. ।।१८।।

जिव्हेमधें नाना स्वाद । निवडूं जाणे भेदाभेद । जें जें जाणें तें तें विशद । करुनी बोले ।।१९।।

जिभेने मधुरादी सहा रस कळणे, पदार्थातील भेद व अभेद जाणणें, जे समजले आहे, त्याचे स्पष्टीकरण करणे ही कार्यें त्याचीच. ।।१९।।

उत्तम अन्नाचे परिमळ । नाना सुगंध परिमळ । नाना फळांचे परिमळ । घ्राणइंद्रियें जाणे ।।२०।।

सुग्रास अन्नाचे स्वाद, अनेक प्रकारचे सुगंध, प्रत्येक फळाचा वेगळा गंध, नाकाच्या माध्यमातून तोच जाणतो. ।।२०।।

जिव्हेनें स्वाद घेणें बोलणें । पाणीइंद्रियें घेणें देणें । पादइंद्रियें येणें जाणें । सर्वकाळ ।।२१।।

जिभेने चव घेऊन बोलण्यांस मदत करणे हातांनी देणेघेणे व पायांनी येणे जाणे इ. क्रिया तोच सतत करतो. ॥२१॥

शिस्नइंद्रियें सुरतभोग । गुदइंद्रियें मळोत्सर्ग । मनेंकरूनी सकळ सांग । कल्पून पाहे ।।२२।।

जननेंद्रियाने संभोग, गुदद्वारे मलविसर्जन व मनाने संकल्पविकल्प तोच करतो. ॥२२॥

ऐसे व्यापार परोपरी । त्रिभुवनीं येकलाचि करी । त्याची वर्णावया थोरी । दुसरा नाहीं ।।२३।।

त्रिभुवनातील सर्व जीवांचे हे व्यापार ईश्वर चालवितो. (पिंडाचे व्यापार जीवात्मा तर ब्रह्मांडाचे व्यापार विश्वात्मा किंवा ईश्वर चालवितो.) तो सर्वश्रेष्ठ आहे. ॥२३॥

त्याविण दुसरा कैचा । जे महिमा सांगावा तयाचा । व्याप आटोप आत्मयाचा । न भूतो न भविष्यति ।।२४।।

तो कोणासारखा मोठा आहे हे सांगू म्हटले तर तसा कोणीच नाही! त्यासारखे अप्रतिहत सामर्थ्य व व्याप्ती जीवसृष्टीत कधीच नव्हती व पुढे असणारही नाही. ॥२४॥

चौदा विद्या चौसष्टी कळा । धूर्तपणाच्या नाना कळा । वेद शास्त्र पुराण जिव्हाळा । तेणेंविण कैचा ।।२५।।

जीवचैतन्याशिवाय चौदा विद्या, चौसष्ट कला, अनेक प्रकारचे बुद्धिवैभव, वेदशास्त्र व पुराणांची गोडी कोणाला असणे शक्य आहे? ॥२५॥

येहलोकींचा आचार । परलोकीं सारासारविचार । उभय लोकींचा निर्धार । आत्माच करी ।।२६।।

लौकिक जीवनासाठी आवश्यक ते आचारधर्म व मोक्षासाठी जरूर असलेला सारासार विचार जीवात्माच करतो. ॥२६॥

नाना मतें नाना भेद । नाना संवाद वेवाद । नाना निश्चय भेदाभेद । आत्माच करी ।।२७।।

अनेक मतांची मांडणी, भेद पोटभेद, अनेक कारणांनी होणारे संवाद व झडणारे वाद, अनेक प्रकारचे निश्चय, भेदाभेदवादासारखे तत्त्वज्ञान इत्यादी जीवात्म्यामुळेच होतात. ॥२७॥

मुख्य तत्व विस्तारलें । तेणें तयास रूप आणिलें । येणेकरितां सार्थक जालें । सकळ कांहीं ।।२८।।

सर्वत्र ब्रह्म भरून राहिले असून ईश्वराने सृष्टीची रचना करून अरूप ब्रह्माला रूप आणले. शिवाय ईशसृष्टीत जीवाने आपल्या सृष्टीची भर घातली. जीवाने ईश कृपेने ब्रह्म जाणले की त्याच्या जीवनाचे सार्थक होते. ॥२८॥

लिहिणें वाचणें पाठांतर करणें । पुसणें सांगणें अर्थ करणें । गाणें वाजवणें नाचणें । आत्म्याचकरितां ।।२९।।

लिहिणे, वाचणे, पाठ करणे, विचारणे, सांगणे, अर्थ लावणे, गाणें, वादन व नृत्य इ. सर्व जीवात्मा करतो. ॥२९॥

नाना सुखें आनंदतो । नाना दुःखें कष्टी होतो । देहे धरितो आणी सोडितो । नानाप्रकारें ।।३०।।

शब्दादी विषयांनी सुखी होणारा, प्रतिकूलतेने दुःखी होणारा, जन्ममरण भोगणारा जीवच आहे. ॥३०॥

येकलाचि नाना देहे धरी । येकलाचि नटे परोपरी । नट नाट्यकळा कुसरी । त्याविण नाहीं ।।३१।।

वासनामय जीव अनेक देह धारण करून नाना प्रकारे नटतो. नाट्य व अन्य कला व कौशल्ये त्याशिवाय नाहीत. ॥३१॥

येकलाचि जाला बहुरूपी । बहुरूपी बहुसाक्षपी । बहुरूपें बहुप्रतापी । आणी लंडी ।।३२।।

जीवात्मा वेगळ्या वेगळ्या शरीरांत वेगळे वेगळे स्वभाव दाखवतो. अत्यंत प्रयत्नशील व आळशी, अत्यंत पराक्रमी व पराकाष्ठेचा भित्रा तोच होतो! ॥३२॥

येकलाचि विस्तारला कैसा । पाहे बहुविध तमासा । दंपत्येंविण कैसा । विस्तारला ।।३३।।

एकाच मूळ संकल्पाचा हा प्रचंड व विविधतापूर्ण खेळ आहे. मूळ संकल्पाला पत्नी नसूनही एवढा मोठा विस्तार झाला! ।।३३।।

स्त्रियांस पाहिजे पुरुष । पुरुषासी पाहिजे स्त्रीवेष । ऐसा आवडीचा संतोष । परस्परें ।।३४।।

व्यवहारामध्ये पुरुषाला स्त्री व स्त्रीला पुरुष एकमेकांना संतुष्ट करण्यासाठी हवे असतात. ।।३४।।

स्थूळाचें मूळ ते लिंग । लिंगामधें हें प्रसंग । येणें प्रकारें जग । प्रत्यक्ष चाले ।।३५।।

जनजीवनाच्या स्थूल क्षेत्रात स्थूल लिङ्गाचेच महत्त्व असून स्त्री व पुरुष यांचेमुळे जगातील जीवसृष्टीचे सातत्य टिकून आहे हे स्पष्ट दिसते. ।।३५।।

पुरुषांचा जीव स्त्रियांची जीवी । ऐसी होते उठाठेवी । परी या सूक्ष्माची गोवी । समजली पाहिजे ।।३६।।

पुरुषशरीरात जीव व स्त्रीशरीरात जीवी असते असे अज्ञानाने वाटते. पण सूक्ष्म मूलतत्त्व लिङ्गरहित आहे हे रहस्य लक्षात घेतले पाहिजे. ।।३६।।

स्थूळाकरितां वाटे भेद । सूक्ष्मी आवघेंचि अभेद । ऐसें बोलणें निरुध । प्रत्यया आलें ।।३७।।

स्थूळ शरीरांमुळे लिङ्गभेद जाणवतो. सूक्ष्मात तो नसतो. हे बोलणें शंका न येता कळण्यासारखे आहे. ।।३७।।

बायकोनें बायकोस भोगिलें। ऐसें नाही कीं घडलें। बायकोस अंतरी लागलें। ध्यान पुरुषाचें।।३८।।

स्त्रीला स्त्रीशी खऱ्या अर्थानें संभोग घडत नाही. तिला त्यासाठीं पुरुषाचीच मनात तीव्र गरज वाटते.।।३८।।

स्त्रीसी पुरुष पुरुषास वधु। ऐसा आहे हा समंधु। याकारणें सूक्ष्म संवादु। सुक्ष्मीं च आहे।।३९।।

स्थूल व्यवहारात स्त्रीला पुरुष व पुरुषाला स्त्रीचा संबंध हवा असतो. पण सूक्ष्मात; सूक्ष्म घटनाक्रम काम करतो. (ईक्षणाने जग निर्माण होते.)।।३९।।

पुरुषइछेमधें प्रकृती । प्रकृतीमधें पुरुषवेक्ती । प्रकृतीपुरुष बोलती । येणें न्यायें ।।४०।।

पुरुषरूप ब्रह्माच्या मूळ संकल्पात मूळमायांतर्गत प्रकृती असते. प्रकृतीत पुरुषाचा प्रवेश असतो. म्हणून 'प्रकृतिपुरुष' अशा जोडशब्दाच्या भाषेत बोलतात. ।।४०।।

पिंडावरून ब्रह्मांड पाहावें । प्रचीतीनें प्रचीतीस घ्यावें । उमजेना तरी उमजावें । विवराविवरों ।।४१।।

शरीररूप पिंडावरून ब्रह्मांडाचा अंदाज बांधावा. हळूहळू अंदाजाचे रूपांतर निश्चयात करून घ्यावे. असा निश्चय होत नसेल तर सतत मनन-चिंतनाने ते समजावून घ्यावे. ।।४१।।

द्वैतइछा होते मुळीं । तरी ते आली भूमंडळीं । भूमंडळीं आणी मुळीं । रुजु पाहावें ।।४२।।

'बहुस्याम' या मूळ संकल्पात द्वैताची इच्छा होती. त्यामुळे तीच इच्छा पृथ्वीवरील जीवसृष्टीतही उतरली. (जीवालाही बहु व्हावेसे वाटू लागले.) मूळ संकल्प व पृथ्वीवरील जीवांचा संकल्प यांतील ऐक्य जाणावे. ।।४२।।

येथें मोठा जाला साक्षेप । फिटला श्रोतयांचा आक्षेप । जे प्रकृतीपुरुषाचें रूप । निवडोन गेलें ।।४३।।

या विवेचनाच्या मोठ्या खटपटीने प्रकृती व पुरुष यांच्या स्वरूपाचा निवाडा होऊन श्रोत्यांच्या शंकेचे समाधान झाले. ।।४३।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'महद्भूतनिरूपणनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'महद्भूतनिरूपण' नावाचा सातवा समास समाप्त

दशक सोळावा : सप्ततिन्वयाचा

समास आठवा : आत्मारामनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

नमूं गणपती मंगळमूर्ती । जयाचेनि मतिस्फूर्ती । लोक भजती स्तवन करिती । आत्मयाचें ।।१।।

ज्याच्या कृपेने बुद्धीत प्रतिभा जागी होते, त्या मंगलमूर्ती श्रीगणेशाला मी वंदन करतो. 'त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि' अशा प्रकारे लोक त्याचे आत्मबुद्धीने स्तवन करून त्याची भक्ती करतात. ॥१॥

नमूं वैखरी वागेश्वरी । अभ्यांतरीं प्रकाश करी । नाना भरोवरी विवरी । नाना विद्या ।।२।।

चारी वाणीत श्रेष्ठ असलेल्या वैखरीला वंदन करू. तीच अनेक विद्यांचा पुरेपूर उलगडा करून बुद्धीत ज्ञानरूप प्रकाश करते. (परा, पश्यन्ती व मध्यमेतील ज्ञान सुप्त असल्याने त्या वाणी सूक्ष्म असल्यातरी इतरांना त्यांचा उपयोग होत नाही. म्हणून ज्ञानदानासाठी वैखरीच श्रेष्ठ होय.) ॥२॥

सकळ जनामधें नाम । रामनाम उत्तमोत्तम । श्रम जाउनी विश्राम । चंद्रमौळी पावला ।।३।।

मनुष्यमात्रासाठी भगवन्नामाचा मोठा आधार असून त्यात रामनाम सर्वांत उत्तम आहे. प्रत्यक्ष शंकराला सुद्धा रामनामाने विषाचा दाह सोसण्याचे सामर्थ्य येऊन शांती लाभली. ॥३॥

नामाचा महिमा थोर । रूप कैसें उत्तरोत्तर । परात्पर परमेश्वर । त्रयलोक्यधर्ता ।।४।।

नाममाहात्म्य फार मोठे आहे. मूर्तीसारख्या स्थूलरूपापासून, स्वरूपापर्यंत त्याचा उत्तरोत्तर विकास होतो. त्रैलोक्याचा स्वामी परमेश्वर व श्रेष्ठात श्रेष्ठ असलेले ब्रह्म हे नामी नाममय आहेत. (मूर्तिरूप राम, सगुण साकार श्रीराम, ईश्वररूप राम व ब्रह्मरूप राम या क्रमाने रामनामाचा विकास आहे. राम हे नाम व त्याचे चार नामी यांत अभेद आहे, हे लक्षात घेऊन नामसाधकाने नामाच्या माध्यमातून नामीशी ऐक्य साधावे. आत्मनिवेदन भक्ती साधावी.) ॥४॥

आत्माराम चहुंकडे । लोक वावडे जिकडे तिकडे । देहे पडे मृत्य घडे । आत्मयाविण ।।५।।

सर्व लोकांचा जिकडे वावर असतो तिकडे सर्वत्र आत्मा व्यापून आहे. जीवात्म्याने शरीर सोडले की ते पडते व मरते. (जिवंत व मृत शरीरात व्यापक आत्मा असतो. तो येत जात नाही. जीव येतो व जातो.) ॥५॥

जीवात्मा शिवात्मा परमात्मा । जगदात्मा विश्वात्मा गुप्तात्मा । आत्मा अंतरात्मा सूक्ष्मात्मा । देवदानवमानवीं ।।६।।

देव, दानव व मानव यांच्या आत्म्याचे बाबतीत बोलताना जीवात्मा, शिवात्मा, परमात्मा, जगदात्मा, गुप्तात्मा, आत्मा, अंतरात्मा, सूक्ष्मात्मा इ. शब्द वापरतात. ॥६॥

सकळ मार्ग चालती बोलती । अवतारपंगतीची गती । आत्म्याकरितां होत जाती । ब्रह्मादिक ।।७।।

आत्मा आहे म्हणून आत्मज्ञानाचे सगळे मार्ग चालू आहेत. त्यामुळेच अवतारांची मालिका होते व ब्रह्मदेवादी होऊन जातात. ॥७॥

नादरूप जोतीरूप । साक्षरूप सत्तारूप । चैतन्यरूप सस्वरूप । द्रष्टारूप जाणिजे ।।८।।

नरोत्तमु वीरोत्तमु । पुरुषोत्तमु रघोत्तमु । सर्वोत्तमु उत्तमोत्तमु । त्रयलोक्यवासी ।।९।।

नादरूप, ज्योतीरूप, साक्षरूप, सत्तारूप, चैतन्यरूप, सस्वरूप, द्रष्टारूप, नरोत्तम, वीरोत्तम, पुरुषोत्तम, रघोत्तम,

सर्वोत्तम, उत्तमोत्तम, त्रैलोक्य व्यापक इ. नावे आत्म्याचीच आहेत. (नाद व ज्योती ही नामे आलंबनात्मक आहेत. साक्षपासून द्रष्टापर्यंत नामे निर्गुण, वाचक असून नरोत्तमापासून उत्तमोत्तमापर्यन्तची नामे सगुणसाकार श्रीरामाची आहेत. त्रैलोक्यवासी ईश्वर आहे.) ॥८-९॥

नाना खटपट आणी चटपट । नाना लटपट आणि झटपट । आत्मा नस्तां सर्व सपाट । चहुंकडे ।।१०।।

जीवाकडून होणारे सर्व प्रयत्न, कार्यक्षमता, गडबड व घाई इ. आत्मा नसेल तर शक्य नाही. सर्वत्र सामसूम होईल! ॥१०॥

आत्म्याविण वेडें कुडें । आत्म्याविण मडें बापुडें । आत्म्याविण थडें रोकडें । शरीराचें ।।११।।

जीवात्मा जाताच शरीर वेडेवाकडे बनते व त्या अचेतनाला मढे म्हणतात. शरीर जणू त्या जीवात्म्याचे साक्षात थडगे होते. ॥११॥

आत्मज्ञानी समजे मनीं । पाहें जनीं आत्मयालागुनी । भुवनी अथवा त्रिभुवनीं । आत्म्याविणें वोस ।।१२।।

जीवन्मुक्त हे मनोमन जाणून असतो की सर्व जीवसृष्टीत आत्मा व्यापून आहे. या पृथ्वीवर किंवा त्रिभुवनातही आत्मा नसेल तर सर्व ओसाड होईल. ॥१२॥

परम सुंदर आणि चतुर । जाणे सकळ सारासार । आत्म्याविण अंधकार । उभय लोकीं ।।१३।।

जीव हे तत्त्व सहजच शुद्ध व विवेकी असल्याने त्याला सर्व प्रकारचा सार व असार यांचा विवेक असतो. (रजतमांच्या प्रभावामुळे तो मावळतो.) साररूप आत्म्याशिवाय सर्वत्र अज्ञानाचा अंधार असतो. ॥१३॥

सर्वांगीं सिध सावध । नाना भेद नाना वेध । नाना खेद आणी आनंद । तेणेंचिकरितां ।।१४।।

तो सतत सर्वांगाने प्रतिक्रियेसाठीं तयार (सिद्ध) व सावध असतो. सर्व प्रकारची विविधता, ध्यास, दुःख व सुख इत्यादी त्यालाच असतात. (ईश्वर व आत्मा असे असणे शक्य नाही.) ॥१४॥

रंक अथवा ब्रह्मादिक । येकचि चालवी अनेक । पाहावा नित्यनित्यविवेक । कोण्हीयेकें ।।१५।।

रंकापासून ब्रह्मदेवापर्यंत जीव व देवांचे सर्व व्यापार परमेश्वराच्या नियमनाखाली चालतात. नित्यानित्यविवेक केला तर हे कोणाच्याही लक्षात येईल. ॥१५॥

ज्याचें घरीं पद्मिणी नारी । आत्मा तंवरी आवडी धरी । आत्मा गेलियां शरीरीं । तेज कैचें ।।१६।।

कोणाच्या घरी पद्मिनीसारखी अतिसुंदर पत्नी असली तरी ती जिवंत (सजीव) असेपर्यंतच त्याला प्रिय असते. जीव गेल्यावर तिची अंगकांती नष्ट होते. ॥१६॥

आत्मा दिसेना ना भासेना । बाह्यात्कारें अनुमानेना । नाना मनाच्या कल्पना । आत्मयाचेनी ।।१७।।

आत्मा दिसत नाही, कळत नाही. तो अरूप असल्याने त्याला आकार नाही. म्हणून बाह्य आकारावरून त्याचा अंदाज करता येत नाही. हे सर्व अंदाज त्याच्याच सत्तेवर चालतात. ॥१७॥

आत्मा शरीरीं वास्तव्य करी । अवघें ब्रह्मांड विवरी भरी । वासना भावना परोपरीं । किती म्हणोनी सांगाव्या ।।१८।।

आत्मा जणू देहबुद्धी धरून शरीरात राहतो तेव्हा ब्रह्मांडाला पुरून उरतील एवढ्या कल्पना करतो. त्या त्या देहातील बुद्धीच्या वासनांचे व भावनांचे किती प्रकार सांगावेत? ॥१८॥

मनाच्या अनंत वृत्ती । अनंत कल्पना धरिती । अनंत प्राणी सांगों किती । अंतर त्यांचें ।।१९।।

मनाच्या अगणित वृत्ती (संकल्प) असतात व त्यामुळे ते अनंत कल्पना करते. जगात असंख्य प्राणी असून त्यांच्या कल्पनांचे प्रकार कसे सांगता येतील? ॥१९॥

अनंत राजकारणें धरणें । कुबुधी सुबधी विवरणें । कळों नेदणें चुकावणें । प्राणीमात्रासी ।।२०।।

अनेक डाव व प्रतिडावांची योजना करणे, सद्बुद्धी व दुर्बुद्धीतील फरक जाणणे, कोणाला कळू न देता व सर्वांना चुकवून काही करणे इ. सर्व जीवात्मा करतो. ॥२०॥

येकास येक जपती टपती । येकास येक खपती लपती । शत्रुपणाची स्थिती गती । चहुंकडे ।।२१।।

कोणी कोणाला जपतात तर कोणी दुसऱ्यावर टपून बसतात. कोणी कोणाला खपवून घेतात तर दुसऱ्यापासून दडून बसतात. कोणी कोणाचे शत्रुत्व करतो. ते सर्व जीव करतो. ॥२१॥

पृथ्वीमधें परोपरीं । येकास येक सिंतरी । कित्तेक भक्त परोपरीं । परोपकार करिती ।।२२।।

या जगात कोणी इतरांना फसवीतच राहतात तर भक्त सतत लोकोपकार करतात. हे दोन्ही जीवच असतात. ॥२२॥

येक आत्मा अनंत भेद । देहेपरत्वें घेती स्वाद । आत्मा ठाईंचा अभेद । भेद हि धरी ।।२३।।

आत्मतत्त्व एकच असले तरी उपाधीमुळे त्यात अगणित भेद असतात. त्या त्या देहाचे भोग जीव भोगतो. म्हणून आत्मा तत्त्वत: एक व उपाधीमुळे भेदांनी भरलेला वाटतो. ॥२३॥

पुरुषास स्त्री पाहिजे । स्त्रीस पुरुष पाहिजे । नवरीस नवरी पाहिजे । हें तों घडेना ।।२४।।

जीवदृष्टीने पुरुषाला स्त्री व स्त्रीला पुरुष हवा असतो. स्त्रीला भोगांसाठी स्त्री चालत नाही. ॥२४॥

पुरुषाचा जीव स्त्रियांची जीवी । ऐसी नाहीं उठाठेवी । विषयसुखाची गोवी । तेथें भेद आहे ।।२५।।

तत्त्वत: पुरुषाचा जीव व स्त्रीची जीवी असे नाही. मात्र संभोगसुखासाठी असा भेद आवश्यक आहे. ॥२५॥

ज्या प्राण्यास जो आहार । तेथेंचि होती तत्पर । पशूचे आहारीं नर । अनादरें वर्तती ।।२६।।

ज्या प्राण्याचे जे अन्न नियोजित आहे, तिकडेच त्याची प्रवृत्ती होते. माणूस पशूचा आहार कधीच घेत नाही. ॥२६॥

आहारभेद देहेभेद । गुप्त प्रगट उदंड भेद । तैसाचि जाणावा आनंद । वेगळाला ।।२७।।

प्राण्यांमध्ये आहार व देहामुळे अनेक भेद आहेत. असेच स्पष्ट व न कळणारे कित्येक भेद आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येकाची सुखाची कल्पनाही वेगळी असते. ॥२७॥

सिंधु भूगर्भींचीं नीरें । त्या नीरामधील शरीरें । आवर्णोदकाचीं जळचरें । अत्यंत मोठी ।।२८।।

लहान सामुद्रधुनी व भूगर्भातील पाणी यांत लहान जलचर असतात. तर पृथ्वीभोवतीच्या सागरात प्रचंड प्राणी राहतात. ॥२८॥

सूक्ष्म दृष्टीं आणितां मना । शरीराचा अंत लागेना । मा तो अंतरात्मा अनुमाना । कैसा येतो ।।२९।।

सावयव दृश्य शरीरात कितीही सूक्ष्म दृष्टीने पाहिले तरी त्याच्या स्वरूपाचे पूर्ण आकलन होत नाही. मग निरवयव व स्वसंवेद्य आत्म्याचे ज्ञान किती कठीण असेल! ॥२९॥

देह्यात्मयोग शोधून पाहिला । तेणें कांहीं अनुमानला । स्थूळसूक्ष्माचा गलबला । गथागोवी ।।३०।।

चेतन आत्मा व अचेतन शरीर यांच्या कल्पित संबंधाची विचाराने थोडी कल्पना येते. वेदान्तशास्त्राचा विचार नसेल तर स्थूल व सूक्ष्माच्या संयोगाचा गोंधळ संपत नाही. गुंता सुटत नाही. ॥३०॥

गथागोवी उगवाव्याकारणें । केलीं नाना निरूपणें । अंतरात्मा कृपाळुपणें । बहुतां मुखें बोलिला ।।३१।।

हा गुंता सुटून गोंधळ संपावा म्हणून वेदान्तशास्त्रकारांनी अनेक रचना केल्या. ईश्वरच त्यांच्या मुखाने कृपाळू झाला. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आत्मारामनिरूपणनाम' समास आठवा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आत्मारामनिरूपण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक सोळावा : सप्ततिन्वयाचा

समास नववा : नानाउपासनानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

पृथ्वीमधें लोक नाना । त्यास नाना उपासना । भावार्थें प्रवर्तले भजना । ठाईं ठाईं ।।१।।

पृथ्वीवरील अनेक माणसे कित्येक प्रकारच्या उपासना करतात. जागोजागी भावभक्तीपूर्वक भजन करतात. ॥१॥

आपुल्या देवास भजती । नाना स्तुती स्तवनें करिती । जे ते निर्गुण म्हणिती । उपासनेसी ।।२।।

प्रत्येक जण आपल्या आपल्या देवाची उपासना करताना त्याची हरप्रकारे स्तुती करतो. प्रत्येक उपासक स्वत:च्या उपासनेला निर्गुणाची उपासना समजतो. प्रश्न– ॥२॥

याचा कैसा आहे भाव । मज सांगिजे अभिप्राव । अरे हा स्तुतीचा स्वभाव । ऐसा आहे ।।३।।

याचे रहस्य काय आहे. त्याचा उलगडा करावा. उत्तर– अरे, उपासनेमध्ये स्तुतीचा सहज समावेश असतो. (स्तवने, स्तोत्रे) ॥३॥

निर्गुण म्हणिजे बहुगुण । बहुगुणी अंतरात्मा जाण । सकळ त्याचे अंश हें प्रमाण । प्रचित पाहा ।।४।।

निर्गुण म्हणजे नि:शेष सर्व गुण असलेला ईश्वर होय. (एकही गुण नाही असे नाही.) प्रत्येक उपास्य देवता हा त्याचाच अंश आहे, हे शास्त्रप्रमाणाने प्रचीतीला येते. ('सर्वदेव नमस्कार: केशवं प्रतिगच्छति' ।) ॥४॥

सकळ जनासी मानावें तें । येका अंतरात्म्यास पावतें । अधिकारपरत्वें तें । मान्य कीजे ।।५।।

('ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन:' या गीतावचनाप्रमाणे–) श्रद्धेच्या रूपाने जे सर्वांना मान्य असते, ते एकाच श्रद्धेय ईश्वराला पोहोचते. पण अधिकारपरत्वे श्रद्धेचे विषय वेगळे असतात हे मान्य करावे लागते. (शेंदूर लावलेल्या धोंड्यापासून अहंग्रह उपासनेपर्यंत) ॥५॥

श्रोता म्हणे हा अनुमान । मुळीं घालावें जीवन । तें पावे पानोपान । हे सध्या प्रचिती ।।६।।

श्रोता– हा केवळ अंदाज दिसतो. प्रत्यक्षात असे दिसते की मुळाला पाणी घातले तर ते वृक्षाच्या सर्व पानांना पोहोचते. (आपण सांगता त्याच्या हे नेमके उलटे आहे.) ॥६॥

वक्ता म्हणे तुळसीवरी । उदक घालावें पात्रभरी । परी न थिरे निमिषभरी । भूमीस भेदे ।।७।।

वक्ता– तुळशीच्या झाडावर पाणी ओतले, तर ते पानांवर क्षणही न थांबता जमिनीवर सांडून आत मुरते. ॥७॥

थोरा वृक्षास कैसें करावें । सेंड्या पात्र कैसें न्यावें । याचा अभिप्राव देवें । मज निरोपावा ।।८।।

श्रोता– वटवृक्षासारख्या प्रचंड वृक्षाचे बाबतीत हे कसे जमेल? शेंड्यावर पाणी ओतण्यासाठीं भांडे तेथपर्यंत कसे नेणार? याचे स्पष्टीकरण करावे. ॥८॥

प्रजन्याचें उदक पडतें । तें तों मुळाकडे येतें । हात चि पावेना तेथें । काये करिती ।।९।।

वक्ता– पावसाचे पाणी शेंड्यांवर पडून ते मुळापर्यंत पोहोचते. शेंड्यापर्यंत भांडे न्यायला हात पोहोचत नाही. त्याला काय इलाज? ॥९॥

सकळास मूळ सांपडे । ऐसें पुण्य कैचें घडे । साधुजनाचें पवाडे । विवेकीं मन ।।१०।।

निर्गुणाचे ब्रह्मरूप मूळ सापडावे एवढे पुण्य सामान्यांनी कोठून आणावे? मात्र साधूची अन्त:करणवृत्ती विवेकाने

नेमकी तेथेच लागलेली असते. ॥१०॥

तथापी वृक्षांचेनि पडिपाडें । जीवन घालितां कोठें पडे । ये गोष्टीचें सांकडें । कांहींच नाहीं ।।११।।

वृक्षाच्या उदाहरणावरून असे लक्षात येते की शेंड्यावर पाणी घातले तरी ते कोठे पडते (मूळ) हे समजण्यात काहीच अडचण नाही. ॥११॥

मागील आशंकेचें निर्शन । होतां जालें समाधान । आतां गुणास निर्गुण । कैसें म्हणती ।।१२।।

पाणी कोठे जाईल याचे उत्तर मिळाले. आता गुणयुक्ताला निर्गुण का म्हणतात ते सांगावे. ॥१२॥

चंचळपणें विकारलें । सगुण ऐसें बोलिलें । येर तें निर्गुण उरलें । गुणातीत ।।१३।।

(सगुण उपासनेला निर्गुणाची उपासना समजणे अगदी अयोग्य आहे हा पुढील १७ ओव्यांचा निर्णय आहे.) उत्पत्ती, स्थिती व लय असणाऱ्या सर्व विकारांना सगुण म्हणतात. ह्यावेगळ्या गुणरहिताला निर्गुण म्हणतात. ॥१३॥

वक्ता म्हणे हा विचार । शोधून पाहावें सारासार । अंतरी राहातां निर्धार । नांव नाहीं ।।१४।।

वक्ता– हा विचार नीट समजण्यासाठी सार व असार यांचा निर्णय करून घ्यावा. एकदा सार कळले की असाराचा (सगुण) मागमूस उरत नाही. ॥१४॥

विवेकेंचि तो मुख्य राजा । आणि सेवकाचें नांव राजा । याचा विचार समजा । वेवाद खोटा ।।१५।।

राजा या नावाचा नोकर व सर्वसत्ताधीश राजा यांतील फरक लक्षात घ्यावा. उगीच वाद करू नये. ॥१५॥

कल्पांतप्रळईं जें उरलें । तें निर्गुण ऐसें बोलिलें । येर तें अवघेंचि जालें । मायेमधें ।।१६।।

कल्पान्तीचा सर्वनाश झाल्यावर जे असते तसे राहते त्याला निर्गुण ब्रह्म म्हणतात. इतर सर्वांचा समावेश मायेत होतो. ॥१६॥

सेना शाहार बाजार । नाना यात्रा लाहानथोर । शब्द उठती अपार । कैसे निवडावे ।।१७।।

(पुढील विविध प्रकारच्या विरोधी किंवा विसंगत किंवा सरमिसळ झालेल्या गोष्टींची एकमेकींपासून निवड करणे कठीण असते–)

लढाईवरील सैन्यातील सैनिकांच्या आरोळ्या, गजबजलेल्या शहरातील कोलाहल व बाजारातील गोंगाट. ॥१७॥

काळामधें प्रज्यन्यकाळ । मध्यरात्रीं होतां निवळ । नाना जीव बोलती सकळ । कैसे निवडावे ।।१८।।

पावसाळ्यात पडणाऱ्या असंख्य धारा व मध्यरात्रीचा रातकिड्यांचा आवाज. ॥१८॥

नाना देश भाषा मतें । भूमंडळीं असंख्यातें । बहु ऋषी बहु मतें । कैसीं निवडावीं ।।१९।।

अनेक देश व त्यांची भाषा व संस्कृती, या भूमीवरील कित्येक ऋषी व त्यांच्या मतांतील विविधता. ॥१९॥

वृष्टि होतां च अंकुर । सृष्टीवरी निघती अपार । नाना तरु लहानथोर । कैसे निवडावे ।।२०।।

पावसाळ्याच्या प्रारंभी उगवणारे असंख्य तृणांकुर व लहानमोठ्या वृक्षांची अरण्ये. ॥२०॥

खेचरें भूचरें जळचरें । नाना प्रकारींचीं शरीरें । नाना रंग चित्रविचित्रें । कैसीं निवडावीं ।।२१।।

आकाश, जमीन व पाणी यांत राहणारे असंख्य प्राणी व त्यांच्या रंगातील अफाट विविधता व त्यांचे विविध रंग. ॥२१॥

कैसें दृश्य आकारलें । नानापरीं विकारलें । उदंडचि पैसावलें । कैंसें निवडावें ।।२२।।

या दृश्य सृष्टीत विविध विकार होऊन ती कशी आकाराला आली व तिचा किती उदंड विस्तार झाला. ॥२२॥

पोकळीमधें गंधर्वनगरें । नाना रंग लाहानथोरें । बहु वेक्ति बहु प्रकारें । कैसीं निवडावीं ।।२३।।

आकाशात अत्यंत भिन्न रंगांच्या ढगांच्या भिन्न आकृती तयार होतात. त्यांची विविधता किती सांगावी? ॥२३॥

दिवसरजनीचे प्रकार । चांदिणें आणी अंधकार । विचार आणी अविचार । कैसा निवडावा ।।२४।।

सूर्यसापेक्ष दिवस व रात्र, चंद्रसापेक्ष चांदणे व अंधार, बुद्धिसापेक्ष विचार व अविचार यांचे स्वरूप कसे निवडावे? (दिवस व रात्र सूर्यरूप आहेत. इ.) ॥२४॥

विसर आणी आठवण । नेमस्त आणी बाष्कळपण । प्रचित आणी अनुमान । येणें रीतीं ।।२५।।

विसरणे व आठवणे, व्यवस्थित व अजागळ, अनुभव व अंदाज याप्रमाणेच जाणावेत. ॥२५॥

न्याय आणी अन्याय । होय आणी न होये । विवेकेंविण काये । उमजों जाणे ।।२६।।

न्याय व अन्याय, शक्य व अशक्य यांतील निवाडा विवेकाशिवाय कसा होईल? ॥२६॥

कार्यकर्ता आणी निकामी । शूर आणी कुकर्मी । धर्मी आणी अधर्मी । कळला पाहिजे ।।२७।।

क्रियाशील व कामचुकार, शूर व भित्रा, धार्मिक व धर्मलंड यांतील फरक लक्षात घ्यावा. ॥२७॥

धनाढ्य आणी दिवाळखोर । साव आणी तश्कर । खरें खोटें हा विचार । कळला पाहिजे ।।२८।।

धनवान व दरिद्री, सज्जन व चोर, सत्य व असत्य यांतील फरक कळला पाहिजे. ॥२८॥

वरिष्ठ आणी कनिष्ठ । भ्रष्ट आणी अंतरनिष्ठ । सारासार विचार पष्ट । कळला पाहिजे ।।२९।।

अधिकाराने श्रेष्ठ व कनिष्ठ, आत्मनिष्ठ व चंचल यांतील अंतर स्पष्ट कळले पाहिजे. (२४ ते २८ मधील उदाहरणांनी सगुण व निर्गुण यांतील अत्यंत फरक लक्षात घ्यावा.) ॥२९॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'नानाउपासनानिरूपणनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'नानाउपासना' नावाचा नववा समास समाप्त

दशक सोळावा : सप्ततिन्वयाचा

समास दहावा : गुणभूतनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

पंचभूतें चाले जग । पंचभूतांची लगबग । पंचभूतें गेलियां मग । काये आहे ।।१।।

पंचीकृत पंचभूतांमुळें जगाची घटना टिकून आहे. ती अलग झाल्यावर जग म्हणून दाखवायला काय राहील? ॥१॥

श्रोता वक्तयास बोले । भूतांचे महिमे वाढविले । आणि त्रिगुण कोठें गेले । सांगा स्वामी ।।२।।

श्रोता– अहो स्वामी, पंचमहाभूतांची सृष्टिरचनेतील महत्त्वाची प्रशस्ती सांगितली. पण त्यांतील तीन गुणांचे स्थान कोणते? ॥२॥

अंतरात्मा पांचवें भूत । त्रिगुण त्याचें अंगभूत । सावध करूनियां चित्त । बरें पाहें ।।३।।

आकाशरूप अंतरात्मा हे पांचवे भूत समजावे. तीन गुण त्यांतच समाविष्ट होतात. सावधपणाने विचार केल्याने हे कळते. ॥३॥

भूत म्हणिजे जितुकें जालें । त्रिगुण जाल्यांत आलें । इतुकेन मूळ खंडलें । आशंकेचें ।।४।।

जे व्यक्तदशेला आले ते भूत. त्रिगुणही व्यक्त झाले असल्याने त्यांचा भूतात समावेश होतो. एवढ्या उत्तराने शंकेचे समाधान व्हावे. ॥४॥

भूतावेगळे कांहीं नाहीं । भूतजात हे सर्वहि । येकावेगळे येक कांहीं । घडेचिना ।।५।।

अशा भूतांहून वेगळे असे व्यक्त जगात काहीच नाही. हे सर्व दृश्य भूतांचे कार्य आहे. त्या पाचांचा समावेश नाही असे काही घडत नाही. ॥५॥

आत्म्याचेनी जाला पवन । पवनाचेन प्रगटे अग्न । अग्नीपासून जीवन । ऐसें बोलती ।।६।।

अंतरात्मारूप आकाशापासून वायू, वायूपासून अग्नी व अग्नीपासून पाणी झाले असे शास्त्र सांगते. ॥६॥

जीवन आवघें डबाबिलें । तें रविमंडळें आळलें । वन्हीवायोचेन जालें । भूमंडळ ।।७।।

सर्वत्र असलेले पाणी सूर्याच्या उष्णतेने वाळून तो अग्नी व वायू मिळून पृथ्वी तयार झाली. ॥७॥

वन्ही वायो रवी नस्तां । तरी होते उदंड सीतळता । ते सीतळतेमधें उष्णता । येणें न्यायें ।।८।।

वायू, अग्नी व सूर्य नसता तर सर्वत्र पाण्याची शीतलताच राहिली असती. त्या शीतलतेत जी उष्णता आहे ती वरील प्रकारे आली. (ओवी ७) ॥८॥

आवघें वर्मासी वर्म केलें । तरीच येवढें फांपावलें । देहेमात्र तितुकें जालें । वर्माकरितां ।।९।।

असे हे उष्णता, शैत्य, जडता इत्यादींचे रहस्य लक्षात घ्यावे. त्यामुळेच या सृष्टीचा व शरीरांचा एवढा पसारा तयार झाला. ॥९॥

आवघें सीतळचि असतें । तरी प्राणीमात्र मरोनी जातें । आवघ्या उष्णेंचि करपते । सकळ कांहीं ।।१०।।

सर्वत्र सतत गारठा असता तर जीवसृष्टी टिकली नसती. सतत उष्णता असती तर सर्व सृष्टी भाजून निघाली असती. ॥१०॥

भूमंडळ आळोन गोठलें । तें रविकिर्णें वाळोन गेलें । मग सहज चि देवें रचिलें । उपायासी ।।११।।

सृष्टिरचनेच्या प्रक्रियेत पाणी गोठून पृथ्वी झाल्यावर ती सूर्याच्या उष्णतेने वाळून जाऊ लागताच ईश्वराने त्यावर उपाय केला. ॥११॥

म्हणोनी केला प्रज्यन्यकाळ । थंड जालें भूमंडळ । पुढें उष्ण कांहीं सीतळ । सीतकाळ जाणावा ।।१२।।

त्यासाठीं त्याने पावसाळी ऋतूची योजना करून सृष्टी थंड केली. पुढे दिवसा उष्णता व रात्री थंडी असलेला ऋतू निर्माण केला. ॥१२॥

सीतकाळें कष्टले लोक । कर्पोन गेलें वृक्षादिक । म्हणोन पुढें कौतुक । उष्णकाळाचें ।।१३।।

त्या थंडीचा जीवांना त्रास झाल्यावर व वृक्षादिकांची पाने झडून गेल्यावर ईश्वराने उन्हाळ्याचा ऋतू निर्माण केला. (वसंत, ग्रीष्म.) ॥१३॥

त्याहिमधें प्रात:काळ । माध्यानकाळ सायंकाळ । सीतकाळ उष्णकाळ । निर्माण केले ।।१४।।

शिवाय त्यातील दिवसातही थंड सकाळ, उष्ण दुपार व पुन्हा थंड सायंकाळ यांची योजना केली. ॥१४॥

ऐसें येकामागें येक केलें । विलेनें नेमस्त लाविलें । येणेंकरितां जगले । प्राणीमात्र ।।१५।।

अशा प्रकारे एकामागून एक मागील ऋतू पुढील ऋतूत विलीन होण्याचा नियम लावून दिल्यामुळे सर्व प्राणी जगतात. (ऋतुचक्र.) ॥१५॥

नाना रसें रोग कठीण । म्हणोंनी औषधी केल्या निर्माण । परंतु सृष्टीचें विवरण । कळलें पाहिजे ।।१६।।

रोग बरे होणे कठीण म्हणून नाना रसांच्या औषधी निर्माण केल्या. हे असो. सृष्टीचे स्वरूप लक्षात घेतले पाहिजे. ॥१६॥

देहेमूळ रक्त रेत । त्या आपाचे होती दात । ऐसीच भूमंडळीं प्रचित । नाना रत्नांची ।।१७।।

स्त्री व पुरुष बीजांनी तयार होणारा गर्भ गर्भाशयात मातेच्या रक्ताने पोसला जातो. रेत व हे रक्त दोन्ही द्रव असूनही अस्थिमांसाचे शरीर बनते. त्या द्रवातूनच दातासारखे अति कठीण अवयव तयार होतात. द्रवरूप पृथ्वीपासून याच प्रकारे अनेक कठीण रत्ने बनतात असे स्पष्ट दिसते. ॥१७॥

सकळांसी मूळ जीवन बांधा । जीवनें चाले सकळ धंदा । जीवनेंविण हरिगोविंदा । प्राणी कैचे ।।१८।।

हे हरी, हे गोविंदा, सर्व जडजीवात्मक सृष्टीचा तुझे पाणी हा आधार आहे. त्याशिवाय प्राणी कसे जगतील? ॥१८॥

जीवनाचें मुक्ताफळ । शुक्रासारिखें सुढाळ । हिरे माणिके इंद्रनीळ । ते जळें जाले ।।१९।।

पाणीदार मोती, शुक्रताऱ्यासारखे तेजस्वी हिरे, माणके, इंद्रनील मणी पाण्यापासूनच होतात. ॥१९॥

महिमा कोणाचा सांगावा । जाला कर्दमुचि आघवा । वेगळवेगळु निवडावा । कोण्या प्रकारें ।।२०।।

खरे तर पांच भूतांपैकी अधिक माहात्म्य कोणाचे सांगावे? कारण ती सगळी परस्परांत बेमालूम मिसळली आहेत. त्यांना वेगळे कसे करावे? ॥२०॥

परंतु बोलिलें कांहींयेक । मनास कळावया विवेक । जनामधें तार्किक लोक । समजती आघवें ।।२१।।

परंतु काहीसा अंदाज येऊन त्यांचा निवाडा करता यावा म्हणून थोडे वर्णन केले. लोकांतील बुद्धिमन्तांना सर्वच समजते. ॥२१॥

आवघें समजलें हें घडेना । शास्त्रांशास्त्रांसीं पडेना । अनुमानें निश्चय होयेना । कांहींयेक ।।२२।।

मानवी बुद्धीला सर्वांचे सर्व आकलन होणे शक्य नाही. संबंधित शास्त्रांत सुद्धा एकवाक्यता नसते आणि केवळ तर्काने तर कशाचाच पूर्ण निश्चय होत नाही. ॥२२॥

अगाध गुण भगवंताचे । शेष वर्णूं न शके वाचें । वेदविधी तेहि काचे । देवेंविण ।।२३।।

अशी सृष्टी रचणाऱ्या भगवंताच्या गुणांचा अन्तपार लागत नाही. शेषाला त्याच्या हजार जिभांनीही त्यांचे वर्णन करता येत नाही. भगवंतामुळेच वेदांच्या विधींचे सार्थक होते. ॥२३॥

आत्माराम सकळां पाळी । आवघें त्रयलोक्य सांभाळी । तया येकेंविण धुळी । होये सर्वत्रांची ।।२४।।

आत्मारामरूप ईश्वर त्रैलोक्य व त्यांतील सर्वांना सांभाळतो. त्यावाचून सर्वकाही निरर्थक व बेबंद होईल. ॥२४॥

जेथें आत्माराम नाहीं । तेथें उरों न शके कांहीं । त्रयलोकीचे प्राणी सर्व हि । प्रेतरूपी ।।२५।।

ईश्वराचे आयुष्य संपते तेव्हा जड व जीव सृष्टीचा मागमूसही उरत नाही. त्रैलोक्यातील सर्व प्राणी प्रेतरूप होतात. मरतात. ॥२५॥

आत्मा नस्तां येती मरणें । आत्म्याविण कैचें जिणें । बरा विवेक समजणें । अंतर्यामीं ।।२६।।

जीवात्मा गेल्यावर सर्वांनाच मरण येते. त्यावाचून जिवंतपणा संभवतच नाही. हा विवेक मनात समजून असावे. ॥२६॥

समजणें जें विवेकाचें । तेंहि आत्म्याविण कैचें । कोणीयेकें जगदीशाचें । भजन करावें ।।२७।।

'विवेकाने समजणें' ही क्रिया सुद्धा आत्म्याच्या सत्तेवाचून कशी होईल? म्हणून प्रत्येकाने त्या जगदीशरूप आत्म्याची उपासना करावी. ॥२७॥

उपासना प्रगट जाली । तरी हे विचारणा कळली । याकारणें पाहिजे केली । विचारणा देवाची ।।२८।।

अशी प्रत्यक्ष उपासना झाली तरच हा विचार समजला असे म्हणता येईल. म्हणून उपास्य देवाचे ज्ञान समजावून घ्यावे. ॥२८॥

उपासनेचा मोठा आश्रयो । उपासनेविण निराश्रयो । उदंड केलें तरी तो जयो । प्राप्त नाहीं ।।२९।।

साधकाला उपासनेचा मोठा आधार आहे. ती नसेल तर तो निराधार होतो. त्याने यज्ञ, अनुष्ठाने, तपे, पारायणादी अन्य कितीही प्रयत्न केले तरी त्याला मोक्षलाभ होणार नाही. ॥२९॥

समर्थाची नाहीं पाठी । तयास भलताच कुटी । याकारणें उठाउठी । भजन करावें ।।३०।।

ज्याला ईश्वराची कृपा लाभत नाही, त्याला साधनमार्गात अनेक प्रकारे त्रास होतो. म्हणून प्रत्येक साधकाने मनापासून व हयगय न करता उपासना करावी. ॥३०॥

भजन साधन अभ्यास । येणें पाविजे परलोकास । दास म्हणे हा विश्वास । धरिला पाहिजे ।।३१।।

भगवंताची उपासना, श्रीगुरूंनी दिलेली साधना व स्वाध्याय ह्या मुख्य उपायांनी मोक्ष लाभतो असा विश्वास धरला पाहिजे असे मी रामदास म्हणतो. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'गुणभूतनिरुपणनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'गुणभूतनिरूपण' नावाचा दहावा समास समाप्त
–दशक सोळावा समाप्त–

दशक सतरावा : प्रकृतिपुरुष

समास पहिला : देवबळात्कार

॥ श्रीराम समर्थ ॥

निश्चळ ब्रह्मीं चंचळ आत्मा । सकळां पर जो परमात्मा । चैतन्य साक्षी ज्ञानात्मा । शड्गुणैश्वरु ।।१।।

अविनाशी व अढळ ब्रह्मस्वरूपात विनाशी व विकारवान जीवेश्वर होतात. ह्यांतील ईश्वर हाच सर्वांत श्रेष्ठ परमात्मा असून त्याला चैतन्य, साक्षी, ज्ञानात्मा व सहा गुणांचा स्वामी म्हणतात. ॥१॥

सकळ जगाचा ईश्वरु । म्हणौन नामें जगदेश्वरु । तयापासून विस्तारु । विस्तारला ।।२।।

तो सर्व जगाचा स्वामी असल्याने त्याला जगदीश्वर म्हणतात. त्यापासून अपार जगताचा विस्तार झाला. ॥२॥

शिवशक्ति जगदेश्वरी । प्रकृतिपुरुष परमेश्वरी । मूळमाया गुणेश्वरी । गुणक्षोभिणी ।।३।।

ईश्वराची निर्माती मूळमाया असून तिला शिवशक्ती, जगदेश्वरी, प्रकृतिपुरुष, परमेश्वरी, गुणेश्वरी, गुणक्षोभिणी इ. नावे आहेत. ॥३॥

क्षेत्रज्ञ द्रष्टा कूटस्त साक्षी । अंतरात्मा सर्वलक्षी । शुद्धसत्व महत्तत्त्व परीक्षी । जाणता साधु ।।४।।

पुरुषाला क्षेत्रज्ञ, द्रष्टा, कूटस्थ, साक्षी, सर्वज्ञ, शुद्धसत्त्व, महत् इ. नावे असून त्यांचे रहस्य साधू जाणतो. ॥४॥

ब्रह्मा विष्णु महेश्वरु । नाना पिंडीं जीवेश्वरु । त्यास भासती प्राणीमात्रु । लहानथोर ।।५।।

ब्रह्मांडात ब्रह्मदेव, विष्णू व शंकर असतात. अनेक शरीरांत जीव व ईश्वर राहतात. त्यातील जीवाला इतर लहान-मोठे प्राणी दिसतात. ॥५॥

देहदेउळामधें बैसला । न भजतां मारितो देहाला । म्हणौनि त्याच्या भेणें तयाला । भजती लोक ।।६।।

ईश्वर देहरूप देवळात व्यापून राहतो. जर जीवाने त्याची उपासना केली नाही, तर तो ईश्वर जीवाला पुन्हा पुन्हा मरण देतो. त्या भीतीने सर्व जीव त्याची उपासना करतात. ॥६॥

जे वेळेसी भजन चुकलें । तें तें तेव्हां पछ्याडिलें । आवडीनें भजों लागले । सकळ लोक ।।७।।

जेव्हा जेव्हा उपासना होत नाही तेव्हा तेव्हा ईश्वर जीवाला जणूं पछाडतो. म्हणून सर्व जीव त्याची आवडीने उपासना करतात. ॥७॥

जें जें जेव्हां आक्षेपिलें । तें तें तत्काळचि दिधलें । त्रैलोक्य भजों लागलें । येणें प्रकारें ।।८।।

देव जेव्हा जे मागतो तेव्हा ते त्याला तत्काळ देऊन जीव त्याची उपासना करतात. त्रैलोक्य त्याची अशी उपासना करते. ॥८॥

पांचा विषयांचा नैव्यद्य । जेव्हा पाहिजे तेव्हां सिद्ध । ऐसें न करितां सद्य । रोग होती ।।९।।

जीव आत्मदेवाला पांच विषयांचे नैवेद्य हवा तेव्हा देतात. असा नैवेद्य दिला नाही, तर जीवाला असंतोषाचा रोग जडतो! ॥९॥

जेणें काळें नैव्यद्य पावेना । तेणें काळें देव राहेना । भाग्य वैभव पदार्थ नाना । सांडून जातो ।।१०।।

असे नैवेद्य बंद झाले तर जीवात्मा भाग्य, वैभव व सर्व कमाई टाकून देह सोडून जातो. ॥१०॥

जातो तो कळों देईना । कोणास ठाउकें होयेना । देवेंविण अनुमानेना । कोणास देव ।।११।।

तो देह सोडून जातो म्हणजे काय व तो कसा जातो हे कोणालाच कळत नाही. ते देवावाचून इतर कोणाला समजत नाही. ॥११॥

देव पाहावयाकारणें । देउळें लागती पाहाणें । कोठेंतरी देउळाच्या गुणें । देव प्रगटे ।।१२।।

सामान्य माणसाला देवाच्या दर्शनासाठी देवळात जावे लागते. पण विचार करणाऱ्याला प्रत्येक शरीररूपी देवळात देव प्रगट झाल्याचे कळते. ॥१२॥

देउळें म्हणिजे नाना शरीरें । तेथें राहिजे जीवेश्वेरे । नाना शरीरें नाना प्रकारें । अनंत भेदें ।।१३।।

अनेक शरीरे ही देवळेच असून त्यांत नियामक ईश्वर व नियम्य जीव राहतात. त्या शरीरांचे प्रकार व भेद अगणित आहेत. ॥१३॥

चालतीं बोलतीं देऊळें । त्यामधें राहिजें राउळें । जितुकीं देउळें तितुकीं सकळें । कळलीं पाहिजे ।।१४।।

शरीरे ही चालती बोलती देवळे असून त्यांत देव राहतो. जेवढी शरीरे तेवढी देवळे हे कळावे. ॥१४॥

मछ कूर्म वाराह देउळें । भूगोळ धरिला सर्वकाळें । कराळें विक्राळें निर्मळें । कितियेक ।।१५।।

मत्स्य, कूर्म व वराह ह्या अवताररूप देवळांनी पृथ्वी तोलून धरली होती. आजही कितीतरी अजस्र, भयानक व सुंदर देह दिसतात. ॥१५॥

कित्येक देउळीं सौख्य पाहे । भरतां आवघें सिंध आहे । परी तें सर्वकाळ न राहे । अशाश्वत ।।१६।।

कित्येक शरीरात सतत सुखाचा अनुभव येऊन जणू सुखसागर हेलावतो असे वाटते. पण ते शेवटपर्यन्त तसेच टिकत नाही. ॥१६॥

अशाश्वताचा मस्तकमणी । जयाची येवढी करणी । दिसेना तरी का जालें धनी । तयासीच म्हणावें ।।१७।।

जो एवढा अवाढव्य प्रपंच निर्माण करतो तो ईश्वर सर्व अशाश्वतांत सर्वश्रेष्ठ आहे! तो दिसत नसला तरी तो जगाचा स्वामी आहेच. ॥१७॥

उद्भवोन्मुख होतां अभेद । विमुख होतां उदंड खेद । ऐसा अधोर्ध संवाद । होत जातो ।।१८।।

उद्भव म्हणजे निर्मिती करणाऱ्या ईश्वराच्या अनुसंधानात सर्व भेद मावळतात. परंतु त्याचे अनुसंधान सुटताच भेददर्शनाने सतत दु:खे होत राहतात. असा हा मुळाकडील (ऊर्ध्व) व पसाऱ्याकडील (अध) प्रवास होत राहतो. ॥१८॥

सकळांचें मूळ दिसेना । भव्य भारी आणी भासेना । निमिष्य येक वसेना । येके ठाइं ।।१९।।

ब्रह्म हे सर्व जगत्भासाचे अधिष्ठानरूप मूळ असून ते व्यापक (भव्य) व सर्वाधिष्ठान (भारी) असून दिसत नाही व कळतही नाही. ते क्षणभरही एक ठिकाणी नसते. (म्हणजेच ते सर्वव्यापी असते.) ॥१९॥

ऐसा अगाध परमात्मा । कोण जाणे त्याचा महिमा । तुझी लीळा सर्वोत्तमा । तूंच जाणसी ।।२०।।

परमात्मा हा असा अतर्क्य असून त्याचा महिमा कोणालाच कळत नाही. हे सर्वोत्तमा, तुझे हे खेळ एक तूच जाणतोस. ॥२०॥

संसारा आलियाचें सार्थक । जेथें नित्यानित्यविवेक । येहलोक आणी परलोक । दोनीं साधिले ।।२१।।

नित्य ब्रह्म व अनित्य प्रपंच हा विवेक ज्याचेपाशी असतो त्यानेच जीवनाचे सार्थक केलेले असते. इहलोकी येऊन मोक्ष साध्य केलेला असतो. ॥२१॥

मननसीळ लोकांपासीं । अखंड देव आहिर्निशीं । पाहातां त्यांच्या पूर्वसंचितासी । जोडा नाहीं ।।२२।।

जे सत्यासत्य, नित्यानित्य इ. विचार (मनन) सतत करतात त्यांचेपाशी देव अखंड राहतो. त्यांचे पूर्वसुकृत

खरोखर सर्वोत्तम असते. ॥२२॥

अखंड योग म्हणोनि योगी । योग नाहीं तो वियोगी । वियोगी तोहि योगी । योगबळें ।।२३।।

जीव व ब्रह्म ह्यांचे सतत ऐक्य साधून असल्याने तो योगी असून, असा योग नसणारा वियोगी असतो. योगाचे सामर्थ्याने वियोगी सुद्धा योगी होतो. ॥२३॥

भल्यांची महिमा ऐसी । जे सन्मार्ग लावी लोकांसी । पोहणार असतां बुडतयासी । बुडों नेदावें ।।२४।।

अशा योग्यांतही जे महात्मे असतात ते इतर लोकांनाही योगमार्गाला लावतात. जो अस्सल पोहोणारा असतो त्याने बुडणाऱ्याला बुडू देऊ नये. ॥२४॥

स्थूळसूक्ष्मतत्वझाडा । पिंडब्रह्मांडाचा निवाडा । प्रचित पाहे ऐसा थोडा । भूमंडळीं ।।२५।।

पृथ्व्यादी स्थूल व अव्यक्तादी सूक्ष्म तत्त्वांचे मिथ्यात्व जाणणारा व पिंड व ब्रह्मांड ह्यांचे स्वरूप जाणून त्यांसंबंधी दृढ निश्चय असणारा ह्या जगात विरळा! ॥२५॥

वेदांतीचें पंचिकर्ण । अखंड तयाचें विवर्ण । महांवाक्यें अंत:करण । रहस्य पाहे ।।२६।।

वेदांतशास्त्रातील पंचीकरणाचा सूक्ष्म अभ्यास करून 'तत्त्वमसि' सारख्या महावाक्यातील पदांचे वाच्य व लक्ष्य अन्त:करणांत त्याने साठविलेले असते. ॥२६॥

ये पृथ्वीमधें विवेकी असती । धन्य तयांची संगती । श्रवणमात्रें पावती गती । प्राणीमात्र ।।२७।।

ह्या पृथ्वीवरील विवेकी महात्म्यांची जे संगत करतील ते धन्य होत. त्यांच्या उपदेशाच्या श्रवणाने त्यांना उत्तम गती प्राप्त होते. ॥२७॥

सत्संग आणी सत्शास्त्र श्रवण । अखंड होतसे विवर्ण । नाना सत्संग आणी उत्तम गुण । परोपकाराचे ।।२८।।

सत्संगतीत राहून अद्वैत वेदान्तशास्त्राचे अखंड विवरण ऐकावे. अशा उत्तम गुण असणाऱ्या व परोपकारी महात्म्यांचा सत्संग सतत असावा. ॥२८॥

जे सद्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश । धर्मस्थापनेचा हव्यास । तेथेंचि वसे ।।२९।।

अशी सत्कीर्ती ज्यांना लाभली आहे ते परमेश्वराचे अंश असतात. धर्मस्थापनेचा मोठा प्रयत्न त्यांचेकडूनच होतो. ॥२९॥

विशेष सारासार विचार । तेणें होय जग्गोद्धार । संगत्यागें निरंतर । होऊन गेले ।।३०।।

त्यांच्याजवळचा मुख्य विशेष म्हणजे सार व असार ह्यांचा विवेक हा होय. तेच जगदुद्धाराचे मुख्य साधन आहे. असार संसाराचा संग सोडून अनेक जण आजपर्यन्त ब्रह्मरूप (निरंतर) झाले. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देवबळात्कारनाम' समास पहिला

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'देवबळात्कार' नावाचा पहिला समास समाप्त

दशक सतरावा : प्रकृतिपुरुष

समास दुसरा : शिवशक्तिनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ब्रह्म निर्मळ निश्चळ । जैसें गगन अंतराळ । निराकार केवळ । निर्विकारी ।।१।।

आकाशरूप अंतरीक्ष जसे निराकार, निर्विकार, निर्मळ व निश्चळ आहे तसेच ब्रह्म आहे. ॥१॥

अंतचि नाहीं ते अनंत । शाश्वत आणि सदोदित । असंत नव्हे तें संत । सर्वकाळ ।।२।।

ब्रह्माला 'पलीकडे' नाही असे ते अन्तपाररहित आहे. ते नित्य, सत्य, कालातीत आहे. ॥२॥

परब्रह्म तें अविनाश । जैसें आकाश अवकाश । न तुटे न फुटे सावकास । जैसें तैसें ।।३।।

आकाशरूप पोकळी जशी तुटत वा फुटत नाही तसे ब्रह्म अविनाशी आहे. ॥३॥

तेथें ज्ञान ना अज्ञान । तेथें स्मरण ना विस्मरण । तेथें अखंड निर्गुण । निरावलंबी ।।४।।

ब्रह्मस्वरूपात वृत्तिज्ञान व झोपेतल्याप्रमाणे अज्ञान नाही. ('जाणीव नेणीव भगवन्ती नाही'– ज्ञाने. हरिपाठ) स्मृती वा विस्मृती नाही. (ह्या बुद्धिसापेक्ष आहेत.) ते गुणातीत, भेदशून्य व आधाराधेयसंबंधविरहित आहे. (ब्रह्म कोणाचा आधार नाही. त्याला कोणाचा आधार नाही.) ॥४॥

तेथें चंद्र सूर्य ना पावक । नव्हे काळोखें ना प्रकाशक । उपाधीवेगळें येक । निरोपाधी ब्रह्म ।।५।।

एकमेव ब्रह्म उपाधिविरहित असून त्यांत सूर्य, चंद्र व अग्नी नाहीत ('न तत्र सूर्यो भाति–' कठ उप.) ज्ञानप्रकाश हे स्वरूप असलेल्या ब्रह्मात अंधार व उजेड ह्यांना अस्तित्व नाही. त्याचे ठिकाणी प्रकाश्यप्रकाशकभाव नाही. (स्वयंप्रकाश ब्रह्माचा कोणी प्रकाशक नाही. उपाधीरहित ब्रह्माला कोणी प्रकाश्य नाही) ॥५॥

निश्चळीं स्मरण चेतलें । त्यास चैतन्य ऐसें कल्पिलें । गुणसमानत्वें जालें । गुणसाम्य ऐसें ।।६।।

निश्चळ ब्रह्मात 'एकोऽहं' ह्या स्मरणाचा अध्यारोप केला. त्या स्मरणाला मूळमाया असे नाव दिले. त्याच मायेतील गुणांच्या समान व सुप्त अस्तित्वाला 'गुणसाम्य' असे नाव दिले. ॥६॥

गगनीं आली अभ्रछाया । तैसी जाणिजे मूळमाया । उद्भव आणी विलया । वेळ नाहीं ।।७।।

आकाशात जसे ढग जमा व्हायला व जायला वेळ लागत नाही तशी ब्रह्मात मूळमाया जाणावी. ॥७॥

निर्गुणीं गुणविकारु । तोचि षड्गुणैश्वरु । अर्धनारीनटेश्वरु । तयास म्हणिजे ।।८।।

मूळ निर्गुण ब्रह्मात जो शुद्धसत्त्वाच्या विकाराचा अध्यारोप केला जातो तोच शुद्धसत्त्व सहा गुणांचा ईश्वर वा अर्धनारीनटेश्वर होय. ॥८॥

आदिशक्ति शिवशक्ति । मुळीं आहे सर्वशक्ति । तेथून पुढें नाना वेक्ती । निर्माण जाल्या ।।९।।

मूळमायेत आदिशक्ती, शिवशक्ती इ. अनेक शक्ती असून त्यांतून विविध नामे व रूपे निर्माण झाली. ॥९॥

तेथून पुढें शुद्धसत्त्व । रजतमाचें गूढत्व । तयासि म्हणिजे महत्तत्त्व । गुणक्षोभिणी ।।१०।।

त्यानंतर शुद्ध सत्त्व, रज व तमांचे झालेले गूढ महत्‌तत्त्व 'गुणक्षोभिणी' ह्या नावाने ओळखले गेले. ॥१०॥

मुळीं असेचिना वेक्ती । तेथें कैंची शिवशक्ती । ऐसें म्हणाल तरी चित्तीं । सावधान असावें ।।११।।

शंका– अजातवादानुसार व्यक्त म्हणून काहीच नसताना ही शिवशक्ती आणली कोठून? त्याचे उत्तर सावधपणाने ऐका. ॥११॥

ब्रह्मांडावरून पिंड । अथवा पिंडावरून ब्रह्मांड । अधोर्ध पाहातां निवाड । कळों येतो ।।१२।।

ब्रह्मांडाकडून पिंडाकडे व पिंडाकडून ब्रह्मांडाकडे असे मोठ्याकडून लहानाकडे व लहानाकडून मोठ्याकडे पाहिले तर त्याचे उत्तर मिळते. उदा– ॥१२॥

बीज फोडून आणिलें मना । तेथें फळ तों दिसेना । वाढत वाढत पुढें नाना । फळें येती ।।१३।।

कोणतेही बी फोडून ते सूक्ष्म दृष्टीने पाहिले तरी त्यात त्याचे फळ दिसत नाही. पण त्याचा अंकुर वाढल्यावर नंतर फळे दिसतात. ॥१३॥

फळ फोडितां बीज दिसे । बीज फोडितां फळ नसे । तैसा विचार असे । पिंडब्रह्मांडीं ।।१४।।

फळ फोडले तर बी दिसते. पण बी फोडले तर फळ दिसत नाही. त्याप्रमाणें ब्रह्मांडात (फळ) पिंड असतात, पण पिंडात (बी) ब्रह्मांड दिसत नाही. ॥१४॥

नर नारी दोनी भेद । पिंडीं दिसती प्रसिद्ध । मुळीं नस्तां विशद । होतील कैसीं ।।१५।।

शरीरात स्त्री व पुरुष हे भेद सर्वांनाच दिसतात. परंतु मूळ मायेत ते नसताना दिसतील कसे? ॥१५॥

नाना बीजरूप कल्पना । तींत काये येक असेना । सूक्ष्म म्हणोनि भासेना । येकायेकीं ।।१६।।

लक्षावधी बीजांच्या घटनांमध्यें कित्येक घटक असतात. पण ते अतिसूक्ष्म असल्याने तात्काळ तेथे दिसत नाहीत. ॥१६॥

स्थूळाचें मूळ ते वासना । ते वासना आधीं दिसेना । स्थूळावेगळें अनुमानेना । सकळ कांहीं ।।१७।।

स्थूळ शरीराच्या जन्माचे पूर्वशरीरातील वासना हे कारण आहे. ती वासना जन्मापूर्वी दिसत नाही. स्थूळाशिवाय सूक्ष्माचा तर्क करता येत नाही. ॥१७॥

कल्पनेची सृष्टी केली । ऐसीं वेदशास्त्रें बोलिलीं । दिसेना म्हणोन मिथ्या केली । न पाहिजेत कीं ।।१८।।

वेदशास्त्र असे सांगते की दृश्य सृष्टी संकल्पातून (कल्पना) झाली आहे. तो संकल्प दिसत नाही म्हणून वेदांना खोटे ठरवू नये. ॥१८॥

पडदा येका येका जन्माचा । तेथें विचार कळे कैंचा । परंतु गूढत्व हा नेमाचा । ठाव आहे ।।१९।।

चालू जन्म व मागील जन्म ह्यांत विस्मृतीचा पडदा आल्याने मागील जन्मातीलसुद्धा घटना आठवत नाहीत. गूढात जमा होतात. एकूण गूढता ही वेदान्त तत्त्वज्ञानात नियमाने असते. ॥१९॥

नाना पुरुषांचे जीव । नाना स्त्रियांचे जीव । येकचि परी देहस्वभाव । वेगळाले ।।२०।।

पुरुष व स्त्री ह्यांत जीवत्व सारखेच असते. पण देहांच्या रचनेत बराच फरक असतो. ॥२०॥

नवरीस नवरी नलगे । ऐसा भेद दिसों लागे । पिंडावरून उमगे । ब्रह्मांडबीज ।।२१।।

उपवर मुलीला दुसऱ्या उपवर मुलीच्या सहवासात गोडी वाटत नाही. ह्या पिंडातील भेदावरून ब्रह्मांडबीजात तो असला पाहिजे हे लक्षात येते. ॥२१॥

नवरीचें मन नवऱ्यावरी । नवऱ्याचें मन नवरीवरी । ऐसी वासनेची परी । मुळींहून पाहावी ।।२२।।

पुरुषाचे लक्ष स्त्रीकडे व स्त्रीचे पुरुषाकडे असते. ह्यावरून त्या दोघांच्यात असलेल्या वंशवृद्धीच्या वासनेचे बीज मूळमायेत असले पाहिजे हे लक्षात घ्यावे. ॥२२॥

वासना मुळींची अभेद । देहसमंधें जाला भेद । तुटतां देहाचा समंध । भेद गेला ।।२३।।

वासना हे तत्त्व मुळात एकच आहे. पण देहांनुसार त्यांत भेद दिसतो. देहतादात्म्य जाताच भेदही निघून जातो किंवा देहाला मरण येताच केवळ वासना उरते. भेद उरत नाही. ॥२३॥

नरनारींचे बीजकारण । शिवशक्तीमधें जाण । देह धरितां प्रमाण । कळों आलें ।। २४।।

स्त्री व पुरुषांची बीजे मूळमायेच्या बीजात असतात. ते ते देह जन्माला आल्यावर त्यातील भेद समजतो. ॥२४॥

नाना प्रीतीच्या वासना । येकाचें येकास कळेना । तिक्षण दृष्टीनें अनुमाना । कांहींसें येतें ।। २५।।

प्रेमाचे अनेक प्रकार व आविष्कार एकाचे दुसऱ्याला कळत नाहीत. बारीक निरीक्षणाने काहींसा अंदाज लागतो. ॥२५॥

बाळकास वाढवी जननी । हें तों नव्हे पुरुषाचेनी । उपाधी वाढे जयेचेनी । ते हे वनिता ।। २६।।

उदा. वात्सल्य हा प्रेमाचा प्रकार असल्याने आई मुलाला सांभाळते. पुरुषाला ते जमत नाही. आई झालेल्या पत्नीमुळेच प्रपंचाचा विस्तार होतो. ॥२६॥

वीट नाही कंटाळा नाहीं । आलस्य नाहीं त्रास नाहीं । इतुकी माया कोठेंचि नाहीं । मातेवेगळी ।। २७।।

मातेला मूल सांभाळण्याचा वीट येत नाही. कंटाळा, आळस, त्रास यांतील काहीच होत नाही. हे प्रेम आईशिवाय इतरत्र कोठेच दिसत नाही. ॥२७॥

नाना उपाधी वाढऊं जाणे । नाना मायेनें गोऊं जाणे । नाना प्रीति लाऊं जाणे । नाना प्रपंचाची ।। २८।।

स्त्रीला प्रपंचाचा व्याप कसा वाढवावा व सांभाळावा ते कळते. वात्सल्य, प्रेम, ओढ, कणव इ. प्रकारे कुटुंबातील सर्वांना ती एकत्र ठेवते व सर्वांना प्रपंचाविषयी प्रेम निर्माण करते. ॥२८॥

पुरुषास स्त्रीचा विश्वास । स्त्रीस पुरुषाचा संतोष । परस्परें वासनेस । बांधोन टाकिलें ।। २९।।

पुरुष स्त्रीवर विसंबून राहतो. स्त्री पुरुषामुळे संतुष्ट होते. दोघे परस्परांना वासनेने बांधून टाकतात. ॥२९॥

ईश्वरें मोठें सूत्र केलें । मनुष्यमात्र गुंतोन राहिलें । लोभाचें गुंडाळें केलें । उगवेना ऐसें ।। ३०।।

ईश्वराच्या या सूक्ष्म योजनेत सर्व माणसे गुंतून राहतात. त्यातून परस्परआसक्तीचा न सुटणारा गुंता तयार होतो. ॥३०॥

ऐसी परस्परें आवडी । स्त्रीपुरुषांची माहां गोडी । हे मुळींहून चालिली रोकडी । विवेकें पाहावी ।। ३१।।

स्त्री व पुरुष यांना एकमेकांचे असलेले हे जबर आकर्षण व गोडी जगाच्या प्रारंभापासून असल्याचे प्रत्यक्ष दिसते. ती विचारपूर्वक लक्षात घ्यावी. ॥३१॥

मुळीं सूक्ष्म निर्माण जालें । पुढें पष्ट दिसोन आलें । उत्पतीचें कार्य चाले । उभयतांकरितां ।। ३२।।

मूळ मायेत सूक्ष्म वासना निर्माण होऊन पुढे शरीरे झाल्यावर वासना प्रगट होते. स्त्री व पुरुष या युगुलामुळे उत्पत्तीचे कार्य अखंड चालू राहते. ॥३२॥

मुळीं शिवशक्ती खरें । पुढें जालीं वधुवरें । चौऱ्यासि लक्ष विस्तारें । विस्तारली जे ।। ३३।।

मूळ शिव व शक्ती ही आद्य तत्त्वे (खरे) असून त्यातून चौऱ्यांशी लक्ष जीवयोनीमध्ये स्त्री- पुरुष भेद निर्माण होऊन एका एका योनीचा मोठा विस्तार झाला. ॥३३॥

येथें शिवशक्तीचें रूप केलें । श्रोतीं मनास पाहिजे आणिलें । विवरलियांविण बोलिलें । तें वेर्थ जाणावें ।। ३४।।

येथे शिव व शक्तीचे स्वरूप स्पष्ट करून सांगितले. श्रोत्यांनी ते नीट लक्षात घ्यावे. स्पष्ट केल्यावाचूनचे बोलणे व्यर्थ समजावे. ॥३४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'शिवशक्तिनिरूपणनाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'शिवशक्तिनिरूपण' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक सतरावा : प्रकृतिपुरुष

समास तिसरा : श्रवणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

थांबा थांबा ऐका ऐका । आधींच ग्रंथ सोडूं नका । सांगितलें तें ऐका । सावधपणें ।।१।।

हे श्रोतेहो, जरा धीर धरा, माझे म्हणणे ऐका. 'आता अभ्यास पुरे' असे म्हणून ग्रंथ बाजूला सारू नका. सांगितलेले पुन्हा एकदा सावधपणे ऐका. ॥१॥

श्रवणामध्ये सार श्रवण । तें हें अध्यात्मनिरूपण । सुचित करून अंत:कर्ण । ग्रन्थामधें विवरावें ।।२।।

अध्यात्मशास्त्राचे निरूपण हे श्रवणातील श्रवणाचे सार आहे. एकाग्र चित्ताने त्याचा ग्रंथातून अभ्यास करावा. ॥२॥

श्रवणमननाचा विचार । निजध्यासें साक्षात्कार । रोकडा मोक्षाचा उधार । बोलोंचि नये ।।३।।

जीव व ब्रह्म एक आहेत हे ऐकावे, त्याचा साधक-बाधक विचार करून तसा निर्णय करावा. 'मी ब्रह्म आहे' असे निदिध्यासन करून प्रत्यक्ष अनुभव घ्यावा व मुक्त व्हावे. मरणानंतरच्या मुक्तीची भाषा नको. ॥३॥

नाना रत्नें परीक्षितां । अथवा वजनें करितां । उत्तम सोनें पुटीं घालितां । सावधान असावें ।।४।।

ज्याप्रमाणे अनेक रत्नांची पारख करताना, सुवर्णादी धातूंचे वजन करताना व सोने अग्नीत घालताना सावध राहावे लागते. ॥४॥

नाना नाणीं मोजून घेणें । नाना परीक्षा करणें । विवेकी मनुष्यासी बोलणें । सावधपणें ।।५।।

पैसे मोजून घेणे, अश्वादी परीक्षा करणे व विचारवन्ताशी बोलताना सावधगिरी बाळगावी लागते. ॥५॥

जैसें लाखोलीचें धान्य । निवडून वेंचितां होतें मान्य । सगट मानितां अमान्य । देव क्षोभे ।।६।।

देवाला अर्पण करण्याचे धान्य जसे निवडून टिपून अर्पण करावे लागते. कचऱ्यासह अर्पण केले तर देव रागावतो. ॥६॥

येकांतीं नाजुक कारबार । तेथें असावें अति तत्पर । त्याच्या कोटिगुणें विचार । अध्यात्मग्रन्थीं ।।७।।

गुप्तपणें राजकारणाची मसलत करताना फार सावधगिरीने, नेटक्या शब्दात व तोल सांभाळून करावी लागते, त्या सर्वांहून (ओवी ४, ५, ६) कोटीपटीने सूक्ष्म व काटेकोर विचार अध्यात्मशास्त्राच्या विचारात करावा लागतो. ॥७॥

काहिण्या कथा गोष्टी पवाड । नाना अवतारचरित्रें वाड । त्या समस्तांमध्यें जाड । अध्यात्मविद्या ।।८।।

साठा उत्तराच्या कहाण्या, भक्तांच्या कथा, न्यायनीती सांगणाऱ्या गोष्टी इत्यादींचे कौतुक व रामकृष्णादी मोठ्या अवतारचरित्रांहून अध्यात्मविद्या श्रेष्ठ व गहन आहे. ॥८॥

गत गोष्टीस ऐकिलें । तेणें काये हातास आलें । म्हणती पुण्य प्राप्त जालें । परी तें दिसेना कीं ।।९।।

वरील भूतकालीन गोष्टी ऐकून काय मिळणार? त्याने पुण्य मिळते असे म्हणतात. पण ते पुण्य मिळालेले कोणालाच दिसत नाही! ॥९॥

तैसें नव्हे अध्यात्मसार । हा प्रचितीचा विचार । कळतां अनुमानाचा संव्हार । होत जातो ।।१०।।

अध्यात्मरूप सार असे नाही. यात मोक्षाचा प्रत्यक्ष अनुभव आहे. तो येताच केवळ सांगोवांगीच्या गोष्टी निरर्थक ठरतात. ॥१०॥

मोठे मोठे येऊन गेले । आत्म्याकरितांच वर्तले । त्या आत्म्याचा महिमा बोले । ऐसा कवणु ।।११।।

व्यास, ज्ञानदेवादी महात्म्यांची जीवने आत्मविद्येलाच समर्पित होती. त्या आत्म्याचा अपार महिमा कोण सांगणार? किंवा महान चक्रवर्तीही आत्म्यानेच जगले. ॥११॥

युगानयुगें येकटा येक । चालवितो तिनी लोक । त्या आत्म्याचा विवेक । पाहिलाच पाहावा ।।१२।।

जो आत्मरूप ईश्वर युगानुयुगे एकटाच या तिन्ही लोकांचे सर्व व्यवहार चालवितो त्याचा शास्त्रशुद्ध विचार वारंवार करावा. ॥१२॥

प्राणी आले येऊन गेले । ते जैसे जैसे वर्तले । ते वर्तणुकेचें कथन केलें । इछेसारिखें ।।१३।।

पृथ्वीवर होऊन गेलेल्या थोरामोठ्यांची चरित्रे त्यांच्या चरित्रकारांनी त्यांना भावली तशी लिहिली. (पण त्यांचे ते मोठेपण आत्म्याच्या सत्तेमुळे होते.) ॥१३॥

जेथें आत्मा नाहीं दाट । तेथें अवघें सरसपाट । आत्म्याविण बापुडें काष्ठ । काये जाणे ।।१४।।

जेथे व्यापक आत्मचैतन्य विशेषरूपाने प्रगट नसते तेथे अचेतनाचे साम्राज्य असते. सामान्यरूपाने आत्मा व्यापून असलेले लाकूड बिचारे काय जाणणार! ॥१४॥

ऐसें वरिष्ठ आत्मज्ञान । दुसरें नाहीं यासमान । सृष्टीमधें विवेकी सज्जन । तेचि हें जाणती ।।१५।।

अशा या आत्मज्ञानासारखे श्रेष्ठ ज्ञान या पृथ्वीवर दुसरे नाही. जगातील विचारवंत सात्त्विकांनाच हे कळते. ॥१५॥

पृथ्वी आणी आप तेज । याचा पृथ्वीमध्यें समज । अंतरात्मा तत्त्वबीज । तें वेगळेंचि राहिले ।।१६।।

पृथ्वी, आप व तेज यांचे त्रिवृत्करण पृथ्वीप्रमाणेच अचेतन आहे. ज्या आकाशरूप अंतरात्म्याच्या तत्त्वरूप बीजातून ही तीन (व वायू) प्रगट होतात ते बीज या तिन्हीहून वेगळेच आहे. ॥१६॥

वायोपासून पैलिकडे । जो कोणी विवेकें पवाडे । जवळीच आत्मा सांपडे । तया पुरुषासी ।।१७।।

वायूहून पलीकडे आकाशरूप ईश्वर व नंतर ब्रह्म असा जो शास्त्रीय विचार करील त्याला तेथल्या तेथेच आत्मदर्शन होईल. तो क्रम असा– ॥१७॥

वायो आकाश गुणमाया । प्रकृतिपुरुष मूळमाया । सूक्ष्मरूपें प्रचित येया । कठिण आहे ।।१८।।

वायू, आकाश, गुणमाया व नंतर प्रकृतिपुरुषरूप मूळ माया या क्रमाने त्यांचा सूक्ष्म निश्चय करणे अवघड आहे. ॥१८॥

मायादेवीच्या धांदली । सूक्ष्मीं कोण मन घाली । समजला त्याची तुटली । संदेहवृत्ती ।।१९।।

नामरूपात्मक मायिक रूपांच्या गोंधळात अडकून पडलेल्याला अस्ति, भाति, प्रियरूप सूक्ष्माचा विचार कसा करता येईल? जो हा विचार करतो त्याचे सर्व संशय नष्ट होतात. ॥१९॥

मूळमाया चौथा देह । जाला पाहिजे विदेह । देहातीत होऊन राहे । धन्य तो साधु ।।२०।।

मूळ माया हा ईश्वराचा चौथा देह आहे. (जीवाच्या महाकारण शरीराप्रमाणे) त्याचाही निरास झाला पाहिजे. असा देहातीत जीवन्मुक्त धन्य होय. (मूळ माया अध्यस्त असून ब्रह्म अधिष्ठान हा निश्चय होणे.) ॥२०॥

विचारें ऊर्ध चढती । तयासी च ऊर्धगती । येरां सकळां अधोगती । पदार्थज्ञानें ।।२१।।

विचाराने जे अतिस्थूलापासून (पृथ्वी) अति सूक्ष्मापर्यन्त (ब्रह्म) वर चढतात त्यांनाच मोक्ष मिळतो. जे वृत्तिज्ञानाने नामरूपात्मक पदार्थात रमतात ते जन्ममरणचक्रात अडकतात. ॥२१॥

पदार्थ चांगले दिसती । परी ते सर्वेंचि नासती । अतो भ्रष्ट ततो भ्रष्ट होती । लोक तेणें ।।२२।।

नामरूपांचे पदार्थ आकर्षक व उपयुक्त असतात, पण ते विनाशी होत. त्यांत रमणारा मोक्षसुख व विषयसुख या

दोन्हींना पारखा होतो. ॥२२॥

याकारणें पदार्थज्ञान । नाना जिनसीचा अनुमान । सर्व सांडून निरंजन । धुंडीत जावें ।।२३।।

म्हणून पदार्थज्ञान हे भ्रमज्ञान असून त्यांची आसक्ती सोडून आत्मानुसंधानात राहावे. ब्रह्माचा शोध घेत असावे. ॥२३॥

अष्टांग योग पिंडज्ञान । त्याहून थोर तत्त्वज्ञान । त्याहून थोर आत्मज्ञान । तें पाहिलें पाहिजे ।।२४।।

अष्टांगयोग देहप्रधान असल्याने त्यांत पिंडज्ञान महत्त्वाचे आहे. त्याहून आत्मानात्मविचाराचे तत्त्वज्ञान श्रेष्ठ असून आत्मज्ञान सर्वश्रेष्ठ आहे. त्याचाच ध्यास धरावा. ॥२४॥

मूळमायेचे सेवटीं । हरिसंकल्प मुळीं उठी । उपासनायोगें मिठी । तेथें घातली पाहिजे ।।२५।।

मूळमाया ही श्रीहरीच्या अनादि संकल्पातून उत्पन्न झाली आहे. त्या श्रीहरीला उपासनेने मिठी मारावी. ऐक्य साधावे. ॥२५॥

मग त्यापैलिकडे जाण । निखळ ब्रह्म निर्गुण । निर्मळ निश्चळ त्याची खूण । गगनासारिखी ।।२६।।

त्या संकल्परूप कारण ब्रह्मापलीकडे आकाशाप्रमाणे केवळ निर्गुण, निर्मळ व निश्चळ ब्रह्म आहे. ॥२६॥

येथून तेथवरी दाटलें । प्राणीमात्रास भेटलें । पदार्थमात्रीं लिगटलें । व्यापून आहे ।।२७।।

ते ब्रह्म मूळमायेपासून पृथ्वीपर्यंत व सर्व जीवसृष्टीत अखंड व्यापून आहे. सर्व दृश्याच्या आतबाहेर भरून आहे. ॥२७॥

त्याऐसें नाहीं थोर । सूक्ष्माहून सूक्ष्म विचार । पिंडब्रह्मांडाचा संव्हार । होतां कळे ।।२८।।

त्यासारखे महान व विभु काहीच नाही. पिंड व ब्रह्मांडाचा प्रलय काळात नाश झाल्यावर ते उरते असा निश्चय होतो. (कळे) ॥२८॥

अथवा पिंड ब्रह्मांड असतां । विवेकप्रळये पाहों जातां । शाश्वत कोण हें तत्त्वता । उमजों लागे ।।२९।।

किंवा पिंड व ब्रह्मांडांच्या स्थितीकाळी विवेकप्रलयाने शाश्वताचा शोध घेतल्यावर ते कळू लागते. ॥२९॥

करून अवघा तत्त्वझाडा । सारासाराचा निवाडा । सावधपणें ग्रन्थ सोडा । सुखिनावें ।।३०।।

सर्व ब्याऐंशी तत्त्वे मायिक आहेत, असा दृढ निश्चय करा. सार व असार यांचा सतत निवाडा करण्याची सवय लागल्यावर सावधान राहून खुशाल ग्रंथ बाजूला ठेवा. (पहा ओवी १) ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'श्रवणनिरूपणनाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'श्रवणनिरूपण' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक सतरावा : प्रकृतिपुरुष

समास चवथा : अनुमाननिरसन

॥ श्रीराम समर्थ ॥

बहुत जनासी उपाये । वक्तयास पुसतां त्रासों नये । बोलतां बोलतां अन्वयें । सांडूं नये ।।१।।

परमार्थ हा फार लोकांना तारून नेणारा असल्याने त्यासंबंधी विचारलेल्या प्रश्नांचा वक्त्याने त्रास मानता कामा नये. विषयाच्या मांडणीत तुटकपणा येऊ नये. विषय सोडून भरकटू नये. ॥१॥

श्रोत्यानें आशंका घेतली । ते तत्काळ पाहिजे फेडिली । स्वगोष्टीनें स्वगोष्टी पेंचली । ऐसें न व्हावें ।।२।।

श्रोत्याने घेतलेल्या शंकेचे तेथल्या तेथे उत्तर द्यावे. स्वत:च्या विधानाने स्वत:च पेंचात पडण्याचा प्रसंग येऊ नये. विधाने काळजीपूर्वक करावीत. ॥२॥

पुढें धरितां मागें पेंचला । मागें धरितां पुढें उडाला । ऐसा सांपडतचि गेला । ठाइं ठाइं ।।३।।

पुढील विधानांमुळे मागील विधानात गोंधळ व मागील बोलण्याने पुढील बोलण्यात गैरमेळ झाला तर तो वक्ता प्रत्येक वाक्याला अडचणीत सापडतो. वक्तृत्व शास्त्रशुद्ध व सुसंगत हवे. ॥३॥

पोहणारचि गुचक्या खातो । जनास कैसा काढूं पाहतो । आशय लोकांचा राहातो । ठाइं ठाइं ।।४।।

जो स्वत:च गटांगळ्या खातो तो इतर बुडणाऱ्यांना कसा वर काढणार? त्यामुळे लोकांच्या मनातील शंका राहूनच जातात. ॥४॥

आपणचि बोलिला संव्हार । आपणचि बोलिजे सर्वसार । दुस्तर मायेचा पार । टाकिला पाहिजे ।।५।।

'दृश्य सृष्टीचा नाश होतो' व 'सर्व दृश्य ब्रह्मरूपच आहे (सार)' अशी अत्यंत विरुद्ध वाक्ये स्पष्टीकरण न करता जर प्रवचन-कीर्तनात वापरली गेली तर श्रोत्यांचा गोंधळ होतो. सृष्टी मायिक आहे असे निश्चयाने सांगून दुस्तर माया कशी तरून जावी हेच परोपरीने समजावून सांगावे. ॥५॥

जें जें सूक्ष्म नाम घ्यावें । त्याचें रूप बिंबऊन द्यावें । तरीच वक्ता म्हणवावें । विचारवंत ।।६।।

ज्या ज्या पारिभाषिक शब्दांचा (सूक्ष्म नाम) वापर केला जातो त्यांचा स्पष्ट अर्थ सोप्या भाषेत श्रोत्यांच्या मनावर ठसवावा. अशा वक्त्यालाच विचारवन्त म्हणावे. ॥६॥

ब्रह्म कसें मूळमाया कैसी । अष्टधाप्रकृती शिवशक्ति कैसी । शड्गुणेश्वराची स्थिति कैसी । गुणसाम्याची ।।७।।

ब्रह्म, मूळमाया, अष्टधा प्रकृती, शिवशक्ती, षड्गुणैश्वर, गुणसाम्य इ. वेदान्त शास्त्रातील संकल्पना स्पष्ट कराव्यात. ॥७॥

अर्धनारीनटेश्वर । प्रकृतिपुरुषाचा विचार । गुणक्षोभिणी तदनंतर । त्रिगुण कैसे ।।८।।

अर्धनारीनटेश्वर, प्रकृतिपुरुष, गुणक्षोभिणी व त्रिगुण हे पारिभाषिक शब्द उलगडून दाखवावेत. ॥८॥

पूर्वपक्ष कोठून कोठवरी । वाच्यांशलक्ष्यांशाची परी । सूक्ष्म नाना विचार करी । धन्य तो साधु ।।९।।

ब्रह्मसूत्रावरील शांकरभाष्यासारख्या ग्रंथात पूर्वपक्षाचीही जोमाने मांडणी केली असल्याने तो कोठून सुरू झाला व कोठे संपला ते नीट लक्षात घ्यावे. वाच्यार्थ व लक्ष्यार्थ यांचा सूक्ष्म विचार करावा. हे सर्व साधणारा साधू धन्य होय. ॥९॥

नाना पाल्हाळीं पडेना । बोलिलेंचि बोलावेना । मौन्यगर्भ अनुमाना । आणून सोडी ।।१०।।

बोलताना पाल्हाळ लावून तेच तेच न बोलता मनाच्या आवाक्यात न येणाऱ्या ब्रह्माच्या जणू काठावर श्रोत्याला नेऊन सोडतो. ।।१०।।

घडी येक विमळ ब्रह्म । घडी येक म्हणे सर्व ब्रह्म । द्रष्टा साक्षी सत्ता ब्रह्म । क्षण येक ।।११।।

ब्रह्माला नामरूपे व त्रिगुणांचा मळ नाही असे एकदा सांगतो व लगेच नामरूप व त्रिगुणात्मक जगत् ब्रह्मरूप आहे असे सांगतो! द्रष्टा, साक्षी व सत्‌रूप निश्चळ ब्रह्म क्षणात– ।।११।।

निश्चळ तेंचि जालें चंचळ । चंचळ तेंचि ब्रह्म केवळ । नाना प्रसंगीं खळबळ । निवाडा नाहीं ।।१२।।

तेच चंचळ झाले असे सांगून ब्रह्म चंचळच असल्याचे विधान करतो. अनेक कीर्तन- प्रवचनांत उलटसुलट विधाने करून सिद्धान्ताला स्पष्टता येऊ देत नाही. ।।१२।।

चळतें आणी निश्चळ । अवघें चैतन्यचि केवळ । रूपें वेगळालीं प्रांजळ । कदापी बोलवेना ।।१३।।

अशाश्वत व शाश्वत दोन्ही केवळ चैतन्यरूपच असे सांगतो. त्यांची भिन्नता स्पष्ट करीत नाही. ।।१३।।

उगीच करी गथागोवी । तो लोकांस कैसें उगवी । नाना निश्चयें नाना गोवी । पडत जाते ।।१४।।

जो असा सावळा गोंधळ करतो त्याला विचक्षण व जिज्ञासू श्रोत्याचे समाधान कसे करता येईल? उलट वेळोवेळी उलट सुलट सिद्धान्त सांगून संभ्रम मात्र होतो. ।।१४।।

भ्रमास म्हणे परब्रह्म । परब्रह्मास म्हणे भ्रम । ज्ञातेपणाचा संभ्रम । बोलोन दावी ।।१५।।

भ्रमरूप जगत् ब्रह्मरूप (सत्य) म्हणतो व ब्रह्माला मात्र ते स्वसंवेद्य असल्याने भ्रमरूप ठरवतो व यावर कडी म्हणजे ज्ञातेपणाचा आव आणतो. (प्रत्यक्ष दिसणारे जग खोटे व कधीच न कळणारे ब्रह्म खरे हे बोलणे नव्या सामाजिक विचारवंतांना पटत नाही.) ।।१५।।

घाली शास्त्रांची दडपण । प्रचितिविण निरूपण । पुसों जातां उगाच सीण । अत्यंत मानी ।।१६।।

अनुभव न घेता निरूपण करणारा, श्रोत्यांवर शास्त्रवचनांची भेंडोळी फेकून, त्यांना दडपून टाकतो. कोणी प्रश्न विचारण्याचे त्याला मोठे संकट वाटते. ।।१६।।

ज्ञात्यास आणि पदार्थभिडा । तो काय बोलेल बापुडा । सारासाराचा निवाडा । जाला पाहिजे ।।१७।।

बिदागी, भेटवस्तू इत्यादींची ज्याला अपेक्षा असते, तो बिचारा काय स्पष्टपणे बोलणार? बोलण्यात सार व असार निर्भीडपणे मांडले पाहिजे. ।।१७।।

वैद्य मात्रेची स्तुती करी । मात्रा गुण कांहींच न करी । प्रचितिविण तैसी परी । ज्ञानाची जाली ।।१८।।

वैद्याने स्वत:च्या औषधाची वारेमाप स्तुती करावी पण त्याचा गुण जराही दिसू नये, त्याप्रमाणे अनुभवशून्य वक्त्याचे वक्तृत्व असते. ।।१८।।

जेथें नाहीं सारासार । तेथें अवघा अंधकार । नाना परीक्षेचा विचार । राहिला तेथें ।।१९।।

जेव्हा सार व असार यांचा विचार शास्त्र, तर्क व अनुभव यांसह सांगितला जात नाही तेव्हा दृश्य जगतातील घटकांची परीक्षा होत नाही. सर्वत्र अज्ञानाचा व अंदाजाचा अंधार भरतो. ।।१९।।

पाप पुण्य स्वर्ग नर्क । विवेक आणि अविवेक । सर्वब्रह्मीं काये एक । सांपडलें नाहीं ।।२०।।

('हे सर्व ब्रह्म आहे' हा जीवन्मुक्ताचा अनुभव असतो. त्या जीवन्मुक्ताने त्याच्या बद्धावस्थेत साधनकाळी 'हे सर्व दृश्य मायिक आहे' या निश्चयाने दृश्याविषयी अनासक्ती सिद्ध केलेली असते. हे अनासक्तीरूप वैराग्य व 'सोऽहं'सारख्या साधनेने तो गुरुकृपेद्वारा मुक्त होतो. त्या मुक्तावस्थेतील 'सर्व खल्विदं ब्रह्म' हा अन्वयी अनुभव आहे. मुक्त न होताच तसे नुसते म्हटल्याने फार मोठे घोटाळे होतात. ते असे—) सर्व ब्रह्मवादाच्या शाब्दिक झपाट्यात पाप-पुण्य, स्वर्ग-

नर्क, विवेक-अविवेक या विरोधी जोड्या ब्रह्मरूप ठरतात! ॥२०॥

पावन आणि तें पतन । दोनीं मानिलीं तत्समान । निश्चये आणि अनुमान । ब्रह्मरूप ।। २१ ।।

पवित्र व पतित, निश्चय व तर्क ही सारखीच ठरून ब्रह्मरूप होतात! ॥२१॥

ब्रह्मरूप जालें आघवें । तेथें काये निवडावें । आवघी साकरचि टाकावें । काये कोठें ।। २२ ।।

सर्वच ब्रह्म ठरल्यावर त्यांत विवेकाने वेगळे काय करावे? सर्वत्र साखर भरल्यावर त्यातून काय निवडावे? ॥२२॥

तैसें सार आणि असार । अवघा जाला येकंकार । तेथें बळावळा अविचार । विचार कैंचा ।। २३ ।।

त्याचप्रमाणे सार ब्रह्म व असार जगत् एकच होण्याच्या सबगोलंकारात अविचारालाच सामर्थ्य येते. विचाराला वावच कोठे उरतो? ॥२३॥

वंद्य निंद्य येक जालें । तेथें काये हाता आलें । उन्मत्त द्रव्यें जें भुललें । तें भलतेंच बोले ।। २४ ।।

मदिरापानानंतर कोणी बरळावे त्याप्रमाणे वंदनीय व निंदनीयही ब्रह्मच! याने काय साधणार? ॥२४॥

तैसा अज्ञानभ्रमें भुलला । सर्व ब्रह्म म्हणोन बैसला । माहांपापी आणि भला । येकचि मानी ।। २५ ।।

त्याप्रमाणे अध्यात्मशास्त्राच्या अज्ञानरूप भ्रमामुळे व आत्मानुभवाच्या अभावामुळे भुलून 'सर्व ब्रह्मरूप आहे' असा ठेका धरून बसला! त्यामुळे महापापी व सज्जन दोन्ही ब्रह्मरूप म्हणजे सारखेच ठरले! ॥२५॥

सर्वसंगपरित्याग । अव्हासवा विषयेभोग । दोघे येकचि मानितां मग । काये उरलें ।। २६ ।।

सर्वसंगाचा परित्याग व अनिर्बंध विषयभोग सारखेच झाल्यावर अध्यात्मशास्त्र, मोक्ष इ. काय राहिले? बद्ध व साधक यांत काय फरक उरला? ॥२६॥

भेद ईश्वर करून गेला । त्याच्या बाचेन व वचे मोडिला । मुखामधें घांस घातला । तो अपानीं घालावा ।। २७ ।।

इंद्रियभेद, स्थानभेद, लिङगभेद, विषयभेद इ. भेद ही ईश्वराची निर्मिती आहे. तो सर्वब्रह्म सांगणाऱ्याच्या बापालाही पुसता येणार नाही! त्याने जेवताना मुखात घास घालण्याऐवजी गुदद्वारात तो घालून दाखवावा! (असा ब्रह्मघोटाळा करणाऱ्याला येथे चांगलेच फैलावर घेतले आहे.) ॥२७॥

ज्या इंद्रियास जो भोग । तो तो करी येथासांग । ईश्वराचें केलें जग । मोडितां उरेना ।। २८ ।।

ज्या इंद्रियासाठी जो भोग नियोजित आहे तोच त्याला द्यावा लागतो. ईश्वरी व्यवस्था बदलता येत नाही. ती बदलली तर जीवन उरणार नाही. ॥२८॥

अवघी भ्रांतीची भुटाटकी । प्रचितिविण गोष्टी लटकी । वेड लागलें जे बटकी । ते भलतेंचि बोले ।। २९ ।।

अनुभवावाचून सर्व ब्रह्म आहे हे सांगणे भ्रमिष्टाला भूतबाधा किंवा बटकीच्या वेड्या मुलाचे बरळणे होय. ॥२९॥

प्रत्ययज्ञाता सावधान । त्याचें ऐकावें निरूपण । आत्मसाक्षात्काराची खूण । तत्काळ बाणे ।। ३० ।।

ब्रह्मानुभव घेतलेला शास्त्रमर्यादा सांभाळून सावधपणे बोलतो. त्याचे निरूपण ऐकले तर आत्मसाक्षात्काराचे रहस्य तेथल्या तेथे उकलते. त्याचा निश्चय होतो. ॥३०॥

वेडें वांकडें जाणावें । आंधळें पाउलीं वोळखावें । बाश्कळ बोलणें सांडावें । वमक जैसें ।। ३१ ।।

कोणी चाचपडत वेडीवाकडी पावले टाकत चालत असेल तर तो आंधळा आहे हे लक्षात येते. त्याप्रमाणे सर्वब्रह्माचे टिपडे वाजवणारा वाह्यात आहे हे ओळखून त्याचे बोलणे उलटीतील अन्नाप्रमाणे टाकावे. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अनुमाननिरसननाम' समास चवथा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'अनुमाननिरसन' नावाचा चवथा समास समाप्त

दशक सतरावा : प्रकृतिपुरुष

समास पाचवा : अजपानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

अजपाची अधिक माहिती–

अजपाची व्याख्या– 'श्वासप्रश्वासयो: बहिर्गमनागमनायां अक्षरनिष्पादनरूपो जप: स च हंस: सोऽहं इत्याकार एव' हंसमंत्र । श्वासाचे आत येणे व प्रश्वासाचे बाहेर जाणे यातून प्रगट होणाऱ्या अक्षरसमुदायातून तयार झालेला जप म्हणजेच 'हंस:' किंवा सोऽहं या रूपाचा असतो.

<u>अजपाची माहिती व माहात्म्य–</u>

हकारेण बहिर्याति सकारेण विशेत्पुन: ।
हंसहंसेत्यमुं मंत्रं जीवो जपति सर्वदा ॥१॥
षट्शतानि दिवारात्रौ सहस्त्राण्येक विंशति: ।
एतत्संख्यान्वितं मंत्रं जीवो जपति सर्वदा ॥२॥
अजपा नाम गायत्री योगिनां मोक्षदा सदा ।
अस्या: संकल्पमात्रेण सर्व पापै: प्रमुच्यते ॥३॥
अनायासदृशं ज्ञानं न भूतो न भविष्यति ।
कुंडलिन्यां समुद्भूता गायत्री प्राणधारिणी ।
प्राणविद्या महाविद्या यस्यां वेदी स वेदवित् ॥४॥
(ध्यानबिंदू उप. ६१-६५)

<u>अजापाजप विधी–</u>

१) प्रात:काळी शौचमुखमार्जन, स्नान करून जपाचे उदक सोडावे. दुर्बळांनी आचमनपूर्वक उदक सोडावे.

२) संकल्प–

आचम्य । प्राणायामम् कृत्वा । देशकालौ स्मृत्वा । श्रीपरमेश्वर प्रीत्यर्थं । अद्य सूर्योदयारभ्य श्व: सूर्योदय पर्यन्तम् । उच्छ्वासनिश्वासादि व्यवहाररूपेण षट् शताधिक एकविशंति सहस्र संख्यांक अजपाजपमहं करिष्ये । तथाच हंसगायत्रीसह न्यासध्यानादि मानसोपचारै: पूजनमहं करिष्ये ॥

३) न्यास– करन्यास.
हं सां ज्ञानात्मने– अंगुष्ठ
हं सीं सूर्यात्मने-तर्जनि
हं सूं सोमात्मने-मध्यमा
हं सैं निरंजनात्मने-अनामिका
हं सौं निराभासात्मने-कनिष्ठिका ।
हं स: सर्वात्मके-करतल:

<u>४) हं इति दिग्बंध:</u>

ध्यानाचा श्लोक
'आधारे लिङ्गनाभौ प्रकटित ह्रदये तालुमूले ललाटे ।
द्वेपत्रे शोडषारे द्विदशदशदले द्वादशार्धे चतुष्के ।
वासांते व ल मध्ये ड फ क ठ सहिते कंठदेशे स्वराणाम् ।

हं सं तत्वार्थयुक्तं सकलदलयुतं वर्णरूपं नमामि ।।

५) पंचपूजा– लं पृथिव्यात्मने इ. ६) मुद्रा– ध्यानमुद्रा दाखवावी. ७) जप: ८) पूर्ववत करहृदयादि न्यास: ९) दिग्विमुख: – 'सो' इति. १०) पुन्हा ध्यान ११) पुन्हा पंचपूजा १२) पुन्हा मुद्रा १३) जप: अनेन तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु । १४) २१ जप १५) ध्यानाच्या श्लोकाची किल्ली– ओळ १ षट्चक्रांचा उल्लेख. ओळ २ चक्रांच्या पाकळ्यांची संख्या. ओळ– ३ चक्रदलांचे वर्ण. (अक्षर) ओळ ४ सहस्रदलातील प्रकाशरूप परमात्म्यास आत्मभावाने प्रणाम.

।। श्रीराम समर्थ ।।

येकवीस सहश्र सासें जपा । नेमून गेली ते अजपा । विचार पाहातां सोपा । सकळ कांहीं ।।१।।

सामान्यत: चोवीस तासांत माणूस एकवीस हजार सहाशे श्वासोच्छ्वास घेतो. ही जणू जपसंख्याच नेमून दिली असून या बाबतीत अधिक विचार केला तर साधना फार सोपी होते. ।।१।।

मुखीं नासिकीं असिजे प्राणें । तयास अखंड येणें जाणें । याचा विचार पाहाणें । सूक्ष्मदृष्टीं ।।२।।

तोंड व नाकावाटे अखंड ये-जा करणाऱ्या प्राणांवर सूक्ष्मपणे लक्ष ठेवून पुढील विचार करावा. ।।२।।

मुळीं पाहातां येक स्वर । त्याचा तार मंद्र घोर । त्या घोराहून सूक्ष्म विचार । अजपाचा ।।३।।

मुळात 'सा' हा स्वर एकच असला तरी तार, मंद्र व घोर या तीन पद्धतींनी तो लावता येतो. त्यातील घोर हा सूक्ष्म समजला जातो. त्याहून अजपाचा जप सूक्ष्म आहे. ।।३।।

सरिगमपदनिस । सरिं मात्रुका सायास । प्रथम स्वरें मात्रुकांस । म्हणोन पाहावें ।।४।।

असा प्रत्यक्ष प्रयोग करताना सा, रे, ग, म, प ध, नी या सात सुरांची सर जाणीवपूर्वक घोर पद्धतीने लावून पाहावी. ।।४।।

परेवाचेहून अर्तें । आणि पश्यंतीखालतें । स्वराचे जन्मस्थान तें । तेथून उठे ।।५।।

नाभिस्थानातील परावाणी व हृदयस्थानातील पश्यन्तीवाणी यांचेमध्ये स्वर उमटतो. ।।५।।

येकांतीं उगेंच बैसावें । तेथें हें समजोन पाहावें । अखंड घ्यावें सांडावें । प्रभंजनासी ।।६।।

शान्त ठिकाणी स्वस्थ बसून श्वास व उच्छ्वास सतत घेत राहून स्वरांच्या उमटण्याचा अनुभव घ्यावा. ।।६।।

येकांतीं मौन्य धरून बैसे । सावध पाहातां कैसें भासे । सोहं सोहं ऐसे । शब्द होती ।।७।।

निर्जन स्थानी अंतर्बाह्य मौन धरून सावधानतेने श्वास व प्रश्वास ऐकले तर त्यांत अनुक्रमे सो व हं असे शब्द ऐकू येतात. ।।७।।

उच्चारेंविण जे शब्द । ते जाणावे सहजशब्द । प्रत्यया येती परंतु नाद । कांहींच नाहीं ।।८।।

प्रत्यक्ष उच्चार न करता जे शब्द उमटतात त्यांना सहजशब्द म्हणतात. ते कळतात पण त्यांचा ध्वनिमय उच्चार होत नाही. ।।८।।

ते शब्द सांडून बैसला । तो मौनी म्हणावा भला । योगाभ्यासाचा गल्बला । याकारणें ।।९।।

ते कळणारे 'सोऽहं' शब्दही सोडून देऊन जो निवृत्त स्थितीत राहतो तोच खरा महान मौनी होय. योगाभ्यासाच्या सर्व खटपटी या स्थितीसाठी करतात! ।।९।।

येकांतीं मौन्य धरून बैसला । तेथें कोण शब्द जाला । सोहं ऐसा भासला । अंतर्यामीं ।।१०।।

एकांतवासात मौन साधून बसल्यावर तेथे कोणता शब्द होणार? 'सोहं' हा शब्द आत चालू असल्याचा केवळ भास होतो. ।।१०।।

धरितां सो सांडितां हं । अखंड चाले सोहं सोहं । याचा विचार पाहातां बहु । विस्तारला ।।११।।

श्वास घेताना 'सो' व सोडताना 'हं' असा सोहं जप अखंड चालू असतो. या विषयाचा विस्तार पाहू गेले तर तो बराच मोठा आहे. ॥११॥

देहधारक तितुका प्राणी । श्वेतजउद्भिजादिक खाणी । स्वासोस्वास नस्तां प्राणी । कैसे जिती ।।१२।।

स्वेदज उद्‌भिजादी चारी खाणीतील देहधारी प्राणी श्वासोच्छ्‌वासावाचून जगणे शक्य नाही. ॥१२॥

ऐसी हे अजपा सकळासी । परंतु कळे जाणत्यासी । सहज सांडून सायासीं । पडोंच नये ।।१३।।

म्हणून अजपा जप सर्वांचाच होतो. पण तो बुद्धिमान मानवालाच कळतो, असे हे सोपे साधन सोडून कष्टाची साधने करूच नयेत. ॥१३॥

सहज देव असतचि असे । सायासें देव फुटे नासे । नासिवंत देवास विश्वासे । ऐसा कवणु ।।१४।।

आत्मरूप देव सहजच उपलब्ध आहे. त्याच्या दर्शनाच्या उपायांचे कष्ट केल्याने तो देव भक्त-भक्ती-भगवंत असा फुटतो! व नंतर सहज देव जणू गुप्त होतो (नासे) अशा देवावर कोण विश्वास ठेवील?

किंवा

आत्मरूप देव नित्य व सत्य आहेच आहे. त्याच्या मूर्ती करण्याचे कष्ट केले तर तो देव कालांतराने फुटतो व नष्ट होतो. त्यावर कोण विश्वास ठेवील? ॥१४॥

जगदांतराचें दर्शन । सहज घडे अखंड ध्यान । आत्मइछेनें जन । सकळ वर्तती ।।१५।।

अजपाच्या अखंड ध्यानाने जगतात व्यापून राहिलेल्या आत्म्याचे दर्शन होते. त्या आत्मरूप ईश्वराच्या योजनेनुसार सर्व जग चालते. ॥१५॥

आत्मयांचें समाधान । घडे तैसेंचि आशन । सांडलें फिटलें समर्पण । तयासीच होये ।।१६।।

जीवात्मा तृप्त होईल असे खाणे-पिणे घडते. (नित्यतृप्त ईश्वराची तृप्ती संभवत नाही) सांडले-लवंडलेले अन्नपाणी सुद्धा त्यालाच अर्पण होते. ॥१६॥

अग्नपुरुष पोटीं वसती । तयास अवदानें सकळ देती । लोक आज्ञेमधें असती । आत्मयांचे ।।१७।।

उदरभरणाच्या यज्ञकर्मातही सर्वजण जठराग्नीतच आहुती देतात. जीवात्म्याच्या तहानभूक इ. भागवण्याच्या आज्ञा लोक पाळतात. ॥१७॥

सहज देवजपध्यानें । सहज चालणें स्तुती स्तवनें । सहज घडे तें भगवान्नें । मान्य कीजे ।।१८।।

अजपामुळे देवाचा सहज जप व ध्यान घडते त्याची स्तोत्रे व आरत्याही सहजपणे चालतात. असे अकृत्रिम साधन देवाला आवडते. ॥१८॥

सहज समजायाकारणें । नाना हटयोग करणें । परंतु येकायेकीं समजणें । घडत नाहीं ।।१९।।

असा सहज देव भेटण्यासाठी माणसे हठयोगासारखी महाकठीण साधने करतात. देव सहज असला तरी ती सहजता एकाएकी कळत नाही व पटत नाही. उदा.– ॥१९॥

द्रव्य चुकतें दरिद्र येतें । तळीं लक्ष्मी वरी वर्ततें । प्राणी काये करील तें । ठाऊकें नाहीं ।।२०।।

धन कोठे आहे ते माहीत नसल्याने भूमीखाली ते असूनही अभागी माणूस त्यावर बसून दारिद्र्य भोगतो. अज्ञानामुळे माणूस काय करील ते सांगता येत नाही. ॥२०॥

तळघरामधें उदंड द्रव्य । भिंतीमधें घातलें द्रव्य । स्तंभीं तुळवटीं द्रव्य । आपण मधें ।।२१।।

तळघर, भिंतीतील पोकळी व तुळयांमध्ये भरपूर संपत्ती असून अशा घरात जो दारिद्र्यात राहतो तो– ॥२१॥

लक्ष्मीमध्यें करंटा नांदे । त्याचें दरिद्र अधीक सांदे । नवल केलें परमानंदें । परमपुरुषें ।। २२ ।।

लक्ष्मीच्या गराड्यात करंट्याप्रमाणे दारिद्र्य भोगतो. अशा माणसाचे दारिद्र्य अधिकच विदारक असते. परमानंदरूप ब्रह्माच्या बाबतीत माणसाचे असेच होते. हे नवलच आहे! ।।२२।।

येक पाहाती येक खाती । ऐसी विवेकाची गती । प्रवृत्ति अथवा निवृत्ति । येणेंचि न्यायें ।। २३ ।।

कोणी धनादी वैभव भोगतात तर कोणी आत्मसुख भोगतात. इतर लोक त्यांच्याकडे आशाळभूतपणे पाहतात. हा फरक व्यावहारिक व पारमार्थिक विवेकामुळे पडतो. व्यवहार व परमार्थ या दोन्हीकडे सारखाच न्याय आहे. ।।२३।।

अंतरीं वसतां नारायेणें । लक्ष्मीस काये उणें । ज्याची लक्ष्मी तो आपणें । बळकट धरावा ।। २४ ।।

अन्त:करणात लक्ष्मीपती नांदत असताना लक्ष्मीची उणीव कशी असेल? लक्ष्मी ज्याची आहे त्याला घट्ट धरून ठेवावे. ।।२४।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अजपानिरूपणनाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'अजपानिरूपण' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक सतरावा : प्रकृतिपुरुष

समास सहावा : देहात्मनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

आत्मा देहामध्यें असतो । नाना सुखदुखें भोगितो । सेवटीं शरीर सांडून जातो । येकायेकीं ।।१।।

देहामध्ये जीवात्मा राहून अनेक प्रकारची सुखदुःखे भोगतो व आयुष्यान्ती अचानक शरीर सोडतो. ॥१॥

शरीरीं शक्ति तारुण्यपणीं । नाना सुखें भोगी प्राणी । अशक्त होतां वृद्धपणीं । दुःखें भोगी ।।२।।

तरुण वयात इंद्रिये कार्यक्षम असल्याने माणूस अनेक प्रकारची सुखे भोगतो. वृद्धावस्थेत इंद्रिये दुर्बळ झाल्याने अनेक दुःखे भोगतो. ॥२॥

मरावेना ऐसी आवडी । हातपाये खोडून प्राण सोडी । नाना दुःखें अवघडी । वृद्धपणीं ।।३।।

म्हातारपणी असह्य आधि व व्याधी होतात. (मानसिक व शारीरिक व्यथा, वेदना) तरी मरावे असे वाटत नाही! पण शेवटी हातपाय झाडून प्राण सोडण्याची पाळी येते. ॥३॥

देहआत्मयांची संगती । कांहींयेक सुख भोगिती । चर्फडचर्फडून जाती । देहांतकाळी ।।४।।

चेतन आत्मा व अचेतन शरीर यांच्या कल्पित संयोगाचे, अविद्येमुळे तादात्म्य संबंधात रूपान्तर होऊन माणसाला शरीराच्या माध्यमातून थोडेफार सुख मिळते. पण शेवटी चरफडत मरावे लागते. ॥४॥

ऐसा आत्मा दुःखदायेक । येकांचे प्राण घेती येक । आणी सेवटीं निरार्थक । कांहींच नाहीं ।।५।।

असा प्रत्येकाचा जीवात्मा दुःखे भोगीत असूनही माणसे एकमेकांचे प्राण घेतात. एवढे करून शेवटी हातात काहीच शिल्लक राहत नाही. ॥५॥

ऐसा दों दिसांचा भ्रम । त्यास म्हणती परब्रह्म । नाना दुःखाचा संभ्रम । मानून घेतला ।।६।।

अशा या अत्यल्प भ्रमरूप जीवनालाच सर्व ब्रह्मवादी ब्रह्मरूप मानतात! ब्रह्म आनंदरूप असताना दुःखांचे डोंगर सोसतात!! ॥६॥

दुःखी होऊन चर्फडून गेले । तेथें कोण समाधान जालें । कांहींयेक सुख भोगिलें । तों सर्वेंचि दुःख ।।७।।

दुःखे भोगून चरफडत मरणाऱ्याला काय समाधान मिळेल? एखादे सुख मिळते न मिळते तोच दुःख भोगावे लागते. ॥७॥

जन्मदारभ्य आठवावें । म्हणिजे अवघें पडेल ठावें । नाना दुःख मोजावें । काये म्हणोनी ।।८।।

जन्मापासूनच्या सर्व दुःखांचे स्मरण केले म्हणजे किती दुःखे भोगली त्याची कल्पना येते. अशी दुःखे किती म्हणून मोजावी? ॥८॥

ऐसी आत्मयांची संगती । नाना दुःखें प्राप्त होती । दैन्यवाणे होऊन जाती । प्राणीमात्र ।।९।।

आत्मा देहतादात्म्याने जीवभाव धरून जगू लागला की त्याला अनंत दुःखांचे दैन्य येते. ॥९॥

कांहीं आनंद काहीं खेद । जन्मवरी पडिला समंध । नाना प्रकारीं विरुद्ध । तडातोडी ।।१०।।

सुखदुःखाचे द्वन्द्व जन्मभर सोसावे लागून अनुकूल व प्रतिकूल अनुभवांचे घाव बसतात. ॥१०॥

निद्राकाळीं ढेकुण पिसा । नाना प्रकारीं वळसा । नाना उपायें वळसा । त्यांस होये ।।११।।
भोजनकाळीं माश्या येती । नाना पदार्थ उंदीर नेती । पुढें त्यांची हि फजिती । मार्जरें करिती ।।१२।।
वा चामवा गोंचिड । गांधेलें कानटें उदंड । येकास येक चर्फड । दोहिकडे ।।१३।।
विंचु सर्प वाग रिसें । सुसरी लांडिगे माणसास माणसें । परस्परें सुखसंतोषें । येकहि नाहीं ।।१४।।
चौऱ्यासी लक्ष उत्पत्ती । येकास येक भक्षिती । नाना पीडा दुःखणी किती । म्हणौन सांगावें ।।१५।।

झोपेत ढेकूण पिसवा चावतात. त्यांना टाळण्यासाठी (वळसा घालणे) अनेक उपाय करावे लागतात. जेवताना ताटात माशा बसतात, उंदीर पदार्थ चोरून नेतात व मांजरे उंदरांना भंडावून सोडतात. उवा, वाळवी, गोचीड, गांधीलमाशा, लहान साप इ. माणसांना सतावतात व माणसे त्यांना मारतात. विंचू, साप, वाघ, अस्वले, सुसरी, लांडगे, माणसाला माणसे इ. परस्परांचा घात करतात. अशा चौऱ्याऐंशी लक्ष योनी एकमेकांना खातात व अनंत यातना देतात. ।।११-१५।।

ऐसी अंतरात्म्याची करणी । नाना जीव दाटले धरणीं । परस्परें संव्हारणी । येकयेकांची ।।१६।।

अशा या ईश्वरी खेळात पृथ्वीवर अनंत जीव दाटीवाटीने राहतात. परस्परांना ठार मारतात. ।।१६।।

अखंड रडती चर्फडिती । विवळविवळों प्राण देती । मूर्ख प्राणी त्यास म्हणती । परब्रह्म ।।१७।।

अशा चरफडून रडणाऱ्या, विव्हळून प्राण सोडणाऱ्या जीवांना मूर्ख लोक परब्रह्म समजतात! ।।१७।।

परब्रह्म जाणार नाहीं । कोणास दुःख देणार नाहीं । स्तुति निंदा दोनी नाहीं । परब्रह्मीं ।।१८।।

परब्रह्म येत-जात नाही, कोणाला यातना देण्यासाठी व निंदास्तुतीसाठी त्याला कोणी नाही. ।।१८।।

उदंड शिव्या दिधल्या । तितुक्या अंतरात्म्यास लागल्या । विचार पाहातां प्रत्यया आल्या । येथातथ्य ।।१९।।

कितीही शिव्या दिल्या तरी त्या जीवात्म्याला झोंबतात (ब्रह्माला नाही), शास्त्रशुद्ध विचाराने हे लक्षात येते. (ब्रह्माला कान व मन नसल्याने त्याला शिव्या ऐकूच येत नाहीत.) ।।१९।।

धनडीचा बटकीचा लवंडीचा । गधडीचा कुतरीचा वोंगळीचा । ऐसा हिशेब सिव्यांचा । किती म्हणोनि सांगावा ।।२०।।

धांगडी, बटकी, लवंडी, गधडी, कुतरी, वोंगळी यांचा मुलगा इ. प्रकारच्या भरपूर शिव्या आहेत. ।।२०।।

इतुकें परब्रह्मीं लागेना । तेथें कल्पनाचि चालेना । तडातोडीचें ज्ञान मानेना । कोणीयेकासी ।।२१।।

यातील परब्रह्माला काहीच लागत नाही (कारण ते कोणाचे कोणी नाही!) परब्रह्मस्वरूपात कोणत्याही कल्पनेला वाव नाही. शास्त्राला मान्य नसलेले तुटके-मोडके ब्रह्मज्ञान विचक्षणाला पटत नाही. ।।२१।।

सृष्टीमधें सकळ जीव । सकळांस कैचें वैभव । याकारणें ठायाठाव । निर्मिला देवें ।।२२।।

सृष्टीत असंख्य माणसे आहेत. सर्वांनाच वैभव कसे मिळेल? म्हणून ईश्वराने उत्तम प्रारब्ध असलेल्यांच्या ठायी वैभवाचा ठाव योजला आहे. ।।२२।।

उदंड लोक बाजारीचे । जें जें आलें तें तें वेंचे । उत्तम तितुके भाग्याचे । लोक घेती ।।२३।।

बाजार भरला की त्यात कित्येक लोक कित्येक वस्तू विक्रीसाठी ठेवतात. भाग्यवान ग्राहक त्यातील उत्तम वस्तू निवडून घेतात. ।।२३।।

येणेंचि न्यायें अन्न वसन । येणेंचि न्यायें देवतार्चन । येणेंचि न्यायें ब्रह्मज्ञान । प्राप्तव्यासारिखें ।।२४।।

अशाच प्रकारे अन्नवस्त्र, देवपूजा, ब्रह्मज्ञान इ. भाग्यानेच म्हणजे पूर्वसुकृताने लाभते. ।।२४।।

अवघेच लोक सुखी असती । संसार गोड करून नेती । माहाराजे वैभव भोगिती । तें करंट्यास कैंचे ।।२५।।

हे खरे की बहुतेक लोक आहे त्या परिस्थितीत सुखाने जगण्याचा प्रयत्न करतात. पण मोठे मोठे सत्ताधीश जे वैभव भोगतात ते सामान्यांना कोठून मिळेल? ॥२५॥

परंतु अंतीं नाना दुःखें । तेथें होतें सगट सारिखें । पूर्वीं भोगिलीं नाना सुखें । अंतीं दुःख सोसवेना ।।२६।।

पण सरत्या जीवनातील अनेक दुःखे सर्वांना सारखीच भोगावी लागतात. विशेषतः पूर्वजीवनात अनेक सुखे भोगली असतील तर उत्तरायुष्यातील दुःखे असह्य होतात. ॥२६॥

कठिण दुःख सोसवेना । प्राण शरीर सोडिना । मृत्यदुःख सगट जना । कासाविस करी ।।२७।।

दुःखाची तीव्रता सहन होत नाही व प्राणही जाता जात नाही असे हे मरणकाळचे दुःख सर्वांना सारखेच कासावीस करते. (Death is the great leveler). ॥२७॥

नाना अवेवहीन जालें । तैसेंचि पाहिजे वर्तलें । प्राणीं अंतकाळीं गेलें । कासाविस होउनी ।।२८।।

पाय लुळे पडणे, डोळा जाणे इ. प्रकारे अनेक अवयव निकामी झाले तरी तसेच जगावे लागते. मरणाचे वेळी जीव अधिकच कासावीस होतो. ॥२८॥

रूप लावण्य अवघें जातें । शरीरसामर्थ्य अवघें राहातें । कोणी नस्तां मरतें । आपदआपदों ।।२९।।

शरीराचा बांधेसूदपणा व सौंदर्य लयाला जाते. शक्ती क्षीण होऊन, संकटे झेलीत एकटेपणात मरण्याची वेळ येते. ॥२९॥

अंतकाळ दैन्य दीन । सकळिकांस तत्समान । ऐसें चंचळ अवलक्षण । दुःखकारी ।।३०।।

शरीराचा अंतकाळ भल्याभल्यांना केविलवाणे व दीन करतो. येथे सर्व सारखेच! विकारी, अवलक्षणी व दुःखदायक देहतादात्म्याचे हे स्वरूप आहे. (देहालाच आत्मा मानणारांचे असे हाल होतात.) ॥३०॥

भोगून अभोक्ता म्हणती । हे तों अवघीच फजिती । लोक उगेच बोलती । पाहिल्याविण ।।३१।।

'आत्मा भोगून अभोक्ता आहे' असे शास्त्र सांगते म्हणून तसा अनुभव न घेता मूर्खही तेच म्हणतात! अशी वायफळ वटवट करणाऱ्यांची सर्व प्रकारे फजिती होते. ॥३१॥

अंतकाळ आहे कठिण । शेरीर सोडिना प्राण । बराड्यासारिखें लक्षण । अंतकाळीं ।।३२।।

अविद्याग्रस्ताचा अंतकाळ खरोखर कठीण आहे. प्राण सहजतेने शरीर सोडीत नाहीत. वेठबिगारीच्या कामगारासारखी परिस्थिती होते. (काम झेपत नाही व सोडूनही जाता येत नाही.) ॥३२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देहात्मनिरूपणनाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'देहात्मनिरूपण' नावाचा सहावा समास समाप्त

दशक सतरावा : प्रकृतिपुरुष

समास सातवा : जगज्जीवननिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

मुळीं उदक निवळ असतें । नाना वल्लीमधें जातें । संगदोषें तैसें होतें । आंब्ल तिक्षण कडवट ।।१।।

पाण्याला स्वत:ची चव नाही. पण ते जेव्हा अनेक वनस्पतींमध्ये शिरते तेव्हा त्या वनस्पतींची आंबट, तिखट किंवा कडू चव त्या पाण्याला येते. ॥१॥

आत्मा आत्मपणें असतो । देहसंगें विकारतो । साभिमानें भरीं भरतो । भलतिकडे ।।२।।

त्याप्रमाणे आत्मा निर्गुण निराकार असतो. पण देहात व्यापून राहिल्याने सगुण साकार इ. विकारांचा भासतो. 'मी देह' असे बंधन पत्करून या देहतादात्म्यरूप देहाहंकारामुळे कामक्रोधादी सहा रिपूंच्या भरीस पडून जन्ममरणांच्या भलत्या चक्रात सापडतो. ॥२॥

बरी संगती सांपडली । जैसी उंसास गोडी आली । विषवल्ली फांपावली । घातकी प्राणी ।।३।।

उसाच्या संगतीने पाण्याला गोडी येते. बचनागाच्या संगतीने तेच पाणी इतर प्राण्यांचा प्राण घेते. ॥३॥

अठराभार वनस्पती । गुण सांगावे ते किती । नाना देहाचे संगती । आत्मयास होये ।।४।।

वनस्पतींच्या जाती असंख्य आहेत व तितकेच त्यांचे गुणही आहेत. त्याप्रमाणे शरीरेही कित्येक असून त्यांचे स्वभावही तेवढेच आहेत. आत्मा त्यांच्या संगतीने जणूं त्या स्वभावाचा होतो. ॥४॥

त्यामधें कोणी भले । ते संतसंगें निघाले । देहाभिमान सांडून गेले । विवेकबळें ।।५।।

अशा देहधाऱ्यांमधील विचारवन्त संतांच्या संगतीत शान्त होतात. आत्मानात्मविवेकाने 'मी देह' हा अभिमान सोडून मुक्त होतात. ॥५॥

उदकाचा नाशचि होतो । आत्मा विवेकें निघतो । ऐसा आहे प्रत्यय तो । विवेकें पाहा ।।६।।

ज्या पाण्याचा आत्म्याला दृष्टान्त दिला ते पाणी वनस्पतीबरोबर वाळून जाते. पण देहातील आत्मा मात्र विवेकाने मुक्त होतो हा फरक विचाराने लक्षात घ्यावा. ॥६॥

ज्यास स्वहितचि करणें । त्यास किती म्हणौन सांगणें । हें ज्याचें त्यानें समजणें । सकळ कांहीं ।।७।।

ज्याला स्वत:चे शाश्वत हित साधावयाचे आहे त्याला असे परोपरीने किती सांगावे! त्यातील वर्म व सर्व ज्ञान ज्याचे त्याने समजून घ्यावे. ॥७॥

आपला आपण करी कुडावा । तो आपला मित्र जाणावा । आपला नाश करी तो समजावा । वैरी ऐसा ।।८।।

जो स्वत:ची सुटका करून घेतो तो आपला आपणच मित्र असतो. जो स्वत:चा नाश करतो तो त्याचा तोच वैरी असतो. ॥८॥

आपलें आपण अन्हित करावें । त्यास आडवें कोणें निघावें । येकांतीं जाऊन जीवें । मारी आपणासी ।।९।।

जो निर्जन जागी जाऊन आत्महत्या करून स्वत:चे अनहित करतो त्याला कोण थांबवणार? ॥९॥

जो आपला आपण घातकी । तो आत्महत्यारा पातकी । याकारणें विवेकी । धन्य साधु ।।१०।।

जो अविद्याग्रस्त राहून आत्महत्या करतो तो पापी असतो. (पहा ईश उप. ३) पण जो सारासारविवेकाने अविद्येतून सुटतो तो साधू धन्य होय. ॥१०॥

पुण्यवंतां सत्संगती । पापिष्टां असत्संगती । गति आणि अवगती । संगतीयोगें ।।११।।

पूर्वसुकृताच्या बळाने संतसंगती, तर पापामुळे दुर्जनांची संगत मिळते. सत्गती व दुर्गती संगतीवर अवलंबून आहेत. ॥११॥

उत्तम संगती धरावी । आपली आपण चिंता करावी । अंतरीं बरी विवरावी । बुद्धि जाणत्याची ।।१२।।

प्रारब्धाने दुर्जनाची संगत मिळाली असली तरी विचाराने ती सोडून सत्संगती धरावी. आपल्या हिताचा आपण विचार करून ज्ञानी महात्म्यांचा उपदेश बुद्धीने योग्य प्रकारे समजावून घ्यावा. ॥१२॥

इहलोक आणि परलोक । जाणता तो सुखदायेक । नेणत्याकरितां अविवेक । प्राप्त होतो ।।१३।।

व्यावहारिक व पारमार्थिक जीवनासाठी जाणत्याची साथ सुखकारक असते. अज्ञान्याची संगत अविवेक निर्माण करते. ॥१३॥

जाणता देवाचा अंश । नेणता म्हणिजे तो राक्षस । यामधें जें विशेष । तें जाणोन घ्यावें ।।१४।।

जाणता पुरुष हा देवाचा अंश असून अज्ञानी माणूस राक्षस समजावा. यांतील फरक लक्षात घ्यावा. ॥१४॥

जाणतां तो सकळां मान्य । नेणता होतो अमान्य । जेणेंकरिता होईजे धन्य । तेंचि घ्यावें ।।१५।।

जाणत्याविषयी सर्वांना आदर वाटतो. अज्ञान्याविषयी समाजाला तुच्छता वाटते. यातील जो कल्याणकर्ता आहे त्याची संगतीसाठी निवड करावी. ॥१५॥

साक्षपी शाहाण्याची संगती । तेणें साक्षपी शाहाणे होती । आळसी मूर्खाची संगती । आळसी मूर्ख ।।१६।।

उद्योगी व शहाण्याच्या संगतीने माणूस उद्योगी व शहाणा होतो. आळशी व मूर्खाच्या नादाने तसाच होतो. ॥१६॥

उत्तम संगतीचें फळ सुख । अद्धम संगतीचें फळ दुःख । आनंद सांडुनिया शोक । कैसा घ्यावा ।।१७।।
ऐसे हें प्रगट दिसे । जनामधें उदंड भासे । प्राणीमात्र वर्ततसे । उभयेयोगें ।।१८।।
येका योगें सकळ योग । येका योगें सकळ वियोग । विवेकयोगें सकळ प्रयोग । करीत जावें ।।१९।।

उत्तम संगतीने सुख तर कुसंगतीने दुःख मिळते. मग सुख सोडून शोक होईल असे दुःख का घ्यावे? समाजात असा अनुभव सतत असल्याने हा नियम स्पष्टच दिसतो. माणसे दोन्ही भोगतात. सत्संगतीत हिताचा पूर्ण योग तर कुसंगतीत त्याचा पूर्ण वियोग होतो. म्हणून सर्व कर्मे विवेकपूर्वक करावीत. ॥१७-१९॥

अवचितें सांकडींत पडिलें । तरी तेथून पाहिजे निघालें । निघोन जातां जालें । परम समाधान ।।२०।।
नाना दुर्जनांचा संग । क्षणक्षणा मनभंग । याकारणें कांहीं रंग । राखोन जावें ।।२१।।
शाहाणा येत्न त्याच्या गुणें । पाहों जातां काये उणें । सुख संतोष भोगणें । नाना श्लाघ्यता ।।२२।।
आतां लोकीं ऐसें आहे । सृष्टीमधें वर्तताहे । जो कोणी समजोन पाहे । त्यास घडे ।।२३।।

कल्पना न येता कुसंगतीचा प्रसंग आला तर त्यातून निर्धाराने निसटून जावे. त्यामुळे लगेच समाधान होते. अनेक प्रकारच्या दुर्जनांच्या संगतीत मन सतत नाराज राहते. म्हणून स्वतःची म्हणून काही तत्त्वे सांभाळून असावे. शहाणपणाने प्रयत्न करीत राहाणाराला काय कमी पडणार आहे? सुख, समाधान व अनेक प्रकारे प्रतिष्ठा मिळते. आजही जगात असाच अनुभव येतो. जो हे जाणून घेईल त्याचेसाठी ते सर्व उपलब्ध आहे. ॥२०-२३॥

बहुरत्न वसुंधरा । जाणजाणों विचार करा । समजल्यां प्रत्ययो अंतरा– । माजीं येतो ।।२४।।

दुर्बळ आणि संपन्न । वेडें आणि वित्पन्न । हें अखंड दंडायमान । असतचि असे ।।२५।।

येक भाग्यपुरुष मोडती । येक नवे भाग्यवंत होती । तैसीच विद्या वित्पती । होत जाते ।।२६।।

येक भरे येक रितें । रितें मागुतें भरतें । भरतेंहि रितें होतें । काळांतरीं ।।२७।।

या पृथ्वीवर व्यक्ती व वस्तूंच्या नाना तऱ्हा आहेत. त्यांचा समजून उमजून विचार करा. त्यामुळे त्यांचेसंबंधी मनात निर्णय होतो. दरिद्री व धनवान, मतिमंद व महाबुद्धिमान इ. जोड्या जगात असणे हा नियमच आहे. काही भाग्यवन्तांचे भाग्य त्यांना सोडते. काही नवे भाग्यवन्त उदयाला येतात. बुद्धी व ज्ञानाचा असाच प्रकार आहे. एक तलाव पूर्ण भरतो तर दुसरा तलाव मोकळा राहतो. भरलेला रिकामा होऊन रिकामा काही काळाने भरतो! ॥२४-२७॥

ऐसी हे सृष्टीची चाली । संपत्ति दुपारची साउली । वयेसा तरी निघोन गेली । हळुहळु ।।२८।।

बाळ तारुण्य आपलें । वृधाप्य प्रचितीस आलें । ऐसें जाणोन सार्थक केलें । पाहिजे कोणियेकें ।।२९।।

देह जैसें केलें तैसें होतें । येत्न केल्यां कार्येे साधतें । तरी मग कष्टावें तें । काये निमित्य ।।३०।।

असे हे जीवनचक्र सतत चालू आहे. त्यात मिळणारी संपत्ती ही दुपारी मिळणाऱ्या झाडाच्या सावलीसारखे थोडे सुख देते. (सूर्य कलला की सावली निघून जाते एवढाच अर्थ घ्यावा) वय तर हळूहळू निघून जाते. बाल्य, तारुण्य व म्हातारपण ज्याचे त्याला अनुभवाला येते. हे लक्षात घेऊन जीवनाचे सार्थक करावे. माणूस प्रयत्न करील तसे त्याला फळ मिळते. प्रयत्नाला यश येते. मग कष्टाचे जीवन का भोगावे? ॥२८-३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'जगज्जीवननिरूपणनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'जगज्जीवननिरूपण' नावाचा सातवा समास समाप्त

दशक सतरावा : प्रकृतिपुरुष

समास आठवा : तत्त्वनिरूपण

।। श्रीराम समर्थ ।।

नाभीपासून उन्मेषवृत्ती । तेचि परा जाणिजे श्रोतीं । ध्वनिरूप पश्यंती । हृदईं वसे ।।१।।
कंठापासून नाद जाला । मध्यमा वाचा बोलिजे त्याला । उच्चार होतां अक्षराला । वैखरी बोलिजे ।।२।।

नाभीखालील मणिपूर चक्रातून जे सामान्य स्फुरण उत्पन्न होते तीच परावाणी होय. तिला हृदयस्थानातील अनाहत चक्रात सूक्ष्म ध्वनीचे स्वरूप आल्यावर तीच पश्यन्ती वाणी बनते. ती वाणी कंठस्थानातील विशुद्ध चक्रात अधिक स्पष्ट होऊन मध्यमा वाणी बनते. पुढे मुखाने उच्चार होताच तिला वैखरी म्हणतात. ।।१-२।।

नाभिस्थानीं परा वाचा । तोचि ठाव अंतःकर्णाचा । अंतःकर्णपंचकाचा । निवाडा ऐसा ।।३।।

नाभीस्थानी असलेली परावाणी हे अन्त:करणाचे उगमस्थान आहे. अन्त:करणपंचकाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे– ।।३।।

निर्विकल्प जें स्फुरण । उगेंच असतां आठवण । तें जाणावें अंतःकर्ण । जाणतीकळा ।।४।।

विचाररहित स्फुरण किंवा स्वत:ची सामान्य जाणीव तेच अन्त:करण. ते चिदाभासाने प्रकाशित असल्याने जाणीवयुक्त आहे. ।।४।।

अंतःकर्ण आठवलें । पुढें होये नव्हेसें गमलें । करूं न करू ऐसें वाटलें । तेंचि मन ।।५।।

स्मृती जागी होऊन नंतर एखादी गोष्ट होईल न होईल, करावी न करावी असे वाटते ते मन होय. ।।५।।

संकल्प विकल्प तें चि मन । जेणेंकरितां अनुमान । पुढें निश्चयो तो जाण । रूप बुद्धीचें ।।६।।

'संकल्प विकल्पात्मिकावृत्ति मन:' संकल्प विकल्प करणाऱ्या अन्त:करणाला मन म्हणतात. तर्क हे त्याचेच काम आहे. नंतर 'निश्चयात्मिका वृत्ति बुद्धि:' निश्चय करणारे अन्त:करण म्हणजे बुद्धी. ।।६।।

करीनचि अथवा न करी । ऐसा निश्चयोचि करी । तेचि बुद्धि हे अंतरीं । विवेकें जाणावी ।।७।।

हे केलेच पाहिजे किंवा हे मी करणार नाही अशा प्रकारे निश्चय करणाऱ्या अन्त:करणाला बुद्धी म्हणतात हे विवेकी लोक जाणतात. ।।७।।

जे वस्तुचा निश्चये केला । पुढें तेचि चिंतूं लागला । तें चित्त बोलिल्या बोला । येथार्थ मानावें ।।८।।

असा केलेला निश्चय धरून ठेवणाऱ्या अन्त:करणाला चित्त म्हणतात. 'अवधारणात्मिका वृत्ति: चित्त:' ।।८।।

पुढें कार्याचा अभिमान धरणें । हें कार्ये तों अगत्य करणें । ऐस्या कार्यास प्रवर्तणें । तोचि अहंकारु ।।९।।

आता हे मी करीन, हे मला केले पाहिजे इ. प्रकारे क्रियेकडे प्रवृत्ती निर्माण करणारे अन्त:करण म्हणजे अहंकार. 'अहं अहं कारयति इति अहंकार:'।।९।।

ऐसें अंतःकर्णपंचक । पंच वृत्ती मिळोन येक । कार्येभागे प्रकारपंचक । वेगळाले ।।१०।।

एकाच अन्त:करणाचे कार्य बदलले की त्याचे नाव बदलते. असे हे अन्त:करणपंचक आहे. ।।१०।।

जैसे पांचहि प्राण । कार्येभागें वेगळाले जाण । नाहीं तरी वायोचें लक्षण । येकचि असे ।।११।।

उदा. पाच प्राणांच्या कार्याप्रमाणे त्यांना समानादी नावे असली तरी ते सर्व वायूच होत. ॥११॥

सर्वांगीं व्यान नाभीं समान । कंठीं उदान गुदीं अपान । मुखीं नासिकीं प्राण । नेमस्त जाणावा ।।१२।।

बोलिलें हें प्राणपंचक । आतां ज्ञानइंद्रियेंपंचक । श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा नासिक । ऐसीं हें ज्ञानेंद्रियें ।।१३।।

वाचा पाणी पाद शिस्न गुद । हे कर्मइंद्रियें प्रसिद्ध । शब्द स्परुष रूप रस गंध । ऐसें हें विषयपंचक ।।१४।।

सर्व शरीरात व्यापून असतो तो व्यान, नाभीस्थानी समान, कंठात-उदान, गुद– अपान, मुख व नाक– प्राण, ही त्याची स्थाने निश्चित आहेत. हेच प्राणपंचक होय. आता पंचज्ञानेंद्रिये– कान, त्वचा, डोळे, जीभ व नाक. पंच कर्मेंद्रिये-वाणी, हात, पाय, जननेंद्रिय व गुद. विषयपंचक– शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध. ॥१२-१४॥

अंतःकर्ण प्राणपंचक । ज्ञानेंद्रियें कर्मेंद्रियें पंचक । पांचवे विषयपंचक । ऐसीं हे पांच पंचकें ।।१५।।

ऐसें हे पंचविस गुण । मिळेन सूक्ष्म देह जाण । याचा कर्दम बोलिला श्रवण । केलें पाहिजे ।।१६।।

पाच अंतःकर्णे, पाच प्राण, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये व पाच विषय अशा पंचवीस गुणांचा सूक्ष्मदेह तयार होतो. हा तपशील आता समजून घ्यावा. ॥१५-१६॥

अंतःकर्ण व्यान श्रवण वाचा । शब्दविषये आकाशाचा । पुढें विस्तार वायोचा । बोलिला असे ।।१७।।

मन समान त्वचा पाणी । स्पर्श रूप हा पवनीं । ऐसे हे अडाखे साधुनी । कोठा करावा ।।१८।।

बुद्धि उदान नयेन चरण । रूपविषयाचें दर्शन । संकेतें बोलिलें मन । घालून पाहिजे ।।१९।।

चित्त अपान जिव्हा शिस्न । रसविषये आप जाण । पुढें ऐका सावधान । पृथ्वीचें रूप ।।२०।।

अहंकार प्राण घ्राण । गुद गंधविषये जाण । ऐसें केलें निरूपण । शास्त्रमतें ।।२१।।

ऐसा हा सूक्ष्म देहे । पाहातां होईजे निसंदेहे । येथें मन घालून पाहे । त्यासीच हें उमजे ।।२२।।

	अन्तःकरण	प्राण	ज्ञानेंद्रिय	कर्मेंद्रिय	विषय
१)	अन्तःकरण	व्यान	श्रवण	जीभ	शब्द
२)	मन	समान	त्वचा	हात	स्पर्श.
३)	बुद्धी	उदान	डोळा	पाय	रूप
४)	चित्त	अपान	वाणी	शिस्न	रस
५)	अहंकार	प्राण	नाक	गुद	गंध

२) महाभूत व विषय

आकाश– शब्द, वायू– स्पर्श, अग्नी– रूप, आप– रस, पृथ्वी– गंध.

असा हा सूक्ष्म देहाचा तपशील लक्षात घेऊन त्या विषयीची संदिग्धता उरू देऊ नये. जो यात पूर्ण लक्ष घालील त्यालाच हे कळते. ॥१७-२२॥

ऐसें सूक्ष्म देहे बोलिलें । पुढें स्थूळ निरोपिलें । आकाश पंचगुणे वर्तलें । कैसें स्थुळीं ।।२३।।

काम क्रोध शोक मोहो भये । हा पंचविध आकाशाचा अन्वये । पुढें पंचविध वायो । निरोपिला ।।२४।।

चळण वळण प्रासारण । निरोध आणि अकोचन । हें पंचविध लक्षण । प्रभंजनाचें ।।२५।।

क्षुधा त्रुषा आलस्य निद्रा मैथुन । हे तेजाचे पंचविध गुण । आतां पुढें आपलक्षण । निरोपिलें पाहिजे ।।२६।।

शुक्लीत श्रोणीत लाळ मूत्र स्वेद । हा पंचविध आपाचा भेद । पुढें पृथ्वी विशद । केली पाहिजे ।।२७।।
अस्ति मांष त्वचा नाडी रोम । हे पृथ्वीचे पंचविध धर्म । ऐसे स्थूळ देहाचें वर्म । बोलिलें असे ।।२८।।
पृथ्वी आप तेज वायो आकाश । हे पांचाचे पंचविस । ऐसें मिळोन स्थूळ देहास । बोलिजेतें ।।२९।।

सूक्ष्म देह सांगून झाला. आता स्थूलदेह सांगून आकाशादी भूते आपल्या गुणांसह स्थूल कशी राहतात ते सांगू.

महाभूत		**गुण**
आकाश	➔	काम, क्रोध, शोक, मोह व भय.
वायू	➔	हालणे, वळणे, प्रसरण, निरोध व संकोच
तेज	➔	भूक, तहान, आळस, निद्रा, मैथुन
आप	➔	पुंबीज, स्त्रीबीज, लाळ, मूत्र व घाम.
पृथ्वी	➔	अस्थि, मांस, त्वचा, नाडी, रोम.

पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश यांच्या पंचवीस गुणांचा स्थूलदेह बनतो. ॥२३-२९॥

तिसरा देह कारण अज्ञान । चौथा देह माहांकारण ज्ञान । हे च्यारी देह निर्शितां विज्ञान । परब्रह्म तें ।।३०।।
विचारें चौदेहावेगळे केलें । मीपण तत्वासरिसें गेले । अनन्य आत्मनिवेदन जालें । परब्रह्मीं ।।३१।।
विवेकें चुकला जन्म मृत्य । नरदेहीं साधिलें महत्कृत्य । भक्तियोगें कृत्यकृत्य । सार्थक जालें ।।३२।।
इति श्री पंचीकर्ण । केलेंचि करावें विवर्ण । लोहाचे जालें सुवर्ण । परिसाचेनयोगें ।।३३।।
हाहि दृष्टांत घडेना । परिसाचेन परीस करवेना । शरण जातां साधुजना । साधुच होइजे ।।३४।।

तिसरे अज्ञानमय सुषुप्तीचे कारण शरीर, चौथा ज्ञानमय महाकारण देह या चारींचा निरास केला असता विज्ञानरूप परब्रह्म उरते. विचाराने आत्म्याला चार देहांपासून वेगळे केल्यावर 'मी' रूप अहंकार त्या देहातील तत्त्वांच्या निरासाबरोबरच निरस्त होतो व परब्रह्मरूप आत्मस्वरूपात आत्मनिवेदनरूप अनन्यत्व होऊन जीवनाचे सार्थक होते. असे हे पंचीकरण शास्त्र सांगून झाले. त्याचे पुन्हा पुन्हा मननचिंतन करावे. मनन-चिंतन रूप परिसाचा स्पर्श झाल्यावर अज्ञानरूप लोखंडाचे रूपांतर ज्ञानरूप सोन्यात होते. हा दृष्टान्तसुद्धा अपूर्णच आहे. कारण एक परीस दुसरा परीस करू शकत नाही. मात्र सन्तांना शरण जाणारा सन्तच होतो. विवेकाने जन्ममरण चुकण्याचे महान ध्येय नरदेहात साध्य होते. भक्तीने कृतकृत्यता येऊन जीवनाचे सार्थक होते. ॥३०-३४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'तत्त्वनिरूपणनाम' समास आठवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'तत्त्वनिरूपण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक सतरावा : प्रकृतिपुरुष

समास नववा : तनुचतुष्टयनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

स्थूळ सूक्ष्म कारण माहाकारण । ऐसे हे चत्वार देह जाण । जागृति स्वप्न सुषुप्ति पूर्ण । तुर्या जाणावी ।।१।।
विश्व तैजस प्राज्ञ । प्रत्यगात्मा हे अभिमान । नेत्रस्थान कंठस्थान हृदयस्थान । मूर्धनी ते ।।२।।
स्थूळभोग प्रविक्तभोग । आनंदभोग आनंदावभासभोग । ऐसे हे चत्वार भोग । चौंदेहाचे ।।३।।
अकार उकार मकार । अर्धमात्रा तो ईश्वर । ऐस्या मात्रा चत्वार । चौंदेहाच्या ।।४।।
तमोगुम रजोगुण । सत्वगुण शुद्धसत्वगुण । ऐसे हे चत्वार गुण । चौंदेहाचे ।।५।।
क्रियाशक्ति द्रव्याशक्ती । इछाशक्ति ज्ञानशक्ती । ऐशा चत्वार शक्ती । चौंदेहाच्या ।।६।।
ऐसीं हे बत्तिस तत्त्वें । दोहींची पन्नास तत्त्वे । अवघीं मिळोन ब्यासि तत्त्वें । अज्ञान आणी ज्ञान ।।७।।
ऐसीं हे तत्वें जाणावीं । जाणोन माइक वोळखावीं । आपण साक्षी निरसावीं । येणें रितीं ।।८।।
साक्षी म्हणिजे ज्ञान । ज्ञानें वोळखावें अज्ञान । ज्ञानाज्ञानाचें निर्शन । देहासरिसें ।।९।।

१)	चारदेह	➔	स्थूल	सूक्ष्म	कारण	महाकारण
२)	अवस्था	➔	जागृति	स्वप्न	सुषुप्ती	तुर्य
३)	अभिमान	➔	विश्व	तैजस	प्राज्ञ	प्रत्यगात्मा
४)	स्थान	➔	नेत्र	कंठ	हृदय	मूर्धा. (मस्तक)
५)	भोग	➔	स्थूल	प्रविविक्त	आनंद	आनंदावभास
६)	मात्रा	➔	अ	उ	म	अर्धमात्रा
७)	गुण	➔	तम	रज	सत्त्व	शुद्धसत्त्व
८)	शक्ती	➔	क्रिया	द्रव्य	इच्छा	ज्ञान

चार देहांची ही बत्तीस तत्त्वे, सूक्ष्मदेहाची पंचवीस व स्थूल देहाची पंचवीस अशी एकूण ब्याऐंशी तत्त्वे आहेत. अज्ञान व ज्ञानासह ही सर्व मायिक आहेत हे समजावून घेऊन आत्मरूप 'मी' त्यांचा साक्षी आहे हे जाणून त्यांचा निरास करावा. 'साक्षित्व' ओळखणे हे ज्ञान व 'ती तत्त्वे मी' हे अज्ञान ओळखावे. देहांच्या निरासाबरोबर ज्ञान व ज्ञान सापेक्ष अज्ञानाचा निरास होऊन जातो. (अधिक माहितीसाठी मांडुक्यकारिका व विवेक सिंधू पाहावा.) ॥१-९॥

ब्रह्मांडी देह कल्पिलें । विराट हिरण्यगर्भ बोलिले । ते हे विवेकें निर्शले । आत्मज्ञानें ।।१०।।

ब्रह्मांडाच्या विराट, हिरण्यगर्भ, महत् व अव्याकृत अशा चार देहांची केलेली कल्पनाही विवेकाने झालेल्या आत्मज्ञानाने निरस्त होते. ॥१०॥

आत्मनात्माविवेक करितां । सारासारविचार पाहातां । पंचभूतांची माइक वार्ता । प्रचित आली ।।११।।

आत्मानात्मविवेक व सारासारविचार केल्यावर ही पंचभूते मायिक असल्याचा निश्चय होतो. ॥११॥

अस्ति मांष त्वचा नाडी रोम । हे पांचहि पृथ्वीचे गुणधर्म । प्रत्यक्ष शरीरीं हें वर्म । शोधून पाहावें ।।१२।।

अस्थि, मांस, त्वचा, नाड्या व रोम हे शरीरातील पृथ्वीतत्त्वाचे अवयव (गुण) आहेत याची विचाराने खात्री करून घ्यावी. ॥१२॥

शुक्लीत श्रोणीत लाळ मूत्र स्वेद । हे आपाचे पंचकभेद । तत्वें समजोन विशद । करून घ्यावीं ।।१३।।

शुक्र, स्त्रीबीज, लाळ, मूत्र व घाम हे शरीरातील जलतत्त्वप्रधान घटक स्पष्टपणे लक्षात घ्यावेत. ॥१३॥

क्षुधा त्रुषा आलस्य निद्रा मैथुन । हे पांचहि तेजाचे गुण । या तत्त्वांचें निरूपण । केलेंचि करावें ।।१४।।

भूक, तहान, आळस, निद्रा व मैथुन हे तेजतत्त्वाचे गुण आहेत हे वारंवार समजावून घ्यावे. ॥१४॥

चळण वळण प्रासारण । निरोध आणि आकोचन । हे पांचहि वायोचे गुण । श्रोतीं जाणावे ।।१५।।

हालणे, वळणे, प्रसरण पावणे, निरोध व आकुंचन हे वायूचे क्रियाप्रधान गुण लक्षात ठेवावेत. ॥१५॥

काम क्रोध शोक मोहो भये । हा आकाशाचा परियाये । हें विवरल्याविण काये । समजो जाणें ।।१६।।

काम, क्रोध, लोभ, मोह व भय हे सर्व शरीरभर व्यापणारे गुण आकाशाचे हे समजावून घेतल्याशिवाय कसे कळेल? (क्रोधाने सर्व शरीर थरथरते.) ॥१६॥

असो ऐसें हें स्थूळ शरीर । पंचविस तत्त्वांचा विस्तार । आतां सूक्ष्मदेहाचा विचार । बोलिजेल ।।१७।।

असे हे स्थूल शरीर म्हणजे पंचवीस तत्त्वांचा विस्तार आहे. आता सूक्ष्मदेहासंबंधी सांगू. ॥१७॥

अंत:कर्ण मन बुद्धि चित्त अहंकार । आकाशपंचकाचा विचार । पुढें वायो निरोत्तर । होऊन ऐका ।।१८।।

व्यान समान उदान । प्राण आणी अपान । ऐसे हे पांचहि गुण । वायोतत्त्वाचे ।।१९।।

श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा घ्राण । हें पांचहि तेजाचे गुण । आतां आप सावधान । होऊन ऐका ।।२०।।

वाचा पाणी पाद शिस्न गुद । हे आपाचे गुण प्रसिद्ध । आतां पृथ्वी विशद । निरोपिली ।।२१।।

शब्द स्पर्श रूप रस गंध । हे पृथ्वीचे गुण विशद । ऐसे हे पंचवीस तत्वभेद । सूक्ष्म देहाचे ।।२२।।

अन्त:करणपंचक	–	अन्त:करण, मन, बुद्धी, चित्त, अहंकार
वायुपंचक	–	व्यान, समान, उदान, प्राण, अपान
तेजतत्त्व	–	कान, त्वचा, डोळे, कर्ण व नाक
आपतत्त्व	–	जीभ, हात, पाय, शिस्न व गुद
पृथ्वीतत्त्व	–	शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध

असे हे पंचवीस भेद सूक्ष्म देहाचे आहेत. ॥१८-२२॥

इति श्रीदासबोधे श्रीगुरुशिष्यसंवादे 'तनुचतुष्टयनिरूपणनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'तनुचतुष्टयनिरूपण' नावाचा नववा समास समाप्त

दशक सतरावा : प्रकृतिपुरुष

समास दहावा : टोणपसिद्धलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

आवर्णोदकीं हटकेश्वर । त्यास घडे नमस्कार । महिमा अत्यंतचि थोर । तया पाताळलिंगाचा ।। १ ।।

हटकेश्वर ह्या अगाध माहात्म्य असलेल्या पाताळलिङ्गरूप देवाला माझा नमस्कार असो. तो देव आवरणाच्या उदकात राहतो. ॥१॥

परंतु तेथें जाववेना । शरीरें दर्शन घडेना । विवेकें आणावें अनुमाना । तया ईश्वरासी ।। २ ।।

पण तेथे प्रत्यक्ष जाता येत नाही. शरीराने त्याचें दर्शन होत नाही. पण त्या ईश्वररूप हटकेश्वराला विचाराने जाणता येते. ॥२॥

सातां समुद्रांचे वेडे । उदंड भूमि पैलिकडे । सेवटीं तुटले कडे । भूमंडळाचे ।। ३ ।।

सातसमुद्रांच्या विळख्यापलीकडे भूमीचा अफाट विस्तार असून त्या भूमीचे शेवटी उंचच उंच तुटके कडे आहेत. (पुराण कल्पना) ॥३॥

सात समुद्र वोलांडावे । तेथें जाणें कैसें फावे । म्हणोन विवेकी असावे । साधुजन ।।४।।

सात समुद्र ओलांडून तेथे कसे जाता येईल? म्हणून शहाण्याने विचाराचा आधार घ्यावा. ॥४॥

जें आपणांस नव्हे ठावें । तें जाणतयास पुसावें । मनोवेगें तनें फिरावें । हें तो घडेना ।।५।।

जे स्वत:ला माहीत नसते ते दुसऱ्या जाणत्याला विचारावे. केवळ शरीराने व मनाने वणवण फिरून ती माहिती कशी मिळेल? ॥५॥

जे चर्मदृष्टीस नव्हे ठावें । तें ज्ञानदृष्टीनें पाहावें । ब्रह्मांड विवरोन राहावें । समाधानें ।।६।।

जे स्थूल दृष्टीने दिसत नाही ते ज्ञानदृष्टीने पाहावे. त्या दृष्टीने सर्व ब्रह्मांडाचे पृथक्करण करून समजल्यावर समाधानात असावे. ॥६॥

मध्यें आहे भूमीचें चडळ । म्हणौन आकाश आणी पाताळ । तें चडळ नस्तां अंतराळ । चहुंकडे ।।७।।

मध्येच पृथ्वीचा अडथळा आहे म्हणून वर आकाश व खाली पाताळ असा भेद वाटतो. अन्यथा सर्वत्र व्यापक पोकळीच आहे. ॥७॥

तयास परब्रह्म म्हणावें । जें उपाधीवेगळें स्वभावें । जेथें दृश्यमायेच्या नांवे । सुन्याकार ।।८।।

त्या आकाशाला परब्रह्म म्हणण्यास हरकत नाही कारण ते ब्रह्माप्रमाणेच उपाधीवाचून असून तेथे माया दृश्यस्वरूपात जराही नाही. ॥८॥

दृष्टीचें देखणें दृश्य । मनाचें देखणें भास । मनातीत निराभास । विवेकें जाणावें ।।९।।

दृष्टीला नामरूपात्मक दृश्य दिसते. मनाने पदार्थांची कल्पना करता येते. जे मनातीत व स्वसंवेद्य आहे ते विवेकाने अनुभवाला येते. ॥९॥

दृश्य भास अवघा विघडे । विवेक तेथें पवाडे । भूमंडळीं ज्ञाते थोडे । सूक्ष्मदृष्टीचे ।।१०।।

दृश्य व काल्पनिक सर्व मोडून जाते. मात्र विवेकाने जाणले जाणारे अक्षय व नित्य आहे. असे सूक्ष्मदृष्टीचे विवेकी

जगात फार थोडे आहेत. ॥१०॥

वाच्यांश वाचेनें बोलावा । न बोलतां लक्ष्यांश जाणावा । निर्गुण अनुभवास आणावा । गुणाचेनयोगें ।।११।।

ज्ञानाचा वाच्यार्थ वाणीने बोलावा. त्याचा लक्ष्यार्थ न बोलता जाणावा व निर्गुण ज्ञान सगुणाच्या साहाय्याने अनुभवावे. ॥११॥

नाना गुणास आहे नाश । निर्गुण तें अविनाश । ढोबळ्याहून विशेष । सूक्ष्म देखणें ।।१२।।

सर्व सगुण नाशवान आहे. निर्गुण अविनाशी आहे. स्थूल सगुणाहून सूक्ष्म निर्गुण जाणण्यात विद्वान माणसाचा विशेष आहे. ॥१२॥

जें दृष्टीस न पडे ठावें । तें ऐकोन जाणावें । श्रवणमननें पडे ठावें । सकळ कांहीं ।।१३।।

जे स्थूलदृष्टीने दिसत नाही ते ऐकून समजावून घ्यावे. जे समजले नसेल ते सर्व सतत श्रवणमननाने समजू लागते. ॥१३॥

अष्टधेचे जिनस नाना । उदंड पाहातां कळेना । अवघें सगट पिटावेना । कोणीयेकें ।।१४।।

अष्टधा प्रकृतीच्या लक्षावधी योनी आहेत. त्या सर्वांचा आवाका कळणे शक्य नाही. त्या सर्व कोणालाही सांगता येणार नाहीत. ॥१४॥

सगट सारिखी स्थिती जाली । तेथें परीक्षाच बुडाली । चविनटानें कालविलीं । नाना अन्ने ।।१५।।

‘हे सर्व सारखेच (ब्रह्मरूप) आहे’ असे म्हटले तर तेथे विवेकाने परीक्षा करण्याचे काहीच कारण नाही. ज्याच्या जिभेला चव समजत नाही तो ताटातील सर्व खाद्य पदार्थ एकत्र कालवतो! ॥१५॥

टोणपा नव्हें गुणग्राहिक । मूर्खास कळेना विवेक । विवेक आणी अविवेक । येकचि म्हणती ।।१६।।

बेधडक मूर्खाला गुणांची जाण नसल्याने त्यांची त्याला किंमत नसते. त्याला विवेक कळत नसल्याने विवेक व अविवेक सारखेच! ॥१६॥

उंच नीच कळेना ज्याला । तेथें अभ्यासचि बुडाला । नाना अभ्यासें प्राणीयाला । सुटिका कैंची ।।१७।।

ज्याला दर्जेदार व दर्जाहीन कळत नाही (उंची व हलका माल) तेथे दर्जा कमविण्यासाठी अभ्यास करण्याची शक्यताच संपली. माणसाला ह्या अभ्यासातून सुटका नाही. ॥१७॥

वेड लागोन जालें वोंगळ । त्यास सारिखेंच वाटे सकळ । तें जाणावें बाश्कळ । विवेकी नव्हेती ।।१८।।

वेड लागल्याने ज्याचा मेंदू बिघडला आहे त्याला सर्व सारखेच दिसते. त्याला निरर्थक समजावे. ते विवेकाचे लक्षण नाही. ॥१८॥

ज्यास अखंड होतो नाश । त्यासीच म्हणती अविनाश । बहुचकीच्या लोकांस । काये म्हणावें ।।१९।।

ज्याचा नाश सतत होतो आहे त्यालाच सर्वब्रह्मवादी अविनाशी म्हणतात. अशी वंचना करणाऱ्याला कोणती विशेषणे द्यावीत? ॥१९॥

ईश्वरें नाना भेद केले । भेदें सकळ सृष्टी चाले । आंधळे परीक्षवंत मिळाले । तेथें परीक्षा कैंची ।।२०।।

ईश्वराने ह्या सृष्टीत अगणित भेद केले आहेत. पण परीक्षा करणारेच आंधळे असतील तर ते भेद पाहणार कोण? ॥२०॥

जेथें परीक्षेचा अभाव । तो टोणपा समुदाव । गुणचि नाहीं गौरव । येईल कैंचें ।।२१।।

जेथे परीक्षा म्हणजे विवक नसतो तेथे बेधडक मूर्खांची टोळी असते. त्यांचेजवळ गुणच नसल्याने त्यांना महत्त्व

कसे मिळेल? ॥२१॥

खरें खोटें येकचि जालें । विवेकानें काये केलें । असार सांडून सार घेतलें । साधुजनीं ।।२२।।

जेथे खरे व खोटे ह्यांचे मूल्य सारखेच असते तेथे विवेकाचे कामच काय? साधू मात्र असार टाकून सार घेतात. ॥२२॥

उत्तम वस्तूची परीक्षा । कैसी घडे नतद्रक्षा । दीक्षाहीनापासीं दीक्षा । येईल कैंची ।।२३।।

जो अभागी असतो त्याला मौल्यवान वस्तू मिळूनही तिची परीक्षा नसल्याने तो ती टाकून देतो. ज्याला साधे व्यवहारज्ञान नाही त्याला आत्मज्ञान कसे होईल? ॥२३॥

आपलेन वोंगळपणें । दिशा करून शौच्य नेणे । वेद शास्त्रें पुराणें । त्यास काये करिती ।।२४।।

प्रातर्विधीला जाऊन आल्यावर ज्याला स्वत:च्या घाणेरडेपणामुळे स्वच्छ होता येत नाही त्याला वेद, शास्त्रे व पुराणे काय ज्ञान सांगणार? ॥२४॥

आधी राखावा आचार । मग पाहावा विचार । आचारविचारें पैलपार । पाविजेतो ।।२५।।

प्रथम सदाचार सांभाळून नंतर आत्मानात्मविचार करावा. दोन्ही मिळून मोक्ष मिळतो. ॥२५॥

जें नेमकास न कळे । तें बाष्कळास केवी कळे । डोळस ठकती आंधळे । कोण्या कामाचे ।।२६।।

जे विचारवन्तालाही कळत नाही ते उथळ माणसाला काय कळणार? जेथे चाणाक्षांची बुद्धी कमी पडते तेथे मूर्खांचे काय काम? ॥२६॥

पापपुण्य स्वर्गनर्क । अवघेंच मानिलें येक । विवेक आणी अविवेक । काये मानावें ।।२७।।

पाप, पुण्य, स्वर्ग व नर्क हे सर्व जो सारखेच मानतो तो विवेक व अविवेक ह्यांतील फरक काय जाणणार? ॥२७॥

अमृत विष येक म्हणती । परी विष घेतां प्राण जाती । कुकर्मे होते फजिती । सत्कर्मे कीर्ति वाढे ।।२८।।

अमृत व विष दोन्ही ब्रह्मरूप मानले तरी विषाने प्राण जातो! नीच कर्माने फजिती होऊन सत्कर्माने कीर्ती मिळते. ॥२८॥

इहलोक आणि परलोक । जेथें नाहीं साकल्य विवेक । तेथें अवघेंच निरार्थक । सकळ कांहीं ।।२९।।

पृथ्वी व स्वर्गादी ह्यांत जर फरक मानला नाही, तर पापपुण्यादी कर्मे निरर्थक ठरतात. (सर्व ब्रह्मवाद्यांचा खरपूस समाचार संपला!) ॥२९॥

म्हणौन संतसंगेंचि जावें । सत्शास्त्रचि श्रवण करावें । उत्तम गुणास अभ्यासावें । नाना प्रयेत्नें ।।३०।।

म्हणून संतांच्या संगतीत राहून सत्शास्त्र श्रवण करून हरप्रयत्नाने दैवी संपदा व सदाचारादी गुण कमवावेत. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'टोणपसिद्धलक्षणनाम' समास दहावा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'टोणपसिद्धलक्षण' नावाचा दहावा समास समाप्त

–दशक सतरावा समाप्त–

दशक अठरावा : बहुजिनसी

समास पहिला : बहुदेवस्थान

॥ श्रीराम समर्थ ॥

तुज नमूं गजवदना । तुझा महिमा कळेना । विद्या बुद्धी देसी जना । लाहानथोरांसी ।।१।।

हे गजानना, तुझे माहात्म्य काही केल्या कळत नाही. तू सर्व लहानथोरांना विद्या व बुद्धी देतोस. ॥१॥

तुज नमूं सरस्वती । च्यारी वाचा तुझेन स्फूर्ती । तुझें निजरूप जाणती । ऐसे थोडे ।। २।।

हे सरस्वती देवी, तुला नमस्कार असो. चारही वाणींमागे तुझी शक्ती असून तुझे स्वरूप जाणणारे लोक फार कमी आहेत. ॥२॥

धन्य धन्य चतुरानना । तां केली सृष्टिरचना । वेद शास्त्रें भेद नाना । प्रगट केले ।।३।।

हे ब्रह्मदेवा, तू धन्य आहेस. तू भेदांनी भरलेली सृष्टी निर्माण करून चार वेद प्रगट केलेस. ॥३॥

धन्य विष्णु पाळण करिसी । येकांशें सकळ जीवांसी । वाढविसी वर्तविसी । जाणजाणों ।।४।।

हे विष्णो, तुझी धन्य आहे. तू पालन केलेल्या विश्वातील जीव तुझ्या आनंदाच्या एका अंशावर जगतात व वाढतात. ते सर्व जाणीवपूर्वक जीवन जगतात. (पहा– द. ९ स. ४.) ॥४॥

धन्य धन्य भोळाशंकर । जयाच्या देण्यास नाहीं पार । रामनाम निरंतर । जपत आहे ।।५।।

भोळ्या शिवशंभूची धन्य असून तो प्रसन्न झाल्यावर हवे ते वरदान देतो. तो सतत रामनाम जपतो. ॥५॥

धन्य धन्य इंद्रदेव । सकळ देवांचाहि देव । इंद्रलोकींचें वैभव । काये म्हणौनि सांगावें ।।६।।

ज्याच्या वैभवाचे वर्णन करणे शब्दापलीकडे आहे, अशा इंद्रलोकाचा स्वामी इंद्र धन्य आहे. तो देवांचा राजा आहे. ॥६॥

धन्य धन्य येमधर्म । सकळ जाणती धर्माधर्म । प्राणीमात्रांचे वर्म । ठाईं पाडिती ।।७।।

धर्म व अधर्माचे स्वरूप जाणून सर्व प्राण्यांच्या पुण्य-पापांची नोंद (वर्म) ठेवणारे यमधर्म धन्य होत. ॥७॥

वेंकटेसीं महिमा किती । भले उभ्यां अन्न खाती । वडे धिरडीं स्वाद घेती । आतळस आपालांचा ।।८।।

व्यंकटेशाचा महिमा अपार आहे. गिरिबालाजीचा प्रसाद प्रतिष्ठित लोक सुद्धा उभ्यानेच खातात. वडे, धिरडी व आपालाचा (पक्वान्न) स्वाद घेतात. ॥८॥

धन्य तूं वो बनशंकरी । उदंड शाखांचिया हारी । विवरविवरों भोजन करी । ऐसा कैंचा ।।९।।

हे बनशंकरी माते, तुला नैवेद्याला चौसष्ट भाज्या लागतात. त्या सर्व मिळवून जेवणारा कोठे मिळणार! ॥९॥

धन्य भीम गोलांगुळा । कोरवड्यांच्या उदंड माळा । दहि वडे खातां सकळां । समाधान होये ।।१०।।

हे बलदंड हनुमन्ता, तुझ्या गळ्यात कोरड्या वड्यांच्या बऱ्याच माळा आहेत. तुझा दहिवड्यांचा प्रसाद खाऊन तुझे भक्त तृप्त होतात. ॥१०॥

धन्य तूं गा खंडेराया । भंडारें होये पिंवळी काया । कांदेभरीत रोटगे खाया । सिद्ध होती ।।११।।

हे खंडेराया, तू धन्य आहेस. तुझ्या भंडाऱ्याने भक्तांचे कपडे व शरीरे पिवळी होतात. रोटगे व कांद्याचे भरीत हा तुझा प्रसाद खाण्यास ते उत्सुक असतात. ॥११॥

धन्य तुळजाभोवानी । भक्तां प्रसन्न होते जनीं । गुणवैभवास गणी । ऐसा कैंचा ।।१२।।

जिचे वैभव व गुणसंपदा जाणणारा कोणीच नाही, ती तुळजाभवानी भक्तांवर कृपा करते. ॥१२॥

धन्य धन्य पांडुरंग । अखंड कथेचा होतो धिंग । तानमानें रागरंग । नाना प्रकारीं ।।१३।।

पांडुरंग धन्य आहे. त्याच्यासमोर टाळमृदुंगासह तालासुरात म्हटल्या जाणाऱ्या अभंगावरील कीर्तनांत रंग भरून वारकरी नाचतात. ॥१३॥

धन्य तूं गा क्षत्रपाळा । उदंड जना लाविला चाळा । भावें भक्ति करितां फळा । वेळ नाहीं ।।१४।।

हे क्षेत्रपाळ भैरवा, तू अनेकांना तुझ्या भक्तीचा नाद लावला आहेस. भावपूर्ण भक्ती केली असता तू त्याचे फळ देण्यास उशीर करीत नाहीस. ॥१४॥

रामकृष्णादिक अवतार । त्यांचा महिमा अपार । उपासनेस बहुत नर । तत्पर जाले ।।१५।।

श्रीराम व श्रीकृष्ण ह्या अवतारांचे माहात्म्य अपार आहे. त्यांच्या उपासनेसाठी अनेक भक्त उत्सुक असतात. ॥१५॥

सकळ देवांचें मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ । भूमंडळीं भोग सकळ । त्यासीच घडे ।।१६।।

ह्या सर्व देवांचे मूळ हा ईश्वररूप अंतरात्मा आहे. सर्व जीवांचे भोजन व देवांचे नैवेद्य त्यालाच पोहोचतात. ॥१६॥

नाना देव होऊन बैसला । नाना शक्तिरूपें जाला । भोक्ता सकळ वैभवाला । तोचि येक ।।१७।।

तोच ईश्वर अनेक प्रकारचे देव व देवी होऊन शक्तिरूपाने प्रगट झाला आहे. सर्व वैभवांचा भोक्ता तो एकच आहे. ॥१७॥

याचा पाहावा विचार । उदंड लांबला जोजार । होती जाती देव नर । किती म्हणोनि ।।१८।।

असाच विचार करीत राहिले तर होऊन जाणाऱ्या माणसांची व देवांच्या यादीची लांबण संपणार नाही! ॥१८॥

कीर्ति आणि अपकीर्ति । उदंड निंदा उदंड स्तुती । सर्वत्रांची भोगप्राप्ती । अंतरात्म्यासीच घडे ।।१९।।

कोणाचीही कीर्ती, अपकीर्ती, निंदा, अमाप स्तुती व भोग अंतरात्म्यालाच पोहोचतात. ॥१९॥

कोण देहीं काये करितो । कोण देहीं काये भोगितो । भोगी त्यागी वीतरागी तो । येकचि आत्मा ।।२०।।

तो एका देहात काही कृती करतो, एकात भोग भोगतो. भोगी, त्यागी व संन्यासी तोच! ॥२०॥

प्राणी साभिमानें भुललें । देह्याकडे पाहात गेले । मुख्य अंतरात्म्यास चुकलें । अंतरी असोनी ।।२१।।

'मी देह' ह्या अभिमानाने भुलून माणसे देहाच्याच विचारात राहतात. अन्त:करण सतत व्यापून असलेल्या आत्म्याकडे दुर्लक्ष करतात. ॥२१॥

आरे या आत्मयाची चळवळ पाहे । ऐसा भूमंडळीं कोण आहे । अगाध पुण्यें अनुसंधान राहे । कांहींयेक ।।२२।।

ह्या आत्म्याच्या सत्तेवर चालणाऱ्या सर्व कर्मांना जाणणारा ह्या जगात कोण आहे? फार मोठ्या पुण्याईने त्याच्या सत्तेचे अनुसंधान राहते. ज्याच्या सत्तेवर हे सर्व चालते ते अधिष्ठान. त्याच्याकडे प्रामाणिक साधकाचे लक्ष राहावे. ॥२२॥

त्या अनुसंधानासरिसें । जळोनी जाईजे किल्मिषें । अंतरनिष्ठ ज्ञानी ऐसे । विवरोन पाहाती ।।२३।।

त्या अनुसंधानामुळे सर्व पापे जळून जातात. अनुसंधानामुळे अंतर्निष्ठ झालेले ज्ञानी आत्म्याचे अधिष्ठान शास्त्रपूर्वक जाणून घेतात. ॥२३॥

अंतर्निष्ठ तितुके तरले । अंतरभ्रष्ट तितुके बुडाले । बाह्याकारें भरंगळले । लोकाचारें ।।२४।।

अंतरनिष्ठ असतात ते तरून जातात. पांगलेल्या चित्ताचे सर्व बुडतात. सामान्यांच्या आचार-विचारांच्या बहिरंगामध्ये ते वाहून जातात. ॥२४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'बहुदेवस्थाननाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'बहुदेवस्थान' नावाचा पहिला समास समाप्त

दशक अठरावा : बहुजिनसी

समास दुसरा : सर्वज्ञसंगनिरूपण.

॥ श्रीराम समर्थ ॥

नेणपणें जालें तें जालें । जालें तें होऊन गेलें । जाणतेपणें वर्तलें । पाहिजे नेमस्त ।।१।।

अज्ञानामुळे आजपर्यन्त झाले ते झाले. ते भूतकाळात गेले. आता मात्र नियमाने ज्ञानपूर्वक वागले पाहिजे. ॥१॥

जाणत्याची संगती धरावी । जाणत्याची सेवा करावी । जाणत्याची सदबुद्धि घ्यावी । हळुहळु ।।२।।

त्यासाठी ज्ञात्याची संगत धरून त्याची मनोभावे सेवा करून त्याचे ज्ञान हळूहळू प्राप्त करावे. ॥२॥

जाणत्यापासीं लेहों सिकावें । जाणत्यापासीं वाचूं सिकावें । जाणत्यापासीं पुसावें । सकळ कांही ।।३।।

ज्ञात्याजवळ लिहिणे–वाचणे शिकून येणाऱ्या सर्व शंका किंवा उद्भवणारे प्रश्न त्याला विचारावेत. ॥३॥

जाणत्यास करावा उपकार । जाणत्यास झिजवावें शरीर । जाणत्याचा पाहावा विचार । कैसा आहे ।।४।।

ज्ञात्याला सर्व प्रकारे मदत करावी, त्याच्यासाठी देहकष्ट सोसावेत व त्याचे विचार समजावून घ्यावेत. ॥४॥

जाणत्याचे संगतीनें भजावें । जाणत्याचे संगतीनें झिजावें । जाणत्याचे संगतीनें रिझावें । विवरविवरों ।।५।।

ज्ञात्याच्या संगतीत उपासना करावी, तप करावे व सूक्ष्म शास्त्रविचार करून संतुष्ट व्हावे. ॥५॥

जाणत्यापासीं गावें गाणें । जाणत्यापासीं वाजवणें । नाना आळाप सिकणें । जाणत्यापासीं ।।६।।

संगीतातील जाणकारापुढे गाणे म्हणावे, वाद्ये वाजवण्यास शिकावे व रागदारीचा अभ्यास करावा. ॥६॥

जाणत्याचे कासेसी लागावें । जाणत्याचें औषध घ्यावें । जाणता सांगेल तें करावें । पथ्य आधीं ।।७।।

जाणत्याचा आधार घ्यावा, तज्ज्ञ वैद्याचे औषध घ्यावे व तो सांगेल ते पथ्य करावे. ॥७॥

जाणत्यापासीं परीक्षा सिकणें । जाणत्यापासीं तालिम करणें । जाणत्यापासीं पोहणें । अभ्यासावें ।।८।।

तज्ज्ञ परीक्षकाकडून रत्नादी परीक्षा शिकाव्यात, उत्तम कुस्तिगीराबरोबर तालीम करावी व तज्ज्ञ पोहोणाऱ्याकडून पोहोणे शिकावे. ॥८॥

जाणता बोलेल तैसें बोलावें । जाणता सांगेल तैसें चालावें । जाणत्याचे ध्यान घ्यावें । नाना प्रकारीं ।।९।।

ज्ञानी वक्ता बोलतो तसे बोलावे, ज्ञानी माणूस सांगेल तसे वागावे व त्याचे सर्व प्रकारे निरीक्षण करावे. ॥९॥

जाणत्याच्या कथा सिकाव्या । जाणत्याच्या युक्ति समजाव्या । जाणत्याच्या गोष्टी विवराव्या । सकळ कांहीं ।।१०।।

जाणता सांगतो त्या कथा शिकून घ्याव्यात, त्याच्या वागण्याबोलण्यातील खुब्या समजावून घ्याव्यात व तो करतो, बोलतो ते सर्व सांगावे व ऐकावे. ॥१०॥

जाणत्याचे पेंच जाणावे । जाणत्याचे पीळ उकलावे । जाणता राखेल तैसे राखावे । लोक राजी ।।११।।

राजधुरंधर मुत्सद्याचे डावपेच शिकावेत, त्याने मनात जे दडवले असेल (पीळ) ते समजण्याचा प्रयत्न करावा व तो ज्या पद्धतीने लोकांना प्रसन्न ठेवतो तसे ठेवावे. ॥११॥

जाणत्याचे जाणावे प्रसंग । जाणत्याचे घ्यावे रंग । जाणत्याचे स्फूर्तीचे तरंग । अभ्यासावे ।।१२।।

जाणत्याने कोणत्या प्रसंगाला कसे तोंड दिले ते पाहावे, त्याचे चांगले स्वभावविशेष आत्मसात करावेत, व त्याच्या प्रतिभेचे आविष्कार अभ्यासावेत. ॥१२॥

जाणत्याचा साक्षेप घ्यावा । जाणत्याचा तर्क जाणावा । जाणत्याचा उल्लेख समजावा । न बोलतांचि ।।१३।।

जाणत्याचा प्रयत्नवाद शिकावा. त्याची तर्कपद्धती शिकून घ्यावी व सांकेतिक बोलणे शांतपणे ओळखावे. ॥१३॥

जाणत्याचें धूर्तपण । जाणत्याचें राजकारण । जाणत्याचें निरूपण । ऐकत जावें ।।१४।।

ज्ञात्याचा धूर्तपणा, डावपेच व एखादा विषय स्पष्ट करण्याची हातोटी शिकावी. ॥१४॥

जाणत्याचीं कवित्वें सिकावीं । गद्यें पद्यें वोळखावीं । माधुर्यवचनें समजावीं । अंतर्यामीं ।।१५।।

महान साहित्यिकांच्या काव्याचे रसग्रहण करावे, त्यांच्या गद्य व पद्य रचनांचा अभ्यास करावा व त्यांचे मधुर भाषण ऐकून अंतर्यामी प्रसन्न व्हावे. ॥१५॥

जाणत्याचे पाहावे प्रबंद । जाणत्याचे वचनभेद । जाणत्याचे नाना संवाद । बरे शोधावे ।।१६।।

जाणत्याच्या लेखांचा अभ्यास करावा, त्याने वेगळ्या प्रसंगी वेगळ्या लोकांबरोबर केलेले संवाद व बोलण्याच्या पद्धती लक्षात घ्याव्यात. ॥१६॥

जाणत्याची तीक्षणता । जाणत्याची सहिष्णता । जाणत्याची उदारता । समजोन घ्यावी ।।१७।।

ज्ञात्याचा प्रसंगी दिसलेला कठोरपणा, सहनशीलता व मनाचा मोठेपणा समजावून घ्यावा. ॥१७॥

जाणत्याची नाना कल्पना । जाणत्याची दीर्घ सूचना । जाणत्याची विवंचना । समजोन घ्यावी ।।१८।।

जाणत्याने मांडलेले अनेक विचार, आगामी घटना व प्रसंगांचे वेध घेण्याचे सामर्थ्य व विषयाचे पृथक्करण करण्याची शैली जाणून घ्यावी. ॥१८॥

जाणत्याचा काळ सार्थक । जाणत्याचा अध्यात्मविवेक । जाणत्याचे गुण अनेक । आवघेच घ्यावे ।।१९।।

जाणता त्याचा काळ कसा सार्थकी लावतो, अध्यात्मशास्त्र किती कुशलतेने समजावून सांगतो व त्याची गुणसंपदा ह्यांचा अभ्यास करून आपण ते सारे आत्मसात करण्याचा यत्न करावा. ॥१९॥

जाणत्याचा भक्तिमार्ग । जाणत्याचा वैराग्ययोग । जाणत्याचा अवघा प्रसंग । समजोन घ्यावा ।।२०।।

महान भगवद्भक्तांची भक्ती, विरक्तांचे वैराग्य व साधनादी सर्वच समजावून घ्यावे. ॥२०॥

जाणत्याचें पाहावें ज्ञान । जाणत्याचे सिकावें ध्यान । जाणत्याचें सूक्ष्म चिन्ह । समजोन घ्यावें ।।२१।।

ज्ञात्याच्या ज्ञानाचा आवाका पाहावा, त्याची ध्यानपद्धती जाणावी व सर्व बारकावे टिपावेत. ॥२१॥

जाणत्याचें अलिप्तपण । जाणत्याचें विदेहलक्षण । जाणत्याचें ब्रह्मविवरण । समजोन घ्यावें ।।२२।।

ज्ञान्याचे असंगत्व, देहतादात्म्य गेल्याची लक्षणे व ब्रह्मविद्येचे स्पष्टीकरण जाणावे. ॥२२॥

जाणता येक अंतरात्मा । त्याचा काये सांगावा महिमा । विद्याकळागुणसीमा । कोणें करावी ।।२३।।

अंतरात्मास्वरूप ईश्वर सर्वज्ञ असल्याने तो एकच खरा ज्ञानी आहे. त्याचे माहात्म्य कसे सांगावे! त्याचे ज्ञान, कला

व गुणांच्या मर्यादा कोणी जाणाव्या? ।।२३।।

परमेश्वराचे गुणानुवाद । अखंड करावा संवाद । तेणेंकरितां आनंद । उदंड होतो ।। २४।।

अशा परमेश्वराचे गुण सतत गावेत. त्यासंबंधी आपापसात बोलावे. त्यामुळे आनंदाला भरते येते. ।।२४।।

परमेश्वरें निर्मिलें तें । अखंड दृष्टीस पडतें । विवरविवरों समजावें तें । विवेकी जनीं ।। २५।।

परमेश्वराने निर्माण केलेली सृष्टी सतत दृष्टीला दिसते. विवेकी साधकांनी तिचे पंचीकृत स्वरूप सर्व बारकाव्यांसह समजावून घ्यावे. ।।२५।।

जितुकें काहीं निर्माण जालें । तितुके जगदेश्वरें निर्मिलें । निर्माण वेगळें केलें । पाहिजे आधीं ।। २६।।

जे जे निर्माण झाले आहे ते परमेश्वराने केले असून तो निर्मितीपासून अलिप्त आहे हे प्रथम लक्षात घ्यावे. ।।२६।।

तो निर्माण करतो जना । परी पाहों जातां दिसेना । विवेकबळें अनुमाना । आणीत जावा ।। २७।।

सर्व जीवसृष्टी जन्माला घालणारा ईश्वर प्रत्यक्षात मात्र दिसत नाही. पण व्यवस्थित विचार केलेल्या तर्काने तो जाणावा. ।।२७।।

त्याचें अखंड लागतां ध्यान । कृपाळुपणें देतो आशन । सर्वकाळ संभाषण । तदांशेंचि करावें ।। २८।।

परमेश्वराचे अखंड अनुसंधान साधणाऱ्या भक्ताच्या अन्नपाण्याची तो व्यवस्था करतो. (आधणीं घातलिया हरळ । होती अमृताचें तांदूळ । जरी भुकेची राखे वेळ । श्री जगन्नाथु ।। ज्ञा. १५-२३) 'मी त्याचा अंश आहे' ह्या भावनेने त्या परमेश्वराशी बोलावे. ।।२८।।

ध्यान धरीना तो अभक्त । ध्यान धरील तो भक्त । संसारापासुनी मुक्त । भक्तांस करी ।। २९।।

जो परमेश्वराच्या अखंड चिंतनात राहतो तो भक्त. असे न करणारा तो अभक्त! तो परमेश्वर अशा भक्ताला संसारातून सोडवतो. ।।२९।।

उपासनेचे सेवटीं । देवां भक्ता अखंड भेटी । अनुभवी जाणेल गोष्टी । प्रत्ययाची ।।३०।।

उपासनेचे रूपांतर भक्तीमध्ये झाले की उपासक व देव ह्यांची ऐक्यरूप कायमची भेट होते, असा अनुभव घेणाराच हे अनुभवाच्या खुणेचे बोलणे जाणतो. ।।३०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सर्वज्ञसंगनिरूपणनाम' समास दुसरा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सर्वज्ञसंगनिरूपण' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक अठरावा : बहुजिनसी

समास तिसरा : निःस्पृहशिकवण

॥ श्रीराम समर्थ ॥

दुल्लभ शरीरीं दुल्लभ आयुष्य । याचा करूं नये नास । दास म्हणे सावकास । विवेक पाहावा ।।१।।

आधी नरदेह दुर्लभ. त्यांत दीर्घायुष्य मिळणे दुर्लभ. ही दोन्ही मिळाली असता ती फुकट घालवू नयेत. मी रामदास म्हणतो की तुम्ही शांतपणे विवेकाचा अभ्यास करावा. ॥१॥

न पाहातां उत्तम विवेक । आवघा होतो अविवेक । अविवेकें प्राणी रंक । ऐसा दिसे ।।२।।

शास्त्राने सांगितल्याप्रमाणे विवेकाचा अभ्यास केला नाही, तर अविवेकाचा प्रभाव राहून माणूस प्रपंच व परमार्थ ह्या दोन्हीत श्रीमंतीची क्षमता असून दरिद्री दिसतो. ॥२॥

हे आपलें आपण केलें । आळसें उदास नागविलें । वाईट संगतीनें बुडविलें । देखत देखतां ।।३।।

ह्याला ज्याचा तोच जबाबदार आहे. त्याला आळस, गरजेचा अभाव व कुसंगत ह्यांनी नागवून कळत असूनही बुडविलेले असते. ॥३॥

मूर्खपणाचा अभ्यास जाला । बाष्कळपणें घातला घाला । काम चांडाळ उठिला । तरुणपणीं ।।४।।

सतत मूर्खासारखी वागणूक, उथळ व पांचटपणाचा प्रभाव व तारुण्यातील कामरूप चांडाळाचा सतत अंमल असलेला. ॥४॥

मूर्ख आळसी आणि तरुणा । सर्वांविषीं दैन्यवाणा । कांही मिळेना कोणा । काये म्हणावें ।।५।।

मूर्ख, आळशी व तरुण सर्व दृष्टीने दीनवाणाच राहतो. कशाचा पायपोस कशात नसतो. त्याला काय म्हणावे! ॥५॥

जें जें पाहिजे तें तें नाहीं । अन्नवस्त्र तेंहि नाहीं । उत्तम गुण कांहींच नाहीं । अंतर्यामीं ।।६।।

जीवनाला जे जे आवश्यक ते काहीच नाही. साध्या अन्न व वस्त्राला सुद्धा पारखा होतो. अंतरंगाच्या जडणघडणीसाठी एकही सद्गुण कमावलेला नसतो. ॥६॥

बोलतां येना बैसतां येना । प्रसंग कांहीच कळेना । शरीर मन हें वळेना । अभ्यासाकडे ।।७।।

नीट बोलता येत नाही, चारचौघात कसे बसावे तेही कळत नाही, प्रसंग व परिस्थितीची जाण नाही व मनाचे कोणत्याच अभ्यासात लक्ष नाही. ॥७॥

लिहिणें नाहीं वाचणें नाहीं । पुसणें नाहीं सांगणे नाहीं । नेमस्तपणाचा अभ्यास नाहीं । बाष्कळपणें ।।८।।

आधी लिहिता-वाचता येत नाही. येत असले तरी त्यातील काहीच करीत नाही. कोणाला काही विचारत नाही व सांगण्यासारखे काहीच नसते. टवाळक्या व उथळपणामुळें कोणतीच गोष्ट नियमाने करीत नाही. ॥८॥

आपणास कांहीच येना । आणी सिकविलेंहि मानेना । आपण वेडा आणी सज्जना । बोल ठेवी ।।९।।

स्वत:ला काही कळत नाही व कोणी सांगितले तर ऐकूनही घेत नाही. स्वत: मूर्ख असून सज्जनाला नावे ठेवतो. उणीदुणी काढतो. ॥९॥

अंतरी येक बाहेर एक । ऐसा जयाचा विवेक । परलोकाचें सार्थक । कैसें घडे ।।१०।।

आत विचार एक व बाहेर वागणे दुसरेच असा अविवेक असताना मोक्षाची प्राप्ती कशी होईल? ॥१०॥

आपला संसार नासला । मनामधें प्रस्तावला । तरी मग अभ्यास केला । पाहिजे विवेकाचा ।।११।।

आपला जीवनरूप संसार बिघडल्याने ज्याला पश्चात्ताप होतो त्याने विवेकाची सतत कास धरावी. ॥११॥

येकाग्र करूनियां मन । बळेंचि धरावें साधन । येत्नी आळसाचें दर्शन । होऊंच नये ।।१२।।

मन सक्तीने एकाग्र करून साधना करावी. मूळचा आळस त्या प्रयत्नात जराही डोकावू देऊ नये. ॥१२॥

अवगुण अवघेचि सांडावे । उत्तम गुण अभ्यासावे । प्रबंद पाठ करीत जावे । जाड अर्थ ।।१३।।

स्वत:चे दुर्गुण प्रयत्नपूर्वक दूर करावेत. सद्‌गुण कमाविण्याचा सतत प्रयत्न करावा व सूक्ष्म व गंभीर (जाड) तत्त्वग्रंथांचा अभ्यास करावा. ते पाठ करावेत. ॥१३॥

पदप्रबंद श्लोकप्रबंद । नाना धाटी मुद्रा छंद । प्रसंगज्ञानेंचि आनंद । होत आहे ।।१४।।

महावाक्यातील पदांसारखी पदे स्पष्ट करणारे ग्रंथ, गीतेसारखे श्लोकबद्ध ग्रंथ अभ्यासावेत. वेगळ्या धाटणी, मुद्रा व छंद असलेल्या काव्यरचना समजून म्हणाव्यात. हे सर्व करतानाच आनंद होतो. ॥१४॥

कोण प्रसंगीं काये म्हणावें । ऐसें समजोन जाणावें । उगेंचि वाउगें सिणावें । कासयासी ।।१५।।

निरूपणातील कोणत्या प्रसंगी कोणत्या प्रमाणाचा श्लोक किंवा आर्या म्हणावी ते विचार करून ठरवावे. अकारण काही करून शिणू व शिणवू नये. ॥१५॥

दुसऱ्याचें अंतर जाणावें । आदर देखोन म्हणावें । जें आठवेल तें गावें । हें मूर्खपण ।।१६।।

इतरांची मने व विचार जाणून घ्यावेत. त्यांचा कल व योग्यता (आदर) लक्षात घेऊन प्रमाणांचे अभंग व श्लोक म्हणावेत. आपल्याला आठवेल ते म्हणणे हा मूर्खपणा आहे. ॥१६॥

ज्याची जैसी उपासना । तेंचि गावें चुकावेना । रागज्ञाना ताळज्ञाना । अभ्यासावें ।।१७।।

त्या त्या समुदायाच्या संप्रदायाप्रमाणे ‘प्रमाणे’ द्यावीत. ह्यांत चूक करू नये. राग व ताल ह्यांचा अभ्यास करीत असावे. (‘प्रमाणे देणे’ म्हणजे चालू विषयाशी सुसंगत अशी शास्त्र किंवा संतांची वचने सांगणे किंवा गाणे.) ॥१७॥

साहित संगीत प्रसंग मानें । करावीं कथेंची घमशानें । अर्थांतर श्रवणमननें । काढीत जावें ।।१८।।

साहित्यशास्त्र, संगीत, चालू परिस्थिती इ. आधाराने हरिकथेचा दणका उडवून द्यावा. विषयाच्या सर्व छटा व अंगे श्रवण व मननपूर्वक सांगावीत. निघू शकणारे सर्व योग्य अर्थ सांगावेत. ॥१८॥

पाठ उदंडचि असावें । सर्वकाळ उजळीत जावें । सांगितलें गोष्टींचे असावें । स्मरण अंतरी ।।१९।।

भरपूर पाठपाठान्तर करून त्यांची पुन्हा पुन्हा उजळणी करावी. पूर्वी किंवा सुरुवातीला काय सांगितले आहे त्याचे स्मरण असावे. ॥१९॥

अखंड येकांत सेवावा । ग्रन्थमात्र धांडोळावा । प्रचित येईल तो घ्यावा । अर्थ मनीं ।।२०।।

रोज काही काळ एकांतात घालवावा, अनेक शास्त्रग्रंथांचे अध्ययन करावे. त्यांतील जे शास्त्रसंमत व तर्काला टिकणारे असेल ते स्वीकारावे. ॥२०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ‘नि:स्पृहशिकवणनाम’ समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील ‘नि:स्पृहशिकवण’ नावाचा तिसरा समास समाप्त

दशक अठरावा : बहुजिनसी

समास चवथा : देहदुर्लभनिरूपण

(प्रास्ताविक- ऐतरेय आरण्यकात ऐतरेय उपनिषद सांगण्यापूर्वी मनुष्यशरीराचे माहात्म्य सांगितले आहे. 'मनुष्य शरीरातच आत्मा अधिक स्पष्ट झाला आहे. कारण तो प्रज्ञानाने अतिशय संपन्न आहे. कळलेले बोलणे, कालची गोष्ट आज आठवणे, प्रकाश व अंधार ह्यांचे ज्ञान, मर्त्य शरीराच्या साहाय्याने अमृत आत्म्याच्या प्राप्तीची इच्छा करणे इ. योग्यता असलेले हे शरीर आहे.' ऐतरेय उपनिषदात 'सुकृतं बतेति । पुरुषो वाव सुकृतं ।' (ऐत.उप.२) 'वा वा! परमेश्वराने हे फार चांगले केले' असे उद्‌गार मानवी शरीराचे बाबतीत आहेत. ह्या समासात वरील आरण्यकातील वाक्यांचा मोठा विस्तार समर्थांनी केला आहे. पहिल्या पंचवीस ओव्यांची सुरुवात 'मानवी देह आहे म्हणून' अशा अर्थाची आहे. अर्थ लिहिताना ही सुरुवात तशीच असल्याने पहिल्या ओवीत तेवढी लिहून नंतर वगळली आहे.)

॥ श्रीराम समर्थ ॥

देह्याकरिंता गणेशपूजन । देह्याकरितां शारदावंदन । देह्याकरितां गुरू सज्जन । संत श्रोते ।।१।।

मानवी देह आहे म्हणून गणेशाची पूजा व शारदेला वंदन होते. श्रीगुरू, सज्जन व सात्त्विक श्रोते आहेत. ॥१॥

देह्याकरितां कवित्वें चालती । देह्याकरितां अधेनें करिती । देह्याकरितां अभ्यासिती । नाना विद्या ।।२।।

काव्यादी वाङमय रचना, नाना शास्त्रांचा अभ्यास व अनेक विद्यांची प्राप्ती होते. ॥२॥

देह्याकरितां ग्रंथलेखन । नाना लिपीवोळखण । नाना पदार्थशोधन । देह्याकरितां ।।३।।

ग्रंथांची रचना, देवनागरीसारखी लिपी वाचणे, अनेक पदार्थांचे स्वरूप जाणणे इ. घडते. ॥३॥

देह्याकरितां माहांज्ञानी । सिद्ध साधु ऋषी मुनी । देह्याकरितां तीर्थाटणीं । फिरती प्राणी ।।४।।

मोठमोठी ज्ञानी मंडळी, सिद्ध, साधू, ऋषी व मुनी जन्माला येतात. तीर्थाटणे होतात. ॥४॥

देह्याकरितां श्रवण घडे । देह्याकरितां मननीं पवाडे । देंह्याकरितां देहीं आतुडे । मुख्य परमात्मा ।।५।।

अध्यात्मशास्त्राचे श्रवण व मनन होऊन जीवाला 'मी ब्रह्म आहे' असा अनुभव येतो. ॥५॥

देह्याकरितां कर्ममार्ग । देह्याकरितां उपासनामार्ग । देह्याकरितां ज्ञानमार्ग । भूमंडळीं ।।६।।

ह्या पृथ्वीवर कर्ममार्ग, उपासना मार्ग व ज्ञानमार्ग तयार होऊन त्यांना तशी प्रतिष्ठाही आहे. ॥६॥

योगी वीतरागी तापसी । देह्याकरितां नाना सायासी । देह्याकरितां आत्मयासी । प्रगटणें घडे ।।७।।

योगी, संन्यासी, तपस्वी घडतात. अनेक प्रकारे प्रयत्न करून अनुभवाचे रूपाने आत्मा जणू प्रगट केला जातो. ॥७॥

येहलोक आणी परलोक । देह्याकरितां सकळ सार्थक । देहेंविण निरार्थक । सकळ कांहीं ।।८।।

पृथ्वी व वैकुंठादी लोक ह्यांच्या अस्तित्वाचे सार्थक होते. अन्यथा ते निरर्थक ठरले असते. ॥८॥

पुरश्चरणे अनुष्ठानें । गोरांजने धूम्रपानें । सीतोष्ण पंचाग्नी साधणें । देह्याकरितां ।।९।।

अनेक पुरश्चरणे, अनुष्ठाने, मशाली फिरवणे, धूर गिळण्याचे तप, शीत किंवा पंचाग्नी साधन इ. घडतात. ॥९॥

देह्याकरितां पुण्यसीळ । देह्याकरितां पापी केवळ । देह्याकरितां अनर्गळ । सुचिस्मंत ।।१०।।

पुण्यवन्त, पापी, घाणेरडे व पवित्र लोक दिसतात. ॥१०॥

देह्याकरितां अवतारी । देह्याकरितां वेषधारी । नाना बंडे पाषांडें करी । देह्याकरितां ।।११।।

रामकृष्णादी अवतार, संन्यासादी वेष, वेदबाह्य विचार किंवा वेदांचे प्रामाण्य नाकारणे होते. ॥११॥

देह्याकरितां विषयभोग । देह्याकरितां सकळ त्याग । होती जाती नाना रोग । देह्याकरितां ।।१२।।

विषय भोगले जातात व त्यांचा त्यागही होतो. रोग होतात व ते बरेही होतात. ॥१२॥

देह्याकरितां नवविधा भक्ती । देह्याकरिता चतुर्विधा मुक्ती । देह्याकरितां नाना युक्ति । नाना मतें ।।१३।।

नऊ भक्ती, चार मुक्ती, अनेक तर्क व द्वैतअद्वैतादी शेकडो मते वा संप्रदाय तयार होतात. ॥१३॥

देह्याकरितां दानधर्म । देह्याकरितां नाना वर्म । देह्याकरितां पूर्वकर्म । म्हणती जनीं ।।१४।।

अनेक दाने, धर्माचरण, रहस्यांची जाणीव व त्यांचा उलगडा व पूर्वकर्मरूप संचित तयार होते. ॥१४॥

देह्याकरितां नाना स्वार्थ । देह्याकरितां नाना अर्थ । देह्याकरितां होईजे वेर्थ । आणी धन्य ।।१५।।

धनादी स्वार्थ, मोक्षादी प्राप्तव्ये अर्थ, जीवन फुकट जाणे वा सार्थकी लागणे शक्य होते. ॥१५॥

देह्याकरितां नाना कळा । देह्याकरितां उणा आगळा । देह्याकरितां जिव्हाळा । भक्तिमार्गाचा ।।१६।।

संगीतादी कलांची निर्मिती, कनिष्ठ व वरिष्ठ भाव, भक्तिमार्गातील भाव, प्रेमादी झाले. ॥१६॥

नाना सन्मार्गसाधनें । देह्याकरितां तुटती बंधनें । देह्याकरितां निवेदनें । मोक्ष लाभे ।।१७।।

सन्मार्गाची धर्म, न्याय, अध्यात्मादी साधने; देह, कर्तृत्वादी बंधने तुटून आत्मनिवेदनाने मोक्ष लाभतो. ॥१७॥

देह सकळामधें उत्तमु । देही राहिला आत्मारामु । सकळां घटीं पुरुषोत्तमु । विवेकी जाणती ।।१८।।

पृथ्वीवरील सर्व पदार्थांत मानवी देह सर्वोत्तम आहे. सर्व देहरूप घटांत आत्मारामरूप पुरुषोत्तम राहतो हे विवेकी जाणतात. ॥१८॥

देह्याकरितां नाना कीर्ती । अथवा नाना अपकीर्ती । देह्याकरितां होती जाती । अवतारमाळिका ।।१९।।

कीर्ती व अपकीर्ती होते. अवतारांची मालिका होते व त्यांची समाप्तीही होते. ॥१९॥

देह्याकरितां नाना भ्रम । देह्याकरितां नाना संभ्रम । देह्याचेन उत्तमोत्तम । भोगिती पदें ।।२०।।

देहतादात्म्यादी भ्रम, मृगजळादी संभ्रम होतात. उत्तमोत्तम पदांचा भोग घडतो. ॥२०॥

देह्याकरितां सकळ कांहीं । देह्याविण कांहीं नाहीं । आत्मा विरे ठाईं ठाईं । नव्हताच जैसा ।।२१।।

ह्या पृथ्वीवरील सर्व पदार्थांचे सार्थक देहामुळे होते. देहावाचून सर्व निरर्थक आहे. उपाधीबरोबर आत्मा जणू प्रगट होऊन उपाधीच्या नाशाबरोबर तो जणू कधीच नसल्यासारखा गुप्त होतो. ॥२१॥

देहे परलोकींचें तारूं । नाना गुणांचा गुणागरु । नाना रत्नांचा विचारु । देह्याचेनी ।।२२।।

परलोकाच्या प्राप्तीसाठी देह हे जणू वाहन आहे. त्यातच अनेक गुणांचा संग्रह आहे. हिरा, मोती, इ. रत्ने मानवी जीवांनाच कळतात. ॥२२॥

देह्याचेन गायेनकळा । देह्याचेन संगीतकळा । देह्याचेन अंतर्कळा । ठाईं पडे ।।२३।।

गायन, संगीत व आत्मा यांचे ज्ञान होते. ॥२३॥

देहे ब्रह्मांडाचें फळ । देहे दुल्लभचि केवळ । परी या देह्यास निवळ । उमजवावें ।।२४।।

हा दुर्लभ मानवी देह ब्रह्मांडरूप वृक्षाला आलेले उत्कृष्ट फळ आहे. मात्र त्यातील जीवात्म्याला शमदमादिकांनी

निववून (निवळ) ज्ञानाची ओढ लावावी. ॥२४॥

देह्याकरितां लाहानथोर । करिती आपुलाले व्यापार । त्याहिमधें लाहानथोर । कितीयेक ।।२५।।

देहामुळेच कित्येक लहानमोठे लोक लहानमोठे व्यापार करतात.

(देहाकरिता व देह्याकरिता असे दोन पाठ आहेत. देही म्हणजे जीवात्मा असल्याशिवाय केवळ देहाला काहीच करता येत नाही. देहीचे रूप 'देह्याकरिता' असे होते. जसे व्याही व व्याह्याकरिता तसे हे समजावे.) ॥२५॥

जे जे देहे धरुनी आले । ते ते कांहीं करून गेले । हरिभजनें पावन जाले । कितीयेक ।।२६।।

जे जे देहधारी होऊन जन्माला आले ते ते या जगात सामान्य कर्मे करून गेले. काहीं मात्र हरिभजनाने मुक्त झाले. ॥२६॥

अष्टधा प्रकृतीचें मूळ । संकल्परूपचि केवळ । नाना संकल्पें देहेफळ । घेऊन आलें ।।२७।।

आदि संकल्पामुळे अष्टधाप्रकृतीची निर्मिती झाली. जीवांना सुद्धा त्यांच्या संकल्पानुसार देहरूप फळ येऊन जन्मावे लागते. ॥२७॥

हरिसंकल्प मुळीं होता । तोचि फळीं पाहावा आतां । नाना देह्यांतरीं तत्वता । शोधितां कळे ।।२८।।

मूळचा हरिसंकल्प या देहरूप फळात पाहावा. अनेक देहातील अनेक संकल्पांवरून हे लक्षात येते. सर्व देहातील जीवांना संकल्पानुसार पुन्हा पुन्हा देहरूप फळ मिळते. ॥२८॥

वेलाचे मुळीं बीज । उदकरूप वेली समज । पुढें फळामध्यें बीज । मुळींच्या अंशें ।।२९।।

बीज हे वेलाचे मूळ म्हणजे कारण आहे. वेल उदकाने वाढत असल्याने ती जलमय आहे. पुढे त्या वेलीला येणाऱ्या फळातील बीज मूळ बीजाचा अंश असते. ॥२९॥

मुळाकरितां फळ येतें । फळाकरितां मूळ होतें । येणेंकरिता होत जातें । भूमंडळ ।।३०।।

मूळ बीजाला फळ येते व त्या फळात पुन्हा बीज होते. याच चक्राकार गतीने विश्वातील जीवसृष्टी होते. ॥३०॥

असो कांहीं येक करणें । कैसें घडे देह्याविणें । देहे सार्थकीं लावणें । म्हणिजे बरें ।।३१।।

एकूण कोणतीही कृती देह व देही यांचेवाचून होत नाही. तो देह देह्याने मुक्त होऊन सार्थकी लावण्यात कल्याण आहे. ॥३१॥

आत्म्याकरितां देहे जाला । देह्याकरितां आत्मा तगला । उभययोगें उदंड चालिला । कार्यभाग ।।३२।।

जीवात्म्याला वासनेनुसार जन्म मिळण्यासाठी देह घडला. जीवात्म्यामुळे देहाला जिवंतपणा मिळतो. असे दोन्ही मिळून सर्व कार्य सतत चालवितात. ॥३२॥

चोरून गुप्तरूपें करावें । तें आत्मयासी पडे ठावें । कर्तुत्व याचेन स्वभावें । सकळ कांहीं ।।३३।।

स्वत: गुप्त राहून कार्य करण्याची कला आत्म्याजवळ आहे. त्याच्या या स्वभावामुळे देहाच्या सर्व क्रिया किंवा व्यापार घडतात. ॥३३॥

देह्यामधें आत्मा असतो । देहे पूजितां आत्मा तोषतो । देहे पिडितां आत्मा क्षोभतो । प्रतक्ष आतां ।।३४।।

देहात जीवात्मा व्यापून राहतो. त्या देहाला हवे ते दिले (पूजन) की जीव संतुष्ट होतो व देहाला यातना झाल्या की जीवाला त्या होतात हे स्पष्ट दिसते. ॥३४॥

देह्यावेगळी पूजा पावेना । देह्याविण पूजा फावेना । जनीं जनार्दन म्हणोनी जना । संतुष्ट करावें ।।३५।।

देहावाचून पूजा करता येत नाही. देह्याशिवाय पूजेचे फळही मिळत नाही. सर्व लोकांच्यात व्यापून राहणाऱ्या जनार्दनाला संतुष्ट करण्यासाठी लोकांना (देह) संतुष्ट करावे. ॥३५॥

उदंड प्रगटला विचार । धर्मस्थापना तदनंतर । तेथेंच पूजेस अधिकार । पुण्यशरीरीं ।।३६।।

धर्माधर्म, आत्मानात्मादी विचार सखोल व सातत्याने करणारा, पुढे धर्म व अध्यात्माचा जीर्णोद्धार करतो. त्या पुण्यशरीराला पूजा करून घेण्याची योग्यता असते. ।।३६।।

सगट भजन करूं येतें । तरी मूर्खपण आंगीं लागतें । गाढवासी पूजितां कळतें । काये त्याला ।।३७।।

योग्यता न पाहता सरसगट पूजा केली तर मूर्खपणा पदरी येतो. गाढवाची पूजा केली तर ती त्याला कळते काय? ।।३७।।

पूज्य पूजेसी अधिकार । उगेचि तोषवावे इतर । दुखऊं नये कोणाचें अंतर । म्हणिजे बरें ।।३८।।

जे पूजनीय असतात त्यांचीच पूजा करावी. इतर सर्वांना व्यावहारिक पद्धतीने संतुष्ट ठेवावे. त्यांच्या मनाला दुखवू मात्र नये. तेवढ्यानेच त्यांची पूजा होते. ।।३८।।

सकळ जगदांतरींचा देव । क्षोभता राहाव्या कोठें ठाव । जनावेगळा जनास उपाव । आणीक नाहीं ।।३९।।

सर्व जनात राहणारा देव जर क्रुद्ध झाला तर ते जन सोडून कोठे राहता येईल? व्यक्तीला समाजाशिवाय दुसरा आधार नाही. ।।३९।।

परमेश्वराचे अनंत गुण । मनुष्यें काये सांगावी खूण । परंतु अध्यात्मग्रंथश्रवण । होतां उमजे ।।४०।।

सगुण निर्गुण परमात्म्याचे अनेक गुण व लक्षणे आहेत. सामान्याला ते कसे कळणार? परंतु अध्यात्मग्रंथांच्या श्रवणाने तेही कळते. ।।४०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ‘देहदुर्लभनिरूपणनाम’ समास चवथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील ‘देहदुर्लभनिरूपण’ नावाचा चवथा समास समाप्त

दशक अठरावा : बहुजिनसी

समास पाचवा : करंटपरीक्षानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

धान्य उदंड मोजिले । परी त्या मापें नाहीं भक्षिलें । विवरल्याविण तैसें जालें । प्राणीमात्रासी ।।१।।

मापाने मणावारी धान्य मोजले तरी ते माप धान्य खात नाही! त्याप्रमाणें अध्यात्मग्रंथांचे उदंड श्रवण करूनही ते समजावून घेतले नाहीत तर तो श्रोता त्या मापासारखाच. ॥१॥

पाठ म्हणतां आवरेना । पुसतां कांहींच कळेना । अनुभव पाहातां अनुमाना– । मधें पडें ।।२।।

कित्येक तास पुरेल एवढे पाठपाठान्तर असते. पण अर्थ जराही कळत नाही. अनुभवाचा विचार केला तर कशात कशाचा मेळ नसतो. ॥२॥

शब्दरत्नें परीक्षावीं । प्रत्ययाचीं पाहोंन घ्यावीं । येर ते अवघीं सांडावीं । येकीकडे ।।३।।

अध्यात्मग्रंथांचा अभ्यास करून त्यांत अनुभवाचा स्पर्श असलेला भाग स्वीकारावा. इतर भाग खुशाल सोडून द्यावा. ॥३॥

नांवरूप आवघें सांडावें । मग अनुभवास मांडावें । सार असार येकचि करावें । हें मूर्खपण ।।४।।

दृश्य सृष्टीतील रूपे व नामे विचाराने दूर सारून येणारा अस्ति, भाति व प्रियाचा अनुभव मनात स्थिर केलेला असावा. हे सार व असार नामरूपे यांचा एकंकार करण्याचा मूर्खपणा करू नये. ॥४॥

लेखकें कुळ समजवावें । किंवा उगेंच वाचावें । येणें दृष्टांतें समजावें । कोणींतरी ।।५।।

ग्रंथ लिहिणाऱ्याने तो समूळ (कुळ) समजावून सांगावा की नुसताच वाचीत जावा? या उदाहरणाने समजदाराने काय ते समजून घ्यावे. ॥५॥

जेथें नाहीं समजावीस । तेथे आवघी कुसमुस । पुसों जातां वसवस । वक्ता करी ।।६।।

जेथें शास्त्र व तर्क यांच्या साहाय्याने समजावून सांगणे नसते तेथे दोन्ही बाजूने (वक्ता व श्रोता) असंतोष धुमसतो. वक्त्याला काही विचारावे तर तो वस्कन श्रोत्याच्या अंगावर येतो! ॥६॥

नाना शब्द येकवटिले । प्रचीतीवीण उपाव केले । परी ते अवघेचि वेर्थ गेले । फडप्रसंगीं ।।७।।

एखाद्या आध्यात्मिक कार्यक्रमातील वक्त्याने बोललेल्या भारंभार शब्दांना जर अनुभवाची जोड नसेल तर तो कार्यक्रम (फड) सर्वप्रकारे व्यर्थ ठरतो. ॥७॥

पसेवरी वैरण घातलें । तांतडीनें जाते वोडिलें । तेणें पीठ बारीक आलें । हें तों घडेना ।।८।।

जात्यावर दळताना पसेच्या पसे धान्य भराभरा घालून जाते वेगाने ओढले तर त्यातून बारीक पीठ बाहेर येणे शक्य नाही. ॥८॥

घांसामागें घांस घातला । आवकाश नाहीं चावायाला । अवघा बोकणा भरिला । पुढे कैसें ।।९।।

चावायला वेळ न देता घासामागे घास तोंडात घालून बोकणा भरला तर त्या खाणाराचे पुढे काय होईल? ॥९॥

ऐका फडनिसीचें लक्षण । विरंग जाऊं नेदी क्षण । समस्तांचें अंत:कर्ण । सांभाळीत जावें ।।१०।।

वक्त्याचे मुख्य लक्षण म्हणजे तो आपल्या कीर्तन-प्रवचनांत क्षणभरही भक्तिज्ञान आणि वैराग्याच्या रंगाची हानी

न होऊ देता सर्वांची मने सांभाळीत प्रबोधन करतो. ॥१०॥

सूक्ष्म नामें सुखें घ्यावीं । तितुकीं रूपें वोळखावीं । वोळखोन समजवावीं । श्रोतयांसी ।।११।।

कूटस्थ, साक्षी इ. नावांनी सुचविलेल्या संकल्पना (रूपे) अवश्य वापराव्यात. पण त्या स्वत: स्पष्टपणे जाणून श्रोत्यांसमोर मांडाव्यात. समजावून सांगाव्यात. ॥११॥

समशा पुरतां सुखी होते । श्रोते अवघे आनंदती । अवघे क्षणक्षणा वंदिती । गोसावियांसी ।।१२।।

श्रोत्यांच्या अभ्यासातील व साधनमार्गातील अडचणी सुटल्या तर सर्व श्रोत्यांना मोठे समाधान मिळून ते अधिकारी वक्त्याला वरचेवर वंदन करतात. ॥१२॥

समशा पुरतां वंदिती । समशा न पुरतां निंदिती । गोसांवी चिणचिण करिती । कोण्या हिशेबें ।।१३।।

अडचणी सुटल्या तर वंदन व न सुटल्या तर निंदा असा सरळ हिशेब असताना वक्त्याने तक्रार का करावी? ॥१३॥

शुध सोनें पाहोन घ्यावें । कसीं लाउनी तावावें । श्रवणमननें जाणावें । प्रत्ययासी ।।१४।।

सोन्याची शुद्धता पारखण्यासाठी ते मुशीतून काढून कसाला लावतात. त्याप्रमाणे श्रवणमनन अनुभवाच्या कसाला लावावे. ॥१४॥

वैद्याची प्रचित येना । वेथा परती होयेना । आणी रागेजावें जना । कोण्या हिशेबें ।।१५।।

रोग बरा होत नाही. वैद्याच्या औषधाला गुण येत नाही. अशा स्थितीत रुग्णाने तक्रार केली तर वैद्याने का रागवावे? ॥१५॥

खोटें कोठेंचि चालेना । खोटें कोणास मानेना । याकारणें अनुमाना । खरें आणावें ।।१६।।

खोटे कोठेच चालत नाही व कोणाला आवडतही नाही. म्हणून सर्वांना शुद्ध परमार्थाचा अनुभव येईल असे प्रबोधन करावे. ॥१६॥

लिहिणें न येतां व्यापार केला । कांहीं येक दिवस चालिला । पुसता सुरनीस भेटला । तेव्हां खोटें ।।१७।।

हिशेब न लिहिता केलेला व्यापार थोडे दिवस चालतो. पण हिशेब तपासणाऱ्या तज्ञाची गाठ पडली की सर्व घोटाळा बाहेर येतो. ॥१७॥

सर्व आवघें हिशेबीं ठावे । प्रत्यय साक्षीनें बोलावें । मग सुरनीसें काये करावें । सांगाना कां ।।१८।।

हिशेबाची वही व्यापारासंबंधी सर्वकाही सांगते! वक्त्याचे बोलणे त्याचा अनुभव सांगते. म्हणून वक्त्याने अनुभवपूर्वक बोलावे. असे नसेल तर तपासनीस व श्रोता तरी काय करणार? तुम्हीच सांगा! ॥१८॥

स्वयें आपणचि गुंते । समजावीस कैसी होते । नेणतां कोणीयेक ते । आपदों लागती ।।१९।।

स्वत:च अपसिद्धांतांच्या घोटाळ्यात अडकलेला वक्ता श्रोत्यांना काय समजाविणार? हे न समजणारा श्रोता वक्त्याप्रमाणेच अडकून पडतो. ॥१९॥

बळेंविण युद्धास गेला । तो सर्वस्वें नागवला । शब्द ठेवावा कोणाला । कोण कैसा ।।२०।।

सामर्थ्य व क्षात्रवृत्ती नसताना लढाईवर जाणारा सर्वस्वी फजित होतो. यात दोष कोणाचा? ॥२०॥

जें प्रचीतीस आलें खरें । तेंचि घ्यावें अत्यादरें । अनुभवेंविण जें उत्तरें । तें फलकटें जाणावीं ।।२१।।

शास्त्र व तर्काशी सुसंगत असून अनुभवाची जोड असलेले लेखन व वक्तव्य स्वीकारावे. इतर सर्व टरफलाप्रमाणे फोल समजावे. ॥२१॥

सिकऊं जातां राग चढे । परंतु पुढें आदळ घडे । खोटा निश्चय तात्काळ उडे । लोकांमधें ।।२२।।

लेखक व वक्ता यांना त्यांचे लेखन व वक्तृत्व कसे असावे हे कोणी अधिकाऱ्याने सांगितले तर राग येतो! पण नंतर ते सर्व विपरीत असल्याने वाचक व श्रोते तेथल्या तेथे ते फेटाळून लावतात. लेखक व वक्त्याला अद्दल घडते. ॥२२॥

खरें सांडुनी खोटे घेणें । भकाधेस काये उणें । त्रिभुवनीं नारायणे । न्याय केला ।।२३।।

अस्सल सोडून नकली स्वीकारले तर फजितीला काय तोटा? असे व्हावे हा ईश्वराचा सार्वत्रिक नियम आहे. ॥२३॥

तो न्याय सांडितां सेवटीं । अवघें जगचि लागे पाठीं । जनीं भांडभांडों हिंपुटीं । किती व्हावें ।।२४।।

हा नियम लक्षात घेतला नाही, तर सर्व जग जणू फजिती करण्यासाठी पाठीमागे लागते. त्याला तोंड देता देता जीव मेटाकुटीला येतो. ॥२४॥

अन्यायें बहुतांस पुरवलें । हें देखिलें ना ऐकिलें । वेडें उगेंचि भरीं भरलें । असत्याचे ।।२५।।

विपरीत विचाराने (अन्याय) अनेकांचे समाधान झाल्याचे दिसत नाही व ऐकिवातही नाही. तरीही काही दुराग्रही मूर्ख तेच विचार घट्ट धरून बसतात. ॥२५॥

असत्य म्हणिजें तेंचि पाप । सत्य जाणावें स्वरूप । दोहींमधें साक्षप । कोणाचा करावा ।।२६।।

शास्त्राला मान्य नसलेला विचार म्हणजेच पाप! शास्त्रसंमत विचारात आत्मानुभव देण्याचे सामर्थ्य आहे. यातील काय स्वीकारून त्याचा प्रयत्नपूर्वक अभ्यास करावा हे उघड आहे. (पूर्वसंदर्भ लक्षात घेऊन येथे सत्य या शब्दाचा आत्मा किंवा स्वरूप हा अर्थ स्वीकारला नाही.) ॥२६॥

मायेमधें बोलणें चालणें साचें । माया नस्तां बोलणें कैंचें । याकारणें निशब्दाचें । मूळ शोधावें ।।२७।।

मायिक जगाचे अस्तित्व स्वीकारले की त्यात कर्म व शब्दांचा व्यवहार सत्य वाटतो. माया नसेल तर शब्द कोठून आणावेत? म्हणून जेथे मायिक शब्द मागे फिरतो त्या आत्मवस्तूचा किंवा वाणीच्या वाणीचा म्हणजे ब्रह्माचा शोध घ्यावा. ॥२७॥

वाच्यांश जाणोनी सांडावा । लक्ष्यांश विवरोन घ्यावा । याकारणें निशब्द मुळाचा गोवा । आढळेना ।।२८।।

तत्त्वमसि महावाक्यातील तत् व त्वम् पदाचा वाच्यांश (ईश्वर व जीव) जाणून सोडून द्यावा. लक्ष्यांशाचे स्पष्टीकरण समजावून घेऊन (कूटस्थचैतन्य व ब्रह्म) 'ते मी' असा त्याचा स्वीकार करावा. या पद्धतीने नि:शब्द ब्रह्म वस्तूसंबंधीचा गुंता सुटून जातो. ॥२८॥

अष्टधा प्रकृती पूर्वपक्ष । सांडून अलक्षीं लावावें लक्ष । मननसीळ परम दक्ष । तोचि जाणे ।।२९।।

अष्टधा प्रकृती मायिक असल्याने ती पूर्वपक्षाची असून (अध्यारोप) स्वसंवेद्य ब्रह्म हा सिद्धान्तपक्ष (अपवाद) आहे. तेथे अन्त:करण वृत्ती स्थिर करावी. हे, मनन करून, सावधपणे साधना करणाऱ्या प्रामाणिक साधकाला साधते. ॥२९॥

नाना भूस आणि कण । येकचि म्हणणें अप्रमाण । रसे चोवडिया कोण । शाहाणा सेवी ।।३०।।

कोंडा व धान्याचे दाणे दोन्ही सारखेच म्हणणे शक्य नाही. उसाचा रस सोडून कोण शहाणा चोयट्या खात बसेल? ॥३०॥

पिंडीं नित्यानित्य विवेक । ब्रह्मांडीं सारासार अनेक । सकळ शोधूनियां येक । सार घ्यावें ।।३१।।

शरीरात नित्य व अनित्य यांचा विवेक करावा. ब्रह्मांडात सार व असार यांचा अनेक प्रकारे विचार करावा. पिंड

ब्रह्मांडाचा धांडोळा घेऊन साररूप एकमेव ब्रह्म घ्यावे. ॥३१॥

मायेकरितां कोणीयेक । अन्वय आणि वीतरेक । ते माया नस्तां विवेक । कैसा करावा ।। ३२।।

माया स्वीकारली तर अन्वय-व्यतिरेकाची भाषा शक्य आहे. त्या मायेचा निरास झाल्यावर या दोन्हींत फरक कसा करणार? (विदेह मुक्तीत परब्रह्म अखंडत्वाने असणे हा तत्पद रूप ब्रह्माचा अन्वय होय. त्या अवस्थेत मायेचे भान न होणे हाच मायेचा व्यतिरेक होय.) ॥३२॥

तत्वें तत्त्व सर्व शोधावें । माहांवाकीं प्रवेशावें । आत्मनिवेदनें पावावें । समाधान ।। ३३।।

पुढील तत्त्वाने अलीकडील तत्त्वाचा निरास करावा. महावाक्यातील पदांचे मनन करावे व जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य साधून समाधान प्राप्त करून घ्यावे. ॥३३॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'करंटपरीक्षानिरूपणनाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'करंटपरीक्षानिरूपण' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक अठरावा : बहुजिनसी

समास सहावा : उत्तमपुरुषनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

नाना वस्त्रें नाना भूषणें । येणें शरीर श्रृंघारणें । विवेकें विचारें राजकारणें । अंतर श्रृंघारिजे ।।१।।

अनेक प्रकारची उंची वस्त्रे व आभूषणे यांनी शरीराचे सौंदर्य वाढविता येते. पण अंतरंगाच्या सौंदर्यासाठी विवेक, विचार व राजकारण हवे. ॥१॥

शरीर सुंदर सतेज । वस्त्रें भूषणें केलें सज्ज । अंतरी नस्तां च्यातुर्यबीज । कदापि शोभा न पवे ।।२।।

मूळचे तेजस्वी व डौलदार शरीर वस्त्रांनी व दागिन्यांनी नटवले तरी अन्तःकरणात चातुर्य नसेल तर त्याला कधीच शोभा येत नाही. ॥२॥

तुंड हेंकाड कठोरवचनी । अखंड तोले साभिमानी । न्याय नीति अंतःकर्णी । घेणार नाहीं ।।३।।

बोलभांड, हट्टी, कठोर शब्द बोलणारे, अहंकाराने धुमसणारे, न्याय व नीतीचा विचारही न करणारे– ॥३॥

तऱ्हे सीघ्रकोपी सदा । कदापि न धरी मर्यादा । राजकारण संवादा । मिळोंचि नेणे ।।४।।

तऱ्हेवाईक, थोडक्या कारणाने सतत संतापणारे, सर्व मर्यादा सतत धुडकावणारे व राजकारणात जराही तडजोड न स्वीकारणारे– ॥४॥

ऐसे लौंद बेइमानी । कदापि सत्य नाहीं वचनीं । पापी अपस्मार जनीं । राक्षेस जाणावे ।।५।।

असे हलकट, दिल्या शब्दाला न जागणारे किंवा कोणाशीच निष्ठा न ठेवणारे, चुकूनही खरे न बोलणारे, अशी पापी व लहरी माणसे ही राक्षसी प्रवृत्तीची समजावीत. ॥५॥

समयासारिखा समयो येना । नेम सहसा चालेना । नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ।।६।।

चालून आलेली संधी पुन्हा पुन्हा येत नाही. राजकारणांत नियमांना एकतर्फी कवटाळून बसता येत नाही. त्याने राजकारणाचा नाश होतो. ॥६॥

अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें । हटनिग्रहीं न पडावें । विवेकी पुरुषें ।।७।।

कोणतीही टोकाची भूमिका टाळून प्रसंगानुसार वागावे. विवेकसंपन्न पुरुषाने कोणताही हेका चालवू नये. ॥७॥

बहुतचि करितां हट । तेथें येऊन पडिले तट । कोणीयेकाचा सेवट । जाला पाहिजे ।।८।।

फार हेका चालवला तर त्याला विरोधकांचे गटतट तयार होतात. मग त्यांच्यात सोक्षमोक्ष लागावाच लागतो. कोणाला तरी माघार घ्यावीच लागते. ॥८॥

बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभोवानी । परंतु विचार पाहोनी । कार्ये करणें ।।९।।

ईश्वर सत्यपक्षाची बाजू घेतो हे खरे आहे. म्हणून तुळजाभवानीची तुम्हांवर कृपा आहे, हेही खरे आहे. तरीही जे करावयाचे ते नीट विचार करून करावे. (अफजलखान वधापूर्वी शिवरायांना दिलेल्या या सूचना आहेत.) ॥९॥

अखंडचि सावधाना । बहुत काये करावी सूचना । परंतु कांहीं येक अनुमाना । आणिलें पाहिजे ।।१०।।

जो सतत जागरूक असतो, त्याला फार काही सांगावे लागत नाही. परंतु त्याने वरील सर्व विचार करून ठेवावेत. ।।१०।।

समर्थापासीं बहुत जन । राहिला पाहिजे साभिमान । निश्चळ करूनियां मन । लोक असती ।।११।।

समर्थ व्यक्तीजवळ अनेक निष्ठावन्त अनुयायी असतात. समर्थाने ती निष्ठा सांभाळली जाईल अशा रीतीने अनुयायांना सांभाळावे. म्हणजे त्यांच्यात चलबिचल होत नाही. ।।११।।

म्लेच दुर्जन उदंड । बहुतां दिसाचें माजलें बंड । याकारणें अखंड । सावधान असावें ।।१२।।

दुष्ट प्रवृत्तीच्या परधर्मीयांची फार दिवसांपासून पुंडाई माजली आहे. ती मोडून काढण्यासाठी सतत सावध असावे. ।।१२।।

सकळकर्ता तो ईश्वरु । तेणें केला अंगिकारु । तया पुरुषाचा विचारु । विरुळा जाणे ।।१३।।

ईश्वर हा सृष्टिजीवनाचा कर्ता करविता आहे. त्याने ज्याला 'माझा' म्हटले आहे, त्या पुरुषाच्या जीवनाचे यथार्थ आकलन होणे क्वचित् एखाद्यालाच शक्य आहे. ।।१३।।

न्याय नीति विवेक विचार । नाना प्रसंगप्रकार । परीक्षिणें परांतर । देणें ईश्वराचें ।।१४।।

न्याय व नीतीचे वर्तन, विवेकसंपन्न विचारीपण, अनेक प्रसंगांचे यथार्थ आकलन व संबंधितांच्या अंतरंगांची परीक्षा हे सर्व गुण ईश्वराच्या कृपेने मिळतात. ।।१४।।

माहायेत्न सावधपणें । समईं धारिष्ट धरणें । अद्भुतचि कार्य करणें । देणें ईश्वराचें ।।१५।।

सर्व सावधगिरी बाळगून अफाट प्रयत्न करणे, वेळप्रसंगी धैर्य धरणे व असामान्य कामगिरी करणे ईश्वरी कृपेनेच शक्य आहे. ।।१५।।

येश कीर्ति प्रताप महिमा । उत्तम गुणासी नाहीं सीमा । नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ।।१६।।

ज्या पुरुषाजवळ अपूर्व यश, व्यापक कीर्ती, अद्भुत पराक्रम व असामान्य मोठेपणा बरोबर असीम उत्तम गुण असतात, तो अद्वितीय पुरुष हे समाजाला दिलेले ईश्वराचे देणे आहे. (छ. शिवराय.) ।।१६।।

देव ब्राह्मण आचार विचार । कितेक जनासी आधार । सदा घडे परोपकार । देणें ईश्वराचें ।।१७।।

देवाची उपासना, ब्राह्मणांचा चरितार्थ, सदाचार व सद्‌विचारांना महापुरुषाचा आधार असतो. सामान्यांना त्याचेकडून दिलासा मिळतो. असा तो सतत परोपकार करणार ईश्वराच्या कृपारूपाने जन्माला येतो. ।।१७।।

येहलोक परलोक पाहाणें । अखंड सावधपणें राहाणें । बहुत जनाचें साहाणें । देणें ईश्वराचें ।।१८।।

व्यवहारजीवन व अध्यात्मजीवन या दोन्हीसाठी प्रयत्न करून सतत सावधगिरीने राहणे व अनेकांचे अनेक अपराध क्षमा करणे हे ईशप्रसादानेच शक्य आहे. ।।१८।।

देवाचा कैपक्ष घेणें । ब्राह्मणाची चिंता वाहाणें । बहु जनासी पाळणें । देणें ईश्वराचें ।।१९।।

देव व धर्माच्या बाजूने उभे राहणे, ब्राह्मणांच्या संरक्षणाची काळजी घेणे व अनेकानेक लोकांचा सांभाळ करण्याचे सामर्थ्य ईश्वरानुग्रहाने लाभते. ।।१९।।

धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार । जाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचे ।।२०।।

धर्मस्थापना करून धर्मरक्षण करणारे महापुरुष हे ईश्वरी विभूती असतात. ती ईश्वरी योजना असल्याने ते पूर्वी झाले, आज आहेत व पुढेही होतील. ।।२०।।

उत्तम गुणाचा ग्राहिक । तर्क तीक्षण विवेक । धर्मवासना पुण्यश्लोक । देणें ईश्वराचें ।। २१ ।।

उत्तम गुणांचा चाहता, तर्कसंगत विचार करणारा तीक्ष्ण बुद्धिमन्त, विवेकी, धर्मशील व पुण्यवन्त पुरुष हे ईश्वरी देणे होय. ॥२१॥

सकळ गुणांमध्यें सार । तजविजा विवेक विचार । जेणें पाविजे पैलपार । अरत्रपरत्रींचा ।। २२ ।।

सर्व गुणांचे सार कशात असेल तर ते विवेक व विचारपूर्वक आखीव रेखीव जीवन जगून प्रपंच व परमार्थ या दोन्हीतून पार पडण्यात आहे. ॥२२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'उत्तमपुरुषनिरूपणनाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'उत्तमपुरुषनिरूपण' नावाचा सहावा समास समाप्त

दशक अठरावा : बहुजिनसी

समास सातवा : जनस्वभावनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

जनाचा लालची स्वभाव । आरंभींच म्हणती देव । म्हणिजे मला कांहीं देव । ऐसी वासना ।।१।।

सामान्य माणसे सहजच लोभी असतात. देवाची उपासना करू लागतात. 'देव' म्हणजे 'काहीतरी मला द्या' अशी कामना धरून असतात. ।।१।।

कांहींच भक्ती केली नस्तां । आणी इछिती प्रसन्नता । जैसें कांहींच सेवा न करितां । स्वामीस मागती ।।२।।

नोकराने जराही काम न करता मालकाकडे दाम मागावे, त्याप्रमाणें उपासनेला आरंभ करताच देव प्रसन्न होण्याची अपेक्षा करतात. ।।२।।

कष्टेंविण फळ नाहीं । कष्टेंविण राज्य नाहीं । केल्याविण होत नाहीं । साध्य जनीं ।।३।।

कष्टाशिवाय या जगात फळ मिळत नाही. राज्यप्राप्तीसारखे फळ तर कष्टाशिवाय नाहीच. ।।३।।

आळसें काम नासतें । हें तों प्रत्ययास येतें । कष्टाकडे चुकावितें । हीन जन ।।४।।

हाती घेतलेले काम आळसामुळे नाश पावते हे तर ठायी ठायी दिसते. टाकावू माणसे कष्ट करण्याची टाळाटाळ करतात. ।।४।।

आधीं कष्टाचें दुःख सोसिती । ते पुढें सुखाचें फळ भोगिती । आधीं आळसें सुखावती । त्यासी पुढें दुःख ।।५।।

प्रथम जे कष्टाचे दुःख सोसतात, त्यांना पुढे सुखाची फळे मिळतात. प्रथम जे आळसाचे सुख भोगतात, त्यांना पुढे दुःखाची फळे मिळतात. ।।५।।

येहलोक अथवा परलोक । दोहिंकडे सारिखाचि विवेक । दीर्घ सूचनेचें कौतुक । कळलें पाहिजे ।।६।।

प्रपंच किंवा परमार्थ या दोन्हीत विवेकाचे महत्त्व सारखेच आहे. संभाव्य परिस्थितीचे आकलन होण्याचे महत्त्व कळले पाहिजे. ।।६।।

मेळविती तितुकें भक्षिती । ते कठीण काळीं मरोन जाती । दीर्घ सूचनेनें वर्तती । तेचि भले ।।७।।

'जेवढे मिळवावे तेवढे संपवावे' अशा प्रवृत्तीचे लोक प्रतिकूल परिस्थितीत टिकाव धरत नाहीत. संभाव्य प्रतिकूलता गृहीत धरून त्याची तरतूद करणारे शहाणे ठरतात. ।।७।।

येहलोकींचा संचितार्थ । परलोकींचा परमार्थ । संचितेंविण वेर्थ । जीत मेलें ।।८।।

प्रपंचासाठीं मिळकतीतून टाकलेली शिल्लक प्रसंगी उपयोगी पडते. परमार्थासाठीं परोपकाराचे पुण्यसंचित कामाला येते. दोन्हीकडे संचय नसेल तर जिवन्तपणीच मेल्यासारखी स्थिती होते. ।।८।।

येकदां मेल्यानें सुटेना । पुन्हा जन्मोजन्मीं यातना । आपणास मारी वांचविना । तो आत्महत्यारा ।।९।।

एकदा मरून माणसाची सुटका नाही. पुन्हा पुन्हा जन्ममरणाच्या चक्रात सापडून त्याच यातना भोगाव्या लागतात. जो याप्रकारे स्वत:ला न वाचवता पुन्हा पुन्हा मरतो त्याला आत्मघातकी म्हणतात. ।।९।।

प्रतिजन्मीं आत्मघात । कोणें करावें गणीत । याकारणें जन्ममृत्य । केवी चुके ।।१०।।

असा आत्मघात कोणी किती वेळा केला याचा हिशेब कोण करणार? त्याचे जन्म-मरण असेच जगून कसे चुकणार? ॥१०॥

देव सकळ कांहीं करितो । ऐसें प्राणिमात्र बोलतो । त्याचे भेटीचा लाभ तो । अकस्मात जाला ।।११।।

'देव कर्ता, करविता आहे' असे सगळेच म्हणतात. पण त्याच्या दर्शनाची संधी मात्र अकस्मात लाभणाऱ्या मनुष्य देहात मिळते. ॥११॥

विवेकाचा लाभ घडे । जेणें परमात्मा ठाईं पडे । विवेक पाहातां सांपडे । विवेकी जनीं ।।१२।।

आत्मानात्मादि विवेकाने 'मी आत्मा' असा अनुभव येतो. असा विवेक हवा असेल तर तो विवेक संतांजवळच सापडतो. ॥१२॥

देव पाहातां आहे येक । परंतु करितो अनेक । त्या अनेकास येक । म्हणों नये कीं ।।१३।।

वस्तुत: देव (ब्रह्म) एकमेव अद्वितीय व भेदशून्य आहे. परंतु अज्ञानामुळे तो भेदाने भरलेला व नाना वाटतो. त्या अनेकांना एक म्हणणे चूक आहे. (अनेक देव आहेत असा विचार करणेच चूक आहे.) ॥१३॥

देवाचें कर्तुत्व आणि देव । कळला पाहिजे अभिप्राव । कळल्याविण कितेक जीव । उगेच बोलती ।।१४।।

देवाचे (ब्रह्म) स्वरूप लक्षण व त्याचे तटस्थ लक्षण (कर्ता, भर्ता, हर्ता इ.) यासंबंधीचे शास्त्र समजले पाहिजे. ते न समजताच बरेच लोक देवासंबंधी बडबड करतात. ॥१४॥

उगेच बोलती मूर्खपणें । शाहाणपण वाढायाकारणें । त्रुप्तिलागीं उपाव करणें । ऐसें जाले ।।१५।।

केवळ मूर्खपणामुळे अशी बडबड होते. शास्त्राभ्यासाने (शहाणपण) देवाचा अनुभव घेऊन तृप्त होण्यासाठी उपाय करणे प्राप्त आहे. ॥१५॥

जेहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले । येर ते बोलतचि राहिले । करंटे जन ।।१६।।

ज्यांनी साधनांचे शास्त्राभ्यासपूर्वक कष्ट केले त्यांना आत्मानुभवाचे भाग्य लाभले. इतर करंटे लोक केवळ बडबड करीत राहिले. ॥१६॥

करंट्यांचे करंट लक्षण । समजोन जाती विचक्षण । भल्यांचे उत्तम लक्षण । करंट्यास कळेना ।।१७।।

बुद्धिमन्तांना करंट्यांच्या कुलक्षणांची परीक्षा होते. मात्र करंट्यांना भाग्यवन्तांची सुलक्षणे लक्षात येत नाहीत! ॥१७॥

त्याची पैसावली कुबुद्धी । तेथें कैंची असेल शुद्धी । कुबुद्धी तेचि सुबुद्धी । ऐसी वाटे ।।१८।।

करंट्याची कुबुद्धी ऐसपैस पसरलेली असते. तो शुद्धीवर कसा असेल? त्याची कुबुद्धीच त्याला सद्बुद्धी वाटते. ॥१८॥

मनुष्य शुद्धीस सांडावें । त्यांचे काये खरें मानावें । जेथें विचाराच्या नावें । सुन्याकार ।।१९।।

जो माणूस शुद्धीवर नसतो, त्याच्या बोलण्यावागण्यावर कसा विश्वास ठेवावा? कारण तेथे विचारांचे नावे मोठे शून्य असते! (वेदान्तशास्त्राची जाण नसणे म्हणजे बेशुद्धी.) ॥१९॥

विचारें येहलोक परलोक । विचारें होतसे सार्थक । विचारें नित्यानित्य विवेक । पाहिला पाहिजे ।।२०।।

प्रपंच व परमार्थाचे सार्थक सत्यमिथ्यादी विचाराने होते. म्हणून तो विवेकाचा विचार शास्त्रशुद्ध पद्धतीने जाणला पाहिजे. (पहा– १-१-१५) ॥२०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'जनस्वभावनिरूपणनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'जनस्वभावनिरूपण' नावाचा सातवा समास समाप्त

दशक अठरावा : बहुजिनसी

समास आठवा : अंतर्देवनिरूपण

।। श्रीराम समर्थ ।।

ब्रह्म निराकार निश्चळ । आत्म्यास विकार चंचळ । तयास म्हणती सकळ । देवे ऐसें ।।१।।

ब्रह्म निराकार व व्यापकत्वामुळे अढळ आहे. ब्रह्मांडाचा आत्मा जो ईश्वर तो ब्रह्मांडउपाधिसापेक्ष असल्याने विकारी व ढळणारा आहे. त्यालाच सर्व लोक देव मानतात. ।।१।।

देवाचा ठावचि लागेना । येक देव नेमस्त कळेना । बहुत देवीं अनुमानेना । येक देव ।।२।।

ब्रह्मरूप देवाचा 'हा तो देव' असा कधीच अनुभव येत नाही. हा एकमेव, भेदशून्य व अखंड देव नीट कळत नाही. शेकडो देवांच्या मागे लागून या एकमेव देवाचा अंदाजही येत नाही. ।।२।।

म्हणोनी विचार असावा । विचारें देव शोधावा । बहुत देवांचा गोवा । पडोंचि नये ।।३।।

म्हणून वेदान्तशास्त्राचा विचार करून देवाचा शोध घ्यावा. शेकडो देवांच्या गोंधळात सापडू नये. ।।३।।

देव क्षत्रीं पाहिला । त्यासारिखा धातूचा केला । पृथ्वीमधें दंडक चालिला । येणें रीतीं ।।४।।

तीर्थक्षेत्रातील देवाची मूर्ती पाहून त्यासारखी धातूची मूर्ती तयार करून त्याला देव म्हणण्याची रूढी जगात चालत आली आहे. ।।४।।

नाना प्रतिमादेवांचे मूळ । तो हा क्षत्रदेवचि केवळ । नाना क्षत्रें भूमंडळ । शोधून पाहावें ।।५।।

या क्षेत्रस्थ देवांना समोर ठेवूनच तशा प्रतिमा तयार करतात हे जगातील तीर्थक्षेत्रे पाहिल्यावर लक्षात येते. ।।५।।

क्षत्रदेव पाषाणाचा । विचार पाहातां तयाचा । तंत लागला मुळाचा । अवताराकडे ।।६।।

क्षेत्रस्थ देवाची मूर्ती दगडाची असते. त्यांचे रूप पाहिले की असे लक्षात येते की भगवंताच्या अवतारांच्या वर्णनाप्रमाणे त्या घडविलेल्या आहेत. ।।६।।

अवतारी देव संपले । देहे धरुनी वर्तोन गेले । त्याहून थोर अनुमानले । ब्रह्मा विष्णु महेश ।।७।।

या अवतारांचीही समाप्ती झाली. विशिष्ट देह धारण करून काही विशिष्ट अद्भुत कार्य करून त्यांनी देह सोडले. त्यांच्यापेक्षा ब्रह्मदेव, विष्णू व महेश हे श्रेष्ठ आहेत. असा अंदाज करता येतो. (कारण साकाराहून निराकार श्रेष्ठ.) ।।७।।

त्या तिही देवांस ज्याची सत्ता । तो अंतरात्माचि पाहातां । कर्ता भोक्ता तत्वता । प्रतक्ष आहे ।।८।।

या तिन्ही देवांपेक्षा त्यांचा नियंता असलेला अंतरात्मारूप ईश्वर अधिक श्रेष्ठ होय. वस्तुत: तोच कर्ता, करविता व यज्ञभोक्ता आहे. ।।८।।

युगानयुगें तिन्ही लोक । येकचि चालवी अनेक । हा निश्चयाचा विवेक । वेदशास्त्रीं पाहावा ।।९।।

एक ईश्वरच तिन्ही लोकांच्या उत्पत्त्यादी स्थिती युगानुयुगे सांभाळतो आहे. हे वेदशास्त्रांचे सांगणे लक्षात घ्यावे. ।।९।।

आत्मा वर्तवितो शरीर । तोचि देव उत्तरोत्तर । जाणीवरूपें कळिवर । विवेकें वर्तवी ।।१०।।

सर्व भूतांच्या हृदयदेशात राहणारा ईश्वरच त्यांच्या शरीरांचा नियंता आहे. शरीरांच्या उत्पत्तीपासून लयापर्यंत (उत्तरोत्तर) तोच देव जाणीवरूपाने शरीरात राहून त्यांचे चालणारे व्याप विचारपूर्वक चालवतो. ॥१०॥

तो अंतर्देव चुकती । धांवा घेऊन तीर्था जाती । प्राणी बापुडे कष्टती । देवास नेणतां ।।११।।

हा अंतर्देव लक्षात न आल्याने बाहेरच्या तीर्थस्थ देवाकडे धाव घेतात. देव न जाणल्याने बिचारे उपासक अपरंपार कष्ट सोसतात. ॥११॥

मग विचारिती अंतःकर्णी । जेथे तेथें धोंडा पाणी । उगेंचि वणवण हिंडोनि । काये होतें ।।१२।।

काही उपासकांच्या असे मनात येते की ज्या तीर्थक्षेत्री जावे तेथे दगडाची मूर्ती व नदी, तलाव, समुद्र इ. रूपाने असणाऱ्या पाण्याशिवाय काहीच दिसत नाही! असे उगीच वणवण फिरून देव कसा कळणार? ॥१२॥

ऐसा ज्यासी विचार कळला । तेणें सत्संग धरिला । सत्संगें देव सांपडला । बहुत जनासी ।।१३।।

हा विचार मनात येणारे संतांना शरण जातात. आजपर्यंत अनेकांना संतसंगतीनेच खऱ्या देवाचा अनुभव आला आहे. ॥१३॥

ऐसीं ही विवेकाचीं कामे । विवेकी जाणतील नेमें । अविवेकी भुलले भ्रमें । त्यांस हें कळेना ।।१४।।

ब्रह्मरूप देवाचा अनुभव वेदान्तशास्त्रातील विवेकाची कास धरल्याशिवाय येत नाही. त्यांनाच यथार्थ ज्ञान होते. विवेकशून्य भ्रमिष्टांना ते होत नाही. ॥१४॥

अंतरवेधी अंतर जाणे । बाहेरमुद्रा कांहींच नेणें । म्हणोन विवेकी शाहाणे । अंतर शोधिती ।।१५।।

अन्तर्निष्ठ ब्रह्मवेत्ते अन्तरात्मा जाणतात. बहिर्मुखाला त्यांतील काहीच कळत नाही. हे लक्षात घेऊन विवेकी बुद्धिमन्त अशा अन्तर्निष्ठांच्या शोधात असतात. किंवा ते अन्तर्मुख होऊन अंतरात्म्याचा शोध घेतात. ॥१५॥

विवेकेंविण जो भाव । तो भावचि अभाव । मूर्खस्य प्रतिमा देव । ऐसें वचन ।।१६।।

विवेकावाचून असलेला भावनाप्रधान देवाविषयीचा भाव आत्मानुभूतीचे दृष्टीने असून नसल्यासारखा आहे. 'मूर्खाचा देव मूर्तीपुरता असतो' असे म्हणतात. ॥१६॥

पाहात समजत सेवटा गेला । तोचि विवेकी भला । तत्वें सांडुनी पावला । निरंजनीं ।।१७।।

वेदान्तशास्त्राचे श्रवण (पाहत) मनन (समजत) करून निदिध्यासनाने जो दृश्य अध्यस्ताच्या अधिष्ठानापर्यंत (सेवटा गेला) जाऊन ठाकतो, तोच खरा विवेकी होय. दृश्य जगताची ब्याऐंशी तत्त्वे भ्रामक आहेत हे जाणून तो ब्रह्मानुभवात रममाण होतो. ॥१७॥

आरे जें आकारासी येतें । तें अवघेंच नासों जाते । मग गल्बल्यावेगळें तें । परब्रह्म जाणावें ।।१८।।

अरे, जे साकार असते ते सहजच विनाशी असते. जे उत्पत्ती, गुण, कर्म, विकार, नाश इ. गोंधळापलीकडे, ते परब्रह्म जाणावे. ॥१८॥

चंचळ देव निश्चळ ब्रह्म । परब्रह्मीं नाहीं भ्रम । प्रत्ययज्ञानें निभ्रम । होईजेतें ।।१९।।

सगुण निराकार, सगुण साकार व मूर्ती हे सर्व देव चंचळ असून परब्रह्म निश्चळ आहे. त्याला दुसरे कोणी नसल्याने ते अभयरूप असून त्याचा 'ते मी' असा अनुभव आल्याशिवाय देव या कल्पनेविषयीचे भ्रम जात नाहीत. ॥१९॥

प्रचीतीविण जें केलें । तें तें अवघें वेर्थ गेलें । प्राणी कष्टकष्टोचि मेलें । कर्मकचाटें ।।२०।।

हा अनुभव न घेता देवाचे नावाने जे जे करावे ते सर्व व्यर्थ जाते. प्रारब्धानुसार कष्ट करून, मरून, पुन्हा पुन्हा संचितादि कर्मबंधनात अडकावे लागते. ॥२०॥

कर्मावेगळें न व्हावें । तरी देवास कासया भजावें । विवेकी जाणती स्वभावें । मूर्ख नेणे ।।२१।।

नैष्कर्म्यसिद्धी होत नसेल तर देवाची उपासना करून काय उपयोग? या बोलण्याचे रहस्य विवेक्याला सहज कळते. मूर्खाला नाही! (ज्ञानाग्नीत सर्व कर्मे भस्मसात होऊन कर्माचा लेप न लागता उर्वरित जीवन जगणे म्हणजे नैष्कर्म्य) ॥२१॥

कांहीं अनुमानलें विचारें । देव आहे जगदांतरें । सगुणाकरितां निर्धारें । निर्गुण पाविजे ।।२२।।

विचार करून अनुमानाने असे लक्षात येते की, जगताचा नियामक देव जगात व्यापून आहे. त्या सगुण देवाच्या आलंबनाच्या उपासनेने निरालंब निर्गुणाचा निश्चित अनुभव येतो. ॥२२॥

सगुण पाहातां मुळास गेला । सहजचि निर्गुण पावला । संगत्यागें मोकळा जाला । वस्तुरूप ।।२३।।

सगुणाचे मूळ शोधता शोधता सहजच निर्गुणापर्यंत अन्त:करणवृत्ती पोहोचते. तिचाही आधार सोडला की मोक्षरूप ब्रह्मवस्तूचा अनुभव येतो. ॥२३॥

परमेश्वरीं अनुसंधान । लावितां होईजे पावन । मुख्य ज्ञानेंचि विज्ञान । पाविजेतें ।।२४।।

जीवाने अन्त:करणवृत्तीच्या साहाय्याने आत्मानुसंधान साधले की जीवभाव धरून पतित झालेला आत्मभावाने पावन होतो. 'मी आत्मा' हा महाकारण देह मावळला की ज्ञानाचे विज्ञान होते. ॥२४॥

ऐसीं हे विवेकाचीं विवर्णे । पाहावीं सुचित अंत:कर्णे । नित्यानित्यविवेकश्रवणें । जगदोधार ।।२५।।

शुद्ध व शान्त मनाने ही व या प्रकारची वेदान्तशास्त्राची प्रमेये अभ्यासावीत. नित्य-अनित्यादी विवेकाच्या श्रवणादिकांनी जगाचे कल्याण होते. ॥२५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अंतर्देवनिरूपणनाम' समास आठवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'अंतर्देवनिरूपण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक अठरावा : बहुजिनसी

समास नववा : निद्रानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

वंदूनियां आदिपुरुष । बोलों निद्रेचा विळास । निद्रा आलियां सावकास । जाणार नाहीं ।।१।।
निद्रेनें व्यापिली काया । आळस आंग मोडे जांभया । तेणेंकरितां बैसावया । धीर नाहीं ।।२।।
कडकडां जांभया येती । चटचटां चटक्या वाजती । डकडकां डुकल्या देती । सावकास ।।३।।
येकाचे डोळे झांकती । येकाचे डोळे लागती । येक ते वचकोन पाहाती । चहुंकडे ।।४।।
येक उलथोन पडिले । तिहीं ब्रह्मविणे फोडिले । हुडकाचे टुकडे जाले । सुधी नाहीं ।।५।।
येक टेंकोन बैसले । तेथेंचि घोरों लागले । येक उताणें पसरले । सावकास ।।६।।
कोणी मुर्कुंडी घालिती । कोणी कानवडें निजती । कोणी चक्रीं फिरती । चहुंकडे ।।७।।
येक हात हालविती । येक पाये हालविती । येक दात खाती । कर्कराटें ।।८।।
येकाचीं वस्त्रें निघोनि गेलीं । ते नागवींच लोळों लागलीं । येकाचीं मुंडाशीं गडबडलीं । चहुंकडे ।।९।।
येक निजेलीं अव्यावेस्तें । येक दिसती जैसीं प्रेतें । दांत पसरुनी जैसीं भूतें । वाईट दिसती ।।१०।।
येक वोसणतचि उठिले । येक अंधारीं फिरों लागले । येक जाऊन निजेले । उकरड्यावरी ।।११।।
येक मडकीं उतरिती । येक भोई चांचपती । येक उठोन वाटा लागती । भलतीकडे ।।१२।।
येक प्राणी वोसणाती । येक फुंदफुंदों रडती । येक खदखदां हांसती । सावकास ।।१३।।
येक हाका मारूं लागले । येक बोंबलित उठिले । येक वचकोन राहिले । आपुले ठाईं ।।१४।।
येक क्षणक्षणा खुरडती । येक डोई खाजविती । येक कढों लागती । सावकास ।।१५।।
येकाच्या लाळा गळाल्या । येकाच्या पिका सांडल्या । येकीं लघुशंका केल्या । सावकास ।।१६।।
येक राउत सोडिती । येक कर्पट ढेंकर देती । येक खांकरुनी थुंकिती । भलतीकडे ।।१७।।
येक हागती येक वोकिती । येक खोंकिती येक सिंकिती । येक ते पाणी मागती । निदसुऱ्या स्वरें ।।१८।।
येक दुस्वप्नें निर्बुजले । येक सुस्वप्नें संतोषले । येक ते गाढमुढी पडिले । सुषुप्तिमध्यें ।।१९।।

निद्रादी तीन अवस्थांचा साक्षी असलेल्या आत्म्याला वंदन करून निद्रेचा खेळ सांगतो. झोप आली की ती लवकर जात नाही. निद्रा अंगात भरली की आळोखेपिळोखे देऊन जांभया येतात. बसणे शक्य होत नाही. कोणी कडकडा जांभया देत तोंडासमोर चुटक्या वाजवतो तर कोणाचा तोल जाऊ लागतो. कोणाचे डोळे पूर्ण मिटतात तर कोणाचे मिचमिचतात. कोणी दचकून उठून चोहीकडे पाहतात. कीर्तन ऐकता ऐकताच कोणी श्रोता झोपेने अचानक कोसळून कीर्तनकाराच्या वीणेवर पडून तो फुटतो. हुडक या वाद्याचे तुकडे झालेलेही कळत नाही. भिंत किंवा खांबाला टेकून बसलेले जागीच घोरू लागतात. काही पडता पडता उताणे होतात. कोणी पोटात पाय घेऊन, कोणी एका कुशीवर तर कोणी चाकाप्रमाणे फिरत झोपतात. कोणी पाय तर कोणी हात हालवतात. काही करकटून दात खातात, कोणाचे धोतर फिटून तो नागवाच झोपतो तर कोणाचे मुंडासे दूरपर्यंत पसरते. कोणी अस्ताव्यस्त पसरतात. कोणाच्या तोंडावर प्रेतकळा दिसते. तर पिशाच्चासारखा जबडा उघडून झोपलेले भेसूर दिसतात. कोणी बडबडत उठतात, कोणी झोपेत

उठून अंधारात चाचपडतात तर कोणी उकिरड्यावर जाऊन पडतात. कोणी उतरंडीची मडकी उतरवतात, कोणी जमीन चाचपतात तर कोणी झोपेतच कोठेही चालू लागतात. एक ओरडतो, एक हुंदके देतो, तर एक खदाखदा हसू लागतो. कोणी कोणाला तरी हाका मारतात, बोंबलत जागे होतात तर कोणी अर्धवट झोपेत उठून जागेवरच खिळून राहतात. एक पायाने जमीन उकरतो, डोके खाजवतो, तर एक कण्हतो. एकाची लाळ गळते, कोणाचा खाल्लेल्या विड्याच्या पानाचा रस गळतो तर कोणाला लघवी होते. वारा सरणे, कर्पट ढेकरा येणे, खाकरून कोठेही थुंकणे हेही घडते. शौचाला होणे, उलटी, खोकला, शिंका इ. झोपेत होते. कोणी मोठ्याने ओरडून पाणी मागतो. कोणी भयंकर स्वप्नाने घाबरतात, सुखद स्वप्नाने सुखावतात तर कोणी अत्यंत गाढ झोपतात. ॥१-१९॥

इकडे उजेडाया जालें । कोण्ही पढणें आरंभिलें । कोणीं प्रातस्मरामि मांडिलें । हरिकीर्तन ।।२०।।

नंतर सूर्योदयाची वेळ होते. कोणी पाठपाठान्तराला सुरुवात करतात. कोणी पहाटेची स्तोत्रे म्हणत हरिकीर्तन करतात. ॥२०॥

कोणीं आठविल्या ध्यानमूर्ती । कोणी येकांतीं जप करिती । कोणी पाठांतर उजळिती । नाना प्रकारें ।।२१।।

कोणी आपापल्या दैवतांच्या ध्यानात मग्न होतात, कोणी एकांतात नामादी जप करतात तर कोणी पाठांना उजाळा देतात. अशा अनेक प्रकारच्या उपासना करतात. ॥२१॥

नाना विद्या नाना कळा । आपलाल्या सिकती सकळा । तानमानें गायेनकळा । येक गाती ।।२२।।

जो तो आपापल्या विद्या व कलांचा अभ्यास करतो. चिजांचे तानांसह रियाज चालू होतात. ॥२२॥

मागें निद्रा संपलीं । पुढें जागृति प्राप्त जाली । वेवसाईं बुद्धी आपुली । प्रेरिते जाले ।।२३।।

झोप झाली. पुढे जाग आल्यावर जो तो आपापल्या उद्योग-व्यवसायाला लागतो. ॥२३॥

ज्ञाता तत्वे सांडून पळाला । तुर्येंपलीकडे गेला । आत्मनिवेदनें जाला । ब्रह्मरूप ।।२४।।

जीवन्मुक्त सुषुप्त्यादी अवस्थातीत होऊन, मायिक तत्त्वांचा निरास करून तिन्ही अवस्थांचे साक्षित्व करणाऱ्या तुर्येपलीकडे जाऊन आत्मनिवेदनाने ब्रह्मरूप होतो. ॥२४॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'निद्रानिरूपणनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'निद्रानिरूपण' नावाचा नववा समास समाप्त

दशक अठरावा : बहुजिनसी

समास दहावा : श्रोताअवलक्षणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

कोणीयेका कार्याचा साक्षप । कांहीं तऱ्ही घडे विक्षेप । काळ साहे तें आपेंआप । होत जातें ।।१।।

एखादे कार्य कितीही प्रयत्नपूर्वक केले तरी त्यात विघ्न येऊ शकते. काळ अनुकूल असेल ते कार्य सहजासहजी होऊन जाते. ॥१॥

कार्यभाग होत चालिला । तेणें प्राणी शोक जाला । विचारहि सुचों लागला । दिवसेंदिवस ।।२।।

कार्याला यश येत गेले की माणसाची उमेद वाढत जाते व दिवसानुदिवस नवी कार्ये व यशाचे मार्ग सुचू लागतात. ॥२॥

कोणीयेक प्राणी जन्मासी येतो । कांहीं तऱ्ही काळ साहे होतो । दुःखाउपरी सुख देतो । देव कृपाळुपणें ।।३।।

जन्माला येणाऱ्या प्रत्येकाला काळाचे थोडेफार तरी साहाय्य मिळतेच. कृपावन्त ईश्वर दुःखापाठोपाठ सुखही देतो. ॥३॥

अवघाचि काळ जरी सजे । तरी अवघेचि होती राजे । कांहीं सजे कांहीं न सजे । ऐसें आहे ।।४।।

सर्वांना सर्वकाळ जर काळाचे साहाय्य मिळाले असते तर सर्वजण सम्राट झाले असते! परंतु काही वेळा यश तर काही वेळा अपयश येणें हे जीवनाचे स्वरूपच आहे. ॥४॥

येहलोक अथवा परलोक । साधतां कोणीयेक विवेक । अद्भुत होये स्वाभाविक । देणें ईश्वराचें ।।५।।

व्यावहारिक विवेकाने प्रपंचाला यश व आध्यात्मिक विवेकाने मोक्षसिद्धी ही दोन्ही जर कोणाला साधली तर लोकांना त्याचे मोठे आश्चर्य वाटणे स्वाभाविक आहे. पण हे ईश्वरी कृपेचे फळ असते. ॥५॥

ऐकल्याविण कळलें । शिकविल्याविण शहाणपण आलें । देखिलें ना ऐकिलें । भूमंडळीं ।।६।।

न ऐकताच कळले व कोणी शिकविल्याशिवाय शहाणपण मिळाले हे या भूतळावर आजपर्यंत कोणी पाहिलेले किंवा ऐकलेले नाही. ॥६॥

सकळ कांहीं ऐकतां कळे । कळतां कळतां वृत्ति निवळे । नेमस्त मनामधें आकळे । सारासार ।।७।।

जे कळावयाचे ते ऐकूनच कळते, कळत गेले की ते बुद्धीत स्थिर होते. नंतर सार व असार यांचा झालेला निश्चय मनात सतत जागा राहतो. ॥७॥

श्रवण म्हणिजे ऐकावें । मनन म्हणिजे मनीं धरावें । येणें उपायें स्वभावें । त्रयलोक्य चाले ।।८।।

अध्यात्मशास्त्र ऐकणे म्हणजे श्रवण. ऐकलेल्याचा साधक-बाधक, शास्त्र-शास्त्रबाह्य इ. विचार म्हणजे, मनन. त्रैलोक्यातील सर्वांना याच प्रकारे ज्ञान होते. ॥८॥

श्रवणाआड विक्षेप येती । नाना जिनस सांगों किती । सावध असतां प्रत्यय येती । सकळ कांहीं ।।९।।

श्रवणामध्येही अनेक विक्षेप येतात. ते किती म्हणून सांगावे! उघड्या डोळ्याने पाहिले की ते सगळे लक्षात येतात. ॥९॥

श्रवणीं लोक बैसले । बोलतां बोलतां येकाग्र जाले । त्याउपरी जे नूतन आले । ते येकाग्र नव्हेती ।।१०।।

पहिल्यापासून श्रवणाला बसलेले श्रोते वक्त्याच्या निरूपणाशी एकरूप होतात. पण उशिरा येणारे श्रोते एकाग्र होत नाहीत. (ते सभेत विक्षेप मात्र निर्माण करतात.) ॥१०॥

मनुष्य बाहेर हिंडोनी आलें । नाना प्रकारीचें ऐकिलें । उदंड गलबलूं लागलें । उगें असेना ।।११।।

अनेक ठिकाणीं, अनेक वक्त्यांचे, अनेक विषयांचे श्रवण झालेला श्रोता श्रवणाला बसल्यावर ते सर्व आठवून चालू श्रवणात स्वस्थ राहत नाही. मधेच बोलणे, हावभावांनी राजी किंवा नाराजी व्यक्त करणे, दुसऱ्या श्रोत्यांशी हळूच बोलणे इ. प्रकारे तो सतत गडबड करतो. ॥११॥

प्रसंग पाहोन चालती । ऐसे लोक थोडे असती । श्रवणीं नाना विक्षेप होती । ते हे ऐका ।।१२।।

प्रसंगाशी मिळून जाणारे लोक फार कमी असतात. श्रवणात होणारे अनेक विक्षेप आता ऐका. ॥१२॥

श्रवणीं बैसले ऐकाया । अडों लागलीसें काया । येती कडकडां जांभया । निद्राभरें ।।१३।।

सभेमध्ये (कीर्तन रात्री ९ नंतर सुरू होत असे.) ऐकण्यास बसल्यावर शरीर अवघडल्यासारखे होते. त्यात झोप आल्यामुळे कडकडा जांभया येतात. ॥१३॥

बैसले सुचित करूनि मना । परी तें मनचि ऐकेना । मागें होतें ऐकिलें नाना । तेंचि धरुनी बैसलें ।।१४।।

काही श्रोते सावधपणे श्रवणाला बसतात, पण थोड्याच वेळात मन पूर्वी केव्हातरी ऐकलेला विषय पकडून बसते व तेथून हालत नाही. ॥१४॥

तत्पर केलें शरीर । परी मनामधें आणीक विचार । कल्पना कल्पी तो विस्तार । किती म्हणौनि सांगावा ।।१५।।

शरीर आसनात स्थिर केले तरी मनात येणाऱ्या अनंत विचारांचा विस्तार किती सांगावा? ॥१५॥

जें जें कांहीं श्रवणीं पडिलें । तितुकें समजोन विवरलें । तरीच कांहीं सार्थक जालें । निरुपणीं ।।१६।।

निरूपणात ऐकलेल्याचा समजून विचार केला तरच त्याचा उपयोग होतो. ॥१६॥

मन दिसते मां धरावें । ज्याचें त्यानें आवरावें । आवरून विवेकें धरावें । अर्थांतरीं ।।१७।।

मन ही काही दिसून पकडण्याची वस्तू नाही! ज्याचे त्याने ते आवरून विवेकाने अर्थाकडे लावावे. ॥१७॥ ।

निरूपणीं येऊन बैसला । परी तो उदंड जेऊन आला । बैसतांच कासाविस जाला । त्रुषाक्रांत ।।१८।।

कोणी श्रोता भरपूर जेवून श्रवणाला बसताच तहानेने अस्वस्थ होतो. त्याचे लक्ष लागत नाही. ॥१८॥

आधीं उदक आणविलें । घळघळां उदंड घेतलें । तेणें मळमळूं लागलें । उठोनी गेला ।।१९।।

मग तो पाणी मागून गटागटा पितो व त्यामुळे मळमळू लागले की सभेतून उठून जातो. ॥१९॥

कर्पट ढेंकर उचक्या देती । वारा सरतां मोठी फजिती । क्षणाक्षणा उठोनी जाती । लघुशंकेसी ।।२०।।

काहींना कर्पट ढेकरा, उचक्या येतात. काही वारा सरल्याने ओशाळतात. काही वरचेवर लघवीला जातात. ॥२०॥

दिशेनें कासाविस केला । आवघेंचि सांडून धांविला । निरूपणप्रसंगीं निघोनी गेला । अखंड ऐसा ।।२१।।

काहींना शौचाची घाई होऊन सभा सोडून जावे लागते. उरलेल्या सर्व निरूपणाला तो मुकतो. ॥२१॥

दृष्टांतीं कांहीं अपूर्व आलें । अंत:कर्ण तेथेंचि राहिलें । कोठवरी काये वाचिलें । कांहीं कळेना ।।२२।।

वक्त्याने सिद्धान्त समजण्यासाठी एखादा नवा दृष्टान्त सांगताच काही श्रोते त्यातच रमतात व पुढील वाचनाकडे त्यांचे दुर्लक्ष होते. ॥२२॥

निरूपणीं येऊन बैसला । तो विंचुवें फणकाविला । कैचें निरूपण जाला । कासावीस ।।२३।।

पोटामधें तिडिक उठिली । पाठीमधें करक भरली । चालक चिखल्या पुळी जाली । बैसवेना ।।२४।।

पिसोळा चाऊन पळाला । तेणें प्राणी दुश्चीत जाला । कोणें नेटें गल्बला केला । तेथेंचि धावें ।।२५।।

श्रवणात विंचू चावला तर कोठले श्रवण! त्याने कासावीस होतो. पोट दुखणे, पाठीत कळकणे, सांधेदुखी, चिखली, अवघड जागी फोड असेल तर बसवत नाही. पिसोळा चावला तर लक्ष उडते. बाहेर मोठा गलका झाला तर कोणी श्रोता तिकडेच पळतो! ॥२३-२५॥

विषइ लोक श्रवणीं येती । ते बायेकांकडेच पाहाती । चोरटे लोक चोरून जाती । पादरक्षा ।।२६।।

विषयासक्त लोक श्रवणा आले की स्त्रीश्रोत्यांकडेच टक लावून पाहतात! चोरटे चपला चोरतात! ॥२६॥

होये नव्हे वादवेवाद । तेणें उदंड जाला खेद । सिव्या गाळी अप्रमाद । होतां चुकला ।।२७।।

एखादे विधान बरोबर की चूक असा वाद उभा राहून सर्व श्रोत्यांच्या मनाला यातना होतात. शिवीगाळ होऊन होऊ नये ते होते. श्रवण बिघडते. ॥२७॥

कोणी निरूपणीं बैसती । सावकास गोष्टी लाविती । हरिदास ते रें रें करिती । पोटासाठीं ।।२८।।

कीर्तनाला आलेले काही श्रोते निवांतपणे गप्पा मारतात. पोटासाठी कथा करणारा काहीतरी रटाळ सांगत असतो. ॥२८॥

बहुत जाणते मिळाले । येकापुढें येक बोले । लोकांचे आशये राहिले । कोण जाणे ।।२९।।

व्यासंगी श्रोते श्रवणामध्ये एकाने सांगितल्या पुढचे बोलू लागतात. त्यामुळे सामान्यांना काही समजेनासे होते. पण तिकडे लक्ष कोण देतो? ॥२९॥

माझें होये तुझें नव्हे । ऐसी अखंड जयास सवे । न्याये नीति सांडून धावे । अन्यायाकडे ।।३०।।

'माझे बरोबर तुझे चूक' ही कायमची भूमिका असणारा श्रोता विधिनिषेधांचा विचार न करता सभेतील सामंजस्य बिघडवून टाकतो. ॥३०॥

आपल्या थोरपणासाठीं । अच्यावाच्या तोंड पिटी । न्याये नाहीं ते सेवटीं । परम अन्याई ।।३१।।

स्वत:चा मोठेपणा मिरविण्याच्या भरात जिभेचा पट्टा चालवून ते सर्व श्रोत्यांवर अत्यंत अन्यायच करतात. सभेची रीत (नीती) धुडकावतात. ॥३१॥

येकेकडे अभिमान उठे । दुसरेकडे उदंड पेटे । ऐसे श्रोते खरे खोटे । कोण जाणे ।।३२।।

एक श्रोता ज्ञानाभिमानाने उभा राहतो. दुसरा त्याच्या विरोधात पेटून उठतो. त्यांतील खरा कोण व खोटा कोण हे ठरविणे कठीण होते. ॥३२॥

म्हणोन जाणते विचक्षण । तें आधींच धरिती नेणपण । मूर्ख टोणपा आपण । कांहींच नाहीं ।।३३।।

म्हणून जे शहाणे विद्वान असतात ते पहिल्यापासून नेणत्याची भूमिका घेतात. आपण अडाणी व अजाण असल्याचे दाखवितात. ॥३३॥

आपणाहून देव थोर । ऐसा जयास कळला विचार । सकळ कांहीं जगदांतर । तेहिं राखावें ।।३४।।

स्वत:पेक्षा ईश्वर श्रेष्ठ आहे हे जाणणारा, सर्वांच्या हृदयात व्यापून राहणाऱ्या जनता जनार्दनाला दुखवीत नाही. ॥३४॥

सभेमधें कळहो जाला । शब्द येतो जाणत्याला । अंतरें राखों नाहीं सिकला । कैसा योगी ।।३५।।

सभेत वादंग माजला तर सभेतील जाणत्याकडे दोष येतो. जो सर्वांचे अंतरंग सांभाळू शकत नाही, त्याला योगी कसे म्हणावे? त्याने सभेला सांभाळून घेतले पाहिजे. ॥३५॥

वैर करितां वैरचि वाढे । आपणास दुःख भोगणें घडे । म्हणोनि शाहाण्याचे कुकडे । कळों आलें ।। ३६ ।।

वैराने वैर वाढून सर्व संबंधितांना दुःखच भोगावे लागते. यातच शहाणपणाचे रहस्य ओळखावे. ।।३६।।

अखंड आपणा सांभाळिती । क्षुल्लकपण येऊं नेदिती । थोर लोकांस क्षमा शांति । अगत्य करणें ।। ३७ ।।

खरा श्रेष्ठ आपला श्रेष्ठपणा सहजपणे सांभाळतो. स्वतःकडे हीनत्व येऊ देत नाही. शांती व क्षमा हे त्याच्या स्वभावाचे स्थायीभाव असतात. ।।३७।।

अवगुणापासीं बैसला गुणी । आवगुण कळतो तत्क्षणीं । विवेकी पुरुषाची करणी । विवेकें होते ।। ३८ ।।

सद्गुणी व दुर्गुणी एक ठिकाणी आले तर त्यातील दुर्गुणी लगेच ओळखू येतो. विवेकपूर्ण वर्तणूक विवेकीच करू शकतो. ।।३८।।

उपाये परियाये दीर्घ प्रेत्न । विवेकबळें नाना येत्न । करील तयाचें महिमान । तोचि जाणे ।। ३९ ।।

लोकांचे अंतरंग सांभाळण्याचे उपाय, प्रसंगी आवश्यक ते पर्याय, विवेकाच्या बळाने केलेले अनेक प्रकारचे प्रदीर्घ प्रयत्न जो करतो त्याचे मोठेपण त्यालाच ठाऊक! ।।३९।।

दुर्जनी वेवदरून घेतला । बाश्कळ लोकीं घसरिला । विवेकापासून चेवला । विवेकी कैसा ।।४० ।।

ज्याला दुर्जन घेरतात, जो उथळ लोकांबरोबर वाहत जातो व विवेकापासून ढळतो त्याला विवेकी कसे म्हणावे? ।।४०।।

न्याये परियाये उपाये । मूर्खास हें कळे काये । मूर्खाकरितां चिवडा होये । मज्यालसीचा ।।४१।।

न्याय, पर्यायी व्यवस्था व उपाय इ. मूर्खांना काय कळणार? ते सभेचा विचका करतात. ।।४१।।

मग ते शाहाणे नीट करिती । स्वयें साहोन साहविती । स्वयें करून करविती । लोकांकरवीं ।।४२।।

शहाणी मंडळी ती सभा मार्गावर आणतात. सर्व प्रकारचे अविचारी वर्तन सहन करून इतरांना ते सहन करण्याची प्रेरणा देतात. स्वतः तसे करून लोकांकडून करून घेतात. ।।४२।।

पृथ्वीमधें उदंड जन । जनामधें असती सज्जन । जयांकरितां समाधान । प्राणीमात्रासी ।।४३।।

पृथ्वीवर माणसांची संख्या प्रचंड आहे. त्यात असलेल्या सज्जनांमुळेच इतरांना समाधान मिळण्याची व्यवस्था होते. ।।४३।।

तो मनोगतांची आंगें जाणे । मान प्रसंग समये जाणे । संतप्तालागीं निवऊं जाणे । नाना प्रकारें ।।४४।।

मानवी विचाराच्या सर्व दिशा त्याला कळतात. कोणत्याही समस्येची व्याप्ती, (मान) प्राप्त प्रसंग व काळाची गरज तो जाणतो. शोकादी कारणांनी संतप्त झालेल्यांना शांत करण्याचे अनेक उपाय त्याचेपाशी असतात. ।।४४।।

ऐसा तो जाणता लोक । समर्थ तयाचा विवेक । त्याचें करणें कांहीं येक । जनास कळेना ।।४५।।

लोकांचे अंतरंग यथार्थपणे जाणणाऱ्या त्या समर्थाच्या विवेकाची हातोटी लोकांना मुळीच समजत नाही. ।।४५।।

बहुत जनास चालवी । नाना मंडळें हालवी । ऐसी हे समर्थपदवी । विवेकें होते ।।४६।।

अनेक लोकांना सन्मार्गी लावून कित्येक समुदायांना कार्याकडे प्रवृत्त करणाऱ्याला 'समर्थ'ही पदवी त्याच्या विवेकसंपन्नतेमुळे मिळते. ।।४६।।

विवेक एकांतीं करावा । जगदीश धारणेनें धरावा । लोक आपला आणी परावा । म्हणोंचि नये ।।४७।।

जीव दृष्टीने भिन्नता असली तरी आत्मदृष्टीने असलेल्या ऐक्याचा विवेक एकांतात करावा. जगदीशाच्या अनुसंधानात राहावे व 'हा माझा, हा परका' असे मनात आणू नये. ।।४७।।

येकांतीं विवेक ठाईं पडे । येकांती येत्न सांपडे । येकांती तर्क वावडे । ब्रह्मांडगोळीं ।।४८।।

असा विवेक एकांतात होतो. तो एकांतातच सांभाळण्याचा यत्न करता येतो. एकांतात तर्काने सर्व ब्रह्मांडाचा धांडोळा घेता येतो. ।।४८।।

येकांतीं स्मरण करावें । चुकलें निधान पडे ठावें । अंतरात्म्यासरिसें फिरावें । कांहीं तरी ।।४९।।

एकांतात गेल्या दिवसाचा विचार केला असता झालेल्या चुका कळतात. तो दिवस बाजूला सारून ईश्वराप्रमाणे जमेल तेवढे व्यापक व्हावे. ।।४९।।

जयास येकांत मानला । अवघ्या आधीं कळें त्याला । त्यावेगळें वडिलपणाला । ठावचि नाहीं ।।५०।।

ज्याचे मन एकांतात रमते त्याला सर्वांच्या अगोदर परिस्थितीचे आकलन होते किंवा स्वरूपानुभव येतो, ब्रह्माएवढे व्यापक (वडील) होण्यासाठी दुसरा उपाय नाही. ।।५०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'श्रोताअवलक्षणनिरूपणनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'श्रोताअवलक्षणनिरूपण' नावाचा दहावा समास समाप्त
—दशक अठरावा समाप्त—

दशक एकोणिसावा : शिकवण

समास पहिला : लेखनक्रियानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ब्राह्मणें बाळबोध अक्षर । घडसुनी करावें सुंदर । जें देखतांचि चतुर । समाधान पावती ।। १ ।।

लोकशिक्षणाची जबाबदारी असणाऱ्याने आपले अक्षर असे वळणदार करावे की ते पाहताच जाणत्याला समाधान व्हावे. ॥१॥

वाटोळें सरळें मोकळें । वोतलें मसीचें काळें । कुळकुळीत वळी चालिल्या ढाळें । मुक्तमाळा जैशा ।। २ ।।

गडद काळ्या शाईने लिहिलेले अक्षर गोल वळणाचे, सरळ व मोकळे असावे. त्या अक्षरांच्या ओळी सरळ रेषेतील मोत्यांच्या माळेप्रमाणे असाव्यात. ॥२॥

अक्षरमात्र तितुकें नीट । नेमस्त पैस काने नीट । आडव्या मात्रा त्या हि नीट । आर्कुलीं वेलांड्या ।। ३ ।।

प्रत्येक अक्षर त्याच वळणाचे, एका रांगेत, मधे पुरेसे अंतर सोडून व काना, मात्रा, वेलांट्या, रफार, इ. जागच्या जागी असाव्यात. ॥३॥

पहिलें अक्षर जें काढिलें । ग्रंथ संपेतों पाहाता गेलें । येका टांकेंचि लिहिलें । ऐसें वाटे ।।४।।

ग्रंथाची सुरुवात करताना लिहिलेले पहिले अक्षर व ग्रंथसमाप्तीचे अक्षर या दरम्यानचे लेखन पाहून ते एका बैठकीत एकाच टाकाने लिहिल्यासारखे वाटावे. ॥४॥

अक्षराचें काळेपण । टांकाचें ठोसरपण । तैसेंचि वळण वांकाण । सारिखेंचि ।।५।।

अक्षर मधेच गडद काळे व कोठेतरी फिकट काळे नसावे. टांकाचे टोक सारखेच जाड असावे. अक्षराचे वळण किंवा वाकण सर्वत्र सारखे असावे. ॥५॥

वोळीस वोळी लागेना । आर्कुली मात्रा भेदीना । खालीले वोळीस स्पर्शेना । अथवा लंबाक्षर ।।६।।

खालच्या व वरच्या ओळीत अंतर असावे. रफार व मात्रांचा परस्परांना छेद बसू नये. एखादेच अक्षर लांब काढून ते खालील ओळीला टेकू नये. ॥६॥

पान शिषानें रेखाटावें । त्यावरी नेमकचि ल्याहावें । दुरी जवळी न व्हावें । अंतर वोळीचें ।।७।।

कागदावर शिसपेन्सिलीने ओळी आधी आखून त्यांवर नेटकेपणें लिहावे. ओळीतील अंतर सारखे हवे. ॥७॥

कोठें शोधासी आडेना । चुकी पाहतां सांपडेना । गरज केली हें घडेना । लेखकापासुनी ।।८।।

दुरुस्तीसाठी वाव असावा. सहसा चूक नसावी. लेखकाने गरजेपोटी काटकसर केली असे होऊ नये. ॥८॥

ज्याचें वय आहे नूतन । त्यानें ल्याहावें जपोन । जनासी पडे मोहन । ऐसें करावें ।।९।।

लहान मुलांनी जाणीवपूर्वक असे सुंदर लिहावे की त्याचा वाचणाऱ्यांना मोह निर्माण होईल. ॥९॥

बहु बारिक तरुणपणीं । कामा नये म्हातारपणीं । मध्यस्त लिहिण्याची करणी । केली पाहिजे ।। १० ।।

तरुण वयात फार बारीक अक्षर लिहिले तर ते वृद्धत्वात वाचता येत नाही. म्हणून अक्षर मध्यम हवे. ॥१०॥

भोवतें स्थळ सोडून द्यावें । मधेंचि चमचमित ल्याहावें । कागद झडतांहि झडावें । नलगेचि अक्षर ।। ११ ।।

कागदावर चोहीकडे पुरेशी जागा सोडून मध्यावर ठसठशीत लिहावे. कागद जीर्ण झाला तरी अक्षरे ताजी दिसावीत. ॥११॥

ऐसा ग्रंथ जपोनी ल्याहावा । प्राणीमात्रास उपजे हेवा । ऐसा पुरुष तो पहावा । म्हणती लोक ।।१२।।

ग्रंथा असा काळजीपूर्वक लिहावा की सर्वांना त्याचे कौतुक वाटून त्यांना लेखकाला भेटावेसे वाटावे. ॥१२॥

काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ति उरवावी । चटक लाउनी सोडावी । कांहीं येक ।।१३।।

त्यासाठी अमाप कष्ट घेऊन मागे सत्कीर्ती राहावी. लोकांना अत्यंत आकृष्ट करून घ्यावे. ॥१३॥

घट्य कागद आणावे । जपोन नेमस्त खळावे । लिहिण्याचे सामे असावे । नानापरी ।।१४।।

दर्जेदार कागदाला नीट खळ लावून नाना प्रकारचे लेखनसाहित्य आधीपासून तयार ठेवावे. ॥१४॥

सुऱ्या कातऱ्या जागाईत । खळी घोंटाळें तागाईत । नाना सुरंग मिश्रित । जाणोनि घ्यावें ।।१५।।

सुऱ्या, कातऱ्या, पट्ट्या, खळ, तुरटीचे पाणी, कागद घोटण्याचा रूळ, तागाचा काला व त्यांत मिसळण्यासाठी सुगंधी द्रव्ये असावीत. ॥१५॥

नाना देसीचे बरु आणावे । घटी बारिक सरळे घ्यावे । नाना रंगाचे आणावे । नाना जिनसी ।।१६।।

ठिकठिकाणचे बोरू आणून त्यांतील टणक, बारीक व सरळ घ्यावेत. ते अनेक जातीचे व रंगाचे असावेत. ॥१६॥

नाना जिनसी टांकतोडणी । नाना प्रकारें रेखाटणी । चित्रविचित्र करणी । सिसेंलोळ्या ।।१७।।

बोरूच्या टोकाला चीर पाडण्यासाठी अनेक प्रकारच्या बारीक सुऱ्या, रेघा आखण्यासाठी पट्ट्या व नाना प्रकारच्या शिशाच्या गोळ्या असाव्यात. ॥१७॥

हिंगुळ संग्रहीं असावे । वाळले आळिते पाहोन घ्यावे । सोपें भिजउनी वाळवावे । संग्रह मसीचे ।।१८।।

डिंक वाळलेला की ओला ते पाहून घ्यावे. काजळाची शाई करण्यासाठी लागणारी वनस्पती भिजवून नंतर वाळवून ती साठवावी. ॥१८॥

तगटी इतिश्रया कराव्या । बंदरी फळ्या घोटाव्या । नाना चित्रीं चिताराव्या । उंच चित्रें ।।१९।।

प्रकरणाच्या शेवटी 'इतिश्री' असे अधिक घोटीव अक्षरात लिहावे. देवदाराच्या फळ्या घासून त्यांवर नाना प्रकारची दर्जेदार चित्रे काढावीत. ॥१९॥

नाना गोप नाना बासनें । मेणकापडें सिंदुरवर्णे । पेट्या कुलपें जपणें । पुस्तकाकारणें ।।२०।।

मऊ दोऱ्या, ग्रंथाची वस्त्रे, शेंदरी मेणकापडे, पेट्या, कुलपे इ. साधनांनी ग्रंथ जपावा. ॥२०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'लेखनक्रियानिरूपणनाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'लेखनक्रियानिरूपण' नावाचा पहिला समास समाप्त

दशक एकोणिसावा : शिकवण

समास दुसरा : विवरणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

मागां बोलिले लेखनभेद । आतां ऐका अर्थभेद । नाना प्रकारीचे संवाद । समजोन घ्यावे ।। १ ।।

मागील प्रकरणात लेखनाची रहस्ये (भेद) उलगडून दाखविली. आता शब्दाचे अर्थ करण्याची रहस्ये व संवादातील खुब्या समजून घ्याव्यात. (मागील समासात लेखनाचे प्रकार सांगितले नसून लेखनक्रिया सांगितली आहे. म्हणून येथे भेद ह्या शब्दाचा 'प्रकार' असा अर्थ न करता रहस्य, युक्ती किंवा कला असा अर्थ केला आहे.) ॥१॥

शब्दभेद अर्थभेद । मुद्राभेद प्रबंधभेद । नाना शब्दाचे शब्दभेद । जाणोनी पाहावे ।। २ ।।

शब्दांमागील योजकता, सुसंगत अर्थ, लेखकाची विशिष्ट मुद्रा (स्वत:च्या नावाचा उल्लेख), लेखनाचा प्रकार (निबंध, टीका इ.) व एकाच शब्दाचे अनेक अर्थ समजावून घ्यावेत. ॥२॥

नाना आशंका प्रत्योत्तरें । नाना प्रचित साक्षात्कारें । जेणेंकरितां जगदांतरें । चमत्कारती ।। ३ ।।

श्रोत्यांच्या व वाचकांच्या अनेक शंकांचे तात्काळ समाधान करावे. त्यांना ते पटेल व अनुभवाला येईल असे सांगावे. त्यामुळे सर्वांनाच नवल वाटते. ॥३॥

नाना पूर्वपक्ष सिद्धांत । प्रत्ययो पाहावा नेमस्त । अनुमानाचें खस्तवेस्त । बोलोंचि नये ।।४।।

अनेक मतांचे व शंकांचे पूर्वपक्ष व सिद्धान्तपक्ष ह्यांचा साकल्याने नियमित अभ्यास करावा. केवळ अंदाजाने अघळपघळ बोलू नये. ॥४॥

प्रवृत्ति अथवा निवृत्ती । प्रचितीविण अवघी भ्रांती । गळंग्यांमधील जगज्जोति । चेतेल कोठें ।।५।।

प्रपंच व परमार्थ ह्या दोन्हींचा वक्ता अनुभवी नसेल तर भ्रमाचे साम्राज्य असते. ओल्या कचरापेटीत जसा अग्नी पेटत नाही त्याप्रमाणे अनधिकाऱ्याला आत्मज्योतीचा अनुभव येत नाही. ॥५॥

हेत समजोन उत्तर देणें । दुसऱ्याचे जीवीचें समजणें । मुख्य च्यातुर्याचीं लक्षणें । तें हें ऐसीं ।। ६ ।।

हे लक्षात घेऊनच प्रश्नांचे उत्तर द्यावे. प्रश्नकर्त्याचे मनोगत लक्षात घेण्याचे चातुर्य असावे. (अनधिकाऱ्याला फार काही सांगू नये) ॥६॥

चातुर्येविण खटपट । ते विद्याचि फलकट । सभेमधें आटघाट । समाधान कैचें ।।७।।

हे चातुर्य नसेल तर वक्त्याजवळ परिपूर्ण ज्ञान असूनही ते फलकटाप्रमाणे उडून जाते. ('कुक्षेत्री बीज घातले'– ज्ञाने.) अशा मंडळींच्या सभेत बोलण्याचा आटापीटा करून समाधान कसे मिळेल? ॥७॥

बहुत बोलणें ऐकावें । तेथें मोन्यचि धरावें । अल्पचिन्हें समजावें । जगदांतर ।।८।।

अनेक लोक अनेक प्रकारे बोलत असतील तर तेथे एक शब्दही बोलू नये. ह्या बडबडीवरूनच त्यांचे अंतरंग ओळखावे. ॥८॥

बाष्कळामधें बैसों नये । उद्धटासीं तंडों नये । आपणाकरितां खंडों नये । समाधान जनाचें ।।९।।

उथळ व सैरटांमध्ये मिसळू नये. सभेतील कोणा उद्धटाशी वाद घालून स्वत:मुळे अनेकांचे समाधान मोडू नये. ॥९॥

नेणतपण सोडूं नये । जाणपणें फुगों नये । नाना जनाचें हृदये । मृद शब्दें उकलावें ।।१०।।

आपली अज्ञानाची भूमिका सोडून पांडित्याने चढून जाऊ नये. हळुवार शब्दांनी, अनेकांचे अज्ञानाने झाकलेले अंत:करण मोकळे करावे. ।।१०।।

प्रसंग जाणावा नेटका । बहुतांसी जाझु घेऊं नका । खरें असतांचि नासका । फड होतो ।।११।।

सभेतील वातावरणाचा अंदाज घेऊन एकाच वेळी अनेकांशी वाद घालू नये. आपले म्हणणे योग्य असले तरी वादंगाने सभा मोडते. ।।११।।

शोध घेतां आळसों नये । भ्रष्ट लोकीं बैसों नये । बैसलें तरी टाकूं नये । मिथ्या दोष ।।१२।।

सज्जन व सत् शास्त्र ह्यांचा शोध घेत राहावा. आचार व विचारभ्रष्टांशी संबंध ठेवू नये. तसा प्रसंग आलाच तर त्यांच्या दोषांचे चिंतन करू नये. त्याने उगीचच मन दूषित होते. ।।१२।।

अंतर आर्ताचें शोधावें । प्रसंगीं थोडें चि वाचावें । चटक लाउनी सोडावें । भल्या मनुष्यासी ।।१३।।

तीव्र मुमुक्षुत्व शोधावे व त्याला आवश्यक तेवढेच शास्त्र वाचून दाखवावे. त्याला आपल्याविषयी ओढ निर्माण व्हावी. ।।१३।।

मज्यालसींत बैसों नये । समाराधनेसी जाऊं नये । जातां येळलिवाणें होये । जिणें आपुलें ।।१४।।

राजकीय वळणाच्या बैठकीत बसू नये. अन्नछत्रात जेवू नये. त्याने आपले जीवन ओशाळवाणे होते. ।।१४।।

उत्तम गुण प्रगटवावे । मग भलत्यासी बोलतां फावे । भले पाहोन करावे । शोधून मित्र ।।१५।।

आपल्यातील उत्तम गुण सर्वांना कळले की कोणाशीही बोलले तरी त्याचा उपयोग होतो. (कीर्तीचा प्रभाव पडतो.) सज्जनांना पारखून त्यांच्याशी स्नेह जमवावा. ।।१५।।

उपासनेसारिखें बोलावें । सर्व जनासी तोषवावें । सगट बरेंपण राखावें । कोण्हीयेकासी ।।१६।।

उपासनेला अनुकूलता निर्माण होऊन ती वाढेल असे बोलावे. सर्वांना संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न करून समाजातील स्वत:चा भलेपणा सांभाळावा. ।।१६।।

ठाईं ठाईं शोध घ्यावा । मग ग्रामीं प्रवेश करावा । प्राणीमात्र बोलवावा । आप्तपणें ।।१७।।

सर्व प्रकारची माहिती घेऊनच महंताने गावात प्रवेश करावा व सर्वांशी ते आपले आप्त असल्याप्रमाणे आपुलकीने बोलावे. ।।१७।।

उंच नीच म्हणों नये । सकळांचें निववावें हृदये । अस्तमानीं जाऊं नये । कोठें तऱ्हीं ।।१८।।

हा श्रेष्ठ, हा कनिष्ठ असा भेदभाव करू नये. सर्वांना समाधान होईल असे बोलावे. सूर्यास्तानंतर मुक्कामाची जागा सोडून कोठेही जाऊ नये. ।।१८।।

जगामधें जगमित्र । जिव्हेपासीं आहे सूत्र । कोठें तऱ्ही सत्पात्र । शोधून काढावें ।।१९।।

ह्या जगात जगाशी मैत्री जोडण्याचे रहस्य वाणीमध्ये आहे. ह्या मैत्रीतून सत्पात्र व मुमुक्षू शोधून काढावेत. ।।१९।।

कथा होती तेथें जावें । दुरी दीनासारिखें बैसावें । तेथील सकळ हरद्र घ्यावें । अंतर्यामीं ।।२०।।

कथा-कीर्तन चालू असेल तेथे जाऊन सामान्याप्रमाणे एका कोपऱ्यात दूर बसावे. एकूण सर्व वातावरणाचा नीट अंदाज घ्यावा. ।।२०।।

तेथें भलें आडळती । व्यापक ते हि कळों येती । हळुहळु मंदगती । रीग करावा ।।२१।।

त्यातील सज्जन व क्रियाशील लोक ओळखून सावकाश व बेताबेताने त्यांच्याशी संबंध वाढवावेत. ।।२१।।

सकळामधें विशेष श्रवण । श्रवणाहुनी थोर मनन । मननें होये समाधान । बहुत जनाचें ।।२२।।

जीवनातील यशासाठी श्रवणाचे फार महत्त्व असून त्याहून मनन श्रेष्ठ आहे. त्या मननशीलतेमध्ये अनेकांचे समाधान करण्याचे सामर्थ्य आहे. ॥२२॥

धूर्तपणें सकळ जाणावें । अंतरीं अंतर बाणावें । समजल्याविण सिणावें । कासयासी ।।२३।।

चाणाक्षपणाने सर्वकाही जाणून घेऊन दुसऱ्याच्या मनात आपले मन मिळवून घ्यावे. हे सर्व लक्षात न घेता उगीचच का कष्टावे? ॥२३॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'विवरणनिरूपणनाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'विवरणनिरूपण' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक एकोणिसावा : शिकवण

समास तिसरा : करंटलक्षणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

सुचित करुनी अंत:कर्ण । ऐका करंटलक्षण । हें त्यागितां सदेवलक्षण । आंगीं बाणे ।।१।।

आता मन एकाग्र करून करंट्याची लक्षणे ऐका. त्यांचा त्याग केला असता भाग्यवंताची लक्षणे अंगी बाणतात. ॥१॥

पापाकरितां दरिद्र प्राप्त । दरिद्रें होये पापसंचित । ऐसेंचि होत जात । क्षणक्षणा ।।२।।

पापाचे फळ म्हणून दारिद्र्याचे दु:ख भोगावे लागून दारिद्र्यामुळे पापे वाढत जातात. असे हे चक्र सतत चालू राहते. ॥२॥

याकारणें करंटलक्षणें । ऐकोनी त्यागचि करणें । म्हणिजे कांहीं येक बाणे । सदेवलक्षण ।।३।।

म्हणून करंटलक्षणे ऐकून त्यांचा त्याग करण्याचे स्वातंत्र्य वापरले तर भाग्यवंताची लक्षणे अंगी बाणतात. ॥३॥

करंट्यास आळस आवडे । यत्न कदापी नावडे । त्याची वासना वावडे । अधर्मीं सदा ।।४।।

करंट्याला आळस फार प्रिय असल्याने प्रयत्नाचे कष्ट कधीच नको असतात. चरितार्थासाठी सतत तो गैरमार्गाकडे वळतो. ॥४॥

सदा भ्रमिष्ट निदसुरा । उगेंचि बोले सैरांवैरा । कोणीयेकाच्या अंतरा । मानेचिना ।।५।।

सतत भ्रमिष्टासारखा, झोपाळू व अकारण बरळत राहतो. तो कोणालाही नकोसा होतो. ॥५॥

लेहों नेणे वाचूं नेणे । सवदासुत घेऊं नेणे । हिशेब कितेब राखों नेणे । धारणा नाहीं ।।६।।

लिहिणे, वाचणे, घेणेदेणे करणे, हिशेब ठेवणे इ. काहीच येत नाही व लक्षातही काही राहत नाही. ॥६॥

हारवी सांडी पाडी फोडी । विसरे चुके नाना खोडी । भल्याचे संगतीची आवडी । कदापी नाहीं ।।७।।

हरवतो, सांडतो, पाडतो, फोडतो, विसरतो, सतत चुका करतो व खोड्याळ असतो. सज्जनांचा सहवास कधीच आवडत नाही. ॥७॥

चाट गडी मेळविले । कुकर्मी मित्र केले । खटनट येकवटिले । चोरटे पापी ।।८।।

थापेबाज व दुर्जन लोकांशी मैत्री करतो. वाकड्या विचाराचे, नाटकी, चोरटे व पापी माणसे जमवतो. ॥८॥

ज्यासीं त्यासीं कळकटा । स्वयें सदाचा चोरटा । परघातकी धाटामोटा । वाटा पाडी ।।९।।

सर्वांशी भांडणे उकरून काढणारा, चोरट्या नजरेचा व चोर, दगाफटका करण्यात पटाईत, व धीटपणे वाटमाऱ्या करतो. ॥९॥

दीर्घ सूचना सुचेचिना । न्याय नीति हे रुचेना । परअभिळासीं वासना । निरंतर ।।१०।।

दूरदर्शित्व मुळीच नाही, न्याय-नीती आवडत नाही व दुसऱ्याच्या धनादिकांवर ते लुबाडण्यासाठी सतत नजर असते. ॥१०॥

आळसें शरीर पाळिलें । परंतु पोटेंविण गेलें । सुडकें मिळेनासें जालें । पांघराया ।।११।।

आळसामुळे शरीराला त्रास देत नाही खरा, पण अन्न न मिळाल्याने ते खंगते. वस्त्र व पांघरुणालाही महाग होतो. ।।११।।

आळसें शरीर पाळी । अखंड कुंसी कांडोळी । निद्रेचे पाडी सुकाळीं । आपणासी ।।१२।।

आळसाने शरीर जोंबाळून ठेवून सतत कुशी खाजवत बसतो. (निरर्थक हालचाली करतो.) अखंड निद्राधीन राहतो. ।।१२।।

जनासीं मीत्री करीना । कठीण शब्द बोले नाना । मूर्खपणें आवरेना । कोणीयेकासी ।।१३।।

कोणाशी संबंध न ठेवता उलट सर्वांना कठोर शब्दांनी अनेक प्रकारे दुखवतो. तो एवढा मूर्ख असतो की त्याची कोणालाही समजूत घालता येत नाही. ।।१३।।

पवित्र लोकांमधें भिडावे । वोंगळामधें निशंक धांवे । सदा मनापासून भावे । जननिंद्य क्रिया ।।१४।।

पवित्र लोकांत जायला लाज वाटते पण घाणेरड्या लोकांत मोकळेपणाने वावरतो. जे कर्म लोक निंद्य समजतात ते मनापासून आवडते. ।।१४।।

तेथें कैंचा परोपकार । केला बहुतांचा संव्हार । पापी अनर्थी अपस्मार । सर्वअबद्धी ।।१५।।

असा माणूस परोपकार कुठला करणार! उलट तो पापी, लहरी, अनर्थकारक व सर्व प्रकारे बेताल माणूस अनेकांचे मोठे नुकसान करतो. ।।१५।।

शब्द सांभाळून बोलेना । आवरितां आवरेना । कोणीयेकासी मानेना । बोलणें त्याचें ।।१६।।

शब्द जपून बोलत नाही, कोणालाही आवरत नाही व त्याचे बोलणे कोणालाच पटत नाही. ।।१६।।

कोणीयेकास विश्वास नाहीं । कोणीयेकासीं सख्य नाहीं । विद्या वैभव कांहींच नाहीं । उगाचि ताठा ।।१७।।

कोणाशीच मैत्रीचे संबंध नसतात, शिक्षण किंवा पैसा काही नसले तरी अकारण गर्व धरून बसतो. ।।१७।।

राखावीं बहुतांचीं अंतरें । भाग्य येतें तदनंतरें । ऐसीं हें विवेकाचीं उत्तरें । ऐकणार नाहीं ।।१८।।

‘अनेकांची मने सांभाळावी तेव्हा भाग्योदय होतो’ इ. व्यावहारिक सुविचार ऐकूनही घेत नाही. ।।१८।।

स्वयें आपणास कळेना । शिकविलें तें ऐकेना । तयासी उपाय नाना । काये करिती ।।१९।।

स्वत:ला समजत नाही व दुसऱ्याचे ऐकत नाही अशाचा भाग्योदय कोणत्या उपायाने होणार? ।।१९।।

कल्पना करी उदंड कांहीं । प्राप्तव्य तों कांहींच नाहीं । अखंड पडिला संदेही । अनुमानाचे ।।२०।।

नाना प्रकारच्या मनोरथांत गुंग झाल्याने प्रत्यक्ष लाभ काहीच नसतो. सतत संशय व तर्ककुतर्कात अडकून पडतो. ।।२०।।

पुण्यमार्ग सांडिला मनें । पाप झडावें काशानें । निश्चय नाहीं अनुमानें । नास केला ।।२१।।

काही पुण्य मिळवावे असे मनातच येत नसल्याने पापाचे क्षालन कशाने होईल? कोणताच निश्चय धड नसल्याने संशय त्याचा नाश करतात. ।।२१।।

कांहींयेक पुर्तें कळेना । सभेमधें बोलों राहेना । बाष्कळ लाबाड ऐसें जना । कळों आलें ।।२२।।

कोणत्याही विषयाचे पूर्ण आकलन नसूनही चार-चौघात तोंड उघडल्याशिवाय राहत नाही! त्यामुळे त्याचा उथळपणा व अज्ञान सर्वांना कळते. नकलीपणा उघडा पडतो. ।।२२।।

कांहीं नेमकपण आपुलें । बहुत जनासी कळों आलें । तेंचि मनुष्य मान्य जालें । भूमंडळीं ।।२३।।

ज्याच्या वागण्या-बोलण्यातील नेटकेपणा सर्वांना कळून येतो त्यालाच जगात मानमान्यता मिळते. ।।२३।।

झिजल्यावांचुनी कीर्ति कैंची । मान्यता नव्हे कीं फुकाची । जिकडे तिकडे होते ची ची । अवलक्षणें ।।२४।।

झीज सोसल्यावाचून फुकट मानमान्यता व कीर्ती लाभत नाही. अवलक्षणे दिसली की सर्वत्र फजितीच फजिती होते. ।।२४।।

भल्याची संगती धरीना । आपणासी शाहाणे करीना । तो आपला आपण वैरी जाणा । स्वहित नेणे ।।२५।।

जो स्वत:चे हित लक्षात घेत नाही असा स्वत:शीच जणू वैर धरलेला तो, जाणत्यांची संगत धरून स्वत:ला शहाणा करीत नाही. ।।२५।।

लोकांसी बरें करावें । तें उसिणें सवेंचि घ्यावें । ऐसें जयाच्या जीवें । जाणिजेना ।।२६।।

लोकांना मदत केली की ते तात्काळ त्याची फेड करतात असे त्या जीवाला कळतच नाही. ।।२६।।

जेथें नाहीं उत्तम गुण । तें करंटपणाचें लक्षण । बहुतांसीं न मने तें अवलक्षण । सहजचि जालें ।।२७।।

जेथे उत्तम गुणसंपदा नसते तेथे करंटेपणा असतो. 'जे अनेकांना आवडत नाही ते अवलक्षण' ही सरळ व्याख्या करता येते. ।।२७।।

कार्याकारण सकळ कांहीं । कार्येंविण तो कांहींच नाहीं । निकामी तो दु:खप्रवाहीं । वाहातचि गेला ।।२८।।

जगात सर्वत्र कार्यकारण भाव आहे. दिल्याचे कार्य मिळण्याचे कारण होते. म्हणून अशा कार्याशिवाय काही हाताला लागत नाही. कार्य न करणारा दु:खाच्या प्रवाहात वाहत जातो. (जन हे सुखाचे । दिल्या घेतल्याचे ।। तुका.) ।।२८।।

बहुतांसीं मान्य थोडा । त्याच्या पापासी नाहीं जोडा । निराश्रई पडे उघडा । जेथें तेथें ।।२९।।

जो अनेकांना थोडाही आवडत नाही त्यासारखा पापी कोणी नाही. असा तो आश्रयरहित जागोजागी उघडा पडतो. त्याचे करंटेपण सर्वांना कळते. ।।२९।।

याकारणें अवगुण त्यागावे । उत्तम गुण समजोन घ्यावे । तेणें मनासारिखें फावे । सकळ कांहीं ।।३०।।

म्हणून उत्तम गुण समजावून घेऊन अवगुणांचा यत्नपूर्वक त्याग करावा. ह्यानेच सर्व काही मनासारखे घडून येईल. ।।३०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'करंटलक्षणनिरूपणनाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'करंटलक्षणनिरूपण' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक एकोणिसावा : शिकवण

समास चवथा : सदेवलक्षणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

मागां बोलिलें करंटलक्षण । तें विवेकें सांडावें संपूर्ण । आतां ऐका सदेव लक्षण । परम सौख्यादायेंक ।।१।।

मागील समासात करंट्याची लक्षणे सांगितली. त्या सर्वांचा विचारपूर्वक त्याग करावा. आता अत्यंत सुख देणारी सुदैवी माणसाची लक्षणे ऐका. ॥१॥

उपजतगुण शरीरीं । परोपकारी नानापरी । आवडे सर्वांचे अंतरीं । सर्वकाळ ।।२।।

काहीजणांमध्ये दुसऱ्याला सतत मदत करण्यासारखे सद्‌गुण उपजतच असतात. ते सर्वांना मनापासून सतत आवडतात. ॥२॥

सुंदर अक्षर लेहों जाणे । चपळ शुद्ध वाचूं जाणे । अर्थांतर सांगों जाणे । सकळ कांहीं ।।३।।

सुंदर हस्ताक्षर, वेगाने व तरीही अस्खलित व शुद्ध उच्चारासह वाचणे, मुख्यार्थ, ध्वन्यर्थ वगैरे समजणे इत्यादी सर्व गुण असतात. ॥३॥

कोणाचें मनोगत तोडीना । भल्यांची संगती सोडीना । सदेवलक्षण अनुमाना । आणून ठेवी ।।४।।

कोणाचे मन दुखवीत नाही, सज्जनांची संगत सोडीत नाही व त्याचेकडे पाहून देवमाणूस कसा असतो त्याचा अंदाज येतो. ॥४॥

तो सकळ जनासी व्हावा । जेथें तेथें नित्य नवा । मूर्खपणें अनुमानगोवा । कांहींच नाहीं ।।५।।

तो सर्वांना हवाहवासा वाटतो. प्रत्येक ठिकाणी प्रथमच आल्यासारखा त्याचा आदरसत्कार होतो. त्याची एकही गोष्ट मूर्खाप्रमाणे अंदाजपंचे नसते. ॥५॥

नाना उत्तम गुण सत्पात्र । तेचि मनुष्य जगमित्र । प्रगट कीर्ती स्वतंत्र । पराधेन नाहीं ।।६।।

अनेक उत्तम गुणांमुळे ज्याची उत्तम पात्रता सिद्ध झाली आहे तो जगाचा सुहृद बनतो. त्याची कीर्ती प्रगट व कमाईची असते. प्रसारमाध्यमातून मिळालेली नसते! ॥६॥

राखे सकळांचें अंतर । उदंड करी पाठांतर । नेमस्तपणाचा विसर । पडणार नाहीं ।।७।।

तो सर्वांची मने सांभाळतो, सतत पाठपाठांतर करतो व न्यायनीती व रीतीने वागणे कधीही विसरत नाही. ॥७॥

नम्रपणें पुसों जाणे । नेमस्त अर्थ सांगों जाणे । बोलाऐसें वर्तो जाणे । उत्तम क्रिया ।।८।।

कोणाला काही विचारणे असेल तर नम्रता धरून विचारतो, शास्त्रशुद्ध अर्थ सांगतो व बोलतो तसे वागून दाखवतो. त्याचे सर्व करणे, वागणे उत्तम असते. ॥८॥

जो मानला बहुतांसी । कोणी बोलों न शके त्यासी । धगधगीत पुण्यरासी । माहांपुरुष ।।९।।

ज्याला बहुसंख्य लोक मानतात अशा तेजस्वी पुण्यसंपन्न महापुरुषाला नावे ठेवण्याची कोणाची हिंमत होत नाही. ॥९॥

तो परोपकार करितांचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला । मग काये उणें तयाला । भूमंडळीं ।।१०।।

जो सतत दुसऱ्यासाठी झिजतो तो सर्वांना हवाहवासा वाटतो.त्याला ह्या जगात काय कमी पडणार? (प्रत्यक्ष सत्ता नसूनही तो सत्ताधीश असतो.) ॥१०॥

बहुत जन वास पाहे । वेळेसी तत्काळ उभा राहे । उणें कोणाचें न साहे । तया पुरुषासी ।।११।।

बरेच लोक त्याच्या येण्याची वाट पाहतात. कारण त्यांच्या वेळीप्रसंगी तो मदतीसाठी तातडीने धावून येतो. त्याला इतरांची काही उणीव सहन होत नाही. ॥११॥

चौदा विद्या चौसष्टी कळा । जाणे संगीत गायेनकळा । आत्मविद्येचा जिव्हाळा । उदंड तेथें ।।१२।।

चौदा विद्या, चौसष्ट कला, संगीत-गायनाचे कौशल्य त्याचे जवळ असते. मुख्यत: त्याला अध्यात्म विद्येची अतिशय आवड असते. ॥१२॥

सकळांसी नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें । अखंड कोणीयेकाचें उणें । पडोंचि नेदी ।।१३।।

तो सर्वांजवळ नम्रतेने बोलतो, सर्वांना काय हवे ते ओळखून वागतो व कोणालाही कोणतीही उणीव वाटली तर ती भरून काढतो. ॥१३॥

न्याय नीति भजन मर्यादा । काळ सार्थक करी सदा । दरिद्रपणाची आपदा । तेथें कैची ।।१४।।

ज्याचे सर्व जीवन न्याय, नीती व उपासनेच्या चौकटीतील बंदिस्त स्थितीत चालते त्याला दारिद्र्याचे संकट कोठून येईल? ॥१४॥

उत्तमगुणें श्रृंघारला । तो बहुतामधें शोभला । प्रगट प्रतापें उगवला । मार्तंड जैसा ।।१५।।

उत्तम गुणांनी मंडित असलेला तो, पराक्रमरूप सूर्य प्रत्यक्ष उगवल्याप्रमाणे, सर्वांच्यात शोभतो. ॥१५॥

जाणता पुरुष असेल जेथें । कळ्हो कैचा उठेल तेथें । उत्तम गुणाविषीं रितें । तें प्राणी करंटें ।।१६।।

ज्या सभेत असा उत्तम पुरुष असतो तेथे वादंग कसे माजतील? ज्यांचेपाशी असे उत्तम गुण नसतात ती माणसे करंटी होत. ॥१६॥

प्रपंचीं जाणे राजकारण । परमार्थी साकल्य विवरण । सर्वांमधें उत्तम गुण । त्याचा भोक्ता ।।१७।।

प्रपंचातील व्यवहारकौशल्य व राजकारण तो उत्तम जाणतो. परमार्थात वेदांत शास्त्राचे उत्कृष्ट स्पष्टीकरण करतो व ज्यात जे उत्तम गुण असतील ते जाणून ते तो घेतो. ॥१७॥

मागें येक पुढें एक । ऐसा कदापी नाहीं दंडक । सर्वत्रांसी अलोलिक । तया पुरुषाची ।।१८।।

तोंडावर एक पाठीमागे एक असे त्याचे बोलणे चालणे कधीच नसते. सर्व लोकांनी त्याचे अलौकिकत्व चांगले जाणलेले असते. ॥१८॥

अंतरासी लागेल ढका । ऐसी वर्तणूक करुं नका । जेथें तेथें विवेका । प्रगट करी ।।१९।।

'कोणाचेही अंत:करण कधी दुखवू नये' असा विवेकाचा विचार तो सर्वांना सर्वत्र सांगतो. ॥१९॥

कर्मविधी उपासनाविधी । ज्ञानविधी वैराग्यविधी । विशाळ ज्ञात्रुत्वाची बुद्धी । चळेल कैसी ।।२०।।

कर्माचे कौशल्य, विधिवत उपासना, ज्ञानप्राप्तीची साधने, वैराग्याची हातोटी साधलेल्या त्या व्यापक ज्ञात्याची बुद्धी कशी बरे घसरेल? ॥२०॥

पाहातां अवघे उत्तम गुण । तयास वाईट म्हणेल कोण । जैसा आत्मा संपूर्ण । सर्वां घटीं ।।२१।।

आत्मा जसा सर्व देहात संपूर्ण व्यापून असतो त्याप्रमाणे त्याच्यात सर्व सद्गुण पुरेपूर असल्याने त्याला कोण नावे ठेवणार? ॥२१॥

आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लाहानथोर । तैसाचि करी परोपकार । मनापासुनी ।।२२।।

लहानमोठी माणसे जशी स्वत:च्या कर्तव्याविषयी तत्पर असतात तसा हा परोपकार हेच कर्तव्य समजून त्यात मनापासून तत्पर असतो. ॥२२॥

दुसऱ्याच्या दुःखे दुखवे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे । आवघेचि सुखी असावे । ऐसी वासना ।।२३।।

दुसऱ्याचे दु:ख हेच त्याचे दु:ख. दुसऱ्याच्या सुखाने होते तेच सुख. सर्वजण सुखी असावेत अशी त्याला तळमळ असते. ॥२३॥

उदंड मुलें नानापरी । वडिलांचें मन अवघ्यांवरी । तैसी अवघ्यांची चिंता करी । माहांपुरुष ।।२४।।

घरात अनेक स्वभावाची अनेक मुले असली तरी वडीलधाऱ्यांचे सर्वांवर सारखे लक्ष असते तशी तो महापुरुष सर्वांची चिंता वाहतो. ॥२४॥

जयास कोणाचें सोसेना । तयाची निःकांचन वासना । धीकारिल्या धीकारेना । तोचि महापुरुष ।।२५।।

ज्याला कोणाचे उणें सहन होत नाही, ज्याची सर्वांच्या सुखासाठी निरपेक्ष इच्छा असते व कोणी कितीही नावे ठेविली तरी नाउमेद होत नाही तोच खरा महापुरुष. ॥२५॥

मिथ्या शरीर निंदलें । तरी याचें काये गेलें । ज्ञात्यासी आणि जिंतिलें । देहेबुद्धीनें ।।२६।।

मायिक शरीराची निंदा केल्याने काय होणार? 'शरीराची निंदा ही माझीच निंदा' अशी देहबुद्धी ज्ञात्याजवळ कधीतरी असेल काय? ॥२६॥

हें अवघें अवलक्षण । ज्ञाता देहीं विलक्षण । कांहीं तऱ्ही उत्तम गुण । जनीं दाखवावे ।।२७।।

देहबुद्धी हे कुलक्षणच आहे. आत्मज्ञानी पुरुष देहाहून वेगळा होऊन देहात राहतो! माणसाने जगाला उत्तम गुणांचा आदर्श घालून द्यावा. ॥२७॥

उत्तम गुणास मनुष्य वेधे । वाईट गुणासी प्राणी खेदे । तीक्षण बुद्धि लोक साधे । काये जाणती ।।२८।।

उत्तम गुणसंपदेकडे माणसे सहजच आकृष्ट होतात. दुर्गुण पाहताच माणसे नाराज होतात. सामान्य माणसाला महान बुद्धिमंताच्या बुद्धीची धार कशी कळणार? ॥२८॥

लोकीं अत्यंत क्षमा करिती । आलियां लोकांचे प्रचिती । मग ते लोक पाठी राखती । नाना प्रकारीं ।।२९।।

'हा माणूस पराकोटीचा क्षमाशील आहे' असे लोकांच्या लक्षात आले की समाज त्या क्षमावंताला हरप्रकारे व हरप्रसंगी पाठिंबा देतो व सांभाळतो. ॥२९॥

बहुतांसी वाटे मी थोर । सर्वमान्य पाहिजे विचार । धीर उदार गंभीर । माहांपुरुष ।।३०।।

'मी मोठा आहे' असे कित्येकांना वाटते! पण सर्वांना तसे वाटले पाहिजे ना!! खरा महापुरुष धैर्यवान, उदार व प्रत्येक गोष्टीचा सखोल वेध घेणारा असतो. ॥३०॥

जितुके कांहीं उत्तम गुण । तें समर्थाचें लक्षण । अवगुण तें करंटलक्षण । सहजचि जालें ।।३१।।

जेवढी उत्तम गुणांची लक्षणे ती सर्व समर्थांची व अवगुणांची लक्षणे करंट्याची असतात हे ओघानेच आले. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सदेवलक्षणनिरूपणनाम' समास चवथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सदेवलक्षणनिरूपण' नावाचा चवथा समास समाप्त

दशक एकोणिसावा : शिकवण

समास पाचवा : देहमान्यनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

मातीचे देव धोंड्याचे देव । सोन्याचे देव रुप्याचे देव । काशाचे देव पितळेचे देव । तांब्याचे देव चित्रलेपे ।।१।।

रुविच्या लांकडाचे देव पोंवळ्यांचे देव । बाण तांदळे नर्मदे देव । शालिग्राम काश्मिरी देव । सूर्यकांत सोमकांत ।।२।।

तांब्रनाणीं हेमनाणीं । कोणी पूजिती देवार्चनीं । चक्रांगीत चक्रतीर्थाहुनी । घेऊन येती ।।३।।

माती, दगड, सोने, रुपे, कासे, पितळ, तांबे ह्या धातूंचे देव, लिंपून केलेले देव, रूईचे लाकूड, पोवळे ह्यांचे देव, बाण, तांदळे, नर्मदेतील गोटे, शालिग्राम, केशर, सूर्यकांत व चंद्रकांत मणी, सोने व तांब्याची नाणी इत्यादीकांना देव मानून त्यांची अर्चनभक्तीत उपासना करतात. काही चक्रतीर्थातील वलयांकित गोटे पूजतात. ॥१-३॥

उदंड उपासनेचे भेद । किती करावे विशद । आपलाले आवडीचा वेध । लागला जनीं ।।४।।

असे उपासनेतील उपास्यांचे किती प्रकार सांगावेत? जो-तो आपल्या आवडीची उपासना करतो. ॥४॥

परी त्या सकळांचें हि कारण । मुळीं पाहावें स्मरण । तया स्मरणाचे अंश जाण । नाना देवतें ।।५।।

पण हे सर्व उपास्य पदार्थ 'एकोऽहं' ह्या मूळ स्फुरणातून झालेल्या सृष्टीतील आहेत. सर्व दैवते त्या स्फुरणाचे अंश आहेत. ॥५॥

मुळीं द्रष्टा देव तो येक । त्याचे जाहाले अनेक । समजोन पाहातां विवेक । उमजों लागे ।।६।।

ईक्षण करणारा किंवा साक्षी ईश्वर हा मूळचा देव असून त्याचेच अनेक देव झाले. विवेकाने नीट विचार केला की हे लक्षात येते. ॥६॥

देह्यावेगळी भक्ति फावेना । देह्यावेगळा देव पावेना । याकारणें मूळ भजना । देहेचि आहे ।।७।।

देहावाचून भक्ती करताही येत नाही व देहधारी देवावाचून देवाचे दर्शनही होत नाही. म्हणून भजनासाठी देह हेच मूळ आहे. ॥७॥

देहे मुळींच केला वाव । तरी भजनासी कैंचा ठाव । म्हणोनी भजनाचा उपाव । देह्यात्मयोगें ।।८।।

अजातवादाने देहाचे अस्तित्वच नाकारले तर उपासनेला आधार कोणाचा? म्हणून आत्म्यासह देह मानूनच उपासना सिद्ध होते. ॥८॥

देहेंविण देव कैसा भजावा । देहेंविण देव कैसा पुजावा । देह्याविण मोहछाव कैसा करावा । कोण्या प्रकारें ।।९।।

देहावाचून देवाचे भजन, पूजन व जयंती यांसारखे महोत्सव कसे साजरे होणार? ॥९॥

अत्र गंध पत्र पुष्प । फल तांबोल धूप दीप । नाना भजनाचा साक्षेप । कोठें करावा ।।१०।।

अत्तर लावणे, गंध विलेपन, पाने, फुले, फळे वहाणे, विडा देणे, धूप घालणे, दिवा ओवाळणे, इ. उपासनांचे

विधी कोणाला करावेत? ॥१०॥

देवाचें तीर्थ कैसें घ्यावें । देवासी गंध कोठें लावावें । मंत्रपुष्प तरी वावें । कोणें ठाईं ।।११।।

देवाचे तीर्थ कसे घेणार? त्याला गंध कोठे लावणार? मंत्रपुष्पांजली कशी वाहणार? ॥११॥

म्हणोनी देह्याविण आडतें । अवघें सांकडेंचि पडतें । देह्याकरितां घडतें । भजन कांहीं ।।१२।।

म्हणून देहावाचून उपासना अडते. तो नसेल तर अडचणी येतात. देहामुळेच उपासना घडते. ॥१२॥

देव देवता भूतें देवतें । मुळींचें सामर्थ्य आहे तेथें । अधिकारें नाना देवतें । भजत जावीं ।।१३।।

देव, देवता, भूते, दैवते इत्यादिकांत सर्व शक्तिमान ईश्वराच्या अंशाने सामर्थ्य आहे. म्हणून प्रसंग व अधिकारानुसार त्यांची उपासना करावी. ॥१३॥

नाना देवीं भजन केलें । तें मूळ पुरुषासी पावलें । याकारणें सन्मानिलें । पाहिजे सकळ कांहीं ।।१४।।

अनेक देवांची उपासना केली तरी ती त्या ईश्वरालाच पोहोचते. ह्या भावनेने ह्या सर्वांची श्रद्धेने उपासना करावी. ॥१४॥

मायावल्ली फांपावली । नाना देहेफळीं लगडली । मुळींची जाणीव कळों आली । फळामधें ।।१५।।

मायारूप वेलीच्या अफाट पसाऱ्याला लाखो देहरूप फळे लागली असून त्या सर्व फळांत शुद्ध जाणीव कळा असल्याचे लक्षात येते. ॥१५॥

म्हणोनी येळील न करावें । पाहाणें तें येथेंचि पाहावें । ताळा पडतां राहावें । समाधानें ।।१६।।

म्हणून अनेकविध उपासनांचाही कंटाळा करू नये. त्यातच ईश्वराची उपासना पाहण्यास शिकावे. तसा निश्चय झाला की समाधानात राहावे. ॥१६॥

प्राणी संसार टाकिती । देवास धुंडीत फिरती । नाना अनुमानीं पडती । जेथे तेथें ।।१७।।

सामान्य उपासक संसाराकडे दुर्लक्ष करून देवाच्या शोधात फिरत असता जागोजागी संशयातच गुरफटत जातात. (प्रत्येक ठिकाणी देवाची वेगळीच तऱ्हा दिसते.) ॥१७॥

लोकांची पाहातां रीती । लोक देवार्चनें करिती । अथवा क्षत्रदेव पाहाती । ठाईं ठाईं ।।१८।।
अथवा नाना अवतार । ऐकोनी धरिती निर्धार । परी तें अवघें सविस्तर । होऊन गेलें ।।१९।।
येक ब्रह्मविष्णुमहेश । ऐकोन म्हणतीं हे विशेष । गुणातीत जो जगदीश । तो पाहिला पाहिजे ।।२०।।

सामान्य भक्तांत अशी पद्धत आहे की ते घरातील देवांची पूजा करतात किंवा अनेक तीर्थ- क्षेत्रातील देवांची उपासना करतात. किंवा अनेक अवतारांच्या कथा ऐकून त्यांतील एकाचा 'हाच देव' असा निश्चय करतात. पण हे अवतार तर भूतकाळात गडप झालेले असतात. काही जण ब्रह्मदेव, विष्णू व महेशांची कीर्ती ऐकून 'हे देव अधिक सामर्थ्यशाली आहेत' असा निश्चय करतात. पण त्रिगुणातीत 'ब्रह्म' ह्या देवाचाच 'तो मी' असा अनुभव घ्यावा. ॥१८-२०॥

देवासी नाहीं थानमान । कोठें करावें भजन । हा विचार पाहातां अनुमान । होत जातो ।।२१।।

देव देशाने व मापाने सीमित नसल्याने त्याची उपासना कोठे करावी असा विचार करू लागले तर संशयांचीच रांग लागते. ॥२१॥

नसतां देवाचें दर्शन । कैसेन होईजे पावन । धन्य धन्य ते साधुजन । सकळ जाणती ।।२२।।

देवाचे दर्शन झाले नाही, तर मुक्ती कशी मिळणार हा विचार त्यांना भंडावून सोडतो. ह्या प्रश्नाचे यथार्थ उत्तर जाणणारे साधू धन्य होत. ॥२२॥

भूमंडळीं देव नाना । त्यांची भीड उलंघेना । मुख्य देव तो कळेना । कांही केल्यां ।।२३।।

पृथ्वीवर लक्षावधी देव आहेत. त्यांना दूर सारता आले नाही, तर मुख्य देव (ब्रह्म) काही केले तरी अनुभवाला येत नाही. ।।२३।।

कर्तुत्व वेगळें करावें । मग त्या देवासी पाहावें । तरीच कांहीयेक पडे ठावें । गौप्यगुह्य ।।२४।।

ईश्वराचे जगत् रचनारूप कर्तृत्व विचाराने दूर केल्यावर ब्रह्मरूप देवाचा अनुभव येतो. राजगुह्य जाणण्याची हीच रीत आहे. (मायेची नामे व रूपे, ईश्वरी सृष्टीतील अस्ति, भाति व प्रिय ह्यांचा विचाराने बाध केल्यावरच ब्रह्मानुभव येतो.) ।।२४।।

तें दिसेना ना भासेना । कल्पांतीं हि नासेना । सुकृतावेगळें विश्वासेना । तेथें मन ।।२५।।

ब्रह्म ज्ञानेंद्रियांनी कळत नाही, अंत:करण वृत्तीला त्याचे ज्ञान होत नाही व कल्पांतीही ते अविनाशी राहते. पूर्वसुकृत फार मोठे असल्याशिवाय त्यावर श्रद्धा बसून त्याचा दृढ निश्चय होत नाही. ।।२५।।

उदंड कल्पिते कल्पना । उदंड इछिते वासना । अभ्यांतरीं तरंग नाना । उदयातें पावती ।।२६।।

जीव असंख्य कल्पना करीत राहतो. वासनांच्या इच्छांची रांग संपत नाही व अंत:करणात कित्येक विचारतरंग उठत राहतात. ।।२६।।

म्हणोनी कल्पनारहित । तेचि वस्तु शाश्वत । अंत नाहीं म्हणोनी अनंत । बोलिजे तया ।।२७।।

म्हणून शाश्वत ब्रह्माचा अनुभव हवा असेल तर कल्पना शांत करावी. ब्रह्म अपार असल्याने त्याला अनंत म्हणतात. ।।२७।।

हें ज्ञानदृष्टीनें पाहावें । पाहोनी तेथेंचि राहावें । निजध्यासें तद्रूप व्हावें । संगत्यागें ।।२८।।

ज्ञानाच्या डोळ्याने ते अनुभवून साभास अंत:करण वृत्ती त्यातच लीन करावी. देह व जगताच्या संगाचा त्याग करून निदिध्यासनाने तेथे स्थिर व्हावे. ।।२८।।

नाना लीळा नाना लाघवें । तें काये जाणिजे बापुड्या जीवें । संतसंगें स्वानुभवें । स्थिति बाणे ।।२९।।

त्या तद्रुपतेचे अनुभव व कौतुक किती म्हणून सांगावे? ते अज्ञानी जीवाला कसे कळणार? संतसहवासात ब्रह्मानुभव आल्यावर ती आत्मस्थिती बाणते. विज्ञान होते. ।।२९।।

ऐसी सूक्ष्म स्थिती गती । कळतां चुके अधोगती । सद्‌गुरुचेनि सद्‌गती । तत्काळ होते ।।३०।।

ही सूक्ष्म स्थिती, तिने प्राप्त होणारी गतिरहित गती लक्षात येऊन अनुभवली की जन्ममरणांची अधोगती चुकते. सद्‌गुरुकृपेने तात्काळ सायुज्यमुक्ती मिळते. ।।३०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देहमान्यनिरूपणनाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'देहमान्यनिरूपण' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक एकोणिसावा : शिकवण

समास सहावा : बुद्धिवादनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

परमार्थी आणि विवेकी । त्याचें करणें माने लोकीं । कां जे विवरविवरों चुकी । पडोंचि नेदी ।।१।।

जो मोक्षार्थी वेदान्तशास्त्रातील विवेक समजावून सांगताना जराही अद्वैताची धार सोडून बाहेर जात नाही व तर्कसंगत मांडणी करतो त्याचे ते करणे जगाला मान्य होते. ॥१॥

जो जो संदेह वाटे जना । तो तो कदापी करीना । आदिअंत अनुमाना । आणून सोडी ।।२।।

लोकांच्या मनात संशय निर्माण होईल असे विवरण तो कधीच करीत नाही. उपक्रम व उपसंहाराची एकवाक्यता सर्वांना समजेल अशा पद्धतीने करून दाखवतो. ॥२॥

स्वतां निस्पृह असेना । त्याचें बोलणेंचि मानेना । कठीण आहे जनार्दना । राजी राखणें ।।३।।

विवेकाच्या जोडीला वैराग्य नसलेल्याचे बोलणे कोणीच मनावर घेत नाही. जनतेच्या हृदयातील जनार्दन संतुष्ट करणे कठीण आहे. ॥३॥

कोणी दाटून उपदेश देती । कोणी मध्यावर्ती घालिती । ते सहजचि हळु पडती । लालचीनें ।।४।।

विवेकयुक्त वैराग्य नसलेले वक्ते स्वत:ला गुरू समजून श्रोत्यांना बळजबरीने गुरुपदेश देतात. काही तर त्यासाठी हस्तकांचीही योजना करतात. हे लोभी सहजच मागे पडतात. ॥४॥

जयास सांगावा विवेक । तोचि जाणावा प्रतिकुंचक । पुढें पुढें नासक । कारबार होतो ।।५।।

त्यांनी ज्याला उपदेश दिलेला असतो तेच पुढे विरोधक बनून सर्व डाव उधळला जातो. ॥५॥

भावास भाऊ उपदेश देती । पुढें पुढें होते फजीती । वोळखीच्या लोकांत महंती । मांडूंचि नये ।।६।।

भाऊ जेव्हा भावाला उपदेश देतो तेव्हा त्यांच्या प्रापंचिक स्तरावरील संबंधांमुळे व पूर्वग्रहांमुळे पुढे फजितीच होते! म्हणून नातलग व मित्र ह्यांच्यात गुरू-शिष्य संबंध असू नयेत (निवृत्ति-ज्ञानदेव अत्यंत सन्माननीय अपवाद.) ॥६॥

पहिलें दिसे परी नासे । विवेकी मान्य करिती कैसे । अविवेकी ते जैसे तैसें । मिळती तेथें ।।७।।

असे संबंध सुरुवातीला कौतुकाचे दिसतात, पण पुढे हमखास बिघडतात. हे बिघडलेले संबंध जाणकारांना कसे रुचतील? मूर्ख मात्र जसे आहे तसे स्वीकारून बसतात. ॥७॥

भ्रतार शिष्य स्त्री गुरु । हाहि फटकाळ विचारु । नाना भ्रष्टाकारी प्रकारु । तैसाचि आहे ।।८।।

पत्नी गुरू व पती शिष्य हाही संबंध वाह्यात आहे. अनेक प्रकारच्या भ्रष्टाचारांपैकीच हा आहे. (दत्तभार्गव संवादांतील अपवाद.) ॥८॥

प्रगट विवेक बोलेना । झांकातापा करी जना । मुख्य निश्चय अनुमाना । आणूंच नेदी ।।९।।

सर्वांसाठी खुलेपणाने आध्यात्मिक विवेक न सांगता, काहींना गाठून चार थापा व छा छू करून अस्सल अद्वैतानुभवाचा अंदाजही येऊ देत नाही. ॥९॥

हुकीसरिसा भरीं भरे । विवेक सांगतां न धरे । दुरीदृष्टीचे पुरे । साधु नव्हेती ।।१०।।

लहरी व तऱ्हेवाईक वागण्यात भूषण मानतो, कोणाचे शास्त्रशुद्ध सांगणे ऐकून घेत नाही. असले साधू मोक्षाची

दूरदृष्टी ठेवणारे व परिपूर्ण नसतात. ॥१०॥

कोण्हास कांहींच न मागावें । भगवद्भजन वाढवावें । विवेकबळें जन लावावे । भजनाकडे ।। ११ ।।

कोणाकडून कोणती अपेक्षा न ठेवता उपासनामार्ग स्वच्छ करून वाढवावा व विवेकाचे बळाने लोकांना भगवद्भजनाला लावावे. ज्ञानपूर्वक उपासना करावी व करवावी. ॥११॥

परांतर रक्षायाचीं कामें । बहुत कठीण विवेकवर्मे । स्वइछेनें स्वधर्में । लोकराहाटी ।। १२ ।।

विवेकाची वर्मे सांगता सांगताच इतरांची मने सांभाळण्याचे कार्य फार कठीण आहे. लोकांना स्वधर्माचे महत्त्व पटून लोकजीवन स्वेच्छेने धर्माला धरून चालावे. ॥१२॥

आपण तुरुक गुरु केला । शिष्य चांभार मेळविला । नीच यातीनें नासला । समुदाव ।। १३ ।।

स्वत: मुसलमान गुरू करून कसाबसा चांभार शिष्य मिळवितो. अशा हलक्या प्रवृत्तींमध्ये व्यवहार घडल्यास लोकजीवन गढूळ होते. ॥१३॥

ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या । संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ।। १४ ।।

ब्राह्मणांच्या समुदायात मिसळावे, सर्व भक्तांना मान द्यावा व जगातील संतांच्या शोधात रहावे. ॥१४॥

उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मळमळीत अवघेंचि टाकावें । निस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ।। १५ ।।

ह्या जगातील उत्कृष्ट व भव्य असेल त्याचा आदर्श ठेवावा किंवा स्वीकार करावा व हलके व दर्जाहीन असेल त्याचा त्याग करावा. स्वत:च्या वैराग्यवृत्तीने जगात प्रसिद्ध व्हावे. ॥१५॥

अक्षर बरें वाचणें बरें । अर्थांतर सांगणें बरें । गाणें नाचणें अवघेंचि बरें । पाठांतर ।। १६ ।।

वळणदार अक्षर, स्पष्ट उच्चारासह अर्थाचे भान ठेवून वाचणे, कीर्तनातील गायन शास्त्रीय संगीताचे आधाराने करणे, कथा खुलवण्यापुरते नाचणे व भरपूर पाठ पाठांतर ह्या सर्व बाबी महंताजवळ असाव्यात. ॥१६॥

दीक्षा बरी मीत्री बरी । तीक्ष्ण बुधी राजकारणी बरी । आपणास राखे नानापरी । अलिप्तपणें ।। १७ ।।

महंताची दीक्षा व मैत्री फलदायी असते. राजकारणात लागणारी तीव्र बुद्धी त्याच्यापाशी असते. समाजात सर्व क्षेत्रात सहजतेने वावरणारा महंत अलिप्तपणे वागून स्वत:ला सांभाळतो. ॥१७॥

अखंड हरिकथेचा छंदु । सकळांस लागे नामवेदु । प्रगट जयाचा प्रबोधु । सूर्य जैसा ।। १८ ।।

सतत हरिकथा करण्याचा महंताला नादच असावा. सर्वांना नामस्मरणाचा वेध लागेल असे त्याने करावे. त्याचे वेदांतशास्त्राचे प्रबोधन सूर्यप्रकाशासारखे स्वच्छ असावे. ॥१८॥

दुर्जनासी राखों जाणे । सज्जनासी निवऊं जाणे । सकळांचे मनीचें जाणे । ज्याचें त्यापरीं ।। १९ ।।

दुर्जनांशी जुळवून घेऊन त्यांना बिथरू देत नाही; सज्जनांचे सर्व प्रकारे समाधान करतो. सर्वांचे मनोगत लक्षात घेऊन प्रत्येकाशी त्याप्रमाणे वागतो. ॥१९॥

संगतीचें मनुष्य पालटे । उत्तम गुण तत्काळ उठे । अखंड अभ्यासीं लगटे । समुदाव ।। २० ।।

त्याच्या संगतीने इतरांचे दुर्गुण जातात, त्यांच्यातील उत्तम गुण लवकरच व्यक्त होऊ लागतात व समाजाचा मोठा भाग सातत्याने अध्यात्माच्या अभ्यासाला लागतो. ॥२०॥

जेथें तेथें नित्य नवा । जनासी वाटे हा असावा । परंतु लालचीचा गोवा । पडोंचि नेदी ।। २१ ।।

तो जातो तेथे नव्याने आल्यासारखा उत्साह वाटून त्या लोकांना त्याने तेथेच राहावे असे वाटते. पण हा अशा मोहात अडकत नाही. ॥२१॥

उत्कट भक्ति उत्कट ज्ञान । उत्कट चातुर्य उत्कट भजन । उत्कट योग अनुष्ठान । ठाईं ठाईं ।। २२ ।।

जागोजागी उत्कट भक्ती, शास्त्रशुद्ध अद्वैतवेदान्त, परिपूर्ण चातुर्य व गंभीर योगानुष्ठान असेल असे कार्य करतो. ॥२२॥

उत्कट निस्पृहता धरिली । त्याची कीर्ति दिगांतीं फांकली । उत्कट भक्तीनें निवाली । जनमंडळी ।।२३।।

परिपूर्ण वैराग्याने सर्वत्र उदंड कीर्ती होऊन उत्कट भक्तीने सर्व माणसांचे समाधान होते. ॥२३॥

कांहीं येक उत्कटेविण । कीर्ति कदापि नव्हे जाण । उगेंच वणवण हिंडोन । काये होतें ।।२४।।

उत्कटपणाशिवाय कीर्ती कधीच मिळत नाही. केवळ वणवण हिंडून खरे कार्य कसे होईल? ॥२४॥

नाहीं देह्याचा भरंवसा । केव्हां सरेल वयसा । प्रसंग पडेल कैसा । कोण जाणे ।।२५।।

स्वत:चा देह केव्हा पडेल व आयुष्य संपेल ते सांगता येत नाही. कोणता प्रसंग केव्हा येईल ते कोण सांगणार? ॥२५॥

याकारणें सावधान असावें । जितुकें होईल तितुकें करावें । भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ।।२६।।

म्हणून सतत सतर्क राहून होईल तेवढे कार्य करावे. भगवंताच्या गुणानुवादाने जग भरावे. ॥२६॥

आपणास जें जें अनकूळ । तें तें करावें तात्काळ । होईना त्यास निवळ । विवेक उमजावा ।।२७।।

स्वत:ला जेथे अनुकूलता दिसेल ती तात्काळ कार्यासाठी वापरावी. जे कार्य घडत नाही त्याचा शांतपणे विचार करावा. ॥२७॥

विवेकामधें सांपडेना । ऐसें तो कांहींच असेना । येकांतीं विवेक अनुमाना । आणून सोडी ।।२८।।

शांतपणे विचार केल्यावर समजत नाही असे काहीच नाही, एकांतात चौफेर विचार केल्यावर तो उत्तरापर्यंत आणून सोडतो. ॥२८॥

अखंड तजवीजा चाळणा जेथें । पाहातां काय उणें तेथें । येकांतेंविण प्राणीयांतें । बुद्धि कैसी ।।२९।।

जेथे सतत विचार व त्यानुसार उपाय असतात तेथे काय कमी पडणार? एकांतात विचार केल्याशिवाय बुद्धीला योग्य विचार कसा स्फुरेल? ॥२९॥

येकांती विवेक करावा । आत्माराम वोळखावा । येथून तेथवरी गोवा । कांहींच नाहीं ।।३०।।

म्हणून एकांतात आत्मानात्मविचार करून आत्माराम स्पष्टपणे जाणावा. म्हणजे गोंधळाला कोठेच वाव मिळत नाही. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'बुद्धिवादनिरूपणनाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'बुद्धिवादनिरूपण' नावाचा सहावा समास समाप्त

दशक एकोणिसावा : शिकवण

समास सातवा : यत्ननिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

कथेचें घमंड भरून द्यावें । आणी निरुपणीं विवरावें । उणें पडोंचि नेदावें । कोणीयेकविषीं ।। १ ।।

हरिकथेचे पुरेपूर माप श्रोत्यांच्या पदरात घालावे. त्याबरोबर वेदांतशास्त्राचेही स्पष्टीकरण करून ह्या दोन्हीत काही उणीव राहू देऊ नये. ॥१॥

भेजणार खालें पडिला । तो भेजणारीं जाणितला । नेणता लोक उगाच राहिला । टकमकां पाहात ।। २ ।।

डोंबारी तारेची कसरत करताना खाली पडला तर तो का पडला हे डोंबाऱ्यालाच कळते. इतर प्रेक्षक त्याकडे उगीच डोळे विस्फारून पाहत राहतात. ॥२॥

उत्तर विलंबी पडिलें । श्रोतयांस कळों आलें । म्हणिजे महत्व उडालें । वक्तयाचें ।। ३ ।।

प्रवचन-कीर्तनात श्रोत्यांनी प्रश्न विचारला असता त्याचे तात्काळ योग्य उत्तर दिले नाही, तर ते त्यांच्या लक्षात येऊन वक्त्याची प्रतिष्ठा कमी होते. ॥३॥

थोडें बोलोनि समाधान करणें । रागेजोन तरी मन धरणें । मनुष्य वेधींच लावणें । कोणीयेक ।।४।।

वक्त्याने नेमक्या शब्दात उत्तर द्यावे. श्रोत्यांचा राग आला तरी त्यांचे मन दुखवू नये व त्यांना स्वत:कडे आकृष्ट करून घ्यावे. ॥४॥

सोसवेना चिणचिण केली । तेथें तामसवृत्ती दिसोन आली । आवघी आवडी उडाली । श्रोतयाची ।। ५ ।।

श्रोत्यांचे प्रश्न विचारणे न आवडून वक्त्याने चिडचिड केली तर त्याच्या तमोगुणाचे दर्शन होऊन श्रोत्यांना वाटणारी निरूपणाची आवड कमी होते. किंवा वक्त्याविषयी आदर कमी होतो. ॥५॥

कोण कोण राजी राखिले । कोण कोण मनी भंगिले । क्षणक्षणा परीक्षिले । पाहिजे लोक ।। ६ ।।

आपण आजपर्यंत कोणाला प्रसन्न ठेवले व किती जणांची मने मोडली ते लोकांचे निरीक्षण करून सतत पाहिले पाहिजे. ॥६॥

शिष्य विकल्पें रान घेतो । गुरु मागें मागें धांवतो । विचार पाहों जातां तो । विकल्पचि अवघा ।।७।।

शिष्याने शंकांचे रान उठवावे व गुरूने त्याची मनधरणी करण्यासाठी आर्जवे करावीत असे असेल तर सर्वत्र संशयाचे साम्राज्य आहे असे जाणावे. (शिष्यत्व, गुरुत्व व त्यामुळे परमार्थ ह्या सर्वांविषयीच संशय निर्माण व्हावा अशी परिस्थिती येते.) ॥७॥

आशाबद्धी क्रियाहीन । नाहीं च्यातुर्याचें लक्षण । ते महंतीची भणभण । बंद नाहीं ।।८।।

जो महंत आशा-अपेक्षांनी दीन, आचारभ्रष्ट व चातुर्यरहित असतो त्याच्या महंतीची सर्वांना पीडा होऊन कोणालाच काही धरबंध उरत नाही. ॥८॥

ऐसे गोसावी हळु पडती । ठाईं ठाईं कष्टी होती । तेथें संगतीचे लोक पावती । सुख कैचें ।।९।।

असे महंत हळूहळू अपयशी होऊन जागोजागी कष्टी होतात. अशा परिस्थितीत त्यांच्या शिष्यांना व कार्यकर्त्यांना

सुख कसे होईल? ॥९॥

जिकडे तिकडे कीर्ति माजे । सगट लोकांस हव्यास उपजे । लोक राजी राखोन कीजे । सकळ कांहीं ।।१०।।

ह्याउलट लोकांची मने सांभाळून सर्व कार्य केले तर महंताची सर्वत्र कीर्ती होऊन सर्वांनाच भक्ती व अध्यात्माची अनिवार गोडी लागते. ॥१०॥

परलोकीं वास करावा । समुदाव उगाच पाहावा । मागण्याचा तगादा न लवावा । कांहीं येक ।।११।।

महंताने स्वत:च्या गावाच्या क्षेत्रापासून दूर जाऊन समाजाचे त्रयस्थपणाने निरीक्षण करावे. योग्य माणसे हेरून कार्य उभारताना कोणाकडेही पैसे व सामग्री मागण्याचा तगादा लावू नये. ॥११॥

जिकडे जग तिकडे जगन्नायेक । कळला पाहिजे विवेक । रात्रीदिवस विवेकी लोक । सांभाळीत जाती ।।१२।।

'जिकडे समाज तिकडे ईश्वर' हा नियम कायमचा ठसला पाहिजे. विवेकी महंत त्याचे अखंड भान ठेवतात. ॥१२॥

जो जो लोक दृष्टीस पडिला । तो तो नष्ट ऐसा कळला । अवघेच नष्ट येकला भला । काशावरूनी ।।१३।।

समाजातील प्रत्येक माणूस वाईट आहे असे ज्याला वाटते त्याने स्वत:ही त्याच समाजाचा घटक असल्याचे लक्षात घ्यावे. मग तोच एक चांगला कशावरून? ॥१३॥

वोस मुलकीं काये पाहावें । लोकांवेगळें कोठें राहावें । तऱ्हें खोटी सांडतें घ्यावें । कांहीं येक ।।१४।।

ओसाड प्रदेशात राहून काय उपयोग? समाज सोडून कोठे राहणार? म्हणून तऱ्हेवाईकपणा करून खोटेपणा पदरात घेऊ नये. समाजाशी जुळते घेण्यासाठी प्रसंगी पडते घ्यावे. ॥१४॥

तस्मात लोकिकीं वर्ततां नये । त्यास महंती कामा नये । परत्र साधनाचा उपाये । श्रवण करून असावें ।।१५।।

म्हणून ज्याला समाजात मिसळून राहता येत नाही त्याने महंती करू नये. व्यक्तिगत मोक्षाचा विचार करून वेदांतशास्त्राचे श्रवणादी करावे. ॥१५॥

आपणासीं बरें पोहतां नये । लोक बुडवावयाचें कोण कार्य । गोडी आवडी वायां जाये । विकल्पचि अवघा ।।१६।।

ज्याला नीट पोहता येत नाही त्याने 'मी तुला पोहावयास शिकवतो' असे म्हणून इतरांना का बुडवावे? त्याप्रमाणे टाकाऊ महंताच्या नादी लागून सामान्य माणसाची परमार्थाची आवड व गोडी वाया जाते. सर्वत्र संशयाचे वातावरण तयार होते. ॥१६॥

अभ्यासें प्रगट व्हावें । नाहीं तरी झांकोन असावें । प्रगट होऊन नासावें । हें बरें नव्हे ।।१७।।

म्हणून महंताने व्यवहार व अध्यात्म ह्या दोन्हींचा पूर्ण अभ्यास करून महंतीला प्रारंभ करावा. महंतीचा मांड मांडून नंतर तो मोडणे इष्ट नाही. ॥१७॥

मंद हळु हळु चालतो । चपळ कैसा अटोपतो । अरबी फिरवणार तो । कैसा असावा ।।१८।।

सावकाश चालणारा सामान्य घोडा बाळगणाराला वेगवान व बलवान अरबी घोडा सांभाळता कसा येईल? तोही तसाच पाहिजे. ॥१८॥

हे धकाधकीचीं कामें । तीक्ष्ण बुद्धीचीं वर्मे । भोळ्या भावार्थे संभ्रमें । कैसें घडे ।।१९।।

महंतीत फार कष्ट असतात. मर्मग्राही व तीक्ष्ण बुद्धी असावी लागते. भोळसट रेम्याडोक्याची ही कामे नव्हेत. ॥१९॥

सेत केलें परी वाहेना । जवार केलें परी फिरेना । जन मेळविलें परी धरेना । अंतर्यामीं ।।२०।।

शेतीत धान्य पिकवून जर ते वाहून बाजारात नेले नाही, दागिने तयार केले पण विक्रीसाठी फिरती केली नाही व कार्यकर्ते गोळा केले पण त्यांना सांभाळले नाही, तर सर्व फुकट जाते. ॥२०॥

जरी चढती वाढती आवडी उठे । तरी परमार्थ प्रगटे । घसघस करितां विटे । सगट लोकु ।।२१।।

जर सर्वांना चढती वाढती अध्यात्माची गोडी लागली तर त्यातून मोक्षश्री प्रगटू लागते. लोकांशी घासाघीस करीत राहिले तर लोक कंटाळून जातात. ॥२१॥

आपलें लोकांस मानेना । लोकांचें आपणांस मानेना । अवघा विकल्पची मना । समाधान कैचें ।।२२।।

आपले वागणे-बोलणे लोकांना पटत नाही व लोक आपल्या मनासारखे नाहीत अशा स्थितीत संशयाचेच वातावरण तयार होते. त्यात समाधान कसे असेल? ॥२२॥

नासक दीक्षा सिंतरु लोक । तेथें कैचा असेल विवेक । जेथें बळावला अविवेक । तेथें राहणें खोटें ।।२३।।

विपरीत गुरूची परिणामशून्य दीक्षा व लबाड व बनावट शिष्य एकत्र आल्यावर तेथे विवेक कसा टिकेल? जेथे अविवेक भरपूर असतो, तेथे राहणारा मूर्ख ठरतो. ॥२३॥

बहुत दिवस श्रम केला । सेवटीं अवघाचि वेर्थ गेला । आपणास ठाकेना गल्बला । कोणें करावा ।।२४।।

महंती मांडताना फार दिवस कष्ट करून शेवटी ते वाया जातात. जे कार्य झेपत नाही तो उपद्व्याप का करावा? ॥२४॥

संगीत चालिला तरी तो व्याप । नाहीं तरी अवघाचि संताप । क्षणक्षणा विक्षेप । किती म्हणौनि सांगावा ।।२५।।

नीटनेटके कार्य चालले तर त्याला व्याप म्हणावा. अन्यथा सर्व संतापच होतो! सतत उभ्या राहणाऱ्या अडचणी किती म्हणून सांगाव्यात? ॥२५॥

मूर्ख मूर्खपणें भरंगळती । ज्ञाते ज्ञातेपणें कळ्हो करिती । होते दोहींकडे फजीती । लोकांमधें ।।२६।।

मूर्ख मूर्खच असल्यामुळे घसरतात तर विद्वान विद्वत्तेच्या अभिमानाने भांडतात. लोकांमध्ये दोघांची सारखीच फजिती होते. ॥२६॥

कारबार आटोपेना करवेना । आणि उगेंहि राहेना । याकारणें सकळ जना । काये म्हणावें ।।२७।।

आरंभलेल्या कार्यावर नियंत्रण ठेवता येत नाही व स्वस्थही बसवत नाही! अशा स्थितीत लोक नावे ठेवणार नाहीत तर काय करतील? ॥२७॥

नासक उपाधीस सोडावें । वय सार्थकीं घालावें । परिभ्रमणें कंठावें । कोठें तरी ।।२८।।

बिघडलेले कार्य ताबडतोब सोडून दूर देशी परिभ्रमण करीत आयुष्य सार्थकी लावण्यासाठी स्वत: साधना करावी. ॥२८॥

परिभ्रमण करीना । दुसऱ्याचें कांहींच सोसीना । तरी मग उदंड यातना । विकल्पाची ।।२९।।

असे परिभ्रमणही करावयाचे नाही व महंतीसाठी हवी ती तितिक्षाही नाही अशा स्थितीत संकल्प- विकल्पांची रांग छळीत रहाते. ॥२९॥

आतां हें आपणाचिपासीं । बरें विचारावें आपणासी । अनकूळ पडेल तैसी । वर्तणूक करावी ।। ३० ।।

हे सर्व आपल्याच हातात आहे. स्वत:शी पूर्ण विचार करून आपले गुणदोष हेरून स्वत:ला अनुकूल होईल असे जीवन जगावे. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'यत्ननिरूपणनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'यत्ननिरूपण' नावाचा सातवा समास समाप्त

दशक एकोणिसावा : शिकवण

समास आठवा : उपाधिलक्षणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

सृष्टिमधें बहु लोक । परिभ्रमणें कळे कौतुक । नाना प्रकारीचे विवेक । आडळों लागती ।।१।।

देशोदेशी भ्रमण केल्याने ह्या जगात किती स्वभावांचे विविध लोक आहेत ते कळते. त्यांचे विचार व चालीरीती समजू लागतात. ।।१।।

किती प्रपंची जन । अखंड वृत्ति उदासीन । सुखदु:खें समाधान । दंडळेना ।।२।।

काही लोक प्रपंचात असूनही अनासक्त वृत्तीने रहातात. सुखदु:खादी द्वंद्वांनी त्यांच्या समाधानाला धक्का लागत नाही. ।।२।।

स्वभावेंचि नेमक बोलती । सहजचि नेमक चालती । अपूर्व बोलण्याची स्थिती । सकळांसी माने ।।३।।

त्यांचे बोलणे व वागणे सहजच मर्यादशील असते, त्यांच्या बोलण्यातील नम्रता, आर्जव व सत्य सर्वांनाच आवडते. ।।३।।

सहजचि ताळज्ञान येतें । स्वभावेंचि रागज्ञान उमटतें । सहजचि कळत जातें । न्यायेनीतिलक्षण ।।४।।

काहींना कोणी न शिकवताच संगीतातील ताल व राग ह्यांची चांगली जाण असते. काहींना न्याय व नीतीचे स्वरूप आपोआपच कळते. ।।४।।

येखादा आडळे गाजी । सकळ लोक अखंड राजी । सदा सर्वदा आवडी ताजी । प्राणीमात्राची ।।५।।

कोणा पराक्रमी पुरुषावर सर्व लोक सतत खूष असतात व त्याच्यावर सतत तितकेच प्रेम करतात. ।।५।।

चुकोन उदंड आडळतें । भारी मनुष्य दृष्टीस पडतें । महंताचें लक्षणसें वाटतें । अकस्मात ।।६।।

क्वचित कोणाजवळ मोठी श्रीमंती दिसते, एखादा राजदरबारी व समाजात वजन असलेला आढळतो तर अचानक कोणी महंताची लक्षणे असणारा दिसतो. ।।६।।

ऐसा आडळतां लोक । चमत्कारें गुणग्राहिक । क्रिया बोलणें नेमक । प्रत्ययाचें ।।७।।

गुणग्राहक असणाऱ्याला अशा व्यक्ती भेटल्या की मोठे नवल वाटते. कारण त्यांचे वागणे बोलण्याप्रमाणे असल्याचा प्रत्यय येतो. ।।७।।

सकळ अवगुणामधें अवगुण । आपले अवगुण वाटती गुण । मोठें पाप करंटपण । चुकेना कीं ।।८।।

आपले दुर्गुण सद्‌गुण वाटणे (त्यांचे समर्थन करणे) हा सर्वांत मोठा दुर्गुण आहे. हे मोठेच पाप असून त्यामुळे करंटेपणा कधीच संपत नाही. ।।८।।

ढाळेंचि काम होतें सदा । जें जपल्यानें नव्हे सर्वदा । तेथें पीळपेंचाची आपदा । आडळेचिना ।।९।।

एखाद्याने कितीही काळजीपूर्वक करूनही न होणारे काम दुसरा दणक्यात करून मोकळा होतो. त्याला पेचप्रसंग व अडचणी ह्यांचा त्रास होत नाही. ।।९।।

येकासी अभ्यासितां न ये । येकासी स्वभावेंचि ये । ऐसा भगवंताचा महिमा काये । कैसा कळेना ।।१०।।

भगवंताच्या जीवसृष्टीच्या व्यवस्थापनेचे असे काय रहस्य आहे ते कळत नाही की ज्यामुळे कोणाला कितीही प्रयत्न करून न साधणारी गोष्ट दुसऱ्याला सहजपणे साध्य होते किंवा कळते. जमून जाते. ॥१०॥

मोठीं राजकारणें चुकती । राजकारणी वेढां लागती । नाना चुकीची फजीती । चहुंकडे ।।११।।

फार मोठे राजकारण जर चुकले तर राजकीय क्षेत्रच अडचणीत सापडते. (१९६२ चे चिनी आक्रमण) ह्या चुकीचे चौफेर दुष्परिणाम व फजिती होते. ॥११॥

याकारणें चुकों नये । म्हणिजे उदंड उपाये । उपायाचा अपाये । चुकतां होये ।।१२।।

म्हणून राजकारणात मोठी चूक होऊ नये. त्यासाठी सर्व प्रकारे उपाययोजना केलेली असावी. चूक झाली तर उपायाचे रूपांतर अपायात होते. ॥१२॥

काये चुकलें तें कळेना । मनुष्याचें मनचि वळेना । खवळला अभिमान गळेना । दोहिंकडे ।।१३।।

नेत्याचे काय चुकले ते त्याला कळत नाही. संबंधितांना काहीच पटत नाही. म्हणून नेता व संबंधित कार्यकर्ते ह्यांच्यात खवळलेला अहंकार जात नाही. ॥१३॥

आवघे फडचि नासती । लोकांचीं मनें भंगती । कोठें चुकते युक्ती । कांहीं कळेना ।।१४।।

उभारलेल्या संस्था किंवा व्यवस्था कोलमडून पडतात. लोकांची मने दुखावली जातात. कोठे चुकते व त्यासाठी काय करावे हे काहीच कळत नाही. ॥१४॥

व्यापेंविण आटोप केला । तो अवघा घसरतचि गेला । अकलेचा बंद नाहीं घातला । दुरीदृष्टीनें ।।१५।।

नियोजन व कार्यकर्ते ह्यांचेवाचून आरंभलेले कार्य अपयशाच्या दिशेने जात रहाते. कारण दूरदृष्टीने त्या कार्याला सूक्ष्म विचाराचे पाठबळ दिलेले नसते. ॥१५॥

येखादें मनुष्य तें सिळें । त्याचें करणेंचि बावळें । नाना विकल्पाचें जाळें । करून टाकी ।।१६।।

कोणी कालबाह्य कल्पना धरून बसला असेल तर त्याच्या सर्व कृती बावळपणाच्या ठरतात. उलट तो सर्व कार्यकर्त्यांत गोंधळ निर्माण करतो. ॥१६॥

तें आपणासी उकलेना । दुसऱ्यास कांहींच कळेना । नाचे विकल्पें कल्पना । ठाईं ठाईं ।।१७।।

तो गोंधळ निस्तरता येत नाही व इतरांचीही काही बुद्धी चालत नाही. अशा परिस्थितीत सर्वत्र संशय व मतभेद माजतात. ॥१७॥

त्या गुप्त कल्पना कोणास कळाव्या । कोणें येऊन आटोपाव्या । ज्याच्या त्यानें कराव्या । बळकट बुद्धि ।।१८।।

हे अंतर्गत (गुप्त) संशय व मतभेद इतरांना कळत नसल्याने त्यांना निस्तरता येत नाहीत. ज्याचे त्यानेच विवेकाने स्थिर केलेल्या बुद्धीने ते निश्चयपूर्वक निस्तरावेत. ॥१८॥

ज्यासी उपाधी आवरेना । तेणें उपाधी वाढवावीना । सावचित करूनियां मना । समाधानें असावें ।।१९।।

ज्याला हाती घेतलेले कार्य नियंत्रणाखाली ठेवता येत नाही त्याने ते बेताने करावे. आपल्या उत्साहाला आवरून शांत असावे. ॥१९॥

धांवधावों उपाधी वेष्टी । आपण कष्टी लोक हि कष्टी । हे कामा नये गोष्टी । कुसमुसेची ।।२०।।

अनेक कार्ये किंवा मोठे कार्य उभारून धावपळ केल्याने स्वत:बरोबरच इतरांना त्रास होतो. त्यातून निर्माण होणारी धुसफूस अधिकच त्रास देते. ॥२०॥

लोक बहुत कष्टी जाला । आपणहि अत्यंत त्रासला । वेर्थचिं केला गल्बला । कासयासी ।।२१।।

स्वत:लाही अतिशय कष्ट व लोकांनाही फार त्रास झाल्याने उगीचच धांदल होते. अशाने काय साधणार? ॥२१॥

असो उपाधीचे काम ऐसें । कांहीं बरें कांही काणोंसें । सकळ समजोन ऐसें । वर्ततां बरें ।।२२।।

मुळात कोणत्याही कार्याचे स्वरूपच असे असते की त्यात काही यश व काही अपयश असायचेच! हे सर्व लक्षात घेऊन कार्याला हात घालावा हे बरे. ॥२२॥

लोकांपासीं भावार्थ कैचा । आपण जगवावा तयांचा । सेवट उपंढर कोणाचा । पडोंचि नये ।।२३।।

सामान्य लोकांपाशी अध्यात्माची डोळस दृष्टी कशी असेल? ती महंताने दिली पाहिजे, जागी केली पाहिजे. सर्वांच्या आयुष्याच्या अखेरीस जीवनाचे वैराण व ओसाड स्वरूप होऊ देऊ नये. ॥२३॥

अंतरात्म्याकडे सकळ लागे । निर्गुणीं हें कांहींच न लगे । नाना प्रकारीचे दगे । चंचळामधें ।।२४।।

ईश्वराच्या सगुणरूपाच्या उपासनेसाठी अनेक प्रकारची सामग्री लागते. निर्गुणाच्या अनुभवासाठी बाहेरील काहीच साहित्य लागत नाही. ईश्वरी सृष्टीतच प्रारब्धामुळे अनेक प्रकारचे त्रास होतात. (पारमार्थिक सत्तेत सुख व दु:ख काही नाही. फक्त आनंद आहे.) ॥२४॥

शुद्ध विश्रांतीचें स्थळ । तें एक निर्मळ निश्चळ । तेथें विकारचि सकळ । निर्विकार होती ।।२५।।

शुद्ध व शांत ब्रह्म हे खऱ्या विश्रांतीचे एकमेव ठिकाण आहे. जीवदशेतील सर्व विकार तेथे लीन होतात. ॥२५॥

उद्वेग अवघे तुटोनि जाती । मनासी वाटे विश्रांती । ऐसी दुल्लभ परब्रह्मस्थिती । विवेकें सांभाळावी ।।२६।।

सगळे उद्वेग नाहीसे होऊन अन्त:करणवृत्ती निवृत्त होते. अशी ही लाभणारी आत्मस्थिती आत्मानात्मादी विवेकांनी सांभाळावी. ॥२६॥

आपणास उपाधी मुळींच नाहीं । रुणानुबंधें मिळाले सर्वहि । आल्यागेल्याची क्षिती नाहीं । ऐसें जालें पाहिजे ।।२७।।

आत्मरूप 'मी'ला एकही उपाधी सत्यत्वाने नाही. जीवरूप 'मी'ला सर्व गणगोत पूर्व पूर्व जन्मातील ऋणानुबंधांमुळे भेटतात. ते आले व गेले तरी काहीच सुखदु:खादी होऊ नयेत अशी अवस्था झाली पाहिजे. ॥२७॥

जो उपाधीस कंटाळला । तो निवांत होऊन बैसला । आटोपेना तो गल्बला । कासयासी ।।२८।।

जो देहरूप व जगतरूप उपाधीपासून अनासक्त होतो तो शांत होऊन बसतो. जे कार्य होत नाही त्या कार्याचा गोंधळ तो का घालील? ॥२८॥

कांहीं गल्बला कांहीं निवळ । ऐसा कंठीत जावा काळ । जेणेंकरितां विश्रांती वेळ । आपणासी फावे ।।२९।।

महंताने काही कार्य, काही निवांतपणा अशी आयुष्याची कालक्रमणा करावी, त्यामुळे स्वत:च्या साधनासाठी वेळ मिळतो. ॥२९॥

उपाधी काही राहात नाहीं । समाधानायेवढें थोर नाहीं । नरदेहे प्राप्त होत नाहीं । क्षणक्षणा ।।३०।।

कोणी एकाने केले नाही म्हणून कार्य होण्याचे थांबत नाही. मात्र मानवी शरीर सारखे सारखे मिळत नाही. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'उपाधिलक्षणनिरूपणनाम' समास आठवा

गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'उपाधिलक्षणनिरूपण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक एकोणिसावा : शिकवण

समास नववा : राजकारणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

ज्ञानी आणी उदास । समुदायाचा हव्यास । तेणें अखंड सावकाश । येकांत सेवावा ।।१।।

अध्यात्मविद्येसह ब्रह्मानुभव असलेल्या विरक्त महंताने कार्यकर्त्यांची फळी उभी करून, समाजात कार्य उभारावे व मधून मधून एकांतात निवांत जाऊन बसावे. ॥१॥

जेथें तजवीजा कळती । अखंड चाळणा निघती । प्राणीमात्राची स्थिती गती । कळों येते ।।२।।

एकांतामध्ये योजना स्फुरतात, नवे नवे उपाय सुचतात व एकूण समाजाची अवस्था व त्याच्या विचारांची दिशा लक्षात येते. समाज कोणीकडे जात आहे ते कळते. ॥२॥

जरी हा चाळणाचि करीना । तरी कांहीच उमजेना । हिसेबझाडाचि पाहीना । दिवाळखोर ।।३।।

ज्याप्रमाणे हिशेब नीट ठेवले नाहीत तर व्यापाराचे दिवाळे निघते त्याप्रमाणे सुयोग्य नियोजन नसेल तर कार्य कसे करावे ते समजेनासे होते. ॥३॥

येक मिरासी साधिती । येक सीध्या गवाविती । व्यापकपणाची स्थिती । ऐसी आहे ।।४।।

योजनाबद्ध काम करणारा नवे काम उभे करतो तर भोंगळपणामुळे उभे राहिलेले काम बिघडते. सर्वांगीण विचार करणे व न करणे ह्याने एवढा फरक पडतो. ॥४॥

जेणें जें जें मनीं धरिलें । तें तें आधींच समजलें । कृत्रिम अवघेंचि खुंटलें । सहजचि येणें ।।५।।

जे कार्य उभे करण्याचा संकल्प केला त्याचसंबंधी सुरुवातीपासूनच विचार करून ठेवला म्हणजे अंदाजपंचे (कृत्रिम) काम करण्याचा प्रसंग येत नाही. ॥५॥

अखंड राहतां सलगी होते । अतिपरिचयें अवज्ञा घडते । याकारणें विश्रांती ते । घेतां नये ।।६।।

सतत कार्याच्या व्यापात राहिले तर कार्यकर्त्यांशी फार जवळीक होऊन त्यांच्यावरील वचक कमी होतो व मग स्वत:लाच फार कामे करावी लागून विश्रांती मिळत नाही. ॥६॥

आळसें आळस केला । तरी मग कारबारचि बुडाला । अंतरहेत चुकत गेला । समुदायाचा ।।७।।

आळसामुळे कामाचा कंटाळा केला तर मग कार्यच बुडते व समाजाच्या हिताचा केलेला विचार निरर्थक होतो. ॥७॥

उदंड उपासनेचीं कामें । लावीत जावीं नित्यनेमें । अवकाश कैंचा कृत्रिमें । करावयासी ।।८।।

लोकांना व्यक्तिगत व सामूहिक उपासनेचे नित्यनेम पुष्कळ लावून द्यावेत. त्यामुळे त्यांना भलते उपद्व्याप करण्यास वेळच मिळत नाही. ॥८॥

चोर भांडारी करावा । घसरतांच सांभाळावा । गोवा मूर्खपणाचा काढावा । हळु हळु ।।९।।

संस्थेच्या भांडारघरावर चोरी करण्याची प्रवृत्ती असलेला कार्यकर्ता नेमावा! त्याने चोरी केल्याचे लक्षात येताच चोरी कळली आहे हे त्याच्या लक्षात आणून देऊन त्याला क्षमा करावी. त्याची ती खोड हळूहळू घालवावी. ॥९॥

या अवघ्या पहिल्याच गोष्टी । प्राणी कोणी नव्हता कष्टी । राजकारणें मंडळ वेष्टी । चहूंकडे ।।१०।।

कार्य करण्याच्या ह्या युक्त्या पूर्वीपासूनच्या आहेत. कोणालाही त्रास न देता महंताने राजकारणाचा व्याप सर्वत्र

वाढवावा. ॥१०॥

नष्टासी नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावे । आपणावरी विकल्पाचे गोवे । पडोंच नेदी ।।११।।

भांडखोर व्यक्तींना तोंड देण्यासाठी कार्यकर्त्यांत भांडखोर कार्यकर्ता तयार असावा. बडबड करणाऱ्यांसमोर बडबड करणारा कार्यकर्ता उभा करावा. महंताने हे सर्व स्वत: बाजूला राहून करावे. कोणालाही त्याचेकडे बोट दाखविता येऊ नये. ॥११॥

कांटीने कांटी झाडावी । झाडावी परी ते कळों नेदावी । कळकटेपणाची पदवी । असों द्यावी ।।१२।।

कांट्याने काटा सफाईने काढून ते कोणालाही कळू देऊ नये. महंत बावळट आहे असेच सर्वांना वाटावे. ॥१२॥

न कळतां करी कार्य जें तें । तें काम तत्काळचि होतें । गचगचेंत पडतां तें । चमत्कारें नव्हे ।।१३।।

गाजावाजा न करता केलेले काम फारसा विरोध न होता लवकर तडीला जाते. कामाचा घोळ घातला की त्यातील नवलाई (Surprise) जाते. ॥१३॥

ऐकोनी आवडी लागावी । देखोनी बळकटचि व्हावी । सलगीनें आपली पदवी । सेवकामधें ।।१४।।

हा कामाचा झपाटा ऐकून लोकांना महंताविषयी आदर वाटावा. ते काम प्रत्यक्ष पाहून तो आदर वाढीला लागून त्याच्या सहवासात आल्यावर लोकांमध्ये महंताच्या तोडीचे कार्यकर्ते तयार व्हावेत. ॥१४॥

कोणीयेक काम करितां होतें । न करितां तें मागें पडतें । या कारणें ढिलेपण तें । असोंचि नये ।।१५।।

कामाचा नेट लावला की कामे होतात, नाहीतर ती मागे पडतात. म्हणून कामात ढिलाई नसावी. ॥१५॥

जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला । जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ।।१६।।

जो कामासाठी दुसऱ्यांवर विसंबून रहातो त्याचे कार्य बिघडते. जो स्वत: कष्ट करतो त्याला यश येते. ॥१६॥

अवघ्यास अवघें कळलें । तेव्हां ते रितें पडिलें । याकारणें ऐसें घडलें । न पाहिजे कीं ।।१७।।

कार्याची सर्व अंगे सर्वांना कळली तर प्रत्येकजण प्रत्येक अंगात लुडबूड करून प्रत्यक्ष काम होत नाही. म्हणून कामे वाटून तेवढीच करून घ्यावीत. सर्वांना सर्व कार्याचा अंदाज येऊ नये. ॥१७॥

मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकांकरवीं करवावें । कित्तेक खलक उगवावे । राजकारणामधें ।।१८।।

राजकारणाचे मुख्य सूत्र स्वत:च्या हातात ठेवावे. प्रत्यक्ष काम दुसऱ्याकडून करून घ्यावे. काम करताना दुष्टप्रवृत्तीचे अनेक लोक हाताशी धरावेत. (खलक म्हणजे खलबते करणारे असा अर्थ पुढील ओव्या लक्षात घेऊन केला नाही) ॥१८॥

बोलके पहिलवान कळकटे । तयासीच घ्यावे झटे । दुर्जनें राजकारण दाटे । ऐसें न करावें ।।१९।।

समाजातील बोलभांड, दांडगे व नीच ह्यांच्याशी झुंज घ्यावी. त्यांच्यामुळे राजकारण आडू नये. ॥१९॥

ग्रामण्य वर्मीं सांपडावें । रगडून पीठचि करावें । करूनि मागुती सांवरावें । बुडऊं नये ।।२०।।

गावगुंडांची व्यक्तिगत वर्मे हेरून त्यांना नेस्तनाबूत करावे. नंतर त्यांना सांभाळून घ्यावे. नष्ट करू नये. केव्हातरी कामाला येतील. ॥२०॥

खळदुर्जनासी भ्यालें । राजकारण नाहीं राखिलें । तेणें अवघें प्रगट जालें । बरें वाईट ।।२१।।

दुष्ट व दुर्जनांना घाबरून कार्यच केले नाही, तर समाजातील बऱ्यावाईट प्रवृत्ती उघड्यावर पडतील. ॥२१॥

समुदाव पाहिजे मोठा । तरी तनावा असाव्या बळकटा । मठ करुनी ताठा । धरूं नये ।।२२।।

जर मोठी संघटना उभारावयाची असेल तर लोकांना सर्व बाजूंनी नियमात बंदिस्त ठेवावे व त्यांचेवर चौफेर लक्ष

ठेवावे. 'मी एक मठपती' असा अहंकार धरून एके ठिकाणी बसू नये. ॥२२॥

दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे । सज्जनापरीस आळवावे । महत्व देउनी ।।२३।।

समाजातील दुर्जनांविषयी माहिती असावी पण त्यांचेविषयी इतरांजवळ बोलू नये. त्यांनाही सज्जनाएवढेच महत्त्व देऊन त्यांची कार्यासाठी मनधरणी करावी. ॥२३॥

जनामधें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटखट । याकारणें ते वाट । बुझूनि टाकावी ।।२४।।

त्यांच्या दुर्जनत्वासंबंधी सतत बोलत राहिले तर त्याच चर्चेला ऊत येतो म्हणून तिचे मूळच छाटून टाकावे. ॥२४॥

गनीमाच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुर्फुरिती भुजा । ऐसा पाहिजे कीं राजा । कैपक्षी परमार्थी ।।२५।।

जे अस्सल लढवय्ये असतात त्यांना शत्रूचे सैन्य दिसताच युद्धाचे स्फुरण चढते. त्यांच्या राजाला परमार्थक्षेत्राचा अभिमान असावा. ॥२५॥

तयास देखतां दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचे तडाखे । बंडपाषांडाचे वाखे । सहजचि होती ।।२६।।

पुढे फौज व मागे ईश्वरीकृपा असलेला राजा पाहिला की दुष्टांना जरब बसते. राजाने दुर्जनांना जबर शासन देऊन सामर्थ्याचा अनुभव दिला की राजकीय बंडे व नास्तिकतेचे विचार मोडून पडतात. ॥२६॥

हे धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें । ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ।।२७।।

ही सर्व कामे मोठ्या मुत्सद्देगिरीने करावी लागतात. राजकारणही चाणक्यनीतीनुसार (नेमे) करावे. जराही ढिलाई असू नये. ॥२७॥

कोठेंच पडेना दृष्टीं । ठाईं ठाईं त्याच्या गोष्टी । वाग्विळासें सकळ सृष्टी । वेधिली तेणें ।।२८।।

महंत कोणतीच गोष्ट स्वत: करताना दिसत नाही. पण सर्व राज्यात लोक त्याचा मोठेपणा गात राहतात, त्याच्या चातुर्यपूर्ण, शास्त्रशुद्ध व वेधक वक्तृत्वाने त्याने सर्वांना आकृष्ट करून घेतलेले असते. ॥२८॥

हुंब्यासी हुंबा लाऊन द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा । लौंदास पुढें उभा करावा । दुसरा लौंद ।।२९।।

अडाण्याला अडाणी, मूर्खाला मूर्ख व धर्मलंडाला धर्मलंड भिडवून द्यावा. ॥२९॥

धटासी आणावा धट । उत्धटासी पाहिजे उत्धट । खटनटासी खटनट । अगत्य करी ।।३०।।

धटिंगणाला धटिंगण, उद्धटाला उद्धट व खोडसाळाला खोडसाळ जोडून द्यावा. ॥३०॥

जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मज्यालसी थाटे । इतुकें होतें परी धनी कोठें । दृष्टीस न पडे ।।३१।।

जशाला तसा भेटला की राजकारणाला रंगत येते! एवढे सर्व होऊनही सूत्रधार कोणालाच दिसत नाही. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'राजकारणनिरूपणनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'राजकारणनिरूपण' नावाचा नववा समास समाप्त

दशक एकोणिसावा : शिकवण

समास दहावा : विवेकलक्षणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ॥

जेथें अखंड नाना चाळणा । जेथें अखंड नाना धारणा । जेथें अखंड राजकारणा । मनासी आणिती ।।१।।

जेथे चतुरस्त्र महंत काम करतो तेथे त्याने तयार केलेल्या समुदायात अनेक विषयांचा सतत विचार चालतो. अनेक बाबी चिंतनात असतात व राजकारणाची खलबते चालतात. ॥१॥

सृष्टीमधें उत्तम गुण । तितुकें चाले निरूपण । निरूपणाविण क्षण । रिकामा नाहीं ।।२।।

ह्या सृष्टीत सर्वात गुणैश्वर्यसंपन्न असलेल्या सगुण साकार ईश्वराचे गुणानुवाद सतत चालतात. ॥२॥

चर्चा आशंका प्रत्योत्तरें । कोण खोटें कोण खरें । नाना वगत्रुत्वें शास्त्राधारें । नाना चर्चा ।।३।।

कर्म, उपासना व ज्ञान किंवा भक्ती, ज्ञान व वैराग्य ह्यासंबंधी चर्चा, शंका व त्यांचे समाधान केले जाते. अनेक शास्त्रे व पाठ प्रवचनांच्या माध्यमातून वेदमान्य व वेदबाह्यासंबंधी चर्चा होतात. ॥३॥

भक्तिमार्ग विशद कळे । उपासनामार्ग आकळे । ज्ञानविचार निवळे । अंतर्यामीं ।।४।।

भगवंताशी ऐक्य साधणाऱ्या भक्तिमार्गाचे स्पष्ट स्वरूप सांगितले जाते. सगुण व निर्गुण उपासनेची रहस्ये उलगडली जातात. आत्मज्ञानाविषयी विचार स्थिर होण्यासाठी वेदान्तशास्त्राचे श्रवणादी होतात. ॥४॥

वैराग्याची बहु आवडी । उदास वृत्तीची गोडी । उदंड उपाधी तरी सोडी । लागोंच नेदी ।।५।।

वैराग्य व नि:संगता ह्यांची महंताला फार आवड असते. कितीही मोठी कामे उभी केली असली तरी ती क्षणात सोडण्याची तयारी असते. ॥५॥

प्रबंदाचीं पाठांतरे । उत्तरासी संगीत उत्तरें । नेमक बोलतां अंतरें । निववी सकळांची ।।६।।

गीता, उपनिषदादिकांचे पाठांतर, विचारलेल्या प्रश्नांना सप्रमाण व तर्कशुद्ध उत्तरे देऊन तो अनेकांचे समाधान करतो. ॥६॥

आवडी लागली बहु जना । तेथें कोणाचें कांही चालेना । दळवट पडिला अनुमाना । येईल कैसा ।।७।।

फार मोठ्या लोकसमुदायाचा तो आवडता असतो. कोणाला ते रुचत नसले तरी त्यांचे काहीच चालत नाही. त्याच्या स्वरूपाचा अंदाजही येत नाही. बहिरंग तो येऊ देत नाही. ॥७॥

उपासना करुनियां पुढें । पुरवलें पाहिजे चहुंकडे । भूमंडळीं जिकडे तिकडे । जाणती तया ।।८।।

उपासनेच्या माध्यमातून तो सर्वांशी संपर्क साधण्यासाठी सर्वत्र भ्रमण करतो. म्हणून त्याच्या दूरवर ओळखी असतात. ॥८॥

जाणती परी आडळेना । काये करितो तें कळेना । नाना देसीचे लोक नाना । येऊन जाती ।।९।।

लोक त्याला ओळखतात पण तो सतत लोकांच्या पुढे पुढे दिसत नाही. तो केव्हा, काय व कसे करतो ते कळत नाही. त्याच्या भेटीसाठी दूरदूरचे लोक येत-जात असतात. ॥९॥

तितुक्यांची अंतरें धरावीं । विवेकें विचारें भरावीं । कडोविकडीचीं विवरावीं । अंत:कर्णे ।।१०।।

त्या भेटीला येणाऱ्या सर्वांना आपलेसे करावे. त्यांना विवेकपूर्वक विचार करण्यास शिकवावे. त्यांच्या मनातील तर्ककुतर्क काढून टाकावेत. ॥१०॥

किती लोक तें कळेना । किती समुदाव आकळेना । सकळ लोक श्रवणमनना । मध्यें घाली ।।११।।

त्याला मानणारे लोक व गट ह्यांची संख्या किती त्याचा इतरांना अंदाज येत नाही. पण त्या सर्वांना तो अध्यात्माच्या श्रवणमननाकडे वळवतो. ॥११॥

फड समजाविसी करणें । गद्यपद्य सांगणें । परांतरासी राखणें । सर्वकाळ ।।१२।।

असंतुष्ट गटाची समजूत घालणे, गद्य-पद्यात्मक शास्त्रसंहिता लिहिण्यास सांगणे व सर्वांची सर्वदा मने सांभाळणे. ॥१२॥

ऐसा ज्याचा दंडक । अखंड पाहाणें विवेक । सावधापुढें अविवेक । येईल कैचा ।।१३।।

हेच ज्याचे जीवन आहे तो सतत विवेकसंपन्न असतो. ह्याविषयी जागरूक असलेल्याच्या मनाला अविवेक स्पर्श तरी कसा करील? ॥१३॥

जितुकें कांहीं आपणासी ठावें । तितुकें हळुहळु सिकवावें । शाहाणें करूनि सोडावे । बहुत जन ।।१४।।

जे जे स्वत:ला ठाऊक असते ते ते हळूहळू इतरांना शिकवून त्या सर्वांना जाणते करावे. ॥१४॥

परोपरीं सिकवणें । आडणुका सांगत जाणें । निवळ करुनी सोडणें । निस्पृहासी ।।१५।।

विरक्तांना हेरून त्यांना सर्वतोपरी विद्या शिकवावी. त्यांच्या अडचणींचे निवारण करावे व त्यांना नि:शंक करून मार्गी लावावे. ॥१५॥

होईल तें आपण करावें । न होतां जनाकरवीं करवावें । भगवद्भजन राहावें । हा धर्म नव्हे ।।१६।।

जे शक्य आहे ते स्वत: करावे. जे अधिक असेल ते दुसऱ्यांकडून करून घ्यावे. पण कोणत्याही परिस्थितीत उपासनामार्ग खंडित करण्याचा अधर्म होऊ नये. ॥१६॥

आपण करावें करवावें । आपण विवरावें विवरवावें । आपण धरावें धरवावें । भजनमार्गासी ।।१७।।

आपण राजकारण करावे व करून घ्यावे. आपण अध्यात्मशास्त्राचा अभ्यास करावा व करून घ्यावा. आपण उपासना करावी व करावयास लावावी. ॥१७॥

जुन्या लोकांचा कंटाळा आला । तरी नूतन प्रांत पाहिजे धरिला । जितुकें होईल तितुक्याला । आळस करूं नये ।।१८।।

जुन्या समुदायात मन रमेनासे झाले तर नव्या समुदायात जाऊन काम उभारावे. पण जेवढे होईल तेवढे काम करीत रहावे. ॥१८॥

देह्याचा अभ्यास बुडाला । म्हणिजे महंत बुडाला । लागवेगें नूतन लोकांला । शाहाणे करावें ।।१९।।

महंताने जर वरीलप्रमाणे अभ्यास केला नाही, तर त्याची महंती नष्ट होते. त्याने एकापाठोपाठ एक याप्रमाणे नव्या समुदायाला शहाणे करावे. ॥१९॥

उपाधींत सांपडो नये । उपाधीस कंटाळों नये । निसुगपण कामा नये । कोणीयेकविषीं ।।२०।।

त्याने कार्यात आसक्त होऊन राहू नये व कामाचा कंटाळाही करू नये. कोठल्याही प्रकारे आळस असता कामा नये. ॥२०॥

काम नासणार नासतें । आपण वेडें उगें च पाहातें । आळसी हृदयसुन्य तें । काये करूं जाणे ।।२१।।

जे काम होण्यासारखे नसते ते होतच नाही. आसक्त माणूस त्या अपयशातच अडकून पडतो. जो आळशी व

मनापासून काम करीत नाही त्याला काय बरे जमेल? ॥२१॥

धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला । नाना बुद्धि शक्ताला । म्हणोनी सिकवाव्या ।।२२।।

ही सर्व दगदगीची कामे दुर्बलाला कशी करता येतील? म्हणून बुद्धी व शरीराचे सामर्थ्य असणाऱ्याला सर्वस्व ओतून सर्व ज्ञान व युक्त्या सांगाव्यात. ॥२२॥

व्याप होईल तों राहावें । व्याप राहातां उठोन जावें । आनंदरूप फिरावें । कोठें तऱ्ही ।।२३।।

जोपर्यंत कामाचा उरक पडतो आहे तोपर्यंत काम करीत राहावे. नाहीतर ते सोडून देऊन आनंदाने मोकळे फिरावे. ॥२३॥

उपाधीपासुनी सुटला । तो निस्पृहपणें बळावला । जिकडे अनकूळ तिकडे चालिला । सावकास ।।२४।।

जो उभारलेल्या कार्यापासून दूर जातो त्याची नि:स्पृहता वाढते व तो जिकडे अनुकूलता असेल तिकडे शांतपणे जातो. ॥२४॥

कीर्ति पाहातां सुख नाहीं । सुख पाहातां कीर्ति नाहीं । केल्याविण कांहींच नाहीं । कोठें तऱ्ही ।।२५।।

कीर्ती हवी असेल तर देहाला जोंबाळून गोंजारून ती मिळत नाही. देहाला सुखात ठेवायचे असेल तर कीर्ती मिळत नाही. (कष्टावाचून नावलौकिक नाही.) कष्टाने कार्य केल्याशिवाय कोणालाही व कोठेही काहीच मिळत नाही. ॥२५॥

येरवीं काय राहातें । होणार तितुकें होऊन जातें । प्राणी मात्र अशक्त तें । पुढें आहे ।।२६।।

जे व्हावयाचे ते कोणावाचून आडत नाही. ते होऊनच जाते. दुर्बळाची लक्षणे पुढे आहेत. ॥२६॥

आधींच तकवा सोडिला । मधेंचि धीवसा सांडिला । तरी संसार हा सेवटाला । कैसा पावे ।।२७।।

काम उभे राहण्याआधीच धीर सोडणे, काम चालू असतानाच हातपाय गाळणे अशी लक्षणे असतील हे जीवन कसे शेवटाला जाईल? ॥२७॥

संसार मुळींच नासका । विवेकें करावा नेटका । नेटका करितां फिका । होत जातो ।।२८।।

संसार मुळातच मायिक आहे. व्यावहारिक सत्तेतील हा संसार न्यायनीती व कष्टासह केला तर त्याची आसक्ती हळूहळू कमी होत जाते. ॥२८॥

ऐसा याचा जिनसाना । पाहातां कळों येतें मना । परंतु धीर सांडावाना । कोणीयेकें ।।२९।।

संसाराचे स्वरूप हे असे आहे. ते विचाराने पाहिले तर नीट कळते. पण प्रत्येकाने धैर्य न सोडता तो पार करावा. मुक्त व्हावे. ॥२९॥

धीर सांडितां काये होतें । अवघें सोसावें लागतें । नाना बुद्धि नाना मतें । शाहाणा जाणे ।।३०।।

धैर्य सोडून काय करणार? ज्याचे त्याला सर्व सोसावेच लागते. जो बुद्धिमान असतो त्यालाच अनेक विचार व मते समजतात. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'विवेकलक्षणनिरूपणनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'विवेकलक्षणनिरूपण' नावाचा दहावा समास समाप्त
–दशक एकोणिसावा समाप्त–

दशक विसावा : पूर्णनामदशक

समास पहिला : पूर्णापूर्णनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

प्राणी व्यापक मन व्यापक । पृथ्वी आप तेज व्यापक । वायो आकाश त्रिगुण व्यापक । अंतरात्मा मूळमाया ।।१।।

प्राणी, मन, पृथ्वी, पाणी, तेज, वायू, आकाश, त्रिगुण, अंतरात्मा व मूळमाया ह्या सर्वांनाच व्यापक म्हणतात. ॥१॥

निर्गुण ब्रह्म तें व्यापक । ऐसें अवघेंच व्यापक । तरी हें सगट किं काये येक । भेद आहे ।।२।।

निर्गुण ब्रह्मालाही व्यापक म्हणतात. तरी ह्या सर्वांचे व्यापकत्व सारखेच आहे की त्यात काही फरक आहे? (प्राण्यांच्या संदर्भात व्यापक म्हणजे व्याप करणारा तर मनाच्या बाबतीत व्यापक म्हणजे चपळ असा अर्थ समर्थ करतात. पुढे मात्र व्यापक म्हणजे व्यापून राहणारा असा नेहमीचा अर्थ घेतात.) ॥२॥

आत्मा आणि निरंजन । येणेंहि वाटतो अनुमान । आत्मा सगुण किं निर्गुण । आणि निरंजन ।।३।।

आत्मा नुसताच निर्दोष आहे की तो सगुण, निर्गुण व निर्दोषही आहे अशी शंका येते. (आत्म्याच्या संदर्भात हे शब्द सतत वापरले जातात. त्यांचा नेमका अर्थ व ह्या तिन्हींचा परस्परसंबंध लक्षात येत नाही.) ॥३॥

श्रोता संदेहीं पडिला । तेणें संदेह वाढला । अनुमान धरून बैसला । कोण तो कैसा ।।४।।

श्रोत्याला शंका आल्याने शंकाच वाढत जातात. तो श्रोता निरंजन आत्मा, सगुण आत्मा व निर्गुण आत्मा ह्यांचेविषयी शंका धरून बसला. ॥४॥

ऐका पहिली आशंका । अवघा गल्बला करूं नका । प्रगट करून विवेका । प्रत्यये पाहावा ।।५ ।

वक्ता म्हणतो की असा गोंधळ करू नका. शास्त्रशुद्ध विचाराने ह्या सर्व संकल्पनांचा निर्णय करावा. आता पहिल्या शंकेचे उत्तर ऐका. ॥५॥

शरीरपाडें सामर्थ्यपाडें । प्राणी व्याप करी निवाडें । परी पाहातां मनायेवढें । चपळ नाहीं ।।६।।

प्राण्याच्या शरीराच्या आकाराच्या मानाने सर्वसाधारणपणे त्याचे सामर्थ्य असते. त्यानुसार तो तो प्राणी आपापले व्यवहार निवडतो व करतो. पण स्थूल शरीर सूक्ष्म मनाएवढे हालचालीच्या दृष्टीने व्यापक असणे शक्य नाही. (जे सूक्ष्म ते व्यापक व गतिशील असा नियम आहे) ॥६॥

चपळपण येकदेसी । पूर्ण व्यापकता नव्हे त्यासी । पाहातां पृथ्वीच्या व्यापासी । सीमा आहे ।।७।।

हालचाल किंवा चपळपणा ह्यांना नेहमीच काही मर्यादा किंवा सीमा आहे. (जे माहीत आहे त्याविषयीच मन कल्पना करू शकते.) त्यामुळे ते निरपेक्ष किंवा पूर्ण व्यापक नसते. (दृश्यसृष्टी व त्यावर आधारलेले संकल्प-विकल्प ह्यांच्या मनाला मर्यादा पडतात) त्याचप्रमाणे अनंत विश्वाच्या मानाने पृथ्वीची व्यापकता मर्यादित आहे. ॥७॥

तैसेंचि आप आणि तेज । अपूर्ण दिसती सहज । वायो चपळ समज । येकदेसी ।।८।।

हाच विचार पाणी, तेज व वायू ह्यांना लागू पडतो. ते सर्व मर्यादित व्यापक आहेत हे लक्षात घे. ॥८॥

गगन आणि निरंजन । तें पूर्ण व्यापक सधन । कोणीयेक अनुमान । तेथें असेचिना ।।९।।

आकाश व निरंजन ब्रह्म ही दोन तत्त्वे घनदाटपणे सर्वत्र व्यापून आहेत ह्यात मुळीच शंका नाही. ॥९॥

त्रिगुण गुणक्षोभिणी माया । माईक जाईल विलया । अपूर्ण येकदेसी तया । पूर्ण व्यापकता न घडे ।।१०।।

गुणसाम्यावस्थेतील माया व गुणक्षोभिणी माया ह्या दोन्ही मायिक असून त्यांना अंत आहे. त्यांचा व्याप दृश्यसापेक्ष मर्यादित असून त्या निरपेक्ष व्यापक नाहीत. (गुणसाम्यावस्थेत त्रिगुण सुप्त असतात. गुणक्षोभिणी मायेत गुण प्रगट होऊ लागतात.) ॥१०॥

आत्मा आणि निरंजन । हें दोहिकडे नामाभिधान । अर्थान्वये समजोन । बोलणें करावें ।।११।।

जीवात्म्याला व ब्रह्मालाही प्रसंगी आत्मा म्हणतात. तेव्हा चालू विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन त्याचा तो तो अर्थ करावा. (जीवात्म्याला सगुण बुद्धीची उपाधी असल्याने तो सगुण. ब्रह्म निरुपाधिक असल्याने ते निरंजन किंवा त्रिगुणांच्या मलाचा स्पर्श नसलेले निर्दोष निर्गुण.) ॥११॥

आत्मा मन अत्यंत चपळ । तरी हें व्यापक नव्हेचि केवळ । सुचित अंत:कर्ण निवळ । करून पाहावें ।।१२।।

केव्हा केव्हा मनालाच आत्मा म्हणतात. ते कितीही चपळ असले तरी निरपेक्ष व्यापक नसते. हे एकाग्र व शांत मनाने समजावून घ्यावे. ॥१२॥

अंतराळीं पाहातां पाताळीं नाहीं । पाताळीं पाहातां अंतराळीं नाहीं । पूर्णपणें वसत नाहीं । चहुंकडे ।।१३।।

पुढें पाहातां मागें नाहीं । मागें पाहातां पुढें नाहीं । वाम सव्य व्याप नाहीं । दशदिशा ।।१४।।

मन जेव्हा अंतराळात भराऱ्या मारते तेव्हा ते पाताळाचा विचार करू शकत नाही व उलट पाताळात बुडी घेऊन राहिले तर अंतराळाचा वेध घेत नाही. ते चहूकडे व्यापून राहत नाही. मन मागे असेल तर पुढे नाही, पुढे असेल तर मागे नाही, डावीकडे असेल तर उजवीकडे नाही इ. प्रकारे ते दशदिशात व्यापून राहत नाही. ॥१३-१४॥

चहुंकडे निशाणें मांडावीं । येकसरीं कैसीं सिवावीं । याकारणें समजोन उगवी । प्रत्ययें आपणासी ।।१५।।

चारी दिशांना लावलेल्या निशाणांना एकाला एकाच वेळी हात लावता येत नाही त्याप्रमाणे मर्यादित तत्त्वांना अमर्याद व्यापकता येत नाही. ह्या विचाराने सापेक्ष व्यापकता समजावून घ्यावी. ॥१५॥

सूर्य आला प्रतिबिंबला । हाहि दृष्टांत न घडे वस्तुला । वस्तुरूप निर्गुणाला । म्हणिजेत आहे ।।१६।।

'आत्मरूप सूर्याचे बुद्धिरूप पाण्यात प्रतिबिंब पडून जीव तयार झाला' हा दृष्टांत निर्गुण ब्रह्माला लागू पडत नाही. सूर्याला रूप आहे. ब्रह्म अरूप आहे. तथाकथित बिंबाचे प्रतिबिंब कसे पडेल? ॥१६॥

घटाकाश मठाकाश । हाहि दृष्टांत विशेष । तुळूं जातां निर्गुणास । साम्यता येते ।।१७।।

मठातील आकाश हे ब्रह्म व त्यात ठेवलेल्या घटातील आकाश म्हणजे जीव हा दृष्टांत निर्गुण ब्रह्माला जुळणारा आहे. (मठ म्हणजे घर. त्या घरात आकाश व्यापून असते. त्या व्यापक आकाशात घट म्हणजे मडके ठेवले तर त्याही घटात तेच आकाश व्यापून असते.) ॥१७॥

ब्रह्मींचा अंश आकाश । आणी आत्म्याचा अंश मानस । दोहींचा अनुभव प्रत्ययास । येथें घ्यावा ।।१८।।

ब्रह्म आकाशाप्रमाणे व्यापक असून तेच ब्रह्मांडरूप मठ व जीवरूप घट यात व्यापून असते. (ब्रह्मांडात व्यापून राहणारे ब्रह्म = ईश्वर किंवा शिवात्मा. देहात व्यापून राहिलेले ब्रह्म = जीवात्मा. येथे समर्थ आकाशाला ब्रह्माचा व मनाला आत्म्याचा 'अंश' म्हणतात. अचेतन वस्तू चेतनाचा अंश असू शकत नाही म्हणून येथे अंश म्हणजे दृष्टांत

असा अर्थ घ्यावा लागतो. तरच ह्या ओवीची मागील ओवीशी संगती लावता येते) ॥१८॥

गगन आणि हें मन । कैसे होती समान । मननसीळ महाजन । सकळहि जाणती ।।१९।।

गगन व मन हे दोन्ही दृष्टांत असले तरी त्यात सारखेपणा कसा असेल? मनन करण्याची क्षमता असणाऱ्या महापुरुषांना ह्यातील वर्म उमजते. (मन वायुतत्त्वाचे व म्हणून आकाशातून निर्माण होते) ॥१९॥

मन हें पुढें वावडे । मागें आवघेंचि रितें पडे । पूर्ण गगनास साम्यता घडे । कोण्या प्रकारें ।।२०।।

मन जेव्हा एका विषयाचे मनन करते तेव्हा त्या विषयाच्या आकाराचे होऊन इतरत्र मुळीच नसते. आकाश मात्र सदा सर्वत्र समत्वाने व्यापून असते. त्यामुळे दोन्हींची तुलना कशी होईल? ॥२०॥

परब्रह्महि अचळ । आणि पर्वतासहि म्हणती अचळ । दोनीही येक केवळ । हें कैसें म्हणावें ।।२१।।

परब्रह्म अचल आहे (गीता) व डोंगरही अचल आहे (अरुणाचल). दोघांचे अचलत्व सारखेच म्हणता येईल काय? (परब्रह्म व्यापक असल्याने कोठून कोठे हालवता येत नाही. डोंगर प्रचंड व वजनदार असल्याने हालवता येत नाही.) ॥२१॥

ज्ञान अज्ञान विपरीतज्ञान । तिनी कैसीं होती समान । याचा प्रत्ययो मनन । करून पाहावा ।।२२।।

ज्ञान, अज्ञान व विपरीत ज्ञान ही तिन्ही सारखी कशी असतील? विचाराने त्यांची लक्षणे निश्चित करावीत. ॥२२॥

ज्ञान म्हणिजे जाणणें । अज्ञान म्हणिजे नेणणें । विपरीत ज्ञान म्हणिजे देखणें । येकाचें येक ।।२३।।

ज्ञान म्हणजे कळणे. अज्ञान म्हणजे न कळणे. विपरीत ज्ञान म्हणजे वस्तू जशी आहे तशी न कळता भलत्याच रूपाने कळणे होय. (माळजमीन कळणे– ज्ञान, माळ जमीन न कळणे– अज्ञान, माळ जमीन न दिसता मृगजळ दिसणे– विपरीत ज्ञान.) ॥२३॥

जाणणें नेणणें वेगळें केलें । ढोबळें पंचभूतिक उरलें । विपरीत ज्ञान समजलें । पाहिजे जीवीं ।।२४।।

ब्रह्माचे ज्ञान व ब्रह्माचे अज्ञान ही दोन्ही वेगळी केल्यावर मध्येच स्थूल पाचभौतिक सृष्टीचे विपरीत ज्ञान होते हे श्रोत्यांनी लक्षात घ्यावे. ॥२४॥

द्रष्टा साक्षी अंतरात्मा । जीवात्माचि होये शिवात्मा । पुढें शिवात्मा तोचि जीवात्मा । जन्म घेतो ।।२५।।

जीवात्माच उपाधिभेदाने द्रष्टा, साक्षी, अंतरात्मा व शिवात्मा असतो. 'मी ब्रह्म' असे अपरिवर्तनीय प्रत्यक्ष ज्ञान झाले तर तो मुक्त होतो. अन्यथा तत्त्वत: शिवरूप असूनही त्याला जन्माला यावे लागते. ॥२५॥

आत्मत्वीं जन्ममरण लागे । आत्मत्वीं जन्ममरण न भंगे । संभवामि युगे युगे । ऐसे हें वचन ।।२६।।

'मी ब्रह्म' ह्या जाणीवरूप महाकारण शरीरात जीवात्मा असताना त्याला मरण आले तरी जन्ममरणांचे चक्र चुकत नाही. ते पाठी लागतेच. प्रत्यक्ष ईश्वरही ह्याच गटातील असल्याने तोही युगायुगात पुन्हा जन्म घेतो असे गीतावचन आहे. (जीवाचा पुनर्जन्म = कर्मविग्रह. वासनेमुळे जन्माला यावेच लागते. ईश्वराचा पुनर्जन्म = लीला विग्रह. स्वेच्छेने जन्म घेता येतो.) ॥२६॥

जीव येकदेसी नर । विचारें जाला विश्वंभर । विश्वंभरास संसार । चुकेना कीं ।।२७।।

'मी देह' असे परिच्छिन्नत्व (अल्पत्व) धरून बसलेला जीव विचाराने ईश्वराप्रमाणे विश्वाएवढा व्यापक झाला तरी त्याला जन्ममरण चुकत नाही. ॥२७॥

ज्ञान आणि अज्ञान । वृत्तिरूपें हें समान । निवृत्तिरूपें विज्ञान । जालें पाहिजे ।।२८।।

'मला ब्रह्म कळत नाही' ही अज्ञानवृत्ती व 'मी ब्रह्म आहे' ही ज्ञानवृत्ती आहे. दोन्ही वृत्तिज्ञानरूपाने सारख्याच आहेत. 'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसासह' ह्या श्रुतीनुसार वृत्ती आत्मदर्शनाने निवृत्त झाल्यावर त्या आत्मानुभवाला सहजता आली पाहिजे. ज्ञानाचे विज्ञान झाले पाहिजे. ॥२८॥

ज्ञानें येवढें ब्रह्मांड केलें । ज्ञानें येवढें वाढविलें । नाना विकाराचे वळलें । तें हें ज्ञान ।।२९।।

ज्ञानरूप ब्रह्मात कोणत्याच जाणिवेचा विशेष नसतो. भेसळ नसते. त्या ज्ञानरूपाला मायेच्या उपाधीने 'मी ज्ञानी' असा विशेष उत्पन्न होतो. त्या सविशेष ज्ञानरूप ब्रह्माने एवढे ब्रह्मांड उत्पन्न करून वाढविले आहे. त्यातच जीव व उत्पत्त्यादी अनेक विकार समाविष्ट झाले. ।।२९।।

आठवें देह ब्रह्मांडीचें । तें हें ज्ञान साचें । विज्ञानरूप विदेहाचें । पद पाविजे ।।३०।।

ब्रह्मांडाचा आठवा देह म्हणजे मूळमाया. ती म्हणजेच वर सांगितलेली ज्ञानशक्ती, 'मी ब्रह्म आहे' ह्या ज्ञानशक्तीनेच ज्ञानाचे विज्ञान होते. त्यातील विचाररूप शक्तीचा भाग गळून पडतो. देह असून विदेही अवस्था प्राप्त होते. ।।३०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'पूर्णापूर्णनिरूपणनाम' समास पहिला
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'पूर्णापूर्णनिरूपण' नावाचा पहिला समास समाप्त

दशक विसावा : पूर्णनामदशक

समास दुसरा : सृष्टित्रिविधलक्षण

॥ श्रीराम समर्थ ॥

मूळमाया नस्तां चंचळ । निर्गुण ब्रह्म तें निश्चळ । जैसें गगन अंतराळ । चहुंकडे ।।१।।

निरभ्र किंवा वायुरहित आकाश जसे मोकळे असते त्याप्रमाणे क्रियाशील मूळमाया नसली तर ब्रह्म केवळ निर्गुण व शांत असते. ।।१।।

दृश्य आलें आणि गेलें । परी तें ब्रह्म संचलें । जैसें गगन कोंदाटलें । चहुंकडे ।।२।।

निरभ्र आकाश जसे सर्वत्र व्यापून असते त्याप्रमाणे दृश्य दिसू लागले व गेले तरी परब्रह्म सर्वत्र घनदाट व्यापून असते. ।।२।।

जिकडे पाहावें तिकडे अपार । कोणेकडे नाहीं पार । येकजिनसी स्वतंत्र । दुसरें नाहीं ।।३।।

जिकडे पाहू जावे तिकडे ते अपरंपार अखंड भरून असून त्याला शेवट नाही. ते पूर्ण स्वतंत्र असून स्वत:च्या स्वातंत्र्यात ते मायेला प्रवृत्त करते व आवरून घेते. ।।३।।

ब्रह्मांडावरतें बैसावें । अवकाश भकास अवलोकावें । तेथें चंचळ व्यापकाच्या नांवें । सुन्याकार ।।४।।

विचाराने अनंत विश्वाच्या पलीकडे जाऊन तेथून रिकाम्या पोकळीकडे पाहिले तर चंचळ व व्यापक मूळमाया मुळीच दिसत नाही. (अशी कल्पना करावी की जेथे मृगजळ दिसते त्या जागेवर झोपून आपण मृगजळ पाहत आहोत! तेथून मृगजळ मुळीच दिसणार नाही.) ।।४।।

दृश्य विवेकें काढिलें । मग परब्रह्म कोंदाटलें । कोणासीच अनुमानलें । नाहीं कदा ।।५।।

दृश्य सृष्टीचा विचाराने बाध केला असता सर्वत्र केवळ ब्रह्म उरते. त्याविषयी कोणालाही कसलाच अंदाज बांधता येत नाही. कारण ते वर्णनातीत आहे. ।।५।।

अधोर्ध पाहातां चहुंकडे । निर्गुण ब्रह्म जिकडे तिकडे । मन धांवेल कोणेकडे । अंत पाहावया ।।६।।

तथाकथित वर, खाली व काही दिशांना तेच ब्रह्म अपरंपार भरलेले असते. अंत:करणवृत्तीच्या क्षुद्र मर्यादेत ती धावून धावून कोठपर्यंत जाईल? त्याचा अंतपार तिला कसा लागेल? ।।६।।

दृश्य चळे ब्रह्म चळेना । दृश्य कळे ब्रह्म कळेना । दृश्य आकळे ब्रह्म आकळेना । कल्पनेसी ।।७।।

दृश्य सृष्टीला उत्पत्ती, स्थिती व लय असतात. ब्रह्म अज, विकारशून्य व अमृत आहे. अंत:करणवृत्तीला दृश्यसृष्टीचे प्रमाणांनी (इंद्रिये) ज्ञान होते. ब्रह्माचे होत नाही. कल्पनेने म्हणजे विचाराने दृश्य वस्तूचे तर्कजन्य ज्ञान, स्मृतिज्ञान इ. प्रकारे ज्ञान होते. ब्रह्माचे होत नाही. ।।७।।

कल्पना म्हणिजे कांहींच नाहीं । ब्रह्म दाटलें ठाईंचा ठाईं । वाक्यार्थ विवरत जाइ । म्हणिजे बरें ।।८।।

कल्पनेला स्वत:चे रूप नसल्याने तिने मांडलेल्या पसाऱ्यालाही वास्तविक अस्तित्व नसते. ब्रह्म मात्र सत्, व्यापक व अखंड आहे. 'सर्व खल्विद ब्रह्म' इ. वेदान्त वाक्यांचे मनन चिंतन केल्याने तसा अनुभव येतो. ।।८।।

परब्रह्मायेवढें थोर नाहीं । श्रवणापरतें साधन नाहीं । कळल्याविण कांहींच नाहीं । समाधान ।।९।।

परब्रह्मासारखे श्रेष्ठ प्राप्तव्य नाही. (परम अर्थ) त्याच्या अनुभवासाठी यथार्थ श्रवणासारखे दुसरे साधन नाही.

वेदांतशास्त्र गुरुमुखातून कळल्याशिवाय खरे समाधान कधीच होत नाही. ॥९॥

पिप्लीकामार्गे हळु हळु घडे । विहंगमें फळासी गांठी पडे । साधक मननीं पवाडे । म्हणिजे बरें ।।१०।।

कर्म उपासनादी मार्ग मुंगीच्या चालीने मोक्षापर्यंत नेतात. ज्ञानमार्गाने पक्षाच्या उड्डाणाप्रमाणे एकदम ब्रह्मानुभव येतो (फळाची गाठ पडते) पण साधकावस्थेतील साधकाने (दशक ५ समास ९) तसे मनन केले पाहिजे. ॥१०॥

परब्रह्मासारिखें दुसरें । काहींच नाहीं खरें । निंदा आणी स्तुतिउत्तरें । परब्रह्मीं नाहीं ।।११।।

परब्रह्मासारखे सत्य, नित्य, अनादि, आद्य दुसरे काहीच नाही. त्यामुळे त्या अद्वैतात निंदा व स्तुतीसारखी द्वंद्वे (दु:ख व सुख) नाहीत. ॥११॥

ऐसें परब्रह्म येकजिनसी । कांहींच तुळेना तयासी । मानुभव पुण्यरासी । तेथें पवाडती ।।१२।।

परब्रह्म असे अखंड सच्चिदानंदघन असून त्यासारखे दुसरे काही नाही. शुद्ध पुण्याची जोड असलेले महात्मे त्याच्या 'ते मी' अशा अनुभवात स्थिर रहातात. ॥१२॥

चंचळें होते दु:खप्राप्ती । निश्चळायेवडी नाहीं विश्रांती । निश्चळ प्रत्ययें पाहाती । माहानुभाव ।।१३।।

दृश्य सृष्टीतील जीवनात दु:खे असतात. ब्रह्मानुभवासारखी विश्रांती कशानेच मिळत नाही. (त्यात दु:खाचे कष्ट नसतात) महात्मे त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतात. ॥१३॥

मुळापासून सेवटवरी । विचारणा केलीच करी । प्रत्ययाचा निश्चयो अंतरीं । तयासीच फावे ।।१४।।

ब्रह्माच्या 'एकोऽहं बहुस्याम' ह्या मूळ संकल्पापासून ते अचेतन पाषाणापर्यंत झालेल्या सृष्टिनिर्मितीचा जो सतत विचार करतो तो पुढील विस्ताराचा निरास करून ज्याला स्फुरण झाले त्याच्या अनुसंधानात राहतो व त्यालाच ती ब्रह्मरूप विश्रांती मिळते. ॥१४॥

कल्पनेची सृष्टी जाली । त्रिविध प्रकारें भासली । तिक्षण बुद्धीनें आणिली । पाहिजे मना ।।१५।।

त्या संकल्परूप कल्पनेचीच सृष्टी तयार झाली असून ती तीन प्रकारांनी भासते (पुढील ओवी पहा.) अत्यंत सूक्ष्म बुद्धीने हे वर्गीकरण लक्षात घ्यावे. ॥१५॥

मूळमायेपासून त्रिगुण । अवघें येकदेसी लक्षण । पांचा भूतांचा ढोबळा गुण । दिसत आहे ।।१६।।
पृथ्वीपासून च्यारी खाणी । चत्वार वेगळाली करणी । सकळ सृष्टीची चाली येथुनी । पुढें नाहीं ।।१७।।

१) मूळमायेपासून त्रिगुणापर्यंत पहिला वर्ग– हा देशाने, कालाने व वस्तूने परिच्छिन्न असतो. (मर्यादित जागेत व कालात असतो. जेथे एक असतो तेथे दुसरा नसतो.) २) पंचीकृत पंचमहाभूते– ही स्थूल असतात. ३) जारज, उद्भिजादी चार प्रकारच्या जीवांच्या योनी ह्या पृथ्वीपासून उत्पन्न होऊन त्यांचे सर्व व्यवहार तसे तसे चालतात. हा सृष्टिरचनेचा शेवट होय. ॥१६-१७॥

सृष्टीचे विविध लक्षण । विशद करूं निरूपण ।श्रोतीं सुचित अंत:कर्ण । केलें पाहिजे ।।१८।।

आता ह्या तीन प्रकारच्या सृष्टीचे अधिक स्पष्टीकरण करू. श्रोत्यांनी मन एकाग्र करून ते ऐकावे. ॥१८॥

मूळमाया जाणीवेची । मुळीं सूक्ष्म कल्पनेची । जैसी स्थिती परे वाचेची । तद्रूपचि ते ।।१९।।

'अहं' ह्या जाणिवेची मूळमाया घडलेली आहे. ती जाणीव म्हणजेच मूळमाया. त्या अहं ह्या जाणिवेचे मूळ अतिसूक्ष्म कल्पना हे आहे. माणसातील परावाणी ही जशी केवळ स्फुरण रूप आहे तशीच अहं ही जाणीव केवळ स्फुरणरूप आहे. (परावाणीत अक्षरे, शब्दार्थ इ. काही नसतात. त्याप्रमाणे 'अहं' स्फुरणात सृष्टिरचनेला रूप नसते) ॥१९॥

अष्टधा प्रकृतीचें मूळ । ते हे मूळमायाच केवळ । सूक्ष्मरूप बीज सकळ । मुळींच आहे ।।२०।।

पंचभूते व त्रिगुण ह्या आठ प्रकारच्या सृष्टीचे मूळमाया हे मूळ आहे. पुढे स्पष्ट होणाऱ्या दृश्य सृष्टीचे बीज संपूर्णपणे मूळमायेत आहे. ॥२०॥

जड पदार्थ चेतवितें तें । म्हणौन चैतन्य बोलिजेतें । सूक्ष्म रूपें संकेतें । समजोन घ्यावीं ।।२१।।

मानवी शरीरासारख्या स्वभावाने अचेतन असणाऱ्यात जे जाणीवरूप चैतन्य निर्माण करते त्याला चेतन म्हणतात. त्या चैतन्याच्या वेगवेगळ्या नावाच्या सूक्ष्म अभिव्यक्ती संकेताने समजावून घ्याव्यात त्या अशा– ।।२१।।

प्रकृतिपुरुषाचा विचार । अर्धनारीनटेश्वर । अष्टधा प्रकृतीचा विचार । सकळ कांहीं ।।२२।।

प्रकृति व पुरुष ह्यांत प्रकृति अचेतन व तिचा प्रकाशक पुरुष चेतन आहे. अर्धनारीनटेश्वरात नारी शक्तिरूप अचेतन असून नटेश्वर चेतन आहे. अष्टधा प्रकृती अचेतन असून ब्रह्म चेतन आहे. ।।२२।।

गुप्त त्रिगुणाचें गूढत्व । म्हणौन संकेत महत्तत्त्व । गुप्तरूपें शुद्धसत्व । तेथेंचि वसे ।।२३।।

त्रिगुणांना रूप नाही. (गुप्त) त्यांचा प्रभाव व कार्य हे मोठे गूढ असून ते ज्यात असतात त्या तत्त्वाला महत् असे म्हणतात. (महत् = मोठे, व्यापक, विस्तृत, शक्तिमान, उच्च. सांख्यांच्या पंचवीस तत्त्वांतील दुसरे,) ज्याच्या साह्याने ईश्वर अवतार घेतो ते शुद्ध सत्त्व त्या महत्‌मध्येच असते. ।।२३।।

जेथून गुण प्रगटती । तीस गुणक्षोभिणी म्हणती । त्रिगुणाचीं रूपें समजती । धन्य ते साधु ।।२४।।

गुणसाम्यावस्थेतून जेव्हा गुण प्रकट होऊ लागतात तेव्हा त्या अवस्थेला गुणक्षोभिणी म्हणतात. त्रिगुणांचे स्वरूप व त्यांच्या अभिव्यक्तीची लक्षणे जाणणारे साधू धन्य होत. ('गुणा गुणेषु वर्तन्ते' हे गीता वाक्य त्यांच्या जीवननौकेचे सुकाणू बनते) ।।२४।।

गुप्तरूपें गुणसौम्य । म्हणौनि बोलिजे गुणसाम्य । सूक्ष्म संकेत अगम्य । बहुतांस कैंचा ।।२५।।

गुण प्रगट नसतात तेव्हा ते समस्वरूपात असतात. (विभागणी सारखी असते.) म्हणून त्या अवस्थेला गुणसाम्यावस्था म्हणतात. हा बारकावा फार सूक्ष्म असल्याने सर्वांना त्याचे यथार्थ आकलन होत नाही. ।।२५।।

मूळमायेपासून त्रिगुण । चंचळ येकदेसी लक्षण । प्रत्ययें पाहातां खूण । अंतरीं येते ।।२६।।

त्रिगुण मूळमायेतूनच व्यक्त होतात. मूळमाया एकदेशी व विकारी असल्याने तेही तसेच आहेत. थोड्या विचाराने व निरीक्षणाने हे लक्षात येते. (ब्र. सू. शां. भा. २-९ माणसाचे त्रिगुण प्रसंगी कमी-अधिक प्रभावी होतात) ।।२६।।

पुढें पंचभूतांचीं बंडें । वाढलीं विशाळें उदंडें । सप्तद्वीपें नवखंडे । वसुंधरा हे ।।२७।।

नंतर पंचमहाभूतांचे पंचीकरण होऊन त्यांचा पसारा अतोनात वाढला. सात बेटे व नऊ खंडांची पृथ्वी त्यापासूनच झाली. (बेटे– जंबु, प्लक्ष, शाल्मली, कुश, क्रौंच, शाक व पुष्कर अशी सप्तद्वीपे. खंड– इंद्र, कशेरु, ताम्र, गभस्ती, नाग, वारुण, सौम्य, ब्रह्म व भरत हे नऊ खंड. आणखीही दोन प्रकारे ही संख्या सांगतात.) ।।२७।।

त्रिगुणापासून पृथ्वीवरी । दुसऱ्या जिनसाऱ्याची परी । दोनी जिनस याउपरी । तिसरा ऐका ।।२८।।

सोळाव्या व सतराव्या ओवीतील दोन प्रकार सांगून झाले. आता तिसरा प्रकार ऐका. (चार योनी) ।।२८।।

पृथ्वी नाना जिनसाचें बीज । अंडज जारज श्वेतज उद्भिज । च्यारी खाणी च्यारी वाणी सहज । निर्माण जाल्या ।।२९।।

पृथ्वीतून अनेक पदार्थ निर्माण होतात. अंडज, जारज, स्वेदज व उद्भिज अशा चार योनी व परादी वाणी झाल्या. ।।२९।।

खाणी वाणी होती जाती । परन्तु तैसीच आहे जगती । ऐसे होती आणी जाती । उदंड प्राणी ।।३०।।

चार खाणी, चार वाणी व प्राणी जन्माला येतात व नष्ट होतात. पण पृथ्वी आहे तशीच असते. ।।३०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सृष्टित्रिविधलक्षणनिरूपणनाम' समास दुसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सृष्टित्रिविधलक्षणनिरूपण' नावाचा दुसरा समास समाप्त

दशक विसावा : पूर्णनामदशक

समास तिसरा : सूक्ष्मनामाभिधान

॥ श्रीराम समर्थ ॥

मुळींहून सेवटवरी । विस्तार बोलिला नानापरी । पुन्हा विवरत विरत माघारी । वृत्ति न्यावी ।।१।।

मूळमायेपासून अंडजादी चार योनीपर्यंत सृष्टीचा विस्तार विस्ताराने सांगितला. आता आत्मानुभवासाठी उलट्या क्रमाने अंत:करण वृत्ती मागेमागे न्यावी. तिने उलट्या क्रमाने तत्त्वांचा वेध घेत (विवरत) शेवटी ब्रह्मस्वरूपात लीन व्हावे (विरत) ॥१॥

च्यारी वाणी च्यारी खाणी । चौऱ्यासि लक्ष जीवयोनी । नाना प्रकारीचे प्राणी । जन्मास येती ।।२।।

चौऱ्यांशी लक्ष जीवयोनीत चार खाणींचे अनंत प्राणी त्यांच्या चार वाणींसह जन्माला येतात. ॥२॥

अवघे होती पृथ्वीपासुनी । पृथ्वीमधें जाती नासोनी । अनेक येती जाती परी अवनी । तैसीच आहे ।।३।।

हे सर्व पृथ्वीपासून जन्माला येऊन मरणोत्तर पृथ्वीमध्येच विरून जातात. ते आले व गेले तरी पृथ्वी आहे तशी आहे. ॥३॥

ऐसें हें सेंड्याकडील खांड । दुसरें भूतांचे बंड । तिसरें नामाभिधानें उदंड । सूक्ष्मरूपें ।।४।।

१) पृथ्वी व प्राणी हा संसार वृक्षाचा शेंड्याचा भाग आहे.

२) व्यक्त पंचभूतांचा अतोनात विस्तार ह्या फांद्या, हा दुसरा भाग.

३) मूळमायेपासून त्रिगुणापर्यंत अनेक नावे असलेल्या सूक्ष्म तत्त्वांचा तिसरा व प्रारंभीचा भाग आहे ॥४॥

स्थूळ अवघें सांडून द्यावें । सूक्ष्मरूपें वोळखावें । गुणापासून पाहिलेच पाहावें । सूक्ष्मदृष्टीं ।।५।।

स्थूल पदार्थ विचाराने बाजूला सारावेत. सूक्ष्माच्या सर्व अभिव्यक्ती जाणून घ्याव्यात. तमोगुणप्रधान मायेपासून झालेली पंचमहाभूते व त्यांचे शब्दादी गुण, आकाशादिकांच्या सत्त्वगुणापासून झालेली श्रोत्रादी ज्ञानेंद्रिये व रजोगुणापासून झालेली वाणी इ. कर्मेंद्रिये अपंचीकृत पंचभूतांच्या सत्त्वगुणापासून झालेली बुद्धी इ. गुणांचा पसारा सतत सूक्ष्मदृष्टीने चिंतनात ठेवावा. ॥५॥

गुणाची रूपें जाणीव नेणीव । पाहिलाच पाहावा अभिप्राव । सूक्ष्मदृष्टीचें लाघव । येथून पुढें ।।६।।

ज्ञान व अज्ञान ह्या गुणांच्या अभिव्यक्ती आहेत. त्या संबंधीचे शास्त्र सतत अभ्यासावे. सूक्ष्म दृष्टीचे खरे कौशल्य येथून पुढेच आहे. ॥६॥

शुद्ध नेणीव तमोगुण । शुद्ध जाणीव सत्त्वगुण । जाणीवनेणीव रजोगुण । मिश्रित चालिला ।।७।।

१) तमोगुण = पूर्ण अज्ञान. २) सत्वगुण = पूर्ण ज्ञान. ३) रजोगुण = ज्ञान व अज्ञान ह्यांचे मिश्रण ॥७॥

त्रिगुणांची रूपें ऐसीं । कळों लागलीं अपैसीं । गुणापुढील कर्दमासी । गुणक्षोभिणी बोलिजे ।।८।।

अशा ह्या त्रिगुणांच्या अभिव्यक्ती सहज कळतात. गुणांच्या प्रत्यक्ष अभिव्यक्ती आधीच्या (पुढील) अवस्थेला गुणक्षोभिणी म्हणतात. त्यात तिन्ही गुण कालविलेले असतात. (गुणसाम्य– गुणक्षोभिणी– त्रिगुण.) ॥८॥

रज तम आणि सत्व । तिहींचें जेथें गूढत्व । तें जाणिजे महत्तत्त्व । कर्दमरूप ।।९।।

महत् ह्या सूक्ष्म तत्त्वात सत्त्व, रज व तम ह्या तिन्ही अव्यक्त गुणांचे मिश्रण गूढरूपाने राहते. ॥९॥

प्रकृति पुरुष शिवशक्ति । अर्धनारीनटेश्वर म्हणती । परी याची स्वरूपस्थिती । कर्दमरूप ।।१०।।

त्याच महत्‌ला प्रकृति-पुरुष, अर्धनारीनटेश्वर, शिव-शक्ती अशीही नावे आहेत. पण मिश्रण हेच त्यांचे स्वरूप आहे.

सूक्ष्मरूपें गुणसौम्य । त्यास बोलिजे गुणसाम्य । तैसेंचि चैतन्य अगम्य । सूक्ष्मरूपी ।।११।।

अव्यक्त गुण शांत (सौम्य) असतात. त्यांनाच गुणसाम्य असेही म्हणतात. मायेतील ब्रह्माचा चिदाभास त्यामध्येही सूक्ष्मत्वाने असतो. तो जाणणे फार कठीण आहे. (आभासवादाप्रमाणे ब्रह्माचे मायेत प्रतिबिंब असते. ते मायेच्या सर्व स्तरात सहजच असते.) ॥११॥

बहुजिनसी मूळमाया । माहांकारण ब्रह्मांडीची काया । ऐसिया सूक्ष्म अन्वया । पाहिलेंचि पाहावें ।।१२।।

मूळमायेच्या पोटात कित्येक तत्त्वे दडलेली आहेत. त्या मूळमायेला ईश्वराचे महाकारण शरीर म्हणतात. (ब्रह्मांड किंवा विराट हे ईश्वराचे स्थूल शरीर आहे.) विराटापासून मागे जात मूळमाया, तिच्यातील ब्रह्माचा आभास व ब्रह्म असा सूक्ष्म अनुक्रम वरचेवर विचारात असावा. ॥१२॥

च्यारी खाणी पांच भूतें । चौदा सूक्ष्म संकेतें । काये पाहाणें तें येथें । शोधून पाहावें ।।१३।।

चार खाणी, पंचमहाभूते व मूळमायेच्या चौदा अभिव्यक्ती ह्या दोन समासातच शोधून त्यांचा अभ्यास करावा. (मागील समासातील तेविसाव्या ओवीत शुद्ध सत्त्व आहे. एकविसाव्यात चैतन्य आहे. अंतरात्म्याचा उल्लेख जागोजागी आहे.) ॥१३॥

आहाच पाहातां कळेना । गरज केल्यां समजेना । नाना प्रकारीं जनाच्या मना । संदेह पडती ।।१४।।

उथळ विचाराने ह्यातील काहीच कळत नाही. गरजेपुरता विचार करूनही भागत नाही. अशा वरवरच्या अभ्यासामुळे लोकांच्या मनात अनेक प्रकारचे संशय घर करतात. ॥१४॥

चौदा पांच येकोणीस । येकोणीस च्यारी तेविस । यांमधें मूळ चतुर्दश । पाहिलेंचि पाहावें ।।१५।।

मूळमायेच्या चौदा अभिव्यक्ती, पंचमहाभूते अशी एकोणीस व त्यामध्ये चार खाणी मिळविल्या की एकूण तेवीस तत्त्वे होतात. द. ७ स. ३ मध्ये दिलेल्या चौदा ब्रह्मांचा विचार करून ती मायिक आहेत असा निश्चय करावा. ॥१५॥

जो विवरोन समजला । तेथें संदेह नाहीं उरला । समजल्याविण जो गल्बला । तो निरार्थक ।।१६।।

प्रत्येक तत्त्व स्पष्टपणे जाणून घेणाऱ्याला संशय उरत नाहीत. समजल्यावाचून केलेले प्रयत्न गोंधळ निर्माण करतात व ते टाकाऊ असतात. ॥१६॥

सकळ सृष्टीचें बीज । मूळमायेंत असे सहज । अवघें समजतां सज्ज । परमार्थ होतो ।।१७।।

सर्व स्थूल सूक्ष्म सृष्टी मूळमायेतून व्यक्त होते. कारण ती सृष्टी त्या मूळमायेतच लीन होऊन राहिलेली असते. मूळमायेपर्यंत निरास करीत करीत तिच्या अधिष्ठानाशी जीवाचे ऐक्य साधले असता मोक्ष (परमार्थ) मिळतो. ॥१७॥

समजलें माणुस चावळेना । निश्चइ अनुमान धरीना । सावळगोंदा करीना । परमार्थ कदा ।।१८।।

हे सर्व ज्याला स्पष्टपणे कळते तो त्याच्या झालेल्या त्या निश्चयामुळे निष्फळ कल्पना करीत बसत नाही. साधनमार्ग व अध्यात्मशास्त्र ह्यांत गोंधळ घालत नाही. ॥१८॥

शब्दातीत बोलतां आलें । त्यास वाच्यांश बोलिलें । शुद्ध लक्ष्यांश लक्षिलें । पाहिजे विवेकें ।।१९।।

मनवाचातीत ब्रह्मासंबंधी शब्दांनी जे सांगतात त्याला वाच्यांश म्हणतात. ब्रह्माच्या 'मी ब्रह्म' अशा शुद्ध लक्षांशाच्या अनुभवासाठी नित्य-अनित्यादी विवेकानेच त्याचे अनुसंधान करावे लागते. ॥१९॥

पूर्वपक्ष म्हणिजे माया । सिद्धांतें जाये विलया । माया नस्तां मग तया । काये म्हणावें ।।२०।।

मायेसंबंधीचे सर्व बोलणे पूर्वपक्षाचे (अध्यारोप) असून ब्रह्मस्वरूपाच्या सिद्धांतपक्षाने (अपवाद) ते बोलणे निरर्थक ठरते. माया मावळून गेल्यावर जे काही तथाकथित उरते त्यासंबंधी कसे, काय व कोणी बोलावे? ॥२०॥

अन्वये आणी वीतरेक । हा पूर्वपक्षाचा विवेक । सिद्धांत म्हणिजे शुद्ध येक । दुसरें नाहीं ।।२१।।

'जेथे जग असते तेथे ब्रह्म असते' असा जगात ब्रह्माचा अन्वय व 'जेथे ब्रह्म असते तेथे जग नसते' असा ब्रह्मात जगताचा व्यतिरेक इ. खटाटोप पूर्वपक्षाचा आहे. शुद्ध एकमेव भेदशून्य ब्रह्मात हे काहीच नाही. ॥२१॥

अधोमुखें भेद वाढतो । ऊर्धमुखें भेद तुटतो । नि:संगपणें निर्गुणी तो । माहांयोगी ।।२२।।

अध्यस्ताच्या विचारात अंत:करण वृत्ती पांगली (अधोमुख) की सर्वत्र भेदच भेद दिसतो. उलट ती अधिष्ठानाच्या अनुसंधानात राहिली (ऊर्ध्वमुख) की भेद मावळून अभेदाचा अनुभव येतो. असा अनासक्त व असंग साधक निर्गुणानुभवाने महायोगी होतो. ॥२२॥

माया मिथ्या ऐसी कळली । तरी मग भीड कां लागली । मायेचे भिडेनें घसरली । स्वरूपस्थिती ।।२३।।

माया सतासतविलक्षण अनिर्वचनीय (मिथ्या) आहे असे लक्षात आल्यावर ती सत्य का मानावी? तिचे अनुसंधान का सोडू नये? ह्या विपरीत अनुसंधानामुळेच आत्मस्थिती सुटून बद्धता आली. ॥२३॥

लटके मायेनें दपटावें । सत्य परब्रह्म सांडावें । मुख्य निश्चयें हिंडावें । कासयासी ।।२४।।

मिथ्या मायेने दामटून नादी लावावे व त्यामुळे सत्य ब्रह्माचे अनुसंधान का सुटावे? मायेला ती सत्य व मुख्य मानून वणवण का करावी? ॥२४॥

पृथ्वीमधें बहुत जन । त्यामध्यें असती सज्जन । परी साधूस वोळखतो कोण । साधुवेगळा ।।२५।।

पृथ्वीवर अब्जावधी लोक रहातात. त्यातच संतसज्जनही असतात. पण दुसऱ्या सज्जनाशिवाय त्यांना कोण जाणतो? ॥२५॥

म्हणौन संसार सांडावा । मग साधूचा शोध घ्यावा । फिरफिरों ठाइं पाडावा । साधुजन ।।२६।।

म्हणून मुमुक्षू व साधकाने संसार गौण समजून संतांचा शोध घेण्यासाठी जागोजागी धांडोळा घ्यावा व शरण जावे. ॥२६॥

उदंड हुडकावे संत । सांपडे प्रचितीचा महंत । प्रचितीविण स्वहित । होणार नाही ।।२७।।

अनेक संतांचा शोध घेतल्यावर आत्मानुभवी महंताची गाठ पडते. अशा सद्‌गुरुरूप महंताशिवाय शाश्वत हित होणार नाही. ॥२७॥

प्रपंच अथवा परमार्थ । प्रचितीविण अवघें वेर्थ । प्रत्ययेज्ञानी तो समर्थ । सकळांमध्यें ।।२८।।

व्यवहार असो की परमार्थ त्यात अनुभवाशिवाय कशाचाच उपयोग होत नाही. स्वानुभवसंपन्न असतो तोच सर्वांत श्रेष्ठ असतो. ॥२८॥

रात्रंदिवस पाहावा अर्थ । अर्थ पाहेल तो समर्थ । परलोकींचा निजस्वार्थ । तेथेंचि घडे ।।२९।।

साधकाने वेळात वेळ काढून अध्यात्मशास्त्राचा अभ्यास करावा. त्यालाच मोक्षसिद्धीचे सामर्थ्य लाभते. 'मोक्षलोक' हा खरा स्वार्थ त्यानेच साधतो. ॥२९॥

म्हणौन पाहिलेंचि पाहावें । आणि शोधिलेंचि शोधावें । अवघें कळतां स्वभावें । संदेह तुटती ।।३०।।

म्हणून वाचलेले पुन्हा वाचावे. वाचलेल्याचा पुन्हा पुन्हा विचार करून त्याचे सार शोधावे. शास्त्र व साधना ह्यांची सर्व व्याप्ती कळली की संदेहरहित अवस्था लाभते. ('भिद्यते हृदयग्रन्थि: छिद्यन्ते सर्व संशया:' मुंडक २-८) ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सूक्ष्मनामाभिधाननाम' समास तिसरा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सूक्ष्मनामाभिधान' नावाचा तिसरा समास समाप्त

दशक विसावा : पूर्णनामदशक

समास चवथा : आत्मानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

सकळ जनास प्रार्थना । उगेंच उदास करावेंना । निरूपण आणावें मना । प्रत्ययाचें ।।१।।

माझी सर्वांना अशी विनंती आहे की अभ्यासाचा उगीच कंटाळा न करत अनुभवपूर्वक केलेले निरूपण मनापासून अभ्यासावे. ॥१॥

प्रत्यये राहिला येकेकडे । आपण धांवतो भलतेकडे । तरी सारासाराचे निवाडे । कैसे होती ।।२।।

अनुभवाचे स्वरूप एकीकडे व अभ्यासाची दिशा भलतीकडे असे झाले तर सार व असार ह्यांचा नेमका निवाडा कसा होईल? ॥२॥

उगिच पाहातां सृष्टी । गल्बला दिसतो दृष्टीं । परी ते राजसत्तेची गोष्टी । वेगळीच ।।३।।

जगाकडे वरवर पाहिले तर सर्वत्र विस्कळितपणा दिसतो. पण त्यामागे घटना व कायद्याची सत्ता काम करीत असते. ती विस्कळीत नसते. त्याप्रमाणे ह्या सृष्टीत कितीही उलथापालथ झाली तरी त्यामागे ईश्वरी सत्ता अढळपणे उभी असते. ॥३॥

पृथ्वीमधें जितुकीं शरीरें । तितुकी भगवंताचीं घरें । नाना सुखें येणें द्वारें । प्राप्त होती ।।४।।

पृथ्वीच्या पाठीवर जेवढे देह आहेत ती सर्व ईश्वराची घरे आहेत. त्या देहातील जीवांना देहाच्या माध्यमातून सर्व सुखे मिळतात. (झोप सुख देते. विषय सुख उत्पन्न करतात. आत्मा सुखरूप आहे.) ॥४॥

त्याचा महिमा कळेल कोणाला । माता वांटून कृपाळु जाला । प्रत्यक्ष जगदीश जगाला । रक्षितसे ।।५।।

त्या ईश्वराचे माहात्म्य कळणे फार कठीण आहे. त्याने सर्व जीवांवर कृपा करून त्यांना आई दिली व त्यांच्या पालनपोषणाची सोय केली. त्या आईप्रमाणे ईश्वर जगाला सांभाळतो. ॥५॥

सत्ता पृथ्वीमध्यें वांटली । जेथें तेथें विभागली । कळेनें सृष्टि चालिली । भगवंताचे ।।६।।

राजसत्ता ही सर्व पृथ्वीवर कित्येक रूपांनी काम करते व तिचे कित्येक विभाग आहेत (राष्ट्रपती इ. रूपे. राष्ट्र इ. विभाग.) त्या सत्ता ईश्वराच्या सत्तेवर चालतात. (सत्ताधीशांनी ईश्वरी आज्ञा पाळल्या नाहीत तर राज्याचा नाश होतो. जनांचे हाल होतात. व्यक्तीच्याही हृदयात ईश्वर राहतो. तिने ईश्वरी आज्ञा मानल्या नाहीत, तर तिचाही नाश होतो.) ॥६॥

मूळ जाणत्या पुरुषाची सत्ता । शरीरीं विभागली तत्त्वता । सकळ कळा चातुर्यता । तेथें वसे ।।७।।

मूळचा जाणता पुरुष म्हणजे अंतरात्मा किंवा ईश्वर. तो सत्तारूपाने (ईशान म्हणजे नियामकत्वाचे सामर्थ्य) सर्वांच्या अंत:करणात राहतो. त्याचे ठिकाणी सर्व गुण व कला असतात. (जीवाचे ठिकाणी त्या असतात असा अर्थ केला तर मतिमंदाचे बाबतीत ते जुळत नाही.) ॥७॥

सकळ पुराचा ईश । जगामध्यें तो जगदीश । नाना शरीरीं सावकास । करूं लागे ।।८।।

(पुर म्हणजे शहर, जुन्या शहरांना द्वारे असत. शरीरालाही डोळे, कान इ. द्वारे असल्याने त्याला 'पुर' म्हणतात.

अशा पुरात 'शेते' म्हणजे वास्तव्य करतो त्याला पुरुष म्हणतात.) ईश्वर सर्व शरीरात व्यापून राहतो व तोच ईश्वर सर्व जगातही व्यापून असतो. त्या त्या शरीरांचे सर्व व्यापार तो सहजतेने चालवतो. ॥८॥

पाहातां सृष्टिची रचना । ते येकाचेन चालेना । येकचि चालवी नाना । देह धरुनी ।।९।।

अवाढव्य सृष्टी एका केंद्रसत्तेने चालणार नाही म्हणून त्या ईश्वराने प्रत्येक शरीर स्वत:चे सत्ताकेंद्र केले व त्या त्या देहांच्या सर्व व्यवहाराचे नियंत्रण चालविले आहे. ॥९॥

नाही उंच नीच विचारिलें । नाहीं बरें वाईट पाहिले । कार्ये चालों ऐसें जालें । भगवंतासी ।।१०।।

शरीरांच्या मनुष्यादी प्रतवारीचा विचार केला नाही. शरीर देखणे की ओंगळ अशीही निवड पाहिली नाही. नियोजित कार्य बरोबर व्हावे एवढाच भगवंताने विचार केला.

वर्णक दुसरे– ईश्वराने प्राणी विकसित (माणूस) की अविकसित (चिलट, कृमी इ.) असा विचार केला नाही. निरुपद्रवी की क्रूर हेही पाहिले नाही. एकूण सर्व जीव जड सृष्टी व्यवस्थित चालावी एवढाच विचार केला. ॥१०॥

किंवा नेणणें आडवें केलें । किंवा अभ्यासीं घातलें । हें कैसें कैसें केलें । त्याचा तोचि जाणे ।।११।।

माणसाला ब्रह्मज्ञान होऊ नये किंवा स्वरूप ओळखू नये म्हणून ईश्वराने तो व स्वरूप ह्यांच्यात अविद्या किंवा अज्ञानाला (नेणणे) का आडवे घातले? आणि काहींना स्वरूपाची ओळख होण्यासाठी वेदांतशास्त्र व साधनेच्या अभ्यासाला का प्रवृत्त केले? ह्याचे उत्तर त्याचे त्यालाच माहीत!

वर्णक दुसरे– एकाला यश येऊ नये म्हणून ईश्वराने तो व यश ह्यांत अज्ञानाला का आडवे घातले? व कोणाला यश मिळण्यासाठी अभ्यासाकडे म्हणजे ज्ञानाकडे का प्रेरणा दिली? हे त्याने का व कसे केले ते त्याचे त्यालाच ठाऊक! म्हणून आपल्या परीने योग्य प्रयत्नांची पराकाष्ठा करून जे घडेल ते ईश्वरी इच्छा म्हणून शांतपणे स्वीकारावे. ॥११॥

जगदांतरीं अनुसंधान । बरें पाहाणें हेंचि ध्यान । ध्यान आणी तें ज्ञान । येकरूप ।।१२।।

सर्व चेतन व अचेतनात्मक सृष्टीत व्यापून राहिलेल्या परमेश्वराला पाहणे हेच खरे ध्यान होय. ह्या ध्यानाला ज्ञानाचा दर्जा आहे. ॥१२॥

प्राणी संसारास आला । कांहीं येक शाहाणा जाला । मग तो विवरों लागला । भूमंडळीं ।।१३।।

माणूस जन्माला येऊन थोडाफार शहाणा झाल्यावर ह्या जगात वावरू लागतो. पण तो अज्ञानातच असतो. ॥१३॥

प्रगट रामाचें निशाण । आत्माराम ज्ञानघन । विश्वंभर विद्यमान । भाग्यें कळे ।।१४।।

विश्वंभर म्हणजे विश्वात भरून राहिलेला ईश्वर. विद्यमान म्हणजे सत्तारूपाने त्याचे अस्तित्व आज व सतत आहे. ईश्वराची विद्यमान व विश्वंभर ही दोन विशेषणे आहेत. आत्माराम म्हणजे कूटस्थ चैतन्य किंवा आत्मचैतन्य. ज्ञानघन म्हणजे ज्ञानमय किंवा ज्ञानरूप ब्रह्म. सगुण ईश्वर व निर्गुण ब्रह्म ह्या दोघांचा समावेश 'राम' ह्या नामात केला असून त्याचे निशाण ईश्वराच्या जगत् रूपाने व ब्रह्माच्या शुद्ध जाणिवेच्या रूपाने प्रत्येकाला प्रत्यक्ष ज्ञात आहे. पण हे फार मोठ्या भाग्याने कळते. ॥१४॥

उपासना धुंडून वासना धरिली । तरी ते लांबतचि गेली । महिमा न कळे बोलिली । येथार्थ आहे ।।१५।।

आवडती उपासना निवडून किंवा कोणा महात्म्याकडून मिळूनही त्यात सकामता शिरली तर तिला काही मर्यादाच राहत नाही. उपासनेचे खरे महत्त्व बहुतेक वेळा कळत नाही असे जे म्हणतात ते योग्यच आहे. ॥१५॥

द्रष्टा म्हणिजे पाहाता । साक्षी म्हणिजे जाणता । अनंतरूपी अनंता । वोळखावें ।।१६।।

अनंत असलेला अनंतात्मा द्रष्टा वा साक्षी आहे. ('उदासीनत्वे सति बोद्धा साक्षी' जे चैतन्य बुद्धी इत्यादिकांना प्रकाशित करून स्वत: उदासीन राहते ते साक्षी किंवा द्रष्टा. जीव = ज्ञाता.) त्याला जाणण्यात पुरुषार्थ आहे. ॥१६॥

संगती असावी भल्यांची । धाटी कथा निरूपणाची । कांहीं येक मनाची । विश्रांती आहे ।।१७।।

सज्जनांची संगत व प्रवचनकीर्तन ऐकण्याची किंवा करण्याची सवय असली तर मनाला थोडीफार विश्रांती मिळते. ॥१७॥

त्याहिमधें प्रत्ययेज्ञान । जाळून टाकिला अनुमान । प्रचितीविण समाधान । पाविजेल कैंचें ।।१८।।

प्रवचन-कीर्तनातील प्रबोधन अनुभवातून आलेले असले म्हणजे केवळ कल्पना, तर्क, अंदाज इ. जळून जातात. अनुभवाशिवाय समाधान कसे होईल? ॥१८॥

मूळ संकल्प तो हरिसंकल्प । मूळमायेमधील साक्षेप । जगदांतरीं तेंचि रूप । देखिजेतें ।।१९।।

अज्ञानाचे हरण करणाऱ्या ज्ञानरूप किंवा ब्रह्मरूप हरीमध्ये मूळसंकल्प झाला. मूळमायेत घडणाऱ्या पुढील सर्व घटनाक्रमाचे त्याचा ईक्षणरूप प्रयत्न हे कारण आहे. भक्त व ज्ञानमार्गीयांनी जगामध्ये तो हरीच पहावा. ॥१९॥

उपासना ज्ञानस्वरूप । ज्ञानीं चौथा देह आरोप । याकारणें सर्व संकल्प । सोडून द्यावा ।।२०।।

वाच्यार्थाने जो ईश्वर आहे तोच लक्ष्यार्थाने ब्रह्म असल्याने ईश्वरोपासना व ज्ञानरूप ब्रह्माची उपासना एकच आहे. ‘अहं’ ह्या जाणिवेला ईश्वराचा चौथा म्हणजे महाकारण देह म्हणतात. केवळ संकल्पामुळे ब्रह्म व मूळमाया असा फरक झाला. म्हणून जीवाने संकल्पाचा बाध करून माया ओलांडून ब्रह्मरूप व्हावे. ॥२०॥

पुढें परब्रह्म विशाळ । गगनासारिखें पोकळ । घन पातळ कोमळ । काये म्हणावें ।।२१।।

संकल्पाचा बाध केल्यावर अनुभवाला येणारे परब्रह्म व्यापक, आकाशाप्रमाणें पोकळ (मोकळे) असते. त्याला दाट, विरविरीत व मृदु ह्यांतील कोणते विशेषण द्यावे? (निर्विशेष) ॥२१॥

उपासना म्हणिजे ज्ञान । ज्ञानें पाविजे निरंजन । योगियांचें समाधान । येणें रितीं ।।२२।।

आत्मनिवेदन भक्ती व आत्मज्ञान दोन्ही एकच. त्याने ‘शुद्ध ब्रह्म मी आहे’ असा अनुभव येतो व ब्रह्माशी योग साधणाऱ्या योग्यांचे समाधान मिळते. ॥२२॥

विचार नेहटूनसा पाहे । तरी उपासना आपणचि आहे । येक जाये एक राहे । देह धरुनी ।।२३।।

शास्त्रशुद्ध सूक्ष्म विचार साधनापूर्वक केला तर उपास्य ब्रह्म व उपासक मी एकच आहेत असा प्रत्यक्ष अनुभव आल्यावर ज्या देहात उपासक राहत होता त्यांत तोच उपासक उपास्यरूपाने आयुष्य असेपर्यन्त राहतो. ॥२३॥

अखंड ऐसी घालमेली । पूर्वापार होत गेली । आतां हि तैसीच चालिली । उत्पत्ति स्थिती ।।२४।।

अशी ही सृष्टीची उलाढाल अनादि काळापासून चालत आली आहे. उत्पत्ती होऊन आता स्थितिकाळ चालू आहे. ॥२४॥

बनावरी बनचरांची सत्ता । जळावरी जळचरांची सत्ता । भूमंडळीं भूपाळां समस्तां । येणेंचि न्यायें ।।२५।।

वनात वन्य प्राण्यांची, पाण्यांत जळचरांची व पृथ्वीवर सत्ताधीशांची सत्ता अशीच पूर्वीपासून चालली आहे. ॥२५॥

सामर्थ्य आहे चळवळेचें । जो जो करील तयाचें । परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ।।२६।।

क्रियाशीलतेला सामर्थ्य असते व जो क्रिया करील त्याला ते प्राप्त होते. पण त्या क्रियेमागे व सामर्थ्यामागे ईश्वराची आद्य क्रिया (संकल्प) व सामर्थ्य आहे हे प्रत्येकाने लक्षात ठेवावे. (सृष्टिरचनेचे कर्म हेच आद्य कर्म आहे– गीता अ. ८) ॥२६॥

कर्ता जगदीश हें तों खरें । परी विभाग आला पृथकाकारें । तेथें अहंतेचें काविरें । बाधिजेना ।।२७।।

सर्व कर्ता ईश्वर आहे ह्यांत तिळमात्र शंका नाही. पण त्याचे ते कर्तृत्व प्रत्येक जीवाच्या, समूहाच्या व सत्ताधीशाच्या माध्यमातून व्यक्त होते. हे लक्षात घेतले तर ह्यातील कोणालाच अहंकाराचे वेड बाधत नाही. ॥२७॥

हरिर्दाता हरिर्भोक्ता । ऐसें चालतें तत्वता । ये गोष्टीचा आतां । विचार पाहावा ।। २८ ।।

हरी जे जीवाला विषय रूपाने देतो त्यांचा भोक्ता अधियज्ञाचे रूपाने तोच असतो. हा सिद्धान्त नीट पहावा. ॥२८॥

सकळ कर्ता परमेश्वरु । आपला माइक विचारु । जैसें कळेल तैसें करूं । जगदांतरें ।।२९।।

कर्ता करविता परमेश्वर आहे. जीवरूप मी मायिक आहे. ह्या जगात जगताना शास्त्राप्रमाणें जे कळेल ते करीत राहू. ('तस्मात शास्त्रं प्रमाणं ते'– गीता) ॥२९॥

देवायेवढें चपळ नाहीं । ब्रह्मायेवढें निश्चळ नाहीं । पाइरीनें पाइरी चढोन पाहीं । मूळपरियंत ।।३०।।

ईश्वराएवढा क्रियाशील कोणी नाही. ब्रह्मासारखे निष्क्रिय काही नाही. क्रियांच्या पायरी पायरीने चढत निष्क्रियतेच्या शेवटापर्यन्त पोहोचावे. (क्रियेतील ८२ तत्त्वे ओलांडून ब्रह्मरूप व्हावे) ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आत्मानिरूपणनाम' समास चौथा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आत्मानिरूपण' नावाचा चौथा समास समाप्त

दशक विसावा : पूर्णनामदशक

समास पाचवा : चत्वारजिन्नसनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

येथून पाहातां तेथवरी । चत्वार जीनस अवधारीं । येक चौदा पांच च्यारी । ऐसें आहे ।।१।।

ह्या दृश्य कल्पित सृष्टीत; ह्या टोकापासून त्या टोकापर्यन्त पदार्थांचे फक्त चार गट आहेत. १) परब्रह्म २) मायेच्या चौदा अभिव्यक्ती ३) पंच महाभूते ४) उद्भिजादी चार खाणी ॥१॥

परब्रह्म सकळांहून वेगळें । परब्रह्म सकळांहून आगळें । नाना कल्पनेनिराळें । परब्रह्म तें ।।२।।

पहिले परब्रह्म इतर तीन गटांहून अगदी वेगळे व आगळे म्हणजे वैशिष्ट्यपूर्ण आहे. सर्वांत व्यापून अलिप्त व सूक्ष्मातिसूक्ष्म आहे. कोणताही मानव जी कल्पना करू शकतो त्याहून ते भिन्न आहे. ॥२॥

परब्रह्माचा विचार । नाना कल्पनेहून पर । निर्मळ निश्चळ निर्विकार । अखंड आहे ।।३।।

शुद्ध, स्वस्थ व निर्विकारत्वाच्या परिसीमेची जेवढी कल्पना करणे शक्य आहे त्याहून ते शुद्ध, स्वस्थ व निर्विकार परब्रह्म अखंडत्वाने सर्वत्र व्यापून आहे. ॥३॥

परब्रह्मास कांहींच तुळेना । हा येक मुख्य जिनसाना । दुसरा जिनस नाना कल्पना । मूळमाया ।।४।।

ह्या दृश्य सृष्टीचे अधिष्ठान असलेले परब्रह्मच मुख्य व एकमेव सत्य पदार्थ आहे. त्यासारखा कोणताच अन्य पदार्थ नाही. अनेक काल्पनिक जिनसांनी भरलेली मूळमाया हा दुसरा पदार्थ आहे. ॥४॥

नाना सूक्ष्मरूप । सूक्ष्म आणी कर्दमरूप । मुळींच्या संकल्पाचा आरोप । मूळमाया ।।५।।

मूळमायेत अव्यक्तादी अनेक सूक्ष्मतत्त्वे दडलेली आहेत. शिवाय तशा सूक्ष्म तत्त्वांचे मिश्रणही आहे. परब्रह्मावरील स्फुरणाच्या अध्यारोपालाच मूळमाया म्हणतात! ॥५॥

हरिसंकल्प मुळींचा । आत्माराम सकळांचा । संकेत नामाभिधानाचा । येणें प्रकारें ।।६।।

ह्या स्फुरणरूप संकल्पाला अंतरात्मा किंवा ईश्वर म्हणतात. तो सर्वांच्या हृदयात राहतो. (कूटस्थ वा अक्षर गीता अ. १५) इतर नामांचे संकेत पुढीलप्रमाणे– ॥६॥

निश्चळीं चंचळ चेतलें । म्हणौनि चैतन्य बोलिलें । गुणासमानत्वें जालें । गुणसाम्य ऐसें ।।७।।

मूळ निश्चळ ब्रह्मावर चंचळ स्फुरणाचा आरोप करताच त्याला चैतन्य असे नाव मिळाले (निश्चळ + चंचळ.) मूळमायेतील गुणांच्या साम्यावस्थेमुळे तिला गुणसाम्य असे नाव मिळाले. ॥७॥

अर्धनारीनटेश्वर । तोचि शड्गुणैश्वर । प्रकृतिपुरुषाचा विचार । शिवशक्ती ।।८।।
शुद्धसत्वगुणाची मांडणी । अर्धमात्रा गुणक्षोभिणी । पुढें तिही गुणांची करणी । प्रगट जाली ।।९।।
मन माया अंतरात्मा । चौदा जिनसांची सीमा । विद्यमान ज्ञानात्मा । इतुके ठाइं ।।१०।।

१) अर्धनारीनटेश्वर २) शड्गुणैश्वर ३) प्रकृती पुरुष ४) शिवशक्ती ५) शुद्धसत्व ६) अर्धमात्रेची गुणक्षोभिणी ७) सत्त्व ८) रज ९) तम १०) मन ११) माया १२) अन्तरात्मा १३) चैतन्य १४) गुणसाम्य. त्या सर्वांचे प्रकाशन करून ज्ञानरूप आत्मा त्यात राहतो. ॥८-१०॥

ऐसा दुसरा जिनस । अभिधानें चतुर्दश । आतां तिसरा जिनस । पंचमाहाभूतें ।।११।।

असा हा दुसरा पदार्थ असून त्याच्या ह्या चौदा अभिव्यक्ती आहेत. तिसरा गट पंचभूतांचा आहे. ॥११॥

येथें पाहातां जाणीव थोडी । आदिअंत हे रोकडी । खाणी निरोपिल्या तांतडी । तो चौथा जिनस ॥१२॥

पंचमहाभूतात ज्ञानरूप आत्मा व्यापून असतो म्हणून त्यांत जाणीव आहे असे म्हणावयाचे एवढेच! अन्यथा ती अचेतन आहेत. मात्र त्यांच्या आधीचा ईश्वर व नंतरच्या चार खाणी ह्यांत जाणीव स्पष्ट असते. चार खाणी हा चौथा गट होय. ॥१२॥

च्यारी खाणी अनंत प्राणी । जाणीवेची जाली दाटणी । च्यारी जिनस येथुनी । संपूर्ण जाले ॥१३॥

चार खाणींतील प्राण्यांची संख्या अनंत वा असंख्य आहे. त्यांच्यात जाणीवरूप ज्ञान घनदाट भरले आहे. असे हे दृश्य सृष्टीतील चार गट सांगून झाले. ॥१३॥

बीज थोडें पेरिजेतें । पुढें त्याचें उदंड होतें । तैसें जालें आत्मयातें । खाणी वाणी प्रगटतां ॥१४॥

मूठभर बी पेरले की त्याचे कितीतरी धान्य होते. त्याप्रमाणें अंतरात्म्यानें (ईश्वर) चारखाणी व चारवाणींचे प्रगटीकरण करताच असंख्य प्राणी जन्माला आले. ॥१४॥

ऐसी सत्ता प्रबळली । थोडे सत्तेची उदंड जाली । मनुष्यवेषें सृष्टी भोगिली । नाना प्रकारें ॥१५॥

मूळची मर्यादित असलेली ईश्वरी सत्ता अशा प्रकारे असंख्य शरीरांच्या माध्यमातून अतोनात वाढली. मानवी शरीरातील जीवाने तर सृष्टीचा नाना प्रकारे भोग घेतला. ॥१५॥

प्राणी मारून स्वापद पळे । वरकड त्यास काये कळे । नाना भोग तो निवळे । मनुष्यदेहीं ॥१६॥

एखादे श्वापद (वाघ इ.) लहान प्राण्याला मारून तो खाण्यासाठी तोंडात धरून दूर घेऊन जाते. त्याची अतिसामान्य बुद्धी (वरकड) एवढ्याच मर्यादेत भोग भोगते. पण मानवी प्रगत बुद्धी मात्र पाच ज्ञानेंद्रिये व अन्त:करणाने असंख्य भोग भोगते. (जीभ– नाना चवी, मानस भोग– कीर्ती, सत्ता, इ.) ॥१६॥

नाना शब्द नाना स्पर्श । नाना रूप नाना रस । नाना गंध ते विशेष । नरदेह जाणे ॥१७॥

शब्दांची कारंजी, मऊ, मुलायम इ. स्पर्श, सुंदर रूपे, मधुरादी सहा रस, अत्तरे व फुलांचे गंध इ. विशेष भोग मानवी शरीरातच भोगले जातात. ॥१७॥

अमोल्य रत्नें नाना वस्त्रें । नाना यानें नाना शस्त्रें । नाना विद्या कळा शास्त्रें । नरदेह जाणे ॥१८॥

हिरे, वैडूर्यादी अनमोल रत्ने, उंची वस्त्रांचे असंख्य प्रकार (फॅशन), अनेक प्रकारची वाहने, संहारक शस्त्रे, अनेक विद्या, संगीतादी कला व वेदान्तादी शास्त्रे यांची जाण मानवी जीवालाच असते. ॥१८॥

पृथ्वी सत्तेनें व्यापिली । स्थळोस्थळीं अटोपिली । नाना विद्या कळा केली । नाना धारणा ॥१९॥

पृथ्वी ईश्वराच्या सत्तेने व्यापली असून तिची सर्वत्र पकड आहे. पूर्ण नियंत्रण आहे. त्या सत्तेच्या नियोजनानुसार मानवी माध्यमातून अनेक विद्या, कला व मतमतांतरे (धारणा) व्यक्त होतात. ॥१९॥

दृश्य अवघेंचि पाहावें । स्थानमान सांभाळावें । सारासार विचारावें । नरदेहे जालियां ॥२०॥

ही दृश्यसृष्टी नीट पारखून पहावी. त्यांतील आपले स्थान व मर्यादा (मान) यांना सांभाळून राहावे. मानवी शरीर मिळाल्यावर प्रामुख्याने सृष्टी व शरीर यांतील सार व असार यांचा शास्त्रशुद्ध विचार करावा. ॥२०॥

येहलोक आणी परलोक । नाना प्रकारींचा विवेक । विवेक आणी अविवेक । मनुष्य जाणे ॥२१॥

इहलोक व परलोक या संकल्पना व व्यावहारिक, नैतिक व आध्यात्मिक विवेक आणि अविवेक त्यांचा विचार फक्त माणूसच करू शकतो. ॥२१॥

नाना पिंडीं ब्रह्मांडरचना । नाना मुळींची कल्पना । नाना प्रकारीं धारणा । मनुष्य जाणे ॥२२॥

मनुष्यादी शरीरांच्या रचनेचे शास्त्र (Anatomy), ब्रह्मांड रचनेचे शास्त्र (Cosmology), मूलभूत संशोधन इ. मानवी बुद्धीच धारण करू शकते. ॥२२॥

अष्टभोग नवरस । नाना प्रकारींचा विळास । वाच्यांश लक्ष्यांश सारांश । मनुष्य जाणे ।।२३।।

सुगंधादी आठ भोग, शृंगारादी नऊ रस, नृत्य वस्त्रादी विलास व शब्दांचे वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, सारार्थ इ. खेळ माणूसच करू शकतो. ॥२३॥

मनुष्यें सकळांस आळिलें । त्या मनुष्यास देवें पाळिलें । ऐसें हें अवघें कळलें । नरदेहयोगें ।।२४।।

माणूस इतर जीवसृष्टीवर व जगावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो. पण त्या माणसावर ईश्वराचे नियंत्रण आहे. हे सर्व मानवी शरीरातच कळते. ॥२४॥

नरदेह परम दुल्लभ । येणें घडे अलभ्य लाभ । दुल्लभ तें सुल्लभ । होत आहे ।।२५।।

मानवी शरीराचा लाभ होणे अतिशय दुर्लभ आहे. पण त्यांतच मोक्षाचा अलभ्य लाभ होतो. तो फार दुर्लभ असला तरी या शरीरात सहजसाध्य आहे. ॥२५॥

वरकड देहे हें काबाड । नरदेह मोठें घबाड । परंतु पाहिजे जाड । विवेकरचना ।।२६।।

मनुष्येतर जीवसृष्टी बुद्धीने अतिसामान्य (वरकड) व बहुतकरून कष्टांच्या भोगांसाठीं आहे. मनुष्यदेह मात्र मोठे घबाड आहे. परंतु त्याची पूर्ण क्षमता वापरण्यासाठी नित्यानित्यादी विवेकाचा सतत पाठपुरावा केला पाहिजे. ॥२६॥

येथें जेणे आळस केला । तो सर्वस्वें बुडाला । देव नाहीं वोळखिला । विवेकबळें ।।२७।।

मानवी शरीर मिळूनही केवळ आळसाने जो 'मी ब्रह्म' असा अनुभव विवेकपूर्वक घेत नाही तो हाती आलेले घबाड घालवून सर्वस्वाला मुकतो. ॥२७॥

नर तोचि नारायेण । जरी प्रत्ययें करी श्रवण । मननशीळ अंतःकर्ण । सर्वकाळ ।।२८।।

जो अनुभवी महात्म्याकडून श्रवण करून स्वतः अनुभव घेण्यासाठी अन्तःकरण वृत्तीने आत्मस्वरूपाचे अखंड चिंतन करतो तो देहाने माणूस असला तरी स्वरूपाने नारायण होतो. ॥२८॥

जेणें स्वयेंचि पोहावें । त्यास कासेस नलगे लागावें । स्वतंत्रपणें शोधावें । सकळ कांहीं ।।२९।।

एकदा असे श्रवण घडले की त्याने स्वतःच्या विचाराने पुन्हा अध्यात्मग्रंथांचा अभ्यास करावा. एकदा पोहावयास शिकले की नंतर शिकवणाऱ्याचा आधार सोडून द्यावा. ॥२९॥

सकळ शोधून राहिला । संदेह कैचा तयाला । पुढें विचार कैसा जाला । त्याचा तोचि जाणे ।।३०।।

अशा परिपूर्ण अभ्यास करणाऱ्याला संशय कसे उरतील? स्वतःचा अभ्यास सुरू केल्यावर त्याचा जो विकास होत जातो तो त्याचा त्यालाच कळतो. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'चत्वारजिन्नसनाम' समास पाचवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'चत्वारजिन्नस' नावाचा पाचवा समास समाप्त

दशक विसावा : पूर्णनामदशक

समास सहावा : आत्मागुणनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

(येथे आत्मा म्हणजे ईश्वर. आत्मा निर्गुण असल्याने त्याला गुण नाहीत, क्रिया नाहीत व त्याचा नामरूपात्मक पसारा, सत्ता इ. काहीच नाही. हे सर्व अन्तरात्म्याचे म्हणजे ईश्वराचे आहेत.)

पाहों जातां भूमंडळ ।। ठाईं ठाईं आहे जळ । कित्तेक तें निर्मळ माळ । जळेंविण पृथ्वी ।।१।।

या पृथ्वीचे निरीक्षण करता असे दिसते की जागोजागी पाण्याचे लहानमोठे साठे आहेत व अनेक ठिकाणी जराही ओलावा नसलेले माळ पसरले आहेत. ॥१॥

तैसें दृश्य विस्तारलें । कांहींयेक जाणीवेनें शोभलें । जाणीवरहित उरलें । कितीयेक दृश्य ।।२।।

त्याचप्रमाणे या दृश्य सृष्टीच्या अफाट विस्तारातील जीवसृष्टीत जाणिवेची शोभा आहे व विस्तृत अचेतन सृष्टी जाणीवशून्य आहे. ॥२॥

च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यासी लक्ष जीवयोनी । शास्त्रीं अवघें नेमुनी । बोलिलें असे ।।३।।

जीवसृष्टीच्या चार खाणी, चार वाणी व चौऱ्यांशी लक्ष जीवयोनी शास्त्रात सांगितल्या आहेत.

श्लोक

जलजा नवलक्षाश्च दशलक्षाश्च पक्षिणः ।
कृमयो रुद्रलक्षाश्च विंशल्लक्षा गवादयः ।।
स्थावरास्त्रिंशल्लक्षाश्च चतुर्लक्षाश्च मानवाः ।
पापपुण्यं समं कृत्वा नरयोनिषु जायते ।।१।।

श्लोकार्थ

जळचर– ९ लाख. पशू– २० लाख
पक्षी– १० लाख वृक्षवेली– ३० लाख
कृमिकीटक– ११ लाख माणसे– ४ लाख
३० + ५४ = ८४ लाख.
पापपुण्य समान होताच मनुष्यजन्म मिळतो. ॥३॥

मनुष्यें च्यारी लक्ष । पशु वीस लक्ष । क्रिम आक्रा लक्ष । बोलिलें शास्त्रीं ।।४।।
दाहा लक्ष ते खेचर । नव लक्ष जळचर । तीस लक्ष स्थावर । बोलिलें शास्त्रीं ।।५।।
ऐसी चौऱ्यासी लक्ष योनी । जितुका तितुका जाणता प्राणी । अनंत देहयाची मांडणी । मर्यादा कैंची ।।६।।

(वरील ओव्यांचा अर्थ श्लोकार्थात आलेला आहे) ॥४-६॥

अनंत प्राणी होत जाती । त्यांचें अधिष्ठान जगती । जगतीवेगळी स्थिती । त्यास कैंची ।।७।।

कित्येक प्राणी जन्माला येऊन मरण पावतात ते जगाच्या पाठीवरच असतात. जग सोडून ते कोठे राहणार? ॥७॥

पुढें पाहातां पंचभूतें । पावलीं पष्टदशेतें । कोणी विद्यमान कोणी तें । उगीच असती ।।८।।

त्यानंतर स्पष्ट दिसणारी पंचमहाभूते असतात. त्यांतील पृथ्वी, आप व तेज दिसतात तर वायू व आकाश नुसतेच असतात. ॥८॥

अंतरात्म्याची वोळखण । तेचि जेथें चपळपण । जाणीवेचें अधिष्ठान । सावध ऐका ।।९।।

जेथे हालचाल असते, तेथे ईश्वराचे कर्तृत्व समजावे. आता जाणीव किंवा ज्ञानाची अभिव्यक्ती कोठे कशी ते ऐका. ॥९॥

सुखदुख जाणता जीव । तैसाचि जाणावा सदा शिव । अंत:कर्णपंचक अपूर्व । अंश आत्मयाचा ।।१०।।

जीव व ईश्वर यांना सुखदु:खांची जाणीव असते. सर्व भूतांच्या एकत्रित झालेल्या सत्त्वगुणापासून जीवाचे अन्त:करण उत्पन्न होते (अपूर्व) ते ईश्वराच्या अन्त:करणाचा अंश होय. ॥१०॥

स्थुळीं आकाशाचे गुण । अंश आत्मयाचे जाण । सत्त्व रज तमोगुण । गुण आत्मयाचे ।।११।।
नाना चाळणा नाना धृती । नवविधा भक्ति चतुर्विधा मुक्ती । अलिप्तपण सहजस्थिती । गुण आत्मयाचे ।।१२।।
द्रष्टा साक्षी ज्ञानघन । सत्ता चैतन्य पुरातन । श्रवण मनन विवरण । गुण आत्मयाचे ।।१३।।
दृश्य द्रष्टा दर्शन । ध्येय ध्याता ध्यान । ज्ञेय ज्ञाता ज्ञान । गुण आत्मयाचे ।।१४।।
वेदशास्त्रपुराणअर्थ । गुप्त चालिला परमार्थ । सर्वज्ञपणें समर्थ । गुण आत्मयाचे ।।१५।।
बद्ध मुमुक्ष साधक सिद्ध । विचार पाहाणें शुद्ध । बोध आणी प्रबोध । गुण आत्मयाचे ।।१६।।
जागृति स्वप्न सुषुप्ति तुर्या । प्रकृतिपुरुष मूळमाया । पिंड ब्रह्मांड अष्टकाया । गुण आत्मयाचे ।।१७।।
परमात्मा आणि परमेश्वरी । जगदात्मा आणी जगदेश्वरी । महेश आणी माहेश्वरी । गुण आत्मयाचे ।।१८।।
सूक्ष्म जितुकें नामरूप । तितुकें आत्मयाचें स्वरूप । संकेतनामाभिधानें अमूप । सीमा नाहीं ।।१९।।
आदिशक्ती शिवशक्ती । मुख्य मूळमाया सर्वशक्ती । नाना जीनस उत्पती स्थिती । तितुके गुण आत्मयाचे ।।२०।।
पूर्वपक्ष आणी सिद्धांत । गाणें वाजवणें संगीत । नाना विद्या अद्भुत । गुण आत्मयाचे ।।२१।।
ज्ञान अज्ञान विपरीतज्ञान । असद्वृत्ति सद्वृत्ति जाण । ज्ञेप्तिमात्र अलिप्तपण । गुण आत्मयाचे ।।२२।।
पिंड ब्रह्मांड तत्वझाडा । नाना तत्त्वांचा निवाडा । विचार पाहाणें उघडा । गुण आत्मयाचे ।।२३।।
नाना ध्यानें अनुसंधानें । नाना स्थिति नाना ज्ञानें । अनन्य आत्मनिवेदनें । गुण आत्मयाचे ।।२४।।
तेतिस कोटी सुरवर । आठ्यासी सहश्र ऋषेश्वर । भूत खेचर अपार । गुण आत्मयाचे ।।२५।।
भूतावळी औट कोटी । च्यामुंडा छपन्न कोटी । कात्यायेणी नव कोटी । गुण आत्मयाचे ।।२६।।
चंद्र सूर्य तारामंडळें । नाना नक्षत्रे ग्रहमंडळें । शेष कूर्म मेघमंडळें । गुण आत्मयाचे ।।२७।।
देव दानव मानव । नाना प्रकारीचे जीव । पाहातां सकळ भावाभाव । गुण आत्मयाचे ।।२८।।
आत्मयाचे नाना गुण । ब्रह्म निर्विकार निर्गुण । जाणणें येकदेसी पूर्ण । गुण आत्मयाचे ।।२९।।

पुढील सर्व अन्तरात्म्याचे गुण म्हणजे अभिव्यक्ती असून त्यांना त्याची निर्मितीही म्हणता येईल. या ओव्यातील

अलिप्तपणा, सहजस्थिती, मुक्ती इ. अभिव्यक्ती सापेक्ष आहेत. जीव लिप्त, असहज व बद्ध असतो. म्हणून त्यासापेक्ष (व्यावृत्ती) या स्थिती सांगाव्या लागल्या. त्यामुळें त्यांना माया सापेक्षत्व आहे. ईश्वर माया विशिष्ट चेतन असल्याने असे असणे स्वाभाविक आहे. आत्म्याचे गुण असे आहेत– (१) सूक्ष्म आकाशाचे तत् सापेक्ष स्थूल अन्त:करणातील काम, क्रोध, शोक, मोह व भय. (२) सत्त्व रज व तमोगुण. (३) विचारांची देवघेव, धैर्य, नऊ भक्ती, चार मुक्ती, अलिप्तपणा व सहजस्थिती. (४) द्रष्टा, साक्षी, चित्घन, सत्ता, चैतन्य, पुराणत्व, श्रवण, मनन व विवरण. (५) द्रष्टा-दृश्य-दर्शन, ध्येय-ध्याता-ध्यान, ज्ञेय-ज्ञाता-ज्ञान या तिन्ही मुख्य त्रिपुटी. (६) वेद, धर्मादी शास्त्रे, पुराणें व त्यांचा अर्थ, अंतरंगात चाललेला परमार्थ, सर्वज्ञतेचे सामर्थ्य. (७) बद्ध, मुमुक्ष, साधक, सिद्ध, शुद्धविचार करणें, बोध व प्रबोध. (८) जागृती, स्वप्न, सुषुप्ती, तुर्य, प्रकृती, पुरुष, मूळमाया, पिंड, ब्रह्मांड व त्यांचे आठ देह. (९) परमात्मा, परमेश्वरी, जगदात्मा, जगदीश्वरी, महेश व माहेश्वरी (१०) सूक्ष्म नामरूपें व त्यांची सांकेतिक नामे. (११) आदिशक्ती, शिवशक्ती, सर्वशक्तिमान मुख्य मूळमाया, अनेक पदार्थांची उत्पत्ती व स्थिती. (१२) पूर्वपक्ष, सिद्धान्तपक्ष, गायन, वाद्यवादनादी संगीत, इंद्रजालादी अद्भुत विद्या. (१३) ज्ञान, अज्ञान, विपरीत ज्ञान, वाईट व चांगल्या प्रवृत्ती, ज्ञप्तिमात्र (केवळ, शुद्ध, निर्विशेष ज्ञान) व अलिप्तपण. (१४) पिंड व ब्रह्मांडातील तत्त्वांचा शोध, नाना तत्त्वांचा निवाडा, सुस्पष्ट विचार. (१५) ध्यानाच्या विविध प्रक्रिया, अनुसंधानाच्या पद्धती, जागृतादी स्थिती, ज्ञानाच्या असंख्य शाखा, अनन्यत्व व आत्मनिवेदन भक्ती. (१६) तेहेतीस कोटी देव, अठ्याऐंशी हजार श्रेष्ठ ऋषी व असंख्य भूते व पिशाच्चे. (१७) साडेतीन कोटी भुतावळ, छप्पन कोटी चामुंडा व नऊ कोटी कात्यायनी. (१८) चंद्र, सूर्य, असंख्य तारे, नक्षत्रे व ग्रह, शेष, कूर्मादी अवतार व मेघमंडळे. (१९) देव, दानव, मानव, अनेक प्रकारचे जीव, सर्व भाव व अभाव. (२०) असे ईश्वराचे अनेक गुण आहेत. ब्रह्म निर्विकार व निर्गुण आहे. सविशेष ज्ञान, मग ते अपूर्ण असो की पूर्ण, अंतरात्म्याचेच असतात. ।।११-२९।।

आत्मारामउपासना । तेणें पावले निरंजना । निसंदेहे अनुमाना । ठावचि नाहीं ।। ३० ।।

वरील प्रत्येक अभिव्यक्तीमध्ये अन्तरात्मा (आत्माराम) पाहण्याची उपासना केली असता ब्रह्मानुभव येतो. मी कोण व जगाचे स्वरूप काय यासंबंधी नि:शंक ज्ञान झाल्याने कल्पना किंवा अंदाजाला मुळीच वाव राहत नाही. ।।३०।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आत्मागुणनिरूपणनाम' समास सहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आत्मागुणनिरूपण' नावाचा सहावा समास समाप्त

दशक विसावा : पूर्णनामदशक

समास सातवा : आत्मानिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

अनुर्वाच्य समाधान जालें । तें पाहिजे बोलिलें । बोलिल्यासाठीं समाधान गेलें । हें तों घडेना ।।१।।

आत्मसुखानुभवाने होणारे समाधान शब्दाने सांगण्यासारखे नसले तरी ते अवश्य सांगावे. झालेले समाधान सांगण्याने मोडत नाही हे नक्की. ॥१॥

कांहीं सांडावें लागत नाहीं । कांहीं मांडावें लागत नाहीं । येक विचार शोधून पाहीं । म्हणिजे कळे ।।२।।

ब्रह्मसुखाच्या अनुभवामुळें मिळणाऱ्या शाश्वत समाधानासाठीं जुन्या वस्तू किंवा पदार्थांचा त्याग किंवा नव्या वस्तू व पदार्थांची जुळवाजुळव करावी लागत नाही. (नित्य प्राप्ताची जणू फेरप्राप्ती.) वेदान्त शास्त्र, संत व श्रीगुरू यांनी सांगितलेले विचार नीट समजावून घेतले म्हणजे या सांगण्याचे वर्म कळते. ॥२॥

मुख्य कासीविश्वेश्वर । श्वेतबंद रामेश्वर । मलकार्जुन भीमाशंकर । गुण आत्मयाचे ।।३।।

सेतुबंधन रामेश्वर, भीमाशंकर इ. बारा ज्योतिर्लिङ्गात काशीविश्वेश्वर मुख्य आहे. या सर्व ईश्वराच्या अभिव्यक्ती आहेत. ॥३॥

जैसीं मुख्य बारा लिंगें । यावेगळीं अनंत लिंगें । प्रचित जाणिजेत जगें । गुण आत्मयाचे ।।४।।

या बारा ज्योतिर्लिङ्गांशिवाय कित्येक लिङ्गे जगभर आहेत. त्यांचे काही अनुभवही (चमत्कार) जगातील उपासकांना येतात. पण या ईश्वरी लीला आहेत. ॥४॥

भूमंडळीं अनंत शक्ति । नाना साक्षात्कार चमत्कार होती । नाना देवांच्या सामर्थ्यमूर्ती । गुण आत्मयाचे ।।५।।

पृथ्वीवर कित्येक प्रकारच्या शक्ती कार्य करीत असतात. त्यांचे सामर्थ्य व चमत्कार अनेकांना अनुभवावयाला मिळतात. काही देव जागृत असल्याचे सांगतात. या सर्व ईश्वरी लीला आहेत. ॥५॥

नाना सिद्धांचीं सामर्थ्ये । नाना मंत्रांचीं सामर्थ्ये । नाना मोहरेवल्लींत सामर्थ्ये । गुण आत्मयाचे ।।६।।

नाना तीर्थांचीं सामर्थ्ये । नाना क्षेत्रांची सामर्थ्ये । नाना भूमंडळीं सामर्थ्ये । गुण आत्मयाचे ।।७।।

चांगदेवांसारखे सिद्ध, मृत्युंजय मंत्र, रत्नांचे व वनस्पतींचे सामर्थ्य (शापित हिरा इ.) इ. सर्व ईश्वरी योजनांचे भाग आहेत. काशीसारखे तीर्थ, कुरूक्षेत्रासारखे क्षेत्र व इतर हिमालयासारख्या भूभागांचे सामर्थ्य ईश्वराचे असते. ॥६-७॥

जितुके कांहीं उत्तम गुण । तितुकें आत्मयाचें लक्षण । बरें वाईट तितुकें जाण । आत्म्याचकरितां ।।८।।

या जगातील जे जे उत्तम गुणांचे आहे ते ते ईश्वराचे आहे (विभूती). पण तसे पाहिले तर चांगले व वाईट हे दोन्ही त्याच्या सृष्टिरचनेचे भाग आहेत. ॥८॥

शुद्ध आत्मा उत्तमगुणी । सबळ आत्मा अवलक्षणी । बरी वाईट आवघी करणी । आत्मयाची ।।९।।

सत्त्वप्रधान जीवात्मा उत्तम गुणांचा असतो. रजतमांनी गढूळ झालेला अधम गुणांचा असतो. हे उत्तम व अधम ही ईश्वराचीच करणी आहे. ॥९॥

नाना साभिमान धरणें । नाना प्रतिसृष्टी करणें । नाना श्रापउश्रापलक्षणें । आत्मयाचेनी ।।१०।।

कोणाचा कैवार घेऊन त्याचे महाभयापासूनही रक्षण करणे, प्रतिसृष्टी निर्माण करणे व शाप उशाप देण्याचे सामर्थ्य ईश्वरापासून मिळते. ॥१०॥

पिंडाचा बरा शोध घ्यावा । तत्वांचा पिंड शोधावा । तत्वें शोधिता पिंड आघवा । कळों येतो ।।११।।

शरीराच्या घटनेचे तत्त्वरूप घटक सूक्ष्मपणे लक्षात घ्यावेत. त्या घटकांचे घडलेले शरीर तपासले की त्याचे स्वरूप कळते. ॥११॥

जड देह भूतांचा । चंचळ गुण आत्मयाचा । निश्चळ ब्रह्मावेगळा ठाव कैचा । जेथें तेथें ।।१२।।

अचेतन महाभूतांचे शरीर बनते. प्राणासह असलेल्या जीवात्म्यामुळे त्याची हालचाल होते. या जड व चंचळ शरीरात निश्चळ आत्मा सर्वत्र व्यापून असतो. ॥१२॥

निश्चळ चंचळ आणी जड । पिंडीं करावा निवाड । प्रत्ययावेगळें जाड । बोलणें नाहीं ।।१३।।

या शरीरातच जड, चंचळ व निश्चळ या तिन्ही तत्त्वांचा निवाडा करावा. या अनुभवातून जे बोलणें होईल त्यासारखे यथार्थ बोलणे इतरांना जमणार नाही. ॥१३॥

पिंडामधून आत्मा जातो । तेव्हां निवाडा कळों येतो । देहे जड हा पडतो । देखतदेखतां ।।१४।।

अचेतन देहातून जीवात्मा निघून जातो. त्या क्षणी तो देह अचेतन असल्याचे लक्षात येते. देहातील घटक कळतात, चेतन आणि अचेतन यातील फरक कळून येतो. ॥१४॥

जड तितुके पडिलें । चंचळ तितुकें निघोनी गेलें । जडचंचळाचें रूप आलें । प्रत्ययासी ।।१५।।

अचेतन देह पडला. चंचळ जीवात्मा निघून गेला. असे हे जड व चंचळाचे स्वरूप लक्षात आले. (आत्मा दिसत नाही, जीवात्मा जाताना दिसत नाही, जड देह पडताना सर्वांना दिसतो.) ॥१५॥

निश्चळ आहे सकळां ठाईं । हें तो पाहाणें नलगे कांहीं । गुणविकार तेथें नाहीं । निश्चळासी ।।१६।।

निश्चळ ब्रह्म सर्वच जीवसृष्टीत व्यापून आहे हे नव्याने सांगण्याची गरज नाही. त्याला त्रिगुण व सहाविकार मुळीच नसतात. ॥१६॥

जैसें पिंड तैसें ब्रह्मांड । विचार दिसतो उघड । जड चंचळ जातां जाड । परब्रह्मचि आहे ।।१७।।

'पिंडी ते ब्रह्मांडी' हा सिद्धान्त प्रसिद्धच आहे. पिंड व ब्रह्मांडातील अचेतन भूते व चंचळ जीव व ईश्वर जाताच घनदाट परब्रह्म जसेच्या तसे राहते. ॥१७॥

माहांभूतांचा खंबीर केला । आत्मा घालून पुतळा जाला । चालिला सृष्टीचा गल्बला । येणें रितीं ।।१८।।

प्रथम पंचमहाभूतांचे मजबूत आकार तयार करून त्यांत आत्म्याने प्रवेश केल्यावर शरीरे तयार झाली. (पहा– ऐतरेय उप.) व सृष्टीचे सर्व व्यापार सुरू झाले. ॥१८॥

आत्मा माया विकार करी । आळ घालिती ब्रह्मावरी । प्रत्ययें सकळ कांहीं विवरी । तोचि भला ।।१९।।

अंतरात्मा किंवा मूळमायाच विकारमय आहे व ती ब्रह्मावरच त्या विकारांचा आरोप करते. (अन्योन्याध्यास) म्हणजे मायेचे विकार ब्रह्माचे असल्याचा भ्रम होतो. याचे अनुभवपूर्वक विवेचन करतो तोच प्रबोधनकार खरा. ॥१९॥

ब्रह्म व्यापक अखंड । वरकड व्यापकता खंड । शोधून पाहातां जड । कांहींच नाहीं ।।२०।।

ब्रह्म निरपेक्ष व्यापक व निरवयव अखंड आहे. अध्यस्त सृष्टी सापेक्ष व्यापक, भेदांनी भरलेली व सावयव आहे. नीट शोधले तर हे समजणे अवघड नाही. किंवा विचारापुढे अचेतन म्हणून काहीच टिकत नाही. ॥२०॥

गगनासी खंडता नये । गगनाचें नासेल काये । जरी जाला माहांप्रळये । सृष्टीसंव्हार ।।२१।।

आकाशाचे तुकडे पाडता येत नाहीत. जरी महाप्रलय होऊन सर्व सृष्टीचा नाश झाला तरी आकाशाचे काहीं बिघडेल काय? ॥२१॥

जें संव्हारामध्यें सांपडले । तें सहजचि नासिवंत जालें । जाणते लोकीं उगविलें । पाहिजे कोडें ।।२२।।

महाप्रलयात ज्याचा नाश होते ते विनाशी असते हे ओघानेच आले. हा नित्य व अनित्याचा गुंता जाणत्यांनी सर्वांना उलगडून सांगावा. ॥२२॥

न कळतां वाटे कोडें । कळतां आवघें दिसें उघडें । म्हणोनी येकांतीं निवाडे । विचार पाहावा ।।२३।।

जोपर्यंत काहीं कळत नाही तोपर्यंत सर्व गुंतागुंतच वाटते. एकदा कळू लागले की सर्व स्पष्ट होत जाते. म्हणून एकांतात शास्त्रशुद्ध विचार करावा. ॥२३॥

मिळतां प्रत्ययाचे संत । येकातापरीस येकांत । केली पाहिजे सावचीत । नाना चर्चा ।।२४।।

अनुभवी श्रीगुरूंची भेट हा सर्वश्रेष्ठ एकान्त होय. त्यांच्याशी अत्यंत सावधपणाने अध्यात्मचर्चा करावी. ॥२४॥

पाहिल्यावेगळें कळत नाहीं । कळतां कळतां संदेह नाहीं । विवेक पाहातां कोठेंचि नाहीं । मायाजाळ ।।२५।।

अशी चर्चा केल्याशिवाय सत्याचा उलगडा होत नाही. उलगडा झाला की शंकेचा मागमूस रहात नाही. विचाराच्या बळापुढे माया टिकत नाही. ॥२५॥

गगनीं आभाळ आलें । मागुती सवेंचि उडालें । आत्म्याकरितां दृश्य जालें । उडेल तैसें ।।२६।।

आकाशात ढग गोळा होतात व थोड्याच वेळात उडून जातात. तसेच ब्रह्मरूप अधिष्ठानामुळें (आत्मा) दृश्यसृष्टिरूप अध्यस्त किंवा भ्रम होतो व कालान्तराने तो नष्ट होतो. किंवा ईश्वरी संकल्पामुळे सृष्टी निर्माण होते व नंतर ती नष्ट होते. ॥२६॥

मुळापासून सेवटवरी । विवेकी विवेकें विवरी । तोचि निश्चय थावरी । चळेना ऐसा ।।२७।।

'स्व' पासून ब्रह्मापर्यंत किंवा पंचीकृत पृथ्वीपासून ब्रह्मापर्यंत विवेकी साधक विवेकज्ञानाने अनात्म व आत्मवस्तूचा विचार करून अनात्माचा त्याग करून झालेला आत्मनिश्चय ढळणार नाही असा सांभाळून ठेवतो. ॥२७॥

वरकड निश्चय अनुमानाचे । अनुमानें बोलतां काये वेंचे । जाणते पुरुष प्रचितीचे । ते तों मानीतना ।।२८।।

जे केवळ कल्पनेने व अंदाजाने केलेले निश्चय असतात ते सर्व उथळ (वरकड) असतात. तशी बडबड करणाऱ्याचे काय जाते! पण अनुभवी शास्त्रवेत्ते ते स्वीकारीत नाहीत. ॥२८॥

उगें च बोलणें अनुमानाचें । अनुमानाचें कोण्या कामाचें । येथें सगट विचाराचें । काम नाहीं ।।२९।।

उथळ बोलणे वायफळ असून कल्पनेने बोलून काय उपयोग होणार? हे हौशी मंडळींनी विचार करण्यासारखे काम नाही. परमार्थात बागडणाऱ्यांचे हे काम नव्हे. ॥२९॥

सगट विचार तो अविचार । कित्येक म्हणती येकंकार । येकंकार भ्रष्टाकार । करूं नये ।।३०।।

सरसगट सर्वांनी केलेला विचार हा अविचार असतो. काहीं सर्वब्रह्मवादी जडचेतन पदार्थ ब्रह्मरूप आहेत असे मोठ्या आढ्यतेने सांगतात! पण साधकाला भ्रष्ट करणारा असा भ्रष्टाचार करू नये. ॥३०॥

कृत्रिम अवघें सांडावें । कांहीं येक शुद्ध घ्यावें । जाणजाणों निवडावें । सारासार ।।३१।।

जे कोणी केले आहे ते कृत्रिम व म्हणून असार आहे. जे अकृत्रिम शुद्ध ब्रह्म ते सार आहे. सर्व प्रकारे हा विषय समजावून घेऊन सार व असार निवडावे. ॥३१॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आत्मानिरूपणनाम' समास सातवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'आत्मानिरूपण' नावाचा सातवा समास समाप्त

दशक विसावा : पूर्णनामदशक

समास आठवा : देहेक्षेत्रनिरूपण

॥ श्रीराम समर्थ ॥

विधीप्रपंचतरु वाढला । वाढतां वाढतां विस्तीर्ण जाला । फळें येतां विश्रांती पावला । बहुत प्राणी ।।१।।

ब्रह्मदेवाने उत्पन्न केलेला संसारवृक्ष वाढत गेला व वाढता वाढता त्याचा अफाट व्याप झाला. त्यांतील सर्व प्राण्यांना त्यांची त्यांची अन्ने मिळू लागल्याने समाधान झाले. ॥१॥

नाना फळें रसाळें लागलीं । नाना जिनसी गोडीस आलीं । गोडी पाहावया निर्माण केलीं । नाना शरीरें ।।२।।

फळे, पाने, धान्ये इ. मधुरादी सहा रसांची तयार झाली. त्यांत अनेक प्रकार होऊन वेगळ्या चवी आल्या. ते रस व चवी भोगण्यासाठी मानवादी अनेक शरीरे तयार केली. ॥२॥

निर्माण जाले उत्तम विषये । शरीरेंविण भोगितां नये । म्हणोनि निर्मिला उपाये । नाना शरीरें ।।३।।

चवी व स्वादांचे अनेक विषय निर्माण झाले तरी शरीरी (जीव) असल्याशिवाय ते भोगता येत नाहीत. म्हणून अनेक शरीरे निर्माण केली. ॥३॥

ज्ञानइंद्रियें निर्माण केलीं । भिन्न भिन्न गुणांचीं निर्मिलीं । येका शरीरासी लागलीं । परी वेगळालीं ।।४।।

एकाच शरीराला वेगळ्या वेगळ्या क्षमतेची वेगळी वेगळी ज्ञानेंद्रिये दिली. (गुण = क्षमता = ऐकणे इ.) ॥४॥

श्रोत्रइंद्रिईं शब्द पडिला । त्याचा भेद पाहिजे कळला । ऐसा उपाये निर्माण केला । इंद्रियांमधें ।।५।।

कानांनी ध्वनी ऐकला तर त्या ध्वनीचे विविध प्रकार (तार, मंद्र, खर्ज, खुळखुळ इ.) कळतील अशी योजना केली. ॥५॥

त्वचेइंद्रियें सीतोष्ण भासे । चक्षुइंद्रियें सकळ दिसे । इंद्रियांमधें गुण ऐसे । वेगळाले ।।६।।

त्वचेला उष्णता, गारवा कळावा, डोळ्यांनी अनेक रूपे पाहावीत इ. प्रकारे त्या त्या ज्ञानेंद्रियांना त्या त्या क्षमता दिल्या. ॥६॥

जिव्हेमधें रस चाखणें । घ्राणामधें परिमळ घेणें । इंद्रियामधें वेगळांल्या गुणें । भेद केले ।।७।।

जिभेने सहा रह चाखावेत, नाकाने विविध गंध घ्यावेत इ. वेगळ्या क्षमता दिल्या. (माध्यम इंद्रिये. ज्ञाता जीव.) ॥७॥

वायोपंचकीं अंत:कर्णपंचक । मिसळोनि फिरे निशंक । ज्ञानइंद्रियें कर्मइंद्रियें सकळिक । सावकास पाहे ।।८।।

पंचप्राणांच्या ऊर्जेने अन्त:करणपंचक क्रियाशील बनते. किंवा वायू इ. पंचभूतांच्या सत्त्वगुणांपासून तयार झालेले मनादी अन्त:करण पंचक कार्यरत होते. हे अन्त:करण कर्मेंद्रियांचे व ज्ञानेंद्रियांचे हवे तसे नियंत्रण करते. ॥८॥

कर्मइंद्रियें लागवेगीं । जीव भोगीं विषयांलागीं । ऐसा हा उपाये जगीं । ईश्वरें केला ।।९।।

जीवाने कर्मेंद्रियांच्या मदतीने विषय मिळवावेत अशी ईश्वराने योजना केली. (उदा. हाताने फळे तोडून सोलून खावीत.) ॥९॥

विषय निर्माण जाले बरवे । शरीरेंविण कैसे भोगावे । नाना शरीराचे गोवे । याकारणें ।।१०।।

केशरकस्तुरीसारखे चांगले विषय निर्माण झाले खरे, पण ते देहावाचून कोण भोगणार? म्हणून विविध शरीरे निर्माण झाली. ॥१०॥

अस्तीमाशांचे शरीर । त्यामधें गुणप्रकार । शरीरासारिखें यंत्र । आणीक नाहीं ।।११।।

सर्व शरीरे अस्थिमांसाची असली तरी त्यामध्ये कित्येक प्रकार व क्षमता आहेत. शरीरासारखे अद्भुत यंत्र या जगात दुसरे मिळणार नाही. (नवे विज्ञान सुद्धा शरीरासारखे स्वयंचलित व आपले आपण दुरुस्त होणारे यंत्र पाहून थक्क होते. त्या काळात शरीराला यंत्र म्हणणारी बुद्धी अद्भुतच.) ॥११॥

ऐसीं शरीरें निर्माण केलीं । विषयभोगें वाढविलीं । लाहानथोर निर्माण जालीं । येणें प्रकारें ।।१२।।

अशी अनेक लहानमोठी शरीरे निर्माण करून विषयांच्या भोगाने त्यांच्या वाढीची व्यवस्था केली. ॥१२॥

अस्तिमांशाचीं शरीरें । निर्माण केलीं जगदेश्वरें । विवेकें गुणविचारें । करूनियां ।।१३।।

जगदीश्वराने वेगवेगळ्या शरीरात वेगवेगळ्या क्षमता ठेवण्याचा विचार करून (ईक्षण) अस्थिमांसाची ती ती शरीरे निर्माण केली. ॥१३॥

अस्तिमौंशाचा पुतळा । जेणें ज्ञानें सकळ कळा । शरीरभेद वेगळा । ठाईं ठाईं ।।१४।।

अस्थी व स्नायू हे घटक सर्व शरीरात सारखे असले तरी ज्ञानाच्या (बुद्धी) कमी- अधिकपणामुळे प्रत्येक माणसाच्या क्षमतेत (कळा) फरक पडतो. ॥१४॥

तो भेद कार्याकारण । त्याचा उदंड आहे गुण । सकळ तीक्ष्ण बुद्धीविण । काये कळे ।।१५।।

बुद्धी या कारणाने होणारे क्षमता हे कार्य वेगळे वेगळे असून हा वेगळेपणा अगणित आहे. तीक्ष्ण बुद्धीशिवाय हे कसे कळेल? ॥१५॥

सकळ करणें ईश्वराला । म्हणोनी भेद निर्माण केला । ऊर्धमुख होतां भेदाला । ठाव कैंचा ।।१६।।

मूळ संकल्पात 'बहुस्याम' (पुष्कळ) असल्याने अफाट बहुत्व निर्माण केले. साधकाने; या खालील भेदावर लक्ष न ठेवता वरील अधिष्ठानाकडे पाहिले तर बहुत्व आहे कोठे? ॥१६॥

सृष्टिकर्णीं आगत्य भेद । संव्हारें सहजचि अभेद । भेद अभेद हा संवाद । मायागुणें ।।१७।।

सृष्टी तयार करताना सर्व प्रकारे भेद आहेतच. संहारामध्यें सहजच अभेद होतो. (भेद मूळमायेत लीन होतात.) भेद व अभेदाची भाषा केवळ मायेमुळे बोलली जाते. ॥१७॥

मायेमधें अंतरात्मा । नकळे तयाचा महिमा । जाला चतुर्मुख ब्रह्मा । तोहि संदेहीं पडे ।।१८।।

मूळमायेत ब्रह्म चिदाभास रूपाने असते. त्याचे हे मायेत अलिप्तपणे राहण्याचे गूढ व त्याचा महिमा समजत नाही. प्रत्यक्ष ब्रह्मदेवाला सुद्धा ते सांगता न आल्याने त्याला हंसरूपाने ते सांगावें लागले. (भागवत) ॥१८॥

पीळ पेंच कडोविकडीं । तर्क तीक्षण घडीनें घडी । मनासी होये तांतडी । विवरण करितां ।।१९।।

ब्रह्म व माया यांचा व त्यांच्या संबंधाचा विचार करताना अनेक पीळ सोडवावे लागतात, पेचप्रसंगातून मार्ग काढावा लागतो, डोंगराच्या कड्यावर चढताना कराव्यात तशा तार्किक कसरती कराव्या लागतात, तीक्ष्ण बुद्धीनें एक एक घडी उलगडताना व स्पष्टीकरण करताना मनाची तारांबळ होते. ॥१९॥

आत्मत्वें लागतें सकळ कांहीं । निरंजनीं हे कांहींच नाहीं । येकांतकाळीं समजोन पाहीं । म्हणिजे बरें ।।२०।।

जीवात्मा व ईश्वरात्मा यांच्या संदर्भात या सर्व खटपटी असतात. (अध्यारोप) शांत, निर्विकार व अखंड परब्रह्मात

यातील काहीच नाही. (अपवाद) एकान्तात मनन-चिंतन करून हे समजावून घेण्यांत शाश्वत हित आहे. ॥२०॥

देहेसामर्थ्यानुसार । सकळ करी जगदेश्वर । थोर सामर्थ्ये अवतार । बोलिजेती ।।२१।।

प्रत्येक शरीराला दिलेल्या शक्तीच्या माध्यमातून ईश्वरच त्यांच्या सर्व हालचाली करतो. अतर्क्य सामर्थ्य असलेल्या शरीराला अवतार म्हणण्याची रीत आहे. ॥२१॥

शेष कूर्म वऱ्हाव जाले । येवढे देहे विशाळ धरिले । तेणें करितां रचना चाले । सकळ सृष्टीची ।।२२।।

शेष, कूर्म व वराह यांची प्रचंड शरीरे धारण करून सृष्टीचा सांभाळ केल्याने ती अबाधित चालू आहे. ॥२२॥

ईश्वरें केवढें सूत्र केलें । सूर्यबिंब धावाया लाविलें । धुकटाकरवीं धरविलें । अगाध पाणी ।।२३।।

ईश्वराचे लीलासामर्थ्य खरोखर अगाध आहे. सूर्याला त्याने ठराविक कक्षेत फिरते ठेवले व विरळ ढगात वजनदार पाणी साठविण्याची व्यवस्था केली. ॥२३॥

पर्वताऐसे ढग उचलती । सूर्यबिंबासी अछ्यादिती । तेथें सवेंचि वायोची गती । प्रगट होये ।।२४।।

सूर्याला झाकून अंधार करण्याएवढे प्रचंड ढग तयार होतात. तोच त्यांना हाटवणारा वाराही वाहू लागतो. ॥२४॥

झिडकझिडकुं धांवे वारा । जैसा काळाचा म्हणियारा । ढग मारुनी दिनकरा । मोकळे करी ।।२५।।

जणू काळाचा सेवक असलेला वादळी वारा मोठे आवाज करीत वाहून ढगांना दूर सारून सूर्याला मोकळा करतो. ॥२५॥

बैसती विजांचे तडाखे । प्राणीमात्र अवचिता धाके । गगन कडकडून तडके । स्थळांवरी ।।२६।।

विजांचे भयंकर कडकडाट ऐकून सर्व प्राणी दचकतात, भिऊन दडून बसतात. वीज जणू आकाश फाडून एखाद्या ठिकाणावर पडते. ॥२६॥

येहलोकासी येक वर्म केलें । महद्भूतें महद्भूत आळिलें । सकळां समभागें चालिलें । सृष्टिरचनेसी ।।२७।।

या मूळ सृष्टीची रचना करताना असे कौशल्य वापरले की एक महाभूत दुसऱ्या महाभूताला सांभाळते, आवरते. त्या सर्वांना सारखेच नियंत्रणात ठेवल्याने सृष्टी टिकते. ॥२७॥

ऐसे अनंत भेद आत्मयाचे । सकळ जाणती ऐसे कैचें । विवरतां विवरतां मनाचे । फडके होती ।।२८।।

असे हे ईश्वरी सृष्टीचे अगणित भेद पूर्ण जाणणें कोणालाच शक्य नाही. त्यांचा तपशील सांगू गेले तर मनाच्या चिंध्या होतात. ॥२८॥

ऐसी माझी उपासना । उपासकीं आणावी मना । अगाध महिमा चतुरानना । काये कळे ।।२९।।

मी अशा प्रकारची उपासना केली आहे. सर्व उपासकांनी ती समजावून घ्यावी. त्या उपासनेचे अपार महत्त्व, प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही कळत नाही. ब्रह्मदेवही दृश्यसृष्टीचा घटक आहे. ॥२९॥

आवाहन विसर्जन । हें चि भजनाचें लक्षण । सकळ जाणती सज्जन । मी काये सांगों ।।३०।।

उभारणी (आवाहन) व संहारणी (विसर्जन) यांचा विश्वाचे संदर्भात सतत विचार करणे हेच खरे भजन होय. जाणते सज्जनही हे वर्म जाणतात. ते मीच सांगावे असे नाही. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देहेक्षेत्रनिरूपणनाम' समास आठवा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'देहेक्षेत्रनिरूपण' नावाचा आठवा समास समाप्त

दशक विसावा : पूर्णनामदशक

समास नववा : सूक्ष्मनिरूपण

।। श्रीराम समर्थ ।।

मृतिकापूजन करावें । आणी सर्वेचि विसर्जावें । हे मानेना स्वभावें । अंतःकर्णासी ।। १ ।।

मातीच्या मूर्तींची पूजा करून त्यांचे विसर्जन करावे हे कित्येक उपासकांना मनापासून न आवडणे स्वाभाविक आहे. ।।१।।

देव पूजावा आणी टाकावा । हें प्रशस्त न वटे जीवा । याचा विचार पाहावा । अंतर्यामीं ।। २ ।।

देवाची पूजा करून तो टाकून द्यावा हे श्रद्धावन्तांना योग्य वाटत नाही. यासंबंधी अन्त:करणात विचार करावा. ।।२।।

देव करिजे ऐसा नाहीं । देव टाकिजे ऐसा नाहीं । म्हणोनि याचा कांहीं । विचार पाहावा ।। ३ ।।

खरे तर देव उत्पन्न करण्यासारखा व टाकण्यासारखा नाही. म्हणून खऱ्या देवाचा शास्त्रशुद्ध विचार करावा. ।।३।।

देव नाना शरीरें धरितो । धरुनी मागुती सोडितो । तरी तो देव कैसा आहे तो । विवेकें वोळखावा ।। ४ ।।

आत्मा अनेक शरीरांच्या उपाधीत राहून नंतर त्या सोडतो. हा आत्मदेव विवेकाने जाणून घ्यावा. ।।४।।

नाना साधनें निरूपणें । देव शोधायाकारणें । सकळ आपुले अंतःकर्णे । समजलें पाहिजे ।। ५ ।।

ब्रह्मरूप देव ओळखण्यासाठी अनेक शास्त्रे व साधने सांगितली आहेत. ती सर्व बुद्धीने जाणून देवाचा निश्चय करावा. ।।५।।

ब्रह्मज्ञानाचा उपाये । समजल्याविण देतां नये । पदार्थ आहे मा घे जाये । ऐसें म्हणावें ।। ६ ।।

ब्रह्म ही एखादी वस्तू नाही की ती कोणालाही घेऊन जाण्यास सांगावी! म्हणून ब्रह्मानुभव विचारपूर्वक व साधनापूर्वक समजावून घेणाऱ्यालाच देता येतो. ।।६।।

सगट लोकांचे अंतरींचा भाव । मज प्रतक्ष भेटवावा देव । परंतु विवेकाचा उपाव । वेगळाचि आहे ।। ७ ।।

सर्वसामान्यपणें सर्वांनाच असे आतून वाटते की मला देवाचे डोळ्यांनी दर्शन व्हावे. पण देवाच्या खऱ्या दर्शनाचा विवेक हा उपाय; वेगळाच आहे. ।।७।।

विचार पाहातां तगेना । त्यास देव ऐसें म्हणावेना । परंतु जन राहेना । काये करावें ।। ८ ।।

विवेकपूर्ण देवाचा विचार स्थिर होत नाही व त्याने जो देव सांगतात तो अमूर्त असल्याने त्याला देव म्हणणें पटत नाही. पण लोकांना देवाशिवाय चैनही पडत नाही! आता काय करावे!! ।।८।।

थोर लोक मरोनि जाती । त्यांच्या सुरता करुनी पाहाती । तैसीच आहे हेहि गती । उपासनेची ।। ९ ।।

व्यवहारातील सम्राटासारखी माणसे मरण पावल्यावर त्यांची चित्रे पाहून लोक समाधान मानतात. तशी त्यांना देवांची चित्रे हवी असतात. ।।९।।

थोर व्यापार ठाकेना जनीं । म्हणोनि केली रखतवानी । राजसंपदा तयाचेनी । प्राप्त कैची ।। १० ।।

मोठा व्यापार करण्याची हिंमत नसल्याने शाई विकण्याचा किरकोळ व्यापार करून राजवैभव मिळत नसते! तसेच विवेकाची जाण नसल्याने चित्रांची पूजा करून ब्रह्मज्ञान होत नाही. ।।१०।।

म्हणोनि जितुका भोळाभाव । तितुका अज्ञानाचा स्वभाव । अज्ञानें तरी देवाधिदेव । पाविजेल कैचा ।।११।।

म्हणून अज्ञानाचा भोळेपणा अज्ञानरूपच असतो. अज्ञानाने त्या ईश्वराचेही कर्ते असलेले ज्ञानरूप ब्रह्म कसे अनुभवाला येईल? ॥११॥

अज्ञानासी ज्ञान न माने । ज्ञात्यास अनुमान न माने । म्हणोनि सिद्धांचीये खुणें । पावलें पाहिजे ।।१२।।

अज्ञान्याला ज्ञान झेपत नाही, ज्ञात्याला कल्पनांचे खेळ खपत नाहीत. अशा परिस्थितीत ब्रह्मानुभव घेतलेल्यांचे सांगणे मानले पाहिजे. ॥१२॥

माया सांडून मुळास जावें । तरीच समाधान पावावें । ऐसें न होतां भरंगळावें । भलतीकडे ।।१३।।

नामरूपात्मक मायिक दृश्य, अस्तिभातिप्रियरूप ईश्वरी सृष्टी या दोन्ही माया बाजूला सारून सत्‌चिदानंद ब्रह्मरूप अधिष्ठानाच्या अनुसंधानाने व ऐक्याने समाधान होते. अन्यथा भलतीकडेच भटकन्ती होते. ॥१३॥

माया उलंघावाकरणें । देवासी नाना उपाय करणें । अध्यात्मश्रवणपंथेंचि जाणें । प्रत्ययानें ।।१४।।

मायेची मलविक्षेप व आवरणशक्ती नष्ट करण्यासाठीं जीवात्मारूप देवाला श्रवण-मननादी, उपासना, अनुष्ठाने इ. अनेक उपाय करावे लागतात. अध्यात्मश्रवणाने अनुभव घेत पुढे जावे लागते. ॥१४॥

ऐसें न करितां लोकिकीं । अवघीच होते चुकामुकी । स्थिती खरी आणि लटकी । ऐसी वोळखावी ।।१५।।

असे केले नाही, तर जीवनभर देवाची व जीवाची चुकामूक होत रहाते. खरी आत्मस्थिती व काल्पनिक अवस्था वरीलप्रमाणे जाणावी. ॥१५॥

खोट्याचे वाटे जाऊं नये । खोट्याची संगती धरूं नये । खोटें संग्रहीं करूं नये । कांहींयेक ।।१६।।

खोट्या शास्त्रांचा अभ्यास करू नये. खोट्या साधकाची संगत धरू नये. खोट्या साधनांना व व्रतादिकांना थारा देऊ नये. (केवलाद्वैत हे खरे शास्त्र. विवेकपूर्वक सोऽहं साधना करणारा खरा साधक. विवेक, वैराग्य, शमादी सहा व मुमुक्षुत्व ही खरी साधने) ॥१६॥

खोटें तें खोटेंचि खोटें । खऱ्यासीं तगेनात बालटें । मन अधोमुख उफराटें । केलें पाहिजे ।।१७।।

खोटे हे कालत्रयी खोटेच असते. ते खऱ्याची केसभरसुद्धा बरोबरी करू शकत नाही. मनाला नामरूपादिकांपासून मागे वळवून अधिष्ठान ब्रह्माच्या चिंतनात स्थिर केले पाहिजे. ॥१७॥

अध्यात्मश्रवण करीत जावें । म्हणिजे सकळ कांहीं फावे । नाना प्रकारीचे गोवे । तुटोनी जाती ।।१८।।

म्हणून श्रोत्रिय, ब्रह्मनिष्ठ व दयाळू महात्म्याच्या मुखातून अध्यात्मश्रवण करीत असावे. त्यामुळे सर्व लाभ पदरात पडतात. अनेक प्रकारचे गुंते व अडचणी सुटून जातात. ॥१८॥

सूत गुंतलें तें उकलावें । तैसें मन उगवावें । मानत मानत घालावें । मुळाकडे ।।१९।।

सुताचा गुंता झाला की तो शान्तपणें प्रयत्नपूर्वक सोडवावा लागतो. त्याप्रमाणें गोंधळलेल्या व अडचणीत सापडलेल्या साधकाच्या मनाला सर्व शास्त्र हळूहळू व त्याला कळेल अशा बेताने सांगून ब्रह्माकडे वळवावे लागते. ॥१९॥

सकळ कांहीं कालवलें । त्या सकळाचें सकळ जालें । शरीरीं विभागलें । सकळ कांहीं ।।२०।।

सृष्टीची निर्मिती होताना सर्व तत्त्वांचे परस्परांत मिश्रण झाले असून त्या मिश्रणाने सर्व दृश्य व्यापले आहे. तेच शरीरातही आहे. (पहा– १७-८ व ९) ॥२०॥

काये तें येथेंचि पाहावें । कैसें तें येथेंचि शोधावें । सूक्ष्माचीं चौदा नांवें । येथेचि समजावीं ।।२१।।

जी तत्त्वे पाहावयाची ती याच शरीरात पाहावीत. त्यांचे स्वरूप कसे ते यातच शोधून सूक्ष्म मूळमायेच्या चौदा अभिव्यक्ती येथेच समजावून घ्याव्यात. (२२ ते २९ ओव्यांत या अभिव्यक्ती आहेत) ॥२१॥

निर्गुण निर्विकारी येक । तें सर्वां ठाईं व्यापक । देह्यामधें तें निष्कळंक । आहे की नाहीं ।।२२।।

निर्गुण, निराकार व एकमेव ब्रह्म सर्वांत व्यापून असून देहात राहूनही त्याला विकार, अवस्थादिकांचा कलंक आहे किंवा नाही याचा एकदाच निर्णय करावा. (उपाधींना कलंक आहे. ब्रह्माला नाही.) ॥२२॥

मूळमाया संकल्परूप । तें अंत:कर्णाचें स्वरूप । जड चेतवी चैतन्यरूप । तें हि शरीरीं आहे ।।२३।।

संकल्प हेच मूळमायेचे स्वरूप असून तो अन्त:करणाचा स्वभाव आहे. जडाला प्रकाशित करणारे चैतन्यही शरीरातच रहाते. ॥२३॥

समानगुण गुणसाम्य । सूक्ष्म विचार तो अगम्य । सूक्ष्म साधु जाणते प्रणम्य । तया समस्तांसी ।।२४।।

मूळ मायेत तीन अव्यक्त गुण साम्यावस्थेत कसे राहतात हे समजणे अति कठीण आहे. हा बारकावा ज्या साधूंना कळतो त्यांना वंदन असो. ॥२४॥

द्विधा भासतें शरीर । वामांग दक्षणांग विचार । तोचि अर्धनारीनटेश्वर । पिंडीं वोळखावा ।।२५।।

शरीराला जशी उजवे व डावे अशी दोन अंगे असतात त्याचप्रमाणें पिंडात अर्धी नारी व अर्धा नटेश्वर असतात असे ओळखावेत. ॥२५॥

तोचि प्रकृतिपुरुष जाणिजे । शिवशक्ती वोळखिजे । शड्गुणईश्वर बोलिजे । तया कर्दमासी ।।२६।।

प्रकृती-पुरुष, शिवशक्ती ह्या मिश्रणाला षड्गुणईश्वर म्हणतात. ॥२६॥

तयासीच म्हणिजे महत्तत्त्व । जेथें त्रिगुणाचें गूढत्व । अर्धमात्रा शुद्धसत्व । गुणक्षोभिणी ।।२७।।

त्यालाच महत् असेही नाव असून त्यात गूढ असे त्रिगुण रहातात. अर्धमात्रा, गुणक्षोभिणी व शुद्धसत्त्व ही तिचीच नावे होत. ॥२७॥

त्रिगुणें चालतें शरीर । प्रतक्ष दिसतो विचार । मुळींच्या कर्दमाचें शरीर । ऐसें जाणावें ।।२८।।

तीन गुणांच्या प्रेरणांनुसार ह्या शरीराचे कार्य चालते ते स्पष्टच दिसते, त्या सर्वांच्या मिश्रणाचे शरीर आहे हे जाणावे. ॥२८॥

मन माया आणि जीव । हाहि दिसतो स्वभाव । चौदा नामांचा अभिप्राव । पिंडीं पाहावा ।।२९।।

मन, माया व जीव ही तिन्ही मूळमायेची रूपे पिंडात सहजच असतात. अशी चौदा नामे पिंडात पहावीत. ॥२९॥

पिंड पडतां अवघेंचि जातें । परंतु परब्रह्म राहातें । शाश्वत समजोन मग तें । दृढ धरावें ।।३०।।

देहाला मरण आले की चौदा प्रकारची माया देहाला सोडते, पण परब्रह्म अढळ राहते. तेच शाश्वत आहे हे जाणून त्याच्या अनुसंधानात राहावे. ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सूक्ष्मनिरूपणनाम' समास नववा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'सूक्ष्मनिरूपण' नावाचा समास नववा समाप्त

दशक विसावा : पूर्णनामदशक

समास दहावा : विमळब्रह्मनिरूपण

॥ श्रीरामसमर्थ ॥

धरूं जातां धरितां न ये । टाकूं जातां टाकितां न ये । जेथें तेथें आहेच आहे । परब्रह्म तें ।।१।।

ब्रह्म हा कांहीं पदार्थ नसल्याने तो पकडताही येत नाही व टाकताही येत नाही. ते सर्वत्र व्यापक, अक्रीड व निर्विषय आहे. ॥१॥

जिकडे तिकडे जेथें तेथें । विन्मुख होतां सन्मुख होतें । सन्मुखपण चुकेना तें । कांहीं केल्यां ।।२।।

आठ दिशा, जमीन, पाणी व अन्तरिक्षात ते सर्वत्र आहे. त्याच्याकडे पाठ करावी तर तेच समोरही येते! काहीं झाले तरी समोरून ते हालत नाही. ॥२॥

बैसलें माणुस उठोन गेलें । तेथें आकाशचि राहिलें । आकाश चहुंकडे पाहिलें । तरी सन्मुखचि आहे ।।३।।

बसलेला माणूस उठून गेला तरी तो आकाशातून आकाशातच जातो. कोणत्याही दिशेकडे दृष्टी टाकली तरी आकाश समोरच आहे. ॥३॥

जिकडे जिकडे प्राणी पळोन जातें । तिकडे आकाशचि भोंवतें । बळें आकाशाबाहेर तें । कैसें जावें ।।४।।

प्राणी ज्या ज्या दिशेला पळतो तिकडे आकाश सर्व बाजूंनीं असते. किती खटपट केली तरी त्याबाहेर कसे जावे? ॥४॥

जिकडे तिकडे प्राणी पाहे । तिकडे तें सन्मुखचि आहे । समस्तांचे मस्तकीं राहे । माध्यानीं मार्तंड जैसा ।।५।।

सूर्य जसा मध्यान्हकाळी सर्वांच्या डोक्यावर राहतो त्याप्रमाणें प्राणी पाहेल तिकडे ब्रह्म समोरच असते. ॥५॥

परी तो आहे येकदेसी । दृष्टांत न घडे वस्तुसी । कांहीं येक चमत्कारासी । देउनी पाहिलें ।।६।।

तसे पाहिले तर मर्यादित व्याप्तीच्या सूर्याची ब्रह्माला उपमा देता येत नाही. पण जरा वेगळा दृष्टान्त असावा म्हणून देऊन पाहिला. ॥६॥

नाना तीर्थे नाना देसीं । कष्टत जावें पाहाव्यासी । तैसें न लगे परब्रह्मासी । बैसले ठाईं ।।७।।

सगुण देवाच्या दर्शनासाठी वेगळ्या वेगळ्या ठिकाणी असलेल्या तीर्थांच्या यात्रा करण्याचे बरेच कष्ट करावे लागतात. पण परब्रह्माचा अनुभव बसल्या जागी येतो. ॥७॥

प्राणी बैसोनीच राहातां । अथवा बहुत पळोन जातां । परब्रह्म तें तत्वतां । समागमें ।।८।।

माणूस एका जागी स्वस्थ बसला किंवा दूर दूर अंतरावर निघून गेला तरी ब्रह्म सतत त्याच्या बरोबरच असते! ॥८॥

पक्षी अंतराळीं गेला । भोंवतें आकाशचि तयाला । तैसें ब्रह्म प्राणीयाला । व्यापून आहे ।।९।।

पक्षी आकाशात उडतो तेव्हा त्याच्याभोंवती आकाशच असते. त्याप्रमाणें ब्रह्म सर्व प्राण्यांना सतत व्यापून आहे. ॥९॥

परब्रह्म पोकळ घनदाट । ब्रह्म सेवटाचा सेवट । ज्यासी त्यासी ब्रह्म नीट । सर्वकाळ ।।१०।।

परब्रह्म सर्व दृश्य जगाला सामावून घेण्याएवढे पोकळ, तर ते सर्व दृश्यात आतबाहेर भरून असल्याने घनदाट आहे. ज्याला शेंवटचे टोक म्हणता येईल त्याही पलीकडे ब्रह्म आहे. त्यामुळें सर्वांना ब्रह्म सतत अटळ आहे. (काल्पनिक पुरुषाला सामावून घेण्यासारखे झाडाचे खोड पोकळ असावे त्याप्रमाणें ब्रह्म पोकळ आहे!) ।।१०।।

दृश्या सबाहे अंतरीं । ब्रह्म दाटलें ब्रह्मांडोदरीं । आरे त्या विमळाची सरी । कोणास द्यावी ।।११।।

दृश्यसृष्टीच्या आत व बाहेर असे ते ब्रह्म अलिप्तपणाने अनंतकोटी ब्रह्मांडांमध्यें भरले आहे. त्या अत्यंत शुद्ध ब्रह्माची तुलना कोणाशी होणार? ।।११।।

वैकुंठकैळासस्वर्गलोकीं । इंद्रलोकीं चौदा लोकीं । पन्नगादिकपाताळलोकीं । तेथेंहि आहे ।।१२।।

वैकुंठ, कैलास, स्वर्ग, इंद्र इ. लोक, तल-अतलादी चौदा भुवने, पन्नगादी पाताळ लोकातही ते घनदाट भरले आहे. ।।१२।।

कासीपासून रामेश्वर । आवघें दाटलें अपार । परता परता पारावार । त्यास नाहीं ।।१३।।

काशीपासून रामेश्वरापर्यन्त ते परिपूर्ण भरून आहे. जी पलीकडेची अन्तिम सीमा मानावी तिच्याही ते पलीकडे आहे. ।।१३।।

परब्रह्म तें येकलें । येकदांचि सकळांसी व्यापिले । सकळांस स्पर्शोन राहिलें । सकळां ठाईं ।।१४।।

परब्रह्म एकमेव, अद्वितीय असून त्याने सर्वांना कायमचेच व्यापले आहे. सर्व काही त्याच्या सानिध्यात असून ते त्यात गच्च भरले आहे. (तरंग पाण्याच्या अत्यंत सन्निध असतो) ।।१४।।

परब्रह्म पाउसें भिजेना । अथवा चिखलानें भरेना । पुरामधें परी वाहेना । पुरासमागमें ।।१५।।

पावसाच्या पाण्यात ब्रह्म असून ते पाण्याने भिजत नाही, चिखलात असून त्याने माखत नाही, पुराच्या प्रवाहात असून त्याबरोबर वाहत जात नाही. ।।१५।।

येकसरें सन्मुख विमुख । वाम सव्य दोहिंकडे येक । आर्धऊर्ध प्राणी सकळीक । व्यापून आहे ।।१६।।

एकाच वेळी ते मागे, पुढे, डावीकडे, उजवीकडे, वर व खाली आणि सर्व जीवसृष्टीला व्यापून आहे. ।।१६।।

आकाशाचा डोहो भरला । कदापी नाहीं उचंबळला । असंभाव्य पसरला । जिकडे तिकडे ।।१७।।

आकाशाचा जणू डोह कितीही भरलेला दिसला तरी त्यावर एकही तरंग कधी उठत नाही. (निर्विकार) तरी तो डोह अथांगपणें सर्वत्र पसरला आहे. ।।१७।।

येकजिनसी गगन उदास । जेथें नाहीं दृश्यभास । भासेंविण निराभास । परब्रह्म जाणावें ।।१८।।

आकाश एकसारखे (Homogenous) व मोकळे दिसते. त्यात दृश्यसृष्टीची नामोनिशाणी जराही नाही. तसे नामरूपात्मक भासावाचून असलेल्या आकाशातून आकाशाचाही भास काढला की जे उरते ते परब्रह्म! (ब्रह्म हे कारण असून आकाश हे पहिले कार्य आहे. त्यामुळें ते कारणासारखे वाटते. तेही काढावे) ।।१८।।

संतसाधुमहानुभावां । देवदानवमानवां । ब्रह्म सकळांसी विसांवा । विश्रांतिठाव ।।१९।।

संत, साधू, सिद्ध, देव, मानव व दानव ह्या सर्वांना खरी विश्रान्ती ब्रह्मस्वरूपातच मिळते. त्यांचे पुनर्जन्मांचे व द्वन्द्वभोगांचे कष्ट ब्रह्मामध्यें कायमचे विसावतात. ।।१९।।

कोणेकडे सेवटा जावें । कोणेकडे काये पाहावें । असंभाव्य तें नेमावें । काये म्हणोनी ।।२०।।

ब्रह्मावाचून दुसरा शेवट कोठून आणावा? ब्रह्मावाचून कोणीकडे काय पहाणार? जे अमेय आहे त्याला मापात आणण्याचा प्रयत्न कसा करणार? ।।२०।।

स्थूळ नव्हे सूक्ष्म नव्हे । कांहीं येकासारिखें नव्हे । ज्ञानदृष्टीविण नव्हे । समाधान ।।२१।।

ब्रह्म दगडासारखे स्थूल किंवा मनासारखे सूक्ष्मही नाही. किंबहुना कोणा वस्तू वा व्यक्तीसारखे नाही. ज्ञानदृष्टीनेच त्याचे यथार्थ आकलन झाल्याशिवाय खरे समाधान कधीच होत नाही. ॥२१॥

पिंडब्रह्मांडनिरास । मग तें ब्रह्म निराभास । येथून तेथवरी अवकास । भकासरूप ।।२२।।

पिंड व ब्रह्मांडाचा वेदान्तशास्त्रानुसार निरास केल्यावर जाणीवनेणीवविरहित ब्रह्माचा अनुभव येतो. ते सर्वत्र नामरूपांनी मोकळे (अवकास) व त्रिपुटीविरहित रिकामे (भकास) आहे. ॥२२॥

ब्रह्म व्यापक हें तों खरें । दृश्य आहे तों हें उत्तरें । व्यापेंविण कोण्या प्रकारें । व्यापक म्हणावें ।।२३।।

जोपर्यन्त दृश्यसृष्टी सत्यत्वाने दिसते तोपर्यन्त ती ब्रह्माने व्यापलेली व ब्रह्म व्यापणारे हे बोलणें खरे आहे. व्याप्यच नसेल तर व्यापकत्व कोठून असणार? ॥२३॥

ब्रह्मासी शब्दचि लागेना । कल्पना कल्पूं शकेना । कल्पनेतीत निरंजना । विवेकें वोळखावें ।।२४।।

ब्रह्म शब्दात सांगता येत नाही, त्याची कल्पना करता येत नाही. अशा त्या कल्पनेपलीकडील शुद्ध ब्रह्माला विवेकानेच जाणावे लागते. ॥२४॥

शुद्ध सार श्रवण । शुद्ध प्रत्ययाचें मनन । विज्ञानीं पावतां उन्मन । सहजचि होतें ।।२५।।

सार व असाराचे शास्त्रशुद्ध श्रवण, शास्त्राने सांगितलेला अनुभव येईल असे मनन ह्या साधनांनी प्रथम 'मी ब्रह्म' हे ज्ञान व नंतर त्याची सहजस्थिती म्हणजे विज्ञान झाल्यानंतर मनाचाच बाध होऊन जगन्मिथ्यात्वाचा अनुभव येतो. ॥२५॥

येथून पुढे समर्थ ग्रंथाचा उपसंहार करतात–

जालें साधनाचें फळ । संसार जाला सफळ । निर्गुणब्रह्म तें निश्चळ । अंतरीं बिंबलें ।।२६।।

वरील साधनांचे वर सांगितलेले फळ मिळाल्यामुळें ह्या संसारात माणूस म्हणून जन्माला आल्याचे सार्थक झाले. 'निर्गुण ब्रह्म मी आहे' असा सहज निश्चय अन्त:करणात सुस्थिर झाला. ॥२६॥

हिसेब जाला मायेचा । जाला निवाडा तत्वांचा । साध्य होतां साधनाचा । ठाव नाहीं ।।२७।।

मायेच्या सर्व अभिव्यक्ती स्पष्ट झाल्या, ब्याऐंशी तत्त्वांचा निवाडा होऊन 'ती मी नाही' असा त्यांचा निरास झाला. जीव व ब्रह्म ह्यांचे मूळचे ऐक्य जणू पुन्हा सिद्ध झाल्याने त्या सिद्धीसाठी चालवलेली साधने आपोआप गळून पडली. साधक-साधन-साध्य ही त्रिपुटी लयाला गेली. ॥२७॥

स्वप्नीं जें जें देखिलें । तें तें जागृतीस उडालें । सहजचि अनुर्वाच्य जालें । बोलतां न ये ।।२८।।

अविद्या व अज्ञानाच्या स्वप्नकाळात जे देह-जगतादी सत्यत्वाने अनुभवाला येत होते ते विज्ञानाच्या जागृतीत मिथ्यात्व निश्चयात गेले. मिथ्या पदार्थ सत्‌विलक्षण, असत्‌विलक्षण असा अनिर्वचनीय असल्याने त्यासंबंधी काहीच बोलता येत नाही. ॥२८॥

ऐसें हें विवेकें जाणावें । प्रत्ययें खुणेंसी बाणावें । जन्ममृत्याच्या नांवें । सुन्याकार ।।२९।।

असे हे वेदान्तशास्त्र सार-असार, नित्य-अनित्य, क्षर-अक्षर, अमृत-मर्त्य इ. विवेकांनी अनुभवपूर्वक जाणून ज्ञानाची सर्व लक्षणें अंगात बाणली जावीत. जन्ममरणांच्या चक्रातून सुटावे. ॥२९॥

भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें । समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध ।।३०।।

माझा श्रीराम भक्तांचा कैवारी आहे. त्या समर्थ प्रभू रामचंद्राच्या कृपेतून जो ग्रंथ शब्दबद्ध झाला तोच हा दासबोध. ॥३०॥

वीस दशक दासबोध । श्रवणद्वारें घेतां शोध । मननकर्त्यास विशद । परमार्थ होतो ।।३१।।

वीस दशकांतील दासबोधाचा यथार्थ श्रवणपूर्वक अभ्यास करून त्याचे मनन करणाऱ्यास परमार्थ शास्त्राचे स्वरूप स्पष्टपणे कळते. ॥३१॥

वीस दशक दोनीसें समास । साधकें पाहावें सावकास । विवरतां विशेषाविशेष । कळों लागे ।।३२।।

वीस दशकातील दोनशे समासांचा साधकाच्या भूमिकेतून सुव्यवस्थित अभ्यास करावा. त्यावरील शास्त्रशुद्ध विवरणाने त्याची सर्व वैशिष्ट्ये कळू लागतात. ॥३२॥

ग्रंथाचें करावें स्तवन । स्तवनाचें काये प्रयोजन । येथें प्रत्ययास कारण । प्रत्ययो पाहावा ।।३३।।

खरे तर ग्रंथसमाप्तीच्या वेळी ग्रंथाचे स्तवन करावे अशी पद्धत आहे. पण खरोखर स्तवनाचा काय उपयोग? ग्रंथात अनुभवाला प्राधान्य असून अनुभवच घ्यावा. ॥३३॥

देहे तंव पांचा भूतांचा । कर्ता आत्मा तेथींचा । आणी कवित्वप्रकार मनुशाचा । काशावरुनी ।।३४।।

कोणाचाही देह पंचमहाभूतांचा असून त्या देहातील सर्व व्यापारांचा प्रेरक ईश्वर आहे. सर्व कर्तृत्व त्याचे आहे. असे असताना कवित्व तेवढे जीवाचे कसे असेल? ॥३४॥

सकळ करणें जगदीशाचें । आणी कवित्वचि काय मानुशाचें । ऐशा अप्रमाण बोलण्याचें । काये घ्यावें ।।३५।।

'सर्व कर्ता करविता जगदीश आहे' असे म्हणावयाचे व ग्रंथाचे कर्तृत्व तेवढे जीवाकडे घ्यावयाचे! अशा अप्रामाणिकपणावर कसा व कोण विश्वास ठेवील? ॥३५॥

सकळ देह्याचा झाडा केला । तत्वसमुदाव उडाला । तेथें कोण्या पदार्थाला । आपुलें म्हणावें ।।३६।।

सर्व शरीर झटकून टाकून त्यातील ब्याऐंशी तत्त्वांचे मिथ्यात्व समजल्याने ती उडून गेली! त्यांतील कोणाला आता मी किंवा माझे म्हणावे? मिथ्या पदार्थ मी किंवा माझा असू शकत नाही. ॥३६॥

ऐसीं हें विचाराचीं कामें । उगेंच भ्रमों नये भ्रमें । जगदेश्वरें अनुक्रमें । सकळ केलें ।।३७।।

हे मोक्षरूप परमार्थशास्त्र केवळ विचाराने सफळ होते. उगीच कल्पनांच्या भ्रमाने भ्रमिष्ट होऊ नये. एका जगदीशाने आकाशापासून जीवापर्यन्त सर्वांची निर्मिती एका विशिष्ट अनुक्रमाने केली आहे, ह्याचे सतत भान असावे. ॥३७॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'विमळब्रह्मनिरूपणनाम' समास दहावा
गुरुशिष्यसंवादात्मक श्रीदासबोध या ग्रंथातील 'विमळब्रह्मनिरूपण' नावाचा दहावा समास समाप्त
—दशक विसावा समाप्त—

श्री दासबोध ग्रंथ समाप्त

।। श्री ।।
।। आरती दासबोधाची ।।

वेदांतसंमतीचा काव्यसिंधु भरला ।
श्रुतिशास्त्रग्रन्थगीता साक्ष संगम केला ।
महानुभाव संतजनीं अनुभव चाखीला ।
अज्ञान जड जीवा मार्ग सुगम जाला ।।१।।

जय जय दासबोधा ग्रन्थराज प्रसिद्धा ।
आरति वोवाळीन विमळज्ञान बाळबोधा ।।ध्रु.।।

नवविधा भक्तिपंथें रामरूप अनुभवी ।
चायुर्तनिधी मोठा मायाचक्र उगवी ।
हरिहरहृदयींचें गुह्य प्रगट दावी ।
बद्धचि सिद्ध जाले असंख्यात मानवी ।।२।।

वीसहि दशकींचा अनुभव जो पाहे ।
नित्यनेम विवरितां स्वयें ब्रह्मचि होये ।
अपार पुण्य गांठीं तरी श्रवण लाहे ।
'कल्याण' लेखकाचें भावगर्भ हृदईं ।।३।।

श्री समर्थ रचित श्रीरामाची प्रार्थना

कल्याण करी रामराया । जनहित विवरी ।।ध्रृ.।।
तळमळ तळमळ होतचि आहे । हे जन हातिं धरी ।।१।।
अपराधी जन चुकतचि गेले । तुझा तूंची सांवरी ।।२।।
कठिण त्यावरी कठीण जालें । आतां न दिसे उरी ।।३।।
कोठें जावें काय करावें । आरंभिली बोहरी ।।४।।
दास म्हणे आम्ही केलें पावलों । दयेसि नाहीं सरी ।।५।।